भारतीय संस्कृतिकोश

प्रथम खंड

अं ते औक्षण

संपादक

पं. महादेवशास्त्री जोशी

सहसंपादक

तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर, एम्. ए.

भारतीय संस्कृतिकोश मंडळ

४१३ शनिवार पेठ, पुणे २.



भारतीय संस्कृतिकोश

भारतीय संस्कृतिकोश

वैज्ञानिक संशोधन व सांस्कृतिक व्यवहार खातें, नवी दिल्ली व
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ यांच्या साहाय्याने प्रकाशित

प्रथम खंड

अं ते औक्षण

संपादक

पं. महादेवशास्त्री जोशी

सहसंपादक

तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर, एम्. ए.

भारतीय संस्कृतिकोश मंडळ

४१३ शनिवार पेठ, पुणें २.

प्रकाशक :
पं. महादेवशास्त्री जोशी
भारतीय संस्कृतिकोश मंडळासाठी
४१३ शनिवार पेठ, पुणें २

मुखपृष्ठ :
श्री. सुधाकर खासगीवाले

अंतर्गत सजावट :
श्री. दत्ता महाबळेश्वरकर
श्री. सुधाकर खासगीवाले
श्री. गंगाधर नाटके

ठसे :
श्री. ब. शं. दाते
कलाभुवन, पुणें २

प्रथमावृत्ति :
शके १८८४
(सन १९६२)

प्रकाशन :
हस्तें ना. श्री. हुमायून कबीर
मंत्री, वैज्ञानिक संशोधन व सांस्कृतिक व्यवहार,
नवी दिल्ली
दि. २० डिसेंबर १९६२

मुद्रक :
श्री. मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३, नारायण पेठ,
पुणें २

: मूल्य
तीस रुपये

: एकमेव विक्रेते
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

संपादकीय निवेदन

भारतीय संस्कृतिकोशाचा हा प्रथम खंड वाचकांच्या हातीं देतांना आमच्या मंडळाला व व्यक्तिशः मलाहि परम आनंद होत आहे. गेलीं सात वर्षें ज्या कार्याचा एकमेव ध्यास घेऊन मी आमच्या मंडळाच्या सन्माननीय सभासदांच्या मार्गदर्शनाखाली या महान् कार्याची रचना चालविली होती, त्याचें हें दृश्य फल या प्रथम खंडाच्या रूपाने आज वाचकांच्या समोर येत आहे.

१९४७ सालीं भारत पारतंत्र्यांतून मुक्त झाला आणि भारतांत स्वातंत्र्याचें एक नवें सुवर्णयुग अवतरलें. भारत स्वतंत्र झाला, स्वतःचा भाग्यविधाता बनला, ही गोष्ट चिरवांछित अशीच झाली. पण कोणत्याहि देशाचा सर्वांगीण उत्कर्ष केवळ राजकीय स्वातंत्र्याने होऊं शकत नाही. त्यासाठी त्याला आर्थिक आणि आत्मिक स्वातंत्र्याचीहि गरज असते. किंबहुना राजकीय स्वातंत्र्य हें, या पुढील स्वातंत्र्यांचें एक साधनच ठरतें. त्या दृष्टीने भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक स्वातंत्र्याचे भगीरथ प्रयत्न आज देशभर चालू आहेत. त्याचबरोबर भारताच्या संस्कृतीचाहि विकास व्हावा म्हणूनहि भारतसरकार प्रयत्नशील आहे. साहित्य अकादमी, नाट्य अकादमी, ललितकला अकादमी अशा विविध साहित्य-कलासंस्था भारत सरकारने त्यासाठी निर्माण केल्या आहेत. भारतीय आकाशवाणीवरहि संस्कृतिविषयक कार्यक्रमांना प्राधान्य दिलें जात असून त्या द्वारें भारतांतील भिन्न भिन्न राज्यांतील भिन्नभाषी लोकांच्या संस्कृतीचा परस्परांना परिचय व्हावा आणि तो वाढावा म्हणून प्रयत्न होत आहेत. इतकेंच नव्हे; तर भारत सरकारने देशांतील सांस्कृतिक व्यवहारांना चालना, प्रोत्साहन व मार्गदर्शन करण्यासाठी ' वैज्ञानिक संशोधन व सांस्कृतिक व्यवहार ' या नांवाचें एक स्वतंत्र मंत्रालयच निर्माण केलें आहे.

या सर्व सांस्कृतिक प्रयत्नांना एका निराळ्या रीतीने हातभार लावावा, या उद्देशाने १९५७ सालीं आमच्या भारतीय संस्कृतिकोश मंडळाची स्थापना झाली.

मंडळाचे संस्थापक सभासद—

(१) **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,** *संपादक धर्मकोश, वाई.*
(२) **महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार,** *बी. ए.; कुलगुरु; पुणें विद्यापीठ, पुणें.*
(३) **डॉ. रा. ना. दांडेकर,** *एम्. ए. पीएच्. डी. पुणें.*
(४) **श्री. अ. ह. लिमये,** *एम्. ए. पुणें.*
(५) **श्री. शं. वा. किर्लोस्कर,** *कारखानदार, किर्लोस्करवाडी.*
(६) **श्री. दा. वा. पोतदार,** *बी. ई., पुणें.*
(७) **प्रा. न. र. फाटक,** *बी. ए., मुंबई.*
(८) **श्रीमती दुर्गा भागवत,** *एम. ए., मुंबई.*
(९) **श्री. वि. पु. भागवत,** *संपादक ' मौज ', मुंबई,*
(१०) **प्रा. गोवर्धन पारीख,** *एम्. ए., रेक्टर, मुंबई विद्यापीठ, मुंबई.*

(११) श्री. काशीनाथ दामोदर नायक, *व्यापारी व संशोधक, गोवा.*
(१२) श्री. चिं. ग. कर्वे, *बी. ए., संपादक, सुलभ विश्वकोश, पुणें.*
(१३) श्री. बा. ग. जगताप, *बी. ए., बी. टी., शिक्षणशास्त्रज्ञ, पुणें.*
(१४) श्री. सि. ग. फडके, *बी. ए., एल्‌एल्. एम्. पुणें.*
(१५) श्री. चिं. श्री. नातू, *एम्. ए., पुणें.*
(१६) श्री. जयंतराव टिळक, *बी. एस्‌सी., संपादक 'केसरी' पुणे*
(१७) डॉ. ग. वि. देसाई, *डी. डी. एस्., पुणें.*
(१८) पं. महादेवशास्त्री जोशी, *ग्रंथकार, पुणें.*
(१९) तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर, *एम्. ए., पुणें.*

मंडळाचा उद्देश—

संस्कृत, पाली, हिंदी, मराठी, गुजराती, बंगाली, कन्नड, तेलुगु, तमिळ, इ. देशी भाषांतील आणि इंग्रजी इ. परदेशी भाषांतील भारतीय संस्कृति–विषयक ग्रंथसंपत्तीचें आलोडन करून त्या आधारें महाराष्ट्र ज्ञान-कोशाच्या धर्तीवर 'भारतीय संस्कृतिकोश' या नांवाने भारतीय संस्कृतीचा व्यापक आणि तपशीलवार ज्ञानकोश मराठी व हिंदी या दोन्ही भाषांत तयार करून तो प्रकाशित करणें, हा या मंडळाचा उद्देश आहे.

स्वतंत्र भारताला अशा एका बृहत्कोशाची अत्यंत गरज होती. आजमितीस भारतीय जनतेंत संस्कृति-विषयक जिज्ञासा नव्याने उदय पावली आहे. सुशिक्षित, सुसंस्कृत माणसें आपल्या परंपरा आणि आपला प्राचीन इतिहास, यांचा शोध घेण्याच्या प्रयत्नांत दिसतात. समाजाच्या या जिज्ञासेची अंशतः तरी पूर्ति करणें व अधिक ज्ञानाच्या कामीं तिला मार्गदर्शन करणें, हें अत्यावश्यक होतें. महाराष्ट्रांत आणि भारताच्या अनेक भाषांत अनेक ज्ञानकोश आहेत व नव्यानेहि निर्माण होत आहेत. पण त्यांचा व्याप अखिल विश्वात्मक असल्यामुळे भारतीय संस्कृतीच्या ज्ञानाविषयींच्या आकांक्षा ते बृहत् विश्वकोश साकल्याने पुऱ्या करूं शकत नाहीत, असें आढळून आलें व म्हणूनच भारतीय संस्कृतिकोश मंडळाने केवळ सांस्कृतिक विषयांना वाहिलेला असा एक तपशीलवार व व्यापक कोश निर्माण करण्याचें हें महत्कार्य अंगीकृत केलें.

संस्कृतीची व्याख्या—

संस्कृति म्हणजे काय, हा इथे मुख्य प्रश्न आहे. कृ = करणें या धातूपासून बनलेल्या 'कृति' या शब्दाला 'प्र' 'वि' आणि 'सम्' असे उपसर्ग लागून प्रकृति, विकृति आणि संस्कृति असे शब्द अनुक्रमें बनतात. प्रकृति म्हणजे निसर्ग. विकृति म्हणजे त्यांत होणारा विकार किंवा बिघाड. आणि संस्कृति म्हणजे प्रकृतींत विकार किंवा बिघाड होऊं नये, या उद्देशाने तिच्यावर करायचे विविध सम्यक् संस्कार होत. प्रकृति, विकृति आणि संस्कृति हे तीन्ही शब्द डोळयांपुढे ठेवले असतां संस्कृतीचा जो अर्थ अल्पांशाने प्रतीत होतो, त्याचें स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करतां येईल—

मानव हा सभोवतीच्या निसर्गांत किंवा निसर्गांतल्या पदार्थांत आपल्या जीवनाला अनुकूल आणि उपयुक्त असे बदल करून किंवा प्रसंगीं त्यांच्यावर इष्ट ते संस्कार करून आपली जीवितयात्रा चालवीत असतो. मानवाला बाह्य विश्वावर आणि स्वतःच्या मन-बुद्धींवर विजय मिळवूनच आपलें जीवित सफल करतां येतें. तो बाह्य विश्वांतील पदार्थ आपल्या जीवनाला उपयुक्त व शोभादायक करून घेण्यासाठी त्यांत बदल घडवून आणतो; त्याचबरोबर स्वतःचे देह, मन, बुद्धि, आत्मा, यांच्यावरहि संस्कार करून स्वतःमध्येहि

बदल घडवून आणतो. या दोन्ही क्रिया कळत न कळत एकसमयावच्छेदाने चालू असतात. यावरून संस्कृतीचें आणखी एक लक्षण श्रीमती इरावती कर्वे यांच्या शब्दांत सांगतां येईल, तें असें— ' मनुष्यसमाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिति व डोळ्यांना न दिसणारी; पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टि म्हणजे संस्कृति. '

ही संस्कृति परंपरेने मानवाला प्राप्त होत असते. संस्कृतीची निर्मिति, तिचा संचय व एका पिढींतून दुसऱ्या पिढींत, दुसरींतून तिसरींत अशी तिची संक्रांति होत जाणें म्हणजे संस्कृतीची परंपरा होय. संस्कृति ही एका व्यक्तीची नसून ती समाजाची असते. व्यक्तीचें जीवन मर्यादित व अत्यल्प असतें; तर समाजाचें जीवन प्रदीर्घ व मोठ्या प्रदेशावर विस्तारलेलें असतें. जुनीं माणसें मरतात आणि त्यांच्या जागीं नवीं जन्माला येतात. हीं नवीं माणसें जुन्या माणसांच्या सामाजिक परंपरा घेऊनच आपल्या जीवनक्रमाला लागतात. त्यामुळेच सामाजिक परंपरा या युगायुगांचें जिणें घेऊन दीर्घायु बनतात. संस्कृति ही व्यक्तीच्या आयुष्याची दिशा निश्चित करते; तर व्यक्ति युगधर्माला अर्थात् देशकालाला अनुसरून संस्कृतीचा प्रवाह बदलीत असते. हवा, पाणी, सूर्यप्रकाश या गोष्टी जितक्या सहजतेने मानवाच्या जीवनांत सोबत करतात, तितक्याच सहजपणें संस्कृतिहि मानवाचें अंतर्बाह्य जीवन व्यापून राहते.

आपण जिला संस्कृति म्हणतों, तिचीं स्थूल मानाने आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक अशीं तीन अंगें कल्पितां येतात—

बाह्य विश्वावर संस्कार करून त्याला मानवाच्या उन्नतीसाठीं उपकारक बनविणें, हा संस्कृतीचा आधिभौतिक विभाग होय. शेती, पशुपालन, स्थापत्य, धातुकाम, यंत्रनिर्मिति, नगररचना, औषधिसंशोधन, अर्थोत्पादन आणि वितरण, या सर्व गोष्टी आधिभौतिक या विभागांत येतात.

भाग्य अनुकूल व्हावें, प्रयत्न सफल व्हावे, तसेंच बाधा आणि संकटें निरस्त व्हावीं, या उद्देशाने देवतांची पूजा आणि प्रार्थना करणें, जपतपादि आचरणें, मंत्रतंत्र आणि टोणे टोटके करणें आणि या सर्व क्रियांच्या द्वारें विश्वांतर्गत अदृश्य अशा दैवी शक्तींचें साहाय्य प्राप्त करून घेणें, या गोष्टी संस्कृतीच्या आधिदैविक विभागांत येतात.

स्वतःच्या मन-बुद्धींवर संस्कार करून त्यांना आत्मदर्शनाची योग्यता प्राप्त करून देणें, हा संस्कृतीचा आध्यात्मिक विभाग होय. धर्म, तत्त्वज्ञान, नीतिनियम, विद्या-कला, साहित्य, सद्‌गुण, शिष्टाचार, संस्कार, इत्यादि सर्व गोष्टींचा अंतर्भाव संस्कृतीच्या आध्यात्मिक विभागांत होत असतो.

भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य—

धर्म, संस्कृति आणि जीवन या तिन्ही क्षेत्रांचा विस्तार आणि व्यापकता समान आहे. या तिन्हींचा आशय एकच; आणि तो म्हणजे सर्व अंगांनी अंतर्बाह्य विकसित झालेलें मानव्य ! व्यक्तित्व आणि मानव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भारतीय संस्कृति या दोन्ही अंगांचा परिपोष करण्यासाठी प्रयत्नशील आहे. लौकिक अभ्युदयाची साधना करतां करतांच निःश्रेयसाची सिद्धि प्राप्त करणें आणि आधिभौतिकाचा योग्य तो मान राखून आध्यात्मिक मूल्यांची प्रतिष्ठापना करणें, हें भारतीय संस्कृतीचें उद्दिष्ट आहे. म्हणून भारतीय संस्कृति कर्माला प्राधान्य देते. त्या कर्मांत जिव्हाळा निर्माण व्हावा, म्हणून भक्तीचा आधार घेते आणि कर्मांत उत्साहाचा झरा सतत वाहता राहावा म्हणून कलेलाहि मान्यता देते. भारतीय संस्कृतींत चारित्र्याला विशेष रूपानें महत्त्व दिलें गेलें आहे. त्यासाठी ती संत-महंत, ऋषि-मुनी, तत्त्वज्ञानी, स्वार्थत्यागी

आणि चारित्र्यवान् व्यक्तींचा सन्मान करते आणि योग्य प्रसंगीं त्यांचें स्मरणहि करायला सांगते. भारतीय संस्कृति केवळ ऐहिक उत्कर्षावर संतुष्ट नाही. तिचें अंतिम साध्य आहे धर्मविजय किंवा अध्यात्मविजय !

भारत—महामानवतेचा सागर—

भारत देश महामानवतेचा सागर आहे. अनेक मानववंश आणि अनंत जाती यांचे प्रवाह एकत्र मिळून हा महामानवसागर निर्माण झाला आहे. भारताची संस्कृति या विभिन्न जातींनी संमीलित रूपाने निर्माण केलेली आहे. संघर्ष, समन्वय, सामंजस्य आणि एकात्मता या क्रमाने भारतीय संस्कृतीचें हें महावस्त्र विणलें गेलें आहे. या आसेतुहिमाचल खंडप्राय देशांत वास्तव्य करणाऱ्या जातीजमातींनी देश-काल-परिस्थितीला धरून आपापल्या सांस्कृतिक आविष्कारांच्या विविध पद्धती निर्माण केल्या आहेत. धर्म, पंथ, आचार, विचार, श्रद्धा, संकेत, पूजास्थानें, देवता, यात्रा, उत्सव, व्रतें, पर्वें, साहित्य, नृत्य, नाट्य, शिल्प, चित्र, त्याचप्रमाणें सामाजिक आणि कौटुंबिक चालीरीती, अशा असंख्य प्रकारांनी या विविधतेने विस्तृत रूप धारण केलें आहे. आणि असें असूनहि या विविधतेच्या आवरणांत एकत्वाची अनुभूति सदैव जागृत राहिली आहे. 'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति ' हा वैदिक विचार इथे दृढ आहे. याच्याहि पुढे जाऊन असें म्हटलें पाहिजे, कीं नानात्वांत एकत्वाचें दर्शन घेणें हा भारतीय संस्कृतीचा विशेष धर्म आहे. नाम-रूपांच्या या विस्तारलेल्या सागरांत नाम-रूपातीत अंतिम आणि शाश्वत तत्त्वाचा शोध करणें, हें भारतीय संस्कृतीचें अंतर्गत सूत्र आहे. तो तिचा इतिहासप्रसिद्ध महिमा आहे.

म्हणूनच नवनिर्माणासाठीं बद्धपरिकर झालेल्या स्वतंत्र भारताने या देशांत भिन्न प्रदेश, भिन्न भाषा, भिन्न पंथ आणि भिन्न धर्म, यांच्या आश्रयाने विकसित झालेल्या आपल्या संस्कृतीचें सम्यक दर्शन घेणें आवश्यक ठरतें

हाच विचार भारताचे महामंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांनी श्री. रामधारीसिंह दिनकर यांच्या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत मांडला आहे--

" यह संभव है कि, संसार में जो बडी बडी ताकतें काम कर रही हैं, उन्हें हम पूरी तरह न समझ सकें । लेकिन इतना तो हमें समझना चाहिये, कि भारत क्या है और कैसे इस राष्ट्र ने अपने सामासिक व्यक्तित्व का विकास किया है । उस के व्यक्तित्व के विभिन्न पहलू कौनसे हैं और उसकी सुदृढ एकता कहाँ छिपी हुई है . . . यदि हम इस बुनियादी बात को नहीं समझ पाते, तो फिर हम भारत को समझने में असमर्थ रहेंगे और यदि भारत को नहीं समझ सके तो हमारे भाव, विचार और काम सब के सब अधूरे रह जायेंगे और हम देश की कोई ऐसी सेवा नहीं कर सकेंगे जो प्रभावपूर्ण और ठोस हो । "

भारतीय संस्कृतिकोश मंडळ याच भावनेने प्रेरित होऊन या बृहत् कोशाच्या निर्मितीसाठी बद्धपरिकर झालें आहे. या कोशाच्या द्वारें भारताच्या विविध सांस्कृतिक परंपरांचें, प्रवाहांचें आणि आविष्कारांचें सार-रूप पण सर्वांगीण दर्शन वाचकांना आणि जिज्ञासूंना घडावें, हेंच या कार्याचें प्रमुख उद्दिष्ट आहे.

संस्कृतीच्या उपरिनिर्दिष्ट व्याख्या व तिची व्याप्ति यांना अनुसरून प्रस्तुत कोशांत पुढील विषयांची तपशीलवार माहिति यावयाची आहे--

* यज्ञसंस्था व तिचीं अंगोपांगें.
* वैदिक, स्मार्त, पौराणिक व अन्यधर्मीय लोक यांचे गृह्य आणि सामाजिक संस्कार.
* ग्रह, नक्षत्र, तिथि, वार यांच्या योगाने होणारीं सर्व प्रकारचीं पर्वें.
* प्रांतीय व अखिल भारतीय सण व उत्सव.

- ★ पुण्य तीर्थें, क्षेत्रें व सरोवरें
- ★ गंगादि पुण्य नद्यांचें माहात्म्य व त्यांचा परिचय.
- ★ अखिल भारतांतलीं सुप्रसिद्ध देवस्थानें.
- ★ सर्व प्रकारचीं दानें व महादानें.
- ★ सर्व प्रकारचीं मांगलिक, क्षेत्रीय व पार्वणादि श्राद्धें.
- ★ स्मार्त, पौराण इ. सर्व प्रकारचीं प्रायश्चित्तें.
- ★ अग्नि, जल इ. विविध प्रकारचीं दिव्यें.
- ★ देव-देवतांच्या पूजा आणि बलिदानें.
- ★ शुभाशुभ योग, शकुन आणि मुहूर्त.
- ★ पौराणिक आणि लौकिक व्रतें व उद्यापनें.
- ★ वापीकूपतडागादि इष्टापूर्त कर्में.
- ★ अरिष्टनिवारणार्थ सर्व प्रकारचीं शांतिकर्में.
- ★ वर्णाश्रमादि कर्तव्यें आणि अधिकार.
- ★ भारतांतील सर्व जातीजमाती, त्यांचीं वैशिष्टचें, कार्यें, आणि त्यांचें समाजांतलें स्थान.
- ★ भारतांतील सर्व आदिवासी जमाती, त्यांची राहणी, क्षेत्र, देव-धर्म, भाषा, आणि इतर वैशिष्टचें.
- ★ जातिसंस्था, तिचा उगम, विकास आणि परिणाम.
- ★ पूर्वास्पृश्य जाती, त्यांचीं कार्यें, सामाजिक स्थिति आणि अस्पृश्यतेचा इतिहास.
- ★ मंत्रतंत्रादि प्रकार, प्रयोग आणि सिद्धि.
- ★ अखिल भारतीय निसर्गोपासनेचे विविध प्रकार.
- ★ अवतार, संत व राष्ट्रपुरुष यांचे जन्मोत्सव व पुण्यतिथी.
- ★ सर्व पंथोपपंथ, त्यांचे आचार, दैवतें आणि त्यांच्या उपासना.
- ★ भारतांतील इतर धर्म, त्यांचा इतिहास, वैशिष्टचें, संघर्ष आणि समन्वय.
- ★ आस्तिक – नास्तिक सर्व दर्शनें.
- ★ पंथोपपंथांचें तत्त्वज्ञान.
- ★ सर्व दार्शनिक मतवाद.
- ★ तंत्र, नीति, राज्य, साहित्य, नाटच, इ. शास्त्रें, त्यांचा उगम व विकास.
- ★ विविध विद्या व कला.
- ★ सदाचार आणि सद्व्यवहार.
- ★ निसर्ग आणि पशु-पक्षी यांच्याशीं मानवाचे सांस्कृतिक संबंध.
- ★ वेद, उपवेद, वेदांगें, सूत्रें, उपनिषदें यांचा परिचय.
- ★ स्मृति, पुराणें, उपपुराणें आणि महाकाव्यें.
- ★ वेदकालापासून तों वर्तमान काळापर्यंत भारतांत झालेले वैदिक, पौराणिक व ऐतिहासिक राजवंश.
- ★ प्रादेशिक भाषा, त्यांचा विकास, साहित्य व लोकसाहित्य.
- ★ विविध उद्देशांनी निर्माण झालेलें संस्कृत, प्राकृत, पालि, अर्धमागधी, प्रांतिक भाषा इ. चें कथासाहित्य.
- ★ बौद्ध, जैन, लिंगायत, शैव, शाक्त, वैष्णव, इ. चें धार्मिक व सांप्रदायिक वाङ्मय.

★ नागर नाटच व लोकनाटच आणि त्यांच्या प्रांतोप्रांतींच्या परंपरा.
★ शास्त्रीय नृत्यें व लोकनृत्यें.
★ ब्राह्मणी, बौद्ध व जैन मूर्तिकला.
★ चित्रकला व तिच्या प्रादेशिक शैली.
★ लोककला, खेळणीं, पात्रें व उपकरणें.
★ प्रांतोप्रांतींची वेषभूषा व अलंकार.
★ विविध स्थापत्यशैली.
★ विविध भारतीय खेळ.
★ प्रांतोप्रांतींचे रांगोळी, कणे, भित्तिचित्रें, गोंदणें, इ. कलाप्रकार.
★ संगीत – शास्त्रीय व जानपद.
★ रागरागिण्या, स्वर, ताल, लय इत्यादि.
★ शास्त्रीय संगीताचीं, ग्रामीण व आदिवासींचीं वाद्यें.
★ वैदिक, पौराणिक, तांत्रिक, ग्रामीण व क्षुद्र देव-दैवतें.
★ यक्ष, राक्षस, पिशाच, इ. अतिमानवी योनि.
★ वैदिक, पौराणिक ऋषिमुनी.
★ महाकवि व आचार्य.
★ पुण्यश्लोक राजे, महाराजे.
★ संत, भक्त व संप्रदायसंस्थापक.
★ राष्ट्रीय महापुरुष.

याशिवाय या कोशाचीं आणखी कांही वैशिष्टचें पुढीलप्रमाणे आहेत –

★ या कोशांत उत्तरेइतकेंच दक्षिणेलाहि महत्त्व दिलेलें आहे.
★ नागर संस्कृतीइतकेंच लोकसंस्कृतीलाहि प्राधान्य दिलेलें आहे.
★ प्रत्येक प्रादेशिक भाषेंतील संत, भक्त, कवि आणि लोककवि यांच्या साहित्याचे नमुने त्या त्या भाषेंत पण देवनागरी लिपींत दिले आहेत. आंतरभारती व भाषिक सामंजस्य या दृष्टीने टाकलेलें हें एक प्रगतिशील पाऊल आहे.

संपादनविभागांत काम करणारी मंडळी—

श्री. व. ग. सहस्रबुद्धे, *बी. एस्. सी.*
श्री. सौ. सुलोचना लिमये, *एम्. ए.*
श्री. विद्याधरशास्त्री भिडे, *एम्. ए.*
श्री. रामचंद्र वामन दातार, *बी. ए.*
श्री. सुहास हरि जोशी, *बी. ए.*
श्री. श्रीधर शंकर फडके *बी. ए.;* वेदान्तपारंगत

याशिवाय श्री. स. शं. देसाई, प्रा. रा. का. बर्वे, कै. ल. के. भावे, श्री. डॉ. शां. भा. देव, डॉ. सी. ग. देसाई, श्री. बा. मो. कानिटकर या मंडळींनी कोशाच्या संपादनाला लेखनरूपाने बहुमोल साहाय्य केलें आहे.

तसेंच लेखनिक व इतर तांत्रिक गोष्टींतले साहाय्यक म्हणून श्री. रमेश अमृत परचुरे, वसंत चिंतामण फाटक, मोरेश्वर माधव वाळिंबे, हे विद्यार्थी मंडळांत काम करीत आहेत.

विद्वन्मंडळीचें साहाय्य आणि सहकार्य—

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, म. म. द. वा. पोतदार, पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर, न्यायविद्वान् श्री. पां. ज. चिन्मुळगुंद I. C. S., श्री. सेतुमाधवराव पगडी M. A., डॉ. रा. ना. दांडेकर M. A. Ph. D., श्रीमती दुर्गा भागवत M. A., प्रा. न. र. फाटक B. A., श्री. रा. चिं. ढेरे, या मान्यवर विद्वानांनी कोशरचना जास्तींत जास्त निर्दोष व्हावी, या उद्देशाने संपादकांना बहुमोल बौद्धिक साहाय्य केलें आहे.

मराठी व हिंदी या दोन्ही भाषांत कोशनिर्मिति करणें आणि त्या कोशाचें मुद्रण करणें हा लक्षावधि रुपयांचा प्रकल्प आहे. हें काम तडीस जायचें, तर त्या कामीं सरकार व समाज यांची अर्थशक्ति मंडळाच्या मागे उभी असणें आवश्यक होतें व आहे. 'सर्वारम्भास्तण्डुलाः प्रस्थमूलाः' हें सुभाषित प्रसिद्धच आहे. त्या दृष्टीने भारत सरकार व महाराष्ट्र राज्य सरकार यांच्याकडून आम्हांला आजवर थोडीबहुत आर्थिक मदत मिळाली आहे. पण त्याशिवाय समाजांतून अन्य मदतीचे हात पुढे आले नसते, तर हें काम आमच्या संकल्पाप्रमाणे एवढ्या मुदतींत प्रथम खंडाच्या प्रकाशनापर्यंत येऊन पोंचलेंच नसतें. त्या दृष्टीने आम्हाला द्रव्यसाहाय्य करून ज्यांनी हें कार्य अविच्छिन्न चालू ठेवण्यास मदत केली, त्या उदारधी दात्यांचीं नांवें अशीं—

श्रीमान् अरविंद नवीनचंद्र मफतलाल, मुंबई.

श्रीमान् दयानंद बांदोडकर, पणजी-गोवा.

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, पुणें.

श्रीमान् सरदार डी. के. जाधव. ग्वाल्हेर.

श्री. ठक्कर जादवजी कारा चॅरिटी ट्रस्ट, मुंबई.

श्री. मेघजी तुलसीदास बदाई भाटिया धर्मशाळा ट्रस्ट, मुंबई.

श्री. काशीनाथ दामोदर नायक, मडगांव—गोवा.

श्री. अखिल भारतीय आर्य (हिंदु) धर्मसेवा संघ, दिल्ली.

याशिवाय कोशाचे आगाऊ ग्राहक म्हणून बऱ्याच मंडळींनी आमच्याकडे मंडळाने ठरविलेली कोशाची सवलतीची किंमत भरली असून त्यांच्या या सहकार्यानेहि कोशनिर्मितीच्या कामाला बहुमोल मदत झाली आहे.

मंडळ वरील उदारधी दात्यांचें आणि आगाऊ ग्राहकांचें ऋणी आहे.

भारतीय संस्कृतिकोश मंडळाचा कार्यवाह आणि संपादक अशी दुहेरी भूमिका माझ्याकडे आलेली आहे. त्यामुळे अंतर्गत आणि बहिर्गत अशीं उभयविध कामें मला करावीं लागतात. या कामीं मंडळाचे कोशाध्यक्ष श्री. अ. ह. लिमये व मंडळाचे एक सभासद श्री. चिं. श्री. नातू यांनी मित्रभावाने मला वेळोवेळीं सहकार्य दिलें व अनेकदा माझ्या कामाचा भार आपल्या शिरावर घेतला. त्यांच्या या दैनंदिन आणि आस्थेवाईक सहकार्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहें. त्याचप्रमाणे मंडळाला वेळोवेळीं आवश्यक तो कायद्याचा सल्ला श्री. सि. ग. फडके B. A. LL. M. वकील देत असून हिशेब तपासण्याचें काम श्री. जी. डी. आपटे अँड को ऑडिटर्स, पुणें हे करीत आहेत, त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

कोणत्याहि कोशनिर्मितीच्या कार्यांत संदर्भग्रंथ ही अत्यंत मौलिक किंवा प्राणभूत अशी गरज असते. संदर्भ ग्रंथांवांचून कोशनिर्मितीचें पान हालूं शकत नाही आणि सगळे संदर्भग्रंथ स्वतःच्या ग्रंथालयांत जमा करणें,

ही गोष्ट कोणत्याहि संस्थेला सुतराम् शक्य नाही. अशा वेळीं अन्य ग्रंथालयांची मदत फार मोलाची ठरते. त्या दृष्टीने आम्हाला आवश्यक ते संदर्भग्रंथ उपलब्ध करून देण्याच्या कामीं कलकत्ता येथील नॅशनल लायब्ररी, दिल्ली येथील सेंट्रल सेक्रेटॅरिएट लायब्ररी, मुंबई येथील एशियाटिक सोसायटीची लायब्ररी, पुणें येथील भांडारकर रिसर्च इन्स्टिटय़ूट, फर्ग्युसन कॉलेज व केसरी-मराठा संस्था यांचीं ग्रंथालयें, तसेंच श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार या सर्वांनी आम्हांला आस्थेवाईक साहाय्य केलें आहे. त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों व यापुढेहि या सर्वांचें आम्हाला असेंच सहकार्य मिळेल, अशी आशा करतों.

संगम प्रेस, पुणें याचे चालक श्री. पटवर्धन बंधु यांनी कोशाच्या छपाईची धुरा आपल्या खांद्यावर वाहिली आणि आमच्या अडीअडचणी विचारांत घेऊन व हें कार्य आपलेंच आहे अशा आस्थेवाईक जाणिवेने कोशाच्या छपाईचें काम उत्कृष्टपणें केलें, याबद्दल त्यांना आमचे हार्दिक धन्यवाद आहेत.

श्री. दत्ता महाबळेश्वरकर, श्री. सुधाकर खासगीवाले व श्री. गंगाधर नाटके आमच्या कोशमंडळाचे चित्रकार कलावंत आहेत. कोशाची अंतर्बाह्य सजावट त्यांनीच केली आहे. तसेंच श्री. बाळुकाका दाते, कलाभुवन पुणें, यांनी चित्रांचे ठसे उत्तम प्रकारें बनवून दिले. आपल्या व्यवसायांत त्यांनी आमच्या कामाला प्राथम्य दिलें. याबद्दल मी या सर्वांचे हार्दिक आभार मानतों.

प्रस्तुत प्रथम खंडाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ, मुंबई, या मंडळाने ५००० रुपये आरंभीं दिले असून खंड प्रकाशित होतांच आणखी ५००० रुपये देण्याचें आश्वासन दिलें आहे.

तसेंच केंद्र सरकारच्या वैज्ञानिक संशोधन व सांस्कृतिक व्यवहार खात्याने प्रस्तुत खंडाच्या प्रकाशनासाठी ११००० रुपयांचें अनुदान दिलें आहे.

भारतीय संस्कृतिकोश मंडळ वरील अनुदानाबद्दल महाराष्ट्र राज्य सरकार व केंद्रीय सरकार यांच्याविषयीं अत्यंत कृतज्ञ आहे.

प्रस्तुत कोशाच्या प्रथम खंडाच्या प्रकाशनासाठीं पुणे विद्यापीठाने एक हजार रुपयांचें अनुदान दिलें आहे. या अनुदानाबद्दल भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे विद्यापीठाचे मनःपूर्वक आभार मानीत आहे.

कोशाच्या या प्रथम खंडाचें प्रकाशन अत्यंत विषम परिस्थितींत होत आहे. चीनने भारतावर आक्रमण करून भारताच्या स्वातंत्र्याला आणि अभेद्यत्वाला जबरदस्त धक्का दिला आहे. भारत सरकार आणि भारतीय जनता हें आक्रमण परतवून लावण्यासाठी व भारतीय स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी साऱ्या शक्तीनिशी बद्धपरिकर झाली आहे. भारतावरचें हें परचक्र लवकरच निरस्त होवो आणि भारतीय जनतेला शांतीचें आणि सुखसमृद्धीचें नवें युग प्राप्त होवो, अशी आकांक्षा या प्रसंगीं मी व्यक्त करतों.

त्याबरोबरच कशाहि अनुकूल वा प्रतिकूल परिस्थितींत आम्ही हातीं घेतलेलें हें कोशनिर्मितीचें काम आम्ही थांबवणार नाहीं वा त्यांत कसलीहि शिथिलता येऊं देणार नाही, असें मंडळाच्या वतीने मी आमच्या बहुसंख्य चाहत्यांना, ग्राहकांना आणि दात्यांना या प्रसंगीं निर्धाराचें अभिवचन देतों.

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥

सर्वांचा नम्र

महादेवशास्त्री जोशी

—संपादक व कार्यवाह

संदर्भ ग्रंथ संक्षेप

अ. औ. उ. सा.—अवधी और उसका साहित्य, त्रिलोकीनारायण दीक्षित, १९५४

अ. च. को.— अर्वाचीन चरित्र कोश, सि. वि. चित्राव, १९४६

अथर्व.— अथर्ववेद, संपादक– श्री. दा. सातवळेकर, १९५७

अ. भा. सं.— अरब और भारतके संबंध, सय्यद सुलैमान नदवी, १९३०

अमर.— अमरकोश

अ. रामायण— अध्यात्म रामायण भाषांतरकार–भालचंद्र शंकर देवस्थळी, १९५५

अर्थ.—कौटिलीय अर्थशास्त्र

अ. सा.— अपभ्रंश साहित्य, हरिवंश कोछड, प्रथम संस्करण, १९५६

अ. हि. नॉ. इं.— Early History of North India, Sudhakar Chattopadhyaya, 1958

आं. सा. इ.— आंध्रका सामाजिक इतिहास, सुरवरम् प्रताप रेड्डी, अनु.–आर्. वेंकटराव, १९५९

आ. आ. दे.— आर्योंका आदि देश, डॉ. संपूर्णानंद, १९५७

आ. इ.— आयुर्वेदका इतिहास, कविराज सूरमचंद्र

आ. ध. सू.— आपस्तंब धर्मसूत्र

आप. श्रौ. सू.— आपस्तंबीय श्रौतसूत्र

आ. व्हॅ.— Assam Valley, R. C. Muirhead Thomson, 1948

आश्व. गृ. सू.— आश्वलायन गृहयसूत्र

आश्व. श्रौ. सू.— आश्वलायन श्रौतसूत्र

आ. सं.— आर्यसंस्कृति, बलदेव उपाध्याय, १९५३

आ. सं.— आगाखानी संप्रदाय, अनु.–श्री. दा. सातवळेकर, १९४७

इं. अँ.—Indian Antiquary

इं. इ.— Indian Inheritance, Published by Ramakrishnan

इं. फो. लो.— Indian folk-lore

इं. बु. इ.— Indian Buddhist Iconography, Benoytosh Bhattacharya, 1958

इं. म्यु. इं. — Indian Musical Instruments

इं. वे. क. सू. — India of Vedic Kalpasutras, Ram Gopal, 1959.

इं. स्क.— Indian Sculpture, C. Sivaramamurti, 1961

इं. स्ट. भा. १—Indian Studies Vol. 1, Editor– Debiprasad Chattopadhyaya, 1960

इ. साँ. ला. ग्रे. म्यू.— Evolution of Songs and Lives of Great Musicians, Pada Bandyopadhyaya, 1949

उ. प्र. बौ. वि.— उत्तर प्रदेश में बौद्ध धर्मका विकास, नलिनाक्षदत्त, कृष्णदत्त वाजपेयी, १९५६

उ. भा. सं. प.— उत्तर भारत की संत परंपरा, परशुराम चतुर्वेदी, १९५२

उ. यो. द.— उमेश योगदर्शन, उमेश चंद्रजी, अनु.–प्रभाकर य. रानडे, १९५९

उ. र.—उपनिषद् रहस्य, रा. द. रानडे

ऋ.– ऋग्वेद संहिता

ऋ. आ.– ऋग्वेदिक आर्य, राहुल सांकृत्यायन, १९५७

ऋतु. सं.– ऋतुसंहार, कालिदास

ऋ. द.– ऋग्वेददर्शन, रामचंद्र गोविंद कोलंगडे, १९५४

ऋ. ब्र. क.— ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चय

ए. क. – Ancient Karnataka, Bhasker A. Saletore. 1936

एज्यु. ए. इं.– Education in Ancient India, A. S. Altekar, 1957

ए. द.—एकनाथदर्शन, संपा. बळवंत गिरिराव घाटे

एन्सा. मुं— Encyclopaedia Mundarica, Haufman, 1950

एन्सा. रि.— Encyclopaedia of Religion, Virgilius Ferm

एन्सा. रि. ए.— Encyclopaedia of Religion and Ethics, James Hastings Edinburgh

एन्सा. हिं. आ.— Encyclopaedia of Hindu Architecture, Prasannakumar Acharya, 1946

एपि. इं.—Epigraphica Indica

ए. भा.—एकनाथी भागवत

ए. से. ए. इं.— Ethnic Settlements in Ancient India, Sashi Bhusan Chaudhuri, 1955

ऐ. आ.—ऐतरेय आरण्यक

ऐ. ब्रा.— ऐतरेय ब्राह्मण

औ. वि. च.—औचित्य विचार चर्चा

क. कौ.— कविताकौमुदी, रामनरेश त्रिपाठी

क. तीर्थांक— कल्याण-तीर्थांक, संपा.-हनुमानप्रसाद पोद्दार

क. द.— Karnataka Darshana, Published by R. S. Hukkerikar, 1955

क. ब्र.— Cult of Brahma, Tarapada Bhattacharya

क. म.— Customs of Mankind, Lillian Eichler

क. सं.— कल्पना संगीत, गोविंद स. टेंबे

क. हि. वा. पु.— Cultural History from the Vayu Purana, Devendrakumar Rajaram Patil, 1946

क. हे. इं— Cultural Heritage of India, 1958

का. ट्रा. स. इं.— Castes and Tribes of Southern India, Thurston

का. ट्रा. सी. पी.— Casts and Tribes in Central Provinces

काठ. गृ.— काठक गृह्यसूत्र

कात्या. श्रौ. सू.— कात्यायन श्रौतसूत्र

कात्या. स्मृ.— कात्यायनस्मृतिसारोद्धारः

कादं. ए. सा. अं.— कादंबरी, एक सांस्कृतिक अध्ययन, वासुदेवशरण अग्रवाल, १९५८

का. प्र.— काव्यप्रकाश

की. पॉ.— Keys of Power, J. Abbot, 1932

कु. सं.— कुमारसंभव

कृ. क. त.— कृत्यकल्पतरु, लक्ष्मीधर भट्ट

कैं. सा. द.— कैरली साहित्य दर्शन, रत्नमयीदेवी दीक्षित

क्रि. स्ट. ले. उ.— Critical Study of the Later Upanishads, S. G. Desai

क्ला. डि. हिं. मा.— Classical Dictionary of Hindu Mythology, 1957

खं. वै.— खंडहरोंका वैभव, मुनिकांतिसागर

खो. प.— खोजकी पगडंडियां, मुनिकांतिसागर, १९५३

ग. लो.— गढ़वाली लोकगीत, गोविंद चातक, १९५६

गा. म. वि.— गायत्री महाविज्ञान, पं. श्रीरामशर्मा आचार्य, १९५९

गा. स.— गाथा सप्तशती, स. आ. जोगळेकर, १९५६.

गी. र.— गीतारहस्य, बा. गं. टिळक, १९५६.

गु. द. यो.— गुरुदत्तयोग, प्रा. श्री. शं. खानवेलकर, १९५७.

गो. च. प.— श्री गुरु गोरक्षनाथ चरित्र आणि परंपरा, रा. चिं. ढेरे, १९५९.

गोभिल गृ.— गोभिल गृह्यसूत्र

ग्रे. वि. इं.— Great Women of India, Swami Madhavananda, 1953

ग्लो. उ. प्र.— Glories of Uttar Pradesh, Nandalal Chatterji, 1957

च. व. चि.— चतुर्वर्गचिन्तामणि

छं. र.— छंदोरचना, माधव त्रि. पटवर्धन, १९३७

छांदो.— छांदोग्य उपनिषद्

जा. का. भा. सं.— जातककालीन भारतीय संस्कृति, पंडित मोहनलाल महतो 'वियोगी', १९५८

जै. इ.— Jaina Iconogrophy, B. C. Bhattacharya

जै. उ. ब्रा.— जैमिनीय उपनिषद् ब्राह्मण, आचार्य रघुवीर, लोकेशचंद्र, १९५४

जै. मी.— जैमिनीय मीमांसा

जै. व्र. वि. सं.— जैन व्रत-विधान-संग्रह, बारेलाल जैन राजवैद्य, १९५२

जै. सा. इ.— जैन साहित्य और इतिहास, नाथूराम प्रेमी, १९५६

ट्रा. आ. मि. इं— Tribal Art of Middle India, Verrier Elwin

ट्रा. ए. इं.— Tribes in Ancient India, Editor–Bimal Churn Law, 1943

ट्रा. का. सें. प्रॉ. इं.— Tribes and Castes of the Central Provinces of India, R. V. Russel, Rai Bahadur Hiralal

डि. इ.— Dictionary of Islam

डि. सा. इं. म्यु. म्यु.— Dictionary of South Indian Music and Musicians, P. Sambamoorthy

डे. हिं. इ.— Development of Hindu Iconography, Jitendra Nath Banerjea, 1956

त. औ. उ. सा.— तमिळ और उसका साहित्य, पूर्ण सोमसुंदरम्

त. सा. सं.— तमिळ साहित्य और संस्कृति, अवधनंदन, १९५८

तां. बौ.सा.सा.— तांत्रिक बौध साधना और साहित्य, नागेंद्रनाथ उपाध्याय, १९३९

तां. ब्रा.— तांड्य महाब्राह्मण

तै. आ.— तैत्तिरीय आरण्यक

तै. ब्रा.— तैत्तिरीय ब्राह्मण

तै. सं.— तैत्तिरीय संहिता

द. चिं.— दर्शन और चिंतन, पं. सुखलालजी, १९५७

द. दि.— दर्शन-दिग्दर्शन, राहुल सांकृत्यायन, १९४७

द. भा.— दक्षिण भारत (द्वैमासिक)

द. सं. इ.— दत्त संप्रदायाचा इतिहास, रा. चिं. ढेरे, १९५८

दा. चं.— दान चंद्रिका

दे. भा.— देवीभागवत

दो. को.— दोहा कोश, सिद्ध सरहपादकृत, संपादक-राहुल सांकृत्यायन, १९५७

द्र. गॉ. मॉ. हिं.— Dravidiyan Gods in Modern Hinduism, W.T. Elmore

ध. वि. स्व.— धर्मविवादस्वरूप, के. ल. दप्तरी, १९३४

ध. सिं.— धर्मसिंधु
ध. सू.— धर्मसूत्रें
ना. भा. ध. — नाथांचा भागवत धर्म, श्रीधर रंगनाथ कुलकर्णी, प्रथमावृत्ति, १९५८
ना. सं.— नाथ-संप्रदाय, हजारीप्रसाद द्विवेदी, १९५०
नि.—निरुक्त
नि. सिं.— निर्णयसिंधु, कमलाकर भट्ट
ने. फा. — India's North-East Frontier, Verrier Elwin, 1959
न्या. को.— न्यायकोश, मीमांसाचार्य झळकीकर
पं. ज्यो.— पंचांगांतील ज्योतिःशास्त्र, त्र्यं. गो. ढवळे, १९५८
पं. ब्रा.—पंचविंश ब्राह्मण
पद्म पु.— पद्म पुराण
प. ध. शा. को.— पवित्र धर्मशास्त्र-विषयक कोश, दि. शं. सावरकर, १९४२
पॉ. क. क.— Popular Culture in Karnataka, Masti Venkatesa Iyengar, 1937
पा. भा.— पाणिनिकालीन भारतवर्ष, वासुदेवशरण अग्रवाल, १९५५
पार. गृ. सू.— पारस्कर गृह्यसूत्र
पा. वा. ते. भि र.— पाली वाङ्मयांतील तेरा भिक्षुणी रत्नें, ना. के. भागवत, १९५३
पा. सा. इ.— पालि साहित्यका इतिहास, भरतसिंह उपाध्याय, १९५१
पु. इं.— Purāṇa Index, V. R. Ramachandra Dikshitar, 1955
पु. त. नि.— पुरातत्त्व निबंधावली, राहुल सांकृत्यायन, १९३७.
पु. त. मी.— पुराणतत्त्व मीमांसा, त्रिपाठी श्रीकृष्णमणि, १९६१
पू. म. भा.— पूर्व-मध्यकालीन भारत, वासुदेव उपाध्याय, १९५३
पो. वी. हिं. सि.— Position of Women in Hindu Civilization A. S. Altekar, 1956
प्र. वि.— प्रतिमा विज्ञान, द्विजेंद्रनाथ शुक्ल, १९५६
प्रा. पैं.— प्राकृत पैंगलम
प्रा. च. को.— प्राचीन चरित्र कोश, सि. वि. चित्राव, १९३२
प्रा. भा. क. वि.— प्राचीन भारत के कलात्मक विनोद, हजारीप्रसाद द्विवेदी, १९५२
प्रा. भा. प्र.— प्राचीन भारत के प्रसाधन, अत्रिदेव विद्यालंकार, १९५८
प्रा. भा. म.— प्राचीन भारतीय मनोरंजन, मन्मथ राय, १९५७
प्रा. भा. वि. वि.— प्राचीन भारतीय विचार और विभूतियां, राधाकुमुद मुकर्जी, हिंदी संस्करण १९५८
प्रा. भा. वे.— प्राचीन भारतीय वेषभूषा, मोतीचंद्र, १९५१
प्रा. भा. सां.— प्राचीन भारतकी सांग्रामिकता, पं. रामदीन पांडेय, १९५७
प्रा. म.— प्राचीन महाराष्ट्र, श्री. व्यं. केतकर, १९३५
प्रा. म. सं.— प्राचीन मराठी संतकवि, जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर, १९५७
प्रा. मौ. बि.— प्राङ्मौर्य बिहार, देवसहाय त्रिवेद, १९५४
प्रा. सा. इ.—प्राकृत साहित्यका इतिहास, जगदीशचंद्र जैन, १९६१
प्रि. क. इं.—Primitive Culture of India, T. & C. Hudson
फे. फे. आ.— Fairs and Festivals of Assam, Hem Barua and J. D. Baveja. 1956
फो. आ. ऑ. बं.— Folk Art of Bengal, Ajit Mookerjee, 1946
फो. डा. ऑ. म.—Folk-Dance of Maharashtra, Rajabhau Joshi, 1950
बॅ. ग्रा. आ. क.— Background of Assamese Culture, R. M. Nath
बाँ. बे. क्रा.—Bombay Beggars and Criers
बि. पे. ला.— Bihar Peasant Life, G. A. Grierson, 1926
बी. सी. लॉ. कोमे. व्हॉल्यूम—B. C. Law Commemoration Volume
बृहदा.— बृहदारण्यकोपनिषद्
बौ. द. मी.— बौद्ध दर्शन मीमांसा, पं. बलदेव उपाध्याय, १९५४
बौ. ध. द.— बौद्ध धर्म दर्शन, आचार्य नरेंद्रदेव.
ब्र. सू. शां. भा.— ब्रह्मसूत्र शांकरभाष्य
ब्रा. जा. प्र.— भारतीय ब्राह्मण जाति प्रदीपिका, इंद्रदेव नारायणसिंह, १९५८
ब्रा. भि. वि.— ब्राह्मणांतील भिन्नशाखीय विवाह, पं. महादेवशास्त्री दिवेकर, १९४५
भ. वि.— भक्ति का विकास, मुंशीराम शर्मा, १९५८
भविष्य पु.— भविष्य पुराण
भा. इ. रू.— भारतीय इतिहास की रूपरेखा, जयचंद्र विद्यालंकार
भाग. पु.— भागवत पुराण
भा. ना. सा.—भारतीय नाट्य साहित्य, संपादक-नरेंद्र
भा. ज्यो.— भारतीय ज्योतिषशास्त्र अथवा भारतीय ज्योतिषशास्त्राचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास, शं. बा. दीक्षित, १९३१
भा. द.— भारतीय दर्शन, पं. बलदेव उपाध्याय, १९५७
भा. द. सं.— भारतीय दर्शन संग्रह, द. वा. जोग, १९५८
भा. प्र. वि.— भारतीय प्रतिमा विज्ञान, द्विजेंद्रनाथ शुक्ल, १९५६
भा. प्रा. लि. मा.— भारतीय प्राचीन लिपिमाला, गौरीशंकर हीराचंद ओझा, १९५९

भा. बृ. इ.— भारतवर्षका बृहद् इतिहास, पं. भगवद्दत्त, १९६०

भा. ब्रा. जा. प्र. — भारतीय ब्राह्मण जाति प्रदीपिका, इंद्रदेव नारायणसिंह, १९५८

भा. मा. शा.— भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ आणि सविरण पातञ्जल योग दर्शन, कृष्णाजी केशव कोल्हटकर, १९५९

भा. वा.— भारतीय वास्तुशास्त्र, द्विजेंद्रनाथ शुक्ल, १९५५

भा. व्य. को.— भारतीय व्यवहार कोश, संपादक-विश्वनाथ दिनकर नरवणे, १९६१

भा. सं.— भागवत संप्रदाय, बलदेव उपाध्याय, १९५४

भा. सा.— भारत सावित्री, वासुदेवशरण अग्रवाल, १९५७

भा. सा. शा.— भारतीय साहित्यशास्त्र, गणेश त्र्यंबक देशपांडे, १९५८

म. का.— मनोरम काश्मीर, मोहनकृष्ण दर, १९५८

म. च. को.— मध्ययुगीन चरित्र कोश, सि. वि. चित्राव, १९३७

मत्स्य पु.— मत्स्य पुराण

मदुरा गॅझे.— Madras District Gazetteers– Madurai, Gazetteer of India, B. S. Baliga, 1960

म. ना. उ.—महानारायणोपनिषद्

म. भा.—महाभारत, चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

म. भा. उ. वि. —मराठी भाषा उद्गम व विकास, कृ. पां. कुलकर्णी, १९५७

म. भा. उ. सं.— महाभारताचा उपसंहार, चिं. वि. वैद्य, प्रथम संस्करण–१९२१.

म. भा. सा.— मध्यकालीन भारतीय साधना, क्षितिमोहन सेन

म. म. वा.—महानुभावीय मराठी वाङ्मय, य. खु. देशपांडे, १९६०

म. लो. सं. —मराठी लोकांची संस्कृति, इरावती कर्वे, १९५१.

म. वा. इ. —मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल. रा. पांगारकर

म. सा.— महाराष्ट्र सारस्वत, वि. ल. भावे, १९५१

म. सा. प.—महाराष्ट्र साहित्य पत्रिका

म. सा. पु.—महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना–रा. शं. वाळिंबे, १९६२

म. हिं. क.— मध्यकालीन हिंदी कवयित्रियां, सावित्री सिन्हा, १९५३

म. ज्ञा. को.— महाराष्ट्रीय ज्ञानकोश, श्रीधर व्यंकटेश केतकर

मानव ध. सू.—मानव धर्मसूत्र

मार्कं. पु.— मार्कंडेय पुराण

मुं. इ. जा.—मुंबई इलाख्यांतील जाती

मु. इ.— मुलांचे इकबाल, श्रीपाद जोशी, १९६०

मु. इं.— Mussalmans of India, Mrs. Ali Meer Hassan, 1917

मु. का. भा.— मुगलकालीन भारत, आशीर्वादीलाल श्रीवास्तव, १९५९

मु. चिं.— मुहूर्तचिंतामणि

मै. श. गु. अ. ग्रं.— मैथिलीशरण गुप्त अभिनंदन ग्रंथ, संपादक वासुदेवशरण अग्रवाल, १९५६

मों. जि. गॅझे.— मोंघीर जिल्हा गॅझेटिअर

म्यु. इं.— Music af India, Herbert A. Popley, 1921

यं. चिं.— यंत्रचिंतामणि

याज्ञ. स्मृ.—याज्ञवल्क्य स्मृति

रघु.— रघुवंश, कालिदास

रा. जा.—राजस्थान की जातियां, १९५४

रा. भा. औ. सा.— राजस्थानी भाषा और साहित्य, पं. मोतीलाल मेनारिया, १९५२

रा. ले. सं.— राजवाडे लेखसंग्रह, संपा.- लक्ष्मणशास्त्री जोशी, १९५८

रा. सं.— राधावल्लभ संप्रदाय सिद्धान्त और साहित्य, विजयेंद्र स्नातक, १९५८

रा. शा.— रामभक्ति शाखा, रामनिरंजन पांडेय, १९६०

रा. सा. म. उ.— रामभक्ति साहित्य में मधुर उपासना, श्रीभुवनेश्वरनाथ मिश्र १९५७

रि. फि. अ.— Religion and Philosophy of the Atharvaveda, N. J. Shende, 1952

रे. क. इं.— Races and Cultures of India, D. N. Majumdar

स. ल. सं.— सर्व लक्षण संग्रह

लिंग पु.— लिंग पुराण

लो. ध. ना.— लोकधर्मी नाट्य परंपरा, श्याम परमार, १९५९

लो. सा. भू.— लोकसाहित्यकी भूमिका, कृष्णदेव उपाध्याय, १९५७

लो. सा. रू.— लोकसाहित्याची रूपरेखा, दुर्गा भागवत, १९५६

वर्ष. क्रि. कौ.— वर्षक्रिया कौमुदी, गोविंदानंद कवि कंकणाचार्य

व. श्रा.— वसुनंदि श्रावकाचार, आचार्य वसुनन्दि

वाका. नृपति व त्यांचा काल— वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, वा. वि. मिराशी, १९५७

वा. पं. इ.— वारकरी पंथाचा इतिहास, शं. वा. दांडेकर, १९५७

वा. रा.— वाल्मीकि रामायण

वि. उ. वि.— विज्ञान उदय व विकास, प्र. न. जोशी, १९६०

वि. तं.—श्रीविद्यार्णवतंत्र, एस्. श्रीकांतशास्त्री, १९४४

वि. पि.— विनयपिटक

वि. मुं. रा. प.— विशाल मुंबई राज्य परिचय, १९६०

वि. ध. द.—विश्वधर्मदर्शन, श्रीसांवलिया बिहारीलाल वर्मा, १९५३

विष्णु पु.— विष्णु पुराण

वि. स्मृ. ग्रं.— विक्रम स्मृति ग्रंथ, १९४५

वे. इं.— Vedic Index of Names

and Subjects, Arthur Anthony Macdonell, Arthur Berriedale Keith.

वे. शा. दी.––वेदशास्त्रदीपिका, १९४१

वै. दे. अ. द.––वैदिक देवतांचें अभिनव दर्शन, रामचंद्र नारायण दांडेकर, १९५१

वै. ध.––वैष्णव धर्म, परशुराम चतुर्वेदी.

वै. नि.–– वैदिक निबंध, ना. गो. चापेकर

वै. मा.–– वैदिक माइथॉलॉजी, एम्. ए. मॅकडॉनेल

वै. वा. इ.–– वैदिक वाङमय का इतिहास, पं. भगवद्दत्त, १९५६

वै. वि. भा. प.–– वैज्ञानिक विकास की भारतीय परंपरा, सत्यप्रकाश, १९५४.

वै. सं. वि.–– वैदिक संस्कृतीचा विकास, लक्ष्मणशास्त्री जोशी, १९५१

वै. सा.–– वैदिक साहित्य, पं. रामगोविंद त्रिवेदी, १९६०

वै. सा. सं.–– वैदिक साहित्य और संस्कृति, बलदेव उपाध्याय, १९५८

व्या. ज्ञा. को.––व्यायाम ज्ञान कोश

व्र. चं.–– व्रतचंद्रिका, गौरीशंकर उपाध्याय, १९५२

व्र. ति. नि.–– व्रततिथिनिर्णय, श्रीनेमिचंद्र शास्त्री, १९५६

व्हि. गॉ. सा. इं.–– Village Gods of South India, W. Whitehead

श. क.–– शब्दकल्पद्रुम, राजा राधाकांत देव.

श. ब्रा.–– शतपथ ब्राह्मण

शी. स्फू. इ.–– शीखांचा स्फूर्तिदायक इतिहास, शं. पु. जोशी, १९३९

शृं. हा.–– शृंगार हाट, संपा. मोतीचंद्र, १९५९

श्रु. बो.–– श्रुतिबोध, रा. वि. पटवर्धन

श्रौ. सू.––श्रौत सूत्र

सं. इं. डि.–– Sanskrit English Dictionary, P. K. Gode, C. G. Karve,

सं. द.–– संगीत दर्पण, दामोदर पंडित

सं. मि.–– संशोधकाचा मित्र, ग. ह. खरे

सं. शा.–– संगीत शास्त्र, के. वासुदेव शास्त्री, १९५८

सं. सा. इ.–– संस्कृत साहित्यका इतिहास, ए. बी. कीथ, भाषांतरकार मंगलदेव शास्त्री, १९६०

सं. सा. सो. इ.–– संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास, विनायक वामन करंबेळकर, १९५४

सत्या. श्रौ. सू.–– सत्याषाढ श्रौतसूत्र.

स. द. सं.–– सर्वदर्शनसंग्रह

स. पॉ.–– Serpant Power, Arthur Avalon (Sir John Woodroffe)

सा. इं. इ. गॉ. गॉ.––South Indian Images of Gods and Goddesses

सा. द.–– साहित्य दर्पण

सारण गॅझे.–– Bihar District Gazetteres–Saran, P. C. Roy Chaudhury, 1960

सिं. क.–– Sindhi Culture, V.T. Thakur, 1958

सि. आ. प. भा.–– सिकंदर का आक्रमण और पश्चिमोत्तर भारत, १९५७

सि. सा.–– सिद्ध साहित्य, धर्मवीर भारती, १९५५

सु. वि. को.–– सुलभ विश्वकोश, य. रा. दाते, चिं. ग. कर्वे

सो.इं.ट्रॅ.—Sources of Indian Tradition, Wm. Theodore de Bary

सो. चें. म.—Social Changes in Malabar, M. S. A. Rao, 1957

स्कंद पु.–– स्कंद महापुराण

स्कू. से. इन्. जै. लि.–– Schools and Sects in Jaina Literature, Amulyachandra Sen, 1931

स्ट. इं. क. हि.–– Studies in Indian Cultural History, P. K. Gode, 1961

स्ट. उ. पु.–– Studies in the Upapurāṇas, R. C. Hazra, 1958

ह. च.–– हर्षचरित, बाणभट्ट

ह. च. सां. अ.–– हर्षचरित–एक सांस्कृतिक अध्ययन, वासुदेवशरण अग्रवाल, १९५३

ह. यो. दी.–– हठयोग दीपिका, स्वात्माराम योगींद्र, १९५३.

हरि वं.–– हरिवंश, चित्रशाळा प्रकाशन, पुणें

हि. इं. लॉ.–– History of Indian Logic, S. C. Vidyabhushan

हि. आ.–– History of Orissa, Harekrushna Mahtab,1959

हिं. क. को.––हिंदी कथाकोष, हिंदुस्तानी एकेडेमी, इलाहाबाद, १९५४

हिं. क. भ. आं. तु. अ.––हिंदी और कन्नड में भक्ति-आंदोलन का तुलनात्मक अध्ययन, हिरण्मय, १९५९

हि. बं. लॅं. लि.–– History of Bengali Language and Literature, Dinesh Chandra Sen, 1954

हिं. मॅ. क. से.–– Hindu Manners Customs and Ceremonies, Abbe J. A. Dubois, 1959

हिं. मा.–– A Classical Dictionary of Hindu Mythology, John Dowson 1957,

हिं. वि.–– हिंदी विश्वकोश, धीरेंद्र वर्मा, १९६०

हिं. वि. को.––हिंदी विश्वकोश, संपादक धीरेंद्र वर्मा, भगवतशरण उपाध्याय, गोरखप्रसाद, नागरी प्रचारिणी सभा, वाराणसी

हिं. सं.–– हिंदु संस्कार, राजबली पांडेय, प्रथम संस्करण, १९५७

हिं. सा. को.––हिंदी साहित्य कोश, संपा. धीरेंद्र वर्मा, १९५९

हिं. सा. बृ. इ.–– हिंदी साहित्य का बृहत् इतिहास, संपा. राजबली पांडेय

हिं. हॉ. से.— Hindu Holidays and Ceremonials, B. A. Gupte, 1916

हि. इं. फि.— History of Indian Philosophy, Surendranath Dasgupta, 1957

हि. जॉ. ए. इं.— Historical Geography of Ancient India, Bimla Churna Law, 1954

हि. जै. मो.— History of Jaina Monachism, Shantaram Bhalchandra Deo, 1956

हि. द. ना. सं.— History of Dasnami Naga Sanyasis, Sir Panchayati Akhara Mahanirvani

हि. ध.— History of Dharma Śāstra, P. V. Kane

ज्ञा. मा.— ज्ञानोबा माउली, रा. चिं. ढेरे, १९६०

स्थूल शुद्धिपत्र

पृष्ठ	स्तंभ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२१	२	१७	अत्यंज	अंत्यज
४९	१	३५	मद्रास	केरळ
१३९	२	१३	न + आहत = ताडित =	न + आहत (= ताडित) =
१८६	२		१० व्या ओळींत ५ व ६ हे आकडे गळाले आहेत, ते पुढीलप्रमाणे वाचावे—	(५) धूत— उजवीकडून डावीकडे व डावीकडून उजवीकडे डोकें वळविणें. (६) कंपित— खालीवर डोकें हालविणें.
१९३	२	२६	अमरकटक	अमरकंटक
३७६	१	३	आबिकेय	आंबिकेय
४४५	१	३५	आनगुदा	आनेगुंदी
४९२	१	४	म्हैसूर राज्यांतलें	आंध्रप्रदेशांतलें

भारतीय संस्कृतिकोश

प्रथम खंड

भारतीय संस्कृतिकोश

खंड पहिला

अं अ च्या डोक्यावर टिंब दिल्याने हें अक्षर बनतें. मात्र ही पद्धत फारशी प्राचीन नाही. गिरनारच्या शिलालेखांत अ च्या पुढे टिंब देऊन तें बनविलें आहे. इ. स. च्या चौथ्या शतकांत अ च्या डोक्यावर टिंबाऐवजी लहान रेघ दिलेली आढळते. अं हें मंत्रशास्त्रांत पहिलें बीज मानलें आहे.

अंकगणित संस्कृतीची वाढ केवळ भौतिक साधनांनी होऊं शकत नाही. त्यासाठी मानसिक साधनांचीहि आवश्यकता असते. भाषा व गणित हीं दोन मानवी व्यवहारांचीं मानसिक साधनें होत. विचार आणि संशोधन यांच्या दृष्टीने गणिताचें महत्त्व भाषेपेक्षाहि अधिक आहे. गणिताच्या साह्यानेच मनुष्य विश्वाचें आकलन करण्यास अधिक समर्थ झाला आहे.

प्राचीन काळीं गणितशास्त्र हा वेदांगज्योतिषाचा एक भाग मानला जात असे. यज्ञांतील विविध आकृतींचें क्षेत्रफळ काढण्यासाठीहि या शास्त्राचा उपयोग करीत. त्याचप्रमाणें परमेश्वरप्राप्तीचें साधन असलेली मनाची एकाग्रता या शास्त्राच्या अभ्यासाने साध्य होते, अशीहि समजूत होती. गणितशास्त्राच्या अनेक शाखा आहेत. त्यांपैकी अंकगणित ही सर्वांत सोपी व उपयुक्त शाखा आहे. अंकगणिताला भास्कराचार्यांनी पाटीगणित असें नांव दिलें आहे. त्याला व्यक्तगणित असेंहि म्हणतात.

संख्या मोजणें व संख्या लिहिणें या बाबतींत प्राचीन अन्य राष्ट्रांच्या तुलनेने वैदिक लोक बरेच पुढे गेले होते. काल व अक्षर यांच्या गणनेसाठी त्यांनी दशांकपद्धति शोधून काढली. गोपथब्राह्मणांत अंक शब्द संख्यावाचकच आहे (१.१.२७). गणितांत शून्याची कल्पना हा प्राचीन भारतीयांचा मोठाच शोध होय. शून्यकल्पनेने गणितशास्त्रांत नवें युग निर्माण झालें. वैदिक वाङ्मयांत शून्य शब्दाचा रितें किंवा पोकळ असा अर्थ दिलेला आहे (शब्रा. २.३.१-९ ; तैब्रा. २.१.२.१२).

वस्तूंची गणना प्रथम हातापायांच्या बोटांच्या मदतीने सुरू झाली. त्यासाठी उभ्या रेघांचाहि उपयोग केला जात असे. त्यानंतर संख्यावाचक शब्द निर्माण झाले. पांच, दहा, शंभर, इ. संख्यांसाठी नुसत्या रेघा मारण्याची पद्धत इजिप्त, असीरिया रोम, इ. देशांत चालू होती. संख्या व्यक्त करण्याची दुसरी पद्धत म्हणजे लिपींतील अक्षरें त्यांच्या अनुक्रमाप्रमाणे वापरणें. संख्यावाचक प्रथमाक्षर त्या संख्येचें चिन्ह म्हणून वापरण्याची पद्धतहि अस्तित्वांत होती. रोमन C, M. हीं अक्षरें अद्यापहि अशा प्रकारें वापरलीं जातात.

अंक याचा मूळ अर्थ चिन्ह किंवा खूण असाच आहे. 'उत्सङ्गचिन्हयोरङ्कः' (अमर). १ ते ९ अंक व ० (शून्य) हीं चिन्हें कशीं उगम पावलीं, त्याचा इतिहास देतांना म. ज्ञानकोशांत म्हटलें आहे, की संख्यांच्या नांवांचीं आद्याक्षरें हींच पूर्वी संख्याचिन्हें होतीं. आणि त्या आद्याक्षरांचीं अपभ्रष्ट रूपें म्हणजेच सांप्रतचे आंकडे होत --

मूळ शब्द	शब्दचिन्ह	अपभ्रष्ट रूप
एक	ए	१
द्वौ	द	२
त्रि	त्र	३
पंचन्	प	५
नव	न	९
शून्य	श	०

नाणेघाट येथे सांपडलेल्या एका शिलालेखावरून असें दिसतें, की हे अंक हिंदुलोकांत सनपूर्व ३०० पासून प्रचलित होते. हेच अंक इ. स. ६०० च्या सुमारास अरबांनी युरोपांत नेले.

एकपासून परार्धापर्यंत संख्यांची गणना करणें हें वैदिक आर्यांना माहीत होतें, यांत शंका नाही. शुक्ल यजुर्वेदांत (१७-२) एक (१), दश (१०), शत (१००), सहस्र (१०००), नियुत (१००,०००), अर्बुद (१०,०००,०००), परार्ध (१,०००,०००,०००,०००) येथपर्यंत संख्यांचा उल्लेख आहे. मैत्रायणी व काठक या संहिता, पंचविंश ब्राह्मण, सांख्यायन श्रौतसूत्र, इ. ग्रंथांतहि अशा प्रकारचीं संख्यांचीं नांवें आहेत. जन्म, नामकरण, विवाह, मृत्यु, इ. प्रसंगीं किंवा मंत्र-तंत्रात्मक विधींत १ पासून १०० पर्यंत अनेक संख्यांचीं नांवें वेदांत वापरलेलीं आहेत. ललितविस्तर (सनपूर्व १०० वर्षे) या

बौद्ध ग्रंथांत शतगुणोत्तर पद्धतीने एक तल्लक्षण = $१०^{५३}$ पर्यंत संख्यांची गणना दिलेली आहे.

आपल्या अंकपद्धतींत आकड्यांना त्यांच्या विशिष्ट स्थानामुळे भिन्न किंमत प्राप्त होते. एखाद्या संख्येंतील ज्या स्थानीं मूळ किंमतीचा कोणताहि आकडा ठेवतां येत नाही; पण जें स्थान भरणें आवश्यक असतें, तें भरण्यासाठी शून्याचा उपयोग होतो. शून्याला स्वतंत्रपणें कांही किंमत नसते; पण दुसऱ्या मोठमोठ्या संख्या सुलभ रीतीने मांडण्यासाठी त्याचा फार उपयोग होतो.

दशमानपद्धतीने संख्या लिहिणें, हा भारतीय अंकगणितांतला एक अत्यंत महत्त्वाचा शोध आहे. सनपूर्व दोन हजार वर्षांच्या सुमारास हा शोध लागला असावा. परंतु त्या पद्धतीने संख्या लिहिल्याचें उदाहरण मात्र इ. स. ६ व्या शतकाअखेरचें आहे. त्यापूर्वीचा तसा दाखला जगांत कुठेहि उपलब्ध नाही. दशांश अपूर्णांकहि भारतीय गणितज्ञांस त्याच काळांत माहीत होते असें दिसतें.

ब्रह्मगुप्ताने आपल्या ब्राह्म-स्फुट-सिद्धांत या ग्रंथांत अंकगणितांतील वीस प्रक्रिया दिल्या आहेत. बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, वर्गमूळ, घन, घनमूळ, अपूर्णांक, त्रैराशिक, पंचराशिक, सप्तराशिक, नवराशिक, एकादशराशिक, भाण्ड–प्रतिभाण्ड, (अदलाबदल व विनिमय) इ. त्या प्रक्रिया होत.

बेरीज (संकलित) व वजाबाकी (व्युत्कलित) करण्याच्या क्रम व उत्क्रम अशा दोन पद्धती होत्या. जिच्यांत एकम्‌कडून प्रारंभ केला जातो तो क्रम व त्याच्या उलट तो उत्क्रम होय. सध्याची अंकगणिताची पद्धत क्रमपद्धतीशीं जुळती आहे. गुणाकार करण्याच्या अनेक पद्धती ब्रह्मगुप्त, श्रीधर, महावीर, भास्कर, श्रीपति, इ. गणिती पंडितांनी दिलेल्या आहेत. त्यांपैकी गोमूत्रिका पद्धति सध्याच्या पद्धतीशीं जुळती आहे. भागाकार करण्याची सध्याची रीत फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. त्याचप्रमाणे वर्गमूलादि काढण्याच्या पद्धतीहि वरील ग्रंथकारांच्या ग्रंथांत आढळतात. व्यवहारी अपूर्णांक व पदावली सोडवण्याची रीत भारतीयांना प्राचीन काळापासून ज्ञात आहे. त्याचप्रमाणे त्रैराशिकादि प्रकारहि सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीपासून भारतांत प्रचलित आहेत.

कर्जाऊ रक्कम देऊन तिच्यावर व्याज आकारण्याची प्रथाहि पुरातन आहे. पाणिनि, कौटिल्य व गौतम हे तिचा उल्लेख करतात. आर्यभटीय तसेंच गणितसारसंग्रह या ग्रंथांत व्याजाचा हिशेब करण्याच्या अनेक रीती व त्यांवरील उदाहरणें दिलेलीं आहेत.

श्रीधर, द्वितीय आर्यभट्ट, महावीर, यांनी कोणत्याहि संख्येस शून्याने गुणिलें अथवा भागिलें तर गुणाकार वा भागाकार शून्य येतो, असें लिहिलें आहे. पण त्यांत एक चूक आहे ती ही, की शून्याने एखाद्या संख्येस भागिलें असतां भागाकार शून्य न येतां अनंत येतो.

बखशाली हस्तलिपि, त्रिशतिका, गणितसारसंग्रह, गणिततिलक, लीलावती, गणितकौमुदी, पाटीसूत्र, इ. ग्रंथांमध्ये पाटीगणिताविषयी बरीच माहिती मिळते. भास्कराचार्यांनी पाटीगणिताचे आठ विभाग केले आहेत – (१) परिभाषा अथवा कोष्टकें (विविध परिमाणें). (२) परिकर्माष्टक (आठ प्रकारची बेरीज, वजाबाकी, गुणाकार, इ. कर्में). (३) व्यस्तविधि, इष्टकर्म, विषयकर्म, त्रैराशिक, इ. संकीर्ण विषय. (४) मिश्रक व्यवहार (व्याज, हौद, नळ्या, क्रयविक्रय, वर्गज्ञान (सोन्याचा कस), छंदश्चिति, शिल्प, इ.) (५) श्रेढीव्यवहार. (६) क्षेत्रव्यवहार (क्षेत्रफळ, घनफळ, चिति, राशि, छाया, इ.). (७) कुट्टक –अतिशय व्यापक स्वरूपाचा दृढभाजक. व (८) गणितपाश –यावच्छक्य भेदसंख्या सांगणें (परम्युटेशन व काँबिनेशन). अंकगणितांत हल्ली ज्या ज्या प्रकरणांचा समावेश होतो, तीं तीं बहुतेक सर्व यांत आलीं आहेत.

सांप्रत जीं अधिक, उणें, गुणिले, वगैरेंचीं चिन्हें प्रचारांत आहेत, तीं भारतांत पूर्वी ज्ञात नव्हतीं. संख्या निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या क्रमाने मांडणें, या पलीकडे कांही योजना नव्हती. कांही वर्णात्मक चिन्हें विशिष्ट ग्रंथकारांनी व्यक्तिशः योजलेलीं आढळतात; परंतु त्यांचा सार्वत्रिक प्रचार झाला नव्हता. इ. स. च्या पहिल्या शतकांतल्या एका संस्कृत ग्रंथांत युति म्हणजे बेरीज या शब्दांतील आद्याक्षर यु हें + चिन्हाऐवजीं योजलें आहे, तर सांप्रतचें + चिन्ह वजाबाकी– साठी वापरलें आहे. फल म्हणजे उत्तर, यांतील आद्याक्षर फ हें समत्वचिन्ह म्हणून योजलें असून सांप्रत त्यासाठी (=) हें चिन्ह वापरलें जातें. सध्या प्रचारांत असलेलीं चिन्हें मूळ युरोपांत उगम पावलीं आहेत.

प्राचीन गणितज्ञांना अंकांच्या अनेक श्रेणी माहीत होत्या. श्रेणींचें युग्म व अयुग्म (सम व विषम), असें विभाजन केलेलेंहि आढळतें. त्रिलोकसाराच्या लोकसामान्याधिकार या प्रकरणांत निरनिराळ्या चौदा श्रेणी दिलेल्या आहेत.

अशा प्रकारें अठरापर्यंत आकड्यांच्या प्रचंड संख्यांची गणना, दशमानपद्धति, एक ते नऊ आकडे, शून्याचा उपयोग, इ. महत्त्वाचे शोध लावून प्राचीन भारतीयांनी जी गणितशास्त्राची परंपरा सुरू केली, ती ख्रिस्ती शकाच्या १२ व्या शतकापर्यंत अबाधित चालली. ख्रिस्तोत्तर काळांत आर्यभट्ट,

ब्रह्मगुप्त, श्रीधर, पद्मनाभ व भास्कराचार्य हे महान् ज्योतिषी व गणिती होऊन गेले. त्यांनी ज्योतिषशास्त्राला साहाय्यक विषय म्हणून गणितशास्त्राचा अभ्यास केला व त्यांत अनेक शोध लावले. त्यानंतरच्या ६–७ शे वर्षांच्या अंधकारयुगांत इतर शास्त्रांप्रमाणेच या विषयांतहि कांहीं प्रगति झाली नाही. १९ व्या शतकाच्या अखेरीस मात्र एक महान् गणिती भारतांत जन्मला. त्यांचें नांव रामानुजन्. त्यांची अलौकिक बुद्धिमत्ता व गणितांतले त्यांचे विलक्षण शोध पाहून पाश्चात्त्य गणिती आश्चर्यस्तिमित झाले. लंडनच्या रॉयल सोसायटीने त्यांना F. R. S. ही सर्वश्रेष्ठ पदवी देऊन त्यांचा गौरव केला. २० व्या शतकांत अनेक भारतीय गणितज्ञांनी त्या शास्त्रांत संशोधनपूर्वक बरीच भर घातली आहे व प्राचीन भारतीय गणितपरंपरेचें पुनरुज्जीवन केलें आहे. **पाहा**—अंकविद्या. [एन्सा. रि. ए; म. ज्ञा. को; वै. वि. भा. प; वि. उ. वि.]

अंकधारणा विशिष्ट आसनबंध. याचें लक्षण—

दक्षिणं चोपविश्योरुं वामगुल्फोपरि न्यसेत् ।
वामोरौ दक्षिणं गुल्फं तच्चोपस्थमुदीरितम् ।।

(आचारेन्दु)

अर्थ –(बसतांना) उजवी मांडी डाव्या पायाच्या घोट्यावर व उजवा घोटा डाव्या मांडीवर घेऊन आसनबंध करणें. याला उपस्थ असेंहि म्हणतात. कोणतेंहि कर्म करतांना विशिष्ट आसनबंध सांगितला नसेल, तेव्हा अशा आसनबंधाने बसायचें असतें.

अंकम्म द. भारतांतील ग्रामदेवता. मारी देवतांतहि हिची गणना होते. गांवाबाहेर हिच्या नांवाने एक ओबडधोबड दगडी मूर्ति बसविलेली असते. मातीच्या गाडग्यांत कवड्या घालून त्या रूपाने घरांतहि हिची स्थापना करतात. पटकीची सांथ येते तेव्हा हिला कोंबड्या–बकऱ्यांचे बळी देतात. हिची जत्रा पांच दिवस चालते. त्या जत्रेंत हिला रेडा बळी देतात. पुजारी कुंभार असतो. रेणुकेने एका प्रसंगीं भयानक रूप घेतलें तीच ही अंकम्म होय. हिच्या अनेक दंतकथा असून त्यांत ब्राह्मणी धर्माचा उपहास आढळतो. हिलाच अंकरम्म किंवा अंगरम्म असेंहि म्हणतात. [द्र. गॅा. मॅा. हिं.]

अंकलम्म द. भारतांतील ग्रामदेवता. हिला स्त्रिया विशेषें करून भजतात. हिच्या जत्रेच्या वेळीं हिची नवी मृण्मय मूर्ति करून बसविल्यावर ग्रामीण स्त्रिया तिच्या भोवती फेर धरून रात्रभर नाचतात. हिची मूर्ति बसलेली व चतुर्भुज असते. एका हातीं पाश आणि दुसऱ्या हातीं ब्रह्मकपाल असतें. भुताने झपाटलेलीं माणसें हिच्या कृपेने बरीं होतात, अशी समजूत आहे. हिला पशुबलीच्या ऐवजी भाताचा नैवेद्य चालतो. [व्हि. गॅा. सा. इं.]

अंकविद्या आजमितीस गणितशास्त्रांत असाधारण प्रगति झाली आहे. या शास्त्राचा पाया म्हणजे दशमानात्मक संख्यालेखनपद्धति हा होय. ही पद्धति नऊ अंक व शून्याचें चिन्ह यांवर बसविलेली आहे. ही एकदम अस्तित्वांत आली नसून प्राथमिक अंकांत व संख्यालेखनपद्धतींत सुधारणा होत गेल्या, तसतशी कालांतराने आजच्या परिणतावस्थेस पोंचली आहे. मानवी व्यवहार जसजसे वाढू लागले, तसतशी मानवाला हिशेब करण्याची गरज निर्माण झाली. त्यासाठी अंक व सोयिस्कर संख्यालेखनपद्धति तयार करण्याची गरज निर्माण झाली. हिशेबाच्या निरनिराळ्या पद्धती व तदनुषंगिक अंकपाठ, माणसाला मुळांत आपल्या हाताकडे पाहून सुचले असावे, अशी सार्वत्रिक कल्पना आहे. आजहि हिशेब करण्याच्या कामीं हातांच्या बोटांचा उपयोग सर्वत्र केला जातो. तसा तो करीत असतांनाच प्राचीन काळीं कोणीतरी त्रिमान, चतुर्मान, पंचमान, दशमान, इ. गणनापद्धती बसविल्या असाव्या. राजवाडे म्हणतात, की संस्कृतांत तीन वचनें व त्यांचे प्रत्यय दिसतात, ते ज्या कोणत्या तरी काळीं आपल्या पूर्वजांना केवळ तीनच आकडे मोजतां येत होते, अशा अवस्थेचीं स्मारकें आहेत. माणसाच्या बोटांना प्रत्येकीं तीन पेरें आहेत, यावरून तिनांच्या गटांनी हिशेब करण्याची त्रिमानपद्धति सुचली असावी. अंगठा सोडून चार बोटांवर हिशेब करणाऱ्यांनी चतुर्मानपद्धति बसविली. चार बोटें व प्रत्येकाचीं तीन पेरें या सर्वांचा उपयोग करून द्वादशमान पद्धति उदयास आली. एका हाताच्या सर्व बोटांचा उपयोग करणाऱ्यांना पंचमानपद्धति व दोन्ही हातांच्या बोटांचा एकदम उपयोग करणाऱ्यांना दशमानपद्धति सुचली असावी. अशा प्रकारें हिशेब करण्याच्या कामीं हातांच्या बोटांचा उपयोग करण्याची वहिवाट सर्व देशांत पुरातन कालापासून चालत आलेली आहे.

अंक म्हणजे संख्यादर्शक दृश्य चिन्हें, अशी जर त्या शब्दाची व्याख्या केली, तर हातांचीं बोटें हेच वस्तुतः प्राचीन काळांतले अंक होते, असें म्हटलें पाहिजे. संख्या व गणित यांच्यासाठीं दृश्य चिन्हांचा उपयोग करणें, ही गोष्ट लेखनकलेहूनच नव्हे; तर दशमानात्मक संख्यावाचक परिभाषेहूनहि अधिक प्राचीन आहे. तात्पुरत्या हिशेबासाठी हातांचीं बोटें अंकाचें कार्य करीत; पण संख्यांची कायमची नोंद करून ठेवण्याची

गरज जेव्हा उत्पन्न झाली, तेव्हा त्याचबरोबर अंकासाठी कोणत्यातरी लिखित चिन्हाचीहि आवश्यकता भासूं लागली. अशा स्थितींत एक ही संख्या दर्शविण्याकरिता एक उभी रेघ ओढावी, असें त्या काळच्या लोकांना सकृद्दर्शनीं सुचलें असावें. इजिप्तमधील चित्रलिपींत एक ते नऊ अंक तितक्या उभ्या रेघांनी दाखवीत असत. दहा, शंभर व हजार या संख्यांसाठी निराळीं चिन्हें असत. लक्षाकरिता बेडकाचें व दशलक्षाकरिता आश्चर्याने बाहू पसरलेल्या माणसाचें चित्र काढीत.

सध्या उपलब्ध असलेले भारतांतले सर्वांत प्राचीन अंक हे अशोकाच्या नाणेघाटांतल्या शिलालेखांत दिसणारे अंक होत. हा लेख सनपूर्व सुमारें तिसऱ्या शतकांतला आहे. अशोकाच्या लेखांत दोनशेकरितां तीन वेगवेगळीं चिन्हें सांपडतात, त्यावरून अंकांकरितां लिखित चिन्हें वापरण्याची पद्धति भारतांत अशोकाच्याहि पूर्वी कित्येक शतकें प्रचलित असली पाहिजे. प्राचीन भारतीय अंकपाठांत एक ते तीन या संख्यांकरिता तितक्या आडव्या रेघा काढीत. चार ते नऊ यांच्यासाठीं सहा चिन्हें, दहा ते नव्वद या दशकांकरिता नऊ चिन्हें व शंभर व हजार यांकरितां एकेक चिन्ह अशीं चिन्हें अथवा अंक होते.

इजिप्शियन लोकांचे अंक व प्राचीन भारतीय अंक यांची तुलना पुढीलप्रमाणे करतां येते–

(१) दोन्ही अंकपाठांत पहिले तीन अंक रेघांनी दर्शविलेले असतात.

(२) दोन्हीकडच्या संख्यावाचक चिन्हांची संख्या सारखी असून ज्या संख्येकरिता इजिप्शियन अंकपाठांत निराळें चिन्ह असतें, त्याच संख्येकरिता भारतीय अंकपाठांतहि बहुधा निराळी आकृति दृष्टीस पडते.

(३) दोनशे, तीनशे, इ. शंभराच्या पटी दाखवणाऱ्या शतकाच्या अंकांकरिता व दोन हजार, तीन हजार, इ. हजाराच्या पटी दाखवणाऱ्या सहस्राच्या अंकांकरिता दोन्ही ठिकाणीं निराळीं चिन्हें न योजितां शंभर किंवा हजार यांच्या अंकास पटीचीं निदर्शक चिन्हेंच जोडून काम साधलेलें आहे.

पण या तीन गोष्टी सोडून दिल्या, तर इजिप्शियन व भारतीय अंकपाठांत कुठेहि सादृश्य नाही. चार या अंकाकरिता इजिप्शियन लोकांनी मूळची रेघायुक्त आकृतिच कायम ठेवली आहे, तर भारतांत त्या संख्येकरिता निराळी आकृति निर्मिलेली आहे. भारतांत दोनशे व तीनशे यांच्याकरिता शंभराच्या अंकास व दोन हजार आणि तीन हजार यांच्याकरिता सहस्राच्या अंकास उजव्या बाजूस अनुक्रमें एक व दोन आडव्या रेघा काढण्याचा प्रघात होता. पण चारशे ते नऊशे हे शतकांचे आंकडे व चार हजार ते नऊ हजार हे सहस्रकांचे आंकडे शंभराच्या व हजाराच्या अंकांस अनुक्रमें चार ते नऊ हे अंक जोडूनच सिद्ध करीत.

प्राचीन इजिप्शियन व भारतीय अशा दोन्ही अंकपाठांत जें थोडेंबहुत साम्य आढळतें, त्यावरून या उभय देशांतल्या अंकांत कांहीतरी परस्पर संबंध असला पाहिजे, हें सूचित होतें. प्राचीन काळीं भारतांत तयार झालेल्या चैनीच्या वस्तू इजिप्तच्या बाजारांत विक्रीस जात असत; त्यावरून या परस्पर संबंधाला पुरावाहि मिळू शकतो. भारतांतील लोकांनी आपले अंक निरनिराळ्या देशांतल्या अंकांपासून किंवा अक्षरांपासून बनविले, असें मत बर्नेल व बेली या पाश्चात्य पंडितांनी मांडलें आहे. पण बुल्हेरला हें मत मान्य नाही.

भारतांत कोणत्याहि प्रकारची अक्षरांकपद्धति अस्तित्वांत येण्याच्या पूर्वी कित्येक शतकें सर्वसाधारण संख्यावाचक शब्दांशिवाय दुसऱ्या कित्येक सांकेतिक शब्दांचा संख्या दर्शविण्याकरिता उपयोग केला जाई. शतपथ ब्राह्मण (१३–३–२–१) व तैत्तिरीय ब्राह्मण (१–५–११–१) यांत चार या संख्येकरिता कृत हा शब्द वापरला आहे. चौवीस संख्येकरिता गायत्री, अठ्ठेचाळीस संख्येकरितां जगती, असे सांकेतिक शब्द श्रौत सूत्रांत आढळतात. वेदांगज्योतिषांत १, ४, ८, १२ व २७ यांकरिता अनुक्रमें रूप, अय, गुण, युग व भसमूह हे शब्द वापरलेले आहेत. पिंगलाच्या छंदःसूत्रांतहि निरनिराळ्या वृत्तांत किती अक्षरांच्या नंतर यति येतो, तें सांगण्यासाठी सांकेतिक शब्द योजिलेले आहेत. सातव्या शतकानंतरच्या कित्येक ज्योतिष ग्रंथांत असे सांकेतिक शब्दांक सर्वत्र आढळतात. प्राचीन शिलालेखांतले व दानपत्रांतले शक, तसेंच संस्कृत कवींच्या ग्रंथांतील रचनेचे शक, यांतहि सांकेतिक शब्दांक वापरलेले दिसतात.

संस्कृतांत ज्योतिष व गणित या शास्त्रांवरचे ग्रंथ छंदोबद्ध असल्यामुळे त्या ग्रंथांतल्या मोठमोठ्या संख्या श्लोकांत ग्रथित करण्यासाठी ही शब्दांकांची पद्धति बरीच विकास पावली. या सर्व ग्रंथकार आचार्यांनी अंकांना स्थानीय किंमत देऊन शून्य व नऊ अंक अशा दहा चिन्हांवर बसविलेली संख्यालेखनपद्धतिच वापरली. त्यांच्या संख्यांमध्ये एकम्चा आकडा प्रथम देऊन नंतर दहम्, शतम्, इ. आंकडे यथानुक्रम सांकेतिक शब्दांनी दिलेले असतात. उदा० आकाश–पंच–वसु–पक्षः ही संख्या घ्या. तिच्यामधील आकाश, पंच, वसु व पक्ष हे शब्द अनुक्रमें शून्य, पांच, आठ व दोन या अंकांचे सूचक असून ती संख्या आकड्यांनी २८५० अशी होते.

हे शब्दांक म्हणजे व्यवहारातल्या निरनिराळ्या वस्तूंचीं किंवा कल्पनांचीं नांवें असून ते त्या त्या वस्तूंनी किंवा कल्पनांनी सूचित होणाऱ्या संख्यांकरितां योजिलेले असतात. एकच

संख्या निरनिराळ्या वस्तूंच्या किंवा कल्पनांच्या नांवांनी सूचित होणें शक्य असतें व त्या प्रत्येक नांवाला कित्येक प्रतिशब्दहि असणें शक्य असतें. त्यामुळे एकाच संख्येकरितां अनेक शब्द वापरलेले आढळून येतात. पुढील उदाहरणें पाहा–

० करितां –शून्य, ख, गगन, आकाश, नभ, पूर्ण, रंध्र, इ.
१ करितां –आदि, शशि, इंदु, विधु, अब्ज, भू, क्षिति, इ.
२ करितां –यम, अश्विन्, नासत्य, लोचन, कर, कुच, इ.
३ करितां –राम, गुण, लोक, अग्नि, इ.
४ करितां –वेद, श्रुति, समुद्र, केंद्र, वर्ण, युग, कृत, अय, इ.
५ करितां –बाण, भूत, पर्व, प्राण, पांडव, अर्थ, विषय, इंद्रिय, इ.
६ करितां –रस, ऋतु, रिपु, दर्शन, इ.
७ करितां –नग, ऋषि, वार, स्वर, धातु, छंद, इ.
८ करितां –वसु, अहि, गज, सिद्धि, भूति, मंगल, इ.
९ करितां –अंक, नंद, निधि, ग्रह, द्वार, गो, पवन, इ.
१० करितां –दिशा, अंगुलि, अवतार, इ.
११ करितां –रुद्र, भर्ग, इ.
१२ करितां –रवि, मास, राशि, व्यय, इ.
१३ करितां –विश्वेदेव, काम, अतिजगती, अघोष, इ.
१४ करितां –मनु, विद्या, इंद्र, लोक, इ.
१५ करितां –तिथि, घस्र, पक्ष, इ.
१६ करितां –नृप, अष्टि, कला, इ.
१७ करितां –अत्यष्टि.
१८ करितां –धृति.
१९ करितां –अतिधृति.
२० करितां –नख व कृति.
२१ करितां –उत्कृति, प्रकृति व स्वर्ग.
२२ करितां –कृति व जाति.
२३ करितां –विकृति.
२४ करितां –गायत्री, जिन, अर्हत्, सिद्ध, इ.
२५ करितां –तत्त्व.
२७ करितां –नक्षत्र, उडु, भ, इ.
३२ करितां –दंत, रद, इ.
३३ करितां –देव, त्रिदश, इ.
४० करितां –नरक.
४८ करितां –जगती.
४९ करितां –तान.

'अङ्कानां वामतो गतिः' या नियमानुसार या सांकेतिक शब्दांकांची उजवीकडून डावीकडे रचना करायची असते. उदा० गुण–वसु–गज–भूमिते शकाब्दे, ही संख्या वरील पद्धतीने मांडली असतां शके १८८३ असा बोध होतो.

जुन्या हस्तलिखितांत अंकांकरितां अक्षरांचाहि उपयोग केलेला दिसतो. अंकांना अक्षरांचीं रूपें देण्याची कल्पना आर्यभट्ट इ. ग्रंथकारांच्या अक्षरांकांवरूनच कांही अंशीं सुचली असावी. आर्यभट्ट (प्रथम) याने आपल्या आर्यभटीय ग्रंथांत अक्षरांकांचा प्रथम उपयोग केला. त्याच्या पद्धतींत क वर्गापासून प वर्गापर्यंतचीं पंचवीस अक्षरें पहिल्या पंचवीस अंकांकरितां नियुक्त केलीं असून त्यांपुढील य ते ह या आठ वर्णांचा अनुक्रमें ३०, ४०, ५०, ६०, ७०, ८०, ९० व १०० हे अंक दाखविण्याकरितां उपयोग केला आहे. स्वरांमध्ये ऱ्हस्व दीर्घ हा भेद मानलेला नसून अ ला एक व इ, उ, ऋ, ऌ, ए, ऐ, ओ व औ यांना अनुक्रमें शंभर व शंभराचा दुसरा, तिसरा, चौथा, पांचवा, सहावा, सातवा, व आठवा, घात असे अर्थ दिलेले आहेत. व्यंजनाला जोडलेला स्वर व्यंजनाच्या संख्येची आपल्या संख्येइतकी पट दर्शवीत असून संयुक्त व्यंजनांतील स्वर त्याच्या अवयवीभूत प्रत्येक व्यंजनाबरोबर घ्यायचा असतो. उदा० महायुगांत किती भूभ्रमणें होतात, हें आर्यभट्टाने ङिशिबुण्ऌष्खृ या अक्षरांकसंख्येने सांगितलें असून ती संख्या १५,८२,२३,७५,२०० इतकी होते.

दुसऱ्या आर्यभट्टाने आपल्या आर्यसिद्धांतांत नऊ अंक व शून्य या दहा चिन्हांकरितां वर्णमालेच्या पहिल्या दोन वर्गांतील (क, च) दहा अक्षरें यथानुक्रम घेतलीं असून पुढच्या दोन वर्गांतील (ट, त) दहा अक्षरें पुन्हा त्याच अंकांकरितां यथानुक्रम योजिलीं आहेत. राहिलेल्या व्यंजनांपैकी प वर्गाचीं अक्षरें पहिल्या पांच अंकांसाठीं व यरलवादि आठ अक्षरें पहिल्या आठ अंकांसाठी योजलेलीं आहेत. या पद्धतीला कटपयादि क्रम असें म्हणतात. यांत स्वरांना कोणताच अर्थ नाही. यांतील संख्यालेखनपद्धति 'अङ्कानां वामतो गतिः' या सर्वसाधारण नियमाच्या उलट आहे. या पद्धतीप्रमाणें एकम्चें अक्षर सर्वांत शेवटीं, दहम्चें अक्षर त्याच्या पूर्वीं, शतम्चें अक्षर दहम्च्याहि आधी असा क्रम पाळलेला आहे. उदाहरणार्थ क, ण, ध, ज्ञ, झ्, ञि, ला, या अक्षरसंख्येचा अर्थ १५९९९९३ असा होतो. (आर्यसिद्धांत २.९)

वर सांगितलेल्या दोन अक्षरांकपद्धतींपैकी पहिल्या आर्यभट्टाची पद्धति त्याच्या ग्रंथाबाहेर अन्यत्र दृष्टीस पडत नाही. पण दुसऱ्या आर्यभट्टाचा कटपयादिक्रम कित्येक शिलालेखांतून दिसून येतो. षड्गुरुशिष्य याने सर्वानुक्रमणीवर लिहिलेल्या वेदार्थदीपिका या टीकेंत हा क्रम वापरलेला आहे (इंडियन अँटिक्वेरि पुस्तक २१ पृ. ५०). उत्तरकालीन लेखकांनी या कटपयादि क्रमांत बदल केला तो असा, की ते 'अङ्कानां वामतो गतिः' या नियमाप्रमाणे आपल्या संख्या लिहूं लागले.

याशिवाय केरळ व आंध्र या प्रदेशांत अक्षरांकांची आणखी एक पद्धति दिसून येते. तींत क पासून ळ पावेतों ३४ वर्ण अनुक्रमें पहिल्या ३४ अंकांकरितां योजले असून पुढच्या ३४ अंकांकरितां का, खा, इ. आकारयुक्त व्यंजनें, त्यापुढील ३४ अंकांकरितां कि, खि इ. इकारयुक्त व्यंजनें अशा रीतीनें बाराखडींतील सर्व अक्षरांचा उपयोग करून ४०८ पावेतोंचे अंक अक्षरांनी दाखविलेले असतात. ब्रह्मदेशांतील कांही जुन्या हस्तलिखित ग्रंथांत १ ते १२ करितां क ची बाराखडी, १३ ते २४ करितां ख ची, २५ ते ३६ करितां ग ची अशा प्रकारें सर्व व्यंजनांच्या बाराखड्यांचा, अंक दर्शविण्यासाठीं उपयोग केलेला आहे. लंकेंतल्या हस्तलिखितांतहि पृष्ठांक दर्शविण्याच्या कामीं याच अनुक्रमाने बाराखड्यांतील अक्षरें योजिलीं आहेत.

अंकांकरितां अक्षरांचा उपयोग पहिल्या आर्यभट्टापूर्वी कोणीहि केलेला दिसत नसला, तरी अक्षरांकपद्धतीचा जनक तोच होता, असें मात्र निश्चितपणे सांगतां येत नाही. कारण पाणिनीच्या १–३–११ या सूत्रावरील कात्यायनाचें वार्तिक व कैयटाने दिलेलें त्याचें उदाहरण यांचें अवलोकन केल्यावर असें कळतें, की स्वरित चिन्हांमध्ये १, २, ३, इ. संख्या दर्शविण्याकरितां शिवसूत्रांतील वर्णक्रमानुसार अक्षरें वापरलीं आहेत.

आज सर्वत्र प्रचारांत असलेली केवळ संख्यालेखन पद्धतिच नव्हे; तर नऊ प्राथमिक अंक व शून्य यांचीं चिन्हेंहि मुळांत हिंदीच आहेत. दहाव्या शतकाच्या उत्तरार्धांत ऱ्हीम्स येथें जर्बट यानें स्थानरेषापटावर वापरलेलीं चिन्हें काय, किंवा जॉमेट्रियाचें कर्तृत्व ज्याच्याकडे देण्यांत येतें त्या बोएशसचीं पांचव्या शतकांतील चिन्हें काय, हीं नवीन संख्यालेखनपद्धतींतील त्या त्या हिंदी अंकांसारखीं असून पुन्हा हे नवीन हिंदी अंक जुन्या हिंदी संख्यालेखनपद्धतींतील अंकांपासून तयार झालेले आहेत. अरबांनी आपले अंक हिंदी अंकांपासून तयार केले असें अल्‌बिरूनीनेच म्हटलें आहे. अरब लोकांत दोन प्रकारचे हिंदी अंक प्रचलित होते. पश्चिमेकडे ज्यांचा प्रसार होता त्यांस घोबर (धूळ) अंक असें म्हणत असत. पूर्वेकडील व पश्चिमेकडील अरबी अंकांत विशेष फरक आढळून येत नाही, हें जरी खरें असलें, तरी नवीन पद्धतीचें संख्यालेखन सुरू होण्यापूर्वी युरोपांत स्थानरेषापटावर जे अंक वापरण्यांत येत होते, त्यांचें पूर्वेकडील अरब अंकांपेक्षा स्पेन व आफ्रिका या देशांत प्रचारांत असलेल्या घोबर अंकांशीं अधिक साम्य होतें.

अंकांमध्येहि शुभाशुभ कल्पना व्यक्त झालेली आहे. अनेक जातीजमातींच्या लोककथांत ३, ४, ५, १२, ४०, १००, या संख्या शुभ व पवित्र मानलेल्या आढळतात. सुधारलेल्या समाजांतहि अंकांविषयी शुभाशुभ कल्पना प्रचलित आहेतच. पाश्चात्य देशांत तेरा ही संख्या अशुभ मानतात. भारतीय जातकशास्त्रांत आठ हा अंक व कुंडलीतलें अष्टम स्थान मृत्युसूचक मानलेलें आहे. तीन हा अंकहि असाच अशुभ मानलेला आहे. 'न गच्छेत् ब्राह्मणत्रयम्' म्हणजे तीन ब्राह्मणांनी (किंवा माणसांनी) एकदम एखाद्या कार्यासाठी जाऊं नये; गेल्यास कार्यनाश होतो, अशी समजूत आहे. तीन व त्याची कोणतीहि पट या संख्यांना गूढविद्येंत विशेष महत्त्व आहे. वैदिक वाङ्मयांत तीन व त्याने भाग जाणाऱ्या संख्या यांचा उल्लेख अनेक वेळां आला आहे. वेदांत विश्वाची विभागणी पृथिवी, द्यौः व अंतरिक्ष अशा तीन लोकांत केलेली आढळते. सात या आंकड्यालाहि असेंच महत्त्व आहे. पृथ्वीचीं द्वीपें सात, अग्नीच्या जिव्हा सात, सूर्याच्या रथाचे अश्व सात, मरुत् तीन × सात, ऋषि सात, वायु सात × सात, इत्यादि. अकरा ही संख्या रुद्रांची, बारा आदित्यांची, एकवीस गणपतीची, सहा स्कंदाची, सात मातृकांची, तीन गौरींची, अशा विशिष्ट संख्या विशिष्ट देवतांच्या साठी निश्चित केलेल्या आहेत. पितरांचीं कुळें नऊ व दहा या संख्यांशीं निगडित आहेत. बौद्ध धर्मात सात या अंकाला विशेष मान आहे. बुद्धाचीं सात रत्नें, सात पवित्र स्थानें इत्यादि. काही प्राचीन ग्रंथांत सात, दहा, सत्तर या संख्यांनी पूर्णत्व सूचित केलें आहे. **पाहा**—अंकगणित. [म. ज्ञा. को; विज्ञानेतिहास; प्रा. भा. लि. मा.; एन्सा. रि. ए.]

अंकाई–तंकाई नासिक जिल्ह्यांत सह्याद्रीच्या रांगेंत हें स्थान आहे. याची उंची ३१८२ फूट आहे. या ठिकाणीं एक किल्ला असून जैनांच्या सात गुंफा आहेत. या लहान असल्या तरी शिल्पकलेच्या दृष्टीनें प्रेक्षणीय आहेत. [खं. वै.]

अंका मिरी आसामांत सुंद्री नदीच्या विस्तीर्ण खोऱ्यांत राहणारी एक जमात. हे शेतकरी आहेत. यांची जमीन महामूर पिकते. हे कापडहि विणतात. यांच्या बायका निळे परकर व त्यांवर कुडतीं वापरतात. यांचें स्थान पर्बतिया मिरींच्या वायव्येस आहे. यांच्या स्त्रिया तोंडावर गोंदून घेतात म्हणून आसामी लोक त्यांना अंका (अंक = गोंदणें) म्हणतात. हे लोक तेनाय असें आपल्या जमातीचें नांव सांगतात. यांच्या चालीरीति पदम अबोरांप्रमाणें आहेत. ते दिसतातहि अबोरांसारखेच. हे शांतताप्रिय आहेत; पण लुटारूंपासून स्वतःचें संरक्षण करण्यासाठी त्यांना शस्त्रसज्ज राहावें लागतें. हे गनिमी काव्याने न लढतां आगाऊ जाहीर करून शत्रूवर छापा घालतात. ते पुरुष शत्रूंना झोडपतील, ठार करतील; पण त्यांच्या बायकामुलांना मात्र हात

लावणार नाहीत. **पाहा** – पर्वतिया मिरी; पदम अबोर. [दि. मिरीज् अँड् हिल मिरीज्–डॉल्टन]

अंकिया एक आसामी नाटचप्रकार. बंगालमधलें कीर्तनिया नाटच १६–१७ व्या शतकांत आसाममध्ये अंकिया या रूपांत प्रचलित झालें. त्यांत पद्याच्या जागीं गद्याला महत्त्व मिळालें. करमणूक हेंच केवळ त्याचें उद्दिष्ट न राहतां त्याच्या द्वारें वैष्णव धर्माचा प्रचारहि होऊं लागला. अंकिया म्हणजे एकांकी नाटक होय. शंकरदेव व गोपाळदेव हे आसाममधले लोकप्रिय अंकियाकार होत. **पाहा** – कीर्तनिया, असमिया भाषा व साहित्य; शंकरदेव. [लो. ध. ना.]

अंकुरविधि बोंडो आदिवासींची पितृक्रिया. **पाहा**–बोंडो.

अंकुरारोपण म्हणजे धान्याचे अंकुर वाढविणें. लिंगायत व रड्डी लोकांत लग्नप्रसंगीं हा विधि करतात. लग्नाच्या आदल्या दिवशीं पुरोहित साळी, गहू, हरभरे, ज्वारी व काळे वाटाणे अशीं पांच धान्यें घेऊन तीं एकत्र मिसळतो व वारुळाची माती घालून भरलेल्या मातीच्या भांडचांत तीं पेरतो. पेरतांना सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान या शिवरूपांचे मंत्र म्हणतो. त्याचबरोबर भूमातेचीहि प्रार्थना करतो. नंतर १५ दिवस वधू-वरांच्या पक्षांतील मंडळी पाणी घालून ते अंकुर वाढवतात. १६ व्या दिवशीं वराकडील माणसें तें उगवलेलें शेत घेऊन वधूच्या घरीं जातात. वरमाता त्यांतले कांही अंकुर वधूच्या केसांत माळते व उरलेले सुवासिनींना वांटते. हें विधान वंशवृद्धीसाठी असतें. [की. पॉ.]

अंकुरार्पण जैनांचा लग्नविधि पाहा.

अंकुश (१) लांकडी दांडचाला बसविलेलें आंकडीसारखें हत्यार. हत्तीला ताब्यांत ठेवण्यासाठी हें त्याच्या गंडस्थळाला टोंचतात. गणपति हा अंकुशधारी आहे. 'पाशमङ्-कुशधारिणम् ' असें त्याचें वर्णन आहे (ग. अथ.). कित्येक देवतांच्या हातीं अंकुश असतो. (२) जैन यतींचें एक उपकरण. याच्या साह्यानें फांदी वाकवून ते पानें फुलें तोडतात. अंकुशाच्या डोक्यावर वज्र असतें तेव्हा त्याला वज्रांकुश म्हणतात. **पाहा**–वज्र.

अंग (१) देश व लोक. हें नांव सर्वप्रथम अथर्ववेदांत सांपडतें (५.२२.१४). महाभारताच्या मताप्रमाणें अंग–वंग हा एकच देश असून तो कर्णाच्या आधिपत्याखालीं होता. हें अंग देशाचें राज्य दुर्योधनानें कर्णाला दिलें होतें (सभा. ४४.९). शिवाच्या क्रोधानें आपण भस्मीभूत होऊं, या भयाने मदन त्याच्या आश्रमांतून पळत सुटला व त्यानें ज्या ठिकाणीं आपलें शरीर (अंग) टाकलें, तो देश पुढें अंगदेश या नांवाने प्रसिद्ध झाला (वारा. बाल. ३२). त्यापूर्वी याला कामाश्रम असें नांव होतें. शक्तिसंगमतंत्रांत याचा विस्तार पुढील प्रमाणे सांगितला आहे–

वैद्यनाथं समारभ्य भुवनेशान्तगं शिवे ।
तावदङ्गाभिधो देशो यात्रायां न हि दुष्यति ।।

अर्थ – वैद्यनाथापासून भुवनेश्वरापर्यंत अंगदेश समजावा. हा यात्रेंत दूषित नाहीं.

प्राचीन भारतांतील सोळा महाजनपदांपैकी अंग हें एक महाजनपद होतें व तें समृद्ध होतें (योगिनीतंत्र २.२.११९). बिहार प्रांताच्या पूर्व भागांत हें वसलें होतें. पाणिनीनें अंग, वंग इत्यादींचा एकत्र उल्लेख केला असून (अष्टा. ४.२.१३८) गोपथ ब्राह्मणांत त्याचा मगधांशीं संबंध दाखविला आहे. (२.९)बलीची पत्नी सुदेष्णा हिच्या ठिकाणीं दीर्घतमा ऋषीने पांच पुत्र उत्पन्न केले व त्यांनी आपापल्या नांवाचीं राज्यें वसविलीं, अशी कथा महाभारतांत आहे (आदि. १०५).

अंग लोक हे अनार्य असून ते समुद्रापलीकडून भारताच्या पूर्व भागांत आले, असें पार्गिटरचें मत आहे (जर्नल रॉ. ए. सो. १९०८). पण या विधानाला वैदिक वाङ्मयांत पुरावा मिळत नसल्याचें डॉ. केतकर म्हणतात.

दशरथाच्या काळीं रोमपाद नांवाचा त्याचा मित्र अंगदेशावर राज्य करीत होता. त्याच्या राज्यांत एकवार अवर्षण पडलें तें ऋष्यशृंगाने दूर केलें म्हणून त्याने ऋष्यशृंगाला शांता ही आपली कन्या दिली. अंग देशाची राजधानी चंपा ही असून तिचा पाया याच रोमपाद राजाचा पणतू चंप याने घातला. भागलपूरजवळील चंपानगर व चंपापूर हीं दोन गावें मिळून होणारें क्षेत्र एवढा प्राचीन अंगाच्या राजधानीचा आवाठ होता. त्या पूर्वी चंपा नगरीचें नांव मालिनी असें होतें. जातकांत हिला कालचंपा म्हटलें आहे (महाजनजातक). काश्मीरजवळच्या हिमाच्छादित श्वेतचंपेहून हिचें वेगळेपण दाखविण्यासाठी हिला कालचंपा म्हटलें गेलें. वैद्यनाथ ते भुवनेश्वर एवढा प्राचीन अंगदेशचा विस्तार होता. सध्याचे मोंघीर व भागलपूर हे बिहारांतले दोन जिल्हे प्राचीन अंगांत समाविष्ट होते. नदीकिनारीं वसल्यामुळे ही नगरी व्यापाराचें मोठें केंद्र होती. इथले व्यापारी आपल्या होडचा घेऊन व्यापारासाठी मलाया, सुमात्रा पर्यंत जात होते. या नगरांतल्या लोकांनी हिंदचीनमध्ये आपल्या

नांवाने उपनिवेश स्थापले होते. लोकांकडून कर वसूल करण्यासाठी या नगरींत जकातघरें होतीं. इथले लोक भार्या व मुलें यांची विक्री करीत व रोगग्रस्त लोकांना टाकून देत, अशी माहिती महागोविंदसुत्तांत दिलेली आहे. अंगदेशांत एक स्वतंत्र लिपी चालत असल्याचें ललितविस्तरांत म्हटलें आहे.

अंग देश हें जैन धर्माचें मोठें केंद्र होतें. बारावा तीर्थंकर वासुपूज्य याचा जन्म व निर्वाण इथेच झालें. महावीराने आपले तीन चातुर्मास्य इथेच केले. ब्रह्मदत्त हा अंगदेशाचा शेवटचा राजा होय. त्याच्यानंतर अंगदेश मगधांचा अंकित झाला आणि मगधांचें एक अंग बनून राहिला. मगधराजा बिंबिसार याने राज्याभिषेकानंतर (सन पूर्व ५३०) थोड्याच काळांत अंगदेश हस्तगत केला. पुढे ७ व्या शतकांत केव्हा तरी तो पुनश्च स्वतंत्र झाल्याचें आढळतें. बुद्धाच्या काळीं अंगदेशांत कित्येक महाशाला वा स्नातकसंस्था होत्या व बिंबिसार राजानें त्यांच्या खर्चासाठीं जमिनी तोडून दिल्या होत्या. बुद्ध अनेकवार चंपानगरींत आला होता व त्याने इथल्या गग्गरा पोखरिणी नांवाच्या सरोवराकांठीं विश्राम केला होता. इथेच त्याने विशाखा नांवाच्या शिष्येला आपल्या धर्माची दीक्षा दिली. बुद्धाच्या उपदेशाने इथल्या पुष्कळ ब्राह्मणांनी बौद्ध धर्म स्वीकारला. बुद्धाने नवा धर्म अस्तित्वांत आणल्यानंतर पहिल्या दहा वर्षांच्या काळांतच चंपा आणि तिच्या आसपासचीं नगरें यांमध्ये त्या धर्माचीं केंद्रें निर्माण झालीं. त्या प्रत्येक केंद्रांत एकेक भिक्षुसंघ राहून धर्मप्रसाराचें काम करीत असे.

नवव्या शतकांत अंगदेशांत पाल घराणें उदयास आलें व त्यानें आपली सत्ता संपूर्ण उत्तर बंगाल व बिहार या प्रांतांवर बसविली. नंतर अंगदेशाचें नांव फारसें निघत नाहीं. मुसलमानी अमदानीच्या पूर्व काळांत गौडदेशाच्या एका राजघराण्याकडे हा प्रदेश होता.पुढें अकबरानें तो आपल्या साम्राज्यांत समाविष्ट केला. इ.स.१७६५ सालीं शहा अलम बादशहानें बंगाल, बिहार, उडीसा यांची सनद ईस्ट इंडिया कंपनीला करून दिली, तेव्हा हा देशहि त्याबरोबरच ब्रिटिशांच्या ताब्यांत गेला. [हि. जॉ. ए. इं.; प्रा. मौ. बि; म. ज्ञा. को.]

(२) उल्मुक व पुष्करिणी यांचा पुत्र. हा कृत युगाच्या अंतीं प्रजापति होता. वेन हा याचा पुत्र होय.

(३) नैयायिकांच्या मतें प्रयोजक किंवा उपकारक. मीमांसकांनीं याची व्याख्या केली आहे ती अशी – फलवत्सन्निधौ अफलं तदङ्गम् = स्वर्गादि फल देणाऱ्या मुख्य यागांच्या अनुषंगाने फल न सांगितलेले प्रयाज, अनुयाज इ. जे याग केले जातात, ते अंग होत.

(४) जातकशास्त्रांत लग्नाला अंग म्हणतात.

अंग-उपांग श्वेतांबर जैनांच्या आगमांचा एक भाग. अंगांची संख्या बारा आहे.

(१) **आचारांगसूत्र** – याचे दोन भाग असून त्यांना श्रुतस्कंध असें म्हणतात. या ग्रंथांत जैन साधूंच्या आचारांचें वर्णन आहे. हा ग्रंथ गद्यपद्यमिश्रित आहे.

(२) **सूत्रकृतांग** – यांत जैन साधूंची जीवनचर्या वर्णिलेली असून त्याबरोबरच जैनेतर मतांचें खंडनहि आहे. याचेहि दोन भाग असून ग्रंथ विविध छंदांत निबद्ध आहे.

(३) **स्थानांग** – यांत बौद्धांच्या अंगुत्तरनिकायाप्रमाणे एक ते दहा अशा चढत्या संख्या घेऊन धार्मिक विषयांचें विवेचन केलेलें आहे.

(४) **समवायांग** – यांत निमच्या अंगांत आलेल्या विषयांचेंच अधिक वर्णन आहे.

(५) **भगवतीसूत्र** – महावीराच्या महनीय व्यक्तित्वाचे अनेक पैलू दाखवणारा हा ग्रंथ आहे. महावीराचे शिष्य, त्याच्या समकालीन व्यक्ति आणि त्यांचें प्रभावी व्यक्तिमत्त्व यांचें विवरण देणारा हा ग्रंथ ऐतिहासिक दृष्टीनेहि श्रेष्ठ आहे.

(६) **नायाधम्मकहाओ** (सं. ज्ञानधर्मकथा) – यांत जैन धर्मातील आचार आणि तत्त्वज्ञान यांचें विशद रूपानें वर्णन करणाऱ्या कथांचा संग्रह आहे. वाङ्मयीन दृष्टीनेंहि या कथा मनोज्ञ आहेत. बौद्ध धर्मांत जातककथांना जें महत्त्वपूर्ण स्थान आहे, तेंच जैन धर्मांत या कथांना आहे.

(७) **उपासगदसाओ** (सं. उपासकदशांग) – या ग्रंथांत उपासकांच्या कर्तव्यांचें विस्तृत वर्णन आहे.

(८) **अन्तकृद्दशा** – याचा अर्थ ज्यांनी संसाराचा अंत केला, अशा साधूंच्या संबंधीं दहा अध्याय. यांवरून वाटतें, की या ग्रंथाचे दहा परिच्छेद असावे. पण आज त्यांपैकीं आठच उपलब्ध आहेत.

(९) **अनुत्तरौपपातिकदशा** – याचा अर्थ सर्वांत उच्च अशा स्वर्गाची प्राप्ति करून घेणाऱ्या यतींच्या संबंधीं दहा अध्याय. पण सांप्रत यांतले तीनच उपलब्ध आहेत. यांत श्रीकृष्णाचें चरित्र जैनांच्या दृष्टीने वर्णिलेलें आहे. इथे श्रीकृष्ण जैन धर्मी मानलेला आहे.

(१०) **प्रश्नव्याकरण** – यांत जैन धर्माचे उपदेश प्रश्नोत्तररूपाने सांगितले आहेत.


(११) **विपाकसूत्र** – विपाक म्हणजे सर्व प्रकारचीं कर्में परिपक्व होणें. यांत शुभाशुभ कर्मांचें फल सांगितलें आहे.

(१२) **दृष्टिवाद** – हें अंग आजमितीस लुप्त आहे. फक्त त्याचे उल्लेख कांहीं ग्रंथांत मिळतात.

उपांग – जैनांच्या प्रत्येक अंगाच्या बरोबरीनें एकेक उपांग त्याला जोडलेलें असतें. यांची संख्याहि बाराच आहे. या उपांगांचीं नांवें पुढीलप्रमाणे – (१) औपपातिक (२) राजप्रश्न (३) जीवाधिगम (४) प्रज्ञापना (५) जंबुद्वीपप्रज्ञप्ति (६) चंद्रप्रज्ञप्ति (७) सूर्यप्रज्ञप्ति (८) निरयावली (पाठभेद-कल्पिका), (९) कल्पावतंस, (१०) पुष्पिका, (११) पुष्पचूलिका व (१२) वृष्णिदशा (पाठभेद-वंह्दिदशा). [आ. सं.]

अंग औरव सूक्तद्रष्टा. अधार्मिक दासांना आर्य यथायोग्य प्रतिस्पर्धी भेटले, असें हा म्हणतो. इंद्राने पिप्रूचे दुर्ग फोडले, यज्ञविमुख राक्षसांना ठार केलें, महिने कुठून कसे धरावे तें सांगितलें आणि आकाशांत (नक्षत्ररूप) चक्राच्या परिधीचे विभाग पाडले, असें याने सांगितलें आहे (ऋ. १०.१३८).

अंगठी सोनें, रुपें, इ. धातूचें बोटांत घालण्याजोगें वळें किंवा कडें. अंगठी वाटोळी असते; पण कित्येकदा चौकोनी, अष्टकोनी, असाहि तिचा आकार असतो. कित्येकदा अंगठीवर कोंदण बनवून त्यांत एखादा खडा बसवतात. अंगठी घालून आपलीं बोटें अलंकृत करणें ही आवड पुरातनकालापासून सर्वत्र दिसून येते. ज्या काळीं लेखनकला फार थोड्या लोकांना अवगत होती, त्या काळीं आत्मविशिष्ट चिन्हें अंगठ्यांवर खोदून महत्त्वाच्या कागदपत्रांवर त्यांचा शिक्का उठवीत व असे शिक्के त्या लेखांचा खरेपणा सिद्ध करण्यास उपयोगी पडत.



अंगठ्यांचे प्रकार

ऋग्वेदकालापासून भारतांत अंगठीचा उपयोग होत असलेला दिसतो. ऋग्वेदांत मरुतांचें वर्णन करतांना ते खादियुक्त असतात, असें म्हटलें आहे (ऋ. २.३४.२). खादि म्हणजे अंगठी असा अर्थ सायणाचार्यांनी दिला आहे. मरुतांना हिरण्यखादयः (सोन्याच्या अंगठ्या घालणारे) असें शांखायन श्रौतसूत्रांतहि म्हटलें आहे. धार्मिक विधीच्या वेळीं दर्भाचें पवित्रक (अंगठीच्या आकाराची दर्भग्रंथि) बोटांत घालण्याची पद्धति सूत्रांत आढळत नसली, तरी ती स्मृतिकालांत सुरू झालेली दिसते. या पवित्रकाची ग्रंथि इंग्रजी आठ या आंकड्यासारखी असते. कित्येकदा दर्भाच्या ऐवजी सोन्याचेंच पवित्रक करून तें बोटांत घालतात. तें असलें की मग दर्भाचें घालावें लागत नाही.

खुणेची अंगठी हा एक कथासाहित्यांतला महत्त्वाचा कल्पनाबंध आहे. अंगठीवर स्वतःचें नांव खोदून प्रसंगीं तिचा खुणेसाठी उपयोग करणें ही चाल रामायणाइतकी तरी प्राचीन आहे. हनुमान् सीताशुद्धीसाठी निघाला असतां सीतेची भेट झाल्यास तिला खूण पटावी म्हणून रामाने आपल्या नांवाची अंगठी त्याच्या स्वाधीन केली होती (वारा. किष्कि. ४४.१२). कालिदासाचें अभिज्ञान शाकुंतलम् हें नाटक अशा खुणेच्या अंगठीवरच आधारलेलें आहे. राजकीय व्यवहारांतहि अंगठ्या म्हणजे मुद्रा यांना प्राचीन काळापासून महत्त्व आहे. राजमुद्रा ही राजाच्या अधिकारचिन्हांतली एक वस्तु होती व ती प्रत्येक राजशासनावर उठवावी लागे. त्याशिवाय राजाज्ञेला प्रामाण्य नसे. त्यामुळे अशा अंगठीला फार जपावें लागे. या अंगठ्यांचा परवान्यासाठीहि उपयोग करीत.

केवळ हस्तभूषण म्हणूनच अंगठी घालण्याची चाल पडलेली नाही. तिच्यामागे संरक्षणाचीहि कल्पना आहे. जादूटोण्यांत वर्तुळाला फार महत्त्व असतें. एखाद्या माणसाला भुतांखेतांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी त्याच्याभोवती पाणी, वाटोळे खडे, कांटे, तांदूळ, विस्तव, इ. वस्तूंनी वर्तुळ करून तें मंत्राने भारतात. कित्येक वेळां स्वतःच्या सुरक्षिततेसाठी मांत्रिकच अशा वर्तुळांत बसून आपले प्रयोग करीत असतो. अशा वर्तुळांचेंच छोटें प्रतीक म्हणजे अंगठी. मंतरलेली अंगठी बोटांत घातल्यानें पिशाचादिकांची बाधा होत नाही अशी सार्वत्रिक समजूत आहे. नवग्रहांची बाधा होऊं नये म्हणूनहि विशिष्ट रत्नांच्या अंगठ्या वापरतात.

विवाहाच्या वाङ्निश्चयाच्या वेळीं वराने वधूच्या बोटांत अंगठी घालण्याची चाल पाश्चात्य देशांत सर्वत्र आहे. विवाहाची शपथ म्हणून अंगठीचा उपयोग करण्याची पद्धत प्रथम इजिप्तमधल्या लोकांनी सुरू केली, असें एच्लर म्हणतो (Customs of mankind). प्राचीन इजिप्शियन साहित्यांत अशा अंगठ्यांचे पुष्कळ उल्लेख आहेत. अंगठी वाटोळी असते आणि वर्तुळाला शेवट नसतो; म्हणून विवाहबद्ध होणाऱ्या वधूवरांचें प्रेम चिरकाळ टिकावें या हेतूने ही वाङ्निश्चयाची अंगठी देण्याची चाल पडली असावी. स्त्री-पुरुषांचें जीवन एकटेपणीं अपूर्ण असतें व तें विवाहमीलनाने परिपूर्ण होतें, हीहि कल्पना याच्या मुळाशी असणें शक्य आहे. प्राचीन काळीं पळवून आणलेल्या स्त्रियांच्या हातांत वाटोळ्या बेड्या किंवा कडीं घालीत. त्याचेंच स्मारक प्रतीक म्हणून वराने वधूला

अंगठी घालण्याची पद्धत सुरू झाली असावी, असाहि कांहीं संशोधकांचा तर्क आहे. वाङ्‌निश्चयाची ही अंगठी प्रथम साधी व लोखंडाची असे. पण दुसऱ्या शतकापासून ती सोन्याची झाली व पुढे तिचा विवाहाच्या धार्मिक विधींतहि समावेश झाला.

मोहोरेची अंगठी घालण्याची चालहि बरीच जुनी आहे. बायकांत हिचा बराच प्रचार आहे. विधवा स्त्रियाहि अशा अंगठ्या वापरतात. महाराष्ट्रांत मुनमुख या वैवाहिक सोहळ्यांत मोहोरेच्या अंगठीची गरज असते. श्रीमंत लोक मोहोरेच्या अंगठ्या वापारतात, त्याप्रमाणें गोरगरीब चांदीच्या अंगठ्यांवर चवली, पावली बसवून ती हौस भागवतात. जयपुरी अंगठ्या फार प्रसिद्ध आहेत. उत्तर भारतांत मिन्याच्या सुंदर अंगठ्या बनतात. सुवासिक अंगठ्या, देवदर्शनी अंगठ्या, इष्ट कामना पुरवणाऱ्या अंगठ्या, असे अनेक प्रकार बाजारांत विक्रीस असतात.

वरगृहीं नवोढेचें नामकरण करतांना व बालकाच्या नामकरण संस्कारांत सुवर्णशलाकेऐवजी अंगठीनेच नांव लिहिण्याची पद्धति आहे. कोकणांत लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं वधू-वरांचा अंगठीचा खेळ होतो. परातींतल्या हळदीच्या पाण्यांत अंगठी टाकून ती वधू-वरांना शोधायला लावतात. वधूला ती मिळाली तर तिचा जय होतो व वराला मिळाल्यास वधू ती त्याच्याकडून मागून घेते व आपल्या बोटांत घालते. [एन्सा. रि. ए.; म. ज्ञा. को.]

अंगड शाह (१५०४ – १५५२ इ. स.) शीखांचा एक धर्मगुरु. हा खत्री जातीचा असून नानकाच्या मागून गुरु झाला. आपल्या मुलांना वगळून नानकाने याला आपल्या गादीचा वारस नेमलें. याची कथा सांगतात ती अशी –

नानक आपल्या शिष्यांसह प्रवास करीत असतां त्याला वाटेंत एक प्रेत दिसलें. तें पाहून नानक आपल्या शिष्यांना म्हणाला, की जर तुमची माझ्यावर श्रद्धा असेल, तर तुम्ही हें अन्न (प्रेत) भक्षण करा. या आदेशाला बाकीचे शिष्य कचरले; पण अंगड पुढे झाला. तो तें प्रेत खाण्यासाठीं त्यावरचें आच्छादन काढूं लागला. पण एवढ्यांत प्रेत अदृश्य झालें व त्या जागीं पवित्र अन्नाचें ताट प्रकट झालें. त्या वेळीं नानकानें अंगडाला आलिंगन देऊन म्हटलें, की तूं माझीच प्रतिमा असून माझें तेज तुझ्या ठिकाणीं राहील. तेव्हापासून शीख लोक त्याला नानकाचा अंश समजून भजूं लागले.

गुरुमुखी लिपि अंगडशाहाने शोधून काढली व 'ग्रंथ साहिब' विस्तृत केला, अशी आख्यायिका आहे. याहून याची अधिक माहिती मिळत नाही. याने आपल्या मागून अमरदासाला गुरु म्हणून नियुक्त केलें. [शी. स्फू. इ.; म. ज्ञा. को.]

अंगण घरापुढील मोकळी व वापरांतली मर्यादित जागा. **पाहा**–प्रांगण.

अंगद अंगद व केयूर हे रत्नजडित सुवर्णालंकार दंडांत घालायचे असतात. यांपैकी कांहींची घडण वेलीसारखी, तर कांहींची मकराकृति असते. याच्या वरच्या अंगाला टोक असतें. हें दंडांत घट्ट बसवतात. प्राचीन काळीं स्त्री–पुरुष दोघेहि वापरीत. **पाहा**–केयूर; अलंकार.

अंगदूषण स्थापत्य शास्त्रांतली एक संज्ञा. याचा अर्थ एखाद्या वास्तूची, लांबी, रुंदी, उंची, जोतें, इ. अवयवांची सदोष रचना.

> **आलयाद्यङ्गसर्वेषु हीनाधिक्यं भवेद्यदि ।**
> **राजाराष्ट्रादिकर्तृणां दोषप्राप्तिरिहोच्यते ।।**
>
> (मानसार)

अर्थ — वास्तूच्या सर्व अवयवांत कुठे कमीअधिकपणा निर्माण झाल्यास तो दोष राजा, राष्ट्र व बांधकाम करणारा या सर्वांना बाधतो. [एन्सा. हिं. आ.]

अंगदेवता स्मार्त आणि पौराणिक कृत्यांतील मुख्य देवतेच्या अनुषंगाने असणाऱ्या देवतांना हें नांव आहे. [सं. कौ.]

अंगदेव्यंतर हृद्देवीचें व इतर देवतांचें वसतिस्थान. [ब्रह्मांड पु. ४.३७]

अंगद्वीप जंबुद्वीपाचा पोटभाग. म्लेच्छ प्रदेश. [वायु पु. ४८.१४ – १८]

अंगपूजा व्रतोत्सवादि प्रसंगीं केल्या जाणाऱ्या षोडशोपचार पूजेंतली एक अवांतर पूजा. या पूजेंत देवतेच्या प्रत्येक अंगाचा नामनिर्देश करून मूर्तीवर अक्षता टाकतात. उदा० सुमुखाय नमः पादौ पूजयामि इत्यादि. या पूजेने मूर्तीच्या सर्व अवयवांत सामर्थ्य येतें, अशी धारणा आहे.

अंगबाह्यें दिगंबर जैनांचे धर्मग्रंथ. अंग नामक त्यांच्या मुख्य धर्मग्रंथांत यांचा समावेश नसल्यामुळे यांना अंगबाह्यें किंवा प्रकीर्णकें असें नांव मिळालें आहे. यांत पुढील ग्रंथांचा समावेश होतो –

(१) सामयिक, (२) चर्तुविंशतिस्तव, (३) वंदन, (४) प्रतिक्रमण, (५) दशवैकालिक, (६) उत्तराध्ययन व (७) कल्पव्यवहार. [हि. जै. मो.]

अंगभूत पितरांना मान्य असें तीर्थ. [मत्स्य पु. २२.५१]

अंगयाग अङ्गीभूतः यागः = गौण याग. हा पांच प्रकारचा असतो. समिध्, तनूनपात्, इडा, र्बाह, व स्वाहाकार यांना उद्देशून तो करतात. [सं. इं. डि.]

अंगरखा (अंग + रखा = अंगाचें रक्षण करणारा) पुरुषांच्या अंगांत घालण्याच्या विशिष्ट कपडयाला हा शब्द वापरतात. गुंडीदार, कंठीदार, निमकंठीदार, व प्यालेदार असे चार प्रकारचे अंगरखे पूर्वी करीत. हल्ली ते प्रचारांत नाहीत. पेशवाईंत हे अंगरखे चिटाचे करीत. नाना फडणीसांचा एक लांब अंगरखा पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहांत आहे. हा मलमलीचा असून त्याचा कमरेखालचा घोळ फार मोठा म्हणजे सुमारे २७ हात आहे. त्याला उभे ९ जोड जोडलेले आहेत. या अंगरख्याला आठ बंद व गळ्याखाली गुंडी आहे.

अंगरम्म अंकम्म पाहा.

अंगरक्षक आजच्या प्रमाणेच प्राचीन काळींहि राजाला शरीररक्षक अधिकारी असत. कौटिल्याने त्यांना आत्मरक्षितक (अर्थ. २.३१) व पाणिनीने राजप्रत्येनस् म्हटलें आहे (अष्टा. ६.२.६०). कित्येकदा स्त्रियाहि अंगरक्षणाचें काम करीत. राजाच्या शरीररक्षणाचें कार्य मोठें जबाबदारीचें मानीत. कौटिल्याने त्यासाठी विशेष विधान सांगितलें आहे. बहुधा ही जबाबदारी राजकुमारांवर सोंपविली जात असे. [पा.भा.]



यवनी अंगरक्षिका

अंगराग घामाची दुर्गंधि नष्ट करून शरीर सुंदर बनवणें यासाठीं ज्या सुगंधी द्रव्यांचा देहाला लेप करतात, त्यांना अंगराग असें नांव आहे. यांतलीं मुख्य द्रव्यें आंबेहळद, केशर, चंदन आणि कापूर हीं असतात. हळद ही त्वचा साफ करते; म्हणून तिचा उपयोग मुखलेपासाठी होतो. संस्कृत काव्यग्रंथांत हळदीचा उल्लेख क्वचित् सांपडतो. चंदन, केशर आणि कापूर यांचे उल्लेख मात्र विपुल आहेत. चंदन-कापूर थंड व केशर उष्ण मानलेलें आहे. या व्यतिरिक्त श्वेत अगरु व गोरोचन यांचाहि अंगरागाच्या कामीं उपयोग होत असे. वसंतऋतूंत शरीरावर चंदनाचा व अगरूचा लेप द्यावा व हिवाळ्यांत केवळ अगरूचा लेप करावा, असें चरक सांगतो (सूत्र. ६.२५). अरगजा ही वस्तुहि अंगरागांतच येते. केशर, चंदन, कापूर, इ. वस्तु मिसळून ती बनवितात.

वैदिक साहित्य, महाभारत, अग्निपुराण, अर्थशास्त्र, कामसूत्र, नाटयशास्त्र, इ. अनेक ग्रंथांत अंगरागाचें प्रयोगात्मक वर्णन आढळतें. उद्वर्तन, विलेप, धूलन, चूर्ण, पराग, तैल, दीपवर्ति, धूपवर्ति, गंधोदक, मुखवास, इ. अंगरागाचे विविध प्रकार होतात. गंधसार या ग्रंथाप्रमाणे अंगराग निर्माण करण्याचे मुख्यत्वे खालील ६ प्रकारचे विधि आहेत —

(१) भावनक्रिया–चूर्णित पदार्थांना तरल द्रव्यांनी अनुविद्ध करणें. (२) पाचनक्रिया–विविध पदार्थांचे काढे करून ते एकत्र मिसळणें. (३) बोधक्रिया–गुणवर्धक पदार्थांचा संयोग करून त्यांना उत्तेजित करणें. (४) वेधक्रिया–आरोग्यवर्धक व त्वचेला उपकारक अशा पदार्थांचा संयोग करणें. (५) धूपनक्रिया–सुगंधी द्रव्यांच्या धुराने अंग सुवासित करणें व (६) वासनक्रिया–सुगंधी तेलें व द्रव्यें यांचा संयोग करणें.

भारतांत पुरातन कालापासून वनस्पतींच्या द्वारें प्रसाधनद्रव्यांची व अंगरागांची निर्मिति होत आली आहे. चालू युगांत आधुनिक विज्ञानाने निर्माण केलेलीं अंगरागादि सुगंधी साधनें सर्वत्र वापरलीं जातात.

अनसूयेनें सीतेला आश्रमांत आल्यावेळीं शाश्वत व दिव्य अंगराग दिला होता असें रामायणांत वर्णन आहे. अनसूया म्हणते–

अङ्गरागं च वैदेहि महार्हमनुलेपनम् ।
मया दत्तमिदं सीते तव गात्राणि शोभयेत् ।।

(वारा. अयो. २.११८.१८ – १९)

अर्थ – हे सीते, मी दिलेला हा महामोलाचा अंगराग तुझ्या अवयवांना शोभवील. **पाहा**–प्रसाधन; गंधशास्त्र. [प्रा. भा. प्र.]

अंगलम्म द. भारतांतील ग्रामदेवता. ही सर्वसंहारक आहे. शूद्रातिशूद्रच हिला भजतात. हिला हाडें फार आवडतात. बलिदानाच्या वेळीं हिच्यापुढे अंतरपाट धरतात. रानडुकराच्या रक्तांत भात कालवून त्याचा हिला नैवेद्य दाखवितात. [व्हि. गॉ. सा. इं.]

अंगलोक्य एक प्राचीन जमात. अधिक माहिती मिळत नाहीं. [वायु पु. ४७.४३]

अंगविज्जा (सं. अंगविद्या) जैन साहित्यांत अंगविज्जा नांवाचा एक प्राचीन ग्रंथ आहे. हा ग्रंथ कुषाण व गुप्त या दोन युगांच्या संधिकालांतला असावा. ही प्राचीन-काळची एक लोकप्रसिद्ध अशी विद्या होती. शारीरिक लक्षणां-वरून अथवा अन्य कांही निमित्तें आणि चिन्हें यांवरून एखाद्याचें शुभाशुभ फल वर्तविणें, हा या विद्येचा विषय होता. ही विद्या फार प्राचीन असली पाहिजे. कारण पाणिनिहि तिचा उल्लेख करतो (४.३.१७). दीघनिकायांत ही विद्या बौद्ध भिक्षूला वर्ज्य सांगितलेली आहे. जैनांनी आपल्या आगमसाहित्याच्या प्रकीर्ण ग्रंथांत हिचा समावेश केलेला असून, दृष्टिवाद नांवाच्या बाराव्या अंगांत महावीराने या निमित्तज्ञान सांगणाऱ्या विषयाचा उपदेश केला असल्याचें सांगितलें आहे.

अंग, स्वर, लक्षण, व्यंजन, स्वप्न, छिंक, भूमि व अंतरिक्ष हे निमितकथनाचे आठ प्रकारचे आधार अंगविद्येंत मानलेले आहेत. या आठ महानिमित्तांवरून भूत-भविष्य जाणण्याचा प्रयत्न केला जात असे. या ग्रंथांत तत्कालीन जीवनाच्या अनेक क्षेत्रांशीं संबद्ध अशा शब्दसूची उपलब्ध होतात. या दृष्टीने या ग्रंथाला ऐतिहासिक महत्त्वहि प्राप्त झालेलें आहे. ग्रंथाचे एकूण ६० अध्याय असून त्यांत पुढील विषयांचें विवे-चन आहे--

जिन भगवानाची स्तुति, शिष्य आणि त्यांचे नियम, प्रश्न-कर्त्याच्या मुद्रेवरून आणि त्याच्या तत्कालीन परिस्थितीवरून फलाचा विचार, जीवन-मरणासंबंधीं, वृष्टि आणि धन-धान्यासंबंधीं आणि जयापजयांसंबंधीं फल सांगणें, पूजा-विशुद्धि, डोहाळे, कन्याविवाह याविषयीं विचार, प्रवास आणि पुनरागमन यांसंबंधीं विचार व देश, काल, उत्पात, भूमिगत धन, देवताप्रसाद, नक्षत्रविजय, पूर्व जन्माचें ज्ञान इत्यादि विषयांसंबंधीं चर्चा.

अशा प्रकारें हा अंगविज्जा ग्रंथ सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. यामधली शब्दावलि अनेक स्थळीं अस्पष्ट आणि संदिग्ध आहे. त्या शब्दांच्या अर्थज्ञानासाठी निरनिराळे प्राकृत कोशहि साहाय्य देऊं शकत नाहींत. या ग्रंथावर प्राचीन अर्वाचीन एकहि टीका उपलब्ध नाही. त्यामुळे या ग्रंथातल्या शब्दसंपत्तीवरचें गूढतेचें आवरण कायमच राहिलें आहे. [डॉ. वासुदेवशरण अग्रवाल]

अंगांत येणें एखादें माणूस अवचित घुमूं लागलें, हातवारे करूं लागलें, असंबद्ध किंवा गूढ असें कांहीतरी बोलूं लागलें, शाप किंवा वर या स्वरूपांत कांही उद्‌गार काढू लागलें, की त्याच्या अंगांत आलें असें म्हणतात. अंगांत येणें म्हणजे एखाद्या देवतेचा किंवा भुताखेताचा शरिरांत संचार होणें असें समजतात. भूत अंगांत आल्यास त्याला झडपणी किंवा झपाटणें म्हणतात. भगत, देवऋषि किंवा ग्रामदेवतेचा पुरोहित यांच्या अंगांत त्या त्या देवतेचा संचार होतो व त्यांच्या मुखाने ती देवता ग्रामस्थांचें चांगलें अथवा वाईट बोलून दाखवते, तसेंच त्यांना विशिष्ट कार्याचा किंवा बलिदानाचा आदेशहि देते अशी समजूत आहे. हा संचार कांही कालापुरताच टिकून राहतो. यांत ती व्यक्ति माध्यम या स्वरूपांत काम करते. हें दैवताशीं होणारें एकरूपत्व वैयक्तिक व सामाजिक असें उभयविध असतें. वैयक्तिक एकरूपता प्राप्त झाल्यावर तें माणूस अनैसर्गिक हालचाली करूं लागतें. त्याचें खाणें पिणें, वागणें, बवणें, बोलणें, या गोष्टींतहि विचित्रपणा येऊं लागतो. पुष्कळदा यांतूनच मंत्रतंत्र, जादूटोणा वगैरे प्रकारहि निर्माण होतात. सामाजिक एकरूपतेंत जाती-जमातीचा पुढारी हाच मुख्य असतो व सर्व लोकांच्या वतीने तो देवाशीं आपले संबंध प्रस्थापित करतो. जमातीचें कल्याण व्हावें म्हणून तोच देवाला गाऱ्हाणें घालतो. त्यामुळे त्या जमातीपुरतें त्या पुढाऱ्याला महत्त्व प्राप्त होतें. देवऋषि किंवा भगत हा जेव्हा दुसऱ्याची भूतबाधा दूर करण्यासाठी प्रवृत्त होतो, तेव्हा देवाला अंगांत आणून तो त्या भुताखेताशीं सामना देऊं लागतो. पुष्कळ ठिकाणीं ग्रामदेवता पुजाऱ्याच्या अंगांत येऊन आपली जत्रा करण्याचा आदेश व बऱ्याभल्याचा कौल देते. स्त्री किंवा पुरुष यांपैकी कोणाच्याहि अंगांत संचार होऊं शकतो. देवता अंगांत आली, की तिचा संचार पूर्ण व्हावा म्हणून त्या व्यक्तीपुढे धूप जाळतात व वाद्यांचाहि गजर करतात. पुष्कळदा भूतयोनींत गेलेला एखादा आत्मा कुटुंबांतल्या व्यक्तीच्या अंगांत येऊन त्याच्या मुखाने आपली आशा-आकांक्षा बोलतो व 'इच्छित गोष्ट मिळाल्यावर मी भूतयोनींतून मुक्त होईन' असें सांगतो.

बहुधा अंगांत येणारीं दैवतें हीं क्षुद्र दैवतेंच असतात. नव-रात्रांत अष्टमीच्या दिवशीं महालक्ष्मीच्या पुढे घागरी फुंकतांना एखादी बाई घुमूं लागली, की तिच्या अंगांत महालक्ष्मी आली

असें म्हणतात. मग जमलेलीं माणसें तिला आपापले प्रश्न विचारतात. गांवांत अतिवृष्टि, अनावृष्टि किंवा गुरांच्या अथवा माणसांच्या रोगाची सांथ आली, कीं त्याहि वेळीं ग्रामदेवता पुजाऱ्याच्या अथवा भगताच्या अंगांत येऊन भूत-भविष्य सांगते. मग ग्रामस्थ मंडळी तिच्या आज्ञेप्रमाणे वागतात. अंगांत येणें हा प्रकार सर्व जगांतप्राचीन कालापासून आजतागायत निरनिराळया स्वरूपांत चालू आहे.

अंगामी नाग आसाममधील नाग जमातीपैकीं एक. यांच्यांत सामुदायिक शयनगृह असतें. त्याला ते किछुकी म्हणतात. तिचा उपयोग अविवाहित मुलांमुलींना झोपण्यासाठीच नव्हे; तर इतर सार्वजनिक समारंभासाठीहि करतात. किछुकीला दोन माळे असतात. खालच्या माळ्यावर मुली व वरच्या माळ्यावर मुलगे झोपतात. पतिपत्नी एकमेकांचें नांव घेत नाहीत. पाहा-नाग जमाती.

अंगारक मंगळ या ग्रहाचें नांव. पूर्वजन्मींचा वीरभद्र हा शिवगणच पुढे अंगारक झाला. पाहा – मंगळ. [मत्स्य पु. ७१]

अंगारक चतुर्थी तिथिव्रत. संकष्ट चतुर्थी मंगळवारीं येते तेव्हा तिला अंगारक (=मंगळ) चतुर्थी म्हणतात. या व्रतांत दिवसभर उपवास व रात्रौ भोजन करायचें असतें. व्रतावधि चार किंवा आठ चतुर्थी किंवा जन्मभर. सूर्यास्तानंतर अंगुष्ठमात्र मंगळाच्या प्रतिमेची पूजा, मंत्र– अग्निर्मूर्धा० (ऋ. ८.४४.१६) नंतर अर्घ्यदान व नक्तभोजन. याची कथा अशी –

अवंती नगरींत भारद्वाज नांवाचा ऋषि होता. एके दिवशीं तो क्षिप्रानदीवर स्नानास गेला असतां तिथे अप्सरांची जलक्रीडा पाहून त्याचें वीर्य स्खलित झालें. त्यांतून एक रक्तवर्ण पुत्र उत्पन्न झाला. पृथ्वीने त्याचें पालन केलें. सात वर्षांनंतर त्याने पृथ्वीला विचारलें, की माझा वर्ण असा लाल कां ? त्यावर पृथ्वीने त्याचें जन्मवृत्त त्याला सांगितलें. मग तो भारद्वाजाकडे आला. भारद्वाजाने त्याचें उपनयन करून त्याला वेदशास्त्रें पढविलीं व गणेशाचा मंत्र दिला. मग नर्मदेच्या कांठीं बसून त्या पुत्राने त्याचें अनुष्ठान केलें. माघ कृष्ण चतुर्थीच्या दिवशीं गणपति त्याला प्रसन्न झाला. 'तुला देवांसह अमृतपान करायला मिळेल, मंगळ या नांवाने तूं प्रसिद्ध होशील, आणि तुझ्या नांवाची चतुर्थी लोकांना कल्याणप्रद होईल,' असा गणपतीने त्याला वर दिला. त्या दिवसापासून अंगारक चतुर्थीला महत्त्व आलें. पुढे त्या मंगळाने गणेशाची मूर्ति करून तिचें मंदिर बांधलें. मंगलमूर्ति या नांवाने तो गणेश प्रसिद्ध झाला. तें स्थानहि क्षेत्र बनलें. [व्रतराज]

अंगारक चतुर्दशी मंगळवारीं येणारी चतुर्दशी. शंभर सूर्यग्रहणांत केलेल्या दानादि कृत्यांपेक्षा ही अधिक फल देते. [हि. ध.]

अंगारक व्रत मंगळवारीं येणाऱ्या चतुर्थीस हें व्रत करतात. पाहा-अंगारक चतुर्थी.

अंगारवाहिनी भद्राश्व खंडांतली एक नदी. [वायु पु. ४३.२६]

अंगारा अंगार = निखारा, यापासून हा शब्द बनला आहे. यज्ञांतल्या, चुलींतल्या अथवा एखाद्या पवित्र स्थळांतल्या राखेला किंवा भस्माला अंगारा म्हणतात. भूतबाधा किंवा दृष्टिबाधा झाली असल्यास ती दूर करण्यासाठी अंगारा अभिमंत्रित करून तो त्या व्यक्तीच्या कपाळीं लावतात. ही चाल पुराणग्रंथांतहि आढळते. अरुंधतीने अग्निहोत्र्याच्या कुंडांतील भस्म मृत्युंजय मंत्राने अभिमंत्रित करून तें एका मृत ब्राह्मणाच्या कपाळीं लावलें आणि तो जिवंत झाला, अशी कथा पद्मपुराणांत (अ. १०६) दिली आहे. गुरुचरित्रांत अंगारा किंवा भस्म याच्या सामर्थ्याच्या अनेक कथा आहेत. रामरक्षा, शिवकवच, इ. स्तोत्रें सायंकाळीं पठण करून त्यांनी अभिमंत्रित केलेला अंगारा बाळंतिणीला आणि लहान मुलांना लावण्याची प्रथा महाराष्ट्रांत आढळते. बैरागी, गोसावी हे भिक्षा मागायला येतात, तेव्हा तेहि आपल्या देवाचा अंगारा लोकांच्या कपाळीं लावतात. शिवाच्या देवस्थानांत देवापुढे अंगारा ठेवलेला असतो. दर्शनार्थी लोक तो कपाळीं लावून बाहेर पडतात. पाहा – भस्म.

अंगारेश्वर नर्मदेच्या कांठीं अंगारकाने (मंगळ) निर्मिलेलें एक स्थान. [मत्स्य पु. १९०.९९]

अंगिरस् रैवत मन्वंतरांतल्या अत्रिकुलांतील एक ऋषि (ब्रह्मांड पु. २.३६.६२). विधात्याने अग्नींत दिलेल्या आहुतींतून हा जन्म पावला. याला अग्नीने आपला पुत्र मानलें म्हणून त्याला आग्नेय असें नांव पडलें. [ज्ञा. इं.]

अंगिरसकल्प अथर्ववेदाच्या एका भागाचें नांव. [वायु पु. ६१.५४]

अंगिरस कुल या कुलांतल्या ३३ ऋषींचीं नांवें पुराणांत आलीं आहेत– (१) अंगिरा (२) त्रित

(३) भरद्वाज बाष्कलि (४) ऋतवाक् (५) गर्ग (६) शिनि (७) संकृति (८) गुरुवीत (९) मांधाता (१०) अंबरीष (११) युवनाश्व (१२) पुरुकुत्स (१३) त्रसदस्यु (१४) सदस्युमान (१५) आहार्य (१६) अजमीढ (१७) ऋषभ (१८) कपि (१९) पृषदश्व (२०) विरूप (२१) कण्व (२२) मुद्गल (२३) उतथ्य (२४) शरद्वान् (२५) वाजश्रवा (२६) अयास्य (२७) सुवित्ती (२८) वामदेव (२९) असिज (३०) बृहदुक्थ (३१) दीर्घतमा (३२) कक्षीवान्.

तेहतीसावें नांव लुप्त झालें आहे. वरील बत्तीस नांवांचींहि शुद्ध रूपें निश्चित करतां येत नाहीत. या अंगिरस कुलांत पुढे अनेक पक्ष झाले आहेत. उदा० कण्व, मुद्गल, कपि, इत्यादि. या कुलाचा मूळ पुरुष अंगिरा ही फार पुरातन व्यक्ति होती. याचा अथर्ववेदाशीं घनिष्ठ संबंध आहे. स्वतंत्रपणें व भृगूच्या बरोबर याचीं अनेक सूक्तें अथर्ववेदांत आहेत. या कुलांतल्या मंत्रद्रष्ट्या ऋषींत मांधाता, अंबरीष, युवनाश्व, इ. पुरुपक्षत्रिय होते (वायु पु. ५९.१०२). **पाहा**–अंगिरस्. [वै. वा. इ.]

अंगिरा व्रत कृष्ण दशमी. व्रतावधि एक वर्ष. दशदेवतांचें पूजन. [विष्णुध. पु. ३.१७७.१ – ३]

अंगिरोगण अंगिरसांच्या तीन शाखा – गौतम, भरद्वाज व केवलांगिरस. पहिलीच्या सात, दुसरीच्या चार व तिसरीच्या सहा उपशाखा आहेत. प्रत्येक उपशाखा अनेक गोत्रांत विभागलेली आहे. या सर्वांना मिळून अंगिरोगण म्हणतात. [हि. ध.]

अंगुल बोट, बोटाची रुंदी. ८ यव = १ अंगुल [मानसार २]

अंगुलि 'अङ्गति इति अङ्गुलिः = क्रियेसाठीं गमन करते ती (वि. को.). एक मान. अंगुलि = ८ यव. (अर्थ शा. २.२०) सांप्रतच्या पाऊण इंचाबरोबर. (पा. भा.). यज्ञोपवीत ९६ अंगुलांचें असतें. स्थंडिल यजमानाच्या एका अंगुलीइतकें उंच व अठरा अंगुलि चौरस असतें. लग्नांतलें बोहलें वधूच्या ६ अंगुलींहून अधिक व १२ अंगुलींहून कमी असें विषम अंगुलींचें असतें.

अंगुलिताडितिका एक प्राचीन क्रीडा. खेळणाऱ्या गड्यां तून एकाचे डोळे बंद करून उरलेले गडी आपल्या बोटाने त्याच्या मस्तकाला स्पर्श करीत. स्पर्श करणाऱ्या गड्याचें नांव, डोळे बांधलेल्या गड्याने बिनचूक सांगितलें, तर त्याच्यावरचें राज्य जाऊन ज्याचें नांव ओळखलें गेलें, त्या गड्यावर राज्य येई. [प्रा. भा. म.]

अंगुत्तर निकाय बौद्धांच्या निकाय ग्रंथांपैकी हा चौथा निकाय असून यांत ९५५७ सुत्तें आहेत. हा सुत्तपिटकाचा एक भाग आहे. हा ग्रंथ बुद्धाच्या निर्याणानंतर उत्तर भारतांत रचला गेला. यांतलीं सुत्तें कांही एका ओळीइतकीं लहान, तर कांही तीन चार पानें भरतील इतकीं प्रदीर्घ आहेत. यांत बौद्ध धर्माचीं तत्त्वें विषयवारीने दिलीं असून त्या धर्मातल्या नीतिनियमांचें मानसशास्त्रीय विवरण केलेलें आहे. बौद्धधर्मी व्यक्तीच्या उन्नतीसाठी आवश्यक अशा गुणांचें यांत सविस्तर वर्णन असून एक, दोन, तीन, अशा क्रमाने अकरापर्यंत गुणांची मांडणी यांत आढळते. प्रत्येक विषय विशिष्ट संख्येने युक्त करून यांत नमूद केलेला आहे. ही पद्धत ख्रिस्ती धर्मग्रंथांतहि पुढे अवलंबिली गेली आहे. उदा० सात प्राणघातक पापें, दहा ईश्वरी आज्ञा, बारा प्रेषित, इत्यादि. लेखी पोथ्याहि फार नव्हत्या व पाठांतरच करणें जरूर होतें, अशा काळांत अशा सुत्तांची आवश्यकता होती. बुद्धघोषाने या सर्वांचा संग्रह मनोरथपूरणी या आपल्या ग्रंथांत केला आहे. **पाहा** – सुत्तपिटक; बुद्धघोष.

अंजन काजळाला अंजन म्हणतात. काजळ डोळ्यांत घालण्याची पद्धत भारतांत प्राचीन कालापासून आहे. सुश्रुत संहितेंत काजळ तयार करण्याची पद्धति दिली आहे. सामान्यतः तुपाच्या दिव्यावर एखादें पसरट भांडें पालथें ठेवून त्यांत काजळ धरतात व तें घोटून तयार करतात. नेत्ररोग होऊं नयेत, म्हणून मुलांच्या डोळ्यांत काजळ घालतात. रमणींच्या सोळा शृंगारांत काजळाचा समावेश आहे.'काजळ-कुंकू' हें सुवासिनीचें सौभाग्य मानलेलें आहे. रसिक श्रेष्ठांनी रमणीच्या नेत्रांतल्या काजळाला खूपच गौरविलें आहे. त्याविषयीं एक सुभाषित असें—


डोळ्यांत अंजन घालणारी स्त्रीमूर्ति. खजुराहो

अधरे नववीटिकानुरागो
नयने कज्जलमुज्ज्वलं दुकूलम्।
इदमाभरणं नितम्बिनीना-
मितरद्भूषणमङ्गदूषणाय ॥

अर्थ-अधरावर तांबूलाचा रक्तिमा, डोळ्यांत काजळ व झुळझुळीत तलम वस्त्र, हेंच खरें रमणींचें अलंकारमंडन होय इतर भूषणें हीं त्यांच्या अंगावरचीं दूषणेंच ठरतील.

जिचा पति परगावीं गेलेला आहे (प्रोषितपतिका) तिने व विधवेने काजळ घालूं नये, असा संकेत आहे. कालिदासाने विरहिणी यक्षस्त्री अंजनविरहित असल्याचें लिहिलें आहे (उ. मेघ ३५). लग्नच्या वेळीं वधू-वरांच्या डोळ्यांत काजळ घालण्याची प्रथा पुरातन आहे. लग्नाच्या चौथ्या दिवशीं वधू-वर परस्परांच्या डोळ्यांत अंजन घालीत व त्या वेळीं आपलें डोळे मधासारखे तेजस्वी होवोत, अशी मंत्रयुक्त प्रार्थना करीत. त्याचप्रमाणे मधुप नांवाच्या मण्याचें चूर्ण करून तेंहि डोळ्यांत घालीत व परस्परांना आलिंगन देत. प्राचीन वेदिकास्तंभांवर कित्येक स्त्रीमूर्ती शलाकेने डोळ्यांत अंजन घालीत असलेल्या दाखविल्या आहेत. **पाहा**– सुरमा.

अंजनागिरि (१) हा पर्वत महावनांत असल्याचें जातकांत म्हटलें आहे (५·१३३). रामायण (किष्कि. ३७·५) व मार्कंडेयपुराण (५८·११) यांतहि याचा उल्लेख आला आहे. स्कंदपुराणांत हा सुवर्णाचा असल्याचा उल्लेख आहे. या सर्व उल्लेखांच्या आधारें पंजाबमधील सुलेमान पर्वतांच्या रांगेला प्राचीन काळीं अंजनगिरि म्हणत असावे, असें वाटतें. या पर्वतांत अनेक खिंडी असून त्यांतून भारतांतून बलुचिस्तानांत जाण्याचे प्रमुख मार्ग आहेत. [हि. जॉ. ए. इं; क. हि. वा. पु.]

(२) एक पर्वत. सितोदाच्या पश्चिमेस हा आहे. उरगांचें वसतिस्थान. हा रानटी हत्तींबद्दल प्रसिद्ध आहे (वायु पु. ३६. २८; ३९.५९; ६९.२३८).

अंजना हनुमंताची माता. ही पूर्वजन्मीं पुंजिकस्थला नांवाची अप्सरा होती व शापामुळे कुंजर वानराची कन्या झाली. केसरी हा हिचा पति. त्याच्या समवेत हिने आकाशगंगा या तीर्थावर हजार वर्षें वायूची आराधना केली. तो प्रसन्न झाला असतां हिने पुत्र मागितला. मग त्याच्या अंशाने हिला मारुति हा पुत्र झाला.

अंजनेरी (सं. अंजनागिरि) नासिक-त्र्यंबकेश्वर मार्गावरील एक पर्वत. ही एक टेकड्यांची रांग असून तिच्या पायथ्याला अंजनेरी हें गाव आहे. याच्या माथ्यावर एक मंदिर आहे. गावांत कांहीं मंदिरांचे भग्नावशेष दिसतात. हीं मंदिरें आभीर राज व देवगिरीचे यादव (११५०-१३०८ इ. स.) यांच्या वेळचीं आहेत. प्रत्येक मंदिराच्या दरवाजाच्या वरच्या पट्टीवर तीर्थकराची एक मूर्ति आहे. बऱ्याच मूर्ति खालीं पडून भग्न झालेल्या आहेत. एका जैन देवालयांत इ. स. ११४० चा संस्कृत शिलालेख आहे. त्यांत सेउण यादवाच्या एका वाणी प्रधानाने कांहीं दुकानांचें उत्पन्न देवळाला दिल्याचा उल्लेख आहे. [सु. वि. को.]

अंजलि (१) 'अज्यते अनेन इति' = जेणेकरून सेचन केलें जातें तो (विग्रहकोश). अंजलि ही एक मुद्रा आहे. दोन्ही हात कोपरांपासून उभे, हातांचे तळवे मणिबंधांत जुळवलेले; पण फुगीर आणि पोकळ. बोटांचीं अग्रें किंचित् अंतर्वक्र. ही एक नृत्यमुद्रा आहे. देवाला नमस्कार करतांनाहि अंजलिसंपुट करतात. हिला सर्वराजेंद्रमुद्रा असें म्हणतात.

(२) एक परिमाण. चरकाच्या मतें १६ कर्ष म्हणजे एक अंजलि. कौटिल्याच्या मताप्रमाणे अंजलि अथवा कुडव १२½ तोळ्यांच्या बरोबर असतो. [इं. बु. इ.; पा. भा. व.]

अंजसी एक नदी. ऋग्वेदांत कुलिशी व वीरपत्नी यांच्याबरोबर हिचा उल्लेख येतो (१. १०४. ४). हिच्या तीरावर 'कुयव' नांवाचा असुर राहत होता. ही वायव्य भागांतली एखादी गौण नदी असावी. [वै. सा.]

अंडकटाह भूरादि सात लोकांना मिळून अंडकटाह म्हणतात. हे सात लोक छत्राकार असून त्या प्रत्येकाला त्याचें सूक्ष्म आवरण आहे. या अंडकटाहाच्या सभोवती समुद्र (घनोदधि) आहे. त्याने भूमंडल धारण केलेलें आहे. घनोदधीला, त्याच्याबाहेर घनतेजाने, त्याला घनवाताने, त्याला आकाशाने, आकाशाला भूतादीने, त्याला महत्ने व महत्ला आनंदाने, आवरून धरलें आहे. [वायु पु. ५०]

अंडिनिया डोंबांतला हीन वर्ग. **पाहा** – डोंब.

अंत एक संख्या. १००० कोटी × १ लक्ष (नियुत) (वायु पु. १०१. ९८).


अंतःकरण चतुष्टय अंतःकरण म्हणजे अंतरिंद्रिय. इंद्रियांचे प्रकार दोन-बाह्य व आंतर चक्षु,

श्रोत्र इ. इंद्रियें हीं बाह्यइंद्रियें होत. तीं आपणांस बाह्य-विषयांचें ज्ञान करून देतात. परंतु आंतर विषयांचें ज्ञान होण्यासाठी कोणातरी इंद्रियाची गरज असते. म्हणून अंतःकरण हें एक निराळें इंद्रिय मानलें आहे. त्याच्या द्वारें सुख, दुःख इ. आंतर विषयांचें ज्ञान होतें. अंतःकरण हें ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांच्यावर नियंत्रण ठेवतें. वेदान्त्यांच्या मतें अंतःकरण हें आरशासारखें आहे. ब्रह्माचें प्रतिबिंब त्यांत पडतें व त्या प्रतिबिंबाला जीव ही संज्ञा प्राप्त होते. या अंतःकरणाचे पुढील चार प्रकार व चार विषय आहेत–

मनोबुद्धिरहंकारश्चित्तं करणमन्तरम् ।
संशयो निश्चयो गर्वः स्मरणं विषया इमे ।।

अर्थ – मन, बुद्धि, अहंकार, चित्त (मिळून) अंतःकरण होय. संशय, निश्चय, गर्व व स्मरण हे त्यांचे (अनुक्रमें) विषय होत. [न्यायकोश].

अंतःपुर राजप्रासादांतल्या राणीवशाच्या विभागाला अंतःपुर अशी संज्ञा आहे. शुद्धान्त व अवरोध अशीं त्याचीं आणखीहि नांवें आहेत. शुद्धान्त शब्दावरून सूचित



अंतःपुरांतील नृत्यविनोद–अजंटा

होतें, की राजप्रासादाच्या ज्या भागांत स्त्रियांचें वास्तव्य असे, तो भाग पवित्र मानला जाई. त्या भागांत अनोळखी व अपरिचित लोकांना प्रवेश मिळत नसे. अवरोध असें नांव पडण्याचें कारण तो भाग सुरक्षित व रक्षकांनी वेढलेला असे. या रक्षकांना प्रतीहार व कंचुकी अशीं नांवें होतीं. अंतःपुराचा अधिकारी बहुतांशीं वृद्धच असे. मोगल व चिनी सम्राटांच्या अंतःपुराचे रक्षक व सेवक म्हणून खोजे अर्थात् क्लीब लोक ठेवले जात. गुप्त साम्राज्याच्या काळांतहि ही प्रथा होती.

राजे, महाराजे व श्रीमंत लोक यांचीं अंतःपुरें समृद्ध व कलापूर्ण असत. राजांच्या अंतःपुरांत नाट्यशालाहि असत. रामायणांत अंतःपुरांतल्या वधूजननाट्यसंघाची चर्चा आढळते. मालविकाग्निमित्रांत ज्या नृत्याभिनयस्पर्धेचा उल्लेख आहे, ती अंतःपुरांतल्या रंगमंचावरच झाली होती. नृत्य, गान, वाद्य, चित्रकला इत्यादि कला अंतःपुराच्या आश्रयानें जगत होत्या, वाढत होत्या. कित्येकदा राजकीय कारस्थानेंहि अंतःपुरांतच शिजत. अंतःपुरें सदैव प्रसन्न असत, असें नाहीं. राजस्त्रियांमधले कलह व हेवेदावेहि तिथे धुमसत राहत.

श्रीमंत नागरिकांच्या घराचे दोन प्रकोष्ठ असत. बाहेरचा प्रकोष्ठ पुरुषांसाठी व आंतला प्रकोष्ठ अंतःपुरांतल्या स्त्रियांसाठी. वराहमिहिरानें आपल्या बृहत्संहितेंत अशा प्रकारचें घर बांधण्याचा विस्तृत तपशील दिला आहे. अशीं मोठीं घरें राजमार्गाच्या दोहीं अंगीं बांधलीं जात. अंतःपुरांतल्या वधू अशा घरांच्या वरच्या मजल्यावर राहत, असें दिसतें. बाहेर होणारे विशेष उत्सव आणि समारंभ अंतपुरांतल्या वधू वरच्या मजल्यावरच्या गावाक्षांतून पाहत, असें वर्णन काव्य-नाटकांतून आढळतें. वरच्या मजल्यांना रस्त्याच्या बाजूनें गवाक्ष ठेवणें आवश्यक समजलें जात असे. मालतीमाधव नाटकांतली मालती आपला प्रियकर माधव राजमार्गानें जात-येत असतां त्याला अशा गवाक्षांतूनच पाहत होती. हीं गवाक्षें खालच्या मजल्यापेक्षा थोड्या अधिक उंचीवर ठेवीत. याचें कारण असें असूं शकेल, की अंतःपुरांतल्या स्त्रियांना बाहेरच्या लोकांना पाहतां यावें; पण रस्त्यावरच्या लोकांना मात्र अंत पुरांतल्या स्त्रियांचें दर्शन घडूं नये. जे राजमहाल नदीच्या तीरावर असत, त्यांना जाळीदार गवाक्षें बसवीत. त्यांतून अंतःपुरवधू नदीची शोभा पाहूं शकत. सुनंदेनें इंदुमतीला अशा जाळीदार गवाक्षांतून रेवा नदीच्या चटुल तरंगांची शोभा पाहण्यास सांगितलें होतें (रघु ६. ४३).

अंतःपुराच्या अंतर्भागाची बनावट कशा प्रकारची असे, तें संस्कृत काव्य-नाटकांमधून कल्पितां येतें. तिथे एक मोठी चौसोपी असे. मृच्छकटिकांतला विदूषक या अंतर्गत चौसोपीच्या दारांत बसून पक्वान्नें खात असे. वराहमिहिर अंतःपुराला एक आंगण असावें व त्याला चारी बाजूंनी चार ओसऱ्या किंवा सज्जे असावे असें सांगतो. या ओसऱ्यांचे खांब सुरवातीला

लाकडी असत. नंतरच्या काळांत ते दगडांचे किंवा विटांचे उभारूं लागले. या खांबांवर शालभंजिका नामक मूर्ती कोरीत. या मूर्ती सौभाग्यसूचक मानीत. कालिदासानेहि अशा स्त्री-मूर्तींचा उल्लेख केला आहे (रघु. १६·१७).

वाल्मीकि रामायणांत (१·५) अयोध्येच्या वर्णनप्रसंगांत वधूनाटकसंघ, उद्यान, कूटागार व विमान, यांचे उल्लेख आले आहेत. रामभट्ट या टीकाकाराने वधूनाटकसंघ म्हणजे वधूंसाठी नाटकशाला, उद्यान म्हणजे क्रीडेसाठी निर्मिलेली पुष्पवाटिका, कूटागार म्हणजे स्त्रियांचें क्रीडागृह आणि विमानगृह म्हणजे सात तळांचा महाल, असे त्या शब्दांचे अर्थ दिले आहेत. त्यावरून रामायणकाळांतील प्रासादांतर्गत अंतःपुरांचें भव्य स्वरूप कळून येतें.

अंतःपुराच्या शयनकक्षांत एका पलंगावर मऊ शय्या अंथरलेली असे. बाणभट्ट सांगतो, की कादंबरीचा पलंग फार मोठा नव्हता. त्यावर एक चादर पसरलेली असून तिच्यावर धवल उपधान (शुभ्र उशी) होतें. कादंबरी डावी भुजलता किंचित् वक्र अशी त्या उशीवर ठेवून अर्धशयित अवस्थेत परिचारिकांना भिन्न भिन्न कार्यांचा आदेश देत होती. जवळच्या वेदिकेवर तांबूलपात्र व सुगंधी उपलेपन होतें. तिथल्या भिंतींवर नाना प्रकारचीं चित्रें काढलेलीं होतीं. तीं पाहून चंद्रापीडाला असा भ्रम झाला, की सारें जग जणू कादंबरीच्या दर्शनासाठी इथे चित्ररूपाने उपस्थित झालें आहे. तिच्या महालाच्या छतावरहि विद्याधरांचीं अधोमुख व मनोहर चित्रें रंगविलेलीं होतीं.

अंतपुरांतल्या स्त्रियांच्या मनोविनोदनाचीं जीं अनेक साधनें असत, त्यांत चित्रकर्माला प्राधान्य होतें. अंतःपुरांतल्या कुमारी विवाहित स्त्रियांपेक्षा अधिक कलाप्रवीण असत. त्या वीणा व बांसरी वाजवीत, द्यूत खेळत, चित्रें काढीत व सुभाषितें पाठ करीत. विवाहित स्त्रिया डोक्यावर अवगुंठन किंवा घुंघट घेत, असेहि उल्लेख मिळतात. फक्त चार प्रसंगीं लोक त्यांना पाहूं शकत व तें दर्शन दोषावह मानलें जात नसे. भासाच्या प्रतिमा नाटकांत राम म्हणतो––

स्वैरं हि पश्यन्तु कलत्रमेतद्
बाष्पाकुलाक्षैर्वदनैर्भवन्तः ।
निर्दोषदृश्या हि भवन्ति नार्यो
यज्ञे विवाहे व्यसने वने च ।।
(प्रतिमा १·२९)

अर्थ –– (लोकहो,) तुम्ही अश्रुपूर्ण नेत्रांनी माझ्या या कलत्राला (सीतेला) स्वच्छंदपणे पाहा. कारण, यज्ञ, विवाह, संकट आणि वनगमन या चार प्रसंगीं (राज) स्त्रियांचें दर्शन निर्दोष असतें.

अंतःपुराला लागूनच वृक्षवाटिका असे. तिच्या मध्यभागीं दीर्घिका म्हणजे लांबट तलाव असे. त्या वाटिकेंत फल-पुष्पांचे वृक्ष आणि लताकुंज असत. फुलझाडें क्रमाने एका जातीचीं एका भागांत अशा प्रकारें लावीत. अंतःपुराच्या जवळच्या परिसरांत लहानलहान फुलझाडें, त्यापुढे ताटवे, त्याच्याबाहेर लतामंडप आणि त्याच्याहि पलीकडे मोठे वृक्ष लावले जात. या वाटिकेच्या एका भागांत अंतःपुरस्वामिनी भाजीपालाहि लावीत असे. वात्स्यायनाच्या कामसूत्रांत मुळा, कंद, पालक, वांगीं, कोहळा, सुरण इत्यादि अंतःपुरवाटिकेंत होणाऱ्या शाकभाज्यांचा उल्लेख आहे. तिथल्या दीर्घिकेंत जलपक्षी क्रीडा करीत. अशा प्रकारचे हंस, कारंडव, चक्रवाक इ. पक्षी दीर्घिकेंत असणें व त्यांचा कलरव सदैव कानांवर पडत राहणें मंगलकारक मानलें जाई. बृहत्संहिता (५६. ४. ७) म्हणते, की जिथे जलचरपक्षी विश्राम करतात, तिथे देवतांचा वास असतो. [उपवनविनोद; प्रा. भा. क. वि.]

अंतराळ मंदिरशिल्पांत गर्भगृह व सभामंडप यांच्यामधून असलेला प्रदक्षिणामार्ग. याला अंतरालक किंवा अंतरालय असेंहि म्हणतात. [मानसार]

अंतराळ वर्ग द. भारतांतल्या, विशेषतः केरळांतल्या अनेक जातींचा समूह. ब्रह्म-क्षत्रांपेक्षा कनिष्ठ; पण शूद्रांपेक्षा वरिष्ठ अशा (अंतराळीं असणाऱ्या) लोकांना हें नांव आहे. या वर्गाचे नामपिदि, अंबलवासी व शामंधर असे पोटभेद आहेत. नामपिदि हे मूळचे ब्राह्मण; पण त्यांच्या कोणा पूर्वजाने राजप्रतिनिधीचा खून केला म्हणून त्यांची गणना अंतराळ वर्गांत होऊं लागली. नम्पूतिरि ब्राह्मण यांच्याकडे पौरोहित्य करतात. हे मरुमक्कतायम् हा वारसाकायदा मानतात. अंबलवासींचे व शामंधरांचे ६ पोटभेद आहेत. हे लोक आपणांस क्षत्रियबीजाचे म्हणवतात; पण यांचे रीतिरिवाज नायरां-प्रमाणेच आहेत. हे यज्ञोपवीत वापरीत नाहीत. यांचे संस्कार अमंत्रक असतात. अंबलवासी व शामंधर यांच्यांत रोटीबेटी व्यवहार होत नाही. **पाहा** – अंबलवासी, नायर.

अंतरिक्ष 'अन्तर्मध्ये ऋक्षाणि नक्षत्राणि यस्य तत् =' ज्याच्या मध्यभागीं नक्षत्रें असतात तें (हलायुध). पृथ्वी व स्वर्ग यांच्यामधील अवकाश (वायु पु. २३. १०७). देव, मुनि, यक्ष, गंधर्व, ही मंडळी या प्रदेशांत संचार करतात. ययातीला इंद्राने स्वर्गभ्रष्ट केलें असतां तो भूमीवर न पडतां अंतरिक्षांत सांवरला, अशी कथा मत्स्य पुराणांत आहे (३५. ४).

अंतर्गिर्य प्राचीन लोक. राजमहल जिल्ह्यांतल्या संताळ परगण्यांत राहणाऱ्या प्राचीन लोकांना अंतर्गिर्य म्हणत असावे. यांचे उल्लेख महाभारताच्या भीष्मपर्वात आले आहेत. [ट्रा. ए. इं.]

अंतर्नर्मद पश्चिमेकडील एक देश. इथे नर्मद नांवाची जमात राहते. [पु. इं.]

अंतर्मातृकान्यास अ पासून अः पर्यंतचे स्वर आणि क पासून क्ष पर्यंतचीं व्यजनें यांना मातृका म्हणतात. या मातृकांची आपल्या शरीरामध्यें असलेल्या सहा चक्रांवर प्रतिष्ठापना करणें यालाच अंतर्मातृकान्यास म्हटलें आहे.

या न्यासाची देवता अंतर्मातृकासरस्वती आहे. ॐ अं नमः याप्रमाणे अनुस्वारयुक्त प्रत्येक मातृकेचें स्थापन करायचें असतें. न्यास झाल्यावर भारती किंवा अंबिका हिचें ध्यान करतात. निरनिराळ्या पूजाप्रकारांमध्ये प्रारंभीं हा न्यास करायचा असतो. [ऋ. ब्र. क.]

अंतर्यामी 'सकलजीव नियामकः' = सकल जीवांचें आंतून नियंत्रण करणारा. याला साक्षी असेंहि म्हणतात. साक्षीला सर्व पदार्थांचें ज्ञान होतें; परंतु त्याचा साक्षीवर कांहीहि परिणाम होत नाही. अंतःकरण ही साक्षीची उपाधि होय. वेदांत्यांचा साक्षी हा सांख्यांच्या पुरुषाप्रमाणे निर्लेप आहे.

अंतर्वेदि गंगा – यमुनांच्या मधील हरिद्वार ते प्रयागपर्यंत पसरलेला प्रदेश (दोआब) म्हणजे अंतर्वेदि होय (स्कंद पु. १. १. १७.). वृत्राला मारल्यामुळे इंद्राच्या मागे लागलेली ब्रह्महत्या इथे नष्ट झाली, अशी कथा आहे.

वैदिक कालीं या प्रदेशांत निरंतर यज्ञ होत. त्या काळीं उशीनर, पंचाल व वत्स हे देश अंतर्वेदींत गणले जात. याच्या पूर्वेस काशी व कोसल आणि दक्षिण-पश्चिमेस कुरु, शूरसेन, चेदि हे देश होते. गुप्तकालांत अंतर्वेदि हा गुप्तसाम्राज्याचा एक 'विषय' (जिल्हा) होता. समुद्रगुप्ताने इथे अश्वमेध केला होता.

अंतर्वेदीचा उल्लेख कथासरित्सागरांत वसुदत्त या ब्राह्मणाच्या कथेच्या अनुषंगाने आला आहे. तो अंतर्वेदींत राहणारा असून विद्याभ्यासासाठी वल्लभीस (गुजरात) जाऊं इच्छीत होता. [प्रा. म.]

अंतशिला विंध्य पर्वतांत उगम पावलेली एक नदी. [पु. इं.]

अंताई गुजरातमधील क्षुद्र देवता. ही डांग्या खोकला निर्माण करते. [फो. लो. नॉ. इं.]

अंतानंतिकवाद एक बुद्धकालीन दार्शनिक मत. लोक अन्तवान् आहे, लोक अनन्तवान् आहे या विचारसरणीला हें नांव आहे. बुद्धाच्या उपदेशांत या वादाचा विचार आला आहे. [दीघनिकाय १. १; द. दि.]

अंतेवासी 'अन्ते विद्यामध्येतुम् अध्यापकसमीपे वसति इति' = विद्याध्ययन करण्यासाठी गुरूच्या जवळ किंवा गुरुगृहीं राहणारा ब्रह्मचारी शिष्य. (शब्रा. ५. १. ५. १७; बृहदा. ६. ३. ७). **पाहा** – शिष्य, छात्र, शिक्षण.

अंतोनिगंसनि श्रमणीने वापरण्याचें एक वस्त्र. हें कमरेला घट्ट बांधलेलें असतें व याने अर्ध्या मांड्या झाकल्या जातात. [हि. जै. मो.]

अंत्यक्रिया यालाच संस्कृतांत और्ध्वदेहिक म्हणतात. प्रेत घरांतून बाहेर काढण्यापासून या क्रियेचा प्रारंभ होतो. प्रेतवाहनासाठी प्रयोगकार शिबिका सांगतात. शिबिका म्हणजे पालखी होय. पण प्रेत आडवें ठेवण्याइतकी ती लांब नसते; त्यावरून बसलेल्या स्थितींत प्रेत नेण्याची चाल पुरातन काळीं असण्याचा संभव आहे. सध्या प्रेत तिरडीवरून नेतात. तें उताणें निजवतात. वाहक चार असतात. प्रेतापुढे अग्नि नेण्याची वहिवाट बहुतेक जातींत आढळते. जे लोक प्रेत पुरतात, ते सुद्धा अग्नि घेऊन जातात. जो क्रिया करणारा असतो, तो अग्नीचें मडकें हातांत धरतो. हा अग्नि गोवरीचा असतो. प्रयोगकार दाहगर्तेचा उल्लेख करतात. दाहगर्ता म्हणजे दहनासाठी खड्डा. सध्या असा खड्डा कोणी खणीत नाहीत. ज्या अर्थी प्रेत पुरणारे लोकसुद्धा अग्नि घेऊन जातात, त्या अर्थी जुन्या काळीं ब्राह्मणी प्रथेचें अनुकरण इतर समाजांकडून होत असावें असें वाटतें. प्रेताबरोबर जाणाऱ्यांनी मुक्तकेश व उपवीत (माळेसारखें जानवें करून) जावें असें शास्त्रकार सांगतात.

दुसरी सर्वसामान्य चाल म्हणजे प्रेताबरोबर शिजवलेला भात घरांतून नेणें. ही चाल ब्राह्मणेतरांत आहे. हा भात प्रेताच्या ओठांवर ठेवून आलेलीं सर्व माणसें त्याच्यावर उदक सोडतात. हें ब्राह्मणी पद्धतींतील पिंडदान आणि तिलांजलि यांच्यासारखें आहे. याच भाताला पुढे उत्थापन पिंड असें नांव मिळालें. गरुडपुराणांत अंत्यक्रियेच्या वेळीं सहा पिंड द्यावे असें सांगितलें आहे. (१) मृत्युभूमीवर (२) दारांत (३) चव्हाटयावर

(४) विसाव्याच्या जागीं (५) चितेवर व (६) चितेवर प्रेताच्या शेजारीं. यांना उत्क्रांतिपिंड म्हणतात.

अग्निहोत्र्याशिवाय बाकी सर्वांचीं प्रेतें पालथीं ठेवून जाळण्याची प्रथा पूर्वी होती. अलीकडे ती लुप्त आहे. अग्निहोत्र्याचीं उपकरणें त्याच्याबरोबर जाळायचीं असतात, म्हणून त्याला चितेवर उताणें ठेवावें, असें शास्त्रकार सांगतात. स्त्रियांचें मात्र उताण्या स्थितींतच दहन करावें, असें शास्त्रवचन आहे. ब्राह्मणस्त्रीचें प्रेत मंत्राग्नीने दहन करतात. स्त्रीला वेदाधिकार नसल्यामुळे वास्तविक तिचें प्रेत अमंत्रक दहन केलें जावें; पण ब्राह्मण स्त्रियांचे सर्व संस्कार वेदमंत्रांनीच होतात, तसेंच हेंहि आहे.

प्रेतदहनांत स्त्री व पुरुष ह्यांत आणखी एक भेद प्रयोगकार सांगतात, तो असा–पुरुषाला डोक्याकडून व स्त्रीला पायाकडून अग्नि द्यावा (पुंसः शिरोदेशे स्त्रियाः पाददेशेऽग्निं प्रज्वाल्य). हा नियम ब्राह्मणांत अद्यापि पाळला जातो. शूद्रकमलाकर 'शिरःस्थानेऽग्निं दद्यात्' म्हणजे डोक्याच्या बाजूने प्रथम अग्नि द्यावा असें सांगतो. पण रूढि मात्र पायांकडून अग्नि देण्याची आहे. कदाचित् हीच चाल मूळची असावी. अग्नि देतांना ब्राह्मणेतर जातींत प्रेताकडे पाठ करतात. याला शास्त्राचा आधार नाही. मृताविषयीच्या मायेंतून ही चाल निर्माण झाली असावी. दहनविधींत मडकें फोडण्याची चाल सर्वत्र आहे. घट फोडणें हें प्राण गेल्याचें निदर्शक आहे. या घटांतलें पाणी चितेभोवती तीन प्रदक्षिणा करून धारेने ओततात. अग्नि बाहेर पसरूं नये किंवा चिता विझवून टाकावी, या हेतूने हें जलसिंचन होत असावें. गुजरातेंत प्रेत पुरतें जळून गेल्यावर चिता पाण्याने विझवूनच मंडळी श्मशानांतून परततात. गुजरातेंत कित्येक ठिकाणीं प्रेताबरोबर कुऱ्हाड नेण्याची वहिवाट आहे. ही कुऱ्हाड तिरडीवर प्रेताच्या डोक्याजवळ ठेवतात. प्रेत श्मशानांत जिवंत झालेंच, तर त्याला कुऱ्हाडीने मारतां यावें हा त्याच्या मागचा उद्देश सांगतात. कारण जिवंत झालेलें प्रेत माणूस न राहतां पिशाच होतें, अशी समजूत आहे.

वर सांगितलेली मडकें फोडण्याची क्रिया ज्या दगडाने करतात तोच दगड अश्मा म्हणून पुढे दहा दिवस वापरतात. प्रेताचा जीव अंत्यक्रिया पुरी होऊन स्वर्गमार्गाला लागेपर्यंत त्या दगडांत वास करून राहतो, अशी समजूत आहे. तिलांजलि त्याच्यावरच देतात. मडकें फोडण्याची क्रिया ही वैदिक नाही. उदक सोडण्यासाठी कांहीतरी आधार लागतो; कारण जमिनीवर किंवा दर्भावरहि उदक सोडूं नये, असें हारीत सांगतो––

पात्राद्वा जलमादाय स्वयं पात्रान्तरे क्षिपेत् ।
जलपूर्णेऽथवा गर्ते न स्थले न तु बर्हिषि ।।

ब्राह्मणेतर जातींत प्रेताला स्नान घालण्यापूर्वी तेल, तूप, हळद लावतात. मुसलमानसुद्धा याला अपवाद नाहीत. हा विधि स्मृत्युक्त आहे––

घृतेनाभ्यक्तमाप्लाव्य सवस्त्रमुपवीतिनम् ।
चन्दनोक्षितसर्वाङ्गं सुमनोभिर्विभूषितम् ।।

(कात्या. स्मृ.)

अर्थ–तूप लावून प्रेताला स्नान घालावें. वस्त्र व यज्ञोपवीत द्यावें. सर्वांगी चंदन लावावें व फुलांनी भूषवावें.

पूर्वीच्या स्मृतींत हा विधि आढळत नाही. मूल उपजतांच त्याला न्हाऊं घालतात, त्याचप्रमाणे मनुष्य मेल्यावर त्याला स्नान घालणें युक्त होय, या समजुतींतून ही रूढि निर्माण झाली व कात्यायनाने तिला शास्त्राचें स्वरूप दिलें असें वाटतें. कांही जातींत प्रेताला सोंवळ्याचें वस्त्र नेसवतात. कांही ठिकाणीं प्रेताची श्मश्रूहि करवितात. थोर वयाच्या ब्रह्मचाऱ्याला वस्त्राऐवजी लंगोटी नेसवतात. कांही जातींत सुपांत वरी, नागली, भात, इ. धान्यें घेऊन तीं प्रेतापुढे पेरीत जातात. ब्राह्मणांत हा प्रकार नाही. मेलेल्या माणसाने पिशाच होऊन परत येऊं नये यासाठी ही धान्याची पेरणी असावी. कारण धान्याला पिशाच भितें अशी समजूत आहे.

'शवं प्रच्छादितमुखं प्राक्शिरसं दाहदेशं नयेयुः' म्हणजे प्रेताचें मुख आच्छादित करून व मस्तक पूर्वेकडे करून त्याला श्मशानांत न्यावें, असें धर्मसिंधु सांगतो; पण रूढि मात्र प्रेताचें तोंड उघडें ठेवून नेण्याची आहे. पुरुषाचें व सवाष्णीचें तोंड झाकीत नाहीत. विधवेचें मात्र झाकतात. निपुत्रिकालाहि झाकल्या तोंडानेच नेतात. उघड्या तोंडाने श्मशानांत जातां येणें हें पुरुषार्थाचें लक्षण समजलें जातें.

प्रेतविषयक कित्येक क्रिया जिवंतपणीं केल्या जाणाऱ्या क्रियांच्या उलट असतात. उदा० लग्नांत-वधूवरांना तेलहळद लावतात, ती पायांकडून डोक्याकडे अशी चढती लावतात. प्रेताला हेच पदार्थ वरून खालीं असे लावतात. तेल लावल्यावर गरम पाण्यानेच स्नान केलें पाहिजे असा जिवंतपणींचा नियम असतो. मेल्यावर तेल लावून थंड पाण्याची आंघोळ घालतात. जिवंतपणीं दक्षिणेकडे पाय करून निजत नाहीत. प्रेताचे पाय दक्षिणेकडेच करतात. दक्षिणेकडे ज्योत करून समई ठेवीत नाहीत. पण माणूस मेल्यावर त्याच्या जागीं जी समई अथवा पणती ठेवतात, तिची ज्योत दक्षिणेकडेच असते.

हिंदूंव्यतिरिक्त सर्व जग प्रेतें पुरणारें आहे. प्रेत पुरण्याची चाल ही दहनाच्या पूर्वीची असावी. आणि तें पशुपक्ष्यांकडून खावविण्याची चाल त्याच्याहि पूर्वीची असावी. ऋग्वेदांतील पुढील मंत्र प्रेत पुरण्याच्या चालीचे निदर्शक आहेत–

'हे धरित्रि, वरच्यावर सावरून रहा. ह्या (मृता) ला इजा करूं नको. याचे लाड पुरव. त्याची समजूत कर आणि कोमल मनाची आई जशी लेकराला पदराखालीं झाकून घेते त्याप्रमाणे हे भूमि, याच्यावर तूं आपलें पांघरूण घाल (११). (हे मृता) ही तुझ्यावरील माती ठोकून घट्ट बसविली. आता तुझ्यावर हा मातीचा ओटा करतों. तुला कोणतीहि इजा होणार नाही... (१३). (ऋ. १०. १८. ११-१३)

वेदमंत्रांच्या काळानंतर यज्ञसंस्थेचा विस्तार झाला. यज्ञ हेंच सर्व ऐहिक व पारलौकिक उद्दिष्टांचें साधन बनलें. त्यांतूनच मृताचा संस्कार हाहि अग्नीच्या साहाय्याने करण्याची कल्पना निर्माण झाली. पुढे वैदिक आर्य सरसेस प्रेताला अग्नि-संस्कार करूं लागले. प्रेताला अग्निसंस्कार देऊन तें दग्ध करणें ही वैदिक आर्यांची रीत मग अन्य जातींतहि रूढ झाली. या देशांतले बौद्ध व लिंगायत हे प्रेतें पुरणारे आहेत. ज्या जातींवर लिंगायतांचा प्रभाव आहे, त्याहि प्रेतें पुरतातच. संन्याशाचें प्रेत पुरतात तें बौद्धांचें अनुकरण असावें. संन्याश्याला अग्नि नसतो, म्हणूनहि त्याच्या दहनाचा विधि सांगितला नसेल. संन्याश्याचें प्राणोत्क्रमण समाधिस्थितींत झालें पाहिजे, या समजुतींतून त्याला बसल्या अवस्थेंत पुरण्याची चाल पडली असेल. देवीच्या रोगांत मेलेल्या माणसाला जाळीत नाहीत; तर पुरतात. कुष्टरोग्यालाहि पुरावें किंवा जलसमाधि द्यावी, असें शास्त्रवचन आहे.

मरणोत्तर जी क्रिया करतात त्यांत प्रायश्चित्तें, तिलांजलि, पिंड, श्राद्धें आणि दानें इतक्यांचा अंतर्भाव होतो. और्ध्वदेहिक करणारा प्रथम सहा प्रायश्चित्तांचें उदक सोडतो. यांपैकी तीन प्रेताच्या शुद्धीकरिता व तीन कर्त्याला अधिकारप्राप्ति व्हावी म्हणून असतात. प्रायश्चित्तें सोडल्यावर कर्ता क्षौर करतो. केसांत पाप किंवा मळ असतो म्हणून ते काढून टाकायचे असतात--

यानि कानि च पापानि ब्रह्महत्यासमानि च ।
केशानाश्रित्य तिष्ठन्ति तस्मात्केशान्वपाम्यहम् ।।

अर्थ - जीं कांही ब्रह्महत्येसारखीं पापें असतात, तीं केसांचा आश्रय करून राहतात, म्हणून मी केशवपन करतों.

पण एवढ्यावरून अंत्यक्रियेसाठी कर्त्याने क्षौर करणें अपरिहार्य आहे, असें ठरत नाही. एकंदरींत क्षौर कृताकृतच मानणें चांगलें.

मृत देहाचें चितेंत पूर्ण दहन झाल्यावर श्मशानांत गेलेले आप्तेष्ट परत फिरतात. परत येतांना मागे वळून पाहत नाहीत. बाहेरचे लोक पुनश्च मृताच्या घरांत येतात, मरणाच्या जागीं जातात व मगच आपापल्या घरीं जातात. प्रेताबरोबर गेलेल्या सर्व लोकांनी स्नान व आचमन करून जल, अग्नि, गोमय, इ. पवित्र वस्तूंना स्पर्श करून मगच घरांत जावें असें शास्त्र-वचन आहे.

प्रेतदहनानंतर पहिल्या दिवसापासून दहा दिवस तिलांजलि व पिंड देण्याची जुनी वहिवाट होती. पहिल्या दिवसाची तिलांजलि प्रेताला दाहामुळें उत्पन्न झालेल्या तृषेच्या शमना-साठी असते. पुढे दहा दिवसांच्या क्रियेंत हाच संकल्प म्हटला जातो. नऊ दिवसांच्या पिंडांनी प्रेतात्म्याच्या शरीराचा एकेक अवयव बनावा, नवव्या दिवशीच्या पिंडाने शरीर पूर्ण तयार व्हावें आणि दहाव्या दिवसाच्या पिंडाने त्याची तहान भूक शमावी, अशी त्या दहा पिंडांची कल्पना आहे. ही कल्पना गरुडपुराणावरून उचललेली दिसते. दहा पिंडांनी आत्म्याला नवें शरीर मिळतें व त्या शरीराने तो स्वर्गसुख भोगण्यास पात्र होतो, अशी त्यामागची धारणा आहे. सूत्रग्रंथांत या कर्माचा उल्लेख नाही, यावरून ही कल्पना वैदिक नसून पौराणिक आहे हें उघड होतें. या कर्माच्या कामीं वेदमंत्रांचा उपयोग करीत नाहीत, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

यापुढे श्राद्धाचा विचार येतो. अंत्य कर्मांत सपिंडीकरणा-पर्यंत एकूण अकरा प्रकारचीं श्राद्धें करावीं लागतात. (१) नव अथवा विषम श्राद्ध. हें विषम दिवशीं करायचें असतें. (२) नग्नप्रच्छादन श्राद्ध. हें पहिल्याच दिवशीं करतात. सर्वच प्रयोगकार हें श्राद्ध सांगत नाहीत. प्राण्याला शरीर झांकण्या-करितां वस्त्र मिळावें म्हणून हें श्राद्ध आहे असें त्याच्या नांवा-वरून कोणालाहि वाटेल; पण यांत नुसतें वस्त्रच देत नाहीत; तर आमान्न, तेल, तूप, सोनें, रुप, पादत्राण, छत्री, इ. सर्व प्रवासोपयोगी वस्तु देतात. हें श्राद्ध अमंत्रकच असतें. (३) पाथेय श्राद्ध. हेंहि वरच्याच उद्देशाने करतात. मुख्य क्रियेचा उद्देश प्रेतत्वनिवृत्ति हा असतो. कांही प्रयोगकार याचा विधि सांगत नाहीत. हेंहि अमंत्रकच असतें. (४) अस्थिसंचयन श्राद्ध. आशौचांत विषम दिवशीं अस्थिसंचयन करावें असें सांगितलें आहे. अस्थि गोळा करतांना श्राद्ध करावें लागतें. अस्थिसंचयन समंत्रक असतें; पण श्राद्ध मात्र अमंत्रकच असतें. अस्थि तीर्थांत टाकण्याच्या वेळींहि श्राद्ध करतात. (५) रुद्रगण श्राद्ध (६) वसुगण श्राद्ध. हीं दोन एकोद्दिष्ट पण अमंत्रक श्राद्धें आहेत. हीं सपिंडीच्या पूर्वी करतात. अकरा रुद्र व आठ वसु यांना उद्देशून हीं श्राद्धें करतात. वसु, रुद्र व आदित्य या मृतांच्या देवता आहेत. (७) पाथेय श्राद्ध. हें पूर्वीसारखेंच आणि त्याच उद्देशाने केलेलें दुसरें श्राद्ध होय. (८) उदकुंभ श्राद्ध. यांत मृताला उद्देशून उदकाने भरलेला कुंभ व आमान्न देतात. (९) महैकोद्दिष्ट श्राद्ध. हें अमंत्रक श्राद्ध

प्रेताला उत्तम लोक मिळावा म्हणून अकराव्या दिवशीं करायचें असतें. (१०) सपिंडी श्राद्ध. हें श्राद्ध बाराव्या दिवशीं करतात. प्रेतत्व निवृत्त होऊन मृताचा पितरांत समावेश व्हावा व त्याला पितृलोक प्राप्त व्हावा, म्हणून हें श्राद्ध करतात. हें समंत्रक असतें. यांत प्रेतपिंडाचे दर्भाने तीन भाग करतात आणि प्रेताचा बाप, आजा आणि पणजा यांच्या पिंडांत ते समाविष्ट करतात. खरें म्हणजे सपिंडीकरण श्राद्ध एका वर्षानंतर करायचें असतें. पण एकदा सगळें उरकून टाकावें या उद्देशाने बाराव्या दिवशींच सपिंडी करण्याची वहिवाट पडली आणि पुढे शास्त्रकारांनी तिला मान्यता दिली. (११) सोळा मासिक श्राद्धें. दर महिन्याला एक अशीं बारा आणि ऊनमासिक इत्यादि चार, मिळून यांची संख्या सोळा होते. हीं श्राद्धें पुरीं होईपर्यंत कुलांत मंगल कार्य करूं नये, असा प्रतिबंध आहे. म्हणून हीं मासिकें अकराव्या दिवशींच बोळवून घेतात. याला मासिकनिवृत्ति असें नांव आहे.

ब्राह्मणादि सर्व जातींत अलीकडे नवव्या दिवसापूर्वी कोणी क्रिया सुरू करीत नाहीत. चितेची राख गोळा करणें आणि अस्थिसंचयन हें बहुधा तिसऱ्या दिवशीं होतें. एकंदरींत क्रियेचा मुख्य उद्देश प्रेताला अन्नोदक देणें हा दिसतो. याशिवाय मृतात्म्याला जरुरीचे व आवडते पदार्थ देण्याची वहिवाट सर्वत्र आढळते. मृत्यूनंतरहि आत्म्याला उपभोगक्षम असें शरीर असतें, अशी सर्वत्र समजूत दिसते. सर्व वस्तूंचा उपभोग मृतात्म्याला प्रत्यक्ष रीतीनें घेतां येतो. म्हणून प्रेताला तशा वस्तु अर्पण करणें किंवा प्रेताबरोबर त्या पुरणें ही समजूत सर्व जगांत प्राचीन कालापासून आहे. स्त्रीने सती जाण्याच्या चालीचा उगम या कल्पनेंतूनच झाला असावा. यानंतरची कल्पना म्हणजे इथे उपभोग्य वस्तु दुसऱ्याला दिल्या असतां त्या परलोकीं मृताला मिळतात. गरुड पुराण सांगतें–

'श्राद्धे दत्तं अन्नं द्विजशरीरे प्रविश्य पितरो भुञ्जते'

अर्थ–श्राद्धांत ब्राह्मणाला अन्न दिलें असतां पितर त्या ब्राह्मणाच्या शरीरांत प्रवेश करून त्याचा उपभोग घेतात.

दानें केलीं असतां मृत जीवाला यमदूत पीडा देत नाहीत असेंहि गरुडपुराणांत म्हटलें आहे––

यमदूता महारौद्राः करालाः कृष्णपिङ्गलाः ।
न पीडयन्ति दाक्षिण्याद्वस्त्राभरणदानतः ।।

अर्थ–काळे, पिंगट, महाभयंकर आणि दंताळ असे यमदूत वस्त्रें आभरणें यांचीं दानें दिल्याने (मृतात्म्याला) पीडा देत नाहीत.

अंत्यक्रियेंत अकराव्या दिवशीं दशदानें देण्याची चाल आहे. (१) गाय (२) भूमि (३) तिल (४) सुवर्ण (५) आज्य (६) वस्त्र (७) धान्य (८) गूळ (९) रौप्य व (१०) मीठ हीं दशदानें होत. देवांना मीठ वर्ज्य आहे; पण पितरांना तें प्रिय असल्याने दहा दानांत त्यांचा अंतर्भाव झाला आहे. हीं दानें अभ्युदयार्थ असल्यामुळें मेल्यावर तशींच जन्माच्या वेळीहि द्यायचीं असतात. पण तूर्त जन्माच्या वेळीं हीं दानें देण्याचा प्रघात बंद पडला आहे. सर्व दानांत वृषोत्सर्गाचें महत्त्व फार आहे. (वृषोत्सर्ग पाहा.)

दहाव्या दिवशीं पिंडाला कावळा शिवला पाहिजे अशी सर्वांची समजूत असते. पितर कावळ्याच्या वंशांत येऊन पिंड भक्षण करतात, ही समजूत याच्या मुळाशी आहे. अर्थात् ही आदिम अवस्थेंतली कल्पना आहे. त्यापुढची सुधारलेली कल्पना म्हणजे कावळ्याला यमदूत मानणें ही होय.

प्रेत जळतांना त्याच्या भोवतीं तीन फेऱ्या घालून क्रिया करणाऱ्यानें तीन बोंबा मारणें हीहि चाल बहुतेक सर्व ठिकाणीं आहे. स्वर्ग, पृथ्वी व पाताळ या तिन्ही लोकांत मनुष्य मेल्याची वार्ता बोंब मारून कळवावी हा त्यांतला मथितार्थ दिसतो. पाहा- अंत्येष्टि. [ना. गो. चापेकर ; क. हे. इं.]

अंत्यज

अंत्य या शब्दाचा भौगोलिक अर्थ सीमेच्या पलीकडे राहणारा असा आहे. त्याला धरून समाजांतल्या सर्वांत नीच वर्णांना अर्थात् ग्रामबाह्य जातींना अंत्यज म्हटलें आहे. अंगिरसाच्या मताप्रमाणें पुढील जाती अंत्यज होत –

चण्डालः श्वपचः क्षत्ता सूतो वैदेहिकस्तथा ।
मागधायोगवौ चैव सप्तैतेन्त्यावसायिनः ।।

अर्थ– चण्डाल, श्वपच, (कुत्र्याचें मांस खाणारे) क्षत्ता (सारथी), सूत, वैदेहिक, मागध व आयोगव हे सात अंत्यज होत.

अत्रीच्या मतें परीट, चांभार, नट, बुरुड, कैवर्त (कोळी) मेद व भिल्ल हे सात अंत्यज आहेत (अत्रि स्मृ. २४९). हे अस्पृश्य असले तरी जत्रा, लग्नसोहळा, यज्ञ व सार्वजनिक समारंभ या प्रसंगीं यांची अस्पृश्यता मानूं नये, असेंहि तो सांगतो. मनूने एका ठिकाणीं शूद्राला अंत्यज म्हटलें आहे. व्यासस्मृतींत गोमांस भक्षण करणाऱ्यांनाहि अंत्यज म्हटलें आहे.

मिताक्षरेंत अंत्यज व अंत्यावसायी असा भेद केला असून अंत्यावसायी हे अंत्यजांतलेहि अंत्यज मानलेले आहेत. अंत्यजांच्या अत्रिकृत यादींतले परीट, बुरुड, कोळी व नट हे मेधातिथि व कुल्लूक यांच्या वेळेपासून स्पृश्य मानले गेले आहेत.

सध्या ज्यांना अंत्यज मानलें जातें, अशा जाती प्राचीन काळीं आर्यधर्माच्या कक्षेंत नव्हत्या. त्यांची संस्कृतिहि भिन्न

होती. विशेषतः वन्य व पर्वतवासी जाती यांचा तो समाज होता. आर्यांनी उत्तर भारतांत आपलें राज्य स्थापल्यावर ब्राह्मणधर्म विशेष प्रभावी झाला. ब्राह्मणांच्या पावित्र्याचें रक्षण झालें पाहिजे व त्यासाठीं कांही जातीजमातींचा त्यांच्याशी अजिबात संसर्ग होतां कामा नये, ही भावना त्यामुळे बळावली. त्यासाठी म्लेच्छ म्हणजे पाश्चात्त्य जमाती (यवनादि) व भारतांतल्या मूळच्या दस्यु, शूद्र, चांडाल इ. अनार्य जमाती यांना जातिबाह्य ठरवण्यांत आलें. शूद्रांतलेहि ते अतिशूद्र ठरले. **पाहा** – अस्पृश्यता. [हि. ध; एन्सा. रि. ए.]

अंत्या (ता) वसायी

चांडाल, श्वपच, क्षत्ता, सूत, वैदेहिक, मागध व आयोगव या सात जातींना अंत्यावसायी म्हटलें आहे. मिताक्षरेंत (३.२६०) यांना अंत्यजांचाच एक भाग मानलें आहे. मनु आणि वसिष्ठ हे यांना अनुक्रमें चांडाल पुरुष व निषाद स्त्री आणि शूद्र पुरुष व वैश्य स्त्री यांची संतति मानतात (मनु १० . ३९; वसि. ध. सू. १८ . ३). यांच्या समोर वेदाध्ययन करूं नये असें भरद्वाज आपल्या श्रौतसूत्रांत सांगतो (११. २२. १२). यांना सांप्रत डोंब म्हणतात असें जातिविवेक ग्रंथांत म्हटलें आहे. **पाहा** – चांडाल, अंत्यज. [हि. ध.]

अंत्येष्टि

ज्याने तीन अग्नि ठेवून नित्य अग्निहोत्र धारण केलें आहे, असा यजमान मृत झाल्यास त्याचा अंत्यसंस्कार कसा करावा, या विचारांतून अंत्येष्टि हा संस्कार तयार केला गेला. अंत्य म्हणजे शेवटचा आणि इष्टि म्हणजे यज्ञ. या यज्ञामध्ये हविर्द्रव्य म्हणजे स्वतः मृत यजमानच असतो. यजमानाच्या मुलाने अथवा अन्य बांधवांनी त्याची आहुति देण्याचा विधि म्हणजेच अंत्येष्टि होय. याला पितृमेध असेंहि नांव आहे.

मृत झालेल्या मनुष्यास पाण्यांत अथवा अरण्यांत टाकून द्यावें असाहि एक प्रकार यासंबंधाने सांगितला आहे. परंतु पुरणें, पाण्यांत टाकणें आणि जाळणें या तीन प्रकारांमध्ये मृताचें दहन करणें हेंच अधिक श्रेयस्कर समजलें गेलें आहे. यासंबंधीं पुढील श्लोक आढळतात----

खननं दहनं त्याग इति या त्रिविधोच्यते
शरीरसंस्क्रिया ह्यस्य परलोकजयावहा ।।
विधिः श्माशानसंयुक्तो योऽन्यः सञ्चयनादिकः
कर्मोपयुक्तदेहस्य प्रतिपत्त्यर्थ एव सः ।।

मृत झालेल्याचे संस्कार करण्यास जर कोणीहि अधिकारी नसेल तर मृताला पाण्यांत टाकणेंच योग्य असें सांगितलें आहे. ज्यांचे संस्कार झालेले नाहीत, अशा लहान मुलांना पुरतात. संन्यासी मृत झाला तर त्यालाहि अग्निसंस्कार न करतां पुरायचेंच असतें. मृताला अग्नीमध्ये दहन करणें हाच सर्व सामान्य रूढ प्रकार होय. मृत झालेल्या मनुष्याचे पूर्वी कांही संस्कार झालेले असल्यास त्याचें विधिपूर्वक दहन करतात; पण त्याचे संस्कार झालेले नसल्यास मृताला अमंत्रक अग्नि देतात. याला भडाग्नि देणें असें म्हणतात. मंत्रपूर्वक अग्नि देण्याचा विधि भिन्न भिन्न शाखांमध्ये निरनिराळा सांगितला आहे. तैत्तिरीय आरण्यकाच्या सहाव्या अध्यायामध्ये अंत्येष्टीसाठी लागणारे सर्व मंत्र एकत्रित केलेले दिसतात. ब्राह्मणग्रंथांमध्ये पितृमेधाचा असा विधि सांगितलेला नाही. परंतु प्रायश्चित्ताच्या अनुषंगाने यजमान मृत झाल्यास काय करावें याचें दिग्दर्शन ब्राह्मण ग्रंथांमध्ये केलेलें आढळतें. पितृमेधाचा विधि सर्व सूत्रकारांनी सांगितला आहे. कांही शाखांच्या श्रौतसूत्रामध्ये हा विधि आहे; तर कांही शाखांच्या सूत्रकारांनी पितृमेधाचा समावेश गृह्यसूत्रामध्ये केला आहे. अंत्येष्टि हें कर्म श्रौत आणि गृह्य असें उभयविध आहे. मृत मनुष्य अग्निहोत्री असेल, तर त्याचें दहनकर्म हें पुष्कळ विस्तृत आहे. परंतु अग्निहोत्र नसलेला यजमान मृत झाल्यास कोणता विधि करावा हेंहि सर्व सूत्रकारांनी सांगितलें आहे. सर्वसामान्य दहनविधीची माहिती अशी --

पितृमेधाचा विधि सांगण्यास सुरवात करतांना वैखानस गृह्यसूत्रामध्ये (५.१) आसन्नमरण यजमानाने काय करावें हें सांगितलें आहे–मागच्या तीन वर्षांत येऊन गेलेल्या अरिष्टांचा विचार करून आपल्या आयुर्मर्यादेची परीक्षा करावी. तदनुसार आपल्या आप्तांना बोलावून संपत्तीची वांटणी करावी. मृत्युदिनाच्या दिवशीं स्वच्छ जागीं वाळू पसरावी व तिच्यावर दर्भ आंथरून त्यांवर बसावें अथवा दक्षिणेकडे डोकें करून निजावें. प्रयाणकाल जवळ आला असतां शुक्ल कृष्ण अशा दोन्ही गति ध्यानांत घ्याव्या. विषयांपासून इंद्रियांना निवृत्त करून ब्रह्माच्या ठिकाणीं मन स्थिर करावें. सोऽहम् या तत्त्वाचें चिंतन करावें.

आसन्नमरण यजमानास त्याच्या अग्नीसह नदीच्या कांठावर न्यावें असेंहि कांही सूत्रकारांनी सांगितलें आहे. यजमानाची मरणावस्था जवळ आली म्हणजे ‘ ब्रह्मविदाप्नोति ’ (तैत्तिरीय उप. २) आणि ‘ भृगुर्वै वारुणिः’ (तै. उप. ३) हे दोन अध्याय म्हणावे व यजमान मृत झाला हें नक्की झाल्यावर पुढचें कर्म करण्यास सुरवात करावी असें सांगितलें आहे.

यजमान सकाळचा होम झाल्यानंतर मृत झाल्यास ठीकच; परंतु रात्रीं मृत झाल्यास लगेच प्रातर्होम करून मग अंत्येष्टीचा विधि करायचा असतो. तसेंच पौर्णिमेनंतर आणि अमावास्येच्या अगोदर मृत झाल्यास लगेच अमावास्येष्टि करतात

अथवा त्या इष्टीबद्दल पूर्णाहुति घालतात. मृत यजमानास गार्हपत्याजवळ ठेवून गार्हपत्यादि तीनहि अग्नींवर आहुति देतात. अग्निशाळेच्या दक्षिणेस बंदिस्त जागीं यजमानाचें वपन करतात. मग स्नान घालून एका खाटेवर कृष्णाजिन पसरून त्यावर त्याला आडवें ठेवतात. दक्षिणाग्नीवर चरु शिजवतात. (तीन बोकड मृताबरोबर नेण्यासाठीं आणून ठेवावे असें कांही सूत्रकारांनी सांगितलें आहे.) मग श्मशानाकडे जाण्याची तयारी करतात. एक वृद्ध गाय बरोबर नेतात. तीन्ही अग्नि भांड्यांतून स्मशानांत न्यावे अथवा अग्निसमारोप करून श्मशानांत पुन्हा मंथन करावें असे विकल्प सांगितले आहेत. यजमानाला वाहनांतून न्यावें असेंहि सांगितलें आहे. यजमानाबरोबर अग्नि आणि सर्व यज्ञीय पात्रें नेतात. प्रेताबरोबर वृद्धांनी जायचें असतें. स्त्रियांनीहि बरोबर जावें असें सांगितलें आहे. यजमानपत्नीनेहि प्रेताबरोबर जायचें असतें. स्त्रियांनी केस मोकळे सोडायचे असतात. स्त्रियांनी प्रेताबरोबर जाण्याची प्रथा आजमितीस सर्वत्र आढळून येत नसली, तरी वेदकालांत यजमानपत्नीने जाण्याची पद्धति होती, ही गोष्ट स्पष्ट आहे. आहे. श्मशानाच्या मार्गात एक चतुर्थांश अंतर चालून गेल्यावर एका मातीच्या ढेकळावर भाताचा पिंड देतात. (तीक्ष्ण शस्त्राने त्या वेळीं एक बोकड मारावा असें कांही सूत्रकारांनी सांगितलें आहे.) याप्रमाणे आणखी तीन वेळां वाटेंत थांबून श्मशनांत जातात. पळसाच्या किंवा शमीच्या फांदीने दहनाची जागा स्वच्छ करतात. त्या ठिकाणीं पात्रें ठेवून त्यांचें प्रोक्षण करतात. (या वेळीं यजमानाचें पोट फाडून आंतडें व पुरीष बाहेर काढावें आणि त्या ठिकाणीं तूप ओतून तें दर्भांनी पुन्हा शिवून टाकावें असेंहि एक मत आहे; परंतु असें करणें योग्य नव्हे असें सर्व सूत्रकारांनी सांगितलें आहे.) बरोबर आणलेली म्हातारी गाय मारून तिचीं अंगें बाहेर काढतात. श्मशानाच्या आग्नेयी दिशेकडे चिता रचतात. यजमानपत्नीला या वेळीं पतीच्या शेजारीं झोपण्यास सांगतात. (पत्नीने शेजारीं बसावें असाहि एक पक्ष आहे.) त्या वेळीं पुढील मंत्र म्हणतात--

इयं नारी पतिलोकं वृणाना ।
निपद्यत उपत्वा मर्त्यप्रेतम् ।
विश्वं पुराणमनुपालयन्ती ।
तस्यै प्रजां द्रविणं चेह धेहि ।
(तै. आ. ६.११)

अर्थ – हे मनुष्या ! पतिलोकास येण्याची इच्छा करणारी आणि सनातन स्त्रीधर्माचें पालन करणारी ही पतिव्रता तुझ्या जवळ आली आहे. तू तिला पूर्वीची संतति व धन घेण्याची अनुज्ञा दे.

नंतर जवळच्या नातलगांपैकी कोणीतरी त्या यजमानपत्नीला चितेकडून दूर करतात. प्रेतास चितेवर ठेवून त्यावर सुवर्णाचे तुकडे टाकतात. यज्ञीय पात्रें उक्त ठिकाणीं ठेवतात. याला पात्रांचें चयन म्हणतात. गाईचीं काढलेलीं विविध अंगें यजमानाच्या निरनिराळ्या अवयवांवर ठेवतात. (गाय मारूं नये असाहि एक पक्ष आहे.) मग चितेस अग्नि देतात. आहवनीय पुढच्या बाजूस, गार्हपत्य पाठीमागे व दक्षिणाग्नि दक्षिणेकडे ठवतात. यम देवतेसाठी सूक्तें म्हणून चितेचें उपस्थान करतात. दहन जिथे केलें असेल, त्याच्या पाठीमागे तीन रेधा काढून त्यांत पाणी ओततात. त्या पाण्याने सर्वजण मार्जन करतात. (पत्नीने, मुलाने अथवा अन्य कोणींहि उदकुंभ भरून घेऊन उलटया तीन प्रदक्षिणा घालीत पाण्याची धार पाडावी असें वैखानस गृह्यसूत्रांत (५.५) सांगितलें आहे.) दहनकर्म झाल्यावर वपन करून मागे न पाहतां घरीं परततात. यजमानाच्या जवळच्या नातलगांनीच वपन करावें असें बौधायन पितृमेधसूत्रांत (१.१२) सांगितलें आहे.

याप्रमाणे दहनाचा विधि करायचा असतो. दहनाच्या विधीसंबंधीं अनेक मतभेद असावे असें दिसतें. बौधायन पितृमेध सूत्रामध्ये ठिकठिकाणीं 'यच्चाऽत्र स्त्रिय आहुस्तत्कुर्वन्ति' (=स्त्रिया जें जें सांगतील तें तें करावें) असें वाक्य येतें (१-१०). यजमान पितृलोकास जात असतांना त्याच्याबरोबर आवश्यक ती सामग्री असावी असें सांगितलें आहे. म्हणूनच गाय व बोकड मारून त्याच्या बरोबर द्यावयाचे असतात.

दहन ज्या दिवशीं केलें असेल त्याच्या तिसऱ्या, पांचव्या अथवा दहाव्या दिवशीं अस्थि गोळा करतात. म्हाताऱ्या पुरुषांनी अथवा बायकांनी अस्थि गोळा कराव्या असें सांगितलें आहे. पाय, मांडी, कटिप्रदेश, मस्तक इ. ठिकाणच्या अस्थि गोळा करून एका कुंभांत भरतात. आस्थि गोळा करतांना मंत्र म्हणावे लागतात. श्मशानामध्येच एक खड्डा करून तो अस्थिकुंभ त्यामध्ये ठेवतात. राख भरून दूर टाकून देतात. अस्थींचें पुन: दहन करावें असाहि एक पक्ष आहे. त्यासाठी प्रेताचें ज्या अग्नीने दहन केलें असेल तो अग्नि शिल्लक असल्यास घेतात अथवा मंथन करून अग्नि सिद्ध करतात. अस्थि तुपामध्यें भिजवून त्यांचा या अग्नीवर होम करतात. अस्थि पुरण्याचा आणखी एक निराळा प्रकार आढळतो तो असा--श्मशानांत जाऊन ज्या ठिकाणीं दहन केलें असेल, ती जागा नांगरतात. नांगराच्या रेघा पडतील त्यांवर तिळ, धाना (लाह्या), दूध वगैरे पदार्थ घालतात. नंतर कुंभांतील अस्थि काढून त्या पुरुषाकृतीप्रमाणे नांगराच्या रेघांवर मांडतात. अस्थींच्यावर निरनिराळ्या प्रकारच्या विटा मांडतात. या विटांची संख्या अग्निचयनांतील

विधीप्रमाणे एक हजार अथवा त्याहून अधिक असते. चयन झाल्यावर उपस्थान करायचें असतें. या चयनास लोष्ठचिति अथवा श्मशानचयन असें म्हणतात.

याप्रमाणे अंत्येष्टीचा विधि सांगितला आहे. यजमान प्रवासांत असतां मृत झाला, तर प्रायश्चित्तविधि करून नंतर पितृमेध करतात. [विद्याधरशास्त्री भिडे]


अंदमान

बंगालच्या उपसागरांत लहानमोठ्या बेटांनी बनलेला जो प्रदेश आहे, त्याला अंदमान असें म्हणतात. अंदमानांत लहानमोठीं मिळून २०४ बेटें आहेत. अंदमानाचा भूभाग पांच मुख्य द्वीपांनी बनला आहे. या बेटांच्या वरच्या द्वीपसमूहास महाअंदमान असें नांव आहे. तिथल्या पर्वतश्रेणींतल्या सर्वोच्च डोंगराची उंची २४०० फूट आहे. मुख्य बेटांच्या दक्षिणेस छोटें अंदमान आहे.

इतिहासवेत्ते तर्क करतात, की मलायानिवासी ज्याला हंदुमान म्हणतात, त्या रामभक्त हनुमंतावरून अंदमान हें नांव पडलें असावें. आख्यायिका अशी आहे, की रामाने लंकेंत जाण्यासाठी इथेच प्रथम सेतु बांधण्याचा प्रयत्न केला होता; पण कांही कारणाने तो बेत रद्द करून त्याने रामेश्वराजवळ तें काम पुरें केलें.

पुराणकालीन उल्लेखांप्रमाणेच सनपूर्व काळांत अरब यात्रिकांच्या प्रवासवृत्तांतहि अंदमानाचा उल्लेख मिळतो. चिनी प्रवासी इत्सिंग व मार्कोपोलो (इ. स. १२८६) यांच्या प्रवासवर्णनांतहि अंदमानाचा उल्लेख आला आहे.

लंका, ब्रह्मदेश व तिथून पुढील दूर पूर्वेकडचे अन्य देश यांच्या जलमार्गांत हीं बेटें येतात. कित्येक शतकांपूर्वीपासून दर्यावर्दी खलाशांना हीं बेटें माहीत होतीं. मध्ययुगांत गुलामांच्या व्यापाराचेंहि हें केंद्र बनलें होतें. सागरावर लूटमार करणारे चांचे लोकहि वेळोवेळी यांचा आश्रय घेत. हस्तिदंत, मसाले, ढाक्याची मलमल, हिरेमाणकें, इ. बहुमोल वस्तूंचा व्यापार या भागांतून चाले. चांचे लोक अशा व्यापारी जहाजांवर डोळा ठेवून त्यांच्यावर हल्ला करीत व तो माल लुटीत. विशेषेंकरून ई. इं. कंपनीच्या जहाजांवर त्यांचा डोळा असे. शेवटीं शेवटीं तर, बंगालच्या उपसागरांतली ही चांचेगिरी इतकी भयंकर वाढली, की ई. इं. कंपनीच्या बड्या अधिकाऱ्यांना त्या प्रकरणीं लक्ष घालणें भाग पडलें. मग लॉर्ड कॉर्नवॉलिस याने या चांच्यांचें पारिपत्य करण्यासाठी कॅ. ब्लेअर याच्या नेतृत्वाखालीं १७८९ सालीं एक आरमारी तुकडी अंदमानाकडे रवाना केली. कॅ. ब्लेअर ज्या बंदरांत उतरला त्या बंदराला पुढे त्याचें स्मारक म्हणून पोर्ट ब्लेअर असें नांव देण्यांत आलें. आजहि पोर्ट ब्लेअर हीच अंदमान द्वीपसमूहाची राजधानी आहे. या बंदराचा कलकत्ता व मद्रास या बंदरांशीं सागरी संबंध आहे.




मुख्य रस्ता—पोर्ट ब्लेअर
[मार्च ऑफ् इंडियाच्या सौजन्याने]

१८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेतलेल्या ज्या देशभक्तांना ब्रिटिशांनी जन्मठेपेची शिक्षा दिली, त्यांना पोर्ट ब्लेअर इथल्या तुरुंगांत आणून ठेवण्यांत आलें. तेव्हापासून पुढे ६० वर्षेपर्यंत अंदमानचा हा सेल्युलर तुरुंग काळें पाणी या नांवाने ओळखला जात असे. नुसत्या त्याच्या नांवानेच भारतीय लोकांच्या अंतःकरणाचा थरकांप होत असे. तिथल्या राजबंद्यांना मिळणारी वागणूक अमानुष व अंगावर शहारे आणणारी होती. त्या पाशवी छळाने त्रस्त झालेले बंदी प्रसंगीं प्रतिकारासाठी आपल्या प्राणांवरहि उदार होत. १८७२ सालीं हिंदुस्थानचा ग. ज. लॉर्ड मेयो हा त्या कारागृहाची पाहणी करण्यास गेला असतांना अशाच एका जिवावर उदार झालेल्या कैद्याने त्याचा खून केला. पण त्या घटनेने ब्रिटिश सरकारचे डोळे उघडले व त्या तुरुंगाची कांही अंशीं सुधारणा करण्यांत आली. त्यामुळे तिथल्या कैद्यांचें जीवन अल्पांशानेतरी सुसह्य झालें.

पुढे श्री. सावरकर बंधू, भाई परमानंद, महावीरसिंह, संन्याल बंधू, अशा शेकडो भारतीय क्रांतिकारक देशभक्तांना ब्रिटिश सरकारने अंदमानांतल्या याच कारागृहांत काळचा पाण्यावर धाडलें. दुसऱ्या महायुद्धांत १९४२ सालीं अंदमान बेटें जपान्यांनी काबीज केलीं होतीं. पण युद्धाच्या अखेरीस जपानला शरणागति पत्करावी लागली, तेव्हा त्यांना हीं बेटेंहि सोडणें भाग पडलें.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर हा द्वीपसमूह भारतीय संघ-

राज्याचें चतुर्थ श्रेणीचें राज्य बनलें. भारत सरकारने इथे कित्येक निर्वासितांचें पुनर्वसन केलें आहे. तिथला सेल्युलर जेल आता रुग्णालयांत परिवर्तित झाला आहे. तिथली जनसंख्या अंदाजें ४० हजार आहे. भारतांतून जन्मठेपेवर आलेल्या सर्व जाती-जमातींच्या कैद्यांचे वंशज अंदमानात वसाहत करून राहिले आहेत. अंदमानांतल्या तद्देशीय मूळ लोकांना जारवा व ओंजे म्हणतात. जारवा मोठ्या अंदमानांत असून ओंजे छोटया अंदमानांत आहेत. हे लोक नेग्रिटो वंशाचे आहेत. यांना कामधंदा किंवा शेती करणें आवडत नाही. ते भटकें जीवन जगतात. जारवा लोक तिरंदाजींत निष्णात आहेत. बाणांशिवाय त्यांना दुसरें हत्यार माहीत नाही. वन्य पशूंसारखेंच त्यांचें जीवन आहे. त्यांना माणसाळविण्याचे आजवरचे सर्व प्रयत्न वाया गेले आहेत. आपल्याशिवाय अन्य जातीच्या माणसांची त्यांना विलक्षण भीति वाटते. म्हणूनच ते निबिड अरण्यांत राहतात. ते अद्यापि ख्रिस्ती मिशनऱ्यांच्याहि तावडींत सापडले नाहीत. पण रोगराई व सुधारलेल्या समाजापासून अलगपणा यांमुळे त्यांची संख्या झपाट्याने कमी कमी होत आहे.



अंदमानी लोकांचें भालायुद्ध
[मार्च ऑफ् इंडियाच्या सौजन्याने]

अंदमान बेटांतील प्राचीन रहिवासी मागसलेले होते व ते समुद्रावरून जाणाऱ्या जहाजांचा विध्वंस करून त्यांवरील लोकांना खात असत, असें इ. स. ८५१ मधील एका अरबी लेखांत लिहिलेलें आहे. परंतु हें खरें नाही. इथले आदिवासी हसतमुख, उत्साही व क्रीडाप्रेमी आहेत. मात्र एकदा रागावले, की कोणतेंहि भयंकर कृत्य करायला ते मागेपुढे पाहत नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवणें जड जातें. यांच्यांत अनेक जाती पोटजाती आहेत व त्यांची भाषा व राहणीहि वेगळी आहे. त्यांचा भुतांखेतांवर विलक्षण विश्वास असतो. मनुष्य मेल्यावर तो भूतयोनींत जातो, असें ते समजतात. अंदमानी पुरुषांचें शरीर पीळदार, सुडौल व सुंदर असतें. त्यांचे केस काळे चमकदार कुरळे असतात. स्त्रिया मात्र पुरुषांइतक्या सुंदर नसतात.

अंदमानांतल्या जंगलांत हिंस्र श्वापदें जवळजवळ नव्हतींच. मुख्य भूखंडावर जंगली जनावरांची निपज व वाढ होण्यापूर्वींच अंदमान बेटें त्या भूखंडापासून अलग झालीं असावीं. पण चालू शतकांत तिथे हरणें व वाघ नेऊन सोडलेले आहेत. अंदमान बेटें मलेरियाने ग्रस्त आहेत. तीं निसर्गसौंदर्याने समृद्ध आहेत. लाकूड व तांदूळ हें इथलें मुख्य उत्पन्न आहे. इथल्या समुद्रांत मासेहि अनेक प्रकारचे मिळतात. मालाची वाहतूक बहुतेक जलमार्गानेच होते. यापुढे भारतीय संघराज्यांत या रमणीय द्वीपसमुहाचा भविष्यकाल उज्ज्वल बनेल, अशी खात्री वाटते.

अंध

एक नद. (भाग. पु. ५. १९. १८). 'अन्धशोणौ महानदौ' या वचनांत अंध व शोण हे दोन महानद असल्याचें सांगितलें आहे. श्री. डे म्हणतात, की ही नदी असून ती भागलपूरमध्यें गंगेला मिळते. छंदन किंवा अंधेला असें तिचें नांव आहे. [हि. ध.]

अंध किंवा आंध

विदर्भातली एक शेतकरी जात. ही मूळ आंध्र लोकांची पोटजात असावी. यांचे वरताती व खालताती असे दोन भेद आहेत. पहिल्या वर्गांत औरस वैध संततीचा समावेश होतो. दुसरी अवैध संततीची प्रजा असावी. यांच्यांत गोत्रें व आडनांवेंहि आहेत.

विवाहप्रथा – मामाच्या मुलीशीं लग्न होतें. सगोत्र विवाह निषिद्ध आहे. लग्नविधि कुणब्यांप्रमाणेंच असतो. माघापासून वैशाखापर्यंत लग्नें होतात. अनेक बायका करण्यास मोकळीक असते. मुलीला लग्नापूर्वी उच्च जातीच्या पुरुषाकडून गर्भ राहिल्यास प्रथम तिला दंड करतात व मग पुनर्विवाहाप्रमाणें तिचें लग्न करतात. क्वचित् महार–मांगांबरोबर व्यभिचार केलेल्या स्त्रियांना पावन करून जातींत घेतल्याचींहि उदाहरणें आहेत.

मृताला दक्षिणेकडे डोकें करून पुरतात. मद्यमांसाचा निषेध नाहीं. जातीची पंचायत असते. तिच्या मुख्यास मोहवारिया म्हणतात. त्याला दोन मदतनीस असतात. जातींतले कज्जे, खटले पंचायतींत निवडले जातात. अपराध्याला दंड करतात. हे लोक नामांकित पारधी आहेत. हे पशूंची शिकार करतात; पण पक्षी मारीत नाहीत. हे या प्रदेशांतले आदिवासी असावे. पण आता ते हिंदु संस्कृतींत पूर्णपणें मिसळले आहेत. [म. ज्ञा. को.]

अंधक (१) हें असुरांच्या एका पोटजातीचें नांव असावें, असें सप्तशतीवरून दिसतें. सध्याचे त्यांचे वंशज कोण तें मात्र कळत नाहीं. [रा. ले. सं.]

(२) यादववंशाची एक शाखा. आनर्त देशांत (द्वारका) या शाखेचे लोक राहत असून उग्रसेन हा त्यांचा नायक होता. हे श्रीकृष्णाच्या पराक्रमाची प्रशंसा करीत. कंसाच्या मृत्यूने हे भयमुक्त झाले (भाग. पु. १०. ४५. १५). अखेर हे आपसांतच लढून मरण पावले. मत्स्य पुराणांत यांचा वंश दिलेला आहे (अ. ४४).

अंधकनिकाय अशोकाच्या कालांत महादेव नांवाच्या एका भिक्षूने आंध्र प्रदेशांत चैत्यवादी संप्रदायाची स्थापना करून बौद्ध धर्माचा प्रचार सुरू केला. हा संप्रदाय महाचैत्य संप्रदायाचीच एक शाखा म्हणून जन्माला आला. आंध्रांतल्या धान्यकटक नगराच्या पूर्व–पश्चिमेस दोन डोंगर आहेत. दोन्ही डोंगरांत भिक्षुसंघ राहत होते. त्या आधारावर हा संप्रदाय पूर्वशैलीय आणि अपरशैलीय या दोन शाखांत विभाजित झाला. कांही कालाने त्यांत राजगिरक आणि सिद्धार्थक असे आणखी दोन भेद पडले. हे चारी भेद मिळून अन्धकनिकाय बनतो. त्यांतूनच पुढे वैपुल्यवादी निघाले. त्यांनी जे सिद्धांत पुढे आणले, त्यांत बुद्धाने अवतार घेतला नाही, तो या जगांत राहिला नाही आणि त्याने उपदेश केला नाही, हा एक क्रांतिकारक सिद्धांत होता. अन्धकनिकाय हाच या वैपुल्य-वाद्यांना आधारभूत होता. त्यांतूनच पुढे महायान पंथ उगम पावला. **पाहा**– महायान [सि. सा.]

अंधक-वृष्णि महाभारत आणि कौटिल्य या दोहोंच्या मतें हें संघराज्य होतें. यांत राजन्यांच्या द्वारें शासनाची व्यवस्था होती. अंधक आणि वृष्णि हीं यांतलीं दोन कुलें होतीं. कुलपतीला राजा आणि त्यांच्या अपत्यांना राजन्य म्हणत. अनेक कुलावयव संयुक्त व संघटित करून बनवलेलें हें राज्य होतें व त्याचा भौगोलिक विस्तारहि मोठा होता. अक्रूर हा अंधकांचा आणि कृष्ण हा वृष्णींचा नेता होता. **पाहा**-कृष्ण. [पा. भा.]

अंधकार क्रौंचद्वीपांतील एक वर्ष. [ब्रह्मांड पु. २. १९. ७२]

अंधकासुरमर्दन (शिव) मूर्ति अंधकासुर नांवाचा हिरण्याक्षाचा एक पुत्र होता. त्याने एकदा पार्वतीची अभिलाषा धरल्यामुळे शिव त्याचें पारिपत्य करण्यास गेला. दोघांचें युद्ध झालें. त्यांत असुराच्या प्रत्येक रक्तबिंदूपासून अनेक राक्षस निर्माण होऊं लागले. त्यामुळे शिवाला अंधकासुराचा पराभव करणें कठिण झालें. मग शिवाने चामुंडीसह सप्तमातृकांना उत्पन्न करून त्यांना असुराचें रक्त वरच्यावर पिण्यास सांगितलें. मातृकांनी तसें करतांच अंधकासुराचा निरुपाय होऊन तो शिवाला शरण गेला. मग शिवाने त्याचें भृगीश असें नांव ठेवून त्याला गणांचें आधिपत्य दिलें. या घटनेवर निर्माण केलेलीं अनेक शिवशिल्पें अनेक ठिकाणीं आहेत. त्यांतलें सर्वोत्कृष्ट शिल्प घारापुरी येथे असून त्यांत शिवाच्या हातांतल्या भाल्याच्या फाळावर अंधकासुर खोदलेला आहे **पाहा–**भृंगीश, सप्तमातृका. [मू. वि.]

अंधकूप खोल अंधारी विहीर. एका नरकाचें नांव. शास्त्र-विरुद्ध जीविका चालवणारे, दुसऱ्याला इजा करणारे व परदुःखांत सुख मानणारे लोक या नरकांत यातना भोगतात. [भाग. पु. ५. २६. १७.]

अंधतामिस्र एका नरकाचें नांव. एखाद्याच्या पत्नीचें व मालमत्तेचें हरण करणारे व धर्मविरुद्ध वागून कुटुंबपोषण करणारे या नरकांत जातात. (भाग. पु. ५. २६. ९; ३. ३०. ३३). या नरकांतील यातनांनी जीवाची मति व दृष्टि नष्ट होते. [पु. इं.]

अंधिनी ललितेच्या किरिचक्राच्या तिसऱ्या पर्वावरील एक देवता. [पु. इं.]

अंध्र दक्षिणापथांतील एक जमात. हिने तीनशे वर्षें राज्य केलें (भाग. पु. १२. १. २२). हे हीन यातीचे लोक विष्णूची आराधना करून शुद्ध झाले, असें भागवतांत म्हटलें आहे (२. ४. १८).

अंध्रवाक पूर्वेकडील जमाती लोक. अधिक माहिती मिळत नाही.

अंबट्टन दक्षिण त्रिवांकुरमधल्या नापितांच्या जातीला हें नांव आहे. ब्राह्मण पुरुष व वैश्य स्त्री यांच्या संबंधापासून ही जात निर्माण झाली असें सांगतात. ब्राह्मण यांच्या घरीं पौरोहित्य करतात. सालेम जिल्ह्यांतील कोंगा वेल्लाळांत अंबट्टन हे लग्नाचें उपाध्येपण करतात. याविषयीं दंतकथा अशी –– पांड्यांच्या कारकीर्दींत एका विवाहप्रसंगीं

ब्राह्मण व अंबट्टन या दोघांसहि लग्नाच्या पौरोहित्यास बोलावलें होतें. पण वाटेंत ब्राह्मणाचा मृत्यु झाला. हा अपशकुन समजून राजपुरुषांनी असें ठरविलें, की यापुढें अंबट्टनालाच पौरोहित्यासाठी बोलवायचें.

यांना नासिवन (अपवित्र), नासुवन (नाकांतून जन्मलेला) अथवा नाविदन असें म्हणतात. लग्नप्रसंगीं त्यांना पंडित म्हणतात. स्त्रियांचें क्षौर करण्याचें काम यांच्यांतील बायका करीत. अंबट्टनांना हजामतीखेरीज वैद्यकीहि अवगत असते. यांच्या बायका सुइणीचीं कामें करतात. हे मनुस्मृतींतील अंबष्ठांशीं आपला संबंध जोडून आपल्या जातीचें श्रेष्ठत्व सांगतात; पण तरीहि उच्च वर्णी लोक यांचा विटाळ मानतात.

अंबट्टनांचे तीन पोटभेद आहेत. (१) मलयाळम् भाषा बोलणारे व मरुमक्कतायम् हा कायदा पाळणारे (२) मलयाळम् भाषा बोलणारे; पण मरुमक्कतायम् न पाळणारे, व (३) तमिळ भाषा बोलणारे.

विवाहप्रथा – लग्नसमारंभ पांच दिवस चालतो. विधवाविवाह मान्य नाही. विधवांना लग्नसमारंभांतहि मज्जाव असतो. मुलगी ऋतुस्नात झाली, की तिला ११ दिवस अस्पृश्य मानतात. बाराव्या दिवशीं स्नान करून ती घरांत सर्वांना शिवते.

यांच्यांत शैव-वैष्णव भेदहि आहे. दोघांत लग्नसंबंध होतात. वैष्णव मद्य-मांस सेवीत नाहीत. हे लोक कोमटयांच्या पंगतीला बसत नाहीत. बायका सुवर्णमण्यांचे अलंकार घालतात व मोठ्या प्रमाणांत गोंदून घेतात. मूर्ति, मादेन व यक्षी या अंबट्टनांच्या देवता होत. याशिवाय हे अन्य हिंदु देवतांनाहि भजतात. मृतांना जाळतात व ब्राह्मणाकरवीं और्ध्वदेहिक संस्कारहि करतात. [का. ट्रा. स. इं.; म. ज्ञा. को.]

अंबपालीवन ही आमराई वैशालीमध्ये होती व अंबपाली नांवाच्या एका गणिकेने ही बुद्धाला देणगी म्हणून दिली होती. बुद्ध कांही काल या वनांत राहिला होता. **पाहा** – वैशाली. [दीघनि. २. ९४]

अंबर एक प्राचीन जमात. हे मालवांचे अंकित होते व शिकंदराबरोबर झालेल्या युद्धांत त्यांनी मालव गणांना मदत केली होती. [ए. से. इं.]

अंबर नदी मेरूच्या उतारावरून ही निघते व देवभ्राज, महाभ्राज, वैभ्राज या प्रदेशांतून वाहून पश्चिम दिशेस सितोदा सरोवरांत शिरते व केतुमालांतील पारिजात पर्वताला भिजवून पुढे पश्चिम सागरास मिळते. [वायु पु. पू. ४२. ४४ – ५७]

अंबरनाथ महाराष्ट्राच्या ठाणें जिल्ह्यांतील एक गांव. या ठिकाणीं शंकराचें देवालय असून तें अकराव्या शतकांतलें असावें असें म्हणतात. हें मोडकळीस आलेलें असलें तरी त्याचें शिल्प व कोरीव काम अप्रतिम आहे. या मंदिराभोंवतीची भिंत पडली असून फक्त पश्चिमेकडील दोन दारांचे अवशेष उरले आहेत. समोरचा नंदीमंडपहि नष्ट झाला आहे. मुख्य मंदिर मात्र बरेंचसें सुरक्षित आहे. या मंदिराचे गर्भगृह व सभामंडप असे दोन भाग आहेत. गर्भगृह मंडपापेक्षां खोल आहे. गाभाऱ्यांत खडकाचा एक उंचवटा आहे, त्यालाच स्वयंभू शिवलिंग म्हणतात. गाभाऱ्याच्या दरवाजावर व गणेशपट्टीच्या वरच्या भागीं शिवादि देवता व सिंह, हत्ती इ. आकृति कोरलेल्या आहेत. मंडप सर्व बाजूंनी बंद असून त्यांत स्तंभांच्या रांगा आहेत. त्यांवर अनेक मूर्ति कोरलेल्या असून प्रत्येक मूर्तीवर तोरण आहे.

मंडपाच्या मध्यभागीं चार स्तंभांवर आधारलेलें घुमटाकृति छत आहे. त्याच्या मधोमध झुंबर असून तिथपर्यंत घुमटाची रचना एकापेक्षा एक लहान अशा वर्तुळांनी केलेली आहे. विमान व सभामंडपाचें छप्पर यांच्यामध्ये अंतराळ आहे. विमानाच्या दर्शनी भागावर तोरण असून त्यांतलें नक्षीकाम उत्कृष्ट आहे. मंदिराच्या भिंतींवर एकंदर ७० मूर्ति कोरलेल्या असून त्यांतल्या बऱ्याच मूर्ति शिव-पार्वतींचीं विविध रूपें आहेत. कांही मूर्ति विष्णूच्या व त्याच्या अवतारांच्या आहेत. मंदिरांतल्या एका मूर्तीला त्रिमुखी असें म्हणतात. तिला तीन तोंडें असून तिच्या अंकावर स्त्रीमूर्ति आहे. हें शिव-पार्वतीशिल्प असावें. इथे त्रिभंगी नृत्यमुद्रेंत महिषासुरमर्दिनीची मूर्ति व अष्टभुज कामदेवाचीहि मूर्ति आहे.

हें मंदिर त्या कालीं प्रचलित असलेल्या अनेक मंदिरशैलींच्या मिश्रणाने निर्माण झालें आहे. उत्तर कोकणांत हें अद्वितीय असून शिलाहारांच्या मंदिरशिल्पाचा तो एकमात्र अत्युत्कृष्ट नमुना आहे.

अंबर हुसेन (१६ वें शतक) महाराष्ट्रांतला मुसलमान ग्रंथकार. याने अंबर हुसेनी या नांवाने लिहिलेली ओवीबद्ध गीताटीका उपलब्ध आहे. शंकराचार्यांचें भाष्य व श्रीधरस्वामींचें व्याख्यान पाहून आपण लिहितों, असें तो म्हणतो. यावरून तो व्युत्पन्न असावा, असें वाटतें. [म. सा.]

अंबलक्कारण ग्रामरक्षकाचा व शेतीचा धंदा करणारी तामिळनाडमधील एक जात. हे लोक मुख्यत्वें तिरुचिरापल्ली व पुदुकोट्टाई या भागांत वास्तव्य करतात. मुट्टिरियन जातीशीं यांचा जवळचा संबंध आहे. आपण शिवाच्या घर्मबिंदूपासून जन्मलों असें हे सांगतात. कण्णप्प या नायन्मार संताला हे आपला मूळ पूर्वज मानतात.

विवाहप्रथा–मुलगी वयांत आल्याशिवाय लग्न करीत नाहीत. घटस्फोट घेतां येतो; पण त्याला बरेच निर्बंध असतात. विधवाविवाहाला हरकत नसते. कांही लोक केवळ आपल्या पोटजातींतच लग्नसंबंध करतात. पौरोहित्यासाठी ब्राह्मण बोलावतात. मृताच्या दहनाच्या वेळीं व श्राद्ध करतांना हे जानवें घालतात. मद्यमांस चालतें. प्रत्येक नाडूंत त्यांची पंचायत असते. जातीचे निवाडे पंचायतींत होतात. पंचायत प्रमुखाला कारियक्करण म्हणतात. हा हक्क वंशपरंपरेने चालतो. [का. ट्रा. स. इं.]

अंबलत्थिका राजगृहाजवळचें एक बौद्ध स्थळ. इथे बिंबिसार राजाचें उपवन होतें. बुद्धाच्या काळांत राजगृहाहून पूर्व व ईशान्य या दिशांस जाणाऱ्या राजरस्त्यावरील पहिल्या मुक्कामाचें हें ठिकाण होतें. [दीघनिकाय १. १; २. ७२]

अंबलवासी तमिळनाड व केरळ यांतली एक अंतराळ जात. हिला केरळांत क्षत्रियांच्या खालोखाल मानतात. केरळांत यांना देवलयांतील कामें करण्याचा अधिकार मिळालेला आहे. झाडलोट, दिवाबत्ती पूजेची सामग्री, चौघडा वाजविणें, इ. देवस्थानांतील सर्व कामें हे करतात. यांच्यांत बारा पोटभेद आहेत. याशिवाय जानवें घालणारे व न घालणारे असाहि भेद आहे. पहिल्यांत अदिकल चाक्यार, नावियार, नंबिस्सन, पुष्पळि इ. जाती येतात, तर दुसऱ्यांत नम्बियार, वारियन, मारार इ. जाती येतात. अदिकल हे मुलाचें उपनयन करतात व गायत्रीमंत्रहि म्हणतात. आपण मूळचे ब्राह्मण; पण भद्रकालीच्या मंदिरांत पूजा केल्यामुळें आमचा मान कमी करण्यांत आला असें हे सांगतात. यांचे चाक्यार व नम्बियार असे आणखी पोटभेद आहेत. नम्पूतिरि ब्राह्मणांनीं व्यभिचार दोषाबद्दल जाती बाहेर टाकलेल्या स्त्रीचीं जीं मुलें उपनीत असतात, त्यांना चाक्यार जातींत घालतात व मुंज न झालेल्यांना नम्बियार या जातींत घालतात. अंबलवासींत मरुमक्कतायम् हा वारसा कायदा चालतो. घटस्फोटाची चाल आहे. अशा स्त्रीला नम्पूतिरि ब्राह्मणाशीं दुसरें लग्न करण्यास हरकत नसते. सर्वसाधारण धर्मकृत्यासाठी हे आपल्यातूनच पुरोहित निवडतात. महत्त्वाचे विधि ब्राह्मणाकडून करवितात. मात्र ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या हातचें पाणी घेत नाहीत. अशौच १० दिवस पाळतात. **पाहा**–चाक्यार, नम्बियार. [का. ट्रा. स. इं; सो. चें. म.]

अंबवन बुद्धकालीन एक आमराई. ही राजगृहाजवळ असून जीवक नांवाच्या राजवैद्याच्या मालकीची होती. इथे बुद्ध कांही काल वास्तव्य करीत असतां मगधराजा अजातशत्रु त्याला भेटायला आला होता. [दीघनि. १]

अंबष्ठ–लोक व देश अंबष्ठ हें एक प्राचीन जनपद असून तें राजाधीन होतें. तिथल्या जानपदांना आंबष्ठच म्हणत. ऐतरेय ब्राह्मणांत उल्लेखिलेला आंबष्ठ्य राजा, यांच्यापैकींच असावा असें गोल्डस्टकर म्हणतो (ऐ. ब्रा. ७. २१. ३.). इतक्या प्राचीन काळीं हे लोक पंजावच्या पूर्व सीमेवर वसले होते असें दिसतें. त्यांची गणना औदीच्यांत केलेली आहे. यांचा देश चिनाबच्या खालच्या अंगाला होता. ग्रीक लेखकांनी संबस्तई आणि अवस्तनोइ असें ज्यांना म्हटलें ते लोक अंबष्ठच होत. महाभारतांत अंबष्ठांचा देश पश्चिमेला असून दिग्विजययात्रेंत नकुलाने त्यांचा पराभव केला असें म्हटलें आहे (मभा. सभा. ४८. १४). अंबष्ठ हे युद्धोपजीवी होते. भारतीय युद्धांत हे कौरवांच्या बाजूने लढले होते.

पुराणांत त्यांना अनव क्षत्रिय असें म्हटलें असून त्यांची उत्पत्ति उशीनरपुत्र सुव्रत याच्यापासून सांगितली आहे. शिबि आणि यौधेय यांच्याशींहि त्यांचा संबंध दिसतो. यावरून प्राचीन काळीं यांना शुद्ध क्षत्रिय मानीत असावे असें वाटतें. पण मनु (१०. ८), याज्ञवल्क्य (१. ९१), बौधायन (ध. सू. १. ९. ३), यांनी अंबष्ठांना संकरजाति मानलें आहे. ब्राह्मण पुरुष व वैश्य स्त्री यांच्या विवाहजन्य संततीला ते अंबष्ठ म्हणतात. गौतमाच्या मतें (ध. सू. ४. १४) क्षत्रिय पुरुष व वैश्य स्त्री यांची संतति म्हणजे अंबष्ठ. हे वैद्यकीय व्यवसाय करतात असें मनु सांगतो (१०. १५). श्री. मुजुमदारांच्या मतें ते ब्रह्मक्षत्रिय म्हणजे जन्माने ब्राह्मण व कर्माने क्षत्रिय होत. पुढील काळांत हे जसे खालीं नर्मदेच्या उगमाजवळ येऊन वसले, तसेच ते पूर्वेस बिहार आणि बंगाल या प्रदेशांतहि पोंचले. आजहि ते बंगालमध्यें त्याच नांवाने आणि मनूच्या मताप्रमाणे वैद्य या संज्ञेने ओळखले जातात. एक लढाऊ जमात म्हणून प्राचीन काळीं लोक त्यांना ओळखीत. [पा. भा.; हि. ध.; ट्रा. एं. इं.]

अंबा आदिशक्ति पार्वतीच्या मातृस्वरूपाला अंबा किंवा अंबा भवानी म्हणतात. हीच महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती या रूपांनी त्रिविध व त्रिगुणात्मक बनते. इतकेंच नव्हे; तर हिचीं अनंत रूपें व अनंत नामें आहेत. कोल्हापूरच्या महालक्ष्मीला व तुळजापुरच्या देवीला अंबाबाई म्हणतात. **पाहा**–कोल्हापूर, तुळजापूर, देवी, शक्ति.

अंबाजी गुजराथमधलें एक देवीचें स्थान. या गांवाचें नांव आरासुर असें असून तें बनासकांठा जिल्ह्यांतील दांता या तालुक्यांत आहे. अबूरोड स्टेशनापासून हें क्षेत्र १३ मैलांवर येतें. इथे नियमित बसगाड्या चालतात. या ठिकाणीं अंबाजीचें मंदिर आहे. मंदिर जुनें, ठेंगणें व लहान आहे; पण पुढे मोठा मंडप आहे. मंडपांत चांदीचे व पितळेचे सिंह उभे आहेत. अंबाजीची मूर्ति नाहीं. पण गर्भगृहांतील कोनाड्यांत वस्त्रालंकार व मुखवटा अशा तऱ्हेने रचतात, की पहाणाऱ्याला माताजीने वाघावर स्वारी केली आहे, असें वाटतें. इथे कुंकवाची उधळण असते.



अंबाजी

मंदिराच्या समोरच्या भागांत एक मोठा चौक आहे. त्याला चाचरनो चोक असें म्हणतात. त्या ठिकाणीं होमहवन करतात. अंबाजीच्या यात्रेंत कोणत्याहि कारणासाठी तेल वापरीत नाहीत. केसांनासुद्धा तेल न लावतां तूपच लावतात. इथे यात्रेच्या वेळीं कोणीहि पुरुष कोणत्याहि स्त्रीची थट्टा-मस्करी करूं शकत नाही. इतकेंच नव्हे; तर यात्रेकरू पुरुषाने क्षेत्रांत असेपर्यंत स्वतःच्या पत्नीशींसुद्धा समागम करतां कामा नये, असा नियम आहे. तसें केल्यास माताजीचा कोप होतो, अशी समजूत आहे. प्रत्येक पौर्णिमेला इथे यात्रा भरते. त्या वेळीं भवाई नांवाचें नृत्य होतें.

अंबाजीजवळ कुंभारिया नांवाच्या खेडेगांवांत मंत्री विमलशाह याने बांधलेलीं कांही जैन मंदिरें आहेत. त्यांबद्दल पुढील दंतकथा सांगतात–अंबाजीने विमलशाहाला पुष्कळ द्रव्य दिलें व त्या पैशांतून त्याने ३६० मंदिरें बांधलीं. नंतर देवीने त्याला विचारलें, की तूं हीं मंदिरें कोणाच्या प्रभावामुळे बांधलींस ? तेव्हां त्यानें उत्तर दिलें, की गुरूच्या प्रभावामुळे. त्यामुळे अंबाजीला राग आला व तिने ३५५ मंदिरें जाळून टाकलीं व फक्त पांचच शिल्लक ठेवलीं.

अंबाबाई समर्थ रामदासांची शिष्या. समर्थ-प्रतापांत हिचा उल्लेख आहे. ही मूळची विजापूरची असून करवीर प्रांतीं राशिवडें येथे मठ करून राहिली होती. [म. सा.]

अंबायज्ञ अंबेच्या उद्देशाने श्रीविष्णूने हा यज्ञ केला. त्यासाठी सत्तावीस ऋत्विज वरले. त्यांनी देवीच्या बीजांनी युक्त अशा मंत्राचा जप आणि हवन केलें. त्या वेळीं देवीने आकाशवाणीच्या द्वारें युगायुगांत धर्मरक्षण करण्याचें वरदान दिलें. त्या दिवसापासून हा यज्ञ रूढ झाला. [देभा. स्कं. ३]

अंबिका (१) ही रुद्राची बहीण होय, असें वाजसनेयी संहितेंत (३·५७) सांगितलें आहे. याज्ञवल्क्याने (१·२८५) हिला विनायकाची माता मानलें असून पुराणांतरीं हिला रुद्रपत्नी म्हटलें आहे (भाग. पु. ३. १२. १३). पूर्वजन्मीं ही दक्षकन्या सती असून पुढच्या जन्मीं हिने हिमाचलपत्नी मेनाहिच्या उदरीं अवतार घेतला अशी कथा आहे. तलाव खोदण्या पूर्वीं हिची पूजा करतात. (मत्स्य पु. ५८) **पाहा**– पार्वती, उमा.

(२) जैन दैवतसमूहांतली यक्षिणी. (दिगंबरमतें कूष्मांडी.) ही नेमिनाथाची सेविका आहे. हिचें वर्णन —

स्वर्णकांतिः सिंहवाहना आम्रलुंबिपाशसंयुक्तदक्षिणकरद्वया पुत्रांकुशसहित वामकरद्वया — (नेमि. चरित)

अर्थ — सोनेरी वर्णाची. सिंहारूढ. आम्रगुच्छ, पाश, पुत्र व अंकुश धारण करणारी. हिचें पौराणिक दुर्गेशीं साधर्म्य आहे. हिच्या मूर्ती जैन क्षेत्रांतून आढळतात. [जै. इ.]

अंबिकावन सरस्वतीच्या तीरावरील अंबिकेला प्रिय असलेलें एक वन. या ठिकाणीं होणाऱ्या उत्सवाला कृष्ण, बलराम व इतर गोप यांसह नंदगोप गेला होता. [भाग पु. १०. ३४]

अंबिकाव्रत आषाढ शु. १४ ला उपवास व पूर्णिमेस प्रातःकाळीं अंबिकेची पूजा. फल–विष्णुलोक-प्राप्ति. [व्रतपरिचय]

अंबिकाहृदय विशिष्ट मंत्रसमूह. मद्यपानाच्या पापाचें क्षालन होण्यासाठी याचा पाठ करतात. [पु. इं.]

अंबिगर चौडय्य (११६० इ. स.) कन्नड वीरशैव कवि. याचीं वचनें कर्नाटकांत फार प्रसिद्ध आहेत.

अंबु भक्खिन प्राचीन कालचा केवळ पाणी पिऊन राहणारा पंथ. विशेष माहिती मिळत नाही. [स्कू. से. इन् जै. लि.]

अंबुवाची सूर्य मृग नक्षत्रांत गेल्यावर पहिले तीन दिवस हा पृथ्वीच्या रजोदर्शनाचा काल मानून त्या मुदतींत जमीन नांगरणें बीं पेरणें इ. कृषिविषयक क्रिया वर्ज्य समजतात (देवी भाग. ९. १). बंगालमध्यें हा काल आषाढ वद्य दशमीपासून त्रयोदशीपर्यंत धरतात. सूर्य आर्द्रा नक्षत्राच्या प्रथम चरणांत असतो, तो काळ असाहि पर्याय आहे (वर्ष क्रि. कौ. २८). चौथ्या दिवशीं दगडांना स्नान घालून पुष्प-माळा वाहतात व भूमाता शुद्ध झाली असें समजतात. आसामांत आषाढ महिन्याच्या शुक्ल पक्षांत कामांख्या देवीचा अंबुवाची उत्सव होत असतो. तीन दिवस देवळाचे दरवाजे बंद ठेवतात. कामाख्या ही ऋतुमती आहे अशा कल्पनेने कोणालाहि तिचें दर्शन घेऊं देत नाहीत. चौथ्या दिवशीं देवीला स्नान घालून तिथे जमलेल्या भक्तांच्या दर्शनासाठी दरवाजे उघडले जातात. या उत्सवांत देवीच्या भक्तांना देवीच्या रजोदर्शनाचें प्रतीक म्हणून लाल कापडाचे तुकडे वांटतात. या उत्सवाचा प्राचीन कृषिकर्माशीं संबंध दिसतो. मानवी स्त्रीच्या रजोदर्शनकाळांत तिला गर्भधारणा होत नाही, तिच्या ठिकाणीं टाकलेलें वीर्यरूप बीज वायां जातें, किंबहुना त्या गोष्टीचा तिला त्रास होतो, या अनुभवावरून प्राचीन मानवाने धरित्रीच्या रजोदर्शनाची कल्पना केली व तिलाहि तीन दिवस अस्पृश्य व अयोग्य मानलें. मृगाच्या पहिल्या पावसाने माती वाहून येऊन नदीनाल्यांचें पाणी लाल होतें. या दृश्यावरून पृथ्वीच्या रजःस्रावाची कल्पना प्राचीन मानवाला अधिक स्पष्ट झाली व त्याने ते तीन दिवस कृषि-कर्माला अयोग्य मानले. कामाख्या ही पृथ्वीमातेचेंच स्वरूप असल्यामुळे तिच्या या अंबुवाचीच्या काळांत विशिष्ट विधि-निषेध निर्माण केले गेले आहेत. **पाहा**–कामाख्या. [फे. फे. आ.]

अंबुवासिन पाण्यांत राहून साधना करणारा एक पंथ. विशेष माहिती मिळत नाही. [स्कू. से. इन्. जै. लि.]

अंबेजोगाई याला मोमीनाबाद असेंहि म्हणतात. मराठ-वाड्यांत हें स्थान असून इथे योगेश्वरी (जोगाई) चें सुप्रसिद्ध मंदिर आहे. योगेश्वरी ही महाराष्ट्रांतल्या अनेक घराण्यांची कुलस्वामिनी आहे. मुकुंदराज व दासोपंत या संतपुरुषांचें वास्तव्य या गावांत होतें. इथलीं रामनारायणमंदिर व संकलेश्वरमंदिर हीं जुनीं आहेत. इथे यादवकालीन कांही शिलालेख सांपडले आहेत. **पाहा** – मुकुंदराज, दासोपंत.

अंशावतार जगताचें संचालन करणाऱ्या परमेश्वराच्या सोळा कला मानलेल्या आहेत. जेव्हा तो सोळाहि कलांनी परिपूर्ण असा अवतार घेतो, तेव्हा त्याला पूर्णावतार म्हणतात. जेव्हा त्याच्या कला कमी असतील, तेव्हा त्याला अंशावतार म्हणतात. कृष्णावतार हा पूर्णावतार मानलेला आहे. **पाहा** – अवतार.

अंशुक प्राचीन काळचें एक वस्त्र. बृहत्कल्पसूत्रभाष्याच्या टीकेंत याला कोमल व चमकदार रेशमी कापड असें म्हटलें आहे. यांत जरतारी कामहि करीत. बाणाने (हर्षचरित) याला अत्यंत तलम व स्वच्छ वस्त्र असें म्हटलें आहे. अंशुक फुलें आणि पक्षी यांच्या आकृतींनी सुशोभित केलें जातें, असेंहि तो म्हणतो. त्याच्या तलम या विशेषणावरून कांही संशोधक ती मलमल असावी असें म्हणतात. पण मलमल सुती असते. अंशुक हें रेशमी वस्त्र असल्याचे पुरावे मिळतात. जैनांच्या अनुयोगद्वारसूत्रांत कीटज (रेशमी) वस्त्राचे पांच प्रकार मानले आहेत, त्यांत अंशुकाचें नांव आहे. अंशुकाचे प्रकार दोन–एक भारतीय व दुसरें चीनमधून येणारें. या दुसऱ्याला चीनांशुक असें नांव होतें. बृहत्कल्पसूत्रभाष्यांत याची व्याख्या दिली आहे ती अशी– 'चीनो नाम जनपदः तस्य यः श्लक्ष्णतरः पटः तस्माज्जातम्' (= चीनमधल्या तलम रेशमी कापडापासून बनवलेलें वस्त्र) कालिदासाने याचा शाकुंतलांत उल्लेख केला

आहे – 'चीनांशुकमिव केतोः प्रतिवातं नीयमानस्य' [हर्ष चरित; प्रा. भा. वे.]

अंशुमती एक नदी. ऋग्वेदांत हिचा नामोल्लेख आहे (८. ९५. १४). हिच्या तीरीं कृष्ण नांवाचा असुर राहत होता. इंद्राने त्याला मारलें (ऋ. ८. ९५. १५). ही नदी कुरुप्रदेशांत यमुनेच्या जवळ असल्याचें वाल्मीकीने सांगितलें आहे (वारा. २. ५५. ६).

अंशुवर्धन (इ. स. ७ वें शतक) नेपाळच्या ठाकुरी वंशांतला पहिला राजा. हा प्रथम हर्षाचा मांडलिक होता. त्याच्या पश्चात् स्वतंत्र झाला. याने शब्दविद्याशास्त्र नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. [सु. वि. को.]

अ याचे पुढील अर्थ सांगितलेले आहेत––(१) आदिवर्ण. 'अक्षराणामकारोऽस्मि'––अक्षरांतला अकार मी आहें (गीता १०.३३). वाङमयाचें आदि बीज. (२) प्रणवाची पहिली मात्रा. (३) नञर्थक––नेति नेति-सूचक. (४) शिव, ब्रह्मा, वायु व वैश्वानर.

अः शिखायां सिद्धमन्त्रे प्रग्राहेऽर्के रथार्वणि ।
चक्रे कुक्कुटमूर्ध्नीन्दुबिम्बे ब्रह्मेशविष्णुषु ॥
(नानार्थमंजिरी)

अर्थ––ज्वाला, मंत्र, पर्जन्य, रथाचा घोडा, चक्र, कोंबडयाचें डोकें, चंद्रबिंब, ब्रह्मा, शिव, विष्णु हे अ चे अर्थ होत.

अ हें समस्त भाषांच्या वर्णमालेंतलें पहिलें अक्षर असून पाणिनीने त्याचें स्थान कंठ हें मानलेलें आहे (अकुहविसर्जनीयानां कण्ठः). वेगवेगळ्या उच्चारणांनुसार याचे सानुनासिक व निरनुनासिक असे १८ भेद होतात. अ च्या रचनेबाबत

३ शती ई०पू० मौर्य	१श०प० शक	१-२श०प० आंध्र	२-३श०प० कुषण



२-३श०प० जग्गयपेट	४श०प० आदि गुप्त	६श०प० उत्तर गुप्त	७-९ श० मध्ययुग



(हिंदी विश्वकोश)

वर्णोद्धारतंत्रांत पुढील उल्लेख आहे– एक उभी रेषा असून तिला दोन आडव्या रेषा फुटतात. एक वांकून वर जाते व दुसरी वांकून खालीं येते. सनपूर्व ४ थ्या शतकांतल्या ब्राह्मी लिपीपासून आजच्या देवनागरी लिपीपर्यंत वेगवेगळ्या शतकांत अ चीं मागील रूपें दृग्गोचर होतात––

तंत्रशास्त्रानुसार अ मध्यें ब्रह्मा, विष्णु, शिव व त्यांच्या शक्ती वर्तमान आहेत. अ + उ + म् मिळून ओंकार बनतो. त्याचें प्रथम बीज अ हें आहे. चित्ताच्या एकाग्रतेसाठीं प्रथम त्याचाच जप केला जातो.

अकडा मुंडा खेडयांतलें नृत्याचें सामुदायिक आंगण. हें खेडयाच्या मध्यभागीं किंवा बाहेर असतें. तें नेहमी स्वच्छ ठेवतात. अविवाहित मुलें व मुली त्यांत नृत्य करतात. मुंडा लोक आपल्या मुलांसाठी क्रीडांगणें व तरुण-तरुणींसाठी नृत्यांगणें निर्माण करून त्यांच्या नैसर्गिक आकांक्षांना अवकाश देतात. मुंडा नृत्यांगण ही एक सार्वजनिक संस्थाच असते. या संस्थेवर त्यांचीं नियंत्रणेंहि असतात. वडीलधारीं माणसें तिथल्या नृत्यावर देखरेख ठेवतात. हेतु हा, की नृत्य करणाऱ्या तरुण स्त्री-पुरुषांनी उच्छृंखल वर्तन करूं नये. नृत्याच्या कार्यक्रमाची वेळ मर्यादित असते. नृत्यें रात्रीच्या वेळीं होतात व मध्यरात्रीपर्यंतच संपतात. म्हणजे जाग्रणावर निर्बंध असतो. नृत्याचीं गाणीं अश्लील नसावीं याबद्दल दक्षता घेतात. कोणी अश्लील गाणें म्हणूं लागला, तर लगेच नृत्य बंद करतात व दुसऱ्या दिवशीं पंचायत भरवून त्या माणसाला दंड करतात. [एन्सा. मुं.]

अकथादि त्रिरेखा तीन वर्णरेखांनी बनलेला त्रिकोण. अकारादि सोळा स्वरांनी बनलेली वामा रेखा, ककारादि सोळा वर्णांनी बनलेली ज्येष्ठा रेखा व थकारादि सोळा वर्णांची बनलेली रौद्री रेखा, या तीन रेषांचा त्रिकोण बनतो त्याला हें नांव आहे. **पाहा**– कामकला. [स. पॉ.]

अकबर (१५४२-१६०५ इ. स.) मोगल बादशाहा हुमायूं याचा पुत्र. संपूर्ण नांव जलालुद्दीन मुहम्मद अकबर. याचा जन्म अमरकोट (सिंध)च्या किल्ल्यांत झाला. त्याच्या जन्माच्या वेळी हुमायूं वनवासी झाला होता. त्याने पुढचीं दहा बारा वर्षें अफगाणिस्तान व इराण या देशांत घालवलीं. तो काळ फार धामधुमीचा होता. हुमायूं अकबराला कंदाहारपर्यंत घेऊन गेला; पण पुढे त्याला आपल्या मुलाला कंदाहारमध्येंच सोडून इराणांत पळून जावें लागलें. त्या काळांत अकबराचें संगोपन व संरक्षण त्याच्या चुलत्याने केलें. काही कालाने हुमायूंने इराणांतून परत येऊन काबूल व कंदाहार जिंकून घेतलें. त्या

वेळीं अकबर तीन वर्षांचा होता. इ. स १५५५ मध्ये हुमायूंनें परत भारतावर आक्रमण केलें व दिल्लीचें तख्त जिंकून घेतलें. १५५६ मध्यें हुमायूं मरण पावला. त्या वेळीं अकबर चौदा वर्षांचा होता.बहरामखान नांवाचा एक शूर सरदार अकबराचा गुरु होता. हुमायूंच्या मृत्यूनंतर त्यानें अकबराला दिल्लीच्या गादीवर बसवलें व तो अकबराचा प्रतिनिधि म्हणून राज्यकारभार पाहूं लागला.



अकबर

सर्व बालपण धामधुमींत गेल्यामुळे अकबराचें शिक्षण नीटपणे झालें नाही. लेखन-वाचनांत त्याचें मन रमतहि नसे. मात्र त्याची स्मरणशक्ति तीव्र व बुद्धि कुशाग्र होती. त्यामुळे त्याने अवांतर ज्ञान पुष्कळच मिळवलें होतें. घोड्यावर बसणें, तलवार चालविणें, निशाण मारणें या गोष्टींतहि तो तरबेज होता. अकबर दिल्लीचा बादशहा झाला, त्या वेळीं दिल्ली आग्रा व पंजाब एवढाच मुलूख त्याच्या ताब्यांत होता व सर्व बाजूंनी शत्रू त्याच्याविरुद्ध उठले होते. पंजाबांत सिकंदरशहा सूर, पूर्वेकडे महमदशहा आदिली, मध्यप्रदेशांत व राजस्थानांत हिंदू राजे, तसेच जुने पठाण सरदार व अफगाणिस्तानांतले अम्मलदार या सर्वांनीं अकबराशीं झुंज घेण्याची तयारी चालवली होती. जरी बहरामखान राज्य चालवीत होता, तरी अकबरहि त्यांत लक्ष घालीत होता. त्याने प्रथम पंजाबांतल्या सिकंदरशहा सूरवर चढाई केली व त्याला मागे रेटीत रेटीत शिवालिक पर्वतांतल्या माणकोट येथील किल्ल्याचा आश्रय घ्यायला लावलें. याप्रमाणे अकबर पंजाबांत गुंतला असतां इकडे सिकंदरशहाचा सेनापति हिमू (हेमराज) याने दिल्लीवर चढाई केली. त्यामुळे हातीं घेतलेल्या मोहिमेवरून परत येतांच अकबराला हिमूविरुद्ध लढाई द्यावी लागली. पानिपतच्या मैदानावर तो रणसंग्राम झाला आणि त्यांत बहरामखानाने हिमूचा शिरच्छेद केल्यावर ती लढाई संपली.

राज्यारूढ झाल्यानंतर चार पांच वर्षांतच अकबराने राज्ययंत्र सर्वस्वीं आपल्या ताब्यांत घेतलें. बहरामखानाला ती गोष्ट लागली आणि त्याने अकबराविरुद्ध बंड उभारलें; पण थोड्याच काळांत अकबराने बहरामखानाला कैद करून त्याचें बंड मोडून काढलें. अकबराने तशाहि स्थितींत बहरामखानाला सन्मानाने वागवलें. पण बहरामखान त्याच्याराज्यांत न राहतां मक्केला निघून गेला.

इ. स. १५६० पासून तों १५६७ पर्यंतच्या सात आठ वर्षांपर्यंतचा अकबराचा काळ मुख्यत्वें बंडें मोडण्यांतच खर्च झाला. तेवढ्या कालांत त्याने आपलें राज्य बरेंच सुस्थिरहि केलें. १५६४ पर्यंत अकबराचें सैन्य माळवा जिंकून राजस्थानांत जोधपूरपर्यंत पोंचलें होतें. राजस्थान अकबराच्या विरुद्ध धुमसूं लागला होता. पण राजपूत राजांना जिंकून केवळ आपलें साम्राज्य वाढविणें, एवढाच अकबराचा उद्देश नव्हता; तर त्या राजांशीं मैत्री करून त्यांना आपल्या साम्राज्याचे हितचिंतक बनवावें, अशीहि त्याची आकांक्षा होती. म्हणून त्याने राजपूत राजांना अभिवचन दिलें, की 'तुम्ही जर माझें प्रभुत्व मान्य करून मला सैनिकी सहकार्य द्याल, आपसांतल्या लढाया थांबवाल आणि माझ्या आज्ञेनेच राज्यगादीवर बसाल, तर मीं तुमच्या धर्मांत, कारभारांत आणि सामाजिक जीवनांत हस्तक्षेप करणार नाही.'

त्याप्रमाणे जयपूर व जोधपूर येथील राजपूत राजांनी अकबराच्या शर्ती मानल्या. त्यांनी अकबराशीं मैत्री तर केलीच; शिवाय, त्याला आपल्या घराण्यांतल्या मुली देऊन त्याच्याशीं वैवाहिक संबंधहि प्रस्थापित केले. पण राजस्थानांतला कोणता एक संस्थानिक अकबराच्या आमिषाला भुलला नसेल, तर तो मेवाडचा राणा प्रतापसिंह हा होय. तो अकबराविरुद्ध दंड थोपटून उभा राहिला. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी अकबराने मानसिंहाला सैन्यासह तिकडे पाठवलें. हळदीघाटांत मानसिंह व राणा प्रताप यांचें घनघोर युद्ध झालें आणि त्या युद्धांत प्रतापसिंहाचा पाडाव झाला. त्यामुळे १५७६ मध्ये मेवाडहि अकबराच्या साम्राज्यांत समाविष्ट झालें. त्याआधी त्याने गुजरात, बंगाल व बिहार हे प्रांतहि आपल्या सत्तेखालीं आणले होते. अशा रीतीने १५-२० वर्षांच्या कारकीर्दीत अकबराने काबूलपासून आसामपर्यंत व पश्चिमेस गुजरातपर्यंत आपली सत्ता भारतांत प्रस्थापित केली.

अकबराच्या राज्यविस्ताराचा तक्ता पुढीलप्रमाणे –

१५५६	इ. स.	राज्यप्राप्ति.
१५५७	,,	पंजाबवर स्वारी. सिकंदरशहा शरण आला.
१५६०	,,	बहरामखानाचें बंड मोडून काढलें.
१५६२	,,	माळवा जिंकला.
१५६४	,,	चुन्नार घेतलें.

१५६५	इ. स.	आग्रा येथील किल्ला बांधण्यास प्रारंभ.
१५६८	,,	चितोड हस्तगत केलें.
१५७२	,,	गुजरातवर मोहीम.
१५७५	,,	बंगाल व बिहार सत्तेखाली आणला.
१५७६	,,	मेवाडच्या राणा प्रतापसिंहाविरुद्ध मोहीम.
१५७७	,,	उडीसांतलें दाऊदखानाचें बंड मोडलें.
१५८२	,,	बंधु हकीम याचा पराभव.
१५८७	,,	काश्मीर जिंकलें.
१५८८	,,	सिंध प्रांत आपल्या राज्याला जोडला.
१५९४	,,	कंदाहार काबीज केलें.
१५९६	,,	अहमदनगरवर स्वारी. वऱ्हाड घेतला.
१६००	,,	अहमदनगर घेतलें.

एक उत्तम शासनकर्ता म्हणून अकबर बादशाहा प्रसिद्ध आहे. प्रजेचें हित हेंच त्याचें ध्येय होतें. त्याने सर्व साम्राज्याचे १५ विभाग पाडून सर्वत्र समान राज्यव्यवस्था सुरू केली. शेतीस उत्तेजन देणें, वसुलाची व्यवस्था चांगली ठेवणें आणि काटकसरीने खर्च करणें, हे त्याच्या राज्यव्यवस्थेंतील विशेष गुण होते, असें अबुल फज़ल याने म्हटलें आहे.

लोकांची आर्थिक, सामाजिक व धार्मिक उन्नति व्हावी म्हणून अकबराने अनेक कायदे केले. त्यांची अंमलबजावणी नीट व्हावी म्हणून अधिकारीहि नेमले. तो जितका कठोर तितकाच दयाळूहि होता. राज्यकारभारांत तो फार दक्ष असून दिवसांतील १५-१६ तास त्या कामीं खर्च करीत असे.

समाजसुधारणेच्या दृष्टीने त्याने व्यभिचार व मद्यपानाचा अतिरेक हे गुन्हे ठरवून त्यांसाठीं कडक शिक्षा ठेवली. त्या काळीं लढाईंत पकडलेल्या सैनिकांना गुलाम करण्याची चाल होती, ती त्याने बंद केली. तो वृत्तीने धार्मिक असूनहि त्याच्याजवळ कट्टरपणा नव्हता. त्याचे धार्मिक विचार उदार असून अंतःकरण विशाल होतें. सर्व धर्मांच्या अनुयायांना समानतेने वागविण्याचें धोरण त्याने अवलंबिलें होतें. १५६३ पर्यंत हिंदु यात्रेकरूंकडून तीर्थस्थानांच्या ठिकाणीं यात्राकर वसूल केला जात असे; तो त्याने रद्द केला. त्याचप्रमाणे १५८१ मध्ये त्याने जिजिया करहि रद्द केला.

अकबराला सर्व धर्मांतल्या श्रेष्ठ तत्त्वांविषयीं आदर वाटत असे आणि त्यांचें ज्ञान मिळावें या हेतूने तो प्रत्येक धर्माच्या पंडितांना बोलावून त्यांच्याशीं धर्मचर्चा करी. तो हिंदुत्व व इस्लाम या दोहोंचाहि प्रेमी होता; पण दोन्ही धर्मांतल्या कट्टरपणाची त्याला घृणा होती. धर्मांतर करणाऱ्या लोकांकडे तो तुच्छ नजरेनेच पाही. कारण त्याला वाटे, की जे लोक भीति किंवा लोभ या कारणांनी धर्म बदलतात, ते खरेखुरे धार्मिकच नव्हेत.

धर्म हा अकबराच्या बाबतींत राजनीतीचें साधन नव्हता, तर ती त्याच्या आत्म्याची अनुभवविषयक जिज्ञासा होती. अबुल फज़ल व बदायूनी यांच्या ग्रंथांवरून कळतें, की अकबर सूफी साधूंप्रमाणे कधी कधी समाधि लावून बसत होता. त्या समाधींत तो अंतिम सत्याच्या पुष्कळसा जवळ जात होता, असेंहि लिहिलेलें आहे.

मुसलमान असल्यामुळे त्याला असेंहि वाटे, की आपण इस्लामच्या तत्त्वांप्रमाणे चालावें. पण त्याच्या काळापर्यंत इस्लाम धर्मांत अनेक पंथोपपंथ निर्माण झाले होते. त्यांत कोण खरा आणि कोण खोटा हें इस्लामी धर्मपंडितांच्या वादविवादांतून समजून घ्यावें, म्हणून तो प्रयत्न करी. त्यानें फत्तेहपूर सिकरी येथे त्यासाठी एक इबादतखाना (प्रार्थनागृह) बनविला होता. तिथे तो अनेक प्रसंगीं धार्मिक वादविवाद घडवून आणी. त्या वादसभेचा अध्यक्ष तो स्वतः राही. कित्येक वेळां अन्यधर्मीय, विशेषतः हिंदु पंडितांनाहि इस्लामी पंडितांशीं पूर्वोत्तर पक्ष करायला लावी व त्या वादाचा अंतिम निर्णय आपण देई. अशा प्रकारें स्वतःचें श्रेष्ठत्व इतरांना स्वीकारायला लावून अकबर देशाचा धार्मिक नेताहि बनूं लागला. इ. स. १५७९ मध्ये अकबर साम्राज्याचा प्रमुख इमाम या अधिकाराने मशिदींत खुतबा पढला. त्या वेळीं राज्यांतल्या प्रमुख उलेमांच्या सह्यांनिशीं अशी घोषणा केली गेली, की 'इमाम–ए–आदिल (प्रमुख इमाम अर्थात् अकबर) सर्व धर्मपंडितांत श्रेष्ठ आहे व वादग्रस्त मामल्यांत त्याचा फैसला सर्वांनी मान्य केला पाहिजे. जो न मानील तो दंडनीय ठरेल.'

त्याच्या या घोषणेने कट्टर मुसलमान भडकून उठले व त्यांनी अकबराचा भाऊ महम्मद हकीम याला मिळून बिहार व बंगाल या प्रदेशांत बंड उभारलें. पण अकबर तें मोडून काढण्याच्या कामीं समर्थ ठरला आणि त्यामुळे धर्माच्या बाबतींत अंतिम निर्णय देण्याचें त्याला पूर्ण स्वातंत्र्य मिळालें.

सर्व धर्मांचा समन्वय करून एक व्यापक धर्म निर्माण करण्याची त्याला तळमळ लागली होती. त्यांतूनच त्याचा दीने इलाही हा नवा धर्मपंथ निर्माण झाला. दीने–इ–लाही याचा अर्थ ईश्वरी धर्म असा होतो. त्याला तौहीदे इलाही (एकेश्वरी धर्म) असेंहि म्हणतात.

(१) ईश्वरावर दृढ श्रद्धा असणें (२) अकबर हा ईश्वराचा बारावा इमाम आहे, या कल्पनेवर विश्वास ठेवणें (३) हत्या व मांसभोजन यांचा त्याग (४) स्त्रीसहवासांत संयम व शुचिता आणि (५) वेळोवेळीं भोजन व दान देणें हीं या पंथाचीं मुख्य तत्त्वें होतीं. अबुल फज़ल हा त्या धर्माचा मुख्य आचार्य होता खरा; पण अकबर स्वतःच लोकांना

त्या पंथाची दीक्षा देत असे. दीक्षित मनुष्य अकबराचें एक चित्र स्वतःच्या पगडींत ठेवी. त्यावर अल्ला हु अकबर हे शब्द लिहिलेले असत. या पंथांतलीं दोन माणसें भेटलीं, की अल्ला हु अकबर व जल्ले जलाल हु, या घोषणांनी परस्परांना अभिवादन करीत.

इ. स. १५९३ मध्ये त्याने धार्मिक स्वातंत्र्याबाबत कित्येक फर्मानें काढलीं. त्यांत पुढील आज्ञा महत्त्वाच्या होत्या— (१) जबरदस्तीने बाटविला गेलेला हिंदु जर पुनश्च स्वधर्मांत जाऊं इच्छीत असेल तर त्याला कोणीहि अडवूं नये. (२) कोणत्याहि माणसाला धाकदपटशाने धर्मांतर करायला लावूं नये. (३) प्रत्येक व्यक्तीला आपलें धर्ममंदिर बनविण्याची पूर्ण स्वतंत्रता आहे. (४) विधवेला सक्तीने सती जायला लावूं नये. लहानपणापासून हिंदूंशीं घनिष्ठ संबंध आल्यामुळे त्यांच्या आचारविचारांचें त्याला चांगलेंच ज्ञान झालें होतें. हिंदुधर्मातील पुनर्जन्म, कर्मवाद, इ. अनेक सिद्धान्त त्याला मान्य होते. रक्षाबंधन, दसरा, दिवाळी, वसंतपंचमी, इ. हिंदुसण व उत्सव तो मोठ्या समारंभाने करी. हिंदूप्रमाणे तो कपाळीं टिळा लावी व डोक्याला साफाहि बांधी.

अकबराने आपल्या जीवनांत धार्मिक समन्वयाला मोठेंच स्थान दिलें होतें. जें चांगलें वाटलें, मनाला भावलें, तें तत्त्व व उपास्य त्याने आपल्या आचरणांत आणलें होतें. त्याने पारशी धर्मातील अग्नीची उपासनाहि सुरू केली होती. नवरोजसारखे कांही पारशी सणहि तो साजरे करी. तो सूर्याचीहि उपासना करी. जैन धर्माचाहि त्याच्यावर प्रभाव पडला होता. पण या सर्वांत त्याच्याबर विशेष प्रभाव होता तो हिंदुधर्माचा.

दीने इलाहीच्या स्थापनेनंतर अकबराने दरबारांतले मुसलमानी सण बंद केले, मशिदी बंद केल्या व गोमांसभक्षणासहि बंदी केली. परंतु धर्मसंस्थापकास आवश्यक असणारी कट्टरता त्याच्या अंगीं नव्हती. धर्मप्रसारासाठी आवश्यक तो दीर्घोद्योगहि त्याच्या हातून झाला नाही. त्यामुळे त्याचा दीने इलाही पंथ प्रसार पावला नाही. त्याला सुमारें एक हजारच अनुयायी मिळाले. बिरबलाशिवाय कोणीहि प्रतिष्ठित हिंदु त्यांत सामील झाला नाही. साम्राज्याच्या स्थिरतेसाठी मुस्लीम धर्म अयोग्य



म्हणून अकबराने त्याचा त्याग केला; पण तें स्थान त्याच्या नवीन धर्माला मिळूं शकलें नाही. त्याची सहिष्णु वृत्ति व अनाग्रही बुद्धि यांमुळेच त्या नवीन धर्माचीं पाळेंमुळें त्याच्या साम्राज्यांत खोलवर गेलीं नाहीत. अकबराबरोबरच त्याचा तो धर्म लयाला गेला.

अकबराच्या कारकीर्दीत साहित्य, संगीत व कला यांचा खूप उत्कर्ष झाला. त्याने अनेक पंडितांना व कलावंतांना आपल्या दरबारांत आश्रय दिला होता. अबुल फज़ल, फैझी, बदायूनी, बिरबल, तोडरमल, मानसिंग, तानसेन, हीं त्याच्या नवरत्नांपैकी कांही रत्नें सुविख्यात आहेत. त्यांच्यामुळे त्याच्या कारकीर्दीत विद्वत्ता व कलाकौशल्य या गुणांची चांगलीच जोपासना झाली. त्याने फारसी व संस्कृत साहित्याच्या निर्मितीलाहि खूपच उत्तेजन दिलें. अथर्ववेद, भगवद्गीता, रामायण, महाभारत, हरिवंश, लीलावती, पंचतंत्र, नल-दमयन्ती आख्यान, योगवासिष्ठ, राजतरंगिणी, इ. संस्कृत ग्रंथांचें त्याने विद्वानांकडून फारसी भाषेत भाषांतर करवून घेतलें. त्याच्या काळांत लिहिलेले अनेक फारसी इतिहासहि उपलब्ध आहेत. अकबराची राजवट म्हणजे हिंदी काव्य-रचनेचें सुवर्णयुगच मानलें जातें. तुलसीदास, सूरदास, रहीम, रसखान, बिरबल, हे श्रेष्ठ कवी त्याच्याच काळांत होऊन गेले. चित्रकला, शिल्पकला, इ. कलांचाहि त्या काळांत बराच उत्कर्ष झाला. अकबराला संगीताची फार आवड होती. तो उत्तम संगीतज्ञहि होता. तानसेनासारख्या अलौकिक गायकाला राजाश्रय देऊन त्याने आपलें नांव संगीताच्या क्षेत्रांत अमर केलें. हिंदु व मुसलमानी संगीताचें मिश्रण करून एक निराळेंच हिंदुस्थानी संगीत निर्माण करायला अकबरानेच प्रेरणा दिली.

अकबराची राहणी अगदी साधी असून तो फार संयमी होता. त्याची बुद्धि शोधक होती. त्याला यांत्रिक प्रयोगांचीहि आवड होती. तो उद्योगप्रिय होता. त्याचा बांधा मध्यम आकाराचा; पण सुडौल होता. त्याचा रंग गव्हाळी असून डोळे काळे होते. त्याची वाणी स्पष्ट व भारदस्त होती. तो शूर होता, तसाच कुशल सेनानीहि होता.

अकबराचीं शेवटचीं चार पांच वर्षें फार दुःखांत गेलीं. त्याचा मोठा मुलगा सलीम बापाविरुद्ध उठला. त्याचे दुसरे दोन मुलगे मुराद व दानियल हे दारूच्या व्यसनापायीं मेले. अकबराचा जिवलग मित्र व कारभारी, अबुल फज़ल याचा जहांगिराने खून करविला. या सर्व घटना अकबराला अखेरच्या काळांत अत्यंत असह्य ठरल्या. अशा भग्न व अशरण अवस्थेत १५ ऑक्टोबर १६०५ रोजीं त्याला मृत्यु आला. जगांत जे अनेक थोर सम्राट् होऊन गेले, त्यांत अकबराची गणना होते. अकबराने पाजळलेली हिंदु–मुस्लिम धर्मांच्या समन्वयाची ज्योत पुढच्या मोगल बादशहांनी विझवली नसती, तर भारताच्या इतिहासाला वेगळें आणि चांगलें वळण लागलें असतें. [मु. का. भा; हिं. वि. को; म. ज्ञा. को.]

अकबरी कालिदास

(१७ वें शतक) मूळ नांव गोविंदभट्ट. हा अकबराच्या दरबारांत होता. मुस्लिम राजवटींत ज्या संस्कृत पंडितांना उदार राजाश्रय मिळाला, अशा पंडितांपैकी गोविंदभट्ट हा एक होता. तिथेच त्याला अकबरी कालिदास ही पदवी मिळाली. आपल्या काव्यांतून त्याने या पदवीचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. मात्र याचें काव्य एकत्रित मिळत नसून तें स्फुट स्वरूपांत आढळतें. बांधव सम्राट् रामचंद्र महाराज याचाहि याला आश्रय होता. याने त्या राजाच्या स्तुतिपर लिहिलेला प्रबंध उपलब्ध असून त्याचें नांव रामचंद्र यशःप्रबंध असें आहे. हा सतराव्या शतकांतला श्रेष्ठ साहित्यकार होता. स्वत:च्या प्रतिभेबद्दल तो अभिमानाने लिहितो—

अनाराध्य कालीमनास्वाद्य गौरी–
मृते मन्त्रतन्त्राद्विना शब्दचौर्यात् ।
प्रबन्धं प्रगल्भं प्रकर्तुं प्रवक्तुं
विरिञ्चिप्रपञ्चे मदन्यः कविः कः ।।

(पद्यवेणी ७८६)

अर्थ––कालीची आराधना, गौरीचें आस्वादन, मंत्रतंत्र व शब्दचौर्य या गोष्टी केल्यावांचून प्रगल्भ प्रबंध निर्माण करणें व प्रवचन करणें या कामीं ब्रह्मदेवाच्या सृष्टींत माझ्याहून दुसरा कोणी कवि सांपडणार नाही.

या श्लोकाला कालिदासाच्या अधिक्षेपाचा सूक्ष्म वास येतो.

अकरमासे

अकरमासे म्हणजे पूर्ण बारा मासे नव्हेत असे, म्हणजेच ज्यांच्यांत कांही न्यूनत्व आहे असे लोक. पूर्वी श्रीमंत मराठे लग्नप्रसंगीं आपल्या जावयाला एखादी सुंदर स्त्री आंदण म्हणून देत. अशा स्त्रियांच्या संततीला पुढे अकरमासे म्हणूं लागले. ही जात ठाणें व पश्चिम खानदेश या जिल्ह्यांत आढळते. यांना कडू, शितळे, लेकावळे अशींहि नांवें आहेत. यांच्यांतहि अस्सल व कमअस्सल असे दोन वर्ग आहेत. मराठा स्त्रीला ब्राह्मण व मराठा पुरुषापासून झालेली संतति ती अस्सल व खालच्या दर्ज्याच्या पुरुषापासून झालेली ती कम-अस्सल. सध्या यांचे व्यवसाय दुकानदारी, शेती, सुतारकी, लोहारकीं वगैरे आहेत. हे मराठी बोलतात. यांची राहणी स्वच्छ आणि डामडौली असते. पेहेराव मराठी धर्तीचा असतो. मद्यमांस सेवन करतात. यांच्यांत स्मार्त-भागवत असे दोन्ही पंथ आहेत. हे ब्राह्मण उपाध्यायांकडून धर्मकृत्यें करतात. जातिसभा असते ती तंटयांचा निवाडा करते. यांना विधवाविवाह संमत आहे. मृतांना जाळतात किंवा पुरतात. [म. ज्ञा. को.]

अकरा नरक तामिस्र, अंधतामिस्र, रौरव, महारौरव, संदंश, कुंभीपाक, कालसूत्र, सप्तसूर्मि, वैतरणी, वज्रकंटक व असिपत्र. या नांवांबद्दल एकवाक्यता नाही.

अकरावा मृताच्या अकराव्या दिवशीं दानें व वृषोत्सर्गादि, विधि करतात, त्यांना हें नांव आहे. पाहा– अंत्यसंस्कार.

अकरें देवापुढे लावण्याच्या ११ वाती किंवा ११ पिठाचे दिवे. अकरें हें चढत्या व उतरत्या क्रमाने देवापुढे लावतात.

अकलंकदेव (७ वें शतक) दिगंबरपंथीय जैन आचार्य, याला कवि अशी पदवी होती. हा मोठा विद्वान् व महातार्किक होता. याने अनेक बौद्धपंडितांशीं वाद-विवाद करून बौद्धधर्माच्या प्रभावापासून दक्षिण भारतांतील जैन दर्शनाचें संरक्षण केलें. याने जैन तर्कशास्त्रांत मोलाची भर घातली आहे. गृध्रपिच्छविरचित तत्त्वार्थसूत्रांवर तत्त्वार्थ वार्तिक हा ग्रंथ लिहून याने जैन सिद्धांतावरील त्रिविध आक्षेपांचें निराकरण केलें. समंतभद्रकृत आप्तमीमांसा या ग्रंथावर याचें अष्टशती नांवाचें स्वल्पाक्षर; पण अर्थगंभीर असें भाष्य आहे. त्यांत जैनांच्या स्याद्वादाचें प्रभावी समर्थन आढळतें. प्रमाणसंग्रह, न्यायविनिश्चय, सिद्धिविनिश्चय व लघीयस्त्रय हे चार प्रकरणग्रंथ लिहून याने जैन प्रमाणशास्त्राची व्यवस्थित पुनर्रचना केली.

तत्त्वज्ञानाच्या सर्वंकष अभ्यासाला प्रोत्साहन देणें हें अकलंकदेवाचें दुसरें महत्कार्य. सिद्धिविनिश्चय या ग्रंथांत त्याने निरनिराळ्या सोळा विषयांचा जो ऊहापोह केला आहे, त्यावरून हें स्पष्ट होतें. आपल्या वेळीं उपलब्ध व प्रचलित असलेल्या सर्व तत्त्वज्ञानप्रवाहांचा अभ्यास करून त्यांवर ज्ञानकोशाच्या स्वरूपाचे व्यापक ग्रंथ लिहिण्याची जी प्रथा पुढे वाचस्पतिमिश्र, उदयन, शांतरक्षित, इ. प्रायः सर्व दर्शनकारांनी चालू केली, तिचा प्रारंभ अकलंकदेवाच्या ग्रंथांपासून झाला आहे, असें म्हणतां येतें. याचा धर्मकीर्तीबरोबर निर्देश केला जातो. याने कांची येथील हिमशीतल राजाच्या दरबारांत बौद्धांचा पराभव केला आणि त्यामुळे दक्षिणेंतून बौद्धांची हकालपट्टी झाली, असें रामस्वामी अय्यंगार लिहितात.

अकलंक हा तार्किक असला, तरी त्याचें अंतःकरण भक्ताचें होतें, हें त्याच्या अकलंकस्तोत्रावरून कळून येतें. तो म्हणतो–

त्रैलोक्यं सकलं त्रिकालविषयं सालोकमालोकितं
साक्षाद्येन यथा स्वयं करतले रेखात्रयं साङ्गुलि।
रागद्वेषभयामयान्तकजरालोलत्वलोभादयो
नालं यत्पदलङ्घनाय स महादेवो मया वन्द्यते ॥

अर्थ :— ज्याने त्रिकालविषय असें सकल त्रैलोक्य हाताचीं बोटें आणि त्यांवरील रेषा यांच्याप्रमाणे साक्षात् अवलोकन केलें आहे व राग, द्वेष, भय, रोग, मृत्यु, जरा, चंचलता, लोभ, इत्यादि विकार ज्याच्या पदाचें उल्लंघन करायला असमर्थ आहेत, अशा त्या महादेवाला (महावीर ?) मी वंदन करतों. [नवभारत; म. च. को.]

अका भारताच्या ईशान्य प्रदेशांतील (N. E. F. A.) डोंगरांत राहणारी एक पहाडी जमात. भोरोली नदीच्या कांठीं यांची वस्ती आहे. लोक त्यांना अका म्हणत असले, तरी ते स्वतःला 'ऱ्हुस्सो' म्हणवितात. यांच्या दोन टोळ्या आहेत. (१) हजारीखावा अर्थात हजार चुलींवरचें खाणारे व (२) कापाचोर अर्थात् कापसाच्या झाडांत दडून बसणारे (चोर). अका हे मुळापासून बंडखोर वृत्तीचे आहेत. यांची लोकसंख्या अत्यल्प आहे. इतिहासकाळांत हे खाली आसामांत उतरून दंगल करीत व लोकांना लुबाडीत. त्यांचा बंदोबस्त करणें अशक्य ठरल्यावरून आसाममधील राजांनी त्यांना 'पोजा' चा अधिकार दिला होता. पोजा याचा अर्थ धाकदपटशा असा होतो. त्या हक्कानुसार आसामी राजे त्यांना आपल्या खंडणींतला कांही वांटा देत. १८२५ च्या सरकारी दप्तरखान्यांतील माहितीवरून असें कळतें, की हजारीखावा हे आपापल्या नेमून घेतलेल्या प्रदेशांत घरोघरीं जाऊन स्वतःच खंडणी वसूल करीत.

आसामांत ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यावर ब्रिटिशांना अका जमातीने लोकांकडून खंडणी वसूल करणें ही गोष्ट पसंत पडली नाही. त्यासाठी ब्रिटिश सरकार आपल्या तिजोरींतून त्यांना खंडणी देऊं लागलें.

कापाचोरांचा तंगी नांवाचा एक पुढारी होता. त्याने आपल्या भोवतालच्या प्रदेशांत दहशतीचें राज्य सुरू केलें. आसामचें सरकार त्याच्या पाठीमागे लागलें. पुढे ब्रिटिशांनी आसाम घेतल्यावर तेहि त्याचा पिच्छा पुरवूं लागले. पुढें हळूहळू कापाचोर व हजारीखावा यांच्यांत अंतर्गत भांडणें सुरू करून भेदनीतीच्या बळावर ब्रिटिशांनी तंगीला पकडलें. त्याला गौहाटीच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें होतें; पण तिथूनहि तो निसटला. पुढे १८४१ पर्यंत त्याने खून, लूटमार व पळवापळवी यांचें जणू सत्रच चालू केलें. त्याला आणि

त्याच्या टोळीला शरण आणण्यासाठी ब्रिटिश सरकारला जंग-जंग पछाडावे लागले.

अका हे सहा हजार फूट उंच डोंगरांत राहतात. आपण त्या प्रदेशांत कुठून आलों, त्याबद्दल ते पुढील आख्यायिका सांगतात – आमचे पूर्वज खालच्या सपाटीवर विशनाथाच्या उत्तरेस गिलधरी नदीच्या कांठीं राहत होते. कृष्ण व बलराम यांनी त्यांना तिथून हुसकावून लावलें व ते या डोंगराळ भागांत आले.

तर्क असा आहे, की आहोम टोळीवाले आसामांत घुसले, त्यांच्या पूर्वींच हे लोक आसामचे रहिवासी झालेले असावे व आहोमांनी पिटाळून लावल्यामुळे, ते नेफाच्या डोंगराळ भागांत येऊन स्थायिक झाले असावे. यांची संख्या अत्यल्प असून यांच्या दोन वेगवेगळ्या वसाहती आहेत. मोठ्या वसाहतींत कापाचोर व लहान वसाहतींत हजारीखावा राहतात. यांचीच एक तिसरी टोळी आहे. त्यांना अंकामिरी म्हणतात. अंका लोक मिजी लोकांना आपले मित्र मानतात. मिजी हे बहुसंख्य आहेत. अंकालोक संकटप्रसंगीं मिजींची मदत घेतात. मिजी हे सखल प्रदेशांत क्वचितच येतात. अकांच्या दहा कुळचा आहेत.

अका लोक तीरकमठा, भाला, तलवार व बंदूक हीं हत्यारें कौशल्याने चालवितात. ते तीं स्वतःच बनवितात. गनिमी युद्धांत ते प्रवीण असतात. त्यांचा पोजाचा हक्क आजमितीपर्यंत त्यांनी चालू ठेवला आहे. दरवर्षीं मात्र–फाल्गुनांत ते सपाटीला उतरून तिथल्या मुलखांतून पोजा वसूल करतात.

हरिदेव हा त्यांचा मुख्य देव आहे. याशिवाय फुक्सु हा जंगलाचा व पाण्याचा देव, फिरान व सिमन हे युद्धाचे देव व सातु हा गृह आणि शेती यांचा देव होय. त्यांचीं अन्यहि कांही दैवतें आहेत. ते आपल्या देवांसाठी मंदिरें अथवा झोपड्या बनवितात. त्यांच्या देवप्रतिमा चांदीच्या किंवा सोन्याच्याहि असतात. या प्रतिमा त्यांना त्यांचे शेजारी भोटिया यांच्याकडून मिळाल्या असाव्या असें वाटतें. ते देवांच्या पुजाऱ्याला देवरी म्हणतात. देवरीची निवड दैवी दृष्टांतानुसार होते. देवपूजा आणि बलिकर्म देवरी करतो. अका लोक देवांना गायी, बकऱ्या, कोंबडीं आणि कबुतरें यांचे बलि देतात. त्यांचा शकुनावर विलक्षण विश्वास आहे. घर बांधतांना ते प्रथम त्या जागीं बलिदान करतात व फुक्सूची पूजा करतात. घरें बळकट बांधतात. छप्पर एक प्रकारच्या रुंद पानांचें करतात. कुटुंबांतलीं सर्व माणसें व कुटुंबांतले दास, सर्व मिळून एकाच घरांत राहतात. घरांत तांब्या-पितळेचीं भांडीं वापरतात; मातीचीं वापरीत नाहीत. धान्याचीं कोठारें व गुरांचे गोठे घरापासून लांब ठेवतात. त्यांना औषध माहीत नाही. ते रोग्याला उपचार म्हणून देवरीकडून गंडे, दोरे बांधून घेतात. ते लुटारू असले तरी चांगले शेतकरीहि आहेत. अन्नोत्पादनाच्या बाबतींत ते स्वावलंबी आहेत. ते भात व भाजीपाला पिकवितात. गायी बाळगतात व त्यांचें मांस खातात; पण दुधाला मात्र स्पर्श करीत नाहीत. डुकरें, कोंबडीं व कबुतरेंहि पाळतात. त्यांना अफूचें व्यसन जबरदस्त असतें. बायका.हि त्यांतून सुटलेल्या नाहीत. ते मोड नांवाची कडक दारू स्वतःच बनवून पितात. त्यांचा पोषाख आसाममधल्या इतर टोळीवाल्यांसारखाच असतो. त्यांचें शिरस्त्राण वेताचें बनविलेलें व तीन इंच उंच असतें. त्याला दोन पिसें लावतात. अकांचें शरीर धडधाकट व पिळदार असतें.

अकांमध्ये बहुपत्नीकत्वाची चाल आहे. अका आणि मिजी यांच्यांत बेटीव्यवहार होतो. विवाहाच्या दिवशीं देवांच्या कृपेसाठी बलिदान करतात. जमलेल्या मंडळीला त्याच पशूंची मेजवानी मिळते. विवाहाचा सोहळा पांच दिवस चालतो. वधू-वरांना कापडाच्या छताखालीं उभीं करून देवरी त्यांच्या भोवती एक कापडाचा तुकडा हालवितो व तीं दोघें पति-पत्नी झाल्याचें जाहीर करतो.

स्त्री प्रसूत होत असतां पशुबळि देतात. मुला-मुलींत भेद करीत नाहीत.

अडीच-तीन हात खोल खड्डा करून प्रेतें पुरतात. प्रेताच्या शेजारीं त्याचीं हत्यारें ठेवतात. उरलेल्या जागेवर वस्त्र पसरून त्याच्याभोवती बांबूचें कुंपण घालतात. **पाहा** – मिजी.
[इंडियाज् नॉर्थ ईस्ट फ्रंटियर इन् नाइन्टीन्थ् सेंचरी–व्हेरियर एल्विन]

अकादमी अखिल भारतीय स्वरूपाचें सांस्कृतिक व कला-विषयक कार्य करणारी महासंस्था. ही राष्ट्रीय संस्कृति ट्रस्टद्वारा नवी दिल्ली येथे स्थापन झाली असून, साहित्य अकादमी, ललितकला अकादमी व संगीत नाटक अकादमी असे हिचे तीन विभाग आहेत.

अकादमी (अकॅडमी) हा मूळ ग्रीक शब्द आहे. याची व्युत्पत्ति मनोरंजक आहे. ग्रीक वीर अकॅडमीस याच्या नांवाने अथेन्स शहराजवळ एक बाग होती. या बागेंत प्लेटो या महान् ग्रीक तत्त्वज्ञाने ५० वर्षे आपल्या अनुयायांना तत्त्वज्ञान उपदेशिलें. त्यावरून अकॅडमी याचा अर्थ विद्यापीठ किंवा सरस्वतीमंदिर असा झाला. पुढे लक्षणेने या विद्यापीठालाच अकॅडमी असें नांव पडलें. प्लेटोच्या पूर्वींहि युरोपांत विद्वत्संघांच्या रूपाने अशा अकादमी निर्माण होऊं लागल्या होत्या. आजमितीस बहुतेक देशांत अशा प्रकारच्या अनेक अकादमी स्थापित होऊन त्या विज्ञान, साहित्य, दर्शन, इतिहास, चिकित्सा, ललितकला

इ. क्षेत्रांत महत्त्वाचें कार्य करीत आहेत. लोकशाही विचार आणि भावना यांची जसजशी प्रगति होत आहे, तसतसें या अकादमींच्या धारणेंत आणि कार्यपद्धतींत नवें परिवर्तन घडत आहे. आजच्या कित्येक अकादमी लोकजीवनाची कदर करून त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. जनतेची अभिरुचि, विचारधारा आणि तिचे कलाप्रकार अभ्यासून, आत्मसात् करून त्यांच्या मध्ये चैतन्य आणावें, या दृष्टीने त्यांनी कार्य सुरू केलें आहे.

भारतांत या दृष्टीने आजमितीस तीन अकादमी कार्य करीत आहेत. १९५३ सालीं प्रथम संगीत नाटक अकादमीची स्थापना झाली व राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी तिचें उद्घाटन केलें. भारतीय नृत्य, नाटक, चित्रपट व संगीत या कलांना उत्तेजन देऊन त्यांचा विकास करणें व त्यांद्वारे भारताचें सांस्कृतिक ऐक्य घडवून आणणें, हा या संगीत नाटक अकादमीचा उद्देश आहे. १९५४ सालीं भारताचे उपराष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् यांच्या हस्तें साहित्य अकादमीचें व मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या हस्तें ललितकला अकादमीचें उद्घाटन झालें. भारतांतील सर्व भाषांच्या साहित्याचा विकास घडवून आणणें, त्याचा दर्जा वाढविणें व साहित्यविषयक चळवळींना प्रोत्साहन देणें व अशा प्रकारें देशाची सांस्कृतिक एकात्मता दृढ करणें, हें या संस्थेचें ध्येय आहे. सर्व दृश्य कलांचा विकास करणें, त्यांचें संशोधन करणें, इ. उद्देश ललितकला अकादमीने आपल्यापुढे ठेवले आहेत.

या तिन्हीहि संस्थांची स्थापना होतांना स्पष्टपणे जाहीर करण्यांत आलें आहे, की त्या पूर्णपणे स्वायत्त राहतील. त्यांच्या चळवळींत किंवा कारभारांत सरकार ढवळाढवळ करणार नाही. या सर्व अकादमींचें अधिष्ठान जवळजवळ सारखें आहे. प्रत्येक अकादमीचें एक ७० सदस्यांचें सल्लागार मंडळ (General Council) असतें. हे सदस्य सरकारनियुक्त असतात व ते सर्व राज्यांतून, भाषिक गटांतून आणि सांस्कृतिक व शिक्षणसंस्थांतून आलेले असतात. ती अंतिम स्वरूपाची सर्वाधिकारसमिति असते. प्रत्येक अकादमीचें एक कार्यकारी मंडळहि आहे. त्याच्यावर सल्लागार मंडळाची हुकूमत असते. त्याशिवाय एक अर्थसमितिहि आहे. संस्थेचा आर्थिक व्यवहार बघणें हें तिचें काम. अध्यक्ष, खजिनदार आणि चिटणीस हे अकादमीचे मुख्य कर्णधार आहेत.

संगीत नाटक अकादमी – पूर्वी नृत्य आणि संगीत या दोन्ही कलांना राजेरजवाडे व संस्थानें यांच्याकडून आश्रय मिळत असे. पण संस्थानें विलीन झाल्यावर हा आश्रय तुटला. ती पोकळी भरून काढण्यासाठी संगीत नाटक अकादमीची स्थापना झाली आहे. भारत हा एक खंडप्राय देश असल्याने संगीत व नाटक यांसारख्या सार्वदेशिक कलांच्या वृद्धीचें कार्य पाहणें एका अकादमीला झेपण्यासारखें नव्हतें. म्हणून प्रादेशिक अकादमींची स्थापना झाली आहे. अशा अकादमी आसाम, बिहार, म्हैसूर, मद्रास, उडीसा आणि इतरत्रहि कांही ठिकाणीं स्थापन झाल्या आहेत. देशांतील मोठ्या शहरांतून सुसज्ज अशीं नाट्यगृहें बांधण्याचें अकादमीचें ध्येय आहे; पण तें सिद्ध व्हायला अजून अवधि लागणार आहे. अकादमीने दिल्ली शहरात दोन हजार लोक बसतील एवढें एक 'एअर कंडिशन्ड' राष्ट्रीय नाट्यगृह बांधण्याचा संकल्प केला आहे.

अकादमी एक ग्रंथालय आणि वस्तुसंग्रहालय बांधीत आहे. त्यांत मौल्यवान ग्रंथ, ध्वनिमुद्रिका, अनुबोधपट आणि कांही वाद्यें जतन करून ठेवलीं जाणार आहेत. ध्वनिमुद्रिका अभिजात संगीताच्या – गायन व वादन दोहोंच्याहि – असतील. त्या हिंदुस्थानी संगीत व कर्नाटक संगीत अशा दोन्ही संप्रदायांच्या राहतील. देशांतील विविध संस्थांना मान्यता देण्याच्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां एक तज्ज्ञांची समिति स्थापन करण्यांत आली आहे. अकादमीकडून अड्यारचें कलाक्षेत्र, दि म्युझिक सोसायटी–मद्रास, भातखंडे संगीत विद्यापीठ–लखनौ, बहुरूपी – कलकत्ता, दि इंडियन नॅशनल थिएटर–मुंबई, इ. संस्थांना अकादमीकडून आर्थिक साहाय्य मिळत असतें. कलेचे विविध प्रकार लोकप्रिय व्हावे म्हणून अकादमीने कांही महोत्सवहि केले आहेत. १९५४ सालीं दिल्लीमध्ये एक मोठा संगीत महोत्सव झाला. असाच एक महोत्सव १९५६ सालीं पाटण्यामध्येहि झाला. नाट्यमहोत्सवांत देशांतील सर्व भाषांतील नाटकें झालीं व उत्कृष्ट नाटकांना पारितोषिकें देण्यांत आलीं. राष्ट्रीय नृत्यमहोत्सवांत भरतनाट्यम्, कथकळि, मणिपुरी आणि कथक, या नृत्यप्रकारांचे प्रयोग, देशांतील प्रथितयश मंडळयांनी सादर केले.

नृत्य, नाटक आणि संगीत ह्यांनाच तेवढें प्रोत्साहन देणें हें अकादमीचें ध्येय नाही. प्रस्तुत कलांशीं संबद्ध असलेल्या इतर कलाप्रकारांच्या विविध प्रश्नांचा अभ्यास करण्याचीहि तिला आवश्यकता भासली आहे. त्यासाठी तिने मेळावे भरविले आहेत. असा एक चित्रपटमेळावा १९५५ च्या फेब्रुवारींत भरला. त्याला भारताबाहेरील पाहुणेहि उपस्थित होते. पंतप्रधान श्री. नेहरू यांनी त्याचें उद्घाटन केलें. एक नाट्यमेळावा १९५६ च्या मार्चमध्ये भरला. या मेळाव्यांत आंतरभारतीचे नाटककार आणि नाट्यदिग्दर्शक यांनी भाग घेतला होता. मेळाव्याचें कामकाज उत्साहपूर्ण आणि उपयुक्त झालें. १९५७ सालीं एक संगीतमेळावा भरला. ज्या वेळीं परदेशांतील

शिष्टमंडळें आपल्या देशाला भेट देतात, तेव्हा अकादमी त्यांच्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणते. चीन आणि रशिया या देशांत सांस्कृतिक शिष्टमंडळें पाठविण्याकरितांहि अकादमीनें सरकारला बहुमोल साहाय्य केलें आहे.

संगीत, नाटक आणि नृत्य या तिन्ही क्षेत्रांतील श्रेष्ठ कलावंतांना त्यापूर्वी राष्ट्रपतिपारितोषिकें दिलीं जात असत. याच पारितोषिकांना आता अकादमीपारितोषिकें असें नामाभिधान देण्यांत आलें आहे. हीं पारितोषिकें कायद्याप्रमाणे अर्थात् राष्ट्रपतींच्याच हस्तें दिलीं जातात. नृत्य आणि नाटक यांसाठी प्रत्येकी दोन पारितोषिकें आहेत. हिंदुस्थानी आणि कर्नाटक संगीत, गायन आणि वादन मिळून चार पारितोषिकें आहेत. याशिवाय लोकनृत्यमहोत्सवांत भाग घेणाऱ्या मंडळयांसाठीहि पारितोषिकें राखून ठेवण्यांत आलीं आहेत, तीं वेगळींच. हा लोकनृत्यमहोत्सव प्रजासत्ताक-दिनाच्या समारंभांत होतो.

साहित्य अकादमी — भारतामध्ये चौदा प्रमुख भाषा असून त्यांची साहित्यिक परंपरा वैभवशाली आहे. परंतु एकापेक्षा दोन भाषा जाणणारे व त्या भाषेंतील साहित्याचें रसग्रहण करणारे फार क्वचितच आढळतात. त्यामुळे भारतांतील सर्व साहित्याचें परिशीलन केलेले लोक आढळणें कठीण आहे. अशा परिस्थितींत भारतीय साहित्य अकादमीची स्थिति इतर देशांतील अकादमींहून थोडी गुंतागुंतीची झाल्यास नवल नाही. तिचें कामकाजहि इतर अकादमींहून कठीण आहे. कथकळीचें रसग्रहण आसाममधील लोक करूं शकतील आणि मणिपुरी नृत्यहि केरळवासींना कळणें शक्य आहे. पण मल्याळी साहित्यांतील कांही श्रेष्ठ कृती जर आसाममध्यें नेल्या, तर त्या तिकडे कुणाला समजणारच नाहीत. भारतांतील कुठल्याहि एका भाषेंतील लेखकाला दुसऱ्या भाषेंतील साहित्यांत काय चाललें आहे आणि काय मोलाचें आहे, तें प्रत्यक्षपणे जाणून घेतां येत नाही.

म्हणून भिन्न भिन्न भाषांतील श्रेष्ठ कलाकृतींना प्रोत्साहन देणें आणि त्याच्याहि पुढे भारतांतील सर्व भाषांतील साहित्य हें भारतीय साहित्य असें समजून व त्या साहित्यांतील श्रेष्ठ कलाकृतींचे इतर भाषांत अनुवाद करून त्यांचा प्रसार करणें, हें साहित्यअकादमीचें एक उद्दिष्ट आहे. अकादमीचा दृष्टिक्षेपांतील कार्यक्रम म्हणजे सर्व भाषांतील ग्रंथांची एक सूची तयार करणें आणि लेखकांचा परिचय प्रसिद्ध करणें हा आहे. हें कार्य तूर्त चालू आहे. भारतांतील सर्व चौदा भाषांतील ग्रंथांचा आणि भारतामध्ये प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी ग्रंथांचा व भारतीय नागरिकांनी इंग्रजींत लिहिलेल्या ग्रंथांचाहि त्या ग्रंथसूचींत अंतर्भाव होणार आहे.

सर्व भारतीय भाषांच्या साहित्याचे इतिहास लिहिणें, हा साहित्यअकादमीचा आणखी एक कार्यक्रम आहे. हे इतिहास-ग्रंथ प्रत्येकीं ३०० पृष्ठांचे असतील. ते लिहिण्याचें काम त्या त्या भाषेंतील अधिकारी पंडितांकडे सोंपविण्यांत आलें आहे. ते तद्देशीय किंवा इंग्रजी भाषेंत लिहिले जाणार असून मग त्यांचीं इतर भारतीय भाषांत भाषांतरें होणार आहेत.

कविता, लघुकथा आणि नाटकें यांचे प्रत्येक भाषेंत संकलनात्मक ग्रंथ तयार होत आहेत. त्यांचीं इतर भाषांतहि भाषांतरें व्हायचीं आहेत. ही भाषांतरें भारतांतील आधुनिक १३ भाषांत होणार असून कांही अपवादात्मक भाषांतरें इंग्रजींतहि व्हायचीं आहेत.

संस्कृताविषयींचा कार्यक्रम वेगळा आहे. संस्कृत साहित्याचा एक संग्रह चार खंडांत तयार होणार आहे. कालिदासाचे ग्रंथहि प्रकाशित करण्याचा अकादमीचा मानस आहे. साहित्य अकादमीच्या सल्लागार समितीने अनुवादित करायला लायक असलेल्या ग्रंथांची यादी बनविली आहे. याशिवाय परकी भाषेंतील जे शंभर ग्रंथ भारतीय भाषांतून अनुवादिले जाणार आहेत, त्यांची यादीहि तयार झाली आहे. त्या कार्याची सुरवात म्हणून २५ ग्रंथांची निवडहि झाली आहे. या ग्रंथांपैकी कांहींचे अनुवाद प्रकाशित झाले असून बाकीचे लवकरच प्रकाशित होणार आहेत. कांही श्रेष्ठ दर्जाच्या ग्रंथांच्या प्रकाशनासाठी अकादमी आर्थिक मदतहि करते; मात्र त्यांचें महत्त्व राष्ट्रीय स्वरूपाचें असलें पाहिजे. दर तीन वर्षांमागे प्रकाशित झालेल्या अव्वल दर्जाच्या कलाकृतींना ५००० रुपयांचें एक राष्ट्रीय पारितोषिकहि देण्यांत येतें. संस्कृतावरून लिहिलेल्या ग्रंथांसाठीहि एक वेगळें पारितोषिक आहे. हे ग्रंथ इंग्रजींत किंवा अन्य कोणत्याहि भाषेंत लिहिले तरी चालतात. कांही वर्षांमागे दिल्लींत 'युनेस्को'ची परिषद भरली असतां साहित्य अकादमीने प्रादेशिक साहित्यांतील ग्रंथांचें एक प्रदर्शन भरविलें. त्यांत निवडक २०००० ग्रंथांचा अंतर्भाव झाला होता. साहित्यअकादमी एक ग्रंथालय बांधीत असून त्याची पंधरा विभागांत विभागणी होणार आहे. त्यांत प्रत्येक भाषेसाठी स्वतंत्र विभाग व इंग्रजीसाठीहि एक वेगळा विभाग राहणार आहे.

ललितकला अकादमी — ललितकला अकादमीचें उद्घाटन करतांना मौलाना अबुल कलाम आज़ाद म्हणाले होते, की अकादमीने प्राचीन वैभवशाली परंपरेचें जतन केलें पाहिजे व तींत अर्वाचीन कलावंतांच्या कलाकृतींचीहि भर घातली पाहिजे. त्याचप्रमाणे तिने कलेचा दर्जा आणि लोकांची अभिरुचिहि सुधारली पाहिजे. तो हेतु लक्षांत घेऊन अकादमीने आपला कार्यक्रम आखला आहे, तो पुढीलप्रमाणे —

(१) कलेचीं राष्ट्रीय प्रदर्शनें (२) परदेशांतील प्रदर्शनें (३) भारतीय कलेचीं परदेशांतील प्रदर्शनें (४) लोककला आणि कारागिरी यांचें निरीक्षण (५) लेण्यांतील आणि तत्सम चित्रांच्या नकला करणें (६) प्रकाशनाचा कार्यक्रम आणि (७) कलाविषयक संस्थांना मान्यता व मदत देणें.

प्रचलित भारतीय कलाकृतींना प्रसिद्धि मिळवून देणें हा राष्ट्रीय कलाप्रदर्शनांमागील हेतु आहे. दर वर्षी अशीं प्रदर्शनें भरायचीं आहेत. आतापर्यंत अशीं कांही प्रदर्शनें भरलीं आहेत. प्रदर्शनांमध्ये कलावंतांना बक्षिसें देण्यांत येतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रदर्शन भरलें तर, देशांतील कलाप्रेमी लोकांच्या अनुभवांत भर पडेल, म्हणून अकादमीने परदेशांतील कलाकृतींचीं प्रदर्शनेंहि भरविलीं आहेत. पहिलें प्रदर्शन ३१ कॅनेडियन कलाकृतींचें होतें. ह्या कलाकृती कॅनडाच्या नॅशनल गॅलरी ऑफ् आर्ट या संस्थेनें सादर केल्या होत्या. त्या प्रदर्शनानंतर दुसरें प्रदर्शन हंगेरियन लोककलेचें भरलें. तिसरें चिनी हस्तकलेचें होतें. हीं प्रदर्शनें दिल्ली, कलकत्ता, मद्रास आणि मुंबई या शहरांत भरलीं. या शहरांतून प्रदर्शित करण्यांत आलेलें आणखी एक प्रदर्शन म्हणजे पोलीश कलांचें होय. अर्वाचीन जर्मन कलेचें एक प्रदर्शन वरच्या प्रमाणेच भरलें. परदेशांतील भारतीय कलेच्या रसिकांना भारतीय कला पाहतां याव्या म्हणून अकादमी सर्व प्रकारें मदत करते. एक भारतीय प्रदर्शन युरोपांत पाठविण्यांत आलें. कलाप्रदर्शनें आणि शिष्टमंडळें, लंडन, अफगाणिस्तान, इजिप्त, तुर्कस्तान, इराक, चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, रशिया, पोलंड, पश्चिम जर्मनी, इटली आणि युगोस्लाविया या देशांत पाठविण्यांत आलीं.

देशांतील समृद्ध लोककलांचें परिशीलन करणें, हा अकादमीचा महत्त्वाचा कार्यक्रम आहे. त्या कलांसंबंधीची माहिती गोळा करणें व त्या क्षेत्रांत काम करणाऱ्या कलाकारांना मदत करणें हा त्यामागील हेतु आहे. प्राचीन इमारतींचीं, अवशेषांचीं, शिल्पकृतींचीं आणि चित्रकृतींचीं छायाचित्रें काढून त्यांचा संग्रह करणें हाहि अकादमीचा एक कार्यक्रम आहे. असा संग्रह म्हणजे तें एक चित्रकलेचें संग्रहालयच होणार आहे. अकादमीने भारतांतल्या लेण्यांतल्या व इतरत्र असलेल्या भित्तिचित्रांच्या नकला करण्याचें काम हातीं घेतलें असून बदामीच्या लेण्यापासून त्याची सुरवात झाली आहे.

१९५६ सालच्या फेब्रुवारींत दिल्ली शहरांत अकादमीने कलाशिक्षणाचा एक मेळावा भरविला. या मेळाव्यांत मोठमोठे कलावंत, कलेचे इतिहासकार, कलामर्मज्ञ, कलाशिक्षक, आणि शिक्षणतज्ज्ञ यांनीं भाग घेतला होता. या मेळाव्याने अकादमीला सूचना केली ती अशी– शिक्षणांतील कलेचें उद्दिष्ट माणसाची बौद्धिक शारीरिक आणि आध्यात्मिक वाढ होऊन त्याने आदर्श व्यक्ति आणि आदर्श नागरिक बनावें, हें असावें आणि या ध्येयानुसार शिक्षणाच्या अभ्यासक्रमांत आवश्यक त्या गोष्टींची भर पडावी. माणसाची अशी वाढ होण्याकरितां कलेला मोठाच हातभार लावतां येईल. मात्र त्यासाठी अभ्यास क्रमाच्या सुरवातीच्या अवस्थेंत एक महत्त्वाचा भाग म्हणून तिचा अंतर्भाव झाला पाहिजे.

अकादमीच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमांत भारतीय कलाविषयक ग्रंथ आणि चित्रसंग्रह प्रसिद्ध करणें या गोष्टींचा अंतर्भाव झाला आहे. आतांपर्यंत अशीं अनेक प्रकाशनें झालीं आहेत. अकादमी ललितकला या नांवाचें एक द्वैवार्षिक नियतकालिकहि प्रसिद्ध करते.

आकादमीने देशांतील सुमारें वीस कलासंस्था आणि संघटना यांना मान्यता दिली आहे. या संस्था आणि संघटना अकादमीला सर्व प्रकारें साहाय्य करीत असून त्यांच्या कार्याची व्याप्ति वाढावी व त्यांची उपयुक्तता जनतेच्या निदर्शनास यावी, म्हणून अकादमी त्यांना योग्य ती आर्थिक मदतहि करीत असते.

भारतसरकारच्या विनंतीवरून आकादमीने बुद्धजयंतीच्या निमित्तानें एक कलाप्रदर्शन भरविलें. या प्रदर्शनांत बौद्धचित्रकला, शिल्पकला, जुनीं हस्तलिखितें आणि इतर चित्रें यांचा अंतर्भाव झाला होता. हें सर्व साहित्य भारतांतील व भारताबाहेरील देशांतील वस्तु-संग्रहालयांतून, तसेंच खाजगी संग्रहालयांतूनहि गोळा करण्यांत आलें होतें. हें प्रदर्शन फारच प्रेक्षणीय झालें. त्या वेळीं दिल्लींत युनेस्कोची परिषद भरली होती. त्या परिषदेला आलेल्या सदस्यांना आणि इतर लोकांनाहि तें प्रदर्शन परिणामकारक वाटलें.

या तीनहि अकादमींना लवकरच एकत्र एका वास्तूंत आणण्याची योजना भारत सरकारच्या शिक्षण खात्याने आंखली आहे. [के. एम्. जॉर्ज; म. ज्ञा. को.]

अकाली एक धार्मिक पंथ. अकाल म्हणजे कालरहित, किंवा ज्याच्यावर कालाची सत्ता चालत नाही तो; म्हणजेच परमेश्वर आणि त्याची उपासना करणारा तो अकाली होय. कांही लोक त्याचा अर्थ कालालाहि न डरणारा असा करतात. शीख धर्मांत या शब्दाला विशेष महत्त्व आहे. गुरु नानकदेव यांनी कालातीत परमेश्वराची उपासना अकाल या नांवाने प्रचलित केली. ' जातिगत, धर्मगत व देशगत भावांतून मुक्त होऊन विश्वांतल्या समस्त धर्मांच्या लोकांवर प्रेम करावें. त्यांच्याशीं विरोध न धरतां मैत्रीभावाने वागावें; कारण, सर्व मानवजात त्या अकाल पुरुषाचीच संतति आहे, '

असा गुरु नानक यांचा उपदेश आहे. सत् श्री अकाल ही या पंथाची घोषणा आहे.

याच परंपरेंत पुढे शीखांचा सहावा गुरु हरगोविंद याने अकाली पंथाची स्थापना केली. त्याने अमृतसरच्या सुवर्ण मंदिरासमोर अकालतख्त स्थापन केलें. त्याला अकालबुंग असें नांव आहे. बुंग म्हणजे ज्यावर घुमट आहे, असें एक महाभवन.

या अकालबुंगांत अकाली लोकांच्या गुप्तमंत्रणा व चर्चा होऊं लागल्या. त्यांत जे निर्णय होत त्यांना गुरुमतां अर्थात् गुरूचा आदेश असें नांव दिलें गेलें. धार्मिक समारंभाच्या स्वरूपांत अकाली दलाचीं तिथे अनेक संमेलनें भरत; पण त्यांचा मुख्य उद्देश मोगलांच्या अत्याचारांपासून जनतेचें रक्षण कसें करावें, हाच असे. याच कारणामुळे अकाली चळवळीला राजनैतिक वळण लागलें. जो नामवाणीचा प्रेमी, त्यागी आणि विरक्त असेल, तोच अकालबुंगाचा सभासद होऊं शके. अकाली लोक शूर, निर्भय आणि स्वतंत्र असत. बाल, वृद्ध, दुबळे आणि अबला यांचें प्राणपणाने संरक्षण करणें, हा ते आपला धर्म समजत.

१६९९ सालीं गुरु गोविंदसिंह यानें खालसा पंथ स्थापला. अकाली लोकच त्या पंथाचे अनुयायी होते. औरंगजेबाच्या अत्याचारांना सामना देण्यासाठी अकाली लोक सेनादळाच्या स्वरूपांत संघटित झाले. निळें वस्त्र आणि पांच ककार (कच्छ, कडा, कृपाण, केश व कंघा) धारण करण्याची गुरूने त्यांना आज्ञा केली. तेव्हापासून पांच ककार हे अकाली पुरुषांना अनिवार्य ठरले आहेत. त्यांच्या लष्करी बाण्यामुळे त्यांना निहंग अशीहि संज्ञा मिळाली. निहंग हा फारसी शब्द असून, त्याचा अर्थ निर्भय असा आहे. शीखांच्या इतिहासांत अकालींनी महत्त्वाची कामगिरी बजाविली आहे. निहंग ब्रह्मचर्याने व साधुवृत्तीने राहत. ते दलितांचें आणि दुर्बलांचें संरक्षण करीत, तसाच शीख धर्माचा प्रचारहि करीत. हे भ्रमणशील असत. त्यांची ही पक्षिवृत्ति पाहून कांही लोक त्यांना निहंगच्या ऐवजीं विहंग म्हणत. अफगाणांच्या आक्रमणांना तोंड देणें व अत्याचारी टोळ्यांपासून हिंदु स्त्रियांचें रक्षण करणें हें त्यांचें नित्याचें कार्य होतें.

महाराजा रणजितसिंह (इ. स. १७८० ते १८३९) याच्या काळांत अकाली सेनादल उत्कर्षाच्या शिखरावर होतें. या अकाली सैन्याच्या बळावरच मुलतान, काश्मीर, अटक, नौशेरा, जमशेद, अफगाणिस्तान इथवर रणजितसिंहाने आपला राज्यविस्तार केला. फुलासिंग हा त्या वेळीं अकालींचा पुढारी होता. हा त्या पंथाच्या सर्व गुणदोषांचें प्रतीक होता. इ. स. १८०९ मध्ये अमृतसर येथे मेटकाफ़च्या तुकडीवर हा आपल्या दलासह तुटून पडला आणि त्यामुळेच प्रसिद्धीस आला. इ. स. १८१८ मध्यें वेढ्यांत सांपडलेला मुलतानचा किल्ला याने जबरदस्त पराक्रम करून सर करण्याच्या बेतांत आणला होता. रणजितसिंहाने हा त्याचा पराक्रम पाहून त्याला सिंधच्या खोऱ्यांत मुख्य अधिकारी नेमलें. पुढे १८२३ मधील तेरीच्या लढाईत यानें आपल्या दलासह युसफझईवर चढाई केली. युसफझईचा पराभव झाला खरा; पण फुलासिंगाला त्या युद्धांत मरण आलें. त्याचें स्मारक नौशेरा येथे असून हिंदु व मुस्लीम दोन्ही जाती त्याला मान देतात.

अकाली दलाबद्दल फुलासिंगाच्या पूर्वीपासूनच त्याच्या शत्रूंना व मित्रांनाहि दरारा वाटत असे. शीख सरदारांनाहि त्याची भीति वाटे. पुष्कळदा अकाली लोक त्यांच्याकडून बलप्रयोगाने खंडणी वसूल करीत. १८२३ नंतर रणजितसिंहाने हळूहळू त्यांचें महत्त्व नष्ट केलें. इंग्रजांनाहि अकालींचा धाक वाटत होता. ते अनेक मार्गांनीं त्यांना दाबण्याचा प्रयत्न करीत होते.

शीख गुरूंनी आपल्या धर्माच्या प्रसारासाठी अनेक गुरुद्वारे स्थापले होते व त्यांच्या योगक्षेमासाठी रणजितसिंहाने मोठमोठ्या जहागिऱ्या लावून दिल्या होत्या. इंग्रजी राज्यांत या जहागिऱ्यांचे अधिकार ज्यांच्या हातांत होते, त्यांच्यापैकी पुष्कळसे महंत पुढें दुराचरणी बनले. त्यांच्यामुळे शीख धर्माला कलंक लागण्याची वेळ आली. गुरुद्वारे हीं अनीतीचीं आगरें बनलीं. अशा महंतांच्या हातांतून गुरुद्वाऱ्यांचा उद्धार करण्यासाठी १९२० सालीं अकाली तरुणांनी आपलें नवें सेनादळ संघटित केलें. त्यांनी अनेक ठिकाणच्या मठांतून दुराचरणी महंतांना हुसकावून देऊन ते मठ आपल्या ताब्यांत घेतले. या कार्यांत अनेक अकाली वीरांना आत्मबलिदानहि करावें लागलें. ब्रिटिश सरकारने सुरवातीस महंतांना बरीच मदत केली; पण शेवटीं अकाली दलाचाच विजय झाला. सन १९२५ पर्यंत सगळे गुरुद्वारे शिरोमणि गुरुद्वारा कमिटीच्या सत्तेखाली आले. या कामीं अकाली लोकांना म. गांधींनी पुष्कळ मदत केली व भारतीय काँग्रेसनेहि अकाली आंदोलनाचा पुरस्कार केला.

१९२५ सालीं ब्रिटिश सरकारने गुरुद्वारा कायदा निर्माण केला. तदनुसार १९२६ सालीं गुरुद्वाराप्रबंधक समितीचें पहिलें निर्वाचन झालें. या समितीचें प्रमुख कार्य गुरुद्वाऱ्यांची देखरेख, धर्मप्रचार, विद्याप्रसार, इ. आहे. शिरोमणि गुरुद्वारा प्रबंधक समितीहून वेगळें असें एक केंद्रीय शिरोमणि अकाली दल अमृतसर येथे स्थापन झालें आहे. त्याचे जत्थे प्रत्येक जिल्ह्यांत गुरुद्वाऱ्यांची व्यवस्था आणि जनसेवा इत्यादि कामें

करतात. **पाहा** –शीख धर्म; हरगोविंद, नानक. [एन्सा. रि. ए.; बलवंतसिंह स्याल]

अकुटी बोंगा याचा वाच्यार्थ वाकडें किंवा कमानीसारखें भूत असा होतो. हा मुंडांचा एक देव आहे. याने पछाडलें, की माणसाला धनुर्वात होतो, असें समजतात. याच्या बलिदानाचा विधि पुढीलप्रमाणे—

कर्ता आपल्या घराशेजारीं सूर्याचा पहिला किरण पडेल अशा जागीं कुंपण घालून थोडीशी जागा बंदिस्त करतो. आंतली जागा शेणानें सारवितो. तिथें एक चटई पालथी घालतो. मग अकुटी बोंगाची पूजा करतो. त्यासाठी कर्त्याला खाण्यापिण्या-बाबत कांही निर्बंध पाळावे लागतात. या बोंगाचे बळी मासिक व वार्षिक असे दोन प्रकारचे असतात. लाल रंगाचा बोकड, लाल कोंबडा, तांदुळांची दारू, गव्हाच्या पिठांत साखर मिसळून बनविलेली मिठाई, हे बळीचे प्राणी व पदार्थ असतात. दोन्ही प्रकारचे बळी सोमवारीं किंवा रविवारीं देतात. या विधीचें आणखीहि बरेंच तंत्र आहे. [एन्सा. मुं.]

अकुल तंत्रशास्त्रांत शिवाला अकुल व शक्तीला कुल म्हणतात. 'अकुलं शिव इत्युक्तः कुलं शक्तिः प्रकीर्तिता।' **पाहा**—कौल मार्ग.

अकुलवीर तंत्र नाथसंप्रदायांतला एक संस्कृत ग्रंथ. सिद्ध-नाथ किंवा मीननाथ यांपैकी कोणीतरी त्याचा कर्ता असावा. कारण दोन्ही प्रकारचे उल्लेख मिळतात.

अक्क देवतलु आंध्र प्रदेशांतील कोळी लोकांच्या देवता. या पूर्वी एका घरच्या बहिणी होत्या. त्यांनी एके दिवशीं भांडण करून एकमेकींस ठार मारलें. म्हणून त्या भूतयोनींत गेल्या. पुढे त्या घरांत वाखा उत्पन्न झाला. त्या वेळीं एका भगताच्या अंगांत येऊन त्यांनी सांगितलें, की 'आमची पूजा कराल तरच बचावाल.' त्या दिवसापासून तिथले कोळी त्यांना भजूं लागले. समुद्रांत मच्छीमारीला जाण्यापूर्वी ते त्यांना बलिदान करतात. यांच्या ओबडधोबड मृण्मय मूर्ती टेकडीवर समुद्राकडे तोंड करून बसविलेल्या असतात. त्यांना कोणी स्पर्श करायचा नसतो. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

अक्क महादेवी (सन ११६० चा सुमार) म्हैसूर राज्याच्या शिवमोग्ग (शिमोगा) या जिल्ह्यांत हिचा जन्म झाला. बापाचें नांव विमल व आईचें सुमति. ही अत्यंत रूपमती होती. तिला पाहून त्या प्रदेशाचा जैन राजा कौशिक मोहित झाला व त्याने तिला मागणी घातली. पण हें लग्न व्हावें असें तिच्या मनांत नव्हतें. कारण, समजा-यला लागल्यापासून तिने पर शिवाला आपला पति मानलें होतें. तिची धारणा होती, की आपलें लग्न चेन्न मल्लिका-र्जुनाशीं केव्हाच लागलें आहे. ती म्हणते—

'आई, माझा प्रियकर अरूप असूनहि रूपवान् आहे. तो मृत्युरहित आहे. तो अवकाश, व्यवधान व चिन्ह यांनीहि रहित आहे. तो अभय, अकुल, असीम आहे. तोच माझा पति. इतर मरणधर्मी पति खड्डयांत जाऊं देत' (वचन शास्त्रसार).

पण आईवडिलांनी गळ घातली म्हणून व राजाज्ञा मानली नाही, तर आपल्या आईबापांवर संकट ओढवेल म्हणून ती त्या लग्नाला तयार झाली. मात्र तिने राजाला अट घातली, की 'माझ्या पूजोपासनेंत तूं व्यत्यय आणतां कामा नये; तसें झाल्यास मी तुझ्यापासून अलग होईन.'

राजाने ती अट मानली; पण पाळली मात्र नाही. अखेर त्याची भोगासक्ति तिला असह्य झाली व तिने त्याचा त्याग केला. ती चेन्नबसवाच्या शोधासाठीं बाहेर पडली. लोकांनी तिला परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न केला; पण तिने कोणाचेंहि मानलें नाही. स्त्री ही अबला असली तरी तीहि सबला होऊं शकते, हें तिने आपल्या चरित्राने सिद्ध केलें. अध्यात्मसाधनेच्या क्षेत्रांत तिची वीरवाणी असामान्य ठरली आहे. ती म्हणते—

'ज्याने डोंगरांत घर बांधलें, त्याने जंगली जनावरांना घाबरतां कामा नये. समुद्रावर घर करणाऱ्याने लाटांना डरतां कामा नये. बाजारांत बिऱ्हाड मांडील, त्याने कोलाहलाला घाबरतां कामा नये. हे चेन्न मल्लिकार्जुन ! त्याचप्रमाणे मी या संसारांत जन्म घेतला आहे; तेव्हा मलाहि निंदा—स्तुतीच्या आघातांना न भितां शांतीनेच सर्व साहिलें पाहिजे.' (वचनधर्मसार)

अक्क महादेवी संसारत्याग करून कल्याणक्षेत्रीं गेली. तिथे तिने मधुर भक्ति व उज्ज्वल चारित्र्य या गुणांनी अनेक शिवशरणांना सन्मार्ग दाखविला. आपलें वीर वैराग्य व निर्भय शिवशरणता यांच्या बळावर वीरशैव भक्तांच्या मालिकेंत तिने महत्त्वाचें स्थान मिळविलें आहे. तिचीं वचनें संख्येने अल्प असलीं, तरी तीं तत्त्वार्थाला भिडणारीं आहेत. योगांगत्रिविधि या नांवाचा हिचा एक छोटासा ग्रंथ असून त्यांत सरळ भाषेंत अध्यात्माचें निरूपण आहे. जीवनाच्या अखेरीस आपलें अंतिम उद्दिष्ट साधण्यासाठी ती कल्याणहून श्रीशैलपर्वतावर गेली व तिथेच शिवैक्य पावली.


अक्काचें जीवन हा अमर प्रेमाचा दिव्य संदेश आहे. कन्नड काव्यवनांतली ती कोकिला आहे. तिच्या वचनांत सर्वत्र अध्यात्माचाच स्वर लागलेला आहे. तिला परम शिवाशीं सामरस्य प्राप्त झालें आहे. समरस होऊनहि ती शरणार्थिनी राहिली आहे. ती म्हणते–

नानु निनगोलिदे, एनीनु नगोलिदे
नीनेन्ननगलदिप्पे नानिन्ननगलदिप्पे नय्या
निन ननगे बेरींदु ठावुंटे

अर्थ — मी तुझ्यावर मुग्ध आहें आणि तूं माझ्यावर ! मी तुझ्याशीं अवियुक्त आहें आणि तूं माझ्याशीं ! तुझ्याशिवाय मला दुसरा कोणता आधार आहे ! [डॉ. हिरण्मय]

अक्कलकोट सोलापूरपासून २२ मैल पुणें – रायचूर या रेल्वेमार्गावरचें गांव. अक्कलकोटचे स्वामी यांनी वास्तव्य केल्यामुळे या गांवाला दत्तक्षेत्राचा मान लाभला आहे. स्वामींची समाधि इथेच आहे. **पाहा**– अक्कलकोटचे स्वामी.

अक्कलकोटचे स्वामी (समाधि इ. स. १८७८) माणिक प्रभूंचे समकालीन सत्पुरुष. यांना दत्ताचे अवतार मानतात. दत्तसंप्रदायाच्या अर्वाचीन इतिहासांत यांना महत्त्वाचें स्थान आहे. हे इ. स. १८५७ मध्यें अक्कलकोट येथे आले व अखेरपर्यंत तिथेच राहिले. यांच्या पूर्वजीवनाविषयीं कांहीच माहिती मिळत नाही. त्यांनीहि आपलें पूर्व जीवन अखेरपर्यंत गुप्तच राखलें. त्यामुळे लोक त्यांना अक्कलकोटचे स्वामी याच नांवाने ओळखूं लागले. एकदा कोणीतरी त्यांना प्रश्न विचारला, की 'आपण कुठून आलां ?' त्यावर त्यांनी उत्तर दिलें, 'आम्ही कर्दळीबनांतून निघालों आणि बंगालदेश, गंगा–गोदातटाक, वगैरे स्थळें हिंडत हिंडत शेवटीं इथे आलों.'



अक्कलकोटचे स्वामी

कर्दळीबनांतून निघालों, या त्यांच्या सांगण्यावरून त्यांच्या भक्तांनी मनाशीं निश्चित केलें, की इ. स. १४५८ मध्ये कर्दळीबनांत (श्रीशैल) निजानंदास गेलेले नरसिंह सरस्वतीच या स्वामींच्या रूपाने पुनश्च अवतरले आहेत.

उन्मुक्त लीला आणि अद्‌भुत चमत्कार यांनी त्यांचें चरित्र भरलेलें आहे. ते 'बालोन्मत्तपिशाचवत्' वागत. शेंकडो भाविक जन त्यांच्या दर्शनार्थ येत. राजेरजवाडेहि त्यांत असत. ते कोणाच्या प्रश्नाला कधीच धड उत्तर देत नसत. संदर्भाने ज्याची त्याला खूण पटावी असें त्यांचें मोजकें बोलणें असे. त्यांच्यामुळे महाराष्ट्रांत दत्तोपासनेचा प्रसार मोठ्या प्रमाणांत झाला.

शिव हर शंकर नमामि शंकर
शिवशंकर शंभो
ये गिरिजापति भवानिशंकर शंभो ।।
संतमहंतां होती भेटी
हरुषें नाचूं वाळवंटीं ।

असें स्वामींचें भजन असे. सुषुप्ति अवस्थेंत ते विराट् शिवाचें ध्यान करीत असें सांगतात. त्यांनीं महाराष्ट्रांत गुरुसंप्रदाय वाढविला. वीस वर्षे प्रकट राहून चैत्र व. १३ शके १८०० या दिवशीं ते निजानंदीं निमग्न झाले. अक्कलकोट येथे त्यांची समाधि असून लोक तिच्या दर्शनासाठी जात असतात. [द. सं .इ.]

अक्काबाई लक्ष्मीची थोरली बहीण म्हणजेच दुर्दैवाची दशा. **पाहा** – ज्येष्ठा.

अक्रिया क्रियाभाव, क्रियात्याग व अयोग्यक्रिया असे या शब्दाचे तीन अर्थ आहेत–

अक्रिया त्रिविधा प्रोक्ता विद्वद्‌भिः सर्वकर्मिणाम् ।
अक्रिया च परोक्ता हि तृतीया चायथाक्रिया ।।
(शक)

अक्रियावाद बुद्ध - महावीरांच्या कालांतला एक दार्शनिक मतवाद. त्यांच्याहि पूर्वीं या मताचा खूप बोलबाला होता. महावीराने पाखंडी लोकांचे जे चार वर्ग केले आहेत, त्यांत अक्रियावादी मोडतात.

जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा, पुण्य, अपुण्य व मोक्ष, हीं नऊ तत्त्वें मानणारे ते अक्रियावादी होत. अक्रियावादांत कर्म, क्रिया व प्रयत्न हे अमान्य केलेले आहेत. त्यांच्या मते प्रत्येक गोष्टीचें अस्तित्व क्षणिक असतें आणि कोणतीहि स्थिति उत्पन्न झाल्याक्षणींच नष्ट होते. त्यामुळे तिची कसलीहि क्रिया असूं शकत नाही. अस्तित्व हेंच क्रियेचें कारण व तिचें फळ

असतें. तेंच नाही म्हणजे क्रिया संभवतच नाही. या वादांत नित्य व अनित्य असा भेदच नाही. कारण त्यांनी जीवाचें अस्तित्वच अमान्य केलेलें आहे.

स्वतः, परतः, काल, ईश्वर, आत्मा, नियति, स्वभाव आणि यदृच्छा या विचारभेदांमुळे अक्रियावादांत ८४ उपपंथ निर्माण झाले आहेत.

याच अक्रियावादाचे निराळ्या प्रकारे आठ उपवर्ग होतात–

(१) **एकवाद** – परमात्मा हाच जगताचें मूळ कारण होय असा विश्वास.

(२) **अनेकवाद** – परमतत्त्व एक खरें; पण तें नाना रूपांनी व्यक्त होतें.

(३) **मितवाद** – आत्म्याला विशिष्ट आकार असतो.

(४) **निर्मितवाद** – ईश्वराने विश्व निर्माण केलें, ही श्रद्धा.

(५) **सातवाद** – सुखासीन जीवन जगूनहि मोक्ष मिळतो.

(६) **समुच्छेदवाद** – सर्व वस्तू सतत नाश पावत असतात.

(७) **नित्यवाद** – सर्व वस्तू अनंत आहेत.

(८) **न सन्ति परलोकवाद** – आत्मा, परलोक, पुनर्जन्म, इ. कल्पनांवर अविश्वास.

जीवाने केलेल्या कर्मांचा परिणाम त्याला भविष्यकाळीं भोगावा लागतो, हें अक्रियावाद्यांना मान्य नाही. त्याचप्रमाणे कशालाहि अस्तित्व नसून भविष्यकाळासंबंधीं केलेलीं भाकितें असत्य असतात, असें त्यांचें मत आहे. बुद्धाच्या काळीं पूरण कस्सप (पूर्ण कश्यप) हा आचार्य या मताचा प्रख्यात समर्थक होता. जैन व बौद्ध या दोन्ही संप्रदायांनी वरील अक्रियावादाचें खंडन केलें आहे. [स्कू. से. इन् जै. लि.; बलदेव उपाध्याय]

अक्रूर

श्वफल्काचा पुत्र. हा कंस व कृष्ण या दोघांच्याहि विश्वासांतला होता. यानेच कंसाच्या सांगण्यावरून कृष्णाला मथुरेंत आणलें.

अक्रोध

क्रोधाचा अभाव, क्रोधाचें दमन व यतिधर्मांपैकी एक धर्म. हा दैवी संपत्तींतला एक गुण आहे (गीता १६. २). कौशिक नांवाच्या ब्राह्मणाला एक पतिव्रता स्त्री सांगते —

क्रोधः शत्रुः शरीरस्थो मनुष्याणां द्विजोत्तम।
यः क्रोधमोहौ त्यजति तं देवा ब्राह्मणं विदुः॥
(म. भा. वन. २०६)

अर्थ – हे ब्राह्मणश्रेष्ठा, क्रोध हा मनुष्यांच्या शरिरांत वास्तव्य करणारा शत्रु आहे. जो क्रोध व मोह यांचा त्याग करतो, त्याला देव ब्राह्मण म्हणतात.

संत व स्थितप्रज्ञ पुरुषांच्या अंतरांत अक्रोधवृत्ति सदैव वास्तव्य करते.

अक्ल

सूफी पंथाचा आध्यात्मिक शब्द. परमात्म्याने स्वतःला अनुरूप अशी आदिभूताची सृष्टि केली आणि तीच आदिकारण परमात्म्याची प्रथम अभिव्यक्ति होय. ही प्रथम अभिव्यक्ति अर्थात् विशुद्ध ज्ञान म्हणजेच अक्ल आहे. हिला अक्ले कुल (विश्वज्ञान) असेंहि म्हणतात. [हिं. सा. को.]

अखंड द्वादशी

(१) (तिथिव्रत) आश्विन शु० १२ शी एकादशीस उपवास. द्वादशीस विष्णुपूजा. व्रतावधि एक वर्ष. फल – धर्मकृत्यांतलें न्यून पूर्ण होतें (हेमाद्रि व्रतखंड). (२) मार्ग० शु० १२ शी. उपवास व पूजा. यज्ञांतील वैकल्य दूर होतें (वायु पु. १७. ११–२५; गणेश पु. १.११८)

अखंडानंद

(१५ वें शतक) अखंडानुभूतीचे शिष्य. यांनी पंचपादिकाविवरण या ग्रंथावर तत्त्वदीपन नांवाचा ग्रंथ लिहिला असून तो प्रमाणभूत मानला जातो. [हिंदुत्व]

अखंडानंद भिक्षु

(१८७४–१९४० इ. स.) गुजरातमधील एक सत्पुरुष. यांनी सस्तु साहित्य मुद्रणालय व सस्तु साहित्यवर्धक कार्यालय अशा दोन संस्था निर्माण केल्या व सुमारे तीनशे निवडक ग्रंथांच्या गुजराती भाषेंत लाखों प्रती छापून त्या स्वस्त किंमतींत देण्याची व्यवस्था केली. त्यांच्या या प्रयत्नाने गुजरातेंत बरोबर उत्कृष्ट ग्रंथ पोचले. हे विविध ग्रंथ छापतांना त्यांनी ग्रंथांच्या अनेक प्रतींचें संशोधन करून ग्रंथ जितका मूळ व शुद्ध घेतां येईल, तितका घेण्याचा प्रयत्न केला आहे. [अ. च. को.]

अखर

दसनामी संप्रदायापैकी एक. मोगल राजांच्या कारकिर्दींत इ. स. १७५० च्या सुमारास अखरांपैकी राजेंद्र गिरि याला बरेंच महत्त्व प्राप्त झालें होतें. तेव्हापासून अखर या लढाऊ गोसाव्यांची माहिती मिळते. यापूर्वीचा त्यांचा इतिहास मात्र उपलब्ध नाही.

निर्वाणी आखाड्यांतील एका परंपरागत भाटाकडे अखरांच्यासंबंधीची एक पोथी सांपडली आहे. परंतु दंतकथांच्या रूपाने जी माहिती मिळते, तीच या पोथींत संग्रहीत केलेली आहे.

अखरांमध्ये अवाहन, अटल, निर्वाणी, आनंद, निरंजनी, जूना, अवहन असे भेद आहेत. अटल अखर हे यांपैकी सर्वांत जुने

असून मोगलांच्या कारकिर्दीत हिंदुधर्माच्या रक्षणासाठी यांच्यांतील पुष्कळ वीरांनी मोगलांविरुद्ध लढा दिला होता. हे जोधपूर राज्यांत राहत होते. काबूल व बलुचिस्तान या प्रदेशांतील मुसलमानांनी जेव्हा जोधपूरवर स्वारी केली, तेव्हा अटल संन्याशांनी त्यांचा पराभव केला व मारवाडवर पुन्हा कधीहि हल्ला करणार नाही, अशी कुराणावर हात ठेवून त्यांना शपथ घ्यायला लावली. या कामगिरीबद्दल जोधपूरच्या राजाने त्यांना नागोर तालुका इनाम दिला.

१९ व्या शतकाच्या आरंभीं मिशनरी लोकांनी ख्रिश्चन धर्माचा प्रसार आरंभिला. तेव्हा विद्वान् अखरांनी वेद-शास्त्रांच्या अध्यापनासाठी मठ उभारले. या मठांतील अध्यापकांना मंडलेश्वर असें म्हणत असत. यांपैकी कांही मंडलेश्वरांनी नंतर अखरांच्या अखत्यारीबाहेर आपले स्वतंत्र मठहि स्थापले.

१९११ सालीं हरद्वार येथे निर्वाणी अखरांनी महानिर्वाण वेदविद्यालय स्थापन केलें. पुढे १९१६ सालीं तें तिथून बंद करून अलाहाबाद शहरीं उघडण्यांत आलें.

कुंभमेळा, मकरसंक्रांति, मेषसंक्रांति अशा पर्वकाळीं हरद्वार व प्रयाग येथे गंगास्नानाचा पहिला मान अखरांचा आहे. या–वेळीं गंगेच्या वाळवंटांत निर्वाणी अखर आपला तंबू ठोकून दोन उंच ध्वज उभारतात व त्याखाली चंडीपाठ सुरू करतात. ध्वज उभारलेले असतात, तोंवर ते लोकांना अन्नदान करतात; तसेंच पर्वदिनीं एक घोडा, सव्वा पांच मण खिचडी व पांचशे पंचवीस रुपये इतकें दानहि देतात. प्रत्येक मेळ्याच्या वेळीं निर्वाणी अखरांना निदान तीस हजार रुपये खर्च येतो. मेळ्यानंतर हे काशीला जातात. [हि. द. ना. सं.]

अखो भगत (१५९१–१६५६ इ. स.) एक गुजराती भक्त कवि. जातीचा सोनार. हा जेतलसरहून अहमदाबादेला राहायला आला. त्याच्या एका धर्मभगिनीने त्याला एक सोन्याचा दागिना घडवायला दिला असतां अखोने त्यांत पदरचें सोनें घालून तो दागिना मोठा बनवून दिला. पण त्या बाईला मात्र वाटलें, की हा जातीचा सोनार असल्यामुळे याने आपण दिलेलें सोनें गुंज दोन गुंजा तरी खाल्लें असेल. म्हणून तिने तो दागिना दुसऱ्या सोनाराकडे परीक्षेसाठी नेला; पण तो वजनांत मूळच्यापेक्षा अधिकच भरला. धर्मभगिनीचा हा अविश्वास अखोला कळला व त्याला दुःख झालें. पुढे तो अहमदाबादेच्या टांकसाळीचा मुख्य अधिकारी झाला. पण तिथेहि चांदींत भेसळ केल्याच्या आरोपावरून त्याच्यावर तोहमत आली. अशा अनेक गोष्टींमुळे त्याचें मन संसाराला विटलें. त्याच्या कजाग बायकोनेहि त्याच्या उद्वेगांत अधिकच भर टाकली. त्यामुळे तो घरदार सोडून तीर्थयात्रेला निघाला. त्या यात्रेंत तो गुरूचा शोध करीत होता. तो गुरु त्याला काशींत भेटला. त्याने अखोला ब्रह्मज्ञान शिकविलें. तिथे कांही काल गुरुसेवा करून तो परत अहमदाबादेस आला.

वयाच्या पन्नाशीनंतर त्याने काव्य करण्यास प्रारंभ केला. पंचीकरण, गुरुशिष्यसंवाद, अनुभवबिंदु, चित्तविचारसंवाद आणि अखेगीता, हे त्याचे ग्रंथ आहेत. याशिवाय प्रकीर्ण काव्येंहि पुष्कळच आहेत. अखोच्या काव्यांतला प्रधानरस म्हणजे ब्रह्मरस. एका पंडिताने प्राकृत उपनिषदें म्हणून त्याच्या ग्रंथांचा गौरव केला आहे. मिथ्याचार, दंभ, दुराग्रह, इ. सामाजिक दुर्गुणांवर अखोने आपल्या काव्यांतून कठोर प्रहार केले आहेत. गोकुळनाथ नांवाच्या एका दांभिक गुरूचा तो पुढीलप्रमाणे उपहास करतो—

गुरु कीधा मे गोकुळनाथ
घरडा बळदने घाली नाथ

अर्थ – गोकुळनाथाला मीं माझा गुरु केलें; पण म्हाताऱ्या बैलाला वेसण घालण्यासारखाच तो प्रकार होता.

एक मूर्खने एवी टेव
पत्थर एटला पूजे देव

अर्थ – एका मूर्खाला सगळ्याच दगडांना देव मानून पूजा करण्याची सवय होती.

ज्यां ज्योइए त्यां कूडेकूड
सामेसामा बेठां घूड

अर्थ – जिथे पहावें तिथे लबाडी व अप्रामाणिकपणा. जणू काय घुबडें समोरासमोर बसलीं आहेत.

ऊंडो कुवो ने फाटी बोख
शिखव्युं सांभळ्यू संघळूं फोक

अर्थ – जो शिकविलेलें व ऐकलेलें लक्षांत घेत नाही, तो खोल विहिरींत बुडणाऱ्या फाटक्या पखालीसारखाच आहे.

अखो फारसा शिकलेला नव्हता; पण त्याचें व्यवहारज्ञान खोल होतें. त्याच्यापूर्वींच्या काव्यवाङ्मयांत कृष्णभक्तीचें जें फाजील स्तोम माजलें होतें, तें त्याने पुष्कळच कमी केलें व गुजराती कवितेला नवें वळण लावलें. म्हणूनच गुजराती वाङ्मयांत त्याला युगप्रवर्तक कवि मानतात. [वि. मुं. रा. प.]

अख्याति भ्रमांतील प्रत्यक्ष ज्ञान व स्मरणज्ञान यांची पृथक् प्रचीति न येणें याला अख्याति असें मीमांसक म्हणतात. [भा. द. सं.]

अगमुदैयन् तमिळनाडमध्ये ही जात आढळते. मरवन् आणि कल्लन् या जातींसारखीच ही जात

आहे. अगमुदैयन् शब्दाचा अर्थ घरधनी किंवा जमीनदार असा आहे. शेती हाच यांचा व्यवसाय आहे. या जातींत ऐवलि, नट्टु, कोट्टारपट्टु, मलैनाडु, नट्टुमंगलम्, इ. अनेक पोटजाती आहेत. मूळ अगमुदैयनांचा ब्राह्मणांशीं विशेष संबंध आलेला असून त्याचा त्यांच्यावर बराच प्रभाव पडलेला आहे. हे धर्मकृत्यांसाठी ब्राह्मण पुरोहिताला बोलावितात. सामान्यत: प्रौढ विवाहाची चाल आहे. लग्न ठरवितांना कुंडली पाहतात. लग्नविधि साधा असतो. वराची वहीण वस्त्रालंकार व फुलें घेऊन वधूगृहीं जाते व वधूला त्या वस्तू देऊन तिच्या गळ्यांत हळदीने रंगविलेली माळ घालते. त्या वेळीं शंख वाजवितात. मग त्याच दिवशीं वधूला वराच्या घरीं नेण्यांत येतें. एवढ्याने लग्नविधि पुरा होतो.


अगमुदैयन् जोडपें

मृतांना जाळतात, किंवा पुरतात. त्यांचे और्ध्वदेहिक संस्कारहि करतात. हे शैव पंथी आहेत. अय्यनार, पिडारी, करुप्पण्णस्वामी, इ. अनेक क्षुद्र देवतांनाहि भजतात. स्वत:ला पिळ्ळै ही थोर लोकांना दिली जाणारी पदवी लावून घेतात. कोच्चि संस्थानांतहि यांची वस्ती आढळते. [से. रि. १९११; म. ज्ञा. को.; मदुरा गॅझेटिअर.]

अगम्यागमन अगम्या = समागम करण्यास अयोग्य किंवा निषिद्ध स्त्री. अगम्यागमन = निषिद्ध स्त्रीशीं समागम. हें एक पाप आहे. पुढील स्त्रिया अगम्य होत –

शूद्राणां विप्रपत्नी च विप्राणां शूद्रकामिनी ।
... ...
गुरुपत्नीं राजपत्नीं सपत्नीमातरं प्रसूम् ।
सुतां पुत्रवधूं श्वश्रूं सगर्भां भगिनीं सति ॥
सोदरभ्रातृजायां च भगिनीभ्रातृकन्यकाम् ।
शिष्यां च शिष्यपत्नीं च भागिनेयस्य कामिनीम् ॥
भ्रातृपुत्रप्रियां चैवात्यगम्यामाह पद्मजः ।
एतास्वेकामनेकां वा यो व्रजेन्मानवाधमः ।
स मातृगामी वेदेषु ब्रह्महत्याशतं लभेत् ॥

(ब्र. वै. प्रकृ. २७)

अर्थ — शूद्रांना ब्राह्मणस्त्री, ब्राह्मणांना शूद्रस्त्री, गुरुपत्नी, राजपत्नी, सावत्र माता, माता, मुलगी, सून, सासू, गर्भवती, बहीण, भावजय, भावाची व बहिणीची मुलगी, शिष्या, शिष्यपत्नी, भाच्याची बायको व पुतण्याची बायको, या स्त्रिया अति अगम्य होत, असें विधात्याने सांगितलें आहे. अशा स्त्रियांपैकी एकीशीं वा अनेकींशीं जो संभोग करील, तो मातृगमनी ठरेल व त्याला शंभर ब्रह्महत्यांचें पातक लागेल.

असें पातक घडल्यास त्याच्या निष्कृतीसाठी कृच्छ्र प्रायश्चित्त सांगितलें असून पराशक्तीची पूजा करून तिच्या पंचदशाक्षरी मंत्राचा जप केल्यानेहि प्रायश्चित्त होतें, असें सांगितलें आहे (ब्रह्मांड पु. ४.८).

अगरबत्ती (सं. अगरु + वर्ति = वात) कापूर, ऊद, वगैरे सुगंधी द्रव्यें यांचा मसाला काडीला लावून जी धुपाची काडी तयार करतात, तिचें नांव. ही देवपूजेसाठी व वातावरण सुगंधित व शुद्ध करण्यासाठी वापरतात.

अगरम् मदुराई जिल्ह्यांत दिंडिगुलच्या उत्तरेस सहा मैलांवर हें गांव असून तिथे मुत्तलम्माचें देवालय आहे. आश्विनांत तिथे फार मोठा उत्सव होतो. गाभाऱ्याच्या दोन्ही बाजूंस दोन मोठे राक्षसांचे पुतळे उभे आहेत. त्यांतील उत्तरेकडील पुतळ्यावर सरडा चुकचुकला, तर तें शुभ लक्षण समजून उत्सव केला जातो. सरडा चुकचुकला नाही, तर उत्सव होत नाही. उत्सवांत एका चांदीच्या चक्राची मिरवणूक काढतात. उत्सवासाठी मातीची मूर्ति करून तिचें शेवटीं नदीपलीकडे विसर्जन करतात. [मदुरा गॅझेटिअर.]

अगरु (१) आंध्रांतल्या तेलुगु शेतकऱ्यांची किंवा विड्याच्या पानांचा धंदा करणाऱ्यांची एक जात. नेल्लिमेरळ या ठिकाणीं यांची दाट वस्ती आहे. यांच्यांत मुलें मुली वयांत आल्यावर त्यांचीं लग्नें करतात. पौरोहित्य उडियां ब्राह्मण करतो. मृतांना जाळतात. [का. ट्रा. स. इं.]

(२) कुरु देशांतलें एक अरण्य. हें चंद्रकांत व सूर्यकांत या नांवाच्या दोन पर्वतांच्या मध्यभागीं आहे. [वायु पु. ४५. ३१]

अगस (सा) कानडी धोब्यांची जात. हे लोक दक्षिण महाराष्ट्र आणि कानडी जिल्हे या प्रदेशांत आढळतात. हे द्राविड वंशाचे आहेत. वीरघटेमडिवाळ ईश्वरम् याच्यापासून हे आपली उत्पत्ति सांगतात. हे कपडे धुतात व देवस्थानाच्या उत्सवप्रसंगीं किंवा वरिष्ठ जातींच्या मिरवणुकांत मशाली धरण्याचें काम करतात. ग्रामदेवतांना बळि देण्यासाठी आणलेल्या पशूचें डोकें उडविण्याचा हक्क यांचा असतो. हे

आपल्याहून श्रेष्ठ जातींचेच कपडे धुतात व लग्न मंडपासाठी तसेंच प्रेतासाठीहि कापड पुरवितात. अगस हा शब्द अगसि = पागोटें यापासून बनला आहे. यांच्यांत अनेक पोटजाती आहेत.

यांच्यापैकी कांही शैव तर कांही वैष्णव आहेत. हे लक्ष्मी, भूमिदेवरु, शिव, केदारलिंग, यल्लम्म, भवानी, मारुति, या देवांस भजतात. श्रावणांत भूमिदेवरूचा उत्सव करतात. भूमिदेवरूचे पुजारीहि हेच असतात. भट्टींत कपडे जळूं नयेत म्हणून भट्टीच्या भांड्याची पूजा करून त्याला बळि देतात. यांचें पौरोहित्य बहुधा जंगम लोक करतात. यांचा गुरु लिंगायत असतो.

यांच्यांत बालविवाहाप्रमाणेच प्रौढविवाहहि रूढ आहेत. आते-मामे बहिणीशीं लग्न होतें. एखादी स्त्री जन्मभर अविवाहितहि राहूं शकते. विधवाविवाह रूढ आहेत; पण वरहि विधुर असावा लागतो. गुरीकर नांवाचा यांचा एक नायक असतो, तो लग्नांत वधूवरांच्या हातावर पाण्याची धार ओततो. यांच्यांत काडीमोड करायलाहि मोकळीक आहे.

मृताचे संस्कार लिंगायतांप्रमाणेंच करतात. पितरांसाठी हे महालय करतात.

जातीची पंचायत असते. मुख्य पंचाची निवडणूक करतात. पंचायतीला गुन्ह्याबद्दल शिक्षा किंवा दंड करायचा अधिकार असतो. हे लोक, वक्कलिग व कुरुब अशा वरिष्ठ जातींतील लोकांना आपल्या जातींत घेतात. यांचा दर्जा शूद्राहून खालचा आणि अस्पृश्यांहून वरचा समजला जातो. [मुं. इ. जा; म. ज्ञा. को.]

अगस्त्य (१) वैदिक ऋषि. व्याख्या– ' अगं (विन्ध्यं) स्त्यायति इति ' = विंध्यपर्वताच्या वृद्धीस प्रतिबंध करणारा (विग्रहकोश). अर्थात् हें याचें मूळ नांव नसून भावी आयुष्यांत केलेल्या एका महत्कार्यामुळे त्याला मिळालेली ही गौरवपूर्ण उपाधि आहे. याच नांवाने पुढे तो प्रसिद्ध झाला. याचीं पैतृक नांवें मान्य व मांदार्य अशीं दोन आहेत (ऋ. ७.३३.१३). हा मित्रावरुणांचा पुत्र असून वसिष्ठाचा सख्खा भाऊ आहे. एका सत्रांत मित्रावरुण गेले असतां तिथे आलेल्या उर्वशीवर त्यांची नजर पडली, आणि तिच्याविषयीं उत्पन्न झालेल्या अभिलाषेने त्यांचे वीर्य स्खलन पावलें व तें वसतीवरी नांवाच्या कुंभांत पडलें. त्यांतून अगस्त्य व वसिष्ठ जन्म पावले. अगस्त्य कुंभाच्या मध्यांतून जन्मला (बृ. देवता ५. १३४). अगस्त्य हा कुंभांतून म्हणजे आदिवासींच्या मातृरूप दैवतापासून जन्मला, अशी उपपत्ति डॉ. कोसंबी यांनी लावली आहे. अगस्त्य ऋग्वेदांतल्या २६ सूक्तांचा द्रष्टा आहे.

पुढे हा खेलराजाचा पुरोहित बनला. खेलाची पत्नी विश्पला पतीसमवेत शत्रूशीं लढत असतां दुर्दैवाने शत्रूच्या हातीं सांपडली व त्यांनी तिचा पाय तोडला. अगस्त्याला त्याबद्दल दुःख झालें. त्याने तिच्यासाठी अश्विनौ देवांचें स्तवन केलें. त्या स्तोत्राने ते प्रसन्न झाले व त्यांनी विश्पलेला लोखंडाचा पाय जोडून दिला (ऋ. १. ११८. ८).

एकदा मरुतांसाठी आणलेला पशु इंद्राने पळविला; त्यामुळे मरुत् हे वज्र घेऊन इंद्राला मारायला धावले. त्यावेळीं अगस्त्याने मध्ये पडून तो संघर्ष टाळला व त्यांचें सख्य घडवून आणलें (ऋ. १. १६५,१७०; ऐ. ब्रा. ५. १६). वैदिक आर्यांचा पुढारी इंद्र आणि त्याचे अनुयायी मरुत् यांच्यामधला हा संघर्ष असावा. तो दूर करून अगस्त्याने आर्यांचें ऐक्य अबाधित राखण्याचें कार्य केलें असावें.

विदर्भदेशाची राजकन्या लोपामुद्रा ही याची भार्या. ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळांतलें १७९ वें सूक्त हें अगस्त्य-लोपामुद्रा यांच्या संवादाचें आहे. तिथे लोपामुद्रा वृद्ध अगस्त्याला संभोगाविषयीं प्रवृत्त करीत असतांना दिसते. अगस्त्याने शेवटीं तिच्या इच्छेला मान दिला आहे. याच्यापासून लोपामुद्रेला दृढास्यु नांवाचा पुत्र झाला व तोच पुढे इध्मवाह या नांवाने प्रसिद्ध झाला. अगस्त्य हा सर्व ऋषींत वृद्ध असल्यामुळे इंद्राने यालाच गायत्र्युपनिषद् उपदेशिलें व याने तें इषाला शिकवून त्याची परंपरा सुरू केली (जै. उ. ब्रा. ४. १५. १, १६. १).

पुराणवाङ्मयांत याला अग्नीचा अवतार मानलें आहे (मत्स्य पु ६१. २०१). अगस्त्य विरक्त होता; पण लोपामुद्रेची ऐश्वर्य भोगण्याची आसक्ति प्रबळ होती. तिची इच्छा पूर्ण करावी, म्हणून हा द्रव्य मागण्यासाठी अनेक राजांकडे गेला. पण त्याला अपेक्षित धन कुठेंच मिळालें नाही. शेवटीं इल्वल दैत्याला शरण आणून याने त्याची अपार संपदा हस्तगत केली. अगस्त्याचे मुख्य पराक्रम तीन—विंध्यविजय, समुद्रविजय व इंद्रविजय. हा प्रथम काशींत राहत असे. आर्यावर्तांत दाटीवाटी करून राहिलेल्या आर्यजनांना वसाहतीसाठी विंध्याच्या खालचा दक्षिणप्रदेश उपलब्ध करून द्यावा, म्हणून हा त्या मोहिमेवर निघाला. त्या वेळीं विंध्यपर्वत मेरुपर्वताशीं स्पर्धा करण्यासाठी उंच वाढू लागला होता. अगस्त्यानें त्याला नमविलें व ' आपण दक्षिणेहून



अगस्त्य–चिदंबरम्

परत येईपर्यंत असाच नमून राहा ' म्हणून सांगितलें. कालकेय नांवाचे दैत्य समुद्रांत वास्तव्य करून जगाला पीडा देत होते. त्यांचा नाश करण्यासाठी याने एकाच आचमनांत समुद्र आटवून टाकला (म. भा. वन. १०४, १०५). याने द्वादशवार्षिक सत्र करून पशुहिंसा न करतांहि इंद्राला पर्जन्यवृष्टि करायाला भाग पाडलें (म. भा. आश्व. ९२). प्रजांच्या हितासाठी याने सर्व मृगांचें देवतोद्देशाने प्रोक्षण केलें. त्यामुळे देव-पितृकार्यांत मृगमांस अर्पण करण्यास प्रत्यवाय उरला नाही (म. भा. अनु. ११५). नहुष हा इंद्रपदावर बसला असतां त्याने इंद्राणीच्या महालांत जाण्यासाठी अगस्त्यादि ऋषींना आपली पालखी वाहायला लाविलें. नहुष लवकर चल या अर्थी त्याला ' सर्प सर्प ' म्हणाला. तेव्हा अगस्त्याला क्रोध येऊन त्याने नहुषाला, ' तूं सर्प होऊन धरणीवर पडशील ' असा शाप दिला. महाभारताच्या अनु. पर्वांत हा शाप अगस्त्याच्या जटेंत बसलेल्या भृगूने दिला असें म्हटलें आहे (१. ५७).

तमिळ प्रदेशांत अगस्त्याचें नांव आदराने घेतलें जातें. ते लोक त्याला शिवाचा शिष्य, पारंगत विद्वान्, वेदशास्त्रांचा प्रणेता, त्याचप्रमाणे अलौकिक शक्तीचा महर्षि मानतात. याने दक्षिणेंत येऊन आर्य-द्रविड संस्कृतींचा समन्वय साधण्याचें महत्कार्य केलें आणि उत्तर-दक्षिण हा भेद मिटवून सारा भारत एकसंध करण्याचा प्रयत्न केला. पांड्य राजांचा कुलगुरु या नात्याने तो तिकडे प्रसिद्ध आहे. याने तमिळ भाषेचें अध्ययन केलें व तिचें एक बृहत् व्याकरणहि रचलें अशी कथा सांगतात. याने आर्यभाषा आणि आर्यकथा यांचा तिकडे प्रचार केला आणि तमिळ साहित्याच्या अभिवृद्धीसाठीं संघम्‌ची स्थापना केली. तमिळनाडचा प्राचीन इतिहास अगस्त्याच्या कथांनी ओत-प्रोत भरलेला आहे. दक्षिणापथाच्या प्रवासांत त्याने अनेक जंगलें तोडून वसाहती उभारल्या. त्याला या कामीं मदत कर-णाऱ्या दक्षिणेंतील जमातींत वेळीर व अरुवालर या दोन जमाती मुख्य होत्या. तमिळ साहित्याचा पिता या नात्याने तिकडचे लोक याला भजतात. दक्षिणेंत अगस्त्याच्या नांवाशीं संबद्ध अशीं अनेक क्षेत्रें आहेत. त्यांत कर्नाटकांतलें वातापी (बदामी), कूर्गमधलें ब्रह्मगिरि, आंध्रमधलें द्राक्षारामम्, तंजौर जिल्ह्यांतलें अगस्त्यम्पल्ली, तिरुनेलवेल्ली जिल्ह्यांतलें पोदियमलै व अगस्त्यवरम् हीं क्षेत्रें सर्वांत प्रसिद्ध आहेत. प्रायः या सर्व प्रदेशांत अगस्त्याचीं मंदिरें आहेत. या सर्वांत पोदियमलैला विशेष महत्त्व आहे. पंचवटींतून निघाल्यावर या ठिकाणींच त्याने आपला मुख्य आश्रम स्थापित केला आणि इथूनच साऱ्या तमिळ देशांत आर्यसंस्कृतीचा प्रचार केला. पण अगस्त्याचें पर्यटन इथेच समाप्त होत नाही. तिकडील लोकांचा असा विश्वास आहे, की त्याने समुद्र पार करून यवद्वीप (जावा), बरहनद्वीप (बोर्निओ), सुमात्रा, सयाम, इ. देशांतहि संचार करून तिथेहि आर्यसंस्कृतीचा पाया घातला.

दक्षिणाकाशांत नौकापुंजांत असलेल्या एका ठळक ताऱ्याला अगस्त्याचेंच नांव दिलें आहे. तो भाद्रपदांत उगवतो व त्याच्या उदयानंतर पावसाळ्यांत गढूळ झालेलें नद्यांचें पाणी निवळतें, असा साक्षात्कार आहे (रघु. ४. २१).

अगस्त्याविषयीं महाभारत आणि पुराणें यांत ज्या कथा आढळतात, त्यांचा त्याच्या ऋग्वेदांतील सूक्तांत आभासहि मिळत नाही. तो उत्तरेहून दक्षिणेस गेला आणि विंध्याचा गुरु झाला, याचाहि सुगावा ऋग्वेदांत लागत नाही. त्यामुळे दक्षिणेंत आर्यसंस्कृतीची पताका फडकविणारा अगस्त्य हा अगस्त्याच्या वंशांतला दुसराच कोणीतरी पुरुष असावा, असें श्री. राहुल सांकृत्यायन म्हणतात. मात्र हा जो कोणी अगस्त्य असेल तो साहसी, दूरदर्शी आणि सेवावृत्तीचा असला पाहिजे, यांत शंका नाही. संस्कृतिप्रचारासाठी जिवाची तमा न बाळगतां शेकडो कोसांच्या दुर्गम प्रवासाला निघालेला हा पहिला प्रवासी आहे, असें निस्संशय म्हणतां येतें. शकपूर्व ८०० वर्षें हा या पुरुषाचा काल असावा, असें डॉ. भांडारकर इ. पंडितांनी मानलेलें आहे. हा आर्यसंस्कृतीचा अग्रदूत आहे. दक्षिणेंत यज्ञसंस्थेचें बीजा-रोपणहि यानेच केलें आणि त्याच्याच आदेशानुसार दक्षिणेचे अनेक राजे आणि सामंत यज्ञ करूं लागले. कावेरी पूं पट्टिण-म्‌च्या चोल राजाला त्यानेच इंद्राप्रीत्यर्थ प्रतिवार्षिक २८ दिवसांचा उत्सव करायला सांगितलें.

अगस्त्यगीता, अगस्त्यसंहिता, शिवसंहिता, द्वैधनिर्णयतंत्र, इ. ग्रंथ याच्या नांवावर आहेत. अगस्त्याला ऋग्वेद्यांच्या ऋषि-तर्पणांत स्थान नाही; पण हिरण्यकेशी शाखेच्या तर्पणांत आहे. यावरून सदर शाखा दक्षिणेकडची असावी व दक्षिणेंत प्रमुख स्थान मिळविलेल्या अगस्त्याचा, त्या शाखेच्या तर्पणांत अंतर्भाव झाला असावा. सूक्तकार अगस्त्य आणि आश्रमऋषि अगस्त्य हे दोघे भिन्न असावे, असें श्री. चापेकर म्हणतात (तर्पण), तें वरील राहुल सांकृत्यायनांच्या मताशीं जुळणारें आहे. अगस्ति-अगस्त्य हें गोत्र आपस्तंब, माध्यंदिन व देशस्थ ऋग्वेदी या ब्राह्मणांत आढळतें. पुराणांतील माहितीवरून अगस्त्यवंशाच्या पौलस्त्य, पौलह आणि क्रतु अशा तीन शाखा असल्याचें दिसतें. या वंशांतील राजांनी अगस्त्याचीं मुलें दत्तक घेतलीं असे उल्लेख आढळतात.

(२) शूद्र वैयाकरण. काल सुमारें एक हजार वर्षांमागचा. हा शूद्र जातींत जन्मला होता. हा कवि असून याला प्राचीन अगस्त्याचा अवतार मानतात. याचें अगस्त्यव्याकरण हें

तमिळभाषेचें पहिलें व्याकरण मानतात. याशिवायहि याचे बरेच ग्रंथ तमिळभाषेंत आहेत.

(३) दक्षिणेंतला एक शिल्पशास्त्रज्ञ. आगस्तीय सकलाधिकार या ग्रंथाचा कर्ता. द. भारतांतील मूर्तिकलेला याने वळण लावलें. मूर्तींच्या प्रमाणांविषयीं याने घालून दिलेले नियम आजमितीसहि तिकडील कलाकार पाळतात. त्याच्या सकलाधिकार ग्रंथाचीं ११ प्रकरणें आहेत. त्यांवरून याच्या वेळीं दक्षिणेस उदयाला आलेली मूर्तिकला कशा प्रकारची होती, तें कळून येतें. शिवाच्या १६ प्रतिमांची माहिती त्याने दिली आहे. हा पहिल्या पांड्यराजाचा मंत्री व पुरोहित होता असें सांगतात. पाहा- लोपामुद्रा, दक्षिण भारत, तमिळ साहित्य. [प्रा. च. को.; म. ज्ञा. को.; ऋ. आ.; ऋ. द.; तर्पण; वे. इं; त. सा. सं.; Some contributions of South India to Indian culture.]

अगस्त्यकुंड हें उदयंतक पर्वतावर आहे. इथे आठ ऋषींनी तप करून मोक्ष मिळविला.[वायु पु.१०८.४५]

अगस्त्यदर्शन-पूजन सूर्य कन्याराशीच्या मध्यावर असतां अगस्त्याचें दर्शन व पूजन करावें, असें सांगितलें आहे. [नीलमत पु.]

अगस्त्यपूजा पंचांगांत ज्या स्थितीस अगस्त्योदय लिहिला असेल, त्या दिवशीं ही पूजा सांगितली आहे. एका कलशावर घृतपात्र ठेवून त्यांत अगस्त्याची सुवर्णमूर्ति ठेवून सात दिवस तिची पूजा करतात. मग त्या प्रतिमेचें दान करून कोणतें तरी फळ सोडतात. ब्रह्मप्राप्ति हें याचें फल आहे.

या व्रताची कथा – प्राचीन काळीं देवासुरसंग्राम झाला व त्यांत असुरांनी जीवरक्षणार्थ समुद्राचा आश्रय केला. इंद्राने अग्नि व वायु यांस समुद्र आटविण्याची आज्ञा दिली. पण तसें केल्याने प्राणिसंहार होईल म्हणून अग्नि-वायूंनी त्या गोष्टीस नकार दिला. त्यावर इंद्राने त्यांना शापिलें, की ‘ तुम्ही मानवयोनींत जन्म घ्याल.’ तेव्हा ते मित्रावरुणांच्या रेतापासून कुंभांत निर्माण झाले. वसिष्ठ व अगस्त्य हीं त्या दोघांचीं नांवें होत. अगस्त्याने मलयाचलावर तप करून दक्षिणेच्या पर्वतराजींत विमानाने संचार करण्याचा वर देवांकडून मिळविला. तेव्हापासून लोक त्याला पुजूं लागले. [मत्स्य पु. ६१]

अगस्त्यमलै मद्रास राज्यांतल्या त्रिवांकुर (त्रावणकोर) जिल्ह्यांतल्या पश्चिम घाटांतलें एक कोणाकृति पर्वतशिखर. उंची ६२०० फूट. त्रिवांकुर आणि तिनेवेल्ली या जिल्ह्यांच्या सीमेवर हा पर्वत असून ताम्रपर्णी व नेयार या नद्या याच्यावरून उगम पावतात. अगस्त्य या पर्वतावर अजून राहिलेला असून तो योगनिद्रेंत आहे, असा तिकडील लोकांचा समज आहे. याला अगस्त्यकूटम् असेंहि नांव आहे.

अगस्त्यरामायण यांत सोळा हजार श्लोक असून अगस्त्याने स्वारोचिष मन्वन्तरांतल्या दुसऱ्या कृतयुगांत याची रचना केली, अशी कथा आहे. याची छाया रामचरितमानसांत दिसते. राजा कुंतल व भानुमती हीं पुढील जन्मीं दशरथ-कौसल्या झालीं, सीतेचा जन्म वार्ष्णेयाच्या भूमिशोधनांत झाला, अशा वेगळ्या कथा यांत असून, याशिवाय समुद्राची उत्पत्ति, मुद्रिकादानाचें कारण, ऋष्यमूक पर्वताची स्थिति, इ. कथाहि वेगळ्या रूपाने सांगितल्या आहेत. [हिंदुत्व]

अगस्त्यसंहिता अगस्त्याच्या नांवावर असलेला ३३ अध्यायांचा एक ग्रंथ. अगस्त्य-सुतीक्ष्ण यांच्या संवादांतून हा ग्रंथ विस्तारला आहे. यांत राममंत्राच्या उपासनेचें रहस्य, त्याचे विधी व ब्रह्मविद्या यांचें निरूपण आहे. या ग्रंथांत सर्वत्र सीता-राम यांच्या आलिंगित युगलमूर्तीचें ध्यान व वर्णन आहे. रामभक्तिशाखेच्या वैष्णवांना हा ग्रंथ परम आदरणीय वाटतो. [रा. भ. शा.]

अगस्त्यार्घ्यदान सूर्य सिंहराशींत गेल्यावर २१ दिवसांनी अगस्त्य (तारा) उदय पावतो व सूर्य वृषभ राशींत गेल्यावर ७ व्या दिवशीं त्याचा अस्त होतो, असें गर्गादि मुनींचें वचन आहे. अगस्त्याच्या उदयापासून पुढे सात दिवस त्याला सर्वांनी अर्घ्य द्यायचें असतें. हें व्रत १७ वर्षें करतात. याचा विधि पुढीलप्रमाणे ––

काशतृण व पुष्पें यांनी अगस्त्याची मूर्ति करावी. अलंकार घालून ती पूर्ण कुंभावर ठेवावी. तिची पूजा करून दधियुक्त अक्षतांचा बलि द्यावा. रात्रौ जागरण करावें. मग प्रातःकालीं ती मूर्ति घेऊन जलाशयावर जावें. मग ‘ अगस्त्यः खनमानः खनित्रैः ’ या वेदमंत्राने अगस्त्याची प्रार्थना करावी. लोपामुद्रेचा मंत्र पुढीलप्रमाणे —

राजपुत्रि महाभागे ऋषिपत्नि वरानने ।
लोपामुद्रे नमस्तुभ्यमर्घ्यं मे प्रतिगृह्यताम् ।।

अर्थ – हे राजकन्ये, महाभाग्यवती, ऋषिपत्नी, सुमुखी, लोपामुद्रे, तुला नमस्कार असो. (तूं) माझें अर्घ्य ग्रहण कर.

मग अगस्त्याच्या प्रतिमेचें विसर्जन करून ती ब्राह्मणाला दान द्यावी. नंतर होम करून अगस्त्याच्या उद्देशानें एक फळ सोडावें. फल— ब्रह्मपदाची प्राप्ति. [नि. सिं.]

अगस्त्याश्रम पुढील आठ ठिकाणीं अगस्त्याचे आश्रम असल्याचें रामायण-महाभारतावरून कळतें— (१) दुर्जया नदीच्या कांठीं (बदामी) (२) पुष्करनजीक (३) प्रयागक्षेत्राजवळ (४) गोकर्णानजीक (५) पंचवटी-नजीक (६) प्रवरानदीच्या कांठीं (७) पांड्य देशांत समुद्र-किनारीं व (८) मलयपर्वतावर. याशिवाय अगस्त्याच्या नांवावर भारतांत अनेक तीर्थ-क्षेत्रें आहेत. दक्षिणसमुद्राजवळ अगस्त्यतीर्थ आहे (म. भा. आदि. २३६). हिमाचलाच्या पाय-थ्याला अगस्त्यवट नामक स्थान आहे. कालिंजर पर्वताचा एक भागहि अगस्त्यपर्वत या नांवाने ओळखला जातो.

अगारिया गोंडांची पोटजात. यांची वस्ती रायपूर व बिलासपूर या जिल्ह्यांत आढळते. उडिसा व आसाम प्रदेशांतहि हे आहेत. लोखंडी काम हा यांचा धंदा आहे. आपली जात जगाच्या उत्पत्तीपासून आहे व जगांतला पहिला नांगर आपल्या पूर्वजांनी बनविला, असें हे सांगतात. पथारिया व खूंटिया अशा यांच्या दोन पोटजाती आहेत. लोखंडाची भट्टी पेटवितांना जे लोक भात्याच्या तोंडावर दगड ठेवतात ते पथारिया व जे भात्याची खुंटी ठोकतात ते खूंटिया होत. हे लोक गोंड, कवार व अहीर या तीन जातींतल्या लोकांना आपल्या जातींत घेतात. यांच्या अंगावर कपडे फार कमी असतात. बायका गोंडीपद्धतीचा पोषाख करतात व अंगावर खूप गोंदून घेतात. गोंडांप्रमाणेच यांच्यांतहि गोत्रें आहेत.

सगोत्रविवाह निषिद्ध मानतात. आते-मामे बहिणीशीं लग्न होतें. प्रथम मुलाचा बाप मुलीच्या बापाकडे मागणीविषयी निरोप धाडतो. मुलीच्या बापाला तो संबंध मान्य असला, तर तो 'मागणी घालण्यास या' असा त्याला प्रतिनिरोप धाडतो. मग उभयतांच्या भेटींत लग्न ठरतें. लग्नाचा मुहूर्त पावसाळ्यांत धरतात. कारण त्या दिवसांत त्यांच्या लोखंडाच्या भट्ट्या बंद असतात. बैगा जातीचा माणूस लग्नाचें पौरोहित्य करतो. तो जमिनींतून एक ढेकूळ खोदून काढतो व मुलीची आई तें वधूच्या ओटींत घालते. वर वधूगृहीं आल्यावर काडीने त्याचे दात घासतात. लग्नांत उडीद हें धान्य मंगल समजलें जातें. विवाहविधि अर्धा वधूगृहीं व अर्धा वरगृहीं होतो. ताडाच्या पानांचे मुकुट बनवून वधू-वर ते तळ्यांत सोडतात व आळी-पाळीने एक गडवा पाण्यांत लपवितात व शोधतात. वधू भरली घागर डोक्यावर घेऊन घरीं येते. वधूच्या खांद्यावरून वर पेंढा भरलेल्या हरिणावर तीन तीर मारतो. प्रत्येक बाणाच्या फेकीनंतर वधू त्याला साखर खायला देते. एकहि तीर हरणाला न लागल्यास वराला चार आणे दंड भरावा लागतो. लग्ना-नंतर एक महिना नवरा-बायकोचा एकांत होऊं देत नाहीत.

कित्येकदा नवरा मुलगा वधूसाठी आपल्या भावी सासऱ्याच्या घरीं नोकरी करतो. लग्नाचा विचार ठरतांच वधू-वर मिळून घरांतून निघून जातात. मग वधूपिता त्यांना बोलावून आणून घडल्या प्रकाराचें प्रायश्चित म्हणून ज्ञातिभोजन देतो.

विधवाविवाह मान्य आहे. व्यभिचाराबद्दल स्त्रीला घटस्फोट देतां येतो. मग तिने लग्न करायचें तर तें तशाच म्हणजे लग्न-विच्छेद झालेल्या पुरुषाशीं करावें लागतें.

जननाशौच पांच दिवस पाळतात. मृताचें सामान्यतः दहन करतात. मृताचा वारस असेल त्याने डोक्याला काळें फडकें गुंडाळायचें असतें. सर्वपित्री अमावास्येस पितरांचा महालय करतात.

दुल्हा देव हें यांचें उपास्य दैवत आहे. त्याला कोंबडीं-बकरीं देतात. लोहासुर हा त्यांच्या व्यवसायाचा देव आहे. औषधा-पेक्षा मंत्रतंत्रांवर श्रद्धा ठेवतात. माणूस आजारी पडला, की देव अंगांत आणवून त्याने काय पाप केलें, तें वदवितात व त्या पापाचें प्रायश्चित्त केल्याने रोग दूर होतो, असें मानतात. गोमांस व उष्टें खात नाहीत. गोंड व बैगा यांच्याच हातचें जेवतात. इतर जातीजमातींना स्वतःपेक्षां हीन समजतात. [म. ज्ञा. को.]

अगाशिव लेणीं महाराष्ट्रांत कऱ्हाडपासून दोन कोसांवर हीं बौद्ध लेणीं आहेत. यांच्या तीन रांगा आहेत. एकूण मोठीं लेणीं ६४ असून आणखी लहान कितीतरी आहेत. येथील एका लेखावरून तीं सनपूर्व दुसऱ्या शतकांतलीं असावीं, असें वाटतें.

अगियत्थ ज्याला अजून जैनांचे दैनंदिन आचार आणि धर्मग्रंथ अवगत झाले नाहीत, अशा नवीन दीक्षा दिलेल्या श्रमणकाला अगियत्थ म्हणतात. [हि. जै. मो.]

अगिया ओम् मुंडा आदिवासींच्या विवाहसमारंभांतला एक प्रकार. वधूकडची मंडळी वराकडे देज घेण्यासाठी जाते, तेव्हा त्यांतला एखादा माणूस एका पानावर एक पाण्याने भरलेला लोटा ठेवून तो वराकडील लोकांपुढे ठेवतो. त्याचा अर्थ आम्हांला बोकडाची मेजवानी हवी असा होतो. [एन्सा. मुं.]

अगार पंजाबांतील एक जात. हे सर्व हिंदु असून मीठ तयार करण्याचा धंदा करतात. हे आपणास राजपुतांचे वंशज म्हणवितात. यांचा सामाजिक दर्जा लोहाराहून उच्च आणि जाटांच्या खालचा मानतात. [म. ज्ञा. को.]

अगुरु हें एक सुगंधी द्रव्य आहे. अगुरूचीं झाडें हिमालय, आसाम, भूतान, पूर्व बंगाल या भागांत होतात. अगुरूचा उपयोग धूपासारखा करतात. न्हाल्यानंतर केसांना धूर देणें ही प्रथा प्राचीन कालापासून चालू आहे. हा धूर केसांतला दुर्गंध, उवा व लिका नष्ट करतो आणि केस निरोगी व सुंदर बनवितो, असें चरकानेहि सांगितलें आहे (चि. ७. ७७). अगुरूंत कालागुरु श्रेष्ठ मानला जातो.

शिरांसि कालागुरुधूपितानि ।
कुर्वन्ति नार्यः सुरतोत्सवाय ।।

(ऋतु सं. ४. ५)

अर्थ – पुष्पोत्सवासाठी स्त्रिया आपलीं मस्तकें कालागुरूने धूपवितात.

उत्तम अगुरु पाण्यांत टाकला तर बुडतो. तो केशदोष दूर करून त्यांना सुगंधी बनवितो. अगुरुकाष्ठाचें तेल तिक्त, कटु, व्रणशोधक व कृमिकुष्टहारक आहे (सुश्रुत ४५). याच्या सालीचा उपयोग लेखनासाठीहि करीत.

अगोचरी हठयोगांतली एक मुद्रा. हिचें स्थान कानांत आहे. मनाचा संयम करून त्याला नासाग्रीं स्थिर केल्याने ही मुद्रा सिद्ध होते. ही सिद्ध झाल्याने बाह्य श्रवणाचा प्रतिरोध होऊन अंतस्थ शब्दांचें श्रवण होऊं लागतें.

करणमध्ये अगोचरी मुद्रा
सबद कुसबद ले उतपनी
सबद कुसबद समो कृतवा
मुद्रा तौ भई अगोचरी

(अष्टमुद्रा-गोरखबानी)

अर्थ– कर्णमध्यांत अगोचरी मुद्रा आहे. ती जे शब्द आणि कुशब्द उत्पन्न होतात, त्यांचें ग्रहण करते. शब्द आणि कुशब्द सम केल्याने अगोचरी मुद्रा सिद्ध होते. [गा. म. वि.]

अग्नायी अग्नीची पत्नी. ऋग्वेदांत हिचा उल्लेख येतो; पण ही गौण देवता आहे. **पाहा**–अग्नि.

अग्नि ' अङ्गति ऊर्ध्वं गच्छति इति ' (=वर जातो तो अग्नि होय) दुसरी व्याख्या पुढीलप्रमाणे ––

जातो यदग्रे भूतानामग्रणीरध्वरे च यत् ।
नाम्ना संनयते वाङ्गं स्तुतोऽग्निरिति सूरिभिः ॥

(बृहद्देवता २. २४)

अर्थ– सर्व भूतांच्या आधी जन्मलेला, यज्ञामध्ये अग्रणी आणि नांवाने अंगाचें संनयन करणारा, म्हणून अग्नि अशी त्याची विद्वानांनी स्तुति केली आहे.

एक वैदिक देवता. ही भूमिस्थ देवतांतली प्रमुख आहे. ही देवता मूळ भौतिक स्वरूपांतच ओळखली जात असल्यामुळे अग्नीच्या स्वरूपांत मनुष्यत्वाचे अंश अगदी थोडे दिसतात. वेदांतलें त्याच्या अवयवांचें वर्णन रूपकात्मकच समजायला हवें. अग्नीला अनेक ठिकाणी द्यावा–पृथिवींचा पुत्र म्हटलें आहे (ऋ. १०.४५.८), तर दुसऱ्या एका ठिकाणीं सहसः सूनुः म्हणजे बलाचा पुत्र म्हटलें आहे (ऋ. ६.४८.५). घर्षणाच्या योगाने अग्नि उत्पन्न करण्यास बरेंच बळ लागतें, त्यावरून हें नांव पडलें असावें. याशिवाय त्याला वनस्पतींचा किंवा वृक्षांचा गर्भ (ऋ. २.१.१४; १.७०.४) असें जें म्हटलें आहे, त्याचा संबंध अरण्यांत दोन फांद्यांच्या घर्षणाने अग्नि उत्पन्न होतो, या गोष्टीशीं असावा.

घृतपृष्ठ, घृतमुख, घृतकेश, या विशेषणांत त्याचा आज्याहुतीशीं संबंध दिसतो. त्याच्या दाढा तीक्ष्ण व दांत सोनेरी आहेत (ऋ. ५. २. ३). वेदांतलें त्याचें स्वरूपवर्णन पुढील ऋचेंत आलें आहे–

चत्वारि शृङ्गा त्रयो अस्य पादा
द्वे शीर्षे सप्तहस्ता सो अस्य ।
त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति
महो देवो मर्त्यॉं आविवेश ।।

(ऋ. ४. ५८. ३)

अर्थ – याला चार शिंगें, तीन पाय, दोन मस्तकें, (आणि) सात हात आहेत. ज्या वृषभाला तीन प्रकारांनी बांधून टाकिलें असून जो मोठ्याने डरकाळ्या फोडतो, त्याच महान् ईश्वराने (वृषभाने) मानवांच्या अंतःकरणांत वास केला आहे.

अग्नीचें गरुड, हंस, सर्प, खिंकाळणारा घोडा, इ. प्राण्यांशीं साम्य दाखविलें आहे. पण तें दाखवितांना त्याचें स्वरूप कथन करण्याचा उद्देश नसून अग्नीच्या क्रिया व धर्म प्रकट करण्याचा आहे. सर्व प्राण्यांत वृषभ ही संज्ञा त्याला वारंवार लावलेली आहे. अग्नि हा ताकदवान् वृषभ असून त्याच्या ठिकाणीं पुरुषत्वाची विपुलता आहे, असें वामदेव सांगतो (ऋ. ४.५.३). अग्नीच्या तेजस्वितेविषयीं तर वेदांत पुष्कळच उल्लेख आहेत. तो तेजस्वी रथांतून जातो. गगनाला स्पर्श करतो. त्याचा मार्ग व रथचक्रें काळीं आहेत.

त्याचीं तीन रूपें आणि तीन स्थानें आहेत. द्युलोक, पृथ्वी व जल असा त्याचा स्थानांचा क्रम आहे. अग्नीचें तिसरें म्हणजे द्युलोकांतलें रूप श्रेष्ठ होय, असेंहि म्हटलें आहे (ऋ. १०.१.३; ५.३.३). उत्तरकालीन वैदिक वाङ्मयांत कल्पिलेले दक्षिणाग्नि, गार्हपत्य व आहवनीय हे तीन श्रौताग्नी ऋग्वेदांतल्या तीन रूपांचे प्रतिनिधि असावे. हे तीन श्रौताग्नी ऋग्वेदकालींहि असणें शक्य आहे.

दुसऱ्या कोणत्याहि देवतेपेक्षां अग्नीचा मानवी जीविताशीं आणि त्याच्या गृहसंस्थेशीं निकट संबंध आहे. गृहपति ही संज्ञा फक्त अग्नीलाच दिलेली आहे. ही कल्पना पुरातन कालापासून चालत आलेली असावी.


यः पञ्च चर्षणीरभि निषसाद दमे दमे ।
कविर्गृहपतिर्युवा ।।

(ऋ. ७.१५.२)

अर्थ— पंचजनांसन्मुख प्रत्येक घरांत अधिष्ठित झालेला हा प्रतिभावन् अग्नि गृहपति व तारुण्याची मूर्तीच आहे.

तशीच त्याची दुसरी संज्ञा म्हणजे अतिथि. प्रत्येक गृहांत अग्नि हा पहिला अतिथि असतो (ऋ. ५. ८. २).

पुष्कळ ठिकाणीं अग्नीला पिता, मित्र, बंधु, इ. नात्यांनी उल्लेखिलें आहे. अग्नि हा होमाग्नि म्हणून प्रतिष्ठित होण्यापूर्वी गृहांतल्या सामान्य जीवनाचें केंद्र होता, त्या वेळचीं हीं विशेषणें असावीं. अग्नि हा कौटुंबिक जीवनाचा आधार झाल्यामुळे इतर देवतांच्यापेक्षां त्याच्याशीं वैदिकांचे जिव्हाळ्याचे संबंध दिसतात. तो देवा-मानवांत मध्यस्थाचें काम करतो. मानवांनी अर्पिलेलें हविर्द्रव्य देवां-कडे पोचतें करतो. तो देवांना यज्ञाकडे घेऊन येतो (ऋ. ३.१४.२), म्हणून त्याला दूत हें विशेषण वारंवार लावलेलें आहे.



मेषारूढ अग्निमूर्ति

तो यज्ञकर्मांतला ऋत्विज् आणि पुरोहित आहे (ऋ. १.१.१). तो सर्वभक्षक तसाच विश्वविद् आहे (ऋ. ६. १५. १३). विश्वांतली सर्व संपत्ति त्याच्या ताब्यांत आहे. म्हणूनच त्याची प्रार्थना केलेली आहे—

शिवा नः सख्या सन्तु भ्रात्राऽग्ने देवेषु युष्मे ।
सा नो नाभिः सदने सस्मिन्नूधन् ।।

(ऋ. ४, १०. ८)

अर्थ— हे अग्ने, तुझ्या दिव्य विभूतीशी जडलेलें आमचें मित्रत्व आणि बंधुत्व आम्हांस मंगलप्रद होवो. कारण या धरित्रीच्या वक्षःस्थलावर या यज्ञगृहीं आता आम्हांला मुख्य आधार तेवढाच आहे.

अग्नि हा इंडो—युरोपीय शब्द आहे. पुष्कळ देशांतले अग्नि-वाचक शब्द प्रायः सदृशच आहेत. (१) अग्नि— संस्कृत (२) इग्निस् – लॅटिन (३) उग्निस् – लिथुआनिया (४) इंगले-स्कॉटिश. पुष्कळ देशांत अग्नीला देवता मानून त्याची पूजा केली जाते. इंडो-इराणी काळांतच तो देव बनला आणि त्याच्याभोवती अनेक विधींचें जाळें पसरलें. होमाचा अग्नि हा इंडो-युरोपीय काळांतहि असावा, असें वाटतें. कारण भारतीय लोकांप्रमाणेच ग्रीक व इटालियन लोकहि देवांना द्यायचें हविर्द्रव्य अग्नींत समर्पीत.

पौराणिक कल्पनेप्रमाणे अग्नि हा ब्रह्मदेवाच्या क्रोधापासून उत्पन्न झालेला त्याचा पुत्र आहे. स्वाहा आणि स्वधा अशा याच्या दोन भार्या आहेत. तो आग्नेयी दिशेचा लोकपाल आहे. एकदा सप्तर्षींचें हविर्द्रव्य त्यांना पोचतें करून परत जात असतां त्यांच्या भार्या त्याच्या दृष्टीस पडल्या. अग्नि त्यांच्यावर मोहित होऊन त्यांची प्राप्ति व्हावी यासाठी सप्तर्षींच्या गार्हपत्यांत चिरकाल लपून राहिला. पण तरीहि त्याला ऋषींच्या भार्या प्राप्त होईनात. तेव्हा वैतागून तो देहत्याग करायला निघाला. स्वाहेला ही वार्ता कळली. तिने आपला पति जगावा म्हणून सहाहि ऋषिपत्न्यांचीं रूपें घेतलीं व एकेका रूपांत त्याला भोग दिला. सातव्या अरुंधतीचें रूप मात्र स्वाहेला घेतां आलें नाही (म. भा. वन. २२४). याला सोनें प्रिय आहे. याने आजगव धनुष्य पृथूला दिलें. कृष्णाने केलेल्या पारिजातहरणाच्या वेळीं हा कृष्णाविरुद्ध इंद्राच्या सैन्यांत दाखल झाला होता.

श्वेतकीच्या यज्ञांत सतत हविर्द्रव्य भक्षिल्यामुळे अग्नीला जाड्य उत्पन्न झालें. तेव्हा पाचक म्हणून खांडववन भक्षिण्यास ब्रह्मदेवाने त्याला सांगितलें. अग्नि खांडववन जाळायला निघाला; पण इंद्राने पर्जन्यवृष्टि करून त्याचा तो बेत हाणून पाडला. असें एकदा नव्हे; अनेकदा झालें. अखेर अग्नीने कृष्णार्जुनांकडे संरक्षण मागितलें. त्यांनी आश्वासन दिल्यावर याने अर्जुनाला रथ, अक्षय्य भाते व गांडीव नांवाचें धनुष्य; तसेंच कृष्णाला सुदर्शनचक्र व कौमोदकी गदा हीं आयुधें देऊन

शस्त्रसज्ज केलें. मग त्यांच्या संरक्षणाखाली अग्नीला सुखाने खांडववन जाळायला मिळालें (म. भा. आदि. २२२. २२३).

भृगुपत्नीच्या संबंधांत अग्नीने दमन राक्षसाला चहाडी केली म्हणून भृगूने याला शाप दिला, की 'तूं सर्वभक्षक होशील!' (पद्म पु. पा. खं. १४). भृगूच्या शापामुळे अग्नि पुढे पाण्यांत गुप्त झाला. त्यामुळे यज्ञयाग बंद पडले. देव अग्नीच्या शोधार्थ निघाले, तेव्हा जलांतल्या मत्स्यांनी त्याचा ठावठिकाणा सांगितला. मग देवांनी स्तुति करून त्याला जलांतून बाहेर आणलें (म. भा. आदि. ७). अग्नीचे स्कंद, पावक, पवमान, शुचि, सुदर्शन व स्वारोचिष हे पुत्र होत. अग्नीचें गोत्र शांडिल्य व वाहन मेष मानलेलें आहे. ऋग्वेदांत इंद्राच्या खालोखाल अग्नीला महत्त्व मिळालेलें आहे.

वेदाप्रमाणेच अवेस्त्यांतहि अग्निविषयक कथा अनेक आहेत. अग्नि (आतरो) हा अहुरमज्दाचा पुत्र असून त्याच्यापासून झरतुष्ट्र जन्मला. अग्नीच्या संरक्षकांनाच झरतुष्ट्री धर्मात धर्मगुरु समजतात. हे अग्नीला विझूं देत नाहीत. अग्नींत प्रेत जाळणें, अथवा शेण वगैरे अपवित्र वस्तु टाकणें हें झरतुष्ट्री (पारशी) धर्मांत निषिद्ध मानलें आहे.

मानववंशाच्या प्रगतीचा पहिला महत्त्वाचा टप्पा म्हणजे अग्नि निर्माण करण्याचा शोध हा होय. हा शोध फार प्राचीन काळीं म्हणजे सुमारें चार लक्ष वर्षांपूर्वींच्या हिमांतरयुगांत (Second Glacial Epoch) लागला असावा, असें म्हणतात. अग्नीविषयीं जगांतल्या अनेक मानववंशांमध्ये दंतकथात्मक वाङ्मय भरपूर आहे, त्यावरूनहि या शोधाची प्राचीनता कळते. बहुतेक सर्व आदिवासी जमातींमध्ये अग्नीच्या उत्पत्ति-कथांचा आढळ होतो. त्यांपैकी दोन कथा पुढीलप्रमाणे –

(१) माकडाने आभाळांत जाऊन रंगदेवापासून अग्नि आणला. तो घेऊन तें झाडावर बसलें. त्याने ढोल, तुताऱ्या वाजवून लोकांना जाहीर केलें, की 'जें तुमच्याजवळ नाही, तें माझ्याजवळ आहे'. लोक तिथे जमले. त्यांनी पाहिलें, की माकडाच्या हातीं चमकणारी अशी एक नवीच वस्तु आहे. ती माकडाने खाली टाकावी व आपल्याला मिळावी, म्हणून ते माकडाला दगड मारूं लागले. माकड झाडाच्या शेंड्यांत जाऊन बसलें. मग माणसांनी मुंग्यांचें एक घर आणून तें झाडाच्या बुंध्यांत ठेवलें. मुंग्या झाडावर चढल्या आणि माकडाला चावूं लागल्या. त्यांना झाडून टाकण्याच्या धांदलींत माकडाच्या हातून अग्नि खाली पडला व तो माणसांना मिळाला (मोकलुम-आदिवासी, वायव्य सीमाप्रांत).

(२) प्राचीनकाळीं आदिमानव आपलें अन्न कच्चेंच खात असे. कारण त्याच्याजवळ अग्नि नव्हता. एके दिवशीं एक माणूस जंगल तोडीत असतां त्याने एका पक्ष्यावर दगड मारला. तो एका खडकावर आदळला आणि त्यांतून एक ठिणगी उडली. माणसाने आणखी एक दगड मारला आणि त्यांतून दुसरी ठिणगी उडली व ती जवळच्या झुडपांत पडली. त्यामुळे त्या झुडपांना आग लागली. तिथूनच माणसाला अग्नि प्राप्त झाला (वांचू-आदिवासी, वायव्य सीमाप्रांत).

घर्षणांतून अग्नीच्या उत्पत्तीचा साक्षात्कार ही कल्पना जगांतल्या अग्निकथांत सर्वत्र आढळते. माणसानेहि पुढे तीच पद्धति अवलंबिली. दोन काठ्या किंवा दोन दगड यांचें घर्षण करून तो अग्नि निर्माण करूं लागला. बहुतेक सर्व मानववंश प्लाइस्टोसीन कालाच्या प्रारंभिक दशेंतच अग्निनिर्मितीची ही प्रक्रिया शिकले होते असें, प्रो. जेम्स आपल्या इंट्रोडक्शन टु अँथ्रापॉलॉजी या ग्रंथांत म्हणतात. ऋग्वेदांतहि याचा सुगावा मिळतो.

त्वामग्ने पुष्करादध्यथर्वा निरमन्थत ।
मूर्ध्नो विश्वस्य वाघतः ॥

(ऋ.६. १६. १३)

या मंत्रांत अथर्व्याने अग्नीला पुष्करापासून मंथन करून प्रकट केलें, असें म्हटलें आहे. मंथन करणें म्हणजे दगडावर दगड किंवा लांकडावर लांकूड घासणें होय.

अग्नि हातीं येतांच मानवाच्या जीवनांत क्रांतिकारक बदल झाला. अग्नीच्या ज्ञानानेच मानवाला माणूस बनविलें. मग शेती, पाकनिर्मिति, उष्णता, प्रकाश, प्रेतदहन, धार्मिक विधी, यांच्यासाठी माणूस अग्नीचा उपयोग करूं लागला.

अग्नीला द्रविणोदा असें आणखी एक नांव आहे. निरुक्तांत म्हटलें आहे, की 'स हि बलधनयोर्दातृतमः = तो बल आणि धन यांच्या दात्यांत श्रेष्ठ आहे' (८. १०). प्राचीन मानवाला त्याच्या शिकारींतहि अग्नीचा उपयोग होऊं लागला. मानवाने त्याला प्रथम आपल्या झोपडींत आणून बसविलें आणि त्यामुळे थंडी व हिंस्र जनावरें यांपासून स्वतःचें रक्षण केलें. झोपडीचें छप्पर मध्यभागीं उंच असते. झोपडींत मध्यभागीं स्थापलेल्या अग्नीने झोपडी जाळूं नये आणि धूर बाहेर निघून जायला वाट मिळावी म्हणून हें छप्पर उंच ठेवीत. प्राचीन मानव झोपडींत एकदा पेटविलेला विस्तव विझूं देत नसे. कारण अग्नि विझला तर पुनश्च तो उत्पन्न करणें हें कष्टाचें काम असे. पुष्कळदा मानवसमूह स्थलांतर करण्याच्या वेळीं अग्निहि बरोबर घेऊन जात. म्हणून एका विशिष्ट कालखंडाला अग्नियुग मानलेलें आहे. या युगाचे आद्यंत नक्की सांगणें कठीण आहे. अग्नीचें ज्ञान झालें तेव्हापासून तों माणूस आपल्या निवासासाठी सुंदर आणि सुरक्षित घर बांधायला शिकेपर्यंत हें अग्नियुग प्रचलित

होतें, एवढेंच म्हणतां येतें. अग्नियुगांत अग्नि हा गृहपति आणि सम्राट् होता. वन्य-पशूंपासून आत्मरक्षण करण्याचें प्रमुख साधन तोच होता.

अग्नीच्या उत्पत्तीबद्दल उपनिषदांत म्हटलें आहे, की मूळ सत्पासून प्रथम अग्नि उत्पन्न झाला व त्यापासून पुढे जल व व पृथ्वी हीं निर्माण झालीं (छांदो. ६.८). अग्नीने या विश्वांत शिरून अनेक रूपें धारण केलीं (कठ. २.५).

अग्नीला वैश्वानर हें नांव ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं दिलेलें आहे. द्यु व भूमि यांतील सर्व अग्निरूपांत राहणारा अग्नि तो वैश्वानर असावा, असें डॉ. केतकर म्हणतात. प्राण आणि अपान अथवा उपांशु आणि अंतर्यामि यांच्या पारस्परिक घर्षणांतून जी उष्णता प्रकट होते, तोच पुरुष आहे व तोच वैश्वानर आहे, असें मैत्रायणी उपनिषदांत म्हटलें आहे (२. ६). भूर्भुवः स्वः किंवा अग्नि, वायु, आदित्य या तीन्हीं तत्त्वांच्या समन्वयांतून जी प्राणशक्ति स्पंदित होते, तिला वैश्वानर म्हणतात. प्राण्यांच्या शरीरांत जो तापधर्मा अग्नि आहे, तेंच प्राण्यांचें जीवन होय. मन, प्राण आणि वाक् या तीन तत्त्वांच्या मीलनांतूनच जीवनाची अभिव्यक्ति होत असते. वेदोत्तर कालांत वैश्वानर म्हणजे प्राण्यांच्या शरीरांतला अन्न पचन करणारा जठराग्नि असा त्याचा अर्थ झाला आहे.

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ।।

(गीता १५.१४)

अर्थ – (भगवान् म्हणतात –) मी जाठर अग्नि = वैश्वानर होऊन प्राण्यांच्या देहाचा आश्रय केलेला आहे. (मी) प्राणापानांनी युक्त होऊन चतुर्विध अन्न पचवीत असतों.

शतपथ ब्राह्मणांतहि हाच अर्थ दिलेला आहे (१४.८. १०. १).

ऋग्वेदांत अग्नीला होता असें एक विशेषण आहे (ऋ. १.१.१). याचें स्पष्टीकरण डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांनी पुढीलप्रमाणे केलें आहे – होता म्हणजे देव किंवा शक्ति हिचें आवाहन करणारा. बाहेरून भूततत्त्वें आणून त्यांचें अग्नींत हवन करणारी आणि त्या हवनाच्या द्वारें त्यांना आत्मरूपांत परिवर्तित करणारी जी एक शक्ति आहे, तीच अग्नीचें होतृस्वरूप होय. प्रत्येक गर्भित कोशांत (Fertilised cell) जें स्पंदन चालतें तें या हौत्रकर्माच्या पूर्तीसाठीच असतें. तें बाहेरून पंचतत्त्वांना केंद्रांत खेंचून आणतें आणि त्यांचें संवर्धन करतें. यांत दोन प्रक्रिया दिसतात. एक अन्न–अन्नाद आणि दुसरी संवर्धन. केंद्रांत बसलेला अग्नि हा अन्नाद (= अन्न खाणारा) असून तो बाहेरून अन्नाची अपेक्षा करतो. अन्नाद अग्नीच्या या भुकेलाच अशनाया म्हणतात. जर अग्नीला अन्न मिळालें नाहीं, तर जीवनयज्ञाची समाप्ति होईल व कोशसंवर्धनाचें कार्य थांबेल. बीजापासून पुनश्च बीजापर्यंत जाणें हेंच प्रकृतीचें चक्र असून अग्नीचें हौत्रकर्महि तेंच आहे.

निदानविद्येला धरून ऋग्वेदांत तीन अग्नींना तीन भ्राते म्हटलें आहे (ऋ. १.१६४.१). पृथ्वींतल्या अग्नीला पवमान, अंतरिक्षांतल्या अग्नीला पावक आणि द्युलोक तल्या अग्नीला शुचि म्हणतात. या तीन अग्नींना अनुक्रमें ब्रह्माग्नि, देवाग्नि आणि भूताग्नि असेंहि म्हटलें आहे. यांतला फक्त भूताग्नि तेवढाच दृष्टीला दिसूं शकतो. शरीरांत क्षार–आम्लयुक्त असा जो रसात्मक भौतिक अग्नि आहे, तो प्रत्यक्ष पाहतां येतो. पण त्याच्या आधारावर राहणारे प्राण आणि मन हे दृष्टिगम्य होत नाहींत. म्हणूनच पार्थिव अग्नीला घन, अंतरिक्षाग्नीला तरल आणि द्युलोकस्थ अग्नीला विरल म्हटलें आहे. भौतिक देह घन आहे. त्यांत सर्वव्यापी असलेली प्राणक्रिया तरल आहे आणि मनाची क्रिया विरल आहे. विरल अग्नि सर्वांत सूक्ष्म असून सर्वांहून अधिक व्यापक आहे. मनाची स्थितिहि अशीच असते. तें निकट आणि दूर सर्वत्र व्याप्त असतें (डॉ. वासुदेवशरण अग्रवाल).

अग्निविषयक लोकसंकेत– अग्नीला शिवाचें वीर्य समजतात. मानववीर्याला तेज म्हणण्याची प्रथा यांतूनच पडली आहे. अग्नीवर तोंडाने फुंकर घालीत नाहीत. घालायचाच झाला तर तळहातावरून घालतात. उष्टें–खरकटें पाणी टाकून अग्नि विझवीत नाहीत. अग्नींत थुंकत नाहीत. त्याच्यांत नखें, केस वगैरे अपवित्र पदार्थ टाकीत नाहीत. त्याला पदस्पर्श करीत नाहीत. पिकापाण्याच्या सुबत्तेशीं अग्नीचा संबंध मानतात. सूर्यास्तानंतर अग्नि घरांतून बाहेर देत नाहीत. दोन माणसांच्या मधून अग्नि नेला, तर त्या दोघांचें भांडण होतें, असें समजतात. रजस्वला स्त्री अग्नीला शिवत नाही. घरांतलें माणूस मेल्यावर अग्नि विझवून टाकण्याची चाल कांही ठिकाणीं आहे. [वै. मॉ.; ऋ. द.; म. ज्ञा. को; की. पॉ.]

अग्निकमळ योगशास्त्रांतली एक संज्ञा. दोन्ही भुवयांच्या मध्ये हें असतें व विजेसारखा त्याचा वर्ण असतो. त्याला दोन पाकळ्या असून त्यांवर हं व क्षं हीं बीजचिन्हें असतात.

अग्निका विक्रान्तेच्या तीन मुलींपैकी एक. गंधर्वांच्या आग्नेयगणाची उत्पादक (वायु पु. ६९. २१–२३). [पु. इं.]

अग्निकार्य ब्रह्मचाऱ्याने सकाळ-संध्याकाळ अग्नीला समिधा देणें याला हें नांव आहे. हें संध्यावंदनानंतर करायचें असतें. हें मेधाजनन होईपर्यंत उपनयनाच्या अग्नीवर व नंतर लौकिकाग्नीवर करतात. प्रथम समिदाधानाचा संकल्प करून अग्नीभोवती परिसमूहन व पर्युक्षण केल्यावर 'विश्वानि नः' (ऋ. ५. ४. ९–११) या ऋचेने अग्नीचें अर्चन करून 'अग्नये समिधम्' या मंत्राने अग्नींत समिधा देतात. मग उजवा हात ओला करून आणि अग्नीवर तापवून 'तेजसा मा समनज्मि' या मंत्राने तो मिटलेल्या ओठांवरून खाली आणतात. असें तीनदा करतात. मग उपस्थान, पुनश्च परिसमूहन व पर्युक्षण, तसेंच विभूतिग्रहण केल्यावर गोत्र–प्रवरांसहित आपल्या नांवाचा उच्चार करून अग्नीला व वृद्ध मंडळीला अभिवादन करतात. [आचारेंदु]

अग्निकुंड अग्नि ठेवायचें स्थान. यांतून प्रकट होऊन शिवाने दक्षाला दर्शन दिलें (वायु पु. ३०. १७२). ब्रह्मदेवाच्या अशाच अग्निकुंडांतून तिलोत्तमा निर्माण झाली (वायु पु. ६९. ५९). [पु. इं.]

अग्निकुलें सूर्य व चंद्र यांच्यापासून सुरू झालेल्या राजवंशांप्रमाणे अग्नीपासून सुरू झालेल्या वंशाला अग्निकुलें असें म्हणतात. यांत चौहान, चालुक्य, परमार व पडिहार या चार राजपूत कुलांचा समावेश होतो. या कुलांविषयी श्री. चिंतामणराव वैद्य यांनी आपलें मत पुढील प्रमाणे मांडलें आहे—हीं चार राजपूत कुळें आपणांस अग्निकुलें मानतात; पण तें चुकीचें आहे. इ. स. १००० च्या सुमारास हीं कुलें आपणांस सूर्य-चंद्रवंशी समजत. चंदभाटाने पृथ्वीराज-रासोंत त्या कुलांच्या अग्निकुंडांतून उत्पत्तीचें वर्णन लिहून ठेविलें व त्यामुळे या कल्पनेला ऐतिहासिक स्वरूप येऊन हीं कुलें आपणांस अग्निवंशज समजूं लागलीं. पण याचा दुष्परिणाम असा झाला, की पाश्चात्य संशोधक या कुलांतील लोकांना हूण इत्यादि अनार्य जातीचे; पण वसिष्ठाने अग्निसंस्कार करून क्षत्रिय बनविलेले लोक, असें मानूं लागले.


चंदभाटापूर्वी अग्निकुलाच्या कल्पनेचा अभाव होता, हा श्री. वैद्यांचा निर्णय डॉ. केतकरांस मान्य नाही. ते म्हणतात, कीं चंदभाटापूर्वीहि परमार राजे स्वतःला अग्नि-कुलोत्पन्न समजत. ही अग्निकुलाची कल्पना बरीच जुनी असली पाहिजे. कारण प्राचीन तमिळ वाङ्मयांतहि तिचा निर्देश आढळतो. परंबुनाडूच्या पारि नामक राजाच्या मुलींचीं लग्नें करण्यासाठी कपिलर नांवाचा त्याचा मित्र त्या दोन राजकन्यांना घेऊन ज्या दोन राजांकडे गेला, त्यांतला एक राजा अग्निकुलोत्पन्न असल्याचें त्याने लिहिलें आहे. कपिलरचा काळ इ. स. चें दुसरें शतक हा असावा, असें डॉ. होर्नले याचें मत आहे. यावरून अग्निकुलाची कल्पना इतकी मागे न्यावी लागते. अग्निकुलांचा वास्तव इतिहास उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांच्या उत्पत्तीविषयी एका पौराणिक कथेवर अवलंबून राहावें लागतें. ही कथा पुढीलप्रमाणे—

क्षत्रियांनी ब्राह्मणांचा छळवाद आरंभिल्यामुळे परशुरामाने त्यांच्या विरुद्ध हत्यार उपसलें व एकवीस वेळां क्षत्रियांचा निःपात केला. पण त्याचा परिणाम असा झाला, की क्षत्रियांच्या अभावीं दैत्य माजले व त्यांनी सर्वत्र अंदाधुंदी सुरू केली. मग अर्बुद (अबू) पर्वतावर निवास करणाऱ्या ऋषींना दैत्यांचा अत्याचार असह्य होऊन त्यांनी श्रीविष्णूचा धावा केला. विष्णूने ऋषींना क्षत्रियांच्या पुनर्निर्मितीचा आदेश दिला. त्यांना मदत करण्यासाठी इंद्र, ब्रह्मा, रुद्र या देवांसह विष्णुहि अर्बुद पर्वतावर आला. ऋषींनी क्षत्रियांच्या पुनर्निर्मितीसाठी यज्ञ करायचें ठरविलें. सर्व तयारी झाली. इंद्र हा त्या यज्ञाचा पहिला यजमान झाला. त्याने दर्भाची एक मानवी आकृति तयार करून अग्नींत टाकली. ऋषींनी संजीवन मंत्र म्हटला. त्यासरशीं 'मार, मार' अशी आरोळी ठोकीत एक पुरुष वर आला. हा पहिला अग्निकुलोत्पन्न क्षत्रिय होय. ऋषींनी त्याचें परमार असें नांव ठेविलें.

त्यानंतर ब्रह्मा रुद्र व विष्णु या तिन्ही देवांनी इंद्राप्रमाणेच केलें आणि त्यांपासून चालुक्य, परिहार व चौहान असे तीन पुरुष अग्नींतून निर्माण झाले. हे चार पुरुष चार अग्निकुलांचे मूळ पुरुष होत. त्यांचें व दैत्यांचें धमसान युद्ध झालें व त्यांत सर्व दैत्य–दानवांचा निःपात झाला. नंतर परमाराला अबू धार व उज्जैन या प्रदेशांचें स्वामित्व देण्यांत आलें. चालुक्य अनहलपुर पाटणाचा राजा झाला. परिहार हा मरुस्थलीचा (कच्छचें रण) स्वामी बनला. चौहान मकावती प्रदेशाचा राजा झाला. चंदभाटाने म्हटलें आहे, की छत्तीस राजकुलांत अग्निकुल श्रेष्ठ आहे. कारण त्याचा जन्म अग्नीपासून अतएव अयोनिज असा आहे. **पाहा** – परमार, चालुक्य, परिहार, चौहान. [म. ज्ञा. को.]

अग्निचयन सोमयागांत पूर्व दिशेस उत्तरवेदि नांवाचा एक ओटा तयार करतात व त्यावर विटांनी रचलेलें एक कुंड तयार करतात, त्याला चयन असें नांव आहे. चयनाच्या श्येन, रथचक्र, द्रोण, कंक, सुपर्ण, इ. अनेक आकृति सांगितलेल्या आहेत. एकेका आकृतींत किती इष्टका

(विटा) मांडाव्या, त्यांचे आकार व मापें काय असावीं, इ. तपशील श्रौतसूत्रांत दिलेला असतो. विशेष म्हणजे चयनांतली प्रत्येक वीट मांडतांना मंत्र म्हणायचा असतो. मंत्रांत जो महत्त्वपूर्ण शब्द आला असेल, तो प्रतीक मानून त्याचें नांव इष्टकेला दिलें जातें. उदा० वर्चस्या, तेजस्या, रेतस्या, इ. (अष्टाध्यायी ४. ४. १२५). तैत्तिरीयसूत्रकाराने श्येन चितीचा व कात्यायनाने सुपर्णचितीचा विधि प्रामुख्याने सांगितला आहे. इतर प्रकारचीं चयनें प्रचारांत नाहीत. श्येन किंवा सुपर्ण यांचा उल्लेख गरुडचयन याहि शब्दाने केला जातो. पहिल्या सोमयागांत चयन करायचें नसतें. वाजपेय आणि



सुपर्णचयन

सारस्वतसत्र यांमध्येहि चयन करूं नये, असें सत्याषाढ श्रौतसूत्रांत सांगितलें आहे (११.१). चयनाचा विधि असा–

फाल्गुन पौर्णिमेस इष्टि करून चयनयुक्त सोमयागाचा संकल्प केल्यानंतर उखासंभरण हा विधि करतात. त्यासाठी एक घोडा व एक गाढव घेऊन गांवाबाहेर जातात. विशिष्ट जागीं घोड्याला उभें करून त्याच्या पावलावर आज्याची आहुति देतात. नंतर तिथली माती मंत्र म्हणून कृष्णाजिनांत भरतात व गाढवाच्या पाठीवरून ती यज्ञशाळेंत वाहून आणतात. मग त्या मातींत कौलांचे तुकडे, भाताचा कोंडा, बारीक वाळू, बकऱ्याचे केस, इ. पदार्थ मिसळतात. माती चांगली मळून तिचें उखा नांवाचें कुंडाच्या आकाराचें भांडें तयार करतात. उखेची उंची वीतभर असते. तिच्या गळ्याजवळ मेखला करतात. चारी बाजूंना स्तनासारखे उंचवटे करतात. ती उखा गार्हपत्य अग्नीवर वाळवितात. एका खड्ड्यांत उखा ठेवून भोंवती अग्नि घालून ती भाजतात. हें सर्व कर्म समंत्रक असतें. नंतर पशुयाग करतात. पांच (किंवा एकच) पशु या यागांत घेतात. त्यांचीं शिरें काढून ठेवतात. (याच वेळीं एका पुरुषाचें मस्तकहि आणून ठेवण्यास सांगितलें आहे, किंवा ही पशूंचीं शिरें आणि पुरुषाचें शिर हीं मातीचींच करण्याबद्दलहि सांगितलें आहे.) पशुयागानंतर उखासंभरण करतात. यजमानाचा दीक्षाविधि झाल्यावर उखा आहवनीय अग्नीवर धरतात. तिच्यांत दर्भाचे तुकडे घालतात. उखा तापून लाल झाली म्हणजे आंतले ते दर्भ पेटतात. हाच उख्याग्नि होय. याला तै. सं. (५. १. ९.) मध्ये स्वयंभू म्हटलें आहे. मग यजमान त्याचें उपस्थान करतो. एवढें झाल्यावर ती उखा घडवंचीवर ठेवतात. अग्नि उत्पन्न झाल्यापासून तो त्याला गार्हपत्याच्या आयतनांत ठेवीपर्यंत तो भूमीवर ठेवायचा नसतो. म्हणून यजमान आपल्या गळ्यांत शिंकाळें अडकवून त्यांत अग्नीसह ती उखा ठेवतो. गार्हपत्य आयतनासाठीं २४ इष्टकांचा चौकोनी ओटा बनवितात. याला गार्हपत्यचिति असें नांव आहे. तिच्यावर मग उख्याग्नीची

स्थापना होते. यज्ञशाळेच्या नैर्ऋत्येस दूर अंतरावर तीन इष्टका मांडून तें शिकाळें टाकून देतात.

ज्या ठिकाणीं महाग्नीचें चयन करायचें, ती जागा पुरुष-मानाने म्हणजे यजमानाचा हात उंच करून जेवढी उंची भरेल त्या मानाने मोजून घेतात. ती जागा मंत्रपूर्वक नांगरतात. पाणी शिंपडून तिच्या मध्यभागीं दर्भस्तंब लावतात. मग त्यावर ज्या आकृतीची चिति करावयाची असेल, तदनुसार इष्टका मांडतात. इष्टकांच्या एका थराला प्रस्तर म्हणतात. एका प्रस्तरांत कमींतकमी दोनशे इष्टका असतात. चयनाच्या पूर्व बाजूस शीर्ष, दोन्ही बाजूस पक्ष, मागच्या अंगास पुच्छ व मध्यभागास आत्मा म्हणतात. साधारणपणे रोज एक एक प्रस्तर मांडतात. प्रस्तर मांडून झाल्यावर त्यावर माती पसर-तात. इष्टका मांडण्याच्या पूर्वी मध्यभागीं उखा व दर्भस्तंबा-जवळ कमलपत्रावर सोन्याची पुरुषप्रतिमा ठेवतात (तै. सं. ५. २. ७). रुक्म, तूप आणि दही यांनी भरलेल्या स्रुचाहि ठेवतात. पशूंचीं मस्तकें, पुरुषमस्तक, तसेंच उखळ व मुसळहि तिथे ठेवतात. नंतर निरनिराळे मंत्र म्हणून शीर्ष, पुच्छ, पक्ष आणि आत्मा या ठिकाणीं इष्टकांचा प्रस्तर मांडतात. एक प्रस्तर झाला की पहिली चिति झाली. याप्रमाणे पांच, सात, नऊ इतके प्रस्तर असतात. चयन तयार झाल्यावर पक्ष, पुच्छ आणि शीर्ष यांच्याजवळ उभें राहून उद्गाते निरनिराळीं सामें गातात. सर्व इष्टका मांडून झाल्यावर शेवटच्या इष्टकेवर शतरुद्रीय होम करतात. शेळीचें दूध रुईच्या पानावरून ओततात व तसें करतांना रुद्राध्याय म्हणतात. एका कळकाच्या टोकास बेडूक बांधून तो कळक चितीवर फिरवून त्या बेडकाला मारतात. नंतर विधिपूर्वक महाग्निचितीवर अग्नीचें प्रणयन होतें. वैश्वानर देवतेसाठी इष्टि, गणहोम, वसोर्धारा होम हे विधि होतात. वसोर्धारा होमांत उंबराच्या लांब स्रुचीमधून अग्नीवर तुपाची संतत धार धरतात. सात प्रकारच्या धान्यांनी वाजप्रसवीय होम करतात. मग यजमानाला हुतशेष हविर्द्रव्यांनी अभिषेक करतात. नंतर राष्ट्रभृत् होम करतात. महाग्नीच्या जवळ एक रथ आणून त्या रथाच्या मुखावरून राष्ट्रभृत् होमांतल्या शेवटच्या पांच आहुति देतात. तो रथ मग यजमान अध्वर्यूला देतो. मग सोमयागाप्रमाणे अवभृथापर्यंत सर्व अनुष्ठान करतात.

सोमयागाबरोबर अग्निचयन केलें असेल तर त्यानंतर सौत्रा-मणियाग करावा लागतो. अग्निचयन केल्यानंतर यजमान सर्वश्रेष्ठ होतो. मग त्याने कोणालाहि उत्थापन देऊं नये व व्रतस्थ राहावें, असें सांगितलें आहे.

चयनाच्या विधींत इष्टकाकरण म्हणजे विटा तयार करणें, याचा तपशील सूक्ष्म रीतीने सांगितलेला आहे. चितीच्या रचनेंत बरेच कौशल्य लागतें. संवत्सर सत्रांत चयनाचा विधिहि वर्षभर चालतो. मंत्रसंग्रह मोठा आणि विधींची जटिलता, यामुळे चयनांत ऋत्विजांच्या विद्येची कसोटी लागते. अजूनहि क्वचित् गरुडचयनाचे प्रयोग होतात. पण अन्य चिति नाममात्र राहिल्या आहेत.

तैत्तिरीय ब्राह्मण (३. १०–१२) आणि तैत्तिरीय आरण्यक (१ व ३) यांत काठकचयनें सांगितलीं आहेत. सावित्र, नाचिकेत, चातुर्होत्र, वैश्वसृज व अरुणकेतु अशीं पांच काठक-चयनें आहेत. अशा प्रकारचीं काठकचयनें अन्य शाखांमधून दिसत नाहीत. यांचा विधिहि भिन्न आहे. हीं सोमयागाबरोबर करायचीं असतात. यांत इष्टका वापरीत नसून वाळूचे खडे वापरतात. त्यांनाच इथे इष्टका म्हटलें आहे. बोटाच्या पेराएवढे सोन्याचे तुकडे इष्टका म्हणून घ्यावे, असेंहि सांगितलें आहे. या चयनांचा आकार रथचक्राप्रमाणे असतो.

सावित्रचयनांत रथचक्राच्या मापाएवढें वर्तुळ काढतात. या वर्तुळांत एकांत एक अशीं आणखी नऊ वर्तुळें काढतात. त्या वर्तुळांच्या रेघांवर वाळूचे खडे मांडतात. या चितीवर अग्नीचें प्रणयन करून पशुबंध विधि करतात. पशूच्या अंगयागापूर्वी मृत्युदेवतेसाठी मांसरसाचा ग्रह भरून घेतात.

नाचिकेत चयनाचें अनुष्ठान सावित्रासारखेंच आहे. या नाचिकेताग्नीचा विधि सांगतांना तैत्तिरीय ब्राह्मणांत (३. ११ ८) नचिकेता व यम यांचा संवाद आला आहे. यमाने नचि-केताला या चयनाचा विधि सांगितला, म्हणून याला नाचिकेत चयन म्हणतात.

चातुर्होत्र चयनामध्ये ८६ इष्टका सांगितल्या आहेत. त्या मांडतांना तैत्तिरीय आरण्यकाच्या तिसऱ्या अध्यायांतले मंत्र म्हणतात. बाकीचा विधि सावित्राप्रमाणेच असतो.

वैश्वसृज चयनामध्ये ४२ इष्टका असतात. त्या एका किंवा तीन थरांत मांडतात. हा विधि सहस्रसंवत्सरसत्र, रात्रिसत्र, इ. सत्रांमध्यें केलाच पाहिजे, असें सत्याषाढ श्रौतसूत्रांत सांगितलें आहे (२३. ३. २८). वरील चारहि चयनें एकदम करतां येतात.

अरुणकेतुचयनाचा बहुतेक विधि सावित्रचयनाप्रमाणेच आहे. विशेष म्हणजे यांतल्या इष्टका पाण्याच्या असतात. नदीचें पाणी, कढत पाणी व थंड पाणी अशा प्रकारचें त्रिविध पाणी म्हणजे इष्टका होत. या मांडतांना पुष्कळ मंत्र म्हणावे लाग-तात. उत्तरवेदीच्या जागीं रथचक्राएवढा गुढगाभर खोल खड्डा करून त्यांत त्या जलरूप इष्टका सहा थरांत मांडतात. चयन पुरें झाल्यावर अवशिष्ट जलाने यजमानाला अभिषेक करतात. नंतर चयनावर घडवंची ठेवून तिच्यावर अग्नीचें प्रणयन

करतात. चयन झाल्यावर सौत्रामणीयाग करावा लागतो. या पांचहि चयनांसाठी लागणाऱ्या मंत्रब्राह्मणांचा द्रष्टा कठ हा ऋषि असल्यामुळे यांना काठकचयन असें नांव पडलें आहे. अशा प्रकारे अग्निचयनें करणाऱ्या यजमानाला अग्निचित् म्हणत, असें पाणिनि सांगतो (अष्टा. ३. २. ९१).

यजुर्वेदकाळीं अग्निचयनाला सोमयागाच्या बरोबरीने महत्त्व प्राप्त झालें होतें. यज्ञधर्माच्या इतिहासांत चयनसंस्था हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. ईश्वराची परमपुरुष किंवा विश्वपुरुष रूपाने उपासना व मूर्तिपूजा अग्निचयनांत उगम पावली आहे. मंदिरसंस्थेचा किंवा धार्मिक स्थापत्याचा प्रारंभ इथूनच होतो. शैव–वैष्णव धर्मांचा उगमहि अग्निचयनांत झाला आहे. अग्निचयनांत वैश्वानर इष्टि सांगितली असून या वैश्वानराचें स्वरूप त्रैलोक्यव्यापी असल्याचें शतपथांत सांगितलें आहे (९.३.१३). अग्निचयनाशीं उपनिषदांचा निकटचा संबंध आहे. अग्निचयनांतला हिरण्मय पुरुष म्हणजेच उपनिषदांतला विशुद्ध जिवात्मा अथवा परमात्मा होय. शतपथांतील अग्निरहस्य हें १० वें कांड बृहदारण्यकोपनिषदाची प्रथम अवस्था आहे. छांदोग्य उपनिषदांतील वैश्वानरविद्या व शांडिल्यविद्या अग्निरहस्यांत प्रथम आली आहे. शांडिल्य हा चयनाचा द्रष्टा आहे. शांडिल्यविद्या ही उपनिषदांतल्या आत्मविद्येचें सूत्ररूप सारच होय. कठोपनिषदाचाहि चयनसंस्थेशीं संबंध आहे. त्याचा द्रष्टा नचिकेता हा चयनांतल्या एका विधीचा प्रणेताच आहे. तैत्तिरीय उपनिषदाचा चयनांतील पक्षिपुरुषाच्या उपासनेशीं साक्षात् संबंध आहे. तात्पर्य विश्वात्मक परमपुरुषाच्या उपासनेचा प्रारंभ अग्निचयनांत होत असून उपनिषदांच्या तात्त्विक मननाचा प्रारंभहि तिथेच होतो. उपनिषदांच्या इतिहासाच्या दृष्टीने अग्निचयनाची उपेक्षा करतां येणार नाही.

पंजाबांतील उत्खनांत चयनाची रचना सांपडली असून दक्षिणेंत तुंगभद्रेच्या कांठीं उखा हें पात्र सांपडलें आहे. [विद्याधरशास्त्री भिडे; वै. सं. वि.; हि. ध.]

अग्निचाक्षुष एक सूक्तद्रष्टा. सोमप्राशनाने इंद्र उत्साहित होऊन आपलें विजयी वज्र हातीं घेतो, असें याने म्हटलें आहे (ऋ. ९. १०६. ३).

अग्निज्वाला एका नरकाचें नांव. ऋषींच्या आश्रमांना उपद्रव देणारे लोक या नरकांत जातात (ब्रह्मांड पु. ४. २. १४९). आश्रमांचीं कर्तव्यें करण्यापासून च्युत होणारेहि या नरकांत यातना भोगतात (वायु पु. १०१. १४८). [पु. इं.]

अग्नितापस एक सूक्तद्रष्टा. याने कृपा करण्यासाठी विश्वेदेवांना पाचारण केलें असून अग्नीला समक्ष येऊन आपल्याशीं संभाषण करण्याबद्दल प्रार्थिलें आहे (ऋ. १०. १४१).

अग्नितीर्थ पुढील सहा ठिकाणीं हीं अग्नितीर्थें असल्याचे उल्लेख पुराणांत मिळतात— (१) यमुनेच्या दक्षिण तीरावर (२) वाराणसीच्या खालच्या अंगास (३) गोदावरीच्या किनाऱ्यावर (४) सरस्वतीच्या कांठावर (५) साभ्रमतीच्या उत्तर तीरावर व (६) कुब्जाम्रकाच्या खालच्या बाजूस. [हि. ध.]

अग्निदग्ध पितर. ज्यांच्या प्रेताला दाह संस्कार झाला ते अग्निदग्ध व ज्यांचीं प्रेतें पुरलीं गेलीं ते अनग्निदग्ध होत. वेदकाळीं प्रेतें जाळणें व पुरणें अशा दोन्ही प्रथा होत्या. उपनिषत्कालीं प्रेतदहन हें अधिक प्रशस्त मानूं लागले (छां. उ. ८. ८. ५). अग्निदग्ध व अनग्निदग्ध अशा अनामिक पितरांना सपिंडक श्राद्धांत पुढील मंत्राने भूमीवर जल देतात—

अग्निदग्धाश्च ये जीवा येऽप्यदग्धाः कुले मम ।
भूमौ दत्तेन तोयेन तृप्ता यान्तु परां गतिम् ।।

अर्थ – माझ्या कुलांतले जे अग्निदग्ध व अनग्निदग्ध असे (मृत) जीव असतील, ते भूमीवर दिलेल्या (या) जलाने तृप्त होऊन परम गतीला जावोत. [वे. इं.]

अग्निदान हिवाळ्यांतल्या कडक थंडीच्या दिवसांत गोरगरिबांना शीतनिवारणासाठी अग्नि मिळावा म्हणून, एखाद्या तीर्थांत, देवळांत किंवा मठांत सदैव शेकोटी पेटत राहील अशी व्यवस्था करणे, याला अग्निदान म्हणतात. फल – साठ हजार वर्षें स्वर्गवास. [दानचंद्रिका]

अग्निदिक् अग्नीचें आसन. या आसनावर बसून अग्नि राज्य करतो, असें द. भारतांतील लोक समजतात.

अग्निदिव्य वहिमी किंवा आरोपी याच्यावरचा आरोप शाबीत किंवा नाशाबीत ठरविण्यासाठी प्राचीन काळीं अशा माणसाला एखादी असह्य आणि धोकादायक गोष्ट करायला लावीत. त्या प्रकाराला दिव्य असें नांव होतें. आरोपी जर निरपराध असेल, तर त्याला सत्याच्या पक्षपाती देवता कोणतीहि इजा होऊं देणार नाहीत, अशी या दिव्याच्या मागची धारणा होती. दिव्याचे अनेक प्रकार आहेत. त्यांपैकी

अग्निपरीक्षा किंवा अग्निदिव्य हा एक प्रकार आहे. आरोपीने उकळत्या तेलाच्या कढईत हात बुडवून आंत टाकलेली वस्तु बाहेर काढायची किंवा तप्त लोखंडाचा गोळा हातावर घ्यायचा, हें अग्निदिव्याचें स्वरूप होय. या दिव्यांत त्याच्या हाताला जर इजा झाली नाही तर तो माणूस निरपराधी आहे, असें मानीत.

हा विधि प्राचीन काळापासून सर्व जगांत प्रचलित आहे. अग्नीची शोधक शक्ति रानटी लोकांनाहि माहीत होती. सुसंस्कृत समाजांत अलौकिक सामर्थ्याचें प्रदर्शन व सत्याची प्रतीति पाहणें, हे दोन अग्निदिव्याचे उद्देश असत. तांड्य ब्राह्मणांत अग्निदिव्याची एक कथा आली आहे—दोन ब्राह्मणांनी आपलें श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी अग्निप्रवेश केला. त्यांत वत्स हा ब्राह्मण शरिरावरचा एक केसहि न जळतां अग्नींतून सुखरूप बाहेर पडला व तोच श्रेष्ठ ठरला. अथर्ववेदांत (२. १२) व छांदोग्य उपनिषदांत (६. १६) अग्निप्रवेशाच्या ऐवजीं तापलेलें लोखंड हातीं धरण्याचा उल्लेख आहे.

सहा महिने रावणाच्या लंकेंत राहिल्यामुळे सीतेच्या चारित्र्यावर जो अपवाद आला होता, तो घालविण्यासाठी तिनेहि आग्निदिव्य केलें होतें. वाल्मीकि रामायणांतला तो प्रसंग पुढीलप्रमाणे आहे—

रामाने सीतेच्या चारित्र्याविषयीं शंका घेतली. त्यामुळे तिला अत्यंत दुःख झालें. ती अग्निदिव्य करायला सिद्ध झाली. लक्ष्मणाने तिच्यासाठी चिता रचली. चितेला अग्नि दिल्यावर सीता देव आणि ब्राह्मण यांना नमस्कार करून निर्धार वचन बोलली—

यथा मे हृदयं नित्यं नापसर्पति राघवात् ।
तथा लोकस्य साक्षी मां सर्वतः पातु पावकः ।।
यथा मां शुद्धचारित्र्यां दुष्टां जानाति राघवः ।
तथा लोकस्य साक्षी मां सर्वतः पातु पावकः ।।

(वा. रा. युद्ध. ११६. २५–२६)

अर्थ — जर माझें हृदय कधींहि रामभद्रापासून दूर गेलें नसेल, तर (हा) लोकसाक्षी अग्नि माझें सर्व प्रकारें रक्षण करो. मी शुद्धचरित असून मला रामभद्र कलंकित समजतो. तर (हा) लोकसाक्षी अग्नि माझें सर्वप्रकारें रक्षण करो.

असें म्हणून सीतेने त्या धडकत्या चितेंत उडी टाकली. त्यासरशी त्या चितेंतून मूर्तिमान् अग्नि सीतेला हातीं धरून बाहेर आला आणि त्याने सीतेचें पावित्र्य रामाला पटविलें.

स्त्रियांच्या सतीत्वाची परीक्षा पाहण्याचा हा प्रकार भारतांत तसाच इतर जगांतहि प्राचीन काळापासून चालू आहे. त्या काळीं लोखंडाचा एक फाळ तापवून लाल करीत व जिच्या चारित्र्याविषयी संशय उत्पन्न झाला असेल, अशा स्त्रीला तो जिभेने चाटायला लावीत. जर तिचें तोंड भाजलें, तर ती व्यभिचारिणी व न भाजलें तर सती ठरे. हा अग्निदिव्याचा प्रकार पुढे स्मृतिग्रंथांनीहि मान्य ठरविला. त्याचा सामान्यविधि पुढीलप्रमाणे होता —

पूर्व-पश्चिम अशीं गोमयाचीं नऊ मंडलें बनवीत. अग्नि, वरुण, वायु, यम, इंद्र, कुबेर, सोम, सविता व विश्वेदेव या त्या मंडलांच्या अनुक्रमें देवता मानीत. प्रत्येक मंडल १६ अंगुलांच्या अर्धव्यासाचें व दोन मंडलांत १६ अंगुलांचें अंतर असे. प्रत्येक मंडलांत कुश पसरीत. मग एक लोहार ५० पलें वजनाचा व ८ अंगुलें लांबीचा एक लोखंडाचा तुकडा तापवून लाल करी. मग विशिष्ट मंत्र म्हणून त्या लोहखंडावर देवतांचें आवाहन करीत. नंतर शोध्य माणूस पहिल्या वर्तुळांत पूर्वाभिमुख उभा राही. न्यायाधीश त्याच्या हातांवर लाल रंगाच्या खुणा करी. मग त्या हातांवर पिंपळाचीं सात पानें ठेवून त्यांवर दधियुक्त अक्षता ठेवी. शोध्याचे (आरोपी) दोन्ही हात त्या पानांसह बांधले जात. मग न्यायाधीश त्या दोन्ही हातांवर सांडशीने ते तप्त लोहखंड ठेवी. मग शोध्याला पहिल्या मंडलांतून दुसऱ्या मंडलांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत अशा प्रकारें आठ मंडलांपर्यंत सावकाश चालायला लावीत. मग नवव्या मंडलांत ते लोहखंड शोध्याला टाकायला लावीत. मग हाताची परीक्षा करीत. जर ते भाजले नसतील किंवा त्यांवर फोड उठले नसतील, तर न्यायाधीश शोध्य व्यक्ति निर्दोष असल्याचें घोषित करी (कात्या. स्मृ. ४४१; याज्ञ. स्मृ. २. १०७)



अग्निदिव्याचा एक प्रकार

प्राचीन अग्निदिव्याची ही परंपरा आजहि भारतांत कांहो ठिकाणीं, विशेषतः पूर्व–दक्षिण भारतांत चालू असलेली दिसो.

मात्र हें दिव्य सामाजिक अपराधांसाठी होत नसून विशिष्ट देवतांचे उपासक आपला व्रतस्थपणा देवतेला पटविण्यासाठी तें करतात.

वर्षांतल्या ठराविक दिवशीं कांही देवतांच्या जत्रा असतात. त्या देवतांचे भक्त अशा जत्रांना आवर्जून जातात. त्या आधी त्यांना कांही दिवस व्रतस्थ राहावें लागतें आणि जत्रेला गेल्या-नंतर आपल्या व्रतपालनाचा पुरावा देण्यासाठी प्रथम अग्निदिव्य करावें लागतें. त्या प्रसंगीं एका विशिष्ट जागीं खूप लाकडें घालून अग्नि पेटवितात. त्याचे निखारे झाले, की मग देवस्था-नांतला पुजारी त्या देवतेच्या अंगावरचें एक फूल आगींत टाकतो. तें न जळतां तसेंच राहिलें तर त्या अग्निदिव्याला देवतेची अनुज्ञा आहे, असें समजतात. मग भक्तगण त्या अग्निकुंडांतून उघड्या पायांनी चालत जातात.

आंध्रामध्ये धर्मराजाचें एक मंदिर आहे. त्या मंदिरांत पांडव व द्रौपदी यांच्या मूर्ती आहेत. जवळच सुमारें सहा हात लांब व तीन हात रुंद असें अग्निकुंड आहे. विशिष्ट दिवशीं तिथला पुजारी कुंडांतला निखारा फडक्यांत बांधून तें फडकें द्रौपदीच्या मूर्तीच्या कमरेला बांधतो. पण तें फडकें थोडेंसुद्धा जळत नाही, असें सांगतात. हें कृत्य झाल्यावर पुजारी मूर्तीवरचा एक पुष्प-गुच्छ त्या अग्निकुंडांत टाकतो. त्याला झळ बाधली नाही, की मग तोच गुच्छ हातीं घेऊन त्या अग्निकुंडांतून चालत जातो.

उडीसामध्ये चैत्र महिन्यांत अशाच प्रकारे अनेक ठिकाणीं अग्निदिव्याचे समारंभ होतात. रोगराईची आपत्ति टळावी हा त्यांचा उद्देश असतो. पूर्व लंकेमध्ये तर हा सोहळा मोठ्या समारंभाने साजरा होतो. तिथल्या पांडिरुप्प खेड्यांतले लोक हा समारंभ करतात. त्यासाठी घरदार सुशोभित करतात. त्यानंतर गांवांतल्या सहा धर्मशील लोकांची निवड करतात. त्यांना पांच पांडव व द्रौपदी अशीं नांवें देतात. द्रौपदी झालेला माणूस स्त्रीवेष घेतो. त्यांनीं तो सोहळा संपेपर्यंत मंदिरांत एकभुक्त राहून रात्रौ महाभारताची कथा ऐकायची असते. अग्निदिव्याच्या आधी तीन दिवस त्यांतला अर्जुन एका खास उभारलेल्या खांबाच्या डोक्यावरील पिंजऱ्यांत तपश्चर्येला बसतो. त्यानंतर तिथल्या द्रौपदीच्या मंदिरासमोर एक लांबरुंद खड्डा खणून तो लाकडाच्या ओंडक्यांनी भरून काढतात. अग्निदिव्याच्या दिवशीं पुजारी त्या नामधारी द्रौपदीची पूजा करतो व अग्नी-पासून सर्वांचें संरक्षण होण्याचा वर मागून घेतो. मग तो द्रौपदी झालेला माणूस पानसुपारी आणि केळीं पदरांत बांधून अग्नि-कुंडाला तीन प्रदक्षिणा घालतो व त्या वस्तु कुंडांत ठेवून कुंडाला अग्नि लावतो. कुंड पुरतें पेटून निखारे झाल्यावर त्यांतून स्वतः चालत जातो. त्याच्यामागून मग इतरहि लोक जातात.

कर्नाटकांत केसरकोड गावांतले लोकहि असाच अग्नि-दिव्याचा सोहळा करतात. त्यासाठी अग्निकुंडासमोर विष्णुभूत या देवतेची स्थापना करतात. मुख्य पुरोहित माडाच्या पात्यांनी आपलें शरीर मढवितो. मंत्रतंत्रादि विधि झाल्यावर कांही लोकांच्या अंगांत देवतांचें वारें संचारतें. लगेच ते अग्निकुंडांतून चालत जातात. त्यानंतर मुख्य पुरोहित धावत जाऊन त्या निखाऱ्यावर अंग टाकतो. मग इतर लोक त्याला उचलून बाहेर आणतात व अग्नीची प्रार्थना करतात.

गोमंतकांत शिरगांव येथे वैशाख महिन्यांत तिथल्या देवीची जत्रा होते. त्या वेळीं तिचे धोंड नांवाचे भक्त अग्निकुंडांतून चालत जातात. **पाहा** – दिव्य. [हि. ध; ए. सा. रि. ए.]

अग्निद्वयसंसर्ग

पहिली पत्नी असतांना दुसरीशीं विवाह केल्यास दोन गृह्याग्नि ठेवावे लागतात. मग त्यांचा यथाविधि संयोग करावा लागतो. त्या कृत्यास हें नांव आहे. [सं. कौ.]

अग्निधिष्ण्य ऐश्वर्य

एक सूक्तद्रष्टा. याच्या सूक्तांवरून सोमरसाचा वर्ण आणि तो गाळ-ण्याची प्रक्रिया वगैरे गोष्टी कळतात (ऋ. ९. १०९).

अग्निपंचक

फलज्योतिषांतला एक घातक योग. शुद्ध प्रति-पदेपासून चालू तिथीपर्यंत तिथी मोजून त्या संख्येंत मुहूर्ताच्या काळीं चालू असलेल्या लग्नाची संख्या मिळ-वितात. मग त्या संख्येस नवांनी भागून बाकी दोन राहिल्यास अग्निपंचक मानतात. यांत अग्नीपासून भय असतें, म्हणून गृहारंभास तो मुहूर्त वर्ज्य ठरविलेला आहे. [मु. चिं.]

अग्निपावक

एक सूक्तद्रष्टा. क्षुद्र मनोवृत्तीच्या लोकांना आटोक्यांत ठेवून खरें ऐश्वर्य आपणांस बहाल करण्याबद्दल याने अग्नीला प्रार्थिलें आहे. हा वेदीवरच्या अग्नीला मातेचा कुशल समाचार घेणाऱ्या सुपुत्राची उपमा देतो (ऋ. १०. १४०).

अग्निपुराण

अठरा प्रसिद्ध पुराणांपैकी एक. याच्या नांवा-वरून हें पुराण अग्निमाहात्म्य सांगणारें असावें, असें वाटतें; पण अग्नीने वसिष्ठाला सांगितलेलें विद्या-सार या अर्थानें त्याला अग्निपुराण म्हटलें आहे. ‘ अग्निनोक्तं पुराणं यदाग्नेयं वेदसम्मितम् ’, अग्निपुराण अग्नीने सांगितलें असून तें वेदतुल्य आहे, असें त्या नांवाचें स्पष्टीकरण दिलें

आहे (६०), यांत अग्निरुवाच, ईश्वर उवाच, पुष्कर उवाच, इ. वक्त्यांचीं नांवें आहेत. त्यावरून हें तीन-चार वक्त्यांनी मिळून सागितलें आहे, असें दिसतें. सर्ग-प्रतिसर्गादि पुराणांचीं पांच लक्षणें यांत दिसत असलीं, तरी इथे त्यांना विशेष महत्त्व नाही. इथे महत्त्व आहे तें परा व अपरा या विद्यांना. या दोन विद्यांना धरूनच या पुराणाचा विस्तार आहे. वेद व त्यांचीं षडंगें, तसेंच मीमांसादि दर्शनें, इ. सर्व विद्यांचा या पुराणांत अपरा विद्या या नांवाने निर्देश असून जिच्या योगाने ब्रह्मज्ञान होतें, त्या अध्यात्मविद्येलाच पराविद्या म्हणून गौरविलें आहे (१. १७). याशिवाय अवतार, चरित्रें, राजवंश, विश्वाची उत्पत्ति, तत्त्वज्ञान, व्यवहार, नीति, असे विविध विषय यांत विवेचिले आहेत. अध्यात्माविषयीं मात्र अल्पसेंच विवेचन असल्यामुळे या पुराणाला तामसकोटींत घातलें आहे. यांत एखाद्या विशिष्ट पंथाचा पुरस्कार नसला, तरी पुराणकाराचा शैव धर्माकडे कल दिसतो. या पुराणाच्या रचनाकालीं भारतांत शैव धर्म प्रतिष्ठित झाला होता, हें यावरून कळून येतें.

आनंदाश्रमाने प्रसिद्ध केलेल्या अग्निपुराणाच्या प्रतींत ३८३ अध्याय असून श्लोकसंख्या ११,४५७ आहे; पण निरनिराळ्या पुराणांनी या पुराणाची श्लोकसंख्या भिन्न भिन्न दिली आहे. नारदपुराणांतल्या सूचींत दिलेला ईशानकल्पवृत्तान्त उपलब्ध प्रतींत आढळत नाही. त्याचप्रमाणें अग्निपुराणांतून म्हणून घेतलेले उतारे (उदा० बल्लाळसेनाचा दानसागर) उपलब्ध प्रतींत आढळत नाहीत. यावरून या पुराणाचा कांही भाग लुप्त झाला असावा, असें वाटतें.

या पुराणाचा काळ कोणता याविषयीं मतभेद आहेत. काणे यांच्या मतें तो इ. स. ९००, तर काळे यांच्या मतें तो पांचवें किंवा सहावें शतक हा आहे. इ. स. च्या पांचव्या शतकानंतर व मुसलमानी स्वाऱ्या भारतावर होण्याच्या आधीं याचें संकलन झालें असावें, असें केतकरांचें मत आहे. अन्य पुराणांत सांगितलेल्या अग्निपुराणाच्या १५०००–१६००० इ. श्लोकसंख्या लक्षांत घेऊन हें पुराण पूर्वीं आजच्यापेक्षा मोठें असावें व आजचें पुराण त्याची संशोधित अवशिष्टरूप आवृत्ति असावी, असें काळे म्हणतात.

अग्निपुराणाचा प्रथम श्लोक पुढीलप्रमाणे आहे—

श्रियं सरस्वतीं गौरीं गणेशं स्कन्दमीश्वरम् ।
ब्रह्माणं वह्निमिन्द्रादीन् वासुदेवं नमाम्यहम् ॥

नमनानंतर सर्ग-प्रतिसर्ग इत्यादि विषय डावलून एकदम अवतारकथेपासून वर्णनाला प्रारंभ झालेला आहे. १ ते १६ हे अध्याय अवतारवर्णनांत खर्ची पडले आहेत. मात्र या अवतार-मालिकेंत कूर्मावताराचा उल्लेख नाही. वल्मीकिरामायणांतील रामकथा यांत संक्षिप्त रूपाने दिलेली आहे. 'रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव' हें अनन्वयाचें सुप्रसिद्ध उदाहरण अग्निपुराणांतूनच घेतलें आहे (११. २. २३). कृष्णावताराच्या भागांत गोमंतपर्वताचा उल्लेख आहे. हा गोमंतपर्वत म्हणजे आजच्या गोमंतकाला लागून असलेल्या सह्याद्रीच्या श्रेणींतला एखादा डोंगर असावा, असा तर्क आहे.

महाभारताचा साररूप कथाभागहि यांत दिलेला आहे. अग्निपुराणाच्या रचनेच्या कालांत हिंदूंच्या अवतारपरंपरेंत बुद्धाला स्थान मिळालें होतें, हें उघड दिसतें. इथे बुद्धाला विष्णूचा अवतार म्हटलें असून, विष्णूने हा अवतार कां ग्रहण केला, याविषयीं पुढील कथा दिलेली आहे—

प्राचीन काळीं सगळे दैत्य वैदिक कर्में आचरणारे होते. त्यामुळे ते बलवानहि होते. एकदा देव-दैत्यांच्या युद्धांत देवांचा पराभव झाला. तेव्हा देवांनी विष्णूची प्रार्थना केली व विष्णूने दैत्यांना धर्मभ्रष्ट करून त्यांचा नाश करण्यासाठी बुद्धावतार घेतला.

अवतार वर्णनाचा हा विषय झाल्यावर मग सर्ग-प्रतिसर्गादि वर्णनाला प्रारंभ होतो. त्यांत अव्यक्त ब्रह्मापासून सकल सृष्टि कशा क्रमाने उत्पन्न झाली, तें सांगून पुढें देवोपासना, मंत्र व तदनुषंगिक गोष्टी सांगितल्या आहेत. अध्याय २९ ते ४५ यांत वास्तुशास्त्राचा विचार आलेला आहे. त्यांत देवालय कसें बांधावें, देवतांच्या मूर्ति कशा कराव्या, देवप्रतिष्ठा व जीर्णोद्धार कोणत्या पद्धतीने करावे, इ. विषय सांगितले असून देवप्रतिष्ठा करायला मध्यदेशांतील ब्राह्मणच पात्र असून कच्छ, कावेरी, कोंकण, कलिंग, या देशांतले ब्राह्मण अपात्र आहेत, असें म्हटलें आहे.

या पुढील अध्यायांत सप्तद्वीपें व सागर यांचीं नांवें व वर्णनें आहेत. त्यापुढे राजधर्म वर्णिलेला आहे. राजा कसा असावा, यासंबंधीं पुढील वचन आहे—

राजा स्यात् जनरञ्जनात् ।

(२२०. २४)

अर्थ— जनांच्या रंजनाने राजा हा राजा ठरतो.

राजाने आपल्या प्रजाजनांना कधीहि पीडा देऊं नये व प्रजेचें प्रेमहि संपादन करावें, याविषयीं पुढील वचनें आढळतात—

अरक्षिताः प्रजा यस्य नरकं तस्य मन्दिरम् ।

(२१३. १०)

अर्थ— ज्याच्या प्रजा अरक्षित असतात, त्या राजाला नरकांत राहावें लागतें.

जनानुरागप्रभवा राज्ञो राज्यमहीश्रियः ।

(२२३. ३३)

अर्थ— राजाच्या राज्य, पृथ्वी आणि संपत्ति या गोष्टी प्रजेच्या अनुरागांतूनच निर्माण होतात.

या पुराणांत राजा, राज्य आणि राजकारण या सर्व गोष्टींचें सविस्तर वर्णन आलेलें आहे. यांतला विशेष कौतुक वाटण्यासारखा भाग म्हणजे गीतासाराचा. एकेका श्लोकांत वा श्लोकार्धांत त्या त्या अध्यायाचें तात्पर्य येऊन जातें. उदा०

गतासुरगतासुर्वा न शोच्यो देहवानज ।

(३८१. २)

यांत गीतेच्या दुसऱ्या अध्यायाचें सार येऊन गेलें आहे.

दानाविषयीं अग्निपुराण म्हणतें—

देशे काले च पात्रे च दानं कोटिगुणं भवेत् ।

(२०९. ५)

अर्थ— देश, काल आणि पात्र यांचा विचार करून दिलेलें दान कोटिगुणित होतें.

गायीचें महत्त्व सांगतांना पुढील श्लोक आलेला आहे—

गावः प्रतिष्ठा भूतानां गावः स्वस्त्ययनं परम् ।
अन्नमेव परं गावो देवानां हविरुत्तमम् ॥

(२९२. १५)

अर्थ— गायी या प्राणिमात्राची प्रतिष्ठा आहे. गायी हें परममंगल आहे. गायी (गोरसपदार्थ) हें परम अन्न व देवांचें उत्तम हविर्द्रव्य आहे.

या पुराणाची प्रशस्ति सांगतांना अग्निपुराण हें विष्णूचें महत्तर रूप असें म्हटलें आहे.

या पुराणाला समस्त भारतीय विद्यांचा विश्वकोश म्हटलें तरी त्यांत अतिशयोक्ति होणार नाही. राजनीति, धर्मशास्त्र, ज्योतिष, आयुर्वेद, व्रतें व तीर्थें यांचें वर्णन या पुराणांत विस्ताराने केलें आहे. छन्दःशास्त्र, अलंकारशास्त्र व व्याकरणशास्त्र यांच्याहि विवेचनांत कित्येक अध्याय खर्ची पडले आहेत. राजयोगाच्या अष्टांगांचें वर्णन संक्षिप्त व सुंदर आहे. गीतासाराप्रमाणेच शेवटीं अद्वैत वेदान्ताचेंहि सार दिलेलें आहे. याशिवाय अनेक प्रकारची कल्पविद्या, मंत्रविद्या, मोहिनीविद्या, वृक्षवैद्यक, अश्ववैद्यक, वनौषधि हे विषयहि या पुराणांत विस्ताराने सांगितलेले आहेत.

आग्नेये हि पुराणेऽस्मिन् सर्वा विद्याः प्रदर्शिताः ।

(३८३. २५)

अर्थ— या अग्निपुराणांत सर्व विद्यांचें प्रदर्शन झालेलें आहे. या पुराणाचा वरील प्रकारचा दावा आहे, तो सर्वथा सत्य आहे. [वि. ध. द.; पु. नि.; हि. ध.; म. ज्ञा. को.]

अग्निप्रवेश प्राणोत्सर्ग करण्याचा एक प्रकार. महाभारतांत देहत्यागाचे जे प्रकार सांगितले आहेत, त्यांत अग्निप्रवेशहि सांगितला आहे (शांति. ३५. १७). अत्रीच्या मताप्रमाणे अशक्त, नियमपालनास असमर्थ व असाध्य रोगाने ग्रस्त अशा मनुष्याने स्वतःचा कडेलोट करून, पाण्यांत बुडून, प्रायोपवेशन करून वा अग्निप्रवेश करून प्राणत्याग करणें ही गोष्ट धर्म्य आहे. लक्ष्मीधराने तीर्थविवेचनकांडांत या अग्निप्रवेशाचा विधिहि दिला आहे. हा अग्निप्रवेश समंत्रक असे. त्यापूर्वी वस्त्रावर भैरवमूर्ति रेखाटून तिची रक्तपुष्पाने पूजा करून मग अग्नींत उडी टाकीत. या अग्निप्रवेशाचे आठ प्रकार सांगितलेले आहेत—

(१) पतंगपात—कीट-पतंगाप्रमाणे आगीवर झडप घालणें (२) हंसपात—अंगांचा संकोच करून आगींत उडी घेणें (३) मृगपात—हरिण खड्डयावरून उडी मारतांना फसून आंत पडतो, त्याप्रमाणे करणें (४) मुसलपात—उखळांत मुसळ ज्या पद्धतीने पडतें, तद्वत् उडी घेणें (५) वृषपात—बैलाप्रमाणे हुंकार करीत उडी घेणें (६) विमानपात—विमान आदळतें त्याप्रमाणे पडणें (७) शाखापात—फांदीवरून खालच्या आगींत उडी घेणें व (८) सिंहपात—सिंहाच्या पवित्र्याने उडी घेणें. प्राचीन काळीं पुरुषाप्रमाणे स्त्रियाहि यांपैकी कोणत्यातरी पद्धतीने अग्निप्रवेश करीत होत्या. अर्थात् अशा प्रकारच्या गोष्टी अपवादात्मकच घडत. कोणी एखादा जिवाला कंटाळला असल्यास धर्मशास्त्राने त्याच्या देहत्यागाला अशा प्रकारे सवलत ठेवली होती, एवढाच याचा अर्थ आहे.

अग्निमाठर बाष्कलाचा शिष्य. याला अग्निमाढक असेंहि म्हणतात. बाष्कलाने याला ऋग्वेदाची एक संहिता पढविली (वायु पु. ६०. २६; विष्णु पु. ३. ४. १८).

अग्निमारुत अग्निष्टोमांतलें शेवटचें शस्त्र. हें द्रुतलयींत म्हणतात. **पाहा—**अग्निष्टोम.

अग्निमित्र (सनपूर्व २ रें शतक) शुंग वंशांतल्या पुष्यमित्राचा पुत्र. बापाच्या अमदानींत हा विदिशेचा सुभेदार होता. पित्याच्या मृत्यूनंतर सनपूर्व १५५ मध्ये हा गादीवर बसला. पुराणांत याची कारकीर्द आठ वर्षांची दिली आहे. रोहिल खंडांत याच्या कित्येक मुद्रा सांपडल्या आहेत. कालिदासाच्या मालविकाग्निमित्राचा हाच नायक आहे. हा साहित्य व कला यांचा भोक्ता होता.

विदर्भ देशाच्या यज्ञसेन राजाची मालविका नांवाची कन्या

होती. तिच्याशीं अग्निमित्राचें लग्न ठरलें होतें. त्याने तिला आणण्यासाठी सैन्यहि पाठविलें होतें; पण ही गोष्ट मालविकेच्या भावाला न रुचून त्याने अग्निमित्राच्या सैन्यावर हल्ला चढविला. या धामधुमींत मालविका निसटली व गुप्त वेषाने अग्निमित्राकडे आली. तिने अग्निमित्राची राणी धारिणी हिचा आश्रय घेतला. धारिणीने तिला ओळखलें नाही. पुढे एक दिवस विदूषकाच्या मध्यस्थीने अग्निमित्राने तिचें नृत्य पाहिलें त्यामुळे ती अग्निमित्राच्या मनांत भरली; पण मालविका ती हीच, हें मात्र त्याला कळलें नाही. शेवटीं तिची ओळख पटल्यावर मग त्यांचा विवाह घडून आला. कालिदासाच्या या वर्णनांत कल्पना किती व तथ्य किती, हें समजायला निश्चित साधन नाही. अग्निमित्राने विदिशा ही आपली राजधानी केली होती. [मालविकाग्निमित्र; म. च. को.; हिं. वि. को.]

अग्निमुख ग्रहमख, व्रतोद्यापन, शांति, संस्कार, इ. कर्मांच्या वेळीं स्थंडिलावर अग्निस्थापना करून हवन वगैरे कर्में केलीं जातात. या विधीचें जें तंत्र त्याला अग्निमुख असें म्हणतात. कोणतेंहि साग्निक कर्म म्हटलें, की त्याचें तंत्र एकच असतें. देवता, हविर्द्रव्य व मंत्र तेवढे, त्या त्या कर्माला अनुसरून भिन्न असतात. अग्निमुखाचें सामान्य तंत्र पुढीलप्रमाणे—

अग्निस्थापनेच्या जागीं स्थंडिल म्हणजे मातीचा चौकोनी ओटा तयार करतात. 'इषुमात्रावरं सर्वतः स्थंडिलमुपलिप्य (= कमींत कमी बाणाच्या लांबीइतक्या चारी बाजू असतील, असें स्थंडिल करावें), असें आश्व. गृह्यसूत्रांत सांगितलें आहे. (१.३.१). सत्याषाढ सूत्रांत (१८. १) त्याची चौरस लांबी एक हात किंवा खांद्यापासून बोटापर्यंत भरेल एवढी असावी, असें म्हटलें आहे. तें चार बोटें उंच करतात. त्यावर 'ब्रह्मा यमश्च सोमश्च रुद्र ईशशतक्रतूः' या पंक्तींत सांगितल्याप्रमाणे सहा देवतांसाठी सहा रेघा समिधेने ओढतात. त्यावर लौकिकाग्नीची स्थापना करतात. प्रत्येक कर्मांत या अग्नीचें नांव भिन्न असतें—

सभ्यनामा तु चौले स्याद् व्रतादेशे समुद्भवः ।
गोदाने सूर्यनामाग्निर्विवाहे योजकः स्मृतः ।।
आवसथ्ये द्विजो ज्ञेयो वैश्वदेवे तु रुक्मकः ।
देवानां हव्यवाहश्च पितृणां कव्यवाहनः ।।

अर्थ – चौलाच्या अग्नीला सभ्य, उपनयनाच्या समुद्भव, गोदानाच्या सूर्य, विवाहाच्या योजक, वास्तुशांतीच्या द्विज, वैश्वदेवाच्या रुक्मक, देवांच्या हव्यवाह व पितरांच्या अग्नीला कव्यवाहन अशीं नांवें आहेत.

अग्निस्थापना व ध्यान झाल्यावर देवतांचें अन्वाधान करतात. यांत त्या त्या कर्माच्या देवतेसाठी सांगितलेलें हविर्द्रव्य व त्याची आहुतिसंख्या यांचा निर्देश होतो. अग्नीच्या भोवती परिसमूहन (पाणी फिरविणें) करून दर्भांचीं परिस्तरणें घालतात. हे दर्भ पूर्व-पश्चिमेस उत्तरेकडे अग्रें करून व दक्षिण-उत्तरेस पूर्वेकडे अग्रें करून घालतात. दक्षिणेस ब्रह्म्यासाठी आसनाचा दर्भ टाकतात. अग्नीच्या उत्तरेस दर्भ पसरून त्यांवर कर्मासाठी लागणारीं पात्रें व एकवीस समिधांची जुडी या स्वरूपांत इध्मा व बर्हि (दर्भांची जुडी) असें सर्व मिळून पात्रासादन (पात्रांची मांडणी) करतात. मग ब्रह्मा आपल्या आसनावर बसतो. दोन साग्र दर्भांचें प्रादेशमात्र पवित्रक करून तें प्रणीता नांवाच्या पात्रावर ठेवून त्यांत पाणी घालतात. पवित्रकाने त्या जलाचें उत्पवन करून (वर उडवून) तें पात्र अग्नीच्या उत्तरेस ठेवतात. दुसऱ्या एका पात्रांत जल शुद्ध करून त्याने सर्व पात्रांचें प्रोक्षण करतात. दर्वी व स्रुची यांचें संमार्जन करतात. आज्य पात्रांत तूप घालून तें अग्नींतून बाहेर काढलेल्या निखाऱ्यावर तापवितात. दर्भ पेटवून तीन वेळां त्याच्या भोवती फिरवितात. मग तें आज्य अग्नीच्या पश्चिमेस बर्हीवर ठेवतात. पूर्व बाजू वगळून स्थंडिलाच्या बाकीच्या तीन बाजूंस परिधि घालतात व परिषेक करतात. इध्म्यावर आज्य टाकून त्याचा होम करतात. आघारसंज्ञक दोन आहुती वायव्येकडून आग्नेयीकडे व नैर्ऋत्येकडून ईशान्येकडे अशा क्रमाने देतात. चक्षुषीसंज्ञक दोन आहुती देतात. नंतर व्याहृति होम करून त्या त्या कर्माच्या देवतांच्या उद्देशाने प्रधान होम करतात. प्रधान होमानंतर अंगयाग संज्ञक आज्याहुती देतात. जय, अभ्यातान, राष्ट्रभृत् या नांवाचे होम स्विष्टकृतापूर्वी करावे, असें सत्याषाढ सूत्रांत सांगितलें आहे. (१९.१.५०). प्रधान होमासाठी जीं हविर्द्रव्यें असतील, त्या सर्वांतला थोडा अंश घेऊन स्विष्टकृताची आहुति देतात. इतर आहुतींशीं तिचा संसर्ग होऊं द्यायचा नसतो. इध्म्याला बांधलेल्या दर्भाच्या दोरीचा होम करतात. परिस्तरणांतले कांही दर्भ घेऊन त्यांना आज्य लावून त्यांचा होम करतात. भूमिस्पर्श करून हात धुतात. अग्नीभोवतालच्या तीनहि परिधींचा होम करतात. उत्तर परिषेक करून प्रणीतेचा विमोक करतात. ब्रह्म्याला दक्षिणा देतात. शांति किंवा व्रतोद्यापनें इ. कर्मांत प्रधान देवतांना व क्षेत्रपालाला बलिदान करतात. मग अग्नीची पूजा व प्रार्थना करून कर्म संपवितात. विवाह, उपनयन, इ. संस्कारांत यजमान स्वतः अग्निमुख करतो. त्या त्या संस्काराचे विशिष्ट विधि अग्निमुखाच्या तंत्रामध्येच करायचे असतात. ग्रहमख, स्वाहाकार, इ. मोठ्या अनुष्ठानांत यजमानाने वरलेला आचार्य हें कर्म करतो. आहुतींच्या संख्येनुसार अग्निकुंडाचें प्रमाणहि

कमीअधिक असतें. कर्मानंतर आचार्याला दक्षिणा देणें व ब्राह्मण भोजन घालणें या गोष्टी करतात. [विद्याधरशास्त्री भिडे]

अग्निमूर्ति मूर्तिकलेंत अग्नि वयोवृद्ध दाखवितात. त्याच्या-भोंवती तेजोवलय असतें. तो बसलेला असल्यास त्याला कमलाचें किंवा अर्धचंद्राचें आसन असतें. हेमाद्रीने त्याचें मूर्तिध्यान पुढीलप्रमाणे सांगितलें आहे––

रक्तं जटाधरं वह्निं कारयेद्धूम्रवाससम् ।
ज्वालामालाकुलं सौम्यं त्रिनेत्रं श्मश्रुधारिणम् ।।
चतुर्बाहुं चतुर्दंष्ट्रं देवेशं वायुसारथिम् ।
चतुर्भिश्च शुकैर्युक्ते धूमचिन्हरथे स्थितम् ।।
वामोत्सङ्गगता स्वाहा शक्रस्येव शची भवेत् ।

(च. व. चिं.)

अर्थ – रक्तवर्ण, जटाधारी, धूम्रवस्त्र नेसलेली, ज्वालांच्या मालांनी वेष्टित, सौम्य, त्रिनेत्र, श्मश्रुधारी, चार हातांची, चार दाढांची, चार पोपट जोडलेल्या धूमध्वज रथांत बसलेली, वायु सारथी असलेली आणि इंद्राच्या शचीप्रमाणे ज्याच्या वामांकावर स्वाहा ही भार्या बसली आहे, अशी अग्निमूर्ति करावी.

अग्नियुत स्थौर सूक्तद्रष्टा. अग्नियूप असाहि पाठभेद आहे. 'तुझीं तेजस्वी आयुधें पाजळून तूं दुष्ट जादूगारांचीं अभेद्य नगरें उलथून पाड,' अशी याने इंद्राला प्रार्थना केली आहे (ऋ. १०.११६).

अग्निलिंग याच्या मधून महेश्वराने लिंगपुराण सांगितलें (मत्स्य पु. ५३.३७.८).

अग्निवेश आयुर्वेदाचा आचार्य. भागवतांत याला देवदत्ताचा पुत्र व अग्नीचा अवतार म्हटलें आहे. (९.२ २१–२२) याला अलौकिक प्रतिभावान् असें म्हटलें आहे. आत्रेय पुनर्वसु हा याचा गुरु होय. त्याच्या सर्व शिष्यांत हाच कुशाग्रबुद्धीचा होता. चरकसंहितेंत त्याच्या विषयीं म्हटलें आहे–

बुद्धेर्विशेषस्तत्रासीन्नोपदेशान्तरं मुनेः ।
तन्त्रस्य कर्ता प्रथममग्निवेशो यतोऽभवत् ।

(सू. १.१)

अर्थ – मुनि पुनर्वसु याच्या उपदेशांत भेद नव्हता. पण बुद्धीच्या विशेषत्वामुळे सर्व तंत्रकर्त्यांत अग्निवेश हा पहिला ठरला.

याने आयुर्वेदाचे तंत्र रचलें तें अग्निवेशतंत्र या नांवाने प्रसिद्ध आहे. हें अष्टांगात्मक असूनहि कायचिकित्साप्रधान आहे. त्यावरूनच पुढें चरकाने अधिक संशोधन करून चरकसंहिता लिहिली. चरकाने प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं 'इत्यग्निवेशकृते तन्त्रे चरकप्रतिसंस्कृते' अशी या गोष्टीची नोंद करून ठेविली आहे.

तैत्ति. प्रातिशाख्यावरून कळतें, की कृष्ण यजुर्वेदाची एक अग्निवेशसंहिताहि होती. पण आज मितीस ती उपलब्ध नाही तिचें एक कल्पसूत्रहि होतें. त्याचा एक भाग आग्निवेश्य गृह्यसूत्र हा प्रकाशित झाला आहे. [वै. वि.; आयुर्वेदका इतिहास – भगवद्दत्त]

अग्निवेश्य (१) देवदत्ताचा पुत्र. जातुकर्ण्य व कानीन अशीं याचीं अन्य नांवें आहेत. हा अग्नीचा अवतार व तपोबलाने ब्राह्मण झालेला ऋषि होता. अग्निवेश्यायन नांवाच्या ब्राह्मणांतल्या एका कुलाचा हा उत्पादक आहे (भाग. पु. ९. २. २१ ते २२).

(२) अगस्त्याचा शिष्य. द्रोण व द्रुपद यांचा गुरु. याचा आश्रम प्रयागक्षेत्रांत होता (म.भा. आदि. १५१; भाग. पु.९.२).

अग्निव्रत फाल्गुन शु. ४ थीस प्रारंभ. वासुदेवपूजा. व्रतावधि एक वर्ष. [विष्णु ध. ३. १४३. १–७]

अग्निशिर एक तीर्थ. हें काम्यक वनाच्या उत्तरेस आहे. इथे संजय नांवाच्या राजाने शम्याक्षेप नांवाचा यज्ञ केला होता. भरतानेहि इथे १४८ यज्ञ केले, अशी कथा आहे. [म. ज्ञा. को.]

अग्निष्टुत सोमयागाचा एक विकार. या यागांत त्रिवृत नामक स्तोत्रपद्धतीने अग्नीचें स्तवन केलें जातें. अनुष्ठानाचा विधि सामान्यपणे अग्निष्टोमासारखाच आहे. पापभोजन व अभक्ष्यभक्षण या दोषांच्या निवृत्तीसाठी आणि कामनांच्या सिद्धीसाठी हा याग केला जातो. [विद्याधरशास्त्री भिडे]


अग्निष्टोम हा सोमयागाचा एक प्रकार आहे. याचा उगम ब्रह्मदेवाच्या पहिल्या मुखापासून झाला (ब्रह्मांड पु. २. ८. ५०; वायु पु. ९. ४९). अग्निष्टोम ही सर्व सोमयागांची प्रकृति आहे. हा एकाह यज्ञ आहे. या यागांत अग्नीचा स्तोम म्हणजे स्तुति असल्यामुळे किंवा शेवटचें स्तोत्र अग्नीला उद्देशून असल्यामुळे याला हें नांव मिळालें आहे. हा याग वसंत ऋतूंत करतात. याची आरंभक अशी दीक्षणीयेष्टि पूर्णिमा,

अमावास्या किंवा प्रतिपदा यांपैकी एखाद्या तिथीस करायची असते. या यागाच्या अनुष्ठानाचा क्रम पुढीलप्रमाणे आहे--

आरंभ-- गार्हपत्याच्या पश्चिमेस बसून यजमानदंपती प्रधान संकल्प करतात. नंतर यजमान सोमप्रवाक नांवाच्या एका ऋत्विजाची निमंत्रक म्हणून योजना करतो. मग सोमप्रवाक ब्रह्मा, होता, अध्वर्यु, इ. १६ किंवा १७ ऋत्विजांना यागासाठी बोलावणें करतो. ऋत्विक्‌मंडळी घरीं आल्यावर यजमान मधुपर्कविधीने त्यांची पूजा करतो. मग यजमान राजाकडे देवयजनाची (यज्ञभूमि) याचना करतो. मग अरणींच्या ठिकाणीं अग्नीचें समारोपण करून यजमान ऋत्विजांसह अरणी आणि यज्ञसामग्री घेऊन देवयजनांत प्रवेश करतो.

यज्ञभूमीच्या ठिकाणीं प्रथम प्राग्वंश नांवाचा मंडप उभारला जातो. याच्या आच्छादनाचे वंश (कळक) पूर्वेस अग्रें करून घातलेले असतात. म्हणून या मंडपाला प्राग्वंश किंवा प्राचीनवंश असें म्हणतात व या मंडपाची लांबी पूर्व-पश्चिम १६ प्रक्रम व रुंदी दक्षिणोत्तर १२ प्रक्रम असते. चारी दिशांना चार व ईशान्य कोपऱ्यांत एक, अशीं याला पांच दारें ठेवतात. मंडप कूड घालून सर्व बाजूंनी बंदिस्त करतात.

दीक्षणीयेष्टि--प्राग्वंशांत कुंडें व वेदि घालून त्यांत अरणिमंथनांतून उत्पन्न केलेल्या अग्नीची स्थापना करतात. नंतर आज्यसंस्कार, कूष्मांड होम, इ. विधि होतात. त्यानंतर दीक्षणीयेष्टीला प्रारंभ होतो. यागकालांत यजमानदंपतीला विशिष्ट नियमांचा अंगीकार करावा लागतो, त्याला दीक्षा म्हणतात. दीक्षेसंबंधीची इष्टि ती दीक्षणीयेष्टि होय. या इष्टींत अग्नाविष्णू या देवतेच्या उद्देशाने पुरोडाशाचें हवन होतें. तें अनुष्ठान संपल्यावर यजमान प्राग्वंश मंडपाच्या उत्तरेस एका बंदिस्त जागीं क्षौर करून घेतो व हातापायांचीं नखें काढून घेतो. क्षौर वगळून बाकीचे नखें काढणें वगैरे विधि यजमानपत्नीलाहि करावे लागतात. मग यजमान स्नान व आचमन करतो. मग अध्वर्यु यजमानदंपतीला नवीं रेशमी वस्त्रें देतो. तीं परिधान केल्यावर उभयतां हविष्यान्नाचें भोजन करतात. अंगास लोणी माखतात. डोळ्यांत काजळ घालतात. दर्भांकुरांनी आपल्या शरीरावर पवन नामक संस्कार करून घेतात. हिला अप्सुदीक्षा म्हणतात.



कृष्णाजिन

नंतर अध्वर्यु यजमानाला व प्रतिप्रस्थाता यजमानपत्नीला मंडपांत आणून नियमित जागीं बसवितो दीक्षाहुती दिल्या जातात. यजमान कृष्णाजिनावर बसून कमरेला मोळाची तिपेडी दोरी गुंडाळतो. डोक्यास पागोटें गुंडाळून अंग खाजविण्यासाठी एक मृगशृंगाचा तुकडा व हातीं औदुंबर दंड घेतो. यजमानपत्नी डोक्याला रेशमी जाळी घालते. नंतर यजमान आपल्या मुठी वळतो. मग अध्वर्यु अमक्याचा व अमकीचा पुत्र, नातू व पणतू असा अमुक नांवाचा यजमान सोमयाग करीत असल्याचें वृत्त सर्वांना प्रकट करतो. दुपारीं दीक्षाविधि झाल्यापासून रात्रीं नक्षत्रें दिसेपर्यंत यजमानाला मौन पाळावें लागतें.




औदुंबर दंड



मृगशृंग


प्रायणीयेष्टि--दुसऱ्या दिवशीं प्रायणीयेष्टि होते. पथ्यास्वस्ति, अग्नि, सोम, सविता व अदिति या पांच प्रायणीयेष्टीच्या प्रधान देवता होत. पहिल्या चारांसाठी आज्याचें व अदितिसाठी चरूचें हवन करतात. हें अनुष्ठान संपल्यावर मग सोमक्रयाचा विधि सुरू होतो.

सोमक्रय-- हा सोमवल्ली विकत घेण्याचा विधि असतो. सोम कुत्सगोत्री ब्राह्मणाकडून किंवा शूद्राकडून विकत घेतात. नंतर सोमराजाला (सोमवल्ली) शकटावर (गाड्यांत) घालून मंडपाच्या द्वारांत आणतात. सुब्रह्मण्य ऋत्विज् तो गाडा हांकण्याचें काम करतो. सोमराजाला भेट म्हणून एक बोकड पुढे करतात. मग त्याच्या आतिथ्यासाठी आतिथ्येष्टि होते. प्रथम सोमराजाला प्राग्वंश मंडपांत आहवनीयाच्या दक्षिणेस उंबराची घडवंची मांडून तिच्यावर अधिष्ठित करतात. मग आतिथ्येष्टीचें काम पुढे चालू होतें.



सोमशकट

आतिथ्येष्टि—विष्णु ही या इष्टीची प्रधान देवता होय. तिच्या उद्देशाने नऊ कपालांवर तयार केलेल्या पुरोडाशाचें हवन करतात. मग सगळे ऋत्विज तानूनप्त्र नांवाचा विधि करतात. या विधींत काशाच्या वाटीमध्ये ठेवलेल्या तुपाला स्पर्श करून सगळे ऋत्विज शपथ घेतात, की 'आम्ही एकोप्याने व प्रमादरहित असें यागानुष्ठान करूं.' मग यजमानासह सर्व ऋत्विज सोमावर आप्यायन नामक संस्कार करतात. नंतर प्रवर्ग्य अनुष्ठान होतें. एकावर एक अशीं तीन बोळकीं ठेवल्याप्रमाणे एक मृत्तिकापात्र तयार करतात. त्याला महावीर म्हणतात. तें मातीच्या एका ओटयावर ठेवून त्यांत तूप ओततात व भोवती अग्नि प्रज्वलित करतात. तूप तापलें, की त्यांत गायीचें व शेळीचें दूध ओततात. या दुग्धमिश्रित तुपाला घर्म म्हणतात. घर्म उतू गेल्यावर त्याचें हवन करतात. या अनुष्ठानांत होता हा ऋत्विज् प्रसंगानुरूप विशिष्ट मंत्र म्हणतो व प्रस्तोता सामगायन करतो.




महावीर

उपसदिष्टि—वरील अनुष्ठान संपल्यावर ही इष्टि होते. अग्नि, सोम व विष्णु या हिच्या प्रधान देवता होत. त्यांच्या उद्देशाने आज्याहुती देतात. प्रवर्ग्य व उपसद् हीं दोन्ही कृत्यें सकाळीं व दुपारीं अशीं तीन दिवस रोज दोनदा करायचीं असतात. मधल्या (दुसऱ्या) दिवशीं सोमयागासाठी महावेदि तयार करतात. तिसऱ्या दिवशीं प्रवर्ग्योद्वासन या अनुष्ठानाला प्रारंभ होतो.

प्रवर्ग्योद्वासन—प्रवर्ग्याची सर्व सामग्री घडवंचीवर ठेवून ऋत्विक्‌मंडळी यजमानदंपतीसह उत्तरवेदीकडे येतात. मधे टप्प्या-टप्प्यावर प्रस्तोता सामगायन करतो. सर्व सामग्री उत्तरवेदीवर चक्राकार मांडतात. मग तिच्यावर दही व मध ओततात. आग्नीध्र ऋत्विज् खांद्यावर जलकलश घेऊन त्याची धार ओतीत उत्तर वेदीभोवती तीन प्रदक्षिणा करतो. एवढें झाल्यावर हें अनुष्ठान समाप्त होतें.

मंडपनिर्माण—आहवनीय अग्नि प्रज्वलित करून उत्तरवेदीकडे नेतात. हविर्धान संज्ञक दोन गाडे उत्तरवेदीच्या मागें आणून ठेवतात. नंतर हविर्धानमंडप तयार करतात. महावेदीच्या अर्धभागीं उत्तरेस आग्नीध्रीय मंडप, दक्षिणेस मार्जालीय मंडप व पश्चिमेस सदोमंडप असे तीन मंडप तयार करतात. सदोमंडपाच्या मध्यभागीं औदुंबरी नांवाची एक उंबराची मेढ विधिपूर्वक पुरतात. चात्वालांतून माती उकरून तिने सदोमंडपांत टीचभर व्यासाचे चौरस अथवा वर्तुळ असे सहा ओटे हाता-हाताच्या अंतराने घालतात. त्याचप्रमाणे आग्नीध्रीय मंडपांत एक व मार्जालीय मंडपांत एक असे आणखी दोन ओटे घालतात. यांना धिष्ण्य म्हणतात. नंतर अग्नीचें अन्वाधान होऊन अग्नीषोमीय पशूच्या मुख्य अनुष्ठानास प्रारंभ होतो. पात्रासादन व आज्यग्रहण झाल्यानंतर ब्रह्मा सोमराजाला उचलून घेतो. मग वैसर्जन होम होतो.




आसंदी–घडवंची

अग्नीषोमप्रणयन—अग्नि आग्नीध्रीय मंडपांत ठेवतात व सोमराजाला हविर्धान मंडपांत नेऊन ठेवतात. हेंच अग्नीषोमप्रणयन होय. मग अग्नीषोमीय पशु बांधण्यासाठीं यूप नामक स्तंभ उभारतात पशु म्हणजे बोकड होय. नंतर त्याचें उपाकरण (समर्पण) करण्याचा विधि होतो. पशूला मारून त्याचें पोट फाडतात. व वपा नांवाचा कोठयाला चिकटून बसलेला कागदासारखा पापुद्रा बाहेर काढून त्याचें हवन करतात. मग सुब्रह्मण्य ऋत्विज् इंद्राच्या निमंत्रणासाठी सामगान करतो. अध्वर्यु पाण्याची एक घागर भरून आणून शालामुखीय अग्नीच्या पश्चिमेस ठेवून देतो. या जलाला वसतीवरी अशी संज्ञा आहे. या जलाचा उपयोग दुसऱ्या दिवशीं सोम कुटण्यासाठी वगैरे होतो. त्या रात्रीं यजमान आग्नीध्रीय मंडपांत जागत राहून सोमाचें रक्षण करतो. पत्नी प्राग्वंशांत जागी राहते. प्रतिप्रस्थाता मित्रावरुणांना पयस्या देण्यासाठी त्या रात्रीं गाईचें दूध काढतो. तें दूध विरजण्यांत येतें. दुसऱ्या दिवशीं भल्या पहाटे सोमयागाच्या मुख्य अनुष्ठानास प्रारंभ होतो. या दिवसाला सुत्याह असें म्हणतात.

प्रातःसवन—अध्वर्यु प्रथम आग्नीध्रीयांतील अग्नीवर यज्ञतनु संज्ञक ३३ आज्याहुती देतो. खर नामक ओटयावर सोमरस सांठवण्याचे ग्रह (पेले) मांडून ठेवतात. सोम कुटायचे बत्ते जुळवून ठेवतात. होता प्रातरनुवाक संज्ञक मंत्रसमूह पठन करतो. ब्रह्मा मौन पाळतो. मग अध्वर्युसह चार ऋत्विज अधिषवण चर्मावर सोमवल्ली कुटून तिचा रस काढतात. तो दशापवित्र संज्ञक लोकरी फडक्यांतून गाळून घेतात. विविध

देवतांच्या उद्देशाने ग्रह भरून घेतात. नंतर अध्वर्यु, प्रस्तोता, इ. ऋत्विज एकमेकांना स्पर्श करून विप्रुड्ढोम संज्ञक कर्म करतात. चात्वालाशेजारीं प्रस्तोता, प्रतिहर्ता, इ. ऋत्विज बहिष्पवमान संज्ञक सामगान करतात. दुसऱ्या व तिसऱ्या



वाजिन सदस्य आग्नीध्र (चमस)

सवनामध्ये अनुक्रमें माध्यंदिन आणि आर्भव किंवा तृतीय पवमान गातात. मग पुरोडाशादि हविर्द्रव्यें सुशोभित करतात. आहवनीय, आग्नीध्रीय व मार्जालीय अग्नींना सोमाहुती देतात. अश्विनौसाठी ग्रह भरून ठेवला जातो. नंतर सवनीय पशूचें अनुष्ठान सुरू होतें. पशुहनन करून वपायागापर्यंत सर्व अनुष्ठान झाल्यावर सर्व ऋत्विज आपापल्या स्थानीं येऊन बसतात. शमिता (पशु मारणारा) ऋत्विज् अध्वर्यूच्या आज्ञेने पशूचीं निरनिराळीं अंगें शामित्र शाळेंत (पशू मारण्याची जागा) अग्नीवर शिजत ठेवतो. पुरोडाशादि पांच द्रव्यांचें हवन होतें. अध्वर्यु व प्रतिप्रस्थाता हे इंद्रवायू, मित्रावरुण व अश्विनौ या जोडदेवतांच्या उद्देशाने द्विदेवत्यसंज्ञक सोमपात्रांतील सोमाचें यजन करतात. नंतर शुक्रामंथिप्रचार हें कर्म सुरू होतें. यांत अध्वर्यु शुक्र नामक ग्रह, प्रतिप्रस्थाता मंथि नामक ग्रह व चमसाध्वर्यू नांवाचे दुय्यम ऋत्विज सोमरसाने भरलेले चमस घेऊन त्यांतील सोमाचें हवन करतात. मग अवशिष्ट सोमरसाचें प्राशन व इडाभक्षण करतात. मग अध्वर्यु अच्छावाक नांवाच्या ऋत्विजाच्या हातीं पुरोडाश शकल देतो. तो कांही मंत्रसंघांचें पठण करतो. नंतर सोमरस चमसाचें अध्वर्यु हवन करतो. मग ऋतुयाग करतात. यांत



आश्विनग्रह शुक्रग्रह

अधिकमासासह तेरा महिने व सर्व ऋतु यांच्या उद्देशाने सोमाचें हवन होतें. इंद्राग्नीसाठी सोमग्रह भरून ठेवला जातो. त्या वेळीं होता शस्त्र संज्ञक मंत्रसंघ विशिष्ट पद्धतीने म्हणतो. सोमरसाचें हवन होतें. असे आणखी कांहीं विधी झाल्यावर अध्वर्यु सवनप्रायश्चित्तांच्या आहुती घालतो. मग मैत्रावरुणाची 'सर्पत' (बाहेर चला) अशी आज्ञा होतांच सर्व ऋत्विज सदोमंडपांतून बाहेर पडतात व प्रातःसवनाचें अनुष्ठान समाप्त होतें.

माध्यंदिनसवन—हें अनुष्ठान बरेंचसें प्रातःसवनाप्रमाणेच असतें. द्विदेवत्ययाग, ऋतुग्रहयाग वगैरे कांही कृत्यें या सवनांत वर्ज्य असतात. प्रथम विप्रुड्ढोम झाल्यावर ऋत्विज सदोमंडपांत प्रवेश करतात. मग दधिघर्मप्रचार, पुरोडाशयाग, शुक्रामंथिप्रचार हीं कर्में झाल्यावर दाक्षिणात्य होम करतात. अध्वर्यूला यजमान, त्याला पत्नी व तिला कुटुंबांतील माणसें अन्वारंभ (हस्तस्पर्श) करतात. मग सर्वांच्या वरून वस्त्र आच्छादितात. अध्वर्यु दाक्षिणात्य अर्थात् दक्षिणांगभूत होम करतो. मग दक्षिणा देण्यास प्रारंभ होतो. अत्रिगोत्रांतल्या ब्राह्मणाला सर्वांत आधी सुवर्ण दक्षिणा दिली जाते. मग सर्व ऋत्विजांना दक्षिणा देतात. सोमयागांतली दक्षिणा सात, एकवीस, साठ, शंभर, एकशें बारा, हजार किंवा अगणित अशा गायी किंवा मोठ्या मुलाचा हिस्सा वगळून बाकीची सर्व संपत्ति एवढी असते. याशिवाय अन्य पशू व वेगवेगळीं धान्येंहि दक्षिणा म्हणून देतात. दक्षिणेचा एक चतुर्थांश अध्वर्यु आणि त्याचे मदतनीस यांना मिळतो. बाकीच्यांचे वांटे त्याहून कमी असतात. आग्नीध्राला प्रथम आणि प्रतिहर्त्याला शेवटीं दक्षिणा मिळते. प्रतिहर्त्याला दक्षिणा देऊन झाल्यावर दक्षिणेचें द्वार बंद होतें. मग कोण्याहि याचकाला कांहीहि दिलें जात नाही.

मग वैश्वकर्मण होम, मरुत्वतीययाग, अतिग्राह्यप्रचार, उक्थ्यप्रचार, या कृत्यांत सोमहवन करून सवनप्रायश्चित्तें घातल्यावर माध्यंदिनसवनाचें अनुष्ठान समाप्त होतें.

तृतीयसवन—प्रथम हविर्धान मंडपाचीं द्वारें बंद करतात. मग आदित्य देवतेसाठी सोमाचें हवन होतें. नंतर अध्वर्युप्रमुख चार ऋत्विज प्रातःसवनाप्रमाणेच सोम कुटून त्याचा रस गाळतात. एका कलशांत सोमरस भरून ठेवतात, त्याला पूतभृत् म्हणतात. यजमानदंपती त्यांत आशिर (घुसळलेलें दही) मिसळतात. मग मधलीं सर्व कृत्यें झाल्यावर पाशुक अनुष्ठान सुरू होतें. शमित्याने शिजविलेल्या



पूतभृत्

पशूच्या विविध अंगांचें अध्वर्यु हवन करतो. मग सवनीय पुरोडाशाचा याग, सोमरसाचें यजन, इडाभक्षण, कपालविमोचन, सवनमुखभक्षण, हीं कृत्यें होतात. मग यजमानासह सर्व ऋत्विज

पितृत्रयीच्या उद्देशानें पिंडदान करतात. मग सोमदेवतेसाठी चरु (भात) शिजवितात व त्याचें हवन करतात. मग त्या चरुस्थालींत तूप ओतून अध्वर्यु त्यांत आपल्या मुखाचें अवलोकन करतो. मग आणखी कांहीं कृत्यें झाल्यावर उद्गाताप्रभृति सामगायक अग्निष्टोम नामक सामाचें गायन करतात. सवनीय पशूचें अनुष्ठान संस्राव होमापर्यंत केलें जातें. मग उन्नेता हारियोजन याग करतो. सर्व ऋत्विज आग्नीध्रीय मंडपांत जाऊन दह्यावरची साय भक्षण करतात. सर्व चमसांत पाणी व दूर्वा घालून ठेवतात. आहवनीयाचें उपस्थान करून सर्व ऋत्विज त्यामध्ये सात सात समिधा देतात. मग एकमेकांचा हात धरून उभे राहतात व सख्यविसर्जन अर्थात् यज्ञासंबंधानें केलेल्या ऐकमत्याच्या प्रतिज्ञेचें विसर्जन करतात.

नंतर अध्वर्यु पत्नीसंयाज करतो. प्रायश्चित्ताच्या आहुती देऊन ध्रौवाज्याची समाप्ति करतो. मग समिष्टयजु होम, प्रणीताविमोक व उपवेषनिरसन हीं कृत्यें केलीं जातात. औदुंबरी (मेढ) उपटून चात्वालावर टाकतात. सूर्याचें उपस्थान करतात. सवनीय प्रायश्चित्तें घालतात. मग 'सर्पत' अशी आज्ञा झाल्यावर सर्वजण सदोमंडपांतून बाहेर पडतात. इतकें झाल्यावर तृतीयसवनाचें अनुष्ठान संपतें.

अवभृथ–मग अवभृथस्नानासंबंधीचें अनुष्ठान सुरू होतें. अन्वाधानापासून हविर्द्रव्याच्या निर्वापापर्यंत अनुष्ठान झाल्यावर वरुणासाठी पुरोडाशाचा निर्वाप करतात. तो तयार झाल्यावर महावेदीच्या जवळ आणतात. मग सोमलिप्त पात्रांसह सर्व यज्ञसामग्री चात्वालाजवळ आणून ठेवतात. प्रस्तोता सामगान करतो. मग यजमानदंपती व सर्व ऋत्विज अवभृथस्नानाला जाण्यासाठी मंडपाबाहेर पडतात. मधल्या टप्प्यावर सामगान होतें. सर्वजण नदीच्या किंवा जलाशयाच्या तीरावर जमतात. जलप्रवाह दिसतांच विशिष्ट मंत्र म्हटले जातात. पाण्यांत दर्भमुष्टि टाकतात. पाण्यांतच वरुणाला पुरोडाश अर्पण करतात. स्विष्टकृतापर्यंत अनुष्ठान झाल्यावर सोमवल्लीचा चोथा कातडें पसरलेल्या वडवंचीवर ठेवतात. विषमसंख्येचे मंत्र म्हणून मग तो चोथा स्रुचींत भरून पाण्यावर पालथा करतात. मग सर्वांचें स्नान होतें. यजमान आपली मेखला सोडून टाकतो. पत्नी आपलें योक्त्र विसर्जित करते. स्नानानंतर यजमानदंपती धूत वस्त्रें नेसतात. उन्नेता ऋत्विज् सर्व ऋत्विजांना जलाबाहेर काढतो. नंतर उन्नेत्याला पुढे करून व उंबराच्या समिधा हातीं घेऊन सर्वजण मागें जलप्रवाहाकडे न पाहतां परत यज्ञभूमींत येतात. आणलेल्या समिधा आहवनीय अग्नींत टाकतात. मग उपस्थान झाल्यावर अवभृथाचें अनुष्ठान समाप्त होतें.

नंतर प्रायणीया इष्टीप्रमाणेच उदयनीयेष्टि केली जाते. त्यानंतर मित्रावरुणांच्या उद्देशानें अनुबंध्यायाग प्राचीन काळीं होत असे. यांत वशा अर्थात् वांझ गायीचें हवन करीत. पण हें कृत्य कलिवर्ज्य मानलेलें असल्यामुळे अलीकडे तिच्याऐवजीं आमिक्षेचा याग करतात. मग देविकासंज्ञक देवतांचें यजन होतें. यजमान क्षौर करतो. स्नानानंतर वाजिनयाग होतो. आहवनीयांतला अग्नि एका परळांत घेऊन त्यावर वेदींतले कांहीं दर्भ जाळतात. त्या धुराचें अनुमंत्रण करतात. नंतर अध्वर्यु सक्तुहोम करतो. मग अरणींच्या ठिकाणीं अग्नीचा समारोप करतात. यजमान यज्ञस्थलांतून घरीं येतो. नंतर यज्ञभूमीच्या उत्तरेस निराळ्या विहारांत अग्निमंथन करून अग्निस्थापना करतात. त्यावर अग्नीच्या उद्देशानें उदवसानीया इष्टि करतात. ती न केल्यास पूर्णाहुति संज्ञक आज्याहुति देतात. [म. ज्ञा. को.; हि. ध.]

अग्निष्वात्त एक पितृगण. संख्या चौसष्ट हजार. यांची व्याख्या पुढीलप्रमाणे –– 'यानग्निरेव दहन् स्वदयति ते अग्निष्वात्ताः' = ज्यांना अग्नि जाळून भक्षितो, ते अग्निष्वात्त होत (श. ब्रा. २. ६. १. ७). हे दक्षिण दिशेस सोमपद नांवाच्या प्रदेशांत वास्तव्य करतात (भाग. पु. ४. १. ६३; विष्णु पु. १. १०. १८).

संध्या नामक आपल्या कन्येस पाहून ब्रह्मदेव मोहित झाला असतां त्याच्या घामांतून यांची उत्पत्ति झाली. स्वधा ही यांची पत्नी होय. कांहींच्या मते ते मरीचीचे वंशज असून अन्य कांहींच्या मते ऋतु म्हणजेच अग्निष्वात्त होत. यमपुत्र शंखाच्या सूक्तांत अग्निष्वात्तांना पुढील आवाहन आहे––

अग्निष्वात्ताः पितर एह गच्छत
सदः सदः सदत सुप्रणीतयः ।
अत्ता हवींषि प्रयतानि बर्हि–
ष्यथा रयिं सर्ववीरं दधातन ॥

(ऋ. १०. १५. ११)

अर्थ––हे अग्निष्वात्त पितरांनो, इथे आगमन करा. प्रशंसनीय मार्गानें पण प्रेमळपणानें वागणाऱ्या पितरांनो, आपापल्या आसनांवर अधिष्ठित होऊन, या कुशास्तरणावर ठेवलेले हविर्भाग सेवन करा आणि वीरांनी (पुत्र) परिपूर्ण असें वैभव आम्हांला द्या.

सांप्रत श्राद्धांत पितरांना कुशास्तरणावरच पिंडदान करतात. ही प्रथा वेदकालाइतकी प्राचीन असल्याचें वरील मंत्रावरून दिसतें.


पीवरी ही यांची मानसकन्या होय. तिचा विवाह व्यासपुत्र

शुकाशीं झाला (ब्रह्मांड पु. उ. ३. १०. ७५–८०). दुसरी मानसकन्या सेना ही हिमालयाची भार्या झाली (वायु पु. ३०. २७). हे इतर पितृगणांचे अधिपति होत. **पाहा**–पितृ समाज. [पु. इं.]

अग्निसमारोप संकटकालीं अग्नीचें रक्षण करणें अशक्य झाल्यास अथवा पति–पत्नी या उभयतांनाहि प्रवासाला जाणें असल्यास अग्नीचा समारोप करतात. ‘अयं ते योनिः’ या मंत्राने प्रथम होम करतात. नंतर अग्नीवर अरणि अथवा समिधा तापवून त्या वस्तूंत अग्नि आला असें समजतात. याचेंच नांव समारोप. प्रवासांत ही समिधा बरोबर घेतात व गांवाची सीमा किंवा नदी ओलांडतांना तिला स्पर्श करतात. परत स्वगृहीं आल्यावर मंथनाने अग्नि उत्पन्न करून अथवा श्रोत्रियाच्या घरचा आणून त्याची स्थापना करतात व ती समिधा अग्नींत टाकतात. समारोपाचा अवधि बारा दिवसांचा असतो. त्यापुढे काळ लोटल्यास अग्निविच्छेद झाला, असें समजतात. मग गृह्यसूत्रानुसार अग्नीचें पुनःसंधान करावें लागतें. **पाहा**–प्रत्यवरोहण; पुनःसंधान. [ध. सिं. तृ. प.]

अग्नि सौचिक सूक्तद्रष्टा. तीन हजार तीनशे तीस आणि नऊ इतक्या दिव्य विभूतींनी अग्नीची सेवा करून त्याला यज्ञसंपादक म्हणून त्या (आसना) वर अधिष्ठित केलें, असें हा सांगतो (ऋ. १०. ५२. ६).

अग्निस्तंभन यंत्र याचें विधान पुढीलप्रमाणे – पिवळचा द्रव्याने भूर्जपत्रावर दुहेरी चौकोन काढावा व त्याच्या चारी कोपऱ्यांवर प्रत्येकी दोन त्रिशूळ रेखाटावे. दुहेरी चौकोनाच्या आंत आणखी एक चौकोन काढून त्याच्या चारी दिशांना क्रों हें अक्षर लिहावें व त्या अक्षराच्या मध्यभागीं सिद्धि प्राप्त करून घेऊं इच्छिणाऱ्या व्यक्तीचें नांव लिहावें. मधल्या चौकोनाच्या बाहेरच्या चारी कोपऱ्यांत लं हें अक्षर लिहावें. नंतर यंत्राची पूजा करून ब्राह्मणभोजन घालावें. मग हें यंत्र भूमींत पुरावें व त्यावरून वाहतें पाणी सोडावें. जोंपर्यंत हें पाणी वाहत राहातें, तोंपर्यंत अग्नीचें स्तंभन होतें. [यंत्रचिंतामणि]



अग्निस्तंभन यंत्र

अग्निहोत्र ‘यस्मिन् अग्नये होत्रं होमो भवति तदग्निहोत्रम्’ (= ज्या कर्मांत अग्नीला उद्देशून होम केला जातो तें कर्म म्हणजे अग्निहोत्र होय), अशी याची व्याख्या आहे (जै. सू. भाष्य १. ४. ४). अग्निहोत्र घेणें म्हणजे गार्हपत्य, आहवनीय व दक्षिणाग्नि या तीन अग्नींचें आधान करणें. याला अग्न्याधानविधि म्हणतात. ज्याने अग्न्याधान केलें असेल, त्याला आहिताग्नि म्हणतात. आहिताग्नीला रोज सकाळ–संध्याकाळ होम करावा लागतो. अग्न्याधानाचा अधिकार त्रैवर्णिकांनाच असला, तरी निषाद व रथकार यांनाहि आधान न करतां अग्निहोत्र करतां येतें, असें कांही सूत्रकार सांगतात. केवळ गार्हपत्य अग्नि नित्य ठेवावा व प्रत्येक कर्माच्या वेळीं दुसरे दोन अग्नि गार्हपत्यांतून काढून घेऊन सिद्ध करावे, असा प्रमुख पक्ष आहे. याला उद्धरणपक्ष म्हणतात. तीनहि अग्नि नित्य धारण करणें, या विकल्पाला अजस्रपक्ष म्हणतात. सकाळच्या होमासाठी पहांटेस अथवा सूर्य क्षितिजावर येतांक्षणीच उद्धरण करतात. सायंकाळीं दिन-रात्रींच्या संधिकालांत अथवा आकाशांत पहिला तारा दिसूं लागतां किंवा पहिल्या प्रहरीं उद्धरण करतात.

प्रथम अग्नि प्रदीप्त करून त्याच्या भोवती परिस्तरणें घालतात. पात्रासादन करतात. अग्निशाळेच्या दक्षिणेस गाय उभी करून तिची धार काढतात. तें दूध अग्नीवर तापवितात. यजमानाच्या अनुज्ञेने अध्वर्यु तें दूध चार स्रुवे भरून अग्निहोत्रहवणींत घेतो. प्रथम अग्नींत समिधा देतो व मग दुधाची आहुति देतो. सकाळच्या होमांत सूर्याचा व सायंकाळच्या होमांत अग्नीचा निर्देश करायचा असतो. मग गार्हपत्याची प्रार्थना होते. स्रुचींतल्या हवीचा अल्पांश पितरांसाठी दक्षिणेस टाकतात. यजमान उपस्थान करतो. अध्वर्यु अवशिष्ट दुधाचें प्राशन करतो. स्रुचींत पाणी घालून तें सर्प, पिपीलिका (मुंग्या), इ. क्षुद्र प्राण्यांना दिलें जातें. दुसऱ्यांदा घातलेलें पाणी अध्वर्यु यजमानपत्नीच्या हातावर ओततो. स्रुची अग्नीवर तापवून तिची वाफ सप्तर्षींना उद्देशून आकाशांत सोडतात. तीन्ही अग्नींच्या भोवती परिषेक करून अग्नींत इंधनें घालतात. अग्निहोत्री गृहस्थाने जर बराच काळ होम केला नाही, तर त्याला परत अग्न्याधान करावें लागतें. यजमानाने रोज अग्निहोत्र करावें, निदान पर्वदिवशीं तरी अवश्य करावें, असें सांगितलें आहे. अग्निहोत्र असतां यजमानाला एकट्याने प्रवासाला जाण्यास आडकाठी नाही. पण यजमानपत्नीला मात्र ग्रामसीमा ओलांडतां येत नाही. तिचा आणि अग्नीचा कधीहि वियोग होतां कामा नये. पत्नीला प्रवासाला न्यायचें असेल, तर अग्नीलाहि बरोबर न्यावें लागतें. तसें

करतांना अग्नीचा अरणींत समारोप करून ती बरोबर नेतात व इष्ट स्थळीं पोचल्यावर पुनश्च मंथन करून अग्नि निर्माण करतात. आपत्काळीं एकदम पंधरा दिवसांचे होम देतां येतात. 'मुखं वा एतद्यज्ञानां यदग्निहोत्रम्' (= अग्निहोत्र हें यज्ञाचें मुख होय), असें शतपथांत म्हटलें आहे (१४. ३. १. २९). भरताने अग्निहोत्र केल्याचा उल्लेख भागवतांत आहे (५.७.५). **पाहा** – अग्निहोत्रहोम, अग्न्याधान. [विद्याधरशास्त्री भिडे]

अग्निहोत्र – प्रातर्दन एक आध्यात्मिक कल्पना. मनुष्य बोलतो तेव्हा श्वासाचा निरोध होत असतो. याचा अर्थ तो आपल्या प्राणांचें वाचेंत हवन करतो. बोलणें थांबलें, की श्वास मोकळा होतो. म्हणजे वाणीचें प्राणांत हवन होतें. हीं दोन हवनें अनंत व अमर असून इतर कर्ममय हवनें नश्वर आहेत. याचा अर्थ आपल्या अंतर्यामीं अखंड अग्निहोत्र चाललेलें असतें असा आहे. हें ज्या विद्वानांना कळलें, ते लौकिक अग्निहोत्र पाळीत नाहींत (कौषि. उ. २. ५). या आंतर अग्निहोत्राचा शोध प्रतर्दनाने लावला, म्हणून त्याला प्रातर्दन अग्निहोत्र असें नांव पडलें. [उ. र.]

अग्निहोत्रहवणी यज्ञीय पात्रांतील एका स्रुचीचें नांव. ही वेकळीची करावी, असें सांगितलें आहे. अग्निहोत्रहोम या स्रुचीने करतात. हिच्यांत पवित्रकावरून



अग्निहोत्रहवणी

पाणी ओतून तें मंत्रांनी सिद्ध करतात. या पाण्यालाच प्रोक्षणी म्हणतात. त्यानेच अन्य पात्रांचें प्रोक्षण करायचें असतें. [विद्याधरशास्त्री भिडे]

अग्निहोत्रहोम अग्निहोत्र्याने नित्य सकाळीं आणि सायंकाळीं तीन्ही अग्नींच्या ठिकाणीं जो होम करायचा असतो, त्याला हें नांव आहे. याचा मुख्य हवि म्हणजे गायीचें दूध होय. तें न मिळाल्यास तांदूळ, तूप व दही, हीं द्रव्यें चालतात. विशिष्ट कामनेसाठी विशिष्ट द्रव्यें घेतात. पशुकामना असेल तर दूध, ओजाची कामना असेल तर तांदूळ, इत्यादि (तै. ब्रा २.१). हवनीय द्रव्याच्या दोन दोन आहुति सकाळीं सूर्य व प्रजापति यांना उद्देशून व सायंकाळीं अग्नि व प्रजापति यांना उद्देशून देतात. हा एकच मुख्य विधि अग्निहोत्र्याला नित्य आवश्यक आहे. शिवाय अग्नीजवळ उभें राहून दोन्ही वेळां कांही प्रार्थनामंत्रहि म्हणावे लागतात. या कर्माला उपस्थान अशी संज्ञा आहे.

हें उपस्थान झाल्यावर गृह, पशु, रात्रि आणि दिशा यांचेंहि उपस्थान यजमान करतो. अंतर्वेदींत बसून आपल्या संततीसाठी आशीर्वाद मागतो. उपस्थान सायंकाळींच करावें, की प्रातःकाळींहि करावें, यासंबंधी सूत्रकारांत मतभेद आहेत. महिन्याच्या पहिल्या पक्षांत अग्नीषोमाचें व दुसऱ्या पक्षांत इंद्राग्नीचें उपस्थान अन्य उपस्थानांबरोबर करायचें असतें. या होमाचा विधि यजुर्वेदांतच सांगितलेला आहे. यजमान क्षत्रिय असेल, तर त्याच्या घरीं फक्त पर्वदिवशींच होम होतो. क्षत्रियाच्या घरीं ब्राह्मणानेच होम करायचा असतो. **पाहा**— अग्निहोत्र. [विद्याधरशास्त्री भिडे]

अग्नौकरण श्राद्धाचा अंगभूत होम. श्राद्धांत ब्राह्मणाच्या हातावर किंवा अग्नींत जो चरूचा हविर्भाग देतात, तें कृत्य. [सं. कौ.]

अग्न्याधान अग्निहोत्र घेतेवेळीं हा विधि करतात. शमीच्या वृक्षावर वाढलेल्या अश्वत्थाच्या लाकडाच्या अरणी करून त्यांच्या घर्षणांतून प्रथम अग्नि उत्पन्न करतात. हा आग्नि तीन किंवा पांच ठिकाणीं स्थापणें हें अग्न्याधानांतलें प्रधान कर्म होय. या प्रसंगीं अध्वर्यु, ब्रह्मा, होता, उद्गाता व आग्नीध्र, असे पांच ऋत्विज नियोजित करतात. तीन अग्नि म्हणजे गार्हपत्य, दक्षिणाग्नि व आहवनीय हे होत. या तीन अग्नींत सभ्य व आवसथ्य या दोन अग्नींची भर पडली, की ते पांच अग्नि होतात. **पाहा** – अग्निहोत्र, पुनराधान.

अग्न्याधेय सात हविर्यज्ञांपैकी पहिला याग. हा याग दोन दिवस चालतो. पहिल्या दिवसाला उपवसथ असें नांव असून, त्या दिवशीं प्राथमिक गोष्टी करतात व दुसऱ्या दिवशीं मुख्य विधि करतात. कृत्तिका, रोहिणी, मृगशीर्ष, पूर्वाफल्गुनी, विशाखा, उत्तराभाद्रपदा, यांपैकी एका नक्षत्रावर किंवा वसंत ऋतु, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा, यांतल्या पर्वदिवशीं अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व उपकृष्ट यांनी अग्न्याधेय करावें, असें सांगितलें आहे.

विशिष्ट देशीं, विशिष्ट पुरुषाने मंत्र म्हणून गार्हपत्यादि अग्नींच्या उत्पत्तीसाठी आयतनांत निखारे ठेवणें, याला अग्न्याधेय असें नांव आहे. अरणी आणण्यापासून तों पूर्णाहुतीपर्यंतच्या सर्व क्रियांचा अग्न्याधानांत समावेश होतो. हें

केल्यावर यजमान आहिताग्नि होतो. सर्व यागांपूर्वी अग्न्याधान विहित आहे.

शमीवृक्षांतर्गत वाढलेल्या अश्वत्थ वृक्षाच्या अरणी अध्वर्यु आणतो. त्याचप्रमाणे वाळू, खारट माती, उंदराच्या बिळाची माती, इत्यादि सात प्रकारची माती; तसेंच अश्वत्थ, उदुंबर, शमी, इ. सात प्रकारचें लाकूडहि गोळा करतो.

यजमान एखादी उंच जागा देवयजन म्हणून निवडून तिथे मंडप घालतो. मंडपाच्या मध्यभागीं एका टोकाला गार्हपत्य अग्नीचें आयतन, तसेंच गार्हपत्याच्या पूर्वेला व आग्नेयीला अनुक्रमें आहवनीय व दक्षिण या अग्नींचीं आयतनें असतात. आहवनीयाच्या समोरच्या गृहांत सभ्य व आवसथ्य या अग्नींचीं आयतनें असतात.

यजमान व यजमानपत्नी रेशमी वस्त्रें नेसून अग्नीची प्रतिष्ठापना करतात. यजमान संकल्प करून ऋत्विजांचें वरण करतो व त्यांची मधुपर्कपूजा करतो. दुपारीं किंवा संध्याकाळीं अध्वर्यु औपासन अग्नींतून थोडा अग्नि घेऊन किंवा मंथनाने ब्राह्मौदनिक नामक अग्नि प्रज्वलित करतो. एक स्थंडिल तयार करून त्याच्यावर पूर्व-पश्चिम व दक्षिणोत्तर तीन तीन रेघा मारून त्यांवर औपासनाग्नींतून आणलेले निखारे ठेवतो. रात्रीं अध्वर्यु ब्राह्मौदनिक अग्नीच्या पश्चिमेला चार पात्रांत तांदूळ भरून ब्रह्मौदन शिजवितो. त्यांतील थोडा भाग ब्राह्मौदनिक अग्नीला अर्पण करतो. यजमान चार पात्रांत तो शिजविलेला भात ठेवून त्याच्यावर भरपूर तूप ओततो आणि तो भात ब्राह्मणांना देतो. उरलेल्या ओदनांत चित्रीय अश्वत्थाच्या तीन समिधा बुडवून त्या ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या नांवाने अग्नीला अर्पण करतात. मग यजमान अध्व ूला व ब्रह्मौदन भक्षण करणाऱ्या ब्राह्मणांना प्रत्येकी तीन कालवडी देतो. अग्न्याधेयापूर्वीं बारा, तीन, दोन किंवा एक दिवस चित्रीय अश्वत्थाच्या समिधा यजमानाने अग्नीला द्यायच्या असतात.

अग्न्याधेयाच्या आदल्या रात्रीं काळे ठिपके असलेला बकरा गार्हपत्याग्नि–आयतनाच्या उत्तरेला बांधतात. यजमान त्या रात्रीं मौन पाळतो व ब्राह्मौदनिक अग्नींत लाकडाच्या ढलप्या टाकीत राहतो. पहाटे अध्वर्यु दोन अरणी अग्नीवर तापवितो. नंतर ब्राह्मौदनिक अग्नि विझवितात. अध्वर्यु अरणी यजमानाकडे देतो व यजमान त्यांचें आवाहन करतो. अध्वर्यु अग्नींच्या आयतनांची रचना करून त्यांवर जलप्रोक्षण करतो. मग आयतनांवर वाळू पसरून तिच्यावर गारगोटी, लांकडी वस्तु, इ. संभार ठेवतो. अध्वर्यु ब्राह्मौदनिक अग्नीची राख बाजूला करून तिथे दोन अरणी ठेवतो व सकाळीं अग्नि उत्पन्न करतो. त्या वेळीं एक तांबडा किंवा पांढरा घोडा तिथे ठेवतात व शक्तिसांकृति हें साम गातात.

अग्नि उत्पन्न होतांक्षणींच अध्वर्यु ‘ उपावरोह जातवेदः ’ या मंत्राने त्याचें आवाहन करतो. यजमान चतुर्होतृ मंत्र म्हणतो. अध्वर्यु ढलप्या टाकून अग्नि प्रज्वलित करतो. रथंतर व यज्ञायज्ञीय हीं सामें गायिलीं जातात. या वेळीं तो संभारावर गार्हपत्य अग्नि ठेवतो व मंत्र म्हणतो. यजमान ‘ घर्मशिरस् ’ मंत्र म्हणतो. अध्वर्यु परिस्तरण करतो.

सकाळीं अर्धे सूर्यबिंब वर यायच्या आंत आहवनीयाग्नीची स्थापना करतात. अध्वर्यु गार्हपत्य अग्नीवर काटक्या पेटवितो आणि एका पात्रांत वाळू भरून त्यावर त्या ठेवतो. यजमान घोड्याच्या उजव्या कानांत अग्नितनु मंत्र म्हणतो. मग अध्वर्यु तो अग्नि आहवनीयाच्या आयतनांत स्थापन करतो. अग्नि स्थापन करतांना गोत्र व वर्ण यांप्रमाणे विधि वेगवेगळा असतो. आग्नीध्र गृह्याग्नि घेतो किंवा मंथन करून अग्नि उत्पन्न करतो आणि दक्षिणाग्नि स्थापन करतो. या वेळीं यज्ञायज्ञीय हें साम गातात.

आहवनीय अग्नि गार्हपत्य अग्नींतून एका पात्रांत घेतात. या वेळीं वामदेव्य साम गातात व घोड्याच्या मागून पूर्वेकडे जातात. ब्रह्मा विहाराच्या दक्षिणेला, रथ किंवा रथचक्र याचे तीन फेरे फिरवितो. अध्वर्यु घोड्याला संभारावरून चालायला लावतो व उजवा खूर असा ठेवायला लावतो, की प्रतिष्ठापना केल्यावर अग्नीचे निखारे त्या पावलावर पडावे.

सर्व अग्नींची प्रतिष्ठापना झाल्यावर मग पूर्णाहुति होते. अग्नींची पूजा केल्यावर यजमान ऋत्विजांना गाय, बैल, नवीन रथ, बकरा, पूर्णपात्र, घोडा, इ. वस्तु दक्षिणा म्हणून देतो. **पाहा -** अग्न्याधान. [हि. ध.]

अग्न्युत्तारण जिची स्थापना व पूजा करायची असते, अशा धातुमूर्तींतले दोष नष्ट होण्यासाठी तिला प्रथम ताम्रपात्रांत ठेवून तिच्यावर दूध व पाणी यांचा अभिषेक करतात. त्या वेळीं ‘ अग्निः सप्तिम् ’ इ. सूक्तें म्हणतात. [सं. कौ.]

अग्न्युत्सव पुरी येथील जगन्नाथाच्या मंदिरांत नित्य सर्व प्रथम अग्निपूजा आणि हवन होतें. जगन्नाथाचा नैवेद्य इथल्या यज्ञाग्नीवरच शिजतो. अग्निपूजेची ही प्रथा उत्कलाचा राजा महाभवगुप्त ययाति याने सुरू केली. तो अग्निपूजक होता. त्याच्या प्रेरणेने उत्कलांत अनेक यज्ञ झाले आणि ती प्रथा पुढें दोनशें वर्षेपर्यंत चालू राहिली.

यज्ञनगर नांवाचें एक स्थानहि उत्कलांत प्रतिष्ठित झालें. अग्निपूजा हें मोक्षाचें एकमेव साधन आहे, असा ययातीने प्रचार केला आणि त्याप्रमाणे आचरणहि केलें. ययाति आणि पादपद्माचार्य यांच्या प्रेरणेने, अनेक प्रचारक स्वतः अग्नि धारणा करून समग्र उत्कलांत अग्नीच्या उपासनेचा प्रचार करीत राहिले. हे लोक वड़ू या नांवाने प्रसिद्ध आहेत. ययातीच्या काळांत दर वर्षी माघ पूर्णिमेस अग्न्युत्सव नांवाचा एक उत्सव उत्कलांत साजरा होत होता. आजहि तो चालू आहे. हे लोक जगन्नाथाला यज्ञावतार समजतात. पाहा – जगन्नाथ. [कल्याण–भक्तिअंक]



अग्न्युत्सवमूर्ति

अग्यारी

पारशी लोकांची अग्निशाला. **पाहा** - आतश बेहेराम.

अग्रजन्मा

ब्राह्मणाची एक विशिष्ट संज्ञा. वर्णांमध्यें तो प्रथम झाला म्हणून किंवा अग्र = प्रधान अंग अर्थात् मुख; त्याच्यापासून झाला म्हणून ब्राह्मणाला अग्रजन्मा म्हणतात. 'ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्' अशी श्रुति आहे.

अग्निर्देवतानां ब्राह्मणो मनुष्याणाम्, तस्माद् ब्राह्मणो
मुखेन वीर्यं करोति, मुखतो हि सृष्टः

(तांड्य ब्राह्मण)

अर्थ – अग्नि देवतांचें (व) ब्राह्मण मनुष्यांचें मुख आहे. म्हणून तो मुखापासूनच वीर्य करतो. (तो) मुखापासूनच उत्पन्न झाला आहे.

याशिवाय ज्येष्ठ भ्राता व ब्रह्मदेव यांनाहि अग्रजन्मा म्हणतात (नानार्थमंजिरी). **पाहा** – ब्राह्मण.

अग्रदानी

आसामांतील ब्राह्मणांची एक पोटजात. हे लोक प्रेतदहनाचे मंत्र म्हणतात व श्राद्धाची दानदक्षिणा घेतात. अग्रदानी याचा अर्थ प्रेताच्या उद्देशाने दिलें जाणारें दान घेणारा असा आहे.

अग्रदास

(इ. स. १६८८ चा सुमार.) हा पयहारी कृष्णदासचा शिष्य असून नाभादासाचा गुरु होता. भक्त मंडळींत अग्रअलि नांवाने तो प्रसिद्ध आहे. आंबेरचा राजा मानसिंह हा याचा भक्त होता, असा उल्लेख भक्तमाल ग्रंथांत मिळतो. मानसिक उपासनेंत हा प्रवीण होता. याला बागेची विशेष आवड होती. बागेंत झाडें लावतांना हा सदैव रामनाम जपत राही.

प्रसिध बाग सों प्रीति सुहथ कृत करत निरंतर ।
रसना निर्मळ नाम मन हुं बरसत धाराधर ।।

(छप्पय्य ३६)

अर्थ – बागेवरचें याचें प्रेम प्रसिद्ध असून बागेंत काम करीत असतांना याची जीभ रामनामाचा वर्षाव करीत असे.

याच्याच आदेशावरून नाभादासाने भक्तमाल ग्रंथाची रचना केली. आपल्या गुरूनंतर हा गलताच्या गादीवर बसला. ध्यानमंजरी, अष्टयाम, हितोपदेश, उपाख्यानबावनी, रामभजनमंजरी, इ. याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. रामभक्तीचा साधक या नात्याने अग्रदासाची साधना महत्त्वपूर्ण आहे. श्रीरामाचें सौंदर्य वर्णितांना तो म्हणतो ––

कुंडल ललित कपोल जुगल अस परम सुदेसा ।
तिनको निरखि प्रकास लजत राकेस दिनेसा ।
मेचक कुटिल विसाल सरोरुह नैन सुहाए ।
मुख पंकज के निकह मनो अलि–छौना आए ।

अर्थ – (श्रीरामाने) कानांत कुंडलें धारण केलेलीं आहेत. त्यामुळे दोन्ही गाल मनोहर दिसत आहेत. त्यांना पाहून चंद्रसूर्यहि लाजतात. काळेभोर, खटचाळ, विशाल, असे कमलनयन मोठे सुंदर दिसत आहेत आणि ते जणू मुखकमलावर बसलेले दोन लहान भुंगेच आहेत.

अग्रदास हा रामचंद्राच्या आदर्शाचें पालन करणारा एक निष्ठावंत भक्त होता. [भा. सं.; हिं. ब. वै. क.; रा. भ. शा.]

अग्रवाल

वैश्य वर्णाच्या अंतर्गत एक जात. लोकभाषेंत या शब्दाचें उच्चारण अगरवाल असेंहि होतें. दक्षिण-पूर्व पंजाब, उत्तर राजस्थान व पश्चिमेकडचा उत्तर प्रदेश, या भागांत या जातीची बरीच लोकसंख्या आहे. व्यापारधंद्याच्या निमित्त हे लोक भारतांत सर्वत्र पसरलेले असले तरी, वर उल्लेखिलेले भूप्रदेश हेंच त्यांचें भौगोलिक क्षेत्र आहे. चारणांनी लिहून ठेवलेल्या जातीय परंपरांवरून कळतें, की राजा अग्रसेन हा या

जातीचा मूळ पुरुष होता. त्याचे १८ पुत्र होते आणि त्यांच्यावरूनच अग्रवाल जातींत १८ गोत्रें निर्माण झालीं आहेत.

अगरोहा ही अग्रसेनाची राजधानी होती. हेंच अग्रवाल जातीचें मूलस्थान होय. पंजाबच्या हिसार जिल्ह्यांतल्या फतेहाबाद या शहरावरून सिरसा (शैरीषक) कडे जाणाऱ्या मार्गावर अगरोहा हें ठिकाण लागतें. त्याच्या आसपास बऱ्याच टेकड्या पसरलेल्या आहेत. भारतीय पुराणवस्तु संशोधन खात्याने तिथे केलेल्या उत्खननांत कांही प्राचीन तांब्याचे शिक्के मिळाले आहेत. त्यांवर पुढील लेख आढळतो --

अगोदके अगाच जनपदस

याचा अर्थ, अगोदक स्थानांतल्या अगाच जनपदाची मुद्रा असा होतो. अगोदक हें संस्कृत अग्रोदकाचें प्राकृत रूप आहे. अग्रोदक ही राजधानी होती व तिच्या चारी बाजूंना पसरलेलें एक जनपदराज्य होतें. शिक्क्यावर त्या जनपदाचें नांव अगाच असें दिलें आहे. पण त्याचें संस्कृत रूप अग्रत्य किंवा अग्र असें असलें पाहिजे. अग्रजनपद व त्याची राजधानी, यांत जे लोक वास्तव्य करीत होते, त्यांची राजनैतिक संघटना तत्कालीन अन्य जनपदांच्या धर्तीवरच असावी.

अग्रवाल जातीचा मूळ पुरुष अग्रसेन याची निश्चित ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाही. आपल्या नांवाला अनुरूप अशा मूळ पुरुषाची कल्पना करणें व शक्य तर त्याची कथा तयार करणें, ही जनपदयुगांतल्या जातीजमातींची सर्वमान्य अशी प्रथा होती. त्यावरून असें वाटतें, की याहि लोकांनी आपल्या परमश्रेष्ठ कुलपुरुषाला अग्रसेन हें नांव दिलें असावें. दंतकथांमध्ये या अग्रसेनाला क्षत्रिय, मानलें आहे. मुळांत ही कुलश्रेणी शास्त्रोपजीवी असावी, असें वाटतें. पुढे तिने आपल्या विकासक्रमांत कृषि व वाणिज्य हे व्यवसाय स्वीकारले असावे. भारतीय इतिहासांत अग्रवाल जातीचे उल्लेख तेराव्या शतकापासून मिळूं लागतात. त्या उल्लेखांत अग्रवालांना अग्रोतकान्वय म्हणजेच अग्रोतकवंशी म्हटलें आहे. अग्रोतक हें नांवहि प्राचीन अग्रोदक या नांवाचें सूचक आहे. अग्रोदकांतून बाहेर पडलेले जे अग्रवाल राजस्थानाकडे गेले, त्यांना मारवाडी असें नांव पडलें व जे मध्यदेशांत येऊन वसले, त्यांना देसी हें नांव मिळालें. [डॉ. वासुदेवशरण अग्रवाल]

अग्रवाल कवि

(इ. स. १३५४) याचा जन्म आग्र्याला झाला. याने प्रद्युम्नचरित नामक काव्य लिहिलें आहे. या काव्याबद्दल डॉ. हिरालाल म्हणतात – हा ग्रंथ भाषा व साहित्य या दोन्ही दृष्टींनी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हा कवि अग्रवालवंशी जैन होता. [सूरपूर्व ब्रजभाषा और उसका साहित्य]

अग्रशाला

(अग्र + शाला) देवालयाजवळ बांधलेल्या धर्मशाळेला हें नांव आहे. देवस्थानाच्या उत्सव प्रसंगींच्या जेवणावळी या इमारतींत होतात.

अग्रहार

या शब्दाची व्याख्या मानसार ग्रंथांत पुढीलप्रमाणे दिलेली आहे–

अग्रं ब्राह्मणभोजनं तदर्थं ह्रियन्ते राजधनात्
पृथक् क्रियन्ते ते अग्रहाराः क्षेत्रादयः

अर्थ – अग्र = ब्राह्मणभोजन. त्यासाठी राजधनांतून वेगळे केलेले ते क्षेत्रादिक अग्रहार होत.

प्राचीन काळीं राजे लोक विद्वान् ब्राह्मणांच्या योगक्षेमासाठी विशिष्ट भूभागाचें दान करीत व तिथे त्या ब्राह्मणांची वसाहत उभारून देत. त्या भागाचा महसूलहि त्या अग्रहारांतल्या लोकांच्या उपजीविकेसाठी लावून दिला जाई. अशा गावांना अग्रहार म्हणत. तिथे राहून विद्वान् ब्राह्मण विनाशुल्क अध्यापनाचें काम करीत. अशा अग्रहारांत अनेक ठिकाणांहून विद्यार्थी अध्ययनासाठी येत.

एका काळीं भारतांत सर्वत्र अग्रहार ही संस्था चालत होती. बिल्हणाने काश्मीरांतल्या अग्रहारांचें तपशीलवार वर्णन केलें आहे – प्रवरपुरांत नद्यांच्या संगमावरच्या उत्कृष्ट जमिनी राजांनी ब्राह्मणांना अग्रहार म्हणून दिल्या होत्या. वितस्ता नदीकांठचा अग्रहार शुभ्र होता. तिथलीं घरें लांकडी होतीं. अनंतराजाने डोंगरावरहि अग्रहार स्थापले होते. त्यांना भट्टाग्रहार असें म्हणत. शिथिल होत जाणाऱ्या धर्माला मजबुती आणण्यासाठी उभारलेल्या तटांसारखे ते वाटत ...

गोमंतकांत कदंबराजांनी बरेच अग्रहार स्थापल्याची माहिती मिळते. गोमंतकांतल्या काणकोण विभागाला अष्टागर (अष्टाग्रहार) असें दुसरें नांव आहे; तें वरील शब्दावरूनच आलें आहे. १०व्या शतकांत धारवाड जिल्ह्यांतल्या कडियुर गावीं राष्ट्रकूटांनी दोनशे ब्राह्मणांची सोय होईल, असा अग्रहार स्थापला होता. म्हैसूरमधील आरसीकेरी व बनवासीमधील बेळगावे या ठिकाणींहि अग्रहार होते.

अग्रहारांची रचना सामान्यतः पुढीलप्रमाणे असे –

मध्यभागीं देवालय, होमशाळा, पाठशाळा, भोजनशाळा व रुग्णालय या संस्था आणि सभोवती ब्राह्मणांचीं घरें. अग्रहारांतील वस्ती दृढ झाल्यावर मग तिथे वाणी, उदमी, कारुनारु यांची वस्ती होई. दुकानें थाटलीं जात. मग त्या वसाहतीला

टुमदार नगराचें स्वरूप येई. तिथली व्यवस्था महाजनांकडे असे. ते ब्राह्मणांतूनच निवडले जात. सर्व महाजनांवर एक अध्यक्ष असे. अग्रहारांना मिळालेल्या देणग्या व्याजीं लावून त्या व्याजाचा विनियोग विविध कार्यांकडे केला जाई. बेळगावे येथील अग्रहार या दृष्टीने नमुनेदार होता. तिथलें वातावरण प्रसन्न व पवित्र असे. विविध उत्सवांच्या निमित्ताने तिथे विद्वानांची शास्त्रचर्चा चाले. धर्म, संस्कृति आणि कला यांचा तिथे संगम झालेला होता.

अग्रहारांत संपत्ति सांचली आहे असा सुगावा लागल्यावर आजूबाजूचे लुटारू लोक त्यांच्यावर हल्लेहि करीत. अशा प्रसंगीं महाजनांना त्या लुटारूंचा प्राणपणाने प्रतिकार करावा लागे. त्यांत कित्येक अग्रहारी लोक प्राणांसहि मुकत.

वरंगळच्या काकतीय राजांपैकी गणपतिदेव व त्याची मुलगी रुद्रांबा यांनी स्थापलेल्या अग्रहारांपैकी एका अग्रहाराचें वर्णन मलकापूर येथील शिलालेखांत (इ. स. १२६०) पुढील-प्रमाणे आहे--

मंदर नांवाचा गाव सर्व हक्कांसहित विश्वेश्वर शंभूला गणपतिदेवाकडून देण्यांत आला. त्याची मुलगी रुद्रदेवी, त्याच्या अनुज्ञेने वेलंगपुडि नांवाचा दुसरा गाव त्या बरोबर मिळवून आठ प्रकारच्या हक्कांसहित व इतर उत्पन्नांसहित, कृष्णेंत असलेल्या बेटासहित दान दिला. विश्वेश्वर देवाचा शाश्वत मठ, सर्वांना उपयोगी पडणारा अग्रहाराच्या बरोबर छत्र स्थापन करून विश्वेश्वर देशिकाने त्या दोन्ही गावांना मिळवून श्रीविश्वेश्वरगोडकी हें नांव दिलें. अनेक गोत्रीयांना व एक दुसऱ्या बरोबर क्रयविक्रय करणारे, साठ द्राविड ब्राह्मणांना, प्रत्येकी एक पेनुंबाका मानेडूच्या हिशेबाने उपजीविकेकरितां व्यवस्था केली. वेलंगपूडि मंदर गावीं एकशेवीस खंडीची जमीन देण्यांत आली. त्यांतून राहिलेली जमीन तीन भागांत वांटून एक भाग शिवाच्या नांवाने, दुसरा भाग विद्यार्थ्यांना व शुद्ध शैव मठाला प्रसूति व आरोग्य शालांना छत्रांना मिळवून विश्वेश्वर देशिकाला दिला. हे शैव सिद्धांत पूर्णपणें जाणणारे या गावांत विद्यार्थ्यांच्या सोयीकरितां ऋग्-यजु-सामवेद म्हणणारे तीन पदवाक्य प्रमाण साहित्यागम व्याख्यान करणाऱ्याच्या बरोबर एक वैद्य व एक कायस्थ यांची व्यवस्था करण्यांत आली. या दहा जणांना प्रत्येकी दोन खंडीची जमीन देण्यांत आली. [एज्यु. ए. इं.; मु. पू. म.; वरंगळचे काकतीय राजे]

अग्रहारी

एक जात. हे लोक बनिया असून यांचा जबलपूर व राजगड या भागांतील अगारियांशीं संबंध आहे. मुख्यत्वेंकरून उत्तर प्रदेशांत ही जात आढळते.

अग्रिय

पातालांतला एक प्रदेश. यांतील भूमीचा रंग सोनेरी असतो (विष्णु पु. २५.२ – ३).

अग्रोहा

हें गाव पंजाबांतल्या हिस्सार व फतेहबाद या रस्त्यावर हिस्सारपासून ७ कोसांवर आहे. इथल्या उत्खननांत नाणीं, मणी, मूर्तींचे अवशेष व तांबूस मातीच्या भांड्यांचे तुकडे सांपडले आहेत. [एस्केव्हेशन ॲट् अग्रोहा, पंजाब–श्रीवास्तव क्र. ६१]

अघमर्षण

(१) 'अघं मर्षति इति' (=पापाला पराभविणारें) (विग्रहकोश). ऋग्वेदाच्या १० व्या मंडलांतील एक पापक्षालनसूक्त. संध्येंतला एक विधि, या सूक्ताने करायचा असतो—

ऋतं च सत्यं चाभीद्धात्तपसोऽध्यजायत ।
ततो रात्र्यजायत ततः समुद्रो अर्णवः ।।१।।
समुद्रादर्णवादधिसंवत्सरो अजायत ।
अहोरात्राणि विदधद्विश्वस्य मिषतो वशी ।।२।।
सूर्याचन्द्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत् ।
दिवं च पृथिवीं चान्तरिक्षमथो स्वः ।।३।।

(ऋ. १०. १९०)

अर्थ – (सृष्टिनिर्मात्याच्या) जाज्वल्य तपःसामर्थ्याने प्रथम न्याययुक्त धर्म आणि सत्य उत्पन्न झालें. नंतर (अंधकार रूप) रात्र उत्पन्न झाली आणि त्यानंतर उदककल्लोळांनी उचंबळणारा समुद्र निर्माण झाला (१). उचंबळणाऱ्या समुद्राच्या (उत्पत्ती) नंतर कालनिदर्शक वर्षमान उत्पन्न झालें आणि नंतर डोळ्यांची उघडझांप करणारे सर्व प्राणिमात्र सृष्टीच्या अधिपतीने घडवून अहोरात्र (वर्षाचे विभाग) प्रचारांत आणले (२). तथापि पूर्वीं ठरविलेल्या योजनेप्रमाणे सृष्टिकर्त्याने रवि, चंद्र उत्पन्न केले होते. (पण त्यांच्या अगोदर) द्युलोक केला आणि नंतर (क्रमाने) पृथ्वी, अंतरिक्ष आणि स्वर्गलोक अशी रचना केली (३).

संध्येंत उजव्या हाताच्या खळग्यांत पाणी घेऊन तें वरील सूक्ताने अभिमंत्रित करतात व त्या पाण्यांत उजव्या नाकपुडींतून श्वास सोडून तें डाव्या बाजूस भूमीवर टाकतात. या कृतीने शरिरांतील पापपुरुष श्वासावाटे बाहेर पडून त्याचा नाश होतो.

यथाऽश्वमेधः क्रतुराट् सर्वपापापनोदनः ।
तथाघमर्षणं सूक्तं सर्वपापप्रणाशनम् ।।

अर्थ – जसा यज्ञांचा राजा अश्वमेध सर्व पापें दूर करतो, त्याप्रमाणे अघमर्षणसूक्त सर्व पापांचा नाश करणारें आहे. स्नानाच्या वेळींहि हें सूक्त म्हणतात.

(२) ऋग्वेदांतील एक सूक्तद्रष्टा. अघमर्षण हें एकच सूक्त याच्या नांवावर आहे. या सूक्ताला पदपाठ नाही, त्यावरून हें मागाहून घातलें असण्याचा संभव आहे. हा ऋषि केवळ अथर्ववेद्यांच्या तर्पणांत येतो. त्यावरून हें सूक्त मूळचें अथर्ववेदांतलें तर नसेल, अशी शंका श्री. ना. गो. चापेकर व्यक्त करतात.

(३) एक तीर्थ. हें विंध्य पर्वताच्या पायथ्याशीं आहे. इथे दक्षाने तप केलें व हंसगुह्य नामक स्तोत्राने विष्णूची स्तुति केली (भाग. पु. ६.४).

अघमर्षणव्रत सकल पातकांचें प्रायश्चित्त म्हणून हें व्रत करतात. रोज तीन वेळां पाण्यांत बुडी मारून अघमर्षणसूक्त (ऋ. १०. १९०.) म्हणतात. हें तीन दिवसांचें व्रत आहे (बौ. ध. सू. ४. २. १९–२०). तीन दिवस उपवास, दिवसां उभें राहणें, रात्रीं बसून राहणें, व व्रताच्या शेवटीं गाय दान देणें, असाहि अधिक विधि सांगितला आहे (विष्णु ध. ४६. १–९). [हि. ध.]

अघारिया बंगालमधील एक छोटी शेतकरी जमात. हे लोक मूळ आग्र्याहून आले म्हणून यांना अघारिया म्हणूं लागले. ते असें सांगतात, की आपण मुळांत क्षत्रिय होतों; पण राजकीय छळामुळे तिकडून पळून बंगाल प्रांतीं आलों. इकडे आल्यावर आम्ही जानव्याला फाटा दिला व नांगर हातीं धरला, म्हणून लोक आम्हांला हीन समजूं लागले. हे लोक उंच व वर्णाने निमगोरे असतात. त्यांचे अवयव प्रमाणबद्ध असतात. दिसण्यांत ते राजपुतांसारखे आहेत. त्यांच्या स्त्रिया पुरुषांबरोबर शेतीच्या कामाला जात नाहीत. त्या घरीं बसून सूत कांततात. त्यांची वेषभूषा नीटनेटकी असते. त्या चांदीचे दागिने घालतात.

मुलींचीं लग्नें त्या वयांत आल्यावर करतात; पण साखरपुडा लहानपणीं होतो. तो होऊनहि मुलींना पूर्ण स्वातंत्र्य असतें. अघारिया मुलीचे डोळे सतेज, दांत शुभ्र, केस काळेभोर व पापण्या लांब असतात. त्या फक्त हात आणि पाय यांवरच गोंदून घेतात. लग्नें ब्राह्मण उपाध्यायाकरवीं होतात; पण तो ब्राह्मण पंजाबकडील असला पाहिजे. उत्कल ब्राह्मण त्यांना चालत नाही. यांच्यांत विधवाविवाहाचा निषेध नाही.

मृतांना पुरतात व मुख्य सांध्यांचीं व कवटीचीं हाडें गंगेंत विसर्जित करतात. कित्येक लोक हें कृत्य करीतहि नाहीत.

बंगालमधील इतर लोकांची अशी समजूत आहे, की अघारियांच्या बायका चेटकिणी असतात. विशेषेंकरून गंगापूर जिल्ह्यांत हा प्रवाद फार आहे. या स्त्रियांनी चेटूक क्रिया सोडून द्यावी, म्हणून त्यांच्यावर सक्ति केली जाते. प्रसंगीं त्यांना मारहाणहि करतात. म्हाताऱ्या बायका तरुण स्त्रियांना ही विद्या शिकवितात. [इंडियन स्टडीज् पास्ट अँड प्रेझेंट – डाल्टन]

अघारिया एक जात. या नांवाच्या दोन व्युत्पत्ति सांगतात. पहिली अशी, की हा शब्द आग या शब्दापासून बनला असवा. कारण अघारियांचा संबंध सतत अग्नीशीं येतो. दुसरी अशी, की ते आग्र्याहून आले म्हणून त्यांना लोक अघारिया म्हणूं लागले. विदर्भ, रायगड, सारंगगड, बिलासपूर, छोटा नागपूर, बालाघाट, रेवा, उदेपूर, या भागांत यांची वस्ती आहे. हे आग्र्याजवळच्या राजपुतांचे वंशज आहेत, असें मानतात. दिल्लीच्या बादशहाला मस्तक न नमवितां एका हातानेच सलाम करण्याचा त्यांना हक्क होता. असें सांगतात, की इतिहासकाळांत दिल्लीच्या बादशहाने यांचें सरसकट शिरकाण केलें. त्यांत एकच अघारिया शिल्लक राहिला. बादशहाने त्यालाहि बोलावणें धाडलें; पण त्याने आपल्याऐवजी एक चांभार तिकडे रवाना केला व स्वतः छत्तीसगडावर पलायन केलें. त्याचे वंशज आजहि पितृतर्पण करतांना प्रथम या चांभाराला पाणी देतात.

यांचा वर्ण व बांधा असा– रंग काळा, डोकें चौकोनी, नाक रुंद, केस सरळ, बांधा दणकट, चेहरा भावशून्य व चालण्याबोलण्यांत जडता. कांही लोक यांना आर्यमानववंशाचे समजतात. कांही लोकांच्या मतें ते कोल, गोंड, कोरवा, इ. जमातींपैकी असून त्यांतल्या ज्या लोकांनी लोखंड शुद्ध करायचा धंदा सुरू केला, ते अघारिया झाले. कारण आजहि अघारिया लोकांच्या चालीरीती आणि देवाधर्माच्या कल्पना वरील आदिवासींप्रमाणेच आहेत. पण श्री. वेरियर एल्विन यांना हें मत मान्य नाही. त्यांचा बांधा, राहणी व साहित्य यांचा अभ्यास केल्यावर ते लोक वरील आदिवासींहून भिन्न अतएव स्वतंत्र जमात आहेत, असें त्यांचें मत झालें आहे.

हे आपली उत्पत्तिकथा पुढीलप्रमाणे सांगतात – पृथ्वी उत्पन्न होऊन पांच वर्षें लोटल्यावर नंगा बैगा व नंगा बैगिन हें जोडपें जन्मलें. त्याने बांसरी वाजविली व त्यामुळे देवाचें सिंहासन हालूं लागलें. देवाने त्यांना बोलावणें धाडलें. धरतीमाता नको म्हणत असतां तीं दोघें गेलीं. देवाने त्यांना सांगितलें, की पृथ्वी डळमळते, तिला तुम्ही नखें रोवून स्थिर करा. त्यांनी आपली करंगळी कापून ती भूमींत पुरली; पण पृथ्वी स्थिर झाली नाही. मग त्यांनी आग्यासुराचें स्तवन

केलें. त्याने एक माणूस जन्माला घातला आणि तोच अघारियांचा मूळ पुरुष झाला. त्याने चार लोखंडी खांब बनवून धरतीच्या चारी दिशांना ठोकून दिले. त्यामुळे पृथ्वी स्थिर झाली तेव्हापासून अघारिया लोखंडाचें काम करूं लागले.

यांचा मूळ व्यवसाय लोखंड शुद्ध करण्याचा होता; पण अलिकडे तो सोडून ते शेती करूं लागले आहेत. यांचे बडे व छोटे असे दोन प्रमुख भेद आहेत. गोत्रें ८४ असून त्यांतल्या ६० गोत्रांस पटेल, १७ गोत्रांस नाईक व ६ गोत्रांस चौधरी अशा पदव्या आहेत. यांच्या गोत्रांत ब्राह्मणी गोत्रें, रजपूत कुलनामें, कांही प्राण्यांचीं नांवें व कांही अर्थ कळत नसलेले शब्द यांचें मिश्रण आहे.

कांही उपजाती पुढीलप्रमाणे–पठारिया व मुखी–हे दिंडोरी तहसिलींत राहतात. यांच्या बायका नथ व कांचेच्या बांगडया घालीत नाहीत व हळदीने भांग भरीत नाहीत. कल्ला–हे छत्तीसगड विभागांत राहतात. यांच्या बायका नथ व बांगडया घालतात व कुंकूहि लावतात. खुंटिया चोख – हे बिलासपूरमध्ये जमीनदारांच्या आश्रयाने राहतात. भात्यासाठी सांबराचें कांतडें वापरतात. बायका नाक टोचीत नाहीत. कांचेच्या बांगडया व चांदीचीं दंडकडीं घालतात. विवाहित स्त्रिया कासोटा घालीत नाहीत; पण अविवाहित मुली घालतात. मासिक विटाळ पाळतात, हे इतर जमातींच्या हातचें जेवीत नाहीत. रायपूर जिल्ह्यांतले अघारिया समाजांत मान्यता मिळावी म्हणून स्वतःला लोहार म्हणवितात. याशिवाय अघारियांच्या अनेक पोटजातीहि आहेत.

कांही जमातींत मामाच्या मुलीशीं लग्न करण्याची प्रथा आहे; तर कांहींत नाही. शक्य तों आपल्या गावांतील मुलगी न करतां दुसऱ्या गावची करतात. मुलींसाठी देज द्यावें लागतें. कांही जमातींत वैवाहिक निष्ठा शिथिल असते. तगळीं लग्नें पांच किंवा सहा वर्षांनी एकदा एकाच मुहूर्तावर उरकून घेतात

हे लोक आपल्या लोखंडाच्या भट्टया उघडयावर लावीत नाहीत व हत्यारेंहि उन्हांत करीत नाहीत. त्याचें कारण म्हणून ते पुढील कथा सांगतात–– प्राचीन काळीं सूर्य हा लोगुंडी राजाच्या राज्याभोवती असलेला लोखंडाचा तवा होता. पण नंतर देवाने त्याला आकाशांत भिरकावून दिलें. त्यामुळे सूर्याचें व लोखंडाचें वितुष्ट आलें.

हे जगाच्या उत्पत्तीची कथा पुढीलप्रमाणे सांगतात—परमेश्वराने प्रथम पाण्यावर एक कमलपत्र ठेवलें. पण तें सूर्याच्या उष्णतेने वाळून गेलें मग त्यानें लाखेचें जग बनविलें. पण तें फुटून गेलें. मग त्यानें आपल्या स्तनाचा मळ काढून त्याचा एक कावळा निर्माण केला. त्याला तीन वेळां पाजून म्हटलें, 'आता तुला तहान भूक लागणार नाही. यापुढे तूं व मी मिळून पृथ्वीचा शोध करूं.' तदनुसार कावळा खूप भटकला; पण त्याला पृथ्वी दिसली नाही. तो दमला व एका खेकडयावर पडला. त्या भाराने खेकडा पाण्यांत बुडाला. पाण्याच्या तळाशीं नळराजा व राणी झोपलीं होतीं. तिथेच पृथ्वी होती. कावळयाने नळराजाचा गळा दाबून पृथ्वीला बाहेर काढलें व अशा प्रकारें पृथ्वी उदयास आली. पृथ्वीच्या उत्पत्तीसंबंधी कमलपत्र व त्यावर पसरलेली माती, यांचे उल्लेख वैदिक वाङ्मयांत आढळतात. वराहाने सागराच्या तळांतून पृथ्वीला वर काढलें, ही कथा पुराणांत येते. या दोन्ही कथांशीं अघारियांची ही सृष्टीच्या उत्पत्तीची कथा ताडून पाहण्यासारखी आहे.

हे लोक चेटकिणी, मृतात्मे, विटाळशी स्त्री आणि अनेक क्षुद्र दैवतें, यांना फार घाबरतात. आपल्या लोखंडाच्या भट्टीला अशा अनेक आपत्तींपासून धोका येत असतो, असें त्यांना वाटतें. भगवान् हा देवहि त्यांच्या मतें संहारकच आहे. फक्त महादेवाला ते घाबरत नाहीत. कारण तो त्यांना भट्टी लावण्याची कला शिकवितो. लोहासुर, कोयलासुर, अग्यासुर, पवनदेव व धुआधरणी हीं यांचीं खास दैवतें आहेत व तीं त्यांच्या व्यवसायाशींच निगडित आहेत. त्यांचा कोप होऊं नये म्हणून ते फार जपतात व त्यांना गाय किंवा बैल बळी देतात. अग्नीला पाय लावणें व मशाल फेकून देणें अशुभ समजतात. हे लोक लोखंड, कोळसा किंवा अग्नि यांची शपथ घेत नाहीत. दुल्हा देवाला भजतात. हा ठाकुरदेवाचा पुत्र आहे. बापाचें वास्तव्य गांवाबाहेर तर मुलाचें वास्तव्य गावांत असतें. पण रोगराई उत्पन्न करून माणसांना छळणें, हें दोघांचें कार्य एकच.

अघारियांचा लोखंडाशीं घनिष्ठ संबंध असल्यामुळे त्यांच्याविषयी इतर जमातींना तिरस्कारहि वाटतो व थोडी भीतिहि वाटते. कारण लोखंडाच्या अंगीं गूढ व अनर्थकारक सामर्थ्य असतें व लोखंड हें भुताखेतांविरुद्ध प्रभावी शस्त्र असतें, अशी त्यांची समजूत आहे. हे लोक लग्नाच्या वेळीं भूतबाधा होऊं नये, म्हणून लोखंडाचें कडें अथवा अडकित्ता जवळ बाळगतात. नव्या भट्टींतून गाळलेलें पहिलें लोखंड अलौकिक शक्तीचें असतें अशी त्यांची समजूत आहे. त्यासाठी जें खनिज वापरतात, तेंसुद्धा विधिपूर्वक खणून काढलेलें असतें.

विटाळशी स्त्रीविषयीं त्यांना वाटणारें भय विलक्षणच आहे. देव व भुतें यांच्यापासून उत्पन्न होणारें भय कोणत्या-तरी उपायांनी कमी करतां येतें; पण रजस्वला स्त्रीच्या संपर्कामुळे येणारी आपत्ति अनिवार्य, असें ते समजतात.

यासाठी तिला खाणीजवळ किंवा नव्या भट्टीजवळ येऊं देत नाहीत. ऐरण व मोठा हातोडा यांना स्पर्श करूं देत नाहीत. तसें कांही घडलेंच तर मांत्रिकाला बोलावून देवाला डुक्कर, दूध व हळद अर्पण करतात व दक्षिणाहि देतात. त्यासाठी होणाऱ्या खर्चाला ते मागेपुढे पाहत नाहीत.

कांही अघारिया म्हातारा माणूस मेला, तर त्याला जाळतात; पण तरुण मृताला पुरतात. म्हाताऱ्याचें भूत अतिशय घातक मानतात. जाळतांना किंवा पुरतांना मृत माणसाचीं व्यवसायसाधनें त्याच्या शेजारीं ठेवतात. कांही पोटजातींत गवताचें कडें करून तें मृताच्या पायांत घालण्याची चाल आहे. मृत्यूनंतर दहाव्या दिवशीं मृताचे नातेवाईक बरा नहावन हा विधि करतात. याचा अर्थ स्नान करणें, असा आहे. स्नानानंतर पुरुष रांग करून घरीं येतात. येतांना पुढचा मनुष्य एक दगड उचलून मागच्या माणसाच्या हातीं देतो. तो आपल्या मागच्याच्या हातीं देतो. असें करीत दगड शेवटच्या माणसाच्या हातीं आला, की तो त्या दगडावर थुंकून त्याला फेकून देतो. घरीं गेल्यानंतर कोंबडीच्या पिलाचा एक पाय मोडून त्याच्या रक्ताचे थेंब मडक्यांतल्या पाण्यांत टाकतात. रक्त जसें पाण्यांत मिसळतें तसा मृतात्मा देवांत मिसळून जातो, अशी समजूत आहे. बायका मर्तिकाचें स्नान करतांना मासा किंवा बेडूक पकडतात व त्याला भांड्यांत घालून घरीं आणतात. घरीं आल्यावर कोंबडीच्या पिलाला मृताच्या नांवानें संबोधून भात खायला देतात. पिलानें भात खाल्ला तर मृतात्मा त्या पिलांत आहे, असें मानून सगळे नातेवाईक त्याला मारून खातात. त्यानें भात खाल्ला नाही तर मृतात्मा रुष्ट आहे, असें समजून पिलाला सोडून देतात. कांही पोटजमातींत स्नानानंतर घरीं येऊन तांदुळाच्या पिठानें कांहीतरी आकृति काढतात व तिच्यावर पाट ठेवून त्यावर खिचडीचा द्रोण व पाण्याचें भांडें ठेवतात. मग सर्वजण नदीवर जाऊन मृतात्म्याला घरीं चलण्याची विनंती करतात. त्यानें ती विनंती मानली, तर खिचडी आणि पिठाची आकृति यांवर कांही खुणा दिसतात. अशा प्रकारे मृतात्म्यांना प्रसन्न करून ते घरांत राहूं देतात. दुसऱ्या देहांत प्रवेश करून नवीन जीवन सुरू करीपर्यंत ते तिथे सुखानें राहतात, अशी त्यांची समजूत आहे.

मृताचें भूत परत येऊन, त्यानें छळूं नये म्हणून अघारिया लोक प्रेतयात्रा वेड्यावाकड्या मार्गानें नेतात व स्मशानाभोवती पांच फेऱ्या घालतात.

अघारिया एकंदरींत भित्रे व बुजरे असले, तरी ते कष्टाळू आहेत. लोहारकाम करूनहि ते स्वच्छता व टापटीप राखतात. सामान्यतः ते सच्चे व पापभीरू असतात. **पाहा – दुल्हादेव.** [अघारिया; म. ज्ञा. को.]

अघोर (१) महेश्वराचें ३२ व्या कल्पांतलें रूप. याचा वर्ण काळा होता (वायु पु. २३. २९. ७६). (२) एक शिवावतार. हा चौदा हातांचा, आयुधें धारण करणारा व नृत्यासाठी सिद्ध असणारा, असा आहे. याची कथा अशी– ब्रह्मदेवाच्या वरानें मरुत्त नामक दैत्य माजला. त्याला मारण्यासाठी शिवानें पार्वतीला आज्ञा केली. पार्वती त्या कामीं असमर्थ ठरली. मग शिवानें स्वतः अघोर रूप घेऊन त्याचा संहार केला. ही घटना तिरुवेन्काडु या ठिकाणीं घडली. तमिळनाडमधल्या या गांवीं आजमितीस भद्रकालीचें मंदिर असून तिच्यासमोर अघोरमूर्तीची स्थापना केलेली आहे.

अघोरमूर्ति चतुर्मुख, अष्टभुज, मुंडमालाधारी व मरुत्त दैत्याचें मस्तक तुडविणारी, अशी करतात. अघोराचा निवास स्मशानांत असून त्याच्याभोवती भूत–प्रेतांचा मेळावा असतो, असें मानतात. [सा. इं. गॉ.; सा. इं. गॉ. गॉ.]

अघोर चतुर्दशी भाद्रपद कृष्ण चतुर्दशीचें नांव. या दिवशीं उपवास करून शिवपूजा करतात.

भाद्रे मास्यसिते पक्षे अघोराख्या चतुर्दशी ।
तस्यामाराधितः स्थाणुर्नयेच्छिवपुरं ध्रुवम् ।।

अर्थ–भाद्रपद कृष्ण चतुर्दशीला अघोरा असें नांव आहे. त्या दिवशीं शंकराची पूजा केली असतां तो भक्ताला शिवलोकीं नेतो. [श. क.]

अघोरनाथ शिवाची एक मूर्ति. जो घोर म्हणजे भयानक नव्हे, तो अघोर अर्थात् सौम्य. अघोर पंथाचे लोक या नांवानें शिवाची पूजा करतात. [अ. अ.]

अघोरपंथ एक संप्रदाय. याला औगर, औघड, अशींहि नांवें आहेत. यजुर्वेदाच्या रुद्राध्यायांत 'या ते रुद्र शिवा तनूरघोरा पापकाशिनी' असा एक मंत्र आहे. यांत शिवाच्या अघोर तनूचा उल्लेख आहे. अघोरीश्वर या नांवानें शिवाची उपासना कर्नाटकांत व इतरत्रहि दृष्टीस पडते. त्यावरून या पंथाचा संबंध शैव संप्रदायाशीं, विशेषतः पाशुपत व कालामुख संप्रदायांशीं जोडला जातो. या पंथाच्या लोकांचें वर्णन युआन च्वांग या चिनी प्रवाशानें केलें आहे, तें असें – हे लोक अंगाला राख फासून गळ्यांत कवट्यांच्या माळा घालतात व नग्न हिंडतात. कांही लोक पानें किंवा झाडांच्या साली

नेसतात. कोणी वाघाचें कातडेंहि गुंडाळतात. चामुंडा ही यांची देवता आहे. हे तिला नरबलि देतात व प्रेताचें मांसहि खातात. आनंदगिरीनेहि शांकर दिग्विजयांत यांचें असेंच वर्णन केलें आहे. हे अन्ननिषेध पाळीत नाहीत. घोडयाचें मांस वर्ज्य करून इतर सर्व प्रकारचें मांस खातात. यांची अत्यंत किळसवाणी गोष्ट ही की ते आपली विष्ठा अन्नांत मिसळून खातात व तिचें पाणी फडक्यांतून गाळून पितात. या प्रकाराला ते अतिलिया म्हणतात. या प्रकाराने अद्‌भुत सामर्थ्य प्राप्त होतें, असें ते मानतात.

थेवेनो, वार्ड, टॉड, या पाश्चात्य ग्रंथकारांनी अघोरी लोकांविषयीं बरीच माहिती लिहून ठेवली आहे—

अघोरी लोक गोरक्षनाथाला आपला मूळ पुरुष मानतात. यांच्यांत मंत्रतंत्र व जादूटोणा हेहि प्रकार बरेच आहेत. हे मंत्रतंत्रांनी माणसांना मारतात व त्यांना पुनश्च जिवंत करतात, अशाहि आख्यायिका प्रचलित आहेत. त्यामुळे सामान्य लोकांना यांचें भय वाटत असतें. अबूचा पहाड ही आपल्या पंथाची आद्यभूमि असें ते मानतात. सांप्रत या पंथाचे लोक अल्प असले, तरी ते सर्व भारतभर आढळतात. मुसलमानहि या पंथाचे अनुयायी आहेत. बिहारमध्ये यांची संख्या अधिक असून त्या खालोखाल राजस्थान व मारवाड या भागांत आहे. अलिकडे हे वस्त्रें वापरूं लागले आहेत. पण त्यांचा वेष सर्वत्र समान नसतो. अघोरी स्त्रिया टोळ्या करून हिंडतात. कमरेला घागरा, मस्तकीं जटा, गळ्यांत स्फटिकांच्या माळा व हातांत त्रिशूळ असा त्यांचा वेष–परिवेष असतो.

भारतांत ब्रिटिशांचा अंमल सुरू झाल्यावर अघोरी लोकांना त्यांच्या क्रूर कृत्यांबद्दल इं. पिनल कोडाप्रमाणे शिक्षा होऊं लागल्या. त्यामुळे या पंथांत बाह्य सुधारणा पुष्कळ झाली. त्यांनी मनुष्यवध व नग्नसंचार बंद केला. पूर्वीं माणसांच्या हाडांच्या माळा घालीत, त्याऐवजी ते आता रुद्राक्षमाळा, सापांच्या हाडांच्या माळा किंवा रानडुकराच्या सुळ्यांच्या माळा वापरूं लागले आहेत.

या पंथाशीं संबंधित असें पुष्कळ साहित्य सगळीकडे विखुरलेलें आहे. पण अद्यापि त्याचें अध्ययन व अनुशीलन झालेलें नाही. त्यांचें तत्त्वज्ञान निर्गुण अद्वैतवादाशीं मिळतेंजुळतें आहे. त्यांची साधना हठयोग पद्धतीला धरून असते. ते ध्यानयोगाला विशेष महत्त्व देतात. गुरूची परमहंस समजून पूजा करतात. साधुसंतांच्या समाधीचीहि पूजा करतात. शीत-उष्ण, क्षुधा–तृषा, इ. द्वंद्वांविषयी बेफिकीर राहून यांच्यामधले कांही लोक लययोगाची साधना करतात. अशा स्थितींत त्यांचे शिष्य या साधकांची लहान बालकांप्रमाणे काळजी वाहतात. निर्वाणी व गृहस्थ असे दोन प्रकारचे लोक या पंथांत आहेत.

किनाराम हा या पंथाचा सर्वप्रसिद्ध आचार्य होय. हा अठराव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला. हा काशीजवळ राहत होता. याने लिहिलेल्या ग्रंथांत विवेकसार हा ग्रंथ मुख्य असून तोच या पंथाचा प्रमाणग्रंथ आहे. किनारामाच्या मतें सत्य पुरुष किंवा निरंजन हा सर्वत्र व्यापक रूपाने स्थित असून त्याचें अस्तित्व सहजरूप आहे. या ग्रंथांत सृष्टिरहस्य, कायापरिचय, पिंड-ब्रह्मांड, अनाहतनाद, योगसाधना, निरालंब-स्थिति, आत्मविचार, सहजसमाधि, इ. अनेक विषयांचें विवेचन आहे. किनारामाने प्रस्तुत पंथाच्या प्रचारासाठी रामगढ, देवल, हरिहरपुर व कृमिकुंड अशा चार ठिकाणीं आपले मठ स्थापले. हा इ. स. १७६९ मध्ये मृत्यु पावला. किनारामावरूनच या पंथाला किनारामी पंथ, असेंहि म्हणतात. याच्या व्यतिरिक्त भिनकराम, भिखनराम, टेकनराम, सदानंदबाबा, बालखंडीबाबा, इ. कांही सुप्रसिद्ध संत या पंथांत होऊन गेले.

सरभंगी नांवाचा एक दुसरा पंथ यांच्यांतूनच निघाला आहे. याचा प्रचार विशेषेकरून बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यांत आहे. हे लोक वीतराग व द्वंद्वसहिष्णु असले, तरी किळसवाण्या प्रकारांपासून अलिप्त आहेत. **पाहा** – किनाराम, सरभंगसंप्रदाय. [ए. रि. ए.; हिं. सा. को.; म. ज्ञा. को.]

अघोर शिवाचार्य (इ. स. १२ वें शतक.) श्रीकंठमताचा अनुयायी. याने मृगेंद्रसंहितेवर व्याख्या लिहिली आहे. शैवमतांत याचा हा ग्रंथ प्रमाण मानतात. श्रीकंठाने पांचव्या शतकांत ज्या शैवमताला नवजीवन दिलें, त्याचाच परिपोष बाराव्या शतकांत याने केला. [हिंदुत्व]

अघोरेश शिवाचें एक रूप. याच्या जपाने सर्व दुःखें नाहीशीं होतात. यव, क्षीर, आज्य व शुभ्र तांदूळ, यांच्या हवनाने हा संतुष्ट होऊन वैभव देतो व व्याधींचा नाश करतो. [लिंग पु. ४९]

अचरपाकम् चेट्टी चेट्टींची एक उपशाखा. हे लोक बेरि-चेट्टींच्या वर्गांत मोडतात. **पाहा** – चेट्टी.

अचल म्हणजेच नित्य, ध्रुव व अविनाशी. वैशेषिक दर्शनाने या चंचल विश्वाच्या मुळांत अचल तत्त्वांचें संशोधन केलें आहे. परिवर्तनशील वस्तूंच्या मुळाशीं जी नित्य वस्तु आहे, तिला वैशेषिकांनी द्रव्य म्हटलें आहे. अचल अर्थात् नित्यतत्त्व हा वैशेषिकांच्या विचाराचा पाया आहे. बौद्धांच्या क्षणिक वादाशीं त्यांचा विरोध आहे.

अचलदानें संख्या दहा. हीं दानें पुढीलप्रमाणे आहेत– धान्यपर्वत, लवणाचल (मिठाची रास),गुडाचल (गुळाची ढेप), हेमपर्वत (सोन्याची रास), तिलशैल, कार्पास-पर्वत, धृतशैल, रत्नपर्वत राजतशैल (रुप्याची रास) व शर्कराचल. हीं दानें पर्वकाळीं किंवा मंगलकार्यप्रसंगीं द्यायचीं असतात. चतुरस्त्र मंडप उभारून त्याच्या मध्यभागीं दर्भावर दानद्रव्यांचा ढीग रचतात व त्यांचें दान देतात. फलसमृद्धि, राजैश्वर्य व उत्तमलोकप्राप्ति, [दा. चं.]

अचलासप्तमी मार्गशीर्ष शु. ७ मी. (व्रतराजमतें माघ शु. ७ मी) सूर्यव्रत. हें व्रत करणारे षष्ठीस एकभुक्त राहतात. सप्तमीच्या सुप्रभातीं जलचरांनी पाण्यांत खळबळ सुरू करण्यापूर्वी एखाद्या जलाशयावर स्नानाला जातात. जातांना सोन्यारुप्याच्या अथवा तांब्याच्या पात्रांत तेलवातीचा दिवा पेटवून ठेवून तें पात्र डोक्यावर घेतात. मग जलाशयाच्या कांठीं उभें राहून हाताने त्याचें पाणी हालवितात.

नमस्ते रुद्ररूपाय रसानां पतये नमः ।
वरुणाय नमस्तेऽस्तु हरिवास नमोऽस्तु ते ॥

अर्थ–भयानक रूप असलेल्या, तसेंच रसांचा अधिपति आणि श्रीहरीचा निवास असलेल्या वरुणा, तुला नमस्कार असो.

हा मंत्र म्हणून तो दिवा पाण्यांत सोडतात. मग स्नान व स्नानांग तर्पण करतात. या व्रताच्या मुख्य देवता शिव-पार्वती व सूर्य या होत. चंदनाच्या अष्टदलांत मध्यभागीं शिव-पार्वतीची स्थापना करून अष्टदलाच्या आठ पाकळ्यांवर पूर्वादिक्रमाने रवि, भानु इ. सूर्यरूपांची सुपाऱ्यांवर स्थापन करतात. नंतर पूजा करून देवतांचें विसर्जन करतात. मग घरीं येतात. नंतर एका मृण्मय अथवा ताम्रपात्रांत गूळ व तूप मिसळलेलें तिळाचें पीठ घालून त्यांत सुवर्णाचें कर्णभूषण ठेवतात व त्यावर तांबडें वस्त्र आच्छादितांत. त्या पात्राची पूजा करतात मग त्यावरचें आच्छादन ब्राह्मणांकरवीं दूर करून त्याचें दान करतात. मग दिवसभर सूर्यचिंतन, सायंकाळीं अन्नदान व मग भोजन करतात. याची कथा अशी ––

पूर्वी सगर राजाची इंदुमती नांवाची एक वेश्या होती. एकदा ती स्वस्थ बसली असतां तिच्या मनांत विचार आला, की 'आपल्या हातून आजवर कोणतेंहि पुण्य घडलेलें नाही. आपण शिव-विष्णूंची पूजाहि कधी केली नाहीं. छे ! केवळ विषयासक्त राहून आपला उद्धार होणार नाही.' मग वसिष्ठ ऋषीकडे जाऊन तिने आपली ही मनोव्यथा त्याला निवेदली. वसिष्ठाने तिला अचलासप्तमीचें व्रत सांगितलें. तें केल्यावर ती अंतीं इंद्रलोकाला गेली. हें व्रत इष्टप्राप्तीसाठीं सर्वांनी करावें, असें श्रीकृष्णाने धर्मराजास सांगितलें आहे. [व्रतराज]

अचलेश्वर अमृतसर – पठाणकोट रेल्वेमार्गावर बटाला स्टेशनपासून दीड कोसावर अचलेश्वराचें मंदिर आहे. हें मंदिर एका सरोवराच्या मध्यभागीं आहे. मंदिरांत कार्तिकेयाची आणि पार्वतीचीहि मूर्ति आहे. इथे वसु आणि सिद्धगण यांनी यज्ञ केला होता. गुरु नानकानेहि कांही काल इथे साधना केली होती. कार्तिक शु. १० मीला इथे मेळा भरतो. [कल्याण–तीर्थांक]

अचळागौर जिचे आईवडील व सासूसासरे हयात आहेत आणि जिच्या एकाहि अपत्याचा मृत्यु झालेला नाही, अशा सुवासिनीला महाराष्ट्रांत अचळागौर म्हणतात. नवरात्रांत हिला बोलावून भोजन घालण्याची चाल कांही घराण्यांत आहे. अशा वेळीं तिला सगळें दधिपात्र देतात व त्यांत दक्षिणेचें द्रव्य घालतात.

अचित् विशिष्टाद्वैत दर्शनांत ज्ञानशून्य व विकारास्पद वस्तूला अचित् म्हटलें आहे. लोकाचार्याने अचित् तत्त्वाचे तीन भेद मानले आहेत–(१) शुद्ध सत्त्व (२) मिश्र सत्त्व व (३) सत्त्वशून्य. शुद्ध सत्त्वाचें दुसरें नांव नित्य विभूति हें आहे. या सत्त्वाची कल्पना हें रामानुजदर्शनाचें वैशिष्टच आहे. मिश्र सत्त्व रज–तमांशीं मिश्रित असल्यामुळें तें प्राकृतिक सृष्टीचें उपादान आहे. यालाच माया, अविद्या किंवा प्रकृति म्हणतात. सत्त्वशून्य तत्त्वाला काल म्हणतात. या तत्त्वांत रज-तमांचा लेशमात्रहि संसर्ग नसतो. [भा. द.]

अचिंतिपा चौऱ्यांशी सिद्धांपैकी एक. हा मुळांत मोळी-विक्या होता. एकदा हा रानांत गेला असतां याने तिथे पडलेल्या एका नागाला दोरी समजून त्यानेच आपली मोळी बांधली, असें सांगतात. चित्रांत तेंच दृश्य आहे. हा कानिफनाथाचा शिष्य होय. [ना. सं.]



अचिंत्य न + चिन्त्य = कल्पनेच्या पलिकडचें, ब्रह्म किंवा आत्मा. वेदान्त्यांच्या मते ब्रह्म हें अचिंत्य स्वरूप आहे. 'प्रकृतिभ्यः परं यच्च तदचिन्त्यस्य लक्षणम्' (= जें प्रकृतीहून पर–पलिकडचें तें अचिंत्याचें लक्षण होय.)

अच्छाप्ता जैनांची विद्यादेवी. अश्ववाहना व खड्गधारिणी. [जै. इ.]

अच्छावाक (१) एक ऋत्विज्. होत्याच्या गटांत याचें तिसरें स्थान आहे. याची वाणी स्पष्ट असावी, असा संकेत आहे. म्हणूनच याला अच्छावाक ही संज्ञा मिळाली आहे. हा ऋग्वेदी व सामर्थ्यवान् असावा, असें ऐतरेय ब्राह्मणांत सांगितलें आहे (२.३६). सोमयागांत याज्या आणि शस्त्र म्हणणें हें याचें काम असतें. [विद्याधरशास्त्री भिडे]

(२) भुवर्लोकांतील अग्नीचें नांव (वायु पु. २९.२८).

अच्छिद्र छिद्ररहित, दोषरहित. विशेषतः श्राद्धप्रसंगीं ब्राह्मणांकडून 'अच्छिद्रं भवतु' (= श्राद्ध अच्छिद्र होवो), असा या शब्दाचा प्रयोग होतो–

अच्छिद्रमिति यद् वाक्यं वदन्ति क्षितिदेवताः ।
प्रणम्य शिरसा ग्राह्यमग्निष्टोमफलैः समम् ।।

अर्थ–(श्राद्धाचे) ब्राह्मण श्राद्ध अच्छिद्र होवो, असें जें वाक्य उच्चारतात, तें श्राद्धकर्त्यानें नतमस्तक होऊन स्वीकारावें. तें वाक्य अग्निष्टोमाप्रमाणे फलदायक असतें. [श. क.]

अच्छोद बाण कवीनें या सरोवराचा उल्लेख केला आहे. त्यावरून हें काश्मीरांत असावें, असें दिसतें. वायु पुराणांत याला स्वर्गीय सरोवर म्हटलें आहे (४७.५) व तें कैलासावर असल्याचें सांगितलें आहे. [क. हि. वा. पु.]

अच्छोदा बर्हिषद पितरांची मानसकन्या. तिनें चुकून अमावसु या पितृगणांतल्या पुरुषालाच वरलें, त्यामुळे ती योगभ्रष्ट झाली. पुढे तिला तिचे पितर त्रसरेणूंच्या स्वरूपांत दिसले व तिनें त्यांची प्रार्थना केली. ते म्हणाले. 'तूं २८ व्या द्वापारांत पृथ्वीवर मत्स्यकन्या होशील व तुझा शंतनूशीं विवाह होईल. तूं दोन पुत्रांची माता होशील. नंतर तुला पितृलोकांत स्थान मिळेल.' हीच अच्छोदा एका कोळ्याची कन्या म्हणून जन्माला आली. सत्यवती व मत्स्यगंधा हीं तिला नांवें मिळालीं. पुढे शंतनूशीं तिचा विवाह होऊन तिला चित्रांगद व विचित्रवीर्य असे दोन पुत्र झाले. [ब्रह्मांड पु. ३. १०; वायु पु. ७३; मत्स्य पु. १४]

अच्युतव्रत याचा विधि असा–पौष कृ. १ देस अच्युतपूजा. 'ॐ नमो वासुदेवाय' या मंत्रानें तिल व घृत यांचें हवन व तीस दंपतींना भोजन. [हि. ध.]

अच्युतानंतगोविंद संकटें व आधिव्याधि यांचें निराकरण व निरामय आरोग्याची प्राप्ति, यांच्यासाठी विष्णूच्या अच्युत, अनंत आणि गोविंद या तीन नामांचा जप करावा, असें सांगितलें आहे. हा जप ब्राह्मणद्वारा केला तरी चालतो. 'ॐ अच्युताय नमः अनंताय नमः गोविंदाय नमः' असा या नाममंत्राचा जप करायचा असतो. कश्यप, अत्रि व भरद्वाज हे या मंत्राचे ऋषि आहेत.

अच्युतानन्त गोविन्द नामोच्चारणभेषजात् ।
नश्यन्ति सकला रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहम् ।।

या अनुष्टुभ् मंत्राचा जप केला तरी चालतो. जपसंख्या सहस्र, दशसहस्र, लक्ष किंवा यथाशक्ति. [ऋ. ब्र. क.]

अछरीनृत्य उत्तर प्रदेशांतलें एक लोकनृत्य. अछरी हा अप्सरा शब्दाचा अपभ्रंश आहे. हें नृत्य स्त्रियांचें असून सौम्य व आकर्षक आहे. नृत्य करणाऱ्या स्त्रिया घागरा नेसून रंगीत पोषाख करतात व संथ गतीनें नाचतात. या नृत्यांत राधा-कृष्णविषयक गीतें म्हणतात. [सम्मेलन-पत्रिका–लोकसंस्कृति विशेषांक]

अछुताळी तमिळनाड व केरळमधील सुवासिनी स्त्रियांचा गळ्यांत घालायचा एक अलंकार. **पाहा** – ताळी.

अछुवारु तमिळनाडमधील लमाणी धंदा करणारे उडिया भाषी लोक. गौडांची एक उपजाति. हे देवांग विणकऱ्यांशीं संलग्न असून कैकोलन विणकऱ्यांशीं यांचें साम्य आहे. [का. ट्रा. स. इं.]

अछुवेल्लाळ पट्टवंशीयांचें एक नांव. अधिक माहिती उपलब्ध नाही.

अज (१) न जायते इति अजः = ज्याला जन्म नाही असा. परमेश्वराचें नांव.

न हि जातो न जायेऽहं न जनिष्ये कदाचन ।
क्षेत्रज्ञः सर्वभूतानां तस्मादहमजः स्मृतः ।।

अर्थ –– (विष्णु म्हणतो) मी उत्पन्न झालों नाही, होत नाहीं व होणार नाहीं. सर्व भूतांचा मी क्षेत्रज्ञ आहें. म्हणून

मला अज म्हटलें आहे. (२) तुषित देवगणांतला एक. (३) ब्रह्मदेवाचें एक नांव.

अज एकपाद् एक वैदिक देवता. हिचा अहिर्बुध्न्याशीं निकटचा संबंध आहे (ऋ. २. ३१. ६). याच्याबरोबर अज एकपाद् याचा पांच ठिकाणीं उल्लेख



अज एकपाद् – बिकानेर म्युझियम

येतो. निघंटूमध्ये याला स्वर्गीय देवता म्हटलें आहे (५. ६). याने दोन्ही लोक (द्यावा-पृथिवी) स्थिर केले, असें अथर्ववेदांत म्हटलें आहे (१३. १. ६). हा पूर्वेस उदय पावत असल्याचें वर्णन तै. ब्रा. मध्ये येतें (३. १. २. ८). यावरून हें सूर्याचेंच एक नांव असावें असें वाटतें. दुर्गाचार्यांचेंहि तेंच मत आहे. म. भा. मध्ये याला एकादश रुद्रांपैकी एक म्हटलें आहे. अग्नीचें एक रूप अशीहि समजूत आहे. याला पेयनिषेक देतात (पार. गृ. २. १५. २). **पाहा** – अहिर्बुध्न्य, एकादश रुद्र.


अजक अजमीढ व अजक्रंद अशीं साल्वांचीं दोन अवयवराज्यें होतीं. या दोहोंतलें अज हें पूर्वपद त्या नांवाच्या एका असुराशीं संकेत करतें. हा अजक असुर साल्वांचा स्थानिक देव होता. ते लोक साल्व राजाला त्याचाच अवतार मानीत. [पा. भा. व.]

अजंटा आचार नांवाचा एक अर्हत् होता. त्याची माता मरण पावली. तिने याच देशांत पुनर्जन्म घेतला आहे, असें त्याला अंतर्ज्ञानाने समजलें. तो तिचा शोध घेत हिंडूं लागला. एकदा एक बालिका त्याला भिक्षा वाढायला आली असतां हीच आपली आई असें त्याने ओळखलें. अर्हताला पाहून तिलाहि पान्हा फुटला. कोवळ्या वयांत हा प्रकार झालेला पाहून लोकांना तें आश्चर्य व दुश्चिन्ह वाटलें. मग अर्हताने तिच्या पूर्वजन्माचा वृत्तांत सांगून लोकांचें समाधान केलें. तिच्यासह तो अंजटचास आला. तिथे त्याने डोंगरांत संघाराम खोदविले आणि त्यांच्या भिंतींवर बुद्धचरित्रांतलीं अनेक चित्रें रंगवून घेतलीं.

अजंटा लेण्यांबद्दलची ही दंतकथा आहे.

महाराष्ट्रांतल्या फर्दापूर या गांवापासून नैर्ऋत्येस सुमारें दोन कोसांवर सह्याद्रीच्या इन्ध्याद्रि श्रेणींतल्या अजंटा शाखेंत एका डोंगरखिंडींत अजंटचाचीं बौद्ध लेणीं आहेत. मध्य रेल्वेच्या पाचोरा-जामनेर लोहमार्गावरच्या पहूर स्टेशनावर उतरून पुढे १५ मैल गेल्यावर अजंटा हें गांव लागतें. तिथून पुढे चार मैलांवर या लेण्यांचा डोंगर लागतो.

बौद्धांच्या काळांत हीं लेणीं त्यांचीं तीर्थस्थानें बनलीं होतीं. पुढे बौद्ध धर्माच्या ऱ्हासानंतर या स्थळाचें महत्त्व कमी झालें. तिकडे कोणी जाईना; त्यामुळे त्या भागांत जंगल माजून त्यांत हिंस्र श्वापदांनी वस्ती केली. इ. स. १८२१ पर्यंत हें स्थान लोकांना अज्ञातच राहिलें. पुढे सर जेम्स अलेक्झांडर याने मोठ्या धैर्याने जंगलांत प्रवेश करून हीं लेणीं प्रसिद्धीस आणलीं.



बाह्य दृश्य–अजंटा डोंगर

हीं लेणीं सनपूर्व पहिल्या शतकापासून तों सातव्या शतकापर्यंतच्या काळांत खोदण्यांत आलीं. यांतलीं सर्वांत प्राचीन लेणीं पैठणच्या शातकर्णींच्या वेळचीं असून तीं हीनयान पंथाचीं

आहेत. पहिल्या विभागांत चैत्य असून दुसऱ्यांत बुद्धाच्या मूर्ति आहेत. दोन्ही विभागांत रंगीत चित्रें आहेत. मानवाच्या विध्वंसक वृत्तीचा, तसेंच कडक आणि विषम हवेचा परिणाम पुष्कळशा चित्रांवर होऊन त्यांतलीं बरींचशीं नष्टप्राय झालीं आहेत. केवळ तेरा लेण्यांतलींच चित्रें काय तीं शिल्लक आहेत. [त्यांतल्या त्यांत एक, दोन, नऊ, दहा, बारा, सोळा, सतरा व एकोणीस या क्रमांकाच्या लेण्यांतील चित्रें सुरेख आहेत. दुसरें व बारावें हीं लेणीं विहाराचीं आहेत. ६५ फट लांबी रुंदीचीं सपाट छत असलेलीं व १२ ते १४ फूट उंचीचीं तीं प्रशस्त दालनें आहेत. भव्य स्तंभांनी तीं तोलून धरलेलीं आहेत. त्यांत मागच्या भिंतीच्या आंतल्या अंगास एका वेदीवर भव्य बुद्धमूर्ति दिसते. पुढच्या भिंतींत द्वारें व गवाक्षें आहेत. बाजूने जाणाऱ्या ओवऱ्यांचे स्तंभ आणि आंतलीं प्रशस्त दालनें यांवर सुंदर पण विचित्र आकृतिबंध कोरलेले आहेत.

अजंट्यांतलीं चित्रें काढण्यासाठी लागणारी पार्श्वभूमि माती, शेण व दगडाची वस्त्रगाळ पूड, हे पदार्थ एकत्र करून व त्याचा भिंतीवर लेप देऊन बनविण्यांत आली आहे. छतासाठी भाताच्या तुसाचाहि उपयोग केलेला आहे. अजंट्याच्या चित्रकारींत वापरलेले रंग काजळी, फिकट लाल, फिकट पिवळा आणि गर्द निळा, एवढेच असून ते अगदी साधे आहेत. चित्रविषयांची बाह्य रेखा गुलाबी, तपकिरी किंवा काळचा रंगांत आढळते. इथल्या चित्रकलेचें हें एक वैशिष्टच आहे. विशिष्ट जातीचीं माणसें विशिष्ट रंगानेच चित्रित करायचीं, असा इथला संकेत दिसतो. सर्वसाधारण माणसाचा रंग काळसर तपकिरी आहे. सामान्यत: भारतीयांचा वर्ण हाच असतो. या वर्णांतच एखाद्या व्यक्तींत सोनेरी किंवा गुलाबी छटा आढळते, ती आरोग्याची किंवा आनंदी वृत्तीची द्योतक असावी. विटकरी तांबूस आकृती शेतकरी, कामकरी वगैरे श्रमिकांच्या आहेत. हिरवट आकृती वन्यांच्या आहेत.

अजंट्याच्या चित्रांचे तीन विभाग आहेत — (१) अलंकारिक चित्रें (२) मानवी आकृतींचें यथातथ्य रेखांकन असलेलीं चित्रें व (३) कथानकपर चित्रें. पहिल्या विभागांत पशु, पक्षी, कल्पित प्राणी व यक्षगंधर्वादि अतिमानवी योनि, यांचा समावेश आहे. दुसऱ्या विभागांत लोकपाल, बुद्ध व बोधिसत्त्व यांचा मुख्यत्वे समावेश होतो. बुद्ध हा लोंबत्या कानामुळे इतर भिक्षूंहून वेगळा दिसतो. बोधिसत्त्वांच्या अंगावर राजभूषणें आढळतात. कांही चित्रें समूहरूप आहेत. त्यांपैकी एक कुबेराच्या पंचिक नांवाच्या सेनापतीचें आहे. चित्रांत तो बसलेला असून जवळ त्याची पत्नी हारीती मुलाला पाजीत बसली आहे. बुद्धचित्रें विविध आसनबंधांचीं आहेत. त्यांतल्या मुद्रा भिन्न भिन्न आविर्भाव दाखवतात. बुद्धाचें समग्र जीवनच या ठिकाणीं चित्रित झालें आहे. तिसऱ्या विभागांत जातककथांचा समावेश होतो. सिबिजातकांत बोधिसत्त्वाने एका कबूतराला वांचविण्यासाठी आपलें मांस ससाण्याला कसें




स्नानशृंगार–अजंटा

देऊं केलें, तें दाखविलें आहे. महाजनकजातकांतल्या कथेंतलेहि कांही देखावे आहेत. सिंहली राजकन्येची बोधिसत्त्वाला भुरळ घालण्यासाठी चाललेली धडपड, समुद्रपर्यटनांत बोधिसत्त्वाची नौका बुडाली असतां मणिमेखल यक्षाने त्याला केलेली मदत, वगैरे देखावे त्यांत आहेत. रुरुजातकांत बोधिसत्त्व हरिण झालेला दिसतो. छदनाजातकांत तो हत्तींचा राजा होतो. वेस्संतरजातकांत बोधिसत्त्वाला देशत्याग करावा लागतो. तो आपलीं मुलेंहि ब्राह्मणाला दान देतो. ब्राह्मण त्या मुलांचा छळ करतो व मग इंद्राच्या कृपेने वेस्संतराला मुलांसह राजलक्ष्मीची प्राप्ति होते, असा तो देखावा आहे.

इथलीं १६, १७ व १९ या क्रमांकांचीं लेणीं स्थापत्य व चित्रकला या दोन्ही दृष्टींनी भारतांतल्या कुठल्याहि लेण्यांपेक्षा उत्कृष्ट आहेत, असें बर्जेसने म्हटलें आहे. यांतलें १६ वें लेणें वाकाटक नृपति हरिषेण याच्या वराहदेव नांवाच्या सचिवाने आपल्या मातापित्यांच्या पुण्योपचयासाठी खोदविलें आहे. हें लेणें अनेक बाबतींत अत्युत्कृष्ट गणलें जातें. याची ओसरी किंवा पडवी ६५ फूट लांब व सुमारें ११ फूट रुंद असून तिला मध्ये अष्टकोनी स्तंभ आहेत. या ओसरींतून आंतल्या मंडपांत जायला तीन दरवाजे आहेत. मोठ्या दरवाजाच्या चौकटीच्या बाजूच्या लहान स्तंभांवर दोहीं अंगीं मकरवाहना गंगेची मूर्ति खोदलेली आहे. आंतल्या मंडपाचा पुढील संपथ (Corridor) मागील संपथापेक्षां लांब म्हणजे ७४ फूट आहे. त्याच्या पाठीमागे चैत्य मंदिर असून त्यांत जायला तीन दरवाजे आहेत. मध्यभागीं बुद्धाची भव्य मूर्ति सिंहासनावर

अधिष्ठित असून ती धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेंत आहे. बुद्धाच्या मुखाभोवती तेजोवलय असून त्याच्या दोही अंगीं वज्रपाणि व



प्रेमी युगुल–अजंटा

पद्मपाणि चवऱ्या घेऊन उभे आहेत. मंडपाच्या दोन्ही बाजंस प्रत्येकीं सहा, मागच्या भिंतींत दोन व ओसरीच्या उभय अंगीं दोन, अशा एकंदर सोळा लहान खोल्या भिक्षूंकरितां खोदलेल्या आहेत.

या १६ व्या लेण्यांत मुख्यत्वें बुद्धाच्या शेवटच्या जन्मांतले प्रसंग चित्रित झाले आहेत. मंडपांत प्रवेश करून उजव्या बाजूच्या भिंतीवरचीं चित्रें ओळीने पाहत गेल्यास तीं बुद्धाच्या चरित्रांतल्या घटनांना अनुलक्षून क्रमाने काढलीं आहेत, असें दिसतें. मायादेवीचें स्वप्न, बुद्धजन्माचा देखावा, असित ऋषीचें भविष्यकथन, बाल गौतम पाटीवर धुळाक्षरें काढीत असल्याचें दृश्य, त्याचें धनुर्विद्येचें शिक्षण, सुजातेने त्याला केलेलें पायसदान, बुद्धाची राजगृहांतील भिक्षा, बुद्धाचा धर्मोपदेश, अजातशत्रु बुद्धाच्या दर्शनास आल्याचें दृश्य, त्यापुढे दुसऱ्या व तिसऱ्या खोल्यांवरच्या भिंतींवर नंदाचा धर्मप्रवेश, बुद्ध राजवाड्यांत आला असतां त्याची पत्नी व पुत्र त्याला सामोरे आल्याचें दृश्य, नंदाला दिव्य लोकांत नेऊन बुद्धाने तिथल्या अप्सरा दाखविल्या तें दृश्य, अशी ही प्रसंगमालिका आहे.

या कथेंतल्या शेवटच्या प्रसंगाचें चित्र चांगल्या स्थितींत असून कलासमीक्षकांनी त्याची मुक्तकंठाने स्तुति केली आहे. नंदाने बुद्धाचा धर्म स्वीकारून भिक्षुजीवन जगण्याचा निश्चय केल्यावर त्याचा राजमुकुट त्याची पत्नी सुंदरी हिच्याकडे एका सेवकाने आणून दिला व तो पाहून सुंदरी शोकावेगाने मरणोन्मुख झाली, हा त्या चित्राचा विषय आहे. सुंदरी एका सखल आसनावर लोडाला टेकून बसली आहे. मरणोन्मुख अवस्थेमुळे तिची मान गळून पडली आहे. तिचे डोळे शक्तिपातामुळे अर्धवट मिटले आहेत. ती खाली पडूं नये, म्हणून एक दासी तिला सावरून धरीत आहे व दुसरी शोकविव्हल दृष्टीने तिच्याकडे पाहत आहे. तसें करतांना ती एका हाताने सुंदरीची नाडी पाहत आहे व दुसरा हात तिने आपल्या धडधडत्या हृदयावर ठेवला आहे. पंखा धारण करणारी आणखी एक दासी विकलांग अवस्थेंत उभी आहे. जवळच कांहीं सेवक असून ते सुंदरीच्या अखेरच्या अवस्थेबद्दल दुःख करीत आहेत. उजव्या बाजस बाहेरच्या अंगणांत उभ्या असलेल्या दोन दासी या प्रकाराबद्दल आपसांत चर्चा करीत आहेत. मंडपावरचा मोरहि शोकाकुल झाला असून तो आपली मान लांब करून जणू त्या दासींचें बोलणें ऐकत आहे.

अनेक पाश्चात्य कलाविदांनी या चित्राची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. शोक, कारुण्य आणि सुस्पष्ट प्रसंगचित्रण या बाबतींत या चित्राला मागे टाकणारी कलाकृति कलेच्या इतिहासांत आढळणार नाही, असें ग्रीफिथ म्हणतो. फ्लॉरेन्सचे चित्रकार, यापेक्षा चांगल्या आकृति कदाचित् काढूं शकले असते आणि व्हेनिसच्या कलाकारांना कदाचित् त्यांत यापेक्षा जास्त चांगले रंग भरतां आले असते; पण त्यांपैकी कोणालाहि या चित्रांतल्या भावना यापेक्षा जास्त उत्तम रीतीने व्यक्त करतां आल्या नसत्या. या चित्रांत वाकाटककालीन चित्रकलेने उच्चांक गाठला, असें म्हणतां येतें.



नृत्यविनोद–अजंटा

१६ क्रमांकाच्या लेण्यापुढून खाली उतरलें असतां नागराजाचें लहानसें लेणें लागतें. त्यांत एका नागाने केलेल्या वेटोळ्यावर नागराज बसला असून त्याच्या मस्तकावर रत्नजडित मुकुट आहे. त्यावर बैठकीच्या नागाची फणा आहे. अजिंट्याचीं लेणीं नाग कारागिरांनी खोदलीं असल्याने त्यांमध्ये अशा नागराजांच्या प्रतिमा अनेक ठिकाणीं कोरल्या गेल्या आहेत, असें श्री. मिराशी म्हणतात.

१७ व्या क्रमांकाचें लेणें विहारपद्धतीचें असून १९ वें चैत्य पद्धतीचें आहे. १७ वें ऋषीक देशाच्या राजाने भिक्षुसंघाकरितां खोदविलें होतें. याच्या ओसरीच्या डावीकडील भिंतीवर एका भव्य चक्राचें चित्र आहे. याविषयीं मिराशी पुढील माहिती सांगतात –

हें चित्र कांतिवृत्ताचें आहे, अशा समजुतीने कांही पाश्चात्य विद्वानांनी या लेण्याला कांतिवृत्ताचें लेणें असें नांव दिलें होतें. पण हें चित्र कांतिवृत्ताचें नसून संसाराचें आहे. संसाराला पुष्कळदा चक्राची उपमा देतात. या भव्य चक्राचे आठ भाग करण्याचा उद्देश होता, असें दिसतें; पण त्याचे पांचच भाग चक्राच्या तुंब्यापासून परिधीपर्यंत जाणाऱ्या अंतरांनी विभागले आहेत. बाकीचे तीन भाग खिडकीमध्ये आल्यामुळे रंगविले गेले नसावे. या चक्रामध्ये खेडेगांवांतल्या तसेंच नगरांतल्या व राजप्रासादांतल्या जीवनाचे विविध पैलू रंगविले आहेत. उदाहरणार्थ शेतकऱ्यांचीं घरें, त्यांचें साधें जीवन, त्यांचीं जनावरें, नगरांतील नाचरंग, प्रेमी युगुलांचे विविध विलास, अरण्यांतील प्रशांत स्थलीं आत्मानात्मविचारांत गुंतलेले ऋषिगण, इत्यादि चित्रें तिथे आहेत. हें सबंध चक्र कोण्या भयंकर आकाराच्या प्राण्याच्या (दैवाच्या) हाताने फिरविलें जात आहे, असेंहि दाखविलें आहे.

१९ वें लेणें गंधकुटी या नांवाने उल्लेखिलेलें असून तें वैशिष्टचपूर्ण आहे. तें अंतर्बाह्य कोरीव कामाने भरलेलें आहे. त्याच्यासमोर द्वारमंडप असून त्यच्या वाटोळचा स्तंभांना उभ्या गलथ्यांनी व आडव्या कमलबंधाच्या पट्टचांनी भूषविलें आहे. त्याच्या शिरोभागीं आमलक आहे. या गंधकुटींतील चत्यांत दोन खांबांवरच्या कमानींत बुद्धाची उभी मूर्ति कोरलेली आहे. त्याने पायापर्यंत लोंबणारा अंगरखा घातला असून त्याची मुद्रा शांत आहे. चैत्याच्या घुमटावर हर्मिका व तिच्यावर तीन छत्रें आहेत.

अजंटाच्या चित्रांवरून तत्कालीन समाजस्थितीवर बराच प्रकाश पडतो. तत्कालीन श्रीमंतांच्या घरांचे दिवाणखाने बहुधा चौकोनी व क्वचित् गोलहि असत. आंतलें सामान साधेंच असे. बसायला चौरंगासारखे कातीव पायाचे मंच, टेकण्याकरिता त्यांना गोल आकाराची पाठ व पाय ठेवण्यासाठी पादपीठ असे. स्वयंपाकघरांत शिंकीं लोंबविण्याची पद्धत असे. भोजनासाठी बसायला चौरंग व ताट ठेवायला वाटोळी ठेंगणीशी तिवई असे. इथल्या चित्रांवरून तत्कालीन समाजांतल्या भिन्नभिन्न वंशाच्या लोकांचीहि कल्पना करतां येते. चित्रसमूहांत कांही लोक काळे, खुजे व चपटचा नाकाचे दिसतात. ते या प्रदेशांतले आदिवासी असावे. इथे नागवंशी लोकहि दिसतात. त्या काळांत कुशाण, पल्हव, ग्रीक वगैरे परदेशी लोकहि महाराष्ट्रांत येऊन स्थायिक झाले होते. त्यांचीं हीं चित्रें आहेत. १७ व्या लेण्यांत बुद्धाच्या श्रोतृवर्गांत दाढीमिशांचे, अंगांत पूर्ण बाह्यांचे कोट घातलेले व डोक्यावर उंच निमुळता टोप असलेले पुरुष दिसतात. हे या परदेशी वर्गाचे प्रतिनिधि असावे. चित्रांत कांही चिनी चेहरेहि दिसतात. तत्कालीन स्त्रीपुरुष अर्धोरुक म्हणजे अर्ध्या मांडया उघडचा दिसतील, असें वस्त्र नेसत व त्या वस्त्राला भिन्न रंगांचे पट्टे असत. बायका विकच्छ पद्धतीने नेसत. कांही पुरुष मांडचोळणा घालीत. शिकारी पुरुष तुमान घालून वर गुडघ्यापर्यंत पोचणारा कोट चढवीत. पुरुष सामान्यतः उत्तरीय वस्त्र जानव्याप्रमाणे वापरीत. कांही लोक एकाच वस्त्राचा कमरेखाली नेसण्यासाठी व वर उत्तरीयासाठीहि उपयोग करीत. कांही स्त्रिया आपल्या स्तनांवर रुंद पट्टी बांधीत. अशा पट्टचांना पयोधरपट म्हणत. त्यांची गांठ पाठीवर येत असे. चोळीचा प्रकार सार्वत्रिक होता असें दिसत नाही. अधिकारी व सामान्य जन आपले केस पाठीवर किंवा छातीवर मोकळे सोडीत. कांही लोक केसांवर वस्त्राची पट्टी बांधीत. ब्राह्मणांच्या डोक्यावर शेंडीची गांठ असे.



नर्तकी—अजंटा

अजंटाच्या लेण्यांत स्त्रियांच्या केशरचनेचे व शिरोभूषणाचे इतके विविध व सुंदर प्रकार दिसतात, की प्रेक्षक आश्चर्यचकित होतो. अलंकारांचीहि विविधता व विपुलता दिसते. ललाटिका, चटुलातिलक, मधे मोठा इंद्रनील मणि बसवलेला मोत्यांचा एकसर, गळसरी, सोनपुतळ्यांचे हार, वाटोळीं कर्णकुंडलें, मोत्यांचे लोंबते पदर असलेलीं केयूरें, रत्नजडित मणिमेखला, इ. अलंकार इथे दिसतात. नाकांत नथ घालण्याचा प्रघात त्या काळीं नव्हता.



खिन्न युवती—अजंटा

पुरुष पादत्राण घालीत व त्याचा पट्टा घोटचाजवळ पायाभोवती बांधीत. तलवार कमरेला बांधीत व खंजीर कमर-

पट्टयांत खोवीत. घोडयावरचें जीन, लगाम वगैरे सामान दिसतें; पण रिकीब मात्र दिसत नाही. धनुष्य, बाण, भाले व ढाली दिसतात. ढाली बहुधा वांकडया चौकोनी आयत आकाराच्या व क्वचित् वाटोळयाहि असत. छत्र्या बहुधा चौरस किंवा आयताकार दिसतात. राजछत्र मात्र वाटोळें असे.

अजंटयाच्या चित्रकलेने मोहून जाणार नाही, असा प्रेक्षक विरळा ! इथल्या चित्रकलेंतल्या तांत्रिक पूर्णतेचा परिणाम मनावर अधिक होतो, की त्या चित्रांतल्या भावनात्मक प्रगाढतेचा अधिक होतो, हें सांगणें कठीण आहे, असें डॉ. आनन्दकुमारस्वामी म्हणतात. या चित्रकलेला स्त्रीपुरुषांच्या आंतरिक भावनेची पूर्ण जाणीव आहे. एवढेंच नव्हे; तर पशुपक्ष्यांनाहि अंतःकरण असतें, हीहि जाणीव आहे. त्यामुळे या कलेला अमरत्व प्राप्त झालें आहे. [सह्याद्रि, वाकाटक नृपति व त्यांचा काल, डॉ. मोतीचंद्र.]

अजतुंग एक क्षेत्र. स्थाननिर्देश नाही. इथे केलेलें श्राद्ध फलप्रद होतें (वायु पु. ७७.४८). इथे पर्वकाळीं देवांच्या सावल्या दिसतात, असें म्हणतात. [हि. ध.]

अजपाजप विशिष्ट प्रकारचा जप. यांत नामोच्चारण नसतें. माला वगैरे बाह्य साधनांचाहि उपयोग करायचा नसतो. हा जप एक, दोन, तीन किंवा चार अक्षरांचा असतो. श्वासनिरोधासह हा जप अवाक् पद्धतीने करतात. हा जप म्हणजे योगसाधनेंतली एक प्राथमिक महत्त्वाची गोष्ट आहे. शून्यांत मनाला केंद्रित करण्याचें तें एक साधन आहे. सिद्ध आणि नाथपंथी यांच्या साहित्यांत या जपाची चर्चा आहे. दिवस आणि रात्र मिळून माणसाचे जे २१६०० श्वासोच्छ्वास होतात, त्यांनाच नाथपंथी योगी अजपाजप म्हणतात.

इकबीस सहस्र षट्सा आद् पवन पुरिष जप माली।
इला प्यंगुला सुषमन नारी अहनिसि बहै प्रनाली ।।
(गोरखबानी)

कबीराने नाथपद्धतीला धरूनच श्वास–निःश्वासांना अनुक्रमें ओहम् व सोहम् म्हटलें असून त्यांच्या आंतबाहेर जाण्यायेण्याने होणाऱ्या जपाला अजपाजप म्हटलें आहे.

श्री. कोल्हटकर यांनी आपल्या भारतीय मानसशास्त्र किंवा पातंजलयोगदर्शन या ग्रंथांत अजपाजपाचें विधान पुढीलप्रमाणे दिलें आहे —

हा विधि अत्यंत प्राचीन काळापासून चालत आला आहे, अशी सांप्रदायिकांची भावना आहे. भारतवर्षांत अति प्राचीन काळी जेव्हां हंस हा एकच वर्ण होता, त्या वेळीं ह्या अजपाजपद्वाराच विराटाची उपासना ऋषि–मुनि करीत असत, अशीहि समजूत आहे.


श्वसन करणाऱ्या प्राणिमात्राच्या ठिकाणीं हा अजपाजप जन्माच्या क्षणापासून मरणाच्या क्षणापर्यंत अखंडपणें पण न कळत चाललेला असतो. या विधीला अनुसरून त्याचा संकल्पपूर्वक उच्चार केला व असा क्रम नित्यनियमाने प्रत्यहीं ठेवला म्हणजे हा जप जाणिवेच्या कक्षेंत येऊन त्यावर सहजपणाने अनुसंधान राहूं लागतें. दीर्घ काळ असा क्रम चालविल्यास मनाशीं या जपाचें इतकें तादात्म्य होतें, की रिकाम्या असलेल्या कोणत्याहि क्षणीं या जपावर मन तात्काळ एकाग्र होतें व समाधिपादांतील २८ व्या सूत्रांत सांगितलेला अभ्यास सहजपणाने घडूं लागतो. या अभ्यासाने चित्तांत प्रसुप्तावस्थेंत असलेले अनंत जन्मांतील पापसंस्कार धुवून जातात. चित्त स्वच्छ, शांत आणि प्रसन्न होतें व आधि-व्याधि दूर होतात. हा जप करीत असतांना प्रणवाचा जप अनायासाने होतो. यासंबंधींचें अधिक विवेचन पातंजल योगसूत्रांतल्या समाधिपादांतील २७, २८ व २९ या सूत्रांच्या विवरणांत पाहायला मिळेल. [सि. सा.; पा. यो. द.]

अजपालिपा चौऱ्यांयशी सिद्धांपैकी एक. याचें दुसरें नांव जवरिपा असें होतें. हा कण्हपाचा प्रशिष्य होता. [पु. त. नि.]

अजमेर मूळ नांव अजयमेरु. राजस्थानांतील हें नगर अजयपाल नांवाच्या चौहान राजाने निर्माण केलें, असें कर्नल टॉड सांगतो (ॲनल्स ऑफ राजस्थान खं. १ पृ. ६६३ तळटीप). कालाबद्दल मात्र मतभेद आहेत. पण तद्विषयक सर्व मतें लक्षांत घेतां हें नगर फार प्राचीन असल्याचें कळतें. हें शहर तारागड डोंगराच्या पायथ्याशीं वसलें आहे. या डोंगरावर किल्ला आहे तो अज नांवाच्या राजाने इ. स. १४५ मध्ये बांधला किंवा तो अजय राजाने इ. स. बाराव्या शतकांत बांधला, असे उभयविध उल्लेख आहेत. या शहराभोवती जुना पडिक तट आहे. तारागड डोंगरावर किल्ला असून तो अकबराने बांधला आहे. तो सुमारें १४०० फूट उंच आहे.

इथे ऐतिहासिक इमारती पुष्कळ आहेत. अजमेरला जैनांचें प्राबल्य असून त्यांचें एक भव्य मंदिरहि आहे. शहराला लागूनच उत्तरेस आनासागर नांवाचा तलाव आहे. पृथ्वीराजाच्या आजाने तो बांधला. त्याच्या बांधावर शहाजहानने

पांच सुंदर क्रीडागृहें बांधलीं होतीं, त्यांतलीं चार आजमिती-सहि चांगल्या स्थितींत आहेत.



अढाई दिनका झोपडा–अजमेर

मुसलमान या शहराला दुसरी मक्का मानतात. दरसाल रज्जब महिन्यांत भरणाऱ्या इथल्या उरुसाला इस्लामी जगांतले यात्रेकरू सर्व ठिकाणांहून येतात. या नगराला प्रतिमक्केचें स्थान प्राप्त झालें त्याचें कारण, येथील मोइनुद्दिन चिश्ती याचा दरगा हें होय. मोइनुद्दिन हा भारतांतला पहिला इस्लामचा प्रचारक असें समजतात. हा इ. स. १२३५मध्ये मरण



ख्वाजा मोइनुद्दिन चिश्ती याचा दरगा–अजमेर

पावला. त्याचा हा दरगा प्रेक्षणीय आहे. अशीच दुसरी प्रेक्षणीय वास्तु म्हणजे शहाजहानने संगमरवरांत बांधलेली जामा मशीद. दरग्याच्या मागे अढाई दिनका झोपडा नांवाची एक इमारत शिल्पकलेच्यादृष्टीने महत्त्वाची आहे. पूर्वी तिथे संस्कृत महाविद्यालय होतें व तें सम्राट् वीसल देव याने स्थापलें होतें. त्याचीच पुढे मशीद बनविली गेली. इथे एका फकीराचा अडीच दिवसांचा उरूस भरत असे म्हणून त्या मशिदीला तें नांव पडलें. पाहा–मोइनुद्दिन चिश्ती.

अजय बंगालमधील बरद्वान जिल्ह्यांतून वाहणारी नदी. ही कटवानजीक भागीरथीला मिळते. हिला अजमती असेंहि म्हणतात. जयदेवाचें केंदुलि (किंदुबिल्व) हें जन्मग्राम हिच्या तीरावरच आहे. [हि. जॉ. ए. इं.]

अजयगढ उत्तर प्रदेशांतला एक पर्वत. प्राचीन नांव अजगढ. दशरथाचा पिता अज याने इथे एक किल्ला बनवला होता, म्हणून हें नांव पडलें असें सांगतात. मकरसंक्रांतीला इथे मेळा भरतो. या पर्वताची प्रदक्षिणा केल्याने रोग दूर होतात, अशी समजूत आहे. [कल्याण-तीर्थांक]

अजवीथि आकाशस्थ शिशुमाराच्या पाठीवरून दक्षिणेकडे जाणारा मार्ग. मूळ, पूर्वाषाढा व उत्तराषाढा हीं तीन नक्षत्रें मिळून हा मार्ग बनला आहे. याच्या दक्षिणेस पितृयाणमार्ग आहे. [भाग. पु. ५. २३. ५; ब्रह्मांड पु. २. २१; मत्स्य पु. १२४]

अजा एक रहस्यमय देवता. हिला सोळा हात–पाय, चार नखें व एक शिंग आहे. ही आपल्या केसांचे तीन अंबाडे बांधते. ही अष्टविद्यांची देवता असून हिला माया असेंहि म्हटलें आहे. [पु. इं.]

अजा एकादशी श्रावण कृ. ११ हीचें नांव. हिचें व्रत पापनाशक आहे. या व्रताची कथा पुराणांत आहे, ती अशी–

पूर्वी हरिश्चंद्र नांवाचा एक राजा होऊन गेला. विपरीत दैवगतीमुळे तो राज्यभ्रष्ट झाला. त्याने विश्वामित्राची दक्षिणा पुरी करण्यासाठी प्रथम पत्नी व पुत्र यांस विकलें व शेवटीं एका डोंबाघरीं स्वतःलाहि विकलें. धन्याच्या आज्ञेने तो श्मशानांतली प्रेतवस्त्रें गोळा करीत असतां त्याला गौतमऋषि

भेटला. त्याने सांगितलेलें अजा एकादशीचें व्रत केल्यामुळे हरिश्चंद्राला पत्नी-पुत्रांची भेट झाली व राज्यहि परत मिळालें. [पद्म पु. उ. खं. ५६.]

अजातशत्रु बुद्धकालांतला मगधाचा प्रतापी सम्राट्. हा बिंबिसाराचा पुत्र असून शिशुनागवंशांतला सहावा राजा होय. याच्या कालाबद्दल विवाद आहे. बार्नेटने याच्या मृत्यूचा काळ सन पूर्व ४७५ हा दिला आहे. याचीं कूणिक किंवा कूणिय अशीं नामांतरें आहेत. हा गादीवर कसा आला यासंबंधीं मतभेद आहेत. बिंबिसाराने आपल्या वृद्धापकाळीं स्वहस्तें याला राज्यावर बसविलें, अशी जैन दंतकथा आहे, तर गौतम बुद्धाचा मेहुणा देवदत्त याच्या चिथावणीवरून अजातशत्रूने बापाला उपाशी मारून राज्य बळकाविलें, अशा बौद्ध व ब्रह्मी दंतकथा आहेत. व्हिन्सेंट स्मिथ यांना या बौद्ध दंतकथा मान्य नाहीत (ऑक्सफर्ड हिस्टरी ऑफ् इंडिया). पुराणांत भारतीय युद्धानंतरचे राजे सांगतांना याचा निर्देश आला आहे.

बिंबिसाराच्या कारकीर्दींत महावीर व गौतमबुद्ध हे दोघेहि मगधांत आपापल्या मताचा प्रचार करीत होते. कोसलराजाची बहीण ही अजातशत्रूची सावत्र आई होती आणि महावीराशीं तिचें जवळचें नातें होतें. दंतकथा अशी, की आपल्या पतीचा म्हणजेच बिंबिसाराचा आपल्याच पुत्राने अमानुष वध केलेला पाहून ती दुःखाने मरण पावली. त्याचा सूड घेण्यासाठी कोसल राजाने आजातशत्रूवर स्वारी केली; पण त्यांत कोसल राजाचा पराभव झाला. आपली कन्या अजातशत्रूला देऊन त्याने मग त्याच्याशीं तह केला (व्हि. स्मिथ–अर्ली हिस्टरी). या विजयाने अजातशत्रूची महत्त्वाकांक्षा वाढली आणि त्याने आजूबाजूचे अंग, लिच्छवि, वज्जी, कोसल व काशी, हे जनपद म्हणजेच गंगा व हिमालय यांच्या मधला सर्व प्रदेश मगधराज्याला जोडून एका विस्तृत साम्राज्याची स्थापना केली. लिच्छवि जनपदांतले लोक हे त्याचे प्रमुख शत्रु होते. त्यांच्या आक्रमणाला पायबंद घालण्यासाठी याने शोण व गंगा यांच्या संगमाजवळ पाटलि गांवीं एक किल्ला बांधला.

अजातशत्रूच्या कारकिर्दींतली महान् घटना म्हणजे बुद्धाचें महापरिनिर्वाण ही होय. त्या प्रसंगीं बुद्धाच्या अस्थि मिळविण्यासाठी अजातशत्रूनेहि परिश्रम केले व आपल्या वांट्याचा भाग मिळाल्यावर राजगृहाच्या टेकडीवर स्तूप बनवून त्यांत त्या अस्थि सुरक्षित ठेवल्या. पाहा—पाटलिपुत्र

अजातिवाद अजातिवाद व विवर्तवाद या दोहोंत पुष्कळ अंशीं साधर्म्य आहे. अद्वय, अज, असें ब्रह्म तेवढेंच केवळ सत्य असून जग नांवाची वस्तु उत्पन्नच होत नाही, असें अजातिवादाचें प्रतिपादन आहे. विवर्तवादांतहि अधिष्ठान-स्वरूप ब्रह्म तेवढेंच सत्य असतें व नामरूपात्मक जग हा अध्यास असून तो मिथ्या असतो म्हणजे ब्रह्मभिन्नत्वाने सत्य नसतो. गौडपादाचार्यांनी मांडूक्यकारिकेंत हा अजातिवाद प्रतिपादिला आहे. याच्याहि पूर्वी उपनिषदांतहि या सिद्धान्ताचा ध्वनि ऐकूं येतो. माध्यमिक बौद्धांच्या दर्शनांत या सिद्धान्ताचें विस्ताराने प्रतिपादन केलेलें आहे.

उत्पन्न वस्तूचा उत्पत्तीपूर्वी जर अभाव असेल, तर त्या अभावात्मक वस्तूची सत्ता कोणत्याहि प्रकारें संभवत नाही. कारण अभावांतून कांहीहि उत्पन्न होत नाही. जर उत्पत्तीच्या पूर्वी वस्तु विद्यमान असेल, तर उत्पत्तीचें कांही प्रयोजनच नाही. जी वस्तु अजात आहे, ती अनंत काल अजातच राहणार. तिच्या स्वभावांत परिवर्तन होणार नाही. अजात वस्तु अमृत असते. अतएव ती जात होऊन मृत होऊं शकणार नाही.

याच कारणांनी माध्यमिक बौद्ध कार्यकारणभावालाहि असिद्ध ठरवितात. जर कार्य व कारण एक असतील, तर कार्याच्या उत्पत्तीबरोबरच कारणाचीहि उत्पत्ति झाली पाहिजे. पण तसें होत नाही. म्हणून सांख्यांचा नित्यकारणभाव असिद्ध ठरतो. असत् कारणापासून असत्कार्य उत्पन्न होऊं शकत नाही. तसेंच सत्कारणापासून सत्कार्यहि निर्माण होत नाही. सत्पासून असत्ची व असत्पासून सत्ची उत्पत्ति होत नाही. म्हणूनच कार्य आपोआप उत्पन्न होत नाही; तसेंच कोणत्याहि कारणाच्या द्वारेंहि उत्पन्न होत नाही. [भा. द. सं.; मांडूक्य कारिका; मूल माध्यमिक कारिका; हिं. वि. को.]

अजाद एक प्राचीन जनपद. पाणिनीच्या अष्टाध्यायींत याचा उल्लेख मिळतो (४. १. १७१). नांवावरून वाटतें, की हा प्रदेश बकऱ्यांसाठी प्रसिद्ध असावा. इटावाच्या आसपासचा प्रदेश आजहि बकऱ्यांसाठी प्रसिद्ध आहे. हाच कदाचित् पूर्वीचा अजाद असेल. [पा. भा.]

अजादान अजा = शेळी. चैत्रमासीं कोणत्याहि शुभ दिवसापासून तीन दिवस नक्त भोजन करतात. दुधाने भिजवलेल्या तांदुळांच्या पिठाची भाकरी हें भोज्य अन्न समजतात. भोजनापूर्वी चंदनाने पार्वतीची दशभुज प्रतिमा रेखतात. ज्वालामुखी या नांवाने तिची पूजा करतात व तिसऱ्या दिवशीं पांच दुधाळ शेळ्या ब्राह्मणास दान देतात. दानाचें फल–मोक्ष. [व्रतराज]

अज़ान

जाहीर करणें. मशीदींतला मुअझ्झन प्रार्थनेची वेळ झाली, की जो पुकारा करतो, त्यालाहि अज़ान म्हणतात. मशीद लहान असेल तर दरवाज्यांत उभें राहून आणि मोठी असली तर मनोऱ्यावर उभें राहून तो अज़ान करतो. त्याचे शब्द असे—

अल्लाहु अकबर ! अश्हदु अन् ला इलाह इल्लिल्लाह·········

अर्थ—परमेश्वर सर्व श्रेष्ठ आहे. मी ग्वाही देतों, की त्याच्या व्यतिरिक्त दुसरा देव नाही. मी ग्वाही देतों, की मुहम्मद हा देवदूत आहे. प्रार्थनेसाठी चला. पापमुक्तीसाठी चला·········

हा पुकारा करतांना मुअझ्झनने मक्केकडे तोंड करून कानांत बोटें घालणें आवश्यक असतें. [डि. इ.]

अजित

(१) जैन दैवतसमूहांतला यक्ष. सुविधिनाथाचा सेवक. याचें वर्णन——

तत्तीर्थजन्मात्वजितः श्वेताङ्गः कूर्मवाहनः ।
बिभ्राणौ दक्षिणौ बाहू मातुलिङ्गाक्षसूत्रिणौ ।
वामौ तु नकुलकुन्तधारिणौ धारयन् भुजौ ।।

(समृद्धिनाथचरित्र)

अर्थ——सुविधिनाथाच्या तीर्थांतून जन्मलेला, शुभ्रवर्णाचा, कासवावर बसलेला, चतुर्भुज व उजव्या दोन हातांत मातुलिंग व अक्षमाला धारण करणारा असा हा अजित आहे. (दिगंबर-मतें फल, माला, शक्ति व वरदमुद्रा धारण करणारा.)[जै. इ.]

(२) चाक्षुष मन्वंतरांतला विष्णूचा अवतार. याच्याच अवतारकालांत क्षीरसमुद्राचें अमृतासाठी मंथन झालें (भाग पु. २. २. ५). याने देवांना असुरांशीं मैत्री करून समुद्रमंथनांत त्यांचें सहकार्य घेण्याचा सल्ला दिला (भाग पु. ८. ६).

(३) स्वारोचिष मन्वंतरांत तुषितेच्या उदरीं जन्मलेला विष्णु (ब्रह्मांड पु. ३. ३).

(४) एक देवगण. या गणांत पुढील नांवांचे देव आहेत—असम, उग्रदृष्टि, सुनय, शुचिश्रवस्, केवल, विश्वरूप, सुदक्ष, मधुप, तुरीय व इंद्रयुक् (ब्रह्मांड पु. २. ९. ४६).

अजित केशकंबल

(सन पूर्व ५२३) हा बुद्धाच्या काळांतला एक विख्यात संप्रदायप्रवर्तक होता. केशकंबल या त्याच्या उपाधीवरून तो माणसांच्या केसांची घोंगडी बनवून ती पांघरीत होता, असें दिसतें. घोंगडी ही त्याच्या साध्या राहणीची साक्ष आहे. बुद्धाचा उदय झाला त्या वेळीं हा एक सुप्रसिद्ध आचार्य म्हणून गाजत होता. दीघनिकाय ग्रंथावरून हा भटक्या होता, असें कळतें. मतप्रचारासाठी आणि संघटनेसाठी तो भटकत असावा. लोकायतमताची सुव्यवस्थित मांडणी करून, यानेच त्याचा संघटित पंथ निर्माण केला, असें कांही विद्वानांचें मत आहे. पालीसूत्रांत याच्या बरोबरीने इतर पांच नास्तिकांचा उल्लेख येतो. पण या सर्वांत हाच तेवढा सूक्ष्म आणि तर्कशुद्ध विचार करणारा वाटतो. याचा आणि बुद्धाचा राजगृह येथील वर्षावासांत वाद झाला होता (बुद्धचर्या). याच्या मतांचे उल्लेख सनपूर्व सहाव्या शतकापासून तों सनाच्या आठव्या शतकापर्यंतच्या साहित्यांत अनेक ठिकाणीं आढळतात. याची सर्व माहिती बौद्ध आणि जैन ग्रंथांतूनच मिळते. जैन सूत्रांत याचीं मतें विकृत स्वरूपांत मांडलेलीं आहेत.

अजित हा पूर्ण भौतिकवादी होता. तो पृथ्वी, आप्, तेज व वायु हीं चारच भूतें मानतो व आकाश मानीत नाही. आत्मा, पुनर्जन्म, पापपुण्य आणि कर्मविपाक या गोष्टी तो ओळखीत नाही. यज्ञ, दान, हवन, हें सर्व झूट मानतो. त्याला इहपरलोक आणि देवदेवता मंजूर नाहीत. मानवप्राणी मरतो तेव्हा त्याच्या शरिरांतला पृथ्वीचा अंश पृथ्वींत, जलाचा जलांत, अग्नीचा अग्नींत आणि वायूचा वायूंत मिळून जातो व मूर्ख असो वा पंडित असो; त्याचें कांही शिल्लक उरत नाही, असें तो मानतो.

अजिताने औपनिषदिक तत्त्वज्ञानाचा आभ्यास केल्याचें दिसून येतें. कोणी श्रमण वा ब्राह्मण ब्रह्मज्ञानी होऊं शकतो, या गोष्टीवर त्याचा विश्वास नाही. चार्वाकाचें जीवनतत्त्वज्ञान अजिताच्या मतांत अंतर्भूत आहे. जवळजवळ सगळा चार्वाकवाद अजितानेच सांगितला, म्हटलें तरी चालेल. बुद्धाच्या पूर्वींच अजिताने ब्राह्मणधर्मविरुद्ध बंड पुकारलें. त्याची चळवळ बुद्ध आणि महावीर या दोघांच्याहिपेक्षा अधिक पायाशुद्ध होती. बुद्धाने मध्यममार्ग काढून कळत नकळत तत्त्वज्ञानाशीं तडजोड केली आहे. अशी तडजोड अजिताने केली नाही. पण बुद्धाच्या असामान्य व्यक्तिमत्त्वापुढे तो फिका पडला आणि त्याचें नांवहि लोपलें. ब्राह्मणी वाङ्मयांत त्याचा मागमूसहि लागत नाही व बौद्ध वाङ्मयांत तर त्याची सर्वत्र निंदाच आढळते.

अजिताचा संप्रदाय अग्निहोत्र, वेद, त्रिदंड, इ. गोष्टींचा विरोधी होता——

अग्निहोत्रं त्रयो वेदास्त्रिदण्डं भस्मगुण्ठनम् ।
बुद्धिपौरुषहीनानां जीविका धातृनिर्मिता ।।

(सर्व द. सं.)

अर्थ — अग्निहोत्र, वेदत्रयी, त्रिदंड, भस्मचर्चन (हें) ब्रह्मदेवाने बुद्धि व पौरुष यांनी हीन असलेल्या लोकांना उपजीविकेचें साधन निर्माण करून दिलेलें आहे.

वत्सदेशाचा तत्कालीन राजा उदयन हा अजिताच्या संप्रदायांत होता (ललितविस्तर अ. १). अजिताचा दार्शनिक सिद्धान्त हाच पुढे लोकायतदर्शनाचा व कौटिल्याच्या अर्थ-

शास्त्राचाहि पाया ठरला, असें धर्मानंद कोसंबी सांगतात. [बौ. ध. वि.; चार्वाक व त्याचें तत्त्वज्ञान.]

अजितनाथ जैनांचा दुसरा तीर्थंकर. अजित शब्दाची व्याख्या – 'पुरीषादिभिर्न जित इति अजितः' (= अन्नादिकांच्या मलांनी दूषित न होणारा) (हेमचंद्र). याला दुसरा अर्हत् मानतात. पापांना अजिंक्य म्हणून त्याला अजित म्हटलें आहे (उ. पु. पर्व ४८). याला सप्तपर्ण म्हणायचें कारण, याचा जन्म सप्तपर्ण (सातवण) वृक्षाच्याखालीं झाला हें होय. याचा ज्ञानवृक्षहि तोच असून लांछन गज आहे. याच्या आईला गरोदरपणीं हत्तीचें स्वप्न पडलें होतें. याच्या यक्ष-यक्षिणी महायक्ष व अजितबला या होत. जन्म माघमासीं रोहिणी नक्षत्रावर. मोक्षस्थान पारसनाथ पर्वत.



अजितनाथ–देवगढ

अजितनाथाच्या मूर्ति देवगढ, झांशी, सारनाथ, या ठिकाणीं आढळतात. हा खड्गासनावर उभा असून याच्या आसनाखालीं हत्ती कोरलेला असतो. यक्ष-यक्षिणी आसनाच्या दोन्ही कोपऱ्यांत उभीं असतात. यक्षाच्या हातीं भाला, अंकुश व गदा आणि यक्षिणीच्या हातीं पाश व अंकुश हीं आयुधें असतात. अवसर्पिणी कालांतील पांचव्या दुःखरूप फेऱ्यांत याचा जन्म झाला, असें जैन मानतात. अजितकेशकंबल हाच अजितनाथ कीं काय, याचा शोध घेतला पाहिजे. [जै. इ.]

अजितनाथ पुराण जैन पुराण. अजितनाथ हा जैनांचा दुसरा तीर्थंकर असून या पुराणांत त्याचे जन्म, जन्माभिषेक, राज्याभिषेक, निष्क्रमण, केवलज्ञान-लाभ, इ. प्रसंग ४७ पर्वांत वर्णिले आहेत.

अजितपुराण रन्न कवि लिखित कन्नड ग्रंथ. याचा लेखन-काल इ. स. ९९४ हा आहे. या ग्रंथाचा नायक जैनांचा दुसरा तीर्थंकर अजितनाथ हा आहे. त्याच्या वैराग्य आणि भक्ति यांचें पराकाष्ठेचें वर्णन यांत केलेलें आहे. या पुराणांत अजितनाथाचा जन्म, जन्माभिषेक, वैराग्य, परि-निष्क्रमण, इ. विषयांचें कवीने हृदयग्राही वर्णन केलें आहे. रन्नाने जैन धर्माबरोबरच अन्य धर्मांचेंहि अध्ययन केलें होतें, याचे दाखले या पुराणांत अनेक ठिकाणीं आढळतात. पाहा – रन्न. [किव्वळ्ळी गणपतिशर्मा]

अजितबला अजितनाथ या जैन तीर्थंकराची यक्षिणी. हिचें वर्णन –

लोहासनाधिरूढां चतुर्भुजां वरदपाशाधिष्ठित–
दक्षिणकरां बीजपूराङ्कुशयुक्तवामकराम्

(निर्वाणकलिका)

अर्थ – लोहासनावर बसलेली. (श्वेतांबरमतें वृषभवाहना) चतुर्भुज. वरदमुद्रा व पाश उजव्या हातीं. मातुलिंग व अंकुश डाव्या हातीं. (दिगंबरमतें अभयमुद्रा, शंख व चक्र धारण करणारी). देवगढ येथे हिची मूर्ति आढळते [जै. इ.]

अजिता भवमालिनीला अनुसरणारी देवता (मत्स्य पु. १७९ • ७१).

अजिन अजिन = चर्म. (अजिनं चर्म कृतिः स्त्री – अमर). बकऱ्याचें किंवा हरिणाचें कातडें. प्राचीन कालीं अजिन म्हणून बकऱ्याचें चामडें वापरण्याचा प्रघात होता. मागाहून मृगचर्माची चाल पडली. ऋग्वेदांत अजिनपरिधानाचा अनेक ठिकाणीं उल्लेख आहे. शतपथ ब्राह्मणांत अजिनवासी (मृगचर्म नेसणाऱ्या) मुनींचा उल्लेख आहे (३. ९. १. १२). यज्ञप्रसंगीं दीक्षा घेण्याच्या वेळीं यजमानाने आपल्या अंगावर कृष्णाजिन पांघरावें असें सांगितलें आहे (ऐ. ब्रा. १. १. ३). सामान्य इष्टीपासून तों मोठमोठ्या यागांपर्यंत यज्ञसंस्थेंत मृगाजिनाचा उपयोग असतो. बृहस्पतिसव यज्ञांत यजमानाला मृगाजिनावर बसवून अभिषेक करतात. उपनयनांत बटूलाहि मृगाजिन देतात. मृगाजिन हें एक पवित्र आसनहि मानलेलें आहे. याच्या जोडीने व्याघ्राजिनालाहि तेवढेंच पावित्र्य आहे. राजसूय यज्ञांत एका प्रसंगीं यजमानाला व्याघ्राजिनावर बसवून अभिषेक करतात (जै. ब्रा. १. ७. ८). शिव हा व्याघ्रचर्म धारण करणारा आहे. तो गजचर्महि पांघरतो.

अजि(चि)रवती वर्तमान राप्ती नदीचें प्राचीन नांव. पाणिनीने हिचा उल्लेख केला आहे (अष्टा. ६. ३. ११९). ही नदी हिमालयांत उगम पावून औध प्रांतांत गोरखपूर जिल्ह्यांत शरयूला मिळते. कोसलाची शेवटची राजधानी असलेलें श्रावस्ती नगर हिच्या कांठीं वसलें होतें. कोसलाचा राजा पसेनदि याच्या गच्चीवरून ही नदी

दिसत असे. नगरांतलीं मुलें हिच्या कांठीं कुस्त्या खेळत. पसेनदीचा पुत्र विदूदभ याने हिच्या तीरावर शाक्यांशीं युद्ध करून त्यांचा पराभव केला. या नदीला अनर्थावह असे महापूर येत. अशाच एका पुरांत विदूदभ राजा आपल्या सैन्यासह वाहून गेला. हिच्या कांठीं अनाथपिंडक नांवाच्या सावकाराने आपली संपत्ति पुरून ठेवली होती. एका महापुरांत त्या संपत्तीपैकीं ८०० कोटी द्रव्य वाहून गेलें. [हि. जॉ. ए. इं.]

अजीव जैन दर्शनांतील एक द्रव्य. रूपी व अरूपी असे याचे दोन भेद आहेत. रूपीचे स्कंध, देश, प्रदेश व अविभागी, असे पुन्हा चार भेद होतात. सकल पुद्गल द्रव्याला स्कंध, स्कंधाच्या अर्ध्या भागाला देश, तदर्ध भागाला प्रदेश व परमाणूला अविभागी म्हणतात. **पाहा** – पुद्गल. [वसुनन्दि-श्रावकाचार]

अजोगिपा चौऱ्यांयशी सिद्धांपैकी एक. चित्तसंप्रदाय व व्युदस्थान या ग्रंथांचा कर्ता. [म. च. को.]

अज्जा (सं. आर्या) महाराष्ट्रांतली एक ग्रामदेवता. दुर्गेचें शांत स्वरूप. गाथा सप्तशतींत हिचा उल्लेख येतो (क्र. १७२). हिचीं त्या कालीं मंदिरें असावीं. हिला बापदेवाची भार्या मानलें आहे. [गा. स.]

अझाबुल कब्र इस्लामी कल्पनेप्रमाणे थडग्यांत मिळणारी शिक्षा. माणसाचें शव थडग्यांत ठेवल्यावर तिथे दोन कृष्णवर्णी देवदूत येऊन त्याला पैगंबराविषयीं प्रश्न विचारतात. तो सच्चा मुसलमान असला, तर ' परमेश्वर एक आहे व मुहम्मद त्याचा प्रेषित आहे ' असें उत्तर देतो. मग त्याचें थडगें विस्तारतें, त्यांत प्रकाश पडतो व मृत मनुष्य त्यांत शांतपणे निजूं शकतो. अन्य धर्मी मृत माणसें विरुद्ध उत्तर देतात; त्यामुळे त्यांचें थडगें संकोच पावून तीं चिरडलीं जातात. देवाची कृपादृष्टि होईपर्यंत त्यांना मग तिथे कठोर शिक्षा भोगाव्या लागतात. [डि. इ.]

अटक एक नदी. या नांवाचें गांवहि आहे. पण हा शब्द सिंधुनदाच्या उत्तर भागास उद्देशूनच वापरतात. अटक हें नांव त्या नदीच्या दुस्तरतेला अनुलक्षून अकबराने दिलें आहे. पुढे तें लोकांच्या समजुतींत भारताची सरहद्द बनलें. अटकेच्या पलीकडे हिंदूंनी जाऊं नये; ती सीमा ओलांडून पुढे गेल्यास प्रायश्चित्त घ्यावें लागेल, असा धर्मशास्त्रीय अर्थहि त्या शब्दाला पुढे प्राप्त झाला. ज्याप्रमाणे अटक ही हिंदूंची धर्मशास्त्रीय मर्यादा मानली गेली, त्याचप्रमाणे हिंदु राज्यकर्त्यांच्या राजकीय विचारांची आणि कर्तृत्वाची सरहद्दहि तीच ठरली, असें म्हटलें तरी चालेल. इ. स. १७६० मध्ये बाळाजी बाजीराव याने गंगाधर यशवंत यास पत्र लिहिलें, की तुम्हीं सर्वांनी एक चित्तें करून मेहनत करून, अबदालीचें पारिपत्य करून अटक पार करावा' (राजवाडे खं. १.१५६.२४५). खैबर घाटापलीकडे जाऊन शत्रूला अडविण्याची किंवा त्याचें पारिपत्य करण्याची कल्पना मराठी राज्यकर्त्यांस शिवली नसावी, असें दिसतें. अटक ही भारताची उत्तर सीमा ही आपलीच समजूत आहे, असें नसून परकीयांचीहि तशीच समजूत प्राचीन काळापासून आहे. हप्तहिंदवः हा भारताविषयींचा अवेस्त्याच्या काळांतला उल्लेख आहे. सिंधुनदाच्या पलीकडे हिंदुस्थान, ही इराणी लोकांची आणि ग्रीक लोकांचीहि समजूत होती. [म. ज्ञा. को.]


अटवी राज्य विंध्याच्या पायथ्याचा प्रदेश. याला अटवी राज्य म्हणत. हें राज्य वेतवा नदीच्या दोन्ही तीरांवरील अरण्यांच्या रूपाने पसरलें होतें. या राज्यांत पुलिंद राहत होते. बाणभट्टाने त्यांचें वर्णन केलें आहे. [भा. सा.]

अट्टहास (१) हिमालयांतील एक क्षेत्र (वायु पु. २३). हें पितृतीर्थ आहे. वाराणसींतील एका लिंगाचेंहि हें नांव आहे. [हि. ध.]

(२) शिवाचा एक अवतार. चालू वैवस्वत मन्वंतराच्या विसाव्या युगचौकडींत हिमालयाच्या अट्टहास शिखरावर हा अवतार झाला. सुमंतु, वर्वरी, कबंध व कुशिधर हे याचे शिष्य होते. [प्रा. च. को.]

अट्टालक (१) उपरिगृह किंवा प्राकारमंडपाच्या वरची शाला असा याचा अर्थ आहे (हलायुधकोश). अलिकडच्या भाषेंत अट्टालकाला टॉवर किंवा मीनार असें म्हणतां येईल. लांबी व रुंदी यांच्या अनुपातांत ज्याची उंची कितीतरी पटींनी अधिक असते, अशा स्थापत्यरचनेला अट्टालक म्हणतात. प्राचीन काळीं नगर किंवा गड-कोट यांच्या सुरक्षिततेसाठी अट्टालकांची उभारणी करीत. पहारेकरी अट्टालकांत उभें राहून दूरच्या शत्रूच्या हालचालीहि पाहूं शकत. अट्टालकांची उभारणी वास्तुकलेच्या भव्यतेचें प्रदर्शन करण्यासाठीहि करीत. बहुतेक अट्टालक मंदिरें किंवा राजप्रासाद यांच्या मुख्य प्रवेशद्वारावरच बनवीत. पुढे अशा अट्टालकांना गोपुर असें

म्हणूं लागले. गुप्तकालीन मंदिरांचीं अत्युच्च शिखरें म्हणजे एक प्रकारचे अट्टालकच होत. देवगड येथील दशावतारमंदि-



अट्टालक

राचें शिखर ४० फूट उंच आहे. बहुतेक अट्टालकांचीं शिखरें निमुळतीं होत जातात; पण कांही अट्टालकांचा अग्रभाग चपटा व लांबटहि असतो. राजपुतांच्या व मोगलांच्या काळीं भारतांत उंच उंच मीनार बनविण्याची पद्धत होती. ताजमहालच्या चार कोपऱ्यांवर चार उंच मीनार बनविलेले दिसतात व ते त्या वास्तूची शोभा वाढवितात. चितोडचा विजयस्तंभहि याच प्रकारचा आहे. हिंदुमंदिरावरच्या अट्टालकावर किंवा गोपुरा-वर मूर्तिकारी दिसून येते. मदुरा व कांची येथील गोपुरें त्यांवरच्या मूर्तिकलेसाठी सुप्रसिद्ध आहेत. विजयस्तंभावरहि थोडयाबहुत प्रमाणांत मूर्तिकारी आढळते. **पाहा** — गोपुर; [हिं. वि. को.]

(२) भूतपिशाचांच्या गमनागमनाचें स्थान. [पु. इं.]

अट्टालिका

दोन किंवा अधिक मजले असलेलें घर, उंच घर किंवा राजवाडा. 'दिष्कम्भचतुरस्रमट्टालकम्' (= प्रशस्त व चौकोनी वास्तु म्हणजे अट्टालक होय), अशी त्याची व्याख्या आहे. [मानसार]

अट्टे वक्कल

कर्नाटकांतली डोंगरी जमात. अंकोला आणि येल्लापूर या भागांत यांची वस्ती आहे. यांची लोकसंख्या अल्प आहे. अट्टे हा कन्नड शब्द असून त्याचा अर्थ बांबूची पाटी असा आहे. हे लोक बांबू व वेत यांच्या पाटया वगैरे वस्तु बनवतात, त्यावरून त्यांना हें नांव पडलें आहे. यांची भाषा कन्नड-कोकणी अशी मिश्र आहे. हे लोक झोपडयांतून राहतात. त्यांचा मुखिया असतो त्याच्या घराला देवडी असते आणि दारांत एक वृक्ष लावलेला असतो. कांही अट्टे वक्कल गुरें चारण्याचें काम करतात. त्यांना स्वत:ची अशी शेती करणें माहीत नाही. लग्नासाठी जबर व्याजाने एखाद्या सावकाराचें कर्ज घेतात आणि तें फिटेपर्यंत तो पुरुष त्या सावकाराच्या घरीं राहून काम करतो.

देव-धर्म — तिरुपति वेंकटरमण ही यांची कुलदेवता. हे तुळशीच्या झाडाखाली त्याची मूर्ति बसवून तिरुपतीच्या यात्रेसाठी जातात. यात्रेकरूला दास म्हणतात आणि त्याचा आदर करतात. प्रतिवर्षी एखाद्या घरीं हरिदिन या नांवाने वेंकटरमणाचा उत्सव करतात. त्यांच्या चुलीजवळ एका कट्टयावर नारळ ठेवलेला असतो. त्या नारळांत ते आपल्या पितरांचा निवास आहे, असें समजतात.

जननविधि — एक दिवस जननाशौच पाळतात. धोब्या-कडून शुद्धि करवितात. १४ व्या दिवशीं मुलाचें नांव ठेवतात.

विवाहप्रथा — बालविवाह प्रचलित आहे. मुलाचा बाप फुलें घेऊन मुलीच्या बापाकडे जातो व मुलीला मागणी घालतो. मुलीचें देज ठरल्यावर वधूपित्याला विडा देतो. लग्नासाठी नवरदेव वधूगृहीं जात असतांना एका हातीं रंगीत रुमाल आणि दुसऱ्या हातांत कटचार घेतो. अंगांत बंडी, डोक्याला रुमाल आणि पायांत खडावा असा त्याचा वेष असतो.

मर्तिकप्रथा — एखाद्या घरीं मृत्यु झाला, की सगळे लोक तिथे रडायला जातात. एखादा मनुष्य अपघाती मेल्यास दुसऱ्या गांवच्या ग्रामदेवाला कोंबडें देतात. एक दिवस सुतक पाळतात.

सामाजिक प्रथा — मुखिया सर्वांना आचार-विचार समजा-वून देण्यासाठी जमातीच्या सभा भरवतो, जातिधर्माला सोडून वागणाऱ्याला आर्थिक दंड देतो व क्वचित् प्रसंगीं बहिष्कृतहि करतो. [शंकर कृष्णतीर्थ.]

अट्ठकथा

(सं. अर्थकथा.) अट्ठकथा म्हणजे पाली भाषेंतील बौद्ध ग्रंथांवर लिहिलेलें भाष्य. यांत मूळ पाठाची व्याख्या नीट कळावी म्हणून प्रथम तत्संबंधी एक कथा सांगितलेली असते व मग मूळ शब्दांचा अर्थ सांगितला जातो. त्रिपिटकाच्या प्रत्येक ग्रंथावर अशा अट्ठकथा उपलब्ध आहेत. बौद्ध अनुश्रुतीप्रमाण स्थविरमहेंद्र व त्याचे सांगाती भिक्षु, लंकेंत जातांना पालित्रिपिटकांबरोबर अट्ठकथाहि घेऊन गेले. या कथा प्रथम मुखपरंपरेने चालत होत्या. लंकेंत

त्यांचें पालि रूप लुप्त होऊन त्यांना सिंहली रूप प्राप्त झालें. बुद्धघोषाने पुढील प्रमुख अट्ठकथांचा निर्देश केला आहे—(१) महा अट्ठकथा (२) महा पच्चरी (३) कुरुंदी (४) अंधट्ठकथा (५) संखेप अट्ठकथा (६) आगमट्ठकथा व (७) आचरियानं समानट्ठकथा.

भारतांत बौद्धधर्म ऱ्हासोन्मुख झाल्यावर वरील अट्ठकथा लंकेंतून इकडे आणण्याची आवश्यकता निर्माण झाली. आणि म्हणूनच आचार्य रेवंताने आपला पट्टशिष्य बुद्धघोष याला त्या उद्देशाने लंकेंत पाठविलें. बुद्धघोषानें सिंहली स्थविरांच्या साहाय्याने या सिंहली अट्ठकथांचें पालिरूपांतर केलें. बुद्धघोषकृत सुमंगलविलासिनी, पपंचसूदनी, सारत्थपकासिनी व मनोरथपूरणी या अट्ठकथा सिंहली महा अट्ठकथेवर आधारलेल्या आहेत.

पालि साहित्यांत अट्ठकथांचा समावेश इ. स. च्या चौथ्या पांचव्या शतकापासून झालेला दिसतो. बुद्धानंतर सुमारें १००० वर्षांनी या अट्ठकथा लिहिल्या गेल्या होत्या; पण त्यांची परंपरा तुटली होती. या अट्ठकथा बौद्धांच्या सिंहली परंपरेवर आधारित नसत्या, तर त्यांना इतक्या दीर्घ कालखंडानंतर बौद्ध साहित्यांत प्रामाण्य लाभलें नसतें. आजमितीस त्रिपिटकाच्या खालोखाल अट्ठकथा प्रमाणभूत मानल्या जातात. बुद्धदत्त, बुद्धघोष व धम्मपाल, हे तीन पालिसाहित्यांतले मोठे अट्ठकथाकार होत. हे चौथ्या पांचव्या शतकांतच होऊन गेले. [पा. सा. इ.]

अट्ठ गुरुधम्मा (सं. अष्ट गुरुधर्म.) बौद्ध भिक्षूंच्या बाबतींत जसे चार पाराजिक धम्म वर्ज्य सांगितले आहेत, त्याचप्रमाणे भिक्षुणींना अट्ठ गुरुधम्मा म्हणजे आठ प्रकारचे निषेध सांगितले आहेत. मैथुनादि व्यभिचारांना मुख्य धरून हे निषेध कल्पिलेले आहेत. असे गुन्हे करणाऱ्या भिक्षुणींना भिक्षुसंघांतून घालवून देत असत.

अठरा एक संख्या. भारतीय वाङमयांत या संख्येला एक वैशिष्टच लाभलें आहे. भारतीय युद्ध १८ दिवस लढलें गेलें. त्यांत १८ अक्षौहिणी सैन्याने भाग घेतला. महाभारताचीं पर्वे १८ आहेत. व्यासांनी प्रथम जें भारत रचलें, त्याला जय अशी संज्ञा आहे. 'नारायणं नमस्कृत्य...ततो **जय**मुदीरयेत्' हा त्याचा पहिला श्लोक असून जय शब्दाची संख्याशास्त्रांतून निघणारी संख्याहि १८ च आहे (ज = ८, य = १). गीतेचे अध्यायहि १८ च आहेत. रामाबरोबर लंकेवर चालून गेलेलें वानरसैन्य १८ पद्मेंच होतें. मोरोपंतांनी आपल्या भारत रचनेच्या प्रारंभीं प्रत्येक आर्येचें आद्याक्षर विशिष्ट योजून 'श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति' असा १८ अक्षरांचा जयमंत्र साधला आहे. पुराणें १८, उपपुराणें १८ व विद्या १८, अशा प्रकारें आणखीहि कांही १८ संख्येचीं उदाहरणें आढळतात. मोरोपंतांच्या भारताची आर्यासंख्या एकंदर १७१३६ येते. त्यांतील आकड्यांची बेरीज १८ च भरते.

अठरा आखाडे आखाडा म्हणजे संप्रदाय किंवा पंथ. त्यावरून अठरा आखाडे याचा अर्थ गोसाव्यांचे अठरा पंथ असा रूढ झाला. हे आखाडे किंवा संप्रदाय पुढीलप्रमाणे आहेत —

अघोरी, अरण्य, अवधूत, आनंद, आश्रम, इंद्र, उदासी, कानफाटचा, कालवेला, गोदंड, गोरखपंथी किंवा गोरखनाथी, डवरा, नंगागिरी, निरंजनी, निर्वाणी, पुरी, भराडी, भारती, राऊळ, वन आणि सरभंगी.

इथे अठरा हा आकडा अनेक या अर्थानें घ्यायचा आहे. वर दिलेलीं नांवें हीं केवळ अठराच नसून एकवीस भरतात. सांप्रत यांपैकीं अनेकांचें गोसावीपण जाऊन त्यांना जातीचें स्वरूप आलें आहे. **पाहा** – गोसावी पंथ. [म. ज्ञा. को.]

अठरा उपपुराणें ब्रह्मपुराण, विष्णुपुराण, शिवपुराण, बृहन्नारदपुराण, लघुनारदपुराण, नृसिंहपुराण, भागवतपुराण, रेणुकापुराण, यमनारदपुराण, हंसपुराण, नंदीप्रोक्तपुराण, वायुप्रोक्तपुराण, विष्णुरहस्यपुराण, तत्त्वसारपुराण, भगवतीपुराण, पाशुपतपुराण, भविष्यपुराण, ब्रह्मांडपुराण, (गणेशपुराणावरून).

दुसरा पाठ पुढीलप्रमाणें —

सनत्कुमारोक्त, नारसिंह, नारद, शिवधर्म, दुर्वासोक्त, नारदोक्त, कापिल, मानव, औशनस, ब्रह्मांड, वारुण, कालिका, माहेश्वर, सांब, सौर, पराशरोक्त, विष्णुभागवत, देवीभागवत. [हेमाद्रि]

अठरा कारखाने कारखाना म्हणजे मोठें खातें. शिवाजी महाराजांनी अठरा शाळा स्थापल्या, त्या अशा — गजशाला, मल्लशाला, धान्यसंग्रह, भेरिदुंदुभी. यंत्रशाला, वैद्यशाला, पानीयशाला, उष्ट्रशाला, शिबिरशाला, खटकशाला, रत्नशाला, पाकशाला, शस्त्रशाला, तांबूलशाला, रथशाला, लेखनशाला, नाटकशाला (वस्तुशाला), जिनसखाना.

पेशवे सरकारचे अठरा कारखाने असे — तोफखाना,

पीलखाना, उष्टरखाना, शिलेखाना, फरासखाना, कोठी, लकडखाना, इमारत, बागा, कुरणें, वहीतकोठी, रथखाना, पुणें पेटा, थट्टी, पोतें व जामदारखाना, जिन्नसशाळा व वैद्यशाळा, पुस्तकशाळा व खासगी. [सु. वि. को.]

अठरा धान्यें जव, गहू, भात, तिळ, राळे, कुळीथ, उडीद, मूग, मसूर, वाल, सांवे, मोहरी, गवेधुक (तृणधान्य), नीवार (तृणधान्य), तूर, वाटाणा, हरभरा व चीनक हीं अठरा धान्यें होत (स्कंदपुराण). या बरोबरच अठरा किंवा वीस उपधान्येंहि मानलेलीं आहेत.

अठरा नाथपंथ संतनाथ, सातनाथ, गुगुळीम, धर्मनाथ, हाजी, मिस्कीन, कादर, नाथीयास्वजन, रामनाथी, एकनाथी, जारोबैरागी, गमपंथी, चाळिका, गंगनाथ, हेहेतमार्ग, धनंजय, गजकथडी व नागार्जुन. [दर्शनप्रकाश]

अठरा पगड जाती तांबट, पाथरवट, लोहार, सुतार, सोनार, कासार, कुंभार गुरव, धनगर, गवळी, वाणी, जैन, कोष्टी, साळी, चितारी, माळी, तेली व रंगारी. [सु. वि. को.]

अठरा पुराणें यांचीं नांवें अशीं – शिव, भविष्य, मार्कंडेय, लिंग, वराह, स्कंद, मत्स्य, कूर्म, वामन, ब्रह्मांड. (हीं दहा पुराणें शैव आहेत.) विष्णु, भागवत, नारद, गरुड. (हीं चार वैष्णव पुराणें आहेत.) ब्रह्म, पद्म. (हीं दोन ब्राह्म पुराणें आहेत.) अग्नि व ब्रह्मवैवर्त. (शेवटच्या पुराणांत सूर्याचा महिमा प्रतिपादिला आहे.) (स्कंद पु. संभव २.३०.३९)

या पुराणांचीं आद्याक्षरें घेऊन एक श्लोक बनविला आहे तो असा—

मद्वयं भद्वयं चैव ब्रत्रयं वचतुष्टयम् ।
अन्नापलिंगकूस्कानि पुराणानि पृथक् पृथक् ।।

अठराहि पुराणांचा प्रधान उद्देश शिव, विष्णु, सूर्य, गणेश व शक्ति या देवतांची उपासना वाढविणें व त्यांचें माहात्म्य प्रकट करणें, हा आहे. (प्रस्तुत कोशांत प्रत्येक पुराणावर स्वतंत्र लेख दिलेला आहे.)

अठरा विद्या (१–४) चार वेद (५–१०) षडंगें (११) मीमांसा (१२) न्याय (१३) धर्मशास्त्र (१४) पुराण (१५) आयुर्वेद (१६) धनुर्वेद (१७) गांधर्व वेद व (१८) अर्थशास्त्र. (यांपैकी बहुतेक विषयांवर स्वतंत्र टिपण कोशांत आहे तें पाहावें.)

अठरा स्मृतिकर्ते (१) विष्णु (२) पराशर (३) दक्ष (४) संवर्त (५) व्यास (६) हारीत (७) शातातप (८) वसिष्ठ (९) यम (१०) आपस्तंब (११) गौतम (१२) देवल (१३) शंख-लिखित (१४) भरद्वाज (१५) उशनस् (१६) अत्रि (१७) शौनक व (१८) याज्ञवल्क्य.

अठ्ठावीस योग मुहूर्त ज्योतिषांत आनंदादि २८ योग सांगितले आहेत, त्यांचे श्लोक पुढीलप्रमाणे—

आनंदाख्यः कालदंडश्च धूम्रो
धाता सौम्यो ध्वांक्षकेतू क्रमेण ।
श्रीवत्साख्यो वज्रकं मुद्गरश्च
छत्रं मित्रं मानसं पद्मलुंबौ ।।१।।
उत्पातमृत्यू किल काणसिद्धी
शुभोऽमृताख्यो मुसलो गदश्च ।
मातंग रक्षश्चर सुस्थिराख्याः
प्रवर्धमानाः फलदाः स्वनाम्ना ।।२।।


अर्थ— (१) आनंद (२) कालदंड (३) धूम्र (४) धाता (५) सौम्य (६) ध्वांक्ष (७) केतु (८) श्रीवत्स (९) वज्रक (१०) मुद्गर (११) छत्र (१२) मित्र (१३) मानस (१४) पद्म (१५) लुंब (१६) उत्पात (१७) मृत्यु (१८) काण (१९) सिद्धि (२०) शुभ (२१) अमृत (२२) मुसल (२३) गद (२४) मातंग (२५) राक्षस (२६) चर (२७) स्थिर व (२८) वर्धमान. हे योग आपापल्या नांवाप्रमाणे शुभाशुभ फल देतात.

हे योग काढतांना अभिजितासह २८ नक्षत्रें धरतात. कोणत्या तिथीस कोणता योग आहे हें जाणण्यासाठी इष्ट रविवार असेल तर अश्विनी, सोमवार असेल तर मृगशीर्ष, मंगळवार असेल तर आश्लेषा, बुधवार असेल तर हस्त, गुरुवार असेल तर अनुराधा, शुक्रवार असेल तर उत्तराषाढा व शनिवार असेल तर शततारका, या नक्षत्रांपासून क्रमाने इष्ट तिथीपर्यंतचीं नक्षत्रें मोजावीं. जी संख्या येईल, त्या संख्येने दर्शविलेला योग त्या दिवशीं आहे, असें समजावें. [मु. चिं.]

अठ्ठावीस व्यास प्रथम व्यास प्रजापति, (द्वापारयुगांत) उशना, बृहस्पति, सविता, मृत्यु, मघवा, वसिष्ठ, शारद्वत, त्रिधामा, त्रिवृष, भारद्वाज, अंतरिक्ष, धर्मी,

प्रस्वासुरण, धनंजय, मेधातिथि, वृत्ति, अत्रि, गौतम, उत्तम, हर्यात्मा, वेना, आजस्रजाक्ष, सोम, उष्यायन, तृणबिंदु कृष्ण-द्वैपायन. [देवीभागवत]

अडकित्ता तांबूलसाहित्यांत अडकित्त्याला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. अडकित्ता म्हणजे सुपारी कापण्याचें हत्यार. याचे अनेक प्रकार आढळून येतात. हा शब्द अडकोत्तु या कानडी शब्दापासून मराठींत आला आहे. अडकी = सुपारी आणि ओत्तु = दावणें किंवा फोडणें, या दोन कानडी शब्दां-



अडकित्ता

पासून तो बनला आहे. अडकित्त्याचा जुना उल्लेख भीम-कवीच्या (इ. स. १३६९) बसवपुराणांत सांपडतो. पतंजलीच्या महाभाष्यांत शङ्कुलाखंड असा शब्द असून डॉ. वासुदेवशरण अग्रवाल शङ्कुला याचा अडकित्ता असाच अर्थ सांगतात. अडकित्ते नाना प्रकारच्या कारागिरीचे असतात. पुणें येथील श्री. केळकर यांच्या पुराणवस्तुसंग्रहांत मिथुनकल्पनेचा एक अडकित्ता आहे. त्याची एक बाजू पुरुषाकृत्ति व दुसरी बाजू स्त्रीच्या आकृतीची आहे. सुपारी कापतांना हें मिथुन परस्परांस आलिंगन देत असल्याचा प्रत्यय येतो.

अडपडव दक्षिण कर्नाटकांतल्या न्हाव्यांना हें नांव असून तें त्यांच्या धोकटीवरून पडलें आहे. [का. ट्रा. स. इं.]

अडभोपा हस्तरेखा पाहून भविष्य वर्तविणारी राजस्थानांतली एक जात. यांना सुरेल आवाजाची देणगी अभिजात असते. यांच्या बायका नाचून आणि गाऊन भिक्षा मागतात.

अॅडॅम ख्रिस्ती धर्मानुसार पहिला मानव पुरुष. हाच मानव-वंशाचा जनक होय. बायबलमधील अॅडमह या हिब्रू भाषेंतील शब्दाचा अर्थ पृथ्वीतत्त्व असा आहे. त्यांतून देहधारी प्राणी उत्पन्न झाला, असा याचा आशय आहे. अॅडॅम हा शब्द जातिवाचक म्हणजे मनुष्यजातीचा बोधक आहे. परंतु फार प्राचीन काळापासून त्याचा उपयोग विशेषनामासारखा करतात.

ईश्वराने एकूण सहा दिवसांत विश्वोत्पत्ति केली, असें बायबलांत सांगितलें आहे. प्रथम देवाने आकाश व पृथ्वी निर्माण केली. सुरवातीला सर्वत्र अंधार पसरलेला होता व देवाचा आत्मा जलावर तरंगत होता. नंतर देवाने प्रकाश उत्पन्न केला. दुसऱ्या दिवशीं आकाश व जल पृथक् केलें. तिसऱ्या दिवशीं कोरडी जमीन व तिच्यावर गवत, झाडेंझुडपें, चौथ्या दिवशीं ग्रहतारे, पांचव्या दिवशी जीवजंतु व पक्षी व सहाव्या दिवशीं अनेक जातींचे वनपशु व ग्राम्य पशु निर्माण केले. या सर्व सृष्ट वस्तंवर स्वामित्व गाजविण्यासाठी त्याने स्त्री व पुरुष असें एक मिथुन निर्माण केलें. त्याने भूमींतील मातीचा मनुष्य बनविला व त्याच्या नाकपुड्यांत प्राणवायु फुंकला.

या पुरुषाच्या शरीराची एक फांसळी काढून व त्यांत मांस भरून ईश्वराने ईव्ह नांवाची त्याची सहचारिणी निर्माण केली. या पुरुषाच्या करमणुकीसाठी देवाने एडन नांवाची एक सुंदर बाग तयार केली. या बागेंत एक ज्ञानवृक्ष होता. या वृक्षाचें फळ न खाण्याबद्दल त्याने या दांपत्याला बजावलें. पण एक दिवस देवाचा वैरी सॅटन सर्परूप घेऊन तिथे आला व त्याने ईव्हचें मन वळवून दोघांना ज्ञानवृक्षाचें फळ खायला लावलें. त्याबरोबर ज्ञान होऊन त्यांना नग्न स्थितींत राहण्याची लाज वाटू लागली. तेव्हा त्यांनी अंजिराचीं पानें शिवून स्वतःकरिता वस्त्रें बनविलीं. ज्ञानवृक्षाचें फळ खाण्याच्या अपराधाबद्दल शाप देऊन देवाने त्यांना बागेंतून हाकलून दिलें. तेव्हापासून मनुष्य मर्त्य व पतित झाला, असें ख्रिस्ती लोक मानतात. अॅडॅम-ईव्हना एबेल, केन व सेथ असे तीन पुत्र झाले. एबेलला केनने ठार मारलें. केन व सेथ यांच्यापासून मानववंश विस्तारला. यहुदी धर्मानुसार अॅडॅमच्या अधःपाताची कथा मानवाची अपूर्णता दर्शविते. [म. ज्ञा. को; ए. रि.]

अडवळ धूम पडवळ धूम महाराष्ट्रांतल्या मुलींचा एक खेळ. दोन मुली समोरासमोर उभ्या राहतात व एकमेकींच्या गळ्यांत हाताची मिठी घालून वर्तुळाकार नाचतात. या खेळाचें गाणें असें—

कारली धूम । पडवळ धूम ।।
पडवळीच्या वेलावर पाय कसा देऊं ।
पाय कसा देऊं ।।
नागिणीच्या फणीवर दिवा कसा लावूं ।
दिवा कसा लावूं ।।

मूठभर तांदळाचें वाण कसें देऊं
वाण कसें देऊं ।।
वीतभर खणाची चोळी कशी शिवूं ।
चोळी कशी शिवूं ।।
मामाला लेक झाली नांव काय ठेवूं ।
नांव काय ठेवूं ।।
[व्या. ज्ञा. को.]

अड (ट) वियर द. भारतांत तंजाऊर व तिनेवेल्ली जिल्ह्यांत असणारा तमिळभाषी विणकरांचा वर्ग. [का. ट्रा. स. इं.]

अडवी द. भारतांतल्या गोल्ल जातीची एक शाखा. [का. ट्रा. स. इं.]

अडियोडि याचा अर्थ गुलाम किंवा तावेदार असा होतो. केरळांतल्या सामंतांची एक पोटजात. यांचा दर्जा नायरांप्रमाणे असतो. [का. ट्रा. स. इं.]

अड्यार हें ठिकाण मद्रासपासून सात मैलांवर आहे. हें थिऑसॉफिकल सोसायटीचें एक जागतिक महत्त्वाचें पीठ आहे. इथे अड्यार नदी बंगालच्या उपसागराला मिळते. इथे ३०० एकर जागेंत एक रमणीय उद्यान केलेलें असून त्यांत एक प्रचंड विस्ताराचा वटवृक्ष आहे. त्या वृक्षातळीं सभा-संमेलनेंहि भरतात. इथे वरील सोसायटीच्या अनेक इमारती असून एक मोठें ग्रंथालयहि आहे.

आणिमा अष्ट सिद्धींपैकी एक. ही प्राप्त झाली, की माणसाला अणूएवढें लहान होतां येतें. **पाहा**—अष्ट सिद्धि. [स. पॉ.]

अणु कालाचें एक अत्यंत सूक्ष्म प्रमाण. दोन अणु = एक परमाणु (भाग. पु. ३. ११. ५).

अणुवाद प्राचीन काळीं अणुवाद हा दार्शनिक विवेचनाचा एक विषय होता. प्रत्येक प्राकृत पदार्थ हा अणूंचा बनलेला असतो, असा अणुवादाचा सिद्धान्त आहे.

अन्त्यावयवत्वम् अणुत्वम् (= ज्या पदार्थाचे पुढे आणखी अवयव पाडतां येत नाहीत, त्याला अणु म्हणावें), अशी अणूची व्याख्या आहे. अणु किती सूक्ष्म आहे, याची कल्पना येण्यासाठी पुढील उदाहरण देतात—

जालसूर्यमरीचिस्थं सूक्ष्मं यद् दृश्यते रजः ।
तस्य षष्ठतमो भागः परमाणुः स उच्यते ।।

अर्थ—खिडकींतून येणाऱ्या सूर्यकिरणांत जो सूक्ष्म रजःकण दिसतो, त्याच्या सहाव्या भागाला परमाणु असें नांव आहे.

अणु निरवयव आणि म्हणूनच नित्य आहे. अणूलाहि आणखी अवयव आहेत, असें मानलें तर अनवस्था प्रसंग ओढवेल, असें वैशेषिकांना वाटतें.

वैशेषिक दर्शनाचे आचार्य कणाद महर्षि यांनी अणूसंबंधी विशेष विचार केला आहे. त्यांना अणूचा इतका ध्यास लागला होता, की पीलवः पीलवः असें म्हणतच त्यांनी देह ठेवला, अशी त्यांची आख्यायिका सांगतात.

वैशेषिकांच्या अणुवादाची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे—

सृष्टीच्या प्रारंभीं सर्व पदार्थांचे चार प्रकारचे अणु किंवा परमाणु असतात. परमेश्वराच्या इच्छेने त्यांच्यांत हालचाल उत्पन्न होते व दोन अणु एकत्र येऊन एक द्व्यणुक तयार होतें. तीन द्व्यणुकांच्या संयोगाने एक त्र्यणुक उत्पन्न होतें. व चार त्र्यणुकांच्या संयोगाने एक चतुरणुक बनतें आणि अशा रीतीनें स्थूल पृथिवी, स्थूल जल, स्थूल तेज व स्थूल वायु हीं द्रव्यें अस्तित्वांत येतात. विशेष हे या निरनिराळ्या द्रव्यांच्या अणूंचे व्यावर्तक आहेत.

ईश्वराला जेव्हा सृष्टीचा प्रलय व्हावा, अशी इच्छा उत्पन्न होते, तेव्हा द्व्यणुकाचे दोन परमाणु एकमेकांपासून विभक्त होतात व द्व्यणुकाचा नाश होतो. द्व्यणुकनाशामुळे क्रमाने त्र्यणुकनाश व चतुरणुकनाश होतो. अशा रीतीने असमवायि कारण नाशाने व समवायि कारण नाशाने द्रव्यनाश होतो. सृष्टीचा अवांतर प्रलय होतो, तेव्हा सर्व कार्यद्रव्यांचा ध्वंस होतो व महाप्रलय होतो, तेव्हां सर्व भावकार्यांचा ध्वंस होतो.

वैशेषिकांनी उत्पत्तीचा जो क्रम मानला, तोच क्रम त्यांनी विनाशाचाहि मानला आहे. या प्रक्रियेवर शंकराचार्यांनी वेदान्तसूत्रांवरील (२. ३. १४) आपल्या भाष्यांत आक्षेप घेतला आहे तो असा—

विपर्ययेण तु प्रलयक्रमोऽत उत्पत्तिक्रमाद् भवितुमर्हति । तथाहि लोके दृश्यते येन क्रमेण सोपानमारूढस्ततो विपरीतेन क्रमेणावरोहति ।

अर्थ—उत्पत्तिक्रमाच्या नेमका विरुद्ध असा प्रलयक्रम असायला पाहिजे. ज्या क्रमाने माणूस जिना चढून जातो, त्याच्या विरुद्ध क्रमाने उतरतो, असाच जगांत अनुभव येतो.

घट जेव्हा फुटतो, तेव्हा त्याचीं दोन कपालें होतात. नंतर त्या कपालांचे आणखी बारीक बारीक तुकडे होऊन शेवटीं

द्व्यणुकाचा नाश होतो, असें सर्वत्र दिसतें. वैशेषिकांच्या मताप्रमाणे घटनाश होतो म्हणजे सुरवातीलाच घटाच्या द्व्यणुकाचा नाश होतो. पण असें मानलें तर मग बाकीचा घट कुठे राहील? त्याच क्षणीं सर्व घट पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळून पडेल. परंतु असें कांही प्रत्ययाला येत नाही. तेव्हा वैशेषिकांचें हें मत बरोबर नाही. प्राचीन काळीं अणु हा दार्शनिक विवेचनाचा विषय होता; तर आधुनिक कालांत तो वैज्ञानिक संशोधनाचें केंद्र बनला आहे.

अणुव्रतें अणुव्रत म्हणजे लघुव्रत. जैन लोक पुढील पांच अणुव्रतें मानतात –– (१) अहिंसा (२) अचौर्य (३) सत्य (४) स्वस्त्रीसंतोष व (५) परिग्रहप्रमाण. दोन इंद्रियांच्या प्राण्यापासून तों पंचेंद्रियांच्या प्राण्यापर्यंत कोणत्याहि जीवाची हत्या न करणें याचें नांव अहिंसा. चोरी न करणें, विसरलेलें, पडलेलें, एखाद्यानें ठेवलेलें व आपलें नसलेलें धन न घेणें, याचें नांव अचौर्य. सदासर्वदा खरें बोलणें हें सत्य. जिचें पाणिग्रहण केलें असेल, तिच्याशिवाय अन्य स्त्रीची अपेक्षा न बाळगतां स्वतःच्या स्त्रीच्या ठिकाणीं संतुष्ट असणें, हें स्वस्त्रीसंतोष. धनधान्य, घरदार, वस्त्रपात्र, इ. भोग्य वस्तु गरजेपुरत्याच ठेवून अधिकाचा त्याग करणें हें परिग्रहप्रमाण.

महाव्रतें व अणुव्रतें यांच्यांत अंतर एवढेंच, की महाव्रतें श्रमण साधूंसाठी व अणुव्रतें गृहस्थ श्रावकांसाठी असतात. महाव्रतांत सर्वत्यागाची अपेक्षा असते; तर अणुव्रतांत अहिंसा-सत्यादि गोष्टींचें स्थूल स्वरूपांत पालन केलें जातें. अन्यथा दोन्ही सारखींच आहेत. [जैनधर्म; तत्त्वार्थसूत्र; रत्नकरंड-श्रावकाचार.]

अण्णासामीशास्त्री (१८२७–१९०० इ. स.) तमिळनाडमधला एक संगीतरचनाकार. याने बांधलेल्या अनेक चिजा कर्नाटकसंगीतांत प्रचलित आहेत. [डि. सा. इं म्यु. म्यु.]

अतल सप्त पाताळांपैकी चौथें. तिथली भूमि पीत वर्णाची आहे. त्या लोकांत मयपुत्र बलाचें राज्य असून कालनेमि, नमुचि, शंकुकर्ण, इ. दैत्य, नाग व राक्षसहि तिथे राहतात. अतल ही विराट् पुरुषाची मांडी होय. [भाग. पु. २. ५. ४०; विष्णु पु. २. ५. २. ३; वायु पु. ५०. ११. १३]

अतलदी हें तेलुगु स्त्रियांचें गौरीव्रत आहे. कुमारीने इच्छित वर मिळावा म्हणून हें करायचें असतें. वद्य पक्षांतील तृतीयेस सूर्योदयापूर्वी भोजन, दुपारीं गौरीची पूजा व दहा स्त्रियांना मिठाई देणें, असा याचा विधि आहे.

अतिकृच्छ्र बारा दिवस ग्रासमात्र अन्न सेवन करणें व नंतर तीन दिवस उपवास. अशक्त व्यक्तीने हातांत मावेल तेवढें (पाणिपूर) अन्न ग्रहण करावें, असेंहि सांगितलें आहे (मनु. ११. २१३; याज्ञ. ३. ३१९). या प्रायश्चित्ताने महापातकें सोडून इतर सर्व पापांचें क्षालन होतें (गौत. २६. २२). **पाहा** –– कृच्छ्र.

अतिक्रुद्ध हा एक आगमोक्त मंत्र आहे. याचीं अठ्ठावीस किंवा एकतीस अक्षरें असतात.

अष्टाविंशत्यक्षरो य एकत्रिंशदथापि वा ।
अतिक्रुद्धः स विज्ञेयो निन्दितः सर्वकर्मसु ॥

अर्थ –– अठ्ठावीस किंवा एकतीस अक्षरें असलेल्या मंत्राला अतिक्रुद्ध असें नांव असून सर्व कर्मांत तो निंदित आहे.

यावरून तंत्रमार्गाव्यतिरिक्त अन्य जपविधानांत याला मान्यता नव्हती, असें दिसतें.

अतिचार 'अतिक्रम्य चरणं गमनम्' (= अतिक्रमण करून जाणें). भौमादि पांच ग्रहांचें राशिभोगाचा नियतकाल समाप्त होण्याच्या पूर्वी दुसऱ्या राशींत जाणें, याला अतिचार म्हणतात. ग्रह पूर्वराशींत गेल्यास तो वक्रातिचार होतो. हे दोन्ही अतिचार गुरूने केल्यास अवर्षणादि संकटें येतात. [स्मृतिज्योतिष]

अतिच्छंद एक वृत्त. प्राचीन पद्धतीप्रमाणे हें सहावें वृत्त असून सहा या संख्येचें निदर्शक आहे. पुढे याच वृत्ताला शक्वरी म्हणूं लागले. **पाहा**–शक्वरी.

आतितान स्वर्गीय गायनाचें नांव. हाहा व हूहू हे गंधर्व ब्रह्मलोकांत हें गातात. [विष्णु पु. ४. १. ६८.]

अतिथि 'अतिथिर्ना गृहागते' = घरीं आलेल्या माणसाला अतिथि म्हणावें (अमर). 'अतति सततं गच्छति इति' = सदा प्रवासी. 'अध्वनीनोऽतिथिर्ज्ञेयः' = पांथस्थाल अतिथि म्हणावें. 'नास्ति तिथिर्यस्य सः'= ज्याच्या येण्याला काळ वेळ किंवा निश्चित दिवस नाही. त्याला अतिथि म्हणावें, अशी आणखी एक अतिथीची व्याख्या सांगतात. अतिथि म्हणजे पाहुणा. अतिथीला देव मानून त्याचें आतिथ्य करण्याची प्रथा वेदकाळापासून होती. पराशर म्हणतो –

प्रियो वा यदि वा द्वेष्यो मूर्खः पण्डित एव वा ।
वैश्वदेवे तु सम्प्राप्तः सोऽतिथिः स्वर्गसङ्क्रमः ।।

(पारा. स्मृ. १. ४०)

अर्थ– मित्र असो वा शत्रु; मूर्ख असो वा पंडित; वैश्वदेवाच्या काळीं दारीं आलेला अतिथि (यजमानाला) स्वर्ग देणारा होतो.

वैश्वदेव झाल्यानंतर अतिथीची प्रतीक्षा कशी करावी, या संबंधांत पुढील श्लोक आहे–

ततो गोदोहमात्रं तु कालं तिष्ठेद् गृहाङ्गणे ।
अतिथिग्रहणार्थाय तदूर्ध्वं वा यदृच्छया ।।

अर्थ – वैश्वदेवानंतर गोदोहन कालाइतकी (गोदोहन काल= मुहूर्ताचा आठवा भाग) अतिथीची वाट पाहावी, किंवा यदृच्छेने त्याहूनहि अधिक काळ मार्गप्रतीक्षा करावी (विष्णु. पु.).

वैश्वदेवाच्या काळीं चांडाल जरी अतिथि म्हणून आला, तरी त्यालाहि भोजन घालावें, असें आपस्तंब आणि वृद्धहारीत यांनी सांगितलें आहे. महाभारतांत म्हटलें आहे, की –

चक्षुर्दद्यान्मनो दद्याद् वाचं दद्याच्च सूनृताम् ।
अनुव्रजेदुपासीत स यज्ञः पञ्चदक्षिणः ।।

(अनु. ७. ६)

अर्थ–(यजमानाने) नेत्र, मन व गोड वाणी हीं अतिथीला द्यावीत, त्याच्या व्यवस्थेकडे स्वतः लक्ष द्यावें आणि तो निघाला असतां त्याला थोडें पोंचवायला जावें. मनुष्ययज्ञाची ही पंचविध दक्षिणा होय.

ज्याच्या घरांतून अतिथि विमुख जातो, त्या यजमानाला अतिथीचें पाप मिळतें व यजमानाचें पुण्य त्या अतिथीला मिळतें, असेंहि सांगितलें आहे.

यजमानाने आपल्या ऐपतीप्रमाणे भोजन, केवळ पाणी किंवा आंथरूण दिलें, तरी तें आतिथ्य होतें. यजमान घरीं नसल्यास त्याच्या पत्नीने अतिथीचा सत्कार करावा. मनु तर स्पष्ट सांगतो, की 'भोजन देण्याची ऐपत नसेल, तर तृणासन बसायला द्यावें, तेंहि नसेल तर साध्या जमिनीवर बसा म्हणावें आणि तेवढेंहि शक्य नसलें तर गोड शब्दांनी त्याचें कुशल विचारावें. सज्जनांच्या घरीं निदान एवढें तरी झालेंच पाहिजे' (३.१०१).

या अतिथिसत्काराच्या मागे मानवतेची भावना स्पष्ट आहे. स्मृति–सूत्रकारांनी आणखीहि कांही कारणें सांगितलीं आहेत. अतिथिपूजेने शांति आणि स्वर्ग यांचा लाभ होतो. योगी आणि सिद्धपुरुष ब्राह्मणरूपाने पृथ्वीवर फिरत असतात; हें जाणून गृहस्थाने त्यांचें अतिथ्य केल्यास त्याचें कल्याण होतें. ब्रह्मचारी व यति यांना भोजन घातल्याशिवाय जर गृहस्थाने भोजन केलें, तर त्याला चांद्रायण प्रायश्चित्त घ्यावें लागतें. वृद्धहारीत तर म्हणतो, की–

यतिर्यस्य गृहे भुङ्क्ते तस्य भुङ्क्ते हरिः स्वयम् ।

अर्थ–ज्याच्या घरीं यति भोजन करतो, त्याच्या घरीं साक्षात् श्रीहरि भोजन करतो.

जर यति गृहस्थाच्या घरीं एक रात्र राहिला, तर यजमानाचें सर्व पाप धुवून जातें. अतिथीच्या आधी जो यजमान भोजन करतो, तो अन्न, वैभव, प्रजा, पशु व पुण्य हें सर्व घालवून बसतो. म्हणून वैश्वदेवप्रयोगांत काकबलि टाकल्यावर यजमानाने गायीची धार काढून होईल, इतक्या कालापर्यंत बाहेर उभें राहून अतिथीची प्रतीक्षा करावी, असें सांगितलें आहे.

मात्र अतिथीचें स्वागत करतांना पात्रापात्रविचारणा ठेवावी आणि तारतम्याने निरनिराळया वर्णाचें आतिथ्य करावें, असेंहि अनेक स्मृतिकारांनी सांगितलें आहे. वेदकाळीं अतिथीसाठी गाय किंवा कालवड मारण्याची प्रथा होती, असें शतपथ ब्राह्मणावरून कळतें (७. ३. २. १).

पुराणांतरीं गाजलेला अतिथि म्हणजे दुर्वास मुनि हा होय. यजमानाला संकटांत पाडून त्याचें सत्त्वहरण करण्याचा प्रयत्न करणें अशी त्याची वृत्ति आहे. पांडव वनवासांत असतां रात्रौ त्यांच्या आश्रमांत शिष्यांसह जाऊन जेवण मागणें, अंबरीषाच्या घरीं जाऊन त्याची साधनद्वादशी मोडण्याची वेळ आणणें, अशा गोष्टी त्याने केल्या आहेत. दुसरा अतिथि विष्णु. त्याने वामनरूप घेऊन बळीकडे त्रिपाद भूमि मागितली व त्याला राज्यभ्रष्ट केलें. तिसरा अतिथि शिव. याने श्रियाळराजाकडे जाऊन त्याचा पुत्र चिलया याच्या मांसाचें भोजन मागितलें. ब्रह्मा–विष्णु–महेश हे यतिवेषाने अत्रीच्या आश्रमांत आले व त्यांनीं अनसूयेला विवस्त्र होऊन भोजन वाढण्यास सांगितलें. पण या सर्व प्रकारांत शेवटीं त्या त्या गृहस्थांचाच विजय झालेला दाखविला आहे. या सर्व कथा गृहस्थाच्या असीम आतिथ्यधर्माचाच गौरव दाखविणाऱ्या आहेत.

अतिथिधर्म हा गृहस्थाचा मुख्य धर्म मानलेला आहे. प्राचीन काळीं रस्ते आणि वाहनें यांच्या विशेषशा सोयी नव्हत्या. माणसें तीर्थयात्रा किंवा अन्य कारणें यांच्यासाठी पायीं प्रवास करीत. दुपारच्या वेळीं क्षुधेच्या तृप्तीसाठी व रात्रीच्या मुक्कामासाठी त्यांना वाटेंत कोणाच्या तरी घरीं जावेंच लागे. अशा पांथस्थांना अन्न व निवारा मिळून त्यांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी आलेल्या अतिथीचें आतिथ्य करण्याची जबाबदारी धर्मशास्त्राने गृहस्थाश्रमावर टाकलेली आहे. पुराणांनीहि अतिथिधर्माचा जागोजाग गौरव केलेला

आहे. अतिथि, मग तो कोणत्याहि जातीचा असो; त्याला विष्णूप्रमाणे पूज्य समजून गृहस्थाने कुशलप्रश्नपूर्वक त्याचें आतिथ्य करावें, असें पुराणांचें स्पष्ट मत आहे. याविषयीं पद्म-पुराणांत कथा दिली आहे ती अशी --

ज्ञानभद्र नांवाचा एक गृहस्थ सौराष्ट्रांत राहत होता. एकदा दुष्काळांत त्याला व त्याच्या पत्नीला एकवीस दिवस उपास पडला. त्यानंतर एका डोंगरावर हिंडत असतां त्याला एक कोहळा मिळाला. घरीं आणल्यावर त्याच्या पत्नीने त्याचे दोघांसाठी दोन भाग केले. एवढ्यांत त्याच्या दारीं एक गोप आला. तोहि क्षुधार्त होता. ज्ञानभद्राने त्याला आपला भाग देऊन टाकला. तेवढ्याने त्याची भूक थांबली नाही, म्हणून पत्नीनेहि त्याला आपला भाग दिला. अतिथि तो कोहळा खाऊन संतुष्टपणे निघून गेला. त्या अतिथि-सत्कारामुळे त्या दंपतीला तर मोक्ष मिळालाच; शिवाय सौराष्ट्रांत पाऊस पडून दुष्काळहि संपला (प. पु. क्रि. खं. २५). पाहा–गृहस्थाश्रम [वे. इं.; हि. ध.]

अतिथिपूजा अतिथि पाहा.

अतिदेश 'अतिदेशो नाम इतरधर्मस्य इतरस्मिन् प्रयोगाय आदेशः' (= एखाद्याच्या धर्माचा दुसऱ्या एखाद्यामध्ये प्रयोग करण्यासाठी वापर करणें). किंवा--

अन्यत्रैव प्रणीतायाः कृत्स्नाया धर्मसंहतेः ।
अन्यत्र कार्यतः प्राप्तिरतिदेशः स उच्यते ॥ १ ॥
प्राकृतात् कर्मणो यस्मात् तत्समानेषु कर्मसु ।
धर्मप्रवेशो येन स्यादतिदेशः स उच्यते ॥ २ ॥

अर्थ–(१) अन्य ठिकाणीं सांगितलेल्या धर्मांचा दुसऱ्या एखाद्या कार्यामध्ये जरुरीप्रमाणे वापर करणें. (२) प्रकृतींत सांगितलेल्या अंगांची विकृतींत देखील अनुवृत्ति करणें.

अतिपातक नवविध पापांपैकी सर्वांत मोठें पातक. हें तीन प्रकारचें आहे. पुरुषाने माता, कन्या व सून यांच्याशीं गमन केल्यास व स्त्रीने पुत्र, पिता व सासरा यांच्याशीं गमन केल्यास तें अतिपातक होतें. अशा पातकाला अग्निप्रवेश हेंच प्रायश्चित्त होय, असें विष्णुधर्मोत्तर पुराणांत सांगितलें आहे (३४.१.२).


अतिबला हें एका औषधीचें नांव आहे. देवमूर्तीला पहिलें स्नान घालतांना या औषधीचा उपयोग करतात. [मत्स्य पु. २६७. १४]

अतिभंग मूर्तीचें एक अवस्थान. यांत दोन किंवा तीनपेक्षा मूर्ति अधिक ठिकाणीं वांकलेली असते. पाहा–भंग.

अतिमानवी योनि यक्ष, गंधर्व, किन्नर, गुह्यक, राक्षस, विद्याधर, पिशाच, सिद्ध, सर्प, नाग, या अतिमानवी योनि होत. महाभारत, रामायण, पुराणें, जातकें यांत या योनींचे उल्लेख मिळतात. या योनींचें स्थूल वर्गीकरण असें--

गंधर्व, यक्ष, किन्नर हें प्रथम श्रेणींतले व स्वर्ग-संबंधी. गंधर्वांबरोबरच अप्सराहि आल्या. नाग व राक्षस हे पातालसंबंधी व देवविरोधक. यांची श्रेणी दुसरी. गुह्यक, विद्याधर, सिद्ध यांची श्रेणी तिसरी. व पिशाचांची चौथी. या सर्व अतिमानव योनींचीं वैशिष्ट्यें अशीं--

(१) मायिक सिद्धि (२) आकाशसंचार (३) अदृश्य होणें आणि रूप पालटणें (४) ललित-कलांत प्रावीण्य (५) मानव स्त्री–पुरुषांशीं संभोग करूं शकणें. (६) त्यांची मानवापासून झालेलीं अपत्यें मानवी होतात (७) रात्रिसंचाराची आवड व (८) मानवाच्या दैवाचे सहाय्यक किंवा विघातक.



अप्सरा
[सेन्ट्रल रेल्वेच्या सौजन्याने]

यांना देवयोनि असेंहि म्हणतात. या शब्दाचा विग्रह असा– 'देवा योनिरुत्पत्तिस्थानम् एषाम् इति' (= देव हें ज्यांचें उत्पत्तिस्थान आहे तें–म्हणजेच देवांश). अमरकोशांत यांची नांवें पुढीलप्रमाणे दिलीं आहेत—

विद्याधराप्सरोयक्षरक्षोगंधर्वकिन्नराः ।
पिशाचो गुह्यकः सिद्धो भूतोऽमी देवयोनयः ॥

सर्व प्राचीन संस्कृतींत राक्षस किंवा अतिमानुष अशा

प्रकारच्या व्यक्ति मानलेल्या आहेत. हे अतिमानव माणसांशीं प्रसंगानुरूप चांगलें किंवा वाईट वर्तन करतात. ख्रिस्ती धर्मांत त्यांना दुष्टच मानलेलें आहे. ते सैतानाचे दूत असून देवांचे व ख्रिस्ताचे वैरी समजले जातात. [लो. सा. रू.]

अतिरात्र सप्त सोमसंस्थांमधील एक सोमयाग. हा याग एका दिवसांत न संपतां एक दिवस व एक रात्र उलटून गेल्यावर संपतो, म्हणून त्याला अतिरात्र हें नांव मिळालें आहे. या यज्ञांत स्तोत्रें आणि शस्त्रें प्रत्येकीं २९ आहेत. स्तोत्रें आणि शस्त्रें यांचे चार पर्याय रात्रौ म्हणतात. रात्रींच्या आहुति दिल्यानंतर आश्विन शस्त्र म्हणायचें तें कमींत कमी एक हजार ऋचांचें असलें पाहिजे व तें सूर्योदयापर्यंत म्हटलें पाहिजे, असा नियम आहे. सूर्योदयानंतर सूर्यसूक्तें व संधिकालीं संधिस्तोत्रें म्हणतात. मुख्य सुत्येच्या दिवशीं सरस्वतीला उद्देशून पशुयाग करतात. रात्रीं आपिशर्वरसंज्ञक इंद्र या मुख्य देवतेला चमस अर्पण करतात (हि. ध.). ' (देवाः) अतिरात्रेणामुं द्युलोकमभ्यजयन् ' (= देवांनीं अतिरात्र याग करून हा द्युलोक जिंकला), असें तांडच ब्राह्मणांत म्हटलें आहे (९.२.९).

हा याग विधात्याच्या मुखापासून झाला (भाग. पु. ३. १२ ४०). कश्यपानें हा यज्ञ केला (ब्रह्मांड पु. ३. ५. ४). धर्मकृत्यांत मधाचें दान केल्याने अतिरात्राचें फल मिळतें (वायु पु. ७९.११).

अतिरुद्र अकरा महारुद्रांचा एक अतिरुद्र होतो.

अतिलंघन व्रत किंवा उपवास यांची उचित अशी समाप्ति झाल्यावरहि पारणा न करतां उपवास करीत राहणें, याला अतिलंघन असें म्हणतात.

अतिविजया पुनर्वसु नक्षत्रावर येणाऱ्या शुक्ल एकादशीचें नांव. तिलदान हा या दिवशींचा विधि सांगितला आहे. याशिवाय उपवास वगैरे आहेच.

अतिवीरराम पांडियन् (१५ वें शतक) मदुरेचा राजा. अळकिय देशिकराचा शिष्य. याने नैषध, काशीखंड, लिंगपुराणम् व कूर्मपुराणम् असे चार ग्रंथ रचले आहेत. नैषध सर्वांत मोठा आहे. [त. सा. सं.]

अतिवृद्ध अनेक आगमोक्त मंत्रांपैकी हा एक प्रसिद्ध असून तो निषिद्ध मानला आहे--

चतुःशतं समारभ्य यावद्वर्णसहस्रकम् ।
अतिवृद्धः स मन्त्रस्तु सर्वशास्त्रेषु वर्जितः ।।

अर्थ— चारशें वर्णांपासून तों हजारापर्यंत वर्णसंख्या असलेल्या या मंत्राला अतिवृद्ध हें नांव असून सर्व शास्त्रांत तो वर्जित आहे. [सं. इं. डि.]

अतिसांतपन एक प्रायश्चित्त. **पाहा**— महासांतपन.

अतीत कच्छमधील एक जात. आसामांतहि यांची थोडी वस्ती आहे. यांच्या अनेक पोटजाती आहेत. हे पोटजातीचें नांव आपल्या नांवापुढे लावतात. हे शैव असून यांच्यामध्ये ब्रह्मचारी व गृहस्थ असे दोन वर्ग आहेत. पहिल्यास मठधारी, व दुसऱ्यास घरबारी म्हणतात. हे मद्य–मांस सेवन करतात. भिक्षा किंवा अन्य कोणतेतरी धंदे करून निर्वाह चालवितात. यांना पुनर्विवाह संमत आहे. मरणोत्तर समाधि बांधून तिच्यावर शिवलिंग बसवितात. [सु. वि. को.]

अतीतपंथ संसाराचा त्याग करून संन्यस्त वृत्तीने परमार्थाचें आचरण करणाऱ्या वैराग्यांचा हा पंथ आहे. शैव आणि वैष्णव या दोन्ही पंथांत अतीत आढळतात. वैष्णव अतीत बिहारमध्ये दिसतात. अवधूत आणि अतीत यांच्यामध्ये साधर्म्य आहे. पण अवधूत शब्द प्राचीन असून, अतीत शब्द अर्वाचीन आणि प्रादेशिक आहे. स्थूल अर्थानें दशनामी गोसाव्यांना अतीत या नांवाने ओळखतात. दशनामींपैकी अर्ध्या वर्गाला दंडी म्हणतात. कारण ते दंडा किंवा सोटा वापरतात. अतीत दंड वापरीत नाहीत. त्यांचें खाणेंपिणें, कपडे, स्वयंपाक करण्याची पद्धत आणि दीक्षाविधि हे दंडींहून वेगळे आहेत. बहुसंख्य अतीत संन्यासी असले, तरी त्यांतले कांही गृहस्थाश्रम संभाळून व्यापार, उदीमहि करतात. संन्यस्त अतीत मठांत किंवा आश्रमांत राहतात. त्यांचीं वस्त्रें गेरूने रंगविलेलीं असतात. ते महादेव, भैरव व हनुमान यांची उपासना करतात. तत्त्वज्ञानांत अद्वैताचा पुरस्कार करतात. शैव अतीत अर्धनग्न राहून जटा, दाढी वाढवितात. ते मौन पाळतात व भिक्षेवर जगतात. [एन्सा. रि. ए.]

अतींद्रिय इंद्रियातीत ज्ञान किंवा अनुभूति. इंद्रियगम्य अनुभवाहून ही अनुभूति घन व संश्लिष्ट असते. म्हणूनच साहित्यशास्त्रांत तिला अलौकिक तत्त्व म्हटलें आहे. अभिनवगुप्ताच्या ध्वन्यालोकलोचन या ग्रंथावरच्या टीकेंत मम्मट हिचें वर्णन पुढीलप्रमाणे करतो– अलौकिक चमत्कारी,

अलौकिक आनंदमय व लोकोत्तर अशा आत्मसंवेदनालाच गम्य, अशी अलौकिक सिद्धि म्हणजे अतींद्रिय अनुभूति होय. ही रसमय असते म्हणूनच रसाला ब्रह्मास्वादसहोदर (ब्रह्मानंदाचा सख्खा भाऊ) म्हटलें आहे. पण आधुनिक मनोविज्ञान हें काव्यरसाचा आनंद संपूर्णपणें इंद्रियातीत असतो, असें मानीत नाही. ज्या रहस्यवादी लेखकांनी अतींद्रिय अनुभूतीची चर्चा केली आहे, त्यांनाहि तिच्या विशदीकरणासाठी इंद्रियगोचर अशींच उपमानें योजावीं लागलीं आहेत. अतएव अतींद्रिय हा शब्द साहित्यक्षेत्रांत केवळ कल्पनामात्र समजावा लागतो. [हिं. सा. को.]

अतीश (मृत्यु १०५२ इ. स.) एक विद्वान् बुद्ध भिक्षु. याला दीपंकर असें दुसरेंहि नांव आहे. हा भारतांतून तिबेटांत गेला. तिथें त्याला दिसलें, की तिथला बौद्ध धर्म दुराचारी पुरोहितवर्गाच्या हातीं गेला असून भूतप्रेतपिशाचांची पूजा त्या धर्मांत शिरली आहे. म्हणून त्याने शुद्ध बौद्ध धर्मावर अधिष्ठित असा एक नवाच पंथ काढला. त्या पंथाचें नांव का–दम् (Kah-Dam) असें होतें. पिवळी टोपी हें या पंथाचें अभिज्ञानचिन्ह होतें. यांतूनच पुढे आजचा तिबेटचा राष्ट्रधर्म गेलुग हा उदयास आला. अतीशाने आपल्या पंथांत ब्रह्मचर्यावर विशेष भर दिला आहे. याने भारतीय बौद्ध ग्रंथांचीं तिबेटी भाषेंत भाषांतरें केलीं. अतीशाचा महत्त्वाचा तात्त्विक ग्रंथ बोधिपथप्रदीप हा होय. याच्याच उपदेशांतून पुढे तिबेटांत निमसुधारक असे सस्–क्य (Sas-Kya) आणि कर्ग्यु (Kargyu) या नांवांचे पंथ निर्माण झाले. सस्क्य पंथाचें वर्चस्व तिथे बराच काल टिकून राहिलें. अतीश ने–त्–अंग (Netang) या गांवीं निधन पावला. त्याच्या चितेवर उभारलेला स्तूप आजहि चांगल्या अवस्थेंत आहे. [एन्सा. रि. ए.; म. ज्ञा. को.]

अत्तर घ्राणेंद्रियाला आल्हाद देणारीं अत्तरें, सुवासिक तेलें व पदार्थ यांचा उपयोग मनुष्य जातींत फार पूर्वींपासून प्रचलित आहे. फुलांचा मधुर वास, कस्तूरीमृग, जवादी मांजर, वगैरे प्राण्यांपासून निघणारीं सुगंधी द्रव्यें व वनस्पतिज निर्यास, यांपासून निरनिराळीं अत्तरें व तेलें तयार होतात. पूर्वीं सुधारलेल्या सर्व देशांत व भारतांत यांचा खप होत असल्यामुळे अत्तरें तयार करण्याची कला पूर्णत्वास पोंचली होती. यांचा उपयोग विलासी लोकच करीत, असें नसून, धार्मिक संस्कार व शुभ कृत्यें यांतहि तीं वापरलीं जात. देवपूजा, साधुसंतांचा सत्कार, अभ्यंगस्नान, यांकरितांहि यांचा उपयोग फार पूर्वींपासून प्रचलित आहे. मिसर देशांत प्रेतसंस्काराच्या वेळीं यांचा उपयोग करीत. जंगली जातींतहि अत्तरें व सुगंधी द्रव्यें वापरतात व गृहशुद्धीकरितां चंदन, ऊद व अबीर जाळतात. सुगंधी द्रव्यें वर सांगितलेल्या पदार्थांखेरीज रासायनिक मिश्रणानेहि तयार होतात. त्यांना रासायनिक सुगंध म्हणतात. दिल्ली, अमृतसर व लाहोर येथून या अत्तरांचा व्यापार चालतो. कनोज येथेहि अत्तराचे कारखाने आहेत. [सु. वि. को.]

अत् तहियात् इस्लाम धर्मांतला एक मंत्र. रोजच्या नमाजांतले दोन भाग म्हणून झाले, की हा मंत्र म्हणतात. त्या वेळीं डावा पाय दुमडून त्यावर बसतात व गुडघ्यांवर हात ठेवतात. मंत्राचा अर्थ असा––

मी माझ्या जिभेने, देहाने तसेंच दानाने देवाची आराधना करीत आहें. त्याच्या कृपेने व आशीर्वादाने हे देवदूता, तुला शांति लाभो. आम्हांला आणि सर्व ईश्वरभक्तांना शांति लाभो. [डि. इ.]

अत्तिमब्बे (१० वें शतक) एक दानशूर सच्चरित्र अशी कर्नाटकांतली स्त्री. पुंगनुर गांवीं तिचा जन्म झाला. तिचा बाप सेनापति असून विद्येचा भोक्ता होता. अत्तिमब्बेचें नागदेव नांवाच्या सेनापतीशीं लग्न झालें. पण तो थोड्याच कालांत निवर्तला. नंतर तिने आपलें सर्व जीवन जैन धर्माच्या प्रसारार्थ वाहिलें. तिने १५०० जैनमंदिरें बांधलीं असें सांगतात. शांतिनाथ पुराणाच्या एक हजार प्रती लिहवून तिने त्या लोकांना वाटल्या. या औदार्यामुळे तिला दानचिंतामणि ही पदवी मिळाली. पुढे तर लोक तिला देवताच मानूं लागले. [क. द.]

अत्तुर मदुराई जिल्ह्यांत दिंडिगुलच्या नैर्ऋत्य दिशेला दहा मैलांवर हें गांव असून, तिथे वंडिकलियम्मन् देवीचें मंदिर आहे. त्या मंदिरांत मुत्तलम्माचीहि मूर्ति आहे. प्रत्येकीचा उत्सव एका वर्षाआड केला जातो. वंडिकलियम्मन्‌चा उत्सव अधिक महत्त्वाचा असून तो पंगुनि (फाल्गुन) महिन्यांत होतो. पूर्वीं उत्सवांत अनेक रेडे बळी दिले जात. उत्सवाच्या वेळीं देवीच्या मातीच्या मूर्तीची मिरवणूक काढतात आणि एका बागेंत तिचें विसर्जन करतात. मुत्तलम्माचा उत्सवहि अशाच प्रकारें होतो. [मदुरा गॅझेटिअर]

अस्तिकाय जैन तत्त्वज्ञानांत जीव, अजीव, धर्म, अधर्म आकाश व काल अशीं सहा द्रव्यें मानलीं

आहेत, त्यांपैकी शेवटचें सोडून बाकीच्यांचा उल्लेख अस्तिकाय या शब्दाने करतात. [हि. जै. मो.]

अत्यग्निष्टोम सप्त सोमसंस्थांपैकी एक सोमयाग. याचा विधि अग्निष्टोमाप्रमाणेच असतो. षोडशीस्तोत्र, षोडशीग्रह व इंद्रासाठी एक अधिक पशु एवढा विधि यांत अधिक आहे. [हि. ध.]

अत्यराति जानंतपि हा राजा नव्हता तरी वासिष्ठ सात्यहव्याने ऐन्द्र महाभिषेक केल्यामुळे याने पृथ्वी जिंकली. नंतर सात्यहव्याने त्याच्याकडे पौरोहित्याची बिदागी मागितली. तेव्हा तो म्हणाला, की 'उत्तर कुरूंना जिंकल्यावर मी सर्व पृथ्वीचें राज्य तुला देईन व तुझा सेनापति होईन.' त्यावर सात्यहव्य म्हणाला, 'तूं मला फसविलेंस. कारण उत्तरकुरूंना जिंकणें मनुष्यांना शक्य नाही.' एवढ्यावरच न थांबतां सात्यहव्याने शिबि राजाच्या अमित्रतपन शुष्मिण या पुत्राकडून त्याचा वध करविला. क्षत्रियाने ब्राह्मणाशीं द्रोह करूं नये, म्हणून ही कथा सांगितली आहे (ऐ. ब्रा. ८.२३). [प्रा. च. को.]

अत्याकराल गोज्वाल केतुमालाचा एक जनपद. [पु. इं.]

अत्रि (१) सूक्तद्रष्टा. ऋग्वेदांतल्या पांचव्या मंडलांतील ३७–४३ व ७६ आणि ७७ हीं सूक्तें याच्या नांवावर असून, या मंडलांतलीं इतर सूक्तें याच्या गोत्रज ऋषींनी दृष्ट आहेत. याची जन्मकथा अशी—

प्रजापतीने साध्य देवांसह त्रिसंवत्सर नांवाचें एक सत्र आरंभिलें. त्यांत वाग्देवी प्रकट झाली. तिला पाहून प्रजापति व वरुण यांचें मन विचलित झालें आणि त्या दोघांचें वीर्य पतन पावलें. वायूने तें वीर्य अग्नींत टाकलें. या अग्निज्वालेपासून भृगु आणि निखाऱ्यापासून अंगिरा ऋषि जन्मला. हीं दोन सुंदर मुलें पाहून वाग्देवी प्रजापतीला म्हणाली. 'या दोघांसारखाच तिसरा एक पुत्र तुम्हीं मला द्यावा'. प्रजापतीने 'वरें आहे' असें म्हणून प्रतिसूर्यच जणू असा एक पुत्र निर्माण केला, तोच हा अत्रि होय (बृ. दे. ९. १०१).

दुसरी कथा अशी, की हा स्वायंभुव मन्वंतरांत ब्रह्मदेवाच्या नेत्रापासून झालेला पुत्र होय. हा ब्रह्मदेवाच्या दहा मानसपुत्रांतला एक आहे. कर्दम प्रजापतीची अनसूया नांवाची कन्या ही त्याची भार्या होय. चतूरात्र नांवाचा याग याने सुरू केला (तै. सं. ७. १. ८). याला कांही कारणामुळे तुरुंगवास घडला होता. हा लोकशासित राज्याचा पुरस्कर्ता असल्यामुळे राजसत्तेची वक्रदृष्टि होऊन याला बंदिवास घडला असावा (ऋ. ५. ६६). हा अग्नींत होरपळत असतां अश्वींनी याला सोडविलें (ऋ. १. ११८. ७). सूर्यग्रहणासंबंधींचें ज्ञान प्रथम याला झालें. त्यामुळे ग्रस्त सूर्याला अत्रि परत आणतो, असें लोक समजूं लागले (ऋ. ५. ४०. ५; ९). अत्रिकुलांतले पुरुष कवि होते, तसेच लढवय्येहि होते. अत्रीचें पर्जन्यसूक्त ओजस्वी आहे (ऋ. ५. ८३). हा एके ठिकाणीं म्हणतो—

विसर्माणं कृणुहि वित्तमेषां
ये भुञ्जते अपृणन्तो न उक्थैः ।
अपव्रतान् प्रसवे वावृधानान्
ब्रह्मद्विषः सूर्याद् यावयस्व ।।

(ऋ. ५. ४२. ९)

अर्थ—जे (लोक) स्तोत्रें म्हणण्याचा धंदा करून पोट भरतात (व चैनहि करतात) पण (एका कवडीचाहि) दानधर्म करून देवांस संतुष्ट करीत नाहीत, त्यांचें धन तूं क्षणभरहि टिकूं देऊं नकोस. तसेंच सन्मार्गापासून भ्रष्ट झालेले, भरपूर पोरेंबाळें असल्याने माजलेले व धर्माचा (ज्ञानाचा) द्वेष करणारे असे जे दुष्ट असतील, त्यांना सूर्यप्रकाशांतून अंधारांत ढकलून (गाडून) टाक.

अत्रि हा सप्तर्षींपैकी एक असून मोठा कर्मनिष्ठ व तेजस्वी होता. एकोणिसाव्या द्वापार युगांतला हा व्यास आहे. याला अनसूयेपासून दत्त, दुर्वास, सोम व अर्यमा हे चार मुलगे व अमला ही मुलगी झाली. दाशरथी राम वनवासांत याच्या आश्रमांत आला होता व या दंपतीने त्याचें उत्तम स्वागत केलें होतें. राम-लक्ष्मणांना इथून पुढचा मार्ग अत्रीनेच दाखविला (वा. रा. २. ११७–११९).

याच्या नांवावर अत्रिसंहिता व अत्रिस्मृति असे दोन ग्रंथ आहेत. मनु याचें मत गौरवाने स्वीकारतो (३. १६). अत्रिसंहितेंत नऊ अध्याय असून त्यांत योग, जप, कर्मविपाक, प्रायश्चित्त, इ. विषयांचा विचार केलेला आहे. हा सूत्रकारहि आहे. **पाहा**– अनसूया. [ऋ. द.; प्रा. च. को.]

(२) बाराव्या द्वापारयुगांतला विष्णूचा अंशावतार. स्थान हैमक वन. [वायु. पु. २३. ११५]

(३) स्वायंभुव मन्वंतरांतला तिसरा प्रजापति. [पु. इं.]

(४) एक जमात. [मत्स्य पु. ११४. ४३]

अत्रिकुल यांत पुढील मंत्रद्रष्टे ऋषि आहेत— (१) अत्रि (२) अर्चनानस् (३) श्यावाश्व (४) गविष्ठिर (५) आविहोत्र व (६) पूर्वातिथि. यांतल्या पांचव्या नांवा-

बद्दल पाठभेद आहेत. तें नांव अंधिगु असणें शक्य आहे. अंधिगु गविष्ठिराचा पुत्र असून ऋ. ९. १०१ या सूक्ताचा द्रष्टा आहे. [वै. वा. इ.]

अत्रि भौम सूक्तद्रष्टा. याने दानाचें माहात्म्य पुढीलप्रमाणे वर्णिलें आहे—

ये अश्वदा उत वा सन्ति गोदा
ये वस्त्रदाः सुभगास्तेषु रायः ।

(ऋ.५. ४२. ८)

अर्थ—जे (आर्त जनांस) अश्व, धेनु व वस्त्र देतात, तेच भाग्यशाली होत. अशांच्या जवळच ऐश्वर्य टिकून राहतें.

अत्रि सांख्य सूक्तद्रष्टा. याने आपल्या सूक्तांत पुढील कथा सांगितली आहे—भुज्यु हा समुद्राच्या लाटांमध्ये सांपडून दृष्टीपलिकडे वाहत गेला, तेव्हा अश्वी आपल्या पक्षिवाहनांत बसून तिथे गेले व त्यांनी भुज्यूकडून समुद्र तरविला (ऋ. १०. १४३. ५).

अत्रिस्मृति या स्मृतींत नऊ अध्याय आहेत. हिच्यामध्ये चारहि वर्णांचीं कर्मे, त्यांची उपजीविका, प्रायश्चित्तें, स्त्री आणि शूद्र यांना पतित करणारीं कर्मे, स्पर्शास्पर्श दोष, उच्छिष्टादि अन्नदोष, दशविध ब्राह्मण, श्राद्ध, सूतकनिर्णय, इ. विषय आले आहेत. मनु या स्मृतीचा गौरवाने उल्लेख करतो (३ . १६). पुण्याच्या आनंदाश्रमाने छापलेल्या स्मृतिसमुच्चयांत हा ग्रंथ आहे.

अथर्वण–ब्राह्मण अग्नीची उपासना करणाऱ्या प्राचीन पुरोहितांना अथर्वन् म्हणत. हा शब्द पर्शुभारतीय काळाचा असून अवेस्त्यांतील अथ्रवन् या शब्दाशीं संबद्ध दिसतो. ब्राह्मण वर्गाचा उदय होऊन भारतांत त्याच्याकडे पौरोहित्य येण्यापूर्वी अथर्वणांकडे भारतीयांचें पौरोहित्य असावें. अथर्ववेद हा यांचा वेद असून पुढे त्याच्या शाखा, उपशाखा झाल्या आहेत. तूर्त भारतांत हा वर्ग अगदीच अल्प आहे. महाराष्ट्रांत अथर्वण शाखेचे कांही लोक सातारा जिल्ह्यांत आढळतात. उत्तर भारतांतहि तुरळक आहेत. हे शौनक शाखेचे असून यांच्यांत पांच गोत्रें आहेत. महाराष्ट्रांत या शाखेचें शरीरसंबंध देशस्थ, कऱ्हाडे यांच्याशीं होतात. आपला वेद सर्वांत आधीचा आहे व त्याचें अधिदैवत भार्गवराम आहे, असें हे मानतात. यांच्यांतले पुष्कळसे लोक शाखालोपामुळे आता ऋग्वेदी झाले आहेत. हे श्राद्धांत पितृत्रयीचा उच्चार उलटया क्रमाने म्हणजे पणजा, आजा, बाप असा करतात. **पाहा** – अथर्ववेद. [ब्रा. भि. वि.; सु. वि. को.]

अथर्वणाचार्य तेलंगी ब्राह्मण व कवि. महाभारतावर याने तेलुगु भाषेंत ग्रंथ रचला असून त्यांतला तुरळक भाग उपलब्ध आहे. [म. ज्ञा. को.]

अथर्ववेद चारहि वेदांच्या संहितांमध्ये अथर्ववेदाचें स्थान शेवटचें आहे. अंगिरोवंशीय अथर्वा ऋषीने हा प्रथम पाहिला आणि आविष्कृत केला, म्हणून याचें नांव अथर्ववेद असें पडलें. याचा निर्देश अथर्वांगिरसवेद अशा जोड नांवानेहि केलेला आहे. या जोड नांवामुळे या वेदाची संयुक्तता तशीच विषयभिन्नताहि सूचित होते. याविषयीं गोपथ ब्राह्मणांत एक आख्यायिका असून ती काल्पनिक भासली तरी तिचा उल्लेख आवश्यक आहे —

सृष्टि निर्माण करण्याच्या उद्देशानें ब्रह्मदेव तपश्चर्या करीत असतांना त्याच्या रोमरंध्रांतून स्वेदधारा भूमीवर वाहिल्या. त्या स्वेदजलांत ब्रह्मदेवाने आपलें प्रतिबिंब पाहिलें आणि लगेच त्याचें वीर्य स्खलन झालें. मग तें रेतमिश्रित जल द्विधा होऊन त्याचा एक भाग शांत, पेय, स्वादु, असा झाला; तर दुसरा क्षार, अपेय, अस्वादु, बनला. या दोन भागांतून अनुक्रमें भृगु व अंगिरा हे ऋषि निर्माण झाले. या दोहोंनाहि दहा दहा पुत्र होऊन ते अथर्वांगिरस नांवाचे वीस ऋषि झाले. या प्रत्येक ऋषीने शौनक संहितेच्या एकेका कांडाची रचना केली. अथर्व ऋषींच्या मंत्रांचा आथर्वणवेद बनला व अंगिरा ऋषींच्या मंत्रांचा आंगिरसवेद झाला.

या आख्यायिकेचें तात्पर्य असें दिसतें, की आथर्वण व आंगिरस हे प्रथम दोन स्वतंत्र वेद होते व पुढे त्यांचें एकीकरण होऊन त्या संयुक्त स्वरूपाला अथर्ववेद असें नांव पडलें.

अथर्ववेदाला भृग्वंगिरस असें आणखीहि एक नांव आहे. भृगु ऋषि हे अंगिरसांचे शिष्य होते व स्वतःला आंगिरस म्हणवीत होते, हें त्याचें कारण होय. अथर्ववेदाच्या प्रचारांत या भृगूंचा बराच हात होता. अथर्ववेदाचें अध्ययन करणारे ऋषि भृगु गोत्रांत बरेच असावे. 'अथर्वाणः भृगूत्तमाः' असा एक उल्लेख मिळतो. त्यावरून भृगुकुलाचा अथर्ववेदाशीं निकटचा संबंध कळून येतो. 'अङ्गिरोभ्यः स्वाहा' असा तैत्तिरीय संहितेंत केवळ अंगिरसाचाच उल्लेख येतो, त्यावरून याला आंगिरस वेद असेंहि म्हणत असल्याचें कळतें. या शब्दाची व्युत्पत्ति बृहदारण्यकोपनिषदांत पुढीलप्रमाणे दिली आहे–

अङ्गेषु गात्रेषु यो रसः सप्तधातुमयस्तमधिकृत्य
या चिकित्सा साङ्गिरसानां चिकित्सा ।

(१. ३. ८)

अर्थ– शरीरामध्ये असलेला जो सप्तधातुमय रस, त्याविषयींची चिकित्सा ज्यांत आहे, तो अंगिरसवेद होय.

याला ब्रह्मवेद असें आणखी एक नांव आहे.

चत्वारो वा इमे वेदा ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदो ब्रह्मवेदः

(गो. ब्रा. २. १६)

प्रारंभीं यज्ञकर्मांत वेदत्रयीलाच स्थान होतें. होता, अध्वर्यु व उद्‌गाता हे तीन ऋत्विज अनुक्रमे ऋक्–यजुः–साम मंत्रांनी आपापलें कर्म पार पाडीत. ब्रह्मा हा चौथा ऋत्विज्; त्याला निराळा वेद नव्हता, हें ऐतरेय ब्राह्मणावरून (५.३३) उघड होतें. पुढे मात्र 'अथर्वाङ्गिरोभिर्ब्रह्मत्वम्' असा नियम ठरविण्यांत आला व ब्रह्म्याचें काम अथर्ववेदी ब्राह्मणाला देण्यांत आलें (गो. ब्रा. २. २४). अथर्ववेदांत यज्ञोपयुक्त असा फारच थोडा भाग आहे. आणि म्हणूनच वेदत्रयीहून त्याला कमी पवित्र मानलें गेलें. धर्मसूत्रें आणि स्मृतिग्रंथ यांनी त्याचा उल्लेख अनादरानेच केला आहे. अथर्ववेद बहुतांशीं अभिचारात्मकच आहे. श्रौतामध्ये स्थान मिळाल्यावांचून त्या अभिचारात्मक मंत्रांचें वेदत्व मान्य होणें शक्य नव्हतें. म्हणून मग सारे विखुरलेले मंत्र एकत्र करून ब्रह्मवेद या नांवाने त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यांत आली. अथर्ववेदांतील मंत्रांचा गृह्यकर्माशीं विशेष संबंध असल्यामुळे ब्रह्मा हा ऋत्विज् अथर्ववेदी असावा, असें ठरविण्यांत आलें. यावरून किंवा पुढे वेदान्तांत विकास पावलेल्या ब्रह्मविद्येचा उगम अथर्ववेदांत झाला आहे, म्हणूनहि त्याला ब्रह्मवेद म्हणूं लागले असावे.

अथर्ववेद हा पुरोहितांचा वेद समजला जातो. शांत, पौष्टिक, घोर, अभिचार, इ. अनेक प्रकारच्या कर्मांचा अथर्ववेदांत समावेश होत असल्यामुळे त्या वेदाचें अध्ययन केलेल्या ब्राह्मणालाच पुरोहित नेमावें, असें सांगितलें आहे. राजाच्या शांतिक आणि पौष्टिक कर्मांचें संपादन पुरोहिताने अथर्ववेदाच्या आधारेंच करायचें असे. अशा राजपुरोहिताचा राजकारणांत आणि युद्धांतहि मोठाच अधिकार असे. तो खऱ्या अर्थानें 'पुरोहित' (= पुढे राहणारा) असे. 'ज्या राज्यांत अथर्ववेत्ता वास्तव्य करतो, त्या राष्ट्राचे सर्व उपद्रव शांत होऊन त्याला समृद्धि प्राप्त होते', असें याच्या परिशिष्टांत म्हटलें आहे.

अथर्ववेदाला क्षत्रवेद म्हणायचीहि रूढि आहे. युद्धांत शत्रूचा पराभव व्हावा म्हणून अथर्ववेदांत अनेक अभिचारकर्मे सांगितलीं आहेत. राजकर्माणि या नांवाचा बराच मोठा सूक्तसंग्रह अथर्ववेदांत आहे. हीं सर्व कर्मे करण्याचें काम राजपुरोहिताकडे असे. कांही विधि खुद्द राजानेच करायचे असत.

महाभाष्य, चरणव्यूह इत्यादींच्या मतें 'नवधा आथर्वणो वेदः' (या वेदाच्या नऊ शाखा आहेत). त्यांचीं नांवें अशीं–

(१) पैप्पल (२) दान्त (३) प्रदान्त (४) स्नात (५) सौत्र (६) ब्रह्मदावन (७) शौनक (८) देवदर्शनी व (९) चारणविद्या. अन्य मतें हीं नांवें पुढीलप्रमाणे––

(१) पैप्पलाद (२) तौदायन (३) मौदायन (४) शौनक (५) जाजल (६) जलद (७) ब्रह्मवेद (८) देवदर्श व (९) चारणवैद्य.

वर उल्लेखिलेल्या शाखांपैकी शौनक आणि पैप्पलाद या दोनच शाखा सध्या उपलब्ध आहेत. या दोन्ही शाखांचें मुद्रण रोथ आणि व्हिटने या दोघां पाश्चात्य पंडितांनी केलें आहे. व्हिटनेने तर संपूर्ण अथर्ववेदाचें इंग्रजी भाषांतर केलें आहे. डॉ. रघुवीर यांनी पैप्पलाद शाखेची संशोधित आवृत्ति व पं. सातवळेकरांनी शौनक संहिता प्रसिद्ध केली आहे.

पैप्पलाद – ही शाखा पिप्पलाद मुनीच्या नांवावर आहे. हा ऋषि थोर अध्यात्मवेत्ता होता. याने सुकेश, भारद्वाज, इ. सहा मुनींचें जें शंकासमाधान केलें, तें प्रश्नोपनिषदाच्या रूपाने प्रसिद्ध आहे. याच्या शाखेची संहिता २० कांडांची आहे.

शौनक – अथर्ववेदाची ही संहिता २० कांडें, ३४ प्रपाठक, १११ अनुवाक, ७७३ वर्ग, ७६० सूक्तें, ६,००० मंत्र व ७३८२६ शब्द अशा प्रकारें विभागली गेली आहे. सूक्तसंख्येच्या बाबतींत मतभेद आहेत.

अथर्ववेदाच्या मंत्रांचें संकलन विशिष्ट उद्देश डोळ्यांपुढे ठेवून केलेलें असल्यामुळे त्याची रचना कृत्रिम व विस्कळित आहे. ऋग्वेदाप्रमाणे मंडलरचना, देवतांचा क्रम, ऋषींचा निर्देश, या गोष्टींची सुबद्धता अथर्ववेदांत आढळत नाही. १ ते ५ कांडांतल्या सूक्तांत अनुक्रमें ४ ते ८ मंत्र आहेत. ६ व्या कांडांतलीं बरींच सूक्तें एक किंवा दोनच मंत्रांचीं आहेत. ८ ते १२ या कांडांतलीं सूक्तें मोठीं असून त्यांत विषयवैचित्र्य आढळतें. १३ ते १८ या कांडांत विषयांची एकरूपता दिसते. १५ व १६ हीं दोन कांडें गद्यमय आहेत. शेवटचीं दोन कांडें खिल कांडें या नांवाने ओळखलीं जात असून तीं मूळ संहितेला मागाहून जोडलीं गेलीं, असें मानतात. शेवटच्या कांडाची मंत्रसंख्या सुमारें १ हजार असून हे मंत्र सोमयागासाठी घेतलेले आहेत. एकूण अथर्ववेदाचा एकपंचमांश भाग ऋग्वेदांतून घेतलेला आहे. वर्तमान ऋग्वेदांत नसलेलीं, पण त्याच्या कोणत्या तरी शाखेंतून ग्रहण केलेलीं कुन्ताप नामक सूक्तें अथर्ववेदाच्या शेवटच्या कांडांत असून त्यांची संख्या १० आहे. कौषीतकि

ब्राह्मणावरून (३०.५) कळतें, की या सूक्तांचा उपयोग यज्ञविधानांत आवश्यक म्हणून होत होता. या सूक्तांत परीक्षित राजा आणि त्याचें राष्ट्र यांचें विशद वर्णन आहे. त्यामुळे या सूक्तांना ऐतिहासिक मूल्य प्राप्त झालें आहे. अथर्ववेदाची भाषा सोपी असून तिला नियमबद्धता कमी आहे.

पैप्पलाद शाखेचे कोणतेच उपग्रंथ सांपडत नाहीत. शौनक शाखेचे मात्र उपग्रंथ उपलब्ध आहेत. गोपथब्राह्मण हें अथर्ववेदाचें एकमेव ब्राह्मण होय. प्रश्न, मुंडक, मांडूक्य हीं तीन उपनिषदें अथर्ववेदाचीं आहेत. वैतान व पैठीनसी श्रौतसूत्रें, सुमन्तु धर्मसूत्र व कौशिक गृह्यसूत्र अशीं सूत्रें आहेत. प्रातिशाख्यहि आहे. नक्षत्र, शांति, अंगिरस, यांसारखीं कल्पें परिशिष्टांत आहेत.

प्राचीन मानवसमाजाच्या नाना प्रकारच्या क्रिया, अनुष्ठानें, संकेत, श्रद्धा, टोणेटोटके, या सर्वांचें विशद वर्णन अन्य वेदांपेक्षा अथर्ववेदांतच विशेषत्वाने पाहायला मिळतें. समाजशास्त्राच्या अभ्यासकाला अथर्ववेद हा एक बहुमोल आणि समृद्ध असा साहित्यनिधि आहे. वैद्यक शास्त्रांतली प्रगति, राष्ट्रविषयक विचार व व्यवहार, स्त्री–पुरुषसंबंध, देवघेव, लोकभ्रम, संकेत, अध्यात्म, इ. अनेक विषयांचें ज्ञान अथर्ववेदाच्या अध्ययनाने मिळतें.

प्रतिपाद्य विषयांच्या दृष्टीने अथर्ववेदाचें पृथक्करण केल्यास त्यांत १४४ सूक्तें आयुर्वेदासंबंधी, २१५ सूक्तें राजधर्मासंबंधी, ७५ सूक्तें समाजव्यवस्थेसंबंधीं, ८३ सूक्तें अध्यात्मासंबंधी व २१३ सूक्तें विभिन्न विषयांसंबंधी आहेत.

आयुर्वेदविषयक सूक्तांत मानवशरीराच्या समस्त अवयवांचें वर्णन असून ज्वर, गंडमाळा, कुष्ठ, राजयक्ष्मा, इ. रोगांची नामोल्लेखपूर्वक चिकित्सा आहे. भूत–प्रेत–राक्षस यांच्या बाधेमुळे नाना प्रकारचे रोग संभवतात, अशी अथर्ववेदाची कल्पना आहे. तदनुसार त्या त्या रोगांचें निर्मूलन करणारे मंत्रहि त्यांत दिलेले आहेत. मानवाची या जगांत दीर्घकाल जगण्याची आकांक्षा आणि मृत्यु टाळण्याचा त्याचा प्रयत्न, या दोन कल्पना अथर्ववेदांत प्रामुख्याने वावरतात. दीर्घायुष्याची कामना करणारीं कितीतरी सूक्तें अथर्ववेदांत आहेत. कौटुंबिक उत्सव आणि गृह्यसंस्कार यांच्या प्रसंगीं हीं सूक्तें म्हटलीं जात. पुढील सूक्त त्यांतलेंच आहे–

पश्येम शरदः शतम् ।
जीवेम शरदः शतम् ।
बुध्येम शरदः शतम् ।
रोहेम शरदः शतम् ।
पूषेम शरदः शतम् ।
भवेम शरदः शतम् ।
भूयेम शरदः शतम् ।
भूयसीः शरदः शतात् ।

(१९.६७)

अर्थ—आम्ही शंभर वर्षें पाहूं, शंभर वर्षें जगूं, ज्ञान प्राप्त करूं, वाढूं, पुष्ट होऊं, अस्तित्व राखूं, व शंभर वर्षांहूनहि अधिक वर्षें (हें सर्व मिळवूं).

दीर्घायुष्यासाठी हातांत रक्षासूत्र किंवा मणि बांधण्याचें विधानहि अथर्ववेदांत सांगितलें आहे (१९. २७, २८). केवळ वैद्यक दृष्टचाहि रोगचिकित्सेचें ज्ञान अथर्ववेदांत बरेंच प्रगत झालेलें दिसतें. विशिष्ट विकारांसाठी पृश्निपर्णी, आघाडा, पिंपळी, इ. वनस्पतींचे प्रयोग तिथे सांगितले आहेत.

राजधर्माचें अनेक अंगांनी केलेलें विवरण हें अथर्ववेदाचें वैशिष्टच होय. तिथे विशुद्ध लोकतंत्रात्मक राज्यव्यवस्थेचा निर्देश केलेला आहे. त्या काळीं प्रजेकडून राजा निवडला जात असे. या गोष्टीचा उल्लेख ‘ त्वां विशो वृणतां राज्याय ’ (= तुला प्रजा राजा म्हणून वरोत), या मंत्रांत (३. ४. २) मिळतो. अथर्ववेदांत राजाची निवड, त्याचे अधिकार, त्याचें सामर्थ्य व कर्तव्य, यांविषयीं स्पष्ट उल्लेख आहेत. ४ थ्या कांडांतलें ८ वें सूक्त राज्याभिषेकासंबंधी आहे. त्यांत राजाच्या अंगावर पवित्र जलाचें सिंचन करणें व त्याने वाघाच्या किंवा बैलाच्या कातड्यावर बसणें, या दोन महत्त्वाच्या क्रिया सांगितल्या आहेत. त्या प्रसंगीं राजा आपल्या प्रजेला अभिवचन देतो, की––

अहं राष्ट्रस्याभीवर्गे निजो भूयासमुत्तमः

(३. ५. २)

अर्थ––मी राष्ट्रांतल्या जनांमध्ये त्यांचा म्हणून राहीन व प्रजेच्या विश्वासाला पात्र ठरेन.

राजा हा ईश्वरी अंश आहे, ही कल्पना अथर्ववेदांत आढळत नाहीं; तर प्रजेच्या सामर्थ्याने आणि प्रेमाने तो श्रेष्ठ व समर्थ होतो, असाच तिथला सूर आहे. सभा व समिति या त्या काळांतल्या दोन राजकीय संस्था होत्या. त्यांच्या अनुमतीने राजा आपला कारभार चालवीत असे. त्या दोहोंत सभा ही विद्वज्जनांची असल्यामुळे वरिष्ठ होती व न्यायदानाचें कामहि तिच्याकडेच होतें. समिति तिच्या धोरणाप्रमाणे सर्व राजकीय कार्यें पार पाडीत होती (१५. ९. २-३). राजा म्हणे, की ‘ सभा च मां समितिश्चावताम् ’ (= सभा आणि समिति माझें रक्षण करोत). राजा अशीहि आकांक्षा धरी, की सभा–समितींच्या सदस्यांनी माझ्याबरोबर एका स्वरांत बोलावें व आपण त्यांच्या ज्ञानाचा व शक्तीचा समुचित उपयोग करून घ्यावा (७. १३).

अथर्ववेदांतली समाजव्यवस्थाहि वर्णाश्रम धर्मावरच आधारलेली आहे. समाजशास्त्राच्या सिद्धांतानुसार सामाजिक जीवनाचा मूल घटक म्हणजे कुटुंबसंस्था होय. या वेदाच्या तिसऱ्या कांडांत कौटुंबिक जीवनाचें एक आदर्श चित्र रेखाटलें आहे. त्या सूक्ताला सांमनस्य सूक्त असें नांव आहे. त्यांतले कांही मंत्र पुढीलप्रमाणे आहेत––

अनुव्रतः पितुः पुत्रो
मात्रा भवतु संमनाः ।
जाया पत्ये मधुमतीं
वाचं वदतु शन्तिवाम् ।।
मा भ्राता भ्रातरं द्विक्षन्
मा स्वसारमुत स्वसा ।
सम्यञ्चः सव्रता भूत्वा
वाचं वदत भद्रया ।

(३. ३०. २–३)

अर्थ—पुत्र पित्याचा अनुगामी आणि मातेच्या मनाला अनुकूल होवो. पत्नी आपल्या पतीशीं शांतिप्रद असें मधुर भाषण करो. भाऊ–भाऊ आणि बहिणी–बहिणी हीं एकमेकांचा द्वेष न करोत. (तुम्हीं सगळे) मनाने एक आणि समव्रत होऊन मंगल वाणीने भाषण करा.

घरें बांधणें, शेती करणें, अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें, इ. अनेक गोष्टींचें वर्णन अथर्ववेदांत केलें आहे. पतिपत्नींच्या प्रेमासंबंधींहि अथर्ववेदांत सुंदर सूक्तें आहेत. निरोगी, सुदृढ शरीराप्रमाणेच स्त्रीपुरुषांच्या प्रेमभावनेचीहि मानवी जीवनाला अत्यंत आवश्यकता आहे, असें अथर्ववेद मानतो.

या वेदाचा चौथा प्रतिपाद्य विषय अध्यात्म हा आहे. ' अस्य वामस्य ' हें ऋग्वेदांतलें अध्यात्मविद्येविषयीचें सूक्त अथर्ववेदांतहि आलें आहे. अथर्ववेद बहुदैवतवादाचें निराकरण करून एकेश्वरवादाची स्थापना करतो (९. १०. २८). अथर्ववेदांत कोणत्याहि तत्त्वप्रणालीचें संपूर्ण दर्शन होत नसलें, तरी तिथे ब्रह्म, आत्मा, जीव, मृत्यु, स्वर्ग, इ. कल्पना विखुरलेल्या स्वरूपांत आढळतात. उपनिषदांतल्या ब्रह्मविषयक व आत्मविषयक कल्पनांचा उगम अथर्ववेदांतच सांपडतो. ऋषींचें तप, मंत्र आणि यज्ञकर्म, यांतून ब्रह्माची उत्पत्ति झाली, असा विचार तिथे आहे. आत्म्याला अमर आणि सर्वव्यापक असें म्हटलें आहे. सृष्टिविज्ञानांत जीव, ईश्वर आणि प्रकृति हे तीन नित्य पदार्थ अथर्ववेदाने मानले आहेत. या तीनहि पदार्थांचें स्वरूप आणि त्यांचा संबंध अलंकारिक भाषेंत सांगितला आहे. (प्रकृतिरूप) वृक्षावर जीव आणि ईश्वर असे दोन पक्षी बसले आहेत, असें तें रूपक आहे (३. ९. २०). जीवाने त्या ईश्वराचा साक्षात्कार करून घेतल्यानंतर त्याला परमानंदस्वरूप मोक्षाची प्राप्ति होते.

प्रजापति हा सर्व प्रणिमात्राचा प्रभु असून तो सर्व प्रजांना जन्म देतो (७.१९. १). प्रजोत्पादन हें त्याचें मुख्य कार्य होय (५. २५. ५; ६. ११. २). त्याने उत्पन्न केलेल्या प्रजेचें पालनपोषण विराज् हा करतो. विराज् म्हणजे विश्व किंवा पृथ्वी होय. उपनिषदांत (श्वेता. १. ३) ज्याप्रमाणे काल हें मूल तत्त्व मानलेलें आहे, त्याप्रमाणेच अथर्ववेदानेहि मानलेलें आहे. मात्र तो ब्रह्म व काल हीं दोन्ही तत्त्वें अभिन्न समजतो.

कालो ह ब्रह्म भूत्वा बिभर्ति परमेष्ठिनम् ।

(१९. ५३. ९)

अर्थ––काल हाच ब्रह्म होऊन परमेष्ठीला (प्रजापति) धारण करतो.

अथर्ववेदांतले अध्यात्मविषयक विचार पाहिले म्हणजे अथर्ववेद हा वेदकालीन यज्ञधर्म आणि उपनिषदांतील ब्रह्मविद्या यांच्या मधला सेतु आहे, हें कळून येतें.

अथर्ववेदाशीं संबंधित अशा उपनिषदांची संख्या भिन्न भिन्न पंडितांच्या मतें भिन्न आहे. पण ज्यांच्या प्रारंभीं ' भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः' हा शांतिपाठ आहे व शेवटीं ' इत्यथर्ववेदे... उपनिषद् समाप्ता ' हें वाक्य आहे, अशीं ६८ उपनिषदें अथर्ववेदाशीं निश्चितपणें संबंधित आहेत. इतर तीनहि वेदांच्या मानाने अथर्ववेदाशीं संबंध असलेल्या उपनिषदांची संख्या अधिक आहे. त्यावरून अथर्वण परंपरा त्या काळीं किती मान्यता पावली होती, तें समजून येतें.

अथर्ववेदांत धर्माव्यतिरिक्त इतर अनेक गोष्टींसंबंधीं सूक्तें अधिक असल्यामुळे वैदिक धर्माचे अभिमानी त्याला प्रारंभीं वेद मानीत नव्हते. पण पुढे यज्ञधर्म प्रस्थापित झाल्यावर ब्राह्मण साहित्यांत अथर्ववेदाला मान मिळूं लागला. ब्राह्मणकालांत अथर्ववेदी ब्राह्मण राजपुरोहित झाले होते. त्यांनी आपल्या वेदांतील सूक्तांचा व्यावहारिक उपयोग करून दाखविल्यामुळे त्या वेदाला मान्यता मिळाली असावी. पुढच्या कालांत यज्ञधर्माविषयीं अश्रद्धा हळूहळू वाढूं लागली. तिला आळा घालण्यासाठी अथर्वण ऋषींनी नवीन संघटना उभी केली. भक्तीला महत्त्व दिलें. अवतारवाद स्वीकारला. कृष्ण, रुद्र, शिव, इ. अनेक देवतांची उपासना करून ब्रह्मप्राप्ति होणें शक्य आहे, या नवीन विचारप्रणालीचा पुरस्कार करण्यासाठी अथर्वण उपनिषदें रचण्यांत आलीं. त्यांच्या या प्रयत्नामुळे सनातन धर्माचा ऱ्हास थांबला. या अथर्वण उपनिषदांचे पांच वर्ग दिसतात ते असे –– (१) शुद्ध वेदान्त प्रतिपादक (२)

योगमार्गाचा पुरस्कार करणारीं (३) संन्यास धर्माचें प्रतिपादन करणारीं (४) शैवमत प्रतिपादक व (५) वैष्णवमतप्रतिपादक.

त्रिमूर्ति कल्पना अथर्वण उपनिषदांतच उत्क्रांत झाली आहे. पंचायतन पूजेचा उगमहि तिथेंच सांपडतो. अशा प्रकारें शैव-वैष्णव उपासनांचा या उपनिषदांत समन्वय होऊन त्यांतून पुढें स्मार्त धर्माचा उदय झाला. मुंडकोपनिषद् हें दशोपनिषदांतलें उपनिषद् असून त्यांत अथर्वण कुलांतील अंगिरसाचा महिमा गुरु म्हणून वर्णिलेला आहे. तो ब्रह्मविद्या शिकवितो. द्वैत, अद्वैत, अमरत्व यांच्याविषयीं पाठ देतो. आत्मोपनिषदांत तर त्याने शुद्ध अद्वैतवाद प्रतिपादिला आहे. भगवद्गीतेंतील बऱ्याच कल्पना अंगिरस ऋषीच्या विचारप्रणालींतून घेतलेल्या आहेत, असें विद्वानांचें मत आहे.

ऋग्वेदापेक्षा अथर्ववेदांतलें वातावरण अगदी वेगळें आहे. जादूटोणा हा अथर्ववेदांतला एक प्रमुख विषय आहे. यालाच यातुविद्या असें म्हणतात. ऋग्वेदांतल्या बहुतेक देवता अथर्ववेदांतहि आल्या आहेत. पण तिथे त्यांचें स्वरूप बरेंच पालटलें आहे. खालच्या वर्गांतील लोकांनी निर्माण केलेल्या देवतांना अथर्ववेदांतच मान्यता मिळाली. ऋग्वेदापासून अथर्ववेदापर्यंत चाल केल्यास अथर्ववेदांत देवांची जागा भुतें, खेतें, रोग, मृत्यु यांनी व्यापलेली दिसते. भुतें, खेतें आणि राक्षस यांचा नाश करणें हेंच महत्त्वाचें काम अथर्ववेदांतल्या देवतांना करावें लागतें. ऋग्वेदांतला स्वतिथि आणि अन्य देवतांना आहुति पोंचविण्याचें काम करणारा अग्नि अथर्ववेदांत शत्रूवर विजय मिळविण्यासाठी केलेल्या अभिचार कर्माचा साहाय्यक बनलेला आहे. इथे यज्ञाला प्रतियज्ञ करून एखादा शत्रु यजमानाच्या फलप्राप्तींत बिघाड आणूं शकतो. आणि अशा यज्ञाचीं हविर्द्रव्यें भाताचा कोंडा, पळसाचीं पानें, इ. हलक्या वस्तु असतात. म्हणून आपल्या यज्ञकर्माचा नाश होऊं नये, यासाठी संभाव्य शत्रूला आधीच मारून टाकण्याचे मंत्रतंत्र अथर्ववेदांत दिले आहेत. हे मंत्रतंत्रात्मक विधि करतांना वेळूचा एक तुकडा उभा चिरला जातो. तें शत्रूला चिरण्याचें प्रतीक आहे. अथर्ववेदांत दुष्ट आत्मे व त्यांची अद्भुत शक्ति यांचाच विचार अधिक केलेला आहे. जादूटोणा करणारीं माणसें आपल्या अंगींची शक्ति शत्रूवर घालतात, तिला कृत्या असें नांव आहे. या कृत्येचे विरोधी मंत्रहि अथर्ववेदांत आढळतात. दुःस्वप्नांचें भय त्या काळीं लोकांना फार वाटे. तीं मृत्युसूचक समजलीं जात. अशीं स्वप्नें पडूं नयेत म्हणून अथर्ववेदाचें १६ वें कांड म्हणण्याची प्रथा होती. पिशाच, राक्षस आणि गंधर्व-अप्सरा, यांचा त्रास चुकविण्यासाठी अथर्ववेदांतल्या दुसऱ्या कांडांतल्या दुसऱ्या सूक्ताचा उपयोग करीत. शिवाय अजशृंगी वनस्पतीची धुरीहि देत. निरनिराळ्या कारणांसाठी निरनिराळ्या प्रकारचे ताईत हाताला बांधीत. त्यासाठी औषधि–वनस्पतींचा उपयोग करीत. मंत्रसिद्ध अंगठ्याहि वापरीत.

कृषि आणि पशु यांच्या समृद्धीसाठी अथर्ववेदांत अनेक मंत्र दिलेले आहेत. शेतीची नांगरट करतांना शुनासीर देवतेची प्रार्थना करीत, धान्य पेरतांना ६ व्या कांडांतलें १४२ वें सूक्त म्हणत. पिकांची नीट वाढ होण्यासाठी व त्यांना भरपूर हवा, पाऊस मिळण्यासाठी मरुत् व पर्जन्य या देवतांची प्रार्थना करीत. गोधन वाढावें, यासाठी विशेष प्रकारचे विधि करीत. दुसऱ्या कांडांतलें २६ वें सूक्त त्याकामीं उपयोजीत. मार्गशीर्ष पौर्णिमेस आग्रहायण विधीच्या वेळीं म्हटलें जाणारें भूमिसूक्त अत्यंत महत्त्वपूर्ण असून त्यांतला प्रत्येक मंत्र भूमीच्या भक्तीने ओतप्रोत भरलेला आहे. त्यांतले कांही मंत्र पुढीलप्रमाणे आहेत ––

यस्यां पूर्वे पूर्वजना विचक्रिरे
यस्यां देवा असुरानभ्यवर्तयन् ।
गवामश्वानां वयसश्च विष्ठा
भगं वर्चः पृथिवी नो दधातु ।।५।।
यो नो द्वेषत् पृथिवि यः पृतन्याद्
योऽभिदासान्मनसा यो वधेन ।
तं नो भूमे रन्धय पूर्वकृत्वरि ।।१४।।
यस्यां वृक्षा वानस्पत्या ध्रुवास्तिष्ठन्ति विश्वहा ।
पृथिवीं विश्वधायसं धृतामच्छा वदामसि ।।२७।।
मा नः पश्चान्मा पुरस्तान् नुदिष्ठा मोत्तरादधरादुत ।
स्वस्ति भूमे नो भव मा विदन्
परिपन्थिनो वरीयो यावयावधम् ।।३२।।
निधिं बिभ्रती बहुधा गुहा वसु
मणिं हिरण्यं पृथिवी ददातु मे ।
वसूनि नो वसुदा रासमाना
देवी दधातु सुमनस्यमाना ।।४४।।
मल्वं बिभ्रती गुरुभृद् भद्रपापस्य निधनं तितिक्षुः ।
वराहेण पृथिवी संविदाना
सूकराय वि जिहीते मृगाय ।।४८।।
उपस्थास्ते अनमीवा अयक्ष्मा
अस्मभ्यं सन्तु पृथिवि प्रसूताः ।
दीर्घं न आयुः प्रतिबुध्यमाना
वयं तुभ्यं बलिहृतः स्याम ।।६२।।

(१२.१)

अर्थ –– जिथे आमच्या पूर्वजांनी अद्‌भुत कार्यें केलीं, जिथे देवांनी असुरांना मारलें आणि जी गाई, घोडे आणि पक्षी यांची माता आहे, ती भूमि आम्हाला तेज व ऐश्वर्य देवो (५). जे आमचा द्वेष करतात, जे सैन्यासह आमच्यावर चढाई करतात, जे मनांतून आमचें वाईट इच्छितात आणि जे आम्हाला मारण्यासाठी उद्युक्त असतात, त्यांना हे शत्रुमर्दिनि, तूं नष्ट कर (१४). जिथे चारी बाजूंना वृक्ष–वनस्पति उभ्या आहेत, त्या विश्वधारक पृथ्वीचें आम्ही गुणगान करीत आहों (२७). मागूनपुढून आणि वरूनखालून कोणीहि आमच्यावर प्रहार करूं नयेत. हे भूमि, तूं मंगल कर. हिंसक, चोर आणि लुटारू यांना आमचा पत्ता न लागो. हे भूमि, अशा लोकांना तूं पिटाळून लाव (३२). ही विविध वैभवशालिनी पृथ्वी मला मणि आणि सुवर्ण देवो. प्रसन्नवदना, वरदात्री आणि धनरत्नदायिनी अशी ही पृथ्वी आम्हांला अमित वैभव देवो (४४). लहानथोर पदार्थांना धारण करणारी, व पापी आणि पुण्यवंत यांचा भार वाहणारी ही पृथ्वी आहे. हिला वराहरूपी ईश्वराने शोधून प्राप्त केलें (४८). हे भूमि, तुझे प्रदेश रोग, क्षय आणि भय यांनी रहित होवोत. आम्ही दीर्घायु होऊं, सदा सावध राहूं आणि तळहातावर शिर घेऊन तुझ्या-साठी सर्वस्वाचा त्याग करण्यासाठी तयार राहूं (६२).

अथर्ववेदाची रचना ऋग्वेदानंतर झालेली असावी, हें त्यांतील भाषा व छंद या अंतर्गत प्रमाणांवरून दिसून येतें. अथर्ववेदांत ज्या समाजाचें प्रतिबिंब दिसतें, तो समाजहि ऋग्वेदकालाहून अर्वाचीन आहे. अथर्ववेदांतले आर्य हे सप्त-सिंधूंच्या प्रदेशांतून बाहेर पडून पूर्व आणि दक्षिण या दोन दिशांना बरेच पुढे गेलेले दिसतात. ऋग्वेदांत चातुर्वर्ण्याचा केवळ उल्लेख आहे, तर अथर्ववेदांत चातुर्वर्ण्य प्रतिष्ठित झालेलें दिसतें.

अथर्ववेदाचें मूर्तिशास्त्रांतलें ध्यान हेमाद्रीने पुढीलप्रमाणे सांगितलें आहे ––

अथर्वणाभिधो वेदो धवलो मर्कटाननः ।
अक्षसूत्रं च खट्‌वाङ्‌गं बिभ्राणोऽयं जनप्रियः ।।

अर्थ — अथर्ववेद हा शुभ्र वर्णाचा, माकडाच्या तोंडाचा, यज्ञोपवीत व खट्‌वांग धारण करणारा व लोकप्रिय असा आहे. [रि. फि. अ.; वै. सा. सं.; वै. सा.; इं. फो. लो.; म. ज्ञा. को.; हि. ध.; वै. नि.]

अथर्ववेदशाखा

'नवधाऽथर्वणो वेदः' = अथर्व वेदाच्या शाखा ९ आहेत (पातं. म. भा. पस्पशा-ह्निक). चरणव्यूहानुसार त्यांचीं नांवें अशीं– (१) पैप्पलाद (२) स्तौद (३) मौद (४) शौनकीय (५) जाजल (६) जलद (७) ब्रह्मवद (८) देवदर्श व (९) चारणवैद्य. यांतल्या सहा नांवांच्या शुद्धतेबद्दल संदेह नाही. स्तौद, जलद व ब्रह्मवद या तीन नांवांबद्दल संशोधनाची आवश्यकता आहे. ब्रह्मवद हे कदाचित् ब्रह्मपलाश किंवा ब्रह्मबलहि असूं शकतील.

कृष्ण-द्वैपायनाचा चौथा शिष्य सुमंतु याने अथर्वसंहितेच्या दोन शाखा बनवून कबंध नामक शिष्याला पढविल्या. बृहदारण्यकांत (३.७) आरुणि-याज्ञवल्क्य संवादांत कबंध आथर्वणाचें नांव येतें. तो सुमंतूचाच शिष्य असावा. कबंधाने आपण मिळविलेल्या दोन शाखा पथ्य व देवदर्श या शिष्यांना पढविल्या. त्यांच्या नंतर या दोन शाखा ९ प्रकारें विभक्त होऊन विस्तारल्या ––

पैप्पलाद – स्कंद पुराणाच्या नागरखंडानुसार पिप्पलाद हा याज्ञवल्क्याचा संबंधी व महाविद्वान् होता. याची संहिता २० कांडांचीं व ब्राह्मण ८ अध्यायांचें आहे. ही संहिता सांप्रत उपलब्ध आहे. 'शं नो देवीरभिष्टये' हा अथर्ववेदाचा प्रथम मंत्र या शाखेचा आहे, असें छांदोग्य मंत्रभाष्यांत गुणविष्णु सांगतो.

स्तौद – सायणाचा पाठ तौद असा आहे. बुद्धाच्या कालीं कोसल देशांत तौदेय्य अथवा तोदेय्य ब्राह्मण होते, ते या शाखेचे असावे (मज्झिम नि. २.५.१०).

मौद – पातं. महाभाष्याच्या काळांत ही शाखा बरीच प्रसिद्ध असावी. अथर्व परिशिष्टांत (२.४) जलद व मौद या शाखांच्या पुरोहितांकडून कृत्य करून घेणाऱ्या राजाचें राष्ट्र नाश पावतें, असें म्हटलें आहे. सांप्रत ही शाखा नाममात्र शिल्लक आहे.

शौनकीय – शौनक नांवाचे अनेक ऋषि झाले आहेत. यांतला आथर्वण शौनक कोणत्या गोत्राचा व देशाचा होता, तें अज्ञात आहे. शौनकीय संहितेंत १८ च कांडें आहेत. कौशिक व वैतान हीं सूत्रें शौनकीय शाखेशीं संबंध दाखवितात. पंचपटलिकानुसार शौनकीय संहितेंत एकूण ४६२७ मंत्र आहेत.

जाजल – विशेष माहिती उपलब्ध नाही.

जलद – जलदायन असाहि पाठभेद आहे (अथर्व परिशिष्ट-अरणिलक्षण २).

ब्रह्मवद – याचें गोत्रनाम भार्गव असावें. कारण या शाखेचें वर्णन अथर्ववाङ्‌मयांत भार्गव नामाच्या अंतर्गत मिळतें.

देवदर्श – यांचा उल्लेख जाजलांच्या वर्णनांत येतो. पाणिनीय गणपाठांत देवदर्शन असें नांव आढळतें.

चारणवैद्य – कौशिक सूत्राच्या (६.३७) व्याख्येंत केशव लिहितो, की 'त्वमग्ने व्रतपा असि' व 'कामस्तदग्रे' हीं सूक्तें चारणवैद्यांच्या तंत्रांत म्हटलीं जातात. वायु व ब्रह्म या पुराणांत या शाखेच्या संहितेची मंत्रसंख्या ६०२६ एवढी दिली आहे. या

पुराणांच्या कालांत ही संहिता विशेष प्रसिद्ध असावी. चरण-व्यूहांत सगळ्या अथर्ववेदाच्या शाखांची मिळून मंत्रसंख्या 'द्वादशैव सहस्राणि' (= बारा हजार) एवढी दिली आहे. [वै वा. इ.]

अथर्ववेदाचे उपग्रंथ अथर्ववेदाच्या ९ शाखांपैकी शौनक शाखेचे मात्र उपग्रंथ सध्या उपलब्ध आहेत. गोपथ ब्राह्मण हें अथर्ववेदाचें एकमेव ब्राह्मण आहे. प्रश्नोपनिषद्, मुंडकोपनिषद् व मांडूक्योपनिषद्, हीं तीन उपनिषदें अथर्ववेदाचीं आहेत. वैतान श्रौतसूत्र, सुमंतु धर्मसूत्र, कौशिक गृह्यसूत्र, अशीं तीन सूत्रें आहेत. प्रातिशाख्यहि आहे. अथर्व परिशिष्टामध्ये नक्षत्रकल्प, शांतिकल्प, अंगिरसकल्प, यांसारखीं अनेक कल्पें आहेत. लक्षणग्रंथ आणि प्रायश्चित्तें यांचाहि समावेश परिशिष्टामध्ये आहे. आयुर्वेद, सर्पवेद, पिशाचवेद, असुरवेद, इतिहासवेद आणि पुराणवेद हे अथर्ववेदाचे उपवेद म्हणून समजले जातात.

अथर्वा एक प्राचीन उपाध्याय. 'थर्वतिश्चरतिकर्मा तत्प्रतिषेधः' (=चित्तवृत्तिनिरोधरूप समाधीने संपन्न अशी व्यक्ति म्हणजे अथर्वा, असा भावार्थ आहे.) अशी निरुक्तांत त्याची व्याख्या दिली आहे (११.२.१७). हा अग्निमंथनाच्या पद्धतीचा संशोधक असून (ऋ. ६.१६.१३) याने उत्पन्न केलेला अग्नि विवस्वानाचा दूत झाला, असें म्हटलें आहे (ऋ. १०. २१. ५). याच्या नांवावरूनच अग्नीला अथर्वन् असें नांव पडलें. ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं याचा उल्लेख येतो. याचा व इंद्राचा स्नेह होता. यज्ञ करून याने स्वतःला स्थैर्य मिळविलें होतें. वरुणाने याला एक कामधेनु दिली होती (अथर्व. ५.११; ७.१०४). हा ब्रह्मदेवाचा ज्येष्ठ पुत्र व स्वायंभुव मन्वंतरांतला ऋषि आहे. शांति व चित्ति अशा याच्या दोन भार्या असून याला धृतव्रत, प्रदध्यच् व अथर्वशिरस् असे तीन पुत्र होते. त्यांना आथर्वण असें म्हणतात. हा अंगिरस कुलांतला पहिला असून याचा अथर्ववेदाशीं घनिष्ठ संबंध आहे. नहुष राजा इंद्रपदावर बसतांच याने त्याचा वेदमंत्रांनी सत्कार केला. त्या वेळीं नहुषाने त्याला वर दिला, की 'तुझ्या वेदाचें नांव अथर्वांगिरस् होईल व तुला यज्ञभाग मिळेल.' [प्रा. च. को.; बलदेव उपाध्याय]

अथर्वांगिरस् (१) अथर्वा व अंगिरा यांच्या अनुवर्ती पुरुषांना हें नांव आहे. यांतले कित्येक पुरुष मंत्रद्रष्टे होते. यज्ञानुष्ठानांत अथर्ववेदाचें विधिवत् पालन होतें, कीं नाही, यावर यांची देखरेख असे.

(२) ब्राह्मण ग्रंथांत संपूर्ण अथर्ववेदासाठीहि हें नांव येतें (तै. ब्रा. ३. १२. ८. २; श. ब्रा. ११. ५. ६. ७). कांही पंडितांच्या मतें अथर्व म्हणजे त्या वेदांतील पवित्र भाग (भेषजानि) व अंगिरस म्हणजे जादूटोण्याचा भाग (अभिचार) होय. पुराणांत भिषज् आथर्वण व घोर आंगिरस या नांवाचे दोन पुरुष आढळतात, त्यावरून वरील मताला पुष्टि मिळते. पाहा—अथर्वा, अथर्ववेद. [वे. इं.; हिं. वि. को.]

अथिपट्ट तमिळनाडमधला एक नायन्मार. हा नेगापट्टम् येथील कोळी असून जाळयांत पकडलेल्या माशांपैकी मोठा मासा शिवाला देण्याचा याचा नेम होता. तेवढयावर त्याला शिवकृपा लाभली. [पे. पु.]

अदत्त देऊनहि जें दान ठरत नाही व ज्याचें पुण्यरूपी फल मिळत नाही, तें अदत्त होय. याचे प्रकार पुढील श्लोकांत दिले आहेत—

अदत्तं तु भयक्रोधशोकावेगरुजान्वितैः ।
तथोत्कोचपरीहासव्यत्यासच्छलयोगतः ।।
बालमूढास्वतन्त्रार्तमत्तोन्मत्तापवर्जितम् ।
कर्ता ममेदं कर्मेति प्रतिलाभेच्छया च यत् ।।
अपात्रे पात्रमित्युक्ते कार्यं वा धर्मसंहिते ।
यद्दत्तं स्यादविज्ञानाददत्तमिति तत् स्मृतम् ।।

अर्थ —भीतीने, रागाने, शोकाने व रुग्ण अवस्थेंत दिलेलें, त्याचप्रमाणे कार्याला प्रतिबंध करणाऱ्या अधिकाऱ्यांना लांच म्हणून दिलेलें, 'हा माझें काम करील,' या अपेक्षेने दिलेलें, अपात्राला पात्र म्हणून दिलेलें, कांही न येणाऱ्याला चारी वेद जाणतो, असें समजून दिलेलें आणि अज्ञानाने दिलेलें, द्रव्यादि दान हें अदत्त अर्थात् देऊन न दिल्यासारखेंच होय. [श. क.]

अदाभ्य ज्योतिष्टोमांतला एक ग्रह. याच्या समर्पणाने स्वर्गप्राप्ति होते. [तै. सं. ६. ६. ९. २]

अदारिद्र्य षष्ठी तिथिव्रत. षष्ठीच्या दिवशीं उपवास अथवा एकभुक्त राहणें व सूर्यपूजा करणें. व्रताचा अवधि एक वर्ष. भोजनांत तेल व मीठ वर्ज्य. पायसाचें भोजन. फल-दारिद्र्यनाश. [च. व. चिं.]

अदिकल केरळांतील अंबलवासी जातिसमहापैकी एक वर्ग. हे मुळांत ब्राह्मण होते; पण शंकराचार्यांनी

घेतलेल्या सत्त्वपरीक्षेंत हे टिकले नाहीत; म्हणून यांना हीन जाति स्वीकारावी लागली, असें सांगतात. ज्यांना मद्याचा नैवेद्य हवा असतो, अशा भद्रकाली इ. देवतांच्या मंदिरांतून हे पुजाऱ्याचें काम करतात. हे उपनयन करून जानवें घालतात. दहा वेळां गायत्री जप करतात. यांच्यांतलें पौरोहित्य याच जातीचे लोक करतात. लग्न व वारसा यांसंबंधांत मरुमक्कतायम् हा कायदा पाळतात. यांच्या बायका नम्पूतिरि बायकांसारखे दागिने घालीत असल्या, तरी त्यांना ताडपत्री छत्री वापरण्याचा व कुणवीण बरोबर नेण्याचा अधिकार नाही. हे आशौच दहा दिवस पाळतात. मंत्र, तंत्र व जादूटोणा, इ. अभिचारकर्म हा यांचा धंदा आहे. **पाहा** — अंबलवासी. [का. ट्रा. स. इं.]

अदिति अ + दिति = जिला मर्यादा नाही अशी. एक वैदिक देवता. यास्काने हिला देवांची बलवती माता मानलेलें आहे. ही विश्वाचीहि माता आहे. ही आकाशाला आधार देते आणि पृथ्वीचें धारण करते. पण ऋग्वेदांत हिचें स्वरूप मात्र निश्चित नाही. हिला एकदा दक्षाची कन्या म्हटलें आहे, तर लगेच दक्ष हा तिचा पुत्र असेंहि म्हटलें आहे (ऋ. १०. ७२. ४). हिच्या आठ पुत्रांचा वारंवार उल्लेख येतो. त्यांचीं नांवें अशीं — मित्र, वरुण, धाता, अर्यमा, अंश, भग, विवस्वान् व आदित्य.

हिला फक्त सातच पुत्रांची अपेक्षा होती. म्हणून आठव्या खेपेस तिने आपला गर्भ फोडला. तोच पुढे मार्तंड या नांवाने प्रसिद्ध झाला. सात पुत्रांना घेऊन ती देवांकडे गेली आणि आठव्याला तिने आकाशांत फेकून दिलें (ऋ. १०. ७२. ८). हे आठ पुत्र म्हणजेच अष्ट वसु होत.

तैत्तिरीय संहितेंत हिला विष्णुपत्नी म्हटलें आहे (७. ५. १४). ऋग्वेदांत अदितिविषयक एकहि संपूर्ण सूक्त नाही. प्रसंगवशात् तिचा ऐंशी वेळां उल्लेख मात्र आला आहे. हिला देवी असें म्हटलें असून प्रातःकाल, मध्याह्न व सायंकाल असें त्रिकाल तिचें आवाहन करावें, असें सांगितलें आहे.

अदिति ही मित्रावरुणांची व त्याचबरोबर अर्यम्याचीहि माता असल्यामुळे तिला राजमाता, वीरपुत्रा अशीं नांवें मिळालीं आहेत. अथर्ववेदांत (६.४) हिचे भाऊ व पुत्र या दोहोंचाहि निर्देश आहे. वाजसनेयि संहितेंत (२१. ५) हिला स्तोत्यांची महान् माता, ऋताची अधिष्ठात्री, पराक्रमी, रक्षणकर्त्री व मार्गदर्शक म्हणून गौरविलें आहे. अशा प्रकारचे व आदित्यांबरोबर येणारे तिचे उल्लेख पाहिले असतां मातृत्व हा अदितीचा विशेष गुण आहे, असें दिसतें. पस्त्या या तिच्या विशेषणानेहि बहुधा हेंच सूचित केलेलें असावें. विपत्ति, अपराध किंवा पाप यांपासून मुक्त होण्यासाठी ऋग्वेदांत अदितीचें अनेकवार आवाहन केलें आहे.

अदिति, आप व पृथ्वी यांच्यापासून देव उत्पन्न झाले (ऋ. १०. ६३. २). एका ठिकाणीं अदितीला विश्वसृष्टीची मूर्ति म्हटलें आहे. अदिति ही आदित्यांची माता असल्यामुळे तिच्याकडे प्रकाशाची याचना केलेली आहे व तिच्या अक्षय्य प्रकाशाची स्तुतिहि केलेली आहे (ऋ. ७. ८२). उषेला अदितीचें मुख असें म्हटलें आहे. ऋग्वेदांत व वाजसनेयि संहितेंत तिला गौः असें संबोधिलें आहे. संस्कारविधींत जी गाय लागते, तिला सामान्यतः अदिति असें म्हणत.

मैनाक पर्वताच्या मध्यावर असलेल्या विनशन नामक तीर्थावर अदितीने चरु शिजविला होता (म. भा. वन. १३५). देवयुगांत पुत्रप्राप्त्यर्थ सतत एका पायावर उभें राहून तिने अत्युग्र तपश्चर्या केली व नंतर तिला विष्णु हा पुत्र झाला (म. भा. अनु. ८३). विष्णूच्या आधी हिला अकरा पुत्र होते. [वे. इं.; वे. मा.; प्रा. च. को.]

अदिति कुंड अमीन गांवाच्या पूर्वेस दोन सरोवरें आहेत. त्यांपैकी एकाचें नांव अदितिकुंड असून दुसऱ्याचें सूर्यकुंड आहे. या ठिकाणीं पूर्वी कश्यप आणि अदिति यांचा आश्रम होता. इथेच अदितीच्या पोटीं वामनावतार झाला. या ठिकाणीं एक शिवमंदिर असून दोन प्राचीन, लाल दगडाच्या मूर्ति आहेत. [कल्याण – तीर्थांक]

आदितीष्टि दर्शेष्टि झाल्यावर अदितीसाठी तुपांत शिजविलेल्या चरूचा याग करावा, असें कांही श्रौतसूत्रांत सांगितलें आहे. एकदा या यागाचा उपक्रम केला, की प्रत्येक दर्शेष्टीबरोबर ही इष्टि केली पाहिजे, असा नियम आहे. पशुकाम यजमानाने ही इष्टि करावी, असें मानव श्रौतसूत्रांत सांगितलें आहे (१. ३. ५. २९). कामना पुरी होईपर्यंतच ही इष्टि करावी, असेंहि एक मत आहे. [विद्याधरशास्त्री भिडे]

अदिन् कोठाम आदिवासींच्या झोपडींतलें धान्यकोठार तो त्यांचा एक प्रकारचा कौटुंबिक देव्हाराहि असतो. त्या कोठारांत घराण्यांतल्या मृत पूर्वजांचें वास्तव्य असतें, या समजुतीमुळे ते लोक परक्या माणसाला तिथे जाऊं देत नाहीत. बा परब या सणाच्या दिवशीं कुटुंबप्रमुख मृतांच्या नांवाने तिथे महानैवेद्य ठेवतो. [एन्सा. मुं.]

अदिन् बोंगाकु मुंडा, वेड्डा, इ. आदिवासींचा ग्रामदेव. याची उपासना ही पितरोपासनेचें प्रतीक आहे. या देवाचा सिम् बोंगा या देवाशीं संबंध आहे. या देवाची वर्षातून एकदा सामुदायिक समाराधना होते. अदिन् बोंगाकु व सिम् बोंगा यांच्या समागमें सर्व पितर असतात, अशी त्यांची समजूत आहे. ते लोक आपल्या मृत व्यक्तींच्या आवडी निवडी लक्षांत घेऊन, त्या त्या वस्तु अदिन्च्या छपरावर ठेवतात. [एन्सा. मुं.]

आदिमित्तम् द. भारतांतील मारान जातीची उपशाखा. त्रिवांकुरमध्ये हे लोक मंदिराचें आवार झाडण्याचें काम करतात. [का. ट्रा. स. इं.]

आदियान द. भारतांतली एक जात. मूळ अर्थ गुलाम असा आहे. हे जमीनदारांच्या शेतीचे संरक्षक होते. प्रत्येक अदियानला आपल्या जमीनदारास कांहीतरी वार्षिक खंडणी द्यावी लागते व त्याच्या घरीं वेठबिगार करावी लागते. [का. ट्रा. स. इं.]

अदुःख नवमी भाद्र. शु. ९ मीचें नांव. विशेषतः स्त्रियां-करितां या दिवशीं तिथिव्रत असतें. व्रताचा अवधि नऊ वर्षांचा असतो. व्रतदेवता गौरी असते. उपवास, पूजा व जागरण या तिन्ही गोष्टींना या व्रतांत महत्त्व आहे. स्त्रिया प्रातःकालीं नदीवर स्नान करून मौन धरून घरीं येतात. कलशावर पूर्णपात्रांत गौरीची स्थापना करतात. पुढील मंत्राने ध्यान करतात ––

दिव्यपात्रधरां देवीं विभूतिं च त्रिलोचनाम् ।
दुग्धान्नदाननिरतां गौरीं त्वां चिन्तयाम्यहम् ।

अर्थ – दिव्यपात्र धारण करणाऱ्या, ऐश्वर्यसंपन्न, त्रिलोचन, दूध आणि अन्न यांचें दान करण्यांत तत्पर, अशा हे गौरि, मी तुझें चिंतन करतें.

नंतर पूजा, वायनदान व उपोषण. तें शक्य नसल्यास हविष्यान्नभोजन. रात्रौ नृत्य, गीत, कथाश्रवणादि कार्यांत जागरण दशमीस देवीची उत्तरपूजा, विसर्जन, दंपतीभोजन व व्रतसंपूर्ति नऊ वर्षे पूर्ण झाल्यावर उद्यापन. सुवर्णाच्या गौरीप्रतिमेची पूजा व दान. तिल, घृत, पायस यांचें हवन. नऊ दंपतींस वायन व भोजन. या व्रताची कथा अशी ––

शापदग्ध अशा दोन अप्सरा कोंबडी आणि माकडीण या रूपांनी जन्मल्या. दोघीहि रानांत हिंडत होत्या आणि दोघीं-नाहि पूर्वजन्माची स्मृति होती. एक दिवस अदुःख नवमी आली असतां 'आपण गौरीचें व्रत करूं या' असें कुक्कुटी मर्कटीस म्हणाली. कुक्कुटीने उपवास केला; पण मर्कटीला त्याचें विस्मरण होऊन तिने मोराचीं अंडीं दिसलीं तीं खाल्लीं. आपण संपूर्ण उपवास केला, असें तिने खोटेंच कुक्कुटीस सांगितलें. पण कुक्कटीने तिचा खोटेपणा ओळखला व तिची निर्भर्त्सना केली. शेवटीं दोघींनीहि शंकराला शरण जाण्याचें ठरविलें. त्यांनी शिवाची प्रार्थना करून देहत्याग केला. पुढे कुक्कुटी एका सच्छील ब्राह्मणाच्या घरीं जन्माला आली. तिला नव-राहि चांगला मिळाला व पांच पुत्रहि झाले. मर्कटी एका राजाची राणी झाली. पण तिला मात्र मूलच होईना. ती आपल्या मैत्रिणीचा मत्सर करूं लागली. शेवटीं तिच्या मनांतला द्वेष इतका वाढला, की तिने आपल्या मैत्रिणीच्या पांचहि पुत्रांना ठार मारून त्यांच्या शिरांचें वाण मैत्रिणीस धाडलें. कर्मधर्म-संयोगाने त्या दिवशीं अदुःख नवमी होती. कुक्कुटीला व्रत होतें. त्या व्रताच्या पुण्याने तिचे पांचहि पुत्र जिवंत होऊन परत आले. ही गोष्ट समजतांच मर्कटीला अपार दुःख झालें व ती पश्चात्ताप करीत कुक्कटीकडे आली. कुक्कुटीने तिला अदुःख नवमीचें व्रत सांगितलें. राजाची राणी झालेल्या मर्कटीने तें यथासांग केलें. मग तिलाहि एक पुत्र झाला. पुढे त्या दोघींचें सख्य आमरण राहिलें. [व्रतराज]

अदृष्ट 'न दृष्टम् । अतींद्रियो गुणः । शुभाशुभकर्मजन्य-संस्कारः' (= न दिसणारें. इंद्रियांना अगम्य असा गुण. शुभ व अशुभ कर्मांपासून उत्पन्न होणारा संस्कार). कोणतेंहि कर्म केल्यावर त्याचें फल मिळेपर्यंत जो क्रिया व फल यांचा संबंध राहतो, त्याला अदृष्ट असें म्हणतात. 'ज्योतिष्टोमेन स्वर्गकामो यजेत' (= स्वर्गाची इच्छा करणाऱ्याने ज्योति-ष्टोमयाग करावा), असें यागविधायक वाक्य आहे. तदनुसार याग केल्यावर स्वर्ग मिळेपर्यंत याग व स्वर्ग यांचा जो संबंध टिकून राहतो, तेंच अदृष्ट होय.

नैयायिक अदृष्ट हा आत्मगुण मानतात. त्यांच्या मतें धर्माधर्म हे अदृष्ट होत. अदृष्ट हें अन्यथानुपपत्ति या प्रमाणाने मानावें लागतें. अदृष्ट मानल्याशिवाय स्वर्ग व याग यांचा कार्यकारणभाव उपपन्न होत नाही.

अद्‌भुतकथा परीकथा पाहा.

अद्‌भुत ब्राह्मण सामवेदाचें एक ब्राह्मण. यांत शुभाशुभ शकुन, अद्‌भुत गोष्टी व भविष्यें यांचें वर्णन आहे. [क्ला. डि. हिं. मा.]

अद्भुत रस ' विस्मयोद्भुतमाश्चर्य चित्रम् ' (अमर). काव्यांतला एक रस. विस्मय हा त्याचा स्थायी भाव होय.

विस्मयस्य सम्यक् समृद्धिः अद्भुतः
सर्वेन्द्रियाणां ताटस्थ्यं वा ।

(रसतरंगिणी)

अर्थ — विस्मयाची चांगल्या प्रकारें समृद्धि अथवा सगळचा इंद्रियांना तटस्थता किंवा स्तंभ प्राप्त होणें, याला अद्भुत रस म्हणतात.

तात्पर्य हें, की जेव्हा एखाद्या कविकृतींत विस्मय हा स्थायी भाव पूर्णपणे प्रकट होऊन सगळीं इंद्रियें त्या विस्मयाने अभिभावित होऊन कांही काल निश्चेष्ट बनतात, तेव्हा अद्भुतरसाची निष्पत्ति होते. याची उत्पत्ति वीररसांतून होत असल्याचें भरत सांगतो. त्याच्या मतें याचा वर्ण पीत व देवता ब्रह्मा आहे. विश्वनाथाच्या मतें याची देवता गंधर्व आहे.

सरस्वतीकंठाभरणांत विस्मयाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे ––

विस्मयश्चित्तविस्तारः पदार्थातिशयादिभिः ।

अर्थ –– एखाद्या अलौकिक पदार्थाच्या ज्ञानाने उत्पन्न होणारा चित्ताचा विस्तार म्हणजे विस्मय होय.

विश्वनाथाने विस्मयाला चमत्काराचा पर्याय मानलें असून तोच या रसाचा प्राण असल्याचें सांगितलें आहे (सा. द.). त्यान या रसाच्या बाबतींत नारायणपंडिताचें पुढील मत उद्धृत केलें आहे ––

रसे सारश्चमत्कारः सर्वत्राप्यनुभूयते ।
तच्चमत्कारसारत्वे सर्वत्राप्यद्भुतो रसः ।
तस्माददद्भुतमेवाह कृती नारायणो रसम् ।

(सा. द. ३.३)

अर्थ –– सर्व रसांत चमत्कार हा साररूपाने असतो व त्याच्या त्या साररूप अस्तित्वाने सर्वत्र अद्भुतरसच प्रतीत होतो आणि म्हणून नारायणपंडित अद्भुत हा एकच रस मानीत आहे.

मानसशास्त्रज्ञहि विस्मयाला एक प्रधान भाव मानतात व जिज्ञासेंतून त्याची प्रवृत्ति दाखवितात. आदिमानवाला सभोंवतीच्या अफाट पांचभौतिक निसर्गाच्या दर्शनाने सर्वप्रथम भय आणि विस्मय या दोन भावांचीच प्रतीति झाली असावी. कला किंवा काव्य यांच्या आकर्षणांत विस्मयाची भावना प्रबल असते. त्यामुळेच अद्भुत रसाचें महत्त्व स्वयंसिद्ध आहे. जगन्नाथाच्या मतें अद्भुतरस शृंगार व वीर या रसांना अविरोधी असतो, म्हणजेच त्या दोन रसांबरोबर अद्भुताची अवस्थिति होऊं शकते.

रसभाव –– विस्मय हा स्थायिभाव. अलौकिक वस्तु किंवा अलौकिकतेने युक्त असें वाक्य, शील किंवा कर्म हा आलंबनविभाव. त्यांच्या गुणधर्मांचें वर्णन हा उद्दीपनविभाव. थबकणें, मनाचा गोंधळ होणें, स्वर गद्गद होणें, डोळे ताठ होणें, हे अनुभाव आणि हर्ष, भ्रांति, वितर्क हे या रसाचे व्यभिचारी भाव होत.

अद्भुत रसाचें उदाहरण ––

माझिया नेत्र हो । हा पहा कीं पहा ।
श्रीनिशेचा महाराष्ट्र-संसार हा ।
केवढा थोर हा, आणि भव्याकृति ।
ईश्वराची किती ही अगम्या कृति ।

(चंद्रशेखर –– तारातरंग)

अद्भुतशांति घरांतल्या खांबाला पालवी फुटली, कावळा घरांत शिरला, गाय स्वतःचेंच दूध प्याली, अग्नि नसतांना धूर उत्पन्न झाला, सर्पदंश झाला, किंवा अशासारखें कांही अद्भुत घडलें तर तें अशुभ समजतात. अशा वेळीं ही शांति करावी, असें बौधायन गृह्यसूत्रांत सांगितलें आहे (३ . ६). इंद्र ही या कृत्याची मुख्य देवता होय. तिला चरूच्या आहुती व इंद्राग्नींसाठी आज्याहुति देतात. पूर्णाहुति झाल्यावर अवशिष्ट चरु शमीच्या पानावर काढून ठेवतात. चरुस्थालींत पाणी घालून तें ज्या जागीं अशुभ घडलें असेल, त्या जागीं ओततात.

अद्रिज - अद्रैस्ती एक प्राचीन मानवगण. अद्रिज लोकांचा देश रावीच्या पूर्वेस पसरलेला होता. पिंप्रामा हा त्यांचा किल्ला होता. महाभारतांत अद्रिजांचा उल्लेख आला आहे (द्रोण. १५९.५). हे लोक व ग्रीकांचे अद्रैस्ती हे लोक एकच असावे. यांना शिकंदराच्या सैन्यापुढे हार खावी लागली होती. [हिंदुस्थानचा केंब्रिज इतिहास १.३७१]

अद्वय द्वित्वभावरहित. महायान बौद्धांच्या दर्शनांत भाव आणि अभाव यांच्या दृष्टीच्या पलिकडच्या ज्ञानाला अद्वय म्हटलें आहे. यांत अभेदाचें अवस्थान नसतें. अद्वैत हे भेदरहित सत्तेचा बोध करतें. अद्वैतांत ज्ञानाच्या सत्तेला प्राधान्य असतें, तर अद्वयांत चतुष्कोटिविनिर्मुक्त ज्ञानाचेंच प्राधान्य मानलें जातें. या चतुष्कोटि अशा ––

(१) अस्ति (आहे) (२) नास्ति (नाही) (३) अस्ति नास्ति (आहे नाही) व (४) नास्ति नास्ति (नाही नाही).

अद्वयतारकोपनिषद् १०८ उपनिषदांपैकी ५३ वें उपउपनिषद्. शुक्ल यजुर्वेदांत याचा समावेश असून ब्रह्मप्राप्ति हा याचा प्रतिपाद्य विषय आहे. या उपनिषदांत राजयोगाचीं तत्त्वे विशद केलीं असून शमदमादि षड्गुणयुक्त योगी, हा याचा अधिकारी मानलेला आहे. यांतील प्रतिपादन पुढीलप्रमाणे --

जेव्हा योगी, मी चिद्रूप आहें, असें कल्पून भ्रूमध्यांत अंतर्दृष्टीने सच्चिदानंदतेजोरूप ब्रह्माचें अवलोकन करतो, तेव्हा तो तारकरूप होतो. म्हणजे त्याची जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका होते. ब्रह्मप्राप्तीसाठी तीन लक्ष्यें सांगितलीं आहेत, तीं पुढीलप्रमाणे–

अंतर्लक्ष्यलक्षण– देहांत सुषुम्ना नांवाची ब्रह्मनाडी असते. तिचा आकार सूर्यासारखा व तेज चंद्रासारखें असतें. ही नाडी मूलाधारापासून निघून ब्रह्मरंध्रांत जाते. तिच्यामध्ये अतिशय बारीक पण कोटि विजांप्रमाणे लखलखीत अशी कुंडलिनी असते. तिचें मानसिक दर्शन झाल्याबरोबर पुरुषाच्या सर्व पापांचा नाश होतो व तो मुक्त होतो. ललाटभागीं त्याला जर निरंतर कुंडलिनी दिसली, तर तो सिद्ध होतो. मग त्याच्या कर्णरंध्रांत फूत्कारध्वनि उत्पन्न होतो. तर्जनीच्या अग्रांनी दाबल्याने हा आवाज बंद होतो. मन या स्थितीवर स्थिर झालें की, नेत्रांच्या मध्यभागीं त्याला अंतर्दृष्टीने निळा तेजस्वी प्रदेश दिसतो व त्याला निरतिशय सुख लाभतें.

बहिर्लक्ष्यलक्षण – जेव्हा पुरुष नासिकाग्राच्या पुढे क्रमाने चार, सहा, आठ, दहा व बारा अंगुळांवर निळ्या रंगाचें व लाल रंगाने मिश्रित परंतु वास्तविक नारिंगी रंगाचें असलेलें आकाश पाहतो, तेव्हा तो योगी होतो. आकाशाकडे पाहिलें असतां त्याला जेव्हा तेजस्वी किरण दिसतात, तेव्हा तो योगी होतो. मस्तकावर बारा अंगुळांच्या अंतरावर असे किरण दिसल्यास, तो अमर होतो.

मध्यलक्ष्यलक्षण – प्रातःकाळीं त्याला सूर्याप्रमाणे मोठें बिंब दिसतें. तें अग्नीप्रमाणे तेजस्वी व चित्रविचित्र रंगांचें असतें. नंतर तो पुरुष तदाकार होतो व तेंच दृश्य सतत पाहिल्याने त्याला आकाश गुणरहित दिसूं लागतें. त्यानंतर तेंच आकाश त्याला कोटिसूर्य प्रकाशाने झळाळल्याप्रमाणे दिसते. तारकयोग्याला एकूण पांच प्रकारचें आकाश दिसतें. हें सर्व ज्याला दिसतें, त्याची फलापासून मुक्तता होते.

या उपनिषदांत याशिवाय तारयोगसिद्धि, तारकयोगाचें स्वरूप, शांभवी मुद्रा व आचार्यलक्षण हे विषय आले आहेत.

अद्वयवज्र (११ वें शतक) सिद्धसाहित्याचा एक प्रमुख टीकाकार व पंजिकाकार. सिद्धवाङ्मयांतील रहस्यांची उकल करून दाखविण्यांत अद्वयवज्र हा सिद्धहस्त आहे. सरहपादाच्या दोहाकोशगीति या सुप्रसिद्ध ग्रंथावरील अद्वयवज्राची संस्कृत पंजिका उपलब्ध आहे. अद्वयवज्र हा अत्यंत विद्वान् होता. याशिवाय, सिद्धांच्या सहवासाचा लाभ मिळाल्यामुळे त्याला सिद्धचर्याहि चांगली अवगत होती. दीपंकर श्रीज्ञान याचा तो विद्यागुरु होता. अद्वयवज्राचें जीवनचरित्र थोडक्यांत पुढीलप्रमाणे --

हा नानूक व सावित्री या ब्राह्मण दंपतीचा मुलगा. जन्मनाम दामोदर. याने सामवेद व व्याकरणादि शास्त्रें यांचें अध्ययन केलें. नंतर तो बौद्ध दर्शनांतहि पारंगत झाला. त्यानंतर ज्ञानश्री मित्राचे प्रकरणग्रंथ व मंत्रशास्त्र यांचें शिक्षण घेतल्यावर तो विक्रमशिला नगरांत जाऊन भिक्षु बनला. त्या वेळीं त्याला मैत्रीगुप्त असें नवें नांव मिळालें नंतर त्याने सिद्धि मिळविण्यासाठी पंचक्रम तारापद्धतीला अनुसरून चतुर्मुद्रासहित एक कोटि जप केला. नंतर त्याला दक्षिण भारतांत जाण्याबद्दल स्वप्नदृष्टान्त झाला. त्याला अनुसरून तो आंध्रांतल्या धान्यकोट येथे गेला. तिथे उपवासव्रत घेऊन तारादेवीची उपासना करीत असतां पुनश्च त्याला मनभंग व चित्रविश्राम या पर्वतांकडे जाण्याचा दृष्टान्त मिळाला. तिथेहि तो गेला. त्याने तिथे निकराची साधना सुरू केली. अंतीं तो आपलें मस्तकहि तोडून घेण्यास सिद्ध झाला. मग त्याला ८४ सिद्धांतल्या शबरपाने साक्षात् दर्शन दिलें, आपला शिष्य म्हणून त्याला अभिषेक केला व पंचचक्र आणि चतुर्मुद्रा यांचा उपदेशहि केला. त्याने त्याचें अद्वयवज्र असें नवें नांव ठेवलें. अद्वयवज्राला सिद्ध बनण्याची तीव्र इच्छा होती; पण एवढें होऊनहि ती मात्र सफल झाली नाही. पुढे तो राजगृहांत (मगध) जाऊन एकांतवासांत राहिला.

त्याने अनेक ग्रंथांवर टीका लिहिल्या असून त्यांपैकी अबोधबोधक, गुरुमैत्रीगीतिका, चतुर्मुद्रोपदेश, चित्तमात्रदृष्टि, दोहानिधितत्त्वोपदेश, चतुर्वज्रगीतिका, हे टीकाग्रंथ तिबेटांतील संग्रहांत आहेत. **पाहा** – शबरपा, सिद्धसंप्रदाय. [राहुल सांकृत्यायन; दो. को.]

अद्वयवज्रसंग्रह वज्रयानपंथाचा एक ग्रंथ. हा सदर पंथाच्या विविध तत्त्वप्रणालींवर लिहिलेल्या रचनांचा संग्रह आहे. या ग्रंथांत अन्य पूर्ववर्ती ग्रंथांपेक्षा

पारमितासाधनेवर विशेष भर दिलेला आहे. त्यांतहि प्रज्ञापारमितेवर विशेष. प्रज्ञापारमिता नसेल, तर इतर पांच पारमिता त्या पदावर अधिष्ठित होऊं शकत नाहीत. पंचपारमितांच्या बरोबरीने प्रज्ञापारमितेचें सतत सेवन केलें तरच साधक सुखी आणि स्वस्थ होतो, असें या ग्रंथाचें प्रतिपादन आहे.

अद्वैत

(१) याची व्याख्या पुढीलप्रमाणे –

न विद्यते द्वैतं द्विधा भावो यत्र तत्

(सिद्धान्तबिंदु १०)

अर्थ – ज्याच्या ठिकाणीं द्विधा भाव नाही तें अद्वैत होय.

नामरूपात्मक जग हें प्रातिभासिक असून ब्रह्मज्ञानाने त्याचा बाध होतो आणि अद्वैत = द्विधाभावरहित ब्रह्म तेवढेंच शाश्वत अतएव सत्य असतें, हेंच उपनिषदें, ब्रह्मसूत्रें व गीता यांचें सार आहे, असें शंकराचार्य सांगतात. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः' हें त्यांच्या सिद्धान्तांचें सार होय. हाच अद्वैत शब्द घेऊन रामानुजांनी विशिष्टाद्वैत व मध्वाचार्यांनी शुद्धाद्वैत असा त्यांत स्वमतें फरक केला आहे व त्या त्या नांवाने आपलें तत्त्वज्ञान उभारलें आहे. **पाहा** – अद्वैत-दर्शन.

(२) शिवाचा एक अवतार. एकदा कुबेराने कैलासावर शिवमंत्राचा जप केला. तेव्हा शंकर पुढे येऊन त्याला 'वर माग' म्हणाला. कुबेराने त्याला आपला पुत्र होण्याविषयी प्रार्थिलें. शिवाने जन्मांतरीं त्याचा पुत्र होण्याचें मान्य केलें. त्याप्रमाणे कुबेराला अद्वैत नामक पुत्र झाला, तोच हा अवतार होय. [श. क.]

अद्वैत-दर्शन

षड्दर्शनांपैकी एक प्रमुख दर्शन. याला वेदान्त, उत्तरमीमांसा व शांकरदर्शन अशींहि अन्य नांवें आहेत. हें दर्शन सकल अध्यात्मशास्त्रांचा मुकुटमणि आहे. शंकराचार्यांपूर्वींच्या दार्शनिक प्रवृत्ती व तार्किक विचार यांचा चरमोत्कर्ष या दर्शनांत झाला आहे. श्रुतींचा चरम सिद्धान्त या अर्थी वेदान्त शब्दाचा प्रयोग उपनिषदांत झाला. उपनिषदांनाच वेदान्त अशी संज्ञा मिळाली. वेदान्ताची व्याख्या अशी —

वेदशिरोभागो ब्रह्मप्रतिपादक उपनिषद्रूपो ग्रन्थविशेषः। अत्र उपनिषदर्थनिर्णायकत्वेन ब्रह्मसूत्राणामपि वेदान्तत्वमुपचर्यते इति विज्ञेयम्। (न्यायकोश)

अर्थ — वेदांचा शेवटचा भाग व ब्रह्मप्रतिपादक असा उपनिषद्रूपी ग्रन्थविशेष म्हणजे वेदान्त होय. ब्रह्मसूत्रें हीं उपनिषदांच्या अर्थांचीं निर्णायक असल्यामुळे त्यांनाहि वेदान्त ही संज्ञा लागू होते, असें जाणावें.

वेदान्तांत सांगितलेल्या सर्व सिद्धान्तांचा मूलाधार म्हणजे उपनिषदें होत. तीं वेदांतील रहस्यमय सिद्धान्तांचीं प्रतिपादक झाल्यामुळे त्यांनाच वेदान्त म्हणूं लागले. पण उपनिषदांच्या सिद्धान्तांत एकवाक्यता नाही; इतकेंच नव्हे, तर बऱ्याच ठिकाणीं विरोधहि आहे, असें जेव्हा दिसून आलें, तेव्हा त्या विरोधाचा परिहार करून एकवाक्यता प्रस्थापित करण्याची आकांक्षा निर्माण झाली आणि तिच्या पूर्तीसाठी बादरायणमुनीने ब्रह्मसूत्रांची रचना केली. हा ५५० सूत्रांचा लहानसा ग्रंथ समस्त वेदान्तसिद्धान्तांचा आकरग्रंथ बनला आहे. ब्रह्मसूत्रांवर एकूण २४ आचार्यांनी भाष्यें किंवा व्याख्या लिहून आपापल्या भिन्नभिन्न दार्शनिक मतांची प्रस्थापना केली आहे.



अद्वैत दर्शनाचे प्रणेते श्रीशंकराचार्य

या आचार्यपरंपरेंत शंकराचार्य हे अलौकिक पुरुष होऊन गेले. त्यांची प्रगाढ विद्वत्ता, दिव्यदर्शी प्रतिभा व असाधारण तर्कपटुता, यांच्यापुढे कोणालाहि नतमस्तकच व्हावें लागेल. प्रस्थानत्रयीचे आद्य भाष्यकार हेच होत. त्यांचे परमगुरु गौडपादाचार्य, हे अद्वैत-तत्त्वज्ञानाचे पहिले आचार्य मानले गेले आहेत. त्यांचा मांडूक्यकारिका हा ग्रंथ म्हणजे अद्वैताचा पायाच समजला जातो.

परमार्थसत्तारूप ब्रह्माची एकता व नानात्वाने प्रतीत होणाऱ्या जगाची मायिकता, हा वेदान्तशास्त्राचा मूलमंत्र आहे. हा मंत्र यथार्थत्वाने अवगत होण्यासाठी अन्य कांही सिद्धान्तांचा परिचय होणें आवश्यक आहे. आत्मज्ञानाची स्वयंसिद्धि हा वेदान्तांतला एक मौलिक सिद्धान्त आहे. तो समजल्यावरच अन्य तत्त्वांचें अनुशीलन करतां येईल.

आत्मसत्ता — जगत् हें अनुभूतीवर आधारलेलें आहे. जगाचे सर्व व्यवहार अनुभवालाच धरून चालतात. या अनुभूतीच्या विविध स्तरांत आत्म्याची सत्ता स्वयंसिद्ध आहे. ज्ञाता या रूपाने आत्म्याची उपलब्धि असल्यावांचून कोणत्याहि विषयाचें ज्ञानच संभवनीय नाही. प्रत्येक अनुभवाच्या प्रक्रियेंत अनुभव घेणाऱ्याला स्वतःच्या सत्तेचा अनुभव अवश्यमेव होत असतो. प्रमाणादि सकल व्यवहारांचा आश्रय आत्माच आहे. कोणत्याहि व्यवहाराच्या पूर्वीच आत्म्याची सिद्धि असते. त्याचें निराकरण होऊं शकत नाही. कारण निराकरण आगंतुक वस्तूचें होतें; स्वभावाचें नव्हे. उष्णता हा अग्नीचा स्वभाव आहे. अग्नि त्याचें निराकरण करूं शकत नाही. शंकराचार्यांनी या सिद्धान्ताचें प्रतिपादन संक्षेपरूपाने केलें आहे, तें असें —

सर्वांचा आत्म्याच्या अस्तित्वाविषयीं संपूर्ण विश्वास असतो. असा कोणीहि माणूस आढळणार नाही, की जो 'मी नाही' असें म्हणून आपलें अस्तित्व नाकारील. म्हणून आत्म्याची सिद्धि स्वयमेव मानावी लागते (ब्र. सू. १. १. १ शां. भा.).

आत्मसत्ता ही स्वयंसिद्ध आहे, हें सांगण्यासाठी याज्ञवल्क्य म्हणतो —

विज्ञातारम् अरे केन विजानीयात्

(बृह. २. ४. १४)

अर्थ — जो स्वतः ज्ञाता आहे त्याला दुसऱ्या कोणत्या साधनाने जाणावें ?

सूर्याच्या प्रकाशाने जग प्रकाशित होतें; पण सूर्याला कोण प्रकाशित करील ? तद्वत् प्रमाणांच्या सिद्धीला प्रमाणभूत होणारा आत्मा कोणत्या प्रमाणांनी सिद्ध केला जाईल ? अर्थात् आत्मा हा स्वयंसिद्धच आहे.

प्रत्येक विषयानुभूतींत दोन अंश असतात — (१) अनुभव घेणारा आत्मा व (२) अनुभवाला विषयभूत होणारा ज्ञेय पदार्थ. व्यवहारी किंवा स्थूल दृष्टीला जीव आणि जगत् अशा दोन भिन्न व स्वतंत्र सत्ता दिसतात; पण सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास आत्मा हीच एकमेव सत्ता सिद्ध होते. या विशाल विश्वांत आत्म्याहून भिन्न अशी एकहि वस्तु नाही. नामरूपात्मक विकारांच्या आंत सर्वत्र एकच आत्मस्वरूप चैतन्यरूपाने प्रकाशत आहे. प्रत्येक अनुभूतींत विषयी किंवा विषय आणि कर्ता किंवा कर्म या रूपांत एकाच अखंड आत्म्याची उपलब्धि होत असते. शंकराचार्यांनी या सृष्टीला देश-काल यांच्या विचित्रतेने चित्रीकृत, असें म्हटलें आहे. देश-काल हे मायाकल्पित असल्यामुळे तज्जन्य भेद हे केवळ काल्पनिक ठरतात. या जगांत एकच अखंड सत्ता विद्यमान आहे आणि ती म्हणजे आत्मसत्ता होय. तिला जो जाणतो तोच खरा तत्त्वज्ञानी.

ब्रह्मस्वरूप — या निर्विकल्प, निरुपाधिक व निर्विकार अशा आत्मसत्तेचेंच नांव ब्रह्म असें आहे. ब्रह्म हेंच परमार्थतः सत्य आहे. तसेंच तें ज्ञानस्वरूप असून अनंतहि आहे. 'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म' (तै. उ. २. १. १) ही श्रुति याविषयीं प्रमाण आहे. उपनिषदांनी सगुण-निर्गुण अशा दोन्ही ब्रह्मांचें प्रतिपादन केलें आहे. पण शंकराचार्यांच्या मतें निर्गुण ब्रह्म हेंच उपनिषदांचें प्रतिपाद्य आहे. त्यांनी ब्रह्माच्या स्वरूप-निर्णयासाठी ब्रह्माचीं दोन प्रकारचीं लक्षणें केलीं आहेत — (१) स्वरूपलक्षण व (२) तटस्थलक्षण. 'स्वरूपं सत् व्यावर्तकं स्वरूपलक्षणम्' = पदार्थाच्या सत्य, तात्त्विक स्वरूपाचा परिचय देणारें व इतर पदार्थांहून त्याला वेगळें करणारें तें स्वरूपलक्षण होय. 'सत्यंज्ञानमनन्तं ब्रह्म' हें ब्रह्माचें स्वरूपलक्षण समजावें. इथे ब्रह्म हें विशेष्य असून सत्य, ज्ञान व अनंत हीं तीन पदें त्याचीं विशेषणें आहेत. यांतलें सत्यम् हें विशेषण ब्रह्माला नामरूपात्मक विकारापासून निवृत्त करतें. ज्ञानम् हें विशेषण जडत्वाची व्यावृत्ति करण्यासाठी आहे. इथे ज्ञान शब्दाचा अर्थ ज्ञप्ति किंवा जाणीव असा घेतला पाहिजे. अनन्तम् हें विशेषण मर्यादित पदार्थांच्या निवृत्तीसाठी आहे. वरील लक्षणांतील सत्य शब्द अबाधित सत्त्व या अर्थी, ज्ञान शब्द स्वप्रकाशचैतन्य या अर्थी व अनंत शब्द व्यापक या अर्थी आहे. हीं तीन विशेषणें विशेष्याला म्हणजेच ब्रह्माला आपला अर्थ समर्पित करून विरुद्ध अर्थाचें निराकरण करतात. 'विज्ञानमानन्दं ब्रह्म' (बृह. ३. ९. २८) हेंहि ब्रह्माचें दुसरें स्वरूपलक्षण होय. या उभय लक्षणांवरून ब्रह्म हें सत् (सत्ता), चित् , (ज्ञान) व आनंदरूप म्हणजेच सच्चिदानंद आहे, असें सिद्ध होतें.

ब्रह्माची अद्वैतता सिद्ध करण्यासाठी शंकराचार्य व त्यांचे अनुयायी चातुर्यपूर्ण युक्तिवाद करतात. ब्रह्म केवळ श्रुतीच्या आधारावरच प्रतिष्ठित नाही; तर त्याचें अस्तित्व युक्तिवादानेहि सिद्ध करतां येतें.

कार्यकारणसंबंधांचा विचार केल्याअंतीं असें दिसतें, की कार्य हें उत्पन्न होण्यापूर्वी कारणांत विद्यमान असतें. कार्य ही कारणाहून भिन्न अशी वस्तु नाही. मातीचीं बनविलेलीं गाडगीं, मडकीं, इ. पदार्थ हे सगळे मातीच आहेत. सोन्याचे बनविलेले अंगठी, कंकण, इ. अलंकार वस्तुतः सोनेंच आहेत. याचा अर्थ असा, की कारणामध्ये कार्य हें अव्यक्त रूपाने पहिल्यापासूनच विद्यमान असतें. कुंभार, सोनार या निमित्तकारणांच्या द्वारें तेंच अव्यक्त रूप व्यक्त केलें जातें. विचारांतीं असें कळून येईल, की आकार नांवाची पदार्थाहून भिन्न अशी एखादी

वस्तु नाही. ती द्रव्याची केवळ एक अवस्था असते. द्रव्याला धरूनच आकाराची सत्ता असते. म्हणून आकारजन्य भेद स्वीकारून एखाद्या उपादानकारणाला त्याहून भिन्न मानणें उचित नव्हे. तात्पर्य हें, की एखादा आकार किंवा गुण याला मूलद्रव्याहून पृथक् मानणें हें युक्तिसंगत नाही. आकाराला किंवा गुणाला द्रव्याहून भिन्न अशी सत्ता नाही. कुंभाराने आपल्या कल्पनेने घडे गाडगे बनविले, त्यांना भिन्न भिन्न नांवें दिलीं, तरी त्यांचीं नामरूपें मिथ्या आहेत. त्यांतलें वास्तवद्रव्य माती हेंच एकमेव खरें आहे. हाच आशय, पुढील श्रुतींत सांगितला आहे–

वाचारम्भणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ।

(छान्दो. ६. १. ४)

अर्थ – विकार, विकार असें जें म्हणतात, तें केवळ वाचारंभण म्हणजे नुसतें नांव आहे. विकार हा खोटा असून केवळ मृत्तिकाच सत्य आहे.

विवर्तवाद – कारणाच्या या असत्य व काल्पनिक परिवर्तनाला विवर्त म्हणतात. 'अतत्त्वतोऽन्यथाभावो विवर्तः' (अप्पय्य दीक्षित) म्हणजे तत्त्वाच्या ठिकाणीं खोटा व भ्रामक असा जो बदल दिसतो त्याला, म्हणजेच तत्त्वाच्या ठिकाणीं अतत्त्वाच्या भावाला, विवर्त अशी संज्ञा आहे. हा विवर्त किंवा परिवर्तन वास्तव नसून मनाने आरोपित असतें. या मानसिक आरोपालाच शंकराचार्य अध्यास असें म्हणतात. अधि या पदाने अधिष्ठानाचा बोध होतो. ज्यावर एखाद्या पदार्थाचा आरोप होतो, तें अधिष्ठान होय. यांतला आरोपित पदार्थ मिथ्या असून अधिष्ठान तेवढें सत्य असतें, हा अद्वैत-दर्शनाचा ठाम सिद्धान्त आहे. जोंवर अधिष्ठानाचें ज्ञान झालेलें नसतें, तोंवर आरोपित पदार्थ भासत असतो. तें ज्ञान झालें, की तो भासमान पदार्थ मिथ्या आहे, असा निश्चय होतो. यासाठी या दर्शनांत नेहमी दिलीं जाणारीं उदाहरणें म्हणजे रज्जु-सर्प व शुक्ति-रजत हीं होत. अर्धवट अंधारांत दोरी पडलेली दिसते व तिच्यावर सर्पाचा भ्रम होतो. त्याचप्रमाणे वाळवंटांतली शिंप दुपारच्या उन्हांत चमकते व तिच्यावर रुप्याचा भास होऊं लागतो. पण दिव्याच्या प्रकाशांत दोरी पाहिल्यावर, तसेंच ती शिंप हातांत घेतल्यावर वरील दोन्ही भ्रम निरस्त होतात. (अध्यास पाहा)

वरील दोन्ही उदाहरणांत रज्जु व शुक्ति या अधिष्टानांची सत्ता मान्य केलेली आहे. या उदाहरणांवरूनच शंकराचार्यांना जगन्मिथ्यात्व सिद्ध करायचें आहे. ब्रह्म या अधिष्ठानावर जगत् हें भ्रमाने भासतें व सत्यज्ञान झाल्यावर त्या भ्रमाचा निरास होऊन 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हा सिद्धान्त दृढ होऊं शकतो असें आचार्य सांगतात.

आचार्य जगाचें मिथ्यात्व सांगतात, तेव्हा ते जगाचें अस्तित्व अजिबात नाकारतात, असें नव्हे; तर पारमार्थिक अवस्थेंत आत्मज्ञानी पुरुषाला जग भासत नाही, असें त्यांचें म्हणणें आहे. नामरूपें क्षणोक्षणीं पालटणारीं व नश्वर असल्यामुळे वेदान्त्यांनी त्यांना मिथ्या मानलें आहे. आत्मज्ञान होईपर्यंत व्यवहारदशेंत अद्वैतीसुद्धा जगाला सत्यच मानतात. आत्मसाक्षात्कार होईतों सर्व लौकिक व वैदिक व्यवहार उपपन्न होतात, असें आचार्यांनी अनेक ठिकाणीं सांगितलें आहे.

अशा युक्तीने विचार केल्यावर जगांतले समस्त आकार मिथ्या ठरतात. मग प्रश्न असा येतो, की सर्वत्र आणि सार्वकाल असणारी सत्य वस्तु कोणती ? घडा हा नश्वर आणि मृत्तिका ही सत्य असें आपण म्हटलें; पण मृत्तिकासुद्धा सर्वत्र समानरूपाने असणारी मूळ वस्तु नाही. जी सर्व पदार्थांचें अधिष्ठान होऊं शकते आणि जी सर्व पदार्थांत अनुस्यूत असते, तीच मूलवस्तु होय. अशा वस्तूचा शोध करूं जातां सत्ता नांवाची एक वस्तु आपणाला मिळते. सत्ता म्हणजे विशिष्ट सत्ता नव्हे; तर शुद्ध सत्ता. ही जगताचें उपादानकारण असते व ती नाना रूपांत प्रकट होऊनहि स्वतः निराकार व निरवयव असते. ही सत्ता म्हणजेच ब्रह्म होय. तें एक आहे आणि अद्वितीय आहे.

माया वा अविद्या -- मग या एकमेवाद्वितीय, निर्विशेष व अनिर्वचनीय अशा ब्रह्मापासून नामरूपात्मक सविशेष व सलक्षण अशा जगताची उत्पत्ति कां व कशी झाली ? याचें उत्तर शंकराचार्यांनीं मायावादाच्या आधारें दिलें आहे. मायेच्या ठिकाणीं दोन शक्ति आहेत. एक आवरणशक्ति व दुसरी विक्षेपशक्ति होय --

शक्तिद्वयं हि मायाया विक्षेपावृत्तिरूपकम् ।
विक्षेपशक्तिर्लिङ्गादि ब्रह्माण्डान्तं जगत् सृजेत् ।।
अन्तर्दृग्दृश्ययोर्भेदं बहिश्च ब्रह्मसर्गयोः ।
आवृणोत्यपरा शक्तिः सा संसारस्य कारणम् ।।

(दृग्दृश्यविवेक)

या श्लोकांचा विस्तृत अर्थ असा--आवरणशक्ति ही ब्रह्माचें शुद्ध स्वरूप झाकून टाकते व विक्षेपशक्ति त्या ब्रह्माच्या ठिकाणीं आकाशादि भौतिक जग उत्पन्न करते. जसा एखादा छोटासा ढग पाहणाऱ्या माणसाच्या दृष्टीपुढे येऊन अनेक योजनें विस्तृत असलेल्या सूर्यमंडळाला झाकून टाकतो, तद्वत् परिच्छिन्न अज्ञानाने अनुभवकर्त्याच्या बुद्धीला झाकून टाकल्यामुळे अपरिच्छिन्न आत्मा आच्छादित होतो. या शक्तीलाच आवरण म्हणतात. त्याचप्रमाणे रज्जूचें अज्ञान

रज्जूच्या ठिकाणीं आपल्या शक्तीने जसें सर्प निर्माण करतें, तद्वतच माया ही अज्ञानाच्छादित आत्म्याच्या ठिकाणीं आपल्या शक्तीच्या बळावर आकाशादि जगताचा प्रपंच निर्माण करते. या शक्तीलाच विक्षेप असें म्हणतात. मूलस्वरूपावर पडदा टाकणें म्हणजे आवरण व त्या आच्छादित स्वरूपावर दुसऱ्या वस्तूचा आरोप करणें म्हणजे विक्षेप होय.

शंकराचार्यांनी माया व अविद्या हे दोन्ही शब्द समानार्थक मानले आहेत. पुढचे वेदान्ती त्या दोन शब्दांत सूक्ष्म फरक दाखवितात. माया म्हणजे परमेश्वराची बीजशक्ति. ही अविद्यात्मक असल्यामुळे हिला अव्यक्त असेंहि म्हणतात. ही परमेश्वराच्या ठिकाणीं आश्रित असते. जगांतल्या पदार्थांचीं रूपें दोन––सत् आणि असत्. सत् म्हणजे अबाधित आणि असत् म्हणजे बाधित. माया ही सत् व असत् या दोहोंहून विलक्षण आहे. म्हणूनच ती अनिर्वचनीय आहे. जो पदार्थ सत् किंवा असत् या रूपांनी वर्णितां येत नाही, त्याला दार्शनिक परिभाषेंत अनिर्वचनीय म्हणतात. मायेला सत् म्हणावें, तर ब्रह्मज्ञान झाल्यावर ती बाधित होते. बरें तिला असत् मानावें, तर तिची प्रतीति होते. असत् पदार्थाची प्रतीति कधींहि होणार नाही. मायेच्या ठिकाणीं हे दोन विरुद्ध धर्म राहत असल्यामुळे शंकराचार्यांनी तिला अनिर्वचनीय म्हटलें आहे.

शंकराचार्यांप्रमाणेच रामानुजांनाहि माया मान्य आहे. पण दोघांच्या मायाविषयक कल्पनेंत भिन्नता आहे. रामानुज ही सारी सृष्टि वास्तव व सत्य मानतात. त्यांच्या मतें माया ही ईश्वराची सृष्टिकार्य करण्याची शक्ति आहे. तिच्यामुळे ब्रह्मांत अवस्थित असलेल्या शरीर या अचित् तत्त्वांत विकार उत्पन्न होतो. पण शंकराचार्यांच्या मतें ब्रह्मांत कोणताहि विकार अथवा परिवर्तन घडत नाही. शंकराचार्यहि मायेला ईश्वराची शक्ति मानतात; पण तें ईश्वराचें नित्य स्वरूप नव्हे, असें आचार्यांचें म्हणणें आहे.

ईश्वरविचार–हेंच निर्विशेष ब्रह्म मायेच्या योगाने आवृत झाल्यावर सविशेष होतें व सगुण भाव धारण करतें. यालाच ईश्वर म्हणतात. विश्वाच्या सृष्टि-स्थिति-लयांना तोच कारण असतो. सर्वज्ञ, सर्वेश्वर, सर्वकाम, सर्वनियंता, सर्वांतर्यामी, जगत्कारण, इ. विशेषणें अद्वैत-दर्शनांत ईश्वराला दिलेलीं आहेत. समस्त प्रपंचाचा साक्षी असल्यामुळे तो सर्वज्ञ आहे. सर्व जीवांना त्यांच्या त्यांच्या कर्मानुसार फल देत असल्यामुळे तो सर्वेश्वर आहे. त्याच्या सर्व इच्छा पूर्ण झालेल्या असल्यामुळे तो सर्वकाम आहे. सर्व जीवांना त्यांच्या त्यांच्या कर्मांत प्रेरणा देत असल्यामुळे तो सर्वनियंता आहे. सर्व जीवांच्या हृदयांत राहून त्यांना नियंत्रित करतो, म्हणून तो सर्वांतर्यामी आहे. चराचर विश्वाला विवर्तरूपांत अधिष्ठान होत असल्यामुळे तो जगत्कारण आहे.

एवंगुणविशिष्ट हा ईश्वर, सृष्टि कां म्हणून निर्माण करतो, हाहि एक विचारणीय प्रश्न आहे. जर या कामीं त्याचें आत्मप्रयोजन कांहीं असेल, तर त्याचें सर्वकाम हें विशेषण बाधित होतें. निरुद्देश तो हें कार्य करतो म्हटलें, तर त्याच्या सर्वज्ञतेला धक्का पोंचतो. याचें उत्तर अद्वैत-दर्शन त लीला असें दिलेलें आहे. सृष्टिकार्य ही ईश्वराची लीला आहे. तो पूर्णकाम ईश्वराचा विलास आहे (ब्र. सू. २. १. ३२–३३ शां. भा.).

न्यायशास्त्र ईश्वराला जगताचें निमित्तकारण मानतें, तर वेदान्तशास्त्र निमित्तकारणाबरोबरच त्याला जगताचें उपादान कारणहि मानतें. कुंभार घटाचा असतो, तसा तो जगताचें निमित्तकारणहि आहे व माती जशी घटाचें उपादानकारण असते, तसा तो जगताचें उपादानकारणहि आहे. ईश्वर म्हणजे मायोपाधिक ब्रह्म होय. त्याच्या चेतनधर्माला अनुसरून तें जगताचें निमित्तकारण आहे व मायोपाधीच्या दृष्टीने तेंच जगताचें उपादानकारणहि आहे. ब्रह्म वस्तुतः निर्गुण खरें; पण मायेच्या संबंधाने तेंच सगुणत्वाने प्रतीत होतें. उपासकाच्या दृष्टीने तेंच सगुण अर्थात् ईश्वराचें रूप धारण करतें.

जीवाचेंहि तसेंच आहे. जीव आणि ब्रह्म यांत कोणत्याहि प्रकारें भेद नाही. ' जीवो ब्रह्मैव नापरः।' ईश्वर मायावच्छिन्न चैतन्य आहे, तर जीव अंतःकरणावच्छिन्न चैतन्य आहे. दोन्ही चैतन्यरूपच आहेत. उपाधीच्या योगाने सीमित झाल्याकारणाने त्यांना पृथक् नांव व पृथक् सत्ता हीं प्राप्त झालीं. मायेनेच त्या दोघांना ब्रह्माहून पृथक् पदार्थ बनविलें. विद्यारण्यांच्या शब्दांत सांगायचें तर —

मायाख्यायाः कामधेनोर्वत्सौ जीवेश्वरावुभौ।
यथेच्छं पिबतां द्वैतं तत्त्वमद्वैतमेव हि ।।

(पंचदशी ६. २३६)

अर्थ –– जीव आणि ईश्वर हे मायारूपी कामधेनूचे दोन वत्स आहेत. ते आपल्या इच्छेनुसार द्वैताचें प्राशन खुशाल करोत; पण त्यांचें तत्त्व मात्र अद्वैतच आहे.

आचार्यांच्या मतें शरीर व इंद्रियसमूह यांचा अध्यक्ष व कर्मफलाचा भोक्ता असा आत्मा म्हणजे जीव होय (ब्र. सू. २. ३. १७ शां. भा.). जीवाच्या जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ति अशा तीन अवस्था आहेत. शब्दादिविषयांचें ज्ञान इंद्रियांच्या द्वारें ज्या अवस्थेंत होतें, ती जाग्रत् अवस्था होय. जाग्रत् अवस्थेंतील अनुभवाने उत्पन्न झालेल्या संस्कारापासून जीवाला स्मरणरूप

मनोमय विषयानुभव येतो. या अवस्थेस स्वप्न म्हणतात. जाग्रत् व स्वप्न या अवस्थेंत भोग देणारीं कर्में क्षीण होतात. त्यामुळे स्थूल–सूक्ष्म देहांवरील त्याचा अभिमान नष्ट होतो, बुद्धिकारणशरीररूप अज्ञानांत लीन होते व मग संस्कारजन्य स्मरणरूप ज्ञानहि होत नाही, अशा अवस्थेस सुषुप्ति म्हणतात.

या अवस्थात्रयाप्रमाणेच जीवाचे पांच कोश मानलेले आहेत. अन्नमय, मनोमय, प्राणमय, विज्ञानमय व आनंदमय अशीं त्यांचीं नांवें आहेत. त्याचप्रमाणे जाग्रत्, स्वप्न आणि सुषुप्ति या अवस्थांचा अभिमान बाळगणारे अनुक्रमें विश्व, तैजस आणि प्राज्ञ असे जीवात्म्याचे भेद आहेत. हे भेद व्यष्टीच्या अभिमानी जीवाचे असून समष्टि–अभिमानी ईश्वराच्या याच तीन भेदांना अनुक्रमें विराट् किंवा वैश्वानर, सूत्रात्मा किंवा हिरण्यगर्भ व ईश्वर अशा संज्ञा आहेत. खालील कोष्टक पाहा—

शरीर	अभिमानी	कोश	अवस्था
स्थूल	समष्टि–वैश्वानर व्यष्टि–विश्व	अन्नमय	जाग्रत्
सूक्ष्म	समष्टि–सूत्रात्मा व्यष्टि–तैजस	मनोमय प्राणमय विज्ञानमय	स्वप्न
कारण	समष्टि–ईश्वर व्यष्टि–प्राज्ञ	आनंदमय	सुषुप्ति

जीव आणि ईश्वर या दोन तत्त्वांचें निरूपण वेदान्तशास्त्रांत अनेक प्रकारें केलेलें आहे. जीव आणि ईश्वर यांचें सामान्यरूप चैतन्य हें आहे. चैतन्य हें बिंब. त्याचीं प्रतिबिंबें भिन्न उपाधींत पडून भिन्न नामें ग्रहण करतात. माया किंवा अविद्या हिच्या ठिकाणीं पडलेल्या प्रतिबिंबाला ईश्वरचैतन्य आणि अंतःकरणांत पडलेल्या प्रतिबिंबाला जीवचैतन्य म्हणतात. पूर्ण घटांत आणि जलाशयांत पडणाऱ्या सूर्याच्या प्रतिबिंबांत जें अंतर, तेंच अंतर जीव आणि विश्व या दोहोंत समजावें.

जगद्विचार – एखाद्या जादुगाराप्रमाणे ईश्वर आपल्या मायाशक्तीच्या द्वारें ही विचित्र सृष्टि निर्माण करतो. इथेच हा प्रश्न उपस्थित होतो, की जगत् सत्य कीं असत्य ? शंकराचार्यांनी सत्याची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे —

यद्रूपेण यन्निश्चितं तद्रूपं न व्यभिचरति तत्सत्यम् ।

अर्थ – ज्या रूपाने जो पदार्थ निश्चित होतो, त्या पदार्थाचें तें रूप जर सतत व्यभिचरित न होतां, आणि समभावाने विद्यमान राहील, तर त्याला सत्य म्हणावें.

नित्यपरिवर्तनशील किंवा परिणामस्वभाव असलेलें हें जग या दृष्टीने सत्य नाही. मग जगत् नितान्त असत्य आहे असें म्हणायचें काय ? याचें उत्तर देतांना वेदान्ती सांगतात ––

नामरूपाने युक्त व क्षणोक्षणीं पालटणारें असल्यामुळें हें नामरूपात्मक जग मिथ्या आहे. 'नेह नानाऽस्ति किञ्चन,' 'इदं सर्वं यदयमात्मा', इ. श्रुतिवचनें जगताचें मिथ्यात्व व ब्रह्माचें सत्यत्व प्रस्थापित करतात. आत्मज्ञान होईपर्यंत व्यवहारदशेंत जग हें द्वैत्यांना जेवढें सत्य वाटतें, तेवढेंच अद्वैती वेदान्त्यांनाहि वाटतें. जगताची पारमार्थिक स्थिति मान्य नसूनहि त्याची व्यावहारिक सत्ता आचार्य मान्य करतात.

वेदान्तमतांत सत्ता तीन प्रकारची मानलेली आहे – (१) प्रातिभासिक, (२) व्यावहारिक व (३) पारमार्थिक. जी सत्ता प्रतीतिकाळांत सत्यरूपाने प्रतिभासते; पण नंतर बाधित होते, तिला प्रातिभासिक सत्ता म्हणतात. उदाहरणार्थ – रज्जु-सर्प शुक्ति-रजत इत्यादि. व्यावहारिक सत्ता विश्वांतल्या समस्त व्यवहारगोचर पदार्थांत राहते. विश्वांतल्या पदार्थांना कोणतेंतरी नाम आहे व कोणतेंतरी रूप आहे. या नाम-रूपात्मक वस्तूंची सत्ता व्यवहारासाठी नितान्त आवश्यक आहे. व्यवहारकालांतच सत्य असल्यामुळे जगांतल्या विकारात्मक पदार्थांची सत्ता व्यावहारिक ठरते. पारमार्थिक सत्ता ही खरीखुरी सत्ता आहे. ज्ञानी पुरुषाच्या दृष्टीने जगाकडे पाहिलें असतां, तें असत्य प्रतीत होतें. जग इंद्रियांना अवश्य सत्य आहे; पण वास्तवरूपाने तें सत्य नाही.

वेदान्तांत मिथ्या याचा अर्थ असत् नव्हे; तर अनिर्वचनीय असा आहे. याच अनिर्वचनीयवादाची पारिभाषिक संज्ञा विवर्त अशी आहे. परिणाम आणि विवर्त यांच्यामधला भेद वेदान्तसारांत पुढीलप्रमाणे सांगितला आहे –

सतत्त्वतोऽन्यथा प्रथा विकार इत्युदीरितः ।
अतत्त्वतोऽन्यथा प्रथा विवर्त इत्युदीरितः ।।

अर्थ – तात्त्विक परिवर्तनाला विकार व अतात्त्विक परिवर्तनाला विवर्त असें म्हणतात.

दही हा दुधाचा विकार आहे; पण सर्प हा रज्जूचा विवर्त आहे. कारण दूध व दही यांची सत्ता एका प्रकारची असून रज्जु व सर्प यांची सत्ता भिन्न प्रकारची आहे. सर्पाची सत्ता काल्पनिक आहे, तर रज्जूची सत्ता वास्तविक आहे (ब्र. सू. २. १. ७ शां. भा.).

जीवविचार – मग प्रश्न येतो तो असा, की आत्मा जर स्वभावतःच नित्यमुक्त आहे, तर तो संसारांत बद्ध झालेला कां दिसतो ? आनंदरूप आत्मा सांसारिक दुःखांनी तळमळतांना कां दिसतो ? याचें एकमात्र उत्तर म्हणजे अध्यास. जीवाने

स्वतःला स्थूल-कृश, अंध-बधिर, सत्कृत-तिरस्कृत, अशा प्रकारें मानणें म्हणजेच इंद्रियादिकांच्या धर्मांचा आरोप स्वतःवर करणें व त्यामुळे सुखी वा दुःखी होणें हें सारें अविद्याविजृंभित अध्यासाचेंच फल आहे. कर्तृत्व आणि भोक्तृत्व यांचा प्रवर्तक असलेला हा अध्यास स्वाभाविक आहे, अनादि आहे, तसाच अनंतहि आहे (शां. भा. उपोद्घात). जगांतल्या समस्त प्रमाण-प्रमेयांच्या व्यवहाराचा मूलाधार हाच आहे. याचेंच दुसरें नांव अध्यारोप असें आहे. याच अध्यारोपाचा निरास करण्यासाठी आत्मविद्येचें प्रतिपादन करणें, हें वेदान्तशास्त्राचें प्रधान उद्दिष्ट आहे.

जीव हा आत्मस्वरूपाच्या अज्ञानामुळेच या संसारात अनंत क्लेश भोगतो. अविद्येमुळे तो आपला शुद्ध-बुद्ध-मुक्त असा स्वभाव विसरून गेला आहे. त्याला या अज्ञानांतून बाहेर काढून ज्ञानाच्या भूमिकेवर आरूढ करणें, यालाच मोक्ष असें म्हणतात. एका बाजूने आनंदरूप ब्रह्माची प्राप्ति आणि दुसऱ्या बाजूने सकल शोकांची निवृत्ति हें मोक्षाचें स्वरूप आहे. याच मोक्षाच्या प्राप्तीसाठी वेदान्ताने साधनमार्गहि सांगितला आहे —

दार्शनिकांनी आपापल्या दृटिकोनांतून केवल कर्म, कर्मज्ञान-समुच्चय व केवल ज्ञान, तसेच भिन्नभिन्न साधनमार्ग सांगितले आहेत. शंकराचार्यांना पहिल्या दोन गोष्टी मान्य नसून शेवटची म्हणजे केवल ज्ञान हीच तेवढी मान्य आहे. ज्ञान मार्ग किंवा ज्ञाननिष्ठा यांविषयीं त्यांचा आग्रह आहे कर्माच्या द्वारें कैवल्यप्राप्ति कधीच होणार नाही, म्हणून कर्म व्यर्थ आहे, असें ते सांगतात (नैष्कर्म्यसिद्धि १. ५३). पण त्याच बरोबर नित्यकर्माचें अनुष्ठान करावें, असें हि त्यांचें सांगणें आहे. तें कर्म साक्षात् मोक्षप्रद होऊं शकत नसलें, तरी निष्कामपणे आचरिलेल्या त्या कर्मामुळे चित्तशुद्धि होते व ती झाल्यावर जीव आत्मस्वरूप जाणूं शकतो. पद्मपादाचार्यांनी आपल्या विज्ञानदीपिकेंत वेदान्तसंमत आचारपद्धतीचें जें विवेचन केलें आहे, यांत ते म्हणतात, की ' कर्म हें प्रबल आहे. त्यामुळे वासना उत्पन्न होते व वासनेंतूनच संसाराचा उदय होतो. म्हणून संसाराचा उच्छेद करावयाचा असेल, तर कर्माचें निर्हरण करणें नितान्त आवश्यक आहे.'

ज्ञानाने मोक्ष–ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया शंकराचार्यांनी आपल्या विवेकचूडामणि व उपदेशसाहस्री या ग्रंथांत मोठ्या रोचक भाषेंत सांगितली आहे. ज्ञानप्राप्तीसाठी साधकाने साधनचतुष्टय संपन्न झालें पाहिजे, असें ते म्हणतात. ब्रह्म हेंच केवल सत्य असून तदितर समस्त संसार अनित्य व असत्य आहे, अशा विवेकाचा उदय, ऐहिक व पारलौकिक अशा समस्त फलभोगांविषयी वैराग्य, मनाची एकाग्रता, इंद्रियनिग्रह, उपरति, तितिक्षा, समाधान, गुरु व वेदान्तवाक्यें यांच्यावर दृढ श्रद्धा आणि मुमुक्षुत्व, इ. गुणांचा उदय झाल्यावर मनुष्य वेदान्तश्रवणाचा अधिकारी बनतो. मग त्याने ब्रह्मवेत्त्या गुरूला शरण जाऊन आत्मविषयक प्रश्न करावे. मग गुरूने त्याला 'तत्त्वमसि' इ. महावाक्यांचा उपदेश करावा. त्या उपदेशाच्या द्वारें त्या शिष्याला जीव-ब्रह्मांच्या ऐक्याचें ज्ञान उत्पन्न होईल व त्याचे सारे शोक–मोह नष्ट होऊन त्याला आनंदाचा अनुभव घडेल.

अद्वैतज्ञानाच्या साधकाला श्रवण, मनन व निदिध्यास या तीन गोष्टींची नितान्त आवश्यकता आहे. या गोष्टी साध्य केल्यावर मगच त्याचें परोक्षज्ञान अपरोक्षज्ञानाच्या रूपांत परिणत होईल. मग तो साधक 'अहं ब्रह्मास्मि ' (मीच ब्रह्म आहें) अशा अनुभवाच्या भूमिकेवर आरूढ होईल. असा हा वेदान्ताचा साधनमार्ग आहे.

ज्याला मोक्ष मिळाला आहे, असा पुरुष संसारबंधनांत पडत नाही. त्याला शोक–मोह बाधत नाहीत. प्रारब्ध कर्मांचा क्षय होईपर्यंत तो देह धारण करतो; पण त्याची देहावरील आसक्ति गळून गेलेली असते. अशा पुरुषाला जीवन्मुक्त म्हणतात. मी कर्ता, भोक्ता नव्हे, अशी जिवंतपणींच प्रतीति येणें, अशा अवस्थेला जीवन्मुक्ति म्हणतात.

गीतेंत ' प्रजहाति यदा कामान् ' (२. ५५) इ. श्लोकांत जीं स्थितप्रज्ञाची लक्षणें सांगितलीं आहेत, तीं जीवन्मुक्ताचींच लक्षणें होत. वेदान्ती लोक या मुक्तीचें स्वरूप समजाविण्यासाठीं पुढील उदाहरण देतात –

एखाद्या माणसाच्या गळ्यांत सोन्याचा हार आहे, पण तो ती गोष्ट विसरून हार हरवला आहे, असें समजून त्याची अन्यत्र शोधाशोध करतो. मग कोणीतरी दुसरा मनुष्य त्याला सांगतो, की ' अरे, हार तर तुझ्या गळ्यांतच आहे ' त्यावर तो माणूस हार सांपडला, अशा भावनेनें हर्षित होतो. वस्तुतः त्याचा हार कुठेच गेला नव्हता. तो हरवला नव्हता आणि त्यामुळेच तो मिळालाहि नव्हता. मुक्तीचीहि स्थिति अशीच आहे. जीव स्वभावतःच मुक्त आहे. मुक्तीची उत्पत्तिहि होत नाही आणि प्राप्तिहि होत नाही. पण जीव ही गोष्ट विसरून मुक्ति कुठेतरी बाहेर शोधूं लागतो. दैववशात् गुरु भेटला व त्याने उपदेश केला म्हणजे त्याचें एतद्विषयक अज्ञान दूर होतें, मग विवेक उत्पन्न होतो, त्यामुळे तो जीव स्वाभाविक मुक्तीलाच प्राप्त करून घेऊन प्रसन्न होतो. वेदान्तमतांत मोक्षदशा ही नितान्त आनंदमय आहे. या दशेंत जीव-ब्रह्मविषयक भेद-भावना आणि तज्जन्य दुःखें यांची केवळ निवृत्तिच होत

नाही; तर साधकाला अलौकिक आनंदाची अनुभूति घडते आणि मग त्या अनुभूतीने तो कृतकृत्य होतो.

अद्वैत वेदान्ताचें हें संक्षिप्त सार आहे. याच्या अनुशीलनानें शंकराचार्यांच्या अलौकिक विद्वत्तेचा, तसाच असाधारण तार्किकतेचाहि परिचय होऊं शकेल. शंकराचार्यांनी आपल्या सिद्धान्तांच्या प्रतिपादनासाठी जागोजाग श्रुतींचा आश्रय घेतला आहे व आपल्या मताच्या दृढीकरणासाठी अन्य मतांचें खंडनहि केलें आहे. आचार्यांच्या तर्कपद्धतीचें एक वैशिष्टय हें, की त्यांचा तर्क वेदशास्त्रानुकूल असतो. त्यांनी प्रतिपादिलेला अद्वैताचा साधनमार्गहि मनोरम आहे. ते कर्माचा तिरस्कार करीत नाहीत, तर चित्तशुद्धीसाठी निष्काम कर्म आचरलेंच पाहिजे, असें सांगतात. याच कारणामुळे सर्वसामान्य जनतेलाहि ते आदरणीय झाले आहेत. बौद्धांना परास्त करून वैदिक धर्माचें पुनरुत्थान घडवून आणण्यांत शंकराचार्यांना फार मोठें श्रेय आहे. आचार्य श्रीविद्येचे उपासक व सिद्धपुरुष होते. त्यांना शंकराचा अवतार म्हटलें जातें. वैष्णवाचार्यांनी शंकराचार्यांचा मायावाद भक्तीशीं नितान्त विरोधी आहे, असें मानून त्याचें मोठ्या हिरीरीनें खंडन करण्याचा प्रयत्न केला आहे; पण एवढें होऊनहि या विश्वाचें कोडें उलगडण्याच्या कामीं अद्वैत वेदान्त जेवढा सफल झाला आहे, तेवढें दुसरें कोणतेंहि मत झालें नाही. आणि म्हणूनच अद्वैत–दर्शनाचा जगांत एवढा गौरव आहे.

अद्वैत वेदान्ताचे मूलस्रोत आपणांस उपनिषदांत आढळतात. त्याहूनहि प्राचीन असलेल्या वैदिक संहितांतहि अद्वैत-विचार अनेक ठिकाणीं दृष्टीस पडतो. उपनिषदांनी आपल्या सिद्धान्तांचें उगमस्थान म्हणून वेदसंहितांचाच स्वीकार केला आहे. वेदान्त हा व्यावहारिक धर्म आहे. वेदान्ताने माणसांना निष्क्रियतेची शिकवण दिली, असा कांही लोक वेदान्तावर आरोप करतात; पण तो सर्वथा भ्रांत आहे. वेदान्त विश्वांतल्या प्रत्येक जीवाच्या ठिकाणीं परब्रह्माची सत्ता मानतो. तो विषयसुख तुच्छ करून जीवांना शाश्वत आनंदाकडे जाण्यासाठी प्रोत्साहन देतो. विषयसुख हें नाशिवंत असून अध्यात्मसुख हेंच चिरस्थायी आणि खरें सुख आहे, हें वेदान्ताने आग्रहपूर्वक प्रतिपादिलें आहे. नराचा नारायण बनण्याचा बहुमोल आदर्श वेदान्ताने आपल्यासमोर उभा केला आहे. क्षुद्र स्वार्थाच्या भावनेने त्रस्त आणि ग्रस्त झालेल्या मानवसमाजाला वेदान्त हा अमृतमय कल्याणोपदेश आहे. इतकेंच नव्हे; तर 'वसुधैव कुटुंबकम्' ही वृत्ति बाणवून घेण्यासाठीहि वेदान्त हेंच सर्वश्रेष्ठ साधन आहे. [भा. द.; भा. द. सं.]

अद्वैतानंद (१८ वें शतक) काशी क्षेत्रांतले सुप्रसिद्ध संन्यासी व महाविद्वान्. हे मूळचे महाराष्ट्रीय होत. ब्रह्म-विद्याभरण नांवाचा यांचा अद्वैत वेदांतावर ग्रंथ आहे. [म. च. को.]

अद्वैतानंद बोधेंद्र (इ. स. ११५० चा सुमार) द. भारतांत कावेरीच्या तीरावर पंचनद नांवाच्या गावांत यांचा जन्म झाला. यांचें पूर्वाश्रमींचें नांव सीतानाथ व गोत्र कौंडिण्य होतें. यांनी वयाच्या १७ व्या वर्षी कांचीच्या कामकोटिपीठाच्या आचार्यांकडून संन्यास घेतला. आचार्यांनी त्यांचें अद्वैतानंद नांव ठेवून पुढे त्यांना आपल्या पीठावर बसविलें. अद्वैतमताचें अध्ययन पूर्ण झाल्यावर यांनी भारतयात्रा केली व अन्य संप्रदायांतल्या विद्वानांशीं वाद करून त्यांच्यावर विजय मिळविला. यांनी शांतिविवरण व गुरुप्रदीप असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. यांनी मुख्यत्वें वाचस्पतिमिश्रांचें अनुसरण केलें आहे. [हिंदुत्व]

अद्वैतोपनिषद् एक गौण उपनिषद्. यांत स्थावर–जंगमामध्ये एकच अद्वैतब्रह्म प्रकाशित आहे, अद्वैताच्या ठिकाणीं भेद नाही व अद्वैताच्या ज्ञानाने पुरुष अमूढ होतो, असें सांगितलें आहे.

अधमा नायिका गुण आणि प्रकृति यांच्या अनुसारें केलेला एक नायिकाभेद. भानुदत्त हिच्याविषयी म्हणतो –

हितकारिण्यपि प्रियतमेऽहितकारिण्यधमा

अर्थ – प्रियकर हित करणारा असतांहि (त्याचें) अहित करणारी (प्रतिकूल वागणारी) ती अधमा नायिका म्हणावी. उदाहरण –-

चित्ताणि अदईअसमागमम्मि कअमण्णुआइँ भरिऊण
सुण्णं कलहाअन्ती सहीहि रुण्णा ण ओहसिआ

(गाथासप्तशती)

अर्थ – नवऱ्याची भेट झाली न झाली तोंच रागाच्या गोष्टी आठवून कलहाला प्रवृत्त होणाऱ्या स्त्रीच्या अवस्थेबद्दल तिच्या मैत्रिणींना खेद होतो. सहानुभूतीमुळे त्या तिचा उपहास करीत नाहीत, एवढेंच !

अधर्म (१) ब्रह्मदेवाच्या पृष्ठभागापासून उत्पन्न झालेला धर्मविरोधी पुरुष. याची भार्या मृषा. तिच्यापासून दंभ आणि माया या मिथुनाची उत्पत्ति झाली (भाग पु. ३.

१२). त्या मिथुनापासून लोभ आणि निकृति, क्रोध व हिंसा, कलि व दुरुक्ति, मृत्यु व भीति, निरय व यातना अशी मिथुनसंतति झाली (भाग पु. ४. ८). हा काल्पनिक पुरुष असून मानवी जीवनांतला अधर्म, त्यांतून निघणारे दुर्गुण आणि त्यांचे परिणाम, यांच्यावर बसविलेलें हें रूपक आहे. [प्रा. च. को.]

(२) धर्माचा विरोधी. पाहा—धर्म.

अधर्मसंतति प्रत्येक देशांत अनीतीच्या आचारणामुळे झालेली संतति असतेच. आणि ही संतति अनेक प्रकारचे सामाजिक प्रश्न उभे करते. वेश्यागमन आणि शरीरविक्रय यांमुळेच केवळ अनीतीचें आचरण होतें असें नाही; तर अन्यत्रहि तें बरेंच होतें. निदान अधर्मसंततीची संख्या वाढविण्यास वेश्यागमनाहून अन्य कारणें असूं शकतात. आपल्याकडे अधर्मसंततीचीं कारणें अनेक आहेत. दासी ठेवण्याच्या चालीने, देवळांतल्या भाविणीपासून झालेल्या संततीने आणि वैधव्यांत असलेल्या स्त्रियांच्या अनीतीच्या आचरणाने अधर्मसंतति उत्पन्न झाली आहे. आपणांकडे कुमारींपासून झालेल्या मुलांची संख्या मात्र फारशी नाही.

अधर्मसंततीचें भिन्न भिन्न प्रमाण, समान आचारविधींनी नियंत्रित झालेल्या समाजांचा नैतिक दर्जा कांहीसा दिग्दर्शित करतें, तरी अधर्मसंततीच्या प्रमाणावरून राष्ट्रांतील नीतिमत्ता ठरवितां येणार नाही. एखाद्या देशांत अधर्मसंततीचें प्रमाण अतिशय मोठें असलें, तर त्याचें कारण तेथील नीतिमत्ता बिघडली आहे, हेंच केवळ नसून तेथील आचारविधि किंवा आर्थिक स्थिति या गोष्टी तरुणपणीं विवाहाला पोषक नसतील किंवा मुलांच्या आईबापांनी मागाहून लग्न केल्यास मुलें औरस बनणें तेथील कायद्याप्रमाणें शक्य होत असल्यामुळे अधर्मसंतति हा मोठा महत्त्वाचा प्रश्नच नसेल. ज्या लोकांत अधर्मसंततीचें प्रमाण बरेंच कमी असेल, पण गर्भपात व गर्भधारणेला मुद्दाम प्रतिबंध करणें, यांसारख्या पद्धति प्रसृत पावल्या असतील, त्या लोकांतलें केवळ अधर्मसंततीचें प्रमाण पाहून त्यांची नीतिमत्ता उच्च तऱ्हेची ठरविणें भ्रामक आहे. बहुतेक ख्रिस्ती देशांतल्यापेक्षा मुसलमानी देशांत अधर्मसंतति निःसंशय कमी आहे. पण तेवढ्यावरून मनोनिग्रहाच्या बाबतींत मुसलमान श्रेष्ठ आहेत, असें म्हणतां येणार नाही. तथापि समान संस्कृति व आचारधर्म असलेल्या भिन्न समाजांत अधर्मसंततीच्या प्रमाणांत जी भिन्नता येते, ती नीतिकल्पना व नीतिभावना कांही अंशीं स्पष्ट करण्यास खास उपयोगी पडते.

हिंदु समाज हा जातिबद्ध असल्यामुळे अधर्मसंततीस कोणत्याहि जातींत स्थान मिळत नाही. अशी प्रजा निराळी राहते व तिला निराळी जात बनवावी लागते. अशी परिस्थिति असल्यामुळे कांही लहान लहान अनिश्चितपद जाती अधर्मसंततीमुळे उत्पन्न झाल्या असणें शक्य आहे. त्या कोणत्या, हें आज सांगणें शक्य नाही. धर्मशास्त्रग्रंथांत ज्या अनेक जातींचा संकरजाति म्हणून उल्लेख आहे, त्यांत मागध, सैरंध्र, चांडाल, यांसारख्या राष्ट्रस्वरूपी जातींचा उल्लेख आहे. आपल्याकडे पूर्वी गोवर्धन ब्राह्मणांस गोलक म्हणून ' अमृते जारजः कुंडो मृते भर्तरि गोलकः ' या मनुस्मृतिवाक्यान्वये त्यांना इतर ब्राह्मण पंक्तिबाह्य धरीत; पण गोवर्धन ब्राह्मण ही प्रादेशिक जात असावी, व त्यांची जोशीपणाची वृत्ति निदान रामदेवराव जाधवाच्या काळाइतकी जुनी असावी, असें दिसतें. ब्राह्मण पुरुष व ब्राह्मण स्त्री यांची अधर्मसंतति ब्राह्मणांतच गफलतीने मिसळून गेल्याचीं उदाहरणेंहि अवलोकनांत आहेत. एकत्र राहणाऱ्या पण विवाहबद्ध नसलेल्या सजातीय स्त्रीपुरुषांपासून झालेली संतति धडपड करून व अडचणींत सांपडलेलीं वधूवरें पाहून आपल्या आईबापांच्याच जातींत प्रवेश करते. जेव्हा वरच्या जातींतील विधवा स्त्रिया पुरुषाबरोबर राहत नसतील व त्यांना मुलें झालीं असतील, तेव्हा त्या आपल्या मुलांची कशी तरी वाट लावतात. त्या मुलांस मारून टाकतात, किंवा पंढरपूरसारख्या ठिकाणीं ठेवून देतात किंवा ख्रिस्ती मिशनऱ्यांस किंवा गोसाव्यांस तीं मुलें देऊन टाकतात. उच्च वर्गांतील विधवा किंवा कुमारी आपल्या अधर्मसंततीला उघडपणें बाळगून आहेत, असें एकहि उदाहरण पाहण्यांत नाही.

जेव्हा पुरुष व स्त्री भिन्न जातीय असून अधर्म व्यवहाराने एकत्र राहत असतील, तेव्हा त्यांना जीं मुलें होतात, तीं रक्षिलीं जातात. अशी मंडळी विदुर जात फुगवितात. पण त्यांनाहि हल्लीं बराच प्रतिबंध झाला आहे. ब्राह्मण पुरुष आणि ब्राह्मणेतर स्त्री अशांपासून जी संतति आहे, तिनें इतरांपासून वियुक्तता स्थापन केली आहे, म्हणजे आपली स्वतंत्र जात बनविली आहे. ते स्वतःला पाराशर ब्राह्मण म्हणवून घेत आहेत. मराठ्यांमध्ये प्रथम अधर्मसंततीला दूर ठेवण्यांत येतें व त्यांचा समावेश कुलीनांत होत नाही; पण कालांतराने तसलीं कुटुंबें सुशिक्षित व संपन्न झालीं, म्हणजे त्यांच्याशीं चांगल्या कुळांतील लोकहि लग्नव्यवहार करूं लागतात. म्हणजे मराठे जातींतच अधर्मसंततीला थोडेंबहुत औदार्य दाखविलें जात, असें म्हणतां येईल. मुंबईंतील कांही अकरमासे सामान्य मराठ्यांपेक्षां शैक्षणिक व सांपत्तिकदृष्ट्या अधिक चांगल्या स्थितींत आहेत. ते मराठ्यांत मिसळून जाण्यास फारसे

तयार नाहीत. अशांपैकी पुष्कळ मंडळी आपणांस ब्राह्मो म्हणवितात. अशांच्या लग्नांची व्यवस्था त्या मंडळींतच होते. ब्राह्मणादि चांगल्या जातींतहि अशांचीं लग्नें झाल्याचीं उदाहरणें आहेत. त्यांना कायद्याच्या अडचणी नाहीत. एका बाबतींत तर त्यांची स्थिति कायद्यानें इष्ट प्रकारचीच आहे. एखाद्या हिंदु स्त्रीनें युरोपियनाबरोबर लग्न केलें, तर त्या स्त्रीच्या संततीला हिंदु समजण्यांत येणार नाही; पण तिचा युरोपियनाबरोबर अधर्मसंबंध असला, तर मात्र तिच्या संततीला हिंदु समजण्यांत येतें. मुंबईतील अकरमाशांत असा वर्ग आहे. तसेंच मलयाळी लोकांपैकी तिय्या जातींतहि असा वर्ग आहे. [म. ज्ञा. को.]

अधःशिरस् एका नरकाचें नांव. याला अधोमुखहि म्हणतात. जे निषिद्ध लोकांकडून पापदानें घेतात व जे लोक फलज्योतिषावर उपजीविका करतात, त्यांना या नरकांत पडावें लागतें. [ब्रह्मांड पु. ४.२.१४८; विष्णु पु. २.६.४]

अधारंग दिल्लीपति महंमदशहा याच्या काळांत (इ. स. १७१९ – १७४८) उदयास आलेल्या दोन संगीतकार बंधूंपैकी एक. हिंदुस्तानी संगीतांतले अनेक ख्याल यानें बांधले आहेत. **पाहा**––सदारंग,

अधारी नाथपंथी योगी लाकडाच्या एका दांडक्याला खालीवर पाटासारख्या फळचा बसवून आपलें आसन तयार करतात, त्याचें नांव अधारी. योगी लोक हें बरोबर घेऊनच हिंडतात व बसायच्या वेळीं याचा उपयोग करतात.

अधिकमास याला मलमास, पुरुषोत्तम मास आणि महाराष्ट्रांत धोंडामास, असेंहि म्हणतात. चांद्र वर्ष व सौर वर्ष यांचा मेळ घालण्यासाठी सरासरी बत्तीस किंवा तेहतीस चांद्रमासांनंतर चांद्र वर्षांत जो एक अधिक महिना धरावा लागतो, त्याला अधिक मास म्हणतात. सामान्यतः प्रत्येक चांद्र मासांत एक सौर संक्रांति होत असते. ज्या मासांत अशी एकहि सौर संक्रांति घडत नाही, म्हणजेच जो चांद्रमास संपूर्णपणें दोन संक्रांतींच्या दरम्यान येतो, तो अधिक मास समजायचा. उदा० सूर्याची मेषसंक्रांति चैत्र अमावास्येला घडली व त्याची वृषभ संक्रांति वैशाखांत न होतां ती त्यापुढील महिन्याच्या प्रतिपदेस घडली, तर हा संक्रांतिविहीन मास अधिक वैशाख ठरेल व त्यापुढचा महिना हा निज वैशाख होईल.

चैत्र, ज्येष्ठ व श्रावण हे १२ वर्षांनी, आषाढ १८ वर्षांनी, भाद्रपद २४ वर्षांनी, आश्विन १४१ वर्षांनी व कार्तिक ७०० वर्षांनी अधिक मास होतो. भाद्रपदापर्यंतच्याच मासांना अधिक मास म्हणतात. आश्विन व कार्तिक अधिक आले, तरी त्यांस तसें म्हणत नाहीत. ज्या वर्षी आश्विन अधिक होतो, त्या वर्षी पौष क्षयमास होतो. अशा वेळीं दोन प्रहरांपर्यंत मार्गशीर्ष व दोन प्रहरांनंतर पौष मानून दोन्ही मासांचीं धर्मकृत्यें एकाच महिन्यांत करतात. या जोडमासाला संसर्प असें म्हणतात. कार्तिकापुढील चार महिने अधिक मास होत नाहीत व आश्विनाच्या पूर्वी क्षयमास होत नाही.

चांद्र व सौर अशा दोन्ही मासांचा प्रचार भारतांत वैदिक कालापासून आहे. ' द्वादश मासाः संवत्सरः ' म्हणजे बारा मासांचें एक वर्ष ही कालगणनादेखील वैदिक कालाइतकीच प्राचीन आहे. पण सौर वर्षाचे दिवस सुमारे ३६५ असतां चांद्रमासाचे दिवस मात्र ३५४ च भरतात. त्यामुळे १२ चांद्र मास म्हणजे एक वर्ष असें मानलें, तर हळूहळू प्रत्येक मास मागे मागे पडूं लागेल व वसंत ऋतूंतला चैत्रमास ३३ वर्षांत सगळ्या ऋतूंत भ्रमण करील. दुसरा परिणाम असा होईल, की ३३ सौर वर्षांत चांद्र वर्षांची संख्या एका वर्षानें वाढेल. असें होऊं द्यायचें नसेल, तर बत्तीस किंवा तेहतीस चांद्र महिन्यांनंतर एक चांद्र मास अधिक धरणें भाग आहे. भारतीय ज्योतिर्विदांनी हा उपाय अवलंबून चांद्र व सौर या दोन्ही वर्षांचा मेळ घातला.

संहिता व ब्राह्मणें यांत यज्ञ व संवत्सर हे पर्यायवाचक शब्द असल्याचें दाखविणारीं अनेक वचनें आहेत. लो. टिळकांच्या मतें यज्ञ ही संवत्सराचीच एक प्रतिमा होती. त्या प्रमाणे यज्ञ बारा चांद्र मासांत पूर्णहि होत असे. परंतु नवीन यज्ञाची सुरुवात संवत्सरारंभीं व्हायची असल्यामुळे यज्ञदेवता प्रजापति हा उरलेले बारा दिवस (चांद्र वर्षापेक्षां सौर वर्ष सुमारें ११–१२ दिवसांनी मोठें असतें.) नव्या वर्षाच्या यज्ञाची तयारी करण्यांत घालवितो, असें अथर्ववेदांत (४. ११. ११) म्हटलें आहे. सर्व वर्षभर श्रम केल्यामुळे ऋभू (म्ह. ऋतु) हे या अवधींत आपली गति मंद करून सूर्याचा पाहुणचार घेतात, असें जें ऋग्वेदांत वचन आहे, तें देखील या अधिक दिवसांनाच अनुलक्षून आहे. ' वेदाय उपजायते ' (ऋ. १. २५. ८) या मंत्रांशाचा अर्थहि संदर्भावरून अधिक मास असाच घेतला पाहिजे.

वाजसनेयी संहितेंत अधिक मासासाठी अंहसस्पति व मलिम्लुच अशीं दोन नांवें आलीं आहेत (७. ३०; २२. ३०). यांतील मलिम्लुच शब्दावरूनच मलमास हा शब्द आला आहे.

तेराव्या मासाला ऐ. ब्रा. मध्येहि निंद्य म्हटलें आहे (३. १). वेदाच्या ज्या भागांत अधिक मासाचा उल्लेख आहे, तो सनपूर्व १५०० वर्षांच्या सुमारास तयार झाला असावा, असें कांही युरोपीय पंडितांचें म्हणणें आहे. पण शं. बा. दीक्षित यांच्या मतें अधिक मास धरण्याची पद्धत सनपूर्व सुमारें पांच हजार वर्षांपासून भारतांत प्रचलित असावी.

बृहन्नारदीय व पद्म या पुराणांत पुरुषोत्तममासमाहात्म्य व मलमासमाहात्म्य या प्रकरणांत अधिक मासाचें महत्त्व वर्णिलें आहे. त्यांत अधिक मासांत करायचीं व्रतें, दानें, उद्यापनें यांचा विधि सांगितला असून फलश्रुतिहि निवेदिली आहे.

अधिकमासकृत्यें — या मासाची पुरुषोत्तम म्हणजे विष्णु ही देवता मानली असून त्याच्या कृपेसाठी पुढील कृत्य करण्यास सांगितलें आहे -- पूजा, पापक्षालनासाठी मलमासव्रत, प्रत्येक दिवशीं अनरसे इ. पक्वान्नें तेहतीस या संख्येने कांस्यपात्रांत भरून पात्रासह त्यांचें दान, पादत्राणें व छत्री यांचें दान, सुवर्णदक्षिणा, इत्यादि. महाराष्ट्रांत अधिक मासांतलें अनरशांचें वाण बहुधा जावयाला देतात. कन्या व जामात यांना लक्ष्मीनारायणस्वरूपी मानलें आहे, त्यांतून ही पद्धत आली असावी.

जीं कर्मे अन्य वेळीं करणें शक्य असेल, तीं अधिक मासांत वर्ज्य सांगितलीं आहेत. उदा० अग्न्याधान, देवप्रतिष्ठा, राज्याभिषेक, विवाहोपनयनादि संस्कार, गृहारंभ, गृहप्रवेश, देशांतरयात्रा, इत्यादि.

अधिक मासांत मृत झालेल्यांचें श्राद्ध व महालय, शुद्ध मासांत त्या तिथीस करतात. अधिक मासांत जन्मलेल्या बालकाचा जन्ममास त्या नांवाचा शुद्ध मास असेल तो धरतात. **पाहा**–अधिमासव्रत. [पं. ज्यो.; पु. चिं.; म. ज्ञा. को.]

अधिकरणसमथा धम्मा बौद्ध धर्मशास्त्रांतले सात नियम संघांत विवाद निर्माण झाल्यास त्याच्या शांतीचे उपाय म्हणून पुढील सात नियम सांगितले आहेत -- (१) संमुखविनय – दोन्ही पक्षांनी एकत्र येऊन धर्मविवादाचें ज्ञानाने परीक्षण करणें (२) स्मृतिविनय– भिक्षूला अपराधाची स्मृति करून देणें (३) अमूढविनय– मतिभ्रमाने केलेल्या अपराधाची जाणीव (४) प्रतिज्ञातकरण– वृद्ध भिक्षूजवळ जाऊन अपराधनिवेदन करणें (५) यद्भूयसिक–आवासांतल्या सर्व भिक्षूंना एकत्र करून विवादपरीक्षण (६) तत्पापीयसिका – अपराधाविषयीं विस्मरण झाल्याचा बहाणा केल्यास दुसऱ्या भिक्षूने त्याला समजावणीच्या मार्गाने कबूल करायला लावणें व (७) तिणवत्थारक– अपराधी माणसाने स्वतःला तृणाने झांकणें. [पा. सा. इ.]

अधिकारनंदी शिववाहन नंदीचें एक वेगळें स्वरूप. या स्वरूपांत तो वाहन नसून सेवक असतो. त्याचें रूप पूर्ण किंवा अर्धें मानवी असतें. कांही पंडितांच्या मतें नंदी हें शिवाचेंच वृषभरूप आहे. वाहनाची कल्पना सनपूर्व पहिल्या–दुसऱ्या शतकांत उगम पावली असावी आणि गुप्तकालापूर्वी नंदीला मानव रूप मिळालें असावें. कालिदासाने त्याचें वर्णन शिवाचा द्वारपाल असें केलें आहे --

लतागृहद्वारगतोऽथ नन्दी
वामप्रकोष्ठार्पितहेमवेत्रः ।
मुखार्पितैकाङ्गुलिसंज्ञयैव
मा चापलायेति गणान् व्यनैषीत् ॥

(कुमार सं. ३. ४१)

अर्थ – (शिवाच्या तपोवनांत मदनाचा प्रवेश झाल्यावर साहजिकपणेंच शिवगणांच्या चित्तांत विकृति उत्पन्न झाली. मग) लतागृहाच्या दारांत (पहारा करीत) उभा असलेला व ज्याने आपल्या डाव्या हातांत सुवर्णाची वेतकाठी घेतली आहे असा नंदी नाकावर बोट ठेवून 'चंचल बनूं नका' म्हणून शिवगणांना इशारा देता झाला.

रामायणांत त्याचें वानररूप वर्णिलें आहे (वा. रा. १६. १४). सर्व शैव पुराणांतून नंदी मानवरूपांतच आढळतो. मूर्तिकलेंत त्याच्या मूर्ति शिवासारख्याच घडवितात. फक्त त्याचे पुढचे दोन हात जोडलेले असतात. द. भारतांतल्या अनेक शिवालयांच्या प्रवेशद्वारावर अशा शिवसदृश नंदीमूर्ती आढळतात. पण असें असलें तरी नंदीचें वृषभरूप मात्र केव्हाहि विसरलें गेलें नाही. **पाहा** – नंदी, नंदीशमूर्ति. [डि. हिं. इ.]

अधिगारी बदगांची एक शाखा. मलबारमधील ग्रामप्रमुखाचें नांव. [का. ट्रा. स. इं.]

अधिदेवता ग्रहयज्ञ वगैरे कर्मांत मुख्य देवतेच्या उजव्या बाजूस स्थापन केलेली देवता. [सं. कौ.]

अधिदैवत वेदान्तदर्शनांतील पारिभाषिक शब्द. इंद्रियांच्या देवता. जसें – हातांची इंद्र, पायांची विष्णु, डोळ्यांची सूर्य, इत्यादि. त्या त्या देवता त्या त्या इंद्रियांचे व्यापार चालवितात. उपनिषदांत उपासनेसाठी ब्रह्मस्वरूपाचीं जीं प्रतीकें सांगितलीं आहेत, त्यांत आकाश हें अधिदैवत प्रतीक मानलें आहे (छान्दो. ३. १८. १). गीतेंत श्रीकृष्ण

अर्जुनाला 'पुरुषश्चाधिदैवतम्' = पुरुष म्हणजे अधिदैवत होय, असें सांगतो (८. ४). पुरुष या शब्दानें सूर्यातला पुरुष, पाण्याची देवता किंवा वरुणपुरुष, इ. सचेतन सूक्ष्मदेहधारी देवता विवक्षित असून हिरण्यगर्भाचाहि त्यांत समावेश होतो. **पाहा** – हिरण्यगर्भ. [गी. र. पृ. ७०८]

अधिमासव्रत अधिक मासांत करायचें मासव्रत. याचा विधि पुढीलप्रमाणे – विष्णुस्वरूप सूर्याची पूजा. उपवास किंवा नक्तभोजन. तेहतीस गुडघृतमिश्र अपूपांचें (अनरसे) दान. दानाचा मंत्र असा ––

विष्णुरूपी सहस्रांशुः सर्वपापप्रणाशनः ।
अपूपान्नप्रदानेन मम पापं व्यपोहतु ।।

अर्थ – विष्णुरूपी, सर्वपापनाशक सूर्य, (मीं केलेल्या) अपूपदानानें माझें पाप नष्ट करो.

मग प्रार्थना, ब्राह्मणभोजन व पुरुषोत्तममाहात्म्याचें श्रवण. व्रताचें फल– पापनाश व सुखसमृद्धीची प्राप्ति. या व्रताची कथा अशी ––

नहुषराजाला इंद्रपद मिळाल्यावर तो उन्मत्त झाला व त्यानें शचीची कामना धरली. तिच्या महालांत जाण्यासाठी त्यानें अगस्त्यादि ऋषींना आपली पालखी वाहायला लावलें. पालखींत बसल्यावर तो अगस्त्याला 'सर्प, सर्प '(लवकर चल) म्हणाला, तेव्हां अगस्त्याने 'तूंच सर्प हो ' असा शाप दिला. नहुष सर्पयोनींत पडला. शेवटीं व्यासांच्या आदेशानुसार त्यानें हें व्रत केलें व तो सर्पयोनींतून मुक्त झाला. **पाहा** – अधिक मास. [हे. व्र.]

अधियज्ञ वेदान्तांतील पारिभाषिक शब्द. यज्ञाचा अधिष्ठाता. सर्व यज्ञांचा अधिपति. 'अहं हि सर्व यज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च '= मीच सर्व यज्ञांचा भोक्ता व प्रभु आहें, असें श्रीकृष्णाने अर्जुनास सांगितलें आहे (गीता ९. २४).

अधिवासन 'अधिवासयति स्थापयति देवता अनेन इति ' (=ज्याच्या योगानें देवतेची स्थापना करतात, असा एक विधि), अशी याची व्याख्या आहे. तेल, हळद, इ. द्रव्यांनी स्थापनीय मूर्तीचें शुद्धीकरण व संस्करण करणें, याला अधिवासन म्हणतात. हें प्रतिष्ठेच्या पूर्वदिवशीं सायंकाळीं करतात. हीं संस्कारद्रव्यें पुढीलप्रमाणें एकंदर २२ आहेत–– मृत्तिका, गंध, शिला, धान्य, दूर्वा, पुष्प, फल, दधि, घृत, स्वस्तिक, सिंदूर, शंख, काजळ, रोचना, पांढऱ्या मोहऱ्या, सुवर्ण, रुपें, तांबें, चामर, दर्पण, दीप व प्रशस्त पात्र. [श. क.]

अधिषवण सोमरस काढण्यासाठी ज्या दोन फलकांवर सोमलता ठेऊन ती दगडांनी कुटतात, त्या फलकांना अधिषवण असें नांव आहे (अथर्व. ५. २०. १०; श. ब्रा. ३. ९. ४. १).

अधिष्ठान (१) आश्रय, वस्तूची राहण्याची जागा. 'आत्मनो भोगायतनं शरीरम्' = आत्म्याचें भोग भोगण्याचें ठिकाण, स्थान म्हणजे शरीर होय. (वात्स्या. १. १. ९). म्हणून शरिरालाहि अधिष्ठान म्हटलें आहे. प्रत्येक पदार्थाला अधिष्ठान व उपाधि अशीं दोन अंगें दिसतात. उदा० सोनें व सोन्याचा दागिना. यांत सोनें हें अधिष्ठान व दागिना हा उपाधि आहे. उपाधि (आकार) बदलला, की त्याला निराळें नांव पडतें. यावरून जगांतलीं भिन्न भिन्न नावें उपाधीलाच लागतात; अधिष्ठानाला नाहीत, असा सिद्धान्त आहे (ब्र. सि. मा.).

भक्तिमार्गांत मानवहृदय हें भगवंताचें अधिष्ठान मानलेलें आहे. गीता सांगते––

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन् सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ।।
(१८. ६१)

अर्थ –– हे अर्जुना, ईश्वर सर्व भूतांच्या हृदयांत राहून यंत्रावर चालविल्याप्रमाणे सर्व भूतांना (आपल्या) मायेनें चालवीत असतो.

(२) स्थापत्य शास्त्रांत इमारतीच्या चौथऱ्याला किंवा जमिनीबरोबरच्या सर्वांत खालच्या घटकाला हें नांव आहे (कामिकागम ३०. ५).

अधिसामकृष्ण एक पौराणिक राजा. मत्स्य पुराणाच्या मतें शतानीकाचा पुत्र. वायु, विष्णु व मत्स्य या पुराणांत या राजाच्या पुढे भविष्यकालीन राजवंश सांगण्यास प्रारंभ झाला आहे. हा राज्य करीत असतां वायुपुराण लिहिलें गेलें. हस्तिनापुर महापुरांत वाहून गेल्यामुळे यानें आपली राजधानी कौशांबीला नेली (वायु पु. २. ३७. २५४). विष्णु व मत्स्य या पुराणांत अधिसोमकृष्ण व भागवतांत अधिसीमकृष्ण असे नांवाचे पाठभेद आहेत. [प्रा. च. को.].

अधीवास उपरणें. वेदकाळीं पुरुष आपल्या कपड्यांवरून हें वस्त्र परिधान करीत (ऋ. १. १४०. ९);

स्त्रियाहि अशा वस्त्राचा उपयोग करीत.

अधोमुखजननशांति मूल अधोमुख जन्माला आलें तर त्या अशुभाचा परिहार करण्यासाठी ही शांति आहे. प्रथम गोमुखप्रसवशांति, रुद्र या देवतेची स्थापना व पूजा. मग अग्निस्थापनापूर्वक अग्निमुख. मुख्य देवतेसाठी कलशस्थापना करून रुद्राध्याय व रुद्रसूक्त यांचें पठन. समिधा, चरु, आज्य व तिल यांचा प्रधान होम. मग बलिदान, पूर्णाहुति व बालकासह यजमानाला अभिषेक. [विद्याधरशास्त्री भिडे]

अधोमुख नक्षत्रगण सत्तावीस नक्षत्रांत पुढील नक्षत्रें अधोमुख आहेत –

आश्लेषवह्नियमपित्र्यविशाखयुक्तं
पूर्वात्रयं शतभिषा च नवाप्युडूनि ।
एतान्यधोमुखगणान्यशुभानि नित्यं
विद्यार्घ्यभूमिखननेषु च शोभितानि ।।

आश्लेषा, कृत्तिका, भरणी, मघा, विशाखा, पूर्वा, पूर्वाषाढा पूर्वा भाद्रपदा व शततारका हीं नऊ नक्षत्रें अधोमुख असल्यामुळें अशुभ असून तीं विद्या, अर्ध्य व भूमि खणणें या कार्यासाठी शुभ होतात. [ज्योतिःसारसंग्रह]

अधोवस्त्र प्राचीन काळचें कमरेभोवती कसून बांधायचें (निबिड निपीडित) छोटें वस्त्र. त्याचा एक पदर नाभीच्या खालीं असे. वरच्या टोकाची गांठ बांधीत व खालचें टोक सुटें ठेवीत. दुसऱ्या पदराचा मागच्या बाजूने कांचा खोचल्यावरहि कांही भाग वर राही. शरीर वांकविल्यावर वस्त्र वर ओढलें गेल्याने उजव्या मांडीचा कांही भाग उघडा दिसे. अधोवस्त्र वापरण्याची ही पद्धत गुप्तकालीन मूर्तींत दिसून येते. [ह. च.]

अध्यग्नि स्त्रीधनाच्या सहा प्रकारांपैकी एक. हे सहा प्रकार मनूने पुढीलप्रमाणे सांगितले आहेत—

अध्यग्न्यध्यावाहनिकं दत्तं च प्रीतिकर्मणि ।
भ्रातृमातृपितृप्राप्तं षड्विधं स्त्रीधनं स्मृतम् ।।

(मनु. ९. १९४)

अर्थ – अध्यग्नि, अध्यावाहनिक, सणासुदीस पतीकडून प्रेमभेट म्हणून मिळालेलें, भाऊ, माता व पिता यांनी दिलेलें, असे स्त्रीधनाचे सहा प्रकार आहेत.

विवाहकाले यत् स्त्रीभ्यो दीयते ह्यग्निसन्निधौ ।
तदध्यग्निकृतं सद्भिः स्त्रीधनं परिकीर्तितम् ।।

(कात्या. स्मृ.)

अर्थ – विवाहाच्या वेळीं, अग्नीसमक्ष स्त्रियांना जें (द्रव्य) दिलें जातें, त्याला सज्जनांनी अध्यग्निसंज्ञक स्त्रीधन, असें नांव दिलें आहे.

अध्यवसाय 'इदमेवेति विषयपरिच्छेदो निश्चयः' (= 'हेंच' अशा प्रकारें विषयाचें ज्ञान होणें. याला निश्चय म्हणतात). निश्चय म्हणजेच अध्यवसाय होय. 'निश्चयोऽध्यवसायः स्यात्' (अमर). कोणतीहि गोष्ट तडीस नेण्यासाठी या अध्यवसायाची अत्यंत जरुरी असते. सांख्यांच्या मतें 'अध्यवसायो बुद्धिः' = अध्यवसाय म्हणजेच बुद्धि होय. (सां. का.). ही बुद्धिच पुरुषाला भोगापवर्ग देते.

अध्यक्ष 'अध्यक्ष्णोति समन्तात् व्याप्नोति इति' (= सर्व बाजूंनी पाहणारा, व्यापणारा अतएव आयव्ययादि कृत्यांचा निरीक्षक अधिकारी म्हणजे अध्यक्ष होय.) (हलायुध). 'अध्यक्षाधिकृतौ समौ' असें म्हणून अमरकोशांत अध्यक्ष व अधिकारी हे समान मानले आहेत. वेदोत्तर व पाणिनीच्या कालांत एखाद्या खात्यावरच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला अध्यक्ष म्हणत. कौटिल्याच्या मतें एकेका विभागाचा उच्चतम प्रशासक म्हणजे अध्यक्ष होय. अर्थशास्त्रांत पंचवीस अध्यक्षांचीं नांवें आलीं आहेत. त्यांत अश्वाध्यक्ष व गवाध्यक्षहि आहेत. **पाहा** – अर्थशास्त्र. [पा. भा.]

अध्यात्म रामायण रामचरित्र कथन करणारा सुप्रसिद्ध ग्रंथ. याला अध्यात्मरामचरित किंवा आध्यात्मिक रामसंहिता, असेंहि म्हटलें आहे. हा उमामहेश्वरांच्या संवादांतून विस्तारलेला ग्रंथ आहे. उमेची प्रार्थना अशी– 'भक्तियोग हें जरी परमेश्वरप्राप्तीचें श्रेष्ठ साधन असलें, तरी परमेश्वराचें स्वरूप अनेकांनी अनेक प्रकारें वर्णिल्यामुळे त्याविषयी निश्चय होत नाही. तरी तुम्ही मला परमेश्वराचें खरें स्वरूप सांगावें.' त्यावर शिवाने तिला समग्र अध्यात्म रामायण सांगितलें.

अध्यात्म रामायणाचा मूलाधार वाल्मीकीचें रामायण हाच आहे. मात्र कांही ठिकाणीं कर्त्याने मूळ रामायणांत बदल केला आहे. उदा० दशरथाने केलेल्या पुत्रकामेष्टींत अग्नीने दिलेला पुरोडाश कौसल्या व कैकयी यांना मिळाला असतां, त्यांनी आपल्यांतला अर्धा अर्धा वांटा सुमित्रेला दिला, अशी कथा

अध्यात्म रामायणांत सांगितली असून वाल्मीकि रामायणांत तो अग्निदत्त पायस दशरथानेच सर्व राण्यांना वांटून दिला आणि त्यांतहि सुमित्रेला दोनदा दिला असें म्हटलें आहे.

या ग्रंथाचीं ७ कांडें व ६५ सर्ग आहेत. याचा रचनाकाल इ. स. १५ वें शतक हा मानलेला आहे. कोण्या शिवोपासक रामशर्म्यानें हा ग्रंथ रचला, असें भविष्य पुराणांत (प्रतिसर्ग पर्व) म्हटलें आहे. हा रामशर्मा म्हणजे रामानंदस्वामीच होय, असेंहि कांही लोक म्हणतात. पण संशोधक तें मान्य करीत नाहीत. या ग्रंथावर अद्वैतमताचा प्रभाव तर आहेच; शिवाय योगमार्ग व तंत्रमार्ग यांचाहि प्रभाव आहे. मुख्यतः वेदान्त व भक्ति यांची सांगड घालण्याकरितां गीतेच्या व श्रीमद्भागवताच्या आधारावर हा ग्रंथ लिहिलेला आहे, असें श्री. नरहर गणेश जोशी म्हणतात. हा ग्रंथ रामभक्तांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, असें त्यांत म्हटलें आहे. यांत रामाला विष्णूचा अवतार मानलें असून त्याचबरोबर तो निर्गुण परब्रह्म आहे, असेंहि म्हटलें आहे. इथे सीता ही योगमाया असून रावण हा रामाचा विरोधभक्त आहे. रामाचें अवतारकार्य वाचकांच्या डोळ्यांपुढे सतत राहावें, अशा तऱ्हेने अध्यात्म रामायणाची रचना आहे. बालकांडांतील रामहृदयस्तोत्रापासून तों उत्तर कांडांत कौसल्येला रामाने तत्त्वज्ञान उपदेशिलें आहे, तिथवर रामाचीं निरनिराळ्या लोकांनी केलेलीं स्तोत्रें या ग्रंथांत जागोजाग आढळतात. भागवतांतल्या कृष्णकथेचें अनुकरण करून या ग्रंथांत रामाच्याहि बाललीलांचें वर्णन केलें आहे. कृष्णाने अर्जुनाला गीता उपदेशिली, त्याच धर्तीवर अध्यात्मरामायणांत रामाने लक्ष्मणाला उपदेश केला असून तो रामगीता या नांवाने प्रसिद्ध आहे. या रामगीतेचा पहिला श्लोक असा–

आदौ स्ववर्णाश्रमवर्णिताः क्रियाः
कृत्वा समासादितशुद्धमानसः ।
समाप्य तत्पूर्वमुपात्तसाधनः
समाश्रयेत् सद्गुरुमात्मलब्धये ।।

(उत्तरकांड ५.७)

अर्थ – प्रथमतः मनुष्याने स्वत:च्या वर्णाश्रमांनुसार (नित्य-नैमित्तिक) कर्में आचरावीं. त्यायोगें अंतःकरणशुद्धि होईल. पुढे तिच्यामुळे शमदमादि साधनें प्राप्त झालीं असतां कर्माचरणांतच केवळ गुरफटून न राहतां आत्मज्ञानासाठी सद्गुरूचा आश्रय करावा.

त्यापुढे राम म्हणतो – जगामध्यें दिसणारें नानात्व अनित्य असून नाम-रूपांच्या पलिकडचें परब्रह्मतत्व हेंच काय तें एकमेव सत्य होय. मनुष्याच्या संसारबंधाला एकमेव कारण म्हणजे अज्ञान आणि त्याच्या नाशाचा एकच उपाय म्हणजे आत्मज्ञान होय. श्रद्धायुक्त होऊन आणि मन निर्मळ करून गुरुकृपेने 'तत्त्वमसि' इ. वाक्यांनी जीवात्मा व परमात्मा यांचें एकरूपत्व जाणावें आणि मेरुप्रमाणे निश्चल, सुखरूप होऊन राहावें.

तुलसीदासांच्या रामचरितमानसावर अध्यात्म रामायणाचा प्रभाव बराच आहे.

अध्यात्मरामायण कीर्तनलु सुब्रह्मण्यम् या कवीने तेलुगु भाषेंत रचलेला ग्रंथ. यांत शंभर 'कीर्तनां'मध्ये संपूर्ण रामायणकथा वर्णित आहे. हीं कीर्तनें १२ किंवा १४ चरणांचीं आहेत. कर्नाटक-सारंग, मंगलकैशिकी, ललितपंचमी, इ. अप्रसिद्ध राग या काव्यांत पाहायला मिळतात. १९ व्या शतकाच्या प्रारंभीं हा कवि होऊन गेला. याचीं हीं कीर्तनें आंध्रांत लोकप्रिय आहेत. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अध्यात्मसंकीर्तनलु अण्णम्माचार्यानें तेलुगु भाषेंत रचलेलीं आध्यात्मिक गीतें. अण्णम्माचार्य हा तिरुपतीच्या 'तल्लपाकम्' संगीतरचनाकारांपैकी एक होता. तिरुपति संस्थानाने हीं गीतें प्रकाशित केलीं आहेत. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अध्यापक 'उपेत्य अधीयते अस्मात् इति' (= ज्याच्या जवळ जाऊन अध्ययन केलें जातें तो अध्यापक होय). विशिष्ट ग्रंथांच्या अध्यापनामुळे अध्यापकांचे अनेक भेद मानलेले आहेत. चरणांतर्गत विषयांचें नियमपूर्वक अध्यापन करणाऱ्याला आख्याता म्हणत (अष्टा. १.४.२९). स्वाध्यायविषयक ग्रंथांचें अध्यापन करणाऱ्याला प्रवचनीय म्हणत. 'प्रवचनीयो गुरुः स्वाध्यायस्य' (अष्टा. ३.४.६८). वैदिक ग्रंथांचें प्रवचन करणाऱ्याला प्रवक्ता म्हणत (अष्टा. २.१.६). वेदांगांचें शिक्षण देणाऱ्याला अनूचान म्हणत. 'अंगाध्यायी अनूचानः' (बौधा. गृ. सू. १.४). उपनयन करणाऱ्या गुरूला अधीष्ट म्हणत. जेवढ्या कालासाठी शिष्य अध्यापनाबद्दल प्रार्थना करी, तेवढ्या कालावरून त्याला मासाध्यापक इ. नांवें मिळत. अष्टाध्यायींत दारुणाध्यापक, घोराध्यापक, इ. आणखी कांही अध्यापकांचे प्रकार सांगितले आहेत. विद्यार्थ्यांना कठोर शिस्तींत वागवून अध्यापन करणाऱ्यांना हीं नांवें होतीं. अनुभवी, सरळ व आदर्श अध्यापकांना काष्ठाध्यापक, परमाध्यापक, स्वाध्यापक असें म्हणत. घोकंपट्टी करून घेणाऱ्या अध्यापकाला भृशाध्यापक म्हणत. [पा. भा.]

अध्याय मोठ्या ग्रंथाच्या लहान अंशाला अध्याय असें नांव आहे. अध्यायसदृश अशीं विभागणीचीं आणखी कांही नांवें पुढील श्लोकांत दिलीं आहेत––

सर्गो वर्गः परिच्छेदोद्घाताध्याया‌ङ्कसंग्रहाः ।
उच्छ्वासः परिवर्तश्च पटलः काण्डमाननम् ।
स्थानं प्रकरणं चैव पर्वोल्लासाह्निकानि च ।

अर्थ–– सर्ग, वर्ग, परिच्छेद, उद्घात, अध्याय, अंक, संग्रह, उच्छ्वास, परिवर्त, पटल, कांड, आनन, स्थान, प्रकरण, पर्व, उल्लास, आह्निक, (इ. नांवें संस्कृत ग्रंथकारांनी आपल्या ग्रंथांच्या परिच्छेदांना वा प्रकरणांना दिलेलीं आहेत).

अध्यारोप 'असर्पभूतरज्जौ सर्पारोपवत् अजगद्रूपे ब्रह्मणि जगद्रूपारोपवत् वस्तुनि अवस्त्वारोपोऽध्यारोपः' (= सर्प नसलेल्या रज्जूवर सर्पाचा, त्याचप्रमाणे जगद्रूप नसलेल्या ब्रह्मावर जगाचा आरोप होतो, तद्वत् अवस्तूवर वस्तूचा आरोप करणें याला अध्यारोप म्हणतात). ब्रह्म सत्य, जग मिथ्या व जीवब्रह्मैक्य, या तीन गोष्टींची सिद्धि वेदान्तशास्त्र करतें. पण अज्ञ जनांच्या समजुतीप्रमाणे जग सत्य आहे, असें गृहीत धरून व सृष्टीचे उपक्रमोपसंहार सांगून नंतर 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म' (= ब्रह्म हें एकमेव व अद्वितीय आहे), हा सिद्धान्त सिद्ध करावा लागतो. म्हणून वेदान्ताच्या प्रकरण-ग्रंथांच्या प्रारंभीं 'अध्यारोपापवादाभ्यां निष्प्रपञ्चं प्रपञ्च्यते' (=अध्यारोप व अपवाद या दोहोंच्या साहाय्याने निष्प्रपंच ब्रह्माचा प्रपंच केला जातो), असें म्हटलेलें असतें. [ब्र. सि. मा.]

अध्यावाहनिक स्त्रीधनाच्या सहा प्रकारांपैकी एक. त्याचें लक्षण पुढील श्लोकांत केलें आहे –

यत् पुनर्लभते नारी नीयमाना तु पैतृकात् ।
अध्यावाहनिकं नाम स्त्रीधनं परिकीर्तितम् ।।

(कात्या. स्मृ.)

अर्थ––पित्याच्या घरांतून पतिगृहीं जातांना स्त्रीला जें धन मिळतें, त्याला, अध्यावाहनिक स्त्रीधन, असें म्हणतात. [सं. इं. डि.]

अध्यास अद्वैतदर्शनांतला एक पारिभाषिक शब्द. अयथार्थ-ज्ञान अर्थात् मिथ्याज्ञान किंवा 'अतस्मिंस्तद्बुद्धिः' म्हणजे तें नसलेल्या ठिकाणीं तें आहे अशी बुद्धि होणें, याला अध्यास म्हणतात. शुक्तीच्या ठिकाणीं रुप्याचा किंवा रज्जूच्या ठिकाणीं सर्पाचा भ्रम होणें, हीं याचीं उदाहरणें आहेत.

यांतलें अधि हें पद महत्त्वाचें आहे. त्याचा अर्थ अधिष्ठान असा आहे. आचार्यांनी अधिष्ठानाची सत्ता स्वीकारून बौद्धांचा शून्यवाद टाळला आहे. अध्यासांत दोन पक्ष असतात. ज्याच्यावर आरोप होतो तो एक पक्ष व ज्याचा आरोप होतो तो दुसरा पक्ष. उदा० रज्जु हा एक पक्ष व सर्प हा दुसरा पक्ष. या दोहोंमुळे अध्यास होतो. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हा अद्वैतवेदान्ताचा परम सिद्धान्त आहे व तो सिद्ध करण्यासाठी शंकराचार्यांनी अध्यासाचा अवलंब केला आहे. मिथ्या जगाचा सत्य ब्रह्म या अधिष्ठानावर भ्रमाने आरोप होतो हें सिद्ध करून त्यांना ब्रह्माची सत्यता व जगन्मिथ्यत्व पटवायचें आहे.

तार्किकांच्या मतें अध्यास हा प्रमाणाने सिद्ध होणारा नाही. पण आचार्यांच्या मतें लोकव्यवहार तसा होत असल्यामुळे अध्यास संभवनीय आहे. परमार्थतः दोन धर्मींचें तादात्म्य नसणें व धर्मांचें मिश्रण न होणें याला विवेक म्हणतात. या विवेकाच्या अभावामुळे अध्यास होतो. आत्मा व देहादि हे दोन पृथक् पदार्थ आहेत. तसेंच त्यांचे अनुक्रमें चैतन्य व जाड्य हे धर्महि भिन्न आहेत. तेव्हा वस्तुतः धर्मी–धर्मींचा व धर्मी व धर्म यांचा अध्यास संभवूं नये. पण अविवेकामुळे तो संभवतो. परस्पर भेदज्ञान न झाल्यामुळे देहावरच आत्म्याचा आरोप होतो व जन्ममरणादि देहाचे धर्म आत्म्यावर आरोपित होतात. म्हणजेच आत्मा व देह यांची भिन्नता न कळल्यामुळे 'मी अमुक आहें व हे अमके तमके पदार्थ माझे आहेत,' असें वाटूं लागतें. सत्यानृताचें मिथुनीकरण होऊन (खऱ्या खोट्याच्या मिश्रणानें) हा अध्यास निर्माण होतो. कारण सत्याच्या ज्ञानावांचून मिथ्याज्ञानाचा संभव नाही. सत्य म्हणजे चिदात्मा व अनृत म्हणजे देह, इंद्रियें इत्यादि. या दोन धर्मींचें मिथुनीकरण झालें, की 'मी मनुष्य आहें व पुत्र-भार्यासंपत्ति हीं माझीं आहेत', असा संसर्गरूप अध्यास होतो. अध्यासावस्थेंत सत्य व मिथ्या यांचा परस्परविवेक होऊं शकत नाही.

अध्यासाचें स्वरूपलक्षण शंकराचार्यांनी पुढीलप्रमाणे केलें आहे —

स्मृतिरूपः परत्र पूर्वदृष्टावभासः

अर्थ – एखाद्या पदार्थात तत्सदृश अशा दुसऱ्या एखाद्या पूर्वदृष्ट पदार्थाचा स्मृतिरूप अवभास होणें.

शिंप पाहिल्यावर पूर्वदृष्ट स्मृतिरूप रुप्याचा व रज्जु पाहिल्यावर तसाच सर्पाचा त्यांवर आरोप होत असतो. हाच अध्यास होय. रज्जु पाहिल्यावर प्रथम सर्पाचें स्मरण व त्यानंतर सर्पाचें ज्ञान अशी ती प्रक्रिया आहे. ही सर्पज्ञानाची

स्मृति सर्पाहून भिन्न वस्तु आहे. अधिष्ठानाचें ज्ञान, म्हणजेच शिंप ही शिंप आहे व रज्जु हा रज्जु आहे, असें ज्ञान झालें, की त्यावरचीं रूपें व सर्प यांचा अध्यास दूर होतो.

अध्यास हा सत् व असत् यांहून विलक्षण अतएव अनिर्वचनीय आहे. रज्जूवर भासलेला सर्प हा सत् नव्हे. कारण तो सत् असता, तर त्याचा बाध झाला नसता. सद्वस्तूचा कधीहि बाध होऊं शकत नाही. तो असत् म्हणावा, तर असत्पदार्थाचें कधीहि ज्ञान होत नसल्यामुळे सर्पाचें ज्ञानच होऊं नये. पण तें होतें. म्हणून अध्यासाचें निरूपण अनिर्वचनीय या शब्दानें करावें लागतें.

निरुपाधिक व सोपाधिक असे अध्यासाचे दोन भेद आहेत. दोष किंवा कर्म यांनी क्षुब्ध झालेल्या अज्ञानापासून उत्पन्न होणारा व तत्त्वज्ञानाचा विरोधी असा जो भ्रम, व त्यामुळे निरुपाधिक चिद्रूप आत्म्याच्या ठिकाणीं अहंकाराचा अध्यास होणें, याला निरुपाधिक म्हणतात. तत्त्वज्ञानाने तो बाधित होतो. अविद्येमुळे मायोपाधिक ब्रह्माच्या ठिकाणीं जीव व ईश्वर या रूपाने भेदाचा आभास होणें, याला सोपाधिक म्हणतात. उपाधीच्या निवृत्तीने त्याचा निरास होतो.

अध्यासाचे ज्ञानाध्यास व अर्थाध्यास असे आणखीहि दोन भेद आहेत. ज्ञानाध्यासांत एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूवर आरोप होतो. सर्प व सर्पज्ञान हीं भिन्न आहेत. सर्पाचा अध्यास म्हणजे अर्थाध्यास व सर्पज्ञानाचा अध्यास म्हणजे ज्ञानाध्यास होय. चैतन्यस्वरूप ब्रह्मावांचून जेवढे म्हणून व्यावहारिक व प्रातिभासिक पदार्थ आहेत, त्या सर्वांचा ब्रह्माच्या ठिकाणीं आरोप करणें, याला अर्थाध्यास म्हणतात. आत्मसाक्षात्कार होण्यापूर्वी ज्यांचा बाध होत नाही, ते पदार्थ व्यावहारिक व आत्मज्ञानापूर्वी ज्यांचा बाध होतो, ते पदार्थ प्रातिभासिक होत. [वैदिक शांकर अद्वैतमतानुवाद]

अध्रिगुप्रैष पशुयागांतील पशुहननाच्या अधिष्ठात्री देवतेला अध्रिगु असें नांव आहे. 'अध्रिगुर्वै देवानां शमिता' (= अध्रिगु हा देवांचा शमिता अर्थात् शामित्र कर्म करणारा होय), असें ऐतरेय ब्राह्मणांत म्हटलें आहे (२. ७). तैत्तिरीय ब्राह्मणांत (३. ६. ६) अध्रिगुप्रैषाचे कांही मंत्र दिले आहेत. त्यांचा प्रारंभ 'दैव्याः शमितार उत मनुष्या आरभध्वम्' असा आहे. या मंत्रांत दिव्य आणि मानुष शमित्यांना पशूला यज्ञभूमीवर आणण्यासाठी आवाहन केलेलें आहे. वध्य पशूचे आप्तेष्ट पशुहत्येला अनुज्ञा देतील व हननानंतर पशूचे अवयव त्या त्या अवयवांच्या देवतांत विलीन होतील, असा विश्वास तिथे प्रकट केलेला आहे.

या मंत्रांचा कांही भाग ऐकूं न जाईल इतका हळू म्हणायचा असतो, तर कांही भाग तीन वेळां म्हणायचा असतो. [हि. ध.]

अध्वरकल्पेष्टि 'यस्य भ्रातृव्यः सोमेन यजते' (= ज्याचा चुलतभाऊ (शत्रु) सोमयाग करीत आहे), त्याने ही इष्टि करावी, असें मैत्रायणी संहितेंत म्हटलें आहे (२. १. ७). त्यावरून सोमयागाचें फल त्याला मिळूं नये, या उद्देशाने ही इष्टि असते. शत्रूच्या यज्ञांत मुख्य दिवसाचें अनुष्ठान असतें, त्या दिवशीं तीन्ही काळांत (त्रिकाळ) ही इष्टि करायची असते. अग्नाविष्णू, सरस्वती व बृहस्पति, या या इष्टीच्या देवता होत.

अध्वर्यु 'अध्वरं याति इति' (=अध्वरांत (यागांत) जातो तो – अमर) यज्ञांतला एक प्रमुख ऋत्विज्. अध्वर म्हणजे यज्ञ. ध्वरा = हिंसा ज्यांत नाही तो. यज्ञामध्ये पशुयाग असला, तरी यज्ञांतील हिंसा ही हिंसा नव्हेच, असें शास्त्रकारांनी सांगितलें आहे ('तस्माद्यज्ञे वधोऽवधः'–मनु. ५. ३९). अशा अध्वरामध्ये प्रमुखत्व स्वीकारतो, तो अध्वर्यु होय. यज्ञामध्ये विविध कामें मंत्र म्हणून अध्वर्यूला करावीं लागतात. त्या वेळीं कोणते मंत्र म्हणायचे ते ब्राह्मणग्रंथांमध्ये सांगितलेले असतात. हे मंत्र यजुर्वेदांत सांगितले आहेत म्हणून यजुर्वेदास अध्वर्युवेद असेंहि म्हटलें आहे. अध्वर्यु हा साधारणपणे कोणतेंहि कार्य आरंभिण्यापूर्वी यजमान व ब्रह्मा यांची अनुज्ञा घेतो व अन्य ऋत्विजांना आज्ञा देतो. सामान्यतः अनेकांच्याकडून तीं तीं कामें करवून घेण्याची जबाबदारी अध्वर्यूवर असते. या आज्ञापनास प्रैष असें म्हणतात. उदाहरणार्थ––

सोमाय राज्ञे क्रीताय प्रोह्यमाणायानुब्रूहि, ब्रह्मन् वाचं यच्छ, सुब्रह्मण्य सुब्रह्मण्यामाह्वय, प्रतिप्रस्थातः सवनीयान् निर्वप ।

(सत्या. श्रौ. सू. ८. १)

अर्थ –– (हे होत्या,) विकत घेतलेल्या सोमराजाला नेलें जात आहे त्यासंबंधीं मंत्र म्हण. हे ब्रह्या, वाङ्नियम कर. सुब्रह्मण्या, सुब्रह्मण्यानामक सामगान कर. हे प्रतिप्रस्थात्या, सवनीय पुरोडाशांचा निर्वाप कर.

यांत होता, ब्रह्मा, सुब्रह्मण्य आणि प्रतिप्रस्थाता या चौघांना अध्वर्यूने वेगवेगळे प्रैष दिलेले आहेत. अध्वर्यु हा शब्द कोणतेंहि काम पुढाकार घेऊन करणारा या अर्थी रूढ झाला आहे, तो याचमुळे. अध्वर्यूच्या गटामध्ये प्रतिप्रस्थाता, नेष्टा व उन्नेता असे तीन ऋत्विज असतात. कोणत्याहि श्रौतयागामध्ये अध्वर्यु असावाच लागतो. आहुति देण्याचें प्रमुख काम

अध्वर्युच करतो. अध्वर्यूचें काम खरोखरीच अवघड आहे. त्याला अनेक प्रकारचीं कामें विधियुक्त पार पाडायचीं असतात; तसेंच तीं करीत असतांना प्रत्येक कृतीस मंत्र म्हणावे लागतात. हे मंत्र बरेचसे याजुष असतात. हे छंदोरहित असून लहान-मोठेहि असतात. कोणत्याहि कामांत चूक झाल्यास प्रायश्चित्त करावें लागतें. अध्वर्यु हा चपळ असावा लागतो. त्याचें पाठांतर अस्खलित असलें पाहिजे. त्याला पुढील कर्माचें चांगलेंच अवधान पाहिजे. एक कर्म करीत असतांना पुढे चौथ्या कर्मा-पर्यंत त्याचें लक्ष गेलें पाहिजे. 'आचतुर्थात् कर्मणोऽभिसमीक्षेत। इदं करिष्यामीदं करिष्यामीति' (आप. श्रौ. सू. १. २. ११). अध्वर्यूच्या या चपळतेवरून तैत्तिरीय आरण्यकांत अध्वर्यूला चक्षु म्हटलें आहे (१०. ६४). म्हणजे अध्वर्यूची हालचाल डोळ्यांइतकी जलद होणें आवश्यक असतें असा त्याचा अर्थ. सोमयागांत बहुतेक वेळां अध्वर्यूलाच सोमाचा याग करावा लागतो. त्याला सोमपानहि अनेक वेळां करावें लागतें. इतर ऋत्विजांच्या कामाची माहितीहि अध्वर्यूला असावी लागते. यज्ञीय कर्मकांडाचा विस्तार झाला, तसतसे अध्वर्यूमध्येहि भेद पडलेले दिसतात. प्राच्याध्वर्यु हा देशभेद आहे. शाखाभेदाने कर्मकांडांतहि भेद पडले व त्या त्या शाखेप्रमाणे आध्वर्यव करणाऱ्या ऋत्विजाला कठाध्वर्यु, कलापाध्वर्यु अशीं नांवें पडलीं आहेत. **पाहा** – अग्निष्टोम. [विद्याधरशास्त्री भिडे; पा. भा.]

अध्वा मार्ग, पंथ. पण तंत्रशास्त्रांत जगत् किंवा सृष्टि असा त्याचा अर्थ आहे. तंत्रमतें अध्वा शुद्ध व अशुद्ध असा दोन प्रकारचा असतो. शुद्ध अध्वा म्हणजे महामाया हें ज्याचें उपादान कारण आहे, असें सात्त्विक जगत् होय. शिवाची परिग्रहशक्ति अचेतन व परिणामशालिनी मानली जाते. तिलाच बिंदु म्हणतात. शुद्ध बिंदूचें नांव महामाया असून तो सत्त्वमय जगताच्या उत्पत्तींत उपादानकारण बनतो. अशुद्ध बिंदु म्हणजे माया. ती प्राकृत जगताचें उपादान कारण होते. महामायेच्या क्षोभांतून शुद्ध अध्वा व मायेच्या क्षोभांतून अशुद्ध किंवा मायाध्वा उत्पन्न होतो. [बलदेव उपाध्याय]

अनंग त्रयोदशी (१) मार्ग० शु. १३ शी. या तिथी-पासून एक वर्षभर प्रत्येक १३शीस अनंगाची (काम) निरनिराळ्या नांवांनी, फुलांनी आणि नैवेद्यांनी पूजा (हे. व्र. २. १-८). (२) चैत्र किंवा भाद्र० शु. १३ शी. प्रतिमासीं वस्त्रावर कामदेवाची प्रतिमा काढून तिची पूजा (पु. चिं. २२३).

अनंगदान व्रत वेश्यांसाठी काम्य व्रत. रविवारीं पुनर्वसु, पुष्य किंवा हस्त नक्षत्र आलें असतां, त्या दिवशीं वेश्येने विष्णु व काम यांची पूजा करावी, विद्वान् ब्राह्मणाला विष्णुरूप मानून त्या रात्रीं रतिसुख द्यावें व विष्णुप्रतिमा आणि शय्यादि साहित्य दान द्यावें, असा याचा विधि आहे. याप्रमाणे तेरा महिने व्रत करायचें असतें. याची कथा अशी –

नारदाच्या शापाने कृष्णाच्या सोळा हजार स्त्रिया पुढील जन्मीं वेश्या झाल्या. पुढे त्यांना दाल्भ्य ऋषीने हें व्रत सांगून त्यांचा उद्धार केला. [मत्स्य पु. ७०]

अनंगपा चौऱ्यांयशी सिद्धांपैकी एक. हा जातीने शूद्र असून गौड देशाचा रहिवासी होता. हा डोंबि-पाच्या तिसऱ्या पिढींत येतो. [पु. त. नि.]

अनंगरंग कल्याणमल्लाचा कामशास्त्रावरील एक ग्रंथ. कल्याणमल्ल हा १५ व्या शतकांत होऊन गेला. लोदी घराण्यांतील लाडखान नामक एका सरदाराचा त्याला आश्रय होता. आपल्या धन्यासाठीच कल्याणमल्लाने हा ग्रंथ लिहिला. रतिरहस्य व कामसूत्र या ग्रंथांचा आधार घेऊन त्याने हा ग्रंथ लिहिलेला आहे.

या क्षणभंगुर विश्वांत एकच गोष्ट सत्य आहे व ती म्हणजे कामिनीसमागमाचा आनंद. हा आनंद ब्रह्मास्वादसहोदर आहे, असें कल्याणमल्लाचें मत आहे. [कामकल्प]

अनंगवज्र हा पद्मवज्राचा शिष्य असून ८४ सिद्धांपैकी एक आहे. पूर्व भारतांतील गोपाल नांवाच्या राजाचा हा मुलगा असें मानलें जातें. याच्या अनेक ग्रंथांचे तिबेटी अनुवाद तिबेटांतल्या तंजूरमध्ये सांपडतात. हा वज्र-यानी पंथाचा एक आचार्य होता. प्रज्ञोपायविनिश्चयसिद्धि हा याचा संस्कृत ग्रंथ त्या पंथांत महत्त्वाचा मानला जातो. [आर्यसंस्कृति]

अनंगव्रत (अनंग = शंकर) काम्य व्रत. स्त्री व पुरुष दोघांनाहि हें करतां येतें. व्रतारंभ मार्ग० शु. १३ शीस करतात. व्रताची देवता शंकर असून प्रत्येक महिन्यांत भिन्न भिन्न नांवांनी त्याची पूजा केली जाते. पूजा, उपोषण व जागरण या तीन्ही गोष्टींना या व्रतांत सारखेंच महत्त्व आहे. व्रतावधि एक वर्ष. उद्यापनाच्या वेळीं अर्धनारी-नटेश्वराची सुवर्णप्रतिमा करून तिला सर्व राजोपचार समर्पण

करतात. व्रताचें फल – संपत्ति व आयुरारोग्य यांची प्राप्ति. [व्रतराज]

अनंगहर्ष (८ वें शतक) एक संस्कृत नाटककार. तापसवत्सराज हें याचें सुप्रसिद्ध नाटक होय. हें उदयन कथाचक्राशीं संबद्ध आहे. यांत वत्सराजाच्या विरही अवस्थेचें प्रामुख्याने प्रणयन आहे. [सं. सा. इ.]

अनाग्निदग्ध अग्निदग्ध पाहा.

अनघाव्रत तिथिव्रत. मार्ग० व. ८ मीस गोमयाने पवित्र केलेल्या वेदीवर अनघ व अनघा य नांवांनी दोन शहाळीं स्थापन करून त्यांची पूजा करावी व पुढे एक वर्षपर्यंत प्रत्येक व. ८ मीस हें व्रत चालवून मग त्याची सांगता करावी, असें हेमाद्रि सांगतो. फल – पापनाश. [हे. व्र.]

अनघाष्टमी मार्ग० व. ८ मी. या दिवशीं वासुदेव व लक्ष्मी यांच्या दर्भमूर्ति बनवून त्यांची पूजा करतात. पूजेचा मंत्र 'अतो देवा...' (ऋ. १. २२. १६) हा आहे. [हे. व्र.]

अनंत (१) विष्णूची तापसी कला. सात्वत तंत्राचे अनुयायी याला संकर्षण म्हणतात. तो आपल्या सहस्र फणांपैकी एका फणेवर पृथ्वी धारण करतो. याच्या कपाळांतून रुद्र अकरा रूपांनी प्रकट झाला. नागराजे अनंताच्या कृपाप्रसादासाठी त्याची प्रार्थना करतात. नारद–तुंबरु त्याची कीर्ति गातात (भाग. पु. ३. २६. २५; ४. ९. १४; विष्णु पु. २. ५. १३–२७). देवकीचा सातवा पुत्र बलराम व अनंत हे एकच होत. जलप्रलयाच्या वेळीं अनंत हा विश्वाला आपल्याकडे खेचून घेतो (भाग. पु. १०. ६८. ४६). याला शेष असेंहि म्हणतात. श्रीकृष्णाने 'अनन्तश्चास्मि नागानाम्' म्हणून त्याला आपली विभूति मानलें आहे (गीता १०. २९). [पु. इं.]

(२) कात्यायन श्रौतसूत्राचा टीकाकार. प्रज्ञापरिशिष्टभाष्य या ग्रंथाचा कर्ता. [म. ज्ञा. को.]

(३) (१४ वें शतक) गोत्र गार्ग्य. विदर्भातला राहणारा. जातकपद्धति या ग्रंथाचा कर्ता. [भा. ज्यो.]

(४) (१६ वें शतक) अनंतसुधारस नांवाच्या पंचांगगणिताचा कर्ता. हा ग्रंथ सूर्यसिद्धांताला अनुसरणारा आहे.

(५) (१८ वें शतक) एक मराठी कवि. हा मूळचा सातारा जिल्ह्यांतील मेथवड या गांवचा राहणारा. पुढे याला श्रीरामदास स्वामींनी निलंगाबादेस मठ स्थापून दिला होता व हा तिथेच राहत असे. याची हजार पंधराशे कविता सध्या प्रसिद्ध आहे व आणखीहि कांही उपलब्ध झाली आहे. याने सुलोचनागहिंवर, सुलोचना आख्यान व रामदासस्तुति या नांवाचीं काव्यें लिहिलीं आहेत. याच्या उपलब्ध काव्यांतील अनेक उल्लेखांवरून याची बरीच कविता अजून अनुपलब्ध असावी, असें वाटतें. [म. सा.]

(६) अनंत चतुर्दशीस पूजा करून हाताला बांधतात, तो १४ गांठींचा दोरा.

अनंतगुंफा उडीसांतल्या भुवनेश्वरजवळ खंडगिरी नांवाचीं जैनांचीं लेणीं आहेत. हीं इ. स. च्या पहिल्या शतकांत खोदलेलीं आहेत. त्यांतल्या एका गुंफेचें नांव अनंतगुंफा असें आहे. त्या गुंफेंत एक चक्र व चार घोड्यांच्या रथांत बसलेल्या सूर्याची मूर्ति कोरलेली आहे. हा सूर्यरथ अंधकाररूपी राक्षसाच्या अंगावरून जात आहे. अशा प्रकारच्या सूर्यमूर्ति बोधगया, भाजें या ठिकाणींहि आढळतात. [डि. हिं. इ.]

अनंतचतुर्दशी (१) भाद्र० शु. १४ शीस हें व्रत करतात. हें काम्य व्रत असून याचा अवधि चौदा वर्षांचा आहे. गतवैभव परत मिळावें, या हेतूने मुख्यतः हें व्रत सांगितलें आहे. हें व्रत सार्वत्रिक नाही. कोणी उपदेशिल्यास किंवा अनंताचा दोरा सहजपणें सांपडल्यास हें व्रत घेतात व मग तें त्या कुळांत चालू राहतें. अनंत अर्थात् विष्णु ही याची मुख्य देवता असून शेष व यमुना या गौण देवता आहेत. पूजेचा विधि पुढीलप्रमाणे —

सकाळीं नदीवर स्नान करून सुशोभित अशी मांडवी तयार करतात. तिच्याखाली सर्वतोभद्र मंडल काढून त्यावर तांब्याचें किंवा रुप्याचें पूर्णपात्र ठेवून त्यांत अष्टदळ काढतात. त्यावर सात फणांचा दर्भांकुरांनी बनविलेला शेष नाग ठेवून त्याच्यापुढे चौदा गांठींचा रेशमी दोरा ठेवतात. कुंभाला वस्त्रयुग्माचें वेष्टन करतात. कुंभांतल्या जलाला यमुना म्हणतात. प्रथम यमुना व शेष यांचें पूजन झाल्यावर मग त्याच पूर्णपात्रांत अग्न्युत्तारण करून बसविलेल्या अनंतमूर्तीचें पुढील मंत्राने ध्यान करतात––

नवाम्रपल्लवाभासं पिङ्गभ्रूश्मश्रुलोचनम् ।
पीताम्बरधरं पद्मशङ्खचक्रगदाधरम् ॥
अलङ्कृतपयोराशिं विश्वरूपं विचिन्तये ।

अर्थ – नूतन आम्रपल्लवाप्रमाणे ज्याची कांति आहे, ज्याच्या भुवया, मिशा व डोळे पिंगट आहेत, जो पीतांबर नेसलेला व शंख-चक्र-गदा धारण करणारा आहे व ज्याने सागराला भूषविलें आहे, अशा विश्वरूपाचें (विष्णूचें) मी ध्यान करतों.

नंतर षोडशोपचारें पूजा करतात. या पूजेंत अंगपूजा, आवरण पूजा, अष्टोत्तरशतनामपूजा अशा आणखी अंगभूत पूजा असतात. पुष्पांजलि झाल्यावर अर्घ्य देतात. मग दोरकाची प्रार्थना करून तो चौदा गांठींचा दोरा हातांत किंवा गळ्यांत बांधतात आणि जुन्या दोऱ्याचें विसर्जन करतात. वड्या घारग्यांचें वायन देऊन व्रतदेवतांचें विसर्जन करतात. सांगतेसाठी दंपतीभोजन घालतात.

चौदा वर्षें पूर्ण झाल्यावर व्रताचें उद्यापन करतात. त्याचा विधि असा–

त्रयोदशीस एकभुक्त. चतुर्दशीस तीळ, आवळे यांचा कल्क अंगाला लावून यथाविधि स्नान. अनंताची पूजा. रात्रौ अश्वत्थ-समिधा, तिल, व्रीहि, यव, घृत या द्रव्यांनी व्रतदेवतांचें हवन. कथाश्रवण. पूर्णिमेस प्रातःकाळीं पुन्हा पूजा. नंतर आचार्यपूजन, प्रतिमादान, गोप्रदान, दक्षिणादान, आशीर्वाद-ग्रहण, ब्राह्मण व आंधळे–पांगळे यांस अन्नदान व नंतर विष्णु-स्मरण करून पारण्याचें भोजन. या व्रताची कथा अशी––

कौरव–पांडवांचें द्यूत झालें. त्यांत युधिष्ठिर सर्वस्वीं हरला. पांडवांना बारा वर्षें वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास पत्करावा लागला. एके दिवशीं श्रीकृष्णाने वनांत जाऊन पांडवांची भेट घेतली व आपत्तींतून मुक्त होण्यासाठी युधिष्ठिराला अनंतचतुर्दशीचें व्रत सांगितलें. युधिष्ठिराने त्याविषयीं प्रश्न केला असतां श्रीकृष्णाने त्याला एक कथा सांगितली ––

कृतयुगांत सुमंतु नांवाचा एक आचारसंपन्न ब्राह्मण होता. त्याला शीला नांवाची एक मुलगी झाली. तिच्या जन्मानंतर तिची आई मृत्यु पावली आणि सुमंतूने दुसरा विवाह केला. त्याला ती पत्नी कर्कशा मिळाली. पुढे शीलाचें लग्न कौंडिण्य मुनीशीं झालें. शीलाची वरात जातेवेळीं सुमंतूने पत्नीला म्हटलें, की 'जावईबुवांना कांहीतरी आंदण देऊं या.' पण कर्कशेने त्या गोष्टीला संमति दिली नाही. उलट जावयाचा आणि लेकीचा अपमानच केला. दुःखी होऊन शीला आपल्या पतीबरोबर निघाली. वाटेंत एका नदीच्या कांठीं कांही स्त्रिया एकत्र जमून व्रत करीत असलेल्या तिला दिसल्या. तें व्रत अनंताचें होतें. शीलेने तें त्याच ठिकाणीं आचरिलें आणि हातांत अनंताचा दोरा बांधून ती पतीसह घरीं आली. त्या व्रताच्या पुण्याने तिचा संसार समृद्ध झाला. कौंडिन्याला त्या वैभवाची धुंदी चढली. एके दिवशीं एकांतांत असतां त्यानें शीलेच्या हातांतला तो दोरा तोडून अग्नींत टाकला. त्यामुळे अनंताचा कोप झाला. लक्ष्मी आली तशी निघून गेली. शीलेने त्याला त्याची चूक समजावून दिली. मग तो अनंताला प्रसन्न करून घेण्यासाठी वनांत निघाला. भेटेल त्या प्राण्याला 'अनंत कुठे भेटेल' म्हणून विचारूं लागला. कोणी त्याला सांगेना. शेवटीं तो आत्महत्येस प्रवृत्त झाला. मग अनंताने ब्राह्मणाच्या रूपाने त्याला दर्शन दिलें. नंतर परत घरीं येऊन त्याने अनंतव्रत केलें. त्या योगें त्याचें गतवैभव त्याला फिरून प्राप्त झालें (व्रतराज).

या व्रतांत सर्पपूजेचे अवशेष दिसतात. प्राचीन नागपूजक लोक वैष्णवधर्मांत प्रविष्ट झाल्यावर, ही नागपूजा व्रतरूपाने वैष्णवधर्मांत आली असावी.

(२) जैन व्रत. व्रतकाल भाद्र० शु. ११ शी ते पूर्णिमा. प्रथमचे तीन दिवस एकाशन, चतुर्दशीस उपवास आणि पूजा व पूर्णिमेस पुन्हा एकाशन. या प्रकारें १४ वर्षें व्रत करतात. हें व्रत अयोध्येजवळच्या पद्मखंड गांवीं सोमशर्मा ब्राह्मणाने आपल्या पत्नीसह केलें व मृत्यूनंतर स्वर्गादि सुखें भोगून मोक्ष मिळविला. [जै. व्र. वि. सं.]

अनंततनय

एक मराठी कवि. समग्र महाभारत न रचतां त्यांतील मधलेंच एखादें पर्व मराठींत सांगणारे अनेक कवि आढळतात; त्यांपैकी अनंततनय हा एक होय. त्याने दोन-चार पर्वें लिहिलेलीं असावीं, असें दिसतें. परंतु त्यांतलें एकच उपलब्ध आहे आणि तें म्हणजे उद्योगपर्व. हें रचण्याचें कारण त्याने पुढीलप्रमाणे दिलें आहे ––

पूर्वीं मुक्तेश्वरें । अनेक कवींच्या ईश्वरें ।
आरंभिलें भारत सारें । भाषाधारें रचावया ।।
परी तें न गेलें समाप्ती । ऐसें तर्कुनी सर्व मती ।
चतुर्थानंतरें पंचमीं प्रीती । 'उद्योगीं' मती संचरली ।।

अनंततनयाचें नांव त्र्यंबक असावें, असें उद्योगपर्वांतील अनेक उल्लेखांवरून दिसतें –

ही त्र्यंबकें आपुली वाणी । वाक्पुष्पांची गुंफिली श्रेणी ।
अर्पिली असे श्रीकृष्णचरणीं । अर्थ सुगंधें घमघमीत ।।

या व्यतिरिक्त या कवीचें वसतिस्थान, काल, इत्यादींबद्दल माहिती उपलब्ध नाही. याच्या उद्योगपर्वाची ओवी संख्या अदमासें सहा हजार आहे. याने आपला ग्रंथ व्यासकृतीवरून फार काळजीपूर्वक लिहिला असून प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं त्यांत मूळ भारताच्या किती व कोणत्या अध्यायांतील कथा

भागांचा समावेश केला आहे, हेंहि सांगितलें आहे. प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं उपसंहारादाखल याने एक एक श्लोक घातला असून, त्या श्लोकांत त्या त्या अध्यायांतला कथाभाग सारांशरूपाने सांगितलेला आढळतो. [म. सा.]

अनंत तृतीया एक व्रत. भाद्रपद, वैशाख किंवा मार्गशीर्ष या मासांच्या शु. ४ थीपासून एक वर्षपर्यंत. व्रताची देवता गौरी असून प्रत्येक मासीं वेगवेगळ्या फुलांनी तिची पूजा करतात. [च. व. चिं.]

अनंतदेव (१) (१७ वें शतक) पैठणचे एकनाथ महाराज यांच्यापासून चौथा पुरुष. याच्या वडिलांचें नांव आपदेव. या आपदेवाने मीमांसान्यायप्रकाश नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. याच्या घराण्यांत मीमांसाशास्त्राचें अध्ययन परंपरेने चालू होतें. अल्मोडा व नैनिताल या प्रदेशावर राज्य करणारा बाजबहाद्दुर (इ. स. १७ वें शतक) हा चंद्रवंशी राजा अनंतदेवाचा आश्रयदाता होता. त्याच्याच प्रेरणेने अनंत-देवाने स्मृतिकौस्तुभ नांवाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ विस्तृत असून लोकप्रियहि आहे. भारतांतील सर्वश्रेष्ठ न्यायालयाने हा ग्रंथ प्रमाणभूत मानला आहे.

या ग्रंथांतील विषयांची संक्षिप्त यादी पुढीलप्रमाणे –– गर्भाधानादि संस्कार, त्यांचे योग्य काल, नागबलि व नारायण-बलि, कृच्छ्रादि प्रायश्चित्तें, दत्तकपुत्राचा विचार, ब्रह्मचारी धर्म, इत्यादि. दत्तकाविषयीं याचीं मतें अशीं – पुतण्या हा दत्तक घेण्यास सर्वांहून अधिक लायक होय. तो नसेल तर सगोत्र सपिंड, असगोत्र सपिंड, सगोत्र असपिंड व मग स्वतःच्या जातीचा, अशा क्रमाने मुलगा दत्तक घ्यावा. कन्येचा व बहिणीचा पुत्र दत्तक घेऊं नये. दत्तक हा आईबापांचा एकुलता किंवा ज्येष्ठ पुत्र असतां कामा नये. उपनयन संस्कार जनक पित्याच्या घरीं झाल्यास, तो दोन्ही गोत्रांचा मानावा. त्याच्या विवाहाच्या वेळीं दोन्ही कुलांचें गोत्र विचारांत घ्यावें. दत्तक घेतल्यानंतर औरस पुत्र झाल्यास, त्या दोन्ही मुलांना बापाच्या मालमत्तेचा समान वांटा मिळावा. धार्मिक विधि करून मुलगीहि दत्तक घेतां येते.

याशिवाय संस्कारकौस्तुभ, राजधर्मकौस्तुभ, अग्निहोत्र-प्रयोग, इ. बरेच ग्रंथ याने लिहिले आहेत. कृष्णभक्तिचंद्रिका या नांवाचें एक नाटकहि याने लिहिलें आहे. [हि. ध.]

(२) (१३ वें शतक) भास्कराचार्यांच्या वंशांतला एक ज्योतिषी. याने ब्रह्मगुप्त सिद्धान्ताचा २० वा अध्याय व बृह–ज्जातक यांवर टीका लिहिली आहे. [भा. ज्यो.]

अनंतनाग आदिनाग किंवा आदिशेष याचेंच हें नांव आहे. विष्णुधर्मोत्तर पुराणांत याचें मूर्तिवर्णन पुढीलप्रमाणे आढळतें – चतुर्भुज, अनेक फणा, मधल्या फणेवर पृथ्वी देवतेची मूर्ति, उजव्या दोन हातांत कमळ व मुसळ, डाव्या दोन हातीं फाळ व शंख.

तिथेच सुरासागर व तालवृक्ष यांचा उल्लेख असल्यामुळे मूर्तिकलेच्या दृष्टीने याचें संकर्षण किंवा बलराम याच्याशीं साम्य दिसतें. बलराम हा शेषाचाच अवतार मानतात. प्राचीन शिल्पकृतींत नागराज बहुधा अर्धसर्प व अर्धमानव या स्वरूपांत दिसतो. पण तोच जेव्हा विष्णूचें आसन अथवा शयन असतो, तेव्हा तो संपूर्णपणें सर्परूपांत दाखवितात. **पाहा** – शेष, बलराम. [डि. हिं. इ.]

अनंतनागक्षेत्र याला हल्ली इस्लामाबाद म्हणतात. हें क्षेत्र काश्मीरांतल्या मार्तंड पठाराच्या पश्चिम अंगाला पायथ्याशीं आहे. [हि. ध.]

अनंतनाथ जैनांचा चौदावा तीर्थंकर. जन्मस्थान अयोध्या. मातापित्यांचीं नांवें–– जयश्यामा व सिंहसेन. जन्मनक्षत्र – रेवती. लांच्छन – अस्वल (श्वेतांबरमतें ससाणा). ज्ञानवृक्ष – पिंपळ. मोक्षस्थान– पारसनाथपर्वत. यक्ष–याक्षिणी पाताल व अनंतमति (श्वेतांबरमतें अंकुशा). हा गर्भांत असतां याच्या मातेला शेवटाचें टोक नसलेली (= अनंत) अशी मोत्यां-ची माळ दिसली; म्हणून याचें नांव अनंत ठेवलें गेलें. [जै. इ.]

अनंतपंचमी फाल्गु० शु. ५ मी. देवतेचें नांव निर्दिष्ट नाही. [हि. ध.]

अनंतपंथ श्रीविष्णूची अनंत या नांवाने उपासना करणारा वैष्णव पंथ. उ. भारतांत बरेली व सीतापूर याठिकाणीं या पंथाचीं केंद्रें आहेत. [म. भा. सा.]

अनंत पद्मनाभ गोस्वामी (१९ वें शतक) तंजाऊर मधील कालक्षेपम् या गीत–प्रकाराचा सुप्रसिद्ध गायक. हा कांही काल सर्फोजीच्या पदरीं होता. याला कोकिळकंठ अशी पदवी होती. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अनंत फंदी (१७४४–१८१९ इ.स.) एक मराठी शाहीर. हा नगर जिल्ह्यांतील संगमनेरचा रहिवासी होता. हा वाजसनेयी ब्राह्मण असून याचें गोत्र कौंडिन्य व

आडनांव घोलप होतें. याच्या पत्नीचें नांव म्हाळसाबाई असून मुलाचें श्रीपति असें होतें. मलिक फंदी या नांवाच्या एका फकिराशीं याचा स्नेह जमला; त्यामुळे लोक यालाहि फंदी म्हणूं लागले. भवानीबावा नामक एका पुरुषाच्या कृपेने याला तरुणपणींच कवित्वस्फूर्ति झाली, अशी आख्यायिका सांगतात. पुढे याने तमाशाचा फड उभारला व तो तमासगीर बनला. याची रचना व म्हणण्याची धाटणी फारच रसाळ होती. श्रोते तल्लीन होऊन त्याचें कवित्व ऐकत. एकदा याला वाटेंत भिल्लांनी लुटलें. त्या वेळीं याने त्यांच्या नायकावर लावणी रचून म्हटली. ती ऐकून सर्वजण खूष झाले व त्यांनी त्याची लूट परत करून वर त्याला बिदागीहि दिली.


अनंत फंदी

याची कविता लावणी, कटाव, फटका, श्लोक, आर्या व ओवी अशा अनेक जातींची आहे. या सर्व काव्यप्रकारांत त्याचे फटके अधिक लोकप्रिय आहेत.

वर्म काढुनी शरमायाला । उणें कुणाला बोलुं नको ।
कर्जबाजारी होउनि बहु तूं । बोज आपला दवडुं नको ।
स्नेहासाठी पदरमोड कर । जामिन कोणा राहुं नको ।

या फटक्यांतील मार्मिक व्यवहारी उपदेश सर्वांना पटेल असा आहे. होनाजी बाळासारख्या तत्कालीन शाहिराने ' फंदी अनंत कवनांचा सागर ' अशा शब्दांत त्याला गौरविलें आहे.

एकदा अहिल्याबाई होळकर हिची व याची गांठ पडली असतां ती फंदीला म्हणाली, की ' तमाशाचा धंदा करणें हें ब्राह्मणास उचित नव्हे. ' तें ऐकून याने तमाशा सोडून दिला व कीर्तन करणें सुरू केलें.

दुसऱ्या बाजीरावाची याच्यावर बहाल मर्जी होती. त्याने फंदीकडून माधवरावाच्या मृत्यूवर श्रीमाधवनिधनग्रंथ नामक ओवीबद्ध काव्य लिहवून घेतलें. या ग्रंथामध्ये सहा अध्याय आहेत. प्रसादयुक्त पण ओजस्वी वाणी व समयसूचकता या गुणांमुळे याची समकालीन शाहिरांवरहि विलक्षण छाप होती. [ऐतिहासिक पोवाडे; म. सा.; म. च. को.]

अनंतफलसप्तमी भाद्र० शु. ७ मी. एक वर्ष प्रत्येक शु. ७ मीस सूर्यपूजा करणें. या व्रताचें अनंत फल मिळतें. [हि. ध.]

अनंत भारती (१८४५–१९०५ इ. स.) उमैयापुरम्चा वैष्णव ब्राह्मण. याने भागवत दशमस्कंधावर तमिळ भाषेत कीर्तन नांवाचा ग्रंथ लिहिला; तसेंच रामायणाचें उत्तरकांडहि कीर्तन शैलीने लिहिलें. [डि. मा. इं. म्यु. म्यु.]

अनंतमति जैन यक्षिणी. अनंतनाथाची सेविका (श्वेतांबरमतें अंकुशा). हिचें वर्णन ––

तथानन्तमती देवी हेमवर्णा चतुर्भुजा ।
चापं बाणं फलं धत्ते वरदा हंसवाहना ।।

(प्रतिष्ठासारसंग्रह)


अर्थ––सुवर्ण कांतीची. चतुर्भुज. धनुष्य, बाण, फल व वरदमुद्रा धारण करणारी. हंसवाहना. (श्वेतांबरमतें कमलवाहना.) हंस या हिच्या वाहनावरून हिचें सरस्वतीशीं साधर्म्य दिसतें. ही विद्यादेवीहि आहे. [जै. इ.]

अनंतवीर्य (इ. स. ११ व्या शतकाचा सुमार) जैनधर्मी, दिगंबरपंथी आचार्य. याने परीक्षामुख या ग्रंथावर प्रमेयरत्नमाला व अकलंकाच्या ग्रंथावर न्यायविनिश्चयवृत्ति अशा दोन टीका लिहिल्या आहेत. [म. च. को.]

अनंतव्रत काम्य व्रत. मार्ग० मासांत मृगशीर्ष नक्षत्र येईल त्या दिवशीं विष्णुपूजा. पुढे पौषांत पुष्यनक्षत्रावर, माघांत मघा नक्षत्रावर, अशा क्रमाने त्या त्या मासांत त्या त्या मासनक्षत्रावर पूजा करणें. व्रतावधि एक वर्ष. हें व्रत पुत्रप्रद आहे (च. व्र. चिं).

(२) प्रत्येक शु. २ येस एक वर्षपर्यंत विष्णुरूपाने अनंतपूजा (विष्णु ध. ३. १५०).

अनंतशयन विष्णूचें एक अवस्थास्वरूप. शेष नागाची शय्या करून विष्णु त्यावर पहुडतो. शेषाची फणा त्याच्या मस्तकावर छत्राप्रमाणे पसरून राहते. पायांगती लक्ष्मी सेवा करीत बसलेली असते. द. भारतांतल्या बहुतेक सर्व


अनंतशयन मूर्ति

विष्णुमंदिरांत अशाच प्रकारच्या मूर्ती आहेत. त्यांना रंगनाथ किंवा रंगस्वामी म्हणतात. जगच्चालक नारायणाचेंच हें एक रूप होय. त्रिवांकुर येथे अनंतशयनमूर्ति चौदा हात लांबीची आहे. ६ व्या शतकांत खोदलेल्या देवगड येथील शिल्पांतहि अशा प्रकारची एक मूर्ति मिळाली आहे. [डि. हिं. इ.]

अनंतसुत विठ्ठल

(१९ वें शतक) बडोद्याचा मराठी कवि. याने संन्यास घेतला होता. याचा दत्तप्रबोध हा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. याचा संप्रदाय निंबराज संप्रदाय या नावाने अस्तित्वांत आहे. या पंथांतले लोक पीतवस्त्र परिधान करून उघडया अंगाने कीर्तन करतात.

उभें रहावें कीर्तनीं उघडें । पागुटें नसावें आंगडें ।
कांस घालोनि वाडेंकोडें । गावे पवाडे श्रीहरीचे ।।
ती आज्ञा शिरीं वाहोन । संप्रदायी करिती कीर्तन ।
सप्त पिढी वरदान । निंबराजा पावन जाहलेसे ।।

याप्रमाणे कीर्तन करण्याच्या पद्धतीसंबंधीं त्याने आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे. [म. ज्ञा. को.]

अनंतह्रद्

काश्मीरमधील वितस्तानदीजवळचें एक तीर्थ. याला अनंत नाग असेंहि म्हणतात.

अनंतक्षेत्र

एक वैष्णव क्षेत्र (ब्रह्मांड पु. ३. १७. ५८). अधिक माहिती उपलब्ध नाही.

अनंताकुली पंथ

उडीसामधला एक धर्मपंथ. या पंथाचे लोक जातपात मानीत नाहीत. कोणत्याहि जातींतल्या मुलीशीं लग्न करतात व कोणाकडेहि जेवतात. [म. भा. सा.]

अनंताचार्य

(१८ वें शतक) कण्वशाखी ब्राह्मण पंडित. काशीचा निवासी. याने कण्वसंहितेवर भावार्थ-दीपिका नांवाची टीका, भाषिकसूत्रभाष्य, यजुःप्रातिशाख्य-भाष्य, श. प. ब्राह्मणभाष्य, कण्वकंठाभरण, इ. ग्रंथ लिहिलेले आहेत. [वै. सा.]

अनंतार्य

(१६ वें शतक) हा दक्षिणेंत मेलकोटे येथे राहत होता. याने ज्ञानयाथार्थ्यवाद, प्रतिज्ञावादार्थ, ब्रह्म-लक्षणनिरूपण, इ. अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्याच्या ग्रंथांवरून त्याचें प्रगाढ पांडित्य कळून येतें. [हिंदुत्व]

अनध्याय

प्राचीन काळीं निरनिराळया कारणांनी वेदाध्ययन विशिष्ट कालांत बंद राहत असे, त्याला अनध्याय असें म्हणत. प्रतिपदा, अष्टमी, चतुर्दशी, पूर्णिमा आणि अमावास्या, या अनध्यायाच्या तिथि होत. बौधायन धर्मसूत्र सांगतें —

हन्त्यष्टमी ह्युपाध्यायं हन्ति शिष्यं चतुर्दशी ।
हन्ति पञ्चदशी विद्यां तस्मात् पर्वणि वर्जयेत् ।।

अर्थ — अष्टमीस अध्ययन केल्यास तें गुरूला घातक, चतुर्दशीस केल्यास शिष्याला घातक आणि पूर्णिमेस किंवा अमावास्येस केल्यास विद्येला घातक होतें, म्हणून पर्वदिवशीं तें वर्ज्य करावें.

याशिवाय प्रतिपदा हा मोठा अनध्याय होता. प्रतिपदेला पाठनाशिनी म्हणजे पठिताचा नाश करणारी, असें म्हटलें आहे. अपरार्काच्या मतें महानवमी (आश्विन शु. ९ मी), भाद्रपद वद्यांतलें भरणी नक्षत्र, अक्षय्यतृतीया, रथसप्तमी, युगादि मन्वादि तिथि, दक्षिणोत्तरायणांचे आरंभदिन, विषुवदिन, आणि सोपपदा तिथि या दिवशींहि अध्ययन बंद ठेवावें.

अनध्यायाचे प्रकार चार आहेत — (१) नित्य (२) नैमित्तिक (३) तात्कालिक व (४) आकालिक.

नित्य अनध्याय — वर दिलेले अनध्याय हे नित्य होत.

नैमित्तिक अनध्याय — शिष्य, ऋत्विज्, गुरुबंधु व स्वशाखेचा श्रोत्रिय, यांपैकी कोणी मृत झाला असतां; तसेंच ऋतुसंधि, उत्सवांतलें भोजन, श्राद्धीय द्रव्याचा प्रतिग्रह, ग्रहणदिन, इ. प्रसंगीं होणारा अनध्याय.

तात्कालिक अनध्याय — कुत्रा, कोल्हा, घुबड, इ. पशूंचा शब्द ऐकू येत असतां; आशौचांतला माणूस, शव, अंत्यज, पतित, हे सन्निध असतां; जलांत असता; पशु, वृक्ष व पर्वत यांवर आरोहण केलें असतां; श्रोत्रिय विद्वान् घरीं किंवा आश्रमांत आला असतां; धुकें असतां; मध्यरात्रीं, संध्यासमयीं, इ. प्रसंगीं होणारा अनध्याय. निमित्त दूर झालें, की हा अनध्याय संपतो.

आकालिक अनध्याय — अकालीं मेघगर्जना, वृष्टि, एकदम वीज पडणें, विवाद, कलह, युद्ध या गोष्टी चालू असतां; अजीर्ण, वमन, रक्तस्राव झाला असतां; रात्रौ वीज चमकली असतां होणारा अनध्याय. याची मुदत आकालिक निमित्त झालें असेल, त्या वेळेपासून दुसऱ्या दिवशीं त्या वेळेपर्यंत असते.

अशा प्रकारें अनध्यायाच्या दिवसांची संख्या बरीच वाढली. त्यामुळे अनध्याय प्राप्त झाला असतांहि मनांतल्या मनांत वेदांची उजळणी करायला, किंवा ब्रह्मयज्ञांत वेद म्हणायला हरकत नाही, असा पर्याय सांगितलेला आहे.

प्राचीन काळीं महिन्यांतल्या दोन प्रतिपदा हे मुख्य अनध्याय असत. त्या दिवशीं विद्यार्थ्यांना संपूर्ण सुट्टी असे. पण अष्टमी, चतुर्दशी, पूर्णिमा, अमावास्या, या तिथींस वेदांगांचें अध्ययन करण्यास प्रत्यवाय नसे. किंवहुना त्या अध्ययनाची उपेक्षा न व्हावी, म्हणूनच हे अनध्याय निर्माण केले असावे. वेदमंत्रांत दिव्य सामर्थ्य असतें, अशी वैदिकांची श्रद्धा आहे. अपवित्र स्थितींत, अपवित्र देश-कालांत आणि मनाच्या खिन्न अथवा भयभीत अवस्थेंत, त्यांचें पठण झाल्यास त्या मंत्रांतलें सामर्थ्य नष्ट होईल, या भीतीने वरील नैमित्तिक, आकालिक, इ. अनध्याय सांगितले असावे. [ध. सिं.; नि. सिं.; हि. ध.]

अनन्य अलि (१८ वें शतक) वृंदावनांत वास्तव्य करणारा एक भक्त कवि. याला गोविंदलाल गोस्वामींकडून राधावल्लभ संप्रदायाची दीक्षा मिळाली होती. पूर्वनाम भगवानदास. याने ७९ ग्रंथ रचले, असें सांगतात. अनन्य अलीकी बानी या नांवाने ते ग्रंथ प्रसिद्ध आहेत. हा संपूर्ण संग्रह सुमारें ६००० पदांचा आहे. जुगल प्रेमलीला व जुगल माधुरी हे याच्या वर्णनांचे मुख्य विषय होत. याच्या ग्रंथांचीं नांवें स्वप्नविलास, प्रेमसरोवरक्रीडा, शरद्‌ऋतुविलास, जलविहारलीला, इ. आहेत. [रा. स.]

अनय तामिळनाडमधला एक नायन्मार. हा गुराखी होता. एके दिवशीं रानांत गेला असतां याला एका वृक्षांत शिवरूप दिसूं लागलें. याने बासरी वाजवून त्याला प्रसन्न केलें. तेव्हा शिवाने याला साक्षात् दर्शन दिलें. [पे. पु.]

अनरक नर्मदेवरील एक क्षेत्र. इथे स्नान केल्याने नरकभय टळतें. [मत्स्य पु. १९३. १–३]

अनरकव्रत ऋतुव्रत. हेमंत व शिशिर या ऋतंत हें करतात. मार्ग० शु. १ देपासून याचा प्रारंभ होतो. यांत केशवपूजा व 'ॐ नमः केशवाय' या मंत्राचा १०८ वेळां जप करतात. [च. व. चिं.]

अनर्क एक पिशाच वंश. [वायु पु. ६९: २६४]

अनर्थदंडव्रत एक जैनव्रत. शास्त्रमर्यादा पाळणें, दुसऱ्यास पाप करण्यास सल्ला न देणें, हिंसक हत्यारें दुसऱ्यास न देणें, वाईट व निंद्य गोष्टींचें चिंतन न करणें, इ. गोष्टींचा या व्रतांत समावेश होतो. [जैन धर्म]

अनल धर्माला वसूपासून झालेला पुत्र. कुमार, शाख, विशाख व नैगमेय हे याचे पुत्र होत. हा वैवस्वत मन्वंतरांतला आग्नेयी दिशेचा स्वामी आहे.

अनलहक् सूफी संप्रदायांतला पारिभाषिक शब्द. 'मीच खुदा (परमात्मा) आहें,' असा त्याचा अर्थ आहे. या शब्दाच्या द्वारें सूफी पंथी आत्म्याला परमात्म्याच्या स्थितींत विलीन करतात. खुदापर्यंत पोंचण्याच्या या अवस्थेप्रत जाण्याच्या सूफींनी चार पायऱ्या मानल्या आहेत. या पायऱ्या क्रमशः चढून जाणें आवश्यक असतें. पहिली शरीयत. या पायरीवर नमाज़, रोज़ा व अन्य कांही गोष्टी यांवर अंमल करावा लागतो. दुसरी पायरी तरीकत. या पायरीवर साधकाला एका पीराची (गुरु) आवश्यकता उत्पन्न होते. पीर भेटल्यावर साधकाचें ज्ञान वाढतें. मग तो मारिफत या तिसऱ्या पायरीवर आरूढ होतो. त्यापुढची पायरी हकीकत ही होय. इथे त्याला अंतिम सत्याची प्राप्ति होते व तो स्वतःला खुदामध्ये विलीन करतो. मग त्याचा द्वैतभाव मिटतो. मी व तूं म्हणजेच आत्मा व परमात्मा यांत अंतर राहत नाही. मग तो अनलहक् अर्थात् 'मी खुदा आहें,' असें पुकारीत उठतो.

अनलहक् अशी पहिली घोषणा मन्सूर बिन हल्लाज याने केली व आपलें खुदाशीं अभिन्नत्व जाहीर केलें. हा इराणचा सुप्रसिद्ध सूफी साधु होता. पण त्याचा हा उद्घोष इस्लामी धर्मगुरूंना धर्मविरोधी वाटला. मुल्ला लोक त्याला खुदाईचा दावेदार समजले व त्यांनी मन्सूरला सुळावर चढविलें. खुदा व मानव हे दोघे कधीहि एक होणें किंवा असणें शक्य नाही, असा इस्लामचा सिद्धान्त आहे. [डॉ. अबदुल अलीम; हिं. वि. को.]

अनवलोभन हा गर्भिणीचा संस्कार असून गर्भस्राव होऊं नये, म्हणून तो करायचा असतो. दुसऱ्या किंवा तिसऱ्या महिन्यांत पुंसवनानंतर हा संस्कार करतात. 'न अवलुप्यते गर्भोऽनेन इति' (=जो केल्याने गर्भ गळून पडत नाही, तो अनवलोभन संस्कार होय), अशी याची व्याख्या आहे (बैजवाप गृह्यसूत्र), वास्तविक हा अनवलोपन असा शब्द असून त्याचेंच अनवलोभन असें स्वरूप झालें आहे.

या संस्कारांत गर्भवतीला पूर्वाभिमुख मखरांत बसवून पति तिच्या मागे उभा राहतो व कांही मंत्र म्हणून तिच्या उजव्या

नाकपुडींत दूर्वांचा रस अंगठ्याने पिळतो. मग अवदान विधीने प्रजापतीला चरूची आहुति देतो. मग तिच्या हृदयाला स्पर्श करून गर्भाच्या संरक्षणासाठी देवतांची प्रार्थना करतो' [सं. कौ.]

अनसूया एक सती. कर्दम–देवहूतींची कन्या व अत्रिऋषीची भार्या. हिने तपश्चर्या करून शिवाला प्रसन्न केलें होतें. एकदा दहा वर्षे अनावृष्टि झाली असतां लोक दुष्काळाने हैराण झाले. अशा वेळीं आपल्या पर्वतावरच्या आश्रमांत हिने तपःसामर्थ्याने गंगा आणली व अन्नधान्य पिकवून दुष्काळ निवारिला. मांडव्य ऋषीला सुळावर चढविलेल्या अवस्थेंत एका स्त्रीचा धक्का लागला व त्यामुळे झालेल्या वेदना असह्य होऊन त्याने त्या स्त्रीला 'सूर्योदयापूर्वी तूं विधवा होशील', असा शाप दिला. ती स्त्री अनसूयेची सखी होती. त्यामुळे आपल्या मैत्रिणीच्या सौभाग्यासाठी हिने सूर्योदय होऊंच द्यायचा नाही, असें ठरविलें. तेव्हा सर्वत्र हाहाकार माजला. मग सर्व देव आणि ऋषि तिला शरण आले. अशा प्रकारें हिने आपल्या तपोबळावर सखीचा शाप दूर करून मगच सूर्योदय घडविला. हिच्या सतीत्वाबद्दल असूया वाटून उमा, लक्ष्मी, सावित्री यांनी आपल्या पतींना तिचें पातिव्रत्य नष्ट करण्यासाठी पाठविलें. ब्रह्मा-विष्णु-महेशांनी आश्रमांत येऊन तिला नग्न अवस्थेंत भिक्षा वाढायला सांगितलें. तिने पतीचें चरणतीर्थ तीन्ही देवांवर प्रोक्षिलें, त्यासरशीं तीन्ही देव लहान बाळें झाले व मग तिने विवस्त्र होऊन त्यांना स्तनपान दिलें. त्या तीन्ही देवांच्या अंशांनी पुढे तिला दत्त, दुर्वास व चंद्र असे तीन पुत्र झाले. वनवासांत राम–सीता हिच्या आश्रमांत आली असतां हिने सीतेला अंगराग व वस्त्रभूषणें देऊन सतीधर्माचा उपदेश केला –



अनसूयेची मूर्ति

नगरस्थो वनस्थो वा शुभो वा यदि वाऽशुभः ।
यासां स्त्रीणां प्रियो भर्ता तासां लोका महोदयाः ॥
(वा. रा. २. ११७. २१)

अर्थ – नगरांत राहणारा वा वनवासी, अनुकूल वा प्रतिकूल कसाहि असो; आपला पति ज्या स्त्रियांनी प्रिय मानला, त्यांना प्रकाशित असे परलोक प्राप्त होतात. **पाहा**–अत्रि.

अनस्तमी व्रत एक जैनव्रत. व्रतावधि जीवनाच्या अखेरीपर्यंत. याचा विधि असा – दोन घटिका दिवस झाल्यानंतर व दोन घटिका शेष राहीपर्यंतच्या काळांत भोजननिवृत्ति व मंत्रजप. या व्रताची कथा अशी —

सुप्रसिष्ठ नगरांत सागरसेन मुनीजवळ एक मांसलोलुप कोल्हा होता. मुनीने त्याच्याकडून हें व्रत करवून घेतलें. त्यामुळे दुसऱ्या जन्मांत तो प्रीतिंकर नांवाचा श्रेष्ठीपुत्र म्हणून जन्माला आला. त्याने पुढे विरक्त होऊन जिनदीक्षा घेतली. [जै. व्र. वि. सं.]

अनागतवंश पालिभाषेंतलें १४२ पद्यखंडांचें एक काव्य. हें काव्य कस्सप नांवाच्या कवीनें लिहिलें. कस्सपाच्या कालाचा पत्ता लागत नाही. मेत्तेय (मैत्रेय) या भावी बुद्धाचें त्यांत वर्णन आहे. त्याच्या एका हस्तलिखित प्रतींत, अनागतबुद्धस्स वण्णना, असें लिहिलेलें आहे. भावी कालांत होणाऱ्या मेत्तेय बुद्धाविषयीं बौद्धांचा विश्वास वाढत गेल्याने या ग्रंथाला बरेंच महत्त्व आलें. निकाय किंवा पिटक ग्रंथांत मेत्तेयाचा उल्लेखहि नाही. अपवाद काय तो दीघनिकायाचा. त्यांत मात्र २२ व्या संवादांत बुद्धाच्या तोंडीं असें भविष्य घातलें आहे, की 'मेतेयाला हजारों अनुयायी मिळतील.'

या ग्रंथांत नवीन असें कांही नाही. पूर्वीच्या बुद्धकथांवरच त्याची उभारणी झाली आहे. फक्त नांवें तेवढीं निराळीं आहेत. मेत्तेयाच्या अवताराचा काळ हें सुवर्णयुग ठरेल व त्या वेळचे राजे व प्रजाजन सत्य व सद्‌गुण यांच्या आचरणांत एकमेकांशीं स्पर्धा करतील, असें त्यांत वर्णिलें आहे. ख्रिस्ती धर्मातला मेसाया व हा मेत्तेय या दोघांत संशोधकांना बरेंच साम्य आढळलें आहे. मेत्तेय हें व्यक्तिनाम नसून तें त्याचें गोत्रनाम आहे.

अनागामी बौद्ध दर्शनांतला एक पारिभाषिक शब्द. ही अर्हत्पदाच्या खालची भूमि आहे. जेव्हा सत्काय दृष्टि, विचिकित्सा, शीलव्रतपराभास, कामच्छंद व व्यापाद, हीं पांच बंधनें गळून पडतात, तेव्हा बौद्ध साधक हा अनागामी होतो. मृत्यूनंतर तो वरच्या भूमींत दाखल होतो. तिथेच उत्तरोत्तर उन्नत होत होत, अविद्येचा नाश झाल्यावर

तो अर्हत्पदाला पोचतो. मग त्याला पुनर्जन्म नाही. म्हणूनच त्याला अनागामी (न + आगामी = न येणारा) म्हटलें आहे. [हिं. वि. को.]

अनात्मवाद आत्मवादाचा विरोधी सिद्धान्त. ज्यांत आत्म्याचा निषेध केलेला आहे, असा वाद म्हणजे अनात्मवाद होय. आत्मवाद ब्राह्मणपरंपरेंतला असून तें श्रौतदर्शन आहे, तर अनात्मवाद श्रमणपरंपरेंतला असून तें बौद्धदर्शन आहे. पालिभाषेंत याला अनात्तवाद असें म्हटलें आहे. नैरात्म्यवाद किंवा पुद्गलप्रतिषेधवाद, अशींहि त्याचीं पर्यायनामें आहेत.

बुद्ध हा अनात्मवादी होता. अनात्मवाद हा बुद्धदर्शनाचा पाया आहे. कांही लोक असें मानतात, की अनात्मवादांत आत्म्याचें संपूर्णतया निराकरण केलेलें आहे आणि हा वाद म्हणजे आत्म्याचा अनस्तिवाद किंवा भौतिकवाद आहे. पण हा विचार चुकीचा आहे. बौद्धदर्शनांत अनात्मवाद वरील अर्थानें स्वीकारलेला नाही. बुद्धानें त्याला शाश्वतवाद व उच्छेदवाद या दोन एकांतिक वादांच्या मधला रस्ता — मध्यमा प्रतिपद्, असें म्हटलें आहे. शाश्वतवादाचा सिद्धान्त म्हणजे आत्मा हा नित्य, कूटस्थ, चिरंतन व एकरूप आहे असें मानणें. उच्छेदवाद म्हणजे आत्मा नाहीच असें म्हणणें. बुद्धानें आपल्या अनात्मवादाला या दोहोंपासून पृथक् करून अभौतिक नैरात्म्यवाद या स्वरूपांत त्याची देशना दिली. बुद्ध आत्म्याचें वर्णन निषेधात्मक पद्धतीनें करतो. रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान हे पांच स्कंध असून ते म्हणजे आत्मा नव्हे, असें तो म्हणतो. जीव, आत्मा, सत्ता हे शब्द बौद्ध दर्शनांत समानार्थक आहेत. बुद्धाच्या मतें या शब्दांच्या द्वारें अभिहित होणारा पदार्थ म्हणजे एखादी स्वतंत्र सत्ता नसून तें अनेक धर्मांचें एक सामान्य नामकरण आहे. बुद्धानें व्यावहारिक रूपानें आत्म्याचा निषेध केलेला नाही; तर तो पारमार्थिक रूपानें केला आहे. लोकव्यवहारांत पंच स्कंधांचा समुदाय या रूपांत आत्म्याची सत्ता आहे; पण त्याव्यतिरिक्त एखादा आत्मा नांवाचा स्वतंत्र पदार्थ नाही, असें त्याचें मत आहे. तो आत्मवादाचें खंडन मोठ्या अभिनिवेशानें करतो ––

आत्मवादी पुरुष आत्म्याचें स्वरूप समजून न घेतां त्याच्या कल्याणासाठी नाना प्रकारचीं यज्ञयागादि सत्कृत्यें करीत असतो. कल्पना करा, की एखादा पुरुष देशांतल्या सर्वांत सुंदर स्त्रीवर प्रेम करीत आहे. मात्र त्यानें त्या स्त्रीला कधीच पाहिलेलें नाही. तिचे रंग, रूप, आकार, गुण, यांपैकी कांहीहि त्याला ठाऊक नाही. तिचें नांव आणि गोत्रहि त्याला माहीत नाही. पण असें असूनहि त्याचें प्रेम मात्र तिच्यावर जडलें आहे. असा पुरुष लोकांमध्ये जसा हास्यास्पद ठरेल, तद्वत्च आत्म्याचे गुणधर्म न समजतां त्याच्या पारलौकिक सुखासाठी यज्ञयागादि कृत्यें करणें, हें उपहासास्पद व गर्हणीय ठरेल (दीघनिकाय).

उपनिषदांचें सांगणें आहे, की 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति' म्हणजे आत्म्याच्या कामनेसाठी सर्व कांही प्रिय होतें (बृहदारण्यक). याचा अर्थ जगांत सर्वप्रिय वस्तु म्हणजे आत्मा होय. याच आत्म्याच्या सुखासाठी मनुष्य विषयांची कामना करतो. पण ही कामना किंवा काम हाच बुद्धाला मान्य नाही. हा काम निर्माणच होऊं नये, म्हणून त्यानें एका नव्या मार्गाची दीक्षा दिली. त्याची विचारधारा एका नव्या मार्गानें प्रवाहित झाली. तो म्हणतो ––

आत्म्याचें अस्तित्व मानणें, हेंच सर्व अनर्थांचें मूळ आहे. आत्मा मानल्यानें अहंकाराचा उदय होतो. आत्म्याला सुख व्हावें म्हणून जीव नाना प्रकारांनी शरीराला सुख देऊं पाहतो व त्या सुखप्राप्तीचे अनेक उपाय धुंडूं लागतो. यासाठी आत्म्याचा निषेध करणें हाच कामविजयाचा सुगम मार्ग आहे. बुद्धाच्या या उपदेशाचा प्रतिध्वनि पुढच्या काळांत अनेक बौद्ध आचार्यांच्या ग्रंथांत उमटला आहे. या आचार्यांनी अनात्मवादाच्या व्याख्या अनेक ढंगांनी केल्या आहेत.

आत्मविषयांत बुद्धानें संघातवाद व संतानवाद हे दोन सिद्धान्त स्वीकारले आहेत, असें थेरवादी नागसेनानें सांगितलें आहे. आत्मा हा रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान या पांचांचा संघातमात्र आहे. ज्या व्यक्तीला आपण एखाद्या नांवानें हाक मारतों, ती व्यक्ति केवळ पंच स्कंधांचा समुच्चय असते. आत्मा कोणी एकम्, कूटस्थ व नित्य नसून, तो नित्य परिवर्तनशील असा स्कंध आहे.

पण बुद्धाच्या मतें आत्मा हा स्कंधांहून भिन्नहि नाही व अभिन्नहि नाही. म्हणून संघातवाद ही बुद्धाची शिक्षा-दीक्षा होती, हें निश्चित रूपानें सांगतां येत नाही. संतानवाद हा आत्मा संतानरूप असल्याचें सांगतो. भौतिक व मानसिक, बाह्य व आभ्यंतर, इंद्रिय व इंद्रियग्राह्य, अशा पदार्थांचें आत्मा हा संतान आहे. विशेषतः सर्वास्तिवादी बौद्धांचें हें मत आहे. त्यांनी बुद्धाचा अनात्मवाद हा संतानवादाच्या स्वरूपांत स्वीकारला आहे. आत्मा अवस्तु नाही, तर ती नित्य वस्तु आहे. मात्र ती स्थिर किंवा कूटस्थ नसून नित्य परिवर्तनशील आहे. आत्म्याचे घटक क्षणिक व विपरिणामधर्मी आहेत. जलप्रवाह किंवा दीपशिखा हीं अग्नीच्या किंवा जलाच्या क्षणांचे संतान असतात, तद्वत् आत्मा केवळ स्कंधांचें संतान आहे.

वात्सीपुत्रीय बौद्धांनी आत्म्याला पुद्‌गल किंवा द्रव्य यांचा पर्याय मानलें आहे. पण वसुबंधु आपल्या अभिधर्मकोशांत या मताचें खंडन करतांना सांगतो, की पुद्‌गलवाद शेवटीं शाश्वत-वादाकडेच झुकतो, हा त्यांतला दोष आहे.

विज्ञानवादी व योगाचारी यांच्या मतें आत्मा केवल विज्ञान आहे. सौत्रांतिकांनी आत्मविज्ञानाला सत् व ध्रुव मानलें; पण नित्य मानलें नाही. वेदान्तांतला आत्मा नित्य आहे व ध्रुव आणि नित्य या शब्दांचा साधारण अर्थ एकच आहे. या दृष्टीने तो वेदान्ताच्या जवळ आला आहे. वसुबंधूने ज्याला विज्ञप्तिमात्र मानलें, तो तर वेदान्तांतल्या नित्य आत्म्याहून अंशमात्रहि भिन्न नाही.

या अनात्मवादाचे कांही सिद्धान्त पुढीलप्रमाणे आहेत–– (१) पंच स्कंधांना आत्मा समजणें योग्य नव्हे. कारण ते बाधांनी ग्रस्त रोगाधीन आहेत. (२) पंचस्कंध अनित्य आहेत अतएव दुःख आहेत. म्हणून ते आत्मा होऊं शकत नाहीत. (३) जर ते आत्मा नव्हेत, तर त्यांच्यापासून निर्वेद प्राप्त करून घेतला पाहिजे; तरच निर्वाणाचा लाभ होईल. (४) जोवर आत्मग्रह आहे, तोवर आत्मीयाचा बोध आहे, बंधन आहे व आसक्तिहि आहे. आत्म्याला नित्य व सत् मानलें, तर खरी अनासक्ति व विरक्ति प्राप्त होणार नाही आणि खऱ्या अनासक्तीवांचून निर्वाण दुर्लभ आहे. या आणि अशाच आणखी कांही कारणांनी बुद्धाने अनात्मवादाची देशना दिली आहे.

या देशनेच्या मागे तत्कालीन सामाजिक परिस्थितीचाहि विचार होता. वैदिक आत्मवादांत कित्येक दोष शिरले होते. आत्म्याच्या पारलौकिक कल्याणासाठी यज्ञयाग आणि तन्निमित्त पशुहिंसा सर्वत्र चालत होती. आत्मा हा सर्वत्र एकरूप व सम मानणारे वेदान्ती व्यवहारांत मात्र तसे वागत नव्हते. जीव हे उच्च–नीच आहेत व त्यांच्यामध्ये जातिकृत अनेक भेद आहेत, अशा धारणेने त्यांचा व्यवहार चालत होता. आचार-विचारां-तली ही विसंगति बुद्धाच्या ध्यानीं आली व तिच्या निरा-करणासाठी त्याने अनात्मवादाची घोषणा केली. या अनात्म-वादाच्या सिद्धान्ताने यज्ञादि पुण्यकर्मांची व्यर्थता सिद्ध केली व अनासक्ति व समचर्या यांना आधारशिला मिळवून दिली.

चौऱ्यांयशीं सिद्ध हे बौद्धमतावलंबीच होते व त्यांनीहि अनात्मवादाचाच प्रचार केला. त्यांचे अनुवर्ती नाथपंथीहि अर्धबौद्ध व अर्धयोगी होते. त्यांच्या साहित्यांत अनात्मवाद हा आध्यात्मिक जीवनाची प्रेरणा व अध्यात्मांतली चरम अनुभूति या उभय रूपांत दिसून येतो. त्यानंतरचे निर्गुनिया संत व सूफी संत यांच्यावरहि अनात्मवादाचा प्रभाव आहे. अनात्मवाद हा वस्तुतः मौनवाद आहे. या प्रकरणीं बुद्धाला पुढील प्रश्न विचारले गेले होते –– (१) जीव शरीराहून भिन्न आहे की अभिन्न ? (२) तथागत (बुद्ध) मृत्यूनंतर राहतो किंवा नाही ? (३) का राहतहि आहे आणि न राहतहि आहे ? (४) का नाही राहत आहे का नाही न राहत आहे ? बुद्धाने या सर्व प्रश्नांचें उत्तर मौनानेंच दिलें. बुद्धाच्या या मौनाचा खरा अर्थ काय, याविषयीं आजवर अनेक बौद्ध व बौद्धेतर पंडितांनी तर्काचें रान उठवून अनेक मतें मांडलीं आहेत. [बौ. द. मी.; हिं. सा. को.]

अनाथपिंडक बुद्धाचा समकालीन एक गृहपति. याने बुद्धासाठी एक कोटि रुपयांचें दान दिलें. बुद्धासाठी जेतवन खरेदी करतांना याने त्या भूमीवर सर्वत्र रुपये पसरून तेवढी रक्कम त्याच्या धन्याला दिली. अशोका-वदान या ग्रंथांत या कथेचा निर्देश आहे. याचें मूळ नांव सुदत्त होतें. [म. च. को.]

अनादि षट्क 'उत्पत्तिशून्यत्वम्'= ज्याला उत्पत्ति नाहीं असा पदार्थ. अद्वैत वेदान्ती असे सहा अनादि पदार्थ मानतात–

जीव ईशो विशुद्धा चित्तथा जीवेशयोर्भिदा ।
अविद्या तच्चितोर्योगः षडस्माकमनादयः ।।

अर्थ–जीव, ईश्वर, विशुद्ध, चैतन्य, जीवेश्वरांचा भेद, अविद्या व अविद्येचा चैतन्याशीं योग, हे सहा अनादि होत.

अनादेशदेवता एकाद्या स्मार्त कृत्यांत जिथे विशिष्ट देवता घ्याव्या असें सांगितलेलें नसतें, तिथे अग्नि, वायु, सूर्य व प्रजापति या देवता घेतात. त्यांना अनादेशदेवता म्हणतात. [सं. कौ.]

अनानत पारुच्छेप एक सूक्तद्रष्टा. सोमरस व इंद्राचें वज्र, हीं दोन्ही युद्धांत अजिंक्य ठर-तात, असें याने म्हटलें आहे (ऋ. ९. १११. ३.).

अनावळा ब्राह्मण गुजराती खेडावाळ ब्राह्मणांचा एक वर्ग. सुरतेच्या पूर्वेस ४० मैलांवर असलेल्या अनावळ या गांवावरून यांना हें नांव पडलें. गुजरातेंतल्या व्यारा महालांत ऊन पाण्याचे कांही झरे आहेत. स्कंद पुराणां-तल्या एका कथेने प्रस्तुत ब्राह्मणांचा या उन्हाळचांशीं संबंध जोडून दिला आहे –

रामचंद्र लंकेहून अयोध्येला जात असतां वाटेंत अगस्त्याश्रमांत उतरला आणि तिथे त्याने रावणवधाचें प्रायश्चित्त केलें. त्या विधीसाठी रामाने हिमाचलांतून ब्राह्मण आणविले व त्यांच्या सुखार्थ इथे ऊन पाण्याचे झरे निर्मिले. हे ब्राह्मण बारा गोत्रांचे होते. त्यांनी रामाकडून दक्षिणा घेतली नाही, यास्तव रामाने त्यांचा वेदाध्ययनाचा व प्रतिग्रहाचा अधिकारच नष्ट करून टाकला. ' यापुढे तुम्ही वैश्य वृत्तीने जगाल ' असा रामाने त्यांना शापहि दिला. अशा प्रकारें ब्राह्मण्यापासून भ्रष्ट झाले म्हणून पुढे या अनावळ ब्राह्मणांना लोक भठेला (भ्रष्ट) असें म्हणूं लागले.

दुसऱ्या एका कथेंत रामाने अनावळ येथील एका भिल्लाला ब्राह्मण करून घेतलें व पुढे त्याचा वंश अनावळ ब्राह्मण म्हणून प्रसिद्ध झाला, असें म्हटलें आहे.

हे लोक शेतकरी पेशाचे असल्यामुळे त्यांच्या ब्रह्मकर्माचा लोप झालेला आहे. हे आपलीं धर्मकृत्यें औदीच्य ब्राह्मणांकडून करवितात. यांच्यांत वशी आणि नायक असे दोन पोटभेद आहेत. दक्षिण गुजरातचे पहिले वसाहतकार ते वशी व तिथून दुसरीकडे जाऊन राहिले ते नायक होत. अनावळांतल्या श्रेष्ठ वर्गाला देसाई व कनिष्ठ वर्गाला भठेला म्हणतात. देसाई भठेल्यांशीं सोयरीक करीत नाहीत. पूर्वी या लोकांत बहुपत्नीत्व रूढ होतें. अलिकडे यांच्यांत पुष्कळ सुधारणा झाली आहे. [मुं. इ. जा.; म. ज्ञा. को.]

अनासक्तियोग

महात्मा गांधींनी गीतेचें गुजराती भाषांतर केलेलें असून त्याला अनासक्तियोग असें नांव दिलेलें आहे. या ग्रंथाचीं अनेक भाषांत भाषांतरें झालेलीं आहेत. त्यांचें इंग्रजी रूपांतर त्यांचे पट्टशिष्य श्री. महादेवभाई देसाई यांनी केलेलें असून त्याला विस्तृत व विचारपूर्ण प्रस्तावनाहि जोडलेली आहे. म. गांधींच्या मतें अनासक्ति शब्दाचा अर्थ असंग, निवृत्ति किंवा त्याग असा आहे. असंग हें त्या स्थितीचें अभावात्मक स्वरुप आहे, तर निवृत्ति हें भावात्मक स्वरूप आहे. त्यागाचा अर्थ ते कर्मफलत्याग असा करतात. हें सर्व मिळून अनासक्तियोग सिद्ध होतो. गांधीजी म्हणतात, की 'अनासक्ति या सूर्याभोवती भक्ति, ज्ञान व कर्म हे उपग्रह फिरत आहेत' (अना. यो. पृ. १२५). याचा अर्थ असा आहे, की भक्ति, ज्ञान व कर्म हीं सर्वस्वीं अनासक्तीच्या सिद्धान्तावर अवलंबून आहेत व अनासक्तीची त्यांच्यावर सत्ता आहे. गांधीजींनी अनासक्ती व सत्य-अहिंसा यांचा अतूट संबंध जोडून दिलेला आहे. अहिंसेचें तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी गीता सांगितली नाही, हें ते कबूल करतात; पण पुढे म्हणतात, की 'अहिंसेच्या तत्त्वाला गीतेच्या फार फार पूर्वींच मान्यता मिळालेली होती... ४० वर्षें अविश्रांत परिश्रम करून माझी अशी खात्री झाली, की सर्व प्रकारें व सर्व स्वरूपांत अहिंसा पूर्णतः आचरणांत आणल्यावांचून पूर्णकर्मफलत्याग अशक्य आहे.' अनासक्ति हें एक नाणें असून अहिंसा व सत्य या त्याच्या दोन बाजू आहेत.

अनासक्ति या कल्पनेचें पृथक्करण केल्यास तिच्यांत तीन विचार अंतर्भूत दिसतात. निष्कामकर्म, सर्वकर्में ईश्वरार्पण करणें व शरणागति म्हणजेच देह व आत्मा ईश्वरचरणीं अर्पण करणें. गांधीजी म्हणतात, कीं हें सर्व केलें, तरच मनुष्याचा देह हा देवाचें देऊळ होऊं शकेल. हा झाला अनासक्तीचा सिद्धान्त.

गांधीजींचें दुसरें मत असें आहे, की महाभारत हा इतिहास नसून एक रूपक आहे. ते म्हणतात, ' आधुनिक अर्थाने महाभारत हा इतिहासग्रंथ आहे, हें मी मानीत नाही. याचीं सयुक्तिक प्रमाणें आदिपर्वातच सांपडतात. (महाभारतांतील स्त्रीपुरुष) पात्रांची अमानुष आणि अतिमानुष उत्पत्ति वर्णून भगवान् व्यासाने राजा–प्रजेच्या इतिहासाला साफ पुसून टाकलें आहे. त्यांत वर्णिलेलीं पात्रें मुळांत ऐतिहासिक खुशाल असोत; पण महाभारतांत त्यांचा उपयोग व्यासांनी केवळ धर्माचें दर्शन घडविण्यासाठीच केला आहे. याच महाग्रंथांत गीता ही शिरोमणि म्हणून विराजमान आहे. या गीतेच्यां रूपाने मानवाच्या अंतःकरणांत सदैव सुरू असणाऱ्या नैतिक झगडयाचें चित्रण झालेलें आहे. गीतेसारख्या लोकोत्तर ग्रंथाचीं निर्मिति, कौटुंबिक भांडणें योग्य कीं अयोग्य हें ठरवून त्याबाबत निर्णय देण्यासाठी झाली असेल हें संभवत नाही. गीतेंतील कृष्ण शुद्ध संपूर्ण ज्ञानाची मूर्ति आहे. पण तो काल्पनिक आहे, असें म्हणण्याने कृष्ण या नांवाच्या अस्तित्वाचा मी निषेध करीत नाहीं. मात्र संपूर्ण कृष्ण काल्पनिक आहे, संपूर्ण अवताराचें त्याच्यावर मागाहून केललें आरोपण आहे, असें मला वाटतें. प्रत्येक देहधारी प्राणी हा अवतारच आहे. पण मानवतेची कांहीतरी लोकोत्तर सेवा केल्यावांचून कोणालाहि पूर्णावतार हें विशेषण देतां येणार नाही. मानवांच्या हितासाठी केलेली अलौकिक सेवा हाच अवतारपदाचा निकष आहे.

परमेश्वरस्वरूप झाल्याविना मानवाला सुखाचा लाभ व शांतीची प्राप्ति होत नाही. ईश्वरस्वरूप होण्याचा प्रयत्न हाच खरा पुरुषार्थ आणि हेंच आत्मदर्शन ! आत्मसाक्षात्कार हा गीतेचा विषय आहे; पण या विषयाचें प्रतिपादन करण्यासाठी कांही गीतेची रचना झालेली नाही. मुमुक्षूंना मोक्ष म्हणजेच आत्मदर्शन प्राप्त करून देणारा एक अद्वितीय उपाय सांगावा,

असा गीतेचा उद्देश आहे. आणि हा अद्वितीय उपाय म्हणजे कर्मफलत्याग होय.

पण कर्मफलत्याग ही साधी गोष्ट नाही. तीं केवळ बुद्धीची कसरतहि नाही. अंतःकरण घुसळून निघालें तरच ती संभवते. त्यागाचें हें सामर्थ्य अंगीं बाणण्यासाठी ज्ञानाची आवश्यकता आहे. ज्ञानाची परिणति शुष्क पांडित्यांत होऊं नये, म्हणून गीताकाराने ज्ञानाची भक्तीशीं सांगड घालून दिली आहे व भक्तीला अग्रस्थान दिलें आहे. गीतेंतील ही भक्ति म्हणजे भावविवशता नव्हे; किंवा भावडेपणाहि नव्हे. गीतेंतलीं भक्ताचीं लक्षणें पुढीलप्रमाणे आहेत ––

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी ॥


(१२.१३)

यावरून आपल्याला कळतें, की ज्ञान मिळविणें व भक्त होणें, हेंच आत्मदर्शन होय. पण तरीहि अशा ज्ञानाला किंवा भक्तीला कर्मफलत्यागाच्या कसोटीस उतरावें लागतें. गीता सांगते, की 'फलासक्ति सोडा आणि कर्म करा. निष्काम होऊन कर्म करा.' पण फलत्याग म्हणजे कर्माच्या परिणामा–विषयीं बेदरकारी असा मात्र त्याचा अर्थ नाही. परिणाम, साधनविचार व त्यांचें ज्ञान या गोष्टी अत्यावश्यक होत. हें सर्व झाल्यावर फलासक्ति न ठेवतां जो साधनेंत म्हणजेच कर्मांत तल्लीन होऊन जातो, तो फलत्यागी होय. फलासक्ति धरणारा, केवळ फलाचेंच चिंतन करणारा, मनुष्य पुष्कळ वेळां कर्तव्यापासून च्युत होतो व न करण्याच्या गोष्टीहि करूं लागतो. त्याचा नीति-अनीतीचा विवेक सुटतो आणि तो सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब करतो. असे हे फलासक्तींतून निघणारे कटु परिणाम विचारांत घेऊन, गीताकाराने अना–सक्तीचा सिद्धान्त बनविला व तो जगापुढे आकर्षक भाषेंत मांडला. [गांधी विचारदर्शन; भगवद्गीता–साक्षात्कार दर्शन]

अनाहतचक्र अनाहत= न ताडित. योगविद्येंतलें एक चक्र. हें रक्त वर्णाचें असून हृदयाच्या ठिकाणीं असतें. या ठिकाणीं आहत प्रेरणेवांचून शब्दप्रत्यय येतो, म्हणून याला हें नांव मिळालें आहे.

शब्दब्रह्ममयः शब्दोऽनाहतस्तत्र दृश्यते ।
अनाहताख्यं पद्मं तन्मुनिभिः परिकीर्तितम् ॥

अर्थ – त्या अनाहत चक्रांत शब्दब्रह्मरूप शब्द अनाहत स्वरूपांत प्रत्ययाला येतो म्हणून मुनींनी त्याला अनाहत पद्म (चक्र) म्हटलें आहे.



अनाहत चक्र

हें बारा पाकळ्यांचें कमळ असून त्या पाकळ्यांवर कं खं पासून टं ठं पर्यंत बारा वर्ण असतात. हें वायु तत्त्वाचें स्थान असून, यं हें त्याचें बीज आहे. काळवीट हें त्याचें वाहन व काकिनी ही त्याची शक्ति होय. [गुरु-दत्तयोग; स. पॅा.]

अनाहतनाद न+आहत=ताडित=अनाहत. एक यौगिक प्रक्रिया. नादाचे दोन भेद आहेत. एक आहात व दुसरा अनाहत. नाद हा आकाशाचा गुण आहे. हृदय हें चेतनाचें स्थान आहे. त्यांतच दहराकाश नांवाची एक लहानशी जागा शुद्ध आकाशाने व्याप्त आहे. त्या शुद्ध आकाशांत आघातावांचून एक नाद हमेशा उठत असतो. पण माणसाचें मन व इंद्रियें बाह्य विषयांकडे झुकलेलीं असल्यामुळे त्याला हा नाद ऐकूं येत नाही. हा नाद योगिजनांनाच साध्य आहे.

हा नाद व त्याच्या श्रवणाची प्रक्रिया पुढीलप्रमाणे सांगितलेली आहे – नाद हा अव्यक्त परमतत्त्वाच्या व्यक्ती-करणाचा सूचक असा आदि शब्द आहे. तो प्रथम परावाणींत सूक्ष्म रूपाने राहत असतो व पुढे क्रमशः अपरावाणींत येऊन अनुभवगम्य होतो. तो ॐकाररूप असून ब्रह्मांडाचें मूलतत्त्व आहे. तो अनाहत रूपाने पिण्ड-ब्रह्माण्डांत व्याप्त असतो, पण अज्ञानी जीवाला त्याचें श्रवण होत नाही. कारण त्याचा सुषुम्नामार्ग अवरुद्ध असतो. हठयोगाच्या साधनेने तो मार्ग मोकळा होऊन जेव्हा कुंडलिनी शक्ति जागृत होते व प्राणवायु सुषुम्ना नाडींत प्रवेश करतो, तेव्हा त्याचें श्रवण होऊं लागतें. सुषुम्नेच्या मार्गांत षट्चक्रें अवस्थित असतात. प्राणायामाच्या द्वारें या चक्रांचा भेद होऊन प्राणवायु जेव्हा ऊर्ध्व गतीने अनाहतचक्रांतल्या ब्रह्मग्रंथींत पोचतो, तेव्हा या अनाहत नादाचा प्रारंभ होतो. या अवस्थेंत त्याला नानाविध भूषणध्वनि ऐकूं येऊं लागतात. पुढे प्राण-अपान व नाद-बिंदु, यांचें मीलन होतें, तेव्हा प्राणवायु विशुद्ध चक्रांतल्या विष्णुग्रंथींत प्रविष्ट होतो. तिथे त्याला ब्रह्मानंदाची भेरी ऐकूं येऊं लागते. या नादावस्थेला घटावस्था म्हणतात. तिथून पुढे प्राणवायु आज्ञाचक्रांतल्या रुद्रग्रंथींत प्रविष्ट होतो, तेव्हा त्याला मर्दल

ध्वनीचा अनुभव घडतो. इथेच त्याला अष्टसिद्धींची प्राप्ति होते. या नादावस्थेला परिचयावस्था म्हणतात. तोच प्राणवायु तिथून वर ब्रह्मरंध्रांत प्रविष्ट झाला, की त्याला बांसरी किंवा वीणा यांच्या ध्वनीचा अनुभव घडतो. नादाच्या या चौथ्या अवस्थेला लयावस्था म्हणतात. या अवस्थेंत साऱ्या वृत्ति निरुद्ध होतात व आत्मा निजस्वरूपीं स्थित होतो.

हाच नाद उपाधियुक्त होतो, तेव्हा तो सप्तस्वरांत विभाजित होतो. निरुपाधिक अवस्थेंत तो प्रणवरूप असतो. हठयोगी एकांत स्थळीं शवासन करून व हाताच्या दोन्ही आंगठ्यांनी दोन्ही कान बंद करून या नादाची साधना करतात. याला अनहद, अनुहत, अशींहि नांवें आहेत. [हठयोगदीपिका; गोरक्षसिद्धांतसंग्रह; हिं. वि. को.]

अनाहित मझ्द संप्रदायांतली एक प्रमुख देवता. अवेस्त्यांत हिचें अनेक ठिकाणीं वर्णन आलें आहे. हिला बलिष्ठ व पवित्र देवता असें म्हटलें आहे. ही पर्जन्य व वसंत-ऋतु यांची अधिष्ठात्री असून नक्षत्र मंडलांत वास करते. तिथून जगांतल्या सर्व नद्या उगम पावतात. या नद्यांच्या दैवी जलांपासून पृथ्वीवर वनस्पति व प्राणी निर्माण झाले. अनाहित ही पुरुषबीज, स्त्रीचा गर्भाशय व स्तनांतलें दूध शुद्ध करते. प्रसूतिसमयीं स्त्रिया तिची प्रार्थना करतात. ही युद्धाचीहि देवता आहे. वारा, पाऊस, ढग आणि गारा या चार घोड्यांच्या रथांत बसून ती रणांगणांत जाते व वीरांना विजय मिळवून देते. हिच्या प्रीत्यर्थ ज्यांनी बलिदान केलें, त्या सर्व वीरांची नामावलि अवेस्त्यांत एका ठिकाणीं दिली आहे. त्यांत झरथुष्ट्राचेंहि नांव आहे. ही कुमारिका असून सुंदर, उंच व बलवती आहे. हिच्या अंगांत सोनेरी झगा, कानांत कुंडलें, गळ्यांत कंठा व मस्तकीं मुकुट आहे.

ही देवता अनत या सेमेटिक देवीसारखी आहे. प्राचीन काळीं अनाहितेची उपासना इराणी साम्राज्यांत प्रतिष्ठा पावली होती. आर्मेलिया, लिडिया, पॉंटस, कॅपाडोशिया, सिलिशिया, या देशांतहि अनाहितेच्या उपासनेचे अवशेष आढळतात. हिला बैल आवडतो असें समजतात. लॅटिन प्रदेशांत फ्रिजियाच्या मॅग्नामेटर (महामाता) व मिथ्र या देवतांशीं हिचा संबंध जोडलेला आहे. [एन्सा. रि. ए.; म. ज्ञा. को.]

अनितभा एक नदी. ऋग्वेदांत रसा आणि कुभा यांच्या बरोबर हिचा उल्लेख आला आहे (ऋ. ५. ५३. ९). ही सिंध प्रांतांतली एखादी साहाय्यक (Tributory) नदी असावी. [वै. सा.]

अनित्य अ + नित्य = नित्य नसलेलें. जगांतील सर्व पदार्थांचे नित्य व अनित्य असे दोन भाग करतां येतात. मात्र नित्यानित्यासंबंधी दार्शनिकांच्या कल्पना भिन्न असल्यामुळे त्यांचे नित्यानित्य पदार्थहि भिन्न होतात. 'ध्वंस-प्रतियोगित्वम्' हें नैयायिकांनी अनित्याचें लक्षण केलें आहे (त. दी.). ज्या वस्तूचा ध्वंस होतो, ती वस्तु अनित्य होय, असा त्याचा अर्थ आहे. म्हणून नैयायिक परमाणु तेवढे नित्य मानून इतर सर्व दृश्य पदार्थ अनित्य मानतात. अद्वैत वेदान्त्यांच्या मतें ब्रह्म तेवढें नित्य असून, इतर सर्व अनित्य आहे. जें नित्य तेंच सत्य व जें अनित्य तें मिथ्या, असें ते मानतात.

अनित्यवाद क्षणिकवाद पाहा.

अनियतधम्मा (सं. अनिश्चित धर्म) बौद्ध धर्मशास्त्रांतले अपराध. ज्या अपराधांचें स्वरूप अनिश्चित असून साक्षीने सिद्ध झाल्यावरहि ज्या अपराधांना विशेष श्रेणींत घालावें लागतें, त्यांना अनियतधम्मा म्हणतात. यांचें स्वरूप दोन प्रकारचें आहे–(१) एखाद्या भिक्षूने एकांत स्थळीं बसून स्त्रीशीं संभाषण करणें. व (२) खुल्या जागेंत स्त्रीशीं संभाषण करीत असतां कांही अनुचित शब्द वापरणें. एखाद्या स्त्रीनें अशा कृत्यांबद्दल त्या भिक्षूला दोषी ठरविल्यास त्याला पाराजिक इ. प्रायश्चित्तें करावीं लागतात. [पा. सा. इ.]

अनिरवसित शूद्रांतला उच्च थर. ज्या पात्रांत या शूद्रांनी भोजन केलें असेल तीं पात्रें कायमचीं विटाळलेलीं न राहतां, त्यांवर संस्कार केल्याने तीं शुद्ध होतात. निरवसित शूद्रांनी वापरलेलीं पात्रें परत शुद्ध होत नाहीत. तीं टाकून द्यावीं लागतात. **पाहा**–शूद्र.

अनिरुद्ध (१) प्रद्युम्नाचा पुत्र व कृष्णाचा नातू. याला अनेक स्त्रिया असून हा मद्य पिऊन त्यांच्याशीं रममाण होत असे. बाणासुरकन्या उषा हिच्याशीं याने गांधर्वविधीने लग्न केलें.

(२) सात्वत धर्मांतल्या व्यूहकल्पनेंतला हा चौथा व्यूह असून त्याला अहंकाररूप मानलें आहे. व्यूहोपासनेंत याची मूर्ति पुढीलप्रमाणें करावी, असें हेमाद्रि सांगतो — पद्मपत्रा-सारखा वर्ण. रक्त वस्त्र. खड्ग–चर्म हीं आयुधें. त्याच्या डाव्या अंगीं पताकायुक्त असे देवांचे ध्वज असावे. अनिरुद्धाला

शब्दयोनि = शब्दाचें उगमस्थान, असेंहि म्हटलें आहे (भाग. पु. ३. १. ३४). [पु. इं.]

अनिरुद्धभट्ट (१२ वें शतक) बंगालमधील धर्मशास्त्राचा प्रमुख ग्रंथकार. हा बंगाली ब्राह्मण असून गंगा नदीच्या तीरावरील विहारपाटक गांवचा रहिवासी होता. त्याला धर्माधिकरणिक (न्यायाधीश) असेंहि म्हटलें आहे. बल्लाळसेनाच्या दानसागर या ग्रंथावरून कळतें, की तो बल्लाळसेन राजाचा गुरु होता व दानसागराच्या रचनेला त्याची मदत झाली होती. हारलता, पितृदयिता, चातुर्मास्य पद्धति व भागवततत्त्वमंजरी, असे याचे ग्रंथ आहेत. हारलता हा ग्रंथ बिब्लिओथेका इंडिका ग्रंथमालेंत १९०९ सालीं प्रसिद्ध झाला असून पितृदयिता हा वंगीय संस्कृत साहित्य परिषदेने प्रसिद्ध केला आहे.

हारलतेंत जननमरणाशौच, सपिंड मृताचा अग्निसंस्कार, उत्तरक्रिया, तिचे अधिकारी, तर्पण, इ. विषय आले आहेत.

पितृदयिता हा ग्रंथ सामवेदी लोकांसाठी आहे. आह्निक, श्राद्ध, दान व इतर धार्मिक कृत्यें हे विषय या ग्रंथांत विवेचिले आहेत. भागवततत्त्वमंजरी हा ग्रंथ वैष्णव तत्त्वज्ञानाचें विवेचन करणारा आहे. अनिरुद्धभट्ट हा कुमारिलभट्टाचा अनुयायी होता. याला बंगालमध्ये फार मोठी कीर्ति लाभली. [हि. ध.]

अनिर्वचनीय ज्याचें निर्वचन करणें अशक्य असा पदार्थ. जगांतल्या सर्व पदार्थांचें निर्वचन (वर्णन) करतां येतें; पण ब्रह्म हा एक असा पदार्थ आहे, की त्याचें वर्णन करतां येत नाही. उपनिषदांत ब्रह्मवर्णन आढळतें; पण तें केवळ कांही अंगांनीच केलेलें असतें. त्याचें संपूर्ण निर्वचन शक्य नाही, असें अद्वैत वेदान्ती मानतात. रामानुजांच्या मतें ब्रह्म हें सगुण अर्थात् वासुदेवस्वरूप आहे. त्यामुळे अनंत कल्याण गुणांनी त्याचें निर्वचन होणें शक्य आहे, असें ते म्हणतात. पण अद्वैत वेदान्त्यांचें ब्रह्म हें निर्गुण, निर्विकार असल्यामुळे तें अनिर्वचनीय आहे. सांख्य व पातंजल यांचेंहि मत अद्वैत वेदान्त्यांसारखेंच आहे. अनिर्वचनीयाचें लक्षण सर्वदर्शनसंग्रहांत पुढीलप्रमाणे दिलें आहे —

प्रत्येकं सदसत्त्वाभ्यां विचारपदवीं न यत् ।
गाहते तदनिर्वाच्यमाहुर्वेदान्तवादिनः ।।

अर्थ —सत् किंवा असत् या दोन्ही शब्दांनी जें विचारभूमींत प्रविष्ट होत नाही, त्याला अद्वैत वेदान्ती अनिर्वाच्य म्हणतात.

अनिल वातायन एक सूक्तद्रष्टा. यान वाऱ्यावादळाची प्रशंसा केली आहे. तो म्हणतो – सृष्टींत प्रथम उत्पत्ति झाली ती वायूची. सत्यस्वरूप तोच (= प्रथमजा ऋतावा). पण खरें पाहिलें तर तो कुठे उत्पन्न झाला व कुठून आला, तेंच समजत नाही. हा दिव्य विबुधांचा आत्मा व सृष्टीचें बीज आहे (ऋ. १०. १६८).

अनीश्वरवाद ईश्वराची सत्ता न मानणारा एक दार्शनिक सिद्धान्त. जगताचें सर्जन, संचालन व नियंत्रण करणाऱ्या कोण्या एका ईश्वराची सत्ता, अनीश्वरवादीं मानीत नाहीत. त्यांच्या मतें हें जग स्वयंसंचालित व स्वयंशासित आहे. ईश्वरवादी ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं जीं प्रमाणें देतात, त्या सर्वांची आलोचना करून अनीश्वरवादी तीं असिद्ध ठरवितात. ईश्वरवाद्यांचें मत असें, की मनुष्याच्या मनांत ईश्वरप्रत्यय स्वयंसिद्ध व अनिवार्य असतो, हें ईश्वराच्या अस्तित्वाचें द्योतक होय. यावर अनीश्वरवादी म्हणतात, की ईश्वरभावना सर्व मनुष्यांत अनिवार्यरूपाने आढळत नाही. आणि आढळली तरी केवळ मानसिक भावनेने, मनाच्या कक्षेच्या बाहेर असलेल्या वस्तूंचें अस्तित्व सिद्ध होऊं शकत नाही.

विश्वांतल्या सर्व वस्तूंचें कांहीतरी कारण असतेंच. कारणाशिवाय कार्याची उत्पत्ति नाही, हा सिद्धान्त आहे. त्यावरून ईश्वरवादी म्हणतात, की घटपटादि वस्तूंप्रमाणे हें सर्व जगहि एक कार्यच आहे. आणि म्हणूनच त्याचें उपादान व निमित्त कारण असलेंच पाहिजे. हें कारण म्हणजेच ईश्वर होय. यावर अनीश्वरवाद्यांचें म्हणणें असें, की घटपटादि वस्तू कुठे आणि केव्हा उत्पन्न झाल्या, तें आपणास कळूं शकतें; पण या जगाचा आरंभ केव्हा झाला, तें समजायला मात्र आपल्याजवळ एखादें प्रमाण नाही. जगताचा प्रवाह अनादि आहे आणि म्हणून त्याचा निर्माता आणि त्याचें उपादान कारण याचा शोध घेण्याची आवश्यकता नाही. जगाचा स्रष्टा म्हणून कोणी ईश्वर मानलाच तर अनेक प्रश्न पुढे उभे राहतात. उदा० जगाची सृष्टि करण्यांत ईश्वराचा उद्देश काय ? केवळ मानसिक किंवा आध्यात्मिक सत्ता भौतिक सृष्टि कशी निर्माण करूं शकेल ? ती त्या भौतिक सृष्टीचें उपादान कारण कशी होऊं शकेल ? जर या सृष्टीचें उपादान कारण म्हणून एखादा भौतिक पदार्थ मानला, तर तो जगाचें नियंत्रण कसें करूं शकेल ? ईश्वर स्वतः भौतिक शरीर अथवा भौतिक उपकरणें यांच्या साहाय्याने सृष्टिनिर्माणाचें कार्य करतो, की त्यांच्यावांचूनच करतो ? भौतिक शरीरा-

दिकांच्या साहाय्याने करतो म्हणावें, तर सृष्टि अस्तित्वांत नसतांना तें शरीर व तीं उपकरणें आलीं कुठून? याशिवाय ही सृष्टि दुःखमय असून इथे जीवनाचा अंत मरणांत, सुखाचा अंत दुःखांत, संयोगाचा वियोगांत व उन्नतीचा अवनतींत होतो. अशी सृष्टि निर्माण करण्यांत ईश्वराला लाभ काय? ईश्वराचे भक्त त्याला सर्वशक्तिमान् सर्वज्ञ व कल्याणकारी मानतात; मग अनंत दुःखें, संघर्ष, हिंसा, कठोरता, छल-कपट, इ. दोषांनी युक्त असा हा विश्वप्रपंच निर्माण करणारा परमेश्वर सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् व कल्याणकारी कसा होऊं शकेल?

यावर ईश्वरवादी एक युक्ति अशी सांगतात, की या विश्वप्रपंचांत सर्व वस्तूंच्या अंतर्गत एक प्रकारची नियमबद्धता व प्रयोजनाची सार्थकता आढळते. यावरून या विश्वाचें संचालन करणारा कोणीतरी बुद्धिमान् असा ईश्वर असला पाहिजे हें सिद्ध होतें. या युक्तीचें अनीश्वरवादी असें खंडण करतात, की या जगांत अशा कितीतरी घटना घडतात, की त्यांचा उद्देश किंवा प्रयोजन कल्याणकारी आहे, असें दिसून येत नाहीं. अतिवृष्टि, अनावृष्टि, महापूर, दुष्काळ, वणवा, अकालमृत्यु, व्याधि, वार्धक्य, इ. गोष्टींत ईश्वराचा कल्याणकारी उद्देश असतो, असें कसें म्हणतां येईल? या सृष्टींत जितके नियम दिसतात, तितकाच अनियमितपणाहि दिसतो. जेवढें ऐक्य तेवढाच विरोधहि आढळतो. पण यावर ईश्वरवादी आणखी एक युक्तिवाद करतात, की सर्व प्राणिमात्रांच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवून त्यांच्यावर सत्ता गाजवणारा, तसेंच त्यांच्या पापाला दंड व पुण्याला शुभफल देणारा कोणीतरी ईश्वर असणें, ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे. याला उत्तर म्हणून अनीश्वरवादी सांगतात, की जगांत प्राकृतिक नियमांव्यतिरिक्त दुसरा कोणताहि नियम नाही. पाप-पुण्य हा भेद मनुष्यकृत आहे आणि म्हणूनच तो मिथ्या आहे. इथे सारा व्यवहार क्रिया आणि प्रतिक्रिया या स्वरूपांत चालतो. त्यासाठीं कोण्या नियामकाची किंवा शासकाची गरजच नाही. जर पाप-पुण्यासाठी निग्रहानुग्रहसमर्थ असा ईश्वर असता, तर जगांत सदैव पुण्यात्मे व साधुसंत यांचें रक्षण झालें असतें व त्याचबरोबर दुष्टात्म्यांचें निर्दालनहि झालें असतें. पण जगांत तसें घडतांना दिसत नाही. प्रबळांनी दुर्बळांना चिरडून टाकावें आणि हिंसकांनीं मानवांची निर्घृण हत्या करावी, हाच अनुभव मानवी व्यवहारांत सदैव येत असतो. अशा प्रकारें ईश्वरवाद्यांच्या युक्तींचें व प्रमाणांचें खंडण करून अनीश्वरवादी त्याहिपुढे जाऊन सांगतात, की अशा प्रकारचें हिंसा, रक्तपात, उत्पात, अपघात यांनी भरलेलें हें जग निर्माण करणारा कोणी मानायचा असेल, तर तो बुद्धिमान् व कल्याणकारी ईश्वर न मानतां मूर्ख व दुष्ट असा सैतानच मानावा लागेल.

भारतांत जैन, बौद्ध, चार्वाक, सांख्य व मीमांसक हे अनीश्वरवादी आहेत. बुध्द ईश्वराची सत्ता मानीत नव्हता. आपल्या उपदेशांत त्याने अनीश्वरवादी भावना स्पष्ट शब्दांत व्यक्त केली आहे. अदृष्ट आणि अज्ञात अशा ईश्वरावर भरंवसा ठेवून आपल्या अनुयायांनी अकर्मण्य बनूं नये, असें त्याला वाटत होतें. पथिकसुत्तांत त्याने ईश्वराच्या कर्तृत्वाचा उपहास केला आहे. दुसऱ्या एका ठिकाणीं त्याने ईश्वराला अन्य देवतांप्रमाणेच एक सामान्य देवता मानलें आहे. शिवाय, त्याला अज्ञानीहि ठरविलें आहे. त्याच्या दृष्टीने ईश्वर हा बुद्धीच्या कसोटीवर शिल्लक उरतच नाही.

अनीश्वरवादी दर्शनांत ईश्वराच्या नास्तित्वाबद्दल दिल्या गेलेल्या युक्तींचें, गुणरत्न या आचार्याने संकलन केलें आहे. कुमारिलभट्टाचें श्लोकवार्तिक व रामानुजांचें श्रीभाष्य या ग्रंथांतहि अनीश्वरवादी विचारांचा संग्रह झालेला आहे. **पाहा**——ईश्वर

अनु (१) पंच जनांपैकी एक जन व द्रुह्यूंचे जोडीदार. हे परुष्णीच्या (रावी) तीरावर राहत होते. दाशराज्ञ युद्धांत अनु हे सुदासाच्या शत्रुपक्षांत होते (ऋ. ७. १८. १४). अनूंना पंचजनांत महत्त्व होतें. इंद्राचा रथ एका अनूने तयार केला होता व तो इंद्राचा उपासक होता. (ऋ. ८. ४. १).

(२) ययातीला शर्मिष्ठेच्या ठायीं झालेल्या पुत्रांत अनु हा थोरला होता. ययातीचें वार्धक्य यानेहि न स्वीकारल्यामुळे ययातीने याचा राज्याधिकार नष्ट केला. पुढे हा उत्तरेस म्लेच्छांचा राजा बनला. [म. भा. आदि. ६३; मत्स्य पु. ३४]

अनुक्रमणी अनुक्रमणी म्हणजे वेदांचे सूचीग्रंथ होत. हे वेदांग साहित्यांत मोडतात. यांची रचना वेदांच्या नंतर झालेली असून वेदरक्षण आणि वेदार्थ मीमांसा हा त्यांचा उद्देश आहे. अनुक्रमणीवरून कोणत्याहि मंत्राचे ऋषि, देवता आणि छंद हे कळून येतात. ऋक्संहितेच्या अनेक अनुक्रमणी आहेत. त्यांत शौनकाची अनुवाकानुक्रमणी आणि कात्यायनाची सर्वानुक्रमणी हे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. या दोहोंवरहि विस्तृत टीका उपलब्ध आहेत. सर्वानुक्रमणीवर षड्गुरु शिष्य (१२ वें शतक) याचें भाष्य अत्यंत उपयुक्त असें आहे. यांत मूळ ग्रंथांतल्या विषयांचें संक्षिप्त पण सुरेख वर्णन आहे. शौनकाच्या अनुक्रमणीला बृहद्देवता असें नांव आहे.

यांत ऋग्वेदांतील देवतांचें क्रमशः वर्णन असून प्राचीन आख्यानांचेंहि विवरण आहे. माधवभट्टानेहि एक सर्वानुक्रमणी लिहिली असून, तिचे दोन खंड उपलब्ध आहेत. यजुर्वेदाची अनुक्रमणी शुक्लयजुःसर्वानुक्रम या सूत्रांत दिलेली आहे. तिच्यावर श्रीदेवाचें भाष्य आहे. सामवेदाशीं संबद्ध असलेल्या अनुक्रमणी बऱ्याच असून त्यांत त्या वेदाचे ऋषि, छंद व सामविधान यांचें विवरण आहे. अथर्ववेदाच्या बृहत्सर्वानुक्रमणींत प्रत्येक ऋषि-दैवत-छंदांचें पूर्ण विवरण मिळतें. **पाहा**–बृहद्देवता. [हिंदुत्व, सं. सा. इ.]

अनुगंगाप्रयाग

नाग व गुप्त राजांच्या अमलाखालील प्रदेशाच्या विस्ताराला हें नांव आहे. [ब्रह्मांड पु. ३. ७४. १९४; वायु पु. ९९. ३८३]

अनुग्रह

' अभीष्ट सम्पादनेच्छारूपः प्रसादः ' = मनोवांच्छित वस्तूच्या संपादनाविषयीं (भगवंताचा) इच्छारूप प्रसाद (न्यायकोश). भगवंताची कृपा. सर्व संप्रदायांनी भगवंताच्या अनुग्रहरूप कृपेला विशेष महत्त्व दिलें आहे. गीतेंत श्रीकृष्णाने अर्जुनालाहि अनुग्रहाचें महत्त्व सांगितलें आहे ––

मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम्

(१८. ५६)

अर्थ – (भगवत्परायण कर्मयोगी) माझ्याच कृपेने (अनुग्रहाने) शाश्वत पदाची प्राप्ति करून घेतो.

पुष्टिमार्गांत पुष्टीलाच अनुग्रह म्हटलें आहे (भाग. पु. २. १०). परमात्मा हा निग्रहानुग्रहसमर्थ असून अनन्य भक्तीने त्याचा अनुग्रह संपादन केल्यास भक्ताचें शाश्वत कल्याण होतें, अशी सर्व भक्तिसंप्रदायांची मूलभूत धारणा आहे. **पाहा** – पुष्टिमार्ग, भक्ति.

अनुग्रहशिवमूर्ति

शिवाने कित्येक भक्तांवर अनुग्रह केला असून त्या भक्तांत अर्जुन, रावण, व विष्णु हे प्रमुख आहेत. अर्जुनानुग्रहाची मूर्ति श्रीशैल येथील शिल्पांत आहे. तिथे अर्जुन शिवाने दिलेला बाण ग्रहण करीत आहे. घारापुरी व वेरुळ येथें रावणानुग्रहाचीं शिल्पें आढळतात. त्यांत शिव–पार्वती उच्चासनावर बसलीं असून त्यांच्या बैठकीखालीं रावण आपल्या वीस भुजांनी कैलासपर्वत हालवीत असल्याचें दाखविलें आहे. विष्णूवर अनुग्रह केलेल्या शिल्पांत चतुर्भुज शिवाच्या बैठकीजवळ विष्णु असून तो उजव्या हाताने शिवाला कमळ वाहत असून दुसऱ्या हाताने सहस्रकमळांत एक उणें पडलें म्हणून आपलें नेत्रकमळ उपटून काढीत आहे, असें दाखविलें आहे. [मू. वि.]

अनुग्रहसर्ग

हा पांचवा सर्ग (सृष्ट्युत्पत्ति) असून त्याचे विपर्यय, शक्ति, तुष्टि व सिद्धि असे चार विभाग आहेत. [वायु पु. ६. ५७]

अनुत्तर

बौद्ध तत्त्वज्ञानांत शून्यता, प्रज्ञा आणि उपाय यांच्या एकात्मज्ञानाला अनुत्तर ज्ञान, असें म्हणतात. अनुत्तर उपलब्धीची परंपरा सिद्धांनी योगाचारांतून ग्रहण केली. अनुत्तर शब्दाचा अर्थ सर्वश्रेष्ठ, ज्याच्या पलिकडे कांही नाही, असा आहे. बौद्ध संप्रदायांत योग आणि अनुत्तर या दोन उच्च पातळींवरच्या सूक्ष्म साधना होत्या. जे निःस्वभाव झाले आहेत किंवा ज्यांनी सहजस्वभाव किंवा वज्रस्वभाव पूर्णपणें आत्मसात् केला आहे, अशा साधकांनाच अनुत्तर साधनेचा अधिकार होता. या साधनेविषयीं आस्था धारण करणारे सिद्ध अन्य पद्धतींचा तिरस्कार करीत नसत. अनुत्तर साधक लोक मंत्र, तंत्र, इ. आडंबराचें महत्त्व मानीत नव्हते. **पाहा** – सहजयान, वज्रयान, योगाचार. [हिं. सा. को.]

अनुत्तरपूजा

बोधिचित्ताच्या उदयासाठी अनुत्तर नामक पूजाविधान सांगितलें आहे. या पूजेचीं सात अंगें अशीं – वंदन, पूजन, पापदेशना, पुण्यानुमोदन, बुद्धाध्येषण, बुद्धयाचना व बोधिपरिणामना. ही पूजा मानसिकहि होऊं शकते. साधक प्रथम जगताच्या कल्याणासाठी त्रिरत्नांना शरण जातो. नंतर विविध उपचारांनी बुद्ध व बोधिसत्व यांचे वंदन व पूजन करतो. जाणिवेंत अथवा नेणिवेंत केलेल्या पापांचें बुद्धापुढे प्रकटीकरण करतो. यालाच पापदेशना म्हणत. ही पश्चात्तापपूर्वक केल्यास जुनीं पापें नष्ट होतात व बुद्धाच्या कृपेने नवीं पापें घडत नाहीत. नंतर साधक सर्व प्राण्यांच्या हातून शुभ कर्में घडावीं व त्यांना सर्व दुःखांपासून मुक्ति मिळावी म्हणून पुण्यानुमोदन करतो. म्हणजेच विश्वांतल्या संपूर्ण सत्त्वांची सेवा करण्याचा निश्चय करतो. अंतरांत शुभ भावनेला आश्रय देतो. अंजलिसंपुट जोडून सर्व दिशांमध्ये स्थित असलेल्या बुद्धांना तो प्रार्थना करतो, की त्यांनी जीवांना त्यांच्या दुःखनिवृत्तीसाठी धर्मोपदेश करावा. समस्त जीवांसाठी त्यांनी चिंतामणी अथवा कल्पवृक्ष बनावें. त्यालाच बुद्धाध्येषणा म्हणतात. त्यानंतर पुढची प्रार्थना ही, की कृतकृत्य बोधिसत्वांनी मानवांच्या कल्याणसाधनांत सदैव मग्न असावें. याचें नांव बुद्धयाचना होय. नंतर या साधकाची शेवटची प्रार्थना अशी

असते, की या अनुत्तरपूजेचें जें फलस्वरूप सुकृत मला प्राप्त झालें आहे, त्याच्याद्वारें मी प्राणिमात्रांच्या दुःखप्रशमनाचें कारण बनावें. या भावनेचें नांव बोधिपरिणामना होय. या पूजेच्या योगानें बोधिचित्ताचा उदय अवश्य होतो. **पाहा**– त्रिरत्न, बोधिसत्त्व. [बौ. द. मी.]

अनुपदसूत्र चौथ्या सामसूत्राचें नांव. याचे दहा प्रपाठक आहेत. याचा संग्रह कोणी केला, त्याचा पत्ता लागत नाही. पंचविंश ब्राह्मणांतल्या पुष्कळशा दुर्बोध वाक्यांची यांत व्याख्या केलेली असून, षड्विंश ब्राह्मणाचीहि चर्चा केलेली आहे. या ग्रंथांत पुष्कळशी ऐतिहासिक सामग्री उपलब्ध होते व बऱ्याच प्राचीन ग्रंथांचीं नांवेंहि मिळतात. यांत उक्थ, स्तोत्र व गान यासंबंधींची माहिती आहे व अनेक वेदशाखा व उपनिषदें यांच्या सिद्धांतांचा संग्रह केलेला आहे. [हिंदुत्व]

अनुपमा वस्तुपाल आणि तेजपाल हे धोल्काचा राजा वीरधवल याचे सेनापति होते. हे धर्मानें जैन असून. यांनी अबू व गिरनार या पर्वतावरील जैनमंदिरें बांधलीं. त्या दोन भावांपैकी धाकटा तेजपाल याची अनुपमा ही पत्नी होय. हे दोघे बंधु नेहमी तिच्या सल्ल्यानें वागत. तिच्याच सांगण्यावरून वर उल्लेखिलेलीं जैनमंदिरें बांधलीं गेलीं. तिला साहित्य व तत्त्वज्ञान यांची आवड होती. तिला षड्दर्शनमाता असें नांव मिळालें होतें. पुरातनप्रबंधसंग्रहांत कंकणकाव्य आहे, तें तिनेच रचलें आहे, असें म्हणतात. शत्रुंजय तीर्थासमीप तिच्या नांवाचें अनुपमा हें सर आहे. [ग्रे. वि. इं]

अनुपलब्धि एक प्रमाण. प्रत्यक्षादि प्रमाणें भाव पदार्थाच्या उपलब्धीला साधक होतात; पण अभावाच्या उपलब्धीलाहि प्रमाणाची आवश्यकता असतेच. आपलीं इंद्रियें भावात्मक वस्तूंचें ज्ञान करून देतात; पण तीं अभाव दाखवू शकत नाहीत. म्हणूनच अनुपलब्धीची स्वतंत्र सत्ता आहे. उदा० जर विशिष्ट ठिकाणीं घट उपस्थित असता, तर तो अवश्य दिसला असता. ज्या अर्थी तो दिसत नाही, त्या अर्थी त्याचा अभाव आहे. याचाच अर्थ वस्तूची अनुपलब्धि (अदर्शन) ही त्या वस्तूचा अभाव सूचित करते.

अनुपलब्धि प्रत्यक्ष प्रमाणाहून भिन्न आहे. कारण आपण डोळ्यांनी घट पाहूं शकतों; पण घटाभाव पाहूं शकत नाही. ती अनुमानाहूनहि भिन्न आहे. कारण अनुमानासाठी ज्या उचित व्याप्तीची सत्ता असायला हवी, ती इथे नाही. आप्त वाक्य नसल्यामुळे अनुपलब्धि ही शब्दप्रमाण नव्हे आणि सादृश्य ज्ञानाच्या अभावीं उपमानहि नव्हे. फलतः हें एक स्वतंत्र प्रमाण आहे. भाट्ट मीमांसक व वेदान्ती अनुपलब्धि हें प्रमाण मानतात. प्रभाकरमतानुयायी मीमांसक व नैयायिक मात्र हें मानीत नाहीत. नैयायिकांचें मत असें, की अभावज्ञान विशेषण विशेषाख्य सन्निकर्षानें होतें; त्यासाठी अनुपलब्धि हें निराळें प्रमाण मानण्याची गरज नाही. यावर वेदान्त्यांचें म्हणणें असें, की पदार्थाच्या ज्ञानास रूपाची आवश्यकता असते. पण अभावाला रूप नसल्यानें त्याच्या ज्ञानासाठी अनुपलब्धि हें निराळें प्रमाण मानलेंच पाहिजे. [भा. द.]

अनुपातक गोवध, परदारागमन, व्रात्यता (योग्य वेळीं उपनयन न करणें), व्रतलोप (ब्रह्मचर्यव्रत मोडणें), संन्यास घेतल्यावर परत गृहस्थाश्रमांत जाणें, अस्पृश्य व अमंगळ वस्तूंचा स्पर्श होणें, कनिष्ठ किंवा पतित यांच्याकडून दान स्वीकारणें, धर्मभ्रष्टता, इ. पातकांना अनुपातकें म्हणतात (विष्णु. ध. सू. ३६; मनु ११.५५-५८; याज्ञ. ३.२२८-२३). त्यांना महापातकांप्रमाणेंच मानतात व त्यांपासून शुद्ध होण्यासाठी अश्वमेध किंवा तीर्थयात्रा हीं प्रायश्चित्तें सांगतात. याज्ञवल्क्यानें गोवधासाठी पुढील प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत – एक मास इंद्रियदमन, पंचगव्यप्राशन, गोष्ठशयन, गोपालन, गोदान, कृच्छ्र व अतिकृच्छ्र. परदारागमनासाठी गाढवाचें कातडें पांघरून सात घरीं भिक्षा मागण्यास सांगितलें आहे (आप. ध. सू. १.१०.२८.१९). व्रतलोपासाठी मृत्युदेवतेला गाढवाचा बळि (आप. ध. सू १.९. २६.८–९), संन्यासानंतर पुनश्च गृहस्थाश्रमांत येणाऱ्याला सहा महिने कृच्छ्र व अशुद्ध स्पर्शासाठी सचैल स्नान (गौत. ध. सू. १४. २८ आणि धर्मभ्रष्ट मनुष्याला कृच्छ्र करून शुद्ध व्हावें लागतें. **पाहा**–महापातकें.

अनुप्पन् तमिळनाडमधली कानडी शेतकऱ्यांची जात. यांचें मूलस्थान म्हैसूर अथवा दक्षिण कर्नाटक असावें. यांच्यांत कांही शैव आणि कांही वैष्णव आहेत. वैष्णवांच्या घरीं ब्राह्मण पौरोहित्य करतात; पण शैवांच्या घरीं करीत नाहीत. यांचे सहा पोटभेद आहेत. प्रत्येक पोटभेदाचा एकेक प्रमुख असतो. यांची पंचायत असते.

विधवाविवाह मान्य आहे. पण व्यभिचार शाबीत होऊन एखाद्या स्त्रीला घटस्फोट मिळाला असल्यास, तो नवरा जिवंत असेतों तिला दुसरें लग्न करतां येत नाही. आतेबहिणीवर मामेभावाचा हक्क असतो. एखाद्या स्त्रीचा पति तिच्याहून लहान अतएव पतिधर्म पाळण्यास असमर्थ असल्यास

जवळच्या नातेवाइकाकडून तिला प्रजोत्पादन करून घेतां येतें. मात्र त्या प्रजेचें पितृत्व तिच्या नवऱ्याकडे जातें.

हे अनेक देवतांना भजतात आणि त्यांतल्या बहुसंख्य देवता या सती गेलेल्या स्त्रिया असतात. [का. ट्रा. स. इं.]

अनुप्पनदी मदुराईच्या आग्नेयी दिशेस दोन मैलांवर हें गांव असून तिथे प्रेतें पुरण्याची प्रागैतिहासिक जागा सांपडली आहे. तिथे मातीचीं अनेक थडगीं असून त्यांत माणसांचीं हाडें व कांही लहान भांडींहि मिळालीं आहेत. त्यांतलीं कांही भांडीं चकचकीत आहेत. [मदुरा गॅझे.]

अनुप्रवचनीय एक होम. वेदांच्या कांही भागाचें अध्ययन झाल्यावर हा करीत. सांप्रत तो उपनयनविधीमध्येच करतात. **पाहा**–उपनयन.

अनुबंधचतुष्टय संस्कृत भाषेंत वेदान्त ग्रंथांच्या प्रारंभीं ग्रंथाच्या भूमिकेच्या रूपांत अनुबंधचतुष्टय सांगण्याचा प्रघात आहे. ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय, त्याच्या प्रतिपादनाचें प्रयोजन, ग्रंथाचा अधिकारी म्हणजे कोणासाठी ग्रंथ लिहिला तें व त्या अधिकाऱ्याशीं त्या विषयाचा संबंध, या चार गोष्टी मिळून अनुबंधचतुष्टय होतें. केव्हा केव्हा ग्रंथाच्या मंगलाचरणांतच अनुबंधांचा निर्देश केलेला असतो. अलिकडे ग्रंथांना ज्या विस्तृत भूमिका किंवा उपोद्घात लिहिले जातात, त्यांचें अनुबंधचतुष्टय हें पूर्वरूप समजायला हरकत नाही. [ब्र. सि. मा.]

अनुब्राह्मण ब्राह्मणसदृश ग्रंथांना अनुब्राह्मण असें म्हटलें आहे. अशा प्रकारचे कांही ग्रंथ प्राचीन काळीं होते. भट्टभास्कराने तैत्तिरीय ब्राह्मणाच्या विशिष्ट अंशाला अनुब्राह्मण म्हटलें आहे (तै. सं. भाष्य १.८.१). शांखायन श्रौतसूत्राचे १४ व १५ हे अध्याय ब्रह्मदत्त नांवाच्या टीकाकाराने अनुब्राह्मण म्हणूनच मानले आहेत. आश्वलायन व वैतान श्रौतसूत्रांतहि अनुब्राह्मणांचा उल्लेख येतो. या अनुब्राह्मणांचें अध्ययन करणाऱ्यांना अनुब्राह्मणी असें म्हणत, असें पाणिनीने सांगितलें आहे (अष्टा. ४.२.६२). [पा. भा.]

अनुभव हा शब्द अनु + भव या दोन शब्दांपासून बनला आहे. अनु म्हणजे तत्सदृश व भव म्हणजे होणें किंवा बनणें. याचाच अर्थ ज्या वस्तूचा अनुभव घ्यायचा तिच्याशीं वृत्ति तद्रूप होणें असा आहे. याची व्याख्या अशी– 'स्मृतिभिन्नं ज्ञानम्' = स्मृतीहून भिन्न असें ज्ञान (त. सं.). 'हा घट आहे' असें चाक्षुष प्रत्यक्ष म्हणजे अनुभव होय. त्याचे यथार्थ व अयथार्थ असे दोन भेद आहेत. प्रत्यक्ष, अनुमिति, उपमिति व शब्द असे यथार्थ अनुभवाचे चार प्रकार आहेत. संशय, विपर्यय व तर्क हे अयथार्थअनुभवाचे तीन प्रकार होत. वैशेषिकमतें प्रमा व अप्रमा असे अनुभवाचे दोन प्रकार आहेत. बुद्धिवृत्ति विषयानुरूप बनणें म्हणजे अनुभव, असें पातंजलयोगशास्त्राचें मत आहे. पाटाचें पाणी शेतांत गेलें म्हणजे तें जसें शेताचा तुकडा चौकोनी, त्रिकोनी असेल त्याप्रमाणे चौकोनी, त्रिकोनी बनतें, तद्वत् इंद्रियांच्या पन्हळींतून अंतःकरण बाहेर जाणें व त्या त्या विषयाच्या आकाराने परिणत होणें, विषयानुरूप बनणें म्हणजे अनुभव होय.

इंद्रियवादी लोक अनुभवाची कक्षा इंद्रियांपुरती मर्यादित करतात; तर अध्यात्मवादी अनुभवाचें क्षेत्र इंद्रियांच्या पलिकडे असल्याचें सांगतात. इंद्रियग्राह्य अनुभव घेण्यास इंद्रियें सदैव तयार असतात. पण त्यांच्या शक्ति मर्यादित असल्यामुळे त्यांनी घेतलेल्या अनुभवावर बुद्धीचा संस्कार करून ज्ञानाची रचना करावी लागते. आत्मा अत्यंत सूक्ष्म असल्याने तो इंद्रियातीत आहे. जड व स्थूल वस्तूच्या ज्ञानासाठी जी बुद्धि, जीं साधनें व ज्या पद्धति आपण वापरतों, त्या सर्व इंद्रियातीताच्या म्हणजेच सूक्ष्माच्या क्षेत्रांत लटक्या पडतात. तिथे उपयोगी पडते ती एक प्रतिभा. प्रतिभेमध्ये तद्रूपतेने ज्ञान होतें. व्यवहारांत इंद्रियांचा जसा विषयांशीं साक्षात् संबंध येतो, तद्वत् प्रतिभेमध्ये आत्म्याशीं साक्षात् संबंध येतो. म्हणून आत्म्याच्या अनुभवाला साक्षात्कार असेंहि म्हणतात. 'प्रत्यक्षात्मकं ज्ञानम् = साक्षात्कारः' (न्या. म.). व्यावहारिक ज्ञान इंद्रियप्रत्यक्ष असतें, तर आत्मज्ञान इंद्रियातीत प्रत्यक्ष असतें. आत्मानुभवाचें शब्दाने वर्णन करणें म्हणजे तें आत्म्याचें अप्रत्यक्ष ज्ञान होय. त्याला परोक्षानुभूति म्हणतात. तिच्यामुळे आत्म्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याकडे प्रवृत्ति होते. आत्म्याशीं एकरूप होऊन होणारें ज्ञान हें साक्षात् अनुभवरूप असल्यामुळ त्याला अपरोक्षानुभूति असें म्हणतात. [न्या. को.; के. वि. बेलसरे]

अनुभूति स्वरूपाचार्य (इ. स. १२५०–१४५० च सुमार) याने सारस्वतप्रक्रिया, आख्यातप्रक्रिया व धातुपाठ हे ग्रंथ केले आहेत. याला साक्षात् सरस्वतीकडून व्याकरण मिळालें, अशी आख्यायिका आहे. [म. च. को.]

अनुमंडनपट्टि उथमपलयम्च्या नैर्ऋत्य दिशेस पेरियरच्या रस्त्यावर दोन मैल अंतरावर हें गांव असून तिथून जवळच एका झाडींत एक ३–४ फूट उंच शिळा उभी आहे व तिच्यावर दोन पुरुषांच्या आकृती कोरलेल्या आहेत. त्या शिळेला अन्नमर्कल किंवा भावांची शिळा म्हणतात.

दोघे भाऊ होते. त्यांना आपल्या बहिणीच्या शीलाचा संशय आला. त्यांनी तिला एकीकडे गांठून ठार मारलें व स्वतःचेहि प्राण वेंचले, अशी त्या शिळेची आख्यायिका सांगतात. भावांच्या या शिळेसमोर बहिणीचीहि शिळा आहे. ग्रामवासी या दगडांची पूजा करतात. [मदुरा गॅझे.]

अनुमति (१) 'कलाहीने साऽनुमतिः' = चंद्र एका कलेने हीन असतां त्याची जी अवस्था असते तिचें नांव (अमर). म्हणजेच कलाहीन चंद्र असलेली शुक्ल चतुर्दशीयुक्त पूर्णिमा.

(२) पहिल्या पूर्णिमेचें नांव (वायु पु. ५०.१०१.) ही श्रद्धा (किंवा स्मृति) व आंगिरस् यांची कन्या (भाग. पु. ४.१.३४; वायु पु. २८.१५). धात्याची पत्नी व पूर्णिमेची माता व देवता. चंद्र परिपूर्ण होण्याच्या पूर्वी हिची पूजा करतात.

(३) राजसूय यज्ञांत अनुमतीला उद्देशून केलेली इष्टि. ही फाल्गुन पूर्णिमेस करतात.

(४) षोडशपत्र कमलावरील शक्तिदेवी (ब्रह्मांड पु. ४.३२.१२).

अनुमंत्रण एखादें कर्म करीत असतां त्याला अनुसरून योग्य असा मंत्र म्हणणें. याची व्याख्या अशी–

मन्त्रमुच्चारयन्नेव मन्त्रार्थत्वेन संस्मरन् ।
शेषिणं तन्मना भूत्वा स्यादेतदनुमन्त्रणम् ।।

अर्थ – मुखाने मंत्र म्हणत असतांनाच त्याच्या अर्थाचें मनन करून त्याच्याशीं पूर्ण तादात्म्य पावणें, याला अनुमंत्रण म्हणतात. [आचारेन्दु]

अनुमरण पतीच्या मागून अग्निप्रवेश करून मरणें, म्हणजेच सती जाणे असा त्याचा अर्थ आहे–

देशान्तरमृते पत्यौ साध्वी तत्पादुकाद्वयम् ।
निधायोरसि संशुद्धा प्रविशेज्जातवेदसम् ।।

अर्थ – पति देशांतरीं मृत झाला असतां (त्याचें प्रेत न मिळाल्यास) शुचिर्भूत साध्वीने त्याच्या पादुका हृदयाशीं धरून अग्निप्रवेश करावा.

ही गोष्ट क्षत्रिय, वैश्य व इतर स्त्रियांनाच विहित आहे. ब्राह्मण स्त्रियांना या बाबतींत निषेध सांगितला आहे. पाहा–सतीप्रथा.

अनुमान भारतीय दर्शनें व तर्कशास्त्र यांतील एक पारिभाषिक शब्द. भारतीय दर्शनांत ज्ञानप्राप्तीच्या साधनांना प्रमाण असें म्हणतात. त्यापैकी अनुमान हें एक प्रमाण आहे. चार्वाकदर्शन सोडल्यास बहुतेक सर्व दर्शनांत अनुमान हें प्रमाण मानलें आहे. 'अनुमितिकरणम् अनुमानम्' म्हणजे अनुमान हें अनुमितीचें असाधारण कारण आहे.

ज्या पदार्थाचें ज्ञान प्रत्यक्ष प्रमाणाने होत नाही, पण त्या पदार्थाशीं साहचर्यनियमाने संलग्न असणाऱ्या दुसऱ्या एका पदार्थाच्या प्रत्यक्षाने होतें, त्याला अनुमिति व त्या प्रक्रियेला अनुमान असें म्हणतात. उदा० एखाद्या पर्वतावर धूम (धूर) दिसला, की त्या पर्वतावर वह्नि (अग्नि) आहे, असें ज्ञान आपल्याला होतें. कारण पूर्वी महानसादि (स्वयंपाकघर) अनेक ठिकाणीं वह्नि व धूम यांचें साहचर्य आपण पाहिलेलें असतें. त्यामुळे पर्वतावर धूम पाहिला, की जिथे जिथे धूम असतो, तिथे तिथे वह्नि असतो, याचें स्मरण होतें. आणि ज्याअर्थी या पर्वतावर धूम दिसतो, त्या अर्थी तिथे वह्नि असला पाहिजे, असें ज्ञान होतें.

या अनुमानप्रक्रियेंतील पारिभाषिक शब्द पुढीलप्रमाणें आहेत– ज्या पदार्थाचें आपल्याला प्रत्यक्ष ज्ञान होतें व ज्याच्या ज्ञानाच्या आधारावर अप्रत्यक्ष पदार्थाच्या अस्तित्वाचें ज्ञान होतें, त्याला हेतु किंवा लिंग असें म्हणतात. उदा० धूम हा पदार्थ. ज्या पदार्थाच्या अस्तित्वाचें ज्ञान होतें, त्याला साध्य असें म्हणतात. उदा० वह्नि. हेतु व साध्य यांच्या साहचर्यनियमाला व्याप्ति असें नांव आहे. ज्या ठिकाणीं हेतूचें (धूमाचें) प्रत्यक्ष होतें, त्याला पक्ष असें म्हणतात. उदा० पर्वत. ज्या ठिकाणीं हेतु धूम व साध्य वह्नि यांचें साहचर्य आपण पूर्वी पाहिलेलें असतें, त्याला सपक्ष म्हणतात. उदा० महानस (स्वयंपाकघर). जिथे साध्याचा म्हणजे वह्नीचा अभाव असतो, तिथे धूम या हेतूचाहि अभाव असतो, त्याला विपक्ष असें म्हणतात. उदा० जलह्रद (पाण्याचा डोह). पक्षावर म्हणजे पर्वतावर हेतु असणें, याला पक्षधर्मता व त्याचें प्रत्यक्ष ज्ञान होणें, याला पक्षधर्मताज्ञान असें म्हणतात. जेव्हा एकाच वेळीं पक्षधर्मताज्ञान व व्याप्तिस्मरण हीं दोन्ही होतात, तेव्हा त्याला परामर्श असें म्हणतात. 'साध्यव्याप्यहेतुमान् पक्षः' असें परामर्शाचें स्वरूप असतें. व्याप्तिविशिष्ट धर्मतेला लिंगपरामर्श किंवा अनुमान असें म्हणतात.

अनुमानाचे दोन प्रकार आहेत–स्वार्थानुमान व परार्थानुमान. स्वार्थानुमान ही स्वतःची मानसिक प्रक्रिया आहे. महानसादि ठिकाणीं धूम व वह्नि यांचें साहचर्य अनेकवार पाहून मनांत धूम व वह्नि यांच्या व्याप्तीचा निश्चय होतो व एखाद्या वेळीं पर्वतावर धूम दिसला, की मग पर्वतावर वह्नि आहे, अशी अनुमिति होते. हें स्वार्थानुमान होय.

परंतु जेव्हा दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला पक्षावर साध्य आहे याचा निश्चय करून द्यायचा असतो, तेव्हा आपल्या मानसिक प्रक्रियेला आपण पांच अंगांत प्रकट करितों. या पांच अंगांना पंच अवयव असें नांव आहे.

पञ्चावयवेन वाक्येन स्वनिश्चितार्थप्रतिपादनं परार्थानुमानम् ।

अर्थ –– पंचावयवी वाक्यानें आपल्याला निश्चित माहीत असलेल्या अर्थाचें प्रतिपादन करणें, म्हणजे परार्थानुमान होय.

हे पांच अवयव पुढीलप्रमाणे आहेत –

प्रतिज्ञा –– ‘साध्यवत्त्वेन पक्षवचनं प्रतिज्ञा’ = पक्षावर साध्य आहे, असें सांगणें म्हणजे प्रतिज्ञा होय. उदा० ‘पर्वतो वह्निमान्’.

हेतु – ‘लिङ्गस्य पक्षधर्मत्ववचनं हेतुः’ = लिंग पक्षावर आहे, असें सांगणें म्हणजे हेतु होय. उदा० ‘धूमवत्त्वात्’.

उदाहरण – ‘सव्याप्तिकं दृष्टान्तवचनमुदाहरणम्’ = व्याप्तिसहित दृष्टांत देणें, म्हणजे उदाहरण होय. उदा० ‘यो यो धूमवान् स स वह्निमान् यथा महानसम्’.

उपनय– ‘परामर्शवचनमुपनयः’ = परामर्शाचा बोध करून देणें, म्हणजे उपनय होय. उदा० ‘तथा (वह्निव्याप्य धूमवान्) च अयम् (पर्वतः)’.

निगमन –– ‘लिङ्गसम्बन्ध–प्रयुक्त–निश्चित–साध्यवत्त्व वचनं निगमनम्’ = लिंगसंबंधयुक्त निश्चित साध्याचें प्रतिपादन म्हणजे निगमन होय. उदा० ‘तस्मात् (धूमवत्त्वात्) तथा (वह्निमान्)’.

दार्शनिक व इतर प्रकारच्या वादविवादांतहि परार्थानुमान उपयोगी पडतें.

गौतमाने अनुमानाचे स्वार्थ व परार्थ असे भेद न सांगतां पूर्ववत्, शेषवत् व सामान्यतो दृष्ट असे तीन प्रकार कल्पिले आहेत. ‘यत्र कारणेन कार्यमनुमीयते तत् पूर्ववत्’(न्यायसूत्र) =ज्या ठिकाणीं कारणावरून कार्याचें अनुमान केलें जातें, तें पूर्ववत् अनुमान होय. उदा० आकाशांत मेघ जमले, की वृष्टि होणार असें केलें जाणारें अनुमान.

‘यत्र कार्येण कारणमनुमीयते तच्छेषवत्’ (न्यायसूत्र) = जिथे कार्यावरून कारणाचें अनुमान केलें जातें, तें शेषवत् अनुमान होय. उदा० नदीला पूर आलेला दिसला, की ती ज्या प्रदेशांतून वाहते, त्या प्रदेशांत कुठेतरी पाऊस पडला असला पाहिजे, असें अनुमान होणें.

या दोन्ही प्रकारांत न मोडणारीं अनुमानें हीं सामान्यतो दृष्ट या सदराखाली येतात. उदा० एखाद्या माणसाला सकाळीं आपण त्याच्या घरीं पाहिला आणि संध्याकाळीं जर तोच माणूस आपल्याला बाजारांत दिसला, तर तो मधल्या काळांत घरून बाजारांत गेला असला पाहिजे, असें अनुमान होतें. त्याचप्रमाणे सूर्य सकाळीं पूर्वेला तर संध्याकाळीं पश्चिमेला दिसतो, यावरून दिवसभरांत सूर्याने पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रयाण केलें, असें त्याची गति न पाहूनहि अनुमान करतां येतें.

अनुयाज

बर्हि, नराशंस व स्विष्टकृत् अग्नि या देवतांना उद्देशून दिल्या जाणाऱ्या आहुति. प्रधान आहुतींनंतर या देतात. यांतील पहिला प्रैष ‘देवान् यज’ असा असून दुसरे दोन ‘यज’ एवढेच असतात. [हि. ध.]

अनुयोग

जैन आगमांच्या व्याख्येला अनुयोग म्हणतात. प्राचीन काळीं आगमांतल्या प्रत्येक शब्दाची व्याख्या ‘नया’च्या आधारें केली जात असे. पण पुढे मंदबुद्धि पुरुषांच्या ज्ञानासाठी आर्यरक्षित या आचार्याने अनुयोगाची चतुर्विध विभागणी केली ती अशी ––

(१) **प्रथमानुयोग** – यांत पद्मपुराण, त्रिषष्टिलक्षण, महापुराण, हरिवंश पुराण व उत्तर पुराण या कथात्मक ग्रंथांचा समावेश होतो. याला धर्मकथानुयोग असेंहि म्हणतात.

(२) **करणानुयोग** – यांत पृथ्वी, ग्रह, विश्व वगैरे सृष्टीच्या उत्पत्तीची माहिती देणाऱ्या सूर्यप्रज्ञप्ति, चंद्रप्रज्ञप्ति व जयधवला या ग्रंथांचा समावेश होतो. याला गणितानुयोग असेंहि म्हणतात.

(३) **द्रव्यानुयोग** – कुंदकुंदाचार्य, उमास्वाति व समंतभद्र यांनी लिहिलेल्या तत्त्वज्ञानात्मक ग्रंथांचा या विभागांत समावेश होतो.

(४) **चरणानुयोग** – या विभागांत जैन श्रमणांच्या दैनंदिन आचरणाचे नियम येतात. मूलाचार, त्रिवर्णाचार, रत्नकरंड श्रावकाचार, या ग्रंथांचा यांत समावेश होतो.

या अनुयोगांच्या आधारावर त्या त्या विषयांचें प्राधान्य लक्षांत घेऊन शास्त्रांचेंहि विभाजन केलें गेलें. आचारांग इ. सूत्रें चरणानुयोगांत, उवासगदसा इ. प्रथमानुयोगांत, जंबुदीवपण्णति इ. करणानुयोगांत व पन्नवणा इ. द्रव्यानुयोगांत


समाविष्ट करण्यांत आलीं. अनुयोगाच्या प्रक्रियेचें विवेचन करणारा प्राचीन ग्रंथ अनुयोगद्वार हा आहे. [हि. जै. मो.; हि. वि. को.]

अनुराधपुर लंकेंतलें एक प्राचीन नगर. कोलंबोच्या नंतर लंकेंतलें हेंच सर्वांत मोठें नगर असून हें बौद्धांचें प्रसिद्ध तीर्थ आहे. हें सुमारें १३०० वर्षें लंकेची राजधानी असून कदम्बा नदीच्या तीरावर वसलें आहे. अनुराध नांवाच्या एका राजाने हें सनपूर्व सहाव्या शतकांत वसविलें. पुढे १०० वर्षांनी पंडुकाभय नांवाच्या राजाने आपली राजधानी तिथे आणली. त्यानंतर इ. स. आठव्या शतकांतल्या अग्गबोधि राजाच्या कारकीर्दीपर्यंत म्हणजे सुमारें १३०० वर्षें ही लंकेची राजधानी होती. सिंहली शेतकरी याला अनुराजपुर असेंहि म्हणतात. या शहराजवळ दोन मैल परिघाचा एक सुंदर तलाव पंडुकाभय राजानेच बांधून ठेवलेला आहे. याच्या दक्षिण तीरापासून एक मैलाच्या अंतरावर बोधिवृक्ष आहे. हा वृक्ष सुमारें २२०० वर्षांइतका जुना आहे. गयेच्या मूळ बोधिवृक्षाची एक फांदी सम्राट् अशोकाने लंकेच्या तिस्स राजाला अर्पण केली, तिचाच हा वृक्ष बनलेला आहे, असें म्हणतात. तिस्स राजा व त्याचे सरदार यांनी बौद्ध धर्म स्वीकारून अनुराधपुरांत बौद्धपद्धतीच्या सुंदर वास्तु उभ्या केल्या. अनेक आराम व विहारहि बांधले. त्यांतली थूपाराम ही स्तूपाच्या आकाराची एक इमारत ७० फूट उंचीची होती. सांप्रत या सर्व इमारती नष्ट झालेल्या आहेत.

तिस्स राजाच्या मृत्यूनंतर ही राजधानी तमिळ लोकांनी जिंकली. पण त्यानंतर १०० वर्षांनी दुत्थगामिनि अभय या राजाने ती पुनश्च जिंकून घेतली. लंकेंत या राजाच्या कित्येक आख्यायिका प्रचलित आहेत. या राजाने लाखो रुपये खर्च करून सोनेरी वाळूचा अभयगिरि नांवाचा एक दागोबा बांधला. त्याची उंची १८९ फूट आहे. पालि भाषेंत त्याला महाथूप असें म्हणतात. बौद्ध त्या वास्तूला पूज्य मानतात. अनुराधपुर अशा अनेक इमारतींनी शोभिवंत झालें होतें.

या शहराचा उल्लेख फा हि यानने आपल्या ग्रंथांत केलेला आहे. तो या नगरांत बौद्धग्रंथांचा अभ्यास व त्यांच्या नकला करण्याकरितां दोन वर्षें राहिला होता. अनुराधपुर हें नालंदा-विद्यापीठाप्रमाणे लंकेंतलें एक महान् विद्यापीठ बनलें होतें. बौद्ध तत्त्वज्ञानावरचे अनेक ग्रंथ व अट्ठकथा इथें निर्माण झाल्या. सुप्रसिद्ध बौद्ध पंडित बुद्धघोष हा इथलाच विद्यार्थी होता.

इ. स. ४५० मध्ये धातुसेन नांवाचा राजा तिथे राज्य करीत होता. त्याच्यानंतर तिथल्या राजघराण्यांत यादवी युद्धें सुरू झालीं. अशा युद्धांच्या वेळीं एखादा पक्ष तमिळ लोकांना



अनुराधपुर – एक बौद्ध स्तूप

आपल्या मदतीस बोलावीत असे. याच तमिळ लोकांच्या लुटारू सैन्याने अनुराधपुर अनेक वेळां लुटलें. अखेर इ. स. च्या ८ व्या शतकांत इथून राजधानी हालवून दक्षिणेस पुलस्तिपुर इथे नेण्यांत आली. इ. स. १३०० नंतर अनुराधपुराची बहुतेक वस्ती उठली व आसपास जंगल माजलें. आज मितीस हें नगर पुनः वसलें आहे व व्यापार व व्यवसाय यांचें केंद्र बनलें आहे. [म. ज्ञा. को.]

अनुराधा अश्विन्यादि २७ नक्षत्रांपैकीं १७ वें नक्षत्र. तुळेच्या पूर्वेस विंचवाच्या आकृतीसारखी एक आकृति आषाढांत रात्रीच्या पहिल्या प्रहरीं दक्षिणेच्या अंगाने दिसते, तिला वृश्चिक म्हणतात. वृश्चिकाच्या डोक्यांत एक ठळक तारका आहे, तिचें नांव अनुराधा. हें नक्षत्र वृश्चिक राशींत येतें. या नक्षत्राची देवता मित्र आहे (तै. सं. ४.४.१०). याला नक्षत्रीय प्रजापतीची प्रतिष्ठा म्हटलें आहे (तै. ब्रा. १. ५. २. २.). **पाहा** – नक्षत्रीय प्रजापति; नक्षत्रें.

अनुलोम–प्रतिलोम श्रेष्ठ वर्णाचा पुरुष कनिष्ठ वर्णाच्या स्त्रीशीं विवाह करतो, तेव्हा त्या विवाहाला अनुलोम विवाह आणि त्यांच्या संततीला अनुलोम प्रजा असें म्हणतात. आणि श्रेष्ठ वर्णाची स्त्री जेव्हा कनिष्ठ वर्णाच्या पुरुषाशीं विवाह करते, तेव्हा त्या विवाहाला प्रतिलोम व त्यांच्या संततीला प्रतिलोम प्रजा म्हणतात.

अनुलोम व प्रतिलोम विवाहांचीं उदाहरणें भारतांत मध्ययुगापर्यंत अनेक आढळतात. कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रम्' मध्ये वर्णिलेल्या विवाहांत अग्निमित्र ब्राह्मण व मालविका क्षत्रकन्या होती. वाकाटक रुद्रसेन (द्वितीय) याने प्रभावती हिच्याशीं विवाह केला होता, ती वर्णाने वैश्य होती. प्रतिलोमाच्या उदाहरणांत कदंबकुल-संस्थापक मयूरशर्मा हा ब्राह्मण असून त्याने आपल्या मुली गुप्त व अन्य राजांच्या घरीं दिल्या होत्या. ययाति व देवयानी यांच्या उदाहरणांत ययाति क्षत्रिय व देवयानी ब्राह्मणकन्या होती. पुढे पुढे अशा विवाहांना धर्मशास्त्रकारांनी पायबंद घातला.

अनुलोम आणि प्रतिलोम संततीच्या बाबतींत प्रश्न प्रामुख्याने येतो तो असा, की विवाहजन्य संबंधामुळे निर्माण झालेल्या प्रजेला हें नांव द्यायचें, की विवाहबाह्य संबंधांमुळे निर्माण झालेल्या प्रजेला ?

मूर्धावसिक्त, अंबष्ठ, निषाद, माहिष्य, उग्र आणि करण या सहा अनुलोम जाती याज्ञवल्क्याने सांगितल्या आहेत. मनु म्हणतो, की या जातींना उपनयनादि संस्कारांचा अधिकार असून प्रतिलोम जातींना मात्र तो नाही (१०.४१); कारण ते शूद्रवत् आहेत. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांना जरी तो अधिकार असला, तरी ब्राह्मण स्त्री आणि क्षत्रिय पुरुष यांच्या संततीला तो नाही. पराशरमाधवीयांत प्रतिलोम हे वर्णबाह्य व पतित आहेत, असें देवलाचें मत दिलेलें आहे. उशना आणि वैखानस यांनी निरनिराळ्या प्रतिलोम जातींना निरनिराळीं नांवें दिलीं आहेत. उदा० ब्राह्मण स्त्री आणि क्षत्रिय पुरुष यांच्या विवाहामुळे झालेल्या संततीला सूत असें नांव असून विवाहबाह्य संततीला रथकार असें आहे. अपवाद सांगायचा, तर देवयानी ब्राह्मणकन्या व ययाति क्षत्रिय असूनहि, त्यांच्या पुत्रांना सूत न म्हणतां क्षत्रिय मानलें गेलें.

विवाहसंबंधांत अनुलोम व प्रतिलोम या शब्दांचा व्यवहार वैदिक साहित्यांत आढळत नाही. मन्वादि स्मृतिकार मात्र याचा ऊहापोह करतात. यावरून अनुमान होतें, की वेदोत्तर कालांत वर्णव्यवस्था दृढ झाल्यावर मग अशा विवाहांचा विचार करणें भाग पडलें असावें. स्मृतिग्रंथांत वरील दोन्ही प्रकार दिसत असले, तरी धर्मशास्त्रकारांना अनुलोम विवाह तेवढेच मान्य होते. मात्र अनुलोमविवाहजन्य प्रजेचा सामाजिक दर्जा काय असावा, यावद्दल स्मृतिकारांत मतभेद आहेत. सर्वसाधारणपणे तीन मतें प्रमुख आहेत –

(१) नारद व कौटिल्य यांच्या मतें एका वर्णाच्या पुरुषाने त्या वर्णालगतच्या वर्णांतील स्त्रीशीं विवाह केला, तर ती संतति पित्याच्या वर्णाची होते.

(२) दुसरें मत असें, की अनुलोम विवाहजन्य प्रजा ही पित्यापेक्षा कनिष्ठ आणि मातेपेक्षा श्रेष्ठ दर्जाची असते.

(३) तिसरें आणि बहुमान्य मत असें, की अनुलोम विवाहजन्य प्रजा मातृवर्णी असते. प्रतिलोम प्रजा मातापित्यांपेक्षा कनिष्ठ दर्जाची समजतात.

आपस्तंब धर्मसूत्रांत चांडाल, पौल्कस व वैन या अनुलोम जातींचा उल्लेख आहे. मनूने प्रथमच या जातींच्या धंद्यांची माहिती दिलेली आहे.

सुरवातीला सहा अनुलोम आणि सहा प्रतिलोम जाती होत्या. परंतु पुढे अनुलोम आणि प्रतिलोम यांचा परस्पर व इतर वर्णांशीं संबंध आल्यामुळे त्यांतून असंख्य जाती–उपजाती निर्माण झाल्या. [हि. ध.]

अनुवत्सर पंचसंवत्सरात्मक युगसंज्ञक वर्षांपैकी चौथें वर्ष. [पु. चिं.]

अनुवह सहाव्या वातस्कंधाचा प्रमुख. हा अनुवहस्कंध ग्रह व सप्तर्षिमंडल यांच्यामध्ये असतो. [ब्रह्मांड पु. ३.५. ८७]

अनुवादक यजमान प्रायश्चित घेतो, त्या वेळीं अनुवादक हा त्याच्या पातकांचा उच्चार करतो.

अनुव्याख्यान लेखनाचा एक प्रकार (बृहदा. २. ४. १०). शंकरमतें मंत्रांचें स्पष्टीकरण म्हणजे अनुव्याख्यान होय. **पाहा** - व्याख्यान.

अनुशय बौद्ध तत्त्वज्ञानांत पुढील सहा अनुशय मानलेले आहेत – (१) राग (तृष्णा) (२) प्रतिघ (द्वेष) (३) मान (४) अविद्या (विद्याविरोधी तत्त्व) (५) दृष्टिविशेष (उदा० सत्कार्यदृष्टि, मिथ्यादृष्टि. इ.) व (६) विचिकित्सा (संशय). हे अनुशय संसाराचें मूल कारण होत. अन्य दर्शनांत वासना, कर्म, अपूर्व, अदृष्ट, संस्कार, इ. नांवानी ज्या तत्त्वांचा बोध होतो, त्यालाच बौद्धांनी अनुशय म्हटलें आहे.

बौद्ध दर्शनांत या अनुशयांच्या निरासाचा उपाय प्रामुख्याने सांगितला आहे.

अनुशयाना नायिकाभेद. अनुशय = खेद, दु:ख किंवा पश्चात्ताप. प्रियकराचें मीलनस्थान किंवा भेटीचा संकेत चुकल्याने दु:ख पावणारी परकीया स्त्री ही अनुशयाना होय. सर्वप्रथम भानुदत्ताने या नायिकेची कल्पना केली आहे.

अनुष्टुभ् गायत्र्यादि सात प्रमुख वैदिक छंदांतला तिसरा छंद. याला ब्रह्म्याचें चौथें मुख म्हटलें आहे (पु. इं.). आठ अक्षरांचा एक असे चार चरण यांत असतात. 'द्वात्रिंशदक्षरानुष्टुप्' = बत्तीस अक्षरांचा अनुष्टुभ् होतो, असें सांगितलें आहे (कौ. ब्रा. २६.१). याचें वैदिक उदाहरण–

आतिष्ठ वृत्रहन् रथं । युक्ता ते ब्रह्मणा हरी ।
अर्वाचीनं सु ते मनो । ग्रावा कृणोतु वग्नुना ।
(ऋ. १.८४.२)

ब्राह्मणग्रंथांतून वाणीलाच अनुष्टुभ् म्हटलें असून (तै. ब्रा. ३.३.१०.३) परम छंद म्हणून त्याला गौरविलें आहे (श. ब्रा. १३.३.३.१). 'अनुष्टुभिभ छन्दसां योनि:' = अनुष्टुभ् हें (सर्व) छंदांचें जन्मस्थान आहे (तां. ब्रा. ११.५.१७). हा प्रजापतीचा छंद आहे (ऐ. ब्रा. ३.१३). सर्व सोमसवनांत याचा प्रथम उपयोग करतात. याविषयीं कथा अशी ––

प्रजापतीने यज्ञाच्या शेवटीं अनुष्टुभाला अच्छावाकीय ऋचेकडे सोडून दिलें. तें न आवडून तो प्रजापतीला म्हणाला, 'मी तुझा मूळ छंद असून तूं मला आपल्यापासून दूर केलेंस; यावरून तूं सर्व देवांत अत्यंत पापी आहेस.' प्रजापतीला ती गोष्ट लागली. त्याने स्वत:वरचा दोषारोप घालविण्यासाठी सोमयाग करून अनुष्टुभाला प्रथम स्थानापन्न केलें (ऐ. ब्रा.).

वेदोत्तर काळांत या छंदाला फार महत्त्व आलें. रामायण-महाभारतादि पुराणेतिहास ग्रंथ बव्हंशीं याच छंदांत आहेत. वेदेतर वाङमयांत वाल्मीकीला हा छंद प्रथम स्फुरला.

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगम: शाश्वती: समा: ।
यत्क्रौञ्चमिथुनादेकमवधी: काममोहितम् ॥

अर्थ – हे निषादा, तूं चिरकाल जगूं नकोस; कारण तूं क्रौंच मिथुनापैकी काममोहित अशा नराला ठार केलेंस.

वाल्मीकीची ही शापवाणी प्रथमच अनुष्टुभ् छंदांत अवतरली. त्यानंतर त्याच छंदांत रामायण रचण्याचा आदेश त्याला ब्रह्मदेवाकडून मिळाला (वा. रा. १.२).

याचें लक्षण पुढील प्रमाणे –

श्लोके षष्ठं गुरु ज्ञेयं सर्वत्र लघुपञ्चमम्
द्विचतुष्पादयोर्ह्रस्वं सप्तमं दीर्घमन्ययो: ॥

अर्थ – श्लोकांत (चरणांत) सहावें अक्षर गुरु व पांचवें लघु जाणावें. तसेंच दुसऱ्या व चवथ्या चरणांतलें सातवें अक्षर ह्रस्व व पहिल्या व तिसऱ्या चरणांतलें दीर्घ असावें. [श्रुतबोध १०]

अनुस्तरणी प्रेताचें दहन करण्यापूर्वी एक गाय वा शेळी मारून तिचे अवयव प्रेताच्या अवयवांवर ठेवण्याची प्रथा प्राचीन काळीं केव्हा तरी होती. त्या गायीला वा शेळीला अनुस्तरणी अशी संज्ञा होती (कात्या. श्रौ. सू. २५.७.३४–३७; श. ब्रा. १२.५.२.१५).

अनूढा नायिकाभेद. अनूढा=अविवाहित. भोजाने सर्वप्रथम हा भेद कल्पिला. मतिरामाने हिचें लक्षण असें दिलें आहे – ' अनव्याहि केहु पुरुषसों अनुरागिनी जो होय. ' अर्थ– अविवाहित अवस्थेंत एखाद्या पुरुषावर प्रेम करणारी स्त्री (रसराज ६२). [हिं. सा. को.]

अनूप (१) एक जनपद. या जनपदाच्या स्थानासंबंधीं अनेक मतें आहेत. अनूप लोकांचा प्रदेश सुराष्ट्र व आनर्त यांच्या नजीक असावा, असें हरिवंशावरून कळतें. नासिक येथील गौतमी बलश्री हिच्या शिलालेखांत अनूपाचा उल्लेख विदर्भ व अवंति यांच्या समवेत केलेला असून, हा प्रदेश म्हणजे नर्मदाकांठच्या महिष्मती नगरीभोवतालचा प्रदेश होय, असें सुचविलें आहे. वायु पुराणांत नर्मदानूप असा एक उल्लेख आहे. यावरून कार्तवीर्य अर्जुनाचें ज्या प्रदेशावर राज्य होतें, त्याच्या जवळपास हे अनूपलोक राहत असावे, असें दिसतें. कार्तवीर्याप्रमाणेच नलराजाचा संबंधहि अनूपदेशाशीं असल्याचें समजतें. जातक ग्रंथांत अनूपिय या नगराचा उल्लेख आहे; पण त्याचा अनूप जनपदाशीं कांही संबंध आहे की काय हें त्यावरून कळत नाही. अनूप लोकांची याहून विशेष माहिती आढळत नाही. [क. हि. वा. पु.]

(२) समुद्रालगतच्या पण दलदल असलेल्या भूमीला अनूप असें म्हणत. बंगालच्या अतिदक्षिण व अतिपश्चिम प्रदेशांस अनूप अशी संज्ञा आहे. कार्तवीर्य व ताल या राजांना महाभारतांत अनूपाचे राजे म्हटलें आहे. अनूप देशांत राहणाऱ्या लोकांनाहि अनूप अशी संज्ञा होती. क्वचित् अनीप असेंहि म्हणत. [ट्रा. ए. इं.]

अनूपसिंह (१६७४–१७०९ इ. स.) हा बिकानेर (राजस्थान)चा राजा होता. लहानपणींच याला राजगादी मिळाली. हा मोठा विद्याप्रेमी व संगीतज्ञ होता. निरनिराळ्या ग्रंथांच्या प्रती करून घेऊन त्यांचा आपल्या ग्रंथालयांत संग्रह करण्याचा त्याला विलक्षण नाद होता. त्या कामासाठी त्याने आपल्या पदरीं अनेक लेखनिक बाळगले होते. बिकानेरच्या अनूप संस्कृत लायब्ररींत त्याने जमा केलेले अनेक संस्कृत ग्रंथ आहेत. शहाजहानच्या कालापर्यंत मोगलदरबारांत गायक–वादकांचा मोठा आदर होता. पण औरंजेब हा संगीतद्वेष्टा निपजला व त्यामुळे तिथून निघालेले कित्येक संगीताचार्य बिकानेरमध्ये अनूपसिंहाच्या आश्रयाला आले. त्यांतल्याच भावभट्ट नांवाच्या एका विद्वानाने त्याच्या पदरीं राहून संगीत अनूपांकुश, अनूप-संगीत-विलास, इ. ग्रंथांची रचना केली.

अनूपसिंहाचें जीवन अनेक युद्धें लढण्यांत व्यतीत झालें. या लढायांमुळे त्याचा बहुतेक काल बिकानेरच्या बाहेरच जात असे. पण या धामधुमींतहि त्याने ग्रंथसंग्रहाचें काम आवर्जून केलें. नष्ट होण्याच्या मार्गाला लागलेले कित्येक ग्रंथ केवळ त्याच्या ग्रंथसाक्षेपामुळे वांचले. हा राजा कवींचाहि पोशिंदा होता. त्याने लोकप्रियताहि मिळविली होती. चारण कवींनी राजस्थानी भाषेंत त्याच्यावर कबित्त, दोहा, वेलि, इ. अनेक प्रकारचीं प्रशस्तिकाव्यें रचलीं आहेत. [अगरचंद नाहटा]

अनूबंध्या सोमयागांत उदयनीया इष्टि झाल्यावर हा विधि होतो. यांत मित्रावरुणांना उद्देशून वंध्या गाय अर्पण करतात. पूर्वी या गायीचें हनन होत असे. पण पुढे हें कलिवर्ज्य म्हणून बंद करण्यांत आलें. गायीऐवजीं बैल किंवा पयस्या अर्पण केली तरी चालते, असें कात्यायन सांगतो. **पाहा** – अग्निष्टोम. [हि. ध.]

अनेकान्तवाद जैन धर्मांतील एक प्रमुख तात्त्विक विचार. कोणत्याहि पदार्थाकडे एकान्त पक्षाने न पाहणें याला जैन अनेकान्तनय म्हणतात. जगांत कोणतीहि वस्तु नव्याने उत्पन्न होत नाही, तर सर्व पदार्थ आपापल्या अवस्थेचें स्थित्यंतर करतात, म्हणजे एक स्वरूप सोडून दुसरें धारण करतात. प्रत्येक पदार्थास उत्पाद, व्यय व ध्रौव्य अशा तीन अवस्था असतात. पदार्थाच्या एका अवस्थेचें रूपांतर होऊन त्याला दुसरी अवस्था प्राप्त होणें, याला उत्पाद म्हणतात. रूपांतरसमयीं पहिल्या अवस्थेचा नाश होणें याला व्यय म्हणतात व तत्त्वरूपाने पदार्थाच्या अस्तित्वाचें परिणमन असणें, याला ध्रौव्य म्हणतात. पदार्थ ध्रौव्यापेक्षेने नित्य आहे व पर्यायापेक्षेने अनित्य आहे. पदार्थांत एकाच वेळीं नित्यानित्य स्वभाव असणें, याला नित्यानित्यात्मक म्हणतात. पदार्थांत एकाच काळीं अनेक धर्म असतात त्यांचें स्वरूप वर्णन करण्यास अशक्य असणें, याला अवक्तव्य धर्म म्हणतात. या दृष्टीने वस्तूंत उत्पाद, व्यय व ध्रौव्य यांच्या अपेक्षेनेहि सात भिन्न भिन्न धर्म आहेत. या सातांना मिळून जैनमतांत सप्तभंगी नय असें म्हटलें आहे. या सप्तभंगी नयानुसार पदार्थांत पुढील सात धर्म आढळतात –(१) नित्य-(२) अनित्य (३) अवक्तव्य (४) नित्यानित्य (५) नित्य अवक्तव्य (६) अनित्य–अवक्तव्य व (७) नित्यानित्य अवक्तव्य.

या सात प्रकारांनी पदार्थस्वरूप जाणण्याचे सप्तभंगी-नयाचे सात प्रकार आहेत ––

(१) **स्यादस्ति** – स्वद्रव्य, क्षेत्र, काल, भाव, या चारांच्या अपेक्षेने पदार्थाचें अस्तित्व मानणें.

(२) **स्यान्नास्ति** – सातापैकी पुढील चारांच्या अपेक्षेने पदार्थाचें अस्तित्व नाही म्हणणें.

(३) **स्यादस्तिनास्ति** – तोच पदार्थ वेगवेगळ्या काळांत आहे व नाही म्हणणें.

(४) **स्यात् अवक्तव्य** – त्या पदार्थाची स्थिति सांगतां येणें अशक्य असणें.

(५) **स्यादस्ति अवक्तव्य** – कांही अपेक्षेने पदार्थाचें अस्तित्व सांगणें अशक्य झाल्यास तिथे कथंचित् अस्तित्व सांगतां येण्यासारखें नाही, असें म्हणणें.

(६) **स्यान्नास्ति अवक्तव्य** – पदार्थाचें नास्तित्व कथंचित् सांगतां येणें शक्य असणें.

(७) **स्यादस्ति नास्ति अवक्तव्य** – पदार्थाचें अस्तित्व व नास्तित्व सांगणें शक्य व अशक्य असणें.

येणेप्रमाणे स्याद्वादाचें हें अतिसंक्षिप्त स्वरूप आहे. विशिष्ट पदार्थ असा किंवा तसाच आहे, असें समजून चालणें हा एकान्त पक्ष या वादाला मान्य नसून, विशिष्ट पदार्थ निरनिराळ्या अपेक्षेने असा किंवा तसा, असेल किंवा नसेल, असें सांगून एकान्त पक्ष टाळणें, हाच अनेकान्ताचा मुख्य हेतु आहे. एकाच स्त्रीला कोणी आई, कोणी कन्या, कोणी पत्नी, कोणी सासू, तर कोणी सून म्हणतो व निरनिराळ्या लोकांच्या अपेक्षेने सर्वांचें तें तें म्हणणें खरेंहि असतें.

पं. सुखलालजीनी या वादाविषयीं पुढील विचार मांडले आहेत ––

या विश्वाचा विचार करणाऱ्या परस्पर भिन्न दोन मुख्य

दृष्टि आहेत. एक आहे सामान्यगामिनी व दुसरी आहे विशेषगामिनी. पहिल्या दृष्टीने प्रारंभीं विश्वांत समानता दिसते व पुढे ती दृष्टि हळूहळू अभेदाकडे झुकते. शेवटीं तिचा निश्चय होतो, की जें जें कांही प्रतीतीचा विषय आहे, तें तें वास्तवांत एकच आहे. दुसऱ्या दृष्टीला विश्वांत सर्वत्र असमानताच दिसते व ती या असमानतेचें मूळ शोधतां शोधतां शेवटीं अशा भूमिकेवर जाते, की विश्वांत एकता कुठे नाहीच. फलतः तिचा निश्चय होतो, की विश्व म्हणजे केवळ भेदांचा पुंज आहे.

वरील दोन्ही दृष्टि मुळांतच भिन्न आहेत. कारण पहिलीचा आधार आहे समन्वय; तर दुसरीचा आधार आहे विश्लेषण. या दोन विचारसरणींमुळे अनेक विरोधी वाद उभे होतात. या दोन मूलभूत विचारधारांतून निर्माण होणाऱ्या किंवा त्या दोहोंशीं येनकेनप्रकारेण संबंध राखणाऱ्याहि अनेक विचारधारा प्रवाहित झाल्या आहेत. कोणी अभेद तर स्वीकारतात; पण त्याची व्याप्ति स्वरूप किंवा द्रव्य इथवर न वाढवितां देशकालापुरतीच मर्यादित करतात. या विचारधारेंत अनेक द्रव्यें मानणारेहि लोक आहेत; पण त्यांतून त्या द्रव्याची कालिकनित्यता तशीच दैशिक व्यापकता याविषयीं वाद निर्माण झाले. उदाहरणार्थ सांख्यांचा प्रकृतिपुरुषवाद. दुसऱ्या विचारधारेने भेदाचें क्षेत्र इतकें वाढविलें, की तिच्यांतून परमाणुवाद विभुद्रव्यवाद, इ. कल्पना निघाल्या.

अद्वैतवादी दृष्टीने सारे भेद असह्य मानून अभेदमूलक अनेक वादांना जन्म दिला. सत्कार्यवाद हा त्यांतलाच एक आहे. तसेंच एका बाजूने सारें विश्व अखंड व एकतत्त्वरूप मानणारा एक पक्ष व दुसऱ्या बाजूने विश्व हें निरंश, अंशपुंज मानणारा दुसरा पक्ष. या दोघांना आपलें अभीष्ट तत्त्व सिद्ध करायचें असेल, तर अनिर्वचनीयतेचाच स्वीकार करावा लागेल. कारण त्या तत्वाचें शब्दाच्या द्वारें निर्वचन होतें, असें मानल्यास त्यामुळे अखंड सतत्त्वाची सिद्धि होऊं शकणार नाही; तशीच निरंश भेदतत्त्वाचीहि सिद्धि होऊं शकणार नाही. निर्वचन करणें म्हणजे जणूं अखंडता किंवा निरंशता यांचा लोप करणें आहे. या मतांतून पुढे अनिर्वचनीय वाद निर्माण झाला. त्या वादाला टक्कर देण्यासाठी लक्षणवादी तार्किक पुढे आले व त्यांनी वस्तुमात्राचें लक्षण बनविणें केवळ शक्यच नव्हे, तर तें वास्तविकहि आहे असा दावा केला व निर्वचनीयवाद पुढे आणला.

हे सगळे एकान्तवाद होत. त्यांची पारस्परिक वादलीला पाहून अनेकान्तदृष्टीचे आचार्य अंतर्मुख होऊन विचार करूं लागले, की ' या सर्व वादांत कांही तथ्यांश आहे का? असल्यास तो किती प्रमाणांत आहे किंवा नाही ? का हें संपूर्ण सत्य आहे ? ' याचा विचार करतां करतां त्यांना एक किल्ली सांपडली. त्यामुळे सर्व विरोध मावळून त्यांना पूर्ण सत्याचें दर्शन झालें. ही किल्ली म्हणजेच अनेकान्तदृष्टि होय. अनेकान्ताच्या प्रकाशांत त्यांना दिसून आलें, की प्रतीति अभेदगामिनी असो वा भेदगामिनी असो, दोन्ही वास्तविक आहेत. भेद व अभेद यांच्या प्रतीति परस्परविरुद्ध यामुळे दिसतात, की त्या प्रत्येकीला ते ते लोक पूर्णप्रमाण मानतात. सामान्य व विशेष या दोन्ही प्रतीति या स्वविषयांत यथार्थ असूनहि पूर्ण प्रमाण ठरूं शकत नाहीत. वस्तूचें पूर्ण स्वरूप असें असलें पाहिजे, की विरुद्ध दिसणाऱ्या प्रतीतींनीहि आपल्या स्थानीं राहून त्या वस्तूला अविरोधी भावाने प्रकाशित करावें व सर्वांनी मिळून वस्तूचें पूर्ण स्वरूप प्रकाशित केल्यामुळे सर्व प्रतीति प्रमाणभूत मानल्या जाव्या. या समन्वयगर्भित विचाराच्या बळावर त्यांनी सांगितलें, की सत् द्वैत व सत् अद्वैत या दोहोंत कसलाहि विरोध नाही. कारण वस्तूचें पूर्ण स्वरूप भेदाभेदात्मक किंवा सामान्य विशेषात्मकच असतें. उदाहरणार्थ स्थान, समय, रंग, रस, परिमाण, इ. विचार केल्यावांचून आपण केवळ विशाल जलराशीचाच विचार करतों, तेव्हा आपल्याला एकच एक समुद्र प्रतीत होतो. पण त्याच जलराशीच्या विचारांत जेव्हा स्थान, समय, इ. विचार दाखल होतात, तेव्हा आपल्याला एका अखंड समुद्राच्या जागीं अनेक छोटे मोठे समुद्र दिसूं लागतात. हा भेद वाढतां वाढतां शेवटीं जलकणसुद्धा शिल्लक राहत नाही व अंतीं सर्व शून्यवत् भासूं लागतें. जलराशींत अशा प्रकारें अखंड समुद्राची बुद्धि व त्याच्या अंतिम अंशाची बुद्धि या दोन्ही वास्तविक आहेत. पहिली बुद्धि यासाठी वास्तविक, की ती भेदांना अलग अलग रूपानें स्पर्श न करतां त्या सर्वांना एकसमयावच्छेदाने (सामान्य) रूपांत पाहते. स्थान, समय, इत्यादिकृत भेद – जे एक दुसऱ्यापासून व्यावृत्त आहेत–त्यांना अलग अलग रूपाने विषय करणारी बुद्धिहि वास्तविक आहे. कारण ते भेद तसे आहेतच. साऱ्या विश्वाला एकमात्र सत् रूपानें पाहत असतां किंवा समस्त भेदांच्या अंतर्गत एकमात्र अनुगमक सत्तेचा विचार करीत असतां आपण म्हणूं शकतों, की सर्व कांही एक, एकमेव सद्रूपच आहे. कारण सर्वग्राही सत्तेचा विचार करतेवेळीं परस्परव्यावृत्त असे भेद भासत नाहीत. यालाच सत् अद्वैत म्हणतात. पण जेव्हा आपण विश्वाला गुणधर्मकृत भेदांत विभाजित करतों, तेव्हा विश्वाचें एक सत् रूप जाऊन त्या ठिकाणीं अनेक सत् रूपें प्रतीत होऊं लागतात. हेंच सत् द्वैत होय. या दोन्ही सत् अद्वैत व सत् द्वैत बुद्धि आपापल्या

विषयांत यथार्थ असल्या, तरी त्या दोन्ही जेव्हा सापेक्ष रूपाने एकत्र येतात तेव्हाच त्यांना पूर्ण प्रामाण्य लाभतें. हाच या दोन परस्परविरुद्ध समजल्या जाणाऱ्या वादांचा अनेकान्त दृष्टीने केलेला समन्वय होय.

अनेकान्त दृष्टि अनिर्वचनीयत्व व निर्वचनीयत्त्व या दोन्हीहि वादांचा झगडा मिटवते. ती सांगते, की वस्तूचें तेंच रूप प्रतिपाद्य होऊं शकतें, की जें संकेताचा विषय बनेल. सूक्ष्मतम बुद्धीच्या द्वारें केला जाणारा संकेतहि वस्तूच्या स्थूल अंशालाच विषय करूं शकतो. वस्तूचे असे असंख्य भाव आहेत, की ज्यांचें संकेताच्या द्वारें शब्दाने प्रतिपादन करणें शक्य नाही. या अर्थाने अखंड सत् स्थूल भावाने निर्वचनीय होऊं शकत असलें तरी सूक्ष्म भावाने तें अनिर्वचनीयच आहे. एकाच वस्तूची भावरूपता व अभावरूपता या दोन्हीहि परस्परविरुद्ध नाहीत. दूध हें दूध रूपानेहि प्रतीत होतें व अदधि किंवा दधिभिन्न रूपानेहि प्रतीत होतें. अशा अवस्थेंत वस्तूचें भाव–अभाव असें उभयरूप सिद्ध होऊन एकाच वस्तूंतली भावत्व व अभावत्व ही विरोधप्रतीति नाहीशी होते.

कार्य–कारणांत कार्याला केवल सत् व केवल असत् मानणारे विरोधी वाद आहेतच. त्याहि विरोधाचा परिहार अनेकान्त दृष्टि सरळ रीतीने करूं शकते. ती म्हणते, की कार्य हें उपादानांत सत्हि आहे व असत्हि आहे. कंकण बनण्याच्या पूर्वीं सुवर्णांत तें बनण्याची शक्ति आहे म्हणून उत्पत्तीच्या पूर्वींहि शक्तिरूपानें कार्य सत् म्हणतां येतें. शक्तिरूपाने सत् असूनहि उत्पादकसामग्रीच्या अभावीं तें कार्य उत्पन्न न होऊं शकल्यामुळे तें उपलब्ध होत नाही. म्हणून तें असत्हि आहे.

बौद्धांचा केवळ परमाणुपुंजवाद व नैयायिकांचा अपूर्वावयवी वाद हे दोन्ही आपसांत टकरा देतात; पण अनेकान्त दृष्टीने स्कंध या तत्त्वाचा स्वीकार करून वरील दोन्ही वादांचा समन्वय केला आहे. कारण स्कंध हा केवळ परमाणुपुंज नाही, तसाच तो अनुभवबाधित अवयवांनी भिन्न असा अपूर्व अवयवीरूपहि नाही. अशा प्रकारें अनेकान्त दृष्टीने अनेक विरोधी वादांचा समन्वय मध्यस्थ भावाने केला आहे. असें करीत असतांना अनेकान्तवादाच्या बरोबरच नयवाद व भंगवाद आपोआप फलित होतात; कारण पदार्थांचे वेगळे वेगळे पैलू, त्यांच्या विषयमर्यादेचा विभाग व त्यांचा एकाच विषयांत यथोचित विन्यास या गोष्टी करून अनेकान्तवाद सिद्ध झाला आहे.

वैदिक परंपरेंतल्या न्याय, वेदान्त इ. दर्शनांत तसेंच बौद्ध दर्शनांत कोणत्याहि एका वस्तूचें विविध दृष्टींनी निरूपण करण्याची पद्धति, तसेंच अनेक पक्षांच्या समन्वयाची दृष्टिहि दिसून येते; नाही असें नाही. पण तरीहि प्रत्येक वस्तु व तिचा प्रत्येक पैलू यांच्यावर संभाव्य समग्र दृष्टींनी विचार करण्याचा आत्यंतिक आग्रह, तसेंच समग्र दृष्टिबिंदूंच्या समन्वयांतच विचाराची परिपूर्णता मानण्याचा आग्रह, जैनपरंपरेशिवाय अन्यत्र दिसत नाही. त्याच आग्रहांतून जैन तार्किकांनी अनेकान्त, नय व सप्तभंगीवाद यांचें स्वतंत्र व व्यवस्थित शास्त्र निर्माण केलें. जैन दर्शन सर्व दृष्टींचा समन्वयहि करतें व सर्व दृष्टींना आपापल्या विषयांत तुल्यबल व यथार्थहि मानतें. [जैन धर्म; दर्शन और चिंतन]

अनैयूर तिरुमंगल तालुक्यांतील सुमारें हजार वस्तीचें खेडें. नांवाचा अर्थ हत्तीचें खेडें असा होतो. याची आख्यायिका अशी – इंद्राच्या ऐरावताचा वर्ण दुर्वासाच्या शापामुळे काळा झाला होता. या खेडयांत असलेल्या देवालयाजवळील भुईकमल तलावांत त्या हत्तीने आंघोळ केली, तेव्हा त्याचा वर्ण पुन्हा पांढरा होऊन त्याला पूर्वपद प्राप्त झालें. तो पुढे त्याच खेडयांत राहिला व तिथेच मृत झाला. इ. स. १८७७ सालीं केलेल्या उत्खननांत येथे हस्तिदंताचे कांही अवशेष सांपडले आहेत. त्यावरून पूर्वीं केव्हातरी येथे हत्ती पुरलेला असावा, असें दिसतें. इथलें देऊळ ऐरावतेश्वराला अर्पण केलेलें आहे. तें उग्रपांडय नांवाच्या राजाने बांधल्याचें सांगतात. [मदुरा गॅझे.]

अनोदना सप्तमी चैत्र शु. ७ मी. षष्ठी व सप्तमी दोन्ही दिवस केवळ पाणी पिऊन उपवास. ७ मीस सूर्यपूजा. [हे. व्र.]

अनोमा गोरखपूर जिल्ह्यांतील औमी नदीचें प्राचीन नांव. बुद्धाने कपिलवस्तूचा त्याग केल्यावर तो या नदीच्या तीरीं आला व त्याने इथे विरक्त मठवासी जीवनाचा स्वीकार केला. [हि. जॉ. ए. इं.]

अन्न 'अद्यते अस्मै इति' = ज्याला खाल्लें जातें तें (विग्रह कोश). अन्न व त्याच्या जोडीचे दुसरे कांही पदार्थ यांची व्याख्या व्रतराजांत पुढीलप्रमाणे सांगितली आहे–

सस्यं क्षेत्रगतं प्राहुः सतुषं धान्यमुच्यते ।
आमं वितुषमित्युक्तं स्विन्नमन्नमुदाहृतम् ।।

अर्थ–शेतांतल्या पिकाला सस्य, कोंडयासहित दाण्याला धान्य, कोंडा काढून निराळें केलेल्या धान्याला आम व पाणी घालून अग्नीवर शिजविलें म्हणजे त्याला अन्न म्हणतात.

वैदिक आर्यांची अन्नविषयक भावना भव्य होती. ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलांत अन्नस्तुति नांवाचें एक सूक्त आहे. त्यांत अगस्त्य ऋषि म्हणतो, ' हे सोमा, श्रेष्ठ देवांचें मन तुझ्यावर बसलें आहे. दूध वा धान्य यांचे जे पदार्थ आम्ही खातों, त्यांचेंहि हे रसा, तूंच पोषक सार हो. तूं हृदयांतील जीवनरस आणि तूंच (बुद्धीला) उज्वलता देणारा हो' (ऋ. १.१८७). अन्न हें सुख देणारें, द्वेषरहित, सुखोत्पादक व अद्वितीय मित्र असतें, असेंहि वरील सूक्तांत म्हटलें आहे. अन्नाविषयीं वेदांत वारंवार प्रार्थना केलेली दिसते. 'अन्नं वै वाजः'= अन्न म्हणजेच पोषक द्रव्य होय (तां. ब्रा. १३.९.१३). 'अन्नं वा आयतनम्' = अन्न हेंच स्थान आहे. (श. ब्रा. ७.५.१.२०).'अन्नं प्राणः' = अन्न म्हणजेच प्राण होय (तै. ब्रा. ३.२.३.४). अन्न हें विराट् (शोभा व महत्त्व देणारें) आहे. म्हणून ज्याच्याजवळ अन्न भरपूर आहे, तोच लोकांमध्ये पुष्कळ महत्त्व पावतो (ऐ. ब्रा. १.५). स्वतःच्या प्रकृतीला मानवेल इतकेंच अन्न माणसाचें रक्षण करतें. त्याहून अधिक सेवन केल्यास घात करतें व गरजेपेक्षा कमी घेतल्यास कृश करतें (श. ब्रा. ७.५.१.१४). अन्न म्हणजेच श्री (शोभा) आहे.

अन्नं प्राणमन्नमपानमाहुः । अन्नं मृत्युं तमु जीवातुमाहुः ।
अन्नं ब्रह्माणो जरसं वदन्ति । अन्नमाहुः प्रजननं प्रजानाम् ।।
(तै. ब्रा. २.८.८.३)

अर्थ – अन्न हें प्राण आणि अपान आहे. तें मृत्यु व जीवनरसायन आहे. तें तारुण्य देणारें आहे, असें ब्राह्मण म्हणतात. तें प्रजांची उत्पत्ति करणारें आहे.

असे अन्नाबद्दल वैदिक वाङ्मयांत अनेक ठिकाणीं उल्लेख आहेत.

प्राचीन मानव गुहांत राहून मांस व कंदमुळें यांवर निर्वाह करीत असे. विविध साधनांच्या द्वारें शेती करून धान्य निर्माण करणें व तें उदरनिर्वाहाचें साधन बनविणें, हा मानवी संस्कृतीच्या विकासांतला एक महत्त्वाचा टप्पा आहे. वेदकाळांत मातृ या धान्यावर विशेष भर होता. यजुर्वेदांत ही धान्याची यादी वाढली आहे. आज प्रचारांत असलेलीं सर्व धान्यें त्या यादींत आढळतात. शिवाय दहि, मध, तूप, हे पदार्थहि अन्न व परम अन्न म्हणून सांगितले आहेत (श. ब्रा. ९.२.१.१२). अग्नीच्या साहाय्याने धान्यें शिजवून भोजन करणें, ही पद्धतहि अत्यंत प्राचीन आहे. धान्याच्या लाह्या बनविण्याची पद्धतहि मानवांना प्राचीन काळापासून अवगत होती. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत धान्यांचा उपयोग करण्याच्या अनेक पद्धति दिल्या आहेत. त्यांचीं नांवें अशीं–– (१) कुट्टककर्म–कुटणें (२) पिष्टकर्म– पीठ करणें (३) सक्तुकर्म– भाजणें व (४) तैलपीडन– तेल काढणें.

अन्नाचे प्रकार–– अन्न चतुर्विध मानलेलें आहे–(१) भक्ष्य–चावून खाण्याचें (२) पेय–पिण्याचें (३) लेह्य–चाटून खाण्याचें व (४) चोष्य–चोखून खाण्याचें.

अन्नरस––हे सहा प्रकारचे मानलेले आहेत–(१) मधुर (२) अम्ल–आंबट (३) क्षार–खारट (४) कडु (५) तुरट व (६) तिक्त–तिखट.

माणसाला अन्नाची किंमत फार प्राचीन काळापासून कळलेली आहे. तें निर्माण करणें, त्याचें रक्षण करणें आणि तें पुढे मिळण्याची नक्की तरतूद करणें, या अन्नधान्यविषयक क्रियाकलापांतून सर्व जगभर अनेक धार्मिक उत्सव व सण निर्माण झाले आहेत. अशा सणासमारंभांतून अन्नाचे माहात्म्य गायिलें जाई. अन्नाचें रक्षण व्हावें व त्याची नासधूस होऊं नये म्हणून फार खबरदारी घेतली जाई. त्यासाठी कांहीं नियमहि करण्यांत आले होते. अन्नाचा दुरुपयोग करूं नये याविषयीं सर्व भाषांत म्हणी व वाक्प्रचार आहेत.

पोषण या दृष्टीनेच नव्हे, तर सामाजिक दृष्टीनेहि अन्न-संशोधन व अन्नसमृद्धि या गोष्टी मानवी क्रियेच्या बुडाशीं वास्तव्य करतात. अन्नाचा पुरवठा म्हणजे श्रमाची प्राथमिक अवस्था व त्याचा संचय म्हणजे संपत्तीची प्राथमिक अवस्था होय. अन्नसंचय हीच प्राथमिक संपत्ति होती. धर्म आणि नीति यांच्याशीं अप्रत्यक्षपणे अन्नाचा संबंध आहे. नैतिक कायद्याचा आरंभहि विशिष्ट अन्नाच्या निषेधापासूनच होतो. रानटी व सुधारलेल्या समाजांतला मुख्य फरक अन्नमूलक आहे. रानटी समाज नैसर्गिक अन्नावर अवलंबून राहतो; तर सुधारलेला समाज अन्न निर्माण करतो आणि हंगाम नसेल त्या वेळीं उपासमार होऊं नये, म्हणून त्याचा संग्रहहि करतो.

अन्नोत्पादनाच्या प्रकारांपेक्षा पाकसिद्धीचे प्रकार अधिक आढळतात. सर्व पाकशास्त्र, भाजणें व शिजविणें या दोन गोष्टींत सामावलेलें आहे. पदार्थाला अग्नि देणें म्हणजे भाजणें व पाण्यांत अन्नाला अग्नीची उष्णता देऊन तें मऊ करणें, म्हणजे शिजविणें होय. तापून लाल झालेले दगड पाण्याच्या भांड्यांत टाकून तें पाणी अन्न शिजविण्याजोगें गरम करणें, हा प्राचीन प्रकार आहे. विस्तवावर अन्न शिजविण्याची पद्धत ही त्यानंतरची होय. विशिष्ट प्रकारचे अन्ननिषेध हे सर्वांना अन्न उपलब्ध व्हावें व अन्नपदार्थांची वृद्धि व्हावी, म्हणूनच मूलतः सांगितले गेले. त्यांना धार्मिक व नैतिक महत्त्व पुढील काळांत प्राप्त झालें. [वै. वि. भा. पं.; ए. रि. ए.; म. ज्ञा. को.]

अन्नकूट विविध प्रकारचीं पक्वान्नें आणि खाद्य पदार्थ तयार करून ते कृष्ण-मूर्तीच्यापुढे मांडणें व कृष्णाला त्यांचा नैवेद्य दाखविणें याला अन्नकूट म्हणतात. कार्तिक शु. १ दा ही याची तिथि आहे.

कार्तिकस्य सिते पक्षे अन्नकूटं समाचरेत् ।
गोवर्धनोत्सवं चैव श्रीविष्णुः प्रीयतामिति ॥
(सनत्कुमारसंहिता)

अर्थ– कार्तिकाच्या शुक्ल पक्षांत अन्नकूट आणि गोवर्धनोत्सव श्रीविष्णूच्या प्रीतीसाठी आचरावा.

अन्नकूट म्हणजे वास्तवांत गोवर्धनाचीच पूजा होय. प्राचीन काळीं हा उत्सव इंद्राप्रीत्यर्थ होत असे; पण वैष्णव संप्रदाय बलवान् झाल्यावर इंद्रपूजेचें रूपांतर गोवर्धनपूजेंत केलें गेलें. गोवर्धन पर्वत हा मथुरेजवळ असून त्यालाच अन्नकूट असें नांव आहे (हि. ध.). याची कथा अशी–

एकदा श्रीकृष्ण गवळ्यांसह गोवर्धन पर्वतावर गायी चारीत असतां एके दिवशीं गवळ्यांनी तिथे लतामंडप उभारायला सुरवात केली. कृष्णाने त्याचें कारण विचारतां ते गवळी म्हणाले, 'दर वर्षी आम्ही इंद्राप्रीत्यर्थ इंद्रमख नांवाचा उत्सव करतों. त्यामुळे अतिवृष्टि आणि अनावृष्टि यांचें भय न उरतां देशांत सुखसंपदा नांदते.'

त्यावर कृष्ण म्हणाला, 'तुम्ही लोक मूर्ख आहां. इंद्राचा आपला कांही संबंध नाही. गोवर्धन हाच आपला आणि आपल्या गुरावासरांचा पोशिंदा आहे. आपण उत्सव करायचा, तर तो या पर्वताचा करावा.'

त्यावर नंदाने सगळ्या गवळ्यांची सभा भरविली. त्या सभेंत कृष्णाने आपलें मत मांडलें व लोकांना तें मान्य झालें. गोकुळांतल्या लोकांनी त्या वर्षी गोवर्धनाचा उत्सव मांडला. हें वर्तमान नारदाकडून इंद्राला समजलें. इंद्र क्रुद्ध झाला. त्याने गोकुळावर मुसळधार वृष्टि केली. कृष्णाने आपल्या करांगुलीवर गोवर्धन उचलून धरून त्याच्या खाली सगळें गोकुळ सुरक्षित राखलें. इंद्राचा गर्व हरण होऊन तो कृष्णाला शरण आला. तेव्हापासून गोवर्धनपूजा सुरू झाली.

व्रजमंडलांत अन्नकूटाचा उत्सव समारंभाने साजरा होतो. त्या दिवशीं मिठाईच्या पदार्थांची देवापुढे रास उभारतात. राजस्थानमधील नाथद्वारा आणि काशींतलें अन्नपूर्णामंदिर या ठिकाणीं त्या दिवशीं भाताचे डोंगर रचतात. उदेपूरमध्ये या दिवशीं मिरवणूक निघते. हतींची साठमारी व दारूकामहि होतें. [व्रतचंद्रिका]

अन्नद मन्त्र या मंत्राचा ऋषि ब्रह्मा, छंद निचृद्, देवता गायत्री, वसुधा आणि श्री, बीज ग्लौम् व शक्ति श्रीम् आहे. मंत्र असा–

अन्नं मह्यन्नं मे देह्यन्नाधिपतये ममान्नं प्रदापय स्वाहा ।

मंत्राचा प्रयोग करतांना तो ॐ ग्लौं श्रीम् या बीजांनी संपुटित (मंत्रारंभीं ॐ ग्लौं श्रीम् या क्रमाने व मंत्रान्तीं उलट क्रमाने बीजें लावणें) करतात. मंत्राची साधना करतांना मंत्र-देवता वसुधा व श्री यांचें ध्यान करायचें असतें. सुरुवातीस पीठ-शक्तींची स्थापना, अष्टशक्तींची पूजा, इ. विधि करून मग मूलमंत्राचा एक लक्ष जप रोज ठराविक संख्येने पुरा करतात. जप पुरा झाल्यावर घृतयुक्त अन्नाचें हवन (दशसहस्र संख्येने) करतात. असें हें पुरश्चरण केल्याने मंत्र सिद्ध होऊन यजमानाला विपुल अन्न (धान्य) मिळतें. [मं. म.]

अन्नदान अखिल जीवसृष्टीला जीवधारणेसाठी कशाची अत्यंत आवश्यकता असेल, तर ती अन्नाची होय. 'स वा एष पुरुषोऽन्नरसमयः' (तो हा पुरुष अन्नरसमय आहे) असें तै. उपनिषदांत म्हटलेंअसून 'अन्नं ब्रह्म' (अन्न हेंच ब्रह्म) अशीहि घोषणा केलेली आहे (२.१). ब्रह्माचें जें लक्षण तेंच अन्नाचेंहि सांगितलें आहे. अन्नापासूनच हीं सर्व भूतें उत्पन्न होतात, अन्नावरच जगतात आणि अखेर अन्नाप्रत जाऊन त्यांतच लय पावतात (तै. उ. ३). अन्नाला प्राण व आयु असेंहि म्हटलें आहे. शरीर व प्राण यांचा जो योग, त्यालाच आयु म्हणतात. आणि या दोहोंचीहि धारणा अन्नानेच होत असते. म्हणूनच सर्व दानांत अन्नदान श्रेष्ठ मानलें आहे. आपल्या परिवाराला कमी करूनहि क्षुधिताला प्रथम जेवू घालावें. अन्नदान करतेवेळीं अतिथीचें नांव, गांव, कुलशील, कांहीहि पाहूं नये व जो क्षुधित तो सत्पात्र समजावा असेंहि सांगितलें आहे अन्नदानाची प्रशंसा कारणारे कांही श्लोक हलायुधकोशांत पुढीलप्रमाणे दिले आहेत–

अन्नदस्य मनुष्यस्य बलमोजो यशांसि च
कीर्तिश्च वर्धते शश्वत्त्रिषु लोकेषु पाण्डव ॥ १ ॥
अन्नदानात्परं दानं न भूतं न भविष्यति ।
पुण्यं यशस्यमायुष्यं बलपुष्टिविवर्धनम् ॥ २ ॥

अर्थ – अन्नदान करणाऱ्या मनुष्याच्या बल, ओज, यश, कीर्ति या गोष्टी तीन्ही लोकांत वाढतात (१). अन्नदानाहून श्रेष्ठ दान झालें नाही व होणार नाही. (तें) पुण्य, यश, आयुष्य, बल व पुष्टि वाढविणारें आहे.

(२). अन्नदानानें पुण्य मिळतें असेंहि सांगितलेलें आहे.

अन्नदेव गोंड जातीची कृषिदेवता. मकर संक्रांतीला या देवाचा उत्सव होतो. या दिवशीं शेतांत सामुदायिक भोजन व नाचगाणीं करतात.

अन्नपूर्णा अन्नपूर्णा म्हणजे अन्नधान्य पुरवणारी देवता. हा पार्वतीचा अवतार आहे. काशींत हिचें मंदिर असून त्या क्षेत्रांतली समस्त जनता जेवल्याशिवाय ती अन्नग्रहण करीत नाही, अशी तिची आख्यायिका आहे. चांद्रसेनीय कायस्थांत गृहिणी आपला पति प्रवासाहून घरीं येण्याच्या वेळीं हिची पूजा करते, हिच्या मस्तकावर पिवळचा अक्षता वाहते व प्रार्थना करते, की ' घरीं येणाऱ्या थोर पाहुण्याचें (पतीचें) रक्षण कर. '



अन्नपूर्णा – काशी

श्रीविद्यार्णवतंत्रांत हिची मूर्ति पुढीलप्रमाणें करावी, असें सांगितलें आहे–

सुवर्णवर्णा, शशिकला धारण करणारी, त्रिनेत्र, भू-श्रीपूजित, डाव्या हातीं पानपात्र, उजव्या हातीं पळी व दृष्टि नृत्य करणाऱ्या शिवाकडे लागलेली. हिचा मंत्र –

ॐ श्रीं ऱ्हीं क्लीं नमो भगवति अन्नपूर्णे
ममाभिलषितमन्नं देहि देहि स्वाहा ।

या मंत्राचा ऋषि द्रुहिण, छंद कृति, व देवता अन्नपूर्णेश्वरी आहे. या मंत्राचें सव्वालक्ष पुरश्चरण सांगितलें आहे. हिची कथा पुढीलप्रमाणे —

शिव भिक्षाटन करून आपल्या कुटुंबाचें पोषण करीत असे. एक दिवस त्याला पुरेशी भिक्षा मिळाली नाही व त्याचा परिवार उपाशी राहिला. त्या वेळीं नारदाने तिथे येऊन कलागत लाविली, की पार्वतीच्या अशुभ पायगुणामुळे हें दैन्य आलें आहे. लगेच पार्वतीकडे जाऊन नारद म्हणाला, की ' शिव हा दुर्भागी असल्यामुळे तुझी अशी उपासमार होत आहे.' तें ऐकून पार्वतीने शिवाचा त्याग करण्याचें ठरविलें. त्यावर नारद तिला म्हणाला, ' तूं आज शिवाच्या आधी भिक्षेला जा.' पार्वतीने तसें केलें. तिला खूप भिक्षा मिळाली. मागाहून शिव भिक्षेला गेला. त्याला रिकाम्या झोळीने परत यावें लागलें. पण पार्वतीने आपल्या भिक्षेंतून त्याला पोटभर भोजन वाढलें. त्यामुळे शिव प्रसन्न होऊन तिला म्हणाला, ' तूं अन्नपूर्णा आहेस. ' [अ. अ.]

अन्नप्राशन एक शिशुसंस्कार. मुलाला प्रथम अन्न भरविण्याचा हा संस्कार आहे. मूल जन्मल्यानंतर सहाव्या महिन्यांत हा संस्कार करावा, असे बहुसंख्य स्मृतिकारांचें मत आहे. मुलाला पुष्टि, तेज, चपळपणा व कांति प्राप्त व्हावी यासाठी पित्याने बकऱ्याचें व कवडयाचें मांस, मासे किंवा भात शिजवून त्यांत दही, दूध, तूप मिसळून तें अन्न महाव्याहृतींच्या उच्चारासह मुलाला भरवावें, असें शांखायन स्मृतींत सांगितलें आहे. कांही स्मृतिकार होम, ब्राह्मणभोजन व आशीर्वाद हे विधि अधिक सांगतात. मुलाला भरवितांना 'अन्नपतेऽन्नस्य...' हा मंत्र म्हणावा असें आश्व. गृह्य सूत्रांत सांगितलें आहे. अलिकडे सामान्यतः सहाव्या महिन्यांत शुभ दिवशीं मुलाला आईच्या मांडीवर बसवून सोन्याचांदीच्या पात्रांतून त्याला खीर भरवितात. महाराष्ट्रांत याला उष्टावण असें म्हणतात. उष्टावणासाठी चांदीचें भांडें आणि चमचा मुलाच्या मामाने द्यायचा असा संकेत आहे. मुलाला भरवून झाल्यावर त्याच्यापुढे वस्त्र, शस्त्र, पुस्तक, लेखणी व कारागिरीच्या वस्तु मांडून ठेवतात. ज्या वस्तूला मुलगा स्पर्श करील, त्या वस्तूच्या अनुरोधाने तो आपली उपजीविका चालवील, असें समजतात.

अन्नंभट्ट (इ. स. १५ वें शतक) या तेलंगी ब्राह्मणाचा जन्म तेलंगणांतील गरिकपाद या गांवीं झाला. कोंडवीडु येथील संस्कृत पाठशाळेंत याने बारा वर्षे अध्ययन करून न्यायशास्त्रावर प्रभुत्व मिळविलें. पुढे याने ' बालानां सुखबोधाय ' म्हणजे नवीन विद्यार्थ्यांना न्यायशास्त्रांतले पदार्थ आणि सिद्धान्त सुलभपणें कळावे म्हणून तर्कसंग्रह या ग्रंथाची रचना केली. हा ग्रंथ न्यायशास्त्रांत नांवाजता ठरला आहे. न्यायाचे विद्यार्थी प्रथम हाच ग्रंथ पढतात. पुढे याने स्वतःची पाठशाळा स्थापून तिथे आपल्या पद्धतीने न्यायाचें अध्यापन सुरू केलें. याचे विद्यार्थी न्यायशास्त्रांत फार नांवाजले. याने वयाच्या ५५ व्या वर्षीं मल्लिकार्जुनाची यात्रा केली. त्या आधी आणि त्यानंतर हा कुठल्याहि प्रवासाला गेला नाही. याने कोणाहि राजाकडे व धनिकाकडे कधी तोंड वेंगाडलें नाही. त्याच्यापाशी जें होतें, तेवढयावरच संतोष मानून त्याने

अध्यापनांत आपलें आयुष्य वेंचलें. [कविचरित्र]

अन्नमय कोश पंच कोशांतील एक. पंचमहाभूतांपासून बनलेलें हें शरीर मृत्यूनंतर आपल्या मूल घटकांत विलीन होतें. या स्थूल शरीराला वेदान्तांत अन्नमय कोश, असें म्हटलें आहे. याचें पोषण अन्नामुळे होतें व जागृतावस्थेंत जीव या कोशांत वास्तव्य करतो. [स. पॉ.]

अन्नमय्या (१४२३–१५०२ इ. स.) तेलुगु भाषेचा एक महान् कवि. याचा जन्म आंध्र प्रदेशांतल्या ताल्लपाक या गांवीं झाला. वयाच्या सोळाव्या वर्षी हा तिरुपति क्षेत्रांत वास्तव्याला गेला. तिथे त्याने वेंकटेशाची उपासना सुरू केली. तो देवाच्या स्तुतिपर अशीं पदें नित्य रची व गाई. याने एकूण ३२,६०० पदें रचलीं, अशी आख्यायिका आहे. पण सांप्रत तेवढीं उपलब्ध नाहीत. जीं आहेत, तीं सर्व वेंकटेश्वर देवस्थानांतल्या एका खोलींत सुरक्षित ठेवलेलीं आहेत. त्या खोलीला ताल्लपाक वारि कोट्टु असें म्हणतात. त्या खोलीच्या भिंतीवर अन्नमय्याची मूर्तीहि कोरलेली आहे. या कवीचें श्रीसर्वेश्वरशतक हें काव्य प्रसिद्ध आहे. त्यांतल्या प्रत्येक पदाच्या चौथ्या चरणांत वेंकटेश्वरा असें संबोधन असतें. त्याला संकीर्तनाचार्य ही उपाधि होती. तो जसा कवि, तसाच उत्तम संगीतज्ञहि होता. त्याने आपलीं कीर्तनें साठ राग-रागिण्यांत रचलीं आहेत. त्यागराजाने ज्या प्रकारच्या कीर्तनसाहित्याला पराकोटीला पोचविलें, त्याचा श्रीगणेशा अन्नमय्याने केला होता. अन्नमय्याचा असा एकच परिवार आहे, की ज्याच्या पुत्रपौत्रांनीसुद्धा वेंकटेशाच्या आराधनेंतच आपलें आयुष्य वेंचलें. अन्नमय्याच्या कित्येक रचना ताम्रपत्रांवरहि खोदलेल्या आढळल्या आहेत. याचीं सर्व कीर्तनें अलिकडेच वेंकटेश्वर-देवस्थानसमितीने ११ भागांत प्रकाशित केलीं आहेत. [आंध्र भारती–बालशौरि रेड्डी]

अन्नम्म द. भारतांतली ग्रामदेवता. ही सात बहिणींतली प्रमुख आहे. हिच्या वार्षिक जत्रेंत भक्तगण जळत्या निखाऱ्यांवरून चालून जातात. **पाहा**–अग्निनृत्य. [व्हि. गॉ. सा. इं.]

अन्नसमर्पणाविधि कोणत्याहि निमित्ताने ब्राह्मणभोजन घालतेवेळीं पानें वाढून झाल्यावर जो विधि करतात, त्याचें हें नांव आहे. याला उदक सोडणें, असेंहि म्हणतात. प्रथम गायत्री मंत्राने पानें प्रोक्षण करतात मग ‘ प्रजापते न त्वदेतानि.... ’ (ऋ १०.१२१.१०) हा मंत्र म्हणून मग पुढील श्लोक म्हणतात–

> **एको विष्णुर्महद्भूतं पृथक् भूतान्यनेकशः ।**
> **त्रींल्लोकान् व्याप्य भूतात्मा भुङ्क्ते विश्वभुगव्ययः ।।**

अर्थ–श्रीविष्णु हें एक महाभूत आहे. वेगवेगळीं भूतें अनेक आहेत. विश्व भोगणारा अव्यय असा भूतात्मा तीन्ही लोकांना व्यापून भोजन करीत असतो.

हा श्लोक म्हणून यजमान उदक सोडतो. या ब्राह्मण-भोजनाने त्या त्या कर्माची देवता संतुष्ट होवो, असें यजमान म्हणतो. मग ब्राह्मण भोजनास प्रारंभ करतात. [ऋ. ब्र. क.]

अन्नसूक्तें ऋग्वेदांतील ‘ पितुं नु स्तोषम्...’ (१. १८७) हें समग्र सूक्त व कयानश्चित्र...’ (४.३१.१ – ३) हे मंत्र यांना अन्नसूक्तें म्हटलें आहे. पार्वणश्राद्धांत पानें वाढीत असतां हीं सूक्तें म्हणतात.

अन्यथानुपपत्ति ‘स्वाभावप्रयोज्यासम्भवः ’=कोणत्या तरी अत्यावश्यक कारणावांचून कोणत्या तरी गोष्टीची सिद्धि न होणें, याचें नांव अन्यथानुपपत्ति. हिचें स्पष्टीकरण पुढील अनुमान मांडून सांगतां येतें– ‘देवदत्तो रात्रिभोजी दिवा अभुञ्जानत्वे सति पीनत्वात् ’ (=देवदत्त दिवसा जेवत नसूनहि लठ्ठ दिसतो, त्यामुळे तो रात्रीं जेवत असावा). इथे दिवसा न जेवणाऱ्या देवदत्ताचें लठ्ठपण, रात्रीं भोजन करीत असल्यावांचून अनुपपन्न (असंभाव्य) आहे. [न्यायकोश]

अन्यथासिद्धि ‘ यस्य कारणतां विनापि सिद्धिः ’ =एखाद्या कारणाचें असणें किंवा नसणें असलें तरी कार्याची सिद्धि होणें (ल. सं.). कार्याच्या उत्पत्तींत ज्याची आवश्यकता नसते, किंवा असली तरी दुसऱ्या कोणत्या तरी कारणाच्या द्वारें ती असते, अशा कारणाला अन्यथासिद्ध कारण म्हणतात. न्यायशास्त्रांत घटाची उत्पत्ति या कार्याला दंडत्व, दंडाचें रूप, आकाश, कुंभाराचा बाप व माती वाहून आणणारें गाढव, हीं अन्यथासिद्ध कारणें मानलीं आहेत. यांच्यावांचूनहि घटाची उत्पत्ति होऊं शकेल; पण मुख्य कारण जें माती, त्यावांचून मात्र घट उत्पन्न होणार नाही. ही कारणकल्पना न्यायशास्त्रांत गंगेशोपाध्यायांपासून (१३ वें शतक) सुरू झाली.

अन्यसंभोगदुःखिता नायिकाभेद. पतीने वा प्रियकराने अन्य स्त्रीशीं संभोग केल्यामुळे म्हणजेच आपल्या प्रेमाशीं प्रतारणा केल्यामुळे जिला दुःख झालें आहे, अशी स्त्री. भानुदत्ताने सर्वप्रथम अशा नायिकेची कल्पना मांडली. हिंदी भक्तिकाव्यांत मर्यादित व रीतिकाव्यांत व्यापक रूपाने हिचें चित्रण झालें आहे. [हिं. सा. को.]

अन्वय-व्यतिरेक 'यत्सत्त्वे यत्सत्त्वम्'–अन्वयः (= एक गोष्ट असतां दुसरी गोष्ट असणें याला अन्वय म्हणतात.) उदा० धूम असतां त्या ठिकाणीं अग्नि असणें. 'यदभावे यदभावः'–व्यतिरेकः (= एका गोष्टीचा अभाव असतां दुसरी गोष्ट नसणें, याला व्यतिरेक म्हणतात.) उदा० अग्नि नसतां धूम नसणें. **पाहा**–अनुमान.

अन्वष्टका एक श्राद्धप्रकार. यालाच अन्वष्टक्य असेंहि म्हणतात–

अष्टकामनुक्रियते इत्यन्वष्टक्यं कर्म –

अर्थ––अष्टकांच्या मागून केलें जातें, म्हणून या कर्माला अन्वष्टक्य म्हणतात.

ही व्याख्या रुद्रस्कंदाने खादिर गृह्यसूत्राच्या टीकेंत (३. ५.) सांगितली आहे. भाद्र० कृष्ण पक्षांतील मघा नक्षत्रावर अन्वष्टका श्राद्ध करतात. याचा विधि पिंडपितृयज्ञाप्रमाणेच असतो. या वेळीं स्त्रीपितरांना पिंडदानाबरोबरच दारू अर्पण करावी, असें सांगितलें आहे (पार. गृ. सू.३.३). या सुरा–दानाविषयीं डॉ. काणे यांनीं पुढील तर्क केला आहे– समाजांतल्या चालीरीतींप्रमाणे पुरुषांनी मद्यपान बंद केलें असलें, तरी बायका चोरून मद्यपान करीत असाव्या किंवा गृह्य-सूत्रांच्या कालापूर्वीं आंतरजातीय विवाह होत असल्यामुळे ब्राह्मण हे क्षत्रियांच्या आणि वैश्यांच्या मुली करीत असावे आणि त्यांना मद्यपानाची सवय असावी. **पाहा**– अष्टका. [हि. ध.]

अन्वाख्यान आख्यानाला पूरक असा कथाभाग. (श. ब्रा. १०.१६.९) **पाहा**–आख्यान.

अन्वाधान (अनु + आधान) श्रौत-स्मार्तकर्मांत अग्नीची स्थापना केल्यानंतर आचार्य हातांत समिधा घेऊन 'अस्मिन्नन्वाहितेऽग्नौ...' अशी सुरुवात करून कर्माच्या देवतांचा व हविर्द्रव्यांचा निर्देश करतो व मग त्या समिधेचा होम करतो. याला अन्वाधान म्हणतात. [सं कौ.]

अन्वारंभ श्रौत–स्मार्तकर्म करतेवेळीं पत्नीने पतीच्या हातास हात लावणें, अथवा यजमानाने आचार्याच्या हातास दर्भ लावणें. [सं. कौ.]

अन्वारंभणीया इष्टि दर्श-पूर्णमास इष्टि प्रथमच करायची असेल, तर ही इष्टि करतात. सरस्वतीला दोन आहुती देऊन ही इष्टि सुरू करतात. हिच्यांत अग्नाविष्णूंना एकादशकपाल पुरोडाश, सरस्वतीला चरु व सरस्वान् आणि भगिन् अग्नि यांना अनुक्रमें एकादश-कपाल व अष्टाकपाल पुरोडाश देतात. ही इष्टि एकदाच करतात. **पाहा**–पुरोडाश, दर्श–पूर्णमास. [हि. ध.]

अन्वारोहण पतीचें प्रेत चितेवर ठेवतांच सतीने त्याच चितेवर स्वतःला जाळून घेण्यासाठी आरोहण करणें, याला अन्वारोहण म्हणतात. याचा विधि पुढीलप्रमाणें–

प्रथम संकल्प. नंतर सुवासिनींना सौभाग्यवायनें देणें. अग्नी-जवळ जाऊन पंचरत्नें व नील अंजन पदरास बांधणें. तोंडांत मोतीं धरणें. नंतर पुढील मंत्राने अग्नीची प्रार्थना ––

स्वाहासंश्लेषनिर्विण्ण सर्वगोत्र हुताशन ।
सत्त्वमार्गप्रदानेन नय मां भर्तुरन्तिकम् ॥

अर्थ––हे स्वाहेच्या आलिंगनाने सुख पावलेल्या सर्वगोत्र अग्ने, मला सत्त्व (प्रकाशमय) मार्ग दाखवून पतीच्या जवळ घेऊन जा.

नंतर अग्नि, विष्णु, काल,पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, ब्रह्मा व रुद्र यांना उद्देशून आज्याच्या आहुति देणें. अग्नीला प्रदक्षिणा. पाषाण व उपला यांची पूजा. पुनश्च हातीं पुष्पांजलि घेऊन अग्नीची प्रार्थना. आणि मग हळूहळू अग्निप्रवेश. असा हा अन्वारोहणविधि आहे.

या अन्वारोहणाने (सती जाण्याने) पतीच्या सर्व पापांचा नाश होऊन त्याला स्वर्ग मिळतो व पुढील जन्मीं त्या स्त्रीसह अनंत सुखें प्राप्त होतात. **पाहा** – सतीप्रथा. [नि. सिं.]

अन्वाहार्यपचन एका विशिष्ट अग्नीचें नांव. याच्यांतून वृत्राची उत्पत्ति झाली, असें भागवतांत म्हटलें आहे. (६. ९. १२).

अन्वाहार्य श्राद्ध एक मासिक श्राद्ध. पिंडपितृयज्ञांतले कित्येक विधि गाळून हें श्राद्ध करतात. भट्ट नारायण सांगतो, की अन्वाहार्य श्राद्ध अमावास्येस मासिक

पिंडपितृयज्ञ झाल्यावर करावें. यांत ब्राह्मणभोजन, पिंडदान व पितरांना वस्त्रसमर्पण करायचें असतें.

अपंग एका तारेचें केवळ तालवाद्य. याची बनावट अशी– एक वाटोळा डबा घेऊन त्याच्या तोंडावर चामडें मढवितात. डब्यावर दीड हात लांबीची वांबूची काठी बसवितात. तिच्या डोक्यावर खुंटी बसवितात. तारेचें एक टोक चामड्यावर व दुसरें खुंटीला बांधून मग ती खुंटी आवळतात. या तारेवर हाताने तालाचे बोल वाजवितात. त्यामुळे तालाची गति स्पष्ट समजते व तार कमी अधिक खेंचल्याने त्याच्या नादाला कमीअधिक तीव्रता येते. [परंपरा]

अपग एक प्राचीन जमात. विशेष माहिती उपलब्ध नाहीं. [पु. इं.]

अपथ एक डोंगरी जमात. अधिक माहिती मिळत नाही. [पु. इं.]

अपदान पालि भाषेतील एक ग्रंथ. बुद्धकालीन त्या संप्रदायांतील ५५० पुरुष सदस्यांचीं व ४० स्त्री सदस्यांचीं चरित्रें यांत आहेत. हा ग्रंथ छापलेला नाही. परंतु यांतील ४० चरित्रांतील पुष्कळ उतारे थेरी गाथेच्या टीकेंत घेतलेले आहेत. यांपैकी एका उताऱ्यांत सन पूर्व ३ ऱ्या शतकांतील कथावत्थु नामक ग्रंथाचा उल्लेख आढळतो. यावरून या ग्रंथाचें अर्वाचीनत्व सिद्ध होतें. आणखीहि कांही गोष्टी या ग्रंथाच्या अर्वाचीनत्वाच्या द्योतक आहेत. दीघनिकायांत ऐतिहासिक बुद्धाच्या आधींच्या बुद्धांची संख्या सहा सांगितली आहे. बुद्धवंशासारख्या यापुढील ग्रंथांत ती चौवीस झाली आहे आणि अपदानांत तर ती पस्तीस असल्याचें सांगितलें आहे. सुमंगलविलासिनी या ग्रंथावरून असें दिसतें, की दीघनिकायाचे पाठक अपदान ग्रंथाचा अंतर्भाव अभिधम्म पिटकामध्ये करीत, तर मज्झिम निकायाचे पाठक तो सुत्तन्त पिटकामध्ये करीत. संप्रदायांतील याच्या स्थानाविषयींचा मतभेद हा या ग्रंथाच्या अर्वाचीनपणाचाच पुरावा होय.

अपदान म्हणजे शुद्धाचरण किंवा शूरकर्म. प्रत्येक अपदानांत प्रथम त्यांतील नायकाच्या किंवा नायिकेच्या पूर्वजन्माचा इतिहास दिलेला असून नंतर त्याच्या चालू जन्मांतील हकिगत दिलेली असते. त्यावरून अपदान हें जातकांप्रमाणे वर्तमान व भूतकाळाचें पुराण असतें, असें म्हणायला हरकत नाही. फरक इतकाच, की जातकांत बुद्धाची पूर्वजन्मकथा दिलेली असते; तर अपदानांत बहुधा अर्हताची कथा असते.

विसुद्ध-जन-विलासिनी नामक अपदानावरची एक टीका उपलब्ध आहे. या टीकेचा कर्ता बुद्धघोष आहे, असें गंधवंशांतील दोन उताऱ्यांवरून दिसतें.

इ. स. च्या पहिल्या शतकांत जेव्हा बौद्ध संस्कृत भाषेंत ग्रंथरचना करूं लागले, तेव्हा अपदानाचें अवदान असें संस्कृत रूपांतर झालें. अनेक अपदानांचीं संस्कृत, तिबेटी व चिनी भाषेंत रूपांतरें झालीं आहेत. अवदानशतक व दिव्यावदान हे त्यांतील प्रमुख ग्रंथ होत. या अवदानांत अपदानांतील कथा जशाच्या तशा घेतलेल्या नसून त्यांतील कांहींवर संस्कार केलेले आहेत; तर कांही नव्याने लिहिलेल्या आहेत. [म. ज्ञा. को.]

अपप्रावरण एक डोंगरी जमात. विशेष माहिती उपलब्ध नाही. [पु. इं.]

अपभ्रंश भाषा अपभ्रंश शब्दाचा उल्लेख पतंजलीच्याहि (सनपूर्व १५०) पूर्वी झालेला दिसतो. पतंजलीनेंहि आपल्या महाभाष्यांत त्याचा उल्लेख केला आहे. तो म्हणतो, की 'एकाच शब्दाचे अनेक अपभ्रंश होतात. उदा० गौः या शब्दाचे गावी, गोणी, गोता इत्यादि' (१. १. १.). यावरून कळतें, की पतंजलीच्या मतें शिष्टसंमत संस्कृत भाषेपासून विकृत किंवा भ्रष्ट झालेले शब्द हे अपभ्रंश होत. भरताच्या नाट्यशास्त्रांत प्राकृताचे तीन प्रकार सांगितले आहेत– (१) ज्यांत संस्कृतासारख्या शब्दांचा प्रयोग होतो, (२) संस्कृतापासून विकृत झालेल्या शब्दांचा प्रयोग होतो व (३) देशीभाषेच्या शब्दांचा प्रयोग होतो. हेंच निराळ्या शब्दांत सांगायचें तर तत्सम, विभ्रष्ट किंवा तद्भव व देशी शब्दांच्या उपयोगाने होणाऱ्या भाषेला प्राकृत म्हणावें. पतंजलीने जिला अपभ्रंश म्हटलें, तिलाच भरताने प्राकृत किंवा विभ्रष्ट म्हटलें आहे.

वाक्यपदीयम् या ग्रंथाचा कर्ता भर्तृहरि याने व्याडि नामक आचार्याच्या मताचा उल्लेख करतांना अपभ्रंश शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला आहे ––

शब्दसंस्कारहीनो यो गौरिति प्रयुयुक्षिते ।
तमपभ्रंशमिच्छन्ति विशिष्टार्थनिवेशिनम् ।।

अर्थ––गौः या शब्दाचा प्रयोग करायचा असतां असमर्थतेमुळे किंवा प्रमादामुळे गावी इ. शब्दसंस्कारहीन असा विशिष्टार्थ दर्शविणारा शब्द उच्चारला जातो, त्याला अपभ्रंश म्हणतात.

उत्तरकालीन लेखकांनी अपभ्रंश भाषेला उकारबहुला (जिच्यांत उकार पुष्कळ आहेत अशी) म्हटलें आहे. भरताच्या वर दिलेल्या निर्देशावरून स्पष्ट होतें, की त्याच्या काळीं अपभ्रंश नांवाची भाषा विकसित झाली नव्हती. या-व्यतिरिक्त शबर, आभीर, इ. कांही विभाषाहि होत्या. भाषा व विभाषा या दोहोंतला अर्थ स्पष्ट करतांना अभिनवगुप्त म्हणतो ––

भाषा संस्कृतापभ्रंशः भाषापभ्रंशस्तु विभाषा

(पृ. ३७६)

अर्थ–संस्कृताचा अपभ्रंश म्हणजे भाषा व अपभ्रंशापासून विकृत झालेली बोली म्हणजे विभाषा होय.

चंडाने प्राकृतलक्षणम् या ग्रंथांत अपभ्रंश भाषेला विभाषा म्हटलें आहे. अपभ्रंशाच्या बाबतींत प्राचीन आलंकारिकांत दोन परस्पर विरोधी मतें होतीं. रुद्रट अपभ्रंशाला प्राकृत म्हणतो, तर भामह व दंडी तिला प्राकृताहून भिन्न अशी काव्यभाषा मानतात. याकोबी या भिन्न मतांचा समन्वय असा करतो, की शब्दसमूहाच्या दृष्टीने अपभ्रंश ही प्राकृताला जवळची आहे व व्याकरणाच्या दृष्टीने ती प्राकृताहून भिन्न आहे. दंडीने समस्त वाङ्मय चार भाषाविभागांत विभक्त केलें आहे, त्यांत अपभ्रंश हाहि एक प्रकार आहे–

तदेतद्वाङ्मयं भूयः संस्कृतं प्राकृतं तथा।
अपभ्रंशश्च मिश्रं चेत्याहुरार्याश्चतुर्विधम् ॥

(काव्यादर्श १.३२)

मार्कंडेयाच्या मतानुसार अपभ्रंश भाषेचीं नागर, उपनागर व व्राचड अशीं तीन रूपें होतात, तर नेमिनाथाच्या मतें तीं नागर, उपनागर व ग्राम्य अशीं तीन प्रकारचीं आहेत.

इ. स. १० व्या शतकाच्या सुमारास झालेल्या पुष्पदंताने आपल्या महापुराणांत संस्कृत व प्राकृत यांच्याबरोबर अप-भ्रंश भाषेचाहि स्पष्ट उल्लेख केला आहे (५.१८.६). त्या काळांत संस्कृताबरोबरच अपभ्रंश भाषेचेंहि राजकुमारींना शिक्षण दिलें जात असे. राजशेखरहि पुष्पदंताच्याच काळांतला होय. त्याने अपभ्रंशाचा अनेक ठिकाणीं निर्देश केला आहे. वल्लभीचा राजा धरसेन याच्या शिलालेखावरून कळतें, की सहाव्या शतकांत अपभ्रंश भाषेंतहि साहित्य-रचना होऊं लागली होती. वरील भिन्न भिन्न निर्देशां-वरून पुढील गोष्टी सिद्ध होतात –

(१) प्रारंभीं प्रतिमानापासून च्युत, स्खलित, भ्रष्ट अथवा विकृत शब्दांनाच अपभ्रंश ही संज्ञा होती. अपभ्रंश हा शब्द सामान्यतः तिरस्कारनिदर्शकच होता; पण पुढे पुऱ्या भाषेला हें नांव मिळालें. (२) भरताच्या वेळीं अपभ्रंश भाषा बीज-रूपाने वर्तमान होती व शबर, आभीर, इ. पश्चिमोत्तर भार-तांतले वनवासी लोक ती बोलत होते. (३) सहाव्या शतकांत अपभ्रंश हा शब्द, व्याकरण व अलंकार यांवरील ग्रंथांत प्रयुक्त होऊं लागला होता व त्याला साहित्यशास्त्राकडून स्वीकृतिहि मिळाली होती. (४) नवव्या शतकांत ही सर्वसाधारण लोकांची भाषा असें मानलें जाऊं लागलें. प्रथम ही भाषा गुर्जरप्रदेश, हिमवत् प्रदेश, सौवीर व सिंधुदेश, इथवरच मर्यादित होती; पण पुढे ती माळवा, राजस्थान, पंजाब, इथ-पासून तों सर्व उत्तर प्रदेश व्यापून मगधापर्यंत पसरली. (५) अकराव्या शतकांत अपभ्रंश ही एकच भाषा स्थानभेदाने अनेक प्रकारची बनली. तिचा व्यापकरूपाने काव्यव्याकरणादि ग्रंथांत प्रयोग होऊं लागला. सिद्धांनी मगधांत प्रचलित असलेल्या अपभ्रंश भाषेंत आपले ग्रंथ रचले, त्यावरून या गोष्टीला पुष्टि मिळते.

या भाषेविषयीं श्री. ब्लॉक यांनी पुढील विवेचन केलें आहे ––

" शेवटीं प्राकृताच्या जागीं दुसरी एक भाषा येऊं लागली ती म्हणजे प्राकृताचा पेहेराव चढविलेली आधुनिक अपभ्रंश भाषा. जैनांनी धार्मिक लेखनासाठी प्राकृत राखून ठेवली; पण इतरत्र मात्र त्यांनी अपभ्रंश भाषेला पसंत केलें. या वेषांत-राचा एक हेतु म्हणजे त्यांतून देशीला काढून टाकणें हा होता.

अपभ्रंश हें नांव प्रदेशवाचक नाही. प्राकृत आणि संस्कृत या नांवांप्रमाणेच तेंहि गुणवाचक असून या दोन भाविक अवस्थांशीं तें विरोध दर्शवितें. सर्वांत आधी तें वाटचुकेपणा दाखवितें. पतंजलि तें मध्ययुगीन आर्यभाषांच्या कांही रूपांना लावतो. हीं रूपें त्याच्या काळच्या संस्कृतांत प्रचलित होतीं; पण त्याच्या दृष्टीने चुकीचीं होतीं. म. आ. भाषांवर संस्कार घडवून त्यांना नियमबद्ध करण्यांत आलें, तेव्हा ज्यांना साहित्यांत स्थान नव्हतें, अशा उत्क्रांत रूपांना अपभ्रंश ही संज्ञा लावण्यांत येऊं लागली. पण एक काळ असा आला, की अपभ्रंशाचीं कांही रूपें प्राकृतांत शिरलीं. एवढेंच नव्हे; तर ही भाषा प्राकृताच्या बरोबरीनें लेखनासाठी मान्य ठरविण्यांत आली. सहाव्या शतकांतल्या साहित्यशास्त्रावरच्या एका ग्रंथांत त्याचें अशा प्रकारचें वर्गीकरण करण्यांत आलेलें आहे; आणि याच काळांत होऊन गेलेला वलभीचा अधिपति गुहसेन हा––त्याच्या नातवाच्याच भाषेंत सांगायचें झालें तर–'संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश या तीन भाषांत' निष्णात लेखक होता. यानंतरच्या काळांत प्राकृताबरोबर या भाषेचे नियम देऊन व्याकरणकर्त्यांनी त्या दोघींना बरोबरीचा दर्जा दिला.

वास्तविक या भाषेंतले सर्वांत जुने लेख फार तर इ. स. १००० च्या आसपासचे आहेत. आणि ते राजस्थान आणि गुजरातमधल्या जैनांचे आहेत. लिखित साहित्याला आवश्यक अशा प्राकृतीकरणामागे त्याच्यावर पडलेला खऱ्याखुऱ्या बोलभाषांचा प्रभाव त्यांत दिसून येतो. यानंतर स्वतःच्या जन्मभूमीबाहेर पडून अपभ्रंश सर्व हिंदुस्थानभर पसरली. आता ती केवळ जैन लोकांचीच राहिली नाही. व्रजभाषेंतल्या भाटांच्या वीरगीतांतहि तिचीं रूपें दिसून येतात. नंतर अगदी थोड्या कालावधींत बुद्धधर्मीय स्तोत्रांत दिसून येणारें तिचें एक पूर्वेकडील रूप उपलब्ध होतें. मिथिलेंतल्या विद्यापतीच्या वैष्णव स्तोत्रांवर तिचा परिणाम झालेला असून प्राकृतपिंगल या छंदोरचनेवरील ग्रंथाला तिने कांही उदाहरणें पुरविलीं आहेत. टीकाकार त्याला अवहट्टभासा असें म्हणतात. मूळरूप आणि त्याला फुटलेले प्रादेशिक फाटे यांची आठवण हें नांव करून देतें.

ज्या प्रदेशांतल्या भाषा एकमेकींपेक्षा फारशा भिन्न नव्हत्या, त्या प्रदेशांत आणि ज्या भागांत राजपूत भाटाप्रमाणे 'अमके' भाषा येणें हें आपल्या व्यवसायाला गौरवास्पद आहे, असें कवींना वाटत होतें, त्या सर्व ठिकाणीं पूर्वी होऊन गेलेल्या साहित्यिक भाषांप्रमाणे अपभ्रंश भाषेचा विस्तार सहज, कोणताहि अडथळा न येतां झाला. हें कारणच लोकभाषेंतल्या उदात्त व सुसंबद्ध रूपाच्या साहित्याची त्या भाषेकडून अपेक्षा ठेवणाऱ्या अभ्यासकांना गोंधळांत टाकणाऱ्या त्यांतल्या मिश्रणाचा खुलासा करूं शकतें. अपभ्रंशांत प्राकृताचें अनिश्चित प्रमाणांत मिश्रण आहे. हें प्रमाण कित्येकदा फार मोठें असतें. यासाठींच त्यांत बोलभाषेच्या एका अवस्थेचे कांही अंश सांपडतात; पण ती अवस्था कोणत्याहि भाषेचा पूर्ण प्रतिनिधि नव्हे.

अपभ्रंश कवि आपल्या या भाषेला भासा, देसी भासा किंवा गामेल्ल भासा असें म्हणत असले, तरी मध्यकालीन भारतीय आर्य भाषांच्या उत्तरकालीन अवस्थेला अपभ्रंश भाषा, असें नांव रूढ झालें. अकराव्या शतकांत या भाषेचें परिवर्तन विस्तृत स्वरूपांत झालें. व्यंजनसमीकरणाची प्रक्रिया यापूर्वींच त्या भाषेमध्ये सुरू झाली होती. ती या काळांत पराकाष्ठेला पोंचली. त्यांतूनच उत्पन्न झालेली द्वित्व व्यंजनांच्या ठिकाणीं एकव्यंजनाची प्रवृत्तिहि या काळांत सुरू झाली. त्याचा परिणाम म्हणून पुढे व्यंजनांचा पूर्वस्वर दीर्घ होऊं लागला. उदा०—सप्त > सत्त > सात; कर्म > कम्म > काम, इत्यादि. ऱ्हस्वाच्या जागीं दीर्घ स्वर व दीर्घाच्या जागीं ऱ्हस्व स्वर असे प्रयोग करण्याची प्रवृत्ति वाढली. वैदिक भाषा व त्यानंतरची संस्कृत भाषा, यांत कांही विशिष्ट अवस्थांतच दन्त्य व्यंजनांच्या जागीं (त, थ, द, ध, न) मूर्धन्य व्यंजनांचा (ट, ठ, ड, ढ, ण) प्रयोग होत होता. पण अपभ्रंश भाषेंत ही गोष्ट प्रचुरतेने दिसूं लागली. उदा० पत् > पड; दुल् > डोल, त्रुट् > टुट्ट, इत्यादि.

या भाषेंत षष्ठी विभक्तीच्या स्य या प्रत्ययाच्या जागीं स्स व सप्तमीच्या स्मिन् या प्रत्ययाच्या जागीं स्सि असे प्रयोग होतात. उदा० पुत्रस्य > पुत्तस्स > पुत्तह; तस्मिन् > तस्सि > तहिं इत्यादि. सुबन्त व तिङन्त पदांत प्रत्ययांश असलेल्या अनुनासिक वर्णाच्या जागीं अनुस्वाराचा प्रयोग होतो. उदा० देवेन > देवेण > देवें; धरामि > धरऊं इत्यादि. प्रथमेच्या एकवचनांत ओच्या जागीं उकार व सप्तमीच्या एकवचनांत एच्या जागीं इकार येतो. उदा० देवो > देवु; देवे > देवि इत्यादि. प्रथमा व द्वितीया या विभक्तींचीं रूपें समान होतात. पंचमी, षष्ठी व सप्तमी यांच्या रूपांतहि बऱ्याच अंशीं समानता आहे. उदा० पंचमी बहुवचन गिरिहुं; ष. ब. गिरिहं–गिरिहुं; स. ब. गिरिहुं इत्यादि. पण विभक्तिरूपांच्या या समानत्वामुळे अर्थज्ञानांत काठिण्य व संकर निर्माण झाला व त्याचा परिणाम म्हणून अनेक परसर्गांचा प्रयोग सुरू झाला. उदा० मणमहि > मनमें; मइतणी > मेरा इत्यादि. धातुरूपांतहि भिन्न भिन्न काल सूचित करणाऱ्या अनेक लकारांचा लोप झाला. वर्तमान, सामान्य भविष्य व आज्ञार्थ, यांचींच रूपें प्रामुख्याने प्रयुक्त होऊं लागलीं.

मध्यकालीन भारतीय आर्यभाषांच्या काळांत संस्कृताव्यतिरिक्त द्राविड व ऑस्ट्रिक भाषांतूनहि शब्दांचें निस्संकोच ग्रहण होऊं लागलें. या संस्कृतेतर भाषांच्या प्रभावामुळे अपभ्रंश भाषेंत अनुकरणात्मक बरेचसे शब्द आले.

प्रारंभीं अपभ्रंश भाषेला 'आभीरोक्तिः, आभीरादिगिरः' म्हणजे आभीरांची भाषा असें म्हटलें जाई. याचा अर्थ असा नव्हे, की ही आभीरांची खास भाषा होती, किंवा आभीर लोक जिथून कुठून आले तिथून ते ही भाषा आपल्याबरोबर घेऊन आले. वस्तुस्थिति अशी आहे, की आभीर जिथे जिथे गेले, तिथे तिथे त्यांनी तद्देशीय प्राकृत स्वीकारलें व त्यांत स्वतःच्या स्वभावाला अनुसरून उच्चारणादिकांच्या बाबतींत परिवर्तन केलें. या परिवर्तित आणि विकसित भाषेलाच पुढे अपभ्रंश असें नांव दिलें गेलें (हिंदी साहित्यकी भूमिका—डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी).

संस्कृत व प्राकृत व्याकरणाप्रमाणेच हेमचंद्र, त्रिविक्रम (इ. स. १४०० चा सुमार), लक्ष्मीधर (इ. स. १५ व्या शतकाचा उत्तरार्ध), मार्कंडेय (इ. स. १७०० चा सुमार),

इ. वैयाकरणांनी अपभ्रंश भाषेचीं व्याकरणें लिहिलीं. व्याकरणाच्या नियमांनी बद्ध झाल्यामुळे अपभ्रंश भाषेच्या वृद्धीला पायबंद बसला.

अपभ्रंशसाहित्य विशेषतः जैन–बौद्धांनी वाढविलें. म्हणूनच त्या भाषेंत धार्मिक साहित्याची विपुलता आहे. अपभ्रंश-कालांत बौद्ध–जैन धर्मांच्या बरोबरच इस्लामचाहि प्रचार सुरू झाला. त्यासाठी इस्लामी धर्मप्रचारकांनीहि अपभ्रंश भाषेंत ग्रंथरचना केली. पण असें असलें तरी अपभ्रंश साहित्याची रचना व त्याची सुरक्षा या उभयविध कार्यांत जैनांचे परिश्रम फार मोठे आहेत. जैन आचार्य हे संस्कृत पंडितहि होते हें खरें; पण जैनांमध्ये व्यापारी वर्ग बराच मोठा होता व तो संस्कृत भाषेला अनभिज्ञ होता. या वर्गाच्या धार्मिक भावनेला परिपुष्ट करण्यासाठी जैन आचार्यांना त्यांच्या भाषेचा अवलंब करावा लागला. त्यासाठीच त्यांनी अपभ्रंश भाषेंत अनेक धार्मिक व दार्शनिक ग्रंथ लिहिले. त्याशिवाय काव्य, नाटक, ज्योतिष, आयुर्वेद, व्याकरण, अलंकार, गणित, राजनीति, इ. विषयांवरहि त्यांनी विपुल ग्रंथसंपदा निर्माण केली आहे. जैनांनी रामायण, महाभारत व पुराणें यांवरहि ग्रंथ लिहिले आहेत ; पण त्यांत आपल्या धर्माला पोषक होतील अशा प्रकारें मूळ कथेंत आणि व्यक्तींच्या चरित्रचित्रणांतहि फेरबदल केले आहेत.

भाषाशास्त्रज्ञ इ. स. ५०० ते १००० एवढा कालखंड अपभ्रंश भाषेच्या नांवावर घालतात. पण त्या भाषेंतलें साहित्य सुमारें आठव्या शतकापासूनच मिळूं लागतें. नवव्या शतकापासून तों तेराव्या शतकापर्यंतचा कालखंड हें अपभ्रंश भाषेच्या समृद्धीचें युग आहे. याच कालखंडांत पुष्पदंत, धवल, धनपाल, नयनंदी, कनकामर, धाहिल, इ. कितीतरी प्रतिभाशाली कवि आणि महाकवि आपल्याला भेटतात. या सर्वांत पुष्पदंत हा अपभ्रंश भाषेचा कविसार्वभौम आहे. जैनांचीं महापुराणें, चरित्र ग्रंथ, स्तोत्रें, बौद्ध सिद्धांचे दोहे आणि पदें, विद्यापतीची कीर्तिलता, अब्दुर् रहमानचें संदेशरासक, इ. कितीतरी काव्यग्रंथ अपभ्रंश साहित्याचीं भूषणें ठरलीं आहेत. जैन भांडारांनी अपभ्रंश साहित्याची जिवापाड जपणूक केली आहे. गुजरात, सौराष्ट्र आणि राजस्थान, या प्रदेशांत जैनांचीं समृद्ध ग्रंथालयें आहेत. या ग्रंथालयांतून प्राप्त झालेले कित्येक अपभ्रंश ग्रंथ आजमितीस प्रकाशांत आले आहेत आणि पुढेंहि येण्याची शक्यता आहे. मध्ययुगीन कालांत एखाद्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत तयार करवून घेऊन एखाद्या जैनभांडारांत श्रावकांच्या उपयोगासाठी ती ठेवून देणें, हें जैनांच्या दृष्टीने मोठें धर्मकार्य होतें. जैनभांडारें हस्तलिखित ग्रंथांनी संपन्न झालीं तीं याच धार्मिक भावनेमुळे. तत्कालीन कित्येक श्रीमंत व राजेमहाराजे कवींना आणि आचार्यांना आश्रय देऊन त्यांच्याकडून संस्कृत न जाणणाऱ्या श्रावकांसाठी अपभ्रंश भाषेंत ग्रंथ रचून घेत. सामान्य जनतेच्या अंतःकरणांत प्रवेश करणें व त्यांना धर्म, नीति व सदाचार यांचा कांतासंमित उपदेश करणें, हें जैन कवींचें ध्येय होतें. सामान्य जनतेला प्रभावित करायचें असेल, तर कथेहून अन्य श्रेष्ठ साधन नाही हें जाणूनच पुराणचरितादि सर्व ग्रंथ जैनांनी कथा आणि अवांतर कथा यांनी भरून टाकले आहेत. श्रीचंद्राचा कथाकोश म्हणजे अनेक धार्मिक आणि उपदेशप्रद कथांचें भांडार आहे.

अपभ्रंश साहित्यांत कित्येक रासग्रंथहि उपलब्ध आहेत. पृथ्वीराजरासो व संदेशरासक हे दोन ग्रंथ सोडल्यास बाकीचे सारे धार्मिक विषयांवर आधारलेले आहेत. जिनदत्तसूरिकृत उपदेशरसायन या रासग्रंथांत धार्मिक कृत्यांचा उल्लेख असून गृहस्थांना केलेला सदुपदेशहि आहे. ६३ महापुरुषांचीं चरित्रें व अन्य कित्येक धार्मिक पुरुषांचीं जीवनचरित्रेंहि उपलब्ध आहेत. तीर्थंकरांचीं व गुरूंचीं स्तोत्रेंहि बरींच आहेत. अभयदेवसूरीचें जयतिहुयण स्तोत्र, त्याचप्रमाणें ऋषभ–जिन–स्तोत्र, धर्मसूरिस्तुति, इ. स्तोत्रें प्रसिद्ध आहेत. या व्यतिरिक्त चूनरी, चर्चरी, पुलक, इ. नांवांचे कांही ग्रंथ मिळाले आहेत. विनयचंद्राने आपल्या चूनरींत, धार्मिक भावना व सदाचार यांनी रंगविलेली चूनरी पांघरावी, असा उपदेश केला आहे. जिनदत्तसूरीच्या चर्चरींत त्याने आपल्या गुरूचें गुणगान केलें आहे. त्यानेच रचलेल्या पुलकांत श्रावक गृहस्थांना धर्मोपदेश आहे.

बौद्ध सिद्धांनीहि अपभ्रंश भाषेंत कांही स्फुट पदें व दोहे लिहिले असून त्यांत वज्रयान व सहजयान यांच्या सिद्धान्तांचें प्रतिपादन आहे. सिद्धांची अपभ्रंश रचना दोन प्रकारची आढळते. एका प्रकारांत त्यांच्या सिद्धान्तांचें प्रतिपादन व दुसऱ्या प्रकारांत ब्राह्मणांच्या कर्मकांडाचें व रूढिप्रियतेचें तीव्र खंडन. काश्मीरी शैव मतानुयायांनीहि स्वमतप्रतिपादक कांही पदें अपभ्रंश भाषेंत लिहिलेलीं काश्मीरमध्ये आढळलीं आहेत. त्यावरून अपभ्रंश भाषेच्या क्षेत्रविस्ताराची कल्पना येते. अपभ्रंशकाव्यांत शृंगार, वीर व शांत, या तीन रसांचेंच प्रामुख्याने दर्शन होतें. सौंदर्यवर्णनांत शृंगार व युद्धवर्णनांत वीररस आढळतो. जिथे संसाराची असारता वर्णिलेली असते, तिथे शांतरस दिसतो. मुख्यत्वें अपभ्रंश साहित्याचा स्थायी भाव शांतरसाचाच आहे. अपभ्रंश भाषेचीं प्रबंधकाव्यें संस्कृत महाकाव्यांच्या धर्तीवर रचलेलीं आढळतात. संस्कृत काव्यें सर्गबद्ध असतात, तर अपभ्रंश भाषेचीं मोठीं काव्यें संधिबद्ध असतात. कांही कडवकें मिळून एक संधि होतो. कडवकाची समाप्ति

घत्ता या छंदाने होते. कडवकाचा मूलभाग पज्झटिका, पादाकुलक, वदनक, पाराणक, इ. छंदांत असतो. काव्यकृतीच्या प्रारंभीं मंगलाचरण, सज्जन-दुर्जनस्मरण, आत्मविनय, इ. विषय असतात. अपभ्रंश काव्यांत भाषेच्या दोन शैली आढळतात. एक शैली प्राचीन संस्कृताच्या परिपाटीला धरून विकसित झाली आहे, तर दुसरी शैली अधिक मुक्त व स्वच्छंद आहे. तिच्यांत भाषेचें बोलचालींतलें सर्वसाधारण स्वरूप आढळतें. दुसरी एक प्रवृत्ति दिसते, ती ध्वन्यात्मक शब्दांच्या प्रयोगाची. अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी त्या त्या भावाला अनुकूल असे ध्वन्यात्मक शब्द विशेषतः प्रारंभींच्या अपभ्रंश साहित्यांत आढळतात. अपभ्रंश कवींनी मात्रिक छंदांचा मोठ्या प्रमाणांत उपयोग केला असून छप्पय, कुंडलिक, चंद्रायन, रासाकुल, इ. नवे छंदहि निर्मिले आहेत. गाथा छंदाचाहि उपयोग केला आहे.

अधिकांश अपभ्रंश साहित्याची रचना गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, विदर्भ, मिथिला व मगध या प्रदेशांत झाली आहे. अपभ्रंश साहित्याचें प्रादेशिक वर्गीकरण पुढीलप्रमाणे सांगतां येईल—

(१) पश्चिमी प्रदेशाचें अपभ्रंश साहित्य——यांत स्वयंभू, योगींदु, धनपाल, हेमचंद्र, अब्दुर् रहमान, इ. लेखकांच्या कृतींचा अंतर्भाव होतो.

(२) महाराष्ट्राचें अपभ्रंश साहित्य——यांत पुष्पदंत व कनकामर यांच्या कृतींचा अंतर्भाव होतो.

(३) पूर्वेकडील प्रदेशाचें अपभ्रंश साहित्य——यांत बौद्ध सिद्ध व विद्यापति यांच्या रचनांचा समावेश होतो.

(४) उत्तरेकडील प्रदेशाचें अपभ्रंश साहित्य——यांत नाथ-संप्रदायांतल्या कवींच्या पदांचा समावेश होतो.

दुसरें वर्गीकरण जैन व जैनेतर अशा स्वरूपांत करतां येतें. जैनांच्या अपभ्रंश साहित्याचें विवेचन वर झालेंच आहे. जैनेतर साहित्यांत ब्राह्मण, बौद्ध व मुसलमान यांनी रचलेल्या साहित्याचा समावेश होतो. [डॉ. ना. गो. कालेलकर; अपभ्रंश साहित्य; हिं. सा. को.]

अपरनंदा हिमाचलांत असलेली एक नदी. ही हेमकूटाच्या नजीक आहे. श्री. डे यांच्या मतें, ही व अलकनंदा एकच होत. [हि. ध.]

अपरा एकादशी वैशाख वद्य एकादशीचें नांव. हिचें उपवासादि व्रत केलें असतां पुत्रप्राप्ति होते. [पद्म पु. उ. खं. अ. ५]

अपराजिता (१) जैन दैवतसमूहांतली यक्षिणी. मल्लि-नाथाची सेविका. हिचें वर्णन——

अष्टापदं समारूढा देवी नाम्नाऽपराजिता ।
फलासिखेटहस्ताऽसौ हरिद्वर्णा चतुर्भुजा ।।

अर्थ——कमलावर आरूढ. चतुर्भुज. मातुलिंग, खड्ग व खेटक धारण करणारी; तसेंच हरितवर्णाची अशी ही अपराजिता देवी आहे. (दिगंबरमतें सिंहारूढ. मातुलिंग, खड्ग, खेटक व वरदमुद्रा धारण करणारी.)

हिचें पौराणिक दुर्गेशीं पुष्कळच साम्य आहे. [जै. इ.]

(२) दुर्गेचें पर्यायवाची नांव. हें नांव तिच्या रौद्र रूपाचें द्योतक आहे. याच रूपांत तिने अनेक असुरांचा संहार केला. देवीपुराणांत हिच्या स्वरूपाचें विशद वर्णन आढळतें. तंत्र साहित्यांत हिच्या पूजेचें स्वतंत्र विधान आहे.

(३) एक विद्या. हिचा कालिदासाने आपल्या विक्रमोर्वशी-यांत उल्लेख केला आहे.

(४) बौद्ध देवता. पीतवर्ण. द्विभुज. मूर्तिकलेंत ही गणेशाला पायदळीं तुडवितांना दिसते. ही माराचा उच्छेद करणारी आहे. ब्रह्मादि देव हिच्या मस्तकावर छत्र धरतात. [इं. बु. इ.]

(५) शाकद्वीपांतली एक नदी. [भाग. पु. ५. २०. २६]

(६) मानसजात मातृशक्ति. [मत्स्य पु. १७९. १३. ६९]

(७) एक देवता. विजया दशमीस सीमोल्लंघनास निघण्यापूर्वी अपराजिता, जया व विजया या देवतांची पूजा करावी, असें निर्णयामृतांत सांगितलें आहे. पूजाविधान असें — अष्टदल कमलावर मृण्मय मूर्तीची स्थापना व पूजा करतात. मग हळदीने रंगविलेल्या वस्त्रांत दूर्वा व मोहऱ्या घालून त्यांची पुरचुंडी करून ती उजव्या दंडावर पुढील मंत्राने बांधतात—

जयदे वरदे देवि दशम्यामपराजिते ।
धारयामि भुजे दक्षे जयलाभाभिवृद्धये ।।

हें व्रत विशेषतः राजेलोकांसाठी सांगितलें आहे.

अपराजिता सप्तमी भाद्रपद शु. ७ मीला अपराजिता सप्तमी असें नांव आहे. चतुर्थीला एकभुक्त राहून पंचमीला नक्तभोजन, षष्ठीला उपवास व सप्तमीला सूर्यपूजा करून मग पारणें, असें त्याचें विधान आहे. आश्विनादि, मार्गशीर्षादि, फाल्गुनादि व ज्येष्ठादि असे या व्रताचे चार प्रकार असून त्यांच्या देवता अनुक्रमें भर्ग, अंशुमान्, अर्यमा व सविता या आहेत. या व्रतांत वरील देवतांची पूजा व प्रार्थना करायची असते. हें व्रत आचरणारा युद्धांत शत्रूला पराजित करतो व त्रिवर्गावर जय

मिळवून सूर्यलोकाला जातो, असें सांगितलें आहे. व्रतावधि एक वर्ष. [हे. व्र.; कृ. क. त.]

अपरादित्य (इ.स. ११ व्या शतकाचा उत्तरार्ध) कोंकणचा एक राजा. याचा ११०९ मधील शिलालेख उपलब्ध आहे. या लेखांत त्याने लिहिलें आहे, की ' तीर्थांत स्नान करून श्रीवैद्यनाथदेवास पंचोपचार पूजेसाठी पट्‌पष्टी म्हणजे हल्लींची साष्टी यांतील एका जमिनीच्या उत्पन्नापैकी २४ द्राम उत्पन्न दिलें. ' आपण दिलेलें दानशासन कोणीहि मोडूं नये, अशी त्याने शपथ घातली असून ती मराठींत आहे. यावरून तत्कालीन राजकुळांत मराठी भाषा वापरली जात असे, हें कळून येतें. [म. सा.]

अपराध अकार्यादि दोषांना अपराध असें म्हणतात. हे बत्तीस प्रकारचे आहेत —

यानैर्वा पादुकैर्वापि गमनं भगवद्‌गृहे ।
देवोत्सवाद्यसेवा च अप्रणामस्तदग्रतः ।।
उच्छिष्टे वाथवा शौचे भगवद्दर्शनादिकम् ।
एकहस्तप्रमाणं च तत्पुरस्तात् प्रदक्षिणम् ।
पादप्रसारणं चाग्रे तथा पर्यङ्‌कबन्धनम् ।
शयनं भक्षणं वापि मिथ्याभाषणमेव च ।
उच्चैर्भाषा मिथो जल्पो रोदनानि च निग्रहः ।
निग्रहानुग्रहे चैव नृषु च क्रूरभाषणम् ।।
कम्बलावरणं चैव परनिन्दा परस्तुतिः ।
अश्लीलभाषणं चैव अधोवायुविमोक्षणम् ।।
शक्तौ गौणोपचारश्च अनिवेदितभक्षणम् ।
तत्तत्कालोद्‌भवानां च फलादीनामनर्पणम् ।।
विनियुक्तावशिष्टस्य प्रदानं व्यञ्जनादिके ।
पृष्ठीकृत्यासनं चैव परेषामभिवादनम् ।
गुरौ मौनं निजस्तोत्रं देवतानिन्दनं तथा ।
अपराधास्तथा विष्णोर्द्वात्रिंशत् परिकीर्तिताः ।
द्वात्रिंशदपराधा ये कीर्त्यन्ते वसुधे मया ।
वैष्णवेन सदा ते तु वर्जनीयाः प्रयत्नतः ।।

(वराह पु.)

अर्थ– वाहनांत बसून किंवा पादुका घालून देवालयांत जाणें, देवाची उत्सवादि सेवा न करणें, देवाला नमस्कार न करणें, उष्टयाने किंवा आशौचांत देवाचें दर्शन घेणें, एकाच हाताने नमस्कार करणें, देवापुढे नुसते हात ओवाळणें, देवापुढे पाय पसरून बसणें, त्याचप्रमाणे पर्यंकबंध घालून बसणें, झोपणें, खाणें, खोटें बोलणें, मोठ्याने व आपसांत बोलणें, रडणें, भांडणें दुसऱ्यावर निग्रह व अनुग्रह करणें, लोकांशीं कठोर बोलणें, कांबळ पांघरणें, परनिंदा, परस्तुति, अश्लील भाषण, अधोमार्गानें वायु सोडणें, सामर्थ्य असतां गौण उपचार समर्पिणें, नैवेद्य न दाखवितां खाणें, त्या त्या कालांत उत्पन्न होणारीं फळें अर्पण न करणें, तोंडीलावणीं वगैरे जेवढीं अर्पिण्याचें ठरविलें असेल, त्यांतला अल्पांशच अर्पण करणें, देवापुढे पाठ करून बसणें, देवासमोर दुसऱ्याला नमस्कार करणें, गुरूसमोर मौन पाळणें व आत्मस्तुति करणें, हे बत्तीस अपराध आहेत. ते वैष्णवाने प्रयत्नपूर्वक टाळावे.

अहन्यहनि यो मर्त्यो गीताध्यायं तु संपठेत् ।
द्वात्रिंशदपराधैस्तु अहन्यहनि मुच्यते ।।

अर्थ – जो माणूस रोज गीताध्याय पठण करतो, त्याची रोजच्या रोज बत्तीस अपराधांतून मुक्तता होते. [श. क.]

अपराधशतव्रत काम्य व्रत. मार्ग० शु. १२ शी, कोणतीहि शुक्ल किंवा कृष्ण ८ मी किंवा अमावास्या या दिवसापासून व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधि एक वर्ष. विष्णुपूजा. शंभर अपराधांचीं नांवें भवि. पु. उ. १४६ मध्ये सांगितलीं आहेत. या व्रताने त्यांचें क्षालन होतें.

अपरान्त अपर म्हणजे पश्चिम आणि त्याचा अन्त म्हणजे अखेरचा प्रदेश, कडेचा प्रदेश होय. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील प्रदेशाला प्राचीन काळीं अपरान्त असें नांव होतें. भडोचपासून गोमंतकापर्यंतच्या सागरी तीरावरील भूपट्टीला अपरान्त म्हणत असावे. डॉ. भांडारकरांच्या मतें अपरान्त म्हणजे आजचा उत्तर कोंकणाचा प्रदेश होय. शूर्पारक किंवा आजचा सोपारा ही त्या प्रदेशाची राजधानी होती. महाभारताच्या भीष्मपर्वांत अपरान्ताचा उल्लेख आलेला आहे (अ. ९). अपरान्तांत फार पाऊस पडतो, असें कौटिल्य सांगतो. कालिदासाच्या दिग्विजयवर्णनावरून अपरान्त देश केरळच्या उत्तरेस असल्याचें स्पष्टपणें कळतें (रघु. ४. ५३). वायु पुराणांत अपरीत व मत्स्यपुराणांत पुरंधर असें म्हटलें आहे; पण हीं दोन्ही नांवें चुकीचीं आहेत. आभीर लोक या प्रदेशांत राहत असत, असें विष्णुपुराण सांगतें. अपरान्ताचा जुन्यांत जुना ऐतिहासिक उल्लेख अशोकाच्या शिलासनांत आढळतो. मोग्गलिपुत्र तिस्स याने सनपूर्व २४७ च्या सुमारास अपरान्तांत बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी आपले शिष्य पाठविले होते, असें लंकेंतील महावंसो या ग्रंथांत म्हटलें आहे. अपरान्तांत ३७ हजार लोकांना बौद्धधर्माची दीक्षा देण्यांत आली, असें सामन्तपासादिकेंत म्हटलें आहे. अव्वल बौद्ध काळांत अपरान्ताच्या

चतुःसीमा ठाणें, कुलावा आणि त्याच्या आसपासच्या प्रदेशापुरत्याच मर्यादित होत्या. पण पुढे वसाहती विस्तृत झाल्या आणि दळणवळण वाढलें तसतशा अपरान्ताच्या मर्यादाहि वाढलेल्या दिसतात. पौराणिक अपरान्तांत कच्छ, सौराष्ट्र, अबू, महीखोरें, भडोच व नासिक यांचा समावेश होत होता, असें श्री. राय चौधरी सांगतात.

अपरान्ताचें प्राकृत नांव कोंकण असें आहे. महाभारत, बृहत्संहिता, इ. ग्रंथ व प्राचीन ताम्रपट–शिलालेख, यांत कोंकणाचा उल्लेख येतो. युआन च्वांगच्या वर्णनावरून वनवासी, बेळगांव व धारवाड, या घाटावरच्या प्रदेशालाहि कोंकणच मानीत असावे, असें दिसतें. पाहा–कोंकण. [क. हि. वा. पु.; म. सा. प. वर्ष ९; सह्याद्रि]

अपरार्क (१२ वें शतक) हा शिलाहार वंशांतला विद्वान् राजा होता. याने याज्ञवल्क्य स्मृतीवर एक मोठा टीकात्मक निबंध लिहिला असून त्याला विद्वन्मान्यता आहे. [आ. सं. मू.]

अपराह्ण 'पञ्चधा विभक्तेऽहनि चतुर्थो भागः' = दिवसाचे पांच भाग केले, तर त्यांतला चौथा भाग. 'द्विधा विभक्तेऽह्न्युत्तरो भागः' = दिवसाचे दोन भाग केले असतां दुसरा भाग (मिताक्षरा २.९७). सामान्यतः सूर्योदयापासून १८ घटी काल गेल्यावर अपराह्ण मानतात. श्राद्धस्य पूर्वाह्णादपराह्णो विशिष्यते' (= श्राद्धासाठी पूर्वाह्णापेक्षा अपराह्ण विशेष विहित आहे), असें मनु म्हणतो (३.२७८). जप, तप, दानादिदेवकार्यें पूर्वाह्णांत करावीं व पितृकार्ये अपराह्णांत करावीं, असा शिष्टाचार आहे.

अपराह्णा कालाची एक शक्ति. [ब्रह्माण्ड पु. ४. ३२. १०].

अपरिग्रह परि+ग्रह्=संपत्ति किंवा विषयभोग जवळ बाळगणें, त्यांचा संग्रह करणें व त्यांवर स्वतःचें स्वामित्व प्रस्थापित करणें. याच्या उलट अपरिग्रह=संपत्तीचा व भोग्य वस्तूंचा संचय व संग्रह न करणें. परिग्रहामुळे आसक्ति, चिंता व दुःख वाढतें. परिग्रहवृत्ति बळावली, की समाजांत एखाद्या ठिकाणीं संपत्तीचा ढीग तर दुसऱ्या अनेक ठिकाणीं दैन्य-दारिद्र्य अशी विषम परिस्थिति निर्माण होते. परिग्रह म्हणजेच संपत्तीचा संचय हा वैयक्तिक मोक्ष व सर्व समाजाचा उत्कर्ष या दोहोंनाहि बाधक ठरतो. म्हणून श्री. विनोबा हे सर्वोदयासाठी अपरिग्रहसमाज निर्माण करूं पाहत आहेत ते म्हणतात –

"बाबा (विनोबा) जो असंग्रही समाज करूं इच्छितो, त्यांत कमींत कमी दोन वर्षें पुरणारा धान्याचा सांठा राहील. ... भुकेलेल्याला प्रत्येक घरीं जाऊन मागण्याचा हक्क राहील. . . त्याला जेवूं घालण्यापुरतें धान्य प्रत्येक घरीं असावें. . . . मी संग्रह वाढवूं इच्छितों; पण तो प्रत्येक घरांत वांटून देऊं इच्छितों. अपरिग्रह समाजांत संपत्ति चांगली वाढेल. याचें कारण अपरिग्रह म्हणजे अत्यंत संग्रह; परंतु विभागलेला. तिसरी गोष्ट ही, की कोणत्याहि व्यर्थ वस्तूंचा संग्रह होणार नाही. चांगल्या वस्तूंतसुद्धा क्रम पाहावा लागेल. . . . हा क्रम खालील प्रमाणें असेल –

१ जेवण उत्तम मिळालें पाहिजे. (२) प्रत्येकाला कपडा मिळाला पाहिजे. (३) चांगलें घर मिळालें पाहिजे. (४) शेतीचीं अवजारें मिळालीं पाहिजेत. (५) ज्ञानाचीं साधनें ... मिळालीं पाहिजेत. (६) मनोरंजनाचीं साधनें संगीत वगैरे उपलब्ध झालें पाहिजे.

असंग्रह याचा अर्थ क्रमाप्रमाणें संग्रह . . . . अपरिग्रही समाजांत पैसा कमींत कमी राहील. . . . अपरिग्रही समाजाचीं पांच लक्षणें आहेत––(१) या समाजांत लक्ष्मी पुष्कळ वाढेल म्हणजे तिची (धान्य, फळें, दुभतें, भाजी, इ.) समृद्धि होईल. (२) लक्ष्मी घराघरांत वांटली जाईल म्हणजे तिचें समान वांटप होईल. (३) निरर्थक वस्तूंचा संग्रह होणार नाही. (४) क्रमाप्रमाणे संग्रह होईल. (५) पैसा कमींत कमी राहील." [भूदानगंगा]

अपरीत लोक व देश. भारताच्या उत्तरेस राहणारी एक जमात. [क. हि. वा. पु.]

अपर्णा पार्वतीचें एक नांव. शिव पति मिळावा म्हणून तपश्चर्या करीत असतां हिने सर्व आहार सोडला व शेवटीं वृक्षाचें पानहि खाण्याचें सोडून दिलें. म्हणून तिला अपर्णा असें नांव मिळालें. हाच आशय कालिदासाने कुमारसंभवांत पुढील श्लोकाने सांगितला आहे––

स्वयं विशीर्णद्रुमपर्णवृत्तिता
परा हि काष्ठा तपसस्तया पुनः।
तदप्यपाकीर्णमतः प्रियंवदां
वदन्त्यपर्णेति च तां पुराविदः ॥
(५.२८)

अर्थ––वृक्षांवरून गळणाऱ्या पर्णांनी जीवनधारण करणें ही

तपाची पराकाष्ठा (मानली जाते). पण पार्वतीने तीं पर्णेंहि खायचें सोडून दिलें, म्हणून पुरातत्त्ववेत्ते तिला अपर्णा म्हणतात.

अपवर्ग याचें लक्षण–'आत्यन्तिकी दुःखनिवृत्तिरपवर्गः' =आत्यंतिक दुःखनिवृत्ति म्हणजे एकदा निवृत्त झालेलें दुःख पुनश्च कधीहि न येणें, याला अपवर्ग म्हणतात (सर्व द. सं. पृ. २४६). सामान्य अर्थ निःश्रेयस् किंवा मोक्ष. मानवाचें अंतिम साध्य काय, याविषयीं विचार करून दार्शनिकांनी अपवर्गाची कल्पना मांडली. सांख्य मतें प्रकृति पुरुषविवेक हें साधन व दुःखनिवृत्ति हाच मोक्ष होय (सां. का.६८). प्रमाण, प्रमेय, इ. षोडश पदार्थांच्या ज्ञानाने निःश्रेयस् मिळतें, असें नैयायिक सांगतात (गौ. सू. १. १. १). अपवर्ग म्हणजे एकवीस दुःखांचा नाश, असें नैयायिकांचें मत आहे (त. भा. प्र. ४१). म्हणजे त्यांच्या मतें तो अभावरूप ठरतो. पण इतर दर्शनकारांस ही कल्पना मान्य नाही. मीमांसक स्वर्गादि लोकांत मिळणाऱ्या निरतिशय सुखालाच मोक्ष मानतात(न्या. को. पृ. ४१३). अद्वैतवेदान्त्यांच्या मतें अपवर्ग हा आनंदरूप असून महावाक्यार्थबोधानंतर तो प्राप्त होतो. व्याकरणांत फलप्रप्तीला अपवर्ग मानलें आहे. यांत लौकिक फलाचाहि समावेश होतो. **पाहा**–मोक्ष.

अपविद्ध पुत्राचा एक प्रकार. आईबापांनी किंवा त्यांच्या- पैकी एकाने त्याग केलेल्या मुलाला स्वतःचा पुत्र म्हणून स्वीकारल्यास, तो अपविद्धसंज्ञक पुत्र होतो. **पाहा**—पुत्र. [हि. ध.]

अपशकुन शकुन म्हणजे भविष्यसूचक चिन्ह किंवा वस्तु. शकुनांत शुभाशुभ असे दोन्ही भाग असतात. अशुभ शकुनांना अपशकुन म्हणतात. मंगल कार्याचा उपक्रम करतांना, महत्कार्याला प्रारंभ करतांना आणि प्रवासास निघतांना कांहीं चिन्हें, वस्तु व प्राणी यांचें दर्शन व कांही शब्दांचें श्रवण अशुभ मानलेलें आहे––

वंध्या स्त्री, चर्म, भूस, हाडें, सर्प, मीठ, निखारे, लाकडें, नपुंसक, विष्ठा, तेल, उन्मत्त मनुष्य, चरबी, ओशट पदार्थ, शत्रु, जटा वाढविलेला माणूस, संन्यासी, तृण, रुग्ण, नग्न, तैलाभ्यक्त व केस सोडलेला माणूस, जातिभ्रष्ट, अवयवहीन, क्षुधित, रक्त, स्त्रियांचें आर्तव, सरडा, गृहदाह, मांजरांचें भांडण, शिंक, गूळ, ताक, चिखल, विधवा, कुबडा, कुटुंबांत कलह, वस्त्रांत पाय अडखळणें, हातांतली वस्तु पडणें, रेड्यांची झुंज, कृष्ण धान्यें, कापूस, वमन, उजव्या अंगाला गाढव ओरडणें, अकस्मात् एखाद्याला क्रोध येणें, गर्भवती, मुंडित मनुष्य, ओलेता माणूस, दुष्ट भाषणाचें श्रवण, अंध, बधिर, रजस्वला, हे प्रयाणादि शुभ कार्यारंभीं अशुभ शकुन समजावे. **पाहा**–शकुन. [मु. चिं.]

अपसंचित (१) एक वास्तु प्रकार. यांत पायाच्या रुंदीचें माप प्रमाण धरून त्या अनुरोधाने वास्तूचीं इतर मापें धरलेलीं असतात.

(२) ज्यांतील मुख्य मूर्ति शयनावस्थेंत असते, असें मंदिर. [मानसार ३०.१७३-१७४]

अपसंद बिहारच्या गया जिल्ह्यांतील एक गांव. या गांवांत अनेक मूर्ति असून त्यांतली वराहमूर्ति ही सर्वोत्कृष्ट आहे, असें कनिंगहॅमने लिहिलें आहे. गुप्त वंशांतील शेवटचे राजे या ठिकाणीं येऊन राहिले होते. त्यांपैकी आदित्यसेन हा एक होता. त्याच्या पत्नीने इथे एक मोठा तलाव खोदला आहे. इथे एक शिलालेख उपलब्ध झाला आहे. त्यावरून आदित्यसेनाने इथे एक विष्णुमंदिर बांधलें व त्याची माता श्रीमती हिने एक धार्मिक विद्यापीठहि स्थापन केलें, असें कळतें. [गया गॅझे.]

अपसद विशिष्ट प्रकारच्या संततीला हें नांव आहे. याची व्याख्या पुढील प्रमाणे –

विप्रस्य त्रिषु वर्णेषु नृपतेर्वर्णयोर्द्वयोः ।
वैश्यस्य वर्णे चैकस्मिन् षडेतेऽपसदाः स्मृताः ॥

(मनु. १०.१०)

अर्थ––ब्राह्मणापासून खालच्या तिन्ही वर्णांच्या, क्षत्रियापासून दोन वर्णांच्या व वैश्यापासून खालच्या एका वर्णाच्या स्त्रीला झालेल्या संततीला अपसद हें नांव आहे.

अपसव्य शरिराच्या दक्षिण अंगाला अपसव्य म्हणतात. 'अपसव्यं तु दक्षिणम्' (अमर.) सव्य व अपसव्य या दोन संज्ञा यज्ञोपवीताच्या अवस्थेसाठी वापरतात. यज्ञोपवीत उजव्या खांद्यावरून डाव्या खांद्याखाली येणें, याला अपसव्य किंवा प्राचीनावीत म्हणतात. याच्या उलट म्हणजे डाव्या खांद्या वरून उजव्या खांद्याखालीं येतें, तेव्हा त्याला सव्य म्हणतात. नहमी जानवें याच अवस्थेंत असतें. श्राद्धांत यज्ञोपवीताचें अपसव्य करून पितरांची पूजा व तर्पण करायचें असतें. 'प्राचीना-

वीतं पितृणाम्' पितरांचे कर्म प्राचीनावीत करून करावे (तै. सं. २.५.११). पाहा–तर्पण.

अपःस्पर्श आचमनाचा एक प्रकार. यांत पाण्यांत बोटें बुडवून तीं डोळे, कान व ओठ यांना लावायचीं असतात. देवपूजा, इ. कर्मे करीत असतांना अधोवायूचें निस्सरण. असत्य भाषण कानीं पडणें, मांजर किंवा उंदीर यांचा स्पर्श, क्रोध येणें, अशा गोष्टी घडल्या असतां अपःस्पर्श करावा, असें सांगितलें आहे. [आचारेंदु]

अपस्मार (१) नटराजाच्या मूर्तीत त्याच्या पायाखाली चिरडलेला व पालथा पडलेला असा एक ठेंगू पुरुष दाखवितात, त्याचें नांव अपस्मार असें आहे. अपस्मार हा एक दानव असल्याची पूर्वापार समजूत आहे. वैदिक ग्रंथांत त्यावर मंत्रोपचारहि सांगितला आहे.

(२) दुष्ट पिशाचांचा एक समुदाय. [भाग. पु. १०. ६. ६८]

अपांक्तेय भोजनांत पंक्तीस बसण्यास अयोग्य. मानसिक व्यंग, रोग, निंद्य व्यवसाय, अनैतिक आचरण, पाप, रूढिभंग, इ. दोषांनी ब्राह्मणहि ब्राह्मणांच्या पंक्तीस बसण्यास अयोग्य होतो (मनु. ३. १६७).

अपान 'अपानयति मलादिनिःसारणेन जीवयति इति' = मलादिकांच्या निःसारणाने जीवन चालवितो तो (हलायुध). पंचप्राणापैकी दुसरा. याची गति अधोगामी असते व हा गुदद्वाराच्या ठिकाणीं राहतो, असें वेदान्तसारांत म्हटलें आहे. अथर्ववेदांत याचा वारंवार उल्लेख येतो (२. २८. ३;५ ३०. १२). ऐतरेय उपनिषदांत याचा नाभीशीं संबंध दाखविला आहे. याचें कार्य पुढीलप्रमाणे सांगितलें आहे –

अधो नयत्यपानं तु आहारं च नृणामधः ।
मूत्रशुक्रवहो वायुरपान इति कथ्यते ।।

(हलायुध)

अर्थ–माणसांचा अधोवात व आहार खालीं नेणारा, व मूत्र व शुक्र यांना वाहून नेणारा वायु; याला अपान म्हटलें जातें. योगसिद्धीसाठी प्राण व अपान हे सम करावे लागतात (गीता ५. २७). पाहा—प्राण, प्राणायाम.

अपांनपात् एक वैदिक देवता. अग्नीचें विद्युद्रूप. ऋग्वेदांतल्या एका संपूर्ण सूक्तांत याचें स्तवन आहे (ऋ. २. ३५). अंतरिक्षांतलें जल हें याचें जन्मस्थान असून याला जलांचा गर्भ म्हटलें आहे. तो उदकांत बलिष्ठ होऊन विराजतो व उदकांत इंधनावांचून प्रकाशतो (ऋ. २. ३५. ४, ७).

अपांनपात् हें मेघांत लपलेल्या विद्युद्रूपी अग्नीचें प्रतीक मानलेलें असावे. या देवतेचा उगम भारताबाहेर व पर्शुभारतीय काळांत झाला असावा; कारण अवेस्त्यांत हा एक जलांत राहणारा असुर असून, तो स्त्रियांच्या मेळाव्यांत राहतो व तेजदार घोड्यांवर स्वार होतो, असें म्हटलें आहे. ओल्डेनबर्गच्या मतें ही मुळांत एक साधी जलदेवता असावी. पण पुढे अगदी विसदृश असा जलोत्पन्न अग्नि व अपांनपात् यांना एक मानूं लागले असावे. [वै. सा. सं.; म. ज्ञा. को.; वेदविद्या]

अपान समाधि बौद्ध तत्त्वज्ञानांतल्या समाधीच्या अनेक प्रकारांपैकी एक. हिच्या साधनेंत अन्य उपायांचा अवलंब करुन चित्त एकाग्र करायचें असतें. [हि. इं. फि.]

अपाप संक्रांति व्रत एक काम्य व्रत. कोणत्याहि संक्रांतीपासून प्रारंभ. व्रतावधि एक वर्ष. सूर्यपूजा व शुभ्र तिळांचें दान. [हे. व्र.]

अपामार्ग एक वनस्पति. (आघाडा) याचीं पानें पत्रपूजेत साठी वापरतात. ऋषिपंचमीच्या व्रतांत व्रती स्त्रीने याच्या काड्यांनी दात घासून व पानें मस्तकावर ठेवून स्नान करायचें असतें. हा गौरीचा प्रतिनिधि आहे. देवीला याची पत्री आवडते. ग्रहयज्ञांत बुधासाठी याच्या समिधा वापरतात. वैदिक वाङ्मयांत अभिचारासाठी याचा उपयोग सांगितला आहे. प्राचीन काळीं मृताच्या अस्थि जमिनींत पुरल्यानंतर स्नान करण्यापूर्वी या वनस्पतीच्या साहाय्याने शुद्धि करीत.

अपामार्जन एक स्तोत्र. हें विष्णुधर्मोत्तर पुराणांत दाल्भ्य व पुलस्त्य यांच्या संवादप्रसंगाने आलें आहे. सर्व प्रकारचीं दुःखें कोणत्या उपायाने दूर होतील, असें दाल्भ्याने विचारल्यावरून पुलस्त्याने हें स्तोत्र सांगितलें. याचे १९१ श्लोक असून त्यांत विष्णूची स्तुति आहे. याला स्तोत्रराज म्हटलें असून याच्या पठणाने ब्रह्महत्येचें पातकहि दूर होतें, असें सांगितलें आहे. याच स्तोत्रांत एक ज्वरमंत्र आहे. ज्वरपीडा नष्ट होण्यासाठी त्या मंत्राचा १०,००० जप

व होम करावा, असा विधि तिथेच दिला आहे. [ऋ. ब्र. क.]

अपाला वेदकालीन ब्रह्मज्ञानी स्त्री. अत्रीची कन्या. हिच्या देहावर कोड उजळल्यामुळे नवऱ्याने हिला टाकलें. त्या कारणाने बापाच्या घरीं राहून हिने इंद्राच्या प्रसादासाठी उग्र तप केलें. इंद्राला सोम आवडतो, हें जाणून ती तो आणण्यासाठी नदीवर गेली. तिथे मिळालेली सोमवल्ली तिने आधी चाखून पाहिली. तो आवाज ऐकून इंद्र तिथे आल्यावर तिने त्याला सोम दिला. त्यामुळे इंद्राने तिचा कुष्ठरोग दूर करून तिचें शेत सुपीक केलें. [प्रा. च. को.]

अपीकुळी मुंडा आदिवासी देवाला बळि देण्याच्या विधी-साठी तीन पानें त्रिकोणी आकारांत जोडून त्यांचा द्रोण बनवितात, त्याला हें नांव आहे. मुंडांच्या बलि-कर्मांत तीन या अंकाला विशेष महत्त्व आहे. तीन हा विषम अंक आहे. असे तीन ते नऊ हे विषम अंक मुंडांना महत्त्वाचे वाटतात. सिंग् बोंगाने सर्व प्राणिसृष्टि जोडीजोडीने निर्माण केली. अर्थात् ती पूर्ण आहे. अतएव आपल्या अपूर्णतेचें सूचक म्हणून ते विषम संख्या स्वीकारतात. आपलें न्यून बोंगाने पुरें करावें, अशी त्यांची आकांक्षा असते. [एन्सा. मुं.]

अपूप 'न पूयते, विशीर्यति इति' = जो कुजत नाही तो (हलायुध). घारगा. गहू किंवा तांदूळ यांच्या पिठांत तूप मिसळून (व गूळ घालून) तळलेला वडा. हें आपल्या देशांतलें प्राचीन पक्वान्न आहे. ऋग्वेदांतहि याचा उल्लेख येतो (ऋ. १०. ४५. ९). महाउम्मगजातकानु-सार तांदुळाचीं तीन प्रकारचीं पक्वान्नें बनवीत – यागु, पूप व भत्त. यागु म्हणजे गोड लापशी, पूप म्हणजे वडा व भत्त म्हणजे (गोड वा तिखट) भात. अनरसा (हिंदी-अँदरसा) हा अपूपच आहे. पुढे वैष्णव धर्माच्या काळांत अपूप हा विष्णूचा नैवेद्य ठरला. अधिक मासांत पुरुषोत्तमासाठी अपूपां-चेंच दान सांगितलें आहे. तिखटमिठाचा वडा हा ग्रामदेवता व कुलदेवतांचा नैवेद्य असतो. मंगलकार्यांतला वडा हा कढई-तून टोचून बाहेर काढतात. पितृकार्यांतला वडा न टोंचतां बाहेर काढतात. वडा हा वाटोळा असतो. म्हणून तें सूर्यप्रतीक ठरलें आहे. सूर्य व विष्णु यांचा अभेद असल्यामुळे वैष्णवांच्या पूजाविधींत वड्याला मान्यता मिळाली. [पा. भा.; वे. इं.]

अपूर्व 'यागादिजन्यः स्वर्गादिजनकः कश्चन गुणविशेषः' = यागादि कर्मांनी उत्पन्न होणारा व स्वर्गादि फलाचा जनक असलेला एक विशिष्ट गुण म्हणजे अपूर्व होय (न्यायकोश). हें मीमांसकांचें मत आहे. याला वेदान्ती प्रारब्ध कर्म, नैयायिक धर्माधर्म, वैशेषिक अदृष्ट व पौराणिक पुण्य-पाप म्हणतात.

मीमांसादर्शनांत अपूर्वाला फार महत्त्व आहे. अपूर्व मानल्याशिवाय त्यांची स्वर्गकल्पना उपपन्नच होऊं शकत नाही. यज्ञाने स्वर्ग मिळतो; पण यज्ञ हा तीन क्षणच राहणारा (त्रिक्षणावस्थायी) असल्यामुळे यज्ञ व स्वर्ग म्हणजेच कारण व कार्य यांचें सामानाधिकरण्यच येत नाही. म्हणून त्यासाठी अपूर्व कल्पावें लागलें. तें यज्ञ व स्वर्ग यांमधला दुवा आहे. यज्ञ केल्यावर त्यापासून अपूर्व निर्माण होतें व तें स्वर्गफलाच्या प्राप्तीपर्यंत टिकतें. व्यवहारांत प्रत्येक गोष्टीला पांच कारणें सांगितलीं, त्यांत अपूर्व = अदृष्ट हें एक कारण आहे. सर्वच गोष्टी पुरुषप्रयत्नाने साध्य होत नाहीत. कांही गोष्टी अदृष्टा-धीन असतात. त्यावरून दोन विचारमार्ग निघाले. एक दैववादी व दुसरा प्रयत्नवादी. पण प्रत्येक कार्यांत अपूर्वाचाहि थोडाफार भाग असतो, हें आता पुष्कळ विचारवंतांस मान्य झालें आहे.

अपूर्वविधि मंत्र व ब्राह्मण मिळून वेद होतो. ब्राह्मणवाक्यें म्हणजे विधिवाक्यें. त्यामध्ये अनेक प्रकारचे विधि असतात. अपूर्वविधि हा त्यांतलाच एक प्रकार आहे. याचीं लक्षणें —

(१) 'अप्राप्तप्रापकोविधिः = प्राप्त म्हणजे ज्ञात होय. अप्राप्त म्हणजे अज्ञात. अज्ञात वस्तूचें ज्ञान जो करून देतो, तो अपूर्वविधि होय.

(२) 'यो विधिः अत्यन्ताप्राप्तमर्थं बोधयति सः' = जो विधि अत्यंत अप्राप्त (अज्ञात) अशा विषयाचें बोधन करतो तो (न्यायकोश).

उदा० 'अग्निहोत्रं जुहुयात् स्वर्गकामः' = ज्याला स्वर्गाची कामना असेल, त्याने अग्निहोत्र करावें, असें वैदिक वचन आहे. या विधींत सांगितलेलें अग्निहोत्र प्रत्यक्षादि इतर कोणत्याहि प्रमाणाने ज्ञात होत नाही, म्हणून या विधीला अपूर्वविधि म्हणायचें. याचे चार प्रकार आहेत —

(१) **कर्मविधि** – 'अग्निहोत्रं जुहोति' या वाक्यांतलें अग्निहोत्राचें विधान.

(२) **गुणविधि** – 'द्रव्यदेवतादिविधायकविधिः' = द्रव्य, देवता, इत्यादींचें विधान करणारा. उदा० 'दध्ना जुहोति' यांत दही या हवनीय द्रव्याचें विधान आहे.

(३) **विनियोगविधि** – उदा० 'ऐन्द्रया गार्हपत्यमुपतिष्ठते'.

इथे इंद्रदेवताक ऋचेचा गार्हपत्याच्या स्तुतीसाठी विनियोग सांगितला आहे.

(४) **प्रयोगविधि** – अमुक गोष्ट आधी करून मग दुसरी गोष्ट करावी, असें ज्या विधीने सांगितलें जातें, तो विधि. उदा० 'अधीत्य स्नायात्' = अध्ययनानंतर स्नान करावें.

अपूर्वव्रत जैन व्रत. यांत भाद्रपदांत प्रतिपदेस उपवास, चौवीसीची (२४ तीर्थंकर) त्रिकाल पूजा, किंवा तीन्ही लोकांची रचना असलेल्या चैत्यालयाची स्थापना करून त्याची पूजा करतात. [व्र. ति. नि.]

अपोटो द. भारतांतील गौडांची एक पोटजात. मुख्य धंदा पालखीं व मेणा वाहून नेणें. [का. ट्रा. स. इं.]

अपोशान जें अन्न आपण खातों, त्याला उपस्तरण (बैठक) व अपिधान (आच्छादन) या दोन गोष्टी आवश्यक असतात. त्या करण्यासाठी उजव्या हाताच्या तळव्यावर (आचमनाला घेतात तसें) पाणी घेऊन तें 'ॐ अमृतोपस्तरणमसि' या मंत्राने भोजनापूर्वी प्राशन करणें व 'ॐ अमृतापिधानमसि' या मंत्राने त्याचप्रमाणे भोजनोत्तर प्राशन करणें, याला अपोशान कर्म म्हणतात. धोतर व उपरणें या दोन वस्त्रांनी मनुष्य जसा अनग्न होतो, तद्वत् अपोशानाने (आपोष्णी) अन्न अनग्न होतें. हें अपोशान शिजविलेलें अन्न भक्षण करतेवेळींच करावें, असें सांगितलें आहे. [आचारेंदु]

अपोहवाद् बौद्ध दर्शनांत सामान्याचें खंडन करून नामजात्यादि असंयुक्त अर्थालाच शब्दार्थ मानलें आहे. भाषा ही सामान्य किंवा जाति यांच्या आधारावांचून राहूं शकत नाही, असा न्याय–मीमांसा–दर्शनांचा सिद्धान्त आहे. प्रत्येक व्यक्तीसाठी भिन्न भिन्न शब्द प्रयुक्त करायचा झाला, तर भाषेला अनवस्था प्राप्त होईल. भाषेंतच नव्हे; तर ज्ञानाच्या क्षेत्रांतहि सामान्याला महत्त्व आहे. कारण एक ज्ञान जर दुसऱ्या ज्ञानाहून पृथक् मानावें लागलें, तर एकाच वस्तूच्या अनेक ज्ञानांत कांही परस्परसंबंध राहणार नाही. म्हणूनच न्याय-मीमांसेंत अनेक व्यक्तींत राहणाऱ्या एका सामान्याची (जाति) नित्य सत्ता मानलेली आहे. हीच सत्ता भाषेच्या व्यवहारालाहि कारण आहे.

पण बौद्धांच्या मतें सर्व पदार्थ क्षणिक असल्यामुळे ते सामान्याची सत्ता मानीत नाहीत. त्यांचा दावा असा, की जर सामान्य एक असेल, तर तें अनेक व्यक्तींच्या ठिकाणीं कसें राहील ? जर सामान्य नित्य असेल, तर नष्ट पदार्थांत राहणाऱ्या सामान्याचें काय होतें ? अतएव सामान्यनामक नित्य सत्ता पदार्थामध्ये राहते, हें खरें नाही. पदार्थ क्षणिक असल्यामुळे तो कोणत्या अन्य वस्तूशीं संबंधित न होतां, तो स्वतःच स्वतःमध्ये एक विशिष्ट सत्ता असतो. त्याला स्वलक्षण असें म्हणतात. अनेक स्वलक्षण पदार्थांत अज्ञानामुळे एकत्वाची मिथ्या प्रतीति होते. अर्थात् लोकव्यवहाराला ती आवश्यकच असते. म्हणून सामान्यलक्षण पदार्थाला व्यावहारिक सत्ता असली, तरी पारमार्थिक दृष्ट्या तो असत् आहे. शब्दांचा अर्थ परमार्थतः सामान्य संबंधाने रहित होऊनच भासित होतो. यालाच अन्यापोह किंवा अपोह (अप + ऊह्) म्हणतात. अपोहवादाच्या विकासाचे तीन स्तर मानलेले आहेत. दिङ्नागाच्या मतें शब्दाचा अर्थ अन्याभाव मात्र असतो. शांतरक्षित म्हणतो, की शब्द हा भावात्मक अर्थाचा बोध करवितो व त्याचा अन्याशीं भेद ऊहाच्या द्वारें कळतो. रत्नकीर्तीचें मत असें, की शब्दार्थ हा अन्याच्या भेदाने युक्त असतो. हीं तीनहि मतें शब्दार्थाला अन्याच्या भेदाने युक्त मानणारीं आहेत. हेंच अपोहवादाचें वैशिष्ट्य आहे. [राजबली पांडेय]

अपौरुषेयवाद वेद हे पौरुषेय (पुरुषनिर्मित) कीं अपौरुषेय असा प्राचीन काळापासून वाद आहे. वेदांचा आविष्कार कसा झाला, याबाबत मीमांसक व नैयायिक या दोघांचीं मतें भिन्न भिन्न आहेत. जैमिनीय मीमांसक, कुमारिलादि मीमांसक, आधुनिक मीमांसक व सांख्यवादी, यांच्या मतें वेद हे नित्य, अपौरुषेय व स्वतःप्रमाण आहेत. मीमांसक हे वेदांना स्वयंभू मानतात. वेदांच्या निर्मितीचा प्रयत्न कोणाहि व्यक्तीचा किंवा ईश्वराचा नाही, असें त्यांचें म्हणणें आहे. नैयायिक मात्र वेद हे ईश्वरप्रोक्त आहेत, असें समजतात. मनुष्य हा भ्रम, प्रमाद, दुराग्रहादि दोषांनी युक्त असल्यामुळे त्याने वेदासारखा निर्दोष ग्रंथ रचणें शक्य नाहीं; म्हणून वेद अपौरुषेय, इतकेंच मीमांसक म्हणतात; तर त्याच्यापुढे जाऊन नैयायिक असें प्रतिपादन करतात, की भ्रमप्रमादशील मानवाने वेद निर्माण केले नाहीत, अशी श्रद्धा ठेवून ते ईश्वराने सांगितले किंवा प्रकट केले, असें मानणेंच योग्य होईल. ईश्वराने सृष्टि निर्माण केली, तसेंच त्याने वेदहि निर्माण केले, असें म्हटल्यास हरकत कोणती, असा नैयायिकांचा सवाल आहे.

श्रुतीच्या मताप्रमाणे ऋग्वेदादि वेद हे 'त्या महाभूताचे निःश्वास आहेत.' श्वासप्रश्वास हे स्वतः आविर्भूत

होतात. त्याच्यासाठी मानवाच्या प्रयत्नाची वा बुद्धीची अपेक्षा नसते. म्हणून त्या महाभूताचे निःश्वासरूप असलेले वेद अदृष्ट-वशात्, अबुद्धिपूर्वक, स्वयं आविर्भूत होतात. मीमांसामतांत शब्द नित्य मानलेला आहे. शब्द हा अश्रुत होतो. पण तो लुप्त होत नाही. शब्द आविर्भूत झाला, की तो क्रमशः विकीर्ण होऊन लघु व अश्रुत होतो; परंतु केव्हाहि लुप्त होत नाही. शब्द उच्चारला जातो म्हणजेच आकाशांत अंतर्हित असलेला शब्द तालु व जिह्वा यांच्या संयोगाने फक्त आविर्भूत होतो; उत्पन्न होत नाही (मी. सू. १. १. १४ शा. भा.). वेद ही नित्य शब्दांची संहति असल्यामुळे ते नित्य आहेत व कोण-त्याहि प्रकारें उत्पाद्य नाहीत. कांही वैदिक संहितांचा संबंध तित्तिरि, कठ, इ. व्यक्तिनामांशीं येतो; परंतु या व्यक्तींनी त्या त्या संहितांचें प्रवचन केलें, असा त्याचा अर्थ आहे; त्यांनी त्या ग्रंथांची रचना केली, असा नव्हे (मी. सू. १. १. ३० शा. भा.). वेदांमध्ये जागोजाग आढळणारे बबर, प्रावाहणि, यांसारखे शब्द हे व्यक्तीचे वाचक नसून, नित्य पदार्थाचे निर्देशक आहेत. अशा प्रकारें स्वतः आविर्भूत वेद हे कोण्याहि पुरुषाने रचलेले नसल्यामुळे अपौरुषेय ठरतात. या सर्व विचाराला अपौरुषेयवाद असें नांव आहे. [श्रु. बो.; हिं. वि. को.]

अप्पय्य दीक्षित (१५२०–१५९२ इ. स. महालिंगशास्त्री यांच्या मतें) एक दाक्षिणात्य महापंडित. द्रविड ब्राह्मण. पित्याचें नांव नारायण दीक्षित. अप्पय्य दीक्षित याला त्याच्या वडिलांकडूनच विद्या मिळाली. बाराव्या वर्षीच त्याने अध्ययन पूर्ण केलें. पुढे अलंकार, व्याकरणशास्त्र व दर्शनें यांतहि पारंगतता मिळविली. याचे वडील व आजोबा अद्वैती होते. त्यांचे संस्कार ग्रहण करून यानेहि अद्वैतमताचा प्रसार केला. इतकेंच नव्हे; तर तो शंकराचार्यांच्या अद्वैत-परंपरेंतला सर्वश्रेष्ठ आचार्य बनला.

तो अद्वैती असूनहि परम शिवभक्त होता. सिद्धान्तकौमुदी-कार भट्टोजी दीक्षित हा याचा शिष्य होता. पण तो परम वैष्णव असूनहि त्यांचा गुरुशिष्यसंबंध जिव्हाळ्याचा राहिला. अप्पय्य शैव असूनहि अनाग्रही होता. तो म्हणे –

सुरारौ च पुरारौ च न भेदः पारमार्थिकः ।
तथाऽपि मामकी भक्तिश्चन्द्रचूडे प्रधावति ॥

अर्थ–विष्णु व शिव या दोघांत परमार्थतः भेद नाही, पण माझी भक्ति मात्र चंद्रशेखर शिवाकडेच धाव घेते.

शैवसिद्धान्ताच्या स्थापनेसाठी त्याने शिवार्कमणिदीपिका, शिवतत्त्वविवेक, शिवकर्णामृत, इ. पांडित्यपूर्ण ग्रंथ लिहिले. शांकरसिद्धान्तांत वाचस्पतिमिश्राचें, रामानुजमतांत सुदर्शनाचें व माध्वमतांत जयतीर्थाचें जें स्थान व महत्त्व, तेंच श्रीकंठ-संप्रदायांत शिवार्कमणिदीपिका रचून अप्पय्य दीक्षिताने मिळविलें आहे.

एकदा नर्मदातीरनिवासी नृसिंहाश्रम हे त्याच्याकडे आले. त्यांनी अप्पय्य दीक्षिताला जाणीव दिली, की पितृ-पिता-महांच्या अद्वैतपरंपरेची जाणीव ठेव. त्याला अनुसरून त्याने न्यायरक्षामणि, सिद्धान्तलेश, इ. ग्रंथ लिहिले. सिद्धान्त-लेश या ग्रंथांत त्याने अद्वैतवादी आचार्यांच्या एकजीववाद, नानाजीववाद, बिंबप्रतिबिंबवाद, अवच्छेदवाद, साक्षित्व, इ. विषयांतल्या मतभेदांचें दिग्दर्शन करून त्या विषयांवर स्वतःचे विचार मांडले आहेत. त्याचा हा ग्रंथ शांकर संप्रदायाचा एक महान् कोशच आहे.

त्याची विद्वत्ता, वादपटुत्व व सदाचरण या गुणांवर लुब्ध होऊन चंद्रगिरि येथील राजा व्यंकटपति रायलु याने याच्या कुटुंबाच्या व याच्याकडे शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या योगक्षेमासाठी म्हणून त्याला एक अग्रहार दिला होता. तिथे राहून त्याने कित्येक विद्यार्थी पढविले. दक्षिणेंतल्या अनेक राजदरबारांत याला बिदागी व मानसन्मान मिळाला होता.

याने दार्शनिक विषयांवर १०४ ग्रंथ लिहिले, अशी जनश्रुति आहे; पण ते सगळे उपलब्ध नाहीत. अलंकार-शास्त्रावरचा कुवलयानंद हा त्याचा ग्रंथ पंडितमान्य आहे. चंद्रालोक नांवाच्या ग्रंथावरची ती एक विस्तृत व्याख्या आहे. हा ग्रंथ त्याने राजा व्यंकटपति याच्या प्रेरणेवरून लिहिला. वृत्तिवार्तिक व चित्रमीमांसा हेहि त्याचे साहित्य-विषयक ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

हा वैदिकधर्माचा निष्ठावंत अनुयायी होता. कावेरीच्या तीरावर याने अनेक यज्ञ केले. पुढे त्रिस्थळीयात्रा करून कांही काल काशीक्षेत्रीं वास्तव्य केलें. याच वास्तव्यांत त्याची व पंडितराज जगन्नाथ याची गांठ पडली. जगन्नाथ पंडिताने याच्या चित्रमीमांसेचें खंडन केलें आहे. आख्यायिका अशी, की जगन्नाथ व अप्पय्य हे काशीक्षेत्रांत एकमेकांचे प्रतिस्पर्धी बनले होते. त्रिस्थळीहून गांवीं परत आल्यावर त्याने संस्कृतांत कांही पदें रचलीं. त्यांतून ' ब्रह्मैवाहम् ' हाच अद्वैत घोष गंभीरपणे प्रकट होतो.

आयुष्याच्या अखेरीस काशीक्षेत्रीं देह ठेवावा, या उद्देशाने तिकडे जाण्याची तो तयारी करूं लागला; पण सगळ्या ग्रामस्थांनी त्याला आपला देश न सोडण्याची गळ घातली. म्हणून तो चिदंबरम् या ठिकाणीं राहायला गेला. त्याच्याजवळ स्फटिकाचीं पांच शिवलिंगें होतीं. त्यांतलीं दोन त्याने ब्राह्म-णांस दान दिलीं. एक मुलाला व एक पुतण्याला दिलें व

पांचव्याची चिदंबरम् येथे स्वहस्तें स्थापना केली.

दार्शनिक दृष्टीने तो निर्गुणब्रह्मवादी होता; पण त्या ब्रह्माच्या उपलब्धीसाठी साधन म्हणून त्याने सगुणोपासनेचा स्वीकार केला आहे. याला सर्वतंत्रस्वतंत्र म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाही. प्रगाढ पांडित्य व असामान्य प्रतिभा, या लोकोत्तर गुणांनी हा महापंडित संस्कृत साहित्याच्या आकाशातला एक देदीप्यमान तारा ठरला आहे. [हिंदुत्व; म. ज्ञा. को.; म. च. को.]

अप्पर तमिळनाडमधल्या नायन्मार शैव संतांतला एक प्रमुख संत. याचा काल निश्चत नाही. कोणी त्याला तिसऱ्या चौथ्या शतकांतला मानतात; तर कोणी सातव्या शतकांतला समजतात. हा दक्षिण अर्काटमधल्या तिरुवामूर या गांवीं वेळ्ळाबर या अब्राह्मण कृषक जातींत जन्मला. याचें मूळचें नांव मरुलनीकियर असें होतें. याला तिलकवडियार नांवांची मोठी बहीण होती. तिचें एका सुभेदाराबरोबर लग्न ठरलें होतें; पण तो सुभेदार लग्नाआधींच एका युद्धांत मरण पावल्यामुळे ती विरक्त बनली. अशांत तिचे आईवडीलहि निवर्तले. त्या आघाताने तिची जीवनावरची आस्थाच संपली आणि ती अग्निप्रवेशाला उद्युक्त झाली. पण मरुलनीकियरने तिला प्राणत्याग न करण्याची गळ घातल्यामुळे तिला त्या निश्चयापासून परावृत्त व्हावें लागलें. पुढे ती शिवाराधनेंत आपला काळ कंठीत राहिली.



अप्पर

हळूहळू मरुलनीकियर मोठा झाला. अध्ययन करून तो महापंडित आणि मोठा वादविवादपटु बनला. पुढे त्याला अध्यात्माची गोडी लागली. त्या काळीं दक्षिणेंत जैन धर्माची चलती होती. अशा स्थितींत कोणीतरी जैन साधु त्याला भेटला आणि त्याच्या प्रभावांत सांपडून मरूलनीकियरने जैन धर्माची दीक्षा घेतली. आख्यायिका अशी, की त्याने पाटलीपुत्रांत जाऊन जैन धर्म स्वीकारला व तो तिथेच जैनांचा आचार्य बनला. अनेक अन्यधर्मी पंडितांना त्याने वादांत पराभूत केलें. हें त्याचें सामर्थ्य जाणून अनेक जैन श्रमणांनी त्याला आपला गुरु केलें.

आपला भाऊ जैन बनल्याचें ऐकून तिलकवडियारला दुःख झालें. ती आपला गांव सोडून तिरुअधिकै या शिवक्षेत्रांत जाऊन राहिली. आपल्या मोठेपणाच्या धुंदींत मरुलनीकियरला तिचें स्मरणहि राहिलें नाही. पुढे एके दिवशीं त्याला पोटशूळ उठला आणि त्यांत तो मरणोन्मुख अवस्थेला पोंचला. त्यावेळीं मात्र त्याला बहिणीचें स्मरण झालें व त्याने तिला बोलावणें धाडलें; पण तिचा प्रतिनिरोप आला, की 'मी जैनांच्या मठ-मंदिरांत पाऊलहि ठेवणार नाहीं.' त्यामुळे शेवटीं त्यालाच उठून बहिणीकडे यावें लागलें. बहिणीचे पाय धरल्यावर तिने भावाला शिवाची विभूति दिली व तिच्या सेवनाने त्याचा पोटशूळ गेला. या रोकडया प्रचीतीने त्याची शिवावर श्रद्धा जडली व त्याने जैन धर्म सोडून शैव धर्म अंगीकारला.

या घटनेने जैन साधु त्याच्यावर क्षोभले आणि त्यांनी महेंद्रवर्मन् या पल्लव राजाकडे त्याच्याविषयीं नाना प्रकारच्या चुगल्या केल्या; पण मरुलनीकियर आपल्या भक्तिसाधनेंत मस्त होता. राजाने त्याला पकडून आणण्यासाठी शिपाई पाठविले, तर तो त्यांना एका पद्यांतच बोलला –

नाम आक्कुंम् कुडि अल्लोम्
नामाक्कुंम् कुडि अल्लोम्
नमनै अञ्जोम्
नरकातिल् इडर्प्पडोम्
नडलै इल्लोम् एमाप्पोम्
पिणि अरियोम् पणिवोम् अल्लोम्
इन्बे एन्नाळुम् तुन्बम् इल्लै
तमाक्कुंम् कुडि अल्लात् तन्नेयान
शंकरन् नरचङ्गवेण्
कुल्लै और कादिल्
कोमार्के नाम एन्रूप् मीळा आलयफ्
कोयम् मळर्च् चेवडियिणैये कुरुहि नोवे

अर्थ–आमच्यावर कोण्याहि राजाची सत्ता नाही. आम्हांला जुलमी राजाचेंच काय, पण नरकाचेंहि भय वाटत नाही. आमचा कधी थरकांप होत नाही. आम्हांला दुःख ठाऊक नाही. आम्ही सदा सुखी. आपदा-विपदा आमच्यासमोर उभ्या राहूं शकत नाहीत. आमच्या जीवनाला दुःखाची छाया नाही; कारण आम्ही राजाधिराज शंकराचे दास आहों. त्याच्यावर आमची पूर्ण निष्ठा आहे आणि आम्ही स्वतःला त्याच्या चरणावर वाहिलें आहे.

तो पल्लव राजा जैन होता. जैन धर्माचा त्याग केल्याबद्दल मरुलनीकियरचा त्याने अनन्वित छळ केला; पण

मरुलनीकियरने आपली शिवनिष्ठा सोडली नाही. सरतेशेवटीं राजाच त्याला शरण गेला आणि त्यानेहि जैनधर्म टाकून शिवदीक्षा घेतली. त्यानंतर मरुलनीकियरने चिदंबरम्, शियाली, वेदारण्यम्, इ. अनेक शैवक्षेत्रांच्या यात्रा केल्या. त्या संचारांत त्याची आणि संबंधरची गांठ पडली. संबंधरने त्याची योग्यता ओळखून त्याला अप्पर (पिता) अशी पदवी दिली. पुढे याच नांवाने तो प्रसिद्ध झाला.

अप्परसंबंधी बऱ्याच आख्यायिका प्रचलित आहेत. देवालयाच्या आवारांतलें गवत काढण्यासाठी हा सदैव आपल्या खांद्यावर खोरें वागवीत असे, असें सांगतात. तमिळनाडमधल्या त्याच्या मूर्तींत हें खोरें दाखविलेलें असतें. अप्परच्या ठिकाणीं अद्‌भुत कार्यशक्ति होती. त्याने अत्यंत कष्ट सोसून दक्षिणेंत शैव धर्म वाढविला. शिवाचे गुणानुवाद करणारीं याचीं सुमारें दोनशें पदें तेवारम्‌मध्ये संग्रहीत आहेत. तिरुनावुक्करशु असें याचें आणखी एक नांव होतें; याचा अर्थ पवित्र वाणीचा राजा किंवा वाक्शक्तिप्रवर असा आहे. खरोखर त्याच्या वाणींत अपूर्व सामर्थ्य होतें. त्याच्या कवितेंत अनेक ठिकाणीं शिवनृत्याचें वर्णन आढळतें. हा गूढवादी कवि होता. त्याने आपल्या शेतकीपेशाचेंहि काव्यमय चित्रण केलें आहे. त्याने जणू शैव धर्माचें रहस्यच आपल्या कवितेच्या द्वारें लोकांच्या श्रवणसंपुटांत ओतलें. **पाहा**—तेवारम्; नायन्मार. [त. सा. सं.]

अप्पाकवि आंध्रांतला एक श्रेष्ठ कवि. याचे तेलुगु भाषेंत आंध्रप्रयोगरत्नाकर व वृंदासंभावना असे दोन ग्रंथ आहेत. पहिला ग्रंथ छंदःशास्त्रावर आहे. [म. च. को.]

अप्पुडी अडिगळ त्रेसष्ट शैव संतांपैकी एक. हा परम गुरुभक्त होता. याने आपली सर्व धनसंपदा गुरूला समर्पिली होती. एकदा गुरु त्याच्या घरीं भोजनास आला असतां, याने आपल्या मुलाला केळीचीं पानें आणायला धाडलें, तिथे त्याला सर्पदंश होऊन मृत्यु आला. पण गुरूने त्याला पुनश्च जिवंत करून याच्या वरचें अरिष्ट दूर केलें. [पे. पु.]

अप्रकाश एक देवगण. या गणाचा अधिपति यम आहे. [ब्रह्मांड पु. ३. १. ५२]

अप्रकाश्य पुढील नऊ गोष्टी गुप्त ठेवाव्या, असा शिष्ट लोकांनी संकेत घालून दिला आहे—

जन्मर्क्षं मैथुनं मन्त्रो गृहच्छिद्रं च वञ्चनम् ।
आयुर्धनापमानं स्त्री न प्रकाश्यानि सर्वथा ।।

अर्थ – जन्मनक्षत्र, मैथुन, मंत्र, गृहच्छिद्र, फसवणूक, वय, धन, अपमान, व स्त्री या गोष्टी कधींहि प्रगट करूं नयेत.

अप्रतिचक्रा एक जैन विद्यादेवी. हिला जंबुनदा असेंहि म्हणतात. ही मयूरवाहना व भाला धारण करणारी आहे. [जै. इ.]

अप्रतिरथ एक सूक्तद्रष्टा. बृहस्पतीने (इंद्र) राक्षसादि शत्रूंशीं केलेल्या तुंबळ युद्धाचें याने ओजस्वी भाषेंत वर्णन केलें आहे. वैदिक आर्यांच्या युयुत्सु वृत्तीचें प्रतिबिंब याच्या सूक्तांत उत्तम रीतीने पडलेलें दिसतें (ऋ. १०. १०३).

अप्रतिष्ठ पृथ्वीच्या खालील चौथा नरक. या नरकांतल्या प्राण्याला स्थिति नसते. त्याला सदैव भ्रमण करीत राहावें लागतें. [ब्रह्मांड पु. ४. २. १५०, १८४]

अप्सरा गंधर्व वर्गांतल्या स्त्रिया. यांना गांधर्वी असेंहि म्हणतात.

घृताची मेनका रम्भा ऊर्वशी च तिलोत्तमा ।
सुकेशी मञ्जुघोषाद्याः कथ्यन्तेऽप्सरसो बुधैः ।।

(अमर.)

हीं प्रसिद्ध अप्सरांचीं नांवें आहेत. वायुपुराणांत अप्सरांची संख्या चौतीस सांगितली आहे (६.४). अप्सरा नृत्यप्रिय व स्वरासक्त असतात. स्नान, सुगंधी मद्य व मांस या गोष्टी त्यांना फार आवडतात. वृक्षांच्या गर्द राया व उपवनें यांत विहार करणेंहि त्यांना आवडतें. स्वर्गांतल्या इंद्रसभेंत नृत्य–गायन करून देवांना व स्वर्गस्थ पुरुषांना शृंगारसुख देणें, हें त्यांना नेमून दिलेलें कार्य होय. अप्सरांची सौंदर्याबद्दल ख्याति आहे. पुण्यवान् लोकांना अप्सरांचा उपभोग मिळतो, अशी सर्व धर्मांची श्रद्धा आहे.

अप्सरा हा शब्द वैदिक वाङ्‌मयांत गंधर्व शब्दांशीं जोडून येतो. यजुर्वेद व अथर्ववेद यांत त्यांचीं विशेष वर्णनें आढळतात. अप् + सरस् अशी या शब्दाची फोड करून जलांत क्रीडा करणाऱ्या त्या अप्सरा, अशी सायणाचार्यांनी त्या शब्दाची व्युत्पत्ति दिली आहे. महाभारतांत अप्सरांचा उल्लेख बऱ्याच ठिकाणीं आढळतो. कश्यपापासून प्राधेला रंभादि अप्सरा झाल्या, असें

संभव पर्वांत सांगितलें आहे. या सूर्याच्या समोर नृत्य करतात व द्वादशादित्यांबरोबर आळीपाळीने चालतात (भाग. पु. १२. ११. ४७). समुद्रमंथनांतून यांची उत्पत्ति झाली, असें भागवतांत सांगितलें आहे (८. ८. ७.). अप्सरा मेरुपर्वतावर राहत असून कामदेव हा त्यांचा अधिपति आहे (ब्रह्मांड पु. २. १५. ४९.).

एखाद्या पुरुषाचें तप उग्र झालें आणि त्याच्यापासून आपल्या इंद्रपदाला धोका आहे असें वाटलें तर इंद्र त्या ऋषीचा तपोभंग करण्यासाठी, अप्सराना पाठवीत असे. अप्सरांचे चौदा गण असून त्यांत दैविक व लौकिक असे दोन भेद आहेत. त्यांपैकी कांही अप्सरा ब्रह्मा व मनु यांच्या मानस कन्या आसून कित्येक देवांच्या व ऋषींच्या स्त्रिया व माता आहेत (पु. इं.).



अप्सरा–खजुराहो

अप्सरा पृथ्वीवर येऊन मानवावरहि प्रेम करतात. पुरूरवा–उर्वशी यांची प्रेमकथा प्रसिद्ध आहे. कांही अप्सरा जलांच्या स्वामिनी असतात. त्या तलावांत पक्षिरूपाने विहार करतात (श. ब्रा. ११. ५. १. ४). अरण्यांतले जलाशय, नद्या, समुद्र हीं आणखी त्यांचीं निवासस्थानें होत. जलाव्यतिरिक्त वृक्षांशींहि त्यांचा संबंध आहे. त्या वड व पिंपळ यांवर झोपाळे बांधून झोके घेतात, व कर्करी नांवाचें मधुर वाद्य वाजवितात (अथर्व. ४. ३७.४). महाराष्ट्रांत ज्यांचा आसऱ्या म्हणून उल्लेख येतो, त्या अप्सराच होत.



अप्सरा

फारसी भाषेंत अप्सरेला हूरी म्हणतात. पुराणांत अप्सरांच्या व त्यांच्या शृंगारविलासांच्या अनेक कथा आढळतात.

अप्सरेश नर्मदेवरील एक तीर्थ (मत्स्य पु. १९३. १६–१७). अधिक माहिती उपलब्ध नाही.

अफगाण टोळ्या अनेक सजातीय गटांच्या या टोळ्या बनलेल्या असतात. पण त्यांच्या सामाजिक चौकटींत परकी गटांचा अंतर्भाव करण्याची तरतूद असते. अफगाण लोक भटके असल्यामुळे पुष्कळदा त्यांच्या टोळ्यांत फुटीरपणा निर्माण होतो. कांही लोक सामायिक जमीन व पाणी यांचा त्याग करून मूळ टोळीपासून दूर जातात. हा फुटीरपणा कधी तात्पुरता, तर कधी कायमचा असतो. भारतांत आढळणारे अफगाण हे बहुसंख्य घिलझाई आहेत. अस्सल अफगाणांशीं त्यांचा वांशिक दृष्टया कोणताहि संबंध नाही. हे लोक उंचे पुरे व शरीराने दणकट असतात. हिंदूंशी ते वाकडया वृत्तीने वागतात. ते फक्त शिखांची तेवढी कदर करतात. कारण ते त्यांचे एकाकाळीं राष्ट्रीय शत्रु होते. [रे. क. इं.]

ॲबट् मूळ अर्थ पिता. ख्रिस्ती मोनॅस्टरींतला एक धर्माधिकारी. ६ व्या शतकांतील सेंट बेनिडिक्ट या ॲबट्ने आपले अधिकार वाढवून घेतले. तेव्हापासून ख्रिस्ती समाजावर धार्मिक सत्ता चालविण्याचा मोठा अधिकार त्यांना मिळाला. मठवासी स्त्रियांवर अधिकार चालविणारी ॲबेस् ही धर्माधिकारिणी असे. पोप आणि ख्रिस्ती जगांतले राजे ॲबट्सना देशोदेशीं आपले वकील म्हणून नेमीत. या विशेष अधिकारामुळे ॲबट् हे खूप श्रीमंत झाले. मठवासी मंक हे ॲबट्सची निवड करीत व राजे लोकहि त्या कामीं लक्ष घालीत.

अबदल - लोक ही जमात पंजाबांतील कांगडा, होशियारपूर या जिल्ह्यांत, तसेंच बिलासपूर, चंबा, मंडी, या ठिकाणीं आढळते. गाणीं गाऊन भिक्षा मागणें, हा यांचा धंदा आहे. राजपुतांच्या लग्नांत व अंत्यविधीच्या प्रसंगीं हे गाणीं गाण्याचें काम करतात. याच नांवाचे मुसलमान फकीरहि आहेत. पण त्यांचा व यांचा कांही संबंध नाही. [सु. वि. को.]

अबदागिरी कमळासारखें कापडी मोठें वर्तुळ, त्याला झालर, वर चांदीचा कळस आणि खाली लांब रंगीत दांडा, अशी अबदागिरी असते. हें पौर्वात्य देशांतलें वैभवाचें व राजसत्तेचें प्रतीक आहे. इजिप्तमधील चित्रांतहि अबदागिरी दिसतात. भारतांत देवाच्या मूर्तींवर

राजेरजवाडे यांच्या मस्तकावर आणि लग्नकार्याच्या मिरवणुकींत अबदागिरी धरतात. पेशवाईंत पराक्रम गाजविणाऱ्या पुरुषाला अबदागिरी वापरण्याचा अधिकार मिळे व त्यासाठी सरकारांतून एका माणसाचा पगार व अबदागिरीचें सामानहि दिलें जाई. [सु. वि. को.]

अबदाल बदलचें बहुवचन. बदली व्यक्ति किंवा प्रतिनिधि. इस्लामी कल्पनेप्रमाणे अशा अबदालांच्या मार्फत ईश्वर जगरहाटी चालवितो. सर्व जगांत असे सत्तर लोक असून त्यांतले चाळीस सिरियांत आहेत. मात्र ते कोण व कुठे आहेत, तें ईश्वराव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाला माहीत नसतें. त्यांतला एक पुरुष मृत झाला, कीं ईश्वराज्ञेने दुसरा त्याची जागा घेतो. [डि. इ.]

अबदाली एक मुसलमान जात. यांची वस्ती गुजरातमध्ये आहे. हे भिक्षेकरी आहेत. जादूगार जेव्हा जादूचे प्रयोग करतो, तेव्हा हे गाणीं म्हणतात. मुसलमानांच्या घरांतून यांना वार्षिक संभावना मिळते. [मुं. इ. जा.]

अबदुल हक् (१५५१–१६४२ इ. स.) एक उर्दू ग्रंथकार. सादुल्ला तुर्क नांवाचा तैमूरलंगाचा एक अनुयायी दिल्लीला राहिला होता, त्याचा हा वंशज होय. १५९६ सालीं याने तारीख–इ–हक्क किंवा तारीख-इ–अबदुल-हक्की हा ग्रंथ लिहिला. धर्म व इतिहास या विषयांवर याने शंभरांवर ग्रंथ लिहिले आहेत. उतार वयांतहि याची प्रतिभा जागृत होती. उत्तर प्रदेशांत याची साधुपुरुषांत गणना होते. दिल्लीला याची कबर आहे. [सु. वि. को.]

अबदुलाह मुहम्मदाचा पिता. दक्षिण पॅलेस्टाइनमधील गाझाकडे त्याने व्यापारी सफर काढली होती. तिथून परत येतांना मदिनाह मुक्कामीं त्याचा मृत्यु झाला. त्यावेळीं त्याची पत्नी अमिनाह ही गरोदर होती. पतिनिधनानंतर तिने मुहम्मदाला जन्म दिला. [डि. इ.]

अबिल खेळूं का तबिल खेळूं महाराष्ट्रांतील मुलींचा खेळ. चार मुली वर्तुळ करून उभ्या राहतात व डाव्या उजव्या बाजूच्या मुलींच्या हातावर टाळ्या देतात. या खेळाचें गाणें असें—

अबिल खेळूं का तबिल खेळूं
गायी गेल्या खडका गुल्ले खेळूं
डबा बाई डबा चंदनी डबा
आरसा फणी घाल माझी वेणी
आरसा फुटला वेणी सुटली

हें गाणें म्हणून शेवटीं पक्वा घालतात. [व्या. ज्ञा. को.]

अबीर यालाच बुका असेंहि म्हणतात. चंदन, नागरमोथा, गवला कचरा, इ. सुगंधी पदार्थांचें चूर्ण करून तें कोळशांच्या चूर्णांत मिसळतात व त्याची वस्त्रगाळ पूड करतात, तोच अबीर होय. याचा खप भारतांत सर्वत्र आहे. महाराष्ट्रांत आळंदी, पंढरपूर, इ. भागवत संप्रदायाच्या क्षेत्रांत देवाला अबीर वाहण्याची पद्धत आहे. पुराण, कीर्तन व भजन, या प्रसंगीं पुराणिक, हरिदास व जमलेली मंडळी यांच्या कपाळीं अबीर लावतात. हिंदी गाण्यांत गुलालाच्या जोडीने अबीराचा उल्लेख येतो. 'विठोबाला वाहिला बुक्का' अशा प्रकारें मराठींतहि त्याचे उल्लेख येतात. वारकरी संप्रदायांतील लोक क्षेत्रांतून घरीं येतांना बुका प्रसाद म्हणूनहि आणतात. [सु. वि. को.]

अबुल फज़ल (१५५१ – १६०२ इ. स.) नागोर येथील शेख मुबारकचा पुत्र व अकबराच्या दरबारांतला इतिहासलेखक आणि विद्वान्. याचें शिक्षण बापाच्या देखरेखीखाली झालें. शेख मुबारक हा धर्माच्या बाबतींत उदारमतवादी होता. त्यामुळे त्याला कट्टर मुल्ला व उलेमा यांच्याकडून खूप छळ सोसावा लागला. अबुल फज़लहि त्या छळांतून सुटला नाही. वयाच्या १५ व्या वर्षीच फज़लने आपलें परंपरागत अध्ययन पूर्ण केलें. त्याचा वडील भाऊ फैज़ी. तोहि गाढा विद्वान् होता. त्याने फज़लला अकबराकडे आणलें.

उलेमांचा धार्मिक कडवेपणा व शिरजोरी कमी व्हावी, या हेतूने अकबराने एक नवा मनमुवा रचला होता. दर गुरुवारीं सर्व धर्मांच्या पंडितांना एकत्र बोलावून तो धार्मिक विषयांवर त्यांच्यांत वादविवाद घडवून आणी. त्या पंडितसभेंत फज़लने अनेकदा आपली बौद्धिक चमक दाखविली व त्यामुळे तो अकबराला प्रिय झाला. त्या पंडितसभेचें संचालन तोच करी व अकबर शेवटीं स्वतःचा निर्णय देई. या वादविदांत अखेर उलेमांचा पाडाव झाला व कुराणाला अनुसरून इस्लामी धर्मांत परिवर्तन करण्याचा अकबराचा हेतु व अधिकार उलेमांना मान्य करावा लागला. पुढे अबुल फज़लशीं विचारविनिमय करून अकबराने दीने इलाही नांवाचा नवा धर्मपंथ स्थापन केला. अकबराने अबुल फज़लला आपला मंत्री म्हणून नेमून घेतलें होते.

अकबराचा राजनैतिक पत्रव्यवहार तोच करीत असे. या सर्व गोष्टी कट्टर मुसलमानांस आवडल्या नाहीत. ते फज़लला सतत पाण्यांत पाहूं लागले. शहाजादा सेलीम हाहि फज़लच्या वाइटावर टपून होता. त्याने अकबराकडे फज़लबद्दल खूप चुगल्या केल्या. पण अकबराने त्यांचें कांही मानलें नाही. त्यामुळे सेलीमने अकबराशीं विद्रोह मांडला. त्याने ओरछाचा राजा वीरसिंह बुंदेला याला फूस दिली व फज़ल दक्षिणेंतून आग्र्याला परत येत असतां वाटेंत त्याची हत्त्या करविली. फज़लच्या निर्घृण हत्त्येमुळे अकबराला फार दुःख झालें.

अबुल फज़लने पुष्कळच लिहिलें आहे. पण त्या सर्वांत अकबरनामा हा त्याचा प्रमुख ग्रंथ होय. याचे तीन विभाग असून त्यांत अकबराच्या राज्यकारभाराचा विस्तृत इतिहास आहे. ऐने अकबरी, या त्याच्या दुसऱ्या ग्रंथांत तत्कालीन भारताच्या सामाजिक व धार्मिक जीवनाविषयीं बरीच माहिती मिळते. या ग्रंथाचें गैरट व ब्लाकमन या पश्चात्य विद्वानांनी भाषांतर केलें असून फज़लच्या विद्वत्तेची प्रशंसाहि केली आहे. याशिवाय त्याने कुराणावरहि टीका लिहिली आहे. तो शांतिप्रिय होता व त्याचीं धार्मिक मतेंहि उदार होतीं. अकबराला त्याच्या साम्राज्य शासनांत अबुल फज़लची फार मोठी मदत झाली. मुस्लीम समाजावरचें उलेमांचें वर्चस्व नष्ट करण्याच्या कामीं त्याने अकबराला मनोभावें साह्य केलें.

अबुल फैज़-फैज़ी (१५४७ – १५९६ इ. स.) अकबराच्या दरबारांतला राजकवि. हा नागोरच्या शेख मुबारकचा मुलगा व अबुल फज़लचा वडील भाऊ होय. याच्या बापावर अकबराच्या दरबारांतल्या उलेमांनी नसतीं बालंटें आणल्यामुळे तो आपल्या मुलांना आग्र्यास ठेवून परागंदा झाला होता.

अबुल फैज़ी लहानपणासूनच काव्य करूं लागला. थोड्याच काळांत त्याची ही कवित्वकीर्ति अकबराच्या कानीं आली आणि त्याचीं काव्येंहि त्याला वाचायला मिळालीं. त्यामुळे अकबर संतोष पावला व त्याने फैज़ीला आपल्या दरबारांत बोलावून आणून त्याचा सन्मान केला. प्रथम त्याने शहाजादा मुराद याला शिकविण्याचें काम फैज़ीकडे दिलें व पुढे आग्र्याचा सदर म्हणून त्याची नेमणूक केली. कविराज अशा अर्थाचा मलिक–उश–शुअरा असा त्याला किताबहि दिला. फैज़ी हा कवि होता, तसाच इतिहास, तत्त्वज्ञान, वैद्यक व गणित या विषयांतला पंडितहि होता. बादशहाच्या आज्ञेवरून त्याने नल-दमयंती आख्यानावर फारसींत महाकाव्य रचलें आहे.

नल-दमयंतीची कथा त्याला फारच आवडली होती. तो आपल्या महाकाव्यांत म्हणतो ––

सद शुक्र के ई निगार खाना
बजिरफ्त निगारे जाविदाना

अर्थ – धन्य आहे ! जगाच्या चित्रशाळेला या अमर चित्राचा – नल-दमयंती काव्याचा–लाभ झाला.

या महाकाव्यांत त्याने मूळ कथानकांत थोडा फरक केला आहे. त्याने नलाला निषधाचा नव्हे, तर उज्जयिनीचा राजा बनविलें आहे. जाळें पसरून दमयंतीने हंसांना पकडलें, असें तो सांगतो. कलीने नलशरीरांत प्रवेश केल्याची गोष्ट फैज़ीने वगळली आहे. प्रस्तुत महाकाव्यांत भारतीय वातावरण सुरेखपणें उतरलें आहे. तो म्हणतो ––

ई रिश्ता बसरहे हिन्द बस्तन्द
बई सब्जा बखाके हिन्द किश्तन्द

अर्थ – ही प्रेमाची गांठ केवळ हिंदुस्थानांतच बांधली जाते व हें पीक हिंदुस्थानांतच उगवतें.

दमयंतीच्या सौंदर्याचें वर्णन करतांना तो म्हणतो, कीं 'बाग इतकी सुंदर दिसते, त्याचे कारण तिने दमयंतीच्या सौंदर्याचा कांही भाग चोरला आहे.' तिथे कूजन करणाऱ्या पक्ष्यांना तो वेदपठण करणाऱ्या ब्राह्मणांची उपमा देतो. शेवटीं दमयंतीला नलाची ओळख पटल्यानंतर ती जेव्हा परस्परांना आलिंगन देतात, तेव्हा तो त्याना एकमेकांचीं चुंबनें घेणाऱ्या दोन कळ्यांची व एकमेकांना बिलगलेल्या एकाच झाडाच्या दोन फांद्यांचीं उपमा देतो.

आपण एक भारतीय कथा सांगत आहों, याचा फैज़ीला वाटत असलेला अभिमान त्याच्या काव्यांत जागजागीं दिसतो. तो म्हणतो –

अर्जी सन्दल ना बसूदाहबरसग
पेशानीये सुबहरादहम रंग

अर्थ – नल-दमयन्ती आख्यानाच्या चंदनाचें गंध उगाळून मी प्रभातकालाच्या कपाळावर टिळा लावीत आहें.

फारसी साहित्यांत फैज़ीचें हें महाकाव्य अपूर्व गणलें गेलें आहे.

अकबराने नेमलेल्या ग्रंथसंपादक मंडळाचा फैज़ी हा अध्यक्ष होता. महाभारताच्या फारसी अनुवादाचें काम याच्याकडूनच झालें आहे. हिंदु वाङमयाचा व दर्शनांचा काळजीपूर्वक अभ्यास करणारा पहिला मुसलमान हाच होय. भास्कराचार्यांच्या बीजगणित व लीलावती या ग्रंथांचींहि त्याने

फारसींत भाषांतरें केलीं. त्याने कुराणावरहि विस्तृत टीका लिहिली आहे. बदायूनी व बख्तावरखाँ यांच्या मतें फैज़ीने १०१ ग्रंथ लिहिले. त्याची सगळी कविता पन्नास हजार भरेल असें म्हणतात; पण त्याचे कित्येक ग्रंथ उपलब्धच होत नाहीत.

अकबराने आपल्या दरबारचा वकील म्हणून एकदां त्याची दक्षिणेंत बुरहानपूर येथे नेमणूक केली होती. तो आगरा येथे मृत्यु पावला. त्याच्या मृत्यूने अकबराला फार दुःख झालें. फैज़ीजवळ फार मोठा ग्रंथसंग्रह होता. त्यांत दर्शन, संगीत, ज्योतिष, गणित, वैद्यक, इतिहास, धर्म, इ. अनेक विषयांवरचे लिखित ग्रंथ होते. त्याच्या मृत्यूनंतर अकबराने ही सारी ग्रंथसंपदा राजकीय ग्रंथालयांत दाखल केली. [ऐने अकबरी; मु. रियासत; हिं. वि. को.; मणिकांचन]


अबू पहाड (सं. अर्बुद) पश्चिम रेल्वेच्या अहमदाबाद-दिल्ली या मार्गावर अबूरोड नांवाचें स्टेशन आहे. तिथून हा पर्वत १७ मैलांवर आहे. याची उंची समुद्र सपाटीपासून ४ हजार फूट असून, लांबी १२ व रुंदी ३ मैल आहे. त्याच्यावर जाण्याचे मार्ग दोन – एक नवा व दुसरा जुना. जुन्या मार्गावर मानपुरच्यापुढे हृषीकेशाचें मंदिर लागतें. या स्थानाला द्वारकेचें द्वार म्हणतात. याच्या आसपास प्राचीन चंद्रावती नगराचे भग्न अवशेष आहेत. पुढे अंबरीषाचा आश्रम लागतो. तिथून परत फिरून नव्या मार्गाने अबू पर्वतावर जावें लागतें. हा पर्वत देवांचें आवडतें स्थान असल्याचें इथल्या स्थलमाहात्म्यांत म्हटलें आहे.

या पर्वतावर गौतम आणि वसिष्ठ यांचे आश्रम आहेत. वसिष्ठाची ध्यानस्थ मूर्ति आणि तिच्या जवळच कामधेनु आहे. असें सांगतात, की प्राचीन काळीं गौतम ऋषीचा आश्रमहि इथेच होता. याच्याजवळच एक नागकुंड आहे. उत्तंकाने गुरुपत्नी-साठी मिळविलेली कुंडलें तक्षकाने या ठिकाणीं चोरलीं आणि इथूनच उत्तंक त्याचा पाठलाग करीत नागलोकांत गेला, असें सांगतात.

संस्कृतांत या पर्वताला अर्बुदाचल असें म्हटलें असून त्याला हिमवंताचा पुत्र मानलें आहे. इथे एक रात्र राहिल्याने सहस्र गोदानें दिल्याचें पुण्य लाभतें (म. भा. वन. ८२). या पर्वता-विषयीं आणखी एक कथा आहे ती अशी –

विश्वामित्र ऋषि या ठिकाणीं शिवाची आराधना करीत होता. पण त्याच्या आराधनेंत दैत्य विघ्न आणूं लागले. त्याने त्यासाठी देवांची प्रार्थना केली. तेव्हा देव प्रत्यक्ष तिथे आले व तिथल्या अग्निकुंडांतून त्यांनी चौहान, परिहार, सोळंकी आणि परमार अशीं चार क्षत्रिय कुलें निर्माण केलीं. यांना अग्नि-कुलें असें म्हणतात. या कुलांनी युद्ध करून सर्व दैत्यांचा संहार केला.

अबूचा पहाड हें जैनांचें एक विख्यात तीर्थस्थान आहे. बारा मास इथे यात्रा असते. इथे अनेक जैन मंदिरें आहेत; पण त्यांतलीं दोनच कारागिराच्या दृष्टीने अप्रतिम आहेत. तीं संगमरवरी दगडाने बांधलेलीं आहेत. त्यांतलें नक्षीकाम आश्चर्यजनक आहे. केवळ भारतीयांच्याच नव्हे; तर परदेशांतल्या कलारसिकांच्याहि कौतुकाला तीं पात्र झालीं आहेत. एकाचें नांव विमलवसही व दुसऱ्याचें लूणवसही.


दिलवाडा मंदिर–अबू

विमलवसही हें मंदिर गुजरातचा राजा भीमदेव याच्या प्रधानाने इ. स. १०३१ सालीं बांधलें. त्याचें नांव होतें विमलशाह. हे मंदिर बांधण्यासाठी त्याला १८ कोटि, ५३ लाख रुपये लागले, असें सांगतात. हें मंदिर इ. स. १०८० मध्ये पुरें झालें व त्यांत जैनांचा पहिला तीर्थंकर ऋषभदेव याची प्रतिष्ठा झाली. हें मंदिर बाहेरून पाहिलें असतां तितकेंसें मनांत भरत नाही; पण आंत शिरल्याबरोबर तिथली समृद्धि व कलाकुसर पाहून मन थक्क होतें.

या मंदिरांत गर्भगृह, गूढमंडप, नवचौकी, रंगमंडप, बावन्न जिनालय व एकशें एकवीस स्तंभ आहेत. भिंती व छत यांवर ऋषभदेवादि तीर्थंकरांच्या जीवनांतील घटना संगमरवरांत कोरलेल्या दिसतात. कांही ठिकाणीं हिंदूंच्या पुराणांतील कथाप्रसंगहि कोरलेले आहेत. त्यावरून तत्कालीन जैनांचा धार्मिक दृष्टिकोन संकुचित नसल्याचें कळून येतें. या मंदिरांतलीं तोरणें विशेष प्रेक्षणीय असून खांबांवरहि मूर्ति-चित्रणाची परमावधि दिसून येते. तिथली मूर्तिकला इतकी नाजूक आहे, की प्रेक्षकांची दृष्टि प्रत्येक मूर्तींवर खिळून

जावी. गाभाऱ्यांतली ऋषभदेवाची मूर्ति सुंदर असून ती हिरेमाणकांनी मढविलेली आहे.

इ. स. १३६८ मध्ये अल्लाउद्दिनाने हें मंदिर भग्न केलें; पण पुढे दहा वर्षांनी मंडोरचा लाखनसिंह व त्याचे बंधु यांनी या मंदिराचा पुनरुद्धार केला.

लूणवसही हें मंदिर वस्तुपाल व तेजपाल या दोघां बंधूंनी इ. स. १२३१ सालीं बांधले. ते दोघे गुजरातचा राजा वीरधवल याचे मंत्री होते. लूणसिंह नांवाचा तेजपालाचा एक पुत्र होता. तो लहानपणींच मृत्युमुखीं पडला. त्याच्या स्मरणार्थ हें मंदिर बांधलें गेलें व त्याला लूणवसही असें नांव देण्यांत आलें. या मंदिरांत बाविसावा तीर्थंकर नेमिनाथ याची मूर्ति प्रतिष्ठित आहे. लूणवसहीची बांधणी विमलवसहीप्रमाणेच असली तरी कांही बाबतींत तें पहिल्याहून श्रेष्ठ आहे. याचे अनेक स्तंभ चितोडच्या कीर्तिस्तंभासारखे दिसतात. या मंदिराचा घुमट पाहतांना जणू स्वर्ग पाहत असल्यासारखें वाटतें. इथलें सर्व नक्षीकाम पाहतांना डोळे थकतात व पुढे पुढे मनाची संवेदनाच बधिर होते. हीं दोन्ही मंदिरें भारतीय कलेचीं जणू आगरेंच आहेत. या मंदिरांनी जैन धर्माचा महिमा वाढविला, इतकेंच नव्हे; तर मानवी-जीवनाच्या बहुविध लीला व कला संगमरवरांत आविष्कृत करून भारतीय कलेलाहि गौरवान्वित केलें.




मातृमूर्ति–अबू

वस्तुपाल व तेजपाल हे बंधू स्वतः जैन होते; पण त्याबरोबरच त्यांना इतर सर्व धर्मांबद्दलहि आदर होता. याच समत्व भावनेंतून त्यांनी लूणवसहीबरोबरच गातेश्वर मंदिर, ब्रह्मशाला, दानशाला, धर्मशाला, वापी, तलाव, मशीद, इ. अनेक इष्टापूर्त कर्में केलीं. हें सर्व निर्माण करायला त्यांना तीन अब्ज, चौऱ्यांयशीं लाख, अठरा हजार रुपये खर्च आला. त्या बंधूंनी एक विश्वस्तसंस्था निर्माण करून मंदिरांच्या व्यवस्थेसाठी बरेंच द्रव्यहि त्या संस्थेच्या हवालीं केलें.


लूणवसहीच्या प्राकारांतला हत्तीखाना उल्लेखनीय आहे. या हत्तीखान्यांत संगमरवराचे दहा हत्ती उभे केलेले आहेत. या हत्तींच्या मागे भिंतीस लागून वस्तुपाल, तेजपाल, त्यांच्या बायका व नातेवाईक यांच्या माणसाच्या उंचीच्या मूर्ती आहेत.

दिलवाडा मंदिरें पाहून त्याच रस्त्याने पुढे गेल्यावर अचलेश्वराचें मंदिर लागतें. या मंदिरांत लिंगाच्या जागीं एक खड्डा आहे. त्या खड्ड्यांत एक गुळगुळीत बाण एका बाजूने आडवा



संगमरवरी हत्ती–अबू

दिसतो. त्याला काशीविश्वेश्वराच्या पसरलेल्या पायाचा आंगठा समजतात. तिथेच जवळ मंदाकिनीकुंड आहे. त्याच्या काठावर आदिपाल नामक परमार राजाची धनुर्धारी मूर्ति उभी आहे. तत्कालीन राजांचा पोशाख व अलंकरण यांची त्या मूर्तीवरुन कल्पना करतां येते.



आदिपाल परमार–अबू

अचलेश्वराच्या पुढे थोड्या अंतरावर अचलगढ लागतो. मेवाडचा राणा कुंभ याने इ. स. १४३३ सालीं हा किल्ला बांधला. या किल्यांत जैनांचीं चार मंदिरें आहेत. अचलगढापासून पुढे दोन मैलांवर ओरिया नामक एक गांव लागतें. तिथूनच गुरुशिखरावर चढण्याचा मार्ग आहे. हें शिखर समुद्रसपाटीपासून ५६५३ फूट उंच आहे. हें दत्तात्रेयाचें निवासस्थान मानतात. तिथल्या

एका छोटया मंदिरांत दत्ताचीं उमटलेलीं पावलें स्थापित आहेत.

अबूवरचा नखी तलाव देवतांनी आपल्या नखांनी खोदला, अशी कथा आहे. इथे अर्बुदा नामक देवीचें मंदिर आहे. ही अबूची स्थलदेवता होय. देव-आंगन या मंदिरांत विष्णुमूर्ति आहे. तिथून एक मैल खाली उतरल्यावर करोडीध्वज नांवाचें सूर्यमंदिर लागतें. इथे अश्वारूढ सूर्यमूर्ति आहे. इथें इ. स. ११४७ चे दोन शिलालेख आहेत, त्यांवरून हें मंदिरहि प्राचीन असल्याचें कळतें.

जैनांच्या पूर्वी या पर्वतावर शाक्त पंथाचें केंद्र होतें. अघोरी साधूंचाहि हा एक मोठा आखाडा होता. इथलीं मंदिरें आणि तीर्थें यांच्यामुळे हिंदु व जैन या दोन्ही धर्मांच्या लोकांना अबू हें पवित्र स्थान झालें आहे.

अबू हें राजस्थानांतलें एक थंड हवेचेंहि ठिकाण आहे. पहाडावर कायमची वस्ती असून सर्व प्रकारच्या सुखसोयीहि आहेत. अबूरोड स्टेशनापासून पहाडावर जाण्यासाठीं नियमित बसगाडया सुटतात. अबूचा मार्ग वेडयावांकडया वळणांचा असून डोंगरावर जंगलहि पुष्कळ आहे.

अबू बक्र मुहम्मदाची पत्नी आयेशा हिचा पिता. हा मुहम्मदाचा वारस व पहिला खलीफा झाला. हा फार सात्त्विक व सत्यवादी होता. दोन वर्षें राज्य करून तो इ. स. ६३४ मध्ये मरण पावला. [डि. इ.]

अबू लहब मुहम्मदाचा चुलता व वैरी. याने इस्लामच्या स्थापनेला कसून विरोध केला होता. [डि. इ.]

अबू हनीफ (७००–७७० इ. स.) हनीफी पंथाचा संस्थापक. हा सुन्नी कायद्याचा महान् पंडित समजला जात असून त्याच्या सिद्धांतांना तुर्कस्तान, तार्तर व भारत या देशांत फार मान आहे. याचा जन्म अल् कूफह येथे व मृत्यु बगदाद येथे झाला. [डि. इ.]

अबू हुरैरह मुहम्मदाबरोबर सतत राहणाऱ्या सात सेवकांपैकी एक. पैगंबराशीं घनिष्ठ संबंध आल्यामुळे त्याच्याकडून पैगंबराचीं सर्वांत अधिक वचनें जगाला मिळालीं आहेत. [डि. इ.]

अबोर नेफा (भारताचा ईशान्य प्रदेश) मधील एक जमात. अबोर हा शब्द असमिया भाषेतील असून त्याचा अर्थ रानटी किंवा स्वतंत्र असा होतो. अबोर नामक एक पर्वतश्रेणी आसामच्या उत्तर सरहद्दीवर आहे. त्याच्यावर कांही अबोर राहतात. पण मुख्यतः दिहाँग नदीच्या दोन्ही कांठांवर यांची मुख्य वस्ती आहे. उजव्या कांठावर पाशी व मेयाँग अबोर व डाव्या कांठावर पड्डो, सिन्बो किंवा सिळूक, मेइवो व गोलीबार अबोर राहतात. अबोर टोळीवाले सखल प्रदेशांतील मिरी टोळीवाल्यांना आपले दास समजत व मिरीहि त्यांचा तो अधिकार मान्य करीत. परंतु आसाममध्ये ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यावर कांही मिरी लोक अबोरांची सत्ता झुगारून ब्रिटिशांच्या आश्रयाला गेले. त्यामुळे अबोर व ब्रिटिश यांच्यामध्ये बेबनाव निर्माण झाला. या बेबनावांत आणखीहि एका गोष्टीची भर पडली.

दिहाँग नदींत सोन्याची वाळू मिळत असे. ती गाळून तिथले धोबी लोक सोन्याचा धंदा करीत. हे धोबीहि अबोरांच्याच सत्तेखाली होते. ब्रिटिशांनी त्या वाळूवर आपला हक्क प्रस्थापित करतांच ते साहजिकच ब्रिटिशांच्या अमलाखाली आले. त्यांनीहि मग अबोरांचा संबंध तोडला. अबोरांना हें सहन झालें नाही. त्यांनी या अपमानाचा सूड घेण्यासाठी एका रात्रीं धोब्यांच्या वस्तीवर हल्ला करून कित्येक धोब्यांना पळवून नेलें. ब्रिटिशांच्या सत्तेला तें एक उद्दाम आव्हानच होतें. त्यामुळे ब्रिटिश व अबोर यांच्यांत वैर सुरू झालें. उभयपक्षीं वारंवार चकमकी झडूं लागल्या. सतत १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत ही धामधूम चालू राहिली.



अबोर धोबी

अबोरशाखा—अबोर जमातीच्या दोन शाखा आहेत. दिहाँग नदीच्या डाव्या तीरावर दिबाँगपर्यंत पसरून राहणाऱ्या जमातीला बोर अबोर किंवा मोठे अबोर म्हणतात. पदम अबोर ही दुसरी शाखा होय. बोर अबोर हे पदम अबोरांपेक्षा अधिक जंगली व अधिक लढाऊ आहेत. इतरांचीं गुरें, ढोरें, व वस्तु पळविणें ही गोष्ट म्हणजे त्यांच्या हातचा मळ आहे. लांब भाले, लांब तलवारी व

धनुष्य बाण, हीं त्यांचीं आयुधें असतात. ते सदैव हत्यारबंद राहतात. शत्रूच्या हल्लचाची इशारत मिळतांच ते एकजुटीने त्याला तोंड देतात.

अबोरांचें मूलस्थान आसाम व तिबेट यांच्या मध्यें आहे. ते बारा हजार फूट उंचीवर असून दाम्लोह पदम असें त्याचें नांव आहे. तिथून ते खाली उतरले. तिथे त्यांच्या शेतीला जागा कमी पडूं लागली म्हणून ते दिहाँग नदीच्या तीरावर येऊन वसले. इथूनच त्यांनी इतरत्र हातपाय पसरले.

हल्ली दिहाँग नदी हीच त्यांची नैसर्गिक सरहद्द आहे. जो नवा प्रदेश त्यांनी व्यापला, त्यांतील मूळ टोळीवाल्यांची त्यांनी कत्तल केली. मिशमी हे त्यांपैकीच होत.

एखाद्या खडकाला लागून ते आपलीं घरें बांधतात. त्यामुळें खडक ही त्यांच्या घराची एक भिंत बनते. एका बाजूने खडक व दुसऱ्या बाजूने जमिनींत पुरलेल्या मेढी यांच्या आधारावर ते आपल्या घरांत बांबूची माची बसवितात. माचीच्या खाली गुरें बांधतात आणि वर आपण राहतात. मिथॉन या नांवाचें एक जनावर ते पाळतात.

अबोर लोक तार्तर वंशाचे असून त्यांचें शरीर धिप्पाड व पिळदार असतें. दिसायला ते उग्र व कुरूप असतात. नेफा टेकड्यांतील बहुतेक टोळीवाल्यांप्रमाणे अबोरांना दाढी नसते. मिशाहि तुरळकच असतात. स्त्रिया पुरुषांप्रमाणे आपले केस कापतात. त्यांच्या केसांची रचना घेऱ्याच्या आकाराची असते. स्त्री-पुरुष दोघेहि कानांना मोठीं भोकें पाडतात व त्यांत लाकडाचे तुकडे घालतात. स्त्रिया गळ्यांत विविध कांचमण्यांच्या माळा व पितळेच्या सऱ्या घालतात. त्यांच्या हातांतहि पितळेच्याच बांगड्या मनगटापासून तों कोंपरापर्यंत भरलेल्या असतात. त्या पायांत वेताचे वाळे घट्ट आंवळून बांधतात. पुरुष उद्दाल वृक्षाच्या सालीचें वल्कल कमरेभोवती गुंडाळतात. व अंगांत तिबेटन लोकरीचा किंवा कातड्याचा कोट घालतात. त्यांचीं शिरस्त्राणें तीन प्रकारचीं असतात. एक वेताचें व दुसरीं दोन सांबराच्या कातड्याचीं. त्यांना अस्वलाच्या कातड्याची किनार असते. हीं शिरस्त्राणें घातलीं, की ते भयंकर दिसतात. यांच्या कपाळावर क्रॉस गोंदलेला असतो. या क्रॉसमुळे आयुष्यभर संरक्षण व मृत्यूनंतर स्वर्ग मिळतो, अशी त्यांची समजूत आहे. बायका कमरेभोवती एक फडकें गुंडाळतात व दुसऱ्या एका फडक्याने वक्षःस्थल झांकतात. त्यांची भाषा कर्कश असते.



अबोर सरदार

अबोर हे मुख्यत्वें शेतीचा व्यवसाय करतात. सपाट प्रदेशावर ते भात कापूस, तंबाखू, ऊंस, मिरची, हीं पिकें काढतात. शेतकामांत स्त्रिया पुरुषांना मदत करतात. शेतीशिवाय ते गुरेंढोरेंहि बाळगतात.

देवधर्म — हे वनदेवतांना भजतात. मुलें हरवलीं तर तीं वनदेवतांनी नेलीं, असें समजतात. रोगराई देवतांच्या कोपामुळे होते, असें मानतात. त्यामुळे रोग्याला औषधपाणी देण्याऐवजी ते देवतेला बळी देतात. हा बळी वृद्ध किंवा अशक्त माणसाकडून देतात. प्रत्येक रोगाची एकेक देवता असते. पोम्सा, उरोम, किलू–देले, निपाँग, हीं त्यांचीं नांवें होत. या सर्व देवता रिगम पर्वतावर राहतात. हिंदूंप्रमाणे ते एक सर्वश्रेष्ठ देवहि मानतात. परलोकांत जम नांवाचा मर्त्यांचा न्यायाधीश असतो व तो पाप–पुण्याचा निवाडा करतो, अशी त्यांची समजूत आहे. हिंदूंच्या यमाप्रमाणेच याचाहि स्वभावधर्म असतो. अपोम व त्याचा भाऊ पोम्स हें रबराच्या झाडींत राहणारे देव होत. देवदार नामक शकुन सांगणारे लोक त्यांचें पौरोहित्य करतात.

विवाहप्रथा — लग्नें वडील माणसें जुळवीत असलीं तरी तरुण–तरुणींना त्या बाबतींत मोकळीक असते. एखाद्या तरुणाचें एखाद्या मुलीवर प्रेम बसतें, तेव्हां तो आपली पत्नी होण्याबद्दल तिची संमति विचारतो. ती मिळाल्यास मग त्या तरुणाचीं वडीलधारीं माणसें मुलीच्या आई–बापांकडे पुढील बोलणीं करण्यासाठी जातात. जातांना ते आपल्याबरोबर थोडी दारू व चार खारी नेतात. मुलीच्या आईबापांनी संमति न दिल्यास त्यांना आणखी कांही खारी देण्याचें आमिष दाखवून त्यांची संमति मिळवितात. सर्वसाधारणपणे खारींची संख्या तीस ते चाळीस असते. कांही वेळां ही संख्या दोनशें ते तीनशें पर्यंत जाते. खार हें अबोरांचें अत्यंत आवडतें भक्ष्य आहे. ते त्यांना मारून वाळवून ठेवतात. खारींची मागणी मान्य झाल्यावर त्या तरुणाचा त्या मुलीवर हक्क शाबीत होतो. मुलगी लग्न झाल्यावरहि माहेरींच राहते. तिचा नवराच रात्रीं तिथे झोपायला येतो. दोघेहि दिवसा आपापल्या बापाच्या शेतावर


राबतात. त्यांना मूल होऊन तें सात वर्षांचें होईपर्यंत त्यांचा जीवनक्रम अशा प्रकारें चालतो. तोंपर्यंत जांवई सासऱ्याची खारींची मागणी थोडी थोडी करून पुरी करतो. त्यानंतर मग तीं दोघें आपलें स्वतंत्र घर थाटतात व स्वतंत्र शेती करतात. यांच्यांत क्वचित् बहुभर्तृकत्व व बहुपत्नीकत्वहि आढळतें.


अबोरकन्या

यांच्यांत व्यभिचार फार करून होत नाही. पण झालाच, तर त्या व्यभिचाराची सर्व जबाबदारी पुरुषावर टाकली जाते. ज्या स्त्रीशीं त्याचा अनैतिक संबंध असेल, तिच्या नवऱ्याला सहा ते आठ मिथॉन जनावरें द्यावीं लागतात. शिवाय त्याला शारीरिक शिक्षाहि होते. व्यभिचारांत स्त्री अपराधी असल्याचें सिद्ध झाल्यास, तिला कडक शिक्षा करतात.

चोरालाहि देहदंडाची शिक्षा होते. शिवाय, चोरलेल्या मालमत्तेच्या किंमतीच्या प्रमाणांत त्याला दंडहि भरावा लागतो. चोराने गुन्हा नाकबूल केल्यास त्याला दिव्य करावें लागतें.

अबोर टोळीवाले मागासलेले असले तरी ते पाहुण्यांचें व आल्यागेल्याचें आतिथ्य तत्परतेने करतात. आपल्या इष्टमित्रांना बोलावून मेजवान्या देण्याची त्यांची चाल आहे. मेजवानीस हजर असणारा प्रत्येक माणूस आपल्या घरीं इतरांना निमंत्रण देतो व अशा प्रकारे त्यांच्या वस्तींत सदैव मेजवान्या होत राहतात. मेजवानीसाठी कापलेल्या जनावरांच्या कवटया ते घरांत टांगून ठेवतात. ज्याच्या घरांत अधिक कवटया, तो अधिक श्रीमंत समजला जातो. तो मेल्यावर त्याच्या खड्डयावर त्या कवटयांचा ढीग रचतात.


थडग्यावर रचलेल्या कवटया

अबोर स्त्रिया त्यांनी सोडून दिलेल्या शेतांतल्या केळीवरचीं केळीं कधींच तोडीत नाहीत. कारण त्या केळीवर नीइपाँग नांवाचें एक भूत राहतें व तें स्त्रियांना पछाडतें, तसेंच मासिक रजोदर्शन, प्रसूति, इ. प्रसंगीं त्यांना तें खूप त्रास देतें, अशी त्यांची समजूत आहे. स्त्रियांनाच नव्हे; तर पुरुषांनाहि तें बाधा करतें. त्याला भाताचा किंवा कोंबडयांचा बळि द्यावा लागतो. **पाहा**—पदम अबोर. [नेफा]

अब्दपूर्ति एक शिशुसंस्कार. याला वर्षवर्धन असेंहि म्हणतात. मूल एक वर्षाचें झालें म्हणजे त्याच्या जन्मनक्षत्रावर हा संस्कार करायचा असतो (गोभिल गृ. सू.). यांत त्या नक्षत्राची देवता, तें नक्षत्र, व धाता यांना आज्याहुती देतात. **पाहा**—वर्धापन. [हि. ध.]

अब्दुर् रहमान एक कवि. संदेशरासक या काव्याचा कर्ता. मूळ नांव अद्दहमाण. त्याचेंच परिवर्तित रूप अब्दुर् रहमान झालें असावें. हा पश्चिम भारतांत राहत होता. आपण म्लेच्छ देशाचे रहिवासी, असें तो म्हणतो. हा म्लेच्छ देश मुलतान असावा; कारण त्याच्या काव्यांत मुलतानचें वर्णन तपशीलवार आढळतें. हा मीर हुसनचा पुत्र असून धंद्याने कोष्टी होता. भारतीय संस्कृति तसेंच संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश या भाषा आत्मसात् करून काव्यरचना करणारा हा पहिला मुसलमान कवि होय. तो इस्लामचा अनुयायी असूनहि त्याची संस्कृति आणि विचारधारा हिंदुत्वाला धरूनच वाहिली आहे. त्याचें संदेशरासक हें मेघदूताचें अनुकारी काव्य अपभ्रंश साहित्यांतलें एक रत्न समजतात. याच्या कालाबद्दल मात्र मतभेद आहेत. डॉ. कत्रे त्याचा काल इ. स. ११ ते १४ या शतकांमध्ये मानतात. डॉ. द्विवेदी यांच्या मतें तो ११ व्या शतकांत होऊन गेला.

अब्धीय जैन श्रमणांचा एक पंथ. गुत्थमहित याने महावीराच्या निर्वाणानंतर ५८४ वर्षांनी हा संप्रदाय प्रवर्तित केला. कर्माचे अणू आत्म्याला फक्त स्पर्श करतात; ते त्याला बद्ध करीत नाहीत, हा या पंथाचा प्रमुख सिद्धान्त आहे. कालांतराने हा पंथ मूळ जैनधर्मांत विलीन झाला. [हि. जै. मो.]

अब्लिंगमंत्र ऋग्वेदाच्या एका सूक्तांतले (१०.९) पहिले तीन मंत्र अब्लिंग या नांवाने प्रसिद्ध आहेत—

आपो हि ष्ठा मयोभुवस्ता न ऊर्जे दधातन ।
महे रणाय चक्षसे ॥ १ ॥

यो वः शिवतमो रसस्तस्य भाजयतेह नः।
उशतीरिव मातरः ।। २ ।।
तस्मा अरंगमाम वो यस्य क्षयाय जिन्वथ ।
आपो जनयथा च नः ।। ३ ।।

अर्थ – हे आपोदेवींनो, तुम्ही कल्याणमय आहां; तर आम्ही परम रमणीय वस्तु पाहावी, म्हणून आम्हाला ओजस्वितेच्या ठिकाणीं घेऊन चला (१). तुमचा जो अत्यंत मंगलकारक रस आहे, त्याचा प्रेमळ मातेने आपल्या बालकाला दुग्धाचा आस्वाद करवावा, त्याप्रमाणे आम्हाला उपभोग करवा (२). ज्या तुमच्या निवासस्थानावर तुमचें प्रेम आहे, त्याच्या जवळ आम्ही त्वरित पोंचावें, म्हणून हे आपोदेवींनो आम्हांला तिथेच उत्पन्न करा (३).

संध्येंतील मार्जनांत आणि मंगलाभिषेकांतहि या मंत्रांचा विनियोग होतो.

अब्सोल्यूशन ख्रिस्ती धर्मांतला पारिभाषिक शब्द. माणसाला शिक्षा न देतां त्याच्या पापांतून त्याला मुक्त करण्याचा जो एक अधिकार चर्चला दिलेला असतो, त्याला हें नांव आहे. त्याचा अर्थ देवाने केलेली क्षमा असा आहे. प्रभु हा क्षमाशील असतो, हा ख्रिस्ती चर्चचा सिद्धान्त आहे. चर्चने त्याचेंच कार्य चालवायचें असतें. अकराव्या शतकापूर्वी अब्सोल्यूशनची कल्पना तितकीशी स्पष्ट नव्हती. पण आजमितीस तिला स्पष्टार्थ प्राप्त झालेला आहे. ही कल्पना रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट या दोन्ही पंथांत आहे. [एन्सा. रि.]

अभंग अभंग हें एका खास मराठी लौकिक छंदाचें नांव आहे. बहुतेक प्राचीन मराठी कविता ओवी आणि अभंग या दोन लौकिक छंदांत आविष्कृत झालेली आहे. ओवी आणि अभंग हे दोन्ही मराठी छंद एकरूपच आहेत. ओवी हें या दोन्ही छंद–प्रकारांचें मूळ रूप असून अभंग हें ओवीचेंच मालात्मक रूप आहे. महानुभावीय वाङ्मयांत अभंग हा शब्द समाप्तिमुद्रा (Colofon) या अर्थाने वापरला गेला आहे (स्मृतिस्थळ स्मृ. ११३; लीळाचरित्र उत्तरार्ध लीळा ४२३). परंतु त्याचा अभंग छंदाशीं कांही संबंध दिसत नाही. ओवीच्या मालिकेला अभंग म्हणतात, हें खरें असलें, तरी अभंग या नांवाची खास परंपराहि आढळते. तेराव्या शतकांतील कानडी कवि चौंडरस हा विठ्ठलाला अभंग–विठ्ठल असें म्हणतो. एकनाथादि मराठी संतांनीहि अभंग–विठ्ठल या शब्दांनी विठ्ठलाचें वर्णन केलें आहे.–

अभंग विठ्ठल परि । मना सांडी विषय खोडी
सिंधु तो अभंग विठ्ठल

यावरून असें अनुमान निघतें, की विठ्ठल विषयक ओवी प्रबंधास अभंग हें नांव रूढ झालें असावें. विठ्ठलाच्या अभंग या विशेषणाचें रहस्य असें आहे, की तो वृंदावनांतील देहुडचा कृष्णाप्रमाणे त्रिभंग उभा नसून समचरणांवर अभंग अवस्थेनांत उभा आहे. अभंगाचें लक्षण सांगतांना अभंगकार नामदेवाने म्हटलें आहे–

समचरणीं अभंग । नव्हे तान–छंदो भंग ।

समचरणीं अभंग हे शब्द सूचक आहेत. ते समचरणांवर उभ्या असलेल्या अभंग विठ्ठलाशीं अभंग छंदाचें नातें जोडणारे आहेत. याचा अर्थ असा, की विठ्ठल–भक्ति–परंपरेंत महनीयता पावलेल्या या लौकिक छंदाचें नांवहि विठ्ठलाच्या रूपविशेषांशीं संबद्ध आहे.

जात्यावरील ओव्या, दळणकांडण करतांना म्हणायच्या ओव्या आणि वारकऱ्यांचे अभंग यांतील संबंध अभेदाचा आहे. आद्य महानुभावीय कवींची अभंग–रचना वोवीच्या सदरांतच गणली जात असे. संत नामदेवाने अभंग– कलेविषयी म्हटलें आहे–

अभंगाची कळा नाही मी नेणत ।
त्वरा केली प्रीत केशीराजें ।।
अक्षरांची संख्या बोलिले उदंड ।
मेरु सुप्रचंड शर आदीं ।।
सहा साडेतीन चरण जाणावे ।
अक्षरें मोजावीं चौक चारी ।।
पहिल्यापासोनी तिसऱ्यापर्यंत ।
अठरा गणित मोज आलें ।।
चौक चारी आधीं बोलिलों मातृका ।
बाविसाची संख्या शेवटील ।।
दीड चरणाचें दीर्घ तें अक्षर ।
मुमुक्ष विचार बोध केला ।।
नामा म्हणे मज स्वप्न दिलें हरी ।
प्रीतीने खेचरीं आज्ञा केली ।।

यावरून अभंग ही बावीस अक्षरसंख्या असलेली दीर्घ–प्रचुर रचना आहे, असें नामदेवाचें मत होतेंसें दिसतें. बाव्वीस अक्षरांचे साडेतीन भाग. या भागालाच नामदेव चरण म्हणत आहे. तीन भागांचीं अठरा अक्षरें व पुढच्याचीं चार अक्षरें मिळून बाव्वीस अक्षरें एका चौकांत असतात. असे बाव्वीस अक्षरी (साडेतीन) चरण सहा झाले, म्हणजे अभंग होतो. हा झाला मोठा अभंग. लहान अभंगाविषयीं नामदेव म्हणतो ––

मुख्य मातृकांची संख्या । सोळा अक्षरें नेटक्या ।।
समचरणीं अभंग । नव्हे ताल–छंदो–भंग ।।
चौक पुलिता (?) विसर्ग । गण यति लघु दीर्घ ।।
जाणे एखादा निराळा । नामा म्हणे तो विरळा ।।

सोळा अक्षरें असलेल्या दोन (सम–) चरणांवर उभा असलेला हा अभंग कधींहि ताल-छंदोभंग पावत नाही. उलट इतर रचनांतील गण, यति, लघु, दीर्घ, विसर्ग, वगैरे गोष्टी भानगडीच्या आहेत व त्या जाणणारा कोणी निराळा व वेगळाच असतो.

अभंग छंदाचे रचनेच्या दृष्टीने तीन मुख्य प्रकार आढळतात. त्यांपैकी दोन प्रकार स्वतंत्र असून, तिसरा प्रकार दुसऱ्यांतच थोडा फरक होऊन झालेला दिसतो. याशिवाय दुसरा व तिसरा यांच्या मिश्रणाने झालेला आणखी एक प्रकारहि आढळांत येतो.

प्रकार पहिला – तीन सहाअक्षरी चरण आणि चौथा चरण लहान चारअक्षरी, अशा रचनेचा मोठा अभंग. यालाच छंदोरचनाकारांनी देवद्वार हें नांव दिलें आहे. महदंबा, देमाइसा या महानुभावीय कवयित्रींच्या ओव्या प्राय: याच प्रकारच्या अभंगाचीं उदाहरणें आहेत. तुकारामाचे व इतर संतकवींचे बहुसंख्य अभंग या मोठ्या रचनेचेच आहेत.

स्त्रियांच्या कित्येक ओव्याहि याच प्रकारच्या आहेत ––

फुलांची ग वेणी । पाठीवरी लोळे ।
भावांत बहिण खेळे । उषाबाई ।।

प्रकार दुसरा–– यांतील चरण अष्टाक्षरी असतात. याची दोन तऱ्हांनी मोडणी होऊं शकते. एक, सर्व अक्षरें सुरवातीपासून घेऊन दोन आवर्तनें घ्यायचीं. या मोडणीप्रमाणे हा प्रकार पादाकुलक छंद होईल. दुसरी मोडणी, आघतालपूर्व दोन अक्षरें ठेवून पुढे ताल चालू करायचा. या मोडणीच्या अभंगालाच छंदोरचनेंत देवीवर अशी संज्ञा दिलेली आहे. हा लहान अभंग होय.

प्रकार तिसरा –– क्वचित् षडक्षरी व अष्टाक्षरी अशा प्रकारचें संयोजन असतें. असे अभंग खूप आढळतात.

अभंगांतील चरण आणि अक्षरें यांच्या विविधतेमुळे अभंगांचे थोडयाफार फरकाने अनेक भेद पडतात. इतिहासाचार्य राजवाडे यांनी पिंगलोक्त परिभाषा वापरून प्रतिष्ठा अभंग, सुप्रतिष्ठा अभंग, उष्णिग् अभंग, अनुष्टुभ् अभंग, बृहती अभंग, पंक्ति अभंग, त्रिष्टुभ् अभंग, जगती अभंग, अशीं अभंग–प्रकारांचीं नांवें वापरलीं आहेत. अभंग या संज्ञेचें स्पष्टीकरण करतांना राजवाडे म्हणतात, 'ज्या छंदांत भंग नाहीत, तो अभंग. भंग म्हणजे कर्णमधुर गण. अर्थात् अभंग म्हणजे गणविहीन वृत्तात्मक समचरण किंवा विषमचरण छंद.' छंदोरचनाकारांच्या मतें अभंग हा लगत्वभेदातीत अक्षरसंख्याक पद्यप्रकार आहे. या लगत्वभेदातीत अक्षर–संख्याक पद्यप्रकाराला कांहीतरी पारिभाषिक नांव पाहिजे, म्हणून वैदिक पद्यप्रकाराला असणारें छंद हें नांव दिलें आहे, असें त्यांचें एतद्विषयक स्पष्टीकरण आहे.

प्रा. भवानीशंकर पंडितांच्या मतें अभंग हा मात्रिक आहे. श्री. वि. ज. सहस्रबुद्धे यांनी प्रा. पटवर्धन आणि प्रा. पंडित या दोघांच्या मतांचें खंडन करण्याचा प्रयत्न केला आहे. अभंगांतील प्रत्येक अक्षराच्या दोन मात्रा धरायच्या, हें प्रा. पटवर्धनांचें मत त्यांना अभंग–गायनाच्या स्वरूपाशीं विसंगत वाटतें. प्रा. पंडितांच्या मताविषयीं प्रतिक्रिया व्यक्त करतांना ते म्हणतात, 'वादाकरितां अभंगास मात्रिक म्हणावयासहि हरकत नाही. पण मात्रावृत्ताच्या दृष्टीने अभंगाची रचना शिथिल असल्याची गोष्ट मान्यच करावी लागेल व शिथिलता शेंकडा नव्वद अभंगांत आहे, असेंहि कबूल करण्याची आपत्ति प्राप्त होईल ! ... त्यापेक्षा अभंगाची गणना अक्षर छंदांत केलेली आहे, तीच योग्य नव्हे काय ? '

डॉ. ना. ग. जोशी यांनी मराठी छंदोरचनेचा लयदृष्टया पुर्नविचार मांडतांना, अनेक अभंग–प्रकारांचें विश्लेषण करून असें मत व्यक्त केलें आहे, की 'छांदस रचनेंतील अक्षरोच्चार द्विमात्रक कालमानाचा असतो, हें कै. माधवराव पटवर्धनांचें मतच ग्राह्य ठरतें.'

अभंग छंदांत प्राचीन मराठींत विपुल रचना झालेली आहे. ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंत अनेक मराठी संतकवींनी आपल्या आत्मानुभूतीच्या अभिव्यक्तीसाठी अभंगाचें माध्यम वापरलें. ओवींतून मराठी संतांनी परमार्थविचार मांडला; तर अभंगांतून त्यांनी परमार्थानुभव व्यक्त केला. अभंग–वाङ्मय म्हणजे मराठी संतांच्या पारमार्थिक आत्मचरित्रांचा सागरच आहे. अभंगांत ज्ञानेश्वरांच्या अनुभूतीचा 'मोगरा' दरवळत आहे, नामदेवाच्या वत्सलभावाची दूधगंगा फेसाळत आहे, नाथांच्या समचित्ताची शांति विलसत आहे, समर्थांचें सामर्थ्य निनादत आहे आणि तुकोबांच्या परमार्थप्रवासाच्या दीप्तिमान् पाऊलखुणा तेजाळत आहेत. अभंग हा मराठी शारदेचा अभंग ठेवा आहे. **पाहा** –– ओवी. [रा. चिं. ढेरे]

अभयागिरि सुप्रसिद्ध बौद्ध मठ. हा लंकेंत अनुराधपुर या नगरांत आहे. वट्टगामिनी या तिथल्य

राजाने बुद्धस्तूपाजवळ हा मठ बांधला. त्यापूर्वी सुमारें २०० वर्षे महाविहार नांवाचा एक मठ इथे होता. या दोन मठांतल्या भिक्षूंत वैमनस्य उत्पन्न झाल्यामुळे तिथल्या महासेन राजाने (इ. स. ३००) तो महाविहार पाडून टाकला. पण कालांतराने त्याची पुनश्च उभारणी झाली व दोन्ही मठांचा नांवलौकिक कायम राहिला. पाहा—अनुराधपुर.

अभयदान हें दान सर्व दानांत श्रेष्ठ मानलेलें आहे. जो दुःखी व आर्त जनांना अभय देतो, तो महादानी समजावा. सर्व भूतांना अभय देणें याहून श्रेष्ठ दान नाही. [जा. का. भा. सं.]

अभयदेवसूरि (१) (मृत्यु १०८३ इ. स.) बृहत् खरतर गच्छाचा संस्थापक. याला नवांगवृत्तिकार असें म्हणतात. हा धार येथे जन्मला. पित्याचें नांव धन व आईचें धनदेवी. वयाच्या १६ व्या वर्षी याने आचार्य पदवी मिळविली. जिनेश्वरसूरीने याला सूरि बनविलें. स्थानांगा-वरील टीका, भगवतीसूत्रटीका, समवायांगटीका, इ. अनेक ग्रंथ याने लिहिले आहेत. हा गुजरातेंत कप्पडवंज गांवीं मरण पावला.

(२) (इ.स. सुमारें १०००) जैनधर्मी श्वेतांबर राजगच्छ शाखेचा आचार्य व प्रद्युम्नसूरीचा शिष्य. याने वादमहार्णव नांवाचा ग्रंथ लिहिला.

(३) प्रश्नवाहन कुलांत जन्मलेला व जयसिंहसूरीचा शिष्य. याने सौराष्ट्राच्या खेंगार राजाला जिनदीक्षा दिली व कित्येक ब्राह्मणांना जैन बनविलें. याने मदेरा शहरीं महावीराचें मंदिर बांधलें.

(४) (१२ वें शतक) याला दुसरा अभयसूरि म्हणतात. याच्याच नेतृत्वाने रुद्रपल्लीय गच्छ महत्त्वाला चढला. याने जयन्तविजय नांवाचें, मगधदेशच्या जयंत या राजाची प्रशंसा करणारें, १९ सर्गांचें महाकाव्य लिहिलें आहे. काशीच्या राजा-कडून याला वादीसिंह अशी पदवी मिळाली होती. [सं. सा. इ.; म. च. को.]

अभय-नृसिंह-मंत्र याचा अर्थ अभय देणारा नृसिंहाचा मंत्र असा आहे. तो मंत्र पुढीलप्रमाणे—

ॐ नमो भगवते नरसिंहाय नमस्तेजस्तेजसे आविराविर्भव वज्रनख वज्रदंष्ट्र कर्माशयान्रंधय रंधय तमोग्रस ग्रस स्वाहा अभयमात्मनि भूयिष्ठा ॐ क्ष्रौम्.

हा बासष्ट अक्षरी मंत्र अभयप्राप्तीसाठी जपावा, असें सांगितलें आहे. याचें विधान नारसिंह मंत्राप्रमाणेंच आहे. [मं. म.]

अभयमुद्रा मूर्तिकलेंतील एक मुद्रा. हिचें लक्षण असें—उजवा हात कोपरापासून पुढे किंचित् उचललेला, तळवा उघडा व बोटें किंचित् विलग. कित्यक देवमूर्ती अभयमुद्रा दाखविणाऱ्या असतात. [इं. बु. इ.]

अभयहस्त यालाच वरदहस्त असेंहि म्हणतात. हें एक सर्वमान्य शुभ चिन्ह आहे. हाताचा पंजा कुंकवांत बुडवून त्याचा छाप उठविला, की तो अभयहस्त होतो. असा छाप घरावर, देवळावर, वस्त्रावर, बैलाच्या पाठीवर, इ. अनेक ठिकाणीं उठवितात. त्यायोगे अशुभाचा परिहार होऊन मंगल होतें, अशी समजूत आहे.

अभया (१) क्रौंचद्वीपांतील एका नदीचें नांव. [भाग. पु. ५. २०. २१.]

(२) उष्णतीर्थांतली एक शक्तिदेवता. [मृत्य पु.१३.४२]

अभाव (न+भाव=अभाव.) याचा अर्थ नसणें, अस्तित्वांत नसणें असा आहे. नैयायिकांनी अभाव हा एक पदार्थ मानलेला असून त्याचे पुढील चार प्रकार सांगितले आहेत — प्रागभाव, प्रध्वंसाभाव, अत्यन्ताभाव व अन्योन्या-भाव. वेदान्त्यांच्या मतें अभाव हा अधिकरणापेक्षा निराळा पदार्थ नाही; भावाहून निराळें होणें म्हणजेहि अभाव होय.

अभिज एक नरक (ब्रह्मांड पु. ४. २. १५०). विशेष वर्णन उपलब्ध नाही.

अभिजित् (१) अश्विन्यादि नक्षत्रांपैकी २८ वें नक्षत्र. उत्तराषाढानक्षत्राचा चतुर्थ चरण व श्रवणाचा पंधरावा भाग मिळून होणाऱ्या १९ दंडांइतक्या कालास अभिजित् असें नांव आहे. याची गणना नक्षत्रांत होत असली, तरी याचा क्रांतिवृत्ताशीं कांहीहि संबंध नाही. हें क्रांति-वृत्ताच्या बरेंच उत्तरेस आहे. मैत्रायणी संहिता (२.१३.२०), तै. ब्राह्मण (१.५.१) व अथर्वसंहिता (१९.७.) यांमध्ये त्याचा उल्लेख असून तो एकवचनी आहे. त्यावरून वैदिक काळांत अभिजिताचा तारा एकच मानीत असावें, असें दिसतें. उत्तरकालीन मुहूर्तादि ग्रंथांत मात्र या नक्षत्राच्या तारकांची संख्या तीन दिलेली आहे. पाश्चात्य ज्योतिषांत ज्याला

लायरा नामक पुंज म्हणतात, त्यांत हें नक्षत्र आहे. या नक्षत्राची देवता ब्रह्मा असून मध्याह्नपूर्व एक घटका व मध्याह्नोत्तर एक घटका, एवढ्या कालाला ज्योतिषग्रंथांत अभिजिन्मुहूर्त असें म्हटलें आहे. श्रावण द्वादशीस याच मुहूर्तावर वामनावतार झाला. याच नक्षत्रावर शिवानें त्रिपुरभेद केला (भाग. पु. ८. १८. ५; ७. १०. ६७.). दानास उत्तम काल (मत्स्य पु. २२. २). पुण्याहवाचनाच्या वेळीं या नक्षत्राच्या मंत्राचा उच्चार होतो.

(२) एक याग. कृति सोमयागाप्रमाणे. न कळत ब्रह्महत्या घडली असतां प्रायश्चित्त म्हणून हा याग करावा, असें मनु सांगतो (११. ७४).

अभितपा सौर्य एक सूक्तद्रष्टा. यानें सूर्याला वरुणाचा नेत्र म्हटलें असून ज्या सत्यमय वाणीनें द्युलोक व अहोरात्र हे विस्तारले आहेत, ती सत्य वाणी माझें सर्व बाजूंनी रक्षण करो (ऋ. १०. ३७.), अशी प्रार्थना केली आहे.

अभिधम्म (सं. अभिधर्म.) त्रिपिटकांतील एक पिटक. आभीक्ष्ण्य = एकाच धर्माचे नाना प्रभेद दाखविणें, अभिभव = अन्य मतांचें खंडन करणें व अभिगति = बौद्ध सिद्धान्तांची यथायोग्य आध्यात्मिक व्याख्या करणें, या तीन कारणांमुळे याला अभिधम्म असें नांव दिलें गेलें आहे. यांत बौद्ध धर्माच्या तत्त्वांचें विशिष्ट पद्धतीनें प्रतिपादन केलेलें आहे. यांत पुग्गलपञ्जति, धातुकथा, धम्मसंगणि, विभंग, पठ्ठानपगरण, कथावत्थु व यमक, असे सात ग्रंथ येतात. पालि टेक्स्ट सोसायटीनें हे सारे ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. यांत बौद्ध धर्मातील विशिष्ट शब्दांच्या व्याख्या व निश्चित अर्थ देऊन नंतर त्यांचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन विस्तारपूर्वक केलें आहे. मानसशास्त्रदृष्टचा विवेचिलेलें रुक्ष नीतितत्त्वज्ञान यांत भरलेलें आहे. शेवटीं बौद्धेतर सर्व मतें कशीं पाखंडी व मूर्खपणाचीं आहेत, त्याबद्दल चर्चा केलेली आहे. या पिटकाचा काल दुसऱ्या दोन पिटकांपेक्षां अलिकडचा म्हणजे सनपूर्व सुमारें ४०० व २५० यांच्या दरम्यानचा असावा. सात ग्रंथांपैकी धम्मसंगणि सर्वांत जुना व कथावत्थु सर्वांत अलिकडचा आहे, असें कांहीं पंडित म्हणतात. सर्वास्तिवादीपंथांत या सातहि ग्रंथांना संस्कृतरूप दिलें गेलें होतें; पण भारतांत महायान पंथाचा उत्कर्ष झाल्यावर हे ग्रंथ तर लुप्त झालेच; शिवाय अभिधम्म हा शब्दहि मागे पडला. या ग्रंथांचीं चिनी भाषांतरें तेवढीं उपलब्ध आहेत. अभिधम्माच्या अभ्यासकांना अभिधम्मिक असें नांव होतें व बौद्ध भिक्षूंत त्यांचा दर्जा मोठा होता, असें मिहिंतल येथील शिलालेखावरून कळतें. [बौ. द. मी.; म. ज्ञा. को.]

अभिधम्मत्थ बौद्धांच्या मानस व नीति या शास्त्रांवरील लघु, पण अत्यंत महत्त्वाचा, असा हा संग्रहग्रंथ आहे. इ. स. १२ व्या शतकांत अनुरुद्ध या पंडितानें हा ग्रंथ केला. अभिधम्मअध्ययनाचीं केंद्रें असणाऱ्या लंका व ब्रह्मदेश या ठिकाणीं हा ग्रंथ आधारभूत मानला जात असून यावर अनेक टीका व भाष्यें आहेत. याचीं एकंदर ९ प्रकरणें असून शेवटचें फार लोकप्रिय आहे.

अभिधर्मकोश (इ. स. ५ वें शतक) वसुबंधु या विख्यात बौद्ध पंडितानें लिहिलेला एक संस्कृत ग्रंथ. या ग्रंथांतलें तत्त्वज्ञान सर्वास्तिवादाला अनुसरून आहे. हा सर्व ग्रंथ करिका-बद्ध असून कारिकांची संख्या ६०२ आहे. या कारिकांवर वृत्तिहि आहे. धातु, इंद्रियें, लोक, अनुशय, आर्यपुद्गल, ज्ञान, समाधि व पुद्गल, असे आठ विषय यांत चर्चिले आहेत. नीति, मानस व अध्यात्म या तीन्ही विषयांचें यांत प्रतिपादन आहे. वसुबंधु हा सर्वास्तिवादी होता. पण त्याचा हा ग्रंथ इतका व्यवस्थित, सुस्पष्ट, सुसंबद्ध व निश्चितार्थक झाला, की सर्व बौद्धपंथांत त्याला मान्यता व प्रामाण्य मिळालें. या कोशाची मूळ संस्कृत आवृत्ति नष्ट झाली असून त्याचे चिनी व जपानी अनुवाद तेवढे उपलब्ध आहेत. अभिधर्मकोशावर भारत, तिबेट, चीन, जपान, या देशांतील बौद्ध विद्वानांनी इतक्या टीका व इतके भाष्यग्रंथ लिहिले आहेत, की त्या सर्वांचें मिळून एक ग्रंथालयच होईल. या ग्रंथावर ज्या अनेक टीका व व्याख्या झाल्या, त्यांत अभिधर्मकोशव्याख्या या ग्रंथाला सर्वोच्च स्थान आहे. यशोमित्र नांवाच्या बौद्ध पंडितानें ही व्याख्या लिहिली असून सदर ग्रंथ नेपाळांत जपून ठेवलेला आहे. पाहा—वसुबंधु.

अभिधा अर्थबोध करविणारी एक शक्ति. ‘स मुख्योऽर्थस्तत्र मुख्यो व्यापारोऽस्याभिधोच्यते’ = साक्षात् संकेतित अर्थ म्हणजे मुख्य अर्थ, त्याचा बोध करून देणाऱ्या व्यापाराला अभिधा असें म्हणतात (का. प्र. २.८). ही एक शब्दशक्ति आहे. हिच्या द्वारें तीन प्रकारच्या शब्दांचा अर्थबोध होत असतो.

रूढ शब्द —— या शब्दांचा अर्थबोध समुदायशक्तीच्या द्वारें

होतो व त्या शब्दांची व्युत्पत्ति होत नाही. उदा० घोडा, बैल, गड, वड इत्यादि.

यौगिक शब्द––या शब्दांचा अर्थबोध अवयवांच्या (प्रकृति व प्रत्यय) शक्तीच्या द्वारें होतो. उदा० दिनकर, सुधांशु, इत्यादि.

योगरूढ शब्द––यांचा अर्थबोध समुदाय व अवयव यांच्या शक्तीच्या सहयोगाने होतो. हे शब्द यौगिक असूनहि रूढ असतात. उदा० वारिज, जलज, या शब्दांचा यौगिक अर्थ जलांत उत्पन्न होणारी वस्तु असा आहे; पण योगरूढ अर्थ मात्र कमळ असाच होतो.

अभिनंदन नाथ

जैनांचा चौथा तीर्थंकर. 'अभिनन्द्यते देवेन्द्रादिभिरित्यभिनन्दनः' = देवेंद्रादिकांकडून ज्याचें अभिनंदन केलें जातें असा (अभिधान चिंतामणि). याचा जन्म साकेतांत झाला. याचा पिता संवर नांवाचा राजा आणि माता सिद्धार्था होय. जन्मनक्षत्र पुनर्वसू. यक्ष-यक्षिणी ईश्वर व काली. ज्ञानवृक्ष प्रियाल (खिरणी). लांच्छन माकड. मोक्षस्थान पारसनाथ पर्वत. याच्या मूर्ती क्वचितच आढळतात. याचा परिवार पाहतां या तीर्थंकराची कल्पना शैवसंप्रदायावरून केलेली दिसते. [जै. इ.]

अभिनय

'अभिनयति हृद्गतभावान् प्रकाशयति इति' =अंतरांतील राग–द्वेषादि भाव प्रकाशित करणें म्हणजे अभिनय होय, अशी याची व्याख्या आहे. वाणी, शारीरिक चेष्टा, मुखमुद्रा व वेषभूषा यांच्या द्वारें मानसिक भाव व्यक्त करणें, तसेंच प्रेक्षकाला रसाची अनुभूति घडविणें हें मुख्यत्वें अभिनयाचें उद्दिष्ट आहे. या शब्दाचा यौगिक अर्थ जवळ नेणें, म्हणजेच प्रेक्षकाला कवीच्या भावार्थाप्रत पोंचवणें असा आहे. भरताचें नाटयशास्त्र व नंदिकेश्वराचा अभिनयदर्पण यांत अभिनयाचें विस्तारानें वर्णन आहे.

नाटयशास्त्रानुसार अभिनयाचे चार प्रकार होतात––

भवेदभिनयोऽवस्थानुकारः स चतुर्विधः ।
आङ्गिको वाचिकश्चैवमाहार्यः सात्त्विकस्तथा ।।

अर्थ –अभिनय म्हणजे अवस्थेचें अनुकरण. तो चार प्रकारचा असतो –आंगिक, वाचिक, आहार्य व सात्त्विक.

आंगिक अभिनय– शरीर, मुख आणि विविध चेष्टा यांनी एखादा भाव किंवा अर्थ प्रकट करणें, म्हणजे आंगिक अभिनय होय. मस्तक, हात, कंबर, वक्ष, पार्श्व आणि चरण, यांच्या द्वारें आंगिक अभिनय केला जातो. डोळे, भुवया, अधर, गाल, व हनुवटी यांच्या द्वारें केला जाणारा अभिनय हा आंगिक अभिनयांतला उपांग अभिनय होय. संपूर्ण शरीराच्या विशेष चेष्टा, अर्थात् लंगडा, कुबडा, वृद्ध यांच्या चेष्टांचें अनुकरण याला चेष्टाकृत अभिनय म्हणतात. हे सर्व प्रकारचे अभिनय रस, भाव, आणि संचारी भाव यांच्या अनुसार केले जातात. मुखज चेष्टांचा अभिनय याच प्रकारचा होतो. मुखरागयुक्त शारीरिक अभिनय अल्पांशाने जरी झाला, तरी तो समग्र अभिनयाची शोभा वाढवितो, असें भरताने म्हटलें आहे. हा मुखराग चार प्रकारचा असतो––स्वाभाविक, प्रसन्न, रक्त व श्याम.

मस्तक हालवून करायच्या अभिनयाचे नऊ प्रकार होतात–

(१) **सम** – डोकें खाली वांकलेलें किंवा उचललेलें किंवा हालत नसलेलें. उपयोग : नृत्यारंभ, प्रार्थना, अधिकारयुक्त भाषण, समाधान, राग, बेपर्वाई किंवा क्रियाशून्यता.

(२) **उद्वाहित** – डोकें वर उचलून स्थिर ठेवणें. उपयोग : पताका, चंद्र, आकाश, पर्वत, हवेंत उडणारे पदार्थ, कोणतीहि उंच वस्तु.

(३) **अधोमुख**– डोकें खाली वांकविलेलें असणें. उपयोग : विनय, दुःख, नमन, एखादी गोष्ट हिडिस मानणें, मूर्च्छा, जमिनीवर पडलेले पदार्थ, स्नान.

(४) **आलोलित**– डोकें वर्तुळांत फिरविणें. उपयोग : निद्रावस्था, पर्याकुलावस्था, उन्माद, मूर्च्छना, घेरी येणें, कांकूं करणें, हसणें, इत्यादि.

(५) **धूत**– उजवीकडून डावीकडे व डावीकडून उजवीकडे डोकें वळविणें. उपयोग : नकार, पुन्हापुन्हा पाहणें, सहानुभूति, आश्चर्य, निराशा, बेपर्वाई, थंडी, आग, भीति, मद्य पिण्याच्या वेळचा पहिला क्षण, युद्धाची तयारी, अव्हेर, आतुरता, आपल्या अवयवाकडे नजर टाकणें, दोन्ही बाजूंना हांक मारणें.

(६) **कंपित**– खाली वर डोकें हालवणें. उपयोग : क्रोध, 'थांब' म्हणणें, पृच्छा, हांक, भीति घालणें, इत्यादि.

(७) **परावृत**– डोकें एका बाजूला करणें. उपयोग : 'हें कर' असें सांगणें, तिटकारा, नम्रता, कांपणें, अंग चोरणें, अ[illegible] करणें, इत्यादि.

(८) **उत्क्षिप्त**– डोकें एका बाजूला वर करणें. उपयोग : 'हें घे' म्हणणें, खून करणें, प्रतिपाळ करणें, मान्यता देणें.

(९) **परिवाहित**– एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे पंख्याप्रमाणे डोकें हालविणें. उपयोग : प्रेमी बनणें, प्रियेकरितां झुरणें, सुख, आनंद, विचार.

दृष्टीच्या अभिनयाचे आठ प्रकार सांगितले आहेत ––

(१) **सम**– देवांच्या स्त्रियांप्रमाणे डोळे न हालवितां बघणें, उपयोग : नृत्यारंभ, तागडी, इतर कांही गोष्टीविषयीं विचार, आश्चर्य, देवमूर्ति.

(२) **आलोकित**– तीक्ष्ण कटाक्षांनी जलद डोळे फिरविण

उपयोग : कुंभाराचें फिरतें चाक, एकूण एक वस्तू दाखविणें, इच्छा.

(३) **साचि**– डोकें न हालवितां डोळ्यांच्या कोपऱ्यांतून पाहणें. उपयोगः इंगित, मिशीला पीळ घालणें, आत्मविश्वास, बाणाचा नेम धरणें, खूण करणें, इत्यादि.

(४) **प्रलोकित**– एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे डोळे फिरविणें. उपयोग : दोन्ही बाजूंच्या वस्तू पाहणें, खूण करणें, हालणें, अस्वस्थ मन.

(५) **निमीलित**– डोळे अर्धवट झांकलेले अर्धवट उघडलेले. उपयोग : ऋषीसारखा आविर्भाव, दुसऱ्याच्या मर्जीप्रमाणे वागणें, जप, ध्यान, नमस्कार, वेड, सूक्ष्मदृष्टि.

(६) **उल्लिखित**– सूक्ष्म रीतीने वर व बाजूला कटाक्ष टाकणें. उपयोगः ध्वजाचा अग्र, गोपूर, देवमंडप, पूर्वजन्म, उंची, चंद्रिका.

(७) **अनुवृत्त**– झट्दिशी खाली वर बघणें. उपयोगः रागीट मुद्रा, स्नेहयुक्त आमंत्रण.

(८) **अवलोकित**– खाली बघणें. उपयोग : छायेकडे बघणें, विचार, शय्या, अभ्यास, आपल्या अंगाकडे बघणें.

भुवयांच्या अभिनयाचे सहा प्रकार सांगितले आहेत. ते असे–

(१) **सहज** – नेहमीच्या चेहऱ्यांतील भुवई ही नैसर्गिक स्थिति दर्शविते.

(२) **पतित** – स्थिर असलेल्या भुवया चढविणें. उपयोग : अरुचि, आश्चर्य, मत्सर.

(३) **उत्क्षिप्त**– एक किंवा दोन्ही भुवया वर उचलणें. उपयोग : स्त्रीचा राग, खरें बोलणें, शृंगारभाव, लीला.

(४) **चतुर**– भुवया मिळवून थोड्या हालविणें. उपयोग : एकमेकांचे चेहरे मिळविणें, हृत्सौख्य, आवेग.

(५) **रेचित**– सुंदर व मधुर रीतीने एक भुवई आकुंचित करणें. उपयोगः एखादें गुह्य ऐकणें, एखाद्या स्थळाकडे बघणें, इत्यादि.

(६) **कुंचित** – एक किंवा दोन्ही भुवया कमानदार करणें. उपयोग : प्रियकर हजर नसतांना त्याची आठवण करून दिल्यामुळे झालेला आनंद (मोट्टाइत), खोटा राग (कुट्टमित), विलास, किलकिंचित.

मान हालवून करायच्या अभिनयाचे चार प्रकार सांगितले आहेत––

(१) **सुंदरि** – मान क्षितिजाशीं समांतर अशी इकडे तिकडे फिरविणें (तिर्यक् प्रचलित). उपयोग : प्रणयप्रारंभ, परीक्षा घेणें, 'शाबास' असें म्हणणें, आठवण, थट्टेचें भाषण, सहानुभूतीचें सुख.

(२) **तिरश्चीन**– सापाच्या चालीप्रमाणे दोन्ही बाजूंना मान वर करणें. उपयोगः तरवार पाजळणें, सर्पाकार गति.

(३) **परिवर्तित**– अर्धचंद्राप्रमाणे उजव्या व डाव्या बाजूला मान वळविणें. उपयोग : शृंगारनर्तन, कपोलचुंबनप्रसंगीं.

(४) **प्रकंपित**– कपोताप्रमाणे पाठीमागे व पुढे मान फिरविणें. उपयोग : 'तूं आणि मी' असें सांगणें, गणना, झोके.

हस्ताभिनयाचे एकूण बारा प्रकार सांगितले आहेत––

(१) प्रसारण– बोटें ताठ करून. (२) कुंचित – बोटें वांकवून. (३) रेचित– बोटें पसरून. (४) पुंखित– हात पुढे, बोटें ताठ, वांकलेलीं किंवा पसरलेलीं. (७) उद्वेष्टित– तळहात वर धरलेला. (८) व्यावृत्त– हात बाजूने पुढे रोखलेला. (९) परिवृत्त– हात बाजूकडून पुढें केलेला. (१०) संकेत – शब्दाशिवाय कल्पना देणें. (११) चिन्ह– ज्या गोष्टी पुढे आहेत व ज्या अदृश्य आहेत, त्यांच्या खुणा निरनिराळ्या चिन्हांनी दाखविणें. (१२) पदार्थटीक– शब्दांचे अर्थ समजावून देणें.

या व्यतिरिक्त वक्षाचे पांच, पार्श्वाचे पांच, उदराचे तीन, कटीचे पांच, उरूचे पांच, जांघेचे पांच व पायांचे पांच प्रकारचे अभिनय भरताने सांगितले आहेत. सोळा भूमिचारी व सोळा आकाशचारी यांचें वर्णन करून भौममंडलाचे दहा व आकाशमंडलाचे दहा अभिनय सांगत असतांना भरताने गतीच्या अभिनयाचें विस्ताराने वर्णन केलें आहे. गतीप्रमाणेच आसन म्हणजे बसण्याचे विविध प्रकारहि त्याने सांगितले आहेत. आंगिक अभिनयाचें भरताने जितकें तपशीलवार व सांगोपांग निरूपण केलें आहे, तितकें अन्य कोणत्याहि नाट्याचार्याने केलेलें नाही.

वाचिक अभिनय–रंगभूमीवर अभिनय करणारी व्यक्ति मुखाने जें कांही सांगते, त्या सगळ्याला वाचिक अभिनय म्हणतात. या अभिनयांत रसयुक्त वाक्यांचा प्रयोग करून त्यांचें शृंगार, करुण, रौद्र, इ. रसांना अनुकूल असें योग्य त्या आरोहावरोहासह उच्चारण करायचें असतें. भरताने वाचिक अभिनयाचीं त्रेसष्ट लक्षणें सांगितलीं असून त्याच्या गुणदोषांचेंहि विवेचन केलें आहे. वाचिक अभिनयाचें सर्वांत मोठें वैशिष्ट्य हें, की अभिनेता पडद्याआडून बोलला तरी केवळ त्याच्या शब्दोच्चारावरून प्रेक्षकाला त्याची मुखमुद्रा व मनोवस्था यांची कल्पना करतां यावी.

आहार्य अभिनय–अभिनेत्याने आपापल्या भूमिकेला अनुरूप अशी वेषभूषा करणें, याला आहार्य म्हणतात. वस्तुतः आहार्य हें अभिनयाचें अंग नसून तो नेपथ्यकर्माचा भाग आहे.

सात्त्विक अभिनय–अष्टसात्त्विक भावांचें प्रदर्शन. यांत स्तंभ, स्वेद, रोमांच, इ. अष्टसात्त्विक भाव येतात.

भारतीय अभिनयकलेचा इतिहास फार प्राचीन आहे. संस्कृत भाषेंत भासाचीं नाटकें हीं सर्वांत जुनीं आहेत. त्यांवरून कळतें, कीं आपल्या देशांत अभिनयाचा प्रारंभ दोन, सव्वादोन हजार वर्षांपूर्वीं झाला आहे. भरतमुनि हा भासाच्या आसपासच्याच कालांतला असावा, असें डॉ. केतकरांचें मत आहे. त्याने ज्या अर्थीं अभिनयकलेचें तपशीलवार विवेचन केलें आहे, त्या अर्थीं त्याच्याहि पूर्वी भारतांत अभिनयकलेचा अनेक अंगांनी विकास झाला होता, हें सिद्ध होतें.

अभिनयांत अनुकरण, नक्कल, इ. गोष्टी आढळतात. त्यांचें मूळ मानवजातीच्या आदिम अवस्थेपासून दिसून येतें. अनुकरणाची प्रवृत्ति बालकांत तर असतेच, पण थोडयाफार प्रमाणांत ती पशूंतहि आढळते. या अनुकरणप्रवृत्तीच्या मागे दोन कारणें संभवतात. एक म्हणजे त्यांत अभिनेत्याला वास्तवाच्या अनुभूतीसारखा आनंद प्राप्त होतो; व दुसरें म्हणजे एका व्यक्तीला दुसऱ्या अनेक व्यक्तींपुढे आपल्या अनुभूतींची अभिव्यक्ति करण्याचा अवसर मिळतो. या दुसऱ्या उद्देशांतून हावभाव व मुद्रा यांचा विकास झाला आहे.

आजमितीस भारतांतल्याच नव्हे, तर जागतिक अभिनयकलेलाहि एक शास्त्रीय व परिष्कृत असें स्वरूप प्राप्त झालें आहे. पण आजचें अभिनयशास्त्र व प्राचीन अविकसित नाटचनृत्य यांची तुलना करतां, अभिनयाचे आधारभूत सिद्धांत दोन्हीकडे सारखेच दिसतात. मध्ययुगीन काळांत अभिनयकलेला हीनत्व आलें होतें. नट किंवा अभिनय करणारे यांची सामाजिक प्रतिष्ठा कमी झाली होती. पण आजमितीस सर्वच ललित कलांच्या बरोबरीने अभिनयालाहि प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. नाटच व अभिनय यांच्या मागचे सांस्कृतिक संबंध लक्षांत घेऊन आजमितीस त्या कलेच्या वृद्धीला सर्वत्र प्रोत्साहन मिळत आहे आणि तें योग्यच आहे.

अभिनवगुप्त (इ. स. ९५० चा सुमार) काश्मीरी शैव ब्राह्मण व महान् आचार्य. तंत्रशास्त्र व साहित्यशास्त्र यांचा प्रकांड पंडित. अभिनवगुप्त हा क्षेमेंद्र व मम्मट यांच्या पूर्वीचा आणि भट्टनारायण याच्या नंतरचा आहे. याच्या वडिलांचें नांव चुखल असें होतें. याचें घराणें विद्या व तांत्रिक साधना या बाबतींत काश्मीरमध्ये महशूर होतें. अभिनवगुप्ताची ज्ञानतृष्णा विलक्षण होती. अनेक गुरूंच्या जवळ तो अनेक विद्या शिकला. जालंधर येथे जाऊन आचार्य शंभुनाथ याच्याजवळ याने कौलिक मताचें प्रगाढ अध्ययन केलें. आपल्या पित्याकडून व्याकरण, भूति राजाकडून ब्रह्मविद्या, लक्ष्मणगुप्ताकडून त्रिकदर्श, भट्टेंद्र राजाकडून ध्वनिशास्त्र, भट्टतोत याच्याकडून नाटचशास्त्र, अशा, विविध गुरूंकडून विविध विद्या त्याने संपादिल्या. कौलसाधनेत त्याला शांति व सिद्धि या दोन्ही प्राप्त झाल्या. ग्रंथ, टीका व स्तोत्रें धरून याने केलेली रचना ५० च्या वर जाते. याच्या प्रमुख ग्रंथांचें स्वरूप पुढीलप्रमाणे–

(१) **तंत्रालोक**– हा तंत्रशास्त्रावरचा विश्वकोशच आहे, असें म्हटलें पाहिजे. याचे ३७ परिच्छेद आहेत. यांत तंत्रशास्त्राचे सिद्धांत, तंत्राच्या प्रक्रिया, तंत्रविषयक नाना मतें, बंध-मोक्ष, मोक्षाचें स्वरूप, परमार्थसाधक उपाय, शैवाचाराच्या विविध प्रक्रिया, इ. विषयांचें सुंदर व साधार विवरण आहे.

(२) **ध्वन्यालोकलोचन**– हें आनंदवर्धनाच्या ध्वन्यालोकावरचें प्रौढ व्याख्यान आहे. अभिनवगुप्ताच्या अनेक रससिद्धान्तांबद्दल साहित्यशास्त्र त्याचें ऋणी आहे. त्याचें रसविषयक विवेचन वैज्ञानिक व युक्तिसंगत आहे.

(३) **अभिनवभारती**– भरतमुनीच्या नाटचशास्त्रावरचें पांडित्यपूर्ण व प्रमेयबद्दल व्याख्यान. हा ग्रंथ नसता तर नाटचशास्त्रांतील तत्त्वांचा पत्ता आजहि लागला नसता.

(४) **ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी**– हा ग्रंथ अभिनवगुप्ताच्या प्रौढ पांडित्याचा आदर्श आहे.

याशिवाय त्याचे परमार्थसार बोधपंचदशिका, तंत्रसार, तंत्रोच्चय, भगवद्गीतार्थसंग्रह, असे आणखी कांही ग्रंथ आहेत. पांडित्यांत त्याचा असा मोठा अधिकार असल्यामुळेच नारदाच्या संगीतमकरंदांत त्याला महामहेश्वराचार्य अशा उपाधीने गौरविलें आहे. व्याकरणाच्या इतिहासांत पतंजलीचें व वेदान्ताच्या इतिहासांत वाचस्पतिमिश्राचें जें महत्त्वपूर्ण स्थान आहे, तेंच अलंकारशास्त्रांत अभिनवगुप्ताचें आहे. याने अलंकारशास्त्राला दर्शनाच्या पदवीवर आरूढ केलें. अभिनवगुप्त केवळ शुष्क तार्किक नव्हता; तर विश्वाचें रहस्य शोधणारा मर्मज्ञ साधकहि होता. [बलदेव उपाध्याय; हिं. वि. को.; म. ज्ञा. को.]

अभिमान एखाद्या कृत्याचें वा पदार्थाचें कर्तृत्व आपणाकडे नसतां, तें मीं केलें असें म्हणणें किंवा आपलें खरें स्वरूप एक असतां, तें दुसरेंच मानणें, याला अभिमान म्हणतात. अविवेक हा अशा अभिमानाला कारणीभूत असतो. अभिमानापासून राग-द्वेष उत्पन्न होतात व राग-द्वेषांपासून कर्में घडतात. राग म्हणजे सुखप्रीति व द्वेष म्हणजे दुःखाविषयीं अप्रीति होय. **पाहा**–अविवेक. [ब्र. सि. मा.]

अभियुक्त कुशद्वीपांतील मानवसमाज. हा जातवेदसरूपी ईश्वराचें यजन करतो. [भाग. पु. ५. २०.१६]

अभिरूपपातिव्रत विद्वान् व सुंदर पति प्राप्त होण्यासाठी हें उपवासात्मक व्रत आहे (हि. ध.). मृच्छकटिक नाटकांत याचा उल्लेख आहे.

अभिलषितार्थचिंतामणि बाराव्या शतकांत निर्माण झालेला एक ज्ञानकोश. याला मानसोल्लास असेंहि दुसरें नांव आहे. विक्रमादित्याचा पुत्र सोमेश्वर हा कल्याण येथे इ. स. ११२६ सालीं गादीवर बसला. हा राजा विद्वान् होता. हा ग्रंथ जरी त्याच्या नांवावर असला, तरी अनेक विद्वानांच्या सहकार्याने त्याने याची रचना केली असली पाहिजे. यांत वस्त्रभोग, पुत्रोपभोग, अन्नभोग, आलेख्य-कर्म, नृपगेह, आस्थाभोग, राष्ट्रपालन, इ. अनेक विषय आहेत. विद्या व कला या संबंधांत त्या कालापर्यंत जी ग्रंथसंपदा निर्माण झाली होती, ती सर्व एकट्या माणसाला अभ्यासणें अशक्य आहे, हें जाणून सर्वांच्या आटोक्यांत येईल असा हा सर्व विद्याकलांचा सारसंग्रह सोमेश्वराने निर्माण करून जिज्ञासूंवर उपकार केले, असें म्हटलें पाहिजे. जगांतला पहिला ज्ञानकोश म्हणून याचा उल्लेख केला, तर तें अस्थानीं होणार नाही. [मु. पु. म.]

अभिवादन स्वनामोच्चारणपूर्वक नमस्कार. 'आभिमुख्येन वाद्यते आशीः कार्यते अनेन' = समोर उभें राहून गुरूकडून आशीर्वाद ज्यामध्ये मिळविला जातो, तें कृत्य (हलायुध). अभिवादन तीन प्रकारचें असतें–नित्य, नैमित्तिक व काम्य. प्रहररात्रीं शिष्याने गुरूजवळ उभें राहून करायचें तें नित्य, गांवाहून परत आल्यावर करायचें तें नैमित्तिक व दीर्घायुष्य आणि स्वर्गप्राप्ति यांच्यासाठी करायचें तें काम्य. ऋत्विज्, श्वशुर, चुलता व मामा यांना उत्थापन देऊन 'अभिवादये अमुकशर्माऽहं भो', असें म्हणून अभिवादन करायचें असतें. प्रत्यभिवादन कसें करावें तें ठाऊक नसेल त्यांना अभिवादन करतांना वरील उच्चारणांतला 'भो' शब्द गाळायचा असतो. ब्राह्मण, पुरुष, क्षत्रिय, वैश्य किंवा स्त्री यांना अभिवादन करतेवेळीं स्वतःचें नांव गाळून 'मी नमस्कार करतों' एवढेंच म्हणायचें. ब्राह्मणाने उजवा हात कानाच्या, क्षत्रियाने छातीच्या व वैश्याने कमरेच्या रेषेपर्यंत आणून अभिवादन करायचें. शूद्र आपला हात खाली पायापर्यंत लांब करीत. विद्वानांना दोन्ही हातांनी व इतरांना एकाच हाताने अभिवादन करावें, सवर्णांनी सवर्णांनाच अभिवादन करावें व इतरांना नुसतें 'स्वस्ति' म्हणावें, असें सांगितलें आहे. अभिवादनाविषयी मनु म्हणतो–

अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः ।
चत्वारि संप्रवर्धन्ते आयुर्विद्यायशोबलम् ॥

(२.१२१)

अर्थ– अभिवादन हें ज्यांचें शील आहे व जो नित्य वृद्धांची परिचर्या करतो, अशा (पुरुषा)चीं आयुष्य, विद्या, यश आणि बल हीं चार वृद्धि पावतात.
पाहा–प्रणाम. [हि. ध.]

अभिवादनीय नाम मुलाने आईबापांना वंदन करतांना 'मी अमुक नांवाचा अभिवादन करीत आहे,' असें म्हणून उच्चारायचें आत्मनाम हें अभिवादनीय होय. हें नांव पित्याने ठेवायचें असतें व तें इतरांपासून गुप्त राखायचें असतें. **पाहा**–नामकरण.

अभिव्यक्तिवाद एक दार्शनिक मत. या मतांत, पदार्थ उत्पन्न होत नाहीत, तर ते नुसते अभिव्यक्त (प्रकाशित) होतात, असें मानलें जातें. सांख्य व वैयाकरण यांचें हेंच मत आहे. असंगाने आपल्या योगाचारभूमि य ग्रंथांत या मताचें खंडन केलें आहे. [द. दि.]

अभिषाह उत्तरेकडील एक प्राचीन राज्य. [ब्रह्मांड पु २. १६. ४८]

अभिषिक्त एक संकर जात. ब्राह्मण पुरुष व क्षत्रिय स्त्री यांची विवाहबाह्य संतति. [हि. ध.]

अभिषेक अभि + षिच् = सर्वांगीं सर्व बाजूंनी शिपडणें, या धातूपासून हा शब्द बनला आहे. शुक्ल–कृष्ण यजुर्वेद, ब्राह्मणें, श्रौतसूत्रें, इ. ग्रंथांत हा शब्द आढळतो; ऋग्वेद व सामवेद यांत आढळत नाही. वेदकाळीं राजाच्या राज्यारोहणप्रसंगीं त्याच्या मस्तकावर समंत्रक पाणी शिंपडून त्याला शुद्ध करीत; त्या विधीला अभिषेक म्हणत. 'शीर्षतो वा अभिषिच्यमानोऽभिषिच्यते' = ज्याचा अभिषेक करायचा त्याच्या मस्तकापासून अभिषेक सुरू करावा, असें शतपथ ब्राह्मणांत सांगितलेलें आहे (९. ३. २. ३). अभिषेकाचें वर्णन तै. ब्रा. (१. ७. ५), श. ब्रा. (५. ३. ३). ऐ. ब्रा. (८. ५), इ. ब्राह्मण ग्रंथांत दिलेलें आहे. त्यावेळीं म्हणायचे मंत्र निरनिराळ्या संहितांत आढळतात.

प्राचीनकाळीं फक्त राजांनाच अभिषेक होत. असे. इतर लोक त्या विधीला पात्र नसत. इतर देशात प्रत्यक्ष रक्ताने

अभिषेक करीत व त्यामुळे शरीरांत उत्साह निर्माण होतो, असें मानीत. भारतांत मात्र असा रक्ताभिषेक कधीहि नव्हता. हा विधि सार्वभौम सत्ता मिळविण्यासाठी करायचा असे. सम्राट् व महाराजे यांच्या राज्याभिषेकांचें वर्णन महाभारतांत आलें आहे. भारतीय युद्धानंतर राज्यारोहणप्रसंगीं युधिष्ठिराला अभिषेक झाल्याचें वर्णन महाभारतांत पाहायला मिळतें (शांति. ४०. २४). वनवासांतून परत आल्यावर रामचंद्राला केलेल्या राज्याभिषेकाचें वर्णन कालिदासाने पुढील श्लोकांत केलें आहे—

सरित्समुद्रान् सरसीश्च गत्वा
रक्षः कपीन्द्रैरुपपादितानि ।
तस्यापतन् मूर्ध्नि जलानि जिष्णो-
र्विन्ध्यस्य मेघप्रभवा इवापः ।।

(रघु. १४. ८)

अर्थ—राक्षस व वानर यांच्या नायकांनी निरनिराळ्या नद्या, समुद्र, सरोवरें, इ. ठिकाणीं जाऊन त्यांचीं आणलेलीं जलें विंध्याच्या मस्तकावर मेघांतून पाणी पडावें त्याप्रमाणे त्या जयशील रामाच्या मस्तकावर पडलीं.

सम्राट् अशोक याने कलिंग विजयानंतर चार वर्षांनी आपला राज्याभिषेक करून घेतला होता. बृहत्कथेंत नरवाहन-दत्ताचा अभिषेक वर्णिला आहे. भावी कालांत ज्याला राज्य मिळायचें, अशा युवराजालाहि अभिषेक होत असे व त्याला यौवराज्याभिषेक असें म्हणत. ज्या प्रसंगीं रामचंद्राला वनवास पत्करण्याची वेळ आली, तो त्याचा यौवराज्याभिषेकच होता (वा. रा. २. ३–८).

पुढील काळांत अमात्य, सामान्य राजे, व राजपुरोहित यांनाहि अभिषेक होत असल्याचें 'मूर्धाभिषिक्ता अमात्या राजानः' या हर्षचरितांतल्या उल्लेखावरून कळतें.

ऐतरेय ब्राह्मणांतहि सामान्य राजांना अभिषेक होत असल्याचें सांगितलें आहे (८. १४). अथर्ववेदाच्या कौशिक सूत्रांत सामान्य राजांच्या अभिषेकाहून श्रेष्ठ राजांचा अभिषेक निराळा कल्पिला आहे (१७. ११–१३).

पुष्याभिषेक नांवाच्या आणखी एका अभिषेकाचें सविस्तर वर्णन अथर्वपरिशिष्ट ४, बृहत्संहिता व कालिकापुराण या ग्रंथांत आढळतें. या विधीचें वैशिष्टय म्हणजे चंद्र-पुष्य यांच्या योगावर हा अभिषेक करायचा असतो. याच योगावर पूर्वीं इंद्राने असुरांना जिंकलें होतें. बौद्ध कल्पनेप्रमाणे बोधि-सत्त्वाचा यौवराज्याभिषेक व अभिनिष्क्रमण या दोन्ही घटना याच योगावर घडल्या.

महाभारत (शांति. ४०), रामायण, अग्निपुराण व मानसार या ग्रंथांत अभिषेकासंबंधीं माहिती आली आहे. वरील ग्रंथांत या विधींतल्या तंत्राची व पौरोहित्याची कल्पना विकसित झालेली दिसत नसली, तरी या ग्रंथांच्या रचनाकालीं वैदिक अभिषेकांच्या विधींत बराच फरक पडला होता, असें दिसून येतें. वेदोत्तर अभिषेकविधीची उभारणी मुख्यत्वें उत्तरकालीन कल्पनांवर आधारलेली दिसते. या संस्कारांतील सर्वसाधारण गोष्टी खालीलप्रमाणे असत —

अभिषेकाच्या आदल्या दिवशीं राजा विधिपूर्वक स्नान करी. अभिषेकाच्या पूर्वी किंवा त्या वेळीं तो आपले अनेक मंत्री निवडी. राणी, हत्ती, श्वेताश्व, पांढरा बैल, शुभ्र छत्र व चामर, इ. राजरत्नांची निवड होई. व्याघ्रचर्माच्छादित सुवर्णसिंहासन किंवा भद्रासन तयार केलें जाई. सप्तसमुद्रांचें जल, मध, दूध, दही, इ. वस्तूंनी भरलेले सुवर्णकलश सिंहासनाजवळ आणून ठेवीत. अभिषेकविधीची इतर सामग्री पुढीलप्रमाणे असे ——

वड, उदुंबर, अश्वत्थ व प्लक्ष या लांकडांचीं पात्रें; प्रियंगु व यव या धान्याच्या ओंब्या; उदुंबराचा मंचक, चमस व फांदी.

नंतर राजा आपल्या राणीसह सिंहासनावर बसे. सामंत, मांडलिक, इ.राजे त्याची मोठ्याने द्वाही फिरवीत. नंतर पुरोहित, ज्या मंत्रांत वरुणाचा सम्राज् या नांवाने उल्लेख आला आहे, असे मंत्र म्हणून उदुंबराच्या शाखेने जल, दूध, दही, मध, इ. द्रव्यांनी त्याला अभिषेक करी. एकटा पुरोहितच नव्हे, तर इतर ब्राह्मण, मंत्री, आप्त व प्रजाजनहि त्याला अभिषेक करीत. नंतर राजा इंद्राचें स्तवन करी. पुरोहित व उपाध्याय यांना दक्षिणा देई. नंतर पुरोहित राजाला प्राशन करण्यासाठी सुरेने भरलेलें पात्र देई व सुरा ही सोमरूप आहे, असें सांगे. मग शांतिमंत्रांचा पाठ होई. अग्निपुराण व मानसार यांत सांगितल्याप्रमाणे राजा राजधानीच्या नगराभोवती एक प्रदक्षिणा करी व नंतर अभिषेकाचा विधि समाप्त होई. त्या प्रसंगीं राज्यांत सर्वत्र आनंदोत्सव केला जाई व कैद्यांनाहि मुक्त करण्यांत येई.

ऐतरेय ब्राह्मणांत अशा अभिषिक्त झालेल्या प्राचीन राजांची व त्यांना अभिषेक करणाऱ्या ऋत्विजांची पुढीलप्रमाणे यादी दिली आहे –

राजा.	ऋत्विज.
(१) जनमेजय पारिक्षित	—— तुर कावषेय
(२) शार्यात मानव	—— च्यवन भार्गव
(३) शतानीक सात्राजित	—— सोमशुष्म वाजरत्नायन
(४) आंबाष्ठ्य	—— पर्वत व नारद
(५) युधांश्रौष्टि औग्रसैन्य	—— पर्वत व नारद
(६) विश्वकर्मा भौवन	—— कश्यप
(७) सुदास पैजवन	—— वसिष्ठ

(८) मरुत्त आविक्षित — संवर्त आंगिरस
(९) अंग — उदमय आत्रेय
(१०) भरत दौष्यन्ति — दीर्घतमा मामतेय

महाराष्ट्रांत छत्रपति शिवाजी महाराजांनी असाच स्वतः-वर राज्याभिषेक करून घेतला होता. त्याचें पौरोहित्य काशीचा सुप्रसिद्ध विद्वान् गागाभट्ट याने केलें होतें. या समारंभाचीं विस्तृत वर्णनें बखरींत आलीं आहेत.

पुनरभिषेक— हा संस्कार ज्याच्यावर करायचा तो राजा पूर्वीच अभिषिक्त असतो. या पुनरभिषेकाने त्याचें बलवर्धन करायचें असतें. यामुळे, ज्या अनेक शक्ति राजामधून गेलेल्या असतात, त्या त्याला पुनश्च प्राप्त होतात. याचा विधि पुढीलप्रमाणे —

व्याघ्रचर्माने आच्छादित उदुंबराचा मंचक, उदुंबराचाच एक चमस व फांदी, दही, मध, तूप, ऊन पडलें असतांना पडलेल्या पावसाचें उदक, तृणांकुर, सुरा आणि दूर्वा आणीत. स्फ्य नांवाच्या आयुधाने वेदी आंखून वरील मंचक अर्धा वेदींत व अर्धा वेदीबाहेर ठेवीत. राजा वीरासन घालून वेदीमागे बसे व दोन्ही हातांनी तो मंचक धरून त्यावर आरूढ होण्याकरितां देवांना पाचारण करी. त्या वेळीं ' देवस्य त्वा सवितुः प्रसवे... ' इ. मंत्रांनी सवित्याला आवाहन केलें जाई. मग राजा त्या मंचकावर आरोहण करी. ऋत्विज् त्याला अभिषेक करी व त्याच्या हातीं सुरापात्र देई. राजा त्यांतील सुरा पिऊन अवशिष्ट भाग आपल्या मित्राला देई. मग मंचकाखाली उतरून व पूर्वाभिमुख बसून ' नमो ब्रह्मणे... ' हा मंत्र तीनदा म्हणे. मग विजयाची इच्छा प्रदर्शित करून ऋत्विजाला दक्षिणा देई व अग्नींत समिधा टाकी. मग घरीं गेल्यावर गृह्याग्नीच्या मागे बसे. ऋत्विज् आज्यपात्रांतून अग्नीला आहुति देई व राजाच्या कल्याणासाठी कांही मंत्र म्हणे.

ख्रिस्ती अभिषेक —पाश्चात्य देशांत पहिलें रोमन साम्राज्य लयाला गेल्यावर पुढे आलेले ख्रिस्ती राजे पोपकडून राज्याभिषेक करवून घेऊं लागले. इंग्लिश राजे वेस्ट मिनिस्टर ॲबेमध्ये व स्कॉटिश राजे स्कोन येथे राज्याभिषेक करवून घेत. आजमितीस इंग्लंडचा राजा राज्यारूढ झाल्यानंतर एका वर्षाने हा अभिषेकविधि केला जातो.

ख्रिस्ती धर्मांत तेलाने अभिषेक होतो. त्यामुळे देवाच्या सेवेसाठी आवश्यक तें पावित्र्य मिळतें, अशी समजूत आहे. हिब्रू शब्द मसीह व ग्रीक शब्द ख्रिस्त यांचा अर्थ अभिषिक्त असा होतो. येशूचा हा अभिषेक पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने झाला. ख्रिस्तशिष्यांचा अभिषेक ईश्वराकडून झाला, असें समजतात. चर्चच्या मुख्य याजकालाहि अभिषेक होत असतो.

देवाभिषेक— एखाद्या मूर्तीची प्रतिष्ठा करण्याच्या वेळीं तिला अभिषेक करण्याचा विधि आहे. देवाच्या षोडशोपचार पूजेंत पंचामृत स्नानानंतर महाभिषेक करतात.

अभिषेक करीत असतांना शिवासाठी रुद्राध्याय, विष्णूसाठी पुरुषसूक्त, किंवा पवमान पंचसूक्त, गणपतीसाठी गणपतिअथर्वशीर्ष, देवीसाठी श्रीसूक्त व सूर्यासाठी सौर सूक्तें म्हणतात. हा अभिषेक झाल्यानंतर पुनरभिषेकांतले ' देवस्य त्वा सवितुः प्रसवे... ' इ. मंत्र म्हणण्याची वहिवाट आहे. पुण्याहवाचनांत व शांतिकर्मानंतर यजमानदंपतीला, व लग्नांत वधूवरांना अभिषेक केला जातो, त्याला अमृताभिषेक असें म्हणतात. हा अभिषेक दूर्वा व पंचपल्लव यांनी केला जातो. कांही संस्कारांच्या वेळीं जलाशयावर जें स्नान करतात, त्यालाहि अभिषेक म्हणतात.

बौद्ध अभिषेक— बौद्धांच्या दसभूमींत शेवटच्या भूमीस अभिषेकभूमि असें म्हणतात. वज्रयान मताप्रमाणे अभिषेकाचे सात प्रकार आहेत— उदकाभिषेक, मुकुटाभिषेक, पट्टाभिषेक, वज्रघंटाभिषेक, वज्रव्रताभिषेक, नामाभिषेक व अनुज्ञाभिषेक. यांतले पहिले दोन देहशुद्धीसाठी, तिसरा-चौथा वाचाशुद्धीसाठी, पांचवा व सहावा चित्तशुद्धीसाठी व सातवा ज्ञानशुद्धीसाठी आहे.

जैनांच्या एका आचार्याला अभिषेक अशी उपाधि असते. त्याला जैनसूत्रें योग्य पद्धतीने कशीं वाचावीं व त्यांचा नेमका अर्थ काय, हें माहीत असावें लागतें. **पाहा**— राजसूय, अभिषेचनीय. [हि. ध.; म. ज्ञा. को.; बौ. ध. द.; प. ध. शा. को.]

अभिषेक मंत्र

देवाच्या षोडशोपचार पूजेंत अभिषेक नांवाचा एक विधि असतो. यांत देवाला समंत्रक स्नान घालायचें असतें. त्यासाठी पुढील मंत्रांचा विनियोग करावा, असें आचारेंदु या ग्रंथांत सांगितलें आहे —

स्वर्णधर्मानुवाकेन महापुरुषविद्यया ।
पौरुषेण च सूक्तेन सामनीराजनादिभिः ।।

अर्थ— स्वर्णधर्मानुवाक, महापुरुषविद्या, पुरुषसूक्त व सामनीराजन, इ. मंत्रांनी (देवाला सुगंधित उदकाने स्नान घालावें).

एखाद्या मंगलकार्यांत यजमानदंपतीला अमृताभिषेक करायच्या वेळीं 'हिरण्यवर्णाः शुचयः...', 'त्रायन्तामिह देवाः...', इ. मंत्रांचा विनियोग करतात.

अभिषेचनीय

राजसूय यज्ञांतील हा एक सोमयाग आहे. हा पांच दिवस चालतो. चैत्र प्रतिपदेस यज्ञभूमीच्या दक्षिण भागांत दीक्षाविधि होतो. यामध्ये होता

भृगुगोत्रांतला असावा लागतो. सोम आणल्यानंतर सविता, अग्नि गृहपति, सोम, बृहस्पति, इंद्र, रुद्र, मित्र व वरुण या देवतांना चरूच्या आहुती देतात. नंतर ब्रह्मा रत्नींना सांगतो, की ' यजमान हा तुमचा राजा आहे. ' याशिवाय तो निरनिराळ्या देशांतल्या लोकांचाहि उल्लेख करतो. मग उपाध्याय सतरा प्रकारचें जल उदुंबराच्या सतरा पात्रांत आणून तें मोठ्या पात्रांत ओततो. त्या पात्राच्या पूर्वेस व्याघ्राजिन आंथरतो. त्याच्या पश्चिम टोकाला शिश्याचा तुकडा ठेवलेला असतो. मग पार्थ नामक सहा याग होतात. मग दर्भयुक्त सुवर्णाने जल शुद्ध करून तें चार पात्रांत ओततात. यजमान रेशमी वस्त्र नेसतो. अध्वर्यु त्याला सज्य धनुष्य व तीन बाण देतो. यजमान शिश्याचा तुकडा पायाने लोटून व्याघ्राजिनावरच्या सुवर्णावर पाय ठेवून उभा राहतो. नंतर कांही पावलें चालून पूर्वाभिमुख होतो. मग अध्वर्यु वगैरे ऋत्विज त्याला अभिषेक करतात. यजमान अंगावरचें जल मृगशृंगाने घासतो. होता त्याला शुनःशेपाचें आख्यान सांगतो. होता व अध्वर्यु यांना शंभर किंवा हजार गायींची दक्षिणा देण्यांत येते. मग राजा व्याघ्राजिनावर विष्णुक्रम नांवाचीं तीन पावलें टाकतो. **पाहा**– राजसूय, अभिषेक. [हि. ध.]

अभिष्टुत् एक प्रायश्चित्तस्वरूप सोमयाग. याला अग्निष्टुत् असेंहि म्हणतात. अजाणतां ब्रह्महत्या घडली असतां या यागाच्या अनुष्ठानाने त्या पातकांतून मुक्तता होते (मनु. ११. ७४; वसिष्ठ. २२.७).

अभिसार एक प्राचीन देश. श्री. स्टाइनच्या मताप्रमाणे हा झेलम व चिनाब या नद्यांच्या दुआबांत असलेल्या पर्वतराजींनी वेढलेला होता. याच्या पश्चिमेस उर्श हा प्रदेश होता. सांप्रत ज्याला पूर्वीहजारा म्हणतात, तोच प्राचीन अभिसार होय. रजऊर जिल्ह्याचा कांही अंश प्राचीन अभिसारांत समाविष्ट असण्याचा संभव आहे. [सि. आ. प. भा.]

अभिसारिका अष्टनायिकांपैकी सुप्रसिद्ध नायिका. हिची व्याख्या पुढीलप्रमाणे––

कान्तार्थिनी तु या याति सङ्केतं साऽभिसारिका

(अमर.)

अर्थ– संकेत ठरवून प्रियकराकडे जाणारी ती अभिसारिका. भरताने हीच व्याख्या तिच्या मनोवृत्तीसह दिली आहे –

उद्दाममन्मथमहाज्वरवेपमाना
रोमाञ्चकण्टकितगात्रलतां वहन्ती ।
निःशङ्किनी व्रजति या प्रियसङ्गमाय
सा नायिका निगदिता त्वभिसारिकेति ।।

अर्थ– उच्छृंखल मदनाच्या महाज्वराने कांपणारी, जिची काया रोमांचांनी कंटकयुक्त झाली आहे अशी व निःशंकपणें प्रियकराच्या भेटीस निघणारी, ती अभिसारिका म्हटली गेली आहे.



अभिसारिका नायिका

रसमंजरींत तिचा आणखी एक विशेष सांगितला आहे–

स्वयमभिसरति प्रियमभिसारयति वा या, स अभिसारिका ।

अर्थ –– स्वतः प्रियकराच्या भेटीस जाते किंवा प्रियकराला भेटीस आणविते, ती अभिसारिका.

अभिसार म्हणजे प्रेमिकांनी एकमेकांस चोरून भेटायला जाणे. स्वीया, सामान्या, मुग्धा, प्रौढा, उत्तमा, मध्यमा, इ. अभिसारिकांचे पोटभेद सांगितले आहेत. अभिसारिकेचा प्रियकर परपुरुषच असायला हवा, असा नियम नाही. स्वतःच्या पतीला भेटण्यासाठी घरच्या माणसांचा डोळा चुकवून संकेतस्थळीं जाणारी स्त्रीहि अभिसारिकाच ठरते. म्हणून या पोटभेदांत स्वीयेला स्थान मिळालें आहे. परकीया अभिसारिकेला याहून निराळें भय असतें. आपला व्यभिचार उघडकीस आला, तर आपली अप्रतिष्ठा होईल, कदाचित् आपणांस संसारालाहि मुकावें लागेल, या भीतीने तिचें काळीज धडधडत असतें. शुक्लपक्षाच्या रात्रीं चांदणें असतें; म्हणून ती शुभ्र वस्त्र नेसते. कृष्णपक्षांत काळें वा निळें वस्त्र नेसते. उद्देश हा, की भोवतालच्या वातावरणाशीं एकरूप व्हावें व कोणाच्या नजरेंत येऊं नये. हिचे भेद असे– अभिसार करतांना जिला केवळ साहसाचेंच साहाय्य असतें, ती उत्तमा. जी दूतीच्या सोबतीने जाते, ती मध्यमा व जी कालावर विसंबून राहते, ती अधमा होय.

अष्टनायिकांत अभिसारिका हीच रसिकांना विशेष प्रिय आहे. अमरुशतकांतला हिच्या वर्णनाचा श्लोक असा –

उरसि निहितस्तारो हारः कृता जघने घने
कलकलवती काञ्ची पादौ रणन्मणिनूपुरौ ।
प्रियमभिसरस्येवं मुग्धे त्वमाहतडिण्डिमा
यदि किमधिकत्रासोत्कम्पं दिशः समुदीक्षसे ।।

अर्थ– तुझ्या हृदयावर मुक्तामाला झळकत आहे. पुष्ट जघनावर मेखला किणकिणत आहे. पायांत मणि–नूपुरें झणत्कार करीत आहेत. हे मुग्धे, अशा प्रकारे तूं जणू वाद्यें वाजवीत अभिसारांला निघाली आहेस. मग आता (कोणी पाहील का या) भयाने आजूबाजूला कशाला पाहतेस ? [शृंगारनायिका]

अभिसेग जैनसूत्रांचें अध्ययन करून आचार्यपदवीस पात्र ठरलेला श्रमणक. क्वचित् हा शब्द उपाध्याय या शब्दाशीं समानार्थक मानतात. याचें स्त्रीलिंग अभिसेगा. प्रवर्तिनीपद धारण करण्यास योग्य अशा श्रमणीला अभिसेगा म्हणतात. [हि. जै. मो.]

अभिज्ञा दिव्य शक्ति. ही पांच प्रकारांनी आविर्भूत होते– विविध चमत्कार, दिव्य श्रवण, दिव्य दर्शन, पर-चित्त विज्ञान व पूर्वजन्मस्मरण. बुद्धाच्या मतें योगी समाधि-बलाने या शक्ति मिळवूं शकतो. मात्र त्याने तेंच ध्येय मानूं नये.

अभीष्ट तृतीया मार्ग० शु. ३ या. तिथिव्रत. या दिवशीं गौरीची पूजा करून अभीष्ट सिद्धीसाठी तिची प्रार्थना करतात. [काशीखंड ८३. १. १८]

अभीष्ट सप्तमी कोणत्याहि मासाची शु. ७ मी. तिथिव्रत. या व्रतांत सागर, द्वीप, पाताल व पृथ्वी यांची पूजा करतात. [हे. व्र. १. ७९१]

अभौतिकवाद बुद्ध अनात्मवादी आणि अनीश्वरवादी असूनहि भौतिकवादी नव्हता. जेव्हा जेव्हा भौतिकवाद्यांशीं त्याची गांठ पडली, तेव्हा तेव्हा त्याने त्यांचें जोरदार खंडन केलें. भौतिकवादाचें अवलंबन केल्याने ब्रह्मचर्य आणि समाधि यांना प्रतिबंध होतो, असें त्याचें मत होतें. एका प्रसंगीं त्याने सांगितलें, की ‘तोच जीव आहे, तोच शरीर आहे, दोन्ही एक आहेत, असें मानल्यावर ब्रह्मचर्यवास होऊं शकत नाही. जीव दुसरा आहे, शरीर दुसरें आहे, असें मत झाल्यानेहि ब्रह्मचर्यवास होणार नाही’ (अंगु. नि. ३). याचें तात्पर्य हें, की भौतिकवादी आणि आत्मवादी यांच्या दृष्टीने साधुजीवन हें युक्तिसंगत ठरत नाही. परलोकांत शुभ-फल प्राप्त व्हावें अशी आकांक्षा असली, तरच मनुष्य साधु-जीवनाकडे वळेल. पण भौतिकवादी तर परलोकच मानीत नाहीत. म्हणून बुद्ध अनात्मवादी असूनहि भौतिकवादाचा विरोधी होता. आस्तिकवाद मान्य करून त्यानें आचारशिक्षा दिलेली आहे. आस्तिकवाद ही त्याच्या आचारशिक्षेची दार्शनिक आधारशिला आहे. [बौ. द. मी.]

अभ्यंग अंगाला तेल, उटणीं व अत्तर लावून उष्णोदकाने स्नान करणें, याला अभ्यंगस्नान म्हणतात. याला मांगलिकस्नान असेंहि नांव आहे. ही चाल प्राचीन काळा-पासून भारतांत आणि इतरहि देशांत आहे. माणूस ऐहिक सुखोपभोगासाठी तेलें व सुगंधी द्रव्यें वापरूं लागल्यावर अभ्यंग-स्नानाचा विधि रूढ झाला. शरीराचे स्नायू बलवान् व्हावे व बल, पुष्टि आणि कांति वाढावी, या उद्देशाने अभ्यंगस्नान करण्याची पद्धत निर्माण झाली. आरोग्यवृद्धि हा त्याचा पहिला उद्देश होता. पुढे या प्रकाराला धार्मिक स्वरूप आलें. या कामीं तीळ किंवा खोबरें यांचें तेल व तूप वापरतात. त्यांत चंदन, गुलाब, मोगरा, वगैरे फुलांचीं अत्तरें मिसळतात. तेलांत हळदहीं टाकतात. लग्नाच्या आधीं वधूवरांना हळद लावतात, तोहि अभ्यंगाचाच प्रकार आहे. मंगलकार्याच्या प्रारंभीं यजमानदंपतीने अभ्यंगस्नान करावें, असा विधि आहे. महा-पूजेंत देवालाहि अभ्यंगस्नान घालतात. बळी देण्याच्या पूर्वी बोकडाच्या अंगाला अभ्यंग करण्याची प्रथा सर्व मागसलेल्या जातींत आहे. मृताच्या शरीरालाहि तेल, तूप, हळद लावून स्नान घालतात. विशिष्ट प्रसंगीं वेदी, देवळें, धार्मिक उपकरणें, शस्त्रें, यंत्रें, वाहनें यानांहि तेल लावण्याची प्रथा आहे. राज्या-भिषेक, राजसूय, अश्वमेध, इ. प्रसंगीं अभ्यंगस्नानाला विशेष प्राधान्य असून त्याला १८ द्रव्यांची आवश्यकता असते. ज्यू लोकांत राजे आणि धर्माधिकारी यांना अधिकारासंबंधी अभिषेक करण्याच्या प्रसंगीं तेल लावीत. ख्रिस्ताचें मसीह असें जें नांव आहे, त्याचा अर्थ तैलाभिषिक्त असाच आहे. रोमन कॅथॉलिकांच्या मंदिरांतून विशेष प्रसंगीं अभ्यंगविधि होत असतो. हिंदूंतहि वर्षप्रतिपदा, दिवाळी, इ. सणावारीं अभ्यंग-स्नान करण्याची चाल आहे. आजारीपणांत, आशौचकालांत, स्त्रियांच्या मासिक रजोदर्शनांत, उपवासाच्या दिवशीं, विद्यार्थीदशेंत आणि संन्यासी, बैरागी यांनी अभ्यंग करूं नये, असें सांगितलें आहे.

अभ्यातान होम एक काम्य होम. तै. सं. ३. ४. ५ मधील मंत्रांना अभ्यातान अशी संज्ञा आहे. देवांनी यज्ञांत या अभ्यातान मंत्रांनी होम केल्यामुळे त्यांचें कर्म समृद्ध झालें. म्हणून एखादें कर्म समृद्ध व्हावें, अशी इच्छा करणाऱ्याने हा होम करावा, असें सांगितलें आहे. बौ. श्रौ. सूत्रांत या होमाचें स्वतंत्र विधान आहे (१४. १६). हा होम जयहोमाप्रमाणेच इतर कर्मांच्या अनुषंगाने करायचा असतो. हा श्रौत व स्मार्त अशा दोन्ही प्रकारच्या कर्मांत करतात. [विद्याधरशास्त्री भिडे]

अभ्यावर्ती चायमान वैदिक काळांतला वीर योद्धा. हा पार्थव म्हणजे पृथूंचा सम्राट् होता (ऋ. ६. २७. ८). वृचीवंतांचा राजा वरशिख व अभ्यावर्ती या दोघांचें वितुष्ट येऊन युद्ध जुंपलें. त्यांत अभ्यावर्तीचा पाडाव झाला. या पराजयाने अभ्यावर्ती मनांत जळूं लागला. त्याने भरद्वाजाची भेट घेतली. भरद्वाज हा इंद्राचा कृपापात्र होता. त्याने आपला पुत्र पायु याच्या करवीं धनुष्य, बाण, कवच, इ. शस्त्रें अभिमंत्रित केलीं व तीं अभ्यावर्तीस दिलीं. मग इंद्राप्रीत्यर्थ यज्ञ केला. इंद्र सोमग्रहणासाठी तिथे आल्यावर भरद्वाजाने अभ्यावर्तीचा पक्ष घेण्याबद्दल इंद्राला गळ घातली. त्यावर अभ्यावर्तीला इंद्राचें साहाय्य मिळालें. त्याने मग वरशिखावर चढाई करून त्याला ठार केलें. हें निर्वाणीचें युद्ध हरियूपीया व यव्यावती या दोन नद्यांच्या कांठीं झालें (बृ. दे. ५. १२४–१४८; ऋ. ६. २७. ५). हरियूपीया म्हणजेच सांप्रत हरप्पा नांवाने ओळखलें जाणारें स्थान होय. अभ्यावर्तीला पार्थव असें म्हटलें आहे. पाश्चात्य विद्वानांच्या मतें याचा भारताच्या वायव्येस राहणाऱ्या पारसीकांशीं संबंध होता. वरील सूक्तांतच दैववात असें एक नांव येतें, तें अभ्यावर्तीचेंच दुसरें नांव असावें. [ऋ. द.; वै. सा. सं.; वे. इं.]

अभ्यास या शब्दाच्या निरनिराळ्या व्याख्या दिलेल्या आहेत—(१) 'पुनःपुनः संशीलनम्' = ध्येय वस्तूच्या ठिकाणीं मनाच्या स्थिरीकरणासाठी प्रयत्न करणें (सर्व द. सं. पृ. १२४). (२) 'पौनःपुन्यम्' = समाधि विशेष साधण्यासाठी पुनःपुनः प्रयत्न करणें (गौ. सू. ४.२.२६). (३) 'संस्कारबाहुल्यम्' = वस्तूवर सतत संस्कार करीत राहणें. (गौ. सू. वृ. ३.२.४२)

एखादा विषय चित्तांत दृढ होण्यासाठी त्याचें पुनःपुनः प्रतिपादन करणें, तीच गोष्ट पुनःपुनः सांगणें, याला अभ्यास म्हणतात. आरुणीने श्वेतकेतूला 'तत्त्वमसि' हें वाक्य नऊ वेळां सांगितल्यावर मग तें त्याला पटलें, असें छांदोग्य उपनिषदांत सांगितलें आहे. योगशास्त्रांत चित्त स्थिरीकरणाचा उपाय म्हणून अभ्यासाला महत्त्व दिलेलें आहे. एखाद्या विषयाचें तात्पर्य काय, याचा निर्णय करण्यासाठी देखील मीमांसा दर्शनांत अभ्यासाचा प्रमाण म्हणून उपयोग करतात.

अभ्युक्षण प्रोक्षण, अभ्युक्षण व अवोक्षण हे तीन्ही शब्द एखाद्या वस्तूवर पाणी शिंपडणें या अर्थाचे आहेत. याविषयीं पुढील श्लोक प्रसिद्ध आहे—

उत्तानेनैव हस्तेन प्रोक्षणं परिकीर्तितम् ।
न्यञ्चताभ्युक्षणं प्रोक्तं तिरश्चावोक्षणं स्मृतम् ।।

अर्थ—उताण्या हाताने प्रोक्षण, वाकलेल्या (पालथ्या) हाताने अभ्युक्षण व तिरक्या हाताने अवोक्षण केलें जातें.


पानें वाढल्यानंतर तुलसीपत्राने त्यांवर जें जलसेचन करतात, त्याला प्रोक्षण म्हणतात. श्राद्धविधींत फुलें, दर्भ, इ. वस्तूंवर जलसेचन करतात, त्याला अभ्युक्षण म्हणतात. अग्निमुखांत स्थंडिल तयार केल्यावर त्यावर जलसेचन करतात, त्याला अवोक्षण म्हणतात.

अभ्रि वैदिक काळांतलें कुदळीसारखें हत्यार. अथर्ववेदांत त्याचा अनेकदा उल्लेख येतो (४. ७. ५–६; १०. ४. १४). त्याचा दांडा बांबू, उदुंबर किंवा विकंकत या वृक्षांचा करीत. त्याचें अग्र वेगवेगळ्या धातूचें असे. कधी कधी त्याचीं दोन्ही टोकें धारदार असत (श. ब्रा. ६. ३. १. ३०.).

अमर (१) एक पर्वतराज्य. [मत्स्य. पु. ११३. ५६] (२) वाराणसींतलें हें एक शिवक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. [मत्स्य. पु. १८०. २६]

अमरकटक (१) मध्य प्रदेशांतील विलासपूर जिल्ह्यांतला पर्वत. इथन नर्मदा नदी उगम पावते. याचें दुसरें नांव मेकल असून त्यामुळेच नर्मदेला मेकलकन्यका असें नांव पडलें आहे. विंध्य आणि सातपुडा या पर्वतश्रेणींच्या मध्यभागीं मेकल पर्वत उभा आहे. कालिदासाने मेकलाला आम्रकूट म्हटलें आहे (मेघ.१७). कटनी-विलासपुर रेल्वे मार्गावरील पेंडरा स्टेशनापासून सात मलांवर हें ठिकाण आहे. इथे गिरिशिखरावरील एका कुंडांतून नर्मदेची लहानशी धार बाहेर येते व पुढे दोन मैल वाहून सत्तर फुटांवरून खाली पडते. या स्थानाला कपिलधारा म्हणतात. नर्मदेच्या उगमाजवळ कुंडाभोवती अमरनाथ, नर्मदा, इ. शैव-

वैष्णव मंदिरें आहेत. इथे कर्णमंदिर नांवाचें एक भग्न मंदिर असून वास्तुकलेच्या दृष्टीने तें अभ्यसनीय आहे.



अमरकंटक—नर्मदेचा उगम.

प्राचीनकाळीं अमरकंटकाच्या परिसरांत गोंडांचें राज्य होतें व रतनपुर नांवाची त्यांची राजधानी होती. पुढे हैहयवंशी राजांनी त्यांना जिंकलें. इथे जलेश्वर नांवाचें स्थान आहे. त्या ठिकाणीं केलेलें श्राद्ध विशेष फलप्रद होतें, असें वायु पुराणांत म्हटलें आहे (७७.१०–११). शिवाने बाणासुराचीं तीन पुरें जाळलीं, त्यांतलें दुसरें पुर या पर्वतावर होतें (मत्स्य पु. १८८. ७९). सूर्यचंद्रांच्या ग्रहणपर्वांत या स्थळाची यात्रा केल्याने अश्वमेधाहून दसपट पुण्य मिळतें (पद्म पु. आदि. १५. ७४-८०). अशा अनेक गोष्टींमुळे या क्षेत्राचें माहात्म्य वाढलें आहे. जगन्नाथ-पुरीच्या यात्रेला जातांना किंवा तिथून परत येतांना अमरकंट-काची यात्रा करण्याचा प्रघात आहे. मत्स्य पुराणांत या क्षेत्राची प्रशंसा पुढीलप्रमाणे केलेली आहे—

एवं भोगो भवेत्तस्य यो मृतोऽमरकण्टके ।
अग्नौ विषजले वापि तथा चैव ह्यनाशके ।।
अनिवर्ति गतिर्यस्य पवनस्याम्बरे यथा ।
पतनं कुरुते यस्तु अमरेशे नराधिप ।।

(१८६. ३४-३५)

अर्थ —जो कोणी अग्नि, विष, जल किंवा उपवास या साधनांनी या ठिकाणीं देह ठेवतो, त्याला (स्वर्गांत) विविध भोग मिळतात व जो या शिखरावरुन देहपात करतो, त्याला मोक्ष मिळतो.

पाहा—नर्मदा. [भारती १९५७ ; हि. ध.; व्रतराज]

(२) माल्यवताच्या शिखरावरील एक प्रसिद्ध टेकडी. इथे विशल्यकरणी नदी उगम पावते. हें क्षेत्र कलिंग देशाचा एक भाग आहे. इथे पितृश्राद्ध करण्याबद्दल सांगितलें आहे. ही अंगिरा ऋषीची तपोभूमि होती. [ब्रह्मांड पु. ३. १३.४-१६]

अमरकुंड आंध्रांतील एका नगराचें नांव. त्याच्या जवळ असलेल्या पर्वतावर एका देवालयांत ऋषभ आणि शांतिनाथ यांच्या मूर्ती आहेत.

अमरकोश उपलब्ध कोशग्रंथांत सर्वांत प्राचीन असा शब्दकोश. हा मुख्यतः अनुष्टुभ् छंदांत रच-लेला आहे. अमरसिंह हा याचा कर्ता होय. या कोशावर अनेक पंडितांनी टीका लिहिल्या आहेत. संस्कृत भाषेच्या अभ्यासकांना या कोशाचें किती महत्त्व वाटत होतें तें यावरून कळतें. मध्ययुगीन शिक्षणक्रमांत अमरकोश लहानपणींच मुलांकडून पाठ करून घेत. क्षीरस्वामीची (११ वें शतक) अमरकोशोद्घाटन ही टीका सर्व उपलब्ध टीकांत जुनी, प्रामाणिक व पांडित्यपूर्ण आहे. अमरकोशाचीं कांडें तीन असून त्यांत दहा हजार शब्द आहेत. पहिल्या कांडांत स्वर्वर्ग, व्योमा-दिवर्ग, कालवर्ग, धीवर्ग, शब्दादिवर्ग, नाट्यवर्ग, पातालभोगि-वर्ग, नरकवर्ग, व वारिवर्ग ; दुसऱ्या कांडांत भूमि, पुर, शैल, वनौषधि, इ. वर्ग व तिसऱ्या कांडांत विशेष्यनिघ्न, संकीर्ण, नानार्थ, इ. वर्ग आहेत. अमरकोशाला त्रिकांड व नामलिंगा-नुशासन अशींहि नांवें आहेत. शब्दाबरोबरच त्याचें लिंगहि कळावें, अशी सोय या कोशग्रंथांत केलेली आहे. **पाहा**—अमरसिंह.


अमरचंद्रसूरि (इ. स. १३ वें शतक) एक जैन कवि. गुजरातेंतील अनहिल पट्टनाच्या (पाटण) बीसल देवाचा हा सभापंडित होता. याने बालभारत नांवाचें ४४ सर्गांचें काव्य लिहिलें असून त्यांत संक्षेपाने महाभारतकथा वर्णिली आहे. याशिवाय याचे छंदोरचनावली व कलाकलाप असे आणखी दोन ग्रंथ आहेत. [सं. सा. इ.; म. च. को.]

अमरदास (१५०९–१५७४ इ. स.) शीखांचा तिसरा गुरु. याला १५५२ मध्ये अंगदशहाने आपल्या गादीचा वारस बनविलें. क्षमा आणि सहनशीलता या गुणांचा तो भोक्ता होता. जातिभेद मोडण्याविषयीं त्याचा प्रयत्न असे. तो आपले अनुयायी व येणारे पाहुणे यांना एका पंक्तीला जेवायला बसवी. ' कोणीहि जातीचा अभिमान बाळगूं नये; कारण त्यांतून अनेक पापें उद्भवतात. ब्रह्म जाणणारा तोच ब्राह्मण समजावा. संपूर्ण विश्व एकाच मातीचें घडलेलें असून

त्याच्या कुंभाराने म्हणजेच ईश्वराने स्वतःच्या इच्छेनुसार पात्राला वेगवेगळे आकार दिलेले आहेत,' अशा प्रकारचा उपदेश तो करी. याने सतीची चाल बंद पाडण्याचाहि प्रयत्न केला होता. तो म्हणे, 'प्रेताबरोबर स्वतःला जाळून घेते ती सतीच नव्हे. जी पतिवियोगाच्या क्षणींच त्या दुःखाने मरण पावते, तीच खरी सती होय. शिवाय मृत सतीचें सतत स्मरण ठेवून ज्या स्त्रिया विरक्त वृत्तीने दान-धर्मांत काळ घालवितात, त्याहि सतीच समजाव्या.'

अमरदासाच्या मनांत स्वतंत्र राज्य स्थापावें, असें होतें. पण त्याच्या अनुयायांना ती गोष्ट पसंत पडली नाही. राज्याच्या नादीं लागल्याने धर्म बुडतो, अशा कल्पनेने त्याचे अनुयायी त्याला सोडून नानकाचा नातू धर्मचंद याचे अनुयायी बनले. या नवीन शीखांच्या शाखेला उदासी व निर्मल अशीं नांवें आहेत. **पाहा** – उदासी.

अमरनाथ (१) काश्मीरमधलें एक विख्यात शिवक्षेत्र. श्रीनगरच्या ईशान्येस ८६ मैलांवर हें क्षेत्र आहे. ही एक निसर्गनिर्मित गुहा आहे. या गुहेंतलें शिवलिंग बर्फाचें बनलेलें आहे. हें शिवलिंग शुक्ल प्रतिपदेपासून हळूहळू वाढीस लागतें आणि पौर्णिमेस पूर्ण होतें; तसेंच वद्य प्रतिपदेपासून त्याची घट सुरू होते आणि अमावास्येला तें पूर्णपणें अदृश्य होतें, असें सांगतात. पण या आख्यायिकेंत तथ्य नाही. हें लिंग थंडीच्या दिवसांत आपोआप बनतें आणि थंडी संपल्यावर हळूहळू क्षीण होत असलें तरी पूर्णपणें कधीच नष्ट होत नाही. मात्र आश्चर्याची गोष्ट ही, की लिंग व त्याची पिंडी हीं दोन्ही घट्ट बर्फाचीं बनतात आणि गुहेच्या बाहेरचें सर्वत्र पसरलेलें बर्फ मात्र कच्चें आणि भुसभुशीत असतें. गुहेच्या वरच्या अंगास डोंगरावर रामकुंड असून त्यांतून ठिबकणाऱ्या थेंबांनी हें शिवलिंग बनतें, असें सांगतात.




अमरनाथ–हिमलिंग

या गुहेंत लिंगाशिवाय आणखी दोन विग्रह बर्फाचेच बनतात. त्यांना पार्वती व गणपति समजतात. अमरनाथ हें एक शक्तिपीठ असून तिथे सतीचा कंठ गळून पडला असल्याचें सांगतात.

गुहेच्या खालच्या अंगाला अमरगंगेचा प्रवाह आहे. हिला पंजतरणी म्हणतात. यात्रिक लोक या प्रवाहांत स्नान करून मग अमरनाथाच्या दर्शनाला जातात. श्रावण पौर्णिमेस इथे मोठी यात्रा भरते. हेच दिवस या यात्रेला जाण्यास सोयीचे असतात. पुढे या भागांत असह्य थंडी सुरू होते. श्रावण शु. ५ मीस श्रीनगराहून एक मोठा मेळा अमरनाथाकडे जायला निघतो. त्याच्या अग्रभागीं काश्मीरच्या शारदापीठाचे शंकराचार्य असतात. 'हर हर महादेव' अशी गर्जना करीत साधु, नागा महंत, बैरागी, गृहस्थ, असे सर्व लोक अमरनाथाचा पहाड चढूं लागतात. ज्यांना पायीं यात्रा करणें शक्य नसेल, त्यांच्यासाठी श्रीनगरला घोडीं मिळूं शकतात.

या गुहेंत कांही कबूतरें आहेत. त्यांना शिव-पार्वतीचीं रूपें समजतात. त्याविषयीं कथा अशी–– शिव एकदा पार्वतीला सृष्टीचें रहस्य समजावून सांगत होते. ती गोष्ट कबूतरांच्या



अमरनाथ गुंफा

एका जोडीने ऐकली व ती जोडी त्यामुळे अमर झाली. इथे जवळच आणखी एक गुंफा आहे. तिच्यांत भस्मासारखी माती मिळते. यात्रेकरू शिवाचा प्रसाद म्हणून ती माती आणतात. [कल्याण–तीर्थांक; मनोरम काश्मीर; भारती.]

(२) गोरक्षनाथाचा शिष्य आणि गहिनीनाथाचा गुरुबंधु. याचे अनुयायी महाराष्ट्रांत आढळतात (म. सा. ३११–३१२). याचें जीवनवृत्त अजून अंधारांतच आहे. निवृत्तिनाथांनी आपला परिवार सांगतांना 'गुरु गयनी अमर' असा याचा उल्लेख केला आहे. अमरनाथसंवाद नांवाचा याचा मराठी ग्रंथ अंशतः उपलब्ध आहे. यांत गुरुदत्त ज्ञान ग्रथित आहे हा ग्रंथ पद्याला जवळ असणाऱ्या गद्यांत लिहिला

आहे. यांतील दृष्टांत आणि प्रमेयें ज्ञानेश्वरींतल्या दृष्टांत-प्रमेयांशीं तंतोतंत जुळतात. त्यावरून वाटतें, की अमरनाथ व ज्ञानेश्वर या दोघांची परंपरा एकच असावी. या ग्रंथांत अजातवाद व मायावाद यांचें प्रतिपादन आहे. [गोरक्ष चरित्र आणि परंपरा]

अमरनीति तामिळनाडमधला एक नायन्मार. हा शिवभक्त गृहस्थ असून याचा मोठा व्यापार होता. एके दिवशीं शिवाने याची साधुवेषांत सत्त्वपरीक्षा घ्यायचें ठरविलें. त्याने आपली लंगोटी याच्याकडे ठेव म्हणून ठेवली; पण दुर्दैवाने ती हरवली. तिच्यासाठी साधु हटून बसला. शेवटीं तिच्या मोबदल्यांत आपली सर्व संपत्ति आणि बायकामुलेंसुद्धा साधूला देण्यास हा तयार झाला. तें पाहून शिवाने त्याला निजरूपांत दर्शन दिलें व कृतार्थ केलें. [पे. पु.]

अमरसिंह अमरकोश नांवाच्या सुप्रसिद्ध संस्कृत शब्दकोशाचा कर्ता. हा विक्रमाच्या नवरत्नांपैकी तिसरा होता. याच्या कालाबद्दल मतभेद आहेत. विल्सन याचा काल सनपूर्व १ लें शतक मानतो; तर अन्य संशोधक त्याला इ. स. च्या ३ ऱ्या किंवा ५ व्या शतकांतला मानतात. याच्या नांवापुढे सिंह उपपद असल्यामुळे हा क्षत्रिय असावा, असें वाटतें. हा जैन किंवा बौद्ध असावा, असेंहि म्हणतात. युआन च्वांग याच्या उल्लेखावरून याचा आश्रयदाता चंद्रगुप्त विक्रमादित्य असावा, असें वाटतें.

अमरावती (१) स्वर्गींतील इंद्राची राजधानी. ही मेरु पर्वताजवळ असून भव्यता व सौंदर्य यांविषयीं प्रसिद्ध आहे. या अमरावतींत सुधर्मा नांवाची देवसभा असून नंदनवन नांवाचें उद्यान आहे. अमृताची सांठवणहि याच ठिकाणीं आहे. ही नगरी कांही काल बलि दैत्याने जिंकून घेतली होती. इथे गंधर्व-अप्सरा वास्तव्य करतात व देवेंद्राची तसेंच पुण्यवंत राजर्षींची सेवा करतात. इथलें वातावरण नृत्य–गायनाने धुंद असतें. इथें पुण्यवंतांना सर्व प्रकारचे सुखोपभोग यथेष्ट मिळतात (म. भा. वन ४३). **पाहा**–इंद्र, स्वर्ग.

(२) भारतसरकारच्या पुरातत्त्व विभागाने आंध्रप्रदेशांत कृष्णा व गुंटूर जिल्ह्यांत अनेक ठिकाणीं उत्खनन केलें असून त्याचें फल म्हणून आंध्रांतल्या कित्येक बौद्ध तीर्थांचा पत्ता लागला आहे व कांही प्राचीन बौद्ध स्तूप उघडकीस आले आहेत. प्राचीन काळीं कृष्णा नदीच्या तीरावर अमरावती, जग्गय्यपेट, घंटसाला, गुम्मडिपर्रू, भट्टिप्रोलु, इ. प्रसिद्ध बौद्ध क्षेत्रें होतीं. या सर्वांत अमरावती हें महाक्षेत्र ठरतें.

हें क्षेत्र गुंटूर जिल्ह्यांतल्या सत्तनपल्ली तालुक्यांतलें एक खेडें असून तें कृष्णेच्या तीरावर आहे. याच्या उत्तरेस जवळच धरणीकोट किंवा धान्यकटक नांवाचें एक नगर प्राचीनकाळीं नांदत होतें. अमरावती हें ठिकाण एका बौद्ध स्तूपामाठी आता जगप्रसिद्ध झालें आहे. भारतीय बौद्ध कलेच्या इतिहासांत अमरावती हें एक मोठेंच प्रकरण आहे. बौद्ध युगांतल्या आंध्रांनी बुद्धाला भक्तिभावाने जी एक शिल्पसंपदा समर्पित केली, ती म्हणजे अमरावतीचा स्तूप ही होय. आंध्र बौद्धांनी या स्तूपाच्या रूपाने आपल्या शिल्पकौशल्याचा व चित्ररचनेचा जगाला परिचय करुन दिला आहे. बौद्ध युगांतल्या आंध्र संस्कृतीच्या ज्ञानासाठी अमरावतीस्तूप हा एक मणिदर्पण आहे. भारतांतल्या बौद्धकलासंप्रदायांत अमरावतीला आगळें स्थान आहे.

१९ व्या शतकाच्या प्रारंभीं गांवांतल्या एका जमिनदाराच्या नोकरांनी तिथली एक टेकडी खोदली आणि आश्चर्याची गोष्ट ही, की तींतून सहजगत्या हा स्तूप बाहेर आला. मग इ. स. १८८० सालीं इथे मोठ्या प्रमाणावर उत्खनन झालें व हा स्तूप चारी अंगांनी मोकळा करण्यांत आला. हा स्तूप संगमरवरी विटांनी रचित असून त्याच्या भोवती दोन प्राकार आहेत. बाहेरचा प्राकार अधिक जुना असून त्याची उंची सुमारें १४ फूट आहे. आंतला प्राकार ६ फूट उंचीचा असून त्याच्या जोत्यावर स्त्री–पुरुष, मुलें व अनेक गमतीदार प्राणी, यांचीं चित्रें आहेत. संगमरवरी विटा व दोन्ही प्राकारांचे सर्व दगड उठावदार नक्षीने भरलेले आहेत. स्तूपाचा व्यास १३८ फूट व बाहेरच्या कठड्याचा परिघ ८०३ फूट आहे. एकट्या बाहेरच्या कठड्यावर कोरलेल्या आकृतीच सुमारें १४००० असाव्या असा अंदाज आहे. आंतल्या कठड्यावरच्या आकृती तर त्याहून जास्त असाव्या.




श्रीवत्सांकित स्तूप अमरावती

अमरावतीचे हे आकृतियुक्त कठडे म्हणजे शल्पविद्येंतले एक महदाश्चर्यच होय. आजच्या भग्न, त्रुटित अवस्थेंतहि ते धर्म व कला यांच्या इतिहासाला मोठीच साधनसामग्री पुरवितात. मुख्य स्तूप सनपूर्व २०० च्या पूर्वी बनला असावा, असें कांहीं शिलालेखांवरून वाटतें. बाहेरचा कठडा इ. स. च्या दुसऱ्या शतकांतला आहे. तो पुलुमायी व यज्ञश्री या आंध्र राजांनी उभा केला. आंतला कठडा इ. स. ३०० च्या नंतरचा असावा.

इथल्या पाषाणशिल्पांचा काल गांधारशैली व सांची-शैली यांच्या मधला आहे, असें कलादृष्टीने म्हणतां येतें. प्रारंभीं बुद्धाच्या मूर्ति बनवीत नसत. फक्त कांही चिन्हांनी बुद्धाचें अस्तित्व दर्शवीत. पण गांधारकलेने बुद्धाला त्याच्या चरित्रांतील प्रसंगानुसार चित्रांकित केलें. अमरावतीच्या शिल्पांत सांचीप्रमाणे बुद्धाचीं प्रतीकेंहि आहेत. व गांधारशैली-प्रमाणे बुद्धाच्या मूर्तीहि आहेत. अमरावतीच्या कांही सुंदर मूर्ति आजमितीस मद्रास येथील वस्तुसंग्रहालयांत ठेवलेल्या आहेत.

बौद्ध युगांत कृष्णानदीच्या तीरावर जी कलाक्षेत्रें निर्माण झालीं, तीं निर्मिणाऱ्या सर्व कलाकारांनी अमरावतीचेंच अनुकरण केलें आहे. बौद्ध युगांतल्या आंध्र संस्कृतीच्या रूपदर्शनासाठी अमरावती हा एक मणिदर्पण आहे. तें आंध्र-संस्कृतीवरचें चित्रव्याख्यान आहे. बौद्धकलासंप्रदायांत अमरा-वतीचा कलासंप्रदाय सर्वोत्कृष्ट समजला जातो. या ठिकाणीं ब्राह्मी लिपींतले पुष्कळ शिलालेखहि सापडले आहेत. डॉ. बर्जेस यांनी त्यांपैकी कांहींचें वाचनहि केलें आहे. [मलिपल्लि सोमशेखर शर्मा; एन्सा. रि. ए.; द. भा.]

(३) विदर्भांतलें एक नगर. अंबेच्या मंदिरामुळे प्राचीन काळापासून या शहराला महत्त्व प्राप्त झालें आहे. अमरावतीच्या पूर्वेस चौदा कोसांवर कौंडण्यपुर नांवाचें एक खेडें आहे. तिथे अंबादेवीचें स्वयंभू स्थान आहे त्याच्या आसपासच्या वस्तीला अंबिकापुर म्हणत. त्या भागांत उंबराचीं झाडें विपुल असल्यामुळे पुढे त्याला उंबरमती हें नांव मिळालें. त्याचेंच पुढे उमरावती किंवा अमरावती



एकवीरा देवी अमरावती

असें रूपांतर झालें असावें. मध्यंतरीं या नगराचा महिम लुप्तप्राय झाला होता. पुढे १८ व्या शतकांत नागपूरचे श्रीमंत रघूजी भोसले यांच्या राजवटींत या नगराला पुनश्च ऊर्जिता-वस्था प्राप्त झाली. जुनें अमरावती शहरहि समृद्ध व व्यापारी ठाणें असावें. कारण त्या नगराच्या रक्षणार्थ सभोवती सुमारें २६ फूट उंचीचा भक्कम तट बांधलेला आहे. अंबेचें देवालय या तटाच्या बाहेर असून बरेंच प्रशस्त आहे. मंदिराच्या दक्षिणेस एक नाला वाहतो. त्याच्या पैलतीरावर एकवीरा देवीचें मंदिर आहे.

विदर्भराजकन्या रुक्मिणी हिची अंबा ही उपास्यदेवता होती. या देवीच्या दर्शनासाठी रुक्मिणी आली असतां इथूनच श्रीकृष्णाने तिचें हरण केलें, असें सांगतात. [शकुंतला दिवाणजी]

अमरु (इ. स. ७०० चा सुमार) एक संस्कृत कवि. याचें अमरुशतक नांवाचें शतश्लोकी प्रणयकाव्य प्रसिद्ध आहे. शंकराचार्यांनी ज्या मृत राजाच्या देहांत प्रवेश केला, त्या राजाचें नांव अमरु होतें, असें शांकरदिग्विजयांत म्हटलें आहे. अमरूच्या देहांत प्रवेश केल्यानंतर वात्स्यायनाच्या सूत्रांच्या आधारें शंकराचार्यांनी कामशास्त्रांतील विविध अवस्था व प्रसंग यांविषयीं हे शंभर श्लोक लिहिले, अशी आख्यायिका आहे. वामन व आनंदवर्धन यांनी अमरूचे श्लोक उद्धृत केले आहेत.

अमरुशतक ही संस्कृत प्रणयकाव्यांतली सर्वश्रेष्ठ स्फुट रचना आहे. दीर्घ व नादमधुर वृत्तरचना हा त्याचा विशेष आहे. सर्व साहित्यशास्त्रज्ञ शृंगारचर्चेसाठी अमरूला उपजीव्य मानतात. अमरूच्या मतें प्रणय ही सर्वंकष देवता आहे. प्रणयाची हलक्या हाताने छेडलेली तार जर कुठें ऐकूं येत असेल, तर ती अमरुशतकांत! कल्पना व्यक्त करण्याच्या दृष्टीने त्याचा प्रत्येक श्लोक सुटसुटीत व संपूर्ण आहे. एका मुग्धेचें पुढील शब्दचित्र पाहा —

मुग्धे मुग्धतयैव नेतुमखिलः कालः किमारभ्यते
मानं धत्स्व धृतिं बधान ऋजुतां दूरे कुरु प्रेयसि ।
सख्यैवं प्रतिबोधिता प्रतिवचस्तामाह भीतानना
नीचैः शंस हृदि स्थितो हि ननु मे प्राणेश्वरः श्रोष्यति ।।

अर्थ– ‘ हे मुग्धे, तूं आपला सगळा वेळ मुग्धपणांतच (भोळेपणा) कां घालवतेस ? अग प्रेमिके, जरा रुसवा धर, धैर्य बांध व आर्जव दूर ठेव. ’ अशाप्रकारें सखीने उपदेशिलेली प्रेयसी मुद्रेवर भय दाखवीत सखीला प्रतिवचन बोलली. ‘ अग, हळू सांग ! हृदयांत बसलेला माझा प्राणेश्वर ऐकेल ना ! ’

अमरु कवीच्या प्रेमवर्णनाचा विशेष लक्षांत घेण्याजोगा आहे. पुरुष प्रेमाशीं प्रतारणा करील, तो स्वार्थी व चंचलहि बनेल; पण स्त्रीचें प्रेम मात्र पवित्र, अविचल व निःस्वार्थ असतें, असें तो मानतो. तत्कालीन संस्कृत वाङ्मयांत स्त्रियांच्या प्रेमाला चंचल, स्वार्थी व अविश्वसनीय असें म्हणण्याची पद्धत रूढ असतांना, अमरूनेच मात्र वेगळा दृष्टिकोन मांडावा, हें त्याला भूषणावह आहे. अमरूनंतर त्याचें अनुकरण करणारीं कितीतरी शृंगारशतकें निर्माण झालीं; पण तरीहि त्याच्या काव्यांतली हृदयंगमता कमी झालेली नाही. अमरूबरोबर भर्तृहरीची तुलना केली जाते. तोहि एका शृंगारशतकाचा कर्ता आहे. प्रणयाची विचारमग्नता व खेदजनक नैराश्य या गुणांत भर्तृहरि वरचढ असला; तरी भावनेचा हळुवारपणा, तिच्यांतली तळमळ व विकास यांच्या चित्रणांत अमरूचा हात धरणारा कोणी नाही. **पाहा–** भर्तृहरि. [सं. सा. सो. इ.]

अमलानंद

(१३ वें शतक) याचें जन्मस्थान निश्चित नाही. हा देवगिरीच्या यादवांच्या राज्यांत राहत होता. हा अद्वैतमताचा समर्थक असून वेदान्तकल्पतरु, शास्त्रदर्पण, व पंचपादिकादर्पण, असे याचे तीन ग्रंथ आहेत. त्यांवरून याची प्रगाढ विद्वत्ता कळून येते. [हिंदुत्व]

अमहीयु आंगिरस

एक सूक्तद्रष्टा. याने पवमान सोमाची स्तुति केली आहे (ऋ. ९. ६१).

अमात्य

राज्याच्या सात अंगापैकी दुसरें अंग म्हणजे अमात्य होय. राज्यकारभारांतला मंत्री किंवा सचिव या अर्थीं हा शब्द आप. धर्मसूत्रांत प्रथम आढळतो (२. १०. २५. १०). मनुस्मृति (७. ५५) व कौ. अर्थशास्त्र (१. ७) यांत अमात्याची आवश्यकता पुढीलप्रमाणे सांगितली आहे– एकटा राजा सर्व राज्यकारभार पाहूं शकत नाही, म्हणून त्याने अमात्य योजावा. या अमात्याच्या अंगीं पुढील गुण असावे–

तो देशांत जन्मलेला, उच्चकुलोत्पन्न, प्रभावशाली, कलाभिज्ञ, दूरदर्शी, चतुर, दक्ष, हजरजबाबी, सदाचरणी, निरोगी, सशक्त व निष्ठावंत असावा. त्याची स्मरणशक्ति तीव्र, वागणें सौजन्यपूर्ण व वृत्ति प्रेमळ असावी. महाभारतांत विशेष गुण सांगितला आहे तो म्हणजे अमात्याला पौर-जानपदांचा विश्वास संपादन करतां आला पाहिजे (म. भा. शांति. ८३. ४६).

अमात्यपद वंशपरंपरेने चालत नसे. मुलगा बापाइतकाच कर्तबगार व वरील गुणांनी युक्त असेल, तरच त्याला अमात्य नेमावें, असें बहुतेकांचें मत आहे (मनु ७. ५४; याज्ञ. १. ३१२; म. भा. सभा. ५. ४३). ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांतूनच अमात्य निवडावे, असें शुक्रनीतीसार (२.४२६–२७) व नीतिवाक्यामृत (१०८) यांत सांगितलें आहे.

अमात्यकर्तव्यें –– राजाने अमात्य मंडळाशीं विचारविनिमय करावा, आपत्कालीं मंत्र्यांनी बहुमताने दिलेल्या निर्णयानुसार वागावें, राजा वाममार्गानें जाऊं लागला, तर त्याला जागृत करावें, बेजबाबदारपणा करीत असेल तर त्याचा तोल सांभाळावा व राजानेहि अमात्य हे आपले गुरुच आहेत असें मानावें, असा कौटिल्याचा उपदेश आहे (अर्थ. १. १५). शांतता, सुरक्षा, आय-व्यय, सेना, कोश, देश, आत्मरक्षण, इ. विषयासंबंधीं अमात्यांचा सल्ला घेऊनच राजाने कारभार करावा, असें मनु म्हणतो (७. ५६, ५९). शुक्रनीतिसारांत अमात्य मंडळाचीं नांवें व कार्यें पुढीलप्रमाणे सांगितलीं आहेत–

कार्याकार्यप्रविज्ञाता स्मृतः प्रतिनिधिस्तु सः ।
सर्वदर्शी प्रधानस्तु सेनावित्सचिवस्तथा ॥
मन्त्री तु नीतिकुशलः पण्डितो धर्मतत्त्ववित् ।
लोकशास्त्रनयज्ञस्तु प्राड्विवाकः स्मृतः सदा ॥
देशकालप्रतिज्ञाता ह्यमात्य इति कथ्यते ।
आयव्ययप्रतिज्ञाता सुमन्त्रः स च कीर्तितः ॥

अर्थ– कार्याकार्य जाणणारा तो प्रतिनिधि. सर्व गोष्टींचें यथायोग्य आकलन करणारा तो प्रधान. सैन्यव्यवहार जाणणारा तो सचिव. नीतिकुशल तो मंत्री. धर्मतत्त्व जाणणारा तो पंडित. लोकव्यवहार व कायदेकानू जाणणारा तो प्राड्विवाक. देश-काल ओळखून कार्याचें धोरण आंखणारा तो अमात्य. व नफा-तोटा जाणणारा अर्थशास्त्रज्ञ तो सुमंत्र होय.

वरील मंत्रिमंडळ हें आठ जणांचें आहे. अमात्यांची संख्या किती असावी, याविषयीं मतभेद आहेत. कोणी ही संख्या तीन ते चार पर्यंतच मर्यादित ठेवतात, तर कोणी ती आठ ते दहा पर्यंत वाढवितात. रामायणांत दशरथाच्या मंत्र्यांची संख्या आठ दिलेली आहे (वा. रा. १. ७. २–३). इतिहासकाळांत छत्रपति शिवाजीने अष्टप्रधानांची प्रथा सुरू केली होती. ही कल्पना त्याने रामायणावरून किंवा शुक्रनीतिसारावरून घतली असावी.

महाभारत, अर्थशास्त्र व नीतिवाक्यामृत या ग्रंथांवरून अमात्यमंडळ तीन प्रकारचें असावें असें वाटतें – (१) तीन किंवा चार मंत्र्यांचे महत्त्वाचे निर्णय घेणारें एक अंतरंग मंत्रिमंडळ, (२) सात किंवा आठ मंत्र्यांची एक मंत्रिपरिषद् व (३) राज्यांतल्या वेगवेगळ्या भागांतील उच्च अधिकाऱ्यांसह बनणारी मंत्रिमहासभा.

इतिहासकाळांत शिशुनाग वंशापासून शुंगकालपर्यंत कर्तबगार आणि श्रेष्ठ अशा अमात्यांचीं अनेक नांवें आढळतात. अजातशत्रूचा वर्षकार, विड्डभाचा दीर्घचारायण, उदयनाचा यौगंधरायण, चंद्रगुप्त मौर्याचा चाणक्य, अशोकाचा राधगुप्त, पालकाचा पिशुन, ब्रह्मदत्ताचा बाभ्रव्य हे प्रधानामात्य सुप्रसिद्ध आहेत. यांना आर्यब्राह्मण असेंहि म्हणत. राजाप्रमाणेच यांचें व्यक्तिमत्त्वहि प्रभावशाली होतें. कुशाणकालांत मंत्रिपरिषदेचें स्पष्ट चित्र आढळत नाही; पण गुप्तसम्राटांच्या काळांत मंत्रिपरिषद् व तिचा अध्यक्ष या नात्याने प्रधान मंत्री यांना पुनश्च पुराणकालीन गौरव प्राप्त झाला. [हि. ध.; हिं. पॉ.; कादं. ए. अ.]

अमानत (१८२१ – १८६५ इ. स.) लखनौचा एक सुप्रसिद्ध कवि. उर्दू प्रेमकाव्यांत वासोख्त नांवाचा एक पद्यप्रकार आहे. वासोख्त याचा अर्थ तळतळाट असा होतो. यांत दुसऱ्याच्या नादीं लागलेल्या प्रेयसीविषयीं प्रियकराच्या असह्य वेदना व तळतळाट व्यक्त झालेले असतात. जिचें मन विचलित झालें आहे, अशा प्रेयसीचें वर्णन अमानतने पुढीलप्रमाणे केलें आहे –

रूठकर मैं जो कभी पाससे हट जाता था
हाथ फैलाके गलेसे वो लिपट जाता था

अर्थ – मी जर कधी एखाद्या वेळीं रुसून तिच्यापासून दूर झालों, तर ती हात लांब करून माझ्या गळ्याला मिठी मारायची. पण हाय !

आयिनेसे वो दो चार आठ पहर रहने लगी
शौक़ खुदबीनीका मंजुरे नज़र रहने लगी

अर्थ – ती आता तासन् तास आरशासमोर उभी राहून स्वतःचें कौतुक करूं लागली.

पलकें झपकाके हज़ार आफ़तें ढायीं उसने
लाख छुरियां दिले आशिक पे लगायीं उसने

अर्थ – ती आता खिडकींत बसून येणाऱ्या जाणाऱ्याकडे पाहूं लागली. मधुर गीतें गुणगुणूं लागली. आपल्या पापण्यांच्या उघडझापांनी ती लोकांचीं हृदयें घायाळ करूं लागली.

अमानतने लिहिलेलें हें प्रणयकाव्य आपल्या माधुरीमुळे गेलीं सव्वाशें वर्षें रसिकांच्या जिभेवर नाचत आहे. [उर्दू काव्याचा परिचय]

अमालद एक प्राचीन मानवगण. मालद किंवा मानद असेंहि नांव आढळतें. यांचें जनपदराज्य होतें. हे लोक भारताच्या पूर्व भागांत राहणारे होते व भीमाने आपल्या दिग्विजयाच्या मोहिमेंत यांचा पराभव केला होता, असें महाभारतावरून कळतें. बंगालमधील मल्दह या नांवाने सांप्रत ज्ञात असलेल्या प्रदेशांत हे लोक राहत असावे. वायुपुराणांतहि पूर्वेकडील जनपद असाच यांचा उल्लेख आहे. [क. हि. वा. पु.]

अमावसु पितरांपैकी एक. हा रूपाने अत्यंत सुंदर; पण इंद्रियनिग्रही होता. पितरांची मानसकन्या अच्छोदा ही याच्यावर भाळली, तरीहि हा ब्रह्मचर्यापासून ढळला नाही. ही वार्ता पितरांस कळल्यानंतर त्यांनी याची स्तुति केली व मासाची शेवटची तिथि याच्या नांवें सर्व पितरांना प्रिय होईल, असा त्याला वर दिला. तेव्हांपासून त्या तिथीला अमावास्या असें म्हणूं लागले. **पाहा** – अमावास्या. [मस्त्य पु. १४]

अमावस्यका षोडशपत्र कमलावरील एक शक्तिदेवता. [पु. इं.]

अमावास्या अमा + वस् = अमा सह वसतश्चन्द्रार्कौ यस्यां सा = अमा अर्थात् सहितत्वाने (एका नक्षत्रीं) ज्या तिथीस चंद्र-सूर्य राहतात, ती तिथि (हलायुध). चांद्रमासाचा शेवटचा दिवस. ' सूर्याचन्द्रमसोर्यः परः सन्निकर्षः सामावस्या ' = सूर्य-चंद्रांच्या परम सान्निध्याला अमावास्या म्हणावें, असें गोभिल सांगतो.

अमा षोडशभागेन देवि प्रोक्ता महाकला ।
संस्थिता परमा माया देहिनां देहधारिणी ।।

(स्कंद पु. प्र. खं.)

अर्थ – चंद्रमंडलाची सोळावी कला (अर्थात् अमावास्या) ही क्षयोदयादि रहित असल्यामुळे ती महाकला म्हटली जाते. ती प्राण्यांचे देह धारण करणारी परम माया आहे.

पंचांगांत ही तिथि ३० या आंकड्याने दर्शवितात. अमावास्या हें नांव ज्योतिषाच्या प्रगतीचें दर्शक आहे. त्यापूर्वीं दर्श हा शब्द होता. दर्श म्हणजे अमावास्येनंतरची चंद्रदर्शनाची प्रतिपदा होय. अमावास्या शब्द ऋग्वेदांत नाही.

विधिविधान – अमावास्या ही स्वभावतः अशुभ तिथि आहे. म्हणून नित्यकर्माव्यतिरिक्त अन्य कर्मास ती वर्ज्य मानतात सोमवारीं, मंगळवारीं व गुरुवारीं, तसेंच अनुराधा, विशाखा, स्वाती, या नक्षत्रांवर ती आल्यास विशेष पवित्र समजतात. सोमवारीं आल्यास हिला सोमवती असें म्हणतात व त्या तिथीस स्त्रिया अश्वत्थाची पूजा करून त्याला १०८ वस्तु समर्पण करतात. भाद्रपद अमावास्येस सर्वपित्री म्हणतात व त्या दिवशीं सर्व पितरांच्या उद्देशाने श्राद्ध करतात. मांत्रिक

लोक मंत्रसाधनेसाठी ही रात्र पसंत करतात. दृष्टिदोषावर मंत्र, तंत्र, गंडे, दोरे, या दिवशीं करतात. वडार वगैरे कांही कारुनारू लोक अमावास्येला हत्यारांची पूजा करतात. कापणी, मळणी, पेरणी करीत नाहीत. नवे वस्त्रालंकार धारण करीत नाहीत. धान्य, पैसे वगैरे संपत्तिदर्शक वस्तु दुसऱ्यांना देत नाहीत. अनाध्याय पाळतात. साधु, पीर, यांच्या समाधीचें दर्शन घेतात. प्रत्येक अमावास्येस श्राद्ध करण्याची प्रथा दक्षिणेंत एका काळीं होती. अमावास्येचें मूर्तिध्यान हेमाद्रीने पुढीलप्रमाणे सांगितलें आहे ––

अमावास्या विधातव्या द्विर्दोर्मरकतप्रभा ।
दर्भासनस्थिता चेयं दर्भपिण्डधरा कृशा ।।

अर्थ – द्विभुज, मरकतमण्याच्या कांतीची, दर्भासनावर बसलेली, दर्भमुष्टि धारण करणारी व कृश अशी अमावास्येची मूर्ति करावी.

अमायां च नदीस्नानं पुनात्यासप्तमं कुलम्

अर्थ – अमावास्येच्या दिवशीं नदींत स्नान केल्याने सात कुळें पुनीत होतात.

बंगालमध्ये अमावास्येला सूर्यपूजा व उपवास करण्याची पद्धत आहे. त्या व्रताची कथा अशी ––

एक गरीब ब्राह्मण होता. त्याला सूर्याची भक्ति होती. त्याच्या एकुलत्या एक मुलाचें लग्न चालू असतां तो मुलगा मरण पावला. त्या धसक्याने ब्राह्मणहि मेला. सास्वा–सुना विधवा झाल्या. कसेबसे दिवस कंठूं लागल्या. एके दिवशीं सूर्य तरुण ब्राह्मणाच्या रूपाने त्यांच्या घरीं आला. त्याने मृतपुत्राचें वस्त्र नेसायला आणि ताट जेवायला मागितलें. सासूने तसें केलें. सूर्य मग सासूला म्हणाला, ‘आज रात्रीं सुनेला माझ्याकडे पाठव. आश्चर्यांत पडूं नको. तुझा पुत्र हा माझाच अवतार होता.’ मग सून रात्रौ त्याच्याकडे गेली. तसेंच पुढे चालू राहिलें. सूर्य रात्रभर तिच्यासह राही व पहाटे निघून जाई. मग एकदिवस सासूने आपलें दारिद्र्य त्याला सांगितलें. सूर्याने तिला ओंजळभर मोत्यें दिलीं; पण सुनेने तीं फेकून दिलीं. तिथे झाडें उगवलीं आणि त्यांना मोत्येंच मोत्यें लागलीं. सूर्याने तिला तीं खुडून बाजारांत विकायला सांगितलें. सासूने तसें केलें. तिला खूप द्रव्य मिळालें. तिने त्या द्रव्यांतून सूर्याचें देऊळ बांधलें. पुढे एक दिवस सूर्य तिच्या घरीं आला असतां सासूने त्याला खोलींत कोंडून घातलें. त्यामुळे सकाळ झाली तरी सूर्य उगवला नाही. साऱ्या सृष्टींतला अंधार तसाच राहिला. मग देव तिच्याकडे आले व त्यांनी तिला सर्व परिस्थिति समजावून सांगितली. मग सासूने सूर्याला खोलीबाहेर काढलें. सूर्य म्हणाला, ‘या बाईचा अन्याय नाही. मला तसा शापच होता, तो आज भोगून संपला.’ मग सूर्याने सास्वासुनांना आपल्या बरोबर घेऊन रथावर बसविलें. तो दिवस अमावास्येचा होता. त्या दिवसापासून संपत्ति मिळावी म्हणून लोक अमावास्येला सूर्यपूजा व उपवास करूं लागले. [हिं. हॉ. से.]

अमावास्यापयोव्रत अमावास्येस फक्त दूध पिऊन राहणें व विष्णुपूजा करणें असा याचा विधि आहे. व्रतावधि एक वर्ष. [हे. व्र.]

अमावास्याव्रत तिथिव्रत. शिवार्पणबुद्धीने दान व ब्रह्मदेवाच्या संतोषासाठी तीन ब्राह्मणांची पूजा, असा याचा विधि आहे. [हि. ध.]

अमितगति (११ वें शतक) जैनांच्या दिगंबर संप्रदायांतील माथुर संघांतला एक सुप्रसिद्ध कवि व ग्रंथकार. परमार वंशांतल्या वाक्पतिराज मुंज या राजाच्या दरबारांतला हा सुप्रसिद्ध विद्वान् होता. याने अनेक ग्रंथ लिहिले असून ते सगळे संस्कृतांत आहेत. त्यांचीं नांवें अशीं –

(१) सुभाषितरत्नसंदोह – यांत विषयनिराकरण, इंद्रिय निग्रहोपदेश, स्त्रीगुणदोषविचार, इ. ३२ प्रकरणें असून तीं सुंदर सुभाषितांनी भरलेलीं आहेत. (२) धर्मपरीक्षा – यांत हिंदूंच्या पुराणकथांची टवाळी करून त्यांना अविश्वसनीय ठरविलें आहे. (३) श्रावकाचार – याचे १० परिच्छेद असून त्यांत श्रावकांचे आचार संपूर्ण सांगितले आहेत. वरील तीन ग्रंथांमुळे त्याला जैन साहित्यांत मानाचें स्थान मिळालें आहे. [जै. सा. इ.]

अमितप्रभ एक बोधिसत्त्व. याचें ध्यान असें-वर्ण शुभ्र किंवा रक्त. चिन्ह कलश. शुभ्र वर्णाचा असतांना तो वैरोचनाचा व लाल वर्णाचा असतांना अमिताभाचा पुत्र मानला जातो. याच्या मस्तकीं अमृत कलश असतो, तर कधीं तो त्याच्या डाव्या हातांत असतो. [इं. बु. इ.]

अमिताभ (१) अमिताः आभाः यस्य = ज्याचे प्रकाश अगणित आहेत असा. ध्यानी बुद्धांतला एक प्रमुख. याचें वर्णन –

पश्चिमे दले रविमण्डलोपरि रक्तह्रीकारसम्पुटो
रक्तवर्णोऽमिताभः पद्मचिह्नसमाधिमुद्राधरः......

(अद्वयवज्रसंग्रह)

अर्थ – (सुखावतीच्या) पश्चिम अंगाला रक्तशोभायुक्त करसंपुट असलेला, रक्तवर्ण, पद्म व समाधिमुद्रा धारण करणारा अमिताभ……

शिरोलांच्छन कमळ. वाहन मयूरयुग्म. हा सुखावती नामक दिव्य लोकाचा अधिपति असून सदैव ध्यानावस्थेत राहतो. चालू भद्रकल्पाचा तो अध्यक्ष आहे. पद्मपाणि हा बोधिसत्त्व याच्या पासून उत्पन्न झाला असून तोच चालू कल्पांतला सर्व सृष्टिव्यवहार करतो. अमिताभाचा मंत्र असा – 'ॐ आः आरोलिक हुम् ।'

अमिताभाविषयीं बौद्ध साहित्यांतली कथा अशी –

हा प्राचीन काळीं धर्माकर नांवाचा भिक्षु होता. त्याला बुद्धत्व प्राप्त झाल्यावर दहा कल्प लोटून गेले. त्याचें अंतर्धानहि पुढें अनंत काळाने होणार आहे. याने असा निर्धार केला होता, की 'मी बुद्ध झाल्यावर अतिशय शुभ असें एक बुद्धक्षेत्र निर्माण करीन.' त्या प्रमाणे त्याने सुखावती नांवाचा दिव्यलोक निर्माण केला. या लोकांत सुखाची अनंत सत्ता विद्यमान आहे. तिथे बुद्धत्वाची आकांक्षा धरणारे अनेक बोधिसत्त्व त्याचा उपदेश श्रवण करीत असतात. जपानमध्ये अमिताभ अमिदो या नांवाने प्रसिद्ध आहे. **पाहा** – सुखावतीव्यूह. [इं. बु. इ.]

(२) सावर्णि मन्वन्तरांतला एक देवगण.

(३) रैवत मन्वन्तरांतील एक देवगण. [पु. इं.]

अमितायु अमिताभ या ध्यानी बुद्धांतल्या प्रमुखाचा अवतार. बौद्धांच्या उत्तरकालीन सगुणोपासनेचें एक रूप. मध्ययुगीन काळांत भारतांत याची उपासना बरीच वाढली होती. श्री. वॅडेल याला अनेक बौद्ध मंदिरांतून त्याचे अवशेष सांपडले आणि त्यानेच या मूर्तीकडे लोकांचें लक्ष वेधलें. अमितायु म्हणजे ज्याचें आयुष्य अपरिमित आहे असा. अशा प्रकारच्या दीर्घायु मुनींची उपासना तिबेटी बौद्ध संप्रदायांत चालू आहे. तिथल्या प्रत्येक मंदिरांत त्याची प्रतिमा आढळते. तो आयुष्य वाढविणारा म्हणून तिथल्या लोकांना पूज्य ठरला आहे. मंत्रतंत्रांतहि त्याचा उपयोग करतात. रस्त्याच्या कडेच्या दगडांवरहि त्याच्या मूर्ती कोरतात. याची प्रतिमा अमिताभा-प्रमाणेंच असते; पण त्याला निरलंकृत न दाखवितां तेरा अलंकारांनी भूषवितात. शिवाय त्याच्या हातांत अमृतपात्रहि असतें. सुखावतीव्यूह हा बौद्धांचा स्वर्ग असून अमितायु हा त्याचा स्वामी आहे. त्याच्या नामस्मरणाने आणि मृत्युसमयीं केलेल्या ध्यानाने स्वर्गप्राप्ति होते, असा बौद्धांचा विश्वास आहे. अमितायुर्ध्यानसूत्र या नांवाचा एक ग्रंथ असून त्यांत त्याच्या ध्यानाने प्राप्त होणाऱ्या अलौकिक फलांचें वर्णन आहे.

अमियरस एक यौगिक धारणा. यालाच अमृत किंवा सोमरस अशींहि नांवें आहेत. सहस्रदल कमलाच्या मध्यभागीं चंद्रबिंदु असतो. त्यांतून एक प्रकारचा स्राव गळून तो खालीं मलाधार चक्रापर्यंत येतो व शरीरांतल्या अन्न-रसांत मिश्रित होतो. यालाच अमियरस असें नांव आहे. 'रसगगन गुफासे अजर झरै' (=रसमय आकाशगुंफेंतून अजर (अमिय) रस पाझरत राहतो,) असें कबीराने त्याचें वर्णन केलें आहे. नाथपंथी योगमार्गांत कायशोधन व कायरक्षण या गोष्टी महत्त्वाच्या मानलेल्या आहेत. अमियरसाच्या सेवनाने वरील गोष्टी साध्य होतात, असें गोरखनाथाचें मत आहे. **पाहा**— सहस्रदलचक्र, अमृत. [हिं. सा. को.]

अमिल सिंधमधल्या हिंदूंतील नोकरीपेशाने जगणारी एक जमात. हे लोक लोहाणा अथवा खत्री जमातींपैकी आहेत. अमिल हें नांव पर्शियन अमल या शब्दावरून आलें आहे. अमल याचा अर्थ कारभार हाकणें असा होतो. या जमातीचे लोक सर्व सरकारी खात्यांत कारकून व अधिकारी या नात्यांनी होते. त्यांना मानाचें स्थान होतें. सुशिक्षित असल्यामुळे या जमातीने एका काळीं सिंधमधील सगळीं बौद्धिक क्षेत्रें व्यापलीं होतीं, असें म्हणायला हरकत नाही. यांच्यांत नऊ गोत्रें आहेत. लोहाणा जातींतून हे लोक आले असले, तरी पुढे त्यांचा लोहाणाशीं शरीरसंबंध होईनासा झाला. [सिं. क.]

अमी बिहारमधील सारण जिल्ह्यांतील एक क्षेत्र. याला अंबिका-आस्थान असेंहि नांव आहे. बाव्वन शक्ति-पीठांपैकी हें एक असून इथे अंबिकेचें मंदिर आहे. चैत्र महिन्यांत इथे यात्रा भरते. राजा सुरथ इथे राज्य करीत होता, असें कांही पंडितांचें म्हणणें आहे. [सारण गॅझे.]

अमीर खुस्रव (१३ व्या शतकाची अखेर) एक महान् पर्शियन कवि व संगीतकार. पर्शियन संगीत व संस्कृति यांचा त्याने उत्तम अभ्यास केला होता. शिबली याने त्याचें चरित्र लिहिलें आहे. भारतीय संगीताच्या प्रचारासाठी त्याने बरेच प्रयत्न केले. त्याने अनेक मिश्र रागहि निर्माण केले आहेत.

कवाली पद्धतीची गायकी त्यानेच प्रथम शोधून काढली. सतार या वाद्याच्या आकारांत त्याने सुधारणा केली व त्याला सहतार-अल् असें नांव दिलें. नंतर मशीदखानाने त्यांत आणखी तीन तारांची भर घालून सध्या प्रचारांत असलेली सतार निर्माण केली.

त्याच्या पूर्वी पखवाज हेंच गाण्याच्या साथीचें वाद्य होतें. पण याने एका पखवाजाचे तबला व डग्गा असे दोन भाग करून तें एक नवेंच वाद्य बनविलें व प्रचारांत आणलें.


अमीर खुस्रव

मजीर, सजगिरी यमन्, मुवाफिक, झिलफ, फरगन, सरपदी इ. राग याने नव्याने निर्माण केले. या रागांच्या निर्मितींत अमीरने आपली सूक्ष्म बुद्धिमत्ता प्रकट केली आहे. इतर रागांच्या बाबतींतहि त्याने कांही फेरफार केले, असें रागदर्पणांत म्हटलें आहे. [दि एव्होल्यूशन ऑफ साँग्स् अँड लाइव्हज् ऑफ ग्रेट म्यूझिशियन्स्.]

अमुक्ताभरणव्रत तिथिव्रत. हें मुख्यत्वें स्त्रियांसाठी आहे. भाद्र० शु. ७ मीस अमुक्ताभरणसप्तमी म्हणतात. त्या दिवशीं शिव-पार्वतींच्या चित्राकृति स्थापून त्यांच्या पार्श्वभागीं सोन्यारुप्याच्या तारांचा अथवा सुताचा दोरा वळून ठेवतात. नंतर षोडशोपचार पूजा करतात. पूजेचा मंत्र असा--

मन्दारमालाकुलितालकायै
कपालमालाङ्कितशेखराय ।
दिव्याम्बरायै च दिगम्बराय
नमः शिवायै च नमः शिवाय ॥

अर्थ--मंदारमाला वेणींत माळणारी व दिव्य वस्त्र नेसणारी पार्वती आणि जटाजूटाभोवती रुंडमाला वेष्टिणारा व दिगंबर असा शिव यांना नमस्कार असो.

या व्रताचा महानैवेद्य पायस, अपूप व गूळभात यांचा असतो. पूजेनंतर दोरा हातांत बांधतात, त्याचा मंत्र--

सप्तसामोपगीतं त्वां चराचरजगद्‌गुरो ।
सूत्रग्रन्थिस्थितं हस्ते धारयामि स्थिरो भव ॥

अर्थ--हे चराचर जगताच्या गुरो (शंकरा), सप्तसामें तुझें स्तवन करतात. (अशा तुला या) सूत्रग्रंथीवर स्थापून मी (माझ्या) हातांत धारण करतों. (इथे) तूं स्थिर हो !

नंतर मागच्या वर्षीच्या दोऱ्याचें विसर्जन करतात. अकरा घारग्यांवर तूप घालून त्यांचें वाण देतात. उद्यापनाच्या वेळीं शिव-पार्वतींच्या सुवर्णप्रतिमेचें दान व दंपतीभोजन करून व्रतसमाप्ति करतात. याची कथा अशी--

पूर्वी अयोध्यानगरींत नहुष नांवाचा राजा होऊन गेला. त्याच्या राणीचें नांव चंद्रमुखी. त्याच नगरांतल्या विष्णुगुप्त नांवाच्या ब्राह्मणाच्या भार्येचें नांव भद्रमुखी असें होतें. दोघीहि मैत्रिणी होत्या. एकदा त्या दोघी शरयूवर स्नानास गेल्या असतां नगरांतील स्त्रिया तिथे जमून शिव-पार्वतींची पूजा करीत असलेल्या त्यांनी पाहिल्या. त्यांच्या हातांत कसले तरी दोरे बांधलेले आहेत, हेंहि त्यांना दिसलें. त्यांनी त्याविषयीं जिज्ञासा दर्शवितांच त्या स्त्रियांनी त्यांना तें अमुक्ताभरणव्रत सांगितलें. त्या दोघींनी तें करण्याचा संकल्प केला. कांही वर्षांनी दोघींनाहि व्रताचा विसर पडला. त्यामुळे मृत्यूनंतर चंद्रमुखी वानरीच्या व भद्रमुखी कोंबडीच्या जन्मास आली. मात्र त्यापुढील जन्म त्यांना माणसाचा मिळाला. भद्रमुखी ब्राह्मणस्त्री झाली व चंद्रमुखी राजाची राणी झाली. भद्रमुखी अष्टपुत्रा झाली. चंद्रमुखीला एक पुत्र झाला खरा; पण जन्मतःच रोगट असल्यामुळे तो लगेच निवर्तला. त्यामुळे चंद्रमुखीला भद्रमुखीचा मत्सर वाटूं लागला. तिने भद्रमुखीच्या आठहि पुत्रांवर मारेकरी घालून त्यांना ठार केलें. पण ती व्रत करीत राहिलेली असल्यामुळे त्या व्रताच्या प्रभावाने ते पुनश्च जिवंत झाले. चंद्रमुखीला त्या गोष्टीचें आश्चर्य वाटून ती भद्रमुखीला शरण गेली. तिने चंद्रमुखीला व्रताचा प्रभाव सांगितला. मग चंद्रमुखीनेहि तें व्रत भक्तिभावाने केलें व ती पुत्रपौत्रांसह सुखाने नांदली. [व्रतराज]

अमृत 'नास्ति मृतं (= मरणं) यस्मात् तत्' = जें प्याल्याने मरण टळतें, तें अमृत होय (हलायुध). याला पीयूष व सुधा अशीं आणखी नांवें आहेत. अमृत हें एक रसायन आहे. याच्या उत्पत्तीची कथा पुढीलप्रमाणे--

एकदा इंद्र ऐरावतावर बसून चालला होता. त्याचें तें गजान्त वैभव पाहून दुर्वास ऋषि प्रसन्न झाला. त्याने आपल्या गळ्यांतली माळ काढून इंद्रावर फेकली. पण इंद्राने झेलून न घेतल्यामुळे ती खाली पडून हत्तीच्या पायदळीं तुडविली गेली. त्यामुळे दुर्वासाला क्रोध येऊन त्याने इंद्राला शाप दिला, की 'तुझें ऐश्वर्य नष्ट होईल !' तो शाप खरा झाला व दैत्यांनी स्वर्ग जिंकल्यामुळे, इंद्र पदभ्रष्ट झाला. मग ब्रह्म्यासह सर्व देव विष्णूला शरण गेले. विष्णूने त्यांना सांगितलें, की तुम्ही दैत्यांशीं सलोखा करून त्यांच्या साह्याने क्षीरसागराचें मंथन करा. त्यांतून अमृत निघेल. त्याच्या प्राशनाने तुम्ही

अमर व बलवान व्हाल. आणि मग दैत्य तुमचा पराभव करूं शकणार नाहींत.

दैत्यांचा राजा बलि हा होता. देवांनी त्यांच्याशीं संगनमत केलें व 'निघालेल्या अमृताचा अर्धा वांटा आम्हांला मिळाला पाहिजे' ही त्यांची अटहि मान्य केली. मग मंदर पर्वताची रवी व वासुकीची दोरी करून देव-दैत्यांनी मिळून क्षीरसागराचें मंथन केलें. त्याच वेळीं विष्णूने कूर्मरूप घेऊन मंदराचलाला खालून आधार दिला. या मंथनांतून चौदा रत्नें वर आलीं. अमृत हेंहि त्यांतलेंच एक रत्न होय. धन्वंतरी अमृताचा कलश घेऊन वर आला. तें पाहतांच दैत्यांनी हल्ला करून तो अमृतकलश पळविला. त्यामुळे देव दुःखी होऊन पुनश्च विष्णूकडे गेले. विष्णूने सर्व कांही ठीक करण्याचें त्यांना वचन दिलें. तो मोहिनीरूप घेऊन मंथनस्थळीं प्राप्त झाला. मोहिनीचें अप्रतिम लावण्य पाहून दैत्य भुलले व तिच्या मागे



अमृत मंथन (६ वें शतक)– बदामी

लागले. मी सर्वांना अमृत वांटून देईन, असें सांगून मोहिनीनें देव-दैत्यांच्या पंक्ती बसविल्या. तिने देवांच्या पंक्तीपासून अमृत वाढायला सुरवात केली. दैत्यांच्या पंक्तींत राहु बसला होता. त्याला वाटलें, की 'अमृत देवांच्या पंक्तींतच संपून गेलें तर आपण वंचित होऊं' म्हणून तो गुप्त रूपाने देवांच्या पंक्तींत येऊन बसला. हें त्याचें कपट चंद्र-सूर्यांनी ओळखलें व मोहिनीच्या कानीं घातलें. तात्काळ मोहिनीने सुदर्शनचक्राने राहूचें शिर उडविलें. पण राहूच्या जिभेला अमृताचा स्पर्श झालेला असल्यामुळे त्याचें शिर तुटलें तरी तें अमर राहिलें. मोहिनीने देवांच्या पंक्तींतच सर्व अमृत संपविलें व दैत्यांना त्याचा थेंबहि मिळाला नाही. त्यामुळे दैत्य खवळले आणि युद्धाला उभे ठाकले. पण त्या युद्धांत देवांनी त्यांचा पराभव केला. मोहिनी लगेच गुप्त झाली (भाग. पु. ८.६-११).

'मी मर्त्य आहें, तो अमर कसा होईन,' ही चिंता वेदकालापासून माणसाला लागलेली दिसते––

यदग्नेऽमर्त्यस्त्वं स्यामहं मित्रमहो अमर्त्यः ।
सहसः सूनवाहुत ।।

(ऋ. ८·१९·२५)

अर्थ–हे अग्ने, मी मर्त्य आहें आणि मैत्रीची-प्रेमाची दीप्ति असलेला तूं अमर्त्य आहेस; मी आणि तूं एक व्हावें (तुझ्याप्रमाणेच मीहि अमर्त्य व्हावें).

काण्व सौभरीने व्यक्त केलेली ही एक प्रातिनिधिक आकांक्षा आहे. वैदिक ऋषींची प्रतिभा अमृताच्या शोधासाठी सर्व विश्वाचा ठाव घेण्यास व स्वर्गाच्या अंतिम मर्यादाहि उल्लंघून पार होण्यास निघाली आहे, असें दिसतें. वैदिक लोक अन्नसेवनाच्या आधीच्या व नंतरच्या अपोशानाला अमृताचें उपस्तरण (बैठक) व अपिधान (झांकण) समजत. ऋग्वेदांत अग्नीला अमर्त्य म्हटलें आहे. त्यावरून वेदोत्तर वाङमयांत सर्व देवांना अमर्त्य म्हणण्याची पद्धत पडली. देवांना अमर असें नांव मिळालें. देव अमर कां; तर त्यांच्यापाशी अमृत नांवाचा रस आहे आणि तो त्यांना प्राशन करायला मिळतो म्हणून. 'अमृतं सोमः' = सोम हा अमृत आहे व तो (रस) देवाचें पेय आहे, असें मानलेलें आहे. (श. ब्रा. ९·५·१·८) 'आम्ही सोम प्यालों व अमर झालों' असेंहि काण्व प्रगाथ म्हणतो (ऋ. ८·४८·३) शतपथांत हा शब्द अनेकवार आलेला असून तें स्वर्गीय पेय असल्याचें म्हटलें आहे. वायु पुराणांत अमृताचा संबंध सोमाशीं न जोडतां तो चंद्राशीं जोडलेला आहे. पुराणकाळांत सोमाचा वल्लीशीं असलेला संबंध सुटून तो चंद्राशीं जोडला जाऊं लागला, याचें हें उदाहरण आहे. वैदिक वाङमयांत आदित्य, अग्नि, अप् या देवतांना जसें अमृत म्हटलें आहे; तसेंच प्राण, हिरण्य, ऋक्, रुच् (दीप्ति), स्वर्ग, इ. अनेक वस्तूंनाहि अमृत म्हटलें आहे (श. ब्रा. ९·१·२·३२; ९·४·४ ५; तै. ब्रा. १·७·६·३; १·३·७·५). अमृतामुळे मृत्यु नष्ट होतो, असें शतपथ म्हणतें (१०·२·६·१९). 'मृत्योर्मा अमृतं गमय' = मृत्यकडन मला अमृताकडे ने, ही उपनिषदांची प्रार्थना आहे.

पण अमृत म्हणजे नक्की कोणता पदार्थ, तें मात्र त्यावरून कळत नाही. कदाचित् शतपथाच्या कर्त्यालाहि तें अज्ञात असेल. म्हणून शंभर वर्षें किंवा त्याहून अधिक आयुष्य तें पूर्णायुष्य म्हणजेच अमृत, असें त्याचें स्पष्टीकरण दोन तीन ठिकाणीं दिलेलें आढळतें (श. ब्रा. ९·५·१·१०; १०·२ ६ ८). चंद्रमंडलांतून अमृतरस पाझरतो, ही कल्पना पुराणकालांत पुढे आली. चंद्राच्या अमृतमय कला कृष्णपक्षांत देव प्राशन करतात व अवशिष्ट दोन कला पितर मागच्या बाजूने येऊन पितात, असें विष्णुपुराण सांगतें (२·१२).

पाश्चात्य देशांत अँब्रोशिया हें खाद्य व नेक्टर हें पेय अमरत्व देणारें मानतात. ग्रीक पुराण व होमरचें इलियड यांवरून हे पदार्थ सुवासिक असल्याचें कळतें. अँब्रोशिया खाऊन अमर झाल्याच्या कथा पाश्चात्य वाङमयांत पुष्कळ आहेत.

त्याच्या अंगीं जखमा बऱ्या करण्याचेंहि सामर्थ्य असल्याचे उल्लेख आहेत.

स्वर्गात अमृताचा साठा असून त्याच्या रक्षणाची विशिष्ट यंत्रणा असल्याचें महाभारतांतल्या सुपर्णाख्यानावरून कळतें (आदि. ३२). त्याचप्रमाणे पाताळांतल्या नागलोकांतहि अमृताच्या तोडीचा एक रस आहे, असें पुराणांनी मानलें आहे. कौरवांनी भीमसेनाला वेलींनी बांधून नदींत फेकून दिलें असतां वासुकीने त्याला पाताळांत नेऊन तिथला रस प्राशन करायला दिला. त्या रसाने भीमाला दहा हजार हत्तींचें बळ प्राप्त झालें (म. भा. आदि.१२८–१२९). चित्रांगदालाहि हाच रस प्राशन करायला मिळाला होता.

मृत व अमृत हे शब्द उपनिषदांत वारंवार येतात. बृहदारण्यकांत (४.४.१४) अमृत हा शब्द दुःखाचा प्रतियोगी म्हणून आला आहे. छांदोग्यांत (७·२३) भूमालाच सुख म्हटलें असून भूमा म्हणजेच अमृत असा त्याचा अर्थ दिला आहे. अमृत हें बाह्य विश्वांत नसून माणसाच्या मनांतच आहे. शरीर मर्त्य; पण मन अमृत होय. मनांत जेव्हा विषाद, तम व पाप हीं शिरतात, तेव्हा मनुष्याचा अमृताच्या धारेशीं असलेला संबंध तुटतो. मन प्रसन्न ठेवणें व प्रमादरहित होणें, ही अमृतप्राप्तीची पहिली पायरी आहे. माणसाला आत्मज्ञान होणें म्हणजे ती अमृताचीच प्राप्ति असते. ज्याने आत्म्याला जाणलें, तो मृत्यूला तरून गेला व त्याने अमृतत्व मिळविलें असें समजावें, हा अध्यात्मशास्त्राचा सिद्धान्त आहे.

आधिदैविक दृष्टीने देवांना अमर्त्य मानलें असून त्यांची कृपा हा अमृतप्राप्तीचा मार्ग होय, असें मानलें आहे. आधिभौतिक दृष्ट्या स्वस्थ, आरोग्यसंपन्न व शतायुष जीवन हें अमृत होय. 'एतद्वै मनुष्यस्य अमृतत्वं यत्सर्वमायुरेति' माणसाने संपूर्ण आयुष्य जगणें हेंच मनुष्याचें अमृतत्व होय, असें शतपथांत म्हटलें आहे (९·५·१·१०).

विश्वांतला प्राणस्रोत हेंच अमृताचें स्थान होय. जिथे जिथे प्राण आहे, तिथे तिथे अमृत आहे. 'अमृतमु वै प्राणाः' अर्थात् प्राणतत्त्व हेंच अमृत होय (श. ब्रा. ९·१·२·३२). वैदिक विज्ञानाच्या दृष्टीने अमृत व मृत्यु हीं दोन्ही एकाच वेळीं मानवशरीरांत राहतात. दोघांचें कार्य मात्र भिन्न भिन्न आहे. अनृत, पाप व तम हे मृत्यूचें कार्य; तर सत्य, पुण्य व ज्योति हें अमृताचें कार्य होय. या दोहोंत संकर होऊं न देणें यांत माणसाची बुद्धिमत्ता असते.

अमृत हें कुठेतरी बाह्य विश्वांत नसून मानवशरीरांतच सहस्रदलकमलांत तें असतें व कुंडलिनी जागृत झाल्यानंतरच तिथून कुंडलिनीमुखांत त्याचा स्राव होऊं लागतो, असें हठयोगपद्धतींत मानलें आहे. ज्ञानेश्वर त्याला चंद्रामृत म्हणतात (ज्ञाने. ६·२४७). परमात्म्याची १७ वी कला ही अमृतकला असल्याचें ते सांगतात. मध्यकालीन तांत्रिक साधनेंत लोक माणसाला अमरत्व देणाऱ्या कोणत्या तरी (अमृत) रसाच्या शोधांत होते, असें दिसतें. कालांतराने मैथुनाचें सुख हाच अमृतरस असें ते मानूं लागले. तांत्रिक अनुष्ठानांत मद्याचा प्रवेश अमृताचें प्रतीक म्हणूनच झाला आहे. पुढे 'निर्गुनिया' संतांनी मद्याचा निषेध करून हठयोगांतल्या 'अमियरसा'चा स्वीकार केला (हिं. सा. को.). 'अमृत व मृत्यु हीं दोन्ही माझींच रूपें होत' असें गीतेंत श्रीकृष्णानें अर्जुनाला सांगितलें आहे (९·१९).
पाहा—सहस्रदल; अमियरस; सोम.

अमृतचंद्र (इ. स. ९ वें शतक) जैन पंडितांत कुंदकुंदाचार्याच्या नंतर याचेंच नांव घेतलें जातें. याचे पुढील ग्रंथ उपलब्ध आहेत —(१) पुरुषार्थसिद्ध्युपाय – यांत निराळ्या ढंगाने श्रावकाचार सांगितले आहेत. (२) तत्त्वार्थसार – हा उमास्वातीच्या तत्त्वार्थसूत्रांचा पद्यानुवाद आहे. (३) समयसारटीका. (४) प्रवचनसारटीका व (५) पंचास्तिकायटीका. तीन ते पांच हे तीन्ही ग्रंथ कुंदकुंदाच्या प्राकृत ग्रंथांच्या संस्कृत टीका आहेत. [जै. सा. इ.; म. च. को.]

अमृतचरु प्रजापति इ. सहा देवतांच्या उद्देशाने दिल्या जाणाऱ्या आहुतींचें नांव.

अमृत छकना शीख धर्माच्या दीक्षेंतला एक आवश्यक विधि. दीक्षार्थी पुरुष प्रथम सकेश स्नान करून शुद्ध वस्त्र व पांच ककार धारण करून येतो. मग त्याला शीख धर्माचे मुख्य सिद्धान्त उपदेशून 'अरदास' केली जाते. एका लोखंडी कटोऱ्यांत खांड्याच्या टोकाने बत्तासे पाण्यांत घोळले जातात. त्या वेळीं पांच 'प्यारे' किंवा सिंह जपूजी, जापजी, दससवैया, चौपाई व आनंदसाहब या ग्रंथांतील वाणीचें पठण करतात. एवढें झाल्यावर लोखंडी कटोऱ्यांत अमृत तयार होतें. मग दीक्षार्थी चार नियम व पांच ककार धारण करून धर्माने वागण्याची 'रहत' अर्थात् प्रतिज्ञा करतो. मग 'वाह गुरु का खालसा' व 'वाह गुरुकी फतेह' असा उद्घोष करून त्याला तें अमृत प्राशन करवितात. त्याचे केस व डोळे यांवरहि त्या अमृताचा पांच वेळां शिडकाव करतात. एवढें झाल्याने दीक्षार्थी शीख पंथाचा सदस्य होऊन 'सिंह' ही उपाधि धारण करण्यास अधिकारी होतो. शेवटीं प्रसाद वांटला जाऊन हा विधि समाप्त होतो. [अ. अ.]

अमृतनादोपनिषद् १०८ गौण उपनिषदांपैकी २१ वें उपनिषद्. हें पद्यात्मक असून कृष्ण यजुर्वेदांत आलें आहे. विशुद्ध चित्त असणाऱ्यांना श्रवणमननादिकांच्या योगानें पुरुषार्थाची सिद्धि प्राप्त होते; परंतु ज्यांचें चित्त मलिन असेल, अशांनी मोक्षप्राप्तीसाठी ब्रह्माची उपासना व षडंग योगांचा अभ्यास करावा, असें यांत सांगितलें आहे. त्या दृष्टीनें या उपनिषदांत प्रणवोपासना, प्रत्याहारलक्षण, षडंगयोग, प्राणायाम, समाधि व ती सिद्ध करण्याचे उपाय, इ. माहिती आली आहे.


अमृतबिंदूपनिषद् १०८ गौण उपनिषदांपैकी २० वें उपनिषद्. कृष्ण यजुर्वेदांत हें आलें आहे. मन हेंच आत्म्याच्या बंधाचें व मोक्षाचेंहि कारण आहे, हा या उपनिषदाचा प्रतिपाद्य विषय आहे. त्या अनुषंगानें यांत मनोनिरोध हाच मोक्षाचा उपाय होय, असें सांगितलें आहे.

अमृतराम (इ. स. १८ वें शतक उत्तरार्ध) राजस्थानातला एक संत. हा पल्लीवाळ ब्राह्मण असून कृष्णभक्त होता. यानें नाहरगडाच्या रस्त्यावर आपल्या घराशेजारीं अटलबिहारीचें मंदिर बांधलें आहे. याच्या लहानमोठ्या ११ काव्यकृती उपलब्ध आहेत. अमृतकोश, चौपरिहुलास, बन्सीबहार अशीं त्यांचीं नांवें आहेत. चौपरिहुलासांत राधाकृष्णांच्या चौपड खेळाचें वर्णन आहे. [मरुभारती १९५७]

अमृतराय (१६९८ – १७५३ इ. स.) औरंगाबादच्या बिसो मोरो या मुत्सद्याचा आश्रित. एक भक्त कवि. याचें मूळचें नांव अंबाजी. मध्वमुनीश्वरांच्या उपदेशानें हा भक्तिमार्गाकडे वळला, असें सांगतात. याची बरीचशी कविता कटावबद्ध आहे. याचीं पद्यें कीर्तनकारांना फार उपयुक्त वाटतात. याची भाषा साधी, सरस व प्रौढ आहे. सुदामचरित्र, द्रौपदीवस्त्रहरण, पारिजातकाख्यान, इ. याचीं काव्यें वर्णनाच्या दृष्टीनें बहारदार आहेत. माधव, ब्रह्मगिरि, इ. याचे बरेच शिष्य असून तेहि कवि होते. [म. च. को.]

अमृतसर पूर्व पंजाबांतलें एक मोठें शहर व शिखांचें पवित्र स्थान. हें बियास (व्यास) नदीच्या तीरावर वसलें आहे. याची स्थापना इ. स. १५७७ मध्ये झाली. शिखांचीं चार 'तख्तें' आहेत. त्यांपैकी अमृतसरचें तख्त हें 'श्री अकाल तख्त साहबी' या नांवानें ओळखलें जातें. या ठिकाणाला प्रथम चाक असें नांव होतें. शिखांचा चौथा गुरु रामदास याला वाटलें, की शिखांसाठी एक सुंदर मंदिर निर्माण करावें. म्हणून प्रथम त्यानें एक तलाव खोदायला प्रारंभ केला. या तलावाचें नांव त्यानें अमृतसरोवर ठेवलें. या नांवामागें एक आख्यायिका आहे—

रामचंद्रानें अश्वमेध करायचें ठरवून दिग्विजयार्थ घोडा सोडला. लव–कुश यांनीं तो घोडा पकडला. त्याच्या मुक्ततेसाठी राम–लक्ष्मण व भरत–शत्रुघ्न यांनी लव–कुशांशीं युद्ध मांडलें. पण त्या कुमारांनी चौघांनाहि मूर्च्छित पाडलें. पुढे त्यांना उठविण्याचा प्रश्न आला, तेव्हा लव–कुशांनी स्वर्गांतून अमृत आणून तें त्यांच्यावर शिंपडलें व उरलेलें तिथेंच जमिनींत पुरून टाकलें.



सुवर्णमंदिर–अमृतसर

ज्या ठिकाणीं तें अमृत पुरलें होतें, त्याच ठिकाणीं गुरु रामदास यांनी हा तलाव खोदला आहे, असें म्हणतात. ही भूमि गुरु रामदास याला अकबरानें भेट म्हणून दिली होती. हें सरोवर ४७५ फूट लांब–रुंद आहे. त्याला सर्व बाजूंनी संगमरवराचे घाट बांधले आहेत. तलावाच्या मध्यभागीं शिखांचें पवित्रस्थान असें सुवर्णमंदिर आहे. त्याचा चौथरा ६५ फूट चौरस आहे. हें मंदिर शिखांचा पांचवा गुरु अर्जुनदेव यानें निर्माण केलें. मंदिरांत जाण्यासाठी सरोवराच्या पश्चिम अंगाला दोनशें फूट लांबीचा संगमरवरी पूल आहे. सुवर्णमंदिर हें खरोखरच सोन्याचें मंदिर आहे. याच्या रचनेला जेवढें सोनें लागलें आहे, तेवढें क्वचितच दुसऱ्या एखाद्या वास्तूला लागलें असेल. जगांतल्या अद्भुत इमारतींत याची गणना होते. महाराजा रणजितसिंहानें या मंदिराची शोभा वाढविण्यासाठी अपार धन वेंचलें. या मंदिराचीं छतें व भिंती सोन्याचा मुलामा दिलेल्या पत्र्यांनी लखलखत असतात. याला हरमंदिर असेंहि दुसरें नांव आहे.

शीख लोक याला दरबारसाहब म्हणतात व आपल्या

पवित्र ग्रंथाला ग्रंथसाहब म्हणतात. मुख्य मंदिराला जोडून सेतूच्या पश्चिम अंगाला एक स्थान आहे, त्याला अकालबुंग म्हणतात. रोज सकाळीं या ठिकाणाहून ग्रंथसाहब आणून तो सुवर्णमंदिरांतल्या एका छत्रीखालीं ठेवतात. दिवसभर तो तिथे असतो. ग्रंथी नांवाचा एक माणूस त्याच्यावर चवरी वारीत राहतो. देवस्थानाचे गायक त्याच्यापुढे बसून ग्रंथसाहबांतलीं गीतें रागदारींत गातात. त्याच्या समोर एक वस्त्र पसरलेलें असतें. त्यावर भाविक लोक दक्षिणा ठेवतात. रात्र पडल्यावर ग्रंथ-साहब परत अकालबुंगांत नेतात. शिखाच्या गुरुद्वारांत उघड्या डोक्याने कोणालाहि जातां येत नाही. इथे एकूण तेरा गुरुद्वारे आहेत. त्यांतला सुवर्णमंदिर हा मुख्य होय.



ग्रंथसाहबाचें पठण–अमृतसर

अमृतसर, संतोषसर, रायसर, विवेकसर व कमलसर (कौलसर) अशीं इथें पांच तीर्थें आहेत. दुर्गा, सत्यनारायण, लक्ष्मीनारायण अशीं तीन प्रसिद्ध हिंदु मंदिरें आहेत. प्रतिवर्षी कार्तिक मासांत इथे मोठा मेळा भरतो.

इ. स. १७६२ सालीं अफगाण सेनापति अहमद शहा याने तोफा डागून हें पवित्र स्थान उद्ध्वस्त केलें, पण शिखांची निष्ठा एवढी जबर, की त्यांनी पुढे अवघ्या चारच वर्षांत तें पुनश्च उभारलें व त्याच्या भोवती तटबंदीच्या इमारती बांधल्या. **पाहा** – ग्रंथसाहब. [क. तीर्थांक; भारती; एन्सा. रि. ए.]

अमृतसिद्धियोग

जातकाच्या मुहूर्तस्कंधांतला एक शुभ योग. याविषयीं श्लोक असा ––

आदित्यहस्ते, गुरुपुष्ययोगे,
बुधानुराधा, शनिरोहिणी च ।
सोमे च सौम्यं भृगुरेवती च
भौमाश्विनी चामृतसिद्धियोगः ।।

अर्थ – रवि-हस्त, गुरु-पुष्य, बुध-अनुराधा, शनि-रोहिणी, सोम-मृगशीर्ष, शुक्र-रेवती व मंगळ-अश्विनी असा वार-नक्षत्रांचा योग होतो, तेव्हां त्याला अमृतसिद्धियोग म्हणतात.

मात्र पंचमीस रवि-हस्त, सप्तमीस मंगळ-अश्विनी, षष्ठीस सोम-मृगशीर्ष, अष्टमीस बुध-अनुराधा, दशमीस शुक्र-रेवती, नवमीस गुरु-पुष्य व एकादशीस शनि-रोहिणी, असा अमृतसिद्धि योग असतां तो अशुभ समजून शुभकार्यांस वर्ज्य समजतात. [मु. चिं.]

अमृता

(१) प्लक्षद्वीपांतील एका नदीचें नांव. [विष्णु पु. २. ४. ११]

(२) सूर्याशीं संबंधित अशा पर्जन्य देणाऱ्या नाड्यांचा समूह. [ब्रह्माण्ड पु. २. २४. २७]

(३) विंध्याच्या गुहेंतील एक देवता. [मत्स्य पु. १३. ४२]

(४) वेणा नदीच्या ठिकाणीं असलेली शक्तिदेवता. [मत्स्य पु. १३. ४९]

अमृताकर्षणी

एक गुप्त शक्ति. [ब्रह्माण्ड पु. भा. ४. १९. २०]

अमृतानंद

ही एक योगाची अवस्था आहे. आत्मानंदाला-सुद्धा अमृतानंद म्हणतात. ‘ तत्रैवं विद्वानमृत इह भवति ’= आत्मज्ञानी पुरुष या लोकीं अमृत होतो (नृ. पू. उ. १. १६). आत्म्याचें स्वरूप अमृतत्त्व हेंच मानलेलें आहे. ‘ अहं ब्रह्मास्मि, ’ ‘ तत्त्वमसि ’, इ. महावाक्यांच्या अर्थज्ञानाने जो आत्मसाक्षात्कार होतो, त्यालाच अमृतानंद म्हणतात.

अमृतौघा

क्रौंचद्वीपांतील एक नदी. [भाग. पु. ५. २०. २१]

अमेश स्पेन्त

झरथुष्ट्री धर्मांत सर्वश्रेष्ठ देवदूतांच्या संघाला हें नांव आहे. याचा अर्थ अमेश=अमर व स्पेन्त = उपकारी, अर्थात् अमर परोपकारी व्यक्ति. अवेस्त्यांतल्या प्राचीन गाथाग्रंथांत हा शब्द आढळत नाही; पण उत्तरकालीन अवेस्त्यांत व त्या धर्माच्या इतर वाङ्मयांत तो बरेच वेळां येतो. अमेश स्पेन्त हे अहुरमझ्दाचे सेवक होत (यस्त-इ-प्रयानो २. ५५. ५९; वोहुमनयश्त ३. ३१). हे संख्येने सहा असून स्त्राओश ही देवता त्यांत अंतर्भूत केली तर त्यांची संख्या सात होते. ते सतत अहुरमझ्दाजवळ राहतात व जगाला मार्गदर्शन करण्याच्या कार्यांत त्याला मदत करतात.

अमेश स्पेन्त ही अहुरमझ्दाची स्वतःची सृष्टि आहे. ते अदृश्य, अमर, उत्तम शास्ते व दानशूर असतात. धार्मिक कृत्यांत त्यांच्यासाठी यजन केलें जातें. यज्ञांतली आहुति ग्रहण करण्या-साठी ते प्रकाशमय मार्गाने खाली येतात. त्यांच्यापैकी वोहुमनह हा सुवर्णाच्या सिंहासनावर बसतो. अहुरमझ्दाने त्यांच्यापैकी प्रत्येकाला सृष्टींतलें विशिष्ट कार्य नेमून दिलें आहे--

(१) वोहुमनह – याचें काम उपयुक्त प्राण्यांची काळजी घेणें. (२) अशवहिश्त – अग्नीविषयीं कार्य. (३) क्षथ्रवैर्य–धातूंची देखरेख. (४) स्पेन्त अर्मैति–पृथ्वीचें रक्षण. (५) हौर्वतात व (६) अमेरेतात–पाणी व वनस्पति यांचें रक्षण करणें. प्रत्येकाचा विशिष्ट मास विशिष्ट दिवस व विशिष्ट फूल असतें. झरथुष्ट्री वाङमयांत या सहांना सहा सद्‌गुणांचें प्रतीक मानलें आहे--

(१) वोहुमनह – सद्विचार. (२) अशवहिश्त–नीतिमत्ता. (३) क्षथ्रवैर्य – इच्छित राज्य. (४) स्पेन्त अर्मैति – पवित्र ऐक्य. (५) हौर्वतात – संरक्षक आरोग्य व (६) अमेरेतात – अमरत्व. पहिले तिघे पुरुष असून पुढच्या तीन स्त्रिया आहेत. त्यांना अनुक्रमे सतत सहा दैत्यांकडून विरोध होत असतो. त्यांची नांवें अशीं – (१) अकमनह (२) इंद्र (३) सौरू (४) नाओणहैथ्य (५) तौरू (६) झैरी (वेन्दिदाद १०. ९. १०; १९. ४३. यश्त १९. ९६).

सामान्य देवतांपेक्षा श्रेष्ठ व अहुरमझ्दापेक्षा कनिष्ठ असे हे देवदूत आहेत. यांची कोणी बायबलमधल्या श्रेष्ठ देवदूतांशीं (आर्चेंजल) तुलना करतात; तर कोणी वैदिक आदित्यांशीं त्यांचें साम्य दाखवितात. हें साम्य एकाची कल्पना दुसऱ्याने उचलल्यामुळे आलें आहे किंवा एकाच कोणत्या तरी उगम-स्थानांतून ही कल्पना उगम पावून पुढे भिन्न संप्रदायांत भिन्न रीतीनें वाढली आहे, याविषयीं अद्यापि निश्चित संशोधन झालेलें न.ही. [एन्सा. रि. ए.]

अमोघदर्शी एक बोधिसत्त्व. याचा वर्ण पीत असून चिन्ह कमळ आहे. [इं. बु. इ.]

अमोघसिद्धि ध्यानी बुद्धांपैकी चौथा. याचें वर्णन अद्वय-वज्रसंग्रहांत पुढीलप्रमाणे दिलें आहे --

उत्तरदले श्यामवर्णोऽमोघसिद्धिर्विश्वबज्रचिह्ना-भयमुद्राधरः ...

अर्थ – उत्तर दलाच्या ठिकाणीं अमोघसिद्धीचें स्थान असून तो अभयमुद्रा, व विश्ववज्र धारण करतो ...

गरुडयुग्म हें वाहन. श्यामवर्ण व उत्तराभिमुख. मूर्तीवर सात नागफण्यांचें छत्र असतें. याच्या मंदिरापुढे लहानसा खड्डा असतो, तें त्या नागांचें निवासस्थान होय. याचा मंत्र – 'ॐ आः प्रज्ञाध्रुक् हुम् ।' [इं. बु. इ.]

अमोघाक्षी विपाशा नदीच्या तीरावर स्थापिलेली देवता. [मत्स्य पु. १३. ३५]

अमोहक ब्रह्मतीर्थाचें दुसरें नांव. इथ पाण्यांत हत्तीसारखा एक पाषाण आहे; त्यावर पितरांना उद्देशून पिंडदान करतात. [पु. इं.]

अम्म द. भारतांतील मातृदेवता. प्राचीन तमिळ साहित्यांत हिचें बरेंच वर्णन आहे. हिला अय्यि (माता), कोट्टवई (विजयी माता) किंवा कोट्टी (संहारकर्त्री) अशींहि अन्य नांवें आहेत. मरवर जमातीची ती कुलदेवता आहे. त्या जमातीने ताडी, भात, रक्त व बळी देऊन तिची कृपा संपादन केली, असें सांगतात. ती रणरागिणी आहे. रणांगणावर ती अग्रभागीं असते. तिच्या गळ्यांत आंतडयांच्या माळा असतात. मारलेले शत्रु स्वतःच्या रक्तांत पोहत असलेले पाहून ती विकट हास्य करते. तिच्या निशाणावर सिंह असतो. ती काळविटावर बसते. तिच्या हातांत पोपट व सभोवती भुताखेतांचा मेळावा असतो.

पत्तुप्पाट्टु या तमिळ गीतसंग्रहांत याहून भयानक असें तिचें वर्णन आहे. शिलप्पधिकारम्‌मध्ये तिचीं कुमारी, गौरी, अशीं आणखी कांही नांवें दिलीं आहेत. तमिळ महाकाव्यांच्या अखेरीच्या काळांत अम्माच्या स्वभावविशेषांसंबंधीं अनेक दंतकथा निर्माण झाल्या. उमा, रमा, सावित्री, या तीन देवतांची ती मूलशक्ति मानली गेली. शिवाच्या सहस्रनामां-प्रमाणेंच तिचींहि सहस्र नामें निर्माण झालीं. त्यांतलीं कांही नांवें तिच्या क्रूर स्वभावाचीं, तर कांही सौम्य स्वभावाचीं निदर्शक आहेत. शाक्त पंथांत तिचीं नामें, रूपें व उपासना यांना खूप महत्त्व दिलेलें आहे. **पाहा**– मातृदेवता, काली, चंडी, नवदुर्गा. [रि. इं.]

अम्मानै तमिळनाडमधल्या स्त्रियांचा चेंडूचा खेळ. यांतले चेंडू लहान असतात व ते दोन्ही हातांनी चक्राकार वर फेकून झेलायचे असतात. या खेळाच्या वेळीं जें गाणें म्हणतात, त्याचें नांव अम्मानैप्पाट्टु असें आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अम्माल आचार्य (१७ व्या शतकाची अखेर) हा घटित शत सुदर्शनाचार्य याचा मुलगा असून कानेईचा वैष्णव आचार्य होता. याने रामानुजांचीं तत्त्वें व त्यांचा दिग्विजय यांसंबंधीं यतिराजविजय अथवा वेदान्तविलास नांवाचें नाटक लिहिलें आहे. तसेंच चोलभाण, वसंततिलकाभाण अशीं त्याचीं अन्यहि नाटकें आहेत. [म. ज्ञा. को.]

अम्मावारु द. भारतांतील ग्रामदेवता. हिच्या कोपामुळे पटकी उद्‌भवते अशी समजूत आहे. हिची कथा पुढीलप्रमाणे– ही आदिमाया असून हिने क्षीरसागरांत तीन अंडीं घातलीं. त्यांपैकी दोन फुकट गेलीं व तिसरें उबलें. त्यांतून ब्रह्मा-विष्णु-महेश जन्मले. त्याच्या खालच्या अर्धापासून पृथ्वी व वरच्या अर्धापासून आकाश बनलें. विष्णु लोण्यावर, ब्रह्मा हळदीवर आणि शिव तिच्या दुधावर वाढला. अम्मावारुने प्रत्येकाच्या कपाळीं धार्मिक चिन्हें कोरलीं. मग चार नगरें निर्मिलीं. तीन त्या देवांसाठी व चौथें स्वतःसाठी. पुढे हे तीन देव राजे झाले व अम्मावारुला जुमानीनासे झाले, त्यामुळे ती कोपली. तिने तिघांसहि ठार केलें; पण पुढे लहर फिरल्यावर त्यांना परत जिवंतहि केलें. पुन्हा त्यांचा संघर्ष सुरू झाला. त्यांत ब्रह्मा-विष्णु हरले; पण शिव मात्र हरला नाही. [व्हि. गॉ. सा. इं.]

अम्लु कुरुक्षेत्रांतली एक पवित्र नदी. [वामन पु. ३४. ७]

अयन 'सूर्यस्य उत्तर–दक्षिण–दिग्गमनम्' सूर्याचें उत्तर किंवा दक्षिण दिशेस जाणें म्हणजे अयन होय. वर्षाचीं अयनें दोन असतात. एक दक्षिणायन, आणि दुसरें उत्तरायण. रोज एका ठराविक जागीं उभें राहून पूर्वक्षितिजावर सूर्य कुठे उगवतो, हें क्षितिजालगतच्या झाडांच्या किंवा टेकड्यांच्या अनुषंगाने पाहत गेल्यास असें आढळतें, की जूनच्या २२ तारखेच्या सुमारास उगवता सूर्य क्षितिजावर जास्तींत जास्त उत्तरेला गेला आहे. या सुमारास दिनमान मोठ्यांत मोठें आणि रात्रिमान लहानांत लहान असतें. त्यानंतर सूर्य हळूहळू दक्षिणेकडे वळतो. म्हणजे त्याचें दक्षिणायन (दक्षिणेकडे जाणें) सुरू होतें. त्यानंतर सप्टेंबरच्या २३ तारखेला सूर्य कुठे उगवतो हें पाहून ठेवावें. या सुमारास दिनमान आणि रात्रिमान हीं समान असतात. या ज्ञानासाठी तारकापटाचा आधार घेतल्यास सोयीचें पडेल. त्या पटावरच्या ज्या बिंदूंत सूर्य या दिवशीं आलेला दिसेल, त्याला शरद्‌संपात म्हणतात. तिथूनहि पुढे सूर्य आणखी दक्षिणेकडे जाऊन थांबलेला दिसतो, तो डिसेंबरच्या २२ तारखेस. या वेळीं तो तारकापटांत पूर्वाषाढेंत आलेला दिसेल. तिथून मग तो माघारा उत्तरेकडे वळतो, म्हणजे त्याचें उत्तरायण सुरू होतें. त्यानंतर जूनच्या २१ तारखपर्यंत तो सतत उत्तरेकडे जात राहतो आणि मग पुन्हा दक्षिणेकडे वळतो. त्या तारखेस तो मृग आणि आर्द्रा या दोन नक्षत्रांच्या दरम्यान आलेला असतो.

मार्च २१ तारखेस अहोरात्राचें मान समान होतें. त्यामुळे पुढील काळांत पृथ्वीच्या उत्तर गोलार्धात येऊं घातलेल्या उन्हाळ्याची सूचना मिळते. २२ जूनचें दक्षिणायन हें पावसाळ्याचें सूचक असतें. २३ सप्टेंबरचा समरात्रिंदिन काल पावसाळा संपून हिवाळा सुरू होणार असें सुचवितो. २१ डिसेंबरचें उत्तरायण वसंतागमाची ग्वाही फिरवितें.

अशा प्रकारें २१ मार्च आणि २३ सप्टेंबर या दिवसांची जी समरात्रिंदिनाची अवस्था असते त्या वेळीं सूर्य आकाशांत अनुक्रमें वसंतसंपात बिंदूंत, आणि शरद्‌संपात बिंदूंत असतो. हे दोन बिंदु हळूहळू पश्चिमेकडे चळतात, असा अनुभव आहे. ही चळणूक सामान्यतः १००० वर्षांत सुमारें १३ अंशांची असते. उत्तरायण आणि दक्षिणायन केव्हां सुरू होणार तें पंचांगांत दिलेलें असतें.

धर्मशास्त्रांत उत्तरायण पवित्र व पुण्यकारक मानलेलें असून, दक्षिणायन हें पितरांचें व यमाचें अतएव अशुभ मानलेलें आहे. उत्तरायणांत मृत्यु शुभप्रद व दक्षिणायनांत अशुभ मानतात. याविषयीं गीतेंतले पुढील दोन श्लोक प्रसिद्ध आहेत —

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।
तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ।।
धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।
तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ।।

(८. २४–२५)

अर्थ – ज्योतिर्मय अग्नि, दिवस, शुक्लपक्ष आणि उत्तरायणाचे सहा महिने, या कालांत मृत्यु पावलेले ब्रह्मवेत्ते जन ब्रह्माला प्राप्त होतात. (त्याचप्रमाणे) धूर, रात्र, कृष्णपक्ष आणि दक्षिणायनाचे सहा महिने (या कालांत मृत्यु पावलेला) योगी चंद्राच्या ज्योतीला प्राप्त होऊन (स्वर्गांत आपल्या शुभ कर्मांचें फल भोगून) परत भूलोकावर येतो.

शरपंजरीं पडलेला भीष्म आपला देहत्याग करण्यासाठी, उत्तरायणाची वाट पाहत बसला होता, असें महाभारतांत म्हटलें आहे.

अयनें मोजण्याच्या पद्धती दोन आहेत. एक म्हणजे, सूर्य विषुववृत्तावर येऊन उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे वळतो, तिथून अयन सुरू झालें असें मानायचें व दुसरी म्हणजे सूर्याची

उत्तर–दक्षिण गति संपून तो माघारा वळतो, तिथपासून अयन समजायचें. महाभारतकाळीं ही दुसरी पद्धति प्रचारांत होती. त्या काळीं उत्तरायण माघ महिन्यांत सुरू होत असे, असें कळतें. हल्ली मात्र उत्तरायण पौषांत आणि दक्षिणायन आषाढांत सुरू होतें. दक्षिणायनाचा स्वामी यम असल्यामुळे महत्त्वाचीं शुभ कर्में त्या अयनांत करीत नाहीत.

विधि-निषेध – सूर्य उत्तरायणांत असतां पुढील कृत्यें करावीं, असें सांगितलें आहे —

देवतारामवाप्यादि प्रतिष्ठोदङ्मुखे रवौ ।
दक्षिणाभिमुखे कुर्वन्न तत्फलमवाप्नुयात् ।।

(सत्यव्रत)

अर्थ – देवता, उद्यानें, वापी, कूप इत्यादींची प्रतिष्ठा उत्तरायणांत करावी. दक्षिणायनांत केल्यास फल मिळत नाही.

मातृभैरववाराहनारसिंहत्रिविक्रमाः ।
महिषासुरहन्त्री च स्थाप्या वै दक्षिणायने ।।

(वैखा. सं.)

अर्थ – मातृका, भैरव, वराह, नरसिंह, त्रिविक्रम, देवी, इ. (उग्र) देवतांची स्थापना दक्षिणायनांत करावी.

गृहप्रवेश, देवार्चा, विवाह, चौल, उपनयन, इ. शुभ कर्में दक्षिणायनांत वर्ज्य करावीं. [पु. चिं.; पं. ज्यो.; म. भा. उ.]

अयनव्रत

काम्य व्रत. उत्तरायण लागलें असतां गोघृत-स्नान व विष्णुपूजा असा याचा विधि आहे. फल – विष्णुसायुज्य. [व्र. प.]

अयनांश

निरयनगणनेचें आरंभस्थान जो निःशर रेवती योगतारा (झीटापिशियम), त्याच्यापासून सायन-मेषसंपातापर्यंतचें क्रांतिवृत्तावरील अंशादि अंतर म्हणजे अयनांश होत. हे अयनांश सूर्यसिद्धांताप्रमाणे २७ अंशांपेक्षा जास्त कधीहि होत नाहीत. निःशर रेवती योगताऱ्यापासून पूर्वेस व पश्चिमेस २७ अंशांपर्यंत संपात जातो, असें मानतात. पण अर्वाचीन संशोधनाने संपाताची पूर्ण प्रदक्षिणा होते, असें निश्चित झालें आहे.

शून्यायनांश– गणेश दैवज्ञ याच्या मताने शके ४४४ मध्ये संपात रेवतीयोगताऱ्यावर (झीटापिशियम) होता. त्याची गति त्याने दरसाल ६० विकला धरली आहे. राजमृगांक, करणप्रकाश, करणकुतूहल या ग्रंथांमध्ये शके ४४५ मध्ये संपात रेवतीच्या योगताऱ्यावर होता, असें दिलेलें आहे. भास्वतीकरण ग्रंथामध्ये शके ४५० या वर्षीं, आर्यसिद्धान्ताच्या मतें शके ५२७ या वर्षीं व पराशरमतें शके ५३२ सालीं संपात रेवतीवर होता. संपात रेवतीवर आला असतांना अयनांश शून्य होतात.

पाश्चात्य गणितावरून पाहिलें असतां शके ४९६ सालीं संपात रेवती योगताऱ्यावर होता असें दिसतें. तसेंच पाश्चात्य शोधांवरून संपातगति सुमारें ५०·२ विकला आहे. प्राचीन ज्योतिष्यांनी ती ६० विकला धरली आहे. तीमध्ये दरसाल ९·८ विकला एवढा फरक पडतो. या चुकीच्या गतीमुळे शके ४९६ पासून दरसाल मेषसंक्रांतीमध्ये ९·८ विकलांची चूक पडत गेलेली आहे. प्राचीन मताने शके १८४० सालीं, १८४० उणें ४४४ = १३९६ गतवर्षें झालीं. तेव्हा दरसाल ६० विकला म्हणजे १ कला संपातगति धरली, तर त्या सालीं १३९६ कला म्हणजे २३ अंश १६ कला इतके अयनांश येतात. तेव्हा प्राचीन अयनांश २३·१६ – अर्वाचीन सूक्ष्म अयनांश १८·४४ = ४·७२ इतकें अंतर शके १८४० सालीं असल्यामुळे प्राचीन संक्रांती व निरयन ग्रह ४ अंश ३२ कला एवढ्याने अंतरित होतात. याप्रमाणे आजपर्यंत होत आलेली चूक नाहीशी केली, तरच पुढील पंचांगें शुद्ध निघतील. आज जें टिळकपंचांग प्रसिद्ध होत आहे, त्यांत ही चूक दुरुस्त केली आहे.

युरोप खंडांत संपातगतीचा म्हणजे जिच्यामुळे अयनांश धरावे लागतात, त्या अयनगतीचा शोध प्रथम हिपार्कस याने सनपूर्व १२५ च्या सुमारास लावला. त्याने आपले वेध व आपल्या पूर्वी १७० वर्षें टोमोकेरीस याने केलेले वेध, यांवरून हा शोध लावला. त्याच्या मागाहून सुमारें ३०० वर्षांनी टॉलेमीने संपातास गति आहे, ही गोष्ट निश्चयाने स्थापित केली. तो म्हणतो, की ‘ हिपार्कसच्या वेळेपासून आजपर्यंत २६७ वर्षांत तारांचे भोग २ अंश ४० कला वाढले आहेत. ’ यावरून १०० वर्षांस १ अंश म्हणजे ३६ वर्षांस १ विकला संपातगति त्याने ठरविली. टायकोब्राही याने संपाताची वार्षिक गति ५१ विकला ठरविली आणि पुढे लालांडी याने ५०·५ आणि डिलांबर याने ५०·१ विकला ठरविली. आमच्या प्राचीन ग्रंथांत जशा वार्षिक संपातगति निरनिराळ्या दिलेल्या आहेत, त्याचप्रमाणे वरील गतीहि भिन्न भिन्न आहेत. अरब लोकांतील अलबटानि नामक ज्योतिष्याने ६६ वर्षांत १ अंश म्हणजे वर्षास सुमारें ५५·५ विकला संपातगति ठरविली आहे, ती सूर्यसिद्धांताशीं बरीच जुळते. हल्ली पाश्चात्यांनीं संपातगति ५०·२ विकला निश्चित केलेली आहे. प्राचीन भारतीय ग्रंथकारांप्रमाणे अरब ज्योतिषीहि संपातास पूर्व-पश्चिम आंदोलगति मानीत होते. [म. ज्ञा. को.]

अयाचित पं. कमलाकर

(१४ वें शतक) स्थानपोथी या महानुभावी ग्रंथाचा कर्ता.

यांत चक्रधरस्पर्शित अशा सुमारें अडीचशें स्थानांची तपशील-वार नोंद असून त्यावरून तत्कालीन महाराष्ट्राची कल्पना येऊं शकते. [म. सा.]

अयाचितव्रत 'याचनां विना अन्येन दत्तस्य भोजनमयाचितम्' = (कोणाकडेहि) न मागतां दुसऱ्याने दिलेल्या अन्नाचें भोजन तें, अयाचित होय (पु. चिं.). प्रथम या व्रताचा संकल्प करतात. मग अयाचित वृत्तीने राहून दिवसांतून एकदा दुपारीं वा रात्रौ भोजन करतात. अयाचित असें कांही न मिळाल्यास उपवास करावा लागतो.

अयास्य आंगिरस एक सूक्तद्रष्टा. अंगिरसाला स्वराजेपासून झालेला मुलगा. हा हरिश्चंद्राच्या व शार्याति मानवाच्या यज्ञांत उद्गाता होता. हा आभूति त्वाष्ट्राचा शिष्य होय. इंद्राप्रीत्यर्थ सामगायन करीत असतां याला ध्यानशक्तीचें रहस्य उकललें. धेनु म्हणजे उषा, सूर्य व विद्युत् या वस्तू होत, असें हा सांगतो. 'मौक्तिकालंकारांनी काळचा घोडचाला सजवावें, त्याप्रमाणे पितरांनी काळचा आकाशाला तेजस्वी तारागणांनी मंडित केलें आहे आणि अंधाराला रात्रौ व प्रकाशाला दिवसा मोकळीक दिली आहे,' अशा उपमेने याने पितरांचें कर्तृत्व सांगितलें आहे. हा ऋषि मोठा निसर्गनिरीक्षक असून याच्या दोनच सूक्तांत कितीतरी निसर्गविषयक सुंदर उपमा येऊन गेल्या आहेत (ऋ. ९. ४४, ४६; १०. ६७, ६८).

अयोगव एक संकरजाति. 'वैश्यकन्यायां शूद्रादुत्पन्नसन्तानः' = वैश्य स्त्रीच्या ठिकाणीं शूद्रापासून उत्पन्न झालेल्या संततीला अयोगव असें नांव आहे. [श. क.]

अयोगुडजलोपल युद्धांत उपलयंत्रांतून शत्रूवर फेकावयाचा दगड किंवा तप्त गोळा. प्राचीन युद्धांतला हा एक प्रकार होता.

अयोध्या उत्तर प्रदेशांतल्या फैजाबाद जिल्ह्यांतलें एक महाक्षेत्र. सात पुऱ्यांमध्ये अयोध्येची गणना आहे. हें शहर सरयूच्या तीरावर वसलें आहे. 'मनुना मानवेन्द्रेण सा पुरी निर्मिता स्वयम्' = मानवश्रेष्ठ मनूने ती नगरी स्वतः निर्माण केली, असें वाल्मीकीने म्हटलें आहे (वा. रा. १. ५. ६). मनूचा पुत्र इक्ष्वाकु. तो पुढे अयोध्येच्या सिंहासनावर बसला. रामचंद्राच्या सत्ताकालांत अयोध्येचा परम उत्कर्ष झाला. वाल्मीकीने त्या काळच्या अयोध्येचें वर्णन पुढीलप्रमाणे केलें आहे —

> **कपाटतोरणवतीं सुविभक्तान्तरापणाम् ।**
> **सर्वयन्त्रायुधवतीमुषितां सर्वशिल्पिभिः ।।**
> **सूतमागधसम्बाधां श्रीमतीमतुलप्रभाम् ।**
> **उच्चाट्टालध्वजवतीं शतघ्नीशतसङ्कुलाम् ।।**

(वा. रा. १. ५. १०–११)

अर्थ – द्वारें आणि तोरणें यांनी युक्त, आंतल्या बाजारपेठांची मांडणी व्यवस्थित आणि विभक्त असलेली, सर्व यंत्रें आणि आयुधें यांनी युक्त, सर्व प्रकारचे कारागीर जिच्यामध्ये राहतात अशी, सूत व मागध यांनी भरलेली, ऐश्वर्यवती, जिची प्रभा अतुलनीय आहे, जिच्यामध्ये उंच हवेल्या आणि ध्वज फडकत आहेत आणि जिच्यामध्ये शेंकडो तोफा आहेत, (अशी ती अयोध्या होती).

या अयोध्येचें माहात्म्य तुलसीदास पुढीलप्रमाणे सांगतात —

> **जद्यपि सब बैकुंठ बखाना**
> **वेदपुराणविदित जगु जाना ।।**
> **अवध सरिस प्रिय मोहि न सोऊ**
> **यह प्रसंग जानै कोउ कोऊ ।।**

अर्थ – वेद-पुराणांनी जरी वैकुंठाचें वर्णन केलें असलें, तरी अयोध्येसारखें दुसरें कोणतेंहि क्षेत्र मला प्रिय नाही, ही गोष्ट पुष्कळांना माहीत आहे.

अयोध्या ही कोसल देशाच्या अंतर्गत असून हिची लांबी बारा योजनें आणि रुंदी तीन योजनें (१ योजन = ४ कोस) होती, असें वाल्मिकीने सांगितलें आहे (वा. रा. १. ५. ७). स्कंदपुराणाच्या मतें ती सुदर्शन चक्रावर वसली असून भूतशुद्धितत्त्व या ग्रंथाच्या मतें ती रामाच्या धनुष्याग्रावर स्थित आहे.

कथासरित्सागरांत अयोध्येचे अनेक उल्लेख मिळतात. उदयनाची माता मृगावती ही अयोध्येच्या कृतवर्म राजाची कन्या असें तिथे सांगितलें आहे. शशांकवती–लंबकाच्या मुख्य कथेचें स्थान अयोध्या हेंच आहे. वेताळपंचविशींत शूर चोराला पति म्हणून वरणारी रत्नवती नांवाची वैश्यकन्या अयोध्येंतलीच होती. तिचा हा वृत्तांत वीरकेतूच्या कारकिर्दींत घडला.

वर्तमान अयोध्या ही विक्रमादित्याने वसविली आहे. एका प्रसंगीं त्याच्या सैन्याचा तळ सरयूच्या तीरावर पडला. तिथे तप करणाऱ्या योगिजनांकडून त्याला कळलें, की इथेच पूर्वी रामाची अयोध्या होती. त्याने मग त्या क्षेत्राचें पुनरुज्जीवन करावें असें ठरवून तिथे मंदिरें, सरोवरें, विहिरी या गोष्टी

निर्माण केल्या. बुद्धकालांत अयोध्येला बरेंच महत्त्व होतें. इथे अनेक बौद्ध विहार असल्याचें युआन च्वाँग सांगतो. गुप्तकालांतहि हिला राजधानीचा दर्जा मिळाला होता. अयोध्येवर मुसलमानांचीं अनेकदा आक्रमणें झालीं आहेत. सन ११९३ मध्ये शहाबुद्दीन घोरीने हा प्रांत जिंकून घेतला. तेव्हापासून तों १८५६ मध्ये ब्रिटिशांच्या ताब्यांत जाईपर्यंत हा प्रांत मुसलमानांकडेच होता.

अयोध्येंत अनेक शिव-विष्णुमंदिरें आहेत, तशाच मशिदीहि आहेत. सीतारसोई, हनुमानगढी, कनकभवन, इ. दर्शनीय स्थळें आहेत. साधु-बैराग्यांचे मठ आणि आखाडेहि आहेत. अयोध्येच्या दोन परिक्रमा आहेत. पहिली स्वर्गद्वार या स्थानापासून सुरू होते व जनौरा, गुप्तार घाट, हीं स्थळें करून परत स्वर्गद्वारांत येऊन संपते. दुसरी अंतर्वेदीची परिक्रमा रामघाटापासून सुरु होऊन सुग्रीव पर्वत, लक्ष्मण घाट, या क्षेत्रांवरून परत रामघाटीं येऊन पुरी होते.

गोस्वामी तुलसीदासांनी आपलें रामचरितमानस अयोध्येंत प्रकाशित केलें. अयोध्या हें जैनांचेंहि पवित्र क्षेत्र आहे. त्यांच्या पहिल्या व चौथ्या तीर्थंकराचें हें जन्मस्थान आहे. या नगराला विनीता, अयोध्या, अयुधा, साकेत, इक्ष्वाकुभूमि, रामभूमि, रामपुरी, अशीं अन्य नांवें आहेत.

अयोध्येंत एक प्राचीन विद्यापीठ होतें व तें तिथला जैन राजा ऋषभ याने स्थापलें होतें, असें त्रिषष्टिशलाकापुरुषचरित या ग्रंथावरून कळतें. अर्हत् ऋषभ याला ७२ विद्या येत होत्या व त्या त्याने आपल्या प्रजेला शिकविल्या. या शिक्षणाचा प्रारंभ लेखनकलेने झाला व त्याचा शेवट आकाशांतल्या ताऱ्यांचें ज्ञान देऊन करण्यांत आला, असें त्या ग्रंथांत म्हटलें आहे. **पाहा–** कोसल, साकेत.

अयोनिसंभव नर्मदेवरील एक तीर्थ. यांत स्नान केल्याने पुनर्जन्म टळतो. [मत्स्य पु. १९२]

अय्यनार द. भारतांतला विशेषतः तमिळनाडमधला एक ग्रामदेव. याला अय्यप्प असेंहि म्हणतात. केरळांत याला शास्ता म्हणतात. द्रविड आदिवासी त्याला आपला नियामक समजतात. तमिळनाडमध्ये प्रत्येक गावांत याला स्थान आहे. पाणवठ्याजवळ व उंच वृक्षाच्या छायेंत याच्या नांवाने दगड बसविलेला असतो. कांहीं गांवांतून चवाठ्यावर याच्या मूर्ती बसविलेल्या असतात. हा भुताखेतांचा अधिपति आहे. तो मध्यरात्रीं घोड्यावर स्वार होऊन आपल्या भूतगणांसह संचाराला निघतो. त्याच्या हातीं खड्ग असतें. त्याच्या वाटेंत जो कोणी येतो तो मृत्युमुखीं पडतो. आजारांतून बरें



अय्यनार

होण्यासाठी लोक त्याला नवस करतात व चिकणमातीचे हत्ती, रेडे, कुत्रे व घोडे बनवून त्याला अर्पण करतात. याचे पुजारी कुंभार असतात. अवर्षण पडतें तेव्हा याची अश्वारूढ प्रतिमा तयार करून तिची मिरवणूक काढतात आणि घरोघरचा भात जमवून त्याला नैवद्य सर्मपितात. रात्रीच्या वेळीं लोक याच्या स्थानाकडे फिरकत नाहीत. याचें स्वरूप, अधिकार व कार्य पाहिलें असतां, खंडोबा व ब्रह्मभूत या देवांशी याचें साधर्म्य दिसतें. केरळांत हा वनदेव



अय्यनारचें मंदिर

मानला जात असून त्याचें प्रमुख स्थान साबरीमलै (शबरीमलै) वर आहे. **पाहा –** शास्ता.

अय्यंपळ्ळैयम् मदुराई जिल्ह्यांत दिंडिगलपासून १८ मलांवर हें गांव आहे. तिथे असलेलें अय्यनारचें मंदिर प्रसिद्ध आहे.

अय्यर कोटीश्वर (१८६९–१९३८ इ. स.) तमिळ पदांचा रचयिता. कुंजर भारती या कवीचा हा नातू होय. रामनद जिल्ह्यांतील नंदनूर गांवीं याचा जन्म झाला. याचा पिता नागनाथ अय्यर हा शिवगंगै

व रामनद येथे दरबारगायक होता. कोटीश्वर अय्यर हा संगीतकार व उत्तम गायक होता. मद्रास विद्यापीठाची पदवी मिळविल्यावर याने मद्रास हायकोर्टांत नोकरी पत्करली व फावल्या वेळांत तमिळ भाषेंत कीर्तनें रचण्यास सुरवात केली. नोकरींतून निवृत्त झाल्यावर याने बाहात्तर मेलाराम कीर्तनें रचलीं. दाक्षिणात्य संगीतांत कोटीश्वर अय्यरने घातलेली ही मोलाची भर होय. तोडीरागावर याचें स्वतंत्र व मूलग्राही विवेचन आहे.



अय्यर कोटीश्वर

त्यावरून याला तोडी कोटीश्वर असें म्हणूं लागले. त्याने स्वतःला कवि कुंजरदास अशी उपाधि घेतली होती. त्यागराजावर याने लिहिलेलें काव्य फार प्रसिद्ध आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अय्यर पगै तमिळनाडमधला एक नायन्मार. हा धनाढ्य शिवभक्त होता. एके दिवशीं शिवाने साधुवेषांत येऊन याची पत्नीच मागितली. हा तिचें दान करायला निघाला, तेव्हा आप्तेष्ट आडवे पडले. त्या सर्वांना कापून काढून याने त्या साधूला पत्नीचें दान केलें. त्यामुळें शिवाने संतुष्ट होऊन त्याची पत्नी त्याला परत दिली व मेलेल्यांना जिवंत केलें. [पे. पु.]

अय्यावाळ मूळ नांव श्रीधर वेंकटेश्वर दीक्षित. हा तिरुविसैनल्लूर येथे राहणारा तेलुगु ब्राह्मण होता. याने अनेक काव्यें व स्तोत्रें लिहिलीं आहेत. तमिळनाडमध्ये नामसंकीर्तन या नांवाने भजनाचा प्रकार यानेच सुरू केला. हा मोठा संगीतज्ञ होता. आजहि कार्तिक मासांत पौर्णिमेपर्यंत तिरुविसैनल्लूर या गांवीं त्याच्या स्मृतीसाठी संगीतोत्सव होत असतो. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अरकल तमिळनाडमधील एक जमात. यांची वस्ती मुख्यत्वें कर्नूल जिल्ह्यांत आहे. अरक=नांगर किंवा अरकदु=शेतकरी, या शब्दांवरून या जमातीचें नांव व्युत्पादितात. [का. ट्रा. स. इं.]

अरख उ. भारतांतील एक शेतकरी जात. वऱ्हाडांतहि यांची वस्ती आहे. ही जात द्रविड वंशांतली दिसते. परशुरामाला एकदा जळू चावली व त्यांतून निघालेल्या रक्तांतून आपली उत्पत्ति झाली, असें हे सांगतात. गोंड व पासी यांच्या संबंधांतून यांची उत्पत्ति झाली असावी, असें रसेल व हिरालाल यांचें मत आहे. चांदा जिल्ह्यांतले अरख गोंडांचे अगदी जवळचे भाईबंद दिसतात. हे स्वतःला हिंदु म्हणवीत असले, तरी त्यांचे धार्मिक व्यवहार वन्य धर्मांप्रमाणेच चालतात. देवी व करतल नांवाचा देव हीं यांचीं दैवतें आहेत. सामान्यतः हे सर्व हिंदु सण पाळतात. यांच्यांत गोत्रें आहेत. सगोत्रविवाह करीत नाहीत. कुलाचाराप्रमाणे १२ देवतांची पूजा करतात. समान संख्येचीं दैवतें पूजणारे, परस्परांत विवाहसंबंध करीत नाहीत. लग्नें मारुतीच्या देवळापुढे लावतात. मुलीचें देज घेतात. लग्नांत पांच दोऱ्यांचें मंगळसूत्र बांधतात व कपाशीचें झाड लावतात. विधवाविवाह रूढ आहे.

मृताचें आशौच एक दिवसच पाळतात. मद्य—मांस चालतें. चांभाराला शिवत नाहीत. ब्राह्मण यांच्या घरीं पौरोहित्य करीत नाहीत. [से. रि.; का. ट्रा. सी. पी.]


अरगजा अंगाला लावायचें एक उटणें. तवकील पिवळ्या रंगाने रंगवून त्याला चमेली, उदाचें फूल, बेलिया, चंदन या अत्तरांचा वास दिला, की अरगजा तयार होतो. उंची अरगजांत केशर, कस्तुरी हे पदार्थ वापरतात. याच्या मसाल्याचे मणि बनवून त्यांच्या माळा करतात. [सु. वि. को.]

अरगु मुंड आदिवासींतला वाग्दान विधि. वरपक्षाकडील मंडळी वधूपक्षाकडे आल्यावर वधूला बाहेर आणतात. तिच्या मागे एक माणूस पेटलेली चूड आणि दुसरा माणूस दारूचें मडकें व पाण्याचा लोटा घेऊन उभा राहतो. नंतर वधूला वरपित्याच्या किंवा त्याच्या प्रतिनिधीच्या हातीं देण्यांत येतें. तो तिला उराशीं कवटाळून आपल्या घरीं तिला मायेने संभाळलें जाईल, असें अभिवचन देतो. मग जमातीचा पंच 'मुलीला नीट निरखून पारखून घ्या', असें वरपित्याला सांगतो. त्या पेटलेल्या चुडीचा अर्थ हा, की 'जें काय आहे तें उघड आहे, आमच्याकडे लपवाछपवी नाही'. त्यानंतर वधूला जर तो संबंध पसंत असेल, तर ती लोटच्यांतलें पाणी द्रोणांत भरून तें भावी सासऱ्याला देते. तो विचारतो, 'पाणी कसें

आहे ?' ती उत्तर देते, 'सोन्यासारखें.' त्या वेळीं जमलेले जे लोक तें पाणी पितात, ते त्या लग्नाचे साक्षीदार होतात. मग वरपिता दारूच्या मडक्यांतून द्रोणभर दारू वधूला प्यायला देतो. तो त्या द्रोणांत आठ पैसे टाकतो, ते वधूला मिळतात. मग सर्वांचें जेवण होतें. [एन्सा. मुं.]

अरणभेंडी पंढरपुराजवळचें सांवता माळ्याचें गांव. इथे त्याचा मळा व विहीर अजूनहि दाखवितात. **पाहा** – सांवता माळी.

अरणि (णी) यज्ञीय अग्नि मंथन करून निर्माण केला जातो. त्यासाठी अश्वत्थाच्या दोन फळ्या घेतात. अरणीच्या मधोमध एक खांच पाडून त्यांत मंथा बसवितात. खालच्या अरणीला अधरारणि व वरचीला उत्तरारणि म्हणतात. अरणीला 'अग्नेर्योनिः' = अग्नीचें जन्मस्थान, असें म्हटलें आहे. अरणींच्या साहाय्यानें अग्निमंथन करण्याचा उल्लेख ऋग्वेदांत आहे. विश्वामित्र म्हणतो ––



अरणि—उत्तर व अधर

ज्याप्रमाणे गर्भवती स्त्रियांच्या उदरांत गर्भ ठेविला जावा त्याप्रमाणे हा सर्वज्ञ (अग्नि) या दोन मंथन फळ्यांच्या ठिकाणीं स्थापित झाला आहे. मनुष्याने जागृत राहून व हवि समर्पून रोज त्याचा गौरव करावा, अशी या अग्नीची थोरवी आहे (ऋ. ३.२९.२).

अरण्य 'अर्यते मृगैः इति' = जिथे पशु संचार करतात तें अरण्य होय (हलायुध). अरण्य शब्दाचा अर्थ नेहमीच जंगल असा असतो, असें नाही. अरण्य हें वाडी, परसूं व शेतजमीन यांपासून विभक्त व मनुष्यापासून दूर (तिरः) असतें, असें वैदिक वाङ्मयांत सांगितलें आहे. अरण्य व ग्राम यांतहि भेद केला आहे. भिक्षु अथवा संन्यासी वनांत राहतात, असें छांदोग्यांत म्हटलें आहे (८.५.३). ऋग्वेदांत अरण्याला लागणाऱ्या वणव्याचें वर्णन आहे (ऋ. १.६५.४; २.१४.२).

पुराणान्तरीं नऊ अरण्यें प्रसिद्ध असून त्यांचीं नांवें पुढील-प्रमाणे आहेत–– (१) दंडकारण्य (२) सैंधवारण्य (३) पुष्करारण्य (४) नैमिषारण्य (५) कुरु-जांगल (६) उत्पला-वर्तकारण्य (७) जंबूमार्ग (८) हिमवदरण्य व (९) अर्बुदारण्य.

अरण्यद्वादशी तिथिव्रत. मार्ग० शु. ११ शी किंवा कृत्य-मयूखाच्या मताप्रमाणे चैत्र किंवा श्रावण शु. ११ शी. व्रतावधि एक वर्ष. यांत गोविंदपूजा व द्वादशीस अरण्यांत जाऊन पारणा करायची असते. पारणेस १२ ब्राह्मण, यती किंवा दंपती यांस भोजन घालतात. [हे. व्र.]

अरण्यषष्ठी ज्येष्ठ शु. षष्ठी. हें तिथिव्रत आहे.

ज्येष्ठे मासि सिते पक्षे षष्ठी चारण्यसंज्ञिता।
व्यजनैककरास्तस्यामटन्ति विपिने स्त्रियः ।।
तां विन्ध्यवासिनीं स्कन्दषष्ठीमाराधयन्ति च ।
कन्दमूलफलाहारा लभन्ते सन्ततिं शुभाम् ।।

(राजमार्तंड)

अर्थ– ज्येष्ठ शु. षष्ठीला अरण्यषष्ठी असें नांव आहे. तिला स्कंदषष्ठी असेंहि म्हणतात. त्या दिवशीं सुवासिनी हातात पंखा घेऊन वनांत हिंडतात; कंद-मुळें-फळें खाऊन उपास करतात. व विंध्यवासिनीची पूजा करतात. अपत्यप्रीप्तिसाठी हें व्रत आहे.

राजस्थानांतल्या स्त्रिया हें व्रत करतात व त्या दिवशीं अरण्यांत जाऊन अपत्यप्राप्तिसाठी विशिष्ट वनस्पति खातात. यासारखाच आणि याच हेतूने प्राचीन ड्रुइडिक (Druidic) लोक एक सण पाळीत आणि त्याची तिथिहि षष्ठी हीच असे.

अरण्यानी वैदिक देवता. सप्तसिंधूतल्या आर्यांच्या पशु-धनाचें संवर्धन अरण्यांवर अवलंबून असे. म्हणून त्यांनी अरण्याला देवता मानलें आहे. देवमुनि म्हणतो––

आञ्जनगन्धिं सुरभिं बह्वन्नामकृषीवलाम् ।
प्राहं मृगाणां मातरमरण्यानिमशंसिषम् ।।

(ऋ. १०.१४६.६)

अर्थ–– रानांतील सुगंधी लतांचें उटणें लावणारी ही अरण्यानी स्वतःहि सुवासिक आहे. जमीन न नांगरतां ही बहुत खाद्यपदार्थ निर्माण करते. ही मृगादि पशूंची माता आहे. हिची प्रशस्ति मी गायिली आहे.

अरत्नि मूळ अर्थ कोपर असा आहे. 'बाहुर्वा अरत्निः' (श. ब्रा. ६.३.१.३३). व्यवहारांत लांबी मोज-ण्याचें एक परिमाण. एक हात (कोपरापासून करंगळीच्या टोकापर्यंत) असा त्याचा अर्थ आहे (ऋ. ८.८०.८; अथर्व. १९.५७.६). [वे. इं.]

अरध–उरध सं. अधोर्ध्व=खाली व वर. मेरुदंडाच्या अधोभागीं असलेल्या मूलाधार चक्राला अध व सहस्रार चक्राला ऊर्ध्व असें हठयोगसाधनेंत कल्पिलें आहे. या दोहोंचें वेगळेंपण मोडून कुंडलिनीला मूलाधारांतून सहस्रारांत नेऊन स्थिर करणें, ही हठयोगाची प्रमुख साधना आहे. 'गोरखबानीं'त या अधोर्ध्वाच्या मध्यभागीं त्रिकुटी शून्याचा उल्लेख आहे. 'अरध उरध बिच धरी उठाई। मंधि सुनमें बैठा जाई'=अरध उरध यांच्या मधील शून्यांत साधकाची स्थिति असावी. [हिं. सा. को.]

अरनाथ जैनांचा अठरावा तीर्थंकर. जन्मस्थान हस्तिनापुर. मातापिता मित्रसेना व सुदर्शन. जन्मनक्षत्र रोहिणी. लांछन नंद्यावर्त किंवा मत्स्य. ज्ञानवृक्ष आम्र. मोक्षस्थान पारसनाथ पर्वत. यक्ष–यक्षिणी यक्षेंद्र व धारणी. हा गर्भांत असतां याच्या आईने रत्नयुक्त अर (चाकाची आर) स्वप्नांत पाहिला म्हणून अरनाथ असें याचें नांव ठेवलें. हा चक्रवर्ती झाला. याच्या कुशाणकालीन दोन पाषाणमूर्ति सांपडल्या आहेत. [जै. इ.]

अरपचन एक बोधिसत्त्व. मंजुश्रीचा रूपभद. याचें वर्णन पुढीलप्रमाणे केलें आहे—

खड्गपुस्तकधारिणं रक्तवस्त्रयुगयुतम् ......
विश्वदलकमलस्थबद्धपर्यङ्किनम्....... (साधनमाला)

अर्थ–खड्गपुस्तकधारी, दोन लाल वस्त्रें धारण करणारा... विश्वदलकमलावर पर्यंकासन घालून बसलेला....

रक्त–गौर. पार्श्वभागीं केशिनी, उपकेशिनी, चंद्रप्रभ व सूर्यप्रभ. याला सद्योनुभव असें दुसरेंहि नांव आहे. याच्या मूर्ति बऱ्याच आढळतात. [इं. बु. इ.]

अरंपुकट्टी द. भारतांतील वेल्लाळांची एक शाखा. हे लोक फुलांचे हार व गुच्छ तयार करण्याचा व्यवसाय करतात. [का. ट्रा. स. इं.]

अरफात मक्केपासून बारा मैलांवरचा एक डोंगर. हाजचे यात्रेकरू यात्रेच्या नवव्या दिवशीं याच्यावर मुक्काम करून तिथेंच दुपारची प्रार्थना म्हणतात व खुत्बा ऐकतात. [डि. इ.]

अरब व भारत अरबस्तानांत राहणाऱ्या लोकांना अरब म्हणतात. अरब ही जात नसून ती एक जमात आहे. बहुसंख्य अरब धर्माने मुसलमान आहेत. अरब हे स्थायिक व भटक्ये असे दोन्ही प्रकारचे आढळतात. स्थायिक अरब शेती व पशुपालन करून राहतात. भटक्ये अरब वाळवंटांतून उंटाच्या पाठीवर माल लादून त्याची ने-आण करतात. भटक्या अरबांचे उंटांचे काफिले दिवसभर वाळवंटांतून प्रवास करून रात्रौ एखाद्या ओलाव्याच्या जागीं तळ ठोकतात. अरबांचें अन्न मुख्यत्वें मका किंवा गहूं यांची रोटी, खजूर व उंटाचें दूध, हें असतें. अरब हे बुद्धीने हुशार, आतिथ्यशील, शूर व बऱ्याच अंशीं कडवे असतात.

कुराण हा इस्लामी धर्मग्रंथ अरबी भाषेंत लिहिलेला आहे. अरबी भाषा ही सेमेटिक भाषाकुलांतली दक्षिणेकडील शाखा आहे. उत्तरेची व दक्षिणेची असे तिचे दोन मुख्य भेद आहेत. दक्षिणेकडील भाषेस हिमीअराइट असें नांव होतें; पण ती आता नष्टप्राय आहे. उत्तरेची भाषा म्हणजे कुराणाची भाषा होय. ती सर्व अरबस्तानांत बोलली व लिहिली जाते. उच्च दर्जाची अरबी भाषा येमेन प्रांतांतील उच्च वर्गामध्ये आढळते. मुहंमदानंतरच्या दोन शतकांपर्यंत या भाषेच्या व्याकरणाची फारशी वाढ झालेली नव्हती. मुसलमानांनी चालविलेल्या युद्धांमुळे व मिळविलेल्या विजयांमुळे या भाषेचा प्रसार पश्चिम आशिया, पूर्व व उत्तर आफ्रिका, तसेंच स्पेन व भूमध्य समुद्रांतील कांही बेटें इथवर झाला. या सर्व प्रदेशांत तिचे अवशेष आजहि दृष्टीस पडतात. या भाषेंतील प्राचीन वाङ्मयाची फारशी उपलब्धि नाही. पण या भाषेंत प्राचीन काळापासून काव्यरचना होत असली पाहिजे, असें अनुमानितां येतें. मुहंमदापूर्वीहि अरब कवींनी त्यांच्यांतल्या यादवीयुद्धांवर, वीरांच्या पराक्रमांवर व स्त्रियांच्या सौंदर्यावर काव्यरचना केलेली आढळते. अरबांच्या जत्रा होत, त्या वेळीं त्यांच्यांतल्या शायरांच्या काव्यस्पर्धा होत व त्या वेळीं कवींचा गौरवहि करीत. त्यांचीं काव्यें सुवर्णाक्षरांत लिहवून काबाच्या मंदिरांत टांगण्यांत येत. त्यांना मोदसहबात किंवा मोअल्लाकत अशी संज्ञा आहे. अशा काव्यांपैकी सात काव्यें उपलब्ध आहेत.

अरबी वाङ्मयाच्या उत्कर्षकालास मुहंमदापासून प्रारंभ होतो. अल् मनसूर याने अरबी वाङ्मयाला प्रथमच उत्तेजन दिलें. हारून-अल्-रशीद (७८६–८०८ इ. स.) याच्या कारकीर्दींत अरबी भाषा, कला व वाङ्मय यांना श्रेष्ठ वैभव प्राप्त झालें. याने सर्व देशांतून विद्वान् लोकांस पाचारण करून त्यांना मोठमोठ्या देणग्या दिल्या व त्यांच्याकडून ग्रीक, सीरियॅक, संस्कृत, इ. भाषांतील ग्रंथांचीं भाषांतरें करवून त्यांचा प्रसार केला. अल् मामून (८१३–८३३ इ. स.) याने

विद्या व कला यांना खूपच उत्तेजन दिलें. इतकेंच नव्हे; तर बगदाद, अलेक्झांड्रिया, इ. शहरांत त्याने ग्रंथालयें स्थापिलीं. मध्ययुगांत अरब लोक गणित, भूगोल, वैद्यक, काव्य, ज्योतिष, रसायन, इ. शास्त्रांत बरेच पुढारलेले होते. त्यांना पाश्चात्य देशांच्या ज्ञान-विज्ञानाचे आद्य गुरु मानतात.

अरबी लिपि ही उजवीकडून डावीकडे लिहिली जाते. त्यांच्या लिपींपैकी जुनी कुफी ही लिपि युफ्रातिस नदीवरील कुफा या शहरावरून नामाभिधान पावली असून ती सीरियॅकवरून निघाली आहे. दहाव्या शतकांत नस्तालिक ही नवी लिपि प्रचारांत आली. व तीच सध्या प्रचलित आहे.

अरब लोकांची अशी समजूत आहे, की हजरत आदम हा स्वर्गांतून प्रथम खाली उतरला तो हिंदोस्तानांत. तिथून तो अरबस्तानांत गेला. म्हणून अरब लोक भारताला आपली पितृभूमि मानतात. ही इतिहासपूर्वकालांतली कथा आहे. ऐतिहासिक कालावर नजर टाकली तरी असें दिसतें, की हजारों वर्षांपूर्वी अरब व्यापारी भारताच्या बंदरांत येऊन विविध प्रकारचा माल यूरोपपर्यंत घेऊन जात. इराणच्या बादशहाने इ. स. च्या सहाव्या शतकांत सिंधवर आपली सत्ता स्थापली होती. अरबस्तानांत इस्लामचा उदय झाल्यानंतर प्रथम त्यांनी इराण जिंकला व नंतर भारताकडेहि आपली दृष्टि वळविली. सातव्या शतकांत ठाणें, भडोच, इ. पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांना त्यांचा उपसर्ग पोंचला. आठव्या शतकांत मुहंमद-बिन-कासीमने सिंधवर स्वारी करून मुलतान पर्यंत आपली सत्ता स्थापन केली. गुजरात व मध्यभारत यांवर झालेलीं त्यांचीं आक्रमणें चालुक्य, प्रतीहार वगैरे राजांनी निकराचा प्रतिकार करून परतवून लाविलीं. त्या काळीं सिंधमध्ये बौद्ध धर्माचें प्राबल्य होतें व बौद्ध व ब्राह्मण यांचें वैर होतें. त्यामुळे दाहर राजाच्या विरुद्ध असलेले अनेक बौद्ध लोक मुसलमानांना जाऊन मिळाले व दाहरच्या पराजयाचें तें एक महत्त्वाचें कारण ठरलें.

आठव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत अनेक अरबी व्यापारी भारतांत येऊन गेले. त्यांतील कांही जणांनी आपल्या प्रवासाचीं वर्णनें लिहून ठेवलीं आहेत. त्यांत भारताविषयीं बरीच माहिती आढळते. विशेषतः ११ व्या शतकांत अल्-बिरुनीने भारतांत वास्तव्य करून जी माहिती आपल्या तारीख-अल्-हिंद या ग्रंथांत लिहिली आहे, ती अभ्यसनीय आहे. सातव्या शतकापासून तों पंधराव्या शतकापर्यंत भारताचा परदेशाशीं चालणारा व्यापार अरबांच्याच हातांत होता. सिंधमध्ये देवल, गुजरातमध्ये खंबायत व सोपारा, दक्षिणेंत कोलम्मल्ली, मलबार, इ. बंदरें त्या काळांत चालू होतीं. अरबांची तिथे नेहमी ये-जा चालू असे. ते येतांना खजूर व घोडे भारतांत आणीत व लिंबू, नारळ, आंबा, इ. पदार्थ अरबस्तानांत घेऊन जात.

आफ्रिकेला वळसा घालून व्हाॅस्कु द गाम (वास्को डि गामा) भारतांत आला व तो नवा समुद्रमार्ग त्यानेच शोधून काढला, असा समज आहे. पण त्यापूर्वी अनेक शतकें अरबांना तो मार्ग माहीत होता. इब्नमाजिद नांवाच्या एका अरबी खलाशानेच व्हाॅस्कूला तो मार्ग दाखविला व त्याला भारताच्या किनाऱ्यावर आणून सोडलें, असें एका अरबी ग्रंथांत लिहिलें आहे.

खुरासान हा अफगाणिस्तानच्या सीमेवरचा इराणांतला एक प्रदेश होय. (पूर्व इराण व आधुनिक अफगाणिस्तान याला समुच्चयाने खुरासान म्हणत.) त्या प्रदेशांत इस्लामच्या पूर्वी बौद्धधर्म प्रचलित होता. त्या देशांतील बल्ख या शहरांत नौबहार नांवाचें बौद्ध मंदिर होतें. बरमक हें तिथल्या पुजाऱ्याचें नांव होय. खलीफा उस्मानच्या काळांत इस्लामी लोकांनी बल्ख जिंकलें, तेव्हा बरमक याने इस्लाम धर्म स्वीकारला. पुढे याच्या वंशजांनी अब्बासी घराण्याच्या कारकीर्दींत मुख्यमंत्री म्हणून काम केलें व त्या राज्यांत भारतीय विद्यांचा प्रसार केला. त्यांनी भारतांतून बऱ्याच शास्त्री-पंडितांना बगदादला नेलें व त्यांच्या करवीं अनेक संस्कृत ग्रंथांचें अरबींत भाषांतर करविलें. अनेक इतिहासकारांनी आपल्या ग्रंथांत त्या वेळच्या भारताला गौरविलें आहे. अरबांनी आपण १ ते ९ अंक हिंदुलोकांकडूनच मिळविले, असें स्पष्ट कबूल केलें आहे. अरबी भाषेंत या अंकांना हिंदसा असें म्हणतात. गणिता-प्रमाणेच ज्योतिष, संगीत, रसायन, वैद्यक, तर्कशास्त्र, अलंकार-शास्त्र, युद्धविद्या, इ. अनेक विषयांचें ज्ञान अरबांनी भारतीय पंडितांकडूनच मिळविलें व तें पुढे युरोपीय लोकांना दिलें.

बुद्धिबळें व सोंगट्या हे खेळहि अरबांनी भारतीयांकडूनच घेतले. याकूबी नांवाच्या अरबी लेखकाने त्याविषयी बरेंच लिहिलें असून असें प्रतिपादिलें आहे, की 'हे खेळ भारतीय दर्शनाच्या दोन विचारधारांचे सूचक आहेत. सोंगट्या म्हणजे दैववाद व बुद्धिबळें म्हणजे प्रयत्नवाद होय.'

उत्तर भारतांत इस्लामचा प्रवेश होण्यापूर्वी दक्षिण भारतांत अरब मुसलमानांचा प्रवेश झाला होता; पण तो राजनैतिक नसून व्यापारी स्वरूपाचा होता. मलबारशीं अरबांचे संबंध आठव्या शतकापासूनचे आहेत. अरब व्यापारी तिथे वखारी घालून स्थायिक झाले होते. मापिळ्ळा (मोपला) ही मलबार-मधली मुसलमान जमात अरबांपासूनच निर्माण झालेली आहे. कारोमंडल किनाऱ्यावरहि अरब लोकांचा व्यापार चालू होता.

या अरबांचे तिथल्या हिंदु राजांशीं चांगले संबंध होते. नवव्या शतकांत गुजराथमधील राजांशींहि त्यांचे व्यापारी संबंध होते. त्या काळांत कच्छ-काठेवाडमध्ये अरब व्यापाऱ्यांची संख्या बरीच होती. भारतांत अरबांचें राज्य सिंधपुरतेंच मर्यादित राहिलें. मुसलमानांनी भारतांत राज्यें स्थापन केलीं; पण ते अरब नसून तुर्क व इतर वंशाचे होते. [अ. भा. सं.; सु. वि. को.]

अरयडिगळ तमिळनाडमधला एक नायन्मार. हा कवि असून कांचीच्या पल्लव राजकुलांत जन्मला होता. याने राजकाजांतून निवृत्त झाल्यावर शैव क्षेत्रांच्या यात्रा केल्या व प्रत्येक क्षेत्रांत एकेक काव्य रचलें. [पे. पु.]

अरवन द. भारतांतील एक ग्रामदेव. हा द्रौपदी नामक ग्रामदेवतेच्या अनुषंगाने असतो. हा नागकन्येपासून अर्जुनाला झालेला पुत्र होय, असें मानतात. भारतीय युद्धांत विजय मिळविण्यासाठी पांडवांनी याला बलिदान केलें, अशी कथा दक्षिणेंत प्रचलित आहे. [सा. इं. इ. गॉ. गॉ.]

अरवली एक पर्वत. संस्कृत नांव पारियात्र. मूळचें देशी नांव आडावला. टॉलेमीने उल्लेखिलेला अपो कोपी मांटे हा पर्वत हाच असावा. अबू हें याचें अत्युच्च शिखर होय. हा विस्ताराने लहान असला, तरी याचें माहात्म्य मोठें आहे. हा राजस्थानाचा आधार आहे. याच्या उत्तरेस सप्तसिंधूंचा प्रदेश व पश्चिमेस थर–पारकरचें रण आहे. सिंध–पंजाबच्या मैदानांतून भारतावर झालेलीं आक्रमणें कांही कालपर्यंत यानेच थोपवून धरलीं. या संघर्षांचीं प्रतीकें त्याच्या अंगाखांद्यावर गडांच्या रूपाने आजहि विद्यमान आहेत. हा डोंगर राजस्थानाचे दोन भाग बनवितो. सौराष्ट्र, राजस्थान व मारवाड हे तिन्ही प्रदेश अरवलीनेच निर्माण केले आहेत. पण त्यांची प्रकृति किती भिन्न आहे! जरा पाऊस जास्त पडला, तर गुजरातेंत महापूर लोटतात; तर सरस्वतीसारखी महानदी गडप करूनहि मारवाडची मरुभूमि तृषार्त व कोरडीच राहते. सौराष्ट्र वैश्यवृत्तीचा; तर राजस्थान क्षात्रवृत्तीचा आहे. [सह्याद्रि; म. ज्ञा. को.]

अरविंद घोष (१८७२–१९५० इ. स.) या महापुरुषाचा जन्म पश्चिम बंगालमधील एका कायस्थ घराण्यांत झाला. यांच्या वडिलांचें नांव कृष्णधन असें होतें. हे एम्. डी. असून सिव्हिल सर्जनच्या हुद्यावर काम करीत होते. अरविंदांचें प्राथमिक शिक्षण दार्जिलिंग येथे झालें.


महायोगी अरविंद

वयाच्या सातव्या वर्षी त्यांना त्यांच्या दोन ज्येष्ठ बंधूंसह शिक्षणासाठी इंग्लंडांत पाठविण्यांत आलें. तिथे मँचेस्टर येथील ड्रेवेट दंपतीच्या देखरेखीखाली हीं मुलें राहत. अरविंदांनी पांच वर्षांत माध्यमिक शिक्षण पुरें करून केंब्रिज येथील किंग्ज् कॉलेजांत प्रवेश मिळविला. तिथे त्यांनी अनेक भाषांचा अभ्यास करून त्यांवर प्रभुत्व मिळविलें. असामान्य बुद्धीचा विद्यार्थी असा त्यांचा तिथे लौकिक झाला. याच वयांत आपल्या देशाबद्दल त्यांच्या मनांत भक्तिभाव निर्माण झाला.

१८९० मध्ये त्यांनी आय्. सी. एस्. चीहि परीक्षा दिली. पण घोड्यावर बसण्याच्या परीक्षेच्या वेळीं ते गैरहजर राहिल्याने त्यांना अनुत्तीर्ण ठरविण्यांत आलें. विलायतेंतून मायदेशीं आल्यावर अरविंदांनी बडोद्याच्या दरबारांत नोकरी पत्करली. प्रारंभीं ते जमाबंदी व दिवाणी खात्यांत होते. पण प्रशासकी कामाची आवड नसल्यामुळे त्या नोकरींत त्यांचें मन रमेना; म्हणून त्यांना मग बडोदा कॉलेजांत इंग्रजीचे प्राध्यापक व पुढें कुलगुरु नेमण्यांत आलें. तिथे असतांनाच त्यांचें धर्म व संस्कृति यांकडे लक्ष वेधलें. अंतरांत राष्ट्रीय वृत्ति जागृत झाली. १९०१ सालीं राजबहाद्दुर भूपाल बोस यांची कन्या मृणालिनीदेवी हिच्याशीं त्यांचा विवाह झाला. पुढे अरविंद पाँडेचरीस निघून गेल्यानंतर आपल्या माहेरीं १९१९ सालीं मृणालिनीदेवींचा मृत्यु झाला. बडोद्याला असतांनाच त्यांना योगमार्गाची गोडी लागली. ब्रह्मानंद नांवाच्या एका योग्याच्या शिष्याकडून ते प्राणायाम शिकले. श्री. विष्णु भास्कर लेले या गृहस्थाकडून त्यांनी समाधीची विद्या मिळविली. लेले यांनीच त्यांना ईश्वरी आदेशावर अवलंबून राहण्यास सांगितलें.

पुढे हळूहळू त्यांना राष्ट्राच्या उद्धारासाठी चाललेल्या चळवळींत आपण प्रत्यक्ष सहभागी झालें पाहिजे, असें वाटूं लागलें. याच काळांत वंगभंगाची चळवळ सुरू झाली. त्या चळवळीने उभ्या भारतांत उग्र रूप धारण केलें. अशा वेळीं त्यांना केवळ पोटार्थी नोकरी करीत स्वस्थ बसवेना. १९०६ सालीं बडोद्याची नोकरी सोडून ते कलकत्त्यास आले आणि तिथे राष्ट्रीय शिक्षणासाठी नवीनच निघालेल्या नॅशनल कॉलेजचे प्राचार्य झाले. पण त्या शिक्षण मंडळाच्या कार्यकारिणींत नेमस्तांचेंच मताधिक्य असल्यामुळे अरविंदांचें त्यांच्याशीं पटलें

नाही. त्यामुळे त्यांनी तें प्राचार्यपद सोडलें. नंतर ते श्री. बिपिनचन्द्र पाल यांच्या 'वन्दे मातरम्' पत्राच्या संपादक वर्गात दाखल झाले. थोडयाच काळांत त्या पत्राची सर्व जबाबदारी अरविंदांना स्वीकारावी लागली. हळूहळू या पत्राची प्रतिष्ठा वाढत गेली आणि अरविंदांची राष्ट्राच्या प्रमुख नेत्यांत गणना होऊं लागली. या पत्रांतील कांही प्रक्षोभक लेखांबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. पण त्यांतून ते निर्दोषी सुटले. पुढे सुरतेच्या सुप्रसिद्ध कॉंग्रेस अधिवेशनाला उपस्थित राहून त्यांनी लोकमान्य टिळकांच्या खांद्याला खांदा लावून नेमस्तांशीं लढा दिला. त्यानंतर थोडयाच काळांत अरविंद उभ्या भारतांत लोकप्रियतेच्या शिखरावर चढले.

याच वेळीं बंगालमधल्या क्रांतिकारकांनी लेफ्टनंट गव्हर्नरची गाडी उलथून टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. मुझफरपूरचे सेशन जज्ज किंग्ज फोर्ड यांची गाडी समजून त्यांनी दुसऱ्याच एका गाडीवर बाँब फेकले. या कृत्यांत अरविंदांचे बन्धु बारीन्द्र यांचा हात होता. पण अरविंद हेच या कटाचे सूत्रधार असावे, असा संशय घेऊन सरकारने त्यांना अलिपूरच्या तुरुंगांत डांबलें. त्याहि खटल्यांत अरविंद पुनश्च निर्दोषी सुटले.


पण तुरुंगाबाहेर येतांच त्यांना आपल्या राष्ट्रीय पक्षाची वाताहात झालेली दिसली. सरकारच्या दडपशाहीमुळे त्यांच्या अनुयायांची पांगापांग झाली होती. 'वन्दे मातरम्' छापखानादेखील जप्त झाला होता. पण तरीहि धीर न सोडतां 'कर्मयोगी' हें इंग्रजी दैनिक व 'धर्म' हें बंगाली साप्ताहिक सुरू करून ते सरकारशीं लढत राहिले. त्यांनी स्वदेशी व बहिष्कार या लोकमान्य टिळकांच्या चळवळीला भरपूर पाठिंबा दिला. पण जितक्या आकस्मिक रीतीने ते राजकारणाच्या क्षेत्रांत उतरले, तितक्याच आकस्मिकपणें ते त्यांतून निवृत्तहि झाले.

त्याच वेळीं अरविंदांना हद्दपार करण्याचा किंवा निदान कायमचें स्थानबद्ध करण्याचा सरकारचा विचार असल्याच्या अफवाहि पसरल्या. अशा वेळीं त्यांच्या मनाने एकदम पलट खाल्ली. स्वतःचें राजकारण सफल झालें नाही, जनतेंतहि म्हणावी तशी जागृति नाही आणि सुबुद्ध म्हणविणाऱ्यांच्या दहशतवादालाहि नैतिक अधिष्ठान नाही, हें त्यांना समजून चुकलें. आध्यात्मिक अधिष्ठान लाभल्यावांचून आपलें कार्य यशस्वी होणार नाही, अशी त्यांची धारणा झाली. उत्तरपारी येथील आपल्या भाषणांत त्यांनी जनतेला अखेरचा संदेश दिला तो असा —

'आमची चळवळ केवळ राजकीय नाही, तर ती धार्मिकहि आहे. सनातन धर्माचें पुनरुत्थान या व्यापक अर्थाने ती चालवायला हवी. देशभक्तीचा आमचा ध्येयवाद प्रेम व बंधुभाव यांच्यावर अधारलेला आहे आणि केवळ राष्ट्रीयच नव्हे; तर अखिल मानवजातीचें अंतिम ऐक्य हें त्याचें उद्दिष्ट आहे.'

१९१० सालीं ते कलकत्त्याहून पाँडेचरीस आले आणि तिथेच शेवटपर्यंत राहिले. पाँडेचरी हें ठिकाण त्या वेळीं फ्रेंचांच्या ताब्यांत असल्यामुळे ब्रिटिश सरकारचा उपसर्ग न होतां त्यांना तिथे निर्वेध अध्यात्मसाधना करतां आली. पाँडेचरीस गेल्यानंतर पहिलीं चार वर्षे त्यांनी पद्धतशीर योगसाधनेंत घालविलीं. पूर्वी स्वतःला आलेल्या अनुभवांत निरनिराळ्या योगमार्गांच्या अभ्यासाची भर घालून त्यांनी योगानुभवाच्या सर्व कल्पना पारखून घेतल्या. १९१४ सालीं तत्त्वज्ञान व धर्म यांना वाहिलेलें 'आर्य' नांवाचें एक इंग्रजी मासिक त्यांनी सुरू केलें. याच वेळीं एक फ्रेंच पंडित पॉल रिचर्ड हे आपल्या पत्नीसह भारतांत आले. ते गुरूच्या शोधांत होते. अरविंदांची कीर्ति ऐकून ते त्यांना जाऊन भेटले व पुढे तिथेच राहिले. अरविंद व पॉल दंपती या तिघांनी मिळून 'आर्य' मासिक सात वर्षें चालविलें. या मासिकांत लिहिलेल्या लेखांतूनच दैवी जीवन (Life Divine) हा अरविंदांचा जगप्रसिद्ध ग्रंथ निर्माण झाला. १९१४ सालीं लोकमान्य टिळक मंडालेहून परत आल्यानंतर त्यांनी अरविंदाना राजकारणासाठी परत बोलाविलें. पण अरविंदांनी त्यांना उत्तर दिलें तें असें—
'ईश्वर प्रत्येकाला एकदांच कार्याची संधि देतो, त्या वेळीं आपण आपलें कर्तव्य पार पाडावें. तो काळ गेला, की दुसऱ्यासाठी जागा खाली करावी.'

हळूहळू अरविंदांची साधना वृद्धिंगत होऊं लागली. त्यांच्या भोंवती अनेक साधक गोळा झाले, त्यांतूनच १९२० च्या सुमारास पाँडेचरीची योगाश्रम ही संस्था उभी राहिली. काहीं कालानंतर पॉल हे पाँडेचरीहून निघून गेले तरी त्याच्या पत्नी श्री. मिरा रिचर्ड या मात्र तिथेच राहिल्या. त्यांनी तिथे अध्यात्मांत खूपच प्रगति केली. सर्व साधक त्यांना 'Mother' म्हणून आदराने संबोधूं



अरविंद समाधि-पांडेचरी


लागले. आजहि त्या 'माताजी' या नांवानेच ओळखल्या जातात. योगाश्रमाची शिस्त त्यांनीच बसविली. अध्यात्म-तत्त्वाचा जीवनांत प्रवेश घडविणें हें या संस्थेचें उद्दिष्ट आहे. अरविंदांच्या निर्याणानंतर आजहि पाँडेचरीस योगाश्रमाचीं सर्व सूत्रें त्याच चालवितात.

१९२० सालानंतर अरविंद हळूहळू पूर्ण एकांतवासांत गेले. आश्रमांतील साधकांनाहि त्यांचें दर्शन दुर्लभ झालें. २४ नोव्हेंबर १९२६ रोजीं त्यांना सिद्धिलाभ झाला. तेव्हापासून १५ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन, २२ फेब्रुवारी हा माताजींचा जन्मदिन व २४ नोव्हेंबर हा सिद्धिलाभ दिन या तीनच दिवशीं आश्रमांतल्या व बाहेरच्या मंडळींस त्यांचें दर्शन मिळे. सिद्धिलाभ झाल्यानंतरहि अरविंद आश्रमाबाहेर आले नाहीत. ३ डिसेंबर १९५० रोजीं त्यांनी आपली इहलोकींची जीवनयात्रा समाप्त केली.

अरविंदांचें इंग्रजी भाषेवर विलक्षण प्रभुत्व होतें. त्यांची कल्पनाशक्ति अफाट होती. आणि विचारसरणी अगदी नवी व स्वतंत्र होती. त्यांनी प्रचंड लेखन केलें असून तें सहज समजेल इतकें सोपें नाही. अरविंदांचे प्रमुख ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत –

[1] The Life Divine [2] Lights on Yoga [3] The Riddle of This World [4] Yogic Sadhana [5] Ahana (कवितासंग्रह) [6] Love and Death (कविता) [7] The Objects of Love [8] The Ideal of The Karmayogin [9] Brain of India [10] Renaissance in India [11] Self Determination [12] Superman [13] Ishopanishad [14] Essays on the Gita [15] The Mother

अरविंदाश्रम––ही एक आदर्श आणि स्वयंपूर्ण अशी संस्था आहे. कामाच्या सोयीसाठी आश्रमाचे अनेक विभाग केलेले असून त्या त्या विभागांत काम करणारे साधक माताजींच्या सांगण्याप्रमाणे आपापलें काम सेवाभावाने करीत असतात. इथे कोणी कोणावर देखरेख करीत नाही. इथे प्रत्येक कार्यकर्ता स्वतःच स्वतःचा निरीक्षक



अरविंदाश्रम – पाँडेचरी

असतो. त्यामुळे आश्रमाच्या सर्व खात्यांतल्या कामांत सुसंवाद असतो. प्रत्येक साधकाला जरूर तेथे आपल्या कामांत सुधारणा करण्याचे, नवे प्रयोग करून नवे ज्ञान मिळविण्याचें स्वातंत्र्य माताजींनी दिलेलें असतें.

साधकांना राहण्यासाठी इथे शंभराच्या वर घरें आहेत. तीं दाटीवाटीने न बांधतां अंतर ठेवून बांधलेलीं आहेत. प्रत्येक साधकाची खोली साधी; पण स्वच्छ असते. गरजेपुरत्या पण मोजक्याच वस्तु तिथे असतात. अधिक उण्या वस्तूंची आवश्यकता उत्पन्न झाल्यास त्या वस्तु आश्रमाकडून पुरविल्या जातात. साधकांत पुरुषांप्रमाणे स्त्रियाहि असतात. त्यांच्या आरोग्याचा विचार विशेषतः योगदृष्टीनेच केला जातो. रोगनिवारण निसर्गोपचारांनीच व्हावें असा कटाक्ष असतो. निरुपाय तिथे अॅलोपथी, होमिओपथी किंवा आयुर्वेद यांचा आश्रय केला जातो.

आश्रमाचें भोजनगृह विस्तृत असून तिथे एका वेळीं हजार माणसांचा स्वयंपाक व भोजन या गोष्टी होऊं शकतात. जेवण शाकाहारी, सात्त्विक व सकस असतें. त्यांत भात, भाजी, पाव, केळीं, लिंबू व दूध यांचा समावेश असतो.

आश्रमासाठी लागणाऱ्या भाज्या व फळें तिथल्या बागेंतूनच निघतात. या बागेंत नाना प्रकारचीं सुवासिक फुलें सदैव फुललेलीं असतात. पूजा व प्रसाद यांच्यासाठी लागणारीं फुलें पहांटेच तोडलीं जातात. आश्रमाचे दोन कारखानेहि (वर्कशॉप) आहेत. तिथला कामगारवर्ग आपापल्या कामांत वाकबगार असतो. आश्रमाच्या अंतर्बाह्य दुरुस्तीचीं सर्व कामें तिथे होतात. फुकट जाणाऱ्या कागद, चिंध्या, इ. प्रत्येक वस्तूचा तिथे कांहींना कांही सदुपयोग केला जातो. आश्रमांतल्या स्त्री साधिका तिथलें विणकामखातें चालवितात. ग्रामोद्योगाचीहि एक शाखा तिथे चालते. [प्रा. मधुसूदन फडके; संजीवन]

अरविंद दर्शन महायोगी अरविंद ही एक अलौकिक विभूति होती. तें भूतलावरील एक दिव्य जीवन होतें. त्यांनी ऋग्वेद, उपनिषदें, गीता आणि अध्यात्म-विद्यांचे सर्व संप्रदाय स्वतंत्र दृष्टीने तपासून त्यांतला गूढ अर्थ आपल्या अभिनव आणि समृद्ध अशा शैलीने मांडला आहे. दृश्य सृष्टि, अदृश्य आध्यात्मिक विश्व आणि दैवी – मानवी ध्येयवाद या सर्वांचा परामर्श घेणारें अध्यात्मवादी तत्त्वज्ञान त्यांनी नव्या स्वरूपांत रचलें आहे. अरविंदांचें प्रतिपादन परिचित व अपरिचित अशा आध्यात्मिक कल्पनांच्या विस्ताराने तज्ज्ञ वाचकालाहि भांबावून सोडणारें आहे. त्यांतले विचारांचे टप्पे नीट ओळखणें कठीण जातें. विज्ञान आणि

तत्त्वज्ञान यांच्यांतील पाश्चात्य व पौर्वात्य पारिभाषिक शब्दांची यांत भरपूर पेरणी आढळते. त्यांच्या अनुरोधाने त्यांनी मांडलेल्या सिद्धान्तांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करतांना पुष्कळदा पंचाईत पडते. त्यांच्या विचारसृष्टींतील उत्तरोत्तर थरांचें आकलन करणें बुद्धीला अशक्य होतें. त्यांच्या विचारांत तार्किक संगति आहे; पण उपपत्ति अल्प आहे. आधुनिक विज्ञानाच्या सिद्धान्तांतून आणि प्रश्नांतून सूचित होणारे अध्यात्मवादी अभिप्राय त्यांनी अधिकारवाणीने सांगितले आहेत. हे विज्ञानाचे सूचितार्थ आध्यात्मिक विशाल संवेदनांना आधार देणारे आहेत.

अरविंदांच्या तत्त्वज्ञानाचें सार दोन शब्दांत सांगावयाचें तर तें 'पूर्ण योग' या शब्दांनी सांगतां येईल. मानवी जीवात्म्याची दिव्य परमात्म्यामध्ये परिणति होणें, तसेंच प्राकृत जीवनाची दिव्य जीवनांत परिणति होणें, हें अरविंदांच्या पूर्ण योगाचें उद्दिष्ट आहे. या पूर्ण योगाला चार साधनांची आवश्यकता आहे. पहिलें साधन म्हणजे धर्मशास्त्रांचें ज्ञान, दुसरें उत्साह किंवा प्रयत्न, तिसरें गुरूचें प्रत्यक्ष उदाहरण किंवा गुरुप्रभाव व चौथें काल. या विश्वांत सर्व वस्तु चक्र-नेमिक्रमाने (Cycle) नियमित असून त्याप्रमाणे दिव्य शक्तीच्या संचारालाहि अनुकूल काल यावा लागतो. म्हणून त्यांनी कालाला चौथें साधन मानलें आहे. पूर्ण योगाच्या साधकाला एका किंवा अनेक शास्त्रांचा उपयोग करतां येईल; पण तीं शास्त्रें त्याला बंधक होणार नाहीत. साधकाला आपल्या जीवनांत शास्त्र नव्हे; तर सत्य आचरून दाखवायचें असतें. शास्त्रप्रामाण्य किंवा शब्दब्रह्म यांच्या पलिकडे त्याला जायचें असतें. अशा साधनेच्या कामीं शास्त्र हें त्याला केवळ मार्गदर्शक होतें.

पूर्ण योगाच्या साधनेला अत्यावश्यक कोणती अट असेल; तर ती साधकाने पूर्णपणें स्वतंत्र असणें ही होय. त्याला अनिर्बंध अनुभव घेतां आला पाहिजे. प्रत्येक माणसांत भौतिक प्रकृतीच्या अतीत (Upsurging) होण्याची एक आकांक्षा असते. तदनुसार प्रत्येक माणसाला जेव्हा आपापल्या योगमार्गाने स्वतःचा विकास करून घेतां येईल; तेव्हाच त्याला पूर्ण योगाची सिद्धि लाभेल. कारण स्वातंत्र्य हाच खरा नियम, तीच खरी परिपूर्ति व तीच कृतार्थता होय.

मानवांतील अहंकाराचें रूपच बदलून टाकणें (Transformation) हे पूर्ण योगाचें उद्दिष्ट आहे. योगाचा प्रारंभ आणि सिद्धि म्हणजे हे अहंकारविसर्जनच होय.

पूर्ण योग साध्य करण्याच्या कामीं दोन शक्तींचें संयुक्त साहाय्य लागतें. एक म्हणजे स्वतःची उन्नति करून घेण्या-विषयींची दुर्दम्य व स्थिर प्रेरणा. ही प्रेरणा नेहमी खालून वर जाण्याची इच्छा करीत असते व वरच्या शक्तीला जणूं मदतीसाठी हाक मारीत असते. दुसरी शक्ति म्हणजे परमेश्वराची वरदायिनी कृपा (Grace). ही उच्च स्थानावरून पहिल्या शक्तीच्या हाकेला ओ देत असते. या दैवी शक्तीला अरविंदांनी जननी म्हटलें आहे. तिने योगमायेचें आवरण घेतलें असल्याने तिचा आपणांस प्रत्यय येत नाही. परमेष्ठी समष्टि व व्यष्टि अशा तीन अवस्थांत तिचें स्फुरण होतें. पहिल्या अवस्थेंत सृष्टीचा परम तत्त्वांशीं प्रथम संबंध घडतो. दुसरींत सृष्टीची बैठक तयार होते व तिसरींत व्यक्तिमात्रा-पर्यंत तिचा आविष्कार येऊन पोंचतो.

पूर्ण योगाच्या साधनेंत क्रमबद्ध पण अविभक्त असे तीन टप्पे असतात. पहिला स्वतःच्या अतीत होण्याचा (Self-Transcendence) प्रयत्न करणें. याचाच अर्थ अहंकाराचा निरास करणें. त्यायोगें दिव्य शक्तीशीं संबंध प्रस्थापित व्हायला सुरवात होते. दुसरा टप्पा म्हणजे ज्या दिव्य शक्तींशीं आपला संबंध जडला, तिला स्वतःमध्ये आत्मसात् करणें आणि तिसरा टप्पा म्हणजे वरील प्रकारें आपल्या मानवतेची जी उच्च परिणति (Transformation) झाली आहे, तिचा जगांतील एका दिव्य शक्तीचें प्रेरक केंद्र म्हणून जगासाठी उपयोग करूं देणें हा होय. कारण पूर्ण योग म्हणजे केवळ वैयक्तिक मोक्ष नसून त्याच्या पलिकडची ती अवस्था आहे.

अहंकाराचें विसर्जन हें पहिलें साधन. या साधनामुळे साधक दिव्यशक्तीशीं सायुज्य संपादन करतो. जसजसा हा संबंध वाढत जातो, तसतशी साधकाला जाणीव होऊं लागते, की आपण स्वतः कांही करीत नसून ती दिव्य शक्तिच आपल्या द्वारें सर्व काही करीत आहे. मग या परमशक्तीला शरण जाण्याचा ध्यास साधकाला अधिकाधिक लागतो. आणि शेवटीं तो आपली साधनाहि त्या दिव्य शक्तीच्याच हवालीं करतो. म्हणूनच पूर्ण योगाच्या साधकाला अशी प्रतीति येते, की ज्या सिद्धि आपल्याला प्राप्त होत आहेत. स्वतःच्या शक्तीमुळे नव्हेत; तर त्या परमशक्तीमुळेच ! साधक हा त्या दिव्य शक्तींचें एक उपकरण असतो. पण आपण त्या शक्तीचें साधन आहों; हाहि त्याचा अभिमान गळून गेला पाहिजे.

पूर्ण योग म्हणजे आध्यात्मिक विकास होय. आध्यात्मिक जीवनाला उत्क्रांतीची किंवा क्रमविकासाची कल्पना लावून दाखविणें हें अरविंदांच्या तत्त्वज्ञानाचें महत्त्वाचें वैशिष्टच आहे. ते म्हणतात – आपणाला दिव्य शक्तीचें ज्ञान होतें आणि दिव्य शक्तीशीं सायुज्यहि प्राप्त होतें. कारण मुळांत अप्रकटपणें

आपणच ती दिव्य शक्ति असतों. सर्व उपदेश म्हणजे प्रकटीकरण (Revealing) म्हणजे अनावरण होय. दिव्य शक्तीशीं सायुज्य संपादणें किंवा स्वत: दिव्य शक्तिरूप होणें म्हणजे आपलीं आवरणें गळून पडणें आणि त्यायोगें आपलें मूळ रूप प्रकट होणें (Unfoldment) हें होय.

शरीरधारी (Outer) मानवाला जी पूर्णता प्राप्त करून घेणें शक्य आहे, तिची प्राप्ति म्हणजे मानवामधील परमात्म्याच्या नित्य पूर्णत्वाचाच अनुभव होय. ही आध्यात्मिक उत्क्रांति अनंत काळपर्यंत होत राहणार, म्हणून साधकाने उतावीळ न होतां कालाविषयीं असीम सहिष्णुता बाळगली पाहिजे व आपल्या उत्साहशील प्रयत्नांत खंड पडूं देतां कामा नये. त्याला त्या दिव्य शक्तीच्या साक्षात्काराविषयीं आत्मविश्वास असला पाहिजे. या दिव्य शक्तीचीं चार स्वरूपें असून त्यांचीं नांवें महासरस्वती, महेश्वरी, महाकाली आणि महालक्ष्मी अशीं आहेत.

पूर्ण योग ही अशी एक प्रक्रिया आहे, की तिच्या योगाने व्यक्तीला तर पूर्णता येतेच; शिवाय त्याचबरोबर विश्वाचाहि विकास (Cosmic Evolution) होतो. व्यक्तीच्या आध्यात्मिक उत्क्रांतीने जगालाहि फायदा होतो. या व्यक्तीमुळे दिव्यत्वाकडे नेणारें एक केंद्र जगांत प्रस्थापित होतें. याच्या उलट जगाची आध्यात्मिक उन्नति ही व्यक्तीलाहि पोषकच होते.

व्यक्तीचा हा आध्यात्मिक विकास घडवून आणतांना ती दिव्य शक्ति अनेक पद्धतींचा अवलंब करते. तिचा व्यापार म्हणजे परमेश्वरी लीलाच आहे. ही लीला अशी कांही और आहे, की ती प्रमादांचा उपयोग सत्यसंशोधनाकडे, दु:खाचा उपयोग आनंदप्राप्तीकडे आणि अपूर्णतेचा उपयोग पूर्णतेच्या सिद्धीकडे करून घेते. पण आपलें अहंकारी मन स्वत:च्या आवडीनिवडी त्या दिव्य शक्तीच्या व्यापारावर लादीत असतें. आपल्या अहंकारी मनाची अशी वासना असते, की असें कांही तरी अद्भुत घडावें, की त्यामुळे आपली त्या दिव्य शक्तीवर श्रद्धा बसेल. आपल्या अहंकाराच्या या आंधळेपणामुळे आणि अधीरपणामुळे आपल्या पदरीं नाना प्रकारचे अनर्थ मात्र येतात. त्यामुळे दिव्य शक्तीचें साहाय्य बाजूला राहून आपण अनर्थकारक विपरीत शक्तीचे मात्र धनी होतों.

पूर्ण योगाच्या साधकाने हें लक्षांत ठेवलें पाहिजे, की दिव्य शक्तीचा आविष्कार हें नेहमीच आवरणाखाली दडलेलें असें 'गुह्य' आहे. आपण कोणीकडे नेले जात आहो, हें आपल्याला कळत नाही. अहंकाराच्या प्रभावामुळे माणसाला आपल्यांतलें जें 'गूढ' तें पाहणें सुलभ होत नाही. म्हणूनच बहुतेक साधकांना आपल्या विकासासाठी एखाद्या बाह्य आधाराची, एखाद्या श्रद्धेय वस्तूची आवश्यकता असते.

पूर्ण योगाच्या बाबतींत श्रेष्ठ आप्तवाक्य किंवा शास्त्रप्रामाण्य कोणतें असेल, तर तो प्राणिमात्राच्या हृदयांत गूढ असलेला सनातन वेद हाच होय. पूर्ण योगाचा श्रेष्ठ सद्गुरु म्हणजे हृदयस्थ अंतर्यामी. तोच आपलें तिमिर दूर करतो आणि वाढत्या प्रमाणांत स्वत:चें स्वरूप आपणांतच प्रकट करतो. या अंतर्यामी जगद्गुरूला पाहणें, जाणणें, त्याच्याशीं तद्रूप होणें आणि आपल्या अंतर्बाह्य स्वरूपांत त्याला भरून घेऊन आपल्या जीवनाची परिपूर्ति करणें, हेंच आपल्या ऐहिक जीवनाचें उद्दिष्ट आणि हेंच पूर्ण योगाचें संपूर्ण लक्षण (Definition) किंवा वैशिष्टय होय.

पूर्ण योगाची पहिली आणि शेवटची अट अहंकाराचें विसर्जन ही आहे. अहंकाराच्या त्यागाने साधकाला अशी एक शांति प्राप्त होते, की तिच्या योगाने त्याचें जीवन आमूलाग्र बदलून जातें. अंत:स्थ दिव्य शक्तीशीं प्राप्त झालेल्या एकरूपतेचें आणि अंतर्गत उपशमाचें ही शांति हें बाह्य प्रतीक होय.

या अंतिम अवस्थेंत मनुष्याला संपूर्ण दिव्य जीवन लाभतें. पुरुषोत्तमाच्या पराप्रकृतीशीं साधक एकरूप होतो. त्याला जणू दिव्य जन्म लाभून त्याच्या दिव्य कर्माला प्रारंभ होतो. ज्ञान, भक्ति व कर्म यांचा महासमन्वय घडवून आणणारा हा पूर्ण योग आहे. हें ज्ञान, ही भक्ति व हें कर्म म्हणजे शुद्ध अशा मोक्षस्थितीचा महान् आविष्कार असतो. हृदयस्थ परमेश्वराचा विशुद्ध संकेत त्या स्थितींत प्रकट होतो. ही स्थिति म्हणजे निवृत्तिपर संन्यासयोग नव्हे. संन्यासमय मोक्ष ही ज्ञानाची अलिकडची अवस्था आहे; ती पूर्ण स्थिति नव्हे. विश्वव्यापी ज्ञान, भक्ति आणि कर्म हे मोक्ष स्थितीचेच म्हणजे पुरुषोत्तम-अवस्थेचेच अविभाज्य अंश आहेत.

मृत्तिकेंतून मनापर्यंत मानवी जीवनाचा विकास झाला आहे. आता एका नव्या कक्षेंत म्हणजे कलियुगांतून सत्ययुगांत, मनांतून अतिमनांत प्रवेश करण्याचा समय जवळ आला आहे. मन व अतिमन यांचा सांधा जिथे जुळतो तिथेच उत्क्रांति-अपक्रांतीच्या सरणींतील ऊर्ध्वगोल व अधोगोल यांची गांठ पडली आहे.

ही उत्क्रांति-अपक्रांतीची कल्पना अरविंदांनी पुढीलप्रमाणे सांगितली आहे – स्वत:च्या अस्तित्वाचा परमानंद लुटण्यासाठी परब्रह्म वेड पांघरून सृष्टींत उतरतें. पुनश्च त्याच उद्देशानें तें वेड झुगारून देऊन आत्मज्ञान प्राप्त करून घेतें. अज्ञान हें या प्रक्रियेचें पाताळ म्हटलें तर अविद्या हा

मध्यलोक व परमज्ञान हा वैकुंठ होय. अतिसंज्ञेंतून (Super conscience) अपसंज्ञेंत (Inconscien) व पुनश्च अपसंज्ञेंतून अतिसंज्ञेंत जगताच्या अपक्रांतीचा व उत्क्रांतीचा सर्ग चालू असतो. जगताचें स्वरूप केवळ मृण्मय अथवा केवळ आध्यात्मिक असतें तर उत्क्रांति संभवलीच नसती. चैतन्याचा मृत्तिकेंत 'अवतार' होतो म्हणूनच मृत्तिकेचा चैतन्यांत 'उद्धार' होऊं शकतो. स्वयंभाव, आत्मज्ञानात्मक शक्ति व भावानंद हीं तीन पदें अतिसंज्ञ तत्त्वांच्या ऊर्ध्वगोलांतलीं आहेत. परब्रह्म क्रमाने या तीन पदांतून अतिमानसांत आलें व तिथून क्रमाने मन, जीवात्मा, (Psyche) जीवन व मृत्तिका या अधोगोलांतील कोटींत उतरलें म्हणजे अपक्रांतीचा (Involution) सर्ग पुरा होतो. उलट पक्षीं विरुद्ध क्रमाने हीच अष्टपदी पुरी करून तें पहिल्या जागीं परत आलें, म्हणजे तीच उत्क्रांति पूर्ण होते.

मन व अतिमन यांच्यामधील पटल दूर झालें, तरच ऊर्ध्व-गोलांतील कोटींचा अध:प्रवेश व अधोगोलांतील कोटींचा ऊर्ध्वप्रवेश शक्य होत असतो. मनाचें जगताविषयींचें ज्ञान व्यवहारबुद्धीने मर्यादित असतें. अतिमन हेंच परब्रह्माला त्याच्या स्वरूपांत जाणूं शकतें. अतिमनाचें ज्ञान म्हणजे तादात्म्या बुद्धीचें ज्ञान. त्या योगेंच व्यष्टींत परमेष्ठीचा साक्षात्कार घडेल-परम ज्ञानाचा प्रकाश खाली उतरेल. त्याच्या दीप्तीने जीवन भरून जाईल. अमृततत्वाचा लाभ होईल. मानव हा अतिमानव होईल. अशा मानवाच्या साहचर्याने, वर्तनाने व संदेशाने माणसांच्या जीवनांत अंत:प्रेरणेचा मुक्त संचार दिसूं लागेल. मग मानवांच्या परस्पर व्यवहारांत जाणीव, सहानुभूति व सहिष्णुता अधिकाअधिक निर्माण होईल. होतां होतां या परमज्ञानी अतिमानवांचा एक निराळा वंश, एक नवा देवसमाजच पृथ्वीवर नांदूं लागेल.

दि ह्यूमन सायकल या ग्रंथांत अरविंदांनी मानवी इति-हासाचें तत्त्वज्ञान सांगितलें आहे. यांत मानवजातीची एकता ही माणसाच्या जीवनसाफल्याचें अबाधित तत्त्व आहे, हा सिद्धान्त गृहीत धरून समाजगतिशास्त्राचे सिद्धान्त मांडलेले आहेत. मानवी समाजाची प्रगति होत असतां एक मानसिक सोपानपरंपरा तयार होते. तिचें विलग स्वरूपाचें पृथक्करण करणें कठीण असतें; पण तिच्यामुळे कांही मानसिक अवस्थांचें क्रमिक दिग्दर्शन होतें. या अवस्था पांच आहेत —(१) प्रतीकमय (Symbolic). ही अवस्था दृश्य विश्वाच्या व जीवनाच्या अंतरंगांतील सूक्ष्म शक्तींच्या अनुभवाला अभिव्यक्त करणाऱ्या प्रतीकांनी संपन्न असते. (२) सुरेखतेला प्राधान्य देणारी (Typal). ही नैतिक व्यवस्थेला अभिव्यक्त करते. (३) रूढीच्या बंधनांना प्रामुख्य देणारी (Conventional). हिच्यांत परंपराप्राप्त शिस्तीचा जोर मोठा असतो. या अवस्थेंत आज्ञा-धारकता आणि नियमबद्धता अंमलांत येते. शब्दप्रामाण्य काटे-कोरपणे पाळलें जातें. हिच्यामुळे श्रद्धामय शांतता निर्माण होते. मात्र ती बाह्यात्कारी असते. तिच्या पोटीं निर्दयत्व व दास्य हीं गुप्तपणें नांदत असतात. (४) व्यक्तिवादी (Individualistic). हिच्यांत परंपरेच्या विरुद्ध प्रतिक्रिया वरचढ होते. बुद्धिवाद बंड करून उठतो. त्याला यशहि मिळतें. व (५) आत्मनिष्ठ (Subjective). बुद्धिवाद व व्यक्ति-स्वातंत्र्य यांतून ही अवस्था उदित होते. हिच्यांत आत्म-स्वातंत्र्य गाढ अशा विश्वव्यापी अनुभूतीने आणि मानवव्यापी ध्येयवादाने संपन्न बनतें. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तत्त्वांच्या रूपाने हिचा आविष्कार बाह्य जगांत दिसतो. सर्व सष्टीच्या विकासाचें हेंच अंतिम फलित होय. हेंच दिव्य जीवन होय. लोकसत्ता हें त्याचें बाह्य लक्षण आहे.

सामाजिक परिणतीचा आदर्श नियम ते पुढीलप्रमाणे सांगतात —

व्यक्तीला दैवी पूर्णता लाभण्याच्या कामीं सर्व तऱ्हेच्या साधनांचा पुरवठा करणें, हें समाजाचें ध्येय असलें पाहिजे. स्वातंत्र्य व संवादित्व निर्माण होईल असा प्रयत्न झाला पाहिजे. स्वातंत्र्याने विशेष गुणांची वाढ होते व संवादित्वाने एकता प्राप्त होते. हीं दोन तत्त्वें म्हणजे प्रगति आणि साफल्य यांचीं मुख्य साधनें होत. स्वत:ची अनिर्बंध प्रगति करण्याची आणि इतरांच्या तशाच प्रगतीला मदत करण्याची सोय ज्या समाजांत असते, तोच समाज सुसंवादी जीवन निर्माण करूं शकतो. मानव जातीची पूर्णता याच पद्धतीने साधतां येईल. अध्यात्मशक्तीने संपन्न असलेली अथवा आत्मनिष्ठ अशी समाजसंस्था निर्माण करण्याचा हाच खरा मार्ग आहे. आत्म-निष्ठ समाजव्यवस्था समाजांतील साधूंपासून तों गुन्हेगारां-पर्यंतच्या सर्व व्यक्तींना यांत्रिक, ठराविक सांच्याचा आकार देण्याचें क्रौर्य दाखविणार नाही. ती गुन्हेगारांना जाळ्यांत गुंतलेले कष्टी आत्मे समजून त्यांना आधार देऊन बचावण्याचा प्रयत्न करील. या समाजसंस्थेच्या अर्थशास्त्राचा हेतु प्रत्येक माणसाला सर्वांत उच्च आनंद कामांतून मिळावा, तें काम ज्याच्या त्याच्या स्वभावाला अनुरूप असावें, त्यांतून आत्मविकासाला अवकाश मिळावा आणि सर्वांना संपन्न आणि सुंदर जीवन जगायला मिळावें, अशा प्रकारचा राहील. या समाजव्यवस्थेचें राज्य-शास्त्र नागरिकांना समष्टिरूप आत्मे असें समजेल. हे आत्मे स्वत:चा विकास अन्त:प्रेरणेने करीत राहून त्या कामीं एक-मेकांना मदत करतील. म्हणजेच दिव्य आत्म्याचा शोध घेत राहतील. या समाजव्यवस्थेचें राज्यशास्त्र नागरिकांना प्रचंड

राज्ययंत्राचे केवळ संरक्षक असें समजणार नाही. त्यांना राष्ट्रदेवतेच्या वेदीवर देण्याचे केवळ बळि किंवा तिच्या मस्तकावर रक्ताचा अभिषेक करणारीं पात्रें असें मानणार नाही. राष्ट्रें किंवा राज्यें म्हणजे घातक शस्त्रास्त्रें निर्माण करण्याचे कारखाने नव्हेत. कोटयवधि लोकांच्या जीविताची आणि घरादारांची राखरांगोळी झाली तरी त्याची पर्वा न करतां शस्त्रास्त्रांचा अग्निवर्षाव करणाऱ्या राक्षसी मुत्सद्यांचा सवता सुभा म्हणजे कांही राज्य नव्हे.

अशा प्रकारच्या आत्मनिष्ठ समाजसंस्था निर्माण होण्याच्या पूर्वी अनेक व्यक्तींनी स्वतंत्रपणें आत्मनिष्ठ जीवनाचे प्रयोग करायला हवे. नव्या व्यवस्थेचे आदर्श व्यक्तींनी प्रथम आपल्या जीवनांत उतरविले पाहिजेत. कारण आत्मस्वातंत्र्याच्या प्रत्यक्ष अनुभवांतूनच अशा आत्मनिष्ठ समाजसंस्था निर्माण व्हायच्या आहेत. आत्मस्वातंत्र्य हीच त्यांची मूलभूत शक्ति आहे. [नारायणराव निकम; वै. सं. वि.]

अरसु कोच्चिनमधील एका जातीचें नांव. यांना राजपिंडे असेंहि म्हणतात. यांचे दोन पोटभेद आहेत. पल्ली व परैयन या तमिळ जमातींचा अरसु हा एक उपवर्ग आहे. यांचा म्हैसूरच्या राजाशीं आप्तसंबंध आहे. हे म्हैसूरच्या राजवाडयांत नोकरी करतात. कांही शेतकरीहि आहेत. यांच्यांत शैव-वैष्णव दोन्ही पंथ चालतात. ब्राह्मण अथवा लिंगायत हे यांचे उपाध्याय असतात. [सेन्सस रिपोर्ट–कोच्चिन]

अरिकम्मा द. भारतांतील एक ग्रामदेवता. ही कालीच्या आठ अवतारांपैकी एक मानलेली आहे. **पाहा**–काली. [व्हि. गॉ. सा. इं.]

अरिट्टपट्टि मेलुर आणि अलगर कोविल यांच्यामध्ये वसलेलें एक गांव. तिथे खडक खोदून निर्माण केलेलें शिवमंदिर आहे. ज्या डोंगरांत तें मंदिर खोदलें आहे, त्याला पेरुमलै म्हणतात. [मदुरा गॅझे.]

अरिमेध एक प्राचीन जमात. पुराणांतून यांचे उल्लेख सापडत नाहीत; पण हे लोक मेवाडचे प्राचीन रहिवासी असावे. यांच्यामध्ये शत्रूला देवीपुढे बळि देण्याची चाल होती, त्यावरून यांना हें नांव मिळालें असावें. यांच्याबद्दल संशोधकांत भिन्न मतें आहेत. कनिंगहॅमच्या मतें मेढ किंवा मेढी या नांवांनी ओळखले जाणारे पंजाबमधले लोक हेच पूर्वीचे अरिमेध असावे. सातव्या शतकापर्यंत जाटांच्या बरोबरीने हे मेध लोक सिंधमध्ये राहत असल्याचे पुरावे आढळतात. [ए. से. अॅ. इं.]

अरिवत्तय्य तमिळनाडमधला एक नायन्मार. रोज शिवमंदिरांत जाऊन शिवाला महानैवद्य दाखविणें हा याचा नेम होता. एके दिवशीं पावसांतून जातांना याच्या थाळींतलें अन्न सांडलें. महानैवद्याची वेळ चुकली म्हणून याला दुःख झालें व हा आत्मघात करायला निघाला. मग शिवाने प्रकट होऊन त्याला आवरलें. [पे. पु.]

अरिष्टनेमि तार्क्ष्य एक सूक्तद्रष्टा. याने द्यावा-पृथिवींची प्रशंसा पुढीलप्रमाणे केली आहे––

उर्वी न पृथ्वी बहुले गभीरे ।
मा वामेतौ मा परे तौरिषाम ।

(ऋ. १०. १७८)

अर्थ – हे पृथ्वी आणि आकाश हो, तुम्ही फार विस्तीर्ण, अवाढव्य व अमर्याद आहां. कोणी आला काय किंवा कोणी गेला काय; तुम्हाला त्याची दादहि नसते.

अरिष्टनेमिपुराण एक जैन पुराण. **पाहा** – हरिवंशपुराण.

अरिष्टपुर प्राचीन शिबि राजाची राजधानी. पाणिनि हिचा उल्लेख करतो (६.२.१००). शिबि राजाने या नगरांत सहा धर्मदाय गृहें बांधलीं होतीं. रोज त्या ठिकाणीं याचकांना शतसहस्त्र नाणीं वांटलीं जात. [हि. जॉ. ए. इं.]

अरिष्टें अरिष्ट=मृत्युसूचक लक्षण. याची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे––

रोगिणो मरणं यस्मादवश्यं भावि लक्ष्यते ।
तल्लक्षणमरिष्टं स्याद्रिष्टमप्यभिधीयते ।।

अर्थ – रोग्याचें मरण अटळ आहे असें ज्यामुळे लक्षित होतें त्या लक्षणाला अरिष्ट किंवा रिष्ट असें म्हणतात. (सं. इं. डि.)

अरुंधती, ध्रुव व चंद्रावरची छाया न दिसणें, सूर्याचे किरण न दिसणें, व अग्नींतून किरण निघताहेत असें दिसणें, मूत्र किंवा विष्ठा यांचें वमन, स्वप्नांत सोन्यारुप्याची वांती, जमिनीवर पाऊल अर्धेंच उमटणें, कावळा, कपोत किंवा गिधाड

डोक्यावर बसणें, दक्षिण दिशेस मेघ नसतां वीज दिसणें, जलांत इंद्रधनुष्य दिसणें, आरशांत आत्मप्रतिबिंब न दिसणें, स्वप्नांत वानर जोडलेल्या रथांतून गायन करीत दक्षिण दिशेस जाणें, इ. अनेक मृत्युसूचक अरिष्टें पुराणांतून सांगितलीं आहेत.

अरिष्ट निरसनाचे उपाय – वरील प्रकारचीं लक्षणें दिसूं लागल्यानंतर शहाण्या माणसाने समजावें, की तीन, चार, सहा, नऊ, इ. महिन्यांच्या आंत किंवा एका वर्षाच्या आंत आपला मृत्यु अटळ आहे. मग त्या मृत्यूला धैर्याने सामोरें जावें. गृह-त्याग करून पूर्व किंवा उत्तर दिशेला गमन करावें. निर्जन स्थानीं योगासनावर बसून महेश्वराला नमस्कार करावा. निवातोंच्या दीपाप्रमाणें स्थिर राहून योगधारणा करावी ओंकाराचें ध्यान करावें. आणि अशा रीतीनें नश्वर देहाचा त्याग करून मोक्ष साधावा. [वायु पु. १९]

अरिहंत जैन धर्मांत तीर्थंकरांचा उल्लेख अरिहंत या नांवाने करतात. त्याचा मंत्रहि ' ॐ णमो अरिहन्ताणम् ' असा असतो. [हि. जै. मो.]

अरुण तांबडा किंवा गुलाबी असा याचा अर्थ आहे. हा कश्यप व विनता यांचा पुत्र असून गरुडाचा मोठा भाऊ आहे. विनतेने आपल्या गर्भाचें अंडें गर्भ पूर्ण होण्या-पूर्वीच फोडलें, म्हणून हा अनूरु म्हणजे ' मांड्या नसलेला ' अतएव पांगळा निपजला (म. भा. आदि. १६). गरुडाने याला पूर्व दिशेस नेऊन ठेविलें असतां याने योगबलाने सूर्याचें तेज गिळून टाकलें. नंतर देवांच्या सांगण्यावरून हा सूर्याचा सारथि झाला (म. भा. आदि. २४).

वैदिक देवता उषा हिलाच पुढे अरुण हें नांव मिळालें आहे अरुण म्हणजे सूर्योदयापूर्वीचा तांबडा प्रकाश होय. याची भार्या श्येनी. तिच्यापासून याला जटायु व संपाति असे दोन पुत्र झाले. लोकसाहित्यांत सूर्य हा पांगळा मानलेला आहे त्याचें हें पांगळेपण त्याच्या परिवारांतहि उतरलें आहे. अरुण पांगळा, शनि मंद आणि यम लंगडा आहे. [पु. इं.]

अरुण औपवेशी एक आचार्य. उपवेशीचा शिष्य. शत-पथांत अग्न्याधानाच्या वेळीं वाग्यत असावें, हें सांगण्यासाठी याची आख्यायिका दिली असून सत्या-साठी मौन पाळणें श्रेयस्कर, असें तिचें तात्पर्य आहे (श. ब्रा. २. १. ६. २०). सुप्रसिद्ध उद्दालक आरुणि हा याचा पुत्र होय. [प्रा. च. को.]

अरुणकेतुचयन काठक चयनांपैकीं एक. पाहा—अग्निचयन.

अरुणगिरि कैलासाजवळची त्याच्या दुसऱ्या अंगाला असलेली टेकडी. हें शिवाचें वसतिस्थान असून इथे ओषधि—वनस्पतींची विपुलता आहे. या टेकडीच्या पायथ्याशीं शैलोद नामक सरोवर असून त्यांतून शिलादा नदी उगम पावते. तिच्या कांठीं सुरभि नांवाचें एक वन आहे (ब्रह्मांड पु. २. १८–२३; वायु पु. ४७. १७–२२).

अरुणगिरिनाथर (१५ वें शतक) तमिळनाडमधला एक सुप्रसिद्ध कवि. हा संस्कृत व तमिळ या दोन्ही भाषांचा पंडित होता. आळवारांच्या युगानंतर तमिळ-नाडमध्ये जे भक्तकवि होऊन गेले, त्यांत हा विशेष प्रसिद्ध आहे. कोण्या चेट्टियारच्या रखेलीपासून याचा जन्म झाला, असें सांगतात. हा सुब्रह्मण्याचा परमभक्त असून त्याच्या मंदिरांत चौघडा वाजवीत असे. त्याविषयीं एक आख्यायिका सांगतात, ती अशी —

एकदा तो सुब्रह्मण्याच्या पूजेस बसला असतां तिथला राजा मंदिरांत आला. पूजेंत मग्न असल्यामुळे याने राजाला उत्थापन दिलें नाही. त्यामुळे राजाला क्रोध येऊन त्याने अरुणगिरि-नाथरला कैदेंत टाकलें. राजा म्हणाला, की 'तूं जर खरा भक्त असशील, तर सुब्रह्मण्य तुझी मुक्तता करील.' आणि घटना तशीच घडली. सुब्रह्मण्य मोरावर बसून तिथे आला व त्याने त्याची सुटका केली. त्याच्याच कृपेने अरुणगिरिनाथर हा पुढे कवि झाला.

याचा सर्वप्रसिद्ध ग्रंथ तिरुप्पुहळ् हा आहे. याचा अर्थ 'पवित्र स्तुति' असा होतो. या ग्रंथांत अरुणगिरिनाथरने सुब्रह्मण्याचें विविध प्रकारें स्तवन केलें आहे. हा ग्रंथ त्याच्या अनेक पद्यांचा संग्रह आहे. पळनि, तिरुच्चेंदुर, इ. सुब्रह्मण्याच्या क्षेत्रांत जाऊन त्याने या पद्यांची रचना केली आहे. त्याने एकंदर १६ हजार भक्तिगीतें रचलीं, असें सांगतात; पण त्यांतलीं दोन हजार पद्येंच आज उपलब्ध आहेत. हीं गीतें विविध तालांत आणि छंदांत निबद्ध आहेत. या गीतांची सुरावट आणि शब्दशक्ति आश्चर्यकारक आहे. याच्या काव्यांत संस्कृत शब्दांचें प्रमाण अधिक असलें, तरी त्यांतला भक्तीचा प्रवाह प्रसन्न आणि सुबोध आहे. या गीतांत आध्यात्मिक सुगंध भरून राहिला आहे. या ग्रंथामुळेच त्याला ' चंदपवल्लप्पेरुमन् ' ही पदवी मिळाली.

याशिवाय कंदरनुभूति, कंदरअंदादि, भूतवेतालवगुप्पु,

अलंकारम्, हे याचे आणखी ग्रंथ आहेत.

तिकडील शिवभक्तांमध्ये तिरुप्पुहळ् या ग्रंथाला विशेष स्थान आहे. शिवाच्या आणि सुब्रह्मण्याच्या मंदिरांतून त्याचे पाठ चालतात. मुलांना रागदारीसह तीं पदें शिकवितात. कार्तिक मासांत पहाटे उठून तिकडील शिवभक्त वाद्यांच्या साथीवर तिरुप्पुहळ् गात गांवांतून हिंडतात व मंदिर–प्रदक्षिणा करतात. या पदांच्या गायनाने त्रिविधताप नष्ट होतात, अशी तिकडील शिवभक्तांची श्रद्धा आहे. [त. सा. सं.; डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अरुण वैतहव्य एक सूक्तद्रष्टा. याच्या एका ऋचेंत यज्ञांत बळि दिल्या जाणाऱ्या किंवा त्यानिमित्त सोडण्यांत येणाऱ्या पशूंची यादी दिली आहे ती अशी –अश्व, बैल, गवा, वांझ पशु आणि मेंढा (ऋ. १०. ९१. १४).

पशूंचें हनन करण्याऐवजीं त्यांचें उत्सर्जन करणें हा पर्याय वेदकाळांतच चालू झाला असावा, असें यावरून वाटतें.

अरुणा (१) पृथूदक क्षेत्राजवळची एक नदी. इंद्राला ब्रह्महत्येपासून मुक्त करण्यासाठी इथे सरस्वती अरुणेला मिळाली.

(२) कौशिकी नदीची एक शाखा. नेपाळांत सात कोसी नद्या आहेत, त्यांतली ही सर्वांत महत्त्वाची आहे. [हि. ध.]

अरुणाचल हा पर्वत कैलासाच्या पश्चिमेस आहे. हें एक पुण्यक्षेत्र आहे. ब्रह्मा व विष्णु या दोघांत श्रेष्ठ कोण, याविषयीं वाद चालला असतां, शिव त्या दोघांमध्ये स्तंभरूपाने उभा राहिला. शिवाने, या स्तंभाचे आदि-अंत जो जाणील तो श्रेष्ठ, असें त्यांना सांगितलें. ब्रह्मदेव त्या स्तंभाचें अग्र शोधण्यासाठी निघाला; पण त्याला तें सांपडलें नाही. विष्णुहि स्तंभाचें मूळ शोधण्यासाठी जाऊन अयशस्वी ठरला. पण ब्रह्मा ‘ आपण शोध लावला, ’ असें खोटें बोलला आणि विष्णूने मात्र सत्य तें सांगितलें. त्यावरून शिवाने ब्रह्मदेवाला अपूज्य ठरविलें. हा स्तंभ अरुणाचल क्षेत्रीं प्रकट झाला म्हणून इथे शिवपूजा मुक्तिप्रद मानलेली आहे. **पाहा–** अरुणगिरि. [शिवपुराण]

अरुणाचल कविरायर (१७११–१७८८ इ. स.) तंजाऊर जिल्ह्यांतल्या तिलैयादि या गांवीं याचा जन्म झाला. रामनाटकम् हें यांचें तमिळ भाषेतलें रामायणावरील महाकाव्य होय. त्याच्या शिष्यांनी त्याला संगीताचा साज चढविल्यामुळे तें अल्पकाळांतच लोकप्रिय झालें. या महाकाव्याचें पहिलें संकीर्तन श्रीरंगम्च्या मंदिरांत झालें. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अरुणोद मेरूवरील एक पवित्र सरोवर. [पु. इं.]

अरुणोदय रात्रीचा शेवटचा अर्धा प्रहर अथवा सूर्योदयापूर्वीं चार घटिका, हा अरुणोदयाचा काल मानलेला आहे. [हि. ध.]

अरुणोदा मंदराच्या शिखरावरून वाहणारी आम्ररसाची नदी. ही पूर्वेला इलावृतवर्षांतून वाहते. हिच्यांत पार्वतीच्या दासी असलेल्या अप्सरा स्नान करतात. [भाग. पु. ५. १६. १७–१८]

अरुद्रा (सं. आर्द्रा) तमिळनाडमध्ये मार्गशीर्षाला मार्गलि असें म्हणतात. त्या मासांत, आर्द्रा नक्षत्र येईल त्या दिवशीं नटराजाची पूजा करून सण साजरा करतात. रुद्र ही आर्द्रेची देवता आहे. नक्षत्रांच्या द्वारें विश्वांतल्या अदृश्य शक्तींचा प्रवाह मानवापर्यंत येत असतो. त्याचा स्वीकार करायचा तर मानवाचें शरीर शुद्ध असायला हवें व त्याच्या ठिकाणीं इच्छाशक्तिहि प्रबल असायला हवी. अरुद्रा नक्षत्रावर नटराज शिवाची पूजा केल्याने मानवाला शुद्धता व इच्छाशक्ति हीं दोन्ही प्राप्त होतात, अशी त्या लोकांची श्रद्धा आहे.

कलि नांवाचा एक पदार्थ या दिवशीं शिवाला अर्पण करण्याची प्रथा आहे. त्याच्या मागची कथा अशी– सेंदनार नांवाचा एक मोळक्या होता. तो सर्पण विकून आलेल्या द्रव्यांत एका शिवभक्ताला भोजन घाली. एके दिवशीं पावसाने लाकडें ओलीं झाल्यामुळे तीं कोणी विकत घेईना. त्या दिवशीं त्याला द्रव्याऐवजी फक्त थोडें पीठ मिळालें. त्या पिठाचा त्याने कलि हा पदार्थ बनविला. मग तो एखाद्या शिवभक्ताची वाट पाहूं लागला. एवढ्यांत नटराज वृद्ध ब्राह्मणाच्या रूपाने त्याच्यापुढे आला. मोळक्याने त्याला कलि दिला. तो घेऊन नटराज मंदिरांत आला. दुसऱ्या दिवशीं लोकांना तो पदार्थ मंदिरांत सांडलेला आढळला. लोकांनी प्रसाद म्हणून त्याचें ग्रहण केलें तेव्हापासून ही प्रथा पडली.

चिदंबरम् प्रमाणेच पेरूर, कुट्टालम्, तिनेवेल्लि, मदुरा, तिरुवलनागडु या ठिकाणींहि हा सण करतात. [सा. इं. फे.]

अरुंधती वसिष्ठाची भार्या. मेधातिथि मुनीने ज्योतिष्टोम केला, त्या वेळीं ही यज्ञकुंडांतून उत्पन्न झाली. ही पूर्वजन्मांत ब्रह्मदेवाची मानसकन्या संध्या होती. ही चंद्रभागेच्या तीरीं वाढली. पुढे ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून मेधातिथीने तिला शिक्षणासाठी सावित्रीकडे ठेवलें. बारा वर्षें पूर्ण झाल्यावर एका उद्यानांत योगायोगाने हिची आणि वसिष्ठाची गांठ पडली. वसिष्ठ तिच्या रूपावर भाळला. पुढे सावित्रीने त्या दोघांचें लग्न लावून दिलें (कालिका पु. २३).

ही वसिष्ठाला केव्हाहि विरोध करीत नसे, म्हणून हिचें अरुंधती असें नांव पडलें, अशी त्या नांवाची व्युत्पत्ति आहे. हिला महापतिव्रता मानलेलें आहे. ही वसिष्ठाला सोडून कधीच राहत नाही. सप्तर्षींमध्ये वसिष्ठाच्या शेजारीं हिचें स्थान आहे. गगनमंडळांत हिची तारका मंदप्रभ आहे. अरुंधती दिसेनाशी झाली, की सहा महिन्यांत माणसाचा मृत्यु ओढवतो, असा लोकसंकेत आहे. कृत्तिका या इतर सहा ऋषींच्या भार्या होत. त्यांचीं रूपें घेऊन एकदा स्वाहेने अग्नीशीं संभोग केला. पण तिला अरुंधतीचें रूप मात्र घेतां आलें नाही, अशी कथा वनपर्वांत आहे. विवाहांत वधूला अरुंधतीचें दर्शन घडवितात.

एकदा हिला आश्रमांत ठेवून सप्तर्षी फळेंमुळें आणण्यासाठी हिमालयांत गेले. या कालांत बारा वर्षांचें अवर्षण पडलें. त्यामुळे हिमालयांतून सप्तर्षी परत आलेच नाहीत. अशा वेळीं शिव ब्राह्मणाच्या वेषाने तिची सत्वपरीक्षा घेण्यासाठी आला. हिच्याजवळ त्याला देण्यास कांहीच नव्हतें; म्हणून हिने त्याला लोखंडी बोरें दिलीं. ब्राह्मणाने तिला तीं शिजत ठेवायला सांगितलीं. तीं शिजत लावून ती त्याच्याशीं तत्त्वचर्चा करीत बसली. त्यांचें बोलणें चालू असतां बारा वर्षें नकळत उलटून गेलीं. एवढ्यांत सप्तर्षी फळेंमुळें घेऊन परत आले. त्या वेळीं शिवाने निजरूपांत प्रकट होऊन अरुंधतीच्या तपाची प्रशंसा केली. त्या दिवसापासून तें स्थान बदरपाचन-तीर्थ म्हणून प्रसिद्ध झालें (म. भा. शल्य. ४८).

तिच्या दुर्धर पातिव्रत्यामुळे कृत्तिकांत हिचा समावेश झाला नाही. पण तमिळ-तेलुगु भाषांत मात्र हिचा 'सात बहिणीं'त अंतर्भाव आहे. दक्षिणेंतले माडिगा लोक तिला अरंजोथी म्हणतात व अगस्त्याची पत्नी समजतात. मग प्रश्न असा येतो, की अगस्त्यापासून हिची ताटातूट कां झाली ? त्याचेंहि स्पष्टीकरण माडिगांच्या कथेंत सांपडतें—

एकदा एक तरुण परगांवाहून रात्रीं घरीं आला व पत्नीला न उठवितां तिच्या शेजारीं झोपला. तिला परपुरुषाची शंका येऊन तिने त्याला लाथ मारली. तेव्हा त्याने तिला शापलें, की 'तूं पुढील जन्मीं माडिगा होशील.' तें ऐकून त्याच्या सासऱ्याने त्यालाहि प्रतिशाप दिला, की 'तूं पुढील जन्मीं देवदासीचा पुत्र होशील.'

त्याप्रमाणे अरुंधती माडिगा जातींत जन्मली व तो देवदासीपुत्र झाला. कांही कालाने तो मूठभर वाळू, लोखंड व चिंचेचीं पानें घेऊन तिच्याकडे आला. त्याला वाळूचा भात, लोखंडी डाळीचें वरण आणि चिंचेच्या पानांची पत्रावळ बनविणारी पतिव्रता स्त्री पत्नी म्हणून हवी होती. अरुंधतीने तें अद्भुत कृत्य करून दाखविलें. पुढे त्या दोघांचें लग्न झालें. तें तिच्या बापाला आवडलें नाही. त्याने जावयाला शाप दिला, की 'तूं दक्षिणेचा तारा होशील' आणि मुलीला शापलें, की 'तूं उत्तरेकडची तारका होशील.' त्यामुळे त्या दोघांची ताटातूट झाली (लो. सा. रू.).

हिचें दुसरें नांव ऊर्जा असें होतें. चित्रकेतु व इतर सात ऋषि यांची ही माता समजली जाते (भाग. पु. ४. १. ४०). शक्ति हा हिचा आणखी एक पुत्र होय. हिने योगाचें फल प्राप्त होण्यासाठी देवीच्या १०८ नांवांचें ध्यान केलें. [पु. इं.]

अरुंधतीव्रत स्त्रीव्रत. चैत्र शु. ३ येस प्रारंभ. याचा विधि असा —— त्रिरात्र उपवास करतात. कलशावर पूर्णपात्रांत अरुंधतीची सुवर्णमूर्ति मध्यभागीं बसवून तिच्या दोहीं अंगीं वसिष्ठ व ध्रुव यांच्या मूर्ति बसवितात हिच्या ध्यानाचा श्लोक पुढीलप्रमाणे ——

ध्यायामि दिव्यरूपां तां वसिष्ठस्य प्रियां शुभाम् ।
पतिव्रतां पुण्यशीलां सौभाग्यैकनिकेतनाम् ।।

अर्थ —— वसिष्ठपत्नी, दिव्यरूपा, पुण्यशील पतिव्रता, सौभाग्याचें एकमेव स्थान अशा अरुंधतीचें मी ध्यान करतें.

नंतर षोडशोपचारें पूजा, अर्घ्यदान व प्रार्थना. वंशपात्रांत सौभाग्यवायन ठेवून त्याचें व सुवर्णमूर्तीचें ब्राह्मणास दान. चार दंपतींची पूजा व भोजन. उद्यापनाच्या वेळीं तिल व समिधा यांचें १०८ हवन, सुवासिनीपूजा, दंपतीभोजन व शक्त्यनुसार कांस्यपात्र, दीप, आरसा, चामर, घोडा व शय्या यांचें दान. व्रताचें फल – सौभाग्यप्राप्ति. याची कथा अशी ——

एक विद्वान् ब्राह्मण होता. त्याला एक रूपवती कन्या होती. बालवयांतच तिला वैधव्य प्राप्त झालें. त्या दुःखाने घराबाहेर पडून यमुनेच्या तीरावर ती तप करूं लागली. एके दिवशीं शिव-पार्वती फिरत फिरत त्या ठिकाणीं आलीं. त्या मुलीची ती दशा पाहून पार्वतीला दुःख झालें. तिने तिच्या वैधव्याचें कारण शिवाला विचारलें. शिव म्हणाला—

"ही बालिका पूर्वजन्मीं ब्राह्मण पुरुष होती. त्या ब्राह्मणाने एका सुंदर स्त्रीशीं विवाह केला व कांही दिवसांनी तो प्रवासाला गेला तो परत आलाच नाही. त्या स्त्रीला सर्व आयुष्य पतीवांचून कंठावें लागलें. अशा प्रकारें पत्नीचा त्याग केल्याचें प्रायश्चित्त त्या ब्राह्मणाला भोगावें लागलें. तोच आता या मुलीच्या रूपाने जन्माला आला असून आजमितीस वैधव्य-दुःख भोगीत आहे."

शिवाने सांगितलेला हा वृत्तांत ऐकून पार्वतीला करुणा आली. तिने तिच्या पापाच्या निष्कृतीचा उपाय शिवाला विचारला. त्याने त्या स्त्रीला अरुंधतीव्रत उपदेशिलें. त्या विधवा मुलीने तें केलें व त्या पुण्याने ती पापमुक्त होऊन स्वर्गाला गेली (व्रतराज).

या व्रतांत वसिष्ठाची मूर्ति करायला सांगितली आहे, ती तो अरुंधतीचा पति म्हणून व ध्रुवाची मूर्ति करायची ती अक्षय्य-तेचें प्रतीक म्हणून. विवाहाच्या वेळीं वधूला ध्रुवदर्शन करायला लावतात, त्यांतहि अक्षय्य सौभाग्य लाभावें हाच हेतु असतो.

अरुव द. भारतांतील एक शेतकरी जात. ते स्वतःला पटणीस (मुसलमान) पुरुष व ओडिया स्त्री यांचे वंशज मानतात. यांना नायको, पाट्रो, पोधानो, इ. किताब आहेत. यांच्यांत अशी समजूत आहे, की आपल्यांतल्या पुरुषांचा अथर्ववेदाशीं व स्त्रियांचा यजुर्वेदाशीं संबंध आहे. अरुव कोणत्याहि इस्लामी समारंभांत भाग घेत नाहीत वा नमाज पढत नाहीत. पुष्कळसे लोक हिंदु दैवतांनाच भजतात. ते मृतांना पुरतात. [का. ट्रा. स. इं.]

अरुवत्तुमूवर तमिळनाडमध्ये त्रेसष्ट शैव संत होऊन गेले त्यांना 'अरुवत्तुमूवर' म्हणतात. पेरिय पुराणम्‌मध्ये यांचीं चरित्रें विस्ताराने दिलेलीं आहेत. तिकडील सणावारांत या संतांच्या पुण्यतिथी पाळतात व त्यांचें प्रातः-स्मरण करतात.

अरूप विंध्य पर्वतावरील एका प्राचीन जनपदांतले लोक. [मत्स्य पु. ११३. ५४]

अरे एक जात. हा शब्द आर्य या शब्दावरून बनलेला दिसतो. हे लोक मध्यप्रदेश व त्रिवांकुर या भागांत राहतात. हे महाराष्ट्रांतून तेलंगणांत व तिकडून चांद्याकडे गेले असावे. हे सर्व ब्राह्मणी धर्मविधि ब्राह्मण पुरोहिताच्या द्वारें करतात; पण ब्राह्मणाकडे अन्न मात्र घेत नाहीत. हे ब्राह्मण, बनिया व कोमटी या लोकांना आपल्या जातींत घेतात. सोयर व सुतक पंधरा दिवस पाळतात. [म. ज्ञा. को.]

अरेन उत्तर भारत व पंजाब या ठिकाणीं राहणारी एक जात. हे बहुतेक मुसलमान आहेत. कांबोज लोक बाटले व त्यांच्यापासून ही जात बनली. हे शेतीवर उपजीविका करतात. [सु. वि. को.]

अरैय्यरनटनम् तमिळनाडमधलें एक धार्मिक नृत्य. श्रीरंगम् व इतर वैष्णव मंदिरांमधून मार्गशीर्ष महिन्यांत हें नृत्य करतात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अरोगा वैद्यनाथ क्षेत्रांतील एक देवता. ही रोगनाशक आहे. [मत्स्य पु. १३. ४१]

अरोरा उत्तर भारत व पंजाब येथील एक जात. या जातींत सर्व धर्मांचे लोक आहेत; पण मुसलमान फारच कमी आहेत. हे खत्री लोकांसारखे दिसतात. अरोरा या नांवाची एक प्राचीन राजधानी होती. हे लोक तिथून पंजाबांत गेल्यामुळे त्यांना हें नांव पडलें असावें. पंजाबांत हे लोक सावकारी करतात. [सु. वि. को.]

अर्कपुटसप्तमी फाल्गुन शु. ७ मी. काम्य व्रत. सूर्यपूजा, निराहार व अष्टमीस तुळशीपत्राएवढचा रुईच्या पत्राचें प्राशन, हा या व्रताचा विधि आहे. फल–व्याधिनाश. [भविष्य पु.]

अर्कमर्क एक पिशाचगण. हे ठेंगू व वानरसदृश असून वृक्षांवर राहतात. [पु. इं.]

अर्कविवाह अर्क म्हणजे रुईचें झाड. त्याच्याशीं एखाद्या पुरुषाने विवाह करणें, याला हें नांव आहे. रुईला सूर्यकन्या मानलेलें आहे. एखाद्या पुरुषाच्या दोन बायका मृत झाल्या, तर तिसऱ्या स्त्रीशीं लग्न केल्यास दोघांपैकी एखाद्याला अपमृत्यु येऊं नये, यासाठी हा विधि आहे. शनिवारीं वा रविवारीं हस्त नक्षत्रावर लगुष्पयुक्त रुईजवळ जाऊन प्रथम पुण्याहवाचनादि कृत्यें करतात. कन्यादाता म्हणून आचार्य निवडतात. रुईच्या झाडावर छायेसहित सूर्याची पूजा करतात. नंतर रुईला शुभ्र वस्त्राने वेढून विवाहेच्छु पुरुष सूर्याची प्रार्थना करतो ––

त्रिलोकवासिन् सप्ताश्व छायया सहितो रवे ।
तृतीयोद्वाहजं दोषं निवारय सुखं कुरु ।।

अर्थ -- त्रैलोक्यांत वास करणाऱ्या, सात अश्वांच्या रथांत बसणाऱ्या आणि छायेसहित असणाऱ्या हे सूर्या, (मी करणार असलेल्या) तिसऱ्या विवाहापासून उत्पन्न होणारा दोष दूर करून (मला) सुख दे.

नंतर कन्यादाता आचार्य, वराची मधुपर्क पूजा करून कन्यादान करतो. त्यानंतर कंकणें बांधतात. रुईच्या चारी दिशांस चार कलशांवर विष्णूची स्थापना करून त्याची पूजा करतात. नंतर होम व आचार्याला गोप्रदान करून विधि पूर्ण करतात. शेवटीं शांतिसूक्त म्हणतात.

अर्कव्रत तिथिव्रत. उभय पक्षांतल्या षष्ठी व सप्तमी या तिथींस हें व्रत करतात. सूर्यपूजा व रात्रौ भोजन असा याचा विधि आहे. व्रतावधि एक वर्ष. [हे. व्र.]

अर्कसंपुट सप्तमी तिथिव्रत. याचा आरंभ फाल्गुन शु. ७ मी पासून करतात. व्रतावधि दोन वर्षें. सूर्यपूजा हा यांतला मुख्य विधि आहे. [हि. ध.]

अर्कसप्तमी तिथिव्रत. व्रताचा आरंभ उत्तरायणांत रविवारीं शुक्लपक्षांत सप्तमी येईल, त्या दिवसापासून करतात (पद्म पु. ५. ७५. ८६-१०६). या व्रताची देवता सूर्य आहे. व्रतावधि दोन वर्षें. पंचमीस एकभुक्त, षष्ठीस नक्तभोजन, सप्तमीस उपवास व अष्टमीस पारणा, असा याचा विधि आहे. व्रतकाळांत रुईच्या पानाच्या द्रोणांतून पाणी पितात. [हे. व्र.]

अर्काष्टमी तिथिव्रत. व्रतारंभ शु. ८ मीस रविवार असेल त्या दिवसापासून करतात. या व्रतांत उमा-शंकरपूजेचें विधान आहे. [हि. ध.]

अर्घ्य षोडशोपचार पूजेंतला चौथा उपचार. अर्घ्याची व्याख्या याज्ञवल्क्य पुढीलप्रमाणे सांगतो -' दूर्वासर्षप-पुष्पाणां दत्वार्घं पूर्णमञ्जलिम् '=देव, पितर व वंदनीय व्यक्ती यांस दूर्वा , मोहऱ्या व फुलें यांसह ओंजळभर उदक देणें याचें नांव अर्घ्य होय.

अर्घ्यदान ' अर्घार्थमुदकम् ' अर्घ = पूजा. तिच्यासाठी जल (विग्रह कोश). संध्येंतला व व्रतांतला एक विधि. संध्येंत ओंजळभर उदक घेऊन सूर्याभिमुख उभें राहतात व व्याहृतिपूर्वक गायत्री मंत्र म्हणून ती ओंजळ त्रिवार पाण्यांत सोडतात. निरनिराळ्या व्रतांत आणि स्नानविधींत त्या त्या देवतांना उद्देशून अर्घ्यदान करायचें असतें. व्रताचे अर्घ्य कुशाग्रें, अक्षता, तिल, व्रीहि, यव, माष, प्रियंगु व सिद्धार्क या द्रव्यांनी युक्त असावें (पारिजात), किंवा गंध, पुष्प, अक्षता, यव, कुशाग्र, तिल, सर्षप (मोहऱ्या) व दूर्वा यांनी युक्त असावें (व्रतराज). प्राचीन काळीं अर्घ्य हा आतिथ्याचा एक भाग होता. अभिज्ञान शाकुंतल नाटकांत दुष्यंत आश्रमांत आलेला पाहिल्यावर अनसूया शकुंतलेला म्हणते -

हला शकुंतले, गच्छोटजम् । फलमिश्रमर्घमुपहर ।
(अ. शा. १)

अर्थ -- गडे शकुंतले, पर्णकुटींत जा (आणि अतिथीसाठी) फलयुक्त अर्घ्य घेऊन ये. ' **पाहा**-संध्या, पूजा.

अर्घ्यपात्र पूजाविधानांतलें एक पात्र. हें वनस्पतीचें किंवा पानांचें किंवा समुद्रांत उत्पन्न होणाऱ्या शंख-शिंपल्याचें करावें, असें पृथ्वीचन्द्रोदय या ग्रंथांत सांगितलें आहे. तें सोनें, रुपें किंवा तांबें यांचें करावें, असें हेमाद्रि सांगतो. [नि. सिं.]

अर्चट (इ. स. ९ वें शतक) एक तार्किक आचार्य. याने धर्मकीर्तीच्या ग्रंथावर हेतुबिंदुविवरण नांवाची टीका लिहिली आहे. मूळ संस्कृत पुस्तक उपलब्ध नाही. फक्त तिबेटी भाषान्तर तेवढें मिळतें. या टीकेचे चार भाग आहेत. [म. च. को.]

अर्चत हैरण्यस्तूप एक सूक्तद्रष्टा. याने सृष्टीच्या उत्पत्ती-विषयीं पुढील प्रक्रिया सांगितली आहे- जगत्प्रेरक सवित्याने ज्या पोकळींत तारकांच्या समुद्राला स्थिर केलें, तिथेच तो उचंबळून गेला. या पोकळींतच भूमि उत्पन्न झाली. तिथूनच रजोलोक निघाला आणि त्याच आकाशांत नक्षत्रें आणि पृथिवी यांचा विस्तार झाला. त्याच्या मागून अमर विभूतींचा लोक, व त्याच्या प्रभावाने यज्ञरूप पवित्र सामर्थ्य उत्पन्न झालें. या जगत्प्रेरक सवित्यापासूनच सुपर्ण प्रथम उत्पन्न झाला. तो सवित्याच्या अनुशीलनाप्रमाणे चालतो (ऋ. १०. १४९).

अर्चनभक्ति ' अर्चनम् देवतापूजनम् ' (हलायुध). गंध-पुष्पादि लौकिक पूजासाहित्य घेऊन किंवा

तें घेतल्याचें मनाने कल्पून श्रद्धापूर्वक भगवंताची पूजा करणें याला अर्चनभक्ति म्हणतात. प्रतिमा, स्थंडिल, अग्नि, सूर्य, जल, हृदय, गाय व ब्राह्मण हीं पूजेचीं आठ अधिष्ठानें आहेत. पहिलें मुख्य; तें न मिळाल्यास दुसरें व मग क्रमाने आठापर्यंत कोणतेंहि अधिष्ठान अर्चनासाठी घ्यावें, असें सांगितलें असून अधिष्ठानपरत्वें पूजाविधींत फरकहि सांगितला आहे. गृहस्थाने विशेषतः अर्चनभक्तिच करावी असें भागवतांत म्हटलें आहे (१०.८४.३७). सन्मार्गाने मिळविलेल्या द्रव्याचा अर्चनभक्तीसाठी विनियोग करणें, हें पुण्यकारक मानलेलें आहे. **पाहा**––भक्ति, पूजा.

अर्चनानस् आत्रेय एक सूक्तद्रष्टा. पांचव्या व आठव्या मंडळांत मिळून याच्या नांवावर तीन सूक्तें आहेत. 'ईश्वर हा प्रिय आणि सुखमय असून तो कोणाचाहि घात करीत नाही; तेव्हा आपण त्याच्या सेवेला लागावें' असा विचार याने मांडला आहे (ऋ. ५.६४.३.). वैदिक ऋषींचे अधूनमधून प्रकट होणारे अशा प्रकारचे विचार पुढील भक्तिमार्गाचें बीजारोपण करतात. हा ऋषि श्यावाश्वाचा पिता असून मित्रावरुणांनी याला अनेक प्रकारें मदत केली आहे (ऋ. ५.६४.७).

अर्जुन तिसरा पांडव. याचा जन्म इंद्रमंत्राच्या प्रभावाने हिमालयाच्या शतशृंग नांवाच्या पर्वतावर झाला. याला मध्यम पांडव असेंहि म्हणतात. हा सव्यसाची धनुर्धर होता. याने आपल्या आयुष्यांत अनेक महान् पराक्रम केले. याला अग्नीपासून गांडीव धनुष्य, दोन अक्षय्य भाते व कपिध्वज रथ, मयासुराकडून देवदत्त नांवाचा महाशंख, इंद्राकडून कवचकुंडलें व शिवाकडून पाशुपतास्त्र मिळालें. राजसूय यज्ञाच्या प्रसंगीं याने पूर्वेचा दिग्विजय केला. भारतीय युद्धांत कर्णाला यानेच मारलें. श्रीकृष्णाशीं याची सख्यभक्ति होती. युद्धारंभीं हा मोहग्रस्त झाला असतां श्रीकृष्णाने याला गीता उपदेशिली. कृष्णार्जुनांना नर-नारायणांचे अवतार मानलेलें आहे. वयाच्या १०६ व्या वर्षी पांडवांच्या महाप्रस्थानांत हा हिमालयावर मृत्युमुखीं पडला. याला द्रौपदीपासून श्रुतकीर्ति, सुभद्रेपासून अभिमन्यु, चित्रांगदेपासून बभ्रुवाहन व उलूपीपासून इरावान् असे पुत्र झाले. **पाहा**––महाभारतकथा.

अर्जुनसिंह (१५८१–१६०६ इ. स.) शीखांचा ५ वा गुरु. रामदासानंतर हा गुरुपदावर आला. हा प्रतिभावंत कवि, तत्त्वज्ञानी, व्यवस्थापक व मुत्सद्दी होता. याने सर्वप्रथम शीखांचा पवित्र धर्मग्रंथ निर्माण करण्याचें काम हातीं घेतलें. त्याच्या कालापर्यंत गुरु नानकाचें चरित्र आणि त्याचें काव्य एवढ्यापुरताच त्यांचा 'ग्रंथसाहिब' मर्यादित होता. याने अत्यंत परिश्रम करून पूर्वगुरूंचीं वचनें एकत्र केलीं आणि स्वतःच्याहि काव्यांची त्यांत भर घालून आदिग्रंथ अर्थात् ग्रंथसाहिब विस्तृत केला. त्यामुळे सर्व शीखांच्या धार्मिक भावना या आदिग्रंथावर केंद्रित झाल्या आणि अनायासें त्यांचें संघटन झालें.

त्याने आणखी एक महत्त्वाची गोष्ट केली. अमृतसर येथे सुवर्णमंदिर बांधून अखिल शीख समाजाला एकच एक असें पवित्र क्षेत्र निर्मून दिलें. हेंच क्षेत्र पुढे त्यांच्या धर्मकार्याचेंहि केंद्र बनलें. आदिग्रंथ किंवा ग्रंथसाहिब याला धार्मिक कायद्याचें



गुरु अर्जुनसिंह

स्वरूप प्राप्त होतांच धर्मगुरु हा शीखांचा शास्ताहि बनला. त्याच्या मठाला राजदरबाराचें स्वरूप प्राप्त झालें. शीख समाज जेव्हा गुरूकडे राजा म्हणून बघूं लागला, तेव्हा अर्जुनसिंहाने धर्मसंस्थेच्या पोषणासाठी कर घेण्याची पद्धत सुरू केली.

शीख समाजाला आत्मसंरक्षणासाठी समर्थ करणें, ही अर्जुनसिंहाची सर्वांत श्रेष्ठ कामगिरी होय. त्याने शीखांतले साहस, उत्साह, स्वाभिमान, इ. सद्गुण वाढीस लावले. धर्मप्रसार करणाऱ्या शीखसमाजाची अर्जुनसिंहाने राष्ट्रीय संस्था बनविली. नानकापासून चालत आलेल्या धर्मसभेला त्याने कायदे मंडळाचें स्वरूप दिलें. झोपड्यांच्या जागीं भव्य राज-

वाडे उभे केले. जपमाळेऐवजी तलवार हातीं धरली. त्याने आपली धर्मसंस्था वैभवसंपन्न केली; पण तो मात्र स्वतः अत्यंत साधा राहिला.

अर्जुनसिंहाच्या या संस्थेला मोगल दरबारींहि महत्त्व प्राप्त झालें. त्याच्याजवळचें द्रव्य आणि सैन्य या गोष्टी त्याला कारण होत्या.

त्यानंतर एके दिवशीं चंदुलाल नांवाचा मोगलांचा दिवाण अर्जुनसिंहाकडे आला. अर्जुनसिंहाचा पुत्र हरगोविंद याला आपली कन्या देण्याच्या हेतूने तो तिथे गेला होता; पण 'माझी मुलगी सून करून घ्या,' असें सांगतांना तो अशी कांही अरेरावीची भाषा बोलला, की अर्जुनसिंहाने त्याची सोयरीक नाकारली. त्यामुळे चंदुलालचें पित्त खवळलें. लगोलग दिल्लीस जाऊन त्याने अकबराकडे अर्जुनसिंहाबद्दल खोटेंनाटें सांगितलें. तो म्हणाला–

"अर्जुनसिंह मोगलांचें साम्राज्य उच्छेदून शीखराज्य स्थापूं इच्छितो. त्याच्या आदिग्रंथांत महंमदी धर्माची निंदा आहे."

अकबराने तें ऐकलें; पण चंदुलालवर त्याचा विश्वास बसला नाही. त्याने तो ग्रंथ अर्जुनसिंहाकडून मागून घेतला आणि बारकाईने वाचला; पण त्याला त्यांत कुराण किंवा इस्लाम यांची निंदा कुठेच आढळली नाही. अकबराने आदरपूर्वक तो ग्रंथ अर्जुनसिंहाकडे परत पाठविला. चंदुलालला हात चोळीत स्वस्थ बसावें लागलें.

अकबरानंतर जहांगिर गादीवर आला. त्याच्या कारकीर्दीत मात्र चंदुलालने आपला सूड उगवून घेतला. जहांगिराचा पुत्र खुस्रव. याने बापाविरुद्ध बंड केलें. त्यांत त्याचा पराजय झाला. तो सुरक्षित आश्रयासाठी अर्जुनसिंहाकडे गेला व अर्जुनसिंहाने क्षात्रधर्म म्हणून त्या शरणागताला आश्रय दिला. चंदुलालला तेवढें कारण पुरेंसें वाटलें. त्याने अर्जुनसिंहावर राजद्रोहाचा आरोप ठेवून जहांगिराकडून त्याला पकडण्याचा हुकूम मिळविला. त्याने अमृसरला जाऊन अर्जुनसिंहाला कैद केलें व जहांगिरापुढे आणून उभें केलें. जहांगिराने त्याला कारागृहांत पाठविलें व चंदुलालला त्याच्यावर अधिकारी म्हणून नेमलें. चंदुलालने त्याला म्हटलें, की 'माझी मुलगी सून करून घेत असशील, तर अजूनहि मी तुझे प्राण वांचवीन.' पण अर्जुनसिंहाने त्या गोष्टीला स्पष्ट नकार दिला. चंदुलाल त्यामुळे अधिकच खवळला व त्याने अर्जुनसिंहाला हालहाल करून ठार मारलें.

अर्जुनसिंहाचा अंत झाला आणि तेव्हापासून शीख व मोगल यांच्यांत संघर्षाची ठिणगी पेटली. शीखांच्या दमनासाठी मोगलांनी नानाप्रकारचे अघोरी उपाय योजले. शीखांनी त्या सर्व संकटांना धैर्याने तोंड दिलें. शीखांच्या इतिहासाला त्यामुळे निराळें वळण लागलें. अर्जुनसिंहाच्या काळापर्यंत शीखांचा पंथ हा केवळ धार्मिक पंथ होता. पण तोच पुढे मुसलमानांचा कट्टा द्वेष्टा व रणगाजी असा एक राजकीय पंथ म्हणून संघटित झाला. **पाहा**–शीखधर्म.

अर्जुनक्षेत्र एक पितृतीर्थ. [मत्स्य पु. २२.४३]

अर्जुनायन प्राचीन लोक व देश. यांना प्रार्जुन असेंहि म्हणतात. प्रयाग येथील एका स्तंभावर समुद्रगुप्ताने जिंकलेल्या जमातींचीं जीं नांवें आहेत, त्यांत या लोकांचा उल्लेख आहे. समुद्रगुप्ताच्या राज्याच्या पश्चिम भागांत हे लोक स्थायिक झाले होते, असें दिसतें. या जमातीच्या दोन्ही नांवांत अर्जुन शब्द येतो. वर उल्लेखिलेल्या स्तंभलेखांत यौधेय नांवाचा युधिष्ठिराचा एक पुत्र होता. त्याच्याशीं यौधेय जमातीचा संबंध जोडला, तर अर्जुनायन यांचा अर्जुनाशीं संबंध जोडतां येणें शक्य आहे. इतिहासकारांच्या मतें यौधेय व अर्जुनायन हे आप्तसंबंधी होते व ते मध्यप्रदेशांत राहत होते. **पाहा**–यौधेय. [ट्रा. ए. इं.]

अर्जुनीया एक नदी. श्री.अय्यंगार यांच्या मतें ही व बाहुदा या दोन्ही नद्या एकच असल्या पाहिजेत. [तीर्थकल्प, पृष्ठ २८३]

अर्थवाद 'अर्थस्य प्रयोजनस्य वादो वादनम् । विध्यर्थप्रशंसापरं वचनम्' अर्थ = प्रयोजन, त्यासंबंधीं बोलणें, म्हणजेच विध्यर्थाचें प्रशंसापर वचन म्हणजे अर्थवाद होय (न्यायकोश). हा पूर्वमीमांसेंतला पारिभाषिक शब्द आहे. 'मंत्र–ब्राह्मणयोर्वेदनामधेयम्' = वेदामध्ये मंत्र आणि ब्राह्मण असे दोन भाग असतात (आप. श्रौ. सू.). मंत्रांत देवतांची अथवा कर्माची स्तुति असते व ते मंत्र निरनिराळ्या अनुष्ठानाच्या वेळीं म्हणायचे असतात. क्रियमाण कर्मसंबंधींचा अर्थ त्या मंत्रामध्यें आलेला असतो. मंत्रभागामध्ये कांही छंदोबद्ध मंत्र असतात. त्यांना ऋक् म्हणतात. आणि गद्यस्वरूप मंत्रांना यजुस् म्हणतात. मंत्रभाग वगळून वेदाचा जो भाग शिल्लक राहतो, त्याला ब्राह्मण असें म्हटलें आहे. विधि, निषेध, नामधेय आणि अर्थवाद असे ब्राह्मणाचे चार विभाग शास्त्रकारांनी कल्पिले आहेत. त्यामुळे मंत्र आणि ब्राह्मण मिळून वेदाचे पांच भाग होतात.

विशिष्ट मंत्र म्हणून विशिष्ट कर्म करावें, त्याचप्रमाणे अमुक याग केल्याने अमुक फल मिळतें, अशा प्रकारें ज्या वाक्यांत कर्माची प्रेरणा असते, किंवा ज्या वाक्यांत एखादें विधान केलेलें असतें, अशा वाक्यांना विधि म्हणतात. 'अग्निहोत्रं जुहुयात् स्वर्गकामः' = स्वर्गाची कामना असेल त्याने अग्निहोत्रहोम करावा, यासारखे अनेक विधि ब्राह्मणग्रंथांमध्ये येतात. एखादी गोष्ट करूं नये, असा निषेध ज्या वाक्यामध्ये केलेला असतो, त्याला निषेध म्हणतात. उदा० 'नोपर्यासीत, न मांसमश्नीयात्'। इ. ब्राह्मणभागास निषेध म्हणतात. दर्शपूर्णमास, अग्निहोत्र, ज्योतिष्टोम इ. शब्दांना नामधेय म्हणतात. अनेक अंगें असलेल्या एका यागाच्या नांवास नामधेय म्हटलें आहे. विधि, निषेध व नामधेय वगळून उरलेल्या ब्राह्मणभागास अर्थवाद म्हणतात.

निरनिराळ्या ब्राह्मण ग्रंथांमध्ये खूप मोठा भाग अर्थवादाचाच आहे. अर्थवादामध्ये अनेक कथा सांगितलेल्या असतात. एखादा विधि सांगितला, की त्या विधीने सांगितलेलें कर्म करावें, अशी प्रेरणा मिळते. परंतु 'तें कर्म कां करायचें ? तें कर्म केल्याने काय होतें ? त्या कर्माचें माहात्म्य काय ? तेंच कर्म करणें कां चांगलें ?' इ. अनेक प्रश्न उत्पन्न होतात. या सर्व प्रश्नांचीं उत्तरें देण्यासाठीच अर्थवादाची आवश्यकता असते. कोणत्याहि कर्माची निरनिराळ्या दृष्टीने स्तुति करायची, हें अर्थवादाचें मुख्य प्रयोजन होय. 'अग्निहोत्रं जुहुयात्' = अग्निहोत्रहोम करावा, एवढें सांगून कोणी अग्निहोत्र घेऊन होम करण्यास प्रवृत्त होणार नाही; तर अग्निहोत्र होम केल्यामुळें काय होतें ? त्याचें माहात्म्य काय ? पूर्वीं त्यासंबंधीं काय काय घडलें ? अग्निहोत्रहोम केल्यामुळे कोणाला कसा स्वर्ग मिळाला ? हें सर्व सांगितल्यावरच अग्निहोत्रहोम करण्याची प्रवृत्ति होऊं शकेल.

त्याचप्रमाणे एखादी गोष्ट करूं नये, एवढें सांगून तें न करण्याची प्रवृत्ति होणार नाही, तर ती गोष्ट करण्यामुळे काय वाईट होतें तें सांगावें लागतें. अर्थवादामध्यें तें सांगितलेलें असतें. अकरणीय गोष्टीची निंदा करून ती गोष्ट सर्वथा त्याज्य करावी, हेंच सांगण्याचा त्या ठिकाणीं उद्देश असतो. तेव्हा एखाद्या विधीची स्तुति किंवा निषेधाची निंदा ज्या वाक्यामध्ये अथवा भागामध्ये केलेली असते, तो अर्थवाद अशी आणखी एक व्याख्या उपलब्ध होते—'स्तुतिनिन्दान्यतरद् वाक्यम् अर्थवादः' = स्तुति किंवा निंदा यांपैकी एखाद्या गोष्टीसंबंधीं जें वाक्य तो अर्थवाद होय. निषेधवाक्यांनी एखाद्या गोष्टीची निंदा केलेली असली, तरी तिचा उद्देश निंदा करणें हा नसून जें विहित तें करावें, असें सांगण्याचा असतो. याला मीमांसाशास्त्रांत 'नहि निन्दान्याय' म्हणतात ('न हि निन्दा निन्द्यं निन्दितुं प्रवर्तते अपि तु विधेयं स्तोतुम्।' तंत्रवार्तिक. जै. सू. २. ४. २१. वरील भाष्य).

अर्थवादाचे स्तुति, निंदा, परकृति व पुराकल्प असे चार भेद आहेत. (गो. न्यायदर्शन २. १. ६४). याशिवाय गुणवाद, अनुवाद आणि भूतार्थवाद असेहि तीन प्रकार मानलेले आहेत.

विरोधे गुणवादः स्यादनुवादोऽवधारिते।
भूतार्थवादस्तद्धानादर्थवादस्त्रिधा मतः॥

(तन्त्रवार्तिक १. २.)

याचें स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे—प्रत्यक्ष, अनुमान इ. प्रमाणांशीं ज्यांचा विरोध दिसतो, अशा अर्थवादवाक्यांना गुणवाद म्हणतात. अशा वाक्यांचा अर्थ लक्षणेने निराळा घेऊन मगच त्यांची एकवाक्यता करायची असते. 'यजमानो यूपः' = यजमान हा यूप आहे, 'आपो वै दर्भाः' = आपः हे दर्भ आहेत, 'अग्निः पशुः' = अग्नि हा पशु होय, अशीं अनेक अर्थवाद वाक्यें ब्राह्मणग्रंथांत येतात. त्यांचा अर्थ लक्षणेनेच घ्यावा लागतो. 'धूम एवाग्नेर्दिवा ददृशे' = अग्नीचा धूरच दिवसा दिसतो, हें वाक्य घ्या. केवळ धूर नव्हे; तर प्रत्यक्ष अग्निहि दिवसा दिसूं शकतो. त्यामुळे वरील वाक्याचा अभिधाशक्तीने अर्थ केला, तर तें वाक्य विरोधी ठरतें. अग्नि आणि सूर्य यांना आहुति देण्याचें विधान ज्या वाक्यांत केलें आहे, त्या वाक्याची स्तुति करतांना अग्नि आणि सूर्य यांचें परस्परावलंबित्व सांगितलेलें आहे. दिवसा अग्नि आपलें तेज सूर्याला देतो, म्हणून दिवसा केवळ धूरच दिसतो, अशी त्या वाक्यांत अग्नीची स्तुति केलेली आहे. अशा प्रकारचीं अर्थवादवाक्यें गुणवाद या प्रकारांत येतात व त्यांचा अर्थ लक्षणेनेच घ्यायचा असतो.

जी गोष्ट प्रत्यक्षादि प्रमाणांनी सिद्ध आहे, तीच पुन्हा सांगायची, याला अनुवाद म्हणतात. 'अग्निर्हिमस्य भेषजम्' (तै. सं. ७. ४. १८) = अग्नि हें थंडीवर औषध आहे, ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवाने सिद्ध आहे. 'वायुर्वै क्षेपिष्ठा देवता' = वायु ही जलद चालणारी देवता आहे, हें दुसरें वाक्य. वायु जलद वाहतो ही गोष्ट सिद्ध आहे. अर्थात् वरील दोन्ही वाक्यें अनुवादरूप समजायचीं.

अनुवादाचा आणखी प्रकार—'दध्ना जुहोति' = दह्याने होम करावा, या वाक्यांत दह्याचें विधान नवीन करायचें आहे. परंतु होम करावा ही गोष्ट 'अग्निहोत्रं जुहोति' या वाक्यांत आधीच सांगितली आहे. म्हणून 'दध्ना जुहोति' या वाक्यांत 'जुहोति' = होम करावा याचा अनुवाद आहे, असें समजतात.

जी गोष्ट प्रत्यक्षादि प्रमाणांशीं विरोधी नाहीं, तथापि जी आपणांस माहीत नाही, परंतु ती खरी असणें शक्य आहे, अशी गोष्ट सांगणें याला भूतार्थवाद म्हणतात. एखादा विधि सांगितल्यावर तें कर्म करण्याची प्रवृत्ति व्हावी, यासाठी पूर्वीच्या तशा कर्मांच्या व कर्म करणाऱ्यांच्या अनेक कथा ब्राह्मणग्रंथांमधून ठिकठिकाणीं सांगितलेल्या असतात. या सर्व कथा भूतार्थवादाचींच उदाहरणें होत. यांत देव आणि असुर यांचें युद्ध झालें आणि त्या प्रसंगीं काय घडलें, तें सांगितलेलें असतें. अशा बऱ्याच गोष्टी सांगितल्यानंतर 'य एवं विद्वान्...' जो हें जाणतो त्यानें हें करावें, अशा प्रकारचीं वाक्यें येतात. त्या सर्वांना भूतार्थवाद म्हणायचें.

अर्थवादाचे मीमांसाशास्त्राच्या अन्य ग्रंथांत अडतीस भेद केलेले आहेत (बालमीमांसाप्रकाश : पृ. ४८–५५). शास्त्रीय दृष्ट्या त्यामध्यें अनेक भेद असले, तरी एखाद्या कर्मास प्रवृत्त करणें, हेंच खरें अर्थवादाचें कार्य होय. 'प्ररोचनया तु प्रवर्तते द्वेषान्निवर्तते इति तयोर्विवक्षा' एखाद्या कर्माची आवड उत्पन्न केल्याने (कर्ता) प्रवृत्त होतो व त्याची निंदा केल्याने निवृत्त होतो म्हणून त्यांची विवक्षा, असें शबरस्वामीने भाष्यांत म्हटलें आहे. अर्थवादवाक्यांची विधिवाक्यांशीं एकवाक्यता करून त्यांचें प्रामाण्य जाणून घ्यायचें असतें. त्यांचा स्वतंत्रपणे अर्थ करून प्रामाण्य दाखवितां येणार नाही. शाबरभाष्यामध्ये अर्थवादाधिकरणांत अर्थवादाचें प्रामाण्य सिद्ध केलें आहे (१. २. १). मूळ विधानाची स्तुति करणें, हें अर्थवादाचें काम असल्यामुळें त्या अर्थी अर्थवाद अन्यत्रहि योजतात. अर्थवादांना स्वातंत्र्याने अर्थ असतो; परंतु स्वतंत्रपणें तो अर्थ लक्षांत घेतल्यास अनेक परस्परविरोधी आणि विचित्र अर्थ त्यांतून निघूं लागतील. म्हणून वेदांत आलेले अर्थवाद कोणत्या विधीच्या अनुरोधाने आले आहेत, हें पाहणें आवश्यक असतें.

पूर्वमीमांसा हें दर्शन वेदांना अनादि, नित्य व अपौरुषेय मानतें. त्यामुळे सर्व विरोधी वाक्यांचा समन्वय करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. समस्त वेदवाक्यांचें मुख्य प्रयोजन मनुष्याला यज्ञकर्मासाठीं प्रवृत्त करणें हें आहे, असा मीमांसकांचा सिद्धान्त आहे. त्यांच्या दृष्टीने वेदांतले, ब्रह्म, ईश्वर, जीव, देवता, लोक, परलोक हे सर्व विषय केवळ अर्थवादरूपच आहेत. पण उत्तरमीमांसेंत अनेक आचार्यांनीं त्यांचें खंडन केलें आहे. [विद्याधरशास्त्री भिडे].

अर्थशास्त्र

'अर्थ्यते इति अर्थः' = ज्याची अपेक्षा केली जाते तो अर्थ होय. जमीन, सुवर्ण, गुरेंढोरें धान्य, उपकरणें, योगक्षेम इ. सर्वांना मिळून अर्थ अशी संज्ञा आहे. या सर्व गोष्टींचा विचार करणारें शास्त्र तें अर्थशास्त्र होय. यांत मानवाच्या अर्थविषयक प्रयत्नांचें विवेचन येतें. मनुष्याच्या आर्थिक प्रयत्नांच्या द्वारें विश्वांत सुख व शांति निर्माण करणें म्हणजेच पर्यायाने विश्वकल्याण साधणें हा अर्थशास्त्राचा उद्देश आहे. म्हणूनच चतुर्विध पुरुषार्थांत अर्थ हा दुसरा पुरुषार्थ मानलेला आहे.

अर्थशास्त्र ही प्राचीन विद्या आहे. चार वेदांचे चार उपवेद आहेत, त्यांत एक अर्थवेदहि असून तो ऋग्वेदाचा उपवेद आहे. मात्र तो सांप्रत उपलब्ध नाही. भारतीय अर्थशास्त्राचा उगम ब्रह्मदेवापासून झाला आहे असें म. भा. च्या शांतिपर्वांत सांगितलें आहे (५९). ती कथा अशी–

एकदा सर्व देव ब्रह्मदेवाकडे गेले व त्यांनी त्याला मानवाच्या कल्याणाचा मार्ग विचारला. तेव्हा ब्रह्मदेवाने एक हजार अध्यायांचें त्रिवर्गशास्त्र (धर्म-अर्थ-काम) निर्माण करून तें देवांना उपदेशिलें. या पैतामह अर्थशास्त्रांत दंड व नीति यांचें अपूर्व विधान होतें. ब्रह्म्याच्या या अर्थशास्त्राचा पुढे विशालाक्ष, स्कंद, इंद्र, पुलोमा, बृहस्पति, काव्य उशना, यांनी विस्तार केला.

यांशिवाय नारद, बुध, सुधन्वा (बृहस्पतीचा बंधु), मरुत्त, तसेंच स्वायंभुव, प्राचेतस व वैवस्वत हे तीन मनु, वसिष्ठ, भरद्वाज, गौरशिरा, पराशर, व्यास, भीष्म, कौणपदंत, द्रोण, भारद्वाज, उद्धव वातव्याधि, शांबव्य, शालंकायन, विष्णुगुप्त, असे अनेक अर्थशास्त्रज्ञ महाभारतादि ग्रंथांतून उल्लेखित आहेत.

प्राचीन भारतीय आचार्यांनी लोकांच्या व्यावहारिक जीवनाशीं ज्या ज्या गोष्टींचा संबंध पोचतो, त्या त्या सर्वांचा उपदेश आणि शिक्षण अर्थशास्त्र या नांवाने दिलेलें आहे. अर्थशास्त्राची अत्यंत महत्त्वाची शाखा राजकारण ही होय. तिला नीतिशास्त्र असें स्वतंत्र नांव होतें. म्हणूनच केव्हा केव्हा अर्थशास्त्र व नीतिशास्त्र हीं नांवें समानार्थक योजिलीं जात. प्राचीन भारतांत राजसत्ताक पद्धतीशिवाय दुसऱ्याहि कांही शासनपद्धति अस्तित्वांत होत्या. पण त्या अन्य पद्धतींचा विचार न करतां भारतीय आचार्यांनी राजाधिष्ठित राजनीति, या दृष्टीनेच शासनशास्त्राचें विवेचन केलेलें आहे.

अर्थशास्त्र हें स्वतंत्र शास्त्र म्हणून जन्माला येण्यापूर्वी धर्मशास्त्राच्या अनुषंगानेच त्याचा विचार होत असे. आपस्तंब धर्मसूत्रांत अर्थशास्त्राच्या कक्षेंतल्या विषयांचें विवेचन आलें आहे. पण धर्म व अर्थ या दोन शास्त्रांत एक मूलभूत फरक आहे. धर्मशास्त्र हें श्रुतिस्मृतिप्रतिपादित कर्तव्यें शिकवितें,

तर अर्थशास्त्र हें नीति-धर्मनिरपेक्ष अशा भौतिक सिद्धीचे मार्ग दाखवितें. अर्थशास्त्र हें वस्तुस्थितीला अनुसरणारें शास्त्र आहे.

महाभारताच्या काळांत अर्थशास्त्र हें धर्मशास्त्रापासून विभक्त होऊन स्वतंत्रपणें आकार धरूं लागलें, असें अनुमानितां येतें. त्या काळांत राज्यकारभार व राजधर्म यांना महत्त्व प्राप्त झालें आणि त्यामुळे राजधर्माचा (Polity) विचार अर्थशास्त्र या स्वतंत्र नांवाने करण्याची गरज उत्पन्न झाली. तेव्हापासूनच राज्यशास्त्राचा विचार धर्मनिरपेक्ष होऊं लागला. त्यामुळे त्याला एक निराळीच दिशा मिळाली. त्याचा परिणाम असा झाला, की भारतीयांच्या ठिकाणीं भूमि व लोक यांच्यावर आधिपत्य मिळविण्यासाठी व मिळालेलें आधिपत्य टिकविण्यासाठी स्पर्धा सुरू झाली. या सत्तास्पर्धेत उपयोजिले जाणारे उपायहि फारसे विशुद्ध राहिले नाहीत. भारतीय राज्यशास्त्राचा विचार करतांना हें परिवर्तन लक्षांत घ्यावें लागतें व त्याचा सुगावा आपल्याला महाभारतांतच मिळतो. कौरवपांडवांच्या संघर्षांत भीष्म, द्रोण, कर्ण हे अतिरथी, महारथी कौरवांच्या पक्षांत होते. त्यांना युद्धांत मारण्यासाठी पांडवांनी श्रीकृष्णाच्या अनुमतीने ज्या मार्गांचा अवलंब केला, त्यांना धर्मयुद्धांत स्थान देतां येणार नाही. आणि असें असूनहि पांडवांना मिळालेला विजय हा तत्कालीन जनतेने धर्मविजय मानला. यावरून त्या काळीं जुना राजधर्म व अर्थशास्त्रप्रणीत राजधर्म यांमध्यें दुसराच धर्म अधिक प्रभावी ठरूं लागला होता असें दिसून येतें.

प्राचीन धर्मशास्त्र व हें नवें अर्थशास्त्र यांमधील फरक स्थूलमानाने पुढीलप्रमाणे सांगतां येतो– धर्मशास्त्रांत ध्येयसिद्धीसाठी वापरण्याचीं साधनें शुद्ध असावीं यावर भर होता; पण अर्थशास्त्रांत या साधनशुचितेला स्थान उरलें नाही. येन केन प्रकारेण राजकीय उद्दिष्ट साध्य करण्यांत यश मिळविलें म्हणजे अर्थशास्त्राचा हेतु सफल झाला. त्यामुळेच अर्थशास्त्र हें अथर्ववेदाला जवळचें आहे असें मानण्याची रूढि पडली. प्राचीन भारतांतील राजकीय विचारांवर या अर्थशास्त्रीय विचारांचा मोठाच प्रभाव पडलेला आहे. पण कोणत्याहि परिस्थितींत अर्थशास्त्राला धर्मशास्त्राचा लगाम असावा, असें प्रतिपादन करण्याचे प्रयत्न मात्र पुनः पुनः केलेले आढळतात. धर्मशास्त्र व अर्थशास्त्र यांच्यामध्यें विरोध निर्माण झाल्यास धर्मशास्त्रच प्रमाण मानावें अशी विचारसरणीहि अनेकदा व्यक्त झाली आहे. उदा० पुढील वचनें पाहावीं–

अर्थशास्त्रात्तु बलवद्धर्मशास्त्रमिति स्थितिः ।

(याज्ञ. २. २१)

अर्थ–अर्थशास्त्राहून धर्मशास्त्र बलवान् (मानावें) असा नियम आहे.

यत्र विप्रतिपत्तिः सद्धर्मशास्त्रार्थशास्त्रयोः ।
अर्थशास्त्रोक्तमुत्सृज्य धर्मशास्त्रोक्तमाचरेत् ।।

(नारद १. ३९)

अर्थ–अर्थशास्त्र व धर्मशास्त्र यांत विरोध आल्यास अर्थशास्त्रांत सांगितलेलें टाकून धर्मशास्त्रांत सांगितलें असेल, तें आचरावें.

महाभारत व मनुस्मृति यांचा रचनाकाल सामान्यतः एकच मानला जातो. पण महाभारतांतले राज्यशास्त्रविषयक विचार मनुस्मृतींतल्य विचारांपेक्षा अधिक उच्च दर्जाचे आहेत. शांतिपर्वांतील 'राजधर्म' हें उपपर्व पूर्णपणें राज्यशास्त्रविषयक सिद्धान्त, राजनैतिक डावपेंच व दैनंदिन राज्य कारभारांतील बारकावे, यांनी भरलेलें आहे. तत्पूर्वी निर्माण झालेल्या आणि विवेचिलेल्या राजकीय सिद्धान्तांचा समन्वय करण्याचें कार्य महाभारताने केलें.

याज्ञवल्क्यस्मृति, कामंदकीय नीतिसार व शुक्रनीति हे तीन ग्रंथ राज्यशास्त्राचा विचार करणारे असून त्यांची रचना मनुस्मृति व महाभारत यांच्या नंतरची आहे. मौर्य राजवंशावर मनुस्मृतीचा प्रभाव होता; तर गुप्त घराण्यावर याज्ञवल्क्यस्मृतीचा होता. इ. स. च्या चौथ्या व पांचव्या शतकांत भारताच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रांत कोणकोणते बदल झाले, तें याज्ञवल्क्यस्मृतीवरून कळून येतें. गुप्त साम्राज्याचा कायदा याज्ञवल्क्यस्मृतीवरच आधारलेला आहे. गुप्तकालांत व्यक्ति, जात आणि वर्ग यांचा विचार न करतां राज्याचे कायदे सर्वांना सारख्याच पद्धतीने लागू करण्यांत आले. तत्पूर्वी ब्राह्मणांना कायद्यांत कित्येक सवलती होत्या, त्या या काळांत काढून घेण्यांत आल्या. शूद्रांच्या बाबतींतले कित्येक अन्याय्य निर्बंधहि दूर करण्यांत आले. याज्ञवल्क्यापूर्वीच्या स्मृतिकारांनी कायद्याचा धर्मनिरपेक्ष असा विचार केलेला नव्हता. याज्ञवल्क्यस्मृतींत तो प्रथमच केलेला आढळतो, हें त्या स्मृतीचें वैशिष्ट्य होय. फौजदारी कायद्यांपेक्षा दिवाणी कायद्यांचा विचार याज्ञवल्क्याने बारकाईने केला आहे.

कामंदकीय नीतिसारांत कौटिल्याचेच सिद्धांत व नियम पुनश्च निराळ्या भाषेंत मांडलेले आहेत. या ग्रंथांत राज्यशास्त्रविषयक कोणताहि नवा विचार आढळत नाही. मात्र या ग्रंथावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते, की कौटिल्यानंतर भारतांत राजकारणाचा प्रपंच करणारे तोलामोलाचे असे ग्रंथकार निर्माण झालेच नाहीत.

शुक्रनीति या ग्रंथाचा काळ इ. स. चें आठवें शतक हा

होय. कामंदकीयनीतिसाराप्रमाणेच हाहि ग्रंथ संकलनात्मकच आहे. पण या ग्रंथांत मंत्रिमंडळाची घडण व व्यवस्था, तसेंच परराष्ट्रीय संबंध व सैन्यविषयक धोरण, या विषयांचें विवेचन चांगल्या प्रकारें केलेलें आहे.

शुक्रनीतींतले अर्थशास्त्रविषयक विचार पुढीलप्रमाणे आहेत ––

नीतिशास्त्र हें जीवनाच्या प्रत्येक गोष्टींत उपयोगी पडणारें आणि त्यामुळे मानवी जीवनाला स्थैर्य प्राप्त करून देणारें शास्त्र आहे. धर्म, अर्थ, व काम या तीन पुरुषार्थांचा नीतिशास्त्रांत समावेश होतो. नीतिशास्त्राच्या अध्ययनाने मानवाला व्यवहाराचातुर्य लाभतें आणि त्याचे मनोरथ पूर्ण होतात. राजांनी या शास्त्राचें अध्ययन अवश्य केलें पाहिजे. प्रजेचें संरक्षण व समाजांतल्या दुष्ट प्रवृत्तींना आळा घालणें, हीं राजाचीं दोन प्रधान कर्तव्यें होत. त्यासाठी राजाला चांगल्या राजपुरोहिताची आवश्यकता शुक्रनीतीने प्रतिपादिली आहे. विद्वान्, निग्रही, निर्लोभी, शस्त्र आणि शास्त्र या दोहोंतहि पारंगत, स्पष्टवक्ता आणि धोरणी असा राजपुरोहित असावा असें तिथे सांगितलें आहे. मंत्री विश्वासपात्र असावे. राजाला त्यांनी योग्य तो सल्ला द्यावा आणि अयोग्य वर्तन करण्याच्या वेळीं राजाला त्यांचें भयहि वाटावें. मुख्य प्रधानाने सर्व मंत्र्यांकडून नेमलेलीं कामें करून घ्यावीं. सरसेनापतीने सैन्यभरती, सैन्याची शिस्त आणि सैन्यसंचालन, इ. गोष्टी योग्य प्रकारें सांभाळाव्या. राजाला विद्वान् आणि नीतिनिपुण असे सल्लागारहि असावे. न्यायाधीशांना देशांतील चालीरीतींचें व रूढींचें चांगलें ज्ञान असावें.

शुक्रनीतीने परदेशांतील वकिलाला फार महत्त्व दिलें आहे. योग्यायोग्यतेचा विवेक असणारा, स्थलकालमर्यादा लक्षांत ठेवून वागणारा, दुसऱ्याचें इंगित अचूक ओळखणारा, चांगलें व्यक्तिमत्त्व आणि मोहक वक्तृत्व असणारा व वेळीं प्रसंगीं निर्भयपणें आपत्तींना तोंड देणारा असा पुरुष राजाने परदेशांत वकील म्हणून नेमावा, असें त्या ग्रंथांत सांगितलें आहे.

कौटिलीय अर्थशास्त्र – इ. स. १९०५ सालीं अर्थशास्त्रावरचा एक प्राचीन ग्रंथ उपलब्ध झाला. त्याचें नांव कौटिलीय अर्थशास्त्र हें होय. हा अर्थशास्त्रावरील युगप्रवर्तक ग्रंथ असून कौटिल्य हा त्याचा कर्ता आहे. कौटिल्य हा चंद्रगुप्त मौर्याचा महामंत्री होता. या ग्रंथामुळे प्राचीन भारताच्या इतिहास व संस्कृति यांविषयींच्या कल्पनांत महत्त्वाचे फेरबदल घडून आले आहेत. या ग्रंथामुळे सिकंदर भारतावर स्वारी करून आला त्या वेळच्या राजकीय परिस्थितीवर चांगलाच प्रकाश पडतो व तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीमुळे भारतांत एका बलाढ्य अशा मध्यवर्ती सत्तेची स्थापना होणें कसें व कां आवश्यक होतें, तेंहि स्पष्ट होतें.

कौटिल्याने अर्थशास्त्राची व्याख्या केली आहे ती अशी––

तस्याः पृथिव्याः लाभपालनोपायः शास्त्रमर्थशास्त्रम् ।

(कौ. अ. १५.१)

अर्थ––पृथ्वीचा (पृथ्वीवरील सत्तेचा) लाभ करून घेणें व मिळालेल्या पृथ्वीचें पालन करणें, या गोष्टींचा उपाय सांगणारें शास्त्र तें अर्थशास्त्र होय.

अर्थ एव प्रधानः इति कौटिल्यः ।
अर्थमूलौ हि धर्मकामाविति।

(कौ. अ, १.७.)

अर्थ––अर्थ हाच प्रधान आहे. (व) धर्म आणि काम हे अर्थमूलक आहेत.

अर्थशास्त्राचा मुख्य प्रतिपाद्य विषय राजनीति हा आहे. मानवमात्राचें सर्व सुख-कल्याण अर्थशास्त्रांत समाविष्ट आहे. आपल्या पूर्वीच्या १८ अर्थशास्त्रज्ञ आचार्यांचा आणि संप्रदायांचा कौटिल्याने उल्लेख केला आहे. यावरून असें दिसून येतें, की नंदांच्या कालापर्यंत अर्थशास्त्र हें स्वतंत्र विद्या या स्वरूपांत मान्यता पावलें होतें. त्याला धर्मशास्त्राइतकीच योग्यता मिळाली होती. आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता आणि दंडनीति या चार विद्यांचें विवेचन करतांना कौटिल्याने मनु, बृहस्पति आणि उशना यांचीं मतें उद्धृत केलीं आहेत. प्राचीन आचार्यांच्या अर्थशास्त्रविषयक साऱ्या ग्रंथांचें आलोडन करूनच कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्राची उभारणी केली आहे. कौटिल्याच्या या अर्थशास्त्रांत पंधरा अधिकरणें असून त्यांची विषयसूची पुढीलप्रमाणे आहे––

(१) **विनयाधिकार**–अमात्योत्पत्ति, मंत्री आणि पुरोहित यांची नियुक्ति, भिन्न उपायांनी मंत्र्यांची परीक्षा, गुप्त विचार, राजकुमारांचें रक्षण आणि कर्तव्य, अन्तःपुराचा प्रबंध, आत्मरक्षण आणि दूतकर्म इत्यादि.

(२) **अध्यक्षप्रचार**–शासनसंस्थेंतील प्रमुख म्हणजेच अध्यक्ष यांचीं कर्तव्यें, त्यांचे विभाग, दुर्ग म्हणजे गडकोट यांची उभारणी, कर गोळा करणें, रत्नांची परीक्षा, खनिज पदार्थांच्या उद्योगांचें संचालन, वजनें आणि मापें, सेनापतीचीं कार्यें, गुप्त हेरांची योजना इत्यादि.

(३) **धर्मस्थीय**–कज्जे खटले यांचा निर्णय, विवाहविषयक नियम, दायविभाग, गृहवास्तु, श्रम आणि भांडवल यांचा विनियोग, बेवारशी धनाची व्यवस्था इत्यादि.

(४) **कंटकशोधन**–कारागिरांचें व व्यापाऱ्यांचें रक्षण,

तर अर्थशास्त्र हें नीति-धर्मनिरपेक्ष अशा भौतिक सिद्धीचे मार्ग दाखवितें. अर्थशास्त्र हें वस्तुस्थितीला अनुसरणारें शास्त्र आहे.

महाभारताच्या काळांत अर्थशास्त्र हें धर्मशास्त्रापासून विभक्त होऊन स्वतंत्रपणें आकार धरूं लागलें, असें अनुमानितां येतें. त्या काळांत राज्यकारभार व राजधर्म यांना महत्त्व प्राप्त झालें आणि त्यामुळे राजधर्माचा (Polity) विचार अर्थशास्त्र या स्वतंत्र नांवाने करण्याची गरज उत्पन्न झाली. तेव्हापासूनच राज्यशास्त्राचा विचार धर्मनिरपेक्ष होऊं लागला. त्यामुळे त्याला एक निराळीच दिशा मिळाली. त्याचा परिणाम असा झाला, की भारतीयांच्या ठिकाणीं भूमि व लोक यांच्यावर आधिपत्य मिळविण्यासाठी व मिळालेलें आधिपत्य टिकविण्यासाठी स्पर्धा सुरू झाली. या सत्तास्पर्धेत उपयोजिले जाणारे उपायहि फारसे विशुद्ध राहिले नाहीत. भारतीय राज्यशास्त्राचा विचार करतांना हें परिवर्तन लक्षांत घ्यावें लागतें व त्याचा सुगावा आपल्याला महाभारतांतच मिळतो. कौरवपांडवांच्या संघर्षांत भीष्म, द्रोण, कर्ण हे अतिरथी, महारथी कौरवांच्या पक्षांत होते. त्यांना युद्धांत मारण्यासाठी पांडवांनी श्रीकृष्णाच्या अनुमतीने ज्या मार्गांचा अवलंब केला, त्यांना धर्मयुद्धांत स्थान देतां येणार नाही. आणि असें असूनहि पांडवांना मिळालेला विजय हा तत्कालीन जनतेने धर्मविजय मानला. यावरून त्या काळीं जुना राजधर्म व अर्थशास्त्रप्रणीत राजधर्म यांमध्यें दुसराच धर्म अधिक प्रभावी ठरूं लागला होता असें दिसून येतें.

प्राचीन धर्मशास्त्र व हें नवें अर्थशास्त्र यांमधील फरक स्थूलमानाने पुढीलप्रमाणे सांगतां येतो– धर्मशास्त्रांत ध्येयसिद्धीसाठी वापरण्याचीं साधनें शुद्ध असावीं यावर भर होता; पण अर्थशास्त्रांत या साधनशुचितेला स्थान उरलें नाही. येन केन प्रकारेण राजकीय उद्दिष्ट साध्य करण्यांत यश मिळविलें म्हणजे अर्थशास्त्राचा हेतु सफल झाला. त्यामुळेच अर्थशास्त्र हें अथर्ववेदाला जवळचें आहे असें मानण्याची रूढि पडली. प्राचीन भारतांतील राजकीय विचारांवर या अर्थशास्त्रीय विचारांचा मोठाच प्रभाव पडलेला आहे. पण कोणत्याहि परिस्थितींत अर्थशास्त्राला धर्मशास्त्राचा लगाम असावा, असें प्रतिपादन करण्याचे प्रयत्न मात्र पुनः पुनः केलेले आढळतात. धर्मशास्त्र व अर्थशास्त्र यांच्यामध्यें विरोध निर्माण झाल्यास धर्मशास्त्रच प्रमाण मानावें अशी विचारसरणीहि अनेकदा व्यक्त झाली आहे. उदा० पुढील वचनें पाहावीं–

अर्थशास्त्रात्तु बलवद्धर्मशास्त्रमिति स्थितिः ।

(याज्ञ. २. २१)

अर्थ–अर्थशास्त्राहून धर्मशास्त्र बलवान् (मानावें) असा नियम आहे.

यत्र विप्रतिपत्तिः स्द्धर्मशास्त्रार्थशास्त्रयोः ।
अर्थशास्त्रोक्तमुत्सृज्य धर्मशास्त्रोक्तमाचरेत् ।।

(नारद १. ३९)

अर्थ–अर्थशास्त्र व धर्मशास्त्र यांत विरोध आल्यास अर्थशास्त्रांत सांगितलेलें टाकून धर्मशास्त्रांत सांगितलें असेल, तें आचरावें.

महाभारत व मनुस्मृति यांचा रचनाकाल सामान्यतः एकच मानला जातो. पण महाभारतांतले राज्यशास्त्रविषयक विचार मनुस्मृतींतल्य विचारांपेक्षा अधिक उच्च दर्जाचे आहेत. शांतिपर्वांतील 'राजधर्म' हें उपपर्व पूर्णपणें राज्यशास्त्रविषयक सिद्धान्त, राजनैतिक डावपेंच व दैनंदिन राज्य कारभारांतील बारकावे, यांनी भरलेलें आहे. तत्पूर्वी निर्माण झालेल्या आणि विवेचिलेल्या राजकीय सिद्धान्तांचा समन्वय करण्याचें कार्य महाभारताने केलें.

याज्ञवल्क्यस्मृति, कामंदकीय नीतिसार व शुक्रनीति हे तीन ग्रंथ राज्यशास्त्राचा विचार करणारे असून त्यांची रचना मनुस्मृति व महाभारत यांच्या नंतरची आहे. मौर्य राजवंशावर मनुस्मृतीचा प्रभाव होता; तर गुप्त घराण्यावर याज्ञवल्क्यस्मृतीचा होता. इ. स. च्या चौथ्या व पांचव्या शतकांत भारताच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रांत कोणकोणते बदल झाले, तें याज्ञवल्क्यस्मृतीवरून कळून येतें. गुप्त साम्राज्याचा कायदा याज्ञवल्क्यस्मृतीवरच आधारलेला आहे. गुप्तकालांत व्यक्ति, जात आणि वर्ग यांचा विचार न करतां राज्याचे कायदे सर्वांना सारख्याच पद्धतीने लागू करण्यांत आले. तत्पूर्वी ब्राह्मणांना कायद्यांत कित्येक सवलती होत्या, त्या या काळांत काढून घेण्यांत आल्या. शूद्रांच्या बाबतींतले कित्येक अन्याय्य निर्बंधहि दूर करण्यांत आले. याज्ञवल्क्यापूर्वींच्या स्मृतिकारांनी कायद्याचा धर्मनिरपेक्ष असा विचार केलेला नव्हता. याज्ञवल्क्यस्मृतींत तो प्रथमच केलेला आढळतो, हें त्या स्मृतीचें वैशिष्टय होय. फौजदारी कायद्यांपेक्षा दिवाणी कायद्यांचा विचार याज्ञवल्क्याने बारकाईने केला आहे.

कामंदकीय नीतिसारांत कौटिल्याचेच सिद्धांत व नियम पुनश्च निराळ्या भाषेंत मांडलेले आहेत. या ग्रंथांत राज्यशास्त्रविषयक कोणताहि नवा विचार आढळत नाही. मात्र या ग्रंथावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते, की कौटिल्यानंतर भारतांत राजकारणाचा प्रपंच करणारे तोलामोलाचे असे ग्रंथकार निर्माण झालेच नाहीत.

शुक्रनीति या ग्रंथाचा काळ इ. स. चें आठवें शतक हा

होय. कामंदकीयनीतिसाराप्रमाणेच हाहि ग्रंथ संकलनात्मकच आहे. पण या ग्रंथांत मंत्रिमंडळाची घडण व व्यवस्था, तसेंच परराष्ट्रीय संबंध व सैन्यविषयक धोरण, या विषयांचें विवेचन चांगल्या प्रकारें केलेलें आहे.

शुक्रनीतींतले अर्थशास्त्रविषयक विचार पुढीलप्रमाणे आहेत --

नीतिशास्त्र हें जीवनाच्या प्रत्येक गोष्टींत उपयोगी पडणारें आणि त्यामुळे मानवी जीवनाला स्थैर्य प्राप्त करून देणारें शास्त्र आहे. धर्म, अर्थ, व काम या तीन पुरुषार्थांचा नीतिशास्त्रांत समावेश होतो. नीतिशास्त्राच्या अध्ययनाने मानवाला व्यवहाराचातुर्य लाभतें आणि त्याचे मनोरथ पूर्ण होतात. राजांनी या शास्त्राचें अध्ययन अवश्य केलें पाहिजे. प्रजेचें संरक्षण व समाजांतल्या दुष्ट प्रवृत्तींना आळा घालणें, हीं राजाचीं दोन प्रधान कर्तव्यें होत. त्यासाठी राजाला चांगल्या राजपुरोहिताची आवश्यकता शुक्रनीतीने प्रतिपादिली आहे. विद्वान्, निग्रही, निर्लोभी, शस्त्र आणि शास्त्र या दोहोंतहि पारंगत, स्पष्टवक्ता आणि धोरणी असा राजपुरोहित असावा असें तिथे सांगितलें आहे. मंत्री विश्वासपात्र असावे. राजाला त्यांनी योग्य तो सल्ला द्यावा आणि अयोग्य वर्तन करण्याच्या वेळीं राजाला त्यांचें भयहि वाटावें. मुख्य प्रधानाने सर्व मंत्र्यांकडून नेमलेलीं कामें करून घ्यावीं. सरसेनापतीने सैन्यभरती, सैन्याची शिस्त आणि सैन्यसंचालन, इ. गोष्टी योग्य प्रकारें सांभाळाव्या. राजाला विद्वान् आणि नीतिनिपुण असे सल्लागारहि असावे. न्यायाधीशांना देशांतील चालीरीतींचें व रूढींचें चांगलें ज्ञान असावें.

शुक्रनीतीने परदेशांतील वकिलाला फार महत्त्व दिलें आहे. योग्यायोग्यतेचा विवेक असणारा, स्थलकालमर्यादा लक्षांत ठेवून वागणारा, दुसऱ्याचें इंगित अचूक ओळखणारा, चांगलें व्यक्तिमत्त्व आणि मोहक वक्तृत्व असणारा व वेळीं प्रसंगीं निर्भयपणें आपत्तींना तोंड देणारा असा पुरुष राजाने परदेशांत वकील म्हणून नेमावा, असें त्या ग्रंथांत सांगितलें आहे.

कौटिलीय अर्थशास्त्र – इ. स. १९०५ सालीं अर्थशास्त्रावरचा एक प्राचीन ग्रंथ उपलब्ध झाला. त्याचें नांव कौटिलीय अर्थशास्त्र हें होय. हा अर्थशास्त्रावरील युगप्रवर्तक ग्रंथ असून कौटिल्य हा त्याचा कर्ता आहे. कौटिल्य हा चंद्रगुप्त मौर्याचा महामंत्री होता. या ग्रंथामुळे प्राचीन भारताच्या इतिहास व संस्कृति यांविषयींच्या कल्पनांत महत्त्वाचे फेरबदल घडून आले आहेत. या ग्रंथामुळे सिकंदर भारतावर स्वारी करून आला त्या वेळच्या राजकीय परिस्थितीवर चांगलाच प्रकाश पडतो व तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीमुळे भारतांत एका बलाढ्य अशा मध्यवर्ती सत्तेची स्थापना होणें कसें व कां आवश्यक होतें, तेंहि स्पष्ट होतें.

कौटिल्याने अर्थशास्त्राची व्याख्या केली आहे ती अशी--

तस्याः पृथिव्याः लाभपालनोपायः शास्त्रमर्थशास्त्रम् ।

(कौ. अ. १५.१)

अर्थ--पृथ्वीचा (पृथ्वीवरील सत्तेचा) लाभ करून घेणें व मिळालेल्या पृथ्वीचें पालन करणें, या गोष्टींचा उपाय सांगणारें शास्त्र तें अर्थशास्त्र होय.

अर्थ एव प्रधानः इति कौटिल्यः ।
अर्थमूलौ हि धर्मकामाविति।

(कौ. अ, १.७.)

अर्थ--अर्थ हाच प्रधान आहे. (व) धर्म आणि काम हे अर्थमूलक आहेत.

अर्थशास्त्राचा मुख्य प्रतिपाद्य विषय राजनीति हा आहे. मानवमात्राचें सर्व सुख-कल्याण अर्थशास्त्रांत समाविष्ट आहे. आपल्या पूर्वीच्या १८ अर्थशास्त्रज्ञ आचार्यांचा आणि संप्रदायांचा कौटिल्याने उल्लेख केला आहे. यावरून असें दिसून येतें, की नंदांच्या कालापर्यंत अर्थशास्त्र हें स्वतंत्र विद्या या स्वरूपांत मान्यता पावलें होतें. त्याला धर्मशास्त्राइतकीच योग्यता मिळाली होती. आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता आणि दंडनीति या चार विद्यांचें विवेचन करतांना कौटिल्याने मनु, बृहस्पति आणि उशना यांचीं मतें उद्धृत केलीं आहेत. प्राचीन आचार्यांच्या अर्थशास्त्रविषयक साऱ्या ग्रंथांचें आलोडन करूनच कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्राची उभारणी केली आहे. कौटिल्याच्या या अर्थशास्त्रांत पंधरा अधिकरणें असून त्यांची विषयसूची पुढीलप्रमाणे आहे--

(१) **विनयाधिकार**–अमात्योत्पत्ति, मंत्री आणि पुरोहित यांची नियुक्ति, भिन्न उपायांनी मंत्र्यांची परीक्षा, गुप्त विचार, राजकुमारांचें रक्षण आणि कर्तव्य, अन्तःपुराचा प्रबंध, आत्मरक्षण आणि दूतकर्म इत्यादि.

(२) **अध्यक्षप्रचार**–शासनसंस्थेंतील प्रमुख म्हणजेच अध्यक्ष यांचीं कर्तव्यें, त्यांचे विभाग, दुर्ग म्हणजे गडकोट यांची उभारणी, कर गोळा करणें, रत्नांची परीक्षा, खनिज पदार्थांच्या उद्योगांचें संचालन, वजनें आणि मापें, सेनापतीचीं कार्यें, गुप्त हेरांची योजना इत्यादि.

(३) **धर्मस्थीय**–कज्जे खटले यांचा निर्णय, विवाहविषयक नियम, दायविभाग, गृहवास्तु, श्रम आणि भांडवल यांचा विनियोग, बेवारशी धनाची व्यवस्था इत्यादि.

(४) **कंटकशोधन**–कारागिरांचें व व्यापाऱ्यांचें रक्षण,

दैवी आपत्तींवर उपाय, गुंड व अत्याचारी लोकांचें निरोधन व त्यांना द्यायच्या शिक्षा इत्यादि.

(५) **योगवृत्त**–राजांविषयीं सेवकांचीं कर्तव्यें, विश्वासघातकी सेवकांचा प्रतिकार, दंडविधान, कोशसंग्रह इत्यादि.

(६) **मंडलयोनि**–शत्रुराष्ट्रांना वश करून घेण्याचे उपाय, प्रकृतीचे गुण, उद्योग आणि शांति.

(७) **षाड्गुण्य**–षड्गुणांचा उद्देश, त्याचप्रमाणे त्यांचीं स्थानें, वृद्धि आणि क्षय, युद्धविषयक विचार, संधि, विग्रह, आणि विक्रम, प्रबल शत्रूशीं वागण्याची नीति इत्यादि.

(८) **व्यसनाधिकारिक**–राज्यावरच्या आपत्तींचीं मूळ कारणें शोधणें आणि त्यांच्या शांतीचे उपाय इत्यादि.

(९) **अभियास्यत् कर्म**–युद्धप्रस्थान करण्यापूर्वीची तयारी, बाह्य आणि आभ्यंतर आपत्ति, अर्थानर्थसंशय, त्यांचें विवेचन आणि उपाय इत्यादि.

(१०) **सांग्रामिक**–सैन्याचें प्रयाण, सैन्याचे तळ, कूटयुद्ध, युद्धभूमि, चतुरंग दळाच्या हालचाली, व्यूह आणि प्रतिव्यूह इत्यादि.

(११) **संघवृत्त**–संघराज्यांत फूट पाडण्याविषयीं विचार, त्यांचे नियम इत्यादि.

(१२) **अबलीयस्**–दुर्बल राजांनी प्रबल राजांच्या आक्रमणाचा प्रतिकार कसा करावा याविषयीं विचार, मंत्रयुद्ध, शस्त्र, अग्नि आणि रस यांचा प्रयोग इत्यादि.

(१३) **दुर्गलंभोपाय**–शत्रूच्या किल्लेकोटांचा ताबा मिळविण्याचे उपाय, जित प्रदेशांत शांतीची स्थापना इत्यादि.

(१४) **औपनिषदिक** – शत्रुघाताचे विविध प्रयोग, त्यांपासून स्वपक्षाचें रक्षण, अद्भुताचें उत्पादन, औषधें आणि मंत्र यांचे प्रयोग इत्यादि.

(१५) **तंत्रयुक्ति** – अर्थशास्त्राचा अर्थ, तसेंच बत्तीस युक्तींचीं नांवें आणि त्यांचे अर्थ इत्यादि.

१५ अधिकरणें, १५० अध्याय, १८० उपविभाग व ६००० श्लोक, एवढा या ग्रंथाचा विस्तार आहे. कौटिलीय अर्थशास्त्राचें सार पुढीलप्रमाणें सांगतां येईल–

राजा, मंत्री, देश, दुर्ग, कोश, सैन्य व सामंत हे राज्यसंस्थेचे सात घटक आहेत. या सर्वांना प्रकृति असें नांव असून सर्वांच्या समुदायाला प्रकृतिमंडल म्हटलें आहे. त्यांत राजा हा प्रथम आहे. तो उच्च कुलांत जन्मलेला, प्रयत्नवादी, स्वतंत्र, प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा, वडिलांचा आदर करणारा, त्यांची सल्लामसलत मानणारा, सत्यवादी, सुसंगत वागणुकीचा, महत्त्वाकांक्षी, कृतज्ञ, आज करतां येण्याजोग्या गोष्टी उद्यावर न ढकलणारा, मांडलिकांवर जरब ठेवणारा, स्थिर बुद्धीचा आणि शिस्तीचा भोक्ता असा असावा. हे गुणविशेष अंगीं असले, तरच त्याला लोकवश्यता लाभते.

मंत्री हे स्वदेशीं जन्मलेले, उच्चकुलीन शास्त्रविद्यापारंगत प्रजेवर प्रभाव टाकणारे, दूर दृष्टीचे, कलाभिज्ञ, धीट, वाक्पंडित, उत्साही, कर्तृत्ववान् व चिकाटीचे असावे. ज्या देशांत मंत्री मूर्ख असतात, तिथे राजांना स्वेच्छाचार करायला फावतें.

देशाच्या सर्व सीमा नैसर्गिक व निश्चित असाव्या. विपत्कालीं देशांतील सर्व लोकांची उपजीविका चालू शकेल इतकें धान्य उपजविणारी देशांतली भूमि असावी. वेळीं प्रसंगीं परकीयांना आसरा देण्याची पात्रता त्याच्यामध्ये असावी. तो संरक्षणास सुलभ असावा. त्याचें दर्शन सुखदायक असावें. ज्यांत चांगलें लाकूड उपलब्ध होईल, अशीं जंगलें आणि गुरांचे कळप पोसले जातील अशीं कुरणें देशांत असावीं. देशांतलीं पिकें केवळ पावसावर अवलंबून नसावीं. कालवे असावे. जलमार्ग व स्थलमार्ग चांगले असावे. खाणी आणि विविध मालाने भरलेल्या बाजारपेठा असाव्या. आपत्कालीं करांचें जादा ओझें पेलूं शकेल, इतकी देशांतल्या प्रजेची सांपत्तिक स्थिति ठीक असावी. उद्योगी शेतकरी, उदार धनी व विश्वासू नोकर असलेला देश चांगला. देशांत सुविद्य आणि आदरणीय चरित्राचे लोक असावे. वैश्य व शूद्र यांची वस्ती अधिक असावी. देशाच्या सर्व सीमांवर उत्तम किल्ले असावे. त्यांची डागडुजी चांगली ठेवावी.

कायदेशीर, वारसाहक्काने मिळालेली किंवा राजाने स्वपराक्रमाने मिळवलेली सोनें, रूपें, रत्नें इ. संपत्ति राजाच्या भांडारांत असावी. बऱ्याच कालपर्यंत अवर्षण पडलें किंवा अन्य कोणत्याहि प्रकारची दैवी अथवा नैसर्गिक आपत्ति कोसळली, तरी राज्याचे सर्व व्यवहार सुरळीतपणे चालूं शकतील, इतकी संपत्ति राजाच्या खजिन्यांत नेहमी असावी.

सैनिकांच्या अंगीं पुढील गुण असावे – ते राजनिष्ठ आणि आज्ञाधारक असावे. परमुलुखांत गेले तरी त्यांना आपल्या देशाचें प्रेम राहावें. सर्व प्रकारच्या संकटांना तोंड देण्याची व सर्व शस्त्रें उत्तम प्रकारें वापरण्याची त्यांना संवय असावी. ते लांचलुचपतीला वश होणारे व राजाशीं दगलबाज होणारे नसावे. सैन्यांत शक्यतों क्षत्रियांचीच भरती करावी.

राजाचे सामंत व मांडलिक मैत्रीधर्माने वागणारे असावे. त्यांची निष्ठा अचल असावी. त्यांनी राजाची कोणतीहि विनंती अमान्य करूं नये. जरूर पडल्यास सर्व सामर्थ्यानिशीं त्यांनी मदतीला धावून यावें.

अशा प्रकारचें सप्तांगसंघटित राज्य हें आदर्श राज्य होतें.

संपूर्ण सार्वभौमत्व अशा सुसंघटितपणावरच अवलंबून असतें. शहाणा राजा आपल्या बुद्धिबलानें या सातहि अंगांतलें न्यून पूर्ण करून घेतो. शिवाय हे सर्व घटक गुणसंपन्नहि करूं शकतो. पण राजाचेंच व्यक्तिमत्त्व खुजें असेल किंवा त्याला धोरण आणि कर्तृत्व नसेल, तर त्या राज्याचे घटकच त्याचा पराजय करूं शकतात.

अर्थ मिळविणें व मिळविलेल्याचें रक्षण करणें, यासाठी विश्रांति व कार्यतत्परता या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. कार्यतत्परता म्हणजे श्रमाचीं फळें दुसऱ्यांनी हिरावून नेऊं नयेत, अशी व्यवस्था होय.

ज्या राजाला उत्तम व्यक्तिमत्त्व आहे, ज्याच्या राज्याचे सर्व घटक सुसंघटित आहेत व ज्याला योग्य असें राजकीय धोरण आहे, तोच राजा विजयी ठरतो. कौटिलीय अर्थशास्त्रांत अशा प्रकारच्या विजेत्या राजाबद्दलच सर्व विधानें केलेलीं आहेत. किंबहुना विजेता राजा किंवा राजर्षि हाच त्या शास्त्राचा नायक आहे. कौटिल्यानें इंद्र, धर्म आणि यम यांच्याशीं राजाची तुलना केली आहे. तो ईश्वराचा प्रतिनिधि आहे आणि म्हणून त्याचा कोणी अपमान करूं नये, असेंहि कौटिल्यानें सांगितलें आहे. राजा जर उन्मार्गगामी, अधर्मी, अन्यायी आणि व्यभिचारी झाला, तर त्याला पदच्युत करावें, प्रसंगीं त्याचा वधहि करावा, इथपर्यंत कौटिल्यानें विचारांची झेप दाखविली आहे.

कौटिल्यानें गणराज्यांचें संपूर्ण विलीनीकरण करून एकतंत्री राज्याची स्थापना केली. त्याला ठाऊक होतें, की एकतंत्री राज्यांत अनेक दोष उत्पन्न होतात आणि त्यांतला मुख्य दोष म्हणजे राजा हाच त्या पद्धतींत सर्वाधिकारी होतो. म्हणून त्यानें राजाला सर्वगुणसंपन्न बनविण्याचा पूर्ण प्रयत्न केला आहे. तो मदान्ध, स्वेच्छाचारी आणि प्रजापीडक न बनावा, यासाठीं त्याच्यावर प्रकृतिमंडलाचें पूर्ण नियंत्रणहि ठेवलें आहे. राजाचा उत्तराधिकारी होईल तोहि गुणसंपन्न व्हावा यासाठी त्यानें राजकुमारांचें शिक्षण, आचार व्यवहार, भोजन, शयन, वागणूक इ. प्रत्येक गोष्टीचें उचित असें विधिविधान घालून दिलें आहे. राजाची दिनचर्या आणि रात्रिचर्याहि त्यानें नेमून दिली आहे.

राजमंडळ व राज्याराज्यांमधील संबंध यांविषयी लिहितांना कौटिल्य म्हणतो – कोणत्याहि राज्याच्या सभोवती ज्यांचीं राज्यें असतात, ते राजे व त्यांचीं राज्यें हें राजमंडळ होय. केंद्रांत असलेल्या राजानें या सर्व राजांना आपले शत्रु मानून त्यांच्याशीं व्यवहार करायला हवा. आपल्या राज्यापासून अगदी जवळचा राजा हा सर्वांत पहिला शत्रु मानावा. तो जेव्हा आपत्तींत असेल, तेव्हा त्याच्यावर हल्ला करून त्याला जिंकावें. शत्रुराज्याच्या पलीकडे असलेला राजा आपला मित्र मानावा. त्याच्याशीं मैत्री केल्यानें मधल्या शत्रुराज्याला कोंडींत पकडतां येतें. शत्रूचे मित्र हेहि शत्रूच मानावे. आपल्या राज्याला लागून असलेला पण आपल्याशीं मित्रत्वानें वागणारा राजा आपला नैसर्गिक मित्र मानावा. संकटकालीं ज्यानें आपल्याला आश्रय दिला असेल, त्याला परिस्थितिजन्य मित्र मानावें. आपण व शत्रु यांच्यामध्ये असलेल्या राजाला मध्यस्थ समजावें. राजमंडळांत ज्याचा समावेश होत नाही, जो बलवान् आहे किंवा ज्याला आपल्या शत्रूला मदत करणें सहज शक्य आहे आणि जो आपल्या विशिष्ट वागणुकीमुळे भोवतालच्या सर्व राजांवर वचक ठेवूं शकतो, अशा राजाला तटस्थ समजावें.

कौटिल्याच्या एकूण वर्णनावरून बारा राजांचें मिळून राजमंडळ बनत असावें असें दिसतें. विजिगीषु राजा, त्याचा शत्रु, मध्यस्थ व तटस्थ हे चार, त्यांचे मित्र हे चार व मित्राचे मित्र हे चार मिळून बारा राजे होतात. विजिगीषु राजानें या राजमंडळाशीं सहा गुणांचा योग्य काळीं योग्य प्रकारें अवलंब करून वागावें. हे सहा गुण पुढीलप्रमाणे आहेत — (१) संधि (तह) (२) विग्रह (युद्ध) (३) यान (चढाई) (४) आसन (युद्ध किंवा चढाई न करतां स्वस्थ राहणें) (५) द्वैध (एकाशीं तह व दुसऱ्यावर चढाई) आणि (६) आश्रय (बलवान् राजाचा आश्रय घेणें.)

राजमंडळ, राजांचें अंतर्वर्तुळ, आंतरराज्यांमधील संबंध, तसेंच त्यांच्याविषयीं षड्गुणाश्रयी धोरण, या गोष्टींसंबंधीं कौटिल्यानें केलेला ऊहापोह लांबलचक व कंटाळवाणा वाटेल. पण हें धोरण ठरवितांना तत्कालीन राजांना आलेले राज्यकारभाराचे अनुभव कौटिल्यानें जमेस धरून त्याचा एवढा विस्तारानें प्रपंच केला आहे.

कौटिल्य व मनु -- या दोघांचे मतभेद पुढीलप्रमाणे आहेत— नियोगपद्धति ब्राह्मण जातीनें स्वीकारण्यास कौटिल्याची मान्यता आहे. मनूनें नियोगाविषयीची माहिती सांगून नंतर त्याचा निषेध केला आहे. कौटिल्याच्या मतें ब्राह्मणाच्या शूद्र स्त्रीपासून झालेल्या पुत्राला पित्याच्या मिळकतींत वांटा मिळावा, तर मनूच्या मतें अशा पुत्राला बापाच्या मिळकतींत वारसाहक्क नाही. मनूनें विधवाविवाहाला प्रतिबंध केला आहे (५. १६१–१६५), तर कौटिल्यानें विधवांना पुनर्विवाहाची परवानगी दिली असून त्या बाबतींत पुष्कळच सवलती ठेवल्या आहेत (कौ. अ. ३. २–४). मनूचा द्यूताला तीव्र विरोध आहे (९. २२१–२२४), तर कौटिल्य

सांगतो, की जुगारीचे अड्डे राजाने आपल्या नियंत्रणाखाली चालू ठेवावे व त्यांचा उपयोग चोर, दरोडेखोर इ. गुन्हेगारांना पकडण्याच्या कामीं करावा (३. २०).

कौटिल्य व याज्ञवल्क्य -- याज्ञवल्क्यस्मृतींत कौटिल्याचीं बरींच मतें उद्धृत केलीं आहेत. याज्ञवल्य कौटिल्यापेक्षा कित्येक बाबतींत प्रगत दिसतो. दाव्याच्या कामांतील निरनिराळे विषय व पुराव्याचे प्रकार यांबाबत कौटिल्याने स्पष्ट नियम दिलेले नाहीत. याज्ञवल्क्याने या सर्व बाबींचा सविस्तर विचार केला आहे. निपुत्रिकाच्या मालमत्तेला त्याची विधवा किंवा माता वारस म्हणून कौटिल्य मानीत नाही; पण याज्ञवल्क्य तसें मानतो. पति हयात असतांना मृत झालेल्या स्त्रीच्या स्त्रीधनाचे वारस कौटिल्य अनुक्रमें पुत्र व कन्या असे मानतो, तर याज्ञवल्क्य पुत्रापूर्वी कन्येचा हक्क सांगतो.

कौटिलीय अर्थशास्त्र व कामसूत्र -- या दोन ग्रंथांत अनेक बाबतींत साम्य आढळतें. दोहोंतलीं कित्येक प्रकरणेंहि समान आहेत. मतभेदाच्या गोष्टी अशा -- कामसूत्रांत ग्रहांचे परिणाम व कुंडलींतील लग्न यांची महती दिली आहे, तर कौटिल्याने ग्रहांचें फल पाहण्याचा निषेध केला आहे. मात्र शुभाशुभ नक्षत्रांविषयीं तो उल्लेख करतो व वेदांगज्योतिषांतील पांच संवत्सरांचें एक युग, एका युगांत दोन अधिक मास व अयनाच्या शेवटीं दिवस व रात्र यांच्या कालामध्यें सहा मुहूर्तांचें अंतर, या गोष्टी मान्य करतो.

ज्ञातवाङ्मय -- कौटिल्याला चार वेद, अथर्ववेदांतील जारण-मारण, वेदाचीं षडंगें, इतिहास-पुराणें, धर्मशास्त्र, सांख्य, योग व लोकायत हीं दर्शनें, इ. साहित्य ज्ञात होतें. त्याने धातुशास्त्राचाहि उल्लेख केला आहे. त्याच्या काळीं सरकारी भाषा संस्कृत होती. कौटिल्य हा स्वतः भाषाप्रभु होता. त्याची भाषा साधी, सुबोध व स्पष्ट आहे. ती व्याकरणासारखी संक्षिप्त नाही, सूत्रासारखी स्वल्पाक्षर नाही व आपस्तंबासारखी आर्ष नाही. विषयांचा व्यवस्थित अनुक्रम व एकसूत्रीपणा इ. गुणांमुळे कौटिल्याचें अर्थशास्त्र ही अत्यंत तेजस्वी बुद्धिमत्तेच्या विद्वानाची कृति आहे अशी खात्री पटते.

देश व लोक -- कौटिल्याने दिलेली देशांची व लोकांची माहिती बोधप्रद आहे. त्या काळीं रेशमी कापड चीनमधून व लोकरीचे नमदे नेपाळमधून येत. कांबोज व सुराष्ट्र या देशांत वृष्णींचें गणराज्य व क्षत्रियांच्या श्रेणी (कार्पोरेशन्स) होत्या व ते लोक शेती, व्यापार व युद्धाचा धंदा करून उपजीविका करीत. लिच्छिविक, वृजिक, मल्लक, मद्रक, कुकुर व कुरुपांचाल हे गण स्वतःला राजा ही उपाधि लावून घेत. कांबोज, सिंधु, आरट्ट व वनायु या देशांत घोडे चांगले निपजत. म्लेच्छ लोक टोळचा करून राहत व स्वतःचीं मुलें विकीत किंवा तारण म्हणून गहाण ठेवीत. बौद्धांविषयींची स्पष्ट माहिती कौटिल्याने क्वचितच दिलेली आहे. त्यावरून असें वाटतें, की त्याच्या काळांत बौद्धधर्माचा फारसा प्रसार झाला नव्हता व लोकांत त्याला मानमान्यताहि मिळाली नव्हती.

कौटिल्यानें औषधि-वनस्पतींची आश्चर्यकारक माहिती दिलेली आहे. कौटिल्याचें औषधिविज्ञान सुश्रुतापेक्षाहि अधिक विस्तृत आहे, असें डॉ. यॉली म्हणतो. त्याने रसविद्ध (पारामिश्रित) सुवर्णाचा व सुवर्णमिश्रित रसायनांचाहि उल्लेख केला आहे.

कौटिल्याच्या कालांत किल्ल्यांवर शिव, वैश्रवण, अश्विनी, लक्ष्मी व मदिरा (दुर्गा) यांचीं देवालयें बांधीत व अपराजित, अप्रतिहत, जयंत व वैजयंत या देवतांकरितां स्वतंत्र कोनाडे करीत. महाद्वारानजीक ब्रह्मा, इंद्र, यम व स्कंद या संरक्षक देवता स्थापीत.

समाजजीवन -- कौटिल्याने अष्टविध विवाहांचा उल्लेख केला आहे. त्याच्या काळीं प्रौढविवाह प्रचलित होते. पहिल्या तीन वर्णांत औपशयिक दोष उत्पन्न झाल्यास विवाहविच्छेदाला परवानगी होती. मात्र मुलें झाल्यावर तसा विवाहविच्छेद करतां येत नसे. विशिष्ट परिस्थितींत स्त्रियांनाहि घटस्फोट घेऊन दुसरें लग्न करतां येत असे. एका स्त्रीला अनेक पुरुषांकडून पुत्रोत्पत्ति झाल्यास, ते ते पुत्र आपल्या पित्याच्या संपत्तीचे अधिकारी मानले जात. एकपत्नीव्रत आणि पातिव्रत्य हे आदर्श श्रेष्ठ मानले जात. व्यभिचारी स्त्री-पुरुषांना दंड होत असे. नियोगाचीहि चाल होती. राजा जर वृद्ध अथवा सदा रोगी असेल, तर तो नियोगपद्धतीने गोत्रांतल्या पुरुषांकडून स्वतःच्या पत्नीच्या ठिकाणी प्रजोत्पत्ति करून घेत असे. आईबापांनी मुलीच्या लग्नाकडे दुर्लक्ष केल्यास, ती स्वतः वराची निवड करून विवाहबद्ध होत असे. वृत्ति आणि अवध्य असें दोन प्रकारचें स्त्रीधन मानलें जात होतें. पुनर्विवाह केल्यास पूर्वीच्या स्त्रीधनावर हक्क राहत नसे. उच्च कुलांत पडद्याची प्रथा होती. अनाथ, विधवा आणि प्रोषितभर्तृका अशा बायकांना सरकारकडून सूत कातणें, कशीदा काढणें, शिवणें, विणणें, इ. कामें देऊन वेतन दिलें जात असे. राज्यांतल्या वेश्यागृहांची नोंदणी होत असे. वेश्यांचीं संस्थानें (मोहल्ले) स्वतंत्र असत. वेश्येला व्यवसायासाठी सरकारकडून परवानगी घ्यावी लागे. तिच्या इच्छेविरुद्ध तिच्याशीं व्यवहार करणाऱ्या पुरुषाला कडक शासन दिलें जात असे. कर्ज देणें घेणें, उधारी उसनवारी, यांच्याविषयीं नियम होते. गांवोगांवीं पंचायती होत्या. घर, जमीन, इ. लहान सहान कज्जांचे निवाडे

पंचायतींतच होत असत. सामुदायिक शेतीचीहि प्रथा होती.

कौटिलीय अर्थशास्त्रावर आतापर्यंत भट्टस्वामींचें प्रतिपद-पंचिका व माधवयज्वाचें नयचंद्रिका हीं दोन भाष्यें प्रकाशित झालीं आहेत. पण दोन्ही भाष्यें अपूर्ण आहेत. पहिल्याचा प्रारंभ दुसऱ्या अधिकरणांतील ८ व्या अध्यायापासून झाला असून त्याची अखेर त्याच अधिकरणांतील ३६ व्या अध्यायाच्या शेवटीं झाली आहे. दुसरें भाष्य ७ व्या अधिकरणांतल्या ७ व्या अध्यायापासून सुरू होऊन १२ व्या अधिकरणांतील ४ थ्या अध्यायाच्या शेवटीं समाप्त होतें. या ग्रंथाचें महत्त्व जाणून कित्येक भारतीय व परदेशी विद्वानांनी याचीं भाषांतरें केलीं आहेत व त्यावर विस्तृत प्रबंधहि लिहिले आहेत. त्यांत श्री. शामशास्त्री, गणपतिशास्त्री, डॉ. नरेंद्रनाथ लॉ, श्री. प्रमथनाथ बानर्जी, डॉ. जयस्वाल, प्रा. बंद्योपाध्याय, प्रा. विद्यालंकार हे भारतीय लेखक असून श्री. हर्मान याकोबी, श्री. हिलेब्रांट, श्री. कीथ, हे पाश्चात्य लेखक आहेत.

चाणक्यनीति व सूत्रें– डॉ. शामशास्त्री यांनीं चाणक्याच्या ५७१ सूत्रांचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. डॉ. काणे यांच्या मतें हीं सूत्रें कौटिल्यानंतरचीं आहेत. चाणक्यनीति नांवाचे कित्येक ग्रंथ भारताच्या निरनिराळ्या भागांत आढळतात. तेहि सर्व कौटिल्यानंतरचेच आहेत. चाणक्य राजनीतिशास्त्र या ग्रंथांत ६६० श्लोक आहेत. याशिवाय वृद्धचाणक्य, लघु चाणक्य इ. नांवांनी कित्येक ग्रंथ रचले गेले आहेत. [सो. इं. ट्रॅ.; हि. ध.; कौ. अ.; म. ज्ञा. को.]

अर्थापत्ति

मीमांसा दर्शनांतलें एक प्रमाण. 'अर्थापत्तिरपि दृष्टः श्रुतो वाऽर्थोऽन्यथा नोपपद्यते इत्यर्थ-कल्पना '= एखाद्या अर्थाची अन्य अर्थाच्या ग्रहणाशिवाय उपपत्ति होत नाही असें पाहून त्याच्या उपपत्तीसाठीं ज्या अन्य अर्थाची कल्पना केली जाते, तिला अर्थापत्ति म्हणतात. (जै. सू. १.१.५ शा. भा). उदा० देवदत्त दिवसा भोजन करीत नाही; पण लठ्ठ मात्र दिसतो. इथे उपवास करणें आणि लठ्ठ दिसणें या दोन गोष्टींतला परस्परविरोध स्पष्ट आहे. याचा परिहार कसा करायचा ? तो करायचा तर 'देवदत्त रात्रीं अवश्य भोजन करीत असला पाहिजे' अशा अन्य अर्थाची कल्पना करावी लागते. यालाच अर्थापत्ति म्हणतात.

अर्थापत्ति हें एक स्वतंत्र प्रमाण आहे. त्याच्या द्वारें उपलब्ध होणारें ज्ञान प्रत्यक्ष, अनुमान व शब्द या तीन्ही प्रमाणांच्या द्वारें होऊं शकत नाही. वरील देवदत्ताच्या उदाहरणांत तो भोजन करीत असल्याचें 'प्रत्यक्ष' कोणीं पाहिलें नाही. 'अनुमान' करायचें तर व्याप्ति जमत नाही. 'शब्द' प्रमाणाने ठरवायचें, तर त्याच्या रात्रिभोजनाबद्दल कोण्या आप्त पुरुषाने आपणांस सांगितलें नाही. म्हणूनच अर्थापत्ति हें स्वतंत्र प्रमाण मानलें पाहिजे, असें मीमांसक म्हणतात.

दैनिक व्यवहारांतहि वाक्यांचा अर्थ समजण्याच्या कामीं अर्थापत्तीचें आपणांस पुष्कळ साहाय्य होतें. अर्थापत्तीचे दोन भेद आहेत–

(१) **दृष्टार्थापत्ति**–उदा० वरील देवदत्ताचा दृष्टान्त.

(२) **श्रुतार्थापत्ति**–म्हणजे एखाद्या अर्थाच्या उपपत्तीसाठी अन्य शब्दाची कल्पना करणें. उदा० 'बंद कर' हे शब्द ऐकतांच 'दार' या पदाची कल्पना केली जाणें. [भा. द.]

अर्देशिर

(इ. स. तिसरें शतक). हा इराणी राज्याच्या ससानियन घराण्याचा संस्थापक होय. अर्देशिरने पहिल्या प्रथम सर्व इराण आपल्या अमलाखाली आणला. नंतर नजीकचीं कांही राज्येंहि जिंकून घेतलीं. इ. स. २२४ सालीं पर्थियन सम्राट् अर्तबान याला मारून पुढें त्याची राजधानीहि काबीज केली. नंतर त्याने मझ्दयस्नियन या धर्मपंथाचा प्रसार करण्याचें कार्य हातीं घेतलें. या कामीं त्याला झरतुष्ट्रियन पुरोहित वर्गाचें मोठेंच सहकार्य मिळालें. हा धर्म राष्ट्रीय करावा म्हणून त्याने कंबर बांधली. सिकंदर व पुढील मुसलमान आक्रमक यांच्या टोळधाडींत अवेस्ता ग्रंथाची वाताहत झाली होती. तो ग्रंथ त्याने एकत्र जमवून संपूर्ण तयार केला. तसेंच पारंपरिक लोककथा, कायदा व धर्मतत्त्वें, इ. सर्व वाङ्मयहि एकत्र केलें. खरा धर्म व खरी देवतोपासना यांचा प्रसार केल्याचें श्रेय तो स्वतःकडे घेतो. या प्रमाणे धार्मिक व राजकीय सत्ता स्वतःच्या हातीं केंद्रित करण्याचें महत्कार्य अर्देशिरने केल्यामुळे त्याचें नांव पर्शियन इतिहासांत व झरतुष्ट्री धर्मांत अजरामर झालें आहे. **पाहा**– झरतुष्ट्री धर्म, अवेस्ता. [एन्सा. रि. ए.]

अर्धकृच्छ्र

व्रत किंवा प्रायश्चित्त. यांत प्रथम चार दिवस एकभुक्त राहून नंतर दोन दिवस उपवास करायचा असतो (आप. स्मृ. ९.४३–४४). दुसरा पर्याय तीन दिवस अयाचित एकभुक्त व तीन दिवस उपवास. **पाहा**–कृच्छ्र.

अर्धचंद्र

देवमूर्तीसाठी ज्या पीठिका बनवितात त्यांपैकी एक. ही पिठिका केल्याने कर्त्याला पुत्रप्राप्ति होते, असें मानतात. [मत्स्य पु. २६१. १३]

सांगतो, की जुगारीचे अड्डे राजाने आपल्या नियंत्रणाखाली चालू ठेवावे व त्यांचा उपयोग चोर, दरोडेखोर इ. गुन्हेगारांना पकडण्याच्या कामीं करावा (३. २०).

कौटिल्य व याज्ञवल्क्य —– याज्ञवल्क्यस्मृतींत कौटिल्याचीं बरींच मतें उद्धृत केलीं आहेत. याज्ञवल्क्य कौटिल्यापेक्षा कित्येक बाबतींत प्रगत दिसतो. दाव्याच्या कामांतील निरनिराळे विषय व पुराव्याचे प्रकार यांबाबत कौटिल्याने स्पष्ट नियम दिलेले नाहीत. याज्ञवल्क्याने या सर्व बाबींचा सविस्तर विचार केला आहे. निपुत्रिकाच्या मालमत्तेला त्याची विधवा किंवा माता वारस म्हणून कौटिल्य मानीत नाही; पण याज्ञवल्क्य तसें मानतो. पति हयात असतांना मृत झालेल्या स्त्रीच्या स्त्रीधनाचे वारस कौटिल्य अनुक्रमें पुत्र व कन्या असे मानतो, तर याज्ञवल्क्य पुत्रापूर्वी कन्येचा हक्क सांगतो.

कौटिलीय अर्थशास्त्र व कामसूत्र —– या दोन ग्रंथांत अनेक बाबतींत साम्य आढळतें. दोहोंतलीं कित्येक प्रकरणेंहि समान आहेत. मतभेदाच्या गोष्टी अशा —– कामसूत्रांत ग्रहांचे परिणाम व कुंडलींतील लग्न यांची महती दिली आहे, तर कौटिल्याने ग्रहांचें फल पाहण्याचा निषेध केला आहे. मात्र शुभाशुभ नक्षत्रांविषयीं तो उल्लेख करतो व वेदांगज्योतिषांतील पांच संवत्सरांचें एक युग, एका युगांत दोन अधिक मास व अयनाच्या शेवटीं दिवस व रात्र यांच्या कालामध्यें सहा मुहूर्तांचें अंतर, या गोष्टी मान्य करतो.

ज्ञातवाङ्मय —– कौटिल्याला चार वेद, अथर्ववेदांतील जारण-मारण, वेदाचीं षडंगें, इतिहास-पुराणें, धर्मशास्त्र, सांख्य, योग व लोकायत हीं दर्शनें, इ. साहित्य ज्ञात होतें. त्याने धातुशास्त्राचाहि उल्लेख केला आहे. त्याच्या काळीं सरकारी भाषा संस्कृत होती. कौटिल्य हा स्वतः भाषाप्रभु होता. त्याची भाषा साधी, सुबोध व स्पष्ट आहे. ती व्याकरणासारखी संक्षिप्त नाही, सूत्रासारखी स्वल्पाक्षर नाही व आपस्तंबासारखी आर्ष नाही. विषयांचा व्यवस्थित अनुक्रम व प्रकरणविभाग इ. गोष्टींमुळे कौटिल्याचें अर्थशास्त्र हें अत्यंत [illegible] आहे अशी खात्री पटते.

देश व लोक —– कौटिल्याने दिलेली देशांची व लोकांची माहिती बोधप्रद आहे. त्या काळीं रेशमी कापड चीनमधून व लोकरीचे नमदे नेपाळमधून येत. कांबोज व सुराष्ट्र या देशांत वृष्णींचें गणराज्य व क्षत्रियांच्या श्रेणी (कार्पोरेशन्स) होत्या व ते लोक शेती, व्यापार व युद्धाचा धंदा करून उपजीविका करीत. लिच्छिविक, वृजिक, मल्लक, मद्रक, कुकुर व कुरु-पांचाल हे गण स्वतःला राजा ही उपाधि लावून घेत. कांबोज, सिंधु, आरट्ट व वनायु या देशांत घोडे चांगले निपजत. म्लेच्छ लोक टोळ्या करून राहत व स्वतःचीं मुलें विकीत किंवा तारण म्हणून गहाण ठेवीत. बौद्धांविषयींची स्पष्ट माहिती कौटिल्याने क्वचितच दिलेली आहे. त्यावरून असें वाटतें, की त्याच्या काळांत बौद्धधर्माचा फारसा प्रसार झाला नव्हता व लोकांत त्याला मानमान्यताहि मिळाली नव्हती.

कौटिल्यानें औषधि-वनस्पतींची आश्चर्यकारक माहिती दिलेली आहे. कौटिल्याचें औषधिविज्ञान सुश्रुतापेक्षाहि अधिक विस्तृत आहे, असें डॉ. यॉली म्हणतो. त्याने रसविद्ध (पारामिश्रित) सुवर्णाचा व सुवर्णमिश्रित रसायनांचाहि उल्लेख केला आहे.

कौटिल्याच्या कालांत किल्ल्यांवर शिव, वैश्रवण, अश्विनी, लक्ष्मी व मदिरा (दुर्गा) यांचीं देवालयें बांधीत व अपराजित, अप्रतिहत, जयंत व वैजयंत या देवतांकरितां स्वतंत्र कोनाडे करीत. महाद्वारानजीक ब्रह्मा, इंद्र, यम व स्कंद या संरक्षक देवता स्थापीत.

समाजजीवन —– कौटिल्याने अष्टविध विवाहांचा उल्लेख केला आहे. त्याच्या काळीं प्रौढविवाह प्रचलित होते. पहिल्या तीन वर्णांत औपशयिक दोष उत्पन्न झाल्यास विवाहविच्छेदाला परवानगी होती. मात्र मुलें झाल्यावर तसा विवाहविच्छेद करतां येत नसे. विशिष्ट परिस्थितींत स्त्रियांनाहि घटस्फोट घेऊन दुसरें लग्न करतां येत असे. एका स्त्रीला अनेक पुरुषांकडून पुत्रोत्पत्ति झाल्यास, ते ते पुत्र आपल्या पित्याच्या संपत्तीचे अधिकारी मानले जात. एकपत्नीव्रत आणि पातिव्रत्य हे आदर्श श्रेष्ठ मानले जात. व्यभिचारी स्त्री-पुरुषांना दंड होत असे. नियोगाचीहि चाल होती. राजा जर वृद्ध अथवा सदा रोगी असेल, तर तो नियोगपद्धतीने गोत्रांतल्या पुरुषांकडून स्वतःच्या पत्नीच्या ठिकाणी प्रजोत्पत्ति करून घेत असे. आई-बापांनी मुलीच्या लग्नाकडे दुर्लक्ष केल्यास, ती स्वतः वराची निवड करून विवाहबद्ध होत असे. वृत्ति आणि अवध्य असें दोन प्रकारचें स्त्रीधन मानलें जात होतें. पुनर्विवाह केल्यास पूर्वीच्या स्त्रीधनावर हक्क राहत नसे. उच्च कुलांत पडद्याची प्रथा होती. अनाथ, विधवा आणि प्रोषितभर्तृका अशा बायकांना सरकारकडून सूत कातणें, कशीदा काढणें, शिवणें, विणणें, इ. कामें देऊन वेतन दिलें जात असे. राज्यांतल्या वेश्यागृहांची नोंदणी होत असे. वेश्यांचीं संस्थानें (मोहल्ले) स्वतंत्र असत. वेश्येला व्यवसायासाठी सरकारकडून परवानगी घ्यावी लागे. तिच्या इच्छेविरुद्ध तिच्याशीं व्यवहार करणाऱ्या पुरुषाला कडक शासन दिलें जात असे. कर्ज देणें घेणें, उधारी उसनवारी, यांच्याविषयीं नियम होते. गांवोगांवीं पंचायती होत्या. घर, जमीन, इ. लहान सहान कज्जांचे निवाडे

पंचायतींतच होत असत. सामुदायिक शेतीचीहि प्रथा होती.

कौटिलीय अर्थशास्त्रावर आतापर्यंत भट्टस्वामींचें प्रतिपद-पंचिका व माधवयज्वाचें नयचंद्रिका हीं दोन भाष्यें प्रकाशित झालीं आहेत. पण दोन्ही भाष्यें अपूर्ण आहेत. पहिल्याचा प्रारंभ दुसऱ्या अधिकरणांतील ८ व्या अध्यायापासून झाला असून त्याची अखेर त्याच अधिकरणांतील ३६ व्या अध्यायाच्या शेवटीं झाली आहे. दुसरें भाष्य ७ व्या अधिकरणांतल्या ७ व्या अध्यायापासून सुरू होऊन १२ व्या अधिकरणांतील ४ थ्या अध्यायाच्या शेवटीं समाप्त होतें. या ग्रंथाचें महत्त्व जाणून कित्येक भारतीय व परदेशी विद्वानांनी याचीं भाषांतरें केलीं आहेत व त्यावर विस्तृत प्रबंधहि लिहिले आहेत. त्यांत श्री. शामशास्त्री, गणपतिशास्त्री, डॉ. नरेंद्रनाथ लॉ, श्री. प्रमथनाथ बानर्जी, डॉ. जयस्वाल, प्रा. बंद्योपाध्याय, प्रा. विद्यालंकार हे भारतीय लेखक असून श्री. हर्मान याकोबी, श्री. हिलेब्रांट, श्री. कीथ, हे पाश्चात्य लेखक आहेत.

चाणक्यनीति व सूत्रें– डॉ. शामशास्त्री यांनीं चाणक्याच्या ५७१ सूत्रांचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. डॉ. काणे यांच्या मतें हीं सूत्रें कौटिल्यानंतरचीं आहेत. चाणक्यनीति नांवाचे कित्येक ग्रंथ भारताच्या निरनिराळ्या भागांत आढळतात. तेहि सर्व कौटिल्यानंतरचेच आहेत. चाणक्य राजनीतिशास्त्र या ग्रंथांत ६६० श्लोक आहेत. याशिवाय वृद्धचाणक्य, लघु चाणक्य इ. नांवांनी कित्येक ग्रंथ रचले गेले आहेत. [सो. इं. ट्रॅ.; हि. ध.; कौ. अ.; म. ज्ञा. को.]

अर्थापत्ति मीमांसा दर्शनांतलें एक प्रमाण. 'अर्थापत्तिरपि दृष्टः श्रुतो वाऽर्थोऽन्यथा नोपपद्यते इत्यर्थ-कल्पना '= एखाद्या अर्थाची अन्य अर्थाच्या ग्रहणाशिवाय उपपत्ति होत नाही असें पाहून त्याच्या उपपत्तीसाठीं ज्या अन्य अर्थाची कल्पना केली जाते, तिला अर्थापत्ति म्हणतात. (जै. सू. १.१.५ शा. भा). उदा० देवदत्त दिवसा भोजन करीत नाही; पण लठ्ठ मात्र दिसतो. इथे उपवास करणें आणि लठ्ठ दिसणें या दोन गोष्टींतला परस्परविरोध स्पष्ट आहे. याचा परिहार कसा करायचा ? तो करायचा तर 'देवदत्त रात्रीं अवश्य भोजन करीत असला पाहिजे' अशा अन्य अर्थाची कल्पना करावी लागते. यालाच अर्थापत्ति म्हणतात.

अर्थापत्ति हें एक स्वतंत्र प्रमाण आहे. त्याच्या द्वारें उपलब्ध होणारें ज्ञान प्रत्यक्ष, अनुमान व शब्द या तीन्ही प्रमाणांच्या द्वारें होऊं शकत नाही. वरील देवदत्ताच्या उदा-हरणांत तो भोजन करीत असल्याचें 'प्रत्यक्ष' कोणीं पाहिलें नाही. 'अनुमान' करायचें तर व्याप्ति जमत नाही. 'शब्द' प्रमाणाने ठरवायचें, तर त्याच्या रात्रिभोजनाबद्दल कोण्या आप्त पुरुषाने आपणांस सांगितलें नाही. म्हणूनच अर्थापत्ति हें स्वतंत्र प्रमाण मानलें पाहिजे, असें मीमांसक म्हणतात.

दैनिक व्यवहारांतहि वाक्यांचा अर्थ समजण्याच्या कामीं अर्थापत्तीचें आपणांस पुष्कळ साहाय्य होतें. अर्थापत्तीचे दोन भेद आहेत–

(१) **दृष्टार्थापत्ति**–उदा० वरील देवदत्ताचा दृष्टान्त.

(२) **श्रुतार्थापत्ति**–म्हणजे एखाद्या अर्थाच्या उपपत्तीसाठी अन्य शब्दाची कल्पना करणें. उदा० 'बंद कर' हे शब्द ऐकतांच 'दार' या पदाची कल्पना केली जाणें. [भा. द.]

अर्देशिर (इ. स. तिसरें शतक). हा इराणी राज्याच्या ससानियन घराण्याचा संस्थापक होय. अर्देशिरने पहिल्या प्रथम सर्व इराण आपल्या अमलाखाली आणला. नंतर नजीकचीं कांही राज्येंहि जिंकून घेतलीं. इ. स. २२४ सालीं पर्थियन सम्राट् अर्तबान याला मारून पुढें त्याची राजधानीहि काबीज केली. नंतर त्याने मझदयस्नियन या धर्मपंथाचा प्रसार करण्याचें कार्य हातीं घेतलें. या कामीं त्याला झरतुष्ट्रियन पुरोहित वर्गाचें मोठेंच सहकार्य मिळालें. हा धर्म राष्ट्रीय करावा म्हणून त्याने कंबर बांधली. सिकंदर व पुढील मुसलमान आक्रमक यांच्या टोळधाडींत अवेस्ता ग्रंथाची वाताहत झाली होती. तो ग्रंथ त्याने एकत्र जमवून संपूर्ण तयार केला. तसेंच पारंपरिक लोककथा, कायदा व धर्मतत्त्वें, इ. सर्व वाङ्मयहि एकत्र केलें. खरा धर्म व खरी देवतो-पासना यांचा प्रसार केल्याचें श्रेय तो स्वतःकडे घेतो. या प्रमाणे धार्मिक व राजकीय सत्ता स्वतःच्या हातीं केंद्रित करण्याचें महत्कार्य अर्देशिरने केल्यामुळे त्याचें नांव पर्शियन इतिहासांत व झरतुष्ट्री धर्मांत अजरामर झालें आहे. **पाहा**– झरतुष्ट्री धर्म, अवेस्ता. [एन्सा. रि. ए.]

अर्धकृच्छ्र व्रत किंवा प्रायश्चित्त. यांत प्रथम चार दिवस एकभुक्त राहून नंतर दोन दिवस उपवास करायचा असतो (आप. स्मृ. ९. ४३ – ४४). दुसरा पर्याय तीन दिवस अयाचित एकभुक्त व तीन दिवस उपवास. **पाहा**–कृच्छ्र.

अर्धचंद्र देवमूर्तीसाठी ज्या पीठिका बनवितात त्यांपैकी एक. ही पिठिका केल्याने कर्त्याला पुत्रप्राप्ति होते, असें मानतात. [मत्स्य पु. २६१. १३]

अर्धनारीश्वर शिव-पार्वतींच्या संयुक्त रूपाला हें नांव आहे. यांत मूर्तीचा अर्धा भाग शिवाचा व अर्धा पार्वतीचा असतो व दोन्हीहि भाग बेमालूम सांधलेले असतात. दक्षिण भारतांत अशा प्रकारच्या मूर्ती उत्तर भारतापेक्षा अधिक प्रमाणांत आढळतात. शिव-शक्ति किंवा स्त्री-पुरुष तत्त्व यांचा संयोग हें सृष्टीचें मूलतत्त्व आहे. या संयोगाची प्रतिमा अर्धनारीश्वराच्या रूपांत कल्पिली आहे. अर्धनारीश्वराच्या उत्पत्तीविषयीं कथा आहे ती अशी –

ब्रह्मदेवाने सृष्टिकार्याच्या प्रसंगीं मानसपुत्र उत्पन्न करून त्यांना प्रजा निर्माण करण्याची आज्ञा दिली. पण त्यांच्याकडून तें कार्य होईना. त्यामुळे ब्रह्मदेव खिन्न झाला व त्याने उग्र तप केलें. त्या तपाच्या प्रभावाने शिव हा अर्धनारीरूप घेऊन त्याच्या मस्तकांतून बाहेर पडला. त्याने ब्रह्मदेवासकट सर्व सृष्टि जाळून टाकली व स्वतःच्या भार्येशीं (सती) यौगिक प्रक्रियेने समागम करून पुनश्च ब्रह्मा, विष्णु, यांच्यासह सर्व सृष्टि निर्माण केली (लिंग पु. ४१).

शिवाचें हें अर्धनारीरूप मूर्तिशिल्पांत सर्वसामान्य व आकर्षक ठरलें आहे. कवि व तत्त्वज्ञ या दोघांनाहि त्याने सारखेंच लोभविलें आहे. कालिदासाने रघुवंशाच्या प्रारंभीं नांव न घेतां याच अर्धनारीश्वराला वंदन केलें आहे –

वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ।।

(१. १)

अर्थ – शब्द व त्याचा अर्थ यांचें सम्यक् ज्ञान व्हावें एतदर्थ एकमेकांशीं निगडित झालेल्या वाणी व अर्थ यांच्याप्रमाणे एकमेकांत मिळून गेलेल्या जगताचे मायबाप अशा पार्वती-परमेश्वरांना (मी) वंदन करितों.

फार प्राचीन काळीं योनि व लिंग हीं दोन स्वतंत्र प्रतीकें होतीं. पुढे मानवाने त्या दोन प्रतीकांना शिवलिंगांत एकत्र जुळवून त्यांची उपासना आरंभिली. त्यानंतर मानवसमाज मूर्ति घडविण्याइतका सुसंस्कृत व कलावंत झाला, तेव्हा हेंच योनि–लिंग प्रतीक त्याने अर्धनारीश्वराच्या रूपांत आकाराला आणलें. प्रजावृद्धि व्हायची, तर उभयांचा एकीभाव होणें अपरिहार्य आहे, हाच त्या दोन्ही प्रतीकांतला आशय आहे.

सृष्टीच्या पूर्वी स्त्री–पुरुष भेद कशा प्रकारें होता, त्याचें उत्तर देण्याचा प्रयत्न या शिल्पाच्या द्वारें केलेला आहे. प्रारंभिक अवस्थेंत स्त्री-पुरुष तत्त्वें हीं अविभक्त होतीं, एकमेकांत एकमेक होतीं. आजहि अत्यंत खालच्या थराच्या जीवांत स्त्रीतत्त्व आणि पुरुषतत्त्व हीं दोनहि एकाच शरीरांत वास्तव्य करतात. अशा जीवांना हार्मोफ्रोडाइट असें नांव आहे. ते स्वतःमध्येंच नर-नारी असतात आणि स्वतःमधूनच निर्मिति करितात.

विश्वांतलें समस्त नररूप म्हणजे शिव आणि नारी रूप म्हणजे उमा होय, असें रुद्रहृदयोपनिषदांत सांगितलें आहे–

रुद्रो नर उमा नारी तस्मै तस्यै नमो नमः

हे उभय म्हणजेच जगत्कारण. ‘ अग्नीषोमात्मकं जगत् ’ असें श्रुतिवचन आहे. अग्नि हें पुरुषतत्त्व असून तें स्त्रीच्या रजांत आहे. सोम हें स्त्रीतत्त्व असून तें पुरुषाच्या शुक्रांत आहे. काम हा त्या दोहोंच्या मधला संयोजक भाव आहे. हीं दोन्ही तत्त्वें कामामुळे एकमेकांना आकृष्ट करतात.

तत्त्वज्ञानहि हाच आशय सांगतें. शिव हा शक्तियुक्त होतो तेव्हाच कार्यक्षम होतो. शिवागमांतल्या अद्वैतांत शक्तीचा म्हणजे मायेचा त्याग केलेला नसून ब्रह्मशक्ति म्हणून तिचा संग्रहच केला आहे. शिवशक्तीची नित्य समरसता म्हणजेच अद्वैत असें तिथे मानलेलें आहे. माया ही प्रकृति असून महेश्वर हा तिचा धारणकर्ता आहे. या उभयांच्या संयोगांतून सर्व विश्व निर्माण झालें. मनु म्हणतो ––

द्विधा कृतात्मनो देहमर्धेन पुरुषोऽभवत् ।
अर्धेन नारी तस्यां स विराजमसृजत्प्रभुः ।।

(१. ३२)

अर्थ –परमेश्वराने स्त्री व पुरुष अशा उभय रूपांत आत्मदेह विभक्त केला आणि मग स्त्रीच्या ठिकाणीं विराजाला (चराचर विश्वाला) जन्म दिला.

हें अर्धनारीरूप कसें घडवावें याविषयीं हेमाद्रीने तपशीलवार विवरण केलें आहे ––

शिवाचें डावें अर्ध नारीचें बनवावें. तिच्या कपाळीं कुंकुमतिलक लावावा. केशसंभार दाखवावा. गळ्यांत हार घालावे. स्तन वाटोळा व घन असावा. वस्त्र नेसवावें. मेखला बांधावी. पायाला अळिता लावावा. दोन हातांत आरसा आणि कमळ देऊन डोळ्यांत काजळ रेखावें.

उजवें नररूप सर्वलक्षणयुक्त करावें. त्याच्या मस्तकीं जटाजूट व त्यावर चंद्र असावा. अंगाला भस्मचर्चन व नागयज्ञोपवीत असावें. ऊर्ध्वलिंग व कटीला सर्पमेखला असावी. पाय कमळावर असावा. हातांत त्रिशूळ व अक्षमाला असावी (च. व. चिं.).

अर्धनारीश्वराच्या मूर्तीचा प्रथम उल्लेख इ. स. ३ न्या शतकांत पॅरीफिरीने केला आहे. त्याला अशी मूर्ति उत्तर भारतांतल्या एका गुंफेंत सांपडली. अशीच दुसरी भव्य मूर्ति (१६ फूट ९ इंच उंच) घारापुरी येथे आहे. मथुरा हें कुशानकालीन शिल्पाचें आगर होय. तिथल्या शिलापट्टांत

अर्धनारीश्वराची मूर्ति उभी आणि द्विभुज आहे. या शिल्पांत



अर्धनारीश्वर–तिरुविड

शिवाच्या जटा व पार्वतीचा पुष्ट स्तन स्पष्ट दिसतो. बदामीच्या गुहेंतील मूर्ति चतुर्भुज असून तिच्या खालच्या हातांत आडवा दंड व वरच्या दोन हातांत नागवेष्टित परशु व कमल आहे. धारासुरम् यथील अर्धनारीश्वराची मूर्ति अष्टभुज व व त्रिमुख आहे. हीं तीन मुखें शिव, रुद्र व उमा यांचीं असावीं. कांही शिल्पांत शिवाचें ऊर्ध्व लिंग असतें.

अर्धनारीश्वराचें ध्यान तंत्रसारांत पुढीलप्रमाणे सांगितलें आहे –

नीलप्रवालरुचिरं विलसत्त्रिनेत्रम् ।
पाशारुणोत्पलकपालकशूलहस्तम् ।
अर्धाम्बिकेशमनिशं प्रविभक्तभूषम् ।
बालेन्दुबद्धमुकुटं प्रणमामि रूपम् ॥

अर्थ – निळ्या पोवळ्याप्रमाणे सुंदर दिसणाऱ्या, त्रिनेत्रधारी, पाश, रक्तकमल, कपाल व त्रिशूळ हातीं धारण करणाऱ्या, स्त्री आणि पुरुष यांची वेषभूषा ज्याच्या रूपांत स्पष्ट दिसते अशा व ज्याच्या मुकुटांत चंद्रकोर बांधली आहे अशा अर्धनारीश्वराला मी नमस्कार करतों.

तंत्रसारांत याचें पूजाविधान, जप व होमहि सांगितला आहे. [मू. वि. ; सं. प्र.; डि. हिं. इ.; श. क.]

अर्धपर्यंक मूर्तिकलेंतील एक आसन. दोन्ही पाय खाली सोडून पादपीठावर टेकलेले, एक गुडघा किंचित् उचललेला आणि दुसरा किंचित वक्र असतो. [इं. बु. इ.]

अर्धपलितंका जैनांची एक तपोवस्था. एक पाय मागच्या बाजूने नितंबावर टेकवून एका पायावर हात उंच करून व सूर्याकडे तोंड करून उभें राहणें. [हि. जै. मो.]

अर्धफलक मगधामध्ये मोठा दुष्काळ पडला असतां श्वेतांबरांपैकी कांही श्रमणांनी फक्त लंगोटी वापरून राहायचें ठरविलें. अशा श्रमणकांना अर्धफलक म्हणत. दिगंबरपंथी या लोकांना श्वेतांबरांतले पुरोगामी समजत. [हि. जै. मो.]

अर्धमंडप मंदिरांत गर्भगृह व मुखमंडप यांना जोडणारा अरुंद रस्ता. हा गर्भगृहास प्रदक्षिणा घालण्यासाठी असतो. [एन्सा. हिं. आ.]

अर्धमत्स्येंद्रासन एक योगासन. याची पद्धति अशी–– उजवा पाय सरळ ताठ पसरून बसावें. डावा पाय गुडघ्यापासून वळवून उजव्या पायाच्या गुडघ्याच्या डाव्या बाजूस ठेवावा. उजव्या पायाचा चवडा जमिनीस टेकवावा. डाव्या पायाचा चवडा ताठ ठेवण्याचा प्रयत्न करावा. उजव्या हाताच्या कांखेंत डाव्या पायाचा गुडघा ठेवून उजव्या हाताने डाव्या पायाचा चवडा घट्ट पकडावा. डावा हात पाठीकडे वळवून कमरेवर ठेवावा आणि श्वासोच्छ्वास चालू ठेवावा. शक्य तितकी छाती अधिक फुगवावी. शरीराचा कोणताहि भाग सैल ठेवूं नये. मस्तकाचा भाग डावीकडे वळवून हनुवटी खांद्यावर ठेवावी. डोळे उघडे ठेवावे. उजव्या पायाचा गुडघा जमिनीपासून उचलूं देऊं नये. हळूहळू पोटाचा भाग डाव्या पायाच्या गुडघ्याने दाबून ठेवण्याचा प्रयत्न करावा.

डावा पाय समोर ताठ करून बसावे. नंतर उजवा पाय गुडघ्यापाशीं वळवून डाव्या पायाच्या गुडघ्याच्या डाव्या बाजूस ठेवावा. उजव्या पायाचा चवडा जमीनीस टेकवावा. डाव्या पायाचा चवडा ताठ ठेवण्याचा प्रयास करावा. डाव्या

हाताच्या कांखेंत उजव्या पायाचा गुडघा ठेवून डाव्या हाताने उजव्या पायाचा चवडा घट्ट पकडून ठेवावा. डावा हात



अर्धमत्स्येंद्रासन

पाठीमागे वळवून कमरेवर ठेवावा. शक्य तितकी छाती फुगवावी. शरीराचा कोणताहि भाग सैल सोडूं नये. मस्तकाचा भाग उजवीकडे वळवून हनुवटी खांद्यावर ठेवावी. डाव्या पायाचा गुडघा जमिनीपासून जरासुद्धा हालूं देऊं नये. हळूहळू पोटाचा भाग उजव्या पायाच्या गुडघ्याने दाबण्याचा प्रयत्न करावा. वरील दोन्ही प्रकार करून झाल्यावर अर्धमत्स्येंद्रासनाचा अभ्यास पूर्ण होतो. हें आसन प्रमेहरोग दूर करतें, असें सांगितलें आहे. [उ. यो. द.]

अर्धमागधी एक प्राकृत भाषा. शौरसेनी व मागधी या दोन भाषाप्रदेशांच्या मध्ये अर्धमागधीप्रदेश होता. हल्लींचा अयोध्या प्रांत व त्याचा दक्षिणेकडील प्रदेश यांत अर्धमागधी प्रचलित होती.

पालिभाषा ज्याप्रमाणे बौद्धांच्या हीनयान पंथाशीं निगडित झाली, त्याचप्रमाणे जैनांच्या श्वेतांबरसंप्रदायांत अर्धमागधीला महत्त्व मिळालें. स्वतः महावीराने याच भाषेंत धर्मोपदेश दिला होता, असें सांगतात (समवायांगसुत्त). श्वेतांबर जैनांचे धार्मिक ग्रंथ अर्धमागधींत लिहिलेले आहेत. त्यांतल्या त्यांत भाषाशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचा असा गद्यग्रंथ म्हणजे आयारंगसुत्त हा होय. याची भाषा सर्वांत जुनी आहे. अर्धमागधीच्या गद्य आणि पद्य यांच्या भाषेंत कांही फरक पडतो. पालिसाहित्याप्रमाणेच अर्धमागधीच्या पद्यभागाची भाषा अधिक प्राचीन व आर्ष आहे.

भाषाविज्ञानाच्या दृष्टीने अर्धमागधी ही मागधीहून सर्वथा भिन्न आहे. ती मागधीच्या नियमांचें पूर्णपणें पालन करीत नाही. अर्धमागधींत र् व स् हे वर्ण आहेत; पण मागधींत त्यांच्या जागीं ल् आणि श् येतात. मागधींत प्रथमेच्या एकवचनांत अ हें विभक्तिचिह्न मिळतें; पण अर्धमागधींत ए व ओ हीं दोन्ही रूपें मिळतात. अर्धमागधीचीं भाषाविषयक मुख्य लक्षणें अशीं—

संयुक्त व्यंजनाच्या पूर्वींचा स्वर दीर्घ बनतो व त्याच्या एका व्यंजनाचा लोप होतो. जसें, ‘ वस्स ’, वर्षबद्दल ‘ वास.’

व्यंजनांचा लोप होऊन ‘ य ’ अपश्रुतीचा प्रयोग होतो. जसें स्थित बद्दल ‘ ठिय, ’ सागरबद्दल ‘ सायर. ’

‘ क ’च्या स्थानीं ‘ ग ’ येतो. जसें अशोक, श्रावक यांच्याबद्दल ‘ असोग ’, ‘ सावग. ’

प्रथमेचें एकवचन मागधीप्रमाणे एकारान्त होतें. जसें ‘भदन्ते ‘ सावके. ’ पण त्याचबरोबर कित्येकदा एकाराच्या एवजीं ओकारांत रूपहि मिळतें. जसें श्रमणः बद्दल ‘ समणो. ’

त्वा, ल्यप् यांच्या स्थानीं ‘ इतु ’ प्रत्यय येतो. जसें ‘श्रुत्वा’ बद्दल ‘ सुणित्तु ’, ‘ ज्ञात्वा’बद्दल ‘ जाणितु ’, ‘ अपहृत्य’बद्दल ‘ अवहट्टु. ’

भरताने नाटयशास्त्रांत अर्धमागधीला स्वतंत्र भाषा म्हटलें आहे (१८.३८). त्यानंतर विश्वनाथाने हिला गुप्तचर, राजपुत्र आणि शेठ यांची भाषा म्हटलें आहे (सा. द. ६). मुद्राराक्षसांतला जीवसिद्धि क्षपणक, त्याचप्रमाणे प्रबोधचंद्रोदय नाटकांतलीं कांही पात्रें अर्धमागधी बोलतात. भासाच्या कर्णभार नाटकांतहि इंद्र अर्धमागधी बोलतांना दिसतो.

सांप्रत उपलब्ध असलेल्या ग्रंथांवरून असें दिसतें, की अर्धमागधीला दीर्घ परंपरा असून ती इतर प्राकृत भाषांपेक्षा अधिक संपन्न आहे. जैनपंडित तिला अन्य सर्व भाषांची जननी मानतात. महावीराने याच भाषेच्या द्वारें धर्मप्रसाराचें कार्य केलें. आपले धर्मनियमहि याच भाषेंत सांगितले. त्यामुळे, त्यावेळच्या लोकांच्या बोलचालींत ही भाषा आली. लोक तिला प्राकृत म्हणूं लागले. या भाषेचा अभ्यास करण्याची प्रवृत्ति उत्तरोत्तर वाढत आहे. [हिं. सा. बृ. इ.; म. ज्ञा. को.; सु. वि. को.]

अर्धलक्ष्मीहरि विष्णूचें अर्धनारी रूप. तंत्रसारांत याचें ध्यान दिलें आहे, तें पुढीलप्रमाणे —

उद्यत्प्रद्योतनशतरुचिं तप्तहेमावदातम्
पार्श्वद्वन्द्वे जलधिसुतया विश्वधात्र्या च जुष्टम् ।
नानारत्नोल्लसितविविधाकल्पमापीतवस्त्रम्
विष्णुं वन्दे दरकमलकौमोदकीचक्रपाणिम् ।।

अर्थ – उगवत्या शतसूर्यांप्रमाणे तेजस्वी, तप्त सुवर्णाप्रमाणे निर्मळ, विश्वजननी लक्ष्मी ही ज्याचें अर्धांग बनली आहे अशा, विविध रत्नांनी झगमगणारी वेषभूषा केलेल्या, पिवळसर वस्त्र परिधान केलेल्या, विकसित कमल, कौमोदकी गदा व चक्र हातीं धारण करणाऱ्या, अशा विष्णूला मी नमस्कार करतों.

तंत्रसारांत याचें पूजाविधान दिलें आहे. अर्धलक्ष्मीविष्णूची कल्पना ही वैष्णव आगमांनी शैवागमांतल्या अर्धनारीश्वराच्या कल्पनेची उसनवारी केली आहे, असें दिसतें. [श. क.]

अर्धशाला मोठ्या दिवाणखान्याच्या उभय भागीं असणाऱ्या लहान लहान खोल्यांना अर्धशाला असें म्हणत. [एन्सा. हिं. आ.]

अर्धश्रावणिक व्रत व्रतारंभ श्रावण शु. १ देपासून. एक मासपर्यंत एकभुक्त, किंवा नक्तभोजन व पार्वतीची पूजा, हा या व्रताचा विधि आहे. उद्यापनाच्या दिवशीं ब्राह्मण व कुमारिका यांना भोजन घाततात. [हि. ध.]

अर्धाधान अग्निहोत्र घेण्याच्या वेळीं स्मार्ताग्नींतून अर्धा अग्नि घ्यावा किंवा संपूर्ण स्मार्ताग्नीचें रूपान्तर श्रौताग्नींत करावें, असे दोन पक्ष आहेत. अर्धा स्मार्ताग्नि तसाच ठेवून अर्ध्या स्मार्ताग्नीचा उपयोग अग्न्याधानांत करतात, त्याला अर्धाधान म्हणतात.

अर्धासन (१) एक यौगिक आसन. याची पद्धति अशी–

एकपादमथैकस्मिन्विन्यस्योरुणिसत्तम ।
आसीनोर्धासनमिदं योगसाधनमुत्तमम् ।।

अर्थ– एका पायाचा चवडा दुसऱ्या मांडीवर ठेवून ताठ बसणें याचें नांव अर्धासन असून तें योगसाधनाला प्रशस्त आहे.

(२) हें राजकीयहि असतें. अर्जुनाला इंद्राचें अर्धासन प्राप्त झालें होतें. याचा उल्लेख कालिदासहि करतो (रघु. ९.७३). प्राचीनकाळीं अर्धासन ही राजदरबारांतली एक पारिभाषिक संज्ञा होती. राजा किंवा सम्राट् ज्या आसनावर बसायचा, त्यावर अन्य कोणत्याहि व्यक्तीला बसतां येत नसे. पण सम्राट् एखाद्या व्यक्तीच्या विद्या-विक्रमादि गुणांवर प्रसन्न होऊन व त्याला आपला मित्र मानून आपल्या अर्ध्या आसनावर बसण्याचा मान देई. गुप्तकालापर्यंत ही प्रथा चालत होती. मुसलमानी दरबारांतहि अशी प्रथा दिसते. सुलतानाच्या आसनाला ‘ जामेखाना ’ म्हणत व त्याच्या कृपेला पात्र अशी विशिष्ट व्यक्तिच त्यावर बसूं शके.

अर्धोदयपर्व याचें लक्षण पुढीलप्रमाणे–

अमार्कपातश्रवणैर्युक्ता चेत्पौषमाघयोः ।
अर्धोदयः स विज्ञेयः कोटिसूर्यग्रहैः समः ।।

अर्थ– पौष किंवा माघ अमावास्येच्या दिवशीं, रविवार, श्रवण नक्षत्र व व्यतीपात इतके योग असतील, तर त्या पर्वाला अर्धोदय म्हणतात. हा योग कोटि सूर्यग्रहणांच्या तोडीचा आहे. यांत एखादा योग कमी असल्यास त्याला महोदय पर्व मानतात. अर्धोदय पर्वाचा योग दिवसा आल्यासच प्रशस्त होय, असें स्कंद पुराणांत सांगितलें आहे.

अर्धोदये तु सम्प्राप्ते सर्वं गङ्गासमं जलम् ।
शुद्धात्मानो द्विजाः सर्वे भवेयुर्ब्रह्मसन्निभाः ।
यत्किञ्चित् क्रियते दानं तद्दानं सेतुसन्निभम् ।।

अर्थ–अर्धोदय पर्वाच्या वेळीं सर्व उदकें गंगोदकासमान होतात, शुद्ध अंतःकरण असलेले सर्व ब्राह्मण ब्रह्मतुल्य होतात व कोणतेंहि दान सेतुबंध यात्रेच्या योग्यतेचें होतें.

त्या दिवशीं कांस्यपात्रांत पायस भरून घेतात व त्यावर अष्टदल काढून त्यावर यथाशक्ति सुवर्ण ठेवतात. मग त्याची श्वेत पुष्पांनी पूजा करतात. मग त्या पात्राला वस्त्रालंकारांनी अलंकृत करून तें ब्राह्मणाला दान देतात. [पु. चि; श. क.]

अर्धोदय व्रत अर्धोदयपर्व क्वचितच येतें. तें एक पुण्यपर्व असल्यामुळे त्याचें व्रत सांगितलें आहे. या व्रताच्या देवता ब्रह्मा–विष्णु–महेश या होत. अर्धोदयाच्या आदल्या दिवशीं नद्यांच्या संगमावर स्नान करून पुढील मंत्राने संकल्प करतात––

त्रिदैवत्यं व्रतं देवाः करिष्ये भुक्तिमुक्तिदम् ।
भवन्तु सन्निधौ मेऽद्य त्रयो देवास्त्रयोऽग्नयः ।।

अर्थ– देवहो, भुक्ति–मुक्ति देणारें व तीन देवता असलेलें हें व्रत मी करीन. (त्यासाठी) तीन देव व तीन अग्नी माझ्या सन्निध राहोत.

तीन देवतांच्या सुवर्णप्रतिमा तीन तिळांच्या राशींवर डावीकडून उजवीकडे अशा अनुक्रमाने स्थापून पर्वाच्या दिवशीं मध्यान्हीं प्राणप्रतिष्ठापूर्वक त्यांची पूजा करतात. नंतर ‘ प्रजापते.…’ (ऋ. १०.१२१.१०), ‘ इदं विष्णुः …’ (ऋ. १.२२.१५) व ‘ त्र्यंबकं यजामहे…’ (ऋ. ७.५९.१२) या मंत्रांनी अनुक्रमे तीन्ही देवांसाठी हवन करतात. मग तिलराशी-

सह प्रतिमांचें दान, सवत्स धेनु, वस्त्र–पात्र. इ. चें दान व दहा ब्राह्मणांस भोजन घालतात. [व्रतराज]

अर्बुद (१) व्रात्य झालेले भारताच्या पश्चिमेकडील ब्राह्मण. [भाग. पु. १२.१.३८].

(२) ललितेला प्रिय असलेलें पश्चिमेकडील एक राज्य. [ब्रह्माण्ड पु. २.१६.६२]

(३) दक्षिणेकडील एक जमात. यादवी युद्धांत जसा यादवांचा नाश झाला, तसाच यांचाहि झाला. [भाग. पु. ११.३०.१८].

अर्बुद काद्रवेय एक नागर्षि. याने यज्ञाचीं न्यूनें कशीं सुधारावीं व सोमरस कसा काढावा, याचें ज्ञान सांगितलें (ऐ. ब्रा. ६.१). सर्पसत्रांत हा ग्रावस्तुत होता (पं. ब्रा. २५.१५). [प्रा. च. को.]

अर्बुदसरस्वती पितरांना प्रिय असलेली एक नदी. [मत्स्य पु. २२.३८]

अर्बुदा देवी अबूच्या पहाडांतील एक देवी. हिला अधरदेवी असेंहि म्हणतात. हिच्या पायथ्याशीं एका महंताचा आश्रम आहे. तिथून तीनशें पायऱ्या चढून गेल्यावर एक गुहा लागते. या गुहेंत दुर्गादेवी व चौसष्ट योगिनी यांच्या कोरीव मूर्ती आहेत. या गुहेंतच दुसरी एक अरुंद तोंडाची पण प्रशस्त अशी गुंफा आहे. त्या गुंफेंत अर्बुदादेवीची भव्य मूर्ति आहे. इथे तुपाचे दिवे सतत पाजळत असतात. देवीच्या उजव्या बाजूला जो लहानसा बोगदा आहे, त्यांतून देवी खालच्या नखी तलावावर नित्य स्नानाला जाते, अशी भाविकांची समजूत आहे. या गुंफेवरचा घुमट शोभिवंत दिसतो. विजयादशमीला या देवीची मोठी यात्रा भरते. **पाहा**–अबू पहाड.

अर्यमा एक वैदिक देवता. बारा आदित्यांपैकी एक. ऋग्वेदांत मित्रा-वरुणांबरोबर याचा उल्लेख येतो. हा अनेक देवतांचा मित्र आहे. हा कश्यप-अदितीचा पुत्र असून मातृका ही याची पत्नी व चर्षणी हे पुत्र होत. अवेस्त्यांतहि याचा उल्लेख येतो. त्यावरून हा इंडोइराणी काळांतला देव आहे, हें उघड होतें. हा वैशाख मासाचा आदित्य असून याचे तीनशें किरण आहेत. यमाला शाप होऊन तो शंभर वर्षे विदुराच्या रूपाने शूद्र योनींत गेला असतां तेवढ्या काळांत अर्यम्याने त्याचा अधिकार संभाळला. गीतेंत श्रीकृष्णाने पितरांत अर्यमा ही आपली विभूति असल्याचें सांगितलें आहे (१०. २९).

गृह व प्रासाद यांच्या निर्माणकाळीं देव-गंधर्व-पितरांबरोबर याचीहि पूजा करावी, असें सांगितलें आहे (मत्स्य पु. २५२. ३०). शिशुमाराच्या मांडीच्या जागीं याचें स्थान असून याच्या दक्षिणेस पितृयाणमार्ग आहे (ब्रह्मांड पु. २. २३. १०३). हा हिरण्मयखंडांत श्रीहरीच्या कूर्मतनूची पूजा करतो. पृथूने पृथ्वीचें दोहन केलें त्या वेळीं पितरांनी याला वत्स करून कव्य दोहून घेतलें. [भाग. पु. ६. ६. ३९–४२ ; ५. १३. १५].

अर्व चंद्राच्या अनेक घोड्यांपैकी एक. अर्धा घोडा व अर्धा पक्षी असें याचें स्वरूप आहे. हा दैत्यांचें वाहन म्हणून प्रसिद्ध आहे.

अर्वाक्तल पृथ्वीच्या खालीं असलेलें वालुकायुक्त पांचवें तल. विरोचन दैत्याचें वसतिस्थान. इथे नाग, दानव व राक्षस यांचीं हजारों पुरें आहेत. [ब्रह्मांड पु. २०]

अर्वाक्स्रोत विधात्याने निर्मिलेल्या विश्वापैकी एक. हें अव्यक्तांतून प्रादुर्भूत झालें. याला तैजससर्ग असेंहि म्हणतात. हा सर्ग आठ ठिकाणीं विभक्त आहे. [वायु पु. ६. ४९–५२]

अर्ह द्वारकेचें रक्षण करणारा एक गण. [भाग. पु. १. ११. ११]

अर्हत् 'अर्ह: प्रशंसायाम्' यावरून स्तुत्य, पूज्य, मान्य अशी व्यक्ति. संकेतार्थाने जिन, बुद्ध, तीर्थंकर, पारंगत इत्यादि. 'अर्हतीति अर्हत्'=पूज्य असतो तो अर्हत् होय, अशीहि व्युत्पत्ति आहे. वेदोत्तर काळीं ब्राह्मणांशीं स्पर्धा करणाऱ्या वर्गाने स्वतःच्या सामाजिक व आध्यात्मिक उच्चतेचा निदर्शक असा अर्हत् हा शब्द स्वतःला लावून घ्यायला सुरवात केली. अर्हत् हेच खरे ब्राह्मण होत, असें त्यांनी ठरविलें. या शब्दाला सांप्रदायिक अर्थ येण्यापूर्वी तो शब्द पूज्य, श्रेष्ठ या अर्थाने वापरला जात होता. 'यदध्यासितमर्हद्‌भिस्तद्धि तीर्थं प्रचक्षते' किंवा 'त्वमर्हतां चाग्रसरः स्मृतोऽसि नः' या ठिकाणीं कालिदासानेहि याच सामान्य अर्थाने तो वापरला आहे.

हा शब्द धर्मग्रंथांत दोन अर्थांनी आढळतो. एक बौद्धधर्मी अर्हत् व दुसरा अन्यसंप्रदायांतला अर्हत्. पंचविंश ब्राह्मणाच्या

आधारें व्रात्यसंस्कृतींत अर्हतांचा एक प्राचीन पंथ असल्याचें श्री. करमरकर सांगतात. इतर संप्रदायांत त्याचा अर्थ सांप्रदायिक मताप्रमाणें जें उच्च ध्येय असेल, तें गांठलेला मनुष्य असा आहे. प्रारंभींच्या बौद्धधर्मी लोकांनी ज्या अर्थी या शब्दाचा उपयोग केला आहे, त्या अर्थी बुद्धापूर्वी उत्तर भारतांत जे उपासना संप्रदाय होते, ते या शब्दाचा उपयोग करीत असावे, असें स्पष्ट दिसतें. पण बौद्धांनी हा शब्द विशेष उचलून धरला.

बुद्ध सारनाथाला पोंचल्यावर तिथल्या पांच भिक्षूंपाशीं गेला. पण त्यांनी त्याचें स्वागत करायला नाखुषी दर्शविली. तें पाहून बुद्ध त्यांना म्हणाला. ' भिक्षूंनो, डोळे उघडून पाहा. तुमच्या पुढे उभा असलेला तथागत हा एक अर्हत् आहे. मी तुम्हाला विनय शिकवीन व मार्गदर्शन करीन. '

बुद्धाची आणि काश्यपाची भेट झाली तेव्हा बुद्धाने दाखविलेले चमत्कार पाहून काश्यप म्हणाला. 'श्रमणाच्या ठिकाणीं अचाट सामर्थ्य आहे, हें मी मान्य करतों; पण तो माझ्यासारखा ' अर्हत् ' नाही. ' त्यावर बुद्ध म्हणाला. ' काश्यपा, तूं अर्हत्‌हि नाहीस आणि तुला त्या पदापर्यंत पोंचण्याचा मार्गहि गवसलेला नाही. '

ज्या वेळीं बुद्धाला कळून चुकलें, की गुरु किंवा धर्मोपदेशक झाल्यावांचून अर्हत् पदवी प्राप्त होत नाही, तेव्हा त्याने खास भिक्षूंचा एक वर्ग बनवून त्याला उपदेश द्यायला प्रारंभ केला. ज्यांनी आस्रवांचा म्हणजे रागद्वेषादि विकारांचा नाश केला आहे, अशा भिक्षूंनाच या वर्गांत प्रवेश मिळे. अशा भिक्षूंनाहि स्वत:ला अर्हत् म्हणवून घेण्याची मोकळीक होती. अशा रीतीने बुद्धाने अर्हत् पदवी शिष्यसामान्य करून टाकली. त्यामुळे केवळ बुद्धालाच श्रेष्ठत्व मिळालें असें नव्हे; तर त्याच्या शिष्यांचाहि दर्जा वाढला. त्यामुळे बुद्धाच्या धर्माचेंहि श्रेष्ठत्व प्रस्थापित झालें. पण याच गोष्टीमुळे बुद्धाला त्याच्या शिष्यांतून श्रेष्ठतम ठरविण्यासाठी एका निराळ्या पदवीची आवश्यकता उत्पन्न झाली. त्यासाठी जो नवा शब्द निर्माण झाला, तो सम्यक्संबुद्ध हा होय. सम्यक्संबुद्ध म्हणजे सर्वज्ञ. ही पदवी मात्र बुद्धाशिवाय अन्य कोणालाहि लागू झाली नाही.

जैनांनीहि या शब्दाला विशेष मान्यता दिलेली आहे. ' ॐ णमो अरिहन्ताणम् ' या त्यांच्या सुप्रसिद्ध मंत्रांत अर्हतालाच नमन आहे.

बौद्धांचे अर्हत् आणि सम्यक्संबुद्ध हे शब्द जैनांच्या केवली आणि अर्हत् या शब्दांशीं समानार्थक आहेत. द्रष्टेपणा, सच्चेपणा, विनय, तप, आत्मक्लेश, सेवा, दातृत्व हे जैनमताप्रमाणे अर्हत्‌चे गुणविशेष होत. हे गुण आत्मसात् करणारा केवलीहि अर्हत् होऊं शकतो. त्यांनी केवलीचे दोन प्रकार मानले आहेत–केवली आणि अर्हत्–केवली. दोघेहि वीतराग आणि सर्वज्ञ असतात. पण धर्मप्रवर्तकाची म्हणजेच गुरु होण्याची योग्यता मात्र अर्हत्– केवली, म्हणजे तीर्थंकर यालाच असते.

ज्याने अष्टांगिक मार्ग पूर्णपणे आक्रमिला व जो शेवटच्या स्थितीला प्राप्त झाला, असा थोर पुरुष म्हणजे अर्हत् होय. अर्हतांनी तीन मद म्हणजे इंद्रियवासना, पुनर्जन्म व अज्ञान हे दोष जिंकलेले असतात. प्रत्येक अर्हत् हा सम्यक्–ज्ञानी असतो. त्याला संबोधि प्राप्त झालेली असते. तो (१) अनुद्विग्नता (२) आत्मशुद्धि (३) उत्साह (४) शांतता (५) आनंद (६) एकाग्रता, व (७) औदार्य, या सप्त गुणांनी युक्त असतो. बुद्धाचा पुत्र राहुल हा वरील गुणांनी युक्त होऊन अर्हत् बनला. बौद्धमतें अर्हत्‌पुरुषाला पुनर्जन्म नाही व संसारी पुरुषालाहि तें पद प्राप्त करून घेतां येतें. बुद्धाच्या जीवनकालांत अर्हत्‌पदाला पोंचलेल्या वीस जणांचीं नांवें अंगुत्तरनिकायांत दिलीं आहेत. दीघनिकायांतल्या सप्तसंवादांतल्या तिसऱ्या संवादांत अर्हत्‌पद हें सर्वोच्चपद असल्याचें सांगितलें आहे. अर्हत्‌पदाचा अर्थ विस्तृत होत चालला तसतसा अर्हत्‌पुरुषाबद्दल पूज्य भावहि वाढत गेला. एखाद्या भिक्षूला जेव्हा आपण अर्हत् बनलों असें वाटे, तेव्हा तो तसें जाहीर करी. पुढेपुढे तर त्या विषयींच्या कल्पना इतक्या वाढल्या, की अर्हत्‌पदाची प्राप्ति प्राचीन काळांतल्या थोर पुरुषांनाच शक्य होती; प्रस्तुत काळांत तसा पुरुष होणें शक्य नाही, असाहि समज रूढ झाला.

बौद्धधर्माच्या स्थापनेनंतर कांही शतकांनी महायान पंथ निघाला. त्या पंथाचे पंडित पालि भाषा सोडून संस्कृत भाषेंत ग्रंथ लिहूं लागले. अर्हत्‌पदाची कल्पना हीनयानी संप्रदायाची असल्यमुळे महायानी पंडितांनी तिला उचलून न धरतां बोधिसत्त्व ही नवीच पदवी प्रचारांत आणली. बोधिसत्त्व अवस्था हें त्यांनी अंतिम उच्च ध्येय ठरविलें. ललितविस्तर व महावस्तु या ग्रंथांत बुद्धाच्या आरंभींच्या शिष्यांनाच फक्त अर्हत् ही उपाधि दिलेली आहे. सद्धर्मपुंडरीक या ग्रंथांत अर्हत्‌शब्द बऱ्याच वेळां आला असला, तरी अर्हत् ही अवस्था बुद्धापेक्षा कमी दर्जाची आहे, असें तिथे स्पष्ट म्हटलें आहे.

पाहा – बोधिसत्त्व. [दि कन्सेप्ट ऑफ अर्हत् – प्रा. जैन; एन्सा. रि. ए.; म. ज्ञा. को.; रिलिजन्स ऑफ इंडिया; बौ. द. मी.]

अर्हंत ज्यांनी नर्मदेवर तप केलें ते असुर. विष्णूच्या मायेने मोहित झाल्यामुळे त्यांना वैदिक मार्ग सोडून अवैदिक मार्गाचा अवलंब करण्याचा मोह झाला. [विष्णु पु. ३. १८. १३]

अर्हद्दास (इ. स. १३०० चा सुमार) जैन कन्नड कवि. याला रट्टकवि असेंहि म्हणत. याचा रट्टमत नांवाचा ग्रंथ असन त्यांत पाऊस व दिव्य-भौम उत्पात यांविषयीं वर्णन आहे. याचें तेलुगु भाषेंत भषांतर झालें आहे. [म. च. को.]

अलक एक अलंकारशास्त्रज्ञ. याने रत्नाकराच्या 'खर-विजय' ग्रंथावर टीका लिहिली व मम्मटाचा अपूर्ण राहिलेला 'काव्यप्रकाश', परिकरअलंकारापासून पुढे लिहून पूर्ण केला. [म. च. को.]

अलकनंदा हिमालयांतील गढवाल प्रदेशांतल्या केदार पर्वतांतून उगम पावलेली एक पवित्र नदी. ही गंधमादन पर्वतापासून निघाली, असें भागवत पुराणांत म्हटलें आहे (४.२४). गंगेला मुख्य पाणीपुरवठा हिच्यापासून होतो. अनेक पुराणांत हिला गंगेच्या चार प्रवाहधारांपैकी एक असें म्हटलें आहे (वायु पु. ४१.१८ ; कूर्म पु. १.४६.३१; विष्णु पु. ११.२.३६).

देवप्रयागच्या वरच्या गंगाप्रवाहाला अलकनंदा म्हणतात. देवप्रयाग येथे ही भागीरथीला मिळते व पुढे त्या संयुक्त प्रवाहाला गंगा असें नांव प्राप्त होतें. बदरिकाश्रम हें त्या दोघींचें संगमस्थान होय, असें नारद पुराणांत म्हटलें आहे (२.६७.७२–७३). या नदीला पांच इतर नद्या मिळून पांच प्रयाग बनतात. त्यांचीं नांवें देवप्रयाग, नंदप्रयाग, कर्णप्रयाग, रुद्रप्रयाग व विष्णुप्रयाग अशीं आहेत. **पाहा–गंगा.** [रिव्हर्स ऑफ इंडिया; यू. पी. गॅझे.; हि. जॉ. ए. इं.; हि. ध.]

अलका कुबेराची राजधानी. कैलासावर या नगरीची स्थापना असून कुबेर हा तिचा स्वामी आहे. पुरूकडून तारुण्य घेतल्यानंतर ययातीने या ठिकाणींच विषय-सुखाचा उपभोग घेतला (म. भा. आदि. ८५.९). पुरूरवाहि उर्वशीसह अलकेंतच राहिला होता. कालिदासाने मेघदूतांत या नगरीचें काव्यमय वर्णन केलें आहे.

अलंकार (१) अमरकोशांत 'अलम्' शब्दाचे भूषण, पर्याप्ति, शक्ति आणि वारण असे चार अर्थ दिले आहेत. अलंकार शब्दांतला त्याचा अर्थ भूषण असा आहे. शरीर सुशोभित करण्यासाठीं वापरायच्या वस्तूंना अलंकार म्हणतात. 'अलंकारस्त्वाभरणम्' (अमर).

आपलें शरीर शोभिवंत व आकर्षक दिसावें ही इच्छा मानवमात्रांत स्वभावतःच आहे. अलंकाराला आभरण असेंहि म्हणतात. हा शब्द भर् धातूपासून बनला आहे. त्याचा अर्थ शरीरावर ठेवणें, बाळगणें, किंवा वाहणें असा आहे. त्यावरूनच त्याला अलंकार असाहि अर्थ प्राप्त झाला आहे. अथर्ववेदांत अनेक ठिकाणीं हा शब्द मंत्रसामर्थ्य किंवा मंत्रशक्तीने भारलेली वस्तु अशा अर्थाने येतो (२.४.३). ऋग्वेदांतहि त्याचा अर्थ आणणें, विशेषतः इच्छित वस्तु किंवा शक्तिदात्री वस्तु आणणें, असा आहे.

अलंकार व आभरण यांचे हे लाक्षणिक अर्थ विचारांत घेतां, अलंकारांचा हेतु केवळ शरीर सजविणें एवढाच नसून जीविताचें संरक्षण, देवतांची कृपा, पिशाचांचें निराकरण असे अनेक हेतु अलंकरणाच्या मुळाशीं दिसतात. सौष्ठवयुक्त शरीरांत देवांची वसती असते व रोगग्रस्त शरीर पिशाचांचें माहेरघर असतें, अशी समजूत आहे. सबब आपलें शरीर भूषवून त्यांत देवतांचें वास्तव्य घडवून आणणें व त्या देवतांच्या द्वारें भुताखेतांना पळवून लावणें, असा अलंकाराचा गर्भितार्थ होतो. दृष्टबाधा व ग्रहांची बाधा होऊं नये, असाहि त्यांत उद्देश असतो. याच हेतूमुळे अलंकारांत प्रतीकें शिरलीं आहेत. नाग, कमळ, इ. अलंकार हे प्रतीकात्मकच आहेत. मुलाच्या गळ्यांत वाघनखें घालण्याची पद्धत संरक्षणाच्या उद्देशानेच आली आहे. धातूंचा मुख्य उपयोग भुतांखेतांपासून बचाव व देवतांची कृपा यासाठी होतो, असें प्राचीन काळापासून मानलें गेलें आहे. त्यासाठीच पूर्वीं तांब्याचे दागिने घालण्याची प्रथा होती. अजूनहि मुलांच्या पायांत तांब्याचे वाळे घालतात. पुरुषहि पायाच्या अंगठ्यांत तांब्याचें वळें घालतांना दिसतात. त्याचा मूळ हेतु पौरुषाची जपणूक असा आहे. अलंकारांचा संबंध जादुविद्येशींहि थोडाबहुत आहेच. सामान्यतः शरीरा-वरचे सर्व अलंकार हे ताईतवजाच असतात. सौभाग्यचिन्हांचा सगळा वर्ग अशाच प्रकारचा आहे. विवाहित स्त्रीच्या गळ्यांत बांधलें जाणारें मंगळसूत्रहि भूषणापेक्षा संरक्षण याच भावनेने आलेलें आहे. लग्नांतली अंगठीहि मुळांत संरक्षक म्हणूनच वधूच्या बोटांत घातली गेली.

बहुतेक सर्व मानवसमाजांत अलंकार वापरण्याची चाल आहे. आदिमानव वाळलेलें गवत, वेलीचे देठ, नाना प्रकारच्या बिया, फळें, हाडें, इ. वस्तूंनी आपली काया सुशोभित करी. आजहि पोवळीं, कवड्या, शंख, काचेचे मणी, विशिष्ट

प्रकारच्या लांकडांचे मणी, इ. अलंकार वन्य जमातींत मुक्त हस्ताने वापरलेले दिसतात. गुंजाफळांचे हार भिल्ल स्त्रिया वापरीत, असे उल्लेख संस्कृत वाङ्मयांत अनेक ठिकाणीं आढळतात उदा०

किं जातु गुञ्जाफलभूषणानाम् ।
सुवर्णकारेण वनेचराणाम् ॥

(विक्रमांकदेवचरित १. २५)

अर्थ –– गुंजाफळांचे दागिने घालणाऱ्या वन्यांना (त्यांच्या वस्तींत) सोनाराची काय गरज ?

आपलें संरक्षण व्हावें याबरोबरच आपण सुंदर दिसावें या आकांक्षेंतूनहि विविध अलंकारांची निर्मिति झालेली आहे. सौंदर्याकांक्षा ही स्त्रियांमध्ये विशेष प्रमाणांत दिसत असली, तरी पुरुषांनीहि अलंकारांचा हव्यास कमी धरलेला नाही. अजंठ्याच्या लेण्यांत एका राजकुमाराचें चित्र आहे. त्या राजकुमाराच्या अंगावर कपड्यांपेक्षा हिऱ्यामोत्यांचे अलंकारच अधिक प्रमाणांत दिसून येतात. अलंकारांची हौस केवळ श्रीमंत लोकांतच असते असें नाही; तर ती गरीब लोकांतसुद्धा तितकीच आढळून येते. श्रीमंतांचे अलंकार थोडे; पण ते मौल्यवान्, घाटदार व आकर्षक असतात; तर गरीबांचे दागिने विपुल; पण हलक्या धातूचे असतात. पांढरपेशांपेक्षा अन्य जातींतल्या बायका चांदीचे दागिने मोठ्या प्रमाणांत घालतात. गोंड, कातकरी, ठाकूर वगैरे जमाती पितळेचे आणि मण्यांचे भाराभर अलंकार घालतांना दिसतात.

प्रत्येक समाजांतील अलंकरणांच्या पद्धती वेगवेगळ्या असतात. त्यांतहि स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे अलंकार भिन्न भिन्न प्रकारचे असतात. सौंदर्यदृष्टि बदलते, तसतशी अलंकारांची जडणघडणहि बदलते. भारतीयांची अलंकार-प्रियता ग्रीक इतिहासकारांनी वर्णिली आहे. भारतांतील प्राचीनकाळची सोनें, मोतीं व रत्नें यांची समृद्धि लक्षांत घेतां, भारतीय लोकांच्या दागिन्यांच्या हौसेचें आश्चर्य वाटायचें कारण नाही. ते लोक स्वतःचीं शरीरें तर अलंकारांनी भूषवीतच; पण गायी, घोडे आणि हत्ती यांनाहि सुवर्णालंकारांनी सजवीत.

अलंकारांचे सामान्यतः चार प्रकार आहेत – (१)अवेध्य–किरीट, कुंडल, इ. (२) बंधनीय – फुलें गजरे इ. (३) क्षेप्य – नूपुर, वलय, इ. व (४) आरोप्य–मोत्यें व मणी यांच्या माळा इत्यादि.

वैदिक कालांतले अलंकार कशा प्रकारचे असत, तें समजायला चित्रगत किंवा शिल्पगत असा कोणताहि पुरावा उपलब्ध नाही. पण असें असलें तरी वैदिक साहित्यांत अलंकाराचीं नांवें मात्र थोडीं थोडकीं नाहीत. हीं नांवें पुढीलप्रमाणे आढळतात –

ऋग्वेद –– अंज, अंजि, अरंकृत, अरंकृति, आनूक, ओपश, कर्णशोभन, कुरीर, कृशन, कृशनिन्, खादि, निष्क, न्योचनी, पुंडरीक, पुष्कर, प्रभपन, बर्हन, भूपन, मणि, रत्न, रुक्म, रुक्मिन्, ललामी, वरिमत्, व्यंजन, विभूषन, शतपत्र, शिंबल, सुनिष्क, स्तुका, स्रज्, हिरण्ययी, हिरण्यशिप्र, हिरीमत्, इत्यादि.

तैत्तिरीय संहिता –– पुण्डरिस्रज् (सुवर्ण कमलांची माला), पुष्कर, प्रवर्त, प्राकाश, भोग, मणि, रत्न, स्रज्, इत्यादि.

अथर्ववेद –– अंजि, ओपश, कुम्ब (डोक्यावर घालायची जाळी), कुरीर, कृशन, जीवभोजन (अंजन), देवांजन, नलंद, निष्कग्रीव, पुंडरीक, पुष्म, प्रसाधन, मधूलक, रुक्मन्, ललाम, ललामगु, ललाम्य, सीमन्, सुरुक्म, सुत्र, स्रज्, स्वेदांजि, हरित्स्रज्, हिरण्यज, हिरण्यस्रक्, हैरण्य इत्यादि.

संहितेतर वाङमय –– प्राकाश, फण, लोहमणि, निमुक्ता, स्थागर, इत्यादि.

ऋग्वेदांतले मरुत् हे विशेषेंकरून अलंकारप्रिय दिसतात–

चित्रैरञ्जिभिर्वपुषे व्यञ्जते ।
वक्षःसु रुक्माँ अधि येतिरे शुभे ॥

(१.६४.४.)

अर्थ –– आपल्या शरीरास ते (मरुत्) चित्रविचित्र आभरणांनी भूषवीत असतात. शोभेकरितां त्यांनी आपल्या वक्षःस्थलावर सुवर्णालंकार धारण केलेले असतात.

वैदिक युगांत वक्षःस्थलावर धारण करण्याचा निष्क नांवाचा एक अलंकार होता; पण त्याचा आकार कसा असे तें कळत नाही. तो सुवर्णाचा अलंकार असावा. वैदिक काळांत निष्क नांवाचें एक सुवर्ण नाणें होतें. या नाण्यांचे हार करून ते गळ्यांत घालीत. ‘अर्हन् निष्कं यजतं विश्वरूपम्।’ (ऋ. १.३३.१०) या मत्रांत निष्कांच्या हाराला विश्वरूप असें विशेषण दिलेलें असून विश्वरूप म्हणजे सर्व प्रकारच्या आकृतींचीं सुवर्णनाणीं गुंफून बनविलेला हार रुद्र आपल्या गळ्यांत घालतो, असें म्हटलें आहे.

मणि हा एक आणखी वैदिक अलंकार होय. ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत मणि म्हणजे रत्न असा त्याचा अर्थ दिला आहे. हा मणि दोऱ्यांत ओवून गळ्यांत किंवा दंडावर बांधीत. त्याचा उपयोग ताइताप्रमाणे करीत. पूर्व व उत्तर अश्मयुगांत सर्वत्र मणि अस्तित्वांत होते. सिंधुसंस्कृतींतहि त्यांचा आढळ होतो. मण्यांची वलयें व कुंडलेंहि करीत. सोन्यारुप्याचे मणि श्रीमंत वापरीत तर गरीब लोक दगडाचे, मातीचे, शंखांचे व गारेचेहि मणि बनवून ते वापरीत. लांब, गोल असे त्यांचे

वेगवेगळे आकार असत. मण्यांचा कमरपट्टा करीत. त्याला माणिमेखला म्हणत. मण्यांचीं वळीं किंवा कंकणेंहि करीत.

मणिना वलयं वलयेन मणिः ।
मणिना वलयेन विभाति करः ।।

या सुभाषितांत मणिवलयाने शोभणाऱ्या हाताचा उल्लेख आहे. चूडामणि नांवाचा एक बायकांचा अलंकार होता. तो त्या आपल्या भांगांत लोंबता बसवीत. हा विकसित कमळाच्या आकाराचा असून त्याला मोत्यांच्या पाकळ्या जडवीत. मण्यांचे अलंकार स्त्रियांप्रमाणेच पुरुषहि वापरीत.

प्राचीन काळीं मणि हे विशेषेंकरून दृष्टबाधा, आपत्ति व शरीरगत दोष दूर व्हावे म्हणून वापरीत. ही कल्पना आजहि अस्तित्वांत आहे. मुलांच्या गळ्यांत अजूनहि विशिष्ट मणि हा दृष्टमणि म्हणून बांधला जातो.

ऋग्वेदांतील आणखी एक दागिना म्हणजे खादि. सांखळ्या, कडीं, तोडे वा अंगठी अशा अर्थानें हा शब्द येतो. वाजपेय, दशपेय, राजसूय, अश्वमेध या यज्ञांत यजमान व ऋत्विज यांनी विशिष्ट अलंकार वापरायचे असत. वाजपेय यज्ञांत सर्व ऋत्विज सोन्याच्या कंठ्या घालीत व होता वज्रनामक रत्नें जडविलेली व शंभर सोन्याचीं कमळें गुंफून बनविलेली कंठी धारण करी (आश्व. श्रौ. सू. ९. ९).

वैदिक काळांत रुक्म नांवाचा आणखी एक सुवर्णालंकार होता. रुक्म म्हणजे वाटोळें सुवर्णपदक होय. सूर्याला 'दिवोरुक्म' = आकाशाचें सुवर्णपदक म्हटलें आहे (ऋ. ७ ६३. ४). अग्निचयनांत यजमानाच्या गळ्यांत २१ ठिपके उठविलेलें रुक्म बांधायचें असे.

रत्नाचाहि ऋग्वेदांत उल्लेख येतो. अथर्ववेदांत मणि-रत्नाचा (सर्पमणि) उल्लेख आलेला आहे. सर्व प्रकारचें दुरित नष्ट होण्यासाठी रत्न उपयोगांत आणीत. रत्नांत सर्व कामना पूर्ण करण्याचें अलौकिक सामर्थ्य असतें, अशी पुरातन श्रद्धा आहे. इंद्राने बुद्धाला पूर्वजन्मांत 'विरोचन' = अक्षय प्रकाशी असें रत्न दिलें होतें, अशी जातकांत कथा आहे (जा. ५३१). बौद्ध धर्मांत बुद्धालाच रत्न म्हटलें आहे. निरनिराळीं रत्नें हीं ग्रहांचीं प्रतीकें मानलेलीं आहेत. उदा० गुरूचा पुष्पराग, शनीचा नीलमणि इत्यादि. तीं तीं रत्नें त्या त्या ग्रहांची बाधा नष्ट व्हावी म्हणून अलंकारांच्या रूपाने वापरीत.

मोहेंजोदडो व हराप्पा येथील स्त्री व पुरुष दोघांनाहि अलंकारांची हौस दिसते. उत्खननांत आढळून आलें आहे, की त्या काळच्या स्त्रिया गळ्यांत ताईत बांधीत व हारहि घालीत. दंडांत बाजूबंद, कानांत तुकड्यांसारखीं लटकतीं कर्णभूषणें वापरीत. बांगड्या कोपरापर्यंत भरीत. त्यांच्या कमरेंत मेखला, बोटांत अंगठ्या व पायांत तोरड्या असत. त्या काळच्या श्रीमंतांचे दागिने सोने, चांदी आणि मणि यांचे असत. गरिबांचे दागिने तांबें, हाडें व शिंपा यांचे असत.

वेदोत्तर काळांतल्या राजस्त्रिया व देवता यांच्या कित्येक अलंकारांचीं नांवें पुढीलप्रमाणे आहेत – शिखापाश, शिखाजाल, खंडपत्र, चूडामणि, मकरिका, मुक्ताजाल, कुंडल, खड्गपत्र, वेणीगुच्छ, दारक, ललाटतिलक, भ्रूर, कर्णवलय, दंतपत्र, कर्णपूर इत्यादि. या अलंकारांच्या आकृती कशा असत व कोणता अलंकार कुठे घालीत, याची निश्चित माहिती मिळत नाही. तथापि, भारतांतल्या निरनिराळ्या प्रदेशांतल्या लेण्यांतून आढळणाऱ्या मूर्तींवरून कांही अलंकारांच्या आकृतींची कल्पना करतां येते. बौद्ध काळांत मोत्यांचा वापर अधिक प्रमाणांत दिसतो. नागमुद्रा हें प्रतीक मोत्यांत गंफलेलें आढळतें. कर्णभूषणांत बाण, ध्वज व अंकुश हीं प्रतीकें व कंठभूषणांत खंजीर, श्रीवत्स व वज्र हीं प्रतीकें आढळतात.

मस्तकाभरणें –– अमरसिंहाने आपल्या अमरकोशांत अलंकारांच्या यादीला मस्तकाभरणापासूनच सुरवात केली आहे.


झपटा – केसांत गुंतवून भालप्रदेशीं आणलेला एक अलंकार

स्त्रियांच्या शीर्षालंकारांत भांगांत घालायचे बालपाश्या व पारितथ्या असे दोन अलंकार त्याने सांगितले आहेत. पारितथ्या हा बिजवरा असावा. याला सिंथि असेंहि म्हणतात. हंसतिलक म्हणजे पिंपळपानाच्या आकाराचा हिरेजडित दागिना. हा बिजवऱ्याच्याच जागीं घालीत.

ललामक –– हा बिजवऱ्यासारखाच एक दागिना होता. पण त्याला पेट्या नसून सोन्याचीं पानें असत.

चूडामंडन –– कमलपत्रासारखा सुवर्णाचा दागिना. हा केवड्याप्रमाणे डोक्यांत घालीत.

चूडिका –– कमलासारखें सुवर्णाचें फूल.

ललाटावरचे अलंकार दोन –– पत्रपाश्या व ललाटिका. पत्रपाश्या हा अलंकार पानांच्या गुच्छासारखा असे. डेंख हें

केंद्र समजून निरनिराळ्या दिशांना अग्रें येतील अशा प्रकारें त्यांत पानांची रचना केलेली असे. ललाटिका याचा अर्थ हलायुधकोशांत 'स्वर्णादिरचितललाटाभरणम्' = सुवर्णादि धातूंचें बनविलेलें व ललाटावर लोंबणारें आभरण, असा दिलेला आहे; पण कालिदास ललाटावरचा चंदनतिलक या अर्थी तो शब्द वापरतो --

तदाप्रभृत्युन्मदना पितुर्गृहे
ललाटिकाचन्दनधूसरालका ।।

(कु. सं ५. ५५)

राजे लोक डोक्यावर रत्नखचित मुकुट वापरीत. अर्जुनाच्या किरीटाचें वर्णन महाभारताच्या कर्णपर्वांत आलें आहे. मुकुटधारी दशरथाचें वर्णन कालिदास पुढीलप्रमाणे करतो --

चरणयोर्नखरागसमृद्धिभि-
र्मुकुटरत्नमरीचिभिरस्पृशन् ।।
नृपतय: शतशो मरुतो यथा ।
शतमखं तमखण्डितपौरुषम् ।।

(रघु. ९. १३)

अर्थ – देव ज्याप्रमाणे इंद्राला नमस्कार करतात, त्याप्रमाणे शेकडों राजे चरणांच्या नखांच्या लाल कांतीने युक्त झालेल्या मुकुटांवरील रत्नांच्या किरणांनी, अखंडित पराक्रम असलेल्या त्या दशरथाला प्रणाम करते झाले.



शिरपेंच – मस्तकालंकार

राजस्त्रिया मस्तकीं मुकुट न घालतां भालप्रदेशीं रत्नजडित सुवर्णपट्ट वापरीत. त्यावरूनच पट्टराणी हा शब्द आलेला आहे. चूडामणिरत्नाचा वर उल्लेख झालाच आहे. सीतेच्या चूडामणीचा रामायणांत उल्लेख आहे. हा अलंकार मोत्यें व रत्नें ह्रीं एकत्र जडवून प्रफुल्ल कमळाच्या आकाराचा बनवीत. अमरावतीच्या शिल्पांत चूडामणीचे अनेक सुंदर नमुने कोरलेले दिसतात. चूडामणीच्या जोडीला मकरिका नांवाचाहि एक अलंकार होता. तो श्रीमंत स्त्रियां आपल्या भांगांतून थेट कपाळावर लोंबता सोडीत. याशिवाय, लांब वेणी पाठीवर सोडून तिच्यावर मोत्यांचे किंवा रत्नांचे सर नितंबापर्यंत मोकळे सोडणें अशीहि पद्धत होती. याला प्रवेणी असें नांव असे. प्रवेणीच्या अग्रभागीं सोन्याच्या वाटींत मोती जडवून त्याचा गोंडा लोंबवीत. प्रवेणीचा उल्लेख कालिदासाने केला आहे --

तत्र सौधगत: पश्यन्यमुनां चक्रवाकिनीम् ।
हेमभक्तिमतीं भूमे: प्रवेणीमिव पिप्रिये ।

(रघु. १५. ३०)

अर्थ -- तिथे राजवाड्यावर जाऊन (शत्रुघ्न) चक्रवाक पक्ष्यांनी युक्त असलेल्या यमुनेला पाहत असतां पृथ्वीच्या सुवर्णजडित वेणीप्रमाणे दिसणारा तो देखावा पाहून आनंदित झाला.

याशिवाय चंद्रकोर, गुलाबाचें फूल, नाग, केवडा, बिजवरा, मूद, फिरकीचें फूल, चंद्र-सूर्य, गोंडेफूल, या नांवांचेहि अलंकार बायका डोक्यांत व केसांत वापरीत.

कर्णभूषणें — अमरसिंहाच्या मतें याचे कुंडल व कर्णिका असे दोन प्रकार आहेत. कर्णिकेलाच तालपत्र, ताटक, दंतपत्र, अशीं अन्य नांवें आहेत. कर्णिका कानाच्या वरच्या भागीं व कुंडल खालच्या भागांत घालीत. स्त्री व पुरुष दोघेंहि कुंडलें वापरीत. सापाचें वेटोळें असावें, त्याप्रमाणे कुंडलें वलयाकृति असत. हा अलंकार वजनाला थोडा जड असे. त्यामुळे शरीराची थोडीशी हालचाल झाली तरी कुंडलें मागे पुढे हालूं लागत. कालिदासाने दशरथाच्या कुंडलांचें चांचल्य पुढील श्लोकार्धाने सांगितलें आहे --



त्रिकंटक – कर्णभूषण

तुरगवल्गनचञ्चलकुण्डलो ।
विरुरुचे रुरुचेष्टितभूमिषु ।

(रघु. ९. ५१)

अर्थ – घोड्याच्या चालण्याने ज्याच्या कानांतील कुंडलें सारखीं हालत आहेत, असा तो दशरथ राजा रुरु नामक हरिणें वावरत असलेल्या वनांत शोभूं लागला.

प्राचीन देवमूर्तींच्या कानांत कुंडलें बहुतकरून असतातच. त्यांचा आकार गोल असतो व त्यावर कारागिरी असते. कुंडलांना नाना प्रकारचीं रत्नेंहि जडवीत. लंकेंतल्या स्त्रियांच्या कर्णकुंडलांत हिरे बसविलेले होते, असें रामायणांत वर्णन आहे. दमयंतीच्या स्वयंवरासाठी आलेल्या राजांच्या कानांत मणिकुंडलें असल्याचें वर्णन महाभारतांत आहे.

कुंडलें अनेक नमुन्यांचीं असत. चंद्रकोरीच्या आकाराच्या कुंडलांना मृष्टकुंडल असें नांव होतें. अमरावतीच्या शिल्पांत याच नमुन्याचीं कुंडलें विशेष प्रमाणांत आढळतात. सर्व कुंडलांत मकर-कुंडलें हीं लोकप्रिय व कौशल्याने बनविलेलीं असत. त्यांची जडण-घडण मकराच्या आकृतीची असे. भागवतांत बलिराजाचें वर्णन करतांना—

हेमाङ्गदलसद्बाहुः
स्फुरन्मकरकुण्डलः ।
(८. १५. ९)



कर्णपत्र

असा त्याच्या मकरकुंडलांचा उल्लेख आला आहे. विष्णुमूर्तींच्या कानांतलीं कुंडलें हीं मकरकुंडलेंच असतात. मकरकुंडलांच्याच साच्याचीं मुंबईच्या कोळी स्त्रियांच्या कानांत माशाच्या आकाराचीं कुंडलें आजहि दिसतात. याच प्रकारचें आणखी एक कर्णभूषण म्हणजे कनककमल हें होय. हें वर्तुळाकृति व प्रफुल्ल कमला-प्रमाणे दिसे. कालिदासाने मेघदूतांत त्याचा उल्लेख केला आहे (उ. मे. ११). दक्षिण भारतांतल्या स्त्रिया आजहि अशा प्रकारचीं कनककमलें वापरतात.



मकरकुंडल

याशिवाय आणखी कांही कर्णभूषणें होतीं तीं पुढीलप्रमाणे—

मुक्ताकंटक—मोत्यांची साखळी.

द्विराजिक—भीकबाळी. हिच्यांत दोन मोतीं असून मधला खडा पाच, माणिक, इ. रत्नांचा असे.

त्रिराजिक—तीन मोत्यांची भीकबाळी.

कर्णपूर—फुलाच्या आकाराचीं कुंडलें.

शृंखल—सोन्याची सांखळी. दक्षिणेंतले गवळी असल्या सांखळ्या कानांत घालतात.

कर्णेन्दु—कानांतला चंद्र. हा कानाच्या मागच्या बाजूस घालीत.

कानबाला—याला चक्रवाडी असेंहि म्हणतात. ही मोत्यांची असून कानाच्या वरच्या भागीं घालतात.

महाराष्ट्रांतल्या स्त्रिया जुन्या काळीं वाळ्या, बुगड्या, वेलभोकरें, सोन्यामोत्यांच्या कुड्या, इ. कर्णालंकार वापरीत सांप्रत फक्त कुड्याच तेवढ्या वापरतात.

प्राचीन काळीं हल्लींच्या सारखे दोन्ही कानांत सारखे अलंकार न घालतां एकाच कानांत एखादा अलंकार घालण्याची पद्धत असावी. बाणाने आपल्या कादंबरींत वर्णिलेल्या चांडालकन्यकेच्या एकाच कानांत दंतपत्र होतें.



कर्णालंकार – यांत वलया-ऐवजी चौकोनी दंतपत्रें दिसत आहेत.

नासिकाभूषणें—कालिदास, बाण, इ. संस्कृत कवींनी आपादमस्तक सर्व शरीरा-वरील अलंकारांचें वर्णन केलें असलें, तरी त्यांत नाकांतल्या कोणत्याहि अलंकाराचा उल्लेख नाही. यावरून प्राचीन काळीं नाकांत अलंकार घालण्याची प्रथा नसावी, असें वाटतें. नथ, लवंग, लोलक, चमकी, मोरणी, हे नासि-कालंकार मुसल-मानांच्या संपर्कीतून आले असावे, असा तर्क आहे. अरब स्त्रिया नाकांत नथ व जावलय घालतात. उ. भार-तांत सोन्याच्या तारेचें वलय नाकांत घालण्याचा प्रघात अनेक जातींत आढ-ळतो, तो बहुधा मुसलमानी प्रभावाचा परिणाम असावा. इ. स. १० व्या शत-कापासून नाकांतल्या अलंकारांचे उल्लेख संस्कृत साहित्यांत आढळूं लागतात. द. भारतात तीन प्रकारचे नासिकालंकार आढळतात. मुक्कुकुट्टी, बुलक व नत्तु. मुक्कुकुट्टी हा तिकडील स्त्रियांचा सौभाग्यालंकार आहे.



पंजाबी स्त्रीचा नाकांतला अलंकार

सर्वप्रथम बिल्हण कवि नासिकाभूषणाचा उल्लेख करतो—

नासावंशविनिर्मुक्तमुक्ताफलसनाभिना ।

(विक्रमांकदेवचरित)

शंकराचार्यांच्या त्रिपुरसुंदरीस्तोत्रांत

मद्दत्तामुररीकुरुष्व गिरिजे नासाविभूषामिमाम् ।

हे गिरिजे, मीं दिलेल्या या नासिकाभूषणाचा स्वीकार कर, अशी देवीची प्रार्थना आहे. शंकराचार्यांचा काल ८ वें शतक हा आहे. त्यावरून पाहतां नासिकाभूषणाचा उल्लेख बिल्हणाच्याहि मागे जातो. पण श्री. गोडे यांच्या मतें शंकराचार्यांचे पद्यग्रंथ दुसऱ्या कोण्या तरी शंकराचार्यांचे असून ते ११ व्या शतकांतले आहेत. बहुतेक उल्लेखांत नासिकाभूषण म्हणजे मोती असें म्हटलेलें आहे. नासिकाभूषण हें सोन्याच्या तारेंत मोतीं गुंफून बनवीत. आजमितीस प्रचारांत असलेली महाराष्ट्रांतली नथहि मोतीजडितच असते.



नथ– महाराष्ट्रीय

कंठभूषणें––कंठी वगैरे अलंकारांना पुराणकालांत ग्रैवेयक असें नांव होतें. नाभीपर्यंत लोंबणाऱ्या सोन्याच्या माळेला प्रालंबिका असें म्हणत व ती मोत्यांची असल्यास तिला उरःसूत्रिका म्हणत. हल्ली हांसळी ही लहान मुलांच्याच गळ्यांत घालतात व ती सोन्याची किंवा चांदीची करतात. पण प्राचीन काळीं मोठीं माणसेंहि हांसळी वापरीत. हल्ली स्त्री पुरुष गळ्यांत सोन्याच्या, पोवळ्यांच्या, तुलसीकाष्ठांच्या, रुद्राक्षांच्या किंवा स्फटिकांच्या माळा घालतात. प्राचीन काळीं माळा हा मस्तकावर धारण करण्याचा अलंकार असावा, असें दिसतें. कारण 'माल्यं मालास्रजौ मूर्ध्नि' असें अमरकोशांत म्हटलें आहे. पण मेदिनीकोशावरून वाटतें, की मस्तकावर धारण करायच्या माला या पुष्पमालाच असत. वैदिक ग्रंथांत सुवर्णमालांचा उल्लेख सांपडतो. यज्ञांत उद्गात्याला सुवर्णमालाच द्यावी, असें सांगितलें आहे. गोभिलसूत्रांत आलेल्या 'स्नात्वाऽलंकृत्य' या वचनावरून त्या काळीं स्वर्णमाला कंठांतच धारण करीत, असें दिसतें. मोत्यांच्या एकेरी सराला यष्टिलता किंवा यष्टिका म्हणत. कालिदासाने मोत्यांच्या यष्टीचा पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे ––

क्वचित्प्रभालेपिभिरिन्द्रनीलै-
र्मुक्तामयी यष्टिरिवानुविद्धा ।।

(रघु. १३.५४.)

रत्नावलि हा अलंकार रत्नें, मोत्यें व सुवर्णमणी एकत्र करून बनवीत. याला मणिसोपान असेंहि नांव होतें. याच्या मध्यभागीं मोठा सुवर्णमणि असल्यास त्याला चाटुकार म्हणत.

गळ्यांतला सर्वांत महत्त्वाचा अलंकार म्हणजे हार होय. हाराविषयीं संस्कृत साहित्यांत असंख्य उल्लेख आहेत ––

हारोऽयं हरिणाक्षीणां लुठति स्तनमण्डले ।

(अमरुशतक १००)

अर्थ – हा हार हरिणाक्षींच्या स्तनमंडलावर लोळतो.

पाण्ड्योऽयमंसार्पितलम्बहारः । (रघु. ६. ६०)

अर्थ –– या पाण्ड्य राजाने खांद्यावर लांब हार घातला आहे.



हार–राजांच्या गळ्यांतला

हारांतल्या सरांच्या संख्येवरून त्याला निरनिराळीं नांवें होतीं तीं अशीं –

देवच्छंद — शंभर (किंवा १०८) सरांचा मोत्यांचा हार.

गुच्छ – बत्तीस पदरी हार.

गुच्छार्ध – चौवीस पदरी हार.

गोस्तन – चार पदरी मोत्यांची कंठी.

अर्धहार – बारा पदरी (किंवा सोळापदरी) मोत्यांची कंठी.

माणवक – वीस पदरी मोत्यांची कंठी. भागवतांत विष्णूला 'मायामाणवकं हरिम्' = श्रीहरि हा मायारूपी माणवक धारण करणारा आहे, असें म्हटलें आहे (८. १८. २४).



हार–अनेक पदरी

एकावलि – एक पदरी टपोऱ्या मोत्यांची माळ. कालिदासाने 'लताविटपे एकावली लग्ना' असा या अलंकाराचा उल्लेख विक्रमोर्वशीयांत केला आहे.

नक्षत्रमाला – २७ मोत्यांचा एक पदरी हार किंवा भानुजी दीक्षितांच्या अमरकोशावरील टीकेप्रमाणे ७०० किंवा ८०० मोत्यें असलेला हार.

भ्रामर – मोठ्या मोत्यांची एकपदरी कंठी.

नीललवनिका – पांच, सात, किंवा नऊपदरी मोत्यांची कंठी व तिला जडविलेले पाचेचे लोलक.

वर्णसर – वरीलप्रमाणेच. पाचेऐवजी हिऱ्याचे लोलक.

सारिका – नऊ किंवा दहा मोत्यांची गळ्याबरोबर बसणारी कंठी.

वज्रसंकलिका – वरीलप्रमाणेच; पण मागच्या बाजूस पाचेच्या लोलकाचा गोंडा.

वैकक्षक – यज्ञोपवीतासारखी खांद्यावरून लोंबणारी माळ. अमरावतीच्या शिल्पांत हा अलंकार फक्त स्त्रियांच्याच गळ्यांत दिसतो; पण त्यानंतरच्या शिल्पांत बालसुब्रह्मण्य, बालकृष्ण, इ. बालदेवतांच्या गळ्यांतहि हा अलंकार चढला आहे.

देवंदक – याचेंच दुसरें नांव शतेश्वरी असें आहे.

इंदुच्छंद – याला १००८ पदर असत व तो देवाच्या गळ्यांत घालीत.

विजयच्छंद – पांचशें पदरी हार.

रश्मिकलाप – चौऱ्याण्णव पदरी हार.

मंदर – पांच पदरी हार.

फलकहार –– तीन किंवा पांच पदरी चपटया आकाराच्या रत्नांचा केलेला हार. भारतीय हारांतला हा प्राचीन नमुना आहे. आंध्र, मौर्य व शुंग यांच्या शिल्पांत हा पाहायला मिळतो. हे फलक हारांत सारख्या अंतरावर बसविलेले असत.



हार–पांच पदरी

मोत्यांचा आकार व सख्या यांवरून बहुतेक हारांना नांवें दिलेलीं दिसतात. कांही हारांचीं नांवें मध्यभागीं असलेल्या मोत्यांवरून दिलीं जात. उदा०, शीर्षक, उपशीर्षक, प्रकाण्डक, अवघटक, तरलप्रतिबंध इत्यादि.



फलक हार

विष्णूच्या किंवा श्रीकृष्णाच्या गळ्यांतल्या हाराला वैजयंती म्हटलें आहे. या हाराला पांच पदर असतात व ते सृष्टींतील पंचतत्त्वांचे प्रतिनिधि मानले जातात.



हार–आधुनिक

याशिवाय चंद्रहार, एकदाणी, सरी, ठुशी, पोत, पेटी, तन्मणी, लफ्फा, वज्रटीक, सांखळी, राकडी, मोहनमाळ, बोरमाळ, इ. (विशेषत: स्त्रियांचे) गळ्यांत घालायचे कित्येक अलंकार आहेत.

अंगुलिभूषणें – अंगुरीय, अंगुलीय, ऊर्मिका हीं एकाच अलंकाराची नांवें आहेत. हा अलंकार हाताच्या बोटांत घालण्याचा आहे. सांप्रत या अलंकाराला मोहोर म्हणतात. मोहोर म्हणजे अंगुलिमुद्रा होय. नंदाचा अमात्य राक्षस याची मोहोरेची अंगठी दुसऱ्याच्या हातांत गेल्यामुळे त्याचे सगळे बेत फसले, अशी कथा मुद्राराक्षस नाटकांत आहे. दुष्यंताने शकुंतलेला दिलेली अंगुलिमुद्रा तिच्या हातून हरवली व पुढे तिच्या दुःखाला कशी कारणीभूत झाली, ती कथा शाकुंतल नाटकांत आलेली आहे.

पुरातन काळापासून आपल्या देशांत अंगठ्या घालण्याची चाल आहे. श्राद्धाच्या वेळीं यजमान दर्भाचीं पवित्रकें घालतो, त्यासुद्धा एक प्रकारच्या अंगठ्याच असें म्हटलें पाहिजे. कित्येक धार्मिक लोक आपल्या बोटांत विशिष्ट प्रकारची गांठ असलेलें सोन्याचें पवित्रक कायमचें घालून ठेवतात. तर्जनींत (अंगठ्याजवळील बोट) सोन्याची अंगठी घालावी व अनामिकेंत (करंगळीजवळील बोट) रुप्याची अंगठी घालावी, असा धार्मिक संकेत आहे. संस्कृत साहित्यांत अंगठीचे अनेक प्रकार पुढीलप्रमाणे वर्णिलेले आहेत —

द्विहीरक – दोन बाजूंस दोन हिरे व मध्यें पाचूचा खडा मिळून बनविलेली अंगठी.

त्रिहीरक – मध्ये मोठा हिरा व दोन बाजूंस दोन लहान हिरे अशी बनविलेली अंगठी.

वज्र – त्रिकोणाकृति कोंदणांत बसविलेल्या हिऱ्याची अंगठी.


रविमंडळ – मध्ये इतर रत्नें व त्यांच्याभोवती हिरे अशा प्रकारची अंगठी.

नंद्यावर्त – चौकोनी कोंदणांत बसविलेल्या रत्नांची अंगठी.

वज्रवेष्टक – कोंदणाभोवती हिरे असलेली अंगठी.

सूक्तिमुद्रिका – नागफणीच्या आकृतीच्या कोंदणांत रत्नें जडविलेली अंगठी. (अंगठी पाहा.)

बाहुभूषणें – दंडांत घालण्याच्या दागिन्यांत अंगद व केयूर हे दोन दागिने प्रमुख आहेत. हीं भूषणें स्त्री-पुरुष दोघेहि वापरीत. हे अलंकार रत्नजडित सुवर्णाचे असत. यांतल्या कांहीचा आकार लतेसारखा व कांहीचा मकरासारखा असून वरची बाजू टोंकदार असे. म्हणून हे अलंकार घालणारी व्यक्ति त्याचें वरचें टोंक आपल्या उत्तरीय वस्त्रांत अडकणार नाही, अशी काळजी घेई. कांहीच्या दोन्ही तोंडांस सिंहाचें किंवा अन्य कोणत्या तरी पशूचें मस्तकहि घडविलेलें असतें. केयूर हा अलंकार जडावाचा केलेला असतो. तो मुख्यत्वें उजव्या दंडांत घट्ट बसवितात. केयूराला लोंबता गोंडा असतो. तो नसला, की त्याला अंगद म्हणतात. पुरुषाने वापरलेल्या अंगदाचा उल्लेख कालिदासाने केला आहे – 'संघट्टयन्नङ्गदमङ्गदेन' (रघु. ६. ७३). बाणभट्टाच्या कादंबरींत शूद्रक राजाच्या दंडांत केयूर असल्याचें सांगितलें असून त्यावर सर्पाची उत्प्रेक्षा केलेली आहे. याशिवाय पंचका व कटक अशा दोन बाहुभूषणांचाहि उलेख मिळतो. पंचकामध्ये पुष्कळ ताईत व पेटचा असतात. कटक ही चौकोनी जडावाची सुवर्णपेटी असते. चौरपंचाशिकेंत 'आबद्धहेमकटकां रहसि स्मरामि' म्हणजे जिने सुवर्णांचे कटक दंडांत बांधले आहेत, अशा स्त्रीचें (प्रेयसी) मी स्मरण करतों, असा उल्लेख आहे (१५).




केयूर

मनगटांत धारण करण्याच्या अलंकारांना आवापक, पारिहार्य व वलय अशीं नांवें आहेत. वलय म्हणजे सोन्याचीं सलकडीं किंवा बायकांचे गोठ होत. वलयांत फलकवलय नांवाचा एक प्रकार असून त्यांत चपट्या आकाराचीं रत्नें जडवलेलीं असत. असें शिल्प अमरावतीच्या स्तूपांत आढळतें. वलयाचा कनकवलय म्हणून कालिदासाने दोन ठिकाणीं उल्लेख केला आहे. मेघदूतांतल्या विरही यक्षाचें कनकवलय गळून पडल्यामुळे मनगट रिकामें झालें होतें. दुष्यंताच्या विरहावस्थेमध्ये त्याचें कनकवलय सारखें कोपरापर्यंत जात असे. 'कनकवलयं स्रस्तं स्रस्तं मया प्रतिसार्यते।'



बाहुभूषण–खजुराहो

वलयाच्या खाली कंकणें घालतात. 'कंकणं करभूषणम्' असें अमरकोशांत म्हटलें आहे. संस्कृत साहित्यांत कंकणांचा वारंवार उल्लेख येतो. लग्नांत वधूवर एकमेकांच्या हातांत बांधतात, तें कंकण सुताचें असतें; म्हणूनच मेदिनीकोशांत कंकण शब्दाचे करभूषण, मंडन व सूत्र असे तीन अर्थ दिलेले आहेत. चूड व अर्धचूड हे कंकणाचेच प्रकार आहेत. चूड म्हणजे सोन्याच्या तारेचें स्थूल कंकण व अर्धचूड म्हणजे तसेंच बारीक कंकण होय. चूड यालाच मराठींत चुडा म्हणतात. बंगालमध्ये शंखांचे चुडे आजहि वापरतात. त्याच प्रदेशांत बाहुति नामक एक सलकड्यांचा प्रकार रूढ आहे. काचेच्या, शंखांच्या, सोन्याच्या किंवा पितळेच्या बांगड्या हा भारतांत सर्वत्र वापरला जाणारा स्त्रियांचा अलंकार आहे. उत्तर भारतांतल्या अनेक जातींत कांश्याच्या बांगड्या वापरतात. बांगड्यांचा धंदा करणाऱ्या वर्गाला मराठींत कांसार असें म्हणतात. हाच शब्द तांबट जातीलाहि लावण्यांत येतो. त्यावरून अशी कल्पना होते, की पूर्वीं तांबट लोक कांश्याचीं भांडीं व बांगड्या करीत असावे व त्यामुळे कांसार हा शब्द बांगड्या व भांडीं बनविणाऱ्या दोन्ही जातींस चिकटला असावा.




हस्तभूषणें–प्राचीन

कटिभूषणें – स्त्री आणि पुरुष यांच्या कमरेंत घालायच्या दागिन्यांचे अनेक प्रकार आहेत.

कांची – सोन्याची एक पदरी सांखळी.

एतावता नन्वनुमेयशोभि काञ्चीगुणस्थानमनिन्दितायाः ।। (कु. सं. १. ३७)


मेखला

या श्लोकार्धांत कालिदासानें उमेच्या कटीला 'कांची गुणस्थान' = कांची नामक अलंकार घालायची जागा, असें म्हटलें आहे.

मेखला –– सोन्याची आठ पदरी सांखळी

स्मरसि स्मर मेखलागुणैरुत गोत्रस्खलितेषु बन्धनम् ।। (कु. सं. ४. ८)

अर्थ – हे मदना, नांव घेतांना चूक झाल्यामुळे मी मेखलेच्या पदरांनी तुला बांधलें, ही गोष्ट तूं स्मरतोस काय ?

या श्लोकांत कालिदासाने मेखलेला अनेक पदर असतात, याचीहि सूचना दिली आहे.



कमरपट्टा

रस (श) ना –– सोळा पदरी कमरपट्टा.

रसतु रसनापि तव घनजघनमण्डले । (गीतगोविंद १०)

या जयदेव वचनांत रसना हा ध्वनि उत्पन्न करणारा अलंकार असल्याचें सूचित होतें.

रसनेला बारीक धागऱ्या लावीत असावे. सोन्याच्या तारेंत मणि ओवून हा अलंकार बनवीत. जुन्या मूर्तींच्या कमरेंतहि असा सूत्रमणियुक्त अलंकार दिसतो. याचा उपयोग वस्त्र संभाळण्याकरितां नसून केवळ शोभेकरितां असावा.


अनेक पदरी करदोटा

कलाप – पंचवीस पदरी कटिबंध.

कांचीदाम –– चार बोटें रुंदीचा गोंडे व घुंगुर असलेला सोन्याचा पट्टा.

पुरुषांच्या कटिभूषणाला शृंखला म्हणत. याशिवाय सारसन असेंहि एक कटिभूषणाचें नांव आहे. तें स्त्री व पुरुष दोघेंहि वापरीत असावे.

चरणालंकार – हेहि अनेक आहेत––


पादचूड – रत्नजडित सुवर्णाचा वाळा.

पादकंटक – चौकोनी तीन शिरांचा सोनेरी वाळा. यांतून ध्वनि निघावा म्हणून आंत दाणे घातलेले असत.

पादपद्म ––तीन किंवा पांच सोनेरी सांखळ्यांचा जडावाचा दागिना. बंगालमध्ये चरणपद्म या नांवानें आजहि तो प्रचारांत आहे. हा चांदीचा केलेला असतो.

किंकिणी –– यालाच मराठींत पैंजण असें म्हणतात.

नूपुर –– हा पायांतला सर्व प्रसिद्ध अलंकार होय. नूपुर म्हणजे चाळ. हे पूर्वी सोन्याचे करीत. अलीकडे चांदीचे किंवा पितळेचेहि करतात. अलिकडे नर्तकी स्त्रियाच पायांत चाळ बांधतात; पण प्राचीन काळीं गरती स्त्रियाहि हा अलंकार वापरीत. सीतेच्या पायांतहि नूपुर होतें, हें रामायणावरून कळतें. उद्‌भट म्हणतो की–


नूपुर


गुणवानपि मौखर्यात् पादे लुठति नूपुरः ।

अर्थ–गुण (सूत्र) वान् असूनहि सतत शब्द करीत राहिल्यामुळे नूपुर पायांत लोळतो.

याशिवाय मंजीर नांवाचा आणखी एक चरणालंकार होता. तो रवीला गुंडाळलेल्या दोरीसारखा असे व बायका तो आपल्या पायांना बांधीत. अमरावतीच्या शिल्पांत मंजीराचा नमुना आढळतो.

मुखरमधीरं त्यज मञ्जीरम् । (गीतगोविंद)

या श्लोकांत मंजीर हा अलंकारहि नूपुराप्रमाणेच नाद उत्पन्न करणारा असल्याचें कळतें. तुलाकोटी या अलंकाराचीं दोन्ही टोकें मोठ्या आकाराचीं असतात. तोरड्या चांदीच्या असतात. पासुली या पायांत घालायच्या अंगठ्या होत.


वाळे

सौभाग्यालंकार –– कांहीं अलंकार केवळ सुवासिनींनीच वापरायचे असतात. त्यांना सौभाग्यालंकार असें नांव आहे. यांत मंगळसूत्र हा अलंकार महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांत

प्रचारांत आहे. दक्षिणेंत अशाच प्रकारचा ताळी नांवाचा अलंकार असतो. ताळी व मंगळसूत्र हे दोन्ही अलंकार लग्नांत वर आपल्या वधूच्या गळयांत बांधतो. काळी पोत वाखाच्या दोऱ्यांत किंवा सोन्याच्या तारेंत गुंफून मंगळसूत्र तयार करतात. त्याच्या मधोमध एक मणि असतो. त्याला सौभाग्यमणि म्हणतात. मण्याच्या दोही अंगीं सोन्याच्या दोन बारीक वाटचा असतात. त्या चंद्रसूर्यांचीं प्रतीकें होत. 'यावच्चन्द्रदिवाकरौ' वधूचें सौभाग्य शाश्वत राहावें, असा त्या मंगळसूत्राचा गर्भितार्थ आहे. गाथासप्तशतींत याला कनकदोरा असें म्हटलेलें आहे. कानांतला तालपत्र हा अलंकारहि सौभाग्याचें प्रतीक मानीत. त्या अलंकारावरून तो वापरणाऱ्या स्त्रीचा पति हयात आहे, असें समजत.

नाकांतली नथ व पायांतले जोडवीं, गेंद, विरोल्या, मासोळचा हे अलंकारहि सौभाग्यालंकारांतच गणले जातात. वर चुडचाचा उल्लेख आलेला आहे. लग्नाच्या वेळीं वधूच्या हातांत ज्या बांगडचा भरतात, त्यांना वज्रचुडा असें नांव आहे. उत्तर भारतांत काच व लाख यांच्या बांगडचा हा सौभाग्यालंकार समजतात.

बाळलेणीं — लहान मुलांच्या अंगावर घालण्याच्या दागिन्यांचा एक वर्ग आहे. यांत बिंदल्या, मनगटचा, ताईत, गांठलें, वाघनख, हांसळी, मोडवांकी, पिळाचे वाळे, चाळ, कडचा, हाताच्या बोटांतल्या पांच अंगठचा व त्यांना जोडून केलेला विंचू, डूल, करदोटा, इ. अलंकारांचा अंतर्भाव होतो.

मुसलमानी स्त्रियांचे दागिने बरेचसे हिंदु स्त्रियांच्या अलंकारांच्या धर्तीवरच असतात. त्याचीं कारणें दोन असावीं. एक म्हणजे, बरेचसे मुसलमान मूळ हिंदु असल्यामुळे हिंदूंचे अलंकार त्या समाजांत शिरले व दुसरें म्हणजे, परकी अस्सल मुसलमानांनीहि हिंदूंच्या बहुविध अलंकारांचें अनुकरण केलें. पारशी स्त्रियांचे दागिने विविध प्रकारचे नसतात. पण ते सोनें, मोत्यें व रत्नें यांचे असल्यामुळे अधिक मूल्यवान् असतात. कान, हात व गळा या तीनच ठिकाणीं पारशी स्त्रिया दागिने घालतात. सोन्यापेक्षाहि त्यांचा हिरे, मोत्यें यांवर विशेष भर असतो.

(२) (इ. स. १२ वें शतक) काश्मीरच्या जयसिंह राजाचा दिवाण व पंडित. याचा श्रीकंठचरित्र हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. मंख कवीचा हा बंधु होय. [म. च. को.]

(३) संगीतांत वापरला जाणारा एक शब्द. त्याचा अर्थ स्वरांचा कलात्मक व सुंदर समुच्चय असा आहे. स्थायी, आरोही, अवरोही व संचारी, अशा स्वरांना धरून अलंकार बनत असतो. अलंकारांमुळे संगीताला शोभा येते. वायुपुराणांत संगीतांतल्या अलंकारांचे उल्लेख येतात. आधुनिक संगीतांत अलंकारांविषयीं स्वतंत्र वर्णन आढळत नाही. कारण आजमितीस अलंकार हे गमकांत अंतर्भूत झालेले आहेत. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अलंकारधारण अश्विनी, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, रेवती हीं नक्षत्रें व रवि, मंगळ, गुरु, शुक्र हे वार असतां स्थिरलग्नीं मोत्यें, सोनें, पोवळें, मणी, हस्तिदंत, इ. अलंकार धारण करावे; म्हणजे ते सुख व भाग्य देणारे होतात. दुष्टवारीं, दुष्ट-नक्षत्रीं धारण केले असतां क्लेशावह होतात.

अलंकारमंडप देवालयाला लागून असलेली खोली किंवा जवळच असलेला मंडप. या ठिकाणीं देवाच्या उत्सवमूर्तीला वस्त्राभरणें चढवितात. [एन्सा. इं. आ.]

अलंकारसंप्रदाय 'शब्दार्थभूषणमनुप्रासोपमादिः' = शब्द व अर्थ यांना भूषणभूत होणारे अनुप्रासादि प्रकार म्हणजे अलंकार होत (न्यायकोश). 'काव्यशोभाकरो धर्मः' = काव्याला शोभा देणारा धर्म, अशी दुसरी व्याख्या आहे. संस्कृत साहित्यशास्त्रांत रससिद्धान्ताची प्रतिष्ठापना होण्यापूर्वी कांही साहित्यशास्त्रज्ञ अलंकारालाच काव्याच्या उत्कृष्टतेचें प्रमुख साधन मानीत असत. अलंकारसंप्रदाय म्हणजे काव्यांत अलंकारालाच श्रेष्ठत्व देणारा संप्रदाय होय. या संप्रदायाचा संस्थापक भामह असून त्याचे पोषक उद्भट आणि रुद्रट हे दोघे आहेत. उद्भटाने भामहाच्या अलंकारांना व्यवस्थित स्वरूप दिलें. दंडीलाहि कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत अलंकारांची प्रधानता मान्य होती. या संप्रदायाच्या मतें अलंकार हा काव्याचा प्राण आहे. ज्याप्रमाणे अग्नीला उष्णतारहित कल्पितां येत नाही, त्याचप्रमाणे काव्यालाहि अलंकाराविना काव्यत्व नाही. रमणीचें मुख सुंदर असलें तरी अलंकारावांचून त्याची प्रभा जशी फाकत नाही, त्याचप्रमाणे प्रकृत रूपांत वाणीला चारुता प्राप्त होत नाही. भामहाने वक्रोक्ति हा अलंकारांचा पाया मानला आहे.

सैषा सर्वैव वक्रोक्तिरनयाऽर्थो विभाव्यते।
यत्नोऽस्यां कविना कार्यः कोऽलङ्कारोऽनया विना ।।
(काव्यालंकार २. ८५)

अर्थ — वक्रोक्ति हीच सर्व कांही आहे. हिने अर्थ विशेषत्वाने प्रकाशित होतो. हिच्यासाठी कवीने प्रयत्न करावा. वक्रोक्तीवांचून अलंकार कुठला ?

भामहाने शब्दालंकारांपेक्षा अर्थालंकारांवर विशेष भर दिला आहे. उद्भट हा भामहाचा टीकाकार. उद्भटाने आपलीं लक्षणें भामहावरच आधारलीं; पण त्यांचें स्वरूप अधिक नोटनेटकें केलें. त्याने अलंकारांना दिलेलें शास्त्रीय स्वरूप उत्तरकालीं मम्मटालासुद्धा उचलावेंसें वाटलें. त्याच्यानंतरचे बहुतेक सर्व आलंकारिक आपलीं मतें मांडतांना उद्भटाची दखल घेतल्यावांचून पुढे जाऊं शकत नाहीत. अलंकारांच्या विकासांत दंडीलाहि मोठें श्रेय आहे. दंडीने ३५ अर्थालंकारांचें विवेचन केलें आहे. रुद्रटाचें अलंकारविवेचन सूक्ष्म आणि महत्त्वपूर्ण आहे. शब्दार्थरूपाने अलंकारांचे जे दोन भेद पडले, त्यांची पार्श्वभूमि रुद्रटाने दिली आहे. त्याने एकूण ६८ अलंकारांचें वर्णन केलें आहे. या संप्रदायाच्या आचार्यांनी अलंकारांचें वर्गीकरण करतांना त्यांच्या मूलतत्त्वांचाहि विचार केला आहे. त्यांच्या विभागासाठी कांही सिद्धान्तहि निश्चित केलेले आहेत. अलंकारांच्या वर्गीकरणाचें वैज्ञानिक स्वरूप सर्वप्रथम रुद्रटाच्या काव्यालंकारांत दिसतें. याच विषयांत रुय्यक व विद्याधर यांचें निरूपणहि तर्कशुद्ध, मूलगामी आणि वैज्ञानिक आहे. रुद्रटाने औपम्य, वास्तव, अतिशय व श्लेष यांना अलंकारांचें मूळ मानलें आहे. विद्याधराने आपल्या एकावलि या ग्रथांत औपम्य, विरोध, तर्क इत्यादींना अलंकारांचे मूलविभेदक मानून तो विषय सुंदर रीतीने प्रतिपादिला आहे. वामनाचें अलंकारविवेचनहि वैशिष्टयपूर्ण आहे. त्याने उपमेचाच प्रामुख्याने प्रपंच केला असून, उपमेच्या मर्यादाहि बरोबर ओळखल्या आहेत.

अलंकारांचा विकास हळूहळू होत गेलेला दिसतो. भरताच्या नाटयशास्त्रांत अनुप्रास, उपमा, रूपक व दीपक या चारांचाच निर्देश आहे. यांतला अनुप्रास हा शब्दालंकार असून बाकीचे तीन अर्थालंकार आहेत. अलंकारांची संख्या वाढत गेली, त्याचबरोबर त्यांच्या स्वरूपांतहि फरक पडत गेला आहे. त्यांतल्या वक्रोक्ति अलंकाराचें क्रमशः विकसित स्वरूप अभ्यासण्याजोगें आहे.

या संप्रदायांतल्या कित्येक आचार्यांनी प्रतीयमान (व्यंग्य) अर्थाचें महत्त्वहि स्वीकारलें आहे. त्यांनी ध्वनि व प्रतीयमान अर्थ यांना काव्याचें मूलतत्त्व मानलें नाही; पण समासोक्ति. अप्रस्तुतप्रशंसा, आक्षेप, यांच्यामध्ये प्रतीयमान अर्थाच्या अनेक प्रकारांचा समाहार केला आहे.

अलंकारमताच्या आचार्यांना रसतत्त्व अज्ञात नव्हतें; पण त्यांनी रसाला स्वतंत्र स्थान न देतां त्याला एक अलंकारविशेष म्हणूनच स्वीकारलें आहे. भामहाने रसवत्, प्रेय, ऊर्जस्वी व समाहित या चार अलंकारांच्या अंतर्गत रस आणि भाव यांचा समग्र विषय समाविष्ट केला आहे. रुद्रटाने अलंकारांबरोबरच रसाचेंहि विवेचन केलें आहे. ‘काव्य रसयुक्त असावें, अन्यथा रसिक काव्यापासूनहि विन्मुख होतील,’ असें तो म्हणतो. रुद्रटाच्या रसविवेचनाने शब्दार्थ व रस हे समोरासमोर आले. त्याने रससंख्या दहा मानली असली, तरी तिला मर्यादा घातली नाही. दंडीहि रसवत् अलंकाराशीं परिचित आहे. त्याने आठ रस आणि आठ स्थायीभाव यांचा निर्देश केला आहे. त्याचप्रमाणे ध्वन्यर्थालाहि समासोक्ति, आक्षेप, इ. अलंकारांत त्याने समाविष्ट केलें आहे. भामह, रुद्रट व दंडी यांनी काव्यांत अलंकारांचें जें महत्त्व प्रतिपादिलें, तें कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत पुढच्या कालांतहि मान्यता पावलें आहे. **पाहा** – अलंकार [सं. सा. इ.; हिं. सा. को.; भा. सा. शा.]

अलख या संप्रदायाचा विष्णुगर्भपुराण नांवाचा एक ग्रंथ ओरिया भाषेंत आहे. त्यांत अलखमहिमा वर्णिलेला आहे. अलखिया साधु स्वतःला रहस्यदर्शी व योगी समजतात.

अलखगीत नाथपंथी जोगी भिक्षा मागतांना जीं गीतें गातात, त्यांना अलखगीत म्हणतात. या गीतांतून गोपीचंद, भरथरी, गोरख व मैनावती यांच्या कथा वर्णित असतात. हीं गीतें निर्गुणभावाचीं द्योतक असतात. [हिं. सा. को.]

अलखधारी एक पंथ. भारताच्या वायव्य प्रदेशांत विशेषें करून अंबाला जिल्ह्यांत या पंथाचे लोक आहेत. हे जातीने चर्मकार असून स्वतःला लालबेगचे अनुयायी म्हणवितात. लालबेगला शिवाचा अवतार मानतात. यांचा मूर्तिपूजेवर विश्वास नाही. ते कोणत्यातरी अलख (अलक्ष्य) तत्त्वाचें ध्यान करतात. त्यांच्या मतें या दृश्य जगाव्यतिरिक्त परलोक नांवाचें स्थान नाही. या जगालाच ते महत्त्व देतात आणि इथेच अहिंसा, परोपकार, इ. सद्गुण अंगीं बाणवून सात्त्विक जीवन व्यतीत करावें, असें मानतात. हे सामाजिक भेद मानीत नाहीत. **पाहा**– लालबेग. [उ. भा. सं. प.]

अलखनामी एक धार्मिक पंथ. हा शब्द अलक्ष्य + नाम या संस्कृत सामासिक शब्दापासून बनला आहे. अलखगीर असेंहि याचें दुसरें नांव आहे. दसनामी गोसाव्यांतल्या पुरी नांवाच्या पोटविभागाला अलखनामी किंवा अलखिया असें म्हणतात. त्याचा अर्थ अलखाचा अनुयायी असा

होतो. या पंथाची स्थापना बिकानेरच्या एका चांभार जातीच्या पुरुषाने केली. पुढे त्याच्या अनुयायांनी त्याला लालगीर अशी पदवी दिली. हे लोक कांबळीचा लांब चोगा वापरतात. डोक्यावर उंच निमुळती टोपी घालतात. भिक्षा हें यांचें निर्वाहसाधन होय. भिक्षेसाठी हे लांब कटोरा वापरतात. 'अलख कहो' किंवा 'अलख को जागो' असा उद्घोष करून भिक्षा मागतात. लगेच भिक्षा वाढली तर घेतात, नाही तर पुढच्या घरीं निघून जातात. शांत आणि निरुपद्रवी असा हा भिक्षेकऱ्यांचा वर्ग आहे. यांचा संबंध शैव पंथाशीं येतो.

लालगीर याचा निश्चित काळ सांगतां येत नाही. तसेंच या पंथाचें तत्त्वज्ञान केव्हा निश्चित झालें, तेंहि सांगणें कठिण आहे. अलखनामींना मूर्तिपूजा मान्य नाही. परमेश्वराचें स्वरूप अलक्ष्य अर्थात् अगम्य, अगोचर आहे, हा त्यांचा सिद्धान्त आहे. त्यामुळे अलखाच्या केवळ नामस्मरणांत त्यांची उपासना सांठविलेली असते. याशिवाय दानधर्म करणें, मद्य-मांस न खाणें, अहिंसा पाळणें व वैराग्यवृत्तीनें वागणें, हे या पंथाचे सामान्य नियम आहेत. हे परलोक मानीत नाहीत. 'शरिराबरोबर सर्व कांही नाश पावतें व शेवटीं शरीरहि महाभूतांत विलीन होतें; त्यामुळे सुख-दुःख हें मनुष्याला या ठिकाणीं याच जन्मांत भोगावें लागतें,' असें लालगीरचें मत होतें. लालगीरचीं मतें बौद्ध धर्माशीं बरींच जुळतात. **पाहा**—गोसावी.

अलख बुलाखी (१९ वें शतक, पूर्वार्ध) शांकर मतानुयायी गुजराती कवि. याने गुजरातींत पुष्कळ कविता केली असून याला तिथल्या लोकांत मान्यता आहे. सद्‌गुरु म्हणून ते त्याच्या पादुकांची पूजा करतात. [म. ज्ञा. को.]

अलगर तमिळनाड मधला एक देव. **पाहा**—मीनाक्षी.

अलगर कोविल मदुराई जिल्ह्यांतलें एक विष्णूचें देवस्थान. हें मदुरेच्या ईशान्येस १२ मैलांवर आहे. हें स्थान फार प्राचीन आहे. प्राचीन काळीं तिथे एक कडेकोट नगर वसलेलें होतें. तिरुमल नायकाच्या राजवाड्याचे अवशेषहि तिथे दिसतात. देवळाच्या आसपास अनेक मंडप असून त्यांवर सुंदर कोरीव काम आहे. कल्लर व इतर चोर लुटारू यांची ही कुलदेवता आहे. या देवाच्या उत्सवांत रथ ओढण्याचा मानहि कल्लरांचाच असतो. जुन्या काळीं ते लोक आपल्या लुटींतला कांही भाग या देवास अर्पण करीत. आदि महिन्याच्या अमावास्येस इथे मोठी यात्रा भरते. हें देवस्थान जागृत असल्याचें सांगतात. खोटी शपथ घेणारा मनुष्य तिथल्या करुप्पन द्वारामधून गेला, तर तो मरतो, अशीहि समजूत आहे.

अलगूज बांसरीच्या वर्गातलें एक वाद्य. हें बांबूचें करतात. बांबूचा सुमारें दीड वीत लांबीचा पोकळ तुकडा घेतात. त्याची एक बाजू पेराची असते व त्यामुळे ती सहजच बंद असते. तिला बारीक छिद्र पाडतात. दुसऱ्या बाजूस तिरकस खाप देऊन पायरी करतात. ती आडवी चिरून त्या छेदांत बारीक पाचरीच्या आकाराची गाबडी बसवितात. म्हणजे ती आयतीच पिपाणी बनते. या पिपाणीपासून चार बोटांवर खापाच्या विरुद्ध अंगास चौकोनी छिद्र करून तें थोडेंसें मोकळें राहील, अशा बेताने एक गाबडी बसवितात. त्यामुळे पिपाणींतून फुंकलेला वारा या चौकोनी छिद्रावर आदळतो. चौकोनी छिद्रापासून चार बोटांच्या अंतरावर वाटाण्याच्या आकाराचीं समांतर आठ छिद्रें सळई तापवून तिच्या साह्याने पाडतात मग या छिद्रांवर बोटें ठेवून व वर उचलून इष्ट स्वर काढतां येतो. अलगूज म्हणजे लहानशी सनईच होय. सनईप्रमाणे अलगूजहि उभें धरून वाजवितात. कांही ठिकाणीं दोन अलगुजें एकत्र जोडून तीं जोडीने वाजवितात. जोड अलगुजांत सात छिद्रें असलीं, तरी त्यांतलीं फक्त चारच (सा रे ग म) उघडीं ठेवून बाकीचीं मेणाने बंद करतात. **पाहा**—बांसरी.



अलगूज

अलद्राव्रत अतिवृष्टि थांबविण्यासाठी एक विधि. त्या दिवशीं गांवांत कोणीहि स्वयंपाक, धुणेंपाणी इ. गृहकृत्यें करीत नाहीत. आदल्या दिवशीं शिजवून ठेवलेलें अन्न खातात. मेघराजाशीं हा एक प्रकारचा असहकारच असतो. देव जसा उपचारांनी फलप्रद होतो, तसाच तो प्रसंगविशेषीं त्याच्याशीं असहकार केल्यानेहि इष्ट फल देतो, अशी लोकधारणा आहे.

अलबेलि अलि सखीसंप्रदायांतली एक कवयित्री. (मात्र कांही संशोधक हा पुरुष असावा कीं काय अशी शंका दर्शवितात.) अलबेलि अलिग्रंथावलि, गुसाईजीका मंगल व विनयकुंडलिया असे हिचे तीन ग्रंथ उपलब्ध झाले

आहेत. हिने शुद्ध ब्रजभाषेचा उपयोग केला आहे. तिच्या 'कुंडलिया'चा एक नमुना–

जागत नैनन में रहौ सोवत सपने माँहि।
चलत फिरत इक छिन कहँ अन्तर परिहै नाँहि।
अंतर परिहै नाँहि निरखि तुव वदन किशोरी।
प्रेम छके दिन रैन रहे दृग चन्द चकोरी।।

अर्थ– हे किशोरी! मी जागी असेन तेव्हा तूं माझ्या डोळ्यांत वास्तव्य कर. मी झोपी गेल्यावर माझ्या स्वप्नांत वावरतांना देखील एका क्षणाचाहि तुझा वियोग होऊं नये, तुझें रूप पाहण्यांत एका क्षणाचाहि खंड पडूं नये व चंद्र–चकोर न्यायाप्रमाणे माझे डोळे रात्रंदिवस प्रेमानंदांत मग्न राहावे. [म. हिं. क.]

अलम इस्लामी ध्वज. पैगंबराच्या काळीं काळें व पांढरें अशीं दोन्ही रंगांचीं निशाणें वापरीत. पुढे पंथ भिन्न झाले व शियापंथी हिरवें निशाण वापरूं लागले व सुन्नींनी पांढरा रंग कायम ठेवला. कॉन्स्टंटिनोपल या शहरांत मुहंमदाचें म्हणून एक निशाण जतन करून ठेवलें आहे, तें चौपदरी रेशमी असून त्याचा एक पदर हिरवा आहे. इस्लामी निशाणाचा मूळ रंग मात्र काळा असावा, असें मानतात. [डि. इ.]

अलमखान मराठी भाषेचा मुसलमान कवि. याचा काळ निश्चितपणें कळत नाही; पण त्याच्या भाषेवरून तो अडीचशें वर्षांपूर्वीचा असावा, असें वाटतें. [म. सा.]

अलमोडा कुमाऊं प्रदेशांतील ईशान्येकडचा जिल्हा. या जिल्ह्यांतील अल्पसा भाग वजा केल्यास बाकीचा सर्व प्रदेश हिमालयांत आहे. या पर्वताच्या ओळी निरनिराळ्या व स्पष्ट दिसतात. यांतून सिंधु, सतलज या नद्या उत्तरेस व काली नदी दक्षिणेस उगम पावते. कालीला पुढे गौरीगंगा, धवलगंगा, सरयू, रामगंगा, गोमती, लहुवती व लढिया या नद्या भेटतात.

महाभारतांत या पर्वतामधील पुष्कळ स्थळांचें वर्णन आलें आहे. इथे ब्रह्मपुर नांवाचें राज्य होतें. या राज्याभोवती हिमाच्छादित डोंगर होता. पूर्वीं इथे कत्यूरी नांवाच्या घराण्यांतले राजे राज्य करीत होते. त्यानंतर चंद राजे आले. चंदांचें राज्य इ. स. १७४४ पर्यंत इथे होतें. पुढे कांही काल अली अहमदखान रोहिला याने अलमोडा भाग जिंकून घेतला होता. १८१५ सालीं हा भाग ब्रिटिशांच्या ताब्यांत गेला. [म. ज्ञा. को]

अलवण त्रिवांकुर (कोचिन) मधली मीठ तयार करणारी जात. सुमारें चार शतकांपूर्वी पांड्य देशांतून सात अलवण कुटुंबें त्रिवांकुरच्या मिठागरांत काम करण्यासाठी आणलीं गेलीं व त्यांची ही जात बनली, अशी आख्यायिका सांगतात. हे लोक तमिळ बोलतात, मांस खातात, पण मद्य वर्ज्य मानतात. शास्ता व भद्रकाली या यांच्या कुलदेवता होत. यांना पूर्वी मंदिरप्रवेश बंद होता. हे पूर्वीं मृतांना पुरीत; पण अलिकडे कांही लोक त्यांचें दहन करतात. यांच्यांत गोंदून घेण्याची चाल सार्वत्रिक आहे. [का. ट्रा. स. इं.; म. ज्ञा. को.]

अलवणतृतीया तिथिव्रत. हें केवळ स्त्रियांसाठी आहे. वैशाख, भाद्रपद किंवा माघ शु. ३ या; ही याची तिथि होय. २ येस उपवास व ३ येस गौरीची पूजा व मीठ वर्ज्य करून भोजन, असा याचा विधि आहे. हें व्रत आयुष्यभर केलें तरी चालतें. [हि. ध.]

अलसा एक शक्तिदेवता. [ब्रह्मांड पु. ४. २७. ३८]

अलक्ष्मी (लक्ष्मी नव्हे ती.) समुद्रमंथनप्रसंगीं कालकूटानंतर पण लक्ष्मीच्या आधी ही समुद्रांतून वर आली. म्हणून हिला लक्ष्मीची थोरली बहीण अतएव 'ज्येष्ठा' म्हणतात. महाराष्ट्रांत हिला आक्काबाई असें नांव आहे. अलक्ष्मी म्हणजे दारिद्र्य, दैन्य आणि आपदा. समुद्रांतून वर आल्यावर हिने विचारलें, की 'मी कुठें राहूं?' त्यावर देवांनी तिला सांगितलें, की 'तूं कोळसा, कोंडा व केस यांत राहा. ज्या घरांत कलह, अभक्ष्य भक्षण, गुरु, देव व अतिथि यांचा अपमान, असत्य भाषण, द्यूत, इ. अधार्मिक गोष्टी चालत असतील, तीं तुझीं विहारस्थानें होतील.'

पुढे लक्ष्मी उत्पन्न झाली व तिचें विष्णूशीं लग्न ठरलें. पण थोरल्या बहिणीचें लग्न झाल्यावांचून धाकटीचें करणें धर्मसंमत नसल्यामुळे लक्ष्मीच्या लग्नाला अडचण उत्पन्न झाली. म्हणून मग देवांनी अलक्ष्मीचें उद्दालक ऋषीशीं लग्न लावलें (पद्म पु. ब्र. ९. १०). लिंगपुराणांत तिचें दुःसहाशीं लग्न झाल्याचें सांगितलें आहे (२. ६). पुढे उद्दालकाला तिचा स्वभाव न आवडल्यामुळे तो तिचा त्याग करून निघून गेला. मग ती एका पिंपळाखाली बसून शोक करूं लागली. तो शोक ऐकून लक्ष्मी, विष्णूसह तिला भेटायला आली. लक्ष्मीने

तिला वर दिला, की ' जे कोणी अश्वत्थमूळीं तुझी पूजा करतील, ते श्रीमंत होतील.' तेव्हापासून दर शनिवारीं लक्ष्मी पिंपळाच्या मुळांत तिला भेटायला येते, असें समजतात व शनिवारी सूर्योदयाच्या आधी पिंपळाची पूजा लक्ष्मीप्रद मानतात.

या देवीचें वर्णन आगम व विष्णुपुराण यांमध्ये आढळतें. ती कृष्णवर्ण, रक्तनेत्र, द्विभुज, लांब नाकाची, स्तन व पोट मोठें असलेली, कमळ व काकध्वज धारण करणारी, बैलासारखें तोंड असलेली व कन्या-पुत्रसहित असते. केरसुणी हें तिचें आयुध असतें. शीतला देवीचें स्वरूपहि कांही अंशीं अलक्ष्मीसारखेंच आहे. या वर्णनाशीं जुळणाऱ्या कांही मध्ययुगीन शिल्पकृति उपलब्ध आहेत.

हिचा फेरा आपल्या घरावर येऊं नये म्हणून कांही ठिकाणीं आश्विन शु.८मीस महालक्ष्मीच्या पूजेआधी ज्येष्ठा या नांवाने हिची पूजा करून घराबाहेर तिचें विसर्जन करतात. ही घरांतून निघून जावी म्हणून कांही ठिकाणी मागिलदारीं एक वात लावून ती घराच्या कोनाकोपऱ्यांत फिरवून पुढील दारीं आणून टाकतात. हा प्रकार म्हणजे अलक्ष्मीला बाहेरची वाट दाखविणें होय. याच्या उलट बाहेर वात लावून ती घरांत आणणें म्हणजे लक्ष्मीला घरांत येण्याचा मार्ग दाखविणें, असें समजतात. बंगालमध्ये आश्विनी अमावास्येस शेणाची ' क्षणिका अलक्ष्मी ' बनवून लक्ष्मीप्रमाणेच तिची पूजा करतात व मग तिचें विसर्जन करतात.

अलक्ष्मीनाशक स्नान पौष पूर्णिमेस पुष्य नक्षत्र असेल त्या दिवशीं पुरुषाने पांढऱ्या मोहरीचा कल्क अंगाला लावून स्नान करावें व अलक्ष्मी (दुर्भाग्य)ला घरांतून हाकलून द्यावें. नंतर नारायण, इंद्र, चंद्र, बृहस्पति व पुष्य यांच्या मूर्तींना सर्वौषधियुक्त जलाने स्नान घालून त्यांची पूजा व होम करावा, असें याचें विधान आहे. [पु. चिं. ३०७]

अलाबु सारंगी अलाबु = भोपळा. त्याच्या आधाराने बनविलेलें तंतुवाद्य. हें उत्तर भारतांत प्रचलित आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अलिआ तमिळनाडमधली एक शेतकरी जात. यांच्या नांवाची व्युत्पत्ति हल (नांगर) किंवा अल (धान्य) या शब्दांवरून लावतात. यांचा सामाजिक दर्जा भंडारी व उडिया यांच्या खालचा मानतात. कारण वरील जाती यांच्या हातचें अन्नोदक घेत नाहीत. यांच्यांत गोत्रें आहेत. सगोत्र विवाह होत नाही. बालविवाहाची प्रथा आहे. बालवयांत मुलीचें लग्न होऊं शकलें नाही, तर तिचें पितळी भांडें किंवा बाण यांच्याशीं खोटें लग्न लावतात. हे वैष्णव असून ग्रामदेवतांनाहि भजतात. [का. ट्रा. स. इं.]

अलिगड उत्तर प्रदेशांतील एक शहर. इथला किल्ला व स्टेशनाजवळचा भाग हा कोइल नांवाच्या अतिप्राचीन शहराचा एक भाग आहे पूर्वी चंद्रवंशांतील कोशारव नांवाच्या क्षत्रिय राजाने हें शहर वसविलें. कोल नांवाचा एक राक्षस या ठिकाणीं माजला होता; त्याला बलरामाने ठार केलें व या नगराला कोइल असें नांव दिलें, अशी दंतकथा सांगतात. भारतावर मुसलमानांच्या स्वाऱ्या सुरू होण्यापूर्वी हा भाग डोर राजपुतांच्या ताब्यांत होता. ११९४ सालीं कुतुबुद्दिन याने कोइलवर स्वारी करून हा भाग जिंकला. १७५७ सालीं सुरजमल जाटाने हें शहर हस्तगत केलें; पण पुढे थोड्याच कालांत अफगाणांनी जाटांची इथून उचलबांगडी केली. १७८४ सालीं हा भाग शिंद्यांनी जिंकला. या गडाला रामगड असें नांव होतें, तें बदलून नजीबखानाने त्याचें अलिगड असें नांव ठेवलें. १८०३ सालीं ब्रिटिशांनी हा किल्ला सर केला.

सांप्रत अलिगडची प्रसिद्धि तिथल्या मुस्लीम युनिव्हर्सिटीमुळे विशेष आहे.

अलिगड येथे हिंदूंचे व बौद्धांचे प्राचीन अवशेष जागोजाग आढळतात. [म. ज्ञा. को.]

अलिटकर महाराष्ट्रांतील एक जात. हे लोक बकऱ्याचीं कातडीं अळित्याने रंगवितात. हे मारवाडांतून आले असावे. [मुं. इ. जा.]

अलिंद ' बहिर्द्वारसंलग्नचतुरस्रकृत्रिमभूमिः ' = घराच्या बाहेरच्या दाराला लागून असलेली चौकोनी



अलिंद – पायऱ्या व पडवी

कृत्रिम भूमि, अर्थात् पडवी. दिवाणखाना व अलिंद यांची रुंदी ५ : २ या प्रमाणांत असावी, असें सांगितलें आहे. [एन्सा. हिं. आ.]

अलिन ऋग्वेदांत हा शब्द एकदा बहुवचनी आला आहे; त्यावरून ही एक ऋग्वेदकालीन जमात असावी, असें वाटतें. अलिन लोक सुदासाच्या विरुद्ध असावे. यांचा पक्थ, भलानस व विषाणि या जमाती टोळयांच्या बरोबर उल्लेख आला आहे (ऋ. ६. १८. ७).

अलिपना सणवार, व्रतें आणि धार्मिक व सामाजिक समारंभ या प्रसंगीं बंगालमधील स्त्रिया व मुली लाकडी पाट, चौरंग किंवा जमीन यांवर जीं चित्रें वा नक्षी काढतात, त्या कलाप्रकाराला अलिपना असें नांव आहे. अलिपना अंगणांत किंवा घरांतल्या जमिनीवर काढायची असल्यास ती तांदुळांच्या कोरडया पिठाने काढतात. व भिंतीवर काढायची झाल्यास तेंच पीठ पाणी घालून पातळ करून त्याच्या रेषांनी काढतात. पांढऱ्या रंगाव्यतिरिक्त इतर रंगांचा




अलिपना

वापर क्वचितच करतात. विशेष प्रसंगीं इतर रंग व पदार्थ वापरतात. अलिपना हातानेच काढतात. त्यासाठी कुंचला वापरीत नाहीत.

अलिपना हा निरनिराळया व्रतांचा महत्त्वपूर्ण भाग असतो. त्या व्रतांचा व त्यासाठी काढलेल्या अलिपनेचा अभ्यास केल्यास तिकडील लोकांच्या चालीरीती, धार्मिक श्रद्धा, सामाजिक इतिहास व कलात्मक जीवन यांवर प्रकाश पडतो.

कोणत्याहि मांगलिक प्रसंगीं अलिपना काढण्याची प्रथा आहे. लग्नांत नवरदेव वधूगृहीं मंडपांत येण्याच्या पूर्वीं मुख्य द्वारापुढे शेणाने जमीन सारवून तिच्यावर विशिष्ट प्रतीकांची अलिपना काढण्याचें काम न्हावीण करते. अलिपनेंतली चित्ररचना वास्तवदर्शी नसून प्रतीकात्मक असते. परंपरागत



अलिपना–विवाहसमारंभासाठी

पद्धतीनेच ती आजहि काढली जाते. त्यामुळे तिच्यांत वैविध्य व स्वतंत्र प्रज्ञा आढळत नाही. मात्र ज्या कारणासाठी ती काढली जाते, तें कारण किंवा उद्दिष्ट त्या रचनेंत पूर्णपणें



अलिपना–लक्ष्मीपूजनासाठी

व्यक्त होतें. कलश व देवता यांच्या स्थापनेसाठी खाली अलिपना रेखाटतात.

विशिष्ट व्रतांच्या विशिष्ट अलिपना असतात. ताराव्रताची

अलिपना सर्वांत लोकप्रिय आहे. या अलिपनेंत वरच्या बाजूला सूर्यबिंब, खाली दोहीं अंगीं शिवलिंगें व पार्वती, सर्वांत खाली चंद्र, सूर्य–चंद्रांच्यामध्ये सोळा तारका व ब्रह्मांड, आणि त्यांतच भक्ताचें आसन म्हणून खाली पृथ्वी, अशी रचना असते. माघमंडळ व्रताच्या अलिपनेंतच फक्त विविध रंग वापरतात. ही रचना संपूर्ण वर्तुळाकार असते व वरखाली सूर्य-चंद्र असतात. काजळरेखा नांवाच्या एका लोकगीतांत एका मुलीने केलेल्या अलिपनेचें तपशीलवार वर्णन आहे. अलिपना वर्गाकार व गोलाकार अशी दोन प्रकारची असते. हिचा विस्तार साधण्यासाठी वेलपत्ती किंवा रेषा काढतात. अलमोडा व नैनीताल जिल्ह्यांतल्या बायका अलिपना काढण्यांत विशेष कुशलता दाखवितात.

बंगाली समाजांतली सौंदर्यदृष्टि प्राचीन काळापासून तों आजतागायत कसकशी विकसित झाली, तें अलिपना पाहिल्यावर कळून येतें. सांप्रत ग्रामीण समाजाची स्थिति फार अवनत झाली आहे. तरीहि त्या समाजांत ही कला अजूनहि जागृत स्थितींत आहे. ग्रामीण स्त्रियांचें अलिपना रेखाटण्याचें कौशल्य व त्यांची कल्पनाशक्ति पाहून मन स्तिमित होतें.

अलिपना शब्दाची व्युत्पत्ति अद्यापि स्पष्ट झालेली नाही. संस्कृत 'आलिंपन' यापासून हा शब्द उत्पन्न झाला असावा, असें मानतात. पण कांही विद्वानांच्या मतें तो मूळ आर्येतर शब्द आहे. बंगालमधील वन्य जमातींत गांवाभोवती वेशीची भिंत उभारून तिच्यावर जें नक्षीकाम करीत, त्याला ऐलपन असें नांव होतें. या रेखांकनामुळे गांव आणि शेत यांचें संरक्षण होतें, अशी त्या लोकांची समजूत होती. त्या ऐलपनवरूनच अलिपना शब्द आला असावा.

हा कलाप्रकार किती प्राचीन आहे, तें सांगतां येत नाही. ज्या व्रताशीं व विधीशीं अलिपनेचा संबंध येतो, त्यांपैकीं बरींच व्रतें व विधि बंगालमध्ये आर्यपूर्वकाळापासून चालत आले आहेत, असें म्हणतात. बंगालमधील ग्रामीण स्त्रिया ज्या तऱ्हेचें नक्षीदार कमळ काढतात, तसेंच तें मोहेंजोदडो येथील कलाकृतींतहि दिसतें, असें गुरुसदय दत्त सांगतात. आर्यांच्या आगमनापूर्वीं या भागांत ऑस्ट्रिक वंशाचे जे लोक येऊन वसले, त्यांनी ही कला सुरू केली असावी, असें कांही पंडितांचें मत आहे. ते लोक शेती करणारे होते. बंगालमधील परंपरागत व धार्मिक लोककलांचा शेतीशीं बराच संबंध आहे.

बंगालमध्ये होणाऱ्या कित्येक व्रतांत आणि मांगलिक विधींत अलिपना काढतात. लक्ष्मीपूजनाच्या वेळीं तर तिचें फारच महत्त्व असतें. लक्ष्मी ही सौभाग्य, धनधान्य व सौंदर्य यांची देवता असल्यामुळे प्रत्येक गृहिणी तिची पूजा करते. त्या वेळच्या अलिपनेंत भाताचीं रोपटीं, कोठारें, घुवड, कुंकवाची डबी, या आकृती नेहमी आढळतात. याशिवाय



अलिपना–सूर्यपूजेसाठी

नांगर, विळा, सूर्य, मापटें, या शेतीशीं संबंधित वस्तूंचें दर्शनहि त्यांत होतें. मासा हें समृद्धीचें प्रतीक मानतात व तें सर्व अलिपनांमध्ये आढळतें.

केवळ हौस म्हणूनहि पूर्वीं अलिपना काढली जाई; पण अलिकडे ती प्रवृत्ति कमी झाली आहे. समाजजीवनांतले व्रतें व धार्मिक विधि यांचें महत्त्वहि लोप पावत असल्यामुळे त्याबरोबरच अलिपनेची आवडहि मंद होत चालली आहे. त्या कलाप्रकाराचें पुनरुज्जीवन करायचें, तर त्यांतल्या जुन्या कल्पना टाकून देऊन नव्या कल्पना त्यांत प्रविष्ट केल्या पाहिजेत. जुन्यांतूनच नवें निर्माण करायला हवें व तें भोवतालच्या जीवनाशीं संबंधित असायला हवें. तरच ही कला पुनश्च नव्या जोमाने पुढे येईल. **पाहा** – रांगोळी, थापे, चौक पुरणें. [फोक आर्ट ऑफ बंगाल; संमेलन पत्रिका–कला अंक; अल्पना.]

आलिमद्र प्राचीन जमाती लोक. वायुपुराणांत यांचा उल्लेख आहे. मार्कंडेयपुराणांत यांनाच अनिमद्र म्हटलें आहे. या लोकांचें निश्चित स्थान कळत नाहीं.

अली रंगरेज उत्तर भारतांतील रंगाऱ्यांचा पूज्य पीर.

अलुतीं-बलुतीं ज्या गांवकामगारांना गांवांत कांही हक्क प्राप्त झालेले असतात, त्यांना अलुतेदार

व बलुतेदार म्हणतात. यांची संख्या बारा असते. लोहार, सुतार, महार, मांग, कुंभार, चांभार, परीट, न्हावी, भट, मुलाणा, गुरव, व कोळी हे बारा बलुतेदार होत. तेली, तांबोळी, साळी, माळी, जंगम, कळवंत, डवऱ्या, ठाकर, घडशी, सोनार, तराळ व चौगुला हे बारा अलुतेदार होत. या दोघांनाहि गांवांतल्या शेतकऱ्यांकडून सुगीच्या वेळीं धान्य मिळत असतें. अलुतेदारापेक्षा बलुतेदाराचा हक्क मोठा असतो. हक्कानुसार बलुतेदारांचे तीन वर्ग आहेत. कांही ठिकाणीं गांवचा पाटील व कुलकर्णी यांचाहि बलुतेदारांत समावेश केलेला दिसतो. सर्वच गांवांत बलुतेदार असतात, असें मात्र नाही. [सु. वि. को.]

अलैया बिलावल

हिंदुस्थानी संगीतांतला एक राग. पाहा – बिलावल.

अलौकिक ज्ञान

प्रत्यक्ष व अनुमान हे दोन ज्ञानाचे मोठे विभाग आहेत. वर्तमान कालांत ज्यांची सत्ता आहे व ज्या ज्ञानेंद्रियांच्या टप्प्यांत आहेत, अशा वस्तूंचें ज्ञान प्रत्यक्षाच्या द्वारें होत असतें. पण दूरस्थ व सूक्ष्म वस्तूंचें ज्ञान इंद्रियांच्या द्वारें होत नाही. त्यासाठी अनुमानाचा अवलंब करावा लागतो. म्हणून प्रत्यक्ष व अनुमान यांच्या द्वारें प्राप्त होणाऱ्या ज्ञानाला लौकिक ज्ञान असें म्हणतात. हें ज्ञान देशिक व कालिक प्रतिबंधांनी परिच्छिन्न असतें. केव्हा केव्हा कांही व्यक्तींना देशकालांच्या प्रतिबंधापासून मुक्त असें कांही ज्ञान झाल्याचें दिसून येतें व त्याची व्याख्या प्रत्यक्ष व अनुमान यांच्या आधारें होऊं शकत नाही. म्हणून अशा प्रकारच्या ज्ञानाला अलौकिक ज्ञान म्हणतात. असें अलौकिक ज्ञान असणारे लोक पुष्कळदा आढळून येतात. सर्व देशांत सर्वसामान्य जनतेचाहि अशा अलौकिक ज्ञानावर विश्वास असतो.

भारतीय दर्शनांच्या संसारांत आस्तिक व नास्तिक असे दोन प्रमुख भेद आहेत. चार्वाक, लोकायत, इ. दर्शनें नास्तिक असून तीं इंद्रियांच्या कक्षेच्या बाहेरचें म्हणजेच अतींद्रिय किंवा अलौकिक ज्ञान मानीत नाहीत. पूर्वमीमांसा दर्शनाचीहि अलौकिक ज्ञानाविषयीं अनास्था आहे. या व्यतिरिक्त असलेलीं आस्तिक व नास्तिक दर्शनें मात्र अलौकिक ज्ञानावर पूर्ण भरंवसा ठेवतात.

न्यायदर्शनांत प्रत्यक्ष प्रमाणाचे लौकिक व अलौकिक असे दोन विभाग केलेले आहेत. अलौकिक प्रत्यक्षाचेहि तीन विभाग असून त्यांतलें योगज प्रत्यक्ष हें अलौकिक ज्ञानाशीं संबंध दर्शवितें. वैशेषिक दर्शनाचे भाष्यकार प्रशस्तपाद सांगतात, की समाधि अवस्थेंत योग्यांना केवळ मनाच्या द्वारें लौकिक प्रत्यक्षाच्या टप्प्याबाहेर असलेल्या वस्तूंचें प्रत्यक्ष ज्ञान होतें व समाधि सिद्ध झाल्यावर त्यांच्या स्थूल इंद्रियांनाहि सूक्ष्म, दूरस्थ व व्यवहित अशा पदार्थांच्या ज्ञानाची शक्ति प्राप्त होते. याव्यतिरिक्त अलौकिक ज्ञानाचें आणखी एक रूप प्रशस्तपादांनी मानलें आहे. त्याला ते आर्षज्ञान म्हणतात. आर्षज्ञान म्हणजे ऋषींना होणारें ज्ञान होय. हें ज्ञान प्रत्यक्ष, अनुमान, इ. प्रमाणांनी होणाऱ्या ज्ञानाहून भिन्न आहे. या ज्ञानाला त्यांनी प्रतिभा असें म्हटलें आहे. प्रातिभ अर्थात् अलौकिक ज्ञान केवळ ऋषिमुनींपुरतेंच सीमित नसून सामान्य लोकांनाहि केव्हा केव्हा तें प्राप्त झालेलें दिसतें, असेंहि ते म्हणतात.

सांख्य दर्शनांत त्या दर्शनाचा प्रणेता कपिलमुनि याला सिद्ध व सर्वज्ञ म्हटलें आहे. योगदर्शन हें तर ज्ञानाचें समर्थन करणारें सर्वश्रेष्ठ दर्शन होय. पतंजलि केवळ अलौकिक ज्ञानावरच विश्वास ठेवतो असें नव्हे; तर अलौकिक कार्यशक्तीवरहि विश्वास ठेवतो. पातंजल योगसूत्रांच्या तिसऱ्या अध्यायांत योग्यांना प्राप्त होणाऱ्या पुढील अलौकिक ज्ञानशक्तींचा त्याने निर्देश केला आहे—अतीत व अनागत यांचें ज्ञान (सू. १६), सर्व प्राण्यांच्या बोलींचें ज्ञान (सू. १७), पूर्वजन्माचें ज्ञान (सू. १८), सूक्ष्म, व्यवहित व विप्रकृष्ट ज्ञान (सू. २६), भुवनज्ञान, शरिराच्या आंतररचनेचें ज्ञान (सू. ३०), सिद्धदर्शन (सू. ३३) व दिव्यस्रोत (सू. ४२) इत्यादि.

शंकराचार्यहि ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान या मिथ्या भेदांवर आधारलेल्या ज्ञानाहून श्रेष्ठ व पलिकडचें असें एक तात्त्विक ज्ञान मानतात व त्याला अनुभव अशी संज्ञा देतात. त्यांचा हा अनुभव इंद्रियजन्य नसून त्याचें स्वरूप अतींद्रिय अतएव आध्यात्मिक आहे.

बौद्ध व जैन हीं दर्शनें आस्तिक दर्शनांहूनहि अलौकिक ज्ञानाचें अधिक समर्थन करतात. बौद्धांनी बुद्धाला व जैनांनी तीर्थंकरांना सर्वज्ञ मानलें आहे. या दोन्ही दर्शनांत अलौकिक ज्ञानाला प्रत्यक्ष म्हटलें आहे. 'यत्किंचिदर्थस्य साक्षात्कारि ज्ञानं तत्प्रत्यक्षमुच्यते' (न्यायबिंदुटीका – ३) असें प्रत्यक्षाचें वेगळें लक्षण धर्मोत्तराचार्यांनी केलें आहे. योग्यांना होणाऱ्या ज्ञानाच्या बाबतींत तो म्हणतो, की 'भावनेचा प्रकर्ष झाल्यावर योगी वस्तूंना इतक्या स्पष्ट रूपाने पाहूं शकतो, की त्या जणू काचभिंतीच्या मागे ठेवलेल्या आहेत' (न्यायबिंदुटीका १. ११).

जैनदर्शन सांगतें, की 'जीव मात्र स्वभावतःच सर्वज्ञ आहे. पण कर्मांच्या परमाणूंचें आवरण पडल्यामुळे त्याच्या सर्वज्ञ-

तेला बाध येतो व तें आवरण दूर झाल्याने त्याला सर्वज्ञत्व प्राप्त होतें. 'अशा ज्ञानाला त्यांनी केवलज्ञान म्हटलें असून त्याच्या प्राप्तीसाठी साधक जीवाला अवधि व मनःपर्याय या दोन भूमिका उल्लंघून पुढे जावें लागतें, असें सांगितलें आहे (प्रमाणनयतत्त्वलोकालंकार पृ. १०२–१२०).

पाश्चात्य वैज्ञानिकांनीहि या विषयावर बहुत संशोधन केलें आहे. टेलिपथी (Telepathy) किंवा मनःपर्याय हा एक व एक्स्ट्रॉ सेन्सरी पर्सेप्शन (Extra sensory perception) किंवा अतींद्रिय प्रत्यक्ष हा दुसरा, असे दोन पारिभाषिक शब्द या अलौकिक ज्ञानाच्या संबंधांत त्यांनी उपयोजिले आहेत. टेलिपथी शब्दाचा सर्वप्रथम प्रयोग मायर्स (Myers) याने केला. टेलिपथी म्हणजे एका व्यक्तीच्या आन्तरिक अनुभूति, प्रेरणा, विचार किंवा जटिल अनुभव यांचें ज्ञानेंद्रियांच्या माध्यमाशिवाय दुसऱ्या व्यक्तीच्या मनांत प्रविष्ट होणें (डिक्शनरी ऑफ् सायकॉलॉजी). यालाच मनःपर्याय असें म्हणतां येईल. आधुनिक संशोधनावरून मनःपर्याय ही एक सत्य वस्तु आहे, असें सिद्ध झालें आहे. अनेक प्रयोगांच्या अंतीं आणखी एक गोष्ट सिद्ध झाली ती ही, की मनःपर्यायाची शक्ति विशिष्ट व्यक्तींतच असतें, असें नसून थोड्याबहुत प्रमाणांत ती सर्वच माणसांच्या ठिकाणीं असते. याविषयींचीं अनेक उदाहरणें गर्नी, मायर्स, पॉमीर यांनी लिहिलेल्या फेंटाझम्स् ऑफ् दि लिव्हिंग या ग्रंथांत पाहायला मिळतात. या सर्व संशोधनांतून सारभूत सिद्धान्त निष्पन्न झाला तो असा, की कोणत्याहि भौतिक साधनाच्या साहाय्याशिवाय एक व्यक्ति कितीहि दूर असलेल्या व्यक्तीचें मनोगत जाणूं शकते.

एक्स्ट्रॉ सेन्सरी पर्सेप्शन ही शब्दसंहति डॉ. ऱ्हाइन (Rhine) याने उपयोगांत आणली. दूरदर्शन व दूरश्रवण या गोष्टी वरील शब्दसंहतींत अंतर्भूत आहेत. विस्तृत व गंभीर संशोधनानंतर डॉ. ऱ्हाइन या निष्कर्षावर पोंचला आहे, की अतींद्रिय प्रत्यक्ष हें एक वास्तविक सत्य आहे. डॉ. ऱ्हाइनचें कार्य पुढे नेणाऱ्यांत प्रा. टिरेल याचें नांव प्रमुख आहे. टिरेलनेहि अनेक प्रयोगांच्या अंतीं पुन्हा एकदां ठासून सांगितलें, की अतींद्रिय प्रत्यक्ष हें एक निर्विवाद सत्य आहे. [डॉ. गोवर्धन भट्ट]

अल् अन्वार म्हणजे साहाय्यक. मुहंमद पैगंबर मक्केहून मदिनेस गेला असतां त्याच्या उपदेशाने ज्यांनी तावडतोब इस्लामचा स्वीकार केला, त्यांना अन्वार हें नांव मिळालें. [डि. इ.]

अल् कौसर इस्लामी समृद्धिवाचक शब्द. मुहंमदाच्या स्वर्गांत एक सरोवर आहे, त्याचें नांव हौझुल कौसर म्हणजे समृद्धीचें सरोवर असें आहे. पैगंबराला तें स्वर्गाच्या प्रवासांत दिसलें. तें विस्तीर्ण असून त्याचें पाणी शुभ्र व सुवासिक आहे. तें पिणाऱ्याला पुन्हा तहान लागत नाही. [डि. इ.]

अल्-जन्नाह इस्लामी धर्मांतला स्वर्ग. फारसी भाषेंत त्याला बिहिश्त म्हणतात. कुराणांत स्वर्गाचीं आठ भिन्न नांवें आढळतात. मुस्लीम पंडितांच्या मतें तीं स्वर्गाच्या भिन्न भिन्न विभागांचीं नांवें आहेत – (१) जन्नतुल्-खुल्द (शाश्वतीचें उद्यान), (२) दार्-उस्-सलाम (शांतिस्थान), (३) दार्-उल्-करार, (४) जन्नातुल् अद्न, (५) जन्नातुल्-मवा (आश्रयस्थान), (६) जन्नातुल्-नईम (आनंदधाम), (७) इल्लीयून व (८) जन्नातुल्-फिर्दोस. मुहंमद पैगंबराने वर्णिलेले सुखोपभोग प्रसिद्ध असून मुसलमानांच्या मनावर त्यांचा विलक्षण प्रभाव आहे. [डि. इ.]

अल् बिरूनी (९७३–१०४८ इ. स.) मूळ नांव अबू रैहान महंमद. ख्वारिझम प्रांतांतल्या बिरून शहरीं याचा जन्म झाला. हा प्रख्यात गणिती, ज्योतिषी व तार्किक होता. त्याला गूढ विद्याहि अवगत होती. तो उत्तम संस्कृतज्ञहि होता. त्याला महंमूद गझनीचा राजाश्रय होता. त्याच्याच स्वारीबरोबर तो भारतांत आला. त्याने इ. स. १०३० मध्ये तारिख अल् हिंद (हिंदुस्थानची हकीगत) नांवाचा ग्रंथ लिहिला. अबुल फज़लने ऐने अकबरींत या ग्रंथाचा बराच आधार घेतला आहे. त्याच्या ग्रंथावरून हिंदूंच्या तत्कालीन चालीरीती, त्यांचीं शास्त्रें व वाङमय यांच्याविषयीं बरीच माहिती मिळते. या ग्रंथाचीं एकूण ८० प्रकरणें आहेत. १ ल्या प्रकरणांत हिंदू लोकांची माहिती मिळविण्याच्या बाबतींत कोणत्या अडचणी आल्या, त्याचें वर्णन, २ ते ११ या प्रकरणांत हिंदुधर्म व तत्त्वज्ञान, १२ ते १७ वेद, पुराणें, छंदःशास्त्र, चालीरीति इत्यादि, १८ ते ३१ भूगोल व ज्योतिष, ४३ ते ७९ हिंदूंचे सणवार, उत्सव वगैरे, व ८० व्या प्रकरणांत फलज्योतिष अशा विषयांची माहिती आहे. त्याला गीतेचें तत्त्वज्ञान फार आवडे. पण ज्योतिषशास्त्रावर त्याचा विशेष भर होता. [म. ज्ञा. को.]

अल् मदीना जिथे मुहंमद पैगंबराची कबर आहे, तें शहर. हें अरबस्तानांत आहे. याचें मूळचें

नांव यस्रब असें होतें. मुहंमदाने मक्का सोडून या शहराचा आसरा घेतला, इथे धर्मप्रचार केला व इथेच देह ठेवला. म्हणून मक्केच्या खालोखाल इस्लामी जगांत त्याला महत्त्व आलें आहे. हें पठारावर वसलें असून याच्या भोवती मजबूत दगडी भिंत आहे. या शहराला पाणीपुरवठा भरपूर असल्यामुळे तिथे अरब लोकांची फार पूर्वीपासून वस्ती होती. [डि. इ.]

अल् मसूदी (१० वें शतक) एक अरब प्रवासी. याने भारताचें प्रवासवर्णन बारकाईने लिहिलें आहे.

अल् महदी इस्लामी शियापंथाचा १२ वा नेता. हा प्रेषित असून पुनश्च अवतार घेणार असल्याचें शियापंथी मानतात. [मु. इं.]

अल्लकप्प शाहाबाद जिल्ह्यांतील मसरपासून वैशालीस जाणाऱ्या रस्त्यावरचें एक ठिकाण. या ठिकाणीं बुद्धाच्या काळीं बली नांवाचे गण राहत असून त्यांचें स्वतंत्र गणराज्य होतें. त्यांनी बुद्धाच्या अवशेषांचा कांही भाग मिळवून त्यावर एक स्तूप बांधला, असें दीघनिकायांत (२) सांगितलें आहे.

अल्लम प्रभु (१२ वें शतक) कर्नाटकांतील वीरशैव संप्रदायाचा एक मोठा अध्वर्यु. हा बसवाचा समकालीन होता. चामरसाच्या प्रभुलिंगलीले या काव्यांत याला शिवाचा अवतार मानलें आहे. याचा जन्म कुठे झाला व याचे मातापिता कोण याविषयीं निश्चित माहिती नाही. श्रीनिवासमूर्ति यांच्या मतें याचा जन्म शिमोगा जिल्ह्यांतल्या बळ्ळिळगामे या ठिकाणीं झाला. दिवाकर यांच्या मतें बनवासी हें त्याचें गांव व नागवसाधिपति व सज्जनदेवी हे त्याचे आईवडील होत. याचें पहिलें नांव नुसतें अल्लम होतें; पण पुढे त्याच्या महनीय गुणांवरून त्याला अल्लम प्रभु किंवा प्रभुदेव असें म्हणूं लागले. कामलता नांवाच्या एका रूपवती कन्येशीं याचा विवाह झाला होता; पण ती थोड्याच दिवसांत मरण पावली. त्यामुळे अल्लम विरक्त होऊन संसारांतून उठला. वनांत राहून त्याने दीर्घ तपस्या केली. याच्या वैराग्याची परीक्षा पाहण्यासाठी पार्वतीने आपल्या अंशाने एक राजकन्या उत्पन्न करून त्याच्याकडे पाठविली, अशी आख्यायिका आहे. त्या तपस्येने त्याला आत्मज्ञान प्राप्त झालें. मग तो शिवाद्वैततत्त्वाचा समर्थ प्रचारक बनला. आपल्या शिष्यमंडळींसह त्याने भारतयात्रा केली व परत आल्यावर कल्याणनगरांत (म्हैसूर राज्य) बसवाची भेट घेतली. त्याच्या असाधारण व्यक्तित्वाने बसव व त्याचे शिष्य प्रभावित झाले. बसवाने त्याला आपल्या अनुभवमंटपाचें अध्यक्ष नेमलें.

अल्लमाने षट्स्थलज्ञानचारित्र्य, शून्यसंपादने, मंत्रगोप्य, सृष्टिवचन इ. ग्रंथ रचले. अल्लमाचीं वचनें सुप्रसिद्ध आहेत. त्यांवरून त्याची तीव्र बुद्धिमत्ता आणि भव्य विचारशक्ति दिसून येते. त्याचीं वचनें आकाराने छोटीं असूनहि अध्यात्मज्ञानाचीं रत्नें आहेत. विश्वव्यापी परमेश्वराचें वर्णन तो असें करतो– 'त्याला क्षति नाही, वृद्धि नाही, गति नाही, अंत नाही. तो प्रकाशांतलें चैतन्य आहे.'


भक्तिसाधनेच्या मार्गांत त्याला अश्रद्धा आणि भ्रष्टाचार मान्य नव्हता. अल्लमाच्या मतें खरा ज्ञानी तो, की जो स्वतःला ज्ञानी समजत नाही. 'अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम्' या उपनिषद्वचनाचा जणूं तो अनुवादच करतो– जो आपण परब्रह्म जाणलें असें समजतो त्याला कांहीही कळलें नाही (वचनधर्मसार पृ. ७७). त्याचा मूर्तिपूजेला विरोध होता. हृदयांत परमेश्वर असतांना अन्य मूर्ति आणि मंदिरें कशाला? असा त्याचा सवाल आहे. वीरशैव पंथावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव खोलवर पडलेला आहे. **पाहा–** वचनसाहित्य. [पॉ. क. क.; हिंदी और कन्नडमें भक्तिआंदोलनका तुलनात्मक अध्ययन]

अल्लाह इस्लामी धर्मांतला ईश्वर व सृष्टिनिर्माता. अल्लाह हें ईश्वराचें खरें नांव असून इतर सुमारें शंभर नांवें आहेत, तीं त्याचीं विशेषणें होत. उदा० अर् रहमान (कृपासागर), अर् रहीम (दयानिधि), अस् समद् (अविनाशी) इत्यादि. इस्लामच्या उदयकालांत अरबस्तानमध्ये राहणारे लोक अनेक देव मानणारे व मूर्तिपूजक होते. तेहि अनेक देवतांना उद्देशून अल्लाह हाच शब्द वापरीत. पण मुहंमद पैगंबराने परमेश्वर हा एकच असून त्याच्याशिवाय दुसरा कोणी देव नाही (ला इलाह इल्लल्लाह) अशी घोषणा केली व अल्लाह हें त्या एकाचेंच नांव आहे, हें पहिलें धर्मसूत्र सांगितलें. अल्लाह हा अलीलाह् या अरेबिक शब्दाचा संक्षेप आहे. ईश्वराला त्याच्या खऱ्या नांवाने आळवणाऱ्या माणसाचीच इच्छा पूर्ण होते, असें पैगंबराने म्हटलें आहे (मिश्कात १०. ९. १. २). ज्यू व सिरियन ख्रिश्चन, देव या अर्थी हा शब्द वापरतात; पण त्यांचा देव मुहंमदी अल्लाहून निराळा आहे. [डि. इ.; एन्सा. रि.]

आट्टियम् अकरा पवित्र नृत्यांपैकी एक. मदनदहनानंतर शिवाने हें नृत्य केलें. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अल् हजरुल्-अस्वद् मक्केच्या मशिदींत 'काबा'च्या चबुतऱ्यांत बसविलेल्या एका काळ्या, वाटोळ्या दगडाचें नांव. लक्षावधि मुस्लीम यात्रेकरूंच्या चुंबनामुळे हा दगड गुळगुळीत झालेला आहे. मुहंमदाच्या सांगण्याप्रमाणे हा स्वर्गांतून पडलेला दगड होय. पाप-पुण्याच्या अंतिम निवाड्याच्या वेळीं त्याला स्पर्श करणाऱ्या व्यक्तींच्या वतीने तो साक्ष देणार आहे. [डि. इ.]

अवकहडा चक्र या नांवाचें पंचांगांत एक चक्र दिलेलें असतें. वधू-वरांचें घटित पाहाण्यासाठी याचा उपयोग करतात. या चक्रांत एकूण ८ कोठे असतात. त्यांची क्रमाने माहिती अशी –



अवकहडा चक्र

(१) बाहेरच्या बाजूने पहिला. यांत नक्षत्राच्या चरणांची चू, चे, चो, ला अशीं सांकेतिक अक्षरें दिलेलीं असतात.

(२) यांत नाडीचीं आद्याक्षरें दिलेलीं असतात. नाडीचे प्रकार तीन – आद्य, मध्य, अंत्य.

(३) यांत योनींचीं नांवें दिलेलीं असतात. अश्विनीपासून २७ नक्षत्रांच्या योनी अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत – अश्व गज, मेष, सर्प, सर्प, श्वान, बिडाल, मेष, मार्जार, उंदीर, उंदीर, गौ, महिषी, व्याघ्र, महिषी, व्याघ्र, मृग, मृग, श्वान, वानर, नकुल, वानर, सिंह, अश्व, सिंह, गौ, गज.

(४) यांत गण दिलेले असतात. गण तीन आहेत – देव, मनुष्य, राक्षस.

(५) यांत नक्षत्रांचीं नांवें दिलेलीं असतात.

(६) यांत राशींचे वर्ण दिलेले असतात. वर्ण चार आहेत – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र.

(७) यांत बारा राशींचे स्वामी दिलेले असतात.

(८) यांत मेषादि बारा राशी दिलेल्या असतात.

अवकीर्ण कुरुक्षेत्राजवळचें एक क्षेत्र. बक-दाल्भ्य ऋषींनी एकदा धृतराष्ट्रापाशीं दान मागितलें. पण त्याने या ऋषींचा अपमान केला. त्या रागाने ऋषींनी या क्षेत्रांत येऊन धृतराष्ट्राच्या राज्याची आहुति दिली, अशी याविषयीं कथा आहे. [हि. ध.]

अवकीर्णी एखाद्या ब्रह्मचाऱ्याकडून स्त्रीसमागमादि कारणांनी ब्रह्मचर्य व्रताचा भंग झाला, तर त्या ब्रह्मचाऱ्याला अवकीर्णी म्हणत. त्याचें प्रायश्चित्त म्हणून पुढील विधान सांगितलें आहे – प्रतिपदेला मध्यरात्रीं 'सं मा सिञ्चतु' या मंत्राने अग्निपूजा करून अग्नीला समिधा व दोन आज्याहुती देणें. त्याशिवाय निर्ऋति देवतेच्या उद्देशाने गाढव अर्पण करणें (आप. ध. सू. १. ९ २६. ८ - ९). मनु म्हणतो, की अशा ब्रह्मचाऱ्याने वर्षभर गाढवाचें कातडें पांघरावें, आपल्या अपराधाचा उच्चार करून सात घरीं भिक्षा मागावी व त्रिकाल स्नान करून एकभुक्त राहावें (११. १२२- २३). [हि. ध.]

अवघड दीक्षा जोगी पाहा.

अवचीसुत काशी (१७ वें शतक) मराठी कवि. वर्णाने चंद्रवंशी क्षत्रिय. आडनांव सोळंखी व गोत्र अत्रि. याचा बाप भारम (नासिक जिल्हा)चा देशमुख असून महानुभाव पंथी होता. याने द्रौपदी स्वयंवरावर एक ओवीबद्ध व दुसरा श्लोकबद्ध असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. रसाळ वाणी व बहारदार अलंकारयोजना, हे याच्या काव्याचे विशेष गुण आहेत. 'हरिची भगिनी म्हणे सुभद्रा' ही प्रसिद्ध लावणी याचीच आहे.

अवच्छेदवाद हा वाचस्पति मिश्रांनी मानलेला वाद आहे. या वादांत एकच चैतन्य अज्ञानाचा आश्रय आणि अज्ञानाचा विषय अशा दोन भेदांनी भिन्न होतें, असें मानलें आहे. अज्ञानाचें विषयीभूत चैतन्य म्हणजे ईश्वर व आश्रयभूत चैतन्य म्हणजे जीव होय. दुसऱ्या शब्दांत सांगायचें तर अविद्यावच्छिन्न चैतन्य म्हणजे ईश्वर व अन्तःकरणावच्छिन्न चैतन्य म्हणजे जीव होय. अज्ञान हें नानाविध असल्यामुळे या मतांत जीवहि नाना मानले जातात. [भा. द.]

अवंजी एक प्रकारचा ढोल. गायीच्या कातडयाचें पुड असल्यामुळे याला अवंजी म्हणतात.

अवटनिरोधन २८ नरकांपैकी एक. जे लोक बिळांत वा कोठारांत माणसांना कोंडतात, त्यांना हा नरक भोगावा लागतो. यांत विषारी धूर नाकातोंडांत जाऊन पापी माणसाचा जीव कोंडतो. [भाग. पु. ५.२६. ७ व ३४]

अवटोदा भारतवर्षांतील एक नदी.

अवतंसक बौद्धांचा सूत्रग्रंथ. याचीं दोन चिनी भाषांतरें उपलब्ध आहेत. एक ५ व्या शतकांत बुद्धभद्राने केलेलें व दुसरें शिक्षानंदाने केलेलें. अवतंसक सूत्र प्रथम नागार्जुनाने नागदेशांत संशोधिलें असें म्हणतात.

अवतार अव + तृ = अवतार = उच्च स्थानावरून नीच स्थानावर उतरणें. अवतार कोणाचा, केव्हा आणि कशासाठी होतो, हें श्रीकृष्णाने भगवद्गीतेच्या पुढील दोन श्लोकांत सांगितलें आहे --

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

(४. ७-८)

अर्थ -- हे अर्जुना, जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानि येते आणि अधर्माची उठावणी होते, तेव्हा तेव्हा मी स्वतःला उत्पन्न करतों (अवतार घेतों). साधूंचें संरक्षण, दुष्कृत्यें करणाऱ्यांचा विनाश आणि धर्माची संस्थापना, यांच्यासाठी मी प्रत्येक युगांत जन्म (अवतार) घेतों.

पुराणें व इतर ग्रंथ यांतून प्रतिपादिलेलें अवतारतत्त्व हें मध्ययुगीन व अर्वाचीन हिंदुधर्माचें एक प्रमुख तत्त्व आहे.

वैकुंठधाम सोडून वरील कार्यासाठी भगवंताचें भूलोकीं येणें, याला अवतार म्हणतात. परमात्मा जेव्हा एखाद्या प्राण्याचें अथवा माणसाचें शरीर धारण करून कांही काल किंवा संपूर्ण जीवनभर त्या शरीरांत वास्तव्य करतो, तेव्हा त्या शरीरधारणाला अवतार म्हणतात. उत्पत्ति, स्थिति आणि लय हे सृष्टीचे स्वभावधर्म आहेत. ब्रह्मा, विष्णु व महेश हे या तीन धर्मांचे अनुक्रमें कारक मानलेले आहेत. त्यांत सृष्टीच्या पालनाची जबाबदारी विष्णूवर आहे. म्हणून जेव्हा सृष्टींत उपद्रव सुरू होतात, विनाशाची प्रक्रिया वाढूं लागते व मानवसमाजाच्या धर्माची घडी विसकटते, तेव्हा तो विनाश थांबवून ती घडी पुनश्च नीट बसविणें व मानवसमाजाला धर्ममार्गावर आरूढ करणें, यासाठीं भगवान् विष्णु युगायुगीं अवतार घेतो, अशी भारतीय श्रद्धावंतांची पक्की धारणा आहे. सनातन मताचे सर्व ग्रंथहि ही धारणा परिपुष्ट करतात.



विष्णु--बघौरा

जीवाने आपल्या मातापित्यांकडून शरिराचें ग्रहण करावें, हा सृष्टीचा नियम आहे. परमात्माहि या नियमाला अनुसरून दयादाक्षिण्यादि गुणांनी युक्त व तपःपूत अशीं मातापितरें आपला अवतार घेण्यासाठी निवडतो. मात्र ईश्वराचा हा जन्म परवशतेने न होतां स्वेच्छेने आणि प्रकृतीवर पूर्ण स्वामित्व ठेवून होत असतो. वरील सिद्धान्तानुसार अवतारी पुरुष मनुष्य असूनहि परमात्मरूप असतो व परमात्मा असूनहि मनुष्य असतो. व्यवहारी लोक प्रपंचसिद्धीसाठी मानवरूपाने त्याला ग्रहण करतात व परमार्थी लोक आध्यात्मिक सिद्धीसाठी परमात्मरूपाने त्याला शरण जातात.

प्राचीन लोकांमध्ये अवतारकल्पना वरील तात्त्विक अर्थानें आढळत नाही. प्राचीन लोक ज्या मानवांची अथवा प्राण्यांची पूजा करीत, त्यांना ते दैवी अथवा प्रत्यक्ष देवताच समजत

पुढे मग अशा प्रकारचे पुण्यवान् प्राणी व मानव परमेश्वराचे अवतार म्हणून मानले जाऊं लागले. उदा० अवलोकितेश्वर हा दलाई लामामध्ये अवतरित होतो, असें तिबेटी लोक समजतात. प्राण्यांमध्ये मृत मनुष्याची विशिष्ट व अद्‌भुत शक्ति वास करते, म्हणून त्यांची पूजा करणें आवश्यक आहे, या प्राचीन मानवांच्या कल्पनेंत अवतारकल्पना अंधुक रीतीने प्रत्ययाला येते. वृद्ध व वैद्य यांच्या अंगीं अमानुष शक्ति असते व ते प्रत्यक्ष देवच होत, अशीहि कल्पना प्राचीन जगांत आढळते व तिच्यांतहि अवतारकल्पना बीजरूपाने दिसते.

भारतांत परमेश्वराच्या या अवतारग्रहणाची कल्पना पुराणांनी वाढविली व अनेक कथांच्या रूपाने तिचा विकास केला. पण ही कल्पना पुराणांपेक्षाहि प्राचीन आहे. तिचीं बीजें वैदिक वाङ्मयांतच आढळतात. सनपूर्व कांही शतकें अवतारकल्पना लोकांना परिचित होती. पाणिनि व पतंजलि यांनी कृष्णावताराचा उल्लेख केला आहे. त्यांच्या काळांत अवतार म्हणून विष्णुपूजा प्रचलित होती.

वैदिक वाङ्मयांत अवतारकल्पना आहे; पण ती अस्पष्ट रूपांत आढळते. दशावतारांपैकी कांही अवतारांचीं बीजें वेदांतल्या कांही कथांतून सांपडतात. प्रलयकालीं मनूने आपल्या होडीचा दोर एका माशाच्या शिंगाला बांधला व त्या माशाने मनूचें प्रलयजलांत संरक्षण केलें, अशी कथा शतपथ ब्राह्मणांत दिलेली आहे (२. ९. १.१). या कथेवरून पुढे मत्स्यावताराची कल्पना सुचली असावी. कूर्मावताराचें मूळ तैत्तिरीय संहितेंत व आरण्यकांत आढळते. प्रजापतीचा शरीररस कूर्मरूपाने जलांत फिरत होता, तोच 'सहस्रशीर्षा पुरुषः' या स्वरूपांत प्रजापती पुढे प्रकट झाला. तेव्हा प्रजापतीने त्याला विश्व निर्माण करण्याबद्दल सांगितलें. त्याने मग प्रत्येक दिशेस जल फेकून आदित्यादि सृष्टि निर्माण केली (तै. आ. १. २३.१–९). प्रजापतीने वराह रूप घेऊन समुद्राच्या तळांतून पृथ्वीला वर काढलें, ही कथा तैत्तिरीय ब्राह्मणांत असून ती वराहावताराची सूचक आहे (१. १. ३). कूर्म व वराह या दोन रूपांतलीं कृत्यें मूलतः प्रजापतीचीं आहेत. पुढे प्रजापतीला मागे टाकून नारायण म्हणजे विष्णु हा पुढे आला. तोच जगाचा कर्ता, धर्ता आहे, अशीहि कल्पना केली गेली. म्हणून मग प्रजापतीचीं वर उल्लेखिलेलीं कृत्यें विष्णूच्या नांवावर चढलीं. नमुचि दैत्याचें मस्तक इंद्राने पहाटेस पाण्याचा फेस फेकून उडविलें, या ऋग्वेदांतल्या कथेंत नरसिंह अवताराचें बीज शोधतां येईल (ऋ. ८. १४. १३). नरसिंहाचा प्रथम उल्लेख तैत्तिरीय आरण्यकांत आला आहे. वामनाने बळीकडे त्रिपादभूमि मागून शेवटीं त्रिभुवन व्यापलें, या अवतारकृत्याचा संबंध ऋग्वेदांतील विष्णूच्या तीन पावलांत विश्व व्यापण्याच्या उल्लेखाशीं जोडतां येईल–



मत्स्यावतार–पाषाणमूर्ति

इदं विष्णुर्वि चक्रमे त्रेधा नि दधे पदम् ।

(ऋ. १. २२. १७)

अर्थ – हें (विश्व) तीन पावलें ठेवून विष्णूने आक्रांत केलें.

शतपथांत म्हटलें आहे, की विष्णु हा प्रथम वामन म्हणजे ठेंगू होता. विष्णु म्हणजेच यज्ञ होय. त्याच्या योगाने देवांनी अर्चा व श्रम करून सर्व पृथ्वी प्राप्त करून घेतली (१. २. ५. ५). अथर्ववेदांत परशुराम या अवताराचें बीज सांपडतें. सृंजय वैतहव्य राजे भृगूंची व ब्राह्मणी प्रजेची हिंसा केल्यामुळे पराभूत झाले, असा तिथे उल्लेख आहे (५. १९. १-११).



परशुराम

अवतारवादाचा सूत्रपात प्रथम ब्राह्मणसाहित्याच्या रचनाकालांत झाला. 'वामनो ह विष्णुरास'= वामन हा विष्णु होता, असें शतपथांत स्पष्ट म्हटलें आहे (१. २. ५. ५). नारायणीय उपनिषदांत ही कल्पना याहून अधिक स्पष्ट झाली व पुढे वेगवेगळ्या ग्रंथांत आणि शिलालेखांतहि अवतार कल्पनेचे उल्लेख होऊं लागले. शिल्पाधिकारम्‌मध्ये नृसिंहावताराचा निर्देश आहे. कालिदासाने

"रामाभिधानो हरिरित्युवाच' = राम नांवाचा विष्णु असें बोलला असें म्हणून रामावताराचा उल्लेख केला आहे (रघु. १३.१). छांदोग्यांत (३. १७, ६.) देवकीपुत्र कृष्णाचा, त्याचप्रमाणें तै. आरण्यकांत (१९. १.६) वासुदेव कृष्णाचा उल्लेख येतो. वैदिक वाङ्मयांत त्याला ब्रह्माचा अवतार असें म्हटलें असून पुढे तो विष्णूचा अवतार मानला गेला. महाभारत, हरिवंश व पुराणें यांत कृष्ण हा विष्णु होता, 'कृष्णस्तु भगवान् स्वयम्', असें स्पष्ट म्हटलें आहे.



वामन–अमरावती

महाभारतानंतरच्या वाङ्मयांत वासुदेव व कृष्ण हे एकच मानलेले आहेत. पण त्या पूर्वीं च्या वाङ्मयांत त्या दोन भिन्न व्यक्ती होत्या. तै. आरण्यकांत वासुदेवाचा नारायण व विष्णु यांच्यासह उल्लेख आहे (११. १.६). पाणिनीनेहि 'वासुदेवार्जुनाभ्यां वुञ्' या सूत्रांत वासुदेवाचा उल्लेख करून त्याला देवकोटींतलें मानलें आहे. कृष्णाचें नांव प्रथमतः छांदोग्यांत येतें (३. १७. ६). तिथे त्याला देवकीचा पुत्र व घोर आंगिरसाचा शिष्य म्हटलें आहे. त्या ठिकाणीं कृष्ण हा मनुष्यच मानलेला आहे. पण पुढे कृष्णाच्या मागे ब्रह्मण्य हें विशेषण लागलें व विष्णूशीं त्याचें तादात्म्य कल्पिलें गेलें. ब्राह्मणकाळांत प्रजापति हा विविध रूपें घेऊन मानवांचीं दुःखें निवारीत होता. त्यानंतर नारायणाकडे तें कार्य आलें. त्याचें व दैत्यशत्रु विष्णूचें ऐक्य कल्पिलें गेलें. वेदकालाच्या अखेरीस वासुदेव ही देवता महत्पदास चढली. त्यालाहि विष्णूचाच अवतार समजूं लागले. महाभारतकाळापूर्वी वासुदेव हा विष्णु व नारायण यांच्या बरोबरीने मानला जात होता. देवकीपुत्र कृष्ण हा ज्ञानी यति मानला जात होता. हे दोघेहि भिन्न होते; पण पुढे ते एकरूप होऊन अवतार पदवीला पोचले.

वासुदेव याचा अर्थ वसुदेवोत्पन्न असा सर्वांनी केला आहे. पण बलदेव हा वसुदेवोत्पन्न असूनहि त्याला वासुदेव म्हणत नाहीत. वासुदेव या नांवावरून त्याचा बाप वसुदेव असला पाहिजे, असें गृहीत धरलें गेलें आहे. याला एक पुरावा म्हणजे म. भा. पूर्व वाङ्मयांत कृष्णाच्या बापाचें नांव आढळत नसून देवकी हें त्याच्या आईचें नांव तेवढें दिसतें. कृष्णाचें चरित्र पाहिल्यास त्याच्यामध्यें दैवी व मानवी अशा उभयविध गुणांचा समन्वय झालेला आहे. त्याच्या चरित्राचे सरळ दोन भाग पडतात. त्याचें बालचरित्र गोकुळ वृंदावनांत गोपगोपींशीं निगडित आहे. त्याने बाळपणींच दैत्यसंहाराचीं अद्भुत कृत्यें केलीं आहेत. बलदेव हा देखील शेषाचा अवतार मानला जात असे. कदाचित् या दोन विभूतींचा मुद्दाम संबंध आणला गेला असावा. कंसवधापर्यंत तो संबंध टिकतो व पुढे त्या दोघांचे जीवनप्रवाह वेगळे होतात. कृष्णचरित्राच्या पुढच्या भागांत तो वृष्णींचा राजा व पांडवांचा कैवारी या स्वरूपांत दिसतो. या सर्व गोष्टींवरून असें दिसतें, की कृष्ण हा मुळांत यादव व सात्वत यांचा देव होता. त्यांनीच त्याला वासुदेवाशीं एकरूप केलें असावें. याकोबीच्या मतें पांचरात्र व भागवत या दोन संप्रदायांनी वासुदेव व कृष्ण या दोघांचें ऐक्य करून त्यांची पूजा सुरू केली.



मुरलीधर कृष्ण–धातुमूर्ति


रामावताराच्या बाबतींत याहून थोडा निराळा प्रकार आहे. रामावतार त्रेतायुगाच्या शेवटीं झाला, अशी सर्व हिंदूंची धारणा आहे. प्रथम तो केवळ काव्याचा नायक होता. पण वाल्मीकीच्या रामायणामुळे तो लोकविश्रुत झाला. सत्यवादी, पितृभक्त, बंधुवत्सल, महापराक्रमी आणि सद्‌गुणांचा पुतळा अशा अनेक गुणविशेषांमुळे राम हा लोकांना आदरणीय झाला. डॉ. याकोबीचें अनुमान आहे, की दाशरथी राम हा वैदिक इंद्राचेंच दुसरें रूप आहे. तो पश्चिम

भारतांत बलराम आणि पूर्व भारतांत दाशरथी राम, अशा दोन भिन्न स्वरूपांत विकसित झाला. गृह्यसूत्रांतली इंद्रपत्नी सीता ही त्याच कारणामुळे पुढे रामपत्नी बनली. बौद्ध जातकांवरून कळतें, की बुद्ध हा रामाचा अवतार होता. बौद्ध साहित्यांत रामाची बोधिसत्त्व या रूपांत कल्पना केलेली आहे. त्यावरून सनपूर्व पहिल्या शतकांतच राम हा अवतारी पुरुष मानला गेला असावा, असें दिसतें. मूळ रामायणांत राम हा एक श्रेष्ठ मानव व आदर्श क्षत्रिय या स्वरूपांतच दिसतो. पण रामायणांत भर पडली त्या काळांत मात्र तो पूर्णावतार या पदवीला पोचला.



कोदंड – राम

अवतार या स्वरूपांत रामोपासनेचा अधिक प्रचार इ. स. च्या बाराव्या शतकानंतर झालेला दिसतो. स्वामी रामानंद यांच्या काळांत रामोपासना खूप वाढली. त्या उपासनेवर धार्मिक साहित्यहि निर्माण झालें. रामभक्तिसाहित्यांत अध्यात्म रामायणाला फार वरचें स्थान आहे. इ. स. च्या चौदाव्या शतकानंतर रामभक्तीचा प्रवाह याहून अधिक वेगवान् झाला. त्याला पूर्ण परब्रह्माचें स्थान मिळालें. वाल्मीकीचा राम शरभंगाच्या आश्रमांत गेल्यावर त्या ऋषीच्या चरणांना स्पर्श करतो, तर अध्यात्म रामायणांतला राम शरभंग ऋषीकडून पूजेचा स्वीकार करतो. अगस्त्याच्या बाबतींतहि हाच प्रकार आहे (अध्यात्म रा. ३.२.२-१०). पूर्व–प्रचलित रामकथा मध्ययुगांत अशा वेगळ्याच ढंगांत परिवर्तित झाली आहे. आणि हें परिवर्तन राम हा अवतार म्हणून जनतेच्या हृदयांत ठसल्यानंतर झालेलें आहे. रामकथेचा हा कायापालट भक्तिसंप्रदायाने घडवून आणला. अवतारकल्पना ही वैष्णव संप्रदायांत महत्त्वाला चढली. बहुतेक वैष्णव हे साक्षात् विष्णूपेक्षा त्याच्या राम – कृष्ण या अवतारांनाच विशेष भजतात. प्रथमारंभीं विष्णूचे अनंत अवतार आहेत, अशी कल्पना होती. पण पुढे ही अवतारसंख्या मर्यादित करण्याकडे प्रवृत्ति होऊं लागली.



वराह

अवतारसंख्या –– महाभारतांतल्या नारायणीय उपाख्यानांत (म. भा. शांति. ३३९) वराह, नृसिंह, वामन, भार्गवराम, दाशरथीराम, व वासुदेवकृष्ण या सहा अवतारांची चर्चा आहे. त्याच अध्यायांत पुढे हंस हा अवतार धरून व बुद्ध अवतार वगळून दहा अवतारांचा उल्लेख येतो. कांही ठिकाणीं ही संख्या बारा आहे. भागवत



नृसिंह

पुराणाने २४ अवतारांचा निर्देश केला आहे, त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणे–

(१) नारायण (विराट् पुरुष) (२) ब्रह्मा (३) सनत्कुमार (चार मिळून) (४) नर–नारायण (५) कपिल (६) दत्तात्रेय (७) सुयज्ञ (८) हयग्रीव (९) ऋषभ (१०) पृथु (११) मत्स्य (१२) कूर्म (१३) हंस (१४) धन्वंतरी (१५) वामन (१६) परशुराम (१७) मोहिनी (१८) नृसिंह (१९) वेदव्यास (२०) व्यास (२१) बलराम (२२) कृष्ण (२३) बुद्ध व (२४) कल्कि (६.२.७).

हे सर्व अवतार लीलावतार या नांवाने प्रसिद्ध आहेत. पुढच्या सर्व पुराणांनी अवतारांची दहा ही संख्या निश्चित केली आहे. त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणे––

(१) मत्स्य (२) कूर्म (३) वराह (४) नृसिंह (५) वामन (६) परशुराम (७) राम (८) कृष्ण (९) बुद्ध व (१०) कल्कि.

कित्येक पुराणांनी बुद्धाला अवतार मानलें नाही. ७ व्या शतकाच्या सुमारास बुद्धाला विष्णूचा अवतार म्हणून मान्यता



बुद्ध

मिळूं लागली होती. पण तरीहि कुमारिलभट्टासारख्या प्रखर मीमांसकांचा त्याला विरोध होताच. १० व्या शतकाच्या सुमारास मात्र बुद्ध हा अवतार सर्वत्र प्रसिद्धि पावला. या गोष्टीला बौद्धांचें वाङमयहि कारणीभूत झालें आहे. हिंदूंची अवतार कल्पना हीनयान पंथांत प्रविष्ट झाली नव्हती; पण महायान पंथाने तिचा मोकळ्या मनाने स्वीकार केला. बोधिसत्त्व कल्पनेच्या उदयानंतर बोधिसत्त्व हे बुद्धाचे अवतार आहेत, ही पुढची कल्पना रूढ झाली. बुद्ध जरी निर्वाणाला गेला असला, तरी त्याला पुन्हा अवतार घेण्याचें सामर्थ्य आहे व यापुढे तो मैत्रेय बुद्धाच्या रूपाने अवतरणार आहे, असें महायान पंथाने घोषित केलें.

अवतारांचे प्रकार–अंशावतार व पूर्णावतार असे दोन प्रकारचे अवतार मानलेले आहेत. लहानसहान उपद्रवांच्या शांतीसाठी तेवढ्याच वेळेपुरता परमात्मा अवतार घेतो व तें कार्य संपल्यावर अंतर्धान पावतो, या प्रकाराला अंशावतार म्हणतात. पण नीतिधर्माचा उच्छेद करणाऱ्या आणि भूमीला भारभूत झालेल्या रावण, कंसादि दैत्यांच्या निर्दालनासाठी भगवान् जेव्हा आपल्या शक्तिव्यूहासह अवतार घेतो आणि ते कार्य पुरें झाल्यावरहि कांही काल जगांत राहतो, अशा अवताराला पूर्णावतार म्हणतात. या दृष्टीने राम–कृष्ण हे पूर्णावतार मानले गेले आहेत. रामाचा बंधु लक्ष्मण हा शेषाचा अवतार व वानर हे स्वर्गांतल्या देवांचे अवतार, तसेंच बलराम हा शेषाचा अवतार, रुक्मिणी हा लक्ष्मीचा अवतार व गोप–गोपी हे देव–देवांगनांचे अवतार, हा राम–कृष्णांचा शक्तिव्यूह होय. बौद्ध मतांत अवलोकितेश्वराला बुद्धाचा अंशावतार मानलें आहे.



अवलोकितेश्वर

नित्यावतार –– भगवंताच्या न्यूनाधिक ईश्वरी गुणांचा आदर्श प्रस्थापित करण्यासाठी होणारे आणि त्या उच्चतम आदर्शांचे व्यक्तित्वानुसार प्रकटन करणारे अवतार हे नित्यावतार समजले जातात.

गुणावतार––ब्रह्मा, शिव, मनु, प्रजापति, ऋषि व संत, यांना गुणावतार समजतात.


विभवावतार–यांची संख्या ३९ मानलेली असून यांत ध्रुव, कपिल, मधुसूदन, पद्मनाभ, इ. व्यक्ती येतात (अहिर्बुध्न्य संहिता ५.५०).

सत्त्वावतार-- यांत काल, स्वभाव, कार्य, कारण, मन, पंचभूतें, अहंकार, त्रिगुण, इंद्रियें, ब्रह्मायुशरीर व स्थावर-जंगम जीव, यांची गणना होते (भाग. पु. ६. २. ७).

अर्चावतार – प्राणप्रतिष्ठा केलेल्या आणि भक्तजनांकडून पूजिल्या जाणाऱ्या भगवंताच्या मूर्ती यांत येतात.

अंतर्यामी-अवतार--- प्राण्यांच्या हृदयकमलांत निवास करणारा आणि त्यांच्या समस्त व्यापारांचें नियमन करणारा परमात्मा (गीता. १८. ६१).

लीलावतार--- सनत्कुमार, सनंदन, सनातन, नारद, वराह, मत्स्य, यज्ञ, नर-नारायण, कपिल, दत्तात्रेय, हयग्रीव, हंस, पृश्णिग, ऋषभ, पृथु, नृसिंह, कूर्म, धन्वंतरि, मोहिनी, वामन,



कल्कि

परशुराम, राम, व्यास, बलदेव, कृष्ण, बुद्ध, कल्कि हे लीलावतार होत. प्रत्येक कल्पांत हे होत असल्यामुळे यांना कल्पावतार असेंहि म्हणतात.

मन्वंतरावतार--- यज्ञ, विभु, सत्यसेन, हरि, वैकुंठ, अजित, वामन, सार्वभौम, ऋषभ, विष्वक्सेन, धर्मसेतु, सुदामा, योगेश्वर व बृहद्भानु.

युगावतार--- शुक्ल, रक्त, श्याम व कृष्ण हे कृतयुगादि-क्रमाने चार अवतार होत.

आवेश– कांही महापुरुषांत शक्ति, ज्ञान, किंवा भक्ति यांच्या द्वारें भगवंताचा आवेश होतो. शेष हा शक्त्यावेश, सनक-सनंदन हे ज्ञानावेश व नारद हा भक्त्यावेश होय.

अवताराचीं मूलतत्त्वें--- अवतार कल्पनेच्या मुळाशीं मुख्य सिद्धान्त आहेत, ते असे—

(१) परमेश्वराचा एका रूपांत नित्य लोकामध्ये नित्य-विहार असतो आणि दुसऱ्या रूपांत जगत् प्रवृत्ति असते. (हंसविलास, ४७). (२) परमात्मा एक असूनहि स्वतःला अनेक रूपांत प्रकट करूं शकतो. (३) अवतार नित्यरूप आहे; मायिक नाही. (४) सर्व अवतार सच्चिदानंदविग्रह आहेत. (५) कांही अवतार मनुष्य रूपांत होतात; तर कांहीत मानुष चेष्टा असते. (६) अवताराची मानुष तनुहि दिव्य असते व तिच्या ठिकाणीं दिव्य शक्ती वास्तव्य करतात. (७) प्रत्येक अवताराची विशिष्ट देहलीला असते आणि विशिष्ट लोकहि असतो. (८) परमेश्वर अवतार-रूपाने पृथ्वीवर आला असतांहि तो आपल्या दिव्य व पूर्ण रूपांत निजधामामध्ये विराजमान राहतो.

अवतारकल्पना प्रथम वैष्णव धर्मांत उगम पावली. तिला लोकप्रियता मिळाल्यावर शैव, शाक्त, गाणपत्य, इ. संप्रदायांनी आपापल्या धर्मांत तिचा स्वीकार केला. विष्णूप्रमाणेच शिवानेहि विविध प्रसंगीं अनेक अवतार घेऊन साधुपरित्राण आणि दुष्टविनाश केल्याचें शैवपुराणांत सांगितलें आहे. कालभैरव, शरभ, यज्ञेश्वर, महाकाल, एकादश रुद्र, हनुमान्, नर्तकनट, अवधूतेश्वर, वृषेश, इ. शिवाचे अवतार शिवपुराणांत सांगितले आहेत. शिवाची प्रथम भार्या दक्षकन्या सती, तीच पुढे हिमाचलाच्या पोटीं अवतार घेऊन पार्वती या नांवाने शिवाचें अर्धांग बनली. पार्वतीला आदिमाया किंवा आदिशक्ति असें म्हणतात. तिनेहि असुरमर्दनासाठी अनेक अवतार घेतले आहेत. मुख्य देवतांच्या कांही परिवार देवताहि असतात. या परिवार देवताहि आपल्या स्वामीच्या अनुज्ञेवरून किंवा विशिष्ट कार्यासाठी मानव अवतार धारण करतात. गणपतीनेहि युगायुगांत गणेश, गुणेश, विघ्नेश, मयूरेश, सिद्धिविनायक इ. अनेक अवतार घेतल्याचें गाणपत्य पुराणांवरून कळतें. दत्तात्रेय हा मुळांत श्रीविष्णूचा अवतारच आहे. पण या अवतारानेहि श्रीपाद, श्रीवल्लभ, नृसिंहसरस्वती, इ. अनेक अवतार घेतल्याचें दत्तपरंपरेवरून कळतें. दक्षिणेंतले बारा आळवार हे श्रीविष्णूच्या आयुधांचे अवतार मानलेले आहेत. महाराष्ट्रांतल्या भागवत संप्रदायांत ज्ञानेश्वराला विष्णूचा, नामदेवाला उद्धवाचा आणि तुकारामाला नामदेवाचा अवतार मानलें आहे. मध्यकालांतल्या सर्व संप्रदायांतून अवतारांची चर्चा आढळते. मूळ अवतारकल्पना अशा प्रकारें सर्वत्र विस्तार पावली आणि या कल्पनेला भगवद्गीतेंतील पुढील श्लोकाची पुष्टि मिळाली——

यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवागच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम् ।।

(१०.४१)

अर्थ——(हे अर्जुना) जी जी वस्तु वैभव, लक्ष्मी किंवा प्रभाव यांनी युक्त आहे, ती ती माझ्या तेजाच्या अंशापासून झाली आहे, असेंच तूं समज.

जैन लोक अवतार मानीत नसले, तरी हिंदूंच्या अवतार कल्पनेला थोडीशी कलाटणी देऊन त्यांनी तिचा स्वीकार केला आहे. तीर्थंकर हे मनुष्य रूपाने जन्म घेतात व तपस्येच्या मार्गाने देवत्व मिळवितात. तीर्थंकर याचा अर्थच जीवांना भवसागरांतून पार करण्यासाठी तीर्थ म्हणजे पायउतार

बनणारा असा आहे. सनातन मतांतहि जगदुद्धार हेंच अवताराचें कार्य मानलेलें आहे.

ख्रिस्ती धर्मांत तिसऱ्या शतकापर्यंत अवतारकल्पनेचा विचार झाला नाही. त्यानंतर ख्रिस्ताला देवाचा अवतार म्हणावें किंवा नाही, हा प्रश्न उत्पन्न झाला आणि तो वादग्रस्तहि बनला. कांही ख्रिस्ती ख्रिस्ताला ईश्वराचा अवतार मानीत, तर कांही त्याला केवळ मनुष्य म्हणत. पुढे ख्रिस्त हा ईश्वराचा पुत्र आहे, अशी भाषा प्रचलित झाली. ख्रिस्ती जनतेंत अशी श्रद्धा आहे, की ईश्वर हा मनुष्यजातीच्या पापांचें प्रायश्चित्त करण्यासाठी व मनुष्यांना मुक्तीचा मार्ग दाखविण्यासाठी ख्रिस्ताच्या रूपांत अवतरित झाला.

इस्लामी धर्मांत अवतारकल्पना कशी आली त्याचा इतिहासहि मनोरंजक आहे. ही कल्पना इस्लामी धर्माच्या शिया पंथांत दिसते. महंमदाच्या मनांत आपल्या मागून खलिफा म्हणून ज्याची नेमणूक करायची होती, त्या अलीला मदिनेच्या पुढाऱ्यांनी पदच्युत केलें व अबूबक्र, उमर आणि उस्मान यांना खलिफा नेमलें. पुढे इ. स. ६६० मध्ये अली मारला गेला. त्याचे पुत्र हसन आणि हुसेन हेहि करबलाच्या लढाईंत मृत्यु पावले. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून इराणमधले अलीचे अनुयायी अलीला व त्याच्या मुलांना देवाचे अवतार मानूं लागले.

पारशी धर्मांत अवतारकल्पना नाही. पण तरीहि ते लोक राजाला पवित्र व दैवी शक्तीने युक्त मानतात.

व्यूह आणि अवतार––महाभारताच्या शांतिपर्वांत नारायणीय धर्माचें विवेचन आहे. हा नारायणीय धर्म सर्वप्रथम भगवंताने अर्जुनाला सांगितला आणि नंतर नारदालाहि त्याचा उपदेश दिला (म. भा. शांति. ३४६.१०–११; ३४८. ६-८). याच नारदाने पुढे नारायणीय धर्माच्या अंतर्गत व्यूहकल्पना मांडली. वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध हे चार मिळून चतुर्व्यूह होतो. यांत वासुदेव हा परमात्मा व सकल सृष्टीचा कर्ता होय. संकर्षण हें त्याचें दुसरें रूप. तें प्राणिमात्राचें प्रतिनिधि समजावें. संकर्षणापासून प्रद्युम्नाची उत्पत्ति झाली. प्रद्युम्न म्हणजेच मन. त्याच्यापासून अनिरुद्ध उत्पन्न झाला. तो अहंकाराचा प्रतिनिधि होय. या चारहि नारायणाच्या मूर्ती आहेत. या व्यूहवादाचा सिद्धान्त पुढीलप्रमाणे आहे–

भगवान् वासुदेव कल्पारंभीं स्वतःच्या ठिकाणीं केवळ अव्यक्त मूल प्रकृतीलाच उत्पन्न करीत नाही, तर तिच्या बरोबरच संकर्षण नामक विशिष्ट जीव किंवा एक व्यूहहि निर्माण करतो. संकर्षण आणि प्रकृति यांच्या संयोगांतून मन प्रकट होतें. हें मन हाच प्रद्युम्न होय. प्रद्युम्नापासून अनिरुद्धाची म्हणजे अहंकाराची उत्पत्ति होते. त्याच्यापासून पुढे महाभूतें व त्यांचे गुण उत्पन्न होतात. त्याच वेळीं ब्रह्मयाचीहि उत्पत्ति होते आणि तो तत्त्वांच्या सामग्रीने भूतसृष्टीची रचना करतो.

नारायणीय आख्यानांत व्यूहवादाच्या अनुषंगानेच भगवंताच्या अवतारग्रहणाची चर्चा आलेली आहे. तिथे भगवंताच्या केवळ सहाच अवतारांचा उल्लेख आलेला आहे. पण पुढे विष्णूचें महत्त्व जसजसें वाढत गेलें, तसतसें त्याच्या स्वरूपांत मोठें परिवर्तन होऊन अवतारांची संख्याहि वाढली.

वैदिक संहितांच्या युगांत मित्र, वरुण, अग्नि, इन्द्र इ. देवतांना एकाच देवाधिदेवाचीं भिन्न भिन्न स्वरूपें मानण्याची प्रवृत्ति होती. अवतारवादाच्या युगांत त्याच्या उलट राम, कृष्ण, इ. महापुरुषांना विष्णूचे अंश अथवा अवतार मानूं लागले. गुप्तकाल हा पुराणांच्या उपबृंहणाचा काल होय. त्या कालांत अवतारकल्पनेला सर्वांगीं बहर आलेला दिसतो. अवतारवाद हा बीजरूपाने वैदिक कालांतच होता आणि ब्राह्मण कालापासून पुढे त्याचा हळूहळू विकासहि होत होता. पण नारायणीय धर्माच्या स्थापनेच्या काळीं व्यूहवाद बलवत्तर झाला आणि त्याच्यापुढे अवतारकल्पना कांही काल मंदप्रभ झाली. पुढे गुप्तकालांत अवतारवाद पुनश्च बळावला व त्याने व्यूहवादालाच विस्मृतप्राय करून टाकलें. अवतारकल्पनेंत व्यूहाच्या चार अंगांतलें वासुदेव हें एकच अंग अवशिष्ट राहिलें. बाकीचे व्यूह केवळ विष्णूचे गुणावतार किंवा अंशावतार ठरले. व्यूहवाद हा नारायणावर आधारित होता, तर अवतारवाद हा विष्णूचा आधार घेऊन पुढे आला. विष्णु ही वेदकालांतील एक दुसऱ्या श्रेणीची देवता होती. पण अवतारकल्पनेंत तिने वाढत वाढत सर्वोच्च भगवत्पद अलंकृत केलें. पुराणांत विष्णूचें स्थान सर्वोच्च मानलें गेलें आहे. अशा प्रकारें नारायणीय उपाख्यानांत सांगितलेला मूळचा भागवत किंवा एकांतिक धर्म पुढे वैष्णव धर्मांत परिणत झाला. व्यूहवादांत नारायणाच्या केवळ सृष्टिकारक गुणांनाच प्राधान्य दिलेलें होतें; तर अवतारवादांत भगवंताच्या षड्गुणैश्वर्याला व त्याच्या अनंत लीलांना महत्त्व प्राप्त झालें. आणि त्याहिपुढे साक्षात् विष्णूपेक्षा त्याचे राम-कृष्णादि अवतार हेच विशेषत्वाने भजनीय व पूजनीय ठरले. [वै. ध.; म. ज्ञा. को.; हि. ध.]

अवंती

(१) माळव्यामधील एक प्राचीन नगरी. हिला अवंतिका असेंहि म्हणत. मोक्षदायक सप्तपुऱ्यांमध्यें हिची गणना आहे. ही नगरी पूर्वीं आजच्या उज्जयिनीच्या दक्षिणेस अर्ध्या कोसावर होती. आधुनिक माळवा, निमाड व

मध्यप्रदेशांतील वराचसा भाग मिळून अवंती हा प्रदेश बनला होता. या देशाचे दोन प्रमुख विभाग होते. उत्तर विभागाची राजधानी उज्जयिनी व दक्षिण विभागाची माहिष्मती ही होती. याच उज्जयिनींत प्रख्यात विक्रमादित्य राजा राज्य करीत होता. अवंतीच्या वैभवाचें वर्णन अनेक संस्कृत कवींनी केलें आहे. कालिदास म्हणतो–

प्राप्यावन्तीनुदयनकथाकोविदग्रामवृद्धान्
पूर्वोद्दिष्टामुपसर पुरीं श्रीविशालां विशालाम् ।
स्वल्पीभूते सुचरितफले स्वर्गिणां गां गतानां
शेषैः पुण्यैर्हृतमिव दिवः कान्तिमत् खण्डमेकम् ।
(मेघ. पू. ३१)

अर्थ – उदयनाच्या कथा माहित असलेलीं वृद्ध माणसें ज्या देशांत अजून आहेत, अशा अवंती देशांत प्रवेश केल्यावर तूं पूर्वोक्त वैभवशाली आणि विशाल उज्जयिनीला जा. (ती नगरी म्हणजे) पुण्यकर्म संपत आल्यामुळे मर्त्यलोकीं परत गेलेल्या स्वर्गवासी पुण्यात्म्यांच्या अवशिष्ट पुण्यकर्मांनीं खेचून आणलेला जणूं स्वर्गलोकाचा झळाळता तुकडाच होय.

महाभारतकालीन अवंती राष्ट्राचा विस्तार दक्षिणेस नर्मदेच्या किनाऱ्यापर्यंत व पश्चिमेस महानदीपर्यंत झाला होता. या राष्ट्रांतल्या लोकांना आवंत्य असें म्हणत. आवंत्यांचा उल्लेख वेदांत नाही; पण वेदोत्तर वाङमयांत वैपुल्याने आहे. बौद्ध धर्माच्या स्थापनेच्या वेळीं भारतांत जीं चार प्रमुख राज्यें होतीं, त्यांत अवंतीची गणना होती. नंतर हीं राज्यें मौर्य साम्राज्यांत समाविष्ट झालीं. अवंतींतले क्षत्रिय राजे पराक्रमी होते. भारतीय युद्धांत कौरवांच्या सैन्यापैकीं एक पंचमांश सैन्य अवंतीच्या राजांचें होतें. विंद व अनुविंद हे दोन आवंत्य वीर त्या सर्व युद्धांत कौरवांच्या बाजूने चमकले. शेवटीं अर्जुनाने त्यांचा वध केला.

अवंतीचे क्षत्रिय हे हैहय राजवंशाचे असून त्यांच्यापैकी कार्तवीर्य अर्जुन हा महापराक्रमी राजा झाला. हैहय व यादव यांचे वैवाहिक संबंध घडले आहेत. यदुराजकन्या राज्याधिदेवी हिचा विवाह अवंतीच्या राजाशीं झाला होता. तिला विंद-उपविंद असे दोन पुत्र झाले. भारतीय युद्धांतलें विंद-अनुविंद ते हेच असावे. अवंतीचा उल्लेख पाणिनीने केला असून (अष्टा. ४. १. १७०) भागवत, स्कंदपुराण व योगिनीतंत्र यांमध्येहि तो आहे.

या देशाची जमीन सुपीक होती. कच्छच्या आखातापासून पूर्वेकडे निघालेल्या आर्यांनी हा देश जिंकून तिथे आपली वसाहत केली. इ. स. च्या दुसऱ्या शतकापर्यंत हा देश अवंती या नांवाने प्रसिद्ध होता. पुढच्या काळांत मालव हें नांव त्याला प्राप्त झालें.

अवंतीचें राज्य जंबुद्वीपामधील सोळा महाजनपदापैकी एक होतें. या राज्यांतले लोक श्रीमंत व समृद्ध होते. अवंती हे बौद्ध धर्माचें मोठें केंद्र होतें. या प्रदेशांत थेर महाकच्छायन याने त्या धर्माचा प्रसार केला. जैन तीर्थंकर महावीर यानेहि या ठिकाणीं तपश्चर्या केली होती.

भारताच्या राजकीय इतिहासांत अवंतीला महत्त्वाचें स्थान आहे. बुद्धाचे समकालीन असलेल्या प्रद्योत राजांच्या पराक्रमाची भीति मगध सम्राटांच्याहि हृदयांत वसत होती. प्रद्योताचा हल्ला येऊं नये म्हणून मगधाच्या अजातशत्रूने राजगृह या राजधानीला भक्कम तटबंदी केली होती. प्रद्योत राजा वत्सराज उदयनाचा मत्सर करीत असे. त्याने एकदा उदयनाला पकडून तुरुंगांत टाकलें असतां प्रद्योताची कन्या वासवदत्ता हिचें त्याच्यावर प्रेम जडलें. तो तिला घेऊन पळून गेला आणि त्याने तिला आपली पट्टराणी केलें. ही घटना कालिदासाने 'प्रद्योतस्य प्रियदुहितरं वत्सराजोऽत्र जह्रे' या श्लोकांत सांगितली आहे (मेघ. पू. ३४). सम्राट् अशोक हा अवंती देशाचा राजप्रतिनिधि म्हणून कांही काल उज्जयिनीस राहिला होता. **पाहा** – उज्जयिनी [हि. जॉ. ए. इं.]

(२) एक प्राचीन राज्य. या राज्यांत महाकालवन आहे. त्या वनांत शिव-पार्वती विहार करीत असतां अंधक नांवाच्या दैत्याने पार्वतीला पळवून नेण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीं शिवाने अंधकाशीं युद्ध करून त्याचा पराभव केला. (मत्स्य पु. १७८). जरासंधाने यादवांच्या विरुद्ध मोहीम सुरू केली, तेव्हा अवंतीच्या लोकांना आपल्या सैन्यांत भरती केलें होतें. या प्रदेशावर शूद्र व आभीर यांनी राज्य केलें. मागध पुरंजयाच्या कालांत इथले ब्राह्मण व्रात्य झाले. [भाग. पु. १२–१]

(३) विंध्य पर्वतांतील एक जमात. हैहयांच्या पांच गणांपैकी एक गण. जयध्वजाने यांची इथे वसाहत केली. परशुरामाने यांचा पराभव केला. [पु. इं.]

अवंतीपुर काश्मीरमधलें झेलमच्या तीरावरचें एक क्षेत्र. श्रीनगरपासून हें नऊ कोसांवर असून अनंतनाग क्षेत्राला जाणाऱ्या रस्त्यावर आहे. याचें प्राचीन नांव विश्वैक्यसार असें होतें. ९ व्या शतकांत अवंतीवर्मा या राजाने या नगराची स्थापना केली. या ठिकाणीं अनेक मंदिरांचे भग्नावशेष आहेत. इथलें अवंतीश्वराचें मंदिर जमिनीपासून ५७ फूट उंचीवर असून वर चढायला पायऱ्या आहेत. इथली कारागिरी उच्च दर्जाची आहे. जवळच एका दगडी सिंहासनावर एक

भव्य कन्यामूर्ति उभी असून तिच्या हातीं डमरू आहे व तिच्या दोहीं अंगीं दोन सिंह आहेत.

इथलें दुसरें ऐतिहासिक दृष्टचा महत्त्वाचें मंदिर म्हणजे अवंतिवर्म्याने बांधलेलें विष्णुमंदिर होय. या विष्णुमूर्तीच्या दोहीं अंगीं दोन द्वारपाल आहेत. मंदिराच्या वरच्या भागीं चार कोंबडचा असून त्यांच्या वर चौदा गोल पाषाणांची पंक्ति आहे. मंदिरावर देवतांचीं चित्रें व हंस, सिंह, कमल हीं सांस्कृतिक प्रतीकें कोरलेलीं आहेत. सिकंदराने इथल्या मंदिरांचा विध्वंस केला, असें सांगतात. [म. का.; योजना]

अवत्सार काश्यप

सूक्तद्रष्टा. नवव्या मंडळांतलीं ५३ ते ६० सूक्तें याच्या नांवावर आहेत. सोमपानाने योद्धचांच्या अंगीं वीरश्री चढते आणि ते हजारों शत्रूंना पादाक्रांत करतात, असें हा सांगतो (ऋ. ९. ५५. ४).

अवदान

याच्या व्याख्या पुढील प्रमाणें आहेत–– (१) ‘हविष्ट्वप्रयोजक: संस्कार:’ = हविर्द्रव्याला हविपणा प्राप्त करून देणारा संस्कार (जैमि. न्या. अ. १ १०. ७). (२) ब्राह्मणें व कल्पसूत्रें यांत अवदान शब्द होमयोग्य पदार्थांच्या गृहीतव्य अंशाचा वाचक म्हणून घेतलेला आहे. उदा० ‘तस्मात् यत्किञ्चिदग्नौ जुह्वति तदवदानं नाम’ = म्हणून जें किंचित् अग्नींत हवन करतात, त्याला अवदान असें नांव आहे (श. ब्रा. १. ७. २. ६). (३) दो = कापणें. यावरून मुख्य हवीपासून यागासाठी कापून घेतलेला किंवा निराळा केलेला भाग तो अवदान होय, अशीहि एक व्याख्या आहे.

श्रौत यज्ञांत हविसमर्पणाची विशिष्ट पद्धति आहे. पुरोडाशासारख्या घन हवीच्या मध्यांतून एक व पूर्वार्धांतून एक अशीं दोन अवदानें घेतात. प्रथम जुहूंत एक स्रुवाभर आज्याने उपस्तरण, त्यावर अवदानें व त्यावर आज्याने अभिघार असें करून मग तें अग्नींत देतात. याला चतुरवदान म्हणतात. पंचावदानांत हवीच्या पश्चिमार्धांतून तिसरें अवदान घेतात. जमदग्नि गोत्राच्या यजमानासाठी पंचावदान घ्यावें, असें सांगितलें आहे (सत्या. श्रौ. सू. २. २). हवि द्रवपदार्थ असेल, तर त्याचें अवदान स्रुव्याने घेतात व मांसाचें अवदान स्वधितीने घेतात. [विद्याधरशास्त्री भिडे; भा. वृ. इ.]

अवदानधर्म

स्रुचेला उपस्तरण (तूप लावणें) करून तिच्यांत पंचावत्तीने तीन वेळां व तसा नसेल त्याने दोन वेळां हवि घेऊन त्याला अभिघार करणें म्हणजे अवदानधर्म होय. [सं. कौ.]

अवदान साहित्य

‘अवदानं कर्म वृत्तम्’ = अवदान म्हणजे परिशुद्ध कर्म होय (अमर.). पालि भाषेंतल्या अवदान शब्दाची व्युत्पत्ति अज्ञात आहे; निदान विवाद्य आहे. धार्मिक, नैतिक अथवा ऐतिहासिक प्रकारचें असाधारण कार्य, असा या शब्दाचा सर्वसामान्य अर्थ आहे. “पराक्रमोऽवदानं स्यात्” = पराक्रम म्हणजे अवदान होय असें भागुरिकोशांत म्हटलें आहे. परोपकार बुद्धीने केलेलें कृत्य; मग तें आत्मत्यागाचें असो वा विहार बांधणें, द्रव्यदान, इ. स्वरूपाचें असो, तेंहि अवदान या अर्थानेच घेतलें जातें. कृष्णकृत्यांचें फल काळें व शुभ्र कृत्यांचें फल शुभ्र, हा नीतिसिद्धान्त कथेच्या द्वारें पटवून देणें, हें अवदान साहित्याचें उद्दिष्ट आहे. बौद्धांच्या महाव्युत्पत्तिकोशांत बारा विद्या दिलेल्या असून त्यांत अवदान ही एक विद्या मानलेली आहे. अवदानसाहित्य हें कर्मवादाचा प्रचार करणारें आहे. हें मुख्यत्वें कथासाहित्य आहे. या कथा दंतकथांच्या स्वरूपांत असल्या, तरी त्या स्वत: बुद्धाने सांगितलेल्या असल्यामुळे बौद्धसूत्राप्रमाणेच त्यांचेंहि प्रामाण्य मानतात. अश्वघोषाचा सूत्रालंकार हा ग्रंथ कांही अंशीं अवदानस्वरूपाचा आहे. अवदानकथांचा सर्वांत प्राचीन संग्रह अवदानशतक हा आहे.

हा हीनयानपंथाचा ग्रंथ आहे. यांत सर्वास्तिवादाच्या आगमांतलीं कित्येक सूत्रें उद्धरण म्हणून घेतलेलीं आढळतात. यांत बुद्धपूजेला प्राधान्य दिलें आहे. यांत दहा दशकें असून प्रत्यक दशकाचा विशिष्ट असा विषय आहे. बुद्ध किंवा प्रत्येकबुद्ध होण्यासाठी काय करावें लागतें, तें पहिल्या चार दशकांत सांगितलें आहे. पांचव्या दशकांत मानवाला प्रेतकोटींत होणाऱ्या यातना व बुद्धाने सांगितलेलीं त्यांचीं कारणें, या प्रकारच्या कथांचे आहेत. सहाव्यांत स्वर्गांत देव होऊन राहिलेल्या मानवांच्या व प्राण्यांच्या कथा आहेत. शेवटच्या चार दशकांत कोणत्या कृत्यांनी मानव अर्हत्कोटीला जातो, त्यासंबंधींच्या कथा आहेत.

अवदानशतकांतल्या गोष्टीचा एक नमुना असा –

एका गरीब मुलीने बुद्धाच्या पायांना चंदनाचें विलेपन केलें व त्यामुळे सर्व शहरभर चंदनाचा सुवास सुटला. या चमत्काराचा त्या मुलीला आनंद वाटला व ती बुद्धाच्या पायां पडून त्याला म्हणाली, की ‘मी पुढील जन्मीं प्रत्येकबुद्ध व्हावें.’ त्यावर बुद्धाने हसून तिला म्हटलें, की ‘तूं एके

दिवशीं गंधमादन नांवानें प्रत्येकबुद्ध होशील.'

प्रत्येक कथेचा उपसंहार पुढील वाक्यानें होत असतो –

'गुरूनें असें संभाषण केल्यावर परमानंदित अंतःकरणानें भिक्षूंनीं त्या गुरूची प्रशंसा केली.'

अवदानशतकाच्या आधारावर पुढें कल्पद्रुमावदानमाला, अशोकावदानमाला, अशा कांहीं अवदानमालांची रचना झाली.

या व्यतिरिक्त दुसरा महत्त्वाचा ग्रंथ दिव्यावदान हा होय. या ग्रंथाचा कांहीं भाग महायानपंथाशीं संबद्ध असला, तरी हा मुख्यत्वें हीनयानांचा ग्रंथ आहे. हा ग्रंथ अवदानशतकापेक्षा लहान आहे; पण त्यांत कांहीं प्राचीन सूत्रें आहेत. हा संग्रह इ. स. च्या ३ ऱ्या शतकांत बनला असावा, असें विंटरनिट्झचें मत आहे. यांतली सामग्री सर्वास्तिवादाच्या 'विनयां'तून घेतलेली आहे. यांत सुसंबद्धता फारशी नसली, तरी त्यांतलें काव्य अभिजात आहे. त्याची भाषा सुबोध असून अशोकापासून तों पुष्यमित्र शुंगापर्यंतच्या राजांचा त्यांत उल्लेख आहे. यांतली अशोकपुत्र कुणालाची कथा अत्यंत करुण आहे. यांत अधूनमधून भिक्षूंच्या चर्येचे नियमहि दिलेले आहेत. त्यावरून हा ग्रंथ मूलतः विनयग्रंथ असावा, या मताला पुष्टि मिळते.

अशोकावदान हा ग्रंथहि प्राचीन आहे. कारण इ. स. च्या ३ ऱ्या शतकांत त्याचें चिनी भाषेंत भाषांतर झालेलें आहे. सम्राट् अशोक हा त्यांतील कथाचक्राचा मध्यबिंदु आहे. कल्पद्रुमावदानमाला, रत्नावदानमाला व अशोकावदानमाला हीं अवदानांचीं पद्यात्मक रूपांतरें असून त्यांपैकी कांहीं अवदानशतकांतून घेतलेलीं आहेत. हे तीनहि ग्रंथ वीरकाव्याच्या धर्तीवर लिहिलेले आहेत. यांची भाषा पुराणाच्या भाषेसारखी आहे; त्यावरून ज्या कालांत सांप्रदायिक पुराणें अस्तित्वांत आलीं, त्याच कालांत हे ग्रंथ निर्माण झाले असावे. हे तीनहि ग्रंथ महायानपंथाचे आहेत.

क्षेमेन्द्राचा अवदानकल्पलता हा ग्रंथ इ. स. च्या ११ व्या शतकांत निर्माण झाला. तिबेटांत हा ग्रंथ आदरणीय मानला जातो. हा विशाल कथासंग्रह महाकाव्याच्या धर्तीवर आहे. क्षेमेन्द्राचा पुत्र सोमेन्द्र यानें जीमूतवाहनावदान नांवाची एक कथा त्या ग्रंथांत अधिक घातली आहे. त्याशिवाय द्वाविंशतावदान, भद्रकल्पावदान, व्रतावदानमाला, विचित्रकर्णिकावदान, सुमागधावदान, अशीं आणखीहि लहान मोठीं अवदानें बौद्ध साहित्यांत निर्माण झालीं आहेत.

जातकें म्हणजेहि अवदानेंच होत. बोधिसत्त्व हा जातकांचा नायक आहे. आर्यसूरानें जातकमाला लिहिली असून ती बौद्ध संप्रदायांत अत्यंत लोकप्रिय ठरली आहे. अश्वघोषाच्या सूत्रालंकाराला आदर्श ठेवून ही जातकमाला रचली गेली आहे. इ. स. च्या ५ व्या शतकांत जातकमालेचा चिनी अनुवाद तयार झाला; तेव्हा त्यापूर्वी शंभर वर्षें तरी आर्यसूर हा होऊन गेला असावा. जातकमालेंत बुद्धाच्या पूर्वजन्माविषयीं दंतकथा आहेत. या कथा त्याला पालिजातकांत आयत्या मिळाल्या. जातकमाला गद्य-पद्य अशा संमिश्र स्वरूपांत आहे. पाहा –जातककथा; अश्वघोष. [बौ. ध. द.; सं. सा. सो. इ.; म. ज्ञा. को.; भा. वृ. इ.].

अवधी – भाषा व साहित्य

अवधीचा अर्थ अवधविषयक असा होतो. पण भाषेच्या क्षेत्रांत त्याचा अर्थ अवधप्रदेशांत बोलली जाणारी भाषा किंवा बोली असा आहे. हिंदीच्या प्रादेशिक बोलींत अवधीला प्रमुख स्थान आहे. तुलसी व जायसी यांच्या प्रतिभेचा विलास याच भाषेच्या द्वारें प्रकट झाला. अवध हें हिचें मूळ क्षेत्र असलें, तरी तिचा प्रसार मात्र हिंदीभाषिक विभागांत सर्वत्र आहे. लखनौ, उन्नाव, रायबरेली, सीतापुर, बाराबंकी सुलतानपुर, प्रतापगढ, फैजाबाद, लखीमपुर, खीरी, इ. जिल्ह्यांत ही भाषा बोलली जाते. बिहारमधले मुसलमान हीच बोली बोलतात. याशिवाय उत्तराखंडाच्या दक्षिणेस म्हणजे गंगा ओलांडून प्रयाग, मिर्जापुर, जौनपुर, इ. जिल्ह्याच्या कित्येक तहलसिलींत ही बोली प्रचलित आहे.

हिच्या उत्पत्तीसंबंधीं विद्वानांत मतभेद आहेत. रामचंद्र शुक्ल अपभ्रंश भाषेंतून हिचा उगम झाल्याचें सांगतात. ग्रियर्सनचें मत ती अर्धमागधीपासून जन्मली असें आहे. बाबूराम सक्सेना यांच्या मतें तिचें निकटचें साम्य पालीशीं आहे. पूरबी व पश्चिमी अशीं अवधीचीं दोन रूपें आहेत. पूरबीला शुद्ध अवधी म्हणतात. पहिलीचें सुंदर रूप जायसीच्या काव्यांत व पश्चिमीचें तुलसीदासांच्या काव्यांत आढळतें.

अवध प्रदेशाच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजनैतिक परिस्थितीवर दृष्टिपात केला असतां असें दिसतें, की य प्रदेशाची वीरपरंपरा व वीरगाथालेखनाचीहि परंपरा प्राचीन आहे. आजच्या उपलब्धीप्रमाणे अवधीचें पहिलें काव्य (इ. स. ११७४) वीरकाव्यच आहे व तें जगनिक या कवीनें लिहिलें आहे. या काव्याचें नांव आल्हखंड असें असून त्याचा संबंध आल्हा-ऊदलांच्या कथेशीं आहे. पृथ्वीराजाच्या मृत्यूनंतर अकरा वर्षांनी महोबा या वीरस्थलाचें पतन झालें. त्याबरोबरच परमारांचें कीर्तिवैभव वाढलें, विस्तारलें. आल्हखंडांत याच यशोवितानाचें सविस्तर वर्णन आहे. या काव्याच्या रचनेपासून तों आज–तागायत या काव्यानें किती तरी लोकांच्या हृदयांत साहस आणि जीवन यांचा

मंत्र फुंकला आहे. वीरगाथाकाव्यांत आल्हखंडाला जें भाग्य लाभलें, तें दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथाला लाभलें नाही. तुलसीदासाच्या रामचरितमानसानंतर याच ग्रंथाला अवधप्रदेशांत सर्वाधिक लोकप्रियता मिळाली आहे.

चौदाव्या शतकाच्या प्रारंभीं देशांतल्या परिवर्तनशील राजकीय व ऐतिहासिक परिस्थितीमुळे साहित्याच्या आदर्शांतहि महान् क्रांति झाली. या काळांत इस्लामी धर्मानें हिंदुत्वाशीं कट्टर विरोध धरला होता. इस्लाम जनतेच्या हृदयांत असंतोष आणि विद्रोह यांचीं बीजें पेरीत चालला होता. मात्र हिंदूंची शक्ति क्षीण झालेली असल्यामुळे ते युद्धाच्या मार्गाने आपल्या अपमानाचें उट्टें काढू शकत नव्हते; आत्मसंरक्षणासाठी ईश्वराची प्रार्थना करणें यापलीकडे हिंदूंना कांही करतां येत नव्हतें; त्यामुळे ' निर्वलके बल राम ' हा भाव जनतेच्या हृदयांत पुनश्च जागृत झाला. जनतेचे कवीहि ईश्वराच्या स्तुतिस्तोत्रांतच आपल्या काव्यप्रतिभेचें प्रदर्शन करूं लागले. जनतेच्या भावनांचे प्रतिनिधि असलेल्या या कवींनी धार्मिक महत्त्वाचीं तीर्थक्षेत्रें हेच आपले बसौटे केले व त्या त्या ठिकाणच्या भाषेंत काव्यरचना सुरू केली. कालांतराने त्या त्या क्षेत्ररूप केंद्रांतल्या भाषेने साहित्यिक भाषेचें रूप ग्रहण केलें. चौदाव्या शतकाच्या या कालखंडाला भक्तिकाल असें म्हणतात. उत्तरभारतांत भक्तिकालामध्ये ज्या दोन भाषांना प्राधान्य मिळालें, त्यांतली पहिली व्रजभाषा आणि दुसरी अवधी होय.

भक्तिकालांतलें हें काव्य संतलिखितकाव्य, प्रेमकाव्य, रामकाव्य, व कृष्णकाव्य, या चार धारांनी प्रवाहित झालें. कृष्णकाव्याची रचना व्रजभाषेंत विशेषत्वाने झाली. प्रेमकाव्यें व रामकाव्यें हीं बहुतांशीं अवधींत लिहिलीं गेली; कारण बहुतेक रामाश्रित कवी अवधप्रदेशाचेच रहिवासी होते. संतकवींत अवधीभाषेच्या द्वारें काव्यनिर्मिति करणाऱ्यांत मलूकदासाचें नांव सर्वप्रथम घ्यावें लागेल. रामअवतारलीला, ज्ञानबोध, सुखसागर, इ. ग्रंथ त्याने लिहिले. त्याच्या भाषेचें प्रसन्न, सुंदर रूप त्याच्या स्फुट साहित्यांत दिसून येतें. मथुरादास हा मलूकदासाचा शिष्य. हा इ. स. चें सोळावें शतक संपतांना झाला. यानेहि अवधींत काव्यरचना केली आहे. त्यानंतर अठराव्या शतकाच्या प्रारंभीं राजस्थानांत संत चरनदास जन्माला आला. ज्ञानस्वरोदय, अष्टांगयोग, संदेहसागर, भक्तिसागर, इ. त्याचे २१ ग्रंथ आहेत. त्याच्या बहुतेक ग्रंथांची भाषा अवधी आहे.

प्रेमकाव्यांची भाषा मुख्यत्वें अवधीच झाली आहे. सूफी कवींनी याच भाषेंत आपलीं प्रेमाख्यानें रचलीं आहेत. सूफी आख्यानकाव्यांची परंपरा हिंदु व मुसलमान दोघांनीहि आत्मसात् केली व पुढे चालविली.

उत्तर भारतांत रामानंदाच्या (१४ वें शतक) प्रतिभेने व महान् व्यक्तिमत्त्वाने रामभाव जागृत केला. पुढे रामसाहित्याचा सर्वश्रेष्ठ कवि तुलसीदास हा झाला. त्याच्या काव्यामुळे रामभक्तीचा प्रचार सर्वत्र झाला. त्याच्या रामचरितमानसांतून रामभक्तीची जी एक अविच्छिन्न धारा प्रवाहित झाली, ती आजतागायत या ना त्या स्वरूपाने साहित्यांत दृग्गोचर होत राहिली आहे. तुलसीदासाने अवधींत ' मानसा 'ची रचना करून त्या भाषेला मधुर, परिष्कृत व सुसंस्कृत बनविलें. सूरदासाने व्रजभाषेला जें साहित्यिक वैभव दिलें, तेंच तुलसीदासाने अवधीला दिलें आहे.

सूफी व हिंदु कवींनी अवधीभाषेंत अनेक प्रेमाख्यानें रचलीं आहेत. आजवरच्या संशोधनांतून असे प्रेमाख्यानांचे हिंदु लेखक सुमारें ३४ उपलब्ध झाले आहेत. त्यांतल्या केवळ ११ कवींनीच अवधी भाषेंत काव्यरचना केली. सत्यवतीकी कथा (इ. स. १४९६), रसरतन (इ. स. १६१९), नलदमयंती (इ. स. १६२६), उहुपावती (इ. स. १६७०), उषाचरित्र (इ. स. १७७५), इ. अवधीभाषेंतील प्रेमाख्यानें सुप्रसिद्ध आहेत.

अवधी लोकसाहित्य – अवधी लोकसाहित्य गद्य व पद्य या दोन्ही दृष्टींनी संपन्न आहे. गद्य वाङ्मयांत असंख्य कथा-कहाण्यांचा समावेश होतो. शेतकऱ्यांच्या जीवनानुभवाचें सार या कथांत सांठविलेलें असतें. या कथांचा एक संग्रह श्री. त्रिपाठी यांनी प्रकाशित केला आहे.

अवधींतील पद्य लोकसाहित्याचेहि दोन मुख्य विभाग आहेत. त्यांपैकी एक भाग मोठमोठ्या महाकाव्यांचा बनलेला असून, दुसऱ्या भागांत सरस व रोचक अशीं अनेक प्रकारचीं गीतें येतात. महाकाव्यांपैकी चनैनी हें सर्वांत मोठें आहे. या काव्याची नायिका चनैनी असून नायकाचें नांव लोरिक आहे. हीं दोघेंहि जातीने अहीर असून काशीच्या जवळपास राहणारीं होतीं.

धिरवा नांवाचें दुसरें एक महाकाव्य असून भडभुंजे लोक सूप वाजवीत तें गातात.

याशिवाय, छोटीं छोटीं अनेक गीतें स्त्रिया व पुरुष भिन्न भिन्न धार्मिक व सामाजिक उत्सवप्रसंगीं गातात. अवध प्रदेशांत स्त्रियांनी गोषा घेण्याची पद्धत होती. त्या पुरुषांच्या समाजांत मिसळत नसत. त्यामुळे स्त्रिया व पुरुष यांच्यासाठी वेगवेगळीं गीतें प्रचलित होतीं. या लहान लहान गीतांतून अवध प्रदेशाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचें

वर्णन आढळतें. [अवधी और उसका साहित्य; श्री. त्रिवेदी– आजकल, जुलै १९५४]

अवधूत ' सर्वान् प्रकृतिविकारान् अवधुनोतीत्यवधूतः ' = सर्व प्रकृतीच्या विकारांना धुवून टाकतो, झाडून टाकतो, तो अवधूत होय, अशी त्याची व्याख्या आहे (सिद्धसिद्धान्त पद्धति ६. १). नाथपंथी योग्यांनाहि अवधूत म्हणतात. अवधूत म्हणजे जात, गोत वगैरे सर्व मर्यादा फेकून दिलेला पुरुष. हा बंधातीत असतो, महापातकी व पतित हे सोडून सर्व वर्गांकडून अन्नग्रहण करतो व अजगरवृत्तीने वागून सदैव आत्मचिंतनांत मग्न राहतो.

ब्रह्मनिर्वाणतंत्रांत अवधूताचे मुख्य चार प्रकार सांगितले आहेत –– (१) ब्रह्मावधूत – हा कोणत्याहि वर्गांतील व आश्रमांतील ब्रह्मोपासक असतो. (२) शैवावधूत –– याने विधिपूर्वक संन्यास घेतलेला असतो. हा कमींत कमी वस्त्रें वापरतो, जटा वाढवितो, अंगाला माती फासतो, मौन पाळतो व धुनी लावून बसतो. (३) वीरावधूत –– याचे केस लांब वाढविलेले असून ते अस्ताव्यस्त असतात. याच्या गळ्यांत अस्थि किंवा रुद्राक्ष यांची माला व हातांत काष्ठ-दंड, परशु व डमरू हीं आयुधें असतात. हा अंगाला भस्म किंवा रक्तचंदन फासतो व कौपीन धारण करतो. (४) कुलावधूत –– हा कौल संप्रदायाची दीक्षा घेऊनहि गृहस्थाश्रमांत राहतो.

वैष्णव संप्रदायांतील रामानंदाच्या कांही शिष्यांनाहि अवधूत असें म्हणतात. रामानंदाने रामानुजांच्या अनुयायांत सुधारणा घडवून आणण्यासाठी नवा संप्रदाय स्थापन केला व या संप्रदायाच्या अनुयायांना जाति-धर्मभेद न मानण्याचा आदेश दिला. अशा जातिधर्मातीत पुरुषाला त्यांनी अवधूत ही संज्ञा योजिली. हे अवधूत जटा वाढवितात, गळ्यांत स्फटिकांची माळ घालतात, खांद्यावर घोंगडी टाकतात व हातांत भिक्षापात्र घेऊन फिरतात. बंगालमध्ये यांचे निर-निराळे आखाडे असून त्यांत सर्व जातींचे लोक आहेत. हे जेव्हा भिक्षा मागायला जातात, तेव्हा 'वीर अवधूत' असा पुकारा करतात व एकतारीच्या सुरावर गाणीं गातात. हे राम व मारुति यांना भजतात.

अवधूत साधु कानफाटा गोरख नाथाला आपला गुरु मानतात. 'गोरखबानीं 'तहि अनेकदा अवधूतपदाचें विवेचन आलें आहे. नाथपंथांत अवधूताची स्थिति अत्यंत उच्च मानलेली आहे. तो सर्व प्रकारच्या प्रकृतिविकारांनी रहित आहे, असें गोरक्षसिद्धान्तसंग्रहांत सांगितलें आहे. दत्तसंप्रदायांत दत्तात्रेयाला अवधूत या नांवाने संबोधितात. नाथसंप्रदायाच्या दैवतसमूहांत दत्ताला मानाचें स्थान आहे. अवधूतगीता हा ग्रंथ दत्तात्रेयाने गोरक्षनाथाला उपदेशिला आहे.

पश्चिमोत्तर प्रदेशांत कांही अवधूतवृत्तीच्या स्त्रिया पुरुष-वेषांत राहतात व त्या भस्म व रुद्राक्ष धारण करतात. त्यांना अवधूती असें नांव आहे. गंगागिरि नामक एका अवधूतीच्या परंपरेंतील या स्त्रिया आहेत, असें मानलें जातें. **पाहा** – गोरक्ष, अतीत पंथ, दत्त, रामानंदी संप्रदाय. [गो. च. प.; हि. ध.; हिं. वि. को.]

अवधूती मार्ग ' अवहेलया क्लेशादिपापान् धुनोतीति ' = अनायासाने क्लेशादि पापांना दूर करणारी शक्ति म्हणजे अवधूती होय. सुषुम्ना मार्गाने प्रवाहित होणाऱ्या शक्तीचें तांत्रिक नांव (चर्यापद पृ. ११).

अवधूती मध्यदेशे तु महासुखाधाररूपिणी

(साधनमाला ४४८.११)

अर्थ– अवधूती ही मध्य म्हणजे वाम व दक्षिण शक्तींच्या मध्यभागीं असून ती महासुखाला आधारभूत असते.

बौद्धसाधनेंत हिला पुष्कळ महत्त्व दिलेलें आहे. या मार्गा-नेच बोधिचित्त निर्माणचक्रांतून (नाभिस्थित) उठून क्रमशः धर्मचक्र (हृदयस्थित), व संभोगचक्र (ग्रीवास्थित) यांतून वर जाऊन उष्णीषकमलांत पोचते व तिथे महासुखाचा अनुभव घेते.

उभयोर्मीलनं यच्च सलिलक्षीरयोरिव ।
अद्वयाकारयोगेन प्रज्ञोपायं तदुच्यते ।।

(हेवज्रतंत्र)

अर्थ–ज्या ठिकाणीं प्रज्ञा व उपाय तसेच शून्यता व करुणा यांचें अद्वयाकारयोगाने दूध–पाण्यासारखें मीलन होतें, त्याला प्रज्ञोपाय म्हणतात.

ही महासुखाची अनिर्वचनीय अवस्था आहे.

तांत्रिक संकेतानुसार ललना, चंद्र व प्रज्ञा, हे वामशक्तीचे द्योतक असून रसना, सूर्य व उपाय, हे दक्षिणशक्तींचे बोधक आहेत. या दोहोंच्या मध्ये असणाऱ्या शक्तीला अवधूती अशी संज्ञा आहे. ही शक्ति पापें धुवून टाकणारी आहे. तांत्रिक साधनांच्या द्वारें वाम-दक्षिण शक्तींची विशुद्धि झाल्यावर अवधूती मार्गाचें उन्मीलन होतें. असें उन्मीलन झाल्यावर महासुखाची प्राप्ति होते. अवधूती मार्ग हा रागमार्ग आहे, तसाच प्रवृत्तिमार्गहि आहे. तो वैराग्य किंवा निवृत्ति यांचा मार्ग नाही. म्हणून महासुखाच्या उपलब्धीसाठी शुद्ध विषयरसाच्या सेवनाची आवश्यकता तंत्रमार्गांत सांगितली आहे.

सहजिया ग्रंथांत विशुद्धि व मलिनता यांना धरून शक्तीचीं तीन रूपें सांगितलीं आहेत–(१) अवधूती–हिच्या ठिकाणीं द्वैतभावाचा निवास असतो. (२) चांडाली–हिच्यांत द्वैताद्वैतभाव राहतो. व (३) बंगाली किंवा डोंबी–हिच्यांत अद्वैत राहतें. जाणता तंत्रसाधक वाम आणि दक्षिण या दोन्ही वेडचावांकडचा मार्गांना सोडून मध्यमार्गाने प्रवास करतो. या मार्गाच्या अवलंबनाने अंतिम क्षणीं रागरूप अग्नि आपोआप शांत होतो. मग त्यापासून जो आनंद उत्पन्न होतो, त्याला विरमानंद म्हणतात. साधनेची हीच सर्वोच्च दशा आहे. या दशेंत मन व वायु, तसेंच चंद्र व सूर्य, यांची गति स्तंभित होऊन साधक अद्वैताच्या आनंदांत प्रतिष्ठित होतो. पाहा– सहजयान, मुद्रा. [हिं. सा. बृ. इ.]

अवधूतोपनिषद् एक संन्यासप्रतिपादक उपनिषद्. याचे ३६ मंत्र आहेत. सांकृति व दत्तात्रेय यांच्या संवादांतून हें निर्माण झालें आहे. यांत प्रथम अवधूताचें लक्षण सांगितलें असून, पुढे प्रधान व गौण अशी अवधूतचर्या सांगितली आहे. यांत परमार्थसिद्धीने धन्य झालेला सांकृति म्हणतो–

परमानन्दपूर्णोऽहं संसरामि किमिच्छया ।
अनुतिष्ठन्तु कर्माणि परलोकयियासवः ।
सर्वलोकात्मकः कस्मादनुतिष्ठामि किं कथम् ।।

अर्थ––मी परमानंदाने परिपूर्ण आहें. मला संसाराची गरज काय ? परलोकाला जाण्याची इच्छा करणाऱ्यांनी कर्माचें अनुष्ठान करावें. मी सर्वलोकात्मक झालों आहें. मला कर्माचरणाची गरज काय ?

अवन भारतांतील कोणत्याहि जातीशीं आपला कसलाच संबंध नाही, असें समजणारी एक जात. पण हे मूळचे जाट आहेत, असें कांही समाजशास्त्रज्ञ समजतात. जाटांत या नांवाची एक पोटजातहि आहे. हे प्राचीन काळीं मिठाच्या पर्वताच्या उत्तरेस असलेल्या पठारावर राहत होते. अवन हा शब्द संस्कृत असून त्याचा अर्थ रक्षण असा आहे. अवनांनी मुसलमानी स्वाऱ्यांस तोंड देऊन हिंदूंचें रक्षण केलें, म्हणून यांना संरक्षक या अर्थी अवन हें नांव पडलें असावें, असा एक तर्क आहे. मुसलमानांच्या स्वाऱ्यांनंतर सय्यद कुतुबशहाने यांना इस्लामी धर्म स्वीकारण्यास भाग पाडलें असावें. तेव्हापासून अवन हे आपणांस कुतुबशहाचे वंशज म्हणवूं लागले, हा दुसरा तर्क होय. पण मूळचे हे जाट अथवा राजपूत असावे, याबद्दल त्यांच्या चालीरीती साक्ष देतात. अवनांत अहीर, भाट, चांद, इ. अनेक पोटजाती आहेत. [सु. वि. को.]

अवनिमूलम् तमिळनाडमधला एक उत्सव. भाद्रपदाला तमिळ भाषेंत अवनि असें नांव आहे. त्या मासांतील मूळ नक्षत्रावर हा उत्सव करतात. या मासाची अधिष्ठात्री देवता निर्ऋति आहे. निर्ऋति हा असुर असल्यामुळे या महिन्यांत माणसें आसुरीवृत्तीने पछाडलीं जातात, असें समजून मानवी मनावरचा तो आसुरप्रभाव नष्ट होण्यासाठी हा सण किंवा उत्सव पाळतात. या उत्सवाला मदुराई येथे विशेष महत्त्व आहे. त्या संबंधीची कथा अशी –

प्राचीन काळीं अरिमाधव पांडच हा राजा राज्य करीत असतां, राज्यांत अवर्षण पडलें व वैगाई नदी आटली. त्यामुळे लोकांचे हाल झाले. कांही कालाने अतिवृष्टि सुरू झाली. वैगाईला महापूर आला. त्या वेळीं तें पाणी अडवून ठेवावें या उद्देशाने राजाने वैगाईवर धरण बांधायचें ठरविलें. त्यासाठी घरटी एक माणूस कामाला लावलें. त्या गांवांत एक सुंदरेश्वराची भक्ति करणारी म्हातारी होती. ती पिठाचे पानगे बनवून विकी आणि पोट भरी. वार्धक्यामुळे तिला धरणावर काम करणें अशक्य होतें. एवढ्यांत सुंदरेश्वर मजुराच्या रूपाने तिच्यापुढे आला व तिला म्हणाला. ‘तुझे पानगे मला देत असलीस तर मी तुझ्या वांटचाचें काम करीन.’ म्हातारीने दिलेले पानगे खाऊन मजूर कामावर गेला; पण त्याच्या वांटचाचें काम त्याला दिवस मावळेतों पुरें करतां आलें नाही. हें राजाला समजलें. त्याने मजुराला पुढे बोलावून त्याला फटके मारणें सुरू केलें. पण त्या फटक्याचे वळ नगरांतल्या लोकांच्या पाठीवर उठूं लागले. त्यामुळे राजा आश्चर्यचकित झाला. लगेच मूठभर माती फेकून मजुराने तें सगळें धरणच पुरें केलें व तो अंतर्धान पावला. पाठोपाठ आकाशवाणी झाली. ‘राजा ! तूं ज्याला फटके मारलेस, तो मजूर नसून साक्षात् सुंदरेश्वर होता.’ मग राजाने देवाची क्षमा मागितली. हा प्रसंग घडला तो दिवस अवनिमूलम्चा होता. आजहि मदुराई येथे हा उत्सव थाटाने करतात. त्या दिवशीं सुंदरेश्वराला सोन्याची टोपली व सोन्याचें फावडें अर्पण करतात. व त्याची नदीपासून मंदिरापर्यंत मिरवणूक काढतात. [सा. इं. फे.]

अवनी तमिळनाडमधल्या कोला जिल्ह्यांतील मुलबागल तालुक्यांतलें एक क्षेत्र. भारतांतल्या दहा क्षेत्रांपैकी अवंतिका क्षेत्र तें हेंच, असें तिकडील लोक मानतात.

रामचंद्र लंकेंतून परत येतांना इथे उतरला होता, अशी दंतकथा आहे. एका शिलालेखांत या स्थानाला दक्षिणेची गया असें म्हटलें आहे. इथे स्मार्तपंथाचे आचार्य राहतात. [मदुरा गॅझे.]

अवनेजन अतिथीचे, देवाचे व आदरणीय व्यक्तीचे पाय धुणें, याला विशेषेंकरून हा शब्द आहे. हात धुणें यालाहि हा शब्द वापरतात. श्राद्धांत पिंडदानप्रसंगीं दर्भावर पाणी शिंपडणें यालाहि अवनेजन अशी संज्ञा आहे. [मत्स्य पु. १७. ४७]

अवभृथस्नान अवभृथ म्हणजे चातुर्मास्यांतील वरुणप्रघास-पर्व, कौकिल सौत्रामणि व सर्व प्रकारचे सोमयाग यांच्या शेवटीं वरुण देवतेच्या उद्देशाने करायचा याग होय. ही इष्टि यज्ञसमाप्तिदर्शक असते. हिच्यांत वरुणाला पुरोडाश अर्पण करायचा असतो. या इष्टीनंतर यजमानदंपती सर्व ऋत्विजांसह नदीवर वा जलाशयावर जाऊन स्नान करतात, त्याला अवभृथस्नान म्हणतात. या वेळीं अवशिष्ट सोम व त्याचीं सर्व पात्रें पाण्यांत सोडतात. यजमान आपली मेखला व पत्नी आपलें योक्त्र पाण्यांत टाकते. यजमान 'देवीरापो....' या मंत्राने जलाचें आवाहन करून पाण्यांत उतरतो. यजमानदंपती डोक्यावर पाणी शिंपडून एकमेकांच्या पाठी चोळतात. वरुणास उद्देशून पुरोडाशादि द्रव्यांच्या जलांतच आहुति देतात. यजमानदंपती नवें वस्त्र नेसतात. सोम गुंडाळलेल्या वस्त्राचें यजमान पागोटें बांधतो. मग उन्नेत्याच्या पाठीमागून सर्व मंडळी मागे वळून न पाहतां यज्ञभूमीकडे जातात. मार्जन केल्यावर 'एधोऽसि......' मंत्राने औदुंबराच्या समिधा आहवनीयांत टाकतात. **पाहा** – अग्निष्टोम, चातुर्मास्य याग. [हि. ध.; म. ज्ञा. को.]

अवम दिन एकाच दिवशीं दोन तिथी संपतात, त्या दिवसाला हें नांव आहे. यालाच तिथिक्षय असेंहि म्हणतात. व्रत वा शुभकृत्य यांच्या प्रारंभास हा दिवस वर्ज्य असतो. [नि. सिं.]

अवरीट विवाहित स्त्री आणि तिच्याच जातीचा पुरुष यांच्या अनैतिक संततीचें नांव. [हि. ध.]

अवरुद्धा एखाद्या पुरुषाने आमरण उपभोगासाठी ठेवलेली भोगदासी. धन्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसदारांकडून तिला आपल्या उपजीविकेसाठी कांही द्रव्य मागतां येतें. मात्र तिने दुसरा घरोबा करतां कामा नये, त्या दोघांचा संबंध उघड असला पाहिजे व ती कुटुंबांतलीच एक अशी मानली गेली पाहिजे. [हि. ध.]

अवलंबनसूत्र एक बौद्ध सूत्रग्रंथ. अवलंबन या शब्दाने प्रेतयोनींतून मुक्त न झालेल्या व अधोमुख अशा आत्म्यांची स्थिति दर्शविलेली आहे. या सूत्राचा सारांश असा– बुद्ध जेतवनांत राहत असतां त्याचा शिष्य मोग्गलान हा ऋद्धि संपादन करीत होता. त्याला एके दिवशीं अंतर्ज्ञानाने दिसलें, की त्याची माता अन्नपाण्याच्या अभावीं कृश होऊन प्रेतलोकांत खितपत पडली आहे. मग त्याने तिला भात खायला दिला; पण त्याचे कोळसे झाले. तेव्हा त्याने तिच्या मुक्तीबद्दल बुद्धाला उपाय विचारला. त्यावर बुद्धाने सांगितलें –

'सातव्या महिन्याच्या पौर्णिमेस दशदिशांचे आचार्य बोलावून पूर्वजांच्या मुक्तीच्या उद्देशाने अन्न, जल व वस्त्र त्यांना अर्पण कर. म्हणजे तुझे पूर्वज उद्धरतील.'

त्या अर्पणाच्या वेळीं म्हणायचे मंत्रहि बुद्धाने मोग्गलानाला सांगितले. मोग्गलानाने त्याप्रमाणे केल्यावर त्याची माता दुःखापासून मुक्त झाली.

हें सूत्र भिक्षु धर्मरक्षित याने इ. स. २६५ च्या सुमारास चिनी भाषेंत अनुवादिलें आहे. या सूत्राविषयीं डॉ. केतकर म्हणतात, की ब्राह्मणांच्या भिक्षुकी धंद्यास प्रथम नांवें ठेवून पुढे श्राद्धें वगैरे भिक्षुकी कर्मे आपल्या ताब्यांत घेण्यासाठी बौद्धांचे जे प्रयत्न झाले, त्यांचें फल म्हणजे हें सूत्र होय. [इं. अँ. पु. ९; म. ज्ञा. को.]

अवलोकनक प्राचीन काळीं प्रासादाच्या वरच्या भागांत एक छोटा मंडप तयार करीत. तिथे बसल्यावर खूप दूरवरचें दृश्य पाहतां येत असे. दिव्यावदानांत याचा उल्लेख आहे (पृ. २२१). कान्हेरी येथील लेण्यांत एक फार उंच गुहा आहे, तिला सागरअवलोकनगुहा असें म्हटलें आहे. [शृं. हा.]

अवलोकितेश्वर एक महान् बोधिसत्त्व. अवलोकितेश्वर हा सामासिक शब्द असून त्याचा अर्थबोध स्पष्ट होत नाही. सामान्यतः त्याचे पुढील अर्थ संभवतात–– (१) मनुष्याला जें कांही दिसतें (अवलोकन होतें) त्याचा स्वामी. (२) प्रचलित जगाचा स्वामी. (३) मानवांना दिसणारा ईश्वर. व (४) साक्षात्कार झालेला ईश्वर.

तिबेटी व भारतीय विद्वानांच्या मतें अवलोकितेश्वर म्हणजे मानवांकडे करुणादृष्टीने पाहणारा ईश्वर होय. तो सर्व बाजूंनी सर्व गोष्टी पाहतो व सर्वांचें रक्षण करतो. म्हणूनच त्याला समन्तमुख (सर्व बाजूंनी मुखें असलेला) असेंहि म्हणतात. कांहींच्या मतें त्याचें मूळ नांव अवलोकितस्वर असें होतें. पण पुढे त्याच्या व्यक्तित्वांत शैव गुणधर्म दाखल झाल्याने त्याला अवलोकितेश्वर म्हणूं लागले. कांहीहि म्हटलें तरी त्या शब्दाची समाधानकारक उपपत्ति लागत नाही, एवढें खरें !

लोकेश्वर व लोकनाथ अशीं त्याचीं आणखी दोन नांवें आहेत. त्यांचा अर्थ मात्र विश्वाचा स्वामी हा स्पष्ट दिसतो.

अमिताभ हा स्वर्गीय बुद्ध व पांडरा ही त्याची शक्ति. यांच्यापासून अवलोकितेश्वराचा जन्म मानतात. तो पित्याच्या राज्याचा मुख्य मंत्री (सामन्त) आहे. त्याचें सौंदर्य नेत्रयुग्मांत साठविलेलें असून दया किंवा करुणा हा त्याचा परम गुण आहे. मधुसागर व रथचक्रा एवढीं कमळें निर्माण करण्याचें त्याचें सामर्थ्य आहे. कित्येक महायानी ग्रंथांतून त्याला गौतमबुद्धापेक्षाहि श्रेष्ठ मानलें आहे. तो लंकेंत गेला असतां, तिथल्या राक्षसी त्याच्यावर मोहित झाल्या; पण त्याने त्या सर्वांना सन्मार्गाला लावलें. मगधांत एकदा दुष्काळ पडला व अन्नान्नदशेमुळे माणसें नरमांसभक्षक बनलीं. तें पाहून याने तात्काळ पर्जन्य-वृष्टि करून लोकांना दुष्काळांतून बाहेर काढलें.


अवलोकितेश्वर–ज्योतिर्मय रूप. नेपाळी पद्धत. तीन शिरें त्रिशक्तीचीं प्रतीकें

बौद्धकल्पनेप्रमाणे चालू कल्प हा भद्रकल्प असून त्यावर अवलोकितेश्वराचें स्वामित्व आहे. गुणकरंडव्यूह या ग्रंथांत याचें पुढीलप्रमाणे वर्णन आहे – तो दयाळू व जनांना नैतिक उपदेश करणारा आहे. ' जोंवर जगांतले सर्व प्राणी ज्ञान मिळवून निर्वाणाला जात नाहीत, तोंवर आपणहि निर्वाणाची आकांक्षा धरणार नाही, ' अशी त्याची प्रतिज्ञा आहे. हळूहळू मानवजात निर्वाणाच्या दिशेने प्रगति करील व त्यानंतर त्याच क्रमाने अन्य जीवयोनीहि ज्ञानाला सन्मुख होऊन निर्वाण साधतील, असा त्याचा विश्वास आहे. तो अव्यक्त रूपाने विश्वांत अध्यात्मज्ञानाचा प्रसार करीतच राहिला आहे. महायान पंथांत त्याला बौद्ध संघांतला श्रेष्ठ अतएव ' संघरत्न ' मानतात.

सद्धर्मपुंडरीक या ग्रंथांत याचें माहात्म्य पुढील प्रमाणे वर्णिलें आहे– तो इतर बोधिसत्त्वांहून श्रेष्ठ आहे. तो अक्षय-मतीबरोबर शाक्य मुनीचें प्रवचन ऐकतो. मंजुश्री सोडल्यास तो शाक्य मुनीच्या तोलाचा आहे. तो परित्राणकर्ता आहे. हजारों बुद्धांची पूजा करण्याऐवजी त्याचें एकट्याचें ध्यान करावें. तो बुद्ध, बोधिसत्त्व, महेश्वर, कुबेर, वज्रपाणि वगैरेंचीं रूपें धारण करतो. तो अमिताभाच्या स्वर्गांत असतो व कधी त्याच्या उजव्या तर कधी डाव्या हातास बसतो. सुखावती व्यूह हा ग्रंथहि त्याच्याच माहात्म्यासाठी लिहिलेला आहे. त्यांत त्याला सुखावती (बौद्धांचा स्वर्ग) चा स्वामीच म्हटलें आहे.

कारंडव्यूह व शूरंगम या ग्रंथांतलें त्याचें वर्णन तंतोतंत शिवासारखें आहे. शिव जसा उग्र व कनवाळू, तसाच अवलोकितेश्वरहि आहे. त्याचें स्वरूप विराट् आहे. सगळे बुद्ध एकत्र केले तरी ते त्याच्याशीं तुल्यबल होणार नाहीत. त्याच्या रोम-रंध्रांत हजारों बुद्ध, बोधिसत्त्व व सगळें जग सामावलें आहे. कनिष्ठ दर्जाचे सर्व देव त्याच्या शरिरांतून बाहेर पडतात. चंद्र-सूर्य त्याच्या नेत्रांतून निघतात. महादेव त्याच्या मस्तकांतून निघतो. त्याच्या हृदयापासून नारायणाचा व स्कंधापासून ब्रह्मदेवाचा जन्म होतो. तो ' लक्षभुजधारी ' व ' कोटिकोटि नेत्रवान्' आहे. त्याच्या बोटांतून अमृताच्या नद्या वाहतात व त्या नरकाग्नि शमवून भूत-प्रेतांची क्षुधा-तृषाहि शमवितात.

वरील वर्णनावरून बौद्धांवर पुढेपुढे पौराणधर्माचा किती विलक्षण प्रभाव पडला, तें कळून येतें.

अवलोकितेश्वराचें सर्वांत मोठें कार्य म्हणजे त्याने ' ॐ मणिपद्मे हुम् ' हा षडक्षरी मंत्र जगाला उपलब्ध करून दिला हें होय. या मंत्राचें सामर्थ्य अपार आहे. तिबेटी बौद्ध असें मानतात, की इ. स. ४०० च्या सुमारास हा मंत्र त्यांच्या देशांत स्वर्गांतून पडला. ही मंत्रविद्या अवलोकितेश्वराहून दुसऱ्या कोणालाच अवगत नाही. म्हणून त्यालाच एकट्याला वंदित ही पदवी प्राप्त आहे.

विंटरनिट्झच्या मताप्रमाणें इ. स. च्या ५ व्या शतकापर्यंत भारतांत अवलोकितेश्वराची उपासना चालू झाली होती. त्याची प्राचीनतम मूर्ति ५ व्या शतकांतली आहे. चिनी प्रवासी फाहियान (इ. स. ३९९) याने भारतांत याची पूजा होत असलेली पाहिली. तो लंकेंतून चीनला जात असतां समुद्रावर तुफान झालें व त्याने प्राणरक्षणासाठी अवलोकिते-

श्वराची प्रार्थना केली. तिबेटांत अवलोकितेश्वराला फार मान्यता आहे. तो लामापंथाचा मुख्य देव आहे. त्यांच्या



अवलोकितेश्वर–नेपाळ, यब्–युम् अवस्थेंत.

मुख्य लामा (दलाई लामा) मध्ये हा अवतरित होतो व अमिताभ पंचन लामा (महापंडित) मध्ये अवतीर्ण होतो. त्यामुळे या दोन्ही लामांचे वेगवेगळे मठ आहेत. आजमितीस ते एकमेकांचे प्रतिस्पर्धी समजले जातात.

याचे भारतीय पर्याय १५ आहेत. चौदा प्रकारच्या मूर्तींमध्ये त्याच्या मुकुटांत अमिताभाची मूर्ति असते. १५ व्या प्रकाराचें नांव वज्रधर्म. हा पांच ध्यानी बुद्धांपासून झाला, असें समजतात. नेपाळांत याचे १०८ प्रकार कल्पिलेले असून काठमांडूच्या एका विहारांत त्याचीं तितकीं चित्रें व तितक्या लांकडी कोरीव मूर्ती पाहायला मिळतात. चीनमध्ये अवलोकितेश्वर स्त्रीरूपांत दाखवितात. ही कल्पना भारतीय अर्धनारीश्वरावरून घेतली असावी. याची एक सुंदर मूर्ति लखनौच्या संग्रहालयांत आहे. पद्मपाणि हें त्याचें मुख्य लक्षण असल्यामुळे त्याच्या हातीं कमळ दिलेलें असतें व दुसरा हात अनुग्रह सूचित करतो. त्याच्या बोटांतून गळणारें अमृत, एक प्रेत ओठ पुढे करून प्राशन करीत आहे असेंहि दाखविलेलें असतें. तारा, त्याच्या मंत्राचा पालक हयग्रीव व मैत्रेयाचा मित्र सुधन हे त्याच्या मूर्तिशिल्पांत त्याच्या भोवती दाखवितात. जेव्हा तो चतुर्भुज शिवासारखा असतो, तेव्हा त्याच्या दोन हातांची ओंजळ दाखवितात. दुसऱ्या दोन हातांत पद्म व रुद्राक्षमाला असते. त्याच्या अन्य कांही शिवसदृश मूर्तींत व्याघ्रांबर, कमंडलु, नागबंध, अस्थिमाला या वस्तूहि दिसतात. **पाहा–** अमिताभ, बोधिसत्त्व. [एन्सा. रि. ए.; तां. बौ. सा. सा.; इं. बु. इ.; म. ज्ञा. को.]

अवसर्पिणी जैनांचा कालविभाग. जैन धर्मांत उत्कृष्ट व निकृष्ट अशा अभिप्रायाने उत्सर्पिणी व अवसर्पिणी असे कालाचे दोन विभाग पाडलेले आहेत. अवसर्पिणीचे सहा भाग होतात – सुसम सुसम, सुसम, सुसम दुःसम, दुःसम सुसम, दुःसम, व दुःसम दुःसम. सांप्रत पांचवा दुःसम हा कालविभाग चालू असून तो दुःखाचा आहे व त्याची वर्षसंख्या २१ हजार आहे. [म. ज्ञा. को.]

अवसानविधीची पूजा उत्तर प्रदेशांत विवाह समारंभ समाप्त झाल्यावर ही पूजा करतात. औसान बीबी असा त्या नांवाचा तिकडे अपभ्रंश झाला आहे. या पूजेसाठी पांच किंवा सात सुवासिनी बोलावितात. प्रथम चौक सारवून त्यावर मातीच्या सात पिशव्या चक्राकार मांडतात. त्यांवर कोऱ्या घडयांत पाणी भरून तो कलश बसवितात. सुवासिनी प्रथम अभ्यंग स्नान करून त्या कलशाची पूजा करतात. भाजलेले चणे व गूळ यांचा नैवेद्य करतात. मग तिची पुढील कथा ऐकतात–

दोघें बहीणभावंडें होतीं. भावाला चिमण्या पाळण्याचा नाद होता. पुढे त्याचें लग्न ठरलें; पण तो सारखा कृश होऊं लागला. बहिणीने कारण विचारलें. तो म्हणाला, की 'मी लग्नाला गेल्यावर पाठीमागून माझ्या चिमण्यांचें कसें होणार?' बहिणीने ती जबाबदारी घेतली. लग्नाला न जातां ती घरीं राहिली. पण तरीहि तिच्याकडून दुर्लक्ष झाल्यामुळे कांही चिमण्या अन्नपाण्यावांचून मेल्या. बहिणीला दुःख झालें. ती औसानबीबीला नवस बोलली, की 'माझ्या चिमण्या जिवंत करशील, तर तुझी पूजा करीन.' त्यावर चिमण्या जिवंत झाल्या. बहीण दारांत बसली. समोरून एक वरात जात होती. त्या लोकांना ती म्हणाली, की 'माझे चणे भाजून आणा.' पण कोणीं ऐकलें नाही. त्यामुळे वरातींतला नवरदेव मूर्च्छित पडला. थोडया वेळाने समोरून एक प्रेतयात्रा निघाली. बहीण त्या प्रेतवाहकांना म्हणाली, की 'माझे चणे भाजून आणा.' त्यांनी तें ऐकलें. त्यामुळे प्रेत जिवंत झालें. वरातींतल्या

लोकांनी येऊन बहिणीला म्हटलें, की 'नवरा मुलगा मूर्च्छित कां पडला ?' ती म्हणाली, 'औसानबीबीची अवकृपा.' मग त्यांनी विधि विचारून त्या देवतेची पूजा केल्यावर नवरा मुलगा उठून बसला. त्या दिवसापासून ही पूजा प्रचलित झाली.

अवस्यु आत्रेय सूक्तद्रष्टा. पांचव्या मंडलांतलीं ३१ व ७५ हीं दोन सूक्तें याच्या नांवावर आहेत. अहीबरोबर युद्ध करतांना आर्य सैनिकांची कशी त्रेधा झाली आणि तरीहि आवेशाने लढून त्यांनी त्या पाखंड्याचा कसा धुव्वा उडविला, तें याने सांगितलें आहे ऋ. ५. ३१. ५). पैलतीरावर असलेल्या यदु-तुर्वशांसाठी सदुघ नदीचा प्रवाह इंद्राने स्तब्ध केल्याचें कथाबीज याच्या सूक्तांत आढळतें (ऋ. ५. ३१. ८). हें समग्र सूक्त आर्यांनी दस्यूंवर मिळविलेल्या प्रचंड विजयाचें यशोगान आहे.

अवहट्ट एक संस्कृताची अपभ्रष्ट भाषा. हें नांव विद्यापतीच्या कीर्तिलतेंत आलेलें आहे –

देशिल बयना सबजन मिट्ठा
तँ तयसन जम्पजो अवहट्टा

'देशिल बयना' म्हणजे देशी वचन. विद्यापतीने या ठिकाणीं देशी वचन आणि अवहट्ट हीं दोन्ही एकच मानलीं आहेत. यावरून अनुमान होतें, की अवहट्ट भाषा विद्यापतीच्या काळांत (१४ वें शतक) प्रचलित अशी साहित्य-भाषा होती आणि लोकांना ती सुलभपणे समजतहि होती. ही अपभ्रंश भाषा का तिच्याहून वेगळी, या विषयीं विद्वानांत मतभेद आहेत. कांहीं लोक हिला वर्तमान भारतीय भाषांचें पूर्वरूप समजतात, तर कांहीं हिलाच अपभ्रंश मानतात. [हिं. सा. को.]

अवक्षारण उपनयनाच्या वेळीं गुरूने आपल्या ओंजळींतील उदक बटूच्या ओंजळींत घालून तें त्याच्याकडून खालीं टाकविण्याचा विधि. [सं. कौ.]

अवाचित फलदान संक्रांतीच्या दिवशीं फळाचें नांव न उच्चारतां एखादें फळ, विशेषत: नारळ गुपचुपपणे एखाद्या ब्राह्मणाच्या घरीं जलपूर्ण पात्रांत टाकणें व नंतर त्याच ब्राह्मणाला त्याचें दान करणें असा याचा विधि आहे. या दानाचा मंत्र पुढीलप्रमाणे आहे–

अनाख्यातं जले क्षिप्तं फलमेतदनुत्तमम् ।
ससुवर्णं प्रदास्यामि सुपुत्रादिफलप्रदम् ।।

अर्थ – न सांगतां पाण्यांत टाकलेलें हें श्रेष्ठ फल सुपुत्रादि फळ देणारें म्हणून मी दान देत आहें. [व्रतराज]

अवावट याची व्याख्या पुढीलप्रमाणे–

द्वितीयेन तु यः पित्रा सवर्णायां प्रजायते ।
अवावट इति ख्यातः शूद्रधर्मा स जातितः ।।

अर्थ – एखाद्या स्त्रीच्या ठिकाणीं तिच्या पतिव्यतिरिक्त त्याच वर्णाच्या अन्य पुरुषाकडून जो पुत्र उत्पन्न होतो, त्याला अवावट असें नांव आहे. तो शूद्र ठरतो. [सं. इं. डि.]

अविघ्नकर व्रत एक काम्य व्रत. फाल्गुन शु. ४ थीस सुवर्णाच्या गणेशमूर्तीची पूजा, तिलहवन, तिलदान व तिलपदार्थभोजन असा याचा विधि आहे. असें चार महिने प्रत्येक शु. ४ थीस करणें. मग मूर्तीचें दान. फल – विघ्ननाश. याची कथा अशी – त्रिपुरयुद्धांत शिवाने व समुद्र-मंथनप्रसंगीं विष्णूने हें व्रत केलें. त्यामुळे त्यांची कार्यसिद्धि झाली. [वाराह पु.]

अविघ्न कलश मंडपदेवताप्रतिष्ठा पाहा.

अविघ्न चतुर्थीव्रत फाल्गुन शु. ४ थीस व्रताचा आरंभ. व्रतावधि चार महिने. गणपतीची पूजा, नक्तभोजन, उद्यापनास तिलयुक्त अन्नाचें हवन व सुवर्णाच्या गजमुखाचें दान, असा याचा विधि आहे. हें व्रत पूर्वीं सगराने अश्वमेधाच्या वेळीं व रुद्राने त्रिपुरासुराच्या वधप्रसंगीं केलें होतें. व्रताचें फल – सर्व विघ्नांचा नाश व कार्यसिद्धि. [च. व. चिं; कृ. क. त.]

अविघ्न विनायक अविघ्नव्रत पाहा.

अविद्या (१) 'असत्प्रकाशनशक्तिरविद्या' = असत् पदार्थाच्या प्रकाशनाची शक्ति म्हणजे अविद्या होय. (स. द. सं. शांकर.) हिचीं दोन कार्यें आहेत – आवरण व विक्षेप. आवरण म्हणजे आत्मस्वरूपावर पडदा टाकणें व विक्षेप म्हणजे त्यावर दुसऱ्या वस्तूचा आरोप करणें. अविद्येलाच अज्ञान असेंहि म्हणतात. **पाहा** –– माया; अज्ञान.

(२) ही विधात्याच्या छायेपासून निर्माण झाली. हिचीं

तामिस्र, अंधतामिस्र, तम, मोह व महामोह, अशीं पांच पर्वें आहेत. [भाग. पु. ३. २०. १८]

अविधवा नवमी भाद्र० वद्य ९ मीस हें नांव आहे. या दिवशीं स्वतःची माता अथवा कुटुंबांतील अन्य कोणी स्त्री अहेवपणीं (सधवा) मृत झाली असल्यास तिचें श्राद्ध करतात. (नि. सिं. २. १५४). यांत ब्राह्मण-भोजनाप्रमाणे सुवासिनीलाहि भोजन घालण्याची रूढि आहे.

अविधेय पृथ्वीच्या खालचा सातवा नरक. [वायु. पु. १०१–१७९]

अवियोग द्वादशी तिथिव्रत. भाद्र० शु. १२ शीस शिव–गौरी, ब्रह्मा–सावित्री, विष्णु–लक्ष्मी व सूर्य–निक्षुभा यांची पूजा करणें, असा याचा विधि आहे. [हे. व्र.]

अवियोग व्रत तिथिव्रत. हें केवळ स्त्रियांसाठी आहे. मार्ग० शु. २ येपासून प्रारंभ. ३ येस तांदुळाच्या पिठाच्या शिव–गौरींच्या प्रतिमा बनवून त्यांची पूजा व पायसभोजन असा याचा विधि आहे. व्रतावधि एक वर्ष. प्रत्येक महिन्यांत या तिथीस वेगवेगळ्या नांवांनी व पुष्पांनी पूजा करतात. [हे. व्र.]

अविवाक्य द्वादशाह यागांतील १० व्या दिवसाचें नांव. या दिवशीं घडणाऱ्या चुकांबद्दल अवाक्षर बोलायचें नसतें. [हि. ध.]

अविवेक सत्यासत्य, धर्माधर्म, बरेंवाईट, इ. प्रतियोगी पदार्थांमधील भेद न समजणें. दोन पदार्थांतील भेद समजण्यास त्या पदार्थांचें पृथक् स्वरूप समजावें लागतें. यावरून आत्मा व अनात्मा यांचें स्वरूप व त्या दोहोंतील भेद यांचें अज्ञान म्हणजे अविवेक होय. तो अभिमानाला कारणीभूत होतो. **पाहा** – अज्ञान, अभिमान. [ब्र. सि. मा.]

अविहोत्र अत्रिकुलांतला एक मंत्रद्रष्टा. [प्रा. च. को.]

अविज्ञात प्लक्षद्वीपांतील एक वर्ष. [भाग. पु. ५. २०. ९]

अवीचि २८ नरकांपैकी एक नरक. याला खाली कांही आधार नाही. खोटी साक्ष देणारे तसेंच दान व द्रव्यविनिमय यांच्या बाबतींत खोटेपणा करणारे लोक या नरकांत खाली डोकें, वर पाय अशा अवस्थेंत यातना भोगतात व अंतीं पर्वत-शिखरावरून त्यांचा कडेलोट केला जातो. [भाग. पु. ५. २६. २८]

अवीर क्षत्रिय पुरुष व वैश्य स्त्री यांची अधर्मसंतति [हि. ध.]

अवेष्टि एक इष्टि. हिच्यांत अग्नि व इतर देवता यांना पुरोडाश देतात. राजसूय यागाच्या वेळीं राजा ही इष्टि करतो. पण कांही आहुतींच्या फरकाने ब्राह्मणहि ती करूं शकतो. [हि. ध.]

अवेस्ता प्राचीन इराणचा व पारशी लोकांचा धर्मग्रंथ. पर्शियांतील गबर नांवाने ओळखल्या जाणाऱ्या लोकांचाहि हा धर्मग्रंथ आहे. इराण देश हें पारश्यांचें मूळ वसतिगृह होय. झरतुष्ट्र हा त्यांचा प्रेषित तिथेच उदयाला आला. त्याने सनपूर्व ६०० च्या सुमारास आपला धार्मिक संदेश तिथल्या लोकांना दिला. त्याने लोकांना जे उपदेश वेळोवेळी दिले, त्यांचा संग्रह म्हणजे अवेस्ता होय.

अवेस्ता याचा मूळ अर्थ पवित्र ग्रंथ असा आहे. झंद या शब्दाचा अर्थ अवेस्ताग्रंथावरचें पहलवी भाष्य किंवा विवरण ग्रंथाला जसें अवेस्ता असें नांव आहे, तसेंच ज्या भाषेंत हा ग्रंथ लिहिलेला आहे, तिलाहि अवेस्ता असेंच म्हणतात. अवेस्ता हा शब्द पहलवी भाषेंतील अविस्ताक किंवा अपस्ताक या शब्दांपासून निघाला आहे आणि वरील दोन शब्द उपस्ता या शब्दापासून निघाले आहेत. त्यावरून अवेस्ता शब्दाचा अर्थ मूल ग्रंथ असा होऊं शकेल. दुसरी उपपत्ति अपस्तान (विश्वास) या शब्दावरून लाविल्यास अवेस्ता म्हणजे एकमेव प्रमाणभूत ग्रंथ असाहि त्याचा अर्थ होऊं शकतो.

सध्या उपलब्ध असणारा अवेस्ता हा ग्रंथ मूळच्या एका बृहत्काय ग्रंथाचा केवळ एक भागमात्र आहे. इराणी परंपरा सांगते, की मूळच्या अवेस्त्यामध्ये २१ नस्क व १००० हून अधिक प्रकरणें होतीं व या ग्रंथाची निर्मिति अकमेनिय काळांत (सनपूर्व ५५८ ते ३००) झाली. हा ग्रंथ मुळांत गायींच्या कातडयावर लिहिलेला होता.

तवरी व मसूरी हे इतिहासकारहि वरील परंपरेला पुष्टि देतात. प्लिनी नामक रोमन पंडित तर म्हणतो, की झरतुष्ट्रानें

एकूण २० लक्ष ग्रंथ रचला होता. पहलवी भाषेंतील दिनकर्त व पर्शियन भाषेंतील रिवायत या दोन ग्रंथांत अवेस्त्याच्या या विशालत्वाबद्दल बरीच माहिती दिलेली आहे.

अकमेनियन राजांच्या अंमलांत अवेस्त्याचें श्रद्धापूर्वक रक्षण होत होतें. झरतुष्ट्राचा आश्रयदाता विस्ताश्प याने या ग्रंथाची एक प्रत पर्सिपोलिस येथील आपल्या दप्तरखान्यांत ठेवली होती. विटांवर कोरलेली दुसरी एक प्रत समरकंद येथील अग्यारीच्या खजिन्यांत ठेविलेली होती. पण सिकंदराने केलेल्या स्वारीच्या धामधुमींत या दोन्ही प्रती नाश पावल्या. सिकंदराच्या मागून तिथे सेल्यूकसचा व त्यानंतर पर्थियनांचा अंमल सुरू झाला. त्या कालखंडांत या ग्रंथाची त्याहून अधिक हानि झाली.

तथापि अशाहि परिस्थितींत अवेस्त्याचा कांही भाग इराण-मधल्या कांही झरतुष्ट्री धार्मिक लोकांना मुखोद्गत होता. याशिवाय त्याचीं कांही प्रकरणें इतस्ततः विखुरलेल्या अवस्थेंत पडून होतीं. या सर्व मुखोद्गत व विखरून पडलेल्या ग्रंथाचें संकलन करण्याचा प्रयत्न इ. स. च्या तिसऱ्या शतकांत झाला. तीच परंपरा सस्सानियन राजघराण्याच्या संस्थापकाने पुढे चालू ठेवली. त्याने राजगुरु तन्सार याच्या हातीं जमविलेलें सर्व साहित्य देऊन अवेस्त्याची व्यवस्थित जुळवाजुळव करण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविली. त्याने तें कार्य पुरें केलें. या तयार झालेल्या ग्रंथाला मग धर्मग्रंथ म्हणून मान्यता देण्यांत आली. हें काम दुसरा शापूर राजा याच्या कारकीर्दीत (इ. स. ३०९ – ३७९) झालें. या ग्रंथांत वैद्यक, ज्योतिष व भूगोल हे धर्मेतर विषयहि समाविष्ट करण्यांत आले. अशा प्रकारें तयार झालेल्या या ग्रंथांत २१ नस्क असून त्यांतले २० नस्क मूळ ग्रंथाबरहुकूम आहेत. या २१ नस्कांपैकी पहिल्या सातांना गाथा, दुसऱ्या सातांना दात व तिसऱ्या सातांना हधमाथ्र अशी संज्ञा आहे.

पहिल्या नस्कांत स्तोतयश्त, सूत्कर, वर्श्त, मानसर, बक, वश्तग, हाथोक्त व स्पंद या गाथांचा अंतर्भाव होतो. त्यांत स्तोतयश्त हें फार पवित्र मानलेलें आहे. त्याचीं ३३ प्रकरणें असून त्यांपैकी २२ प्रकरणें पद्यमय आहेत. त्यांची भाषा फार प्राचीन आहे. बाकीचीं ११ प्रकरणें गद्यमय व प्रचलित भाषेचीं आहेत. सूत्कर, वर्श्त, मानसर व बक यांमध्ये प्रत्येकीं २२ प्रकरणें होतीं. पण तीं सर्व उपलब्ध नाहीत. हाथोक्ताचीं ३ प्रकरणें आहेत.

आचारविषयक नस्कांत निकातम, गनबा, सूरनिगत, हस्पारम, इ. प्रकरणांचा अंतर्भाव होतो. या सातांपैकी पहिल्या पांचांत धर्मविषयक कायदे दिलेले आहेत. शेवटच्या दोन नस्कांत विश्वोत्पत्तिविषयक व पौराणिक कथांचा संग्रह आहे. फित्रदात या नस्कांत इराण देश व मानव जात यांच्या उत्पत्तीची माहिती असून झरतुष्ट्राच्या जन्मापर्यंतचा इतिहास दिलेला आहे.

हधमाथ्र नस्कांत दामदात, नातर, रतदात, पागग, इतग, वरीज, कस्किश्रव, विश्ताश्प, अशीं सात प्रकरणें असून त्यांची फार नासाडी झालेली आहे. या विभागांत श्रौतविधि, कालाचे विभाग, नीतितत्त्वें, विस्ताश्पाला झरतुष्ट्राने दिलेली धर्मदीक्षा व झरतुष्ट्राच्या अर्गास्पविरुद्ध झालेल्या लढाया, यांचें वर्णन आलेलें आहे.

पण सिकंदराच्या स्वारीने अवेस्त्याची जेवढी हानि झाली नाही, तेवढी हानि मुसलमानांच्या स्वाऱ्यांनी झाली. मुसल-मानांनी इराण पादाक्रांत केल्यावर इराणी लोकांचा धर्मच्छल आरंभिला. जिथे जिथे अवेस्त्याची प्रत सांपडेल, तिथे तिथे ती जाळून भस्म करावी, अशीं त्यांनी फर्मानें सोडलीं. अशा स्थितींतहि त्या अत्याचारांना तोंड देऊन जे थोडे झरतुष्ट्री लोक पर्शियांत राहिले व जे पळून भारतांत आले, त्यांनी अवेस्त्याच्या ज्या भागाचें जतन केलें, तेवढाच काय तो भाग आजमितीस उपलब्ध आहे. भारतांत आल्यावर पारश्यांनी अवेस्ता ग्रंथ पुन्हा लिहून काढला. त्यांतल्या कांही प्रती १३ व्या व १४ व्या शतकांतल्या असून त्याच सांप्रत उपलब्ध आहेत. मात्र कोणत्याहि एका प्रतींत समग्र अवेस्ता एकत्र झालेला नाही. सांप्रतचा अवेस्ता तुटक तुटक भाग एकत्र करून तयार केलेला असल्यामुळे तो अपूर्ण अवस्थेंत आहे. सस्सानियन कालांतल्या अवेस्त्याचा एक तृतीयांश भाग एवढाच तो भरतो. सांप्रतचा अवेस्ता पुढील चार विभागांत विभक्त आहे–

(१) **यस्न** – (यज्ञ किंवा पूजाविधि) हा ग्रंथ प्रामुख्याने पाराहोम (दूध व कांहीं सुवासिक द्रव्यें यांनी मिश्रित सोमरस) या विधीला वाहिलेला आहे. यांत अहुरमज्द व इतर देवता यांच्या प्रार्थना व अनेक विधिविधानें आहेत. याचे ७२ भाग असून या संख्येचे प्रतिनिधि म्हणून पारश्यांच्या कस्तींत ७२ लोकरीचे धागे एकत्र केले जातात. या भागांतलीं १७ सूक्तें झरतुष्ट्राचीं उपदेशपर वचनें असून त्यांना गाथा म्हणतात. या गाथांचीं नांवें अहुनवइति, उश्तवहति, स्पेन्त-मैन्यु, वोहुक्षथ्र व वहिश्तोइश्त अशीं आहेत. अवेस्त्याचा हा भाग प्राचीन व महत्त्वाचा मानला जातो. हा भाग म्हणजे झरतुष्ट्री धर्माचें प्राचीन स्वरूप होय. झरतुष्ट्र हा सत्यशोधना-साठी घरदार सोडून निघाला व दहा वर्षे भ्रमण केल्यानंतर त्याला असें ज्ञान झालें, की अहुरमज्द हाच एकमेव देव आहे.

या विभागांत झरतुष्ट्राच्या उपदेशाचीं आणखी कांही वैशिष्टचें दिसून येतात. सत् व असत्, चांगलें व वाईट असें नैतिक द्वंद्व किंवा द्वैत सृष्टचुत्पत्तीपासून आहे, असें झरतुष्ट्र सांगतो. त्याचबरोबर त्याने मानवाचें आचारस्वातंत्र्यहि मान्य केलें आहे. त्याच्या मतें या सदसताच्या लढचांत मानवाचें कर्तव्य हें, की त्याने सत् तेवढें ग्राह्य करून ईश्वराची सत्ता वाढविण्यास व असताविरुद्ध सताला विजय मिळविण्यास मदत करावी. झरतुष्ट्र यज्ञ व तपश्चरण या गोष्टींना अनुकूल नाही. याउलट मानवाने आपली भौतिक उन्नति करुन घ्यावी असाच त्याचा उपदेश आहे. त्यासाठी कृषि व गोरक्ष्य हींच साधनें व हींच सत्कृत्यें त्याने सांगितलीं आहेत. झरतुष्ट्र हा मानव असून अहुरमज्द हा मित्राने मित्राशीं बोलावें, तसा त्याच्याशीं बोलतो. मानवाला सत्यकथन करण्यासाठी ईश्वराने त्याची निवड केली, अशा अनेक गोष्टी अवेस्त्याच्या या भागांत वाचकाला कळून येतात. भाषा, छंद व शैली या तीनहि बाबतींत हा भाग इतर भागांहून वेगळा आहे. भाषेच्या दृष्टीने तर तो ऋग्वेदाच्या अगदी जवळ येतो.

(२) **विस्परद** – हा विभाग २४ अध्यायांचा (कर्दे) असून यांत पारश्यांचें कर्मकांड सांगितलें आहे. शिवाय अरिष्टशांतीसाठी अनेक प्रार्थनाहि यांत आहेत. यस्न साहित्यांत भर पडून हा ग्रंथ तयार झालेला आहे. त्यामुळे यस्नापेक्षा याचें महत्त्व कमी मानतात. यांतलीं छोटीं छोटीं प्रार्थनासूक्तें केवळ उपाध्यायांनीच नव्हे; तर सर्व गृहस्थांनी विशिष्ट प्रसंगीं विशिष्ट तऱ्हेने म्हणायचीं असतात.

(३) **वेंदिदाद** – विशेषेंकरून शुद्धीच्या नियमांचा प्रतिपादक हा ग्रंथ आहे. यांत धार्मिक व व्यावहारिक कायदेकानूंचेंहि वर्णन आहे. याचे २२ फरगर्द (प्रकरणें) आहेत. पारश्यांच्या धार्मिक विधींमध्ये यस्न व गाथा यांच्या पठनाबरोबर, वेंदिदादचेंहि पठण करतात. दुसऱ्यावर आघात, नियमभंग, स्त्री–पुरुषांचे अनैतिक संबंध, गर्भपात, इ. पातकांबद्दल या ग्रंथांत शिक्षा व प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. यांत प्राचीन इराणी समाजांतल्या चालीरीतींची माहिती असल्यामुळे वेंदिदाद या ग्रंथाला ऐतिहासिक दृष्टचा महत्त्व प्राप्त झालें आहे. याशिवाय अहुरमज्दाने मानव व पशु यांच्यासाठी पृथ्वीचा विस्तार केल्याची कथा, त्याचा यिमाशीं झालेला धर्मविषयक संवाद, हिमयुग व जलप्रलय यांच्या कथा, इ. गोष्टी यांत आल्या आहेत.

या ग्रंथामधल्या मख्य प्रार्थना न्यैश या होत. मिथ्र, चंद्र, जल, अग्नि व सूर्य यांना उद्देशून या छोटचा छोटचा प्रार्थना आहेत. यांतल्या सीरोझ या प्रार्थना महिन्याच्या तीस दिवसांच्या तीस अधिष्ठात्री देवतांना उद्देशून रचलेल्या आहेत. आफ्रिगान या आशीर्वादपर प्रार्थना असून त्या नवस फेडण्यासाठी केलेल्या बलिदानानंतर म्हटल्या जातात. यांत देवदूत किंवा मृत जीवात्मा यांना आवाहन असतें.

(४) **यश्त** – यांत देवतांचीं स्तोत्रें असलेलीं २१ प्रकरणें आहेत. ही यश्तें पद्यमय व सामान्यतः अष्टवर्णात्मक आहेत. यांत यझत (देवदूत) व प्राचीन इराणी वीर यांची प्रशंसा आहे. यांतल्या ५ व्या प्रकरणांत अनाहित या जलदेवतेची स्तुति आहे. ८ व्यांत तिशत्रिय ताऱ्याने अवर्षणाच्या दैत्यावर विजय मिळविला, त्याचें गुणगान आहे. १० व्यांत मिथ्राचें, १३ व्यांत फ्रावशी या सज्जनरक्षक आत्म्याचें व १४ व्यांत वेरेथ्रघ्नाचें स्तोत्र आहे. यांतल्या कांही देवता वैदिक देवतांना समान अशा दिसतात. त्यावरून या देवतांची मूळ निर्मिति इंडो-इराणी कालांत झाली असावी, असें म्हणतात. इतर देवता मात्र निव्वळ इराणी आहेत. या ग्रंथांतल्या कांही स्तोत्रांत दुष्ट मांत्रिक व चेटुक करणारे यांना ठार मारण्याचें सामर्थ्य आहे, असें मानतात. ज्वर, मृत्यु व इतर आपत्ति यांचाहि नाश करण्याचें सामर्थ्य या मंत्रांत आहे, अशी पारश्यांची श्रद्धा आहे. या स्तोत्रांचें सामर्थ्य मनावर बिंबावें म्हणून यश्तें हीं अहुरमज्द व झरतुष्ट्र यांच्या संवादांतून निर्माण झालीं आहेत, अशी कल्पना केलेली आहे. यस्न व यश्त यांमध्ये झरतुष्ट्री धर्माचें उत्तरकालीन स्वरूप दिसून येतें. यांत झरतुष्ट्राच्या पूर्वी प्रचलित असलेल्या धर्मांतील कांही तत्त्वें पुनरुद्धृत केलेलीं आहेत. हओम संप्रदायाचेंहि यांत पुनरुज्जीवन झालें आहे.

खोर्द अवेस्ता –– उपासनेच्या दृष्टीने तयार केलेला हा मोठचा अवेस्त्याचा संक्षिप्त सारभाग आहे. यांत चंद्र, सूर्य, अग्नि, जल, खुर्शिद, आतश, इ. देवांचीं व देवतांचीं स्तवनें आहेत.

वर जे अवेस्त्याचे विभाग सांगितले, त्याशिवाय पूर्वीच्या नष्ट झालेल्या अवेस्त्यांतले कांही भाग पहलवी वाङ्मयांत आढळतात. त्यांपैकी निरंगिस्तान हा धार्मिक ग्रंथ महत्त्वाचा आहे. त्याचे तीन अध्याय आहेत. प्राहंग इ ओईम ऐवाक या नांवाचा आणखी एक ग्रंथ असून तो म्हणजे अवेस्त्यांतील शब्द व वाक्प्रचार यांचा कोशच होय.

सस्सानियन राजवंशाच्या काळांतच अवेस्ता ग्रंथ दुर्बोध होऊं लागला होता. त्यासाठी त्याचें पहलवी भाषेंत भाषांतर करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. तदनुसार १९ नस्कांचें शब्दशः पहलवी भाषांतर तयार करण्यांत आलें. त्यांतला

कांही भाग सांप्रत उपलब्ध आहे. हें भाषांतर सर्व बाबतींत प्रमाणभूत मानीत नाहीत. तरी पण पुष्कळ बाबतींत तो ग्रंथ मार्गदर्शक म्हणून मानला जातो. इ. स. च्या १२ व्या शतकांत या पहलवी अवेस्त्याचें संस्कृत भाषांतरहि कांही पारशी पुरोहितांनी केलें आहे.

वेदवाङमयाचें संशोधक व इतिहासवेत्ते यांच्या मतें आर्य व इराणी या दोन्ही एकाच मूळ जातीच्या दोन शाखा आहेत. दोन्हीहि अग्निपूजक व गोरक्षक आहेत. आर्यांचें सर्वस्व म्हणजे वेदसाहित्य; त्याचप्रमाणे इराणी लोकांचें सर्वस्व म्हणजे गाथा व अवेस्ता हें होय. आर्य इंद्रपूजक होते तर इराणी अहुरमज्दाचे पूजक अर्थात् असुरोपासक होते. वैदिक साहित्यांत असुरांची निंदा केलेली आहे; तर झरतुष्ट्री साहित्यांत इंद्राची निंदा केलेली आहे. श्री होडीवाला यांच्या मतें ऋग्वेदांत झरतुष्ट्राचीहि निंदा असून त्याला जाळून मारल्याचाहि उल्लेख आहे. त्यांच्या मतें ऋग्वेदांतला जरूथ हाच झरतुष्ट्र होय. ऋग्वेदाचा एक मंत्र पुढीलप्रमाणे आहे—

विश्वा अग्नेऽप दहाराती
र्येभिस्तपोभिरदहो जरूथम् ।

(ऋ. ७. १. ७)

अर्थ— हे अग्ने, ज्या तेजाने तूं कर्कश शब्द करणाऱ्या जरूथाला जाळलेंस, त्या तेजाने राक्षसांना जाळून टाक.

ऋ. ७. ९. ६ व १०. ८०.३ या मंत्रांतहि जरूथाला जाळल्याचा उल्लेख आहे. वरील तीनहि मंत्रांवरून कळून येतें, की जरूथाला अग्नींत जाळूनच मारलें होतें. पारश्यांच्या दिनकर्द, बेहेरामयश्त, दाहेस्तन इ. ग्रंथांवरूनहि झरतुष्ट्राचा मृत्यु अग्नींत, जळूनच झाला, ही गोष्ट कळून येते.

पारश्यांच्या धर्मग्रंथांत झरतुष्ट्राला दख्युमा (दस्यु) व दख्युनाम सूरो (दस्यूंतला विद्वान्) म्हटलें आहे. पारशी साहित्यांत दस्यूचा अर्थ सन्मानपर आहे; पण वैदिक साहित्यांत दस्यूचा अर्थ हीनत्वदर्शक आहे. अवेस्त्यांतला विस्ताश्प हाच ऋग्वेदांतला इष्टाश्व (ऋ. १. १२२. १३) व अरजास्प हाच ऋग्वेदांतला ऋज्राश्व होय. अरजास्पाचा बाप बानदरे मैनी हा होता. त्याचा अर्थ निर्भय असा आहे. हा शब्द भयमान शब्दाचा अपभ्रंश आहे. भयमान हाच वैदिक ऋज्राश्वाचा बाप आहे. अवेस्त्यांतल्या गाथांत ऋग्वेदाच्या ऐतिहासिक नांवांशीं साम्य असलेलीं आणखीहि कांही नांवें आढळतात. अवेस्त्यांतल्या गाथा या ऋग्वेदांतल्या पद्धतीवरच निर्माण केलेल्या आहेत. त्यांत वैदिक आचार-विचारांशीं साधर्म्य असलेल्या बऱ्याच गोष्टी आढळतात. अवेस्त्यांत बऱ्याचशा वैदिक देवता, विभिन्न उच्चारांनी व विभिन्न रूपांनी घतलेल्या आहेत. कांही वैदिक श्रद्धा आणि परंपराहि स्वीकारलेल्या आहेत.

अवेस्त्यामध्ये सांगितलें आहे, की वृत्रासुराने बाबिलोन नगरांतून आर्यांना हुसकून लावण्यासाठी अद्विशूर नांवाच्या देवीची उपासना केली होती; पण त्या प्रयत्नांत त्याला यश आलें नाही. तिथे असेंहि सांगितलें आहे, की फारसचा राजा सायरस याने ज्याप्रमाणे तैग्रिस नदीचा प्रवाह रोखून बाबिलोन जिंकलें, त्याचप्रमाणे वृत्रानेहि आर्यभूमीवर अधिकार मिळविण्याची इच्छा केली होती. एका काळीं बाबिलोन नगर आर्यांच्या अधिकारांत होतें, हें अवेस्त्यांतल्या गाथांवरूनच कळून येतें.

अवेस्त्यांत वृत्राला वेरेथ्रघ्न म्हटलें आहे व इंद्राला त्याचा कट्टर शत्रु मानलें आहे. ऋग्वेदांतहि तीच गोष्ट आहे. ऋग्वेदांत (१. ५२. ५) त्रित असें एक नांव येतें. हा त्रित असुरांचा घोर शत्रु होता. अवेस्त्यांत तोच थ्रेतन या नांवाने पूज्य मानला गेला आहे. इराण्यांची ती प्राचीन देवता आहे. ज्या मंत्रांत त्रिताचा उल्लेख येतो, त्याच मंत्रांत वलनामक असुराच्या वधाचाहि उल्लेख आहे ऋग्वेदांतला हा वल म्हणजेच बाबिलोनचा अधिपति बेल होय, असें रे. बानर्जी म्हणतात (आर्यन विटनेस्). अवेस्त्यांत अग्निपूजेचे विशद उल्लेख आहेत. अग्नि ही इराण्यांची प्रिय देवता आहे. आतर या नांवाने ते तिची पूजा करतात. पर्शिया आणि भारत या दोन्ही ठिकाणीं पारश्यांचीं अशीं अनेक अग्निकुंडें आहेत, की ज्यांतला अग्नि आजवर शेकडों वर्षें अविच्छिन्न प्रज्वलित ठेवलेला आहे. अवेस्त्यांत सोमाला हओम म्हटलें आहे. इराणी लोक मित्राला मिथ्र, वरुणाला वरण, असुराला अहुर व यातुधानाला (राक्षस) यातुमान म्हणतात.

अवेस्त्यांतल्या वृत्तांचें निरीक्षण केल्यास त्यांचे भिन्न भिन्न भाग कोणत्या वेळीं लिहिले गेले, त्याचें अनुमान करतां येतें. त्याचा प्राचीन भाग छंदोबद्ध असून मागाहून लिहिलेला भाग गद्यरूप आहे. अवेस्त्यांतल्या छंदोबद्ध भागाला गाथा म्हणतात. या अष्टाक्षरी वृत्तांत रचलेल्या आहेत.

अवेस्ता ज्या भाषेंत लिहिला गेला, तिला अवेस्तन म्हणतात, इंडोजर्मेनिक भाषासमूहांतली इराणी शाखेची ही भाषा असून तिचें संस्कृताशीं विलक्षण साम्य आहे. अवेस्त्याच्या प्रामाण्यनिश्चयाचें हें एक बलवत्तर साधन ठरलें आहे. ध्वनिशास्त्रदृष्टया या दोन्ही भाषांतील स्वरांत पुष्कळ साम्य आहे; मात्र इ व ओ या स्वरांचे अनेक प्रकार अवेस्तनमध्ये होतात तसे ते संस्कृतांत होत नाहीत. अवेस्त्यांतल्या बऱ्याच व्यंजनांचें

संस्कृत व्यंजनाशीं ध्वनिसाम्य आहे. संस्कृत स चें अवेस्त्यांत ह असें रूप होतें. वैदिक संस्कृताप्रमाणें अवेस्तनभाषेंतहि पुंस्त्रीनंपुसक अशा तीन्ही लिंगांचीं, तीन्ही वचनांचीं व प्रथमादि संबोधनान्त आठहि विभक्तींचीं रूपें आढळतात. क्रियापदांच्या रूपांच्या बाबतींतहि दोन्ही भाषांत साम्य आहे. वर्तमान, भूत व भविष्य, हे तीन काल; तसेंच स्वार्थ, आज्ञार्थ, संशयार्थ व संकेतार्थ हे अर्थ आहेत. धातुसाधित नामें व विशेषणें, तसेंच धातूंचीं मूळ रूपेंहि आहेत.

फरक आढळतो तो वाक्यरचनेच्या बाबतींत. अवेस्त्यांत दोन पोटभाषा दिसतात. एक गाथांची व दुसरी नंतरची. या दोन्हींमधला फरक वैदिक संस्कृत व विदग्ध संस्कृत यांमधील फरकाप्रमाणे आहे. गाथांची भाषा व वाक्यरचना शुद्ध असून नंतरची भाषा मिश्र आहे. तिच्यांत बरेच अपभ्रष्ट शब्द येतात.

अवेस्तन भाषेच्या मानाने अवेस्तन लिपि ही बरीच नंतरची असावी, असें दिसतें. हिच्यांतील अक्षरें सस्सानियन काळांतल्या पहलवी लिपींतून घेतलीं असावीं. ही लिपि उर्दूप्रमाणे उजवीकडून डावीकडे वाचायची असते. मूळच्या अवेस्तन लिपीसंबंधीची माहिती अद्यापि उपलब्ध नाही.

हस्तलिखित अवेस्त्याचा अर्थ लावून त्याचा उलगडा करणें व सदर ग्रंथाकडे पाश्चात्य पंडितांचें लक्ष वेधणें, याचें श्रेय अँक्वेतिल डुपर्राँ (इ. स. १७७१) या फ्रेंच विद्वानास दिलें पाहिजे. त्यापुढे अनेक विद्वानांनी अवेस्त्याच्या अभ्यासाला स्वतःस वाहून घेतलें. बुर्नोफ, वेस्टर गार्ड, स्पीगेल, गीगेर, रॉथ, हॅंग, बार्थोलोमे, वेस्ट, मिल्स, डर्मेस्टेटर व गेल्डनर हे पाश्चात्य पंडित अवेस्त्यावरचे अधिकारी समजले जातात.

अवेस्त्यांतील मंत्रांचे कांही नमुने—

अषॅम् वोहु वहिश्तॅम् अस्ती ।
उश्ता अस्ती उश्ता अह्माइ ।
ह्यत् अषाइ बहिश्ताइ अषॅम् ।

(यस्न ५६.५)

अर्थ – सात्त्विकपणा म्हणजे सर्वोच्च सद्भाग्य (व) जीवनांतील प्रकाश होय. सर्वश्रेष्ठ अॅषच्या प्राप्तीसाठी जो मनुष्य सात्त्विक वृत्तीने राहतो, त्याला हा प्रकाश प्राप्त होतो.

पंचनाँम् अह्मि पंचनाँम् नोइत् अह्मि ।
हुमतहॅं अह्मि दुश्मतहॅं नोइ अत् अह्मि ।
हूख्तहॅं अह्मि दुजूख्तहॅं नोइ अह्मि ।
ह्वर्श्तहॅं अह्मि दुज्वर्श्तहॅं नोइत् अह्मि ।
स्रअोषहॅं अह्मि अस्रुश्तोइश् नोइत् अह्मि ।
अषअोनो अह्मि द्रवतो नोइत् अह्मि ।
अत् चित् अह्मात् यथ अपॅमॅम् ।
मनिवो अङ्हत् निवाइतिश् ॥

(यस्न १०.१६)

अर्थ – मी पांचांमधला एक आहें, मी पांचांमधला एक नाहीं.

जे सद्विचार करतात त्यांच्यापैकी मी आहें, जे कुविचार करतात, त्यांच्यापैकी नाही.

जे सद्वचन बोलतात, त्यांच्यापैकी मी आहें, दुर्वचन बोलणाऱ्यांपैकी नाही.

जे सत्कृत्य करतात, त्यांच्यापैकी मी आहें, दुष्कृत्य करणाऱ्यांपैकी नाही.

जे श्रवण करतात, त्यांच्यापैकी मी आहें, श्रवण न करणाऱ्यांपैकी नाहीं.

मी सज्जनांपैकी एक आहें, दुर्जनांपैकी नाही. आणि असाच शेवटपर्यंत आध्यात्मिक सृष्टीचा नाश होईपर्यंत राहीन.

यो यअोम् कारयॅइति हो अषॅम् कारयॅ इति ।
हो दरनाँम् मज्दयस्नीम् फ़्रवाज् वज़इतॅ ।
हो इमाँम् दएनाँम् मज्दयस्नीम् फ़्पिन अोइति ॥

(वेंदिदाद ३.३१)

अर्थ– जो धान्य पेरतो, तो सात्त्विकपणाची पेरणी करतो; व त्यामुळे तो मज्दच्या धर्माचा फैलाव आणि जोपासना करतो. [डॉ. मेहेंदळे; श्री. सोनटक्के; म. ज्ञा. को.]

अव्यंग सप्तमी

तिथिव्रत. व्रतावधि एक वर्ष. यांत सूर्याला अव्यंग अर्पण करतात. अव्यंग याचा अर्थ कापसाच्या धाग्यांची सापाच्या कातीसारखी १२२ अंगुळें लांब शुभ्र पट्टी. ही सामान्यतः पारश्यांच्या कस्तीसारखी असते. अव्यंग हें अवस्ताणमधील ऐव्यंधन या शब्दाचें संस्कृतीकरण वाटतें. त्याचाहि अर्थ कटिबंध असाच आहे. सूर्यपूजेची ही विशिष्ट पद्धति इराणमधून सूर्यपूजक मगांनी भारतांत आणली असावी, अथवा पारश्यांच्या धार्मिक विधींतून हिंदूंनी ती घेतलेली असावी. या व्रताची कथा दिलेली आहे, ती कृष्णपुत्र सांबाचीच आहे. सांबाने आपलें कुष्ट दूर होण्यासाठी सूर्याची उपासना केली व त्यानिमित्त शाकद्वीपांतून (इराण) मग नांवाचे ब्राह्मण आणले, अशी कथा आहे (भवि. ब्रा. १४२. १–२९). यावरूनहि या व्रताचा संबंध इराणांतील सूर्यपूजेशीं लागतो. या सप्तमीस हस्त नक्षत्र अस्लयास विशेष महत्त्व असतें (नारद पु. १.११६). [हि. ध.]

अव्वट्टग एक जैन पंथ. आषाढ नांवाच्या एका श्रमणाने महावीरानंतर चौदा वर्षांनी हा पंथ प्रवर्तिला. श्रमण आणि ईश्वर सारखेच होत, असें या पंथाचें मत आहे. [हि. जै. मो.]

अव्वैय्यार तमिळनाडची संघमकालीन कवयित्री. तमिळ-साहित्यांतली ही पहिली विदुषी व कवयित्री होय. तमिळनाडमधले लोक तिरुवल्लुवरनंतर हिचेंच नांव घेतात व हिला सरस्वतीचा अवतार मानतात. हिचा जन्मकाळ निश्चित सांगतां येत नाही. इ. स. च्या पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांत ती जन्मली असावी, असा तर्क आहे. दंतकथांवरून कळतें तें असें, की ही भगवान् व आदि या दंपतीची कन्या होती व कावेरीच्या उगमाजवळच्या थगादुर या गांवीं हिचा जन्म झाला होता.

ही आईबापांची ज्येष्ठ कन्या होती. जन्मतांच त्यांनी हिचा त्याग केला व ती एका गायकदंपतीच्या हातीं लागली. त्या जोडप्याने तिचें पालनपोषण केलें. बालपणींच तिला प्रतिभेचें देणें लाभलें व आपल्या कवित्वाने ती भल्याभल्यांना चकित करूं लागली उपवर झाल्यावर तिच्या लग्नाचे बेत सुरू झाले; पण आजन्म कुमारी राहण्याच्या निर्धाराने तिने ते मोडून काढले. मग एक दिवस ती घरांतून निघाली आणि अधिकमान नेडुमान अंजि या राजाच्या दरबारांत गेली. तिथे बराच काल राहिली. राजा तिचा मोठा आदर करी. तिनेहि राजाच्या पराक्रमावर अनेक पद्यें लिहिलीं. तिच्या ज्ञानावर व तीक्ष्ण बुद्धीवर राजाचा विश्वास होता. एकदा तर त्याने तिला आपली राजदूत बनवून कांचीच्या दरबारांत पाठविलें. अव्वैय्यारने आपल्या पद्यांतून अनेक प्रश्नाचीं उत्तरें काव्यमय शैलींत दिलीं आहेत. 'जगांत मधुर काय' या प्रश्नाचें ती पुढील-प्रमाणें उत्तर देते —



अव्वैय्यार

'एकान्त मधुर असतो. त्याहून मधुर दिव्य कादंबरी. त्याहून ज्ञानी पुरुषांचा सहवास. पण सर्वांत मधुरतम म्हणजे स्वतःला अहर्निश ज्ञानसाधनेंत निमग्न करणें.'

सेरमानशीं झालेल्या युद्धांत अंजिराजा मारला गेला. त्या गोष्टीचें अव्वैय्यारला परम दुःख झालें. पुढे कांही काल तिथेच राहून त्या राजाच्या पुत्राला तिने नीतिशिक्षण दिलें. मग ती तिथून निघाली व जन्मभर भटकत राहिली. तिला त्या पुढच्या आयुष्यांत अनेक संकटांना तोंड द्यावें लागलें. त्याविषयींच्या कितीतरी आख्यायिका तमिळनाडमध्ये प्रचलित आहेत. चेर, चोल व पांडच या तीन्ही राजांच्या दरबारांत तिला मानमरातब मिळाला. पुरनानूरु या काव्यसंग्रहांत अव्वैय्यारच्या पदांचा संग्रह केलेला आहे. तमिळनाडमधलीं मुलें तिच्या नीतिपर कवितांनी तमिळकाव्याचे पाठ सुरू करतात. तिने मानवजातीला पुढील संदेश दिला आहे —

दान करण्याची इच्छा धर. क्रोध आवर. कोणी दानधर्म करीत असल्यास त्याच्या आड येऊं नको. जवळ असेल तें फोडूं नकोस. श्रमांत कसर करूं नकोस. संख्या व अक्षरें यांच्याकडे दुर्लक्ष करूं नकोस. भिक्षा मागणें ही गोष्ट लाजिरवाणी समज.' [त. सा. सं.; महेशनारायण; म. ज्ञा. को.]

अशून्य शयन व्रत तिथिव्रत. आषाढ कृ. २ येपासून पुढे चार महिने प्रत्येक कृ. २ येस. व्रतावधि चार महिने. यांत विष्णु-लक्ष्मींच्या मूर्ती मंचकावर स्थापून त्यांची पूजा करतात. प्रार्थनामंत्र असा——

लक्ष्म्या न शून्यं वरद यथा ते शयनं सदा।
शय्या ममाप्यशून्याऽस्तु तथाऽत्र मधुसूदन ।।

(कृत्यरत्नाकर)

अर्थ – हे मधुसूदन विष्णो ! जशी तुझी शय्या लक्ष्मीविरहित असत नाही, तशीच माझीहि शय्या पत्नीविरहित नसो.

या व्रताने स्त्रियांना सौभाग्य व पुरुषांना भार्येचा अविरह प्राप्त होतो. तेलंगणांतल्या एका शिलालेखांत (इ. स. १२७६) एका काकतीय सेनापतीची पत्नी कुप्पांबिका हिने हें व्रत केल्याचा उल्लेख आहे. [हि. ध.]

अशोक (१) (३०४–२३७ सनपूर्व) हा चंद्रगुप्त मौर्याचा नातू आणि बिंदुसाराचा पुत्र होय. बिंदुसाराला १६ राण्या व १०१ पुत्र होते, ही गोष्ट सर्व इतिहासकारांनी मान्य केली आहे. जैन परंपरेप्रमाणे अशोक हा सुभद्रांगी नामक राणीचा पुत्र होय.

बौद्ध परंपरेप्रमाणे बिंदुसाराच्या १०१ पुत्रांत सुमन (किंवा

सुसीम) हा ज्येष्ठ पुत्र होता. पण सुभद्रांगीच्या मनांत आपला पुत्र युवराज व्हावा, अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. त्या दृष्टीने तिने कारस्थानें सुरूं केलीं. त्या कामीं बिंदुसाराचे दोन मंत्री तिला अनुकूल झाले. बिंदुसार वयोवृद्ध झाल्यावर त्यांच्या कारस्थानाला जोर चढला. अखेर राजाची मरण-घटिका जवळ आली. सुमनाच्या हातीं राज्य देऊन त्याला प्राणत्याग करावयाचा होता. पण त्या वेळीं सुमन एका मोहिमेवर गेला होता. ती संधि साधून राधागुप्त नांवाच्या एका मंत्र्याने अशोकाला राजापुढे उभें करून म्हटलें —

'महाराज ! सुमन युवराज येथे नाहीत. तेव्हा तुम्ही अशोकालाच साम्राज्याचा उत्तराधिकारी करा. सुमन परत आल्यावर आम्ही त्याच्या हातीं साम्राज्याची सत्ता सोपवूं.'

निरुपाय म्हणून बिंदुसाराने ती विनंती मान्य केली. बिंदुसार मरण पावला व अशोक सम्राट् झाला. त्याने राधा-गुप्ताला आपला मुख्य प्रधान नेमलें. ही वार्ता तक्षशिलेंत



सम्राट् अशोक

सुमनाला समजली. त्याला या वार्तेने क्रोध आला. अशोकाला उखडून आपल्या हक्काचें साम्राज्य हस्तगत करण्यासाठी तो झपाट्याने तिकडून परत फिरला. पण अशोक सावध होता त्याने एक षड्यंत्र निर्माण करून सुमनाचा कांटा काढला. अशा प्रकारें अशोकाने आपला एक प्रबल शत्रु नाहीसा करून साम्राज्य आपल्यासाठी पक्कें केलें. त्याचा राज्याभिषेक मात्र राज्यप्राप्तीनंतर पुढे चार वर्षांनी झाला.

अशोकाला साम्राज्याचा लाभ होण्यापूर्वी तो तक्षशिला व उज्जयिनी येथे प्रशासक म्हणून काम करीत होता. पाटलि-पुत्राच्या साम्राज्यांतलीं हीं दोन महत्त्वाचीं केंद्रें होतीं. अशोकाने राज्यकारभाराचा अनुभव इथेच घेतला आणि त्या दोन प्रदेशांचा राज्यकारभार सुव्यवस्थित चालविला. याने काश्मीर प्रांत जिंकून तिथे श्रीनगर नांवाचें शहर वसविलें, असें कल्हण सांगतो.

सनपूर्व २६२ सालीं अशोकाने कलिंग देशावर स्वारी केली. त्या काळचा कलिंग म्हणजे आजचा ओरिसाप्रांत होय. कलिंग-राजा शूर होता आणि चतुरंग दळाने समर्थ होता. त्याची प्रजाहि निष्ठावंत होती. अशा या प्रबल राज्यावर अशोकाने आत्मविश्वासपूर्वक धाड घातली. कलिंगाने मोठ्या धैर्याने त्याला टक्कर दिली; पण अखेरीस त्याचें सामर्थ्य कमी पडलें आणि अशोकाचा विजय झाला. या विजयाने एक मोठा प्रदेश अशोकाच्या साम्राज्याला जोडला गेला. हें कलिंगयुद्ध महाघोर झालें. 'या युद्धांत एक लक्ष कलिंग वीर धारातीर्थी पडले, दीड लक्ष अशोकाचे कैदी झाले आणि युद्धजन्य रोगराईने लक्षावधि माणसें मृत्युमुखीं पडलीं,' असें अशोकाच्या चौदाव्या शिलालेखांत नमूद केलेलें आहे. याच प्रमाणांत अशोकाच्या सैन्याचीहि कमीअधिक हानि झाली असली पाहिजे.

या अपरिमित मानवसंहाराने शेवटीं अशोकाला पश्चात्ताप झाला. तो युद्ध या प्रकारालाच विटला. 'यापुढे आपण युद्धा-साठी हातीं शस्त्र धरणार नाही,' अशी त्याने प्रतिज्ञा केली. अशोकाचा हा खेद आणि पश्चात्ताप त्याने आपल्या शिला-लेखांत कोरून ठेवला आहे.

कलिंगावर स्वारी करण्यापूर्वींच अशोक हा बौद्ध धर्माच्या प्रभावाखाली आला होता. त्याच्या दरबारीं बौद्ध भिक्षूंचें बरेंच वजन होतें. बौद्ध धर्माचा सर्वत्र प्रसार करण्याची महत्त्वा-कांक्षा त्यांनीच अशोकाच्या मनांत रुजविली होती. बुद्धाचा धर्म जगभर प्रसारित करायचा तर त्याआधी आपल्या सभोंवतालच्या बौद्ध धर्माला विरोधी असलेल्या राजांचा पाडाव करणें जरूर आहे, असें अशोकाला वाटलें. कलिंग राजा वैदिक धर्माचा कट्टा अभिमानी होता. शिवाय तो पराक्रमीहि होता. त्याला पराभूत केल्याने बौद्ध धर्माला तें राज्य मोकळें मिळेल, या उद्देशानेच अशोकाने ही स्वारी केली होती. या विजयामुळे त्याची शक्ति वाढली. जिंकलेल्या कलिंग देशाचा राज्य-कारभार तिथल्या प्रजेला सुखावह होईल, अशाच प्रकारें त्याने तिथली राज्यव्यवस्था केली. एकूण साम्राज्यांतील सर्वच प्रजेचें त्याने पुत्रवत् पालन केलें.

अशोकाच्या जीवनांतील घटनांचा कालक्रम श्री. मुकर्जी पुढीलप्रमाणे दाखवितात —

सनपूर्व	३०४	जन्म.
,,	२७४	सिंहासनारोहण.
,,	२७०	राज्याभिषेक.
,,	२६५	अशोक बुद्ध-उपासक झाला.
,,	२६२	कलिंगयुद्ध.
,,	२६०	बोधगयेची प्रथम तीर्थयात्रा.
,,	२५७	१४ शिलालेखांच्या द्वारा धार्मिक आज्ञांची घोषणा; आजीविक संप्रदायाला गुहांचें दान.
,,	२५६	कोणागमनचा स्तूप मोठा केला.
,,	२५३	तृतीय बौद्ध परिषद्.
,,	२५०	बौद्ध तीर्थांची यात्रा व कोणागमनस्तूपाजवळ एक स्मारक स्तंभ उभा केला.
,,	२४३	स्तंभ लेखांत धार्मिक आज्ञा.
,,	२४०	राणी असंधिमित्रेचा मृत्यु व तिष्यरक्षितेशीं विवाह.
,,	२३७	मृत्यु.

अशोकाचें साम्राज्य अत्यंत विशाल होतें. दक्षिण भारताचा कांही भाग सोडला, तर सर्व भारतवर्ष त्याच्या छत्राखाली होता. बलुचिस्तान, अफगाणिस्तान, दक्षिण हिंदुकुश, सिंध, काश्मीर खोरें, नेपाळ, हिमालयाचा सखल प्रदेश आणि आजच्या मद्रासपर्यंतचा भाग, एवढी त्याच्या साम्राज्याची व्याप्ति होती. एवढ्या मोठ्या साम्राज्याचा कारभार राजधानीच्या केंद्रांतून चालविणें अशक्य होतें. हें जाणून त्याने राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठी साम्राज्याचे प्रादेशिक विभाग करून त्यांवर प्रशासक नेमले. हे प्रदेश दोन प्रकारचे असत. एक राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा व दुसरा सामान्य. मोठ्या प्रदेशावर प्रशासक म्हणून राजघराण्यांतलाच एखादा पुरुष नेमला जाई. या प्रशासकांना कुमार म्हणत. दुसऱ्या प्रकारच्या प्रांतांवर सामान्य श्रेणींतल्या कर्त्या पुरुषांची नेमणूक होई. अशोकाच्या साम्राज्यांत पहिल्या श्रेणीचे चार प्रांत होते – तक्षशिला, सुवर्णगिरि, तुषालि आणि उज्जयिनी; हे चारी प्रांत कुमारशासित होते.

अशोकाच्या शिलालेखांवरून भारताबाहेरच्या कित्येक देशांशीं त्याचे राजकीय संबंध असावे, असें दिसतें. अशोकाचें साम्राज्य विस्तीर्ण असल्याने त्याच्या राज्यांत सगळीकडे एकसारखी राज्यपद्धति नव्हती. अधिराज्याचा नाममात्र अधिकार स्वतःकडे ठेवून त्याने कांही प्रांतांना व जमातींना अंतर्गत पूर्ण स्वातंत्र्य दिलें होतें.


सिंहासनावर बसल्यानंतर आठ वर्षांनी अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हा नवा धर्म स्वीकारतांना तो प्रथम 'उपासक' व त्यानंतर 'शासनदायाद' झाला. 'अडीच वर्षांहून अधिक काल मी उपासक होतों,' असें त्याने एका शिलालेखांत लिहिले आहे. आपण स्वीकारलेल्या धर्माचा सर्वत्र प्रसार व्हावा, अशी आकांक्षा त्याने धरली व त्यासाठी देशोदेशीं धर्मप्रचारक पाठविण्याची योजना केली. धर्मप्रचारासाठी बाहेरच्या देशांत धर्म–प्रचारक पाठविण्याची कल्पना मुळांत भारतीय आहे आणि त्या कल्पनेचा जनक सम्राट् अशोकच आहे, ही गोष्ट आता पाश्चात्य पंडितांनीहि मान्य केली आहे. पुढच्या काळांत ख्रिस्ती आणि मुस्लीम या धर्मांनीहि परदेशांत आपापले धर्मप्रचारक धाडले. पण त्यांच्या आणि अशोकाच्या धर्मप्रचाराच्या पद्धतींत जमीन-अस्मानाचें अंतर होतें. अशोकाचा धर्मप्रचार सर्वस्वीं प्रेम आणि हृदयपरिवर्तन यांवर अधिष्ठित होता. त्यांत अहिंसेला प्राधान्य होतें आणि माणुसकीला आवाहन होतें. भारतांतल्या बौद्ध धर्माच्या प्रचारकांनी धर्मप्रचारासाठी कधीहि शस्त्र धारण केलें नाही. जगाच्या बऱ्याचशा भागावर अशोकाने धर्मविजय मिळविला. पण तो केवळ हृदयपरिवर्तनाच्या बळावर. बुद्धाच्या धर्माबरोबरच भारतीय विद्या, कला आणि शासनपद्धति त्या त्या देशांत गेल्या. नव्या भारतीय तत्त्वज्ञानाचा सर्वत्र जयघोष गाजूं लागला.

अशोकाने बौद्धधर्माचा स्वीकार केला, तेव्हा बौद्धधर्म भारतांतहि फारसा पसरला नव्हता. किंबहुना बुद्धानंतरच्या शंभर वर्षांत बौद्ध संघामध्ये अंतःस्थ कलह माजून राहिल्यामुळे त्याचा प्रसार होण्याऐवजी संकोचच होऊं लागला होता. अशोकाने बौद्ध संघांतले हे दोष दूर व्हावे, म्हणून मोग्गलिपुत्त तिष्य याच्या अध्यक्षतेखाली एक धर्ममहासभा भरविली. या महासभेंत देशांत आणि विदेशांतहि धर्मप्रचारक पाठविण्याची योजना सिद्ध झाली. त्यासाठी एक हजार भिक्षूंची निवड करून त्यांना प्रचारपद्धतीचें शिक्षणहि देण्यांत आलें.

अशोक आपल्या धर्मविजयाचें कार्य धर्ममहामात्र व धर्मयुत या नांवाच्या अधिकारी वर्गाकडून चालवी. अशोकाचा संदेश घरोघर पोचविणें हें या अधिकाऱ्यांचें काम होतें. लोकांचें हित व सुख जेणेकरून होईल असें वर्तन करणें, अनाथ आणि वृद्ध यांचें संरक्षण करणें, दयाधर्माने वागणें, पवित्र जीवन जगणें, हा अशोकाचा मुख्य संदेश होता. अशोकाने धर्म शब्द विशिष्ट संप्रदायाबद्दल वापरलेला नाही. धर्माबद्दल तो म्हणतो–

'पापापासून दूर राहणें, उत्तम कार्य करणें, दम, दान, सत्य व शौच यांचें पालन करणें, हा धर्म होय.'

तो स्वत: धर्माप्रमाणे वागला. दया, प्रेम व अहिंसा या गुणविशेषांना अनुसरूनच त्याने आपलें साम्राज्य चालविलें. त्याने माणसांनाच नव्हे; तर पशूंनाहि औषध मिळण्याची व्यवस्था केली. राज्यांतली पशुहिंसा कायद्याने बंद केली व सदर कायदा मोडणाऱ्यास ५० पण दंड ठेवला. पाणपोया व धर्मशाळा उघडल्या. दोन दोन हजार मैलांचे रस्ते बांधून त्यांच्या कडेने वृक्ष लावले. जन्ममृत्यूंची नोंद सुरू केली. उद्यानें, नाट्यगृहें व पाठशाळा निर्माण केल्या. व्यापार वृद्धीच्या योजना आंखल्या. आपल्या प्रजेची सत्य परिस्थिति कळावी म्हणून तो स्वत: राज्यांत हिंडे. अशा प्रकारें परोपकार आणि प्रजेची अभिवृद्धि यांच्यासाठी झटणारा हा सम्राट् भारताप्रमाणेच अन्य देशांतल्या लोकांनाहि आदरणीय झाला, यांत नवल नाही. तो राजा असूनहि खऱ्या अर्थाने राजकारणी नव्हता. तो धार्मिक प्रवृत्तीचा पुरुष होता. लोकांत दयादाक्षिण्यादि सद्‌गुणांचें संवर्धन कसें होईल, याच गोष्टीची त्याला अहोरात्र तळमळ होती. धर्मप्रसाराच्या बाबतींत पाश्चात्य इतिहासकारांनी त्याची कान्स्टंटाइन बादशहाशीं तुलना केली आहे. पण त्या दोघांतला एक फरक ते विसरलेले दिसतात. कान्स्टन्टाइनने ख्रिस्ती धर्माच्या प्रचारासाठी शस्त्रबळ वापरलें व रक्त सांडलें. पण अशोकाने मात्र शस्त्राची मदत घेतल्यावांचून धर्मप्रसार केला. त्याच्या कालीं भारतांत अनेक धर्मसंप्रदाय होते आणि त्यांच्यामध्ये चुरसहि होती. पण अशोकाने त्यांना वाक्संयम उपदेशिला आणि अन्य धर्मांची निंदा त्याज्य ठरविली.



बुद्धचरित्रांतलीं महत्त्वाचीं स्थळें पाहण्यासाठी अशोकाने धर्मविजयप्रक्रम नांवाची वैभवशाली यात्रा काढली आणि प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणीं स्तूप, लेख, विहार अशा स्वरूपांत बुद्धाचीं चिरस्थायी स्मारकें उभारलीं. अशोक डोंगरांवर, गुहेंत किंवा खडकांवर आपले शिलालेख कोरून ठेवीत असे. जिथे खडक मिळाले नाहीत, तिथे त्याने त्यासाठी भव्य स्तंभ उभारले आहेत.

अशोक आपला राज्यारोहणदिन महोत्सवाने साजरा करी. त्या दिवशीं कैद्यांची मुक्तता, अपराधी लोकांवर दया, प्रजेला कांही विशेष सवलती, अशा गोष्टी तो करी.

अशोकाला पांच राण्या होत्या– (१) विदिशा (२) असंधिमित्रा (ही पट्टराणी होती) (३) कारुवाकी (४) पद्मावती व (५) तिष्यरक्षिता. विदिशेपासून त्याला महींद्र नांवाचा पुत्र व संघमित्रा नांवाची कन्या अशीं दोन अपत्यें झालीं. त्याला चारुमती नांवाची आणखी एक कन्या

होती. संघमित्रेचा विवाह अग्निब्रह्मा नांवाच्या ब्राह्मण-कुमाराशीं झाला होता. चारुमतीचा विवाह देवपाल नांवाच्या क्षत्रियाशीं झाला. ती नेपाळांत जाऊन मठवासिनी झाली. संघमित्रा लंकेंत धर्मप्रचारासाठी गेली. तिष्य आणि कुणाल असे अशोकाचे आणखी दोन पुत्र होते. जलौक नांवाच्या तिसऱ्या पुत्राला त्याने काश्मीरचा प्रशासक म्हणून नेमलें. हा अशोकापासून फटकून वागे. अशोकाच्या मृत्यूनंतर काश्मीर देश साम्राज्यांतून फोडून त्याने तिथे आपलें स्वतंत्र राज्य स्थापलें असें कल्हणाने सांगितलें आहे. दशरथ नांवाच्या नातवाला अशोकाने युवराजपद दिलें व अशोकानंतर तो मौर्य सम्राट् बनला.

अशोकाचे लेख– अशोकाने आपले धार्मिक आणि नैतिक विचार चिरकाल लोकांच्या पुढे राहावे म्हणून भारतांत अनेक ठिकाणीं शिलालेख कोरून ठेवले. त्याचप्रमाणे स्तंभलेख आणि गुहालेखहि लिहिले. शिलालेखांची प्रथा अशोकानेच प्रथम सुरू केली. पुढच्या सम्राटांनी मग तिचें अनुकरण केलें. अशोकाचे हे शिलालेख ब्राह्मी व खरोष्ट्री अशा दोन लिपींत लिहिलेले आहेत. या लिपी सांप्रत व्यवहारांत नाहीत. मध्यंतरीच्या अंधकारयुगांत तर त्या प्रायः लुप्तच झाल्या होत्या. त्यामुळे हे शिलालेख सांपडूनहि त्यांचें वाचन करणें, ही गोष्ट अवघड होऊन बसली होती. पण जिज्ञासू पंडितांनी कालांतराने ती लिपि उलगडली. या कामांत खटपट करणाऱ्या पाश्चात्य पंडितांत श्री. जेम्स प्रिन्सेप हे अग्रगण्य होत. टोपरा स्तंभावरील लेख त्यांनीच प्रथम संपूर्ण वाचला.



अशोकस्तंभशीर्ष––भारतीय संघराज्याचें प्रतीक

अशोकाच्या शिलालेखांचे दोन भाग पडतात. त्याचे एकंदर चौदा लेख विशिष्ट क्रमाने लिहिलेले बऱ्याच ठिकाणीं आढळले आहेत. त्यांना चौदा शिलालेख असें म्हणतात. हा पहिला भाग. अन्य कांही ठिकाणीं फक्त दोन लेख एकत्र आढळतात. हा दुसरा भाग होय. चौदा शिलालेख खैबर घाटाजवळ शहाबाझगढी या ठिकाणीं सांपडले आहेत. यांत १ ते ११ व १३ ते १४ असे लेख एका मोठ्या खडकावर असून १२ वा लेख थोड्या अंतरावर दुसऱ्या खडकावर कोरलेला आहे. या चौदा लेखांची दुसरी प्रत हजारा जिल्ह्यांत मानसेरा गांवीं, तिसरी मसुरीजवळ कालसी गांवीं, चौथी गिरनार टेकडीच्या पायथ्याशीं, पांचव्या प्रतीचा कांही भाग सोपारा गांवीं, सहावी प्रत तमिळनाडमध्ये येरागुडी गांवीं, सातवी प्रत ओरिसा प्रांतांत धौली या गांवीं (यांत ११, १२ व १३ हे लेख नाहीत) व आठवी प्रत तमिळनाडमध्ये जौगढ या ठिकाणीं सांपडली आहे.

विद्वानांच्या मतें हे चौदा शिलालेख असलेल्या जागीं अशोकाच्या काळीं मोठीं शहरें किंवा त्या त्या प्रांताच्या राजधान्या असाव्या.

स्तंभलेखांचेहि दोन वर्ग असून पहिला वर्ग सात स्तंभलेखांचा व दुसरा दुय्यम स्तंभलेखांचा आहे. हे सात स्तंभलेख पुढीलप्रमाणे आहेत–यमुनातटाकीं सांपडलेला स्तंभ, फेरोजशहा तुगलक याने दिल्लीस आणलेला टोपरा स्तंभ, मेरठ येथील स्तंभ, प्रयाग स्तंभ (यावर दोन लेख आहेत), चंपारण्यांतील लौढिया अरराजस्तंभ, तिथलाच दुसरा नंदगड स्तंभ व तिथलाच रामपुरवा स्तंभ. या स्तंभलेखांच्या जागांचा विचार केला म्हणजे असें दिसतें, की हे स्तंभ तीर्थक्षेत्रांत किंवा त्यांच्या मार्गांवर उभारलेले होते.

अशोकाचे गुहालेख गयेजवळील बराबर व नागार्जुनी टेकड्यांत कोरलेले आहेत. सारनाथ व सांची या ठिकाणीं त्याचे लघु स्तंभलेख आहेत. म्हैसूर राज्यांतल्या रायचूर जिल्ह्यांत म्हस्की येथे त्याचा गुहालेख असून त्याचें वैशिष्ट्य हें, की अशोक हें नांव त्याच गुहालेखांत आढळतें. असे एकंदर ३५ लेख आढळतात. हे सर्व लेख मागधीसारख्या कोणत्यातरी प्राकृत भाषेंत आहेत. थोडाफार फरक असेल तो स्थलपरत्वें समजावा.

अशोकाच्या या शिलालेखांवर ' देवानांप्रिय प्रियदर्शी राजाचें असें म्हणणें – अशी इच्छा आहे ' असा प्रारंभ आढळतो. अशोक स्वतःला ' देवानां प्रिय प्रियदर्शी ' असें बिरुद लाऊन घेत असे. ' देवनां प्रिय ' म्हणजे देवांना प्रिय असलेला, देवांची कृपा अथवा मर्जी असलेला. ' प्रियदर्शी ' म्हणजे प्रिय दिसणारा अथवा लोकांचें प्रिय करणारा. अशोकाचा आजा चंद्रगुप्त मौर्य याचा उल्लेख कांही पालि ग्रंथांतून प्रियदर्शी असा आढळतो. त्यावरून वाटतें, की अशोकाने आपल्या आजाचें हें बिरुद स्वतःसाठी घेतलें असावें.


अशोकाच्या शिलालेखांपैकी पहिला शिलालेख पुढीलप्रमाणे आहे–

'हा धर्मलेख देवानांप्रिय प्रियदर्शी राजाने लिहविला आहे. येथें कोण्याहि प्राण्याचा बलि देण्यांत येऊं नये; अथवा समाज भरवू नये. कारण देवानांप्रिय प्रियदर्शी राजाच्या दृष्टीने या समाजांत बरेच अनिष्ट प्रकार घडत असतात. तथापि कांही विवक्षित प्रकारचे समाज हितावह आहेत, असें प्रियदर्शी राजाला वाटतें.......'

अशोकाच्या स्तंभलेखांपैकी पहिला लेख पुढीलप्रमाणे आहे–

'देवानांप्रिय प्रियदर्शी राजाचें असें म्हणणें आहे– राज्याभिषेकानंतर सव्विसाव्या वर्षी हा धर्मलेख लिहविला आहे. उत्कट धर्मप्रेम, उत्कट आत्मपरीक्षण, उत्कट आज्ञाधारकपणा, उत्कट पापभीरुता व उत्कट उल्हास हे गुण अंगीं असल्याशिवाय इह व परलोकीं उन्नति करणें दुरापास्त आहे. पण माझ्या शिकवणीमुळे धर्माबद्दलचा आदर व धर्मप्रेम यांची लोकांत वृद्धि झाली आहे व ती दिवसानुदिवस होत राहील आणि माझे जिल्हाधिकारी मग ते उच्च, मध्यम वा कनिष्ठ दर्जाचे असोत, त्याप्रमाणे वागतील व त्यांची वाढ करतील. प्रजेला उत्तेजन देण्यास ते समर्थ आहेत. आणि त्याचप्रमाणे सीमाप्रदेशांतील महामात्रहि समर्थ आहेत त्यांना माझी ही शिकवण आहे–– धर्माने पालन करा. धर्माने राज्यकारभार चालवा. धर्माने लोकांना सुखी करा व धर्माने लोकहित साधा ......'

अशोकाने अनेक नगरें व प्रासाद उभारून वास्तुकला व शिल्पकला यांचा विकास केला. जलाशय, कालवे, रस्ते, विश्राम-



अशोकनिर्मित गुहा–बराबर पर्वत (गया)

धामें व रुग्णालयें बांधून जनतेच्या सुखसोयींत भर घातली. त्याने आपल्या विशाल साम्राज्यांत जी शासनव्यवस्था सुरू केली होती, तिच्यांतील व्यापक सिद्धान्त, दूरदृष्टि, मानवता, आंतरराष्ट्रीय भावना, या गोष्टी आजहि सर्व जगाला आदर्शभूत आहेत. त्याचें साम्राज्य सत्य, अहिंसा व विश्वशांति या तत्वांवर आधारलेलें होतें. अनेक भिन्न जातीच्या व भिन्न धर्मांच्या लोकांनी परस्परांशीं कसें वागावें, याविषयीं त्याने जे आदेश दिलेले आहेत, ते आजच्या काळांतहि धार्मिक व नैतिक दृष्टीने शिरोधार्य आहेत.


अशोकाचे स्तंभ म्हणजे शिल्पकला व वास्तुकला यांचे अपूर्व नमुने आहेत. विस्तीर्ण पहाडांतून ५० टन वजनाचे आणि ५० फूट उंच असे अखंड पाषाणस्तंभ तोडून काढणें आणि ते दूर–दूरच्या जागीं नेणें, हें कल्पनेलाहि थक्क करणारें कठिण काम होतें. हे सर्व स्तंभ बहुधा चुनारच्या पहाडांतून काढलेले असावे. हे स्तंभ कलाकौशल्याने परिपूर्ण असून त्यांवरील चमक आधुनिक कारागिरांनाहि सहज साध्य नाही. या स्तंभांचा शिरोभाग अत्यंत सुंदर असतो.

अशोक बौद्ध धर्माचा कट्टर अनुयायी असूनहि त्याच्या अंगीं सहिष्णुता व उदारता होती. तो स्वतः भिक्षु बनला नसला, तरी त्याने बौद्ध भिक्षूंच्या संघांना खूप साहाय्य दिलें. पशूंच्या लढती, अतिरिक्त मद्यपान व मांसभक्षण या गोष्टी ज्यांत होत असत, असे उत्सव त्याने बंद केले आणि नवीन प्रकारचे समारंभ (देवतांची मिरवणूक, रोषणाई, प्रदर्शनें, इ०) सुरू केले. स्वतःच्या जीवनांतहि त्याने साधेपणा व संयम आणला. सर्व प्रकारचे भोगविलास बंद करून तो धार्मिक यात्रा करीत राहिला.

अशोकाच्या राजनीतींत मानवधर्माला आणि लोककल्याणाला प्राधान्य होतें, हें आपण पाहिलें. पण त्यासाठी त्याने शस्त्रसंन्यास करायला नको होता. भारताच्या इतिहासावर व राष्ट्रीय जीवनावर त्याच्या राजनीतीचा परिणाम कसा आणि काय झाला, याविषयी अनेक इतिहासज्ञांनी आलोचना केली आहे. श्री. जयस्वाल यांच्या मतें त्याने इतकें 'धर्मभीरु' बनायला नको होतें. त्याने जर आपल्या पूर्वजांचें राजकीय धोरण चालविलें असतें, तर बिंदुसाराच्या काळापर्यंत मौर्य साम्राज्यांत सामील न झालेलीं जनपद राज्यें त्याला आपल्या साम्राज्यांत विलीन करून घेतां आलीं असतीं. तो इराणच्या सरहद्दीपासून तों कन्याकुमारीपर्यंत समस्त जंबुद्वीपाचा एकछत्री सम्राट् होऊं शकला असता; पण अशोक त्या बाबतींत उदासीन राहिला. ती प्रेरणाच त्याच्या अंतरांतून अंतर्धान पावली. एखाद्या महंताच्या गादीवर तो बसला असता, तर हे सारें ठीक झालें असतें. पण तो बसला मात्र एका साम्राज्याच्या सिंहासनावर. त्यामुळे इतिहासाला वेगळेंच वळण लागलें.

भारतवर्षांत आर्यसत्तेची स्थापना अशोकाच्या पूर्वीच पुरी

होऊन चुकली होती. भारतांतल्या विभिन्न जातीजमाती आर्यांच्या व्यापक अधिकारक्षेत्रांत दाखल झाल्या होत्या. भारतांत राजनैतिक स्थिरता व राजनैतिक एकता निर्माण करणें, ही त्यापुढची कामगिरी होती व इतिहासाने ती अशोकाच्या पुढे उपस्थित केली होती. बिंबिसाराच्या कारकीर्दीपासून साऱ्या राजकीय शक्ती केंद्राभिगामी (Centripetal) होत चालल्या होत्या. अशोकाने त्या शक्तींना प्रोत्साहन देऊन मगधसाम्राज्य व्यापक व दृढ करून भारताचें राजनैतिक ऐक्य व स्थैर्य यांच्यासाठी झटायला हवें होतें; पण त्याने दिग्विजयाच्या ऐवजीं धर्मविजयाची आकांक्षा धरली. त्याचा परिणाम आध्यात्मिक दृष्टीने चांगला झाला असेल कदाचित्; पण राजनैतिक दृष्टचा त्याची ही प्रवृत्ति विनाशकारी ठरली. भारतीयांच्या स्वभावांत आध्यात्मिक वृत्ति ही सहज आहे. अशोकाने त्या वृत्तीचें पोषण केलें. त्यामुळे देशांतल्या समस्त जनतेंत राजकीय पराक्रम व राजकीय आकांक्षा निर्माण होण्याच्या ऐवजी आपण आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी झटावें, अशा प्रकारची प्रवृत्ति बळावली. जनता राजकीय ध्येयाला विन्मुख होऊन परमार्थी विचारांना अधिक गोंजारूं लागली.



अशोकस्तंभ—सौरिआ नंदनगड (बिहार)

निदान त्याने तमिळ राज्यें आणि ताम्रपर्णी (सिंहल) यांना तरी आपल्या साम्राज्यांत सामील करून घ्यायला हवें होतें. त्यासाठी अशोकाला कदाचित् कलिंगविजयाइतकीच किंमत द्यावी लागली असती; पण त्यामुळे समस्त भारत एका सार्वभौम साम्राज्याच्या रूपाने एकत्र आला असता व संघटित झाला असता. सर्वत्र एक कायदा, एक व्यवहार आणि एक राष्ट्रीयता यांची स्थापना झाली असती; पण अशोकाने तेवढेंहि काम पुरें केलें नाही, ही इतिहासवेत्त्यांची अशोकाविषयी तक्रार आहे. [बु. इं.; एडिक्ट्स ऑफ् अशोक; म. ज्ञा. को.; सम्राट् अशोक; प्राचीन भारतीय विचार और विभूतियाँ]

(२) एक वृक्ष. 'नास्ति शोको यस्मात्' = ज्याच्यापासून शोक होत नाही, तो अशोक होय (हलायुध). हा वृक्ष पौराणिक कालापासून सौंदर्य व उपयुक्तता या गुणांनी प्रसिद्ध आहे. याचीं पानें आंब्याच्या पानापेक्षा थोडीं लांब व तुकतुकीत असतात. याला लालसर भगव्या फुलांचे वाटोळे घोस येतात. भारतांत समुद्र किनाऱ्यालगत हा आढळतो. हिंदूंप्रमाणेच बौद्ध हि याला पवित्र मानतात. बुद्धाचा जन्म याच्याखाली झाला, अशी आख्यायिका आहे.



अशोक–नर

'पादाघातादशोको विकसति' = रमणीच्या लत्ताप्रहाराने याला फुलें येतात, असा कविसंकेत आहे (सा. द.). संस्कृत महाकाव्यें आणि चंपूकाव्यें यांतून याचे उल्लेख येतात.



अशोक–मादी

रावणाने सीतेला लंकेंत नेल्यावर अशोकवनांत ठेवलें होतें.

मदनाच्या पंचबाणांत याचें फूल आहे. शिवाने मदनाला जेव्हा जाळलें, तेव्हा तो अशोकाच्या आश्रयाने उभा होता. याचें फूल प्रेमाचें प्रतीक मानलें आहे. चैत्र शु. १३ शीला याची पूजा करावी, असें व्रतराज सांगतो.

बंगालमध्ये अशोकषष्ठीच्या दिवशीं स्त्रिया याच्या कळ्या भक्षण करतात. याला दुःखपरिहारक आणि कल्पवृक्ष मानलें आहे. एके दिवशीं पार्वतीने शिवाला याचें माहात्म्य विचारलें. शिव म्हणाला, 'हा कल्पवृक्ष आहे; याच्यापाशीं तुला हवें तें माग.' पार्वतीने एक स्त्री मागितली. ती तावडतोब पुढे उभी झाली. पार्वतीने तिला आपली कन्या मानून अशोकसुंदरी असें तिचें नांव ठेविलें. 'तुझें नहुषाशीं लग्न होईल,' असा पार्वतीने तिला वर दिला (पद्म पु.).

(३) केतुमाल वर्षातला कुलपर्वत. [वायु पु. ४४. ४]

अशोक कलिका प्राशन काम्य विधि. चैत्र शु. ८ मीस पुनर्वसु नक्षत्र आलें असतां अशोकाच्या आठ कळ्यांचें प्राशन (भक्षण) करतात. त्याचा मंत्र असा आहे—

त्वामशोकवराभीष्टं मधुमाससमुद्भवम् ।
पिबामि शोकसन्तप्तं मामशोकं सदा कुरु ॥

अर्थ—हे अशोकश्रेष्ठा, इष्ट फल देणाऱ्या व चैत्र मासांत उत्पन्न झालेल्या तुझें (तुझ्या कळ्यांचें) मी प्राशन करीत आहें. शोकसंतप्त अशा मला तूं विशोक कर. [नि. सिं.]

अशोक त्रिरात्र व्रत तिथिव्रत. हें विशेषेंकरून स्त्रियांसाठी आहे. ज्येष्ठ, भाद्र० किंवा मार्ग० शु. १३ शीपासून तीन रात्री हें व्रत करतात. व्रतावधि एक वर्ष. रुप्याचा अशोक वृक्ष करून त्याची व त्याचबरोबर पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या रात्रीं अनुक्रमें ब्रह्मा-सावित्री, उमा-महेश्वर व लक्ष्मी-नारायण यांच्या मूर्तींची पूजा व व्रताच्या शेवटीं अशोक वृक्षासह मूर्तिदान असा याचा विधि आहे. फल—व्याधिनाश, दीर्घायुष्य, संपत्ति व संतति यांची प्राप्ति. [हे. व्र.]

अशोक द्वादशी तिथिव्रत. आश्विन शु. १० मी पासून प्रारंभ. यांत केशवाची पूजा करायची असते. त्या दिवशीं अल्पाहार, एकादशीस उपवास व द्वादशीस पारणा असा याचा विधि आहे. व्रतावधि एक वर्ष. फल-आरोग्यलाभ व शोकमुक्ति. [हे. व्र.]

अशोक पूर्णिमा तिथिव्रत. फाल्गुन पूर्णिमा. व्रतावधि एक वर्ष. पृथ्वी व केशव यांची पूजा आणि चंद्राला अर्घ्यदान. पृथ्वीपूजेंत पहिले चार महिने धरणी, दुसरे चार महिने मेदिनी व तिसरे चार महिने वसुंधरा या नांवाने तिची पूजा करतात. [हे. व्र.]

अशोक प्रतिपदा तिथिव्रत. आश्विन शु. १ ला. केवळ स्त्रियांसाठी हें व्रत आहे. अशोकवृक्षाची, त्याच्या रौप्य प्रतिमेची किंवा चित्राची पूजा करणें हा याचा विधि आहे. फल—दुःखनाश व सौभाग्यप्राप्ति. [हे. व्र.]

अशोक रोहिणी व्रत जैन नाक्षत्र व्रत. प्रत्येक मासांतल्या रोहिणी नक्षत्रावर उपवास. व्रतावधि दोन वर्षें व तीन महिने. व्रताची कथा अशी—

चंपा नगरींत मघवा नांवाचा राजा होता. त्याची कन्या रोहिणी. तिचा विवाह हस्तिनापुरच्या अशोक या राजपुत्राशीं झाला. त्या दोघांनी हें व्रत करून स्वर्गादि सुखभोग मिळविले. [जै. व्र. वि. सं.]

अशोकव्रत स्त्रियांचें काम्य व्रत. हें त्रिरात्रव्रत आहे. भाद्र० शु. १३ शीस याचा प्रारंभ होतो. त्या दिवशीं अशोकवृक्षाच्या मुळाशीं जाऊन संकल्प करतात. त्या दिवशीं व दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशीं अनुक्रमें नारळ, खजुराच्या बिया व द्राक्षें हीं द्रव्यें १०८ संख्येने घेऊन अशोकाला १०८ प्रदक्षिणा घालतात. तिसऱ्या दिवशीं नंदीसह शिव व राम-लक्ष्मण-सीता यांच्या सुवर्णमूर्ती, रुप्याच्या अशोक वृक्षाखाली बसवून त्यांची पूजा करतात. प्रार्थनेचा मंत्र असा—

पितृमातृपतीनां च श्वश्रूश्वशुरयोस्तथा ।
अशोक त्वं शोकहरो भव सर्वत्र नः कुले ॥

अर्थ—हे अशोका, तूं माता, पिता, पति, सासू, सासरा या आमच्या कुलांतल्या सर्वांचा शोक हरण करणारा हो.

या व्रताची कथा पुढीलप्रमाणे—

वृत्राचा वध केल्यावर इंद्राच्या मागे ब्रह्महत्या लागली. तो तिच्या भयाने मानससरोवरांत दडून बसला. स्वर्गाचें राज्य नहुषाने घेतलें. इंद्रपत्नी शची निराधार होऊन इंद्राच्या शोधाला निघाली. त्या वेळीं तिला भेटून बृहस्पतीने अशोकव्रताचें माहात्म्य सांगितलें. शचीने तें व्रत केलें. तिची व इंद्राची भेट झाली. त्याच्या ब्रह्महत्येचें क्षालन होऊन त्याला स्वर्गाचें राज्य परत मिळालें. [व्रतराज]

सर्व प्राचीन धर्मांत आढळणाऱ्या भू-माता व आकाश-पिता यांविषयींच्या कल्पना याच काळांतील असाव्या. भू-मातेची प्रतिमा सर्वप्रथम मध्याश्मयुगांत सांपडते. निसर्गांतील नियमित घडामोडी आणि अद्‌भुत घटना पाहून स्तंभित झालेला तत्कालीन मानव संकटकाळीं निसर्गदेवतांची आराधना करूं लागला असावा. त्यांच्याशीं बंधुत्वाचें, प्रेमाचें नातें जोडून व नृत्यगायनाने त्यांना प्रसन्न करून त्यांचें साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न त्याने सुरू केला. प्राण्यांचीं चित्रें काढून, त्यांच्यावर शरसंधान करून, त्या माध्यमांतून खऱ्या पशूंवर मांत्रिक प्रभुत्व (magical hold) मिळविणें हेंहि, त्या वेळच्या मनुष्याला साधलें होतें. चामडयाचे ढोल, शंख, इ. वाद्यें करणें, कवडया, शंख, शिंपले, अस्थि, यांचीं आभूषणें तयार करणें, गोंदणें, वृक्षांचीं पानें, साली व पशूंचीं कातडीं, यांचीं पांघरुणें तयार करून वापरणें, या गोष्टी तो करीत होता.


सनपूर्व २०,००० च्या सुमारास, पृथ्वीच्या इतिहासांतील शेवटचें हिमयुग संपल्यानंतर हत्ती, अस्वलें, सांबर, इ. प्राणी नामशेष झाले आणि मानवाला मांसाचा तुटवडा पडूं लागला. म्हणून त्याने आपोआप उगवणाऱ्या धान्याची पेरणी करून धान्योत्पादन सुरू केलें. तें इतकें यशस्वी झालें, की त्याला इतर गोष्टी करण्यास भरपूर वेळ मिळूं लागला. नवाश्मयुगांतील मानवाने आपलीं अश्म-शस्त्रें घासून घासून अधिक तीक्ष्ण व घाटदार केलीं. शेतीसाठी नदीचें खोरें अधिक उपयुक्त असल्यामुळे तो नदीकाठीं वसाहती करूं लागला. शेती, लाकूडतोड, शिकार, शस्त्रनिर्मिति, इ. कष्टाचीं कामें पुरुषांकडे व घरकामें, शेतीची राखण, हीं कामें स्त्रियांकडे, अशी श्रमांची विभागणी त्याच काळांत झाली.

त्या काळांतील मातीचीं भांडीं उपलब्ध झालीं आहेत. अन्न शिजविण्यासाठी लहान व धान्य साठविण्यासाठी मोठीं भांडीं प्रथम हातांनी बनवून तीं कच्चींच वापरीत असत. कालांतराने चाकाचा उपयोग व भाजणें हे शोध लागले. चाकावरून टकळीचा शोध लागला असावा. त्यामुळे सूत कांतून कापसाचीं वस्त्रें बनविणें शक्य झालें.

त्या कालांत स्त्री हीच कुलप्रमुख मानली जात होती. त्या युगांतील मानवांना भूमातेचें महत्त्व पटलें होतें. पृथ्वीच्या मातृत्वाबरोबरच तिच्या धारिणी व कराल अशा उभय रूपांची कल्पना याच युगांत उदय पावली असावी.

धातुयुगाच्या आरंभीं जीं प्रचंड दगडीं स्मारकें दफनभूमीवर उभारलेलीं आढळलीं आहेत, तीं अश्मयुगांतीलच असावीं असें वाटतें. तीं तत्कालीन मानवाच्या जीवनांतील व विचारांतील परिवर्तन दर्शवितात. त्या काळच्या माणसाला मृत मनुष्यांविषयीं आदर वाटूं लागला होता व मृत्यूनंतरहि त्याच्या अन्नपाण्याची व्यवस्था करणें, हें धार्मिक कर्तव्य वाटूं लागलें होतें. मनुष्याच्या मालकीच्या वस्तू शवाजवळ ठेवण्याची प्रथा याच कल्पनेंतून उगम पावली आहे.

वरील सर्व ज्ञान युरोपांत झालेल्या संशोधनावरून प्राप्त झालेलें आहे. भारतांतील अश्मयुग नेमकें केव्हा सुरू झालें, यासंबंधी तज्ज्ञांचें अजून एकमत झालेलें नाही. भारतांतल्या भिन्न भागांत जीं आयुधें व उपकरणें सांपडलीं आहेत, त्यांचें नीट वर्गीकरण अद्याप झालेलें नाही. त्यामुळे भारतांतील अश्मयुगासंबंधी विशेष ज्ञान अद्यापि प्राप्त झालेलें नाही.



पुराणाश्मयुगीन हत्यारें-- तापीचें खोरें
(पुरातत्त्व खात्याच्या सौजन्याने)

तथापि गंगा, साबरमती, नर्मदा, तापी, महानदी, गोदावरी, कृष्णा, तुंगभद्रा, ब्राह्मणी, पेन्नार, पालार, इ. नद्यांच्या खोऱ्यांत गारगोटी (quartzite) व तत्सदृश पाषाणांचे परशु अनेक ठिकाणीं सांपडले आहेत. ते बदामी आकाराचे, धारदार;

पण ओबडधोबड आहेत. युरोपांतील अश्मयुगाच्या प्रारंभींचीं उपकरणें आणि हे परशु यांत बरेंच साम्य आहे. त्यावरून पुराणाश्मयुगांत भारतांत सर्वत्र आदिमानवाची वस्ती होती, असें वाटतें. या मानवानें प्रथम पंजाबच्या वायव्य भागांतील डोंगराळ प्रदेशांत प्रवेश केला असावा, असें एक अनुमान आहे. कांहीं शास्त्रज्ञांनी दुसरें एक अनुमान केलें आहे, की भारतीय आदिमानव प्रथम दक्षिण भारतांत उदय पावला आणि तिथून पहिल्या हिमयुगाच्या शेवटीं पंजाबकडे सरकला.

मध्याश्मयुगांतलीं छोटीं उपकरणें (Microliths) भारतांत सर्वत्र सांपडलीं आहेत, पण तीं भूपृष्ठाजवळ सांपडल्यामुळे त्यांचा कालनिर्णय करतां येत नाही. म्हैसूरमधील



नवाश्मयुगीन हत्यारें— नागार्जुनकोंडा
(पुरातत्त्व खात्याच्या सौजन्यानें)

ब्रह्मगिरी, पंचमढी येथील महादेव डोंगर, पंजाबमधील उचली, गुजरातमधील लंघनाज व हिरपूर या ठिकाणीं सांपडलेलीं उपकरणें मात्र मध्याश्मयुगीन असावीं. गुजरातमध्ये मानवांचे सांगाडे व प्राण्यांचीं हाडेंहि सांपडलीं आहेत. तिथें नंतरच्या काळांतील अवशेष नाहीत. त्यावरून तिथलीं दगडी आयुधें अत्यंत प्राचीन असावीं. त्या वेळीं प्रेतें पुरण्याची चाल होती. म्हैसूर, गुजरात, काश्मीर, इ. प्रदेशांत नवाश्मयुगीन तीक्ष्ण व घोटीव आयुधें सापडलीं आहेत. तीं गारगोटीचीं नसून उत्तम प्रतीच्या हिरव्या दगडाचीं आहेत. तशीं आयुधें भारतांत सर्वत्र सांपडतात; पण त्यांच्याबरोबरच नंतरच्या काळांतील अवशेषहि सांपडले आहेत. त्यामुळे त्यांच्या कालनिर्णयाला अडचण पडत आहे. त्या काळच्या मानवाला (भारतांतील) अग्नीचा उपयोग माहीत होता, मातीचीं भांडीं करतां येत होतीं, तो धान्योत्पादन व पशुपालन करीत होता, असें अनुमान कांही तज्ज्ञांनी केलें आहे. पण त्याला सबळ पुरावा अजून उपलब्ध झालेला नाही.

भारतांत सर्वत्र आढळणारा नवाश्मयुगीन सस्कंध परशु आग्नेय व दक्षिण आशियांतील विस्तीर्ण भूप्रदेशांत कित्येक मागसलेल्या जमातींच्या हातीं आढळतो. त्यावरून तो ऑस्ट्रिक वंशाशीं संबद्ध असावा आणि ऑस्ट्रिक वंशाचे लोक भारतांतील नवाश्मयुगीन संस्कृतीचे जनक असावे, असें वाटतें. नारळ, जांभूळ, लिंबू, तांबूल, भोपळा, कापूस, कापड, कोंबडा, हत्ती, इ. शब्द ऑस्ट्रिक भाषा-गटांतूनच भारतीय भाषांत आलेले आहेत, असें भाषा-शास्त्रज्ञांनी दाखवून दिलें आहे.

अश्मा ब्राह्मणांच्या और्ध्वदेहिकांत आवश्यक असा एक दगड. चितेभोवती प्रदक्षिणा करतांना पाण्यानें भरलेलें मडकें ज्या दगडानें फोडतात, तोच दगड अश्मा म्हणून प्रेतदहनानंतर घरीं आणतात. मृताला उद्देशून दहा दिवस त्या दगडावरच तिलांजलि देतात. या तिलांजलिदानाचा सूत्रांत उल्लेख नाही; पण रूढि मात्र तशी आहे. मृताचा आत्मा दहा दिवसपर्यंत त्या अश्म्यांत राहतो, अशी कल्पना याच्या मुळाशीं असावी. यालाच अन्य जातींत 'जीवखडा' म्हणतात.

अश्व घोड्याची उत्पत्ति पुढील सात प्रकारांनी सांगितली आहे –

अमृताद् बाष्पतो वह्नेर्वेदेभ्योऽण्डाच्च गर्भतः ।
साम्नो हयानामुत्पत्तिः सप्तधा परिकीर्तिता ।।

अर्थ — अमृत, बाष्प, अग्नि, वेद, अंड, गर्भ व साम या सातांपासून घोड्यांची उत्पत्ति होते. **पाहा** – घोडा. [सं. इं. डि.]

अश्वक एक प्राचीन मानवगण. उत्तरेस पामीर, दक्षिणेस काबूल नदी, पूर्वेस आलिंगार नदी व पश्चिमेस कूणर नदी या चतुःसीमेंत यांचें वास्तव्य होतें. यांच्या शेजारीं कापिश्यायन नांवाचे लोक राहत होते. ग्रीक साहित्यांत अश्वकांना एसापिसियन म्हटलें आहे. या प्रदेशांत चार किल्ले होते. पहिल्याचें नांव ज्ञात नाहीं; पण बाकीचे तीन अंडक, गौरी व अरिगायन या नांवांनी प्रसिद्ध आहेत. गौरी किल्ला ही अश्वकांची राजधानी होती. [सि. आ. प. भा.]

अश्वकूट पूर्व भारतांत राहणारी एक प्राचीन जमात. मार्कंडेय व मत्स्य पुराणांत यांचा उल्लेख आला आहे; पण अधिक माहिती नाहीं.

अश्वक्रंद अमृताचें रक्षण करणारा एक देव. [प्रा. च. को.]

अश्वघोष (इ. स. १लें शतक) संस्कृत भाषेचा एक महाकवि. हा कनिष्काचा समकालीन असल्याबद्दल सर्वांचें मतैक्य आहे. कनिष्क आणि अश्वघोष हीं दोन नांवें इतिहासाने जोडून टाकलेलीं आहेत. अश्वघोष प्रथम मगध नरेशाच्या दरबारांत होता. कनिष्काने त्याचा पराभव केल्यावर अश्वघोषाला तिथून पुरुषपुराला आणलें व शेवटपर्यंत तो कनिष्काच्या आश्रयाने राहिला, अशी आख्यायिका आहे.

हा मूळचा साकेताचा (अयोध्या) रहिवासी होता. त्याने आपल्या आईचें नांव सुवर्णाक्षी असें सांगितलें आहे (सौंदरनंद); पण बापाचें नांव सांगितलें नाही. हा पुढे बौद्ध बनला असला, तरी मूळचा ब्राह्मण होता. विद्यार्थी दशेंत त्याला ब्राह्मणी धर्माचें उत्तम शिक्षण मिळालें होतें. तो वेदवेदांगपारग होता. महाभारत, पुराणें, दर्शनें, अर्थशास्त्र, नाट्यशास्त्र इ. विषयहि त्याने चांगले अभ्यासले होते, याबद्दल त्याच्याच काव्यकृतींतून पुरावे मिळतात. हिंदु देव-देवतांचे आणि पुराणांतल्या कथांचे किती तरी संदर्भ त्याच्या काव्यांत आढळतात.

विद्या पूर्ण झाल्यावर तो निरनिराळ्या पंडितांशीं खंडन-मंडनात्मक शास्त्रार्थ करूं लागला. 'त्याला सोडवितां आला नसतां, असा एकहि प्रश्न नव्हता; त्याने खोडून टाकला नसता, असा एकहि आक्षेप नव्हता. ज्याप्रमाणे सोसाट्याचा वारा जुनाट वृक्ष मोडून टाकतो, त्याप्रमाणे तो आपल्या प्रतिस्पर्ध्याचा पाडाव करीत असे,' असें त्याच्या तिबेटी चरित्रकाराने लिहून ठेवलें आहे. युआन च्वांगने तर त्याला पांडित्यांतला प्रतिसूर्यच म्हटलें आहे.

पण अशाहि प्रतिसूर्य पंडिताला पार्श्व नांवाचा एक वृद्ध आणि महापंडित बौद्ध भिक्षु भेटला आणि त्याच्याशीं वाद जुंपला असतां अश्वघोषाला पराभूत व्हावें लागलें. त्याच्याकडूनच मग अश्वघोषाने बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. तो भिक्षु बनला. लवकरच तो नागार्जुन, वसुमित्र, इ. बौद्ध पंडितांच्या तोडीचा मानला जाऊं लागला. आपल्या धर्माचे नियम तो कटाक्षाने पाळी. तो जसा पंडित होता, तसाच सुरेल गायकहि होता. प्रवचन आणि गायन या दोन्ही साधनांच्या द्वारें त्याने बौद्ध धर्माचा प्रचार केला व अनेकांना त्या धर्माची दीक्षाहि दिली. त्याची संगीतमय वाणी चालू झाली, की रस्त्यावरून जाणारा घोडा देखील आपला 'फुरफुर' घोष थांबवून स्तब्ध होई, अशी आख्यायिका आहे. म्हणूनच त्याला 'अश्वघोष' असें नांव मिळालें, असें म्हणतात. हीनयान पंथाच्या सिद्धान्ताशीं अश्वघोषाचे विचार मिळते जुळते आहेत. त्यावरून प्रारंभीं महायान व मूळ बौद्ध धर्म यांत विशेषसें अंतर नव्हतें, असें दिसतें. महायान पंथाच्या स्थापनेपूर्वीं अश्वघोष हा सर्वास्तिवादी असावा. पुढे तो महायान पंथाच्या संस्थापकांपैकीं एक बनला. कनिष्काने बोलाविलेल्या चतुर्थ धर्मपरिषदेची संघटना त्यानेच केली. तोच तिचा संचालकहि होता. त्याचे विचार उदार होते. त्याच्या हृदयांत भक्ति आणि करुणा होती. तत्कालीन कारागिरांना बुद्धाची मूर्ति घडवायला लावून त्याने कलेला धर्मोन्मुख बनविलें. व धर्मकाजासाठी परंपरागत संस्कृत भाषेलाच प्राधान्य दिलें.

अश्वघोषाने पुढील ग्रंथ लिहिले आहेत–

१ बुद्धचरित (महाकाव्य)
२ सौंदरनंद (,,)
३ गडिस्तोत्रगाथा (धार्मिक लघुकाव्य)
४ सूत्रालंकार (कथासंग्रह)
५ शारीपुत्रप्रकरण (नाटक)
६ महायान श्रद्धोत्पादसूत्र (तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ)
७ वज्रसूची (वर्णव्यवस्थेविरुद्ध वादग्रंथ)

या सर्वांत बुद्धचरित्र हें त्याच्या प्रतिभेचें महाफल आहे. बुद्धाभोवती अतिशयोक्त दंतकथांचें जें जाळें निर्माण झालें होतें, तें तोडून त्याने शुद्ध व सरस असें बुद्धचरित्र मानवजातीला दिलें. धर्मप्रेम आणि स्वतःची वर्णनशैली या साधनांनी त्याने त्या काव्याला रमणीय आणि आस्वाद्य बनविलें आहे. कल्पना, कथा आणि वर्णन या तीन्ही गुणविशेषांचा त्या काव्यांत त्रिवेणीसंगम झाला आहे. अश्वघोषाच्या कोणत्याहि कृतींत

धर्मपरिवर्तनाचा अदम्य उत्साह दिसून येतो. मतामतांच्या जंजाळांत न पडतां माणसाने बुद्धप्रणीत अष्टांगिक मार्गाचें अनुशीलन करून जीवन सार्थकीं लावावें, असा त्याचा आग्रह आहे. बुद्धाचा संदेश त्याने रसाळ करून जनतेच्या हृदयापर्यंत पोचविला , हें त्याचें महत्कार्य होय.

गहन तात्त्विक सिद्धान्त दृष्टान्ताने विशद करून सांगण्याची त्याची हातोटी विलक्षण आहे. निर्वाणाची कल्पना त्याने पुढीलप्रमाणे सांगितली आहे–

दीपो यथा निर्वृतिमभ्युपेतो
नैवावनिं गच्छति नान्तरिक्षम् ।
दिशं न कांचिद्विदिशं न कांचित्
स्नेहक्षयात्केवलमेति शान्तिम् ।।
(सौंदरनंद १६. २८)

अर्थ – दिवा विझला की तो पृथ्वीवरहि जात नाही आणि अंतरिक्षांतहि जात नाही. कुठल्या दिशेलाहि जात नाही आणि कुठल्या विदिशेलाहि जात नाही. तर तेल संपल्यामुळे केवळ (जिथल्या तिथे) शांत होतो.

अश्वघोषाने आपली काव्याची प्रेरणा वाल्मीकीच्या रामायणाकडून मिळविली आणि त्याने स्थापिलेल्या महाकाव्यपरंपरेचा पुढचा वारसदार कालिदास झाला. पण कालिदास आणि अश्वघोष या दोघांत एक मोठाच फरक आहे. कालिदास कविरूपाने भावनांचे आरोह अवरोह दाखवीत ऐहिक जीवन आणि गृहस्थधर्म यांचा पुरस्कार करतो, तर अश्वघोष आचार्यरूपाने प्रसंगीं प्रणयाचेंहि बलिदान करायला लावून माणसाची मोहोर मोक्षाकडे वळवितो. मानवी जीवनाची क्षणभंगुरता, हें त्याचें प्रतिपाद्य आणि करुणा हा महामंत्र आहे.

संन्यास घेतल्यावर फिरून गृहस्थ बनण्याची आकांक्षा धरणाऱ्या सुंदरनंदाविषयीं तो पुढील श्लोकाने खेद व्यक्त करतो––

कृपणं बत यूथलालसो महतो व्याघ्रभयाद्विनिःसृतः ।
प्रविवक्षति वागुरां मृगश्चपलो गीतरवेण वञ्चितः ।।

अर्थ – महान् व्याघ्रभयापासून (एकवार) सुटलेला चंचल मृग कळपांत शिरण्याच्या लालसेने (पुनश्च मागे वळतो) व गीतध्वनीने फसविला जाऊन पुन्हा व्याधाच्या पाशांत (जाळयांत) पडण्याची इच्छा करतो, हें खरोखर खेदजनक आहे.

अश्वघोषाची काव्यशैली वैदर्भी आहे. तिच्यांत प्रसाद, माधुर्य, स्वाभाविकता व ओघ हे गुण भरलेले आहेत. त्याचे दृष्टान्त विषयाला अनुरूप तर असतातच; शिवाय ते परिचितहि वाटतात. तर्कशुद्ध विचार व मधुर भाव यांचा त्याच्या काव्यांत मनोज्ञ संगम झाला आहे. शृंगार व करुण या रसांना त्याने वर्ज्य मानलें नसलें, तरी त्याच्या काव्याचा प्रधान रस शांत हाच आहे. त्याने आपलें व्याकरणपटुत्व ठायीं ठायीं प्रकट केलें आहे; तसेच कांही ठिकाणीं आर्षप्रयोगहि केले आहेत. भावनेला उठाव देणारे विविध छंद वापरण्यांत तो पटाईत आहे. बौद्ध संप्रदायांत त्याला फार मोठा मान मिळाला. इतकेंच नव्हे; तर सातव्या शतकापर्यंत तो बोधिसत्त्व या रूपाने पूजाविषयहि बनला. **पाहा**– कनिष्क. [सं. सा. इ.; सं. सा. सो. इ.; म. ज्ञा. को.]

अश्वतर (१) पाताळांतला एक मुख्य नाग.

(२) कार्तिकमास चालविणाऱ्या विष्णूच्या विभूतींपैकी एक.

(३) याने वत्साकडून विष्णुपुराण ऐकलें व तें कंबलाला सांगितलें. [पु. इं.]

अश्वतीर्थ (१) कनौजच्या जवळचें एक क्षेत्र (म. भा. वन. ९५.३). ऋचीकाने आपली कन्या सत्यवती गाधीला दिली. त्या वेळीं आंदण म्हणून एक सहस्र घोडे त्याने या क्षेत्रांत आपल्या जावयाला दिले (कालिका पु. ८५).

(२) नर्मदातीरावरचें एक पितृतीर्थ. [मत्स्य पु. १९४]..

(३) गोदावरीच्या तीरावरचें एक क्षेत्र(ब्रह्म पु. ८९. ४३). इथे अश्विनीकुमारांचा जन्म झाला. [हि. ध.]

अश्वत्थ (१) पिंपळाचें झाड. ' अश्वत्थं जलम् अस्य अस्ति। मूले सिक्तत्वात् '= मुळांत शिंपल्यामुळे ज्याचें पाणी दुसऱ्या दिवशीं टिकत नाही असा वृक्ष, म्हणजे अश्वत्थ होय, अशी याची व्याख्या आहे. अश्वत्थाची आणखी एक उपपत्ति तैत्तिरीय ब्राह्मणांत पुढीलप्रमाणे दिली आहे –– एकदा अग्नि देवांपासून निघाला व त्याने अश्वरूप धारण केलें. तो त्या स्वरूपांत अश्वत्थ वृक्षावर एक संवत्सरपर्यंत राहिला, म्हणून त्या वृक्षाला अश्वत्थ म्हणूं लागले (१.१.९१).

अश्वत्थ वृक्षाच्या निर्मितीची कथा कथाकल्पतरूंत पुढीलप्रमाणे दिली आहे –– रामाने रावणाचीं दहा शिरें तोडलीं. तीं ब्रह्महत्त्या बनून रामाला छळूं लागलीं. रामाने मौनव्रत घेऊन मंत्रबलाने तीं शिरें जाळून टाकलीं व आपल्या प्रजेला मौन धरायला सांगितलें. त्यामुळे राज्यांतले वेदघोष बंद पडले व राज्याला अवकळा आली. तें पाहून ब्रह्मदेवाने रामाची फजीति करायचें ठरविलें. त्या कामीं त्याने शिव व विष्णु

यांचेंहि साहाय्य घेतलें. ब्रह्मदेव अश्वत्थ बनला व आपल्या शाखांमधून वेदघोष करूं लागला. हें दृश्य पाहून प्रजाजन हसूं लागले. रामाला त्या गोष्टीचा राग आला. त्याने अश्वत्थावर सोडण्यासाठी बाण हातीं घेतला. तेव्हा शिव व विष्णु धावरले व रामाच्या पुढे उभे राहिले. देवांना पाहून रामाला आश्चर्य वाटलें. मग देवांनी सर्व खुलासा केला. त्या वेळीं नारदानें सर्व लोकांना वर दिला, की 'जो रामाची कीर्ति वर्णन करील, त्याची हा अश्वत्थ वृक्ष सर्व पापांतून मुक्तता करील.'



अश्वत्थ

अश्वत्थ हा वेदपूर्वकालापासून पूज्य ठरला आहे. ऋग्वेदांत व वेदोत्तर वाङ्मयांतहि याचे अनेक उल्लेख आढळतात. याच्या लांकडाच्या नौका बनवीत असल्याचें ऋग्वेदावरून कळतें (ऋ. १.१३५.८; १०.९७.५). यज्ञांत अग्निमंथन करण्यासाठी उत्तरारणि अश्वत्थाची करीत. या वृक्षाला वैबाध असेंहि नांव आहे. याचें कारण हा दुसऱ्या वृक्षांवर आपलीं मुळें रुजवून मूळ वृक्षाचीं पाळेंमुळें नाहीशीं करतो, हें आहे (अथर्व. ३.६). याचीं फळें गोड असून तीं पक्षी खातात (ऋ. १.१६४.२०–२२). तिसऱ्या स्वर्गांत अश्वत्थ हें देवसदन मानलें आहे (अथर्व. ५.४.३; छांदो. ८.५३; कौषी. १.३).

वेदपूर्वकालीं भारतांत जी सिंधुसंस्कृति नांदत होती, तिच्यामध्ये अश्वत्थाला निर्मितीचें प्रतीक मानलेलें दिसतें. तिथे सापडलेल्या एका मुद्रेंत एक देवता अश्वत्थाच्या दोन फांद्यांमध्ये उभी आहे. दुसऱ्या एका मुद्रेंत पिंपळाचा एक रोपा वर येत असून दोन एकशृंग देवता त्याला लपेटून त्याचें रक्षण करीत आहेत. 'महिषमुंड' ही सिंधुजनांची श्रेष्ठ देवता असून ती अश्वत्थ निवासिनी होती. हा महिषमुंड देव सिंधुसंस्कृतींत सृष्टिकर्ता दिसतो. वैदिक प्रजापतीचें तें पूर्वरूप असावें. सिंधुसंस्कृतीचें मुख्य प्रतीक रोमन 'व्ही' सारखें आहे. अश्वत्थाच्या मुळांतून फुटलेल्या दोन शाखांनी तें बनलेलें आहे. ऋग्वेदांत अश्वत्थाला यम व पितर यांचें निवासस्थान मानलें आहे. यामुळेच गयेसारख्या क्षेत्रांत अश्वत्थाच्या मुळांत पिंडदान करण्याची पद्धत पडली असावी. बौद्धांनी अश्वत्थाला बुद्धाचें प्रतीक मानलें आहे. बुद्धाला ज्या वृक्षाखाली बोधि प्राप्त झाली, तो वृक्ष अश्वत्थच होता. पुराणकालांत या वृक्षाला फार महत्त्व मिळालें. श्रीकृष्णाने गीतेंत 'अश्वत्थः सर्ववृक्षाणाम्' = सर्व वृक्षांमध्ये मी अश्वत्थ आहें, असें सांगितलें आहे (१०.२६). चातुर्मास-माहात्म्य, कार्तिक व श्रावणमाहात्म्य, व्रतराज, व्रतकौमुदी, इ. ग्रंथांतून याचीं अनेक व्रतें वर्णिलीं आहेत. अश्वत्थमाहात्म्याची एक कथा पद्मपुराणांत दिली आहे, ती अशी —

धनंजय नांवाचा एक विष्णुभक्त ब्राह्मण होता. त्याची सत्त्वपरीक्षा पाहण्यासाठी विष्णूने त्याला दरिद्री केलें. त्यामुळे आप्तेष्टांनी त्याचा त्याग केला. तो थंडीच्या दिवसांत शेकोटी पेटवून स्वतःचें रक्षण करी. त्यासाठी लांकडें तोडण्याच्या उद्योगांत असतां त्याने एकदा पिंपळाची फांदी तोडली. त्या क्षणीं विष्णु तिथे प्रगट झाला. त्याने ब्राह्मणाला सांगितलें, की 'तू पिंपळावर कुऱ्हाड घातलीस, त्यामुळे माझ्या सर्वांगीं जखमा झाल्या आहेत.' ब्राह्मणाला तें ऐकून दुःख झालें. तो कुऱ्हाडीने स्वतःचें मस्तक तोडायला निघाला. तेव्हा विष्णु प्रसन्न होऊन त्याला म्हणाला, की 'तूं नित्य अश्वत्थाची पूजा करीत जा.' ब्राह्मण त्या दिवसापासून अश्वत्थपूजा करूं लागला व कुबेराने त्याचें दारिद्र्य नष्ट केलें (क्रियाखंड अ. १२).

अश्वत्थमाहात्म्याचा निष्कर्ष पुढील एकाच श्लोकांत सांगतां येईल —

अश्वत्थः सर्ववृक्षाणां राजा ब्राह्मणवर्णकः ।
अश्वत्थः पूजितो येन सर्वं संपूजितं भवेत् ।।

अर्थ — अश्वत्थ सर्व वृक्षांचा राजा असून तो ब्राह्मण वर्णाचा आहे. ज्याने अश्वत्थ पूजिला, त्याने सर्व कांही पूजिलें असें होईल.

अश्वत्थ हा प्रथम सृष्टिकर्त्या प्रजापतीचें प्रतीक होता. पण पुढे तो विष्णुरूप मानला गेला. कन्येला वैधव्य येऊं

नये म्हणून प्रथम तिचा अश्वत्थाशीं विवाह करावा, असें संस्कारप्रकाशांत सांगितलें आहे. या प्रसंगीं विष्णुप्रतिमेची पूजा करून ती ब्राह्मणाला दान देतात. स्त्रिया संतानप्राप्तीसाठी अश्वत्थाला प्रदक्षिणा घालतात. नष्ट झालेली व्यक्ति किंवा वस्तु परत मिळावी, म्हणूनहि अश्वत्थाला प्रदक्षिणा घालण्याची रूढी आहे. ज्ञानेश्वरांची आई आपला परागंदा झालेला पति परत यावा म्हणून अश्वत्थाचीच उपासना करीत होती, असें त्यांच्या चरित्रांत लिहिलेलें आहे. स्त्रिया पिंपळाची पूजा करण्यापूर्वी त्याला सूत गुंडाळतात. ही प्रथाहि फार पुरातन आहे. श्री. दुर्गा भागवत यांनी या प्रथेचें मूळ एका लोककथेच्या द्वारें सांगितलें आहे ——

खोडियाल व पिंपळाज या दोन देवकन्या होत्या. तहान भूक कशी असते, हें पाहण्यासाठी त्या मृत्युलोकीं आल्या. त्या दोघी विंध्यपर्वतावर वड व पिंपळ यांच्या रूपाने अवतरल्या. शेतीच्या कामास प्रारंभ करतेवेळीं तिथल्या माणसांनी त्यांना पाणी व नरमांसाचा नैवेद्य दिला. तेव्हापासून त्यांना भूक व तहान लागूं लागली आणि त्या माणसाच्या अंकित झाल्या. हळूहळू त्यांची भूक वाढली. पण पुढे त्यांना मनुष्याचें मांसच मिळेनासें झालें. म्हणून मग माणसांनी त्यांना ऊंस व गहूं आणून दिले. खोडियाल त्याने तृप्त झाली; पण पिंपळाज नरबळीकरितां अडून बसली. तिने रोग उत्पन्न करून नरबलि मिळविले. खोडियालला त्या माणसांची दया आली. एका रात्रीं तिने पिंपळाजला दोरीने बांधून ठेवलें. पिंपळाज पराधीन झाली व गयावया करूं लागली. खोडियाल तिला म्हणाली, की 'तूं जेवढे नरबलि घेतलेस, तेवढे परत करशील तर माणसें तुला पूजतील.' तेव्हापासून पिंपळदेवता घेतलेले बळि पुत्ररूपाने स्त्रियांना परत करूं लागली. स्त्रियाहि सूत गुंडाळून तिला बांधण्याचें कृत्य अजूनहि करतात.

अश्वत्थाचें उपनयन करतात व त्याचें तुळशीशीं लग्नहि लावतात. संस्कार विधींत अश्वत्थाच्या समिधांची गरज असते. ग्रहयज्ञांत गुरूसाठी अश्वत्थाच्या समिधा वापरतात. शनिवारीं सूर्योदयापूर्वी अश्वत्थाची पूजा केल्यास संतति आणि संपत्ति लाभते, असें अश्वत्थाच्या व्रतकथांतून सांगितलें आहे. विशेषतः श्रावणांतल्या शनिवारीं ही अश्वत्थपूजा करतात.

(२) सृष्टिरूप वृक्ष. 'अ + श्व + स्थ' = आज आहे, उद्या नाही असा. सतत परिवर्तनशीलता हा याचा धर्म आहे. त्यामुळे सृष्टि सदैव ताजी, टवटवीत असते. या वृक्षाचें छेदन शक्य नाही. कारण तो नित्य आहे. हा वृक्ष वेद्य आहे. याच्या ज्ञानानेच मोक्ष मिळतो. ऋग्वेदांत याला वरुणाच्या लोकांतला वृक्ष म्हटलें असून त्याच्या किरणांचें मूळ वर आहे व किरण खाली आहेत, असें सांगितलें आहे (१.२४.७). 'द्वासुपर्णा' श्रुति ज्या 'पिप्पल' फळाचा उल्लेख करते, तें याच विश्ववृक्षाचें फल होय (ऋ. १.१६४.२२). वेदांतून हें रूपक पुढे उपनिषदांत उतरलें.

ऊर्ध्वमूलोऽवाक्शाख एषोऽश्वत्थः सनातनः।
तदेव शुक्रं तद् ब्रह्म तदेवामृतमुच्यते ।।

(कठ. ६.१)

अर्थ—ज्याचें मूळ वर व शाखा खाली आहेत, असा हा अश्वत्थ सनातन आहे. तेंच शुक्र, तेंच ब्रह्म व तेंच अमृत असें म्हटलें जातें.

उपनिषदांतून हें रूपक पुढे गीतेंतहि आलें आहे (१५.१.४). सारांश, परमेश्वराच्या मायेने उत्पन्न झालेलें हें जग म्हणजे एक मोठा अश्वत्थ वृक्षच होय. सांख्य या दृश्य सृष्टीला म्हणजेच या अश्वत्थाला 'प्रकृतीचा विस्तार' म्हणतात व वेदान्ती 'मायेचा पसारा' समजतात. अनुगीतेंत यालाच ब्रह्मवृक्ष व ब्रह्मवन म्हटलें आहे (म. भा. अश्व. ३५ व ४७). एका सूक्ष्म बीजापासून ज्याप्रमाणे विस्तृत व गगनचुंबी वृक्ष बनावा, तद्वत् एका अव्यक्त परमेश्वरापासून हा सृष्टिरूप वृक्ष विस्तारला आहे, अशी ही कल्पना आहे. प्राचीन अन्य धर्मांतहि सृष्टीला 'विश्ववृक्ष' असेंच म्हटलेलें आढळतें. [हि. ध.; वै. नि.; वे. इं.; क. ब्र.; म. ज्ञा. को.; गी. र.]

अश्वत्थपट व्रत काम्य व्रत. बंगाली स्त्रिया वैशाख महिन्यांत हें करतात. यांत अश्वत्थवृक्षाची पूजा करायची असते. फल – सुख व शांति. याची कथा अशी—शाम पंडिताची मुलगी नदीवर अश्वत्थाची पूजा करायला आली असतां देवतांच्या संभाषणांतून तिला हें व्रत कळलें. [इं. फो. लो.]

अश्वत्थप्रदक्षिणा व्रत काम्य व्रत. स्नानादि नित्य कृत्यें आटोपून पिंपळाखालची जागा सारवतात. गेरूने वृक्षमूळ रंगवितात. स्वस्तिवाचन, ऋत्विग्वरण, संकल्प इ. झाल्यावर प्रथम विष्णूची व नंतर अश्वत्थाची पूजा करतात. मग विष्णुसहस्रनाम म्हणत वा भगवच्चिंतन करीत प्रदक्षिणा घालतात. प्रदक्षिणांची संख्या व्रतहेतूला अनुसरून एक लक्ष ते बारा लक्षांपर्यंत असते. या प्रदक्षिणा नित्य ठराविक संख्येने घालून पुऱ्या करायच्या असतात. व्रतकालांत यम-नियम पाळावे लागतात. प्रदक्षिणांची संख्या पुरी झाल्यावर पुढीलप्रमाणे उद्यापन करतात——

ऋत्विग्वरण, घृतपायस व चरु यांचें हवन, तर्पण, तिल-राशीवर सुवर्णाची अश्वत्थप्रतिमा स्थापून तिचें पूजन व दान, गोप्रदान, दक्षिणा व ब्राह्मणभोजन असा त्याचा विधि असतो.

या व्रताचा दुसरा पर्याय असा –– कार्तिक मासांत महिनाभर अश्वत्थवृक्षाखाली राधा–दामोदरांची पूजा व लक्ष प्रदक्षिणा. रात्रीं जागरण, कथाकीर्तन व व्रताच्या शेवटीं वरीलप्रमाणे उद्यापन. व्रताचें फल – पुत्रप्राप्ति, गतवैभवाची पुनःप्राप्ति, उत्पातशांति, रोगनाश व सौख्यलाभ. [व्रतराज]

अश्वत्थमूल सिंचन काम्य व्रत. वैशाख मासांत प्रातःकाळीं विधिपूर्वक स्नान करून अश्वत्थाच्या मुळांत पाणी घालून त्याला प्रदक्षिणा करावी व भोवतालचा भागहि पाण्याने शिंपावा, असा याचा विधि आहे. फल – देव-पितृ-मनुष्यांची तृप्ति व कुलाचा उद्धार. [नि. सिं.]

अश्वत्थविद्या विश्वविद्या किंवा आध्यात्मिक सृष्टिरहस्य. अव्यय, अक्षर व क्षर या तीन तत्त्वांची समाप्ति म्हणजे हें विश्व होय. यांच्या अतीत असलेल्या ब्रह्मतत्त्वाला परात्पर म्हणतात. परात्पराच्या पलीकडेहि एक तत्त्व आहे, त्याला निर्विशेष म्हणतात. परात्पराचें स्वरूप रसमय असून त्याच्याच ठिकाणीं महामायेच्या बलाने अव्ययरूपी 'अश्वत्थ' वृक्षाचा म्हणजेच विश्वाचा जन्म होतो. अशीं विश्वें अनेक असतात.

'अश्ववत् तिष्ठति इति अश्वत्थः'=अश्वाप्रमाणे तीन पाय स्थिर व चौथा उचलून उभा राहतो, तो अश्वत्थ होय. हें प्रजापतीचें पूर्ण रूप आहे. त्याचा विश्वरूप पाय प्रत्येक क्षणाला परिवर्तनशील असतो. विश्व हें 'अश्व' आहे. 'न श्वः इति अश्वः' = जें आज आहे; (पण) उद्या नाही. आत्मा याच्या विरुद्ध म्हणजे आज आहे तोच उद्याहि आहे. विश्व हें अलातचक्र (जळतें कोलीत फिरवल्याने दिसणारें चक्राकार वर्तुळ) आहे. तें सारखें फिरत असतें. प्रत्येक क्षणीं त्याचा समोरचा बिंदु पुढे सरकून त्याच्या जागीं दुसरा येत असतो. सारे बिंदु सतत बदलत असतात. जो बदलत नाही तो नामरूपातीत 'आभु' व जें बदलतें तें नामरूपात्मक 'अभ्व' होय. अश्वत्थविद्येचें मूळ रस–बल यांच्या तारतम्यांत आहे. रस म्हणजे बलाकडे असलेली ओढ किंवा सिसृक्षा. बल म्हणजे रसाकडे ओढ घेणारी बुभुक्षा. रस म्हणजे शांत, स्थिर अशी भूमि. बल म्हणजे क्षुब्ध, चंचल अवस्था. या दोहोंचें सम्यक् ज्ञान म्हणजेच अश्वत्थविद्या होय. [डॉ. वासुदेवशरण अग्रवाल]

अश्वत्थविवाह अश्वत्थोद्यापन पाहा.

अश्वत्थ व्रत दुश्चिन्हें, शत्रूची स्वारी, कुष्टादिरोग व सांथी यांच्या निवारणासाठी अश्वत्थपूजापूर्वक हें व्रत करतात. [हि. ध.]

अश्वत्थसेचन व्रत काम्य व्रत. चैत्रादि चार महिने हा व्रतकाल. नित्य घडाभर पाणी अश्वत्थ-मूळांत घालणें हा याचा विधि आहे. याचा मंत्र असा––

सिञ्चाम्यश्वत्थ ते मूलं मम सन्ततिवृद्धये ।
अश्वत्थरूपो भगवान् प्रीयतां मे जनार्दनः ।।

अर्थ–हे अश्वत्था ! माझ्या संतानवृद्धीसाठी मी तुझें मूळ शिंपीत आहें. (या कृत्याने) अश्वत्थरूपी भगवान् मजवर प्रसन्न होवो. [व्रतराज]

अश्वत्थाची मुंज अश्वत्थोद्यापन पाहा.

अश्वत्थोद्यापन अश्वत्थाचें झाड लावून आठ, अकरा किंवा बारा वर्षें झाल्यावर त्याच्याभोवती पार बांधून त्याचें विधिपूर्वक उद्यापन करतात. अश्वत्थाला लागून पांच किंवा नऊ कुंडें असलेला मंडप घालतात. प्रथम संकल्पपूर्वक विधानास घरी प्रारंभ करून मग मंडपांत प्रवेश करतात. आचार्य व इतर ऋत्विज यांची योजना झाल्यावर सर्वतोभद्र व वास्तुमंडल अशीं दोन मंडलें निर्माण करून त्यांवर कर्मांग देवतांचें आवाहन व पूजन करतात. अश्वत्थ, नारायण, वासुदेव, रुक्मिणी, सत्यभामा, सरस्वती व गणपति या देवतांच्या सुवर्णप्रतिमा करून त्या मंत्रपूर्वक स्थापितात. अश्वत्थाभोवती अष्टदिशांना कलश मांडून त्यांवर वरुणाचें आवाहन करतात. मग निरनिराळ्या कुंडांत अग्निस्थापना केल्यावर प्रधानहोम करतात. नवग्रहांसाठी समिधा, चरु व आज्य आणि मुख्य देवतेसाठी पळसाच्या समिधा, तिल व आज्य हीं हविर्द्रव्यें सांगितलीं आहेत. प्रत्येकाच्या १०८ किंवा २८ आहुती द्यायच्या असतात. प्रधान होम झाल्यावर बलिदानापर्यंत सर्व कर्में शांतिकर्माप्रमाणें करतात. मग पिंपळाच्या जवळच खड्डा खणून त्यांत चार किंवा पांच हात लांबीचा एक यूप पुरतात. त्यावर ब्रह्मा–विष्णु–शिव यांचें आवाहन--पूजन करतात. याला यूपाधिवास असें म्हणतात. त्या रात्रीं पुराण श्रवण करायचें असतें. दुसऱ्या दिवशीं या अश्वत्थाचे संस्कार करतात.

पुंसवनापासून उपनयनापर्यंत सर्व संस्कार व्याहृतिमंत्रांनी करतात. मग अश्वत्थाचें अभिमंत्रण करून ध्रुवसूक्ताचें पठण करतात. यज्ञोपवीत, कृष्णाजिन, मेखला, दंड या वस्तू अश्वत्थाला देतात. मग समावर्तन करून त्याच्या विवाहाची सिद्धता करतात. तदंगभूत अग्निस्थापना करून अग्नि, वायु व चंद्रमा या प्रधान देवतांसाठीं तिल व आज्य यांच्या आहुती देतात. मग तुळस व अश्वत्थ यांचा मंगळाष्टकें म्हणून विधिपूर्वक विवाह करतात. शेवटीं क्षेत्रपालाला बलिदान करून पूर्णाहुति करतात. यजमान व त्याचा परिवार यांना अभिषेक करतात. हें विधान पंचकुंडी किंवा नवकुंडी असतें. तेवढें करणें शक्य नसेल, तेव्हा एकाच कुंडावर सर्व अनुष्ठान करतात. या अश्वत्थोद्यापनाने श्रीकृष्ण संतुष्ट होतो, असें सांगितलें आहे. सामान्यतः निपुत्रिक माणसें अश्वत्थोद्यापन करून आपला पुत्रहीनत्वाचा दोष घालवितात. [ऋ. ब्र. क.]

अश्वदान तरणा, उमदा व अव्यंग असा घोडा वस्त्रालंकारांनी भूषवून दान दिल्याने घोड्याच्या अंगावर जितके केस असतील, तितकीं वर्षे सूर्यलोकांत राहतां येतें, असें सांगितलें आहे. याचें विधान असें – ब्राह्मणयोजना व अश्वपूजा. घोड्याला जी किंमत पडली असेल, तिच्या एक तृतीयांश दक्षिणा. दानमंत्र असा---

उच्चैश्रवास्त्वमश्वानां राज्ञां विजयकारक ।
सूर्यवाह नमस्तुभ्यमतः शान्ति प्रयच्छ मे ।।

अर्थ – हे अश्वा, तूं सर्व अश्वांतला उच्चैःश्रवा आहेस. तूं राजांना विजय देणारा व सूर्याला वाहून नेणारा आहेस तुला नमस्कार असो. मला शांति दे.

ज्याला अश्वमेध करण्याचें सामर्थ्य नसेल, त्याने पांढऱ्या घोड्याचें दान करावें, असें गरुडपुराणांत सांगितलें आहे. दान देतांना घोड्याचा कान ब्राह्मणा हातींच्या देतात. मंत्र असा–

महार्णवसमुत्पन्न उच्चैःश्रवसपुत्रक ।
मया त्वं विप्रमुख्याय दत्तो हय सुखी भव ।।

अर्थ –– महासागरांतून उत्पन्न झालेल्या व उच्चैःश्रव्याचा पुत्र असलेल्या हे अश्वा, मी तुझें श्रेष्ठ ब्राह्मणाला दान करीत आहें. तूं सुखी हो.

मग ब्राह्मण त्या घोड्यावर बसून निघून जातो. यजमान त्याच्यापुढे सत्त्याहात्तर पावलें चालत जाऊन सूर्यदर्शन करतो व परत घरीं येतो. [दा. चं.]

अश्वदीक्षा नक्षत्रव्रत. आश्विन शुक्लपक्षांत चंद्र स्वातीनक्षत्रांत येईल त्या दिवशीं उच्चैःश्रव्याची पूजा करतात. त्या दिवशीं ९ मी असल्यास घरच्या घोड्यांची पूजा व चार रंगांचे दोरे घोड्याच्या गळ्यांत बांधतात. [हि. ध.]

अश्वनृत्य तमिळनाडमधलें एक लोकप्रिय नृत्य. घोड्याचें तोंड तयार करून तें एका काठीच्या टोकाला बांधतात, काठीला घुंगुर बांधतात आणि ती काठी दोन पायांमध्ये घेऊन नृत्य करतात. घोड्याचें तोंड तर आरसे वगैरे लावून शृंगारतातच; पण तो घोडा घेऊन नाचणारे पुरुषहि राजेशाही पोषाख करतात. नागस्वरम्, कुंडलम् इ. वाद्यें या नृत्याला साथ करतात. नर्तक वाद्यवृन्दाभोवती फेर धरून नाचतात. नाचतांना ते एका हाताने घोडा धरून दुसऱ्या हाताने रुमाल हालवितात. या नृत्यांत वीररसाचा चांगलाच परिपोष होतो. त्यामुळे इतर लोकनृत्यांपेक्षा हें नृत्य अगदी वेगळ्या धर्तीचें वाटतें. युद्धोपयोगी प्राणी म्हणून घोडा हा तमिळनाडला प्राचीन काळापासून परिचित व प्रिय आहे. त्या आवडींतूनच हें नृत्य निर्माण झालें आहे. [मार्च ऑफ इंडिया १९५९]

अश्वपति कैकय उपनिषत्कालीन आत्मज्ञानी राजा. प्राचीनशाल इ. कांही तत्त्वजिज्ञासु पुरुष आत्म्याविषयीं निश्चित ज्ञान मिळविण्यासाठी याच्याकडे आले. याने त्यांचा सत्कार केला व त्यांना कांही दक्षिणाहि देऊं केली. पण ते लोक दक्षिणा घेईनात. तेव्हा अश्वपतीला वाटलें, कीं आपल्या ठिकाणीं कांही दोष आहे, अशा शंकेने हे दक्षिणा घेत नाहीत. म्हणून तो त्यांना म्हणाला––

न मे स्तेनो जनपदे
न कदर्यो न मद्यपो
नानाहिताग्निर्ना विद्वान्
न स्वैरी स्वैरिणी कुतः ।।

अर्थ –– माझ्या जनपदांत चोर नाही, कृपण नाही, मद्यपी, अहिताग्नि नसलेला व अविद्वान् असाहि कोणी नाही. स्वैराचारी नाही. मग स्वैरिणी कुठून असणार ?

तें ऐकून आलेले लोक म्हणाले, की आम्ही दक्षिणेसाठी आलों नसून आत्मज्ञानासाठी आलों आहों. तेव्हा मग अश्वपतीने त्यांना वैश्वानर आत्म्याचें ज्ञान सांगितलें (छांदो॰ ५.११–१२).

अश्वपूजा ज्यांच्या घरीं घोडे असतील, त्यांनी आश्विन शु. १ देपासून ९ मी पर्यंत रोज अश्वपूजा करावी,

असें सांगितलें आहे. विधान असें– शांति व स्वस्त्ययन करणें. धणे, बिव्वे, कोष्टकोळिंजन, वेखंड, व मोहऱ्या यांची पुरचुंडी करून घोड्याच्या गळच्यांत बांधणें. वायु, वरुण, सूर्य, विष्णु, विश्वेदेव व अग्नि यांच्या मंत्रांनी हवन करणें. या व्रताची कथा अशी– आश्विन शु. १ देस स्वाती नक्षत्र असतां उच्चैः- श्रव्याला प्रथम शोभा प्राप्त झाली. तेव्हापासून अश्वपूजेचा प्रघात पडला. [नि. सिं.]

अश्वमेध एक महान् सोमयाग. सर्व मनोरथ, सर्वत्र विजय व सर्व प्रकारची समृद्धि, प्राप्त करून घेऊं इच्छिणाऱ्याने अश्वमेधाने यजन करावें, असें आश्व. श्रौत सूत्र म्हणतें (१०. ६. १). प्राचीन काळीं साम्राज्य वाढविण्याचा तो एक वैध मार्ग होता. ' श्रीर्वै राष्ट्रमश्वमेध : ' = अश्वमेध म्हणजे राष्ट्र व समृद्धि होय, असें म्हणून त्याला राष्ट्राचें व समृद्धीचें प्रतीकच मानलें आहे. ' राजा वा एष यज्ञानां यदश्वमेध: ' = अश्वमेध हा सर्व यज्ञांचा राजा, असेंहि म्हटलें आहे (श. ब्रा. १३. २. २. १; १३. २. ९. २; तै. ब्रा. ३. ९. ७. १).

हा यज्ञ ऋग्वेदकालापूर्वी बरींच वर्षे प्रचारांत येऊन रूढ झाला होता, असें दिसतें. याच्या उत्पत्तीची आख्यायिका तैत्ति. संहितेंत पुढीलप्रमाणे सांगितली आहे —

एकदा प्रजापतीच्या डोळ्यांतलें एक बुबुळ गळून जमिनीवर पडलें. त्यांतून अश्व उत्पन्न झाला. नंतर देवांनी अश्वमेध करून प्रजापतीचें तें बुबुळ परत त्याच्या डोळ्यांत बसविलें. त्यावेळेपासून प्रजापतीला संतुष्ट करण्यासाठी अश्वमेध करण्याची प्रथा पडली (५. ४–१२).


अश्वमेधासाठी श्यामकर्ण घोडा लागतो. त्याच्या शुभ्र वर्णावर काळे ठिपके असावे, असेंहि सांगितलें आहे. त्याला प्रथम जलाशयावर नेऊन मंगल स्नान घालतात. अध्वर्यु, शंभर राजपुत्रांसह त्याच्या पूर्वेस उभा राहतो. राज्याला अनधिकारी अशा शंभर क्षत्रियांसह ब्रह्मा त्याच्या दक्षिणेस उभा राहतो. सारथी व ग्रामाधिपति अशा शंभर पुरुषांसह होता त्याच्या पश्चिमेस उभा राहतो. क्षत्तृ जातींतल्या व कोशागारावरच्या शंभर लोकांसह उद्गाता उत्तरेस उभा राहतो. हे चौघे ऋत्विज पाणी शिंपडून घोड्याला स्वच्छ धुतात. घोड्याबरोबर एक कुत्रें पाण्यांत सोडतात व मुसळांनी त्याला ठार मारून त्याचें प्रेत घोड्याच्या पोटाखाली तरंगत ठेवतात. स्नान घातल्यावर घोड्याला यज्ञशाळेंत अग्नीजवळ आणतात. त्याच्या अंगावरून पाणी निथळून जाईपर्यंत अग्नीला आहुति देतात. मुंजमेखलेने प्रथम त्याला बांधतात व मग सर्व देशांत वर्षभर संचार करण्यासाठी मोकळा सोडतात. त्याच्या रक्षणासाठी चारशें शस्त्रसज्ज लोक त्याच्या मागून जातात. जो राजा त्या घोड्याला पकडील, त्याच्याशीं युद्ध करून घोडा सोडवून घेतात.

अशा प्रकारें घोडा सर्वत्र विजयी झाला म्हणजे एका वर्षानें त्याला परत आणतात. त्या मुदतींत त्रिकाळ सारस्वत्य नामक इष्टि करतात. इष्टीनंतर ब्राह्मण राजस्तुतिपर गाथा गातो. होता राजाला पारिप्लव नामक आख्यान सांगतो. घोडा सोडल्यापासून तो परत येईपर्यंत अध्वर्यु हाच राजा होतो, असें आपस्तम्ब सांगतो. घोडा आपल्या संचारांत आजारी पडला किंवा मेला, तर अनेक प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. शत्रूने घोडा पळविला व तो परत मिळवितां आला नाही, तर अश्वमेध होतच नाही.

अश्वमेधाचा विधि सत्याषाढ श्रौतसूत्रांत पुढीलप्रमाणे सांगितला आहे–

चैत्र पौर्णिमेस यज्ञाचा प्रारंभ. कर्ता राजा प्रथम सांग्रहणी इष्टि करतो. मग ऋत्विजांचें वरण व यज्ञाचा संकल्प करतो. नंतर दीक्षा घेतो. (अश्वमेधांत दीक्षा, उपसद व सुत्यादिन यांची संख्या बारा असते.) केस व नखें काढतो. स्नान करून वस्त्रालंकार घालतो; मौन पाळतो. मग राजाच्या चार राण्या नटून थटून राजाजवळ येतात. यजमान त्यांच्यासह अग्निशालेंत प्रवेश करून गार्हपत्याच्या पश्चिमेस उत्तराभिमुख बसतो.

या यज्ञांत घोड्यासह अनेक पशूंचें हनन व्हायचें असतें. त्या पशूंना बांधण्यासाठी बेलाचे, खैराचे व पळसाचे प्रत्येकीं सहा, देवदारूचे चार व रगतरोड्याचा एक असे एकूण २१ यूप तयार करतात. २० यूपांना प्रत्येकी ९ असे मिळून १८० पशु बांधतात. रगतरोड्याचा यूप हा अश्वासाठी असतो. तो मुख्य यूप होय. त्याला चातुर्मास्य, ऐकादशिन, व दशिन, या संज्ञांचे आणखी किती तरी पशु बांधतात. या सर्व पशूंचे ग्राम्य (गांवांतले म्हणजे पाळीव) व आरण्यक (रानांतले) असे दोन वर्ग असतात. आरण्यक पशूंना मारीत नाहीत. त्यांच्यावर कांही संस्कार करून त्यांना सोडून देतात.


अश्वमेधाचा दगडी घोडा. ४ थें शतक
लखनौ संग्रहालय

अश्वमेधांत सुत्यादिनांपैकी दुसरा दिवस महत्त्वाचा असतो. त्या दिवशीं प्रथम मेध्य अश्वाला इतर तीन घोड्यांसह रथाला

जुंपतात. त्या रथांत बसून यजमान व अध्वर्यु प्रथम जलाशयावर जातात. मग तो रथ यज्ञभूमीच्या सभोवती फिरवितात. रथावर विजयध्वज फडकत ठेवतात. यज्ञभूमींत आणल्यावर राजाच्या राण्या घोड्याच्या अंगाला आज्य चोळतात. यपाजवळ ब्रह्मा व होता यांच्यामध्ये ब्रह्मोद्य नामक कूटप्रश्नोत्तरें होतात. वेदीच्या बाहेर पट्टराणीला उद्देशून होता बीभत्स व ओंगळ असे कांही शब्द उच्चारतो. राणीहि त्याला तसेंच प्रत्युत्तर देते. राजाच्या राण्या घोड्याच्या अंगाला कांही ठिकाणीं सोन्यारुप्याच्या सुया टोचून खुणा करतात.

घोड्याला मारायला नेतांना त्याच्या पुढे एक घोडी चालवितात. मग एका ठिकाणीं वेतस वृक्षाच्या डहाळ्या पसरतात. त्यांवर तुपांत भिजवलेलें लोकरीचें वस्त्र अंथरतात. त्यावर पांधरायचें कातडें पसरतात. त्यावर सुवर्णखचित शय्या पसरतात. तीवर रुप्याचा पत्रा ठेवतात. मग त्या पत्र्यावर घोड्याला आडवें पाडून त्याला मारतात. अश्वमेधांत पट्टराणी व मृत घोडा यांचें मैथुन विहित आहे (कात्या. श्रौ. सू. २०. ६. १५-१६). वाल्मीकि रामायणांतहि या गोष्टीचा निर्देश आहे–

पतत्रिणा तदा सार्धं सुस्थितेन च चेतसा ।
अवसद्रजनीमेकां कौसल्या धर्मकाम्यया ।।

(बा. कां. १४. ३४)

अर्थ–– (घोड्याला मारल्यानंतर) कौसल्येने धर्मकामना मनांत धरून स्थिर चित्ताने त्या (मृत) अश्वासह एक रात्र घालविली.

घोड्याला मारल्यानंतर त्याच्या शरीरांतील चंद्रनामक मेदाचा याग करतात. सदस् व ऋत्विज् एकमेकांना कोडीं घालतात. अनेक देवतांना आहुती देतात. राजाला अभिषेक करतात. शेवटीं वरुणप्रतीक समजून एका खल्वाटाच्या (टक्कल पडलेला माणूस) डोक्यावर आहुति ठेवतात. त्याला शंभर गायी व एक बैलगाडी देतात. या यज्ञांत अध्वर्यु, होता, इ. ऋत्विजांना अगणित दक्षिणा मिळते.

अवभृथस्नानासाठी समुद्रावर वा नदी-जलाशयावर जातात. यजमानाने स्नान केल्यानंतर अनेक लोक त्या जलांत बुड्या मारतात. तसें केल्याने सर्व पापांचा नाश होतो, अशी धारणा आहे.

ऋग्वेदांत अश्वमेधाचे उल्लेख अनेक वार आले आहेत. ऋग्वेदांत मेध्य अश्वाला यम, आदित्य, त्रित, आणि सोम म्हटलें आहे (ऋ. १. १६३. ३). ऋग्वेदांतलें या अश्वाचें वर्णन उत्साही, ओजस्वी आणि तपशीलवार आहे. त्याच्याविषयीं पुढील प्रार्थना केलेल्या आहेत.

मा त्वा तपत्प्रिय आत्मापियन्तं
मा स्वत्धितिस्तन्व आ तिष्ठिपते ।
मा ते गृध्नुरविशस्तातिहाय
छिद्रा गात्राण्यसिना मिथू कः ।।
न वा उ एतन्म्रियसे न रिष्यसि
देवाँ इदेषि पथिभिः सुगेभिः ।
हरी ते युञ्जा पृषती अभूता–
मुपास्थाद्वाजी धरि रासभस्य ।।

(ऋ. १. १६२. २०–२१)

अर्थ– तूं इहलोक सोडून जातांना तुझ्या प्राणाला यातना न होवोत व कापणाराची सुरी तुझ्या अंगांत कुचंबून न राहो. कापणारा अडाणीपणाने एखाद्या गिधाडाप्रमाणे तुझीं गात्रें आपल्या सुरीने भलत्याच ठिकाणीं तोडतोडून खराब न करो (२०). हें पाहा, तूं कांही मरत नाहीस किंवा नष्ट होत नाहीस; तर सुलभ मार्गांनी देवाकडेच जात आहेस. साक्षात् इंद्राचे हरितवर्ण अश्व किंवा (मरुतांच्या) हरिणी या तुझ्या जोडीस येतील किंवा अश्वी देवांच्या मोठ्याने खिंकाळणाऱ्या अश्वाच्या धुरेला तूंच बलिष्ठ जोडला जाशील (२१).

वेदोत्तर कालांत हळूहळू अश्वमेधाचा ऱ्हास होऊं लागला. पण कृति थांबली तरी स्मृति शिल्लक होती. म्हणून उपनिषत्कालांत त्याला आध्यात्मिक स्वरूप दिलें गेलें. वर दिलेलें ऋग्वेदांतील अश्ववर्णन व पुढे दिलेलें उपनिषदांतील अश्ववर्णन या दोहोंतला फरक सहज कळण्याजोगा आहे –

उषा म्हणजे यज्ञीय अश्वाचें शिर. सूर्य हा त्याचा डोळा. वायु हा श्वास. अग्नि हें मुख. वर्ष हें शरीर. ऋतू हे अवयव ओटीपोट ही पृथ्वी. फुफ्फुसें म्हणजे पर्वत. केस म्हणजे औषधीवनस्पति इ. इ. (बृह. १. १. १).

या उताऱ्यांत मेध्य अश्वाचें विश्वावर रूपक केलें आहे. हें संपूर्ण विश्व म्हणजेच यज्ञाश्व होय, असें सांगण्याचा इथे रोख आहे. यावरून उपनिषत्कालांत प्रत्यक्ष अश्वमेध करण्यापेक्षां संपूर्ण विश्वांत त्याची धारणा करावी, असा त्याला आध्यात्मिक आशय येऊं लागला होता, असें दिसतें.

भारतांत त्यापुढच्या काळांत अश्वमेधप्रथा जवळजवळ बंद पडली. जातकांत अश्वमेधाचा उल्लेख येत नाही. कौटिल्यानें तो फक्त एकदाच केला आहे. हरिवंशपुराणाच्या मतें जनमेजयानंतर पुष्यमित्रानेच अश्वमेध केला (३. १९२. ४०–४१). त्याच्या समकालीन सातकर्णीनेहि दोन अश्वमेध केले. भारशिवांनी दहा अश्वमेध केल्याचें इतिहास सांगतो. ४ थ्या शतकांत सम्राट् समुद्रगप्तानेहि अश्वमेध केला होता. इ. स. च्या १ ल्या शतकापासून पुढच्या ७ शतकांत जीं जीं प्रबळ

राज्यें उभीं झालीं, त्या त्या राज्यांच्या भूपतींनी अश्वमेधाचा पुनरुद्धार करणें, हें आपलें कर्तव्य मानलें. या ७ शतकांच्या कालखंडाला अश्वमेधाच्या पुनरुद्धाराचें युग असें मानतात. बौद्ध व जैन या धर्मांच्या आदर्शांविरुद्ध ती प्रतिक्रिया होती. अश्वमेधाचाच नव्हें; तर वैदिक धर्माचाच पुनरुद्धार झाला पाहिजे, असें त्या प्रतिक्रियेचें स्वरूप होतें. ही प्रतिक्रिया केवळ राजकारणापुरतीच मर्यादित नसून ती त्या युगाच्या समग्र जीवनांतच भरून राहिली होती.

पण तरीहि वैदिक युगांतलें जीवन आणि संस्कृति हीं पुनश्च त्या मूळ स्वरूपांत परत येऊं शकलीं नाहीत. वैदिक संस्कृतीचे पुनरुद्धारक त्या धर्मांतला उत्तम अंश तेवढाच परत आणूं शकले. त्याबरोबरच त्यांना जैन-बौद्धांच्या संस्कृतींतला चांगला व युगानुकूल भागहि स्वीकारावा लागला.

वैदिक संस्कृतीच्या पुनरुद्धाराच्या या प्रयत्नांतून एक नवाच धर्म निर्माण झाला. तो वैदिकहि नव्हता व बौद्धहि नव्हता. तो होता पौराण धर्म ! या धर्माने प्रकृतिदेवता, यज्ञ व त्याचें अवडंबर, यांना दुर्लक्षून अवतार, मूर्तिपूजा, तीर्थस्थळें यांना महत्त्व दिलें. पण त्याहि कालांत अश्वमेधाची स्मृति लुप्त झाली नव्हती. त्याची भव्यता जनतेच्या मनांत घर करून राहिली होती. म्हणून या नव्या पौराण अथवा भागवत धर्माने पूजा, व्रत, नामस्मरण, तीर्थयात्रा, स्तोत्रपाठ या सर्व भक्तिप्रकारांत अल्प श्रमांत अश्वमेधाचें पुण्य लाभतें, असें सांगून जनांची या नव्या धर्माकडे प्रवृत्ति वाढविली. त्यानंतर पुनश्च अश्वमेधप्रथा बंद पडली.

देहरादून जिल्ह्यांत कालसीजवळ यमुनेच्या तीरावर १९५३ सालीं जें उत्खनन झालें, त्यांत अश्वमेधाची यज्ञवेदि तयार करण्यासाठी वापरलेल्या विटा व श्येनचितीचा कांही भाग सांपडला आहे. त्यांतल्या कांही विटांवर पुढील श्लोक आढळला आहे –

नृपतेर्वार्षगण्यस्य पोणषष्ठस्य धीमतः ।
चतुर्थस्याश्वमेधस्य चित्योऽयं शीलवर्मणः ।।

अर्थ – वृषगणांत सामील असणारा व पोणापासून सहावा असा जो शीलवर्मा नांवाचा राजा, त्याच्या चौथ्या अश्वमेधाची ही चिति आहे.

अक्षरवटिकेवरून हा इष्टकालेख इ. स. च्या तिसऱ्या शतकांतला वाटतो.

पाणिनीच्या गर्गादि गणांत वृषगणाचें नांव आलें आहे. पण त्यावरून वृषगण म्हणजे नक्की कोणते लोक तें कळत नाही. पोण हें या गणराज्यांतल्या पहिल्या किंवा अतिपराक्रमी राजाचें नांव असावें व शीलवर्मा हा त्याच्यापासून सहावा असावा. [हि. ध.; म. ज्ञा. को.; सो. इं. ट्रॅ.; क. हि. वा. पु.; भा. इ. रू.]

अश्वमेध – जैमिनी एक पुराणग्रंथ. महाभारतांतील अश्वमेधपर्व हे जैमिनीच्या अश्वमेध या ग्रंथाचा अनुवाद आहे, असा लोकप्रवाद आहे. जैमिनि मुनीने व्यासांप्रमाणेच संपूर्ण भारत रचलें होतें परंतु व्यासांनी त्या भारताला शाप दिला आणि त्यांतील अश्वमेधप्रकरण अपूर्व असल्याने त्याचा तेवढा आपल्या महाभारतांत समावेश केला, अशीहि कथा आहे. महाभारतांतील अश्वमेधपर्व व जैमिनी-अश्वमेध यांतील अनेक विषय समान आहेत. परंतु त्यांत सर्वस्वी एकवाक्यता नाही.

जैमिनिकृत अश्वमेधांत वाचकांच्या अंतःकरणांत सद्भाव उत्पन्न करून त्यांना आत्महिताचा मार्ग दाखविलेला आहे. ऐतिहासिक व भौगोलिक दृष्टींनी हा ग्रंथ अपूर्व व अमोल आहे. पांडवांनी सोडलेला अश्वमेधाचा श्यामकर्ण घोडा संचार करीत ज्या ज्या ठिकाणीं गेला, त्या त्या स्थळांचें भूगोलवर्णन यांत दिलेलें आहे. या ग्रंथांत ६८ अध्याय असून एकूण श्लोकसंख्या ५१६९ एवढी आहे. महाभारताप्रमाणे 'नारायणं नमस्कृत्य' हा श्लोक झाल्यावर ग्रंथाला सुरवात झाली आहे.

या ग्रंथांत पांडवांनी केलेल्या अश्वमेध यज्ञाचें समग्र वर्णन आहे. अश्वमेधाला आवश्यक असलेला श्यामकर्ण घोडा यौवनाश्व राजाजवळ होता. त्याच्यापासून तो मिळविण्याची भीमाने प्रतिज्ञा केली. त्यासाठी तो द्वारकेला गेला व श्रीकृष्णाला भेटला. त्या दोघांचें संभाषण मोठें विनोदी आहे. वृषकेतु व प्रभावती यांचा विवाह, द्रौपदी व सत्यभामा यांचें गुप्त संभाषण, हंसध्वजाची परीक्षा, सुधन्व्याची हरिभक्ति, सुरथाचा पराक्रम, नीलध्वजाचें सामर्थ्य, स्त्रीराज्यांतील राणी प्रमिला हिचा अर्जुनाशीं विवाह, बभ्रुवाहन व अर्जुन यांच्यामधील युद्ध व त्यांत अर्जुनाचा मृत्यु, असे अनेक कथाप्रसंग यांत आहेत. यांशिवाय, मयूरध्वज व चंद्रहास यांचीं रम्य चरित्रें, दुःशीलेची कथा, बकदाल्भ्यदर्शन, धर्मराजाचें असिधाराव्रत, श्यामकर्णाची मोक्षप्राप्ति, हे विषयहि यांत आलेले आहेत.

या ग्रंथांत अनेक टिकाणीं भोजनसमारंभाचें वर्णन येतें. त्यावरून त्या काळच्या खाद्यपदार्थांची चांगली कल्पना येते. उदा० श्रीकृष्णाच्या भोजनाचें हें वर्णन पाहा—

रम्यं तु देवकीदत्तं पात्रे वै काञ्चने शुभे ।
कचोलानां चतुःषष्टिः न्यस्ते सुघटिते हरिः ।।

अर्थ–सोन्याच्या शुभ व सुबक पात्रांत देवकीने चौसष्ट कचोळीं ठेवलीं होतीं (व त्यांत वाढलेलें भोजन श्रीकृष्ण जेवत होता).

त्या भोजनांतले पदार्थ असे––

पायसं चन्द्रसङ्काशं सितशर्करया युतम् ।
भक्तं कुमुदवर्णाभं मुद्गदालिस्तथैव च ।।
नानाव्यञ्जनसंयुक्तं त्रिभिः पंक्तिभिरेव च ।
निम्बूरसेन सार्द्रेण फलमूलयुतेन च ।।
विकृतानि कृतान्येव शतशो भोजने विभोः ।
मरीचं पिप्पली चार्द्रं रम्भा शर्करया युता ।।
सितया सहितेनाथ दुग्धेन क्वथितेन च ।
घृतं सितायुतं देव्या दत्तं प्रीत्या यशोदया ।।
पूरिकाश्च तथा क्षीरविकाराश्च प्रसाधिताः ।
मृद्विकाशिशुपाचूत करमर्दकृतः शुभाः ।।

(९.३५–३९)

अर्थ– पांढरी साखर घातलेला चांदण्यासारखा पायस, श्वेतकमळाच्या वर्णाचा भात, तसेंच मुगाचें वरण; तीन ओळींनी वाढलेल्या नाना प्रकारच्या चटण्याकोशिंबिरी; लिंबाचा रस, आलें व फळेंमुळें यांचीं शेंकडो तोंडीलावणीं, मिरपूड, पिंपळी, आलें, पांढरी साखर घालून दुधांत शिजविलेलीं केळीं, तूपसाखर, वगैरे पदार्थ देवी यशोदेने (श्रीकृष्णाच्या पात्रांत) वाढले होते. पुऱ्या व दह्या-दुधाचें श्रीखंड, बासुंदी इ. पदार्थ तिने तयार केले होते. द्राक्षें, आंबे, करवंदें यांचीं लोणचीं बनविलीं होतीं.

त्याचप्रमाणे खिचडी, फेण्या, मोदक, लाडू वगैरे पदार्थांचेंहि वर्णन आहे. त्यावरून या ग्रंथाच्या रचनाकाळीं म्हणजे इ. स. २०० च्या सुमारास प्रचलित असलेल्या भक्ष्य–भोज्य पदार्थांची कल्पना येते.

या पुराणांतील कांही सुभाषितें पुढीलप्रमाणे–

तावद्देहे नृणां मोहो यावन्नो साधुसंगतिः ।

(१६–३२)

अर्थ –– जोंपर्यंत सज्जनसंगति घडत नाही, तोवरच माणसांची देहावर आसक्ति असते.

पररन्ध्रेषु सर्वेषां दृष्टिर्गच्छत्यचेतसाम् ।

अर्थ –– सर्व अज्ञानी लोकांची दृष्टि दुसऱ्याचीं छिद्रें (दोष, व्यंगें) पाहणारी असते.

आज्ञाभङ्गो नरेन्द्राणां विप्राणां मानखण्डनम् ।
पृथक्शय्या च नारीणामशस्त्रवध उच्यते ।।

अर्थ –– राजांचा आज्ञाभंग, ब्राह्मणांची मानखंडना आणि स्त्रियांची (पतीपासून) वेगळी शय्या हा त्यांचा शस्त्राविना केलेला वधच होय. [बा. मो. कानिटकर]

अश्वमेध भारत सूक्तद्रष्टा. [ऋ. ५. २७]

अश्वरथदान एक दान. याचा विधि असा –– सुवर्णाचा अश्वयुक्त रथ बनवून त्यांत इष्ट देवतेची स्थापना व पूजा. मग त्याचें दान. फल – शिवपदप्राप्ति. [मत्स्य पु. ५८२]

अश्वविद्या घोड्याविषयींचें ज्ञान किंवा घोड्यांना शिकविण्याची विद्या. ही नलराजाला अवगत होती. ती त्याने ऋतुपर्णाला शिकविली. [भाग. पु. ९.९.१७]

अश्वव्रत एक व्रत. इंद्रपूजा. व्रतावधि एक वर्ष. [हि. ध.]

अश्वसूक्ति काण्वायन सूक्तद्रष्टा. याने इंद्राला सोम न अर्पण करणाऱ्या अधार्मिक भटक्या जमातींचा उल्लेख केला असून इंद्राने त्यांचा नायनाट केल्याचेंहि सांगितलें आहे (ऋ. ८.१४.१५). हा सामद्रष्टाहि होता (पं. ब्रा. १९.४.१०).

अश्वसैन्य फार प्राचीन काळापासून युद्धांत घोड्यांचा उपयोग केला जात होता. घोडेस्वार ही एक सैन्यांतली मोठी शक्ति होती. कांबोज, बाल्हीक व सिंधु या देशांतले घोडे युद्धकार्यासाठी प्रशंसिले जात होते (वा. रा. १. २. ६). चिखल, पाणथळ व खडकाळ भूमि वगळून अन्य स्थळीं घोडदळ हेंच महत्त्वाचें मानलें जात होतें. जिंकलेला प्रदेश व जंगलांतलीं सैनिक शिबिरें यांवर पहारा करण्याचें काम घोडेस्वारच करीत. पादचारी सैन्याचें संचालनहि घोडदळाच्या मार्फतच होत असे. सैन्याची पिछाडीहि घोडदळच संभाळीत असे. शत्रूवर प्रथम आक्रमण व्हायचें तें घोडदळाकडनच. शत्रुसैन्याला तुडविणें, राजकुमारांना पळविणें, पाठलाग करणें या कामीं घोडदळच उपयुक्त ठरे. धनुष्यबाणांनी लढणें, तलवार चालविणें व भाला फेकणें, इ. प्रकारांनी घोडेस्वार लढाई करीत. [प्रा. भा. सां.]

अश्वारूढा एक शाक्त देवता. त्रिनेत्र. उजव्या हातीं काठी. रक्तवर्षाव करणारी. तांबड्या घोड्यावर

बसणारी. चतुर्भुज. हिच्या चरणांशीं सुवर्णदंडाने ताडित झालेला 'साध्यक' हात जोडून पायां पडत असतो. [तंत्रराज; श्रीविद्यार्णवतंत्र]

अश्विनी अश्विन्यादि नक्षत्रगणनेंतलें पहिलें नक्षत्र. आयनिक वृत्ताच्या उत्तरेस देवयानी व कृत्तिका यांच्या त्रिकोणांत हें नक्षत्र आकाशांत दिसतें. याच्या कोणी तीन तर कोणी दोन तारका मानतात. तिहींत दोन जवळजवळ असून त्यांत उत्तरेची तारका अधिक तेजस्वी आहे. या तीन तारकांमुळे याची आकृति अश्वमुखासारखी दिसते. घोडीचें रूप धारण करणाऱ्या संज्ञानामक सूर्यपत्नीच्या ठिकाणीं सूर्यापासून दोघे अश्विनीकुमार जन्माला आले, ही कथा या नक्षत्राशीं संबद्ध आहे. या नक्षत्राचा वेदांत अश्वयुजौ असा उल्लेख आहे (तै. सं. ४. ४.१०. तै. ब्रा. १. ५.१; अथर्व १९. १). हा शब्द द्विवचनी असल्यामुळे वेदकाळांत या नक्षत्राच्या दोनच तारका मानीत, असें दिसतें. महाभारतांत मात्र सांप्रत प्रचारांत असलेला अश्विनी हाच शब्द योजलेला आहे (अनु ६४ व ८९). अश्विनौ ही या नक्षत्राची देवता असून हें नक्षत्र अश्वक्रांता या छंदाची देवता आहे. या नक्षत्रावर केलेलें श्राद्ध फलप्रद होतें.

या नक्षत्राचें ध्यान पुढीलप्रमाणे सांगितलें आहे–

तत्रादावश्विनी ज्ञेया पद्मपत्रनिभा शुभा ।
अश्ववक्त्राम्बुजारूढा द्विभुजा च सिताम्बरा ।
दक्षे दिव्यौषधीपात्रं बिभ्रती पुस्तकं करे ।।

अर्थ— कमलपत्रासारख्या कांतीची, कमलावर बसलेली, शुभ, अश्वमुख असलेली, शुभ्रवस्त्र नेसलेली, द्विभुज, उजव्या हातांत दिव्य औषधीचें पात्र व डाव्या हातांत पुस्तक धारण करणारी अशी अश्विनीची मूर्ति करावी. [हे. व्र.; पु. इं.]

अश्विनी मुद्रा हठयोगांतली एक मुद्रा. हिची क्रिया पुढील प्रमाणे सांगितली आहे––

आकुञ्चयेद् गुदद्वारं प्रकाशयेत् पुनः पुनः ।
सा भवेदश्विनीमुद्रा शक्तिसद्बोधकारिणी ।।

अर्थ – वारंवार गुदाचें आकुंचन व प्रसरण करीत राहिल्याने ही मुद्रा होते व ती शक्ति व ज्ञान देतें.

फल – गुह्य-रोगांचा नाश, बल व शुद्धि यांची प्राप्ति. [योगसोपान]

आश्विनौ जुळ्या देवता. इंद्र, अग्नि व सोम यांच्यानंतर ऋग्वेदांतली महत्त्वाची देवता म्हणजे अश्विनौ हीच होय. पुरीं ५० सूक्तें हिच्या वांटयाला आलीं आहेत. मात्र सृष्टींतल्या कोणत्या विशिष्ट व्यापाराशीं या देवतेचा अधिकृत संबंध आहे, तें वैदिक सूक्तांवरून स्पष्ट होत नाही. प्रारंभींच्या वेदार्थकारांपासून सर्वांनाच या देवतेच्या खऱ्या स्वरूपाबद्दल कोडें पडलें आहे. अश्विनौ हे जुळे बंधु असून त्यांची जोडी कधीच फुटत नाही (ऋ. ३.३९.३). ते विवस्वानाचे पुत्र असून सरण्यू त्यांची माता आहे (ऋ. १०. १७.२). ते तरुण, वीर्यशाली, दानशूर, विद्वान्, संपत्तिमान् व शुभांचे स्वामी आहेत. ते मधुप म्हणजे मध पिणारे व सोमपान करणारे आहेत.

सोनेरी रथांत बसून ते सर्वत्र संचार करीत असतात. त्यांचा रथ तीन चाकांचा व तीन खांबांचा असतो (ऋ. १. ११८. २). त्या रथाला मधुवर्ण किंवा मधुवाहन म्हटलें आहे. तो शीघ्रगामी असून एका दिवसांत द्यावा-- पृथिवीं-भोवती फिरून जातो (ऋ. ३. ५८. ८). उषा व सूर्य यांच्या उदयकालामध्यें यांचा उदय होतो. सूर्यकन्या सूर्येचे ते पती आहेत (ऋ. ४. ४३. ६). ती त्यांच्या रथावर चढते. म्हणूनच ऋग्वेदांतल्या विवाहसूक्तांत विवाहित वधूला आपल्या रथावर बसवून घरीं आणण्याबद्दल त्यांची प्रार्थना केली आहे (ऋ. १०. ८५).

अश्विनौच्या वसतिस्थानासंबंधीं विविध उल्लेख आहेत. द्यावा–पृथिवी, द्यौ, अंतरिक्ष, गिरिशिखर, मोठे वृक्ष हीं त्यांचीं मुख्य वसतिस्थानें मानलीं आहेत.

विपत्तींतून प्राण्यांचा उद्धार करणें, हें त्यांचें प्रधान कार्य आहे. ते देवांचे कुशल वैद्य आहेत. ते अंधांना दृष्टि देतात. त्यांनी च्यवनभार्गवाला वार्धक्यांतून मुक्त करून पुनश्च तारुण्य दिलें. अत्रि सप्तवध्रि हा आगीच्या खाईंत पडला असतां त्याला वर काढलें. तुग्रपुत्र भुज्यु समुद्रांत पडला असतां शंभर वल्ह्यांच्या नौकेंतून पुढे येऊन त्यांनी त्याला वर काढलें. ऋज्राश्वाला दृष्टि दिली (ऋ. १. ११७. १७). विश्पलेचा पाय युद्धांत तुटला असतां त्या जागीं लोखंडाचा पाय बसविला (ऋ. १. ११६. १५). घोषेला तिचा रोग दूर करून चांगला पति मिळवून दिला (ऋ. १. ११७. ७.). अथर्वणपुत्र दध्यङ् ऋषीचें शिर तोडून त्या जागीं घोड्याचें तोंड बसवून हे त्याच्यापासून मधुविद्या शिकले (ऋ. १. ११७. २२.).

हीं सर्व त्यांचीं अलौकिक कृत्यें सर्वांना मान्य असलीं, तरी त्यांचा भौतिक आधार काय व अश्विनौ म्हणजे नक्की कोण याविषयीं संशोधकांत मतैक्य नाही. यास्कानेहि हा मतामतांचा गलबला सूचित केला आहे. पाश्चात्य संशोधकहि

त्यांच्याविषयीं अनेक उपपत्ति सांगतात. सर्वांत अधिक मान्य मत असें आहे, की अश्विनौ हे अर्धा तमोमय व अर्धा प्रकाशित अशा प्रभात कालाचें प्रतीक आहेत.

गुरु-शुक्रांच्या सान्निध्यावरून अश्विनौंची कल्पना उत्पन्न झाली, असें श्री. दीक्षित म्हणतात. कांहींच्या मतें ही देवता केवळ भारतीय नसून त्या पूर्वीच्या इण्डो–युरोपीय काळांतील असावी. ग्रीक वाङमयांत झेउस्च्या दोन पुत्रांची कल्पना केलेली आहे. हेलेना ही त्या दोघांची बहीण आहे. अश्विनौंची अशीच उषा ही भगिनी आहे. त्यावरून त्या दोघांत साम्य असावें. अश्विनौविषयीं डॉ. संपूर्णानंद यांनी पुढील विवेचन केलें आहे–

ऋग्वेदांत म्हटलें आहे की – 'हे स्वर्गाच्या रक्षक अश्वींनो, ज्या समयीं काळचा गायी लाल गायींत मिसळतात, अशा समयीं मी तुमचें आवाहन करतो' (१०·६१·४). याचा अर्थ असाच होऊं शकतो, की रात्रीचा काळा अंधार जाऊन जेव्हा पूर्व क्षितिजावर तांबडें फुटतें तो काल अश्विनौच्या उपासनेचा काल होता. पुराणांत ज्या प्रकारें मित्र, वरुण, इ. वैदिक देव मूलस्थानावरून च्युत झाले, तसेंच अश्विनौंचेंहि झालें आहे. अश्विनौंचें वेदांतलें स्थान फार उंच असलें, तरी पुराणकाळांत त्यांना देवांबरोबर बसून यज्ञभाग ग्रहण करण्याचाहि अधिकार उरला नाही.

ऋग्वेदांतले अश्विनौ हे पुराणांत अश्विनीकुमार या नांवाने प्रसिद्ध झाले. विवस्वानाची भार्या संज्ञा ही घोडी होऊन फिरत असतां विवस्वानाने अश्वरूप घेऊन तिच्याशीं संग केला. तो परपुरुष असावा अशा कल्पनेने तिने तें वीर्य आपल्या नाकपुडींतून बाहेर टाकलें. त्यांतून यांची उत्पत्ति झाली. यांच्यापैकी थोरल्याचें नांव नासत्य व धाकटयाचें नांव दस्र असें आहे. हे देवांचे वैद्य, वैवस्वत मन्वंतरांतले देव आणि वर्णानें शूद्र आहेत. नकुल सहदेव हे माद्रीचे पुत्र यांच्याच अंशापासून जन्मास आले.



अश्विनीकुमार
आनंद विकतनच्या सौजन्याने

यांची मूर्ति पुढीलप्रमाणे करावी, असें विष्णुधर्मोत्तर पुराणांत सांगितलें आहे––

कमलपत्राप्रमाणे कांति, द्विभुज, सुंदर डोळयांचे व सर्वाभरणसंपन्न, अशा त्यांच्या मूर्ति बनवाव्या. त्यांच्या उजव्या हातांत पुस्तक असावें. पार्श्वभागीं एक नारीयुग्म निर्माण करावें. [ऋ. द.; वै. सा. सं.; आ. आ. दे.; म. ज्ञा. को.; प्रा. च. को.]

अषुहुण्णीसिद्धर द. भारतांतला एक सिद्ध. याच्या कवितेंत गूढ आध्यात्मिक विषय क्लिष्ट भाषेंत सांगितलेले आहेत. हा महाशक्तीला कण्णम्म असें नांव देऊन तिला सर्वोच्च ईश्वरी स्वरूपांत मानतो. याने आपल्या दारिद्र्य–दुःखांविषयीं वारंवार खेदोद्गार काढले आहेत. [दक्षिण दर्शन]

अष्ट आय ध्वज, सिंह, वृषभ, गज, धूम्र, श्वान, खर, ध्वांक्ष, असे आय शिल्पशास्त्रांत सांगितले असून गृहनिर्माणाच्या वेळीं त्यांचा विचार करतात.

अष्ट उपद्वीप जंबुद्वीपाच्या आसमंतीं क्षार–समुद्रांत पुढील आठ उपद्वीपें आहेत – स्वर्णप्रस्थ, आवर्तन, रमणक, मंदर, हरिण, पांचजन्य, सिंहल व लंका. [भाग. पु. ५. १९. ३०]

अष्टकर्णी गाय या अर्थीं वैदिक प्रतिशब्द. वैदिक काळीं बहुधा गायीच्या कानाच्या आठ पाकळया कापीत असावे अथवा आठ हा अंक त्यावर डाग देऊन अंकित करीत असावे. त्यावरून अशा गायीला अष्टकर्णी म्हणायची प्रथा सुरू झाली असावी. त्यासाठी तांब्याची सुरीच वापरली पाहिजे, लोखंडाची सुरी किंवा बाण वापरतां कामा नये, असा दंडक होता. डागून चिह्न करायचें तर उसाचा तुकडा वापरीत. [वे. इं.]

अष्टक वैश्वामित्र सूक्तद्रष्टा. विश्वामित्राचा पुत्र (ऐ. ब्रा. ७.१७). इंद्राचें स्तवन करतांना ऐतिहासिक महत्त्वाचा असा एक उल्लेख त्याने केला आहे– 'हें इंद्रा, सात महानद्यांना तूं त्या पातकी राक्षसाच्या तावडींतून सोडविलेंस व त्या मोकळया झाल्या असतांहि

त्वां एकाच देवाने जागरूक राहून त्या जलांवर सतत दृष्टि ठेवलीस. त्यांच्या जलौघांनी शत्रूंचीं नगरें विध्वंसून तूं सागर भरून टाकलास.' (ऋ. १०.१०४)

वैदिक आर्यांनी सिंधुसंस्कृतीच्या लोकांच्या नगरांचा व नद्यांना पक्के बांध घालून ते करीत असलेल्या शेतीचा, कशा प्रकारें उच्छेद केला असेल, त्याची यावरून कल्पना येते.

या ऋषीचा महाभारतांतहि उल्लेख आहे. 'तूं गर्वामुळे पतन पावशील' असा नारदाचा याला शाप झाला आहे (म. भा. वन. १९८). हा विश्वामित्रगोत्राचा प्रवर ऋषि आहे.

अष्टका श्राद्ध व होम अशा उभयविध स्वरूपाचें हें कर्म आहे. सर्व सूत्रकारांनी अष्टकाश्राद्ध म्हणून या कर्माचा पाकयज्ञसंस्थेंत अंतर्भाव केला आहे. अष्टका शब्दाचा अर्थ अष्टमी असा आहे. मार्गशीर्ष, पौष, माघ व फाल्गुन या चार महिन्यांच्या वद्य अष्टमींस अष्टका असें म्हणतात. माघ वद्य अष्टमी ही एकाष्टका, म्हणजे मुख्य अष्टमी होय. अष्टकाश्राद्धाच्या आदल्या दिवशीं एक श्राद्ध करतात. अनुराधा नक्षत्रावर हें श्राद्ध करावें, असें सत्याषाढ गृह्यसूत्र सांगतें (२.१४.३). या श्राद्धाचा विधि मासिक श्राद्धाप्रमाणेच असतो. यांत औपासनाग्नीवर चारहि पार्वणांच्यासाठी 'उदीरतामवर उत्परास...' इ. मंत्रांनी पायस, ओदन (भात), कृसर (तिलमिश्रित भात) व अपूप यांची आहुति देतात. ब्राह्मणांना भोजन घालतात व पिंडदान करतात.

अष्टकाश्राद्धाचा विधि तीन दिवस चालतो. तीन दिवस निरनिराळीं श्राद्धें करतात. प्रत्येक श्राद्धविधींत औपासनाग्नीवर होम करतात.

आद्याऽपूपैः सदा कार्या मांसैरन्या भवेत्सदा ।
शाकैरन्या तृतीया स्यादेष द्रव्यगतो विधिः ॥ (वायुपुराण)

अर्थ – पहिल्या श्राद्धांत अपूप किंवा पुरोडाश, दुसऱ्यांत मांस व तिसऱ्यांत शाक (लाह्या वगैरे) यांचा होम करावा.

या तीनहि श्राद्धांचा विधि पुढीलप्रमाणे आहे–

अष्टमीच्या दिवशीं गाय हा पशु मारून त्याचा याग करतात. गाय न मिळाल्यास बोकड, मेंढी या पशूंचें किंवा अन्य कोणत्याहि पशूचें मांस घेतलें तरी चालतें. औपासनाग्नीवर अग्निमुखतंत्राप्रमाणे सर्व विधि करून प्रधान होमाच्या वेळीं पितरांच्यासाठी आहुती देतात. नंतर ब्राह्मणभोजन, पिंडदान, इ. विधि मासिक श्राद्धाप्रमाणे करतात. या श्राद्धांत काम व काल या विश्वेदेवांसाठी भोजनास ब्राह्मण सांगतात. केवळ सुवर्णदान देऊन किंवा बैलाला चारा घालूनहि हें श्राद्ध करावें; पण श्राद्ध केल्याशिवाय राहूं नये, असें बौधायन गृह्यसूत्रांत सांगितलें आहे (२.११). तीनहि अष्टकाश्राद्ध एकाच दिवशीं केलीं तरी चालतात, असेंहि एक मत आहे.

अष्टकाश्राद्धाच्या दुसऱ्या दिवशीं अन्वष्टका श्राद्ध करतात. याचाहि सर्व विधि मासिक श्राद्धाप्रमाणेच आहे. याचीं हविद्रव्यें ओदन, कृसर, पायस, दधिमंथ व मधुमंथ (घुसळलेलें दहीं व मध) हीं असतात. अष्टकाश्राद्धांतल्या अवशिष्ट मांसाचा उपयोग या श्राद्धांत करायचा असतो. या श्राद्धांत स्त्रीपितरांना सुरा व आचाम देतात (आश्व. गृ. सू. २.४). [विद्याधरशास्त्री भिडे; म. ज्ञा. को.]

अष्ट कुमारिका दयंती, मालिका, कौमुदिका, सुशीला, भाति, उन्नति, पुष्पावती व चंद्रिका. या इंद्राच्या कुमारिका मानलेल्या आहेत. [कथाकल्पतरु]

अष्टगंध आठ सुगंधी द्रव्यें एकत्र करून बनविलेलें गंध. हीं आठ द्रव्यें अशीं — गोरोचन, चंदन, देवदार, कर्पूर, कृष्णागुरु, नागरमोथा, कस्तूरी व कुंकूं. याचे आणखीहि कांही पर्याय आहेत.

अष्टछाप कवी पुष्टिमार्गाचे संस्थापक वल्लभाचार्य यांचे चार शिष्य व वल्लभाचार्यांचे पुत्र विठ्ठलनाथ यांचे चार शिष्य मिळून व्रजभाषेचे भक्त-कवी अष्टछाप या नांवाने प्रसिद्ध आहेत. हे श्रेष्ठ कवी संगीतज्ञ आणि कीर्तनकार होते. विठ्ठलनाथांनी या आठ भक्त–कवींचें एक मंडळ बनवून त्यांना व्रजांतल्या गोवर्धन क्षेत्रांतील श्रीनाथाची कीर्तनसेवा नेमून दिली. पुष्टिमार्गांतल्या अनेक शिष्यांतून आठांची निवड करून विठ्ठलनाथाने त्यांच्यावर आशीर्वादाचा मौखिक छाप मारला, म्हणून ते अष्टछाप या नांवाने प्रसिद्ध झाले. त्यांचीं नांवें अशीं—

(१) कुंभनदास — (वल्लभाचार्यांचा शिष्य)
(२) सूरदास — ,,
(३) परमानंददास — ,,
(४) कृष्णदास — ,,
(५) गोविंदस्वामी — (विठ्ठलनाथांचा शिष्य)
(६) नंददास — ,,
(७) छीतस्वामी — ,,
(८) चतुर्भुजदास — ,,

जेव्हा श्रीनाथ गोवर्धनावर प्रकट झाले, तेव्हा त्यांचे अंतरंगसखे असलेले हे आठहि कवी उत्पन्न झाले, अशी पुष्टिमार्गी

लोकांची समजूत आहे. म्हणून पुष्टिमार्गांत त्यांना अष्टसखा असेंहि म्हणतात. या आठहि कवींनी मनोहर पद्यरचना करून तिच्या द्वारें श्रीनाथाची कीर्तनसेवा केली. **पाहा** – पुष्टिमार्ग वल्लभाचार्य. [अष्टछापपरिचय]

अष्ट तारा तारादेवता आठ प्रकारच्या आहेत– तारा उग्रा, महोग्रा, वज्रा, नीला, सरस्वती, कामेश्वरी व भद्रकाली (मायातंत्र). तारेचें मूर्तिविधान पुढीलप्रमाणे- कृष्णवर्ण, त्रिनयन, दोन्ही हातीं कमळ, रत्नालंकारयुक्त व पादत्राणयुक्त (विद्यार्णवतंत्र). **पाहा** – तारा.

अष्ट ताल अष्टताल = ८४ इंच. मानवाची सामान्यतः उंची अष्टताल मानलेली आहे. नवताल पुरुष हा श्रेष्ठ पुरुष होय. [पु. इं.]

अष्ट दानें मृताच्या उत्तरक्रियेंत त्याला परलोकांत उपयोगीं पडाव्या म्हणून आठ वस्तू ब्राह्मणांना देतात. आमान्न, जलकुंभ, धेनु, वस्त्र, भूमि, शय्या, छत्री व आसन या त्या आठ वस्तू होत. [ऋ. ब्र. क.]

अष्ट दिक्पाल पूर्वादि अष्ट दिशांचे आठ पालक असून ते त्या त्या दिशेवर अधिराज्य करतात. त्यांचें कोष्टक पुढीलप्रमाणे —

नांवें	दिशा	वाहनें	शस्त्रें	वस्त्रांचे रंग
इंद्र	पूर्व	ऐरावत	वज्र	तांबडा
अग्नि	आग्नेय	मेंढा	शक्ति	जांभळा
यम	दक्षिण	रेडा	दंड	नारिंगी
निर्ऋति	नैर्ऋत्य	माणूस	कुंत	पिवळा
वरुण	पश्चिम	सुसर	पाश	शुभ्र
वायु	वायव्य	हरिण	ध्वज	निळा
कुबेर	उत्तर	घोडा	खड्ग	गुलाबी
ईशान	ईशान्य	बैल	त्रिशूळ	करडा

अष्ट दिग्गज आठ दिशांना आठ हत्ती उभे केलेले असून त्यांच्या दडपणामुळे पृथ्वीची गुंडाळी न होतां ती स्थिर राहते, अशी समजूत आहे. त्यांच्या नांवांचा श्लोक असा –

ऐरावतः पुण्डरीको वामनः कुमुदोऽञ्जनः ।
पुष्पदन्तः सार्वभौमः सुप्रतीकश्च दिग्गजाः ॥

अर्थ – ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अंजन, पुष्पदंत, सार्वभौम व सुप्रतीक हे आठ दिग्गज होत.

अष्ट द्रव्यें अश्वत्थ, उदुंबर, प्लक्ष, न्यग्रोध, समिध्, तिल, पायस व आज्य, हीं यज्ञीय अष्ट द्रव्य मानलेलीं आहेत.

अष्ट धातु सोनें, रुपें, तांबें, कथिल, शिसें, पितळ, लोखंड व तिखें (पोलाद) या धातूंना अष्ट धातू म्हणतात.

अष्टधा प्रकृति (१) तत्त्वज्ञानांतील – भूमि, आप, अनल (अग्नि), वायु, आकाश, मन, बुद्धि व अहंकार, यांविषयी गीतेंतील श्लोक असा –

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥

(गीता ७.४)

(२) राजकारणांतील – स्वामी, अमात्य, सुहृद्, कोश, राष्ट्र, दुर्ग, बल व प्रजा.

अष्ट नाग अनंत, वासुकि, तक्षक, कर्कोटक, शंख, कुलिक, पद्म व महापद्म, हे अष्टनाग होत. अष्ट नागांप्रमाणेंच नव नागहि आहेत. यांतलीं कांही नांवें त्यांतहि आहेत. **पाहा** – नवनाग.

अष्ट नायिका (१) श्रीकृष्णाच्या सोळा हजार एकशें आठ स्त्रियांमध्ये पुढील आठ स्त्रिया अष्ट नायिका म्हणून प्रमुख मानलेल्या आहेत. त्यांचीं नांवें – रुक्मिणी, सत्यभामा, सत्या, लक्ष्मणा, जांबवती, कालिंदी, भद्रा व मित्रविंदा.

(२) इंद्राच्या – उर्वशी, मेनका, रंभा, पूर्वचिती, स्वयंप्रभा, भिन्नकेशी, जनवल्लभा व घृताची (तिलोत्तमा). [सं. इं. डि.]

अष्ट निधि मार्कण्डेय पुराणांत पद्मिनी विद्येच्या अंतर्गत पुढील आठ निधी सांगितले आहेत–

(१) **पद्म** – ज्याच्याजवळ हा निधि असतो, त्याच्या वंशांत पुत्रपौत्रादि परंपरेने लक्ष्मी राहते. असा पुरुष दान देण्यांत अग्रेसर असतो. तो यज्ञ करून दक्षिणा देतो व सभामंडप आणि देवालयें निर्माण करतो. हा सात्त्विक निधि असून सोनें, चांदी, तांबें, इ. धातूंचा संचय व त्यांचा क्रयविक्रय हें या निधीचें वैशिष्टय आहे.

(२) **महापद्म** – हा पद्मरागादि रत्नें व मोत्यें यांचा संग्रह व क्रयविक्रय करणारा निधि आहे. याचा स्वामी सत्त्वगुणी

असतो. हा निधि सात पिढ्यांपर्यंत कुलांत राहतो. याचा स्वामी योगिजनांना नाना प्रकारची मदत करतो.

(३) **मकरनिधि** – या निधीचा स्वामी सैनिकांना उपयुक्त अशा शस्त्रास्त्रांचा व्यापार करतो. राजे लोकांशीं याची मैत्री असते. हा निधि एका पिढीपुरताच टिकतो. प्रायः लढाईंत किंवा लुटालुटींत याचा नाश होतो.

(४) **कच्छपनिधि** – हा निधि धारण करणारा पुरुष पुण्यकार्यें करतो खरा; पण त्याचा कोणावर विश्वास नसतो. तो कंजूष असतो. कोणाला देत नाही व आपणहि भोगीत नाही. याची संपत्ति पुरलेली असते. हाहि निधि एका पिढी-पुरताच टिकतो.

(५) **मुकुंदनिधि** – याचा स्वामी रजोगुणी व संगीतादि ललितकलांचा प्रेमी असतो. तो गायक, वादक इ. कलावंतांना मुक्त हस्ताने धन देतो. हाहि निधि एका पिढीपुरताच असतो.

(६) **नंदनिधि** – याचा स्वामी रजोगुणी व कांहीसा तमोगुणी असतो. तो धातु, रत्नें, धान्यें, इ. वस्तूंचा संग्रह व व्यापार करतो. त्याच्या घरीं आप्तेष्टांचा व अतिथींचा आदर होतो. हा स्तुतीला भाळणारा असतो. याच्या घरांत अनेक स्त्रिया असतात. हा निधि सात पिढ्या चालू राहतो.

(७) **नीलनिधि**– याचा स्वामी सत्त्वरजमिश्रित स्वभा-वाचा असतो. तो वस्त्र, धान्य, फल. पुष्प, पोवळें-मोती, शंख-शिंपा, काष्ठ, इ. वस्तूंचा संग्रह व व्यापार करतो. तो तडाग, पुष्करिणी बनवितो. नद्यांना बांध घालतो व बागाहि निर्माण करतो. हा निधि तीन पिढ्या चालतो.

(८) **शंखनिधि**–याचा स्वामी रजोमिश्रिततमोगुणी असतो. तो कंजूष असतो. तो एकटाच खातो, आणि एकटाच चांगलीं वस्त्रें वापरतो. तो स्त्रीपुत्रादिकांची कदर करीत नाही. तो केवळ आत्मपोषक असतो.

हे आठ निधि म्हणजे मानवांच्या संपत्तीच्या देवता होत. त्या ज्याच्या घरीं जातात, त्याला आपल्या स्वभावाचा बनवितात. या आठहि निधींची अधिकारी देवता लक्ष्मी आहे. [मार्कं. पु. ६८]

अष्टपदी गीतगोविंदकर्ता जयदेव व त्याचें अनुकरण कर–णारे अन्य कवि यांनी रचिलेल्या प्रबंधांना अष्टपदी म्हणतात. याचे ध्रुव व आभोग असे दोन अवयव आणि पद व बिरुद अशीं दोन अंगें आहेत. अष्टपद्यांचे राग व ताल कर्त्यानेच निश्चित केलेले असतात. उदा० –

अथ तृतीयप्रबन्धो वसन्तरागेण रूपकताले गीयते–

विहरति हरिरिह सरसवसते । नृत्यति युवतिजनेन समं सखि विरहिजनस्य दुरन्ते ।। ध्रु० ॥

ललितलवङ्गलतापरिशीलनकोमलमलयसमीरे ।

मधुकरनिकरकरम्बितकोकिलकूजितकुञ्जकुटीरे ।। १ ।।

अथ चतुर्थप्रबन्धो रामकरिरागेण रूपकताले गीयते –

चन्दनचर्चितनीलकलेवरपीतवसनवनमाली ।

केलिचलन्मणिकुण्डलमण्डितगण्डयुगस्मितशाली ।। १ ।।

पण पुष्कळसे गायक कर्त्याचा नियम मोडून या अष्टपद्या अन्य रागांतहि गातात. [संगीतशास्त्र]

अष्टपाश दुर्गासप्तशतींत शुंभ दैत्याने दुर्गेच्या विरुद्ध लढ-ण्यासाठी पुढील आठ दैत्यांना पाचारण केलें – उदायुध, कंबु, कोटिवीर्य, धौम्र, कालक, दौहृद, मौर्य, व काल-केय. या आठ दैत्यांचा कुलार्णवतंत्रांत अध्यात्मदृष्टीने विचार केला असून त्याना अष्टपाश असें म्हटलें आहे. त्यांचीं नांवें अशीं–

घृणा लज्जा भयं शङ्का जुगुप्सा चेति पञ्चमी ।
कुलं शीलं तथा जातिरष्टौ पाशाः प्रकीर्तिताः ।
पाशबद्धो भवेज्जीवः पाशमुक्तः सदाशिवः ।।

अर्थ – घृणा, लज्जा, भय, शंका, जुगुप्सा, कुल, शील व जाति हे आठ पाश होत. या पाशांनी जो बद्ध असतो तो जीव आणि त्यांच्यापासून जो मुक्त असतो तो सदाशिव होय.

या अष्टपाशांचें आध्यात्मिक स्वरूप असें –

(१) **उदायुध** – ज्याचें आयुध उचललेलें आहे तो. हा दैत्य म्हणजेच घृणा नांवाचा पाश. घृणा म्हणजे दुसऱ्याविषयी तिरस्कारभावना. ती उत्पन्न झाली, की अहंकार वाढतो. 'षड-शीतिरुदायुधाः' असें म्हणून उदायुधांची संख्या ८६ सांगितलेली आहे. घृणेचे प्रकारहि ८६ च आहेत.

(२) **कंबु**– म्हणजे शंख. जीवाचा लज्जारूप दुसरा पाश तोच कंबु होय. शंख जातीचा एक जलचर प्राणी असतो. ज्या वेळीं त्याला प्रतिकूल वेदना होते, तेव्हा तो अवयवांचें आकुंचन करून कवचांत लपून बसतो. लज्जेचें स्वरूपहि असेंच आहे. मनुष्य आपली दुर्बलता दिसू नये म्हणून लज्जारूपी कंबूचें आवरण घेतो. कंबूंची संख्या ८४ मानलेली आहे. त्याच-प्रमाणे लज्जेचेहि तितकेच प्रकार आहेत.

(३) **कोटिवीर्य** – ज्याच्या पराक्रमाची तुलना करतां येत नाही, तो कोटिवीर्य. जीवाचा भय नांवाचा पाशहि तसाच आहे. जीवाला आपल्या अस्तित्वाचा नाश होईल, याचें विलक्षण भय असतें. त्यामुळे तो मोकळ्या मनाने सांसारिक भोग घेत नाही किंवा पूर्णपणे भक्तिभावहि अंगीकारीत नाही. त्यामुळेच त्याच्या ठिकाणीं पारमार्थिक गोष्टींचें अज्ञानहि

राहतें. कोटिवीर्याची पन्नास कुलें होतीं. तसेच या भयाचेहि ५० भेद होतात.

(४) **धौम्र** – विपर्ययज्ञानामुळे उत्पन्न होणारी शंका हा चौथा पाश होय. भय व शंका यांत भेद आहे. स्वतःच्या अस्तित्वाचा नाश होण्याची आशंका म्हणजे भय व आपणाशीं संबंध असलेल्या वस्तूच्या विनाशाची आशंका म्हणजे शंका होय. या पाशाचे प्रकार १०० होतात. धौम्राचीं कुलेंहि शंभरच होतीं.

(५) **कालक** – हा काळचा वर्णाचा असुर म्हणजेच जुगुप्सानामक पाश होय. अज्ञानाचा वर्ण काळाच मानलेला आहे. अज्ञानामुळे भेदज्ञान व त्यापासून जुगुप्सा म्हणजे निंदा किंवा छपवून ठेवण्याची इच्छा प्रादुर्भूत होते. साधकाला जोंवर अभेदाची अनुभूति घडत नाही, तोवर जुगुप्सेच्या हातून त्याची सुटका होत नाही.

(६) **दौर्हृद** – म्हणजेच कुलाचा अभिमानरूप पाश. साधकाला अद्वैताचा कितीहि वेळा उपदेश दिला तरी अभिमानरूप पाश शिल्लक असेल, तर त्या उपदेशाचा प्रभाव पडत नाही.

(७) **मौर्य** – हा जीवाचा शील नांवाचा पाश आहे. शील म्हणजे स्वभावप्रकृति. अद्वयपदाला पोचण्याच्या कामीं ही प्रकृति अडथळा आणते.

(८) **कालकेय** – हा जाति नांवाचा आठवा पाश होय. भेदज्ञानाने जातीविषयींचा अभिमान वाढीस लागतो. या पाशांतून मुक्त होण्यासाठी पुष्कळ परिश्रम करावे लागतात.

घृणालज्जादि हे अष्टपाश जीवाला बंधांत टाकणारे आहेत. ते तोडल्यावांचून विमलबोधरूप भगवत्‌साक्षात्कार होऊं शकत नाही. जो साधक आपले सर्व प्रकारचे सदसत्‌भाव परमात्म्यापुढे ठेवतो, म्हणजेच त्यांच्या जाणिवेसह भगवंताला शरण जातो, तो भगवंताच्याच कृपेने या अष्टपाशांतून मुक्त होतो. [कल्याण - साधनांक]

अष्टपुत्रा सौभाग्यवती

सुवासिनीला ‘ अष्टपुत्रा सौभाग्यवती भव = आठ पुत्र तुला होवोत, असा आशीर्वाद देण्याची प्रथा आहे. त्यापूर्वी ‘ दशपुत्रा सौभाग्यवती भव ’ असा आशीर्वाद देण्याचा प्रघात असावा. ऋग्वेदांत असा एक मंत्र आहे – ‘ दशास्यां पुत्रानाधेहि पतिमेकादशं कृधि ’ = इंद्रा, हिच्या (या वधूच्या) ठिकाणीं तूं दशपुत्रांचें आधान कर आणि हिचा पति हा अकरावा होईल असें कर (ऋ० १०·८५·४५). पण हल्लीची रूढी मात्र ‘ अष्टपुत्रा ’ म्हणण्याचीच आहे. ऋग्वेदाच्या परिशिष्टांत ‘ अष्टपुत्रा भव त्वं च ’ असें वचन आलें आहे. त्यावरून वाटतें, की हे दोन्ही संप्रदाय एकाच वेळीं प्रचलित असावे. त्यांतला दशपुत्री संप्रदाय पुरातन असून, अष्टपुत्री संप्रदाय त्यानंतरचा असावा. पहिला संप्रदाय मागे पडण्याचे बीज ‘ पतिमेकादशं कृधि ’ या वचनांत असावें. दहा पुत्र झाल्यानंतर पत्नीशीं असलेला वैवाहिक संबंध तोडावा लागत असे, हें त्या वचनावरून ध्वनित होतें. तेव्हा ही आपत्ति टाळण्यासाठी अष्टपुत्रा हा आशीर्वाद प्रचलित केला असावा. [वै. नि.]

अष्टभुज कुरुकुल्ला

कुरुकुल्ला देवीचें सौम्य, दयाळू रूप. रक्त वर्ण, हातांत अंकुश, बाण, पाश, धनुष्य, उत्पल, इ. वस्तू. दोन हातांनी ती त्रैलोक्यविजय मुद्रा व एक हाताने वरदमुद्रा दर्शविते. तिच्याभोवती बारा देवता आहेत. [इं. बु. इ.]

अष्टभुज कृष्ण

कांची येथील वरदराजस्वामीच्या मंदिरांत मुरली वाजविणाऱ्या कृष्णाची अष्टभुज मूर्ति आहे. नटराजाच्या अष्टभुजांवरून कृष्णालाहि अष्टभुज बनविलें असावें, असें वाटतें.

अष्ट भैरव

भैरवांची संख्या आठ असून त्यांचीं नांवें अशीं आहेत– (१) असितांग (२) संहार (३) रुरु (४) काल (५) क्रोध (६) ताम्रचूड (७) चंद्रचूड व (८) महाभैरव. कांही ठिकाणीं कपाल, रुद्र, भीषण, उन्मत्त, कुपित, अशीं त्यांचीं वेगळीं नांवें आढळतात. भैरवांची गणना क्रूर दैवतांत होते. हे शैव परिवारांतले आहेत. त्यामुळे शांतिकर्मांत व शैवव्रतांच्या उद्यापनांत यांना आहुती देतात. **पाहा**- भैरव.

अष्ट भोग

(१) सुगंध (२) स्त्री (३) वस्त्रें (४) संगीत (५) तांबूल (६) शय्या (७) भोजन व (८) पुष्प हे अष्टभोग होत. सोमेश्वराच्या मानसोल्लास या ग्रंथांत यांचें विशेष वर्णन आलें आहे—

(१) **सुगंधभोग** – घामाचा वास घालविण्यासाठी निरनिराळ्या उटण्या किंवा उटणीं लावणें.

(२) **स्त्रीभोग** – यांत राजाने ज्या स्त्रियांशीं लग्नें करायचीं, त्यांच्या अंगीं कोणते गुण असावे, तें वर्णिलें आहे.

(३) **वस्त्रभोग** – यांत राजाने कोणत्या ऋतूंत कोणते पोषाख घालावे, त्यांचे ऋतुमानाप्रमाणे रंग कसे असावे आणि त्यांचा जाडतलमपणा कसा असावा, तें सांगितलें आहे.

(४) **संगीत भोग** – मानसोल्लासांत यांचें वर्णन बरेंच आहे.

(५) **तांबूल भोग** – यांत सुपाऱ्या कुठून मागवाव्या, त्या कशा वाळवाव्या व कातराव्या, तें सांगितलें आहे. खास राज-तांबूल पिकलेल्या ५२ पानांचा असावा, त्याला मोत्यांचा चुना लावावा व त्यांत कापूर, कस्तुरी, इ. सुगंधी द्रव्यें घालावीं, अशा सूचना दिल्या आहेत.


(६) **शय्या भोग** – यांत सात प्रकारच्या शय्या आणि आठ प्रकारचे मंचक सांगितले आहेत. तोयशय्या म्हणजे आंत पाणी भरलेली चामडयाची गादी. हंसजा म्हणजे हंसाच्या पिसांची बनवलेली. त्याशिवाय पुष्पशय्या, कमलतंतूंची शय्या, साधी कापडाची शय्या, असे विविध प्रकार सांगितलेले आहेत.

(७) **अन्नभोग** – यांत ऋतुमानाप्रमाणे शाकपदार्थ, मांसपदार्थ व पक्वान्नें, कशीं बनवावीं, तें सांगितलें आहे. भारतीयांच्या आहारशास्त्राचा इतिहास लिहायचा झाल्यास मानसोल्लासांतील हें प्रकरण मोलाचें वाटेल.

(८) **पुष्पभोग** – यांत राजाने कोणत्या फुलांच्या माळा घालाव्या, त्याचा निर्देश असून चंपक, मल्लिका, उत्पल, पाटल, इ. अनेक फुलांचीं नांवें दिलेलीं आहेत. [मानसोल्लास]

अष्ट मंगल म्हणजे मंगलकारक आठ वस्तूंचा समुदाय. ही कल्पना श्रौतस्मार्त नसून पौराणिक आहे. ब्राह्मण, गाय, अग्नि, सोनें, तूप, सूर्य, जल व राजा हीं अष्ट-मंगलें होत. दुसरा पर्याय – सिंह, वृषभ, हत्ती, पूर्णकुंभ, पंखा, माला, भेरी व दीप असा आहे.

अष्टमंगलकमाला आठ मंगल वस्तूंची माला. या वस्तूंची नांवें अशीं – मीनमिथुन, देवविमानगृह, श्रीवत्स, वर्धमान, त्रिरत्न, पुष्पदाम, इंद्रयष्टि



अष्टमंगलकमाला

किंवा वैजयंती आणि पूर्ण कलश. सांची येथील एका तोरण-स्तंभावर ही माला अंकित आहे. मात्र तिथल्या एका मालेंत अकरा आणि दुसरींत तेरा मंगल चिन्हें ग्रथित केलेलीं आहेत. पुढे कुशाणकालांत मंगलांची संख्या आठांवर येऊन तीच रूढ झाली. पृथ्वी जिंकण्यासाठी अभियान करणारे नृपति आणि सेनापति मंगलासाठी अशा माला धारण करीत.

अष्ट मर्यादागीरी हिमालय, हेमकूट, निषध, गंधमादन, नील, श्वेत, शृंगवान् व मौल्यवान् हे आठ मर्यादापर्वत म्हणून पुराणांत सांगितले आहेत. जंबुद्वीपाचीं भारतादि नऊ वर्षे (विभाग) यांच्यामुळेच निर्माण झालीं आहेत.

अष्ट महालक्ष्मी द. भारतांतील शक्तिशाली देवता. त्यांचीं नांवें –– (१) गजलक्ष्मी (२) सामान्य-लक्ष्मी (३) इंद्रलक्ष्मी (४) महालक्ष्मी (५) वीरलक्ष्मी (६) कोलापूरमहालक्ष्मी (७) लक्ष्मी व (८) मही. या सर्वांत गजलक्ष्मी विशेष लोकप्रिय आहे. दक्षिणेंत हिला दाराच्या चौकटींत कोरतात. हिची मूर्ति मामल्लपुरम् येथील रथशिल्पांत आढळते. महालक्ष्मीचें विशेष प्रतीक म्हणजे तिच्या मस्तकावरचें लिंग. याला मातुलिंग म्हणतात. मानसार ग्रंथांत मही ही विष्णूच्या डाव्या हाताला बसलेली किंवा उभी असावी, तिच्या उजव्या हातीं नीलकमल व डावा हात वरदमुद्रेंत असावा, असें सांगितलें आहे. [सा. इं. इ. गॉ. गॉ.]

अष्टमहासिद्धि योगशास्त्रांतील योग्याला प्राप्त होणाऱ्या आठ महासिद्धि पुढीलप्रमाणे–

अणिमा महिमा चैव गरिमा लघिमा तथा ।
प्राप्तिः प्राकाम्यमीशित्वं वशित्वं चाष्टसिद्धयः ।।

अर्थ – अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व व वशित्व या आठ (महा) सिद्धी होत.

अष्टमांगल्य हा त्रैवर्णिकांचा एक संस्कार आहे. याला महाराष्ट्रांत 'आठांग(गु)ळें' म्हणतात. गर्भाधान संस्कार यथाकाल न होतां स्त्री गर्भिणी झाल्यास आठव्या महिन्यांत हा संस्कार करायची रूढि आहे. हा सूत्रोक्त नाही. पुंसवन आणि अनवलोभन या दोन संस्कारांना जोडून हा करतात. याचा सर्व विधि ऋतुशांतीसह गर्भाधानाप्रमाणेच आहे. संस्कारकौस्तुभांत या संस्काराचा उल्लेख आहे.

अष्ट मातृका रौद्री, वैष्णवी, ब्राह्मी, कुमारी, वाराही, नारसिंही, चामुंडा व महेंद्री. या आठ मातृका होत. **पाहा** — मातृका. [काशीखंड]

अष्टमीव्रतें हीं सुमारें ३० आहेत. त्यांच्याविषयीं सामान्य नियम असा, की शुक्ल पक्षांतली ८ मी नवमीयुक्त व कृष्णपक्षांतील ८ मी सप्तमीयुक्त घ्यावी. त्यांची माहिती त्या त्या नांवाखाली दिलेली आहे.

अष्ट मुद्रा सुरभि, ध्यान, शूर्प, योनि, कूर्म, पंकज, लिंग व निर्वाण या अष्टमुद्रा होत. जपाच्या शेवटीं या मुद्रांचें प्रदर्शन करतात. **पाहा**—मुद्रा.

अष्ट मूर्ती (१) पृथ्वी, जल, तेज, वायु, आकाश, यजमान, सूर्य व चंद्र. कालिदासाने आपल्या अभिज्ञान शाकुंतल या नाटकाच्या प्रारंभीं पुढील श्लोकाच्या द्वारें शिवाच्या या अष्टमूर्तीची प्रार्थना केली आहे,—

या सृष्टिः स्रष्टुराद्या वहति विधिहुतं या हविर्या च होत्री
ये द्वे कालं विधत्तः श्रुतिविषयगुणा या स्थिता व्याप्य विश्वम्
यामाहुः सर्वबीजप्रकृतिरिति यया प्राणिनः प्राणवन्तः
प्रत्यक्षाभिः प्रपन्नस्तनुभिरवतुवस्ताभिरष्टाभिरीशः ।।

(२) शैली (पाषाणाची), दारुमयी (लाकडी), लौही (लोखंडाची), लेप्या (लेपाने बनवलेली), लेख्या (चित्रित केलेली), सैकती (वाळूची), मनोमयी (मानसिक) व मणिमयी (रत्नाची), अशा मूर्तिकरणांतील आठ प्रकारच्या मूर्ती आहेत. [सं. इं. डि.]

अष्ट मूलगुण जैन धर्मशास्त्रांत श्रावकधर्माला आधार-भूत असे आठ मूलगुण सांगितले आहेत, ते पुढीलप्रमाणे—स्थूल हिंसादि पांच पापें व मद्य, मांस व मध यांचा त्याग. [वसुनंदि श्रावकाचार]

अष्ट यंत्रबल सिद्धी प्राचीन युद्धोपयोगी साधनांत अष्ट यंत्रबल सिद्धी प्रमुख होत्या. हीं आठ प्रकारचीं वाहनें होतीं, व त्यांत बसून युद्धें लढलीं जात होतीं. त्यांचीं नांवें व संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे—

(१) **दिव्य विमान**— वैदिक युगांत ऋभु नांवाचा एक वर्ग होता व तो शिल्पविद्येंत पारंगत होता. ऋग्वेदावरून कळतें, की ऋभूंनी एका दिव्य विमानाची रचना केली होती. हें विमान यंत्रबलाने आकाश, भूमि व जल या तीन्ही ठिकाणीं अबाधित गतीने चालत असे (ऋ. ४. ३६. १).

(२) **पुष्पक विमान** – वाल्मीकि रामायणांत याचें विस्तृत वर्णन मिळतें. हें संकल्पशक्तीने चालत व थांबत असे (वा. रा. युद्ध. १२३-२४).

(३) **सौभ विमान** – हें शाल्व राजाकडे होतें व त्याचा आकारहि फार मोठा होता. महाभारतांत याचे आकार, प्रकार, संचालन व उपयोग यांचें वर्णन आहे. (म. भा. वन. २२)

(४) **सूत विमान** – पारा व अभ्रक यांचा धातूंशीं संयोग करून याची रचना करीत.

(५) **हर्यश्व विमान** – हें लाकडाचें बनवीत व त्याला दोन लाकडी घोडे जोडीत. त्याची कळ दाबतांच ते घोडे तीव्र गतीने धावूं लागत. हें विमान केवळ इंद्राच्या उपयोगा-साठी बनविलें गेलें होतें.

(६) **प्लव विमान** – सुधन्वा राजाच्या पुत्रांसाठी ऋभूंनी याची रचना केली होती. हें लाकडी वाहन असून तें समुद्र संतरणाचें एक साधन होतें.

(७) **अमृतगवी** – हा एक प्रकारचा रथ होता. ऋग्वेदांत यांचें सुंदर वर्णन आहे (४. ३३. ८)

(८) **शिला संतरिणी** – नदी-नाले पार करण्यासाठी एक रसायन तयार करून त्याचा पाषाणाला लेप देत. त्यामुळे तो पाषाण पाण्यावर तरंगत राही. असेच लेपयुक्त पाषाण एका-पुढे एक रचून नल, नील, इ. वानरांनी रामाचें सैन्य लंकेंत नेण्यासाठी समुद्रावर सेतु बांधला होता. [चिंतनके नये चरण]

अष्टयाम एक खास हिंदीचा काव्यप्रकार. याचा विकास विशेषेंकरून रीतिकाळांत झाला. या प्रकारांत एखाद्या अवताराची अथवा भक्ताची दिनरात्रिचर्या वर्णित असते. कालिदासाने जशी आपल्या ऋतुसंहारांत ऋतुपरत्वें विलासी व्यक्तींची जीवनचर्या सांगितली आहे, तशाच प्रकारची जीवनचर्या अष्टयाम काव्यांत आढळते. देवकवि, विश्वनाथसिंह, हितवृंदावनदास, खुमान व रघुराजसिंह यांचीं अष्टयाम काव्यें विशेष उल्लेखनीय आहेत. **पाहा**— अष्टयाम-सेवा. [हिं. सा. को.]

अष्टयाम सेवा पुष्टिमार्गी भक्तिसंप्रदायाची श्रीनाथपूजा, अष्टयामसेवा या नांवाने आठ प्रहरांत विभागलेली असते. ही सेवा प्रातःकालापासून तों रात्रौ देवाच्या निद्रासमयापर्यंत चालते. मंगला, शृंगार, ग्वाल, राजभोग, उत्थापन, भोग, सायंकालीन आरती आणि शयन अशीं हिचीं

आठ रूपें आहेत. गोस्वामी विठ्ठलनाथांनी ही अष्टयामसेवा विशेष रूपाने प्रचारांत आणली. त्यांनी अष्टछाप कवींना प्रत्येक उपचारप्रसंगीं त्या त्या उपचाराला अनुसरून कीर्तनसेवा नेमून दिली. प्रभुचरण हरिराय यांनी आपल्या साहस्रीभावना या ग्रंथांत अष्टयामसेवेचें वर्णन केलें आहे–

(१) **मंगला–** यांत श्रीकृष्णाला जाग आणतात आणि नंतर त्याच्यापुढे मंगलभोग ठेवून आरती करतात. श्रीकृष्णाचें हें मंगलदर्शन पुढीलप्रमाणे निरूपित आहे–

जनन्युत्सङ्गसंलग्नःप्रदर्शितमुखाम्बुजः ।
यशोदाचुम्बितमुखो नन्दाद्युत्सङ्गलालितः ।।

(साहस्रीभावना ७)

अर्थ– बाळकृष्ण यशोदेच्या मांडीवर बसलेला आहे. तो तिला आपलें मुखकमल दाखवितो. यशोदा त्याच्या मुखाचें चुंबन घेते. (नंतर) नंदादि गोपाल कृष्णाला मांडीवर घेऊन त्याचें कौतुक करतात.

(२) **शृंगारसेवा–**यशोदा बाळकृष्णाला उटणीं वगैरे लावून स्नान घालते, पीतांबर नेसविते आणि त्याचा ललित शृंगार करते. भक्तगण तें रसमय दर्शन घेऊन स्वतःला धन्य समजतात.

(३) **ग्वालसेवा–** श्रीकृष्ण गोपाल सवंगड्यांसह गायी चारण्यासाठी वनांत जायला निघतो. त्या वेळीं यशोदा त्याला उपदेश करते – 'माझ्या बाळा, गहन वनांत आणि जलाशयाकडे जाऊं नको. कंटकित भूमीवर तुझे कमलकोमल चरण ठेवूं नको. गायींच्या पाठीमागून धावूं नको. सवंगड्यांशीं भांडूं नको.'

(४) **राजभोगसेवा–** श्रीकृष्ण वनांत गेला आहे. त्याच्या भुकेच्या वेळीं यशोदा गोपींच्या हस्तें सुरस पक्वान्नें आणि अन्य भोजनसामग्री वनांत पाठवीत आहे. सारे पदार्थ सोन्यारुप्याच्या पात्रांत आहेत. बाळकृष्ण कालिंदीच्या तीरावर बसून भोजन करीत आहे–

यमुना तट भोजन करत गोपाल
बिबिध भाँती दे जसुमति व्यंजन बहुत रसाल
ग्वाल मंडली मध्य विराजत हँसत हँसावत ग्वाल
कमलनयन मुसकाय मंद हँस करत परस्पर ख्याल

(कीर्तनसंग्रह)

अर्थ– यमुनातीरावर गोपाल भोजन करीत आहेत. यशोदेने (त्यांना) नाना प्रकारचीं रसाळ पक्वान्नें पाठवून दिलीं आहेत. गोपबालांच्या मंडळांत विराजित होऊन कृष्ण हसतो आहे आणि मित्रांना हसवितो आहे. कमलनयन श्रीकृष्ण मंदस्मित करीत आहे. तो गवळ्यांसंगें नाना प्रकारच्या मसलती करीत आहे.

(५) **उत्थापनसेवा–** राजभोगानंतर बाळकृष्ण मध्यान्ह शयनासाठी कुंजांत प्रवेश करीत आहे. सहा घटिका दिवस शिल्लक राहिल्यावर त्याला जाग आणली जात आहे.

(६) **भोग–** श्रीकृष्ण शय्येवरून उठल्यानंतर त्याला डोंगरांतून आणलेलीं कंदमूळफळें समर्पित करतात. मग बाळकृष्ण वनांतून घरीं येण्यासाठी उत्सुक होतो.

(७) **संध्या आरती–** श्रीकृष्ण मंदमधुर मुरली वाजवीत वनांतून गायीवासरांसह परत येतो. यशोदा त्याच्या दर्शनाने मुदित होते आणि त्याला आरती ओवाळते.

(८) **शयनसेवा–** यशोदा श्रीकृष्णाला शयनभोगासाठी बोलाविते. सुवर्णपात्रांत नवनीत आणि मिश्री त्याच्यापुढे ठेवते. श्रीकृष्ण भोजन करतो. नंतर निद्रासुखासाठी दुग्धधवल शय्येवर विराजमान होतो. यशोदा त्याच्या पाठीवर हात फिरवून त्याला म्हणते, 'बाळ, आता झोपी जा.' त्याला झोप लागली, असें समजून यशोदा घरांत जाते. पाठोपाठ गवळणी तिथे येऊन त्याला सांगतात, की 'राधा तुझ्या दर्शनासाठी प्रतीक्षा करीत राहिली आहे.' तें ऐकून–

कोटिकन्दर्पलावण्यो मदनाधिकसुंदरः ।
सखीप्रदर्शितपथश्चलितो मन्दमन्थरः ।।

(साहस्रीभावना १०८९)

अर्थ– कोटि मदनांप्रमाणे ज्याचें लावण्य आहे, जो मदनाहूनहि सुंदर आहे, ज्याला सखीजनांनी मार्ग दाखविला आहे, असा (राधारमण शय्येचा त्याग करून) मंदगतीने घरांतून निघाला आहे.

वरीलप्रमाणे त्या त्या प्रहरीं विविध भोग समर्पून आणि प्रसंगाला अनुसरून असें भजन-कीर्तन करून ही अष्टयामसेवा वल्लभसंप्रदायांत केली जाते. **पाहा** – वल्लभसंप्रदाय; पुष्टिमार्ग. [कल्याण-भक्तिअंक]

अष्टयोग एक प्रायश्चित्ताचा प्रकार. याने महापातकांचेंहि क्षालन होतें. याचा विधि असा–प्रथम सात दिवस उपोषण, नंतर एखाद्या शिवालयाचा जीर्णोद्धार, बेलाचें झाड लावणें, शीर्षासन व प्राणायाम. प्राणायामाच्या वेळीं नाडीला उद्देशून म्हणायचें. 'हे देवि, तुझ्यामध्ये पापी जीव वास्तव्य करतो, त्याला बाहेर घालव.' अशा प्रकारें पूरक–रेचक झाल्यावर मग नाडीला पुन्हा म्हणायचें. 'तूं आता पापमुक्त झालीस.' शिवाने याच विधानाने ब्रह्महत्येचें पातक घालविलें. [हिं. मॅं. क. से.]

अष्ट योगिनी दुर्गेच्या आठ परिचारिका. त्यांच्या नांवांचा श्लोक पुढीलप्रमाणे–

मङ्गला पिङ्गला धन्या भ्रामरी भद्रिका तथा।
उल्का सिद्धा सङ्कटा च योगिन्यैताः प्रकीर्तितः ।।

दुसरा पाठ वेगळा आहे. त्यांत पुढील नांवें येतात– मार्जनी, कर्पूरतिलका, मलयगंधिनी, कौमुदिका, भेरुंडा, माताली, नायकी, व जया किंवा शुभाचारा.

अष्ट लोही तमिळनाडमधील उडिया शिल्पकारांचा एक वर्ग. हे आठ धातूंचें शिल्प घडवितात.

अष्टवर्ग (१) सारस्वत ब्राह्मणांच्या लग्नांतला एक विधि. वरात निघण्यापूर्वी वरपिता आपल्या कुळांतलीं आठ माणसें निवडून वरासहित एका पंक्तींत बसवितो. त्यांना अष्टवर्ग म्हणतात. वधू त्यांना केळीच्या पानावर फराळ वाढते व नवऱ्याच्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत तुपाची धार न खळवितां ओतीत जाते. मग त्या अष्टवर्गांना पान-सुपारी देऊन आरती ओवाळते. एवढें झाल्यावर मग अष्टवर्ग फराळ करतात. [ल. वि. सो.]

(२) (स्थापत्यांतले) एकमजली इमारतीचे आठ भाग–(१) अधिष्ठान (तळघर) (२) अंध्रि (बुटका खांब) (३) प्रस्तर (स्तंभाच्या शिरोभागावर आधारार्थ ठेवलेला दगड) (४) ग्रीव (वरचा चौथरा) (५) शिखर (६) स्तूपि (घुमट) (७) ग्रीवमंच (पुढे आलेलें आसन) व (८) वेदिका (उंच चौथरा). [मानसार १९.८०–८५]

अष्ट वसु वसुसंज्ञक देव आठ असून त्यांचीं नांवें पुढील-प्रमाणे आहेत–

धरो ध्रुवश्च सोमः स्यादापश्चैवानिलोऽनलः ।
प्रत्यूषश्च प्रभासश्च वसवोऽष्टौ प्रकीर्तिताः ।।

अर्थ– धर, ध्रुव, सोम, आप, अनिल, अनल, प्रत्यूष, व प्रभास असे आठ वसु सांगितले आहेत.

यांच्या मूर्ती पद्म, अक्षमाला, सीद, शक्ति, चक्र, कमंडलु, अंकुश, खेटक, खट्वा, दंड, कपाल, इ. आयुधें धारण करणाऱ्या असतात. (च. व. चिं.).

वसूंचा उल्लेख वेदांत आहे. पण त्यांचें वैदिक स्वरूप पौराणिक वसूंपेक्षा वेगळें आहे. पुराणांच्या मतें वैवस्वत मन्वंतरांतील दक्षाच्या कन्येचें नांव वसु असून तिला जे आठ पुत्र झाले ते वसु-संज्ञक देव होत. यांचीं नांवें वेगवेगळ्या पुराणांत वेगवेगळीं आहेत.

अष्ट वायन वायन म्हणजे वाण. सुवासिनी स्त्रिया सौभाग्यवृद्धीसाठी पुढील वस्तू एकत्र करून त्यांचें वाण देतात–हळकुंड, सुपारी, दक्षिणा, खण (वस्त्र), सूप, कंकण, धान्य व काचमणि (काळी पोत).

अष्टविध देह देहाचे आठ प्रकार मानले आहेत, ते असे– (१) स्थूल (२) सूक्ष्म (३) कारण (४) महाकारण (५) विराट् (६) हिरण्य गर्भ (७) अव्याकृत व (८) मूलप्रकृति. [पंचदशी तत्त्वविवेक]

अष्टविनायक महाराष्ट्रांत आठ विनायकांचीं स्थानें हीं गणपतिक्षेत्रें म्हणून प्रसिद्ध आहेत. मुद्गल पुराणांत त्यांचें वर्णन आढळतें. त्यांचें कोष्टक पुढीप्रमाणे –

देवतानाम	स्थान	जिल्हा
१ मोरेश्वर	मोरगांव	पुणें
२ बल्लाळेश्वर	मुरुड (पाली)	कुलाबा
३ विनायक	महड	कुलाबा
४ चिंतामणि	थेऊर	पुणें
५ गिरिजात्मज	लेण्याद्रि	पुणें
६ विघ्नेश्वर	ओझर	पुणें
७ गणपति	रांजणगांव	पुणें
८ गजमुख	सिद्धटेक	नगर

वरील प्रत्येक क्षेत्राची माहिती त्या त्या नांवाखाली कोशांत दिली आहे.

अष्ट शक्ती (१) श्री, भू, सरस्वती, प्रीति, कीर्ति, शांति, तुष्टि व पुष्टि या अष्टशक्ती मानलेल्या आहेत. या अनुक्रमें संपत्ति, पृथ्वी, विद्या, प्रेम, कीर्ति, शांति, सुख व बल यांच्या देवता होत. श्रीविष्णूची विश्वधारण-प्रक्रिया या अष्टशक्तींच्या द्वारें चालते. दक्षिणेंत यांच्या मूर्ती आढळतात. त्या चतुर्भुज असून त्यांच्या वरच्या दोन हातांत कमळ असतें व खालचे दोन हात अभय व वरद या मुद्रा दाखवितात. [सा. इं. इ. गॉ. गॉ.]

(२) दीप्ति, सूक्ष्मा, जया, भद्रा, विभूति, विमला, अमोघा व विद्युता हा अष्ट शक्तींचा दुसरा पर्याय होय.

अष्टशील बौद्ध धर्मांतलें एक व्रत. याला उपोसथशील असेंहि म्हणतात. दर महिन्याच्या दोन अष्टमी, पौर्णिमा व अमावास्या या चार उपोसथाच्या तिथी असतात. त्या दिवशींच अष्टशीलांचें पालन करायचें असतें. अष्टशील

ग्रहण करणाऱ्या व्यक्तीला एखाद्या भिक्षुकडे जाऊन तें ग्रहण करावें लागतें. यांत पुढीलप्रमाणे आठ प्रतिज्ञा करायच्या असतात –

(१) मी प्राणिहिंसेपासून विरत राहीन. (२) चोरीपासून विरत राहीन. (३) अब्रह्मचर्यापासून विरत राहीन. (४) असत्य भाषणापासून विरत राहीन. (५) सुरा व मादक पदार्थांच्या सेवनापासून विरत राहीन. (६) अकाल भोजनापासून विरत राहीन. (७) नृत्य, गायन, वादन आणि तमाशा यांपासून, तसेंच पुष्पमाला, सुगंधित द्रव्यें व शरिराच्या शृंगारासाठी कोणत्याहि प्रकारचें आभूषण धारण करणें यापासून विरत राहीन व (८) उंच व मौल्यवान् शय्येवर निजण्यापासून विरत राहीन. [बौद्धचर्या विधि.]

अष्टसखा पुष्टि मार्गांतील एक कल्पना. गोपालकृष्णाचे अनेक सवंगडी होते. त्या सर्वांना समागमें घेऊन कृष्णाने गोकुळांत अनेक प्रकारच्या बाललीला केल्या. त्या सर्व सवंगड्यांत समानवय व समानशील असे कृष्णाचे सात परम मित्र होते. कृष्ण धरून त्यांची संख्या आठ होते. हे आठ मित्र पुष्टिमार्गांत अष्टसखा या नांवाने प्रसिद्ध आहेत. त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणे – कृष्ण, तोक, अर्जुन, ऋषभ, सुबल, श्रीदामा, विशाल आणि भोज.

अष्टछाप कवींना त्यांच्या सख्यभक्तीमुळे आणि अनन्यभावामुळे ‘अष्टसखा’ मानलें गेलें आहे. सूरदासाला कृष्ण, परमानंददासाला तोक, कुंभनदासाला अर्जुन, कृष्णदासाला ऋषभ, छीतस्वामीला सुबल, गोविंदस्वामीला श्रीदामा, चर्तुभुजदासाला विशाल आणि नंददासाला भोज, असें समजतात. **पाहा** – अष्टछाप.

अष्ट सात्त्विकभाव स्तंभ, स्वेद, रोमांच, स्वरभंग, कंप, विवर्णता, अश्रुपात व मृत्यु हे आठ सात्त्विक भाव मानलेले आहेत.

अष्टांग अर्घ्य उदक, दूध, कुशाग्रें, दही, अक्षता, तिल, यव, आणि पांढऱ्या मोहऱ्या, या वस्तू एकत्र करून पूजाविधींत दिलें जाणारें अर्घ्य.

अष्टांग योग योगाचीं आठ अंगें पुढील प्रमाणे –(१) यम (२) नियम (३) आसन (४) प्राणायाम (५) प्रत्याहार (६) धारणा (७) ध्यान व (८) समाधि. [पातं. यो. सू. २. २९]

अष्टादशवाद्यम् तमिळनाडमधील मंदिरांत उत्सवादि प्रसंगीं १८ वाद्यें वाजवितात.

अष्टादशांगुळ बांसरीच्या वर्गांतिलें एक वाद्य. यांत मुखाजवळच्या छिद्रापासून शेवटच्या छिद्रापर्यंत १८ बोटांचें अंतर असतें. १ ते ७ हीं छिद्रें बोटांनीं बंद करून ही बांसरी वाजविल्यावर मंद्र षड्ज निघतो. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

अष्टादंष्ट्र वैरूप सूक्तद्रष्टा. ‘जेव्हा उषादेवी सूर्याशीं संलग्न असते, तेव्हा त्याचे अनेक वर्णांचे किरण अद्भुत शोभा धारण करतात,’ असें हा म्हणतो (ऋ. १०.१११). हा सृष्टिचमत्कार ध्रुवप्रदेशांतला असावा. हा ऋटि सामद्रष्टाहि आहे (पं. ब्रा. ८.९.२१).

अष्टाधिकार महाराष्ट्राच्या समाजरचनेंत पुढील आठ अधिकार मानलेले आहेत – (१) कोळीपणा (२) पाटिलकी (३) देशमुखी (४) कुळकरण (५) वर्तकी (६) पौरोहित्य (७) उपाधिक अथवा भटपणा व (८) जोशीपणा. हींच आठ खातीं पूर्वींच्या काळीं जलाधिकार, स्थलाधिकार, ग्रामाधिकार, कुललेखन, ब्रह्मासन, दंडविधिनियोग, पौरोहित्य व ज्योतिष या नांवांनी ओळखलीं जात. [सु. वि. को.]

अष्टाध्यायी पाणिनिविरचित व्याकरणावरचा सूत्ररूप ग्रंथ. वेदाच्या सहा अंगांत याची गणना आहे. यांत ३९८१ सूत्रें असून आरंभीं वर्णसमाम्नायाचीं १४ प्रत्याहारसूत्रें आहेत. हीं प्रत्याहारसूत्रें शिवाच्या डमरूंतून निघालीं, अशी जनश्रुति आहे. हा ग्रंथ एक हजार अनुष्टुभ् श्लोकांच्या बरोबरीने भरतो. महाभाष्यांत अष्टाध्यायीला सर्ववेदपरिषद्शास्त्र म्हटलें आहे. सर्व वैदिक संहिता व त्यांचीं प्रातिशाख्यें यांचा पाणिनीने समादर केला आहे. अष्टाध्यायींत शाकटायन, शाकल्य, आपिशलि, गार्ग्य, गालव, शौनक, स्फोटायन, भारद्वाज काश्यप, व चाक्रवर्मण या वैयाकरण पूर्वाचार्यांचा उल्लेख केला आहे.

अष्टाध्यायींत आठ अध्याय असून प्रत्येकाचे चार पाद आहेत. प्रत्येक अध्यायांत व पादांत सूत्रांची समान वांटणी झालेली नाही. पाणिनीच्या सूत्रांचे पांच प्रकार आहेत. संज्ञा, परिभाषा, विधि, नियम, व अतिदेश.

पहिल्या व दुसऱ्या अध्यायांत संज्ञा व परिभाषा यांच्या-

विषयीं सूत्रें आहेत. त्यांत क्रियेसाठी आत्मनेपद, परस्मैपद व संज्ञांच्या साठी विभक्ति व समास हे विषय आले आहेत. तीन ते पांच या अध्यायांत कृदन्त, तद्धित या प्रत्ययांचें निरूपण आहे. सहाव्या अध्यायांत द्वित्व, संप्रसारण, संधि, स्वर, आगम, लोप, दीर्घ, इ. विषयांवरचीं सूत्रें आहेत. सातव्या अध्यायांत 'अंगाधिकार' प्रकरण आहे. त्यांत प्रत्ययामुळे मूळ शब्दांत व मूळ शब्दामुळे प्रत्ययांत होणाऱ्या परिवर्तनांचें विवरण आहे. आणि आठव्या अध्यायांत द्वित्व, प्लुत, णत्व, षत्व यांचे नियम दिले आहेत. पाणिनीची सूत्ररचना योजनाबद्ध आहे. तिच्यांत कुठेहि गौरवदोष नाही. एकदा सूत्र रचल्यानंतर पाणिनि त्यांत पुन्हा फिरवाफिरव करीत नाही, असें पतंजलि सांगतो (म. भाष्य. १ पृ. १६).

याव्यतिरिक्त वर्ण्य विषयाशीं संबद्ध अशीं गणपाठ व धातुपाठ नामक दोन प्रकरणें असून तींहि पाणिनीकृतच मानलीं गेलीं आहेत. अष्टाध्यायींत वैदिक संस्कृत व तत्कालीन शिष्ट भाषेंतलें संस्कृत यांचा सर्वांगपूर्ण विचार केलेला आहे. पाणिनीने तत्कालीन संस्कृत भाषेचें फार चांगलें सर्वेक्षण केलेलें आहे. अष्टाध्यायीच्या रचनेपूर्वी भारतांत शब्दविद्येचा अनेकांगी विकास झालेला होता. पण अष्टाध्यायीसारखा बंदिस्त व सर्वांगपरिपूर्ण ग्रंथ निर्माण झाल्यावर त्या पूर्वींचे ग्रंथ लोप पावले. अष्टाध्यायीचेंच आसेतुहिमाचल अध्ययन होऊं लागलें व तिलाच प्रामाण्य लाभलें. अष्टाध्यायीपुढे फक्त यास्काचें निरुक्तच तेवढें टिकलें. कारण त्याचें ध्येय वैदिक अर्थांचें विवरण करणें हें होतें.

पाणिनीच्या अष्टाध्यायीचें निराळ्याहि एका दृष्टीने महत्त्व आहे. निरुक्ताप्रमाणेच तोहि ग्रंथ एककर्तृक आहे. अष्टाध्यायींत कांहीं फेरफार झाले असतील, तर ते अगदीच मामुली. बर्नेल म्हणतो, की अडीच हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालानंतरहि अष्टाध्यायीचा पाठ जितका शुद्ध व प्रामाणिक मिळतो, तितका दुसऱ्या कोणत्याहि संस्कृत ग्रंथाचा मिळत नाही.

पाणिनीच्या रचनेचें सर्वांत आगळें वैशिष्टच हें, की त्याने धातूंपासून शब्दनिर्वचनाच्या पद्धतीचा अंगीकार केला. त्याने लोकप्रचलित सर्व धातूंचा संग्रह 'धातुपाठां'त केला आहे. भारतांतल्या आर्य भाषा व बोली यांच्या तौलनिक अध्ययनासाठी हा धातुपाठ अत्यंत मौलिक आहे. युरोपीय पंडितांना जेव्हा अष्टाध्यायीचा परिचय झाला, तेव्हा त्यांच्या मनावर पाणिनीची विलक्षण छाप पडली. वेबरने तर अष्टाध्यायीला जगांतल्या सर्व व्याकरणग्रंथांत श्रेष्ठ मानलें आहे. पाणिनीचीं सूत्रें अत्यंत संक्षिप्त आहेत. त्यांना स्वल्पाक्षर बनविण्यासाठी पाणिनीने ज्या प्रत्याहारादि युक्त्या योजल्या आहेत, त्या त्याच्या बुद्धीची सूक्ष्मता प्रकट करतात. पाणिनीने अष्टाध्यायी रचून संस्कृत भाषेला अमर पदवी दिली. त्याने संस्कृत भाषेच्या सर्व अंगांवर प्रकाश टाकला. संस्कृत भाषेचा जिथवर विस्तार आहे, तिथवर पाणिनीच्या व्याकरणाला प्रामाण्य आहे.

अष्टाध्यायीच्या निर्मितीपासूनच अर्थव्याख्येला मदत करणारी अशी एक वृत्ति तिच्या जोडीने होती. पतंजलीने अष्टाध्यायीला वृत्तिसूत्र असें नांव दिलें आहे, तें त्यासाठीच. आणखीहि कांही वृत्ती होत्या, त्यांतली 'काशिकावृत्ति' आजमितीस उपलब्ध आहे. त्यानंतर सुमारे दोनशें वर्षांनी कात्यायनाने अष्टाध्यायीच्या सूत्रांची बहुमुखी समीक्षा करणारीं चार हजार वार्तिकें सूत्रशैलींतच निर्माण केलीं. पुढे पतंजलीने त्यांच्या आधारावरच आपलें व्याकरणमहाभाष्य रचलें. पाणिनीच्या सूत्रांचे अर्थ, उदाहरणें व प्रक्रिया या तीन्ही दृष्टींनी महाभाष्य हा ग्रंथ सर्वोपरि आहे. **पाहा** – पाणिनि. [पा. भा.; हिं. वि. को.]

अष्टाह्निक पर्व व्रत जैन पूजापर्व. आषाढ, कार्तिक व फाल्गुन या तीन महिन्यांत तीन वेळां याची प्राप्ति होते. याचा काल शुद्ध ८ मीपासून पूर्णिमेपर्यंत असतो. अनेक प्रकारें हें व्रत केलें जात असलें, तरी त्यांतले तीन विधी मुख्य आहेत– (१) सप्तमीच्या दिवशीं एकाशन. (२) अष्टमी ते पूर्णिमा उपवास. व (३) 'ॐ ऱ्हीं नंदीश्वरसंज्ञाय नमः' या मंत्राचा जप. या आठ दिवसांत जिनमंदिरांत पंचमेरूची स्थापना करून त्यावर नंदीश्वरप्रतिमा बसवितात व तिची पूजाअर्चा करतात. म्हणून याला 'नंदीश्वर पर्व' असेंहि म्हणतात. याची कथा अशी ––

अयोध्येंत कुबेरमित्र नांवाचा एक श्रेष्ठी होता. श्रीवर्म, जयवर्म व जयकीर्ति असे त्याला तीन पुत्र होते. त्यांनी हें व्रत केलें व इहलोकीं राज्यादि वैभव भोगून अंतीं ते मोक्षाला गेले. [जै. व्र. वि. सं.]

अष्टापद एक जैनतीर्थ. निश्चित स्थान सांगतां येत नसलें, तरी विविधतीर्थकल्प या ग्रंथावरून तें कैलासावर असावें, असें वाटतें. अनेक मुनींना व ऋषभाच्या पुत्रांना इथे मोक्षप्राप्ति झाली.

अष्टाक्षरी मंत्र 'ॐ नमो नारायणाय' हा अष्टाक्षरी वैष्णव मंत्र होय. याचा ऋषि नारायण, देवता विष्णु व गायत्री हा छंद आहे. याचा उपदेश गुरूकडून घ्यायचा असतो. हा मंत्र मोक्षदायक आहे. [पद्म पु. उ. खं. २२६]

अष्टिकुरिस्सि (अष्टि = अस्थि = हाड) दक्षिणेंतल्या नायरांची एक पोटजात. हे नंपूतिरि ब्राह्मणांच्या प्रेतदहनाच्या वेळीं मदत करतात व अस्थीहि गोळा करायला उपयोगी पडतात.

अष्टोत्तरशतलिंग शाळुंकेवर बसविलेल्या उभ्या भागाला रुद्रभाग म्हणतात. त्यावर उभ्या व आडव्या रेषा कोरून १०८ चौकोन केल्यास त्याला अष्टोत्तरशतलिंग समजतात. याचप्रमाणे सहस्रलिंगाबद्दलहि समजावें, [डि. हिं. इ.]

असंग (काल – भिक्षु जगदीश काश्यप यांच्या मतें दुसरें शतक व पं. राहुल सांकृत्यायन यांच्या मतें इ. स. ३५०). भारतीय बौद्ध दर्शनाला अंतिम विकासाप्रत पोंचविण्यासाठी पहिला फार मोठा प्रयत्न असंग व वसुबंधु या दोन पेशावरी बंधूंनी केला. असंग हा थोरला बंधु होय. याने योगाचारभूमि, उत्तरतंत्र, इ. ग्रंथ लिहून विज्ञानवादाचें समर्थन केलें. वसुबंधूने अभिधर्मकोश हा विज्ञानवादावरचा मोठा ग्रंथ लिहून आपल्या मोठ्या बंधूच्या दार्शनिक विचारांना सुव्यवस्थित रूप दिलें. वसुबंधूचा आणखी एक ग्रंथ म्हणजे वादविधान हा होय. या ग्रंथाने तो मध्यकालीन न्यायदर्शनाचा जनक ठरला. असंगाचा जन्म पेशावर येथे एका ब्राह्मण कुलांत झाला. याहून त्याच्या चरित्राविषयीं अधिक माहिती उपलब्ध होत नाही. हा विज्ञानवाद्यांचा प्रमुख आचार्य होता. विज्ञानवाद हा असंगाच्या पूर्वीहि अस्तित्वांत होता. लंकावतारसूत्र, संधिनिर्मोचनसूत्र, इ. महायानी सूत्रग्रंथांत त्याचें दिग्दर्शन झालेलें होतें. पण त्या वादाला बौद्ध दर्शनांत सुप्रतिष्ठित केलें तें असंगाने. विज्ञानवाद हा विज्ञानालाच परमार्थतत्त्व मानतो. पांच इंद्रियांचीं पांच विज्ञानें आणि मनाचें विज्ञान हें सहावें विज्ञान, यांव्यतिरिक्त या वादांत एक सातवें आलयविज्ञान मानलेलें आहे. आलयविज्ञान म्हणजे एक समुद्र आहे. समुद्रावर जसे तरंग उत्पन्न होतात व नष्ट होतात, त्याचप्रमाणे आलयविज्ञानाच्या सागरांत विश्वांतल्या साऱ्या जड-चेतन वस्तू उत्पन्न आणि विलीन होतात.

असंगाने महायानोत्तरतंत्र, सूत्रालंकार, बोधिसत्त्वपिटकाववाद, वस्तुसंग्रहणी व योगाचारभूमि, असे पांच ग्रंथ लिहिले आहेत. यांपैकी योगाचारभूमि हा त्याचा महत्त्वाचा ग्रंथ आहे. हा वस्तुतः विज्ञानवादी तत्त्वज्ञानाचाच ग्रंथ आहे; पण या ग्रंथांतल्या योगाचार या नांवावरून त्याच्या संप्रदायाला योगाचार हें नांव मिळालें. विज्ञानभूमि, मनोभूमि, सवितर्कसविचारभूमि, इ. या ग्रंथाच्या १७ भूमी (प्रकरणें) आहेत. योगाचाराचे सिद्धान्त शंकराचार्यांच्या वेदान्त तत्त्वज्ञानाशीं बरेचसे जुळते आहेत. म्हणूनच शंकराचार्यांना प्रच्छन्न बौद्ध म्हटलें गेलें.

वसुबंधु हा प्रथम सर्वास्तिवादी होता; पण पुढे असंगाच्या बौद्धिक प्रभावामुळे तोहि योगाचारसंप्रदायांत दाखल झाला. असंगाच्या योगाचारभूमीचे तिबेटी व चिनी भाषांत अनुवाद झाले आहेत. असंग हा न्यायदर्शनांतलाहि मोठा पंडित होता. **पाहा** – वसुबंधु, [द. दि.; पु. त. नि.; हिं. वि. को.]

असत् (न + सत् = सताचें विरोधी.) 'सत्तावद्भिन्नम्' = ज्याला सत्ता आहे त्याच्याहून भिन्न. 'नामरूपाभ्यामव्याकृतं कारणात्मना स्थितं सूक्ष्मरूपमव्यक्तम्' = नामरूपांनी व्याकृत न झालेलें व कारणरूपाने असलेलें सूक्ष्मरूप अव्यक्त म्हणजे असत् होय. (वेदान्तीमत). 'अकिञ्चित्करम् अभावादिकम् = जें कांही करूं शकत नाही, असें अभावादिक तें असत् (बौद्ध). जग उत्पन्न होण्यापूर्वीं प्रथम असत् होतें. पुढे त्यापासून सत् निर्माण झालें. अव्यक्त होतें तें व्यक्त झालें व त्याने आपल्या आवडीचें रूप धारण केलें (तै. उ. २.७). पण असत्सारख्या अभावात्मक कल्पनेपासून जगाची उत्पत्ति झाली, हें ज्यांना मान्य नव्हतें, त्यांनीं असत्‌चा अर्थ अभावसदृश अमूर्त वस्तु असा लावला. असत्‌ची अज्ञेयात्मक कल्पना ऋग्वेदाच्या नासदीय सूक्तांत प्रथम दिसते (ऋ. १०. १२९). प्रा. रानडे यांनी असत्‌चा अर्थ 'नामरूपात्मक सत्‌शीं विरोधी; पण सत्‌शीं समानधर्मी असलेलें' असा केला आहे. **पाहा** – सत्. [उ. र.]

असमिया – भाषा व साहित्य क्षेत्रफळाच्या दृष्टीने आधुनिक आसामचा प्रदेश सुमारें ८५ हजार वर्ग – मैल इतका विस्तृत आहे. याच्यांत पहाडी भागहि मोठा आहे आणि तो राज्याच्या चारी अंगांना पसरला आहे. ब्रह्मपुत्रा नदीच्या पर्वतराजींतल्या सहा जिल्ह्यांत असमिया भाषा मुख्यत्वें बोलली जाते. सुरमाची पहाडी आणि त्याच्या आजूबाजूचा डोंगराळ विभाग यांत मातृभाषा या नात्याने असमिया बोलणाऱ्यांची संख्या फारच थोडी आहे. इ. स. १९५१ च्या जनगणनेप्रमाणे आसामच्या ९० लाख लोकांपैकी ३९।। लाख लोक असमिया भाषा बोलणारे, १० लाख लोक घरगुती व्यवहाराव्यतिरिक्त बाहेरच्या व्यवहारांत ती बोलणारे आणि १३।। लाख लोक आपल्या जनजातीची भाषा बोलत असले, तरी अन्य भाषिकांकडे असमिया भाषेंत बोलणारे आहेत.


वर्तमान असमिया लिपि देवनागरीचेंच एक वेगळें रूप

आहे. हिचें सर्वांत प्राचीन स्वरूप भास्करवर्म्याच्या इ. स. ६१० च्या ताम्रपटांत पाहायला मिळतें. तेव्हापासून या लिपीचा सतत विकास होत आला आहे. प्राचीन हस्तलिखित ग्रंथांची लिपि आणि आधुनिक लिपि या दोहोंत थोडें अंतर दिसतें. वस्तुतः मैथिली, बंगाली आणि असमिया त्या तीनहि लिपींचें उगमस्थान एकच आहे. आधुनिक असमिया लिपि मैथिली लिपीला अधिक जवळची आहे. र आणि व या दोन वर्णांत बंगाली लिपीशीं तिचा भेद दिसतो. व हा वर्ण बंगाली लिपींत नाही.

असमिया भाषा, तिची वर्णमाला आणि लिपि यांच्या विकासांत आर्यभाषांचा पूर्णतया सहयोग असला, तरी असमिया भाषा आपल्या उगमस्थानांतल्या दुसऱ्या भाषांचे शब्द आणि ध्वनि यांच्या प्रभावापासून मुक्त राहूं शकलेली नाही. म्हणूनच अन्य भारतीय भाषांच्या वर्णोच्चारांपेक्षा असमिया वर्णोच्चार भिन्न आहेत. असमियाचे सर्व ध्वनि कोमल आहेत. द्वित्व झालेले वर्णसुद्धा कठोर उच्चारले जात नाहीत. मूर्धन्य आणि दन्त्य वर्ण, लिखित रूपांत वेगळे दिसत असले, तरी त्यांच्या उच्चारांत फरक होत नाही.

असमियाची जडणघडणहि अन्य भारतीय भाषांपेक्षा थोडी वेगळी आहे. एखाद्या वस्तूचा गुण विशेषरूपानें सांगायचा, तर तद्दर्शक शब्दांचें द्वित्व करण्याची प्रवृत्ति या भाषेंत आहे. ही प्रवृत्ति द्रविड, कोल आणि खासी या भाषांतून आणि मलय या तीन भाषा आग्नेय लोकांच्या भाषा मानल्या जातात. असमिया भाषेंत ज्या शब्दांना व रूपांना देशज मानतात, त्यांतले बहुतेक शब्द आग्नेय भाषांतून आलेले आहेत. जननेंद्रिय विषयक बोलाचालींतले शब्द, जवळच्या कौटुंबिक नात्याविषयीं प्रयुक्त होणारे शब्द, पशूंचीं नांवें, इ. अनेक बाबींतले शब्द आग्नेय भाषांतूनच घेतलेले आहेत. स्थलनामांच्या बाबतींतहि अशीच गोष्ट आहे. उदा०— कामाख्या, प्राग्ज्योतिष, हीं नांवें मूलतः आग्नेयच आहेत. का + मै + खा, प्राग् + जु + थिस हीं त्यांचीं मूलरूपें होत. ग्रामनामांच्या अंतीं येणारीं ता आणि तूल हीं अक्षरें आग्नेय प्रभावामुळेच आलेलीं आहेत. उदा० — कामता, धर्मतूल इत्यादि. असमियाच्या शब्दप्रक्रियेवर प्रभाव टाकणाऱ्या बोंडो आणि आहोम या दोन मुख्य भाषा होत. बोंडो भाषिकांनी आणि आहोम लोकांनी भिन्न भिन्न काळीं आसामवर राज्य केलें होतें, तो त्याचा परिणाम आहे.

असें असलें तरी असमिया भाषेवर वरील अनार्य भाषांपेक्षा आर्य भाषांचा प्रभावच व्यापक आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. डॉ. काकती यांच्या मताप्रमाणे असमिया ही आर्य भाषांचें स्वरूप घेऊन विकसित झाली, याचीं दोन महत्त्वपूर्ण कारणें आहेत— (१) भारताला दूरपूर्वेत जाण्यासाठी आसाममधूनच रस्ता होता आणि त्यामुळे आर्यभाषी लोकांशीं आसामचा संबंध व संपर्क निरंतर येत राहिला. (२) तेराव्या शतकांत असमिया भाषेंत



असमिया लिपि—भारतीय व्यवहार कोशावरून

आली आहे. अनार्य भाषांप्रमाणे शब्दाच्या दुसऱ्या अक्षरावर जोर देणें हेंहि असमियाचें एक वैशिष्ट्य आहे. संबंधवाचक शब्दांना व्यक्तिवाचक प्रत्यय लावून कौटुंबिक नातीं दाखविलीं जातात. पुरुषभेदानें प्रत्ययभेदहि होतो. खासी, कोलारी साहित्यनिर्मिति सुरू झाली, आणि त्यामुळे व्यवहाराची भाषा स्थिर होऊन तिचें आर्यभाषांशीं नातें दृढ झालें आणि यामुळेच आग्नेय भाषांतून सतत येणारा शब्दांचा ओघहि कुंठित झाला.

असमियाची शब्दावलि मुख्यत्वें संस्कृतच आहे. त्या

शब्दांचीं रूपेंहि संस्कृत व्याकरणावरच आधारित आहेत. व्यवहारांत संस्कृत तत्सम शब्दांचा वापर कमी होतो. त्यांच्या स्थानीं बहुतांशीं अर्धतत्सम किंवा तद्भव शब्द घेतले जातात. उदा० सत्य, श्लोक, स्वाद, इ. शब्दांसाठी ग्रामीण भागांत सइत, सोलोक, सोवाद, असे शब्द प्रयुक्त होतात. असमिया भाषेच्या कांही शब्दांशीं सादृश्य असलेले शब्द मराठी आणि गुजराती भाषांतहि आढळतात. असमियाची वाक्यरचना आर्यभाषांप्रमाणेच आहे. तिच्यांतहि कर्ता, कर्म आणि क्रियापद असाच क्रम असतो. व्याकरण संस्कृतला अनुसरणारें आहे. संधि, समास, यांत स्थानपरत्वें थोडाबहुत फरक होतो एवढेंच.

असमियाच्या लिखित साहित्याचे पांच कालखंड कल्पितां येतात – (१) प्राग्वैष्णव काल – इ. स. १२०० ते १४४९ (२) वैष्णव काल – इ. स. १४४९ ते १६५० (३) गद्य बुरुंजीकाल – इ. स. १६५० ते १९२६ (४) आधुनिक काल– इ. स. १९२६ ते १९४७ व (५) स्वातंत्र्योत्तरकाल–इ. स. १९४७ नंतर.

असमिया भाषेंत ग्रंथलेखनास नेमका केव्हा प्रारंभ झाला, तें अजून निश्चित झालेलें नाही. कारण जुन्या हस्तलिखितांचें संशोधन अद्यापि व्हायचें आहे. आसाममध्ये सरकारी दफ्तरखाना असा कधी नव्हताच. तिथल्या राजांनी तो कधी ठेवला नाही आणि ठेवला असल्यास तो राजकीय उलथापालथींत नष्ट झाला असण्याचीहि शक्यता आहे. पण असें असून देखील कौटिल्याचें अर्थशास्त्र, भासाचीं नाटकें आणि राजा भोजाचें समरांगण यांचीं हस्तलिखितें जशीं आजवर प्रकाशांत आलीं, त्याप्रमाणेच एखादा संशोधक आसामी साहित्यांतील जुनीं हस्तलिखितेंहि प्रकाशांत आणील, अशी आशा धरायला हरकत नाही.

असमिया भाषेंतील प्राचीन ग्रंथ आज उपलब्ध नसले, तरी आसामी लोक बुद्धिमान्, प्रगल्भ विचारांचे आणि सत्याच्या प्रचारासाठी सर्व बाजूंनी प्रयत्न करणारे होते. आसामांत पूर्वी मोठमोठे पंडित होऊन गेले. तिथल्या राजांनीहि त्यांची कदर केली. युआन च्वांगच्या वृत्तांतावरून आणि जुन्या ताम्रपटांवरून प्राचीनकाळचे राजे पंडितांना आणि कवींना कशा प्रकारें आश्रय देत असत, त्याची कल्पना येते. आसामी पंडितांच्या वाङ्मयीन प्रतिभेचा आविष्कार जुन्या ताम्रपटांतहि पाहायला सांपडतो. हे ताम्रपट संस्कृत भाषेंत आणि नादमधुर शैलींत लिहिलेले आढळतात. त्यांचे कांही नमुने पुढीलप्रमाणे–

राजा भास्करवर्मा याच्या दिग्विजयाची प्रशंसा निधापूर ताम्रपटांत आली आहे, ती अशी – 'ज्याप्रमाणे सूर्याचें (भास्कर) प्रतिबिंब जलपूर्ण अशा अनेक पात्रांत एकाच वेळीं दिसतें, त्याप्रमाणे भास्करवर्मा राजाच्या पराक्रमामुळे त्याची मूर्ति प्रत्येक मांडलिकाच्या अंतरंगांत (सर्वांना) दिसूं लागली'. रत्नपाल राजाची राजधानी दुर्जयनगरी ही आदर्श राजधानी होती, असें त्या राजाच्या ताम्रपटांत पुढीलप्रमाणे म्हटलेलें आहे – 'दुर्जय नगरीची तटबंदी काक पक्ष्यांच्या कुंपणासारखी बलाढ्य आहे. ती पाहून गुर्जरनृप संत्रस्त व्हावा, गोंडराजांच्या वनगजांना ज्वरबाधा व्हावी, दक्षिणाधिपति अस्वस्थ व्हावा आणि त्या तटबंदीसमोर कोणत्याहि शत्रूचा पराभव व्हावा. या राजधानींत निस्तेजपणा आढळूं शकेल; पण तो इथल्या प्रजेंत नव्हे तर हारांत. चंचलपणा दिसेल; पण तो माकडांत; चलबिचल दिसेल; पण ती भ्रुकुटींच्या वक्रतेंत इ. इ.'

या शिलालेखांवरून आसाममधील तत्कालीन संस्कृताचें बाणभट्टी वळण कळून येऊं शकतें. भास्करवर्म्याच्या काळांत विपुल ग्रंथ निर्माण झाले असण्याची शक्यता आहे. भास्करवर्म्यानें कनोजच्या सम्राट् हर्षवर्धनाला अनेक सुंदर ग्रंथ भेट म्हणून दिल्याची माहिती मिळते. त्या ग्रंथांत सुभाषितांचाहि एक संग्रह होता.

आसामी लोक संगीताचे भोक्ते असून त्या प्रांतांत अनेक संगीतज्ञ होऊन गेले, अशी माहिती शिलालेखांवरून मिळते. आसामी लोकगीतांचा ठेवा फार मोठा आहे. तीं आजहि लोकप्रिय आहेत. असमिया भाषेच्या प्राचीन काळांत तीं अशिक्षित शाहिरांनी रचलेलीं आहेत. विवाह, वसंतोत्सव आणि देवतांचें कोपशमन, इ. प्रसंगीं तीं गायिलीं जातात. बियानाम, बिहुनाम, अलिनाम, आणि देशबिचरारनाम या नांवांनी तीं प्रसिद्ध आहेत. राजे आणि राजकुमार यांच्यावरहि लोकगीतें आहेत. त्यांचे पडसाद बौद्ध साहित्यांतहि पडलेले आहेत. एका गीतांत फुलकुंवर या राजपुत्राची प्रेमकथा निवेदिली आहे. त्या राजपुत्राची प्रेयसी आपल्या आईला धमकी देते, की माझें प्रेम जर सफळ झालें नाही, तर मी तुझी सवत व्हायलाहि कमी करणार नाही. ही कल्पना जगावेगळी आणि घृणास्पद आहे; पण ती पालि साहित्यांतील भिक्षुणी उत्पलवर्णा हिच्याविषयींच्या गाण्यांतहि आढळते.

असमिया भाषेंत साहित्यनिर्मिति होण्यापूर्वी त्या देशांत डाक नांवाचा एक तत्त्वज्ञ होऊन गेला. त्याच्या वचनांना आजहि वेदवाक्यांइतकी मान्यता आहे. हीं वचनें 'डाकारवचन वेदारवाणी' या नांवाने प्रसिद्ध आहेत. बंगाल आणि बिहार या प्रदेशांतहि डाकचीं वचनें प्रचलित आहेत. डाक हा कामरूप जिल्ह्यांतील लेहीडांगर या गांवचा रहिवासी होता. त्याच्या कांही वचनांचें बौद्ध साहित्याशीं आश्चर्यजनक साम्य आहे. डाकने प्रसववेदनांवर कांही उपचार सांगितले आहेत, तेच महाउन्मार्गजातकांतहि पाहायला मिळतात. डाक हा धर्मनिष्ठ

होता. त्याने दान-धर्माचा उपदेश केला आहे. मंदिरें बांधावीं, झाडें लावावीं, असेंहि तो सांगतो. पुरुषांना आकर्षित करण्यासाठी तिथल्या स्त्रिया ज्या मार्गाचा अवलंब करतात, त्यांचें वर्णन डाकने केलें आहे. आजहि कामरूप हा भाग वशीकरण व जादूटोणा यांचा भाग म्हणून ओळखला जातो. आसामी स्त्रियांच्या अंगीं पुरुषांना कोकरें बनविण्याची अलौकिक शक्ति असल्याच्या कथा भारतांत सर्वत्र आहेत. आजहि आसामांत मंत्रतंत्र बऱ्याच प्रमाणांत आहे. या मंत्रांची भाषा पराकाष्ठेची आर्ष असून त्यांतल्या कल्पना गूढ आहेत. हे मंत्र म्हणजे आसामी साहित्याची नांदीच म्हटलें तरी चालेल. तांत्रिक बौद्धांनी आठव्या ते बाराव्या शतकाच्या दरम्यान लिहिलेला एक कवितांचा आणि सूत्रांचा संग्रह पंडित हरप्रसादशास्त्री यांना नेपाळमध्ये सांपडला. त्याचें नांव चर्यापाद असें आहे. त्यांतले कांही दोहे कामरूपांत निर्माण झाले असावे, असा तर्क आहे.

साहित्य या अर्थाने आसामी साहित्याचा प्रारंभ होतो, तो तेराव्या शतकांत. त्याच सुमारास कामरूपमधील हिंदुराज्याचा नाश होऊन कामतापूर येथे कामता या नव्या राज्याचा उदय झाला. त्याचा विस्तार करतोया नदीपासून बार नदीपर्यंत होता. त्यांत रंगपूर, कुचबिहार, गोलपाडा आणि कामरुप या जिल्ह्यांचा समावेश होता. पूर्व आसामच्या कांही प्रदेशावर आहोम राजांची सत्ता प्रस्थापित झाली होती. कामता हें नवें राज्य असलें, तरी त्याच्याकडे जुन्या कामरूप राज्याचा वारसा होता. त्यामुळे तिथल्या कवींनी आणि पंडितांनी त्या राज्याचा आश्रय घेतला. हेमसरस्वती आणि हरिहरविप्र हे दोघे त्या काळांतले प्रसिद्ध कवि होत. हेमसरस्वतीने प्रल्हादचरित्र हें काव्य लिहिलें आहे. याशिवाय या कालांतील आणखी तीन काव्यें म्हणजे लव-कुशारयुद्ध, बभ्रुवाहनयुद्ध व जयद्रथवध हीं होत. हे चार ग्रंथ प्राचीन असमिया काव्याचे नमुने होत.

प्राग्वैष्णव कालांतला सर्वांत मोठा कवि माधव कंदली हा आहे. महामाणिक्य राजाच्या आश्रयाखाली याने असमिया भाषेंत रामायण रचलें. याच्या काव्यांत असमिया भाषा स्वतःच्या प्राकृतिक रूपांत प्रकट झाली. तिच्यावरचें संस्कृतचें दडपण कमी झालें. त्याच्या रामायणाच्या सहा सर्गांपैकी फक्त पांचच उपलब्ध आहेत. त्याच काळांत गीतिकाव्य लिहिणारे बरेच कवि होऊन गेले. दुर्गावर, पीतांबर, मनकर, इ. त्यांचीं नांवें आहेत. दुर्गावराने लौकिक गेय छंदांत रामायण रचलें. पीतांबराने उषापरिणय आणि मनकराने बेवुला लखिन्दर हीं प्रणयकाव्यें लिहिलीं.

यापुढचा काल वैष्णव काल म्हणून ओळखला जातो. हेमसरस्वती, माधव कंदली, इ. कवींनी आपल्या काव्यांतून भक्तीचा प्रचार केला आणि वैष्णव कालांतल्या भक्ति–आंदोलनाची भूमिका तयार करून ठेवली. वरील कवींची भक्ति ही निःसंशय वैष्णव भक्तिच होती. मात्र तिला एखाद्या चळवळीचें स्वरूप आलें नव्हतें. कारण त्या काळांत शाक्त लोक व आहोम आणि कोच राजे हे भक्तिसंप्रदायाच्या वाढीला अडथळे निर्माण करीत होते. पुढे ही परिस्थिति बदलली. कोच राजे वैष्णव झाले आणि आहोम राजांमध्ये सहिष्णुता निर्माण झाली.

या कालखंडांतला प्रख्यात कवि आणि महापुरुष शंकरदेव हा होय. असमिया साहित्याचा तो केवळ नवनिर्माताच नव्हे, तर संपूर्ण आसामी जीवनाला नवें वळण लावणारा, असा तो महाभाग होता. साहित्य, समाज, संस्कार, धर्म, कला, संगीत आणि सामाजिक संघटन या सर्वांनाच त्याने नवजीवन दिलें आणि नवी दिशाहि दाखविली. त्याने आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या माधव कंदलीला अप्रमादी कवि म्हणून आपली आदरांजलि वाहिली आहे. त्याची विनयशीलता एवढी, की पूर्वसूरींना तो ऐरावत म्हणतो व स्वतःला मशक म्हणवून घेतो. याने भागवती धर्माची मुहूर्तमेढ रोवली आणि भागवत पुराणाचा अनुवाद केला. शंकरदेवाची प्रधान रचना कीर्तनघोषा ही आहे. तिच्यांत भागवत आणि अन्य पुराणें यांतून भक्तिपूर्ण आख्यानांची निवड करून त्याने त्यांचा अनुवाद केला आहे. या ग्रंथाच्या रचनेबाबत कांही विद्वान् म्हणतात, की एका ठिकाणीं बसून शंकरदेवाने ग्रंथरचना केली नसून वेळोवेळीं त्याने जीं गीतें रचलीं, त्यांचा संग्रह या कीर्तनघोषेंत केलेला आहे. या ग्रंथांत एकूण दोन हजार दोनशे एकसष्ट पदें आहेत.

माधवदेवाने या कीर्तनघोषेंत आपलीहि सहस्रघोषा या नांवाचीं पद्यें सम्मीलित केलीं आणि पुढे गुरुशिष्यांनी मिळून बनविलेला हा गीतग्रंथ संयुक्त कीर्तनघोषा या नांवाने असमिया वैष्णवांचा पवित्र ग्रंथ बनला. आसाममधले अशिक्षित खेडूतहि यांतलीं पदें प्रेमाने गातात.

भक्तिप्रदीप हा ग्रथ शंकरदेवाने आपल्या धर्माचा सिद्धान्तग्रंथ म्हणून लिहिला. याशिवाय निमिनवसिद्ध, रुक्मिणीहरण, गुणमाला, लीलामाला, इ. ग्रंथहि त्याने लिहिले. भक्तिरत्नाकर हा त्याचा संस्कृत ग्रंथ आहे. माधव कंदलीचें हरवलेलें उत्तरकांड याने स्वतः रचून त्याला जोडलें.

शंकरदेवापासून असमिया कवितेला नवा बहर आला. शंकरदेवाच्या शिष्यांनीहि असमिया भाषेची बहुमोल सेवा केली. या कालांतलें बहुतेक काव्य विष्णु आणि त्याचे विविध अवतार यांच्या वर्णनाचें आहे.

शंकरदेव हा असमिया भाषेचा पहिला नाटककारसुद्धा

आहे. त्याच्या नाटकांना अंकिया नाट म्हणतात. कारण तीं सर्व नाटकें एकांकीच आहेत. या नाटकांत विष्णूची श्रेष्ठता दाखविलेली आहे. रामविजय, कालीदमन, पारिजातहरण, रुक्मिणीहरण, पत्नीप्रसाद हीं त्याच्या नाट्यकृतींतलीं महनीय रत्नें आहेत. या अंकिया नाटकांत जो पद्यभाग असतो, त्याला 'बड (वर) गीत' म्हणतात. हीं गीतें ब्रजबुलि भाषेंत आहेत. शंकरदेवाच्या वैष्णव पथाला खूप लोकप्रियता मिळाली व त्याचा प्रसारहि पुष्कळ झाला. त्यामुळे असमिया साहित्याच्या निर्मितींत मोठीच भर पडली. महाकाव्यें, पुराणें आणि इतर अभिजात संस्कृत साहित्य असमिया भाषेंत अनुवादित झालें. नाट्यरचनाहि पुष्कळच झाली. धार्मिक समारंभाच्या प्रसंगीं व नामवंत पाहुण्यांच्या स्वागतार्थ त्यांचे प्रयोगहि होऊं लागले. कुचविहारचा राजा नरनारायण (१५४० – १५८१) याने दरबारी पंडितांची एक सभा भरवून त्यांना व्याकरण, खगोल, गणित, महाकाव्यें, पुराणें, इ. संस्कृत ग्रंथांचीं असमिया भाषेंत भाषांतरें करण्यास प्रोत्साहन दिलें.

रामसरस्वती हा तत्कालीन कवि म्हणतो, की 'राजा नरनारायण याने मला महाभारताचें असमिया भाषेंत भाषांतर करण्याची आज्ञा दिली व माझें कार्य निराबाध चालावें म्हणून द्रव्य, ग्रथ आणि नोकरचाकर या सर्व गोष्टी माझ्या दिमतीला आणून उभ्या केल्या.' रामसरस्वतीची कल्पनाशक्ति प्रखर होती. मूळ महाभारतांत नसलेलीं कित्येक आख्यानें त्याने आपल्या अनुवादांत भरलीं आहेत. याशिवाय त्याने कित्येक वधकाव्येंहि लिहिलीं आहेत. आपल्या भीमचरित्रांत त्याने आसाममधलें ग्रामजीवन विनोदपूर्ण पद्धतीने चित्रित केलें आहे.

सतराव्या शतकाच्या मध्यापासून पूर्व आसाममधील आहोम राजांकडून कवि आणि पंडित यांना वाढता राजाश्रय मिळूं लागला. इ. स. १६९६ ते १७६९ या कालखंडांत झालेल्या सर्व आहोम राजांनी अनेक कविपंडितांच्या करवीं असमिया भाषेची अभिवृद्धि केली. कविराज चक्रवर्ती हा त्या काळांतला सर्वश्रेष्ठ कवि होय. त्याने ब्रह्मवैवर्त पुराण, गीतगोविंद व शाकुंतल यांचें असमिया भाषेत भाषांतर केलें. माधव-सुलोचना नांवाचें एक प्रणयकाव्यहि त्याने लिहिलें. राजा रुद्रसिंग व त्याचा पुत्र शिवसिंग हे दोघेहि चांगले कवि होते. राजेश्वर सिंग हा त्याच कुळांतला राजपुत्र चांगला लेखक होता. त्याने कीचकवध नांवाचें नाटक लिहिलें आहे. त्याचा पुत्र चारुसिंग. चारुसिंगाची पत्नी प्रेमदा सुंदरी. या दंपतीच्या मनोविनोदासाठी कविशेखर भट्टाचार्य या कवीने कामशास्त्रावर हरिवंश नांवाचा ग्रंथ रचला (इ. स. १७५१ – १७६९). आहोम राज्यांतला एक अधिकारी खरगरिया फू याने कलिकपुराणाचें रूपांतर केलें. याच कालांत वैष्णव सत्रांमधून अनेक भक्त कवींनी असंख्य प्रार्थनागीतें रचलीं. श्रीरामवर यदुमणि, अनिरुद्ध भुइयाँ, पुरुषोत्तमदास ठाकूर, इ. अनेक भक्तकवि त्या कालांत चमकले. या कविसमुदायांत कांही स्त्रियाहि होत्या.

शंकरदेवाच्या नंतर दुसरा तितक्याच तोलामोलाचा कवि माधवदेव हा झाला. तो संस्कृत भाषेचा पंडित, गायक आणि नाटककारहि होता. शंकरदेवाच्या नंतर भागवती धर्माचा यानेच मोठ्या निष्ठेने प्रचार केला. माधवदेवाची महत्त्वपूर्ण रचना नामघोषा ही आहे. हा ग्रंथ अध्यात्मपर आहे. याच्या काळांतला दुसरा कवि अनंत कंदली हा होय. याने कुमरहरण काव्य व सीतालपतालप्रवेश हें नाटक लिहिलें. श्रीधर कंदली नांवाच्या दुसऱ्या एका कवीने श्रीकृष्णाच्या बालजीवनांतील घटनांशीं संबंधित असलेलें कानखोवा नांवाचें मनोरंजक काव्य लिहिलें. हें काव्य अत्यंत लोकप्रिय झालें. आसामी स्त्रिया आपल्या मुलांना झोपवितांना ओवीसारखा त्याचा उपयोग करूं लागल्या. या कवीची विनोदशक्ति धुनुचा या काव्यांत प्रस्फुटित झाली असून तें आख्यानहि आता 'कीर्तन' संग्रहांतच समाविष्ट केलें गेलें आहे. श्रीकृष्णाने इंद्रद्युम्नाची कन्या धुनुचा हिचें पाणिग्रहण केलें ती कथा या काव्यांत आहे.

शंकरदेवाने असमिया गद्याची बैठक मांडली हें खरें; पण त्याला स्पष्ट आणि स्थायीरूप भट्टदेवाने दिलें. हा कवि सोळाव्या शतकांत होऊन गेला. याने भागवतपुराण आणि गीता यांचा असमिया गद्यांत अनुवाद केला. इ. स. १५९७ सालीं त्याने आपला भागवतानुवाद पुरा केला.

१६ व्या शतकाच्या अखेरीस असमिया भाषेंत वैष्णव भक्तांचीं जीवनचरित्रें लिहिण्याला प्रारंभ झाला. यांतलीं बहुतेक चरित्रें पद्यमय असून सविस्तर लिहिलेलीं आहेत. माधवदेवाचा पुतण्या रामचरण ठाकूर आणि त्याचा पुत्र दैत्यारि ठाकूर या दोघांनीहि चरित्रें लिहिलीं आहेत. या कालखंडांत आसाममध्ये संस्कृत भाषा उत्कर्षबिंदूवर होती. या काळांत संस्कृत भाषेंतल्या कांही ग्रंथांचें संकलन झाले व कांही संस्कृत नाटकेंहि अनुवादित झालीं.

यानंतर गद्य बुरुंजी यांचा काल खंड येतो. या कालापर्यंत आसाममध्ये वैष्णव धर्माचा सर्वत्र प्रसार झाला होता. समाजाच्या अंतःकरणांत त्याचीं पाळेंमुळें रुजलीं होतीं. राजपरिवारांतहि त्याच्याविषयीं आदर वाढला होता. त्यामुळे अन्य सांप्रदायिक आंदोलनें शिथिल आणि प्रभावशून्य झालीं. या काळांत धार्मिक साहित्याबरोबरच धर्मनिरपेक्ष अशा साहित्याचीहि रचना होऊं लागली. या धर्मनिरपेक्ष साहित्यांत गद्य बुरुंजीला महत्त्वाचें स्थान आहे. बुरुंजी हा टाई भाषेंतला शब्द

आहे. याचा अर्थ अज्ञात कथांचें भांडार किंवा इतिहास असा होतो. आसाम हे एक स्वतंत्र राज्य होतें. परकीय आक्रमण व अंतर्गत शैथिल्य या दोन्ही बाबतींत त्याला सदैव सावध राहणें आवश्यक होतें. त्यांतूनच या इतिहासलेखनाला प्रारंभ झाला. आहोम राजांनी सर्वप्रथम ही परंपरा सुरू केली. हें काम राजपुरोहित करीत असे. सुरवातीला आहोमांच्या टाई भाषेतच हा इतिहास लिहिला जाई. पण पुढे आहोम राजे आसामी जनतेशीं समरस झाले. आणि त्यांनी असमिया भाषेचाहि स्वीकार केला, तेव्हापासून बुरुंजीलेखन असमिया भाषेंत होऊं लागलें त्यानंतर हें कार्य पुरोहितांच्या हातांतून सुटून दफ्तरखान्यावरच्या अधिकाऱ्यांच्या हातीं आलें. बुरुंजीमध्ये बोलभाषेला विशेष स्थान मिळालें. बुरुंजी साहित्य इतिहासाशीं प्रामाणिक राहून लिहिलें गेल्यामुळें त्यांतल्या माहितीवरून आसामच्या व त्या द्वारें भारताच्या इतिहासावरहि चांगलाच प्रकाश पडतो. लोकांची आर्थिक स्थिति, त्यांच्या चालीरीती व एकंदर समाजजीवन याविषयींहि त्यावरून चांगली माहिती मिळते. भारतांतल्या अन्य भाषांच्या साहित्यांत अशा स्वरूपाचें वाङमय आढळत नाही. बुरुंजी साहित्याव्यतिरिक्त या काळांत राजवंशांच्या वंशावळीहि लिहिल्या गेल्या. त्यांत सूर्यखरी बलदेव याची दरराज वंशावली व रतिकांत द्विज याची राजवंशावली या दोन वंशावली मुख्य आहेत. आहोम नरेशांची वीरगाथा या बुरुंजी वाङ्मयांतच पाहायला मिळते. सेनापति, सामंत व परदेशांत पाठविलेले राजदूत यानी राजाला दिलेले अहवाल, न्यायनिवाडयाचे कागदपत्र व राजसभेची दिनचर्या, हें सर्व लिखाण बुरुंजी साहित्यांतच समाविष्ट आहे आधुनिक असमिया गद्य या बुरुंजी साहित्यांतूनच उत्क्रांत झालेलें आहे. युद्धकला, किल्ले व राजवाडे यांची बांधणी, हत्ती, घोडे वगैरेंचे आजार, या विषयांमध्ये या कालांत प्रबंधरचना झाली. राज्याची अभिवृद्धि संरक्षण व कार्यक्षमता या दृष्टींनी अशा प्रकारच्या प्रबंधांची आवश्यकता होतीच. कला, दर्शन, ज्योतिष, गणित, आयुर्वेद, इ. विषयांवरहि या कालांत नामांकित ग्रंथ रचले गेले आहेत.

बुरुंजीनंतर असमिया साहित्याचा आधुनिक काल येतो. तिथून पुढे १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंतचा काल आसाममध्ये निष्क्रियतेचा गेला. वैष्णव पंथाचा प्रभाव ओसरूं लागला आणि ज्ञानलालसाहि मंद झाली. राजकीय परिस्थितिहि या गोष्टीला पुष्कळ अंशीं कारणीभूत होती. अंतर्गत हेवेदावे, ब्रह्मी लोकांच्या स्वाऱ्या व अफूबाजी या गोष्टींमुळे आसामी जनतेच्या सामाजिक व राजकीय जीवनाची घडी पार विस्कटून गेली. १८५४ सालीं ब्रिटिशांनी आसाम पादाक्रांत केला व कांही अंशीं राजकीय व सामाजिक स्थैर्य प्रस्थापित केलें.

त्यानंतर इथे नवविचारांचा प्रादुर्भाव झाला. रेव्हरंड नाथान ब्राऊन व ओ. टी. कोट्टर हे अमेरिकन मिशनरी याच सुमारास आसाममध्ये आले. त्यांनी आपल्याबरोबर एक छापखानाहि आणला. ख्रिस्ताचा संदेश जनतेच्या भाषेंत सर्वत्र पोंचविण्यासाठी ते असमिया भाषा शिकले. १८४६ सालीं अमेरिकन बाप्टिस्ट मिशनने शिवसागर येथे अरुणोदय नांवाचें मासिक सुरू केलें. त्यांतून साहित्य, इतिहास, विज्ञान, धर्म, इ. विषयांवर लेख प्रसिद्ध होऊं लागले. अशा रीतीने असमिया भाषेच्या या आधुनिक कालखंडाची सुरुवात या मिशनऱ्यांनीच केली, असें म्हणायला हरकत नाही. त्यांच्या द्वारेंच आसामी लोकांना पाश्चात्य कल्पना व ज्ञानविज्ञान यांचा परिचय झाला. या मिशनऱ्यांनी असमिया भाषेंत कित्येक इंग्रज़ी ग्रंथांची भाषांतरेंहि केलीं. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी शालेय पुस्तकेंहि तयार केलीं.

हळूहळू आसाममधील सुशिक्षित वर्ग जागृत झाला. पारतंत्र्यामुळे आपली व आपल्या प्रांताची सर्व प्रकारें दुर्दशा होत आहे, हें त्यांच्या ध्यानीं आलें. भारतांत राष्ट्रीय जागृतीचा तो काल होता. याच वेळीं आनंदराम धेकीयाल फुकन या नांवाचा एक बुद्धिमान् तरुण पुढे आला. तो राजा राममोहन राय यांचा समकालीन होता. त्याने आपल्या लेखनांतून लोकांना आळस झाडून राष्ट्रकार्यासाठी झटण्याचें आवाहन केलें. फुकनकडून ज्या नव्या लेखकांना प्रेरणा मिळाली, त्यांत कमलाकांत भट्टाचार्य हे गृहस्थ होते. त्यांनी कविता आणि निबंध यांच्या द्वारें लोकजागृतीचें कार्य सुरू केलें. भट्टाचार्य आणि त्यांच्या बरोबरीचे अन्य लेखक यांनी आधुनिक असमिया साहित्याच्या मंदिराचा पाया घातला व हेमचंद्र बरुआ आणि गुणाभिराम बरुआ या लेखकांनी त्या पायावर मंदिराची इमारत उभी केली. हेमचंद्र बरुआ यांनी अफूच्या दुष्परिणामावर कनियारकीर्तन नांवाचें एक सुंदर नाटक लिहिलें. त्याने इ. स. १९०० मध्ये असमिया भाषेचा शब्दकोश आणि व्याकरणहि तयार केलें. लक्ष्मीनाथ बेझ बरुआ हा ग्रंथकार हेमचंद्रांच्या गंभीर विडंबनात्मक शैलीचा पालव धरून पुढे आला. त्याची परंपरा गुणाभिराम बरुआ, सत्यनाथ बोरा, दंडिनाथ, लक्ष्मीनाथ, इ. लेखकांनी यशस्वी रीत्या पुढे चालविली. विशेषतः लक्ष्मीनाथ बेझ बरुआ यांनी तर असमिया विनोदी साहित्यावर कळसच चढविला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत येईतों असमिया गद्याला योग्य तो परिपक्वपणा प्राप्त झाला. काव्यप्रांतांत मात्र विशेषशी प्रगति झाली नाही. सुरवातीचा काळ तर निव्वळ

अनुकरणाचाच होता. प्रारंभीचे आसामी कवि मुख्यत्वें इंग्रजी व बंगाली कवितेचें अनुकरण करीत होते. १९ व्या शतकाच्या शेवटच्या पंचविशींत रमाकांत चौधरी व भोलानाथ दास यांनी अनुक्रमे अभिमन्युवध व सीताहरण हीं दोन खंडकाव्यें रचलीं.

त्यानंतर चंद्रकुमार अगरवाल, लक्ष्मीनाथ बेझ बरुआ व हेमचंद्र गोस्वामी या तीन साहित्यिक मित्रांनी कलकता शहरांत विद्यार्जन करीत असतां १८८९ सालीं 'जोनाकी' मासिक सुरू केलें. या मासिकानें इंग्लंडमधील अद्भुतरम्यता-वादाच्या चळवळीचा (Romantic Movement) पुरस्कार केला. निसर्गाविषयीं गूढ सहानुभूति आणि प्रेम हा त्यांच्या अद्भुतरम्यतेचा पाया होता. या लेखकांनी कविता, निबंध, लघुकथा, कादंबरी, नाटक हे ललित साहित्याचे सर्व प्रकार हाताळले. बेझ बरुआ हे या काळांतील अष्टपैलू लेखक होत. त्यांनी कित्येक साहित्यप्रकार असमिया भाषेंत आणले. त्यांचें 'ओमार अपनार देस' हें गीत आसामी राष्ट्रगीत म्हणून ओळखलें जातें. त्यांच्या 'बर्गी अरुवीन' या देशभक्तिपर काव्याइतकें श्रेष्ठ काव्य त्या भाषेंत निर्माण झालें नाही, असें म्हणतात.

हेमचंद्र गोस्वामी यांनी कांही उत्कृष्ट सुनीतें लिहिलीं. पण काव्यलेखनापेक्षा त्यांचें ऐतिहासिक संशोधन महत्त्वाचें आहे. त्यांनी आसामची वैभवशाली राजकीय परंपरा आपल्या गद्यांतून जगाच्या निदर्शनास आणली. चंद्रकुमार अगरवाल हे असमियाचे प्रथम श्रेणीचे भावकवि होत. त्यांच्या कवितेंत राष्ट्रवाद व विश्वबंधुत्व यांचा समन्वय दिसतो. पद्मनाथ गोहाई, बरुआ व रजनीकांत बराली हे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरचे प्रथितयश कादंबरीकार होत. श्री. बार्डोलाय यांच्या कादंबऱ्या आसामी लोकांच्या पराक्रमावर व वैष्णव पंथाच्या गुणदोषांवर आधारलेल्या आहेत. बेझ बरुआनंतर शरच्चंद्र गोस्वामी यांनी लघुकथेंत नांव कमावलें. रघुनाथ चौधरी हे नामवंत कवि झाले. त्यांच्यानंतर काव्य क्षेत्रांत आंबिका गिरिराय चौधरी यांचें नांव सुप्रसिद्ध आहे. स्वातंत्र्य आंदोलनांत भाग घेतल्याबद्दल त्यांना कारावास भोगावा लागला. तिथेहि त्यांनी अनेक प्रक्षोभक कविता लिहिल्या. त्यांची शैली नाजूक नसून घणाघाती आहे. ते एका कवितेंत म्हणतात––

"माझें गाणें हास्य किंवा मौज निर्माण करणारें नाही, की ज्याच्या श्रवणाने थकलेल्या अवयवांना विश्रांति लाभावी. माझें गाणें म्हणजे अग्निवीणेवरचा टोला आहे. मृत व जिवंत यांचा सांधा जुळविणारें तें आहे."

२० व्या शतकांतील असमिया कविता व्यक्तिनिष्ठ बनली. हितेश्वर बरुआ, देवकांत बरुआ, जतींद्रनाथ हे २० व्या शतकांतले आघाडीवरचे कवि होत. त्यांच्यावर इंग्रजी काव्याचा प्रभाव पडला असला, तरी त्यामुळे त्यांचें व्यक्तिवैशिष्टय नष्ट झालेलें नाही. रवींद्रनाथ ठाकुरांचें अनुकरणहि असमिया काव्यांत झालेलें दिसेल. असमिया काव्याचा आत्मा हा निरागस व मनमोकळा असल्याने बंगाली काव्याची सजावट आणि त्याच्या कल्पनांची गूढता त्याला मानवत नाही. कथा-कादंबरीच्या क्षेत्रांत देवचंद्र तालुकदार व दंडिनाथ कलिता या दोन लेखकांची कामगिरी प्रशंसनीय आहे. या दोन्ही लेखकांनी रजनीकांत बार्डोलाय यांच्यापेक्षा जरा खोल जाऊन स्त्री-पुरुष संबंधाचें अधिक संशोधन करण्याचा प्रयत्न केला. युद्धपूर्व कालांत असमिया भाषेंत कथाकादंबऱ्यांची विपुल निर्मिति झाली. बीना बरुआ यांची जीवनारबातांत ही सुप्रसिद्ध कादंबरी याच काळांतली आहे.

बेझ बरुआ यांनी असमिया निबंधाचा पाया घातला. त्यांतूनच पुढे राजकीय निबंध जन्मास आला. निबंधलेखनांत हिलाराम डेका, सोनाराम चौधरी, सूर्यकुमार भुईजा, वेणुधर शर्मा हे प्रख्यात निबंधकार होत. या सर्वांत वाणीकांत काकती हे अग्रगण्य समजले जातात. हे सुविख्यात टीकाकारहि आहेत. दुसऱ्या महायुद्धांत विशेषत: १९४२ च्या राष्ट्रीय आंदोलनापासून आसामी जनतेच्या विचारांना समाजवादी वळण लागलें. लेखकांच्या दृष्टिकोनांत बदल झाला. मार्क्सवादी विचारांच्या परिचयाने राष्ट्रीयता आणि दलितांच्या दुःखाबद्दल संवेदना या गोष्टींत तीव्रता राहिली नाही. आजच्या तरुण कवींवर युरोपांतल्या प्रतीकवादी कवींचा प्रभाव पडलेला आहे. त्यांच्या प्रतिमा नव्या आणि वेगळ्या झाल्या आहेत. कथा-कादंबरीहि पुष्कळच बदलली आहे. वास्तववादी व्यक्तिचित्रण व अनिर्बंध निवेदन हे आजच्या कथा-कादंबरीचे विशेष आहेत. लेखकांचें बौद्धिक क्षितिज विशेषतः तरुण कलावंतांचा जीवनविषयक दृष्टिकोन अधिक विशाल असून आर्थिक प्रश्नावर त्यांचें लक्ष केंद्रित झालें आहे. मनोविश्लेषण व संज्ञाप्रवाह हीं नवीं तंत्रें मान्यता पावलीं आहेत. [बरुआ; काकती. ठसा – भारतीय व्यवहार कोशावरून.]

असमिया रंगभूमि आसाममध्ये नाट्यप्रयोगाला भावोना म्हणतात. नटाला भावोरिया व विदूषकाला बाहुआ म्हणतात. भावोरियांचे खेळ आसाममध्ये पुरातन काळापासून चालत आले आहेत. तिथल्या सामाजिक जीवनांतील घटनांना नाट्यरूप देणें हें त्यांचें काम होय.

भावोरिया शीघ्रकवि असतो. तो कुठल्याहि खेळांत समयस्फूर्त गाणीं म्हणतो. या खेळांतलीं बाहुआदि विनोदी पात्रें प्रेक्षकांना हसविण्यासाठी असतात. धुलिया हें एका विशिष्ट प्रकारच्या खेळाचें नांव. यांत अभिनयाला प्राधान्य असतें. ओझापाली हें आसाममधील नाटकाचें प्राचीन रूप होय. ओझा हें त्यांतील प्रमुख पात्र. हा माणूस पौराणिक कथा संवादरूपाने सांगतो. त्या संवादांत दयनापाली हा ओझाबरोबर भाग घेतो. सर्व पालींत तो प्रमुख असतो. पाली म्हणजे खेळ करणारीं पात्रें. नाचणें आणि गाणें हें काम त्यांच्याकडे असतें. हीं नृत्यें नाटय-शास्त्राच्या नियमानुसार बसविलेलीं असतात. या नृत्यनाटच पद्धतीने रामायण-महाभारतांतील कथा रंगभूमीवर आणतात. बेहुला आणि लोकिंदर ही कथाहि लोकप्रिय आहे. देवधानी हें ओझापालींतील मूक स्त्री-पात्र बेहुलाची भूमिका वठवितें व मनसादेवीच्या प्रसन्नतेसाठीं नृत्य करतें.

आसाममध्ये वैष्णव संप्रदायाचा प्रसार झाल्यानंतर ओझा-पालींत भागवत पुराणांतल्या कथांचा अंतर्भाव होऊं लागला. आसामी नाटचसृष्टींत वैष्णव विषयांचा अंतर्भाव करण्याचें श्रेय आसामचा महान् संत शंकरदेव याजकडे जातें. तो नृत्य व संगीत या दोन्ही कलांचा प्रणेता होता. त्याच्या कालांतच आसाममध्ये खऱ्या अर्थानें नाटकाची उभारणी झाली. शंकरदेव व त्याचा शिष्य माधवदेव या दोघांनी मिळून बारा एकांकी नाटकें लिहिलीं, त्यांना अंकिया नाट असें म्हणतात. हीं नाटकें संस्कृत नाटकांच्या धर्तीवर लिहिलेलीं असलीं, तरी त्यांचें तंत्र निराळें होतें. संगीत, नृत्य आणि छंद यांना त्यांत प्राधान्य होतें. वैष्णव पंथाच्या प्रसारांचें एक प्रमुख साधन म्हणून या अंकिया नाटांचा उपयोग करण्यांत आला. त्यांच्या द्वारें त्यांनी कृष्णचरित्र जनतेच्या हृदयांत बिंबविलें.

अंकिया नाटांचे जत्रा आणि झमूरा असे दोन भेद आहेत. पूर्वीं राजेलोक यात्रेला जात त्या वेळीं त्यांच्या मनोरंजनासाठी व एखाद्या महोत्सवांत मूर्तीची मिरवणूक काढतांना केल्या जाणाऱ्या प्रहसनांना यात्रा म्हणतात. शंकरदेवाचें अशा प्रकारचें चिन्हयात्रा हें पहिलें नाटक आहे. झमूरा हीं छोटीं नाटकें असून त्यांत नांदी नसते. सर्व कथाभाग पद्यांत असतो. नाटकांतील सामान्य पात्रांना कारीता व मुख्य पात्रांना नाटुआ म्हणतात. गाणाऱ्यांना गायन म्हणतात आणि वादकांना बायन म्हणतात. नाटकाचें अनुसंधान सूत्रधार करतो. कांही पौराणिक नाटकांत बकासुर, कालियनाग, इ. पात्रें प्रचंड मुखवटे धारण करतात. नाटकांत ब्रजबुली भाषेचा वापर केलेला असतो.

अंकिया नाटकांतला प्रमुख विषय म्हणजे कृष्णभक्ति. वस्तुतः युद्ध, स्नान, वस्त्रपरिधान, भोजन, कामचेष्टा, असले प्रसंग संस्कृत नाटकांत वर्ज्य असूनहि लोकांना आकर्षण वाटावें म्हणून अंकिया नाटकांत ते दाखविले जात. नाटकांतल्या गाण्यांना अंकियागीतें व भातीया म्हणतात. अंकिया गीतें प्रत्यक्ष नाटचाशीं संबधित असतात; तर भातीया प्रार्थनेचीं व नमनाचीं पदें असतात. तीं खोल आणि झांज या वाद्यांच्या साथीवर म्हटलीं जातात. नाटचगृहाला रभा म्हणतात. रभा म्हणजे समुदाय एकत्र जमण्याचें ठिकाण. आसामांत स्थायी नाटचगृहें नाहीत. उत्सवांतल्या नाटकासाठी नामघर किंवा कीर्तनघर अशा ठिकाणीं, दिवाणखान्यांत किंवा बाहेर मंडप घालून तिथे रंगभूमि बनवितात. रंगभूमीच्या एका बाजूला एक पोथी ठेवतात. तिला थापना असें म्हणतात. तिच्यावरच नाटक सुरू करण्यापूर्वी कृष्णाची पूजा करतात. दुसऱ्या बाजूला दोहारची म्हणजे वाद्यवृंदाची जागा असते. नाटक रात्रभर चालतें. विशिष्ट पात्रांच्या प्रवेशाच्या वेळीं दारू उडवून आतषबाजी करतात. नाटकाच्या प्रसंगीं ढोल वाजवून धेमालीरवोष म्हणजे एक समूहगीत म्हटलें जातें. नंतर ढोलकीवाले वरधेमाली व देवधेमाली हे बोल वाजवितात व फेर धरून नाचतात. मग गुरूचें स्तवन होतें. त्याला गुरुघाट म्हणतात. नंतर सूत्रधार प्रवेशतो. तो प्रथम नृत्य करतो, कृष्ण आणि राम यांना आवाहन करतो व नंतर संस्कृत भाषेंतली नांदी गातो. नाटकाची अखेर मुक्तिमंगल व भट्टिमा या गाण्यांनी होते.

शंकरदेवाच्या अनुयायांनी त्याच्या नंतरहि अंकिया नाटांच्या मार्फतच वैष्णव पंथाचा प्रचार चालू ठेवला. हीं नाटकें बहुरंगी व समाजाच्या भावनेला आवाहन करणारीं असत. त्यांत अद्‌भुतरम्यता भरपूर असे. असमिया रंगभूमीची ही अवस्था प्रदीर्घ काल चालू राहिली. त्या काळीं नाटचसंस्थेला राजाश्रय मिळे; पण पुढे तो बंद झाला व त्यामुळे असमिया रंगभूमीची पीछेहाट झाली.

१६ व्या शतकाच्या अखेर लंबोदर बोरा यांनी रंगभूमीवर आणण्यासाठी शाकुंतलाला असमिया रूप दिलें. असमिया नाटचवाङमयांत कांही उत्कृष्ट पौराणिक नाटकें आहेत. श्री. दुर्गाप्रसाद दत्त यांचें वृषकेतु व श्री. पद्‌मनाभ बरुआ यांचें बंजारा हीं दोन नाटकें विशेष लोकप्रिय आहेत. श्री. बरुआ यांचें जयमती हें ऐतिहासिक नाटक देखील प्रभावी आहे. आहोम राजवंशांतील राजा गदापाणि याच्या राणीने आपल्या पतीसाठी केलेल्या असीम स्वार्थत्यागावर हें नाटक उभारलेलें आहे. या नाटकाने आसामी जनतेचीं अंतःकरणें हालवून सोडलीं आहेत. १९ व्या शतकांत लखीनाथ बेझ बरुआ यांनी अनेक नाटकें लिहिलीं. त्यांचीं लितिकाई व चिकारपति

निकारपति हीं नाटकें विनोदी आहेत. श्री. हेमचंद्र बरुआ यांनी सामाजिक दोषांवर मर्मप्रहार करणारीं अनेक नाटकें लिहिलीं आहेत. ज्योतिप्रसाद आगरवाल यांच्या सोनित-कुँवारी व करिगारलिगिर या दोन्ही नाटकांत नाचगाण्यांची रेलचेल आहे. श्री. प्रबिन फुकन हे आधुनिक नाटककार आहेत. मणिराम दिवाण व लचिन बोर फुकन या आसामी देश-भक्तांच्या जीवनावर आधारलेलीं त्यांचीं दोन नाटकें प्रसिद्ध आहेत. श्री. वेणुधर राजा खोवा व श्री. अतुल हजारीका या दोघांनी ग्रामीण जीवनावर बरींच नाटकें लिहिलीं आहेत.

आसाममध्ये अजूनहि धंदेवाईक नाटचसंस्था नाहीत. आतापर्यंत स्त्रियांना रंगभूमीवर उभें राहण्यास सक्त निर्बंध होता. अलिकडेच तुरळक स्त्रिया रंगभूमीवर प्रवेश करूं लागल्या आहेत. आसाममध्ये बहुधा हौशी नाटचसंस्थाच नाटचप्रयोग करतात.

असमिया लोकसाहित्य आसामचें लोकसाहित्य बरेंच जुनें आहे. तें परंपरेने आजवर चालत आलें आहे. आसामी साहित्याच्या प्राचीन युगाला गीतियुग म्हटलें जातें. धाइनाम, गरखीयानाम, बिहुनाम, फुलकुँवर, मणिकुँवर, पगला पार्वतीर गीत, टोकारीनाम, सुचरीनाम, आइनाम, इ. गीतें आसामी साहित्याच्या प्राचीन युगांत निर्माण झालीं आहेत.

इथला बिहु उत्सव कांही लोक मंगोल परंपरेंतून आला आहे, असें मानतात. यासारखेच उत्सव चीन व आग्नेय एशिया यांमध्ये प्रचलित आहेत. बिहु गीतांत कपौसारख्या चिनी फुलांचीं नांवें मिळतात. धाइनाम, गरखीयानाम, इ. गीतांतली भावना व अनुभूति अत्यंत सरळ आहे. लहान मुलांना खेळविणें-हसविणें या गोष्टींची मनोहर भंगिमा यांत पाहायला मिळते. नांवखेलवागीत, टोकरीगीत, बारहमासा, इ. सुंदर लोकगीतें असमिया भाषेत प्रसिद्ध आहेत. कित्येक लोकगीतें आसामच्या प्राचीन इतिहासाची ओळख करून देतात. फुलकुँवर, मणिकुँवर हीं गीतें या जातीचीं आहेत. या गीतांत विशेषेंकरून मातृ-भूमीसाठी आत्मबलिदान करणाऱ्या वीरांचें यशोगान असतें. [राजर्षि अभिनंदन ग्रंथ]

असहाय (काल इ. स. ७५० ते ११०० याच्या दरम्यान) हा मनुस्मृतीचा एक टीकाकार आहे. त्याचें नांव मेधातिथीबरोबर घेतलें जातें. याने गौतमधर्मसूत्र आणि नारद-स्मृति यांवरहि टीका लिहिल्या आहेत. असहायाचीं कांही मतें पुढीलप्रमाणे आहेत —

(१) अविवाहित बहिणीला स्वतःच्या विवाहाच्या तर-तुदीसाठी भावाकडून एकचतुर्थांश हिस्सा घेण्याचा हक्क आहे (याज्ञ. २. १२४ वरील मिता.). (२) ब्राह्मणाला जी शेतजमीन दान मिळालेली असते, तिच्यांतला वांटा त्याला क्षत्रियपत्नी-पासून झालेल्या पुत्राला मिळत नाही (याज्ञवल्क्य २. ११९ वरील मिता.). (३) निरपत्य ब्राह्मणाचें धन प्रथम गुरूला, तिथून पुढे गुरुपुत्राला, गुरूच्या विधवेला, शिष्याला, शिष्य-पुत्राला, शिष्याच्या विधवेला आणि यापैकी कोणी नसेल तर त्या ब्राह्मणाच्या गुरुबंधूला मिळते. **पाहा** — मेधातिथि. [हि. ध.]

असिक्नी पंजाबांतली एक नदी. ऋग्वेदांत गंगा-यमुनांच्या बरोबर हिचाहि उल्लेख आला आहे (ऋ. १०. ७५. ५). यास्काच्या मताप्रमाणे ही वर्तमान चेनाब नदी होय (निरुक्त ९. २६). हिच्या तीरावर अनेक रोगहर वनस्पती असल्याचें लिहिलें आहे (ऋ. ८. २८. २५). ग्रीक लोकांनी असेकिनेस या नांवाने हिला उल्लेखिलें आहे. हिलाच पुढे चंद्रभागा असें नांव पडलें. असिक्नी म्हणण्याचें कारण हिचें पाणी काळें दिसतें, हें होय. [वै. सा.; हि. ध.]

असिज असि = तलवार. तिच्यापासून उत्पन्न असा नरक. [वायु पु. १०१. १४९]

असित (१) हिमालयांत राहणारा एक ऋषि. याला पांच दिव्य शक्ती प्राप्त होत्या. लुंबिनी वनांत बोधि-सत्त्वाचा (गौतम बुद्ध) जन्म झाला आहे, हें याला दिव्य दृष्टीने समजलें. हा त्याला वंदन करण्यासाठी आकाशमार्गाने कपिलवस्तूंत आला, दर्शनाची इच्छा व्यक्त करतांच शुद्धो-दनाने त्याला म्हटलें की, ' राजकुमार झोपला आहे. ' तेव्हा हा म्हणाला, की ' असे महापुरुष फार वेळ कधीच झोपत नाहीत; किंबहुना ते सदैव जागृतच असतात. ' तें ऐकून शुद्धोदनाने त्याला आपल्या मुलाकडे नेलें. त्याच्या शरीरावरचीं बत्तीस लक्षणें पाहून हा म्हणाला. ' हा मुलगा एक तर चक्रवर्ती अथवा संन्यासी होईल. ' बोलतां बोलतां असिताच्या नेत्रांत पाणी आलें. राजाने त्याचें कारण विचारलें. त्यावर असित बोलला. ' माझ्या दुःखाचें कारण राजकुमाराविषयीं कांही अशुभाची शंका हें नव्हे; र हा मुलगा मोठेपणीं सर्व दुःखी जीवांना एका सत्यधर्माचा उपदेश करील, त्या वेळीं तो उपदेश ऐकायला मी जिवंत असणार नाही. ' [उ. प्र. बौ. वि.]

(२) एक पवित्र पर्वत. असित ऋषीचें निवासस्थान. श्राद्धयोग्य क्षेत्र. [पु. इं.]

असित काश्यप सूक्तद्रष्टा. याला देवल असेंहि म्हणतात. याचीं सर्व सूक्तें पवमान सोमाला उद्देशून आहेत (ऋ. ९. ५–२४). हा गोधनाचा प्रेमी दिसतो. याने सोमाला योजलेलीं उपमानें प्रामुख्याने गायी-बैलांचींच आहेत.

असितगिरि असितमुनींचें निवासस्थान. नेमका स्थल-निर्देश नाही. [ब्रह्मांड पु. ३. १३. ३९]

असित धान्वन वेदकालीन राजा. असुरविद्या हा याचा वेद होय. पारिप्लव आख्यानांत याचा उल्लेख आहे. [प्रा. च. को.]

असिता एक नदी. हिच्या तीरीं श्राद्ध करण्याबद्दल सांगितलें आहे (वायु पु. ७७). हें असित योगी याचें वास्तव्यस्थान होय. [हि. ध.]

असितोद इलावृतवर्षांतील एक सरोवर. [विष्णु पु. २. २. २६]

असिधारा व्रत (असि = खड्ग, धारा = धार). एक खडतर व्रत. आश्विन अथवा कार्तिक पौर्णिमेपासून पांच दिवस, दहा महिने, एक वर्ष किंवा बारा वर्षें अशा चढत्या क्रमाने या व्रताची कालमर्यादा आहे. पाण्यांत उभें राहून जप करणें, भर उन्हाळ्यांत पंचाग्निसाधन, भूमि-शयन, रात्रौ अन्नग्रहण, पत्नी शेजारीं असतांहि ब्रह्मचर्यपालन करणें, अशा उग्र व कठोर नेमधर्मांना असिधाराव्रत असें नांव दिलेलें आहे. हें व्रत तलवारीच्या धारेवरून चालण्याइतकें तीक्ष्ण व कठिण असल्यामुळे त्याला हें नांव पडलें आहे. या व्रताच्या भिन्न कालावधीप्रमाणे फलेंहि भिन्न भिन्न मिळतात. या व्रताच्या बारा वर्षांच्या अनुष्ठानाने जगावर स्वामित्व व अंतीं श्रीविष्णूशीं सरूपतामुक्ति लाभते (विष्णु ध. पु. ३. २१८). भरताने राज्यवैभवाचा त्याग करून, राम वनवासाहून परत येईपर्यंत जें त्याग-वैराग्यपूर्ण व्रत आचरिलें, त्याची तुलना कालिदासाने असिधाराव्रताशीं केली आहे –

पित्रा विसृष्टां मदपेक्षया यः
श्रियं युवाप्यङ्कगतामभोक्ता ।
इयन्ति वर्षाणि तया सहोग्र –
मभ्यस्यतीव व्रतमासिधारम् ।।

(रघु. १३. ६७)

अर्थ – तो भरत, पित्याने दिलेल्या व अगदी हातांत आलेल्या राज्यलक्ष्मीचा, तरुण असतांहि, केवळ माझ्यावरील भक्तीमुळे उपभोग घेता झाला नाही. यावरून तो तिच्या-बरोबर इतकीं वर्षें कठिण असें असिधाराव्रतच आचरीत आहेसें वाटतें.

या व्रताविषयीं आणखी एक संकेत आहे, तो असा – विशिष्ट कालासाठी ब्रह्मचर्य पालन करणाऱ्या पुरुषाने आपण व पत्नी या दोघांच्यामध्ये धार वर करून तरवार आडवी ठेवायची असते. त्यांत जरा हालचाल झाली तरी दुखापत होण्याची भीति असते. पत्नी शेजारीं असूनहि पुरुषाने स्वतःच्या मनाची चलबिचल होऊं न देणें व झाल्यास तिचा कठोर निग्रह करणें, हेंच या व्रतांतलें काठिण्य होय. [हि. ध.]

आसिपत्रवन असि = तलवार. तिच्यासारखीं धारदार पानें असलेलें वन. २८ नरकांपैकी एक नरक. वेदमार्गविरोधी व पाखंडी, तसेंच उंटांचा वध व व्यापार करणारे, प्राणिवध करणारे, अकारण वृक्ष तोडणारे व कर्म-भ्रष्ट लोक या नरकांत जातात. तिथे त्यांच्या शरीराची असिपत्रांनी खांडोळीं केलीं जातात. [भाग. पु. ५. २६. १५; वायु पु. ५६. ७९; विष्णु पु. २. ६. ३]

असी वाराणसी जवळची एक नदी. हिला शुष्क नदी असेंहि नांव आहे. असी आणि वरुणा हे दोन शब्द मिळून 'वाराणसी' शब्द बनला आहे. वाराणसीहून निघणारी पंचक्रोशीची यात्रा गंगा व असी यांच्या संगमावर एक दिवस मुक्काम करते. [हि. ध.]

असुर (१) न + सुर = असुर. देवांचे शत्रू. यांना आणखीहि नांवें आहेत –– 'असुरा दैत्य – दैतेय – दनुजेन्द्रारि-दानवाः' (अमर). हे प्रजापतीच्या मांडीपासून जन्म पावले. हे यज्ञधर्माचे विरोधी होते. यांचें निवासस्थान पृथ्वीच्या खाली (अधोलोक) आहे (भाग पु. ८. १. १७; ११. २४. १३.). यांनी पृथ्वीवर दहा युगें राज्य केलें. त्यांचीं देवांशीं बारा युद्धें झालीं. पुढे दैत्यगुरु शुक्र याने शाप दिल्यामुळे पृथ्वी दैत्यांच्या हातून देवांकडे गेली (ब्रह्मांड पु. ३. ७२. ६९. ९३; वायु पु. ९७. ६८–९३). हे बर्हिषद पितरांचें पूजन करतात. वामनावताराच्या वेळीं असुरांचें तेज नष्ट झालें. असुर हे रात्र व अंधकार यांचे प्रतिनिधि असून तमोव्याप्त आहेत (विष्णु पु. १. ५. ३१–३४).

तैत्तिरीय ब्राह्मणांत असुर शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे –

तेनासुना सुरानसृजत । तदसुराणामसुरत्वम् ।
(२. ३. ८. २)

अर्थ – (प्रजापतीने) त्या असूने म्हणजे प्राणाने त्यांना उत्पन्न केलें म्हणून ते असुर ठरले.

असुर शब्दाचा खरा अर्थ प्राणवान्, वीर्यवान्, पराक्रमी असा आहे.


दितीचे पुत्र ते दैत्य व दनूचे पुत्र ते दानव होत. या दोघांनाहि असुर अशी संज्ञा आहे.

देव आणि असुर हे दोघेहि प्रजापतीचे पुत्र असून त्या दोघांनाहि आपल्या पित्याचा दाय भाग प्राप्त झाला (श. ब्रा. १. ७. २. २२). प्रजापतीने दिवसां देवांना व रात्रीं असुरांना उत्पन्न केलें (ष. ब्रा. ४. १). देव हे प्रजापतीचे धाकटे पुत्र असून असुर हे थोरले पुत्र आहेत (श. ब्रा. १४. ४. १. १). ते सापत्न व भ्रातृव्य आहेत. (श. ब्रा. १३. ८. २. १). प्रजापतीने अपानांतून असुरांची उत्पत्ति केल्याच्या कथा ऐतरेय व शतपथ या ब्राह्मणांत आल्या आहेत. तै. आरण्यकांत प्रजापतीने जलबिंदूंतून असुरांची उत्पत्ति केली, असें म्हटलें आहे. विष्णु आणि वायु या पुराणांच्या मतें असुर हे ब्रह्मदेवाच्या मांडीच्या सांध्यांतून निर्माण झाले. प्रजापतीने असुरांना अंधकार आणि माया या वस्तु दिल्या म्हणून असुर हे मायेची उपासना करूं लागले व त्यांनी रात्रीचा आश्रय केला (श. ब्रा. २. ४. २. ५; ऐ. ब्रा. ४. ५).

असुर हा शब्द ऋग्वेदांत सुमारे १०५ वेळां आलेला असून त्यापैकी ९० ठिकाणीं त्याचा उपयोग देव या अर्थाने केलेला आहे. ऋग्वेदांत वरुणाला आणि इतर अनेक देवांना असुर म्हटलें आहे. ' त्वमग्ने रुद्रो असुरः... ' (तै. ब्रा. ३.११.२.१) या मंत्रांत अग्नीलाहि असुर म्हटलें आहे. यजुर्वेद व ब्राह्मण ग्रंथांच्या कालापासून असुर शब्दांचा देवशत्रु असा अर्थ रुढ झाला. आजमितीस असुर शब्द देवविरोधी याच अर्थाने रूढ आहे. ऋग्वेदाच्या अर्वाचीन भागांत व अथर्ववेदांत याच अर्थाने हा शब्द येतो. ब्राह्मण ग्रंथांत देवसुरांच्या युद्धांचें अनेक उल्लेख आलेले आहेत. असुर हे स्वतःला देवांच्या बरोबरीचे समजत. उघडपणे त्यांनी देवांशीं लढाया केलेल्या असून अनेकदा देवांवर विजयहि मिळविला आहे. देवांचें पौरोहित्य बृहस्पतीकडे असून असुरांचें पौरोहित्य भार्गव–शुक्राने स्वीकारले होतें.

असुर म्हणजे कोणते लोक, याविषयीं तीन चार मतें आहेत– असुर म्हणजे (१) प्राचीन सुमेरियन लोक. (२) प्राचीन असीरियन लोक. (३) मगध किंवा दक्षिण बिहारमधील लोक. व (४) प्राचीन इराणी अहुरमज़्दाचे अनुयायी.

भारतांत आर्यसंस्कृतीचा प्रवेश होण्यापूर्वी असुर, दैत्य, दानव व नाग असे अनेक नांवांचे व भिन्न भिन्न संस्कृतींचे समाज नांदत होते. हे लोक आर्यसंस्कृतीचे विरोधक होते. यावरून असुर हा भारतांतला आर्यपूर्व एक प्रबळ समाज होता, असें दिसतें (ए स्टडी इन एशंट इंडियन मटीरियॉलिझम्) या बाबत पुरावा असा – सायण म्हणतो, की ' मेरुपर्वतावर अमरावती नगरी असून तिथे देवांचें वास्तव्य आहे; तर मेरुपर्वताच्या खालच्या अंगास इरावती ही असुरांची नगरी आहे. ' सायणाचें हें विधान सत्य आहे. इरावती नदीच्या कांठीं जें उत्खनन झालें, त्यामध्ये एका प्राचीन नगराचे अवशेष मिळाले आहेत. या नगराचें नांव हराप्पा हें असून तें वैदिक ' हरियूपीया ' या शब्दाचा अपभ्रंश आहे. ऋग्वेदांत रुद्राला असुरघ्न म्हटलें आहे. इंद्राने वरशिख नांवाच्या असुरावर स्वारी करून त्याला व त्याच्या वंशजांना ठार मारलें, असें जें ऋग्वेदांत वर्णन येतें (ऋ. ६. २७) त्याचा संबंध हराप्पा या नगराशींच लागतो. त्यावरून सिंधुखोऱ्यांतील संस्कृतीचे जनक असुरच होत, हेंहि कळून येतें. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर या असुरांचीं राज्यें होतीं. गजरातमधलें भृगुकच्छ (भडोच) बलि या असुराची राजधानी होतें. बलि आणि वामन यांच्या मधला त्रिपाद भूमीचा प्रसंग भृगुकच्छ येथेच घडला, असें पुराणांत सांगितलें आहे.



असुर—खोर्साबाद भित्तिचित्र

प्राचीन असीरियाची राजधानी म्हणजे निनेव्हे हें शहर होय. त्या ठिकाणीं अलीकडेच उत्खनन झालें असून त्या उत्खननांत बाबिलोनी भाषांच्या क्युनिफोर्म या लिपींत विटांवर लिहिलेले बरेच ग्रंथ हातीं लागले आहेत. या लिखित विटांवरून असुरांविषयीं बरीच माहिती मिळूं शकते. युफ्रातिस आणि तैग्रीस या नद्यांच्या तीरीं राहणाऱ्या प्राचीन लोकांना ' सेमाइट ' म्हणत. असुर हे त्यांचेच वंशज होत, असा अनेक विद्वानांचा तर्क आहे. सुमेरियन लोक हे असुरांचे शेजारी होते.

सुमेरियनांच्या संपर्कानें असुरांच्या ठिकाणीं नागरिक सभ्यतेचा प्रादुर्भाव झाला. पुढे या सेमाइट लोकांनी इराकच्या मध्य-भागांत अकाड आणि उत्तरभागांत अस्सुर हीं नगरें स्थापिलीं. सनपूर्व २५०० च्या सुमारास अकाडवाल्यांनी सुमेरियनांना पादाक्रांत केलें. त्यानंतर बाबेलु नगराचा उदय झाला. यालाच ग्रीक लोक बाबिलोन म्हणूं लागले. बाबिलोनियाच्या एका सेमाइट राजानें इराकचे दक्षिण आणि मध्य हे दोन्ही भाग जिंकून एक साम्राज्य स्थापिलें. सुप्रसिद्ध बाबिलोनचें साम्राज्य तें हेंच होय. असुर हे कांहीं काल बाबिलोनच्या अंकित राहिले. सनपूर्व १८०० च्या सुमारास उत्तरेहून आर्यांच्या टोळ्या बाबिलोनियांत उतरल्या. त्यांना 'कश्शी' म्हणत. त्यांनी बाबिलोनचें साम्राज्य जिंकलें. सन पूर्व १३८० च्या सुमारास असुरांची ताकद विलक्षण वाढली. त्यांनी बाबिलोनिया जिंकून तिथें असुर साम्राज्याची स्थापना केली. सनपूर्व ७४६ ते ६२६ पर्यंत ज्या असुर सम्राटांनी असुर साम्राज्यावर सत्ता चालविली, त्यांत तिग्लथ, पिलेसर, शालमनेसर, सारगन, सेन्नचेरीब, अस्सुरबनिपाल हे सम्राट् प्रसिद्ध आहेत. त्यानंतर पारस देशाचे मीड आणि बाबिलोनचे लोक यांनी संघटित होऊन असुर सम्राज्यावर आक्रमण केलें. त्यांत निनेव्हे या राजधानीचें पतन झालें.

असुर राजांच्या नांवाला जोडून बल हा शब्द वारंवार येतो. त्याचें संस्कृत रूप बलि होऊं शकतें. उपलित नांवाचा जो असुर राजा दिसतो, तोच प्रल्हाद असावा. यानेच असुर साम्राज्य पुनश्च ऊर्जितावस्थेस आणलें. त्याचा पुत्र उलुश हा विरोचन व त्याचा पुत्र बलकुदर उसुर हाच पुराणांतला बलि-राजा असणें शक्य आहे. बलीचा पुत्र बाणासुर होय. त्याच्या राजधानीला पुराणांत शोणितपुर म्हटलें आहे. शोणितपुर म्हणजेच असुरराजधानी निनेव्हे होय. बायबलच्या जुन्या करारांत निनेव्हेला 'रक्ताचें नगर' असेंच म्हटलें आहे. कृष्णाच्या कालांत तिथे बाणासुर राज्य करीत होता. उषा ही बाणासुराची कन्या. तिचें अनिरुद्धावर मन जडलें आणि तिच्या सखीनें अनिरुद्धाला द्वारकेंतून शोणितपुरांत उचलून नेलें. नारदानें हें स्थान द्वारकेपासून ११००० योजनें दूर आहे असें म्हटलें आहे. कृष्णानें तिथपर्यंत जाऊन शोणितपुरावर स्वारी केली आणि बाणाचा पराभव करून उषा–अनिरुद्धांचा विवाह घडवून आणला.

श्री. डेबुर्ग हे असुरांच्या संबंधांत लिहितात– सर्व प्राचीन जमातींत असुर हे महाक्रूर व भयंकर होते. असुरांचा इतिहास म्हणजे युद्धें व आक्रमणें यांचा इतिहास होय. असुर आपल्या शत्रूंशीं सूडबुद्धीनें वागत.

डेबुर्गचें हें वर्णन पुराणांतल्या असुरवर्णनाशीं तंतोतंत जुळणारें आहे. या शोणितपुरांतच कार्तिकेयाचा जन्म झाल्याचें पुराणें सांगतात. कार्तिकेय हा अग्निपुत्र आहे. ज्या ठिकाणीं निनेव्हे हें असुरनगर वसलें होतें, त्याच्या आसपास भूगर्भांत तेल आणि वायू यांचे सांठे होते. ते जेव्हा बाहेर निघत तेव्हा चहूंबाजूंनी आग उत्पन्न होई. पुराणांत शोणितपुराला अनला-वरुद्ध म्हणजे आगीनें घेरलेलें असें म्हटलें आहे, त्याचें कारण हेंच असावें. कार्तिकेय हा सेनापति आहे. हाच कार्तिकेय निनेव्हे नगरांत युद्धदेव म्हणून पुजला जात होता. शुलमनु असें त्याचें नांव होतें. हा शुलमनुच दक्षिण भारतांत येऊन सुब्रह्मण्य झाला असावा.

बाबिलोनियामधूनच असुर लोक हळूहळू भारतांत आले असावे. आर्यांच्या आगोदर पश्चिमेकडून येऊन असुरांनी भारतांत वस्ती केली होती. येथील कोल, चंड, मुंड, इ. वन्य आदिवासींचें साहाय्य घेऊन व त्यांचें पुढारीपण करून त्यांनी आर्यांशीं झगडे केले. श्रीकृष्ण व पांडव यांच्या कालांत बकासुर, जरासंध, कंस, मयासुर, इ. अनेक असुर भारतांत आपापलीं राज्यें स्थापून बसल्याचें महाभारतावरून कळतें. यांपैकी कांहीं असुरांना पांडवांनी मारलें व कांहींना कृष्णानें मारलें. त्याच्याहि आधी पिप्रु, वृत्र, इ. असुरांना इंद्रानें ठार केल्याचे उल्लेख ऋग्वेदांत आहेत (ऋ. १०.१३८). पांडव-कालांत मगध, मथुरा, कच्छ इ. प्रदेशांत असुरांचीं राज्यें दृढमूल झालेलीं होतीं. शंखासुर, बाणासुर, जटासुर, तारका-सुर, जम्भासुर, मय, कैटभ, कुम्भ, निकुम्भ किर्मीर, अंकध, अघ, वृत्र, धुंधु, धेनुक, नरक, नमुचि, सुंद, उपसुंद, इ. असुर नामें कांहीं वेदकालीन तर कांहीं कृष्णकालीन आहेत.

व्हिन्सेंट श्मील यानें असुर-देवतांच्या दिलेल्या यादींत असुर मझाश ही एक देवता असून तिचा संबंध अहुरमज्द या झरतुष्ट्री देवतेशीं जोडण्यांत आला आहे. अहुरमज्द हा शब्द असुरमहस् याचा अपभ्रंश असावा, असें राजवाडे म्हणतात. यावरून खाल्डियन, इराणी व भारतीय आर्य यांचे पूर्वज कोण्या एका काळीं एकत्र असावे व त्यांच्या कांहीं सामान्य देवता असाव्या असें दिसतें. नंतर त्यांच्यांत फूट पडून विशिष्ट शाखेंत विशिष्ट देवतेला प्राधान्य आलें व इतरांच्या देवतांस दूषणें लावण्याची सवय जडली. यामुळे असुर हा शब्द भारतीयांत दैत्यवाचक बनला व देव शब्द इराणी शाखेंत दैत्यवाचक बनला. भारतीयांनी इंद्राला असुरघ्न हें विशेषण लावलें; तर इराणी लोकांनी इंद्राला 'अंग्रमन्यु' बनविलें.

असुर हे देवांच्या दृष्टीनें अपभ्रष्ट भाषा बोलत. शबर-स्वामीनें पिक, नेम, तामरस, इ. शब्द असुर भाषेंतून आले

आहेत, असें म्हटलें आहे. असुरांचा व मानवांचा लग्नसंबंध झाल्याचीं उदाहरणेंहि पुराणांत पुष्कळ आहेत. वसुदेवाची पत्नी देवकी ही असुरकुलांतली होती. उषा–अनिरुद्धांचा विवाह झाला त्या वेळीं वऱ्हाडी म्हणून गेलेल्या अनेक यादवांनी तिथल्या असुरकन्यांशीं विवाह केले, असें हरिवंशांत म्हटलें आहे. अष्टविवाहांत आसुर नांवाचा विवाहाचा प्रकार आहे. तो असुरांमध्ये प्रचलित असावा. आर्यांप्रमाणेंच असुरांमध्येहि श्राद्धविधि असावा, असें राजारामशास्त्री भागवत यांनी अनुमानिलें आहे. आश्वलायन गृह्यसूत्रांतल्या श्राद्धकल्पांत 'आसुर' श्राद्धाचा उल्लेख आहे. असुर हे शिवभक्त असल्याच्या अनेक कथा पुराणांतरीं आढळतात. असुरांची शिवोपासना उग्र होती व बहुतेकांना शिवाकडूनच वर मिळाले होते. भारताच्या बाहेर असतांना ते प्रजापतीचे उपासक असावे. वृत्राला, तारकासुराला व शंखासुराला प्रजापतीकडूनच वरप्राप्ति झाली होती. वैष्णव धर्माचा अंगीकार करणारा पहिला असुर प्रल्हाद हा होय. त्याच्या कुलांतहि पुढे विष्णुभक्ति चालू राहिली, हें बलीच्या कथेवरून दिसतें. [रा. ले. सं.; हि. मॉ.; म. ज्ञा. को.]

(२) एक आदिवासी जमात. या जमातीचे कांही समह सरगुजा, झासपूर, डाल्टनगंज या जिल्ह्यांतल्या जंगलांतून व रांची जिल्ह्यांत तुरळक आढळतात. हे लोक मुंडांपैकीच आहेत. मूळची त्यांची भाषा मुंडारीच होती. पण आजमितीस त्या प्रदेशांत उरांव आदिवासींनी मोठ्या प्रमाणांत वस्ती केल्यामुळे असुर मुंडहि त्यांच्यांत मिसळून गेले आहेत. ते आपली भाषाहि विसरले आहेत. त्यांच्यांत ठाणिया असुर, उठलु असुर, बिरजिया असुर, असे कांही पोटभेद आहेत.

असुरांत साप, मासे व पशू अशीं अनेक देवकें आहेत. जें देवक असेल, त्याचें मांस ते खात नाहीत. एका देवकांत लग्नेंहि होत नाहीत. तीन चार पिढ्यांनी देवक बदलतें व त्याबरोबरच त्यांचा 'मूअ' (पूर्वज)हि बदलतो. बायकांना आपल्या बापाच्या देवकाचें मांस वर्ज्य असतें; पण नवऱ्याच्या देवकाचें नसतें. असुर व मुंड यांचा एके काळीं घनिष्ठ संबंध होता; पण ती गोष्ट आता असुर विसरून गेले आहेत. यांच्या कांही चालीरीती पुढीलप्रमाणे —

लग्नें आईबाप ठरवतात. अनेक बायका करीत नाहीत. पत्नीला टाकीत नाहीत. लग्नाच्या मेजवानीसाठी शक्तीबाहेर खर्च करता व त्यापायीं आर्थिक दृष्ट्या डबघाईला येतात. शकुनांवर विलक्षण विश्वास असतो. प्रसूतीनंतर आठ दिवसांनी अपत्याचें नांव ठेवतात. पाण्याच्या भांड्यांत तांदूळ टाकून विशिष्ट संकेतानुसार अपत्याचें नांव ठरवितात. त्याच दिवशीं मुलाचे कांही केस कापून ते दूर फेकून देतात. पहिलें मूल मेलें असल्यास दुसरें मूल झाल्यावर त्याला शेणाच्या राशीवर ठेवतात. मग एखादा नातेवाईक त्याला उचलून आणून त्याच्या आईकडे देतो. अशा मुलाला गंडुर व मुलीला गंडुरी म्हणतात. मृतांपैकी म्हाताऱ्यांना जाळतात व इतरांना पुरतात. प्रेताच्या तोंडांत कपडा कोंबतात. मृत्यूनंतर मृताचे नातेवाईक आठ किंवा पंधरा दिवसांनी जमातीला जेवण घालतात. पितरांची पूजा करतात. सणावारीं त्यांच्या तृप्तीसाठी दाणे टाकतात. सरहुल नामक फुलांचा सण पाळतात. सिम् बोंगाला पांढरा कोंबडा बळि देतात. भुताखेतांनाहि भजतात. देवाला डुकराचा बळि कधीहि देत नाहीत. ही प्रथा अन्य आदिवासींहून वेगळी आहे. ती हिंदूंच्या अनुकरणांतून आली असावी. बळीचा विधि करण्यासाठी मुख्य सणांत बैगाला बोलावितात. इतर वेळीं तें काम कुटुंबप्रमुख करतो. बळीचें मांस बायकांना खाऊं देत नाहीत. जादूटोण्यावर विश्वास ठेवतात.

वर दिलेल्या चालीरीती छोटा नागपूरमधील इतर आदिवासींमध्येहि आढळतात. असुर जमातीचें एक वैशिष्टच म्हणजे त्यांचें वैयक्तिक देवक. त्यावरून संशोधक असा तर्क काढतात, की मुंडांहून हे लोक वेगळ्या वंशाचे असावे. यांचा मुळांत वेड्डा आदिवासींशीं वांशिक संबंध होता की काय, हा संशोधनाचा विषय आहे. श्री. रॉय यांच्या मतें असुर ही सर्वसामान्य आदिवासींहून वेगळी जमात आहे. [एन्सा. मुं.]

असुर जमाती बंगाल व छोटा नागपूर या भागांतल्या कोलारीयन जमाती टोळ्यांना असुर म्हणतात. हे असुर आर्यविरोधी असुरांचे वंशज कीं मिर्झापूर जिल्ह्यांतले प्राचीन पाटबंधारे बांधणाऱ्या असुरांचे वंशज, हें अद्यापि स्पष्ट झालेलें नाही. पण एक गोष्ट मात्र खरी, की कोल आणि द्रविड या टोळ्यांचें आगमन होण्यापूर्वीच छोटा नागपूरमध्ये या असुरांची वस्ती होती. त्यांचा धंदा भूगर्भांतून तांबें व लोखंड काढणें व त्यापासून शेतीचीं अवजारें बनविणें हा होता. छोटा नागपूरमध्ये आजहि तांब्याच्या कांही प्राचीन खाणी आढळतात. असुरांचा तांबें, लोखंड, वगैरे धातु वितळविण्याचा धंदा असल्याचें पुढील लोककथेवरूनहि कळतें —

असुर हे बारा बंधु होते. त्यांच्या लोखंडी भट्ट्या होत्या. त्या भट्टींतल्या जाळाने सिम् बोंगा (सूर्यदेव) ला त्रास होऊं लागला. त्याने दोन पक्षी असुरांकडे पाठवून भट्ट्या बंद करण्याबद्दल असुरांना कळविलें. पण असुरांनीं तें मानलें नाही. मग सिम् बोंगाने आपल्या मुलाला महारोग्याच्या रूपांत असुरांकडे

पाठविलें. असुरांनी त्यालाहि पकडून भट्टींत टाकलें. पण तो मुलगा भट्टीतून जिवंत बाहेर आला. बाहेर येतांना त्याच्या हातीं एक सोन्याचा तुकडा होता. असुरांना त्याची हाव सुटली. मुलगा असुरांना म्हणाला, की माझ्यासारखे भट्टींत पडाल, तर तुम्हांलाहि खूप सोने मिळेल. असुरांनी तसें केलें. पण ते सगळे प्राणास मुकले. मग असुरांच्या बायकांनी त्या मुलाभोवतीं वेढा घालून त्याच्याकडून वर मागितला. त्या स्त्रियांच्या इच्छेप्रमाणे 'टेकडया, जंगलें, नदीतीरें, व निर्जन जागा, या ठिकाणीं तुम्ही सुखानें राहा' असा त्याने त्यांना वर दिला.

बिजिया आणि आगारिया अशा असुराच्या पोटजाती आहेत. आगारिया हे भटके आहेत. माकडांचा खेळ दाखविणें, हा त्यांचा व्यवसाय आहे. लोहार असुर व पहाडी असुर अशा आणखी दोन पोटजाती आहेत. या सर्व असुरांत देवकें आहेत.

असुर भाषा – असुरांच्या भाषेला 'डुकमा' म्हणतात. ती कोलारियन भाषासमूहांतली एक बोली आहे. असुरांनी ती मुंडांकडून घेतली असावी. आर्य लोकांशीं संपर्क आल्यामुळे असुरांच्या भाषेंत संस्कृत शब्दहि पुष्कळ आढळतात.

चालीरीती – तांदुळांची दारू पुरुषांप्रमाणे बायकाहि पितात स्त्रिया धूम्रपान करीत नाहीत. ते डोंगरांतली शेती करतात. असुरांना नाच गाणें ठाऊक नाही. स्त्रियांचें नैतिक आचरण शिथिल असतें. छोटा नागपूरमधील मोठ्या शहरांतून असुर तरुणी नर्तकीचा व्यवसाय पत्करून राहतात. आहाराच्या बाबतींत त्यांना विधिनिषेध नसतो. मेलेल्या गुरांचेंहि मांस खातात.

धर्म –– असुर लोक सूर्याला जगाचा कर्ता, धर्ता मानतात. मात्र त्याची उपासना केलीच पाहिजे, असा त्यांचा आग्रह नसतो. ते भूत-पिशाचांनाहि भजत नाहीत. त्यामुळें त्यांच्यांत पुरोहित वर्ग अजिबात नाही. एखाद्या मुंडा वस्तींत जर असुर राहत असतील, तर ते आपल्या मुंडा शेजाऱ्याबरोबर त्यांच्या धार्मिक विधींत भाग घेतात. ते पितृपूजक आहेत. पितरांतहि दुष्टात्मे आणि सज्जन आत्मे असा फरक करतात. दुष्टात्म्यांना संतुष्ट करण्यासाठी कुटुंबप्रमुख आपल्या चुलीपुढे कोंबडयाचा बळि देतो.

विवाहप्रथा – एका देवकांत विवाह होत नाही. बालविवाह प्रचलित नाही. विधवाविवाह आणि बहुपतित्व संमत आहे. विवाहाला पुरोहिताची गरज नसते. वधूसाठी तीन रुपयांपासून पांच रुपयांपर्यंत वधूपित्याला देज द्यावें लागतें.

अंत्यसंस्कार – नैसर्गिक मृत्यूने मेलेल्या इसमाला त्याच्या पुढील प्रवासासाठी प्रेताबरोबर अन्न देतात. अपघाती मरणाने मेलेल्यासाठी प्रेतयात्रेच्या वेळीं पशुबळि देतात. प्रेतें जाळतात. मृताच्या नांवाने पुढे आठ दिवस घराबाहेर जेवणाचें पान ठेवतात. आठव्या दिवशीं ज्ञातिभोजन घालतात. त्या वेळीं मनसोक्त दारू पितात. पितरांचा पुनर्जन्म होतो, असेंहि मानतात. [एन्सा. रि. ए.]

असुरविवर विवर = गुहा. अशा गुहेचा बाणभट्टाने अनेक ठिकाणीं उल्लेख केला आहे. (हर्षचरित १०३. ९७). जमिनींत खोल खड्डा खणून त्यांत गाडून घेणें, या प्रकाराला असुरविवरप्रवेश असें म्हणत. ही एक भयानक प्रकारची तांत्रिक साधना वेताळसिद्धीसाठी केली जात असे.

अस्तगिरि शाकद्वीपांतील एक पर्वत. देवासुरयुद्धांत इथे बलि मूर्च्छित पडला व त्याच्यावर संजीवनी विद्येने उपचार केले गेले. [भाग. पु. ८. ११. ४५–४८]

अस्तेय स्तेय = चौर्य. त्याच्या विरुद्ध तें अस्तेय. याची व्याख्या पुढीलप्रमाणे– 'अनादानमदत्तस्यास्तेयव्रतमुदीरितम्' = एकाद्याची वस्तु त्याने न दिल्यास तिचा अपहार न करणें हें अस्तेयव्रत म्हटलें आहे (सर्व. द. सं.). अस्तेय हें जसें व्रत आहे, तसेंच तें पांच यमांपैकी एक आहे (पा. यो. सू. २. ३०). देह व इंद्रियें यांचें योग्य धारण–पोषण होऊन त्यांच्या द्वारें वर्णाश्रमोचित कर्तव्यें नीटपणे पार पडावीं, यासाठीं अन्नवस्त्रादि विषयांचा आवश्यक तेवढा स्वीकार करावाच लागतो. पण माणसें विषयलुब्ध होऊन अधिक विषयांचा अधिक प्रमाणांत संग्रह व उपयोग करीत असतात. तात्त्विक दृष्टया अशा अनावश्यक वस्तूंचा संग्रह करणें म्हणजे स्तेय होय. देहादिकांच्या गरजेसाठी अत्यावश्यक तें आणि तेवढेंच विषयसेवन हें स्तेय नव्हे. कारण ती ईश्वरी योजना आहे. पण ते इष्ट व आवश्यक भोगहि शास्त्रविहित मार्गानें देवादिकांना अर्पण करून मगच त्यांचा उपभोग घ्यावा, हा अस्तेय व्रताचा आशय आहे. याने बुद्धींत सत्त्वगुणाची वृद्धि होऊं लागते. या अस्तेय व्रताचें फल पुढीलप्रमाणे –

अस्तेयप्रतिष्ठायां सर्वरत्नोपस्थानम्

(पा. यो. सू. २. ३७)

अर्थ – साधकाच्या चित्तांत अस्तेय वृत्ति सुप्रतिष्ठित झाली, की पृथ्वीवरील रत्नें म्हणजे त्यांनी उपलक्षित अशी सर्व साधनसंपत्ति त्याच्या इच्छामात्रें (लोककल्याणार्थ) त्याच्यापुढे उपस्थित होते.

याचें तात्पर्य असें, की अस्तेयप्रतिष्ठा ही एक योगसिद्धि

असून अशा योगी पुरुषाला एखाद्यावर अनुग्रह करण्याची इच्छा झाल्यास, केवळ संकल्पाने पृथ्वीवरील सर्व संपत्ति तो त्याच्यापुढे उपस्थित करूं शकतो.

बौद्ध भिक्षूंच्या नियमावलींतहि अस्तेय व्रताला फार महत्त्व आहे. त्यांच्या प्रार्थनेंत ' मी न दिलेलें घेणार नाही, चोरी करणार नाही ' अशा प्रतिज्ञा आढळतात. या प्रार्थनांना शिक्षापदें म्हणतात. पाहा– यम. [भा. मा. शा.]

अस्त्रविद्या प्राचीन काळीं हत्यारांचे शस्त्र व अस्त्र असे दोन भेद करीत. तीक्ष्ण असून घाव घातल्याबरोबर छेद किंवा जखम करणाऱ्या व मृत्यूला कारणीभूत होणाऱ्या हत्याराला शस्त्र म्हणतात. मंत्राच्या साहाय्याने किंवा अग्नि, वायु, विद्युत्, इ. अन्य साधनांनी चालणाऱ्या हत्याराला अस्त्र म्हणत. अस्त्र–शस्त्रांतला भेद असा—

दूरे चान्ते च यत् शस्त्रं शत्रुघातकरं भवेत् ।
तदस्त्रमिति जानीयादन्यथा शस्त्रमुच्यते ॥

अर्थ— जें हत्यार दूर तसेंच जवळ असलेल्या शत्रूचा घात करण्यास उपयोगी पडतें, तें अस्त्र होय. इतर केवळ जवळच्याच शत्रूला मारण्यास उपयोगी असतें, तें शस्त्र होय.

अस्त्राचे दोन प्रकार असे– मंत्रशक्तीने चालणारें व यांत्रिक साधनांनी फेकलें जाणारें. मंत्रशक्ती करणाऱ्या अस्त्राला दैवी म्हणत. दैवी अस्त्रावर मंत्रांतल्या देवतेचा अधिकार चालत असे. योद्धा धनुष्याला बाण जोडून त्यावर विशिष्ट देवतेचा मंत्र जपत असे, त्या वेळीं तो बाणच अस्त्ररूप होई. बाणाप्रमाणेच अंकुश व दर्भ यांवरहि अस्त्रमंत्र जपीत. शस्त्रापेक्षा अस्त्राचें संहारक सामर्थ्य अनेक पटींनी अधिक असे. धनुर्वेदांत विविध अस्त्रांचे मंत्र ओंजळींत पाणी घेऊन जपावे, असें सांगितलें आहे. अस्त्रयोजनेच्या चार अवस्था मानलेल्या आहेत— मंत्र, उपचार, प्रयोग व संहार. त्यांवरूनच अस्त्राला चतुष्पाद म्हटलें आहे (म. भा. उ. ३).

अस्त्रांचे मायिक व निर्माय असेहि आणखी दोन प्रकार आहेत. आकार, शब्द वगैरेवरून ज्याच्या शक्तीचा अंदाज करतां येईल, तें अस्त्र निर्माय. ज्याच्या शक्तीचा आगाऊ अंदाज करतां येत नाही, तें अस्त्र मायिक होय. मायिक म्हणजे मय नामक शिल्पज्ञाने केलेल्या रचनेप्रमाणे माणसाला फसविणारें, माणसाला मोह उत्पन्न करणारें हत्यार होय. हीं अस्त्रें ज्या शक्तींच्या साहाय्याने फेंकलीं जातात, त्यांवरून त्यांचे तंत्रास्त्र किंवा पाणिमुक्त, यंत्रास्त्र किंवा यंत्रमुक्त व मंत्रास्त्र किंवा मंत्रमुक्त असे तीन प्रकार होतात.

अस्त्रांची अकारादि क्रमाने नामावलि – असिरत्न, आग्नेय, ऐंद्र, ऐष्पिम, कंपन, कापल, कालमुद्गर, कैंकर, क्रौंच, गधर्व, 'पपान, त्वाष्ट्र, नंदक, नारसिंह, नारायण, पाशुपत, पैशाच प्रमथन, प्रस्वापन, प्रस्थापन, ब्रह्मशिरस्, ब्राह्म, भावन, भैरव, मथन, महावल, मायाधर, मोहन, मौसल, रौद्र, वायव्य, वारुण, विकंपन, शातन, शामन, शैल, शोषद, संवर्तन, सार्प, सावित्र, सोम व हयशिरस् (पु. इं.).

पुराणकाळीं प्रत्येक क्षत्रियाला धनुर्वेदाच्या अभ्यासांत या अस्त्रविद्येचाहि अभ्यास करावा लागे. अस्त्र हें मंत्रप्रणीत असल्यामुळे मंत्र शिकविण्याचा अधिकार ब्राह्मणांनाच होता. कांही विशेष अस्त्रांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत—

(१) **आग्नेयास्त्र** – हा विस्फोटक बाण होता. हा सोडल्यानंतर पावसाप्रमाणे अग्नीचा वर्षाव होऊन यच्चयावत् वस्तु जळून खाक होत असे. याचा प्रतिकार करण्यासाठी पर्जन्यास्त्राचा उपयोग करीत.

(२) **पर्जन्यास्त्र** – याने कृत्रिम वादळ तयार होऊन पावसाचा वर्षाव होई, विजा चमकूं लागत व प्रचंड वारा वाहूं लागे.

(३) **वायव्यास्त्र** – याने भयंकर तुफानी वादळ होऊन जिकडे तिकडे अंधकार पसरे.

(४) **पन्नगास्त्र** – याने सर्प उत्पन्न होऊन थैमान घालूं लागत. याचा प्रतिकार करण्यासाठी गरुडास्त्राचा उपयोत करीत.

(५) **ब्रह्मास्त्र** – हें अत्यंत भयानक अस्त्र होतें. शत्रूचा धुव्वा उडावा म्हणून हें अस्त्र सोडीत. याचा प्रतिकार ब्रह्मास्त्राविना अन्य कोणत्याहि अस्त्राने करतां येत नाही.

(६) **पाशुपतास्त्र** – अखिल विश्वाचा नाश करण्याचें सामर्थ्य यांत आहे, असें मानीत.

(७) **नारायणास्त्र** – हें अस्त्रहि पाशुपतास्त्राप्रमाणेच महाभयंकर आहे. नारायणास्त्राचा प्रतिकार करील अशी एकहि शक्ति या विश्वांत नाही. अस्त्र सोडणाऱ्याला नम्रतापूर्वक आत्मसमर्पण करणें, एवढाच याच्या प्रतिकाराचा उपाय आहे.

प्रल्हादपुत्र विरोचन याला भवाकडून विशिष्ट अस्त्रें मिळालीं होतीं. सगराने परशुरामाकडून आग्नेयास्त्र मिळविलें होतें. अर्जुनाला शिवाकडून पाशुपतास्त्र व लोकपालांकडून दिव्य अस्त्रें मिळालीं होतीं (म. भा. वन. २८ व ४९). कृष्णालाहि ' परमास्त्रवित् ' असें म्हटलें आहे. कौरव-पांडवांचा गुरु द्रोणाचार्य याला अस्त्रविद्या उत्तम अवगत होती. [म. भा. उ.; कल्याण–संस्कृतिअंक.]

अस्थि शरीरांतील हाडें म्हणजे अस्थी होत. प्राचीन धर्मकल्पनांत व मानसशास्त्रांत अस्थींना महत्त्वाचें

स्थान होतें. मृतात्म्याचा व अस्थींचा निकट संबंध मानला आहे. मृतात्म्याचा उद्धार होण्यासाठी दाहक्रियेनंतर त्याच्या अस्थींचें संचयन करून त्या अस्थी गंगेंत अथवा अन्य एखाद्या पुण्यनदींत टाकतात. अस्थींविषयीं जगांत अनेक प्रकारच्या कल्पना आहेत —

एखाद्याचा ज्यानें खून केला असेल, त्यानें त्यानंतर वीस पंचवीस वर्षांनी जरी त्याच्या हाडांना स्पर्श केला, तरी त्या हाडांतून रक्त निघतें. हाडांत प्राण असतो व त्यांना ताजें रक्त लाभल्यानें माणूस पुनश्च सजीव होतो. कांहीं वन्य समाज पितर म्हणून हाडांची पूजा करतात. हाडांत अडकून पडलेल्या आत्म्याला मुक्त करायचें असल्यास तें हाड फोडून खड्डयांत पुरतात. शिकार केलेल्या जनावरांचीं हाडें काळजीपूर्वक राखून ठेवतात. तसें केल्यानें शिकार चांगली मिळते, अशी समजूत आहे. कांहीं आदिवासी लोक बायकांना मासिक रजोदर्शनाच्या काळांत हाडांना स्पर्श करूं देत नाहीत. खुनाचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केलेला माणूस खून झालेल्या माणसाचें हाड आपल्या भाल्याला लावतो. जादूटोणा व अभिचार या कृत्यांत माणसाचें हाड व कवटी यांचा उपयोग करतात. वज्र हें आयुध दधीचीच्या अस्थींचेंच बनविलेलें होतें. हिंदुधर्मांत अस्थींना अपवित्र मानलें असून, त्यांचा स्पर्श झाल्यास सचैल स्नान करावें, असें सांगितलें आहे. मात्र संत-महात्मे यांच्या अस्थी पवित्र मानतात. बौद्ध लोकांनी अनेक स्तूप उभारून त्यांत बुद्धाचे अस्थिरूप अवशेष संरक्षून ठेवले आहेत. **पाहा**— अस्थिसंचयन. [एन्सा. रि. ए.]

अस्थिपुर

कुरुक्षेत्राजवळचें एक तीर्थ (पद्म पु. १.२७.६२) हें थानेश्वराच्या पश्चिमेस आणि औजसघाटाच्या दक्षिणेस आहे. भारतीय युद्धांत मृत्यु पावलेल्या वीरांचे देह इथे एकत्र करून त्यांचा दाहसंस्कार केला गेला. युआन च्वांग या चिनी प्रवाशाला इथे मोठमोठीं हाडें दाखविलीं गेल्याचे उल्लेख आहेत. [हि. ध.]

अस्थिसंचयन

प्रेतदहनानंतर त्याच्या अस्थी गोळा करून घेतात त्याला अस्थिसंचयन असें नांव आहे. हें दहनानंतर कोणत्या दिवशीं करावें, याविषयीं भिन्न मतें आहेत. धर्मसिंधूंत मुख्यत: तिसरा दिवस सांगितला आहे. याचा विधि असा——

वयस्क पुरुषानें चितास्थानाला उलटया तीन प्रदक्षिणा घालून राखेवर शमीच्या डहाळीनें दूध-पाणी शिंपडावें. प्रथम पायाच्या व शेवटीं मस्तकाच्या अस्थी गोळा कराव्या. त्या सुपानें झटकून मडक्यांत भराव्या. तें मडकें एका खड्डयांत पुरून ठेवावें. हें सगळें समंत्रक करावें. घरीं येऊन स्नान करावें (आश्व. गृ. सू. ४. ५). ज्याचें उपनयन झालें नाही, त्याच्या अस्थी गोळा करूं नयेत (निर्णयसिंधु). या अस्थी पुढे सवडीप्रमाणे मृताच्या पुत्रानें किंवा जवळच्या आप्तानें गंगेंत नेऊन टाकाव्या (विष्णु ध. सू. १९. ११–१२). विसर्जनापूर्वी त्यांची शुद्धि करावी. मग एका मातीच्या गोळचावर फुलें, तीळ व तूप यांच्या सह त्या अस्थी ठेवून गंगेंत सोडाव्या. स्नान करून सूर्यदर्शन घ्यावें व ब्राह्मणास दक्षिणा द्यावी (ध. सिं. ३). **पाहा**—अंत्येष्टि.

अस्पस—अस्सकेन

अलीशाँग व कुनार या दोन नद्यांच्या दुआबांत राहणाऱ्या जमातीचें नांव अस्पस असें आहे. गौरी आणि सुवास्तु यांच्या दुआबांत राहणाऱ्या जमातीला अस्सकेन असें म्हणतात. ग्रीकांनी या नांवाचा अपभ्रंश केला आहे. मूळ नांवें कदाचित् अश्वक व अष्टक किंवा अश्वाटक अशीं असावीं. या दोन्ही जमातींनी सिकंदराशीं प्राणपणानें लढा दिला होता. [भा. इ. रू.]

अस्पृश्यता

हिंदु समाजांत कांहीं जाती अशा आहेत, की त्या जातींत जन्मलेला माणूस केवळ जन्मामुळेच अस्पृश्य मानला जातो. ज्यांच्या केवळ स्पर्शानें सवर्ण हिंदूंना विटाळ होऊं शकतो, अशा ४२९ जाती भारतांत असून त्यांची जनसंख्या सहा कोटींच्या वर आहे. आशिया व युरोप खंडांतल्या कोणत्याहि राष्ट्रांत एवढी लोकसंख्या अस्पृश्य गणलेली नाही. अशा अस्पृश्यांचा चातुर्वर्णिकांच्या शरिराला, वस्त्राला, पाण्याला व अन्नाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्पर्श झाला असतां, त्याचा विटाळ मानणारे लोक सचैल स्नान करतात व त्या स्पृष्ट अन्नोदकांचा त्याग करतात. अशा अस्पृश्यांचा स्पर्श टाळण्यासाठी ते त्यांना दूर ठेवतात. त्यांना आपल्या बैठकीवर बसूं देत नाहीत. घरांत किंवा देवळांत येऊं देत नाहीत. आपल्या विहिरीवर पाणीहि भरूं देत नाहीत. वैदिक लोक अस्पृश्यांच्या कानीं वेदाक्षर पडूं देत नाहीत. या सर्व आचाराला व त्यामागील विचाराला अस्पृश्यता हें नांव आहे. अस्पृश्यता पाळणें हा धर्म आहे, असा स्पृश्य हिंदूंचा समज आहे. पण स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेंत ही अस्पृश्यता पाळणें हा आता अपराध ठरविलेला असून, त्याला दंड व शिक्षाहि सांगितलेली आहे. अशा प्रकारें आजमितीस अस्पृश्यता ही कायद्यानें दूर झालेली असली, तरी जुन्या परंपरेचा पगडा असलेल्या लोकांच्या मनांतून ती अद्यापि

नष्ट झालेली नाही. ती घालविण्यासाठी निष्ठावंत प्रयत्नांची आवश्यकता आहे.

ही अस्पृश्यता पुरातन काळापासून चालत आलेली असली, तरी मध्ययुगांत जनमनावर तिचा पगडा विशेष बसला. विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशीपर्यंत या कल्पनेचा समाजांत विलक्षण प्रभाव होता. एखादा अस्पृश्य न्यायालयांत साक्ष देण्यासाठी आला, तर तिथे उपस्थित असलेले सवर्ण हिंदू चटकन् दूर होत. अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरतां येत नसे. त्यांना गांवाबाहेर राहावें लागे. काश्मीर-मध्ये मेघ, डोम इ. जातींना आजहि गांवाबाहेरच राहावें लागतें. वायव्य सीमा प्रदेशांत धोबी, रंगारी, रयसज, या लोकांनाहि अस्पृश्य समजलें जातें. गुजरातेंतील अस्पृश्यांना आपण अस्पृश्य आहों, हें लोकांना ओळखूं येण्यासाठी पूर्वी डोक्याला एक शिंग लावावें लागत असे.

दक्षिण भारतांत अस्पृश्यतेची भावना उत्तर भारतापेक्षाहि अधिक कठोर आहे. नयाडी जातीचा माणूस दीडशें हात अंतराच्या आंत आला, तरी ब्राह्मणाला विटाळ होत असे. त्यामुळे अशा हीन जातीच्या लोकांना बाजारांत किंवा सार्व-जनिक रस्त्यावर येण्यास बंदी असे. यायचेंच झालें तर त्याला आपण येत असल्याचें आधी ओरडून जाहीर करावें लागे. महाराष्ट्रांत अस्पृश्याच्या सावलीचासुद्धा विटाळ मानला जात असे.

ही अस्पृश्यता केवळ सवर्ण किंवा अंत्यज यांच्यांतच आहे, असें नाही. अस्पृश्यांतहि परस्परांना अस्पृश्य मानण्याची प्रथा आहे. महार मांगाला अस्पृश्य समजतो. दक्षिणेंत पुलयन लोक परियाचा विटाळ मानतात. कुरिच्छ नांवाची एक जंगली जमात आहे तिला इतर सगळ्या जंगली जमातींचा विटाळ होतो. होळेय जातीचे लोक या सर्वांत अधिक सोवळे आहेत. कारण ते ब्राह्मणांनाहि अस्पृश्य मानतात व त्यांना आपल्या वस्तींत येऊं देत नाहींत. अशीं किती तरी उदाहरणें आहेत.

अस्पृश्यता ही श्रुतिस्मृतिप्रतिपादित आहे व ती पाळली पाहिजे, असा सनातनी पंडितांचा आग्रह आहे. पण श्रुतींत अस्पृश्य शब्द आढळत नाही. क्वचित् अंत किंवा अंत्य हा शब्द दिसतो. अमुक एक जात किंवा विशिष्ट हीन धंदा करणारे लोक, हे अस्पृश्य असल्याबद्दल श्रुतींत कुठेहि उल्लेख नाही. स्मृतींत मात्र हा शब्द वारंवार आढळतो. मनुस्मृतींत निषाद, आयोमेद, अंध्र, चुंचु, मद्गु, क्षत्र पुक्कस, धिग्वण व वेण या लोकांनी गांवाच्या बाहेर राहावें, असें म्हटलें आहे (१०. ४८–५५). तैत्तिरीय ब्राह्मणांत 'वायवे चाण्डालम्' असें वचन येतें (३. ४. १७. १). पण आजच्या अर्थाचा तो चाण्डाल नव्हे. 'नमः क्षत्तृभ्यः' या वचनांत क्षत्त्यांना नमस्कार केलेला आहे (तै. सं. ४. ५. २). स्मृतींच्या भाषेंत शूद्राला क्षत्रिय स्त्रीपासून झालेली संतति म्हणजे क्षत्ता होय. पण श्रुतींतला क्षत्ता अस्पृश्य नाही. निषाद हा सांप्रत अस्पृश्य गणला आहे; पण श्रुतींत त्याला वेदमंत्रांनी रुद्रेष्टि करण्याचा अधिकार होता. सूतहि वैदिक काळीं अस्पृश्य नव्हता. राजांची स्तुति गाण्याचें काम त्याच्याकडे होतें, हें 'गीताय सूतम्' या वचनावरून समजतें. आयोगवाकडे यज्ञांतल्या वस्तू विकत घेण्याचें काम होतें, हें 'आक्रयायायोगम्' या वचना-वरून लक्षांत येतें. ऐतरेय ब्राह्मणांत आलेला मरुत्त आविक्षित हा राजा आयोगव होता. मागध म्हणजे भाट किंवा चारण. श्रुतींत 'अतिक्रुष्टाय मागधम्' असा त्याचा उल्लेख येतो (तै. ब्रा. ३. ४. १. १). अर्थात् वैदिक काळीं तोहि अस्पृश्य नव्हता. त्यावरून हे शब्द स्मृतींत श्रुतीहून निराळ्या अर्थानें आले आहेत, हें उघड दिसतें. विदलकार म्हणजे बुरुड व किरात म्हणजे भिल्ल, हे श्रुतींत अस्पृश्य नव्हते व आजहि नाहीत.

आता चाण्डाल शब्दाचा विचार करूं. स्मृतींत चाण्डाल तीन प्रकारचे सांगितले आहेत–(१) ब्राह्मण स्त्री व शूद्र पुरुष यांची प्रजा. (२) सगोत्र विवाहाने झालेली संतति. व (३) विवाहापूर्वी कन्येला झालेली संतति. चाण्डालांचा चौथाहि एक प्रकार होता. संन्यास घेतल्यानंतर पुनश्च एखाद्या पुरुषाने गृहस्थधर्म स्वीकारला, तर तो व त्याची संतति चाण्डाल समजावी, असें लघुशातातपस्मृतींत सांगितलें आहे. हे सर्व 'जन्म चाण्डाल' होत. यांशिवाय 'कर्मचाण्डाल' म्हणून कांहींचा उल्लेख केलेला आहे. आव्हायक (दवंडी देणारा), देवलक (पुजारी), नाक्षत्र (ज्योतिषी), ग्रामयाजक व स्मशानजीवी पाशुपत, अशा ब्राह्मणांना कर्मचाण्डाल मानलें आहे (म. भा. शांति. ७६. ६).

चाण्डाल शब्द वैदिक वाङ्मयांत अनेक वेळां येतो; पण संदर्भावरून त्याचें स्वरूप कळून येत नसल्यामुळे तो अस्पृश्य होता, असें मानावयास आधार नाही. फक्त तो हीन पदवीचा मनुष्य असावा असें दिसतें. पण पुढे अस्पृश्यता वाढत जाऊन ती जन्मसिद्ध ठरविण्यापर्यंत मजल गेली, तेव्हा तो अस्पृश्य मानला गेला असावा. पाणिनीने निरवसित व अनिरवसित असे शूद्रांचे दोन भेद सांगितले आहेत (अष्टा. २. ४. १०). अनिरवसित या शब्दाचा खुलासा पतंजलीने पुढीलप्रमाणे केला आहे–'यैर्भुक्ते पात्रं संस्कारेण शुध्यति ते अनिरवसिताः' ज्यांनी भांड्यांतून खाणेंपिणें केलें असतां तें भांडें धुवून किंवा घासून शुद्ध होतें व त्रैवर्णिकांना चालतें, ते अनिरवसित होत.

प्राचीन स्मृतिकारांचा विशेष कटाक्ष चाण्डालादिकांवरच होता. त्यांनाच ते जन्मजात अस्पृश्य समजत. अंत्यजांपैकी चाण्डालांनीच गांवाबाहेर राहावें, असें विष्णुस्मृतींत म्हटलें आहे (१६. ४). मनूचाहि चाण्डालांवरच कटाक्ष आहे. त्यांनी गांवाबाहेर, चैत्य वृक्षाच्या खाली, स्मशानांत, किंवा डोंगर-दऱ्यांत राहावें आणि मृतांचीं वस्त्रें, फुटकीं भांडीं व लोखंडाचे दागिने वापरावे, असें तो सांगतो (१०. ५०-५७). शूद्राला ब्राह्मणस्त्रीपासून झालेला तो चाण्डाल अशी मनूने त्याची व्याख्या दिली आहे.

अस्पृश्यता ही घाणेरडे धंदे करण्यामुळे उत्पन्न झाली, असें कांहीजण म्हणतात. पण तसें असतें, तर अस्पृश्यता ही सर्व जगांतच उत्पन्न झाली असती. पण ती केवळ भारतांतच असल्यामुळे तिच्या उत्पत्तीचें कारण दुसरीकडे कुठेतरी शोधलें पाहिजे. तें शोधण्याचा साक्षेपी प्रयत्न श्री. विठ्ठल रामजी शिंदे यांनी केला आहे. त्यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला असून त्यांत अस्पृश्यांबद्दलची समाजशास्त्रीय उपपत्ति मांडली आहे. त्या माहितीचा सारांश पुढीलप्रमाणे ––

अस्पृश्यता ही एक स्वतंत्र मानवी संस्था आहे. मानव जातीच्या प्राथमिक अवस्थेंतच तिचा उदय झाला असला पाहिजे. प्रारंभीं ही अस्पृश्यता वैयक्तिक व प्रासंगिक होती. बाळंतीण, तिची खोली, मृतांची जागा, त्यांचे आप्त, विशिष्ट रोगी, झपाटलेलीं माणसें, विक्षिप्त झाडें, खुनासारख्या अपघाताचीं ठिकाणें, वगैरे गोष्टी प्राथमिक काळांतच अस्पृश्य आणि वर्जनीय ठरल्या होत्या. जादूगार व पुरोहित हे देखील सोवळे म्हणजे एक प्रकारें अस्पृश्यच असत. यज्ञांतल्या ऋत्विजांना सोवळ्यांत म्हणजेच अस्पृश्य अथवा अलग स्थितींतच राहावें लागे. कर्नाटकांत मादिगांचे धर्मगुरु म्हणून प्रसिद्ध असलेल्या ढकलगारांना त्यांचे अनुयायीहि शिवत नाहीत. इतकेंच नव्हे; तर त्यांना आपल्या पाणवठ्यांनाहि शिवूं देत नाहीत. अशा या अपधर्मांतच अस्पृश्यतेचा उगम आहे. या अपधर्माला उत्तरोत्तर जसजसें गूढ व दृढ स्वरूप प्राप्त झालें व पुरोहितांच्या द्वारें त्याची परंपरा आणि घटना बनत चालली, तसतशी अस्पृश्यतेच्या वैयक्तिक व स्थानिक स्वरूपाची परिणति जातीय, सार्वत्रिक व नित्यस्वरूपांत होऊं लागली. अभिचारमूलक अपधर्म हा अस्पृश्यतेचें मूळ कारण आहे. तें मूळ कारण पुढे लुप्त व विस्मृत झालें, तरी अस्पृश्यता मात्र शिल्लक उरली.

असली अस्पृश्यता प्राचीन आर्यांतच होती, असें नसून ती बऱ्याच प्राथमिक राष्ट्रांतहि होती. अस्पृश्यतेचा विकास वैयक्तिक स्वरूपांतून जातीय स्वरूपांत होण्यापूर्वीं राज्यांचा विकास होऊन तीं साम्राज्यांत रूपांतरित झाली असणें शक्य आहे. जेव्हा एक जात अथवा राष्ट्र दुसऱ्या सबंध जातीला किंवा राष्ट्राला कायमचें अस्पृश्य मानतें व ती जात आणि तें राष्ट्रहि तसें मानून घेतें, तेव्हाच जातीय गुलामगिरीचा ऊर्फ अस्पृश्यतेचा उदय होणें शक्य असतें. जातीय अस्पृश्यता हा एक गुलामगिरीचाच अतिकठोर प्रकार होय.

वर दर्शविलेली अस्पृश्यता सामान्यत्वें नित्य आणि नैमित्तिक अशा दोन स्वरूपांची असते. याशिवाय, तिरस्करणीय व आदरणीय अशींहि तिचीं दोन स्वरूपें असतात. पहिल्या स्वरूपाला मराठींत विटाळ व दुसऱ्याला सोवळें अशीं नांवें आहेत. या दोन्ही प्रकारांची व्याप्ति भारताबाहेरहि होती व आहे.

भारतांत वरच्या लक्षणांनी युक्त अशी अस्पृश्यता केव्हा रूढ झाली, हें नक्की सांगणें कठिण आहे. कारण, या संस्थेविषयी ग्रांथिक किंवा शिलालेखीय पुरावा मिळत नाही. मात्र, पुरावा नसला तरी अस्पृश्यता भारतांत अनादिकालापासून होतीच, असें मानण्याचें कारण नाही. आर्य आणि द्रविड या भाषांतील वाङ्मयावरूनहि अस्पृश्यतेच्या उत्क्रांतीविषयीं नीट पुरावा मिळविणें अद्यापि सुगम झालेलें नाही.

गौतम बुद्धाचा उदय म्हणजे भारताच्या किंबहुना आशिया खंडाच्या इतिहासांतली एक मेख होय. अस्पृश्यतेचा छडा लावण्यासाठी या मेखेच्या आगे व मागे शोधीत गेलें पाहिजे. बुद्धकालीं म्हणजेच सनपूर्व सहाशें वर्षांच्या सुमारास उत्तर भारतांत आर्यांनी चातुर्वर्ण्य स्थापित केलें होतें व ती वर्णव्यवस्था जन्मसिद्ध मानली जाऊं लागली होती. ब्राह्मण व क्षत्रिय या दोघांत वर्चस्वासाठी परस्पर संघर्ष चालू झाला होता. हा संघर्ष बुद्धाच्या पूर्वींच विकोपाला गेला होता, हें पालि व संस्कृत वाङ्मयावरून उघड होतें. या दोघांनी वैश्य वर्गालाहि तुच्छ मानलें होतें; मग आर्येतर शूद्रांची कथा काय! अशा वेळीं शूद्रत्वाचाहि मान ज्यांना मिळाला नव्हता, असे अतिशूद्र त्या काळांत पूर्णपणे बहिष्कृत ठरले होते. मानीव चातुर्वर्ण्याचा हळूहळू लोप होऊन हल्लीं दृढ झालेल्या जाती–पोटजातींची उभारणी आर्थिक पायावर होऊं लागली होती. या उभारणींत अतिशूद्रांना कोणत्याहि वृत्तीचा अधिकार दिला गेला नव्हता. अस्पृश्य जाती ग्रामबाह्य ठरून त्या वंशपरंपरेने नीच आणि व्यवहाराला वर्ज्य ठरल्या होत्या.

अस्पृश्यतेचा व्याप आणि घटना कमीअधिक मानाने सर्व जगभर आहे, तरी भारतांत या घटनेला विशेष स्थैर्य आलें, ही गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. भारतांतहि उत्तरेपेक्षा

दक्षिणेंत अस्पृश्यतेचा पाया अधिक खोल असून त्याचा परिणामहि अधिक तीव्र आहे. या गोष्टीला कांहीतरी विशेष कारण असलें पाहिजे. कदाचित् आर्यांच्या आगमनापूर्वींहि या देशांत ही संस्था होती कीं काय, अशी आशंका उत्पन्न होते. पण तिचें समाधान होईल असे पुरावे मात्र आढळत नाहीत. एक अनुमान असें निघतें, की आर्यांपूर्वी या देशांत कांही धनसंपन्न जाती वस्ती करून राहिल्या होत्या. त्यांच्या सहवासाने कदाचित् अस्पृश्यतेचा शिरकाव आर्यांच्या समाजघटनेंत झाला असावा.

उत्तरेच्या आर्यांप्रमाणे दक्षिणेच्या द्रविडांतहि प्राचीन काळीं चातुर्वर्ण्य होतें. म्हणजेच सांपत्तिक दृष्टचा उच्चनीच भाव असलेले चार भिन्न समाज तिथे होते. द्रविड देशांत जे लोक स्वतःला शूद्र म्हणवितात, ते शूद्र म्हणजे आर्येतर असा त्याचा अर्थ समजतात. मानीव अस्पृश्यांना ते शूद्र हें बहुमानाचें नांव देत नाहीत. मुदलियार या शब्दाचा यौगिक अर्थ ' मूळचा ' असा आहे. यावरून अस्पृश्य जे परिया लोक, त्यांना परके समजण्यांत येत असे, असें दिसतें.

अस्पृश्यता रूढ होण्याची स्वाभाविक कारणें दोन आहेत– एक जातिद्वेष किंवा वर्णद्वेष आणि दुसरें वृत्तिमत्सर. उत्तर भारतांत आर्यांचा जम हळूहळू बसूं लागल्यावर त्यांनी यथानुक्रम ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशी व्यवस्था लावली आणि ज्यांच्या गुण-कर्मांचा तिटकारा वाटला, अशा जंगली जातींना दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. पुढे अर्थशास्त्राच्या पायावर आर्यांमध्ये निरनिराळ्या वृत्तींचा अर्थात् धंद्यांचा विकास झाला, तसतशी वर्णद्वेषांत वृत्तिमत्सराची भर पडली व पूर्वींच दूर ठेवलेल्या जातींत वृत्तिबहिष्कृत लोकांची भर पडून अस्पृश्यतेचा विस्तार झाला. अर्थात् हें निश्चित विधान नसून हा एक अनुमानित संभव आहे.

मनुस्मृतीच्या काळांत सुतार, लोहार, इ. कुशल पांचाळांची मान्यता वाढलेली दिसते. त्याचबरोबर अकुशल श्रम करणाऱ्या व अंगीं विशेष क्षात्रतेज नसलेल्या आर्येतरांची गणना अस्पृश्यांत होऊन त्यांना गांवाबाहेर टाकलेलें आढळतें. ग्रामबाह्य मानलेल्या जातींचे सारे व्यवहार हत्या व हीन कर्में यांच्याशींच अधिकाधिक निगडित होत गेल्यामुळें त्यांची अस्पृश्यता उत्तरोत्तर दुणावली व दृढ झाली. बौद्धांची अहिंसा व जैनांचा कडकडीत शाकाहार, यांमुळे त्या दोघांचाहि कल अस्पृश्यतेच्या निवारणापेक्षा तिच्या दृढीकरणाकडेच वळला.

भारतीय अस्पृश्यतेच्या उगमाचा व विकासाचा आर्यांच्या वर्णव्यवस्थेशीं जितका संबंध आहे, त्याहून जास्त तो आर्यद्रविडांच्या ग्रामसंस्थेशीं आहे. ग्रामसंस्थेमुळे चातुर्वर्ण्यांतल्या सर्व ग्रामस्थांचा योगक्षेम नीट चालू झाला व ग्रामबाह्यांच्या उन्नतीच्या सर्व वाटा मात्र बंद झाल्या. बलुत्यांचा हक्क हा भारतीय अस्पृश्यांना आजवर महत्त्वाचा वाटत आला आहे. या बलुत्याच्या हक्कापायीच भारतीय अस्पृश्यांची अधिकाधिक अवनति होत गेली, असें म्हणतां येतें.

मनुस्मृतीच्या काळांत बौद्ध धर्म घसरणीला लागला होता व त्याच प्रमाणांत ब्राह्मणी संस्कृतीची पुनःप्रतिष्ठा होऊं लागली होती. मनुस्मृतीच्या दहाव्या अध्यायांत चंडाल, पुक्कस, निषाद वगैरे मानव वंशांची जी ऐतिहासिक मीमांसा केली आहे, ती इतिहासाच्या दृष्टीने निराधार आहे. चांडालादि लोक हे स्वतंत्र मानववंश असून त्यांची उत्पत्ति संकरजात मानणें म्हणजे तो वर्णद्वेषाचाच एक प्रकार आहे. ही संकरकल्पना गुप्त काळापासून पुढे सारखी वाढतच गेली. वर्णसंकर झाला नाही, असें कोणाचेंहि म्हणणें नाही; पण हल्लीच्या सर्व जाती केवळ वर्णसंकरामुळेच झाल्या, ही उपपत्ति मात्र ऐतिहासिक नव्हे. मनुस्मृतींत उल्लेखिलेल्या अस्पृश्य जातींच्या पलिकडे आजच्या समाजस्थितींत महार, मातंग, ढोर, थेड, परिया, चिरुमा, नामशूद्र, मेघवाल, इ. अनेक मानीव अस्पृश्य जातींचीं नांवें आढळतात. त्यांचा उल्लेख कोणत्याहि स्मृतींत किंवा पुराणांतहि आढळत नाही आणि या जाती तर भारतांत सर्वत्र आढळतात. यावरून असें म्हणावें लागतें, की आजकालच्या मानीव अस्पृश्यांची उपपत्ति केवळ वर्णव्यवस्थेच्या धोरणाला धरून न लावतां ती राजकीय, सामाजिक आणि विशेषतः आर्थिक कारणावरूनच लावली पाहिजे. अस्पृश्यतेच्या प्रश्नांत मनोधर्माचाहि बराच पगडा आहे. आपण जें करतों तें न करणारे, आपल्याहून कमी दर्जाचे, असें मानण्याकडे मनुष्याच्या मनाचा कल असतो. त्याला अनुलक्षून स्नान-संध्या करणारे, ती न करणाऱ्यांना कमी लेखूं लागले, मांसाहार न करणारे, तो करणाऱ्यांना हीन मानूं लागले व असें मानणें हें धार्मिकतेचें लक्षण ठरलें. कांही लोकांना कांही कारणास्तव अस्पृश्य मानल्यावर तसें न मानणारे अधार्मिक ठरूं लागले व अशा प्रकारें अस्पृश्यता दृढमूल झाली. कर्मसिद्धान्त व पुनर्जन्म यांच्यामुळे तिला बळ प्राप्त झालें.

भारतांत अस्पृश्यतेचे पुढील प्रकार आढळतात –

(१) **परिस्थितिजन्य अस्पृश्यता–** उदा० बाप व मुलगा किंवा पंक्तींतले लोक जेवतांना एकमेकांना शिवत नाहीत. स्त्री रजस्वला असतां तिला शिवत नाहीत. मलाशौच व मृताशौच असतांहि तो मनुष्य अस्पृश्य असतो, इत्यादि. ही अस्पृश्यता परिस्थिति बदलल्यावर किंवा प्रायश्चित्त घेतल्याने दूर होते.

(२) **निंद्य कर्मांनी होणारी**– उदा० ब्रह्महत्या, सुरापान, इत्यादि. पण योग्य प्रायश्चित्ताने ती दूर होते.

(३) **व्यवसायामुळे उत्पन्न होणारी.** उदा० तीन वर्षे पैसा घेऊन सतत देवपूजा करणारा अस्पृश्य होतो, असें अपरार्क म्हणतो. त्यालाहि प्रायश्चित आहेच.

(४) **वंशभेदाने उत्पन्न होणारी**– उदा० शबर, पुलिंद, म्लेच्छ, यवन, किरात हे देशभिन्नत्वामुळे अस्पृश्य झाले आहेत.

(५) **द्वेषमूलक अस्पृश्यता**– उदा० बौद्ध, जैन, पाशुपत, कापालिक, वैष्णव, शैव, इ. भिन्नपंथीय लोक एकमेकांना केवळ द्वेषामुळे दूर टेवतात.

(६) **जन्मजात अस्पृश्यता**– ही अस्पृश्यता कुठल्याहि प्रायश्चित्ताने दूर होणारी नसते व ती त्या व्यक्तीला व जातीला जन्मभर चिकटून राहते.

वरील अनेक प्रकारच्या अस्पृश्यांपैकी बऱ्याच लोकांची अस्पृश्यता आपण आजवर घालविली आहे. अत्रिस्मृतींत सांगितलेले रजक, नट, बुरुड इ. अंत्यज आज बहुतेक स्पृश्य झालेले आहेत. ही सारी अस्पृश्यता रूढीने आली व रूढीनेच गेली. श्रुतींत तर तिला आधार नाहीच व स्मृतींतहि फारच थोडा आहे.

सांप्रत अस्पृश्यतानिवारणाच्या बाबतींत सार्वजनिक ठिकाणें, पाणवठे व देवळें हीं तीन ठिकाणें महत्त्वाचीं ठरलीं आहेत. अंत्यजांनी देवळांत जावें असें जसें एखाद्या स्मृतींत आढळत नाही, तसें त्यांनी देवळांत जाऊं नये, असेंहि एखादी स्मृति सांगत नाही. अत्रि तर म्हणतो–

देवयात्राविवाहेषु यज्ञप्रकरणेषु च ।
उत्सवेषु च सर्वेषु स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ।।

(अत्रि स्मृ. २४९)

अर्थ– देवयात्रा, विवाह, यज्ञप्रकरण व सर्व उत्सव यांत स्पर्शदोष नाही. ('स्पृष्टास्पृष्टि' म्हणजे स्पृष्टांना लागणारा अस्पृश्यतेचा दोष.)

अस्पृश्यांची सावलीहि अंगावर पडूं देऊं नये, असा एक अस्पृश्यतेंतला भाग आहे. पण हा छायादोष अतिरेकी मनोधर्मांतूनच उत्पन्न झाला आहे. त्याला शास्त्राधार नाही.

याउलट पुराणादि ग्रंथांत अस्पृश्यता घालविण्याचे उपायहि सांगितलेले आहेत. 'ज्याच्या कपाळावर ऊर्ध्वपुण्ड्र लावलेला दिसतो, तो चांडालहि शुद्धात्मा व पूज्य होय', असें पद्मपुराण म्हणतें (५.३७.७१). भागवतांतहि परमेश्वराचें नांव घेणारा श्वपचहि (चांडाल) श्रेष्ठ होय व भगवंताचें श्रवण, कीर्तन व ध्यान यांनी अंत्यजदेखील पवित्र होतो, असें म्हटलें आहे (३.३३; १०.७०).

बौद्ध साहित्यांत हीन जाति या नांवाने निषाद, चांडाल, पुक्कस, इ. अंत्यजांचा उल्लेख येतो. हे लोक गांवाबाहेर राहत (जातक ४.३७६). ते पीतवस्त्र आणि रक्तमाला धारण करीत. खांद्यावर कुऱ्हाड व हातांत कटोरा घेत. चांडाल स्त्रिया जादूटोणा करीत (चुल्लधम्मजातक). पण बौद्ध परंपरेंत हिंदूंपेक्षा अस्पृश्यतेचें स्तोम कमी होतें, असें दिसतें. धर्मज्ञ पुष्करसारी याच्या कन्येचा विवाह चांडालराज त्रिशंकूशीं झाल्याचें दिव्यावदानावरून कळतें. बुद्धाने छुंद या अस्पृश्याच्या घरचें भोजन स्वीकारलें होतें. बुद्धशिष्य आनंद याने चांडालकन्येच्या हातून जलप्राशन केलें होतें (दिव्यावदान पृ. ६११). चांडालराज त्रिशंकु हा स्वतः वेद व इतिहास यांत पारंगत होता. त्याच्या पुत्रानेहि वेदवेदांगांचें अध्ययन केलें होतें, हें शार्दूलकर्णावदान या अवदानकथेवरून कळतें. बुद्धाने तर चांडालादिकांनाहि निर्वाणाचा अधिकार असल्याची निःसंदिग्ध घोषणा केली आहे (जातक ४).

जैन वाङ्मयांतहि अस्पृश्यतेचा आढळ होतो. आदिपुराणांत कारूंचे (शिल्पी) स्पृश्य व अस्पृश्य असे दोन भेद केले आहेत व धोबी, सुतार, लोहार यांना अस्पृश्य वर्गांत घातलें आहे. डोंब, चांडाल व किणिक यांना अस्पृश्यांतलेहि हीन मानलें आहे.

तंत्रमार्गांत स्पर्शास्पर्शाचा विधिनिषेध नसल्यामुळे अस्पृश्यतेला स्थान नाही. शाक्त तंत्रांतल्या डोंबी, चांडाली, इ. मुद्रा या अस्पृश्य जातींतल्याच स्त्रिया असत. कुलार्णवतंत्राने भैरवचक्र प्राप्त झालें असतां सर्व वर्ण हे द्विजच होतात, असें म्हटलें आहे (८. ९६).

मध्यकालीन वैष्णव संतांनी मात्र अस्पृश्यतेचा तिरस्कार केलेला दिसतो. कबीरपंथ, दादूपंथ, वारकरी पंथ, इ. कित्येक पंथांत अनेक अस्पृश्य जातींतले संत होऊन गेले व त्यांचा आदरहि झाला.

एकोणिसाव्या शतकांत म. फुले, राजाराममोहन रॉय व स्वामी दयानंद यांनी अस्पृश्यतानिवारणाचें कार्य सुरू केलें, काँग्रेसनेहि १९१७ सालीं अस्पृश्यता नष्ट करण्याचा ठराव संमत केला. म. गांधी हे तर अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरचा कलंक आहे, असें मानीत. अस्पृश्यतानिवारण हें त्यांनी आपलें एक जीवनकार्य ठरविलें होतें. अस्पृश्यांना त्यांनी हरिजन असें नवें नांव ठेवलें व त्यांच्या उद्धारासाठी आमरण प्रयत्न केला. त्यांनी काँग्रेसच्या रचनात्मक कार्यांत हरिजनोद्धार हा महत्त्वाचा कार्यक्रम म्हणून समाविष्ट केला. १९३२ सालीं त्यांनी 'कम्युनल अवॉर्ड'च्या विरुद्ध पुण्यांत प्रायोपवेशन केलें. त्या कायद्याने हरिजनांना सवर्ण हिंदूंपासून अलग करण्याचा ब्रिटिश सरकारचा डाव होता. या प्रायोपवेशनाने हरिजनोद्धाराची

लाट सर्व देशभर पसरली. याच सुमारास हरिजनसेवकसंघाची स्थापना झाली. पुढे पुढे म. गांधी एखाद्या ठिकाणीं गेले, तर तिथल्या हरिजन वस्तींतच आपला मुक्काम करीत. हरिजनांच्या उद्धाराचें कार्य देशव्यापी करण्याचें श्रेय म. गांधींनाच आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेने अस्पृश्यता नष्ट केली आहे व कोणत्याहि स्वरूपांत अस्पृश्यतेचें पालन करणें, हा गुन्हा असल्याचें घोषित केलें आहे. या कायद्याने अस्पृश्यांची परंपरागत सामाजिक, व्यावसायिक तशीच औद्योगिक अयोग्यता दूर केली असून, त्याबरोबरच लोकसभा व राज्यविधानसभा यांत कांही वर्षांसाठी लोकसंख्येनुसार आपला विशेष प्रतिनिधि निवडून देण्याचा त्यांचा अधिकारहि सुरक्षित ठेवला आहे. आजमितीस हरिजनसेवकसंघ, भारतीय डिप्रेस्ड क्लासेस लीग, हरिजनाश्रम, इ. कांही प्रमुखसंस्था केवळ हरिजनोद्धाराचेंच कार्य करीत आहेत.

डॉ. आंबेडकर हे अस्पृश्यांचे प्रमुख पुढारी होते. अस्पृश्यवर्ग त्यांना देवासमान मानतो. ते स्वत: अस्पृश्य जातींतच जन्माला आले होते. अस्पृश्यांची तीव्र दुःखें त्यांना स्वानुभवाने कळून आलीं होतीं. त्यामुळे त्यांनी अस्पृश्यांवरचे राजकीय व सामाजिक अन्याय दूर करून त्यांचा उद्धार करण्यासाठी आपलें सारें आयुष्य खर्च केलें. अस्पृश्यवर्गाला जागृत करण्यासाठी त्यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत व जनता हीं तीन वृत्तपत्रें चालविलीं. ठिकठिकाणीं सभा-संमेलनें भरवून त्यांनी अस्पृश्य समाजांत प्रथम जागृति निर्माण केली. मग त्या जागृत व संघटित समाजबळाचा त्यांनी प्रत्यक्ष चळवळीसाठी उपयोग केला. त्यांनी पहिला सत्याग्रह केला तो महाड येथील चवदार तळ्यावर पाणी भरण्याचा (मार्च १९२७). दुसरा सत्याग्रह नासिक येथील राममंदिरांत अस्पृश्यांना घेऊन प्रवेश करण्याचा (मार्च १९३०). या दोन्ही सत्याग्रहांमुळे अस्पृश्यांची संघटना प्रभावशाली झाली. महाड सत्याग्रहप्रकरण न्यायालयांत गेलें व अखेर १९३७ मध्ये चवदार तळ्यावर पाणी भरण्याचा अस्पृश्यांचा हक्क न्यायालयाने मान्य केला.

पण असल्या अवांतर उपायांनी खरें अस्पृश्यतानिवारण होणार नाही, असें वाटल्यामुळे त्यांनी राजकीय लढा देण्याचें ठरविलें. १९३१-३२ सालीं त्यांनी ब्रिटिश सरकारचें निमंत्रण स्वीकारून गोलमेज परिषदेंत अस्पृश्यांचीं गाऱ्हाणीं मांडलीं व अस्पृश्यांना राजकीय सत्तेंत वांटा मिळाला पाहिजे, असें आग्रहाने प्रतिपादलें. त्यामुळे अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याचा निर्णय त्या परिषदेंत घेण्यांत आला; पण म. गांधींनी पुणें येथे त्याविरुद्ध प्राणांतिक उपोषण मांडल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी तडतोड म्हणून म. गांधींबरोबर एक नवा राजकीय करार केला. 'पुणे करार' या नांवाने तो प्रसिद्ध आहे. अस्पृश्यांनी प्रथम आपणांतून चार प्रतिनिधी निवडावे आणि त्यांतील एकाची संयुक्त मतदार संघातर्फे निवड व्हावी, असें त्या कराराने ठरलें.

१९३६ सालीं त्यांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापून मुंबई कौन्सिलच्या निवडणुका लढविल्या. त्या निडणुकींत ते स्वत: निवडून आले. १९४२–४६ पर्यंत ते व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे मजूरमंत्री होते. त्या काळांत त्यांनी अस्पृश्यवर्गाची शैक्षणिक व आर्थिक उन्नति करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' ही अस्पृश्यांची प्रातिनिधिक राजकीय संस्था त्यांच्याच नेतृत्वामुळे प्रभावी झाली.

शेवटीं स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताची राज्यघटना तयार करण्याचें काम त्यांच्यावर सोपविण्यांत आलें आणि त्या घटनेंत सर्वानुमतें अस्पृश्यतेला मूठमाती देण्यांत आली. [ध. शा. वि.; ध. वि. स्व.; हिं. वि. को.]

अस्वल हा ऋक्ष वर्गांतील मांसाहारी सस्तन प्राणी असून त्याच्या मुख्य दहा जाती आहेत. ऋग्वेदांत हा शब्द एकदाच आला असून नंतरच्या वैदिक वाङमयांतहि तो क्वचितच आढळतो. याचें कारण वेदकालीन आर्य ज्या प्रदेशांत राहत असत, तिथे अस्वल हा प्राणी दुर्मिळ होता.

दरवेशी लोक अस्वल पाळून त्याचे खेळ करून दाखवितात व त्यावर आपली उपजीविका करतात. अस्वलाच्या केसांचा



अस्वल

ताईत बनवून तो मुलांच्या गळ्यांत बांधल्याने त्यांना भुताखेतांची बाधा होत नाही, अशी समजूत आहे.

अहंकार (१) सांख्यांच्या २५ तत्त्वांपैकी दुसरें तत्त्व. प्रलयदशेंत प्रकृति साम्यावस्थेंत राहते; म्हणजेच सत्त्व, रज व तम हे तिचे तीन गुण समभावाने राहतात. प्रकृतीचा पुरुषाशीं संयोग होतांच या त्रिगुणांत क्षोभ निर्माण होतो. तिथून पुढे सृष्टिकार्याला प्रारंभ होतो. ज्याची प्रथम सृष्टि होते तें महत्तत्त्व होय. त्रिगुणांच्या योगें महत्तत्त्व क्रियाशील झाल्यावर त्यांतून अहंकाराची निर्मिति होते. मी व माझें असा अभिमान धारण करणें, हें अहंकाराचें स्वरूप आहे. या अहंकारामुळेच पुरुष नाना प्रकारच्या भ्रमांत पडून 'मी कर्ता, मी भोक्ता, मी स्वामी' असें मानूं लागतो. गुणवैषम्यामुळे या अहंकाराचीं तीन रूपें होतात– (१) ज्यांत सत्त्वगुणाचें प्राधान्य असतें, तो वैकृत अर्थात् सात्त्विक अहंकार. (२) रजोगुणाचें प्राबल्य असतें, तो तैजस अहंकार. व (३) तमोगुणाचें प्राधान्य असतें, तो भूतादि अर्थात् तामस अहंकार होय.

तैजस अहंकार हा अन्य दोन अहंकारांचा प्रवर्तक असतो; सात्त्विक अहंकारापासून पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें व मन हे उत्पन्न होतात; तसेच तामस अहंकारापासून तन्मात्र उत्पन्न होतात (सांख्य. का. २४ व २५). मीपणा, अभिमान, गर्व, घमेंड, हीं अहंकाराचीं सामान्य नांवें आहेत.

(२) वज्रयानी साधनेंत साधकाने स्वतःला देवताच समजणें, याला अहंकार म्हटलें आहे. या साधनेंत साधक 'ओ सर्वतथागतात्मकोऽहम्' किंवा 'ओ शून्यताज्ञानवज्रस्वभावात्मकोऽहम्' या मंत्राचें पुरश्चरण करतो व त्यानंतर तथागतासारखेंच आचरण करूं लागतो. साधक तथागत (बुद्ध) बनला, की प्रज्ञापारमिता ही त्याची मुद्रा होते. मग त्याच्या अंतरांत त्याच्या साध्य देवतेचा आवेश जागृत होतो व ती देवता त्याच्या माध्यमांतून स्वतःला अभिव्यक्त करते. या पद्धतींत कामक्रोधादि अनेक आवेश येत असतात. त्यांचा उपशम झाल्यावर साधक मंडलांत प्रवेश करतो. [भा. द.; सि. सा.]

अहंकारकर्षिणी एक गुप्त शक्ति. [पु. इं.]

अहत वस्त्र कोरें वस्त्र. मंगल प्रसंगीं वधूवरांना कोरीं वस्त्रें नेसायला देतात. आहेर करतांनाहि कोऱ्या वस्त्राचीच घडी देतात. देवांना व श्राद्धांत पितरांना अहत वस्त्रच द्यावें, असें सांगितलें आहे (वायु पु. ८०. ४. ३७).

अहम् या शब्दाने जीवात्म्याचा बोध होतो. याचे वाच्य व लक्ष्य असे दोन अर्थ आहेत. देहेंद्रियांशीं तादात्म्य हा वाच्यार्थ असून देहेंद्रियांहून भिन्नत्व हा लक्ष्यार्थ आहे. या 'अहम्'वरच कर्तृत्व, भोक्तृत्व, इ. धर्म भासतात. तत्त्वज्ञानांत या अहम्चेंच ब्रह्माशीं तादात्म्य करायचें असतें. अहम्च्या वाच्यार्थामुळेच जगांतले सर्व व्यवहार चालतात. या वाच्यार्थानेच सर्वत्र 'मी मी' करणें, यालाच अहंकार किंवा गर्व असें म्हणतात. त्याच्या लक्ष्यार्थासाठी श्रवण-मननादि साधनांची जरुरी असते.

अहली पहली गुजरातमधला होळीच्या सणांतला एक भाग. याचें मराठी नाव 'मूठपसा' असें होऊं शकेल. होळी पौर्णिमेच्या आधी आठ दिवस गुजरातमधल्या लहान मुली गटागटांनी अहली पहली मागायला बाहेर पडतात. घरोघरीं जाऊन हातांनी ताल देत त्या गाऊं लागतात—

अहली दे जे बाई पहली दे जे
पहलीना पाच डेरा देजे


अर्थ––मूठ द्या बाई पसा द्या. पशाचे पांच डेरे द्या.

मग घरोघरींच्या गृहिणी त्या मुलींना धान्य घालतात. एखादीने तें घातलें नाही, तर मुली लगेच तिला उण्या उत्तराने बोलतात. आठ दिवस असें धान्य गोळा केल्यावर तें विकून त्याच्या बदली खजूर घेतात व सर्व मुली एकत्र जमून पौर्णिमेस होळीचें दर्शन घेतल्यावर तो खजूर खातात. [कंकावटी भा. १]

अहरिमन् झरतुष्ट्री धर्मांत सांगितलेला दुष्कृत्यांचा देव किंवा सैतान. जुन्या अवेस्त्यांत याचें नांव अंग्र मैन्यु असें सांगितलें असून, त्याला स्पेन्त मैन्यूचा (पवित्र-आत्मा) शत्रु मानलें आहे. हा अज्ञानी, लबाड, मत्सरी व कुटिल आहे. याचा ओढा सदैव दुष्कृत्य कडे असतो. तो पापाचाराला उत्तेजन देतो व सदाचाराला विरोध करतो. तो अथांग तमोलोकांतून वर आला आहे. त्याला अहुर मज्दाच्या अस्तित्वाची जाणीव नसते. तो इतका बलाढ्य आहे, की आजवर कोणाहि माणसाला त्याचा पराभव करतां आला नाही. झरतुष्ट्रानेच फक्त त्याचा पाडाव केला. नाना प्रकारचीं दुष्ट कृत्यें करण्यासाठी त्याने स्वतःचें सैन्य निर्माण केलें असून तें नरकलोकांत राहतें. पुनरुत्थानाच्या दिवशीं तो असहाय्य होऊन शरण येतो व शेवटीं त्याचा संपूर्ण नाश होतो. सैतान व अहरिमन् यांच्यांत बरेंच साधर्म्य आहे. अर्वाचीन अवेस्ती पंडित अहरिमन्ला व्यक्ति न मानतां मानवी मनांतील असत्प्रवृत्तीला तें नांव देतात. पाहा––अहुरमज्द, झरतुष्ट्री धर्म. [एन्सा. रि. ए.]

अहर्गण अह : + गण = दिवसांचा समुदाय. अहर्गण हा सावन (सौर) दिवसांचा समुदाय असतो. दिवसांचा उल्लेख जसा वाराने करतां येतो, तसाच तो क्रमांकानेहि करतां येतो. कोणत्या तरी एखाद्या महत्त्वाच्या घटनेपासून एक, दोन, तीन अशा क्रमाने विशिष्ट दिवशीं जी दिवससंख्या येईल तिला अहर्गण म्हणतात. कलियुगाच्या आरंभापासून उलटलेल्या दिवसांची अशी गणना करण्याचा प्रघात आहे. वेगवेगळे ज्योतिषग्रंथकार आपल्या सोयीनुसार वेगवेगळे अहर्गण मानतात. सिद्धान्तग्रंथांत सृष्टचारंभापासून इष्ट दिवसापर्यंत मोजून संख्या काढतात, त्याला 'सृष्टचाद्यहर्गण' म्हणतात. युगारंभापासून व शकारंभापासून मोजलेल्या दिवसांना अनुक्रमें युगाद्यहर्गण व शकाद्यहर्गण म्हणतात. अहर्गणाचा केवळ गणित ज्योतिषांतच उपयोग असतो; व्यवहारांत नाही. अहर्गणाच्या आधारें मध्यम ग्रहसाधन करतात. [पं. ज्यो.; सु. वि. को.]

अहल्या ब्रह्मदेवाची मानसकन्या व गौतमाची भार्या. ही ब्रह्मदेवाने निर्माण केलेली पहिली अत्यंत रूपमती स्त्री होय. ब्रह्मदेवाने तिला शारद्वत गौतमाजवळ ठेव म्हणून



अहल्या — नालंदा येथील एका मंदिरांतील चित्रांकन

ठेवलें. ती वयांत आल्यावर गौतमाने तिला ब्रह्मदेवाकडे परत पाठविलें. गौतमाचें तें जितेंद्रियत्व पाहून ब्रह्मदेव प्रसन्न झाला व त्याने तिचें गौतमाशींच लग्न लावून दिलें (वा. रा. उ. ३०).

या कथेचा दुसरा पर्याय असा—

इन्द्र, अग्नि, वरुण, इ. देवांना, तशीच दानवांनाहि अहल्येची अभिलाषा उत्पन्न झाली. तेव्हा ब्रह्मदेवाने पण लावला, की 'जो पृथ्वीप्रदक्षिणा सर्वांत आधी पुरी करील, त्याला मी ही कन्या देईन.' त्यावर सर्व देव-दानव पृथ्वीप्रदक्षिणेला निघाले. पण, गौतमाने अर्धप्रसूत धेनु ही पृथ्वीच आहे, या शास्त्राधारानुसार त्या धेनूलाच प्रदक्षिणा घातली व तो ब्रह्मदेवाकडे गेला. गौतम प्रथम आला, हें पाहून ब्रह्मदेवाने त्याला अहल्येचें कन्यादान केलें. ही वार्ता ऐकून इंद्राला फार दुःख झालें; कारण त्याला तिची अत्यंत अभिलाषा होती.

विवाहानंतर गौतम व अहल्या ब्रह्मगिरीवर राहायला गेलीं, तरी इंद्राने तिची अभिलाषा सोडली नाही. एके दिवशीं तो गौतमाच्या आश्रमांत आला. गौतम आश्रमांतून बाहेर गेलेला पाहून त्याने गौतमाचेंच रूप घेतलें व अहल्येशीं संभोग केला. अहल्येला त्याचें कपट ओळखतां आलें नाही. इंद्र अशा प्रकारें बरेच दिवस अहल्येकडे येऊन तिचा उपभोग घेत असे. तो आपला पति नसून इंद्र आहे, हें अहल्याहि जाणत होती, असें वाल्मीकि रामायणांत म्हटलें आहे (१.४८.१९). एके दिवशीं इंद्र आश्रमांत असतां गौतम ऋषि परत आला. तें पाहून अहल्या भयभीत झाली. तिने पतीच्या पायां पडून घडलेला अपराध त्याला सांगितला (गणेश पु. १. ३०). गौतमाने क्रोधाविष्ट होऊन त्या दोघांनाहि शाप दिला. तो इंद्राला म्हणाला. 'तूं शत्रूकडून पराभूत होशील. तूं जार कर्माचा उत्पादक आहेस; त्यामुळे मनुष्यलोकांत यापुढे होणाऱ्या प्रत्येक जारकर्माचें अर्धें पाप तुझ्या माथीं बसेल' (वा. रा. उ. ३०. ३४). 'तुझ्या अंगावर सहस्र भगें पडतील' (म. भा. अनु. ४१). 'तुला वृषण राहणार नाही' (लिंग पु. १. २९).

नंतर तो अहल्येला म्हणाला. 'तूं अदृश्य रीतीने इथे नाश पावशील व तुझें रूप सर्वत्र विभागलें जाईल. जेव्हा दाशरथी राम इथे येईल, तेव्हाच तुझा उद्धार होईल' (वा. रा. १. ४८). 'तूं शिला होशील' 'तुझ्या देहावर केवळ अस्थिचर्म राहील. तुझ्या या रूपाने स्त्रियांना पापकर्माची दहशत बसेल.' (स्कंद पु. १. २. ५२.).

'अहल्यायै जार' असें इंद्राचें वेदांत गौरवयुक्त वर्णन आहे. (श. बा. ३. ३. ४. १८) त्यावरून अहल्या-इंद्र ही कथा रूपकात्मक असावी, असें वाटतें. शतपथ ब्राह्मण व जैमिनिसूत्रें या ग्रंथांवरूनहि तिची रूपकात्मकता कळून येते. अहल्या म्हणजे रात्र, गौतम म्हणजे चंद्र व इंद्र म्हणजे सूर्य होय. याचें स्पष्टीकरण असें की इंद्ररूपी सूर्याने अहल्यारूपी रात्रीचें धर्षण केलें. अर्थात् ही कथा निसर्गदृश्यावर आधारित आहे.

अहल्यातीर्थ (१) अहल्येच्या मुक्तीसाठी गौतमाने गोदावरी कांठीं कोटितीर्थावर तप केलें. त्यायोगें तिथे एक सरोवर निर्माण झालें. तेंच हें अहल्यातीर्थ होय. तिथे मग गौतमाने लिंगस्थापना केली. [स्कंद पु. १. ३. ५२]

(२) नर्मदेवरचें एक तीर्थ. इथे अहल्येने तप करून मुक्ति मिळविली. चैत्र शु. १४ च्या दिवशीं इथे जो अहल्येची पूजा करील, तो स्त्रियांना प्रिय होतो. [मत्स्य पु. १९०. ९०–९३]

अहल्याह्रद एक तीर्थ. हें गौतमाच्या आश्रमाजवळ आहे. [हि. ध.]


अहार एक जैन क्षेत्र. टीकमगडापासून ६ कोसांवर हें क्षेत्र असून इथे चार जैन मंदिरें आहेत. मुख्य मंदिरांत शांतिनाथाची ९ हात उंचीची मूर्ति असून ५ हात उंचीची कुंथुनाथाचीहि मूर्ति आहे. [कल्याण–तीर्थांक]

अहि वृत्राला ऋग्वेदांत अहि म्हटलें असावें, असें वाटतें. कारण तिथे एकमेकांचीं विशेषणें एकमेकांना लावलेलीं आढळतात (ऋ. १. ३२). 'अहिं च वृत्रहाऽवधीत्'= इंद्राने अहीला मारलें, असेंहि वर्णन आहे (ऋ. ८. ८२ २).

हा शब्द बहुवचनी येतो, तेव्हा त्याने त्या नांवाच्या राक्षसकुलाचा बोध होतो. अहि हा प्रबल असून तो दुर्गम अशा गिरिकुहरांत राहत असे (ऋ. २. ११. ५). तो दास म्हणजे आर्येतर असून स्वतःला अमर समजत असे (ऋ. २. ११. २). अहि हा एका जमातीचा पुढारी असून त्याने सिंधुप्रांत बळकाविला होता, तो इंद्राने त्याला मारून सोडवून घेतला, असा अर्थ श्री. भागवत सांगतात (ऋ. १०. १३३. २). वल नांवाचें अहीचें स्थान म्हणजे बलुचिस्तान असावें, असेंहि त्यांनी म्हटलें आहे.

ऋग्वेदांत अहिर्बुध्न्य नांवाची एक देवता आहे. ती अहि–वृत्रांचे चांगले गुण दर्शविणारें स्वरूप होय, असें केतकर म्हणतात. वेदांत आणि तदुत्तर कालांत अहि हा शब्द सर्प या अर्थीहि योजलेला दिसतो. याने आपली कात टाकल्याचा व याचा दंश विषारी असल्याचा ऋग्वेदांत उल्लेख आहे (ऋ. ९. ८६. ४४; ७. १०४. ७). हिवाळ्यांत याला जडत्व येतें, म्हणून हा पृथ्वीच्या पोटांत शिरत असल्याचें अथर्ववेद सांगतो (१२. १. ४६). अवेस्त्यांत अहि शब्दाशीं सदृश असा अझि हा शब्द त्याच अर्थाने आला आहे. त्याविषयींच्या इराणी कथा सर्पाशींच संबद्ध आहेत. **पाहा** – नाग. [ऋ. द.; म. ज्ञा. को.]

अहिच्छत्रा एक प्राचीन नगर. उत्तर प्रदेशांतल्या बरेली जिल्ह्यांतल्या रामनगर या गांवाजवळ हें नगर होतें. सांप्रत तें भग्नावशिष्ट रूपांत दिसतें. इथे एका प्राचीन किल्ल्याचे अवशेष आहेत. त्या किल्ल्याला आदिकोट म्हणतात. वैदिक साहित्यांत या नगराचें नांव परिचक्रा असें आढळतें. ही उत्तर पांचालांची राजधानी होती. अर्जुनाने युद्धांत द्रुपदाचा पराभव करून अहिच्छत्रा व कांपिल्य हीं दोन नगरें द्रोणाचार्यांना दिलीं होतीं. (म. भा. आदि. १३८). महाभारतांत व पाणिनीच्या अष्टाध्यायींत अहिच्छत्र, अहिक्षेत्र, अशींहि नांवें आढळतात. जैन ग्रंथांत अहिच्छत्रा किंवा संख्यावती अशीं नांवें आहेत. विविध तीर्थकल्प या ग्रंथांत अहिच्छत्रा नांवाविषयीं पुढील कथा आहे –




चतुर्भुज देवी (मृण्मय) – अहिच्छत्रा

एकदा पार्श्वनाथ या नगरींत वास्तव्याला आला असतां, कमठ नांवाच्या दानवाने त्याच्यावर मुसळधार पर्जन्यवृष्टि सुरू केली. नागराज धरणींद्र याला ही वार्ता समजतांच तो तिथे आला व त्याने आपलें फणाछत्र पार्श्वनाथावर उभारून त्याचें रक्षण केलें. त्या दिवसापासून या नगराला अहिच्छत्रा नांव पडलें.


महाभारतकालांत या नगराची बरीच प्रसिद्धि होती. बुद्धोत्तर कालांत हें मगध साम्राज्यांत समाविष्ट झालें. त्यानंतर शुंगांनी यावर सत्ता गाजविली. इ. स. च्या तिसऱ्या शतकांत यावर नागवंशी राजांचें आधिपत्य होतें. अच्युत नांवाच्या एका राजाचे शिक्के या भागांत सांपडतात. तो राजा नागवंशीच असावा, असें विद्वानांचें मत आहे. त्याचा पराभव करून समुद्रगुप्ताने त्याचें राज्य गुप्तसाम्राज्यांत समाविष्ट केलें.

गुप्तकालानंतर अहिच्छत्रेचा विशेष वृत्तांत उपलब्ध होत नाही. सातव्या शतकांत हा प्रदेश हर्षवर्धनाच्या साम्राज्यांत समाविष्ट झाला होता. याच काळांत भारतांत आलेल्या युआन च्वांगने लिहिलें आहे, की या नगराचा विस्तार दीड कोस असून इथे बौद्धांचे दहा संघाराम होते व त्यांत एक हजार हीनयानी भिक्षू राहत होते. याशिवाय नऊ देवमंदिरें असून त्यांत पाशुपत मताचे ३०० साधु राहत होते. बौद्धांचे अनेक स्तूप व मठ आजहि भग्नावस्थेंत इथे आढळतात. इथल्या उत्खननांत अनेक धार्मिक वस्तू मिळाल्या आहेत. त्यांत कित्येक शैव चिन्हें व शिव-पार्वतींच्या अनेक सुंदर मूर्ती मिळाल्या आहेत.



हत्तीशीं लढणारा तरुण. गुप्तकाल.
राष्ट्रीय संग्रहालय, नवी दिल्ली

हर्षवर्धनाच्या नंतर कोणत्या राजवंशांनी इथे राज्य केलें त्याची निश्चित माहिती मिळत नाही. इ. स. १८६२ सालीं ज. कनिंगहॅमने व त्यानंतर १८९१ सालीं डॉ. फुहररने इथे उत्खनन केलें. तिसरें उत्खनन १९४० सालीं हातीं घेतले गेलें. या उत्खननांत सांपडलेलीं मंदिरें अधिकांश कुशाण व गुप्त यांच्या कालांतलीं आहेत. या उत्खननांत भिन्न भिन्न कालांतलीं मातीचीं भांडीं व अनेक राजवंशांचे शिक्के मिळाले आहेत. मूर्तींमध्यें गुप्त कालांतल्या मूर्ती सर्वांत अधिक आहेत. मृण्मय मूर्तींत बुद्ध, विष्णु, अग्नि, शिव, कुबेर, इ. देव मिळाले आहेत. प्राचीन जैन मूर्तीहि सांपडल्या आहेत. उत्तर भारतांत अहिच्छत्रा हें नगर बरींच शतकें जैनांचें एक प्रमुख केंद्र होतें. आजहि जैन लोक या स्थानाला पुण्यतीर्थ मानतात. इथे जैनांचीं अनेक मंदिरें आहेत. एक विशाल मंदिर उत्खननांतच



उत्खनित मृत्तिका पात्रें–अहिच्छत्रा
(श्री जिनेश्वरदास संग्रह)

सांपडलें आहे. दर वर्षी कार्तिकांत इथे मेळा भरतो. जैन समाज या आपल्या प्राचीन तीर्थाचा पुनरुद्धार करण्याच्या कामीं प्रयत्नशील आहे. [अहिच्छत्रा; हि. जॉ. ए. इं.]

अहिवरा भाट बंगाली लोकांत लग्नापूर्वी उभयपक्षांकडे मेजवान्या होतात, त्यांचें नांव. या प्रसंगीं आप्तेष्टांस मिठाई, फळें व वस्त्रें वांटतात, त्याला 'सामाजिक' म्हणतात. [ल. वि. सो.]

अहिराणी भाषा मराठीच्या पोटभाषांपैकी एक. खानदेशांत ही बोलली जाते. जळगांव व धुळें हे दोन जिल्हे, दक्षिणेस नासिक जिल्ह्याचा उत्तर भाग व उत्तरेस बऱ्हाणपूर, एवढ्या क्षेत्रांत या भाषेचा वापर आहे. लिखित साहित्याच्या अभावामुळे ही भाषा अजून बोलीच्याच अवस्थेंत आहे. तिच्यांत प्रदेशपरत्वें पोटभेदहि निर्माण झाले आहेत. उत्तरेकडे गुजराती भाषेचा निकटचा संबंध आल्यामुळे हिच्यावर पदोपदीं गुजरातीचा ठसा दिसतो. त्यामुळेच अहिराणी ही मराठी भाषेचा पोटभेद आहे, कीं गुजरातीचा, याविषयी भाषा पंडितांनाहि संशय पडला आहे. डॉ. ग्रियर्सन याच्या मतें ती गुजरातीची पोटभाषा आहे. मुख्यत्वें खानदेशांत बोलली जात असल्यामुळे हिला खानदेशी असेंहि म्हणतात.

खानदेशाचा उत्तर भाग सातपुडा पर्वताच्या रांगांनी व्यापलेला आहे. या भागांतून तापी व नर्मदा या दोन मोठ्या नद्या वाहतात. या प्रदेशांत भिल्ल व ठाकूर या जातींचा भरणा विशेष आहे. याशिवाय उत्तरेकडील बऱ्याच फिरत्या टोळ्या या लोकांत येऊन मिसळल्या असण्याचा फार संभव आहे. आभीर लोकहि असेच उत्तर व पश्चिम या देशांतून येऊन या भागांत स्थायिक झाले. आभीरांना अहीर म्हणतात. त्यांच्या नांवावरूनच या भाषेला अहिराणी असें नांव पडलें आहे. अहीरांच्या शाखा खानदेशाच्या बाहेरहि पसरल्या. त्यांच्या प्रसारामुळे भाषेचें क्षेत्रहि विस्तारलें.

या भाषेची ढोबळ खूण म्हणजे 'ळ' काराबद्दल 'य' कार येणें ही होय. उदा० डोळा–डोया, कावीळ–कावीय, जळगाव–जयगाव. तसेंच 'स' बद्दल 'छ' येतो. उदा० सावली–छावली. 'ण' बद्दल 'न' येतो. उदा० पानी, वानी, पाहुना; 'र'च्या पुढे ड आल्यास र बद्दल 'ल येतो. उदा० रडूं–लडूं, ओरडणें-वलडणें. या भाषेंत विभक्तीचे प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत–

	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	—	—
द्वितीया	ले	सले, हले
तृतीया	न्ही, नी, कडतीन, कड	सन्ही–सनी, सकडतीन, सकड
चतुर्थी	ले, से	सले, सकरी, ससे
पंचमी	तिन, थिन, पान	सतिन, सथिन, सपान
षष्ठी	न्ह, न्ही, न, नी	सन्ह, सन्हीं, सन, सनी
सप्तमी	म, मा, मझार	सम, समा, समझार
संबोधन	ओ	ओ

अहिराणींत विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वी नामाचें सामान्यरूप होत नाहीं. उदा० घरले, समले. सर्वनामांत प्रथमा विभक्तींत मी चें अनेकवचन आम्हुं व तूं चें अनेकवचन तुम्हुं होतें. द्वितीया–चतुर्थींत मले–आम्हले, तुले–तुम्हले, पंचमींत मनपान आम्हनपान, तुनपान, तुमुनाथीन, षष्ठींत मन्ह, मनी–आम्हना, आमनी व सप्तमींत, मनमा, आम्हनामा, तुमा तुमनामा होतें. क्रियापदाचे प्रत्यय लिंगाप्रमाणे बदलत नाहीत. तीन्ही लिंगी, तीन्ही पुरुषी व दोन्ही वचनी क्रियापदाच्या एकाच मूळरूपाने भूतकाळ दाखविला जातो. उदा० मी टाक, तूं टाक, त्यांनी टाक. संस्कृतमधील भविष्याचा 'स्य' प्रत्यय अहिराणींत आला आहे. उदा० 'तो करनारसे' = तो करणार आहे.

अहिराणी भाषेचा एक नमुना पुढीलप्रमाणे–

उत्तर हिंदुस्थानमा अयोध्या नावन यक सहेर शे. तठे येक राजा होइ ग्या. त्यान्ह नाव दसरथ व्हत. तो धल्डा होइग्या, पन त्याले पोरसोर झाय नी. तव्हह त्यानी काय के, की त्यान्हा जो ब्राह्मण गुरु व्हता त्याले बलाइसन आन अन "डिकरानी कांही तजवीज आमले दरखाज" अशा त्याना रावन्याकिध्यात बामननी येक उपाय दखाडा. रूसिसरिंग नावना येक रूसी व्हता; त्याले गावमझार लइ येवान ठयरन......

वरील विवेचनावरुन श्री. कृ. पां. कुलकर्णी या भाषेसंबंधी पुढील निर्णय सांगतात —

अहिराणींत मराठी भाषेचीच लक्षणें अधिक असल्यामुळे तिला मराठीचीच पोटभाषा मानणें, हेंच शास्त्रशुद्ध आहे. याचीं कारणें पुढीलप्रमाणे—

(१) मराठी–गुजराती शब्दांचें प्रमाण १००:४१. (२) नामविभक्तींपैकी प्रथमा, संबोधन, द्वितीया, चतुर्थी, तृतीया, पंचमी, सप्तमी, या मराठी दिसतात. (३) षष्ठी विभक्ति गुजराती दिसते. (४) आख्यात–विभक्तींत वर्तमान, भविष्य, आज्ञार्थ, अकरणरूप, हे सर्व मराठी दिसतात. (५) ल्यबंतरूप गुजराती आहे; परंतु त्याचे धातू मराठी तद्भव दिसतात. (६) अस्तिवाचक क्रियापद 'से' हें गुजराती आहे. हें कधी मराठी आख्याताला तर कधी गुजराती आख्याताला चिकटलेलें दिसतें. (७) वाक्प्रचार मराठी वळणाचे आहेत. (८) वर्णप्रक्रियांत मराठीच उच्चार प्रामुख्याने आढळतात. गुजराती उच्चार कानांवर ठसण्यासारखा आढळून येत नाही. [म. भा. उ. वि.]

अहिर्बुध्न्य एक वैदिक देवता. ऋग्वेदांत अहिर्बुध्न्याचा बारा वेळां उल्लेख असून तीन ऋचांत त्याला आवाहन केलेलें आहे (ऋ. ५.११.१६; ७.३४.१६–१७.). याच्याबरोबर येणाऱ्या देवता म्हणजे अपांनपात् व अज एकपाद् या होत. अहिर्बुध्न्य ही अंतरिक्षांतील देवता असावी, असें निघंटूवरून वाटतें (५. ४). भक्तांना दुखापत न करण्याविषयी याला प्राथिलें आहे, त्यावरून त्याचा स्वभाव पीडादायक असावा. पुढच्या काळांत याचा संबंध गार्हपत्य अग्नीशीं लावला गेला आहे. 'एष ह वा अहिर्बुध्न्यो यदग्निर्गार्हपत्यः' = गार्हपत्य अग्नि हाच अहिर्बुध्न्य होय (ऐ. ब्रा. ३. ३६). उत्तरकालीन वाङमयांत रुद्र-शिवाला हें नांव मिळालें असून त्याचें रूप अहिर्ब्रध्न असें झालें आहे. हलायुधाने अहिब्रध्न म्हणजे रुद्रविशेष असें सांगून पुढील कथासंदर्भ दिला आहे – महादेवाच्या प्रसादाने सुरभीला कश्यपापासून अकरा रुद्र, अजैकपाद्, अहिब्रध्न, त्वष्टा व रुद्र असे पुत्र झाले (हरि वं. १३). अहिर्बुध्न्य ही चंद्राची संज्ञा असून प्राचीन काळीं जसे सूर्योपासक लोक होते, तसेच चंद्रोपासकहि होते, असें वेदार्थयत्नकारांचें मत आहे. **पाहा**–अज एकपाद्, अपांनपात्.

अहिर्बुध्न्य संहिता पांचरात्र संप्रदायाचा प्रमुख ग्रंथ. ही संहिता अड्यार लायब्ररी, मद्रास येथून प्रकाशित झाली आहे. अहिर्बुध्न्याने बहुत काल तप करून संकर्षणाकडून सत्यज्ञान प्राप्त करून घेतलें आणि त्या ज्ञानांतूनच ही संहिता प्रकट झाली. या संहितेच्या मताप्रमाणे अंतिम सत्य हें अनादि, अनंत, शाश्वत, नामरूपरहित, अवि-

कारी व वाङ्मनसातीत आहे. त्यालाच परमात्मा, भगवान्, वासुदेव, अव्यक्त इ. नांवांनी संबोधित केलें जातें. या ज्ञानाच्या द्वारें जीवाचीं पापपुण्यें समाप्त झालीं, वासना नष्ट झाल्या व त्रिगुणांचे बंध तुटले, की मग त्याला त्या परब्रह्म परमात्म्याचा अनुभव घडतो.

हें परब्रह्म प्राकृतिक गुणांनी विरहित असूनहि ज्ञान, शक्ति, ऐश्वर्य, बल, वीर्य व तेज या षड्गुणांनी मंडित आहे. परब्रह्माची शक्ति चांदणें जसें चंद्रापासून अविभक्त असतें, तशी त्याच्यापासून अपृथक् आहे. विश्व ही त्याच शक्तीची अभिव्यक्ति होय. ही शक्ति आनंदरूप व निरपेक्ष आहे. तिलाच लक्ष्मी, श्री, कमला, अदिति, इ. नांवें आहेत. तिच्यापासूनच भौतिक व आध्यात्मिक सत्ता उत्पन्न होतात. तिच्याच प्रेरणेने प्रकृति-पुरुषांचा समागम होतो व त्रिगुणात्मक प्रकृति विश्वरचनेसाठी प्रवृत्त होते.

शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रभाष्यांत (२. २. २४ वरील) संकर्षणाला जीव, प्रद्युम्नाला मन व अनिरुद्धाला अहंकार मानलें आहे. अहिर्बुध्न्य संहितेच्या मतें अनिरुद्ध हा सत्त्वगुणाचा अधिष्ठाता असून पुरुष-प्रकृतिभेद संकर्षणापासून नसून प्रद्युम्नापासून सुरू होत आहे. षड्गुणांत ज्ञान–बलांपासून संकर्षणाचा, ऐश्वर्य–वीर्यांपासून प्रद्युम्नाचा व शक्ति–तेजांपासून अनिरुद्धाचा जन्म झाला आहे. हे तीन आध्यात्मिक व्यूह मानले जात असून, तेहि वासुदेवाप्रमाणेच षड्गुणमंडित आहेत.

या संहितेंत जीव–ब्रह्मांचा संबंध वेदांतल्याप्रमाणेच सयुजा व सखा या स्वरूपाचा आहे. सृष्टीच्या आविर्भावसमयीं जीव ब्रह्मापासून पृथक् होतात. प्रलयकालीं पुनश्च परब्रह्मांत लीन होतात. मुक्तिसमयीं ते भगवद्रूप होत असले, तरी त्यांची स्वतंत्र सत्ता टिकून राहते. जीव अणुरूप असला, तरी तो प्रभूच्या सायुज्याने सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् बनतो. **पाहा**– पांचरात्र संप्रदाय, चतुर्व्यूह. [भक्ति का विकास]

अहिर्बुध्न्य स्नान नक्षत्र व्रत. अहिर्बुध्न्य ही उत्तराभाद्रपदांची देवता आहे (बृ. सं. ९७.५). दोन मोठ्या भांड्यांत पाणी भरून त्यांत कुश, गंध, उदुंबराचीं पानें व पंचगव्य टाकतात आणि त्या जलाने स्नान करतात. मग अहिर्बुध्न्य, सूर्य, वरुण, चंद्र, रुद्र व विष्णु यांची पूजा करतात फल – गोधनप्राप्ति व समृद्धि. [हे. ब्र.]

अहिवंशी जवळपूर व नर्मदेचें खोरें या ठिकाणीं वस्ती करून राहणारी एक जात. ब्राह्मण नसून ब्राह्मण म्हणवून घेणारा हा वर्ग आहे. ब्राह्मण बाप व क्षत्रिय आई यांच्यापासून यांची उत्पत्ति झाल्याचें सांगतात. पूर्वीं हे ओझीं वाहण्याचें काम करीत. [का. ट्रा. सी. पी.]

अहिंसा (न + हिंसा=अहिंसा). हिंसेच्या कांही व्याख्या व अर्थ पुढीलप्रमाणे – (१) 'साक्षान्मरणानुकूलव्यापारः' = प्रत्यक्ष मरणाला अनुकूल असा प्रयत्न अथवा उद्योग (दिनकरी). (२) 'द्रोहः इति परे मन्यन्ते' = हिंसा म्हणजे द्रोह असें दुसरे (पंडित) मानतात (गौतमसूत्रवृत्ति). (३) 'हिंसा चौर्यादि कर्म च' = चौर्य, वृत्तिनाश, इ. कर्में म्हणजे हिंसा होय (अमर).

हिंसेच्या विरुद्ध ती अहिंसा. तिच्या कांही व्याख्या पुढीलप्रमाणे–– (१) हिंसा न करणें, काया–वाचा–मनें कोणाहि प्राण्यास पीडा न देणें, भूतमात्रावर प्रेम करणें. (२) देहाने कोणास न मारणें, त्रास न देणें, देहाला कोणीं मारलें, त्रास दिला, तरी सहन करणें (गीताई शब्दार्थ कोश).

योगशास्त्रांत यमांना फार महत्त्व दिलेलें असून त्यांत अहिंसेला प्रथम स्थान दिलेलें आहे (पा. यो. सू. २.३०). मनुष्याच्या हातून जे व्यवहार घडतात, त्या सर्वांचा संबंध शरीर, वाणी व मन या तीहींशीं येत असतो. या तीहींच्याहि द्वारें इतरांना म्हणजे केवळ माणसांनाच नव्हे; तर मानवेतर योनींनाहि दुःख होणार नाही अशा प्रकारें वागणें म्हणजे अहिंसाव्रताचें पालन करणें होय. शारीरिक व्यापारांमुळे इतरांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पीडा होणार नाही असें वागणें, ही कायिक अहिंसा. वाणीने कठोर, मर्मभेदी भाषण न करणें, कुचेष्टा, उपहास, निंदा न करणें, ही वाचिक अहिंसा. मानसिक अहिंसा ही वरील दोहींपेक्षाहि कठिण आहे. कारण तिच्यांत हिंसक विचार मनांतच येऊं द्यायचे नसतात. ही गोष्ट निर्वैर वृत्तीची साधना करूनच साध्य करावी लागते. कोणाचेंहि अशुभ, अनिष्ट न व्हावें अशी मनःस्थिति कायम राखणें, ही मानसिक अहिंसा होय.

अहिंसाव्रत अंतरांत सुस्थिर झाल्यावर त्याचा परिणाम पुढीलप्रमाणे होतो––

अहिंसाप्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्यागः

(पा. यो. सू. २.३५)

अर्थ–(योग्याच्या अंतरांत) अहिंसेची प्रतिष्ठा झाली, की त्याच्या सान्निध्यांत जे येतील, त्यांच्या चित्तांतलेंहि वैर नाहीसें होतें.

भारतीय आर्यधर्माच्या अनेक उदात्त तत्त्वांपैकी अहिंसा हें एक प्रमुख तत्त्व आहे. अहिंसा हा धर्म म्हणून मानला गेला आहे. भारतीयांच्या ४८ संस्कारांत अहिंसा हा एक आत्म-

संस्कार म्हणून मानलेला आहे (गौ. ध. सू.). अहिंसा ही प्रथम एक मोक्षसाधन म्हणूनच प्रचारांत आली. आत्मज्ञानी पुरुष कोणाची हत्या करीत नाही अथवा कोणाला दुखापत करीत नाही. कारण प्राणिमात्र म्हणजे एकाच परब्रह्माचीं अनेक रूपें होत, हें त्याला माहीत असतें. अहिंसा धर्म हा बौद्ध व जैन यांनीच प्रथम उपदेशिला, असें कित्येकांचें मत आहे; पण तें खरें नसून भारतीय आर्यधर्मांत जैन-बौद्धांच्याहि पूर्वी अहिंसातत्त्व उदयाला आलें आहे. ज्ञानमार्गी मनुष्य कोणत्याहि मोक्षसाधनाचा अवलंब करो; त्याने अहिंसातत्त्व मान्य केलेंच पाहिजे, हा सिद्धान्त भारतीय तत्त्ववेत्त्यांनी पुरातन काळींच प्रतिपादिला आहे. छांदोग्योपनिषदांत पुरुषरूपी यज्ञाची 'अहिंसा' ही दक्षिणा आहे, असें म्हटलें आहे (३.१७.४). अहिंसा धर्म हा सर्वांनी पालन करायचा धर्म आहे. कोणत्याहि प्रकारची हिंसा करणें हें पाप आहे, असें मत महाभारतकाळीं लोकसमाजांत पूर्णपणे प्रस्थापित झालें होतें. संसार सोडून अरण्यवास पत्करणारे निवृत्तिमार्गी यति—मुनि हिंसा करीत नसत व मांसाहारहि करीत नसत, अशी साक्ष आद्य ग्रीक इतिहासकार हिरोडोटस (सनपूर्व ४५०) याने देऊन ठेवली आहे. भारतीय आर्यांच्या आहारशुद्धीसंबंधीं ज्या कांही कल्पना होत्या, त्यांत मांसाशनाने माणूस अशुचि होतो, अशी एक कल्पना होती. त्यामुळे अहिंसेच्या प्रचाराला पुष्कळच मदत झाली. मनूने धर्मविहित हिंसा ही अहिंसा मानली असली तरी, केवळ मांसभक्षणासाठीच केली जाणारी हिंसा त्याज्य ठरविली आहे (मनु. ५.४४–४८). ज्याचें मांस भक्षण केलें असेल तो प्राणी पुढच्या जन्मीं माणसाला खातो, अशीहि कल्पना पुढच्या स्मृतिकारांनी पुढे आणली. त्यामुळे मांसाशनाला मोठ्या प्रमाणांत पायबंद बसला. प्रारंभीं मात्र ही कल्पना नव्हती. आर्य जसजसे पूर्वेला आणि दक्षिणेला सरकत गेले, तसतसा त्यांना धान्य व भाजीपाला विपुल प्रमाणांत मिळूं लागला. त्यामुळे मांसाशनाची तेवढीशी गरज उरली नाही. मांसभक्षण न करण्याच्या कारणांबद्दल मतभेद असू शकतील; पण भारतांतील बहुसंख्य लोकांनी त्यांचे पूर्वज दीर्घकालपर्यंत मांसभक्षण करीत असतांहि अहिंसा धर्माला प्राधान्य देऊन मांसाचा स्वेच्छेने त्याग केला, ही गोष्ट मात्र मानवी इतिहासांत अभूतपूर्व अशीच आहे.

अहिंसेचें हें तत्त्व जैनांनी पराकोटीला नेऊन पोचविलें. जैनांच्या पंचमहाव्रतांत अहिंसा हें आद्य व्रत आहे. प्रत्येक श्रमणाने विचार, आचार व उच्चार करतांना कोणत्याहि प्राण्याला पीडा होणार नाही अशी दक्षता घ्यावी, पाणवठ्यावर उभें राहूं नये, प्राण्यांनी गजबजलेल्या स्थळीं वास करूं नये, प्राणी असलेल्या जागीं मलमूत्रादि विसर्जित करूं नये, इ. दंडक जैन धर्मशास्त्राने घालून दिलेले आहेत. कळत नकळत त्यांचा भंग झाल्यास अनेक प्रकारचीं प्रायश्चित्तेंहि सांगितलीं आहेत.

अहिंसा पूर्णपणें पाळली जावी म्हणून जैनांतील स्थानकवासी पंथाचे यति प्रवास करतांना वाट झाडण्यासाठी आपल्या बरोबर नेहमी सुतांचा कुंचा बाळगतात. जीवजंतू तोंडांत जाऊन त्यांची हत्या होऊं नये म्हणून तोंडावर फडक्याची पट्टी बांधतात. अंगावरचे कपडे झाडले असतां त्यांवरचे जीव मरतील, म्हणून कपडेहि झाडीत नाहीत. ढुंढचे जैन तर थंड पाण्यांतले जीवजंतू मरतील म्हणून थंड पाणी न पितां भाताची पेज अथवा भाजीचें पाणी पिऊन राहतात. स्नान करणें, दांत घासणें, इ. देहशुद्धीचीं कर्मेंहि केवळ याच कारणासाठी जैन यतींनी निषिद्ध मानलीं आहेत.

बौद्धांनीहि अहिंसातत्त्वाला मान्यता दिली असली, तरी त्याच्या पालनाला कांही अपवाद केले आहेत. त्या धर्मांत अहिंसा ही मानवधर्माला अनुसरून योजिली आहे. अष्टांगिक मार्गांत अहिंसा ही योग्य आकांक्षांच्या यादींत एकदा व सद्वर्तनांच्या यादींत दुसऱ्यांदा आलेली आढळते. बौद्धांनी आपल्या पंचशीलांत अहिंसेला पहिलें स्थान दिलें आहे. अशोकाने आपल्या शिलालेखांतल्या आज्ञांमध्ये तीन वेळां अहिंसा नमूद केली आहे. कोणत्याहि जीवाची हिंसा केली जाऊं नये, असें अशोकाला वाटत होतें. अतिथिसत्कारासारख्या प्रसंगीं बैल व बकरीं मारून त्यांच्या मांसाने अतिथीला संतुष्ट करण्याचा प्रघात त्या काळीं होता. अशोकाने त्या कृत्याला बंदी करून आपल्या पाकशाळेंत रोज शिजविल्या जाणाऱ्या प्राण्यांचे जीव वांचविले. अहिंसेच्या बाबतींत बुद्ध मात्र अतिरेकी नव्हता. भिक्षूने जी भिक्षा मिळेल तिचा स्वीकार करावा असा त्याचा शिष्यांना आदेश होता. त्यावरून कोणी मांसभिक्षा दिली, तर तिचाहि स्वीकार करावा, असा त्या संप्रदायांत प्रचार सुरू झाला. देवदत्ताला ही गोष्ट न आवडून त्याने बुद्धाचा निर्णय मागितला. बुद्धाने केवळ शाकाहाराचें तत्त्व नाकारून म्हटलें, की मांसाशनाने मनुष्य भ्रष्ट होत नसून तो दुष्कृत्यांनी बिघडतो, भ्रष्ट होतो (विनय २.१९७; ३.२५३). चंड नांवाच्या लोहाराच्या घरीं बुद्धाने भिक्षा म्हणून दिलेलें डुकराचें मांस सेवन केलें होतें. यावरून अहिंसेच्या बाबतींत जैन व बौद्ध यांच्या विचारांत किती फरक आहे, तें कळून येईल.

भागवत धर्माने अहिंसामंत्राचा प्रचार करून हिंसाप्रधान यज्ञाला विरोध दर्शविला. महाभारतांतल्या नारायणीयोपाख्यानांत उपरिचर राजाचें आख्यान दिलेलें आहे (शांति. ३३६). तो राजा भागवतधर्माचा अनुयायी होता. त्याने अश्व-

मेध यज्ञ केला; पण त्यांत पशुहिंसा न करतां यवांच्या आहुती देऊन कर्म पूर्ण केलें. भगवान् नारायणाने वैष्णवधर्माचे सिद्धान्त सांगत असतां ब्रह्मादि देवांना असा आदेश दिला आहे, की–

यत्र वेदाश्च यज्ञाश्च तपः सत्यं दमस्तथा ।
अहिंसाधर्मसंयुक्ताः प्रचरेयुः सुरोत्तमाः ।
स वो देशः सेवितव्यो मा वोऽधर्मः पदा स्पृशेत् ।।

(शांति. ३४०.८९)

अर्थ – (ब्रह्मादि देव हो,) ज्या देशांत वेद, यज्ञ, तप, सत्य, दम हीं अहिंसाधर्माने युक्त असतील, त्या देशांत तुम्ही राहावें. अधर्म तुम्हांला पदस्पर्श न करो.

पशुयागाच्या विषयांत मीमांसक व सांख्य यांचीं मतें भिन्न आहेत. मीमांसक म्हणतात, की पशुयाग श्रुतिसंमत असल्यामुळे कर्तव्य आहे. त्यांत यजमानाला अदृष्ट फलाची सद्यःप्राप्ति होते व यज्ञांत मृत्यु आल्याने पशुहि पशुभाव सोडून मनुष्यभावाची प्राप्ति न होतांहि देवत्व प्राप्त करून घेतो. यज्ञीय हिंसा ही हिंसाच नव्हे; अतएव यजमान व पशु या दोहोंच्याहि दृष्टीने पशुयाग उपादेय आहे. पण सांख्यमताप्रमाणे पशुयाग ही हिंसाच आहे. पशुवधाच्या प्रसंगीं त्या पशूला प्राणवियोगाच्या असह्य वेदना भोगाव्या लागतात आणि पशूला दिलेल्या या क्लेशाने यजमानाच्या समग्र पुण्यांत थोडी तरी घट आल्यावांचून राहत नाही. व्यासभाष्यांत याला आवापगमन असें म्हटलें आहे (२.१३).

वेदविहित यज्ञांत पशुहिंसा होत असे, ही गोष्ट निर्विवाद आहे. जैनांनी, विशेषतः बौद्धांनी पशुहिंसेविरुद्ध मोहीम सुरू करून सार्वजनिक लोकमत पशुहिंसेच्या विरुद्ध बनविलें, हेंहि खरें आहे. पण असें असलें तरी वैदिक धर्माचे कट्टे अनुयायी ब्राह्मण व क्षत्रिय हे मात्र पशुयाग सोडायला तयार नव्हते. महाभारतकालापर्यंत हिंसाप्रधान असे मोठमोठे यज्ञ होतच राहिले होते. इतकेंच काय; पण महाभारतकाळानंतर जेव्हा जेव्हा बौद्ध-जैनांचा पाडाव करून आर्यधर्म विजयी झाला, तेव्हा तेव्हा त्या पराक्रमी क्षत्रिय राजांनी अश्वमेध यज्ञ मुद्दाम केले. अग्निमित्र व चंद्रगुप्त या राजांनी, तसेंच भारशिव नृपतींनी अनेक अश्वमेध केल्याचें इतिहासांत नमूद आहे.

तथापि वैष्णव धर्म जसजसा प्रभावी होऊं लागला, तसतसा एकंदर जनतेंत हिंसाप्रयुक्त यज्ञाविषयीं तिटकाराच उत्पन्न झाला. या दोन्ही प्रवृत्तींचा परिचय महाभारतांतच मिळतो. वनपर्वांतील धर्मव्याधाच्या आख्यानांत हिंसा व मांसान्न याचें समर्थन केलेलें आहे (अ. २०८); तर शांतिपर्वांतल्या तुलाधार–जाजलिसंवादांत हिंसा व मांसान्न यांची निंदा केलेली आहे (अ. २६४–६५). तिथे म्हटलें आहे–

अव्यवस्थितमर्यादैर्विमूढैर्नास्तिकैर्नरैः ।
संशयात्मभिरव्यक्तैर्हिंसा समनुवर्णिता ।।

अर्थ – ज्यांची मर्यादा चळली आहे अशा, विमूढ, नास्तिक संशयात्म व यज्ञद्वारेंच स्वतःची प्रसिद्धि करणाऱ्या लोकांनीच हिंसेचा पुरस्कार केला आहे.

याच अध्यायांत पुढे सांगितलें आहे, की श्रीविष्णूचें यजन करायचें तें (पशुहिंसा सोडून) पायस, फुलें व यज्ञीय वृक्षांच्या समिधा यांनी करावें. कर्णपर्वांत श्रीकृष्णानेहि अहिंसा हाच परम धर्म असल्याचें सांगितलें आहे —

प्राणिनामवधस्तात सर्वज्यायान्मतो मम ।
अनृतं वा वदेद्वाचं न च हिंस्यात्कथं च न ।।

(६९.२३)

अर्थ – (अर्जुना) प्राण्यांची हिंसा न करणें ही गोष्ट मला सर्वांत महत्त्वाची वाटते. एक वेळ खोटें बोलावें; पण हिंसा (मात्र) करूं नये.

गीतेंतल्या ज्ञानलक्षणांत अहिंसेचा समावेश आहे व तें एक शारीर तप असल्याचेंहि सांगितलें आहे (१७.१४). श्रीकृष्णाच्या काळीं यज्ञयागांचें पूर्ण प्राबल्य होतें. म्हणून त्याने यज्ञीय हिंसा वर्ज्य करावी असा उपदेश केला नसला तरी स्वर्गाच्या इच्छेने काम्य यज्ञ करण्याच्या विरुद्ध त्याचा कटाक्ष होता, हें मात्र दिसून येतें (गी. ९.२०–२१). श्रीकृष्णाच्या काळांतच हिंसायुक्त यज्ञाच्या विरुद्ध लोकमत हळूहळू वाढूं लागलें होतें. गवालंभ तर कृष्णभक्तीमुळेच भारतीयांनी बंद केला, असें म्हणायला हरकत नाही.

महाभारतावरून असें दिसून येतें, की भारतांत अहिंसेचा उद्घोष प्राचीन कालीं झाला असला, तरी जैनांप्रमाणे भारतीय धर्मशास्त्रकारांनी अहिंसेंत अतिरेकीपणा केला नाही. हिंसेंतहि परिहार्य–अपरिहार्य असा विवेक त्यांनी केला आहे. वनपर्वांतल्या ब्राह्मण-व्याधसंवादांत धर्मव्याध अहिंसेचें श्रेष्ठत्व प्रतिपादूनहि तिच्यांतला विवेक सांगतो —

'वृक्षांत, फळांत व पाण्यांतहि पुष्कळ जीव असतात. चालतांना पायांखालचे जीव मरतात. तसेंच बसतांना, निजतांना अनेक जीवांची हत्या होते.

के न हिंसन्ति जीवान्वै लोकेऽस्मिन्द्विजसत्तम ।
बहु सञ्चित्य इति वै नास्ति कश्चिदहिंसकः ।।
अहिंसायां तु निरता यतयो द्विजसत्तम ।
कुर्वन्त्येव हि हिंसां ते यत्नादल्पतरा भवेत् ।।

(म. भा. वन. २०८.३३–३४)

अर्थ – हे ब्राह्मणश्रेष्ठा, या लोकांत जीवहिंसा कोण करीत नाही! पुष्कळ विचार केल्या अंतीं (असें दिसतें, की या

जगांत) अहिंसक कोणीच नाही. हे द्विजश्रेष्ठा, अहिंसेच्या ठिकाणीं रत असलेले यती (हि) हिंसा करतातच. (एवंच हिंसा ही अपरिहार्य आहे.) प्रयत्नाने ती (फार तर) कमी होईल.

म. गांधी हे चालू शतकांत सत्याग्रह नांवाचें एक अभिनव तत्त्व घेऊन राजकारणांत उतरले आणि त्याचें अधिष्ठान म्हणून त्यांनी अहिंसेला प्राधान्य दिलें. सत्तेची संघटना व विस्तार करण्यासाठी विविध प्रकारचीं हिंसात्मक दमनसामर्थ्यें वापरणें, हें राज्यशास्त्रांत सूक्त व प्रशस्त मानलें जातें. पण म. गांधींनी याच मूलभूत मुद्यावर आघात करून भौतिक दमनशक्तींना हतप्रभ करणाऱ्या अहिंसात्मक आत्मशक्तीला आवाहन केलें. जगांतील मानवी प्रगति अहिंसेच्या दिशेनेच होत आहे, अशा विश्वासाने ते लिहितात --

'इतिहास जेथपासून ज्ञात आहे, तेथपासून थेट आजपर्यंतच्या कालाकडे आपण नजर टाकली, तर आपणांला असें आढळून येईल, की मानवाची हळूहळू अहिंसेकडे प्रगति होत आहे. आपले प्राचीन पूर्वज नरमांसभक्षक होते. नंतर असा काळ आला, की त्यांना नरमांसभक्षणाचा वीट येऊन ते शिकारीवर राहूं लागले. त्यानंतरच्या अवस्थेंत मानवाला आपल्या भटक्या जीवनाची शरम वाटूं लागली. म्हणून त्याने शेतीकडे लक्ष दिलें व आपल्या अन्नासाठी तो भूमातेवर विसंबून राहूं लागला. अशा तऱ्हेने भटकें जीवन सोडून मानव खेडीं व शहरें यांवर आधारलेल्या सुसंस्कृत स्थिर जीवनांत स्थायिक झाला. एका कुटुंबाचा घटक होता त्या ऐवजीं तो एका जमातीचा व राष्ट्राचा घटक बनला. प्रगमनशील अहिंसेचे व हिंसा अस्तंगत होत असल्याचे हे सगळे दाखले आहेत. जर खरा प्रकार याच्या उलट असता, तर ज्याप्रमाणे अनेक कनिष्ठ प्रकारच्या प्राण्यांच्या जाती नष्ट होऊन गेल्या, त्याप्रमाणेच मानवजातहि आज नाहीशी झाली असती (हरिजन ११–८–४० भाषांतर–दिवाकर).

आचार्य विनोबा हे अहिंसेचे प्रमुख भाष्यकार आहेत. ते म्हणतात —

"आम्ही अहिंसेचा अर्थ हिंसा न करणें एवढाच समजतों. परंतु त्याचा इतकाच निगेटिव्ह (अभावात्मक) अर्थ नाही. त्याचे तीन अर्थ आहेत--पहिला आहे निर्भयता, दुसरा आहे प्रेम आणि सहकार करणें (म. गांधींनीहि अहिंसेचा प्रेम असाच अर्थ केला आहे). तिसरा अर्थ आहे रचनात्मक कार्यावर विश्वास ठेवणें.........हिंसेवर विश्वास ठेवणारे नेहमी भयभीत असतात. ते शरीरालाच आत्मा समजतात. शरीराला कोणीं मारलें, तर ते मारणारालालवकरच शरण जातात. आपल्याला जर अहिंसा वाढविण्याची इच्छा असेल तर आम्ही कुणाला भिणार नाही व भिवविणारहि नाही. 'न भिणें व न भिवविणें' हें व्रत घ्यावें लागेल."

अहिंसेचा तात्त्विक अर्थ सांगताना ते म्हणतात–अहिंसा ही आत्म्याची शक्ति आहे. आत्मा मरत नाही ही त्याची शक्ति आहे. हिंसा ही देहाची शक्ति आहे. पण देह मारला जाऊं शकतो. आत्म्याची शक्ति ही देहाहून फार मोठी आहे हें सर्वमान्य आहे. पण आपण देहबुद्धींत गुंतून पडतों......देहाचें आवरण सोडून देहाच्या पलीकडे, जी वस्तु आहे तिच्याकडे दृष्टि ठेवली तर आपला सारा व्यवहार बोलण्याचालण्याची व विचार करण्याची सारी पद्धतच बदलून जाईल. सारें जग एका वेगळयाच रंगाने रंगलें, नटलेलें दिसेल. असें झालें तर अशा मनुष्याच्या सहवासांत जो जो येईल त्याच्यावर हा रंग चढेल......अहिंसा ही हृदयपरिवर्तनाच्या द्वाराच परिणाम घडवून आणते, बाह्य परिवर्तनाच्या द्वारा नव्हे. [म. भा. उ.; भा. सं., ध. र., भूदानगंगा; हि. ध.; म. ज्ञा. को.]

अहिंसा व्रत एक व्रत. अवधि एक वष. एक वर्ष मांसाशन न करणें व व्रताच्या अंतीं गाय व सुवर्णहरिण दान देणें असा याचा विधि आहे. [हे. व्र.]

अहीन याग सोमयागाचे प्रकार. यांचा प्रारंभ पौर्णिमेस करतात. एकापेक्षा अधिक दिवस या यागांत सोमसवन होतें. यांची समाप्ति अतिरात्राने होते. दीक्षा व उपसद यांचे दिवस धरून ते महिन्यापेक्षा अधिक होता कामा नयेत, असा नियम आहे. त्रिरात्र, पंचरात्र, षडह, असे यांचे गट आहेत. अश्वमेध, व द्वादशाह हे अहीन यागांतले प्रमुख होत. द्वादशाह हें सत्रहि आहे. **पाहा**–अतिरात्र, अश्वमेध, द्वादशाह. [हि. ध.]

अहीर (१) गवळयांची व शेतकऱ्यांची मोठी जात. हे बिहार, ओरिसा, उत्तर प्रदेश, पंजाब, सौराष्ट्र व खानदेश या भागांत पसरलेले आहेत. अहीर हा मुळांत संस्कृत आभीर याचा अपभ्रंश आहे. गुजर आणि अहीर यांचीं नांवें एकत्र घेतलीं जातात. आजहि हे लोक गुजरांप्रमाणेच गुरें पाळतात. दोन्ही जमाती मुळांत एकाच वंशाच्या आहेत. त्यांचें मूलस्थानहि एकच असावें असें म्हणतात. हे लोक मध्य आशियांतून प्रथम सिंधूच्या खोऱ्यांत उतरले. हे सिथियन वंशाचे असावे अशी आजवरची समजूत होती; पण अधिक संशोधनाच्या अंतीं ते आर्यच असले पाहिजेत, असें आता मानलें

जातें. सनपूर्व पहिल्या अथवा दुसऱ्या शतकांत यांचें भारतांत आगमन झालें असावें. मात्र ते गुजरांच्या बरोबर आले असें वाटत नाही. आणि आले असल्यास ते एकाच ठिकाणीं कुठे स्थायिक झाले नाहीत. जाट, गुजर व अहीर यांचा परस्पर रोटीव्यवहार चालतो, त्यावरून त्यांचा सामाजिक दर्जा समान मानला जातो. जाट हे उंट पाळणारे, गुजर डोंगरांत गुरें चारणारे, तर अहीर हे समुद्रसपाटीचे गवळी आहेत. अर्थात् हा मुळांतला भेद आज राहिलेला नाही. हल्ली सगळेच शेतकरी बनले आहेत. अहीरांची मथुरावंशी नांवाची एक पोटजात आहे. हे देहाने उंच, रंगाने गव्हाळी व चेहऱ्याने कोवळे व रेखीव दिसतात. मगधांतले अहीर काळे, मोठ्या हातापायांचे व ओबडधोबड चेहऱ्याचे दिसतात. रसेल व हिरालाल यांच्या मतें अहीरांत जातिसंकरहि झाला असून अन्य जातींच्या मिश्रणाने कांही पोटजाती निर्माण झाल्या आहेत. उत्तर भारतांतील कित्येक अहीरांनी इस्लाम धर्म स्वीकारला असून त्यांना घोसी किंवा गड्डी असें म्हणतात. अहीरांना बंगालमध्ये गोआला व मध्य प्रांतांत गवळी किंवा ग्वाला असें म्हणतात. रावत, कहर व महाकुल अशींहि यांना प्रदेशपरत्वें नांवें आहेत. अहीरांच्या सुतार, सोनार, लोहार अशा आणखीहि पोटजाती बनल्या आहेत.


अहीर—राजस्थान

अहीरांची रावत ही पोटजात मुख्यत्वें छत्तीसगडामध्ये राहते. हे लोक कवनें रचण्यांत पटाईत असून छत्तीसगडांतील लोकसाहित्यांत त्यांच्या कवनांनी महत्त्वाची भर घातली आहे. 'अहीर ददरिया' हा त्यांचा काव्यप्रकार दोह्यासारखा असून ती कविता दोन अथवा चार ओळींची असते. बहुतेक रचना शृंगारिक असते.

अहीर हे मुख्यत्वें कृष्णभक्त असले, तरी स्थानपरत्वें त्यांनी निरनिराळे देव केले आहेत. नर्मदेच्या खोऱ्यांत राहणारे अहीर हे भिलाट देवीची उपासना करतात. ते गायीला पूज्य मानतात. त्याशिवाय तुळसीश्याम, देवी, हब्बेस असे आणखीहि त्यांचे स्थानिक देव आहेत. हरिदासबाबा हा अहीरांचा पूज्य साधु आहे. एका आडनांवांत लग्नें करीत नाहीत. प्रत्येक वर्षी एका ठराविक दिवशीं लग्नें लावतात. विधवेला धाकट्या दिराशीं लग्न करतां येतें. यांना मद्य-मांस चालतें. **पाहा**—आभीर [एन्सा. रि. ए., रजःकण; सु. वि. को.]

(२) एक मात्रिक समच्छंद. 'प्राकृत पैंगलम्' (१.१७७) मध्ये अकरा मात्रांचा समच्छंद व अंतिम 'ज' गणाचा प्रयोग, असें याचें लक्षण सांगितलें आहे. याचा प्रयोग केशव व सूदन या हिंदी कवींनी केला आहे. उदाहरण—

सुरभित मंद बयार, सरसे सुमन सुडार।
गूँज रहे मधुकार, धन्य बसन्त बहार।

[हिं. सा. को.]

अहुर मज्द झरतुष्ट्री धर्मांतला सर्वशक्तिमान् व सर्वश्रेष्ठ देव किंवा परमेश्वर. अहुर हें यांतलें विशेषण असून मज्द हें विशेष्य आहे. संस्कृत असुर या शब्दाचा जो अर्थ, तोच अहुरचा आहे. अहुर म्हणजे प्राणवान्, वीर्यवान्. हें विशेषण केवळ मज्दालाच लावलेलें नसून मिथ्र आणि अपांनपात् यांनाहि योजलेलें आढळतें (यस्न २.५ : १०५; ६२.१२). तथापि अहुर ही पदवी विशेषत्वाने मज्दाचीच समजण्यांत येते. अहुर मज्द म्हणजे संस्कृत असुरमहत् असें राजवाडे म्हणतात. असुरमेधस् असाहि पर्यायशब्द कांही लोक सुचवितात. त्याचा अर्थ सर्वसाक्षी असा होतो. ऋग्वेदांत हा गुण वरुणाला लावलेला असून त्याला असुरप्रचेताः असें म्हटलें आहे (ऋ. १.२६.१४).

ससॅनियन काळांत मज्द संप्रदाय पूर्णावस्थेस पोचला व अहुर मज्द हाच त्याचा श्रेष्ठ देव ठरला. पहलवी ग्रंथांतून त्याला पूर्ण, उत्कृष्ट, शुद्ध व प्रकृतीची प्रकृति, असें म्हटलें आहे. हा सर्वांचें हित साधणारा, उपकारी व दयाळू आहे. तो प्रकाश व बुद्धि यांचें अधिष्ठान आहे. अहरिमन् ही त्याच्या विरोधी अशी देवता आहे. त्यामुळे त्या दोघांचीं स्थानेंहि भिन्न आहेत. अहुर मज्द हा अखंड प्रकाशांत, तर अहरिमन् हा अंधतमांत वास्तव्य करतो.


अहुर मज्द

अहुर मज्दाचीं आणखी सहा रूपें मानलेलीं आहेत. झरतुष्ट्राने या सहा रूपांचे प्रत्येकांत एक याप्रमाणे सहा मुख्य गुण सांगितले आहेत—

(१) अष=ऋत–जगाची नियामक शक्ति.
(२) वोहुमनह–प्रेम व पावित्र्य.
(३) स्पेन्त आर्मैति–सद्बुद्धि, धार्मिक निष्ठा.
(४) क्षथ्र वैर्य–प्रभुत्व.
(५) हौर्वतात–संपूर्णता. व
(६) अमेरेतात–अमरत्व.

झरतुष्ट्राने या सहा गुणांनी युक्त अशा अहुरमज्दाची आराधना करण्याचा लोकांना उपदेश केला आहे. अहुर मज्दाच्या सहा गुणांची ही कल्पना षाड्गुण्यविग्रह विष्णूच्या कल्पनेशीं मिळती-जुळती आहे. नंतरच्या काळांत या गुणांचें दैवतीकरण झालें व त्या सहा देवतांना मिळून अमेश स्पेन्त असें नांव मिळालें. [वि. ध. द.]

अहेतुवाद कांही संदेहवादी दार्शनिक विश्वांत कार्य-कारणनियम किंवा हेतुवाद आहे, असें मानीत नाहीत. इस्लामिक दार्शनिकामध्ये अश–अरी या दार्शनिकाने कार्यकारणनियम म्हणजे ईश्वराच्या सर्वशक्तिमत्त्वाला बाधा आहे, असें मानलें. तो म्हणतो, की कोणतीहि वस्तु उत्पन्न होण्यासाठी कोणतेंहि कारण उपस्थित असावें लागत नाही. अल्लाह प्रत्येक वस्तु प्रत्येक वेळीं खास नवी अशी असतांतून सद्रूपांत आणतो असें त्याचें मत आहे. कांही प्राचीन दार्शनिकहि अहेतुवाद मांडणारे आहेत, असें धर्मकीर्ति हा बौद्धाचार्य सांगतो. त्यांच्या मतें कांटचांमध्यें तीक्ष्णता असण्याला जसें कांही कारण नाही, त्याचप्रमाणे हें सारें जग निर्माण व्हायलाहि कांही कारण लागत नाही. जग हें अहेतुक आहे. [द. दि.]

अहेरिया (१) द्राविड वंशाची एक जमात. ही पंजाब व उत्तर प्रदेश यांत आढळते. हे लोक मुख्यत्वें शिकारी असून चोरीमारीबद्दलहि प्रसिद्ध आहेत. पंजाबांतले अहेरिया कांही शीख व कांही मुसलमान बनले आहेत. उरलेले सर्व हिंदू असले तरी ते हिंदुधर्माच्या संपर्कांत न आल्यामुळे वन्यधर्मीच राहिले आहेत.

हे लोक पिकाच्या कापणीसाठी टोळ्या करून फिरतात. चेहऱ्या-मोहऱ्याने बावरियांसारखे दिसतात. हे निसर्गपूजक असून भुताखेतांचीहि पूजा करतात. जे हिंदुसंपर्कांत आले, ते देवीची पूजा करतात. अहेरिया याच नांवाची त्यांची देवी आहे. मात्र त्यांचा मुख्य देव मेखासुर (मेष + असुर) हा आहे. गुगा अथवा जहीर पीर याची ते मुसलमानांच्या मार्फत पूजा करतात. मिरान साहेब हा मुस्लिम अवलियाहि त्यांना पूज्य वाटतो. जखिया हा त्यांच्यांतला देवत्वाप्रत पोचलेला एक झाडूवाला आहे. त्याला ते भजतात, डुकराचा बळि देतात व भूतबाधा होऊं नये म्हणून त्या बळीचें रक्त मुलाबाळांच्या कपाळीं लावतात. बराई व चामर हीं त्यांचीं ग्रामदैवतें होत. चामराला गव्हाचा रोट व प्रसंगविशेषीं बकऱ्याचा बळि देतात. बळीचें मांस लगेच देवासमोरच भक्षण करतात. देवतांना बलि द्यायचा तो विशिष्ट कुलांतल्याच माणसाने द्यावा लागतो. कांही विधींत पशूची हत्या न करतां त्याच्या कानांतून रक्त काढून त्याला सोडून देतात.

प्रेताला अग्नि दिल्यावर घरीं जातांना चितेवर दगड टाकतात. मृताच्या भुताने आपल्या मागून येऊं नये, हा त्यांतला उद्देश असतो. आणखी एक आश्चर्याची गोष्ट अशी, की हे लोक रामायणकर्त्या वाल्मीकीला आपला आद्य गुरु मानतात. [पॉप्यु० रिली० अँड् फोक लोअर ऑफ् नार्दर्न इंडिया; ट्राइब्स् अँड् कास्टस ऑफ दि नॉर्थ वेस्टर्न प्राव्हिन्सेस् अँड् औध–क्रूक]

(२) राजस्थानांतला एक शिकारीचा सण. हा फाल्गुन महिन्यांत येतो. या दिवशीं राजपूत लोक रानडुकराच्या शिकारीसाठी निघतात. ही शिकार चुरशीची असते. कारण प्रत्येक शिकाऱ्याला आपण शिकार साधावी अशी महत्त्वाकांक्षा असते. शिकारी लोक घोड्यावर बसून रानडुकराचा पाठलाग करतात. भाला व तलवार हीं आयुधें त्यांच्याजवळ असतात. उदेपूर संस्थानांत या शिकारीचें महत्त्व फार असे. राजज्योतिषी शिकारीचा मूहूर्त काढून देत असे. आदल्या दिवशीं उदेपूरचा राणा आपल्या नोकरांना हिरवा पोषाख देत असे. या शिकारींतली घोडदौड बेफाम असे. त्यांत घोडेस्वाराला अपघात होण्याचीहि शक्यता असे. राणा चुंडावत याचा या शिकारींत पाय मोडला होता व त्याच्या मुलाच्या दंडाला भाल्याची जखम झाली होती. या शिकारींत राणा व त्याचा लवाजमा यांचें जेवण रानांत होत असे. शिकारींत ठार केलेल्या डुकराचें मांस रानांतच शिजवायचें असा संकेत आहे. राजपूत लोक रानडुकराला गौरीचा शत्रु समजतात. त्यामुळे ही शिकार धार्मिक स्वरूपाची समजली जाते.

अहेरी (१) भारतीय धर्मसाधनेंत विषयासक्त मनाला मृगाची उपमा दिली जाते व त्याला मारण्यासाठी पारध्याची आवश्यकता मानली जाते. हा पारधी म्हणजे निग्रही साधक होय. त्यालाच हिंदी संतांनी अहेरी म्हटलें आहे. हा अहेरी गुरुवचनरूपी बाणाने त्या मृगाचें विंधान करतो.

'गुरुवाक् पुँछिया बिंध निअमण बाण' (चर्यापद २८). [हिं. सा. को.]

(२) पंजाबांतील एक जमात. हिला थोरी असेंहि म्हणतात. हिचा अहेरिया या जमातीशीं संबंध असण्याची शक्यता आहे. हे लोक भटक्ये असून प्रसंगविशेषीं वाटमारीहि करतात. सर्व प्रकारचीं जनावरें मारून खातात. पत्रावळी बनविणें हाहि एक यांचा धंदा आहे.

अहोई आठें कार्तिक वद्य ८ मीला उत्तर प्रदेशांत हें नांव आहे. हें पुत्रवती स्त्रीचें व्रत असतें. त्या दिवशीं उपवास करून सायंकाळीं भिंतीवर आठ कोठे असलेला एक देवीचा कणा रेखतात. त्याच्या खाली एक साळ व तिचें पिल्लूं काढतात. भिंतीच्या मुळांत कलशस्थापना करतात. मग त्या सर्वांची पूजा करून दूधभाताचा नैवेद्य दाखवितात. नंतर पुढील कथा ऐकतात –

एका स्त्रीला आपल्या घराची भिंत सारवायची होती. म्हणून ती माती आणायला गेली. जिथे ती खणत होती, तिथे खाली साळीचें बिळ होतें. तिची कुदळ नकळत त्या बिळांतल्या साळीच्या पिलावर पडली आणि तें मेलें. त्या पापाने तिचीं सातहि मुलें एका वर्षांत मरून गेलीं. बाई दुःखी झाली. तिने घडली गोष्ट गांवांतल्या वृद्ध स्त्रियांना सांगितली. त्यांनी देवीची पूजा करण्याचा तिला उपदेश दिला. बाईने अहोई आठेंच्या दिवशीं देवीचें व्रत केलें आणि तिला पुनश्च सात मुलगे झाले.

अहो कण्डूयग शरिराचा केवळ खालचा भागच खाजविणारा व वरचा भाग कधीहि न खाजविणारा एक प्राचीन पंथ. [स्कू. से. जै. लि.]

अहोबल (१७ वें शतक) संगीतपारिजात नांवाच्या सुप्रसिद्ध संस्कृत ग्रंथाचा कर्ता. हा द. भारतांतील द्रविड ब्राह्मण होता. याच्या बापाचें नांव श्रीकृष्ण पंडित. बापाजवळच याने संगीतशास्त्र अभ्यासिलें. पुढे धनवड संस्थानाच्या आश्रयाला राहून हिंदुस्थानी संगीताचा अभ्यास केला. याच्या ग्रंथांत श्रुति व स्वर हे भिन्न नसून एकच आहेत, असें प्रतिपादिलें आहे. षड्ज ग्रामांतील पहिल्या चार स्वरांच्या दिढीने पुढील चार स्वर ध्वनिदृष्टचा उच्च आहेत, असें याने सांगितलें आहे. याने सात शुद्ध व पांच विकृत अशा बारा स्वरांचीं स्थानें तारेच्या लांबीने कायम करून ठेवलीं आहेत. विशिष्ट स्वराचा ध्वनि निघण्यास विशिष्ट लांबीची तार हवी, हें याने शोधून ठरविलें. सुधारलेल्या शास्त्रीय साधनांचा अभाव असतां हें काम याने केलें, म्हणून याचें महत्त्व मानतात. याचा संगीतपारिजात हा ग्रंथ सर्वमान्य ठरला आहे. [म. च. को.; सु. वि. को.]

अहोबिल एक पवित्र क्षेत्र. हें आंध्र राज्याच्या कर्नूल जिल्ह्यांत आहे. हें स्थान निर्जन व घनदाट अरण्यांत असल्यामुळे इथे देवस्थानाच्या नोकरवर्गाव्यतिरिक्त अन्य वस्ती नाही. प्राचीन काळीं हिरण्यकशिपूची ही राजधानी होती. प्रल्हादाच्या रक्षणासाठी इथेच नृसिंह अवतार प्रकट झाला व त्याने हिरण्यकशिपूचा वध केला, असें सांगतात. याच्या आसपास प्रल्हादचरित्रांतलीं अनेक स्मारकें दाखविलीं जातात. इथल्या पर्वताच्या शिखरावर एक मंदिर आहे. त्याला अहोबिल मंदिर म्हणतात. इथे छत्रीच्या आकाराचें एक बिळ किंवा विवर आहे. इथल्या पर्वतमालेला गरुडाचल म्हणतात. कश्यपाच्या आदेशानुसार गरुडाने याच पर्वतावर तपश्चर्या केली, असें सांगतात. इथलें सर्वांत मोठें मंदिर म्हणजे प्रल्हादवरदमंदिर होय. हें मंदिर डोंगराच्या तराईंत आहे. इथून दीड कोसावर एक छोटा तलाव आहे, त्याला भार्गवतीर्थ म्हणतात. इथे मंदारै नांवाची एक वेल आहे. क्षेत्रांत आल्यावर तिच्या पानावर भोजन करण्याची प्रथा आहे. हें नृसिंह क्षेत्र असल्यामुळे इथे नृसिंहाचे ९ विग्रह (मूर्ति) आहेत– (१) ज्वाला (२) अहोबिल (३) मालोल (४) क्रोडाकार (५) कारंज (६) भार्गव (७) योगानंद (८) छत्रवट व (९) पवन. हें क्षेत्र रामानुज संप्रदायाच्या अष्टपीठांतलें मुख्य पीठ आहे. इथल्या आचार्याला शठकोपाचार्य म्हणतात. [द. द.; कल्याण–तीर्थांक]

अहोरात्र 'सूर्योदयद्वयपरिच्छिन्नत्रिंशन्मर्हूतात्मकः कालः'= एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंतचा ३० मुहूर्तांचा (मुहूर्त = २ घटिका) काळ म्हणजे अहोरात्र होय (हलायुध). शतपथ ब्राह्मणांत अहोरात्राचे ३० भाग करून त्या प्रत्येकाला मुहूर्त असें नांव दिलें आहे (१२. ३. २. ५). तैत्तिरीय ब्राह्मणांत मुहूर्ताचे आणखी विभाग केले आहेत, त्यांचें कोष्टक असें —

१ मुहूर्त = १५ क्षिप्र
१ क्षिप्र = १५ एतर्हि
१ एतर्हि = १५ इडानी
१ इडानी = १५ निमेष

शांखायन आरण्यकांत हे विभाग पुढीलप्रमाणे आहेत – मुहूर्त,

क्षण, कला, काष्ठा, निमेष (७. २०). पुरुषार्थचिंतामणींतलें कोष्टक असें --

२ निमेष	=	१ त्रुटि
१० त्रुटि	=	१ प्राण
६ प्राण	=	१ विनाडिका
६० विनाडिका	=	१ नाडिका (घटिका)
६० नाडिका	=	१ अहोरात्र

लघु अक्षराचा उच्चार करण्यास जो वेळ लागतो तो निमेष.

मकर संक्रांतीनंतर सूर्य जसजसा उत्तरेकडे जातो, तसतसा दिवस मोठा होत जातो व त्या मानाने रात्र लाहान लहान होत जाते. सूर्य दक्षिणेकडे जाऊं लागला की याच्या उलट होतें. **पाहा**–दिवस, रात्र. [वे. इं.; पु. चि.]

अळकिय देशिकर

(१५ वें शतक) शैव संप्रदायाचा कवि. मदुरेचा राहणारा. याने स्कंद पुराणाच्या आधारावर सेतुपुराण नांवाचा एक ३४३८ वृत्तांचा ग्रंथ रचला आहे. [त. सा. सं.]

अळय संतान

हिंदुकायद्यासारखाच द. भारतांतला एक कायदा. यांत वारसाहक्क मुलाकडे न जातां तो मलीकडे म्हणजेच मुलीच्या मुलाकडे जातो. **पाहा**–मरुमक्कतायम्.

अक्षक्रीडा

प्राचीन कालापासून चालत आलेलें एक मनोविनोदनाचें साधन. अक्ष म्हणजे फासा. फाशांच्या आधाराने केली जाणारी क्रीडा ती अक्षक्रीडा होय. ऋग्वेदांत अक्षक्रीडेचें रोचक वर्णन आहे. तिथे ५३ (त्रिपंचाशः) फाशांचा उल्लेख आहे (ऋ. १०. ३४. ८). वैदिक कालांतले फासे बेहड्याच्या फळाचे असत. त्या काळांत या क्रीडेची इतर साधनसामग्री काय होती, त्याची निश्चित माहिती मिळत नाही. पाणिनीच्या काळीं हा खेळ अक्ष व शलाका यांच्या साहाय्याने चाले, हें 'अक्षशलाकासंख्याः परिणा' (अष्टा. २. १. १०) या सूत्रावरून कळतें. तैत्तिरीय ब्राह्मणांत राजसूयाच्या प्रसंगांत पांच फाशांचा उल्लेख आलेला आहे (१. ७. १०. ५). या पांच फाशांचीं नांवें अनुक्रमें अक्षराज, कृत, त्रेता, द्वापर व कलि अशीं होतीं. या द्यूताला पंचिकाद्यूत असें म्हणत. फासा फेकण्याला ग्रह (अथर्व. ४. ३८. १) किंवा ग्राम (ऋ. ८. ८१. १) म्हणत. ज्या खळग्यांत फासे फेकीत त्याला देवन असें म्हणत (ऋ. १०. ४३. ५). पुरस्कार द्रव्याला लक्ष अशी संज्ञा होती (ऋ. २. १२. ४). पाणिनीने त्यालाच ग्लह असें म्हटलें आहे (अष्टा. ३. ३. ७०). पांचहि फासे एकसारखे चित किंवा पट पडले तर त्याला कृत म्हणत. कृत डाव पडल्याने जीत होत असे. पांचांतला एक उलटा पडला तर त्या डावाला अक्षपरि, दोन उलटे पडले तर द्विपरि, तीन उलटे पडले तर त्रिपरि व चार उलटे पडले तर चतुष्परि म्हणत. पालि ग्रंथांत कलि शब्दाने हार व कृत शब्दाने जीत सांगितली आहे (धम्मपद २५२). पाणिनीनेहि या दोन डावांचा उल्लेख केला आहे (अष्टा. ३. १. २१). यज्ञादि प्रसंगांत एक अनुष्ठान या रूपाने अक्षक्रीडा चाले. अग्न्याधान प्रसंगीं यजमानाला आपल्या पत्नीबरोबर फासे खेळावे लागत. राजसूय प्रसंगीं दिग्विजयाचें प्रतीक या रूपाने फासे खेळण्याची पद्धति होती. त्या वेळचे फांसे सोन्याचे असत (तै. सं. १. ८. ४. १२; श. ब्रा. ५. ४. ४. ६). **पाहा**–द्यूतक्रीडा. [प्रा. भा. म.]

अक्षत देणें

लग्न किंवा मुंज या मंगलकार्याला उपस्थित राहण्यासाठी यजमानदंपती प्रथम घरच्या देवाला, मग गणपति, देवी व ग्रामदेवता यांना निमंत्रण देतात. त्या वेळीं कुंकुमपत्रिकेवर कुंकुमाक्षता, विडा, नारळ व तिळांचा लाडू देवापुढे ठेवून आरंभिलेलें मंगलकार्य निर्विघ्न सिद्धीस नेण्याविषयी देवाची प्रार्थना करतात. मग आप्तेष्टांस निमंत्रण देण्यासाठी जातात. त्या वेळींहि कुंकुमपत्रिकेबरोबर कुंकुमाक्षता देण्याची चाल महाराष्ट्रांत आहे. या प्रकाराला अक्षत देणें, असें म्हणतात. **पाहा** – कुंकुमपत्रिका.

अक्षता

पिंजर किंवा केशर टाकून रंगविलेल्या अक्षत (अखंड) तांदुळांना अक्षता म्हणतात. अक्षतांचे अनेक उपयोग आपल्या धर्मकृत्यांत सांगितले आहेत. अक्षता हें पूजोपचारांतलें प्रतिनिधि द्रव्य आहे. म्हणजे देवपूजेंत एखादा उपचार उपलब्ध नसेल, तर त्याऐवजी देवाला अक्षता वाहतात. महापूजेंतील अंगपूजा, आवरणपूजा, इ. पूजा अक्षता वाहूनच करतात. पीठावर देवतेसाठी ठेवलेल्या सुपारीवर अक्षता वाहूनच त्या त्या देवतेचें आवाहन करतात. अक्षता हा पूजेंतला एक गौण पण स्वतंत्र असा उपचारहि आहे. त्याचा मंत्र असा–

अक्षतास्तण्डुलाः शुभ्राः कुङ्कुमेन विराजिताः।
मया निवेदिता भक्त्या गृहाण परमेश्वर ॥

अर्थ–कुंकुमाने रंगविलेले शुभ्र तांदूळ म्हणजेच अक्षता मीं तुला भक्तीने समर्पिल्या आहेत. हे परमेश्वरा, त्यांचें ग्रहण कर.

लग्न-मुंजीच्या प्रसंगीं वधूवरांच्या व मुंजा मुलाच्या मस्तकावर अक्षता टाकतात. वधूवरांवर अक्षता टाकण्याची ही चाल पुरातन आहे. अक्षतेंतलें धान्य सुपीकपणाचें प्रतीक समजलें जात असे. वधूवरांचा विवाह संततीने सुफलित व्हावा, हा उद्देश त्यांत आहे. याशिवाय धान्याच्या ठिकाणीं भुताखेतांचें निवारण करण्याची शक्ति असल्यामुळे वधुवरांना भुताखेतांची दृष्ट लागूं नये, म्हणूनहि त्यांच्यावर अक्षता टाकतात. लग्नविधींत 'अक्षतारोपण' हा एक स्वतंत्र विधिच आहे.

या मंगलाक्षता तांदूळ, ज्वारी व अन्य कोणत्याहि धान्याच्या असूं शकतात. प्राचीन ग्रीसमध्येहि वधूवरांवर याच कारणासाठी पीठ व मिठाई उधळण्याची चाल होती. प्राचीन पर्शियन विवाह समारंभांतहि तांदुळांना महत्त्वाचें स्थान होतें. आजहि पारश्यांत लग्न व नवजोत या प्रसंगीं अक्षता टाकण्याची प्रथा आहे.

ब्राह्मण आशीर्वादाचे मंत्र म्हणून यजमानाला मंत्राक्षता देतात. अक्षता या बल, समृद्धि व दीर्घायुष्य देणाऱ्या आहेत. [क. मॅ.; की. पॉ.]

अक्षतारोपण लग्नांत कंकणबंधन झाल्यावर हा विधि करतात. एका पात्रांत शुभ्र तांदूळ व दुसऱ्या पात्रांत दूध व तूप एकत्र करतात. वधूवरांना समोरासमोर बसवितात. वर प्रथम वधूच्या ओंजळींत त्या दुधाचा शिडकाव करतो. मग तांदूळ घालतो. नंतर पुन्हा दुधाचा शिडकाव करतो. वधूपिता याचप्रमाणे वराच्या ओंजळींत करतो. मग उभयतांच्या ओंजळींत सुवर्ण ठेवतो. वराची ओंजळ वधूच्या ओंजळीवर धरून 'कन्या तारयतु, पुण्यं वर्धताम्' इ. मंत्र म्हणतो. मग प्रथम वधू व नंतर वर एकमेकांच्या मस्तकांवर त्या ओंजळींतल्या अक्षता टाकतात. असें तीन वेळां करतात. नंतर वधू-वर आपल्या मुंडावळचांतलें एकेक फूल काढून त्या दुधांत भिजवितात व त्याने परस्परांच्या कपाळीं तिलक करतात. मग एकमेकांना पुष्पहार घालतात. आयुष्यवृद्धीसाठी हा विधि असतो.

याला 'आर्द्राक्षतारोपण' असेंहि नांव आहे. प्राचीन काळीं वधू-वरांचे नातलग त्यांच्या मस्तकावर आर्द्राक्षता टाकण्याचा समारंभ करीत, असें रघुवंशावरून कळतें. अज-इंदुमतीच्या लग्नांतल्या या विधीबद्दल कालिदास म्हणतो –

तौ स्नातकैर्बन्धुमता च राज्ञा
पुरन्ध्रिभिश्च क्रमशः प्रयुक्तम् ।
कन्याकुमारौ कनकासनस्था–
वार्द्राक्षतारोपणमन्वभूताम् ॥

(रघु. ७. २८)

अर्थ – सुवर्णाच्या आसनावर बसलेल्या त्या वधूवरांनी (अज-इंदुमती) गृहस्थ, नातलग, राजे व प्रौढ स्त्रिया यांनी एकामागून एक पुढे येऊन केलेलें आर्द्राक्षतारोपण अनुभविलें.

हा वृद्धाचार असल्याचें कांही टीकाकार लिहितात. देशावर आजमितीस ही चाल दिसत नाही; पण कोकणांत व गोव्यांत आहे.

अक्षपटलिक पटल शब्दाचा अर्थ छत किंवा खोली असा आहे. अक्ष शब्द, रुपये पैशांचा व्यवहार किंवा आयव्यय दर्शवितो. प्राचीन काळीं गावांतल्या सरकारी आयव्ययाचा हिशेब जिथे ठेवला जात असे, त्या जागेला अक्षपटल व तिथल्या अधिकाऱ्याला अक्षपटलिक असें म्हणत. [हर्षचरित]

अक्षपाद (इ. स. १५० चा सुमार) न्यायसूत्रांचा कर्ता. हा षोडशपदार्थवादी होता. चौथ्या शतकांतला न्यायभाष्याचा कर्ता वात्स्यायन म्हणतो, की न्यायसूत्र हें अक्षपादाच्या पूर्वीच संगतवार रचलें गेलें होतें. पण सहाव्या शतकांतल्या उद्योतकाराने आपल्या अक्षपादालाच न्यायसूत्राचा कर्ता मानलें आहे. माधवाचार्यानेहि सर्वदर्शनसंग्रहांत न्यायशास्त्राला अक्षपाददर्शन असेंच म्हटलें आहे. पद्म पुराणांत (उखं.२६३) व अन्य कांही पुराणांत न्यायशास्त्र, गोतम अथवा गौतम याने निर्मिलें, असें म्हटलें आहे. न्यायसूत्रवृत्तीचा कर्ता विश्वनाथ त्या सूत्राला गौतमसूत्र असेंच म्हणतो. त्यामुळे न्यायसूत्राचा कर्ता अक्षपाद का गौतम असा दुसरा प्रश्न उद्भवतो. कदाचित् गौतम व अक्षपाद या दोघांनीहि तें लिहिलें असावें.

न्यायसूत्रांत पांच विषय आहेत – (१) प्रमाण (२) प्रमेय (३) वाद (४) अवयव व (५) अन्यमतपरीक्षा. या विषयांपैकी पहिल्या तीन विषयांचा ऊहापोह प्राचीन ब्राह्मणी, बौद्ध व जैन ग्रंथांतून केलेला आहे. गौतमहि आपल्या आन्वीक्षिकी विद्येंत याच विषयांचा परामर्श घेतो. पण अक्षपादाने वरील विषयांपैकी १, ४ व ५ या विषयांचेंच आन्वीक्षिकींत यथाक्रम विवरण केलें आहे. नंतर याच आन्वीक्षिकी विद्येस न्यायसूत्र म्हणूं लागले. यावरून अक्षपाद हाच न्यायसूत्राचा कर्ता ठरतो. यानेच गौतमाच्या आन्वीक्षिकीस न्यायसूत्राचें स्वरूप प्राप्त करून दिलें.

याशिवाय गौतम व अक्षपाद यांच्यांत स्थानभेदहि आहे. गौतम मिथिलेचा; तर अक्षपाद काठेवाडांतील प्रभास क्षेत्रांतला. ब्रह्मांडपुराणांत अक्षपादाचा पिता सोमशर्मा व बंधु कणाद

असें सांगितलें आहे. पण गौतम व अक्षपाद हे दोघे एकच होत, असें मानूं लागल्यावर त्याविषयीं एक दंतकथाहि निर्माण केली गेली -- गौतम हा सदैव तत्त्वचिंतनांत गढलेला असे. एके दिवशीं तो असाच विचार करीत जात असतां एका विहरींत पडला. लोकांनी त्याला मोठ्या कष्टाने बाहेर काढलें. पुनश्च त्याच्यावर असला प्रसंग येऊं नये म्हणून मग देवांनी त्याच्या पायांनाच डोळे निर्माण केले. ही दंतकथा अक्षपाद या शब्दाचा अर्थ सांगण्यासाठी निर्माण झाली हें उघड दिसतें. श्री. बलदेव उपाध्याय यांच्या मतें वर्तमान न्यायसूत्रांत दोन कालखंडांतल्या चिंतनांची उपलब्धि स्पष्ट दिसते. न्यायदर्शनाचा मूळ निर्माता गौतम आहे व त्यांत नवीन विषयांचा समावेश करून मूळ ग्रंथाचें संशोधन करणारा अक्षपाद आहे. न्यायसूत्रें हीं अक्षपादाकडून प्रतिसंस्कृत आहेत. [म. च. को.; हिं. वि. को.]

अक्षमाला (१) रुद्राक्षांची माळ. ही अनेक देवतांच्या हातांत असते.

(२) अकारादि क्षकारान्त वर्णमाला (तंत्रमतें). या वर्णमालेची रचना अशी --

पञ्चाशल्लिपिभिर्माला विहिता जपकर्मसु ।
अकारादि क्षकारान्ता अक्षमाला प्रकीर्तिता ।।
क्षर्णं मेरुमखं तत्र कल्पयेन्मुनिसत्तम ।
अनया सर्वमन्त्राणां जपः सर्वसमृद्धिदः ।।

(तंत्रसार)

अर्थ -- अ ते क्ष अशा एकावन्न वर्णांची अक्षमाला होते. अ ते ळ हे पन्नास वर्ण हे साधे मणि व क्ष हा मेरुमणि होय. या अक्षमालेने केलेला सर्व मंत्रांचा जप सकल समृद्धि देणारा होतो. [श. क.]

अक्षमालिकोपनिषद् १०८ उपनिषदांपैकी ६७ वें उपनिषद्. हें ऋग्वेदांत अंतर्भूत आहे. अक्षमालेंतील मण्यांच्या अनुरोधाने यांत संस्कृत भाषेंतील ५० वर्णांचा विचार केला आहे. अक्षमालेचें लक्षण, भेद, सूत्रें, घटना, वर्ण, प्रतिष्ठा, अधिदेवता व तिचें फल, यांची माहिती प्रजापति व गुह यांच्या संवादरूपाने यांत सांगितली आहे.

अक्षयनिधि व्रत जैनव्रत. श्रावण शु. १० मी व भाद्र० शु. व कृ. १० मी या व्रततिथी होत. यांना अक्षयदशमी म्हणतात. उपवास, जिनप्रतिमांचें पूजन, जिनमंदिरांत जाऊन आदिनाथावर अभिषेक, असा याचा विधि आहे. व्रतावधि पांच किंवा दहा वर्षें. याची कथा अशी --

राजगृह नगरींत मेघनाद राजाने हें व्रत केलें. त्यामुळे प्रथम तो स्वर्गांत देवत्व पावला. पुढे मनुष्ययोनींत जन्म झाल्यावर तपाच्या द्वारें कर्मनाश करून त्याने मोक्ष मिळविला. [व्र. ति. नि.; जै. व्र. वि. सं.]

अक्षयनीवि हुविष्काच्या कारकीर्दीतील मथुराब्राह्मी शिलालेखांत कायमच्या दानाला हें नांव दिलेलें आहे. गुप्तांच्या एका शिलालेखांतहि हा शब्द याच अर्थाने वापरला आहे. [हि. ध.]

अक्षयफलदशमी व्रत जैन तिथिव्रत. श्रावण शु. १० मी ही तिथि. त्या दिवशीं उपवास व 'ॐ ह्रीं वृषभजिनाय नमः' या मंत्राचा जप. व्रतावधि दहा वर्षें. या व्रताची कथा अशी--

राजगृहांत मेघनाद नांवाच्या राजाला पुत्रसंतान नव्हतें. शुभंकर मुनीने त्यासाठी त्याला हें व्रत सांगितलें आणि त्याच्या प्रभावाने राजाला सात पुत्र व पांच कन्या झाल्या. [जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

अक्षय भंडार द. भारतांत वर्षाच्या अखेरीस सुवासिनीला पात्र भरून हळदीचें दान करतात. या दानाने वैधव्याचें संकट टळतें, अशी समजूत आहे.

अक्षयमति दुसरा बोधिसत्त्व. याचें ध्यान– वर्ण पीत व चिन्ह खड्ग. दुसऱ्या मताप्रमाणे वर्ण शुभ्र व दोहीं हातीं ज्ञा ना मृता चा कलश. चीनमध्ये याची एक मूर्ति सांपडली असून ती ध्यानी बुद्ध अमोघसिद्धि याच्या मूर्तीशीं बरीच मिळती जुळती आहे असें संशोधकांचें मत आहे. [इं. बु. इ.]



अक्षयमति

अक्षय(य्य)वट प्रयागमधील एक प्राचीन, पवित्र वटवृक्ष. संस्कृत साहित्याच्या अनुशीलनावरून असें दिसतें, की प्राचीन काळीं प्रयाग क्षेत्रांत एक महान् वटवृक्ष होता व तो मध्ययुगापर्यंत तिथे उभा होता. चित्रकूटाला जात असतां सीता या क्षेत्रांत आली होती आणि तिने पातिव्रत्य-धर्माच्या पालनाचें सामर्थ्य या वृक्षाकडे मागितलें होतें (वा. रा. २.२३.२४). वनवासाहून परत येतांनाहि रामाला या वृक्षाचें दर्शन झालें होतें व तो सीतेला म्हणाला होता--

त्वया पुरस्तादुपयाचितो यः
सोऽयं वटः श्याम इति प्रतीतः ।
राशिर्मणीनामिव गारुडानां
सपद्मरागः फलितो विभाति ।।

(रघु. १३·५३)

अर्थ--(हे सीते) ज्याची पूर्वीं तूं प्रार्थना केली होतीस, तो हा श्याम नामक वटवृक्ष फळाला आल्यामुळे पद्मराग मण्यांनी युक्त असलेल्या पाचमण्यांच्या राशीप्रमाणे दिसत आहे.

भवभूतीच्या उत्तररामचरितांतहि या श्याम वटाचा उल्लेख झालेला आहे (अंक १). या वृक्षाला अक्षयवट हें नांव व्यासांनी दिलें असावें. पांडव आपल्या वनवासांत चार महिने याच्या आश्रयाने राहिले होते.

यावरून असें दिसतें, की महाभारत रचलें गेलें तेव्हा अक्षय वटाचें धार्मिक माहात्म्य प्रस्थापित झालें होतें. त्यापूर्वी अनेक शतकें त्या वृक्षाचें बीजारोपण झालें असलें पाहिजे. अनुशासन पर्वांत गयेंतल्या अक्षय वटाचाहि उल्लेख आहे–

एष्टव्या बहवः पुत्रा यद्येकोऽपि गयां व्रजेत् ।
यत्रासौ प्रथितो लोकेष्वक्षय्यकरणो वटः ।।

(८८·१४)

याशिवाय वायु, मत्स्य, कूर्म, पद्म, अग्नि, स्कंद या पुराणांत अक्षयवटाजवळ देहत्याग केल्याने मोक्ष मिळतो, असें वर्णन आहे.

आजमितीस हा वृक्ष अस्तित्वांत नाही. तिथले क्षेत्रोपाध्ये प्रयागच्या किल्ल्यांत अक्षयवट म्हणून एक वृक्षाचें खोड दाखवितात. गयाक्षेत्रांतहि अक्षयवट म्हणून एक वृक्ष दाखवितात व तो प्रयागमधल्या मूळ वृक्षाचाच शाखाविभाग असल्याचें सांगतात. ज्या वेळीं जलप्रलय होतो, तेव्हा या वृक्षाचा शेंडा त्या प्रलयजलाच्या वर राहतो व श्रीविष्णु बालकरूपाने त्या शेंड्यावर निद्रित असतो, असें अग्निपुराणांत म्हटलें आहे (११५·७०). प्रयागांतल्या तीर्थविधींत अक्षयवटाचें दर्शन हा एक भाग आहे.

अक्षया चतुर्थी मंगळवारी येणारीं चतुर्थी. या तिथीस केलेलीं उपवासादि व्रतें विशेष फलदायक होतात, असें सांगितलें आहे.

अक्षय्य तृतीया वैशाख शु. ३ येचें हें नांव आहे. हें नांव पडण्याचें कारण मदनरत्न या ग्रंथांत पुढीलप्रमाणे दिलें आहे--

अस्यां तिथौ क्षयमुपैति हुतं न दत्तं
तेनाक्षयेति कथिता मुनिभिस्तृतीया ।
उद्दिश्य दैवतपितॄन्क्रियते मनुष्यै–
स्तच्चाक्षयं भवति भारत सर्वमेव ।।

अर्थ – (श्रीकृष्ण म्हणतो) हे युधिष्ठिरा, या तिथीस केलेलें दान व हवन क्षयाला जात नाही, म्हणून हिला मुनींनी अक्षय्य तृतीया असें म्हटलें आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जें कर्म केलें जातें, तें सर्व अक्षय्य (अविनाशी) होतें.

या तिथीस महत्त्व येण्याचें कारण म्हणजे हा कृतयुगाचा (कांहीच्या मतें त्रेताचा) प्रारंभदिन आहे. कालविभागाचा कोणताहि प्रारंभदिवस भारतीयांना नेहमीच पवित्र वाटतो. म्हणून अशा तिथीस स्नानदानादि धर्मकृत्यें सांगितलीं गेलीं आहेत. या दिवसाचा विधि असा –

पवित्रजलांत स्नान, विष्णूची पूजा, जप, होम, दान व पितृतर्पण. या दिवशीं अपिंडक श्राद्ध करावें व तें जमत नसेल तर निदान तिलतर्पण तरी करावें असें सांगितलें आहे. या दिवशीं सामान्न (शिध्यासह) उदकुंभहि द्यायचा असतो. याशिवाय उन्हापासून संरक्षण करणाऱ्या छत्री, जोडा, इ. वस्तूहि दान द्यायच्या असतात. या व्रताची कथा अशी–

एक व्यापारी होता. तो नित्य दानधर्म करी व संत-महात्म्यांच्या कथा आवडीने ऐके. कालांतराने त्याला दारिद्र्य आलें. पुढे एकदा त्यानें असें ऐकलें, की बुधवारीं रोहिणीयुक्त तृतीया आल्यास त्या दिवशीं केलेलें दान-पुण्य अक्षय्य होतें. मग तसा दिवस येतांच त्याने तें सगळें केलें. पुढल्या जन्मीं तो कुशावती नगरीचा राजा झाला. त्याने मोठमोठे यज्ञ केले व अनेक प्रकारचें वैभवहि भोगलें. पण तरीहि त्याच्या पुण्याचा क्षय झाला नाही (भविष्योत्तर पुराण).

याच दिवशीं परशुरामाचा जन्म झाला. म्हणून या तिथीस प्रदोषकाळीं परशुरामाची पूजा करून त्याला अर्घ्य देतात. स्त्रियांना हा दिवस महत्त्वाचा असतो. त्यांना चैत्रांत बसविलेल्या चैत्रागौरीचें त्या दिवशीं विसर्जन करायचें असतें. त्यानिमित्त त्या हळदीकुंकूहि करतात.

ऋषभदेव याने एक वर्ष आणि कांही दिवस एवढचा

कालानंतर हस्तिनापुरचा राजा श्रेयांस याच्या घरीं या तिथीस उसाच्या रसाचें प्राशन केलें. त्यामुळे राजाची भोजनशाला अक्षय्य झाली. म्हणून या तिथीस हें नांव पडलें. [व्र. ति. नि.]

अक्षय्य नवमी कार्तिक शु. ९ मी. या दिवशीं विष्णूने कूष्मांड दैत्याचा वध केला, म्हणून या तिथीला महत्त्व प्राप्त झालें आहे. या तिथीस विष्णूची पूजा करतात. [व्रतराज]

अक्षय्य फलावाप्तिव्रत वैशाख शु. ३ येच्या दिवशीं विष्णुपूजा. या तिथीस कृतिका-नक्षत्र असल्यास विशेष फल असतें. [नि. सिं.]

अक्षर (न + क्षर). ज्याला क्षरण किंवा क्षय नाही तें अक्षर. याचे वेगवेगळ्या पंथांत व तत्त्वज्ञानाच्या संप्रदायांत भिन्न भिन्न अर्थ होतात.––(१) याचा धात्वर्थ असा– न विरघळणारें, विकार न पावणारें, कूटस्थ, नित्य, सर्व-भावातीत व केवलनिर्गुण.

(२) 'वर्णस्मारकरेखात्मकलिपिसन्निवेशः'– वर्णांचें स्मरण करून देणारा रेखात्मक लिपिप्रकार (न्यायकोश).

(३) परब्रह्म, मोक्ष (वेदान्तमतें).

(४) लक्ष्मी (माध्वमतें)

(५) 'भगवदंशभूतो भगवद्रूपो धामविशेषः' = भगवंताचें अंशभूत व भगवद्रूप असें स्थान (वल्लभमत).

(६) ओंकार, वेदांचें सार व ईश्वर यांचें वाचक (गीता ८.११; १०.२५).

(७) अकारादि क्षकारान्त एकावन्न वर्ण–

षाण्मासिके तु सम्प्राप्ते भ्रान्तिः संजायते यतः ।
धात्राक्षराणि सृष्टानि पत्रारूढाण्यतः पुरा ।।

(आह्निक तत्त्व)

अर्थ– सहा महिने झाल्यावर (अक्षराबद्दल) संदेह निर्माण होतो, म्हणून ब्रह्मदेवाने अक्षरें पत्रारूढ केलीं (त्यांची लिपि बनविली).

जगांतल्या भिन्न भिन्न भाषांच्या विविध ध्वनींना व्यक्त करणाऱ्या चिह्नांना अक्षर म्हणतात. प्राचीन संस्कृत साहित्यांत अक्षर शब्दाचा प्रयोग ध्वन्यात्मक (उच्चरित) व संकेतात्मक (लिखित) अशा दोन्ही अर्थीं सांपडतो. ऋग्वेदांत वर्णमालेला अक्षर असें म्हटलें आहे (ऋ. १. १६४. २४–३९). अक्षर = न पाझरणारें, असा व्युत्पत्तीने येणारा अर्थ आहे. ऋग्वेदकाळीं अक्षरें कोरून काढीत असावे. कोरलेलें अक्षर पाणी पडलें असतां शाईच्या अक्षराप्रमाणें क्षरत अर्थात् पाझरत नाही. वर्ण शब्द केवळ संकेतात्मक चिह्न या अर्थीच आढळतो. वर्ण शब्द रंगणें किंवा रंगविणें या अर्थाच्या वर्ण् या धातूवरून आला आहे. वैदिक काळीं तो अक्षरांचा पर्याय शब्द बनला होता. त्यावरून त्या काळीं अक्षरें रंगीत शाईने काढीत असत, असें दिसतें. ध्वनिशास्त्राप्रमाणे एका वेळीं तोंडांतून बाहेर पडणारा ध्वनि म्हणजे अक्षर होय; मग तो लिहून दाखवायला लिपींतील चिन्ह एक लागो अथवा अनेक लागोत. अक्षराचें अधिष्ठान स्वरावर असतें; मग त्यांत आरंभीं वा अंतीं व्यंजनोच्चार मिळो वा न मिळो. 'राजन्' या शब्दाच्या लेखनाकडे पाहून त्यांत तीन अक्षरें आहेत, असें समजणें चूक होईल. त्यांत 'रा' व 'जन्' अशीं दोनच अक्षरें आहेत. 'रा' हें स्वरान्त आहे, तर 'जन्' हें व्यंजनान्त आहे. स्वरान्त अक्षराला विवृत व व्यंजनान्त अक्षराला संवृत म्हणतात.

अक्षराचे लघु-गुरु असे आणखी दोन भेद आहेत. ऱ्हस्व-स्वरान्त अक्षराला लघु व दीर्घ स्वरान्त अक्षराला गुरु म्हणतात. ऱ्हस्वाची मात्रा एक धरली, तर दीर्घाच्या दोन धरतात. ऱ्हस्वाच्या उच्चाराला जेवढा काळ लागतो, त्याच्या दुप्पट काळ दीर्घाचा गणावा, असा संकेत आहे. याशिवाय तिसरा प्रकार म्हणजे प्लुत. तीन मात्रांच्या अक्षराला प्लुत म्हणतात. म्हणजे प्लुत उच्चारतांना स्वर थोडा लांबवून तीन मात्रांचा काळ व्ययित करायचा असतो. वरील आशय भरताने पुढील श्लोकांत सांगितला आहे ––

एकमात्रं भवेद् ऱ्हस्वं द्विमात्रं दीर्घमिष्यते ।
प्लुतं चैव त्रिमात्रं स्यादक्षरं स्वरयोजनात् ।।

(नाटयशास्त्र १७. ११६)

वर्णात्मक अक्षरांचा आविष्कार लेखनकलेच्या उच्चतम विकासाचा निदर्शक आहे. या पद्धतींत एक चिन्ह एकाच ध्वनीला व्यक्त करतें; अनेक ध्वनींना नव्हे. या दृष्टीने अरबी व रोमन हीं अक्षरें अजून अपूर्ण आहेत. देवनागरी अक्षरें हीं या बाबतींत श्रेष्ठ समजलीं जातात; कारण त्यांमध्ये एक अक्षर एकच ध्वनि दर्शवितें. वर्णात्मक अक्षरांत ध्वनि व अक्षर यांच्यामध्ये कोणताहि आकृतिमूलक वास्तव संबंध नसतो. केवळ परंपरेने तो संबंध मानला जातो.

अक्षरें व वर्ण यांतहि शुभाशुभ कल्पना केलेली आहे. वर्णांचें शुभ, अशुभ व दग्ध असें वर्गीकरण आढळतें. काव्यारंभीं अशुभ अक्षर नसावें, असा संकेत आहे (छन्दोरचना).

अक्षरें अ – क – च – ट – त – प – य – श – या आठ वर्गांत

विभाजित केलेलीं आहेत. प्रत्येक वर्गाची विशिष्ट देवता असून श्लोक वा पद्य यांच्या आरंभीं विशिष्ट वर्गांतलीं अक्षरें योजिल्याने विशिष्ट फल मिळतें, असेंहि सांगितलें आहे. या विषयींचें कोष्टक पुढीलप्रमाणे --

वर्ग	देवता	फल
अ	सोम	आयुर्वृद्धि
क	अंगारक	कीर्ति
च	बुध	धनप्राप्ति
ट	गुरु	सौभाग्य
त	शुक्र	कीर्ति
प	शनैश्चर	मंदता
य	सूर्य	मृत्यु
श	राहु	शून्यता

अक्षर अनन्य (इ. स. १८ वें शतक) बुंदेलखंडी संत कवि. सेंवढा ही याची जन्मभूमि आहे. याचें मूळ नांव अछिरु असें होतें. देवीने वरदान देऊन त्याचें अक्षर-अनन्य असें नांव ठेवलें असें सांगतात. याने ३१ ग्रंथ लिहिले आहेत. त्यांतले २१ ग्रंथ संशोधकांना उपलब्ध झाले आहेत. हे सर्व ग्रंथ निर्गुणसिद्धान्तावर आधारित आहेत. उत्तम-चरित्र व महिमासमुद्र हे अनुक्रमें दुर्गासप्तशती व काशीखंड यांचे भावानुवाद आहेत. कबीर हे कामिनी व कांचन यांना अध्यात्मसाधनेंतील विघ्न मानतात. पण अक्षर अनन्याला हें मत मान्य नाही. तो म्हणतो --

बैठबे को हठ नहीं आसन डिगोने कहा,
पूजा जप नैम नाहीं चूक कहा परि है।
व्यसन वैराग्य नाहीं अपसरा छेले कहा,
देव को अराध नाहीं भूल कहा परि है।
दुख-सुख हानि-वृद्धि स्वप्न के समान जान,
सिद्धिऔ असिद्धि तें पन कहा परि है।
अक्षर अनन्य गुरु अक्षर सुरति ध्यान,
ऐसे ज्ञान योग को विघन कहा करि है।

याचा भावार्थ असा, की ज्याचें मन इंद्रियांच्या स्वाधीन आहे व जो विषयदर्शनाने विचलित होतो, तो साधक ज्ञान-योगीच नव्हे. साधकाला समाधीच्या स्थितीपर्यंत पोचायला क्रमशः गुरु, श्रद्धा, धर्म, नियम, प्रेम, धारणा, सुरति, व अभेद ज्ञान या पायऱ्या चढून जावें लागतें. ज्ञानयोगाची समाधि ही अखंड समाधि असते.

ओरछाचा राजा पृथ्वीसिंह याची व अक्षर अनन्याची भेट झाली होती. राजाने त्याच्या प्रतिभेवर लुब्ध होऊन त्याला आपल्याबरोबर सेंवढा येथे आणलें. असेंहि सांगतात, की धामपंथाचे प्रवर्तक श्री. प्राणनाथ यांनी पृथ्वीसिंहाला आपल्या पंथाची दीक्षा देऊं केली होती. अशा स्थितींत राजाला त्या पंथापासून परावृत्त करण्यासाठी त्याच्या राणीने अक्षर अनन्याला सेंवढा येथें बोलावून आणलें.

हा संत ज्ञानाश्रयी परंपरेचा होता. त्यामुळे तो कबीराच्या सिद्धान्ताशीं सहमत नाही. त्याने स्पष्ट म्हटलें आहे, की कबीराचा उपदेश हा निरक्षर, ग्रामीण लोकांसाठी आहे. [विंध्यभूमि - जून १९५६]

अक्षर धाम अ+क्षर = अविनाशी. धाम = स्थान. अर्थात् भगवंताचें अंशभूत आणि भगवद्रूप असें विशेष स्थान (वल्लभमत). वल्लभाचार्य सच्चिदानंद ब्रह्माचीं तीन मुख्य रूपें मानतात. -- (१) पूर्ण पुरुषोत्तम अथवा श्रीकृष्ण. यालाच अक्षर धाम म्हटलें आहे. (२) काल, कर्म व स्वभाव यांना अनुसरून प्रकट झालेली जीवसृष्टि व दैवतसृष्टि. व (३) अन्तर्यामी रूप. पूर्ण पुरुषोत्तम श्रीकृष्ण हा आपल्या अक्षर धामांत (गोलोक) नित्य आनंदलीलानिमग्न असतो, असें पुष्टिमार्गांत सांगितलें आहे.

अक्षरब्रह्म ज्या ब्रह्मांत आनंदाचा अंश किंचिन्मात्र तिरो-हित (झाकलेला) असतो, त्याला अक्षरब्रह्म व आनंदपरिपूर्ण ब्रह्माला परब्रह्म असें वल्लभसंप्रदायांत म्हटलें जातें. **पाहा** -- पुष्टिमार्ग.

अक्षरमूल्यें ज्योतिष व गणित या विषयांवरील ग्रंथांमध्ये एकसारखा संख्या सांगण्याचा प्रसंग येतो. सांकेतिक शब्दांनी संख्या व्यक्त करण्याची पद्धत ही अशा कित्येक प्रसंगी त्रासदायक व लांबट असल्याचें प्रत्ययास येऊं लागलें. म्हणून एकेरी व संयुक्त वर्णांनी संख्या दाखविण्याची युक्ति उपयोगांत आणली गेली. हिचा प्रथम प्रयोग पहिल्या आर्यभटाच्या आर्यभटीय अथवा आर्यसिद्धांत (इ. स. ४९९) ग्रंथांत केलेला आढळतो. हिचें स्वरूप असें --
क् = १, ख् = २, ग् = ३, घ् = ४, ङ् = ५,
च् = ६, छ् = ७, ज् = ८, झ् = ९, ञ् = १०,
ट् = ११, ठ् = १२, ड् = १३, ढ् = १४, ण् = १५,
त् = १६, थ् = १७, द् = १८, ध् = १९, न् = २०,
प् = २१, फ् = २२, ब् = २३, भ् = २४, म् = २५,

य् = ३०, र् = ४०, ल् = ५०, व् = ६०, श् = ७०, ष् = ८०, स् = ९०, ह् = १००, अ – आ = १, इ – ई = १००, उ – ऊ = १००००, ऋ – ॠ = १००००००, ऌ = १००००००००, ए = १००००००००००, ओ = १००००००००००००००, औ = १००००००००००००००००.

या पद्धतीने संख्या दाखवितांना स्वरयुक्त साधें व्यंजन आल्यास दोघांचा गुणाकार करायचा असतो. जसें – च =च्×अ=६ × १ = ६; गि = ग् × इ = ३×१००=३००. स्वरयुक्त संयुक्त व्यंजनांतील दोन्ही व्यंजनांस स्वराने गुणून आलेल्या गुणाकारांची बेरीज करायची असते. जसें – ख्यु =ख् × उ + य × उ = उ (ख् + य्) = १०००० (२ + ३०) = ३२००००. पण ऌ या अक्षराचें निदान सध्याचें स्वरूप असें आहे, की, हें अक्षर केवळ स्वरहि होऊं शकेल व ल् + ऋ हि होऊं शकेल यामुळे याचीं नेहमीच दोन मूल्यें होतील. यांपैकी कोणतें मूल्य कुठें घ्यायचें, हें संदर्भावरून ठरवावें लागेल.

अक्षरांनी संख्या दाखविण्याची आणखी एक पद्धत दुसऱ्या आर्यभटानें (११ वें शतक) दिली आहे, ती अशी –

१	२	३	४	५	६	७	८	९	०
क्	ख्	ग्	घ्	ङ्	च्	छ्	ज्	झ्	ञ्
ट्	ठ्	ड्	ढ्	ण्	त्	थ्	द्	ध्	न्
प्	फ्	ब्	भ्	म्					
य्	र्	ल्	व्	श्	ष्	स्	ह्	ळ्	

या पद्धतींत स्वर निरर्थक अथवा शून्यवाचक असतो. संयुक्त व्यंजनांतील प्रत्येक व्यंजन एकेक स्वतंत्र अंक दाखवितें. संस्कृतांत सामान्यतः ‘ अङ्कानां वामतो गतिः ’ अशी पद्धति आहे. म्हणजे प्रथम एकम्, नंतर दहम्, तदनंतर शतम् अशा क्रमाने संख्येंतील आकडे उजवीकडून डावीकडे सांगितले जातात. पण इथे सर्वोच्च स्थानापासून सर्वाधम स्थानाकडे आंकडे सांगत जायचें असतें. कधी कधी शिलालेख, ताम्रपट व पोथ्या–पुस्तकें यांतून या पद्धतीने काल सांगितलेला आढळतो.

याशिवाय मलबार व तेलंगण या प्रदेशांत पोथ्यांच्या पानांची संख्या दाखविण्यासाठी आणखी एका पद्धतीचा उपयोग केलेला आढळतो, तो असा – १ ते ३४ अंकांसाठी क ते ळ, ३५ ते ६८ साठी का ते ळा, ६९ ते १०२ साठी कि ते ळि, १०३ ते १३६ अंकांसाठी की ते ळी अशा क्रमाने बाराखडचांचीं अक्षरें वापरतात. ब्रह्मदेशांतील पोथ्यांमध्ये क – कः, ख – खः, ग – गः इ. बाराखडचांनी अनुक्रमें १ ते १२, १३ ते २४, २५ ते ३६ इ. संख्या दाखविण्याची पद्धत आहे. लंकेमध्ये ऋ, ॠ, ऌ, ॡ या स्वरांचा समावेश करून प्रत्येक बाराखडी १६ अक्षरांची करीत व क – कः, ख – खः, ग – गः, इ. सोळाखडचांनी १ ते १६, १७ ते ३२, ३३ ते ४८ इ. संख्या दाखविल्या जात. सर्व सोळाखडचा संपल्यावर २क ते २कः अशा तऱ्हेने पुढील संख्या दाखवीत.

अक्षरांनी संख्यानिर्देश करण्याची पद्धत पुष्कळ प्राचीन आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्ये ‘स्वरितेनाधिकारः’ (१. ३. ११) असें सूत्र आहे. त्याचें तात्पर्य असें आहे, की एखाद्या सूत्रांतील एखाद्या शब्दाची पुढील एका किंवा अधिक सूत्रांत अनुवृत्ति असेल, तर तन्निदर्शनासाठी त्या शब्दाचा स्वरित उच्चार करावा. अर्थात् एवढचाने त्या सूत्राची अनुवृत्ति असणाऱ्या सूत्रांची संख्या निश्चित होत नाही. पण या सूत्रावरील कात्यायनाचीं वार्तिकें व कैयटाने दिलेलीं उदाहरणें, यावरून असें सिद्ध होऊं पाहतें की, अनुवृत्त सूत्रांची संख्या दाखविण्यासाठी माहेश्वर सूत्रांतील वर्णांचा उपयोग करीत आणि उपयुक्त वर्णांचा माहेश्वर सूत्रांतील अनुक्रमांक अनुवृत्त सूत्रांची संख्या दाखवी. उदा० एखाद्या सूत्रावर ऐ अक्षर घातलें असल्यास, ऐचें अष्टाध्यायींतील माहेश्वरसूत्रांत आठवें स्थान असल्याने त्या सूत्राची अनुवृत्ति पुढील आठ सूत्रांत आहे, असें समजत.

संस्कृतादि भाषांप्रमाणे अरबी-फार्सी भाषांमध्येहि अक्षरांनी संख्या दाखविण्याची पद्धत आहे. तिला अब्तस किंवा हिसाब–इ–जुम्मल पद्धत म्हणतात. हिच्यामध्ये वाढत्या संख्या दाखविण्यासाठी घेतलेल्या अक्षरांचा क्रम पाहिला, तर असें वाटतें, की हिची घडण फार प्राचीन काळीं झाली असली पाहिजे. कारण हिच्यामधील अक्षरांचा क्रम सध्याच्या क्रमाहून भिन्न आहे. पहिल्या बावीस अक्षरांपर्यंत तो हिब्रू व फिनिशियन वर्णमालेंतील अक्षरांशीं जुळता आहे.

टिपूने आणखी एक नवीनच पद्धत सुरू केली होती. तिच्यांत अरबी वर्णमालेचीं अक्षरें क्रमाने घेऊन त्यांस १ ते ९, १० ते ९०, १०० ते ९०० व १००० अशा किंमती दिल्या होत्या. हिच्यामधील पहिलीं चार अक्षरें अलिफ्, बे, ते, से, हीं असल्याने हिला अब्तस पद्धति म्हणतात.

संस्कृत, अरबी, फार्सी या भाषांप्रमाणे प्राचीन व अर्वाचीन युरोपीय भाषांमध्येहि अक्षरांनी संख्यानिर्देश करण्याची पद्धत चालू होती व सध्याहि आहे. घडचाळाच्या तबकडीवर तासांची संख्या, पुस्तकांत ग्रंथगर्भाशिवाय प्रस्ताव, विषयप्रवेश, अनुक्रमणिका इत्यादींनी व्यापलेला पृष्ठांचा क्रम, जुन्या

छापील पुस्तकांत मुख्यतः छपाईचें साल, प्रतिमापत्रांचा क्रम इ. व्यक्त करण्यासाठी अक्षरांचा उपयोग करतात. [सं. मि.]

अक्षरविद्या हृदयविद्या किंवा केंद्रविद्या हिचें नांव अक्षरविद्या असें आहे. जी वस्तु जीवित आहे, तिच्या मध्यें हृदय असतें व त्याच्या केंद्रांत अक्षर किंवा प्राणतत्त्व वास्तव्य करतें. या प्राणतत्त्वामुळेच जीवित शरीरांत हालचाल होत असते. गति, आगति व स्थिति या तिघांची समष्टि म्हणजे अक्षर होय. गतीला रुद्र, आगतीला विष्णु, आणि स्थितीला ब्रह्मा म्हटलें आहे. अक्षरविद्या म्हणजे निराळचा अर्थानें प्राणोपासनाच आहे. [भा. सा.]

अक्षरारंभविधि मुलाला पांचवें वर्ष लागल्यावर त्याला अक्षरें लिहिण्यास शिकवायचें असतें. याच्या विधींत अक्षतपुंजांवर गणपति, हरि, लक्ष्मी, सूत्रकार व विद्या यांच्या नांवें सुपाऱ्या ठेवून त्यांचें आवाहन करतात. वाळूचें एक स्थंडिल करून त्यांत पळसाची फांदी खोंचतात व तिच्यावर सरस्वतीचें आवाहन करतात. मग सर्व देवतांची यथाविधि पूजा झाल्यावर अग्निस्थापना करून वरील देवतांच्या नाममंत्राने आहुति देतात. हा विधि हिरण्यकेशी ब्रह्मकर्मांत सांगितला आहे. एवढें झाल्यावर मग आचार्य मुलाला 'ॐ नमः सिद्धम्' हीं अक्षरें लिहायला शिकवितो. या अक्षरांना मातृका म्हणतात. मग देवतांचें उद्वासन करतात (ऋ. ब्र. क.).

लौकिक विधींत एका फळीवर वस्त्रगाळ माती पसरून व मुलाचें बोट धरून त्याने 'श्रीगणेशायनमः' 'ओनामासिधम्' हीं अक्षरें गिरवून घेत. हा विधि पूर्वकालीं दसऱ्याच्या किंवा वर्षप्रतिपदेच्या दिवशीं करीत. सांप्रत हा विधि लुप्त झाला आहे.

अक्षोभ्य ध्यानी बुद्धांपैकी दुसरा बुद्ध. अमिताभाच्या खालोखाल याचें महत्त्व आहे. याचें वर्णन –

नील हुंकार निष्पन्न द्विभुज एकमुखो भूस्पर्श–
मुद्राधरो वज्रपर्यंकी कृष्णवज्रचिन्हः ......

(अद्वयवज्रसंग्रह)

अर्थ – नीलवर्ण. हुंकारांतून उत्पन्न. द्विभुज. भूमिस्पर्श मुद्रेंत असणारा. वज्रपर्यंकावर बसणारा व कृष्ण वज्र हें चिन्ह धारण करणारा.

याचा मंत्र 'आः वज्रधुक् हुम्।' असा आहे. याचा एक स्वतंत्र स्वर्गलोक आहे, त्याचें नांव अक्षोभ्य व्यूह होय. याच



अक्षोभ्य

नांवाच्या ग्रंथांत त्याचें वर्णन आहे. [इं. बु. इ.]

अक्षौहिणी भारतीय युद्धशास्त्राप्रमाणे सैन्याची एक इकाई (यूनिट). अक्षौहिणीचा अर्थ रथसमूहयुक्त सेना. (अक्ष = रथ; ऊहिनी = समूहयुक्त.) अक्षौहिणींत २१,८७० रथ, तितकेच हत्ती, ६५६१० घोडे व १०९३५० पायदळांतील सैनिक असत. अक्षौहिणीचें कोष्टक असें –

३ पत्ति	= १ सेनामुख
(१ रथ, १ हत्ती, ३ घोडे व ५ पदाति)	
३ सेनामुख	= १ गुल्म
३ गुल्म	= १ गण
३ गण	= १ वाहिनी
३ वाहिनी	= १ पृतना
३ पृतना	= १ चमू
३ चमू	= १ अनीकिनी
१० अनीकिनी	= १ अक्षौहिणी [सं. इं. डि.]

अज्ञातयौवना एक नायिकाभेद. जिला आपल्या यौवनाच्या आगमनाची जाणीव नाही, अशी नायिका. हा मुग्धेंतला एक भेद आहे. संस्कृतांत हा भेद कोण्याहि साहित्यशास्त्रज्ञाने स्वीकारला नाही. पण हिंदी कवींनी या जातीची नायिका मानली आहे. मतिराम म्हणतो —

निजतनु जौवन आगमन जो नहि जानति
(ललितललाम)

अर्थ – जी आपल्या देहांत यौवनाने प्रवेश केल्याचें जाणत नाही (ती), अज्ञातयौवना होय. [हिं. सा. को.]

अज्ञान

ज्ञानाचें विरोधी किंवा अविद्या. याचें लक्षण सर्व दर्शन संग्रहांत पुढीलप्रमाणे दिलें आहे.

अनादि भावरूपं यद्विज्ञानेन विलीयते ।
तदज्ञानमिति प्राज्ञा लक्षणं सम्प्रचक्षते ।।

अर्थ–अनादि, भावरूप (अनुमानप्रमाणाने) असें जें (कांही) विज्ञानाने नाश पावतें, तें अज्ञान होय, असें प्राज्ञ त्याचें लक्षण सांगतात.

हें मायावादी वेदान्त्यांचें लक्षण आहे. भगवद्गीतेंत ज्ञान व अज्ञान यांचें स्वरूप पुढील एकाच श्लोकांत सांगितलें आहे––

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ।।
(१३. ११)

अर्थ––अध्यात्मज्ञान नित्य आहे अशी बुद्धि होणें व तत्त्वज्ञानाच्या सिद्धान्तांचें परिशीलन यांस ज्ञान म्हटलें आहे. याखेरीज जें दुसरें, तें अज्ञान होय (गी. र.).

मनुष्यमात्राला जीं दुःखें होतात, त्यांना अज्ञान हेंच कारण आहे. आत्म्याचें अज्ञान म्हणजे तो परमानंदरूप आहे, हें न समजणें. त्यामुळे विषयभोगांकडे प्रवृत्ति होते. आत्मस्वरूपाच्या अज्ञानामुळेच विषयवासना होते व ती दुःखरूप असते. ही प्रक्रिया पुढीलप्रमाणे होते– अज्ञानापासून अविवेक, त्यापासून अभिमान, त्यापासून राग–द्वेष, त्यांपासून कर्म, त्यापासून शरीरपरिग्रह व त्यापासून दुःख.

हें अज्ञान नष्ट करण्याचा मार्ग म्हणजे त्याचें प्रतियोगी जें ज्ञान, तेंच मिळविलें पाहिजे; त्यावांचून दुसरा उपाय नाही. आत्मा किंवा ब्रह्म स्वयंप्रकाश असल्यामुळे तिथे अज्ञानाचा प्रवेश होतोच कसा, ही या ठिकाणीं आशंका आहे. तिचें उत्तर असें, की आत्मा व अज्ञान यांमध्ये विरोध नाही. झोपेंतून उठलेला माणूस आपल्या निद्रासुखाचा व त्या अवस्थेंतील अज्ञानाचा अनुभव सांगतो. यावरून सुषुप्तींत आत्मानुभव व अज्ञान या दोन वस्तु एकत्र असूं शकतात. इतकेंच नव्हे; तर आत्मप्रकाश हा अज्ञानाचा साधक आहे; बाधक नव्हे. तसें नसतें, तर इतका वेळ मला कांही समजलें नाही, असा स्वानुभव झोपून उठलेल्या माणसाने प्रगट केला नसता. मग ज्ञान व अज्ञान यांचा शास्त्रांत व लौकिकांत विरोध दिसतो तो कां ? या प्रश्नाचें उत्तर असें–

ज्ञानाचे प्रकार दोन–स्वरूपज्ञान व वृत्तिज्ञान. केवळ ज्ञप्तिरूप आत्मा तें स्वरूपज्ञान व घटज्ञान, पटज्ञान हें वृत्तिज्ञान. पहिल्याला विशेष चैतन्य व दुसऱ्याला सामान्य चैतन्य म्हणतात. ज्ञानाने अज्ञानाची निवृत्ति होते, हा नियम वृत्तिज्ञानाविषयी लागू आहे; स्वरूप ज्ञानाविषयी नाही. उदा० काष्ठांत व्यापून असलेला अग्नि काष्ठाला जाळीत नाही व अंधकाराचा नाशहि करीत नाही. पण त्याच काष्ठाच्या मंथनांतून प्रकट झालेला अग्नि, तें काष्ठहि जाळतो व वातीच्या आश्रयाने अंधाराचाहि नाश करतो. त्याचप्रमाणे आत्म्याच्या सामान्य प्रकाशाने अज्ञानाचा नाश न झाला, तरी तेंच आत्मचैतन्य वृत्तीमध्ये प्रविष्ट (प्रतिबिंबित) झालें असतां अज्ञानाचा नाश होतो (ब्र. सि. मा.).

अज्ञानाला हृदयग्रंथि म्हटलें आहे. सद्गुरूच्या उपदेशाने शिष्याच्या त्या हृदयग्रंथीचा भेद होतो. सद्गुरु ज्ञानांजनाच्या शलाकेने अज्ञानाने अंध झालेल्या शिष्याचें चक्षुरुन्मीलन (डोळे उघडणें) करतो. अज्ञान हें तमाचें फल आहे (गी. १४. १६). अज्ञानामुळेच हा संसार आहे (योगतत्त्वोपनिषत् १६).

अज्ञानमलपङ्कं यः क्षालयेज्ज्ञानतोयतः
स एव सर्वदा शुद्धो नान्यः कर्मरतो हि सः ।।
(जाबालिदर्शनोपनिषद्)

अर्थ––ज्ञानाच्या जलाने जो अज्ञानाचा मल–चिखल धुवून काढतो, तोच सार्वकाल शुद्ध होय. दुसरा जो कर्मांतच रमणारा, तो (शुद्ध) नव्हे. **पाहा**–ज्ञान, सद्गुरु.

अज्ञान कवि

(इ. स. १४ वें शतक) हा महाराष्ट्रीय कवि नागनाथ अर्थात् नागेश या साधुपुरुषाचा शिष्य होता, या पलीकडे याची माहिती उपलब्ध नाही. याने वरद नागेश नांवाचा १८५० ओव्यांचा ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ विवेकसिंधूच्या धर्तीवर आहे. विवेकसिंधु व दासबोध यांच्या मधला हा दुवा आहे. दासबोधावर याची छाप दिसते. माया-ब्रह्माचें विवरण करतांना तो पुढील ओव्या लिहितो––

जैसें गगनाच्या पोटीं । अभ्र असंख्यात उठी ।
क्षणां पाहतां दृष्टी । कांहीचि नाही ।।
ब्रह्म निराकार तैसें । माया तेथे अभ्र भासे ।
इछेविण परियेसें । उद्भवती जाहली ।।
येक उभा गंगातिरीं । तो दिसे उदकाभीतरी ।
परी हा अपुला शरीरीं । अलिप्त असे ।।
ते आहे म्हणों तरी हातां नये । नाही म्हणो तरी दिसताहे ।।

ऐसे मायामये । असे ना नसे ॥

(अध्याय ३)

याशिवाय याने कालज्ञान, गुरुशिष्यसंवाद, पंचीकरणप्रमेय इ. स्फुट प्रकरणेंहि लिहिलीं आहेत. [म. वा. इ.]

अज्ञानदास

शिवकालीन महाराष्ट्रीय शाहीर. याने अफजलखानाच्या वधावर पोवाडा रचला आहे. सर्व पोवाडयांत हा पोवाडा जुना समजला जातो. त्यांत कथानकाच्या अनुषंगाने तत्कालीन महाराष्ट्राच्या परिस्थितीवर कांही प्रकाश पडतो. शिवाजीने या पोवाडयाच्या रचनेवर खुष होऊन त्याला सोन्याचा तोडा व एक घोडा बक्षीस दिला होता––

म्हणून शिवाजी सरज्याने । इनाम घोडा बक्षीस दिला ।
शेरभर सोन्याचा । तोडा हातांत घातला ।

हा पोवाडा एकतारीवर म्हणतां येतो. [म. सा.]

अज्ञानवाद

ज्ञानाला तुच्छ करुन अज्ञानांतच मोक्ष आहे, असें मानणाऱ्या एका पंथाचें महावीराने वर्णन केलें आहे. या पंथाची विचारसरणी अशी–

दोन भिन्न व्यक्तींचें ज्ञान भिन्न असू शकतें. त्या दोन व्यक्तींतल्या ज्ञानविषयक चर्चा व वादविवाद यांच्या योगाने मनें कलुषित होतात. त्यामुळे त्यांना अधिक काळ संसारबंधांत राहावें लागतें. पण ज्ञानच नसलें, तर अभिमान व द्वेष उत्पन्न होत नाही व मोक्ष त्वरित मिळतो. ज्ञानामुळे इच्छा उत्पन्न होते व त्यामुळे जें कर्म घडतें, त्याचे परिणाम अधिक तीव्र असतात. मनाच्या प्रेरणेवांचून केवळ शरीराने घडणाऱ्या कर्मांचे परिणाम फार वाईट व दुःखदायक नसतात आणि चांगलें कर्म करून त्या परिणामांचा निरास करतां येतो. म्हणून मुमुक्षूने अज्ञानांत राहावें हें चांगलें. मोक्षासाठी ज्ञान आवश्यक आहे असें क्षणभर मानलें, तरी खरें ज्ञान कोणतें हा प्रश्न शिल्लक राहतोच. प्रत्येक तत्त्वज्ञानी पुरुषाचें ज्ञान निराळें असतें. महावीरासारखे पुरुष म्हणतात, की 'मला दिव्यज्ञान झालें आहे.' पण त्याला प्रमाण काय ? ज्ञानासंबंधीं कोणत्याहि विधानावर प्रमाणावांचून विश्वास ठेवतां येत नाही. म्हणून ज्ञानापेक्षा अज्ञानच श्रेष्ठ होय.

या अज्ञानवादाचेहि ६७ उपपंथ होते. [स्कू. से. जै. लि.]

अज्ञानसिद्ध

(१४ वें शतक) एक मराठी मध्ययुगीन कवि. अज्ञानसिद्धाचें चरित्र व काव्य याचीं फार थोडी माहिती वाङमयेतिहासांत आढळते.

मोहोळ येथे हेगरस नांवाचा नागनाथचा एक भक्त राहत असे. या हेगरसाला अहिल्या नांवाची एक मुलगी होती. ती मसुरग्रामीं दिली होती. तिला अज्ञानसिद्ध, विदेहसिद्ध व नरेंद्रसिद्ध असे तीन मुलगे होते. त्यांचें गोत्र जमदग्नि होतें. अज्ञानसिद्धाला लहान वयांतच सिद्धस्थिति प्राप्त झाली. मग त्याच्या आईने त्याला नागनाथास अर्पण करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणे वडवाळ येथे येऊन तिने तसें केलें.

नागनाथाने साक्षात् दर्शन देऊन अज्ञानसिद्धावर कृपा केली. वडवाळ येथे कांही काळ गेल्यावर नागनाथाने त्याला आज्ञा केली–

तुवा नरेंद्रपुरीं जाऊन । समाधान विचरिजे ॥
अलंप्रभु वसे भावे । तेथ तुवाही असावें ॥

ही नरेंद्रपुरी उर्फ नरंदें हें गांव कोल्हापूर जिल्ह्यांत हातकणंगलें तालुक्यांत आहे. तिथे अज्ञानसिद्ध जाऊन राहिला. अनेकजण त्याचे भक्त झाले. नरंदें येथेच त्याने जीवत्समाधि घेतली. त्याच्या समाधीचा शक उपलब्ध झालेला नाही. ज्या अर्थी त्याने संकटहरणीचें लेखन शके १३१३ मध्ये केलें, त्या अर्थी त्याचा समाधिकाल चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धापलिकडे जाऊं शकत नाही. नरंद्याला अज्ञानसिद्धाचा दत्तचैतन्य म्हणून एक शिष्य होता. त्यानेच गुरूची समाधि बांधली आहे. अज्ञानसिद्धाची शिष्यपरंपरा मोठी होती.

अज्ञानसिद्धाच्या उपलब्ध चार प्रकरणांची माहिती पुढीलप्रमाणे–

(१) **तत्त्वबोध–** हें २०१ ओव्यांचें लहानसे प्रकरण असून त्याचें स्वरूप गुरुशिष्यसंवादाचें आहे. शिष्य गुरूला परब्रह्म म्हणजे काय, मी म्हणजे कोण, असें प्रश्न विचारतो.

(२) **जीवब्रह्मभेदलक्षण–** हें ५०२ ओव्यांचें प्रकरण असून त्यांत शिष्याच्या "भेदमतखंडण । कीजे स्वामी" या विनंतीवरून गुरुंनी तसें केलें आहे.

(३) **पृच्छापत्र–** या प्रकरणांत १९८ ओव्या असून त्यांत 'सच्चिदानंदपद व्याख्यान' आहे.

(४) **काळज्ञान–** हें ५११ ओव्यांचें प्रकरण आहे. [पंडीत आवळीकर]

आंगिरस

अंगिरस वंशांतल्या लोकांना हा शब्द कुलनाम म्हणून लावलेला आढळतो. यांची वंशावळहि सांपडते (छांदो. १. २. १०.; पं. ब्रा. २०.२१; तै. सं ७. १. ४. १.). अंगिरसाने रथीतराच्या स्त्रीच्या ठिकाणीं उत्पन्न केलेल्या ब्रह्मक्षत्र संततीलाहि आंगिरस म्हणत. अंगिरस् हा अथर्ववेदाचा प्रवर्तक होय. याच्या कुलांतील ऋषींनी सत्र केलें.

यज्ञानुष्ठानांत दूध लागतें; म्हणून त्यांनीं एक गाय बाळगली होती. पण अवर्षणामुळे तिला चारा मिळेना आणि यज्ञांत कुटलेल्या सोमरसाच्या चोथ्यावर त्या गायीचें पोषण होईना. त्यामुळे आंगिरसांना दुःख झालें. या गायीला पुरेसा चारा उत्पन्न करण्याची शक्ति जर आमच्यांत नाही, तर आम्ही सत्र तरी कशाला करावें, असा विचार त्यांच्या मनांत आला. मग त्यांनी कारीरि नामक इष्टि केली. त्यामुळे चारा पुष्कळ मिळू लागला; पण पितरांनी त्यांत विष उत्पन्न केल्यामुळे गायीला तो चारा मानवेना. त्यासाठी मग त्यांनी पितरांना हविर्भाग दिला व त्यानंतर त्या गायीला निर्दोष चारा मिळूं लागला. ती खूप दूध देऊं लागली (तै. ब्रा. २. १. १.). यांनीच द्वि-रात्रयाग सुरू केला (तै. सं ७. १. ४.). **पाहा**–अंगिरोगण; अथर्ववेद. [प्रा. च. को.]

आंगिरसस्मृति

या स्मृतींत ७२ च श्लोक आहेत. पण तो संक्षिप्त ग्रंथ असावा, असें डॉ. काणे मानतात. या संक्षिप्त ग्रंथांत अंत्यजाचें अन्नोदक घेतल्यास व गायीला मारहाण केल्यास कोणतें प्रायश्चित्त घ्यावें, तें सांगितलें आहे.

याज्ञवल्क्याने धर्मशास्त्रकारांच्या यादींत अंगिरसाचें नांव दिलेलें आहे. विश्वरूप, अपरार्क, मेधातिथि व हरदत्त यांनी आणि मिताक्षरा टीकेंत अंगिरसाचीं अशौच, प्रायश्चित्त, सती, परिषद्, इ. विषयांवरील मतें उद्धृत केलेलीं आहेत. [हि. ध.]

आंघ्रि

पाय, सामान्यतः मोठ्या खांबावर रचलेला छोटा ठेंगणा खांब, मजल्याच्या वरच्या भागावर उभारलेला चौरस खांब, मनोरा वा शिरोगृह. [मानसार]

आंजणा

कुणबी जात. हे लोक मुख्यत्वें गुजरातमध्ये आढळतात. यांची चेहेरेपट्टी राजपुतांप्रमाणे दिसते. पुरुष राजपुतांप्रमाणे कल्लेहि राखतात. कांही लोकांच्या नांवाच्या शेवटीं सिंग हें उपपद असतें. यांच्यांत एकंदर ३३ गोत्रें असून त्यांच्यामध्ये रोटी-बेटी व्यवहार होतो. हे लोक मूळचे नवसारी प्रांतांतल्या वन्यधर्मी चोधा वंशाचे असावे. अजूनहि ते आपणांस चोधा म्हणवितात. उत्तर गुजरातेंतल्या राजपूत राजांनी या जातींतल्या कांही लोकांना गाडी हाकण्यास ठेवलें होतें, असें म्हणतात. हे शेती करतात. यांच्यांत रामानुज, शैव, आणि स्वामी नारायण असे पंथ आढळतात. औदीच, मेवाड, मोढ व नागर या ब्राह्मणांना पौरोहित्याला बोलावतात.

मुलाचें जातकर्म करतात. जुन्या काळीं लग्नें ११ व्या वर्षापूर्वी करीत असत. विधवाविवाह व घटस्फोट रूढ आहेत. पुर्नविवाहाला 'नात्रं' म्हणतात. पूर्वीचा नवरा हयात असतांनाहि विशिष्ट कारणांसाठी नात्रं लावतां येतें. हा विधि मंगळवारीं किंवा रविवारीं करतात.

विवाहप्रथा– सामान्य लग्नविधि पुढीलप्रमाणे असतो– मुलाच्या लहानपणींच त्याच्या लग्नाच्या वाटाघाटी सुरू होतात. मुलाजोगती मुलगी ज्याच्या घरीं जन्मली असेल, त्याला वर-पिता दुसऱ्याच्या मार्फत विचारतो. वधूपित्याकडून रुकार मिळतांच वराकडील मंडळी रुपया व गूळ खोबऱ्याची वाटी घेऊन मुलीकडे जातात. मग वाटाघाटी होऊन लग्न ठरतें. पंचांच्या संमतीने लग्नाचा मुहूर्त ठरतो. मग एका कलशावर गणपतिस्थापना करून 'माणेकस्तंभ' पुरतात. लग्नापूर्वी एक दिवस वराचा मामा त्याला पोषाख देतो. वरपिता त्याला पागोटें बांधतो. मामा वराच्या हातीं कटचार देतो. वराची मिरवणूक वधूच्या मांडवाशीं येतांच वधूमाता वराच्या हातीं नारळ देते. पुरोहित लाल सुतांच्या माळा बनवून त्या वधू-वरांना घालायला देतो. मातीच्या कुंडांत अग्नि आणून त्याच्या भोवती सप्तपदी होते. वधूमाता कंसार (शिरा) व तूप आणून तें वधू-वरांपुढे ठेवते. वर त्या पदार्थांना स्पर्श करून सासूचा पदर धरतो. तिने मनाजोगती देणगी देण्याचें कबूल केल्यावर मग तो तिचा पदर सोडतो. नंतर वरमाता वधु-वरांवर अक्षता टाकते. वधूकडील पोक्त मनुष्य तिला वराकडील पोक्त माणसाच्या मांडीवर बसवितो. एवढें झाल्यावर लग्न संपतें. वधू वयांत आलेली असल्यास त्याच वेळीं तिला सासरीं नेतात. लहान असल्यास माहेरींच ठेवतात. मुलीच्या पाठवणीच्या वेळीं तिचा बाप जावयाला व वरपिता मुलीला वस्त्र-भूषणें देतो.

अंत्यविधि–मृतासाठी रडायला बायकांना बोलावितात. त्यांना शिजविलेले गहूं किंवा जोंधळे देतात. [सेन्सस रिपोर्ट–बडोदें; ल. वि. सो.]

आंजनेय

संगीतविद्येचा एक प्राचीन जाणकार. नारद, शार्ङ्गदेव, शारदातनय, इ. लक्षणकारांनी त्याचीं मतें उद्धृत केलीं आहेत. त्यागराजानेहि संगीतांतील विद्वान् असा त्याचा उल्लेख केला आहे. याच्या नांवावरील हनुमत् भरतम् हा ग्रंथ उपलब्ध आहे. हनुमत् कटकम् हा ग्रंथहि हनुमान् किंवा आंजनेय याच्या नांवावरच मोडतो. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

आंडाळ

तमिळनाडमधली एक भक्त व कवियित्री. बारा अळवारांत हिची गणना होते. हिला

'दख्खनची मीरा' म्हणतात. आठव्या शतकाच्या उत्तरार्धांत हिचा जन्म झाला. विष्णुचित्त नामक एका वैष्णव भक्ताला तुळशीच्या वनांत नुकतीच जन्मलेली एक मुलगी सांपडली. भगवंताच्या आदेशाला अनुसरून त्याने ती मुलगी घरीं आणली व तिचें 'कोदई' असें नांव ठेवलें. कोदई म्हणजे फुलांच्या हाराप्रमाणे कमनीय होय. बालपणापासूनच हिची कृष्णावर भक्ति जडली. त्याला सोडून अन्य कुणाला वरायचें नाही, असें तिने ठरविलें व त्याप्रमाणेच ती वागली.

पुढे भगवंताची कृपा व प्रेम प्राप्त झाल्यावर तिला आंडाळ हें नांव मिळालें. विष्णुचित्ताला देवाच्या गळयांत घालण्यासाठी फुलांचे हार गुंफून देण्याचें काम आंडाळकडे होतें. परंतु त्या आधीं तो हार आपला गळयांत घालून ती एका आरशांत स्वतःचें सौंदर्यनिरखी. विष्णुचित्ताला या गोष्टीचा पत्ता नव्हता. पण एक दिवस हारांत एक केस सांपडला. त्यामुळे तो हार बासा समजून त्याने तो रंगनाथाच्या गळयांत घातला नाही. हा अपराध आपल्या मुलीचा आहे, हें समजल्यावर तो आंडाळवर खूप रागावला. पण त्या रात्रीं रंगनाथाने स्वप्नांत येऊन विष्णुचित्ताला सांगितलें, की आंडाळने आधी गळयांत घातलेला पुष्पहारच मला अधिक प्रिय आहे. त्यावरून विष्णुचित्ताला तिच्या भक्तीची कल्पना आली. एक दिवस रंगनाथाने 'आंडाळबरोबर माझा विवाह करा' असा देवालयाच्या अधिकाऱ्यांना आदेश दिला. त्याप्रमाणे अधिकाऱ्यांनी इतर उत्सवांप्रमाणेच रंगनाथाचा हा लग्नसोहळा साजरा केला. आंडाळ मंदिरांत आल्याबरोबर रंगनाथाच्या शेषशय्येवर चढली. त्याबरोबर सर्वत्र दिव्य प्रभा पसरली. व त्या तेजांत ती विलीन होऊन गेली, अशी आख्यायिका सांगतात. द. भारतांतील वैष्णवमंदिरांत अद्यापहि दर वर्षी आंडाळ व रंगनाथ यांचा विवाहसोहळा साजरा करतात.



आंडाळ

आंडाळची भक्ति, प्रेम व कारुण्य यांनी ओथंबलेली आहे. श्रीहरीच्या नामसंकीर्तनांत ती स्वतःला विसरून गेलेली आहे. रंगनाथ (श्रीकृष्ण) पति मिळावा म्हणून तिने गोकुळांतल्या गोपींप्रमाणे कात्यायनीव्रत केलें होतें. तें व्रत 'पावै व्रत' या नांवाने अद्यापहि तमिळनाडमधल्या कुमारी करतात. तिरुप्पावै नांवाचा एक संग्रह आंडाळने मुख्यतः या व्रतासाठी रचलेला आहे. नच्चियार तिरुमोलि हा तिचा दुसरा काव्यग्रंथ होय. आजहि तमिळ ललना माघ मासीं प्रातःकाळीं व्रताच्या स्नानासाठी जात असतांना त्या ग्रंथांतलीं आंडाळचीं गाणीं प्रेमाने म्हणतात. त्यांतलीं कांही गीतें नायिकेला जागें करण्यासाठी आहेत. कांही गीतांतून 'नप्पिन्नै' म्हणजे राधा हिचा उपालंभ आहे. कारण भक्तस्त्रिया पूजेसाठी मंदिरद्वारांत येऊन उभ्या राहिल्या, तरी नप्पिन्नै आपली कृष्णाला जवळ घेऊन झोपलेलीच असते. आंडाळ म्हणते —

मैत्तडं कण्णिणाय् । नी उन् मणाल नै
अॅत्तनै पॉडुम तुयिलॅळ् वॉट्टाय काण
अॅत्तनै एळुम् पिरिवाट्र किळ्ळायाळ्
तत्तुवमन्रु तकर्वळो रॅम्पावाय्

अर्थ — हे नप्पिन्नै, तूं आपल्या प्रियतमाला किती वेळपर्यंत आपल्या मायानिद्रेंत असें गुंगवून ठेवणार आहेस ? तुला क्षणभरहि वियोग सहन होत नाही काय ? हें काय योग्य झालें ?

आंडाळ कृष्णानुग्रहासाठी तळमळत होती. तिला गोकुळांत जाऊन गोपींचें जीवन जगण्याची उत्कंठा लागली होती. त्याच भावनेने ती म्हणते—

करवैकळ पिन्चॅरू कानम् चॅर्दुन्बोम्
अरिवॉन्रूमिळ्ळाद आयकुळुत्तु उन्दन्नैप्
पिरवि पॅरुन्दनै पुण्णियम् यामुडै योम
कुरैवान्रूमिळ्ळाद गोविंदा । उन्दन्नोडु
उखेळ् नमक्कु इंगु ऑळिक्क ऑळियादु

अर्थ — हे कृष्णा, आम्ही तुझ्यासह वनांत गायी चारायला येत आहों. तिथेच आमचें जीवन आहे. कारण तूं आम्हां अडाणी गवळयांच्या घरीं जन्म घेतलास ना ! म्हणून आमचें नशीब उगवलं. हे गोविंदा, तुझा आमचा संबंध आतां अतूट आहे. आम्ही प्रेमविव्हल होऊन तुझ्या नांवाचा पुकारा करतों. त्याबद्दल आम्हाला क्षमा कर.

आराध्य कृष्णाला आवडतील अशा गोष्टींचा संकल्प, त्याला प्रतिकूल अशा गोष्टींचें वर्जन, दृढ विश्वास, रुसवा, त्याच्यावर सर्व भार, आत्मसमर्पण आणि दीनता हे भाव आंडाळच्या सर्व काव्यांत ठळकपणे दिसतात. [गिरीश; भा. सं; भा. सं. म.]

आंडी तमिळनाडमधले बैरागी. शूद्रांच्या अनेक जातींतून यांची जमात बनलेली आहे. जोगी, जंगम, कोविल,

मुट्टव असे यांचे पोटभेद आहेत. सगळेच आंडी भिक्षा मागत नाहीत. कांही मंदिरांत देवाच्या सेवेचें काम करतात. कांही लग्नांत व पशुबलि देत असतांना पौरोहित्य करतात. भिक्षा मागणारे हाताने घंटा वाजवितात. यांच्यांत घटस्फोट व पुनर्विवाह मान्य आहेत. यांना मद्य-मांस चालतें. [का. ट्रा. स. इं.]

आंडुरान नायर कुंभारांची एक पोटजात. हे देवस्थानासाठी लागणारीं मातीचीं भांडीं तयार करण्याचें काम करतात. [का. ट्रा. स. इं.]

आंडय्या (११ वें शतक) एक कन्नड कवि. आंडय्याने काव्यरचना करण्यापूर्वी अशी प्रतिज्ञा केली होती. की मी माझ्या काव्यांत एकाहि संस्कृत शब्दाचा प्रयोग करणार नाही. या प्रतिज्ञेप्रमाणे त्याने कविग्गरकावा किंवा सोबगिन सुग्गि नामक ग्रंथ रचला. त्यामुळे त्याला साहित्यिक व ऐतिहासिक असें दोन्ही दृष्टींनी महत्त्व प्राप्त झालें आहे.

आंदोलन व्रत एक तिथिव्रत. यांत चैत्र शु. ३ येस शिवपार्वती यांच्या मूर्तींची पूजा करतात व दोल्यावर बसवून त्यांना झोके देतात. **पाहा**–चैत्रागौर [हि. ध.]


आंध एक जात. परभणी, नांदेड, या जिल्ह्याचा उत्तरभाग व चांदा, वणी ह्यांचा दक्षिण भाग यांतील डोंगरांत राहणाऱ्या शेतकरी व शिकारी लोकांना आंध हें नांव आहे. ते आते–मामे बहिणीशीं लग्न करतात. विधवेचें दिराशीं लग्न होत नाही. विवाहित मृतास जाळतात, व अविवाहित मृतास पुरतात. [म. लो. सं.]

आंधळी कोशिंबीर मुलांचा एक खेळ. ज्याला खेळायचें नाही, असा एकजण भोगी होतो व खेळणाऱ्या मुलांपैकी एकाचे डोळे झांकतो. बाकीचे खेळगडी एकीकडे जाऊन लपतात. भोग्याने डोळे सोडतांच राज्य आलेला मुलगा लपलेल्यांतील एखाद्या गड्याला शोधतो व तो गडी भोग्याला जाऊन शिवण्यापूर्वी त्याला स्पर्श करतो. मग त्याच्यावर राज्य येतें. विद्याकल्पतरूंत या खेळाला आंधळी कोशिंबीर असें नांव दिलें आहे.

हल्ली आंधळी कोशिंबीर या नांवाने जो खेळ प्रचलित आहे तो असा– प्रथम मुलें चकतात व एकावर राज्य देतात. मग त्याला दिसूं नये म्हणून रुमालाने त्याचे डोळे बांधतात व इतर मुलें भोवती पळतात. त्यांच्यापैकी एखाद्याला आंधळा झालेला मुलगा स्पर्श करतो व त्यामुळे तो बाद होतो. बाद झालेल्या गड्यावर मग राज्य येतें. राजस्थानांत या खेळाला ‘ आंधोभैंसो ’ म्हणतात.

आंध्र भारताच्या संघराज्यांतील एक घटक राज्य. १ ऑक्टोबर १९५३ या दिवशीं या राज्याची स्थापना झाली. भाषिक तत्त्वानुसार स्थापन झालेलें हें पहिलेंच राज्य होय. १ नोव्हेंबर १९५६ रोजीं तेलंगणाचाहि कांही प्रदेश या राज्यांत समाविष्ट करण्यांत आला. याचें सध्याचें क्षेत्रफळ १,०५,९६३ चौ. मैल असून त्यांत श्रीकाकुलम्, विशाखापट्टनम्, पूर्व गोदावरी, पश्चिम गोदावरी, कृष्णा, गुंटूर, नेल्लोर, कडपा, कर्नूल, अनंतपूर, चित्तूर, हैदराबाद, महबूबनगर, आदिलाबाद, निजामाबाद, मेदक, करीमनगर, वरंगळ, खम्मम व नलगोंडा असे वीस जिल्हे आहेत. हैदराबाद ही या राज्याची राजधानी आहे.

आंध्राचा पूर्वेकडील समुद्रकिनाऱ्याचा भाग मैदानी असून कृष्णा व गोदावरी या नद्यांच्या मुखाजवळचा प्रदेश विस्तृत आहे. नद्यांनी वाहून आणलेल्या गाळाने हा प्रदेश व्यापलेला आहे. याच भागांत एक पर्वतांची रांग असून ती दक्षिणोत्तर पसरलेली आहे. पूर्वेला बंगालचा उपसागर, पश्चिमेस महाराष्ट्र-कर्नाटक, दक्षिणेस तमिळनाड व उत्तरेस ओरिसा या आंध्राच्या चतुःसीमा आहेत.



विशाखापट्टनम् बंदर – आंध्र

कृष्णा, गोदावरी व पेन्नार या आंध्रांतल्या प्रमुख नद्या होत. गोदावरीला अनेक उपनद्या येऊन मिळाल्या असून त्यांत मांजरा, प्राणहिता व शबरी या प्रमुख आहेत. कृष्णेलाहि अशाच अनेक उपनद्या मिळालेल्या आहेत.

ज्वारी, डाळी, शेंगदाणे, बाजरी, मका, वरी, तंबाकू,

मिरची, हळद, इ. पिकें आंध्राच्या जमिनींत निघतात. या राज्यांत खनिज द्रव्यें विपुल सांपडतात. पण एवढी खनिज संपत्ति उपलब्ध असूनहि आंध्रप्रदेश औद्योगिक दृष्टया अजून मागासलेला आहे. कांही जिल्ह्यांत कापडगिरण्या आहेत. कांही ठिकाणीं कागद, सिमेंट, चिनी मातीचीं भांडीं, इ. वस्तू बनविण्याचे कारखाने आहेत. विशाखापट्टनम् येथे जहाजबांधणीचा मोठा कारखाना सरकारी क्षेत्रांत चालतो. सूत कांतणें, शिंग व हस्तिदंत यांवरील कोरीव काम, लाखेचीं खेळणीं, लाकूड सामान तयार करणें, रेशमाचे किडे पाळणें, इ. गृहोद्योग हि आंध्रांत चालतात.

विशाखापट्टनम्, काकिनाडा (कोकोनाडा) व मच्छलीपट्टम् हीं आंध्रांतली प्रमुख बंदरें व हैदराबाद, विजयवाडा, गुंटूर, वरंगळ हीं प्रमुख शहरें होत. हैदराबादची लोकवस्ती बारा लाखांच्या वर आहे. आंध्राची लोकसंख्या चार कोटींच्या जवळ जवळ आहे व भाषा तेलुगु आहे. तेनुगु, तेलुगु व आंध्र हे तिन्ही शब्द सांप्रत देश, जाति व भाषा या तीन्ही अर्थांनी वापरतात.



आंध्र राज्य

बौद्धधर्माच्या उत्कर्षकालांत या प्रदेशाला मंजीरदेश, वज्रदेश व नागभूमि अशीं तीन नांवें होतीं. तेलुगु व तेनुगु हे दोन्ही शब्द समानार्थक असले तरी त्यांच्या व्युत्पत्तीबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. कांहींच्या मतें तेलुगु शब्दाचें मूळ रूप त्रिलिंग आहे, तर कांहींच्या मतें त्रिकलिंग आहे. प्रतापरुद्रयशोभूषण या ग्रंथाचा कर्ता विद्यानाथ म्हणतो, की श्रीशैल, कालेश्वर व द्राक्षाराम यांच्या अंतर्गत जो भूभाग येतो, तो त्रिलिंग होय. कारण या भागांत मल्लिकार्जुन, कालेश्वर व भीमेश्वर हीं तीन शिवलिंगें आहेत.

या त्रिलिंग देशांत जीं शिवमंदिरें आहेत, त्यांनी आंध्र संस्कृतीला एक विशिष्ट स्वरूप प्राप्त करून दिलें आहे. या भागांत लहान-मोठे पुष्कळ तलाव असून त्यांच्या कांठीं सर्वत्र शिवमंदिरें उभारलेलीं आहेत. त्रिलिंग-संस्कृतीला तडाग संस्कृति असें म्हटलें, तरी तें साजून दिसेल. या भागाचें जीवनच या तलावांत गुंतलेलें आहे. या प्रत्येक तलावाच्या तळाशीं कांहीना कांही चित्तवेधक इतिहास दडलेला आहे. प्रजेचें दुःख निवारण करण्यासाठी एका राजाने देवीकडे वर मागितला, की 'माझ्या हातून एक मोठा तलाव निर्माण होऊं दे.' त्यावर देवी त्याला म्हणाली. 'तूं हातांत एक काठी घेऊन ती भूमीवरून ओढीत चल. मात्र तसें करतांना मागे पाहूं नको. तूं जिथवर जाशील, तिथवर मी पाणी आणून सोडीन.' राजा त्याप्रमाणे बरीच भूमि चालत गेला. पुढे त्याला राहवेना. त्याने मागे वळून पाहिलें. तेव्हा देवी तिथेच थांबली. पण तेवढ्याने सुमारें तीन कोस विस्तीर्ण असें तळें

त्या भूमीवर निर्माण झालें.

श्रीशैलाजवळच्या कंबम् येथील तलावाचीहि अशीच कथा आहे— विजयनगरचा सम्राट् कृष्णदेवराय याने उत्कलराज-कन्या जिंकून आणली होती. पुढे त्याला कळलें, की ती आपल्या वधाचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे तो तिच्यावर नाराज झाला व त्याने तिला परत उत्कलदेशांत पाठवून दिलें. जातांना ती कंबम् येथे कांही काल राहिली व आपल्याजवळचें द्रव्य खर्चून तिने तिथे एक तलाव बांधला. त्या तलावामुळे हजारो लोकांचें जीवन सुखी झालें. थोडयाच कालांत ही गोष्ट कृष्ण-देवरायाच्या कानीं गेली व तिच्यावरचा राग सोडून त्याने तिला परत आपणाकडे आणलें.

आंध्र लोकांचा उल्लेख प्रथमतः ऐतरेय ब्राह्मणांत येतो. विश्वामित्राला एकशे एक पुत्र होते. त्यांतले पन्नास मधुच्छंदा-हून मोठे व पन्नास लहान होते. मोठ्या पन्नास पुत्रांनी शुनः-शेप या विश्वामित्राच्या मानलेल्या पुत्राला भाऊ मानण्याचें नाकारलें. तेव्हा विश्वामित्राने त्यांना शाप दिला, की 'तुमची संतति शूद्र होईल.' त्याप्रमाणे त्यांची संतति आंध्र, पुंड्र, शबर, पुलिन्द, इ. नांवांनी दस्यु बनली (ऐ. ब्रा. ३·६·१८).

या दस्यु शब्दावरून आंध्र लोक हे दक्षिणेंतील जमाती टोळयांपैकी होते व त्यांची वस्ती कृष्णा व गोदावरी यांच्या मधल्या प्रदेशांत होती, असें समजतें. मॅगास्थेनिस याच्या लिखाणाचा आधार घेऊन व्हिन्सेंट स्मिथने लिहिलें आहे, की चंद्रगुप्त मौर्याच्या काळांत श्रीकाकुलम् येथे त्यांची राजधानी असून चंद्रगुप्ताच्या सैन्याच्या खालोखाल भरेल, इतकें आंध्राचेंहि सैन्य मोठें होतें. हे लोक वैदिक धर्म मानीत असले, तरी त्यांचा ओढा बौद्ध धर्माकडे होता म्हणूनच त्यांना पुराणांत शूद्र म्हटलें आहे (भाग. पु. १२· १).

मौर्यांनी आंध्रांवर आपली पूर्ण सत्ता स्थापन केली होती कीं नाही व केली असल्यास ती कोणत्या कालांत, याचा नक्की शोध लागत नाही. पण अशोक मौर्याने शस्त्रसंन्यास केल्यावर थोडयाच कालांत इतरांप्रमाणेच आंध्रांनीहि आपला राज्य-विस्तार करायला प्रारंभ केला असावा, असें अनुमान निघतें.

आंध्र राजे स्वतःला शातकर्णि किंवा शालिवाहन असें समजत. या शालीवाहनाच्या किंवा सातवाहनाच्या वंशांत सिमुक, कृष्ण, यज्ञश्री शातकर्णि, शक्तिश्री, इ. राजे होऊन गेले. आंध्रांचा इतिहास जमवितांना या राजांनंतरच्या इतर राजांचें पुराणांच्या आधारें अनुमान करावें लागतें. मत्स्य-पुराणांत या वंशांतील २९ राजांचीं नांवें दिलीं आहेत (अ.२७२) व त्यांचा अखेरीचा काल इ·स.४६० हा सांगितला आहे. स्मिथने ही वंशावळ महत्त्वाची मानली आहे.


अशोकाच्या शिलालेखांतहि या सातवाहनांचा उल्लेख आढळतो. यांपैकी शातकर्णि हा दक्षिणापथाचा पति म्हणून प्रसिद्ध होता. याने प्रतिष्ठान येथे आपली राजधानी स्थापून अश्वमेध केला व आपल्या कुलाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली (सनपूर्व १लें शतक). मध्यंतरीं कांही काळ शकनेता नहपान याने सातवाहनांच्या सत्तेला पायबंद घातला होता; पण गौतमीपुत्र शातकर्णि याने शक-यवनादि परकीयांचा पराभव करून महाराष्ट्र, सौराष्ट्र, अपरान्त, विदर्भ व अवंती इथवर पुन्हा सातवाहनांची सत्ता प्रस्थापित केली (इ. स. १०६ – १३०). यज्ञश्री शातकर्णि हा त्या वंशांतला शेवटचा राजा होय (इ. स. १७४ – २०३).

त्यानंतर आंध्र देशांतली केंद्रसत्ता नष्ट झाली. तिच्या अमलांतलीं अनेक राज्यें मात्र पुढे पुष्कळ काळपर्यंत टिकून राहिलीं. बदामीच्या चालुक्यांच्या एका शाखेने वेंगि (आंध्र) देशांत ४०० वर्षें आपली सत्ता टिकवून ठेवली. इ. स. १०२२ ते १०६३ पर्यंत पूर्व चालुक्य राजा राजराजनरेंद्र याने राज-महेंद्री ही आपली राजधानी करून वेंगिदेशावर राज्य केलें. पूर्व चालुक्यांचा इतिहास नन्नय्यभट्ट या आंध्रसाहित्यिकाच्या ग्रंथावरून थोडाबहुत उपलब्ध होतो.

आंध्रांत एका काळीं बौद्ध धर्माचा बराच प्रसार झाला होता. पण राजराजनरेंद्राच्या पूर्वीच चारशे वर्षें आंध्रांतला बौद्ध धर्म ऱ्हास पावला. चालुक्य राजे शैव होते. त्यामुळे त्यांच्या राज्यांत शैवपंथाचीच चलती होती. शैवाप्रमाणेच शाक्त पंथानेहि आंध्रांत प्रवेश केला होता. समाजांत ब्राह्मणांचें वर्चस्व होतें. चालुक्य राजे क्षत्रिय नव्हते; पण ते स्वतःला क्षत्रिय म्हणवून घेत. त्या काळचे बरेचसे राजवंश स्वतःला सूर्य किंवा सोम वंशांतले म्हणवून घेऊन आपली प्रतिष्ठा वाढवीत. चालुक्य राजे विद्या-कलांचे भोक्ते होते. आंध्रांत देशी काव्याला चालुक्यांनीच उत्तेजन दिलें, असें नन्नय्य चोड सांगतो. राजराजनरेंद्र चालुक्याच्या दरबारांत अनेक कवि व विद्वान् होते. षड्दर्शनांच्या अध्ययनासाठी राज्यांत जागोजाग विद्यालयें होतीं. त्याच्या काळांत दक्षिणेंतल्या शिल्पकलेचाहि बराच उत्कर्ष झाला. त्या काळांत लोकांच्या न्यायनिवाडया-साठी ग्रामपंचायती असत. त्यांचे सभासद विद्वान्, सत्यवादी व निःस्पृह असत.

काकतीय राजे— आंध्रामध्ये वरंगळ येथे इ. स. ११५० ते १३२५ या कालांत काकतीय राजांनी राज्य केलें. काकतीय हे मुळांत राष्ट्रकूट असले, तरी त्यांचे आंध्रीकरण फार लवकर झालें. मान्यखेडच्या राष्ट्रकूटांचे हे मांडलिक होते. पण वेंगीचे चालुक्य जेव्हा तमिळनाडमधल्या चोळ राजांच्या गादीवर

हक्क सांगूं लागले, तेव्हा त्या दोन सत्तांमध्ये संघर्ष सुरू झाला. त्यांत काकतीयांनी चालुक्यांना मदत केली. चालुक्य युवराज कुलोत्तुंग या नांवाने चोळ राज्याच्या गादीवर बसला. अशा प्रकारें एक राजसत्ता दोन्ही प्रदेशांचा कारभार पाहूं लागली. याचा परिणाम म्हणून चालुक्यांचें आंध्रावरचें लक्ष कमी झालें. त्याचा फायदा काकतीयांनी घेतला; त्यांनी चालुक्यांची आंध्रावरची उरलीसुरली सत्ता नष्ट करून शंभर वर्षांच्या अविरत प्रयत्नांनंतर समस्त आंध्र देशांत एकछत्री साम्राज्य उभें केलें.



वरंगळचे भग्नावशेष – आंध्र

या दोनशें वर्षांच्या काळांत (११५० – १३२०) आंध्रांत अनेक धार्मिक व सामाजिक चळवळी प्रचंड प्रमाणांत झाल्या. चालुक्यांच्या अखेरच्या काळांत तिथे जैन धर्म प्रबल झाला होता. काकतीय राजेहि प्रथम जैनच होते. त्यांनी जैन धर्माला व जैन धार्मिक संस्थांना उदार आश्रय दिला. पुढे ते शैव बनले. त्यामुळे आंध्रांत शैवपंथाची चळवळ फोफावली व त्या पंथाच्या दोन शाखा प्रबल झाल्या. एक अद्वैतवादी शैव पंथ आणि दुसरा बसवप्रणीत वीरशैव (लिंगायत) पंथ. दक्षिण आंध्रांत रामानुजांच्या विशिष्टाद्वैत मताने बळ धरलें. रेड्डींनी शैवमताचा स्वीकार केला, तर वेलमांनी वैष्णव मत स्वीकारलें. प्रत्येक पंथ आपापल्या वर्चस्वासाठी प्रयत्न करूं लागला. शास्त्रार्थ व वादविवाद यांच्या बळावर वीरशैवांनी जैनांना आपल्या धर्मांत ओढण्याचा खूप प्रयत्न केला. पण जैनांनी त्यांना दाद दिली नाही. त्यामुळे वीरशैव त्यांच्यावर उलटले. त्यांनी जैनांची अनेक ठिकाणीं हिंसा केली. अनेक राजांना अंकित करून त्यांनी त्यांना वीरशैवपंथाची दीक्षा दिली व आपण त्यांचे मंत्री आणि सेनापति बनले. जैनांच्या मूर्तींचा उच्छेद करून त्यांनी त्या त्या जागीं लिंगस्थापना केली.

अशा प्रकारें जैन धर्माचें आंध्रांतून उच्चाटन झाल्यावर मग वीरशैव व वीरवैष्णव यांच्यांत स्पर्धा सुरू झाली. दोन्ही पंथांनी सर्व जातींत आपले अनुयायी वाढविण्यासाठी कंबर कसली. शैवांनी आपल्या अनुयायांच्या गळ्यांत लिंग अडकविलें, तर वैष्णवांनी आपल्या अनुयायांच्या शरिरावर तप्त मुद्रा ठोकल्या. जातीपातींचा भेद न धरतां त्यांनी आपले संप्रदाय वाढविले.



चैत्यपूजक – नागार्जुनकोंडा-आंध्र

काकतीयांच्या कालांत समाजामध्ये अनेक अनुलोम-प्रतिलोम विवाह घडून आले. आजकाल दक्षिणेंत अन्नछत्रांमध्ये केवळ ब्राह्मणांना भोजन मिळतें; पण काकतीयकालांत तिथे सर्व जातींना भोजन मिळे. शैव संप्रदायांच्या छत्रांत तर अस्पृश्यांनाहि अन्न-वस्त्रदान मिळण्याची व्यवस्था होती.

काकतीयांनी अनेक शिवमंदिरें बांधलीं व जागोजाग आपले शिलालेख खोदविले. त्यांनी ललितकलांचाहि विकास केला. अनेक ठिकाणीं कलाशाला निर्माण केल्या. त्यांच्या कारकीर्दींत चित्रकलेचीहि अभिवृद्धि झाली. त्या काळांतले लोक चित्रित पदर नसलेली साडी किंवा धोतर नेसणें अशुभ समजत. घरांच्या भिंती चित्रित करण्याचीहि प्रथा होती. आंध्रांतील मलमल प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे. मछलीपट्टम् हें मलमल विणण्याचें एक मोठें केंद्र होतें. वरंगळ येथे लोकरीचीं सुंदर कांबळीं बनत होतीं. रेशमाचाहि मोठा धंदा होता. रेशमी विणकाम कलाकुसरीचें होत असे. चंदनकावु, पट्टेडुकावु, कादंबकावु, कारकंचुबोम्मंचु, रुद्राक्षवन्ने, नागाबंधनम्, तारा- मंडल, हंसावलि, लक्ष्मीविलास, वसंतविलास, रायशृंगार, इ. रेशमी वस्त्रांचे अनेक प्रकार होते.

काकतीय राजे प्रजाहिततत्पर होते. आपल्या राज्यांत त्यांनी औषधालयें व प्रसूतिगृहें स्थापन केलीं होतीं. १३ व्या शतकाच्या उत्तरार्धांत सुप्रसिद्ध काकतीय राणी रुद्रमहादेवी हिने वेलगपूडि नांवाचें एक गांव लोककल्याणार्थ दान देऊन तिथे एक मठ व धर्मसत्र स्थापिलें होतें. त्या गांवाच्या रक्षणासाठी वीरभद्र व वीरमुष्टि अशी उपाधि असलेले शिपाई नियुक्त केले होते.

काकतीयकाळांत आंध्रामध्ये अनेक तलाव बांधले गेले.

कारसमुद्र, चौडसमुद्र, साब्बिसमुद्र, गौरसमुद्र, कोमटीसमुद्र, इ. नांवांनी ते प्रसिद्ध आहेत. मोटुपल्ली व मछलीपट्टम् हीं त्या काळचीं प्रसिद्ध बंदरें होत. तिथून पूर्व-पश्चिमेच्या देशांत व्यापार चाले. बंदरांत तटकर घेतला जाई. वेगवेगळ्या करांचे दर एका शिलेवर कोरून ठेवलेले असत. काकतीय राजांनी सोन्याचांदीचीं नाणींहि पाडलीं होतीं.

वरंगळचा किल्ला गणपतिदेव यानें बांधला. त्या किल्ल्याला सात कोट होते. सर्वांत आंतल्या शिलाकोटांत राजाचा निवास असे. शैव पंथ स्वीकारल्यावर काकतीयांनी वरंगळ येथे सहस्र-स्तंभी शिवमंदिर बांधलें. काकतीयांचें सैन्यहि मोठें म्हणजे नऊ लाख होतें, असें म्हणतात. भाले व तलवारी हीं त्याचीं महत्त्वाचीं आयुधें होतीं. बरेंचसें सैन्य सरहद्दीवरील सरदारांच्या हाताखाली असे. हे सरदारच पुढे काकतीयांच्या पतनानंतर आंध्रांतल्या लहानमोठ्या राज्यांचे संस्थापक बनले.



तिरुपतिमूर्तीचें खेळणें – आंध्र

वरंगळ शहरांत अनेक अभ्यागतगृहें होतीं. तिथे कुंटणखानेहि चालत. राजे, सामंत व धनिक लोक रखेल्या ठेवीत व समाजांतहि उघडपणें त्यांना बरोबर नेत. कोंबडयांची बकऱ्यांची झुंज, बुद्धिबळें, व कळसूत्री बाहुल्यांचा खेळ, हीं त्या काळचीं मनोरंजनाचीं साधनें होतीं.

रेड्डी व वेलमा — काकतीयांच्या पतनानंतर त्यांच्या हाताखालच्या सरदार-सेनापतींनी जीं स्वतंत्र राज्यें स्थापिलीं, त्यांत रेड्डी व वेलमा यांचीं राज्यें प्रमुख होतीं. रेड्डींनी इ. स. १३२४ – १४३४ पर्यंत राज्य केलें. कर्नूल ते विशाखापट्टनम् इथवर त्यांचा राज्यविस्तार होता. रेड्डी हे शेतकरीवर्गांतून वर आलेले होते. त्यांनी वीरशैवपंथ स्वीकारला होता. त्यांनी अनेक शिवसूत्रांचा उद्धार केला. ते दिवसांतून सहा वेळां शिवाची पूजा करीत. त्यांनी व त्यांच्या मंत्र्यांनी शैव धर्माचा खूप प्रचार केला. श्रीशैल पर्वतावर चढण्यासाठी रेड्डी राजांनीच पायऱ्या बांधल्या.

त्या काळांत शिवाची शक्ति या नात्याने अनेक देवींची पूजा केली जात असे. नूकांब, घट्टांबिक, मणिकादेवी, एकवीरा या देवी प्रसिद्ध होत्या. तिथल्या शैवपंथांत पुढे तांत्रिक वामाचारहि शिरला. बरेंच तंत्रसाहित्यहि निर्माण झालें. शिवलिंगाच्या पूजाप्रसंगीं आत्मबलिदान करणाऱ्या व्यक्तींची गणना वीरपुरुषांत होऊं लागली. त्यांचें स्मारक म्हणून लोक जागोजाग वीरशिला उभ्या करूं लागले. कित्येक एकांतिक शिवभक्त मोक्षाच्या आकांक्षेने कनुमारि नामक मार्ग स्वीकारूं लागले. कनुमारि म्हणजे श्रीशैल पर्वताच्या एका विशिष्ट कडयावरून उडी घेऊन आत्मघात करणें होय.

रेड्डी हे शेतकरी वर्गांतले असूनहि यज्ञयाग, सोमपान, इ. क्षत्रियकर्में करीत. इतकेंच नव्हे; तर चोळ, पल्लव, इ. क्षत्रिय राजांशीं त्यांनी विवाहसंबंधहि जोडले होते. रेड्डी राजांना ब्राह्मणांविषयीं अत्यंत आदर होता. त्यांनी विद्वान् ब्राह्मणांना अग्रहार दिले होते. त्यांच्या दातृत्वाची कीर्ति ऐकून दूरदूरचीं ब्राह्मणकुटुंबें आंध्रांत आलीं व रेड्डींच्या आश्रयावर तिथे स्थायिक झालीं.


चार मिनार – हैदराबाद – आंध्र

आंध्रांत सर्व जमीन राजाच्या मालकीची असे. ठराविक काळासाठी ती शेतकऱ्यांना कसण्यासाठी दिली जाई. शेतकरी आपल्या बैलांच्या संख्येनुसार भागीदारींत शेती करीत. बलुतेदारांना धान्यांतला ठराविक वांटा देऊन व राजासाठी एक षष्ठांश भाग बाजूला काढून मग उरलेलें धान्य शेतकरी

आपल्या हिश्शाप्रमाणे वांटून घेत. ती एक प्रकारें सामुदायिक शेतीचीच पद्धत होती. जमीन मोजणीसाठी ठराविक लांबीचा एक मापनदंड असे, त्याला गडी म्हणत. कवि मल्लनाने लिहिलेल्या गणितशास्त्र या ग्रंथांत तत्कालीन शेती व जमीन मोजणी यांविषयी बरेंच विवेचन केलें आहे. क्षेत्रगणित या नांवाने ताडपत्रांवर शेतांच्या नकाशासहित मोठमोठे ग्रंथहि त्या काळांत निर्माण झाले होते.

रेड्डी युगांत आंध्रांचा व्यापार विशेषतः ब्रह्मदेश, मलाया, इंडोनेशिया, चीन, लंका, इराण, अरबस्तान या देशांशीं होत असे. या व्यापारासून रेड्डी राजांना खूप प्राप्ति होत असे. देशांतील अराजकतेमुळे पूर्वीं बंद पडलेलें मोटुपल्ली बंदरहि रेड्डी राजांनी पुन्हा सुरू केलें. तसेंच सर्व व्यापारी मार्गहि सुरक्षित केले. कांही मालावरील जकात त्यांनी कमी केली, तर कांही मालावरील माफ केली. परदेशांतील व्यापाऱ्यांना ते सन्मानाने वागवीत असत.

तेलंगणांतील तलवारी त्या काळीं खूप प्रसिद्ध होत्या. कांचेचे आरसेहि तिथे होत असत. लेखनाचें काम ताडपत्रांवर लोखंडी लेखणीने करीत. या लेखणीला गंटामु असें म्हणत. राजे, मंत्री वगैरे लोक सुवर्ण-गंटामुने कागदावर लिहीत.

रेड्डी राजांच्या दरबारांत विद्वान् व कलावान् यांचा आदर होता. भारताच्या अन्य प्रांतांतील विद्वान् व कलावंतहि राजाच्या दरबारांत येत असत. त्यांची योग्यता पारखण्यासाठी व त्यांची संभावना करण्यासाठी राजाने कविसार्वभौम श्रीनाथ याला नेमलें होतें.

राजे-महाराजे स्वतः साहित्य, संगीत, नृत्यशास्त्र यांचा अभ्यास करीत. याशिवाय अश्वशास्त्र, गजशास्त्र, राजनीति व युद्धनीति हे तर त्यांचे अभ्यासाचे मुख्य विषय होते.

मुसलमानांच्या संपर्कामुळे आंध्रांत फारसी नृत्याचा प्रचार झाला. पेदँ कोमटीने आपल्या ' नाटचशास्त्रां 'त फारसी नृत्याचाहि अंतर्भाव केला आहे व त्याला ' मत्तल्लि नर्तन ' असें नांव दिलें आहे.

साधारणतः लोक धोतर नेसत. खालच्या वर्गांतले लोक चड्डी वापरीत. बहुधा सर्व लोक खांद्यावर शाल व डोक्याला गोल साफा गुंडाळीत. पुष्कळसे लोक कमरेला फेटा कशीत.

घरें बंद पेटीसारखीं असत. घरांना खिडक्या ठेवण्याची पद्धत नव्हती. उजेडासाठी छतांत गवाक्षें असत. जनावरेंहि घरांतच बांधीत. श्रीमंत मात्र गुरांसाठी वेगळे गोठे बांधीत. राजप्रासाद वास्तुशास्त्राच्या नियमांनुसार बांधीत.

वेलमा हा धर्म शब्दाचा अपभ्रंश आहे. रेड्डींच्या बरोबरच यांचेंहि राज्य निर्माण झालें. पण या दोन राज्यांत कधीहि सख्य नांदलें नाही. प्रामुख्याने हा वर्ग सरंजामी आहे. हे लोक मोठे शूर व उदार आहेत. त्यांना आपल्या क्षत्रियत्वाची सतत जाणीव असते.

ज्या काळीं आंध्र देशांत रेड्डी व वेलमा यांचीं राज्यें उदयाला येत होतीं, त्याच काळांत दुसऱ्या बाजूने कर्नाटकांत विजयनगरचें साम्राज्य जन्म घेत होतें. विजयनगरच्या राज्याची स्थापना इ. स. १३३६ सालीं झाली, असें बहुतेक इतिहासकार मानतात. कृष्णदेवराय हा विजयनगरच्या साम्राज्याचा धुरंधर पुरुष होय. तो इ. स. १५२९ सालीं मृत्यु पावला. १५६५ सालीं तालिकोटच्या लढाईत विजयनगरचा मुख्य प्रधान रामराजा मारला गेला व त्यानंतर दक्षिणेंत मुसलमानी सत्ता प्रस्थापित झाली. संपूर्ण आंध्र मुसलमानांच्या कबज्यांत आला तो १६४० च्या सुमारास. इ. स. १३२३ – १६४० या कालखंडांत आंध्रांनी सतत तीनशें वर्षें मुसलमानी वर्चस्वाला प्रखर विरोध केला. वरील तीन्ही राज्यें या कामीं एकजुटीने झगडलीं. दक्षिण भारताच्या इतिहासाला ही गोष्ट निःसंशय भूषणावह होय. इ. स. १६४० – १७५५ पर्यंत आंध्रावर मुसलमानांनी राज्य केलें. १७५५ मध्ये आंध्रांतलें समुद्रकांठचे जिल्हे प्रथम इंग्रजांच्या ताब्यांत आले. १८०० च्या सुमारास दक्षिण आंध्र त्यांनी घेतला. पण तेलंगण हा आंध्राचा एक तृतीयांश प्रदेश १९४८ सालापर्यंत निजामाच्या ताब्यांत राहिला व त्या सालीं तो भारतीय संघराज्यांत समाविष्ट झाला.

सांस्कृतिक जीवन –– मूल जन्मल्यानंतर १२ व्या दिवशीं बारसें करतात. बारशाचा विधि असा नसतो. फक्त मुलाला पाळण्यांत घालून त्याची आरती करतात व सुवासिनींना हळदीकुंकू व फराळाचें देतात. मंगलारती गाणें हें आंध्राचें एक वैशिष्टच आहे. प्रत्येक सणासाठी लिहिलेल्या अशा गाण्यांचा एक मोठा संग्रह आंध्रांत प्रसिद्ध आहे. मुलाला मुळाक्षरें शिकवितांना प्रथम ॐ हें अक्षर गिरवायला लावतात. आंध्रांत मुलीचें लग्न मामाशीं किंवा मामेभावाशीं होऊं शकतें. या संबंधाला मेनरिकम् म्हणजे मामेसंबंध असें म्हणतात. लग्नसंबंध शक्यतों याच संबंधांत करतात. लग्नाचा मंडप नारळाच्या झापांनी बनवितात. वरात मोठ्या थाटांत काढतात.

कोणतेंहि मंगल कार्य व सण आल्यास त्याआधी घर धुऊन काढतात. जमीन शेणाने सारवून उंबरठा व दाराची चौकट यांवर पिवळ्या रंगाने कणे काढतात. वर्षप्रतिप्रदेच्या दिवशीं पच्चडी करतात व ती सर्वांना देतात. गूळ व चिंचेचा कोळ घालून पाणी तयार करायचें व त्यांत कडुलिंबाचीं फुलें

हातावर मळून घालावयाचीं, म्हणजे पच्चडी हें पेय तयार होतें. रामनवमीच्या उत्सवास नाटकें, बुर्रकथा, इ. कार्यक्रम करतात. विवाहित मुली श्रावणमासांत मंगळवारीं नोमु म्हणजे गौरीचें व्रत करतात. महाराष्ट्रांतल्या मंगळागौरीसारखेंच हें व्रत असतें. श्रावणांतल्या दुसऱ्या शुक्रवारीं वरलक्ष्मीव्रत करतात. हें व्रत फक्त सुवासिनींनीच करायचें असतें. पूजा, उपवास व हळदीकुंकू हे विधि या व्रतांत मुख्य असतात. श्रावणाच्या शुद्ध ८ मीस महाकालीचा दिवस मानतात. त्या दिवशीं सुवासिनी एका मातीच्या घडयांत अन्न भरतात. वर कडुलिंबाचीं पानें घालतात. त्यावर एक गाडगें ठेवतात. त्यांत दिवा लावतात. मग ते घडे डोक्यावर घेऊन मिरवणुकीने देवीच्या देवळांत जातात. हा सण सामान्यतः खालच्या वर्गांत-ल्याच स्त्रिया करतात. भाद्रपद व. ३ येस कुमारिका गौरीचें व्रत करतात. त्याचा विधि असा——

पहांटेस अंधारांतच फराळ करणें, दिवसभर फळें व विडा यांव्यतिरिक्त कांही न खाणें. रात्रीं चंद्रोदय झाल्यावर उडदाचे दीडशे पोळे तयार करणें. त्यांतले पन्नास चंद्राला, पन्नास ब्राह्मणाला व पन्नास आईला देऊन मग उपास सोडणें. या व्रताला अट्लतद्दी म्हणतात. याचाच दुसरा प्रकार सोळा गौरी नोमु. यांत व्रतकर्त्या कुमारी सोळा पदार्थ तयार करून ते ब्राह्मणाला दान देतात. चांगला पति मिळावा, ही या व्रताच्या मागे कामना असते. नवरात्रांत गौर मांडून तिची आरास करतात. तेलंगणांत स्त्रिया व मुली रंगीबेरंगी फुलें गोळा करून एका तबकांत त्यांची रास रचतात. तिच्या डोक्यावर भोपळचाचें फूल किंवा तें न मिळाल्यास हळदीचा उभट आकाराचा गोळा करून तो ठेवतात. या रचनेला बतकम्म म्हणतात. संध्याकाळीं आजूबाजूच्या सर्व मुली आपापल्या बतकम्म एकत्र करतात व त्यांच्याभोवती फेर धरतात. खेळून झाल्यावर बतकम्म विहिरींत अगर तळचांत बुडवितात. असा क्रम ९ दिवस चालतो. दिवाळीचा सण इतर भागापेक्षां तेलंगणांत मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. कारण तेलंगणांत ते दिवस सुगीचे असतात. संक्रांतीचा सण तेलंगणाखेरीज इतर भागांत थाटाने होतो. कारण त्या वेळीं तिकडे सुगी असते. या सणांत रांगोळीला फार महत्त्व असतें. संक्रांतीच्या आदल्या दिवशीं होळी पेटवितात. संक्रांतीस लहान मुली रांगोळी काढून तिच्यावर शेणाचे गोळे ठेवतात व त्यांची पूजा करतात. या प्रकाराला गोब्बीपूजा असें नांव आहे. संक्रांतीस चेंचू आदिवासी गांवागांवांतून भिक्षा मागायला येतात. होळीचा सण फक्त तेलंगणांतच साजरा होतो. त्या वेळीं स्त्री-पुरुष सगळेच रंग उडवून होळी खेळतात.

मंदिरें व स्थापत्य— गोंक व चोड राजे तसेंच मोठे धनिक यांनी आंध्रांत पुष्कळ देवालयें बांधलीं व त्यांच्या पूजा-अर्चेची कायमची व्यवस्था लावून ठेवली. चोळराजा तोंडमान याने गुडालि येथें संगमेश्वराचें मंदिर बांधलें. दुसऱ्या एका चोळराजाने गंडवरम् येथे शिवमंदिर बांधलें असून त्याला दिशासाधन आहे. दिमिले येथील मंदिरांतील नग्नेश्वराची मूर्ति अप्रतिम आहे. तिच्याविषयीं दंतकथा सांगतात ती अशी —

शिव-पार्वतींचा विवाह झाला, तेव्हा अगस्ति तिथे उपस्थित नव्हता. त्याबद्दल अगस्तीला फार वाईट वाटलें. तेव्हा शिवाने त्याला वर दिला, की 'तूं स्मरण करतांच आम्ही उभयता तुला दर्शन देऊं.' त्याप्रमाणे एकदा अगस्तीने त्यांचें स्मरण केलें. त्या प्रसंगीं शिव-पार्वती एकांतांत नग्नावस्थेत होतीं. त्यामुळे तशा स्थितींतच त्यांना अगस्तीपुढे प्रकट व्हावें लागलें. या घटनेचें स्मारक म्हणून इथे नग्नेश्वराची मूर्ति स्थापित करण्यांत आली.

काकतीय राजा १ला रुद्र याने आंध्रांत ११ देवालयें बांधलीं. याशिवाय नन्नेपडू येथे सोमेश्वर, पेनुगुडुरूपडु येथे विंध्यवासिनी, अमृतलूर येथे अमृतेश्वर, कोंडकांची येथे श्रीकंठ, भट्टिप्रोलु येथे भोगीश्वर, श्रीरामपुरम् येथे चोडेश्वर, पेद्दमक्केन येथे अमरेश्वर, कोवूर येथे मदनगोपाल, चवली येथे पापेश्वर, अशीं अनेक मंदिरें आंध्रांत निर्माण झालीं. कृष्णेच्या डाव्या तीरावरचें श्रीकाकुलम् येथील श्रीकाकुल-स्वामीचें (विष्णु) मंदिर आंध्रांत सुप्रसिद्ध असून तें प्राचीन कालापासून यात्रेचें एक महत्त्वाचें स्थान आहे. तेलुगु वाङ्मयांत इथला देव आंध्रेश्वर किंवा आंध्रविष्णु या नांवाने उल्लेखित आहे. या मंदिराला जोडून तीनशे देवदासींची वसाहत होती.

श्रीशैल हें आंध्रांतलें सर्वांत महत्त्वाचें क्षेत्र होय. बारा ज्योतिर्लिंगांत इथल्या मल्लिकार्जुनाची गणना होते. हें स्वयंभू लिंग असून लिंगचक्रवर्ती या नांवाने त्याची व माधवी या नांवाने शक्तीची पूजा केली जाते. द्राक्षारामम् येथे १ल्या चालुक्य भीमाने भीमेश्वराची स्थापना करून त्या स्थळाला महत्त्व प्राप्त करून दिलें. गणपति या काकतीय राजाने श्रीशैलाच्या पायथ्याला त्रिपुरांतकाचें व तिथेच एका तलावांत त्रिपुरसुंदरीचें मंदिर बांधून तें क्षेत्र प्रसिद्धीस आणलें. इथे प्राचीन काळीं नरबलि देत असत, असा उल्लेख आहे.

पूर्व चालुक्य वंशांतील राजांनी आंध्रांत अनेक भव्य-सुंदर मंदिरें उभारलीं. कुब्ज विष्णुवर्धन याच्या काळांत बांधलेल्या एका भव्य शिवमंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ अखंड पाषाणाच्या

द्वारपाल मूर्ति आहेत. पूर्व चालुक्य शैलीचे हे सर्वांत जुने नमुने होत. त्याची राणी अय्यन महादेवी हिने विजयवाडा येथे कांही जैन मंदिरें बांधलीं होतीं (७ वें शतक). पूर्व चालुक्यांचें शिल्प प्रारंभीं पश्चिमी चालुक्य शिल्पाप्रमाणेच अति भव्य होतें. गुप्त आणि वाकाटक शैलीचीं मंदिरेंहि अशींच भव्य होतीं.



वादक व नर्तक – विजयवाडा – आंध्र (९ वें शतक)

९ व्या शतकाच्या आरंभीं राज्य करणारा दुसरा विजयादित्य याने १०८ मंदिरें बांधलीं, त्यांतलीं अद्यापि कांही शिल्लक आहेत. इंद्रकील पर्वतावर एक स्तंभ आहे. त्याच्या बाजूंवर किरातार्जुनीय काव्यांतले कांही प्रसंग कोरलेले आहेत. बिक्कावल येथील गोलिंगेश्वराच्या व राजराजाच्या मंदिरांत विपुल कोरीव काम असून तें तिसरा विजयादित्य याच्या काळांतलें आहे. तिथे चतुर्भुज नटराज, वीरभद्र, शिव, स्कंद, ब्रह्मा यांच्या मूर्ती प्रेक्षणीय असून कौमारीचें कोरीव चित्र फारच सुरेख आहे. तिथल्या एका मंदिरद्वारावर गंगा-यमुनांचें उठावाचें चित्र दिसतें, तें गुणग राजाने राष्ट्रकूट राजा दुसरा कृष्ण याला जिंकल्याचें स्मारक म्हणून निर्माण केलेलें आहे.

कलिंग व आंध्र या दोन देशांचा राजकीय व सांस्कृतिक संबंध दीर्घकाल होता. त्यामुळे ओरिसांतील देवालयांत आढळणारें मिथुनशिल्प व लकुलीशरूप पूर्व चालुक्यांच्या शिल्पांतहि अनेक जागीं आढळतें.

काकतीयांची कलाशैली अधिक कलाकुसरीची होती. त्यांनी निर्मिलेले स्तंभ चकचकीत असून ते शिंगाचे बनविलें आहेत, असें वाटतें. वरंगळ येथे सांपडलेली गणेशपट्टी कोरीव कामाने भरलेली असून काकतीय कलेचा तो एक सुंदर नमुना आहे. काकतीयांनी निर्मिलेल्या देवालयांत स्तंभ व छत यांवर इतिहास-पुराणांतील अनेक प्रसंग खोदलेले आढळतात. त्रिपुरांतकम् येथील शिल्पकाम म्हणजे काकतीय कलेचें श्रेष्ठ उदाहरण होय.

पालनाड व गुंटूर या भागांत १४ व्या शतकांतील रेड्डी राजांच्या शिल्पशैलीचीं अनेक मंदिरें आढळतात. रेड्डीशैली ही काकतीय शैलीसारखीच आहे. त्या वंशांतील अनवेया या श्रेष्ठ राजपुरुषाने श्रीशैल येथील शिवमंदिराचें पुर्ननिर्माण करून तिथल्या प्राकारांत शैव संतांच्या जीवनांतले अनेक प्रसंग कोरून ठेवले आहेत. रेड्डीशिल्पशैलीचें वेगळेंपण तिथे कळतें.

आंध्रांतील धर्मपंथ – आंध्र प्रदेशांतील वेल्नाडूचे चोड राजे देवभक्त होते. त्यांनी देवालयें बांधलीं आणि देवाची पूजाअर्चा व उत्सव यांसाठी उदार देणग्या दिल्या. राजांचे मंत्री, सेनापति व इतर धनिक लोकहि अहमहमिकेने अशा मंदिरांना देणग्या देत असत. देवालयें व तीर्थें या ठिकाणीं जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी रस्ते, धर्मशाळा व पाणपोया बांधण्यांत आल्या होत्या.



मिथुन – नागार्जुनकोंडा आंध्र

कांही चोड राजे बौद्ध धर्माचे अनुयायी बनले, तेव्हा मात्र हिंदुधर्मांतील चातुर्वर्ण्य व्यवस्था कांहीशी विस्कळित झाली. पण पुढे बौद्ध धर्मांतील कांही तत्त्वांचा हिंदु धर्मांत समावेश करून घेऊन वर्णाश्रम व्यवस्थेचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें.

चोड राजे हे शैवपंथी होते, तरीहि ते शिवाबरोबरच विष्णूचीहि अभेदभावाने उपासना करीत व दोन्ही पंथांच्या लोकांना आश्रय देत. त्यांच्या परधर्मसहिष्णुता व सदिच्छा या गुणांमुळेच आंध्रांत शैवपंथ लोकप्रिय झाला व त्याचा सर्वत्र प्रसार झाला.

पुढे या शैवांना बौद्ध व जैन धर्मांच्या आक्रमणापासून स्वसंरक्षण करण्याची आवश्यकता भासूं लागली. याच वेळीं कन्नड देशांत बसव आणि तेलुगु देशांत एकांतद रामय्या, मल्लिकार्जुन व पद्मरस हे तीन पंडित उदयाला आले. बसवाने या तीघां पंडितांच्या साहाय्याने वर्णाश्रमधर्मांतर्गत जातिभेद झुगारून देऊन वीरशैव पंथ नांवाचा नवा शैव संप्रदाय निर्माण केला. आंध्रांतील या तीन पंडितांनी प्रारंभीं वीरशैव पंथाचा


प्रचार केला खरा; परंतु नंतर मात्र त्यांचा बसवाशीं मतभेद होऊं लागला.

या तीन पंडितांपैकी मल्लिकार्जुनाची वेदांवर श्रद्धा होती व तो ब्राह्मणांना पूज्य मानीत होता. प्राचीन चालीरीतींचा वेदांना अनुसरून पुनरुद्धार करून शैवपंथाला चिरस्थायित्व देण्याचा त्याचा प्रयत्न होता. त्यासाठी त्याने बौद्ध व जैन या धर्मांशीं लढा देऊन पाशुपत शैव पंथाचा पुरस्कार केला. मल्लिकार्जुनानेहि शिवतत्त्वसार हा ग्रंथ लिहून वीरशैव पंथाचा आग्रही पुरस्कार केला. आजहि आंध्रांतील आराध्यपंथीय लोक मल्लिकार्जुन पंडिताच्या मतप्रणालीने चालतात. त्यांच्या पंथाला पंडित संप्रदाय हें नांव असून ते ब्राह्मणांचे धार्मिक विधि पाळतात.

आंध्रांत पालनाड येथे हैहय राजे राज्य करीत असतांना शैवपंथ लोकप्रिय होता व वीरशैव पंथाचा प्रचार मोठ्या प्रमाणावर झाला होता. वलमल्लीदेव, अनुगु व नरसिंग हे शैवपंथी होते तर कामराज व त्याचा पुत्र अलराज वीरशैव होते. अलराजाच्या पितामहाच्या कारकीर्दीत नव्वद हजार वीरशैव केवळ भिक्षेवर निर्वाह करीत असले, तरी ते उत्तम सैनिकहि होते. वीरशैव पंथांत काळे डगलेवाले व तांबडे डगलेवाले असे आणखी दोन पोटभेद होते.

वेल्नाडु चोड राजांपैकी पहिला चोड, पहिला व दुसरा गोंक व दुसरा चोड हे राजे विष्णुभक्त होते. वीरवैष्णवपंथ हा वैष्णव पंथाचाच एक भेद आहे. वीरवैष्णवपंथाचा प्रसार आंध्रांत बराच झाला होता. वीरपूजन हें या पंथाचें मूलभूत तत्त्व आहे.

आंध्र प्रांतांत बौद्ध व जैन या धर्मांचाहि प्रसार बराच झाला होता. श्रीशैलम् हें बौद्ध धर्माचें केंद्र होतें. दुसरा चोड राजा स्वतः बौद्धधर्मी होता व त्याचा राजधर्महि बौद्धच होता. वर्धमान-पूरच्या गोन राजांच्या कारकीर्दीत मात्र बौद्ध व जैन या दोन्ही धर्मांच्या खाणाखुणा दिसत नाहीत. पाल-नाडच्या हैहय राजांच्या



ठेंगू यक्ष – नागार्जुनकोंडा – आंध्र

कारकीर्दीत या दोन्ही धर्मांची चलती होती, तर दोड्डुनायडु व पैवेडु यांना जैन-बौद्धांचें वावडें होतें. कोंडपडुमट्टी राजे प्रथम बौद्धधर्मानुयायी होते; पण पुढे ते पंडित संप्रदायाचे अनुयायी झाले. कोट राजांच्या कारकीर्दींत अमरावती हें बौद्ध धर्माचें मोठें केंद्र होतें. दुसरा केत राजा व त्याच्या दोन राण्या आणि मन्मगेताची बय्यला राणी हे सर्व बुद्धाचे उपासक होते. अशा रीतीने शैव, वीरशैव, वैष्णव, वीरवैष्णव, बौद्ध व जैन हे सर्व धर्मपंथ जुन्या काळीं लहान मोठ्या प्रमाणावर आंध्रांत वावरत होते, असें इतिहासावरून कळून येतें. [जर्नल ऑफ् दि आंध्र हिस्टॉरिकल रिसर्च सोसायटी; आं. सा. इ.; इं. स्क.]

(२) एक जात. मनु म्हणतो की, ही अगदी निकृष्ट उपजात असून वैदेहक पुरुष व कारावर स्त्री यांची संतति होय. हे गांवाबाहेर राहून रानटी जनावरें मारून त्यांवर उपजीविका करीत. अशोकाच्या शिलालेखांत यांचा पुलिंदांशीं संबंध जोडलेला आहे.

शुनःशेपाला आपला पुत्र मानायला तयार न झालेल्या आपल्या पन्नास पुत्रांना विश्वामित्राने शाप दिला व ते आंध्र, पुंड्र, शबर, पुलिंद व मूतिब झाले, अशी ऐतरेय ब्राह्मणांत कथा आहे (३३.६). ओरिसांत आदि-आंध्र नांवाची एक वर्गीकृत जमात आहे, तिचा आंध्रांशींच संबंध असावा.

आंध्रक, आंध्रवाक अशीं दुसरीं नांवें आहेत, तींहि याच जमातीचीं असावीं. [हि. ध.]

आंध्र ब्राह्मण आंध्र प्रदेशांतल्या ब्राह्मणांना हें नांव आहे. हे मुळांत कर्नाटकांतले होत. पण तिथून येऊन आंध्रांत स्थायिक झाले. हे तेलुगु भाषा बोलतात. यांच्या सोळा पोटजाति आहेत. आपल्या गोत्राच्या बाहेर असलेल्या पोटजातींत हे विवाह करतात. यांच्या चालीरीती मराठी लोकांप्रमाणे आहेत. [ब्रा. जा. प्र.]

आंध्र राजवंश या राजांना आंध्रभृत्य असेंहि म्हणतात. कण्व राजघराण्याच्या समाप्तीनंतर हें घराणें विशेष उत्कर्षाला चढलें. यांचा सैन्य भरणा बराच मोठा होता. त्यांत १ लक्ष पायदळ, २ हजार घोडेस्वार व १ हजार हत्ती होते. यांच्या अधिकारक्षेत्रांत ३२ मोठीं शहरें असून यांची राजधानी कृष्णाकाठीं श्रीकाकुलम् या ठिकाणीं होती. अशोकाच्या मृत्यूनंतर सिमुक नांवाच्या राजानें आपलें स्वातंत्र्य जाहीर करून आंध्रघराणें चालू केलें. आंध्र राजे शातवाहन कुलांतले असून त्यांपैकी बऱ्याच राजांनी स्वतःच्या नांवापुढे शातकर्णी असें उपपद जोडलेलें दिसतें. आंध्र राजे

हिंदु धर्माचें कट्टे पुरस्कर्ते होते. त्यांनी जाति-संस्था पुनश्च चालू केल्या. त्यांनी नाणींहि पाडलीं होतीं. त्यांपैकी कांहींवर जहाजाचें चित्र आढळतें. या घराण्यांत एकूण ३० राजे झाले व त्यांनी ४५० वर्षें राज्य केलें. त्यांची नांवनिशी निर-निराळ्या पुराणांच्या आधारें पुढीलप्रमाणे सांगतां येते. नांवा-पुढील आंकडा त्या त्या राजानें किती वर्षें राज्य केलें तें दर्शवितो —

विष्णुपुराण	**वायुपुराण**	**मत्स्यपुराण**
शिप्रक (बली)	सिन्धुक २३	शम्भु २३
कृष्ण	भात (कृष्ण) १०	कृष्ण १८
श्रीशातकर्णी (श्रीशांतकर्ण)	श्रीशातकर्णी ५६	श्रीमल्लकर्णी १०
पूर्णोत्संग (पौर्णमास)		पूर्णोत्संग १८
		स्कंदस्तंभ १८
शातकर्णी	सातकर्णी ५ (शांतकर्णी)	शांतकर्णी ५६
लंबोदर		लंबोदर १८
दिविलक (चिबिलक)	आपादबद्ध १० (आपोलब १२)	आपीतक १२
मेघस्वाति		मेघस्वाति १८
पटुमत् (अटमान्)	पटुमत् २४	स्वाति १८
		स्कंधस्वाति ७
		मृगेंद्र स्वातिकर्ण ३
		कुंतल स्वातिकर्ण ८
		स्वातिकर्ण १
अविष्टकर्मन् (अनिष्टकर्मन्)	नेमिकृष्ण २५ (अनिष्टकर्मन्)	अरिक्तवर्ण २५
हाल (हालेय)	हाल १	हाल ५
पत्तलक (पतलक)	सप्तक ५	मंदुलक ५ (पत्तलक)
प्रविल्लसेन (पुरीषभीरु)	पुत्रिकषेण (पुरीषभीरु)	पुरींद्रसेन २१
		सोम्य
सुंदरशातकर्णी (सुनंदन)	सातकर्णी १ (शातकर्णी)	सुंदरशातकर्णी १
चकोरशातकर्णी (चकोर)	चकोरशातकर्णी	चकोरस्वातिकर्ण $\frac{1}{2}$
शिवस्वाति (शिवस्वामी)	शिवस्वामी २८ (शिवस्वाति)	शिवस्वाति २८
गोतमीपुत्र	गोतम	गोतमीपुत्र २१
पुलिमान् (पुरीमान्)		पुलोमत् २८
शिवशातकर्णी (मदीशर)		शातकर्णी २९
		शिवश्री ७
शिवस्कंध (शिवस्कंद)		शिवस्कंध ३
यज्ञश्री (यज्ञश्रीः)	यज्ञश्री १९	यज्ञश्री २९
विजय	विजय ६	विजय ६
चंद्रश्री (चंद्रविज्ञ)	दंडश्री ३	चंडश्री १०
पुलोमार्चिः (सलोमधि)	पुलोवा ७ (पुलोमा)	पुलामा ७ (२)

एकंदर राजे तीस. पण त्यांची संख्या मत्स्यपुराणांत २९, वायुपुराणांत २२ व विष्णुपुराणांत २४ अशी वेगवेगळी दिली आहे. ब्रह्माण्ड, भागवत व विष्णु या पुराणांच्या मतें या राजांनी ४५६ वर्षें राज्य केलें. मत्स्य पुराणांत ही वर्षसंख्या ४६० दिली आहे.

वर दिलेल्या नामावळीच्या पुढचे ऐतिहासिक राजे पुढील-प्रमाणे आहेत—पुरीकसेन २१ वर्षें. सुंदर शातकर्णी १ वर्ष. चकोर शातकर्णी $\frac{1}{2}$ वर्ष. शिवस्वाति २८ वर्षें. गौतमीपुत्र २१ वर्षें. पुलोमा (२ रा), गौतमीपुत्राचा मुलगा २८ वर्षें. शिवश्री पुलोमा (३ रा) ७ वर्षें. शिवस्कंध शातकर्णी ३ वर्षें. यज्ञश्री शातकर्णी २९ वर्षें. विजय ६ वर्षें. छंदश्री (चंद्र) शातकर्णी १० वर्षें. पुलोमा (४ था) ७ वर्षें. घराण्याचा शेवट इ. स. २२५.

या आंध्रांच्या शेजारी आर्य व म्लेच्छ या वंशांचीं पुढील राज्यें होतीं—आभीर, गर्दभिल, शक, यवन, तुषार, गुरुंड व हूण (मत्स्य पु. २७१–२७२).

आंबरडू–फोफरडू गुजरातमधील लहान मुलींचें एक व्रत. आश्विन व कार्तिक महिन्यांत लहान मुली भल्या पहांटे उठून गार पाण्याने स्नान करतात. सहा वायनें घेऊन जवळच्या देवळांत जातात, गाणीं म्हणतात व शेवटीं देवाजवळ पुढील मागणें मागतात—

आणे परिआणे वीरोजी देजे।
रांधणीए वहु वारु देजे।
परिसणे माताजी देजे।
पाटले जमवा बाप देजे।
भेगो जमाडवा भथीजे देजे।

अर्थ–विवाहयोग्य वंधु दे. स्वयंपाक करणारी भावजय दे.

जेवायला वाढणारी आई दे. पाटावर बसून जेवायला पिता दे व भरवायला भाचरें दे. [कंकावटी]

आंबवडें हें गांव पुणें जिल्ह्यांत भोरच्या नैर्ऋत्येस सुमारे ५ मैलांवर आहे. तिथे नागनाथाचें व जैत्रीचें अशीं दोन प्राचीन देवालयें आहेत. अतिप्राचीन काळच्या नाग लोकांचीं तीं दैवतें होत, अशी समजूत आहे. ऐतिहासिक काळांत नागनाथ हें कारीच्या देशमुखांचें दैवत झालें. देवळाच्या शेजारीं असलेल्या तळ्यामध्ये बांधून आणलेल्या पांच मुखांनी बारमास पाणी वाहतें; म्हणून त्या तळ्यास पंचगंगा हें नांव प्राप्त झालें आहे. देवळाशेजारच्या टेकडीवरील उंच जागीं भोर संस्थानचे संस्थापक श्रीमंत शंकराजी नारायण यांची भव्य समाधि आहे. इ. स. १४१३ मधील मराठी भाषेचा एक शिलालेख येथील नागनाथाच्या देवालयांत आहे. या शिलालेखावरून १५ व्या शतकांतील मराठी भाषेची कल्पना येते. [सु. वि. को.; म. सा.]

आंबा भारतांतील फळांपैकी एक उत्कृष्ट फळ. आंब्याचा वृक्ष हा अत्यंत उपयोगी, दीर्घजीवी व विशाल असतो. भारतांत आसेतुहिमाचल आंब्याची लागवड होते.

भारतीय वाङ्मयांतहि आम्रवृक्षाला व त्याच्या मंजरीला स्थान मिळालेलें आहे. कालिदासाच्या निसर्गवर्णनांत वसंतागमनसूचक तांबुस, हिरव्या आणि पांढुरक्या आम्रमंजरीचें वर्णन आल्याशिवाय राहत नाही. कामदेवाच्या पंचशरांत आम्रमंजरीचाहि अंतर्भाव आहे.

आम्रवृक्ष हा मंगलकारक मानलेला आहे. माघ शु. २ येच्या दिवशीं चंद्राला व शिवरात्रीच्या दिवशीं शंकराला आम्रमंजरी अर्पण करतात. मंगलकार्याच्या प्रसंगीं मंडपांत आणि दारावर आंब्याच्या पानांचीं तोरणें बांधायची पद्धत आहे. पुण्याहवाचनांतल्या किंवा कोणत्याहि कलशावर आम्रपल्लव ठेवून मग त्यावर नारळ किंवा पूर्णपात्र ठेवतात. लग्नानंतर वधू–वरांनी आंबा शिंपण्याची चाल महाराष्ट्रांत आहे. दशाहराच्या व्रतांत व वटपौर्णिमेला स्त्रिया आंब्याचीं वाणें देतात. आम्रफल हें वांझपण नष्ट करणारें व गर्भप्रद मानतात (मंगळागौरीची कहाणी पाहा). दैवी कृपेचें आम्रफल खाल्ल्याने वंध्या स्त्रीहि गर्भवती होते, हें कथाबीज भारतीय साहित्यांत अनेक ठिकाणीं आढळतें. आदिवासींच्या कथांतूनहि ही कल्पना आहे. छत्तीसगढांतील व छोटा नागपुरांतील शेतकरी व आदिवासी आंब्याची कच्ची कैरी खाण्याच्या विधीपासून तों पहिले पिकें फळ खाण्यापर्यंतचे विधि नाचून गाऊन साजरे करतात. परधान आदिवासींपैकी मारकम् या टोळीचें आंबा हें देवक आहे. महाराष्ट्रांत चैत्रगौरीला कच्च्या आंब्याच्या डाळीचा नैवेद्य दाखवितात व अक्षय्य तृतीयेला देवीला कैरी वाहतात.



आंबा

आंब्याची लागवड भारतांत फार प्राचीन काळापासून होत होती, असें दिसतें. बृहदारण्यकोपनिषदांत 'तद्यथाऽऽम्रं वा पिप्पलं वोदुम्बरं वा बन्धनात् प्रमुच्यते' असा आंब्याचा उल्लेख आहे. बृहदारण्यकाचा काल सनपूर्व एक हजार वर्षें मानतात. रामायण–महाभारतांतहि आंबरायांचा उल्लेख सांपडतो. अलिकडच्या काळांत अकबराने दरभंगा जिल्ह्यांत एक लाख आंब्याचीं झाडें लावलीं होतीं, असें समजतें. पेशव्यांनीहि आंबराया लावल्या होत्या, असे उल्लेख सांपडतात.

गडबा व कोंड आदिवासींच्या कथांत आंब्याचा संबंध पुरुषाच्या वृषणाशीं जोडलेला आढळतो. आंब्यामुळे मृत्यु पृथ्वीवर अवतरला, असें एका बोंडो आदिवासींच्या कथेंत सांगितलें आहे. गडबा आणि बोंडो आदिवासींत अंत्यसंस्कार करून घरीं परतण्यापूर्वी आंब्याची साल ओलांडण्याची पद्धत आहे. सर्व आदिवासी जमाती आंब्याच्या पहिल्या फळाचा उत्सव करतात व मगच आंबे खातात. आंब्याविषयीं भारतांत अनेक लोकगीतें, आख्यायिका व कथा प्रचलित आहेत. **पाहा–** आंबा शिंपणें.

आंबा शिंपणें लग्नविधींतला एक सोहळा. ऐरिणीदान झाल्यावर वधु-वरांना गौरीहरापाशीं नेतात. तिथे भिंतीवर आंब्याचें झाड काढलेलें असतें. हा आंबा वधूने शिंपायचा असतो. त्यासाठी वधू आपला डावा पाय वराच्या उजव्या मांडीवर ठेवते व नागवेलीचें पान कुंकवाच्या पाण्यांत बुडवून तो चित्रित वृक्ष शिंपते. कोकणांत हा विधी वधूचा गृहप्रवेश झाल्यावर दुसऱ्या दिवशीं करतात. वधु-वर खऱ्या आंब्याची पूजा करून त्याला पाणी घालतात. आंबा हा प्रजो-

त्पादक मानलेला असल्यामुळे लग्नविधींत त्याच्या पूजेला स्थान मिळालें आहे. **पाहा** – आंबा. [ल. वि. सो.]

आंबिकेय

(१) वराहरूप विष्णूने जिथे हिरण्याक्षाचा वध केला तें स्थान. [मत्स्य पु. १२१.१६]
(२) शाकद्वीपांतील एक पर्वत. [पु. इं.]

आंबिये सोहिरोबा

(१७१४–१७८९ इ. स.) एक मराठी संतकवि. हा जातीने सारस्वत ब्राह्मण होता. याचे पूर्वज गोव्यांतून सावंतवाडी संस्थानांतील बांदें गांवीं येऊन राहिले होते. बांदें गांवचें कुलकर्णीपण त्याच्याकडे आलें होतें; पण तें चालवीत असतांहि त्याचा ओढा परमार्थाकिडेच होता.

एक दिवस सावंतवाडीच्या राजाकडून त्याला कांही जरुरीच्या कामाकरिता सावंतवाडीला बोलावणें आलें. बांद्यापासून सावंतवाडी तीन कोस दूर आहे. देवपूजा आटपल्यावर न जेवतांच तो वाडीला निघाला. वाटेंत फराळासाठी त्याने एक फणस बरोबर घेतला. इनसुली गांवांतील ओढ्यावर हातपाय धुवून तो फणसांतले गरे खायला बसला. इतक्यांत एक तेजःपुंज दिव्य पुरुष तिथे अवतीर्ण झाला. सोहिरोबाची व त्या महापुरुषाची दृष्टिभेट होतांच एकमेकांना परस्परांच्या अंतरंगांची मनोमन खूण पटली. त्याने सोहिरोबाकडे फणस मागितला व तो खाऊन झाल्यावर प्रसाद म्हणून कांही गरे सोहिरोबाला दिले. सोहिरोबाच्या मस्तकीं वरदहस्त ठेवून तो दिव्य पुरुष अदृश्य झाला.



सोहिरोबा आंबिये

तो पुरुष अंतर्धान पावल्यानंतर सोहिरोबाची ब्रह्मानंदसमाधि लागली. समाधींतून देहभानावर आल्यावर सावंतवाडीला जाऊन त्याने लेखणी व दप्तर राजापुढे ठेवलें व आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. तो पुरुष मच्छिंद्रनाथांचा शिष्य गैबीनाथ होय, असें सोहिरोबाने आपल्या कवितेंत सांगितलें आहे.

त्यानंतरचा सोहिरोबाचा सर्व काळ भगवद्भजन, अध्यात्मनिरूपण व ग्रंथलेखन यांत जाऊं लागला. गैबीनाथांच्या कृपेमुळे त्याला कवित्वस्फूर्ति लाभली व त्याने पुष्कळ कविता लिहिल्या. त्याने कुलकर्णीपणाच्या त्यागपत्राच्या वेळीं एकदा जी लेखणी खाली ठेवली, ती परत हातांत धरली नाही. त्यामुळे त्याची सर्व कविता दुसऱ्याने विशेषतः त्याच्या बहिणीने लिहून घेतलेली आहे.

वयाच्या ६० व्या वर्षी सोहिरोबा आपल्या दोन पुत्रांसह उत्तर भारताच्या यात्रेला निघाला. काशी, प्रयाग करीत करीत तो इ. स. १७७९ सालाच्या सुमारास ग्वाल्हेरला आला. त्या वेळीं महादजी शिंदे ग्वाल्हेरच्या गादीवर होता. शिंद्यांच्या जिवबादादा केरकर या गोमंतकीय सेनापतीने सोहिरोबाला दरबारांत नेलें. त्या वेळीं महादजीने आपल्या कांही स्वरचित कविता सोहिरोबाला दाखविल्या. सोहिरोबाला त्या आवडल्या नाहीत. त्याने तसें स्पष्ट सांगितलें. त्यामुळे महादजी संतापला. त्यावर सोहिरोबानेहि त्याला सुनावलें–

अवधूत नहीं गरज़ तेरी । हम बेपर्वा फकिरी ।। धृ० ।।
तुम हो राजा मैं हूं जोगी । पृथक् पंथ का न्यारा ।
चार कोट जहागीर तुमारी । ओही पंथ हमारा ।। १ ।।
सोना चांदी हमकु नहि चाहिये । अलख भुवनका वासी ।
महाल मुलुख झांट बराबर । हम गुरुनामोपासी ।। २ ।।
....
तुमबी डूबे हम बी डुबाये । तेरा हम क्या लिया ।
कहे सोहिरा सुने महादजी । प्रकाशजोत गमाया ।।

या प्रसंगानंतर महादजी शिंद्याने सोहिरोबाचा अधिकार ओळखून त्याला पुन्हा सन्मानाने दरबारांत बोलावून नेलें. पुढे त्याने उज्जैन येथे सोहिरोबाला एक मठ बांधून दिला. उज्जैन येथे सोहिरोबा दहा वर्षें होता. तिथे त्याचा शिष्यसमुदाय बराच वाढला. इ. स. १७८९ सालीं रामनवमीस सोहिरोबा मठांतून बाहेर पडला, तो पुन्हा आलाच नाही.

सोहिरोबाचें ज्ञान शुद्ध व वैराग्य कडकडीत होतें. तो चार चार दिवस समाधिस्थितींत असे. तो योगी व पूर्ण वेदान्ती होता. सगुण भक्तीपेक्षा निर्गुण भक्तीकडे त्याचा विशेष ओढा होता.

सोहिरोबाचा ग्रंथसंभार प्रचंड आहे. त्यापैकी अक्षयबोध, महदनुभवेश्वरी, पूर्णाक्षरी, अद्वयानंद, सिद्धान्तसंहिता हे ग्रंथ प्रमुख आहेत. याशिवाय त्याने मराठी व हिंदी मिळून सुमारें चार हजार पदें रचलीं आहेत. [गो. च. पं.; भा. सं. म.]

आंबेडकर डॉ. भीमराव (१८९२–१९५६ इ. स.) अस्पृश्यांचे एक थोर पुढारी, प्रसिद्ध कायदेपंडित व घटनातज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांचा लौकिक आहे. आंबेडकरांच्या जन्म १४ फेब्रुवारी १८९२ रोजीं रत्नागिरी जिल्ह्यांत दापोली गांवीं झाला. त्यांची आई लहानपणींच वारली. त्यामुळे वडिलांनीच त्यांचें पालनपोषण केलें. आंबेडकरांचें मूळ नांव आंबावडेकर असें होतें; पण त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या एका शिक्षकानें तें बदलून आंबेडकर असें केलें. यांचें शिक्षण सातारा व मुंबई येथे झालें. बी. ए. झाल्यावर ते श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या मदतीने अमेरिकेला गेले व कोलंबिया विद्यापीठाचे एम. ए., पीच्. डी. झाले (१९१६–१७). अमेरिकेहून परत आल्यावर त्यांनी बडोदें संस्थानांत नोकरी धरली. या नोकरींत असतांना अस्पृश्य म्हणून त्यांना फार वाईट अनुभव आले. त्यानंतर कोल्हापूरच्या महाराजांचें साहाय्य घेऊन बॅरिस्टर होण्यासाठी ते इंग्लंडला गेले. इंग्लंडमध्ये अभ्यास करून व 'दि प्रॉब्लेम ऑफ दि रुपी' हा प्रबंध लिहून लंडन विद्यापीठाची डी. एस्सी. ही दुर्मिळ पदवी त्यांनी संपादन केली. नंतर बॅरिस्टरीचीहि परीक्षा देऊन ते मायदेशीं परत आले. उच्चविद्याविभूषित असूनहि अस्पृश्य जातींत जन्माला आल्यामुळे त्यांना आयुष्यांत फार अपमान सोसावे लागले. शेवटीं त्यांनी अस्पृश्यांच्या उद्धाराची व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायांचें निर्मूलन करण्याची प्रतिज्ञा केली. आपल्या प्रतिज्ञेला अनुसरून त्यांनी स्वतःला अस्पृश्योद्धाराच्या कामीं सर्वस्वीं वाहून घेतलें.



डॉ. आंबेडकर

'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' व 'जनता' अशीं तीन वृत्तपत्रें त्यांनी सुरू केलीं. त्यांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्य समाजाने दोन प्रखर सत्याग्रह केले. पहिला महाडला चवदार तळ्यावर पाणी भरण्याचा (मार्च १९२७) व दुसरा नाशिकच्या राममंदिरप्रवेशाचा (मार्च १९३०). या सत्याग्रहांमुळे अस्पृश्यांमध्ये जागृति होऊन त्यांची संघटना झाली. १९३० ते ३२ पर्यंत ते गोलमेज परिषदेचे सभासद होते. या परिषदेंत त्यांनी अस्पृश्यांची बाजू घेऊन त्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळावा, अशी मागणी केली व गोलमेज परिषदेंत ती मंजूरहि झाली. परंतु त्यावरूनच म. गांधी व आंबेडकर यांच्यांत मतभेद निर्माण झाला. गांधीजींना अस्पृश्यांचा हा सवता सुभा मान्य नव्हता. म्हणून तो निर्णय बदलून घेण्यासाठी गांधीजींनी पुणें येथे प्राणांतिक उपोषण आरंभिलें. त्या वेळीं आंबेडकर व गांधीजी या दोघांत या प्रश्नावर चर्चा होऊन सुप्रसिद्ध 'पुणें करार जन्माला आला. १९३६ सालीं त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. पुढे ते मुंबई कौन्सिलवर निवडून आले. १९४२ ते ४६ या काळांत ते व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे मजूरमंत्री होते. त्या अवधींत त्यांनी अस्पृश्य वर्गाची शैक्षणिक व आर्थिक उन्नति करण्याच्या कामीं आटोकाट प्रयत्न केले. त्यांनी त्यासाठी मुंबईंत सिद्धार्थ कॉलेज स्थापन केलें. 'शेडयूल्ड कास्ट फेडरेशन' ही अस्पृश्यांची संस्था त्यांच्याच खंबीर नेतृत्वाखाली वाढली. भारत स्वतंत्र झाल्यावर केंद्रीय मंत्रिमंडळांत कायदामंत्री म्हणून त्यांची नेमणक झाली. पुढे स्वतंत्र भारताची राज्यघटना निर्माण करण्याऱ्या कामीं त्यांची योजना झाली. तीन वर्षें सतत परिश्रम करून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी भारताची नवी राज्यघटना तयार केली. आंबेडकरांच्या दृष्टीने या घटनेंतील महत्त्वाचा भाग म्हणजे अस्पृश्यता नामशेष करणारें कलम हा होय. या महत्त्वाच्या कामगिरीबरोबरच १९४८ च्या ऑक्टोबर मध्ये हिंदुकोड बिल लोकसभेला सादर करण्याचा मानहि त्यांनाच मिळाला.

त्यांच्या पहिल्या पत्नीचें नांव रमाबाई असें होतें. त्या १९३७ सालीं निवर्तल्या. त्यानंतर अकरा वर्षांनी म्हणजे १९४८ सालीं डॉ. लक्ष्मीबाई कबीर या सारस्वत महिलेशीं त्यांनी द्वितीय विवाह केला.

स्पृश्यांकडून अस्पृश्यांवर होत असलेला अन्याय त्यांच्या धर्मांतरावांचून दूर होणार नाही, अशा धारणेने सन १९३६ सालीं आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली होती; पण ती त्यांनी अंमलांत आणली, ती मात्र पुढे वीस वर्षांनंतर. १४ ऑक्टोबर १९५६ रोजीं दसऱ्याच्या मुहूर्तावर नागपूर येथे आपल्या एक लाख अनुयायांसह त्यांनी हिंदु धर्माचा त्याग करून बौद्ध धर्म स्वीकारला. जन्मभर आलेल्या कटु अनु-

भवाने ते चिडले होते. आपल्या अस्पृश्य बांधवांना समाजांत समानतेने वागविलें जात नाही, हें शल्य त्यांच्या मनाला सदैव बोचत होतें. त्याचीच परिणति या सामुदायिक धर्मांतरांत झाली. बौद्ध धर्मांत जातिभेद नाही, या तत्त्वावर त्यांनीं बौद्ध धर्म स्वीकारला.

आंबेडकरांना वाचनाचा अतिशय नाद होता. ग्रंथांशिवाय आपण जगूंच शकणार नाही, असें त्यांना वाटे. ग्रंथ वाचण्याबरोबरच ग्रंथ लिहिण्याचेंहि त्यांना व्यसन होतें. लहानमोठे अकरा ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. ज्या ज्या वेळीं ते इंग्लंड, अमेरिका इ. देशांत गेले, त्या त्या वेळीं त्यांनी अनेक दुर्मिळ व बहुमोल पुस्तकें खरेदी केलीं. त्यांच्या खाजगी ग्रंथसंग्रहांत सुमारें पंचवीस हजार ग्रंथ होते.

६ डिसेंबर १९५६ रोजीं दिल्ली येथे आंबेडकरांचा अंत झाला. त्यांच्या पार्थिव देहाला मृत्यु आला असला, तरी एक स्वावलंबी विद्यार्थी, कडवा सुधारक, विद्वान् संशोधक, सूक्ष्म कायदेपंडित व हरिजनांचा झुंझार नेता अशा विविध नात्यांनी ते कीर्तिरूपें अमर राहतील.

आंबेर जयपूर संस्थानाची पूर्वींची राजधानी. हें शहर जयपूरच्या ईशान्येला सात–आठ मैलांवर वसलेलें आहे. इथले राजप्रासाद पहाडांच्या मध्यभागीं बांधलेले असून त्यांच्या पार्श्वभागीं उंच डोंगरावर झारगड आहे. राजप्रासादांत कुरुंदी व संगमरवरी पाषाणाचें अप्रतिम शिल्पकाम आहे. परंतु आंबेर अधिक प्रसिद्ध आहे, तें तिथल्या शिलादेवीच्या मंदिरामुळे. या देवीविषयीं पुढील आख्यायिका सांगतात –– आंबेरचा राजा मानसिंह याने यज्ञ करून शिलादेवीला संतुष्ट केलें. म्हणून देवीने आपला पहिला भक्त, बंगालचा राजा केदार याच्याकडून मानसिंहाकडे येण्याची इच्छा प्रदर्शित केली. तेव्हा मानसिंहाने तिला आंबेर येथे आणून एका भव्य मंदिरांत तिची प्रतिष्ठापना केली.

जैसोरमध्ये सिद्धशिला नामक एक शिला होती. कोण्या ऋषीने तिच्यावर बसून गायत्री मंत्राचीं २४ पुरश्चरणें केलीं होतीं. मानसिंहाला तें समजलें व त्याने त्या शिलेची शास्त्रोक्त मूर्ति घडवून घेतली, असें तिथले पुजारी सांगतात.

जगत्‌शिरोमणि मंदिर, अंबिकेश्वरी मंदिर, अथिनीकुंड, मानसागर हीं आंबेर येथील अन्य प्रेक्षणीय स्थळें आहेत.

आंबेर या नांवासंबंधी पुढील उपपत्ति सांगतात –– अवध देशाचा अंबरीष नांवाचा राजा होता. त्याने इथे अंबिकेश्वराची स्थापना केली व त्यामुळे हें शहर आंबेर या नांवाने प्रसिद्ध झालें. [सं. राजस्थान; ज. द.]

आ द्वितीय स्वरवर्ण. याचें स्थान कण्ठ आहे. हा दीर्घ व प्लुत होतो. याच्याविषयीं कामधेनुतंत्रांत पुढीलप्रमाणे वर्णन आलेलें आहे ––

आकारं परमाश्चर्यं शङ्‌खज्योतिर्मयं प्रिये ।
ब्रह्मविष्णुमयं वर्णं तथा रुद्रमयं प्रिये ।
पञ्चप्राणमयं वर्णं स्वयं परमकुण्डली ।।

अर्थ –– हे पार्वति, आकार हा परमाश्चर्यरूप, शंखासारखा तेजस्वी, ब्रह्मा, विष्णु व रुद्र यांचें निवासस्थान, पंचप्राणात्मक व परमकुंडली (वर्तुळाकार) आहे.

वर्णाभिधानांत याचीं विजय, अनंत, विनायक, अशीं अनेक नांवें दिलीं आहेत.

आई आदिपुरुष औंध येथील पंतप्रतिनीधींच्या ऐतिहासिक पत्रव्यवहाराच्या शिरोभागीं 'श्री आई आदिपुरुष' असें नांव आढळतें. या वरून त्यांच्या वंशांत या नांवाचा कोणी सत्पुरुष होऊन गेला असावा किंवा त्यांच्या वंशांतील कोण्या पुरुषाने त्या नांवाच्या सत्पुरुषाकडून उपदेश ग्रहण केला असावा, असें अनुमान होतें.

समर्थशिष्य देवदास याने आपल्या काव्यांत आई आदिपुरुषाचा उल्लेख केला आहे. [म. च. को.]

आईजी खारडिया शीख लोकांची कुलदेवी. मारवाडांतील बीलाडा येथे आईजीचें मंदिर आहे. शीख लोक त्या मंदिराला दरगाह असें म्हणतात. मंदिरांत नंदादीप अखंड तेवत असतो. त्याच्या ज्योतीचें काजळ पिवळट रंगाचें असतें, म्हणून त्याला केशर म्हणतात. देवीच्या पुजाऱ्याला दीवान हें नांव असून त्याची नेमणूक वंशपरंपरा असते. भाद्रपद शु. द्वितीयेला देवी अंतर्धान पावली, म्हणून त्या दिवशीं इथे उत्सव करतात. त्या दिवशीं अनेक भाविक शीख इथे जमतात व नंदादीपाचें आणि गादीचें दर्शन घेतात. दळायला बसण्यापूर्वीं आईजीच्या नांवाने एक मूठभर धान्य एका हंडचांत टाकायचें, असा शीख स्त्रियांचा रिवाज आहे. असें धान्य गोळा करण्यासाठी आईजीच्या मंदिरातर्फे भगव्या वस्त्राने मढविलेल्या बैलगाडचा मारवाड, मेवाड व माळवा प्रांतांत फिरत असतात. अशा प्रकारे शेकडो मण धान्य आईजीच्या मंदिरांत जमतें व त्याचा सदावर्तांत उपयोग करतात. ज्या शीख कुटुंबांत वीस माणसें किंवा वीस जनावरें असतात, त्यांतील एक देवीला अर्पण करतात व कालांतराने त्याबद्दल कांही पैसे क्रयमूल्य म्हणून देवीला देऊन त्या व्यक्तीला किंवा जनावराला परत घरीं नेतात. [मरुभारती]

आई पंथ नाथपंथाची एक शाखा. गोरखनाथाची एक शिष्या विमलादेवी ही या शाखेची प्रवर्तक होय. ती आई या उपाधीने प्रसिद्ध झाली. म्हणून तिच्या पंथाला आई पंथ असें नांव पडलें. ती गुजरातेंत जन्मली व तिने आपलें निवासस्थान मारवाडांत केलें. आई पंथाचें केंद्र बिलाडा (जोधपूर) हें आहे. तिथेच तिने सर्व जातींच्या लोकांना आपली दीक्षा द्यावयाला सुरवात केली. तिथून आई पंथ सुरू झाला. तिला लोक नवदुर्गेचा अवतार मानून भजतात. रोहटक व हरिद्वार इथेहि या पंथाचे मठ आहेत. या पंथांत अनेक संत व कवी होऊन गेले. त्यांचें साहित्य जनतेंत प्रसार पावलेलें आहे. [वरदा]

आउडी प्राचीन कालांतील सुऱ्याचा एक प्रकार. हें शस्त्र अणकुचीदार असतें. त्याचा आंतला भाग सरळ असतो आणि वरच्या भागाला अनेक खांचा असतात.

आओ नागा आसाममधील नागा लोकांच्या १९ प्रमुख जमातींपैकी एक जमात. हे लोक मोंगोलियन वंशाचे आहेत. आपली उत्पत्ति पाषाणस्वरूपी एका देवतेपासून झाली, असें हे लोक मानतात. आओ जमातीचें व्यक्तित्व एकजिनसी नाही. माँगसेन व चुंग्ली या दोन घटक जमाती एकत्र होऊन तें बनलें आहे. या बाबत पुढीलप्रमाणे दंतकथा आहे—

माँगसेन जमात भूमींतून निर्माण झाली व ती कुबोक येथे राहूं लागली. चुंग्ली जमात चुंग्लीयिन्ती येथे प्रस्थापित झाली. प्रारंभी दोन्ही जमातींची सामाजिक व शासनविषयक व्यवस्था अगदी पृथक् होती. शिवाय या उभय जमातींत सतत संघर्षहि चालत असे. एक जमात दुसरीवर वर्चस्व गाजविण्यासाठी नेहमी बद्धपरिकर असे. अशा स्थितींत शिलुती नांवाचा एक वीरपुरुष चुंग्लीयिन्ती येथील जमातींत निर्माण झाला. त्याने चढाई करून कुबोकच्या लोकांना आपल्या शासनाखाली आणलें. मग या दोन्ही जमाती शेजारीं शेजारीं दोन निरनिराळ्या खेलांमध्ये (आळी किंवा पेठ) नांदूं लागल्या. कालांतराने त्यांच्यामध्ये सांस्कृतिक समन्वय घडून आला. ते बहुतांशीं एकमेकांत मिसळले व मग त्या संयुक्त जमातीला आओ हें नांव पडलें. पण अशा प्रकारें संयुक्त होऊनहि त्यांच्यांत कांही फरक राहिले आहेत, ते पुढीलप्रमाणे—

(१) दोन्ही जमाती एकाच वस्तींत राहत असल्या तरी त्या निरनिराळ्या खेलांत राहतात.

(२) दोन्ही जमातींची बोलभाषा वेगळी आहे. पण अलिकडे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी बायबलाचें भाषांतर चुंग्ली भाषेंत केल्यामुळे ती भाषा आता उभय जमातींना सामान्य झाली आहे. गीतें व काव्यें मात्र अजूनहि माँगसेन भाषेंतच रचलीं जातात.

(३) चुंग्ली जमातींत गांवांतल्या प्रमुख लोकांचें विधिमंडळ असतें व तें निवडणूक होऊन अधिकारावर येतें. माँगसेन जमातींत ही पद्धत नाही.

(४) उभय जमातींतल्या स्त्रियांची वेषभूषा भिन्न असते.

(५) चुंग्ली जमात खाद्यपदार्थांच्या बाबतींत सोवळें ओवळें किंवा विटाळ मानीत नाही. माँगसेन जमात तें सगळें पाळते.

एका काळीं आओ संस्कृतीने गणराज्यपद्धतींत उच्चत्व मिळविलें होतें. प्रत्येक आओ गावांत प्राचीन कालापासून गणराज्य अस्तित्वांत आहे. प्रत्येक गांवाचें क्षेत्र ठरलेलें असे व त्या क्षेत्रापुरती त्यांची राज्यघटना असे. गांवांतल्या प्रमुखांचें एक सभासद मंडळ त्या गांवाचा सर्व कारभार पाही. अशा सभासदांना तातार म्हणत. अनेक बाह्य संकटांना तोंड देऊन त्यांनी ही लोकशाही उभारली होती. चुंग्लीयिन्ती ही वसाहत प्रत्येक गांवाला आदर्शभूत असे.

पुढे चुंग्लीयिन्तीची वसाहत वाढली व वाढत्या लोकसंख्येला जागा व निर्वाहाचीं साधनें कमी पडूं लागलीं, म्हणून कित्येक लोक तिथून बाहेर पडले व त्यांनी सांप्रतच्या आओ प्रदेशांत नवीं गांवें स्थापन केलीं. दक्षिणेकडे गेले त्यांनी सेम व लोथ या प्रदेशांत नव्या वसाहती स्थापल्या. बऱ्याच पिढ्या ते वरील प्रदेशांत नांदेल; पण पुढे बाहेरून उपद्रव होऊं लागल्यामुळे ते परत आओ प्रदेशांत आले.

आओ नागा हे धाडसी व महत्त्वाकांक्षी होते. भावाभावांत किंवा कुलाकुलांत सत्तासंघर्ष सुरू झाला, की त्यांतला कर्तबगार असेल तो नव्या जागीं जाऊन आपलें बस्तान मांडी. मग इतरहि अनेक कुटुंबें त्याच्या भोवती येऊन वसत. मग तिथे प्रमुख लोकांचें गणराज्य स्थापन होई. वस्तींत एखाद्याने ग्रामद्रोही कृत्य केल्यास त्याला वस्तींतून हाकलून दिलें जाई. नवीं गांवें सामान्यपणे शत्रूला दुर्लंघ्य अशा उंच टेकडीच्या माथ्यावर करीत. तसें करतांना हवा—पाणी चांगलें व भोवतालची जमीन सुपीक आहे कीं नाही, तें पाहत. लोकसंख्या वाढून गांवांतली शेतजमीन अपुरी पडते, असें दिसून आल्यावर शेजारच्या वसाहतीकडे जमिनीची मागणी करीत. त्या वसाहतीने नकार दिल्यास त्यांच्यावर भाले—तलवारी घेऊन चाल करीत. लढाईंत विजय मिळाला, तर जिंकलेल्या वसाहतीची जमीन आपल्या वसाहतींत सामील करीत. लुटलेल्यापैकी स्थावर मालमत्ता गांवाच्या मालकीची व जंगम मालमत्ता जमातीच्या पुढाऱ्याच्या मालकीची होत असे. खाजगी मिळकतीचें तत्त्व आओ नागांच्या प्रदेशांत पुरातन कालापासून मान्य झालें आहे.

ग्रामव्यवस्था– आओंच्या प्रत्येक गांवांत वरचा व खालचा असे दोन खेल अर्थात् भाग असतात. प्रत्येक खेलांत अनेक कुटुंबें नांदतात. खेलामध्ये बखेडा निर्माण झाल्यास तातार म्हणजे ग्रामसभेचे सभासद एकत्र जमून त्याचा निवाडा करतात. प्रत्येक खेलाचे आणखी पोटविभाग असतात. त्यांना मेपू म्हणतात. एका मेपूंत एक कुल राहतें. जितके मेपु तितकी कुलांची संख्या असते. वाघाची शिकार, रस्ते, इ. गोष्टी खेलांतील लोक एकजुटीने करतात; पण शत्रूवर हल्ला करायचा असल्यास मात्र गांवांतल्या धाडसी व तगडया पुरुषांचीच निवड होते. सार्वजनिक हिताचीं कामें करण्यासाठी स्वयंसेवकांची एक समिति नेमतात. तिला मापांग असें नांव आहे. या समितींत हुशार व तज्ञ लोकांची नेमणूक होते. याशिवाय ग्रामसंरक्षक म्हणूनहि एक संघटित दल असतें. आग लागणें, अपघात घडणें, शत्रूची स्वारी, इ. प्रसंगीं हें दल नगारा वाजवून गांवाला धोक्याचा इशारा देत असे; पण ही चाल परकी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी बदसल्ला दिल्यामुळे अलिकडे बंद पडली आहे.

समाजरचना– नागाप्रदेशांतली प्राचीन समाजरचना चांगली होती, व त्यांचें जीवन सुखी होतें; पण अलिकडे परदेशांतल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी त्यांच्यांत शिरकाव करून घेतल्यापासून आओ नागा हे आपल्या परंपरागत जीवनाला वंचित होऊं लागले आहेत. त्यांनी पुनश्च आपल्या प्राचीन समाजव्यवस्थेचा स्वीकार करावा, असें मत तार्जेयुब आओ या त्यांच्यांतल्याच एका विद्वानाने व्यक्त केलें आहे. नागा कुटुंबांत नवराबायको, त्यांचीं मुलें, निराश्रित आप्त व एखादा पोरका नातेवाईक, इतकीं माणसें असतात. सगळीं मिळून शेतीचें काम करतात. शेतीची मालकी सामाइक असते. फक्त स्त्रीला माहेराकडून वारसाहक्काने मिळालेली मिळकत तेवढी तिच्या एकटीच्या मालकीची असते. कुटुंबांतले मुलगे मोठे होऊन त्यांचीं लग्नें झालीं, की ते विभक्त होऊन निराळें घर थाटतात. वडिलार्जित उत्पन्नांत विवाहित पुत्रांचा हिस्सा बापाच्या बरोबरीने असतो. आओंच्या प्रत्येक वस्तींत आरिचु नांवाचें एक सार्वजनिक शयनगृह असतें. १२ वर्षांवरील सर्व मुलगे रात्रौ तिथे झोपतात. तिथेच त्यांना युद्धकलेचेंहि शिक्षण दिलें जातें. त्यांच्या आपसांत लुटुपुटीच्या लढायाहि होतात. मध्यरात्रीं दिवा न घेतां एकटया मुलाला जंगलांत पाठविणें, सांपळयांत सांपडलेल्या वाघाशीं कुस्ती खेळायला लावणें, इ. धाडसी कामें करवून आओ आपल्या मुलांना धीट बनवितात. आरिचूमध्ये त्यांचें एक लष्करी मंडळच असतें. त्यांत निरनिराळया श्रेणींचे अधिकारीहि असतात. युद्धकलेबरोबरच तिथल्या मुलांना नृत्य-गायनहि शिकवितात. एक आरिचू लहान पडूं लागलें, की त्यांतलींच मुलें लगेच दुसरें उभारतात. आरिचूच्या खांबावर चित्रें कोरतात. असेंच एक मुलींचेंहि आरिचू असतें. त्याची पालिका एखादी विधवा स्त्री असते. कित्येक ठिकाणीं त्या पालिकेच्या घरांतच मुली जमतात. त्यांना सूतकताई, विणकाम, गृहव्यवस्था, इ. विषय शिकविले जातात. पुष्कळदा मुलें–मुली एकत्र जमून वसतीचीं महत्त्वाचीं कामें सहकार्याने करतात. अशा वेळीं त्यांच्या प्रणयालाहि अवसर मिळतो. मात्र आओ मुली आपला सहचर निवडतांना त्याची कसून परीक्षा घेतात. आओंचे विवाह व घटस्फोट यासंबंधीचे नियम सामान्यतः हिंदु कायद्याप्रमाणेच आहेत. विशेष नियम आहेत ते असे––

(१) कोणालाहि स्वतःच्या कुलांतील मुलीशीं लग्न करतां येत नाही.

(२) या जमातींत पुरुषाला अनेक स्त्रिया व स्त्रीला अनेक पती करण्याची बंदी आहे.

(३) हुंडा किंवा देज देण्याची पद्धत नाही. विवाह ठरला म्हणजे साखरपुडयासारखा एक विधि असतो. त्यावेळीं वराचा बाप वधूच्या बापाला थोडें भात व कांही नाणीं देतो.

(४) वाङ्निश्चयाची मुदत तीन वर्षें असते. त्या मुदतींत वर-वधू परस्परांशीं एकनिष्ठ राहतात. नवरा मुलगा वधूच्या आईबापांना सर्व महत्त्वाच्या कामांत मदत करतो व विवाहोत्तर स्वतंत्र राहण्यासाठी नवें घर बांधतो.

(५) एका कुलांतल्या किंवा नजीकचें नातें असलेल्या वर-वधूंचा विवाह झाला, तर त्या जोडप्याला समाजबहिष्कृत करून गांवाबाहेर हाकलून देतात.

(६) लग्नापूर्वीं मूल झाल्यास त्या संततीला वैध मानीत नाहीत; पण गर्भधारणा झाल्यावर मूल जन्मास येण्यापूर्वीं विवाह झाला तर त्या संततीला वैध मानतात.


(७) अनौरस मुलाचा बाप कोण, हा प्रश्न मूल जन्माला येण्यापूर्वींच सोडवावा लागतो. अशा प्रसंगीं सदर स्त्री ज्या पुरुषाशीं संबंध असल्याचें पुराव्यानिशी शाबीत करील, तो इसम त्या मुलाचा बाप मानला जातो व तें मूल वयांत येईपर्यंत त्याच्या पोषणाची जबाबदारी त्या इसमावर राहते.

(८) व्यभिचार, छळ व त्याग हीं कारणें घटस्फोटाला पुरेशीं असतात. विधवेला पुनर्विवाह करणें असल्यास पतीच्या मरणोत्तर किमान एक वर्ष थांबावें लागतें. [आओ नागा– कस्टमरी लॉज.]

आकर्णनी रेवतीला अनुसरणारी देवता. [मत्स्य पु. १७८.७२]

आकर्षण जादूविद्या किंवा अभिचार यांतलें मंत्रतंत्र. योचन नामक वनस्पति उगाळून तिचा तिलक करणें व त्या वनस्पतीवर 'ॐ ह्रीं क्लीं ऐं क्षौ भोगप्रदा भैरवी मातङ्गी त्र्यैलोक्यं वशमानय स्वाहा' या मंत्राचा सहस्र जप करणें. या तंत्राच्या योगानें कोणतीहि व्यक्ति स्वतःकडे आकर्षित होते, असें सांगितलें आहे. [कालनाथविरचित इंद्रजाल]

आकर्षण धनुरासन या आसनानें संधिवात दूर होतो आणि नाक, डोळे व गळ्याच्या खालच्या भागांतलीं हाडें, यांचे दोष दूर होतात. याची पद्धति पुढीलप्रमाणें--



आकर्षण धनुरासन

उजवा पाय पसरून त्यावर डावा पाय पसरावा. त्यानंतर उजवा पाय वाकवून डाव्या पायाच्या वरच्या भागावर ठेवावा. वाकलेल्या उजव्या पायाच्या अंगठ्याला डाव्या हातानें धरून उजव्या हातानें डाव्या पायाचा अंगठा पकडावा. मग उजव्या पायाला डाव्या कानापर्यंत खेचीत राहावें. डोकें सरळ ठेवावें. मग वेगानें दोन्ही हात सोडून द्यावे व उजवा पाय डाव्या पायाच्या बगलेंत पसरवून जमिनीवर ठेवावा. हें आसन करतांना सर्व शरीर ताणून ठेवावें व पूरक करावा. हळूहळू याचा अभ्यास वाढवावा. [उ. यो. द.]

आकाश याचे अर्थ (१) अंतराळ, मधला अवकाश, पोकळी (लौकिक प्रयोग). (२) पंच महाभूतांतलें शब्द-गुणक महाभूत. (३) सर्वव्यापी अनंत अवकाशरूप तत्त्व. काल-तत्त्व जसें भौतिक सृष्टीहून वेगळें पडतें, तसेंच हेंहि भौतिक सृष्टीहून वेगळें आहे. वर दिलेला अर्थ विशिष्ट आहे आणि आकाश म्हणजे अंतराळ अथवा पोकळी या अर्थाहून तो भिन्न आहे. कारण त्या अर्थाप्रमाणे जिथे घन आहे, तिथे आकाश नसणार. पण व्यापक आकाशतत्त्व घनांतहि मावतें आणि घनहि त्यांत मावतें.

प्रवाहण जैवलीच्या मतें आकाश हें सर्व जगाचें उत्पत्ति-कारण आहे. या विश्वाची गति काय होईल, असा प्रश्न त्याला विचारला असतां, तो म्हणाला--

आकाशः इति होवाच । सर्वाणि वा इमानि
भूतन्याकाशादेव समुत्पद्यन्ते । आकाशं प्रत्यस्तं यन्ति ।
आकाशो हि एव एभ्यो ज्यायान् । आकाशः परायणम्
(छान्दो. १.९.१.)

अर्थ--सर्व भूतें आकाशापासून उत्पन्न होतात व शेवटीं आकाशांतच लीन होतात. आकाश सर्वश्रेष्ठ. तेंच शेवटचें परमस्थान.

ही कल्पना सृष्टिनिर्माणशास्त्राच्या इतिहासांत प्रगत व उच्चतर आहे, असें प्रा. रानडे म्हणतात.

वैरोचनापासून आकाश उत्पन्न झालें असें बौद्ध मानतात. बौद्धमतानुसार आकाश म्हणजे सूक्ष्म वायु किंवा शून्य होय. तें स्वतःतूनच प्रकृतिधर्मांनुसार निर्माण होतें व स्वतःवर स्वतःच सत्ता चालवितें. तें अनंत आहे. सर्व वस्तुमात्र आकाशांत शोषलें जातें. तें उत्पत्ति-स्थिति-लयाचें मूलकारण आहे. पंचमहाभूतें व बौद्धिक सूक्ष्मता यांचें तें मूलतत्त्व आहे.


जैन दर्शनांत आकाश हें पांच अस्तिकायांपैकी एक आहे. जीवादि अस्तिकाय द्रव्यांना आकाशच आधार देतें. जैन दर्शनांत आकाशाची सत्ता अनुमानानें अंगीकारली आहे. जीव, पुद्गल, धर्म व अधर्म हे पदार्थ बहुप्रदेशव्यापी आहेत. त्यांच्या विस्ताराच्या सिद्धीसाठी आकाश या द्रव्याची सत्ता मानणें तर्कसंगत ठरतें. जैनांनी आकाशाचे दोन प्रकार मानले आहेत-- (१) जीव पुद्गलादि द्रव्यें ज्या भागांत राहतात, तें लोकाकाश व (२) त्याच्या वरच्या भागांतील आकाश तें अलोकाकाश होय.

चर्मचक्षूंना आकाश हें क्षितिजापाशी पृथ्वीवर टेकलेल्या एखाद्या प्रचंड घुमटाप्रमाणे दिसतें. ज्योतिषशास्त्राच्या बाल्यावस्थेंत मनुष्याच्या आकाशासंबंधीच्या कल्पना बऱ्याच अज्ञानमय होत्या. आकाश ही जड वस्तु आहे व म्हणून तें चार दिशांना असलेल्या चार स्तंभांवर आधारलेलें आहे, अशी प्राचीन मिसरी लोकांची कल्पना होती; तर पृथ्वीभोवती असलेल्या पर्वतांच्या तटावर आकाशाचा घुमट बसविला आहे, असें खाल्डी लोक समजत होते. वैदिक काळच्या भारतीयांची आकाशविषयक कल्पना मात्र बरीचशी वस्तुस्थितीला धरून [illegible]ी, असें वाटतें. जसजशी ज्योतिषशास्त्राची प्रगति होत

गेली, तसतसें आकाश म्हणजे अवकाश (पोकळी) आहे, हें ज्ञान भारतीयांना झालें व त्या पोकळींत दिसणाऱ्या सूर्य, चंद्र, ग्रह, उपग्रह, तारे, धूमकेतु, उल्का, तारकागुच्छ यांविषयीं त्यांना जिज्ञासा उत्पन्न झाली. मग त्या दृष्टीने ते प्रयत्न करूं लागले.

भूपृष्ठावर कुठेहि उभें राहून पाहिलें तरी आकाशाचा रंग निळा दिसतो. भूपृष्ठापासून जों जों जास्त उंचीवर जावें, तों तों हा निळा रंग जास्त गडद होत जातो व खस्वस्तिकाच्या जागीं त्याला विशेषच गडदपणा येतो.

जगांतील सर्व प्रमुख व सुधारलेल्या धर्मांत त्याचप्रमाणे असंस्कृत अशा सर्व धर्मपंथांतहि आकाशाला देवता मानलेलें आहे. या देवतेचें स्वरूप, दर्जा व वैशिष्टय मात्र भिन्न भिन्न प्रकारचें आहे. आकाशदेवतेच्या कार्याबद्दल अनेक धर्मांतील वर्णनांत साम्य आहे. पाऊस आणि त्याचे भूपृष्ठावर होणारे परिणाम, हें आकाशदेवतेचें पहिलें कार्य होय. पर्जन्यवृष्टीने भूपृष्ठावर अनेक प्रकारची जीवोत्पत्ति होते, हें निदर्शनास आल्यावर आकाश ही प्राणदात्री देवता आहे आणि वीज पडून मृत्यु येतो हें पाहिल्यावर ती मरणदात्रीहि देवता आहे, अशी कल्पना उद्भवली. अनेक धर्मांत आकाशदेवतेला उत्पत्तिकार्यांत प्रमुख स्थान दिलेलें आहे. **पाहा**–द्यावा पृथिवी [गॉ. नॉ. बु.; म. ज्ञा. को.; भा. द.]



आकाशगंगा – ठशावरील भुरके पट्टे आकाशगंगेचे आहेत.

आकाशगंगा

हा धूसर रंगाचा पट्टा सर्व आकाशभर कंबरपट्टयासारखा पसरला आहे. या पट्टयांत ४० अब्ज तारका आहेत. अतिदूर अंतरावर असल्यामुळे त्या स्वतंत्रपणे न दिसतां दुधिया रंगाच्या ओहळासारख्या दिसतात. आपला सूर्य हा या आकाशगंगेच्या पट्टयांतला एक सामान्य तारा आहे. आकाशगंगेला दूधगंगा असेंहि म्हणतात. तै. ब्रा. (१. ७. ६. ६) व श. ब्रा. (५. ३. १. २) या ग्रंथांत 'अर्यम्णः पन्था' असे जे शब्द आहेत, ते आकाशगंगेला उद्देशून आहेत, असें कांही विद्वानांचें मत आहे; तर अन्य कांही विद्वानांच्या मतें त्याचा अर्थ क्रांतिवृत्त असा आहे.

आकाशगंगेविषयी पुढील समजुती प्रचलित आहेत–(१) एकचक्र रथांत बसून सूर्य जातो तो मार्ग. (२) वामनावतारीं विष्णु तिसरें पाऊल टाकीत असतां तें एका अंड्याला लागलें आणि तें फुटून हा प्रवाह निघाला. व (३) स्वर्गावर चढण्याची शिडी.

आकाशगंगा ही स्वर्गातल्या अमरावतीला वेढून राहिली आहे, असें भागवत सांगतें (८. १५. १४).


आकाशगर्भ


आकाशगर्भ

ध्यानी बोधिसत्त्व. याला खगर्भ असेंहि म्हणतात. याचा वर्ण श्याम असून चिन्ह रत्न आहे. याच्या

अनेक मूर्ती आढळतात. [इं. बु. इ.]

आकाशदिवा आश्विन शु. ११ शी ते कार्तिक शु. ११ शी पर्यंत, घराच्या बाहेर एक उंच खांब पुरून त्यावर दोरीच्या साहाय्याने जो दिवा टांगतात, त्याला आकाश-दिवा असें म्हणतात. त्याचा विधि पुढीलप्रमाणे--

घरापासून जवळच थोडी जमीन गोमयाने सारवावी. तीवर चंदनयुक्त जलाने प्रोक्षण करून अष्टदळ कमळ काढावें. मध्यभागीं वीस हात, नऊ हात किंवा पांच हात लांबीचा खांब पुरावा. तो वस्त्र, पताका, अष्टघंटा, कलश, यांनी सुशोभित करावा. त्यावर अष्टदलाकृति दीप करून अडकवावा. त्या



आकाशदिवे

दीपांत मोठा दिवा लावावा. त्याभोवती कमळाच्या प्रत्येक पाकळींत एक असे आठ दिवे धर्म, हर, भूति, दामोदर, धर्मराज, प्रजापति, पितर (तम:स्थित) व प्रेत यांना उद्देशून लावावे. दिव्यांत तिळाचें तेल घालावें. नंतर दीपाची पंचो-पचार पूजा करून तो पुढील मंत्राने वर चढवावा –

दामोऽदराय नभसि तुलायां लोलया सह ।
प्रदीपं ते प्रयच्छामि नमोनन्ताय वेधसे ।।

याचें फल लक्ष्मीप्राप्ति हें आहे. [व्रतराज, नि. सिं.]

आकाशपंचमी एक जैन व्रत. तिथि भाद्रपद शु. ५ मी. आदल्या दिवशीं एकभुक्त. पंचमीला उपवास. रात्रीं णमोकारमंत्राचा जप, स्तोत्रपठण, आणि शास्त्राध्ययन. व्रतावधि पांच वर्षे. याची कथा अशी—

सौराष्ट्र देशांत तिलकपूर नांवाचें नगर होतें. तिथल्या भद्रशाह नामक व्यापाऱ्याला विशाला नांवाची कन्या होती. तिने हें व्रत केलें, त्यामुळे चतुर्थ स्वर्गांत तिला मणिभद्रदेवाचा जन्म मिळाला. नंतर उज्जयिनी नगरींत प्रियंगुसुंदर राजाच्या पोटीं सदानंद नांवाच्या पुत्राच्या रूपाने तिने जन्म घेतला. पुष्कळ वर्षे राज्योपभोग घेतल्यावर सदानंदाने जिनदीक्षा घेतली आणि मोक्ष मिळविला. [जै. व्र. ति. नि.]

आकाशमुखी एक शैव संप्रदाय. याचे अनुयायी आकाशा-कडे तोंड करून राहतात. [सं. इं. डि.]

आकासकन्निगे द. भारतांतल्या ग्रामदेवता. ह्या कुमारी असून तलावांचें संरक्षण करतात. तळ्याच्या बांधांना जिथे भेगा पडायचा संभव असतो, तिथे यांच्या मूर्ती बसवितात. पुष्कळदा त्या तळ्याच्या बांधावर जमून भांडतात आणि त्यामुळे बांध फुटतो, अशी समजूत आहे. गांवाला पुराचा धोका निर्माण होतो, तेव्हा त्यांतली एखादी लहान मुलीच्या रूपाने दारोदार हिंडून लोकांना तशी सूचना देते, अशीहि समजूत आहे. महाराष्ट्रांतहि अशा जल-देवता आहेत. त्यांना आसऱ्या असें म्हणतात. **पाहा**–आसऱ्या.

आकूति स्वायंभुव मनु आणि शतरूपा यांची कन्या. रुचि नामक ऋषींशीं हिचा विवाह झाला. तिला यज्ञ आणि दक्षिणा अशीं जुळीं मुलें झालीं. त्यांनीच पुढे पति–पत्नी हें नातें स्वीकारून याम नामक बारा पुत्रांना जन्म दिला. हे बारा पुत्र यामदेवता या नांवानें प्रसिद्ध आहेत. [क्ला. डि. हिं. मा.]

आक्रंद आपल्या राज्याच्या पृष्ठभागीं असलेल्या मित्र राजाला कौटिल्याने दिलेली संज्ञा. आक्रंदाच्या साहाय्याने पार्ष्णिग्राह राजाच्या सैन्याचा उच्छेद करतां येत असे. आक्रंद राजाकडे पाठविलेल्या दूताला पाणिनीने आक्रंदिक असें म्हटलें आहे (अष्टा. ४. ४·३७). [पा. भा.]

आखाडा एक नृत्यप्रकार. महाराष्ट्रांत लग्नाची वरात निघाली असतां लेजीम, तलवारी, लाठ्या. इ. हत्यारें घेऊन कांही लोक तिच्यापुढे नाचत जातात, त्याला आखाडा असें म्हणतात. जेव्हा वर आणि वधू या दोन्ही पक्षांकडील लोक आखाडा नाचतात, तेव्हा त्या नृत्यांत विशेष रंग भरतो.

(२) जोर, बैठका, मलखांब वगैरे व्यायाम करण्याच्या जागेला आखाडा असें नांव आहे. संस्कृत भाषेंत आखाड्याला मल्लगृह म्हणतात. प्राचीन कालापासून भारतांत मल्लविद्येची महती आहे.

तालीम करण्याची ही जागा एका बिशिष्ट पद्धतीने बांधतात. तालमीच्या खोलीच्या भिंती सात फूट उंच बांधतात व त्या चुन्याने सारवून त्यांवर तांबडे पट्टे ओढतात. आखाडचाला खिडकी नसते. फक्त दरवाजा तेवढा असतो. भिंतीच्या बाजूला दोन, अडीच फूट उंचीचा एक ओटा बांधलेला असतो. तालमीच्या पुढच्या मोकळचा जागेंत कुस्त्या खेळण्याकरिता जागा तयार करतात. तिला हौदा म्हणतात. कुस्तीच्या जागेशेजारींच जोरजोडी, बैठका मलखांब वगैरे व्यायामासाठी खोल्या बांधलेल्या असतात. हिंदूंच्या तालमींत मारुतीची स्थापना केलेली असते; तर मुसलमानांच्या तालमींत 'अल्लाचा पंजा' ठेवलेला असतो. त्यांची अनुक्रमें शनिवारीं व गुरुवारीं पूजा करतात. गांवाच्या तालमींत सर्व जातीच्या लोकांना प्रवेश असतो. तालीमबाज लोक तांबडचा मातीने आपले कपडे रंगवितात. तालमीची वेळ पहाटें व सूर्यास्तानंतर रात्रीं असते.

पूर्वी दसऱ्याच्या सुमारास दर वर्षी मोठचा प्रमाणावर कुस्त्यांचे सामने होत. हल्ली वर्षभर मधून मधून कुस्त्यांचे फड होतात व त्यांत भिन्न भिन्न आखाडचांतील पहेलवानांच्या कुस्त्या होतात. कुस्ती ठरल्यावर कुस्तिगीर महिनाभर पौष्टिक खुराक खाऊन विशेष मेहनत करतात. सामन्याच्या दिवशीं देवापुढें बोकड बळी देऊन त्याचे हातपाय देवाच्यापुढे दगडाखाली पुरून ठेवतात. बाकीचें मांस तालमींतील मांसाहारी लोक खातात. शाकाहारी लोक मांसाऐवजी फळें, पेढे, बर्फी, जिलबी वगैरे गोड पदार्थ सेवन करतात. कुस्ती खेळतांना कुस्तिगीर लंगोट व चड्डी एवढेच कपडे नेसतात. कुस्ती जिंकणाऱ्या पहेलवानाला चांदीचें कडें, पागोटें किंवा कबजा (जाकीट) बक्षीस म्हणून देतात.

संस्थानें विलीन होण्यापूर्वी कित्येक संस्थानिकांच्या पदरीं अनेक कुस्तिगीर पहेलवान असत. त्यांची बडदास्त उत्तम राखली जाई. **पाहा**–मल्लविद्या.

आखाडी कोंकणांतल्या दशावतारी खेळासारखा एक प्रकार. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांत याचा प्रचार आहे. शेतीचा हंगाम संपल्यावर आखाडीला सुरुवात होते आणि पावसाळा सुरू होईपर्यंत हे खेळ चालतात. यांत सगळ्या जातींचे लोक भाग घेतात. आखाडींत निरनिराळ्या देवांची सोंगें आणून नाचायचें असतें. एखाद्या घराण्यांत कांही सोंगें वंशपरंपरेने चालू असतात. आखाडींतलें सोंग मिळणें हा मान समजला जातो. या खेळाला बोहाडा असेंहि नांव आहे. बोहाडा नासिक, धुळें या भागांत खेळला जातो. **पाहा** – बोहाडा.

आखिर-इ-छहार-इ-शम्बह वफर महिन्यांतील शेवटचा बुधवार. शेवटच्या दुखण्यांत मुहंमद पैगंबराला एक दिवस थोडें बरें वाटलें आणि त्यानें स्नान केलें, त्या प्रसंगाची स्मृति म्हणून या बुधवारीं मुसलमान लोकांत मेजवानी करण्याची चाल आहे. [डि. इ.]

आखेती अक्षय्य तृतीयेच्या दिवशीं मराठा वगैरे जातींतील स्त्रिया पाणवठचावर गोळा होतात आणि टिपऱ्यांच्या तालावर फेर धरून नाचतात. कांही ठिकाणीं नदीकाठीं असलेल्या गांवांतील स्त्रिया दोन्ही तीरांवर जमून परस्परांचीं उणींदुणीं काढतात. कांही खेडचांत तर एकमेकांवर दगड फेकण्याचीहि चाल आहे. आखेती हें अक्षय्य तृतीयेचें नांव आहे. **पाहा** – अक्षय्य तृतीया.

आख्यान सामान्य अर्थ – कथन, निवेदन, कथा, कहाणी. विशेष अर्थ – पुरावृत्तकथन, ऐतिहासिक कथा, पौराणिक कथा. विशेषतः जुन्या काळीं घडलेल्या एखाद्या घटनेच्या कथानकाला आख्यान ही संज्ञा आहे. ऋग्वेद संहितेंतच आख्यानांच्या अस्तित्वाचें प्रमाण सांपडतें. ऋग्वेदांत आलेल्या सुपर्ण, पुरूरवा इ. आख्यानांच्या संग्रहाला अथर्ववेदादि ग्रंथांत पुराणसंहिता असें म्हटलेलें आहे. आख्यान हा शब्द मात्र ब्राह्मणवाङ्मयांत प्रथम आढळतो. ऐ. ब्राह्मणांत राजसूय यज्ञाच्या प्रसंगीं होता शुनःशेपाचें आख्यान सांगतो, असा उल्लेख आहे (७. १८. १०).

ऋग्वेदांत तीस आख्यानांचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. त्यांपैकी कांही इंद्र व अश्विनौ यांसंबंधी असून त्यांत या देवतांचा पराक्रम व त्यांची दुसऱ्यांवर उपकार करण्याची बुद्धि या गोष्टी दर्शविलेल्या आहेत. ऋग्वेदांतील शुनःशेप (१. २४), अगस्त्य व लोपामुद्रा (१. १७९), गृत्समद (२. १२), वसिष्ठ व विश्वामित्र (३. ५३; ७.३३), सोमाचें अवतरण (३. ४३), त्र्यरुण व वृशजान (५. २), अग्नीचा जन्म (५. ११), श्यावाश्व (५. ३२), बृहस्पतीचा जन्म (६. ७१), राजा सुदास (७. १८), नहुष (७. ९५), अपाला (८. ९१), नाभानेदिष्ठ (१०. ६१, ६२), वृषाकपि (१०. ८६), उर्वशी आणि पुरूरवा (१०. ९५), सरमा–पणि (१०. १०८), देवापि व शंतनु (१०. ९८), नचिकेता (१०. १३५) हीं आख्यानें प्रसिद्ध आहेत. यांशिवाय दानस्तुति मंत्रांतहि कांही आख्यानांचें सूचन आहे.

ऋग्वेदाशिवाय इतर वैदिक वाङमयांतहि आख्यानें आलेलीं आहेत. यांतील कांही आख्यानें नवीन आहेत; तर कांही

ऋग्वेदांत सूचित केलेल्या आख्यानांत भर घालून वाढविलेलीं आहेत. बृहद्देवता, सर्वानुक्रमणी, निरुक्त, नीतिमंजरी व सायण-भाष्य यांत कांही आख्यानांतील कांही प्रसंगांचें वर्णन केलेलें आहे. पुराणांत वेदांतलीं कांही आख्यानें उपबृंहित झालेलीं असलीं, तरी कांही मूळ वैदिक आख्यानांत पुराणांनी संकोचहि केला आहे. ब्राह्मणग्रंथांत आणि श्रौतसूत्रांतहि कांही आख्यानांचा विकास केलेला दिसतो. च्यवान (पुराणांतील च्यवन) भार्गव व सुकन्या मानवी या आख्यानाचा ऋग्वेदांत (१. ११६, ११७, ११८; १०. ३९) केवळ उल्लेख आहे; परंतु तांड्य ब्राह्मण (१४. ६. ११), निरुक्त (४. १९), श. ब्रा. (४. १. ५) व भागवतपुराण (९. ३) या ग्रंथांत त्याचा खूप विस्तार केलेला आहे. अशा प्रकारें रामायण, महाभारत व पुराणें या ग्रंथांत वैदिक आख्यानांचा मनोरंजक विकास व विस्तार झालेला दिसतो.

या आख्यानांच्या तात्पर्याबाबत विद्वानांत बरेच मतभेद आहेत. कांही विद्वानांनी या आख्यानांना रहस्यमय मानलें आहे. उदा० पुरूरवा-उर्वशी या आख्यानांत कुमारिलभट्ट, सायण इ. च्या मतें एक गंभीर रहस्य सांठवलेलें आहे. पुरूरवा हा सूर्य असून उर्वशी ही उषा आहे. सूर्य व उषा यांचा संयोग क्षणभरच होतो; तर वियोग मात्र दीर्घ कालाचा असतो. विरही झाल्यावर सूर्य दिवसभर उषेच्या शोधांत फिरत राहतो व पुन्हा दुसऱ्या दिवशीं उषेशीं त्याचा क्षणिक समागम होतो.

या आख्यानांचें परिशीलन करतांना एक गोष्ट ध्यानांत येते, ती ही, की यांतील आचार व विचार मानवसमाजाला कल्याणकारक असे आहेत. तेव्हा मानवी मूल्यांच्या दृष्टि-कोनांतून या आख्यानांचा विचार केला पाहिजे, त्याचप्रमाणे ज्या कालांत हीं आख्यानें रचलीं गेलीं, त्या काळाचेंहि अवधान ठेवलें पाहिजे.

भारतीय संस्कृतींत देव आणि मानव परस्परसंबद्ध आहेत. मनुष्य यज्ञांत देवांसाठी आहुति देतो व देव प्रसन्न होऊन मानवाचें ईप्सित पुरें करतात. इंद्र व अश्विनविषयक आख्यानें हीं याचीं द्योतक आहेत. यजमानाने दिलेल्या सोमरसाचें पान करून इंद्र संतुष्ट होतो व त्याची कामना पुरी करतो. अवर्षणाचा दैत्य वृत्र याला इंद्र आपल्या वज्राने ठार करतो व नद्यांचे अडवलेले प्रवाह मोकळे करतो.

प्रत्येक आख्यानाच्या मुळाशीं एखादें बोधक तत्त्व आढळतें. अपाला आत्रेयीच्या आख्यानावरून स्त्रीचरित्राची उदात्तता व तेजस्विता यांचें सम्यक् दर्शन घडतें. राजा त्र्यरुण, वैवृष्ण व वृशजान यांचें आख्यान वैदिककालीन पुरोहिताचें श्रेष्ठत्व सांगणारें आहे. श्यावाश्व आत्रेयाची कथा ऋषीचें श्रेष्ठत्व, प्रेमाचा महिमा व कवीची साधना, यांचें सुंदर दर्शन घडविते. ऋग्वेद युगांतील ही प्रख्यात प्रेमकथा आहे. वैयक्तिक क्षुद्र स्वार्थाला मागे सारून राष्ट्राच्या उन्नतीसाठी वेळींप्रसंगीं प्राणार्पणहि करण्याचा संदेश दध्यङ् आथर्वणाच्या आख्यानांतून मिळतो. पुराणांत याच ऋषीला दधीचि असें म्हटलेलें आहे. या सर्व आख्यानांच्या मुळाशीं ईश्वरावरील असीम श्रद्धा व मानवावरील प्रेम दिसून येतें. कांही आख्यानांत कांही ऋषींचें अनैतिक आचरणहि रेखाटलेलें दिसेल. परंतु तसें न घडावें, हें दर्शविण्यासाठीच हीं आख्यानें लिहिलेलीं आहेत.

हीं वैदिक आख्यानें पुराणांत बरींचशीं विकृत झालीं आहेत. त्या काळच्या बदललेल्या सामाजिक व धार्मिक परिस्थितीला अनुसरून कांही वेळां तीं मुळाशीं विरोधीहि बनलेलीं आहेत.

हीं सर्व वैदिक-पौराणिक आख्यानें पवित्र मानलीं जात. म्हणूनच श्राद्धाच्या प्रसंगीं तीं ब्राह्मणांना ऐकवावीं, असें मनु सांगतो (३. २३२).

आख्यानाचे अन्वाख्यान व अनुव्याख्यान असे पोटभेद आहेत. अन्वाख्यान म्हणजे आख्यानाला अनुसरणारें पूरक निवेदन. अनुव्याख्यान म्हणजे मंत्राचें विवरण किंवा अर्थवाद होय. [हिं. सा. को.; हिं. वि. को.]

आख्यायिका प्रारंभींच्या वैदिक वाङ्मयांत हा शब्द आढळत नाही. तैतिरीय आरण्यकांत एकदाच तो येतो (१. ६. ३); पण तिथेहि तो नेमक्या कुठल्या अर्थानें वापरला आहे, तें नीटसें समजत नाही.

महाभारतापासून मात्र हा शब्द कथा या अर्थीं रूढ झाला. राज्यकर्त्यांच्या वंशाची गद्य रूपाने प्रशंसा करणें, तसेंच कन्याहरण, संग्राम, विप्रलंभ इ. प्रसंग उच्छ्वास, परिच्छेद यांनी विभागून विस्तारपूर्वक सांगणें, म्हणजे आख्यायिका होय, असें अग्निपुराणांत सांगितलें आहे. संस्कृत गद्यकाव्याचे आख्यायिका आणि कथा असे दोन प्रकार मानलेले आहेत. 'आख्यायिकोपलब्धार्था' = ज्ञात किंवा सत्य विषयाचें प्रतिपादन करणारी ती आख्यायिका होय (अमर). उदा० हर्षचरित. काल्पनिक विषय रंगविणारी ती कथा होय० उदा. बाणभट्टाची कादंबरी.

आख्यायिका कथावत् स्यात् कवेर्वंशादिकीर्तनम् ।
अस्यामन्यकवीनां च वृत्तं पद्यं क्वचित् क्वचित् ॥
(सा. द.)

अर्थ — आख्यायिका कथेसारखीच असून तिच्यांत कवीच्या

वंशादिकांचें वर्णन असतें. क्वचित् इतर कवींच्या वृत्तांतांचा आणि क्वचित् त्यांच्या पद्यांचाहि समावेश असतो. [हिं. सा. को.; लो. सा. रू.]

आगतपतिका नायिकाभेद. हा हिंदी कवींनी मानलेला भेद आहे. आपल्या पतीच्या आगमनाने हर्षित होते ती, आगतपतिका होय. हिचेहि पुन्हा मुग्धा, मध्या, आणि प्रौढा असे भेद आहेतच.
मुग्धा आपल्या मनाचा उल्लास व्यक्त करतांना लाजते. मध्या लज्जा-प्रेमांचा आवेग दाखविते. प्रौढेचा भाव निस्संकोच असतो. परकीया आगतपतिका प्रियमीलनासाठी अत्यंत उत्सुक असते, तर सामान्या त्या उत्सुकतेंतहि प्रियकराने आपल्यासाठी काय आणलें आहे, त्याकडे लक्ष देते. रीतिकालीन हिंदी काव्यांत हिचें विविध प्रकारें चित्रण केलेलें आहे. [हिं. सा. को.]



आगतपतिका – एक प्राचीन चित्र

आगम याची व्याख्या पुढीलप्रमाणे – 'आगच्छन्ति बुद्धिमारोहन्ति यस्माद् अभ्युदयनिःश्रेयसोपायाः स आगमः' = अभ्युदय व निःश्रेयस यांचे उपाय ज्याच्यामुळे बुद्धीवर आरूढ होतात, तो आगम होय (तत्त्ववैशारदी १०७).

वाराही तंत्रांत आगमांचें स्वरूप पुढीलप्रमाणे सांगितलें आहे –

सृष्टिश्च प्रलयश्चैव देवतानां यथार्चनम् ।
साधनं चैव सर्वेषां पुरश्चरणमेव च ।।
षट्कर्म साधनं चैव ध्यानयोगश्चतुर्विधः ।
सप्तभिर्लक्षणैर्युक्तमागमं तद् विदुर्बुधाः ।।

अर्थ – सृष्टि, प्रलय, देवतार्चन, सर्वसाधन, पुरश्चरण, षट्कर्म साधन (शांति, वशीकरण, स्तंभन, विद्वेषण, उच्चाटण व मारण) व चतुर्विध ध्यानयोग या सात लक्षणांनी युक्त असलेल्या ग्रंथांना जाणते लोक आगम म्हणतात.

आगमाचे वैदिक व अवैदिक असे दोन प्रकार आहेत. बौद्धादि आगम हे अवैदिक असून वेद, इतिहासपुराणें व तंत्रें हे वैदिक आगम होत. वेदांना निगम हें दुसरें नांव आहे, त्याचप्रमाणे तंत्रांना आगम ही अन्य संज्ञा आहे. शैव, शाक्त व वैष्णव असे आगमाचे तीन भेद आहेत. त्यांपैकी शैवागमाचे पुन्हा कापालिक, कालामुख, पाशुपत व शैव असे चार प्रकार आहेत. यांतील शेवटच्या शैवागमाचे काश्मीर व शैवसिद्धान्त असे दोन पोटभेद आहेत. सर्व शैवागमांत शंकराचें परमश्रेष्ठत्व व त्याचें पूजाविधान प्रामुख्याने वर्णिलेलें असतें. काश्मीर आगमांचा उत्तर भारतांत विशेष व दक्षिण भारतांत तुरळक प्रचार आहे. शैव सिद्धान्तांचा मात्र फक्त दक्षिण भारतांतच प्रसार आहे.

शाक्तागमांचे दक्षिणाचार व वामाचार असे दोन भेद आहेत. दक्षिणाचार प्रायः वैदिकधर्मानुसारी असून वामाचार वैदिक मार्गापासून च्युत आहे. या दोन्ही शाक्तागमांत शक्तीला श्रेष्ठत्व देऊन तिची उपासना सांगितली आहे.

वैष्णवागमांचे वैखानस व पांचरात्र असे दोन भेद आहेत.

निरनिराळ्या तंत्रांवर निष्ठा असलेले लोकच शैव व शाक्त आगमांना प्रमाण मानतात. बादरायणाने शारीरकशास्त्राच्या पाशुपताधिकरणांत 'पत्युरसामञ्जास्यात्' (२·२·३५) या सूत्राने शैवागम हे श्रुतिविरोधी असल्याने अप्रमाण होत, असें म्हटलें आहे. तुल्य न्यायाने शाक्तागमहि अप्रमाण ठरतात. वैष्णवागम मात्र प्रमाण मानलेले आहेत.

परंपरेनुसार आगम अठ्ठावीस व उपागम एकशें आठ मानलेले आहेत. हे सर्व आगम व उपागम अद्यापि उपलब्ध झालेले नाहीत. प्रमुख अठ्ठावीस आगमांचीं नांवें पुढीलप्रमाणे–

शैव– कामिक, योजक, चिंत्य, कारण, अजित, दीप्त, सूक्ष्म, सहस्र, अंशुमान व सुप्रभ किंवा सुप्रभेद.

रौद्रिक – विजय, निश्वास, स्वायंभुव, आग्नेयक, भद्र, रौरव, मकुट, विमल, चंद्रहास (चंद्रज्ञान), मुखयुग्बिंब, (मुखबिंब), उद्गीत (प्रोद्गीत), ललित, सिद्ध, संतान, नारसिंह (सर्वोक्त किंवा सर्वोत्तर), परमेश्वर, किरण व पर (वातुल).

प्रत्येक आगमाचे स्वतंत्र उपागमहि आहेत.

आगमग्रंथ केव्हा तयार झाले, याबद्दल आगमान्तशैव पंथांत एक परंपरागत कथा आहे– गोदावरी नदीच्या कांठीं मंत्रकाली या ठिकाणीं शैवांचें वास्तव्य होतें. गांवांतील मंत्रकालेश्वराच्या देवळाभोवती शैवांचे चार मठ होते. एकदा राजेंद्र चोल उत्तरेकडे दिग्विजयार्थ गेला असतां, त्याला हे शैव भेटले. राजाने त्यांना आपल्या राज्यांत येऊन राहण्याविषयीं

विनंती केली. तिला मान देऊन शैव लोक तोंडैमंडल व चोलमंडल येथे जाऊन राहिले. त्या ठिकाणीं शैव पंथाच्या प्रसाराला उत्तेजन मिळालें व याच कालांत आगमग्रंथांची रचना झाली.

ख्रिस्तपूर्व सुमारें दुसरें शतक हा आगमग्रंथांचा काल मानतात. **पाहा**–शैवसिद्धान्त, शैवदर्शन, तंत्र, [लक्ष्मीतंत्र; रि. इं.; प्र. वि.]

आगमान्त शैव अर्थात शुद्ध शैव संप्रदाय. हा दक्षिण भारतांत प्रचलित असून शैवागमांवर आधारित आहे. शैव आगमांची संख्या २८ असून ते साक्षात् शिवप्रणीत आहेत, असें हे लोक मानतात. पति (शिव), पशु (जीव) व पाश (मल, कर्म, माया किंवा रोध शक्ति) या तीन पदार्थांवर त्यांचें दर्शन उभारलें आहे. शैवागम हे स्त्रिया, शूद्र व प्रतिलोम प्रजा यांच्यासह सर्व शिव भक्तांना पठन करतां येतात व 'नमः शिवाय' हा मंत्रहि सर्वांना जपतां येतो, असें यांचें मत आहे.

या पंथाच्या तत्त्वांचा अर्थ सांकेतिक पद्धतीने सुचविणाऱ्या कांही शिवमूर्ति दक्षिणेंत निर्माण झाल्या असून त्यांचीं नांवें सदाशिवमूर्ति, महासदाशिवमूर्ति व महेशमूर्ति अशीं आहेत. सदाशिवमूर्ति पंचमुख व दशभुज असून पद्मासनावर बसलेली आहे. हीं पंचमुखें सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान या शिवरूपांचीं प्रतिनिधि आहेत. शैवागमांना धरूनच घडविलेली एक मूर्ति परळ येथे सांपडली असून तिच्या एका पूर्णाकृतींतून सहा अर्धाकृति उगम पावल्या आहेत. या अर्धाकृति षडक्षर (ॐ नमः शिवाय) मंत्रांतल्या वर्णांचीं प्रतीकें असाव्या. **पाहा**–शैवदर्शन, काश्मिरीय शैवदर्शन. [डे. हिं. इ.]

आगरकर गोपाळ गणेश (१८५६–१८९५ इ. स.) महाराष्ट्रांतील एक ध्येयवादी समाजसुधारक. सातारा जिल्ह्यांतील टेंभू गांवीं यांचा जन्म झाला. घरची गरिबी असल्याकारणाने यांना शिक्षणासाठी अत्यंत कष्ट सोसावे लागले. अकोल्याच्या हायस्कूलमधून ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. १८७८ सालीं ते बी. ए. झाले व १८७९ मध्यें फेलो होऊन एम्. ए. चा अभ्यास करूं लागले. याच वर्षी लो. टिळकांशीं त्यांचा स्नेह जडला. एम्. ए. झाल्यावर मोठ्या पगाराच्या नोकरीची आशा न धरतां त्यांनी चिपळूणकरांनी काढलेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी पत्करली. १८८१ सालीं न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनी 'केसरी' व 'मराठा' हीं दोन वृत्तपत्रें सुरू केलीं. त्यांपैकी केसरीचें संपादन आगरकरांकडे व मराठ्याचें टिळकांकडे आलें. पण केसरी सुरू होऊन वर्ष होतें न होतें, तोंच कोल्हापूरच्या बर्वेप्रकरणांत टिळक व आगरकर यांना एकशें एक दिवस कारावासाची शिक्षा झाली. टिळक व आगरकर यांचे सामाजिक सुधारणेच्या अग्रमानाबद्दल मतभेद होतेच. डोंगरीच्या तुरुंगांतून बाहेर पडल्यावर यापुढे केसरींतून आपल्या मतांचा हिरीरीने पुरस्कार करणें आपल्याला जमणार नाही, याबद्दल आगरकरांची खात्री पटली व त्यांनी केसरीशीं असलेला आपला संबंध तोडून सुधारक नांवाचें नवीन वृत्तपत्र सुरू केलें. लोककल्याणाच्या तळमळीने प्रेरित होऊन त्यांनी अनिष्ट सामाजिक रूढींवर कठोर प्रहार करायला सुरुवात केली, तेव्हा सनातनी लोक त्यांच्यावर अतिशय खवळले. 'आम्ही तुम्हांला सळो की पळो करून सोडूं' अशी त्यांनी आगकरांना धमकी दिली. इतकेंच नव्हे; तर 'यापुढे लेखणी न आवराल तर प्राणाला मुकाल' अशीं खुनाच्या धमकावणीचीं पत्रेंहि त्यांना येऊं लागलीं. कांही लोकांनी तर त्यांच्या जिवंतपणीं त्यांची प्रेतयात्रा काढली. त्यांच्या पत्नीचाहि त्यांनी छळ करायला कमी केलें नाही. पण स्वार्थाची यत्किंचित्हि तमा न बाळगतां केवळ परहितैक दृष्टीने त्यांनी समाजसुधारणेचा प्रयत्न चालूच ठेवला. आगरकर एकीकडे सुधारक पत्र चालवीत होते तर दुसरीकडे शिकविण्याचें कामहि करीत होते. अध्यापन क्षेत्रांत त्यांची उत्तरोत्तर बढती होत गेली. तें पुढे न्यू इंग्लिश स्कूलचे सुपरिंटेंडेंट झाले. नंतर फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापक झाले व १८९२ सालीं प्रा. वामन शिवराम आपटे मृत्यु पावल्यावर त्याच कॉलेजचे प्रिन्सिपॉलहि झाले. या सर्व धकाधकींत त्यांची शरीर प्रकृति मात्र बिघडली. १८९० पासून त्यांचा दम्याचा विकार बळावला व शेवटीं १८९५ सालीं त्याच विकाराने त्यांचा अंत झाला.



आगरकर.

डोंगरीच्या तुरुंगांतील एकशें एक दिवस, विकारविलसित हें हॅम्लेटचें रूपांतर, वाक्यमीमांसा हा व्याकरणविषयक ग्रंथ, केसरींतील निवडक निबंध, विविधविषयसंग्रह व निबंधसंग्रह (सुधारकांतील) एवढें त्यांचें साहित्य उपलब्ध आहे. आगरकरांच्या निबंधांच्या विषयांचें स्थूल मानाने पुढील चार भा

पडतात–(१) व्यक्तीचें नैमित्तिक आचरण, (२) सामाजिक इतिहास, (३) नैमित्तिक पक्षभेद व (४) स्त्रियांची उन्नति. सुधारकांतील त्यांच्या सर्व निबंधांचें मूलभूत तत्त्व म्हणजे प्रखर बुद्धिवाद ! असा निखळ बुद्धिवाद आगरकरांनीच प्रथम महाराष्ट्राला शिकविला. या बुद्धिवादानेच त्यांना अज्ञेयवादी बनविलें. व्यक्तिस्वातंत्र्य हें आगरकरांच्या विचारसरणीचें दुसरें वैशिष्टय होय. आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या पुरस्काराचा हेतु त्यांनी पुढील शब्दांत दिला आहे––समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत, तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल, तितका घ्यावयाचा हें अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे व हें ज्यांच्या अंतःकरणांत बिंबलें असेल त्यांना आमच्या समाजव्यवस्थेंतील अनेक दोषस्थळें दिसणार आहेत, हें उघड आहे. हीं दोषस्थळें वारंवार लोकांच्या नजरेस आणावीं, तीं दूर करण्याचे उपाय योजावे आणि युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखें काय आहे, तें पुनःपुनः दाखवावें, यास्तव हें सुधारक पत्र काढलें आहे.’

मानवाचें ऐहिक सुखवर्धन हें आगरकरांच्या जीवननिष्ठेचें तिसरें मूलभूत तत्त्व आहे. ‘सुधारणा आणि कलह’ या निबंधांत त्यांनी लिहिलें आहे– ‘मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन या भावी सार्वत्रिक धर्माची ज्यांनी दीक्षा घेतली असेल, त्यांनी कोणास न भितां जें शुद्ध, प्रशस्त, कल्याणप्रद वाटत असेल तें दुसऱ्यास सांगावें आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें, हेंच त्यांस उचित आहे.’

आजच्या समाजहिताला उपकारक असा जो अंश भारतीय आचार-विचारांत असेल, तो पाश्चात्य विद्येच्या स्वीकारानंतरहि टिकून राहील; पण जें कांही सदोष व अहितकारक आहे, तें सर्व पाश्चात्य ज्ञानकुंडांत जळून खाक होणार, असें आगरकरांचें मत होतें. तर्ककर्कश विवेचन, बिनतोड युक्तिवाद, निर्भीड स्पष्टवक्तेपणा व प्रखर ध्येयवाद या त्यांच्या गुणांमुळे तत्कालीन समाजाचा त्यांच्यावर रोष झाला असला, तरी पुढील पिढींतील लोकांच्या मनांत मात्र त्यांनी आदराचें स्थान मिळविलें आहे.

‘इष्ट असेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार’ हा आगरकरांचा महामंत्र होता. [म. ज्ञा. को.; अ. म. वा. इ.]

आगरतारा बंगालमधील आगरतारा नामक देवीचें स्थान. तिरहूत जिल्ह्यांतील बाणगांव नांवाच्या खेडचांत हें स्थान आहे. देवीपुराणांत या देवतेची महती वर्णिली आहे. नवरात्रांत या देवीची जत्रा भरते. [स. भा. प्र. व.]

आगरद्वीप बंगालमधील नदिया जिल्ह्यांतील भागीरथींत हें बेट आहे. तिथे गोपीनाथनामक श्रीकृष्णाचें मंदिर फार जुन्या काळापासून प्रसिद्ध आहे. श्रीचैतन्याचे शिष्य घोसठाकूर यांनी या गोपीनाथाची इथे स्थापना केली. या देवाच्या उत्सवाप्रीत्यर्थ दर वर्षी वसंतदोलोत्सवानंतर मोठी यात्रा भरते. [स. भा. प्र. व.]

आगरी एक जात. आगर म्हणजे माड-पोफळींची बाग किंवा मीठ पिकविण्याची जागा. त्यावरून आगरी लोकांना खारकी, खारपाटे किंवा आगळे कुणबी अशींहि नांवें आहेत. शुद्ध आगरी, दास आगरी व वरप आगरी असे या जातीचे पोटभेद आहेत.

शुद्ध आगरी जातीच्या मीठआगरी, जसआगरी व ढोलआगरी अशा तीन शाखा आहेत. स्वतःला ढोलआगरी म्हणविणारे कोणीहि लोक हल्ली सांपडत नाहीत, असें श्री. काळे लिहितात. वरील सर्व आगरी स्वतःला मीठआगरी किंवा आगरी असें म्हणवून घेतात. दासआगरी मुख्यतः पालघर तालुका व अलिबाग तालुका यांत आढळतात. तिथे यांना कराडआगरी असें म्हणतात. वास्तविक, ही एक निराळीच जमात असून हे लोक मीठआगरी लोकांबरोबर रोटीबेटीव्यवहार करीत नाहीत. यांच्या उत्पत्तीसंबंधीं पुढील दंतकथा सांगतात –


आगरी पुरुष

एका आगरी स्त्रीचीं मुलें जगत नव्हतीं. म्हणून तिने महारांच्या देवाला नवस केला, की माझें मूल जगलें, तर मी डोक्यावर गायीचें हाड व कानावर लोकरीचें फूल खोवून महारवाडचांत प्रवेश करीन. या नवसानंतर तिचें मूल जगलें. तिने आपला नवस बोलल्याप्रमाणे फेडला. या धर्मबाह्य कृत्याबद्दल लोकांनी तिला जातिबहिष्कृत केलें. दासआगरी हे तिचेच वंशज होत.

वरपआगरी लोकांनी प्रथम ख्रिश्चन धर्म स्वीकारला व नंतर पुन्हा ते हिंदु धर्मात आले. त्यांना मग नवे मराठे असें नांव मिळालें. मीठआगरी त्यामुळेच यांना हलके मानतात.

आगरी लोकांच्या पूर्वजांची परंपरागत माहिती मिळते, ती अशी —— आगरी लोक रावणाचे गायक-वादक होते. या कामगिरीबद्दल बक्षीस म्हणून रावणाने त्यांना पश्चिम किनाऱ्यावरील जमीन दिली. त्यांचे वंशज म्हणजे हल्लींचे आगरी होत. ढोल वाजविण्याच्या धंद्यावरून पडलेलें ढोल-आगरी हें नांव या परंपरेचें सूचक आहे. अजूनहि बरेच आगरी गायक-वादकाचा धंदा करतात.

इतिहास —— आगरी मंडळी आपल्या जातीचा इतिहास सांगतात, तो असा —— सुमारें ६०० वर्षांपूर्वी अलिबाग तालुक्यांत चौल, आवाससासवणें आणि सागरगड या ठिकाणीं तीन लहान राज्यें होतीं. चौल व आवास येथें हिंदु राज्यें होतीं. सागरगडावर मात्र दिल्लीच्या बादशहाच्या वतीने एक मुसलमान सरदार राहत होता. व तो दोन्ही हिंदु राजांकडून करभार वसूल करून दिल्लीला पाठवीत होता. पुढे सागरगडावरील तो सरदार बलिष्ठ होऊन दिल्लीच्या बादशहाला जुमानीनासा झाला. म्हणून बादशहाने त्याच्या पारिपत्याकरिता एका सरदाराला पाठविलें. परंतु तो पराभूत होऊन दिल्लीला परत गेला. बादशहाने मग दुसरा सरदार पाठविला व मुंगीपैठणच्या बिंब राजाला त्याला मदत करण्यास विनविलें. त्याप्रमाणें दोघांनीं मिळून गडावरच्या सरदाराला पकडून दिल्लीला पाठविलें. बिंब राजा मग मुंगीपैठणला न जातां सागरगडावरच राहूं लागला. शेजारचीं दोन्ही हिंदु राज्यें त्याने जिंकलीं. नंतरच्या शांततेच्या काळांत त्याच्या जवळच्या मोठ्या सैन्याची त्याला गरज नव्हती; म्हणून पुरेसें सैन्य जवळ ठेवून बाकीच्यांना त्याने मिठागरें बांधून दिलीं व जरूर त्या ठिकाणीं गांवठाणें वसवून तिथे त्यांची वसाहत केली.

पुढे हळूहळू मिठागरें व वसाहती वाढत जाऊन आगरी लोकांची वस्ती कुलाबा जिल्ह्यांतील अलिबाग, पेण, पनवेल, कर्जत, रोहें, जंजिरा व ठाणें इथवर पसरत गेलीं. मात्र ही वस्ती समुद्रकिनाऱ्यावर जिथे खारटाणाचा भाग आहे, तिथे व त्याच्या लगतच्या प्रदेशांतच आहे. याप्रमाणे हातीं आलेला मीठ पिकविण्याचा धंदा या जातीने पिढ्यान्‌पिढ्या चालू ठेवला.

ग्रामरचना —— हल्ली ठाणें जिल्ह्यांतील पालघरपासून तों कुलाबा जिल्ह्यांतील श्रीवर्धनपर्यंत समुद्रकिनाऱ्यावर आगरी लोकांचीच वस्ती आहे. आगरी खेड्यांचें वैशिष्टच असें, की त्यांत फक्त आगरी लोकांचीच वस्ती असते. इतर जातीचा माणूस त्या खेड्यांत औषधालासुद्धा सांपडणार नाही.

भातशेतांच्या मध्यभागीं उंचवटा असेल तिथे आगरी खेडें वसलेलें असतें. सर्वसाधारणपणे एका खेड्यांत पन्नास ते साठ घरें असतात. मोठ्या खेड्याचे पाडे नांवाचे लहान भाग पाडलेले असतात व एका पाड्यांत एकाच आडनांवाचीं २५ ते ४० कुटुंबें राहतात. या खेड्यांत बहुधा पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ असतो. गांवांत एक देऊळ असतें. तिथे पंचायतीची सभा होते. कांही खेड्यांत पीरहि आढळतो. प्रत्येक घर व घरापुढचें अंगण शेणाने सारवून स्वच्छ केलेलें असतें; परंतु एकंदरींत खेडें घाणेरडेंच असतें. त्यामुळे एखादी रोगाची साथ आल्यास तिचा त्वरित फैलाव होतो.


आगरी स्त्री

आगरी लोकांचीं घरें चौकोनी असतात. पुढे उघडी ओटी, नंतर एक मधली खोली, तिच्या एका बाजूला स्वयंपाकघर अन् दुसऱ्या बाजूला कोठीची खोली, अशी घराची रचना असते. घराच्या भिंती मातीच्या असून वर गवताचें छप्पर असतें. आपल्या शेतांत मिळणारें हें साहित्य घेऊनच आगरी माणूस स्वतःचें घर बांधतो.

आगरी लोक वर्णाने काळे असून मजबूत बांध्याचे असतात. एक धोतर, एक किंवा दोन सदरे, एक कबजा व खांद्यावर एक घोंगडी एवढेच त्यांचे कपडे असतात. शेकडा नव्वद पुरुषांना ताडीचें वा गांवठी दारूचें व्यसन असतें. आजमितीस या व्यसनाचा दुष्परिणाम त्यांच्या शरीरावर दिसूं लागलेला आहे.

आगरी स्त्री सात किंवा आठ वारी लुगडें गुडघ्यापर्यंत लांब व अंगाबरोबर चापून चोपून नेसते. हल्लीच ती चोळी घालूं लागली आहे. घरांतलीं सर्व कामें ती करतेच; शिवाय हंगामाच्या दिवसांत शेतांतहि काम करते. १४ ते १८ या वयांत तिचें लग्न होतें. हल्ली कांही मुली प्राथमिक शाळेंत शिकूं लागल्या आहेत.

भात, भाकरी, मासे, हें आगरी लोकांचें मुख्य अन्न आहे. गणेशचतुर्थी, गौरी, दिवाळी, होळी या सणांना ते मोदक, वडे, पुरणपोळी इ. पक्वान्नें करतात.

हे लोक जी भाषा बोलतात, तिला 'आगरी' असें नांव आहे. ती मराठीचीच एक बोली आहे.

आगरी लोकांची भातशेती सर्वस्वीं पावसावर अवलंबून असते. त्यामुळे, अवर्षण पडल्यास ते पावशी देवीचा उत्सव करतात. शंकराच्या देवळांत एका कोपऱ्यांत पावशी देवीची एक मोठी दगडी मूर्ति स्थापलेली असते. ती मूर्ति बाहेर काढून एका पालखींत ठेवतात व वाजतगाजत गांवांतल्या तळ्यापर्यंत मिरवीत नेतात. मग गांवचा पुढारी ती मूर्ति तळ्यांत एका जागीं बुडवून ठेवतो. पाऊस सुरू झाला, की मग तिला पुन्हा देवळांत आणतात.

आगरींचा भुतांखेतांवर विश्वास आहे. एखाद्याला भुताने पछाडलें असें वाटलें, की भगत व मांत्रिक त्यावर इलाज करण्यासाठी येतात.

आगरी लोक मूल जन्माला आल्यावर तिसऱ्या, पांचव्या, सहाव्या व बाराव्या दिवशीं सटीची पूजा व अन्य संस्कार करतात.

विवाहप्रथा —– मार्गशीर्ष ते वैशाख या महिन्यांत आगरी लोक लग्नें करतात. कारण या दिवसांत नवीन पिकें तयार झालेलीं असतात व त्यांच्या धान्याच्या कणग्या भरलेल्या असतात. मुलाचें लग्न १८ ते २५ या वयांत होतें. देजाची पद्धत आहे. साखरपुड्याने लग्नविधीस प्रारंभ होतो. लग्नसोहळा एकंदर पांच दिवस चालतो व एकामागून एक असे चाळीस विधी त्यांत असतात. हे विधी धवलारीणीच्या देखरेखीखाली चालतात. धवलारीण म्हणजे स्त्री पुरोहित होय. प्रत्येक विधीच्या वेळीं ती त्या विधीचें गाणें म्हणते. त्या गाण्यांना धवळे असें नांव आहे. लग्नाच्या स्वयंपाकासाठी लाकडें तोडून आणणें, मसाला कुटणें, भात भरडणें, तांदूळ दळणें, मंडप उभारणें, हीं सर्व कामें आसपासच्या स्त्रीपुरुषांच्या साहाय्याने करतात.

मंडपदेवता स्थापणें व माळ घालायला लावणें हे दोनच विधी ब्राह्मण पुरोहित करतो. बाकीचें सर्व धवलारीण चालविते. तेलवण, गौरन्हाणे, उष्टावळ (घास देणें), सोयरीं समजावणें, तोंड धुणें, सुपारी लपविणें, विड्या तोडणें, गोंधळ घालणें इ. विधी आगरी लोक साग्रसंगीत करतात. जातिबाहेर लग्न केल्यास त्याला बहिष्कृत व्हावें लागतें.

विधवेला विधुराशीं पाट लावण्याची मुभा आहे. पण अलिकडे त्यांच्यांतल्या विधवा एकाकी जीवन घालविणें अधिक पसंत करतात. कारण नवऱ्याबाबतचा त्यांचा अनुभव विशेषसा चांगला नसतो व पुन्हा त्या त्रासांत पडण्याची त्यांची इच्छा नसते.

आगरी लोकांत लग्न ही एक फार खर्चाची बाब आहे. कितीहि गरीब माणूस असला तरी तो कर्ज काढून लग्नसमारंभाचा थाट करतो. यांच्यांत घटस्फोटाची चाल आहे.

समाजव्यवस्था – आगरी लोकांच्या ग्रामपंचायती असून व्यक्तीच्या व समूहाच्या सामाजिक आचाराचे नियम त्या ठरवून देतात. त्याविरुद्ध वर्तन करणाऱ्याला लगेच समज दिली जाते किंवा त्याला दंडहि केला जातो. कांही गांवें मिळून एक टप्पा होतो व त्यावर एक सरपंच किंवा मुकादम असतो. तो बहुधा वंशपरंपरा अधिकारी असतो. त्याच्या अधिकारांतील प्रत्येक गांवाच्या देखरेखीसाठी तो कांही पंच नेमतो. सर्वसाधारणपणे पंच हा वयोवृद्ध, अनुभवी व व्यवहारी असतो. ग्रामपंचायतीचा निकाल मान्य नसल्यास सरपंचाकडे जातां येतें. त्याचा निकाल निर्णायक असतो. टप्प्याबाहेरच्या प्रदेशावर सरपंचाचा अधिकार चालत नाही.

देवधर्म – आगरी लोक खंडोबा, बहिरी, भवानी, म्हसोबा, पीरसाहेब इ. देवतांना भजतात. शिकलेल्या आगरी कुटुंबांत मात्र यांची जागा राम, विष्णु, गणपति या श्रेष्ठ दैवतांनी घेतलेली आहे. ग्रामदेवतेला बोकड बळी देतात.

नाचगाणें, कुस्ती खेळणें, बैलगाड्यांच्या शर्यती लावणें, भजन करणें हीं आगरी लोकांचीं करमणुकीची साधनें होत. गणेशचतुर्थी व शिमगा या दोन सणांना पुरुष नाचतात व गातात. स्त्रियाहि गौरीच्या व शिमग्याच्या दिवसांत एकत्र जमून गाणीं गातात व नाचतात. त्यांच्या गौरीच्या गाण्याचा एक नमुना पुढीलप्रमाणे–

येकच पाय हालवतय । आपले घोला बोलवतंय
आपला घो लाडका । ओटींत घेतल्या खारका
खारका लागल्या गोड । जिभला आले फोड
जिभच फोड फुटं नाय । दारचा पावना उठं नाय

कांही आगरी मीठ पिकविणें व भातशेती करणें यांबरोबरच गुलाब, नेवाळी, ॲस्टर, गुलछडी इ. फुलांच्या बागा व तोंडलीं घेवडा, पपई, आंबा इ. फळझाडांची लागवड करतात. [आगरी–सोशियो–इकॉनॉमिक सर्व्हे]

आगाखान (१८००–१८८१ इ. स.) हसनअल्ली शाहा. हा इराणांतून मुंबईस ब्रिटिश राज्याच्या आश्रयाला आला. मुहंमदाचा जावई अली हा त्याचा पूर्वज होता, असें मानतात. अलीचा मुलगा हुसेन याने इराणच्या एका राजकन्येशीं लग्न केलें होतें. तेव्हा अर्थातच आगाखानाने आपला संबंध इतिहासपूर्वकाळांतील इराणच्या राजघराण्याशीं जोडला. शिवाय याच्या पूर्वजांनी ख्रिस्ती धर्मयुद्ध चालू असतां

वेनिफतिमी लोकांचे खलिफा म्हणून अनेक वर्षे इजिप्तमध्ये राज्य केलें होतें. इराण सोडण्यापूर्वी बादशाह फ़त्तेअलीशाहाने आगाखानाला कर्मान या मोठ्या महत्त्वाच्या प्रांताचा सुभेदार नेमिलें होतें. याची तेथील कारकीर्द चिकाटी, नियमितपणा आणि उच्च राजकीय धोरण, या दृष्टींनी वाखाणण्याजोगी झाली. याच्या प्रतिस्पर्ध्यांनी व शाहाच्या मर्जीतल्या लोकांनी आंतून कारस्थानें करून देशांत अंतःक्षोभ उत्पन्न केला होता; तरी पुष्कळ दिवसपर्यंत याने शाहाचा स्नेह व प्रीति संपादन केली होती. सरतेशेवटी याच्यावरची शाहाची मर्जी उतरून स्वसंरक्षणासाठी त्याला ब्रिटिश राज्यात पळून जावें लागलें. आपल्या वास्तव्यासाठी त्याने हिंदुस्थान पसंत करून मुंबईला आपलें ठाणें मांडलें. त्या वेळीं पहिलें अफगाणयुद्ध जोरांत होतें. तेव्हा इराणहून अफगाणिस्थान मार्गें इकडे येतांना ब्रिटिश सैन्याला उत्तम प्रकारची मदत करण्यास याला आयतीच संधि मिळाली. नंतर कांही वर्षांनी सिंधच्या मोहिमेंत हा असाच ब्रिटिशांच्या उपयोगी पडला. सरहद्दीवरच्या जमातींतील अनेकांचा हा गुरु असल्याने नेपियरने त्या जमातींचा बंदोबस्त करण्यासाठी आगाखानाचीच नेमणूक केली. या आपल्या मुसलमान स्नेह्याची नेपियर फार वाहवा करी. आगाखानहि ब्रिटिश सरकारशीं निष्ठा दाखवून वागे. हा जेव्हा हिंदुस्थानांत कायम राहूं लागला, तेव्हा सरकारने इस्रायली संप्रदायाचा धर्मगुरु म्हणून याला 'हिज हायनेस' ही पदवी व मोठें पेन्शन दिलें. त्या वेळेपासून मरेपर्यंत (इ. स. १८८१) आगाखानाने ब्रिटिशांच्या छत्राखाली मोठ्या शांततेने काळ कंठिला व आपल्या अनुयायांचीं धर्मकृत्येंहि पार पाडलीं. याची धार्मिक सत्ता मानणारे लोक केवळ भारतांतच नव्हे; तर अफगाणिस्तान, खोरासान, इराण, अरबस्तान, मध्यआशिया, सीरिया, मोरोक्को वगैरे देशांतहि आहेत.

याच्या मृत्यूनंतर याचा वडील मुलगा आगाखान (दुसरा) अधिकारावर आला. त्याने आपल्या वडिलांचा कित्ता इतका चांगला गिरविला, की स्थानिक सरकारची त्याच्यावर मर्जी बसून त्याला 'नाइट' ही पदवी मिळाली व मुंबईच्या कायदे कौन्सिलांतहि स्थान मिळालें. [म. च. को.]

आगाखानी पंथ

शमसुद्दीन फकीर नांवाच्या एका साधूने पंजाबांत शमसीमत नांवाचा एक धर्मपंथ चालू केला. त्या धर्मपंथाचे सर आगाखान हे आचार्य होत. अनेक हिंदु व मुसलमान यांनी या धर्मपंथाचा स्वीकार केलेला असून याच्या हिंदु अनुयायांना आगाखानी व मुसलमान अनुयायांना खोजे असें म्हणतात. हे लोक सर आगाखानांना विष्णूचा कलंकी अवतार मानतात. बऱ्याच हिंदूंनी या मताचा स्वीकार केला, त्याचें कारण हेंच आहे.

विष्णूने मुसलमान लोकांत अवतार कां घेतला, याबद्दल शमसीमताच्या धर्मग्रंथांत पुढील कथा आहे-एकदा युधिष्ठिर यज्ञ करीत असतां परमेश्वराने चांडाळाच्या रूपाने तिथे जाऊन त्याचें सत्त्व पाहायचें ठरविलें. ही गोष्ट ऋत्विजांना अंतर्ज्ञानाने समजली होती; पण त्यांनी ती धर्मराजाला सांगितली नाही. चांडाळ यज्ञाजवळ पोचल्यावर धर्मराजाने यज्ञाभोवती एक काळा पडदा उभा केला. पण परमेश्वराच्या तेजाने त्या पडद्याचा रंग पांढरा झाला. त्यावरून धर्मराजाला उमगलें, की हा चांडाळ नसून ईश्वर आहे. मग त्याने ईश्वराची क्षमा मागितली. पण ईश्वर ब्राह्मणांवर रागावला आणि त्याने ब्राह्मणांना सांगितलें, की 'आजवर मीं हिंदूंमध्ये नऊ अवतार घेतले. पण यापुढचा दहावा कलंकी अवतार मी मुसलमानांत घेईन.'

हा दहावा अवतार म्हणजेच सर आगाखान होत, असें ते लोक समजतात. आगाखानाचे ज्येष्ठ वंशजहि अवतारच असतील, अशी शमसीमताच्या अनुयायांची श्रद्धा आहे. विष्णूचा अवतार असल्यामुळे त्यांना 'धनी सलामत दातार' असें म्हणतात.

शमसुद्दीन फकीराने हा पंथ काढला खरा; पण त्याच्या हयातींत त्याचा फारसा प्रसार झाला नाही. पुढे त्याचा नातू सदरुद्दीन याने हा पंथ वाढवायचें ठरविलें व त्यासाठी पुस्तकें बनविण्यास सुरुवात केली. सध्या या पंथाचीं लहानमोठीं चाळीस-पन्नास पुस्तकें आहेत. त्यांतलीं कांही सिंधी भाषेंत असून कांही मिश्र भाषेंत आहेत. कांहींची नांवें पुढीलप्रमाणे— (१) मंगल समाचार (२) सुंदर पुराणी कथा (३) दान-अतिदान (४) धर्मपुस्तकसार (५) गुरुज्ञान (६) जैसी करणी तैसी भरणी (७) गीताकी पोथी इत्यादि.

कांही अवतार प्रसिद्ध, तर कांही गुप्त असतात, असें या पंथाने मानलेलें आहे. दशावतारांबरोबरच मुसलमानी पैगंबरहि हिंदूंनी मानावे, असा प्रयत्न या पंथाच्या पुढाऱ्यांनी केलेला आहे. सकाळीं, संध्याकाळीं व रात्रीं अशी तीन वेळां संध्या करावी, असेंहि शमसीमतांत सांगितलें आहे. अर्थात् ही आज्ञा उघड उघड हिंदूंची दिशाभूल करण्यासाठी आहे.

शमसीमताचे शिष्य या पंथाला 'गुप्तपंथ' किंवा 'गुप्त-मत' आणि स्वतःला 'गुप्ती' असें म्हणतात. आपल्या पंथाचीं तत्त्वें व आचार गुप्त राखणें, हें ते आपलें कर्तव्य समजतात. त्यामुळे त्यांचीं पुस्तकेंहि त्यांच्या शिष्यशाखेंत प्रवेश केल्या-शिवाय मिळत नाहीत. आजवर जरी हा पंथ गुप्त राहिला

असला, तरी आता त्याचा लोकांत प्रचार होऊं लागला आहे. [आ. सं.]

आगुरी एक जात. क्षत्रिय पुरुष आणि शूद्र स्त्री यांची संतति. मनूने या जातीला उग्र म्हटलें आहे. उग्र लोक अतिशय क्रूर होते. झाडांच्या ढोलींत लपून राहणाऱ्या जनावरांना मारणें, हा त्यांचा मुख्य धंदा होता. त्यामुळे या जातीचे लोक आपल्याला उग्रांचे वंशज न मानतां त्यांचे प्रतिनिधि समजतात. कांहीजण आपल्याला शुद्ध क्षत्रिय वंशाचेहि म्हणवितात. यांचे पूर्वज मानसिंगाच्या सैन्यांत अधिकारी होते.

आगू श्रौत कर्मांतला पारिभाषिक शब्द. कोणत्याहि यागांत ज्या देवतेला उद्देशून याज्या पठण केली जाते, त्या आधी त्या देवतेचा उल्लेख होतो. तत्पूर्वी 'ये यजामहे' असा मंत्र म्हणतात. यालाच आगू अशी संज्ञा आहे. याचा क्रम असा– प्रथम अध्वर्यु 'आश्रावय' असा मंत्र म्हणतो. मग आग्नीध्र 'अस्तु श्रौषट्' म्हणतो. नंतर अध्वर्यु 'यज' म्हणतो. नंतर होता 'ये यजामहे' हा मंत्र म्हणजेच आगू पठण करून पुढे याज्या व तिच्या शेवटीं 'वौषट्' असें म्हणतो. असे हे सगळे यागविषयक शब्द आहेत. पुढील श्लोक श्राद्धप्रयोगांत विष्णुप्रीत्यर्थ म्हणतात, त्याचा अर्थ वरील संदर्भाने लागतो––

चतुर्भिश्च चतुर्भिश्च द्वाभ्यां पञ्चभिरेव च।
हूयते च पुनर्द्वाभ्यां स मे विष्णुः प्रसीदतु ॥

अर्थ — चतुर्भिः = आश्रावय व अस्तुश्रौषट् हे शब्द. द्वाभ्याम् = यज हा शब्द. पञ्चभिः = ये यजामहे हे दोन शब्द व शेवटचा द्वाभ्याम् = वौषट् हा शब्द होय. अशा प्रकारें ज्याच्या उद्देशाने हवन केलें जातें, तो विष्णु मला प्रसन्न होवो. [म. ज्ञा. को.]

आगेर कर्नाटकांतील एक जात. देवकांवरून या लोकांत पुष्कळ गोत्रें झालीं आहेत. उदा० कद्दिनबाली, द्यावनबाली, आनेबाली, इत्यादि. द्यावन (कासव) बाली गोत्राचे लोक कासव खात नाहीत; तर आने (हत्ती) बाली गोत्राचे लोक हत्तीला पूज्य मानतात आणि हस्तिदंताचे दागिने अंगावर घालीत नाहीत. इतर गोत्रांचे लोकहि आपल्या देवकप्राण्याचा आदर करतात. या लोकांत सगोत्र विवाह होत नाही. मामेबहिणीशीं लग्न होतें. पण आते व मावस बहिणीशीं होत नाही. मुलीचें लग्न ६ ते १० वर्षांपर्यंत व मुलाचें ६ ते २५ वर्षांपर्यंत पूर्वीं होत असे. बहुपत्नीकत्वाची चाल नाही. नवराबायकोंवर अक्षता टाकणें हा विवाहसमारंभांतील मुख्य भाग असतो. पुनर्विवाहाची चाल आहे; पण प्रथमवराला विधवेशीं लग्न करतां येत नाही. जातींतला पुढारी मनुष्यच उपाध्यायाचें काम करतो. त्याला कोळकाट म्हणतात. कर्नाटकांतील इतर जातींप्रमाणे हे लोक कृष्णाला भजतात. शहाळें ही यांची गृहदेवता आणि हनुमंत ही कुलदेवता होय. दगड, वारुळें वगैरे वस्तूंनाहि हे देवता म्हणून पुजतात. त्यांच्या घरांत देवमूर्ती नसतात.

मीठ तयार करणें हा यांचा मुख्य धंदा होय. यांशिवाय शेतांत काम करणें, ताडाच्या पानांच्या छत्र्या तयार करणें इ. कामेंहि हे करतात.

हे लोक मांसाहारी आहेत. यांची भाषा कानडी आहे. पुरुष किंवा बायका कासोटा घालीत नाहीत. दोघेहि कानांत कुंडलें घालतात. यांच्यांत कुलनामें नसतात. तथापि धंद्यावरून किंवा गांवावरून कांही आडनांवेंहि आलेलीं आहेत.

बुधवंत व गौडा हे दोन अधिकारी जातीच्या प्रश्नांचा विचार करतात. अंकोला येथील वेंकटरामण्णा मंदिराचा मठाधिपति हा त्या लोकांचा धर्मगुरु आहे. अंकोला येथेच या लोकांची मध्यवर्ती संस्था आहे. महत्त्वाच्या खटल्यांचा निकाल ही मध्यवर्ती संस्था देते. जारकर्माबद्दल स्त्रियांना जातीबाहेर टाकतात आणि देवाची सेवा करायला लावतात. [म. ज्ञा. को.]

आगोटा–फागोटा कोंकणांतील एक लोकनृत्य. दोन स्त्रिया समोरासमोर कमरेवर हात ठेवून उभ्या राहतात. आणि नाचत नाचत एकमेकींच्या जवळ येतात, तशाच दूर जातात. नाचतांना जें गाणें म्हणतात, त्यांत एका संत्रस्त स्त्रीचें वर्णन असतें. देशावरहि मंगळागौरीच्या प्रसंगीं मुली हें नृत्य करतात.

आगोम मुंडा आदिवासी बोंगाला नवस बोलतात, त्याची पद्धति. आजारी माणसासाठी नवस असेल, तर घराच्या छपरावर मडकें पालथें घालतात. त्याचा अर्थ माणूस बरा झाला, तर बोकड देऊं असा होतो. बैल देण्याचा नवस असेल, तर बैलाला भात खायला देतात. कोंबड्याचा नवस असेल, तर त्याचें नख किंवा पीस तोडून घेतात. [एन्सा. मुं.]

आग्नावैष्णवीष्टि ज्याला शत्रू असतील अशा यजमानाने पूर्णमासेष्टीला जोडून अग्नाविष्णूसाठी एकादशकपाल पुरोडाश आणि सरस्वती व सरस्वन्त यांच्यासाठी चरु यांचा याग करावा, असें तै. संहितेंत सांगितलें आहे

(२. ५. ४.). या इष्टीचें तंत्र पूर्णमासेष्टीप्रमाणेच आहे. दर्शेष्टीला जोडूनहि ही केल्यास चालेल, असें एक मत आहे. हिला काम्य दर्शपूर्णमास असेंहि म्हणतात. [विद्याधरशास्त्री भिडे]

आग्निवेश गृह्यसूत्र अग्निवेशाने स्थापन केलेली आग्निवेश्य शाखा तैत्तिरीयांच्या वाधूल शाखेची एक पोटशाखा आहे व हें गृह्यसूत्र त्या शाखेचें आहे. यांत वर्णिलेल्या नारायणबलि, यतिसंस्कार, वानप्रस्थविधि, रविकल्प, व्यासबलि इ. विषयांवरून हें सूत्र अलिकडच्या काळांत रचलें गेलें आहे, असें दिसतें. [इं. वे. क. सू.]

आग्निवेश्यायन जातूकर्ण्यापासून सुरू झालेलें एक ब्रह्मकुल. [भाग. पु. ९. २. २२]

आग्नीध्र अध्वर्यूच्या हाताखालचा एक ऋत्विज. अध्वर्यूच्या सगळ्या कामांची याला माहिती असावी लागते. कारण त्यालाच त्या कामाची पूर्वतयारी करायची असते. विविध कर्मांप्रमाणे 'अग्नीद् र्बर्हिः स्तृणाहि', 'अग्नीदग्नीन् विहर', 'अग्नीदग्निं त्रिस्त्रिः संमृड्ढि' इ. अनेक प्रैष त्याला दिले जातात. यांशिवाय, यज्ञाचें रक्षण करणें, हें याचें प्रमुख काम आहे. प्रत्येक यागाच्या पूर्वी अध्वर्यु त्याला 'सर्व ठीक आहे असें सांग' असें म्हणतो. त्यावर हातांत स्फ्य (लाकडी तलवार) घेऊन हा 'सर्व ठीक आहे' असें सांगतो. याला प्रत्याश्रावण असें म्हणतात. दर्शपूर्णमास, पशुयाग, सोमयाग, इ. सर्व यागांत आग्नीध्र असावा लागतो. सोमयागांत याला विशेष महत्त्व असतें. त्याच्यासाठी स्वतंत्र आग्नीध्रीय मंडप असतो. तो याज्या मंत्र म्हणतो. या यागांत त्याला सर्वांच्या आधी दक्षिणा मिळते. ब्रह्मगणांत याचें तिसरें स्थान आहे. [विद्याधरशास्त्री भिडे]

आग्नीध्रीय एक यज्ञीय मंडप. आग्नीध्रीय व मार्जालीय हे दोन मंडप अनुक्रमे महावेदीच्या उत्तरेला व दक्षिणेला घालतात. या मंडपांचा अर्धा भाग महावेदीच्या आंत आणि अर्धा बाहेर असतो. दोन्ही मंडप हमचौरस १२० अंगुलांचे असतात. आग्नीध्रीय मंडपाला दक्षिणेस तोंड करून आणि मार्जालीयाला उत्तरेस तोंड करून एक दार असतें. [म. ज्ञा. को.]

आग्नेय कुबेराचे अनुयायी असलेल्या गंधर्वांचें एक कुल. यांचीं वसतिस्थानें मर्यादा पर्वतांच्या दक्षिण शिखरांवर आहेत. [पु. इं.]

आग्नेयकृच्छ्र एक प्रायश्चित्त. याचें विधान म्हणजे बारा दिवस केवळ तीळ खाऊन राहणें. [हि. ध.]

आग्नेयव्रत तिथिव्रत. कोणत्याहि ९ मीस एकदा हें व्रत करतात. विंध्यवासिनीची पूजा हा या व्रताचा प्रमुख विधि आहे. [हि. ध.]

आग्नेयस्नान स्नानाचा एक प्रकार. अंगाला भस्म लावल्याने हें स्नान होतें. शरीराच्या असमर्थतेमुळे जलस्नान करणें शक्य नसेल, तेव्हा हें स्नान करतात. [हि. ध.]

आग्नेयास्त्र अग्नीचें अस्त्र. भरद्वाजाने अग्निपुत्र अग्निवेश याला हें अस्त्र दिलें आणि त्याने तें द्रोणाला दिलें. असेंच एक अस्त्र और्वाने आपला शिष्य राजा सगर याला दिलें होतें. सगराने त्याच्या मदतीने त्याची पैतृक मालमत्ता बळकावणाऱ्या क्रूर टोळ्यांचा पराभव केला, असें विष्णुपुराणांत सांगितलें आहे. [क्ला. डि. हिं. मा.]

आग्नेयी पूर्व व दक्षिण यांमधली एक उपदिशा. 'उदयगिरिसंनिहिता सुमेरुव्यवहिता च दिक्' = उदयपर्वताच्या (पूर्व) जवळ असलेली व सुमेरु पर्वताने वेगळी झालेली दिशा (न्यायकोश). अग्नि हा या दिशेचा स्वामी आहे

आग्रदास एक हिंदी कवि. हा नाभादासाचा गुरु असून तुलसीदासाचा समकालीन होता. जयपूर राज्यांतील गलता हें याचें गांव. अष्टछाप कवींपैकी श्रीकृष्णदास पयहारीचा हा शिष्य होता. हितोपदेश, उणखागाबावनी, ध्यानमंजिरी (रामध्यानमंजिरी) व कुंडलिया असे याचे चार ग्रंथ उपलब्ध आहेत. [हिं. श. सा.]

आग्रयण एक इष्टि. गोभिलस्मृतींत (३. १०३) हिला नवयज्ञ आणि मनुस्मृतींत (४. २७) नवसस्येष्टि असें म्हटलें आहे. आपस्तंब गृह्यसूत्राच्या (१९. ६) टीकेंत सुदर्शनाने आग्रयणाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे--

येन कर्मणा अग्रं नवद्रव्यं देवान् प्रापयतीति
यत्कर्मकृत्वैव वाग्रयणं प्रथमायनं नवान्नप्राशन-
प्राप्तिर्भवतीति ।

अर्थ – ज्या विधीने अग्र म्हणजे नवीन धान्य देवांना अर्पण

करतात, किंवा जो विधि केल्यानंतर नवीन धान्य प्राशन करतात, त्याला आग्रयण असें नांव आहे.

वैदिक काळीं तांदूळ, श्यामाक (सावे) आणि यव हीं धान्यें पिकलीं असतां प्रथम आग्रयण इष्टि करून मगच तीं उपयोगांत आणीत. प्रतिपदा किंवा पौर्णिमा या दिवशीं ही इष्टि करीत.

आहिताग्नि पुरुषांना ही इष्टि विहित आहे, असें आश्व. श्रौत-सूत्रांत सांगितलें आहे (२. ९). आग्रयणयज्ञ नवधान्याचा असून तो श्रौतसूत्राप्रमाणे किंवा आश्व. गृ. सूत्राप्रमाणे त्रेताग्नीवर करावा, असें नारायण सांगतो. आहिताग्नि नसलेल्या गृहस्थाला औपासन अग्नीवर आग्रयणयज्ञ करतां येतो. आग्रयणांत सतरा सामिधेनी ऋचा असतात.


आग्रयणाच्या इंद्राग्नी, विश्वेदेव व द्यावापृथिवी या देवता असतात. वसंत ऋतूंत पर्व दिवशीं नव्या यवाने व शरद् ऋतूंत नव्या भाताने आग्रयणेष्टि करावी, असें मानव गृह्यसूत्र सांगतें. वैखानसाने या इष्टीशीं पितरांचा संबंध जोडलेला आहे.

या इष्टीचा पर्याय हल्लींहि पाहायला मिळतो. दक्षिणेंत आश्विन पौर्णिमेला नव्याची पौर्णिमा असें नांव असून या दिवशीं नव्या धान्याच्या लोंब्या फुलांबरोबर गुंफतात आणि त्या दारावर तोरणासारख्या लावतात. **पाहा**–नवान्नभक्षण. [हि. ध.; नि. सिं.]

आग्रहायणी सप्त पाकयज्ञांपैकी एक यज्ञ. मार्गशीर्ष पौर्णिमेला हें नांव असून त्या दिवशीं जो विधि करतात, त्यालाहि त्याच नांवाने संबोधतात. श्रावण पौर्णिमेपासून सर्पाच्या भीतीने पलंगावर झोपण्यास सुरवात करावी व मार्गशीर्ष पौर्णिमेला त्याचा त्याग करावा, असें सांगितलेलें आहे. म्हणून या विधीला प्रत्यवरोहण असेंहि दुसरें नांव आहे. कांहींच्या मतें आग्रहायणी व प्रत्यवरोहण हे दोन निरनिराळे विधी असून ते अनुक्रमे मार्गशीर्ष पौर्णिमेला व हेमंत ऋतूंतल्या पहिल्या रात्रीं करतात. हल्ली हा विधि प्रचारांत नाही. पाहा–प्रत्यवरोहण [हि. ध.]

आग्रा हें शहर यमुना नदीच्या कांठावर वसलें आहे. या शहराला प्राचीन परंपरा असून महाभारतांत याचा अग्रवन असा उल्लेख आहे. महाभारतकाळीं हें नगर अत्यंत समृद्ध असून शूरसेनाच्या प्रदेशांत त्याचा अंतर्भाव होत होता. इथेच कंसाचें कारागृह होतें. या नगरांत शहराच्या चारी कोपऱ्यांवर व मध्यभागीं महादेवाची स्थापना केलेली होती. इथून दहा मैलांवर रेणुकाक्षेत्र आहे. या ठिकाणीं यमुना नदी पश्चिमवाहिनी असल्यामुळे इथे स्नान करणें पुण्यप्रद मानतात

आग्र्याजवळील बटेश्वर क्षेत्रांत श्रीकृष्णाचे पूर्वज व वंशज यांच्या वसाहतीचे अनेक अवशेष सांपडले आहेत. बटेश्वराच्या प्राचीन अवशेषांपैकी श्रीकृष्णाचा पुत्र प्रद्युम्न व नातू अनिरुद्ध यांच्या नांवांनी वसलेलीं ' पदमन खेडा ' व ' औंधखेडा ' हीं गांवें या गोष्टीची साक्ष देतात.



आग्र्याचा किल्ला

आग्रा हें व्रज प्रदेशांतील प्रमुख नगर होतें. तिथल्या बारा वनांपैकी अग्रवन हें एक होतें. आर्य भारतांत आल्यावर त्यांनी ज्या पांच ठिकाणीं वस्ती केली, त्यांत आग्रा हेंहि एक ठिकाण होतें. त्या वेळीं त्याला आर्यगृह हें नांव होतें. या आर्यगृह किंवा अग्रवन या नांवावरूनच पुढे या शहराला आग्रा हें नांव मिळालें.

श्रीकृष्णाचें क्रीडास्थान, अनसूया व शबरी यांची तपोभूमि, परशुराम, तीर्थंकर नेमिनाथ, वेदव्यास व सूरदास यांची जन्मभूमि म्हणूनहि आग्र्याचें महत्त्व आहे.

इ. स. च्या १० व्या शतकाच्या अखेरपर्यंत हें शहर हिंदु राजांच्या आधिपत्याखाली होतें. इ. स. १०२८ सालीं मुहंमद गजनीने जयपाल राजाकडून तें जिंकून घेतलें. गुलाम, खिलजी, मोगल व सैयद या वंशांतील सुलतानांच्या काळीं हें एक सामान्य शहर होतें. परंतु सिकंदर लोदीने त्याचा विकास केला व त्याला आपली राजधानी बनविलें.

इ. स. १५२६ सालीं बाबराने हें शहर जिंकलें. त्या वेळच्या लुटींत त्याला सुप्रसिद्ध कोहिनूर हिरा मिळाला. बाबरानंतर सुमारें २५ वर्षांनी त्याचा नातू अकबर याने आग्रा शहराला मोगल साम्राज्याची राजधानी बनविलें आणि शहराच्या सौंदर्यांत भर घातली. परंतु आग्र्याचें खरें सौंदर्य ताजमहालासारखी उत्कृष्ट इमारत बांधून शहाजहाननेच वाढविलें, असें म्हटलें

पाहिजे. शहाजहानने पुढें आपली राजधानी दिल्लीला हालविली. त्यानंतर आग्रा शहारावर बरींच आक्रमणें झालीं. भरतपूरच्या जाटांनी त्याच्यावर हल्ला केला. मग मराठ्यांनी तें काबीज केलें. पुन्हा १७७३ सालीं नजफखानाने तें हस्तगत केलें. बारा वर्षांनंतर पुन्हा एकदा मराठ्यांनी तें जिंकलें. त्यानंतर १८०३ सालीं इंग्रजांनी त्याचा ताबा घेतला. असा एकंदर त्याचा राजकीय इतिहास आहे. आजमितीस तें भारतांतलें एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे.




ताजमहाल – आग्रा

आग्रा शहरांतील किल्ला प्रेक्षणीय आहे. अकबराने या भव्य किल्याची रचना केली व तो बांधला. त्यानंतरच्या राजांनी अनेक सुंदर इमारती त्या किल्याला जोडल्या. सध्या ज्या ठिकाणीं किल्ला बांधलेला आहे, तिथे पूर्वी बादलगड होता, असें कांही इतिहासकार सांगतात. हा किल्ला लाल दगडांचा असून त्याचें बांधकाम सुमारें आठ वर्षें (इ. स. १५६५ – १५७३) चाललें होतें. किल्ल्याच्या आंतील बऱ्याचशा इमारती मात्र शहाजहानने बांधलेल्या आहेत. किल्ल्याचा परिघ दीड मैलाचा असून भोवती दुहेरी तटबंदी आहे. दोन भिंतींमधील अंतर चाळीस फूट असून मधला भाग दगडगोट्यांनी भरलेला आहे. भिंतीची उंची ७० फूट आहे. किल्याला चार दरवाजे आहेत. किल्ल्यांतील अकबराचा महाल, जहांगीरचा महाल, खास महाल, शीशमहाल, दिवाण–इ–खास, नगीना मशीद, मच्छीभवन, दिवाण-ई-आम, मोती मशीद या वास्तू सुंदर आहेत.

याशिवाय, इतिमद्–उद्–दौलाची कबर, चिनीका रोझा, रामबाग, सिकंदरा येथील अकबराची कबर, या वास्तूहि प्रेक्षणीय आहेत.

परंतु आग्रा हें नांव उच्चारलें, की डोळ्यासमोर चित्र उभें राहतें तें ताजमहालाचें. शहाजहानने आपल्या राणीचें स्मारक म्हणून उभें केलेलें तें शिल्प आजहि एक जागतिक महत्त्वाची कलावस्तु बनून राहिलें आहे.

सिकंदर लोदी याचे काळापासून आग्रा हें विद्येचें केंद्र होतें. अकबराच्या कारकीर्दींत तिथे फारसी भाषा व साहित्य यांचें अध्ययन–अध्यापन चाले. या स्थानाचें सांस्कृतिक महत्त्व जाणून सूरदास इथे येऊन राहिला होता. तानसेनच्या काळापासून हें संगीताचेंहि प्रमुख केंद्र मानलें गेलें आहे. [आग्रा – सां. प.]



इतिमद् उद्दौल्याची कबर – आग्रा

आग्रेय एक प्राचीन मानवगण. हे लोक अग्रोदक प्रदेशांत राहत होते व यांचें गणराज्य होतें. पंजाबमधील हिस्सार जिल्ह्यांत अग्रोह नांवाचें गांव आहे, तेंच अग्रोदक होय. इथे आग्रेयांचीं नाणीं सांपडलीं आहेत. [अ. हि. ना. इं.]

आघाटि याचा अर्थ टाळ किंवा झांज, असा आहे. वेदकाळीं नृत्याला साथ करण्यासाठी हें वाद्य वाजवीत (ऋ. १०. १४६.२). [वे. इं.]

आघाडा संस्कृतांत याला अपामार्ग म्हणतात. वैदिक वाङ्मयांत अभिचारासाठी याचा उपयोग सांगितलेला आहे. याला गौरीचा प्रतिनिधि मानतात. भाद्रपदांत ज्येष्ठागौर बसवितात, त्या वेळीं आघाड्याचीं रोपटीं एकत्र बांधून तीं भांड्यावर ठेवतात व त्यावर गौरीचें चित्र बांधतात. आघाडा पावसाळ्यांत फार होतो आणि त्याची उंची ४ ते ६ फूट असते. देवीला याची पत्री फार आवडते. ऋषिपंचमीच्या दिवशीं व्रती स्त्रिया याच्या काड्या दंतधावनासाठी वापरतात. ग्रहयज्ञांत बुधाच्या हवनासाठी याच्या समिधा घेतात. देवतांच्या पत्रपूजेंत याच्या पानाचा समावेश केलेला आहे. **पाहा**-अपामार्ग.

आघार आहवनीय अग्नींत अध्वर्यु जी आज्याहुति देतो, तिला आघार असें नांव आहे. आघाराचे दोन प्रकार आहेत. एकांत प्रजापति ही देवता असून तिला वायव्येकडून आग्नेयीकडे आहुति देतात. दुसऱ्यांत इंद्र ही देवता असून तिला नैर्ऋत्येकडून ईशान्येकडे आहुति देतात. **पाहा**–अग्निमुख. [हि. ध.]

आघारी (सं. आघार) शूद्रांत श्राद्धाच्या दिवशीं तूपभाताचा होम करतात, त्याला हें नांव आहे. प्रथम जमीन सारवून तिथे अग्नि प्रज्वलित करतात व त्यावर हा होम करतात. मग सभोवती पाणी फिरवून त्याला नमस्कार करतात. श्राद्धप्रयोगांतल्या अग्नौकरणाचाच हा एक पर्याय आहे.

आघासिक एक जात. वैदेहिक पुरुष आणि शूद्र स्त्री यांची संतति. हिला आंधसिक किंवा रांधवणु अशीहि नांवें आहेत. हे लोक शिजविलेलें अन्न विकीत असत. [हि. ध.]

आचण्ण (१२ वें शतक) एक कानडी जैन कवि. हा भारद्वाजगोत्राचा होता. याच्या मातेचें नांव मल्लांबिके असून पित्याचें केशवराज होतें. पुलिगेरें म्हणजे हल्लीचें लक्ष्मेश्वर हें याचें गांव होय. याच्या गुरूचें नांव नंदीयोगेश्वर होतें. याच्या पित्याने रेवण चमूपाच्या सांगण्यावरून वर्धमानपुराण लिहिण्यास प्रारंभ केला. परंतु तें त्याच्या हातून पुरें झालें नाही. पुढे आचण्णाने तें पुरें केलें. रेवण चमूप हा प्रथम कलचुरी राजाचा मंत्री होता. नंतर तो होयसळ वीर बल्लाळाचा (इ. स. ११७३-१२२०) मंत्री झाला, असा उल्लेख आढळतो. [म. च. को.]

आचमन 'आचम्यतेऽम्भोऽत्राचमनम्' = ज्यांत जलप्राशन केलें जातें तें आचमन होय (क्षीरस्वामी). 'वैधकर्मारम्भात् पूर्वं वारत्रयं जलपानपूर्वक–यथाक्रमाष्टाङ्गस्पर्शरूपशुद्धिजनक–क्रिया' = विधिप्रयुक्त कर्मांच्या प्रारंभापूर्वीं तीन वेळां जलपानपूर्वक यथाक्रम अष्टांगांना स्पर्श करणें एतद्रूप शुद्धिजनक क्रिया, म्हणजे आचमन होय. उजव्या हाताच्या तळव्यावर शुद्ध व शीत उदक घेऊन तें केशव, नारायण, माधव या तीन नामांचा उच्चार करून प्राशन करणें, याला आचमन म्हणतात.

त्रिराचामेदपः पूर्वं द्विः प्रमृज्यात्ततो मुखम् ।
संमृज्याङ्गुष्ठमूलेन त्रिभिरास्यमुपस्पृशेत् ।।

(गरुड पु. २१५)

अर्थ — प्रथम जलाचें तीनदा प्राशन करावें. नंतर दोनदा तोंड पुसावें. नंतर अंगठ्याच्या मुळाने मुखावर मार्जन करून तीनदा जलाने मुखाला स्पर्श करावा.

ओल्या हाताने डोळे, कान, नाक, हृदय आणि मस्तक यांना स्पर्श करावा; भोजन, हवन, दान, दोन्ही संध्या, उपहार, प्रतिग्रह, हविर्भक्षण, या प्रसंगीं व कर्मान्तीं दोनदा आचमन करावें व आचमन शक्य नसेल, तेव्हा नुसता उजव्या कानाला स्पर्श करावा, असें सांगितलें आहे. श्रौत, स्मार्त व आगमोक्त असे आचमनाचे तीन प्रकार आपस्तंब सांगतो – प्रत्यक्ष श्रुतीने विहित व दर्शपूर्णमासाचें अंग तें श्रौताचमन होय. स्मार्ताचमन हें संध्यादि कर्माचें अंग आहे. आगम किंवा पौराण आचमन हें शौचादि कर्माचें अंग असतें. आचमनाच्या वेळीं पहिल्या केशवादि तीन नांवांनी उदक प्राशन करायचें असतें व पुढच्या गोविंदादि एकवीस नांवांनी शरिराच्या विविध अंगांना स्पर्श करायचा असतो. भूमीवर पाय ठेवून पूर्व अथवा उत्तर दिशेकडे तोंड करून आचमन करतात. आसनावर पाय ठेवून अथवा आसनमांडी घालून व हात गुडघ्याबाहेर ठेवून आचमन करूं नये. आचमनाच्या वेळी हातांत पवित्रक, निदान दर्भ तरी असावे. स्नान, दान, जप, यज्ञ, स्वाध्याय व नित्यकर्म करतांना हातांत दर्भपवित्रक असण्याची आवश्यकता आहे.

आचमनीय मुखप्रक्षालनासाठी पाणी देणें. देवाच्या षोडशोपचार पूजेंतील हा एक उपचार आहे. हें जल कसें असावें, त्याचें वर्णन पुढे दिलें आहे–

दद्यादाचमनीयं तु सुगन्धिसलिलैः शुभैः ।
कर्पूरवासितैर्वापि कृष्णागुरुसुधूपितैः ।।

(कालिका पु. ६७)

अर्थ— पवित्र, सुगंधी, कापराचा वास असलेलें किंवा कृष्णागुरूचा धूर दिलेलें जल आचमनीय म्हणून द्यावें.

हें जल स्वच्छ, फेसवर्जित असावें व तें तेजस्वी पात्रांतून किंवा शंखांतून देवाला अर्पण करावें, असेंहि सांगितलें आहे.

आयुर्बलं यशोवृद्धिं प्रदायाचमनीयकम् ।
लभते साधको नित्यं कामांश्चैव यथेप्सितान् ।।

अर्थ— हें आचमनीय अर्पण केल्याने साधकाला नेहमी दीर्घायुष्य, बल, यश व इच्छित वस्तु यांचा लाभ होतो. [श. क.]

आचमनोपनिषद् एक गौण उपनिषद्. यांत आचमन विधीचें वर्णन आहे. तीनदा आचमन करावें. पहिल्या आचमनाने ऋग्वेद, दुसऱ्याने यजुर्वेद व तिसऱ्याने सामवेद प्रसन्न होतो. ब्राह्मणाच्या उजव्या हाताच्या

ठिकाणीं देव, ऋषि, पितृ, ब्रह्म व अग्नि, अशीं पांच तीर्थे असतात, असें यांत सांगितलें आहे.

आचाम्लव्रत जैन श्रावकांचें एक व्रत. अष्टम्यादि पर्वतिथींना जैन धर्मांत निर्जल उपवास सांगितलेला आहे. पण तसा तो करण्याची शक्ति नसेल, तेव्हा आचाम्लव्रत करतात. यांत एक वेळ रुक्ष व नीरस अन्न ग्रहण करतात. मात्र केवळ पाण्यांत शिजविलेलें अन्न किंवा नुसती चपाती लिंबू-चिंच यांच्या पाण्याबरोबर खाल्ली तरी चालते. [व. श्रा.]

आचार आचरण किंवा अनुष्ठान असा याचा अर्थ आहे. धर्मसंमत व शिष्टसंमत अशी वागण्याची पद्धति म्हणजे आचार होय. आचाराचे म्हणजेच वागणुकीचे सदाचार व कदाचार (निंद्य आचार) असे दोन भेद होतात. इथे आचार शब्दाने सदाचार अपेक्षित आहे. कोणतेंहि कर्म शास्त्राला अनुसरून करणें, याला सदाचार म्हणावें. भारतीय संस्कृतींत आचाराला फार महत्त्वाचें स्थान दिलें आहे. श्रुतिस्मृतींनी सांगितलेल्या आचारधर्माचें पालन प्रत्येकाने केलें पाहिजे, असा धर्मशास्त्राचा आग्रह आहे.

आचार हें एक धर्माचें प्रमाण मानलें आहे. धर्माच्या निरनिराळ्या अंगोपांगांचा विचार करून धर्म शब्दाच्या अनेक व्याख्या भिन्न भिन्न ग्रंथांत आढळतात. धर्माच्या जशा सर्वसंग्राहक व्याख्या आहेत, तशाच त्या धर्मांतील महत्त्वाच्या गोष्टींचा निर्देश करून बनविलेल्या एकांगी अशाहि कांही आहेत. वसिष्ठस्मृतीने आचाराला प्राधान्य देऊन पुढील व्याख्या केली आहे ––

आचारः परमो धर्मः सर्वेषामिति निश्चयः ।

(६. १)

अर्थ –– आचार हा सर्वांचा श्रेष्ठ धर्म होय, असा निश्चय आहे.

धर्माचें लक्षण आचार आहे, असें म्हणत असतां सज्जनांचा आचार म्हणजेच सदाचार, असाच अर्थ गृहीत धरला जातो. सज्जन किंवा शिष्ट जी गोष्ट करतात, ती आचरणांत आणणें म्हणजेहि धर्म पाळणें होय. श्रेष्ठ लोक जें जें आचरितात, त्याचेंच अनुकरण सामान्यजन करीत असतात, असें भगवद्गीतेंत म्हटलें आहे (३. २१). वेदांत अथवा धर्मशास्त्रांत ज्या गोष्टी आचरणीय म्हणून सांगितल्या असतील, त्यांचें पालन केलें तरच विहित फल मिळतें. म्हणूनच श्रुतींचें तत्त्व आचारावर अवलंबून आहे, असें पाराशर स्मृतींत सांगितलें आहे. धर्मशास्त्रांत आचार, व्यवहार व प्रायश्चित्त या तीन गोष्टींचा विचार केलेला असतो. या तीहींत आचारालाच प्राधान्य दिलेलें आहे.

मनु, याज्ञवल्क्य, इ. स्मृतिकारांनी धर्माचीं चार प्रमाणें सांगितलीं आहेत, तीं अशीं ––

श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।

(याज्ञ. १. ७)

अर्थ –– श्रुति, स्मृति, सदाचार आणि आत्मतुष्टि हीं धर्माचीं चार लक्षणें होत.

श्रुति म्हणजे वेद. श्रुतीला सर्व शास्त्रकारांनी स्वतःप्रमाण मानलें आहे. ‘ चोदनालक्षणोऽर्थो धर्मः ’ = वेदविहित कर्म म्हणजे धर्म होय, असें जैमिनीने धर्माचें लक्षण केलें आहे. तात्पर्य श्रुति हाच वैदिक धर्माचा आधार आहे. याच अर्थाने अखिल वेद हेंच धर्माचें मूळ आहे, असें मनूने म्हटलें आहे. (२. ६).

वेदांचें प्रामाण्य मानून वेदविहित कर्मांचाच विस्तार स्मृतींमध्ये केलेला असतो. म्हणूनच स्मृति हें सुद्धा धर्माचें प्रमाण ठरतें. ‘स्मृतिस्तु धर्मसंहिता ’ = स्मृति म्हणजेच धर्मशास्त्र होय. (अमर).

धर्माचें तिसरें प्रमाण सदाचार हें आहे. वेदांत अथवा स्मृतींत एखाद्या गोष्टीला आधार मिळाला नाही, तर सज्जन किंवा शिष्ट ज्याप्रमाणे आचरण करीत असतील, त्याप्रमाणे त्या गोष्टींचें आचरण करणें, म्हणजे धर्माचें पालन करणें होय. हाच आशय पुढील वचनांत सांगितला आहे.

श्रुतिस्मृतिविहितो धर्मः । तदलाभे शिष्टाचारः प्रमाणम् ।

(वसिष्ठ स्मृ. १. ४)

कल्पसूत्रांत श्रौत, गृह्य व धर्म असे तीन विभाग असतात. धर्मसूत्रांच्या प्रारंभींच धर्माचें व्याख्यान करतांना आचाराचा उल्लेख येतो. धर्म म्हणजे आचार असाच अर्थ त्या ठिकाणीं गृहीत धरलेला असतो.

अथातः सामयाचारिकान् धर्मान् व्याख्यास्यामः ।

(आप. ध. सू. १. १. १.)

अर्थ –– यानंतर निरनिराळ्या वेळीं पाळावयाचे आचार म्हणजे धर्म यांचें व्याख्यान करीत आहों.

चौथें धर्माचें प्रमाण आत्मतुष्टि हें होय. सज्जनांना ज्या ठिकाणीं संशय उत्पन्न होईल व जिथे दुसरें कोणतेंहि प्रमाण मिळणार नाही, तिथे स्वतःच्या अंतःकरणाला जें योग्य वाटेल, त्याचेंच आचरण सज्जन करीत असतात. या आचारासहि धर्माचें प्रमाण म्हणून मानतात.

वर उल्लेखिलेल्या चार प्रमाणांमध्ये पहिल्या पहिल्या

प्रमाणास अधिक प्राबल्य असून उत्तरोत्तर गौणत्व आहे.

धर्माचें प्रमाण म्हणून सदाचाराचा विचार करीत असतां सज्जन किंवा शिष्ट कोण, याचाहि विचार केलेला आहे. ज्यांना वेदांचें यथार्थ ज्ञान असतें, जे निरहंकार, निर्मत्सर व स्थिर असतात, तसेंच दंभ, दर्प, लोभ, मोह, मद व क्रोध हे ज्यांनी जिंकलेले असतात, ते शिष्ट होत, असें बौधायन स्मृतींत सांगितलें आहे (१०५). शिष्ट हे वेदांत प्रत्यक्ष न सांगितलेल्या गोष्टींचें अनुमान करूं शकतात. शिष्टांच्यामुळेच आपणांस वेदांचें प्रत्यक्ष ज्ञान होत असतें. म्हणूनच स्मृतींमध्ये शिष्टांना 'श्रुतिप्रत्यक्षहेतवः' असें म्हटलें आहे. शिष्ट लोक धर्मबुद्धीने निःस्वार्थपणे जो आचार पाळतात, तो सदाचार होय.

जनपदधर्म, ग्रामधर्म, कुलधर्म, हेहि सदाचारांत गणले जातात. जरी ते श्रुतिस्मृतिप्रतिपादित नसले, तरी विवाहादि संस्कारांच्या प्रसंगीं त्यांचें पालन करावें, असें सांगितलें आहे. उदा० विवाहांतला कंकणबंधाचा विधि. तो श्रुतिस्मृतिप्रतिपादित नाही; पण तरीहि तो एक सदाचार असल्यामुळे त्याचा विवाहविधींत समावेश केलेला आहे. ज्या देशांत जे आचार परंपरेने चालत आलेले असतात व ज्यांचा श्रुतिस्मृतींशीं विरोध नसतो, असे आचार सदाचार म्हणून पाळले जावे, असाच सर्व धर्मशास्त्रकारांचा उपदेश आहे.

प्रजेचें धारण करतो तो धर्म अशी धर्माची सामान्य व्याख्या आहे. या धर्माचें पालन सदाचाराचे नियम पाळूनच केलें पाहिजे. धर्माचें पालन म्हणजे धर्मशास्त्रांत सांगितलेल्या गोष्टींचें आचरण करणें होय. कारण धर्म हा आचाराधीन आहे.

आचारप्रभवो धर्मो धर्मस्य प्रभुरच्युतः ।

अर्थ--धर्म हा आचारापासून उत्पन्न झाला असून त्या धर्माचा प्रभु पुराणपुरुष अच्युत म्हणजे श्रीविष्णु हा आहे.

धर्म हा व्यक्ति, समाज व राष्ट्र यांना व्यापून राहणारा आहे. धर्माबरोबरच आचार हाहि सर्व ठिकाणीं दाखल होतो. सदाचार हा तो आचरण करणाऱ्या व्यक्तीच्या उन्नतीस जसा कारण होतो, तसाच तो समाजाच्या उन्नतीसहि हातभार लावतो. म्हणूनच धर्मशास्त्रांत सदाचरणी व्यक्तीची प्रशंसा आढळते, तशीच आचारहीनाची निंदाहि आढळते. 'आचारहीनं न पुनन्ति वेदाः' = आचारहीन पुरुषाला वेदाध्ययनानेहि पावित्र्य येत नाही, असें स्मृतींनी म्हटलें आहे.

सदाचार किंवा शिष्टाचार हें एक धर्माचें प्रमाण मानल्यामुळे वैदिक–विशेषतः पौराणिक–धर्म सर्वसंग्राहक ठरला आहे. या देशांत अनेक पंथोपपंथ निर्माण झाले आणि त्या सर्वांचा धर्मांत समावेश होऊं शकला. शिष्टाचार प्रामाण्यामुळेच श्रुतिस्मृतींत न सांगितलेल्या कित्येक गोष्टींचा धर्मांत समावेश करणें शक्य झालें. कित्येक प्रसंगीं वेदप्रामाण्य न मानणाऱ्यांचींहि कांही तत्त्वें शिष्टाचारामुळेच आपण स्वीकारलीं आहेत. शिष्टाचार हे परंपरेने, रूढीने चालत आलेले असतात. सज्जन किंवा शिष्ट हे निरनिराळ्या कालखंडांत निरनिराळे असतात. त्यामुळे त्यांनी संमत केलेले आचारहि युगपरत्वें भिन्न भिन्न असतात. याच कारणामुळे धर्म हा कांही बाबतींत परिवर्तनीय आहे, असें म्हणतां येतें. वेद आणि स्मृति यांच्याशीं विरोध न येईल, असा आचार स्वीकारण्यास धर्मशास्त्राने अनुमति दिलेली आहे.

भारतीय दर्शनांत आचरणविषयक प्रश्नांना महत्त्वपूर्ण स्थान दिलेलें आहे. भारतीय दर्शनांनी मोक्ष हें जीवाचें परम साध्य मानलेलें असून त्या मोक्षाच्या सिद्धीसाठी सदाचारनियमांची समीक्षा केलेली आहे. आस्तिक व नास्तिक अशा दोन्ही प्रकारच्या दर्शनांची या बाबतींत कांही मर्यादेपर्यंत एकवाक्यता आहे. जैन दर्शनांत अर्हत्पदाच्या प्राप्तीसाठी आचारनियमांची विस्तृत चर्चा केलेली असून अहिंसा हा त्या बाबतींत सर्वश्रेष्ठ आचार मानलेला आहे. बौद्ध दर्शनांत अनेक विभिन्न आणि परस्परविरोधी संप्रदाय असले, तरी त्या सर्वांनी बुद्धाच्या आचरणविषयक उपदेशांचा स्वीकार केलेला आहे. बुद्धाने उपदेशिलेल्या चार आर्यसत्यांपैकी चौथें आर्यसत्य दुःखनिरोधमार्ग हें असून तेंच त्यांच्या आचारशास्त्राचा आधार ठरलें आहे. त्याचें व्यावहारिक स्वरूप मध्यममार्ग हें आहे. एका बाजूने निरर्थक आत्मपीडा व दुसऱ्या बाजूने क्षणिक सुखांचा हव्यास या दोन अतींचा परिहार करून मध्यममार्गाचें अवलंबन करणें, हाच सदाचार होय, असें त्याने मानलें आहे. त्यामुळे प्रतीत्य समुत्पादाचा अंत होऊन भवचक्रांतून सुटका होते. प्रेम, सहानुभूति, दया व प्राणिमात्राविषयीं मैत्रीची भावना या सद्‌गुणांवर बौद्ध आचारशास्त्रांत विशेष भर दिलेला आहे.

हिंदु दर्शनांच्या सर्व संप्रदायांनी आचाराच्या बाबतींत उपनिषदें व भगवद्‌गीता यांच्या मुख्य सिद्धान्तांचा स्वीकार केलेला आहे. ब्रह्मज्ञान हें उपनिषदांचें परम लक्ष्य आहे. त्याचा विचार करीत असतांना उपनिषदांनी आत्मसाधना व शील यांच्या व्यावहारिक बाजूकडेहि दुर्लक्ष केलेलें नाही. भगवद्‌गीता ही तत्वज्ञानापेक्षा आचारशास्त्राच्या दृष्टीने अधिक महत्त्वपूर्ण आहे. गीतेंत ब्राह्मी स्थितीच्या प्राप्तीसाठी निष्काम कर्माचा अनेक प्रकारें उपदेश केलेला आहे. अकर्मण्यता ही त्याज्य असून कर्मसंन्यासापेक्षा फलासक्ति टाकून कर्तव्यकर्म करीत राहणें, हेंच मोक्षप्राप्तीसाठी श्रेयस्कर होय. धैर्य, मनो-

निग्रह व आत्मबुद्धि हे गुण सदाचाराला आधारभूत असतात. मोक्षासाठी चित्तशुद्धीची आवश्यकता असते व चित्तशुद्धीसाठी वर्णाश्रमविहित कर्में आचरावीं लागतात, असें शंकराचार्यांनी स्पष्टपणे प्रतिपादिलें आहे. [विद्याधरशास्त्री भिडे; हिं. वि. को.]

आचारज ब्राह्मण मारवाडांतील ब्राह्मणांची एक जात. यांनाच कार्टिया ब्राह्मण असेंहि नांव आहे. आचारज हें आचार्य शब्दाचें विकृत रूप आहे. हे लोक प्रेतदहनाचें पौरोहित्य करतात. मृताच्या बारा दिवसांत मृत माणसांच्या आप्तेष्टांनी दिलेलें अन्न ग्रहण करतात. त्यामुळेच हे लोक हीन दर्जाचे मानले गेले आहेत. पंजाबमध्ये यांना गांवाच्या आंत प्रवेशहि मिळत नसे. दुसरे ब्राह्मण यांना अस्पृश्य मानतात. हे शिवाचे उपासक असून सिनावड, दिलीवाल, जोशी, वनबाला, सारस्वत इ. यांच्या पोटजाती आहेत. [रा. जा.]

आचारवर्धनव्रत एक जैन व्रत. व्रतावधि ११९ दिवस. यांत १०० उपवास आणि ५० पारणा असतात. कुठल्याहि महिन्यांत व्रताचा प्रारंभ करतां येतो. [जै. व्र. वि. सं]

आचारी पंथ रामानुजी वैष्णवांची एक शाखा. हे लोक विष्णूची पूजा करतात व तप्तमुद्रा धारण करतात. यांचीं अनेक देवालयें आहेत. क्षत्रिय, वैश्य वगैरे वर्णांस या पंथाची दीक्षा देतात. धर्माचार्य ब्राह्मण असतो.

आचार्य या शब्दाच्या व्याख्या—(१) 'मन्त्रव्याख्याकृदाचार्य:'= मंत्रांची व्याख्या करणारा, तो आचार्य होय (अमर.).

(२) 'यस्माद्धर्मानाचिनोति स आचार्य:'= ज्याच्यापासून शिष्य धर्मांचा संग्रह करतो, तो आचार्य होय (आप. ध. सू.).

(३) 'आचार्य: कस्मादाचारं ग्राहयति आचिनोत्यर्थानाचिनोति बुद्धिमिति वा।' = जो आचार शिकवितो, अर्थ (शुल्कधन) गोळा करतो किंवा शिष्याची बुद्धि संपन्न करतो, तो आचार्य होय (निरुक्त).

उपनीय तु य: शिष्यं वेदमध्यापयेद् द्विज: ।
सकल्पं सरहस्यं च तमाचार्यं प्रचक्षते ॥

(मनु. २. १४०)

अर्थ—जो ब्राह्मण शिष्याचें उपनयन करून त्याला वेद, यज्ञकर्म, उपनिषदें यांचें शिक्षण देतो, त्याला आचार्य असें म्हणतात.

प्राचीन काळीं आचार्यपद शिक्षणाशीं निगडित होतें. विद्येच्या क्षेत्रांत आचार्याचें स्थान फार उच्च होतें. त्यामुळे आचार्यांकडून विद्या ग्रहण केली असतां ती सफळ होते, अशी त्या काळीं लोकांची धारणा होती. आचार्याबरोबरच गुरु व उपाध्याय या तिघांची उच्चतम कोटीच्या अध्यापकांत गणना केली जात असे. पण त्यांच्यामध्ये आचार्याचें स्थानच सर्वश्रेष्ठ मानलें जाई.



आचार्य—अमरावतीशिल्प.

मुलाचे गर्भाधानादि संस्कार करणारा, तो गुरु होय (न्यायकोश). जो आपल्या उपजीविकेसाठी विद्यार्थ्यांकडून शुल्क घेऊन त्याला वेदाचा कांही भाग किंवा वेदांगें शिकवीत असे, त्याला मनुस्मृतींत उपाध्याय असें म्हटलेलें आहे. (२. १४१).

शिष्याचें उपनयन करण्याचा अधिकार फक्त आचार्यालाच असतो. ज्याचें उपनयन अविद्वान् करतो, तो अंधकारांतून घोर अंधकारांत प्रवेश करतो. त्यामुळे कुलीन, विद्यासंपन्न व बुद्धिमान् अशा माणसाचीच आचार्यपदासाठी निवड केली पाहिजे, असें आप. धर्मसूत्रांत सांगितलें आहे (१. १. १. ११–१३).

आचार्य उपनयमानो ब्रह्मचारिणं कृणुते गर्भमन्त:।

(अथर्व. ११. ५. ३)

अर्थ—आचार्य उपनयनसंस्कार करून ब्रह्मचाऱ्याला आपल्या विद्यागर्भांत प्रविष्ट करतो.

ज्याप्रमाणे मातेच्या गर्भांत मुलाचें पोषण होतें, त्याचप्रमाणे आचार्यांच्या विद्यागर्भांत ब्रह्मचारी शिष्याचें आध्यात्मिक पोषण होतें (म. भा. उ. ४४. ६).

बौद्ध-जैनांतील आचार्य किंवा गणधर याच्याविषयींहि त्यांच्या ग्रंथांत विस्ताराने लिहिलें आहे. जैनांच्या विविध गच्छांमध्ये आचार्याला मोठा मान असे. दरोडेखोरांनीं हल्ला केला असतां, आचार्यांच्या जीवाला धोका पोचूं नये, म्हणून एखादा श्रमणक स्वत: आचार्य असल्याचा बहाणा करी. महा-

पूर, आग, दुष्काळ या आपत्तींत प्रसंगविशेषीं इतर श्रमणकांचे प्राण देऊनहि आचार्याचें रक्षण करावें, असें जैनांचें मत आहे. [हि. ध.; हि. जै. मो.]

आचार्यकुल आचार्य अर्थात् गुरु याचें निवासस्थान. त्याची रचना पुढीलप्रमाणे असे – गुरुगृह, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र खोल्या व राजपुत्रांना सुखप्रद होतील असे निवास. या रचनेप्रमाणेच जैन–बौद्धांनी आपले विद्याविहार उभारले असावे. नालंदा वगैरे विद्यापीठें म्हणजे प्राचीन आचार्यकुलांची सुधारून वाढविलेली आवृत्ति असेंहि म्हणतां येईल. [सो.हि.इं.]

आचेरी हें एका लहान मुलीचें भूत असून तें डोंगरावर राहतें व रात्रीं खाली येतें. हें आपली सावली टाकून मुलांना आजार उत्पन्न करतें. लाल रंगाचें पांघरूण असलेल्या मुलाला तें बाधा करीत नाही. अशा उत्तर भारतांत याच्याविषयीं समजुती आहेत. आचेरीपासून मुलाचें संरक्षण होण्यासाठी त्याच्या गळ्यांत तांबडा दोरा बांधतात. [फो. लो. नॉ. इं.]

आजगरव्रत अजगर नांवाच्या सर्प जातीच्या वृत्तीला धरून कल्पिलेलें एक व्रत. हें व्रत ऋषभदेवाने आचरिलें होतें. अजगर जसा भक्ष्य गिळल्यावर स्वस्थ पडून राहतो, त्याप्रमाणे यदृच्छाप्राप्त मिळेल त्या अन्नावर संतुष्ट राहून स्वस्थ पडून असणें, असें याचें स्वरूप आहे. [भाग. पु. ५.५.३२]

आजगव मूळचें शिवाचें धनुष्य. हें पृथूच्या जन्माच्या वेळीं आकाशांतून खाली पडलें. [हिं. मा.]

आज़ाद मौ. अबुल कलाम (१८८८–१९५८ इ. स.) भारतांतले एक अग्रगण्य पुढारी व म. गांधींचे अनुयायी. त्यांचा जन्म मक्केस झाला. त्यांचें बालपणहि तिथेच गेलें. त्यांचे वडील नामांकित धर्मशास्त्री व श्रेष्ठ चारित्र्याचे पुरुष होते. त्यांच्या हाताखालीच आज़ादांचें शिक्षण झालें. त्यांनी अरबी व फारसी या दोन भाषांचें सखोल ज्ञान प्राप्त करुन घेतलें. त्यानंतर ते भारतांत आले. हळूहळू कलकत्त्याच्या वृत्तपत्रांतून ते लेखन करूं लागले. १९०५ सालीं ते लखनौ येथील अन-नदवा या पत्राचे संपादक म्हणून नियुक्त झाले. त्यानंतर दोन वर्षांनी ते अमृतसर येथे गेले व तिथल्या वकील या पत्राचे संपादक बनले.

१९१२ सालीं त्यांनी कलकत्ता येथे स्वतःचें अल् हिलाल नामक साप्ताहिक पत्र सुरु केलें. त्या काळांत उर्दूमध्ये इतक्या उच्च कोटीचें दुसरें कोणतेंहि साप्ताहिक नव्हतें. या वृत्तपत्रामुळे आज़ादांचें नांव सर्व उर्दू जगापुढे झळकूं लागलें. त्या काळीं पेशावरपासून तों बंगालपर्यंत सर्वत्र उर्दूचा बोलबाला होता. आज़ादांनी आपल्या स्वतंत्र शैलीने आणि पांडित्याने उर्दू गद्याला नवें वळण लावलें. त्या काळच्या भारतीय मुसलमानांचें धोरण इंग्रजांशीं राजनिष्ठ राहून स्वतःच्या जातीचा उद्धार करून घेण्याचें होतें. सय्यद अहंमद हे या धोरणाचे पुरस्कर्ते होते. अलीगड विद्यालय हें मुसलमानांच्या शिक्षणाचें एक महान् केंद्र बनलें होतें. तिथूनच हळूहळू भारतीय स्वातंत्र्याकांक्षेला विरोध करण्याचें प्रतिगामी राजकारण सुरू झालें. इंग्रजांशीं राजनिष्ठ राहणें व कॉंग्रेसला विरोध करणें, हा मुसलमानांचा धर्म आहे, अशा प्रकारचा प्रचार भारतांतल्या प्रमुख मुसलमानांनी त्या वेळीं चालविला होता. तरुण आज़ादांना या प्रतिगामी वृत्तीची चीड आली आणि त्यांनी अल् हिलालमधून त्या वृत्तीवर प्रखर हल्ला चढविला. हिंदुस्थान हा एक आहे, त्याचें स्वातंत्र्य हें सर्वांचें स्वातंत्र्य आहे व तें मिळविण्यासाठी हिंदु–मुस्लीम या दोहोंचें अढळ ऐक्य पाहिजे, हा विचार त्यांनी आपल्या वृत्तपत्रांतून पुरस्कारिला. त्यांच्या त्या लेखांनी मुसलमानांत नव जागृति निर्माण झाली. सुशिक्षित मुसलमानांचें हळूहळू त्या दिशेने मतपरिवर्तन होऊं लागलें आणि त्यामुळेच इंग्रज सरकारला आज़ादांना स्वतंत्र ठेवणें धोक्याचें वाटूं लागलें. १९१५ सालीं ब्रिटिश सरकारने त्यांना रांची येथे स्थानबद्ध केलें. ४ वर्षें स्थानबद्धतेंत काढून १९१९ सालीं ते मुक्त झाले; पण १९२१ सालीं पुन्हा त्यांना पकडण्यांत आलें.



मौलाना आज़ाद

स्थानबद्धतेच्या काळांत त्यांनी कुराणाच्या सटीक उर्दू अनुवादाचें काम हातीं घेतलें. वर्तमानपत्राचें संपादन करीत असतांनाच त्यांनी इंग्रजी व फ्रेंच या भाषांचें अध्ययन केलें. त्यांचें आधुनिक शिक्षण स्वसंपादित व स्वकष्टार्जित होतें. या शिक्षणाने त्यांच्या बुद्धीचें क्षेत्र विस्तारलें. इस्लामी धर्माकडे व संस्कृतीकडे ते चिकित्सक दृष्टीने पाहूं लागले. त्यांची राजकारणी दृष्टिहि व्यापक होत गेली. अल् हिलालच्या द्वारें त्यांनी एक अभिनव राजकीय तत्त्वज्ञान प्रतिपादिलें व नव्या जगाशीं समरस होण्याच्या कामांत मुसलमानांचें नेतृत्वहि केलें.

१९२३ सालीं ते कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. त्या अधिवेशनांत त्यांनी असे उद्‌गार काढले, की ' जर कोणी देवदूत आकाशांतून दिल्लीच्या कुतुबमिनारावर उभा राहून म्हणूं लागला, की हिंदु-मुस्लीम ऐक्याचा नाद सोडा, मी दोन तासांत तुम्हाला स्वराज्य देतों, तर मी त्याला असें सांगेन, की मला हिंदु-मुस्लीम ऐक्य हवें आहे. त्यासाठी मी स्वराज्यालाहि दूर सारीन. कारण स्वराज्य लांबलें तर हिंदुस्थानचेंच नुकसान होईल; पण हिंदु-मुस्लीम ऐक्य नाहीसें झालें, तर त्यांत अखिल मानवजातीचें नुकसान आहे.'

१९३० सालीं इतर सर्व नेत्यांबरोबर आजादांनाहि तुरुंगवास घडला. ३०–३१ सालच्या सत्याग्रहांत जी कांही मुसलमान जनता सामील झाली, तिचें श्रेय आज़ादांनाच दिलें पाहिजे. १९३९ सालीं ते पुनश्च कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडले गेले. १९४२ सालीं म. गांधींनी 'चलेजाव' ची चळवळ सुरू केली. तिच्यांत आज़ादांना पुनश्च बंदिवास भोगावा लागला. धर्माधिष्ठित राष्ट्रवादाला त्यांनी कधीच मान्यता दिली नाही. पण १९४७ सालीं प्रादेशिक जनतेच्या आकांक्षांच्या पूर्तीसाठी त्यांनाहि देशाच्या फाळणीला मान्यता द्यावी लागली. स्वातंत्र्यानंतर ते केंद्रीय मंत्रिमंडळांत सामील झाले व शेवटपर्यंत भारताचे शिक्षणमंत्री म्हणून काम करीत राहिले. १९४७ पासून तों ५८ सालापर्यंत आज़ाद हे कॉंग्रेसच्या राजकारणांत आघाडीवर होते. पं. नेहरूंच्या खालोखाल कॉंग्रेसमध्यें त्यांचेंच वजन होतें. तथापि एका दृष्टीने ते या सर्व गोष्टींपासून अलिप्तच होते. त्यांनी म्हटलें आहे —

'धर्म, साहित्य, राजकारण व दर्शन कुठल्याहि क्षेत्रांत जिथे जिथे मला जावें लागलें, तिथे तिथे मी एकटा व एकाकी होतो. समकालीन मंडळींबरोबर जाणें मला जमलें नाही. ज्या कुठल्याहि रस्त्याने मी गेलों, त्यांत सर्व कांही समकालीन मी मागे टाकले आणि जेव्हा केव्हा मी मागे वळून पाहीं तेव्हा फक्त माझ्या गतीमुळे निर्माण झालेले धुळीचे ढगच दिसत. माझ्या संवगड्यांना मीं सोडलें नाही; पण ते माझ्याबरोबर येऊं शकले नाहीत. त्यांच्या व माझ्या पायांना कमीजास्त जखमा झाल्या होत्या. तथापि मी चालतच राहिलों आणि त्यामुळे कदाचित् थोडा रस्ताहि मीं साफ केला, असें म्हणतां येण्यासारखें आहे.'

तज़्केरा, गुब्बारे खातिर्, कौले फ़ैसल, दास्ताने करबला, इ. त्यांनी लिहिलेले ग्रंथ प्रसिद्ध आहेत; पण त्यांच्या लौकिकांत विशेष भर पडली ती त्यांच्या 'तरजुमानुल कोरान' या कुराणाच्या उर्दू अनुवादाने. इंडिया विन्स फ्रीडम् या नांवाने त्यांनी विस्तृत आत्मचरित्रहि लिहिलें आहे. [माझे समकालीन; हिं. वि. को.]

आज़ाद पंथ इस्लामचा हा एक उपपंथ आहे. हे लोक दाढी वाढवीत नाहीत व कोणतेहि धर्मग्रंथ मानीत नाहीत. या पंथाचे अनुयायी जलान येथे आढळतात. [मि. मि. इं.]

आजीवक पंथ एक संप्रदाय. प्राचीन काळींहि आजच्याप्रमाणेच भारतांत अनेक धर्मपंथ होते. पाणिनीच्या कालीं मस्करी नामक परिव्राजकांचा एक संप्रदाय होता. बुद्धाच्या काळांतील आजीवक नांवाचा पंथ व मस्करी संप्रदाय हे एकच असले पाहिजेत. कारण बौद्ध साहित्यांत आजीवक लोकांचे जे मूळ सिद्धान्त वर्णिलेले आहेत, ते मस्करी लोकांच्या सिद्धान्तांपेक्षा भिन्न नाहीत.

सीताहरणाच्या वेळीं रावण 'मस्करी'चा वेष धारण करून आला होता, असें कुमारदासाने (६ वें शतक) आपल्या 'जानकीहरणां'त सांगितलें आहे —

दम्भाजीवकमुत्तुङ्गजटामण्डितमस्तकम् ।
कञ्चिन्मस्करिणं सीता ददर्शाश्रममागतम् ।।

या श्लोकावरून मस्करी व आजीवक एकच होते, असें दिसतें. मस्करीच्या मस्तकावर लांब जटा वाढविलेल्या असत. उदापी कुंडियान हा या पंथाचा संस्थापक व आद्य आचार्य होता. मस्करी लोक आजीवकवृत्तीने राहत, म्हणजे उपजीविकेसाठी लोकांचें भविष्य सांगत हिंडत. अनेकांना त्यांच्या भविष्याची प्रचीति येई; त्यामुळे लोकांत यांना मान होता. ब्राह्मण, बौद्ध व जैन ग्रंथांत या संप्रदायाची माहिती मिळते.

बुद्धाने 'मंखली गोशाल' याचा जैन तीर्थकरांच्या मालिकेंत उल्लेख केला आहे. मंखली हें 'मस्करी'चेंच पालि रूप आहे. कांही जैन ग्रंथांत मंखली गोशाल याला आजीवक पंथाचा संस्थापक मानलें आहे. जैनांच्या सातव्या अंगांत गोशालाने सद्दालपुत्त नांवाच्या पुरुषास आजीवक पंथांत समाविष्ट करून घेतल्याचा उल्लेख आहे. भगवतीसूत्रांत गोशालाचें चरित्र दिलेलें आहे.

गोशालाच्या बापाचें नांव मंखली असून तो भिक्षेकरी होता. एका गोठ्यांत याचा जन्म झाला, म्हणून त्याला गोशाल हें दुसरें नांव मिळालें. मोठेपणीं गोशाल भिक्षा मागत हिंडत असतां, त्याची महावीराशीं अनेकदा गाठ पडली होती. महावीराला लोकांमध्ये मान मिळतो, हें पाहून गोशाल हर प्रयत्नांनी महावीराचा शिष्य बनला. परंतु गोशाल हा लबाड व अविश्वासू असल्यामुळे सहा वर्षांच्या अवधींत त्या दोघांची मैत्री तुटली. यानंतर गोशालाने आजीवक लोकांचा एक निराळा पंथ स्थापन केला. आजीवक संप्रदायाच्या इतिहासांत

श्रावस्ती नगरांत राहणाऱ्या हालाहला नांवाच्या कुंभारणीला महत्त्वाचें स्थान आहे. ती धनाढ्य, सुंदर व बुद्धिमान् होती. आजीवकमताच्या प्रचारासाठी तिने खूप पैसा खर्च केला. गोशाल तिच्याच घरीं राहत होता. पुढे सोळा वर्षांनी महावीर श्रावस्तीनगरींत आला असतां, त्याला गोशालाची चलती आढळली. त्याने गोशालाचें ढोंगी स्वरूप लोकांच्या नजरेस आणलें. तेव्हा दोन्ही पंथांची मारामारी होऊन तींत महावीराचा जय झाला. या अपकीर्तीचा गोशालाच्या मनावर अनिष्ट परिणाम झाला व सर्व नीतिनियम धाब्यावर बसवून तो नाचरंग व मद्यपान या व्यसनांत दंग झाला. मात्र पुढे त्याला आपल्या कृत्यांचा पश्चात्ताप झालेला दिसतो. सनपूर्व ५०० च्या सुमारास गोशाल मरण पावला.

गोशाल किंवा त्याचा एखादा शिष्य याने आपल्या पंथाचा आचारधर्म किंवा विचारपद्धति यांबद्दल कांहीच लिहून ठेवलेलें नाही. त्यामुळे आजीवकांच्या माहितीसाठी बौद्ध व जैन ग्रंथांचाच आधार घ्यावा लागतो. या संप्रदायाचे भिक्षु व गृहस्थ असे दोन प्रकारचे अनुयायी होते. भिक्षु विवस्त्र राहून तपःसाधना करीत. शरीराला भस्म लावीत. ते क्रमाने दुसऱ्या, तिसऱ्या व सातव्या घरीं भिक्षा मागत आणि भिक्षा न मिळाल्यास उपाशी राहत.

आजीवकांचे नीतिनियम कडक होते. ते कठोर वैराग्य पाळीत. गृहजीवनाचा त्याग करीत. देह गलिच्छ ठेवीत. नग्नता झांकण्यासाठी चटईसारखें कांहीतरी कमरेभोवती गुंडाळीत. अशोक वृक्षाची पूजा करीत. उंबर, वट, बोर, सतर व पिलंखु या वृक्षांचीं फळें खात नसत. हातांत मोराचा पिसारा घेऊन फिरत. स्थानांगसूत्रांत यांचीं चार प्रकारचीं सूत्रें सांगितलीं आहेत. औपपादिकसूत्रांत त्यांच्या भिक्षाचर्येचे नियम दिलेले आहेत. भगवतीसूत्रांत त्यांचें तत्त्वज्ञान सांगितलें आहे.

आजीवक हे आत्मवादी असून ते पुनर्जन्म व मोक्ष मानीत. नियतिवाद हें त्यांचें प्रमुख तत्त्व होतें. मस्करी शब्दाचा व्युत्पत्तिलभ्य अर्थ काम न करणारा, अकर्मण्यतावादी किंवा दैववादी असा आहे. बौद्ध निकायांत या अर्थाला पुरेशी पुष्टि मिळते. जगांतली कोणतीहि गोष्ट मानवाच्या प्रयत्नाने होत नसून ती नियतीने घडते. जीव जें सुख वा दुःख भोगतो, त्याला कांही कारण असत नाही व तें टाळण्यासाठी मनुष्य कांही करूंहि शकत नाही. कारण मनुष्य निर्बल आहे, निर्वीर्य आहे. अशा प्रकारच्या त्यांच्या विचारपद्धतीचे उल्लेख दीघनिकाय, उवासगदसाओ इ. बौद्ध व जैन ग्रंथांत आलेले आहेत. परस्त्रीगमन केल्याने मुनीला कसल्याहि प्रकारचें पाप लागत नाही, अशी गोशालाची शिकवणूक असल्याचें महावीराने सांगितलें आहे. गोशाल हा कांही दिवस महावीराचा शिष्य होता. यावरून त्या दोघांची विचारसरणी सामान्यतः सारखी होती, हें सिद्ध होतें. महावीर व गोशाल या दोघांचीं पुढील दोन तत्त्वें समान होतीं— (१) उत्तराध्ययनसूत्रांत सांगितल्याप्रमाणे सर्व प्राण्यांची एकेंद्रिय, द्विरिंद्रिय, त्रिरिंद्रय, चतुरिंद्रिय व पंचेंद्रिय अशी वर्गवारी, व (२) मानवजातीची सहा अभिजातींमध्ये विभागणी.

परंतु, कांही बाबतींत मात्र महावीर व गोशाल यांच्या विचारसरणींत असलेले भेद जैन आख्यायिकांमध्ये सांगितले आहेत. महावीराने आत्म्याचे बद्ध व मुक्त असे दोन भाग पाडले; परंतु गोशालाचें म्हणणें असें, की या आत्म्यांखेरीज तिसरा ' ना बद्ध ना मुक्त ' असा एक भेद पाडला पाहिजे. कारण महावीराच्या मुक्त अवस्थेंतहि एक प्रकारचा तात्त्विक उद्दामपणा आहे व आपल्या संप्रदायाच्या प्रतिष्ठेची लालसा आहे. त्यामुळे हे मुक्त जीवहि वस्तुतः बद्धच होत.

गोशालाने पुनर्जन्माच्या कल्पनेशीं ' चैतन्यसंक्रमणा 'चें नवीन तत्त्व जोडून दिलें. गोशालाच्या नीतिबाह्य वर्तनाबद्दल महावीराने टीका केली होती. त्याची तीव्रता कमी करण्यासाठी गोशालाने हा प्रयत्न केला, असें भगवतीसूत्रांत सांगितलें आहे.

आपल्या गुरूच्या चरित्राला अनुसरून त्याच्या शिष्यांनी अष्टचरमवाद नांवाच्या सिद्धान्ताचा प्रचार केला. भगवती सूत्रांत या ' अट्ठचरमाणि ' (शेवटच्या आठ गोष्टी) पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत – शेवटचा मद्याचा पेला, शेवटचें गीत, शेवटचा नाच, शेवटचें प्रियाराधन, शेवटचा झंझावात, शेवटचा तुषार उडविणारा हत्ती, शिलायुक्त अस्त्रांचें शेवटचें युद्ध व शेवटचा तीर्थंकर मंखलीपुत्त. गोशालाच्या आयुष्यांत अखेरीस ज्या कांही घटना घडल्या त्यांवरून वरील आठ चरम तत्त्वांची उत्पत्ति झालेली दिसते. त्यांपैकी पहिले चार प्रसंग म्हणजे गोशालाने निधनापूर्वीं केलेलीं कृत्यें होत. शेवटच्या तीन घटना त्याच्या मृत्युसमयीं घडलेल्या आहेत.

गोशालाच्या मृत्युसमयीं घडून आलेल्या अशाच एका प्रसंगावरून ' चत्तारि पाणगाइम् चत्तारि अपाणगाइम् ' म्हणजे प्राशन करायच्या चार गोष्टी व प्राशन न करतां केवळ स्पर्श करायच्या चार गोष्टी, या विशिष्ट तत्त्वाची उत्पत्ति झाली. तापाच्या झटक्यांत गोशालानें एक आंबा हातांत घेतला व कुंभाराच्या अंगणांत असलेल्या चिखलांत स्वतःला बुडवून घेतलें, असें सांगितलें आहे. या प्रसंगावरून त्याला एकदम वरील विचार सुचले असावेत.

महावीर व गोशाल यांचे मतभेद तात्त्विक नसून केवळ आचारासंबंधी होते. शीतजलप्राशन, न शिजविलेलें धान्य

खाणें, मुद्दाम तयार केलेल्या वस्तूंचा परिग्रह करणें व स्त्रीसंग करणें या चार गोष्टींबद्दल महावीराने जे निर्बंध घातले होते, ते गोशालाला मान्य नव्हते. गोशालाच्या नीतिबाह्य वर्तनामुळे महावीराला ब्रह्मचर्यव्रताची कठोर योजना करावी लागली व त्यावरूनच महावीर व गोशाल यांचें भांडण झालें.

महावीर व गोशाल यांचे दुसरेहि कांही मतभेद होते. महावीराने जैन मुनींना भिक्षेकरितां एक पात्र बाळगण्याची अनुमति दिली होती; तर गोशालाचें म्हणणें, की अन्न हें हातांच्या अंजलिरूप भिक्षापात्रांतूनच सेवन केलें पाहिजे. त्याचप्रमाणे महावीराने जरुरीपुरतें कटिबंधन-वस्त्र वापरण्याची अनुज्ञा दिली होती. तर गोशालने नग्न स्थितींत राहण्याचाच उपदेश केला.

अशोकाच्या शिलालेखांत आजीवकांचा प्रथम उल्लेख येतो. या शिलालेखांचा काल सनपूर्व २२७ हा आहे. त्यानंतर वराहमिहिराने (इ. स. सुमारें ५५०) बृहज्जातक व लघुजातक या आपल्या ग्रंथांत आजीवकांसह सहा प्रकारच्या तापसांचा उल्लेख केलेला आहे. शीलार्क (इ. स. सुमारें ८७६) नांवाच्या जैन टीकाकाराने आजीवकांचा दिगंबर जैन म्हणून उल्लेख केलेला आहे. हलायुधानेहि (इ. स. सुमारें ९५०) आपल्या अभिधानरत्नमाला नामक ग्रंथांत दिगंबरानांच आजीवक म्हणतात, असें सांगितलें आहे. परंतु मुनि कल्याण विजयजींच्या मतें, आजीवक हे दिगंबर जैन नसून ते भिन्न संप्रदायाचे होते.

गोशालाला मंखलीपुत्त किंवा मंखली (दंडधारी) असें म्हणत असत. यावरून तो मुळांत एकदंडी तापसांच्या पंथापैकी एक होता, हें स्पष्ट दिसतें. पुढे जरी त्याने महावीराची विचारपद्धति स्वीकारली, तरी आपलीं स्वतःचीं कांही मतें व दंड घेण्याची चाल कायम ठेवली. यामुळेच निर्ग्रंथ पंथामध्ये गोशालाच्या अनुयायांना आजीवक किंवा एकदंडी हें नांव मिळालें. सांप्रतहि दिगंबर जैन हातांत दंड धारण करतात.

इ. स. ८ व्या शतकांत आजीवकांचा स्वतंत्र संप्रदाय नष्ट झाला व हळूहळू ते शैव व वैष्णव संप्रदायांत शिरले, असें कांही विद्वान् मानतात. आजकालच्या नागा लोकांत त्यांचा अंतर्भाव झाला, असेंहि एक मत आहे. **पाहा** – मंखली गोशाल. [म. ज्ञा. को.; विश्वधर्मदर्शन; बौ. द. मी.]

आजेचीर लग्नांत वधूवरांच्या आजीला जें लुगडें देतात, त्याला आजेचीर असें म्हणतात.

आजेपाडवा दौहित्र श्राद्ध पाहा.

आज्य 'अजायाः इदम् आज्यम्' = शेळीचें (तूप). मुळांत आज्य म्हणजे शेळीचें तूप असावें. पुढे आज्य हा शब्द गायीचें तूप या अर्थी रूढ झाला.

आज्यं हव्यमनादेशे जुहोतिषु विधीयते

(गोभिल गृ. १. ११३)

अर्थ – एखाद्या विधींत हवनीय द्रव्याचा आदेश केला नसेल, तर त्या जागीं आज्य हें हवनीय म्हणून घेतलें जातें.

घृतं वा यदि वा तैलं पयो वा दधि यावकम् ।
आज्यस्थाने नियुक्तानामाज्यशब्दो विधीयते ॥

अर्थ – घृत, तेल, दूध, दही किंवा यवांचा पदार्थ, हीं आज्यस्थानीं नियुक्त केल्यास त्यांनाहि आज्य असेंच म्हणतात.

आज्यकंबलविधि भुवनेश्वराच्या चौदा यात्रांपैकी एक यात्रा. जेव्हा सूर्य मकरराशींत प्रवेश करतो, तेव्हा ही यात्रा करतात.

आज्यदान एक दान. एक प्रस्थ म्हणजे सुमारे वीस शेर तूप या दानासाठी घेतात.

कामधेनोः समुद्भूतं सर्वक्रतुषु संस्थितम् ।
देवानामाज्यमाहार अतः शान्ति प्रयच्छ मे ॥

अर्थ – कामधेनूपासून उत्पन्न झालेलें, सर्व यज्ञांत असलेलें आज्य देवांचा आहार आहे. तेव्हा (या दानाने) मला शान्ति दे.

या मंत्राने प्रार्थना करून ब्राह्मणाला आज्याचें दान देतात. [दा. चं.]

आज्यदोहसाम मूर्धानं दिवः... (साम. १.८७; ऋ. ६. ७. १). त्वां विश्वे...; (साम. २.४९१ ऋ. ६. ७. ४); आणि नाभिं यज्ञानाम् (साम. २. ४९२ ऋ. ६. ७. २) या तीन मंत्रांच्या आधारें जें साम म्हणतात, त्याला आज्य दोह साम ' असें नांव आहे. [हि. ध.]

आज्यप एक पितृगण. हे कर्दम प्रजापतीच्या सत्ताक्षेत्रांत वास्तव्य करतात. अजा = शेळी, हिचें तूप प्राशन करतात, म्हणून यांना हें नांव मिळालें आहे. हे पुलहाचे वंशज असून दक्षकन्या स्वधा ही या सर्वांची पत्नी आहे. तिला या पितरांकडून वयुना व धारिणी अशा दोन कन्या झाल्या व त्या दोघीहि ब्रह्मवादिनी बनल्या. (भाग. पु. ४. १. ६३-६४). विरजा ही नहुषाची पत्नी आज्यपांची मानस कन्या होती. वैश्यवर्ग या पितरांचें पूजन करतो. [पु. इं.]

आज्यभाग होमाच्या प्रारंभीं आधारानंतर स्थंडिलावर प्रथम उत्तरेकडे व नंतर दक्षिणेकडे अग्नि व सोम यांना उद्देशून ज्या दोन घृताच्या वर्तुळाकृति आहुति देतात, त्यांना आज्यभाग म्हणतात. आज्यभाग हे यज्ञाचे चक्षू होत. पूर्णमास यागांत या आज्यभागांना वार्त्रघ्न व दर्शयागांत वृधन्वन्त असें नांव आहे. [सं. कौ.; हि. ध.]

आज्यशस्त्र सोमयागांत प्रातःसवनामध्ये होता जें पहिलें शस्त्र म्हणतो, तें आज्यशस्त्र होय. यांत इन्द्राग्नी देवतेसाठी ऋचांचें स्वरविरहित म्हणजे एकश्रुतीने पठण करायचें असतें.

आज्यस्तोत्रें 'अग्न आयाहि वीतये', 'आ नो मित्रा वरुणा', 'आयाहि सुषुमा हि ते' व 'इन्द्राग्नी आगतं सुतम्' हीं प्रातःसवनांत गायत्र सामाने गायिलीं जाणारीं चार सूक्तें आज्यस्तोत्रें होत. [जै. न्या. १. ४. ३]

आज्यस्थाली एखाद्या यागास आवश्यक तितकें तूप राहूं शकेल, एवढी मातीची स्थाली. मंत्र म्हणून या आज्यस्थालींत तूप ओतून घेतात. आज्यस्थाली ही काश्याची किंवा चांदीचीहि करतात. प्रायश्चित्तहोमासाठी आणि ध्रुवेच्या पूरणासाठी आज्यस्थालीमधूनच आज्य घ्यायचें असतें. [विद्याधरशास्त्री भिडे]




आज्यस्थाली

आट भागवतम् आंध्रांतील एक नृत्यनाटच. कृष्णा-जिल्ह्यांतील कुचिपुडी गांवांतील भागवत हें नृत्य करतात. पाहा – कुचिपुडी भागवतम्.

आटव्य दक्षिणापथांतील लोक. [पु. इं.]

आट्यापाट्या एक महाराष्ट्रीय खेळ. हा खेळ किती प्राचीन आहे, तें सांगतां येत नाही. पण तुकारामाच्या अभंगांत या खेळांतील मृदुंगपाटीचा उल्लेख आलेला आहे. पूर्वी शिमग्याच्या सणाच्या वेळीं हा खेळ खेळत असत.

या खेळांत पाटचा पाडलेल्या असतात. आरंभीच्या पाटीला चांभारपाटी अगर कपाळपाटी असें म्हणतात. सर्व पाटचांना दुभागून जाणाऱ्या आडव्या पाटीला मृदुंगपाटी किंवा सूरपाटी



आटचापाटचांचें क्षेत्र

असें नांव आहे. शेवटच्या पाटीला लोणपाटी म्हणतात. सूरपाटी व इतर पाटचा यांमधील छेद तो कांडेंछेद होय. सूरपाटीच्या योगाने झालेला पाटीचा प्रत्येक विभाग म्हणजे पाटीचें कांडें होय. दोन पाटचांमधील सूरपाटीचा भाग हा सूरपाटीचें कांडें होय. चांभारपाटी वा सूरपाटी धरणाऱ्याला

मृदुंग किंवा सूर असें नांव आहे. पाटचावर उभें राहून विरुद्ध पक्षाला अडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या पक्षाला धरणारे व त्या विरुद्ध पक्षाला खेळणारे असें म्हणतात. खेळणाऱ्याने पाटी धरणाऱ्याला चांभारपाटीच्या विरुद्ध दिशेला तोंड करायला सांगणें, याला तोंड मागणें म्हणतात. धरणाऱ्याच्या शरिराचा कोणताहि भाग पाटीच्या मर्यादेच्या बाहेर मागील अगर पुढील बाजूला जमिनीवर लागला, तर त्याचा पाय चुकला असें म्हणतात. धरणाऱ्याचीं पाउलें व गुडघे यांशिवाय कोणताहि भाग जमिनीला टेकला, तर त्याने हात टेकले असें म्हणतात. धरणारा इसम एक पाऊल जमिनीपासून उचलून दुसऱ्या पायावर उभा राहिला असतां, त्याने पाय उचलला असें होतें. खेळणाऱ्याचें पाऊल मर्यादेच्या बाहेर गेल्यास त्याचा पाय बाहेर गेला असें म्हणतात. हे सर्व खेळांतील दोष होत. विरुद्ध पक्षाच्या खेळगडचाला नियमांचें उल्लंघन न करतां हाताने स्पर्श करणें, याला गडी मारणें असें नांव आहे. चांभारपाटीकडून लोणपाटीकडे खेळत जाणें याला वरून खाली जाणें व लोणपाटीकडून उलटून चांभारपाटीकडे खेळत येणें याला खालून वर येणें, असें म्हणतात. खेळगडचांपैकी खालून वर येणारा व वरून खाली जाणारा यांची गांठ पडल्यास त्याला लोण मिळणें असें नांव आहे आणि तें पहिल्याने दुसऱ्याला पोंचविलें असें म्हणतात. चांभारपाटींतील कांडेछेदांत निदान एक पाऊल ठेवून व पुढच्या पाटींतील कांडेछेदांत निदान एक पाऊल टाकून पुन्हा चांभारपाटींतील कांडेछेदांत एक पाऊल टाकणें, या सर्व क्रियेला कांडें चिरणें अशी संज्ञा आहे.

खेळापूर्वी ओली-सुकी होते. जिंकणारा नायक मर्जीप्रमाणे पाटचा धरणें अगर खेळणें पतकरतो. खेळणाऱ्या संघांतील सर्व गडी चांभारपाटीबाहेर, त्या पाटीच्या बाहेरच्या रेषेला पाय लावून पाटचा ओलांडण्याच्या तयारीने उभे राहतात. पाटी धरणारे खेळाडू चांभारपाटी सोडून, त्या पाटीकडे तोंड करून एका पाटीवर एक, याप्रमाणे लोणपाटीपर्यंतच्या आठ पाटचांवर खेळणाऱ्याला अडविण्याच्या तयारीने उभे राहतात. चांभारपाटीच्या कांडेछेदांत एक पाऊल ठेवून सूर, कांडे चिरण्याच्या तयारीने सुरावर उभा राहतो. डाव सुरू होतांच सूर कांडें चिरूं लागतो व खेळणारे चांभारपाटीवरून आंत घुसून पाटचा ओलांडूं लागतात. सुराचें कांडें चिरणें होईपर्यंत खेळणाऱ्यांपैकी बहुतेक गडी तिसऱ्या पाटी धरणाऱ्यापर्यंत येऊन पोचतात. एवढचांत सूर तिसऱ्या पाटीपर्यंत येतो व तिसऱ्या पाटीवाल्याबरोबर कोंडी करून त्यांत खेळाडूंना अडवितो. मग पाटीवाल्याचें अथवा सूराचें आपणांकडे फारसें लक्ष नाही असें पाहून 'लागणारे' (हुलकावणी देणारे) गडी मोठचा कुशलतेने कोंडी फोडतात. लागलेला एक गडी कोंडींतून बाहेर पडला, की त्याची जागा दुसरा घेतो व पुन्हा हुलकावणी द्यायला सुरवात होते. याप्रमाणे गडी कोंडीच्या बाहेर पडतात. कोंडींतून सुटलेला गडी पाटींतून जाण्यासाठी पाटीवाल्याला हुलकावण्या देतो व पाटींतून जातो. खेळणाऱ्यांपैकी एकाने लोणपाटी ओलांडली, की तो त्या पाटीवाल्याच्या मागे येऊन 'तोंड' असें म्हणतो. मग पाटीवाला तोंड फिरवितो. नंतर खेळणारा ती पाटी ओलांडण्याचा प्रयत्न करूं लागतो. ही पाटी ओलांडण्यापूर्वी जर वरून एखादा गडी मागच्या बाजूने त्या पाटीवाल्यापर्यंत आला, तर तो गडी तोंड मारणारा गडी ज्या चौकांत नसेल, त्या चौकांत येतो. म्हणजे त्याला लोण मिळतें. नंतर दोहोंपैकी एक त्या पाटींतून वर जातो व त्या दुसऱ्या पाटीवाल्यामागे जाऊन 'तोंड' असें म्हणतो. लगेच तो पाटीवाला तोंड फिरवितो. त्याच्या पाटींत वरच्या बाजूला जर खेळणारे गडी असतील, तर ते वरप्रमाणेच हा पक्का गडी ज्या चौकांत असेल, त्या चौकांत येतात व त्यांनाहि लोण मिळते. याप्रमाणे खालून वर जातांना पुढचा खेळाडू दरेक पाटीवाल्याजवळ तोंड मागतो व त्या पाटींतले गडी खाली येऊन लोण मिळवितात. लोण घेऊन खेळाडू पाटी ओलांडून वर वर येऊं लागले, की सूर पुन्हा कोंडी सोडतो व पुढचा लोणवाला गडी ज्या पाटींत असेल त्या पाटींत जाऊन कोंडी करतो. लोण आलें, की खेळाला जास्त रंग चढतो. खेळांत थोडी गडबड व गोंधळ सुरूं होतो. लोण आणणाऱ्याला, कच्च्या गडचाला लोण पोंचवितांना कोणी बारगळणार नाही, याची काळजी घ्यावी लागते; तर कच्च्या गडचाला पक्क्या गडचाकडे जातांना सूर मधे आडवा येणार नाही, याकडे लक्ष ठेवावें लागतें. सूरहि पक्क्या गडचांना कोंडींत अडवीत अडवीत वर येतो किंवा एखादा खेळाडू पकडण्यासाठी सूरावर धावपळ करीत राहतो. खेळणारे पाटचा ओलांडीत चांभारपाटीपर्यंत वर आले व त्यांच्यापैकी एखाद्याने ती पाटी ओलांडली, की लोण होतें. प्रतिपक्षावर किती लोणें लागलीं त्यावरून जय-पराजय ठरवितात. या खेळाबाबत बरेच नवीन नियम झाले आहेत. [व्या. ज्ञा. को.; म. ज्ञा. को.)

आठविंद कुणबी लोकांचा एक सण. आश्विन वद्य ८ मी ही या सणाची तिथि होय. या दिवशीं संध्याकाळीं घरासमोर रांगोळीचा कणगा काढतात व त्याला शिडी लावलेली दाखवितात. त्याच्या पुढे एकापासून आठापर्यंत मानवाकृती काढतात. या आकृतींना गोसावी असें म्हणतात.

संध्याकाळीं या गोसाव्यांची पूजा करून त्यांना काकडीच्या घावनांचा नैवेद्य दाखवितात. हे गोसावी कणग्याचे रक्षक असावे. कित्येकदा खळ्यावर कणगे काढतात; पण त्या वेळीं गोसावी मात्र काढीत नाहींत. [बदलापूर]

आठांगुळें अष्टमांगल्य पाहा.

आडनांव आडनांव म्हणजे कुलनांव. इतरांपेक्षा कोकणस्थ ब्राह्मणांत आडनांवें प्रामुख्याने दिसतात. तीं कशावरून पडलीं, हा एक संशोधनाचा विषय आहे. कारण तीं धंद्यांवरून किंवा हुद्द्यांवरून पडलेलीं नाहीत, असें ना. गो. चापेकर यांचें मत आहे. आडनांव याला प्रतिशब्द आहे उपनांव. एका कुलांतील सर्वांचा निर्देश ज्याने करतां येतो, तें आडनांव होय. अर्धनाम या संस्कृत शब्दाचें अड किंवा आडनांव हें अपभ्रष्ट रूप आहे, असें कांहीजण प्रतिपादितात. परंतु ही व्युत्पत्ति अर्थाला अनुकूल नाही. शब्दकोशांत आडनांवाची व्युत्पत्ति पुढीलप्रमाणें दिलेली आहे — अड्डनाम = आडनांव = श्रेष्ठ नांव. कानडींत अड्डु शब्दाचा अर्थ श्रेष्ठ असा होतो.

पण आडनांव म्हणजे श्रेष्ठ नांव असा अर्थ घेतां आला, तरी त्याचा वाईट नांव असाहि अर्थ होऊं शकेल. काळे, आगलावे, तिरडे, घुले, आचारी, कामाठी, भस्मे, हीं आडनांवें कमीपणा दाखविणारींच आहेत. गौण अथवा दुय्यम प्रतीचें नांव सुचविणारा उपनाम शब्द अगोदरचा असला पाहिजे. आडनांव हा शब्द त्या नंतरचा असावा.

इंग्रजी राज्य आल्यावर आडनांवांचें महत्त्व वाढलें. जुन्या काळीं व्यक्तीचें नांव व पुढे बापाचें नांव, एवढाच नामनिर्देश करीत. उदा० वासुदेव बळवंत, अण्णाजी दत्तो इत्यादि. आडनांवें अस्तित्वांत येतात, त्यामागे बहुधा कांही कारणें असतात. अनेक कारणांनी आडनांवें बदलतातहि. उदा० इचलकरंजीकर ब्राह्मणवंशाला घोरपडे हें मराठा जातीचें नांव मिळालें आहे. बागल, पोळ, सावंत, थोरात वगैरे आडनांवें ब्राह्मणकुळांनी मराठा जातीच्या आपल्या धन्यांवरून घेतलेलीं आहेत. कांही प्रभु व ब्राह्मण नोकरांनी इंग्रज मालकांचीं नांवें स्वीकारलीं आहेत. कांही प्रांतांत कुलवाचक आडनांवें नसतात; तेव्हा आडनांवांप्रमाणेच कांही विशिष्ट आळीचीं, गांवांचीं किंवा दुसरीं नांवें वैयक्तिक नांवाच्या पुढे किंवा मागे जोडून आडनांवाचे कार्य भागवितात.

मराठ्यांतील बरींच आडनांवें फार प्राचीन असावीं. कारण शेलार, पवार, मोरे, चाळके, पालव, कदम हीं त्यांचीं आडनांवें अनुक्रमें शिलाहार, प्रमार (परमार ?) मौर्य, चालुक्य, पल्लव, कदंब, यांपासून व्युत्पादितात. महारांचीं कांही आडनांवें नागकुलांच्या नांवांवरून आलेलीं आहेत, असें श्री. राजवाडे यांनी दाखविलें आहे. कित्येकांनी आपल्या देवकांचीं नांवें आडनांवें म्हणून स्वीकारलीं आहेत; तर कांही ब्राह्मणांनी गोत्रनामच आडनांव म्हणून लावलें आहे. प्रभुदेसाई, पट्टवर्धन, भानु, उपाध्याय, पाठक व घळशे हीं आडनांवें यादव व चालुक्य यांच्या ताम्रपटांत सांपडलीं आहेत.

बंगालमधील शास्त्री, आचार्य, भट, भट्टाचार्य, उपाध्याय, मुखोपाध्याय हीं आडनांवें मूळच्या उपाध्यायपेशाचीं निदर्शक आहेत. बोस व घोष, दत्त व मित्र, सेन व गुप्ता हीं नांवें जातिबोधक आहेत. गुप्त हें नांव वैद्यांत व दास हें कायस्थांत आहे. पण एकंदरींत, बंगाल प्रांतांत आडनांवें फार कमी आहेत. मद्रास, म्हैसूर या भागांतील ब्राह्मणांत अय्यर व अय्यंगार हीं पंथदर्शक आडनांवें प्रचलित आहेत. त्याच भागांतील-शूद्रांमधील नायडू, मुदलियार, पिल्ले हीं नांवें विशिष्ट अधिकारवाचक आहेत. शीख व रजपूत लोकांत आडनांवेंच नसतात. ते आपल्या नांवापुढे सिंग (सिंह) हें पद जोडतात. कांही लोक देवकांचीं नांवें घेऊन त्यांचीं आडनावें बनवितात; तर कित्येक लोक नांवांतील उत्तर भाग हाच आडनांव असें समजतात. पंजाबी व काश्मिरी हिंदूंत अशीं कांही नांवें आहेत.

मलबारांत नायर व मेनन या जातिवाचक पदव्या आडनांवांप्रमाणे योजतात. उत्तर भारतांत राम, प्रसाद, दास, लाल, चंद, मल्ल, नंद हीं नांवें जेव्हा व्यक्तीच्या नांवांत अंतर्भूत असतात, तेव्हा इंग्रजींत लिहितांना हा उत्तरभाग आडनांवासारखा लिहितात. मुसलमानांत आडनांवें क्वचितच असतात. बक्ष, दीन, गुलाम, ख्वाजे, फकीर, काझी, मुनशी, शेख, सय्यद हीं पंथदर्शक किंवा पदवीवाचक नांवें हल्ली ते आडनांवाप्रमाणे योजूं लागले आहेत. पारशी लोकांची आडनांवें राहण्याच्या ठिकाणांवरून किंवा धंद्यावरून पडलेलीं असतात. उदा० बाटलीवाला, रेडीमनी, कॉंट्रॅक्टर, सकलातवाला, एडनवाला, पन्थकी, जोशी, संजाना इत्यादि.

महाराष्ट्रीय आडनांवांचें वर्गीकरण सामान्यत: पुढीलप्रमाणे केलेलें आहे —

धंद्यावरून किंवा पदवीवरून पडलेलीं नांवें — कारखानीस, देशमुख, देशपांडे, कुलकर्णी, जोशी, पाटील, पोतदार, सुतार, माळी, पुराणीक, फडणीस, भट, वैद्य, आचार्य इत्यादि.

गांवांवरून पडलेलीं नांवें — पुणेकर, सोलापूरकर, दाभोळकर, चिपळूणकर, म्हैसूरकर, आजगांवकर इ.

रंगांवरून पडलेलीं नांवें -- काळे, गोरे, हिरवे, पांढरे, पिवळे, करडे इत्यादि.

प्राणिवाचक नांवें-- रेडे, घोडे, तट्टू, ढेकणे, वाघ, मांजरे, एडके, बगळे, कावळे, राजहंस, कोकीळ, ढोर, टोळ इत्यादि.

नात्यावरून पडलेलीं नांवें -- नातू, पोरे, सातपुते, अष्टपुत्रे, नवरे इत्यादि.

वृक्षवनस्पतींवरून पडलेलीं नांवें — पिंपळे, मोगरे, फुले, पळशे, उंबरे, खैर, कळके, मुळचे, भेंडे इत्यादि.

पदार्थांवरून पडलेलीं नांवें -- साखरे, तेले, कस्तुरे, पितळे, सोने, तांबे, पर्वते इत्यादि.

निंदाव्यंजक नांवें -- आगलावे, घोडमुखे, नकटे, बोंबले, खुळे, बाताडे, बावळे, कोळसे इत्यादि.

गुणवाचक नांवें -- धुरंधर, अजिंक्य, दाते, पूर्णपात्रे, सहस्त्रबुद्धे, पंडित, महाबळ, मनोहर, रास्ते, विनोद, जयवंत इत्यादि.

प्राचीन ऋषींवरून पडलेलीं नांवें — वैशंपायन, व्यास, अत्रे, गर्गे, पराशर, गौतम, विश्वामित्र, जमदग्नि इ.

शरीरावयवांवरून पडलेलीं नांवें--पोटे, डोळे, माने, काणे. डोके इत्यादि.

अश्लील शब्दांवरून आलेलीं नांवें -- हगवणे, लवडे, नलवडे, गांडेकर, झवकिरे इत्यादि.

वि. का. राजवाडे यांनीं पौराणिक व श्रौतसूत्री गोत्रांवरून अनेक आडनांवें व्युत्पादिलीं आहेत. जसें -- कौरव्या:पासून कर्वे, आकशायेया:पासून आगाशे; श्वानेया:पासून साने; गौधिलिपासून गोंधळे इत्यादि. परंतु यांत अडचण अशी आहे, की कर्वे यांचें गोत्र कौरव्य नसून गार्ग्य आहे. आगाशे यांचें गोत्र आकशायेय नसून कौशिक आहे, तर मराठे यांचें कपि आहे.

कांही वेळां आडनांवें विचित्र पद्धतीनें लिहिलेलीं आढळतात. महाराष्ट्रांतले जे लोक कर्नाटक, तंजावर या भागांत गेले आहेत, ते प्रथम वडिलांचें नांव, नंतर आडनांव हीं आद्याक्षरांत लिहितात व शेवटीं स्वतःचें नांव लिहितात. उदा० व्ही. पी. माधवराव म्हणजे माधवराव विश्वनाथ पाटणकर.

भारतांत आडनांवें बदलण्यास कायद्यानें बंदी नाही. त्यामुळे कांही ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणी आडनांवें घेतलेलीं आहेत. मद्रास प्रांतांत सौराष्ट्र जातीचे लोक अय्यर व अय्यंगार हीं आडनांवें लावूं लागले आहेत. [चित्पावन; म. ज्ञा. को.]

आडपाप

द. भारतांतल्या जमीनदार स्त्रियांच्या दासींना हें नांव आहे. यांना लग्न करण्याची परवानगी नसल्याने त्या वेश्यावृत्तीने राहतात. यांचे पुत्र स्वतःला बलिज म्हणवून घेतात. [का. ट्रा. स. इं.]

आडंबर

एक रणवाद्य. एक प्रकारचा ढोल. हा ढोल वाजविणाऱ्याला आडंबराघात असें म्हणत. पुरुषमेधांतल्या बलींच्या यादींत आडंबराघाताचें नांव आहे (वा. सं. ३०. १९; श. ब्रा. १४. ४. ८. १). या शब्दाच्या मागे एक कथा असून ती सुवण्णकक्कट जातकांत सांपडते --

सुवण्णकक्कट नांवाचा एक प्रचंड खेकडा गंगेच्या डोहांत राहून हत्तींना मारून खात असे. बोधिसत्त्वाने हत्ती होऊन त्याला मारलें. त्याचे दोन आंकडे गंगेच्या प्रवाहांतून वाहत गेले. एक आंकडा वासुदेव कृष्णाला मिळाला. त्याचा त्याने आनक नांवाचा दुंदुभि केला. दुसरा आंकडा समुद्रांत गेला, तो असुरांना मिळाला. त्याची त्यांनी आडंबर नामक भेरी केली. इंद्राने त्या असुरांचा पराजय केल्यावर ती भेरी इंद्राला मिळाली. मेघगर्जना होते ती इंद्राच्या या आडंबरभेरीचीच गर्जना होय, असा खुलासा आढळतो. या आडंबरावरूनच 'अवडंबर माजविणें' हा वाक्प्रचार रूढ झाला आहे. [लो. सा. रू.]

आढक

द्रव पदार्थ मोजायचें एक प्राचीन माप. चरकाच्या मतें आढक व पात्र हे एकमेकांचे पर्याय शब्द आहेत (कल्पस्थान १२.९४). चरकाने दिलेलें आढकाचें कोष्टक असें--

४ कर्ष = १ पल
२ पल = १ प्रसृति = ८ तोळे
२ प्रसृति = १ अंजलि किंवा कुडव = १६ तोळे
४ कुडव = १ प्रस्थ = २५६ तोळे
४ प्रस्थ = १ आढक
४ आढक = १ द्रोण = १०२४ तोळे = १२$\frac{4}{5}$ शेर

पाणिनीने दोहोंचाहि एकदम उल्लेख केला आहे. [पा. भा.]

आढा ओपा

(१९ वें शतक) आढा गोत्रांतील एक चारण. सिरोही राज्यांतील पेशवा हें याचें गांव होय. याचा जन्म केव्हा झाला, जीवन कशा प्रकारें गेलें, याला राजाश्रय लाभला होता किंवा काय, याबद्दल कांहीच माहिती मिळत नाही. याच्या काव्यावरून एवढेंच समजतें, की हा ईश्वरभक्त होता.

दुसऱ्यावर आक्रमण करणारा व स्वतःला विजेता म्हणविणारा हा वास्तविक विजेताच नव्हे; ज्याने हरीला जाणलें, तोच खरा विजेता होय असें सांगून ओपा पुढे म्हणतो --

ओपलो कहै, मत कोय भूला अनंत
वड़ा-वड़ा जोध जोधार वीता ।
विसन न पछाणियो जिके रीता वुहा
जिहा हर जाणियो जिके जीता ।।

अर्थ – परमेश्वराला विसरूं नका. मोठमोठे योद्धे मरून गेले. ज्यांनी विष्णूला ओळखलें नाही, त्यांचा जन्म व्यर्थ गेला. ज्यांनी हरीला ओळखलें, त्यांनीच खरें जिंकलें.

ओपाचीं गीतें राजस्थानांत लहान-थोर सर्वांच्या मुखीं आहेत. [संयुक्त राजस्थान]

आढो नाच माळव्यांतील एक लोकनृत्य. यांत स्त्रिया कमरेच्या खालीं वांकून नाचतात. नाचाची गति संथ असते. [संमेलन पत्रिका]

आततायी 'आततेन विस्तीर्णेन शस्त्रादिना अयितुं शीलमस्य' = धनुष्याला दोरी लावून जातो तो अर्थात् चढाई करायला किंवा ठार मारायला उद्युक्त झाला आहे, तो. (वाचस्पत्यम्)

अग्निदो गरदश्चैव शस्त्रोन्मत्तो धनापहः ।
क्षेत्रदारहरश्चैतान् षड् विद्यादाततायिनः ॥

(शुक्रनीति)

अर्थ – आग लावणारा, विषप्रयोगकरणारा, हातीं शस्त्र मिळाल्यामुळे उन्मत्त झालेला, दरोडेखोर, शेत कापून नेणारा, किंवा दुसऱ्याची बायको पळविणारा असे सहा प्रकारचे लोक आततायी होत.

गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम् ।
आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन् ।


(मनु. ८. ३५)

अर्थ – गुरु, बाल, वृद्ध किंवा बहुश्रुत ब्राह्मण यांपैकी जर कोणी आततायी होऊन आला असेल, तर त्याला कसलाहि विचार न करतां ठार मारावें.

तपस्वी, विद्वान् अशा ब्राह्मण आततायीला ठार मारलें असतां, ती ब्रह्महत्त्या होत नाही, असें भृगूचें मत असल्याचें कात्यायन सांगतो. पण या उलट, ब्राह्मण आततायीला ठार मारूं नये असें मेधातिथि, अपरार्क व कुल्लूक म्हणतात.

आतपत्र 'आतपात् त्रायते इति' = उन्हापासून रक्षण करतें तें. देवाच्या व राजाच्या मस्तकावर धरल्या जाणाऱ्या छत्राला आतपत्र म्हणतात. हें जेव्हा शुभ्र असतें, तेव्हा त्याला सितातपत्र म्हणतात. **पाहा–छत्र.**

आतश बेहेराम प्राचीन काळापासून आर्य लोकांत सूर्य व अग्नि यांच्या विषयीं पूज्यभाव आहे. पारशी लोक हे आर्यांच्या इराणी शाखेचे वंशज असल्यामुळे त्यांच्यांतहि अग्नीचें महत्त्व फार आहे. परमेश्वराची प्रार्थनासुद्धा ते लोक अग्नीसमक्ष किंवा सूर्यासमक्ष करतात. अग्नि जतन करून ठेवण्यासाठी पारशी लोक मंदिरें उभारतात. या मंदिरांना आतश बेहेराम, आतश अद्रान, आतश दादगा, आतशखाना, अग्यारी इ. नांवें आहेत. आतश बेहेराम हें या सर्वांत श्रेष्ठ होय. यांतील अग्नि सिद्ध करण्यास एक वर्षाच्यावर विधि करावे लागतात. आतश अद्रान सिद्ध करण्यास मात्र चार दिवस पुरतात. अग्यारी (अग्निगृह) ही सर्व मंदिरांत कनिष्ठ प्रतीची मानतात. पण जिथे जिथे पारशांची थोडीबहुत तरी वस्ती आहे, तिथे तिथे अग्यारी ही असतेच. आतश दादगा हा पारशांचा गृह्याग्नि होय. पारशी जेव्हा घर बदलतात, तेव्हा आतश दादगा आपल्याबरोबर घेऊन जातात व तो कधी विझूं देत नाहीत.



आतश बेहेराम – मुंबई

भारतांत एकंदर आठ आतश बेहेराम आहेत. त्यांपैकी चार मुंबईंत आहेत. पहिला आतश बेहेराम उदवाड्यास सुमारें १७४२ सालीं बांधला. दुसरा नवसारी येथे १७६५ सालीं बांधला. तिसरा इ. स. १७८३ सालीं दादाभाई नोशीरवानजीने कदमी पारशांसाठी मुंबईंत बांधला. चौथा बाई जाईनीने इ. स. १८२३ सालीं सुरतेला शाहनशाही पारशांकरितां बांधला. सुरतेलाच कदमी पारशांकरितां पेस्तनजी काळाभाई वकील याने १८२३ सालीं पांचवा उभारला. सहावा बमनजी, रुस्तमजी व अर्देसर हरमजी वाडिया या तीन बंधूंनी १८३० सालीं शाहनशाही पारशांकरितां बांधला. सातवा व आठवा अनुक्रमें १८४५ व १८९७ सालीं मुंबईला बांधले गेले. आतश बेहेरामचा अग्नि सिद्ध करण्याचा विधि अतिशय

बिकट असून तो अग्नि एकंदर हजार अग्नींपासून तयार करायचा असतो. प्रथम पुढील सोळा अग्नि वेगवेगळ्या ठिकाणांहून जमवितात-मृताच्या दहनाचा, रंगारी, राजा, कुंभार, विटा करणारा, तांबट, सोनार, टांकसाळवाला, लोहार, शिकलगार, भडभुंजा, दारुभट्टीवाला, योद्धा, धनगर, पुरोहित या सर्वांच्या घरचा व आकाशांतील विजेचा असे ते एकूण सोळा होतात. यांतील प्रत्येक अग्नि शुद्ध करून घेतात. उदा० प्रेतदहनाचा अग्नि मिळाल्यावर तो दुसऱ्या एका जागीं नेतात. त्यावर छिद्रें पाडलेला धातूचा पत्रा अग्नीला स्पर्श न होईल अशा बेताने धरतात. त्या पत्र्यावर चंदन, धूप इ. सुगंधी द्रव्यें ठेवलेलीं असतात. वाऱ्याने व उष्णतेने हीं द्रव्यें पेटलीं म्हणजे जो नवा अग्नि तयार होतो, तो दुसऱ्या जागीं नेतात. तिथे वितीवितीच्या अंतरावर एक्याण्णव खड्डे खणलेले असतात. त्या प्रत्येकांत इंधन असतें. एका खड्डयांत पत्र्यावरील अग्नि टाकतात व ज्वाला निर्माण झाली म्हणजे त्यावर धातूचा पत्रा पुन्हा धरून त्यांतील अग्नीने दुसऱ्या खड्ड्यांतील इंधन पेटवितात. याप्रमाणे सर्व खड्ड्यांतील अग्नि प्रज्वलित झाले, कीं शेवटच्या खड्ड्यांतील अग्नि मंदिरांत नेतात. तिथे त्या अग्नीच्या कांही भागावर यस्न मंत्रांनी संस्कार करून तो बाजूला ठेवतात. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशीं अग्नीच्या बाकीच्या भागावर यस्न मंत्रांनी संस्कार करतात. मग अहुरमझ्द-महिन्याच्या प्रतिप्रदेपासून पुढे अठ्ठ्यायशीं दिवस त्यावर यस्न व वेंदिदाद मंत्रांनी संस्कार होतात. याप्रमाणे एक अग्नि तयार होतो.

बाकीच्या पंधरा अग्नींवरहि याप्रमाणेच संस्कार करतात. दुसऱ्या अग्नीला ८०, तिसऱ्याला ७०, चौथ्या नवव्या, दहाव्या, अकराव्या व बाराव्या अग्नीला ६१, पांचव्याला ७५, सहाव्याला ५०, सातव्याला ६०, आठव्याला ५५, तेराव्याला ३५, चवदाव्याला ३३, पंधराव्याला १८४, व सोळाव्याला ९० याप्रमाणे संस्कारासाठी दिवस लागतात. अशा रीतीने हा अग्नि सिद्ध होण्यास दीर्घ कालावधि लागतो. तो तयार झाल्यावर चांदीच्या अगर ब्राँझच्या धातूच्या पेल्यांत ठेवून तो एका दगडी चबुतऱ्यावर ठेवतात. ज्या खोलींत हा अग्नि ठेवायचा असेल, त्या खोलींत भिंतीवर एक तलवार व चोपदाराच्या दोन काठ्या व प्रत्येक कोपऱ्यांत पितळी घंटा टांगतात. दिवसा व रात्रीं मिळून पांचदा अग्नीची उपासना करतात. या प्रत्येक वेळेला किंवा प्रहराला गेह असें म्हणतात. अग्नीवर चारित्र्यसंपन्न पुरोहितांचा नेहमी पहारा असतो. ते हा अग्नि सतत प्रज्वलित ठेवतात. अग्नि विझल्यास तें दुश्चिन्ह समजतात. भाविक पारशी रोज अग्निदर्शन करतात; तर बाकीचे दर महिन्याच्या तीन, नऊ, सतरा व वीस या तिथींना अग्निदर्शन घेतात. मंदिरांत गेल्यावर पारशी हात, पाय, तोंड धुऊन कस्तीचा मंत्र म्हणतो व अग्नीच्या गाभाऱ्याशीं जातो. तिथे उंबरठ्यावर गुडघे टेकून तो उभा राहतो व मंत्र म्हणतो. पुजारी त्याला अंगारा देतो व तो पुजाऱ्याला दक्षिणा व चंदनाचें खोड देतो. स्त्रियाहि अग्निदर्शनार्थ मंदिरांत जातात.

आतश अद्रानला फक्त चार दिवसांचा विधि असतो. याच्या मंदिराला दार-ई-मेहेर (सूर्याचें द्वार) म्हणतात. पुरोहिताशिवाय अन्य कोणी या अग्नीला स्पर्श करायचा नसतो.

आतश बेहेरामजवळ काम करणारे पुरोहित तोंडावर एक कापड बांधतात, त्याला पदान असें नांव आहे. आतश बेहेरामविषयी पारशांची अत्यंत पूज्य भावना असते. त्याच्यावर कुठलाहि प्रकाश पडलेला त्यांना चालत नाही. [पारशांचा इतिहास]

आतार

एक मुसलमान जात. महाराष्ट्रांत व अन्यत्रहि यांची वस्ती आढळते. यांचें मूळ नांव महलनुतार असें होतें. पण पुढे त्यांनी अत्तरें व सुगंधी द्रव्यें यांचा व्यापार सुरू केल्यामुळे त्यांना आतार हें नांव मिळालें. हिंदूंत हा धंदा तेली, गुरव व बेलदार करतात. आतार हेहि पूर्वी हिंदूच होते. पण औरंगजेबाच्या काळांत त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला. पिंजारी, कसाई व कुंजडे या जाती सोडून इतर मुसलमानांशीं हे लग्नसंबंध करतात. हे हिंदूंना धर्मांतर करायला लावून आपल्या जातींत घेतात. बाटविलेल्या माणसाची सुंता करतात. पण तो म्हातारा असल्यास किंवा त्याच्या जननेंद्रियावर पुढील कातडें नसल्यास तिथे विड्याच्या पानाची गुंडाळी धरून ती कापतात व तेवढ्याने सुंता झाली असें समजतात.

रजोदर्शनापूर्वीं मुलीचें लग्न करतात. तसें न केल्यास आईबापांना मानवहत्त्येचें पाप लागतें असें समजतात. मुलाचा बाप योग्य वाटेल त्या ठिकाणीं मुलीला मागणी घालण्यासाठी एखाद्या बाईला पाठवितो. वधूपिता लग्नापूर्वी वराला छाप नांवाची आंगठी देतो. वधूला लग्नाचें आंदण म्हणून स्वैंपाकाचीं भांडीं, गादी व पलंग देतो. लग्न झाल्यावर वधूवरांस पलंगावर बसवून बायका गाणीं म्हणतात. वधूवरांचें प्रतिबिंब परस्परांस आरशांतून दाखवितात. वरात घरीं आल्यावर वराच्या घरच्या स्त्रिया वधू-वरांच्या शृंगारिक चेष्टा करतात. मग मेजवानी होते. तिला तामवलीमा म्हणतात. वधू-वरें वयाने लहान असलीं तरी त्यांना शयनगृहांत ढकलून कोंडून ठेवतात. तेलहळद, कंकणबंध इ. कित्येक हिंदूंच्या चाली आतारांनी स्वीकारल्या आहेत.

लग्नापूर्वी मुलीला पुरुषसंबंध घडला तरी जर तिला गर्भ राहिला नसेल, तर तिचें लग्न विधिपूर्वक होऊं शकतें. ती गर्भवती झाल्यास मात्र प्रसूतीपर्यंत लग्न थांबतें व मग तें विधवाविवाहाप्रमाणे होतें. तें कानीन मूल तिच्याबरोबर राहतें; पण तिच्या नवऱ्याकडून त्याला कसलाहि वारसाहक्क मिळत नाही. विधवेला पतीच्या मृत्यूनंतर ४० दिवसांनी लग्न करतां येतें. ती धाकट्या दिराशीं लग्न करूं शकते. दोघांपैकी कोणाच्याहि इच्छेने घटस्फोट घेतां येतो. दोन साक्षीदारांच्या समक्ष पतीने 'तूं मला मातेसमान आहेस,' असें पत्नीला म्हटलें, की विवाहविच्छेद होतो. मामेबहिणीशीं लग्न होतें. लग्नांत काजीला सव्वा रुपया किंवा पागोटें देतात.

आतार हे सुन्नी पंथाचे मुसलमान आहेत. हे पिरांना भजतात. शबरात या सणांत पितरांच्या थडग्यावर हलवा ठेवून दिवा लावतात. कुत्र्याला अपवित्र व कोळ्याला पवित्र समजतात. एका पेल्यांतून शरबत प्याल्याने त्यांचें गुरु-शिष्य हें नातें जुळतें. हे मृताशौच पाळीत नाहीत. मद्य-मांस सेवन करतात. वारसाकायदा हिंदूंचाच मानतात. देवी आल्यावर 'मातां' ची पूजा करतात. बायका पडदा पाळीत नाहीत. दांतांना दांतवण लावतात व तंबाकू आणि अत्तरें विकतात. [म. ज्ञा. को.]

आतिथ्य हिंदूंच्या आचारधर्मांत अतिथिसत्काराला फार महत्त्व आहे. आतिथ्य हाच यज्ञ होय, असें अथर्ववेदांत सांगितलें आहे. अतिथीच्या सत्कारांत भोजनाला प्राधान्य असतें. हिंदु धर्मांतील चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळे व जाति-भेदाच्या कडक नियमांमुळे कनिष्ठ वर्णाच्या अतिथीला यजमानाच्या पंक्तीचा लाभ मिळत नसला, तरी त्याला भोजन हें मिळत असेच. धर्मशास्त्रांत ब्राह्मण अतिथीविषयीं अधिक आस्था दाखविलेली असली, तरी इतर कोणत्याहि वर्णाच्या अतिथीविषयीं अनादर दर्शविलेला नाही. स्मृतिग्रंथांत याविषयीं नियम सांगितले आहेत, ते असे —

यदि त्वतिथिधर्मेण क्षत्रियो गृहमाव्रजेत् ।
भुक्तवत्सु च विप्रेषु कामं तमपि भोजयेत् ।।
वैश्यशूद्रावपि प्राप्तौ कुटुम्बेऽतिथिधर्मिणौ ।
भोजयेत्सह भृत्यैस्तावानृशंस्यं प्रयोजयन् ।।

(मनु. ३.१११–११२)

अर्थ – क्षत्रिय जर अतिथिधर्माने ब्राह्मणाच्या घरीं आला, तर ब्राह्मणांचें भोजन झाल्यावर त्यालाहि जेवूं घालावें. ब्राह्मण कुटुंबांत वैश्य व शूद्र अतिथि म्हणून आले, तर त्यांना सदयतेने गडीमाणसांबरोबर जेवायला वाढावें. अतिथि, आप्तेष्ट व घरचे नोकर यांचें जेवण झाल्यावर मग यजमानाने आपल्या पत्नीसह अवशिष्ट अन्नाचें ग्रहण करावें.

अतिथिसत्काराची कल्पना वेद, ब्राह्मणग्रंथ व उपनिषदें यांतहि आढळते. कठोपनिषद् व ऐतरेय ब्राह्मण यांत अतिथि-पूजनाचे अनेक उल्लेख आहेत. नचिकेता यमाकडे गेला असतां तीन रात्रीं त्याला उपाशी राहावें लागलें, याबद्दल यमाने हळहळ व्यक्त केली व तो नचिकेताला अतिथि म्हणून तीन वर देता झाला (कठ. १). बलिराजाची कथाहि या बाबतींत उद्बोधक आहे. बटु वामनाला अतिथि म्हणूनच त्याने त्रिपादभूमि दिली व शुक्राचार्यांने देवांच्या कपटाची जाणीव दिली असतांहि आतिथ्यधर्माला जागणें कर्तव्य समजून त्याने वामनाच्या हातांवर दानोदक सोडलें. पुराणें व त्यानंतरचें धार्मिक वाङ्मय, यांत तर अतिथिसत्काराला खूपच महत्त्व दिलेलें आहे. शिवलीलामृतांतील श्रियाळ-चांगुणा यांची कथा हें याचें उत्कृष्ट उदाहरण होय. आजहि समाजांतील सर्वच वर्गांत अतिथिसत्काराची भावना इतकी दृढमूल झालेली आहे, की कुठेहि गेल्यास आपल्याला घासभर अन्न मिळेल, याची खात्री भारतांत प्रत्येकाला वाटते. मग तो कोणत्याहि जातीचा वा धर्माचा असो. कोणत्याहि सणासमारंभाच्या प्रसंगीं ब्राह्मणभोजन घालण्याची जी प्रथा भारतांत सर्वत्र आढळते, तिच्या मुळाशीं नि:स्पृह व विद्वान् ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व व त्यांना संतुष्ट केल्यामुळे लाभणारें पुण्य, या कल्पना आहेत.

बौद्धांच्या आतिथ्य विषयक कल्पना हिंदुलोकांप्रमाणेच आहेत. बौद्ध भिक्षूंचा, ब्राह्मणांप्रमाणेच सर्वत्र सत्कार होत असे. जातपात, पंथभेद यांचा विचार न करतां सर्वांचें सारखेंच आतिथ्य करावें, अशी या धर्माची आज्ञा आहे.

जैन धर्मांतहि आतिथ्याला महत्त्वाचें स्थान आहे. विशेषतः जैन मुनि (निर्ग्रंथ) अतिथि म्हणून घरीं आल्यास त्याच्या सत्काराचें विशेष फल सांगितलें आहे (प. पु.).

येशू ख्रिस्तापूर्वी युरोपमध्ये भारताप्रमाणेच व्यक्तिगत आतिथ्याची चाल होती; पण ख्रिस्ताने त्याला सामाजिक आतिथ्याचें स्वरूप दिलें. समाजांत जे कोणी अनाथ, अपंग, भुकेले व रोगग्रस्त असतील, त्यांना सर्व समाजाने आसरा, अन्नपाणी व औषधें दिलीं पाहिजेत, ही कल्पना त्याने लोकांच्या मनावर बिंबविली. त्या प्रेरणेने युरोपांत रुग्णालयें व अन्नछत्रें उघडण्यांत आलीं. हें काम प्रथम धर्मगुरूंवर सोंपविलेलें होतें. त्यामुळे रंजल्या-गांजलेल्यांची सेवाशुश्रूषा करणें हें त्यांचें श्रेष्ठ कर्तव्य ठरलें. **पाहा – अतिथि**; अतिथिपूजा. [म. ज्ञा. को.; एन्सा. रि. ए.]

आतिश(ष)बाजी सण, उत्सव व मंगल कार्यें या प्रसंगीं शोभेची दारू उडवितात, त्या प्रकाराला आतिशबाजी असें नांव आहे. भारतांत आतिशबाजीची कला केव्हापासून अस्तित्वांत होती, तें कळण्यासाठी भारतीय साहित्याचा मागोवा घेतला पाहिजे. महानवमी सणाच्या दिवशीं विजयनगरांत विविध प्रकारचें शोभिवंत दारूकाम लावीत असत, असें अब्दुर् रझाक याने लिहून ठेवलें आहे. तो विजयनगरचा राजा दुसरा देवराय याच्या दरबारांत इ. स. १४४३ मध्ये पर्शियाचा वकील म्हणून काम पाहत होता. यावरून १५ व्या शतकांत भारतांतील लोकांना ही कला ज्ञात होती, हें सिद्ध होतें. ही शोभेची दारू विजयनगरांत तयार होत असे, कीं ती परदेशांतून आणीत असत, हें त्यावरून समजत नाही. परंतु ती उडविण्याची माहिती विजयनगरच्या लोकांना होती, एवढें निश्चित. कदाचित् त्या पूर्वींच्या काळांतहि लोकांना तें ज्ञान असावें.

यानंतरचा आतिशबाजीचा उल्लेख रामचंद्र काक याने केला आहे. काश्मीरचा राजा झेन अल् अबिदिन (इ. स. १४२१–१४७२) याने शोभेची दारू कशी तयार करावी, यासंबंधीं प्रश्नोत्तररूपी एक ग्रंथ पर्शियन भाषेंत लिहिला आहे, अशी माहिती काक याने दिली आहे.

यानंतरच्या काळांत बार्बोसा याने आपल्या प्रवासवर्णनांत (इ. स. १५१८) एका गुजराती ब्राह्मणाच्या लग्नसमारंभाचें वर्णन केलें असून त्या प्रसंगीं शोभेची दारू उडविली गेल्याचें लिहिलें आहे. यावरून इ. स. १५०० च्या सुमारास भारतांत मोठ्या प्रमाणावर शोभेची दारू तयार होत असे व गुजरातेंत लग्नसमारंभाच्या प्रसंगीं असें दारूकाम उडविण्याची प्रथा होती, असें दिसतें.

भारतीय ग्रंथकारांचेहि याबाबत उल्लेख सांपडतात—

गजपति प्रतापरुद्रदेव (इ. स. १४९७–१५३९) या ओरिसांतील प्रसिद्ध धर्मशास्त्रकाराने कौतुकचिंतामणि नांवाचा एक संस्कृत ग्रंथ लिहिला असून त्यांत शोभेची दारू कशी तयार करावी, तें सांगितलें आहे. 'राजविनोदनानि' या सदराखाली त्याने कल्पवृक्षबाण, चामरबाण, चंद्रज्योति, चंपाबाण, पुष्पवर्ति, छुछुंदरीरसबाण, तीक्ष्णनाल, पुष्पबाण या शोभेच्या दारूच्या प्रकारांचा निर्देश केला असून गंधक, यवक्षार, अंगार, तीक्ष्णलोहचूर्ण, लोहचूर्ण, ताम्रोद्भव, जांगलनामक द्रव, तालक, काव, खदिराचें लाकूड, पोकळ बांबू, वात, पंचक्षार, तीक्ष्णलोह, आपुपाषाणमंत्र, चिन्नुकात्रय, एरंडबीजमज्ज, पारा, अन्नपिष्ट, शिसें किंवा जस्त, अर्कांगार, गोमूत्र, हिंगुळ व हरिताल हीं त्यांची घटक द्रव्यें असल्याचें सांगितलें आहे.

शोभेच्या दारूचा शोध भारताच्या आधी चीन देशांत लागला होता. तिथेहि बहुतेक वरील सर्व घटक द्रव्यांचा उपयोग करून शोभेची दारू बनवीत असत. कदाचित् इ. स. १४०० च्या सुमारास चीनमधील शोभेच्या दारूच्या घटक द्रव्यांची माहिती भारतांतील लोकांना मिळाली असेल व त्या द्रव्यांपैकी जीं द्रव्यें भारतांत उपलब्ध नव्हतीं, त्या ठिकाणीं भारतीय द्रव्यांचा उपयोग करून भारतांतील लोकांनी शोभेची दारू बनविली असेल, अशीहि शक्यता आहे.

आकाशभैरवकल्प नामक एका संस्कृत हस्तलिखित ग्रंथांतहि राजाच्या मनोविनोदनासाठी केल्या जाणाऱ्या आतिशबाजीचा उल्लेख आढळतो.

संस्कृत वाङ्मयाशिवाय मराठी वाङ्मयांतहि आतिशबाजीचे बरेच निर्देश आलेले आहेत.

एकनाथांनी आपल्या रुक्मिणीस्वयंवर या काव्यांत कृष्णरुक्मिणींच्या वरातीच्या वेळीं शोभेचें दारुकाम कशा प्रकारचें झालें, त्याचें वर्णन केलें आहे. अग्नियंत्र, हवई, सुमनमाला, चिचुंदरी, भुइनळा, हातनळा, बाण, चंद्रज्योती, असे त्याचे विविध प्रकार नाथांनी वर्णिले आहेत. अद्यापहि वरातीपुढे व भिक्षावळीपुढे शोभेची दारू उडविण्याची प्रथा महाराष्ट्रांत आहे. एकनाथांनंतर रामदास, श्रीधर, या कवींच्या ग्रंथांत व पेशवेबखरींतहि आतिशबाजीचे निर्देश आढळतात.

राजस्थानांतील दिवाळीच्या आतिशबाजीला दारूची लंका असें म्हणत. त्या प्रसंगीं रावणाची एक प्रतिमा करून ती मध्यभागीं ठेवीत व तिच्या सभोवती राक्षस, वानर व मारुति यांच्या प्रतिमा बसवीत. मग मारुतीच्या शेपटीला आग लावीत. तो मग लंकेंतील सगळ्या घरांना आग लावीत सुटे.

यावरून अठराव्या शतकांत राजस्थानांत आतिशबाजी लोकप्रिय झालेली होती व राजेलोकांची करमणूक करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर तिचा उपयोग करीत असत, हें कळतें.

लखनौच्या नबाबाच्या कारकीर्दींत कांही इंग्रज लोक आपली ही कला भारतांतील राजांना दाखवून त्यांना खूष करीत असत, असे उल्लेख सांपडतात.

यानंतरच्या काळांत आतिशबाजीचे उल्लेख अनेक वेळां येतात. सवाई माधवरावांच्या कारकीर्दींत शोभेच्या दारूच्या विविध प्रकारांचीं नांवें सांपडतात——उदा० तावदानी रोषणाई, आकाशमंडळ तारांगण, चादरी दारूकाम, नारळी झाडें, प्रभाचमक, कैचीचीं झाडें, बादलगर्ज, बाण, पाणकोंबडी, महताफा इत्यादि.

आधुनिक काळांत, भिक्षावळ, वरात इ. प्रसंगीं व

दिवाळीच्या सणांत मोठ्या प्रमाणावर आतिशबाजी करण्याची प्रथा आहे. [स्ट. इं. क. हि. पु. २ रें]

आतुर संन्यास रुग्ण व आसन्नमरण पुरुष ज्या प्रकारचा संन्यास घेतो, त्याला आतुर संन्यास म्हणतात. अशा पुरुषाने संन्यासाचा संकल्प करून 'संन्यस्तोऽहम्' असा फक्त उच्चार करायचा असतो. संकल्प, क्षौर, सावित्रीप्रवेश व प्रैषोच्चार एवढ्या गोष्टी आतुर संन्यासालाहि आवश्यक आहेत. बाकीचें विधान विविदिषा संन्यासाप्रमाणे यथासंभव करावें, असें सांगितलें आहे. **पाहा**–संन्यास. [हि. ध.; ध. सि.]

आतेबहिणीशीं लग्न मामाच्या मुलीशीं लग्न करणें हें धर्मशास्त्रकारांना समंत आहे. पण आत्याच्या मुलीशीं विवाह करणें हें अधर्म्य व लोकविद्विष्ट असल्यामुळे निषिद्ध होय, असें धर्मसूत्रकार मानतात. पण कांही जातींत विशेषतः आदिवासी जमातींत मात्र ही चाल आढळते. आंध या जातींत आतेबहिणीशीं लग्न होतें.

आत्तखंडिक एक जमाती टोळ्यांचा देश. [मत्स्य पु. ११३. ४०]

आत्मकथा आत्मकथा म्हणजे आत्मचरित्र होय. आपल्या स्वतःच्या जीवनासंबंधीं लेखक जें कांही लिहितो, तें आत्मचरित्र होय. दैनंदिनी (डायरी), जर्नल, संस्मरण, हे लेखनप्रकार म्हणजे आत्मचरित्राचीं स्फुट रूपें होत. कारण त्यांत जाणतेपणी किंवा अजाणतेपणी आत्मविषयक लेखन केलेलें असतें. आत्मचरित्र लिहिण्यामागे कांही उद्देश असतो. कांही वेळां, आत्मपरीक्षण किंवा आपण केलेल्या कृत्यांचें समर्थन करण्यासाठीहि आत्मचरित्र लिहितात; तर कांही वेळां गतस्मृतींना उजळा देऊन पुनःप्रत्ययाचा आनंद देण्याघेण्याची वृत्ति त्यामागे दिसते. महान् ऐतिहासिक आंदोलनें किंवा घटना यांच्या संपर्कात असलेल्या माणसांची दैनंदिनी (डायरी) किंवा आत्मवृत्त हें भावी काळांत इतिहासकालीन घटनांबद्दल प्रमाण मानलें जातें.

प्राचीन भारतीय वाङमयांत आत्मचरित्र हा लेखनप्रकार नाही. संस्कृत कवि विनयाने स्वतःच्या नांवापलीकडे फारशी माहिती सांगत नव्हते, अशा स्थितींत आत्मचरित्र कुठलें! नाही म्हणायला बाणभट्टाने मात्र हर्षचरिताच्या निमित्ताने आत्मचरित्र सांगितलें आहे. पण हा प्रकार अपवादात्मकच म्हणावा लागेल. [हिं. सा. को.]

आत्मनिवेदन आत्मसर्वस्वसमर्पण. भक्तीचा एक प्रकार. अहंकाररहित होऊन आपलें तन-मन-धन, परिवार व आपलें म्हणून जें कांही असेल, तें सारें प्रेमपूर्वक व श्रद्धायुक्त अंतःकरणाने भगवंताला अर्पण करणें, याला आत्मनिवेदनभक्ति असें नांव आहे. नवविधा भक्तींतला हा परमोच्च प्रकार मानलेला आहे–

इष्टं दत्तं तपो जप्तं वृत्तं यच्चात्मनः प्रियम् ।
दारान् सुतान् गृहान् प्राणान् यत्परस्मै निवेदनम् ।।

(भाग. पु. ११.३.२८)

अर्थ–यज्ञ, दान, तप, जप, धर्मानुष्ठान, स्वतःला प्रिय असेल तें, स्त्री, पुत्र, घर, प्राण इ. सर्व परमेश्वराला अर्पण करावें.

भागवतपुराणाने या भक्तीवर विशेष भर दिलेला आहे. **पाहा**–भक्ति.

आत्मपूजोपनिषद् एक गौण उपनिषद्. यांत निश्चिंतन हें ध्यान, सर्वकर्मनिराकरण हें आवाहन, निश्चल ज्ञान हें आसन, इ. राजयोगी पुरुषाच्या सर्वात्मक पूजेचे उपचार सांगितले आहेत.

आत्मबांधव नात्याच्या संबंधांतील पुढील व्यक्तींना आत्मबांधव म्हणतात —

आत्ममातुः स्वसुः पुत्रा आत्मपितुः स्वसुः सुताः ।
आत्ममातुलपुत्राश्च विज्ञेया ह्यात्मबांधवः ।।

(श. क.)

अर्थ – मावशीचे, आत्याचे व मामाचे पुत्र यांना आत्मबांधव असें जाणावें.

आत्मयाजी मनुस्मृतीमध्ये याची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितली आहे —

सर्वभूतेषु चात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
समं पश्यन्नात्मयाजी स्वाराज्यमधिगच्छति ।।

(१२. ९१)

अर्थ — सर्व प्राणिमात्राच्या ठिकाणीं आत्म्याला व आत्म्याच्या ठिकाणीं सर्व प्राणिमात्राला जो समबुद्धीने पाहतो, तो आत्मयाजी होय. त्याला स्वराज्याची – आत्मसाम्राज्याची प्राप्ति होते.

आत्मषष्ठ वाद जैन धर्मांतील एका पंथाचें तत्त्वज्ञान. या पंथाचा सिद्धान्त असा – पृथिव्यादि पंच महाभूतें हे पांच व आत्मा हा सहावा पदार्थ हेच विश्वाचे

मूळ घटक असून ते कोणत्याहि कारणामुळे नाश पावत नाहीत. नसलेलें कांहीहि उत्पन्न होत नाही व असलेलें मूलतःच अनंत (अविनाशी) असतें. [स्कू. से. इन् जै. लि.]

आत्मसाक्षात्कार अध्यात्मांतील एक श्रेष्ठ अनुभव. हा अनुभव घडेपर्यंत नाद, रंग, रूप इ. इतर पुष्कळ अनुभव आले, किंबहुना मोठमोठ्या सिद्धीहि प्राप्त झाल्या, तरी साधकाची साधना पूर्णतेला गेली, असें म्हणतां येत नाही. न्यायदर्शनांत 'साक्षात्प्रतीतिः' अशी प्रत्यक्ष प्रमाणाची व्याख्या दिली आहे. प्रत्यक्षाचें ज्ञान म्हणजेच इंद्रियांनो होणारें ज्ञान, हें वस्तूशीं निगडित असून संकेतविरहित असतें. इंद्रियांच्या कक्षेंत ज्याप्रमाणे असें निःसंशय ज्ञान प्रत्यक्षप्रमाणाने होतें, त्याचप्रमाणे अतींद्रियक्षेत्रांत ज्या वेळीं आत्म्याच्या अस्तित्वाबद्दल साक्षात् ज्ञान होतें, त्या वेळीं त्या ज्ञानाला आत्मसाक्षात्कार असें म्हणतात. आत्मसाक्षात्कार म्हणजे इंद्रियातीत प्रत्यक्ष होय. त्या अनुभवाचें प्रधान लक्षण असें, की साधकाला स्वतःच्या हृदयांत आत्म्याच्या अस्तित्वाची साक्षात् जाणीव होते. 'अहं ब्रह्मास्मि' अशी त्याला निःसंशय प्रतीति येते.

कोणताहि साधक साधनेच्या प्रथमावस्थेंत बहिर्मुख असतो. त्याचें सर्व ज्ञान बाहेरून आंत आणलेलें असतें. हृदयस्थ आत्म्याचें ज्ञान देखील तो प्रथम शब्दरूपाने म्हणजे दुसऱ्याकडून त्याविषयी श्रवण करून संपादन करतो. पण इथून पुढे अंतर्मुख बनण्याची क्रिया सुरू होते. श्रवणानंतर मनन, नामस्मरण, सत्संग, ईश्वरार्पण बुद्धीने केलेलें कर्म, या गोष्टींनी चित्तशुद्धि होऊन त्याच्या मनाला सूक्ष्मता आणि स्थिरता येऊं लागते. नंतर ध्यान सुरू होतें. ध्यानाच्या अवस्थेंत साधकाचा भगवंताशीं एक प्रकारचा एकान्त असतो.

मानवी जीवनांतील अनेक प्रकारच्या अनुभवांत आत्मसाक्षात्कार हा अनुभव सर्व दृष्टींनी विलक्षण असतो. यालाच आत्मज्ञान, अपरोक्षानुभूति, सोऽहंबोध, इ. अनेक नांवें आहेत. या साक्षात्कारांत ज्ञाता हा ज्ञेयाशीं तादात्म्य पावतो व जीवाचें जीवपण नष्ट होतें. त्याचबरोबर त्याची देहबुद्धिहि हरपून जाऊन गुरु व शिष्य एकाच पदावर आरूढ होतात.

सामान्यतः जाग्रत्-स्वप्न-सुषुप्ति या तीन अवस्था आपल्या अनुभवाच्या असतात. पण आत्मदर्शनांत या तीहींहून विलक्षण अवस्था अनुभवाला येते, तिला तुरीय किंवा चौथी अवस्था असें म्हणतात. या अवस्थेंत साधकाला देहाचा पूर्ण विसर पडतो. पण ती बेशुद्धि नसते, तशीच ती जागेपणाची शुद्धिहि नसते. हिलाच देहभाव हरपणें, असें साधुसंत म्हणतात.

या तुर्यावस्थेला योगशास्त्रांत संप्रज्ञातसमाधि असें नांव असून पाश्चात्य तत्त्वज्ञ तिला Ecstacy म्हणतात. या समाधींत त्याला लोकविलक्षण आनंद अनुभवास येतो. या आनंदाला ज्ञानेश्वरांनी 'महासुखाची दिवाळी' असें नांव दिलें आहे. याचें वैशिष्टच हें, की या आनंदांत तृप्ति, क्षय, अपूर्णता व काळाचें भान यांपैकी कांहीहि नसतें. [श्री. बेलसरे – प्रसाद]

आत्महत्या म्हणजे हेतुपूर्वक स्वतःचे प्राण देणें, आत्मघात करणें. प्राचीनकाळचे आर्यलोक जीवनांत रस घेणारे होते. जीवन आनन्दमय आहे, उपभोगांत सुख आहे, अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे आत्महत्येकडे त्यांची प्रवृत्ति नव्हती. ऋग्वेदांत आत्महत्येचा उल्लेख नाही. तै. संहितेंत मात्र तिचा उल्लेख आहे. सर्व यज्ञांत आत्मयज्ञ श्रेष्ठ होय, असें तिथे सांगितलें आहे. त्याचप्रमाणे शतपथ ब्राह्मणांत म्हटलें आहे, की पुरुषमेध व सर्वमेध या यज्ञांत सर्वस्वाचें दान करून कर्त्याने वनांत जावें व लवकर मृत्यु येईल अशा रीतीने जीवन घालवावें. इथेहि दूरान्वयाने देहत्यागाचा उल्लेख आलेला आहे.

आत्मा व परमात्मा वस्तुतः एकच असून मायेच्या योगाने त्यांच्यांत भेद दिसतो; तेव्हा हें लक्षांत घेऊन ज्ञानयोगाने परब्रह्माशीं एकरूप होणें, ही सर्वोच्च स्थिति होय, असें उपनिषदांत प्रतिपादन केलेलें आहे. जाबाल व कठश्रुति या उत्तरकालीन उपनिषदांत आत्मज्ञान झालेल्या संन्याशाने अग्निप्रवेश, जलप्रवेश, उपवास इ. मार्गांनी देहत्याग करण्यास हरकत नाही, असें म्हटलें आहे.

संन्याश्याने हळूहळू अन्न कमी करून फळें, कंदमुळें, पानें, बीं व तृण भक्षण करावें; नंतर क्रमाने केवळ जलपान व वायुभक्षण करावें व शेवटीं सूक्ष्म वायु भक्षण करावा, असें आपस्तंब धर्मसूत्रांत सांगितलें आहे (१.९.२३.२). अग्निप्रवेश केल्याने ब्रह्मलोक प्राप्त होतो, असें वसिष्ठ धर्मसूत्रांत सांगितलें आहे (२९.४).

हिंदु धर्मांत अशा प्रकारें धार्मिक आत्महत्या गौरवास्पद मानलेली आहे. रोगग्रस्तासाठी मनु आत्मघाताचा पुढील उपाय सांगतो––

अपराजितां वास्थाय व्रजेद्दिशमजिह्मगः ।
आनिपाताच्छरीरस्य युक्तो वार्यनिलाशनः ।।

(६.३१)

अर्थ –– रोगग्रस्त व दुर्दैवी ब्राह्मणाने ईशान्य दिशेकडे प्रस्थान ठेवावें आणि पाणी व वायुभक्षण करून देहपातापर्यंत चालत राहावें.

जलसमाधि, कडेलोट, अग्निप्रवेश, उपवास या प्राचीन ऋषींच्या मार्गानें प्राणत्याग करणारा ब्रह्मलोकाला जातो, असेंहि मनूनें म्हटलें आहे.

महाभारतांत सामान्यपणे आत्महत्त्येला हीन मानलें आहे. परंतु घरांत अंथरुणावर पडून मरणें, त्या कालच्या ब्राह्मणांना संमत नव्हतें. ब्राह्मणाला व क्षत्रियाला देहपाताला योग्य जागा म्हणजे अनुक्रमें अरण्य व युद्धभूमि या होत, अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे दुर्योधनानें जेव्हा प्राणत्यागाचा संकल्प केला, तेव्हा त्या प्रसंगाचें उदात्त वर्णन महाभारतांत केलेलें आहे.

पुढील काळांत भक्ति संप्रदायांतून आत्मत्यागाचा एक नवाच प्रकार रूढ झालेला दिसतो. सगुण परमेश्वराची भक्ति करतां करतां शेवटीं देहत्याग करून त्याच्या स्वरूपांत विलीन होणें, हा तो प्रकार होय. उदा० मीराबाई, आंडाळ व कान्होपात्रा या भक्त स्त्रिया अनुक्रमें श्रीकृष्ण, रंगनाथ व पांडुरंग यांच्या स्वरूपांत विलीन झाल्या, असें त्यांच्या चरित्रांत लिहिलें आहे. जगन्नाथपुरीला जगन्नाथाच्या रथाखाली पडून आत्मत्याग करणें, हाहि एक भक्तीचाच उत्कट प्रकार असें मानलेलें आहे. दक्षिणेंतहि कालभैरवाच्या कड्यावरून स्वतःला लोटून प्राणत्याग करण्याची प्रथा होती. त्याचप्रमाणे गंगेच्या मुखाजवळ समुद्रांत प्राणार्पण करण्याची प्रथा गेल्या शतकाच्या प्रारंभापर्यंत रूढ होती. असें करण्यामागे अमरत्वाची व अक्षयसुखाची कामना असे. प्रयागच्या गंगा-यमुना संगमांत देहत्याग केल्यानें मोक्ष मिळतो, असें धर्मग्रंथ सांगतात. अशा प्रकारें धार्मिक भावनेनें आत्महत्या करण्याचे अनेक प्रकार हिंदु धर्मशास्त्रानें संमत केलेले आहेत. ब्रिटिश अमदानींत आत्महत्येला कायद्यानें बंदी झाली; तरी सुद्धा अधूनमधून असे प्रकार घडतच.

मात्र हिंदुधर्मांत धार्मिक आत्महत्येशिवाय इतर कारणांसाठी केलेल्या आत्महत्त्येचा निषेधच केलेला आहे. पूर्ण जीवन जगून व संन्यस्त वृत्तीने राहून ज्यानें कांही सिद्धि प्राप्त केली असेल, त्यालाच आत्मत्याग करण्याचा अधिकार धर्मशास्त्रानें दिलेला आहे.

बुद्धानें देहदंडाच्या सर्व प्रकारांचा व धार्मिक आत्महत्त्येचा निषेध केला आहे. जैन धर्मानें मात्र त्याला संमति दिली असून त्याचा पुरस्कारहि केला आहे. मात्र आत्मघाताची ही अनुज्ञा अर्हत्पदाला पोचलेल्या यतींनाच फक्त होती. अन्नपाणी वर्ज्य करून ते देहपात करीत. सल्लेखना असें त्या प्रकाराचें नांव आहे. ११७२ सालीं हेमचंद्र या जैन विद्वानानें गुजरातच्या कुमारपाल राजाच्या मृत्यूनंतर प्रायोपवेशनानें देह ठेवला, असें सांगतात.

दैवी अंश व सामर्थ्य असलेले पुरुष स्वतःचें दैवी सामर्थ्य कमी झालें, की आपला अवतार संपवीत, अशा कथा पुराणांत आहेत. जुना देह टाकून नवा अधिक सचेतन देह धारण करणें, हा त्या मागचा हेतु असे. कांही देशांत राजा निधन पावला, की त्याचे दासदासीसुद्धा त्याच्या थडग्यांत स्वतःला पुरून घेत असत. धन्यावरील प्रेम, निष्ठा व परलोकांतहि आपण त्याची सेवा करूं शकूं, ही श्रद्धा त्या आत्महत्त्येच्या मागे असे. त्यांत धार्मिक भावनेचा अंशहि नसे. धार्मिक भावना प्रकर्षानें दिसते, ती सती जाण्याच्या चालींत. पति हेंच सर्वस्व मानून भारतांत हजारों पतिव्रता स्त्रियांनी इतिहासकाळांत जळत्या चितेवर आरोहण केलें आहे. जीवनांत तसेंच मरणांतहि पतीला साथ देणाऱ्या या पतिव्रतांच्या आत्मत्यागाचें स्वरूप अत्यंत उदात्त व पुण्यपावन आहे.

प्राणांपेक्षाहि शील व चारित्र्य हीं श्रेष्ठ आहेत आणि प्रसंगीं प्राणार्पण करूनहि त्यांचें संरक्षण करणें हें कर्तव्य आहे, या भावनेने मध्ययुगांत हजारों रजपूत स्त्रियांनी जोहार केला, ही गोष्ट राजस्थानाच्या इतिहासांत ठळकपणे दिसून येते. हें त्यांचें हौतात्म्यहि परम मंगल व स्फूर्तिप्रद मानलें गेलें आहे.

मागसलेल्या समाजांत मात्र आत्महत्येला विरोध आढळतो; पण त्याचें कारण थोडें निराळें आहे. आत्महत्या करणारा माणूस असंतुष्ट असेल किंवा त्याच्यावर अन्याय झालेला असेल, तर तो भूत होईल व सूड घेण्याचा प्रयत्न करील, अशी त्यांची समजूत असते. या समजुतीमुळेच आत्महत्या करणाऱ्याच्या प्रेताला इजा करण्याची प्रथा कांही ठिकाणीं आहे.

माणसें आत्महत्या करायला कां प्रवृत्त होतात, याची मीमांसा हल्ली नीतिशास्त्राच्या व समाजशास्त्राच्या दृष्टिकोनांतून करतात. आधुनिक काळांत आत्महत्या करणाऱ्यांमध्ये धार्मिक भावनेपेक्षा मनाचा कमकुवतपणाच अधिक आढळतो.

सांप्रत मात्र भारतीय राज्यघटनेनें कोणत्याहि कारणासाठी आत्महत्या हा गुन्हा ठरविला आहे.

आत्मा

भारतीय तत्त्वज्ञानांत आत्मा ही एक अत्यंत महत्त्वाची कल्पना असून यास्कानें त्या शब्दाची व्युत्पत्ति पुढीलप्रमाणे दिली आहे–

आत्माऽततेर्वाप्तेर्वापि वाप्त इव स्याद्
यावद् व्याप्तिभूत इति ।

(निरुक्त ३.१३.२)

अर्थ — आत्मा शब्द अत्=सतत चालणें किंवा अप्=व्यापणें या धातूपासून बनलेला आहे. सतत गतिशील असल्यामुळे त्याला आत्मा ही संज्ञा मिळाली आहे.

शंकराचार्यांनी आत्मा शब्दाची व्युत्पत्ति देतांना एक प्राचीन श्लोक उद्धृत केला आहे, तो असा —

यच्चाप्नोति यदादत्ते यच्चात्ति विषयानिह ।
यच्चास्य सन्ततो भावस्तस्मादात्मेति कीर्त्यते ।।

अर्थ — हा वस्तुजाताला व्यापून राहतो, वस्तुमात्राचें ग्रहण करतो, या लोकांत विषयांचा उपभोग घेतो व याचा सदैव सद्भाव असतो, म्हणून याला आत्मा म्हणतात.

भिन्न भिन्न दर्शनांतल्या आत्मविषयक व्याख्या भिन्न भिन्न आहेत. त्यांचें दिग्दर्शन पुढीलप्रमाणें—

लोकायतिक चैतन्यविशिष्ट देहाला आत्मा समजतात. व त्याला कर्ता व भोक्ता मानतात. वेगवेगळ्या अतिप्राचीन सांप्रदायिक दर्शनांत बृहस्पतिप्रणीत सूत्रग्रंथांतील अनेक सूत्रें उद्धृत केलीं आहेत. त्यांपैकी आत्मविषयक सूत्र पुढीलप्रमाणे आहे—

चैतन्यविशिष्टः कायः पुरुषः ।

अर्थ— चैतन्यविशिष्ट शरीर म्हणजेच आत्मा होय.

लोकायतिकांपैकी कांही इंद्रियांना, कांही प्राणांना तर कांही मनालाच आत्मा मानतात.

माध्यमिक बौद्धांच्या मतें आत्मा म्हणजे शून्य होय. विज्ञानवादी बौद्धांच्या मतें क्षणिक विज्ञान संतान म्हणजेच आत्मा होय. वैभाषिक हे अनादिकालापासून निर्वाणकालापर्यंत स्थायी असलेल्या प्रवाहपतित विज्ञानाच्या धारेला आत्मा मानतात. योगाचारांच्या मतें चित्त अथवा आत्मा आलय-विज्ञानात्मक आहे.

जैन लोक जीवतत्त्वाला आत्मा मानतात. त्यांच्या मतें जीवाचा स्वभाव पांच प्रकारचा आहे — औपशमिक, क्षायिक, क्षायोपशमिक, औदयिक व पारिणामिक. प्रत्येकांत पुन्हा अवांतर भेद आहेतच.

न्याय-वैशेषिक मतानुसार आत्मा नित्य व विभुद्रव्यविशेष आहे, आत्मे व मनें अनेक आहेत. ज्ञान, इच्छा, प्रयत्न, सुख-दुःख, धर्माधर्म व भावनाख्य संस्कार हे आत्म्याचे विशेष गुण आहेत.

आत्मा किंवा पुरुष नित्य व चिद्रूप म्हणजेच ज्ञानस्वरूप आहे, तो केवल द्रष्टा असून कूटस्थ आहे, असें सांख्य कल्पितात. पातंजल मतानुयायी सांख्यांच्याच आत्मविषयक सिद्धान्ताला मान्यता देतात.

आत्मा अहंप्रतीतीचा विषय असून तो सुखदुःखउपाधिरहित नित्य वस्तु आहे, असें मीमांसकांचें मत आहे. आत्मा हा अंशभेदानें ज्ञानस्वरूप व जडस्वरूप आहे, अशी भाट्ट मीमांसकांची धारणा आहे.

तांत्रिकांच्या मतें आत्मा हा विश्वोत्तीर्ण प्रकाशात्मक आहे. आत्मा हा विश्वमय आहे, असें कुलाम्नायांत सांगितलें आहे.

अद्वैत वेदान्त्यांची आत्मव्याख्या पुढीलप्रमाणे आहे—

चिद्रूपः कर्तृत्वादिरहितः परस्मादभिन्नः प्रत्यगात्मा

(स. द. सं. शांकर)

अर्थ — (प्रत्यक्) आत्मा हा चैतन्यरूप, कर्तृत्व, भोक्तृत्वा-दिरहित व परब्रह्माहून अभिन्न आहे.

आत्म्याच्या स्वरूपाविषयीं उपनिषदांत बराच विचार केलेला आहे. हा शब्द ऋग्वेदांत प्रथम आढळतो. मात्र कांही ठिकाणीं तो प्रत्यक्ष आहे, तर कांही ठिकाणीं सूचित आहे. उदा० 'अमर्त्यो मर्त्येना सयोनिः' = मर्त्य शरीराशीं अमर्त्य संलग्न असतो, असें ऋग्वेदांतील 'अस्यवामीय' या गूढ सूक्तांत अनेकवार सांगितलें आहे (ऋ. १. १६४). अमर्त्य व मर्त्य एकमेकांचे सयोनि बंधु आहेत, असें तिथे म्हटलें आहे. असु, प्राण व आत्मा हे शब्द समान अर्थानें ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं योजिलेले आहेत.

आत्मन् हा शब्द दोन मुख्य अर्थांनी वेदांत आला आहे. शरीरांतील जीवनशक्ति हा पहिला अर्थ व संपूर्ण व्यक्ति हा दुसरा अर्थ होय. संपूर्ण व्यक्तींत शरीर, इंद्रियें, अवयव, मन, वाणी इ. गोष्टी अंतर्भूत होतात. या सर्व व्यक्तित्वाचा 'अहम्' या संज्ञेने आविष्कार होतो. आत्मा हा शब्द साधारणरूपाने 'अहम्' या अर्थाचा बोधक म्हणूनच वैदिक परिभाषेंत रूढ आहे. वेदांतील तात्त्विक किंवा धार्मिक विचारांत आत्मशब्द चैतन्य, जीवनशक्ति, प्राण अथवा जीव या अर्थी आलेला आहे. वायु व प्राण हे तत्त्वतः एकच होत, अशी ऋग्वेदकालांत लोकांची कल्पना होती व तीच पुढेहि कायम राहिली आहे. ऋग्वेदांत वायूला उद्देशून आत्मा ही संज्ञा अनेक वेळां योजिली आहे. मृताचा चक्षु सूर्यांत व आत्मा वायूंत विलीन होतो, असें ऋग्वेदांत सांगितलें आहे. परंतु एकंदरींत पाहतां, आत्मा शब्दाचा जीवनशक्ति हाच अर्थ तात्त्विक दृष्टया ऋग्वेदांत रूढ होता, असें दिसतें. 'आत्मन्' किंवा 'त्मन्' हा शब्द 'स्वतः' या दर्शक सर्वनामार्थी ऋग्वेदांत वारंवार येतो. उदा० द्युलोक व पृथ्वी सर्व विश्वाला स्वतःच (आत्मना) धारण करतात असें ऋग्वेदांत म्हटलें आहे. यावांचून, शरीराचा मध्यभाग या अर्थी आत्मा शब्द यजुर्वेदांत व ब्राह्मणग्रंथांत पुष्कळ वेळां वापरलेला आहे. उपनिषदांतील आत्मकल्पनेचा विचार करतांना वरील सर्व अर्थ उपयोगी पडतात.

उपनिषत्पूर्व वैदिक वाङ्मयांत विश्वाच्या अंतिम सत्याचा उल्लेख 'पुरुष' किंवा 'ब्रह्म' या संज्ञेने अनेक वेळां केला असला, तरी आत्मन् शब्द त्या अर्थी सर्रास योजलेला आढळत

नाही. उपनिषदांत मात्र त्याचा वापर सर्वत्र होऊं लागला व त्याची चर्चाहि सर्व अंगांनी सुरू झाली. पुढे जागतिक तत्त्वज्ञानांतहि ही आत्मकल्पना महत्त्व पावली.

'अहम्' हा आत्मशब्दाचा पर्याय आहे, हें वर सांगितलेंच. मनुष्य आपल्या जीवनशक्तीला आत्मा या शब्दाने निर्दिष्ट करतो. जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्था किंवा जन्म व मरण या अवस्था, ज्यांत ओवलेल्या आहेत, असें जीवन, प्राण किंवा चैतन्यरूपी सूत्र म्हणजे आत्मा होय. उत्पत्ति, स्थिति व लय या तीन अवस्थांतून विश्व जात असतें. या तीन्ही अवस्थांना व्यापणारी जीवनशक्ति या अर्थी आत्मा हा शब्द परमपुरुषाला उपनिषदांनी लावला. ऋग्वेदांत इंद्र ही मुख्य देवता आहे. इंद्र स्वतःचा 'अहम्' म्हणून निर्देश करतो, हा 'मी' म्हणजेच आत्मा होय (ऋ. १०. ४८).

माणूस विश्वशक्तीला देव म्हणून भजूं लागला व त्याच्याशीं आपलें अभेदाचें नातें प्रस्थापित करायला उत्सुक झाला, ही गोष्ट उपनिषत्पूर्व काळांतील वैदिक वाङ्मयांत अनेक ठिकाणीं व्यक्त झाली आहे. 'मीच विश्वशक्ति देवता आहें,' या भावनेचा निष्कर्ष 'विश्वशक्ति आत्मा आहे' असा निघाला. याप्रमाणे राजा त्रसदस्यु हा वरुण व इंद्र या देवतांशीं एकात्मभाव अनुभवीत असल्याचें वर्णन ऋग्वेदांत आहे (४. ४२). अशा रीतीने भक्त व पुरुषोत्तम एकच आहेत, हें निश्चित झाल्यावर आत्मा या शब्दाने त्या एकतेचा निर्देश होऊं लागला. विश्वाचें मूळ तत्त्व प्राण, प्रजापति किंवा ब्रह्म असून तें मनुष्यांत प्रविष्ट झालें, असा विचार उपनिषत्पूर्व वैदिक वाङ्मयांत आलेला आहे. मनुष्य हें विश्वशक्तीचें एक रूप आहे व याउलट, विश्वशक्ति मनुष्याचें मूळ स्वरूप होय, असा दुहेरी निष्कर्ष वेदांत काढलेला आहे. याच निश्चयाची पुढे उपनिषदांत 'विश्वसत्य आत्मा आहे,' अशी परिणति झाली.

अशा प्रकारें वैदिक वाङ्मयांतील आदिपुरुषाची कल्पना, परमदेवता किंवा विश्वशक्ति तिच्या उपासकाहून भिन्न नाही, असा प्रत्यय व आदिपुरुष, प्रजापति किंवा ब्रह्म मनुष्यांत प्रविष्ट झालें ही कल्पना, यांवर उपनिषदांतील आत्मविषयक विस्तृत कल्पना अधिष्ठित झालेली आहे.

सुरवातीला आत्मा शब्दाचा प्रयोग स्वभाव किंवा वस्तूची सत्ता (वस्तुत्व) किंवा वस्तूची एकता अशा अर्थी होत असे. पुढे त्याला सातत्यभावाची जोड देण्यांत आली व जो सततगामी आहे, त्याला आत्मा म्हणूं लागले. एकता व सततगामिता यांच्या आधारें तत्त्वविचार सुरू झाला व 'तत्त्व' म्हणून आत्मा शब्दाचा प्रयोग होऊं लागला. छांदोग्योपनिषदांत अधिदैवतरूपाने आदित्य, चंद्रमा, विद्युत्, मेघ, वायु, आकाश, अग्नि व जल यांना क्रमशः आत्मतत्त्व मानलेलें आहे. त्याच उपनिषदांत अध्यात्मरूपाने आदर्श (आरसा), छाया, प्रतिध्वनि, शब्द, शरीर, दक्षिण नेत्र व सव्य नेत्र यांना क्रमशः आत्मतत्त्व म्हटलेलें आहे. पुढे अध्यात्मपर चिंतन प्रगत झाल्यावर वाक्, प्राण, चक्षु, श्रोत्र, मन व हृदय यांनाच आत्मा असें म्हणूं लागले. ऐतरेयोपनिषदांत आत्मा हें जगताचें आदिकारण किंवा मूलतत्त्व असून त्याच्यापासूनच सृष्टीची उत्पत्ति झाली, असें सिद्ध केलें आहे.

ब्रह्म हें जगताचें आदिकारण मानलेलें आहे. त्यामुळे आत्मा म्हणजेच ब्रह्म असें समीकरण पुढे रूढ झालें. 'ब्रह्मभावश्चाहमात्मा ब्रह्म' = आत्मा ब्रह्म आहे, असा स्पष्ट उल्लेख बृहदारण्यकोपनिषदांत आला आहे (२. ५. १९). छांदोग्योपनिषदाने 'तत् त्वमसि' = तें (ब्रह्म) तूं आहेस, असें उद्घोषित केलें (६. ८. ७). तेव्हापासून आत्मा हा प्रत्यगात्मा म्हणजे सकल विषयांचा ज्ञाता अशा अर्थी व ब्रह्म हें जगताचें मूळ कारण अशा अर्थी रूढ झालें. 'सोऽहमस्मि' या अनुभवांत आत्मा व त्याचा ब्रह्माशीं अभेद यांचें प्रत्यक्ष ज्ञान होतें.

परंतु द्वैतवादी लोकांना आत्मा व ब्रह्म यांचें हें अद्वैत आवडलें नाही व त्यांनी प्रत्यगात्म्याला जीवात्मा व ब्रह्माला परमात्मा अशा संज्ञा दिल्या. त्यामुळे आत्मा म्हणजे जीवात्मा हा अर्थ पुढे प्रचलित झाला.

या आत्म्याचें वास्तव्य हृदयांत असतें, असें बहुतेक उपनिषत्कारांचें मत आहे. आत्मा व शरीर यांचा परस्परसंबंध काय, याचें उत्तर देतांना प्रजापति सांगतो, की 'ह्या देहरूपी रथाचा आत्मा हा सारथी असून तो शुद्ध, शांत, शाश्वत, अज व स्वतंत्र आहे (मैत्रा. उ. २. ३–४). तो सर्व शारीरिक व्यापारांचा अधिपति व इंद्रियांचा राजा आहे. तो इंद्रियांच्या द्वारें उपभोग घेतो व इंद्रियें त्याच्या आश्रयावर जिवंत राहतात (कौषी. उ. ४. २०). आत्मा हा आकाराने 'अंगुष्ठमात्र' असल्याचीं कल्पना उपनिषत्कालीं सर्वश्रुत असावी, असें दिसतें. कुठे त्याला 'प्रादेशमात्र' (वितीएवढा) असेंहि म्हटलें आहे. आत्मा हा यवाएवढा, अंगुष्ठाएवढा, प्रादेशमात्र, प्रत्येकाच्या शरीरांत शरीराएवढा व सरतेशेवटीं सर्वव्यापी अनंत, अशी त्याच्या आकाराची उत्तरोत्तर प्रगति होत गेली आहे.

जीवात्म्याला कोणी कर्ता, कोणी भोक्ता तर कोणी ज्ञाता मानतात. परंतु वेदान्तदर्शनांत आत्म्याला सच्चिदानंदरूप मानलें आहे. आत्मा चैतन्यरूप आहे. आपण अनेक वस्तू पाहतों, ऐकतों व आपल्याला त्यांचें ज्ञान होतें. चैतन्य किंवा ज्ञाता जर नसता, तर या वस्तूंचें ज्ञान झालें नसतें. ज्या अर्थीं तें होतें, त्या अर्थीं त्यांचा ज्ञाता कोणीतरी अवश्य असला पाहिजे व तो

कोणीतरी म्हणजे आत्माच होय. आत्मा सगळ्या ज्ञेय वस्तूंचा आधार आहे. त्यामुळे तो कधीं ज्ञेय म्हणजे ज्ञानविषय होत नाही.

कांही लोक आत्म्याचें अस्तित्वच मानीत नाहीत व त्याला 'अभाव' किंवा 'शून्य' असें म्हणतात. परंतु 'अभाव,' 'शून्य' हे पुन्हा ज्ञानाचे विषय अर्थात् ज्ञेय आहेत, असें एकदा मानलें, की त्याच्या पाठोपाठ ज्ञाता व ज्ञान हीं आलींच. नास्तिकहि अशा रीतीने आत्म्याचें अस्तित्व पर्यायाने मानतातच.

आत्मा ज्या अर्थीं शरीरांत वास करतो, त्या अर्थी त्याला कांही मानसिक अवस्थांचा अनुभव येत असावा, असें मानणें प्राप्त आहे. मांडूक्य उपनिषदांत 'सोऽयमात्मा चतुष्पात्'= आत्मा हा चतुष्पाद आहे, असें सांगून जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति व चौथी स्वसंवेद्य अशा त्याच्या चार अवस्था वर्णिल्या आहेत. जाग्रत् अवस्थेंत विश्व, स्वप्न अवस्थेंत तेजस् व सुषुप्ति अवस्थेंत प्राज्ञ अशीं अवस्थाभेदाने त्याला भिन्न नांवें दिलीं आहेत. मांडूक्य उपनिषदांत आत्म्याचें शुद्ध रूप तुरीय या नांवाने दर्शविलें आहे. जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति या अवस्थांहून भिन्न अशी शुद्ध आत्म्याची जी अंतरंगदशा तीच तुरीय अवस्था होय. या अवस्थेंतील आत्म्याला अदृष्ट, अग्राह्य, अव्यवहार्य, अचिंतनीय, अव्यपदेश्य, शांत, शिव, अद्वैत अशा विशेषणांनी गौरविलें आहे. ओंकाराची तुरीय अर्धमात्रा ही शुद्ध आत्म्याच्या या अवस्थेची द्योतक होय. शुद्ध आत्मा व ब्रह्म यांत वस्तुतः भेद नाही.

जो मनुष्य या जगांत सर्वत्र व्यापून राहिलेल्या एकत्वाचा म्हणजेच चैतन्यरूप आत्मतत्त्वाचा अनुभव घेतो, त्याला त्या ज्ञानाच्या बळावर याच जन्मीं मोक्षप्राप्ति होते आणि म्हणूनच आत्मसाक्षात्कार हें उपनिषदांनी मानवाचें परम लक्ष्य मानलें आहे.

तमेव विदित्वाऽतिमृत्युमेति
नान्यः पन्था विद्यतेऽयनाय

(श्वेता. ३.८)

अर्थ — त्यालाच (आत्म्यालाच) जाणून मनुष्य मृत्यूच्या पलिकडे जातो. मोक्षप्राप्तीसाठी यापेक्षा निराळा मार्ग नाही.

'ऋते ज्ञानान्न मुक्तिः' म्हणजे ज्ञानावांचव मुक्ति नाही, असें भारतीय तत्त्वज्ञानांत उच्चरवाने उद्घोषित केलें आहे. 'स्व'रूपाचा साक्षात्कार झाल्यावांचून शास्त्रांचें केवल अध्ययन व्यर्थ आहे. म्हणून उपनिषदांत ध्यानयोग व तत्त्वज्ञान यांच्या आधारें परमतत्त्वाची उपलब्धि हेंच मानवी जीवनाचें ध्येय होय, असें सांगितलें आहे.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो
न मेधया न बहुधा श्रुतेन

(कठ. १.२.२२)

अर्थ – आत्मा केवळ प्रवचनानें, कुशाग्र बुद्धीच्या साहाय्याने किंवा बहुश्रुतपणाने प्राप्त होत नाही. (त्यासाठी साधना करावी लागते.)

आत्मज्ञान किंवा आत्मप्राप्ति यांच्यासाठी पुढील नैतिक सद्गुणांची आवश्यकता आहे, असें मुंडकोपनिषदांत सांगितलें आहे –

सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा
सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम्

अर्थ – सत्य, तपाचरण, सम्यग्ज्ञान व अखंड ब्रह्मचर्य या गुणांनी आत्मलाभ होतो.

आत्मज्ञानाचा आणखी एक मार्ग बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्याने मैत्रेयीला सांगितला आहे, तो असा – 'श्रवण, मनन व निदिध्यासन या उपायांनी आत्म्याचें ज्ञान होतें व एकदा आत्मज्ञान झाल्यावर मग सर्व वस्तूंचें ज्ञान होतें. (२.४.५).

श्रवण म्हणजे उपनिषदांतील वाक्यांचा स्वाध्याय, मनन म्हणजे त्यावर प्रमाणपूर्वक विचार करणें व निदिध्यासन म्हणजे आत्म्याचें सतत चिंतन करणें, यालाच ज्ञानमार्ग म्हणतात. यावांचून, कर्ममार्ग व भक्तिमार्ग असे आत्मज्ञानाचे आणखीहि दोन मार्ग सांगितलेले आहेत. [वैं. सं. वि.; हिं. सा. को.; भा. द. सं.; पंचदशी; हिं. वि.]

आत्माकर्षणिका

एक गुप्त शक्ति. [पु. इं.]

आत्मानंद

(१) शरीरस्थ आत्म्याला जीव व चराचर सृष्टींत व्याप्त असलेल्या आत्म्याला ब्रह्म म्हणतात. पहिला पिंडाचें, तर दुसरा ब्रह्मांडाचें संचालन करतो. पहिल्याला जीवात्मा म्हणतात, तर दुसऱ्याला परमात्मा म्हणतात. ब्रह्म म्हणजे परमात्माच होय. अद्वैतवादी जीवात्मा व परमात्मा यांत भेद मानीत नाहीत. या आत्म्याचा आनंद म्हणजेच आत्मानंद होय. त्याचा अर्थ जीवात्म्याने परमात्म्यांत लीन होणें किंवा दोघांचें सामरस्य होणें असा आहे. [अ. अ.]

(२) (इ. स. १४ वें शतक) वेदभाष्यकार. याने ऋग्वेदाच्या 'अस्यवामीय' सूक्तावर भाष्य लिहिलें आहे. या भाष्यांत उद्धृत केलेल्या स्कंदादिभाष्यकारांच्या नांवांत सायणाचें नांव नाही. त्यावरून हा सायणपूर्वकालांतला असावा

हा वेदविद्येंत पारंगत होता. याने त्या सूक्तांतला प्रत्येक मंत्र परमात्मपर लावला आहे व तेंच त्याच्या या भाष्याचें वैशिष्टच आहे. याचा शाकपूणीच्या निरुक्ताशीं विशेष परिचय दिसतो. [वै. सा. सं.; म. च. को.]

आत्मारामबुवा समर्थशिष्य कल्याण याच्या शिष्यपरंपरेंतील एक शिष्य. रामदास-कल्याण-शिवराम-रामचंद्र अशी त्याची गुरुपरंपरा आहे. आत्मारामबुवाच्या रंक नामक शिष्याने त्याचें ओवीबद्ध चरित्र लिहिलें आहे. त्यावरून त्याच्यावद्दल माहिती मिळते, ती अशी– त्याचें मूळ नांव तिपण्णा; पण पुढें तें आत्माराम झालें. मोगलाईंतील वाघोर गांवचा तो रहिवासी होता. लहानपणापासूनच त्याला एकांतवास प्रिय होता. पुढे योगायोगाने त्याची व आपचंद मठपति रामचंद्रबाबा यांची भेट झाली व तो समर्थसंप्रदायांत आला. इ. स. १८०३ च्या सुमारास त्याने दासविश्रामधाम नांवाच्या ग्रंथांत समर्थांचें ओवीबद्ध चरित्र रचलें. या ग्रंथाची ओवीसंख्या सोळा हजारांच्या वर आहे. याशिवाय त्याची विपुल कविताहि उपलब्ध आहे. बिदर जिल्ह्यांत येकेहळी येथे त्याचा मठ आहे [म. सा.]

आत्मारामस्वामी (१८ वें शतक) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. आडनांव शिंदखेडकर. महाराष्ट्रांत चाळीसगांव येथे याचें वास्तव्य होतें. याने वृद्धावस्थेंत आनंदसंप्रदायाला धरून संन्यासदीक्षा घेतली व शिरपूर येथे आपला मठ स्थापला. याने आपल्या अलौकिक सामर्थ्यानें हिंदु-मुसलमानांत ऐक्याची भावना निर्माण केली व औरंगजेबाला अल्ला व ईश्वर हे एक आहेत असें सिद्ध करून दाखविलें, असें सांगतात. हजारो हिंदूंना याने इस्लामच्या तावडींतून वांचवून स्वधर्मांत राखलें, अशीहि त्याची ख्याति आहे. याने पुढील ग्रंथ लिहिले आहेत––आत्मबोध, चतुर्दशचक्रावली, परज्ञानसागर, महार्णवचित्प्रकाश, नीलांबरशास्त्र इत्यादि. याची कन्नड, तेलुगु, वऱ्हाडी, गोंडी वगैरे अनेक भाषांत स्फुट कविता बरीच आहे. [म. क. च.]

आत्रेय (१) लोक व देश. मार्कंडेय व मत्स्य पुराणांत यांचा उल्लेख आहे. हे ब्राह्मण जातीचे लोक सरस्वतीच्या तीरीं राहत असत. यांच्या बरोबर भारद्वाज, कुशेरक, लंपाक या लोकांचेहि उल्लेख येतात. हे अत्रिकुलोत्पन्न लोक होत, असें ब्रह्मांड पुराण म्हणतें. वरील सर्व लोक आत्रेयांबरोबरच जवळपास राहत असत असें दिसतें. [ट्रा. ए. इं.]

(२) या नांवाचा एक पुरुष तैत्तिरीय संहितेचा पदपाठ तयार करणारा असावा, असें चित्रावशास्त्री म्हणतात. तै. शाखेच्या आचार्यतर्पणांत याचा समावेश आहे. [प्रा. च. को.]

(३) पूर्वमीमांसेचा एक प्राचीन आचार्य. 'स्वामिनः फलश्रुतेरित्यात्रेयः ' असा ब्रह्मसूत्रांत त्याच्या नांवाचा उल्लेख आलेला आहे (ब्र. सू. ३.४.४४). प्रस्तुत सूत्राचा विषय उपासना हा आहे. अंगाश्रित उपासनेचे दोन प्रकार आहेत– एक यजमानाने केलेली व दुसरी पुरोहिताकरवीं केलेली. या उपासनेचें फल कोणाला मिळतें, यजमानाला कां पुरोहिताला या आशंकेंत आत्रेयाचें मत असें, की तें यजमानाला मिळतें. ब्रह्मसूत्रकारांनी या मताचें खंडन केलें आहे. पूर्वमीमांसेंत दोन ठिकाणीं आत्रेयाचा उल्लेख आहे (४.३.१८; ६.१.२६). [हिंदुत्व; शंकराचार्य]

(४) यज्ञाला जे प्रेक्षक जमतात, त्यांच्यापैकी एखाद्या श्रेष्ठ पुरुषाची अग्रपूजा करतात. अशा पुरुषाला आत्रेय म्हणतात. तो अत्रिकुलोत्पन्न असावा, असा संकेत आहे. तसा कोणी नसल्यास दुसऱ्या कोणाची तरी आत्रेय समजून पूजा करतात.

(५) पितृलोकाची वृद्धि करणारा एक ऋषिगण. [ब्रह्मांड पु. ३. १. ५१]

आत्रेय पुनर्वसु आयुर्वेदांतील कायचिकित्साशास्त्राचा प्रवर्तक. चांद्रभाग किंवा कृष्णात्रेय या नांवांनीहि हा प्रसिद्ध आहे. चरकसंहितेच्या प्रत्येक अध्यायाच्या आरंभीं 'भगवान् आत्रेयाने असें सांगितलें,' असें म्हटलेलें असतें. ओषधि–वनस्पतींचे गुणधर्म शोधण्यांत गुंतलेला प्राचीनतमकाळचा हा पहिला ऋषि होय, असा याचा वावर हस्तालिखितांत उल्लेख आला आहे. हा विचारविनिमय व विचारस्वातंत्र्य यांचा फार भोक्ता होता. चरकसंहितेंत विचारविनिमयाचे नियम दिलेले असून आत्रेयाच्या नेतृत्वाने वादविवाद होत असत, असाहि उल्लेख आहे. याचा श्रेष्ठ शिष्य अग्निवेश होय. त्याने सर्व आयुर्वेदशास्त्राचें तंत्र संकलित केलें. [वै. वि. भा. पं.]

आदम आदिमानव. मुसलमान पंडित त्याला पहिला द्रष्टा मानतात. त्यांच्या धर्मग्रंथांतील दहा भागांचा (शहीफह) त्याला दृष्टान्त झाला व 'शफीयुल्लाह' (देवाने निवडलेला) अशी पदवी मिळाली. [डि. इ.]

आदरसिंहासन व्रत एक बंगाली स्त्रीव्रत. व्रतकाल वैशाख मास. या व्रतांत रोज एक

सवाष्ण बोलावून तिला चौरंगावर बसवितात व न्हाविणी-कडून तिच्या हातापायांचीं नखें काढतात. मग तिचे हातपाय अळित्याने रंगवितात. तेल लावून तिची वेणी घालतात. भांगांत शेंदूर भरतात. हातांत गजरे घालून अत्तर लावतात. मिष्टान्नाचें भोजन घालतात. महिनाभर रोज असें करतात. चार वर्षें असें व्रत केल्यावर मग त्याचें उद्यापन करतात. व्रताचें फल–सौभाग्यवृद्धि.

आदि लिंग बलिजांची एक शाखा. हे लोक आपल्या स्त्रियांना गोषांत ठेवतात. नरसिंहाची पत्नी चेंचित ही याच जातीची होती, असें सांगतात. [का. ट्रा. स. इं.]

आदिकूर्म ललितादेवीच्या उजव्या हाताच्या तर्जनीच्या नखापासून उत्पन्न झालेला एक कूर्म (कासव)-रूपी देव. याचा विस्तार एक योजन होता. भंड नांवाच्या दैत्याने अर्णवास्त्र सोडून निर्माण केलेले जलाशय याने प्राशन केले. [ब्रह्मांड पु. ४. २९. ९२]

आदिकेशव द. भारतांतील तिरुवट्टार येथे ताम्रपर्णी नदीच्या तीरावर आदिकेशवाचें मंदिर आहे. मंदिरांत शेषशायी विष्णूची भव्य मूर्ति आहे. एका दारांतून त्याच्या श्रीमुखाचें, दुसऱ्यांतून वक्षःस्थळाचें व तिसऱ्यांतून चरणांचें दर्शन होतें. शेषाच्या खाली एक राक्षस दबलेला आहे. या राक्षसासंबंधीं पुढील कथा प्रसिद्ध आहे–

एकदां ब्रह्मदेव तपश्चर्या करीत असतां एका राक्षसाने त्याच्याकडे येऊन भोजन मागितलें. ब्रह्मदेवाने त्याला कदलीवनांत जायला सांगितलें. त्याप्रमाणे तो तिकडे गेला व तिथल्या ऋषींना त्रास देऊं लागला. ऋषींच्या विनंतीवरून विष्णूने त्या राक्षसाला ठार मारलें. मरतेसमयीं राक्षसाने विष्णूला आपल्या शरिरांत निवास करण्याविषयीं प्रार्थना केली. विष्णूने ती मान्य केली. म्हणून राक्षसाच्या शरिराला खाली ठेवून विष्णु त्यावर स्थानापन्न झाला. [कल्याण – तीर्थांक]

आदिगदाधर विष्णूचें एक नांव. गदासुराच्या अस्थींपासून केलेली गदा धारण करतो, म्हणून त्याला हें नांव मिळालें आहे. [पु. इं.]

आदिग्रंथ शीखांचा पवित्र ग्रंथ. याला ग्रंथसाहिब असेंहि म्हणतात. शीखांचा पांचवा गुरु अर्जुनसिंह याने गुरु नानक व इतर अनेक भगत व शेख यांच्या लेखनाचें संकलन करून हा ग्रंथ तयार केला. या ग्रंथाचे दोन भाग आहेत. वर उल्लेखिला तो पहिला भाग. दुसऱ्या भागाला दसम पादशाही किंवा दसम ग्रंथ म्हणतात. दसम पादशहा म्हणजे गुरु गोविंदसिंह हा होय. बहुसंख्य शीख लोक पहिला भाग प्रमाण मानतात. कांही जहाल मताचे शीख तेवढे दुसऱ्या ग्रंथाला प्रामाण्य देतात. हल्लींच्या स्वरूपांत असलेला आदिग्रंथ अर्जुनसिंह याने इ. स. १५८१–१६०६ या कालांत तयार केला. त्याच्या नंतर त्यांत तेगबहादुराचीं कांही पदें व गुरुगोविंदसिंहाचा एक दोहरा एवढें साहित्य समाविष्ट करण्यांत आलें. या संहितेंत कोणाकोणाचीं पदें आहेत, तें पुढील वर्गवारीवरून कळेल––

शीखगुरु – नानक, अंगडशाह, अमरदास, रामदास, अर्जुनसिंह, तेगबहादुर, गोविंदसिंह.

भगत –– बेणी, भीकन, धन्ना, फरीद (शेख), जयदेव, कबीर, नामदेव, पीपा, रामानंद, रविदास, सधना, सैणु, सूरदास, त्रिलोचन.

भट्ट–– भलहउ, भिका, दास, गंगा, हरिबंश, जलन, जालप, कल (कलु, कल्हु), कलसु, कलसहार, कीरतु, मथुरा, नल, रड, सल.

भगतांपैकीं नामदेव हा मराठी संत आहे. हा पहिला असून तोच या ग्रंथांतला प्राचीन लेखक दिसतो. या ग्रंथांतले कबिराचे दोहे फारच उठावदार आहेत. रामानंद व सूरदास यांचीं परमार्थपर पदें त्यांत समाविष्ट असल्याने हा ग्रंथसाहिब शीखेतर हिंदूंनाहि परका वाटण्याजोगा नाही. आणखी एका दृष्टीने पाहिलें तर शीखपंथ व महाराष्ट्रांतला भागवत धर्म यांचा निकट संबंध आहे. महाराष्ट्रांत भागवत धर्माचा पाया रचणाऱ्या ज्ञानेश्वरांचे वडील विट्ठलपंत, कबीर व नानक हे तीघेहि रामानंदांचे शिष्य व गुरुबंधू होते, अशी समजूत आहे. नामदेव हा शीखांचा आदिकवि, तर मराठी संतांतलाहि तो जुन्यांपैकी आहे. ग्रंथसाहिब हा भाई गुरुदास याच्या हस्तें गुरुमुखी लिपींत लिहिला गेला आहे.

या ग्रंथाचे विभाग पुढीलप्रमाणे आहेत––

(१) **जपुनी साणु (जपुजी)** – ही नानकाची गद्यमय तात्त्विक रचना असून चिंतन व मनन यांसाठी तिचा मोठा उपयोग असल्यामुळे अर्जुनाने त्या रचनेला प्रातःस्मरणीय म्हणून प्रथम स्थान दिलें आहे.

(२) **सोदरु पहला** – आस व गूजरी रागांतील सायंप्रार्थना.

(३) **सो पुरुखु** – आस रागांतील सायंप्रार्थना.

(४) **सोहिला** – गौरी, आस व धनाश्री रागांतील निजण्यापूर्वींची प्रार्थना.

(५) **राग** – हा या ग्रंथाचा मुख्य भाग आहे. हे राग ३१ असून त्यांत निरनिराळ्या गुरूंचीं पदें समाविष्ट आहेत. रागांच्या नांवांवरून आंतील विषयांचा कांही बोध होत नाही. प्रत्येक रागाच्या शेवटीं भगतांचीं वचनें कशीं तरी जोडून दिलेलीं असतात. पहिल्या चार रागांत महत्त्वाचा विषय असून पुढील रागांतून आलेले विषय ग्रंथाचा व्याप वाढविण्यासाठीच आहेत

(६) **भोग** – म्हणजे ग्रंथपरिणति. यांत निरनिराळ्या गुरूंचे व भगतांचे श्लोक आणि पदें आलीं आहेत.

वरील पहिले चार भाग उपासनेसाठी आवश्यक म्हणून प्रथम दिले आहेत.

ग्रंथांतलें साहित्य वेगवेगळ्या ठिकाणांहून संग्रहीत केलेलें असल्यामुळे भाषादृष्ट्या हा ग्रंथ समान शैलीचा न राहतां संमिश्र स्वरूपाचा झाला आहे. उदा० नामदेवाची रचना जुन्या मराठींत आहे. जयदेवाची संस्कृत व अर्वाचीन मिश्र आहे. रामानंद व कबीर यांची भाषा जुनी हिंदी आहे. नानक व त्याच्या पुढचे गुरू हे पंजाबांतले असूनहि त्यांनी हिंदीला जवळच्या अशा भाषेंतच रचना करावी, हें आश्चर्यकारक वाटतें. पण कबीर व इतर भगत यांची धार्मिक शिकवण जशी नानकादि गुरूंनी उचलली, त्याचप्रमाणे त्यांची भाषाहि उचलली, असें म्हटलें पाहिजे. पण त्यामुळे त्यांतला बराचसा भाग अर्वाचीन शीखांना दुर्बोध झाला आहे.

या ग्रंथांत दोहरा, दुपदा, त्रिपदा, चौपदा, पंचपदा, अष्टपदी, श्लोक, डखणा, छंट, पउरी, सवैय्या व गाथा हीं वृत्तें आढळतात.

आदिग्रंथाला गुरुबानी असेंहि म्हणतात. शीखांच्या दृष्टीने तो ग्रंथ गुरुस्वरूप आहे, म्हणून त्याला स्वच्छ रेशमी वस्त्रांनी वेष्टून एका चांदव्याखाली उंच गादीवर प्रतिष्ठित करतात, त्याला फुलें वाहतात, त्याच्यावर चवऱ्या ढाळतात व त्याची आरती करतात. शुचिर्भूत होऊनच त्याच्या दर्शनाला जातात. कधी कधी त्याची मिरवणूकहि काढतात. कधी त्याचा अखंड पाठ, तर कधी सप्ताह पाठहि करतात. बालकाचें नामकरण, त्याची दीक्षा, विवाहादि मंगल कृत्यें व प्रेतसंस्कार अशा प्रसंगीं त्या ग्रंथांतलीं विशिष्ट वचनें वा पद्यें म्हटलीं जातात. प्रस्तुत ग्रंथांतले कांही भाग प्रातःकाळ, सायंकाळ व शयनवेला या प्रसंगीं म्हणण्यासाठी निश्चित केलेले आहेत. शीखांचें संपूर्ण धार्मिक जीवन या आदिग्रंथाने प्रभावित झालेलें आहे. **पाहा** – जपुजी; शीख धर्म. [म. ज्ञा. को.; हिं. वि. को.; दि सिख्स्]

आदित्य

(१) वैवस्वत मन्वंतरांतील एका देवतासमूहाला हें नांव आहे. ऋग्वेदांत याच्या वर्णनपर सहा सूक्तें आहेत. या देवतासमूहांत मित्र, अर्यमा, भग, वरुण, दक्ष व अंश अशा सहा देवतांचा समावेश होतो (ऋ. २.२७.१).

त आदित्यास उरवो गभीरा
अदब्धासो दिप्सन्तो भूर्यक्षाः ।
अन्तः पश्यन्ति वृजिनोत साधु ।
सर्वं राजभ्यः परमा चिदन्ति ।

(ऋ. २. २७. ३)

अर्थ – ते आदित्य विशाल, गंभीर, अजिंक्य, शत्रुघातक, अनेक डोळ्यांचे व चांगलें-वाईट पाहणारे आहेत. दूरचा पदार्थहि त्यांना अगदी जवळ दिसतो.

धारयन्त आदित्यासो जगत्स्था
देवा विश्वस्य भुवनस्य गोपाः

(ऋ. २.२७.४)

अर्थ – ते आदित्य स्थावर – जंगम पदार्थांचे धारणकर्ते असून सर्व भुवनांचें रक्षण करणारे आहेत.

सत्याच्या योगाने त्यांचा महिमा वाढला आहे. जो आदित्यांच्या मर्जींत असतो, त्याला जवळून अगर दुरून कोणीहि ठार करूं शकत नाही, असें ऋग्वेदांत म्हटलें आहे.

आदित्य हे अदितीचे पुत्र असून त्यांची संख्या आठ आहे, असें अथर्ववेदांत सांगितलें आहे (८.९.२१). तै. ब्राह्मणांत अंश, भग, धाता, इंद्र, विवस्वान्, मित्र, वरुण व अर्यमा, अशीं त्यांचीं नांवें दिलेलीं आहेत (१.१.९.१–३). ऋग्वेदांत व शतपथांत अदितीच्या आठव्या पुत्राला मार्तंड असें म्हटलेलें आहे.

आदित्यांची संख्या बारा असून ते बारा महिन्यांचे निदर्शक आहेत, असेंहि श. ब्रा. मध्ये सांगितलें आहे (११. ६. ३. ८) त्यांच्यापैकी विष्णु हा सर्वश्रेष्ठ आदित्य होय. आदित्य हे कश्यप व अदिति यांचे पुत्र होत. (१) अंशुमान् (२) अर्यमा (३) इंद्र (४) त्वष्टा (५) धाता (६) पर्जन्य (७) पूषा (८) भग (९) मित्र (१०) वरुण (११) विवस्वान् व (१२) विष्णु अशी त्यांची यादी भविष्यपुराणांत दिली असून स्कंद पुराणांतील वेगळी नामावळी पुढीलप्रमाणे आहे–

(१) लोलार्क (२) उत्तरार्क (३) सांबादित्य (४) द्रुपदादित्य (५) मयूखादित्य (६) अरुणादित्य (७) वृद्धादित्य (८) केशवादित्य (९) विमलादित्य (१०) गंगादित्य (११) यमादित्य व (१२) सकोलकादित्य (स्कंद पु. २. ४. ४६).

हे बारा आदित्य वर्षाच्या बारा मासांवर आधिपत्य करतात. यांना साध्य असेंहि नांव आहे. कालरूपधारी भगवान् आदित्य वेगवेगळ्या बारा गणांसह बारा महिन्यांचें संचालन करतो. हा आदित्य विश्वसंचार करीत असतां चारी वेदांचे

ऋषि त्याला सूक्तें गातात. गंधर्व–अप्सरा त्याच्यापुढे नृत्य करतात. नाग त्याचा रथ अधांतरीं धरतात. नैर्ऋत पाठी-मागून तो ढकलतात. वालखिल्य त्याच्या पुढे चालत असतात. या सर्व समुदायाला मिळून 'आदित्यव्यूह' असें नांव आहे (भाग पु. १२. ११). पाहा – मार्तंड, सूर्य. [ऋ. द.; प्रा. च. को.]

(२) बांसरीचा एक प्रकार. संगीतरत्नाकरांत हिचा उल्लेख आहे. या बांसरीचें मुखाजवळील छिद्र व तर्जनी ठेवण्याचें छिद्र यांत बारा आंगुळांचें अंतर असतें. [डि. सा. इं. म्यु.]

आदित्यदर्शन बाळ-बाळंतिणीचा एक संस्कार. याला निष्क्रमण, उपनिष्क्रमण किंवा निर्णयन असें नांव आहे. **पाहा** – निष्क्रमण.

आदित्यदोरा सूर्यनारायणाच्या पूजेंतला हा एक अलंकार असून महाराष्ट्रांतील प्रभु व ब्राह्मण स्त्रिया तो गळयांत घालतात. आंगुळभर लांबीची सोन्याची मधोमध पोकळ नळी, तिच्यावर बारा अंगठ्या, त्यांत लहान घागऱ्या जडविलेल्या, दोन बाजूंना दोऱ्याचे सहा पदर व त्यांत कांचेचे मणी ओवलेले, अशी याची रचना असते. यांतल्या बारा अंगठ्या बारा महिन्यांचीं व सहा पदर सहा ऋतूंचीं प्रतीकें होत. हा प्रकार सौर संप्रदायांतून आलेला असावा.



आदित्यदोरा

आदित्य पुराण एक उपपुराण. या पुराणाची अधिक माहिती उपलब्ध नाही.

आदित्यमंडलविधि रक्तचंदनाने किंवा केशरी गंधाने एक वर्तुळ काढून त्यावर कणिक किंवा सातू यांच्या पिठाची तूप व गूळ मिश्रित पानगी ठेवतात. मग तिची व सूर्याची तांबड्या फुलांनी पूजा करतात. [हि. ध.]

आदित्य राणूबाई महाराष्ट्रांतील स्त्रियांचा एक वसा. काल : श्रावणांतील पहिला रविवार. या दिवशीं स्त्रिया मौन धरून अंथरुणावरून उठतात. स्नान करून पाण्याचा तांब्या जमिनीवर न ठेवतां भरून आणतात. विड्याच्या पानावर रक्तचंदनाने सूर्याचें चित्र काढतात. व तिथेच एका वर्तुळांत षट्कोनी आकृति काढतात. सहा पदरी दोरा घेऊन त्याला सहा गांठी मारतात व मग या सर्वांची मिळून पूजा करतात. सवाष्ण जेवायला वाढतात. या वशाची कहाणी पुढीलप्रमाणे—

एक गरीब ब्राह्मण होता. तो रानांत लाकडें आणायला गेला होता. तिथे अप्सरा, नागकन्या पूजा करीत होत्या. ब्राह्मणाने विचारलें. 'तुम्ही कसली पूजा करतां?' त्यांनी आदित्य राणूबाईची पूजा व तिचें विधान ब्राह्मणाला सांगितलें. हा वसा केल्याने दैन्य फिटतें व धनदौलत मिळते, असेंहि सांगितलें. ब्राह्मणाने तो वसा वसला. सूर्य त्याच्यावर प्रसन्न झाला. त्याला धनदौलत मिळाली.

त्याला दोन मुली होत्या. त्यांचीं लग्नें राजपुत्र व प्रधानपुत्र यांच्याशीं झालीं. राजाच्या राणीला चार मुलगे झाले. बारा वर्षांनी बाप त्या मुलींना भेटायला गेला. त्या दिवशीं श्रावणांतला रविवार होता. त्याने मुलीला म्हटलें, की 'मी कहाणी सांगतों तेवढी तूं ऐक. राणी- म्हणाली. 'राजा शिकारीला निघाला आहे; मला आता वेळ नाही.' त्यावर बाप उठून दुसऱ्या मुलीकडे गेला. तिने बापाची कहाणी ऐकली. राणीने कथा न ऐकल्याने आदित्य राणूबाईचा अपमान झाला. त्यामुळे राणीवर संकट ओढवलें. राजा शिकारीला गेला होता, तो वाट चुकला व परत आलाच नाही. पुढे राणीला दारिद्र्य आलें. मग दर रविवारीं एक याप्रमाणे आपल्या चौघांहि मुलांना तिने आपल्या श्रीमंत बहिणीकडे पाठविलें. आपल्या चारी भाच्यांना प्रधानाच्या सुनेने सोन्यानाण्यांचें व हिऱ्यांचें गुप्तदान दिलें, पण आदित्याच्या अवकृपेने वाटेंतच तें नाहींसें झालें. चारी मुलगे हात हालवीत घरीं परतले. शेवटीं राणी स्वतः उठून बहिणीकडे गेली. बहिणीने राणीला सांगितलें, की 'तूं आदित्यराणूबाईला विसरलीस म्हणून तुला असे दिवस आले.' राणीला पश्चात्ताप झाला. तिने आदित्य राणूबाईची पूजा करून क्षमा मागितली. सूर्य तिच्यावर प्रसन्न झाला. तिला धनदौलत परत मिळाली व राजाहि घरीं सुखरूप आला.

आदित्यवरद दर रविवारीं सूर्याची पूजा करणाऱ्या कुटुंबांना हें नांव आहे. [का. ट्रा. स. इं.]

आदित्यवार विशिष्ट तिथि व विशिष्ट नक्षत्रें यांनी युक्त आदित्यवार जेव्हा विशिष्ट महिन्यांत येतो, तेव्हा त्याला विविध नांवें मिळतात. असे एकंदर बारा वार आहेत. मार्ग० शु. ६ ला आदित्यवार आल्यास त्याला नंद हें नांव आहे. या दिवशीं नक्त भोजन व सूर्याची अगस्त्याच्या फुलांनी पूजा करतात. भाद्र० शु. पक्षांतल्या आदित्यवाराला भद्र ही संज्ञा असून त्या दिवशीं नक्त किंवा उपवास करतात. या प्रमाणे सौम्य = रोहिणीनक्षत्रयुक्त; कामद = मार्ग० शु. ६ ला आलेला; जय = दक्षिणायनांतील; जयंत = उत्तरायणांतील; विजय = रोहिणीनक्षत्रयुक्त सप्तमीला आलेला; पुत्रद = रोहिणी किंवा हस्तनक्षत्रयुक्त; या दिवशीं एकभुक्त राहून सकाळपासून सूर्यास्तापर्यंत महाश्वेतामंत्राचा जप करतात. हृदय = संक्रांतियुक्त. या दिवशीं नक्त करून सूर्यमंदिरांत सर्याकडे तोंड करून आदित्यहृदय मंत्राचा १०८ वेळां जप करतात. रोगह = पूर्वाफाल्गुनीयुक्त. या दिवशीं रुईच्या फुलांनी सूर्याची पूजा करतात. महाश्वेताप्रिय = सूर्यग्रहणयुक्त. या दिवशीं उपवास करून महाश्वेतामंत्राचा जप करतात.

आदित्यवार नक्तव्रत एक काम्य व्रत. ज्या रविवारीं हस्त नक्षत्र असेल, त्या दिवशीं एकभुक्त राहून व्रताला आरंभ करतात व तेव्हापासून दर रविवारीं नक्तभोजन करतात. सूर्याला नमस्कार घालून ब्राह्मणभोजन घालतात. सूर्य व त्याच्या रथाचे घोडे यांच्या आकृत्या काढून त्यांना अर्घ्य देतात. वर्षभर असें व्रत करून उद्यापनाच्या वेळीं सुवर्णकमळ, सवत्स गाय व गुळाने भरलेलें ताम्रपात्र ब्राह्मणाला दान देतात. व्रताचें फल – पापनाश व सूर्यलोकप्राप्ति. [कृ. क. त.]

आदित्यवार व्रत मार्गशीर्ष महिन्यांतल्या रविवारापासून या व्रताला प्रारंभ होतो. व्रतावधि–एक वर्ष. प्रत्येक रविवारीं सूर्याची पूजा. बारा महिन्यांच्या बारा सूर्यांचीं वेगवेगळीं नांवें आहेत. त्या नांवांनी त्याची पूजा करायची असते. उदा० मार्गशीर्ष महिन्यांत मित्र, पौषांत विष्णु, इत्यादि. या दिवशीं आदित्यहृदयाचा पाठ व गणाधिप आणि महाश्वेता या मंत्राचा जो जप करतो तो सूर्यलोकाला जातो, असें सांगितलें आहे. व्रताचें फल – कुष्ठादि रोगांचा नाश. [हि. ध.; कृ. क. त.]

आदित्यव्रत (१) आश्विनांतील रविवारीं याचा प्रारंभ करतात. व्रतावधि–एक वर्ष. देवता–सूर्य. स्कंद पुराणांत याविषयीं पुढील कथा आहे – कृष्णाने सांबाला ‘तुला कुष्ठरोग होईल’ असा शाप दिल्यावर सांबानें हें व्रत केलें व त्याचा कुष्ठरोग बरा झाला.

(२) चतुर्दशी तिथि व रेवतीनक्षत्रयुक्त रविवार किंवा अष्टमी तिथि व मघानक्षत्रयुक्त रविवार या दिवशीं हें व्रत करतात. यांत शिवाची पूजा करतात.

(३) ब्रह्मचाऱ्याने करायचें एक व्रत. व्रतावधि– एक वर्ष. व्रताला प्रारंभ करण्यापूर्वी तो नवीन मृगाजिन, जानवें व मेखला धारण करतो. [हि. ध.]

आदित्यशयन व्रत रविवार, सप्तमी, हस्तनक्षत्र व सूर्य-संक्रांति, अशा योगावर हें व्रत विहित आहे. या दिवशीं सूर्य व शिव यांची एकत्र पूजा करतात. आच्छादनें व उश्या यांनी सुशोभित शय्या व एक गाय दान देतात.

आदित्यशांति व्रत वारव्रत. हस्तनक्षत्रयुक्त रविवारीं हें व्रत करतात. सूर्य प्रतिमेची पूजा व रुईच्या समिधांचें हवन. हा याचा विधि आहे. [हि. ध.]

आदित्यहृदयविधि संक्रांतियुक्त रविवारीं सूर्यमंदिरांत आदित्यहृदय या मंत्राचा १०८ वेळां जप करतात, त्याला हें नांव आहे. रावणाबरोबरच्या युद्धांत अंतीं जय प्राप्त व्हावा, म्हणून अगस्त्य ऋषीने रामचंद्राला आदित्यहृदयनामक सूर्याच्या स्तुतीचा जप करायला सांगितलें होतें, असें वाल्मीकीने सांगितलें आहे (युद्ध. १०७). [हि. ध.]

आदित्याभिमुखविधि एक व्रत. हें करणाऱ्याने सकाळीं स्नान करून सूर्याकडे तोंड करून सूर्यास्तापर्यंत उभे राहावें, उशीला टेकून महाश्वेतामंत्राचा जप करावा, सूर्याची पूजा करावी, ब्राह्मणाला दक्षिणा द्यावी व नंतर भोजन करावें, असा या व्रताचा विधि आहे. [हि. ध.]

आदित्येश नर्मदेवरील एक तीर्थ. [मत्स्य पु. १९०.५]

आदिदेव सहस्रदल पद्माच्या कोशांतील पर बिंदूला आदिदेव अशी संज्ञा आहे. [स. पॉ.]


आदिद्विपद द. भारतांत नृत्य-नाट्य सुरू होण्यापूर्वी त्याचें कथानक द्विपद वृत्तांत थोडक्यांत निवेदन

करतात, त्याला ही संज्ञा आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

आदिनाग भगवान् विष्णु ज्या नागावर शयन करतो, त्याला आदिनाग किंवा आदिशेष म्हणतात. पाहा – शेष, अनंत. [डे. हिं. आ.]

आदिनाथ (१) जैनांचा पहिला तीर्थंकर. यालाच ऋषभदेव असेंहि म्हणतात. हा गर्भांत असतांना याच्या आईला चौदा स्वप्नें पडलीं, त्यांत बैलाचें स्वप्न पहिलें होतें.

इक्ष्वाकु वंशांत हा जन्मला. पूर्वजन्म सर्वार्थसिद्धि. काळ सुसम दुःसम. नक्षत्र उत्तराषाढा. जन्मस्थान अयोध्या. पित्याचें नांव नाभिराज. मातेचें नांव मेरुदेवी. उंची ५०० धनुष्यें. वर्ण सुवर्ण. ज्ञानवृक्ष न्यग्रोध (वड). गणधर ८४. आसन पर्यंकासन. वय ८४ लक्षपर्व. लांछन वृषभ. यक्ष–यक्षिणी गोमुख-चक्रेश्वरी. निर्वाणस्थान कैलासपर्वत. उपासक भरत व बाहुबली. आदिनाथाच्या पंचकल्याणिकाच्या पर्वतिथी पुढीलप्रमाणे––



आदिनाथ

गर्भकल्याण आषाढ व. द्वितीया; जन्मकल्याण व दीक्षाकल्याण चैत्र व. नवमी; केवलज्ञानकल्याण फाल्गुन व. एकादशी; मोक्षकल्याण मार्ग० व. चतुर्दशी.

भागवतांत जो ऋषभदेव वर्णिला आहे, त्याचींहि मातापितरें मेरु व नाभि हींच आहेत (५·३·६). हा शवटीं जडोन्मत्ताप्रमाणे नग्नावस्थेंत राहूं लागला. कोणीं त्रास दिला, तरी हा स्वस्वरूपीं स्थिर राहत असे, असें सांगितलें आहे. त्यावरून बुद्धाप्रमाणे या जैनांच्या पहिल्या तीर्थंकरालाहि पौराण व्यक्तींत स्थान मिळालें असावें.

उदेपूर–अहमदाबाद रस्त्यावर ऋषभनाथ नांवाचें एक गांव आहे, तिथे ऋषभदेवाचें मंदिर आहे. पूर्वी एक गाय एका विवक्षित ठिकाणीं येऊन नियमितपणे पान्हा सोडीत असे. पुढे तिथे खणलें असतां ऋषभनाथाची मूर्ति सांपडली. त्या स्थानावर नंतर मंदिर उभारण्यांत आलें. कित्येक स्वयंभू शिवलिंगांच्या बाबतींतहि अशाच कथा सांगितल्या जातात. हें मंदिर आता बरेच वाढलें असून, जैन लोकांचें यात्रास्थान बनलें आहे. [जै. इ; म. ज्ञा. को.]

(२) नवनाथांपैकी एक. नेवासें गांवाच्या जवळ मर्मरगिरींत याचें स्थान आहे. याला वृद्धेश्वर किंवा म्हातारदेव असेंहि म्हणतात. याच्या आसपास मत्स्येंद्र, गोरक्ष व गहिनी या नाथांच्या समाधी आहेत.

आदिनाथजयंती व्रत जैन व्रत. फाल्गुन व. ११ शीस आदिनाथ या पहिल्या तीर्थंकराला केवलज्ञानप्राप्ति झाली व याच दिवशीं त्याने पहिलें प्रवचन दिलें. म्हणून, या दिवशीं जैन उपवास व 'ओम् ह्रीं श्रीवृषभाय नमः' या मंत्राचा त्रिकाल जप करतात. [जै. व्र. वि. सं.]

आदिनाथनिर्वाणोत्सव व्रत जैन व्रत. माघ व. १४ शीस आदिनाथाला निर्वाण प्राप्ति झाली. म्हणून जैन या दिवशीं उपवास व 'ओम् ह्रीं श्रीवृषभाय' नमः या मंत्राचा जप करतात. [जै. व्र. वि. सं.]

आदिनाथ भैरव एक नाथपंथी सिद्ध. याचा जन्म पुण्याजवळ निघोजें येथे झाला. याने विटें गांवीं इ. स. १८३४ मध्ये नाथलीलामृत हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचे २८ अध्याय असून ओवीसंख्या ५४९३ आहे. ग्रंथाची भाषाशैली प्रासादिक आहे. आदिनाथाच्या सांप्रदायिक ग्रंथाध्ययनाची या ग्रंथावरून चांगली कल्पना येते. नाथलीलामृत हा ग्रंथ महाराष्ट्रांत फारसा लोकप्रिय नाही. [गो. च. प.]

आदिनारायणदास (१९ वें शतक) तमिळनाडमधील एक भक्त कवि. हा भद्राचल राम-

दासाचा वंशज असून मद्रासजवळील मांवलम् गांवीं राहात असे. याने अनेक भक्तिपर काव्यें रचलीं आहेत. रामनवमीचा उत्सव हा भक्तिभावाने साजरा करीत असे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

आदिपुरम् द. भारतांतील एक उत्सव. आदि = आषाढ मासांत पुरम् हें नक्षत्र असतें, त्या दिवशीं द. भारतांत सर्व देवालयांतून हा उत्सव साजरा करतात. या दिवशीं शक्तिदेवीने अवतार घेतला म्हणून तिची पूजा करतात. या नक्षत्रीं शुक्रवार असेल तर तो विशेष योग समजतात. या उत्सवाची कथा पुढीलप्रमाणे —

श्रीविल्लिपुत्तुर येथे पेरियाळवार नांवाचा वैष्णव संत राहत होता. तो निपुत्रिक होता. एकदा शेत नांगरतांना त्याला एक सुंदर मुलगी सांपडली. त्याने तिचें संगोपन केलें व ती मोठी झाल्यावर श्रीरंगम् येथील श्रीरंगनाथाशीं तिचें लग्न लावून दिलें.

या मुलीचें नांव आंडाळ असून तिलाच देवीचा अवतार मानून तिचा हा उत्सव करतात. मदुरा, श्रीविल्लिपुत्तुर, तिनेवेल्ली, वेदारण्यम्, तिरुवन्नामलै इ. देवालयांत हा उत्सव फारच थाटामाटाने साजरा होतो. चिदंबरम् येथे मात्र तो आदिमासांत न करतां अर्पिसि महिन्यांत करतात. **पाहा** – आंडाळ. [सा. इं. फे.]

आदिपुराण (१) अठरा उपपुराणांपैकीं एक. याला आद्यपुराण असेंहि नांव आहे. हें उपपुराण वैष्णव पंथाचें आहे.

आदिपुराण किंवा आद्यपुराण हें इ. स. च्या ६ व्या शतकांत रचलें गेलें असावें. या ग्रंथाचें एकहि हस्तलिखित उपलब्ध नाही. तथापि, त्यांतील उतारे अनेक टीकांमध्ये व निबंधग्रंथांत घेतलेले आढळतात. त्यांवरून त्यांतील विषयांची कल्पना करतां येते. साधारणपणे त्यांत पुढील विषयांची चर्चा आढळते–

चातुर्वर्ण्याच्या लोकांना वसाहती करण्यासाठी योग्य प्रदेश, सदाचार, विवाहविधि, अंत्यसंस्कार, आशौचनिर्णय, शुद्धीचे उपाय, दानें, व्रतें, शुभाशुभशकुन व लक्षणें. या पुराणाच्या काळांत नर्मदा, सिंधु व करतोया या नद्यांनी सीमित केलेल्या आर्यावर्ताच्या प्रदेशाबाहेर जाणें निषिद्ध मानलेलें होतें. तसा कोणी गेल्यास त्याला प्रायश्चित्त घ्यावें लागे. [स्ट. उ. पु.]

(२) (काळ ९ व्या शतकाचा मध्य) जैन धर्माचें एक प्रसिद्ध पुराण. जैन धर्मांत त्रिषष्टि = त्रेसष्ट पुरुष प्रतिभाशाली धर्मप्रवर्तक व चारित्र्यसंपन्न मानलेले असून ते शलाकापुरुष या नांवाने प्रसिद्ध आहेत. २४ तीर्थंकर, १२ चक्रवर्ती, ९ वासुदेव, ९ प्रतिवासुदेव, ९ बलदेव किंवा बलभद्र हे सगळे मिळून ६३ शलाकापुरुष होतात. यांच्या जीवनविषयक ग्रंथांना श्वेतांबर लोक 'चरित्र' व दिगंबर लोक 'पुराण' म्हणतात. आचार्य जिनसेनाने या सर्व महापुरुषांचें चरित्र संस्कृत भाषेंत काव्यनिबद्ध करण्यासाठी 'महापुराण' ग्रंथाला प्रारंभ केला. परंतु ग्रंथ समाप्त होण्यापूर्वींच तो मरण पावल्यामुळे गुणभद्र नामक त्याच्या शिष्याने उरलेला ग्रंथ पुरा केला. या ग्रंथाच्या पहिल्या भागांत ४८ पर्वें व १२ हजार श्लोक असून त्यांत ऋषभदेव या पहिल्या तीर्थंकराचें जीवनचरित्र वर्णिलेलें आहे. पहिल्या भागाला लौकिकांत आदिपुराण व उत्तर भागाला उत्तरपुराण असें म्हणतात. आदिपुराणांतील संपूर्ण ४२ पर्वें व ४३ व्या पर्वांतील ३ श्लोक म्हणजे एकंदर १०,३८० श्लोक जिनसेनाने रचले आहेत व १६२० श्लोक एवढी गुणभद्राची रचना आहे. जिनसेनकृत आदिपुराणाचा भाग इ. ८४३ च्या सुमाराला पूर्ण झालेला दिसतो. दिगंबर संप्रदायांतील प्रथमानुयोगाचा हा प्रधान ग्रंथ असून जैन वाङ्मयांतील एक उत्तम ग्रंथ म्हणून त्याची ख्याति आहे. जैन लोकांच्या सर्व कथांचा, चरित्रांचा व भूगोलादि माहितीचा कर्त्याने यांत मोठ्या कौशल्याने संग्रह केलेला आहे. जैन संप्रदायांतील सर्वमान्य तत्त्वांची माहिती या ग्रंथांत कोणत्या ना कोणत्या तरी संदर्भांत करून दिलेली आहे. पुढील ग्रंथकारांनी या ग्रंथांतील अवतरणें 'आर्ष' म्हणून उद्धृत केलीं आहेत.

या ग्रंथाला काव्य म्हणूनहि मान्यता मिळाली आहे. महाकाव्याचीं बहुतेक सर्व लक्षणें याला लागू पडतात. शृंगारादि नवरसांनी हा ग्रंथ नटलेला असून त्यांतील काव्यहि सामान्यतः उच्च प्रतीचें आहे. याचें कथासूत्र मनोवेधक असून भाषासरणी ओघवती व प्रासादिक आहे. उत्कृष्ट दृष्टान्त व सुभाषितें यांचें हा ग्रंथ म्हणजे एक भांडारच आहे. [जै. सा. इ.; हिं. वि. को.; म. ज्ञा. को.]

आदिप्पय्य एक कर्नाटकी संगीताचार्य. हा तेलुगु व संस्कृत भाषांचा पंडित होता. याने वीरभद्रय्य याला अनुसरून देशी रागांत गमक जातींनी युक्त अशीं अनेक कीर्तनें रचलीं. तीं श्रीवेंकटरमण या मुद्रेने मुद्रित आहेत. याचा भैरवी रागाचा विरिबोणि नामक तानवर्ण प्रसिद्ध आहे. तो मौखिक व वीणागान या दोन्ही प्रकारांत सारखाच रंजक आहे. [सं. शा.]

आदिबदरी हिमालयांतलें एक क्षेत्र. आदिबदरीचें दर्शन हें बदरीनाथाच्या दर्शनासमान मानतात. येथील बदरीनाथाची मूर्ति प्रथम तिबेटांत होती व ती आद्य शंकराचार्यांनी भारतांत आणली, अशी आख्यायिका आहे. [कल्याण-तीर्थांक]

आदिबुद्ध कालचक्रयानपंथाची प्रमुख देवता. आदि म्हणजे आद्यंतरहित. आदिबुद्ध सर्वज्ञ आहे. पद्यकारंड-व्यूहांत त्याचें जें वर्णन आलें आहे, तें योगदर्शनांतील नित्य-मुक्त व सर्वज्ञ ईश्वराच्या कल्पनेशीं जुळणारें आहे. समस्त विश्वाच्या प्रारंभीं आदिबुद्ध हा स्वयंभू किंवा आदिनाथ या नांवाने प्रकट झाला व समाधींत त्याने विश्व निर्माण केलें. वज्रयानांतील बुद्धाप्रमाणेच यालाहि सहज, धर्म, संभोग व निर्माण असे चार काय आहेत.

आदिबुद्ध हा प्रज्ञा व करुणा यांची मूर्ति आहे. तो जेव्हा मानवी रूप घेतो, तेव्हा त्याला वज्रधर म्हणतात. वज्रधराचीं एकाकी व यब्-युम् (मिथुनीभूत) अशीं दोन रूपें आढळ-तात. नेपाळमध्ये स्वयंभू आदिबुद्धाचें मंदिर असून तिथे त्याची पूजाअर्चा चालते. आदिबुद्ध हा त्या ठिकाणीं ज्वालेच्या रूपांत प्रकट झाला व मंजुश्रीने त्या ज्योतिस्वरूपावर मंदिर बांधलें, असें सांगतात. नेपाळांत बौद्धांचे अनेक संप्रदाय असून त्यांतले कांही अमिताभाला तर कांही वैरोचनाला, आदिबुद्ध मानतात. नामसंगीति या ग्रंथांत मंजुश्रीलाच आदि-बुद्ध मानलेलें आहे.



आदिबुद्ध – अवलोकितेश्वर

महायानी बौद्धांनी ईश्वर या रूपाने आदि-बुद्धाला आकाराला आणलें. पुढे १० व्या शतकांत नालंदा येथे या कल्पनेचा अधिक विकास झाला. पुढे संपूर्ण आशिया खंडांत या आदिबुद्धाची प्रसिद्धि झाली. आजहि लंकेंतले व जपानमधले बौद्ध आदि-बुद्धालाच भजणारे आहेत. **पाहा–** वज्रधर, ध्यानी बुद्ध. [बौ. द. मी.; बौ. ध. द.; इं. बु. इ.]

आदिबुद्ध पंथ बुद्धाला ईश्वर मानणारा नेपाळांतील एक पंथ. या पंथांत ध्यानी बुद्धांची कल्पना व इतर पूर्वकालीन विचारपद्धति यांचा समन्वय आहे. बुद्ध हें ब्रह्माप्रमाणेच आदितत्त्व असून सामान्य जनासाठी त्याला सगुण रूप घ्यावें लागलें, असें हे मानतात.

आदिबुद्ध आपल्या ध्यान-कर्मांनी पांच ध्यानी बुद्ध निर्माण करतो. ते आपल्या शक्तींच्या द्वारें ध्यानी बोधिसत्त्व निर्माण करतात व मग हे बोधिसत्त्व या जड, नश्वर विश्वाची निर्मिति करतात. अशीं तीन विश्वें आतापर्यंत नष्ट झालीं असून सध्या अवलोकितेश्वर-निर्मित चौथें विश्व चालू आहे.



आदिबुद्ध

आदिबुद्ध किंवा परमादिबुद्ध हें नांव प्राचीन लेखांत आढळतें. कालचक्रयानाशीं या पंथाचा निकटचा संबंध आहे. आदिबुद्धाचें दर्शन हें तांत्रिक बौद्ध धर्माशीं मिळतें जुळतें आहे. या पंथाचें वैशिष्ट्य हें, की त्याने सहाहि बुद्धांच्या वरचा समंतभद्र नांवाचा एक बुद्ध धर्मकायरूपांत मानलेला आहे व त्याच्या ठिकाणीं सकल बुद्धांच्या व सकल अर्हतांच्या ठिकाणीं वास करणाऱ्या बत्तीस गुणांचा अध्यारोप केलेला आहे. या समंतभद्रापासूनच जगाची उत्पत्ति होते, असें या पंथाचें मत आहे. [म. ज्ञा. को.]

आदिब्राह्मसमाज बंगालमधील एक धर्मपंथ. श्री. देवेंद्रनाथ ठाकुर हे प्रथम ब्राह्मसमाजाचे अध्वर्यु होते. पण पुढे त्यांचें पुढारीपण श्री. केशवचंद्र सेन यांच्याकडे गेलें व वरील दोघांत मतभेद निर्माण झाले. मग देवेंद्रनाथ व त्यांचे अनुयायी यांनी केशवसेनांचा पंथ सोडून जो ब्राह्मसमाज चालविला, तो पुढे आदि ब्राह्मसमाज या नांवाने ओळखला जाऊं लागला. ब्राह्मसमाज हें नांव केशवचंद्र

सेन यांच्याच समाजाला लागू राहिलें. **पाहा**–ब्रा समाज [सं. चा. अ.]

आदिमूर्ति ब्राह्मी शक्तीचें नांव. ही चतुर्भुज आहे. हिचे दोन हात अभय व वरद या मुद्रेंत असून दुसऱ्या दोन्ही हातांत कमंडलु व रुद्राक्षमाला असते. [स. पॉ.]

आदियप्पय्य पच्छिमिरियम् (जन्म इ. स. १७३०) 'विरिबोणी' या भैरवी रागांतील व 'अट' तालांतील प्रसिद्ध 'वर्णा'चा रचयिता. तो कुशल वैणिक होता. रक्ती व देशीय रागांत त्याने अनेक कृति रचल्या आहेत. राग आलापन, मध्यमकाल व पल्लवी यांच्या गायनपद्धतींत त्याने एक विशिष्ट रचनाबद्धता आणली. प्रतापसिंह महाराज (इ. स. १७४१—६४) व तुलजा महाराज (१७६५–८७) यांच्या कारकीर्दीत तंजाऊर येथे तो आस्थान विद्वान् होता. पुदुकोट्टई व उडैयार पालयम् या राज्यांचाहि त्याला राजाश्रय होता. तो माध्व ब्राह्मण असून श्रीवेंकटरमण अशी स्वतःची सही करीत असे. त्याला 'तानवर्णमार्गदर्शी' ही पदवी मिळाली होती. श्याम शास्त्री, घनम् कृष्णअय्यर, पल्लवी गोपालअय्यर व त्याचा भाऊ संजीवय्यर हे त्याचे प्रमुख शिष्य होत. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

आदिरामायण या ग्रंथाची एक हस्तलिखित प्रत उपलब्ध झाली आहे. यांत मंजरी मुग्धा, मध्या, प्रौढा इ. नायिकांचे प्रसंग आहेत. 'चित्रकूटमाहात्म्य' नांवाचा एक हस्तलिखित ग्रंथ आहे तो आदिरामायणाचाच एक भाग आहे, असें श्री. कामिल बुल्के यांचें म्हणणें आहे. चित्रकूटावर सांतानक वनांतील सरोवराच्या मध्यभागीं एक रम्य मंडप बनलेला असून तिथे एका वेदिकेवर सीता व तिच्या सख्या यांसह श्रीराम नित्य रासक्रीडा करतो, असें वर्णन या ग्रंथांत आहे. [रा. सा. म. उ.]

आदिवराह वराह म्हणजे डुक्कर. 'विध्यद्वराहं तिरो अद्रिमस्ता = वृत्ररूप वराहाच्या अंगावर (विष्णूने) आपलें अस्त्र तिरपें फेकून त्याचा देह छिन्नविच्छिन्न करून टाकला (ऋ. १. ६१. ७) व एमुष नामक वराहाला इंद्राने मारलें (ऋ. ८. ६६. १०), असे ऋग्वेदांत आदिवराहाविषयीं उल्लेख आहेत. याच एमुष वराहाने पृथ्वीला वर काढलें असें तैत्तिरीय संहितेंत म्हटलें आहे (१४. १. २. ११). तै. सं. च्या मताप्रमाणे वराह हें प्रजापतीचें रूप आहे, तर पुराणांच्या मताप्रमाणे तें विष्णूचें रूप आहे.

भारतीय शिल्पकलेंत वराहमूर्ति दोन प्रकारची आढळते. एक पशुरूप व दुसरी नर-पशु अशी मिश्र. पहिलें रूप हें आदिवराहाचें आहे. उत्तर भारतांत आदिवराहाच्या पशुरूप मूर्ती अनेक ठिकाणीं आढळतात. मध्यप्रदेशांत खजुराहो येथे आदिवराहाची पशुरूप भव्य मूर्ति आहे. नर-पशु अशा मिश्ररूपांतली सर्वांत प्राचीन मूर्ति उदयगिरि येथील चौथ्या गुंफेंत आहे. याशिवाय यज्ञ- वराह व प्रलयवराह अशीं आणखी त्याचीं दोन रूपें आहेत. **पाहा** – वराह, यज्ञवराह. [हिं. इ.]

आदिवारम् द. भारतांतलीं रविवारविषयक व्रतें. हीं व्रतें सुवासिनी स्त्रियांचीं आहेत —

(१) प्रवत्स आदिवारम् – यांत रविवारीं दंपतीपूजन करतात. फल – संतान प्राप्ति.

(२) अपादलेणी आदिवारम् – रविवारीं एकभुक्त सुवासिनींना पांच रोट, रोवळीभर तांदूळ, चोळी व इतर सौभाग्यवस्तूंचें दान. फल – संपत्तिलाभ.

(३) चपिट्टी आदिवारम् – वर्षभर प्रत्येक रविवारीं अळणी भोजन. फल — संततीस दीर्घायुष्य. [का. ट्रा. स. इं.]

आदिवासी आर्य व द्रविड हे भारतांतले दोन मोठे मानवसमाज सोडून त्यांच्याहि पूर्वी भारतांत राहणाऱ्या किंवा बाहेरच्या देशांतून येऊन, वनें व पर्वत यांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना वन्य जाती किंवा आदिवासी असें म्हणतात. मानववंशशास्त्रदृष्ट्या वन्य जाती हा भारतीय लोकसमाजाचा प्राचीनतम विभाग आहे. जगांतल्या सर्व देशांत वन्य जातींचा आढळ होतो. त्यांची माहिती देतांना निरनिराळ्या लेखकांनी व अभ्यासकांनी त्या त्या देशांच्या प्राचीन परंपरा, इतिहास, सामाजिक संस्था इत्यादिकांस अनुसरून निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब केलेला आहे. भारतांतहि प्रशासक, मानववंशशास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते इ. लोकांनी कातडीचा वर्ण, डोक्याचा आकार, भाषा, चालीरीती, रहणी व जातीय परिस्थिति इ. गोष्टींच्या आधारें क्वचित् परस्परविरोधी अशाहि कसोट्या लावून वन्य जमातींचें वर्णन केलेलें आहे.

भारतांत प्राचीन काळीं प्रोटो-आस्ट्रलाइड, मंगोलाईड व नेग्रिटो हे भिन्न मानववंश राहत होते. सांप्रत आपण ज्यांना आदिवासी म्हणतों त्यांची उत्पत्ति वरीलपैकी कोणत्यातरी मानववंशापासून झाली असली पाहिजे, हें मत आता दृढ

झालें आहे. आदिवासी हे लोक भारतांतील आद्य वसाहतकार होत. हे लोक आत्मसंरक्षणास तितकेसे समर्थ नव्हते त्यामुळे भारतांत पश्चिम, वायव्य व ईशान्य या दिशांकडून आलेल्या अनुक्रमें द्रविड, इंडोआर्यन व मोंगोलियन या लोकांपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. नवागत लोक हे संख्याबलानेच नव्हे; तर साधनसामुग्रीनेहि वरचढ असल्यामुळे वन्य जमातींस त्यांच्यापुढे हार खावी लागली व त्यांना डोंगर-दऱ्यांचा किंवा जंगलांचा आश्रय करावा लागला. आजहि ते अशाच जागीं कायमची वस्ती करून राहिलेले दिसतात. त्यांच्या पैकी ज्यांनी आपलें मूलस्थान सोडलें नाही, ते हळूहळू नष्ट तरी झाले किंवा नवागतांशीं एकरूप होऊन आपलें स्वतंत्र अस्तित्वच हरवून बसले.

या आदिवासींचें सांप्रत अनेक जाती-पोटजातींत विभाजन झालेलें असून त्यांतली प्रत्येक जात स्वतंत्र समजली जाते. प्रत्येक जात आपल्या जातींत किंवा पोटजातींतच विवाह-संबंध करते. प्रत्येक जातीच्या स्वतःच्या अशा कांही चालीरीतीहि आहेत. तथापि सर्वांचा साकल्याने विचार करतां सर्व आदिवासींची सामान्य अशीं पुढील लक्षणें दिसतात ——

(१) ते सुधारलेल्या जगापासून दूर, तसेंच दुर्गम दऱ्याखोऱ्यांत राहतात.

(२) नेग्रिटो, प्रोटो–आस्ट्रलाईड किंवा मंगोलाईड यांपैकी कोणत्यातरी एका मानववंशाशीं त्यांचा संबंध आहे.

(३) जातिविशिष्ट अशी एकच बोली ते बोलतात.

(४) ॲनिमिझम् या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या मूळ धर्माचे ते अनुयायी असून ते भुताखेतांची व पितरांची पूजा करतात.

(५) शिकार, कंदमुळें, फळें व शेतांत पडलेला दाणागोटा, यांवर ते आपली उपजीविका करतात. क्वचित् डोंगरांतली शेती करतात.

(६) बहुतेक सगळे मांसाहारी असतात.

(७) ते नग्न किंवा अर्धनग्न स्थितींत राहतात. लज्जारक्षणासाठी झाडांचीं पानें व साली यांचा उपयोग करतात.

(८) भटकण्याची प्रवृत्ति असते.

(९) मद्य व नृत्य यांची विशेष आवड असते.

इंडियन कॉन्फरन्स ऑफ सोशल वेल्फेअर वर्क्स या संस्थेच्या विद्यमाने ट्रायबल वेल्फेअर कमिटीचें कलकत्ता येथे जें अधिवेशन झालें, त्या प्रसंगीं एकत्र आलेल्या मानववंशशास्त्रज्ञांनी व समाजकार्यकर्त्यांनी सध्या भारतांत विद्यमान असलेल्या वन्य जातींचें पुढे दिल्याप्रमाणे वर्गीकरण केलें आहे.

(१) **वन्यसमाज** – (ट्रायबल कम्युनिटीज्) दऱ्या-खोरीं किंवा दाट अरण्यें अशा मूल वसतिस्थानांना धरून राहिलेले व प्राचीन जीवनक्रम चालविणारे लोक या वर्गांत येतात.



नकाशांतले ठिपके आदिवासी जमातींच्या वस्तीचें प्रमाण दर्शवितात.

(२) **अर्धवन्यसमाज** – (सेमिट्रायबल कम्युनिटीज्) ग्रामीण भागांत गांवालगत येऊन वसलेले व शेती आणि तदनुषंगिक व्यवसाय करणारे लोक या वर्गांत येतात.

(३) **संस्कारित वन्य जमाती** – (कल्चर्ड ट्रायबल कम्युनिटीज्) जे शहरांत किंवा अर्धनागरी प्रदेशांत जाऊन सुधारलेल्या उद्योगधंद्यांत पडले आहेत व ज्यांच्यावर आधुनिक जीवनाचे संस्कार झाले आहेत, असे लोक या वर्गांत येतात.

(४) **विलीन जमाती** – हिंदुसमाजरचनेंत पूर्णपणे विलीन झालेले लोक या वर्गांत येतात.

वन्यजमातींची प्रदेशवार विभागणी – गुजरातच्या पूर्वेस, मध्यप्रदेशांतील पठाराच्या दक्षिण भागांत पसरलेला, विंध्य व सातपुडा यांच्याशीं जवळजवळ समांतर असा, जंगलें व दऱ्याखोरीं यांनी व्यापलेला जो प्रदेश आहे, तें या वन्यजमातींचें प्रमुख वसतिस्थान होय. याच्या खालोखाल वन्यजमातींचा दुसरा मोठा भूप्रदेश म्हणजे आसामला ब्रह्मदेशापासून विभक्त करणारा डोंगराळ प्रदेश हा होय. भारतांतील वन्यजमातींची वस्ती ज्या भूभागांत केंद्रित झाली आहे, ते भूभाग विचारांत घेऊन वन्य जमातींच्या वस्तीचे भौगोलिक विभाग पुढीलप्रमाणे दिसतात–

(१) हिमालयाला लागून असलेला प्रदेश, भारताच्या पूर्व सीमेवरील पर्वतराजी, मध्यखासिया व गारो टेकड्या हा एक विभाग होय.

(२) नर्मदा व गोदावरी यांच्यामधला प्रदेश. दक्षिण भारताला व उत्तर भारताला विभक्त करणारी जी पर्वतराजी आहे, तें वन्य जमातींचें प्राचीन काळापासूनचें प्रमुख आश्रयस्थान आहे. पूर्वेस संताळ परगणा, दक्षिणेस हैद्राबाद (आंध्र), पश्चिमेस गुजरात व उत्तरेस राजस्थान या चतु:सीमांमध्ये हा प्रदेश यतो. यांत प्रामुख्याने भिल्लांची वस्ती आहे.

(३) पश्चिम घाटांतला, दक्षिणेकडील वायनाडपासून तों कन्याकुमारीपर्यंत पसरलेला प्रदेश.

वर उल्लेखिलेल्या विभागाखेरीज भारताच्या अन्य कांही भागांत व अंदमान-निकोबार या बेटांत राहणाऱ्या वन्यजमातींचा आणखी एक विभाग कल्पितां येईल.

भारतांतील भिन्न भिन्न प्रदेशांत पुढील आदिवासी व वन्य जमाती आढळतात ––

आंध्र प्रदेश–चेंचू, कोया, गदबा, जतपुस, कोंडा–दोरा, कोंडा-कापुस, कोंडा–रेड्डी, खोंड, सुगली (लंबाडी), येनाडी, येरु, कुल, भिल, गोंड, डोंगरी रेड्डी, कोलाम्, वालिमकी, परधान (बोगता).

आसाम–गारो, खासी, कुकी, मिझो, मिकिरनाग, अबोर, डफला, मिश्मि, अप्तनि, सिंग्फो (काचरी).

बिहार–असुर, बैंगा, बंजारे, बिरहोर, गोंड, हो, खाडिया, खोंड, मुंडा, कोरवा, उराँव, संताळ, माल पहारिआ, भूमिज सवरिया, पहाडिया (मुसाहर, थारू).

महाराष्ट्र व गुजरात– भिल, गोंड (यांत अगारिया, असुर, बिसनहॉर्न, कोया यांचा समावेश होतो), वारली, कोळी, ठाकूर, दुबळा, बैगा, गदवा, कमार, खाडिया, खोंड, कोल, कोलाम्, कोरकु, कोरवा, मुंडा, उराँव, परधान आणि वाघरी.

केरळ–कदर, इरुल, मुथुवन, कनिक्कर, मलंकुरवन, मलयरयन, मलवेतन, मलयन (मालंपटारम् येरवा), मन्नन, उल्लतन, उरळी, विशवन, अरनदन, कट्टुनैकन, कोरग, कोत, कुरिचियन, कुरुमन, पनियन, पुलयन, मालसर, कुरुंब.

मध्यप्रदेश – कोरल, भिल, वैगा, गदबां, गोंड, खोंड, कोल, कोलम्, उरावँ, परधान.

मद्रास—तोड, कदर, इरुल, कोत, अदियन, अरनदन, कट्टुनैकन, कोरग, कुरिचियम, मालसर, कुरूमन, मुयुवन, पसियन, पुलयन, मलयाली, कुरुंब, एरवल्लन, कनिक्कर, मन्नन, पलियन, उरळी, विशवन (हळवा).

म्हैसूर–गौदलु, हक्किपिक्कि, इरुलिग (बेरड, सोलेगा), जेतु कुरुब, मलैकुडि, भिल, गोंड, तोड, वारली, चेंचू, कोया, अरनदन, येरव, होलेय, कोरम.

ओरिसा – बैगा, बंजारे, बिरहोर, बोंदो, चेंचू, गदबा, गोंड, हो, जतपुस, जुआंग, खडिया, कोल, खोंड, कोया, उराँव संताळ, सवरा (पोरजा).

पंजाब–गड्डि, स्वंगल, भोट.

राजस्थान– भिल, गरासिया, दुबळा, गोंड, कोरकु, कोळी, कातकरी, वारली, पारधी, सेहरिया.

प. बंगाल – हो, कोल, मुंडा, उराँव, भूमिज, संताळ, गारो, लेपचा, असुर, बैगा, बंजारे, गोंड, बिरहोर, खोंड, कोरवा, लोहार.

हिमाचल प्रदेश–गड्डि, गुर्जर, लहौल, लांब, पगवल.

मणिपुर – अंगामी, मिझो, कोम, पैते, पुरुम, सेमा.

त्रिपुरा – लुशाई, मग, कुकि हलम, खासी, भुतिया, मुंडा, संताळ, भिल, जमतिया, रिआंग व उच्छै.

आदिवासी किंवा वन्य ही कांही एकरस, अखंड जमात नव्हे. त्यांच्यांत सुमारें दोनशे वेगवेगळ्या जमाती आहेत. या सर्व जरी वन्य असल्या, तरी भाषा, पोषाख, चालीरीती, देवधर्म या सर्व गोष्टींत त्यांच्यामध्ये खूप फरक आहे.

आदिवासींच्या जुन्या भाषा आज जीवन–मरणाच्या प्रसंगांत सांपडलेल्या आहेत. सर्व आदिवासी भाषांत गोंडी ही प्रमुख भाषा होय. ही भाषा सुमारें १५ ते २० लाख लोक

बोलतात. तिच्यांतहि अनेक पोटभाषा आहेत. कुरुख ही उराँव आदिवासींची भाषा आहे. प्राचीन तमिळ भाषेशीं हिचें नातें लागतें. खोंड आदिवासी कान्ध किंवा कुई ही भाषा बोलतात. छोटा नागपूर व त्याच्या आसपासच्या प्रदेशांत मुंडा भाषा व तिच्या अनेक बोली बोलल्या जातात. सवर व गदबा यांच्या स्वतंत्र भाषा आहेत.

कोरकु भाषेचें खेरवारी भाषेशीं पुष्कळ साम्य आहे. आसाममध्ये नागा टोळीवाल्यांच्या भाषेशिवाय आणखी वेगवेगळ्या १६ भाषा बोलल्या जातात. पुष्कळशा आदिवासी जमाती द्वैभाषिक आहेत, तर कित्येक आपली मूळ भाषा विसरून गेले आहेत. लिखित वाङ्मयाची परंपरा नसल्यामुळे व निरनिराळे समाज दूरदूर राहत असल्यामुळे त्यांच्या भाषांची परस्पर दुर्बोधता वाढली आहे.

भारतांतील आदिवासींचे चार मुख्य सांस्कृतिक विभाग पडतात–

पहिल्या गटांतील आदिवासी हे खरेखुरे गिरिजन आहेत. त्यांनी आपल्या प्राचीन परंपरा व आचार अजून टिकवून ठेवले आहेत. या कामीं त्यांना भौगोलिक परिस्थितीचेंहि साहाय्य मिळालें आहे. त्यांचा सखल प्रदेशांतील लोकांशीं क्वचितच संबंध येतो. त्यांच्या जीवनाचे प्रमुख विशेष पुढीलप्रमाणे–

कुटुंबें मोठीं. एक खेडें म्हणजे एक कुटुंबच म्हटलें तरी चालेल. सामुदायिक शेजघर. आर्थिक जीवनहि सामुदायिकच. कांही खेड्यांत धान्य कोठारेंहि सामुदायिकच असतात. कांही ठिकाणीं कर देखील सामुदायिकच भरला जातो. जमीन सामुदायिक मालकीची असते. हे आदिवासी गिरिजन दरवर्षी डोंगरांतलें शेतीपुरतें जंगल तोडून व तें जाळून तिथे धान्य पेरतात. ही त्यांची पुरातन पद्धत असून त्यांच्या कथांतहि तिच्यावर भर दिलेला आढळतो. हे लोक निरागस व प्रामाणिक असतात. त्यांच्यांत गुन्हेगारी जवळ जवळ नसतेच. व्यभिचार हा मोठा अपराध समजतात. हे लोक कपडे अगदी अल्प वापरतात. बस्तरमधील मरिया, जुआँग, गदबा, बोंडो, बैगा, या आदिवासींच्या स्त्रियांचें वक्षःस्थल उघडेंच असतें.

दुसऱ्या वर्गांतले आदिवासी वनप्रदेशांतच राहतात. तेहि आपल्या प्राचीन परंपरा सांभाळून आहेत. पण हळूहळू त्यांच्यांत स्थित्यंतर होत आहे. यांचे मुख्य विशेष पुढीलप्रमाणे–

हे व्यक्तिवादी आहेत. यांचीं कुटुंबें सामुदायिक नसतात. प्रत्येकाचें घर वेगळें असतें. तथापि त्यांतल्या मुरिया, भुइया व उराँव यांचीं मात्र शेजघरें सामुदायिक असतात. यांचे व्यवहारहि स्वतंत्र असतात. परस्पर स्पर्धेचीहि भावना असते. यांच्या जमिनीचें वांटप होतें. हे गुरें पाळतात. गरज पडेल त्याप्रमाणे एकमेकांचीं शेतीचीं अवजारें वापरतात. यांचा बाह्य जगाशीं वारंवार संबंध येतो. पहिल्या वर्गाच्या मानाने हे कपडे अधिक वापरतात. पहिल्या वर्गापेक्षा ते अधिक चलाख व कमी प्रामाणिक असतात.

आदिवासींतला तिसरा गटहि बराच मोठा आहे. त्यांचा बाह्य जगाशीं वरचेवर संबंध येत असल्यामुळे त्यांची जुनी संस्कृति, धर्मविषयक कल्पना व सामाजिक संघटना, या गोष्टी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.

चौथा गट खानदानी आदिवासींचा. भिल्ल, नागांचे टोळीप्रमुख, गोंड राजे, भुइया जमीनदार, कोरकूंतलीं कुलीन घराणीं, संताळांतले श्रीमंत, उराँव लोकांचे मुखंड व शिक्षण घेतलेले मुंडा, यांचा या गटांत समावेश होतो. यांनी आपल्या प्राचीन संस्कृतीचा पूर्णतया त्याग केलेला नसला, तरी या लोकांवर हिंदु धर्माचे बरेच संस्कार झालेले आहेत. या गटांतील सुखवस्तु आदिवासींनी स्वपराक्रमावर समाजांत मानाचें स्थान मिळविलें आहे. या गटांत मंत्रिपद भूषविणारे, मोठे सरकारी अधिकारी, विद्वान् व धर्मोपदेशकहि आहेत. हिंदूंशीं व ख्रिस्ती मिशनऱ्यांशीं संपर्क आल्यामुळे त्यांच्यांत ही सुधारणा झालेली आहे.



मयूरचित्र
कोंड आदिवासी

पण या अन्य संस्कृतींच्या संपर्कामुळे या लोकांचें कांही बाबतींत नुकसानहि झालें आहे. लैंगिक रोग, क्षय, वेश्याव्यवसाय, लांडीलबाडी, इ. अनिष्ट व्याधि व दुर्गुण त्यांच्यांत शिरले आहेत. नागा आदिवासींत बरेच लोक ख्रिस्ती झाले आहेत. या धर्मांतरामुळे त्यांना पाश्चात्य राहणी व पोशाख यांची गोडी वाटूं लागली आहे. पण आर्थिक दृष्टचा त्यांना या दोन्ही गोष्टी परवडण्याजोग्या नसल्यामुळे त्यांची कुचंबणा होत आहे. त्यांची जुनी जीवनशक्तिहि कमी कमी होत आहे. त्यांचें जुनें सामाजिक जीवन नष्ट झालें आहे. याचें प्रमुख उदाहरण म्हणजे नृत्य. पूर्वीं आदिवासींच्या जीवनांत नृत्याला फार मोठें स्थान होतें. पण आता त्यांच्यांत नृत्याचे समारंभ क्वचितच होतात. कारण, नृत्य करणें त्यांना आता कमीपणाचें वाटतें.


ब्रिटिश राज्यकारभार आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांचा धर्मप्रचार, या गोष्टींनी तिसऱ्या व चौथ्या गटांतल्या आदिवासींच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाची उलथापालथ करून टाकली. त्यांचें वांशिक ऐक्य, सणांचा आनंद, सामुदायिक जीवनांतली अद्‌भुतरम्यता, रंगीबेरंगी पोशाखाची आवड, या गोष्टी त्यांनी नष्ट करून टाकल्या आहेत.

आणखी एक गोष्ट इथे नमूद केली पाहिजे ती ही, की ख्रिस्ती मिशनऱ्यांना हिंदु धर्माच्या मदतीशिवाय कुठल्याच आदिवासींत आपला धर्मप्रसार करतां आला नाही. ज्या लोकांत हिंदुधर्माचा प्रवेश झाला होता, तिथेच ख्रिस्ती मिशनऱ्यांना आपला धर्मप्रचार करणें शक्य झालें. इतर ठिकाणीं ते आदिवासींचें धर्मांतर करण्यांत अपेशी ठरले आहेत.

ब्रिटिशांच्या राज्यकारभारामुळेहि त्यांच्या अवनतींत भर पडली. शहरवासी लोकांकडून त्यांची पिळणूक होऊं लागली. सावकारांनी त्यांच्या जमिनी घशांत घातल्या. सरकारने त्यांना जंगलतोड करून शेती करण्यास प्रतिबंध केला, त्यामुळे डोंगरांतील आदिवासी शेतीला मुकले. बहुतेक आदिवासींच्या सणांत शिकार हा महत्त्वाचा भाग असतो. परंतु सरकारी नियंत्रणामुळे त्यांना हल्ली शिकार करतां येत नाही. त्यांच्या मच्छीमारीवरहि अनेक निर्बंध पडले आहेत. शिकार व मासे हें त्याचें महत्त्वाचें अन्न. पण तेंच हल्ली दुर्मिळ झाल्यामुळे त्यांचें जीवन खुरटत चाललें आहे.

शिकारीप्रमाणे दारू ही देखील आदिवासींच्या जीवनांतील महत्त्वाची बाब आहे. त्यांचा कुठलाहि सण-उत्सव दारूशिवाय साजरा होत नाही. त्यांच्या धार्मिक कृत्यांनाहि दारू लागते. पूर्वी त्यांना दारू गाळण्यास प्रतिबंध नव्हता; पण आता त्यांना आपल्या हातभट्ट्या चालवितां येत नाहीत.

हल्ली आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार पुष्कळच होऊं लागला आहे. याचें श्रेय अर्थात् भारतीय स्वातंत्र्याला दिलें पाहिजे. ब्रिटिश आमदानींत त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्षच केलें गेलें. त्या काळीं आदिवासींच्या प्रदेशांतील प्राथमिक शाळा जिल्हा सल्लागार मंडळाच्या हातीं असत. या मंडळावरचे सभासद जमीनदार, वकील आणि व्यापारी या वर्गांतले असत. आदिवासींची अनेक प्रकारें पिळणूक करून ते गबर झालेले असत. त्यामुळे आदिवासींच्या शिक्षणाला त्यांचा मनांतून विरोध असे. हे लोक शिकले सवरले, तर ते आपणांवर उलटतील व आपल्या स्वार्थाला टांच लागेल, अशी त्यांना भीति वाटे. पण भारताला स्वातंत्र्य मिळालें आणि ही स्थिति पालटली. भारत सरकारने त्यांच्या अभ्युदयाकडे लक्ष दिलें. त्यांच्या मुलांना शेती व विविध धंदे यांचें तांत्रिक शिक्षण मिळण्याचीहि सोय केली.



आदिवासींची कला
तपकिरीची डबी



आदिवासींची कला – नवरदेवाचें बाशिंग

या शिक्षण प्रसारामुळे आदिवासींचा व्यावहारिक फायदा होऊं लागला ही गोष्ट खरी; पण, फायद्याबरोबरच कांहीं तोटेहि झाले, हें विसरतां येणार नाही. आदिवासी मुलें शिक्षणासाठी शहरांत आलीं, की तीं शहरी जीवनाचें अनुकरण करतात. त्यांना फिरून आपल्या समाजांत जावेंसें वाटत नाही. त्यांना आपल्यां चालीरीतींचीहि लाज वाटूं लागते. यावर कोणी विचारील, की शिकलेल्या आदिवासींनी देखील आपल्या परंपरागत व असंस्कृत चालीरीतींना चिकटून राहावें कीं काय ? याचें उत्तर नाही असेंच दिलें पाहिजे. पण कांही गोष्टी अशा असतात, की त्यांचें जतन व्हायलाच हवें आहे. उदा० आदिवासींचीं गाणीं व त्यांचें नृत्य. त्यांच्या या दोन्ही कला उच्च दर्जाच्या आहेत. पण आजमितीस त्यांचा हळूहळू लोप होत आहे. कांही आदिवासींच्या मुलांचे, विशेषत: मुरिया आदिवासींच्या मुलांचे खेळ फारच मनोरंजक असतात. पण या दर्जेदार खेळांची आज उपेक्षा होऊं लागली आहे.

मृत पूर्वजांना न विसरणें, भूमीचें प्रेम, बहुरंगी सण-उत्सव, शिस्तीचे नियम, या गोष्टी अशा आहेत, की त्या आदिवासी जीवनांतून जातां कामा नयेत. त्या जतन करण्यासाठी सरकारने

व सुसंस्कृत लोकांनी काळजी घेतली पाहिजे. कांही आदिवासींची सामुदायिक अर्थयोजना व त्यांचें सामुदायिक जीवन, हें तर आधुनिक जगाहून कितीतरी वर्षांनी पुढे आहे. प्रत्येक वस्तु विभागून खाणें व एकमेकांच्या सुखदुःखांत सहभागी होणें या त्यांच्यांतल्या प्रवृत्ति निस्संशय स्पृहणीय आहेत. त्यांचा साधेपणा, प्रामाणिकपणा, विनोदबुद्धि हे सद्‌गुणहि विलोभनीय आहेत. कौटुंबिक निष्ठा हा त्यांचा आणखी एक गुणविशेष. सुधारलेल्या जगानेहि या बाबतींत त्यांचा कित्ता गिरवावा. पण आजच्या शिक्षणपद्धतीमुळे आदिवासी समाज या सद्‌गुणांना आणि सहजप्रवृत्तींना मुकत चालला आहे.

आदिवासींचें परंपरागत जीवन साधें आणि असलेल्यांत समाधानी असतें. नैसर्गिक आनंदाने तें परिपूर्ण असतें. आदिवासी नेहमी अरुणोदयापूर्वी उठतात. भोपळ्यांतल्या पाण्याने तोंड धुतात. आदल्या रात्रीं करून ठेवलेली पेज पितात. धडधाकट माणसें सूर्योदयाबरोबरच कामाला जातात. म्हातारीं माणसें घरीं राहतात. तीं टोपल्या, चटया वगैरे विणणें, धान्य सुकीं फळें वगैरे वस्तु उन्हांत वाळविणे इ. कामें करतात. पुरुष जंगलांतील झाडें तोडून लाकडें करतात. बायका पत्रावळी व द्रोण यांच्यासाठी पानें गोळा करतात आणि कंदमुळें व रानटी फळें मिळवून आणतात. धाडसी तरुण डोंगरकडयांवर चढून मध गोळा करतात. मुलें शेळ्या–मेंढयांना चारायला नेतात व रानटी उंदीर व पांखरें यांची शिकार करतात. बांसरी हें बहुतेक आदिवासींचें आवडतें वाद्य. रानावनांतून त्याचे स्वर निनादत राहतात. प्रेमी युगुलें झाडावर चढून एकमेकांस उद्देशून प्रेमगीतें म्हणतात.

बहुतेक आदिवासी जमातींत स्त्रीचें स्थान उच्च आणि मानाचें असतें. सगळीकडे ती अनिर्बंध संचार करते. आपल्या नवऱ्याबरोबर ती शेतांत व जंगलांतहि काम करते. तिचें लग्न ती वयांत आल्यानंतर होतें व तो संबंध जर अयशस्वी झाला, तर तिला घटस्फोट घेण्याचा अधिकार असतो. तिचा पति निधन पावला, तरी तिला वैधव्यांत राहावें लागत नाही ती पुनर्विवाह करूं शकते. कांही आदिवासींत तर तिला मृत पतीची मालमत्ताहि प्राप्त होते. तिचें जीवन असें मुक्त असल्यामुळे तिच्या मनांत नेहमी काव्यमय विचार घोळत असतात. तिच्या जिभेवर विनोद नाचत असतो. ती सर्व कार्यांत पतीची सहधर्मिणी असते.

आदिवासी लोक दिवसांतून दोनदा जेवतात. पहिलें जेवण सकाळच्या पहिल्या प्रहरानंतर व दुसरें सूर्यास्ताच्या सुमारास. डोंगरी भात व कडधान्यें हें त्यांचें मुख्य अन्न होय. पूरक अन्नांत कंदमुळें, डाळी, मका, महुआ व चिंच इ. वस्तूंचा अंतर्भाव असतो. त्यांच्यापाशी जनावरांची कमतरता असल्यामुळे मांसाहारासाठी त्यांना ससे, खारी, वाघुळें, वगैरे प्राण्यांवर अवलंबून राहावें लागतें. बैगांना तर एकवीस प्रकारचे उंदीर माहीत आहेत. कांही भुकेकंगाल आदिवासी माकडाचें व गायीचेंहि मांस खातात. सायंकाळीं कामावरून घरीं आल्यावर ते ताडी पितात. रात्रीचें जेवण झाल्यावर लगेच निद्राधीन होतात. म्हातारीं माणसें शेकोटीभोवती गोष्टी करीत बसतात व दुसरीकडे सामुदायिक शयनगृहांतून मुलामुलींचे हास्यकल्लोळ बाहेर पडत राहतात.



आदिवासींची कला.
धार्मिक कृत्यांसाठी मुखवटे

वरील दैनंदिन जीवनांत कांही वेळां व्यत्यय येतो, तो पुढील कारणांनी– परवानगी काढून करण्यांत येणारी मोठी शिकार, सामुदयिक मच्छीमारी, जंगली हत्ती किंवा वाघ यांचा पाठलाग, सण, लग्नें व नृत्याच्या सफरी.

आदिवासींचें जीवन सुखी व समृद्ध नसलें, तरी तें स्वतंत्र असतें, हें त्याचें वैशिष्टच ! बाकी त्यांनाहि चिंता व विवंचना असतातच. रोगराई व भय यांच्याशीं त्यांना सदैव सामना द्यावा लागतो. डांस त्यांना सतावून सोडतात. निरनिराळ्या साथींनी ते हैराण होतात. पावसाच्या अनियमितपणामुळे त्यांच्या पिकांची नुकसानी होते. नाना प्रकारच्या सरकारी कायद्यांनीहि ते संत्रस्त असतात.

आदिवासी धर्म – आदिवासींचा धर्म मूलतः निसर्गवादी आहे. निसर्गातल्या प्रत्येक वस्तूंत एक कांहीतरी शक्ति असते आणि त्या शक्तीला मानवी जीवनांत बरेंवाईट स्थान असतें, असें ते मानतात. मृतात्मे व निसर्गातल्या दुष्ट शक्ती यांच्या कल्पनेवर आदिवासींचा धर्म आधारलेला आहे. आदिवासींचे मृतात्मे म्हणजे त्यांचे पितर होत. ते दगडांत, नद्यांत व झाडांवर राहतात. झाडेंझुडपें व जनावरें माणसाशीं बोलूं शकतात व त्यांच्या भवितव्यावर प्रभाव पाडतात, असें कोरवा आदिवासींना वाटतें. माणसाच्या अंगांतहि एक अदृश्य अशी शक्ति असते, असें बंगालमधील पोलिया आदिवासी समजतात. ते

कोणालाहि आपला फोटो काढूं देत नाहीत. त्या फोटोबरोबर त्या माणसांतली शक्ति निघून जाते, अशी त्यांची समजूत आहे. निसर्गाची प्रक्रिया लहरी अशा विशिष्ट शक्तींच्या हातांत असते, अशी त्यांची समजूत आहे. म्हणून तिला नियंत्रित करून तिच्याकडून इष्ट कार्य साधून घेण्यासाठी ते जमातींतल्या देवर्षि, भगत किंवा पुरोहित अशा लोकांचा सल्ला घेतात व त्यासाठी उपाय व उपचार करतात.



आदिवासींची कला– मुरिया गोंडांची फणी

आदिवासी धर्म ही एक प्रकारची सत्तास्पर्धा असते. निसर्गांतल्या दुष्ट शक्तींवर विजय मिळविण्याचा तो एक लढा असतो. प्रत्येक आदिवासी जमातीची शक्तिविषयक कल्पना भिन्न भिन्न असते. ती धूसर अतएव अस्पष्ट असते. पण सर्व श्रद्धा आणि उपासना यांचें तीच मूळ कारण असते. ज्या नैसर्गिक घटनांचा त्यांच्या जीवनावर परिणाम होतो, त्यांचा अर्थ लोक त्यांना मिळालेल्या अनुभवांवरून लावतात. त्या घटनांचा कोणत्या तरी शक्तीशीं, देवाशीं, किंवा मृतात्म्याशीं ते संबंध जोडतात. मृतात्म्यांची शक्ति आपल्याला उपकारक ठरावी, या हेतूनेच ते त्यांची पूजा करतात.

पशुपक्षी ही आणखी एक शक्ति होय. तिच्या आराधनेंतून त्यांच्यांतल्या पशुपूजेचा जन्म झाला आहे. वृक्षोपासना हीहि त्याच श्रद्धेंतून निर्माण झाली आहे. आदिवासी लोक वृक्षांना सुबत्तेचें प्रतीक समजतात. फार कशाला; दगड, पिसें, हाडे, मणी इ. पदार्थदेखील सजीव आहेत आणि त्यांच्यामध्येहि गूढ शक्तींचें वास्तव्य आहे, असें ते समजतात. म्हणूनच आदिवासींच्या धर्मांत जादूटोण्याला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. महामारी, तापसरी, देवी, इ. प्राणघातक साथींनाहि त्यांनी शक्तिरूप देवत्व कल्पिलें असून त्या त्या देवांना त्यांनी नांवेंहि दिलीं आहेत. त्या शक्तींची बाधा होऊं नये म्हणून विशिष्ट प्रसंगीं त्या शक्तिरूप देवतांना ते बलिदान करतात.

दुष्ट शक्तींप्रमाणेच सौम्य व उपकारक शक्तींचीहि आदिवासींना जाणीव आहे. अशा शक्तींच्या उपासनेचाहि अंतर्भाव त्यांच्या धर्मांत होतो. धरती, वनस्पति, सूर्य, चंद्र, व तारे यांचीहि ते पूजा करतात. मुंडा लोक सूर्याला 'सिङ्‌बोंगा' म्हणतात. त्यांच्या मतें हा देव चांगला असून तो कोणाचेंच अकल्याण करीत नाही. प्रत्येक आदिवासी जमातीचा, जमात निर्माण करणारा असा एक देव असतो. तो देवहि त्या जमातीचें नेहमीं कल्याणच करतो. पण आश्चर्याची गोष्ट ही, की या कल्याणकर्त्या देवांकडून त्यांना कसलीच भीति नसल्यामुळे ते त्यांच्यापेक्षा दुष्ट देवांचीच पूजा मोठ्या श्रद्धेने करतात.

बोंगा या नांवाने कित्येक आदिवासींनी आपल्या सर्वश्रेष्ठ देवाची कल्पना केली आहे. हिंदूंच्या परमेश्वराचे बरेच गुणधर्म बोंगामध्ये दाखल झाले आहेत. बोंगाच्या या कल्पनेनेच ते हिंदूंच्या पौराण धर्माच्या जवळ आले आहेत.

आदिवासी संस्कृति – आदिवासींच्या भाषेंतच नव्हे; तर त्यांच्या आचार-विचारांतहि भरपूर विविधता आढळते. कांही जमातींत पितृप्रधान कुटुंबसंस्था आहे, तर कांहींत ती मातृप्रधान आहे. कांही जमातींत बहुपत्नीकत्व आहे, तर कांहीत बहुपतित्वहि आहे. कांहीत उच्चनीच अशा कुळंचाहि आहेत. कांही जमातींत अस्पृश्यताहि आढळते. परधान हे गोंडांचे आश्रित व अस्पृश्य गणले जातात. गंदा, पंका, कम्मार, ओझा, नागरची इ. आदिवासी अस्पृश्य गणले जातात. ज्यांनी आपलें सांस्कृतिक स्वातंत्र्य टिकवून ठेवलें आहे, असे गोंड, मेइथेइ, हे स्वतःला क्षत्रिय समजतात. सामान्यतः निकृष्ट शेती करणारे हीन व उत्कृष्ट शेती करणारे उच्च समजले जातात.

आदिवासींच्या संस्कृतीची घडण अगदी साधी आहे. जें कांही विनामूल्य व सुलभतेने मिळतें, त्यावर ते आपल्या चालीरीती, हौसामौजा व उत्सव–समारंभ भागवून नेतात. सामान्यतः सर्व आदिवासींत स्वातंत्र्यप्रियता आढळते. नोकरी करणें किंवा कायमचें एखाद्या ठिकाणीं स्वतःला बांधून घेणें, हें त्यांना आवडत नाही. एखादी नोकरी सोडून द्यायला त्यांना नाममात्र निमित्त पुरतें.

बहुतेक सर्व आदिवासींना विस्तव तयार करणें, हत्यारें बनविणें, घरें बांधणें, मातीचीं भांडीं बनविणें, लाकूडकाम करणें व वस्त्रें विणणें, या कला अवगत आहेत. प्रत्येक जमतीला आपली अशी स्वतंत्र भाषा आहे. शिक्षणाची किंवा पारंपरिक ज्ञान देण्याघेण्याची पद्धतहि सर्वत्र सारखीच आहे. काय करावें व काय करूं नये याचें शिक्षण प्रत्येक आदिवासीला त्याच्या आईबापांकडून मिळत असतें. परंपरागत लोककथा, दैवतकथा, यांच्या आधारें त्यांचें जीवन-व्यवहार

नियमित होतात. जी गोष्ट त्यांच्या कल्पनेच्या आटोक्यांत येत नाही, ती करून दाखविणारी व्यक्ति त्यांना असामान्य वाटते.

नृत्य ही त्यांच्या आनंदाची परिसीमा आहे. कांही आदिवासी चर्मवाद्यें व सुषिरवाद्यें स्वतः बनवितात व नृत्यांत त्यांचा उपयोग करतात. नृत्यांत बेहोषी येण्यासाठी दारू पिण्याची चाल बहुतेक आदिवासींत आहे. त्यांचीं नृत्यें त्यांच्या देवाधर्मांशीं संबद्ध असतात.

समाजव्यवस्था अगदी साधी असते. जोंवर मुलांना स्वतःचें अन्न स्वतंत्र रीत्या मिळविणें शक्य नसतें, तोंवरच आईबाप त्यांची जबाबदारी वाहतात. मुलें-मुली वयांत आल्यावर त्यांचीं लग्नें होतात. स्त्री-पुरुषांवर विशिष्ट कालांत कांही बंधनें असतात. गरोदरपणीं स्त्रियांनी पाळायचे नियम प्रत्येक जमातींत निरनिराळे असतात. जन्म, मृत्यु, विवाह इ. प्रसंगीं पुरुषांनी पाळायचे नियमहि भिन्न भिन्न असतात. मुलांना पूर्वजांचीं नांवें ठेवतात. मृतात्म्यांच्या संतोषासाठी श्राद्धासारखे कांहीतरी विधि करायची प्रथा सर्व आदिवासींत आढळते. बायका अंगावर गोंदून घेतात. जुन्या काळीं स्तनावर व पाठीवर चोळीसारखें गोंदून घेण्याची प्रथा होती, पण आता ती हळूहळू नष्ट होत आहे.

आदिवासींची विवाहपद्धति -- उत्तर भारतांतल्या आदिवासींत मुलें-मुली वयांत आल्यावर त्यांचे विवाह होत असले, तरी त्यांच्यामध्ये विवाहपूर्वकालांत लैंगिक संबंध घडून येतात. पण द. भारतांतल्या आदिवासींत मात्र असे प्रकार होऊं नयेत, याची काळजी घेतली जाते. दक्षिणेंत मुलां-मुलींचीं शयनगृहें वेगवेगळीं असतात. विशेषतः अविवाहित मुलींच्या शयनगृहांवर जमातींतल्या वृद्ध स्त्रियांची कडक देखरेख असते. विवाहांचे प्रकार कालमान आणि समाजस्थिति यांच्या अनुरोधानें बदलत आले आहेत. हे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत--

(१) **राक्षसविवाह किंवा जबरीविवाह** -- हा प्रकार सर्वांत प्राचीन होय. याचे अवशेष आजहि केरळांत मन्नान व मुथुवन या गिरिजनांत पाहायला मिळतात. विवाह निश्चित झाला, की मुथुवन नवरदेव आपल्या वधूला जंगलांत पळवून नेतो. मन्नान तरुणाचें एखाद्या मुलीवर प्रेम बसलें व तिने जर त्याच्याशीं विवाह करण्यास नकार दिला तर तो तरुण तिला रानांत पळवून नेतो व कांही काल तिच्यासह राहतो. नातेवाईक मग त्यांचा शोध करून त्यांना घरीं आणतात व त्यांचें लग्न लावून देतात. खारिया व बिरहोर या जमातींतहि तरुण मुलगे आवडत्या मुलीला एकटे गांठून तिच्या अंगाला तेलहळद लावतात. विवाहसंबंधाची ती प्राथमिक निशाणी समजली जाते. एकमेकांच्या वस्तीवर हल्ले चढवून किंवा जत्रेंत दोन जमाती एकत्र जमल्या असतां दुसऱ्या जमातीवर हल्ला करून मुलींचें अपहरण करण्याची चाल कित्येक आदिवासींत होती. आजहि ती कुठे कुठे दिसते.

(२) **सेवाविवाह** -- वधूपित्याच्या घरीं कांही काल नोकरी करून त्या नोकरीच्या मोबदल्यांत वधू मिळविणें, अशीहि पद्धत मन्नान, पलियन, गोंड, बैगा इ. जमातींत आहे. जेव्हा वधू मिळविण्यासाठी द्रव्य देणें दारिद्र्यामुळे अशक्य असतें, तेव्हा आदिवासी तरुण अशा सेवाविवाहाचा मार्ग अवलंबितात.

(३) **क्रयविवाह** -- वधूच्या बापाला पैसे किंवा अन्य वस्तु देऊन मुलगी मिळविणें, ही प्रथा आजहि सर्वत्र रूढ आहे. मुलींची किंमत निरनिराळ्या आदिवासी जमातींत कमीजास्त असते. हो जमातींत मुलींची किंमत फार असते. त्यामुळे लग्नें जमणें अवघड होतें. म्हणूनच त्या जमातींत वाढलेल्या मुली व अविवाहित पुरुष पुष्कळ आढळतात. त्यांतले कित्येक धाडसी तरुण मग राक्षसविवाहाचा अवलंब करतात. नागा आदिवासींतल्या आओ व अंगामी या आदिवासींत मुलींचे दर कमी असल्यामुळे स्त्रियांचा दर्जाहि कमी आहे. याच्या उलट रेंगमा जमातींत मुलींची किंमत वाजवी असल्यामुळे त्यांचा दर्जाहि उच्च असतो व त्यांना संरक्षणहि चांगलें मिळतें.

(४) **साटेंलोटें विवाह**– एकमेकांच्या बहिणी एकमेकांना देऊन विवाहबद्ध होण्याची दक्षिणेंतल्या कित्येक आदिवासींत प्रथा आहे. त्यामुळे ज्या मुलाला बहीण नसते त्याचें लग्न होणें कठीण जातें. विशेषतः उरळी जमातींत ही चाल कडक आहे. मामाच्या मुलीशीं सर्रास लग्न होतें. आतेबहिणीशीं मात्र तें कांही तुरळक जमातींतच होतें.

एकपत्नीकत्व व बहुपत्नीकत्व– कांही वन्य जमातींत एक बायको असतां दुसरी करण्याची प्रथा नाही. अनेक बायका करण्याची चाल नागा, गोंड, बैगा इ. अनेक जमातींत आहे. पुरुष आणि स्त्रिया यांच्या संख्येंतली विषमता हे बहुपत्नीकत्वाचें एक कारण आहे, असें मानतात. दुसरें कारण म्हणजे, अनेक बायका केल्याने एखाद्याच्या भौतिक सुखांत अधिक भर पडते. काम करायला सत्तेचीं माणसें अधिक मिळाल्याने त्याच्या आर्थिक उत्पादनांतहि वाढ होते व त्यामुळे त्याचा सामाजिक दर्जाहि उंचावतो. म्हणूनच उरळी आदिवासींत एखादा पुरुष जितक्या बहिणी असतील, तितक्या बायका घरीं आणूं शकतो.

बहुपतिकत्व – ज्या जमातींत स्त्रियांपेक्षा पुरुष अधिक असतात, तिथे बहुपतिकत्वाची प्रथा संभवते. सामान्य नियम असा, की जिथे सुबत्ता असते, तिथे स्त्रियांची संख्या अधिक असते व जिथे अन्नाची कमतरता असते, तिथे पुरुष अधिक

असतात. मालापुलयन, उरळी, पलियन या जमातींत स्त्रियांहून पुरुष अधिक आहेत. त्यामुळे त्या जमातींत तसेंच खासी, तोडा, कोट इ. जमातींत अनेक भावांना मिळून एकच बायको असते. कित्येक-वेळा चुलत भावांचीहि एकच बायको असते. संपत्तीची विभागणी होऊं नये हें व दारिद्रय आणि दुर्भिक्ष्य हें, अशीं दोन कारणें या प्रथेच्या मुळाशीं संभवतात.



आदिवासींचा लग्नांतला ठाणदिवा

घटस्फोट व पुनर्विवाह– व्यभिचार, वांझपणा, विजोडपणा, पुरुषांमधलें व्यंग व षंढत्वादि दोष इ. कारणांसाठी सर्व आदिवासींत स्त्रीला लग्नविच्छेदाचा अधिकार आहे. परस्परांच्या संमतीनेहि त्यांना विभक्त होतां येतें. मात्र, ज्या व्यक्तीला विभक्त व्हायचें असेल, त्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस नुकसानभरपाई दिली पाहिजे. विधवेला पुर्नविवाह करण्याचा अधिकार असतो. पुष्कळ ठिकाणीं ती आपल्या धाकट्या दिराशीं लग्न करते. कांही थोड्याच जमातींत तिला थोरल्या दिराशीं लग्न करतां येतें.



गोंड आदिवासींचा
लोखंडी दीपस्तंभ

ऋतुप्राप्ति व लैंगिक संबंध– पुष्कळ आदिवासींत मुली वयांत आल्यावरच त्यांचे विवाह होत असले, तरी कांही जमातींत बाल-विवाह रूढ आहेत. अशा विवाहानंतर मुलीला रजोदर्शन होण्यापूर्वीहि तिचा पतीशीं संबंध घडवून आणण्याची चाल दक्षिणेंतल्या कांही आदिवासींत आढळते. अशा अकालीं संभोगामुळे स्त्री-पुरुषांच्या आरोग्यावर व प्रजोत्पादनावर अनिष्ट परिणाम झालेला दिसून येतो. कनिक्कर जमातींत गर्भस्रावाचें प्रमाण फार आहे, त्याचें कारण हेंच असावें, असें मानतात.

व्यभिचार – आदिवासी लोक स्त्रीच्या नैतिक आचरणाला फार महत्त्व देतात. तिचें पाऊल वाकडें पडलें, तर तिला कडक शिक्षा मिळते. व्यभिचार हा मोठा गुन्हा मानला जातो. दक्षिणेंतल्या कांही आदिवासींत व्यभिचाराबद्दल पुरुषाला झाडाला उलटें टांगून खालून धूर देत असत. शिवाय त्याला पंचवीस फटकेहि मारीत. स्त्रीला पंधरा फटक्यांची शिक्षा असे. पण ती शिक्षा अलिकडे कायद्याने बंद झाली आहे. व्यभिचाराच्या कारणास्तव स्त्रीला घटस्फोटहि दिला जात असे. पूर्वी आदिवासी लोकांचा सुधारलेल्या जगाशीं क्वचितच संपर्क येई; पण अलिकडे हा संपर्क वाढत चालल्यामुळे आदिवासींच्या नैतिक आचरणावर त्याचा अनिष्ट परिणाम होऊं लागला आहे. त्यांच्या स्त्री-पुरुष संबंधांत शैथिल्य निर्माण होऊं लागलें आहे.

आदिवासींचे विधि-निषेध – आदिवासी कपडे कमी वापरतात; पण वस्त्रांविषयीं त्यांच्यांत आख्यायिका पुष्कळ आहेत. बोंडो आदिवासी हे बहुतांशी नग्न असले तरी ते स्वतः वापरीत नसलेल्या विविध वस्त्रांच्या कथा सांगतात. छत्तिसगडचे आदिवासी कमरेभोवती केवळ एक वस्त्राची पट्टी वापरतात. त्याबद्दल ते दंतकथा सांगतात ती अशी––

एकदा महादेव कपडे वांटीत होता. त्या वेळीं सगळे लोक तिथे वेळेवर जमले; पण उशीर केला तो छत्तिसगडी लोकांनी. महादेव त्यांना म्हणाला. 'आता तुमच्या वांट्याला कापडाच्या कांही पट्ट्या उरल्या आहेत, त्या तुम्ही घ्या !'

हो आदिवासी जांभई देतांना तोंड झांकून घेतात. तसें केलें नाही तर तो माणूस वाघाचें भक्ष्य होतो, असें समजतात. याशिवाय, या जांभईचा संबंध त्यांनी मुलीचें देज घेण्याशीं लावलेला आहे. ती कथा अशी––

एका मुंडाच्या मुलीने तोंड झांकून न घेतां जांभई दिली. त्यासाठी लोकांनी तिला वाघाच्या गुहेंत नेऊन ठेवलें. एका धनगराने ही गोष्ट दुरून पाहिली. त्याने संध्याकाळीं त्या गुहेत जाऊन वाघाला मारलें आणि त्या मुलीला आपल्या घरीं आणलें. तीं दोघें पति–पत्नीच्या नात्याने राहूं लागलीं. कालांतराने ती गोष्ट उघडकीस आली. मुंडांनी त्या धनगराला मारायचा बेत केला. धनगर घाबरला. तो मुंडांकडे जाऊन म्हणाला. 'मी तुम्हांला एक रेडा व तीन विसा गाई देतों. तुम्ही आमच्या लग्नाला परवानगी द्या.' मुंडांनी ती गोष्ट मान्य केली व त्या दिवसापासून मुलाकडून मुलीचें देज घेण्याची प्रथा पडली.

हिंदूप्रमाणेंच आदिवासीहि लग्नांत कुंकू वापरतात. हें कुंकू नवऱ्याने नवरीला लावायचें असतें. याविषयीं उराँव आदिवासींत एक कथा आहे ती अशी—–

चौघे मित्र होते. ते उद्योगधंदा शोधण्यासाठी प्रवासाला



आदिवासींचीं प्राणिचित्रें

निघाले. रात्रीं एका रानांत आंब्याच्या झाडाखाली झोपले. तीघांनी झोपायचें आणि एकाने पहारा करायचा असें ठरलें. पहिला पहारेकरी सुतार होता. त्याने वेळ जाण्यासाठी एक लांकूड घेऊन त्याची एक मुलगी बनवली. दुसरा पहारेकरी सोनार होता. त्याने त्या मुलीला दागिने घडविले. तिसरा पहारेकरी विणकर होता. त्याने त्या मुलीला वस्त्रें नेसविलीं. चौथा पहारेकरी कुंकवाचा व्यापारी होता. त्याने तिच्या कपाळीं मळवट भरला. त्यासरशी ती जिवंत झाली. चौघेहि उठले आणि म्हणूं लागले, की 'ही माझी बायको.' मग त्यांच्यांत भांडण सुरू झालें. एवढ्यांत एक साधु तिथे आला. त्याने त्या तंटयाचा निवाडा केला. तो म्हणाला. 'ज्याने हिला बनविली तो हिचा बाप, ज्याने हिला नेसविली तो हिचा भाऊ, ज्याने हिला दागिने घातले तो हिचा मामा आणि ज्याने तिच्या कपाळीं मळवट भरला तोच हिचा नवरा.' तेव्हापासून उराँव आदिवासींत कुंकवाची प्रथा चालू झाली.

कित्येक आदिवासींत रतिक्रिया रात्रीं आणि घरांत करूं नये, अशी समजूत आहे. पशु-पक्षी रात्रीं संभोग करीत नाहीत, या निरीक्षणांतून या कल्पनेचा उगम झाला असावा. त्यांच्या घरांतून पितरांच्या नांवाने कांही भांडीं ठेवलेलीं असतात. त्यांच्या सान्निध्यांत रतिक्रिया करणें उचित नव्हे, या कल्पनेंतूनहि ही चाल पडली असावी. त्यांच्या वस्तीजवळच रानांत कांही जागा स्वच्छ करून ठेवलेल्या असतात. संभोगाची इच्छा होतांच तें जोडपें त्या ठिकाणीं जातें आणि आपण तिथे असतांना दुसऱ्या कोणी तिकडे फिरकूं नये म्हणून त्या वाटेवर कांटेरी झुडूप ठेवून देतें. देवाने दिवस हा कामासाठी आणि विषयोपभोगासाठी दिलेला असून रात्र केवळ विश्रांतीसाठी दिलेली आहे, अशी सवर आदिवासींची समजूत असल्याचें श्री. रॉय सांगतात.

पुष्कळ आदिवासींत गोंदून घेण्याचीहि प्रथा आहे. मृत्यूनंतर माणसाला आपल्याबरोबर कांहीतरी घेऊन जातां यावें, या कल्पनेंतून ही गोंदण्याची प्रथा सुरू झाली असावी. परिया आदिवासींत बायका दंडावर चोळीच्या आकाराचें गोंदून घेतात, पण स्तनांवर मात्र गोंदीत नाहीत. कुमाँऊ प्रदेशांत अशी श्रद्धा आहे, की जेव्हा मृत मनुष्य भगवानापुढे उभा राहतो, त्या वेळेला तो हिंदु आहे कीं मुसलमान आहे, हें त्याच्या गोंदण्याच्या पद्धतीवरूनच भगवानाला समजतें.

अंत्यसंस्कार–आदिवासींचे अंत्यसंस्कार विविध आणि विचित्र असतात. माणूस मृत्युपंथाला लागला म्हणजे त्याच्या प्राणाला बाहेर जायला अडथळा होऊं नये, म्हणून कांही आदिवासी घरांचीं दारें खिडक्या उघड्या टाकतात. कांही जमातींत मृताला बायका बाहेर आणतात व त्याला स्नान घालून त्याचे केस विंचरतात. नीलगिरीच्या आदिवासींत मृताच्या डोक्याचे कांही केस कापून घेऊन ते जतन करून ठेवण्याची पद्धति आहे. सवर आदिवासींत मृताची तिरडी स्मशानांत नेण्याचें काम बायका करतात. मृताबरोबर त्याचे कपडे, चीजवस्त व आयुधें जाळतात किंवा पुरतात. तसें केलें नाही, तर मेलेला माणूस भूत होऊन त्या वस्तू मागायला येतो, अशी त्यांची समजूत आहे.

दक्षिणेकडे पाय करून प्रेत पुरतात. अलिकडे पुष्कळ जमातींत प्रेतें जाळण्याची पद्धत सुरू झाली आहे. साथीने मेलेल्या रोग्यांना मात्र पुरतात. त्याचप्रमाणे पांच वर्षांच्या आंतल्या मुलांनादेखील वडाच्या किंवा मोहाच्या झाडाखाली पुरतात. गरोदर स्त्री मेल्यास तिला दूर जंगलांत नेऊन पुरतात. ज्या जागीं प्रेत जाळायचें असेल तिथे प्रथम कोंबड्या-बकऱ्याचा किंवा अन्य पशूचा बळी देतात. पुरुषासाठी सात थरांची व स्त्रीसाठी आठ थरांची चिता रचतात. जाळण्यापूर्वीं मृताची पूजा करून त्याला अन्न देतात. त्याच्या सर्व शरीराला तेल-हळद लावतात. चितेवर वस्त्र, द्रव्य व अलंकार ठेवतात. घरचा वृद्ध पुरुष चितेला अग्नि देतो. तोंवर इतर लोक ढोल वाजवून गातात, नाचतात. प्रेत अर्धें जळल्यावर त्यांचा पुरोहित हातांत काठी घेऊन मृतात्म्याला सांगतो. 'जगाचा मोह सोडून तूं स्वर्गाला जा. इथे तुझें कोणी नाही. जा, जा.' आणि मग तो ती काठी मोडून जळत्या चितेंत टाकतो. गारो आदिवासी प्रेत चार दिवसपर्यंत चितेंत ठेवून देतात व मग मध्यरात्रीं ती चिता पेटवितात. पूर्वकाळीं त्यांचा एखादा सरदार मेल्यावर त्याच्या सेवकांना बळी देण्याची पद्धत होती; पण आता ती बंद झाली आहे. बस्तरच्या आदिवासींत एक निराळीच प्रथा आहे. तिथले लोक प्रेत जाळण्यापूर्वीं एका जागीं तीन पानें मांडून त्यांवर थोडे तांदूळ ठेवतात. तिरडी

वाहणारे लोक तिथे आल्यावर मृताचा नातेवाईक त्याला मृत्यूचें कारण विचारतो. त्या वेळीं मृताचा आत्मा प्रेत वाहणाऱ्या लोकांच्या अंगांत येतो. ते लोक त्याच्या प्रेरणा-शक्तीने त्या तीन पानांपैकी कोणत्या तरी पानाजवळ जाऊन उभे राहतात. पहिल्या पानाजवळ गेल्यास मृत्यु नैसर्गिक रीतीने, दुसऱ्या पानाजवळ गेल्यास पितरांच्या कोपाने व तिसऱ्या पानाजवळ गेल्यास जादुटोण्याने झाला, असें समजण्यांत येतें. जादुटोणा हें कारण असल्यास त्याचें निराकरण झाल्याशिवाय प्रेताचा अंत्यसंस्कार करीत नाहीत.

मृत्यूच्या नवव्या दिवशीं मृतात्म्याला परत बोलाविण्याचा धार्मिक विधि बऱ्याच आदिवासींत केला जातो. मृताचें नातेवाईक, विशेषतः स्त्रिया, मृताची राख टाकण्यासाठी नदीवर जातात व मृताचें नांव घेऊन त्याला हांका मारतात. मग पाण्यांत उतरून कांही किडे किंवा मासळी पकडून घरीं आणतात. त्या रूपाने मृताचा आत्मा घरीं परत येतो, अशी त्यांची श्रद्धा आहे. पाण्यांत जी स्त्री प्रथम एखादा जीव पकडते तिच्या पोटीं तो मृतात्मा जन्म घेतो, अशीहि समजूत आहे.

पुरुष क्षौर करतात. हें क्षौर न्हावी करीत नाही; तर मृताच्या कुटुंबियांपैकीच कोणीतरी करतो. वैगा आणि नागा आदिवासींत क्षौराची पद्धत नाही. ते दहाव्या दिवशीं 'कुंडा मिलाना' हा विधि करतात. मृत माणूस आपल्या पितरांना भेटला कीं नाही, तें पाहण्यासाठी एका भांड्यांत पाणी भरून त्यांत दोन तांदूळ टाकतात. ते तांदूळ एकमेकांजवळ आले, तर मृतात्मा पितरांना भेटला, असें समजतात. तसें झालें नाही, तर एका महिन्यानंतर तोच विधि पुन्हा करतात. गोंड आदिवासींत कोज्जी नांवाचा एक विधि करतात. एक कापड अंथरून त्यावर पायलीभर पीठ घालून त्याचा त्रिकोणी आकार बनवितात. शेजारीं एका टोपलीखाली एक दिवा झाकून ठेवतात. मृतात्मा रात्रीं त्या पिठावर कांही खुणा करतो, अशी समजूत आहे. सकाळीं तो दिवा पाण्यांत सोडतात व त्या पिठाच्या पोळ्या करून त्या प्रसाद म्हणन सर्व नातेवाईकांना वांटतात. सवर आदिवासींत प्रेत जळून गेल्यावर त्यांचा पुरोहित त्याची हाडें गोळा करतो व मृत्यू कशाने आला, त्याचा शोध लावतो. मग तीं हाडें एका खड्यांत पुरून त्यांवर एखादी झोपडी किंवा कांहीतरी स्मारक उभारतात. मुंडा आदिवासी सर्वांत उत्तम स्मारकें बनवितात. पंचमढीच्या जवळ कोरकुईचें स्मारक प्रसिद्ध आहे. तें दगडांचें बनविलेलें असून त्यावरचें कलात्मक खोदकाम प्रेक्षणीय आहे. माडिया आदिवासी आपल्या पितरांचीं स्मारकें येत्याजात्यांना स्पष्ट दिसावीं, म्हणून उंच जागीं बांधतात. भिल्लांचें स्मारक ख्रिस्ती लोकांप्रमाणे दगडांचें बांधलेलें असतें. हीं स्मारकें तीन ते आठ फूट एवढीं उंच असतात. त्यांवर आदिवासींच्या संस्कृतीची छाप स्पष्ट दिसते. त्याच्या शिखराचा भाग बहुधा निमुळता असतो. त्यांवर लोखंडाची सळई उभी केलेली असते. तिच्यावर कोणत्यातरी पक्ष्याची आकृति बसविलेली असते. बहुसंख्य आदिवासी कावळ्याची प्रतिमा बसवितात. कावळा अमर असून तो देवलोकापर्यंत जातो, असा त्यांचा विश्वास आहे. स्मारकावर नाना प्रकारचीं चित्रें काढतात किंवा कोरतात. त्या चित्रांवरून त्यांचें दैनंदिन जीवन, व्यवसाय, राहणी, वेषभूषा इ. गोष्टींचा परिचय होतो.

आदिवासींचे नृत्य—आदिवासी लोक नाच–गाण्यांचे विलक्षण शोकीन असतात. करमा, बिहु, बापरब इ. आदिवासी नृत्यें प्रसिद्ध आहेत. त्यांच्या नृत्य-गीतांचा जन्म निसर्गातल्या शक्तींना संतुष्ट करण्यासाठी झाला आहे. निसर्गशक्तींना संतुष्ट केल्याने पीक-पाणी अमाप येतें व शिकार चांगली मिळते, अशी त्यांची पूर्वापार समजूत आहे. नृत्य हा आदिवासींचा धर्मच आहे म्हटलें तरी चालेल. मूल जन्माला आल्यापासून तों माणसाच्या मर्तिकापर्यंत सर्व संस्कारांमध्ये त्यांच्या नृत्याचें आयोजन असतें. सण व उत्सव या प्रसंगींसुद्धां ते बेहोष होऊन नाचतात. आदिवासींचें जिणें दैन्य, दारिद्र्य व संकटें यांनी व्याप्त असतें. त्यामुळे आली घडी नाचून खेळून साजरी करायची व उद्याची चिंता करायची नाही, अशी त्यांची वृत्ति बनलेली असते. त्यांचीं बहुतेक नृत्यें संमिश्र स्वरूपाचीं असतात. स्त्री-पुरुष व मुलें-मुली एकत्र नाचतात. त्यांच्या नृत्यांतले पदन्यास, अंगविक्षेप व हिर्‌र्हुर्र हे उद्‌गार अर्थपूर्ण असतात. त्यांत निसर्गातल्या कोणत्यातरी प्रक्रियेचें अनुकरण असतें किंवा त्यांच्या दैवताच्या स्वभावविशेषाचें



वैगा नर्तक

निदर्शन असतें. क्वचित् कृषिकर्मांतल्या विविध क्रियांचेंहि अनुकरण असतें. कित्येकदा नृत्यप्रसंगीं गायिल्या जाणाऱ्या गीतांचा आशय अभिनयाच्या द्वारें व्यक्त केला जातो. आदिवासींच्या जीवनांतून नृत्य व गीत वगळल्यास तें जीवन निरानंद व भकास ठरेल.

आदिवासींची कला व कारागिरी––आदिवासींच्या कलेला पुढील तीन उद्देशांनी प्रेरणा मिळाली आहे –– (१) वस्तूंना सुंदर व आकर्षक बनविणें, (२) समाजांत प्रतिष्ठा मिळविणें व (३) धर्म. ज्याच्या दारावर खोदकाम केलेलें असेल, किंवा ज्याचें घर सजविलेलें असेल, तो गृहस्थ त्या जमातींत श्रेष्ठ समजला जातो. आपलें घर सुंदर दिसावें, म्हणून ते भिंतीवर पुराणांतल्या कथा चितारतात व दारावर शिकारीचीं दृश्यें चित्रित करतात. सजावटीची प्रवृत्ति सर्व प्रथम शरीर शृंगारण्यांत दिसून येते. तरुण-तरुणींची केशरचना, गळाभर दागिने, नृत्यासाठी शरिरावर फुलांची व पिसांची रचना, यांतून त्यांची कलात्मकता दिसून येते. फण्या व तंबाखूच्या डब्या कोरून नक्षीदार करणें, त्यांना फार आवडतें. या डब्यांचे आकार मासा, पक्षी, पशु इ. प्राण्यांचे असतात. तंबाखू ओढण्याचे त्यांचे पाईपहि विविध आकृतींचे असतात. नृत्याच्या वेळीं ते जे मुखवटे घालतात, त्यांवरहि चित्रें व नक्षीकाम असतें. हे मुखवटे त्यांच्या पौराणिक कथांच्या आधारांवर बनवितात. भुतां-खेतांपासून नर्तकाचें रक्षण व्हावें, हा त्यांतला उद्देश असतो.



आदिवासी खेळणें

विवाहप्रसंगीं तर त्यांच्या कलेला बराच वाव मिळतो. वधू-वरांसाठी ते सुंदर मुकुट तयार करतात व त्यांवर रंगीबेरंगी मणी बसवितात. संताळ लोक वधू-वरांसाठी छानदार मेणे सजवितात. त्यांवर गाय-वासरूं, उराउरीं भेटणारे दोन मित्र, मुलाला स्तनपान देणारी माता, गर्भवती स्त्री इ. चित्रें कोरतात. प्रत्येक चित्राला कांही तरी प्रतीकात्मक अर्थ असतो. त्यांतून मांगल्य व प्रजावृद्धि सूचित होत असते. लग्नाच्या दिवशीं तांदुळाचें पीठ कालवून त्या द्रवाने भूमीवर चित्रविचित्र कणे रेखतात. माणसाच्या उंचीचा ठाणदिवा तयार करून तो लग्नमंडपांत ठेवतात.


कांहीं जमातींत थडग्यांवरहि चित्रें कोरलेलीं आढळतात. प्राचीन काळच्या थडग्यांवरची चित्ररचना ओबडधोबड असते; पण अलिकडच्या काळांत ती सुरेख व घाटदार बनली आहे.



आदिवासींची भांड्यांवरील चित्रकला

मरिया जमातींत मृतांच्या स्मारकांसाठी मोठमोठे खांब उभारतात व त्यावर मृतांच्या आवडत्या वस्तू, अन्न व मद्य वाढणाऱ्या स्त्रिया, सालंकृत नर्तकी व शिकारीचे देखावे इ. चित्रें कोरतात. आसाममधील फोम व कोन्यक आदिवासींतहि ही प्रथा आहे. उराँव आदिवासींच्या वस्तीचें हत्ती, घोडा, मगर, अशासारखें प्रतीक असतें. उत्सवप्रसंगीं ते लोक त्या प्रतीकाची मांडणी करतात.

सवर व जंगम या आदिवासींची कला धर्मभावनेंतून प्रकट झाली आहे. देवता व मृतात्मे संतुष्ट व्हावे व त्यांनी मुलाबाळांना त्रास देऊं नये, या भावनेने त्यांच्या चित्रकलेला प्ररणा मिळाली आहे. त्यांच्या प्रत्येक वस्तींत असा एखादा चित्रकार असतोच. लोकांच्या भिंती चित्रित करणें हेंच त्याचें काम. ज्या भिंतीवर चित्रें काढायचीं असतील, तिच्या



सवर आदिवासींचीं भित्तिचित्रें

मुळांत तो आदल्या रात्रीं झोपतो व त्याला स्वप्नांत ज्या आकृती दिसतात, त्याच दुसऱ्या दिवशीं तो भिंतीवर रेखाटतो. सवरांच्या चित्रकलेंत रानडुक्कर व मोर हे हमखास आढळतात. डुकराला ते परलोकांतला रक्षक व मोराला पुरोहित समजतात. आदिवासींच्या धर्मांत मूर्तिपूजेला स्थान नसल्यामुळे त्यांच्या चित्रकलेंत देवमूर्ति आढळायच्या नाहीत. सूर्य, चंद्र व तारे यांचीं चित्रें मात्र सर्व जमातींतून दिसतात.

पण अलिकडे नागर संस्कृतीच्या संपर्कामुळे आदिवासी आपल्या मूळ कलेला विसरत चालले आहेत. तिच्यांत विकृतीहि शिरूं लागली आहे. एखाद्या वस्तींत शाळेची इमारत उभारली गेली, तर तिथले आदिवासी तिच्या भिंतीवर आपलीं परंपरागत चित्रें काढायला लाजतात. त्यांना आपलीं पूर्वीचीं वस्त्रभूषणेंहि आवडेनाशीं झालीं आहेत. शेकडो वर्षांच्या आर्थिक शोषणामुळे त्यांच्या सर्वच कला ऱ्हासाच्या मार्गाला लागल्या आहेत. सौंदर्याचा अनुभव घेणें व कलेच्या द्वारें त्या अनुभूतीचा आविष्कार करणें, या दोन्ही शक्ति त्यांच्यांतून हळूहळू लोपत चालल्या आहेत.

आसामांतले आदिवासी विणकामाच्या कलेंत तरबेज आहेत. त्यांच्याविषयी म. गांधी एकदा म्हणाले होते, की आसामच्या स्त्रिया आपल्या हातमागांवर जणूं कविताच विणीत असतात. आसामी लोक लाकडांवर खोदकाम करतात व सुंदर खेळणीं बनवितात. लुशाई आदिवासींत रंगीबेरंगी विणकामाची आवड व कला आज वाढतच आहे. अबोर, बोंडो इ. कांही आदिवासी लोकरीचें कापड विणून थंडीपासून आपले संरक्षण करतात. मिश्मी स्त्रिया आपल्या पुरुषांसाठी सुंदर कोट बनवितात व नाना प्रकारच्या थैल्या तयार करतात. लाकडी खोदकामांत खाम्प्टी लोक फार प्रसिद्ध आहेत. पुष्कळ आदिवासी वेत व बांबू यांच्या अनेक वस्तू बनवितात. आदिवासींच्या कलात्मक वृत्तीला आजमितीस त्या त्या प्रदेशाच्या सरकारांकडून प्रोत्साहन मिळत आहे, ही गोष्ट चांगली आहे.



आदिवासींची टोपल्या विणण्याची कला

इ. स. १९४७ सालीं भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताच्या राज्यकारभाराबाबत जो घटना-कायदा पसार करण्यांत आला, त्या घटनेंतील एका स्वतंत्र कलमान्वयें आसाम प्रांतांतील आदिवासी लोकांनी व्यापलेल्या प्रदेशाचा राज्यकारभार स्वतंत्ररीत्या चालविण्यासाठी स्वतंत्र शासकाची नेमणूक करण्यांत आली आहे. जमिनीची वांटणी, करआकारणी, शिक्षण, व्याजबट्टा व व्यापारविषयक सर्व व्यवहारांवर नियंत्रण, या गोष्टींची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी त्याच्यावर सोंपविली आहे. तसेंच इतर राज्यांपैकी ज्या राज्यांत आदिवासींचीं वस्ती असून त्यांनी स्वतंत्र रीत्या व्यापलेले प्रदेश आहेत, त्यांविषयीं उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या प्रश्नांवर त्या त्या राज्यांच्या राजप्रमुखांना सल्लामसलत देण्यासाठी 'ट्रायबल् अॅड्व्हायसरी कौन्सिल्स्' निर्माण केलीं आहेत. अशा प्रकारचीं कौन्सिलें सध्यां मुंबई, बिहार इ. अकरा प्रांतांत कार्य करीत आहेत. याशिवाय अशा प्रकारचीं कौन्सिलें निर्माण करण्याचा प्रश्न उद्भवल्यास त्यासंबंधी जरूर ती तजवीज ताबडतोब करतां यावी, यासाठी राष्ट्रपतींना संपूर्ण अधिकार दिले आहेत.

सदर घटनेंतील दुसऱ्या एका कलमान्वयें वन्य जातींचें लक्षण स्पष्ट केलेलें असून त्यांना योग्य तें संरक्षण मिळण्याचीहि तरतूद केली आहे. कायदा अमलांत आल्यापासून दहा वर्षेपर्यंत लोकसभा व विधानसभा यांत त्या जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत त्यांना आपले प्रतिनिधि निवडण्याचे हक्क दिले आहेत. त्यांच्यासाठी स्वतंत्र जागा राखून ठेवण्याची व्यवस्थाहि केलेली आहे. त्याप्रमाणेच जिल्हा बोर्डें, नगरपालिका, लोकल बोर्डें, ग्रामपंचायती इ. स्थानिक स्वराज्य संस्थांतहि त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळावें, अशी तरतूद केली आहे.



आदिवासी जादुगार

या घटना कायद्यांतील कलमान्वयें आसाम प्रांतासाठी सुचविण्यांत आलेल्या सहा जिल्हा कौन्सिलांपैकी पांच अस्तित्वांत आलेलीं असून त्यांचें कार्य चालू झालेलें आहे. या कौन्सिलांना जमिनीची वांटणी, जमीनधारणा, जमिनी राखून ठेवणें किंवा त्यांचा उपयोग करणें, राखीव जंगलांव्यतिरिक्त इतर जंगलांची व्यवस्था, कालवे व त्यांच्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग, ग्राम व नागर सभांची स्थापना, वारसा हक्क, वैवाहिक व सामाजिक चालीरीती इ. गोष्टींच्या बाबत जरूर ते कायदेकान करण्याचे अधिकार दिलेले आहेत.

घटनेंतील दुसऱ्या एका कलमान्वये सरकारी नोकरींत आदिवासी जमातींनाहि त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत निरनिराळ्या श्रेणींत जागा मिळण्याची व्यवस्था केली आहे. त्या जागांवर इतर समाजांतून नोकरांची भरती करू नये, असेहि हुकूम संबंधित अधिकाऱ्यांना देऊन ठेवले आहेत.

आदिवासींचे निरनिराळ्या बाबतींतील हितसंबंध अबाधित राहण्यासाठी कायद्यानें त्यांना जें संरक्षण दिलें आहे, त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारें होत आहे की नाही, तें पाहण्यासाठी व त्यासंबंधीं प्रतिवृत्त तयार करून तें वरिष्ठांकडे पाठविण्यासाठी स्वतंत्र कमिशनरची नेमणूक केलेली आहे. या कमिशनरचें कार्य चालू असून आतापर्यंत याबाबत चार रिपोर्ट्सहि केले गेले आहेत.

सामाजिक व आर्थिक बाबतींत आदिवासी–हित–संवर्धक अशा निरनिराळ्या योजना आंखण्यांत आलेल्या असून इ. स. १९५३ सालापासून त्यांची अंमलबजावणी होऊं लागली आहे. त्यासाठी मध्यवर्ती सरकारकडून नियमितपणे अनुदानेंहि दिलीं जात आहेत.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत आदिवासी–समाजकल्याण–कार्याला विशेष चालना मिळालेली असून मध्यवर्ती सरकार–कडून व राज्यसरकारांकडूनहि त्या कार्यासाठी निराळ्या रकमा काढून ठेवलेल्या आहेत. समाजकल्याण कार्याच्या चळवळीचें काम व्यवस्थितपणे चालावें, यासाठी शिक्षणविभाग, आर्थिक पुनर्रचनाविभाग व संकीर्णविभाग, असे तीन स्वतंत्र विभाग केलेले असून त्या त्या प्रांतांच्या निकडीच्या गोष्टींकडे लक्ष पुरविलें जात आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत वरील गोष्टी अधिक प्रमाणांत करण्यांत आल्या असून त्यांना कृषिक–वसाहतींची जोड देण्यांत आली आहे. या वसाहतींत कालवे खोदणें, शेतीचीं प्रात्यक्षिकें, धान्य कोठारें, डोंगरटेकडयांतून शेतें खणून तयार करणें इ. नवीन गोष्टींविषयीं प्रयोग चालू आहेत. त्यासाठी घटना कायद्याप्रमाणे कांही प्रांतांतून स्वतत्र वेलफेअर डिपार्ट्मेंट्स सुरू करण्यांत आलीं आहेत. [ट्रायबल डेमोग्राफी इन् इंडिया; मि. मि. इं.; दि अबोरिजिनल्स; दि प्रिमिटिव्ह कल्चर ऑफ इंडिया; रे. क. इं.; एन्सा. रि. ए.; आमची संस्कृति]

आदिश्रावणाची अमावास्या भिल्लांचा एक कौटुंबिक सण. या दिवशीं घरांत गोडधोड करतात. स्त्रीपुरुष एकत्र जमून गातात व नाचतात.

आदिष्टी कोंकणांतील एक देवी. आदिष्टीचा उल्लेख देवीभागवतांत आला आहे.

आदिसैवर द. भारतांतली एक जात. वेळ्ळाळांची उपशाखा. हे शिवमंदिरांतून ‘ तेवारम् ’ गातात. हे शैवपंथी असले तरी लिंगायतांच्या प्रभावापासून अलिप्त आहेत. [का. ट्रा. स. इं.]

आदीश्वर जैन धर्मांत याला सृष्टींतला मूळ पुरुष मानलेलें आहे. जैनांचे चार वेद यानेच निर्माण केले, असें समजतात. आदीश्वर स्वर्गांतून पृथ्वीवर आला व एक कोटी वर्षें राहिला. त्याने मानवांत जातिभेद निर्माण केले व त्यांना कायदेकानू लावून देऊन राज्यकारभार कसा चालवावा, तें शिकविलें. थोडक्यांत म्हणजे जैनांचा आदीश्वर हा हिंदूंच्या ब्रह्मदेवाहून निराळा नाही.

आद्य रैवत मन्वंतरांतील देवगण.

आद्यगौड ब्राह्मण महमूद गझनीने केलेल्या आक्रमणाच्या वेळीं हे कान्यकुब्ज देशांतून इ. स. १०१७ मध्ये दक्षिण कोकणांतल्या कुडाळ प्रांतांत आले. यांचा मूळपुरुष सामंत प्रभु नांवाचा होता व तो कनोजच्या राजाचा मांडलिक होता. कदंब राजाच्या आश्रयाने यांनी कुडाळ प्रांतांत आपली वसाहत केली. यादवांच्या राजवटींत यांच्या एका पूर्वजाने सावंतवाडी भागावर राजसत्ताहि उपभोगिली होती. हे मूळचे गौड व शुक्ल यजुर्वेदी. परंतु क्षात्रवृत्ति स्वीकारल्यामुळे शाखालोप होऊन यांचे पुरोहित असलेल्या कऱ्हाडयांचा ऋग्वेद या ज्ञातीने स्वीकारला. हे स्मार्त व अद्वैत मतानुयायी आहेत. यांची मठपरंपरा स्वतंत्र आहे. हे मासे खातात. **पाहा–** कुडाळदेशकर ब्राह्मण. [ब्रा. भि. वि.]

आद्यपाप ख्रिस्ती धर्मांतील ही एक मूलभूत कल्पना आहे. माणसाच्या मनांत पापाची वासना कां उत्पन्न होते, याचा शोध घेण्याची तळमळ धर्मवेत्त्यांना व तत्त्ववेत्त्यांना प्राचीन काळापासून लागलेली आहे. ख्रिस्ती धर्मांतहि ती दिसून येते. सर्व प्रथम सेंट पॉल याने पापाची उपपत्ति पुढीलप्रमाणे मांडली – मानवजातीचा आद्यपुरुष जो आदम याने प्रथम पाप केलें व त्यामुळे त्याचें अधःपतन झालें आणि आदमची पापप्रवृत्ति मानवाच्या पुढील पिढयांतहि संक्रांत

झाली. त्यामुळ त्याचे सर्व वंशज कुमार्गी व नीतिभ्रष्ट झाले. आदमच्या या आदिपापामुळेच समस्त मानवजात ईश्वराच्या कृपेला पारखी झाली असून मृत्यु, दुःख आणि विषयवासना यांची शिकार बनली आहे. पण असें असलें तरी येशू ख्रिस्त आपल्या दयाबुद्धीने या पापापासून मानवाचा उद्धार करूं शकेल असें सेंट पॉलचें मत आहे.

पुढे सेंट आगस्टाईन याने असें मत प्रतिपादिलें, की आदमचें पाप पुढील सर्व पिढ्यांत संक्रांत झालें, याचें कारण मानवाची स्त्री–पुरुषविषयक आसक्ति हें होय. ही आसक्तिच मूळ पाप मूलक आहे. मध्ययुगीन रोमन कॅथॉलिक व सनातनी प्रॉटेस्टंट या दोन्ही पंथांच्या अनुयायांनी ही उपपत्ति ग्राह्य मानली आहे. आधुनिक प्रॉटेस्टंट मात्र ही उपपत्ति विज्ञानाशीं विसंगत असल्यामुळे ती त्याज्य मानतात.

आद्य प्रतीहारी चार हातांची, शुभ्र वस्त्रें परिधान केलेली, शिवाची पहिली सेवक कुमारिका. हिच्या पाठीमागे शिवाची प्रार्थना करणाऱ्या इतर स्त्रिया असतात. [पु. इं.]

आधण ओयरणें मकर संक्रांतीच्या दिवशीं एका ब्राह्मणाच्या घरीं जाऊन त्याच्या कुटुंबांतील माणसांना एकावेळीं अन्न पुरेल इतकें तांदूळ त्याच्या घरांतल्या चुलीवरच्या आधण पाण्याच्या भांड्यांत ओयरतात. तांदूळ ओयरतांना पुढील मंत्र म्हणतात —

स्थाल्यां तप्ताम्बुयुक्तायामक्षय्यान्नप्रतुष्टये
कुटुम्बाशनपर्याप्तांस्तण्डुलान्निर्वपाम्यहम् ॥

अर्थ — आधण पाण्याने भरलेल्या तपेल्यांत अक्षय्य अन्नाची प्राप्ति व्हावी म्हणून कुटुंबाच्या एक वेळच्या जेवणाला भात पुरेल, इतके तांदूळ मी ओतीत आहें. [व्रतराज]

आधिपत्यमय एक वैदिक शासनव्यवस्था. यांत राजाकडेच सर्वाधिकार असत. तो एकटा कायदे करी व ते प्रजेवर लादी. यांत राज्यांतले सर्वाधिकारी विशेष शक्तिमान् असत. **पाहा** –– साम्राज्य, भौज्य, [वै. सा.]

आधिवेदनिक स्त्रीधनाचा एक प्रकार. याची व्याख्या पुढीलप्रमाणे ––

यच्च द्वितीयविवाहार्थिना पूर्वस्त्रियै
पारितोषिकं धनं दत्तं तदाधिवेदनिकम् । (विष्णुस्मृति)

अर्थ –– द्वितीय विवाह करूं इच्छिणाऱ्या पुरुषाने आपल्या प्रथम पत्नीला बक्षीस म्हणून दिलेल्या द्रव्याला अधिवेदनिक असें नांव आहे. [सं. इं. डि.]

आनंतर्य व्रत एक स्त्रीव्रत. व्रतारंभ मार्ग० शु. ३ येपासून करतात. प्रत्येक पंधरवड्यांतल्या ३ येस उपवासपूर्वक उमेची पूजा करणें, हा या व्रताचा विधि आहे. व्रतावधि–एक वर्ष. फल — पति-पुत्रांचा अवियोग [हे. व्र.]

आनंद (१) सुखदुःखातीत सहज समाधान म्हणजे आनंद होय. आनंद शब्द ब्रह्मानंदाचा वाचक आहे. ‘ आनन्दो ब्रह्मेति व्यजानात् ’= आनंद ब्रह्म असें जाणता झाला (तै. उ. ३. ६).

रसो वै सः । रसं ह्येवायं लब्ध्वाऽऽनन्दी भवति
एष ह्येवानन्दयति । (तै. उ. २. ७. १)

अर्थ –– तो ब्रह्मानंद रस आहे. तो रस प्राप्त झाल्यावर मनुष्य आनंदी होतो. तो रस सगळ्यांना आनंदित करतो.

आनंदाच्या अंशमात्र आधारानेहि सर्व प्राणी जगतात, असें बृहदारण्यकोपनिषदांत म्हटलें आहे.

आनंद हें आत्म्याचें लक्षण आहे. अद्वैत वेदान्त्यांनी आत्म्याला आनंदरूप मानलें आहे. जेव्हा मनुष्य दुःखी-कष्टी असतो, तेव्हा त्याची ही अस्वाभाविक अवस्था आहे, असें जाणून लोक त्याला दुःखी होण्याचें कारण विचारतात. परंतु तो सुखी असतो, तेव्हा त्याच्याबद्दल त्याला कोणी कारण विचारीत नाहीत. कारण, ती माणसाची स्वाभाविक अवस्था आहे, असें समजलें जातें. यावरून दुःख हें आत्म्याचें उपलक्षण आहे म्हणजे तो त्याचा आगंतुक किंवा परिवर्तनशील गुण आहे व आनंद हें त्याचें स्वाभाविक लक्षण आहे, हें सिद्ध होतें.

आनंद नित्य आहे. त्यामुळे त्याचा अभाव कधीच संभवत नाही. जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ति या तीन्ही अवस्थांत आनंदाचा कांही ना कांही अनुभव येतोच. सुषुप्तींत विषयांचा अभाव असतो, तरीहि आनंदाचा अनुभव घडतो. झोपेंतून जाग आलेल्या प्रत्येकाला हा प्रत्यय येतोच. जाग्रत् व स्वप्न या अवस्थांत सुख व दुःख या दोहोंचाहि अनुभव येतो. आनंद हा या सुखदुःखांच्या मुळाशीं असतो. सुषुप्तींत मात्र सुख-दुःखांचें द्वंद्व दबलें जाऊन केवळ आनंदाचा अनुभव येतो. यावरून आनंद नित्य आहे व त्याचा प्रत्यक्ष अनुभव घडतो, हें सिद्ध होतें. तै. उपनिषदांत आनंदाची मीमांसा करतांना म्हटलें आहे, की आरोग्य, धन, गुण, सामर्थ्य, सौभाग्य, या गुणांनी युक्त असलेल्या पुरुषाला जो आनंद होऊं शकतो, तो

एक मानुषआनंद होय. त्या आनंदाच्या कोटिगुणित संख्येइतका आनंद म्हणजे ब्रह्मानंद होय.

सामान्य जन, सुख व आनंद हीं दोन्ही एकच मानतात. परंतु त्या दोहोंत फरक आहे. वेदान्ती सुखाला सातिशय सुख व आनंदाला निरतिशय सुख म्हणतात. सुख अस्थिर व भंगुर आहे; तर आनंद स्थिर व नित्य आहे. सुख हें दुःखसापेक्ष आहे. सुख व दुःख मिळून एक द्वंद्व बनतें. आनंद या द्वंद्वापासून मुक्त आहे. सुखाचा संबंध शरीर व इंद्रियें यांच्याशीं आहे तर आनंदाचा आत्म्याशीं आहे.

आनंद हा आत्म्याचा स्वभाव आहे. त्यामुळे आत्मज्ञान झाल्याशिवाय आनंदाचेंहि भान होत नाही. या आनंदाची गोडी एकदा ज्याने चाखली, त्याला इतर सर्व सुखें तुच्छ वाटतात. ही आनंदप्राप्ति म्हणजेच मोक्षाचा लाभ होय.

आनंदाचे तीन प्रकार मानलेले आहेत ––

ब्रह्मानन्दो वासना च प्रतिबिम्ब इति त्रयम् ।
अन्तरेण जगत्यस्मिन्नानन्दो नास्ति कश्चन ।।

(पंचदशी ११ . ८७)

अर्थ – या जगांत ब्रह्मानंद, वासनानंद व विषयानंद असे तीन आनंद आहेत. या व्यतिरिक्त कोणताच आनंद नाही.

अनुकूल विषय प्राप्त झाला असतां इच्छातृप्ति होऊन मनुष्याला सुख होतें, त्याला विषयानंद म्हणतात. त्या वेळीं मनोवृत्ति अंतर्मुख होऊन त्यांत ब्रह्मानंदाचें प्रतिबिंब पडतें. सुखीहि नाही व दुःखीहि नाही, अशी जी मनाचीं अवस्था असते, तिला वासनानंद म्हणतात. आज मला कोणतीहि काळजी नाही, माझें मन शांत आहे, या शब्दांनी माणूस ब्रह्मानंद व्यक्त करतो. सर्व लोकांना सुषुप्तींत व योग्यांना समाधींत या ब्रह्मानंदाचा अनुभव घडतो.

सांसारिक आनंद हा अनर्थ असून वेदविहित धर्माचें पालन केल्याने आनंदाची प्राप्ति होते, असें पूर्वमीमांसा सांगते. शरिराला फार कष्ट दिल्यावर तें 'ऊर्ध्वगमन' करतें व त्याला अपार आनंदाची उपलब्धि होते, असें जैन संप्रदायाचें मत आहे.

बौद्ध दर्शनांत स्थूल दृष्टीने आनंदाचे चार भेद मानलेले आहेत – (१) आनंद (२) परमानंद (३) विरमानंद व (४) सहजानंद. ज्या वेळीं कामाच्या द्वारें मनांत क्षोभ निर्माण होतो, त्याच वेळीं आनंदाचाहि उगम होतो. वास्तविक हा भावाचाच विकास असतो. शक्तीच्या अभिव्यक्तीने याचा आविर्भाव होतो. यानंतर जेव्हा अभिव्यक्त शक्तीशीं मीलनाचें पूर्णत्व सिद्ध होतें, तेव्हा बोधिचित्तहि पूर्ण होतें. या आनंदाला परमानंद म्हणतात. बौद्ध तांत्रिक परिभाषेंत शरिराच्या सारभूत अंशाला बिंदु म्हणतात. याचेंच नांव बोधिचित्त होय. ललाटापासून बोधिबिंदूचा जो क्षण होतो, तोच अमृतक्षण होय. या अवस्थेला ज्वालावस्था म्हणतात. हाच विरमानंद होय. यानंतर जेव्हा वाचेच्या व चित्तबिंदूच्या अवसानांत चतुर्बिंदूचा निर्गम होतो, तेव्हा सहजानंदाचा अविर्भाव होतो. हीच निर्वाणावस्था होय.

भारतीय साहित्यशास्त्रावरहि आनंदवादाचा प्रभाव पडला आहे. साहित्यशास्त्रकारांनी काव्यानंद हा 'ब्रह्मानंदसहोदर' ब्रह्मानंदाचा सख्खा भाऊ मानला आहे. 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' अशी काव्याची व्याख्या करून हा रस म्हणजे विशुद्ध ब्रह्मानंद होय, अशी कल्पना केलेली आहे. संत व भक्त यांनी भक्ति हाच मुख्य रस मानून त्यालाच सर्वश्रेष्ठ आनंद म्हटलें आहे. [हिं. सा. को.; बौ. ध. द.; हिं. वि. को.; ब्र. सि. मा.]

(२) गौतम बुद्धाच्या प्रमुख शिष्यांपैकी एक. हा शाक्य वंशांतील क्षत्रिय असून बुद्धाचा पट्टशिष्य होता. बुद्ध आपलें सगळें मनोगत त्याला सांगे. बुद्धाने आपल्या निर्वाणापूर्वी आनंदाची, त्याच्या लोकमान्यतेची व सुबोध धर्मप्रवचनांची प्रशंसा केली आहे. भिक्षुणीसंघ स्थापन करण्याच्या कामीं यानेच पुढाकार घेऊन बुद्धाची त्याबाबत संमति मिळविली. पण पुढे राजगृह येथे भरलेल्या संगीतीमध्ये त्याला या स्त्रीपक्षपाताबद्दल जाब द्यावा लागला. बुद्धाच्या हयातींत त्याला अर्हत्पदाच्या प्राप्तीसाठी साधना करायला सवड मिळाली नाही; पण बुद्धाच्या निर्वाणानंर त्याने तें पद प्राप्त करून घेतलें, असें सांगतात. बुद्धवचनांचा संग्रह करण्यासाठी वैभार पर्वताच्या सप्तपर्णी गुहेच्या दारावर जेव्हा भिक्षुसंघ बसला होता, तेव्हा आनंद योगबलाने आपल्या आसनावर उपस्थित झाला, असें म्हटलें आहे. बुद्धोपदिष्ट धर्माचा संग्रह करण्याच्या कामीं हाच प्रमुख होता. [एन्सा. रि. ए.; त्रिपिटक; हिं. वि. को.]

(३) गालव्य कुलांतला ब्राह्मण. याने ब्रह्माचे अधिकार धारण करून नवीन यज्ञपद्धति, विवाहपद्धति व वर्णाश्रमपद्धति स्थापन केली. [वायु पु. १.२१.२६; म. भा. शांति. ५९]

आनंदकंद हृदयाच्या अधोभागीं एक रक्तवर्ण, अष्टदल पद्म असतें, त्याला आनंदकंद म्हटलें आहे. षट्चक्रांहून हें वेगळें आहे. तें आराध्य देवतेचें स्थान मानून तिथे तिची मानसपूजा करतात. [स. पॉ.]

आनंदगिरि (१२ वें शतक) एक महान् टीकाकार. याने शंकराचार्यांच्या सर्व भाष्यांवर टीका लिहिल्या आहेत. आचार्यांच्या भाष्यांतलें भाव हृदयंगम करण्याच्या

दृष्टीने याचे ग्रंथ उपयुक्त आहेत. याची सर्वांत पांडित्यपूर्ण रचना म्हणजे सुरेश्वराचार्यांच्या बृहदारण्यकवार्तिक या ग्रंथावरची टीका होय. सायण भाष्यांतलें कांही उतारे जसेच्या तसे याच्या ग्रंथांतून येतात, त्यावरून कांही संशोधक याचा काल १५ वें शतक हा ठरवितात; पण सायणानेच त्याच्या ग्रंथांतून अवतरणें घेतलीं असावीं, असें वाटतें. शांकरदिग्विजय हा ग्रंथहि याचाच मानतात; पण ग्रंथाच्या पुष्पिकेंत ग्रंथकाराचें नांव अनंतानंदगिरि असें आढळतें. त्यावरून हा कोणींतरी वेगळा आनंदगिरि असावा, असें म्हणतात. हा पुढे शंकराचार्यांच्या गादीवर बसला. कामकोटिपीठाचे लोक त्याला आपल्या पीठाचा अधिकारी मानतात; तर द्वारकापीठाचे लोक आपल्या पीठाचा समजतात. अद्वैतवेदान्ताच्या इतिहासांत याने आपलें नांव अजरामर करून ठेवलें आहे.

आनंदजल जारुधि नामक देवपर्वतावरील एक सरोवर. याचें पाणी स्वच्छ व शुद्ध असतें. इथे नागांचा अधिपति चंड राहतो. [वायु पु. ४१.६८-७३]

आनंदतनय (१७ वें शतक) एक मराठी कवि. याच्या चरित्राविषयीं विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही. परंतु वि. का. राजवाडे व काव्यसंग्रहकर्ते जोग यांनी याच्याविषयीं थोडेंबहुत लिहून ठेवलें आहे, तें असें—

शहाजीच्या व व्यंकोजीच्या काळांत कांही देशस्थ ब्राह्मण घराणीं तंजाऊरच्या बाजूला जाऊन स्थायिक झालीं. त्यांपैकी एका घराण्यांत आनंदतनयाचा जन्म झाला. याचें मूळचें नांव गोपाळ असून याच्या वडिलांचें नांव आनंद व आडनांव वेदोभास्कर असें होतें. परंतु आपल्या काव्यांत याने स्वतःचा गोपाळ असा उल्लेख न करतां आनंदतनय, आनंदसुत, आनंदात्मज अशा नांवांनी केला आहे. मुरार परब्रह्म नामक साधूचा हा शिष्य व शहाजीचा गुरु होय. कर्नाटकांतील अरणी परगण्याची मामलत याच्याकडे होती व याचें वास्तव्यहि अरणीलाच होतें, असें सांगतात. याने स्वतःला अरणीचा शिपाई म्हणवून घेतलें आहे. यावरून तो योद्धाहि असावा, असें वाटतें.

कंगाल ते ब्राह्मण आरणीचे
परंतु ते शूर रणांगणींचे।

हा त्याचा श्लोकार्ध दक्षिणेंतील महाराष्ट्रीयांना मुखोद्गत आहे.

रघुनाथ पंडित व आनंदतनय हे समकालीन असून एकमेकांचे व्याही होते, अशी सर्वसामान्य समजूत आहे.

आनंदतनयाने भारत, भागवत, रामायण, मार्कंडेयपुराण यांच्या आधारें रचलेलीं वीस काव्यें आजपर्यंत उपलब्ध झालीं असून, तीं काव्यसंग्रह मासिकांत प्रसिद्ध झालीं आहेत. त्याच्या काव्यग्रंथांचीं कांही नांवें पुढीलप्रमाणे – शबरीआख्यान, शिबिकथा, उमा-रमासंवाद, कंदुकाख्यान, कृष्णचरित्र, सेतुबंध, राधाविलास इत्यादि. यांशिवाय याने अनेक पदें रचलीं असून त्यांपैकी १५६ पदें ‘ काव्यसंग्रह ’ मासिकांत छापलीं आहेत.

आनंदतनयाची भाषा प्रौढ, सरस व प्रसंगविशेषीं अलंकारयुक्त आहे. याची वर्णनशैली चित्तवेधक असून चित्रकाव्याकडे त्याचा विशेष कल आहे. मराठींतील अक्षरगण वृत्तात्मक काव्यरचना व दिंडी वृत्ताचा वापर प्रथम यानेच केला, असें म्हणतात. याची बरीच रचना महाराष्ट्रांतील हरिदासांच्या मुखीं आहे.

‘ सीतास्वयंवर ’ हें आनंदतनयाचें श्रेष्ठ काव्य आहे. रामचंद्राने जनकाचा पण जिंकल्यावर सीता त्याला वरमाळ घालण्यासाठी निघाली, त्या वेळचें हें वर्णन पाहा––

तों त्या सौधतटीं सख्यांस निकटी चांफेकळी गोरटी ।
सीता सिंहकटी ससंभ्रम उठी कासे घटी गोमटी ।।
सज्जीं चालत सज्जनस्तुतगणा ते भव्य भागीरथी ।
पावे दाशरथी कृपाब्धिजवळी ते कोण लीला कथी ।।
डोळे मीन विलोल ते तळपती हस्तांघ्रि पद्में नवीं ।
वक्षोजद्वय चक्रवाक कच ते भृंगालि ओघच्छवी ।।


आनंदतनय रामोपासक होता. त्याचें नित्यपूजेचें रामपंचायतन अद्यापि तंजाऊर येथील त्याच्या वंशजांकडे आहे. [प्रा. म. सं.; म. ज्ञा. को.]

आनंदतृतीया व्रत वैशाख, भाद्रपद व मार्गशीर्ष या मासांतल्या शु. ३ येस ललिता देवीची पूजा करून त्याबरोबरच सुवासिनींचीहि पूजा करणें, हा या व्रताचा विधि आहे. [मत्स्य पु. ६२]

आनंदनवमी व्रत एक व्रत. व्रतारंभ फाल्गुन शु. ९ मीस होतो. व्रतावधि एक वर्ष. व्रतकाल पंचमीपासून नवमीपर्यंत पांच दिवस. या दिवसांत अनुक्रमें एकभुक्त, नक्त, अयाचित, व उपवास करायचा असतो. देवीचीं पूजा हा याचा मुख्य विधि होय. [कृ. क. त; हे. व्र.]

आनंदपूर शीख लोकांचें पंजाबांतील एक क्षेत्र. शिखांचा नववा गुरु तेगबहाद्दुर याने १९ व्या शतकांत शिवालिक टेकड्यांच्या उतरणीवर हें गांव वसविलें. गुरु तेगबहाद्दुर व गोविंदसिंग यांच्या वास्तव्यामुळे याला क्षेत्रमाहात्म्य आलें. केशगढ हा येथील सर्वांत भव्य गुरुद्वारा होय.

खालसा पंथाच्या चार तख्तांपैकी एक इथे आहे. गुरु गोविंदसिंगाने आपल्या पांच शिष्यांना आत्मत्यागाची दीक्षा दिली ती इथेच. 'गुरुका महाल', 'गुरुद्वार तेगबहादुर' (त्याच्या मस्तकाच्या दहनाची जागा), 'डमडमसाहिब' (गोविंदसिंग गुरु झाला, तें स्थान), आनंदगढ' अशीं अनेक पवित्र स्थळें त्या गांवांत आहेत.



गुरुद्वारा—आनंदपूर

होळीच्या व त्याच्या दुसऱ्या अर्थात् होला या दिवशीं इथे शिखांची मोठी जत्रा भरते. सर्व भारतांतून यात्रेकरू इथे जमतात. प्रवचनें, गाणीं व अन्नदान असा होळीच्या दिवशीं कार्यक्रम असतो. होलाच्या दिवशीं गुरूंच्या शस्त्रांची मिरवणूक काढतात.

आनंदबोध जातवेद भट्टोपाध्यायाचा पुत्र. याने काण्वसंहितेवर 'काण्ववेदमंत्रभाष्यसंग्रह' नांवाचा भाष्यग्रंथ लिहिल्याचें समजतें. पण अद्यापि तो संपूर्ण उपलब्ध झालेला नाही. कांही खंडित लेख सांपडले आहेत. याचा निश्चित काल सांगतां येत नाही. [वै. सा.]

आनंदबोध यति (१२ वें शतक) अद्वैत वेदान्ताचा एक मोठा आचार्य. शांकर वेदान्तावर याने न्यायमकरंद, न्यायदीपावलि व प्रमाणमाला असे तीन ग्रंथ लिहिले आहेत. न्यायमकरंद या ग्रंथांत त्याने निरनिराळ्या ग्रंथांतील चांगलीं तत्त्वें ग्रथित केली आहेत. या ग्रंथामुळे अद्वैताच्या इतिहासांत याचें नांव अमर झालें आहे.

याने अनेकात्मवाद व अनेकविषयवाद यांचें खंडण केलें आहे. त्याचप्रमाणे न्याय, मीमांसा व बौद्ध तत्त्वज्ञान यांतील भ्रमप्रक्रियांचें त्याने केलेलें विवेचनहि चांगलें आहे. तो अनिर्वचनीयवादाचा पुरस्कर्ता आहे. आत्मा हा संविद्रूप आहे, असें त्याचें मत आहे. न्यायदीपावलि या ग्रंथांत त्याने शुक्ति-रजत दृष्टान्ताने जगन्मिथ्यात्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. आत्मवास हा याचा गुरु होय. [हि. आ. इं. फि.]

आनंदमूर्ति (मृत्यु इ. स. १६९६) एक महाराष्ट्र संतकवि. रामदास-पंचायतनांतील हा सर्वांत धाकटा होय. याचें पहिलें नांव अनंतभट. याचे पूर्वज भेडच गांवचे जोशी. पण याने आगळगांवीं स्थायिक होऊन अठरा गांवांची जोशीपणाची वृत्ति मिळविली.


रघुनाथस्वामी हे याचे गुरु. आनंदमूर्ति १७ व्या वर्षी त्यांच्या भजनीं लागला. पण त्याच्या वडिलांना हें न आवडून त्यानी बायकोमुलांसह आनंदमूर्तीला घराबाहेर काढलें. तेव्हा रघुनाथस्वामींनी स्वतः चार वर्षें भिक्षा मागून या शिष्याचें पालन केलें व त्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला. तो झाल्यावर आनंदमूर्तीचा शिष्यपरिवार बराच वाढला. पुढे रघुनाथस्वामींनी त्याला ब्रह्मनाळ येथे राहण्यास सांगितलें. त्याच्या आनंदी वृत्तीवरुन त्याला आनंदमूर्ति हें नांव पडलें. आनंदमूर्तीचें अनेक चमत्कार प्रसिद्ध आहेत. त्याची वाणी रसाळ असून तो कीर्तन उत्तम करीत असे. रघुनाथस्वामी सामाधिस्थ झाल्यावर ब्रह्मनाळ गांवीं त्यांचें वृंदावन बांधण्यांत आलें. आनंदमूर्ति समोर कीर्तनाला उभा राहिला, की तें वृंदावनडोलत असे, असें सांगतात. ब्रह्मनाळला गुरूच्या शेजारींच आनंदमूर्तीचीहि समाधि आहे. तिथे कार्तिक शु. चतुर्दशी व पौर्णिमा या दिवशीं त्याचा उत्सव होतो.

आनंदमूर्तीच्या सहा भूपाळ्या व सात वारांचीं पदें प्रसिद्ध आहेत. [म. वा. इ.; सु. वि. को.]

आनंदयोग बुधवारीं हस्तनक्षत्र येणें, या योगाला आनंद योग अशी संज्ञा आहे.

आनंदरामायण रसिक संप्रदायाचा एक प्रमुख ग्रंथ. काल १५ वें शतक. या ग्रंथांत बाराहजार दोनशे बावन्न श्लोक व नऊ कांडें आहेत. पहिल्या कांडांत रामजन्म ते सीताहरण, दुसऱ्यांत रामचंद्राची तीर्थयात्रा, तिसऱ्यांत रामाश्वमेध, चौथ्यांत सीतेचें नखशिखान्त वर्णन, रामसीतेची जलक्रीडा व विहार, रामचंद्राने एकपत्नीव्रत घेतल्यामुळे पुढील अवतारांत त्याला अनेक भार्या मिळतील, असें आश्वासन मिळाल्याची कथा, पांचव्यांत लव-कुशांचा जन्म व त्यांचें रामाच्या सैन्याशीं युद्ध, सहाव्यांत आठ पुत्रांचा विवाह व सातव्यांत विजययात्रा इ. विषय आहेत. त्या कांडाच्या एकविसाव्या सर्गांत एक दासी रामाचा तांबूलरस पिते व त्यामुळे तिला राधा होण्याचें वरदान मिळतें, असा विषय आहे. आठव्यांत रामोपासनेचा विधि असून नवव्यांत कुशाचा अभिषेक व रामाचें स्वर्गारोहण हे विषय आले आहेत. [रा. सा. म. उ.; रा. शा.]

आनंदलहरी दक्षिणेंतील एका तंतुवाद्याचें नांव. तुणतुण्याच्या भांडयासारखें एक लाकडी भांडें, त्याच्या मधोमध एक उभी तार व त्या तारेला वर गोल



आनंदलहरी

खुंटीचें टोपण अशी त्याची रचना असते. हें वाद्य धनुकलीने वाजवितात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

आनंदवर्धन (९ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक संस्कृत कवि व 'ध्वन्यालोक' या ग्रंथाचा कर्ता. याच्या पित्याचें नांव नोण असें होतें, असा देवीशतकांत उल्लेख आहे. काश्मीरच्या अवंतिवर्मा राजाच्या (इ. स. ८५५–८८३) दरबारांत हा सभापंडित होता, असें कल्हण सांगतो –

मुक्ताकणः शिवस्वामी कविरानन्दवर्धनः ।
प्रथां रत्नाकरश्चागात् साम्राज्येऽवन्तिवर्मणः ।।
(राजतरंगिणी ५. ३४)

अर्थ – मुक्ताकण, शिवस्वामी, आनंदवर्धन व रत्नाकर हे अवंतिवर्म्याच्या कारकीर्दीत प्रसिद्धि पावले.

आनंदवर्धनाचे पुढील चार ग्रंथ प्रसिद्ध आहेत. (१) देवीशतक–त्रिपुरसुंदरीच्या स्तुतिपर काव्य (२) अर्जुनचरित–अर्जुनाच्या शौर्याचें वर्णन करणारें महाकाव्य (३) विषमबाण–मदनाच्या लीला वर्णिणारें प्राकृत काव्य व (४) ध्वन्यालोक. पण त्याची कीर्ति अजरामर झाली ती ध्वन्यालोक या ग्रंथामुळे ! ध्वन्यालोकाने संस्कृत साहित्यशास्त्रांत एक नवें युग सुरू केलें. वेदान्तांत ब्रह्मसूत्रांचें जें स्थान, तेंच साहित्यशास्त्रांत ध्वन्यालोकाचें आहे.

ग्रंथकाराची गाढ विद्वत्ता, सूक्ष्म विवेचनशक्ति या ग्रंथांत पानोपानीं प्रत्ययाला येते. आनंदवर्धनाने काव्यांत 'ध्वनि' सिद्धान्ताची स्थापना केली. त्याच्या मतानुसार काव्यांत 'वाच्य' अर्थाबरोबर एक 'व्यंग' अर्थहि असतो. त्यालाच वैयाकरण 'ध्वनि' असें म्हणतात. याच 'ध्वनी'चा विचार ध्वन्यालोकांत केला आहे. ग्रंथाचे पद्यमय कारिका, गद्यवृत्ति व उदाहरण असे तीन भाग आहेत. आनंदवर्धनानेच प्रथम काव्याच्या अन्तस्तत्त्वाचें विश्लेषण केलें. त्यामुळे त्याला आलंकारिकांच्या पद्धतीचा प्रस्थापक मानतात. [सं. सा. इ.]

आनंदव्रत या व्रतांत अयाचित जलदान करायचें असतें. व्रतावधि चैत्रादि चार महिने. व्रताच्या अंतीं अन्न, वस्त्र, तिलपात्र व सुवर्ण यांचें दान करायचें असतें. फल – ब्रह्मलोकाची प्राप्ति व कल्पान्तीं राजपद. [मत्स्य पु. १००. ३१–३२; कृ. कौ.]

आनंदसंप्रदाय नारद, वाल्मीकि, सेना न्हावी, वगैरे मंडळी या संप्रदायांत मोडतात. त्र्यक्षरी 'श्रीराम' किंवा द्व्यक्षरी 'राम' हा या संप्रदायाचा मंत्र आहे. [वा. पं. इ.]

आनंद सफल सप्तमी तिथिव्रत. व्रतारंभ भाद्र. शु. ७ मीस करतात. व्रतावधि एक वर्ष. सूर्यपूजा व उपवास हा याचा मुख्य विधि होय. [कृ. क. त.]

आनंदसभा जामनगर येथील मुक्ताश्रमी आनंददेवनामक एका ब्राह्मण साधूने या सभेची स्थापना केली. सभेचे अनुयायी यालाच आपला गुरू मानतात. याने रचलेलें रामायण, आनंदविलास वगैरे ग्रंथ हे सभेचे पूज्य ग्रंथ होत. रामोपासनेचा प्रचार, कलाकौशल्याची वृद्धि व सामाजिक सुधारणा हे या सभेचे उद्देश आहेत.

आनंदानवमी व्रत एक काम्य व्रत. फाल्गुन शु. नवमीला आनंदानवमी हें नांव आहे. पंचमीस एकभुक्त, षष्ठीला उपास, सप्तमीला अयाचित वृत्तीने राहणें, अष्टमीला पुनश्च उपास, व नवमीला देवीची पूजा, खिरीचा नैवेद्य व देवीचा जप, असा याचा विधि आहे.

या व्रताचें दुसरें विधान पुढीलप्रमाणे––

प्रत्येक महिन्याच्या नवमीला कुमारीला भोजन. आषाढापासून आश्विनापर्यंत प्रत्येक नवमीला भगवती देवीची पूजा. पंचमीला एकभुक्त राहून षष्ठीला व अष्टमीला उपास. सप्तमीला अयाचित वृत्तीनें राहून नवमीला उपास. शिवा देवीचें पूजन. यथाशक्ति ब्राह्मण, सुवासिनी व कुमारिका यांना भोजन. व्रताचें फल –– ब्रह्मलोकप्राप्ति. [कृ. क. त.]

आनय्य द. भारतांतील एक संगीतरचनाकार. हा तमिळ ब्राह्मण असून तंजाऊर जिल्ह्यांतील वैयैचेरी येथील रहिवासी होता. त्याच्या पित्याचें नांव वेंकट सुब्बय्यर होतें. तो संस्कृत, तमिळ व तेलुगु भाषांचा पंडित होता. उमादास या टोपण नांवाने त्याने तमिळ व तेलुगु या भाषांत

रचना केली आहे. तंजाऊरच्या सरफोजीच्या दरबारांत तो समास्थान विद्वान् होता. त्याचा भाऊ ऐय अय्यर हाहि संगीतज्ञ होता. महा वैद्यनाथ अय्यर हा त्याचा शिष्य होता. आनय्याच्या क.ही प्रसिद्ध कृतींची नांवें पुढीलप्रमाणे ––

इंतपराका (नादनामक्रिया), भजन सायवे ओ मनसा (केदार), महिम तेलिय तरमा (शंकराभरण), पोडुम् पोडुमय्या (पुन्नागवरालि) इत्यादि. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

आनर्त भारतांतला एक प्राचीन देश. याचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग होते. शर्यातीचा पुत्र आनर्त याच्या नांवावरून हा देश प्रसिद्धीस आला. महाभारत, भागवत, बृहत्संहिता इ. ग्रंथांतून याचे उल्लेख आढळतात (म. भा. सभा. २६; भाग. पु. १.१०.३५;९.३.२८; बृ. सं. १४. १७). हल्लींचें वडनगर याला पूर्वी आनर्तपुर म्हणत व तेंच त्या राज्याची राजधानीहि होतें. कांही पुराणांतून सौराष्ट्राचा आनर्तदेशांत समावेश केलेला आढळतो. द्वारका ही आनर्ताची राजधानी असेंहि म्हटलेलें दिसतें. पण आनर्ताची व्याख्या व त्याच्या चतु:सीमा यांविषयीं सगळीकडचीं वर्णनें मोघमच आहेत. रुद्रदामन्‌चे शिलालेख व महाभारत यांवरून द्वारकेच्या आसपासचा प्रदेश तोच आनर्त देश होय, असें कळतें (इ. स. १५० चा गिरनार येथील शिलालेख). हा प्रदेश महाक्षत्रप रुद्रदामन् याने जिंकून घेतला व तिथे आपलें राज्य स्थापन केलें (जुनागड येथील इ. स. ७२ चा शिलालेख). अर्जुनाने एका प्रसंगीं या आनर्तांना जिंकलें होतें. [क. हि. वायु. पु.; हि. जॉ. ए. इं.]

आनाय्य दक्षिणाग्नीचें विशेष नांव. गार्हपत्य अग्नींतून याचें ग्रहण करीत, म्हणून याला आनाय्य हें नांव मिळालें. कर्म संपल्यावर पुन्हा याचें आधान करीत नसत. आणि म्हणून याला अनित्य म्हटलें आहे.

आनीचांपी गुजरातमधील सोनारांतील एक लग्नविधि. वरघोडा निघाल्यावर मार्गांत नवऱ्या मुलाला एखाद्या देवीच्या मंदिरांत नेऊन तिचें दर्शन करवितात. नंतर नवरा मुलगा, त्याचे एक दोघे सोबती व मशालजी एवढे लोक थोडेंसें अंतर पायीं चालत जाऊन परत येतात, याला आनीचांपी असें म्हणतात. [ल. वि. सो.]

आनगुंदी हंपीजवळ तुंगभद्रा नदीच्या उत्तर तीरावरील एक मध्ययुगीन शहर. वालीची किष्किंधा नगरी इथेच होती, असें सांगतात. या शहराला मजबूत तटबंदी होती. हरिहर व बुक्क या दोघा बंधूंनी या शहरास महत्त्व आणलें. इ. स. १३३४ मध्ये सुलतान महमुदाने हें शहर काबीज करून तिथे आपला कारभारी नेमला. त्यानंतर वरील दोघा बंधूंनी तुंगभद्रेच्या दक्षिणतीरावर विजयनगर हें नवें शहर वसविल्यामुळे आनेगुंदीचें महत्त्व कमी झालें. इथे रंगनाथ व लक्ष्मी यांचीं मंदिरें असून लक्ष्मीच्या मंदिरांतल्या गरुड–हनुमंत या लांकडी मूर्ती सुबक आहेत. उत्सवप्रसंगीं त्यांची मिरवणूक निघते. जवळच एका कोसावर पंपा सरोवर आहे. आनेगुंदीच्या एका राजाने पंढरपुरची विठ्ठलमूर्ति तिकडे नेली होती, ती भानुदासाने परत आणली, अशी आख्यायिका आहे. या शहराच्या नांवाचें अनागोंदी असें रूप मराठींत प्रचलित आहे. इथला एक राजा स्वत:ला सार्वभौम समजे व सर्व पृथ्वीचा वसूल आपल्या जमेच्या खातीं लिहून त्या त्या देशांच्या नांवें खर्ची टाकी. हा त्याचा एक छंद होता. त्यामुळे एखाद्या ठिकाणीं गैरशिस्त हिशेब किंवा कारभार दिसला, की त्याला ‘ अनागोंदी कारभार ’ म्हणणें असा एक वाक्संप्रदाय मराठींत रूढ आहे.

आनेराज व्यास अनंतभट्ट किंवा अनंतकूची हा कन्हरदेवराय जाधव यांचा कोशाधिकारी होता. त्याला चक्रपाणि नांवाचा मुलगा होता. चक्रपाणीला दोन पुत्र होते. त्यांपैकी एकाचें नांव गोपाळ पंडित होतें व त्याला जन्मल्याबरोबरच चक्रधराला अर्पण केलें होतें. त्यालाच पुढे अनंत पंडित किंवा आनेराज व्यास म्हणूं लागले. गोपाळ पंडिताने महींभट्टाच्या लीळाचरित्रांतून सूत्रें ग्रथित करून गद्य सूत्रपाठ तयार केला. या सूत्रपाठांत चक्रधराचीं वचनें गोवलेलीं आहेत. या पाठांत साडे दहा प्रकरणें असून त्यांत महानुभाव पंथीयांना उपदेश केलेला आहे. या पाठांतील एक नमुना––

कर्म धर्मविधि:
विखया वेगळेया होआवे ।। ५२ ।।
निरसा निरासा निराया हो आवे ।। ५३ ।।
निरक्षेपा होआवे ।। ५४ ।।
निरअभिमानिया होआवे ।। ५५ ।।
ब्रह्मविद्ये इतउत्तर विद्या अनुखंगिका:
रिधित्वें प्रकटति कां विघ्नत्वें ।। ५६ ।।
परि मोक्षुचि ऐसा नाहीं ।। ५७ ।।

महानुभाव दीक्षावंत व उपदेशी या ग्रंथाचें नित्य पठण करतात. [म. म. वा.]

आन्वीक्षिकी प्राचीन काळीं विद्येचें वर्गीकरण त्रयी, आन्वीक्षिकी, वार्ता व दण्डिनीति असें करण्यांत येत असे. आन्वीक्षिकीचीं लक्षणें व अर्थ विविध आहेत.

प्रत्यक्षागमाभ्याम् ईक्षितस्यान्वीक्षणम् अन्वीक्षा
तया प्रवर्तत इत्यान्वीक्षिकी न्यायविद्या न्यायशास्त्रम् ।

(वात्स्या. १. १. १)

अर्थ – प्रत्यक्ष प्रमाण व आगम यांनीं जें पाहिलें त्याचें मागाहून (चिंतनानें) पुनः ईक्षण करणें म्हणजे अन्वीक्षा होय. अन्वीक्षेने प्रवृत्त होते ती आन्वीक्षिकी अर्थात् न्यायविद्या अथवा न्यायशास्त्र होय.

आन्वीक्षिकी दण्डनीतिस्तर्कविद्यार्थशास्त्रयोः ।

(अमर.)

अर्थ – दंडनीति, तर्कविद्या व अर्थशास्त्र म्हणजे आन्वीक्षिकी होय.

कौटिल्याच्या मतें सांख्य योग व लोकायत हीं दर्शनें आन्वीक्षिकींत येतात (अर्थ. १. २). शुक्रनीति व राजनीतिप्रकाश यांच्या मतें 'आत्मज्ञानोपयोगिनी न्यायविद्या'= आत्मविद्येला साधनीभूत अशी तर्कविद्या म्हणजे आन्वीक्षिकी होय. ब्राह्मण व क्षत्रिय या दोघांनीहि आन्वीक्षिकीचा अभ्यास करावा, असें सांगितलें आहे. कौटिल्यानें विद्यांची यादी देतांना आन्वीक्षिकीस प्रथम स्थान दिलें आहे. आन्वीक्षिकी ही विद्या संदेहनिर्णयास उपयोगी पडते व ती वाणी व कृति यांच्यामध्ये समतोलपणा राखते. इतर सर्व प्रकारच्या ज्ञानाला आन्वीक्षिकी हें शास्त्र मार्गदर्शक असून तें सर्व कार्यांत सौकर्य उत्पन्न करतें. भवभूतीच्या मालतीमाधवांत आन्वीक्षिकीचा उल्लेख येतो (अंक १). त्यावरून त्याच्या काळींदेखील आन्वीक्षिकीचा अभ्यास करण्याकडे विद्वानांची प्रवृत्ति होती, असें दिसून येतें. [हि. ध.; म. ज्ञा. को.]

आप एक वैदिक देवता. जल आणि नदी या दोहोंनाहि वैदिक आर्य आप या नांवाने संबोधीत. ऋग्वेदांत आपोदेवतेविषयीं चार सूक्तें आहेत. आपल्या वज्राच्या साहाय्याने इंद्र आपाला मार्ग आंखून देतो व त्या मार्गानें आप निरंतर वाटचाल करीत असतें, असें ऋग्वेदांत म्हटलें आहे.

आप हें शुद्ध, मधुर व निर्दोष असून तें समुद्रांत राहतें, आकाशांतून बाहेर पडतें व समुद्राकडे वाहत जातें. तें सर्व रोगनिवारक असून त्याने सर्व स्थावर–जंगम सृष्टि उत्पन्न केली आहे, अशी वैदिक धारणा आहे (ऋ. १०.१७.१०).

अंबरीष हा वैदिक ऋषि आपाची पुढीलप्रमाणे स्तुति करतो– हे आपोदेवींनो, तुम्ही कल्याणमय आहां. तुम्ही आम्हाला धन द्या व चांगल्या दर्शनासाठी ज्ञान द्या. हे देवींनो, तुमच्यापाशी असलेला मंगलमय रस, प्रेमळ माता आपल्या बालकाला दुधाचा आस्वाद देते, तसा आम्हाला प्राशन करवा. हे आपोदेवींनो ! माझ्या ठिकाणीं जें जें पातक असेल तें तें धुऊन टाका. मी कोणाचा द्रोह केला असेल, कोणाला शिव्याशाप दिले असतील किंवा खोटें बोललों असेन, तर तेंहि सर्व धुवून टाका (ऋ. १०. ९).

आपो ज्योति रसोऽमृतं ब्रह्म भूर्भुवः स्वरोम् ।

वरील वचनाप्रमाणे वेदामध्ये आप शब्दाचा प्रयोग ज्योति, रस, अमृत, ब्रह्म, भूर्भुवःस्वः व ओम् अशा अर्थीं होतो.

दार्शनिकांनी याला अशेष कारण, चेतना इ. मानलें आहे. योगी याला ब्रह्म व अमृत आणि पौराणिक मधुर क्षीर समजतात. याच्या विस्तारांत साकार ब्रह्म आपल्या मायाव्यूहासह पहुडलें आहे.

जगदुत्पत्तीच्या कारणांत आपाला महत्त्वाचें स्थान आहे. विश्वकर्म्याचा जन्म आदि आपापासून झाला, असें तै. संहितेंत सांगितलें आहे. ऋग्वेदांत म्हटलें आहे –

तम आसीत् तमसा गूळ्हमग्रेऽप्रकेतम् ।
सलिलं सर्वमा इदम् ।

(ऋ. १०. १२९.३)

अर्थ– प्रथमतः तम उत्पन्न झालें. तें तमहि तमानेच व्याप्त होतें. नंतर ज्याला कोणतेंहि रुप अथवा आकार नाही, असें जलतत्त्व सर्वत्र भरून राहिलें.

'जल हेंच सर्व वस्तूंच्या उत्पत्तीचें मूळ कारण आहे', असेंहि तिथेच म्हटलें आहे.

आप हें दिव्य आहे; त्याचप्रमाणे तें पार्थिव जलमार्गांतूनहि वाहतें व शेवटीं समुद्राला जाऊन मिळतें (ऋ. ७. ४९). अग्नि जलांत प्रवेश करतो व आपोदेवी अग्नीच्या माता होऊन त्याला उत्पन्न करतात. आपोदेवी आपल्या स्पर्शानें इतरांना स्वच्छ व पवित्र करतात. त्या घाण वाहून नेतात व नैतिक अपराध, पाप, शाप यांपासून मुक्त होण्यासाठी यांचेंच आवाहन केलें जातें (ऋ. १. २३).

जलाच्या लहरी मधाने भरलेल्या आहेत. घृताशीं संयुक्त होऊन हें जल इंद्राचें पेय बनलें व इंद्र तें पिऊन प्रसन्न झाला (ऋ. ७. ४७). घृत, दूध व मध यांनी संपन्न झालेल्या आपांची सोमयुक्त पुरोहितांशीं तुलना केली आहे (ऋ. १०. ३०). **पाहा** — जल. [ऋ. द.; वै. सा. सं.; भा. प्र. वि.; वै. मा.]


आपगा कुरुक्षेत्राच्या खालीं असलेल्या सात किंवा नऊ नद्यांपैकी एक (म. भा. वन. ८३. ६८). अयक

या नांवाची एक नदी काश्मीर मधल्या जम्मू टेकड्यांमधून उगम पावते व ती आणि आपगा या एकच होत, असें एन्शंट जॉग्रफी या ग्रंथांत म्हटलें आहे (पृ. १८५). आपगा व आपया या दोन्ही नद्या एकच असतील काय, असा संशय डॉ. काणे यांनी व्यक्त केला आहे.

आपग्गा प्राचीन तमिळ कवयित्री. अव्वैय्यारची ही बहीण होय. हिचा जन्म अर्काट जिल्ह्यांतील ऊटकाडु येथे झाला. लहानपणींच हिला आई-बापांनी टाकलें व ती एका परिटाच्या बाईला मिळाली. हिचा नीतिपात्तल नांवाचा ग्रंथ तमिळ भाषेंत आहे. [म. च. को.]

आपटा याला संस्कृतांत अश्मंतक म्हणतात. हा जंगली वृक्ष असून त्याला कांचनासारखीं वाटोळीं दुहेरी पानें असतात. विजयादशमीच्या दिवशीं शमीवृक्ष उपलब्ध नसेल, तर अश्मंतक वृक्षाची पूजा करावी, असें निर्णयसिंधूंत सांगितलें आहे. महाराष्ट्रांत दसऱ्याच्या दिवशीं सीमोल्लंघनानंतर आपट्याचीं पानें आप्तेष्टांना सोनें म्हणून वांटतात. हा वृक्ष औषधीहि आहे. **पाहा** -- विजयादशमी.

आपडी-थापडी एक खेळ. मुलें एकमेकांच्या मांडीला मांडी लावून बसतात व हातावर हात उलथे-



आपडी-थापडी

पालथे करीत डावी– उजवीकडे डुलत पुढील गाणें म्हणतात–

आपडी थापडी गुळाची पापडी ।
धम्मक लाडू तेल पाडूं ।
तेलंगीचं एकच पान ।
घर ग बिब्बे हाच कान ।

शेवटची ओळ म्हणतांना एकदम कुणाचा तरी कान पकडून खूप हसतात. दुसऱ्या कोणीं आपला कान पकडूं नये म्हणून प्रत्येक मूल या वेळीं खबरदारी घेतें.

आपदेव एक सुप्रसिद्ध मीमांसक. याचा ' मीमांसान्यायप्रकाश ' हा पूर्वमीमांसेवरील प्रकरण ग्रंथ आहे. याने सदानंदाच्या वेदान्तसारावर बालबोधिनी नामक टीका लिहिली आहे, त्यावरून मीमांसक असूनहि याचा अद्वैताकडे ओढा असल्याचें कळून येतें. [हिंदुत्व]

आपद्धर्म भारतांत आर्यांनी चातुर्वर्ण्य पद्धति रूढ करून तदनुसार प्रत्येक वर्णाचा व्यवसायहि ठरवून दिला. उदा० ब्राह्मणांनी षट्कर्में, क्षत्रियांनी युद्धविषयक कृत्यें, वैश्यांनी कृषि, गोरक्ष्य, वाणिज्य व शूद्रांनी त्रैवर्णिकांची सेवा, हीं कर्में करून आपली उपजीविका चालवावी.

पण पुष्कळदा कुटुंब मोठें झाल्यामुळे विहित वृत्तीवर त्याचा निर्वाह होत नसे. कित्येकदा दिव्य-भौम उत्पात, दुष्काळ, स्थलांतर इ. आकस्मिक कारणांनीहि समाजव्यवस्था विस्कळित होऊन वर्णांना आपापलीं विहित कर्में आचरून जगतां येत नसे. अशा वेळीं, अन्य वर्णांचा धर्म अपवाद म्हणून स्वीकारायला हरकत नाही, अशी शास्त्रकारांनी सोय करून ठेवली आहे. हिलाच आपद्धर्म (आपदि कर्तव्यो धर्मः = आपत्तींत आचरायचा धर्म) म्हणतात. एका वर्णाच्या मनुष्याने दुसऱ्या वर्णाचा व्यवसाय पत्करणें हा धर्मशास्त्राने सामाजिक अन्याय मानलेला आहे; पण तरीहि त्यांनी व्यावहारिक अडचणींकडे दुर्लक्ष केलेलें नाही. एखादा माणूस एखाद्या वेळीं अशा कांही प्रतिकूल परिस्थितींत सांपडतो, की त्याला स्वतःच्या वर्णाचा धंदा करणें अशक्य होऊन बसतें. अशा वेळीं त्याने कशा प्रकारें आपला जीवनमार्ग काढावा, त्याबद्दल धर्मशास्त्रांत सविस्तर विवरण केलें आहे.

आपद्धर्म म्हणून ब्राह्मण-क्षत्रियांनी पुढील गोष्टी करण्यास हरकत नाही, असें मनु सांगतो --

विद्या शिल्पं भृतिः सेवा गोरक्ष्यं विपणिः कृषिः ।
धृतिर्भैक्ष्यं कुसीदं च दश जीवनहेतवः ॥

(१०. ११६)

अर्थ – विद्या, कलाकुसरीचीं कामें, नोकरी, सेवा, गोपालन, विक्रय, शेती, धृति, भिक्षा मागणें व सावकारी हे दहा व्यवसाय (ब्राह्मण-क्षत्रियांनी) करावे.

यांशिवाय बैलगाडचा हाकणें, डोंगरावरून गवत किंवा सरपण आणून विकणें, हेहि व्यवसाय त्यांनी करण्यास हरकत नाही, असें याज्ञवल्क्य सांगतो.

आपत्तींतहि ब्राह्मणाने शूद्र वृत्तीचा व हीन वर्णाच्या पुरुषाने ब्राह्मणादि उत्तम वर्णांच्या वृत्तीचा आश्रय करूं नये, असें वसिष्ठाचें मत आहे. पण क्षत्रिय व वैश्य या दोन वर्णांचा व्यवसाय कोण्याहि आपद्ग्रस्ताने स्वीकारण्यास हरकत नाही; मात्र आपत्ति नष्ट झाल्यावर आपद्धर्म म्हणून स्वीकारलेली हलक्या वर्णाची वृत्ति टाकून प्रायश्चित घ्यावें व पुन्हा आपल्या वृत्तींत प्रतिष्ठित व्हावें, असें बहुतेक धर्मशास्त्रकारांचें मत आहे.

ब्राह्मणाला वैश्याचा व्यवसाय पत्करावा लागला, तरी त्याने उटणीं, तेलें, चामडीं, गोरस, फल-पुष्प, मद्य-मांस, गवत, पाणी, गुलाम, कालवड, इ. वस्तूंचा व्यापार करूं नये, असें गौतमधर्मसूत्र सांगतें (७.१५). आपस्तंबाने ब्राह्मणाला ज्या पदार्थांची विक्री करूं नये, असा निर्बंध घातला आहे, त्याच पदार्थांचा कांही अपवाद करून विनिमय करण्यास मात्र परवानगी ठेवली आहे (आप. ध. सू. १.२०.१६.; १.२१.१–२). ब्राह्मणाने वृत्तिसंकटाच्या वेळीं सर्व धर्मशास्त्रांतले नियम बाजूस सारून कोणत्याहि साधनाने उदरनिर्वाह करावा; पण सेवावृत्ति आचरूं नये, असें गौतम सांगतो (७.२२); पण सेवावृत्ति स्वीकारायला हरकत नसल्याचीं इतर शास्त्रकारांचीं मतेंहि उद्धृत करतो. वैश्य व शूद्र यांनी आपत्कालीं कोणते नियम पाळावे, ते मात्र कोणींहि सांगितलें नाही. क्षत्रियांवरहि निर्बंध घातलेले नाहीत. त्यावरून असें निष्पन्न होतें, की वैश्य-शूद्रांना आपत्प्रसंगीं वरच्या वर्णांचा व्यवसाय न करतां अन्य कोणतेंहि निर्वाहसाधन स्वीकारायला हरकत नसावी.

सच्छील, कुलीन व विद्वान् ब्राह्मण आपत्तींत सांपडल्यास राजाने त्याच्या धर्मवृत्तीची व्यवस्था करावी; अन्यथा त्याला दोष लागतो, असेंहि मनूने सांगितलें आहे. [हि. ध.; ध. सू.– बानर्जी]

आपया

एक नदी. ऋग्वेदांत हिचें नांव एकदाच आलें आहे (३. २३ .४). ही सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांच्या मधून वाहणारी व सरस्वतीला मिळणारी नदी असावी. महाभारतांतहि हिचा उल्लेख आहे (वन ८३. ६८). या नदीविषयीं पंडितांत ऐकमत्य नाही. कनिंगहॅमच्या मतें औघवती व आपया या एकच असून आपया ही चितांग नदीची एक शाखा आहे. [हि. जॉ. ए. इं.; वे. इं.; हि. ध.]

आपस्तंब

भृगुकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि. हा तैत्तिरीय शाखेचा होता. कश्यप ऋषीने दितीकडून पुत्रकामेष्टि करविली; त्या प्रसंगीं हा आचार्य होता. याच्या पत्नीचें नांव अक्षसूत्रा व पुत्राचें नांव कर्कि असें होतें. कृष्णयजुर्वेदाच्या १५ अध्वर्यु शाखांपैकी तैत्तिरीय ही एक शाखा असून, त्या शाखेंत अंतर्भूत असलेल्या आपस्तंब या उपशाखेचा हा सूत्रकार होता. तैत्तिरीय शाखेच्या सर्व उपशाखा सूत्रभेदावरून निर्माण झाल्या आहेत; त्यांतलीच आपस्तंब हीहि एक उपशाखा आहे. याज्ञवल्क्यस्मृतींत स्मृतिकार म्हणून याचा उल्लेख येतो. तर्पणांत याचें नांव बौधायनानंतर व सत्याषाढ हिरण्यकेशीच्या पूर्वीं येतें, यावरून याची शाखा हिरण्यकेशीच्या बऱ्याच पूर्वींची असावी.

आपस्तंब आंध्रांतला असावा व ती शाखाहि तिथेंच जवळपास निघाली असावी, असें केतकर व काणे यांचें मत आहे. डॉ. बुल्हर याचेंहि मत असेंच आहे. तो या संबंधांत पुढील पुरावे देतो— (१) महार्णव ग्रंथांत आपस्तंबाची जन्मभूमि आंध्र असल्याचें सांगितलें आहे. (२) आपस्तंबशाखेचे ब्राह्मण सांप्रत बहुतांशीं दक्षिण भागांतच राहतात. (३) आपस्तंब आपल्या धर्मसूत्रांत (२.७.१७.१७) एका चालीचा ‘ उदीच्यांची चाल ’ म्हणून उल्लेख करतो. वरील पुराव्याला हरकत घेऊन श्री. रामगोपाल हे, आपस्तंब हा उदीच्य म्हणजे कुरुपांचाल देशांतला किंवा त्याच्या निकटच्या देशांतला असल्याचें सांगतात. त्यांच्या मतें आपस्तंबशाखेचे अनुयायी पूर्वी उत्तरेंतच राहत होते. पुढे त्यांनी दक्षिणेंत स्थलांतर केलें असावें.

आपस्तंबाने पुढील ग्रंथ केले आहेत – (१) आपस्तंब श्रौतसूत्र, (२) आ. गृह्यसूत्र. (३) आ. ब्राह्मण (४) आ. मंत्रसंहिता (५) आ. संहिता (६) आ. सूत्र (७) आ. स्मृति (८) आ. उपनिषद् (९) आ. अध्यात्मपटल (१०) आ. अन्त्येष्टिप्रयोग (११) आ. अपरसूत्र (१२) आ. प्रयोग (१३) आ. शुल्वसूत्र (१४) आ. धर्मसूत्र. याच्या श्रौतसूत्रांतच श्रौत, गृह्य, धर्म, शुल्ब, मंत्रसंहिता इ. भाग आहेत. या ग्रंथांवरून आपस्तंबशाखेचें महत्त्व समजून येतें.

महाराष्ट्रांत आपस्तंबशाखी लोक बहुधा देशस्थ ब्राह्मण असतात. तथापि हिरण्यकेशी शाखेच्या कोंकणस्थ ब्राह्मणांनाहि आपस्तंब म्हणण्याचा प्रघात आहे. महाराष्ट्रांत आपस्तंब

(हिरण्यकेशी) व ऋग्वेदी यांचा बेटीव्यवहारहि होतो. भारतांत आपस्तंबांची वस्ती सर्वत्र आहे. [हि. ध.; म. ज्ञा. को.; इं. वे. क. सू.; प्रा. च. को.]

आपस्तंब कल्पसूत्र कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेच्या या कल्पसूत्राचे ३० भाग असून त्यांना प्रश्न अशी संज्ञा आहे. त्यांतले पहिले २४ प्रश्न म्हणजे श्रौतसूत्र होय. यांत वैतानिक यज्ञांसंबंधी माहिती आहे. दर्शपूर्णमास, अग्निहोत्र, चातुर्मास्य, विध्यपराधप्रायश्चित्त, सोमयाग, वाजपेय, अश्वमेध, महाव्रत, चयन इ. यज्ञविषयक विवेचन या श्रौतसूत्रांत येतें. २४ वा प्रश्न श्रौतसूत्राच्या परिभाषेचा आहे. २५ व २६ हे प्रश्न म्हणजे मंत्रपाठ होय. २७ वा प्रश्न म्हणजे गृह्यसूत्र होय. २८ व २९ हे प्रश्न धर्मसूत्र म्हणून ओळखले जातात. यांत चातुर्वर्णिकांचीं कर्तव्यें सांगितलीं आहेत. ३० वा प्रश्न हें शुल्बसूत्र होय. [वै. सा.; म. ज्ञा. को.; हिंदुत्व]

आपस्तंब गृह्यसूत्र आपस्तंब कल्पसूत्राचा २७ वा प्रश्न म्हणजे आपस्तंब गृह्यसूत्र होय. आपस्तंबाने या सूत्रांत गृह्यसंस्कारांविषयीं अल्पशी चर्चा केली असून त्यांचें विस्तृत विवेचन आपल्या धर्मसूत्रांत केलें आहे. विवाहसंस्काराविषयींची चर्चा मात्र गृह्यसूत्रांतच सविस्तर असून धर्मसूत्रांत प्राजापत्य व पैशाच या दोनच विवाहपद्धतींचा उल्लेख आहे. आपस्तंब कल्पसूत्राचे २५ व २६ हे प्रश्न मंत्रपाठाचे आहेत. मंत्रपाठ व गृह्यसूत्र यांचा परस्परसंबंध, मंत्रब्राह्मण व गोभिल गृह्यसूत्र यांच्यामधील संबंधासारखाच आहे. हें गृह्यसूत्र संक्षिप्त पण सरस आहे. [इं. वे. क. सू.]

आपस्तंब धर्मसूत्र आपस्तंब कल्पसूत्राचे २८ व २९ हे दोन प्रश्न म्हणजे आपस्तंब धर्मसूत्र होय. नांवावरून हें आपस्तंब ऋषीने लिहिलें असल्याचें सूचित होतें. पण तें त्यानेच लिहिलें कां त्या शाखेच्या कोण्या अन्य आचार्याने लिहिलें, हें सांगणें कठिण आहे.

याचा निश्चित काल ठरविण्यास पुरेसा पुरावा अद्यापि उपलब्ध झालेला नाही. यांतल्या पुष्कळशा संस्कृत शब्दांचीं रूपें अपाणिनीय आहेत. यावरून तें बरेंच प्राचीन असावें, असें वाटतें. बुल्हरच्या मतें याचा काळ सनपूर्व ३०० च्या अलिकडे येऊं शकत नाही. डॉ. काणे त्याच्याशीं सहमत आहेत. त्यांच्या मतें जेव्हा जैमिनीचा पूर्वमीमांसा संप्रदाय स्थापित झाला, त्या काळांत हें धर्मसूत्र तयार झालें असावें. यांत बौद्ध व तत्सदृश पंथांचा उल्लेख नाही, यावरून त्याचा काळ सनपूर्व ६०० ते ३०० हा मानावा लागतो.

दुसरा प्रश्न स्थलाचा. आपस्तंब शाखा दक्षिण भारताव्यतिरिक्त दुसरीकडे कुठें नाही. आपस्तंब उदीच्य वृत्तीचा म्हणजे उत्तर भारतीयांत रूढ असलेल्या एका चालीचा उल्लेख करतो (११. १७. १७). त्यावरून आपस्तंब शाखा व हें सूत्र द. भारतांतच निर्माण झालें असावें, असें वाटतें.

या सूत्रांत व बौधायन धर्मसूत्रांत कांही परिच्छेद सारखे आहेत. यावरून एकांतले उतारे दुसऱ्याने घेतले असावे, हें निश्चित ठरतें. पण ते बौधायनाने आपस्तंबाचे घेतले कां आपस्तंबाने बौधायनाचे घेतले, तें सांगणें कठिण आहे.

या सूत्रांत आचार, प्रायश्चित्त, ब्रह्मचारिधर्म, यज्ञोपवीतधारण, श्राद्ध, अध्ययन, गृहस्थधर्म, वारसाहक्क, नीति, अध्यात्म इ. विषयांची चर्चा केलेली आहे. कण्व, कुत्स, वार्ष्यायणि, पुष्कर इ. पूर्व धर्मशास्त्रकारांचीं मतें आपस्तंबाने उद्धृत केलीं आहेत. बौधायनाशीं कित्येक ठिकाणीं त्याने आपला मतभेद दाखविला आहे. बौधायन नियोगाला मान्यता देतो. तर आपस्तंब त्याचा निषेध करतो. जैमिनीचीं बरींचशीं मतें व पारिभाषिक शब्द आपस्तंब धर्मसूत्रांत आढळतात. राजधर्माविषयीं विवेचन करतांना तो एका ठिकाणीं म्हणतो, की 'ब्राह्मणाचें चोरीस गेलेलें धन परत मिळविण्याच्या प्रयत्नांत राजाला मृत्यु आला, तर तो त्याचा यज्ञच ठरतो' (१०. २६. २). न्यायाधीश ऊहापोहकुशल, निर्णयसमर्थ, शुद्ध कुलांतले व प्रमादरहित असावे व अपराधाविषयीं संशय असतां त्यांनी कोणाला शिक्षा करूं नये, असें त्याने सांगितलें आहे (११. २९. ५; ५. ११. २).

या सूत्राचीं ११ पटलें असून पहिल्या व दुसऱ्या पटलांत अनुक्रमें ३२ व २९ कंडिका आहेत. हें धर्मसूत्र बौधायन धर्मसूत्रापेक्षा अधिक सुसंबद्ध आहे. हें गद्यात्मक असून यांत जे श्लोक आहेत, ते इतरांचे घेतलेले आहेत. या सूत्राला प्राचीन काळापासून प्रामाण्य लाभलें आहे. शाबरभाष्य, तंत्रवार्तिक, ब्रह्मसूत्र-शांकरभाष्य व मेधातिथि आणि विश्वरूप यांच्या मनु-याज्ञवल्क्यांवरील टीका, यांत आपस्तंबाचे उतारे घेतले आहेत. या सूत्रावर हरदत्ताने उज्ज्वला नांवाची टीका लिहिली आहे.

आपस्तंबाचें धर्मसूत्र आहे, तसेंच श्रौत व गृह्य सूत्रहि आहे. पण हीं तीन्ही सूत्रें एकाच आपस्तंबाच्या हातचीं आहेत, कीं काय याविषयीं संदेह आहे. गृह्य व धर्म हीं सूत्रें एका आपस्तंबाचीं असावीं व श्रौत दुसऱ्या कोणाचें तरी असावें, असें म्हणतात. [हि. ध.; इं. वे. क. सू.; म. ज्ञा. को.]

आपस्तंब ब्राह्मण हे देशस्थ ब्राह्मण असून कर्नाटकांत म्हैसूरपर्यंत वस्ती करून राहिले आहेत. यांचीं धर्मकृत्यें यजुर्वेदाच्या आपस्तंब शाखेप्रमाणे चालतात. **पाहा–** आपस्तंब. [ब्रा. भि. वि.]

आपस्तंब श्रौतसूत्र आपस्तंब कल्पसूत्र पाहा.

आपस्तंब स्मृति आनंदाश्रमांत छापलेल्या या स्मृतीचे १० अध्याय असून त्यांत प्रायश्चित्ताचा विचार केलेला आहे. याशिवाय आणखी एक आपस्तंब स्मृति अड्यार येथील ग्रंथालयांत असून ती अद्यापि छापली गेली नाही, असें श्री. ए. एन्. कृष्ण अय्यंगार हे के. व्ही. रामस्वामी अय्यंगार यांच्या स्मृतिग्रंथांत लिहिलेल्या लेखांत सांगतात. ती स्मृति वरील स्मृतीहून वेगळी आहे. सदर हस्तलिखित स्मृतीचा अभ्यास केल्याअंतीं कळतें, की ही स्मृति म्हणजे कोणत्या तरी एका मोठ्या कृतीचा भाग असावा. या स्मृतींत कर्त्याचा वैष्णव संप्रदायाकडे कल दिसून येतो. विष्णूला नैवेद्य दाखवून मगच श्राद्ध करावें, असें तो सांगतो. हें त्याचें लिहिणें रामानुजाचार्यांनी घालून दिलेल्या नियमाला धरून आहे. ही स्मृति लक्ष्मीधराच्या स्मृतीहून प्राचीन आहे. पण तिचा काळ मात्र निश्चित ठरवितां येत नाही. या अमुद्रित स्मृतीचीं ६ पटलें असून पहिल्या पटलांत कात्यायनाचा उल्लेख आला आहे. त्यावरून ही स्मृति इ. स. च्या ८ व्या शतकांतली असावी, असें वाटतें.

या स्मृतींत गायीसंबंधी अपराध, उच्छिष्ट भोजन, दूषितोदकप्राशन, अभक्ष्यभक्षण, रजोदोष, अगम्यागमन, इ. अनेक प्रायश्चित्तांचा उल्लेख केलेला आहे. चान्द्रायण, कृच्छ्र, पञ्चगव्यस्नान इत्यादींच्या उपायाने दोषमुक्ति होते, असेंहि सांगितलें आहे. या स्मृतीस धर्मशास्त्र असें म्हटलें आहे.

आपाकदान आपाकाला मराठींत आवा म्हणतात. आवा म्हणजे लहानमोठ्या मृत्तिकापात्रांचा समुच्चय होय. मकर संक्रांतीच्या दिवशीं लहानमोठ्या आकाराची संसारोपयोगी मातीचीं भांडीं धान्याच्या राशीवर ठेवून तीं पुढील मंत्राने सुवासिनींना दान देतात —

> **नानाविधानि भाण्डानि स्थूलसूक्ष्माण्यनेकशः ।**
> **राशीकृतानि दास्यामि सर्वकामप्रसिद्धये ॥**

अर्थ – नाना प्रकारचीं लहानमोठीं भांडीं एकत्र करून मी सर्व कामना पूर्ण होण्यासाठीं दान देत आहे. [व्रतराज]

आपान आपान म्हणजे पाणपोई होय. प्राचीन काळीं वाटसरूंसाठी रस्त्याच्या कडेला एका झोपडींत पाण्याचे रांजण भरून ठेवीत. अशा झोपडीला पाणघर हें नांव होतें. तिथे आल्यागेल्याला पाणी फुकट किंवा कांही वेळेला विकतहि देत. आपान शब्दाचा अर्थ मद्यपानगृह असाहि आहे. **पाहा–** पाणपोई. [एन्सा. हिं. आ.]

आपानकोत्सव मद्य पिऊन गप्पागोष्टी करण्याचा हा उत्सव प्राचीन काळीं राजमहालांत साजरा करीत असत. विदर्भराजा अवंतिवर्मा याने हा उत्सव केला होता व त्यांत सामंत व मांडलिक राजे यांनी आपापल्या स्त्रियांसह भाग घेतला होता, असें वर्णन दशकुमारचरितांत आढळतें.

आपापंथ मुन्नादास नांवाच्या एका सोनाराने या पंथाची स्थापना केली. अयोध्या प्रांतांतील माडबा गांवीं या पंथाचें मुख्य पीठ आहे. नेपाळांतहि या पंथाचे अनुयायी दिसतात. हे लोक निर्गुण ब्रह्माचे उपासक असून जातिभेद मानीत नाहीत. एकमेकांची भेट झाली असतां ' बंदगीसाहेब ' असें म्हणून नमस्कार करतात.

आपिशलि (सनपूर्व ७००–७५० डॉ. बेलवलकर यांच्या मतें) पाणिनिपूर्व व्याकरणकार. पतंजलीने याच्या शिष्यांचा उल्लेख केला आहे (भाष्य ६.२.३६). काशिकेंत म्हटलें आहे, की आपिशलीने लघु-गुरु नियमांचें विशेष रूपाने प्रतिपादन केलें आहे (६.२.१४). पाणिनीने आपल्या ऱ्हस्व–दीर्घ प्रकरणांत याच्या सामग्रीचा उपयोग केलेला असण्याची शक्यता आहे. [पा. भा.; प्रा. च. को.]

आपीत एक संकर जात. सूतसंहितेच्या मतें ब्राह्मण पुरुष व दौष्यन्ती (?) स्त्री यांची ही संतति होय. [हि.ध.]

आपेगांव मराठवाड्यांतील एक गांव. या गांवांत महाराष्ट्राचे संतशिरोमणि ज्ञानेश्वर यांचा जन्म झाल्यामुळे तें एक तीर्थस्थान समजलें जातें.

आपोमय देव क्रौंच द्वीपांतील एक देव. याची पूजा तेथील वर्षपुरुष जलपूर्ण अंजलीने करतात. [पु. इं.]

आप्तवाक्य आप्त शब्दाच्या कांही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत –(१) ' आप्तः खलु साक्षात्कृतधर्मा '=

ज्याला धर्मसाक्षात्कार झाला आहे असा पुरुष. (२) 'यथार्थवक्ता' = यथार्थ बोलाणारा. उदा० व्यास, गौतम इ. (ऋषी) हे आप्त होत (त. सं.). (३) वस्तुतत्वाच्या अनुभवाने ज्याचा संपूर्णपणे निश्चय झाला आहे व रागद्वेषादि विकार उत्पन्न झाले, तरी जो खोटें किंवा विपरीत बोलत नाही, तो आप्त होय, अशी पतंजलीची व्याख्या आहे (न्यायकोश). अशा आप्ताचें जें वाक्य किंवा 'यथादृष्टस्यार्थस्य चिरव्यापयिषया प्रयुक्त: शब्द:' = यथादृष्ट अर्थाच्या प्रस्थापनासाठी योजलेला शब्द म्हणजे आप्तवाक्य होय. हें एक प्रमाण म्हणून मानलेलें आहे.

आप्तोर्याम सोमसंस्थांपैकी एक याग. हा ब्रह्याच्या चौथ्या मुखापासून उत्पन्न झाला (ब्रह्मांड पु. २८). अतिरात्र यागाच्या पुढचा हा याग आहे. अतिरात्रापेक्षां यांत चार स्तोत्रें व शस्त्रें अधिक असतात. यांत अग्नि, इंद्र, विश्वेदेव व विष्णु यांना एकेक चमस अर्पण करतात. ज्यांचीं गुरें जगत नाहीत किंवा ज्याला उत्तम गायीबैलांची कामना आहे, त्याने हा याग करावा, असें आश्वलायन सांगतो (श्रौ. सू. ९. ११. १). या यागांत एक हजार गायींपासून असंख्य गायींपर्यंत दक्षिणा सांगितली आहे. यांत पांढरीं खेचरें जोडलेला रथ होत्याला द्यायचा असतो. आप् = मिळणें, मिळविणें; यावरून इष्ट वस्तु प्राप्त करून देणाऱ्या या यागाला आप्तोर्याम अशी संज्ञा मिळाली आहे. [हि. ध.; म. ज्ञा. को.]

आप्य चाक्षुष मन्वंतरांतला देवगण. [भाग. पु. ८. ५. ८]

आप्यायन (१) तर्पण, प्रीणन किंवा शक्तिसंवर्धन. सोमयागांत सोम विकत घेतल्यापासून दररोज सर्व ऋत्विज त्या सोमावर कोमट पाणी मंत्र म्हणून शिंपडतात, त्याला आप्यायन असें नांव आहे. सोमयागाच्या प्रधान दिवशीं त्याचा रस काढतात.

मंत्रशास्त्रांत मंत्राचें आप्यायन अर्थात् त्याचें सामर्थ्यवर्धन पुढीलप्रमाणे सांगितलें आहे--

> **कुशोदकेन जप्तेन प्रत्यर्णं प्रोक्षणं मनो: ।**
> **वारिबीजेन विधिवदेतदाप्यायनं मतम् ॥**

अर्थ – वारिबीजाचा जप करून कुशोदकाने मंत्राच्या प्रत्येक वर्णाचें विधिवत् प्रोक्षण करणें, याला आप्यायन म्हणतात. [स. द. सं. पातं.]

(२) पितृकार्यांतलें विशिष्ट कृत्य. यांत पितरांना उद्देशून तिल, मधुर रस, उदक इ. दानें द्यायचीं असतात. [मत्स्य पु. १५. ३२ – ४१]

(३) शाल्मलि द्वीपांतील एक वर्ष. [भाग. पु. ५. २०. ९]

आप्रीत एक प्राचीन मानव गण. पाणिनीच्या अष्टाध्यायींत राजन्यादि गणांत याचा उल्लेख आहे. आधुनिक काळांतील आफ्रिदी लोक म्हणजेच प्राचीन आप्रीत होत. आफ्रिदी हे आपल्या नांवाचा उच्चार अप्रीदी असाच करतात आणि तो वरील शब्दाला जवळचा आहे. ऋग्वेदांत 'अपरीत' या नांवाने ज्यांचा उल्लेख येतो, ते लोक हेच असावे. [पा. भा.]

आफ्रिदी वायव्य सरहद्द प्रांतांतली एक संघटित व बलाढ्य जमात. ऋग्वेदांत 'अपरीत' नांवाने ज्या लोकांचा निर्देश आहे, ते लोक हे असावे. सफेद कोह नांवाच्या टेकड्यांत यांचें वास्तव्य आहे. सुप्रसिद्ध खैबरखिंड ती याच प्रदेशांत आहे. ही खिंड म्हणजे भारत व मध्य आशिया यांच्यामधला सांधा आहे. दुसरी कोहट ही खिंडहि याच जमातीच्या प्रदेशांत आहे. त्यामुळे या जमातीला वायव्य सरहद्द प्रांतांत महत्त्व प्राप्त झालें आहे. आफ्रिदींचा पठाण जमातींत समावेश होतो. यांच्यांत कांहीं ग्रीक संस्कृतीचे अवशेष आढळतात. प्राचीन काळीं ग्रीको–बॅक्ट्रियन राजांचें या प्रदेशावर राज्य होतें, हें त्याचें कारण असावें. सिकंदराची भारतावर स्वारी याच प्रदेशांतून झाली होती.

आफ्रिदी प्रदेश डोंगराळ पण ओसाड आहे. तिथे अक्रोडाचीं झाडें वाढतात व रताळीं पिकतात. हे लोक जाडेंभरडें कापड व जाळीं विणतात. या वस्तूंना पेशावरच्या बाजारांत मागणी असते. आफ्रिदी माणूस बंदुकीचा मोठा भोक्ता असतो. केवळ बंदुकीच्या मोहाने ते ब्रिटिश सैन्यांत भरती होत असत. त्यांतले कित्येक लोक बंदूक मिळाली, की संधि साधून सैन्यांतून पळहि काढीत. यांची नेमबाजी अचूक असते. हे कष्टाळू व धाडशी असल्यामुळे चांगले सैनिक होऊं शकतात. गनिमी काव्याच्या युद्धांतहि हे फार हुशार असातात. ब्रिटिश राजवटीशीं यांचें हाडवैर असूनहि कित्येक ब्रिटिश लेखकांनी यांचें कौतुक केलें आहे. आदरसत्कार हा त्यांचा विशेष गुण आहे.

आफ्रिदी माणूस पिळदार, मजबूत, उंच व सडपातळ असतो. त्याचा चेहरा लांबट व नाक उंच असतें. वर्ण हस्तिदंती गोरा असतो. चुणीदार सैल विजार, पैरण, जाकिट व पगडी हा आफ्रिदी लोकांचा सर्वसामान्य पोषाख असतो. ते बंदुकीशिवाय सहसा बाहेर पडत नाहीत. त्यांच्यांत अनेक टोळ्या असतात. व परस्परांत बेबनावहि असतो. पण त्यांच्या स्वातंत्र्याला धोका येईल तेव्हा ते सगळे एक होतात. त्यांनी एकदा शपथ घेतली, की मग ते ती कधींहि मोडीत नाहीत. भौगोलिक परिस्थि-

तीमुळे ते भटक्ये बनले आहेत. ते आपल्या टोळीच्या प्रमुखाला 'मलिक' म्हणतात. खैबरच्या मलिकाला सर्वश्रेष्ठ मानतात. इ. स. १८३९–१९३० या कालखंडांत ब्रिटिश फौजा व आफ्रिदी टोळ्या यांच्यामध्ये अनेक रक्तलांच्छित संघर्ष झाले. ३० सालचा संघर्ष 'सरहद्द गांधी' अबदुल गफारखान यांना ब्रिटिशांनी अटक केल्यामुळे झाला. गफारखानांनी यांच्यामधूनच लाल डगलेवाले अहिंसक सैनिक निर्माण केले होते. आफ्रिदी टोळ्यांची विभागणी आठ कुळांमध्ये झालेली आहे. प्रत्येक कुळींत आणखी बऱ्याच पोटकुळ्याहि असतात. [रे. क. इं.]

आबदस्त मुसलमान लोक प्रार्थनेपूर्वी जें विधियुक्त स्नान करतात, त्याला आबदस्त, वझु किंवा वुझू असें नांव आहे. जेव्हा विटाळ झालेला असतो, तेव्हा सर्वांगस्नान करावें लागतें. इतर वेळीं हातपाय धुवून डोक्यावरून व मानेवरून ओला हात फिरविला की काम भागतें. कांही वेळां शरिराचे गुह्य भागहि धुवावे लागतात. पाणी दुर्मिळ असेल किंवा प्रकृतीला मानवत नसेल, तर मातीने किंवा वाळूने शरीरशुद्धि केली तरी चालते. या प्रकाराला तयम्मुम म्हणतात.

एकदा सर्वांगस्नान केल्यावर मध्यंतरीं विटाळ न झाल्यास प्रत्येक प्रार्थनेच्या वेळीं सर्वांगस्नान करण्याची जरुरी नसते. मुहम्मदाने सर्वांगस्नानाचें महत्त्व जागोजाग वर्णिलें आहे. तो म्हणतो. 'अशा स्नानामुळे सर्व देह पापापासून मुक्त होतो. शेवटच्या निवाडयाच्या दिवशीं प्रत्येकाने हात, पाय, तोंड स्वच्छ धुवून यावें. शरिराच्या ज्या भागाला पाण्याचा स्पर्श झाला असेल, त्या जागीं रत्नालंकार झळकूं लागतील.' (मिश्कात ३. १).

प्रत्येक मशिदींत स्नानासाठी विहीर किंवा हौद बांधून पाण्याची सोय केलेली असते. [डि. इ.]

आबादबी एक खेळ. मुलें चिंध्यांचा किंवा रबराचा चेंडू घेऊन तो वर उडवितात. जो मुलगा तो चेंडू झेलतो, तो इतर मुलांना चेंडू फेकून मारतो. मुलें आपला मार चुकवीत चेंडू झेलायचा प्रयत्न करतात व अशा रीतीने खेळ चालू राहतो.

आभंग किंचित् वक्र अवस्थेंत उभी असलेली मूर्ति. [मानसार ६७. ९५–९६]

आभास इमारतीचा, मंडपाचा किंवा दाराचा एक प्रकार. मूर्ति तयार करण्याच्या एका द्रव्यालाहि आभास असें नांव आहे. संगमरवरी इ. मूर्ती करण्यास उपयुक्त दगड, कोरीव चित्र व रंगचित्र यांनाहि आभास असें म्हणतात. [एन्सा. हिं. आ.]

आभासवाद अद्वैतमतांत आत्माच तेवढा सत्य व आत्मभिन्न सर्व वस्तू मिथ्या आहेत. आत्मा अंतर्यामी नाही, साक्षी नाही व जगत्कारणहि नाही. तथापि तो जेव्हा अज्ञानरूप उपाधीने युक्त होऊन अज्ञानाशीं तादात्म्य पावतो, तेव्हा त्यांत पडलेल्या चिदाभासाच्या अविवेकामुळे तो अंतर्यामी, साक्षी आणि ईश्वर म्हटला जातो. बुद्धि-उपहित तादात्म्याला प्राप्त होऊन बुद्धिगत स्वकीय चिदाभासाला न जाणल्याने जीव हा कर्ता, भोक्ता व प्रमाता मानला जातो. या मताला आभासवाद म्हणतात. या वादानुसार जीव नाना असून ईश्वर एक आहे.

पूर्ण संविद्रूप परमेश्वराच्या ठिकाणीं प्रतिबिंबित होणारें हें विश्व परमेश्वराहून अभिन्न असूनहि घटपटादि रूपांनी भिन्न अवभासित होतें, असा प्रत्यभिज्ञादर्शनाचाहि सिद्धान्त आहे. [भा. द.; प्रत्यभिज्ञादर्शन]

आभास्वरस् चौसष्ट देवतांचा एक समूह. [हि. मा.]

आभियोगिय एक प्राचीन धर्मपंथ. या पंथांतले लोक भुतें काढणें, स्वप्नांचा अर्थ सांगणें, पाणी मंत्रून अंगावर टाकणें इ. कामें करून पोट भरीत. लोकांची त्यांच्यावर श्रद्धा असे. [स्कू. से. इ. जै. लि.]

आभीर लोक व देश. ब्राह्मणपुरुष व अंबष्ठ स्त्री यांपासून उत्पन्न झालेल्या संततीला आभीर म्हणतात, असें मनु सांगतो (१०. १५). महाभारतांत त्यांचा दस्यु व म्लेच्छ या नांवाने उल्लेख आहे. सभापर्वांत त्यांचा पारदाशीं संबंध जोडलेला दिसतो (३२). हे वृत्तीने पशुपाल किंवा गवळी आहेत. आजचे अहीर हे मूळच्या आभीरांचेच वंशज होत. पुराणकालापासून भारतांतील एक जमात म्हणून आभीर लोक प्रसिद्ध आहेत. सांप्रत उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, गुजरात व सौराष्ट्र या भागांत यांची वस्ती मोठ्या प्रमाणांत आहे. आभीर हे परद्वीपस्थ असून ते पुढे हिंदूंच्या चातुर्वर्ण्यांत समाविष्ट होऊन शूद्रवर्गांत दाखल झाले, असें कांही समाजशास्त्रज्ञ म्हणतात.

भारतांत आभीरांच्या स्वाऱ्या वायव्येकडून झाल्या. सनपूर्व दुसऱ्या शतकांत आभीरांचा प्रदेश बॅक्ट्रियन ग्रीकांनी जिंकून

घेतला व त्या भागांत आपली वसाहत केली. टॉलेमी या प्रदेशाला 'इंडोसिथिया' म्हणतो. इंडोसिथियांत अबेरिया किंवा अबीरिया याचा समावेश टॉलेमीने केला आहे. अबेरिया म्हणजेच आभीरांचा प्रदेश होय. भारतांत आभीर सत्तेचा उदय इ. स. १८० च्या सुमारास मानावा लागतो, असें जयचंद्र विद्यालंकार म्हणतात. क्षत्रपांचा सेनापति रुद्रभूति आभीर याचा एक लेख इ. स. १८१ चा आहे. आभीर लोक पश्चिम राजस्थानांत सिंध प्रांताच्या सीमेवर राज्य मिळवून बसले होते. रुद्रदामन्ने मारवाडची मरुभूमि जिंकल्यावर आभीरांचें राज्य क्षत्रपांच्या राज्यांत विलीन झालें. पुढे आभीर लोक हळूहळू क्षत्रपांच्या सत्तेंत उच्चाधिकार मिळवूं लागले. नंतर थोड्याच काळांत त्यांनी क्षत्रप राज्याचा पश्चिम भाग परत जिंकून घेतला व तिथे आपला राजवंश स्थापित केला. शेवटीं तर कांही काळ क्षत्रपांचें सगळें राज्य व महाराष्ट्राचा उत्तर भागहि त्यांच्या ताब्यांत आला होता. आंध्रांच्या नंतर आभीरांनी भारताच्या पश्चिम विभागावर राज्य मिळविलें. ईश्वरसेन या नांवाचा एक आभीरांचा राजा इतिहासांत आढळतो. ईश्वरदत्त नांवाचा एक आभीर पुरुष पश्चिम भारताचा महाक्षत्रप झाला होता व त्याने इ. स. च्या ३ ऱ्या शतकांत महाराष्ट्राचा कांही प्रदेश सातवाहनांकडून जिंकून घेतला होता. ईश्वरदत्त व ईश्वरसेन हीं दोन्ही नांवें एकाच व्यक्तीचीं असावीं. ईश्वरसेनाचें राजघराणें व अपरान्ताचा त्रैकूटक वंश हे दोन्ही एकच होत. आंध्रांनंतर उत्तर महाराष्ट्र व त्या नजिकचा प्रदेश यांवर इ. स. २४८ सालीं आभीरांची सत्ता सुरू झाली.

पार्गिटर म्हणतो, की भारतीय युद्धानंतरच्या काळांत ज्या अनेक घडामोडी झाल्या, त्यांच्याशीं आभीरांचा कांही ना कांही संबंध लागतोच. आभीरांनी गुजरातच्या यादवांवर हल्ला करून त्यांचा मोड केला. अलाहाबाद येथील समुद्रगुप्ताच्या स्तंभलेखांत म्हटलें आहे, की आभीर देश हें पश्चिम-नैर्ऋत्य भारतांतील जमातींच्या राज्यांपैकी एक राज्य असून, त्याचे राजे गुप्त सम्राटांचे मांडलिक होते. गुप्त काळांत ते पूर्व राजस्थान व माळवा इथवर पसरले होते.

दक्षिणेंत येण्यापूर्वी अबेरियांत म्हणजेच उत्तर सिंध प्रदेशांत आभीरांची वस्ती होती. पुढे ते सिंधमधून खाली उतरून जलमार्गाने कोंकणांत उतरले असावे आणि त्यानंतर नाशिककडे आले असावे. मार्कंडेय पुराणांत आभीरांना दक्षिण देशाचे रहिवासी म्हटलें आहे (५७–५८). आभीरांची एक शाखा दक्षिणेंत गेली व तेच तिकडे पुंड्रक, केरळ, पुलिंद, आंध्र इ. नांवांनी ओळखले जाऊं लागले.

आभीरांच्या भाषेला अपभ्रंश असें नांव आहे. श्रीकृष्णाचें बालरूप हें आभीरांचें उपास्य होय. [हि. जॉ. ए. इं.; भा. इ. रू.; हि. ध.; क्ला. डि. हिं. मि.; म. ज्ञा. को.]

आभीर राजे पुराणांत भविष्यकालीन राजवंश सांगतांना आंध्रांनंतर दहा आभीर राजांचा निर्देश आहे--'दशाभीरास्तथा नृपाः' (मत्स्य पु. २७२. १८). आंध्रांनंतर यांचा उल्लेख येत असल्यामुळे आभीर राजांचा काल आंध्रांनंतरचा ठरतो. इ. स. २२५ नंतर पुढे ६७ वर्षांत हे दहा आभीर राजे होऊन गेले असावे. त्यांची नांवनिशी मात्र स्पष्टपणे आढळत नाही.

विष्णु पुराणांत आंध्र राजांच्या नंतर सात आभीर राजे होऊन गेले, असा उल्लेख आहे (४. २४). मत्स्यपुराणांतहि तसेंच म्हटलें आहे. भागवतांत सात आवभृत्य राजे होऊन गेले, असें जें म्हटलें आहे, तें बहुधा आभीरांबद्दलच असावें. वायुपुराणांत आभीर राजांची संख्या दहा सांगितली आहे.

वीरसेन अर्थात् ईश्वरसेन या आभीर राजाची इ. स. ४१९ मध्ये खानदेशावर सत्ता होती, असें नाशिकच्या शिलालेखांत म्हटलें आहे. आभीर ईश्वरदत्त याने क्षत्रपांचा पराभव करून पश्चिम भारतावर आपली सत्ता स्थापली. पण पुनश्च थोड्याच कालांत पश्चिम प्रदेशावर क्षत्रपांची राजवट सुरू झाली, असें नाण्यांवरून वाटतें. इ. स. च्या ८ व्या शतकांत मध्यप्रांताच्या पूर्वेकडील भागावरहि आभीरवंशाची राजवट होती, असें दिसतें. अहीर हें आभीर शब्दाचें अपभ्रष्ट रूप होय. शालिवाहनानंतर तीनशें वर्षे आभीर राजे खानदेश, नाशिक, काठेवाड, पालनपूर व कच्छ या प्रदेशांवर राज्य करीत असावे. ८ व्या शतकांत काठी लोक गुजरातेंत आले तेव्हा तिथे सर्वत्र अभीरांचें राज्य होतें, असें इतिहास सांगतो. हेमचंद्राच्या द्व्याश्रय काव्यांत जुनागडाजवळच्या वनथली येथे राज्य करणारा चूडासमा गृहरिपु हा राजा आभीर होता, असें म्हटलें आहे. हस्तिनापुरावरहि एका अहीर वंशाने राज्य केलें आहे. भारतेतिहास या पुस्तकांत अहीर वंशांतल्या सोळा राजांनी २२७ वर्षे राज्य केलें, असें म्हटलें आहे. अहीर राजांविषयींच्या अनेक दंतकथा ऐकिवांत आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करतां आभीर किंवा अहीर नांवाचा एक बलाढ्य राजवंश इ. स. च्या पहिल्या पांच शतकांत भारतांत नांदून गेला, असें कळून येतें. [म. च. को.]

आभूतरज रैवत मन्वंतरांतील देवगण. [मत्स्य पु. ९. २०]

आभूत संप्लव प्रलयाचा एक प्रकार. यांत पंचमहाभूतांखेरीज सर्व वस्तूंचा नाश होतो. [पु. इं.]

आभ्युदयिक श्राद्ध मंगलप्रसंगीं केलें जाणारें श्राद्ध. पुत्रजन्म, उपनयन, विवाह, वापीकूपोत्सर्ग इ. प्रसंगीं हें श्राद्ध विहित आहे. याचा विधि – समसंख्य ब्राह्मणांना भोजन, सव्याने पूजोपचार, तिळाऐवजी यवांचा वापर, दर्भ सरळ धरणें, ब्राह्मणाच्या हातावर होम, नान्दीमुख नामक पितरांचें आवाहन व 'स्वधा' शब्दाचें वर्जन (आश्व. गृ. सू. २. ५. १३–१५; गोभिल गृ. सू. ४. ३. ३५–३७). **पाहा**– नांदीश्राद्ध. [हि. ध.]

आमर्दक क्षेत्र हें क्षेत्र व बारा ज्योतिर्लिंगांतलें औंढ्या नागनाथ हीं दोन्ही क्षेत्रें एकच असावीं. याला हें नांव पडण्याचें कारण पुढील श्लोकार्धांत सांगितलें आहे—

आमर्दयानि पापानि तस्मादामर्दकं मतम् ।

अर्थ – इथे पापें चिरडलीं जातात म्हणून याला आमर्दक मानलें आहे.

या क्षेत्राला कृतादि चार युगांत अनुक्रमें ज्योतिर्मय, मुक्ति, स्पर्श व नागनाथ अशीं नांवें पडलीं आहेत. **पाहा**– नागनाथ. [हि. ध.]

आमर्दकी व्रत व्रतारंभ कोणत्याहि मासाच्या शु. १२ शी पासून करतात. व्रतावधि एक वर्ष. आवळीच्या झाडाखाली विष्णु-लक्ष्मींची पूजा व रात्रौ जागरण हा याचा मुख्य विधि आहे. [हे. व्र.]

आमलक देवालयाच्या शिखरावर सर्वांत वरच्या शंकूच्या खाली राय–आवळ्यासारखी जी दगडाची घडण करतात, तिला आमलक असें नांव आहे. कधी कधी छपराच्या टोकावरहि अशी घडण आढळते. अशोकस्तंभाच्या शिरोभागींहि आमलक दिसतो. शिल्पशास्त्रविषयक संस्कृत ग्रंथांमध्ये आमलक हा शब्द क्वचितच आढळतो. चिनी भाषेंत बुद्धगयेच्या विहाराच्या वर्णनांत 'ओ–मो–लो–किया–को' असा शब्द आहे. त्यावरून हा शब्द चीनमधून आला असावा, असें कांहीं लोक म्हणतात; पण आधुनिक संशोधकांना हें मत मान्य नाहीं. [एन्सा. हिं. आ.]

आमलकमुष्टयादि क्रीडा प्राचीन भारतांतील एक खेळ. एका खेळाडूने मुठींत कांही आवळे घेऊन दुसऱ्या गड्याला त्यांची संख्या विचारायची. उत्तर बरोबर आलें, तर ते आवळे दुसऱ्या गड्याला द्यायचे व उत्तर चुकलें, तर दुसऱ्या गड्याने पहिल्याला त्याच्या हातांत असतील त्याच्या दुप्पट आवळे द्यायचे, असा या खेळाचा नियम असे.

अजूनहि गडें–फाडें नांवाचा असाच एक खेळ कोकणांत मुलें खेळतात. फक्त तीं आवळ्यांऐवजी काजू, चिंचोके, सुपाऱ्या वगैरे वस्तु घेतात. [प्रा. भा. म.]

आमलकवंटकपीठ एक आसन किंवा बैठक. या आसनाचे पाय आवळ्याच्या आकाराचे असतात. कांही वेळां या आवळ्यांचा आकार चपटा असतो, तर कांही वेळां आवळ्याच्या खाली किंवा वर, उंचीसाठी आणखी कांही



आमलकवंटकपीठ

भाग जोडलेला असतो. शुंगकालापासून कुशाण कालापर्यंत हें आसन प्रचारांत होतें. [मै. श. गु. अ. ग्रं.]

आमलक स्नान संपत्तीची इच्छा करणाऱ्या मनुष्याने नेहमीं आवळ्याचा कल्क अंगाला लावून स्नान करावें, असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे. परंतु सप्तमी, नवमी या तिथींना, तसेंच पर्वकालीं व चंद्र-सूर्यग्रहणांच्या वेळीं आमलक स्नान करूं नये, असा त्याचा निषेधहि सांगितला आहे. [नि. सिं.]

आमलकी एकादशी फाल्गुन शु. ११ शीचें नांव. या दिवशीं उपवास करून आवळीच्या झाडाखाली विष्णु--लक्ष्मींची पूजा करतात (हे. व्र.). या व्रताची कथा अशी–

एके दिवशीं देव आवळीच्या झाडाखाली गेले असतां, विष्णूने आकाशवाणीच्या द्वारें त्यांना आवळीचें महात्म्य

ऐकविलें. तें ऐकून देवांनी फाल्गुन शु. ११ शीच्या दिवशीं आमलकीव्रत केलें व ते महापदाला चढले. [प. पु. उ. ४५]

आमलो घोटन बिहारमधील लग्नसमारंभांतला एक विधि. वधूपक्षाची कोणीतरी वडीलधारी स्त्री वधूच्या आईच्या हातांत पैसे किंवा दागिने ठेवते. नंतर न्हावीण वधूच्या आईला आंब्याच्या पानाच्या शिरा काढून देते. त्या ती एकदा चावून ठेवून देते. नंतर वधूला बोलावितात व त्या शिरा तिच्या डोक्यापासून पायांपर्यंत ओढतात. मग वधूला विचारतात. 'तूं शांत झालीस कां ?' ती 'होय' असें उत्तर देतें. या विधीला भागलपूरमध्ये फार महत्त्व आहे. [बि. पे ला.]

आमश्राद्ध आम म्हणजे न शिजविलेलें अन्न. त्याने करायचें श्राद्ध तें आमश्राद्ध होय.

द्रव्याभावे द्विजाभावे प्रवासे पुत्रजन्मनि ।
आमश्राद्धं प्रकुर्वीत यस्य भार्या रजस्वला ।।

(स्कंद पु. ७.१.२०६)

अर्थ – द्रव्य नसतां, ब्राह्मण मिळत नसतां, प्रवासांत, पुत्र जन्माच्या प्रसंगीं व पत्नी रजस्वला असतां आमश्राद्ध करावें.

ज्याला पार्वणश्राद्ध करण्याचा अधिकार असेल, त्यानेच आमश्राद्ध करायचें असतें. मरीचि सांगतो, की जें श्राद्ध ज्या तिथीस नियमित असेल, अशा अमावास्यादि श्राद्धांविषयीं आमश्राद्धाचा पर्याय विहित आहे. मासिक व सांवत्सरिक श्राद्धांना हा पर्याय योजूं नये.

अशा श्राद्धांत इतर श्राद्धविधि यथोक्त करून भोजन वाढण्याच्या प्रसंगीं फक्त शिधा पुढे ठेवतात. आमान्नाचें प्रमाण पक्वान्नापेक्षा चौपट, दुप्पट, निदान त्याच्या इतकें असावें, असें सांगितलें आहे. शूद्रांना आमश्राद्धच विहित आहे (मत्स्य पु. १७.७०). [ध. सिं.; नि. सिं.; हि. ध.]

आमषष्ठी व्रत ज्येष्ठ शु. ६ ष्ठी. काम्यव्रत. व्रताचा विधि पुढीलप्रमाणे – सौभाग्यवती स्त्रिया तांदुळाच्या पिठाचें एक मांजर बनवितात. मग षष्ठीदेवीची व त्या मांजराची पूजा करतात. त्या बरोबरच मंतरलेल्या सुताच्या गुंड्याचीहि पूजा करतात व त्याचा दोरा बनवून नवीन जन्मलेल्या मुलाच्या हातांत बांधतात. या दिवशीं स्त्रिया उपास करतात. व्रताचें फल - संततीला दीर्घायुष्याची प्राप्ति. याची कथा पुढीलप्रमाणे –

एका ब्राह्मणाची सून चोरून खात असे व मांजरावर आळ घेत असे. तें मांजर षष्ठीदेवीचें वाहन होतें. पुढे त्या सुनेला मुलगा झाला, पण तो सहाव्या दिवशीं नाहीसा झाला. असें पुढील आठ बाळंतपणांत घडलें. त्यामुळे घरांतले लोक सुनेला चेटकी म्हणूं लागले. त्या रागाने ती वनांत गेली व मोठ्याने शोक करूं लागली. तेव्हा षष्ठीदेवी तिच्यापुढे प्रगट झाली. देवीने तिला सांगितलें, की 'तूं मांजरावर आळ घेतेस; म्हणून मी तुझीं मुलें नाहीशीं करतें. माझें हें काळें मांजर इथे मृतप्राय होऊन पडलें आहे, त्याच्या अंगाला तूं दही लाव व तें सगळें दही आपल्या जिभेने चाटून खा.' मग सुनेने त्याप्रमाणे केल्यावर तिला तिचीं सगळीं मुलें परत मिळालीं. [हिंदु हॉलिडेज; से. क.]

आमान्न आमश्राद्ध पाहा.

आमाम् पूसारि केरळ व तमिळनाडमधील खेडेगांवांतल्या मंदिरांतला मुख्य पुजाऱ्याचा साहाय्यक. पूजेच्या वेळीं मुख्य पुजारी जें कांहीं म्हणेल, त्याला होकार भरणें, हें याचें काम असतें. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

आमियाजी राजस्थानांतील मुलींचा एक खेळ. सर्व मुली एकमेकींचे हात धरून वर्तुळ करतात. एक मुलगी मासोळी बनून त्या वर्तुळांत उभी राहते. सर्व मुली गोलाकार फिरत फिरत आंतल्या मासोळीला विचारतात, 'मछली मछली कितनो पाणी ?' मासोळीहि वर्तुळांत फिरत आपल्या पायांना स्पर्श करून 'इतनो पाणी' असें उत्तर देते. तिसऱ्यांदा विचारल्यावर ती आपल्या डोक्याच्या वर पाणी आहे, असें सांगते. तें ऐकतांच सर्व मुली 'मछली डूबगी, मछली डूबगी' असें म्हणत पळूं लागतात. मासोळीहि त्यांच्यामागे पळते व एखाद्या मुलीला शिवते. मग पुढच्या डावांत ती शिवलेली मुलगी मासोळी होते. [मरुभारती]

आमिष पदार्थ प्राण्यांच्या हाडांचा चुना, चर्म-पात्रांतलें पाणी, महाळुंग, ईडलिंबू, वैश्वदेव न झालेलें अन्न, विष्णूला अर्पण न केलेलें अन्न, मसुरा व मांस हे आठ आमिष पदार्थ होत. [ध. सिं.]

आमिक्षा तापलेल्या दुधांत दही ओतल्याने जो दुधाचा चोथा बनतो, त्याला आमिक्षा म्हणतात (आप.

श्रौ. ८.२.६). हा एक यज्ञीय हवि आहे. आमिक्षा फडक्यांतून गाळतांना जो द्रव पदार्थ खालच्या पात्रांत पडतो, त्याला 'वाजिन' म्हणतात. आमिक्षेला पयस्या असेंहि नांव आहे. विविध देवतांना आमिक्षा हा हवि सांगितला आहे. उदा० वैश्वदेवी आमिक्षा, मैत्रावरुणी आमिक्षा इत्यादि. वाजिनाची देवता वाजिन् ही आहे (मै. सं. १.१०.१). आमिक्षेची देवता बदलली, तरी वाजिनाची बदलत नाही. [विद्याधरशास्त्री भिडे]

आमेन हा हिब्रू शब्द असून त्याचा अर्थ 'तथास्तु' किंवा तसें असो किंवा तसें आहे, असा आहे. जुन्या करारांत स्तुतिवचन, शाप किंवा शपथ याला अनुमति देण्यासाठी हा शब्द योजलेला आहे. यहुदी लोकांच्या सिनेगॉगमध्ये स्तुतिवचनानंतर व धर्मगुरूच्या आशीर्वचनानंतर अशी सांघिक अनुमति देत असत. वैयक्तिक किंवा सामुदायिक प्रार्थनेनंतर प्रभुस्तवन झालें, तरच हा शब्द उच्चारायचा असे. जेवणापूर्वी व नंतर प्रभुस्तवन करून आमेन म्हणावें, अशी ख्रिस्ती धर्माची आज्ञा आहे. शिवाय हा शब्द उच्चारल्याने शपथ, शाप, सदिच्छा इ. गोष्टींना सार्वत्रिक मान्यता मिळते. ख्रिस्ताचें विशेषनाम म्हणूनहि कांही वेळां हा शब्द योजतात. कांही पंथांत हें एका देवदूताचें नांव मानलेलें आहे. हिब्रू आमेन आणि भारतीय ॐ या दोन शब्दांत बरेंच साधर्म्य आहे. 'तथास्तु' किंवा अनुमति हा ओंकाराचाहि अर्थ सांगितलेला आहे. [एन्सा. रि.]

आम्नाय याचे तीन अर्थ दिलेले आहेत– (१) 'सम्यगभ्यासः'= नियम धारण करून व गुरुमुख श्रवणपूर्वक अध्ययन करणें, (२) 'सम्यक् पाठः'= चांगल्या प्रकारें पठन करणें व (३) वेद (न्यायकोश). आम्नाय शब्दाचा मूळ अर्थ त्या त्या शास्त्राचा आदिग्रंथ अथवा उपदेश असा आहे. गौतम धर्मसूत्रांत मानवधर्मशास्त्राला आम्नाय मानलें आहे (१.५१; १०.२२). धर्मशास्त्राचा तोच आदिग्रंथ असून त्याच्या आधारावरच पुढे स्वायंभुव मनूचें धर्मशास्त्र रचलें गेलें. जैमिनीच्या सूत्रांत आम्नाय शब्दाचा प्रयोग अनेकदां येतो. 'आम्नायस्य क्रियार्थत्वात् ...' (१.२.३) या सूत्रांतलें आम्नायपद मीमांसा व याज्ञिक यांच्या मूल ग्रंथांचें अर्थात् ब्राह्मणग्रंथांचें वाचक आहे. वैदिक ग्रंथांमध्ये शाखांच्या आदिग्रंथाला आम्नाय म्हणत. कात्यायनाने ऋक्सर्वानुक्रमणीच्या प्रारंभीं लिहिलें आहे–

अथ श्री ऋग्वेदाम्नायके शाकलके...

याचा अर्थ शैशिरि आदि शाखांचें मूळ शाकलक आम्नाय हें होतें, असा आहे. महाभारतांत हाच अभिप्राय अधिक स्पष्ट केलेला आहे—

आम्नायेभ्यः पुनर्वेदाः प्रसृताः सर्वतोमुखाः

(शांति. २६६)

अर्थ – आम्नायांमुळे वेद पुनश्च प्रसार पावले व सर्वतोमुखीं झाले.

याचा भावार्थ: आम्नाय=चरण यांच्यामुळे वेदशाखांचा विस्तार झाला, असा आहे. **पाहा** – चरण. [वै. वा. इ.]

आम्र कुब्जासन जैन धर्मग्रंथांत श्रमणांसाठी सांगितलेलें एक आसन. आंब्याच्या आकारासारखी शरिराची अवस्था करून राहणें, याला आम्रकुब्जासन असें म्हणतात. जैन श्रमणांना तपश्चरणासाठी जीं आसनें विहित आहेत, त्यांत आम्रकुब्जासनाचा अंतर्भाव होतो. [हि. जै. मो.]

आम्रकूट शोण व नर्मदा यांचें उगमस्थान असलेल्या विंध्यश्रेणींतील अमरकंटकाला पुराणांत आम्रकूट म्हटलें आहे. **पाहा** – अमरकंटक.

आम्रपुष्पभक्षण वर्षप्रतिपदेस मदनपूजेचा एक भाग म्हणून आंब्याचा मोहर खावा, असें विधान आहे (हि. ध.). निर्णय सिंधूंत हा विधि फाल्गुन पौर्णिमेस सांगितला आहे. त्याचा मंत्र असा–

चूतमग्र्यं वसन्तस्य माकन्दकुसुमं तव ।
सचन्दनं पिबाम्यद्य सर्वकामार्थसिद्धये ।।

अर्थ – हे आम्रवृक्षा, वसंताचें अग्रपुष्प असलेला तुझा मोहर मी चंदनमिश्रित करून सर्व कामनांच्या सिद्धीसाठी प्राशन करीत आहें.

आम्रातकेश्वर मत्स्य पुराणांतील आठ गुह्य लिंगांपैकी एक. बसरा येथे सांपडलेल्या एका लंबगोल मुद्रेवर एक शिवलिंग दाखविलें असून त्या खाली 'आम्रातकेश्वर' अशीं अक्षरें आहेत. हें एका पर्वताचेंहि नांव आहे. **पाहा**–गुह्य लिंगें. [डे. हिं. इ.]

आयतन (१) बौद्ध दर्शनांतली एक संज्ञा. 'आयं प्रवेशं तनोतीति आयतनम्' = प्रवेशद्वार. चक्षु, श्रोत्र, रसना इ. षडिंद्रियें व रूप, शब्द, रस इ. त्यांचे विषय, हीं

ज्ञानाच्या उत्पत्तीचीं द्वारें होत. म्हणून त्यांना आयतन अशी संज्ञा आहे. यांपैकी इंद्रियांना ‘ अध्यात्म आयतन ’ व विषयांना ‘ बाह्य आयतन ’ म्हणतात. दोन्ही आयतनांची संख्या बारा आहे. [बौ. द. मी.]

(२) यज्ञस्थान, देवस्थान व चैत्य असे याचे अर्थ आहेत. वैदिक वाङ्मयांत प्रारंभीं या शब्दाचा अर्थ गृह किंवा वसतिस्थान असा होता. कालांतराने त्याला प्रांगण किंवा परिसर हा अर्थ प्राप्त झाला. मठ व मंदिरें यांनीं युक्त अशा वसाहतीलाहि आयतन हें नांव होतें. पुढे त्याला देवालय हा अर्थ मिळाला (मत्स्य पु. २७७.२८ – ३४). पंचायतन (पांच देवांचें स्थान) हा शब्द अग्निपुराणांत (४३.१) व देवायतन हा शब्द भविष्य पुराणांत (१३०.१७) आणि बृहत्संहितेंत (५६.१०) आला आहे. [एन्सा. हिं. आ.]

आयतुल् कुर्सी कुराणांतलें एक गीत. याला ‘ सिंहासन गीत ’ असें नांव आहे (२.२५६). रात्रौ झोपण्यापूर्वी जो हें गीत म्हणेल, त्याच्या घराचें देव संरक्षण करील, असें मुहम्मदाने म्हटलें आहे. [डि. इ.]

आयतुल् फतह कुराणांतला एक भाग. याच्या पठनाने मनोरथ पूर्ण होतात, अशा श्रद्धेने प्रत्येक प्रार्थनेनंतर हा भाग म्हणण्याची चाल आहे. [डि. इ.]

आयतुल् मवारिष् कुराणांत वारसाहक्कासंबंधीं जो भाग आहे, त्याचें नांव. मुस्लीम कायद्यांतील वारसाविषयक कायद्याचा हा पाया समजला जातो. [डि. इ.]

आयतुल् हिफ्झ कुराणांतल्या कांही संरक्षक गीतांना हें नांव आहे. मुसलमान लोक ताइतांवर तीं कोरून ते गळ्यांत वा दंडांत बांधतात. [डि. इ.]

आयंबिल वद्धमाण जैन श्रावकांचें एक उपवासव्रत. या व्रताचरणांत दिवसांतून एक वेळ फक्त आयंबिल अन्नाचें सेवन करतात. आयंबिल म्हणजे केवळ शिजविलेला भात होय. त्याला कोणतेंहि तोंडीलावणें घ्यायचें नाही किंवा त्या भातांत कांहीहि कालवण घालायचें नाही. आयंबिल सेवनानंतर चउत्थ उपवास, मग दोन वेळां आयंबिल भोजनें, मग पुन्हा चउत्थ उपवास, असें सत्र शंभरावें आयंबिल भोजन येईपर्यंत करायचें असतें. या संपूर्ण सत्राला चौदा वर्षें, तीन महिने व वीस दिवस लागतात. [हि. जै. मो.]

आयरिय (सं. आचार्य) जैन मठांत ज्या व्यक्तीने आठ वर्षें श्रमणाचे जीवन व्यतीत केलें असेल व ज्याला स्थानांग व समवायांग या अंगांचें ज्ञान असेल, त्यालाच आचार्यपद मिळत असे. आचार्याचें नैतिक आचरण शुद्ध असावें यावरहि कटाक्ष असे. इच्छुक श्रावकांना श्रमणधर्माची दीक्षा देणें व त्यांना शिकविणें हीं कामें जैन आचार्याने करायचीं असत. मठांतील श्रमणींवर त्याचीच देखरेख असे. [हि. जै. मो.]

आयरी शिकारींत मेलेल्या माणसाच्या भुताला उत्तर प्रदेशांत आयरी हें नांव आहे. अनेक भुतें आयरीचीं अनुयायी असतात. हें भूत महाभयंकर खरें; पण प्रसन्न झाल्यास तें गुप्त धन दाखवितें, अशी समजूत आहे. उत्तर प्रदेशांत वर्षांतून एकदा याला बळि वगैरे देऊन संतुष्ट करतात. [फोकलो. नॉ. इं.]

आयला भास्कर (१४ वें शतक) तेलंगणांतला एक कवि. याने केतुमथन नामक ग्रंथाचें तेलुगु भाषेंत श्लोकबद्ध भाषांतर केलें आहे. या ग्रंथाचीं दोन प्रकरणें असून त्यांत युगकल्पादि काल, ऋतुपर्याय, पर्जन्य, पर्वत, नद्या, देश, जलप्रलय इ. विषयांचें विवेचन आहे. [ते. वा.]

आयव्यय व्यक्तीच्या जन्मराशीवरून प्रत्येक वर्षाचा आयव्यय काढण्याची पद्धत आहे. सूर्यसंक्रांतीचा स्वामी व वर्षस्वामी यांवर हे आयव्यय अवलंबून असतात. त्यांत प्रत्येक ग्रहाची एक ठराविक संख्या मानलेली असते. रवि ६, चंद्र १५, मंगळ ८, बुध १७, गुरु १९, शुक्र २१ व शनि १० अशी त्या त्या ग्रहाची संख्या आहे. त्यावरून आयव्यय काढतांना आपला राशिस्वामी व संक्रांतीचा स्वामी या दोघांच्या संख्येची बेरीज करून तिला ३ या संख्येने गुणतात. मग त्यांत ५ मिळवून त्या संख्येस १५ नी भागतात. जी बाकी राहील, तो त्या राशीचा आय होय. भागाकाराला २ या संख्यने गुणून त्यांत ५ मिळवून १५ नी भागल्याने जी बाकी राहील, तो त्या राशीचा व्यय होय.

आयागपट्ट जैन मंदिरांतून एखाद्या फरशीवर जिनमूर्ति कोरून त्या फरशीचा चौरंगाप्रमाणे पूजेसाठी



आयागपट्ट – मथुरा

उपयोग करतात, त्याला आयागपट्ट अशी संज्ञा आहे. [जै. इ.]


आयु काण्व ऋग्वेदांतील एका सूक्ताचा द्रष्टा. (८.५२).

आयुध 'आयुधं तु प्रहरणम्' = प्रहार करण्याचें साधन म्हणजेच शस्त्र (अमर). सर्व प्रकारची युद्धसामग्री असाहि त्याचा व्यापक अर्थ होतो. ऋग्वेदांत धनुष्य व बाण या दोन आयुधांचा प्रामुख्याने उल्लेख असून त्या आयुधांवर विलक्षण विश्वासहि व्यक्त केला आहे (ऋ. ६. ७५). जसजसा वैदिक आर्यांचा सांस्कृतिक व वैज्ञानिक विकास होत गेला, तसतशी आयुधांच्या प्रकारांत भर पडत गेलेली दिसते. महाभारत व पुराणें यांत अनेक आयुधांचीं नांवें व त्यांचे भिन्नभिन्न उपयोग दिलेले आढळतात.

विश्वांतल्या सर्व प्राणिमात्रांत संरक्षणात्मक व आक्रमणात्मक अशा उभयविध प्रवृत्ति दिसतात. प्रत्येक प्राण्याचे अवयवहि याच प्रवृत्तींना अनुरूप असे निर्माण झाले आहेत; कांही अवयवांनी ते स्वतःचें संरक्षण करतात. उदा० नाक, कान, डोळे, पापण्या, हात व त्वचा. कांही अवयवांनी ते दुसऱ्यावर आक्रमण करतात. उदा० दांत, नखें, शिंगें, कुसें, पाय इत्यादि.

माणूस आपल्या विकासाच्या उषःकालांत आपल्या अवयवांनीच आयुधांचें काम भागवीत होता. पशूंप्रमाणेच तोहि दांत, नखें, लाथ व हात यांचा आक्रमणाच्या कामीं उपयोग करीत होता. जसजसा त्याच्या बुद्धीचा विकास होऊं लागला तसतसा त्याने लढाईचा नवा ढंग निर्माण केला. शत्रूवर दुरून वार करणें व शिरस्त्राण, कवच इ. साधनांनी शत्रूच्या शस्त्रास्त्रांपासून स्वतःचें संरक्षण करणें, या गोष्टी त्याने शोधून काढल्या. काठी, दगड, मुद्गर, मुसळ इ. नवीन प्रहारसाधनें त्याने निर्माण केलीं. तो एकटें राहायचें सोडून समूहाने राहूं लागला. एक व्यक्ति दुसऱ्या एकटया व्यक्तीला भिडण्याऐवजी एक समूह दुसऱ्या समूहाशीं टक्कर देऊं लागला. शत्रूवर दरड कोसळून घालणें, वृक्ष उन्मळून पाडणें, अशा अचाट कृत्यांनी मानवसमूह आपल्या शत्रूंचा धुव्वा उडवूं लागले. मारुतीने वृक्ष व गिरिशिखर उपटून त्यांच्या द्वारें राक्षसांचा संहार केल्याचे उल्लेख रामायणांत आहेत (वा. रा. ६. ४३). भीमसेनाचींहि वृक्षयुद्धें महाभारतांत अनेक ठिकाणीं वर्णिलीं आहेत.


मानवसमाज सुधारणेच्या युगाकडे जसजसा प्रगत होऊं लागला तसतसें त्याला लोखंड, तांबें इ. धातूंचें ज्ञान झालें व त्याने त्रिशूल, भाला, बरची, तलवार, कटयार, कुऱ्हाड, कुदळ इ. आक्रमणकारी आयुधें निर्माण केलीं. त्याचप्रमाणे स्वतःच्या संरक्षणासाठी ढाल, वर्म, कवच, शिरस्त्राण, हृदयत्राण, अंगुलित्राण, पादत्राण इ. साधनें शोधून काढलीं. या बरोबरच तो नेमबाजींतहि प्रवीण होऊं लागला. तिरंदाजीबरोबरच गोफणींत दगड घालूनहि शत्रूला हैराण करूं लागला.



(१) पादत्राण (२) हस्तत्राण (३) वक्षत्राण (४) शिरस्त्राण

पुढच्या युगांत, विशेषतः महाभारत कालांत, त्याने अनेक प्रकारच्या यंत्रांचाहि विकास केला. शतघ्नी (तोफ), तैलगुडवालुयंत्र, आशीविषधरयंत्र, शालभिंदिपाल इ. या युगांतलीं उल्लेखनीय यंत्रें होत. ज्यांच्या द्वारें आग, पाणी आणि वादळी हवा निर्माण करून शत्रूला जेरीस आणतां येईल अशीं अनेक अस्त्रें महाभारतांत दिसतात. त्या काळांत आयुधांचे मुख्यतः दोन प्रकार दिसतात–(१) प्रहार करणारीं आयुधें व (२) प्रहारापासून संरक्षण करणारीं आयुधें. प्रहारक आयुधांत पुढील प्रकार होते–(१) कापणारीं शस्त्रें. उदा० परशु, तलवार इ. (२) चूर करणारीं शस्त्रें. उदा० मुद्गर, गदा, मुसळ व घण. (३) शरिरांत घुसणारीं शस्त्रें. उदा० कटयार, सुरी इ. (४) दुरून शरिरांत घुसणारीं शस्त्रें. उदा० भाला, शूल,

शक्ति इ. (५) दुरून फेकण्याने शत्रूचा वध करणारीं शस्त्रें. उदा० बाण, ध्वंसकारी यंत्रें व अस्त्रें.



प्राचीन तोफा

भारतीय देवतासुद्धा विरोधी शत्रूशीं व शक्तीशीं झगडतांना दिसतात. यासाठी दैवतशास्त्रांत विशिष्ट देवतांच्या विशिष्ट आयुधांची कल्पना केलेली आहे. उदा० शिवाचा त्रिशूल, विष्णूचें सुदर्शन, वरुणाचा पाश, गणपतीचा अंकुश इत्यादि. हीं आयुधें त्या त्या देवतांच्या अव्यक्त शक्तींचीं व्यक्त प्रतीकें होत. म्हणून देवतांबरोबरच त्यांच्या आयुधांचेंहि ध्यान-पूजन केलें जातें. जैन व बौद्ध हे हिंसाविरोधी खरे; पण त्यांच्या देव-देवताहि आयुधसज्ज असतात. [हिं. वि. को.]

आयुधपुरुष दैवतशास्त्रांत विविध देवतांना ज्या प्रमाणे मानवी रूपें देण्यांत आलीं, त्याचप्रमाणे त्यांच्या



आयुध पुरुष (सुदर्शनचक्र)

हातांतल्या आयुधांनाहि मानवरूपें देऊन त्यांच्या मूर्ती बनविण्याची प्रथा मध्ययुगीन काळापासून सुरू झालेली दिसते. विष्णूच्या हातांतील शंख, चक्र, गदा, पद्म यांच्या मानवी मूर्ती झाल्या असून त्यांना 'आयुधपुरुष' हें नांव मिळालें आहे. मध्ययुगीन वैष्णव शिल्पांत या मूर्ती आढळतात. मूर्तिकलेच्या साहित्यांत वज्र, शक्ति, खड्ग, त्रिशूळ इ. आयुधांचें मानवरूप वर्णिलेलें आढळतें; पण तशा मूर्ती मात्र क्वचितच पाहायला मिळतात. आयुधपुरुषाचें अतिप्राचीन चित्रण इंडो-सिथियन काळांत झालेलें आढळतें. त्या काळच्या कांही ताम्रमुद्रांवर वज्रमानवाचें चित्र असून इंद्राने त्याच्या मस्तकावर हात ठेवला आहे. अशा मूर्तीच्या मागे किंवा मस्तकावर जें विशिष्ट आयुध दिसतें, त्याच आयुधाची ती मूर्ति समजतात. देवगढ येथील 'अनंतशयन' शिल्पांत चक्र, शंख, धनुष्य इ. आयुधांच्या मूर्ती आहेत. बंगालमध्ये शरिशदह येथे एक चक्रपुरुषाचें शिल्प सांपडलें आहे. त्यांत गरुडाच्या खांद्यावर एक चक्र असून त्याच्या मध्यभागीं एक चतुर्भुज मानवमूर्ति नृत्य करीत आहे. **पाहा** – चक्रपुरुष. [डे. हिं. इ.]

आयुधव्रत श्रावणापासून चार महिने वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध यांची प्रतीकें म्हणून श्रीविष्णूच्या शंख–चक्र–गदा–पद्मांची पूजा करणें हा याचा विधि आहे. [विष्णु ध. पु. ३·१५५]

आयुर्दा शाकद्वीपांतील एक नदी. [भाग. पु. ५·२०·२६]

आयुर्वेद आयुर्वेद म्हणजे दीर्घायुष्यासंबंधीं विचार करणारा वेद होय. याची व्याख्या अशी–'तत्रायुर्वेदयतीत्यायुर्वेदः ......यतश्चायुष्याण्यनायुष्याणि च द्रव्यगुणकर्माणि वेदयत्यतोऽप्यायुर्वेदः' = जो आयुष्याचें ज्ञान करवितो, तो आयुर्वेद होय......तसेंच जो आयुष्याला हितप्रद व हानिकारक अशीं द्रव्य–गुण–कर्में समजावून सांगतो, तो आयुर्वेद होय (च. सू. ३०·३३). याला अथर्ववेदाचा उपवेद मानतात. काय, शल्य, शालाक्य, बाल, ग्रह, विष, रसायन व वाजीकरण अशीं आयुर्वेदाचीं आठ अंगें आहेत. आयुर्वेदाच्या सर्व संहिता व संग्रहग्रंथ यांत ब्रह्याला आयुर्वेदाचा आदिप्रवक्ता म्हटलें आहे—

स्वयंभूर्ब्रह्मा प्रजाः सिसृक्षुः प्रजानां
परिपालनार्थमायुर्वेदमेवाग्रेऽसृजत्...... ।

(काश्यपसंहिता, विमानस्थान)

अर्थ – प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा करणाऱ्या स्वयंभू ब्रह्याने प्रजांच्या परिपालनासाठी प्रथम आयुर्वेदच निर्माण केला. ब्रह्याने आयुर्वेदाची लक्ष श्लोकात्मक एक संहिता लिहिली.

तिचें नांव ब्रह्मसंहिता होतें. ही संहिता उपलब्ध नाही. परंतु त्याने उपदेशिलेले सोळांहून अधिक योग अद्यापहि आयुर्वेद ग्रंथांत सापडतात. चंद्रप्रभावटी, ब्राह्मी तेल व ब्राह्मरसायन, हे त्यांपैकी तीन होत. ब्रह्मदेवाने आपली ही विद्या दक्ष प्रजापति व भास्कर यांना दिली. दक्षाच्या आयुर्वेदविषयक परंपरेंत सिद्धान्ताला; तर भास्कराच्या परंपरेंत चिकित्सापद्धतीला प्राधान्य होतें. दक्ष प्रजापतीकडून अश्विनीकुमारांनी समग्र आयुर्वेदाचें अध्ययन केलें.

अमृत मिळविण्यासाठी ओषधी निवडून काढणें व योग्य स्थानीं त्यांची निपज करणें, हें अश्विनीकुमारांचें विशेष कार्य होय. यासाठी क्षीरसागराच्या (कॅस्पियन समुद्र) भोवतीचा चंद्रपर्वत त्यांनी पसंत केला होता.

द्वितीयः पर्वतश्चन्द्रः सर्वौषधिसमन्वितः ।
अश्विभ्याममृतस्यार्थे ओषध्यस्तत्र संस्थिताः ।।
(वायु पु. ४९)

अर्थ– (क्षीरसागराभोवतीच्या चार पर्वतांपैकी) दुसरा पर्वत चंद्र नामक असून त्यावर सर्व प्रकारच्या ओषधी होत्या. अश्विनीकुमारांनी अमृतप्राप्तीसाठी त्या तिथे लावल्या होत्या.

अश्विनीकुमारांनी वृद्ध च्यवन ऋषीला आपल्या चिकित्सेने तारुण्य प्राप्त करून दिलें, ही कथा सर्वविश्रुतच आहे. त्यांनी आयुर्वेदावर ग्रंथरचनाहि केली आहे. हे ग्रंथ उपलब्ध नाहीत; पण आश्विनसंहिता, चिकित्सासारतंत्र, अश्विनीकुमारसंहिता या त्यांच्या ग्रंथांचे इतर ग्रंथांतून उल्लेख आढळतात.

अश्विनीकुमारांनीच इंद्राला आयुर्वेद शिकविला. इंद्राची आयुर्वेदाविषयींची रचना उपलब्ध नाही. परंतु त्याचें ऐंद्रिय रसायन, सर्वतोभद्र, दशमूलाद्य तैल व हरीतक्यलेह, हे योग प्रसिद्ध आहेत. इंद्राने भृगु, अंगिरा, अत्रि, वसिष्ठ, कश्यप, अगस्त्य, पुलस्त्य, वामदेव, असित व गौतम या दहा ऋषींना आयुर्वेदाचें ज्ञान करून दिलें. भृगु चिकित्साप्रवीण होता. अत्रि हा महान् आयुर्वेदज्ञ होता. कश्यपाची आयुर्वेदविषयक संहिता वृद्धजीवकीयतंत्र या नांवाने प्रसिद्ध आहे. कश्यपाने यांत सिद्धयोग सांगितले आहेत. अगस्त्याने भिषक्क्रियाविषयक द्वैधनिर्णयतंत्र लिहिलें आहे. नावनीतक व चिकित्सासारसंग्रह यांत अगस्त्याचे कांही योग उद्धृत केले आहेत. वामदेवानेहि आयुर्वेदसंहिता लिहिली होती. गदनिग्रहांत याच्या एका योगाचा उल्लेख आहे. गौतमाचा आयुर्वेदविषयक ग्रंथ उपलब्ध नाही; परंतु 'माधवनिदाना'चा व्याख्याकार विजयरक्षित याने गौतमाच्या वचनांचा उल्लेख केला आहे. चरकसंहितेंत सांगितलें आहे, की लोककल्याणाच्या आकांक्षेने ऋषींनी भरद्वाजाला आपला प्रतिनिधि म्हणून इंद्राकडे पाठविलें व इंद्राने त्याला आयुर्वेदाचा उपदेश केला (सूत्रस्थान १). त्यानंतर सर्व ऋषींनी हा आयुर्वर्धक वेद भरद्वाजाकडून शिकून घेतला.

इंद्राकडून मिळविलेलें ज्ञान भरद्वाजाने तंत्ररूपांत निबद्ध केलें, असें भावप्रकाश सांगतो (१·१५). याशिवाय भेषजकल्प व भारद्वाजीय प्रकरण हेहि त्याचे ग्रंथ हस्तलिखित रूपांत मद्रास येथील ग्रंथभांडारांत आहेत.

भरद्वाजाकडून द्वितीय धन्वन्तरीने भिषक्क्रियेसहित आयुर्वेदाचें ज्ञान प्राप्त करून घेतलें. नंतर त्याने आयुर्वेदाचें अष्टांगांत विभाजन केलें व तो शिष्यांना शिकविला. या धन्वंतरीला 'सर्वरोगप्रणाशन' व 'आयुर्वेदप्रवर्तक' अशा पदव्या आहेत. त्याने शल्यशास्त्राचा प्रसार केला. सन्निपातकलिका, धातुकल्प, रोगनिदान, वैद्यचिंतामणि, धन्वन्तरि निघंटु, इ. ग्रंथ याने लिहिले आहेत.

भरद्वाजाचाच दुसरा शिष्य म्हणजे पुनर्वसु आत्रेय. चरकसंहितेंत सांगितलें आहे, की पुनर्वसु आत्रेय हा महान् जिज्ञासु होता. अनेक ऋषींना बरोबर घेऊन तो ओषधी वनस्पतींची पाहणी करीत हिमालयांत हिंडत असे. अनेक ठिकाणीं संचार करीत असतांनाच तो शिष्यांना ज्ञानदान करीत असे (बावर हस्तलेख). आत्रेयाचें तें एक हिंडतेंफिरतें आयुर्वेद विद्यालयच होतें. चरकसंहितेंत पुनर्वसु आत्रेयाला जीं अनेक विशेषणें दिलीं आहेत, त्यांत भिषग्विद्याप्रवर्तक असें एक विशेषण आहे. भिषग्विद्या याचा अर्थ इथे कायचिकित्सा असा आहे. पुनर्वसूचा सहाध्यायी धन्वन्तरि याने भिषक्क्रिया म्हणजे शल्यतंत्र हस्तगत केलें; तर पुनर्वसूने भिषग्विद्येचा पुरस्कार केला. अग्निवेश, भेल, जतूकर्ण, पराशर, हारीत व क्षारपाणि असे आत्रेयाचे सहा प्रमुख शिष्य होते. त्या सर्वांनी एकाच काळीं अध्ययन केलें. नंतर प्रत्येकाने स्वतः ग्रंथरचना केली. मग अनेक ऋषींची व आचार्यांची सभा भरली. सर्व शिष्यांनी रचलेलीं तंत्रें त्या सभेंत वाचून दाखविण्यांत आलीं. सर्व ऋषींनी तीं सम्मत केल्यावर मगच तीं प्रसिद्ध करण्यांत आलीं. या सर्व तंत्रांत अग्निवेशाचें तंत्र विशेष प्रसिद्ध झालें.

याशिवाय आत्रेयाच्या अध्यक्षतेखाली आणखी तीन वादसभा झाल्याचा उल्लेख चरकसंहितेंत आहे. आत्रेयाने स्वतः आयुर्वेदविषयक संहिता लिहिली होती, तिचीं हस्तलिखितें उपलब्ध आहेत.

अग्निवेश हा सूक्ष्म बुद्धीचा होता. त्याचें तंत्र अष्टांगात्मक असून कायचिकित्साप्रधान होतें. याशिवाय त्याने नाडीपरीक्षा, अग्निवेश्यहस्तिशास्त्र या नांवाचे ग्रंथहि लिहिले आहेत.

आत्रेयाचा दुसरा शिष्य भेल. भेलाचा पाठभेद भेड असा आहे. भेडाची संहिता छापलेली आहे. पराशर भेलाचा सम-

कालीन होता. पराशराचें आयुर्वेदीय तंत्र कायचिकित्साप्रधान होतें. वाग्भटाने पराशरतंत्र पाहिलें होतें. पराशराने आपल्या तंत्रांत आर्याछंदाचा उपयोग केला आहे. पराशराच्या हस्त्यायुर्वेद, गोलक्षण, वृक्षायुर्वेद, कृषिशास्त्र, या ग्रंथांचा अन्य ग्रंथकारांनी उल्लेख केला आहे.

जतूकर्ण हा आत्रेयाचा आणखी एक शिष्य होय. त्याची जतूकर्णसंहिता कायचिकित्सापर होती. हा ग्रंथ सध्या उपलब्ध नाही.

हारीत ऋषि हा सम्राट् मांधात्याच्या वंशांतील चौथा पुरुष होता. हारीताची आयुर्वेदीय संहिता कायचिकित्सापर होती. याशिवाय त्याचा 'चिकित्साशास्त्रसंग्रह' नांवाचा ग्रंथहि आहे. हारीताचे बारा योग गिरींद्रनाथांनी उद्‌धृत केले आहेत. आत्रेयाचा सहावा शिष्य क्षारपाणि. याने कायचिकित्सापर एक तंत्र लिहिलें आहे.

चरकसंहितेंत (सू. ३०·२८) आयुर्वेदाचें ज्या क्रमाने वर्णन केलें आहे, त्यांत दुसरें अंग शालाक्य हें आहे. ऊर्ध्वजत्रुगत म्हणजे नाक, कान, घसा इ. रोगांच्या चिकित्सेंत शलाकेचा उपयोग होत असे, म्हणून त्याला शालाक्य असें नांव पडलें. इंद्राचा शिष्य निमि याने शालाक्यतंत्राचें विस्तृत ज्ञान लोकांना प्रथम उपलब्ध करून दिलें, म्हणून त्याला आद्यभिषक् असें नांव मिळालें आहे.

रामायण व पुराणें यांतील वंशावळी तपासतां निमि हा विदेह राज्याचा संस्थापक होता, असें कळतें. जनक हा निमीचा नातू होय. आयुर्वेदाच्या तंत्रांत निमीचें शालाक्यतंत्र प्रमाण मानलें जातें. हें समग्र तंत्र सध्या उपलब्ध नसलें, तरी त्यांतील वचनें अन्य ग्रंथांत उद्‌धृत केलेलीं आढळतात.

निमीचा शिष्य कराल. हा शालाक्यतंत्रकार असून चरकसंहितेंतील अक्षिरोगप्रकरणांत करालतंत्राचाच आधार घेतलेला आहे. नेत्ररोग शहाण्णव प्रकारचे आहेत, असें कराल सांगतो.

यानंतरचा शालाक्यतंत्रकार शौनक होय. कांही यालाच भद्रशौनक असें म्हणतात; तर कांही शौनक व भद्रशौनक या व्यक्ती भिन्न मानतात. भद्रशौनकाचा आयुर्वेदविषयक ग्रंथ होता. शौनकाचें तंत्र प्रसिद्ध होतें.

काङ्कायन हा आणखी एक शालाक्यतंत्रकार. हा बाल्हीक देशाचा निवासी असून त्या देशांतील श्रेष्ठ वैद्य होता. याचे अनेक शिष्य होते.

गार्ग्याने धन्वन्तरीपासून शल्यशास्त्राचें अध्ययन करून शालाक्यतंत्राची रचना केली. याशिवाय गालव व सात्यकि यांनीहि शालाक्यतंत्राची रचना केली आहे.

आयुर्वेदाचा तिसरा भाग शल्यचिकित्सा हा होय. मानवलोकांत सर्वप्रथम दिवोदास धन्वन्तरीने शल्यचिकित्सेचा प्रसार केला. धन्वन्तरीचे सात मुख्य शिष्य होते. सुश्रुत हा त्यांपैकीच एक होय. तो विश्वामित्राचा पुत्र होता, असे सुश्रुतसंहितेंत सांगितले आहे (चि. २·३). सुश्रुत हा ऋषि असून शालिहोत्राचा पुत्र होता, असें शालिहोत्रसंहितेच्या प्रारंभीं लिहिलें आहे, हें दुसरें मत. यावरून कदाचित् दोन सुश्रुत असावे, असेंहि वाटते. सुश्रुताच्या शिष्यांना सौश्रुत म्हणत असत. धन्वंतरीकडून मिळविलेलें शल्यमूलक आयुर्वेदज्ञान सुश्रुताने सुश्रुतसंहितेंत संग्रहीत केलें. हा ग्रंथ अजूनहि उपलब्ध आहे. सुश्रुत, वृद्धसुश्रुत व लघुसुश्रुत हे बहुधा सुश्रुतसंहितेचेच तीन पाठ असावे.

याशिवाय औषधेनव, औरभ्र, पौष्कलावत हे धन्वंतरीचे शिष्य असून त्यांनी ग्रंथरचना केली आहे. करवीर्य, गोपुररक्षित, वैतरण, भोज, भालुकि, दारुक, हे सर्व सुश्रुताच्या नंतर झालेले भिषक् असून त्यांचीहि ग्रंथरचना आहे.

अष्टांग आयुर्वेदाच्या पहिल्या तीन अंगांच्या आचार्यांची माहिती दिल्यावर 'कौमारभृत्या' च्या आचार्य परंपरेचा उल्लेख करणें आवश्य आहे. कौमारभृत्याचा प्रसिद्ध आचार्य जीवक याने प्रजापति कश्यपाकडून या तंत्राचें ज्ञान मिळविलें. जीवक हा भृगुवंशी ऋचीकाचा पुत्र होय. काश्यप संहितेंत या जीवकाविषयीं पुढील माहिती दिलेली आहे--

महर्षि कश्यपाने ब्रह्मदेवाच्या आज्ञेनुसार ज्ञानचक्षूंनी पाहून कुमारतंत्राची रचना केली. ऋचीकपुत्र जीवक याने हें महान् तंत्र ग्रहण केलें व त्याचा संक्षेप केला. परंतु लहान मुलाचा उपदेश म्हणून इतर मुनींनी त्याचा स्वीकार केला नाही. तेव्हा पांच वर्षांच्या जीवकाने सर्वांसमक्ष कनखल येथे गंगाद्वारांत बुडी मारली व दुसऱ्याच क्षणीं तो श्वेतकेशश्मश्रुयुक्त होऊन बाहेर आला. तें पाहून सर्व ऋषींना आश्चर्याचा धक्का बसला व त्यांनी त्या मुलाचें नांव वृद्धजीवक असें ठेवलें.

काश्यपसंहिता किंवा वृद्धजीवकीयतंत्र हा त्याचा ग्रंथ प्रजापति कश्यपाचा उपदेश या स्वरूपांत जीवकाला प्राप्त झाला व वात्स्याने या तंत्राचें प्रतिसंस्करण केलें. दुसरा एक कौमारभृत्याचार्य म्हणजे रावण. त्याचें कुमारतंत्र, बालतंत्र, बालचिकित्सा, नाडीपरीक्षा, अर्कप्रकाश, उद्देशतंत्र हे ग्रंथ उपलब्ध आहेत. याशिवाय पार्वतक व बंधक या दोन कौमारभृत्याचार्यांचा सुश्रुतव्याख्याकार डल्हण याने उल्लेख केला आहे.

भूतविद्या हेंहि एक आयुर्वेदाचें अंग आहे. तन्मात्रांचा दुसरा सर्ग हा भूतसर्ग आहे (म. भा. शांति. २८०·२० नीळकंठी टीका). पंचतन्मात्रांचें कार्य जें सूक्ष्म तत्त्व त्याला भूत असें म्हणतात. प्राकृतिक नियमांच्या उल्लंघनाने सूर्यचंद्रादिकांचा

सूक्ष्म प्रभाव मनुष्यशरीरांतील तन्मात्रांवर पडतो व त्या वेळीं अनेक रोग उत्पन्न होतात, असें चरक सांगतो (नि. ७·१३).

आयुर्वेदांत अगद शब्दाला पारिभाषिक अर्थ प्राप्त झाला आहे. आचार्य डल्हणाने अगदतंत्राची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे–

अगदो विषप्रतिकारस्तदर्थं तन्त्रम् अगदतन्त्रम् ।

अर्थ – विविध विषांच्या शमनाचे उपाय सांगणारे तंत्र, तें अगदतंत्र होय.

काश्यप, उशना व बृहस्पति हे तिघेहि अगदतंत्राचे आचार्य होते. यांशिवाय आलंबायन हाहि एक अगदतंत्रज्ञ होता. याचा काल भारतीय युद्धाच्या अगोदरचा असावा. सुश्रुतसंहितेच्या कल्पस्थानावरील डल्हणच्या व्याख्येंत जागोजाग आलंबायनाचीं वचनें उद्‌धृत केलेलीं आहेत. याशिवाय दारुवाह किंवा नग्नजित् व आस्तीक हेहि अगदतंत्राचे विशारद होते.

आयुर्वेदाचें सर्वांत प्रभावी अंग म्हणजे रसतंत्र होय. या रसतंत्रांत अनेक आयुष्ययोग उद्‌धृत केलेले आहेत. सुश्रुतसंहितेंत रसायनतंत्राची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे—

रसायनतन्त्रं नाम वयःस्थापनमायुर्मेधाबलकरं रोगापहरणसमर्थं च ।

(सू. १·७)

अर्थ– रसायनतंत्र हें (शंभर किंवा त्याहून जास्त वर्षें) आयुष्य देणारें, बुद्धि-बल वाढविणारें व रोगाचा अपहार करणारें आहे.

अनेक ऋषि योगबल व रसायनबल यांच्या योगाने दीर्घायु बनले आहेत. शिव हा रसतंत्राचा प्रधान आचार्य होय. भृगु, अगस्त्य व वसिष्ठ हेहि रसतंत्राचार्य होते. यांच्या पश्चात् आचार्य मांडव्याचें रसतंत्रांत विशेष स्थान आहे. याशिवाय व्याडि, पतंजलि, नागार्जुन, हेहि रसतंत्रकार होते. नागार्जुनाने लोहशास्त्र, रसरत्नाकर, कक्षपुटम्, आरोग्यमंजिरी, योगसार, रसेन्द्रमंगल, रतिशास्त्र, रसकच्छपुट, सिद्धनागार्जुन असे या शास्त्रावर ग्रंथ लिहिले आहेत.

याशिवाय ‘ अष्टांगसंग्रह ’ कार वृद्ध वाग्भट, ‘अष्टांगहृदय’ कर्ता वाग्भट, ‘ रुग्विनिश्चय ’ किंवा ‘माधवनिदान’ याचा कर्ता माधवकर, चक्रपाणिदत्त, वंगसेन, मिल्हण, बोपदेव, लोलिंबराज, सुरेश्वर, नरहरि, मदनपाल, पृथ्वीमल्ल, विश्वनाथसेन, मोरेश्वर इ. अनेक आयुर्वेदाचे ग्रंथकार होऊन गेले.

हिताहितं सुखं दुःखमायुस्तस्य हिताहितम् ।
मानं च तस्य यत्रोक्तमायुर्वेदः स उच्यते ।।

(चरक सू. १·४१)

अर्थ–हितायु, अहितायु, सुखायु, दुःखायु अशा चार प्रकारच्या आयुष्याचें हित, अहित व प्रमाण ज्यांत सांगितलें आहे, त्याला आयुर्वेद असें नांव आहे.

आयुर्वेदाचें स्वास्थ्यानुवृत्तिकर व रोगच्छेदकर असे दोन भाग व हेतु, लक्षणें व औषधिविज्ञान असे तीन स्कंध आहेत. म्हणून त्याला त्रिस्कंध आयुर्वेद असें म्हणतात. यांत शरिराचा विचार पुढीलप्रमाणे केलेला आहे–

तत्र शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं
पंचमहाभूतविकारसमुदायात्मकम्

(चरक शा. ६)

अर्थ – शरीर म्हणजे चेतनतत्त्वाला अधिष्ठान असलेली व पंचमहाभूतांच्या अनेक विकारांनी युक्त असलेली वस्तु होय.

देह, इंद्रियें, मन व आत्मा मिळून शरीर बनतें. या चारींच्या संयोगाला जीवित किंवा आयुष्य अशी संज्ञा आहे. ‘पंचमहाभूतविकारसमुदायात्मक’ तें स्थूल शरीर व ‘ चेतनाधिष्ठानभूत’ तें सूक्ष्म शरीर होय. सचेतन परमाणु हाच शरीरावयवांचा शेवटचा भाग असून त्याचें स्वरूप अतिसूक्ष्म व अतींद्रिय आहे. तसेंच हे परमाणूहि अनेक आहेत. इथपर्यंत आधुनिक शास्त्रें व आयुर्वेद यांचें सामान्यतः साम्य आहे. परंतु हे परमाणु स्वतंत्र नसून कर्मस्वभावाला धरून त्यांचें संयोग-विभाग होतात, असें मानणें हें आयुर्वेदाचें वेगळेपण आहे. मन हें स्वतंत्र, अणु व द्रव्य आहे, अशी आयुर्वेदाची धारणा आहे. विचार करणें, तर्क करणें, बाह्यज्ञानावरून निश्चय करणें, स्वतःचा व इंद्रियांचा निग्रह करणें इ. मनाचीं कर्मे होत. शरिरांतील स्वयंस्फूर्त चेतना हा आत्म्याचा गुण आहे. शरिरांतील पंचमहाभूतें व शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हीं पांच तन्मात्रें मिळून शरिरांतील ‘ पंचमहाभूतद्रव्यगुणसंग्रह ’ होतो. मन, त्याचा विषय, बुद्धि व आत्मा हा ‘ अध्यात्मद्रव्यगुणसंग्रह ’ होय.

माणसाने भक्षण केलेल्या अन्नापासून सजीव कण बनतात. व त्या कणांचे शरिरांत तीन स्थूल धातू बनतात. हे त्रिधातु म्हणजे वायु, पित्त व कफ हे होत. हे धातू शरिराचे मुख्य आधार असून ते शरीरव्यापी असतात व शरिराचें धारण पोषण करतात.

शरीरधातूनां प्रकृतिभूतानां तु खलु वातादीनां फलमारोग्यम् ।

(चरक श. ६)

अर्थ – शरिरांतील प्रकृतिभूत वातादि धातूंचे फल म्हणजेच आरोग्य होय.

त्रिधातू देहाचें धारण करतात, म्हणून त्यांना धातू अशी संज्ञा आहे (धारणाद् धातवः). धातू चित्परमाणूंत आहेत व बाहेरहि आहेत.

एकपेशीमय प्राण्यांच्या शरिरांतील चलन, वलन, पचन, उत्सर्ग वगैरे काय त्यांच्या लहानशा शरिरांतील त्रिधातूंमुळे

लहान अवकाशांत होतात. अनेकावयवी प्राण्यांत या त्रिधातूंची कार्यें निरनिराळ्या अवयवांतून घडतात. प्रत्येक परमाणूंत हे तीन्ही धातू असले तरी ते स्थानभेदाने असतात. त्यांचे प्रत्येकीं पांच भेद आहेत.

त्रिधातूंच्या साम्यावस्थेवर शरीरस्वास्थ्य अवलंबून आहे. ते विकृत झाले, तर शरीर विकृत होतें. ते समस्थितींत असले, की शरीरहि निरोगी राहतें. त्रिधातू समस्थितींत असतांनाच त्यांना धातु ही संज्ञा आहे. त्यांच्यात वैषम्य निर्माण झालें, की त्यांनाच दोष असें म्हणतात (दूषणाद् दोषाः). धातुक्रिया सुरू असतां दोष उत्पन्न होतच असतात; परंतु शरिरांतील साम्यप्रवृत्तीमुळे तें वैषम्य लगेच नाहीसें होत असतें. म्हणून कांही शास्त्रज्ञ धातु व दोष हे दोन शब्द समानार्थी वापरतात व त्रिधातूंनाच त्रिदोष असेंहि म्हणतात.

दोष वाढून त्यांचा प्रकोप झाला, की त्यांना किंवा शरीरव्यापारांत उत्पन्न होणाऱ्या निरुपयोगी द्रव्यांना मल अशी संज्ञा आहे (मलिनीकरणान्मलाः). म्हणून त्यांनी शरिराची दुसरी व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे— 'दोषधातुमलमूलं हि शरीरम्' = दोष, धातु व मल एतन्मूलक तें शरीर होय.

'साम्यं प्रकृतिरुच्यते' = धातुसाम्याला प्रकृति म्हणतात. धातुसाम्य असलें म्हणजे शरीर स्वस्थ, निरोगी राहतें व धातुवैषम्य उत्पन्न झालें, की तें विकृत होतें, या उपपत्तीवर आयुर्वेदांतील इंद्रियविज्ञान, स्वस्थवृत्त, रोगविज्ञान व चिकित्सादि शास्त्रें उभारलेलीं आहेत. 'धातुसाम्यक्रिया प्रोक्ता तंत्रस्यास्य प्रयोजनम्' = धातुसाम्यक्रिया हें चिकित्साशास्त्राचें प्रयोजन होय, असें आयुर्वेदाने मानलें आहे.

धातुसाम्य कसें टिकवावें, याचा विचार स्वास्थ्यानुवृत्तिकर शास्त्रांत केला आहे. धातुवैषम्य किंवा रोग कसा होतो, कोणत्या कारणांनी होतो व तीं नष्ट करून धातुसाम्य कसें प्रस्थापित करावें, याचा विचार आयुर्वेदाने विस्तृत रीतीने केला आहे.

असात्म्येन्द्रियार्थसंयोगः प्रज्ञापराधः
परिणामश्चेति त्रिविधं रोगकारणम्

(चरक नि. १)

अर्थ – असात्म्येंद्रियार्थसंयोग, प्रज्ञापराध, व परिणाम हीं तीन रोगांचीं कारणें होत.

असात्म्य म्हणजे न सोसलेलें, न मानवलेलें. शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पांच इंद्रियार्थ होत. इंद्रियार्थाचें ग्रहण आभ्यंतर इंद्रियाच्या योगाने होतें. परंतु आभ्यंतर इंद्रियाशीं मनाचा संयोग असेल, तरच इंद्रियार्थ ग्रहण होतो. नेहमीच्या संवयीने जें मानवतें किंवा सोसतें, तें सात्म्य व जें संवयीचें नसतें, तें असात्म्य होय. म्हणजे शरीरस्वास्थ्य हें नेहमीच्या खाणेंपिणें, आचारविचार इ. सवयींवर अवलंबून असतें. शरिरावयवांच्या साहाय्याने इंद्रियें कार्य करतात व इंद्रियार्थांचें ग्रहण करतात. यांचे अतियोग म्हणजे अतिमात्र सेवन, विपरीत सेवन व अल्प सेवन यांमुळे त्रिधातूंच्या व्यापारांत व मनोव्यापारांतहि वैषम्य उत्पन्न होतें आणि तिथून मग रोगोत्पत्तीला प्रारंभ होतो.

प्रज्ञापराध म्हणजे जाणूनबुजून आपल्या मानसिक भावनेच्या विरुद्ध वर्तन करणें. याचा परिणाम प्रथम मनावर व नंतर शरिरावर होतो. साहस, अतिस्त्रीसंग, दुरुत्तरें करणें, हीं त्यांचीं उदाहरणें होत.

तिसरें कारण परिणाम. दोषाचे चय, प्रकोप व प्रशम हे ऋतु, रात्र, दिवस यांमधील शीतोष्णादि फरकाने होत असतात. दोषांत वैषम्य उत्पन्न होतें. त्यांची स्वस्थानीं वाढ होणें म्हणजे चय, स्वस्थानांतून ते उन्मार्गगामी झाल्याने प्रकोप व दोषांचें दुष्टत्व कमी होणें म्हणजे प्रशम होय. पावसाळा, उन्हाळा व हिंवाळा या निरनिराळ्या ऋतूंत दोषांच्या चयादि निरनिराळ्या अवस्था संभवतात. याशिवाय विष, गर, कृमि वगैरे बाह्य कारणेंहि रोग उत्पन्न करतात.

रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र हे सात स्थूल धातु किंवा दूष्यें होत. त्रिधातूंच्याच योगाने ते उत्पन्न होतात व व्यवस्थित राहतात. दोषत्व प्राप्त झाल्यावर हेच दुष्ट होतात. म्हणून त्यांना दूष्यें अशी संज्ञा आहे. या दूष्यांत जंतूंची वाढ होते, त्यालाच रोग असें म्हणतात. अशा प्रकारें आयुर्वेदाने देहदोष व मनोदोष ह्यांची समता राखण्याची उपपत्ति शोधून काढून ती व्यवहारांत आणली आहे. रोगबीजें ज्या क्षेत्रांत वाढतात, तें क्षेत्र रोगबीजें वाढायला निरुपयोगी कसें होईल, याचाच विचार आयुर्वेद प्रामुख्याने करतो. आयुर्वेदाचे आचार्य रोगबीजांच्या मागे लागले नाहीत. शरीर स्वस्थ व समधातुमय असलें, की त्यावर रोगबीजांचा कांही परिणाम होत नाही, असा त्यांचा निर्वाळा आहे.

रोगाचीं लक्षणें अत्यंत बारकाईने पाहून, दोषवैषम्याचा ठाम निश्चय करून रोगाची परीक्षा करावी व नंतर औषधोपचार करावा, असें आयुर्वेदाने सांगितलें आहे. ही रोगचिकित्सा दोन प्रकारची आहे. दोषांच्या अनुरोधाने औषधयोजना करणें ही दोषप्रत्यनीक चिकित्सा आणि व्याधि ठरवून तदनुरोधाने विपरीत चिकित्सा करणें, ही व्याधिप्रत्यनीक चिकित्सा होय. व्याधीचा निश्चय करतांनासुद्धा तिचें मूळ कारण जे दोष, त्यांचा प्रथम विचार करावाच लागतो. म्हणून आयुर्वेदाने दोषप्रत्यनीक चिकित्साच मुख्य मानलेली आहे.

याभिःक्रियाभिर्जायन्ते शरीरे धातवः समाः ।
सा चिकित्सा विकाराणां कर्म तद्भिषजां स्मृतम् ॥
(चरक सू. १६. ३४)
त्यागाद्विषमहेतूनां समानां चोपसेवनात्
विषमा नानुबध्नन्ति जायन्ते धातवः समाः ॥
(चरक. सू. १६.३६)

अर्थ – ज्या क्रियांच्या योगाने शरिरांत धातुसाम्य प्रस्थापित होईल, त्या क्रियांचें नांव चिकित्सा व तेंच वैद्यांचें कर्म होय.

विषम हेतूंचा त्याग व साम्योत्पादक साधनांचें सेवन या योगाने वैषम्योत्पादन न होतां व त्यांचा अनुबंध न टिकतां शरिरांत धातुसाम्य प्रस्थापित होतें.

दोष व दोषसंयोग यांच्या विचारानंतर दूष्यांचा म्हणजे रसरक्तादि धातूंचा विचार चिकित्सेच्या वेळीं करावा लागतो. धातूंचे कोणते गुण वाढले आहेत व ते कोणत्या दूष्यांत स्थिरावले आहेत, याचा निश्चय करावा लागतो. याशिवाय रोग्याचें बल, काल, हवामान, प्रकृति, वय, मनोरचना, आहार इ. गोष्टींचाहि सूक्ष्म विचार चिकित्सेच्या आधी करावा लागतो. अशा प्रकारची चिकित्सा कधीहि निष्फळ होणार नाही, असा आयुर्वेदाचा सिद्धान्त आहे.

चिकित्सेचे द्रव्यभूत व अद्रव्यभूत असे दोन प्रकार आहेत. औषधें, आहार, बस्ती, शस्त्रें, यंत्रें इत्यादींच्या साहाय्याने केलेली चिकित्सा ती द्रव्यभूत चिकित्सा होय. आयुर्वेदांत द्रव्यांचे कितीतरी कल्प सांगितलेले आहेत. स्वरस, हिम, फांट, काढा, आसवें, घृतें, तैलें, क्षार, सत्त्वें, भस्में, गुटिका, वटिका, सिद्धरसायनें इत्यादि. आयुर्वेदांत या द्रव्य चिकित्सेचा विस्तार फार मोठा आहे. आश्वासन, सूचना, मंत्र, चोळणें, त्रास देणें, भय दाखविणें, लंघन करविणें, ही अद्रव्यभूत चिकित्सा होय.

औषधें देतांना उत्तान दोष, गंभीर दोष, तिर्यग्गत दोष, वगैरेंचा विचार करून औषधांचें लहान-मोठें प्रमाण ठरवावें लागतें. औषध घेण्याच्या वेळाहि निरनिराळ्या म्हणजे जेवणांत, जेवणानंतर, वारंवार, अनशा पोटीं, सकाळीं, सायंकाळीं इ. दहा दिलेल्या आहेत. दोषदूष्यादिकांचा विवेक करूनच या वेळा ठरविल्या आहेत.

अंतःस्रावक पिंडांच्या विकृतीपासून उत्पन्न होणाऱ्या विकारांत त्या त्या ग्रंथींचे कल्प करून देण्याची आजच्या वैद्यकाची वहिवाट आहे. आयुर्वेदाने त्या बाबतींतहि कांही गुणकारी औषधें शोधून काढलीं आहेत. आरोग्यवर्धिनी, पूर्ण चंद्रोदय, सुवर्णराजवंगेश्वर, पुष्पधन्वा, वसंतकुसुमाकर वगैरे औषधें याच वर्गापैकी होत. आयुर्वेदांतील व्रणशोधन व व्रणरोपण योग हे गुणकारी असल्याबद्दल आधुनिक विद्वानांनीहि त्यांची प्रशंसा केलेली आहे.

नाडीविज्ञान हें आयुर्वेदाचें खास वैशिष्टय आहे. अरबदेशांतील लोकांच्या शिवाय जगांत कुठल्याहि वैद्यकशात्रांत नाडीविज्ञान आढळत नाही. अरबांनीहि ही विद्या भारतीयांपासूनच ग्रहण केली आहे. मनुष्याची नाडी पाहून त्याच्या रोगाचा पूर्व इतिहास व त्याची सद्यःस्थिति जाणणें, हें काम भारतीय वैद्यच करूं शकतात.

आयुर्वेदाने शरिराचा साकल्याने विचार केलेला आहे. त्याला शरिराच्या रुग्ण स्थितीचाहि सर्व बाजूंनी विचार करतां येतो. शरीर सेंद्रिय, सजीव धातूंच्या योगाने चालतें व तें त्यांच्या दोषांनी विकृत होतें. शरिरांत उत्पन्न झालेली विकृति दूर करून धातुसाम्य प्रस्थापित करण्यासाठी दोषधर्म नाहीसे करून धातुगुण प्रस्थापित करावे लागतात. एकदा धातुसाम्य प्रस्थापित झालें, की शरीर निरोगी होतें. धातु सेंद्रिय असल्याने सेंद्रिय द्रव्यांनी व मानसिक व्याधींत मनाच्या प्रसन्नतेने धातुसाम्य प्रस्थापित होतें. हें धातुसाम्य चिकित्सेंतील मर्म होय. आणि म्हणूनच आयुर्वेदास आयुष्याचें विज्ञान अथवा धातुसाम्यकर वैद्यक म्हणतात. [आ. इ.; वे. शा. दी.; पू. म. भा.]

आयुर्व्रत (१) एक शिवव्रत. विष्णूच्यापुढे शिवलिंग रेखाटून पूजा करणें, हा याचा विधि आहे. व्रतावधि एक वर्ष. धेनु व जलकुंभ यांचें दान. फल – सर्वकामसिद्धि. [मत्स्य पु. १००·२२]

(२) शंभु व केशव या देवतांना वर्षभर चंदनाचें गंध लावणें व जलपात्रासह गोप्रदान.

(३) पौर्णिमेस विष्णु – लक्ष्मीची पूजा, उपवास व ब्राह्मणसुवासिनींना वायनदान. [हे. व्र. २·२२७]

आयुष्कामेष्टि आयुष्यवृद्धीसाठी करायच्या इष्टी. या अनेक आहेत. प्रजापतीसाठी १०० कृष्णल (सोन्याचे लहान तुकडे) यांचा याग करावा, असें आप. श्रौतसूत्रांत सांगितलें आहे (१९·२१·१). अग्नि, सोम, वरुण, सरस्वती व अग्नाविष्णू यांच्यासाठी दुसरी एक इष्टि आहे. रोगजर्जर पुरुषाने रोगमुक्तीसाठी ही इष्टि करायची असते (तै. सं. २.३·११). या प्रसंगी एका खैराच्या पात्रांत आज्य भरून त्यांत कर्णभूषण टाकतात. यजमान त्याचें अवलोकन करतो. प्रधान यागानंतर ब्रह्मा तें भूषण पात्रांतून बाहेर काढतो. सर्व ऋत्विज ब्रह्म्याच्या हाताला स्पर्श करतात. तो तें भूषण यजमानास देतो. मग आशीर्वादमंत्र म्हणतात. हें

कर्णभूषण शंभर भारांचें किंवा जितकीं वर्षे जगण्याची इच्छा असेल, तितक्या भारांचें करतात. या सर्व इष्टींचें तंत्र दर्शपूर्णमासाप्रमाणे असतें. [विद्याधरशास्त्री भिडे]

आयुष्मंत एक देवगण. यांची संख्या १४ आहे. [ब्रह्मांड पु.४.१.१२२].

आयुष्मत्य सूर्यापासून उत्पन्न झालेला एक अप्सरांचा गण. [पु. इं.]

आयुष्य जातकर्मांतला एक विधि. यांत मुलाच्या नाभीवर किंवा उजव्या कानांत दीर्घायुष्यमंत्र म्हणतात. ते म्हणत असतांना मुलाच्या तोंडांत मध व तूप घालतात. अग्नीला आहुती देऊन 'अग्ने आयुरसि' हा अनुवाक म्हणतात. **पाहा**—जातकर्म. [आश्व. गृ. सू.; मानव गृ. सू.; हि. ध.]

आयुष्यहोम 'यो ब्रह्मा ब्रह्मण' या धृतसूक्तीने केलेल्या होमाला हें नांव आहे. [सं. कौ.]

आयुःसंक्रांतिव्रत काम्यव्रत. याचा विधि पुढीलप्रमाणे— सूर्यसंक्रांतीच्या दिवशीं सूर्याची पूजा व कांस्यपात्रांत दूध, तूप व सुवर्ण घालून त्याचें दान. दान-मंत्र असा—

सत्क्षीरं सुरभीजातं पीयूषं समर्सापयुक् ।
आयुरारोग्यमैश्वर्यं मह्यं दद्यात् द्विजार्पितम् ।।

वर्षअखेर उद्यापन करतात. फल – शतायुष्याचा लाभ. [व्रतराज; व्रतार्क]

आरंग रायपूरपासून २२ मैलांवर हें शहर असून इथे एक प्राचीन जैन मंदिर आहे. हिंदु देवतांचींहि अनेक मंदिरें आहेत. त्यांपैकी महामायेचें मंदिर ११ ते १२ व्या शतकांत निर्माण झालेलें असावें. कारण त्या काळांत रायपूर जिल्ह्यांत शैव तांत्रिकांचा फार प्रभाव होता. शंकराच्या तंत्रमान्य स्वरूपाच्या मूर्तींचे अवशेष इथे बरेच आढळतात. सांप्रतहि नवरात्रांत कांही साधक इथे साधना करतांना दिसतात. [खं. वै.]

आरजु (१६७१–१७२३ इ. स.) संपूर्ण नांव सिराजुद्दीन अलिखान आरजु. फारसी भाषेचा नामांकित कवि. याचे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. याशिवाय याने सिराजुल्लुकात, चिरागे हिदायत, शरह गुलिस्ताने सादी, शरह सिकंदरनामा, असे आणखीहि ग्रंथ लिहिले आहेत. याने बरेच शिष्य तयार केले व उर्दू भाषेची सुधारणा केली. [क. कौ. ४]

आरट्ट एक प्राचीन देश. पंजाबांतल्या पांच नद्या व सिंधु यांच्या मधल्या प्रदेशाला हें नांव होतें (म. भा. कर्ण. ४३.७). या देशांतले लोक धर्मबाह्य व अपवित्र असतात, म्हणून आर्यांनी तिथे दोन दिवससुद्धा राहूं नये, असें कर्णपर्वांतच म्हटलें आहे (४४.४०).

आरणघाटा बंगालमधील नडिया जिल्ह्यांत राणाघाटापासून तीन कोसांवरचें एक क्षेत्र. चूर्णी नदी याला लागून वाहते. इथे जुगलकिशोर देवाचें मंदिर असून हें एक पवित्र स्थान मानलें गेलें आहे. [हि. जॉ. ए. इं.]

आरण्य चाक्षुषमन्वन्तरांतील एक प्रजापति. [पु. इं.]

आरण्यकें वैदिक वाङ्मयांतला एक विभाग. निर्जन अरण्यांत निवास करून ऋषि–मुनींनी जें गंभीर तत्त्वचिंतन केलें व तदनुसार जे ग्रंथ निर्मिले, त्या वाङ्मयाला आरण्यकें असें म्हणतात. अरणें असेंहि म्हणायचा प्रघात आहे. आरण्यकें म्हणजे वानप्रस्थाश्रमांत अरण्यवासी असतांना अध्ययन करण्याचे ग्रंथ होत, असें सायणाचार्य सांगतात—

अरण्ये एव पाठ्यत्वादारण्यकमितीर्यते ।

(ऐ. आ. भाष्य)

आरुणेय उपानिषदांत सांगितलें आहे, की वानप्रस्थांत वेदांपैकी आरण्यकें व उपनिषदें यांचेंच अध्ययन करावें. विद्यार्थ्यांना आरण्यकांची संथा देते वेळीं ती गांवांत न देतां अरण्यांतच देत असत. सांप्रतहि यांचें अध्यापन एखाद्या देवळांतच करतात.

याशिवाय आरण्यकांच्या अरण्यांत अध्ययनाचें आणखी एक स्पष्टीकरण ज्ञानकोशांत दिलें आहे ––

"यज्ञसंस्थेमध्ये दृष्ट होणारी प्रवर्ग्य संस्था यज्ञाशिवायहि होत असे, पण ती घरीं न करितां गांवाबाहेर, विशेषेंकरून अरण्यांत व्हावी, असा परिपाठ असे. त्या प्रवर्ग्य संस्थेचें विवेचन ब्राह्मणांऐवजी आरण्यक वाङ्मयांत असतें. अरण्यांत म्हणजे गांवाबाहेर होणाऱ्या विधींचा ग्रंथ आरण्यक होय."

वेदकालीन यज्ञसंस्थेचा ब्राह्मणकालांत अफाट विस्तार झाला. यज्ञांतल्या कर्मकांडाची क्लिष्टता व जटिलता याज्ञिकांनी कमालीची वाढविली. पण याच काळांत असा एक वैदिकांचाच वर्ग होता, की त्याला या कर्मकांडांत रस वाटत

नसे. हा वर्ग यज्ञसंस्थेपासून अलिप्त होऊन अरण्यांत राहत असे. अशा अरण्यवासी ऋषि-मुनींनी विजनवास पत्करून यज्ञाच्या मूलभूत रहस्याचें चिंतन सुरू केलें. त्यांत बाह्यकर्मापेक्षा नैतिक व मानसिक उपासना हीं श्रेष्ठ होत, असें त्यांना कळून आलें. त्यामुळे स्वर्गप्राप्तीपेक्षा आत्मप्राप्तीकडे त्यांचें मन वळलें. केवळ यज्ञाचाच नव्हे; तर सृष्टयुत्पत्ति, जीवात्मा, परमात्मा, जन्म, मृत्यु, पुनर्जन्म इ. अनेक विषयांचा त्यांनी तात्त्विक व नैतिक विचार सुरू केला. त्यांतून जें एक नवें चिंतनप्रधान वाङ्मय निर्माण झालें, तींच हीं आरण्यकें होत. आरण्यकांचा विषय यज्ञ हा नसून यज्ञांतर्गत आध्यात्मिक तथ्यांची मीमांसा हा आहे; यज्ञीय अनुष्ठान हा नसून तदंतर्गत दार्शनिक विचार हा आहे.

कालदृष्टया आरण्यकांची रचना ब्राह्मणांच्या नंतर व उपनिषदांच्या पूर्वी झाली असावी. म्हणून त्यांना ब्राह्मण-ग्रंथांच्या पुरवण्या असें समजतात. श्रौतविधींचा जो भाग ब्राह्मणांत स्पष्ट झाला नसेल, तो आरण्यकांत विवेचिला आहे. पण आरण्यकांतल्या एकंदर विवेचनावरून पाहतां तीं ब्राह्मणां-पेक्षा उपनिषदांनाच अधिक जवळचीं वाटतात.

आरण्यक वाङ्मय वेदांगें व ब्राह्मणें यांचें संयोजक आहे. गृह्यसूत्रांत सांगितलेलीं किंवा तत्सदृश अशीं अन्य नित्यकर्मे आरण्यकांत सांगितलीं आहेत (तै. आ. २. ११). यांत उच्चारविषयक कांही नियमहि दिलेले आहेत (ऐ. आ. २. २). त्यावरून शिक्षा विषयाचें पूर्वस्वरूप आरण्यकांत दिसून येतें. वेदांगांत अंतर्भूत न होणारे परंतु तदुत्तर वाङ्मयांत दिसणारे शकुन, अपशकुन इ. विचारहि यांत आढळतात.

आरण्यकांत यज्ञसंस्थेपैकी महाव्रत, उख्य, पितृमेध, अरुण-केतुचयन इ. याज्ञिक विषयांचें विवरण आलेलें आहे. पण यज्ञाच्या आधिदैविक व आध्यात्मिक स्वरूपाचें विवेचन हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. त्यांत यज्ञाचा रहस्यात्मक व प्रतीका-त्मक अर्थ सांगितलेला आहे. आरण्यकांतील वाक्यरचना सरळ, संक्षिप्त व क्रियाबहुल आहे. त्यांचा बाह्य यज्ञापेक्षा मानसिक यज्ञावर विशेष भर आहे. यज्ञाची दार्शनिक व्याख्या यांत आढळते. यज्ञ हा विश्वाचा नियंता असून चराचराचें कल्याण करणारा आहे, अशी आरण्यकांची धारणा आहे. सकाम कर्म व कर्मफल यांच्याविषयीं तिथे श्रद्धेचा भाव नाही. कर्ममार्ग हाच केवळ आत्यंतिक सुखाचा मार्ग नव्हे; त्याला ज्ञानमार्गाची जोड मिळाली पाहिजे, अशी आरण्यकांची विचारसरणी आहे. लोकांची केवळ बाह्यकर्मांतली रुचि व श्रद्धा कमी करून ती मानसिक उपासनेकडे वळविणें, हें आरण्यकांचें क्रांतिकारक कार्य होय.

सांप्रत उपलब्ध असलेलीं आरण्यकें पुढीलप्रमाणे आहेत —

ऋग्वेद –– ऐतरेय व शांखायन (कौषीतकी).

शुक्ल यजुर्वेद –– माध्यंदिन बृहदारण्यक व काण्व बृहदारण्यक.

कृष्ण यजुर्वेद –– तैत्तिरीय आरण्यक. मैत्रायणी शाखेच्या मैत्र्युपनिषद् या ग्रंथालाहि मैत्रायणी आरण्यक असें म्हणतात (वै. सा).

सामवेद — तलवकार आरण्यक. सामवेदांतल्या आर्चिकांचा अवलंब करून गायिल्या जाणाऱ्या विभागालाहि छांदोग्या-रण्यक असें म्हणतात. पण हें इतर आरण्यकांहून सर्वथा भिन्न आहे.

अथर्ववेद –– याचें एकहि आरण्यक उपलब्ध नाही.

बृहदारण्यकांत संन्यासाचें विधान फार सुंदर रीतीने सांगितलें आहे ––

एतमेव विदित्वा मुनिर्भवति । एतमेव प्रव्राजिनो लोक-मिच्छन्तः प्रव्रजन्ति । एतद्ध स्म वै तत्पूर्वे विद्वांसः प्रजां न काम-यन्ते । किं प्रजया करिष्यामो येषां नो ऽयमात्माऽयं लोक इति ते ह स्म । पुत्रैषणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च व्युत्थायाथ ब्रह्मचर्यं चरन्ति ।

(बृह. ४. ४. २२)

अर्थ — याच आत्म्याला जाणून मुनि होतो. ब्रह्मलोकाची इच्छा करणारे संन्यास ग्रहण करतात. पूर्वकाळचे विद्वान् प्रजेची कामना करीत नव्हते. 'आम्हाला प्रजा मिळवून काय करा-यचें आहे ! आम्हाला हा आतमा व हा लोकच इष्ट आहे,' असें ते म्हणत. म्हणूनच पुत्र, धन व कीर्ति यांच्या एषणेचा त्याग करून भिक्षा मागत (व तिच्यावर निर्वाह करीत).

प्राणविद्येचें प्रतिपादन हा आरण्यकांचा एक विशेष विषय आहे. प्राणविद्येचें महत्त्व सांगतांना आरण्यकें ऋग्वेदांतल्या मंत्रांचा उद्धार करतात (ऋ. १. १६४. ३१, ३८). त्या-वरून त्या विद्येच्या दीर्घकालीन परंपरेचा बोध होतो. ऐ. आरण्यक प्राणांची श्रेष्ठता सांगतांना म्हणतें––

सोऽयमाकाशः प्राणेन बृहत्या विष्टब्धः तद्यथा यमाकाशः प्राणेन बृहत्या विष्टब्ध एवं सर्वाणि भूतानि आपिपीलिकाभ्यः प्राणेन बृहत्या विष्टब्धानीत्येवं विद्यात् ।

(ऐ. आ. २. १. ६)

अर्थ — प्राण या विश्वाचा धारक आहे. प्राणशक्तीनेच हें आकाश जसें स्वस्थानीं स्थित आहे, त्याचप्रमाणे सर्वांत मोठ्या प्राण्यापासून तों कीडमुंगीपर्यंत समस्त जीव या प्राणाने विधृत आहेत.

जितक्या ऋचा, जितके वेद व जितके घोष आहेत, ते

सर्व प्राणरूप आहेत. या प्राणाचीं हीं भिन्न भिन्न रूपें व गुण जाणून त्या त्या रूपानें त्याची उपासना केली पाहिजे.

अशा प्रकारें उपनिषदांतल्या कित्येक आध्यात्मिक तत्त्वांचा संकेत आरण्यकांत झालेला दिसतो. वैदिक तत्त्वमीमांसेच्या इतिहासांत आरण्यकांना महत्त्वाचें स्थान आहे. [क. हे. इं.; वै. सा. सं.; म. ज्ञा. को.]

आरती (सं. आर्तिक्य.) आरती शब्द देशी किंवा द्राविडी असावा (म. व्यु. को.). तबकांत नीरांजनें प्रज्वलित करून किंवा पंचारतींत अनेक वाती पाजळून त्या देवाभोवती ओवाळणें याला आरती करणें, असें म्हणतात. यावेळीं आरती नांवाचा गीतप्रकार घंटा, झांज वगैरे वाद्यें वाजवून म्हणतात. आरतींत त्या त्या देवतेची स्तुति असते आणि तिच्याकडे मंगलाची आणि ऐश्वर्याची कामना केलेली असते. 'सुखकर्ता दुखहर्ता' ही गणपतीची, ' लवथवती विक्राळा ' ही शंकराची, 'दुर्गे दुर्घट भारी' ही देवीची, ' युगें अठ्ठावीस ' ही पांडुरंगाची, ' आरती ज्ञानराजा ' ही ज्ञानेश्वराची इ. आरत्या महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत.

पूर्वीं राजेमहाराजे, विजयी सेनापति व विद्वान पंडित यांनाहि आरत्या ओवाळीत. भुताखेतांची किंवा माणसांची दृष्ट बाधूं नये म्हणून ही प्रथा निर्माण झाली. देवाच्या आरतींतहि हाच हेतु असतो. मंगल कार्यांत वधूवरांना व मुंज्या मुलालाहि आरती ओवाळतात. दिवाळीच्या सणांत पाडव्याच्या दिवशीं पत्नी पतीला व भाऊबीजेच्या दिवशीं बहीण भावाला आरती ओवाळते. देवाची आरती पूजा करणारा करतो व इतरांची आरती सुवासिनी स्त्रिया किंवा देवदासी करतात.

लिंगायत लोकांत, पुरुषाचें प्रेत घरांत असेपर्यंत त्याची पत्नी त्याच्या तोंडाभोवती आरती ओवाळते. त्याचा आत्मा भूतयोनींत प्रविष्ट होऊं नये, म्हणून हा विधि असतो. अग्निमंथनाकरिता अरणि सिद्ध करण्यासाठी अग्निहोत्री जेव्हा अश्वत्थाच्या फांद्या तोडतो, तेव्हा आरती ओवाळून त्या अश्वत्थाला तो आपला कठोरपणा विसरायला सांगतो. याशिवाय नवीन विहीर खोदण्याच्या जागेवर, शिवरात्रीला बिल्ववृक्षाभोवती, मुलाच्या बारशाच्या, वाढदिवसाच्या व उष्टावणाच्या दिवशीं त्याला आरती ओवाळण्याची प्रथा आहे. आरतींत सर्व प्रकारची शक्ति सामावलेली असतें, असा समज आहे. आरतींतलें नीरांजन ताम्हनांतून पडलें व त्याची ज्योत विझली, तर घरांतल्या कोणत्यातरी माणसाचा मृत्यु ओढवतो, अशीहि समजूत आहे. तसें झालें तर संभाव्य अरिष्टाच्या निवारणासाठी दीपपतनशांति करतात.

वधूवरांना ओवाळल्या जाणाऱ्या आरतीला कुर्वंडी करणें, असें म्हणतात. या कुर्वंडीचें एक गाणें पुढे दिलें आहे –

रत्नखचित रुक्मपात्र । मुक्तें जडिलीं खणावाणी ।
तयांमाजी कोटी दीप । निशी फांके खणाबाणी ।
श्रीकृष्ण रखुमिणि । ओवाळीते पतिव्रता ।
देवांगना वऱ्हाडिणी । कुर्वंडी वधूवरां ॥ १ ॥
शिवशक्ति साकारल्या । यादव कृष्णाबाई ।
करवल्या दोघीजणी । द्रौपदी सुभद्रा बहिणी ।
वऱ्हाड छपन्न कोटी । पांडव जांवई ॥ २ ॥

आरभट प्राचीन काळचा एक देश. हा देश निश्चित कोणत्या ठिकाणीं आहे, तें अजून समजलेलें नाही. परंतु ग्रीक भूगोल-लेखकांनी सिंधूच्या पश्चिमेला व बलुचिस्तानच्या दक्षिण भागांत ' आरबिटाई ' किंवा ' आर्बिटी ' नांवाच्या ज्या जातीचा उल्लेख केला आहे, त्या लोकांचें वास्तव्य असलेला देशच प्राचीन आरभट देश असावा. त्या देशांत अर्बियस नदी वाहत होती. या देशांतील नृत्यपद्धतीला आरभटी असें नांव असून तींत भारतीय रास व यवनी हल्लीसक यांचा मिलाफ झाला आहे. बाणभट्टाने लिहिलें आहे, की आरभटी नृत्यशैलीचा आविष्कार करणारे नर्तक केस मोकळे सोडून नाचत असतात (चटुलशिखानर्तनारम्भारभटीनटाः). आजहि बलुची व कबायली लोक केस मोकळे सोडून व डोक्याला व शरिराला जोरजोराने झटके देऊन नृत्य करतात. [ह. च. सां. अ.]

आरभटी नाट्याभिनयाची एक शाखा. हिची व्याख्या पुढीलप्रमाणे–

मायेन्द्रजालसङ्ग्रामक्रोधोद्भ्रान्तादिचेष्टितैः ।
संयुक्ता वधबन्धाद्यैरुद्धतारभटी मता ॥

अर्थ – माया, इंद्रजाल, युद्ध, क्रुद्ध व भ्रमिष्ट माणसाच्या लीला, वध इ. घटना रंगमंचावर दाखविल्या जातात, त्यांना आरभटी असें नांव आहे. [सं. इं. डि.]

आरंभवाद कार्यसंबंधी न्यायशास्त्राचा सिद्धान्त. कारणापासून कार्याची उत्पत्ति होत असते. उत्पत्तीच्या पूर्वीं कार्य असत नाही. जर कार्य हें उत्पत्तीच्या पूर्वीं असतें, तर उत्पादनाची गरज नव्हती. पुष्कळशी कारणसामग्री एकत्र येऊन कोणत्यातरी पूर्वीं असत् असलेल्या कार्याच्या निर्मितीचा आरंभ करते, असा न्यायशास्त्राचा सिद्धान्त आहे. यालाच आरंभवाद असें म्हणतात. याच्या उलट सत्कार्यवादी दर्शनांत

उत्पत्तीच्या पूर्वीं कार्य हें सत् मानलें जातें. कार्याची उत्पत्ति म्हणजे त्याची केवळ अभिव्यक्ति होय, असें सत्कार्यवादी मानतात, पण न्यायदर्शनाला उत्पत्तीपूर्वीं कार्याची स्थिति मानणें, हें हास्यापद वाटतें. नैयायिक म्हणतात, की जर तेल पूर्वींच विद्यमान असेल तर तिळांचें मर्दन करण्याची आवश्यकताच काय ? तिळ पाण्यांत घालून तेल काढणें याचा अर्थच असा, की तेल त्यापूर्वीं नव्हतें. उपभोगयोग्य तेल पूर्वीं नव्हतें, तिळ पाण्यांत घालून रगडल्यावर मगच त्याची उत्पत्ति झाली. म्हणून न्यायशास्त्राच्या मतें कार्य नेहमीच आपल्या कारणांतून नवीन निर्माण होतें.

आरसा आदर्श व काच हे शब्द संकृत वाङमयांत प्राचीन काळापासून रूढ आहेत. यावरून आरसा तयार करण्याची रीत भारतीयांना फार प्राचीन काळापासून माहीत असावी, असें दिसतें. प्राचीन काळीं धातूंचा पत्रा गुळगुळीत करून त्यांत आपलें प्रतिबिंब पाहत असावे, असें वाटतें. पण काचेचे आरसे निश्चित कोणत्या काळीं वापरांत आले, त्याबद्दल मात्र विश्वसनीय माहिती मिळत नाही.

कौषीतकी उपनिषदांत 'एष आदर्शे पुरुषस्तमेवाहमुपासे'= आरशांतल्या या पुरुषाची मी उपासना करतों, असा आरशाचा उल्लेख आलेला आहे (४.११). इ. स. च्या प्रारंभीं उत्तर भारतांत धातूचे आरसे असत, असें मिलिंदपन्हांतील उल्लेखावरून वाटते (४. १. ६०). यापुढील वाङमयांत आरशाचा उल्लेख वारंवार येतो.

संस्कृतसाहित्यांत व लोकसाहित्यांत आरेशांचे अनेक उल्लेख आहेत. अप्सरा व नायिका हातांत आरसा घेऊन प्रसाधन करीत असल्याचीं चित्रें व मूर्ती सांपडतात. वेणी व प्रसाधन यांसाठी आरसा ही अत्यंत आवश्यक वस्तु आहे. प्राचीन उत्खननांत तीन आरसे मिळाले आहेत. त्यांतला एक कांस्याचा व अंडाकार आहे

कुमारसंभवांत शिवाने पार्वतीला एक मणिदर्पण दिल्याचा उल्लेख कालिदासाने केला आहे –

प्रियेण दत्ते मणिदर्पणे सा
सम्भोगचिह्नं स्ववपुर्विभाव्य ।
त्रपावती तत्र घनानुरागं
रोमाञ्चदम्भेन बहिर्बभार ।।

(६. २९)

अर्थ – प्रियकराने दिलेल्या मणिदर्पणांत आपल्या शरिरावर उमटलेलीं संभोगचिन्हें पाहून पार्वतीची काया लज्जेने पुलकित झाली व त्या प्रकारावरून तिचें शिवावर किती प्रगाढ प्रेम होतें, तें व्यक्त झालें.

आरशांत माणसाचें जें प्रतिबिंब दिसतें तो माणसाचा आत्मा होय, अशी एक समजूत आहे. **पाहा** – प्रसाधन. [डॉ. मोतीचंद्र; प्रा. भा. प्र.; म. ज्ञा. को.]

आराकु आंध्रांत विशाखापट्टम्पासून सत्तर मैलांवर आराकु खोरें वसलेलें असून समुद्रसपाटीपासून त्याची उंची ३००० फूट आहे. खोऱ्यांत जागोजागीं धबधबे व नद्या आढळतात. या खोऱ्यांत विविध टोळचांचे सुमारें ३५००० आदिवासी राहतात. त्यांनाहि आराकु म्हणतात.

यांचीं घरें मातीचीं पण बिनखिडक्यांचीं असतात. घराचें छप्पर बांबू व गवत यांचें असतें. विस्तव पेटविण्यासाठी ते दोन काठ्या एकमेकांवर घासतात. त्याला अड्डा म्हणतात. ते पितळेचीं भांडीं वापरतात. थंडीच्या दिवसांत घरांत रात्रभर शेकोटी पेटवून ठेवतात.

शेती हा आराकूंचा मुख्य व्यवसाय आहे. बहुतेकांच्या स्वतःच्या मालकीच्या जमिनी आहेत. ज्यांच्या जवळ जमीन नाही, ते शेतमजुरी करतात. हल्ली या भागांत समाजविकास योजनेचें कार्य सुरू झाल्याने आराकूंना मुबलक काम मिळतें.

नाचणी व भात हें त्यांचें मुख्य अन्न होय. शिवाय ते मांसाहारी असल्याने त्यासाठी शेळ्या, कोंबड्याहि पाळतात. आराकु निरागस व साधे असतात. त्यांच्यामध्ये गुन्हेगारी प्रवृत्ति आढळत नाही. भांडणें सामोपचाराने किंवा पंचायत भरवून सोडवितात. अपराध्याला दंड करतात. दंडाचे पैसे चैनींत खर्च करतात. प्रत्येक गांवांत एक नाईक असतो. त्याचें गांवावर मोठें वजन असतें व त्याची आज्ञा सहसा कोणी मोडीत नाही.

आराकु आदिवासींतील मुलीचें लग्न साधारणतः सोळाव्या वर्षीं होतें. हल्लीं तरुण-तरुणीं आपापलीं लग्नें स्वतःच ठरवितात. पूर्वीं विवाहेच्छु मुलगा मुलीच्या आईबापांकडे जाऊन त्यांना दारूचें एक भांडें भेट देत असे. त्यावरून आईबापांना समजे, की या तरुणाला आपल्या मुलीशीं लग्न करायचें आहे. हल्लींचीं लग्नें आठवड्याच्या मेळाव्यांत ठरतात. प्रेमबद्ध तरुण-तरुणी एक दिवस जंगलांत जाऊन राहतात व मग घरीं परततात. यानंतर तीं दोघें विवाहबद्ध झाल्याचें जाहीर करतात. हा एक प्रकारचा गांधर्व विवाहच होय. हे जातिभेद पाळतात. त्यांच्यांत आंतरजातीय विवाह होत नाहीत. हुंड्याची चाल नाही. बहुपत्नीकत्वाची पद्धत आहे. लग्न पुरोहित चालवितो. लग्नांतल्या जेवणावळींत 'जिलुगू काल्' या गांवठी दारूचा उपयोग करतात. आराकूंचें हें आवडतें

पेय असून जिलुगू नांवाच्या वृक्षापासून तें तयार करतात.

प्रत्येक खेड्यांत एक पुरोहित असतो. त्याच्याजवळ पंचांग असतें. त्याला थोडेसें ज्योतिषाचें व वैद्यकाचेंहि ज्ञान असतें.

आराकु आदिवासी जंगलांत राहत असल्याने ते फारसे कपडे वापरीत नाहीत. पुरुष लंगोटी नेसतात व स्त्रिया अंगाभोवती साडी गुंडाळतात. हल्ली कांही स्त्रिया चोळी घालूं लागल्या आहेत. स्त्रिया पितळेचे किंवा ॲल्युमिनियमचे दागिने घालतात. त्यांच्या गळ्यांत 'कांते' नांवाची एक धातूची सरी असते.

आराकु आदिवासींत हिंदूंशिवाय ख्रिश्चन व जैन धर्माचेहि लोक आहेत. प्रत्येकाचे सण वेगवेगळे असले तरी 'चैत्री' सण मात्र सार्वजनिक आहे. हा सण महिनाभर चालू असतो. शिकार हें या सणाचें वैशिष्ट्य होय. जो जास्त शिकार करतो, तो हुषार ठरत असल्यामुळे त्यांच्यांत शिकारीची चुरस लागते.

आराकु हे संगीत व नृत्य यांचे शौकीन आहेत. त्यांना जवळजवळ बारा नृत्यें अवगत आहेत. रोज रात्रीं त्यांचा कसला ना कसला तरी नाचगाण्याचा कार्यक्रम असतोच. त्यांना नाटकाचीहि आवड असून 'गोपीलीला', 'सोसी सेना' या नांवांचीं लोकनाट्यें ते करतात. नृत्यांत स्त्रिया व पुरुष दोघेहि भाग घेतात. आराकूंचें सर्वांत सुंदर नृत्य म्हणजे मयूर-नृत्य होय. मोराचीं पिसें पागोट्यांत खोचून पुरुष हें नृत्य करतात. नृत्याच्या वेळीं मोर आणि लांडोर यांच्या प्रेमावर आधारलेलीं गीतें गातात. [इलस्ट्रेटेड वीकली]

आराख उ. भारतांतील एक द्रविड जात. हे लोक शेतकरी व शेतमजूर आहेत. यांपैकी बरेचसे लोक संयुक्त प्रांतांत राहतात. हे देवीचे भक्त आहेत. देवीच्या बलिदानाच्या वेळीं ते ब्राह्मण पुरोहिताला बोलावितात. मध्यभारतांतील या जातीचे लोक 'कर्तलदेव' या नांवाने सर्पदेवतेची पूजा करतात.

आराट्टु केरळांत देवाच्या उत्सवाच्या शेवटच्या दिवशीं देवाला मिरवणुकीने तलावावर स्नानासाठी नेतात. त्या समारंभाला हें नांव आहे. [सुभद्रा तम्पुरान]

आराधना जैन मुनिधर्मावरील एक ग्रंथ. यापनीय संप्रदायाच्या शिवार्य नामक आचार्याने हा ग्रंथ रचला असून तो शौरसेनी प्राकृतांत आहे. त्यांत एकूण २१७० गाथा असून सम्यग् दर्शन, सम्यग् ज्ञान, सम्यक् चरित्र व सम्यक् तपरूप या चार आराधनांचें वर्णन आहे.

अमितगतीने या ग्रंथाचा संस्कृत अनुवाद केला असून त्याला आराधना हेंच नांव दिलें आहे. [जै. सा. इ.]

आराधी महाराष्ट्रांतील एक अल्पसंख्य जात. वास्तविक हा एक पंथ आहे. ब्राह्मणांपासून अंत्यजापर्यंत हिंदु-अहिंदूंचा यांत प्रवेश झालेला आहे. एखाद्याला मूल होत नसलें, तर तो देवीला नवस करतो, की 'मूल झाल्यास तें मी तुला अर्पण करीन.' कांही असाध्य रोगी देवीला नवस बोलतात, की 'रोगमुक्त झाल्यास मी आराधी बनून तुझी सेवा करीन.' अशा प्रकारें ही जात निर्माण झाली आहे. आराधिणींना लग्न करता येत नाही. पुरुष मात्र आपापल्या जातींतल्या मुलींशीं लग्नें करतात.

एखाद्याला आराधी बनायची इच्छा झाल्यावर तो कोल्हापूर तुळजापूर, रासन इ. क्षेत्रांपैकी आपल्या इष्ट देवतेच्या क्षेत्रांत जाऊन तिचा आराधी बनतो. कांही कारणाने क्षेत्रांत जाणें न जमल्यास त्याला पुढील विधीने आराधी बनवितात– गायीच्या शेणाने सारविलेल्या जमिनीवर चौरंग मांडून व त्यावर शुभ्र वस्त्र पसरून त्यावर घटाची स्थापना करतात. चौरंगाच्या खुरांना उसाचीं कांडीं किंवा बाजरीचीं धाटें बांधतात. मग एक आराधी गुरु घटाची पूजा करतो व आराधी होऊं इच्छिणाऱ्या माणसाच्या हातांत तेलांत भिजविलेला पलिता पेटवून देऊन त्याच्या गळ्यांत कवड्यांची माळ घालतो. नंतर हा नवा आराधी भवानीला नमस्कार करतो. मग आपल्या जातिबांधवांना जेवण घालतो. सर्व विधि झाल्यावर सदर इसम आराधी झाला, असें जाहीर करतात. आराधी पुरुष जाकीट व पायघोळ अंगरखा घालून वर कवड्यांच्या माळा घालतो. 'यमाई तुकाईचा जोगवा' असें म्हणून हा भिक्षा मागतो. त्याच्या हातांत पेटता पलिता असतो व काखेंत अडकविलेल्या बुधल्यांत पलित्याला लागणारें तेल असतें.

आराधी मृत्यु पावल्यावर त्याच्या अंगावरील कवड्यांच्या माळा व हातांतील परड्या त्याच्याबरोबर दहन करतात किंवा पुरतात. [बॉ. बे. क्रा.]

आराध्य ब्राह्मण तेलंगी ब्राह्मणांची एक शाखा. हैदराबाद व मद्रास या भागांत यांची पुष्कळशी वस्ती आहे. हे लोक गळ्यांत यज्ञोपवीताबरोबर लिंगप्रतिमाहि धारण करतात. हे स्वतःला स्मार्त समजतात. भस्म व रुद्राक्ष धारण करतात. लिंगायत धर्माचा संस्थापक बसव याच जातीचा होता. या जातींत कांही वैष्णवहि आहेत. तें मात्र गळ्यांत लिंग बांधीत नाहीत. आराध्य ब्राह्मण पूर्वी त्रिशूला-

दिकांच्या तप्तमुद्रा घेत असत. परंतु हल्ली घेत नाहीत. वीरशैवांचे पांच आचार्य मुळांत याच ब्राह्मणांपैकी असावे, असें भांडारकरांचें मत आहे.

आराध्य ब्राह्मण क्वचित् नियोगी पोटजातींतील मुलींशीं लग्न करतात. यावरून, आराध्य पंथांत येण्यापूर्वी ते नियोगी असावे, असें वाटतें. वीरशैवांप्रमाणे ते मृतांना बसलेल्या स्थितींत पुरतात. दहा दिवस सुतक पाळतात व एकोद्दिष्ट वगैरे श्राद्धें करतात. ते वर्षश्राद्ध न करतां त्या दिवशीं आराधना करतात. त्यांच्या आराधनेला दर्भ व पिंड, या वस्तू लागत नाहीत. त्यांच्यांत विधवांचें केशपवन करीत नाहीत.



आराध्य ब्राह्मण

पालकुर्की सोमनाथ (१४ वें शतक) हा तेलुगु कवि आराध्य ब्राह्मण होता. त्याने बसवपुराण व पंडिताराध्य चरित्र असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. यांच्यांत पिडुपर्थी सोमनाथ व बसवकवि (१६ वें शतक) हे दोघे भाऊहि मोठे ग्रंथकार होऊन गेले. [का. ट्रा. स. इ.]

आराम उद्यानांतील किंवा बागेंतील घर. कालांतराने त्याला विहार किंवा भिक्षूंचें निवासस्थान असा अर्थ प्राप्त झाला. हे स्थान शहरापासून फार जवळ किंवा फार दूर नसावें, ते शांत व सुरक्षित असावें आणि त्याच्या भोवती निरनिराळ्या प्रकारचे चार–पांच तट असावे, असें सांगितलें आहे. [एन्सा. हिं. आ.]

आरासनी द. भारतांत पिंपळाच्या फांदीला हें नांव आहे. ब्राह्मणेतर जातींत लग्नाचा मांडव घातल्यावर ही डहाळी वाजत गाजत आणून मांडवांत पुरतात व तिची पूजा करतात. लग्नविधि आटोपल्यावर तिच्यापुढे नारळ फोडून तिचें विसर्जन करतात. हिला विष्णूचें प्रतीक मानलेलें आहे.

आरासुर अबूच्या पहाडाजवळ अरवली पर्वताच्या नैर्ऋत्येला व गुजरातच्या उत्तरेला हा डोंगर आहे. सरस्वती नदीचा उगम या डोंगराच्या जवळच होतो. उगमाजवळ कोटेश्वर महादेवाचें मंदिर असून तिथे दरवर्षी लाखो यात्रा जमते.

आरासुर येथे अंबिकेचें मंदिर आहे. या मंदिरांत देवतेची मूर्ति नाही; तर एक यंत्र आहे. या यंत्रालाच वस्त्रें नेसवून मूर्तीचें रूप देतात. आरासुर हें एक शक्तिपीठ आहे. इथे श्रीकृष्णाचा चौल संस्कार झाला होता, असें सांगतात. त्यामुळे आजहि कित्येक लोक आपल्या मुलांचा जावळ संस्कार इथे येऊन करतात. श्रावण, भाद्रपद, कार्तिक व मार्गशीर्ष अशी वर्षांतून चार वेळा इथे यात्रा जमते. **पाहा** – अंबाजी.

आराही तंत्रमार्गांतली एक देवता. हिचें वर्णन – कमलाचें आसन. डुकराचें तोंड. कृष्ण वर्ण. मुंडमाला धारण करणारी. चतुर्भुज. दोन हातांत नांगर व मुसळ असून दोन हात वरद व अभय या मुद्रेंत असतात. [विद्यार्णव तंत्र]

आरि तमिळनाडमधील एक अल्पशी जात. हे स्वतःला आर्यप्पहारांच्या श्रेणीचे समजतात. असें असूनहि मंदिराच्या गाभाऱ्यांत त्यांना प्रवेश मिळत नाही. यांचे आचार-विचार तमिळ ब्राह्मणांप्रमाणेच असतात. ते मांसाहार करीत नाहीत. [का. ट्रा. स. इं.]

आरियक्कूत्तु शिलप्पधिकारम् या महाकाव्यांत उल्लेख असलेला एक नृत्यप्रकार. काठीच्या साहाय्याने दोरीवर केलेल्या कसरतवजा नृत्यालाहि हें नांव आहे. याला कझइकूत्तु असेंहि म्हणतात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

आरुणि उद्दालकाचें पैतृक नांव. उद्दालक आरुणि हा सुब्रह्मण्याचा गुरु असून याने हृदयस्थ अष्टदलकमलाच्या ठिकाणीं ब्रह्मदृष्टि ठेवून ब्रह्मोपासना केली (ऐ. आ. २. १. ४.). वासिष्ठ चैकितायनाकडून याने ज्ञान मिळविलें. हा याज्ञवल्क्याचा गुरु होता, असें कांहींचें म्हणणें आहे. हा मानसशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञहि होता. 'सुवर्णाच्या अलंकारांचें ज्याप्रमाणे सुवर्ण हें उपादान कारण आहे, त्याप्रमाणेच ब्रह्म हें सर्व भूतमात्राचें अंतिम उपादान कारण आहे. हें मूलाधारभूत ब्रह्मच तेवढें सत्य असून, बाकी सर्व नामरूपात्मक पदार्थ मिथ्या आहेत, ' असें याचें मत आहे. आरुणीने वेदान्तांतील मायावादाची पूर्वतयारी करून ठेवली, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. ' तत्त्वमसि ' हें महावाक्य त्याने आपला पुत्र श्वेतकेतु याला वारंवार उपदेशिलें आहे. आरुणि-श्वेतकेतु

संवादांत हें जग कसें बनलें व मानव शरिरांत कोणते घटक आहेत, या प्रश्नावर भर दिलेला आहे. 'जगाचें आदिकारण सत् असून त्यांतून क्रमाने तेज, तेजांतून आप्, आप्मधून अन्न, अशीं भौतिक मूलतत्त्वें निर्माण झालीं, त्या तत्त्वांत सद्रूपी आत्मतत्त्वाने प्रवेश केला व या तत्त्वांच्या घटकांच्या मिश्रणांतून ही सृष्टि व मानव निर्माण झाला,' असें त्यांत वर्णन आहे (छान्दो. उ. ६-८-१६). मन, प्राण, वागिंद्रिय हीं अनुक्रमें अन्न, जल व तेज यांतून निर्माण झालीं, असें याने दाखविलें आहे. [उ. र.; नवभारत]

आरुण्युपनिषद् एक संन्यासविषयक गौण उपनिषद्. यांत ९ मंत्र आहेत. यांत प्रथम संन्यास घेऊं इच्छिणाऱ्या पुरुषाचीं कर्तव्यें सांगितलीं असून संन्यास घेतल्यानंतरचे आसनादि नियम सांगितले आहेत. यतीनें 'ॐ हि ॐ हि ॐ हि' या मंत्राने सूर्यमंडलांतल्या आत्म्याचें अनुसंधान करीत भिक्षेसाठी गांवांत जावें, असें सांगितलें आहे.

आरे द. कर्नाटकांत मराठी शेतकऱ्यांना हें नांव असून तें आर्य शब्दापासून बनलेलें आहे. आरे लोक गळ्यांत जानवें घालतात, ब्राह्मणांकडून धार्मिक संस्कार करवितात व शृंगेरी मठाच्या अधिपतीला मानतात. मुलगी वयांत येण्याच्या सुमारास तिचें लग्न करतात. विधवाविवाह अशास्त्र मानतात. स्त्रीनें व्यभिचार केल्यास नवऱ्याला घटस्फोट घेतां येतो; पण नवऱ्याने व्यभिचार केल्यास तिला तसें करतां येत नाही. मांसाशन निषिद्ध नाही; पण मद्यप्राशन वर्ज्य आहे. द. कर्नाटकांतील आरे मराठी किंवा कोंकणी बोलतात; कासरगोड तालुक्यांतले कानडी बोलतात.

द. कर्नाटकांतील मराठी बोलणारे आरेयवरु किंवा आर्यवरु पैतृक वारसा हक्काचा कायदा पाळतात. यांचें पौरोहित्य शिवल्ली ब्राह्मण करतात. लग्नविधींतील एक मजेदार प्रकार म्हणजे नवरा युद्धासाठी रणक्षेत्रावर जायचा आव आणतो व आपलें क्षत्रियत्व व्यक्त करतो. अम्मनोरु (दुर्गा) ही यांची देवता होय. [का. ट्रा. स. इं.]

आरोग्य 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' = धर्म आचरण्याचें पहिलें साधन शरीर होय, असें कालिदासाचें वचन आहे (कु. सं. ५. ३३). भिषग्वर्य चरकानेहि 'धर्मार्थकाममोक्षाणामारोग्यं मूलमुत्तमम्' = धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारी पुरुषार्थांचें आरोग्य हें मूळ आहे, असें सांगितलें आहे. आरोग्याचे उपाय शोधण्याची खटपट, भारतीय शास्त्रज्ञांनी फार प्राचीन काळापासून केलेली आढळते.

वैदिककाळीं आरोग्यरक्षणार्थ लोक ईश्वराची प्रार्थना व मंत्रतंत्रादि उपचार करीत. सूर्योपासना ही विशेषतः आरोग्यासाठीच सांगितलेली आहे. 'आरोग्यं भास्करादिच्छेत्' असें त्याविषयीं वचनच आहे. अथर्ववेदांत ताप, मधुमेह, क्षय, जलोदर वगैरे रोगांपासून मुक्तता व्हावी, अशा अर्थाचीं अनेक सूक्तें आहेत.

वैदिक काळानंतर चरक, सुश्रुत, धन्वन्तरि, जीवक, असे अनेक भिषग्वर्य भारतांत होऊन गेले. त्यांनी रोगनिवारणार्थ व आरोग्यवृद्ध्यर्थ अत्यंत परिश्रम घेतले आहेत. चरकाने अन्न, वस्त्र, हवा, पाणी, औषधी, उपचार यांबद्दल विस्तृत माहिती दिली असून शरिराची बहिःशुद्धि व अंतःशुद्धि करणारे चूर्णें, उटणीं, वमन, विरेचन, संग्रहण, शोधन, दीपन इ. अनेक उपाय सांगितले आहेत. त्यांनी शारीरिक रोगांबरोबर मानसिक रोगांचाहि विचार केलेला असून 'सत्समागम' हाहि आरोग्यरक्षणाचा एक उपाय म्हणून निर्देशिला आहे. प्रजा निरोगी राहावी आणि रोग झाल्यास त्याचें निवारण करतां यावें, याच उद्देशाने वैद्यकशास्त्र प्रवृत्त झालें आहे.

आहाराच्या बाबतींतहि त्यांनी 'इष्टं धर्मेण योजयेत्' या न्यायाने सर्व इष्ट गोष्टींची धर्माशीं सांगड घालून दिली आहे. त्यांत ऋतुमानाचाहि विचार केलेला आहे. उदा० वर्षप्रतिपदेस कडूलिंबाचीं पानें खावीं, चातुर्मासांत कांदा, वांगीं वर्ज्य करावीं, थंडीच्या दिवसांत संक्रांतीच्या निमित्ताने तीळ लावलेली भाकरी खावी, तिळगुळ खावा, शिशिरांत कैरी खावी इ. विधी आरोग्यमूलकच आहेत.

पुष्कळदा खाद्य व पथ्य हीं दोन्ही एकच असतात. उन्हाळ्यांत कोकणामध्ये आंबील खातात, गोंडांत 'बासी' खातात, बंगालमध्ये 'पांता भात' म्हणजे शिळ्या भातांत पाणी घालून तो दुसऱ्या दिवशीं खातात. चातुर्मासांतली निराहार किंवा एकभुक्त उपोषणें आरोग्याची दृष्टि डोळ्यांपुढे ठेवूनच सांगितलीं आहेत. दर पंधरा दिवसांनी येणाऱ्या एकादशीस उपवास करावा, या विधानांतहि कोठ्याला एक दिवस विश्रांति दिल्याने माणसाचें आरोग्य चांगलें राहील, हा विचार अंतर्भूत आहेच.

भारतांत प्राचीन काळापासून शाकाहाराच्या बरोबर मांसाहारहि चालू होता व आहे. त्याचा विचार करून चरकाने खाद्य व औषधी म्हणून कांही पशुपक्ष्यांच्या मांसाचा उपयोग सांगितला आहे. तो म्हणतो —

शरीरबृंहणे नान्यत् खाद्यं मांसाद्विशिष्यते

(चरक सू. २७. ८७)

अर्थ –– शरीरपुष्टीसाठी मांसासारखें दुसरें अन्न नाही.

योग्य प्रमाणांत मद्यपान केल्यास तेंहि पुष्टिदायक ठरतें असाहि निर्वाळा चरकाने दिला आहे. [सं. वि.]

आरोग्य द्वितीयाव्रत काम्य व्रत. पौष शु. २ येस आरंभ. प्रत्येक मासाच्या शु. २ येस चंद्रकोरीचें पूजन. व्रतावधि एक वर्ष. फल – आरोग्य व समृद्धि. [हे. व्र.]

आरोग्य प्रतिपद्व्रत स्त्रीव्रत. चैत्र शु. १ देस प्रारंभ. आदल्या दिवशीं उपोषण, व्रतदिनीं सूर्यपूजा व महानैवेद्य. यांत ब्राह्मण भोजन झाल्यावर यजमानाने अवशिष्ट पदार्थांतून ग्रासमात्र ग्रहण करायचा असतो. व्रतावधि एक वर्ष. फल–आयुरारोग्य व सौभाग्य यांची प्राप्ति. [हे. व्र.]

आरोग्य व्रत (१) एक काम्य व्रत. फाल्गुन अमावास्येस उपवास. वर्षप्रतिपदेच्या दिवशीं सूर्यप्रतिमेची स्थापना व पूजा. सल्लकी वृक्षाचा धूप व तुपाचा दिवा लावणें. ब्राह्मणभोजन झाल्यावर यजमानाने ग्रासमात्र अन्न भक्षण करणें. याप्रमाणे प्रत्येक शु. १ देस करायचें असतें. व्रतावधि एक वर्ष. नंतर उद्यापन. त्या प्रसंगीं होम व सूर्य-प्रतिमेचें दान करतात. फल – आरोग्य लाभ व उत्तमगति [व्रतराज]

(२) भाद्र० व. १ देपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत प्रतिदिनीं कमलांनी अनिरुद्धमूर्तीची पूजा. उद्यापनाच्या आधी तीन दिवस उपवास, होम व ब्राह्मणभोजन. फल – आरोग्य व सौंदर्य यांचा लाभ. [विष्णु ध. पु. ३. २०५]

(३) दशमीव्रत. नवमीस उपवास व दशमीस विष्णु-लक्ष्मीची पूजा. [हे. व्र.]

आरोग्यसप्तमी काम्य व्रत. मार्ग० शु. ७ मीस प्रारंभ. प्रत्येक मासाच्या शु. ७ मीस उपवास व सूर्यपूजा. व्रतावधि एक वर्ष. फल – आरोग्य व समृद्धि यांचा लाभ. [हे. व्र.]

आरोरा सिंधमधील एक जात. हे लोक पंजाबमध्येहि आढळतात. दोन्ही ठिकाणच्या लोकांचें गोत्र एकच आहे. ते स्वतःला क्षत्रिय समजतात व लोहाणांप्रमाणे आपणहि परशुरामाच्या भयाने इतस्ततः पांगलों, असें सांग-तात. सिंधप्रांतांत रोहीर येथे यांनी एक कोट बांधला होता. त्याला आरोरेकोट असेंच नांव आहे. आजहि त्याचे अवशेष दिसतात. [सिं. क.]

आर्चिक सामवेदांत ज्या ऋचा आल्या आहेत, त्यांना आर्चिक म्हणतात. आर्चिक ग्रंथ तीन आहेत– छंद, आरण्यक व उत्तर. उत्तरार्चिकांत एक स्वर, एक छंद व एक तात्पर्य असलेल्या तीन तीन ऋचांचा समूह घेऊन त्यांचें एकेक सूक्त बनविलेलें असतें. या सूक्तांना 'तृच्' म्हणतात. वरील प्रमाणेच दोन दोन ऋचांच्या समष्टीला 'प्रगाथ' म्हणतात. तृच् व प्रगथ यांच्यांतल्या प्रत्येक पहिल्या ऋचेचा छंद आर्चिकांतून घेतला गेला आहे. म्हणून या पहिल्या ऋचेला योनिऋक् व आर्चिकाला योनिग्रंथ म्हणतात. योनिऋचेच्या उत्तर दलांत ज्या दोन किंवा एक ऋचा मिळवितात, त्यांना उत्तरार्चिक अशी संज्ञा आहे.

अरण्यांतच ज्याचें अध्ययन करायचें असतें, अशा एका-ध्यायात्मक ग्रंथाला आरण्यक म्हणतात. छंदोग्रंथांतल्या सामांचें गायन करणाऱ्यांना 'छंदोग' अशी संज्ञा आहे. त्यांच्या कर्मकांडासाठी जे ब्राह्मणग्रंथ उपयोजिले जातात, त्यांना 'छांदोग्य' म्हणतात. [हिंदुत्व]

आर्जिक या नांवाचा प्रदेश काश्मीरमध्ये किंवा तिथेच जवळपास कुठेतरी असावा, असें संशोधकांचें मत आहे. या प्रदेशांत राहणाऱ्या लोकांना आर्जिकीय असें म्हटलें आहे (ऋ. ९. ६५. २३). या प्रदेशांतून वाहणाऱ्या नदीचें नांव आर्जीकिया असें आहे. [वे. इं.]

आर्जीकिया ऋग्वेदांतील नदीसूक्तांत इतर नद्यांबरोबर या नदीचें नांव आलेलें आहे (१०: ७५. ५.). यास्काच्या मताप्रमाणे आर्जीकिया हें विपाश् (आधुनिक बियास) नदीचेंच एक नांव आहे (नि १०. २६). विपाश् नदीचें मूळचें नांव उरूंजिरा असें होतें. [वै. सा.]

आर्तव (१) ऋतूचे पांच पुत्र.
(२) बर्हिषद पितरांचें नामान्तर. [पु. इं.]

आर्तिमत् एक ऋषि. याच्या स्मरणाने सर्पबाधा नष्ट होते. [म. भा. अनु. ५८]

आर्त्विजीन ऋत्विक् कर्मांत दक्ष व निष्णात असलेल्या ब्राह्मणांना ही संज्ञा आहे (अष्टा.५.१.१७१).

यज्ञांत प्रयुक्त होणाऱ्या वेदमंत्रांचें शुद्ध उच्चारण करणाऱ्या ब्राह्मणांना आर्त्विजीन म्हणावें, असें षड्‌विंशब्राह्मणांत सांगितलें आहे. (१. ३. १६). [पा. भा.]

आर्द्रा अश्विन्यादि गणनेंतलें सहावें नक्षत्र. मृगाचा पुढचा डावा पाय व पुनर्वसूंतला दक्षिणेकडचा तारा यांना सांधणारी रेषा काढल्यास त्या रेषेवर दोहोंच्या मध्यभागीं हें नक्षत्र येतें. पूर्वी कोणी कोणी मृगांतल्या पुढच्या डाव्या पायाला किंवा व्याधालाच आर्द्रा मानीत असत. पण आता तसें कोणी मानीत नाहीत. या नक्षत्राची देवता रुद्र आहे (तै. सं. ४. ४. १०). 'आर्द्रया रुद्रः प्रथमान एति' असें तै. ब्रा. मध्ये वचन आहे (३. १. १. ३.). आर्द्रेची मूर्ति कशी करावी, तें हेमाद्रीने पुढीलप्रमाणे सांगितलें आहे––

श्वमुखी कृष्णवर्णा तु रक्तार्द्रा शूलपाणिनी
नीलवस्त्रा वृषारूढा वाऽस्थिमालाविभूषणा

अर्थ–– कुत्र्याचें तोंड, कृष्ण वर्ण, रक्ताप्रमाणे आर्द्र, हातांत शूल, निळें वस्त्र, वृषभ वाहन व हाडांच्या मणक्यांचे अलंकार धारण करणारी अशी आर्द्रेची मूर्ति करावी.

आर्द्रानंदकरी तृतीया काम्य व्रत. कोणत्याहि मासाच्या ३ येस पूर्वाषाढा, उत्तराषाढा, मृग, हस्त व मूळ यांपैकी एखादें नक्षत्र असेल, त्या दिवशीं व्रताचा आरंभ करतात. शिव-भवानीची पूजा हा या व्रताचा विधि आहे. [मत्स्य पु. ६४; हे. व्र.]

आर्भवें पवमान आर्भव = ऋभुविषयक. अग्निष्टोमयागांत तृतीयसवनाच्या वेळीं या नांवाचें स्तोत्र गातात. ऋभू हे मर्त्य होते; पण प्रजापतीने त्यांना अमर्त्य करून तृतीयसवनांत भाग दिला, अशी कथा आहे (ऐ. ब्रा. २८. ४). म्हणूनच तृतीयसवनांतल्या पहिल्या स्तोत्राला आर्भवपवमान असें नांव पडलें आहे. [हि. ध.]

आर्य ऋग्वेदादि वैदिक साहित्याची रचना करणारे, इंद्र, अग्नि, मरुत्, सोम इ. देवतांची उपासना करणारे, यज्ञधर्म आचरणारे, सोम रसाने देवांना संतुष्ट करणारे, पितृप्रधान कुटुंबपद्धति चालविणारे, भारताबाहेरून येऊन प्रथम सप्तसिंधूंच्या (पंजाब) प्रदेशांत वास्तव्य करणारे व तिथून गंगा–यमुनांच्या प्रदेशांत अग्रेसर होणारे असे जे लोक, त्यांना आर्य असें म्हणतात. भृगु, भरद्वाज, अंगिरा, वसिष्ठ, अत्रि इ. पुरुष हे आर्यांतले मंत्रकर्ते असून सुदास, दिवोदास, भरत इ. पुरुष हे आर्यांतले वीर योद्धे होत.

या आर्यांचें रंगरूप कसें होतें, त्याविषयीं ऋग्वेदांत विशेष वर्णन नाही. पण निरनिराळ्या सूक्तांतून त्यांच्या देवतांचें जें रंगरूप कळून येतें, तेंच त्यांचेंहि असावें असें समजायला हरकत नाही. त्यांचा वर्ण गोरा, केस पिंगट, डोळे निळे, नाक धारदार, छाती विशाल आणि गर्दन पुष्ट होती. गायी, घोडे, मेंढ्या, बकऱ्या, हें त्यांचें मुख्य धन होतें. ते मांसभोजी होते. त्यांना सोमरसाची विशेष आवड होती. ते महान् पुरुषार्थी आणि विजेते होते. त्यांचीं शरिरें मजबूत होतीं. ते पट्टीचे घोडेस्वार होते. ते मोकळ्या मैदानांत वसाहत मांडून राहणें अधिक पसंत करीत. ते लोकरीचीं वस्त्रें विणीत व वापरीत. ते बायकांप्रमाणेच आपले केस लांब राखीत. कांही लोक दाढी-मिशा ठेवीत, तर कांही लोक त्या काढीत. त्यांची सामाजिक व्यवस्था कुलबद्ध होती. कुलांच्या समुदायाला ग्राम म्हणत. ग्रामाच्या मुख्याला ग्रामणी म्हणत.

ऋग्वेदकालीं पुरु, यदु, अनु, द्रुह्यु व तुर्वश असे आर्यांचे पांच जनसमुदाय भारतांत राहत होते. सारी आर्यप्रजा पंचजन या नांवाने ओळखली जात होती. ज्याच्या नांवावरून आपल्या देशाला भारत हें नांव पडलें, तें भरतकुलहि पुरातन पुरूंची एक शाखा होतें. भरतांतून पुढे तृत्सु निघाले. यदुकुलांत पुढे श्रीकृष्ण अवतरला. यदु–तुर्वश व अनु-द्रुह्यु हे वेदांत जोडीने आढळतात. पंचजन आर्य हे सगळे इंद्राग्नींचे उपासक होते. ब्राह्मण आणि राजन्य असे दोन भेद सुरवातीस त्यांच्यांत निर्माण झाले. बाकीची सारी आर्य जाति विश् म्हणजे प्रजा, या वर्गांत मोडत असे. ते राजाला विश्पति किंवा विशांपति असें म्हणत.

आर्य सैनिक शिस्तबद्ध असत. हजारोंच्या संख्येने ते शत्रूवर धाड घालीत. आर्यांचें सैन्य चतुरंग नसून तें रथ, घोडे व पायदळ असें त्र्यंग होतें. गजदळ हें चौथें अंग त्यापुढील काळांत निर्माण झालें. दास किंवा दस्यु हे आर्यांचे मुख्य शत्रू होते. शंबर हा त्यांचा सर्वांत मोठा वैरी होय. हिमाचल पर्वताच्या आश्रयाने तो अनेक पुरें उभारून आपलें राज्य करीत होता. दिवोदासाला त्याचा पराजय करण्यासाठी सतत चाळीस वर्षें युद्ध करावें लागलें. आर्य वीरांना आर्य ऋषींनी त्यांच्या पराक्रमांत पुष्कळच साथ दिली आहे. निरनिराळ्या आर्यजनांचे निरनिराळे पुरोहित होते. भृगु हे द्रुह्यूंचे, अत्रि हे पुरूंचे, भरद्वाज, वसिष्ठ व विश्वामित्र हे भरतांचे आणि कण्व हे यदूंचे पुरोहित होत. त्यांनी आपापल्या यजमानांच्या राजकीय आणि सामाजिक कारभारांत आत्मविश्वासानें व समरसतेनें भाग घेतलेला दिसतो.

पण असें असलें तरी आर्य शब्द विशिष्ट मानववंशाचा वाचक नाही. युरोपांत जेव्हा संस्कृत भाषेचा आणि तुलना-

त्मक भाषाशास्त्राचा अभ्यास सुरू झाला आणि प्राचीन भारतीय व प्राचीन युरोपीय, यांचें एकवंशसंभवत्वाचें नातें पाश्चात्यांना दिसूं लागलें, तेव्हा या सर्व मोठ्या मानववंशाला लागू पडेल, अशा एका शब्दाची गरज निर्माण झाली. त्यासाठी वैदिक संस्कृतांत आढळणारा आर्य हा शब्द निवडला गेला आणि त्याचें आर्यन् असें रूपांतर करून तो शब्द विशिष्ट मानववंश वाचक किंवा भाषावंशवाचक म्हणून स्वीकारला गेला. पुढे विशिष्ट मानववंश आपणांस आर्य म्हणवीत असे, ही कल्पना सिद्ध करण्यास अडचणी दिसूं लागल्या, तरी तो शब्द मात्र टाकला गेला नाही.

अनेक भाषाशास्त्रज्ञांनी आर्यन् हा शब्द अनेक अर्थांनी वापरला आहे. माक्स म्यूलर तो इंडो–जर्मन याचा समानार्थक म्हणून वापरतो व त्या भाषा बोलणाऱ्यांना आर्यन् म्हणतो. त्याने इरा म्हणजे पृथ्वी या शब्दावरून आर्य शब्द व्युत्पादिला आहे. पण ही व्युत्पत्ति ज्ञानकोशकारांना मान्य नाही. ॲरियोव्हिस्टस् इ. शब्दांमध्ये ॲरियो हा जो भाग आहे, त्याचें व आर्य शब्दाचें मूळ एक असण्याचा संभव आहे, असें ते मानतात. वैदिक संस्कृतांत, दास किंवा दस्यु यांचा विरोधी, या अर्थानें आर्य हा शब्द वापरला जातो. एकंदर विचार केल्यानंतर आर्य शब्दाच्या उत्पत्तीविषयीं स्पष्ट असें कांहीहि विधान करणें कठीण आहे, असें ज्ञानकोशकारांना वाटतें.

पण कांही असलें तरी हा शब्द कोणत्या तरी उच्च अर्थानें इंडो–जर्मन लोकांच्या पूर्वशाखेचे लोक स्वतःला लावून घेत असत, असें दिसतें. सांप्रत हा शब्द वरील दोन्ही शाखांना लावतात व इराणी आर्यांपासून भिन्नत्व दाखविण्यासाठी भारतीय आर्यांना इंडो–आर्यन् म्हणतात. आर्य लोक बाहेरून कुठून तरी भारतांत आले व त्यांची पहिली वसाहत सप्तसिंधूंच्या (पंजाब) प्रदेशांत झाली, असें सर्वसामान्य विद्वन्मत आहे. या लोकांनाच 'वैदिक आर्य' असें म्हणतात. यांनीच ऋग्वेदाची रचना केली. ऋग्वेदांतली पुष्कळशीं सूक्तें पंजाबांतच निर्माण झालीं आहेत.

या नंतर पुढचा प्रश्न येतो, तो या वैदिक आर्यांच्या मूलवसतिस्थानाचा. या विषयांत डॉ. रा. ना. दांडेकर यांनी साधक बाधक विचार करुन जो निष्कर्ष सांगितला आहे, तो असा––

या आर्यांचें म्हणजेच वैदिक भारतीयांच्या प्राचीन पूर्वजांचें मूल वसतिस्थान आणि त्यांच्या इतिहासांत घडलेलीं निरनिराळीं स्थित्यंतरें याविषयींच्या प्रश्नाने विद्वानांचें लक्ष फार पूर्वीपासून वेधून घेतलें आहे. पिक्टेट याने १८५९–६३ च्या दरम्यान 'प्राचीन आर्यांचें म्हणजे यूरोभारतीयांचें (Indo-Europeans) मूळ' हा आपला द्विखंडात्मक फ्रेंच ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यायोगें या विषयावरील सांगोपांग विवेचन असलेला पहिलाच प्रबंध लिहिण्याचें श्रेय त्याने मिळविलें, असें म्हणण्यास हरकत नाही. मात्र १८७५ सालीं प्रसिद्ध झालेल्या माक्स म्यूलरच्या या विषयावरील लेखाला अधिक प्रसिद्धि मिळाली आणि माक्स म्यूलरने पुढे मांडलेल्या उपपत्तीस या विषयावरील पहिली उपपत्ति असें मानण्यांत येऊं लागलें. या ठिकाणीं एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही, की पहिल्या पिढींतील बहुसंख्य पाश्चत्य विद्वानांनी या प्रश्नाचा विचार मुख्यतः भाषाशास्त्राच्या आधारेंच केलेला आहे. अलिकडील काळांतहि नवनव्या दृष्टिकोनांतून या विषयाची चर्चा चालू आहे आणि नवनव्या उपपत्ति पुढे मांडल्या जात आहेत. त्यापैकी कांही उपपत्तींचा थोडक्यांत, वस्तुनिष्ठ पद्धतीने पण चिकित्सकपणे, आढावा घेतला पाहिजे.

आर्य या शब्दाने निरनिराळ्या लोकांना निरनिराळे अर्थ अभिप्रेत असतात. ज्यांनी वेदांची रचना केली, तेच मुख्यतः आर्य लोक होत, असा समज सामान्यपणें भारतांत प्रसृत आहे. पण इराणी लोकांनी आपल्या देशाच्या इराण या नांवांत आर्य हा शब्द अद्यापि अवशिष्ट ठेवला आहे आणि आपल्या प्राचीन वाङमयांत तो शब्द अनेक वेळा आणि अनेक रूपांत उपयोजिला आहे, ही गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे आर्य हें नामाभिधान केवळ वेदांच्या प्रणेत्यांनाच देणें, हें ऐतिहासिकदृष्टचा मान्य होण्यासारखें नाही. शिवाय वेदाच्या प्रणेत्यांनाच आर्य असें म्हणण्यांत आर्यांचें मूलस्थान भारतांतच होतें ही गोष्ट एक प्रकारचें गृहीत कृत्य म्हणूनच सुचविल्यासारखी होते.

आर्य हें एका विशिष्ट मानववंशाचें नांव आहे, असें कांही विद्वान् मानतात; पण हें मत आधुनिक मानववंशशास्त्रज्ञांस मुळीच मान्य होण्यासारखें नाही. कारण निरनिराळ्या मानववंशांना जीं नांवें दिलीं जातात, तीं सामान्यपणे देहावयववैशिष्टचनिदर्शक (उदा० लांब डोक्याचे, लांब नाकाचे मानव), त्वक्केशवर्णनिदर्शक (उदा० गौर–पीत–कृष्ण मानव व सुवर्णकेशी मानव) किंवा देशनिदर्शक (उदा० आल्पाइन, नॉर्डिक वगैरे) अशीं असतात. ज्याला नॉर्डिकवंश असें म्हणतात, त्या वंशाचे लांब डोक्याचे, नाजूक आणि रेखीव नाकाचे, गौर वर्णाचे, सोनेरी केसांचे, उंच लोक, म्हणजेच खरे आर्य असें मत, कांही वर्षांपूर्वी, जर्मनींत–विशेषत: नात्सी राजवटींत–मोठ्या आग्रहाने पुढे मांडण्यांत येत असे.

कांही संशोधक सर्वच यूरोभारतीय भाषांना आर्य भाषा आणि त्या यूरोभारतीय भाषा बोलणाऱ्या सर्वच लोकांना आर्य असें नामाभिधान देतात. असें करणेंहि फारसें सयुक्तिक

नाही. एक तर खुद्द आर्य हा शब्द यूरोभारतीय भाषांत उपयोजिलेला आढळून येत नाही. केल्टिक भाषेंतील Ariovistu व Ariobriga आणि प्राचीन जर्मन भाषेंतील Ariobindus या क्वचित् उल्लेखिलेल्या नांवावरून आर्य या शब्दाचा बोध होतो खरा; पण तो अगदी अस्पष्ट आणि संदिग्ध रीतीने! याच्या उलट वैदिक भारतीय आणि प्राचीन इराणी यांनी आपल्या वाङमयांत आर्य हा शब्द स्वतःला उद्देशून अनेकदा आणि कांही विशिष्ट अर्थाने वापरलेला आहे. यावरून असें अनुमान करण्यास हरकत नाही, की प्राचीन इराणी आणि वैदिक भारतीय यांचे पूर्वज एकत्र वास्तव्य करीत असतां ते आपणांस आर्य म्हणवूं लागले. त्यांची भाषा – जिला वैदिक भाषा आणि अवेस्तन भाषा यांची अगदी निकटची पूर्वज अशी समजतां येईल ती आर्य भाषा – मूल यूरोभारतीय भाषेचें एक विशिष्ट परिणत स्वरूप दर्शविते. तसेंच त्यांचा धर्म हा प्राथमिक वैदिक धर्म आणि प्राचीन इराणी धर्म यांची निकटची प्राक्कालीन अवस्था दर्शवितो. म्हणजेच आर्य या शब्दास सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने एक विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे.

भाषाशास्त्रज्ञांनी त्या मूलभाषेस, तिच्याशीं संबंध असलेल्या भाषा ज्या भूप्रदेशांत प्रचलित होत्या व आहेत तो सर्व भूप्रदेश सूचित करणारें, 'यूरोभारतीय भाषा' असें अगदी साधें पण समर्पक नांव दिलें आहे. या नांवांत विशिष्ट वंशाची किंवा सत्तेची कल्पना मुळींच समाविष्ट नाही, हें लक्षांत घेणें आवश्यक आहे. एकरूप-मूल-यूरोभारतीय भाषा बोलणारे लोक एका अर्थीं वैदिक आर्यांचे प्राचीन पूर्वजच होते. तेव्हा आज आपल्याला अभिप्रेत आहे, तें मूलवसतिस्थान या एकरूप –यूरोभारती–भाषाभाषकांचेंच ! आर्यांच्या मूल वसतिस्थानाचा शोध करणें म्हणजेच मूल-यूरोभारतीय भाषा बोलणाऱ्या मानवसमूहाच्या वसतिस्थानाचा शोध करणें होय. कारण ऐतिहासिक दृष्टचा वैदिक आर्यांचा संबंध स्पष्टपणे आणि असंदिग्ध रीतीने पोचूं शकतो, तो त्याच मानवसमूहापर्यंत. इथे आणखी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे; आणि ती ही, की मूल-यूरोभारतीय भाषा बोलणाऱ्या लोकांच्या वसतिस्थानाचा शोध करीत असतां त्या भाषेला तिचेंच विशिष्ट म्हणून समजतां येईल असें स्वरूप ज्या ठिकाणीं प्राप्त झालें, तिथपर्यंतच आपण जाऊं शकतों. ज्याच्या आधारावर आपणांस त्याच्याहि पलिकडे जातां येईल असा पुरावा आज तरी उपलब्ध झालेला नाही. म्हणून वर उल्लेखिलेल्या मर्यादित अर्थाने ज्याला यूरोभारतीय-भाषा-भाषकांचें मूल वसतिस्थान म्हणतां येईल, त्याचाच शोध करणें आज आपणांस अभिप्रेत आहे.

आर्यांच्या मूल वसतिस्थानासंबंधींची टिळकांची उपपत्ति सर्वविश्रुत आहे. The arctic home in the Vedas या पुस्तकांत प्रतिपादिलेल्या आपल्या उपपत्तीला टिळकांनी वेदवाङमयांतील उल्लेख, ज्योतिषशास्त्र आणि भूगर्भशास्त्र (Geology) यांचा आधार मुख्यतः घेतला आहे. ऋग्वेदीय देवतांच्या वर्णनांमध्ये कांही भाग असे आहेत, की त्यांचा समाधानकारक अर्थ लावायचा झाल्यास त्यांचा उत्तर ध्रुवाच्या आसपासच्या प्रदेशाशीं संबंध लावणें आवश्यक ठरतें. किंबहुना केवळ उत्तर ध्रुवप्रदेशांतच ज्या निसर्गघटना घडूं शकतील, अशा कांही घटनांचाच उल्लेख वैदिक ऋषींनी आपल्या कांही दैवतशास्त्रीय कथांच्या आणि निर्देशांच्या रूपाने केलेला आहे (ऋ. १. ६४. १६; २. ३२. २; ५. ५४. १५; ६. ४८. ८ वगैरे), असें टिळकांचें मत आहे. या दैवतशास्त्रीय कथांचा आणि निर्देशांचा निसर्गघटनात्मक अर्थ लावूं लागलें, तर त्यांतून नेहमीच एक प्रकारचें सौम्य आणि उत्साहदायी हवामान सूचित होतें, ही गोष्टहि लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पृथ्वीच्या इतिहासांत निदान दोन तरी हिमयुगें होऊन गेलीं असलीं पाहिजेत. या दोन हिमयुगांच्या मध्यंतराच्या कालखंडांत – ज्याला आंतरहिमयुग असें म्हणतां येईल त्या कालखंडांत – आशिया आणि यूरोप या दोन्ही खंडांत समाविष्ट झालेल्या ध्रुव प्रदेशांतील हवामान अगदी सौम्य आणि उत्साहकारक असेंच होतें. शीत उन्हाळा आणि उबदार हिंवाळा – म्हणजेच निरन्तर वसन्तसदृश हवामान – हें आंतरहिमयुगाचें वैशिष्टच होतें. आणि सामान्यतः समशीतोष्ण हवामानाच्या प्रदेशांतच आज उपलब्ध होणाऱ्या ओषधी-वनस्पतींची जोमदार वाढ त्या युगांत उत्तरध्रुवप्रदेशांतहि होत असे. यावरून सहजच असें निगमन काढतां येतें, की वैदिक दैवतशास्त्रांतील वर उल्लेखिलेल्या कथा आणि निर्देश उत्तरध्रुवप्रदेशांतील या आंतरहिमयुगाचेच द्योतक असले पाहिजेत. भूगर्भशास्त्रज्ञांच्या मतें या आंतरहिमयुगाचा काल इसवी सनापूर्वी १०,००० वर्षांहून अधिक इतका असावा. वेदवाङ्मयांतील ज्योतिष्यकीय उल्लेखांवरून वैदिक मंत्रांचा काल इसवी सनापूर्वी ५ ते ६ हजार वर्षें तरी असला पाहिजे, असें दाखविण्याचा टिळकांनी इतरत्र प्रयत्न केला आहे. म्हणजेच मंत्रदृष्टचा वैदिक ऋषींचे पूर्वज आंतरहिमयुगांत– म्हणजे मंत्रकालारंभाच्या पूर्वी निदान पांच सहस्र वर्षें – उत्तर ध्रुवप्रदेशांत राहत असले पाहिजेत. इसवी सनापूर्वी १०,००० वर्षांच्या सुमारास आर्यांच्या या उत्तरध्रुवप्रदेशांतील मूल वसतिस्थानाचा अंतिम म्हणजेच दुसऱ्या हिमयुगामुळे नाश झाला. त्यानंतर या प्रदेशांतून आर्यांचीं मोठीं निर्गमनें (Mig-

rations) सुरू झालीं. त्या आर्यांपैकी वैदिक आणि इराणी आर्यांनी आपल्या पूर्वजांनी ५००० वर्षांपूर्वी उत्तर ध्रुवप्रदेशांत अनुभविलेल्या निसर्गघटना आपल्या वाङ्मयांत ग्रथित करून ठेवल्या आहेत.

टिळकांच्या उपपत्तीचें स्वरूप थोडक्यांत हें असें आहे. टिळकांनी आपली उपपत्ति ज्या मार्मिक आणि मौलिक पद्धतीने पुढे मांडली – आणि विशेषतः ज्या परिस्थितींत असतांना पुढे मांडली – त्याबद्दल सर्वच ज्ञानोपासकांना आदरयुक्त कौतुक वाटतें, यांत संदेह नाही. परंतु त्या उपपत्तीला आधुनिक संशोधकांची मान्यता मात्र फारशी मिळाली नाही. नाही म्हणायला, कांही वर्षांपूर्वी तारापोरवाला यांनी या उपपत्तीचा पुनरुच्चार आणि पुरस्कार केलेला आढळतो. टिळकांनी दिग्दर्शित केलेल्या इराणी आर्यांच्या वेन्दिदाद या ग्रंथांतील पुराव्याचाच अनुवाद आणि विस्तार तारापोरवाला यांनी केला आहे. यूरोभारतीय भाषा बोलणाऱ्या सर्व प्राचीन लोकांच्या पुराण-परंपरांतून त्यांच्या पूर्वजांचें मूलस्थान उत्तरेकडे होतें, हें सूचित झालेलें आहे; इराणी आर्यांच्या वाङ्मयांत या गोष्टीचा उल्लेख इतक्या स्पष्टपणे केलेला आढळत नाही, असें तारापोरवाला यांचें म्हणणे आहे. ऐर्यन वएजो (म्हणजेच आर्यांचें बीज किंवा मूलस्थान) हें अहुर मज्दाने वेह्दाति नदीच्या काठीं निर्माण केलें व तें नष्ट करण्याकरितां अंग्रो मैन्यूने अहि आणि हिम यांची योजना केली (वेन्दि. १. १-३), या इराणी दैवतशास्त्रांतल्या वर्णनावरून हिमयुगामुळे नष्ट झालेल्या आर्यांच्या मूल वसतिस्थानाचीच आठवण होते.

वैदिक दैवतशास्त्राचा अर्थ केवळ निसर्गघटनात्मक लावणें फारसें प्रत्ययदायी नाही, ही गोष्ट आता बहुसंख्य वेदाभ्यासकांना पटूं लागली आहे. वरुण, इंद्र, विष्णु इ. वैदिक देवतांची मूळची आणि सारभूत अशी प्रकृति अगदी वेगळी होती; पण दैवतशास्त्रीय विकासक्रमांत त्या देवतांच्या मूळच्या व्यक्तिमत्त्वावर निरनिराळ्या निसर्गशक्तींचा अध्यारोप केला गेला, ही विकसनशील दैवतशास्त्राची उपपत्ति आता बरीच मान्यता पावली आहे. त्यामुळे वेदांतील अनेक निर्देशांचा संबंध निसर्गघटनांशी लावणें –– त्यांतहि केवळ ध्रुवप्रदेशांतच घडूं शकतील अशा निसर्गघटनांशी लावणें — हा जो टिळकांनी पुढे मांडलेल्या आर्यांच्या मूल वसतिस्थानाविषयींच्या उपपत्तीचा मुख्य पाया, तोच डळमळीत ठरूं पाहत आहे. आपण उल्लेखिलेल्या वैदिक निर्देशांचा टिळकांनी स्वतः लावलेला अर्थ पुष्कळच ओढाताणीचा आहे, असेंहि वाटल्यावाचून राहत नाही. शिवाय त्या निर्देशांचा अर्थ निसर्गघटनांना उद्देशूनच लावायचा असें जरी ठरविलें, तरी त्या निसर्गघटना ध्रुवप्रदेशांतच घडल्या असल्या पाहिजेत, असें अपरिहार्यपणे समजण्याची मुळीच आवश्यकता नाही.

टिळकांच्या कालगणनेप्रमाणे आर्यलोक उत्तर ध्रुवप्रदेशांत सनपूर्व १०,००० वर्षांपूर्वी अनेक वर्षे वास्तव्य करून राहत असले पाहिजेत. ज्या हिमयुगामुळे आर्यांचें तेथील वसतिस्थान नष्ट झालें व त्यांना यूरोप आणि आशिया या खंडांतील निरनिराळ्या प्रदेशांत निर्गमनें करावीं लागलीं, त्या हिमयुगाच्या आरंभाचा काल सनपूर्व १०,००० वर्षे इतका तरी निदान धरला पाहिजे. वैदिक मंत्र रचिले गेले ते, टिळकांच्या मतें सन पूर्व ५००० वर्षांच्या सुमारास ! आणि यांपैकीच कांही मंत्रांत उत्तर ध्रुवप्रदेशांतील निसर्गघटनांचा उल्लेख आला आहे, असें टिळकांचें म्हणणें ! म्हणजे असें, की ५००० वर्षांहून अधिक कालापूर्वी आपल्या पूर्वजांना उत्तरध्रुवप्रदेशांत जे निसर्गघटनात्मक अनुभव आले, ते अनुभव मंत्रद्रष्टया वैदिक ऋषींच्या स्मृतींत – परंपरेने कां होईना पण – जिवंत राहिले होते, असें मानावें लागतें. परंतु मध्यंतरीं एवढा मोठा काल गेला असतां – तो कालहि शांततेचा किंवा स्थिरजीवनाचा नव्हता – आणि इतकीं स्थित्यंतरें झालीं असतां, अशा प्रकारची स्मृति कायम राहील, ही गोष्ट शक्य वाटत नाही. दुसरें असें, की अशी स्मृति विशेषेंकरून वैदिक आर्य आणि इराणी यांनाच तेवढी कां राहिली ?

भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने विचार केला तरीहि टिळकांची उपपत्ति बुद्धीला पटण्यासारखी नाही, असें आढळून येतें. क्रोलच्या ज्या हिमयुगविषयक मताचा आधार टिळकांनी आपल्या उपपत्तीस घेतला आहे, तें मतच शास्त्रज्ञांनी आतां असिद्ध ठरविलें आहे. भूगर्भशास्त्र आणि पुराणवस्तुसंशोधनशास्त्र यांच्या पुराव्यावरून अलिकडे संशोधकांनी मानवेतिहासाचे सामान्यपणे पुढील टप्पे ठरविले आहेत–

(१) चवथें आणि शेवटचें हिमयुग (गुहामानव) – सनपूर्व ५०,००० वर्षे.

(२) पूर्वाश्मयुग – सनपूर्व ३५,००० वर्षे.

(३) उत्तराश्मयुग (रेनडिअर – मानव) – सनपूर्व १५,००० वर्षे.

(४) नवाश्मयुग – सनपूर्व १०,००० वर्षे.

(५) अश्म – धातुयुग (सुमेरी संस्कृति) – सनपूर्व ६,००० वर्षे.

(६) ब्राँझयुग (मानवाची सृजनशक्ति विशेषत्वाने प्रकट होऊं लागली) – सनपूर्व ४००० वर्षे.

(७) अयोयुग (कृषितंत्रादि) – सन पूर्व १,५०० वर्षे.

ही युगगणना जर मान्य केली, तर टिळकांनी उल्लेखिलेलें

आंतरहिमयुग त्यांनी गृहीत धरलेल्या काळापेक्षां किती तरी मागे न्यावें लागेल ! आर्यांच्या वसतीला पुरेसा भूप्रदेश तरी उत्तरध्रुवानजीक उपलब्ध होता किंवा नाही याबद्दलहि चिकित्सक टीकाकारांनी संशय व्यक्त केला आहे. टिळकांनी ज्योतिष्यकीय पुराव्यावरून वैदिक मंत्रांचा काल सन पूर्व ५-६ सहस्र वर्षें इतका धरला आहे. वैदिक भाषा आणि तिचा इतर यूरोभारतीय भाषांशीं असलेला विशिष्ट संबंध यांचा विचार केला, तर ही कालगणना स्वीकार्य वाटत नाही. किंबहुना आपली उपपत्ति पुढे मांडतांना टिळकांनी भाषाशास्त्राची दखल जवळजवळ मुळीच घेतली नाही, असें म्हटलें तरी चालेल.

आर्यांचें मूल वसतिस्थान भारतांतच होतें, या उपपत्तीचा पुरस्कार जरी अलिकडे कांही – विशेषत: भारतीय विद्वानांनी केला असला, तरी आधुनिक संशोधकांकडून तिला फारशी मान्यता मिळालेली नाही. या उपपत्तीच्या प्रवर्तकांनी पुढे मांडलेले पुरावे जरी वेगवेगळे असले, तरी त्यांवरून आर्यांचें मूल वसतिस्थान म्हणून वायव्य भारतांतील कोणतातरी प्रदेश सामान्यत: सूचित झालेला आहे. 'आर्यों का आदिदेश' या आपल्या हिंदी प्रबंधांत श्री. संपूर्णानंद यांनी प्रथम पाश्चात्य पंडितांनी याविषयीं मांडलेल्या उपपत्तींचें खंडन करण्याचा प्रयत्न केला आहे. आर्यांचें मूल वसतिस्थान उत्तरध्रुवप्रदेशांत होतें, या टिळकांच्या मताचें विस्तृत विवेचन करून तें मतहि अग्राह्य आहे, असें त्यांनी पुढे म्हटलें आहे. प्राचीन ग्रीक, प्राचीन इराणी आणि वैदिक भारतीय हे सर्व लोक एकाच –म्हणजे आर्य –मानव वंशांतील होते. व तो आर्य मानवसमूह प्रथम सिंधु आणि सरस्वती या नद्यांमधील, ऋग्वेदांत सप्तसिंधु या नांवाने प्रसिद्ध असलेल्या प्रदेशांत, वसति करून राहिला होता. परंतु पुढे एक प्रकारचें धार्मिक युद्ध –ज्याचा वैदिक वाङ्मयांत देवासुरसंग्राम असा वारंवार उल्लेख केलेला आहे– उद्भवून आर्यांच्या कांही टोळ्यांना सप्तसिंधूंतून इराणाकडे व नंतर तेथूनहि कॅस्पियन आणि कृष्ण समुद्राच्या बाजूंनी बाल्कन देश आणि मध्यसमुद्रावरील बेटें यांच्याकडे निर्गमनें करावीं लागलीं. म्हणजे आर्यांच्या निर्गमनाचें कारण त्यांच्या मूल वसतिस्थानांत झालेली लोकसंख्येची वाढ हें नसून देवासुरसंग्राम हें होतें. संपूर्णानंदांनी आपली उपपत्ती मुख्यत: ऋग्वेदांत उपलब्ध झालेल्या पुराव्यावर आधारलेली आहे. ते पुढे म्हणतात, की अलिकडे ज्ञात झालेली मोहेंजोदडो–हराप्पा संस्कृति अनार्य – सेमिटिक – आहे. ती ऋग्वेदोत्तरकालीन आहे; पण तिच्यावर आर्यसंस्कृतीचा प्रभाव मात्र मुळीच पडलेला दिसत नाही.

श्री. लक्ष्मीधर कल्ला यांचें मत असें आहे, की प्राचीन परंपरा लक्षांत घेतां आर्यलोक आणि हिमालयपर्वत हे दोन्ही पहिल्यापासूनच अविभाज्य असे होते. म्हणजे आर्यांची प्राथमिक वसति हिमालयांत होती, असें मानणें अपरिहार्य आहे. लक्ष्मीधर यांनी या आपल्या विधानास पोषक असे एकूण अकरा मुद्दे आपल्या प्रबंधांत नमूद केले आहेत. नीलमतपुराणाच्या आधारें ते पुढे असें म्हणतात, की हल्लीचा काश्मीर प्रांत आहे, तिथे पूर्वी एक मोठें सरोवर होतें. आपल्या मूलस्थानाहून खाली येऊन आर्यांच्या कांही पहिल्या टोळ्यांनी त्या सरोवरांतील पाणी बाहेर काढलें व तो भूभाग वसतीस योग्य असा केला. नंतर त्या भूभागास, आपल्या नेत्याच्या म्हणजे कश्यपाच्या नांवावरून, कश्यपमिर हें नांव दिलें व तिथे आपल्या निर्गमनांतली पहिली वसाहत केली.

आर्यांच्या मूल वसतिस्थानासंबंधीं चिकित्सा करतांना, आर्य या शब्दाच्या अर्थाचा प्रथम विचार करणें अवश्य आहे, असा उपक्रम करून रामचरित सिंग असें सांगतात, की पुढे जरी आर्य या शब्जाचा अर्थ कुलीन, उदात्त, श्रेष्ठ असा झालेला असला, तरी मूलत: तो शब्द 'अर्' म्हणजे नांगरणें या धातूपासून साधित झाला आहे व त्याचा मूळ अर्थ कृषीवल असाच होता. याच अर् धातूपासून हर् किंवा हल हा शब्द सिद्ध झाला असला पाहिजे, असेंहि ते पुढे सुचवितात. प्राचीन काळीं कृषिकर्म हा सर्वोत्कृष्ट आचार मानला गेलेला असल्यामुळे आर्य या शब्दाचा साहजिकपणेच श्रेष्ठ असा अर्थ झाला. म्हणजेच असें, की आर्य हें कुठल्याहि विशिष्ट मानववंशाचें नांव नव्हतें, तर ज्या लोकांनी कृषिकर्म हें व्यवसाय म्हणून प्रथमत: स्वीकारलें, ते लोक आपणांस आर्य असें म्हणवूं लागले. आणि कृषितंत्र हा मानवी संस्कृतीच्या विकासांतील एक युगप्रवर्तक असा टप्पा असल्यामुळे आर्य या नांवाचा त्यांना अभिमानहि वाटूं लागला.

कृषिकर्माचा व्यवसाय प्रथमच करणारे हे आर्य कोण ? व त्यांचें मूलस्थान कोणतें ? प्रसिद्ध रशियन वनस्पतिशास्त्रज्ञ व्हासिलोव्ह याच्या मतें मानवजातीच्या इतिहासाकडे दृष्टि टाकली, तर निरनिराळे मानववंश एका काळीं दक्षिण आशियांत एकत्र राहत होते, असें दिसून येतें. याच मताचा अनुवाद सिंग यांनी केला आहे. त्यांच्या मतें चार मानववंशांचें– म्हणजे गौर, मोंगोलियन, नीग्रॉइड आणि ऑस्ट्रॅलॉइड या मानववंशांचें – विशिष्टीकरण भारतांत झालें असलें पाहिजे. त्यांपैकी पहिले दोन वंश उत्तर भारतांत आणि दुसरे दोन दक्षिण भारतांत उत्क्रांत झाले. उत्तर भारतांतील या गौर मानववंशानेच सुमारें १२,००० वर्षांपूर्वी कृषिकर्माचा शोध

लावला व स्वत:ला आर्य म्हणविण्यास सुरुवात केली. आणि ही सर्व घटना घडली ती काश्मीर व त्याच्या आजुबाजूच्या प्रदेशांत ! आर्यांचा प्राचीन पूर्वज जो कश्यप, त्याच्या नांवावरूनच त्या प्रदेशाला कश्यपमेरु ही संज्ञा प्राप्त झाली. वेद-वाङमयांत वारंवार उल्लेखिलेल्या यव या धान्याची लागवड प्रथम याच प्रदेशांत झाली. या आपल्या मूलस्थानापासून – म्हणजे काश्मीरपासून – आर्यांनी पुढे पश्चिमेकडील प्रदेशावर आक्रमण केलें आणि इराण, मेसापोटामिया, वगैरे प्रदेशांत आपल्या वसाहती स्थापिल्या.

आर्यांचें मूल वसतिस्थान भारतांतच होतें, या मताचा दुसरा एक पर्याय राजबली पांडे यांनी सुचविला आहे. त्यांनी ऋग्वेदांतील नदीसूक्ताचा (ऋ. १०.७५) या प्रश्नाच्या दृष्टीने विचार करून असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे, की आर्यांचें मूलस्थान मध्यदेश म्हणजेच अयोध्या आणि प्रतिष्ठान (हल्लीचें अलाहाबाद) यांमधील प्रदेश हें असलें पाहिजे.

श्रीकंठशास्त्री यांनीहि मध्यदेश म्हणजे सिंधु आणि गंगा या नद्यांचें खोरें, हेंच आर्यांचें मूलस्थान होतें, असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय मूलस्थानाची उपपत्ति स्वीकारली, की आणखी एक अडचण उपस्थित होते. ती म्हणजे वैदिक संस्कृति आणि मोहेंजोदडो-हराप्पा संस्कृति यांच्या पौर्वापर्यासंबंधीं. मोहेंजोदडो-हराप्पासंस्कृति ही वेदोत्तरकालीन आहे, असें मानल्याखेरीज भारतीय मूलस्थानाची उपपत्ति सुसंगत ठरत नाही. आणि असें मानणें हें तर बुद्धीला मुळीच पटण्यासारखें नाही. सैंधवी संस्कृति ही वैदिक आर्यांहून भिन्न अशा लोकांची संस्कृति होती, ही गोष्ट आता बहुतेक सर्व संशोधकांनी मान्य केली आहे. त्या लोकांत प्रसृत असलेली विशिष्ट प्रकारची मूर्तिपूजा, त्यांना अवगत असलेली लेखनकला, त्यांच्या संस्कृतींत दिसून येणारा अश्वांचा अभाव, वगैरे गोष्टी या संदर्भांत महत्त्वाचा पुरावा म्हणून पुढे मांडतां येतील. सप्तसिंधूंतील आर्यलोकच जर भारताचे मूळचे रहिवासी असतील, तर हराप्पा-संस्कृतीचे लोक भारतांत केव्हा आणि कोठून आले ? त्यांच्या संस्कृतीच्या स्वरूपावरून ते लोक सिंधुखोऱ्यांत दीर्घकाल वसति करून राहिले असले पाहिजेत, हें स्पष्ट दिसून येतें. मग त्या काळांत आर्य लोक कुठे होते ? आणि वेदोत्तर वाङ्मयांत हराप्पियन लोक किंवा त्यांची नागर संस्कृति, यांचा उल्लेख कां नसावा ? या प्रश्नांचीं उत्तरेंहि समाधानकारक रीतीने देतां येण्यासारखीं नाहीत. तसेच भारतीय मूलस्थानाची उपपत्ति आणि ज्योति:शास्त्रीय पुरावे यांवरून सिद्ध होणारा वेदकाल इतका मागे जातो, की तो गृहीत धरून वेदकालीन इतिहास आणि वेदोत्तरकालीन इतिहास यांचा योग्य समन्वय करणें अवघड होतें.

श्री. पिठावाला यांची उपपत्ति वर वर्णिलेल्या उपपत्तीपेक्षा पुष्कळच शास्त्रीय स्वरुपाची आहे. पिठावाला यांच्या मतें भूगोलशास्त्र हेंच इतिहासाचें मुख्य अधिष्ठान समजलें पाहिजे कारण एखाद्या मानवसमूहाचा इतिहास आणि संस्कृति कांही विशिष्ट प्रकाराने घडविण्यांत तो मानवसमूह जिथे वास्तव्य करून राहिला होता, तिथल्या भौगोलिक परिस्थितीचा फार मोठा हात असतो. ज्यांचें जीवन जवळजवळ पूर्णपणे निसर्गावलंबि होतें, त्या आर्यांच्या इतिहासाचा अभ्यास करतांना तर भूगोल-शास्त्राची उपेक्षा करून मुळीच चालणार नाही. पिठावाला यांच्या विवेचनाचा हा प्रारंभबिंदु सर्वांना सामान्यपणे पटेल असाच आहे.

प्राचीन इराणी लोकांचा अवेस्ता हा ग्रंथच पिठावाला यांनी मुख्यत: प्रमाणभूत मानला आहे. त्यांत वर्णन केलेली संस्कृति म्हणजेच मूळच्या आर्यांची संस्कृति आणि त्यांत उल्लेखिलेलें ऐर्यन वएजो. म्हणजेच आर्यांचें मूल वसतिस्थान होय. पिठावाला यांच्या मतें ऐर्यन वएजोपासून आर्यांची संस्कृति नंतर पश्चिमेकडे आयर्लंड, पूर्वेकडे चीन, उत्तरेकडे स्कँडिनेव्हिया आणि दक्षिणेकडे ईस्ट इंडिज, या प्रदेशाकडे पसरली. ही गोष्ट शक्य होण्यासाठी भूगोलशास्त्राच्या दृष्टीने असें अनुमान करणें प्राप्त होतें, की आर्यांचें मूल वसतिस्थान कुठे तरी म्हणजे आशियांत मध्यवर्ती असें असलें पाहिजे. आर्यांच्या मूळ संस्कृतीबद्दल पिठावाला यांनी पुढील गोष्टी गृहीत धरल्या आहेत– ती संस्कृति सुसंरक्षित अशी नदीखोऱ्यांतील संस्कृति होती. मूळचे आर्यलोक स्थिरजीवन कंठीत होते. पशुपालन हा त्यांचा मुख्य व्यवसाय होता. त्यांच्या मूल वसतिस्थानाच्या प्रदेशांत अनेक नैसर्गिक प्रतिरोध त्यांच्या मार्गांत आले असले पाहिजेत. आणि त्यामुळे त्यांना आपल्या विकासास प्रोत्साहनच मिळालें असलें पाहिजे. गेल्या १०,००० वर्षांत पृथ्वीची स्थिति जवळ जवळ मुळीच बदलली नाही, असें आणखी गृहीत धरून मध्य-आशियांतील ६६½ अक्षांश आणि ४० अक्षांश यांमधील भूप्रदेशांची वरील प्रकारची संस्कृति निर्माण होण्याच्या शक्यतेच्या दृष्टीने पिठावाला यांनी छाननी केली आहे. या बाबतींत प्रथम डोळ्यासमोर प्रदेश येतो, तो सैबेरियाचा. परंतु तो प्रदेश फारच विस्तृत आणि विस्कळित स्वरुपाचा असल्यामुळे तिथे आर्यांच्या संस्कृतीसारखी एकसंधी संस्कृति निर्माण झाली असणें केवळ अशक्य आहे. शिवाय आर्यांनी तिथून उत्तरेकडे किंवा दक्षिणे-

कडे निर्गमनें केलीं असण्याची शक्यताहि फार थोडी आहे.

सैबेरियाच्या खाली मध्य-आशियांत ५५ आणि ५० अक्षांशांमध्ये एक काळचा जमिनीची पट्टी लागते. तिथे गवतहि पुष्कळ निर्माण होतें. पण आर्यांच्या मूलस्थानांत नद्यांच्या पाण्याची सुबत्ता जशी अस्तित्वांत असली पाहिजे, तशी या भूप्रदेशांत नाही. पुढे पूर्वेस येनिसियि नदीचें खोरें, पश्चिमेस व्होल्गा नदीचें खोरें वगैरे भूप्रदेशांची चांचणी करीत करीत पिठावाला यांनी शेवटीं सिरदर्या आणि अमुदर्या या नद्यांमधील प्रदेशांत आर्यांचें मूल वसतिस्थान असणें सर्वांत अधिक संभाव्य आहे, असें मत प्रदर्शित केलें आहे. भूगोलशास्त्राच्या अनुरोधानें निश्चित केलेल्या या प्रदेशास वेन्दिदादमध्ये केलेलें ऐर्यन वएजोचें वर्णन बरेंच लागू पडतें, असेंहि त्यांनी पुढे म्हटलें आहे. तसेंच त्यांच्या मतें सिरदर्या या नांवांत अवेस्तांतील आर्दुइ सुरा या नदीच्या नांवाची स्मृति कायम ठेविली गेली असावी.

पिठावाला यांच्या उपपत्तीची पद्धति बरीच शास्त्रीय स्वरूपाची आहे, यांत शंका नाही; पण वर दर्शविल्याप्रमाणे तिला मर्यादाहि बऱ्याच आहेत. दोनच गोष्टींचा उल्लेख करायचा झाल्यास असें म्हणतां येईल, की पिठावाला वाङ्मयदृष्टया वेन्दिदाद या प्राचीन इराणी ग्रंथापलिकडे गेले नाहीत. आणि त्यांनी मूल-यूरोभारतीय भाषेचा मुळीच विचार केलेला नाही. याचा परिणाम म्हणजे त्यांना यूरोभारतीय-भाषिकांचें मूलस्थान निश्चित करतां आलें नाही.

आर्यांचें मूल वसतिस्थान शोधून काढण्यासाठी आधुनिक संशोधकांनी भाषाशास्त्रावलंबि पुराणवस्तुविज्ञान या शास्त्राचा मुख्यतः आधार घेतला आहे. प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्याची हीच पद्धति सर्वांत अधिक सयुक्तिक आहे. आपल्या आजच्या विषयाच्या दृष्टीने भाषाशास्त्रावलंबि पुराणवस्तुविज्ञान या शास्त्राच्या आधारें विद्वानांनी प्रतिपादिलेलीं कांही विधानें मूलभूत आणि सिद्ध म्हणून मानायला कांही हरकत नाही.

पश्चिमेकडे आयर्लंडपासून तों पूर्वेकडे भारतापर्यंत पसरलेल्या विस्तृत भूप्रदेशांत ज्या मुख्य भाषा प्राचीन कालीं प्रचलित होत्या, त्या सर्व भाषांचें मूळ अशी एक भाषा—जिला मूल-यूरोभारतीय भाषा अशी संज्ञा देणें योग्य ठरेल— एके काळीं अस्तित्वांत असली पाहिजे. ती मूल-भाषा कांहीं काळ तरी एका विशिष्ट मर्यादित अशा प्रदेशांत उपयोजिली जात असली पाहिजे. अर्थातच ती भाषा बोलणाऱ्या मूळच्या लोकांतहि एक प्रकारची एकरूपता अस्तित्वांत असली पाहिजे. ती एकरुपता वांशिक स्वरूपाची नव्हती, हें निर्विवाद आहे. भाषा आणि वंश हीं कोणत्याहि अपरिहार्य बंधनांनी परस्परांशी संबद्ध नसतात, ही गोष्ट मुद्दाम लक्षांत घेतली पाहिजे. म्हणून मूल-यूरोभारतीय भाषा बोलणारे लोक यूरोभारतीय मानववंशाचे होते, असें मानणें सर्वथैव अशास्त्रीय होतें. प्रागैतिहासिक पुराणवस्तुसंशोधनशास्त्र निश्चितपणें असें मानण्याविरुद्ध साक्ष देतें. त्या लोकांत राजकीय दृष्टया एकराष्ट्रीयत्व होतें, असेंहि मानतां येणार नाही. मग ही एकरूपता कोणत्या प्रकारची होती ? जरा खोलवर विचार केला तर असें आढळून येईल, की ती एकरूपता अर्थजीवनात्मक असली पाहिजे. मूल-यूरोभारतीय भाषिकांची भोंवतालची परिस्थिति भौगोलिक दृष्टया तसेंच पशुसंपत्ति, वृक्षसंपत्ति इ. दृष्टींनी समान असल्यामुळे त्यांचें भौतिक किंवा आर्थिक जीवन आणि धर्मकल्पना यांच्या एकरूपतेसंबंधी अनुमान करणें कठिण नाही. भाषा, भौतिक जीवन आणि धर्मकल्पना या बाबतींत साधारण असलेल्या या लोकांचें मूल वसतिस्थान कुठें असलें पाहिजे, हीच भाषाशास्त्रावलंबि पुराणवस्तुविज्ञानाची मुख्य समस्या आहे.

यूरोभारतीय-भाषिकांच्या मूल वसतिस्थानासंबंधीं भाषाशास्त्रदृष्टया चर्चा करतांना मूल-यूरोभारतीय भाषा ही एका अर्थी स्वयंसिद्ध किंवा अनन्याश्रयी भाषा होती, असें सामान्यतः समजण्यांत येत असे. उत्तरकालीन निरनिराळ्या यूरोभारतीय भाषांच्या अभ्यासावरून त्या भाषांची सर्वप्रथम पूर्वज अशी जी भाषा भाषाशास्त्राच्या साहाय्याने सिद्ध करतां येते, ती भाषाच अशा चर्चेचा प्रारंभबिंदु म्हणून मानली जात असे; परंतु त्या भाषेच्या या सिद्ध स्वरूपाशींच न थांबतां त्याच्याहि मागे जाऊन त्या भाषेचा उद्‌गम व प्राथमिक विकास होत असतां तिच्यावर तिच्यापूर्वी प्रचलित असलेल्या किंवा तिच्या समकालीन असलेल्या निरनिराळ्या परकीय भाषांचा जो परिणाम अपरिहार्यपणे झाला असला पाहिजे, तो या संदर्भांत लक्षांत घेणें आवश्यक आहे. तसेंच या मूल-यूरोभारतीय भाषेवरून ती भाषा बोलणाऱ्या लोकांच्या संस्कृतीविषयीं जे निष्कर्ष काढले जाऊं शकतात, त्या निष्कर्षांचा प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्रागैतिहासिक पुराणवस्तुसंशोधनशास्त्र, मानववंशशास्त्र इ. शास्त्रांच्या अभ्यासाने निघणाऱ्या निष्कर्षांशीं प्रत्ययकारी समन्वय लावणें, हेंहि आवश्यक आहे.

या दृष्टींनी मूल-यूरोभारतीय भाषेचा विचार करूं लागलों, तर आपणांस प्रथम जी एक गोष्ट स्पष्टपणे प्रतीत होते ती ही, की त्या भाषेवर उग्रो-फिनिश भाषेचा चांगलाच परिणाम झालेला आहे. कोलिंडर या भाषाशास्त्रज्ञाने मूल-यूरोभारतीय भाषा आणि उग्रो-फिनिश भाषा यांच्या घडणींतील बहुविध साम्य दाखविलें आहे. हें साम्य केवळ परस्परांनी केलेल्या

वरवरच्या उसनवारीच्या स्वरूपाचें नाही. त्या दोन भाषांचा अगदी निकटचा संबंध आला असला पाहिजे —— आणि तोहि त्या भाषांच्या प्राथमिक अवस्थेंत आला असला पाहिजे —— असेंच तें साम्य दर्शवितें. भाषाशास्त्राच्या अभ्यासावरून जो हा निष्कर्ष काढतां येतो, त्याला पोषक असा बराच महत्त्वाचा पुरावा मानवेतिहासशास्त्राच्या आधारें उपलब्ध करून दिला गेला आहे.

मूल–यूरोभारतीय–भाषिकांच्या सांस्कृतिक जीवनावर जो आणखी परिणाम झालेला दिसतो, तो अल्ताइक लोकांचा. मूल-यूरोभारतीय भाषा आणि कॉकेशियन नजीकच्या आशियांतील भाषा यांच्यामधील संबंधाचा विचार केला, तर मूल-यूरोभारतीय-भाषिकांचें वास्तव्य उरल प्रदेशाच्या दक्षिणेस– म्हणजेच जिथे त्यांच्यावर अल्ताइक लोकांच्या संस्कृतीचा प्रभाव पडणें शक्य होतें, अशा प्रदेशांत– असलें पाहिजे, असें मानावें लागतें. मूल-यूरोभारतीय संस्कृतीवर परिणाम केलेल्या आणखी एका संस्कृतीचा उल्लेख येथे करायला हवा. सेमिटिक भाषा आणि मूल-यूरोभारतीय भाषा यांचा तौलनिक अभ्यास केल्यास असें दिसून येईल, की कांही विशिष्ट बाबतींत त्या भाषांचे परस्परांशी बरेंच साम्य आहे. उदाहरणार्थ यूरोभारतीय आणि सेमिटिक या दोन भाषाकुटुंबांतच व्याकरणांतील तीन लिंगें मुख्यत: अस्तित्वांत आहेत.

म्हणजे आता असें विधान करायला हरकत नाही, की ज्या प्रदेशांत उग्रो-फिनिश, अल्ताइक आणि सेमिटिक या भाषांचा प्रभाव तिच्यावर पडणें शक्य होतें, अशा प्रदेशांतच मूल-यूरो-भारतीय भाषेचा उद्‌गम आणि प्राथमिक विकास झाला असला पाहिजे आणि असा एक प्रदेश म्हणजे उत्तर किरघीज प्रदेश हाच होय.

या निष्कर्षास उपोद्बलक असा बराचसा पुरावा इतर मार्गांनीहि उपलब्ध होऊं शकतो. मूल-भारतीय Peku (सं. पशु) हा शब्द प्राचीन असून तो मूळचा माणसाळलेल्या मेंढ्यांचा वाचक असा होता. पुढे अर्थविकासक्रमाने तो शब्द सर्व माणसाळलेल्या प्राण्यांना उद्देशून वापरण्यांत येऊं लागला. याच्या उलट मूल-यूरोभारतीय Ouis (सं. अवि) हा शब्द निश्चितपणे नंतरचा आहे. Peku या शब्दाच्या मूळच्या अर्थाचा विस्तार होऊन जेव्हा तो शब्द सर्व माणसाळलेल्या प्राण्यांना लावण्यांत येऊं लागला, तेव्हाच Ouis हा शब्द अस्तित्वांत आला असला पाहिजे. यावरून असें अनुमान काढतां येणें शक्य आहे, की मूल-यूरोभारतीय-भाषिकांनी सर्वप्रथम माणसाळविलेले प्राणी म्हणजे मेंढ्याच होत. प्राणिशास्त्राचा असा एक सामान्य सिद्धान्त आहे, की ज्या प्रदेशांत एखाद्या प्राण्याची रानटी जात आढळते, त्या प्रदेशांतच त्या प्राण्याला माणसाळविलें जातें. रानटी मेंढ्यांचें मुख्य स्थान म्हणजे उरल-अल्ताय प्रदेश. आणि रानटी मेंढ्या माणसाळविणाऱ्या मूल-यूरोभारतीयांचें वसतिस्थानहि तिथेच असलें पाहिजे.

मूल-यूरोभारतीयांना परिचित असलेला दुसरा प्राणी म्हणजे घोडा. त्या लोकांना घोड्याचा परिचय कसा झाला असेल यासंबंधी नेरिंग याने बरेंच विवेचन केलें आहे. प्राणिशास्त्र आणि प्रागैतिहासिक पुराणवस्तुसंशोधनशास्त्र यांच्या आधारें त्याने असें दाखविलें आहे, की घोडे पाळण्याच्या तंत्राचा अवलंब प्रथम अल्ताइक लोकांनी केला व नंतर तें तंत्र मूल-यूरोभारतीयांना अल्ताइक लोकांच्या संपर्कामुळे अवगत झालें.


मूल-यूरोभारतीय Guos (सं. गौ:) या शब्दासंबंधीं अलिकडे जें भाषाशास्त्रीय संशोधन झालें आहे त्याचा निष्कर्षहि वरील निष्कर्षास जुळता असाच आहे. मूल-यूरोभारतीय भाषेंत तो शब्द सुमेरियन gu(d) या शब्दापासून घेतला असावा, असें मत इप्सेन याने पुढे मांडलें आहे. परंतु तें मत स्वीकारण्यांत अनेक अडचणी आहेत. मूळ सुमेरियन शब्द gud असा आहे. तो मूल-यूरोभारतीय भाषेंत घेतला गेला तेव्हा त्यांतील शेवटच्या व्यंजनाचा लोप झालेला होता. सुमेरियन शब्दांतील शेवटच्या d या व्यंजनाचा लोप होण्यास प्रारंभ झाला, तो बऱ्याच उशीराने म्हणजे सनपूर्व २५०० च्या सुमारास. मूल-यूरोभारतीय guos या शब्दापासून सिद्ध झालेले शब्द बहुतेक सर्व महत्त्वाच्या यूरोभारतीय भाषांत अस्तित्वांत आहेत. आणि या भाषा बोलणाऱ्या लोकांचीं मूल वसतिस्थानापासून निर्गमनें सुरू झालीं, तीं निश्चितपणे सनपूर्व २५०० च्या पूर्वींपासून. म्हणजेच guos हा शब्द त्याच्याहि पूर्वीं मूल-यूरोभारतीय भाषेंत आला असला पाहिजे. अर्थात् तो शब्द सुमेरियन भाषेंतून घेतला गेला असणें शक्य नाही.

त्याचप्रमाणे मूल-यूरोभारतीय भाषा-भाषिकांस परिचित असलेल्या कुत्रा आणि सूकर या ण्यांचाहि प्राणिशास्त्र, प्रागैतिहासिक पुराणवस्तुसंशोधनशास्त्र आणि भाषाशास्त्र यांच्या दृष्टींनी नेरिंग याने विचार केला आहे. मूल-यूरोभारतीयांना ज्ञात असलेल्या पशुधनाच्या संबंधींच्या विवेचनावरून शेवटी त्याने असा निष्कर्ष काढला आहे, की मूल-यूरोभारतीयांस परिचित असलेल्या प्राण्यांचें मूलस्थान उरल व अल्ताय या प्रदेशांतच असलें पाहिजे आणि त्या प्राण्यांना माणसाळविण्याचें तंत्र मूल-यूरोभारतीय लोक आंतर-आशियांतील लोकांपासूनच शिकले असावेत.

यूरोभारतीयांच्या मूल वसतिस्थानाच्या प्रश्नाचा विचार

करतांना आणखी एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. मूल-यूरोभारतीय मानवसमूहांतून ज्या निरनिराळ्या लोकांचीं निर्गमनें झालीं, त्या लोकांचा उत्तरकालीन इतिहास पाहिला तर त्यावरून मूल–यूरोभारतीयांच्या कालासंबंधीं कांही अनुमान करणें शक्य आहे. उदा० पहिल्या ट्रोजन संस्कृतीचें स्वरूप निश्चितपणे यूरोभारतीय होतें आणि त्या संस्कृतीचा काल सनपूर्व ३००० वर्षे इतका तरी असला पाहिजे, असें मानतां येतें. तसेंच हराप्पा संस्कृतीच्या अंताचा काल सनपूर्व २५००–२००० हा आहे. त्या संस्कृतीचा नाश वैदिक आर्यांनी केला, असें सामान्यपणे गृहीत धरलें जातें. आणि त्या आर्यांचे पूर्वज तर या कालापूर्वी अनेक वर्षे मूल–यूरोभारतीयांपासून विभक्त झाले होते, असें दाखवितां येतें. म्हणजे मूल–यूरोभारतीयांचा काल ख्रिस्तपूर्व ४०००–३५०० हा होता, हें साहजिकपणेच प्राप्त होतें. पुराणवस्तुसंशोधनशास्त्राच्या आधारें असें दाखवितां येतें, की मृत माणसांना पुरून त्यावर तांबड्या रेतीचे ढीग (Kurgan) करणाऱ्या लोकांची संस्कृति (जिला कुर्गन–संस्कृति असें म्हणतां येईल), रज्जुमुद्रित मृत्पात्रें निर्माण करणाऱ्या लोकांची संस्कृति आणि त्रिपोलजे संस्कृति या तीन संस्कृतींशीं मूल–यूरोभारतीयांचा अगदी निकटचा संबंध आला होता. या तीन्ही संस्कृति ख्रिस्तपूर्व चवथ्या सहस्रकाच्या पहिल्या अर्धांत उरल–अल्ताय प्रदेशाच्या आजूबाजूस अस्तित्वांत असल्याचें पुराणवस्तुसंशोधनशास्त्राने सिद्ध केलें आहे. या तीन संस्कृतींच्या प्रतिनिधिभूत असलेल्या लोकांपैकी रज्जुमुद्रित मृत्पात्रें निर्माण करणारे लोक म्हणजेच मूल–यूरोभारतीय लोक, असें सुचविणारा पुरावाहि उपलब्ध झाला आहे.

त्यापेक्षाहि कुर्गन–संस्कृति ही मुख्यतः मूल–यूरोभारतीयांची संस्कृति होती, असें सिद्ध करणारा अधिक भक्कम पुरावा उपलब्ध झाला आहे. मूल–यूरोभारतीय लोकांत प्रेतें पुरण्याची चाल आस्तित्वांत असल्याचें दिसून येतें. प्रेताची विल्हेवाट करण्याची पद्धति ही कोणत्याहि मानवसमूहाच्या जीवनांतील एक मूलभूत अशी बाब समजली पाहिजे. या बाबतींतली आपली पद्धति सोडायला तो मानवसमूह सहसा तयार होत नाही. प्रत्येक मृत माणसासाठी वेगवेगळा खड्डा खणून त्यांत त्याचा देह पुरायचा, त्या खड्डयावर खणलेल्या मातीचा ढीग रचायचा, आणि अशा ढिगाभोवती एक किंवा दोन लांकडीं कुंपणें घालायचीं, अशी प्राचीन यूरोभारतीय–भाषिकांची पद्धति होती. ऋग्वेदांतहि अशा प्रकारच्या कुंपणाचा उल्लेख आला आहे (ऋ. १०·१८·४, १३). त्यावरून ती पद्धति किती दूरवर पसरली होती, याची कल्पना येईल. किरघीज प्रदेशांत अशीं मृतांचीं मातीचीं थडगीं किंवा कुर्गन अनेक आढळतात. बोगडानोव्ह या रशियन पुराणवस्तुशास्त्रज्ञाच्या मतें त्यांपैकी बरेच कुर्गन नवाश्मयुगकालीन आहेत. याचाच अर्थ असा, की मृतदेह दुमडलेल्या स्थितींत खड्डयांत पुरून त्यावर तांबड्या मातीचा ढीग रचण्याचा प्रघात किरघीज प्रदेशांतूनच पुढे पश्चिमेकडे आणि आग्नेयीकडे प्रसृत झाला. मूल-यूरोभारतीय-भाषिकांचे वैशिष्टचपूर्ण युद्धपरशुहि उत्तर किरघीज प्रदेशांतील कांही उत्खननांत उपलब्ध झाले आहेत. म्हणजे असें, की यूरो–भारतीयांच्या मूल वसतिस्थानासंबंधीं वर काढलेल्या निष्कर्षाच्या बाबतींत पुराणवस्तुसंशोधनशास्त्र



मूल–यूरोभारतीय–भाषिकांचें वसतिस्थान आणि त्यांचीं मुख्य निर्गमनें दर्शविणारा स्थूलालेख

आणि मानवेतिहासशास्त्र या शास्त्रांनी भाषाशास्त्राचा चांगलाच पाठपुरावा केला आहे.

आतांपर्यंत केलेल्या प्रतिपादनाचा आशय असा– मूल–यूरोभारतीय भाषेला तिचेंच असें विशिष्ट स्वरूप प्राप्त झालें, तें उत्तर–किरघीज प्रदेशांत. म्हणून त्याच प्रदेशास ती भाषा बोलणाऱ्या लोकांचें, म्हणजेच वैदिक भारतीयांचा संबंध ज्यांच्यापर्यंत स्पष्टपणे आणि निःसंदिग्धपणे पोचूं शकतो अशा त्यांच्या सांस्कृतिक पूर्वजांचें, मूल वसतिस्थान, असें आपण मर्यादित अर्थानें म्हणूं शकतों. त्या वसतिस्थानापासून मूल–यूरोभारतीयभाषिकांची दोन मोठीं निर्गमनें घडून आलीं. ज्या लोकांनी पश्चिमेकडे जाऊन यूरोपांतील ग्रिप्रेट प्रदेशांत पुन्हा कांही काल वसति केली, त्यांना सामान्यपणे पूर्व–यूरोपीय अशी संज्ञा देतां येईल. या पूर्व–यूरोपीयांच्याहि पूर्वी मूल–यूरोभारतीय–भाषिकांच्या कांही टोळ्यांनी उत्तर–किरघीज प्रदेशांतून बल्ख प्रदेशाकडे प्रयाण केलें होतें. हेंच लोक पूर्वार्य होत. या पूर्वार्यांनी बल्ख प्रदेशांत बऱ्याच कालपर्यंत वसति केली होती; पण पुढें त्यांचींहि तीन मोठीं निर्गमनें झालीं. मिटानी, हुरियन इ. लोकांचे पूर्वज मध्य–आशियांत गेले. प्राचीन इराण्यांचे पूर्वज इराणकडे गेले आणि वैदिक भारतीयांच्या पूर्वजांनी वृत्रहा आणि पुरंदर अशा इंद्राच्या नेतृत्वाखाली सप्तसिंधुप्रदेशावर विजयाक्रमण केलें. [आर्यांचें मूल वसतिस्थान–डॉ. रा. ना. दांडेकर; ऋग्वेदिक आर्य.]

(२) सत्कुलोद्भव (अमर). मान्य, उदारचरित, शांतचित्त असे याचे पर्यायार्थ आहेत. याची व्याख्या अशी–

कर्तव्यमाचरन् काममकर्तव्यमनाचरन् ।
तिष्ठति प्राकृताचारे स तु आर्य इति स्मृतः ।

अर्थ– कर्तव्याचें पालन करणाऱ्या, तसेंच अकर्तव्याचें आचरण न करणाऱ्या व सामान्य जनांच्या आचाराला अनुसरणाऱ्या पुरुषाला आर्य असें म्हणतात. [श. क.]

आर्यक प्लक्षद्वीपांतील ब्राह्मणतुल्य एक जात. [पु. इ.]

आर्यका क्रौंचद्वीपांतील एक नदी. [भाग. पु. ५. २०. २१]

आर्य घोटक घोटक = घोडा. हा शब्द कोशांत आढळत नाही. प्राचीन काळीं सोन्या-चांदीच्या अलंकारांनी सजवून एक घोडा वरातीपुढे चालवीत, त्याला हें नांव होतें. या घोड्यावर कोणी बसत नव्हतें. सांप्रतहि ही चाल अनेक ठिकाणीं दिसते. [शृं. हा.]

आर्यदीक्षित (१७ वें शतक) द्रविड स्मार्त ब्राह्मण. याने अलंकार व अध्यात्मविद्या या दोहोंवर मिळून चौऱ्यांयशी ग्रंथ लिहिले आहेत. [म. च. को.]

आर्यदेव नागार्जुनाचा एक शिष्य. याला देव, काणदेव किंवा नीलनेत्र असेंहि म्हणतात. हा मुळांत लंकेचा रहिवासी असून तो विद्याभ्यासासाठी नालंदा येथे नागार्जुनाकडे आला होता. नागार्जुनाने त्याच्या बुद्धिमत्तेची चांचणी घ्यावी, या हेतूने स्वच्छ जलाने भरलेलें एक पात्र त्याच्याकडे पाठविलें. आर्यदेवाने त्यांत एक सुई घालून तें पात्र नागार्जुनाकडे परत पाठविलें. तें पाहून नागार्जुन प्रसन्न झाला व त्याने आर्यदेवाला आपला शिष्य म्हणून मान्यता दिली. जलपूर्ण पात्राने आर्यदेवाचें ज्ञान हें निर्मल व पूर्ण आहे, असें नागार्जुनाने सुचविलें होतें व त्या पात्रांत सुई घालून आपल्याला त्या ज्ञानाचा तळ गांठायचा आहे, असें आर्यदेवाने सूचित केलें होतें. आर्यदेव हा शास्त्रकार होता. त्याने अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले असून त्यांपैकी चतुःशतक हा प्रसिद्ध आहे. त्यांत चारशें कारिका आहेत. [बौ. ध. द.; हिं. वि. को.]

आर्य बुद्धावतंसक बौद्धांच्या महायान पंथाचें एक सूत्र. या ग्रंथाचा उल्लेख महाव्युत्पत्ति या ग्रंथांत आढळतो (६५.४). चिनी त्रिपिटकांत व तिबेटी कांजुरमध्ये अवतंसक साहित्य प्राप्त होतें. या नांवाचा एक बौद्ध निकाय इ. स. च्या ६ व्या शतकांत निर्माण झाला होता. त्याच निकायाचा हा पवित्र ग्रंथ आहे. जपानमधला ' केगोन ' निकायहि या ग्रंथाला मान्यता देतो. चिनी परंपरा सांगते, की अशीं वेगवेगळीं सहा अवतंसक सूत्रें होतीं व त्यांत छत्तीस हजारांपासून तो एक लक्षापर्यंत गाथा संग्रहीत होत्या. या ग्रंथांत बोधिसत्त्वाच्या उपासनेचा परम प्रकर्ष दिसून येतो. मूळ संस्कृत ग्रंथ अजून उपलब्ध झाला नाही.

आर्यभट (४ थें शतक) हा कुसुमपुराचा (पाटना) रहिवासी असून महान् गणिती व ज्योतिर्विद होता. याने प्राचीन ज्योतिषग्रंथांचें संशोधन व स्वतःचे अनुभव यांच्या आधारें आर्यभटीय या ग्रंथाची रचना केली. हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. त्याची रचनापद्धति वैज्ञानिक असून भाषा सुश्लिष्ट आहे. या ग्रंथाचे चार पाद असून सर्व मिळून १२१ श्लोक आहेत—

(१) **गीतिकापाद**– यांत अक्षरांच्या आधारें संक्षेपांत संख्या लिहिण्याची स्वनिर्मित पद्धति दिली आहे.

(२) **गणितपाद**– यांत अंकगणित, बीजगणित व रेखागणित यांच्यासंबंधीं कांही सूत्ररूप नियम दिले आहेत.

(३) **कालक्रियापाद**– यांत कालगणना, युगें, त्यांचा उत्सर्पिणी व अवसर्पिणी हा कालविभाग, ग्रहांची मध्यम व स्पष्ट गति इ. विषय आले आहेत.

(४) **गोलपाद**– यांत क्रांतिवृत्त, संपातबिंदु, सूर्यापासून ग्रहांचीं अंतरें, खगोलवर्णन, ग्रहणें वर्तविण्याची रीति इ. विषय आले आहेत.

या ग्रंथाचा प्रचार द. भारतांत विशेष रूपाने झाला. इ. स. १६–१७ व्या शतकापर्यंत दक्षिणेंत याचें अध्ययन–अध्यापन सुरू होतें. याच ग्रंथाच्या आधारें बनणारें पंचांग आजहि दक्षिणेंतल्या वैष्णवपंथांत मान्य आहे. त्या मानाने त्याचा उत्तर भारतांत विशेषसा प्रचार झाला नाही. आर्यभटाच्या मागून झालेल्या ब्रह्मगुप्ताने आर्यभटाची अनेक कारणांसाठी निंदा केली असली, तरी त्यालाहि आपल्या खंडखाद्यक या ग्रंथांत आर्यभटाचेंच अनुकरण करावें लागलें आहे. आर्यभटीय या ग्रंथाचे दोन इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध आहेत. एक सेनगुप्त यांचा व दुसरा डब्ल्यू. इ. क्लार्क यांचा. आर्यभट केवळ गणिती नव्हता, तर तो आकाशस्थ ज्योतींचे वेध घेण्यांतहि कुशल होता. [हिं. वि. को.; वै. वि. भा. प.]

आर्यभट द्वितीय – (८ वें शतक) हाहि एक गणिती व ज्योतिर्विद होता. याचा महासिद्धान्त नामक एक ज्योतिष ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. या ग्रंथाचे १८ अधिकार असून ६२५ आर्यांत तो निबद्ध आहे.

आर्य मंजुश्री मूलकल्प

मंत्रयान संप्रदायाचा ग्रंथ. या ग्रंथांत शक्तिवादाचा प्रचार आहे, त्याबरोबरच साधनामार्गांतील मुद्रा, मंडल, यक्षिणी, डाकिनी, आसुर देवता, यांचाहि प्रपंच आहे. तसेंच यांत अथपासून इतिपर्यंत मंजुश्री बोधिसत्त्वाचें माहात्म्य वर्णित आहे. मंजुश्रीचे मंत्र प्राणिमात्राला आयुरारोग्य देणारे व भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारे असून या मंत्रांनी अनेक अलौकिक सिद्धिहि प्राप्त होतात, असें यांत म्हटलें आहे. यांत सिद्धिप्राप्तीसाठी ध्यान व विधि या दोन गोष्टी आवश्यक मानलेल्या असून प्रत्येक तांत्रिक क्रियेसाठी संपूर्ण विधि-विधान दिलेलें आहे. प्रस्तुत ग्रंथांत कांही महत्त्वाची ऐतिहासिक माहिती उपलब्ध होते. विशेषतः उत्तरकालीन गुप्त राजे व मौखरि राजे यांच्याबद्दल बरीच महत्त्वाची माहिती त्यांत आलेली आहे. [तां. बौ. सा. सा.]

आर्यरक्षितसूरि

(सनपूर्व ४–३१ इ. स.) एक जैन विद्वान्. याने पाटलिपुत्र नगरींत येऊन चौदा विद्यांचें अध्ययन केलें (प्रभावक चरित्र). हा जैन मुनि होता. याने इ. स. १८ मध्ये जैनदीक्षा घेतली व जैन धार्मिक साहित्य धर्मकथानुयोग, चरणकरणानुयोग, द्रव्यानुयोग व गणितानुयोग अशा चार भागांत विभाजित केलें. [खो. प.]

आर्यवृद्धा

एक देवी. हिचा उल्लेख आर्या व वृद्धिका या दोन नांवांनी म. भा. वनपर्वांत आला आहे (२१७.९; २२०.१६). आर्येला शिशुमाता म्हटलें आहे. कुषाण कालाच्या सुमारास या देवीला स्त्रियांमध्ये खूप मान्यता होती. कंकाली टेकडीवर आर्यवतीची पाषाणावर खोदलेली एक मूर्ति सांपडली आहे. या मूर्तीला आतांपर्यंत राणीची मूर्ति असें म्हणत; परंतु तिची अभयमुद्रा तिचें देवत्व सूचित करते. आर्यवतीला सर्व धर्मांत सारखीच मान्यता असावी, असें वाटतें. ही सांपडलेली मूर्ति जैनांनी स्थापन केली आहे. आर्यवती व आर्यवृद्धा देवी एकच असली पाहिजे. सांप्रत लोक जिला बिहाई (वृद्ध आर्या) किंवा बीमाता (वृद्धिका माता) म्हणतात आणि सठीच्या दिवशीं जी मुलाचें विधिलिखित त्याच्या भाळीं लिहिते असें म्हणतात, तीच ही आर्यवृद्धा देवी असावी.

बिहाई व बी हीं एकाच मातृदेवतेचीं दोन नांवें आहेत. संध्याकाळीं बाळंतिणीच्या डोक्याजवळ उजव्या हाताला तांदूळ पसरून व त्यांवर बीमातेची मूर्ति ठेवून तिची पूजा करतात. ही मूर्ति प्रायः शेणाची असते. हिच्या गीतांना बिहाई गीतें असें नांव आहे. [कादंबरी – एक सांस्कृतिक अध्ययन]

आर्यशूर

(दुसरें ते पांचवें शतक) एक मोठा बौद्ध कवि. हा व अश्वघोष या दोन्ही व्यक्ति एकच होत, असें मानीत असत; पण शोधाअंतीं आर्यशूर हा अश्वघोषाहून भिन्न असल्याचें ठरलें आहे. याने अश्वघोषाच्या काव्यशैलीचें बेमालूम अनुकरण केलें असल्यामुळे लोकांमध्ये त्याच्या भिन्न व्यक्तित्वाविषयीं संशय निर्माण झाला होता. जातकमाला हा याचा सुप्रसिद्ध ग्रंथ होय. यांत ३४ जातकांचें सरस मनोज्ञ शैलींत वर्णन आहे. याचीं कांही जातकें पालि जातकांच्या आधारावर आहेत, तर कांही प्राचीन बौद्ध आख्यायिकांच्या आधारें लिहिलेलीं आहेत. जातकमाला चंपूशैलींत (गद्य-पद्यात्मक) निबद्ध आहे. बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी या ग्रंथाचा पुष्कळच उपयोग झालेला दिसतो. अजंटयाच्या लेण्यांतील चित्रांत जातकमालेंतल्या कथाप्रसंगांवरून कांही चित्रें काढलेलीं दिसतात. त्याच ठिकाणीं तद्विषयक श्लोकहि खोदलेले आढळतात.

याचा अलिकडेच प्रकाशांत आलेला दुसरा ग्रंथ म्हणजे

पारमितासमास हा होय. यांत सहा पारमितांचें सहा सर्गांत वर्णन केलेलें आहे. त्यांतला एक श्लोक असा --

छायातरोः स्वादुफलप्रदस्य
छेदार्थमाघूर्णपरश्वधानाम् ।
धात्री न लज्जां यदुपैति भूमि-
र्व्यक्तं तदस्या हतचेतनत्वम् ।।

अर्थ -- शीतल छाया व मधुर फळें देणाऱ्या वृक्षावर ज्याने कुऱ्हाड उचलली, अशा माणसाविषयीं (त्याचा भार वाहतांना) पृथ्वी लज्जित होत नाही, यावरूनच ती जड आहे, हें स्पष्ट होतें.

आर्यशूराच्या ग्रंथांना भारतांत, त्याचप्रमाण भारताबाहेरहि लोकप्रियता मिळाली. इ. स. च्या १० व्या शतकांत त्याच्या जातकमालेचा चिनी भाषेंत अनुवाद झाला. तिबेटी भाषेंतहि त्याचे अनुवाद आहेत. इत्सिंग या चिनी प्रवाश्याने (८ वें शतक) त्याच्या काव्याविषयीं गौरवाने लिहिलें आहे. [सं. सा. इ.; सु. वि. को.]

आर्य सत्यें

जीवनाच्या सार्थकतेचा विचार करीत असतां बुद्धाला चार आर्यसत्यांची प्रतीति झाली. या आर्यसत्यांच्या सम्यक् ज्ञानानेच गौतमाला संबोधि प्राप्त होऊन तो बुद्ध ठरला. सत्यांची संख्या अनंत आहे. पण अत्यधिक महत्त्वामुळे त्यांतलीं चार सर्वश्रेष्ठ मानलेलीं आहेत. या सत्यांना आर्य हें विशेषण लावण्याचा अभिप्राय हा आहे, की आर्य म्हणजे विद्वज्जनच या सत्यांपर्यंत पोंचूं शकतात. यांचीं नांवें पुढीलप्रमाणे आहेत--

(१) **दुःखम्** (२) **दुःखसमुदयः** (३) **दुःखनिरोधः** (४) **निरोधगामिनी प्रतिपद्**

बुद्धाने या चार सत्यांचा आविष्कार केला अशी जरी समजूत असली, तरी ऐतिहासिक दृष्टीने पाहिल्यास या सत्यांचें उद्‌घाटन बुद्धाच्या पुष्कळ पूर्वीं भारतीय अध्यात्मवेत्त्यांनी केलेलें दिसून येईल. वरील सत्यांचें क्रमवार निरूपण पुढील प्रमाणे--

दुःख--बुद्ध म्हणतो. 'भिक्षूंनो, दुःख हें एक आर्य सत्य आहे. या लोकांतील जन्म, जरा, रोग, मृत्यु, अनिष्ट संयोग, इष्टवियोग, इच्छाविघात, या गोष्टी दुःख (मय) आहेत. संक्षेपांत सांगायचें, तर रागद्वारा उत्पन्न पांचहि स्कंध (रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान) दुःख आहेत.'

संसार दुःखमय असल्याचा अनुभव सर्वांनाच प्रतिदिनीं येत असतो. पण सामान्य किंवा मूढ मनुष्य संसाराचें हें सत्य स्वरूप न जाणतां भोगसामग्री मिळविण्यासाठी सतत प्रयास करतो व दुःखांतून दुःखच निर्माण करतो. बुद्धाला मात्र त्याच्या दुःखमयतेचा सत्य अनुभव आला. पतंजलीने म्हटलें आहे, की 'दुःखमेव सर्वं विवेकिनः' = विवेकी पुरुषाच्या दृष्टीने हा समस्त संसार दुःखच आहे (योग सू. २. १५). बुद्धाची दृष्टिहि अशीच आहे.

दुःखसमुदय--म्हणजे दुःखोदयाचें कारण. कारणावांचून कार्य उत्पन्न होत नाही. दुःखाचें कारण आहे तृष्णा. ती पौनर्भविक म्हणजे वारंवार उत्पन्न होणारी आहे. ती सर्वत्र आपल्या तृप्तीच्या शोधांत असते. कामतृष्णा (इंद्रियसुखाची तृष्णा), भवतृष्णा (जगाची आसक्ति) व विभवतृष्णा (ऐहिक-पारलौकिक वैभवाची तृष्णा) असे तिचे तीन प्रकार आहेत. ही तृष्णाच जगांतल्या समस्त विद्रोहांची जननी व समस्त पापकर्मांचें निदान आहे.

दुःखनिरोध--निरोध म्हणजे नाश किंवा त्याग. हें तिसरें आर्यसत्य होय. बुद्धाने नुसतें दुःखच सांगितलें नाही, तर त्याच्या नाशाचा उपायहि सांगितला आहे. तो म्हणतो. 'तृष्णेचा संपूर्ण त्याग किंवा सम्यक् वैराग्य याने दुःखनिरोध होऊं शकतो. तृष्णेच्या नाशाने याच जीवनांत पुरुष निर्वाण मिळवूं शकतो.'

निरोधगामिनी प्रतिपद्--प्रतिपद् म्हणजे मार्ग. दुःखनिरोधापर्यंत पोचविणारा मार्ग हें चौथें आर्यसत्य होय. निर्वाण हें प्रत्येक प्राण्याचें गन्तव्य स्थान आहे. त्याप्रत पोंचविणारा हा मार्ग अष्टांगिक आहे. हा मार्ग म्हणजे बौद्धांच्या आचारमीमांसेंतलें श्रेष्ठ साधन आहे. या मार्गाचा सम्यक् अवलंब केल्यास शांति अवश्य प्राप्त होईल, हें बुद्धाच्या उपदेशाचें सार आहे.

बुद्धाने या चार आर्य सत्यांच्या रूपाने आपल्या संदेशाचें सारसर्वस्व जगाला दिलें आहे. या आर्य सत्यांना गूढवादाचा यत्किंचितहि स्पर्श नाही. सूर्य, समुद्र व आकाश यांचें अस्तित्व आबालवृद्धांना प्रतीत होतें. पण त्यांचे परिणाम, गांभीर्य व विशालता केवळ विचारवंतांनाच मननाने समजते. त्याप्रमाणेच बुद्धाच्या गंभीर चिंतनांतून हीं आर्यसत्यें प्रकट झालीं आहेत. [बौ. द. मी.; वै. सं. वि.]

आर्यसमाज

या पंथाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८७५ रोजीं मुंबई येथे केली. या पंथाचीं मुख्य तत्त्वें पुढीलप्रमाणे आहेत --

(१) सर्व यथार्थ ज्ञानाचा उगम व सर्व वस्तूंचें आदिकारण परमेश्वर आहे.

(२) ईश्वर हा सच्चिदानंदस्वरूप असून तो अनादि,

अनंत, निराकार, निष्कलंक, सर्व शक्तिमान्, सर्वसाक्षी, परमन्यायी, कनवाळू, सर्व जगाचा निर्माता, शास्ता व पालक आहे. त्याचेंच भजनपूजन करावें.

(३) वेद हे त्या ईश्वराचींच निःश्वसितें होत. सर्व यथार्थ ज्ञानांचा उगम वेदांतच असल्यामुळे वेदांचें अध्ययन करणें व करविणें, हें प्रत्येक आर्याचें पवित्र कर्तव्य आहे.

(४) प्रत्येक आर्यानें सत्याचा स्वीकार व असत्याचा त्याग करण्याची तयारी दर्शविली पाहिजे.

(५) व्यवहारांतील प्रत्येक कृत्य धर्माला अनुसरून केलें पाहिजे. प्रत्येक कृत्य करण्यापूर्वी तें नीतिनियमांना धरून असल्याबद्दल खात्री करून घेतली पाहिजे.

(६) मानवाची आधिभौतिक, सामाजिक, आध्यात्मिक इ. प्रत्येक बाबतींत उन्नति करून मनुष्यजातीचें सर्वांगीण कल्याण साधणें, हाच आर्यसमाजाचा मुख्य उद्देश आहे.

(७) प्रेमाने व न्यायाने वागणें, हें प्रत्येक आर्य व्यक्तीचें कर्तव्य आहे.

(८) अज्ञानाचा नाश करून ज्ञानाचा प्रसार करणें, हें ध्येय असावें.

(९) केवळ स्वतःच्या कल्याणांतच समाधान न मानतां प्रत्येकाने दुसऱ्याच्या उत्कर्षांतच आपला उत्कर्ष आहे, असें मानलें पाहिजे.

(१०) सामाजिक कल्याणासाठी प्रत्येकाने वैयक्तिक मतभेद व हेवेदावे विसरून झटलें पाहिजे. परंतु खासगी व वैयक्तिक हिताच्या बाबतींत प्रत्येकाला आपल्या मताप्रमाणे वागण्याचें स्वातंत्र्य आहे.

आर्यसमाजाच्या या दहा तत्त्वांपैकी पाहिलीं तीन तत्त्वें धार्मिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचीं आहेत. बाकीचीं तत्त्वें हे केवळ नीतिनियम होत. आर्यसमाजाचीं पंथतत्त्वें फार थोडीं आहेत, हें यावरून समजेल.

स्वामी दयानंदांची वेदांच्या सिद्धान्ताविषयीं कल्पना पुढीलप्रमाणे आहे – वेद शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. वेदांतील ज्ञान ईश्वरप्रणीत असल्यामुळे तें शुद्ध व परिपूर्ण आहे. ईश्वरप्रणीत अशा या ग्रंथांत सर्व शास्त्रांचीं मूलतत्त्वें ग्रथित आहेत. जगांतील एकंदर तत्त्वांचा आविष्कार ईश्वराने चार वेदांत व सृष्टींत केला आहे. अग्नि, वायु, सूर्य व अंगिरा या चार ऋषींना कोटचवधि वर्षांपूर्वी जगदुत्पत्तीच्या आरंभीं ईश्वराने हे वेद शिकविले. ईश्वराने वेदांतील सिद्धान्तांनुसारच सृष्टि निर्माण केली.

स्वामी दयानंद म्हणतात. 'मी वेदांकडे स्वयंसिद्ध सत्य म्हणून बघतों. त्यांच्याविषयीं माझ्या मनांत रतिमात्रहि संदेह नाही आणि त्यांचें श्रेष्ठत्व मान्य करतांना मी अन्य कुठल्याच ग्रंथांचा आधार घेत नाही !'

हिंदु धर्मग्रंथांपैकी केवळ चार वेदच दयानंदांनी प्रमाण मानले. सहा शास्त्रें व अठरा पुराणें त्यांनी कवडीमोल ठरविलीं. वेदांत मूर्तिपूजा, अवतारवाद, तीर्थें व पौराणिक अनुष्ठानें इ. गोष्टींचा पुरस्कार नाही, म्हणून दयानंदांनी या सर्व गोष्टी झूट मानल्या. केवळ वेद प्रमाण मानण्याचीं कारणें त्यांनी सांगितलीं, तीं अशीं––

(१) वेद हे ईश्वरप्रणीत आहेत; कारण त्यांतील ज्ञानाचा सृष्टिप्रक्रियेशीं पूर्ण मेळ आहे.

(२) दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथांतील ज्ञानाचा सृष्टींतील गोष्टींशीं इतका मेळ बसत नाही.

(३) वेदग्रंथ हे मानवजातीच्या वैज्ञानिक व पारमार्थिक विचारांचे उगम होत.

अशा प्रकारची तत्त्वप्रणाली स्वीकारून आर्यसमाजाने भारताला पुनश्च वैदिक मार्गावर नेणें व सर्व जगाला वैदिक धर्म शिकविणें, हीं दोन आपलीं परमश्रेष्ठ कर्तव्यें मानिलीं. या तत्त्वांना अनुसरून आर्यसमाजाने वेदांच्या उद्धाराचें व प्रचाराचें कार्य हिरिरीने चालू केलें. त्याबरोबरच दयानंद स्वामींनी देशांत एक नवा अंधविश्वास निर्माण केला, असेंहि म्हणावें लागतें. याविषयीं श्री. दिनकर म्हणतात—

'दयानंदांच्या पूर्वींहि वेद हे हिंदूंना प्रमाण होते व आजहि आहेत. पण दयानंदांचा वेदांविषयीं अभिनिवेश असा, की वेदांत केवळ धार्मिक गोष्टींच आहेत असें नव्हे; तर विज्ञानहि प्रच्छन्नपणें भरलेलें आहे. पण या त्यांच्या अभिनिवेशामुळे शास्त्रीय जिज्ञासेला खीळ पडली. याचा परिणाम असा झाला, की भारतांत वेद व आर्य या दोहोंनाच अवास्तव महत्त्व प्राप्त झालें. इतिहासकारांचीहि अशी धारणा झाली, की भारताची सभ्यता व संस्कृति वैदिक आर्यांनीच निर्माण केली आहे. भारतांत अनेक जातींचा जो सांस्कृतिक समन्वय झाला होता, त्याकडे त्या काळांत सर्वांनी दुर्लक्ष केलें. द. भारतांतील हिंदूंचा संस्कृतीच्या जडणघडणींतील न्याय्य वांटा नाकारला गेला. त्यामुळेच द. भारतांत आर्यविरोधी वातावरण निर्माण झालें.

आर्यसमाजाच्या धारणेंतील हा एक मोठा दोष खरा; पण त्या काळांत या समाजाने हिंदुत्वाची ध्वजा फडकत ठेवली, हें आवर्जून सांगितलें पाहिजे. त्याने आपल्या आक्रमक प्रचाराने सारा हिंदी प्रांत भारून टाकला. आर्यसमाजाच्या प्रभावांत सांपडलेल्या कित्येक हिंदूंनी मूर्तिपूजा सोडून दिली. पुष्कळांनी घरांतल्या देव-देवतांच्या प्रतिमा छिन्नविच्छिन्न करून फेकून दिल्या. बहुतेकांनी श्राद्धें बंद केलीं व पुरोहितांनाहि रजा दिली.

जे विधियुक्त आर्यसमाजी बनले नाहीत, त्यांचाहि शास्त्रें व पुराणें यांच्या वरचा विश्वास डळमळला. राम–कृष्ण हे ईश्वराचे अवतार आहेत, कीं नाहीत असाहि भ्रम, त्यांच्या मनांत निर्माण झाला.

आर्यसमाजाने वर्ण जन्मजात न मानतां ते कर्माप्रमाणे मानले. आर्यसमाजी कोणत्याहि जातीला अस्पृश्य मानीत नाहीत व सर्वांना वेदाध्ययनाचा अधिकार देतात. आर्यसमाजाने प्रारंभीं मूर्तिपूजेविरुद्ध बंड उभारलें खरें; पण पुढे त्यांनी त्या बाबतींतला अभिनिवेश सोडून दिला. त्यांनी हिंदुसस्कृतीविषयीं अनेक पुस्तकें लिहिलीं व लोकांत त्यांचा प्रसार केला. सुरुवातीला विरोधी मतांचें खंडण करण्यांत त्यांचा बराचसा काळ गेला असला, तरी पुढे त्यांनी विधायक कार्यें उभारायला सुरुवात केली. उ. भारतांतील प्रमुख ठिकाणीं त्यांनी गुरुकुलें, शाळा, विश्वविद्यालयें, अनाथालयें, विधवाश्रम, वगैरे अनेक संस्था स्थापन केल्या. आजहि त्यांचें कार्य व्यवस्थित चाल आहे. सिंध, पंजाब व वायव्य प्रदेश, या भागांत आर्यसमाजाचें कार्य विशेष आहे.

हिंदुधर्मांतली अवतारकल्पना त्यांना मान्य नाही. रामकृष्णादिकांना ते ईश्वर मानीत नसून पुरुषविशेष मानतात. निरनिराळ्या धर्मांत प्रतिपादिलेलें पापक्षमेचें तत्त्वहि आर्यसमाजाला मान्य नाही. ईश्वराने पापी लोकांना पापाबद्दल क्षमा केली, तर लोक निर्भयपणे पाप आचरीत राहतील, अशी त्यांची विचारसरणी आहे.

आर्यसमाजाने जीव, प्रकृति व ब्रह्म हीं तीन तत्त्वें भिन्न भिन्न मानलीं आहेत. दुःखाचा आत्यंतिक विध्वंस म्हणजे मोक्ष, अशी त्यांची मोक्षाविषयींची कल्पना आहे. मुक्ति मिळाल्यावर जीव ब्रह्मानंदाचा उपभोग घेतो; पण महाकल्पानंतर पुनश्च तो संसारांत येतो, असें मुंडकोपनिषदाचा हवाला देऊन 'सत्यार्थप्रकाशां'त सांगितलें आहे. मोक्ष मिळविणें हेंच प्रत्येक व्यक्तीचें ध्येय असून तें प्रत्येकाने स्वप्रयत्नाने मिळविलें पाहिजे. मोक्षाची पूर्ण तयारी करतां यावी, म्हणूनच ईश्वराने पुनर्जन्माची योजना केलेली आहे. तथापि असें असलें, तरी ईश्वराची सत्ता मर्यादित आहे.

आर्यसमाजाला 'नियोग' पद्धति मान्य आहे. वंश चालविण्यासाठी पुरुष-संतति निर्माण करणें व कामविकार अनावर झाल्यास त्याच्या उपशमासाठी नीतियुक्त मार्ग उपलब्ध करून देणें आणि अशा प्रकारें व्यभिचार व जारकर्म यांना पायबंद घालणें, हे उद्देश मनांत धरून दयानंदांनी नियोग धर्म्य ठरविला आहे. विवाहाप्रमाणे नियोगहि सार्वजनिक विधिपूर्वक आचरावा, असें सत्यार्थप्रकाशांत म्हटलें आहे.

नियोग केव्हां अनुसरावा, त्याबाबत त्यांनी कांही नियम घालून दिले आहेत, ते असे––

"आर्यसमाज पति-पत्नींना किंवा विधवा व विधुर यांना खालील नियमांनुसार नियोगसंबंध करण्यास परवानगी देत आहे––

(१) जेव्हा पति किंवा पत्नी, रोग किंवा इतर कांही कारणांमुळे प्रजोत्पादनास असमर्थ असेल,

(२) जेव्हां पति कांही धार्मिक कारणांकरितां, अध्ययनाकरितां किंवा द्रव्यार्जनाकरितां कांही ठराविक काळ घर सोडून गेलेला असेल,

(३) जेव्हा पति किंवा पत्नी त्रासदायक किंवा कटु भाषण करणारीं असतील,

(४) जेव्हा पत्नी वंध्या असेल किंवा विवाह झाल्यानंतर आठ वर्षांत मूल झालें नसेल,

(५) जेव्हा झालेलीं सर्व मुलें अल्पायुषी असतील,

(६) जेव्हा पत्नीला सगळ्या मुलीच झाल्या असतील,

(७) जर आणि जेव्हा पत्नी गर्भवती किंवा सतत आजारी असेल किंवा नवरा आजारी असेल आणि दोघांपैकी एकाला भर ज्वानीमुळे काम आवरणें शक्य नसेल, तर नियोग आचरायला हरकत नाही.

दयानंदांचें हें नियोगतत्त्व चांगलेंच आक्षेपार्ह आहे. परंतु सुदैवाने आर्यसमाजाच्या अनुयायांना हें तत्त्व अंमलांत आणण्याचें धाडस झालें नाही.

हिंदूंचे सोळा संस्कार आर्यसमाजाला मान्य आहेत; मात्र त्यांचें वेदकालीन साधें स्वरूप तेवढेंच त्यांनी स्वीकारलें आहे. याशिवाय, प्रत्येक आर्यसमाजी पुरुषाने पुढील पंचमहायज्ञ अवश्य केले पाहिजेत, अशी समाजाची आज्ञा आहे––

(१) ब्रह्मयज्ञ –– संध्या व नियमित कांही वेदपठण.

(२) देवयज्ञ –– अग्नीला आहुति देणें.

(३) पितृयज्ञ –– वडीलधाऱ्यांची सेवा.

(४) अतिथियज्ञ –– विद्वान् अतिथीला किंवा संन्याशाला भोजन देणें.

(५) बलियज्ञ –– अंध, पंगु, अनाथ व पशु-पक्षी यांना अल्पस्वल्प अन्न देणें.

इ. स. १८८३ मध्ये स्वामी दयानंद मृत्यु पावल्यावर आर्यसमाजाच्या अनुयायांत फूट पडून त्याच्या दोन शाखा झाल्या. मांसाहार व उच्च शिक्षण हे या दोन शाखांतील मतभेदांचे मुद्दे होते. यांपैकी ज्या लोकांनी मांसाहाराचा पुरस्कार केला, त्यांना मांसाहारी व इतरांना शाकाहारी अशीं नांवें मिळालीं. त्याचप्रमाणे ज्यांनी महाविद्यालयीन शिक्षणाला

मान्यता दिली, त्यांना महाविद्यालयपक्ष व इतरांना महात्मा-पक्ष किंवा पुराणमतवादीपक्ष अशीं नांवें पडलीं.

आर्यसमाजाच्या स्थानिक, प्रांतीय व अखिल भारतीय, अशा स्वरूपाच्या एकूण तीन सभा आहेत. आर्यसमाजाच्या दहा तत्त्वांवर श्रद्धा असणारे, दयानंदांनी वेदांचा अर्थ लावण्याकरितां ठरविलेल्या नियमांवर विश्वास ठेवणारे, आपल्या उत्पन्नाचा शतांश 'सभासद शुल्क' म्हणून देणारे व सभेला नियमित हजर राहणारे लोक, हे समाजाचे सभासद होऊं शकतात.

आर्यसमाजाची धार्मिक उपासना आठवड्यांतून एकदां दर रविवारीं सकाळीं होते. ती सुमारें तीन-चार तास चालते. व्यासपीठाजवळ वैदिक अग्नीची वेदि असते. त्या अग्नीला समंत्रक आहुति देऊन मग उपासनेला प्रारंभ करतात. स्वामी दयानंदांचीं प्रार्थनापर पद्यें म्हणणें, प्रवचन ऐकणें व शेवटीं आर्यसमाजाच्या तत्त्वांचा उच्चार करणें, एवढा भाग उपासनेंत येतो.

आर्यसमाजाची काम करण्याची पद्धति मिशनऱ्यांसारखी आहे. त्याची उदारमतवादीशाखा शिक्षणाकडे व महात्माशाखा उपदेशात्मक कार्याकडे विशेष लक्ष देते. आर्यसमाजाची शुद्धिविषयक चळवळ ही सर्वांत महत्त्वाची कामगिरी होय. ही कामगिरी व्यापक असून तिचे तीन प्रकार आहेत—

(१) अहिंदु लोकांना हिंदु धर्माची दीक्षा देऊन आर्यसमाजांत सामील करून घेणें.

(२) मुळांत हिंदु असून परधर्माचा स्वीकार केलेल्या, पण पुन्हा स्वधर्मांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या लोकांना शुद्ध करून घेणें. आणि

(३) मागसलेल्या व अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातींना शिक्षण देऊन त्यांचा उद्धार करणें व त्यांना समान दर्जा देणें.

आर्यसमाजाने विशेषतः या मागसलेल्या जातींच्या उद्धारासाठी फार परिश्रम केले आहेत. ज्या जातींना यज्ञोपवीत धारण करण्याचा अधिकार नव्हता, त्यांना तो देऊन त्यांचें द्विजत्व त्यांनी मान्य केलें व त्यांना शिक्षण देऊन त्यांची नैतिक व धार्मिक उन्नति होण्यास मदत केली.

इ. स. १९२१ सालीं मलबारांत मोपला मुसलमानांनी भयानक बंड केलें व असंख्य हिंदूंना जबरदस्तीने मुसलमान बनविलें. त्या संकटकाळीं आर्यसमाजी लोक धैर्याने मलबारांत गेले व सुमारें अडीच हजार भ्रष्ट हिंदु कुटुंबांना त्यांनी पुनश्च हिंदु धर्मांत आणलें. यानंतर त्यांनी राजस्थानांतील मलकाना राजपूतांचें शुद्धीकरण केलें. १९३७ सालीं आर्यसमाजाने पुन्हा एकदा आपल्या अंगच्या धैर्याचा लोकांना प्रत्यय आणून दिला. हैदराबादच्या निजामसरकारने आपल्या राज्यांत आर्यसमाजाच्या प्रचाराला बंदी केली असतां या बंदीविरुद्ध त्यांनी सत्याग्रहाचें शस्त्र उपसलें व बारा हजार लोकांनी त्या कामीं बंदिवास पत्करला.

ख्रिस्ती व इस्लाम या दोन धर्मांच्या आक्रमणांपासून हिंदु धर्माचें रक्षण करण्यासाठी आर्यसमाजाने जितक्या संकटांना तोंड दिलें आहे, तितक्यांना अन्य कोणत्याच संस्थेने दिलेलें नाही. खऱ्या अर्थाने उत्तर भारतांतील हिंदूंना जागें करून त्यांना प्रगतिशील करण्याचें सारें श्रेय आर्यसमाजालाच आहे. [म. ज्ञा. को.; सं. चा. अ.; वि. ध. द.]

आर्यसमाज स्थापनादिन

स्वामी दयानंदांनी चैत्र शु. प्रतिपदा संवत् १९३२ (७ एप्रिल १८७५) या दिवशीं मुंबई येथे आर्यसमाजाची स्थापना केली. प्रत्येक वर्षप्रतिपदेला आर्यसमाजी लोक हा स्थापनादिन साजरा करतात. या दिवशीं प्रत्येक आर्यसमाजी आपल्या घराची साफसफाई करतो व स्वदेशी वस्त्रें परिधान करतो. नंतर वैदिक मंत्रांनी होमहवन करतो. त्या दिवशीं आर्यसमाजी लोकांची एक सभा भरते व त्या सभेंत समाजाची वर्तमान स्थिति व पूर्व-इतिहास यांबद्दल लोकांना माहिती दिली जाते. [व्र. चं.]

आर्यसमाजी लग्नसंस्कार

आर्यसमाजाने प्रौढ विवाह प्रशस्त मानलेला आहे सोळा वर्षांच्या आंत मुलीचें व पंचवीस वर्षांच्या आंत मुलाचें लग्न करूं नये, असा त्यांचा नियम आहे. आर्यसमाजाचा लग्नविधि पुढीलप्रमाणे होतो––

प्रथम वधू-वर एक घटिका रात्र झाल्यानंतर सुवासिक जलाने स्नान करतात व वस्त्रालंकार लेवून यज्ञशाळेंत येतात. नंतर समंत्रक आचमन व मार्जन करून परमेश्वराची प्रार्थना करतात. त्यानंतर स्वस्तिवाचन, शांति, अग्न्याधान, सनिधाधान हीं कर्में होतात. अग्नींत वेदमंत्रांनी आज्याहुती देतात. वराचा मधुपर्कादि सत्कार झाल्यावर गोत्र-प्रवरांचा उच्चार करून वधूपिता कन्यादान करतो. वधू-वर नवीन वस्त्रें परिधान करतात व यज्ञशाळेंतील ऋत्विजांपुढे 'आम्ही परस्परांचा स्वीकार करीत आहों,' असा उच्चार करून यज्ञकुंडाला प्रदक्षिणा घालतात. नंतर निरनिराळे होम करून वधू-वर एकमेकांना गृहस्थाश्रमाला उपयुक्त अशीं समंत्रक अभिवचनें देतात. वर वधूचें पाणिग्रहण करतो व नंतर अश्मारोहण, लाजाहोम, सप्त पदी, इ. विधि होतात. त्यानंतर वधूगृहाच्या ईशान्येला मुद्दाम

एक घर करून ठेवलेलें असतें, तिथे जाऊन उत्तरविधि करतात. सूर्यास्तानंतर नक्षत्रें दिसूं लागल्यावर पुनश्च अग्निकार्य करून ध्रुव व अरुंधती यांचें दर्शन घेतात. मग अग्नीवर स्थालीपाक करतात व दोघेहि त्यांतला थोडा थोडा भात खातात. नंतर सामवेदाचें गायन होतें व भोजनसमारंभ झाल्यावर वरात निघते. [ल. वि. सो.]

आर्यसुस्थित हा जैनांच्या कोटिकगच्छ शाखेचा प्रवर्तक होता. [म. च. को.]

आर्य सुहस्ति सूरि (सनपूर्व ३ रें शतक) याचें चरित्र ज्ञात नाही. हा जैन संघाचा नेता होता. स्थूलिभद्राची बहिण यक्षा हिने याचें पुत्रवत् पालन केलें होतें. याने पाटलीपुत्रांतल्या वसुभूति नामक श्रीमंताला जैन धर्माची दीक्षा दिली. [खो. प.]

आर्या हा एक मराठी पद्यरचनाप्रकार आहे. आर्या ही प्राकृत गाथेवरून विकास पावली आहे. प्राकृतांत ज्याप्रमाणे प्रबंधांची किंवा महाकाव्यांची रचना खूप झाली, त्याप्रमाणेच स्फुट मुक्तक रचनाहि पुष्कळ झाली. त्यांत हालाच्या 'गाहासत्तसई'चें स्थान वरचें आहे. ही हालाने संग्रहीत केलेली गाथारचना महाराष्ट्र देशांत फार रूढ होती. पुढे त्या गाथेचाच गीतिप्रकार आर्या या नांवाने महाराष्ट्रांत फार लोकप्रिय झाला. या गाथेचें सुसंस्कृत रूप म्हणजे मूळ आर्या होय. गाथेंतील अंत्य चरणांतील दिडकेपणा, तीन मात्रांची कूस भरून काढून घालविल्यावर त्याची गीति बनली. तीच मराठींतील मोरोपंती आर्या होय. या गीती (आर्या)च्या समचरणांत एकेक द्विमात्रक अधिक वाढवून त्याची आर्यागीति झाली.

मोरोपंतांनी गीतीचा उपयोग लोकप्रिय केला व तिलाच आर्या हें नांव दिलें. आर्येचें गायन कीर्तनप्रसंगीं होत असतां विषम चरणान्तीं चार मात्रांची कूस व समचरणान्तीं सहा मात्रांची कूस भरून काढावी लागते व ती तानेने पूरक मात्रा घेऊन भरून काढतात. तसें केल्याने आर्या मृदंगाच्या किंवा तबल्याच्या ठेक्यांत पूर्णपणे बसते. आर्येंतील मात्रिक आवर्तनें अष्टमात्रक पद्यावर्तनें असतात. मात्र दुसऱ्या व चौथ्या चरणांत नववी मात्रा लघुअक्षरयुक्त असावी व तिथे शक्यतों 'ज'गण असावा, अशी रूढि पडलेली आहे.

मराठी भाषेंतील काव्य हें मुळारंभीं मुख्यतः ओवी या छंदांत अवतीर्ण झालें. नामदेव–तुकारामादि भगवद्भक्तांनी अभंगाचा स्वीकार केला व पंडित कवि अक्षरगणवृत्तांना अनुसरले. या दीर्घ काळांत, हाताच्या बोटांवर मोजण्याजोगे अपवाद सोडले, तर गीति हें वृत्त अभावानेच दिसतें. कालिदासादि महाकवींच्या संस्कृत काव्यांतहि गीति वृत्त दिसत नाही. व संस्कृत नाटकें सोडलीं, तर आर्यावृत्तहि क्वचितच दिसतें. तथापि जगन्नाथ पंडिताने मात्र गीति वृत्ताचा कांहीसा उपयोग केलेला दिसतो. मोरोपंतांकडे असलेल्या हस्तलिखित ग्रंथांची जी यादी पांगारकरांनी मोरोपंतचरित्रांत दिली आहे, तींत जगन्नाथ पंडिताच्या अश्वधाटी व भामिनीविलास या ग्रंथांचे उल्लेख आहेत. यामुळे गीतिवृत्त उचलण्याची कल्पना पंतांच्या मनांत जगन्नाथ पंडिताकडून आली असावी, असें वाटतें. 'श्रुतबोध' या संस्कृत वृत्तदर्पणांत गीति वृत्ताचें लक्षण पुढीलप्रमाणे दिलें आहे––

आर्यापूर्वार्धसमं द्वितीयमपि यत्र भवति हंसगते ।
छन्दोविदस्तदानीं गीतिं ताममृतवाणि भाषन्ते ।।

अर्थ–ज्या कवितेंत आर्येच्या पूर्वार्धाप्रमाणेच उत्तरार्धहि असतें, तिला छंदोवेत्ते गीति म्हणतात.

आर्येचे दोन नमुने पुढीलप्रमाणे आहेत––

आर्या आर्यांसि रुचे ईच्या ठायीं जशी असे गोडी ।
आहे इतरां छंदीं गोडी, परि यापरीस ती थोडी ।।

(भीष्मभक्तिभाग्य १·१०)

आर्या देखुनि सज्जन चित्तीं होतील फार सानंद ।
मंदाज्ञानिच सरतिल मागें कीं ठाउकें नसे छंद ।।

(भगवद्गीता–आर्याटीका)

पंतकालीं व पंतोत्तर शंभर–दीडशें वर्षें सर्व मराठी कीर्तनकार आर्येचा मोठ्या प्रमाणांत उपयोग करीत. [रा. चिं. ढेरे; मराठी छंदोरचना]

आर्यावर्त आर्यांच्या वसाहतीला पूर्वी आर्यावर्त अशी संज्ञा होती. ऋग्वेदकाळीं आर्यांची वसती सप्तसिंधूंच्या प्रदेशांत म्हणजे वायव्य सरहद्द प्रांत व पंजाब या प्रदेशांत होती. ऋग्वेदांतील नदीसूक्तांत सप्तसिंधूंच्या प्रदेशांत कुभा (काबूल नदी), क्रुमु (कुर्रम), गोमती (गोमल), सिंधु, परुष्णी (रावी), शुतुद्रि (सतलज), वितस्ता (झेलम्), सरस्वती, यमुना व गंगा या प्रमुख नद्या वाहत होत्या, असें सांगितलें आहे (१०.७५). वैदिक आर्य ज्या प्रदेशांत राहत होते, त्या प्रदेशाच्या सीमा या नद्यांनी दर्शविलेल्या आहेत. पुढे हळूहळू आर्य सप्तसिंधूंच्या प्रदेशांतून पूर्वेकडे व दक्षिणेकडे सरकूं लागले. नंतरच्या काळांत कुरुपांचाल व कोसलविदेह हे देश आर्यांचें सांस्कृतिक केंद्र बनले. ब्राह्मणग्रंथांची निर्मिति

याच प्रदेशांत झाली. अनेक यज्ञयाग याच प्रदेशांत झाले, त्यावरून या प्रदेशाला 'प्रजापतीची नाभि' असें म्हणूं लागले. कुरुपांचालांतील भाषा अतिशय उत्तम आहे, असें शतपथ ब्राह्मणांत सांगितलें आहे. उपनिषदांच्या काळांत आर्यांची संस्कृति पूर्वेला काशीपासून विदेह जनपदापर्यंत फैलावली. म्हणजे पंजाबपासून तों मिथिलेपर्यंत आर्यांची वसाहत वाढली, असा त्याचा अर्थ होतो.

धर्मसूत्रांच्या काळांत मात्र आर्यावर्ताच्या सीमेबद्दल बरेच मतभेद दिसतात. वासिष्ठ धर्मसूत्रांत आर्यावर्ताची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे--


आर्यावर्तः प्रागादर्शात् प्रत्यक् कालकवनादुदक्
पारियात्राद्दक्षिणेन हिमवतः। उत्तरेण च विन्ध्यस्य।
(१.८-९)

याशिवाय वसिष्ठाने आर्यावर्ताच्या सीमेविषयीं आणखी दोन मतें उद्धृत केलीं आहेत--

गङ्गायमुनयोरन्तरेप्येके। यावद्वा कृष्णमृगो विचरति
तावद् ब्रह्मवर्चसमित्यन्ये।
(१.१२.१३)

अर्थ -- गंगा व यमुनांच्या दुआबामधला प्रदेश म्हणजे आर्यावर्त देश, किंवा ज्या प्रदेशांत कृष्णमृग अनिर्बंध संचार करतो, तो प्रदेश यज्ञिय असतो व तोच आर्यावर्त देश होय.

बौधायनाने आपल्या धर्मसूत्रांत आर्यावर्ताच्या सीमा वा. ध. सूत्राप्रमाणेच दिल्या आहेत. मात्र त्याने 'आदर्श' ऐवजी 'विनशन' शब्द योजला आहे. आदर्श व विनशन हीं दोन नांवें एकाच प्रदेशाचीं असलीं पाहिजेत. कारण ''विनशनक्षेत्रीं सरस्वती गुप्त झाली' असें वनपर्वांत सांगितलें आहे.



'पुरखोंका चरित' या पुस्तकांतून

अर्थ-- सरस्वती नदी जिथे गुप्त झाली, त्या प्रदेशाच्या पूर्वेला, कालकवनाच्या पश्चिमेला, पारियात्र व विंध्य या पर्वतांच्या उत्तरेला व हिमालयाच्या दक्षिणेला आर्यावर्त देश पसरलेला आहे.

मनूची आर्यावर्तविषयक व्याख्या अशी --

आसमुद्रात्तु वै पूर्वादासमुद्रात्तु पश्चिमात्।
तयोरेवान्तरं गिर्योरार्यावर्तं विदुर्बुधाः॥ (२.२२)

अर्थ –– हिमालय व विंध्य या पर्वतांच्या मधला व पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत पसरलेला प्रदेश तो आर्यावर्त होय.

प्राचीन काळीं विंध्याच्या दक्षिणेकडील प्रदेश हा आर्य-संस्कृतीच्या कक्षेबाहेरचा होता, हें यावरून समजेल.

वसिष्ठ ज्या प्रदेशाला आर्यावर्त म्हणतो, त्याच प्रदेशाला मनु मध्यदेश म्हणतो (२.२१). वसिष्ठाने आर्यावर्ताची पूर्वेकडील सीमा कालकवन सांगितली असून मनूने मध्य-देशाची पूर्वेकडील सीमा प्रयाग असल्याचें म्हटलें आहे. परंतु कालकवन व प्रयाग या दोहोंचाहि अभिप्राय एकच आहे. प्राचीन काळीं प्रयागच्या जवळच एक मोठें वन होतें, असें वा. रामायणांत सांगितलें आहे (अयोध्याकांड ५४. ५५). म्हणजे वसिष्ठाचें आर्यावर्त व मनूचा मध्यदेश हे दोन्ही प्रदेश एकच होत. यांतील ब्रह्मावर्त नांवाचा एक लहान व पवित्र प्रदेश सरस्वती व दृशद्वती या दोन नद्यांच्या मध्ये असून यांतील परंपरागत आचार हा सदाचार म्हणून प्रसिद्ध आहे. आर्यावर्ताच्या याच सीमा असून याच्या बाहेरील प्रदेशांना म्लेच्छ देश असें नांव होतें व त्या देशांत यात्रेशिवाय अन्य कारणाकरितां गेल्यास प्रायश्चित्त घेणें किंवा इष्टि करणें या गोष्टी आवश्यक होत्या. पूर्वेला अंग, वंग, कलिंग व पश्चिमेला सिंधु, सौवीर इ. देशांत गेल्यास पुनस्तोम किंवा सर्वपृष्ठ यज्ञ करावा, असें बौधायन सांगतो (बौ. ध. सू. १.१.२९-३०). यावरून हें स्पष्ट होतें, की बौधायनाच्या काळीं हे देश आर्या-वर्ताच्या बाहेर मानले जात होते.

तत्कालीन ब्राह्मणवर्गाच्या धार्मिक उत्साहामुळे आर्यांची संस्कृति ज्या अनेक देशांत पसरली, त्या देशांचाहि अंतर्भाव आर्यावर्तांत करणें वस्तुतः योग्य आहे. मेधातिथीने याबाबत आपलें मत पुढीलप्रमाणे व्यक्त केलें आहे ––

'ज्या देशांत सदाचारी क्षत्रिय राजा म्लेच्छांना जिंकून त्या देशांत चातुर्वर्ण्याची स्थापना करील, तो देश यज्ञिय होईल. कारण पृथ्वी स्वतः अपवित्र नाही; तर अपवित्र माणसांच्या संसर्गाने ती दूषित होते (मनु. २.२३ वर मेधा-तिथिभाष्य). जिंकलेल्या देशांना अशा प्रकारें आर्यावर्तांत स्थान द्यावें, असें मेधातिथीचें मत आहे. कारण काळाच्या ओघांत संस्कृतीचीं केंद्रें बदलून जातात. जुन्या केंद्रांची जागा नवीन केंद्रें घेतात व जुनीं केंद्रें पुष्कळदा संस्कृतिहीन बनतात. उदा० पंजाब हें प्राचीन काळीं वैदिक आर्यांचें संस्कृतिस्थान होतें; परंतु महाभारतकाळीं यवनांच्या वर्चस्वामुळे पंजाबप्रांत आचारहीन बनला, असें कळतें. तेथील रहिवासी धर्मबाह्य व अपवित्र वर्तन करणारे असल्यामळे तें स्थान दोन दिवस राहण्याच्या योग्यतेचें सुद्धां नाही, असें कर्णपर्वांत सांगितलें आहे (४३.५–८). आर्यावर्ताबद्दल वैदिक ऋषि व स्मृति-सूत्रकार यांना प्रेम, आदर व अभिमान वाटत होता. आर्या-वर्तांतली संस्कृति व जीवनपद्धति ही सर्व जगांत श्रेष्ठ आहे, अशी त्यांची धारणा होती. मनु म्हणतो–

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ।
(२.२०).

अर्थ – या देशांत जन्मलेल्या ब्राह्मणाकडून पृथ्वीवरील सर्व मानवांनी आपापलें धार्मिक व नैतिक आचरण शिकावें. [इं. इ.; हि. ध.; हिं. वि. को.]

आर्यासप्तशती

हालाच्या गाथासप्तशतीचें अनुकरण करून ७०० आर्यांचा हा ग्रंथ गोवर्धन कवीने रचला. हा कवि बंगालचा अंतिम राजा लक्ष्मणसेन (इ. स. ११२६) याच्या दरबारांत होता. याची रचना अलंकारप्रचुर व वक्रोक्तिपूर्ण असून ग्रंथांत शृंगाररसाला प्राधान्य दिलेलें आहे. स्वतःच्या आर्यांचें त्याने पुढीलप्रमाणे वर्णन केलें आहे––

मसृणपदरीतिगतयः सज्जनहृदयाभिसारिकाः सुरसाः ।
मदनाद्वयोपनिषदो विशदा गोवर्धनस्यार्याः ।।

अर्थ –– कोमल पदन्यासाची गति असलेल्या, सज्जनांच्या हृदयाशीं अभिसार करणाऱ्या, रसयुक्त, शृंगारसाध्य अद्वैताचीं उपनिषदें असलेल्या व सुस्पष्ट अशा (या) गोवर्धनाच्या आर्या आहेत.

शृंगाराच्या विविध अवस्थांचें यांत मनोहर वर्णन केलेलें असून संयोग-वियोगसमयीं स्त्रीहृदयाची होणारी घालमेल, त्याने मार्मिकपणे रंगविली आहे ––

अपमानितमिव संप्रति गुरुणा ग्रीष्मेण दुर्बलं शैत्यम् ।
स्नानोत्सुकतरुणीस्तनकलशनिबद्धं पयो विशति ।।

अर्थ –– कडक उन्हाळयाने जणू अपमानित केलेलें बिचारें शैत्य स्नानोत्सुक तरुणीच्या स्तनरूपी कलशांत असलेल्या पयांत शिरून बसलें आहे.

सा सर्वथैव रक्ता रागं गुञ्जेव न तु मुखे वहति ।
वचनपटोस्तव रागः केवलमास्ये शुकस्येव ।।

अर्थ –– ती गुंजेप्रमाणे अनुरक्त आहे. तिच्या केवळ मुखा-वरच राग नाही. वाक्पटु अशा तुझा अनुराग मात्र पोपटा-प्रमाणे केवळ मुखावरच आहे. [सं. सा. सो. इ.]

आर्षविवाह

विवाहाचा एक प्रकार. याचें लक्षण मनु-स्मृतींत पुढीलप्रमाणे दिलें आहे—

एकं गोमिथुनं द्वे वा वरादादाय धर्मतः ।
कन्याप्रदानं विधिवदार्षो धर्मः स उच्यते ।।

(मनु. ३. २९)

अर्थ –– स्वतःच्या यागादिसिद्धीसाठी वराकडून एक किंवा दोन गायीबैलांच्या जोड्या घेऊन वराला विधियुक्त कन्यादान करणें, याला आर्ष विवाह म्हणतात.

हा विवाहप्रकार निकृष्ट गणला गला आहे. आपल्या यागांत दूधदुभतें मिळावें यासाठी गायीबैलांची जोडी आपल्या मुलाकडून न घेतां ती भावी जावयाकडून घेणें, ही गोष्ट चमत्कारिक दिसते. वधूपित्याला द्रव्य देऊन कन्या मिळविली काय किंवा गायबैल देऊन ती मिळविली काय; दोन्ही गोष्टी तत्त्वतः सारख्याच आहेत. त्यामुळे हा विवाह आसुरविवाह या सदरांत घालावा, असें कांही शास्त्रकारांचें मत आहे. दुसरे शास्त्रकार मानतात, कीं गाय-बैल हें कांही मुलीचें शुल्क (देज) नव्हे. शुल्कच म्हणायचें, तर प्राचीन काळीं कन्याशुल्क घेण्याची जी पद्धति होती, तिचा हा अवशेष आहे, असें फार तर मानावें. [पो. बी. हिं. सि.; हि. ध.]

आर्षेय उपनिषद् एक गौण उपनिषद्. विश्वामित्र, जमदग्नि, भरद्वाज, गौतम व वसिष्ठ यांच्या परस्पर विचारांतून हें उपनिषद् निर्माण झालें. यांत ब्रह्म हें दूरहि नाही, जवळहि नाही व त्याचें महिमान कोणालाहि कळणार नाही, असें सांगितलें आहे. यांत पुंड्र, सुह्म, कुलुंभ, दरद व बर्बर या लोकांचा उल्लेख आला आहे.

आर्षेय ब्राह्मण सामवेदाचें चौथें ब्राह्मण. इ. स. १८७६ मध्ये बर्नेलने तें छापून प्रसिद्ध केलें. यज्ञांत जीं सामें म्हणतात, त्यांचे ऋषि-दैवत-छंद माहीत नसले, तर दोष घडतो, या समजुतीने प्रत्येक सामाचा ऋषि, छंद व देवता या ब्राह्मणांत सांगितल्या आहेत. या ब्राह्मणग्रंथाचें अध्ययन करणाऱ्याला गायत्र, गेय, आरण्य व महानाम्न या सामांचीं नांवें यथाक्रम कळून येतात. ऊह व ऊह्य सामगानासंबंधींचीहि माहिती यांत दिली आहे. कोणतीं विशिष्ट सामें कोणत्या स्वरांत आरंभ करून गावीं, याविषयींहि थोडी माहिती या ब्राह्मणांत सांगितली आहे. याचे तीन प्रपाठक व आठ खंडें आहेत. सामगायकांच्या प्रारंभिक प्रचारक ऋषींचें यांत वर्णन असल्यामुळे या ग्रंथाला ऐतिहासिक दृष्टीनेंहि महत्त्व आहे. [वै. सा. सं.; हिंदुत्व]

आलकरी मुख्यतः खानदेशांत वसलेली एक जात. हे लोक आपणांस राजपूत म्हणवून घेतात. हे अळित्याच्या झाडापासून रंग तयार करून उपजीविका करीत, म्हणून यांना आलकरी हें नांव पडलें. यांना श्रावगी व गोलालारे असेंहि म्हणतात. यांचे पांच पोटभेद आहेत.

विवाहप्रथा –– आते-मामे-मावस अशा तीन्ही प्रकारच्या बहीणींशीं लग्नें होतात. लग्नांत माणकस्तंभ रोवून त्याची पूजा करतात. एकाच कुलांत व पांच पिढ्यांच्या आंत लग्नसंबंध करीत नाहीत. सख्ख्या भावांस सख्ख्या बहिणींशीं लग्न करतां येतें. अनेक बायका करण्याची मोकळीक आहे. विधवाविवाह व घटस्फोट रूढ आहे. प्रथमवराला विधवेशीं लग्न करायचें असल्यास प्रथम त्याचें अंगठीशीं लग्न लावतात.

आलकरी शिवोपासक आहेत. चितोडची भवानी ही त्यांची कुलदेवता आहे. विवाहित मृतांना जाळतात व अविवाहित मृतांना पुरतात. पितरांचें श्राद्ध करतात. आकस्मिक मृत्यु आल्यास मृताच्या स्मरणार्थ वीरांची स्थापना करतात. यांना मद्य-मांस चालतें. [म. ज्ञा. को.]

आलंब ऋषींचा एक वर्ग. [पु. इं.]

आलंबेयगण आलंबा नामक स्त्रीपासून उत्पन्न झालेला एक राक्षसगण. [ब्रह्मांड पु. ३. ७. १४०]

आलम (इ. स. १७ वें शतक) अवधी भाषेचा एक कवि. 'माधवानल–कामकंदला' या काव्याचा कर्ता. अकबराचा अर्थमंत्री तोडरमल याने या कवीला आश्रय दिला होता. आलमच्या काव्याची अवधी भाषा संस्कृतप्रचुर, परिष्कृत व प्रवाही आहे. उदाहरणार्थ––

नृत्य गीत विद्या चतुराई ।
गई बिसरी गुन की अतुराई ।
बदन मलीन पीतरंग भयऊ
रकत माँस सूखि सब गयऊ ।
राजा बोलति मीठे बैना
बिरहिनि नारि न जोरै नैना ।
राजा बोलहि उतर नही देई
बरुनी छूँटि नैन भरि लेई ।।

अर्थ–(या) विरहिणीला नृत्य, गीत, विद्या, चातुर्य या गुणांचा विसर पडला आहे. रक्त, मांस सगळें सुकून गेल्याने चेहरा पिवळा पडला आहे, म्लान झाला आहे. तिच्याशीं राजा अतिशय गोड भाषण करतो आहे; परंतु विरहिणी स्त्री ह्याच्या डोळ्याला डोळाहि देत नाही. राजा बोलतो आहे; परंतु ती उत्तरहि देत नाही. तिच्या पापण्या विलग झालेल्या

आहेत आणि आसवांनी डोळे भरून आले आहेत.

या नांवाचा दुसराहि एक कवि असून त्याने आलम-केलि नामक ग्रंथ रचला आहे. [अ. औ. उ. सा.]

आलमपुर म्हैसूर राज्यांतलें एक प्राचीन क्षेत्र. हें तुंगभद्रा नदीच्या तीरावर वसलें असून इथे ब्रह्मेश्वर व पापेश्वर या नांवाचीं दोन शिवमंदिरें आहेत. याचें प्राचीन नांव बालब्रह्मेश्वर असें होतें. या क्षेत्राला दक्षिणकाशी म्हणतात. विश्वेश्वर, विशालाक्षी, दंतिगणेश व कालभैरव या काशींतल्या देवांचीं इथेहि मंदिरें आहेत, हें याला दक्षिणकाशी म्हणण्याचें कारण होय. इथे ब्रह्मेश्वर नांवाच्या नऊ मंदिरांचा समुदाय आहे. त्यांतल्या बालब्रह्मेश्वराचें मंदिर विशाल असून त्याला अनेक स्तंभ आहेत. त्याचें मुख तुंगभद्रेकडे आहे.

इथल्या सर्व मंदिरांची रचना जशी अद्‌भुत, तशीच सुंदर आहे. पश्चिम भारतांतल्या गुहामंदिरांच्या धर्तीवर त्यांची उभारणी झाली आहे. मंदिरशिखरें प्रचलित शिखरपद्धतीपेक्षा अगदी वेगळीं आहेत. स्तंभांवर कोरलेलीं चित्रें बौद्ध व ब्राह्मणी अशा उभयविध शैलींची आहेत. [अजन्ता]

आलयविज्ञान बाह्य—आभ्यंतर, जड—चेतन असें जें कांही जगत् म्हणून आहे, तें सर्व विज्ञानाचा परिणाम असून या विज्ञानसमष्टीला आलयविज्ञान म्हणतात. सागरावर जसे तरंग उत्पन्न होतात व विलीन होतात, त्याप्रमाणे आलयविज्ञानांत समस्त पदार्थ तरंगवत् उत्पन्न होऊन तिथेच विलीन होतात. या आलयविज्ञानांतून जसें जड जगत् उत्पन्न झालें, त्याचप्रमाणे पांच इंद्रियांचें विज्ञान व मन उत्पन्न झालें आहे. **पाहा** — विज्ञानवाद. [द. दि.]

आलवी हें बुद्धकालीन स्थान श्रावस्तीहून राजगृहाकडे जाणाऱ्या मार्गावर वसलें होतें. हें स्थान नक्की कोणतें, याविषयीं वाद आहे. उन्नाव जिल्ह्यांतील मेवल हें गांव म्हणजे पूर्वीचें आलवी होय, असें कनिंगहॅम सांगतो; तर इटोवाजवळचें आविवा हें पूर्वीचें आलवी, असें डे म्हणतात. इथे अग्गालव चेतिय नामक एक विहार होता व तिथे बुद्ध कधीमधी राहत असे. इथल्या एका क्रूर यक्षाला बुद्धाने सौम्य बनविलें, अशी दंतकथा आहे. विनयपिटकांतले कांही नियमसुद्धा बुद्धाने इथेच तयार केले, असें म्हणतात. [उ. प्र. बौ. वि.]

आलापिनी वीणा वीणेचा एक प्रकार. हिचा दंड वेळूचा व ९ मुष्टि (अंदाचें ३४ इंच) लांब असतो. छिद्राचा व्यास दोन अंगुळें व तन्त्री (तार) बकरीच्या आंतडयाची असते. तुंब्याची रुंदी एक वीत व मुखाचें माप चार अंगुळें असतें. हिची नाभि हस्तिदंताची बनवितात. तुंबा पोटाशीं धरून दंडाचा खालचा भाग डाव्या हाताच्या पकडींत धरतात. ही दोन्ही हातांनी वाजवितात. डाव्या हाताच्या चार बोटांनी चार स्वर व उजव्या हाताच्या तीन बोटांनी तीन स्वर वाजवितात. **पाहा** — वीणा. [सं. शा.]

आलिंगन ‘प्रीतिपूर्वकपरस्पराश्लेष:’ = प्रेमपूर्वक एकमेकांना मिठी मारणें (हलायुद्ध). वात्स्यायन व कल्याणमल्ल यांनी आलिंगनाचे बारा प्रकार सांगितले आहेत—

(१) **स्पृष्टक** — समाजांत कोणालाहि संशय येऊं न देतां या प्रकाराचा अवलंब करतां येतो. गर्दींत प्रियकर आपल्या प्रियेच्या जवळून जातांना तिच्या अंगाला आपलें अंग घसटतो. त्यामुळे प्रियेला आलिंगनाचें सुख मिळतें; पण इतरांना मात्र त्याचा पत्ता लागत नाही.

(२) **विद्धक** — पहिल्याप्रमाणेच हाहि चोरटया आलिंगनाचा प्रकार आहे. पण या प्रकारांत स्त्री पुढाकार घेते. आपल्या प्रियकराच्या मागून किंवा पुढून जातांना ती आपल्या स्तनयुगुलाने, कोणाच्याहि लक्षांत न येईल, अशा प्रकारें त्याच्या अंगाला स्पर्श करते.



आलिंगन — लतावेष्टितक

(३) **उद्घृष्टक** — अंधार असला तर गर्दींतहि प्रियकर आपल्या प्रियेला बराच काळ किंवा वारंवार आलिंगन देतो. अंधारामुळे इतरांच्या तें ध्यानांत येत नाही.

(४) **पीडितक** – उद्‌घृष्टकाचीच ही पुढची पायरी होय. अंधारांत प्रियकर किंवा प्रिया खांबाला किंवा भिंतीला टेकून उभी राहते. त्यामुळे दुसऱ्याला दृढ आलिंगन देणें सुकर होतें.

(५) **लतावेष्टितक** – हा एकान्तांतील आलिंगनप्रकार आहे. वेल जशी वृक्षाला बिलगते त्याप्रमाणे स्त्री आपल्या प्रियकराच्या अंगाभोवती हातांचा विळखा घालते व उत्कंठित होऊन त्याच्याकडे बघते. तो मग तिचें चुंबन घेण्यासाठी खाली वाकतो.

(६) **वृक्षाधिरूढक** – एका पायावर उभी राहून स्त्री आपल्या उजव्या पायाने प्रियकराच्या उजव्या पायाला विळखा घालते. एका हाताने ती प्रियकराच्या खांद्याला धरते व दुसरा हात त्याच्या कमरेवर दाबून धरून ती वृक्षावर चढावें, त्याप्रमाणे करते व चुंबनासाठी मुख वर उचलते.

(७) **तिलतंडुलक** – स्त्री व पुरुष यांचें अतिशय दृढ असे आलिंगन.

(८) **क्षीरनीरक** – पाणी जसें दुधांत पूर्णपणे एकजीव होतें, त्याप्रमाणे स्त्री व पुरुष परस्परांना एकजीव करण्याच्या हेतूने झोपलेल्या किंवा बसलेल्या स्थितींत दृढ आलिंगन देतात.

(९) **उरूपगूहन** – स्त्री व पुरुष एकमेकांकडे तोंड करून कुशीवर झोपतात व एकमेकांच्या मांडयांत मांडया गुंतवितात.

(१०) **जघनोपगूहन** – पुरुष उताणा झोपतो व स्त्री त्याला जोराने आवळते. या वेळीं दोघांचे कटिप्रदेश एकत्र जुळतात.

(११) **स्तनालिंगन** – या प्रकारांत स्त्री पुरुषाच्या हृदयाला आपल्या स्तनांचा दाब देऊन आलिंगन देते.



आलिंगन–ललाटिक

(१२) **ललाटिक** – आलिंगनाचा एक सौम्य प्रकार. यांत स्त्री–पुरुषांचे डोळे, नाक व ओठ परस्परांना भिडतात. कपाळांचा मात्र नुसता स्पर्श होतो. [कामसूत्र; कामकल्प]

आलीढ मुद्रा मूर्तिकलेंतील एक मुद्रा. उजवा पाय पुढे पसरलेला व डावा पाय गुडघ्यांत थोडासा दुमडलेला, अशी ही अवस्था असते. धनुष्याला बाण लावून त्याची दोरी ओढतांना जो पवित्रा असतो, तशी ही मुद्रा असते. [गॉ. नॉ. बु.; इं. बु. इ.]

आलुपवंश दक्षिणेंतला एक राजवंश. या वंशाने इ. स. च्या २ ऱ्या शतकापासून तों १६ व्या शतकापर्यंत तुळुनाडूवर राज्य केलें. आळुक हें शेषाचें नांव आहे. त्यावरून आलुपांचा नागवंशांतून उदय झाला असावा, असें वाटतें. मंगलोर येथील गोल्लर गणपतीच्या देवालयांत एका शिलालेखावर फणाधारी नागाची एक आकृति कोरलेली आहे, त्यामुळे वरील कल्पनेला पुष्टि मिळते.

या राजवंशाचें कुलदैवत शिव (भैरव) हें असून उदयावर (उडुपि तालुका) या राजधानीच्या शहरीं, त्याचें 'शंभु कल्लु' नांवाचें मंदिर आहे.

या वंशाचा इ. स. ५७५ पूर्वीचा इतिहास उपलब्ध नाही. या वंशांतील मारम्म आळ्वरसर (इ. स. ५७५), सकलश्रीमत् आळ्वरसर (इ. स. ६००), कुंदवर्मरस (इ. स. ६२५), त्याचा पुत्र आळु-अरसर गुणसागर (इ. स. ६५०) व चित्रवाहन प्रथम (इ. स. ६७५–७००) यांच्याविषयी शिलालेख व ताम्रपट यांवरून थोडीशी माहिती मिळते. त्यानंतरच्या तीन चार शतकांत या वंशांत रणसागर, श्वेतवाहन, पृथ्वीसागर आळपेंद्र, विजयादित्य आळुपेंद्र, चित्रवाहन द्वितीय, आळ्व रणंजय, दत्ताळपेंद्र, श्रीमार, कुंदवर्म, बंकिदेव आळुपेंद्रदेव, इ. राजे होऊन गेले. यांपैकी शेवटचा राजा इ. स. च्या ११ व्या शतकाच्या मध्यांत अगदी स्वतंत्रपणे राज्य करीत होता. १२ व्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेलेल्या भुजबल कवि आळुपेंद्र याच्या संबंधीं अनेक शिलालेख उपलब्ध आहेत. त्यांवरून त्याने पुष्कळ वर्षें राज्य केलें, त्याच्या राजधानीचें नांव बारहकन्यापूर असें होतें व त्याच्या राज्यांत समृद्धि नांदत होती, या गोष्टी कळतात.


त्यानंतर इ. स. ११७० – १२१५ या कालखंडांत भुजबल कुलशेखर आळुपेंद्र याने राज्य केलें. त्याच्या कारकीर्दींत राज्याला चांगलें स्थैर्य प्राप्त झालें. त्याने प्रथमच स्वतःला पांडय ही उपाधि घेतली व त्याच्यानंतर त्या वंशांतील कांही राजांनी ती उपाधि पुढे चालू ठेवली. १४ व्या शतकाच्या उत्तरार्धांत या वंशांतील राजांनी जैन धर्माला आश्रय दिला, असें दिसतें. इ. स. १३८५ पासून आलुपांच्या राज्याचा विजयनगरच्या साम्राज्यांत समावेश झाला.

आलुप राजे हे स्वतंत्र नसून मांडलिक राजे होते. इ. स. ५७५ च्या सुमारास चालुक्य राजा कीर्तिवर्मा (प्रथम) याने आळ्वखेड (तुळुव राज्य) जिंकून आलुप राजा मारम्म आळ्वरसर याला आपला मांडलिक बनविलें. तेव्हापासून १२ व्या शतकाच्या अखेरपर्यंत तुळुव राज्य चालुक्यांच्या सत्तेखाली होतें. [ए. क. भा. १]

आलुवायची जत्रा केरळांत पेरियर नदीच्या वाळवंटांत शिवरात्रीच्या दिवशीं मोठी जत्रा भरते. तिथलें शिवमंदिर नदीच्या पुरांत वाहून गेलें आहे, म्हणून लोक केवळ त्या दिवसापुरतें नारळीच्या चुडतांचें एक तात्पुरतें मंदिर बनवून तिथे उत्सव करतात. दुसऱ्या दिवशीं जत्रेला आलेले लोक नदींत स्नान करून पितरांना पिंडदान करतात. [सुभद्रा तम्पुरान]

आलेखनकला रांगोळी, तांदुळाचें पीठ, भाताचे जाळलेले तूस इ. च्या साहाय्याने जमिनीवर, भिंतीवर किंवा कागदावर आकृति रेखाटणें म्हणजे आलेखन होय.

वैदिक साहित्यांत हाताने मूर्ति रेखाटण्याचे उल्लेख आहेत किंवा नाहीत, हा संशोधनाचा विषय आहे. परंतु पौराणिक ग्रंथांत मात्र तसे उल्लेख सांपडतात –



आलेखन कला – द. भारत

श्रावणे मासि पञ्चम्यां शुक्लपक्षे नराधिप ।
द्वारस्योभयतो लेख्या गोमयेन विषोल्वणाः ॥

(भवि. पु.)

अर्थ – हे राजा, श्रावण शुद्ध पंचमीच्या दिवशीं दाराच्या दोन्ही बाजूंना गोमयाने विषारी नाग काढावे.

मत्स्यपुराणांतहि खड्गखेटकधारी नागांची आकृति काढावी, असें सांगितलें आहे.

गोवत्स द्वादशीच्या दिवशीं सवत्सगाईची आकृति काढून तिची पूजा करावी, असें नारदपुराणांत सांगितलें आहे. हेमाद्रीने आपल्या व्रतखंडांत त्या त्या व्रताशीं संबद्ध अशा देव-देवतांच्या आकृती कशा काढाव्या, तें सांगितलें आहे. भविष्य पुराणांत व्रतविषयक मंडलें दिलेलीं आहेत, तोहि आलेखनाचाच प्रकार आहे. बंगालमधील अलिपनेचे विविध प्रकार निरनिराळीं व्रतें व संस्कार यांच्याशीं संबद्ध आहेत. उत्तर प्रदेश, राजस्थान, माळवा, महाराष्ट्र व द. भारत या ठिकाणीं प्रचलित असलेले रांगोळीचे प्रकार हि धार्मिक स्वरूपाचे च आहेत. या आलेखनांत जीं स्वस्तिक, अष्टदळ इ. प्रतीकें वापरलीं जातात त्यांना हि विशिष्ट अर्थ असतो.



आलेखन कला – बंगाल

नारदाने चित्रांकनाचे शाश्वत व तात्कालिक असे दोन भेद मानलेले असून, चित्रांचे तीन प्रकार मानले आहेत–(१) भौम–भूमीवर रेखाटलीं जाणारीं चित्रें. (२) कुडचक – भिंतीवर रेखाटलेलीं चित्रें व (३) ऊर्ध्वक – छतावर काढलेलीं चित्रें. या संदर्भांत मूर्तिपूजेचा विकास कसा झाला, त्याचा क्रम पुढील प्रमाणे लावतां येईल––

(१) प्रथम दैवत मंत्रांचें पठन व पाठन.

(२) त्या मंत्रांवरून त्यांच्या स्वरूपाची कल्पना.

(३) दैवतांच्या आकृतीची कल्पना केल्यावर, त्या आकृतिबरहुकूम देवदेवतांच्या आकृतींचें चित्रण.

सुरवातीला हें रेखाटन देवतेच्या आकृतिकल्पनेप्रमाणे होत असेच, असें नाही. प्रथम देवतेचें प्रतीकात्मक रूप किंवा

त्याचें चित्रण करून त्याला पूजोपचार समर्पीत. आजहि स्वस्तिक चिन्ह मंगलकारक प्रतीक समजूनच तें रेखाटतात.

(४) एकदा मूर्ति रेखाटल्यावर, मग त्या रेखाटनाला स्थायी स्वरूप कसें देतां येईल, याचा विचार. **पाहा** –अलिपना, रांगोळी, कोलाम. [भारती]

आलेख्यसर्पपंचमी तिथिव्रत. भाद्रपद शु. पंचमीला रंगीत रांगोळीने नाग काढून त्याची पूजा करतात. सर्पांपासून अभय, हें या व्रताचें फल होय. [हि. ध.]

आलोकदान प्राचीन काळीं गृहस्थ रोज कांही विशिष्ट ठिकाणीं दिवे, भाताचे पिंड व फुलांचे हार देव, राक्षस व यक्ष यांच्या संतोषासाठी ठेवीत. तसेंच धोक्याच्या ठिकाणीं, मंदिरांत व चव्हाटयावर रोज दिवा लावल्याने अशुभाचा परिहार होतो, असें मानीत. [म. उ.]

आल्हखंड अवधी भाषेंतील एक वीरकाव्य. अवधींतील हा सर्वप्रथम काव्यग्रंथ असून जगनिक कवीने इ. स. ११७३ मध्ये याची रचना केली. महोबे येथील दोन वीर आल्हा व ऊदल यांच्या चरित्राशीं या काव्याचा संबंध आहे. काव्याची भाषा ओजस्वी व प्रवाही आहे.

उत्तर भारतांत हें काव्य अतिशय लोकप्रिय असून सर्वसाधारण लोक तुलसीरामायणाप्रमाणे मोठया आवडीने तें वाचतात. हें काव्य बरींच वर्षे मौखिक स्वरूपांतच राहिल्यामुळे त्यांतील भाषा व पाठ बरेच विकृत झालेले आहेत. इ. स. १८६५ मध्ये चार्ल्स इलियटने तें लिपिबद्ध केलें. [अ. औ. उ. सा.]

आल्हा अवधी भाषेंतील एक छंद. भानु कवीच्या ' छंद–प्रभाकर ' या ग्रंथांत छंदांचीं वीर, अश्वावतारी व मात्रिक सवैया अशीं आणखी तीन नांवें दिलेलीं आहेत. अवधी भाषेंतील प्रसिद्ध वीरकाव्य ' आल्हखंड ' याची रचना याच छंदांत आहे. चौपाई व दोहा या छंदांनंतर आल्हा छंद लोकांच्या अधिक परिचयाचा आहे. [अ. औ. उ. सा.]

आवडैयार कोविल तंजाऊर जिल्यांतील एक प्रसिद्ध मंदिर. सुप्रसिद्ध नायन्मार संत मणिक्कवाचकर याला इथेच शैवदीक्षा मिळाली. या मंदिरावर वाद्य, नृत्य व संगीत या विषयांचीं सुंदर चित्रें कोरलेलीं आहेत. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

आवंतीभाषा एक प्राकृत उपभाषा. ही प्राचीन काळीं अवंती देशाची भाषा होती. नाटचशास्त्रांत तिला स्थान दिलेलें आहे. ही शौरसेनीची उपभाषा असून शौरसेनी व महाराष्ट्री या दोन भाषांच्या संकरांतून जन्म पावली आहे. [विक्रम स्मृतिग्रंथ]

आवरणदेवता मानवाच्या लिंग शरिरांत जीं षट्चक्रें आहेत, त्यांत निवास करणाऱ्या देवतांना योगशास्त्रांत हें नांव आहे. त्यांची संख्या ३६० आहे. त्यांना प्रसन्न केल्यावांचून साधकाला षट्चक्रभेद करतां येत नाही. [स. पॉ.]

आवरू ग्वालेरच्या मोहम्मद गौस याच्या वंशांतील एक उर्दू कवि. याची बरीच कविता आहे. [क. कौ. ४]

आवर्तक भृज्जकंठ पुरुष व ब्राह्मण स्त्री यांच्या संततीला हें नांव आहे. [हि. ध.]

आवर्तन जंबुद्वीपाचें एक उपद्वीप. [भाग. पु. २. १९. ३०]

आवर्तय हैहय वंशांतील एक जमात. [पु. इं.]

आवश्यक क्रिया श्वेतांबर जैनांचें एक मूलसूत्र. यांत सहा अध्याय असून जैन साधूंना अवश्यकर्तव्य अशा सहा गोष्टींचें वर्णन आहे. वैदिक लोकांत संध्येला, पारशी लोकांत खोर्द अवेस्त्याला, ख्रिश्चन लोकांत प्रार्थनेला किंवा मुसलमान लोकांत नमाजाला जें महत्त्व आहे, तेंच जैनांत आवश्यकांना आहे.

दैवसिक, रात्रिक, पाक्षिक, चतुर्मासिक व सांवत्सरिक असे आवश्यकांचे प्रकार आहेत. आवश्यक क्रिया सर्वांसाठी एकच नसून अधिकारभेदाने ती भिन्न भिन्न आहे. आवश्यकाची क्रिया ज्ञानपूर्वक केली असतां ती आत्म्याला गुणांनी वासित करते, म्हणून तिला ' आवासक ' असेंहि म्हणतात. स्थूल दृष्टीने आवश्यक क्रियेचे सहा विभाग आहेत–(१) सामायिक (२) चतुर्विंशतिस्तव (३) वंदन (४) प्रतिक्रमण (५) कायोत्सर्ग व (६) प्रत्याख्यान.

रागद्वेषांच्या अधीन न होतां सर्वांशीं आत्मौपम्य बुद्धीनें वागणें, याला सामायिक असें नांव आहे. चोवीस तीर्थंकरांची स्तुति करणें, म्हणजे चतुर्विंशतिस्तव होय. कायिक, वाचिक व मानसिक अशा तीन्ही प्रकारच्या क्रियांनी पूज्य व्यक्तींविषयीं

आदर प्रकट करणें, याला वंदन असें म्हणतात. वंदनालाच चितिकर्म, कृतिकर्म किंवा पूजाकर्म असे पर्यायशब्द आहेत. कांही प्रमादांमुळे शुभ योगापासून च्युत होऊन अशुभ योग प्राप्त होणें व त्यानंतर पुनश्च शुभ योग प्राप्त होणें, याला प्रतिक्रमण ही संज्ञा आहे. मन धर्मकारणीं लावून शरीराच्या ममतेचा त्याग करणें, म्हणजे कायोत्सर्ग होय. कायोत्सर्गाने देहाची व बुद्धीचीहि जडता नष्ट होऊन विचारशक्तीचा विकास होतो. प्रत्याख्यान म्हणजे त्याग. त्याज्य वस्तु द्रव्यरूप व भावरूप अशा दोन प्रकारच्या आहेत. अन्नवस्त्रादि बाह्य वस्तूंचा त्याग हा द्रव्यरूप असून अज्ञान, असंयम इ. दोषांचा त्याग हा भावरूप होय. प्रत्याख्यानामुळे अनेक गुण अंगीं बाणतात, म्हणून त्याला गुणधारण असें दुसरें नांव आहे. कायोत्सर्ग करून ज्याने चित्तशुद्धि, एकाग्रता व आत्मबल प्राप्त करून घेतलें, तोच प्रत्याख्यानाचा खरा अधिकारी होतो. या सहा आवश्यकांचा जो क्रम आहे, तो कार्यकारणभावाच्या शृंखलेवर आधारित आहे.


आवश्यक क्रिया हें जैन धर्माचें प्रधान अंग आहे. त्यामुळे आवश्यक क्रिया व तद्बोधक आवश्यक सूत्र हें जैनांच्या श्वेतांबर व दिगंबर या दोन्ही शाखांत मिळणें स्वाभाविक होतें; पण तसें झालें नाही. श्वेतांबर संप्रदायांतील साधुपरंपरा अखंड चालू राहिल्यामळे, त्या संप्रदायांतील साधु व श्रावक या दोघांचेहि आवश्यक क्रिया व आवश्यक सूत्र हे ग्रंथ टीकेसहित उपलब्ध आहेत. परंतु दिगंबर संप्रदायांतील साधूंची परंपरा खंडित झाल्याने त्यांच्यांतील साधूंच्या आवश्यक क्रिया लुप्तप्राय झाल्या व त्याचबरोबर त्यांच्यांतील श्रावकासंबंधीं आवश्यक क्रियाहि दुर्मिळ झाल्या. त्यामुळे दिगंबर संप्रदायांतील आवश्यक सूत्र संपूर्ण उपलब्ध नाही. [द. चिं.]

आवसथ्य ' अवसथे भवः आवसथ्यः ' = अवसथ म्हणजे अतिथिगृह, त्यांत असणारा तो आवसथ्य होय. हें एका अग्नीचें नांव आहे. अग्निहोत्र्याने अवसथांतहि एक अग्नि ठेवावा व त्याचें आधान विवाहाच्या वेळीं करावें, असें सांगितलें आहे (पार. गृ. सू. १. २). सांप्रत आवसथ्य अग्नि ठेवण्याची पद्धति नाही. [विद्याधरशास्त्री भिडे]

आवळा एक पवित्र फळ. आवळा अलक्ष्मीचा नाश करतो. हें फळ सूर्याला आवडत नाही, म्हणून रविवारीं त्याला शिवत नाहीत. कार्तिकांत तुळशीचें लग्न करतांना वृंदावनांत आवळे ठेवतात. त्यापूर्वी आवळा खाऊं नये, असा संकेत आहे. मरणोन्मुख माणसाच्या नाक, कान, व केस या ठिकाणीं आवळा ठेवल्यास मरणारा विष्णुलोकीं जातो, आवळीचें झाड लावणारा पुनर्जन्मांतून मुक्त होतो व ज्याच्या दारीं आवळीचें झाड असेल, त्याच्या घरांत कोणालाहि भूतबाधा होत नाही, असें पुराणांत सांगितलें आहे. आवळ्याचें माहात्म्य सांगणारी कथा अशी––

एक चांडाल शिकारीला गेला असतां त्याला तहान लागली आणि आवळीच्या झाडावर चढून त्याने खूप आवळे खाल्ले. पण एवढ्यांत तो खाली पडला आणि मृत्यु पावला. तेव्हा त्याला नेण्यासाठी पिशाच तिथे आले; पण त्यांना त्या चांडालाला नेतां येईना. तेव्हा तिथल्या एका ऋषीने पिशाचांना सांगितलें, की ' आवळे खाल्ल्यामुळे याचा देह पवित्र झाला असून हा विष्णुलोकाचा अधिकारी झाला आहे. तुम्हालाहि पिशाचयोनींतून उद्धरून जायचें असेल, तर तुम्हीहि आवळे खा.' पिशाचांनी लगेच तसें केलें व तेहि उद्धरून गेले. [प. पु. सु.खं. ६०]

आवळीपूजन मृदुमान्य दैत्याने देवांना स्वर्गांतून स्थानभ्रष्ट केलें, तेव्हा त्यांनी पृथ्वीवर येऊन



आवळी

आवळीच्या झाडाचा आश्रय घेतला. त्या दिवसापासून या वृक्षाला पूज्यता प्राप्त झाली. कार्तिक पौर्णिमेस या वृक्षाची

पूजा विहित आहे. या पूजेच्या वेळीं आवळीला सूत्रवेष्टन करतात, श्रीफलयुक्त अर्घ्य देतात, तिच्या चारी दिशांना बलिदान करतात, अष्टदिशांना तुपाचे दिवे लावतात व पुढील मंत्राने प्रार्थना करतात––

धात्रि देवि नमस्तुभ्यं सर्व पापक्षयंकरि ।
नीरोगं कुरु मां नित्यं निष्पापं धात्रि सर्वदा ।।

अर्थ –– धात्री (आवळी) देवि, तूं सर्व पापांचा क्षय करणारी आहेस. तुला नमस्कार असो. तूं मला सर्वकाल निरामय व निष्पाप कर.

नंतर पितरांचें तर्पण, घृतपात्रदान व दंपती-भोजन करून व्रत समाप्त करतात. [व्रतराज]

आवळीभोजन कार्तिक शु. १० मी पासून पौर्णिमेपर्यंत एखाद्या दिवशीं आवळीच्या झाडाखाली स्वयंपाक करून इष्टमित्रांसह भोजन करतात. पूजाविधि आवळीपूजनाप्रमाणेच असतो. महाराष्ट्रांत व कर्नाटकांत देवस्थान असेल, त्या ठिकाणीं देवाची मूर्ति पालखींत बसवून आवळीच्या झाडाखाली आणतात. मग देवाला तिथे महानैवेद्य करून भोजन झाल्यावर सायंकाळीं देव मिरवणुकीने परत देवळांत नेतात.

आवीचि एक नरक. [विष्णु. पु. २. ६. ४]

आवेशक एक यक्षगण. [पु. इं.]

आशादशमी तिथिव्रत. कार्तिक किंवा कोणत्याहि महिन्याच्या शुद्ध १० मी पासून व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधि सहा महिने ते दोन वर्षें. अंगणांत दहा दिशांच्या दिक्पालांच्या आकृति स्त्रीरूपांत काढून त्यांची पूजा करतात. पुढील मंत्राने प्रार्थना करतात ––

आशाः स्वाशाः सदा सन्तु सिध्यन्तां मे मनोरथाः ।
भवतीनां प्रसादेन सदा कल्याणमस्त्विति ।।

अर्थ – मला सर्व दिशा शुभकारक होवोत. माझे मनोरथ पूर्ण होवोत. तुमच्या प्रसादाने (माझें) सार्वकाल कल्याण असो.

व्रतोद्यापनच्या वेळीं दिशांच्या सुवर्ण प्रतिमा किंवा तें शक्य नसेल तर पिठाच्या प्रतिमा करून ब्राह्मणाला दान देतात. व्रताचें फल – कामनापूर्ति. [व्र. प.; व्रतराज; हि. ध.]

आशादित्यव्रत काम्यव्रत. आश्विन मासांतील रविवारीं या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधि एक वर्ष. रोज जमिनीवर गोमयाने वर्तुलाकार मंडल करतात व त्या मंडलावर सूर्याला अर्घ्य देतात. त्याचा मंत्र असा –

यथाशा विमलाः सर्वाः सूर्यभास्वरभानुभिः ।
तथाशाः सफला देव कुरु नित्यं ममार्घ्यतः ।।

अर्थ – हे सूर्या, ज्याप्रमाणे सूर्यकिरणांनी सर्व दिशा निर्मल होतात, तशा या अर्घ्यदानामुळे माझ्या सर्व आशा सफल कर.

उद्यापनाच्या वेळीं आदित्याची सुवर्णप्रतिमा करतात व तिची सूर्य, वरुण, माधव, धाना, हरि, भग इ. बारा नांवांनी पूजा करतात. व्रताचें फल व्याधिनाश व कुष्ठरोगनिवारण. व्रताची कथा अशी ––

एकदा दुर्वास ऋषि श्रीकृष्णाला भेटण्यासाठी द्वारकेंत आला. श्रीकृष्णाने त्याचा यथोचित सत्कार केला. परत निघण्याच्या वेळीं श्रीकृष्णपुत्र सांब त्याला हसला. दुर्वासाला त्या गोष्टीचा अतिशय राग आला, पण त्या वेळीं त्याने तो आवरला. नंतर तो नारदाकडे गेला. नारदाला त्याने घडलेली सर्व हकीगत सांगितली व सांबाला शिक्षा होईल, असें कांहीतरी करण्यास सांगितलें. मग नारद द्वारकेंत गेला व श्रीकृष्णाला त्याने सांबाचा उद्धटपणा सांगितला. श्रीकृष्णाने सांबाला 'कुष्ठरोगी हो' असा शाप दिला. पुढे श्रीकृष्णाच्या सांगण्यावरून त्याने आशादित्यव्रत केलें व तो रोगमुक्त झाला. [व्रतराज]

आशाधर एक जैन पंडित. हा मांडलगड (मेवाड) येथे राहत होता. पुढे शहाबुद्दीन घोरीच्या आक्रमणांनी त्रस्त होऊन तो माळव्याची राजधानी धार येथे जाऊन राहिला. तो व्याघ्रेरवाल किंवा बघेरवाल या वैश्य जातीचा होता. याने न्याय, व्याकरण, काव्य, अलंकार, योगशास्त्र, वैद्यक इ. विविध विषयांवर एकोणीस ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकी कांहींचीं नांवें पुढीलप्रमाणे – प्रमेयरत्नाकर, भरतेश्वराभ्युदय काव्य, ज्ञानदीपिका, अध्यात्मरहस्य, रत्नत्रयविधान इत्यादि. [जै. सा. इ.]

आशाधरभट्ट (१७ वें शतक ?) एक साहित्यशास्त्रज्ञ. याचे कोविदानंद, त्रिवेणिका, अलंकारदीपिका, अद्वैतविवेक व प्रभापटल असे पांच ग्रंथ आहेत. शेवटचे दोन अप्रसिद्ध आहेत. [सा. शा. इ.]

आशानंद (इ. स. १६ वें शतक) राजस्थानांतील एक चारण कवि. जोधपुरनरेश राव मालदेव याची आशानंदावर मर्जी होती. इ. स. १५३३ सालीं राव मालदेवाने बिकानेर वर स्वारी केली; तेव्हा हा त्याच्या बरोबर होता.


आशानंदाच्या नांवावर पुढील सहा ग्रंथ आहेत – लक्ष्मणायण, निरंजनप्राण, गोगाजी री पेडी, वाघा रा दूहा, उमादे भाटियाणी रा कवित्त व फुटकळ गीतें. हे सर्व ग्रंथ डिंगल भाषेंत आहेत. याची भाषा मधुर असून कविता हृदयस्पर्शी आहे. आपला मित्र बाघा कोटडिया याच्या मृत्यूनंतर यानें लिहिलेले करुणरसपूर्ण दोहे प्रसिद्ध आहेत.

याच्या कवितेचा नमुना पुढीलप्रमाणे ––

सझ सौळै सिणगार, सत्तव्रत अंग सनाहै ।
अरक बांर मुख उग नीर गंगाजळ नाहै ॥
चीर पहर अस चढै मुकुट बेणी सिर खुलै ।
देती परदिरवणाँह, हंस गत राणी हलै ।।
सर भुवण पैस लीधौ सरग साम तणौ मन रंजियौ ।
रुसणौ मालदे राव सूँ भटियाणी इम भंजियौ ।।

[रा. भा. औ. सा.]

आशापुरी गुजरातमधील एक देवता. ही अनेकांची कुलदेवता आहे. गुजरातच्या वेगवेगळ्या भागांत हिची वेगवेगळ्या नांवांनी पूजा करतात. आपल्या कुलदेवीचें स्थान फार लांब असूं नये, या उद्देशानें आशापुरी देवीची



आशापुरीचे मंदिर – कच्छ

स्थापना अनेक मध्यवर्ती ठिकाणीं झालेली दिसते. माघ महिन्यांत यात्रेकरूंचे संघ त्या त्या ठिकाणीं जातात, त्या वेळीं तिथे भवाई नामक नृत्य होतें. अनेक लोक त्या वेळीं मुलासाठी केलेले नवस फेडतात. भाद्रपद शु. ८ मीला आशापुरीची मोठी यात्रा भरते.

आशिर म्हणजे मिश्रण. वैदिक काळीं सोमरसामध्ये दूध, दही किंवा यव हे पदार्थ मिसळून देवांना अर्पण करण्याची प्रथा होती. [वे. इ.]

आशीर्वाद 'आशीः + वाद (उच्चारण) ' = " होवो " या शब्दाचा प्रयोग करून उच्चारलेलें वचन. उदा० 'भवतु ते शिवप्रसादः' = तुला शिवप्रसाद होवो. 'इष्टार्थाविष्करणम्' = (यजमानाला) इष्ट असलेल्या अर्थाचें आविष्करण, अशीहि 'आशीः' या शब्दाची व्याख्या आहे (न्यायकोश). कनिष्ठानें ज्येष्ठ किंवा वरिष्ठ याला प्रणाम केला असतां, तसेंच शिष्यानें गुरूला व यजमानानें ब्राह्मणाला नमस्कार केला असतां, त्या ज्येष्ठवरिष्ठांनीं प्रणामकर्त्याचें मंगल चिंतिणें व तदर्थक 'स्वस्त्यस्तु, कल्याणं भवतु, आयुष्मान् भव, (स्त्रीला) सौभाग्यवती पुत्रवती भव,' इ. वाक्यें उच्चारणें याला आशीर्वाद म्हणतात. याचें लक्षण पुढीलप्रमाणे ––

वात्सल्याद्यत्र मान्येन कनिष्ठस्याभिधीयते ।
इष्टावधारकं वाक्यमाशीः सा परिकीर्तिता ।।

(श. क.)

अर्थ –– मान्य पुरुषानें कनिष्ठाविषयीं वात्सल्य धरून त्याच्या इष्टसिद्धीला पोषक असें वाक्य उच्चारणें, याला आशीर्वाद म्हणतात.

कोणत्याहि शुभ व मंगल कृत्यांत वडीलधाऱ्यांचा व ब्राह्मणांचा आशीर्वाद घेण्याची पद्धति आहे. आशीर्वादग्रहणावांचून कोणत्याहि कृत्याची सांगता होत नाही. ब्राह्मण वेदांतले कल्याणपर मंत्र अशीर्वादासाठी म्हणतात.

शतं जीव शरदो वर्धमानः
शतं हेमन्ताञ्शतमु वसन्तान् ।
शतमिन्द्राग्नी सविता बृहस्पतिः
शतायुषा हविषेमं पुनर्दुः ।।
आहार्षं त्वाविदं त्वा पुनरागाः पुनर्नव ।
सर्वाङ्ग सर्वं ते चक्षुः सर्वमायुश्च तेऽविदम् ।।

(ऋ. १०.१६१.४–५)

अर्थ –– तूं शंभर शरदृतु, शंभर हेमंत ऋतु आणि शंभर वसंत ऋतूंपर्यंत जीवमान राहा. तूं उत्तरोत्तर उत्कर्ष पाव. कारण इंद्र, अग्नि आणि बृहस्पति ह्यांनी ज्याच्या योगानें मानवाला शंभर वर्षेपर्यंत आयुष्य लाभतें, अशा हविर्भागानें (प्रसन्न होऊन) तुला शंभर वर्षांचें पूर्ण आयुष्य दिलें आहे. मीं तुला (आरोग्य स्थितींत) आणलें आहे; तुझी सर्व परिस्थिति जाणली आहे. पुनः नवीन देह धारण करणाऱ्या

पुरुषा, तूंहि आता (उत्तम स्थितींत) पुनः आला आहेस; हे पूर्णारोग्ययुक्ता, तुझीं चक्षुरादिक सर्व इंद्रियें, किंबहुना तुझें पुढील आयुष्यसुद्धा मीं पूर्ण जाणलेलें आहे.

आशीर्वादमंत्र झाल्यावर मग यजमान उजव्या हाताखालून उपरण्याचा पदर घेऊन त्यांत ब्राह्मणांच्याकडील अक्षता ग्रहण करतो. त्या वेळीं ब्राह्मण पुढील मंत्र म्हणतात —

श्रीर्वर्चस्वमायुष्यमारोग्यमाविधाच्छोभमानं महीयते ।
धान्यं धनं पशुं बहुपुत्रलाभं शतसंवत्सरं दीर्घमायुः ॥

वरील मंत्रांत 'शोभमानं' ऐवजी 'पवमानं' आणि 'धान्यं धनं' या ऐवजी 'धनं धान्यं' असाहि पाठभेद आहे.

आशीर्वादाचा वैदिकेतर मंत्र असा —

आशीर्वादाः सफलाः सन्तु पूर्णाः सन्तु मनोरथाः ।
शत्रूणां नाशनं चास्तु मैत्राणामुदयस्तव ॥

मग यजमान आपल्या स्त्री-पुत्रांसह ब्राह्मणांना नमस्कार करतो. आशीर्वाद मिळाल्यावांचून कुठलेंहि मंगलकृत्य सांग झालें असें समजत नाहीत.

आशीर्वाद व वरदान या दोहोंमध्ये थोडा फरक आहे. ब्राह्मण किंवा पुरोहित आपल्या यजमानाला, वडीलधारीं माणसें आपल्या पुत्रपौत्रादि नातेवाइकांना आणि गुरु किंवा सत्पुरुष आपल्या शिष्यांना आयुरारोग्यादि इष्टार्थाच्या प्राप्तीबद्दल वचन बोलतात, त्याला आशीर्वाद म्हणतात व ईश्वर, देवता किंवा अवतार आपल्या भक्तांना इष्टसिद्धीविषयीं जें वचन बोलतात, त्याला वरदान म्हणतात.

आशीविषधरयंत्र हें युद्धविद्येंतलें एक यंत्र आहे. याच्या द्वारा सर्पांनी भरलेले कुंभ शत्रूवर सोडले जात. [प्रा. भा. सां.]

आशूरा मुहर्रममधला दहावा दिवस. मुहंमदाने त्या दिवशीं उपास पाळला होता, म्हणून मुसलमान लोक त्या दिवशीं उपास धरतात. आदम-ईव्ह, पाटी-पेन्सिल, स्वर्ग-नरक व जीवन-मृत्यु या गोष्टी ईश्वराने याच दिवशीं निर्माण केल्या, असें मानलें जातें. [डि. इ.]

आशौच 'न शुचिः अशुचिः तस्य भावः' = अशुचित्वाचा भाव म्हणजे आशौच होय. आशौच हें विशिष्ट कालानंतर स्नानादि शुद्धिकारक क्रिया केल्याने संपतें. तें पिंडोदकदानादि विधीला व अध्ययन थांबविण्याला निमित्त होतें (याज्ञ. वरील मिताक्षरा ३.१).

एखाद्याच्या जन्माने अथवा मृत्यूने त्या घटनेचा परिणाम म्हणून एक वा अनेक व्यक्तींना आलेलें अशुचित्व म्हणजे आशौच होय. आशौच प्राप्त झालेल्या व्यक्तीला विशिष्ट कालपर्यंत धार्मिक अथवा अर्धधार्मिक कृत्यें करणें निषिद्ध असतें व अशा व्यक्तींच्या संपर्काने इतरांनाहि अशुचित्व प्राप्त होतें. जननाशौचापेक्षां मृताशौचाविषयींचे निषेध अधिक जोरकस आहेत. या निषेधांचें कारण स्पष्ट नाही. मृतव्यक्तीचें शव हें स्वयमेव भयाचें कारण असेल, तें मृत्यूचें वाहन असेल किंवा त्यांतला आत्मा हा त्या कुलांतल्या व्यक्तींच्या आत्म्याशीं अशरीरी अशा संबंधाने संबद्ध असल्यामुळे त्यापासून भय किंवा पीडा संभवत असेल, अशा कोणत्या ना कोणत्या तरी धारणेने आशौचकल्पना जन्माला आली आहे. कांही असलें, तरी मृताचें आप्तस्वजन त्यानंतर कांही निश्चित कालावधीसाठी समाजापासून अलग होतात, ही गोष्ट जगांत सर्वत्र रूढ आहे ज्यांनी मृताचा अंत्यसंस्कार केला असेल, त्यांचें अशुचित्व इतर नातेवाइकांपेक्षा जास्त मानलें जातें. मृताशौच कुळांतल्याच लोकांना पाळावें लागतें असें नव्हे; तर मृताच्या अंत्यसस्काराला एखादें गांव एकत्र झालें असेल, तर त्या गांवालाहि निश्चित कालासाठी अशुचि मानलें जातें.

आशौचाचा कालावधि दूर-निकटसंबंधाने कमी अधिक असतो. भिन्न परिस्थितीप्रमाणे तो स्नान, एक रात्र, एक दिवस, इथपासून तों कांही महिने इथपर्यंत वेगवेगळा असतो.

त्याचप्रमाणे आशौचाचा काल मृताची जात, वय व लिंग यांच्या भेदानुसारहि भिन्न होतो. गृह्यसूत्रांच्या मताप्रमाणे आशौचाचा सामान्य अवधि दहा दिवसांचा आहे (पार. गृ. सू. ३. १०. ३०). पारस्कर ब्राह्मण-क्षत्रियांच्या आशौचांत भेद करीत नाही; पण वैश्य व शूद्र यांच्यासाठी त्याचा काल अनुक्रमे पंधरा दिवस व एक महिना सांगतो (३. १०. ३८). परवर्ती स्मृतिग्रंथ विशिष्ट परिस्थितींत व विशिष्ट व्यक्तींना आशौचांतून केवळ स्नानाने मुक्त करतात. ऋत्विज्, दीक्षित, यज्ञीय कर्म करणारा, दीर्घ सत्र चालविणारा, ब्रह्मचारी, ब्रह्मवेत्ता, कारागीर, शिल्पी, वैद्य, दास-दासी, नापित, राजा व श्रोत्रिय हे 'सद्यःशौच' म्हणजे स्नान केल्याने तात्काळ शुद्ध होणारे होत (याज्ञ. ३. २८). हे अपवाद समाजाच्या सोयीला धरून केले आहेत, हें स्पष्ट दिसतें.

आशौचाचा मुख्य कालावधि प्रौढ व्यक्तींच्या मृत्यूसंबंधांतच लागू आहे. बालमृत्यूचें आशौच अल्प असतें. गृह्यसूत्रांच्या मतें दोन वर्षें होण्याच्या पूर्वी मृत झालेल्या बालकाचें आशौच केवळ मातापित्यांस एक किंवा तीन रात्रीं लागू होतें (पार. गृ. सू. ३. १०. २-५). दांत आलेल्या व चूडाकरण झालेल्या मुलाच्या मृत्यूचें आशौच मात्र सर्व बांधवांना लागू आहे.

विवाहपूर्व कन्येचा मृत्यु झाल्यास तीन दिवस आशौच असतें. दहा दिवसांचें मृताशौच असतां त्यांत दहा दिवसांचें अथवा त्याहून कमी असें मृताशौच प्राप्त झाल्यास, पूर्वीचें आशौच संपतें त्याच्याबरोबरच दुसरेंहि संपतें. संबंधी आणि मित्र यांच्यासाठी आशौच पाळणें ऐच्छिक आहे. कुलपुरोहित, श्वशुर, मित्र, विवाहामुळे झालेले नातेवाईक व भाचा, यांच्या मृत्यूचें आशौचहि गृह्यसूत्रांत ऐच्छिक मानलें आहे (पार. गृ. सू. ३. १०. ४६–४७). पण धर्मसूत्रें आणि स्मृती मात्र हें आशौच अनिवार्य मानतात (आप. ध. सू. १. ६).

जननाशौच पुढीलप्रमाणे मानतात – गर्भिणी सातव्या महिन्यापासून पुढे केव्हाहि प्रसूत झाल्यास सपिंडांना दहा दिवस जननाशौच पाळावें लागतें. या आशौचांत बाळंतिणीस दहा दिवस अस्पृश्यत्व असतें. पुत्र झाल्यास वीस दिवस व कन्या झाल्यास एक महिना तिला धर्मकृत्यांचा अधिकार नसतो.

आशौचासंबंधीचा विस्तृत तपशील धर्मसिंधु व निर्णयसिंधु या ग्रंथांत पाहायला मिळतो. आशौचाच्या अवधींत विधि-निषेधात्मक असे दोन प्रकारचे नियम पाळावे लागतात. भोगविलासांचा व जीवनव्यवसायाचा त्याग, वेदाध्ययन, क्षौरकर्म, गृह्य होम इ. बाबतींत निषेध आहे. संयम, भूमिशयन, केवळ मध्याह्नभोजन, हे विधी आहेत. [ध. सिं.; हिं. सं.]

आश्मरथ्य वेदान्त तत्त्वज्ञानाचा एक आचार्य. ब्रह्मसूत्रांत याच्या मताचा उल्लेख असून तो परमेश्वर प्रादेशमात्र असल्याचें सांगतो. परमेश्वर अनंत असूनहि भक्तावर अनुग्रह करण्यासाठी हृदयादि स्थानविशेषीं प्रकट होतो. या प्रदेशांत सीमित होत असल्यामुळे त्याला प्रादेशमात्र म्हटलें आहे. आश्मरथ्याच्या मतें विज्ञानात्मा व परमात्मा यांमध्ये परस्पर भेदाभेद संबंध आहे. यावरून शंकराचार्य व वाचस्पति मिश्र यांनी त्याला विशिष्टाद्वैतवादी म्हटलें आहे. आश्मरथ्याच्या या भेदाभेदवादाचा पुढे यादवप्रकाशाने अंगीकार व परिपोष केला. [हिंदुत्व; शंकराचार्य]

आश्रम (१) हा शब्द 'श्रम्' = कष्ट करणें या धातूपासून साधलेला आहे. याची व्याख्या अशी – 'आश्रम्यन्ति अस्मिन् अनेन वा इति' = ज्यामध्ये, ज्याच्या योगाने (माणसांना) श्रम – तपस्वाध्यायादि कष्ट करावे लागतात; किंबहुना ज्याच्या आधारें कर्तव्यपालनाचे सर्व परिश्रम करावे लागतात, तो आश्रम होय. आश्रम ही एक आर्यांची संस्था किंवा व्यवस्था आहे. आश्रमव्यवस्थेच्या तपशिलांत शिरण्यापूर्वी तिच्या इतिहासाचा थोडासा मागोवा घेतला पाहिजे.

वर्णांचा उल्लेख ऋग्वेदांत प्रथम पुरुषसूक्तांत येतो. वेदांतहि प्राचीन व अर्वाचीन असे भाग होतात. वर्णांचा उल्लेख असलेलें पुरुषसूक्त अर्वाचीन विभागांतलें मानतात. चार आश्रम तर ऋग्वेदांत कुठेच आढळत नाहीत. अवस्थाभेद-दर्शक ब्रह्मचारी व गृहपति हे दोनच शब्द ऋग्वेदांत आहेत. पण त्यावरून त्या काळीं आश्रमव्यवस्था निर्माण झाली होती, असें म्हणतां येत नाही.

आर्यवर्ण व दासवर्ण असे दोनच वर्ण प्राचीन वैदिक काळांत आढळतात. हाच दासवर्ण पुढे शूद्र या नांवाने वर्ण-व्यवस्थेत दाखल झाला. पण या वर्णाला आर्यांच्या धार्मिक व सामुदायिक जीवनांत मिसळण्यास प्रतिबंध होता. पुढे आर्यांतच विश्, राजन्य आणि ब्राह्मण असे तीन अंतर्गत भेद निर्माण झाले. विश् म्हणजे वसाहत करून कृषि, वाणिज्य व कारागिरी हे व्यवसाय चालविणारे व राजन्य हे शस्त्र धारण करून राज्य करणारे व इतरांना संरक्षण देणारे होत. आणि या दोहोंहूनहि स्वतःचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करणारा ब्राह्मण हा तिसरा किंवा श्रेष्ठत्वाने पहिला समजला गेलेला वर्ग होय. या ब्राह्मणवर्णाच्या मुखांत वेदमंत्र होते आणि त्यांच्या पठनावांचून आर्यांचें कोणतेंहि धार्मिक कृत्य पार पडत नसे. त्या काळीं वेदांच्या अध्ययनाशिवाय शिक्षणक्रम पुरा होत नसे. प्रथम अध्ययन वेदांचें व मग इतर विषयांचें. हें शिक्षणहि त्या काळीं ब्राह्मणांच्याच हातीं होतें. त्यामुळे राजन्य व विश् यांच्या मुलांना शिक्षणासाठी ब्राह्मणगुरुकडेच जावें लागे. त्रैवर्णिक विद्यार्थी गुरूच्या घरीं राहून विद्याभ्यास करीत असल्याचीं उदाहरणें उपनिषदांत अनेक ठिकाणीं आढळतात.

हे विद्यार्थी गुरुगृहीं कामें करीत, गुरूचीं गुरें राखीत, गुरूच्या शेतांत राबत, दोन्ही वेळां अग्नीला समिधा देत व गावांत भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत. फावल्या वेळांत गुरु त्यांना शिकवी. गुरु संथा देईल, त्याप्रमाणें वेद-वेदांगें व इतर विद्या मुखोद्गत करणें व वारंवार आवृत्ति घालून पाठांतर तयार ठेवणें, हा त्या काळांतल्या शिक्षणांतला महत्त्वाचा भाग होता. हा विद्यार्जनाचा काल कित्येक वर्षांचा अन् विद्यार्थ्याला कष्टप्रद असा असे.

या गुरुगृहींच्या वास्तव्यांतून आणि विद्यार्थ्यांच्या त्या काळांतल्या कर्तव्यांतून ब्रह्मचर्य या आश्रमाची कल्पना विकसित झाली. विद्याध्ययन समाप्त केल्यावर सगळेच स्वगृहीं जाऊन गृहस्थाश्रम स्वीकारीत असें नाही. त्यांतले कांही 'नैष्ठिक' ब्रह्मचारी बनून आयुष्यभर गुरुगृहींच राहत. दुसरे कांही वनांत जाऊन तप व आत्मचिंतन करीत, त्यांना 'वानप्रस्थ' म्हणूं लागले. सर्वसंगपरित्याग करून म्हणजेच

संन्यासी बनून भिक्षावर उपजीविका करणारा व सतत मोक्षासाठी ध्यान-साधना करणारा असाहि एक वर्ग त्या काळीं समाजांत निर्माण झाला होता. अशा माणसाला घर नसे व तो सतत फिरत राही म्हणून त्याला ‘परिव्राजक’ म्हणत.

परिव्राट्, यति, मुनि, श्रमण, वैखानस, अशा नांवांनी उल्लेखिला जाणारा असा एक वर्ग वैदिक आर्यांच्याहि पूर्वीपासून भारतांत होता. हा वर्ग विरक्त व संन्यस्त वृत्तीने राहत असे. वैदिक आर्यांची कर्मकांडाकडे प्रवृत्ति असल्यामुळे ते या कर्महीन वर्गाविषयीं आदर दाखवीत नसत. वैदिक काळांत स्वतंत्र आश्रम म्हणून या यति-मुनींच्या पंथाला मान्यता नव्हती. उपनिषदांच्या काळांत वैदिकांचें मन अंतर्मुख झालें, तें मानवी जीवनाचें गंभीर चिंतन करूं लागलें, कर्मकांडांत गढून राहण्यापेक्षां वैराग्य धारण करून आत्मचिंतनांत रममाण व्हावें, अशी आकांक्षा कित्येक लोकांच्या मनांत बळावली व अशा प्रकारें वैदिक आर्यांच्याच समाजांत वैराग्यशील व मोक्षप्रधान संन्यासधर्माकडे प्रवृत्ति वाढूं लागल्यामुळे संन्यासाला आश्रमपदवी देणें त्यांना भाग पडलें. वेदोत्तर काळापर्यंत वानप्रस्थ व संन्यास या दोहोंत विशेषसा फरक मानीत नसत; पण पुढे मुंडक (२. १. ७) व जाबाल (४) या उपनिषदांत चारी आश्रमांचा स्पष्ट उल्लेख केला गेला आहे.

(१) ब्रह्मचर्य (२) गार्हस्थ्य (३) वानप्रस्थ व (४) संन्यास हे चार आश्रम होत. सूत्रकालांत या चारी आश्रमांची परिगणना होऊं लागली. पण तरीहि त्यांच्या नांवांत फरक होता. आपस्तंब धर्मसूत्रांत गार्हस्थ्य, आचार्यकुल (ब्रह्मचर्य), मौन व वानप्रस्थ अशीं त्यांचीं नांवें सांगितलीं आहेत (२.९.२१.१). वासिष्ठ धर्मसूत्रांत गृहस्थ, ब्रह्मचारी, वानप्रस्थ व परिव्राजक अशीं त्यांचीं नांवें दिलीं आहेत. या दोन्ही सूत्रांत गृहस्थाश्रमाला पहिलें स्थान दिलें आहे. गौतमधर्मसूत्रांत ब्रह्मचारी, गृहस्थ, भिक्षु व वैखानस अशीं यांचीं नांवें आहेत (३ .२). बौधायनाने आश्रमांच्या उत्पत्तीविषयीं पुढील कथा दिली आहे –

प्रल्हादपुत्र कपिल या असुराने देवांविषयीं मनांत वैरभाव बाळगून आश्रमव्यवस्था निर्माण केली. हेतु हा, की वानप्रस्थ व संन्यास या आश्रमांत यज्ञ करायचा अधिकार नसतो; त्यामुळें देवांना हविर्भाग न मिळून ते कमजोर होतील (६.२९-३१).

पण आश्रमव्यवस्थेची उत्पत्ति याहून वेगळ्या प्रकारें सांगतां येण्याजोगी आहे. आपल्या शास्त्रकारांनी सर्वसाधारण मानवी आयुष्य शंभर वर्षांचें कल्पून त्याची चार भागांत विभागणी केली आहे. पहिला विभाग ब्रह्मचर्य. यांत गुरुगृहीं राहून अध्ययन व व्रतपालन करायचें असतें. मनूने ब्रह्मचाऱ्याचे धर्म विस्ताराने कथन केले आहेत (२.४१–२४४). अध्ययन समाप्त झाल्यावर गुरूला दक्षिणा देऊन समावर्तन करायचें व मग गृहस्थाश्रमाचा स्वीकार करायचा. यांत यज्ञ, प्रजोत्पत्ति व स्वाध्याय यांच्या द्वारें देव, पितर व ऋषि यांचें ऋण फेडायचें असतें. मनूने या गृहस्थाश्रमाला फार महत्त्व दिलें आहे. तो म्हणतो––

यथा वायुं समाश्रित्य सर्वे जीवन्ति जन्तवः ।
तथा गृहस्थमाश्रित्य वर्तन्ते सर्व आश्रमाः ।।

(३. ७७)

अर्थ – ज्याप्रमाणे प्राणवायूच्या आधाराने सर्व जीव जगतात त्याचप्रमाणे गृहस्थाश्रमाच्या आधारानें सर्व आश्रम आपला निर्वाह करतात.

गृहस्थाने अशा प्रकारें वरील तीन्ही ऋणें फेडून मग केस पांढरे होऊं लागले व अंगावर सुरकुत्या दिसूं लागल्या, की गृहत्याग करून वनांत जायचें, म्हणजे वानप्रस्थ स्वीकारायचा. त्या आश्रमांत कांही काल घालवून मग आयुष्याच्या अखेरच्या कालांत संन्यास घेऊन आत्मज्ञानाने मोक्ष प्राप्त करून घ्यायचा. हा व्यक्तीचा क्रममार्ग झाला. पण एखाद्यास वैराग्य उत्पन्न होऊन त्याने ब्रह्मचर्यांतून एकदमच संन्यास घ्यायचें ठरविलें, तरी त्याला तशीहि मुभा होती. ‘यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्’=ज्या दिवशीं वैराग्य उत्पन्न होईल त्याच दिवशीं संन्यास करावा, असें जाबालोपनिषद् (४) सांगतें. मनूने अशा संन्यासाविषयीं म्हटलें आहे–

यो दत्त्वा सर्वभूतेभ्यः प्रव्रजत्यभयं गृहात् ।
तस्य तेजोमया लोका भवन्ति ब्रह्मवादिनः ।।

(६. ३९)

अर्थ – सर्व भूतांना अभय देऊन जो गृहाश्रमांतून प्रव्रजित होतो, त्या ब्रह्मवेत्त्या पुरुषाला तेजोमय हिरण्यगर्भादि लोक प्राप्त होतात.

वर्णभेदाप्रमाणे कोणीं किती आश्रम करावे, याविषयीं पराशरमाधवीयांत याज्ञवल्क्याचा पुढील श्लोक दिला आहे––

चत्वारो ब्राह्मणस्योक्ता आश्रमाः श्रुतिचोदिताः ।
क्षत्रियस्य त्रयः प्रोक्ता द्वावेको वैश्यशूद्रयोः ।।

अर्थ – ब्राह्मणाला चारी आश्रम विहित आहेत. क्षत्रियाला पहिले तीन, वैश्याला पहिले दोन व शूद्राला केवळ गृहस्थाश्रमच सांगितला आहे.

या आश्रमव्यवस्थेच्या पालनाबाबत समुच्चय, विकल्प व बाध असे तीन पक्ष आहेत. समुच्चयवादी पक्षाचें मत चारी आश्रम एकामागून एक असे स्वीकारावे; त्यांतला एखादा

वगळून पुढचा स्वीकारूं नये, असें आहे. मनु या मताचा पुरस्कर्ता आहे. विकल्पवादी पक्षाचें मत असें, की ब्रह्मचर्य किंवा गार्हस्थ्य यांतून एकदम संन्यास करायला हरकत नाही. वसिष्ठ, याज्ञवल्क्य व आपस्तंब हे या मताचे आहेत. गौतम हा बाधवादाचा पुरस्कर्ता होय. त्याच्यामतें गृहस्थाश्रम हाच खरा आश्रम असून इतर आश्रम त्या मानाने कमी दर्जाचे आहेत.

या तीन्ही मतांचा समन्वय सर्वज्ञ नारायणाने केला आहे. ब्रह्मचर्यांत ज्याने आपल्या इंद्रियांवर व वासना–विकारांवर पूर्ण ताबा मिळविला, त्याने ब्रह्मचर्यानंतर एकदम संन्यास करायला हरकत नाही. पण ही गोष्ट ज्याला साधली नसेल, त्याने क्रमाने चारी आश्रम स्वीकारून हळूहळू वासना-विकारांचा त्याग करावा, व अंतीं मुक्त व्हावें, असें तो सांगतो.

जन्म-मृत्यूचे फेरे चुकविणें किंवा संसारबंधांतून मुक्त होणें, हें भारतीय आर्यांचें परमोच्च ध्येय होतें. पण मोक्ष मिळवायचा तर वैराग्याची आवश्यकता असते. आणि तें कांही सहजासहजी येत नाही. वासना, विकार, सुखोपभोग, यांतून माणूस सहसा मुक्त होऊं शकत नाही. इंद्रियें ताब्यांत आणायचीं, तर त्यालाहि फार कष्ट पडतात. हें सर्व जाणून प्रत्येक अवस्थेंत मनाला हळूहळू निग्रहाचें शिक्षण मिळून अंतीं त्याला इंद्रियजय साध्य व्हावा, या हेतूने प्राचीन भारतीयांनी आश्रमव्यवस्था निर्माण केली. तिच्यामागे मानसशास्त्रीय विचार होता. ब्रह्मचर्यांत विद्येबरोबरच माणसाला विवेक, संयम व इंद्रियनिरोधाची शक्ति हे गुण अंगीं बाणवितां येतात. गृहस्थाश्रमांत त्याला परिष्कृत अशा वैषयिक सुखांचा आनंद उपभोगतां येतो व त्याबरोबरच मुलांबाळांविषयींचीं व समाजाविषयींचीं कर्तव्येंहि पार पाडतां येतात. पन्नाशीची झुळूक लागली, की त्याला भौतिक सुखाची क्षणभंगुरता कळून येते. मग जीवनांतलें शाश्वत तत्त्व काय असेल, याविषयीं तो जिज्ञासु बनतो. मृत्यूनंतर आपलें पुढे काय होणार, याविषयींहि त्याच्या मनांत टोचणी सुरू होते. मग तो तत्त्वचिंतनासाठी वनांत जातो व आत्मक्लेशपूर्वक तपश्चरण करतो. अशा प्रकारें केलेल्या साधनेंतून त्याच्या सर्व आसक्ति नष्ट झाल्या, की मग तो संन्यस्त होतो व त्या आश्रमांत 'तत्त्वमसि' चा साक्षात्कार घडून मुक्त होतो. कित्येकदा हा मोक्षलाभ होण्यासाठी त्याला अनेक जन्महि घ्यावे लागतात.

प्रत्येक व्यक्ति ही समाजाचा एक घटक असते. त्यानुसार प्रत्येकाला समाजविषयक कांही कर्तव्यें पार पाडावीं लागतात. त्यांचें योग्य मार्गदर्शन व नियमन करण्यासाठी भारतांत वर्णव्यवस्था निर्माण झाली. पण सामाजिक कर्तव्यें करीत असतांना त्या व्यक्तीचाहि विकास झाला पाहिजे व तिच्या उत्कर्षालाहि अवसर मिळाला पाहिजे, हें सर्व लक्षांत घेऊन आश्रमव्यवस्थेची आंखणी करण्यांत आली आहे.

बौद्ध व जैन यांनी इतर आश्रमांना हीनत्व देऊन केवळ संन्यासाचीच, केवळ यतिजीवनाचीच तरफदारी केली. पण त्याचा परिणाम असा झाला, की समाजांत भिक्षूंची संख्या अतोनात वाढली. त्यामुळे समाज तर दुर्बल झालाच; शिवाय भिक्षुसंघांतहि भ्रष्टाचार माजले. अपरिपक्व वयोवस्थेंत अर्थ-कामांच्या प्रेरणा दाबून टाकल्या, तर त्या वांकडें वळण घेऊन उन्मार्गगामी बनतात, हा अनुभव आहे. त्यामुळे व्यक्तीचा व समाजाचाहि अधःपात होतो. माणसाच्या अंतरांतल्या अर्थ-कामांना योग्य तो वाव देऊन हळूहळू त्याला त्यांपासून निवृत्त करून विवेक-वैराग्याच्या मार्गावर आरूढ करणें, हेंच हितावह असतें. मानवी जीवन आश्रमव्यवस्थेंत नियमित केल्यानेच हा उद्देश सफळ होईल, हें भारतीय धर्मपुराणांनी जाणलें व आश्रमव्यवस्था पक्की केली. आणि म्हणूनच आश्रमव्यवस्थेंतल्या उच्च तत्त्वांची व आदर्शांची बरोबरी करणारी दुसरी कोणतीहि संस्था आजवर जगांतल्या कोणत्याहि मानवसमाजांत निर्माण झाली नाही, अशी डॉयसेन व गेडेन या समाजशास्त्रज्ञांनी तिची प्रशंसा केली आहे. [वे. इं.; हिं. ध.; एन्सा. रि.]

(२) वसतिस्थान, मठ, देवालय असे या शब्दाचे अर्थ आहेत देवस्थानालाहि आश्रम अशी संज्ञा आहे. या देवस्थानांत मंदिर, तलाव, पाकगृह, अतिथिगृह, भिक्षागृह, भांडार, गोशाळा, अग्रशाळा, देवाच्या वेषभूषेच्या खोल्या, शेजघर, पुष्पवाटिका व भोंवतालच्या भिंती या सर्वांचा समावेश होतो. [एन्सा. हिं. आ.]

आश्रमव्रत चैत्र शु. ४ थीपासून प्रारंभ. तीन महिन्यांचा एक, असे वर्षाचे चार भाग करून प्रत्येक भागांत अनुक्रमें वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध यांची पूजा करणें, असा याचा विधि आहे. व्रतावधि एक वर्ष. [हिं. ध.]

आश्रायणी कश्यपाच्या वंशांतील गोत्रकार ऋषिगण. [मत्स्य पु. १९८. २]

आश्लेषा वैदिक आश्रेषा (तै. सं. ४. ४. १०). २७ नक्षत्रांपैकीं आश्विनीपासून नववें नक्षत्र. हें आकाशांत

पुष्याच्या दक्षिणेस दिसतें. याच्या पांच तारका आहेत व त्या मंदप्रभ आहेत. सर्प ही याची देवता आहे (तै. ब्रा. १.५.१.). या नक्षत्राचें मूर्तिध्यान पुढीलप्रमाणे सांगितलें आहे –

कोकास्या वा बिडालास्या रक्ताश्लेषा चतुर्भुजा ।
अक्षकुण्डीधरा द्वाभ्यां सर्पालिङ्गनकारिणी ।।

(च. व. चिं.)

अर्थ –– आश्लेषांची मूर्ति ही रक्तवर्ण, लांडग्याच्या किंवा मांजराच्या तोंडाची, चतुर्भुज, दोन हातांत फांसे व कुंड धारण करणारी आणि दोन हातांनी सर्पाला आलिंगन देणारी करावी.

आश्लेषाजननशांति आश्लेषा नक्षत्रावर जन्म झाल्यास शांति करावी लागते. प्रथम गोप्रसव शांति करतात. आश्लेषांची देवता सर्प आहे. म्हणून मग सर्पप्रतिमा कलशावर ठेवन तिची पूजा करतात. ही या विधानाची मुख्य देवता होय. तिच्या बरोबरच पुष्य व मघा या नक्षत्रांच्या देवता आणि बृहस्पति व पितर यांचीहि पूजा करतात. मग ऋत्विज् मुख्य देवतेचीं सूक्तें पठण करतो. अग्नि सिद्ध करून आज्यमिश्रित पायस, समिधा, चरु व आज्य या हविर्द्रव्यांचा होम करतात. सर्व देवतांना बलिदान करतात. पूर्णाहुति व बालकासह यजमानदंपतीला अभिषेक करतात. अभिषेकाच्या मंत्रांत पुढील एक मंत्र असतो ––

आश्लेषाऋक्षजातस्य मातापित्रोर्धनस्य च ।
भ्रातुर्ज्ञातिकुलस्थानां दोषं सर्वं व्यपोहतु ।।

अर्थ –– आश्लेषांवर जन्मलेला (हा) बालक, त्याचे आई-बाप, धन, बांधव, ज्ञातींतले व कुळांतले लोक, या सर्वांच्या दोषाचें (हें शांतिकर्म) निराकरण करो.

आश्वकायन पाणिनिकालीन एक गण. ग्रीक लोकांनी याला 'अस्सकेनोआइ' असें नांव दिलें आहे. मस्सग किंवा मशकावती ही आश्वकायनांची राजधानी होती. सुवास्तु किंवा स्वात नदीच्या खालच्या भागांत, बाजौरपासून २४ मैलांवर मजग किंवा मस्सनगर नांवाचें एक शहर आहे. हीच प्राचीन मशकावती होय. हे लोक लढवय्ये होते. बाहेरून हल्ला होई, तेव्हां आश्वकायन स्वात नदीच्या वरच्या बाजूच्या आपल्या पहाडी दुर्गांत आश्रय घेत. आश्वकायन घोडयांचे प्रेमी असावे व युद्धांत ते घोडयांचा उपयोग करीत असावे. [पा. भा,]

आश्वयुजीकर्म सप्त पाकयज्ञांपैकी एक. आश्विन पौर्णिमेस हा यज्ञ करतात. नित्यस्थालीपाकाच्या तंत्रानेच याचें कृत्य करायचें असतें. या यज्ञांत पशुपतीला उद्देशून पुढील मंत्राने पृषातकाच्या आहुती देतात–

पशुपतये शिवाय शङ्कराय पृषातकाय स्वाहा ।

पृषातकाची व्याख्या गोभिलगृह्यसूत्राच्या टीकेंत पुढील-प्रमाणे दिली आहे –

आज्यसंयुक्तं पयो दधि वा पृषातकमित्युच्यते

(३ ८.१)

अर्थ–तुपांत दूध किंवा दही मिसळलें, की त्याला पृषातक म्हणतात.

हा यज्ञ मुख्यत्वें गोधनाच्या वृद्धीसाठी असतो. आणि म्हणूनच यांत पशुपतीला आहुती द्यायच्या असतात.

या यज्ञांत अश्विनौ, पूर्णचंद्र, शरद्ऋतु व पशुपति यांना आज्याहुती द्याव्या, असें शांखायन गृह्यसूत्र सांगतें. या यज्ञांत इंद्रासाठी पायस शिजवावा व त्यांत दही, मध व तूप घालून त्याच्या इंद्र, इंद्राणी, अश्विनौ, पूर्णचंद्र व शरद् यांना आहुती द्याव्या आणि वैभवप्राप्तीसाठी वनस्पति व लाख यांनी भरलेले ताईत यजमानाने व त्याच्या कुटुंबियांनी दंडांत बांधावे, असें गोभिल गृह्यसूत्रांत सांगितलें आहे (३.८.१–८).

काठक गृह्यसूत्रांत या यज्ञाच्या निमित्ताने पुढील विशेष विधि सांगितले आहेत–

गांवाच्या उत्तरेस एका सुशोभित वेदीवर विविध रसांनी भरलेलीं व धान्याने भरलेलीं पात्रें ठेवावीं. तिथेच अग्नि सिद्ध करून वरुण, अग्नि व वर दिलेल्या देवता यांना आहुती द्याव्या. पशूंना स्नान घालावें. घोडयावर खोगीर घालावें व त्यांना वाहनांना जुंपून किंवा त्यांवर स्वार होऊन वेदीला प्रदक्षिणा घालाव्या. जयघोष करावे. करमणुकीचे खेळ खेळावे. गायींच्या मुखांत मीठ घालावें (काठ. गृ. ५९. १–९).

या दिवशीं घर शृंगारावें व रात्रौ वासरांना गायींजवळच ठेवावें, असेंहि सांगितलें आहे.

आश्वलायन हा एक शाखाप्रवर्तक आचार्य असून ऋग्वेद्यांच्या ऋषितर्पणांत याला उदक मिळतें. हा शौनकाचा शिष्य होता. शौनकाने एक मोठें सूत्र तयार केलें होतें. पण आश्वलायनाचें सूत्र संक्षिप्त व अधिक चांगलें आहे असें दिसून आल्यावर त्याने स्वतःचें सूत्र फाडून टाकलें, असें सांगतात. याचें गृह्यसूत्र ऋग्वेद्यांच्या गृह्यकर्माला प्रमाण मानलें जातें. याच्या शाखेचे संहिताब्राह्मणादि ग्रंथ उपलब्ध नाहीत.

आश्वलायन गृह्यसूत्र याचे चार अध्याय आहेत. पहिल्या अध्यायांत विवाह, पार्वण, पशुयाग, चैत्य, संस्कार, इ. विषय आले आहेत. दुसऱ्यांत श्रावणी,

आश्वयुजी, आग्रहायणी, अष्टका, गृहनिर्माण, इ. विषय आहेत, तिसऱ्यांत पंचमहायज्ञांचें विवरण असून ते अवश्य कर्तव्य म्हणून सांगितले आहेत. याच अध्यायांत आपत्काल व युद्धकाल यांतील कर्मांचें वर्णन आहे. चौथ्या अध्यायांत अंत्येष्टि व श्राद्ध यांचें सविस्तर वर्णन आहे. अग्निहोत्री मृत झाला असतां त्याचें शव तीन्ही अग्नींनी प्रज्वलित करावें. त्याला आहवनीय अग्नि प्रथम स्पर्श करील, तर मृत पुरुषाला स्वर्ग मिळाला, गार्हपत्य अग्नीने प्रथम स्पर्श केल्यास अंतरिक्षलोक मिळाला, दक्षिणाग्नीने प्रथम स्पर्श केल्यास मनुष्यलोक मिळाला व तीन्ही अग्नींनी एकदम स्पर्श केल्यास मोक्ष मिळाला असें समजावें, असें त्यांत सांगितलें आहे. अग्निहोत्री मृत झाला असतां त्याचीं यज्ञपात्रें त्याच्यासह दहन करावीं, असेंहि सांगितलें आहे. पण त्याचीं सगळीं मातीचीं भांडीं (कौलालम्) त्याच्या पुत्राने जतन करून ठेवावीं, असें सांगितलें आहे (४. ३. १८.).

या सूत्रांत तर्पणविधि सांगतांना ऋग्वेदाचे मंडलवार ऋषी घेतलेले आहेत. जिथे नामोल्लेख अशक्य वाटला, तिथे प्रगाथ, क्षुद्रसूक्त, महासूक्त व मध्यम असा उल्लेख केला आहे. या व्यतिरिक्त सुमंतु, जैमिनि, वैशंपायन, पैल, सूत्रकार, भाष्यकार व भारतकार यांचाहि उल्लेख आहे.

श्री. चिं. वि. वैद्य यांच्या मतें या सूत्राचा काळ सनपूर्व १२०० वर्षें हा आहे, तर श्री. त्रिवेदी यांच्या मतें तो त्याहूनहि प्राचीन आहे. या ग्रंथावर नारायण व हरदत्त यांनी टीका लिहिल्या असून देवस्वामीने भाष्य लिहिलें आहे. [वै. सा.; हि. ध.]

आश्वलायन श्रौतसूत्र ऋग्वेदाची आश्वलायन शाखा उपलब्ध नसली, तरी तिचीं गृह्य व श्रौत हीं सूत्रें उपलब्ध असून फार प्रसिद्ध आहेत. ऐतरेय ब्राह्मणाशीं आश्वलायनाचा घनिष्ट संबंध आहे. अश्वल ऋषि हा विदेहराजा जनक याच्याकडे होता व तोच या उभय सूत्रांचा प्रवर्तक आहे, असें कांहींचें मत आहे. ऐ. आरण्यकाच्या चौथ्या कांडाच्या प्रवर्तकाचें नांवहि आश्वलायनच आहे. हा शौनक ऋषीचा शिष्य होय.

ऐ. ब्राह्मण व ऐ. आरण्यक या ग्रंथांत जे श्रौतयज्ञ विस्तृत रूपाने सांगितले आहेत, त्यांचें विधान संक्षेपांत सांगणें हा या सूत्राचा उद्देश आहे. याचे १२ अध्याय आहेत. यांत प्रामुख्याने होत्याच्या कर्मांचें विवेचन आहे. इष्टियागांचा प्रकृतियाग म्हणजे दर्श-पूर्णमास हा होय. म्हणून यांत प्रथम त्याचेंच विधान सांगितलें आहे. अग्न्याधान, आग्रयण, काम्येष्टि, चातुर्मास्य, सौत्रामणि, सोमसंस्था, सत्रें व शेवटीं गोत्रप्रवरांचा संग्रह इ. विषय यांत आले आहेत. आश्मरथ्य, कौत्स, गाणगारि, गौतम, तौल्वलि व शौनक, या अचार्यांचा यांत उल्लेख येतो. यांत श्रौत कर्मांविषयीं कांही नियम सांगितले आहेत, ते असे –

(१) आहिताग्नि पुरुष हाच यज्ञाचा अधिकारी होतो.

(२) यजमानानें प्रत्येक देवकार्यांत यज्ञोपवीति (जानवें उजव्या खांद्याखालून असणें) व पितृकार्यांत प्राचीनावीति (जानवें डाव्या खांद्याखालून असणें) आवश्यक आहे.

(३) विहारभूमीला प्रदक्षिणा करणें होत्याचें प्रथम व आवश्यक कर्तव्य आहे.

(४) विहारभूमींत जोवर कांही कार्य चालत असेल, तोंवर तिला पाठ दाखवितां कामा नये.

(५) जिथे जिथे मस्तक, अंगुलि इ. नांवें आलीं असतील, तिथे तिथे त्या अंगाचा दक्षिणभाग समजावा.

(६) 'दान करावें' असा जिथे जिथे विधि असतो, तिथे तिथे तो यजमानासाठीच समजावा.

(७) प्रायश्चित्त प्रकरणांत अथवा जप–होमादि समयीं जो विधि उक्त असतो, तो ब्रह्म्यासाठी समजावा.

(८) जिथे मंत्राचा प्रथम चरण उल्लेखिलेला असेल, तिथे तो संपूर्ण मंत्र समजावा. जिथे चरणाहून अधिक अक्षरें दिलीं असतील, तिथे तीन ऋचा समजाव्या व जिथे चरणाहूनहि कमी अक्षरें दिलीं असतील, तिथे समग्र सूक्त समजावें.

(९) जप (पाठ), अनुमंत्रण (अर्थस्मरणासहित पठण) अभिमंत्रण (ज्याचें संशोधन करायचें अशा हविर्द्रव्यांकडे दृष्टि लावून पठण), आप्यायन (वारंवार जलस्पर्श करीत पठण) व उपस्थान (विनम्र भावाने पठण) हे विधि जिथे जिथे सांगितले असतील, तिथे तिथे मंत्रांचा प्रयोग उपांशु (अशब्द उच्चारण) असला पाहिजे.

(१०) सारें अनुष्ठान समंत्रक असलें पाहिजे.

(११) वेदीची उत्तर श्रोणी हेंच होत्याचें कर्मस्थान होय.


(१२) अध्वर्यूकडून प्रैष मिळाल्यावरच होत्याने मंत्र म्हणावे. होम करीत असतां डाव्या हाताचीं बोटें पसरून हृदयावर ठेवावीं. [वै. सा.; हि. ध.]

आश्वसूक्ति सामद्रष्टा. [पं. ब्रा. १९. ४. २.]

आश्विक एक जात. क्षत्रिय पुरुष व वैश्य स्त्री यांची ही विवाहबाह्य संतति होय, असें वैखानस सांगतो. हे लोक घोड्यांचा व्यापार करीत. [हि. ध.]

आश्विन

चैत्रादि मासांतला सातवा व शरद् ऋतूचा पहिला मास. याला 'इष' असेंहि दुसरें नांव आहे. या मासाच्या पौर्णिमेस किंवा आगे मागे अश्विनीनक्षत्र असतें म्हणून याला आश्विन म्हणतात. या मासांत सूर्याचें तुला राशींत सक्रमण होतें.



आश्विन – सांकेतिक चित्र

आश्विनमासकृत्यें––या मासांत धार्मिक विधी व उत्सव पुष्कळ असतात. नवरात्राच्या घटस्थापनेने या मासाच्या धर्मकृत्यांचा प्रारंभ होतो. आश्विन शु. १ देस मातामहश्राद्ध. ४ थींस सतीची पूजा. त्या दिवशीं सुवासिनींचा सन्मान. ५ मीस कुशतृणाने बनविलेल्या नागांची व इंद्राणीची पूजा. त्याच दिवशीं ललितेची पूजा. त्याच पक्षांत मूळ नक्षत्रावर सरस्वतीचें आवाहन. पूर्वाषाढा नक्षत्रावर तिची स्थापना, उत्तराषाढा नक्षत्रावर तिची पूजा व श्रवण नक्षत्रावर तिचें विसर्जन. ९ मीस आयुधपूजा व दुर्गादेवीसाठी हवन व बलिदान. १० मीस सीमोल्लंघन. पौर्णिमेस नवान्नभक्षण व कार्तिक स्नानाचा प्रारंभ. वद्य पक्षांत १२ शीस गोवत्सांची पूजा. त्याच दिवशीं दत्तात्रेयाचा उत्सव. १३ शीस यमासाठी दीपदान. १४ शीस दिवाळीचें अभ्यंगस्नान. अमावास्येस लक्ष्मीपूजन.

या मासांतलें विशेष कृत्य म्हणजे घृतदान हें आहे. त्याचप्रमाणें पद्मनाभाच्या प्रीतीसाठी गाय, बैल, घोडा, तीळ, दही इ. दानें करावीं असेंहि सांगितलें आहे. तमिळनाडमध्ये या मासाला तुलामास म्हणतात व त्या महिन्यांत विशेषतः अमावास्येस कावेरी नदींत स्नान करतात. [पु. चिं.; हि. ध.]

आश्विनशस्त्र

अश्विनौ देवतेच्या स्तुतिपर ऋग्वेदांतील अनेक ऋचांच्या समूहास आश्विनशस्त्र म्हणतात. अतिरात्र यागामध्ये पहांटेपासून सूर्योदयापर्यंत होता नांवाचा ऋत्विज् या शस्त्राचें पठन करतो. या शस्त्रासंबंधीची कथा अशी –

प्रजापतीने आपली मानलेली कन्या सूर्यासावित्री सोमराजाला दिली. त्या वेळीं तिला वरण्यासाठी सर्व देव आले. तेव्हा प्रजापतीने त्यांच्यापुढे सहस्रऋचात्मक एक शस्त्र ठेवलें. त्या वेळीं, तें आपल्याला मिळावें म्हणून, देव आपसांत भांडू लागले. त्यावर तोड म्हणून त्यांनी असें ठरविलें, की गार्हपत्य अग्नीपासून आदित्यापर्यंत धावण्याची शर्यत लावायची. ती शर्यत जो जिंकील, त्याने तें शस्त्र घ्यावें. त्यानंतर ती शर्यत झाली. अश्विनी कुमारांनी त्या शर्यतींत जय मिळविला व त्यांना तें शस्त्र मिळालें. त्या दिवसापासून त्या शस्त्राला 'आश्विनशस्त्र' असें नाव मिळालें. [वै. नि.]

आश्विनी

आश्विन पौर्णिमेस तिन्हीसांजा आई आपल्या सर्वांत मोठ्या मुलाला (मुलगा किंवा मुलगी) ओवाळून त्याचें औक्षण करते व त्याला दूध प्यायला देते. विशेषतः महाराष्ट्रांत हा प्रघात आहे. याला, मुलांची आश्विनी करणें, असें म्हणतात.

आषाढ

चैत्रादि मासांतला चौथा व ग्रीष्म ऋतूचा दुसरा महिना. याला 'शुचि' असेंहि दुसरें नांव आहे. मासाच्या पौर्णिमेस किंवा तिच्या आगे मागे पूर्वाषाढा किंवा उत्तराषाढा नक्षत्र असतें, म्हणून याला आषाढ ही संज्ञा मिळाली आहे. या मासांत सूर्याचें कर्कसंक्रमण होतें. तिथूनच दक्षिणायन सुरू होतें. कर्कसंक्रमणाच्या वेळी श्राद्ध करावें असें सांगितलें आहे.

आषाढमासकृत्यें –– आषाढ महिन्यांत करायचीं व्रतें पुढीलप्रमाणे ––

आषाढमेकभक्तेन स्थित्वा मासमतन्द्रितः ।
बहुधान्यो बहुधनो बहुपुत्रश्च जायते ॥


(म. भा.)

अर्थ – आषाढ महिन्यांत एकभुक्त करून निरलस राहिल्याने पुष्कळ धनधान्य व पुत्र यांचा लाभ होतो.

उपानद्युगलं छत्रं लवणामलकानि च ।
आषाढे वामनप्रीत्यै दातव्यानि तु भक्तितः ।।

(वामन पु.)

अर्थ – आषाढ महिन्यांत वामनाच्या प्रीतीसाठी पादत्राणें, छत्री व मिठांतले आवळे दान द्यावे.



आषाढ – सांकेतिक चित्र

याशिवाय आषाढ शु. २ या पुष्यनक्षत्रयुक्त असेल, तर त्या दिवशीं कृष्ण, बलराम व सुभद्रा यांचा रथोत्सव करावा. ६ ष्ठीला उपवास व ७ मीला सूर्य पूर्वाषाढा नक्षत्रांत असला, तर त्या दिवशीं सूर्याची वैवस्वत या नांवाने पूजा करावी. ८ मीला महिषासुरमर्दिनीची पूजा, १० मीला वरलक्ष्मीव्रत, पौर्णिमेला अन्नदान, कृष्ण ८ मीला विनायकपूजा इ. कृत्यें करावीं. आषाढ महिना अधिकमास आल्यास कोकिला व्रत करतात. **पाहा** –– कोकिलाव्रत. [हि. ध.; पु. चिं.]

आषाढी तीर्थ हें नर्मदा नदीवर आहे. त्याच्या स्नानाचें फल इंद्राच्या अर्धासनाचा लाभ असें सांगितलेलें आहे. [मत्स्य पु. १९३. २९ – ३०]

आसक्ति आसक्ति शब्दाचा अर्थ 'एखाद्या ठिकाणीं मन जडणें ' असा आहे. भागवतसंप्रदायानुसार परमात्म्याच्या ठिकाणीं भक्त ११ प्रकारांनी आसक्त होऊं शकतो. त्या आसक्तींचे प्रकार पुढीलप्रमाणे––

(१) **गुणमाहात्म्यासक्ति** –– हिच्यांत भगवान् किंवा त्याचे अवतारविशेष यांच्या गुणांच्या माहात्म्यावर भक्त आकर्षित होतो.

(२) **रूपासक्ति** –– हिच्यांत अवतारविशेषाच्या रूपावर भक्ताचें मन मुग्ध होतें.

(३) **पूजासक्ति** –– हिच्यांत भगवंताच्या पूजा-अर्चेविषयीं आवड निर्माण होते.

(४) **स्मरणासक्ति** –– हिच्यांत भगवंताच्या नाम–गुण-कर्मांचें स्मरण करून भक्त सुख मिळवितो.

(५) **दास्यासक्ति** –– भगवंतावताराच्या ठिकाणीं दास-भावनेनें सेवा-धर्माचें आचरण.

(६) **सख्यासक्ति** –– भगवंताशीं सख्यभावाने भक्तियुक्त वर्तन.

(७) **कान्तासक्ति** ––हिच्यांत भक्त स्वतःला परमात्म्याची प्रेयसी समजून त्याची भक्ति करतो.

(८) **वात्सल्यासक्ति** — हिच्यांत भगवंताविषयीं वात्सल्य-भाव प्रकट केला जातो.

(९) **आत्मनिवेदनासक्ति** –– हिच्यांत भक्त परमेश्वरा-पुढे आपल्या अवगुणांचें वर्णन करतो.


(१०) **तन्मयासक्ति** –– हिच्यांत भक्त देहभाव विसरून परमेश्वराच्या ठिकाणीं तन्मय होतो.

(११) **परमविरहासक्ति** –– हिच्यांत भक्त भगवंताच्या विरहांत सदैव व्याकुळ राहतो.

आसंग प्लायोगि वैदिक काळांतला दानशूर राजा व मंत्रद्रष्टा (ऋ. ८. १. ३२ – ३३). याचें पुरुषत्व नष्ट होऊन याला स्त्रीत्व प्राप्त झाल्यामुळे त्याची पत्नी शश्वती हिला दुःख झालें. तिने मेध्यातिथि ऋषीकडे जाऊन आपल्या पतीला पुनश्च पुरुषत्व मिळवून देण्याबद्दल त्याची प्रार्थना केली. मेध्यातिथीने मंत्रसामर्थ्याने त्याला पौरुष दिलें. एका ऋचेंत त्याला ' याद्व ' म्हटलें आहे, त्यावरून हा यदुवंशांतला असावा, असें वाटतें. याने काण्व प्रगाथाला दहा हजार नाणीं व दहा घोडे एवढी देणगी दिली होती. [ऋ. द.; प्रा. च. को.]

आसंदिका बिनहातांचें व पाठ असलेलें एक आसन. हें आसन दोन प्रकारांनी बनवितात. एका प्रकारांत आसनाचे पाय अशा प्रकारें कापतात, की चारी बाजूंना अर्धगोलाकार खिडक्या तयार व्हाव्या. आसंदिकेचा

वरचा भाग वर्तळाकार असतो व त्यावर गादी बसविलेली असते. दुसऱ्या प्रकारांत आसनाचा आकार लांबट चौकोनी असतो. आसंदी ही खैराची करावी असें शतपथ ब्राह्मणांत म्हटलें आहे.
[मै. ग. गु. अ. ग्रं.]



आसंदिका

आसंदी

या शब्दाचा अर्थ उच्चासन असा आहे. ऋग्वेदांत त्याचा उल्लेख नाही; पण अथर्ववेदांत आहे (१५. ३. २). याशिवाय तै. संहिता (७. ५. ८. ५), वाजसनेयी सं. (८. ५६), ऐ. ब्राह्मण (८. ५), श. ब्राह्मण (३. ३. ४. २६) इ. ग्रंथांत आसंदीचे उल्लेख येतात. ही लांकडाची बनवीत. राज्याभिषेकाच्या वेळीं राजा



आसंदी

औदुंबराच्या आसंदीवर बसतो व तें आसन 'मुंज' तृणाने विणलेलें असतें, असें ऐ. ब्राह्मणांत तिचें विशेष वर्णन आहे (८. ५; ६. १२). त्यावरून असें वाटतें, की राजे महाराजे यांना विशेष प्रसंगीं बसण्याचें तें एक सुखासन होतें. पर्यंक हें आसंदीचेंच वाढविलेलें रूप आहे. धनाढ्य व शासक लोक आसंदीचा बसण्यासाठी व आराम करण्यासाठीहि उपयोग करीत. अमरावतीच्या शिल्पांत बुद्ध आसंदीवर बसलेला आहे असें दृश्य आहे. कांही कांही आसंदींची लांबी दोन इसमांना बसण्याइतकी असे. शक्र व मांधाता, राजा व राणी, नागराज व त्याचा मित्र, एका आसंदीवर बसले आहेत, अशीहि दृश्यें अमरावतीच्या शिल्पांत दिसतात. अधिकारभेदपरत्वें आसंदी या उंचीला कमी अथवा अधिक असत. आसंदीला अभ्रा घालीत असत (अथर्व. १५. ३. ७). राजसूय यज्ञांत आसंदीवर व्याघ्राजिनाचें आस्तरण घालीत (ऐ. ब्रा. ८. ५). [वे. इं.; वै. सा. सं.; अमरावती स्कल्प्चर्स इन् दि मद्रास म्यूझियम– सी. शिवराम मूर्ति]

आसंदीवत्

जनमेजय पारीक्षिताच्या राजधानीचें नांव. इथेच त्यानें अश्वमेध केला. काशिकेच्या मताप्रमाणे कुरुक्षेत्राजवळचें अहिस्थल म्हणजेच आसंदीवत् होय. [वे. इं.; पा. भा.]

आसन

हात व पाय एका विशिष्ट अवस्थेंत ठेवून व शरीर ताठ व स्थिर करून ध्यानधारणेसाठी बसणें, याला आसन म्हणतात. भारतांतल्या सर्व धार्मिक संप्रदायांत आसनांची कल्पना आहे. मनाच्या एकाग्रतेसाठी अशा आसनांचा चांगला उपयोग होतो, असें अनुभवी लोक सांगतात. हठयोग आणि राजयोग या दोन्ही योगमार्गांत आसनांचें फार महत्त्व मानलेलें आहे. पातंजल योगसूत्रांत आसनाचें पुढील लक्षण सांगितलेलें आहे – 'स्थिरसुखमासनम्' = ज्या योगाने शरीर स्थिर राहून मनाला सुख वाटतें, अशा बसण्यास आसन म्हणावें (साधनपाद सू. ४६). हठयोगाचें तर आसन हेंच प्रथम अंग आहे.

हठस्य प्रथमाङ्गत्वादासनं पूर्वमुच्यते ।
कुर्यात्तदासनं स्थैर्यमारोग्यं चाङ्गलाघवम् ।।

(ह. यो. प्र.)

अर्थ – हठयोगाचें प्रथमांग आसन होय. म्हणून प्रथम आसन करून नंतर स्थिर होण्यासाठी प्रयत्न करावा. आसनामुळे शरीर चपल व आरोग्यवान् होतें.



वीरासन

जैनांचे तीर्थंकर हे योगीच होते. त्यामुळे जैन शिल्पकारांनी त्यांच्या मूर्तीं विशिष्ट आसनबंधांतच खोदलेल्या दिसतात. कायोत्सर्गासारखीं कांही आसनें जैनांनी स्वतंत्रपणे शोधून काढलीं आहेत. जैनांनी आसनांचे मुख्यतः पांच प्रकार मानले आहेत –

पर्यङ्कमर्धपर्यङ्कं वज्रं वीरासनं तथा ।
सुखारविन्दपूर्वं च कायोत्सर्गश्च सम्मतः ।।

(ज्ञानार्णव)

अर्थ – पर्यंक, अर्धपर्यंक, वज्र, वीर व सुखासन–पद्मासन-पूर्वक कायोत्सर्ग (हीं पांच आसनें होत. यांना मोक्षासनें असेंहि म्हणतात.)

अहिर्बुध्न्य संहितेंत (अ. ३०) अकरा प्रमुख आसनांचीं


नांवें वर्णनासह आलीं आहेत. त्यांचा उपयोग मनाच्या एकाग्रतेसाठीं सांगितला आहे. बसण्याची पद्धति या दृष्टीनें आसन शब्दाचा अर्थ घेतल्यास त्यांत पुढील आसनें प्रसिद्ध आहेत --



कूर्मासन – मोहेंजोदडो

वीरासन -- उजवें पाऊल जमिनीवर ठेवून डाव्या पायाचीं फक्त बोटें व गुडघा जमिनीला टेकवून त्यांवर सर्व शरीर तोलून धरणें आणि छाती पुढे काढून शौर्याचा आविर्भाव दाखविणें, हें वीरासन होय.

कूर्मासन — दोन्ही पाय दुमडून टांचा गुदद्वाराखाली घेणें. मोहेंजोदडो व हराप्पा या ठिकाणीं सांपडलेल्या कांही मुद्रांवर पशुपति कूर्मासनावर बसलेला दिसतो.



पद्मासन

पद्मासन — डावें पाऊल उजव्या मांडीवर व उजवें पाऊल डाव्या मांडीवर ठेवून बसणें.

कुक्कुटासन --(१) पद्मासन घालून दोन्ही हात जमिनीवर टेकणें व त्यांवर भार घालून सर्व शरीर उचलून अधांतरीं लोंबत ठेवणें. (२) दोन्ही पावलें जमिनीवर ठेवून गुडघे उभे करणें व शरीराचा भार पायांवर घालून उकिडवें बसणें.



कुक्कुटासन

सिंहासन – कूर्मासनाप्रमाणेच पाय दुमडून बसणें. हाताचीं बोटें पसरून दोन्ही तळवे मांडयांवर ठेवणें. तोंड उघडें व दृष्टि नासाग्र ठेवणें.

भद्रासन -- दोन्ही पाय दुमडून टाचा अंडाखाली घेणें व दोन्ही हातांनी पायांचे आंगठे धरणें.

वज्रासन – पावलें मांडयांवर घेऊन त्यांचे तळवे उताणे दाखविणें व त्यांवर हातांचे तळवे ठेवणें.

याशिवाय चक्र, मयूर, स्वस्तिक, मुक्त व गोमुख अशींहि आसनें सांगितलीं आहेत.



भद्रासन

योगसूत्रांवरील व्यासभाष्यांत वरील असनांव्यतिरिक्त दंडासन, सोपाश्रय (ज्यांत योगपट्टाचें साहाय्य लागतें, असें आसन), पर्यंक, क्रौंचनिषदन, हस्तिनिषदन, उष्ट्रनिषदन, समसंस्थान, स्थिरसुख व यथासुख अशीं अधिक आसनें सांगितलीं आहेत.


भारतीय मूर्तिकलेंत सामान्यपणे पद्मासनाचा उपयोग केलेला दिसतो. राजकारणी व्यक्तींच्या प्रतिमा बहुधा वीरासनावर दिसतात. सुखासनी मूर्ती डावा पाय सरळ, उजवा पाय गुडघ्यांत वांकवून जवळच उभा व उजवा हात गुडघ्यावर पसरलेला अशा स्थितींत असतात. ऐहोळे येथील विष्णुमूर्ति व शशांकाच्या एका सुवर्ण मुद्रेवरील शिवप्रतिमा सुखासनावर दिसतात.

कांही देवता उत्कूटिकासनावरहि आढळतात. टाचा ढुंगणा-

जवळ येतील अशा पद्धतीनें मांडी घालणें, गुडघे वर उचलणें, पुढे वांकून दोन्ही हात गुडघ्यांवर ठेवणें व गुडघे स्थिर राहावे म्हणून त्यांना योग॰पट्टानें बांधणें, असें हें आसन असतें. पर्यंकासनांत मूर्तीची बैठक उंच असून दोन्ही पाय खाली लोंबते सोडलेले असतात. ललितासनांत एक पाय लोंबता व दुसरा दुमडून घेतलेला असतो. (अन्य यौगिक आसनें त्या त्या नांवाखालीं पाहावीं.)



वज्रासन



योगपट्ट (आसन)

धर्मकृत्याचीं आसनें — जपजाप्य व धर्मकृत्यें यांसाठी बसायला जीं आसनें घेतात, त्यांत पुढील आसनें प्रशस्त मानलीं आहेत —

कौशेयं कम्बलं चैव
अजिनं पट्टमेव च
दारुजं तालपत्रं वा
आसनं परिकल्पयेत् ॥
(आन्हिकसार)

अर्थ —रेशमी वस्त्र, कांबळें, कृष्णाजिन, तलम रंगीत वस्त्र, लांकडी (पाट) व ताडपत्र यांपैकी एखादें आसन घ्यावें.

वेळूची चटई, दगड, गवत व पल्लव हीं आसनें निषिद्ध होत. गवती आसनाचा निषेध हा दर्भ किंवा कुश यांच्या आसनाला लागू नाही. कोणतेंहि आसन घेतलें, तरी त्यावर कुशासन घालावेंच, असें शास्त्रवचन आहे (व्रतराज).

कृष्णमृगचर्माच्या आसनावर साधकाला मुक्ति मिळते. व्याघ्रचर्मावर संपत्ति लाभते. कंबलासनावर इष्टकामाची पूर्ति होते. कुशासनावर मंत्रसिद्धि मिळते. त्रिपुरसुंदरीच्या पूजेसाठी तांबडें कंबलासन सर्वोत्तम होय (गंधर्वतंत्र ७). यती, वानप्रस्थ, ब्रह्मचारी व भिक्षु यांना कृष्णमृगासन प्रशस्त होय. मातीचें आसन दुःखदायक व लांकडी आसन दुर्भाग्यकारक होतें. लांकडी आसन व कंबलासन एकत्र वापरल्यास पुण्यक्षय होतो (योगिनीहृदय). चर्मासन केसाळ असलेलें वापरूं नये. तसें केल्यास सर्व सिद्धी नष्ट होतात (हंसमहेश्वरतंत्र).

आसन शब्दांतल्या तीन अक्षरांचे वेगवेगळे अर्थ आहेत — आ= आत्मसमाधि. स = सर्वरोगप्रतिबंध आणि न = सिद्धिप्राप्ति (कामधेनुतंत्र ३१).



ललितासन

आसनविधि एखाद्या धार्मिक कृत्यास प्रारंभ करण्यापूर्वी आसनावर बसून आत्मशरिराच्या शुद्धीसाठी भूशुद्धि, व भूतशुद्धि, प्राणप्रतिष्ठा, अन्तर्मातृकान्यास व बहिर्मातृकान्यास हे विधी कर्तव्य असतात. या विधींत प्रथम पुढील श्लोकाने पृथ्वीचें ध्यान करून आसनावर बसतात—

पृथ्वि त्वया धृता लोका देवि त्वं विष्णुना धृता ।
त्वं च धारय मां देवि पवित्रं कुरु चासनम् ॥

अर्थ – हे पृथ्वि, तूं लोकांना धारण केलें आहेस. हे देवि, तुला विष्णूने धारण केलें आहे. हे देवि, तूं मला धारण कर व (माझें) आसन पवित्र कर.

नंतर व्याहृतिमंत्रांनी न्यास करतात. अक्षरमातृकांचें बाह्य अवयवांवर आवाहन करून गुरूस वंदन करतात. मग आपल्या भोवती असलेल्या पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या महाभूतांचें ध्यान करून पायांपासून मस्तकापर्यंत आपल्या शरिरावर त्यांचें प्रतिष्ठापन करतात. य, व, र, ल, ह इत्यादि अक्षरें अनुस्वारयुक्त घेतल्यावर तीं बीजें होतात. य बीजांसह महाभूतांचें ध्यान करायचें असतें. याला भूतशुद्धि म्हणतात. या पांच महाभूतांपासून आपली उत्पत्ति झाली आहे, अशी भावना त्या वेळीं करायची असते. यानंतर शरिरामध्ये प्राणशक्तीची स्थापना विधिपूर्वक करतात. प्राणप्रतिष्ठेचा मंत्र म्हणण्यापूर्वी न्यास करतात. अक्षरमातृकांनी युक्त असे हे प्राणप्रतिष्ठेचे मंत्र आहेत. ज्ञानेन्द्रियें, कर्मेन्द्रियें, प्राण इत्यादि

सर्वांचे प्राणशक्तीमध्ये आवाहन करतात. प्राणशक्तीचे गर्भाधानापासून पंधरा संस्कार होण्यासाठी पंधरा वेळां प्रणवाची आवृत्ति म्हणायची असते. नंतर प्राणशक्तीचें ध्यान केलें जातें. एखाद्या प्रतिमेची प्राणप्रतिष्ठाहि वरील पद्धतीनेच करायची असते. [विद्याधरशास्त्री भिडे]

आसपुरा गुजरातमधील एक देवता. ही संतति देते, अशी समजूत आहे. [फो. लो. नॉ. इं.]

आसमाई आशा पूर्ण करणारी एक देवता. वैशाख, आषाढ व माघ या महिन्यांतल्या रविवारीं उ. भारतांत आसमाईची पूजा करतात. बाराजीत (बारा आदित्य) व आसमाई यांची पूजा एकदम करतात. मुख्यत्वें पुत्रवती स्त्रिया हें व्रत करतात. या दिवशीं अळणी जेवतात. एका पानावर चंदनाने आसमाईचें चित्र काढून तिच्यावर चार कवडया ठेवतात. शेजारीं कलश स्थापून त्या सर्वांची पूजा करतात. पूजा समाप्त झाल्यावर पुरोहित बारा गांठींचा एक गंडा व्रतिनी स्त्रीला देतो. ती तो हातांत बांधते. उत्तरपूजा झाल्यावर सर्व पूजासामग्री व गंडा पाण्यांत सोडतात. फक्त कवडया तेवढया दारांत ठेवतात. आसमाईची कथा पुढीलप्रमाणे--

एका राजाला एक पुत्र होता. तो फार खोडकर होता. तो प्रजेला अनेक प्रकारें त्रास देई. शेवटीं राजाने त्याला नगराबाहेर हाकलून दिलें. वाटेंत त्याला भूकमाई, प्यासमाई, नीदमाई व आसमाई या नांवांच्या चार म्हाताऱ्या भेटल्या. त्यांनी राजपुत्राला चार कवडया दिल्या. त्या कवडयांत विलक्षण सामर्थ्य होतें. राजपुत्र त्या घेऊन दुसऱ्या एका राज्यांत गेला. तिथल्या घाटावर त्याला एक जुगारी धोबी भेटला. राजपुत्राने त्याला जुगारांत जिंकलें. धोब्याने ती गोष्ट राजाला सांगतांच राजाने त्या राजपुत्राला बोलावून घेतलें. दोघांचें द्यूत झालें. त्यांत राजा हरला. राजाला त्याचा राग आला. परंतु आपल्या प्रधानाच्या सांगण्यावरून राजाने त्याला आपला जावई केलें. कांही दिवस तिथे राहून तो परत आपल्या बापाकडे गेला. त्याचे आई-बाप पुत्रशोकाने आंधळे झाले होते. मुलगा येतांच परत त्यांना दृष्टि आली. मग सर्वजण सुखाने राहूं लागले. हें सगळें आसमाईच्या कृपेने घडलें, म्हणून त्या दिवसापासून लोक तिची पूजा करूं लागले.

आसवपान आसव = मद्य, पान = प्राशन. मध्य युगांतला एक चैनीचा समारंभ. चतुर्भाणी या ग्रंथांत याचें अनेक ठिकाणीं वर्णन आहे. धूर्तविटसंवाद या भागांत थोरामोठयांनी वेश्यांना आपल्या अर्धासनावर बसवून त्यांच्यासह केलेल्या आसवपानाचें वर्णन आलें आहे. याचें दुसरें नांव आपानकोत्सव. अजंटाच्या भित्तिचित्रांत अशा प्रकारचीं



आसवपान – झिंगलेली स्त्री
कुशाण कालीन शिल्प (मथुरा)

दृश्यें आहेत. गुप्तयुगापूर्वीची एक मातीची गाडी सांपडली असून तिच्यावर खात, पीत व एकमेकांना आलिंगन देत असलेल्या स्त्रीपुरुषांच्या मूर्ती आहेत. पाहा – आपानकोत्सव.


आसादि बेळ्ळारी जिल्ह्यांतील माल अथवा होलेय यांची शाखा. यांच्या स्त्रिया एल्लम्माच्या भक्त असतात व वेश्यावृत्तीने जगतात. [का. ट्रा. स. इं.]

आसाम आसाम हें भारतीय संघराज्यांतलें एक राज्य असून तें भारताच्या ईशान्य सीमेवर वसलें आहे. आसामचें एकूण क्षेत्रफळ ८५,०१२ चौरस मैल असून यांत पहाडी प्रदेश आणि वन्य जमातींचा प्रदेश (नेफा) यांचा समावेश होतो. १९५१ सालीं वन्य जमाती सोडून आसाम राज्याची लोकसंख्या ९०,४३,७०७ होती. वन्यजातींची संख्या सुमारें पांच लाख असावी.

भौगोलिक दृष्ट्या आसामचे तीन स्वाभाविक विभाग पडतात—

(१) उत्तरेला हिमालयाच्या पूर्व श्रेणी पसरल्या असून त्यांतील कांही शिखरें १५ हजार फुटांपेक्षा उंच आहेत. यांपैकी नेमचाबेरवा हें सर्वांत उंच शिखर २५,४४५ फूट आहे.

(२) पूर्व व आग्नेय दिशांचा पहाडी प्रदेश. यांत गारो, खासी, जैतिया, उत्तर काछार आदि पहाड येतात. तिथे वस्ती करून असणाऱ्या जमातींवरून त्या पर्वतांना नांवें दिलेलीं आहेत. या पर्वतांत 'शिलाँग' शिखर हें सर्वोच्च असून त्याची उंची ६,४५० फूट आहे. जगांतील सर्वांत जास्त पाऊस या प्रदेशावर पडतो, म्हणून याला 'मेघालय' असेंहि म्हणतात.



(३) ब्रह्मपुत्रा नदीचें खोरें. हा आसामचा मुख्य भाग असून त्याची रुंदी साठ मैल आहे. खोऱ्याच्या दोहों बाजूंना उंच पर्वत आहेत. याच्या पूर्व व आग्नेय दिशेला नागा पर्वत असून आसाम व ब्रह्मदेश यांमधील ती सीमा आहे. या पर्वतावर राहणाऱ्या नागा टोळ्यांवरून या पर्वतांना नागा पर्वत हें नांव पडलें आहे. यांतील 'जाप्वों' नामक अत्युच्च शिखर दहा हजार फूट उंच आहे.

ब्रह्मपुत्रा ही आसामांतील प्रमुख नदी होय. हिमालयाच्या उच्च पर्वतश्रेणींत उगम पावून ती आसाम खोऱ्यांत उतरते. दिबाँग, सुबनसिरी, दिसाँग, धनश्री इ. नद्या तिला येऊन मिळतात. वर्षाऋतूंत येणाऱ्या महापुरांमुळे ब्रह्मपुत्रेचें पात्र विस्तीर्ण होतें व कांही ठिकाणीं तर त्याला सागरासारखें विशालत्व प्राप्त होतें. या महापुरांमुळे आसामची दरवर्षी अपरिमित हानि होते.

आसामांत वारंवार भूकंप होतात. कारण तिथले जमिनीचे स्तर नवीन व अस्थिर आहेत.

दगडी कोळसा व पेट्रोलियम हीं येथील मुख्य खनिज उत्पन्नें होत. १९४९ सालीं सुमारें साडेतीन लाख टन कोळसा या प्रदेशांत मिळाला. परंतु आता दिवसेंदिवस कोळशाचें प्रमाण कमी कमी होत आहे. आसामांतील दिगबोई, नाहरकटिया व मोरान या ठिकाणीं तेलाचे सांठे आहेत व त्यांतून वार्षिक ६५० लाख गॅलन पेट्रोलियम निघतें. या खनिजांशिवाय कोरंडम दगड, चिकण माती, चुनखडी, सोनें, मीठ इ. पदार्थहि थोड्या प्रमाणांत मिळतात.

आसामांत पावसाचें वार्षिक प्रमाण सरासरी ७५ इंच आहे; पण खासी व जैतिया पर्वतांच्या दक्षिण भागीं वसलेल्या चेरापुंजी विभागांत दरसाल चारशें इंचांपेक्षाहि जास्त पाऊस पडतो.

इ. स. १९४८—४९ सालीं आसामांतील एकवीसहजार चौरस मैल जागा जंगलांनी व्यापलेली होती. त्यापैकी सहा

हजार चौरस मैल वन राखीव होतें. याच्या सखल भागांत



आसामांतले हत्ती

साल व बांबू वाढतात, तर पहाडी प्रदेशांत ओक व चीड हे वृक्ष वाढतात. या झाडांपासून लांकूड, लाख, रबर, मसाले इ.



आसाममधील गेंडे

अनेक पदार्थ मिळतात. आसामांत हत्ती, गेंडे, वाघ, चित्ते, भालू इ. रानटी पशु सांपडतात.

आसाम हा कृषिप्रधान देश आहे. १९५१ च्या खानेसुमारी-प्रमाणे आसामांत साठ लाख एकर जमीन शेतीखाली होती. ब्रह्मपुत्रा व सुरमा या नद्यांचीं खोरीं फार सुपीक आहेत. त्यांत मुख्यत्वें तांदूळ पिकतो. याशिवाय मिरची, कापूस, बाजरी, नाचणी, कडधान्यें, ताग, तंबाकू, हींहि पिकें आसामांत होतात. परंतु व्यापारीदृष्ट्या आसामचें मुख्य पीक चहा हें होय.

लामडिंग हें आसामांतील मोठें रेल्वेकेंद्र असून इथून चारी बाजूंना रेल्वेचे फांटे जातात. १९५१ सालीं रेल्वे रस्त्यांची एकूण लांबी १३०० मैल होती. मैदानी भागांत आसाम क रोड ही प्रमुख सडक असून डोंगराळ भागांत तिच्या कांही शाखा पसरलेल्या आहेत. १९५१ सालीं एकूण ३८०० मैल लांबीच्या सडका आसामांत होत्या. याशिवाय ब्रह्मपुत्रा नदींत दिब्रुगडपर्यंत जहाजांचीहि वाहतूक चालते.




चहाचा मळा – आसाम

आसामांत शें. ९८ लोकवस्ती ग्रामीण भागांत आहे. शिलाँग शहर ही आसामची राजधानी असून त्याची लोकसंख्या पन्नास हजारांवर आहे. याशिवाय गौहाटी, दिब्रुगड, सिलचर, नौगाँव, जोरहाट, हीं इतर प्रमुख शहरें आहेत.

आसाम राज्याचा इतिहास फार प्राचीन असून पुराणांतहि त्याचे उल्लेख येतात. आसामचें प्राचीन नांव कामरूप होतें. दीड हजार वर्षांपूर्वीं कामरूप देशांत ब्रह्मपुत्रा नदीचें खोरें व पूर्व बंगाल आणि भूतानचे उत्तुंग पर्वत यांचा अंतर्भाव होत असे. कामरूपाचे राजे पराक्रमी होते, तसेच सुसंस्कृतहि होते. त्यांनी ब्राह्मणांना सदैव उदार आश्रय दिला. त्यामुळे त्या प्रदेशांत हिंदु धर्माचा प्रसार होण्यास खूप मदत झाली. हिंदु धर्मांतील तांत्रिक पंथाची स्थापनाहि प्राग्ज्योतिषपूर या शहरीं झाली, असें मानतात. गौहाटीच्या जवळच नीलाचल पर्वतावरील कामाख्या देवीचें मंदिर प्राचीन काळापासून सुप्रसिद्ध आहे. कामरूपाचा उल्लेख महाभारत, कालिकापुराण व योगिनीतंत्र या ग्रंथांत आढळतो. तिथल्या असुर राजांत नरक हा प्रसिद्ध असून त्यानेच प्राग्ज्योतिषपूर म्हणजे हल्लीचें गौहाटी हें शहर वसविलें. श्रीकृष्णाने या नरकाला ठार मारलें, तेव्हा दुर्योधनाचा पक्षपाती असलेल्या त्याच्या भगदत्त नामक पुत्राने चीन व किरान यांचें सैन्य आपल्या मदतीला बोलाविलें होतें. पुढे भारतीय युद्धांत अर्जुनाने भगदत्ताला ठार मारलें.

रघुवंशांत कामरूपाचा उल्लेख असून कामरूपाधिपतीने रघुराजाला हत्तींचा नजराणा दिला, असें सांगितलें आहे (रघु-

४.८३). यावरून प्राचीन काळापासून आसाम हत्तींबद्दल प्रसिद्ध होता, असें दिसतें. इ. स. ६४० च्या सुमारास भगदत्ताचा वंशज कुमार भास्करवर्मा हा कामरूपावर राज्य करीत होता, असें युआन च्वांग या चिनी यात्रेकरूने लिहून ठेवलें आहे. त्यानंतर दोन शतकांनी कामरूपाच्या मूळ रहिवाशांच्या हातांत राजसत्ता गेली. पण पुढे प्रलंभ नामक पुरुषाने त्यांचा नाश करून तिथे आपली सत्ता स्थापिली. याचें घराणें शिवपूजक होतें. हारूपेश्वर हें जरी त्यांच्या राजधानीचें ठिकाण होतें, तरी त्याचे वंशज स्वतःला प्राग्ज्योतिषपूरचे राजे म्हणवून घेत. पुढे अकराव्या शतकाच्या प्रारंभीं दुसरें एक घराणें गादीवर आलें. त्या वंशांतील तिसरा राजा रत्नपाल याने 'पृथ्वी देवालयांनी व आकाश यज्ञधूमाने आच्छादून टाकलें', असा उल्लेख आहे.



विधानसभा – शिलाँग

इसवी सनाच्या ७ व्या ते १२ व्या शतकांच्या दरम्यानचे जे ताम्रपट व शिलालेख आसाममध्ये सांपडले आहेत, त्यांवरून या काळांत आसाममध्ये होऊन गेलेल्या कांही राजांची माहिती मिळते. इ. स. १२८२ सालीं आहोम लोक ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यांतून कामरूपांत घुसले. त्यांनी पूर्वीच्या राजांना पादाक्रांत करून तिथे आपली सत्ता स्थापिली व प्राग्ज्योतिषपूर हीच आपली राजधानी केली. त्यांनी शिवसागर व इतर शहरें वसविलीं व अनेक राजवाडेहि बांधले. पुढे आहोम राजे व त्यांचे आहोम प्रजाजन यांचा आसाममधील इतर रहिवाशांशीं शरीरसंबध सुरू झाला. इतकेंच नव्हे; तर तिथल्या तांत्रिक हिंदुधर्माचे ते मोठे पुरस्कर्ते बनले. कामाख्या ही त्यांनी आपली उपास्य देवता केली.

पंधराव्या शतकांत खेन नांवाचें राजघराणें आसामचा दक्षिण भाग व बंगालजवळचा प्रदेश या भागावर राज्य करीत होतें. या घराण्यांतील नीलांबर नामक तिसऱ्या राजाचा बंगालच्या हुसेनशहा या मुसलमान राजाने १४९८ सालीं पराभव केला व त्याची कामतापूर ही राजधानी जिंकली.

पुढे इ. स. १५१५ च्या सुमारास विश्वसिंग हा कोच राजा गादीवर आला. त्याचा पुत्र नरनारायण याने आपलें राज्य बरेंच वाढविलें. सोनार गांवच्या सरदार इसाखानाने त्याचा पराभव केल्यावर नरनारायणाचा पुत्र लक्ष्मीनारायण राजा झाला. रघुराजाचा पुत्र परीक्षित याच्याशीं त्याचें वांकडें आलें, म्हणून परीक्षिताचा पाडाव करण्यासाठी लक्ष्मीनारायणाने मुसलमानांची मदत घेतली. मुसलमानांनी परीक्षिताला कैद केलें. लक्ष्मीनारायणाचा भाऊ बळिनारायण हा प्रतापसिंग या आहोमराजाकडे पळून गेला. मुसलमानांचा पराभव करून प्रतापसिंगाने बळिनारायणाला राज्य परत मिळवून दिलें; पण इ. स. १६३७ सालीं मुसलमानांनी पुन्हा स्वारी करून त्याला ठार मारलें व आहोम लोकांनाहि कामरूपाच्या बाहेर घालवून दिलें. पुढे प्राणनारायण या कोच राजाने मुसलमानी सत्ता झुगारून दिली खरी; परंतु त्याला स्वतःलाच आहोम राजाकडून पदच्युत व्हावें लागलें. इ. स. १६८१ सालीं गदाधरसिंहाने मुसलमानांचा पुरता पाडाव केला.

गदाधरसिंगानंतर रुद्रसिंग गादीवर बसला. आता मुसलमानांच्या स्वाऱ्यांचें भय न उरल्यामुळे त्याने आपलें राज्य वाढविण्यास सुरवात केली. त्याचा पुत्र शिवसिंग हा शाक्त होता. याच्याच कारकिर्दींत इ. स. १७८६ मध्ये मोआरिया जातीने बंड उभारून आहोम राजा गौरीनाथ याचा पराभव केला. नंतर गौरीनाथाने इंग्रजांची मदत मागितली. कॅ. वेल्स हा त्याच्या मदतीकरितां आला. त्याने राज्यांत सर्व स्थिरस्थावर केलें. तो परत गेल्यावर पुन्हा आसाममध्ये बखेडे सुरू झाले. इ. स. १८१० मध्ये चंद्रकांत राजा गादीवर होता. त्याने आपलें राज्य स्थिर करण्यासाठी ब्रह्मी राजाची मदत मागितली. त्यामुळे पुढे कांही वर्षें आसाम ब्रह्मदेशाच्या अंकित झाला. नंतर इ. स. १८२४ मध्ये ब्रह्मी लोक व इंग्रज यांच्यामध्ये युद्ध झालें. इ. स. १८२६ मध्ये त्या दोघांत तह झाला व त्या अन्वयें ब्रह्मी लोकांनी आसाम प्रांत ईस्ट इंडिया कंपनीस दिला. अशा प्रकारें आसाम इंग्रजांच्या आधिपत्याखाली गेला.

आसामांतील धर्मपंथ – आसाममध्ये फार प्राचीन काळापासून हिंदुधर्म प्रचलित असावा, असें समजण्यास प्रत्यवाय नाही. आसामचें कामरूप हें प्राचीन नांव, शंकराने आपला

भालनेत्र उघडून कामाचें दहन केलें, या घटनेवरून पडलें आहे. तांत्रिक शाक्त पंथाची स्थापना प्राग्ज्योतिषपूर या ठिकाणीं झाली. हिंदुकल्पना व आसामांत वस्ती करून असणाऱ्या रानटी गिरिजनांचे जारण-मारणाचे आचार यांच्या



बौद्धविहार दार्जिलिंग

मिश्रणाने तांत्रिक शाक्त पंथाची निर्मिति झाली असावी, असें वाटतें. तांत्रिक शाक्त पंथ हा हिंदु धर्मांतील एक फार जुना पंथ असल्यामुळे कामरूपाचे राजे व उच्चवर्णीय लोक हिंदु होते, हें त्यावरून सिद्ध होतें. परंतु कामरूप देशाची बहुसंख्य प्रजा हिंदु नव्हती. हिंदु धर्म ब्रह्मपुत्रा व सुरमा नद्यांच्या खोऱ्यांपुरतां मर्यादित होता. पहाडी प्रदेशांत राहणाऱ्या रानटी टोळ्यांमध्ये त्याचा मागमूसहि नव्हता. नंतर त्यांनी हिंदु धर्म स्वीकारला, हें जरी खरें असलें, तरी आजहि बरेच लोक हिंदु धर्माच्या बाहेर आहेत.

आसामांतील शाक्त लोकांच्या आचारांपैकी देवीला बळी देणें, हा प्रमुख आचार होता. चूटिया राजे कालीमातेचे भक्त असून ते कालीची निरनिराळ्या स्वरूपांत पूजा करीत. सदिया शहरीं चूटिया राजांनी बांधलेलें कालीचें एक ताम्रमंदिर होतें. तिथे ते देवीला पशुबळी व नरबळी अर्पण करीत असत. १६ व्या शतकाच्या सुमारास आसामांतील बहुतेक राजे शिव व शक्ति यांचे उपासक होते. ते स्वत: जरी शैव किंवा शाक्त असले, तरी त्यांचा वैष्णवांना विरोध नव्हता. इ. स. १५१५ च्या सुमारास बिश्वसिंग या कोच राजाने कामाख्येच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला व त्याचबरोबर वैष्णवांनाहि अनेक दानें दिलीं. मुसलमानांनी पुढे या कामाख्यामंदिराचा विध्वंस केला. पण नरनारायणाने पुन्हा तें उभारलें. नरनारायणाच्या कारकीर्दीत आसामांत शाक्त पंथ तेजींत होता. या नव्या मंदिराच्या उद्‌घाटनप्रसंगीं एकशें चाळीस नरबळी देण्यांत आले, असें सांगतात. नरनारायणाचा शाक्त पंथाकडे ओढा होता, परंतु तो इतर पंथीयांनाहि सहिष्णुतेने वागवीत असे. आसामांतील वैष्णव धर्माचा प्रचारक शंकरदेव हा त्याचा समकालीन होता. त्यालाहि त्याने पुष्कळ उत्तेजन दिलें. आसामांतील वैष्णवांनी सत्ताधाऱ्यांची मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी कनिष्ठ वर्गीय हिंदूंना मोठ्या प्रमाणांत आपल्या पंथांत ओढलें.

शंकरदेवाच्या मृत्यूनंतर त्याचा पट्टशिष्य माधव याने गुरूच्या कार्याची धुरा वाहिली. माधवाच्या पंथाला महापुरुषीय पंथ म्हणतात. पण माधव हा कायस्थ असल्याकारणाने ब्राह्मणांनी त्याचें अनुयायित्व स्वीकारलें नाही व त्यांनी स्वतःचे वेगळे पंथ स्थापन केले. त्यांच्यापैकी दामोदरदेव, हरिदेव व गोपाळदेव हे प्रमुख होत. त्यांनी अनेक सत्रें म्हणजे मठ स्थापन केले. शंकरदेवाचा अनिरुद्ध नांवाचा एक कलिता शिष्य होता. शंकरदेवाशीं न पटून त्याने मोआमारिया नांवाचा पंथ स्थापन केला. आसामच्या इतिहासांत या लोकांनी केलेलें बंड प्रसिद्ध आहे.

महापुरुषीय व बामुनिया गोसावी यांनी आसामांतून शाक्त पंथाचें जवळ जवळ उच्चाटन केलें होतें; पण त्याची पुनश्च प्रस्थापना आहोम राजा रुद्रसिंग (१६९६–१७१४) याने केली. बंगालमधील कृष्णराम भट्टाचार्य नांवाच्या एका पंडिताकडून त्याने शाक्त पंथाची दीक्षा घेतली. रुद्रसिंगाने त्याला कामाख्या देवीचा पर्वतिया गोसावी किंवा मुख्य पुजारी नेमलें. रुद्रसिंगाचा पुत्र लक्ष्मीसिंग याचें कृष्णराम भट्टाचार्याशीं न पटल्यामुळे त्याने बंगालमधून दुसऱ्या एका शाक्त पुजाऱ्याला आणविलें. त्याला ना-गोसावी म्हणजे नवीन पुजारी असें नांव पडलें. हा पुजारी नाती गोसावी पंथाचा संस्थापक होय.

अर्वाचीन कालांत वैष्णव पंथाच्या सर्व सामान्य अनुयायांवर कोणत्या ना कोणत्या तरी 'सत्रा' च्या गोसाव्यांची धार्मिक सत्ता चालते. हे सत्रांतील भक्त लोकांना अधूनमधून भेट देतात व सत्राचा खर्च चालविण्यासाठी त्यांच्याकडून भिक्षा घेतात. सत्रांतील कौलिया भक्त हे ब्रह्मचारी व संन्यासी असतात. ते जातिभेद मानीत नाहीत. मूर्तीची पूजा करीत नाहीत. पण सर्वसामान्य अनुयायांसाठी त्यांच्या सत्रांत विष्णूची मूर्ति मात्र ठेवलेली असते.

महापुरुषीय पंथी लोक शंकरदेव व माधवदेव या दोघांना कृष्णाचे अवतार मानतात. सत्कृत्यें केल्याने मुक्ति मिळते, असें यांचें मत आहे. सत्कृत्यांच्या अभावीं ईश्वरनामसंकीर्तनानेहि

ती मिळू शकते. तात्त्विक दृष्टचा हे जातिभेद मानीत नाहीत; परंतु व्यावहारिकदृष्टचा मात्र अद्यापि जातिभेदाचें उच्चाटन झालेलें नाही. हे लोक मांसाहारी आहेत. परंतु ते शस्त्राने मारलेल्या पशूंचें मांस न खातां काठीने मारलेल्या पशूंचें खातात. शंकराचे 'कीर्तन' व 'दशम' आणि माधवाचे 'नामघोष' व 'रत्नावली' हे ग्रंथ प्रमाणभूत मानतात. महापुरुषीय लोक दामोदरीय पंथाच्या लोकांबरोबर रोटीव्यवहार करीत नाहीत; पण त्यांच्यांत बेटीव्यवहार मात्र होऊं शकतो.

दामोदरीय पंथी लोक कृष्णाची पूजा करतात व दामोदराला ईश्वरी अंश मानतात. हरिदेवाचे अनुयायी हरिदेवाला कृष्णाचा अवतार मानतात. हे लोक हल्ली दामोदरीय पंथाच्या अनुयायांत मिसळतात. गोपाळदेवाच्या अनुयायांत व महापुरुषीयांत बरेंच साधर्म्य आहे. शंकर व माधव यांनी घालून दिलेले सर्व नियम हे पाळतात.

आसाममध्ये प्राचीन कालापासून हिंदुकरणाची प्रथा चालत होती. ब्राह्मण लोक एखाद्या टोळीप्रमुखाजवळ जाऊन, त्याचे पूर्वज पूर्वी हिंदूच होते व कांही अज्ञात कारणाने त्यांनी आपला हिंदु धर्म लपविला, असें त्याला सांगत. एवढ्यावरच न थांबतां त्याच्या पूर्वजांचा एखाद्या हिंदु देवतेशींहि संबंध जोडून देत. त्या गोष्टीमुळे त्या टोळीप्रमुखाला आनंद होई व तो हिंदुधर्म स्वीकारायला तयार होई. त्याच्याबरोबर त्याचे अनुयायीहि मग हिंदु धर्म स्वीकारीत.

अशा रीतीनेच कोच राजांना शिवाचे वंशज ठरविण्यांत आलें. ते राजे हिंदु होतांच त्यांच्या प्रजाजनांनीहि हिंदु धर्म स्वीकारला. हे प्रजाजन मूळ क्षत्रिय होते; पण परशुरामाच्या भयाने त्यांनी गिरिकंदरांचा आश्रय घेतल्यामुळे त्यांचे वंशज पुढे आपला धर्म विसरून गेले, अशी आख्यायिका रचून ब्राह्मणांनी कोच राजाच्या सर्व प्रजेला क्षात्र वर्णांत समाविष्ट केलें. याप्रमाणे काचारी राजांना भीमाचे वंशज ठरविण्यांत आलें. त्यांच्या प्रजाजनांनाहि क्षत्रिय ठरवून त्यांना यज्ञोपवीत घालण्याचा अधिकार देण्यांत आला. मणिपूरच्या राजांचा संबंध अर्जुनाशीं जुळविण्यांत येऊन त्यांना त्यांच्या प्रजेसह हिंदु धर्माची दीक्षा देण्यांत आली. त्याचप्रमाणे आहोमांचा मूळ पुरुष इंद्र होता, असें सांगून त्यांनाहि हिंदुधर्माच्या छत्राखालीं आणलें गेलें.

ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यांत असमिया भाषा बोलणारे आणि धर्माने हिंदु असणारे लोक राहतात. ते आहोम राजांच्या कारकीर्दींत परप्रांतांतून आणलेल्या ब्राह्मणांचे वंशज असून आसामांत फक्त त्यांनाच पौरोहित्याचा अधिकार आहे. ब्राह्मणांच्या आडनांवांपैकी गोहाईं (गोसावी) हें प्रमुख आहे. ब्राह्मणांच्या नंतर कायस्थ येतात. त्यांचें ब्राह्मणांशीं साधर्म्य असून दत्त हें त्यांच्यांतलें प्रमुख आडनांव होय.

याशिवाय कलिता नांवाची एक हिंदु जाति असून तिची संख्याहि बरीच मोठी आहे. आसामांत प्रथमच आलेल्या आर्य लोकांची व स्थानिक स्त्रियांची ही संतति होय, अशी सर्वसाधारण समजूत आहे. कलिता व आहोम हे आसामांतील सुप्रतिष्ठित सनातनी हिंदु लोकांत मोडतात. सध्याचे आहोम हे प्राचीन आहोम राजांचे वंशज आहेत. त्यांची संख्या सुमारें अडीच लाख भरेल. आहोम लोक हिंदु असले, तरी सर्वसामान्य आसामी माणूस हिंदु व आहोम असे दोन वेगवेगळे वर्ग मानतो.

याशिवाय चौडांग नांवाची एक जात आहे. आहोम राजांनी सहा ते सात हजर आसामी लोक आपले शरीररक्षक म्हणून नेमले होते, त्यांचे हे वंशज होत. यांपैकी बरेच लोक अहिंदु आहेत. डोम किंवा कैवर्त ही आसामांतील एक खालची जमात असून तीहि हिंदुधर्माच्या कक्षेंत आलेली नाही.

आसामांत शाक्त पंथाचे अनुयायी बरेच आहेत. ते शिवाला भजतातच; पण शिवपत्नी दुर्गा हिलाहि मातृदेवता म्हणून भजतात. आसामांतील स्त्रिया आपलें ईप्सित पुरें होण्यासाठी तिची करुणा भाकतात. बंगालप्रमाणेच आसामांतहि नवरात्रांत दुर्गा पूजेचा उत्सव थाटामाटांत साजरा होतो. दुर्गादेवीच्या जीवनांतील दोन घटनांना या उत्सवांत विशेष स्थान असतें. लोकांच्या कल्याणासाठी तिने महिषासुराचा वध केला, ही त्यांपैकी एक घटना होय. महिषासुराचें प्रतीक म्हणून या उत्सवांत तिला रेडा बळी देतात. उमा हें दुर्गेचें दुसरें रूप आहे. कैलासाधिपति शंकराशीं उमचा विवाह झाल्यावर ती प्रथमच माहेरीं येते, ही दुसरी घटना होय. या घटनेचें स्मारक म्हणून दुर्गापूजेच्या वेळीं कुटुंबांतल्या माहेरवाशिणी घरीं आणतात. हा दुर्गापूजेचा उत्सव म्हणजे आसामी लोकांना आनंदाची पर्वणीच असते.

आद्य शक्तीचें काली हें स्वरूपहि आसामांत पूजनीय ठरलें आहे. दुर्गापूजेनंतर एका महिन्याने कालीपूजेचा उत्सव करतात. चहाच्या मळ्यांतील कामगार या उत्सवांत विशेष उत्साहाने भाग घेतात. या उत्सवांत देवीला एक काळा बकरा व बाकीचे पांढरे बकरे बळी देतात.

ज्येष्ठ व आषाढ या महिन्यांत अंबुवाची उत्सव साजरा करतात. याला आसामी लोक हाट असें म्हणतात. या दिवसांत पृथ्वी ऋतुमती होते, असें मानतात. हे आसामांतील प्रमुख धार्मिक उत्सव होत.

याशिवाय खास आसामचे असे बिहू नांवाचे दोन सामाजिक

उत्सव आहेत. यांपैकी माघ बिहू हा आसामांतील वर्षारंभ होय. महाष्ट्रांतील होळी सारखाच हा सण आहे. या दिवशीं होळी



लोकनृत्य करणाऱ्या मुली – आसाम

पेटवितात, म्हणून या उत्सवाला अग्निपूजा असेंहि म्हणतात. खेड्यांतील मुलें या उत्सवाच्या कितीतरी दिवस आधी झोपडीच्या आकाराची एक होळी तयार करतात व माघ बिहूच्या मध्यरात्रीं ती पेटवितात. या दिवशीं जनावरांच्या शर्यती व रेड्यांच्या झुंजी लावतात. आहोम राजांच्या कारकीर्दींत या दिवशीं रेडे, वाघ, हत्ती यांच्या शर्यती लावीत असत. माघ बिहूच्या दिवशीं ब्रह्मपुत्रेसारख्या मोठ्या नदींत स्नान करणें, पुण्यप्रद मानतात.

बहाग बिहू हा उत्सव वसंत ऋतूंत येतो व तो सात दिवस चालतो. नृत्य करणें आणि गुरांना नदींवर नेऊन आंघोळ घालणें, हीं या उत्सवाचीं वैशिष्ट्यें होत. या सात दिवसांत आसाममध्ये नृत्याला उधाण येतें. आसामी उच्चवर्णीय हिंदूच हा उत्सव साजरा करतात असें नव्हे; तर काचारी, तेंगल, चौडांग हुनवाल, इ. सर्व लोक त्यांत भाग घेतात. चौडांग स्त्री–पुरुष दारू, भांग इ. मादक पेये पिऊन या सणांत नृत्य करतात.



लायहरोबा – आसामी नृत्य

कांही खेडेगांवांत 'बिसवरी पूजा' हा उत्सव होतो. शिव, ब्रह्मा, इंद्र, विष्णु इ. सात देवांच्या पत्नींना उद्देशून ही पूजा असते.

आसामांतील ब्राह्मणांत वयाच्या ११ ते १३ या वर्षांच्या दरम्यान मुलीचा वाङ्‌निश्चय होतो. लग्न मात्र मुलगी वयांत आल्यावर करतात. पण वाङ्‌निश्चय झाला, की मुलीचें लग्न झाल्यासारखेंच मानतात. त्यामुळे यदाकदाचित् नियोजित वराला लग्नाच्या पूर्वी मृत्यु आला, तरी ती मुलगी लग्न न होतांहि विधवा होते. तिला पुन्हा लग्न करतां येत नाही. ब्राह्मणांशिवाय इतर जातींत मात्र मुला-मुलींचीं लग्नें लहान वयांत होत नाहीत.

कांही उच्चवर्णीय हिंदूंत लग्नापूर्वी तीन, पांच किंवा सात रात्रीं अगोदर एक शुद्धीकरण विधि करतात. एका रात्रीं किंवा पहांटे वधूपक्षाकडील व वरपक्षाकडील स्त्रिया स्वतंत्र रीतीने मिरवत व गाणीं म्हणत मोठ्या तळ्यावर जाऊन शुद्धोदक घेऊन येतात. मग त्या जलाचें वधू-वरांवर प्रोक्षण करतात व त्यांना नवीं वस्त्रें देतात. लग्नांत होमहवनादि झाल्यावर वधू-वर एकमेकांना पान देतात व लग्नसमारंभ संपतो.

आहोम लोकांच्या विवाहविधिला पुरोहित लागतोच असें नाही. आहोमांत लग्नासाठी मोठ्या प्रमाणांत हुंडा द्यावा लागतो. याशिवाय अंथरूण, पांघरूण, दोन वर्षें पुरतील एवढे कपडे व संसाराचीं सगळीं भांडींहि द्यावीं लागतात.

सर्वसाधारण आसामी माणसाला आपल्याला बरेच पुत्र असावे, असें वाटतें. कारण ते त्याला शेतीच्या कामांत उपयोगी पडतात व वृद्धापकाळीं त्याला पोसतात. परंतु अनेक मुली असणें, हें मात्र त्याला संकटच वाटतें. कारण त्यांना उजविण्यासाठी होणाऱ्या भरमसाट खर्चापायीं त्याला कर्जबाजारी व्हावें लागतें.

जेव्हा एखादा माणूस आसन्नमरण होतो, तेव्हा त्याला घराच्या बाहेर आणून ठेवतात. कारण माणसाला घरांत मृत्यु येणें, अशुभ मानतात. घरांत मृत्यु आल्यास आसामी लोक तें घर सोडून दुसरीकडे राहायला जातात व तें घर कायमचें सोडून देतात. ब्राह्मणांत व कायस्थांत तेराव्या दिवशीं ब्राह्मणांना व नातेवाईकांना श्राद्धाला जेवायला बोलावितात. या वेळीं एका वृद्ध माणसालाहि भोजन घालतात. जेवायला सुरवात त्यानेच प्रथम करायची असते. या दिवशीं जो प्रथम जेवायला सुरवात करतो, तो लवकर मरतो अशी त्यांची समजूत आहे.

आसाम खोऱ्यांत लहान लहान खेडीं वसलेलीं आहेत. सभोंवार भाताचीं शेतें व मध्ये असलेल्या उंचवटयावर

जवळ जवळ वसलेल्या अनेक लहान घरांचा पुंजका, अशी त्या खेड्याची मांडणी असते. या वस्तीभोवती बांबू, केळीं, आंबे, फणस इ. अनेक झाडें असतात. पावसाळ्यांत भात-शेतें जेव्हा पाण्याखाली बुडतात, तेव्हा या वस्त्यांना एखाद्या बेटाचें स्वरूप प्राप्त होतें. भात-शेतांचीं रचना अशा रीतीने केलेली असते, की केवळ पावसाच्या पाण्यां-तच तीं शेतें चार पांच महिने बुडून राहावीं. पेरणीच्या व तरूं लाव-ण्याच्या दिवशीं चौडांग लोक देवाची पूजा करतात. ही पूजा सर्वसाधारणपणे वडाच्या झाडाखाली होते. पूजेनंतर नृत्य होतें. या रात्रीं अनेक चौडांग युवक आपल्या मैत्रिणीबरोबर शयन करतात.




नागाप्रमुखाचें घर
नागाटेकड्या – आसाम

एखाद्या वर्षी पावसाला उशीर झाला, तर पाऊस लवकर पडावा, म्हणून आसामी लोक पुढील विधि करतात–

गांवांतल्या दोन सुंदर मुली निवडतात. त्या दोघींना एकेक बेडूक पकडायला लावतात. मग पुरोहित या दोन बेडकांचें यथाविधि लग्न लावतो. बेडकांच्या कपाळीं कुंकू लावून त्यांच्या गळ्यांत दागिने घालतात. गांवांतील स्त्री-पुरुष मंगलाष्टकें म्हणतात. शेवटीं त्या दोन मुली त्या बेडकांना आंघोळ घालतात. या विधीनंतर सात दिवसांच्या आंत पाऊस पडेल, अशी त्या लोकांची धारणा असते.

आसामी हिंदूंत एकत्र कुटुंबपद्धति अस्तित्वांत आहे. घरां-तली सर्व सत्ता सासूच्या हातीं असते. तिच्यामागून ती मोठ्या सुनेकडे येते. घरांत तीन जावा असल्या, तर मोठ्या जावेला स्वयंपाकपाणी करावें लागतें. तिच्याहून लहान जाऊ घरां-तल्या मुलाबाळांना संभाळते व तिच्याहून धाकटी झाड-सारवण करून घर नीटनेटकें व स्वच्छ ठेवते. घरांतल्या बायका कापड विणतात. विणतां येणें हा मुलींच्या शिक्षणांतलाच एक भाग समजतात. रेशमी वस्त्रें विणण्यासाठी रेशमाचे किडे संभाळतात. त्यांची जोपासना करणें व रेशमाचीं वस्त्रें विणणें, हीं कामें घरांतल्या वृद्ध स्त्रिया करतात.

आसामी हिंदु मासे व बकऱ्याचें आणि बदकाचें मांस खातात. प्रत्येक कुटुंबांत गायी, म्हशी, बकऱ्या, बदकें, कबुतरें पाळलेलीं असतात. खेड्यांतील स्त्री-पुरुष त्रिकाल स्नान करतांना आढळ-तात. प्रत्येक कुटुंबांत रामायणाची एक प्रत असते व घरांतलीं माणसें मोठ्या आवडीने तें वाचतात. बायका सर्वसाधारण-पणे शहरांत हिंडतांना दिसत नाहीत. आसामी लोक हत्ती



आसामी आदिवासींचें शिरस्त्राण

हा गणपतीचें रूप आहे, असें मानतात. त्यामुळे माहूत हत्तीवर चढण्यापूर्वी प्रथम गणपतीला नमस्कार करतो. गणपतीचा अपमान होईल, या भीतीने आसामी स्त्रिया कधीहि हत्ती-वर बसत नाहीत.



आसामी स्त्री – वेशभूषा


आसामांतील वन्य जमाती– आसामांतील पहाडी प्रदेशांत अनेक आदिवासी जमातींची वस्ती आहे. इंडोचीन वंशां-तील या जमाती असून त्यांचे दोन वर्ग पडतात. प्राचीन काळीं ईशान्येकडून आलेल्या टोळ्यांचे वंशज खासी हे एका वर्गांत येतात, तर दिमासा किंवा पहाडी काचारी, बोंडो, रामा, कारो, लालूग, डफला, मिरी, अबोर, अप्पाटानी व मिश्मी, या जमातींचा समावेश दुसऱ्या वर्गांत होतो. दक्षिणे-कडून आलेल्या लुशाई, कुकी, या जमाती आता नागा टोळ्यांत मिसळून गेलेल्या आहेत.

आसामी टेकड्या पूर्वी सुसंस्कृत जगापासून अलग पडल्या होत्या. पण दळणवळणाचीं साधनें वाढल्यापासून त्यांचा आता

सुधारलेल्या जगाशीं संबंध येऊं लागला आहे. पहाडी प्रदेशांत रस्ते झाल्यामुळे सेमा व आओ जमातीचे नागा लोक चहाच्या मळचांत मजुरी करण्यासाठी पहाडी प्रदेशांतून खाली उतरूं लागले व परकीय ख्रिस्ती मिशनऱ्यांनी त्यांच्या प्रदेशांत चंचुप्रवेश केला. पण सुसंस्कृत लोकांशीं संबंध आल्यामुळे या वन्य टोळचांचा फायदा होण्याऐवजी तोटाच झाला आहे. त्यामुळे या प्रदेशाचें जुनें निरागस जीवन नष्ट झालें असून सुसंस्कृत जगांतील दुर्गुणांचा व रोगराईचा मात्र त्यांच्या प्रदेशांत फैलाव झाला आहे.

पूर्वी भाताची दारू हें नागांचें राष्ट्रीय पेय होतें. पण परकी लोकांनी दारूबरोबरच त्यांना अफूचेंहि व्यसन लावलें. आता कोन्याक नागा हे पक्के अफीमबाज बनले असून आओ नागांमध्येहि या व्यसनाचा शिरकाव झाला आहे.

मणिपूर प्रदेशांत सडका बांधल्यामुळे त्या प्रदेशांतील दळणवळण वाढलें. पण त्यामुळे नागा स्त्रियांत अनैतिकतेचाहि प्रवेश झाल्यावांचून राहिला नाही. पूर्व अंगामी नागांमधील



ख्रिस्ती चर्च – शिलाँग

कांही स्त्रियांचा अपवाद सोडल्यास त्या भागांत इतरत्र वेश्याव्यवसायाचाहि प्रसार झाला आहे. नागा स्त्रियांना आता सुखी जीवनाची व चैनीची चटक लागली आहे. जी गोष्ट पोषाखाची तीच घरांची. बाप्टिस्ट मिशनऱ्यांनी त्यांना युरोपियन पद्धतीचीं घरें बांधायला शिकविलें; पण आसामच्या दमट हवेला तीं घरें निरुपयोगी ठरलीं आहेत.

इंग्रज सरकारने नागांच्या चालीरीतींत हस्तक्षेप केला नाही. उलट त्यांना त्या जतन करण्यासाठी प्रोत्साहन दिलें. परंतु अमेरिकन मिशनऱ्यांनी ज्या नागांचें धर्मांतर केलें, त्यांची मूळ संस्कृति नष्टच करून टाकली. पूर्वी कांही श्रीमंत नागा लोक गांवजेवणावळी घालीत असत. त्यामुळे गांवांतील गरीब लोकांना अन्न मिळत असे. परंतु अमेरिकन मिशनऱ्यांनी ही चाल बंद पाडली. त्याचप्रमाणे या मिशनऱ्यांनी नागांच्या नृत्यांवरहि बंदी घातली. त्यामुळे नागांना आपल्या रंगीबेरंगी पोषाखाला मुकावें लागलें. स्त्रियांनी मात्र आपला जुना पोषाख अजून कायम ठेवला आहे. त्या हातांत हस्तिदंती बांगडचा व गळचांत मण्यांच्या माळा घालतात. या सर्वांत अंगामी नागा मात्र अजून आपल्या पूर्व रूढींना चिकटून राहिले आहेत. त्यांनी आपला मूळचा पोषाखहि टाकलेला नाही. पण हा अपवादच म्हणायला हवा. अमेरिकन मिशनऱ्यांनी त्यांच्या जुन्या चालीरीतींचा पद्धशीर नायनाट करण्याचें तंत्र अवलंबिलें आहे (मिल्स–सेन्सस ऑफ इंडिया १९३१). हे लोक पूर्वी एकमेकांच्या खेडचांवर छापे घालून लुटालूट करीत व माणसांचीं मुंडकीं छाटून नेत. परंतु आता मनुष्य-



अलंकृत स्त्री – आसाम



विभूषित नागा – आसाम

वधाला व लुटालुटीला कायद्याने बंदी झाल्यामुळे ते प्रकार बंद पडले आहेत. परंतु त्यामुळे नागांच्या अंगांतील चपळाई व मर्दानीपणा हे गुणहि नाहीसे झाले. पूर्वी ते नेहमी युद्धाच्या तयारीने राहत असत. पण त्यांना आता तसें राहण्याची गरजच उरली नाही. त्यामुळे आता कांही नागा लोक शेती व इतर लहान सहान धंदे करूं लागले आहेत. कांही भूमिहीन नागा ब्रह्मदेशांत जाऊन मणि विकण्याचाहि धंदा करतांना दिसतात.

नागांमध्ये हल्ली शिक्षणाचा प्रसार झपाट्याने वाढत आहे. पण त्यांना अद्यापि शिक्षणाची महती कळलेली नाही. थोडेसें शिक्षण मिळालें, की आपल्या जीवनांत आमूलाग्र बदल झाला पाहिजे, असें त्यांना वाटतें. त्यांना सुखासीन जीवन हवें असतें व त्यासाठी त्यांचा सरकारी नोकरीवर डोळा असतो. शहरांत वाढलेला सुशिक्षित नागा तरुण खेड्यांत जाऊन आपल्या वाडवडिलांच्या व्यवसायांत पडूं इच्छित नाही. त्यामुळे नोकरी नसलेले नागा तरुण शहरांत रिकामटेकडे भटकतांना आढळतात. आओ नागांची परिस्थिति तर त्या दृष्टीने फार बिकट आहे. कांही अंगामी नागा शिक्षण घेतल्यावर प्रथम व्यापारांत पडले; पण त्यांना अपेक्षित फायदा न मिळाल्याने ते व्यापार सोडून परत नोकरीच्या मागे लागले आहेत.



भाला फेकणारा नागा तरुण

नागा लोकांत गेल्या तीस-चाळीस वर्षांपासून पाश्चात्यांच्या पोषाखाची अतिशय आवड निर्माण झाली आहे. वास्तविक आसामच्या दमट हवेंत पाश्चात्य पोषाख सोयीचा नाही. शिवाय तो स्वच्छ धुतला पाहिजे, याचीहि त्यांना जाणीव नाही. त्यामुळे ते घामट कपडे वापरतात व अनेक रोगांना निमंत्रण देतात. **पाहा** —– असमिया भाषा व साहित्य. [हिं. वि. को.; म. ज्ञा. को.; एन्सा. रि. ए.; आसाम व्हॅली; सेन्सस रिपोर्ट]

आसामी ब्राह्मण कनोजी ब्राह्मणांतून निघालेली एक शाखा. हे जयध्वज राजाच्या कालांत आसाममध्ये येऊन स्थायिक झाले. हे आपल्याला वैदिकधर्मी म्हणवीत असले, तरी यांच्यांतले पुष्कळसे लोक तंत्रमार्गी आहेत. कांही वैष्णवहि आहेत. यांच्यांतहि पोटजाती असून हे लोक गोत्राच्या बाहेर आपल्या पोटजातींत विवाह करतात. [ब्रा. जा. प्र.]

आसावरी औडव संपूर्ण वर्गातला मृदुला जातीचा एक राग. हा धैवताने आंदोलित असतो. यांतले सर्व स्वर कोमल असल्यामुळे, भैरवीपासून याला दूर ठेवणें कौशल्याचें काम आहे. एका गायकी परंपरेंत यांत तीव्र ऋषभ वापरतात; पण याचें खरें स्वरूप कोमल ऋषभानेच सिद्ध होतें. कोमल ऋषभ तर लावायचा; पण भैरवीचा भास होऊं द्यायचा नाही; आणि त्याचबरोबर विलासखानीलाहि दूर ठेवायचें, या दोन जबाबदाऱ्या गायकाला विशेषतः अवरोहाच्या वेळीं सांभाळाव्या लागतात. हा हृदयस्पर्शी आणि करुण असा राग आहे. गानसमय सकाळच्या पहिल्या प्रहरानंतर. सा रि म प ध सा हा याचा आरोह आणि सा नि ध प म ग रि सा हा अवरोह होय.



आसावरी रागिणी

आसावरीचें ध्यान पुढीलप्रमाणे आहे–

श्रीखण्डशैलशिखरे शिखिपिच्छवस्त्रा ।
मातङ्गमौक्तिकमनोहरहारवल्ली ।।
आकृष्य चन्दनतरोरुरगं वहन्ती
आसावरी वलयमुज्ज्वलनीलकान्तिः ।।

अर्थ – मलय पर्वताच्या शिखरावर बसलेली, मोरपिसा-

सारखें वस्त्र नेसलेली, गजमौक्तिकांची सुंदर माला धारण केलेली, चंदनवृक्षावरील साप ओढून जिने आपल्या हातांत कंकणाप्रमाणें धारण केले आहेत व जिची कांति उज्ज्वल आणि निळसर आहे, अशी ही आसावरी रागिणी आहे. [क. सं.; सं. द.]

आसुपाणि केरळांतली एक जात. हे मूळचे मारन होत. पण मंदिरांत आसु व पाणी हीं दोन वाद्यें वाजविण्याचें काम ज्यांनी पत्करलें, त्यांना हें नांव पडलें. [का. ट्रा. स. इं.]

आसुर विवाह विवाहाचा एक प्रकार. वराने वधूला किंवा वधूपित्याला धनाच्या रूपाने कांही मूल्य देऊन किंबहुना कन्या विकत घेऊन तिच्याशीं विवाह करणें, या पद्धतीला 'आसुर विवाह' असें नांव आहे (आश्व. गृ. सू. १.६.१). या प्रकाराला आसुर हें नांव कां देण्यांत आलें, तें समजत नाही. कदाचित् असुर जमातींतून ही चाल आर्यांच्या समाजसंस्थेंत आली असावी. कांही असलें तरी पैशाच व राक्षस विवाहांपेक्षा हा प्रकार श्रेष्ठप्रतीचा आहे, यांत शंका नाही. कन्या व तिचें कुल यांना कांही दर्जा व मान आहे; तेव्हा मोबदला न घेतां कन्यादान करणें बरें नव्हे, अशी समजूत या प्रकाराच्या मुळाशीं असावी. कन्या पतिगृहीं गेल्यामुळे तिच्याकडून होणाऱ्या कौटुंबिक मदतीला वधूपित्याला मुकावें लागतें, त्याबद्दलहि अंशतः ही भरपाई असूं शकेल. कांही जातींत वराने वधूपित्याला द्रव्य न देतां विशिष्ट कालपर्यंत त्याच्या घरीं नोकरी करायची, अशीहि चाल आढळते.

कांहीहि असो; या पद्धतीमुळे कन्येलाहि कांही किंमत आहे, या गोष्टीची समाजाला जाणीव झाली व विवाहानंतर नवऱ्याकडून होणाऱ्या पत्नीच्या छळाची मात्रा बरीच कमी झाली. छळाने वैतागून एखाद्या स्त्रीने आत्महत्या केल्यास पुरुषाला दुसरी पत्नी मिळणें, ही गोष्ट या आर्थिक कारणामुळे दुष्कर होऊं लागली. त्या दृष्टीने या आसुर पद्धतीचा समाजास अप्रत्यक्ष फायदाच झाला, असें म्हणायला हरकत नाही.

वैदिक काळांतहि आसुर विवाह प्रचलित होता; पण त्याला फारशी मान्यता नव्हती. अशा प्रकारें विवाहबद्ध झालेल्या पुरुषाला 'विजामाता' अशी हीनार्थक संज्ञा दिली जात असे, त्यावरून हें कळून येतें. पौराणिक काळांतले गांधारी, माद्री, कैकेयी यांचे विवाह आसुर पद्धतीनेच झालेले आहेत. पण पुढे मात्र धर्मशास्त्रकारांनी या पद्धतीचा तीव्र निषेध सुरू केला. त्या पुढच्या म्हणजे ऐतिहासिक काळांत बालविवाहाची पद्धत रूढ होऊं लागली व विवाहाच्या बाबतींत मुलींना कांही मतच उरलें नाही. उलटपक्षीं कित्येक वधूपित्यांना द्रव्यलोभ उत्पन्न होऊन विवाहसंस्काराला जणू लिलांवाचें स्वरूप प्राप्त झालें. धर्मशास्त्रकारांनी आसुर विवाहाला तीव्र विरोध केला, त्याचें कारण या वर दिलेल्या गोष्टींत आढळून येईल.

पण सुशिक्षित समाजांत आजमितीस याच्या उलट परिस्थिति आहे. म्हणजे इष्ट वर मिळविण्यासाठी कन्येच्या पालकालाच 'हुंडा' या रूपाने वराला मोठ्या रकमेने द्रव्य द्यावें लागतें. पण उलट अर्थाने चालू झालेल्या या आसुर विवाहाला आता कायद्याने प्रतिबंध झालेला आहे. शेतकरी, कारागीर, व आदिवासी या जातींत मात्र मुलीचें 'देज' घेण्याची पद्धत आजहि सर्वत्र आहे. तें रोख रक्कम किंवा धान्य आणि कपडालत्ता या स्वरूपांत घेतलें जातें. या समाजांत शिक्षणाचा प्रसार व विवाहाची वयोमर्यादा वाढणें, या दोन गोष्टी होतील, तेव्हाच या देजाच्या चालीला आळा बसेल. [पो. वी. हिं. सो.; हि. ध.]

आसुरि माध्यंदिनांच्या ऋषितर्पणांत याचें नांव येतें. वास्तविक याचें स्थान आचार्यतर्पणांत असायला हवें. पण माध्यंदिनांनी आचार्यांनाच ऋषि बनविलें आहे, त्यामुळे तें बदललें. शतपथ ब्राह्मणांत आसुरीचें नांव पुष्कळदा येतें. हा सायंहोमाचा पुरस्कर्ता असल्यामुळे याला आसुरि हें टोपणनांव मिळालें असावें. हा उदितहोमाच्या विरुद्ध होता. [तर्पण]

आसुरी दुर्गा एक तांत्रिक देवता. ही अथर्वण व कटुका यांची कन्या होय. पद्मासना, चतुर्भुज व शूल-अंकुश धारण करणारी, असें हिचें ध्यान आहे. हिचा मंत्र पुढीलप्रमाणे —

ॐ कटुके कटुकपत्रे सुभगे आसुरि रक्ते रक्तवाससे अथर्वणस्य दुहिते अघोरे अघोरकर्मकारिकेऽमुकस्य गतिं दह दह उपविष्टस्य गुदं दह दह सुप्तस्य मनो दह दह प्रबुद्धस्य हृदयं दह दह हन हन पच पच तावद्दह तावत्पच यावन्मे वशमायाति हुंफट् स्वाहा।

इष्टसिद्धीसाठी हा मंत्र जपतात. [विद्यार्णवतंत्र; मं. म.]

आसेचन द्रव पदार्थ ठेवण्यासाठी केलेलें एक पात्र. ऋग्वेदांत मांसरस ठेवण्यासाठी (१. १६२. १३.) व शतपथ ब्राह्मणांत तूप ठेवण्यासाठी (२. १. ९. ५) त्याचा उपयोग केलेला दिसतो. [वे. इं.]

आसेध आसेध म्हणजे राजाने एखाद्या व्यक्तीला उद्देशून काढलेला मनाईहुकूम, असें मिताक्षरेंत सांगितलें आहे. आसेधाचे पुढील चार प्रकार आहेत–(१) स्थानबद्धता (२) ठराविक दिवशीं हजेरी देणें (३) प्रवास करण्यावर निर्बंध व (४) कांही विशेष कृत्यांना मनाई. [हि. ध.]

ऑस्ट्रिक एक मानववंश. भारतांत आसाममध्ये यांनीच प्रथम वसती केली, असें मानतात. ऑस्ट्रेलिया व इण्डोनेशिया या प्रदेशांत राहणाऱ्या जमातींपैकीच हे लोक होत. खासी, सिंटेंग, जेंतिया, कोल, मुंड, हो वगैरे पूर्वेकडील आदिवासी याच वंशाचे आहेत. यांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. माणूस मेल्यावर त्याचा आत्मा एखाद्या झाडांत किंवा दगडांत आश्रय करून राहतो, अशी यांची समजूत आहे. हे लोक मृताच्या नांवाने एक उभा दगड उभारतात व त्याच्या समोर एक दगड आडवा ठेवतात. या आडव्या दगडावर मृतासाठी खाद्यपेय ठेवतात. खासिया व जेंतिया या जमातींत हा दगड उभारण्याचा विधि समारंभपूर्वक करतात व त्या दगडाला वस्त्र नेसवितात. मिकिर लोकांत या विधीच्या प्रसंगीं स्त्री-पुरुषांचें संमिश्र नृत्य होत असतें. नाचतांना अत्यंत अश्लील अर्थाचीं गाणीं म्हटलीं जातात.

स्त्रियांवर देवाची खास कृपा असते, अशी ऑस्ट्रिक लोकांची श्रद्धा आहे. देवा-मानवांत मध्यस्थीचें काम पुष्कळदा स्त्रियाच करतात. पिकावर रोग किंवा अवर्षण पडलें, तर हे लोक स्त्रियांना नग्नावस्थेंत ग्रामप्रदक्षिणा करायला लावतात. हे गायी-म्हशी पाळतात; पण त्यांच्या दुभत्याचा उपयोग करीत नाहीत. **पाहा** –– मानववंश. [दि बॅक्ग्राउंडस् ऑफ् आसामीज कल्चर – एम्. आर. नाथ]

आस्तिक 'परलोकाद्यस्तित्ववादी' = परलोकादिकांचें अस्तित्व मानणारा तो आस्तिक होय. उदा० व्यास (न्यायकोश). 'नरकभीरुरास्तिकशब्दवाच्यः' = नरकाचें भय बाळगणारा तो आस्तिक होय (तत्त्वप्रकाशिका), अशीहि दुसरी व्याख्या आहे. पुढील सहा दर्शनें हीं वेदप्रामाण्य मानणारीं अतएव आस्तिक दर्शनें मानलेलीं आहेत—(१) पूर्व मीमांसा (२) उत्तर मीमांसा (वेदान्त) (३) सांख्य (४) योग (५) न्याय व (६) वैशेषिक.

आस्तीक जरत्कारुदंपतीचा पुत्र. यान गर्भांत असतांनाच शिवाचा उपदेश ग्रहण केला. याच्या मातेने पतीला गर्भाविषयीं विचारलें असतां याने आंतून उत्तर दिलें, की 'अस्ति.' म्हणून याला आस्तीक नांव पडलें. याने च्यवन-भार्गवापाशीं सांग वेदाध्ययन केलें. शंकराने याचा व्रतबंध करविला. जनमेजयाने सर्पसत्र आरंभिलें असतां तक्षकाचा मृत्यु होण्याची वेळ आली. तेव्हा सर्प याच्या मातेकडे गेले व सर्पकुलाच्या रक्षणाबद्दल त्यांनी तिला गळ घातली. तिने ती गोष्ट आस्तिकाला सांगितली. आस्तीक जनमेजयाच्या यज्ञ-मंडपांत गेला व त्याने जनमेजयाचें मन वळवून त्याचें सर्पसत्र बंद पाडलें (म. भा. आदि. ५८). सर्पांनी आस्तिकाचा गौरव केला. त्या वेळीं 'माझें हें आख्यान जे पठन करतील, त्यांना सर्पांनी पीडा देऊं नये' असा त्याने वर मागितला. जनमेजयाने सर्पसत्र बंद केलें, त्या दिवशीं नंदिवर्धिनी नांवाची पंचमी होती. म्हणून तो दिवस नागांना प्रिय ठरला (भवि. पु. ब्रा. ३२). या आख्यानावरूनच जुन्या पिढींतले लोक रात्रौ झोपतेवेळीं 'आस्तीक' नांवाचा त्रिवार उच्चार करीत. सर्पाला आस्तीकाची शपथ घालण्याचीहि रूढि आहे.

अगस्तिर्माधवश्चैव मुचकुन्दो महामुनिः ।
कपिलो मुनिरास्तीकः पञ्चैते सुखशायिनः ॥

या शांतिपाठांतल्या मंत्रांत आस्तिकासह वरील पांचांना 'सुखशायी' म्हणजे स्मरणकर्त्याला सुखनिद्रा देणारे, असें म्हटलें आहे.

आस्थानमंडप प्राचीन राजदरबारांतला एक मंडप. चार सुवर्णदंड उभे करून त्यांवर चांदवा ताणला व त्याखाली सिंहासन मांडलें, की हा मंडप तयार होत असे. बहुधा हा चांदवा लाल रंगाचा असे. माघाने लाल चांदव्याचाच उल्लेख केला आहे (शिशु. ५.२१). याला दुकूल-वितान असेंहि म्हणत. अजंटा येथील भित्तिचित्रांत उपरि-वर्णित आस्थानमंडपाचें चित्र आहे. [कादं. ए. अ.]

आस्रव जैन दर्शनांतला पारिभाषिक शब्द. जीवाच्या मनांत भलेबुरे विचार चालू असणें, याला आस्रव म्हणतात. शुभ व अशुभ असे दोन प्रकारचे आस्रव आहेत. शुभ विचारांच्या चिंतनाने जीवाला स्वर्गादि सुखें प्राप्त होतात व अशुभांच्या चिंतनाने नरक व पशुयोनी प्राप्त होतात. आस्रव हें कर्माचें द्वार आहे. नावेला छिद्र पडल्याने जसें समुद्राचें पाणी नावेंत शिरतें, त्याचप्रमाणे मिथ्यात्व, अविरति, कषाय, व योग या चार कारणांच्या द्वारें जीवाच्या ठिकाणीं कर्म आस्रवित होतें (व. श्रा. ३९). 'आस्रवः कर्मणां बन्धः' = जीवाच्या कर्मबंधास आस्रव हे कारण आहेत (सर्व. द. सं. आर्ह.).

बौद्धांनीहि आस्रव मानले आहेत. त्यांच्या अभिधर्मानुसार

आस्रव चार प्रकारचे आहेत–(१) कामास्रव (२) भवास्रव (३) दृष्टयास्रव व (४) अविद्यास्रव. हे जीवाच्या चित्तांत घर करून राहतात व त्याला भवबंध उत्पन्न करतात. मुमुक्षु योगी या आस्रवांतून सुटल्यावर मगच त्याला अर्हत्पदाचा लाभ होतो. आस्रवाचा विरोधी शब्द 'संवर' हा आहे. 'आस्रवो भवहेतुः स्यात्संवरो मोक्षकारणम्' = आस्रव हा संसाराला कारण असून संवर हा मोक्षाचें कारण आहे (सर्व. द. सं. आर्ह.). आस्रव हे चित्ताचे मल म्हणून अन्य दर्शनांतहि सांगितले आहेत. **पाहा**–संवर.

आहवनीय 'आहूयते आज्यादिभिरस्मिन्' = आज्यादि हवनीय द्रव्यांनी ज्यांत आहुती दिल्या जातात, तो आहवनीय (अग्नि) होय. अग्निहोत्र्याच्या तीन अग्नींपैकी हा एक असतो. अग्निशाळेंत गार्हपत्याच्या मध्यापासून पूर्वेस आठ, बारा किंवा त्याहून अधिक प्रक्रमांवर आहवनीयाचें आयतन (स्थान) असतें. तें चौकोनी असून त्याला दोन मेखला (कट्टयाचे थर) असतात. गार्हपत्यांतून अग्नि आणून आहवनीय सिद्ध करतात. **पाहा**–गार्हपत्य. [विद्याधरशास्त्री भिडे]

आहाव यज्ञांत होता शस्त्र पठन करतांना प्रारंभी 'शों ३ सावों ३' हा मंत्र म्हणतो, त्याला आहाव अशी संज्ञा आहे. त्याचा अर्थ 'हे अध्वर्यु, आम्ही शंसन करतों, आम्हाला अनुज्ञा दे' (ऐ. ब्रा. २. ३३ सायणभाष्य). याला ब्रह्म असेंहि म्हटलें आहे. ऋग्वेदांत हा शब्द बऱ्याच ठिकाणीं आला असून त्याचा अर्थ पाणी काढण्याचें भांडें असा आहे. [म. ज्ञा. को.]

आहिंडिक एक जात. निषाद पुरुष व वैदेही स्त्री यांच्या संततीला हें नांव आहे (मनु १०. ३७). म्हणजे ही दुहेरी प्रतिलोम जात आहे. उशनसाच्या मताप्रमाणे गुन्हेगारांना तुरुंगांत ठेवतात, त्या जागीं अनोळखी लोकांना येऊं न देणें, हा यांचा व्यवसाय होता. जेव्हा हे लोक चर्मकाराचा धंदा करीत, तेव्हा त्यांना कारावर असें म्हणत (मनु १०. ३६). [हि. ध.]

आहिताग्नि ज्याने विधिपूर्वक तीन अग्नींचें आधान केलें आहे, अशा यजमानास आहिताग्नि अशी संज्ञा आहे (तै. सं. १. ५. ९; १. ७. १; ३. ४. १०). आहिताग्नीनें धारण केलेल्या अग्नींचें संरक्षण करण्याची जबाबदारी मुख्यत्वें त्याच्या पत्नीवर असते. आहिताग्नीने रोज सकाळ-संध्याकाळ अग्नीला होम द्यायचा असतो. त्या होमाच्या वेळीं पत्नी त्याच्या जवळ असावी लागते. आहिताग्नि प्रवासाला गेल्यास होमाचें काम अध्वर्यु करतो. मात्र त्यावेळीं पठण करायचे मंत्र आहिताग्नीला प्रवासांतहि म्हणावे लागतात. आहिताग्नीने प्रवासाला निघतांना अग्नीचें उपस्थान करायचें असतें. आहिताग्नि अथवा त्याची पत्नी मृत झाल्यास अग्निहोत्र तिथेच थांबतें. मग अंत्येष्टि करून अग्निहोत्राचीं सर्व पात्रें मृताच्या बरोबर जाळून टाकतात. आहिताग्नीला त्याच्या तीन्ही अग्नींनी यज्ञपात्रांसह जाळावें, असें शबरस्वामी म्हणतो (जै. ११. ३. ३४१ वरील भाष्य).

आहितुंडिक एक जात. यांना गारुडी म्हणतात. **पाहा**–गारुडी.

आहुक एक जमात. महाभारतांत या जमातीचा उल्लेख आला असून रुक्मी हा तिचा पुढारी होता, असें सांगितलें आहे. वायुपुराणांत आहुक हा उत्तरेकडील प्रदेश आहे, असें म्हटलें आहे. [क. हि. वा. पु.]


आहुति अग्नींत हवनीय द्रव्य टाकणें, याला आहुति म्हणतात. आज्य म्हणजे तूप घालणें याला आज्याहुति म्हणतात. ही आज्याहुति देण्याचा सर्वसाधरण विधि असा – अध्वर्यु पात्रांत आज्य घेऊन तें पात्र गार्हपत्य अग्नीवर ठेवतो. आज्य पातळ झाल्यावर तें खाली उतरून तो त्यांत 'पवित्र' संज्ञक दोन दर्भ फिरवून तें शुद्ध करतो. स्रुव नांवाच्या पळीने जुहू नामक स्रुची भरतो व तें आज्य 'स्वाहा' या उच्चारासह अग्नीला अर्पण करतो. यजमान 'अग्नय इदं न मम' = हें अग्नीसाठी आहे; माझे नव्हे, असें म्हणतो.

आहृती ब्रह्मदेवाच्या मानसापासून उत्पन्न झालेला एक अप्सरांचा गण. [ब्रह्मांड पु. ३. ७. १८]

आहेर हा शब्द सं. आहार्य या शब्दावरून आला असावा. त्याचा अर्थ वस्त्र धारण करणें, असा होतो. लग्न, मुंज, केळवण, ओटभरण, गर्भाधान, इ. आभ्युदयिक प्रसंगीं वस्त्रालंकारादि वस्तूंचा आहेर करण्याची पद्धत आहे. पण हा शास्त्रविहित आचार नसून लौकिक आहे. याशिवाय देवदर्शन, सती जाणें, दुखवटा, मेजवानी, प्रथम भेट, शुभवार्ता कानीं पडणें, हे वस्त्रदानाचें म्हणजेच वस्त्राचा आहेर करण्याचे संग सांगितलेले आहेत. मंगलकार्यांत आप्तेष्ट यजमान-

दंपतीला, वधू-वरांना किंवा सत्कार्य व्यक्तीला आहेर करतात. अशा वेळीं पुरोहित 'युवं वस्त्राणि' (ऋ. १. १५२. १) हा मंत्र म्हणतो.

आहोम आसामच्या दरींतली एक जमात. ही मंगोलियन मानववंशाच्या ताई जातीची उपशाखा आहे. लाकुपेदिए हा मानववंशशास्त्रज्ञ म्हणतो, की आहोम हे मॉंस (Mons), नेग्रिटो व चिनी यांच्या संकरांतून निर्माण झालेले लोक होत. यांची वस्ती सयामच्या आखातापासून उत्तरेस



आहोम राजवाडा

आसामपर्यंत पसरलेली आहे. इ. स. १२८२ सालीं सु-का-फा राजाच्या नेतृत्वाखाली हे ब्रह्मदेशांतून पात्काई खिंडींतून ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यांत उतरले व तिथून पुढे कामरूपामध्येहि घुसले. त्यांनी तिथल्या हिंदुराजांना जिंकून आपलें राज्य स्थापलें. गौहाटी येथे आपली राजधानी केली. लक्खिमपुर व शिवसागर हीं नवीं नगरेंहि वसविलीं. आपली राजमुद्रा पंखयुक्त सिंह अशी बनविली. ब्रह्मी लोक त्यांना शान, किंवा शाम म्हणत. त्यावरूनच त्या प्रदेशाला आसाम हें नांव मिळालें आहे. त्यापूर्वीं या प्रदेशाला कामरूप म्हणत. आहोमांनी अनेक ठिकाणीं मोठमोठे राजवाडे बांधले. त्यांची सत्ता हळूहळू वाढू लागली. औरंगजेबाच्या काळीं सदिया ते गोलपारा व दक्षिणेकडील पर्वतराजीपासून तों उत्तरेस भूतियासरहद्दीपर्यंत त्यांनी आपला राज्यविस्तार केला होता. त्यांनी 'बुरुंजी' या नांवाने ज्या बखरी लिहून ठेवल्या आहेत, त्यांवरून ते आसामध्ये शिरल्यापासून तों ब्रिटिशांच्या अमदानीपर्यंत त्यांचा सुसंगत इतिहास उपलब्ध झाला आहे. त्यांच्या सत्तेचा सर्वोच्च उत्कर्ष रुद्रसिंहाच्या कारकिर्दींत झाला. हा राजा इ. स. १६९५ त गादीवर बसला. पुढच्या शतकांत अंतःकलह व बाहेरून शत्रूंच्या स्वाऱ्या, यांमुळे आहोमांच्या सत्तेला उतरती कळा लागली. त्यांच्यांतल्याच एका भांडखोर पक्षाने इ. स. १८१० त ब्रह्मी लोकांना आपल्या साहाय्यार्थ बोलाविलें. ते आले ते सगळें ब्रह्मपुत्रेचें खोरेंच बळकावून बसले. १८२५ सालीं ब्रिटिशांनी त्यांना पिटाळून लावीपर्यंत ब्रह्मी लोकांनी तिथे अमानुषपणे राज्य केलें.

आहोमांनी आपल्या सत्ताकाळांत आपल्या मूळ 'शान' घराण्याचीच राज्यपद्धति कायम ठेवली. ते प्रजेकडून द्रव्य-रूपाने कर घेण्याऐवजी वैयक्तिक चाकरीच्या रूपानें तो घेत. त्यांनी आसाममधल्या पूर्वींच्या लोकांशी शरीरसंबंध केले. त्यांनी हळूहळू हिंदुधर्महि स्वीकारला. ते हिंदुपद्धतीचीं नांवें व पदव्या घेऊं लागले. कामरूपामधल्या तांत्रिक धर्माचा स्वीकार करून ते कामाख्येचे उपासक बनले. त्यांच्या धार्मिक कल्पनांवर बौद्ध धर्माचाहि थोडासा प्रभाव पडला आहे. आहोम हे एकेश्वरवादी आहेत.

यांच्या बायका गोऱ्या वर्णावर असतात. आहोमांना मद्याचें व अफूचें व्यसन जबरदस्त आहे. त्यांचा पोषाख आसामी शेत-कऱ्यांसारखाच असतो. श्रीमंत लोक रेशमी पगडी व लांब कोट घालतात. हे भात-शेती करतात. यांच्यांत सात पोटजाती आहेत. त्यांतली देवधाई ही पोटजात बाकीच्यांचें पौरोहित्य करते. ज्यांनी हिंदुधर्म स्वीकारला नाही, अशा आहोमांचा लग्नविधि वेगळ्या पद्धतीने होतो.



आहोम मुलगी

यांचें राज्य असतांना यांचा राज्यारोहणसमारंभ डामडौलाने होत असे. प्रथम राजा आपल्या पट्टराणीसह चोराईदेव नांवाच्या टेकडीवर जाऊन तिथे दोन केळीचीं झाडें लावी. नंतर परत येऊन बांबूच्या सिंहासनावर बसे. त्याच्या आसनाखाली कांही पशू व एक माणूस बसवीत. त्या आसनावर राजाला स्नान घालीत. मग राजा आपल्या तलवारीने खालच्या माणसाचें मुंडकें तोडी. शेवटी मेजवानी होऊन समारंभ संपे.

आहोम लोक मृताला पुरतात. मृताबरोबर त्याला उपयुक्त अशा कांही वस्तूहि पुरतात. आहोमांचा प्राचीन धर्म व प्राचीन भाषाहि आजमितीस नष्ट झाली आहे. आजमितीस त्यांच्या

कांही जुन्या भिक्षुक घराण्यांत वरील दोन्ही गोष्टींचे कांही अवशेष दिसतील. आहोमांची भाषा ही सयामी-चिनी भाषाकुलाच्या ताई शाखेंतली जुनी भाषा असून तिची स्वतःची वर्णमाला हि होती. पाहा — आसाम, असमिया भाषा व साहित्य. [एन्सा. रि. ए.; बॅक-ग्राउंड्स ऑफ आसामीज कल्चर; सु. वि. को.]



आहोम राजमुद्रा

आह्निक सामान्यतः दिवसांत करायाच्या धार्मिक कृत्यांना आह्निक म्हणतात. गृहस्थाचीं आह्निक कृत्यें पुढीलप्रमाणे सांगितलीं आहेत — ब्राह्ममुहूर्ती उठणें व प्रातःस्मरण म्हणणें. पुढील मंत्राने भूमीची प्रार्थना करणें—

समुद्रवसने देवि पर्वतस्तनमण्डले ।
विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे ।।

अर्थ — समुद्राचें वस्त्र नेसलेल्या, पर्वतरूपी स्तनमंडल असलेल्या, विष्णुपत्नि देवि, तुला नमस्कार असो. तूं माझ्या पदस्पर्शाबद्दल (मी तुला पदस्पर्श करितों त्याबद्दल) मला क्षमा कर.

नंतर गायीचें दर्शन, बहिर्दिशेस जाणें, चूळ भरून (तोंड धुवून) आचमन, नदी किंवा तीर्थ यांच्या जलांत स्नान, भस्म अथवा गोपीचंदन यांचें धारण, द्विजांनी संध्या करणें, औपासन होम, स्वाध्याय, ब्रह्मयज्ञ, पंचमहायज्ञ, देवपूजा, भोजन, तांबूलभक्षण, द्रव्यार्जन, इतिहासपुराणांचें श्रवण, देवदर्शन, रात्रिभोजन, झोपण्यापूर्वी रात्रिसूक्ताचें पठण, नित्य कांहीतरी दान देणें व विशिष्टकालीं यज्ञ करणें, इ. कृत्यें आह्निक या सदरांत येतात. आह्निकांत न्यूनाधिक्य झाल्यास विष्णुस्मरणरूप प्रायश्चित करावें लागतें. पाराशरस्मृतींत द्विजांचीं महत्वाचीं आह्निक कर्में पुढीलप्रमाणें सांगितलीं आहेत.—

सन्ध्या स्नानं जपो होमो देवतातिथिपूजनम् ।
आतिथ्यं वैश्वदेवं च षट् कर्माणि दिने दिने ।।

(१. ३९)

आह्निक म्हणजे नित्यनेम. तो न चालवितां जीवन जगणें हें पशुवत् होय. मनावर नित्य शुभ संस्कार होत राहावे व माणसाला सर्वकाळ ईश्वराचें स्मरण राहावें, या उद्देशानेच आह्निकाची योजना केलेली आहे. [हि. ध.; ध. सिं.]

आळंदी महाराष्ट्रांतलें एक क्षेत्र. पुण्यापासून सुमारें तेरा मैलांवर इंद्रायणीच्या तीरीं आळंदी हें गांव वसलेलें आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधीमुळे आळंदीला जास्त महत्त्व प्राप्त झालेलें असलें, तरी त्यापूर्वीं एक शिवपीठ म्हणून आळंदीचा महिमा गाजत होता. पुराणांत आळंदीला सिद्धक्षेत्र म्हटलेलें असून 'आजहि इंद्रायणीच्या पात्रांत 'सिद्धबेट' नांवाचें एक स्थान दाखवितात. या सिद्धबेटाशीं अनेक सिद्ध पुरुषांचा संबंध होता. आळंदींत सिद्धेश्वराचें एक मंदिरहि आहे.

स्कंद पुराणाच्या सह्याद्रि खंडांत आळंदीचीं आनंदविपिन, वारुण, कपिल, अलका व सिद्धक्षेत्र अशीं पांच नांवें आहेत. संतांच्या अभंगांत अलंकापुरी, अलंकापूर, अलंकावती या नांवांनी आळंदीचा उल्लेख येतो. कृष्णराज राष्ट्रकूटाच्या, शके ६९० च्या, तळेगांव येथील ताम्रपटांत आळंदीचा 'अलंदिय' असा उल्लेख सांपडतो, तो आळंदी या रूढ नांवाशीं जुळता आहे.

आजमितीस आळंदीला भक्तभाविकांची जी गर्दी जमते, ती



ज्ञानेश्वरांची समाधि — आळंदी

ज्ञानेश्वरांच्या समाधीच्या दर्शनासाठी. कार्तिक वद्य त्रयोदशी शके १२१८ रोजी ज्ञानेश्वरांनी इथे जीवत्समाधि घेतली. ही समाधि देऊळवाड्यांत आहे.

समाधीचें द्वार सिद्धेश्वरापुढील नंदीच्या खाली असल्याचें सांगतात. समाधीच्या मागे विठ्ठलरुक्मिणीच्या मूर्ती आहेत. ज्ञानेश्वरांचें समाधिमंदिर इ. स. १५७० मध्ये पुरंदरच्या आंबेकर देशपांड्यांनी बांधलें. भजनी मंडपाचें बांधकाम शिंद्यांचे दिवाण रामचंद्र मल्हार शेणवी यांनी इ. स. १७६० सालीं केलें. समाधीच्या नित्य-नैमित्तिक उपासनेच्या खर्चाची तरतूद पेशव्यांनीं केली होती. पुढे १८५२ सालीं देवस्थानाची व्यवस्था पाहण्यासाठी आळंदी संस्थान कमिटी स्थापन झाली.

ज्ञानेश्वरांच्या समाधीशिवाय गणपति, मुक्ताबाई, सिद्धेश्वर

यांचीं मंदिरें, अजानवृक्ष व सोन्याचा पिंपळ, आणि केसरी-नाथ, भोजलिंग काका, लक्ष्मीनाथ, जोगमहाराज, मल्लाप्पा वासकर इ० पुरुषांचीं समाधिस्थानें व चांगदेव भेटीला आला असतां ज्ञानेश्वरांनी चालविलेली भिंत इ. स्थळें दर्शनीय आहेत.

दर एकादशीला इथे वारकऱ्यांचा व भक्तांचा मेळावा जमतो. कार्तिक वद्य एकादशीला भरणारी यात्रा फार मोठी असते. यात्रेकरूंसाठी इथे अनेक प्रशस्त धर्मशाळा बांधलेल्या आहेत. पाहा– ज्ञानेश्वर. [ज्ञा. मा.]

आळवंदारस्तोत्र आळवंदाररचित एक स्तोत्ररत्न. यांत ७० श्लोक असून आत्मसमर्पणाच्या सिद्धान्तांचें मनोरम वर्णन आहे–

न धर्मनिष्ठोऽस्मि न चात्मवेदी
न भक्तिमांस्त्वच्चरणारविन्दे ।
अकिञ्चनोऽनन्यगतिः शरण्यं
त्वत्पादमूलं शरणं प्रपद्ये ।।

अर्थ–मीध र्मनिष्ठ नाही, तसाच आत्मज्ञानीहि नाही. तुझ्या चरणकमलाच्या ठिकाणीं मी भक्तिमानहि नाही. मी अकिंचन आहे. मला अन्य गति नाही. (म्हणून) मी शरण्य अशा तुझ्या पादमूळीं शरण येत आहे.

रामानुजांच्या संप्रदायांत या स्तोत्राला फार मान आहे. [भा. सं.]

आळवर तमिळनाडमधील एक जात. हे स्वतःला तिरुप्पान आळवर याचे वंशज मानतात. [का. ट्रा. स. इं.]

आळवार तमिळनाडमधील वैष्णव संत व कवि. द. भारतां-तल्या वैष्णव पंथांत दोन मुख्य भेद आहेत– एक आचार्यपरंपरा मानणारा व दुसरा आळवारपरंपरा मानणारा. आचार्य असंख्य आहेत; पण आळवारांची संख्या फक्त बारा आहे. आळवार याचा अर्थ भक्त किंवा परमेश्वराच्या प्रेम-सागरांत बुडून गेलेला असा आहे. हे आळवार निरनिराळ्या काळीं व निरनिराळ्या स्थळीं जन्मले. त्यांचीं नांवें व काल यांचें कोष्टक पुढीलप्रमाणे ––

	नांव	काल- (ख्रिस्तपूर्व)
१	पोइगई – आळवार	४२०३
२	भूतत्तार – आळवार	४२०३
३	पेइ – आळवार	४२०३
४	तिरुमळिसै – आळवार	४२०३
५	नम्म – आळवार	३१०२
६	मधुरकवि – आळवार	३१०२
७	कुलशेखर – आळवार	३०७५
८	आंडाळ – आळवार	३०५६
९	पेरी – आळवार	३००५
१०	तोंडरडिपोड्डि – आळवार	२८१४
११	तिरुप्पाण – आळवार	२७६०
१२	तिरुमंगयी – आळवार	२७०६

वर दिलेल्या आळवारांचे काल हे तमिळ ग्रंथांवरून घेतलेले आहेत. पण ते विश्वसनीय मानणें कठिण आहे. मात्र, त्यांचा अनुक्रम बरोबर आहे. पहिले चार आळवार प्राचीन असून त्यांची विशेष माहिती उपलब्ध नाही. पुढचे पांच मध्ययगीन असून त्यांची माहिती थोडीबहुत सांपडते. शेवटचे तीन आळ-वार ऐतिहासिक या सदरांत येतात. महत्त्वाच्या दृष्टीने या सर्व आळवारांत नम्माळवार हा पहिला ठरतो.

'प्रबंधम्' नांवाच्या तमिळ ग्रंथांत या सर्व आळवारांच्या गीतांचा संग्रह झालेला आहे. तमिळनाडमधील वैष्णवपंथांत गीतेइतकाच 'प्रबंधम्'ला मान आहे. चार हजार पद्यांचा हा संग्रह असून यांतलीं सर्वांत अधिक म्हणजे १३६१ एवढीं पद्यें तिरुमंगयी आळवारच्या नांवावर आहेत. त्याच्या खालोखाल नम्माळवाराचीं आहेत.

आळवार हे बहुंशीं गूढगुंजनवादी संत होते. त्यांनी भक्तीला लोकप्रियता मिळवून देण्यासाठी तिला नवीन दिशा दाख-विली. ही दिशा म्हणजे संपूर्ण शरणागति होय. पांचरात्र हा भक्तीचा संप्रदाय आहे. त्याचें एक खास तत्त्वज्ञान आहे. त्यांत वासुदेव, व्यूह, विभव, अंतर्यामी व अर्चा अशीं परमा-त्म्याचीं पांच रूपें मानलीं आहेत. आळवारांना तीं मान्य आहेत. मात्र त्यांचा विशेष भर अर्चावर (शुभाश्रय) आहे. आळवारांनी वेद व आगम यांच्या तत्त्वज्ञानांत समन्वय घडवून आणला व परमेश्वराकडे नेणाऱ्या साधनांची व्याख्या केली. श्रीव्यंकटनाथाने आळवारांच्या भक्तीवर लिहितांना म्हटलें आहे, की त्यांची भक्ति देवाला सर्वभावें शरण जाण्याची असून भक्तीच्या वाच्यार्थाहून ती वेगळी आहे. आळवारांचा भक्तिमार्ग दिसायला सोपा असला, तरी तो दुष्कर आहे. त्याला बुद्धीची जोड लागते. ती बुद्धि प्राचीन ग्रंथांतील भक्तीचे मार्ग जाणण्यासाठी व संतांचा सदुपदेश श्रवण करून तो चित्तांत ठसविण्यासाठी उपयोगी पडते.

आळवारांचा भक्तिमार्ग हा सार्वजनिक आहे. तो जातपात किंवा वर्णाश्रम यांच्या मर्यादा मानीत नाही. जो ईश्वराला पूर्णपणे शरण जातो, तो कोणत्याहि जातीचा वा धर्माचा

असो; परमेश्वर त्याचा उद्धार व रक्षण करतो. ईश्वर सर्वव्यापी असून तो माणसांत तसाच सृष्टींतील सर्व वस्तूंत वास्तव्य करीत आहे. म्हणून मानवाने आपलें शरीर हें देऊळ आहे, असें समजून त्याची अंतर्यामीं भक्ति करावी. हाच सिद्धान्त गीतेने सांगितला आहे, अशी आळवारपंथी वैष्णवांची धारणा आहे.

रामानुजाचार्यांनी आळवारांच्या या संपूर्ण शरणागतीवरच आपलें प्रपत्तीचें तत्त्वज्ञान मांडलें आहे. भक्तियोगांत वर्ण आणि आश्रम यांच्या दृष्टीने कांही मर्यादा आहेत; पण प्रपत्तींत त्या नाहीत. प्रपत्तीला अन्य गुणांची जरुरी नसते आणि हाच तिचा मोठा गुण आहे. प्रपत्ति ही मानवाला केवळ ज्ञानी किंवा अतिमानव सिद्ध बनविते. इतकेंच नव्हे; तर त्याला जळीं-स्थळीं ईश्वराच्या साक्षात्काराचा आनंद मिळवून देते.

आळवार हे निरनिराळ्या वैष्णव-क्षेत्रांच्या यात्रा करून स्वतः भक्तीचें सुख घेत होते व इतरांनाहि देत होते. श्रीरंगम् व इतर प्रमुख वैष्णव देवस्थानें यांतून आळवारांच्या मूर्ती दिसतात. रामानुजाचार्यांच्या आदेशावरून त्यांची स्थापना झाली, अशी समजूत आहे. आळवारांत सर्व जातींचे लोक दिसतात. त्यांत ब्राह्मण आहेत, तसेच शूद्रहि आहेत. आंडाळ ही एक स्त्रीहि त्यांच्यांतच गणली गेली आहे. दक्षिणेंतील वैष्णवांना आळवार हे आचार्यांपेक्षां श्रेष्ठ वाटतात. कारण ते आचार्यांपेक्षा प्राचीन आहेत व जीवन्मुक्त विभूति आहेत. आजवर उपलब्ध झालेला ऐतिहासिक पुरावा लक्षात घेतां असें दिसतें, की आळवार हे पल्लवांच्या काळांत आणि चोलांचें राज्य येण्यापूर्वीं होऊन गेले. [के. सी. वरदाचारी; एन्शंट इंडिया अॅण्ड साऊथ इंडियन् हिस्ट्री अॅण्ड कल्चर– डॉ. एस्. कृष्णस्वामी अय्यंगार].

आळवी


एक प्राचीन नगर. कोशल साम्राज्याच्या राजधानीचें ठिकाण. हें श्रावस्तीपासून तीस व वाराणशीपासून बारा योजनें दूर होतें. श्रावस्ती व राजगृह यांच्यामध्ये हें येत असे. याच्या जवळच 'अग्गाळव चेतिय' नांवाचा विहार होता. बुद्ध कांही काल तिथे राहिला होता. [हि. जॉ. ए. इं.]

आज्ञाचक्र

योगविद्येंत सांगितलेलें भ्रूमध्यस्थित चक्र. योगमार्गांत गुरूची आज्ञा याच ठिकाणीं ग्रहण केली जाते, म्हणून याला आज्ञाचक्र म्हणतात. याच्याच अंतर्गत मानसचक्र आहे–

एतत्पद्मान्तराले निवसति च मनः
सूक्ष्मरूपं प्रसिद्धम् ॥

अर्थ – आज्ञाचक्राच्या अंतराळांत सूक्ष्मरूप मन वास्तव्य करतें.



आज्ञाचक्र

हें द्विदल पद्म असून त्याच्या दोन पाकळ्यांवर हं व क्षं हे वर्ण असतात. ॐ हें त्याचें बीज, हंसरूप परम शिव ही देवता व डाकिनी ही शक्ति आहे. याच्या त्रिकोण-योनींत आत्मा ज्योतीप्रमाणे तळपतो. [गुरुदत्त योग; स. पॉ.]

आज्ञापत्र

रामचंद्रपंत अमात्यप्रणीत स्वराज्यनीतीवरचा ग्रंथ. हा ग्रंथ इ. स. १७१६ सालीं आज्ञापत्राच्या स्वरूपांत लिहिलेला आहे. आज्ञापत्र म्हणजे शासनपत्र, राजाज्ञापत्र किंवा लिखित आज्ञा होय. छत्रपति द्वितीय संभाजीने रामचंद्रपंत अमात्यांना उद्देशून हे आज्ञा पत्र लिहिलें आहे व त्यांत द्वितीय संभाजीने अमात्यांना त्यांचे राजनैतिक विचार राजकुमाराला शिकविण्याचा आदेश दिला आहे, असा प्रास्ताविक भाग ग्रंथारंभीं आहे. शिवाजीच्या स्वराज्यनीतीवरील हा सूत्रग्रंथ आहे.

या ग्रंथांत एकूण नऊ प्रकरणें असून त्यांत राज्याच्या अनेक घटकांचा फार मार्मिकपणे विचार केला आहे. पहिलीं दोन प्रकरणें प्रस्तावनेसारखीं असून तिसऱ्या प्रकरणांत राजावरील जबाबदारी व त्याच्या राज्यांतील धार्मिक लोक, पुजारी, यती, बैरागी, तपस्वी, पाखंडी, गवई, नर्तक, आंधळे, लंगडे इ. नानाविध लोक, देवळें, मठ, तीर्थें, समाधि इ. संस्था, यांविषयींचीं कर्तव्यें सांगून राजाने खजिना, फौज, शस्त्रास्त्रें इ. संबंधांत कसें सावधान असावें, यासंबंधीं उपदेश केलेला आहे. चौथ्या प्रकरणांत प्रधान अथवा सरकारकून यांची कशी निवड करावी, माणसांची पारख करून त्यांचा संग्रह कसा करावा, याविषयीं उपदेश आहे. पांचव्या प्रकरणांत सावकार व व्यापारी यांचें महत्त्व सांगून इंग्रजांसारख्या घरघेऊ व्यापाऱ्याशीं कसें सावधगिरीने वागावें, त्याचा निर्देश आहे. सहाव्या प्रकरणांत देशमुख, कुळकर्णी इ. वतनदार डोईजड न होतां सेवातत्पर होतील असें वर्तन कसें करावें, त्याचा ऊहापोह आहे. पुढील तीन प्रकरणांत अनुक्रम पूर्वापार चालत आलेल्या वृत्ती, गड-किल्ल्यांचा बंदोबस्त व आरमाराविषयींचें कर्तव्य यासंबंधीं उपदेश आहे.

आज्ञावहा नाडी सहस्रार चक्रांतून जीवात्म्याचा संदेश ही आज्ञाचक्रापर्यंत वाहून नेते. [स. पॉ.]

आज्ञासंक्रांति एक व्रत. एखाद्या संक्रांतीला हें व्रत सुरू करतात. यांत सूर्यपूजा करायची असते. व्रताच्या उद्यापनाच्या वेळीं सूर्याच्या सपरिवार सुवर्णमूर्तीचें दान करतात. सर्वत्र नि:संदिग्ध सत्ता प्राप्त होणें, हें या व्रताचें फल आहे. [हि. ध.]

इंगळ न्हाणें दृष्ट, भूतबाधा वगैरेंचा निरास होण्यासाठी माणसावरून जळते निखारे ओवाळून टाकतात, त्याला इंगळ न्हाणें, असें म्हणतात.

इंझवार भंडारा व बालाघाट जिल्ह्यांतील एक जात. वैनगंगेच्या खोऱ्यांत राहून हे लोक शेतमजुरी व मासेमारी हे धंदे करतात. इंझवार हें विंझवार या शब्दाचें अपभ्रष्ट रूप झालें व पुढे इंझवार ही वेगळी जात बनली. यांच्या आसपास राहणाऱ्या मराठीभाषी लोकांकडून यांनी बऱ्याच सामाजिक चालीरीती उचलल्या आहेत. हे लोक विंध्यटेकड्यांमधील विंध्यदेवीची पूजा करतात. महाराष्ट्रांतील गोवारी लोकांशीं इंझवारांचा संबंध आहे. इंझवारांनाच कांहीं वेळा दूध-गोवारी असेंहि म्हणतात. याचें कारण असें, की एक इंझवार स्त्री गोवाऱ्यांच्या मूळ पुरुषाची दाई होती. इंझवार लोकांत गोवारी रक्ताचें मिश्रण झालें असण्याचीहि शक्यता आहे. इंझवार लोक गोवाऱ्यांना आपल्यापेक्षां वरच्या दर्ज्याचे मानतात आणि त्यांच्या हातचें अन्नपाणी ग्रहण करतात. इंझवारांची कांही कुलनामें गोंड लोकांकडून घेतलेलीं आहेत. यावरून त्यांच्यांत गोंड रक्ताचेंहि मिश्रण असावें, असें वाटतें. इंझवार हे गोंड, गोवारी व विंझवार किंवा बैगा या जातींच्या संकराने निर्माण झाले असावे.

इंझवारांच्या एकूण चार उपजाती आहेत. त्यांचीं नांवें लांजीवार, कोर्रे, चांदेवार आणि सोंझरिया अशीं आहेत. सोंझरियांचीं मेस्राम, टेकाम, मरई व उक्य हीं कुलनामें गोंडांमधून आलेली आहेत. इतर कांही उपजातींपैकी एका जातीचें नांव पीठवाल्या असें आहे. पौनिपत ही दुसरी उपजात कमळाला व त्याच्या पानाला स्पर्श करीत नाही. कमळ उगवलेल्या तळ्यांतील पाणीहि पीत नाही. यांच्या आणखी एका उपजातीचें नांव दोबकरिया रावत असें आहे. कारण हे लोक देवाला दोन बकरीं अर्पण करतात. सोनवाणी या उपजातींत पौनपत सोनवाणी, गुढीवाल, सती सोनवाणी, मुंगफाटिय सोनवाणी, असे आणखी पोटप्रकार आहेत. या पोटप्रकारांत परस्पर विवाहसंबंध होत नाहीत.

विवाहप्रथा – यांच्यामध्ये एकाच कुलांतील स्त्री-पुरुषांत विवाह होत नाहीत. त्याचप्रमाणे दोघां भावांचा दोघी बहिणींशीं विवाहहि निषिद्ध आहे. साधारणपणे मुलगी वयांत आल्यावर तिचें लग्न होतें. वरपिता वधूला मागणी घालण्यासाठी वधूगृहीं जातो व वधूपित्याला तो संबंध पसंत असेल, तर तो वरपित्याचे पाय धुवून आपली संमति व्यक्त करतो. साधारणपणें वधूशुल्क म्हणून २० रुपये देण्याची पद्धत आहे. वर विधुर असेल, तर मात्र हें शुल्क वाढतें. वधूवरांवर अक्षता टाकल्या, की विवाहविधि पुरा होतो. घटस्फोट व पुर्नविवाह यांची चाल आहे. प्रथमवराला विधवेशीं लग्न कर्तव्य असेल, तर आधी रुईच्या झाडाशीं त्याचा विवाह करतात.

मर्तिकाची प्रथा – प्रेतें पुरतात. मृताची उत्तरक्रिया करतात. मृताचा आतमा पुढच्या जन्मीं कोणत्या योनींत प्रवेश करणार, हें ठरविण्याची यांची एक पद्धत आहे. मृताच्या थडग्याजवळ रात्रीच्या वेळीं कसलें तरी पीठ पसरून ठेवतात आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यावर कोणाच्या पावलांचा ठसा उमटला आहे, तें पाहतात. तो मनुष्याचा, पशूचा अथवा पक्ष्याचा असेल, त्याप्रमाणे मृतात्म्याने तो जन्म घेतला, असें मानतात. अक्षय्य तृतीयेला व कार्तिक महिन्यांत असें दोनदा पितृतर्पण करतात. त्यावेळीं मृत पुरुषासाठी एक मोठा मातीचा घडा पाण्याने भरून ठेवतात. घड्याच्या पुढे दिवा तेवत ठेवतात आणि माळी पुरुष किंवा स्त्री यांना जेवूं घालतात.

बहुतेक इंझवार शेती किंवा शेतमजुरी करतात. त्यांच्यापैकी सोंझरिया इंझवार नदींतून सोनें काढण्याचा धंदा करतात. चांदेवार स्त्रिया सुईणीचें काम करतात. चांदेवार लोक साप, सुसरी इ. प्राण्यांचें मांसहि खातात. ब्राह्मण, धीमर, माळी व गोवारी या जातींतल्या लोकांना हे आपल्या जातींत घेतात. त्यांनी ५ ते १५ रुपये दिले आणि ज्ञातिभोजन घातलें म्हणजे झालें. जातींत येणारा पुरुष असो वा स्त्री असो, त्यांना क्षौर करावें लागतें. इंझवार स्त्रीने किंवा पुरुषाने अन्य जातींतील पुरुषाशीं किंवा स्त्रीशीं संबंध ठेवल्यास ज्ञातिभोजन दिल्याने त्यांना माफी मिळते. मात्र ती जात अगदी कनिष्ठ प्रतीची असतां कामा नये. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

इंद परब मुंड लोकांचा एक उत्सव. ज्या गांवाचा जमीनदार नागवंशी असतो, त्या गांवांत आद्य नागवंशी जमीनदाराच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा उत्सव करतात. त्यासाठी

सालवृक्षाचे दोन खांब जमिनींत पुरून त्यांवर एक आडवें लाकड बसवितात. लांकडावर मध्यभागीं एक उंच खांब उभारतात. या खांबाला इंद खांब असें म्हणतात. त्याच्या टोकावर मोहरमच्या ताबूतासारखी सजावट करतात व जमीनदाराने दिलेलें शुभ्र वस्त्र त्यावर पसरतात. सातव्या दिवशीं हा इंद खांब उतरवितात. पहिल्या दिवशीं ग्रामपुरोहित या खांबाजवळ बकरा बळी देतो व शेवटच्या दिवशीं देवांना मद्याचा नैवेद्य दाखवितो.

इंदिरा एकादशी भाद्रपद कृ. ११ शीला हें नांव आहे. या व्रताने पितरांचा उद्धार होतो. व्रताची कथा अशी– इंद्रसेन नांवाचा एक राजा होता. त्याच्या सभेंत एक दिवस नारद आला. त्याने राजाला सांगितलें, की 'तुझा पिता यमलोकांत खितपत पडला असून त्याने आपल्या उद्धारासाठी तुला इंदिरा एकादशीचें व्रत करायला सांगितलें आहे.' राजाने तें व्रत केलें व त्याचा पिता स्वर्गलोकीं गेला. [प. पु. उ. खं. ५८]

इंदी मुंड लोकांचा एक सण. भाद्रपद महिन्यांत करम सणाच्या दुसऱ्या दिवशीं म्हणजे वद्य १२ शीला किंवा भाद्रपद पौर्णिमेनंतर आठ दिवसांनी हा सण येतो. कांही ठिकाणीं दसऱ्याच्या दिवशींहि हा सण पाळतात. दसऱ्याच्या सणाला 'दसाइ इंदी' म्हणतात. गांवांत इंदीसाठी एक उंच जागा राखून ठेवलेली असते. त्या जागेंत एक भक्कम लाकडी चौकट बसवितात. इंदीच्या दिवशीं या चौकटीला लागून एक उंच खांब उभा करतात. पहन (ग्रामप्रमुख) त्या खांबाजवळ चंडी बोंगाला एक कोंबडा अथवा बकरा बळी देतो. या दिवशीं पिकांना इंदीची नजर बाधूं नये, म्हणून शेतांत एका उंच काठीला करेबांचा तुरा बांधतात. दुपारीं पहनाच्या घरापासून मिरवणूक निघते. मिरवणुकींत एक गवताचें आसन असतें व त्यावर बावटा असतो. मिरवणूक त्या पुरलेल्या खांबाजवळ आल्यावर मिरवणुकींतील तें आसन खांबाजवळच्या लाकडी चौकटीवर ठेवतात. नंतर सगळेजण त्या आसनाच्या गवताचे तुरे चुंबून ते खांबावर फेकतात. तसें केल्याने पिकें चांगलीं येतात, अशी समजूत आहे. खांबावर उभारलेला बावटा ज्या दिशेला फडकेल, त्या दिशेला पिकें चांगलीं येतील, असें मानतात.

दुपारीं खांबाजवळ सर्व लोक जमून नृत्य करतात. नाचणारे आंगभर पिसें लावतात. या मेळाव्यांत तरुण–तरुणी भाग घेतात व एकमेकांची थट्टामस्करीहि करतात. थोडक्यांत म्हणजे हा सण जसा धान्योत्सव आहे, तसाच तो अविवाहित तरुण–तरुणींचाहि आहे. [एन्सा. मुं.]

इंदुव्रत साठ संवत्सरव्रतांपैकी अठ्ठावन्नावें व्रत. व्रत करणारा दिवसभर उपवास करतो व सायंकाळीं एका दांपत्याची वस्त्राभरणांनी पूजा करतो. वर्षअखेर एक गाय दान देतो. व्रताचें फल– मोक्षप्राप्ति. [कृ. क.; हि. ध.]

इंद्र (१) वैदिक आर्यांची सर्वश्रेष्ठ व पराक्रमी देवता. ऋग्वेदांतील एकूण सूक्तांच्या एक चतुर्थांश सूक्तें इंद्र विषयक आहेत. यास्काने इंद्र शब्दाची व्युत्पत्ति अनेक प्रकारें दिली आहे–

इन्द्रः इरां दृणातीति वा । इरां ददातीति वा । इरां दधातीति वा । इरां दारयत इति वा । इरां धारयत इति वा । इन्दवे द्रवतीति वा । इन्दौ रमत इति वा ।

(नि. १०.८)

अर्थ–इंद्र बीं फोडून धान्य बाहेर काढतो किंवा तो अन्न देतो किंवा तो अन्न धारण करतो किंवा पृथ्वीला भेगा पाडतो किंवा पृथ्वीला धारण करतो. इंद्र सोमपानासाठी धावत सुटतो किंवा सोमांत रमतो.

'इदमदर्शम्' (हें पाहिलें) यावरून इदंद्र हें नांव व त्यावरून पुढे इंद्र हें नांव रूढ झालें, असें ऐतरेयोपनिषद् सांगतें (३.१३.१४).

वैदिक इंद्रवर्णनांत त्याचा स्वभाव व आकृति हीं एखाद्या मानवी वीराला साजेशीं रंगविलीं आहेत. इंद्राच्या पित्याचें नांव द्यु असून आईचीं नांवें अनेक आहेत व त्यांपैकी अदिति हें एक आहे. आपल्या मातेच्या उदरांत इंद्र एक हजार महिने व असंख्य वर्षें राहिला होता (ऋ. ४.१८.४). त्याचप्रमाणे निसर्गसिद्ध मार्गाने जन्माला न येतां तो मातेच्या पार्श्वांतून जन्मला (ऋ. ४.१८.१–२). जन्मल्याबरोबर त्याने पराक्रम गाजवायला सुरवात केली व पृथ्वी आणि आकाश हीं दोन्हीं आपल्या तेजाने भरून टाकलीं. इंद्राचा वर्ण हिरण्यासारखा असून त्याचे केस व श्मश्रु हीहि हिरण्यवर्णाचींच आहेत. त्याचे बाहु दीर्घ आहेत. दोन हरितवर्ण घोडे जोडलेल्या रथांत बसून तो संचार करतो. हा रथ त्याला ऋभूंनी तयार करून दिला. वज्र हें याचें आयुध असून त्वष्टयाने दधीचीच्या अस्थींपासून तें बनविलें (५.३१.४). दुसऱ्या ठिकाणीं इंद्राचें हें वज्र 'आयसम्' म्हणजे कोणत्या तरी धातूचें केलेलें आहे व त्याला चार किंवा शंभर कोन आणि सहस्र अग्रें आहेत, असें म्हटलें आहे (ऋ. ४.२२.२; ४.१७.१०; ८.६.६).

याच्या पत्नीचें नांव इंद्राणी आहे (ऋ.१०.८६). याशिवाय सीता नांवाची याला एक पत्नी असल्याचाहि उल्लेख आहे



इंद्र–इंद्राणी – दिलवाडा

(पार. गृ. सू. १७.९). इंद्राला सोमाबद्दल अत्यंत आसक्ति आहे. त्यामुळे 'सोमपा' हें विशेषण त्याचेंच निदर्शक बनलें आहे. सोमपान करून उन्मत्त झाल्यावर तो स्वर्ग व पृथ्वी यांच्याहि कक्षेबाहेर जातो (ऋ. १०.१००.४.). सोमपान केल्यावर त्याच्या अंगीं अमित उत्साह व शौर्य यांचा संचार होतो व त्या बळावर तो मोठमोठीं वीरकृत्यें पार पाडतो.

इंद्राचा आकार इतका प्रचंड आहे, की पृथ्वी दहापट मोठी झाली, तरच ती त्याच्या आकाराशीं तुळिली जाईल. तो अत्यंत बलाढ्य असून मानवांना व देवांनाहि त्याच्या सामर्थ्याचा अंत लागत नाही. इंद्राचा अग्नि, वरुण, मरुत् इ. देवतांसह संयुक्त रूपाने अनेकदा उल्लेख केलेला आहे. विशेषत: मरुद्गणाशीं त्याचें साहचर्य अनेक वेळां दिसून येतें. म्हणूनच त्याला 'मरुत्वान्' हें विशेष अभिधान प्राप्त झालें आहे. कोणत्याहि मानवापेक्षां किंवा देवापेक्षा इंद्र शक्तिमान् मानलेला आहे.

इंद्राचे अनेक शत्रु ऋग्वेदांत वर्णिले आहेत. शंबर हा त्यांतला प्रमुख शत्रु होय. याशिवाय शुष्ण, बल, पिप्रु, कुयव, अहि, चुमुरि, नमुचि इ. इंद्राच्या अनेक शत्रूंचीं नांवें ऋग्वेदांत आलीं आहेत. वृत्र हा त्याचा दुसरा महत्त्वाचा शत्रु. त्याने जलाला व्यापून टाकलें होतें व त्याच्या प्रवाहाला प्रतिबंध केला होता. तो स्वत:ला अजिंक्य व अमर समजत होता (ऋ. ५.३२.३) व मोठ्या धूर्तपणाने इंद्रापासून लपून राहिला होता. परंतु चाळीस वर्षांनी (चत्वारिंश्यां शरदि) इंद्राने त्याला शोधून काढलें व आपल्या शतपर्व वज्राच्या प्रहाराने त्याचें शिर धडावेगळें केलें–

वि चिद् वृत्रस्य दोधतो वज्रेण शतपर्वणा ।
शिरो बिभेद वृष्णिना ।।

(ऋ. ८.६.६)

अर्थ– (जगाला) हालविणाऱ्या वृत्राचें मस्तक, आपल्या सहस्र धारांच्या शौर्यवर्धक वज्राने छिन्नभिन्न केलें.

सुतार ज्याप्रमाणे झाड तोडतो, त्याप्रमाणे इंद्र ढग विदीर्ण करून वारिधारांना मुक्त करतो (ऋ. ८.१२.६). पर्वतांचें चूर्ण करतो व जलाना प्रवाहित होण्यासाठी मुक्त करतो. याचा ऐतिहासिक अर्थ असा होऊं शकतो, की वृत्राने सप्तसिंधु प्रदेशांतल्या सातहि नद्यांचे प्रवाह रोखून धरले होते. वृत्राच्या वधानंतर त्या सातहि नद्या पुन्हा वाहूं लागल्या.

इंद्र व वृत्र यांच्या युद्धाचें हें वर्णन प्रभावी असून वीररसाचा परिपोष करणारें आहे. वेदांत इंद्रविषयक जीं वर्णनें आलीं आहेत, त्यांत इंद्राचें वृत्राशीं झालेलें युद्ध व त्या युद्धांत इंद्राला मिळालेला विजय, हा त्या सर्वांचा मध्यबिंदु आहे. हा वृत्र म्हणजे नेमका कोण होता, याबद्दल प्राचीन विद्वानांचीं मतें निरनिराळीं असलीं, तरी वृत्र हा मेघ होता, हें निरुक्तकार यास्काचें मत सायणाचार्यांनाहि मान्य आहे.



इंद्र – चिदंबरम्

वृत्र ही एक दैत्यस्वरूप निसर्गशक्ति आहे. ही शक्ति जलाचा अवरोध करते व त्यामुळे पर्जन्यवृष्टि होऊं शकत नाही. परंतु इंद्र आपल्या वज्राने या वृत्राचा नि:पात करतो व जलांचें विमोचन करतो. त्यामुळे मग पर्जन्यवृष्टि होते. इंद्राचें हें वज्र म्हणजे वीज व इंद्र म्हणजे पर्जन्याधिपति देव होय. रोट, मॅक्डोनेल, ओल्डेनबर्ग, इ. पाश्चात्य पंडितांनीहि इंद्र-वृत्रसंघर्षाचा असाच अन्वयार्थ लावलेला आहे; पण डॉ. रा. ना. दांडेकर यांना हें मत मान्य नाही. त्यांचें म्हणणें असें, की या सर्व वर्णनांत मेघ, विद्युत्, घनध्वनि, पर्जन्य हे पावसाशीं संबद्ध असे शब्द प्रत्यक्षपणे केव्हाच उपयोजिलेले नसून नेहमी त्याऐवजी वृत्र,

वज्र, पर्वत, आप, इ. प्रतीकात्मक शब्दांचाच उपयोग केलेला आहे. इंद्रासारख्या प्रमुख देवतेचें असें संदिग्ध वर्णन वैदिक ऋषींनी केलें असेल, हें शक्य वाटत नाही. तेव्हा इंद्र ही पर्जन्यदेवता मानणें हें चूक आहे. इंद्राच्या बहुसंख्य वर्णनांत मानवी धर्म इतक्या स्पष्टपणे प्रत्ययाला येतात, की त्याला एखाद्या निसर्गशक्तीचें प्रतीक न मानतां मानवी वीर मानणेंच अधिक सयुक्तिक ठरेल. डॉ. दांडेकर यांचा इंद्रविषयक सिद्धान्त पुढीलप्रमाणे आहे—

वेदांतील इतर देवतांपेक्षां इंद्र या देवतेच्या वर्णनांत मानवी स्वभावधर्मांचा उपयोग अधिक केलेला आढळतो. वैदिक आर्यांच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनांत इंद्राचा संबंध फार जवळचा व जिवंत आहे. एखाद्या निसर्गशक्तीला देवतास्वरूप दिल्यामुळे इंद्रविषयक दैवतशास्त्रीय कल्पना उद्भूत झाली असें मानलें, तर इंद्राच्या जन्मासंबंधीं जे उल्लेख वेदांत आढळतात, त्यांना आनर्थक्य येईल. याशिवाय इंद्राचें देवपद हें जन्मसिद्ध नव्हतें, तें त्याने स्वपराक्रमाने मिळविलें होतें, असे सूचक उल्लेख ऋग्वेदांत अनेकवार आलेले आहेत. त्यावरून इंद्र ही एक ऐतिहासिक व्यक्ति होती, असें कळून येतें. इंद्राच्या पराक्रमाचें व त्याच्या गुणांचें वर्णन करीत असतांना वैदिक ऋषींनी त्याच्या स्वभावदोषांचेंहि दिग्दर्शन केलें आहे. इंद्राच्या व्यक्तिमत्त्वांत 'मानवा'चा व 'अतिमानवा'चा हृदयंगम संगम झालेला आहे. त्याच्या स्वभाववर्णनांत त्यामुळे एक प्रकारचा जिवंतपणा आढळतो. तें केवळ प्रतीकात्मक वाटत नाही. सोमपान करून मदस्फूर्त झालेल्या इंद्राचें विडंबन वैदिक कवींनी लबसूक्तांत केलें आहे, तें या बाबतींत उद्बोधक ठरेल. इंद्राची सोमविषयक अतिरिक्त अभिलाषा, स्त्रियांविषयीं त्याला वाटणारें विशिष्ट प्रकारचें कुतूहल (ऋ २. १५. ७; ७. ३८. २.), वृषाकपीच्या प्रसादाने झालेलें त्याचें वीर्यवर्धन (ऋ. १०.८६), कांही विशिष्ट प्रसंगीं त्याला वाटलेलें भय (१. ३२. १४), नेहमी त्याच्याशीं एकनिष्ठ राहणाऱ्या मरुतांशीं कांही वेळीं त्याचे उडालेले खटके (१. १७०. २; १. १७१. ६; ८. ७. ३१), या सर्व गोष्टी इंद्र हा मानव होता व तो इतिहास कालांतील पुरुष होता, याच्या द्योतक आहेत. वैदिक दैवतशास्त्राच्या विकासक्रमांतील एका अवस्थेंत त्याने आर्यांची मूळची पर्जन्यदेवता जी त्रित आप्त्य, तिला स्थानभ्रष्ट करून, तिचे कांही स्वभावविशेष आपल्या व्यक्तिमत्त्वांत सामावून घेतले असले पाहिजेत.

या अतिमानवी वीराच्या कोणत्या पराक्रमामुळे त्याला प्रत्यक्ष देव नसतांनाहि देवाधिदेवाचें श्रेष्ठपद प्राप्त झालें व त्याच्या व्यक्तिमत्त्वांत पर्जन्यदेवतेचे कांही स्वभावविशेष कसे शिरले, तें बघण्यासाठी वेदपूर्वकालीन इतिहासाचा मागोवा घेतला पाहिजे.

ज्या एका मानवसमूहांतून आर्य बाहेर पडले, तो मानवसमूह अगदी प्राचीन काळीं उत्तर किरघीज प्रदेशांत एकत्र वास्तव्य करीत होता. या मानवसमूहाला पूर्व-यूरोभारतीय असें नांव आहे. या मानवसमहाच्या सांस्कृतिक इतिहासाच्या अगदी पहिल्या अवस्थेंतच त्याच्यांतून एक टोळी बाहेर पडली व कास्पियन समुद्राच्या उत्तर बाजूने कॉकेशस पर्वत ओलांडून पूर्वीच्या आशिया मायनर या प्रदेशांत येऊन ठेपली. कालांतराने या मूळ यूरोभारतीय मानवसमूहांतून आणखी दोन मोठ्या टोळ्या बाहेर पडल्या. त्यांपैकी एका टोळीने आपल्या मूळ वसतिस्थानाच्या आग्नेय दिशेकडे वळून बल्ख (बाह्लीक) प्रदेशाच्या आसपास वसती केली. या बाह्लीक प्रदेशांत वसाहत केलेल्या टोळीला प्राचीन आर्य किंवा पूर्वार्य असें म्हणतात. या प्रदेशांतच या लोकांनी आपल्या पूर्वार्य भाषेचा व दैवतशास्त्राचा विशिष्ट प्रकारें विकास केला. त्यांची भाषा म्हणजे वैदिक संस्कृत व प्राचीन इराणी भाषा, या भाषांची पूर्वज होय आणि त्यांचें दैवतशास्त्र म्हणजे अवेस्त्यांतील व वेदांतील दैवतशास्त्राचें मूळ होय.

बाह्लीक प्रदेशांत पूर्वार्यांची वसती दीर्घ काळपर्यंत झाली असावी. कारण पुढे पुढे ते लोक आपलें उत्तर किरघीज प्रदेशांतील मूलस्थान विसरले व बाह्लीक प्रदेशालाच आपलें मूलस्थान मानूं लागले. या पूर्वार्यांच्या सांस्कृतिक इतिहासाच्या अगदीं पहिल्या अवस्थेंत त्यांच्यांतून कांही टोळ्या फुटून निघाल्या व आशिया मायनर प्रदेशांत येऊन दाखल झाल्या. या टोळ्या निघून गेल्यानंतर जे लोक शिल्लक राहिले, तेच प्राचीन इराणी व वैदिक भारतीय यांचे पूर्वज होत. यांनाच आर्य असें म्हणतात. पुढे या आर्य लोकांतूनहि निर्गमनें सुरू झालीं. त्यांतील शांतताप्रिय लोक हळूहळू इराणाकडे सरकूं लागले व आर्यांपैकी अधिक साहसी व महत्त्वाकांक्षी होते ते पूर्वेकडे निघाले. या प्रगमनांत त्यांना अनेक विरोधी मानवसमूहांना तोंड द्यावें लागलें. पण आपल्या पराक्रमी नेत्याच्या नेतृत्वाखाली त्यांनी सर्व विरोधी लोकांचा निःपात केला व ते सप्तसिंधु प्रदेशांत येऊन पोंचले. हे आक्रमक लोक म्हणजे वैदिक भारतीय असून त्यांचा नेता म्हणजे इंद्र होय. आर्यांच्या दैवतशास्त्राचें वैदिक भारतीयांच्या दैवतशास्त्रांत स्वरूपांतर होत असतां वैदिक भारतीयांनी आपल्या महान् नेत्याला देवपदीं बसविलें. त्याची अशी सर्वोच्च स्थानीं प्रतिष्ठापना केल्यामुळे वैदिक दैवतशास्त्र इंद्रप्रधान बनलें. राष्ट्रीय नेत्याचा

राष्ट्रीय वीर व राष्ट्रीय वीराची राष्ट्रीय देवता, असा हा दैवतशास्त्रीय विकास सहज आकलनीय आहे. इंद्राचा प्रतियोगी असा देव प्राचीन इराणी लोकांच्या दैवतशास्त्रांत नाही, याचें रहस्य यावरून स्पष्ट होईल. वैदिक भारतीयांच्या या नव्या देवतेने आर्यांच्या असुर वरुण या देवतेला मागे टाकलें.

असुर कल्पनेबरोबरच दुसरी एक कल्पना पूर्वार्यांच्या दैवतशास्त्रांत निर्माण झाली होती; ती म्हणजे 'वृत्र–वृत्रहा'ची. ही कल्पना बहुंशीं अमूर्त स्वरूपाची होती. प्राचीन इराणी लोकांच्या दैवतशास्त्रांत ती तशीच राहिली; पण वैदिक भारतीयांच्या दैवतशास्त्रांत त्या अमूर्त कल्पनेला एक प्रकारचें मूर्त स्वरूप प्राप्त झालें. कारण वैदिक भारतीयांच्या पुढे 'वृत्र' म्हणजे प्रतिबंध मूर्त स्वरूपांत प्रकट झाला होता व त्याचबरोबर त्या मूर्त मानवी प्रतिबंधाचा नाश करणारा वीर नेताहि त्यांच्यांत निर्माण झाला होता. त्या वीरालाच 'वृत्रहा' हें बिरुद विशेषत्वाने शोभण्यासारखें होतें. अशा प्रकारें आर्यांची अमूर्त अशी 'वृत्रहा'ची कल्पना भारतीयांच्या मूर्त अशा इंद्राशीं संबद्ध होऊन मूर्तत्व पावली व 'वृत्रहा इंद्र' निर्माण झाला.

इंद्र या शब्दाचा भाषाशास्त्रीय विचार अनेक विद्वानांनी केला आहे. यास्काने हा शब्द निरनिराळ्या तेरा प्रकारांनी साधलेला आहे, इंद्र म्हणजे सूर्यदेवता या उपपत्तीशीं जुळण्याकरिता 'इंद्र' शब्द 'इन्ध्' या धातूपासून साधण्याचा कांही पंडितांनी प्रयत्न केला आहे. दुसऱ्या कांही पंडितानी 'इंद्र' हा शब्द भाषाशास्त्रदृष्ट्या 'इंदु' शब्दाशीं सदृश असल्याचें सुचवून इंद्राचा पर्जन्यबिंदूशीं किंवा सोमबिंदूशीं संबंध जोडला आहे. डॉ. दांडेकरांनी मात्र इंद्र व इंदु हे दोन्ही शब्द यूरोभारतीय Oid या शब्दाशीं संबद्ध मानून त्या यूरोभारतीय शब्दाचा पुढे विकसित झालेला अर्थ 'वर्धमान पौरुष', 'वर्धमान पुरुषवीर्यबिंदु' असा आहे, असें सांगितलें आहे. इंद्र या नांवाने वैदिक भारतीयांच्या नेत्याच्या पौरुषाचाच गौरव झालेला आहे.

बाल्हीक प्रदेशांत राहत असतांना आर्यांच्या दैवतशास्त्रांत असुर-ऋत कल्पना हीच प्रमुख कल्पना होती. सप्तसिंधु प्रदेशांत आलेल्या आर्यांनी आपलें नवीन इंद्रप्रधान दैवतशास्त्र निर्माण केलें. परंतु त्यांच्यापैकी कांही लोक प्राचीन असुरधर्माशीं एकनिष्ठ राहिले. फलतः वैदिक दैवतशास्त्रांत प्राचीन असुरवरुणप्रधान पंथ व नवीन इंद्रप्रधान पंथ असे दोन पंथ स्पष्टपणे दिसूं लागले. अनेक ऋग्वेदीय सूक्तांत वरुण व इंद्र यांच्यांतील विरोधाचे सूर उमटलेले दिसतात, त्याचें कारण हेंच. परंतु शेवटीं इंद्राने असुरधर्मावर मात केली व तो सर्वश्रेष्ठ देव बनला. अर्थात् कांही ऋषींनी इंद्रधर्म व वरुणधर्म या दोन धर्मांत समेट घडवून आणण्याचाहि प्रयत्न केलेला दिसतो.

वैदिक दैवतशास्त्रांत सर्वश्रेष्ठ स्थान प्रस्थापित केल्यावर इंद्राच्या व्यक्तिमत्त्वांत पुढे आणखी कांही अंश समाविष्ट झाले. 'वृत्रहा' इंद्र प्रथम मानवी 'वृत्रां'चा संहारकर्ता होता. त्यालाच पुढे वैदिक कवींनी निसर्गांतील 'वृत्रां'चा संहारकर्ता बनविलें. इंद्राच्या व्यक्तिमत्त्वांत पर्जन्यदेवतेचे कांही अंश दिसून येतात, त्याचें कारण हेंच आहे.

इंद्राच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासांत आणखी एक पायरी आहे. इंद्र ही मूळची व्यक्ति होती, तिचें दैवतशास्त्रीय संस्थेंत रूपांतर झालें. त्याचप्रमाणें इंद्र-वृत्रसंघर्षाचें ऐतिहासिक स्वरूप नाहीसें होऊन त्याला जेव्हां दैवतशास्त्रीय स्वरूप प्राप्त झालें, तेव्हा त्यासंबंधींच्या कल्पनेचा प्राचीन पुराणांतर्गत अशा दुसऱ्या एका सदृश कल्पनेशीं समन्वय करण्यांत आला. ती कल्पना म्हणजे वीर आणि अहि किंवा सर्पस्वरूपी राक्षस यांच्यामधील संघर्षाची होय. जवळ जवळ प्रत्येक प्राचीन पुराणशास्त्रांत अशा प्रकारची कल्पना दिसून येते. झ्यूस व टायफन, हरक्युलीस व हैड्रा, अपोलो व पायथन, या वीर आणि अहि यांच्या जोडया अन्य प्राचीन पुराणांतहि दिसतात. वैदिक कवींनीहि इंद्र-वृत्र ही अशीच जोडी मानली. ऋग्वेदांत वृत्राला व इंद्राच्या इतर शत्रूंना 'अहि' असें संबोधिलें आहे, त्याचें कारण हेंच आहे. वैदिक आर्यांच्या दैवतकथाशास्त्राची उभारणी मुख्यत्वें इंद्रकथांवर झालेली आहे.

ऋग्वेदांतील इंद्रकथा गतिशील आहेत. इंद्राची देवप्रमुख म्हणून प्रतिष्ठापना करणें हेंच या कथांचें प्रयोजन आहे. ऋग्वेदांत इंद्रविषयक पुढील कथाबीजें आढळतात – अंगिराने स्फूर्ति दिल्यामुळे याने वलाला ठार केलें (ऋ. २. १५. ८). सूर्याचें चक्र फेकून एतशाला वांचविलें (ऋ. ४. १८. १४). दशद्यूचें व श्वित्राच्या गायींचें संरक्षण केलें (ऋ. १. ३३. १४–१५). अपालेचें कोड घालविलें (ऋ. ८. ९१.). नेम नांवाचा ऋषि इंद्राच्या अस्तित्वाविषयीं शंका घेऊं लागला असतां याने त्याला आपण प्रत्यक्ष असल्याचें दाखविलें (ऋ. ८. १००).

इंद्राच्या पौराणिक कथांचा संभार फार मोठा आहे. पुराणांत देव म्हणून इंद्राला मुख्य स्थान नसलें, तरी ब्रह्मा-विष्णु-महेशांच्या खालोखाल याचा क्रमांक लागतो. याला पूर्व दिशेचा, स्वर्गाचा व अंतरिक्षाचा अधिपति मानलेलें आहे. अमरावती ही याची नगरी असून नंदन नांवाचें याचें उद्यान आहे. गंधर्व

व अप्सरा यांचा समुदाय याचा मनोविनोदक आहे. उच्चैःश्रवा हा याचा घोडा आहे. जयंत हा याचा पुत्र आहे. इंद्राची नित्यपूजा होत नसली, तरी इंद्रध्वज उत्सवांत याच्या पूजेचें विधान आहे.

इंद्राचे पौराणिक कथासंदर्भ पुढीलप्रमाणे ––

याने गौतमपत्नी अहल्या हिच्याशीं जारकर्म केलें. रुक्मांगदाच्या वेषाने त्याची पत्नी मुकुंदा हिच्याशींहि संभोग केला (गण. पु. १. ३६-४०). विश्वरूप, वृत्र व नमुचि यांना ठार केल्यामुळे ब्रह्महत्त्या पाठीस लागली, तेव्हा हा कमळांत दडून बसला. पुढे ही ब्रह्महत्त्या भूमि, वृक्ष, जल व स्त्री यांच्या ठिकाणीं विभागून दिल्यामुळे हा पापमुक्त झाला. दुर्वास व बृहस्पति यांचा अवमान केल्यामुळे हा ऐश्वर्यभ्रष्ट झाला. समुद्रमंथनांतून चौदा रत्नें निघालीं, त्यांतलीं चार याला मिळालीं. त्यानंतर असुरांचा पराभव होऊन याला पुनश्च स्वर्गाचें आधिपत्य मिळालें (भाग. पु. ६. ९). एकदा इंद्र अंगुष्ठमात्र असलेल्या वालखिल्य ऋषींना तिरस्काराने हसला. त्यामुळे ते दुसरा इंद्र निर्माण करण्याच्या उद्योगास लागले. तेव्हा कश्यपाला मध्यस्थ घालून याने त्यांचा राग शांत केला (म. भा. आदि. ३०). शर्यातीने केलेल्या यज्ञांत अश्विनीकुमारांना हविर्भाग मिळूं नये, म्हणून याने च्यवनावर वज्र उगारलें. पण च्यवनाच्या सामर्थ्यापुढे त्याचें कांही न चालल्यामुळे त्याला अश्विनीकुमारांचा हविर्भाग मान्य करावा लागला.

प्रत्येक मन्वंतरांत कोणीतरी इंद्र असतोच. ‘भूर्भुवः स्वः’ या तीन लोकांचें तो आधिपत्य करतो. शंभर यज्ञ करणाऱ्याला इंद्रपद लाभतें. इंद्राचें शतक्रतु हें नांव त्यावरूनच पडलें आहे. म्हणून इंद्र कोणाचेहि शंभर यज्ञ पुरे होण्याच्या वेळीं त्यांत विघ्न आणतो. तसेंच कोणी प्रखर तप करीत आहे असें दिसलें, की तो आपणांस पदच्युत करील, या भीतीने अप्सरांना त्या तपोधनाकडे पाठवून त्यांचा तपोभंग करण्याचा प्रयत्न करतो. सप्तर्षी हे त्याचे सल्लागार असून गंधर्व-अप्सरा हें त्याचें वैभव आहे.

भागवतांतल्या गोवर्धन पर्वताच्या आख्यानांत कृष्णामुळे इंद्राला गौणत्व आल्याचें सूचित होतें. वैष्णव संप्रदायाच्या वाढीबरोबर मूळच्या उपेंद्राला म्हणजे विष्णूला महत्त्व येऊन इंद्र मागें पडला, असा तो इतिहास आहे. जैनांच्या दैवतकथांत इंद्राला यक्षाचें स्थान दिलें गेलें आहे. तीर्थंकरांचें जन्ममंगल करणारा एक सेवक, म्हणून तो जैन वाङ्मयांत दिसतो. बौद्ध वाङ्मयांत त्याचें स्थान याहून जरा उंच आहे. जातककथांत तो मानवप्रेमी व दीनबंधु दाखविलेला आहे. संबुला जातकांत तो संबुलेला एका कामुक यक्षाच्या तावडींतून सोडवितो. भूमिया आदिवासी याला पाऊस व आकाश यांचा देव मानतात. तोच त्यांचा मृत्युदेवहि आहे. इंद्राने आईच्या पार्श्वांतून बाहेर यायचें ठरविलें, या कल्पनाबंधावर आधारलेली एक लोककथा मध्यप्रदेशांत सांपडते ती अशी —

कमलपती ही कमळांची देवी. इंद्रराजा तिच्या बरगडींतून निघाला. इंद्राचा मुलगा मौनकुंवर. माळचाची मुलगी रैंभेदेन. त्या दोघांचें लग्न लागलें. वरातीच्या वेळीं माळचाचें ठेंगणें छत मोडलें. इंद्राने तें वर फेंकलें. तेंच इंद्रधनुष्य बनलें.

कातोडी, कुंभार, गोंड यांच्यामध्येहि इंद्रकथा आहेत.

इंद्राची मूर्ति कशी करावी, तें हेमाद्रीने पुढीलप्रमाणे सांगितलें आहे––

शक्रश्चतुर्भुजः कार्यो द्विभुजा च तथा शची ।
पद्माङ्कुशौ च कर्तव्यौ वामदक्षिणहस्तयोः ॥
वामं शचीपृष्ठगतं द्वितीयं वज्रसंयुतम् ।
वामे शच्याः करे कार्या रच्या सन्तानमञ्जरी ॥
दक्षिणं पृष्ठविन्यस्तं देवराजस्य कारयेत् ।

(हे. व्र.)

अर्थ –– इंद्राची मूर्ति चतुर्भुज व शचीची द्विभुज करावी. इंद्राच्या डाव्या-उजव्या हातांत अनुक्रमे कमल व अंकुश असावे. इंद्राचा दुसरा डावा हात शचीच्या पाठीवर टेकलेला व दुसरा उजवा हात वज्रधारी असावा. शचीच्या डाव्या हातांत मंजरी असावी व उजवा हात इंद्राच्या पाठीवर असावा.

इंद्रासंबंधींची आजची सर्वसामान्य कल्पना म्हणजे तो देवांचा राजा आहे ही होय. पण देवांचा राजा असूनहि नित्याच्या देवपूजेंत इंद्राला आज स्थान नाही. शांतिक पौष्टिक कर्मांत एक लोकपाल म्हणून त्याला आहुति मिळते. प्राचीन काळीं रान डुकर हा त्याचा बळि होता. ‘इन्द्राय सूकरम्’ असें तै. ब्राह्मणांत वचन आहे. इंद्रविषयक सण व उत्सव आजमितीस क्वचितच राहिले आहेत. महाराष्ट्रांत इंद्राच्या वांटचाला एकहि सण सांप्रत राहिलेला नाही. बंगालमध्ये मात्र इंद्रपूजा अस्तित्वांत आहे. भाद्रपद शु. चतुर्दशीस तिकडच्या स्त्रिया इंद्रमूर्तीची पूजा करून इंद्राला चौदा फळें व चौदा लाडू यांचा नैवेद्य दाखवितात. चौदा ही संख्या चौदा मन्वंतरांतील चौदा इंद्रांवरून आलेली असावी. सूर्यास्तानंतर मूर्तीचें विसर्जन करतात. [वै. दे. अ. द.; लो. सा. रू.; प्रा. च. को.; वै. मा.]

(२) संस्कृत भाषेचा एक व्याकरणकार. कथासरित्सागराच्या चौथ्या तरंगावरून कळतें, की पाणिनीच्या पूर्वी एक व्याकरणकारांचा संप्रदाय होता. व्याडि, वररुचि व इंद्रदत्त हे त्या संप्रदायांतले प्रमुख होते. हे ऐंद्र व्याकरणकार म्हणून

ओळखले जात. पाणिनीचें व्याकरण पुढे आलें, विद्वन्मान्य झालें व त्यामुळे हा संप्रदाय लुप्त झाला. बर्नेलच्या मतें तोलकाप्पियम् या तमिळ व्याकरणांत ऐंद्र पद्धतीचेंच अनुकरण आहे. पाणिनि, कात्यायन इ. व्याकरणकार प्राचाम्, एके, इ. शब्दांनी ज्या व्याकरणकाराचा उल्लेख करतात, तो हा इंद्रच असावा. इंद्राचा व्याकरणग्रंथ उपलब्ध नाही; पण अभिनव शाकटायनाच्या शब्दानुशासनांत त्याचा उतारा पाहायला मिळतो. बोपदेवहि आपल्या कविकल्पद्रुमांत इंद्राचा उल्लेख करतो. इंद्र व इंद्रगोमी हे दोघे एकच होत. [म. च. को.]

इंद्रकील हिमालयाच्या श्रेणींतील एक पर्वत (भाग. पु. १०. ६. २२). अर्जुनाने वनवासाच्या काळांत याच पर्वतावर तप केलें होतें (म. भा. वन. ३७). इथेच त्याला इंद्रदर्शन झालें.

इंद्रगोप (१) एक रत्न. याचा रंग पोपटाच्या चोंचीसारखा असतो. नर्मदेच्या किनाऱ्यावर पूर्वी हीं रत्नें मिळत असत.

(२) एक किडा. याला मृगाचा किडा असेंहि म्हणतात. हा तांबड्या रंगाचा असतो. हे किडे शेतांत दिसू लागले, की पृथ्वी ऋतुस्नात झाली असें समजतात व ते किडे दिसेनासे होईपर्यंत शेतांत नांगरणी करीत नाहीत.

इंद्रजत्रा नेपाळांतील एक उत्सव. हा इंद्रोत्सव असून तो भाद्रपद महिन्यांत करतात. या दिवशीं नेपाळांतील नर्तक इंद्राचे मुखवटे घालून काळभैरवाला साष्टांग नमस्कार घालतात. जत्रेच्या दिवसांत एका सुंदर मुलीला कुमारिका देवतेचें प्रतीक समजून रथांत बसवितात व तिची मिरवणूक काढतात. ही जत्रा आठवडाभर चालते. इ. स. १७६६ सालीं नेवार राजाचे सैनिक या जत्रेच्या आनंदांत मग्न असतां, गुरखा राजा पृथिवीनारायण याने काठमांडूवर हल्ला करून तें शहर ताब्यांत घेतलें व तिथे आपलें राज्य सुरू केलें.

इंद्रजाल याची व्याख्या अशी– 'इन्द्राणामिन्द्रियाणां जालं आवरकम्' = इंद्र अर्थात् इंद्रियें (ज्ञानेंद्रियें) यांना जें आवरण घालतें, तें इंद्रजाल होय (श. क.). सामान्यतः जादुविद्येला इंद्रजाल म्हणतात. ऋग्वेदांत इंद्राला मायावान् म्हटलें आहे ––

इंद्रो मायाभिः पुरुरूप ईयते

(६. ४७. १८)

अर्थ –– इंद्र आपल्या (नानाप्रकारच्या) अलौकिक माया-शक्तींनी युक्त होऊन सर्वत्र संचार करतो.

भ्रांतिकृत चमत्कार, भलत्यांतून भलतें निष्पन्न करणें, भलत्या जागीं भलती वस्तु आणणें, वस्तु नाहीशी करणें किंवा तिचें रूपांतर करणें, या सर्व गोष्टी इंद्रजालांत येतात. प्राचीन काळीं अशी जादुविद्या ज्याला येत असे, तोच त्या समाजाचा पुढारी होत असे. लोक त्याला भीत व त्याच्या आज्ञेंत वागत.

हें इंद्रजाल प्रथम एक चमत्कार या स्वरूपांत होतें. पुढे त्याला मंत्र-तंत्राची जोड मिळाली व ती अभिचार विद्या म्हणून प्रसिद्धि पावली. जारण, मारण, वशीकरण, स्तंभन, इ. कर्में इंद्रजालविद्येचीं अंगें ठरलीं. **पाहा––** जादुविद्या.

इंद्रदमन उत्तर भारतांतलें एक पर्व. पावसाळ्यांत ज्या-दिवशीं नदीचें पाणी पात्राची मर्यादा ओलांडून वाहूं लागतें, त्यादिवशीं हें पर्व साजरें करतात. प्रयागांत गंगा-यमुनांच्या संगमावर अशा दिवशीं पिंपळाच्या डहाळीने वर्षा-जलाला स्पर्श करतात व त्यादिवशीं इंद्रदमन उत्सव करतात. याला देवदमन असेंहि नांव आहे. [अ. अ.]

इंद्रद्युम्नसर (१) अवंतीचा राजा इंद्रद्युम्न याने उत्कल प्रदेशांतील जगन्नाथक्षेत्रांत अश्वमेध यज्ञ केला होता. या यज्ञाचें अवभृथस्नान त्याने ज्या सरोवरांत केलें, तें इंद्रद्युम्नसर या नांवाने प्रसिद्ध झालें. या सरोवरांत स्नान व श्राद्ध पुण्यकारक मानतात. [ब्रह्म पु. ५१. २९. ३०]

(२) गंधमादन पर्वताच्या दुसऱ्या अंगाला असलेलें एक सरोवर. या सरोवरांतून पावनी नदी उगम पावते, असें ब्रह्मांड-पुराणांत सांगितलें आहे. इथे पंडूने तप केलें, असा महाभारतांत उल्लेख आहे. [हि. ध; पु. इं.]

इंद्रद्वीप भारतवर्षाच्या नवद्वीपांपैकी एक. या द्वीपांत नलिनी नदी समुद्राला मिळते. [पु. इं.]

इंद्रधनुष्य अर्धवर्तुळाकार व सप्तरंगी असा एक चमत्का-रिक देखावा पावसाळ्यांत आकाशांत दिसतो, त्याला इंद्रधनुष्य म्हणतात. सूर्य ज्या दिशेला असतो, त्याच्या विरुद्ध दिशेला हें दिसतें. त्याच्याविषयीं लोकसमजुती पुढील-प्रमाणे आहेत ––

हें इंद्राचें धनुष्य असून पर्जन्याची मुक्तता करण्यासाठी तो तें सज्य करतो. कांही लोक याला सीतास्वयंवरप्रसंगीं रामाने

मोडलेल्या शिवधनुष्याचा तुकडा मानतात. याचें दर्शन कांही ठिकाणीं अशुभ मानतात व संकट टळावें म्हणून मडक्यांवर मडकीं आपटून तीं फोडतात. क्वचित् तें दिसतांच इंद्राची पूजाहि करतात. पावसाच्या कमी–जास्तपणाचीं भविष्यें याच्यावरून वर्तवितात.

इंद्रध्वजोत्सव वैदिक काळीं इंद्र हा आर्यांचा सर्वप्रमुख देव होता. त्याच्या प्रीत्यर्थ प्राचीन काळचे लोक व राजे-महाराजे प्रतिवर्षी एक उंच सोट उभारून त्याचा महोत्सव साजरा करीत. या उंच सोटाला इंद्रयष्टि असें दुसरें नांव होतें. ऋग्वेदांतल्या एका ऋचेवरून या उत्सवाची सूचना मिळते असें बार्नेट प्रभृति पाश्चात्य विद्वान् म्हणतात. (१. १०. १).

या उत्सवाच्या उत्पत्तीसंबंधीं तीन कथा उपलब्ध आहेत––

(१) चेदि देशाचा राजा उपरिचर वसु याने एकदा राज्याचा त्याग करून उग्र तप आरंभिलें. त्या तपाने संतुष्ट होऊन इंद्राने त्याला एक विमान, एक वैजयंती माला व आर्तत्राणासाठी वेळूचा एक दंड, अशा तीन वस्तू दिल्या. वसूने तो आर्तदंड उभारून त्याला जरतारी कपडे वेढले व त्याला इंद्राचें प्रतीक मानून प्रजेसह त्याचा उत्सव केला. तो दिवस वर्षप्रतिपदेचा होता (म. भा. आदि. ६३).



इंद्र व त्याच्या मागे ध्वजधारी–भाजें

(२) असुरांकडून पराभूत झाल्यावर इंद्र ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून विष्णूकडे गेला. विष्णूने इंद्राला एक ध्वज देऊन सांगितलें, की 'या ध्वजाच्या प्रभावाने तुझा विजय होईल.' इंद्राने तो ध्वज फडकावून दैत्यांचा संहार केला. पुढे इंद्राकडून तो चेदिराज वसु याला मिळाला. त्याच्या पूजनाने वसूची भरभराट झाली. (बृ. सं. ४३).

(३) इंद्राने भरताला आपली दिव्य अंगुलि दाखविली त्याला अनुसरून भरताने त्या अंगुलीएवढी इंद्राची आकृति निर्माण केली व तिचा उत्सव केला. (आवश्यक सूत्र–चूर्णि)

भाद्रपद शु. ८ मी ते पूर्णिमा हा या उत्सवाचा काल होय. 'शिलप्पधिकारम्' या तामिळ महाकाव्यांत चैत्रपूर्णिमेपासून पुढें २८ दिवस एवढा याचा काल दिलेला आहे. जैनांच्या स्थानांगसूत्रांत आश्विन शु. ९ मी ते पूर्णिमा हा याचा काल सांगितला आहे. या उत्सवाचें विधान सामान्यतः पुढीलप्रमाणे आहे ––

भाद्रपद शु. ८ मीस मिरवणुकीने वाजत गाजत रानांत जाऊन सांवर, चाफा, अर्जुन, कळंब यांपैकी एक वृक्ष निवडायचा. त्याची पूजा करून प्रार्थना करायची –'हे वृक्षा, तूं आम्हाला इंद्रध्वजासाठी आपला दंड दे.' दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो वृक्ष तोडून त्याचें लांब खोड तासून नगरांत आणायचें. ५२ हात उंचीचा दंड किंवा सोट उत्तम, ३२ हातांचा मध्यम व २२ हातांचा कनिष्ठ मानला जाई. नगरद्वारांत किंवा राजद्वारांत तो ध्वजदंड उभारला जाई. त्याला वस्त्रालंकारांनी नटवीत. त्याच्या मुळाशीं इंद्राची मूर्ति करून बसवीत. त्याची विधियुक्त पूजा करून इंद्राच्या उद्देशाने बलिदानहि करीत. या निमित्ताने नाट्य, नृत्य इ. करमणुकीचे सामुदायिक कार्यक्रम होत. सैनिक आपापलें शस्त्रकौशल्य दाखवीत. मल्ल कुस्त्यांच्या दंगली करीत. द्यूतहि खेळत. भरत म्हणतो, की 'समुद्रमंथन' हें जगांतलें पहिलें नाटक याच उत्सवाच्या निमित्ताने स्वर्गातल्या रंगभूमीवर करण्यांत आलें. ब्रह्मदेवाने तें लिहिलें व गंधर्व आणि अप्सरा यांनी त्याचा प्रयोग केला.

इंद्रध्वज आणतांना वाजतगाजत समारंभाने आणीत; पण विसर्जन करतांना मात्र तो गुप्तपणे अरण्यांत नेऊन टाकीत. विसर्जनासाठी तो नेला जात असतां कोणीहि त्याच्याकडे पाहूं नये, असा समज असल्याचें 'मृच्छकटिक' नाटकावरून कळून येतें (१०. ७). कालिकापुराणांतहि याविषयीं पुढील श्लोक दिलेला आहे ––

उत्थापयेत्तूर्यरवैः सर्वलोकस्य वै पुरः
रहो विसर्जयेत्केतुं विशेषोऽयं प्रपूजने ।।

(का. पु. ६०)

अर्थ –– (इंद्रध्वज) सर्व लोकांसमक्ष वाजतगाजत उभारावा व त्याचें विसर्जन एकांतीं करावें. हा याच्या पूजनाचा विशेष आहे.

शालिवाहन राजांच्या अमदानींत पैठण येथे हा उत्सव करण्याचा प्रघात होता. भाजें येथील शेवटच्या लेण्यांत ऐरावतावर आरूढ झालेला इंद्र व त्याच्या मागे ध्वजधारी पुरुष असें शिल्प कोरलेलें आहे, तें या प्रथेशीं संबद्ध असावें.

शरद् ऋतूंतला हा इंद्रमहोत्सव पावसाळ्यांत पाडलेल्या पावसाबद्दल इंद्राला कृतज्ञता दर्शविणें व शरद् ऋतूंतहि इंद्राने खरीपाच्या पिकांना अधूनमधून वृष्टि करून जीवन द्यावें, या दुहेरी उद्देशाने सुरू झाला असावा. यालाच इंद्रमहोत्सव, इंद्रमह, इंद्रयष्टि, अशीं अन्य नांवें आहेत. [स्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ; गा. स.; हमारे कुछ प्राचीन लोकोत्सव.]

इंद्रनदी भद्र देशांतील एक नदी. [पु. इं.]

इंद्रपद भारताच्या पश्चिमेकडील एक राज्य. यांतून सिंधु नदी वाहते (ब्रह्मांड पु. २. १८. ४८). इंद्रपद गयेंत आहे, असें वायुपुराण सांगतें (१०९. १९). [पु. इं.]

इंद्रपौर्णमासी एक व्रत. भाद्रपद पूर्णिमेस उपवास व तीस दंपतींना भोजन व वस्त्रालंकार देणें, हा या व्रताचा विधि आहे. फल – मोक्ष. [हे. व्र.]

इंद्रप्रमति पैल ऋषीचा शिष्य. पैलाने स्वतःला मिळालेल्या ऋग्वेदाचे दोन भाग करून त्यांच्यांपैकी एक इंद्रप्रमतीला शिकविला. याला मांडूक्य नांवाचा एक शिष्य होता. [प्रा. च. को.]

इंद्रप्रस्थ पांडवांनी स्थापन केलेलें नगर. या नगराला शक्रप्रस्थ, शक्रपुरी, शतक्रतुप्रस्थ व खांडवप्रस्थ अशींहि नांवें आहेत. महाभारतांत इंद्रप्रस्थाचें सविस्तर वर्णन दिलें आहे. द्रौपदीचें स्वयंवर झाल्यावर तिला घेऊन पांडव हस्तिनापुराला यायला निघाले, तेव्हा धृतराष्ट्राला भीति पडली, की आता कौरवांचें व पांडवांचें राज्यासाठी भांडण होईल. म्हणून त्याने विदुराकरवीं धर्मराजाला निरोप पाठविला, की हस्तिनापुराजवळ खांडववन किंवा इंद्रवन नांवाचें अरण्य आहे; तें तोडून तुम्ही तिथे नवें नगर वसवा व राज्य करा. धर्मराजाने त्याप्रमाणे खांडववन जाळून तिथे नवीन नगर वसविलें व त्याला इंद्रप्रस्थ किंवा खांडवप्रस्थ असें नांव दिलें. इथेच युधिष्ठिराने राजसूय यज्ञ केला. हें नगर अत्यंत सुंदर होतें. त्यामुळेच पुढे शिष्टाईच्या वेळीं कौरवांकडे पांडवांनी जीं पांच गांवें मागितलीं, त्यांत या गांवाचा क्रमांक पहिला होता. हें दिल्लीच्या दक्षिणेस एका कोसावर होतें. सांप्रत याला पानिपत म्हणतात.

अर्जुनाने जिथे उभें राहून आपल्या गांडीव धनुष्याने इंद्रप्रस्थ नगरीच्या कोटाचें संरक्षण केलें, तिथे आता किल्लाकोना मशीद आहे.

द्वारका समुद्रांत बुडून जाईल, या भीतीने कृष्णाने यादवांना इंद्रप्रस्थाला नेलें (भाग पु. १०. ५८. १) व श्रीकृष्णाच्या मृत्यूनंतर अर्जुनाने वज्रनामक एका यादवाला इंद्रप्रस्थाच्या गादीवर बसविलें (म. भा. मौसल ७. ७२).

या इंद्रप्रस्थांत इंद्राने अनेक याग केले, विष्णूकडून वर मिळविण्यासाठी अनेक वेळां तपश्चर्या केली व नारायणासमोर ब्राह्मणांना पुष्कळ दानधर्म केला. तेव्हापासून इंद्रप्रस्थ ख्यातनाम झालें, असें पद्मपुराणांत सांगितलें आहे.

धनंजय कोरव्व हा कुरुवंशीय राजा इंद्रपट्टाचा राजा होता व तक्षशिलेच्या विद्यापीठांत अध्ययन केलेला विदुर हा पंडित त्याचा पुरोहित व प्रधान होता, असें जातकांत सांगितलें आहे (६). हा राजा अत्यंत उदार असून त्याने आपला पांढरा हत्ती कलिंग देशांतील ब्राह्मणांना त्यांच्या मागणीवरून दान दिला होता.

हुमायूँ बादशहाने इथे एक किल्ला बांधला होता व त्याला 'दिन पन्हा' असें नांव दिलें होतें. हुमायूँ या किल्ल्यांतून पळून गेल्यावर त्याचा प्रतिस्पर्धी शेरशहा याने या किल्ल्याला शेरगड किंवा शाहागड असें नवें नांव दिलें. याच किल्ल्याच्या आंतील भागांत किल्लाकोना मशीद व शेरमंडल अशा दोन जुन्या इमारती आहेत. यांपैकी किल्लाकोना मशीद ही तांबूस संगमरवराची असून शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. इ. स. १५४० मध्ये पठाण बादशहांच्या कारकीर्दींत ही बांधली गेली. या मशिदीच्या मनोऱ्यावर उभा राहून पठाणांचा धर्मोपदेशक सर्वांना प्रार्थनेसाठी पाचारण करीत असे. अशाच एका पाचारणाच्या वेळीं शजारच्या शेरमंडल राजवाड्यांतून हुमायूँ लगबगीने येत असतां जिन्यांतून पडला व पुढे त्याच दुखण्यांत जानेवारी १५५६ मध्ये मृत्यु पावला. [चरिय पीटक; म. ज्ञा. को.; पु. इं.; हि. ध.]

इंद्रभूति एक प्रसिद्ध वज्रयानी ग्रंथकार. हा उड्डियानाचा राजा असून पद्मसंभवाचा पिता होता. तंजूर येथे याच्या तेव्वीस ग्रंथांचा अनुवाद मिळतो. कुरुकुल्लासाधन व ज्ञानसिद्धि हे याचे दोन ग्रंथ संस्कृत भाषेंत उपलब्ध आहेत. ज्ञानसिद्धि या ग्रंथांत लहानमोठे वीस



इंद्रभूति

परिच्छेद असून त्यांत गुरु-शिष्य, अभिषेक, साधना, इ. विषयांचें विस्तृत वर्णन आहे.[आ. सं.]

इंद्रभूति गौतम (६०७–५१५ इ. स. पूर्व) याला गौतम असेंहि म्हणत. हा महावीराचा शिष्य व जैन धर्माचा पहिला प्रचारक होता. महावीराचे उपदेश एकत्रित करण्याचें काम याने केलें. महावीराच्या ११ गणधरांपैकी हा एक होता. याचा जन्म मगधांत व मृत्यु राजगृह प्रांतांतल्या गणय या गांवीं झाला. [म. च. को.]

इंद्रमातृ देवजामि ऋ. १०. १५३ या सूक्ताचा द्रष्टा.

इंद्र मुष्कवत् ऋ. १०. ३८ या सूक्ताचा द्रष्टा. कुत्स या भक्तापासून तूं स्वतःला सोडवून घेऊन आमच्याकडे ये, अशी याने इंद्राची प्रार्थना केली आहे.

इंद्रमूर्ति इंद्राची मूर्ति ऐरावतावर बसलेली अशी करतात. या ऐरावताला चार सुळे असतात. चिदंबरम् येथे अशा प्रकारची मूर्ति आहे. इंद्राच्या तीन हातांत धनुष्य, शंख, व चक्र अशीं तीन आयुधें असावीं व चौथा हात अभयमुद्रेंत असावा, असें शिल्पसार ग्रंथांत सांगितलें आहे. इंद्रपत्नी शची ही त्याच्या डाव्या मांडीवर बसलेली असायलाच हवी, असा हेमाद्रीचा आग्रह आहे. इंद्राचा एक हात शचीच्या पाठीवर व शचीचाहि एक हात इंद्राच्या पाठीवर असावा. शचीच्या दुसऱ्या हातांत कल्पवृक्षाच्या फुलांचा गुच्छ असावा.



इंद्रमूर्ति—चालुक्यशैली

पांचाळ मद्रावर्गीत इंद्रमित्राच्या शिक्क्यांवर इंद्रप्रतिमा चित्रिलेली आहे. या मुद्रांवर एका धनुष्याकृति मंडपांत स्थानक मुद्रेंत इंद्रप्रतिमा अंकिलेली आहे. [प्र. वि.; सा. इं. गॉ. गॉ.]

इंद्रयज्ञ एक नैमित्तिक याग. या यज्ञाचा विधि पुढीलप्रमाणे सांगितला आहे – हा यज्ञ भाद्रपद पौर्णिमेस करतात. यजमान इंद्रासाठी पायस व पुरोडाश तयार करून पुरोडाशाचे चार भाग अग्नीभोवती ठेवतो. दोन आज्यभाग झाल्यावर मग इंद्राला पायस अर्पण करतो. इंद्र, इंद्राणी, अज एकपाद्, अहिर्बुध्न्य व प्रोष्ठपद यांना आज्याहुती देतो. नंतर इंद्राला पुनश्च पायस समर्पितो. मग पुरोडाशाचें स्वतः सेवन करून मरुतांना अश्वत्थाच्या पानावर बळि देतो. अश्वत्थ हें मरुतांचें निवासस्थान असल्यामुळे मरुतांसाठी त्याचें पान घेतात. बलिदानाच्या वेळीं ‘ शुक्रज्योतिश्च, चित्रज्योतिश्च.. ’ इ. मंत्र मोठयाने व ‘ उग्रश्च भीमश्च...’ इ. मनांत म्हणायचे असतात. त्यानंतर ब्राह्मणांना भोजन घालून यजमान यज्ञ पूर्ण करतो (पार. गृ. सू. २. १५).

इंद्रयाग गोकुळांत नंदादि गोप पर्जन्याधिपति इंद्राला संतुष्ट करण्यासाठी दर वर्षी हा याग करीत असत. परंतु कृष्णाने त्यांना सांगितलें. ‘ पर्जन्य ही एक नैसर्गिक घटना असून पाऊस पाडण्याचें श्रेय इंद्राला मुळीच नाही. तेव्हा इंद्रयाग करण्याऐवजी तुम्ही गायी, ब्राह्मण व पर्वत यांची पूजा करा. ’ गोपांनी त्याप्रमाणे सुरवात केल्यावर इंद्र रागावला व त्याने जोराची पर्जन्यवृष्टि सुरू केली. त्यामुळे सर्व गोप भयभीत झाले. तेव्हा कृष्णाने आपल्या करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलून धरला व त्याखाली सर्व गोपांना सुरक्षित ठेवलें. सतत सात दिवस कृष्णाने गोवर्धन पर्वत उचलून धरलेला पाहून इंद्राला आश्चर्य वाटलें व त्याने पर्जन्यवृष्टि थांबविली. नंतर कृष्णाने गोवर्धन पर्वताची पुनश्च त्याच्या जागीं स्थापना केली (भाग. पु. १०. २४). [पु. इं.]

इंद्रवज्रा संस्कृत साहित्यांत विशेष प्रचलित असलेलें एक वृत्त. पिंगलसूत्र (६. १६) व नाटयशास्त्र (१६.३१) यांत दिलेल्या लक्षणानुसार दोन तगण, एक जगण व दोन गुरु यांच्या योगाने हें वृत्त बनतें. प्रायः ५ किंवा ६ वर्णानंतर यति येतो. याचें उदाहरण——

आशासु राशीभवदङ्गवल्ली
भासैव दासीकृतदुग्धसिन्धुम् ।।
मन्दस्मितैर्निन्दितशारदेन्दुं
वन्देऽरविन्दासनसुन्दरि त्वाम् ।।

अर्थ — दिशांच्या ठिकाणीं पुंजीभूत झालेल्या तनुलतेच्या कांतीने क्षीरसागराला गौण ठरविणाऱ्या व मंदस्मिताने शारदीय चंद्राला कमीपणा आणणाऱ्या हे कमलासनाधिष्ठित शारदे, मी तुला नमस्कार करतों.

इंद्रवंशा एक छंद. पिंगल सूत्रानुसार दोन तगण, जगण व रगण मिळून हा छंद बनतो (पिं. छं. ६.३०). याचें उदाहरण पुढीलप्रमाणे—

खाणींतही दुर्मिळ रत्न सुंदर,
होती जरी प्राप्त उदंड पत्थर;
देती कसे मान तयांस सन्मती
जे इंद्रवंशामधि फक्त जन्मती ?

(छं. र.)

इंद्र वैकुंठ ऋग्वेद १०. ४८–५० या तीन सूक्तांचा द्रष्टा. याने आर्यविरोधी दस्यूंची संख्या जास्त असल्याचें सांगून इंद्राच्या तोंडीं पुढील वाक्य घातलें आहे – ' न यो रर आर्यं नाम दस्यवे '= दस्यूला मी कधीहि ' आर्य ' म्हणणार नाही. (ऋ. १०. ४९. ३).

इंद्रव्रत साठ संवत्सरव्रतांपैकी सत्तेचाळिसावें व्रत. वर्षाऋतूंत उघडच्या जागीं निजणें व व्रताच्या अंतीं दुभती गाय दान देणें, असा याचा विधि आहे. फल– इंद्रलोकीं निवास. [मत्स्य पु. १००. ६९]

इंद्रशैल महाभद्र सरोवराच्या उत्तरेकडील एक टेकडी (वायु पु. ३६. ३१). [पु. इं.]

इंद्रसालगुहा मगधांतील अंबसद गांवाच्या उत्तरेला वेदियक पर्वतांत ही गुहा आहे. गुहेच्या दाराशीं इंद्रसाल वृक्ष होता, त्यावरून या गुहेला हें नांव मिळालें. या गुहेंत बुद्धाने इंद्राला ' सक्कपण्ह - सुत्तंत ' निवेदन केलें. [हि. जॉ. ए. इं.]

इंद्रसावर्णि चौदावा मनु. उरु, ब्रघ्न, गंभीर इ. त्याचे पुत्र, शुचि हा त्याच्या कालांतला इंद्र, अग्निबाहु, मागध इ. ऋषी व बृहद्भानु हा अवतार होय. [भाग. पु. ८. १३. ३३–३५].

इंद्रसेन प्लक्षद्वीपाच्या सीमेवरील एक टेकडी [पु. इं.]

इंद्रस्तुत एक याग. कांही मंत्रांचा फरक सोडल्यास हा याग जवळ जवळ अग्निष्टुत यागासारखाच आहे. यांत पंचदशस्तोम पद्धतीने मुख्यतः इंद्राची स्तुति केलेली असते. [म. ज्ञा. को.]

इंद्राणी इंद्रपत्नी व सूक्तद्रष्टी. ऋग्वेदांत हिच्या अनेक ऋचा आहेत. सवतीचा नक्षा उतरावा म्हणून हिने तिच्यावर जडीबुटीचा कांही प्रयोग केला आहे (ऋ. १०. १४५). दुसऱ्या एका सूक्तांत हिची तेजस्विता प्रगट झाली आहे (ऋ. १०. ८६). आपल्यापेक्षां वृषाकपीला इंद्र अधिक मान देतो, हें सहन न होऊन ती इंद्रावर रागावते. मानवांप्रमाणेच देवसमाजांतहि कौटुंबिक कलह चालत होते, हें तिच्या सूक्तावरून कळतें.



इंद्राणी

हिला शची असें दुसरें नांव आहे. ही अत्यंत सुंदर व आकर्षक असल्यामुळे अनेक देवतांमधून इंद्राने हिला पसंत केलें, असें तै. ब्राह्मणांत सांगितलें आहे.

ही पुलोमा दैत्याची मुलगी होती, असें रामायणांत व पुराणांत म्हटलें आहे. इंद्राने हिला पळवून नेलें व पुलोम्याने आपल्याला शाप देऊं नये, म्हणून त्याला ठार मारलें. इंद्राबरोबर ही त्याच्या सभेंत बसत असे. हिने पुत्रेच्छा धरून गौरीव्रत केलें व त्यामुळे तिला जयंत हा पुत्र झाला (भवि. पु. ब्राह्म. २२).

इंद्राणीला अखंड सौभाग्यवती मानलेलें आहे. म्हणूनच लग्नांत वाङ्‌निश्चयाच्या वेळीं वधूकडून तिची पूजा करवितात.

विदर्भांत इंद्राणीचें मंदिर आहे. रुक्मिणी आपल्या विवाहापूर्वी याच मंदिरांत तिच्या पूजेसाठी गेली होती. इंद्र-इंद्राणी या विदर्भांतील कांही लोकांच्या कुलदेवता आहेत (भाग.पु.१०. ५३. ४९–५०). ओरिसांत इंद्राणीची एक प्रचंड मूर्ति सांपडली आहे. [सु. वि. को.; पु. इं.; डि. क्ला. हिं. मा.; प्रा. च. को.]

इंद्रिय 'स्वविषयग्रहणलक्षणानीन्द्रियाणि' = स्वतःच्या विषयांचें ग्रहण करणें, हें इंद्रियांचें लक्षण होय (वात्स्या. १. १. १२). त्वक्, चक्षु, श्रोत्र जिव्हा व घ्राण, हीं इंद्रियें असून त्यांच्या द्वारें आपल्याला स्पर्श, रूप, शब्द, रस व गंध, या बाह्य विषयांचें व मनाच्या द्वारें सुखदुःखादि आभ्यंतर विषयांचें ज्ञान होतें. इंद्रियें नसतीं तर विषयांचें ज्ञान अन्य कोणत्याहि साधनाने झालें नसतें. म्हणूनच तर्कभाषेंत 'शरीरसंयुक्तं ज्ञानकरणमतीन्द्रियम्' = इंद्रिय हें शरिराशीं संयुक्त असें अतींद्रिय (इतर इंद्रियांनी ग्रहण न होणारें) व ज्ञानाचें करण होय, अशी इंद्रियाची व्याख्या केली आहे.

न्यायशास्त्रानुसार इंद्रियांचे बहिरिंद्रिय व अंतरिंद्रिय असे दोन भेद आहेत. चक्षु, रसना, घ्राण, त्वक् व श्रोत्र हीं बहिरिंद्रियें असून मन हें अंतरिंद्रिय आहे. मन हें अणुपरिमाण असून हृदयाच्या आंत असतें.

सांख्यमतांत इंद्रियांची संख्या अकरा मानली आहे. पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रिय व एक मन मिळून तीं अकरा होतात. वर उल्लेख केलेलीं पांच हीं ज्ञानेंद्रियें असून मुख, हात, पाय, गुदद्वार व जननेंद्रिय हीं पांच कर्मेंद्रियें होत.

पाणिनीने इंद्रिय शब्दाची व्युत्पत्ति इंद्र शब्दावरून दिली आहे ती अशी––

इन्द्रियम् इन्द्रलिंगम् इन्द्रदृष्टम् इन्द्रसृष्टम् इन्द्रजुष्टम् इन्द्रदत्तम् इति वा। (अष्टा. ५. २. ९३).

इंद्रलिंग––इंद्रियें हीं इंद्राचें बाह्य लिंग किंवा प्रतीकें होत. जोपर्यंत इंद्रियें स्वकर्म करीत असतात, तोपर्यंत इंद्र शरिरांत वास्तव्य करतो.

इंद्रदृष्ट–– इंद्राने इंद्रियें पाहिलीं म्हणजे त्यांचा अनुभव घेतला, म्हणून त्यांना इंद्रिय हें नांव पडलें. यास्काच्या मतानुसार हें आचार्य औपमन्यवाचें मत होतें.

इंद्रसृष्ट–– इंद्राने निर्माण केलीं, म्हणून त्यांना इंद्रिय हें नांव मिळालें. हें मत आग्रायणाचें आहे, असें यास्क म्हणतो.

इंद्रजुष्ट ––इंद्राच्या प्रिय भावनांनी युक्त असल्यामुळे यांना इंद्रिय हें नांव मिळालें. इंद्र जेव्हा इंद्रियांच्या बरोबर असतो, तेव्हा तो सर्वांत जास्त प्रसन्न असतो.

इंद्रदत्त–– इंद्राने इंद्रियांना आपापल्या विषयांच्या उपभोगाचें प्रदान केलें आहे, म्हणून त्यांना इंद्रिय असें नांव आहे.

इंद्रियजय अर्थात् इंद्रियांवर विजय मिळविणें, ही मोक्षमार्गांतली पहिली पायरी मानलेली आहे. [हिं.वि.को.; पा.भा.]

इ तिसरा स्वरवर्ण. याचें स्थान तालु आहे. उदात्तानुदात्तस्वरितभेदाने तो त्रिविध होतो. अनुनासिक व निरनुनासिक असे त्याचे आणखी दोन भेद होतात. हा परमानंददायक, सुगंधी फुलाच्या कांतीचा, ब्रह्माविष्णुमहेशात्मक, शक्तिमय व गुणत्रयसमन्वित असल्याचें कामधेनुतंत्रांत सांगितलें आहे.



'इ' च्या रूपाचा विकासक्रम

वर्णाभिधानतंत्रांत सूक्ष्मा, शाल्मली, विद्या इ. याचीं अनेक नांवें दिलीं आहेत. मातृकान्यासांत याचें स्थान उजव्या डोळ्यावर येतें. हा ब्रह्मदेवाच्या तिसऱ्या मुखापासून उत्पन्न झाला व यजुर्वेद याच्यापासून उत्पन्न झाला. [श. क.; वायु पु. २६·३४]

इकबाल सर मोहम्मद (१८७३–१९३८ इ. स.) एक तत्त्वज्ञ व कवि. सियालकोट (पश्चिम पंजाब, पाकिस्तान) येथे याचा जन्म झाला. त्याच्या पूर्वजांचें आडनांव सप्रू असून ते काश्मीरी ब्राह्मण होते. 'इकबाल' म्हणजे भाग्य. हें कवीचें टोपण नांव आहे. १८९९ सालीं त्याने पंजाब विद्यापीठाची एम. ए. ही पदवी मिळविली. नंतर त्याने प्राध्यापकाची नोकरी केली.

इस्लामच्या जागृतीवर त्याचा भर असला, तरी त्याच्या विचारांत राष्ट्रीयताहि होती. इकबाल हा श्रेष्ठ दर्जाचा कवि व तत्त्वज्ञानी होता. त्याची 'तराना-ए-हिन्दी' ही कविता प्रसिद्ध आहे, ती अशी––

सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा
हम बुलबुलें हैं इसकी, यह गुलिस्ताँ हमारा
गुर्बत में हों अगर हम, रहता है दिल वतन में
समझो वहीं हमें भी दिल हो जहाँ हमारा
परबत वो सबसे ऊँचा, हमसाया आसमाँ का
वह संतरी हमारा, वह पासबाँ हमारा
गोदीमें खेलती हैं इसकी हज़ारों नदियाँ
गुलशन है जिनके दमसें रश्के जिनाँ हमारा
ऐ आबे रूदे गंगा ! वो दिन हैं याद तुझको
उतरा तेरे किनारे जब कारवाँ हमारा
मजहब नहीं सिखाता आपसमें बैर रखना
हिन्दी हैं हम, वतन है हिन्दोस्ताँ हमारा
यूनानो मिस्रो रूमा सब मिट गये जहाँ से
अबतक मगर है बाक़ी नामोनिशाँ हमारा
कुछ बात है कि हस्ती मिटती नहीं हमारी

सदियों रहा है दुश्मन दौरे ज़माँ हमारा
इक़बाल कोई महरम अपना नहीं जहाँमें
मालूम क्या किसीको दर्दे निहाँ हमारा

अर्थ – साऱ्या जगांत आमचा हिंदुस्थान चांगला आहे. हा आमचा बगीचा असून आम्ही या बागेंतील बुलबुल आहों. आम्ही परदेशांत असलों, तरी आमचें हृदय या स्वदेशांतच असतें. जिथे आमचें अंतःकरण असेल, तिथेच आम्ही आहों असें समजा. आकाशाचा शेजारी असलेला तो सर्वांत उंच पर्वत, हिमालय, आमचा रक्षक व पहारेकरी आहे. या भारताच्या मांडीवर हजारो नद्या खेळत असतात. त्यांच्यामुळे आमचा हा बगीचा स्वर्गालाहि हेवा वाटावा असा सुंदर बनलेला आहे. हे प्रवाहिनी गंगे, तुझ्या कांठीं आम्हा आर्यांचा समुदाय उतरला, ते दिवस तुला आठवतात काय ? खरा धर्म हा आपसांत वैर करण्यास शिकवीत नाही. आम्ही हिंदी आहों आणि हिंदुस्थान ही आमची मातृभूमि आहे. ग्रीस, इजिप्त व रोम हे जगांतून नाश पावले. परंतु आमची नांवनिशाणी मात्र अद्यापि शिल्लक आहे. शतकानुशतकें कालचक्राने आमच्याशीं वैर केलें; तरी आमचें अस्तित्व नष्ट होत नाही, ही कांही मामुली गोष्ट नव्हे. इकबाल म्हणतो, जगांत आमचा कोणी मित्र नाही; त्यामुळे आमचें झांकलेलें दुःख कोणाला माहीत असणार ?

इकबालने 'खुदी' विषयक एक सिध्दान्त मांडला होता. इकबालची खुदी म्हणजे आत्मा नसून तें माणसाचें व्यक्तित्व आहे. इकबाल आत्मा व शरीर हे दोन न मानतां एकच मानतो. त्याने 'असरारे खुदी' (जीवाचीं रहस्यें) हें पर्शियन काव्य लिहिलें आहे. [सं. चा. अ.; मुलांचे इकबाल]

इकरि बोंगा सखोल पाण्यांतील भुताला मुंड आदिवासी इकरि बोंगा म्हणतात. सिङ्बोंगाने असुरांना ठार मारल्यावर आकाशांत प्रयाण केलें व जातांना एक ग्रामरक्षक पिशाच म्हणून इकरि बोंगाची पृथ्वीवर नेमणूक केली. असुर दंतकथांत सांगितलें आहे, की जे कोणी खोल पाण्यांत बुडून मेले, ते सगळे इकरि बोंगा झाले. कांही खेड्यांत इकरि बोंगाची खास जागा असते. त्या जागेंत कोणीहि पेरणी करतां कामा नये, असा नियम आहे. त्या जागेंतील झाडेंहि जमातीच्या पुढाऱ्याच्या परवानगीशिवाय कुणाला तोडतां येत नाहीत.

इकरि बोंगाविषयीं ज्या कांही दंतकथा उपलब्ध आहेत, त्यांवरुन तो एक दुष्ट वेताळ आहे, असें वाटतें. जादूटोणा करणाऱ्या लोकांना तो प्रसन्न होतो. तो नेहमी दुष्ट कारवाया करीत असतो. [एन्सा. मुं.]

इक़ामा मुसलमानांच्या सामुदायिक प्रार्थनेपूर्वी जें सूत्र म्हणतात, त्याला इकामा हें नांव आहे. 'अज़ान' मध्ये म्हणजे प्रार्थनेच्या पुकाऱ्यांत 'कद् कामति अस्सलात' (प्रार्थनेची तयारी झाली आहे) हे शब्द घातले, की 'इकामा' होतें. इमामच्या मागे उभा राहणारा 'मुक्तदी' हें सूत्र म्हणतो. [डि. इ.]

इख़्लाष मुसलमान लोक सर्व धार्मिक कृत्यें एकान्तांत करतात. त्यामुळे फक्त परमेश्वराला तीं दिसतात; इतरांना नाही. या प्रथेला इख़्लाष असें नांव आहे. [डि. इ.]

इच्छ सौराष्ट्रांतील भाटिया लोकांतला लग्नापूर्वीचा एक सोहळा. वधूवरांना आपापल्या घरीं कणकेच्या स्वस्तिकावर बसवून मंगल तिलक लावतात व श्रीफळासह लग्नपत्रिका त्यांच्या हातीं देतात. या सोहळ्याला इच्छ असें नांव आहे. [ल. वि. सो.]

इच्छाप्राप्ति अष्ट सिद्धींपैकी एक. हिला प्राप्ति असेंहि म्हणतात. [ब्रह्मांड पु. ४. ३६. ५१.]

इज्मा इस्लामी धर्मशास्त्रांत याचा अर्थ 'धर्मपंडितांची एकमुखी अनुमति' असा होतो. मुस्लीम धर्मपंडिताला 'मुज्तहिद' म्हणतात. जे सात्त्विक वृत्तीचे धर्मपंडित असतात, त्यांच्याच अनुमतीला 'इज्मा' हा मान दिला जातो. [डि. इ.]

इज्या श्रौतयागांना इज्या असें नांव आहे. शिष्टांनी करायच्या आठ गोष्टींपैकी इज्या ही एक आहे (ब्रह्मांड पु. २. ३२. ४०, ४४). इज्या = देवतापूजनम् असाहि अर्थ रामानुजदर्शनांत दिलेला आहे (न्यायकोश).

इझराईल या शब्दाचा अर्थ मृत्युदूत असा आहे. मनुष्य मेल्यावर त्याच्या आत्म्याला घेऊन जाण्यासाठी हा दूत येतो (कुराण, सुरा ३२. ११). [डि. इ.]

इझावा त्रिवांकुर (त्रावणकोर) भागांतील एक जात. मध्य व उत्तर त्रिवांकुरमध्ये यांना चोवा असें म्हणतात. तमिळभाषी शानार व मलबारांतील थिय्या यांच्याशीं या जातीचा संबंध असावा, असें मानतात. इझावा लोक सिंहलद्वीपांतून इकडे आले असावे. कारण इझाम या सिंहली बेटांतील लोक ते इझावा, असें कांही भाषाशास्त्रज्ञ मानतात. डॉ.

काल्डवेलनेंहि या लोकांना बाहेरच्या देशांतलेच मानलें आहे. मध्ययुगांत त्रिवांकुरचे राजे नायरांप्रमाणे इझावांकडूनहि लष्करी कामें करून घेत.

इझावांचे तीन वर्ग पडतात—(१) पांडी किंवा तमिळ जिल्ह्यांतील इझावा (२) मलयाळम् इझावा किंवा चोवा व (३) मलबारचे थिय्या. श्रीमंत व मध्यम स्थितींतील इझावा पुरुष सुस्वरूप असतात व ते नायरांसारखे दिसतात. इझावांमध्ये 'मरुमक्कतायम्' या कायद्याप्रमाणे वारसा पुरुषांकडे न जातां स्त्रियांकडे येतो.

नारळाचीं व ताडीचीं झाडें लावणें व दारू गाळणें हा यांचा मुख्य धंदा आहे. सुपारी, चांफा व लिंबें यांचीं झाडें इझावांनीच प्रथम केरळांत आणलीं. यांच्या स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें कामें करतात.

इझावांचीं घरें नायरांच्या घराप्रमाणे पूर्वाभिमुख असतात. त्यांची वेषभूषा व दागिनेहि नायरांच्याच पद्धतीचे असतात. हे लोक मांसभोजी आहेत.

देवधर्म – इझावांचे कांही प्रचलित धार्मिक विधी पुढीलप्रमाणे––(१) भाताच्या पहिल्या पेंढीचे दाणे दुसऱ्या पेंढीवर टाकतात व ते झांकतात. (२) पहिल्या पिकाची पेंढी प्रमुख जमीनदाराला देतात व त्याने ती दुसरें पीक निघेपर्यंत जपून ठेवायची असते. (३) थोडेंसें धान्य ताडींत भिजवून क्षेत्रदेवतेला अर्पण करतात. या वेळीं पुजारी 'शेतांत चांगलें पीक येऊं दे', असा उद्घोष करतो.

पुष्कळ ठिकाणीं यांचीं स्वतःचीं देवळें असून तिथले पुरोहितहि इझावाच असतात. भद्रकाली ही बहुतेकांची उपास्यदेवता आहे; परंतु भद्रकालीला पशुबळि द्यावा लागतो तो टळावा म्हणून कित्येक देवळांत तिच्या ऐवजी सुब्रह्मण्याची स्थापना केलेली असते. याशिवाय ते शास्ता, वीरभद्र व माता यांनाहि भजतात.

विवाहप्रथा– मुलगी वयांत आली म्हणजे नायर लोकांतल्या प्रमाणे तिच्या गळ्यांत ताळि (मंगळसूत्र) बांधण्याचा समारंभ करतात. ज्याने तिच्या गळ्यांत ताळि बांधली, तोच तिचा नवरा होतो, असें मात्र नाही. वस्त्रदान-समारंभ झाला, की मग मुलीचें खरें लग्न झालें, असें समजतात. वस्त्र देणारा तो पुरुष ताळि बांधणाऱ्याहून वेगळाहि असूं शकतो. इझावांतील न्हावी स्त्रीला धार्मिक संस्कारांत बरेंच महत्त्व असतें. ही स्त्री नवरीच्या मनगटाभोवती 'प्रतिसरम्' बांधते व नवऱ्या मुलाच्या हातीं ताळि देते. वस्त्रदानाच्या वेळीं वधूकडील मंडळींना ऐपतीप्रमाणे हुंडा द्यावा लागतो. मुलगी वयांत येण्यापूर्वी तिचें लग्न झालें, तर त्या लग्नाला 'ताळिकेटटु कल्याणम्' म्हणतात व नंतर झालेल्या लग्नाला 'संबंधम्' म्हणतात.

गर्भवती व अपत्य– गर्भवती स्त्रीच्या सातव्या महिन्यांत पुढील संस्कार करतात– एका संध्याकाळीं गर्भवतीला घराच्या दक्षिण दिशेला असलेल्या चिंचेच्या झाडाकडे नेतात. नंतर ती स्त्री एका दोऱ्यांत चांदीचें कडें ओवून तो दोरा चिंचेच्या झाडाभोवती गुंडाळते. दुसऱ्या दिवशीं तो दोरा काढून घेतात. तिचा पति तिला चिंचेचीं पानें खायला देतो. घरीं गेल्यावर तिला चिंचेचें पाणी प्यायला देतात. नंतर पुरोहिताची पत्नी गर्भवतीच्या बेंबीवर विड्याच्या पानाने थोडें तेल घालते. तेल ज्या तऱ्हेने वाहूं लागेल, त्यावरून मुलगा होणार का मुलगी, तें ठरवितात. मुलाचें बारसें अठ्ठाविसाव्या दिवशीं करतात. त्या दिवशीं मुलाच्या पायांत लोखंडाचे तुकडे ओवून बांधतात. सहाव्या महिन्यांत उष्टावणाच्या वेळीं लोखंडाचे दागिने काढून त्या जागीं सोन्या–चांदीचे घालतात.

मृतकप्रथा– मृताच्या पावलांना गंध लावून त्याचे ठसे एका फळीवर उमटवितात व ती फळी घरांत जपून ठेवतात. फळीवर मृताचें नांव व मृत्युतिथि लिहितात. मृताला जाळतात; पण गर्भवती व मुलें मृत झाल्यास त्यांना मात्र पुरतात. [का. ट्रा. स. इं.]

इट भार्गव

एक सूक्तद्रष्टा. हा सोमयाजी होता. मख नांवाचा शत्रु याच्या अंगावर चालून आला असतां, इंद्राने त्या शत्रूचें मस्तक तोडलें व याच्या रथाचें संरक्षण केलें (ऋ. १०. १७१.२).

इट्टु तुडी


डमरूचा एक प्रकार. मलबारमधील गुरुवायूर मंदिरांत हें वाद्य वाजवितात.

इडक

मलबालरमध्ये प्रचलित असलेला एक ढोल. हें वाद्य वाळूच्या घटिकापात्राच्या आकाराचें असून, तें लाकडाचें बनविलेलें असतें. दोन वाटोळीं कडी घेऊन, त्यांत चामडें बसवून, तीं कडी दोन्ही बाजूंवर घट्ट बसवितात त्या कड्यांना दोऱ्या आवळलेल्या असतात. हाताने दोऱ्या दाबून वादक चमड्याला ताण देतो.

हें वाद्य शारिके (छडी)ने वाजवितात. यावर निरनिराळे स्वर स्पष्ट काढतां येतातच; शिवाय एका सप्तकांतील साधीं गीतेंहि वाजवितां येतात. दोऱ्यांवरील हाताचा दाब कमीजास्ती करून स्वराची उंची कमी अधिक करण्यांत वादकाचें कौशल्य दिसून येतें.

इडक्क हें एक संमिश्र स्वरूपाचें वाद्य आहे. त्याच्या दोन्ही तोंडांवर व्यासाशीं समांतर दोन तांती लावलेल्या असतात-



इडक्क

त्यांचें व चामड्याचें मिळून जें कंपन होतें त्यामुळे ध्वनि उत्पन्न होत असतो. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

इडली व दोशे कर्नाटक व द. भारत या प्रदेशांत इडली व दोशे यांचा सर्रास प्रचार असून महाराष्ट्रांतहि हे पदार्थ लोकप्रिय झाले आहेत. इ. स. ११०० ते १६०० या कालांतील या इडली-दोश्यांचा इतिहास आतां उपलब्ध झाला आहे.

सोमेश्वराच्या (इ. स. ११३०) मानसोल्लास या ग्रंथांतल्या अन्नभोग या प्रकरणांत इडली व दोशे यांचा उल्लेख आला आहे–

विदलं चणकस्यैवं पूर्वसंभारसंस्कृतम् ।
ताप्यां तैले(ल)विलिप्तायां धोसकान् विपचेद् बुधः ।।
माषस्य राजमाषस्य वट्टाणस्य च धोसकान् ।
अनेनैव प्रकारेण विपचेत् पाकतत्त्ववित् ।।

अर्थ – चण्यांच्या डाळीचें चांगलें पीठ तयार करून घेऊन तेलाचा लेप दिलेल्या तव्यावर पाकवेत्त्याने धोसक (दोशे) भाजावे. उडीद, चवळी व वाटाणे यांचेहि अशाच प्रकारें पाकतत्त्ववेत्त्याने दोशे तयार करावे.

इडरिका किंवा इडली हिची पाकक्रिया मानसोल्लासांत पुढीलप्रमाणे दिली आहे–

अम्लीभूतं माषपिष्टं वटिकासु विनिक्षिपेत् ।
वस्त्रगर्भाभिरन्याभिः पिधाय परिपाचयेत् ।।
अवतार्यात्र मारीचं चूर्णितं विकिरेदनु ।
घृताक्ता हिंगु सर्पिर्भ्यां जीरकेण च धूपयेत् ।
सुसिता धवला (:) श्लक्ष्णा एता इडरिका वराः ।।

अर्थ – उडदाचें पीठ आंबवून तें गोल वाटयांत घालावें व तें वस्त्रांत लपेटून शिजवावें. नंतर खाली उतरून त्यांना तूप माखावें व त्यांवर काळ्या मिरीची पूड पसरावी. हिंग व जिरें यांची तुपांतली फोडणी द्यावी. अशा तयार झालेल्या स्वच्छ पांढऱ्या इडरिका मोठ्या साजूक लागतात.

नारायण व्यास (१४ वें शतक) याने रचलेल्या 'ऋद्धिपुरवर्णन' या ग्रंथांत इडलीचें वर्णन पुढीलप्रमाणे आहे–

पूर्ण चंद्राचा अनुकारी
चोखलापणें भजिजे इडारी

एकनाथांच्या रुक्मिणीस्वयंवरांतहि 'सुकुमारा इडुरियां' चा उल्लेख आहे.

याशिवाय रघुनाथ नवहस्त (नवाथे) यांच्या भोजन कुतूहल या ग्रंथांत घिरडीं, पूरिका, गोधूमफेणी या पदार्थांबरोबर इडलीचेंहि वर्णन आलें आहे. [गोडे यांच्या लेखावरून]

इडा(ळा) (१) ऋग्वेदांत 'इडा' शब्दाचा अर्थ अन्न, श्रम परिहारक द्रव्य किंवा दुग्धनिषेक असा आहे. परंतु नंतरच्या वाङमयांत त्याला स्तवनस्रोत हा अर्थ प्राप्त झाला. इळेलाच वाग्देवी असेंहि म्हटलें आहे. इळा ही पृथ्वीची अधिष्ठात्री देवता आहे, असें सायणाचार्य म्हणतात (ऋ. ५. ४१. १९ वरील भाष्य).

प्रलयांत आश्रय केलेल्या पर्वतावरून खाली उतरल्यानंतर मनूने संततीसाठी यज्ञ केला, तेव्हा यज्ञकुंडांतून एक कन्या वर आली. तिचे नांव इळा होतें, असें श. ब्राह्मण सांगतें. ती मित्रावरुणांच्या अंशाने झाल्यामुळे तिच्यावर त्यांचा हक्क होता; पण तिने आपल्या पित्याचा, मनूचा त्याग केला नाही. मनु तिच्यासह राहूं लागला व तिने मनूची वंशवृद्धी केली (श. ब्रा. १. ६. ३. ७–११).

तै. ब्राह्मणांत (१. १. ४) इडा व मनु यांसंबंधीं पुढील माहिती आहे – मनूची संबंधी व यज्ञतत्त्वांचें प्रकाशन करणारी इडा नामक एक स्त्री होती. देवासुरांनी अग्न्याधान केलें, असें कळल्यावरून ती तें पाहण्यास गेली. तिने पाहिलें, की दोघांचाहि अग्निस्थापनेचा क्रम चुकला आहे. मग ती मनूकडे गेली व म्हणाली, की देवासुरांप्रमाणे तुझा यज्ञ निष्फळ होऊं नये, म्हणून मी अग्नींची योग्य क्रमाने स्थापना करतें. त्याप्रमाणे तिने गार्हपत्य, दक्षिणाग्नि व आहवनीय अशा क्रमाने अग्नींची स्थापना केली. त्यामुळे मनूचा यज्ञ सफल होऊन तो प्रजा व पशू यांनी समृद्ध झाला.

मनु यज्ञ करीत असल्यामुळे देवांना ऐश्वर्य प्राप्त झालें. एकदा इडा मनूकडे गेली असतां देवांनी प्रत्यक्षपणे व असुरांनी अप्रत्यक्षपणे तिला आपल्याकडे बोलाविलें. पण इडा देवांकडे गेली; त्यामुळे सर्व प्राणीहि असुरांचा त्याग करून देवांकडे गेले (तै. सं. १. ७. १).

पुराणांत इडा ही वैवस्वत मनूची मुलगी, बुद्धाची पत्नी व पुरूरव्याची माता मानलेली आहे.

(२) शरिराच्या उजव्या भागांत असणाऱ्या एका नाडीला इडा म्हणतात.

(३) पंच संवत्सरांत एक इडा नामक संवत्सर मानलें आहे. [प्रा. च. को.; वे. इं.; म ज्ञा. को.; क्ला. डि. हिं. मा.]

इडसून यज्ञांत लागणारी एक लांकडी फळी. या फळीवर पशूंचीं अंगें ठेवून स्वधितीने त्यांचें अवदान घेतात. बौधायन सूत्रांत इडसूनाचा उल्लेख आहे (४.८). इतर श्रौतसूत्रांत लांकडी फळीऐवजी पिंपरीची फांदी घ्यावी, असें सांगितलें आहे.

इडापात्र एक यज्ञीय उपकरण. हें अश्वत्थ वृक्षाचें बनवितात. तें चार आंगळें रुंद व यजमानाच्या पायाएवढें किंवा एक अरत्नि लांब असतें. त्याचा दांडा चार आंगळें लांब असतो. हविःशेष एका पात्रांत घेऊन त्यावर इडेचें आवाहन करतात. हा हविःशेष ज्या पात्रांत ठेवतात त्याला इडापात्र म्हणतात. [हि. ध.]

इडावत्सर पंचसंवत्सरात्मक युगाचें तिसरें वर्ष. याला इद्वत्सर असेंहि म्हणतात (भाग. पु. ३.११.१४).

इडिग उत्तर अर्काट व चिंगलपेट जिल्ह्यांतील एक जात. बालिज टोळीचीच ही एक शाखा आहे. हे लोक स्वतःला व्यासाचे वंशज मानतात. उड्डू इडिग व बालिज इडिग असे यांचे दोन भेद आहेत. यांचा मुख्य धंदा खजूर व ताडी काढणें, हा आहे. दर रविवारीं हे ताडीच्या कलशांची पूजा करतात. एळळम्म ही यांची मुख्य देवता. ते वर्षप्रतिपदेच्या दिवशीं तिला कोंबड्याचा बळी देतात. यांचे पुरोहित ब्राह्मण असतात. इडिग लोक मृताला पुरतात. कांही प्रांतांत यांना चेट्टी असेंहि म्हणतात. [का. ट्रा. स. इं.]

इडिय कोंकणी शूद्रांची एक जात. कोचीन ही यांची मूळ भूमि होय. ती सोडन त्यांनी त्रिवांकुरमध्ये वस्ती केली. यांना भातशेतें व नारळीच्या बागा सरकारकडून इनाम मिळालेल्या आहेत. या शेतांवर व बागांवर त्यांना कर द्यावा लागत नाही. पण त्याऐवजी त्रिवेंद्रम्‌च्या पद्मनाभ मंदिरांत व महाराजांच्या राजवाड्यांत सडलेला तांदूळ मात्र पाठवावा लागतो. [का. ट्रा. स. इं.]

इडेकट्टु सिद्धर द. भारतांतील एक सिद्ध कवि. दोन गवळ्यांच्या संवादाच्या रुपाने याने आपली ग्रंथरचना केली आहे. कवीचें मन बालकाच्या मनाप्रमाणे सरळ आहे व हीच सरलता त्याच्या काव्यांतहि दृग्गोचर होते. त्याचें आध्यात्मिक व योगविषयक प्रतिपादन सुलभ आहे. मन हें एक पिशाच आहे, असे कल्पून त्याने मनाला उपदेश केला आहे. केवळ योगसामर्थ्याने सिद्धि मिळत नाही; तर त्यासाठी आत्मज्ञानाचीहि जरूरी आहे, असें याचें मत आहे. [द. द.]

इणंगु केरळांतील नायरांच्या मातृसत्ताक कुटुंबसंस्थेला तरवाड म्हणतात. अनेक तरवाड मिळून जो एक गट बनतो, त्याला इणंगु असें नांव आहे. एका तरवाडांत मंगल कार्य व्हायचें असेल, तर इणंगूंतील इतर तरवाड त्याला मदत करतात. अशा गटांतील तरवाडांमध्यें रोटीबेटीव्यवहार होऊं शकतो. ताळिकेट्टु कल्याणम् या समारंभांत ताळि बांधण्यासाठी इणंगु-गटांतील कुटुंबांतल्या मुलाची निवड पुष्कळ वेळां केली जाते. **पाहा** – तरवाड, ताळिकेट्टु कल्याणम्. [सो. चें. म.]

इतरनाममुद्रा स्वनाममुद्रा या प्रकाराच्या अगदी विरुद्ध हा प्रकार आहे. जेव्हा कवि आपल्या कृतीला स्वतःचें नांव किंवा मुद्रा लावतो, तेव्हा त्या नांवाला स्वनाममुद्रा म्हणतात. उदा० जयदेव, नारायणतीर्थ, त्यागराज इत्यादि. जेव्हा कवि आपल्या कृतीला स्वतःचें नांव न देतां दुसऱ्याचें नांव देतो, तेव्हा त्या नांवाला इतरनाममुद्रा असें म्हणतात. उदा० मुथुस्वामी दीक्षितार हे 'गुरुगुह' नांवाने व पट्टण सुब्रह्मण्य हे 'वेंकटेश' या नांवाने ग्रंथरचना करीत असत. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

इतिकाफ रमझान महिन्याच्या शेवटच्या दहा दिवसांत धार्मिक वृत्तीचे मुसलमान मशिदींत वास्तव्य करतात, त्याला इतिकाफ असें नांव आहे. या काळांत अत्यंत जरूरीच्या कामाशिवाय ते मशिदीबाहेर जात नाहीत व सर्व वेळ कुराणपठण, ज़िक्र किंवा नामस्मरण यांत घालवितात. [डि. इ.]

इतिहास 'इति ह आस' = असें घडलें, अशी या शब्दाची व्याख्या आहे. पुरावृत्त, प्राचीन कथा असेहि याचे अर्थ आहेत. वाङ्मयाचा एक प्रकार म्हणून याचा वैदिक साहित्यांत अनेकदा उल्लेख आढळतो.

इतिहास या शब्दाच्या अर्थाविषयीं भिन्न भिन्न मतें आहेत. दुर्गाचार्य म्हणतो—

इति हैवमासीदिति यः कथ्यते स इतिहासः

(नि. २. १० वृत्ति)

अर्थ – असें घडलें अशा प्रकारें जें सांगितलें जातें, तो इतिहास होय.

राजशेखर आपल्या काव्यमीमांसेंत लिहितो–

स च द्विविधा परक्रियापुराकल्पाभ्याम् ।

अर्थ –परक्रिया व पुराकल्प अशी इतिहासाची द्विविध गति आहे.

परक्रियेंत एक नायक वर्णित असतो व पुराकल्पांत अनेक प्रधान पुरुष वर्णित असतात. पहिल्याचें उदाहरण रामायण व दुसऱ्याचें महाभारत.

विष्णुपुराणाच्या श्रीधरस्वामीकृत टीकेंत इतिहासाचा व्यापक अर्थ सांगितला आहे, तो असा–

धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशसमन्वितम् ।
पुरावृत्तकथायुक्तमितिहासं प्रचक्षते ॥

अर्थ – धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांच्या उपदेशाने व पुरावृत्तकथेने युक्त (असा जो वाङ्मयप्रकार) त्याला इतिहास असें म्हणतात.

व्यासांनी इतिहासाचें महत्त्व सांगतांना म्हटलें आहे–

इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् ।

अर्थ – इतिहास व पुराणें यांच्या योगें वेदाचें उपबृंहण करावें.

भारतीय वाङ्मयांत इतिहास या शब्दाशीं मिळता जुळता असा दुसरा शब्द ऐतिह्य हा आहे. विशिष्ट वक्त्याचें नांव न सांगतां जें परंपरागत वृत्त सांगितलें जातें, त्याला ऐतिह्य म्हणतात (पारम्पर्योपदेशः स्यात्–अमर). ऐतिह्य शब्दाने इतिहास-पुराणांचें ग्रहण होतें, असें भट्टभास्कर सांगतो.

भारतीय साहित्यांत इतिहासाला वेदाच्या बरोबरीने मानलें आहे. ऋग्वेदसंहितेंत इतिहासयुक्त मंत्रांचा संग्रह आहे (१.११२.१०; १.१.२; ७.३३.५ इत्यादि). छांदोग्योपनिषदांत नारदाने इतिहास-पुराणाला पंचम वेद म्हटलें आहे (७.१.२). यास्काने ऋचांचें विशदीकरण करतांना 'इतिहासमाचक्षते' म्हणून प्राचीन आचार्यांनी सांगितलेल्या कथा उद्धृत केल्या आहेत. वेदार्थांचें निरूपण करणारे जे भिन्न भिन्न संप्रदाय आहेत, त्यांत ऐतिहासिकांचाहि एक निराळा संप्रदाय होता. 'इति ऐतिहासिकाः' = असें ऐतिहासिक म्हणतात, असा यास्क त्यांचा उल्लेख करतो. कौटिल्याने इतिहासवेदाची गणना अथर्ववेदाबरोबर केली आहे.

उत्तरकालीन संस्कृत वाङमयांत इतिहास याचा दंतकथा किंवा गोष्ट असा सामान्य अर्थ होऊं लागला. त्याला आख्यान, आख्यायिका, कथा इ. प्रतिशब्द वापरले जाऊं लागले. सामान्यतः संस्कृत वाङमयांत कथेच्या रूपाने केलेला उपदेश म्हणजे इतिहास, असा त्याचा अर्थ प्रामुख्याने गृहीत आहे. 'जेव्हां एखादा इसम मरण पावतो, तेव्हा त्याचे इष्टमित्र एकत्र बसून प्रसिद्ध पुरुषांच्या गोष्टी सांगतात व त्याच वेळीं मनावर चांगले संस्कार करणारीं इतिहास-पुराणेंहि सांगितलीं जातात ' असें गृह्यसूत्रांत सांगितलें आहे (आश्व. ४.६. ६). राजाने आपल्या दैनंदिन कार्यक्रमांत इतिहासाचेंहि श्रवण करावें, म्हणजे त्यायोगें त्याचे शिक्षण पुरें होतें, असें कौटिल्याने म्हटलें आहे (अर्थ. १. ५; १०. १४). तो पुढे सांगतो, की प्रधानाने इतिवृत्त व पुराण यांचे दाखले देऊन राजाला चुकीच्या मार्गापासून परावृत्त करावें (अर्थ.५. ६).

संस्कृत वाङमयांत महाभारताला 'महापुण्य इतिहास' असें म्हटलें आहे. महाभारतांत पुष्कळ ऐतिहासिक गोष्टी येतात; पण त्यांत त्यांच्या उपदेशात्मक भागालाच विशेष महत्त्व असतें. कौटिल्याने इतिहास हा शब्द समुदायवाचक अर्थानें वापरला आहे. त्याच्या कल्पनेप्रमाणे इतिहासांत पुराण, इतिवृत्त, आख्यायिका, उदाहरण, धर्मशास्त्र व अर्थशास्त्र इतक्या विषयांचा समावेश होतो.

इतिहास किंवा इतिहासवेद या नांवाचा ग्रंथसमुदाय प्राचीन काळीं अस्तित्वांत होता, असें मानायला सबळ पुरावा आहे. अथर्ववेद (१५. ६. ३), बृहदारण्यक. (४. १. २), तैत्तिरीय आरण्यक (२. ९), आश्व. गृ. सू. (२. ३. १) या ठिकाणीं इतिहास हा शब्द पुराण या शब्दाबरोबर आढळतो. कांही ठिकाणी त्यांचा द्वंद्व समासहि केलेला दिसतो. यावरून इतिहास नामक स्वतंत्र ग्रंथ प्राचीन काळीं अस्तित्वांत होते, हें निर्विवाद सिद्ध होतें. कौटिल्याच्या उल्लेखावरूनहि सनपूर्व तिसऱ्या शतकांत इतिहासवेद अस्तित्वांत होता, असें ठरतें (अर्थ. १. ३).

या प्राचीन इतिहासग्रंथांचे अवशेष ब्राह्मण ग्रंथांतल्या दंतकथा व कल्पित गोष्टी या रूपांत अवशिष्ट उरले आहेत. विशेषतः अर्थवाद या सदराखाली त्या गोष्टी येतात. निरुक्तावरून असें दिसतें, की त्या काळचा पंडितांचा एक वर्ग वेदमंत्रांचा अर्थ लावण्याच्या कामीं इतिहासग्रंथांचा उपयोग करीत असे.

कित्येक मंत्रांना लहान लहान कथात्मक भाग जोडून दिले आहेत, त्यांना यास्क इतिहास किंवा आख्यान असें नांव देतो. अशा प्रकारचे इतिहास बृहद्देवता, अनुक्रमणीग्रंथ, दुर्ग, षड्गुरु-शिष्य व विशेषतः सायण यांचीं भाष्यें यांत आढळतात.

मात्र इथे एक गोष्ट नमूद केली पाहिजे ती ही, की प्राचीन ग्रंथकारांना खरी ऐतिहासिक दृष्टि नव्हती. कालानुक्रमाला धरून लिहिलेला इतिहास भारतांत प्राचीन काळीं निर्माण झाला नाही, ही वस्तुस्थिति आहे. निरनिराळ्या राज्यांत भूर्जपत्रें, ताडपत्रें, कागद इ. वर लिहिलेले शासनाचे लेख असले पाहिजेत. पण त्यांचा उपयोग करून लिहिलेला एकहि प्राचीन ग्रंथ नाही. कल्हणाची राजतरंगिणी हा इतिहासाचा ग्रंथ समजला जातो; पण त्यांतहि इतिहासाची पारंपरिक कल्पनाच आहे. राजतरंगिणी काय, किंवा हर्षचरित काय हे इतिहास असले तरी त्यांतली दृष्टि शुद्ध ऐतिहासिक स्वरूपाची नाही. बुद्धपूर्व भारताचा व्यवस्थित इतिहास आपल्याला मिळत नाही. ग्रीक व चिनी प्रवासी यांचे ग्रंथ नसते, तर बुद्धोत्तर इतिहासहि 'इतिहास' झाला नसता.

इतिहास ही कला आहे, कीं शास्त्र आहे याविषयीं बराच वाद आहे. इतिहास हा कांही झालें तरी वाङ्मयाश्रयी आहे. घडामोडी हा त्याचा आत्मा असला, तरी वाङ्मय हें त्याचें शरीर आहे. वाङमय म्हटलें, की तिथे रचनेची प्रक्रिया आली आणि तिथेच कलेचा प्रांतहि उघड झाला. त्यामुळे इतिहास ही कला आहे हा वाद प्रचलित झाला. पण वाङ्मयाच्या माध्यमांतून ज्या गतकालांतल्या घडामोडी सांगायच्या त्यांतलें सत्यत्व वादातीत असलें पाहिजे, ही इतिहासाची कसोटी हळूहळू उत्क्रान्त होत गेली व त्यांतूनच ऐतिहासिक घटनांचें सत्यत्व पारखण्याचें एक शास्त्र प्रगत झालें. आणि त्यामुळेच इतिहास हें शास्त्र आहे, असें म्हणणें क्रमप्राप्त झालें. वास्तविक इतिहास हें शास्त्र कीं कला हा प्रश्नच गैरलागू वाटतो. इतिहासाचा आत्मा हा शास्त्रपूत सत्यान्वेषणात्मक असून तो सांभाळला गेला पाहिजे व त्याचें शरीर हें वाङ्मयीन कलागुणांनी युक्त असलें पाहिजे, असें त्याचें दुहेरी उत्तर संभवतें.

हिंदी लोकांना इतिहासाचें महत्त्व कळत नाहीं असें अलबिरूनीने लिहून ठेवलें असलें, तरी इतिहास हा शब्द मात्र वेदकालींच अवतीर्ण झालेला आढळतो. हा शब्द स्पष्टार्थवाचक आहे. (समाजाच्या चरित्रांतील) गत गोष्टींची जी हकीगत ती इतिहास होय. किंवा वर्तमान क्षणाच्या पाठीमागील गतकाळीं पृथ्वीवरील नव्या व जुन्या दरोबस्त सर्व प्रकारच्या उलाढालींची जी हकीगत ती इतिहास होय, असें राजवाडे सांगतात (ऐति. प्रस्ता.).

आपण ज्याला इतिहास म्हणतों, त्यालाच इंग्रजींत हिस्टरी म्हणतात. त्याचा धात्वर्थ 'शोधाअंतीं चौकशी करून प्राप्त झालेलें ज्ञान', असा होतो. म्हणजे हिस्टरी या शब्दांत 'सादर करायचा वृत्तान्त शोधपूर्ण चौकशीने निश्चित केलेला असावा' असा जो धात्वर्थ आहे, तोच इतिहास या शब्दांतूनहि ध्वनित होतो. 'असें घडलें' असें जें वृत्त सांगायचें तें खरोखर घडलेलें असलें पाहिजे, इतिहासांत दाखल करायची घटना सत्यरूप असली पाहिजे, असाच या दोन्ही संज्ञांचा कटाक्ष आहे. दोन टोकांच्या दोन भाषांतील या पारिभाषिक संज्ञा समानार्थक आहेत, हें विशेष आहे. त्यावरून सत्यकथन हेंच इतिहासाचें एकमेव उद्दिष्ट असलें पाहिजे, हें सहजपणे सिद्ध होतें.

आणखीहि एक गोष्ट वादातीत आहे, ती ही, की मानव हा इतिहासाच्या केंद्रस्थानीं आहे. कारण इतिहासादि सर्व व्यवहार मनुष्यप्रेरित, मनुष्यनिर्मित व मनुष्यपुरस्कृत आहेत. मनुष्यनिर्मित सर्वच शास्त्रांचें अंतिम उद्दिष्ट मानवाचें अभीष्ट साधणें हें आहे. इतिहासहि त्याला अपवाद नाही. मानवसमाजांत जें कांही घडलें, तें सर्वच इतिहास किंवा शोधाचा विषय ठरतें. माणसें जें जें करतात, सुख-दुःख रूपाने जें जें भोगतात, तसेंच जें जें घडवितात किंवा मोडतात, तें तें सर्व इतिहासाचें क्षेत्र आणि इतिहासाचाच विषय होय.

जगाच्या केंद्रास्थानीं सुप्रतिष्ठित झालेल्या मानवाचें बाह्यदृष्टिक्षेत्र जसें पिढ्यान् पिढ्या वाढत आहे, तशीच मानवाची आंतर दृष्टिहि क्रमशः प्रकट होत आहे. भौतिक दृष्टीमुळे त्याला लाभलेलें ज्ञान सारग्रहण, पृथक्करण इ. द्वारा सुसंगत बनवून त्याने त्याची एक प्रकारची शास्त्रीय व्यवस्था निर्माण केली आहे. या शास्त्रीय प्रगतीमुळेच मानवी व्यवहाराच्या अभ्यासांत सूक्ष्मता येऊन त्या व्यवहाराचेच भिन्न भिन्न पैलू, अभ्यासविषय म्हणून पुढे आले. अशा प्रकारें एकट्या मानवाचाच अभ्यास करणारीं अनेक शास्त्रें संवर्धित झालीं व त्या शास्त्रांना साहाय्यक अशीं अनेकविध उपशास्त्रें पुढे आलीं. मानवसमाजाचा इतिहास म्हणजे अनंत मानवी कर्तृत्वाचा इतिहास, मानवी बुद्धीच्या प्रगतीचा इतिहास, असें साधें समीकरण उत्पन्न झाल्याने इतिहाससाधनांची व्याप्ति अपरिहार्यपणे वाढली आहे.

इतिहासाच्या व्याख्येचा विषय चालू असतांना प्रामुख्याने निर्देश करायला हवा असे एक दोन आणखीहि विचार आहेत–

पहिला विचार इतिहासाच्या उद्देशाविषयीं किंवा हेतूविषयीं आहे. इतिहासाचा उद्देश नीतिधर्मादि शास्त्रांतील दंडक प्रस्थापित करणें, हा नाही. कारण त्या शास्त्रांत कालानुरूप बदल घडत असतो. घटना लहानशी असली, तरी तिच्या वाढीमागे

सत्य तत्त्व काय, हाच खरा कुतूहलाचा विषय असतो. एखाद्या घटनेचा उदय, तिचा विकास व तिच्या परिणतीचा क्रम याबद्दलच आपल्याला जिज्ञासा असते आणि तिची पूर्ति करणें हेंच इतिहासाचें उद्दिष्ट ठरतें. एखादी व्यक्ति, संस्था, समाज किंवा घटना यांचा इतिहास म्हटला तरी त्याचा व्याप एवढा मोठा होतो, की त्या सर्वांचें संकलित वृत्त एकत्र देण्याचा उद्योग करतांनाहि एक विशिष्ट दृष्टि न ठेवल्यास त्या संकलनाचा उपयोग करतां येणें कठिण होतें. केवळ साधनसंभार म्हणजे इतिहासलेखन नव्हे. इतिहास हा अशा साधनसंभाराचा परिपाक असला पाहिजे.

दुसरा विचार इतिहासाच्या अखंडत्वाचा (युनिटी ऑफ हिस्टरी) होय. हा विचार प्रा. फ्रीमन यांनी मांडला. इतिहासाचे कृत्रिम कालखंड पाडणें, राष्ट्राराष्ट्रांचे स्वतंत्र इतिहास सांगण्याची संकुचित दृष्टि ठेवणें, याविरुद्ध त्यांनी फार मोठी आघाडी उभारली. प्राचीन ग्रीस पासून रोमन साम्राज्यापर्यंत, तसेंच साम्राज्यशाही रोमपासून तों थेट मध्ययुगीन व अर्वाचीन युरोपपर्यंत सर्व इतिहास हा एकच एक परस्पर संबद्ध व सलग प्रवाह आहे, हें त्यांनी सिद्ध करून दाखविलें. हाच अखंडत्वाचा न्याय सर्वच्या सर्व जागतिक इतिहासाला लावणें शक्य आहे. एवढेंच नव्हे; तर आजच्या शास्त्रीय प्रगतीमुळे जगाचा अभूतपूर्व संकोच झालेला प्रत्यक्ष दिसत असतांना इतिहासाला हा अखंडत्वाचा नियम लावणें अपरिहार्यच आहे. पूर्वींच्या कालांत आजच्यासारखीं दळणवळणाचीं साधनें नसतांनाहि दूरदूरच्या मानव समाजांचा एकमेकांवर चमत्कारिकपणे परिणाम झालेला दिसून येतो व त्यामुळे इतिहासाच्या अखंडत्वाचा हा सिद्धान्त म्हणजे केवळ कल्पना नसून प्रत्यक्ष वस्तुस्थिति असल्याचें सिद्ध होतें.

वरील सर्व गोष्टी ध्यानांत धरून इतिहासाची व्याख्या मांडायची, तर ती पुढीलप्रमाणे मांडतां येईल –– सलग अशा मानवसंस्कृतिपटांतील विवक्षित घटितांचें स्थान आणि त्या दृष्टीची त्यांची उत्क्रांति दर्शविणारा सत्य, संपूर्ण, साधार व सप्रमाण लेखनिविष्ट वृत्तान्त म्हणजे इतिहास होय.

इतिहासाविषयीं आणखी एक निराळा विचार मांडला आहे तो क्रोचे या तत्त्वज्ञाने. सर्व इतिहास हा समकालीन इतिहासच असतो, हें त्याचें सिद्धान्तवाक्य आहे. हाच सिद्धान्त त्याने आपल्या ग्रंथांत विशद केला आहे.

सांप्रत इतिहासाच्या बरोबरीने समाजाच्या अभ्यासांत अर्थशास्त्र, भूविज्ञान, मानववंशशास्त्र व पुराणवस्तुशास्त्र हीं सर्व अहमहमिकेने भाग घेतांना आढळतात. त्यांनी आपपल्या विशेष क्षेत्रांत अमर्याद प्रगति केली आहे. एवढेंच नव्हे; तर परस्परांच्या सहकार्याने परस्परांचे अनेक प्रश्न सोडवून एकमेकांचीं क्षेत्रेंहि वाढविलीं आहेत. इतिहासाच्या कोणत्याहि व्याख्येच्या कक्षेंत या सर्वांचाहि प्रपंच पडतो. म्हणून कोणत्याहि काटेकोर शब्दयोजनेने संकुचितपणा येऊं देण्यापेक्षा इतिहासाच्या व्याख्येंत लवचिकपणा ठेवणेंच इष्ट ठरतें. कारण समाज या कल्पनेला आणि समाजाच्या अभ्यासाच्या अंगणाला मर्यादा कोणी आणि कशी घालावी ?

इतिहाससंशोधन आधुनिक विज्ञानयुगाच्या पूर्वी इतिहास हें साहित्याचेंच एक अंग मानलें जात होतें. पण सांप्रत इतिहासाने साहित्याशीं असलेला आपला संबंध तोडून वैज्ञानिक स्वरूप धारण केलें आहे. इतिहासविज्ञानाने या युगांत आपली मोठीच उन्नति केली आहे. इतिहासासंबंधीं आजच्या कल्पना कालच्यापेक्षा अधिक प्रौढ, प्रामाणिक व गंभीर आहेत. पूर्वींचे इतिहासकार आपल्या आधार ग्रंथांचें समालोचन करीत नव्हते. त्या आधारांना सत्याच्या निकषावर घासून पाहण्याची त्यांना गरज वाटत नव्हती. लोकांना शिक्षादीक्षा मिळावी व इतिहासाचें ज्ञान त्यांच्या जीवनांत उपयुक्त व्हावें, याच एका हेतूने पूर्वींचे इतिहासकार आपले ग्रंथ लिहीत. अलंकारिक वर्णनांनी इतिहासांतील घटनांना फुलोरा आणायलाहि ते मागेपुढे पाहत नसत. कवि, दार्शनिक, समाजशास्त्रवेत्ते व राजकारणी मुत्सद्दी यांनी इतिहासाचा पुष्कळच उपयोग केलेला दिसतो. पण इतिहास ही काय चीज आहे, इतिहासाचें लक्षण व प्रयोजन काय, त्याची मीमांसा काय, त्याच्या संशोधनाची गरज आहे किंवा नाही, इ. प्रश्नांवर त्यांनी गंभीर विचार केलेला नव्हता. आपल्याकडेच अशी स्थिति होती असें नाही; तर पाश्चात्य देशांतहि तशीच होती. ग्रीक इतिहासकार हिरोडोटस् म्हणतो, की ' इतिहासकार हा एक प्रकारचा महाकविच असतो व वीर पुरुषांच्या गुणगाथा लिहून लोकांचें मनोरंजन करणें, हें त्याचें कार्य असतें. ' थ्युसिडाइडीज या दुसऱ्या ग्रीक पंडिताने इतिहासाला लोकोपयोगी शिक्षणाचें साधन मानलें आहे. इतिहास हा मानवचरिताचा बृहद्कोश असून त्याच्यापासून लोकशिक्षणासाठी उत्तम आदर्श व दृष्टान्त मिळतात, अशी परदेशांतल्याहि प्राचीन पंडितांची धारणा होती. इंग्लंडचे सुप्रसिद्ध लेखक मेकॉले व कार्लाइलहि वरील सिद्धान्ताचेच अनुयायी होते; पण आधुनिक इतिहासविज्ञानाने आता आपला मार्ग बदलला आहे. इतिहासलेखनांत स्वच्छंद विहाराला अवकाश नसून शब्दावडंबर न करतां घटनांचें यथातथ्य वर्णन करणें आणि त्यांतहि जें सांगायचें तें

सप्रमाण सांगणें हें महत्त्वाचें असतें. इतिहासाला दार्शनिक व साहित्यिक सिद्धान्तापासून वेगळें करून त्याचा अभ्यास करणें ही सांप्रतची वैज्ञानिक रीत आहे. यालाच इतिहास-संशोधन असें म्हणतात. ज्या साधनांच्या द्वारें इतिहास तयार करायचा, त्या साधनांची साद्यंत तपासणी करणें, या गोष्टीला संशोधनांत फार महत्त्व असतें. त्या कामीं तर्कबुद्धि तीव्र असावी लागते. संशोधनाच्या द्वारें इतिहासांतील सत्यासत्याचा निर्णय कसा करावा, याविषयीं आता वैज्ञानिक सिद्धान्त स्थापित झाले आहेत.

एकोणिसाव्या शतकापासून विज्ञानाच्या इतर क्षेत्रांबरोबरच इतिहासांतहि प्रगतीचें नवें युग सुरू झालें. इतिहासाने आपलीं पूर्वींचीं जीर्ण वस्त्रें टाकून दिलीं. तो नवा पेहराव चढवून घ्यायला तयार झाला. नवे मार्ग, नव्या रीती, यांनी सत्यसंशोध-नाला प्रारंभ झाला. ज्या प्रमाणांच्या चौथऱ्यावर पूर्वींच्या इतिहासाची इमारत उभी होती, तो पायाच खरा कीं खोटा, याची तपासणी प्रथम सुरू झाली. कांही विद्वान् परंपरागत इतिहासांतलें तथ्य शोधण्याच्या प्रयत्नांत गढून गेले; तर कांही संशोधक नवनवीन ऐतिहासिक साधनांची गवेषणा करूं लागले. या संशोधकांना प्राचीन ग्रंथ-भांडारांतून आपल्या विषयाची सामग्री गोळा करावी लागली. प्राचीन प्रतीकें, शिल्पें व भग्ना-वशेष यांचा अभ्यास करावा लागला. शब्दविज्ञान, मानवविज्ञान, पुरातत्त्व, नाणकशास्त्र, लिपिशास्त्र, इ. अन्य विद्यांचेंहि साहाय्य घ्यावें लागलें. प्राचीन साहित्य ग्रंथांतून ऐतिहासिक घटनांचे तुरळक आढळणारे उल्लेखहि शोधून काढावे लागले. इतिहा-साचे प्राचीन ग्रंथ फारच कमी प्रमाणांत मिळत असल्यामुळे तत्कालीन इतिहासाच्या संशोधनासाठी त्यांना नाणीं, शिक्के, शिलालेख, भग्नावशेष, पत्रव्यवहार, दप्तरें व उकरून वर काढलेल्या वस्तू, यांची मदत घ्यावी लागली. इतिहासाच्या पुनरुद्धाराच्या कामीं पुरातत्त्वसामग्री उपयुक्त ठरली आहे. गौतम बुद्धाच्या ऐतिहासिक अस्तित्वाविषयीं कांही कालापूर्वीं इतिहासवेत्ते संदेह प्रकट करीत होते; पण पुरातत्त्व विज्ञानाने बुद्धविषयक अनेक स्मृतिचिन्हें उजेडांत आणून बुद्धाचें अस्तित्त्व आता निस्संदेह सिद्ध ठरविलें आहे. तसेंच अनेक शिलालेख व ताम्रपट पुढे येऊन त्यांनीहि ग्रंथांतरीं अनुल्लेखित अशा अनेक प्रतापी राजांचें अस्तित्व दाखवून दिलें आहे.

भारताच्या प्राचीन लिपींचें वाचन करणाऱ्या पंडितांत श्री. जेम्स प्रिन्सेप या पंडिताचें नांव अग्रगण्य मानलें पाहिजे. त्याने मोठ्या प्रयासाने ब्राह्मी व खरोष्ठी या लिपींची वर्ण-माला बसवून दाखविली. प्राचीन लिपींच्या ज्ञानाने जुने शिलालेख, ताम्रपट व मुद्रालेख सरळ रीतीने वाचतां येऊं लागले. त्यामुळे भारताच्या प्राचीन इतिहासांतल्या कित्येक अज्ञात गोष्टी संशोधकांना विदित झाल्या. हे शिलालेख व ताम्रपट पाहिल्यावर डॉ. फ्लीटने लिहिलें, की 'प्राचीन हिंदु-लोकांत इतिहासलेखनाची योग्यता व जाणीव होती.' या शिलालेखांचें स्वरूप दस्तऐवजासारखें असतें. त्यांवर व्यक्तीचें पूर्ण नांव, गांव, वंशवृत्त, शक, मिति या गोष्टी आवर्जून लिहिलेल्या असतात. तत्कालीन देशस्थिति, रीतिरिवाज, देवधर्म, इ. विषयांवर हे अभिलेख पुष्कळच प्रकाश टाकतात. भारताच्या पश्चिमोत्तर प्रदेशांत शक, यवन, पल्हव या राजांचीं राज्यें बहुतकालपर्यंत नांदलीं, हें या अभिलेखांनीच आपल्याला विदित केलें आहे. या राजांचीं वंशावळ त्यांच्या शिक्क्यां-वरूनच आपल्याला मिळू शकते. गुप्तकाल हें भारताच्या इतिहासांतलें सुवर्णयुग होतें, याची निस्संदिग्ध माहिती आपल्याला त्यांच्या शिक्क्यांनी आणि नाण्यांनीच पुरविली आहे.

पुरातत्त्व साधनांव्यतिरिक्त प्राचीन हस्तलिखित ग्रंथांतूनहि इतिहासाचे धागेदोरे मिळू शकतात; मात्र त्या ग्रंथांचें प्रामाण्य, त्यांचा लेखनकाल व त्यांचा कर्ता या गोष्टींचा नीट अभ्यास करावा लागतो. अशा कालनिर्णयाच्या कामीं बहिरंग प्रमाण उपलब्ध न झाल्यास त्याची अंतरंग परीक्षा करून तो कालनिर्णय निश्चित करावा लागतो. हें काम मोठ्या कष्टाचें असतें. परीक्ष्य ग्रंथाची शैली व त्यांतले विषय यांचें विश्लेषण करून, त्या देशांतल्या तद्विषयक अन्य ग्रंथांशीं त्याची तुलना करून अन्य ग्रंथांतील त्या ग्रंथाचे उल्लेख व त्या ग्रंथांतील अन्य ग्रंथांचे उल्लेख या सर्व गोष्टींचा बारीक विचार करून त्या ग्रंथाचे देश-काल ठरवावे लागतात. एखाद्या ग्रंथांत प्रक्षिप्त भागहि असू शकतो. नंतरच्या कालांत त्याची वाढहि झालेली असते. तेव्हा त्या ग्रंथाला प्रामाण्य प्राप्त करून देण्यासाठी प्रथम वरील गोष्टींचें निराकरण करावें लागतें. आणि मग अशा रीतीने संशोधित झालेला तो ग्रंथ इतिहासाचें साधन म्हणून उपयुक्त होऊं शकतो.

इतिहास-विज्ञानासाठी ग्रंथांतल्या शब्दांची यथार्थ व्याख्या करणें, हेंहि फार महत्त्वाचें कार्य ठरतें. भिन्नभिन्न युगांत शब्दांचे अर्थ बदलतात. त्यांत संकोच-विकासहि होऊं शकतो. शब्दाचा अशुद्ध अर्थ इतिहासांत भ्रमनिर्मितीला कारण होत असतो. म्हणून इतिहास संशोधकाला त्याचाहि निश्चय करावा लागतो. अशा प्रकारें प्राचीन ग्रंथांच्या विवेचनांतून इतिहा-सांतल्या भिन्न भिन्न घटनांचा पत्ता लागू शकतो. मात्र त्या घटना संबंधरहित असतात; म्हणून मग त्यांना कार्यकारण-

भावाच्या सूत्रांत यथायोग्य ठिकाणीं गुंफण्याची आवश्यकता निर्माण होते. ऐतिहासिक घटना जोंवर कार्यकारणाच्या महानियमांत ग्रथित होत नाहीत, तोंवर त्यांचें महत्त्व किंवा प्रयोजन कळूं शकत नाही. त्यांची जेव्हां परस्पर संगति लागते किंवा त्या शृंखलाबद्ध होतात, तेव्हांच त्यांतून खऱ्या इतिहासाची प्राप्ति होऊं शकते.

लॉर्ड ॲक्टनच्या मतानुसार इतिहास वाचण्यापेक्षा ऐतिहासिक शैलीने त्याचा विचार करण्याची शक्ति प्राप्त करून घेणें, हा उत्तम पक्ष होय. या विचारशक्तीच्या द्वारेंच इतिहासाच्या परिवर्तनपरंपरा व भूतकालांतील मोठमोठ्या आंदोलनांचें रहस्य सरलतेने समजूं शकेल.

अशा प्रकारें ऐतिहासिक घटनांची प्रगति, त्यांचा विकासक्रम व त्यांचें समस्त तात्पर्य सुस्पष्ट करणें, हीच श्रेष्ठ इतिहासकाराची कर्तबगारी होय. भूतकालांतलीं मेलेलीं, गाडलेलीं मढीं उकरून काढणें, याच एका गोष्टीवर तो संतुष्ट नसतो; तर इतिहासाची अंतःशक्ति आणि त्याचा जीवनस्रोत प्रकट करणें, हें तो आपलें परम कर्तव्य समजतो. इतिहासाचें परिशीलन हें आपल्या मानसिक विकासाचें फार मोठें साधन आहे. चालू युगाच्या मानसिक जीवनावर ऐतिहासिक विचारशैलीचा गंभीर प्रभाव पडलेला आहे.

कोणत्याहि विषयाच्या चर्चेंत तद्विषयक इतिहास आपोआप पुढे येतो. साम्प्रत सर्व विद्या–कलांचें विवेचन व समालोचन ऐतिहासिक दृष्टीला धरूनच केलें जातें. ॲरिस्टॉटल्चें म्हणणें आहे, की 'जो मनुष्य कोणत्याहि विषयाचा पूर्वापर विकासक्रम लक्षांत घेऊन त्याचा विचार करतो, त्यालाच त्या विषयाचें पूर्ण व विशद ज्ञान प्राप्त होऊं शकतें.' वस्तुस्थिति अशी आहे, की ज्ञानाच्या कोणत्याहि शाखेचें तिच्या इतिहासाच्या अभ्यासावांचून योग्य प्रकारें आकलन होणेंच शक्य नाही.

खरा इतिहासकार कोणत्याहि जातीच्या धर्मग्रंथांना अपौरुषेय अथवा ईश्वरकृत मानीत नाही. कारण ते ग्रंथ मनुष्याच्या अशा बोलींत लिहिले गेले आहेत, की ज्या बोलींचा इतिहासांत हळूहळूं विकास झाला आहे. त्या ग्रंथांचा देशकालपरिस्थितीशीं घनिष्ट संबंध असतो, त्यांत देशकालांचें पूर्ण प्रतिबिंब पडलेलें असतें. इतिहासकार आधुनिक दर्शन–शास्त्रांचीहि आलोचना ऐतिहासिक विचारशैलीने करतात. ते त्यांतल्या प्राचीन व अर्वाचीन सिद्धान्तांचें तुलनात्मक अध्ययन करून जे विचार पुढे मांडतात, ते पुढील अभ्यासकांना मार्गदर्शक ठरतात.

मानवजातीने आपल्या इतिहासकालांत ज्या ज्ञाननिधीचा संग्रह करून ठेवला आहे, त्याच्या आधारावरच विज्ञानाची उन्नति झालेली आहे. मनुष्य इतिहासाला विसरेल, तर तो भिन्न भिन्न ऐतिहासिक अनुभवांच्या ज्ञानालाहि वंचित राहील व वर्तमानकालांत पुढे उभ्या ठाकणाऱ्या अनेक जटिल समस्यांची उकल करण्यासहि असमर्थ ठरेल. थोडक्यांत सांगायचें, तर इतिहास हा मानवजातीचा संचित ज्ञाननिधि आहे. सर्व विद्यांत त्याचें स्थान उच्च आहे. विद्या आणि शास्त्रें यांचा तो दीपक आहे. तो सर्व कर्मांचा उपाय आणि सर्व धर्मांचा आधार आहे. [प्रा. गंगाप्रसाद मेहता– द्विवेदी अभिनंदन ग्रंथ]

इतुपूजा इतु ही बंगालमधील एक देवता असून ती नवसाला पावते, असें समजतात. आश्विनांतील सूर्यसंक्रांतीला व कार्तिकांतील दर रविवारींहि स्त्रिया तिला पूजतात. इतूचा संबंध सूर्याशीं आहे, असें मानतात. एका मोठ्या मातीच्या परळांत चार लहान बोळकीं आंत माती घालून ठेवतात व त्यांत भात, जव, गहूं, किंवा इतर धान्यें पेरतात. दर रविवारीं त्या 'शेताला' पाणी घालतात. चार भांडीं हीं चार ऋतूंचीं प्रतीकें मानतात. इतूला तांदुळाची खीर व मिठाई यांचा नैवेद्य दाखवितात. नंतर तिची कहाणी ऐकतात ––

एक दरिद्री व अधाशी ब्राह्मण होता. एक दिवस त्याला धिरडें खावेसें वाटलें; म्हणून त्याने बायकोला धिरडीं करायला सांगितलें. पण त्याच्या दोन मुली जुम्नो व उम्नो यांनी एकेक धिरडें खाल्लें व त्यामुळे ब्राह्मणाला पोटभर धिरडीं मिळालीं नाहीत. त्या रागाने त्याने त्या दोन्ही मुलींना रानांत नेऊन सोडलें. तिथे त्या मुलींनी कांही पऱ्यांच्या बरोबर इतु देवतेची पूजा केली. देवी त्यांच्यावर प्रसन्न झाली. मग घरीं येऊन त्या मुलींनी आपल्या बापाला श्रीमंत केलें.

एकदा राजा यांच्या दारावरून जात असतां त्याने या मुलींकडे पाणी मागितलें. मुलींनी तें देऊनहि घड्यांतलें पाणी कमी झालें नाही, हें पाहून राजा खूश झाला व त्याने स्वतः उम्नोशीं व त्याच्या प्रधानाने जुम्नोशीं लग्न केलें. पुढे उम्नोने व तिच्या बापाने इतूची पूजा सोडल्यामुळे त्यांच्यावर अनेक आपत्ती आल्या. परंतु जुम्नोच्या सांगण्यावरून आश्विन संक्रांतीला त्यांनी पुनश्च इतुदेवतेची पूजा केली व त्यामुळे सर्वजण सुखी झाले. [हि. हॉ. से.; फोक् लोअर]

इतखोरी चंपारण्याच्या दक्षिणेला सुमारें दहा मैलांवर हें ठिकाण आहे. इथे हिंदु, बौद्ध व जैन देवतांच्या पाषाणमूर्ती इतस्ततः विखरून पडलेल्या सांपडल्या आहेत.

त्याचप्रमाणे तारा या देवतेच्या मूर्तीवर महेंद्रपाल नामक राजाचा एक कोरीव लेखहि सांपडला आहे [हि. जॉ. ए. इं.]

इत्तिहाद् या शब्दाचा अर्थ एकरूपता, समरसता किंवा गाढ स्नेह असा आहे. 'सर्व दृश्य वस्तूंचें अस्तित्व परमेश्वरांत पाहणें,' अशा अर्थी सूफी तत्त्वज्ञ हा शब्द योजतात. [डि. इ.]

इत्सिंग (६७१–७१३ इ. स.) बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी भारतांत आलेला एक चिनी प्रवासी. हा श्रमण होता. जावा, मलाक्का या मार्गानें तो हुगळीच्या मुखाजवळ असलेल्या ताम्रलिप्ति या गांवीं आला. नालंदा येथे कांही वर्षे अभ्यास केल्यावर त्याने भारतांतल्या बौद्ध क्षेत्रांची यात्रा केली. इ. स. ६९२ मध्ये चीनला जात असलेल्या तत्सइन नामक उपाध्यायाबरोबर त्याने आपला ग्रंथसंग्रह मायदेशीं पाठवून दिला. तो चीनला परत गेल्यावर तत्कालीन वु हाऊ या चीनच्या राणीने त्याचें उत्तम स्वागत केलें. याने ५६ बौद्ध ग्रंथांचें चिनी भाषेंत भाषांतर केलें आहे.

इदानकझ्झि द. भारतांतील एक शैव संत. हा राजकुलांत जन्मला होता. शंकराच्या मंदिरांत पूजाअर्चा व अतिथिसत्कार या गोष्टी यथासांग चालाव्या म्हणून हा दक्ष असे. एकदा दुसऱ्या एका भक्ताने आपली अतिथिसेवा अव्याहत चालावी या हेतूने इदानकझ्झीच्या कोठारावर हल्ला केला. इदानकझ्झीला त्याचा हेतु कळतांच त्याने स्वखुशीने आपलें भांडार त्या भक्ताच्या स्वाधीन केलें. या त्याच्या कृत्यावरून तो महान् संत म्हणून ओळखला जाऊं लागला.

इदु मिश्मी भारताच्या ईशान्य सरहद्दीवरील डोंगराळ प्रदेशांत मूळ रहिवाशांच्या अनेक जमाती आहेत. त्या सर्वांना मिश्मी असें नांव आहे. हे मिश्मी लोक पूर्वी उत्तरेकडील कोणत्या तरी प्रदेशांत राहत असावे व तिथून हळूहळू खाली सरकत तिबेटांतून या प्रांतांत उतरले असावे, असा विद्वानांचा तर्क आहे. सांस्कृतिक व भाषिक दृष्टया या जमाती परस्परांपासून अगदी भिन्न आहेत. तसेंच त्यांचे आपापसांतले संबंधहि सलोख्याचें नाहीत.

हिमालयाच्या पायथ्याला लागून असलेल्या लोहित व दिबाँग या नद्यांच्या खोऱ्यांत मिश्मींची जी जमात राहते, तिला इदु अशी संज्ञा आहे. इदु हा शब्द 'मिदु' शब्दाचा अपभ्रंश आहे. इदु जमातीच्या सात आठ उपशाखा आहेत. दिबाँग नदीला मिळणाऱ्या अनेक नद्यांच्या कांठीं या निरनिराळ्या पोटजमाती राहतात व त्या नदीचें नांव धारण करतात. इदु लोकांची चेहरेपट्टी मंगोलियन वंशांतल्या लोकांसारखी असते. त्यांच्यांतले उत्तर सरहद्दीकडचे लोक उंच व देखणे असून दक्षिण भागांतील लोकांपेक्षा शारीरिक व मानसिक दृष्टया अधिक उत्साही दिसतात. निसर्गरम्य व दुर्गम अशा प्रदेशांत राहत असल्यामुळे या लोकांत नैसर्गिक साधी राहणी व सौंदर्याची आवड दिसते. त्यांच्या सांस्कृतिक परंपरा व चालीरीतीहि प्राचीन काळापासून आजतागायत कायम राहिल्या आहेत. आधुनिक सुधारणेचा त्यांना यत्किंचितहि संपर्क झालेला नाही.

इदु लोक वाघ व वानर यांच्याशीं आपला वांशिक संबंध मानतात. हा संबंध कसा आला, तें सांगणाऱ्या अनेक दंतकथा त्यांच्यांत प्रचलित आहेत. पृथ्वीवर आपली उत्पत्ति कशी झाली, यासंबंधीं ते पुढील कथा सांगतात ––


पृथ्वीवर पूर्वी पुरुष नव्हता. प्रथम सूर्य, चंद्र, वायु व अग्नि हे चार देव व एक स्त्री उत्पन्न झाली. देवांना स्त्री-पुरुष भेदाची कांहीच कल्पना नव्हती. नेहमी ते उघडे राहून भटकत असत. पण एकदा त्या स्त्रीच्या मनांत कामेच्छा उत्पन्न झाली व ती शमविण्यासाठी काय करावें, तें तिला सुचेना. विषण्ण होऊन ती एका टेकडीवर पाय पसरुन बसली. त्याच टेकडीवर वायुदेव 'अमाया खिन्यु' राहत होता, त्याने तिला पाहिलें. कुतूहलाने तो तिच्या गर्भांत प्रविष्ट झाला. त्यामुळे तिचें पोट हळूहळू वाढूं लागलें व योग्य वेळीं तिला मुलगा झाला. तो मुलगा हाच आमचा मूळ पुरुष होय.

आसाम प्रांतावर ब्रिटिशांचा अंमल येण्यापूर्वी हे लोक तिथल्या प्रशासकांच्या हुकमतींत निष्ठापूर्वक राहत. पण निसर्गतःच त्यांची वृत्ति लढाऊ असल्यामुळे जवळपासच्या जमातींबरोबर त्यांचे सदैव झगडे चालू असत. लुटालूट, मारामारी व कत्तल या गोष्टी त्यांच्या जणूं अंगवळणींच पडल्या होत्या. परंतु पुढे ब्रिटिशांनी त्यांच्यावर पूर्ण पगडा बसविला व त्यांच्या पूर्वीच्या वृत्तींत बदल घडवून आणला, असें सांगतात.

इदु लोकांच्या वस्तीची रचना पद्धतशीर नसते. प्रत्येक कुटुंब प्रमुख आपापल्या सोयीप्रमाणे घर बांधतो व त्यामुळे खेड्याचें स्वरूप एकंदरींत अव्यवस्थितच दिसतें.

इदु लोक एकत्र कुटुंबपद्धतीने राहतात. त्यामुळे कुटुंबांत माणसें बरीच असतात. त्या सर्वांना सोयीस्करपणें राहतां येईल, असे घर ते बांधतात. घर बांधण्याच्या जागीं प्रथम जमिनींत लाकडाचे खुंट पुरतात व त्यांवर जमिनीपासून ५-६ फूट उंचीवर घराची उभारणी करतात. हें घर म्हणजे

एकमेकांना लागून असलेल्या खोल्यांची एक मालिकाच असते. सर्व बांधकाम बांबूचें व जंगली लांकडाचें केलेलें असतें. प्रत्येक



इदु मिश्मीचें घर


खोलींत स्वयंपाकासाठी व शेकण्यासाठी एक अग्निकुंड असतें. घराच्या पडवींत हरणें, डुकरें इ. प्राण्यांचीं मुंडकीं टांगून ठेवलेलीं असतात.

प्रत्येक घरांत मृत प्राण्यांच्या कवटया, शेतीचीं व विण-कामाचीं अवजारें, कांही लोखंडी व पितळी भांडीं, बांबूच्या व वेताच्या विणलेल्या चटया, एक-दोन पत्र्याच्या पेटया, एवढें साहित्य असतें.

इतर मिश्मी जमातींपेक्षा इदूंची केशरचना निराळी असते. ते दोन्ही कानशिलांवरील केस काढून टाकून मागच्या बाजूचे लांब सडक वाढवितात व त्यांच्या अग्रांची गांठ बांधतात. इदु लोकांना रंगीबेरंगी पोषाखाची फार आवड असते. पुरुष काळा कोट घालतात व लंगोटी नेसतात. कापडाचा एक तुकडा छातीपोटावर पट्ट्याने बांधून ठेवतात. त्यांचा कोट झाडांच्या सालींतील तंतु व माणसाचे केस यांनी बनविलेला असतो. तो इतका मजबूत असतो, की त्यांत भालादेखील खुपसला जात नाही. ते डोक्याला वेताची टोपी घालतात. स्त्रिया सैलसर पोलकीं घालतात व कमरेभोवती रंगीत वस्त्र गुंडाळतात.

इदूंचे अलंकार मोजकेच असतात. स्त्री व पुरुष दोघेहि लहानमोठ्या मण्यांच्या अनेक माळा गळ्यांत घालतात व कान टोचून त्यांत बांबूचे तुकडे बसवितात.

इदु लोक डोंगरउतारावर शेती करतात व अरुम, टॅपिओका, राळे, मका, तंबाखू इ. पदार्थ तसेंच घेवडा, भोपळा इ. भाज्या पिकवितात. तिरकमठा व बंदूक यांच्या साहाय्याने ते शिकारहि करतात. त्यांना मासे मारण्याचाहि छंद असतो. ते पशुपक्ष्यांचें मांस, मासे, उंदीर, तांदूळ, राळे व भाजीपाला यांचा जेवणांत उपयोग करतात. तांदुळापासून तयार केलेली दारू हें त्यांचें



इदु मिश्मींचा गळ्यांतला एक अलंकार

राष्ट्रीय पेय आहे. त्यांना तंबाखूचें जबरदस्त व्यसन असतें. इदूंना वर्ष व महिने हीं दोनच कालपरिमाणें माहीत आहेत. स्त्रियांच्या दोन मासिक पाळ्यांमधील काल म्हणजे एक महिना, अशी त्यांची समजूत असून ती एका दंतकथेवर आधारित आहे. त्यांच्या वर्षाचा प्रारंभ पावसाळ्यांत होतो.

इदु लोकांची स्वतंत्र भाषा असून तिचा अंतर्भाव मिश्मी भाषांमध्ये होतो. अस्पष्ट उच्चारणामुळे ही भाषा आजपर्यंत इतरांना अगम्यच राहिलेली आहे.

सामाजिक जीवन – इदु कुटुंब हें एकत्र कुटुंब असतें. कौटुंबिक बाबतींत हे लोक कुटुंबप्रमुखाचा शब्द प्रमाण मान-तात. बाप, आजा व चुलता यांच्याविषयीं कुटुंबांतील प्रत्येक माणसाला आदर असतो. जमीन-जुमला, पशु-पक्षी, अन्न-धान्य, घर-दार या गोष्टींवर कुटुंबाची सामायिक मालकी असते. परंतु दागदागिने, कपडालत्ता, पैसाअडका, या गोष्टी मात्र वैयक्तिक मालकीच्या असतात.

इदु जमातींत अनेक शाखा आहेत. एक शाखा म्हणजे, कोण्यातरी एका मूळ पुरुषाची संतति असते. ते परस्परांना अन्ना या नांवाने संबोधतात. पूर्वी एक शाखा एकाच खेड्यांत किंवा अनेक खेड्यांच्या एका गटांत राहत असे व त्या खेड्याला त्या शाखेचें नांव मिळत असे. परंतु ही प्रथा आता मोडत चालली आहे. कारण उद्योगधंद्यासाठी हे लोक आता

आपापलीं खेडीं सोडून अन्यत्रहि जाऊं लागले आहेत. इदूंचा सामाजिक दर्जा ते कोणाचे दास आहेत, कीं स्वतंत्र आहेत त्यावरून ठरवितात. या दोन वर्गांत परस्पर बेटी-व्यवहार होत नाही. इदूंची राहणी अगदीं साधी असते. स्त्रिया घरकाम सांभाळून पुरुषांना शेतीच्या कामांत मदत करतात. तरुण मुलें तिरकमठा घेऊन उंदीर, सरडे, पक्षी यांची शिकार करतात. आईबाप या मुलांना शिक्षण देण्याची कांहीच व्यवस्था करीत नाहीत. त्यामुळे त्यांच्या मनांत वडील माणसांविषयीं अप्रीति निर्माण होत असलेली दिसते.



इदु मुलगी

केवळ स्त्री-पुरुष संबंध झाल्याने संतति होत नाही; तर त्यासाठीं ईश्वरी कृपेची आवश्यकता आहे, अशी इदूंची समजूत आहे. त्यामुळे वांझ स्त्रीला समाजांत योग्य तो मान मिळत नाही. वांझपण टळावें यासाठी स्त्रिया अनेक दैवी उपायांचा अवलंब करतात. गर्भपात होतो, तो पुरोहिताने केलेल्या जादूटोण्यामुळें होतो, असें ते मानतात. त्यामुळे गरोदर स्त्री व तिचा पति हरणाच्या शिंगाला स्पर्श न करणें, हरणाचें मांस न खाणें इ. नियम कटाक्षाने पाळतात. त्याचप्रमाणे गर्भपात टळावा, प्रसूति सुलभ व्हावी, मुलांना भूतबाधा होऊं नये, यासाठीहि त्यांचीं कांही विधि-विधानें असतात. मूल अंगावर पीत असेतों इदु लोक ब्रह्मचर्य पाळतात.

विवाहपद्धति – इदु तरुणांत विवाह होण्यापूर्वीं प्रणययाचना करण्याची पद्धति आहे. मात्र ती अत्यंत गुप्तपणे करावी लागते. कारण प्रियाराधन उघडकीस आल्यास जबर दंड भरावा लागतो. मुलीची संमति आहे, असें दिसल्यास मध्यस्थामार्फत तिच्या बापाकडे तिला मागणी घालण्यांत येते. मुलीचे आई-वडील आपल्या नातलगांची व मुलीची संमति घेऊन देज वगैरे पुढील सर्व व्यवहार ठरवितात. लग्नांत आईबाप मुलीला आंदण म्हणून अनेक वस्तू देतात. मुलींचीं लग्नें साधारणपणें १२ ते १९ या वयांत होतात. मुलींच्या चारित्र्याला इदु लोक फार जपतात. मुलीचें पाऊल वांकडें पडल्याचा नुसता संशय आला, तरी त्याबद्दल तिला देहदंड सोसावा लागतो. इदु लोकांत बहुपत्नीकत्व आहे.



इदु सैनिक

इदु लोक हे वृत्तीन रांगडे आणि रागीट असतात. क्षुल्लक कारणांवरूनहि ते खुनासारखे गंभीर गुन्हे करायला प्रवृत्त होतात. तडजोडीची वृत्ति त्यांच्यांत दिसत नाही. असें असलें तरी, हे लोक दगलबाजी किंवा चोरी मात्र करीत नाहीत, हें विशेष म्हणायला हवें.

व्यभिचार, बालहत्या, खून इ. गुन्ह्यांचा न्यायनिवाडा करण्यासाठी इदु जमातींत न्यायमंडळें असतात. गांवांतील अनुभवी, वृद्ध, समजूतदार व निःपक्षपाती असे लोक त्या मंडळांत नेमलेले असतात. न्यायदानाबद्दल दोन्ही पक्षांकडून त्यांना मानधन मिळतें. न्याय करतांना ते गुन्ह्यामागच्या हेतूकडे विशेष लक्ष देतात. मृत्यु, कैद, नुकसान भरपाई, दंड व फटके मारणें, असे त्यांचे शिक्षेचे प्रकार आहेत.

मर्तिकाची प्रथा – ज्या घरीं मृत्यु झाला असेल, त्या घरच्या माणसांनी पांच दिवसपर्यंत बाहेर जातां कामा नये व बाहेरच्या माणसांनी त्या घरीं येतां कामा नये, असा त्यांच्यांत नियम आहे. हे मृताला पुरतात. मृत व्यक्ति लौकर नजरेआड होऊं नये, यासाठी दोन किंवा तीन दिवससुद्धा ते अंत्यसंस्कार करीत नाहीत.

धार्मिक कल्पना – इदु लोक परमेश्वराला सर्वश्रेष्ठ सृष्टि-कर्ता असें मानतात. त्याला ते इन्नी असें म्हणतात. तो चोख न्याय देणारा आहे, अशी त्यांची धारणा जाहे. सर्व धार्मिक विधींच्या प्रारंभीं ते ईश्वराचें स्मरण करतात. भूतपिशाचां-वरहि त्यांची श्रद्धा असून दैनंदिन जीवनांतील सर्व गोष्टींवर व निसर्गांतील घटनांवर भुताखेतांचें वर्चस्व असतें, अशी त्यांची समजूत आहे. रोगराई होते, ती या भूतपिशाचांच्या कोपामुळेच होते, अशी इदूंची श्रद्धा असते. रोगी बरा होण्या-साठीं ते भुतांना बलिदान देऊन संतुष्ट करतात. हें सर्व करणारा एक उपाध्याय वर्ग त्यांच्यांत असतो. [दि इदु मिश्मी – तपनकुमार बारुआ.]

इदैयन

तमिळ प्रांतांतील धनगरांची एक जात. हल्ली या जातीचे लोक मेंढरें पाळण्याव्यतिरिक्त इतरहि कांहीं धंदे किंवा नोकऱ्या करतात. यांचे मुख्य वर्ग दोन–– एक पूर्णपणे सुधारलेला व दुसरा आपल्या जातीचें मूळ वैशिष्टच कायम ठेवून असणारा. पहिल्या वर्गांतील लोक वैष्णव असून गंधाचा नाम लावतात व स्वतःला यादव वंशांतील समजतात. दुसऱ्या वर्गांतील लोक भुताखेतांना भजतात. ते शैवपंथी असल्यामुळे कपाळीं भस्म लावतात.

विजयनगरच्या कृष्णदेव राजाचा दिवाण तिम्मराज हा इदैयन जातीचा होता, असें हे लोक मानतात. शिबि, कलकट्टी, पासी, पाल, पेंडुक्कुमेक्की, शिबियन, संगुकट्टी, सांबन, पडुनाटु वगैरे यांच्यांत पुष्कळ पोटजाती आहेत. शिबि लोक पूर्वी पालखी वाहण्याचें काम करीत असत. पालखीला शिबिका असें नांव आहे, तें या शिबि लोकांवरूनच पडलें असावें. संगुकट्टी जातीचे लोक शंखांचे दागिने घालतात, तर सांबन लोक अंगाला भस्म चर्चितात.

पडुनाटु पुरुषांना चुलत बहिणीशीं लग्न करतां येतें. लग्नांत पुरोहिताचें काम ब्राह्मण करतात. नवऱ्या मुलाची बहीण नवरीच्या गळ्यांत ताळी बांधते. यांना घटस्फोट किंवा विधवा-विवाह मान्य नाही. संतति नसलेल्या विधवा स्त्रीची संपत्ति भाऊ, बाप किंवा मामा यांच्याकडे जाते. ग्रामपंचायतीकडून तिला नवऱ्याच्या संपत्तीपैकीं उपजीविकेपुरता पैसा मिळतो. पुरुषाची संपत्ति त्याच्या मुलाला न मिळतां ती जावयाला मिळते. जावई सासऱ्याकडेच राहतो.

कांही ठिकाणीं मुलीला ऋतु प्राप्त झाल्यावर तिचा मामा किंवा मामेभाऊ माडाच्या हिरव्या चुडतांचें एक झोपडें बांधून त्यांत तिला सोळा दिवस ठेवतो व नंतर तिची ऋतुशांति केली जाते.

विवाहप्रथा — पोटभेदांपरत्वें लग्नपद्धतींत थोडाफार फरक आढळतो. कोइमतूर येथे लग्नापूर्वीं देवापुढे तांबडें किंवा पांढरें फूल विडयाच्या पानांत गुंडाळून ठेवतात व लहान मुलाला तें उचलायला लावतात. मुलानें पांढरें फूल उचललें तर तो मनांत योजलेल्या लग्नाला शुभ शकुन मानतात. मख-प्रदेशांत प्रौढ इदैयन मुलींचें लग्न कधी कधी दहा बारा वर्षांच्या मुलाशींहि करतात.

मर्तिकाची प्रथा — मृताला स्मशानभूमींत नेल्यावर त्याच्या तोंडांत तांदूळ, पाणी व एक नाणें ठेवतात. दहन केलेल्या जागे-वर नंतर लहानशा नांगरानें नांगरतात व तिथे नऊ प्रकारचीं धान्यें पेरतात. सोळाव्या दिवशीं ब्राह्मण त्यांच्या अंकुरांची मानवाकृति तयार करतो व मृताचा मुलगा तिची पूजा करतो.

त्रिवांकुर येथील कांही इदैयन तमिळ भाषा बोलतात, तर कांही मल्याळम् बोलतात. [का. ट्रा. स. इं.]

इद्वत्सर

इडावत्सर पाहा.

इध्म

' इध्यते अग्निः अनेन इति '= ज्याने अग्नि प्रज्वलित केला जातो तें अर्थात् समिधा म्हणजे इध्म होय. यज्ञ करतांना हवनासाठी वृक्ष-वनस्पतींच्या शाखोपशाखांच्या लहान काटक्यांचा उपयोग करतात, त्यांना इध्म किंवा समिध् असें नांव आहे. पलाश, अश्वत्थ, खदिर (खैर), रोहित (रक्त रोहिडा), हरिता (दूर्वा) व उदुंबर या वृक्ष–वनस्पतींच्या समिधा घ्याव्या, असें मरीचि ऋषीनें सांगितलें आहे. या वनस्पती मिळणें शक्य नसेल, तेव्हा कांटे नसलेल्या कोणत्याहि वनस्पती चालतात, असें त्यानें पुढे सांगितलें आहे. कात्यायनानें आपल्या नामावलींत हरिता व रोहित या वगळल्या असून शमी, न्यग्रोध (वड), प्लक्ष (पिंपरी), वैकंकत (वेकळी), बिल्व, चंदन, सरल (Caniyār), शाल (साण) व देवदारु यांचा अंतर्भाव केला आहे. समिधेसाठी शाखेचा अग्राकडचा भाग घेतात. ती शाखा मात्र खुरटलेली, सडलेली, आंखूड, वेडीवांकडी व फार बारीक नसावी.

एका इध्मात साधारणतः एकवीस काष्ठें असतात. परंतु कांही वेळा ही संख्या कमी-जास्ती होते. दर्शपूर्णमास यागासाठी

एकवीस काष्ठांचा इध्म असतो. इध्मामध्ये तीन परिधि असतात. परिधींची लांबी सामान्यतः ३६ अंगुळें असते. समिधांची लांबी प्रादेशमात्र असते. [विद्याधरशास्त्री भिडे]

इध्मबंधनरज्जु इध्माला बांधायच्या त्रिसंनहन नामक दर्भांच्या तिपदरी दोरीला इध्मबंधनरज्जु असें म्हणतात. ही दोरी यज्ञकर्माच्या शेवटीं अग्नींत टाकतात.

इध्मवाह ऋग्वेद ९.२६ या सूक्ताचा द्रष्टा. हा अगस्त्याचा पुत्र असून ऋतूने याला दत्तक घेतलें होतें. हा एक गोत्रकार होता.

इध्माहरण दर्शपूर्णमास पाहा.

इन सूर्याचें नांव. विष्णूचें स्वरूप. गोपींनीं बालकृष्णाच्या बारा अंगांचें रक्षण व्हावें म्हणून ज्या अनेक देवतांचें स्मरण केलें, त्यांत या देवतेने श्रीकृष्णाच्या कंठाचें संरक्षण करावें, असें प्रार्थिलें आहे. [भाग. पु. १०.६.२२]

इनामाय विदर्भांतली एक देवी. तेथील अनेक गांवांत दसऱ्याला हिची पूजा करण्याची चाल होती. ही पूजा कोतवालाकडे मांडीत व देवीला हेला बळी देत. हल्ली मात्र ही प्रथा बंद पडली आहे. स्त्रिया उंच जागीं पाळणा बांधून त्यांत झोके घेत पंधरा दिवसपर्यंत इनामायचीं विविध गाणीं गातात.

इनुपसनिगलु वेंकटरामय्या (१८ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक संगीतकार. गोपालकृष्ण या नांवाने त्याने तेलुगु भाषेंत अनेक कीर्तनें रचलीं आहेत. भजन हा प्रकार साहित्यांत प्रथमच निर्माण करणाऱ्या बोधेंद्र स्वामीचें भजन याने रचलें आहे. तोडी रागांतील हें भजन गुरुकीर्तन म्हणून प्रत्येक भजनाच्या सुरवातीला म्हणण्याची तिकडे पद्धत आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

इन्क्विझिशन ख्रिस्ती धर्मसमीक्षणसभा. १३ व्या शतकांत, युरोपियन देशांत, लोकांच्या धर्माचारांचें निरीक्षण करण्यासाठी व ते जर कॅथॉलिक धर्माशीं जुळणारे नसतील, तर त्या लोकांना शिक्षा ठोठावून त्या अमलांत आणण्याचें कार्य करण्यासाठीं एक सभा स्थापन झाली होती, तिला इन्क्विझिशन असें नांव आहे. प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी इन्क्विझिशन याच नांवाचा एक ग्रंथ लिहिला असून त्यांत यासंबंधी माहिती दिली आहे, ती पुढील प्रमाणे–

ख्रिस्ताच्या मृत्यूनंतर त्याचे कांही शिष्य युरोपांत पळून गेले व त्यांनी आपल्याबरोबर ख्रिस्ती धर्म तिथे नेला. पण यहुदी प्रदेशांतल्याप्रमाणे युरोपांतहि त्यांचा छळ सुरू झाला. सुमारें दोन–अडीचशें वर्षें असा छळ सहन केल्यावर पुढे त्यांचे दिवस पालटले. रोमच्या कोंस्तांतीनु या राजाने, ख्रिस्तानुयायांच्या औषधींनी त्याची मुलगी रोगमुक्त झाली म्हणून, ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्यामुळे ख्रिस्ती धर्माला एकदम राजाश्रय मिळाला. तो मिळाल्यावर ख्रिस्ताचा धर्म युरोपमध्ये फोफावूं लागला. ख्रिस्ती धर्माऐवजी रेलिजिआंव कातोलिक आपास्तोलिक रोमान हें नांव त्याला मिळालें. मग राजसत्तेच्या बळावर ख्रिस्ती धर्माचे अनुयायी इतर धर्मीयांचा छळ करूं लागले; त्यांना सक्तीने नव्या धर्माची दीक्षा देऊं लागले. पण नव्या धर्माची दीक्षा मिळूनहि त्या नव ख्रिस्ती लोकांनी आपले पूर्वींचेच धर्माचार चालू ठेवले. तेव्हा त्या लोकांना ताळ्यावर आणण्यासाठी ख्रिस्ती धर्मगुरु पोप ९ वा ग्रेगरी, याने १२२९ सालीं इन्क्विझिशन ही संस्था स्थापन केली. नंतर त्याने बिशप व आर्चबिशप यांची एक परिषद् भरविली व तींत ४५ ठराव पास केले. हे ठराव म्हणजेच या संस्थेची नियमावलि होय. पुढे इटली, फरान्स, जर्मनी व स्पेन या कॅथॉलिक देशांत त्या संस्थेचा अंमल सुरू झाला. त्या देशांत स्थायिक झालेल्या ज्यू लोकांना सक्तीने ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्यांत आली. पण ते ख्रिस्ती धर्माचे आचार पाळीत नाहीत, असें दिसून येतांच इन्क्विझिशनचे अधिकारी त्यांना फांसावर लटकवूं लागले. या आसुरी शिक्षाप्रकारांना घाबरून बरेच ज्यू पोर्तुगालमध्यें पळून गेले. परंतु तिथेहि पोर्तुगीजांनी त्यांना ख्रिस्ती केलें व नंतर ते ख्रिस्ती धर्म आचरीत नाहीत, म्हणून त्यांना इन्क्विझिशनच्या धारेवर धरलें. या सर्व प्रकरणांत



इन्क्विझिशनचें प्रतीक चित्र

लाखों ज्यू धार्मिक अत्याचाराना बळी पडले.

१५१० सालीं पोर्तुगीजांनी गोमंतकांत प्रवेश केला. त्या वेळीं फक्त तीस गावांचा तिसवाडी महाल त्यांच्या ताब्यांत आला. पुढे १५४२ मध्ये सासष्टी व बारदेश हे महाल त्यांच्या आधिपत्याखाली आले. तिसवाडी महालांत सक्तीचें ख्रिस्तीकरण करण्यास १५४० मध्येच सुरवात झाली होती. पुढे नवख्रिस्त्यांस धर्मशिक्षण देण्याच्या निमित्ताने सेंट फरान्सिस झेवियर हा गोवा शहरांत आला. त्याला ज्या रीतीने ख्रिस्तीकरण करावें असें वाटत होतें, त्या रीतीला अधिकाऱ्यांची मान्यता मिळत नव्हती. म्हणून त्या अधिकाऱ्यांविरुद्ध कागाळचा करून त्याने पोर्तुगालच्या बादशहाला इन्क्विझिशनची एक शाखा गोव्यांत उघडण्याची विनंती केली. त्याच्या हयातींत ती उघडली गेली नाही. पुढे १५६० सालीं गोवा शहरांत ती सुरू झाली. त्याच वर्षी सासष्टी व बारदेश या महालांत ख्रिस्तीकरण सुरू झालें. तत्कालीन व्हाइसरॉय दों कोंस्तातीनु याने २ एप्रिल १५६० या दिवशीं पुढील आशयाचें एक आज्ञापत्रक काढलें –

सर्व हिंदु लोकांना, जर ते ख्रिस्ती धर्म स्वीकारीत नसतील तर, तिसवाडी महालाच्या बाहेर हांकलून द्यावें. जर ते सासष्टी किंवा बारदेश या महालांतले असतील, तर त्यांना त्यांच्या गांवीं जाण्यास परवानगी द्यावी. इतरांस कैद करून त्यांची संपत्ति सरकारजमा करावी. जाणाऱ्या लोकांनी एका महिन्याच्या आंत आपली जमीन विकून जावें. जो कोणी जाणार नसेल, त्याचें नांव सरकारला कळवावें. अशा लोकांना त्यांची अर्धीच संपत्ति द्यावी व बाकीची सरकारजमा करावी.

त्यानंतर ८ जूनच्या हुकुमान्वयें सोनारांनाहि अशीच ताकीद देण्यांत आली. सोनार हे मूर्ति घडवणारे असल्यामुळे त्यांच्यावर पाद्रयांचा विशेष राग होता.

गोवा शहरांतील इन्क्विझिशनच्या शाखेने आपली कार्यपद्धति ठरविली व नवख्रिस्त्यांनी कोणत्या गोष्टी करूं नयेत, याची जंत्री तयार केली. या जंत्रीविरुद्ध वागणाऱ्यांना फटके मारण्यापासून तों जिवंत जाळण्यापर्यंतच्या शिक्षा देण्यांत आल्या. हे नियम आधी ख्रिस्ती समाजापुरते मर्यादित होते; ते पुढे हिंदूंनाहि लागू करण्यांत आले. या भयाने हिंदु, त्याचप्रमाणे नवख्रिस्तीहि आपलीं घरेंदारें सोडून मद्रास, म्हैसूर कोचीन इ. ठिकाणीं गेले. हे सर्व अत्याचार करण्यांत डोमिनिकन पंथाचे अनुयायी अग्रेसर होते.

इ. स. १७७० च्या सुमारास पोंबाल नांवाचा उदारमतवादी गृहस्थ पोर्तुगालचा मुख्य प्रधान झाला. त्याने डोमिनिकन मिशनऱ्यांची व गोवा शाखेचीं अनन्वित कृत्यें पाहून १७७८ मध्ये गोव्यांतील इन्क्विझिशनची शाखा बंद केली. त्याने तिथल्या सर्व पंथांच्या मिशनऱ्यांना हाकलून लावलें व त्यांची विपुल संपत्ति सरकारजमा केली. पोंबालच्या मृत्यूनंतर दोनामारिया ही पोर्तुगालची राणी झाली. तिने ती शाखा



गोवा इन्क्विझिशनमधील अत्याचाराचें एक दृश्य

पुनरुज्जीवित केली. पण तिला आता पूर्वीचें तेज उरलें नव्हतें. ही शाखा १८०८ मध्ये बंद झाली ती कायमचीच. इन्क्विझिशनच्या सत्ताकालांत गोमंतक, चौल, वसई, सासष्टी, दमण, दीव व पोर्तुगीज सत्तेखालील इतर पौर्वात्य प्रदेश इन्क्विझिशनच्या कार्यक्षेत्राखाली होते.

या शाखेचा २४८ वर्षांचा इतिहास हा असा भयानक व क्रूर आहे. या शाखेच्या कार्यालयाचें दप्तर जरी पोर्तुगीजांनी नष्ट केलें किंवा गुप्त ठेवलें असलें, तरी फरेंच व्यापारी देलोन व डॉ. बुचानन यांनी स्वत: कैदेंत राहून इन्क्विझिशनच्या या छळवादाचा अनुभव घेतला व त्यावर ग्रंथहि लिहिले. त्यामुळे जगाला इन्क्विझिशनच्या अनन्वित कृत्यांची कल्पना आली. [इन्क्विझिशन – प्रा. अ. का. प्रियोळकर.]

इफ्तार या शब्दाचा कोशांतील अर्थ 'मोडणें' असा असला, तरी व्यवहारांत उपवास सोडणें अशा अर्थी तो योजतात. मुसलमान लोक रमझान महिन्यांत रोज दिवसभर उपवास करून संध्याकाळीं तो सोडतात. 'ईद् उल् फित्र' या दिवशीं सायंकाळीं सबंध महिन्याच्या उपासाचें पारणें मोठ्या थाटाने करतात. मुहंमद पैगंबर मात्र फक्त खजूर खाऊन हा उपास सोडीत असे. [डि. इ.]

इब्राहीम ज्यांच्या द्वारें ईश्वराने आपले विशेष आदेश जगाला दिले, अशा सहा जणांपैकी एक. म्हणून

इब्राहीमला 'खलिलुल्लाह' असें म्हणतात. इस्लामी धर्मग्रंथाचे वीस भाग प्रथम यालाच ज्ञात झाले. [डि. इ.]

इब्लिस याला एब्लिस असेंहि म्हणतात. मुसलमानांच्या दैवतकथांतील हा सैतान होय. शैतान या नांवाने कुराणांत याचा बऱ्याच वेळां उल्लेख आलेला असून तिथे त्याला दुष्ट भुतांचा राजा, असें मानलेलें आहे. इब्लिसने अल्लाविरुद्ध बंड केलें व अल्लाची उपासना करण्याचें नाकारलें, म्हणून त्याला स्वर्गांतून हाकलून देण्यांत आलें, अशी कुराणांत कथा आहे. इब्लिसला प्रथम देहदंडाचीच शिक्षा दिलेली होती; परंतु त्याच्या विनवणीवरून उत्थापनाच्या दिवसापर्यंत ईश्वराने ती तहकूब केली. [म. ज्ञा. को.]

इभ्य पाणिनीने दंडादिगणांत याचा उल्लेख केला आहे (५. १. ६). जातकांतहि हा शब्द आढळतो. इभ्य म्हणजे धनिक खरा; पण तो सामान्य नव्हे, तर निगमसभेचा सदस्य असणारा श्रेष्ठी. पाणिनीच्या काळांत याला राजाकडून हत्तीवर बसून जाण्याचा अधिकार प्राप्त होत असे. 'इभमर्हति इति' = हत्तीवर बसण्याचा अधिकारी तो इभ्य होय, अशी त्याची व्याख्या होती. कालांतराने इभ्यालाच नैगम किंवा महाजन म्हणूं लागले. [पा. भा.]

इमान इमान म्हणजे इस्लामी धर्माविषयीं श्रद्धा. ही श्रद्धा अंतकरणांत तर असली पाहिजेच, शिवाय ती मुखानेहि व्यक्त झाली पाहिजे. इमान मुज्मल म्हणजे कुराण व अहादीस यांच्याविषयीं श्रद्धा बाळगणें व इमान मुफस्सल म्हणजे मुस्लीम धर्माच्या सहा मूल तत्त्वांवर विश्वास असल्याची घोषणा करणें. अर्थात् या विश्वासाबरहुकूम आचरण करणें, हें महत्त्वाचें मानलेलें आहे. [डि. इ.]

इमाम मुसलमानांचा नेता किंवा खलीफा याला इमाम असें म्हणतात. नेता कसा असावा, तें हिदायामध्ये सांगितलें आहे. तो इस्लामनिष्ठ, स्वातंत्र्यप्रिय, तीव्र बुद्धीचा, वयाने परिपक्व व सर्वमान्य असला पाहिजे. त्यानें इस्लाम धर्माचा प्रसार करून त्याचें सामर्थ्य वाढविलें पाहिजे. विद्वान् व धार्मिक व्यक्तींचा मानसन्मान केला पाहिजे. व सर्व मुसलमानांना न्यायाने वागविलें पाहिजे. नेता तसा वागत नसेल, तर सर्व लोकांनी त्याला तसें वागायला भाग पाडावें, असेंहि सांगितलें आहे.

सुन्नी पंथाचे लोक आपल्या नेत्यांना खलीफा म्हणतात; तर शिया पंथी आपल्या बारा नेत्यांना इमाम म्हणतात. हे सर्व बाराहि नेते अलीचे वंशज आहेत. [डि. इ.]

इमाम ज़मिनी मुसलमान लोक पालनकर्त्या साधूला अर्पण केलेल्या वस्तूला इमाम ज़मिनी असें म्हणतात. प्रवासाला निघालेल्या किंवा आपत्ति आलेल्या माणसाच्या डाव्या दंडांत एखादें नाणें किंवा अंगठी हळदीने रंगविलेल्या कापडांत गुंडाळून बांधण्याची मुसलमानांत प्रथा आहे. संकल्पित प्रवास पूर्ण झाल्यावर किंवा आपत्तीचें निवारण झाल्यावर त्या बांधलेल्या वस्तूच्या किमतींत थोडी भर घालून तेवढ्या किंमतीची मेवामिठाई रक्षणकर्त्या साधूच्या नांवाने सदाचरणी लोकांना वांटतात. [डि. इ.]

इमामबारा मुहर्रमच्या सणासाठी धनिक मुसलमान लोक एक साधारण चौकोनी इमारत बांधून त्यावर घुमटाकार छत बसवितात, तिला इमामबारा असें नांव आहे. इमारतींत जमिनीवर खजुरीच्या पानांच्या चटया घालून वर सतरंजी पसरतात व तिच्यावर तलम पांढरें कापड अंथरून बैठक तयार करतात. एका भिंतीजवळ मक्केकडे तोंड करून ताझिया ठेवतात. जवळच एक ओटा बांधलेला असतो. तो चांदी, हस्तिदंत, किंवा लाकूड यांच्यापासून करतात. त्यावर रंगीबेरंगी भरजरी कापड अंथरतात. या ओटयावर कुराण ठेवून व मक्केकडे तोंड करून मौलवी तें वाचतो व समोर जमलेले लोक भाविकपणे तें ऐकतात. मखमली किंवा रेशमी पडदे, आरसे, पताका, हंड्या-झुंबरें, यांनी त्या सर्व इमारतींत आरास करतात.

मुहर्रमचे दहाहि दिवस रोज सकाळ, संध्याकाळ इमामबारामध्ये 'मजलिस' (शोकसभा) भरते. त्या वेळीं लोक मौलवीचें मजलिस वाचन ऐकतात. नंतर 'मरसिया' (शोकगीत) गातात व उभें राहून मुहंमद पैगंबरानंतरच्या सर्व थोर पुरुषांची नांवें घेऊन त्यांच्या आत्म्याला शांति मिळावी म्हणून प्रार्थना करतात. नंतर ते दुष्ट खलिफांचीं नांवें घेऊन त्यांना शिव्याशाप देतात. व शेवटीं हसन व हुसेन यांच्या नांवाचा उद्घोष करून व हातांनी छाती पिटून नाचतात. [मु. इं.]

इयमरम् प्राचीन काळचा एक मृदंगाचा प्रकार. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

इयरकोन कलिकाम्म द. भारतांतील एक शैव संत. याने संत सुंदररचा अपमान केला म्हणन

शंकराने याला व्याधिग्रस्त केलें व सुंदरर याच्याच हस्तें ती व्याधि दूर होईल, असा दृष्टान्त दिला. एकदा सुंदरर कलिकाम्माच्या भेटीला आला असतां याने आपलेंच शिर उडविलें, असें सांगतात. सुंदररला तें पाहून फार दुःख झालें व तो स्वतः देहत्याग करायला उद्युक्त झाला तेव्हा शंकराने कलिकाम्माला जिवंत केलें. कलिकाम्माने मग सुंदररचे पाय धरले व त्याचें शिष्यत्व पत्करलें.

इयरपगै तमिळनाडमधल्या त्रेसष्ट शैव संतांपैकी एक. याच्या चरित्रावर गोपालकृष्ण भारती यांनी एक नाटक लिहिलें आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

इरजिक महाराष्ट्रांत एखाद्याच्या शेतावर पेरणी, काढणी व मळणी या कामांत जे कुणबी मदत करतात, त्यांना सकाळीं न्याहारी, दुपारीं जेवण व संध्याकाळीं मोठें जेवण द्यावें लागतें. अशा प्रकारच्या कामाला व त्याच्या भोजनात्मक संभावनेला इरजिक असें नांव आहे. महार, मांग वगैरे लोकांना इरजिकीला बोलावीत नाहीत. इरजिकीच्या वेळीं मांग डफ वाजवीत राहातो व कामकरी 'शाब्बास रे वाघा', 'भलरि दादा' अशीं पालुपदें उंच स्वरांत गातात. [गांवगाडा]

इरट्टैयर या शब्दाचा युग्म असा अर्थ आहे. तमिळनाडमधले हे दोन प्रसिद्ध कवी होते व ते सदैव एकत्र असत. यांतला एक लंगडा व दुसरा आंधळा होता. लंगडा आंधळ्याच्या पाठीवर स्वार होई व दोघे मिळून भिक्षा मागायला जात. दोघे मिळून काव्य रचीत. प्रायः लंगडा छंदाचा पूर्वार्ध रची व आंधळा उत्तरार्ध रचून तो छंद पुरा करी. या दोघांच्या मिळून चार पांच कृती उपलब्ध आहेत. [त. सा. सं.]

इरयिम्मन तंपि (१७८३–१८५८ इ. स.) केरळांतला एक साहित्यकार. त्रिवांकुरच्या स्वाति तिरुनल महाराजाच्या दरबारांत हा आस्थान विद्वान् होता. हा कवि व नाटककार असून याने दक्षयागम्, कीचकवधम् व उत्तरास्वयंवरम्, हीं नाटकें लिहिलीं आहेत. नवरात्रिप्रबंधम् या काव्यांत त्याने त्रिवेंद्रम्च्या नवरात्र उत्सवाचें वर्णन केलें आहे. याने तानवर्ण, पदवर्ण, कीर्तनें व पदेंहि रचलीं आहेत. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

इरलिग बेंगळूरजवळ आढळणारी एक जात. हे लोक कन्नडतेलुगुमिश्रित तमिळ बोलतात व शेती किंवा मजुरी करतात. [सेन्सस रिपोर्ट–म्हैसूर]

इरा (१) प्राचेतस दक्ष व असिक्नी यांची कन्या व कश्यपाच्या भार्यांपैकीं एक. हिला लता, वल्ली (किंवा अलता) व वीरुधा अशा तीन कन्या झाल्या. भाग. पुराणांत हिला इला असें म्हटलें आहे. [पु. इं.; प्रा. च. को.]

(२) एक सरोवर. [कालिकापुराण]

इराणी (१) एक भटकी जमात. मुगल टोळीपैकी हे लोक असून ते अत्यंत उपद्रवी आहेत. सर्व भारतभर हे गुन्हे करीत हिंडतात; परंतु पोलिसांच्या तावडींत मात्र सांपडत नाहीत. चाकू, कात्र्या, बनावट रत्नें, मोती, खेळणीं, मणी, इ. वस्तू विकणें हा यांचा धंदा आहे. जिप्सी लोकांशीं यांचें बरेंच साम्य आहे. कोंबड्यांच्या झुंजी लावणें यांना फार आवडतें. [का. ट्रा. स. इं.]

(२) इराणी या नांवाने ओळखला जाणारा आणखी एक वर्ग भारतांत आहे. हे इस्लामी धर्माचे नसून पारशी धर्माचे आहेत. मुसलमानांशीं यांचा विरोधच दिसून येतो. मुसलमानांना समजूं नये म्हणून हे लोक एक वेगळीच भाषा बोलतात. पर्शियन भाषेचीच ती एक बोली आहे. उपहारगृहें चालविणें हा यांचा प्रमुख धंदा आहे.

इरावती सांप्रतच्या रावी नदीचें प्राचीन नांव. ऋग्वेदांतील परुष्णी नदीलाच इरावती म्हणत, असें निरुक्तांत सांगितलें आहे (९. २६). ही सर्वकल्मषनाशिनी आहे (वामन पु. ७९. ७). हिला पितरांनी पवित्र मानलें आहे. इरा नामक सरोवरांतून हिचा उगम झाला, असें कालिकापुराण सांगतें (२४. १४०). पतंजलीने आपल्या महाभाष्यांत हिचा उल्लेख केला आहे. बाणगहलच्या अनेक नद्यांनी व्यापलेल्या डोंगराळ भागांत ही नदी उगम पावते व पीरपंजालच्या दक्षिण उतारावरून खाली येते. हिच्या हिमालयांतील प्रवाहाची लांबी एकशेतीस मैल आहे. सांप्रत इरावती या नांवाने प्रसिद्ध असलेली नदी मात्र भारतांत नसून ब्रह्मदेशांत आहे. [हि. जॉ. ए. इं.; हि. ध.; पु. इं.]

इरिंबिठि काण्व सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या ८ व्या मंडळांतील १६–१८ सूक्तें याच्या नांवावर आहेत. त्याने इंद्र व अश्वी यांची स्तुति केली आहे. शुद्ध अंतःकरणांतच देवाचा वास असतो, असें याने सांगितलें आहे (ऋ. ८. १८. १५). शनि या ग्रहासाठी विनियुक्त होणारा

'शमग्निरग्निभिः' हा मंत्र याचाच आहे (८. १८. ९). •

इरुल नीलगिरि पर्वतांत राहणारी एक जात. रंगाने हे लोक अतिशय काळे आहेत. यांची भाषा म्हणजे तमिळ भाषेचें एक अपभ्रष्ट स्वरूप आहे. शेती हा त्यांचा उपजीविकेचा प्रमुख व्यवसाय आहे. याशिवाय ते गुरें व मेंढयाहि पाळतात. कांही इरुल जंगलांतून मेण, मध, शिकेकाई, साळी, वगैरे जमवून आणण्याचें काम करतात. यांना गाई-म्हशींव्यतिरिक्त इतर जनावरांचें मांस चालतें.

विवाहप्रथा – यांच्यांत विवाहबंधन शिथिल आहे. दोन स्त्री–पुरुष स्वेच्छेने एकत्र येतात व आपसांत बिनसलें, तर विभक्तहि होतात. मात्र ही गोष्ट बहुधा स्त्रीच्या इच्छेवर अवलंबून असते. विवाहाच्या दिवशीं नवरा मुलगा वधूकडे जातो, तिच्या कपडयांत चार पैसे बांधतो व तिला आपल्या घरीं घेऊन येतो. एवढयावर त्यांचा विवाहविधि पुरा होतो. वराला ऐपत असेल, तर त्या दिवशीं मेजवानी व नृत्य होतें.



इरुल पुरुष

मृतिकप्रथा – मृताला बसलेल्या स्थितींत पुरतात. तिसऱ्या दिवशीं बकरा कापून लोकांना मेजवानी देतात. पुंगकरु, कुडगर (कूर्गनिवासी), कलकट्टी, वेल्लक, देवाल व कोप्पिलिंगम् या यांच्यांतील पोटजाती आहेत. पहिल्या पांचांत परस्पर विवाह होत नाहीत. मात्र या पोटजातींचा कोप्पिलिंगम् जातीशीं विवाह होऊं शकतो.

इरुल स्त्रिया गळयापासून गुडघ्यापर्यंत एक कपडा गुंडाळतात. गळयांत मण्यांच्या माळा व हातांत पितळेच्या बांगडया घालतात. पुरुष लंगोटी किंवा लहानसें धोतर नेसतात. तान्ह्या मुलाला कपडे घालीत नाहीत. जमिनींत लहानसा खड्डा खणून व त्यांत पानें आंथरून त्यांत लहान मुलाला ठेवतात.

चिंगलपेट आणि द. व उ. अर्काट येथील इरुल वन्य इरुलांपेक्षा थोडे सुधारलेले आहेत. भात सडणें हा यांचा मुख्य धंदा आहे. कांही लोक लांकडें, गवत व पत्रावळी विकतात; तर कांही वैदू बनून औषधें देतात. हे कन्निअम्मा व मारी या देवतांना भजतात. हे रंगस्वामी या स्वरूपांत विष्णूला भजतात. उत्तर अर्काटमधील इरुल सप्तकन्निकै (सप्तकन्यका) या देवतांची पूजा करतात. हे लोक एका जागीं कायम न राहतां प्रसंग पडेल त्याप्रमाणे आपलें निवासस्थान बदलतात. कांही इरुल स्त्री-पुरुष भविष्य सांगण्याचाहि धंदा करतात. स्त्रिया एका टोपलींत कवडया घालून भविष्य सांगण्यासाठी दारोदार हिंडतात; तर पुरुष घरींच बसून तें काम करतात. भविष्य सांगते वेळीं त्यांच्या अंगांत संचार होत असतो. [का. ट्रा. स. इं.]



इरुल स्त्री

इरैयण्णार अगप्पोरुळ तमिळ भाषेंतील एक प्रणयप्रधान काव्य. या काव्यांत साठ सूत्रें असून त्यांवर उत्कृष्ट टीकाहि आहे. याच्या रचनेचा काल इ. स. ५ ते ७ या शतकांच्या मधला असावा. यांत उल्लेखिलेलीं स्थळें आजहि आढळतात. तमिळ भाषेच्या तिसऱ्या संघाला आश्रय देणाऱ्या एकूणपन्नास राजांपैकी शेवटचा राजा उग्रप्पेरुवाळुदि याच्या कारकीर्दींत एकदा मोठा दुष्काळ पडला. त्यामुळे त्याने पदरच्या विद्वानांना रजा दिली. बारा वर्षांनंतर पुनश्च स्थिर-स्थावर झाल्यावर त्याने त्या पंडितांना परत बोलाविलें. पण आलेल्या पंडितांत सदर इरैयण्णार अगप्पोरुळ या काव्याचा निश्चित अर्थ सांगणारा कोणी नव्हता. प्रत्येक जण वेगवेगळा अर्थ सांगूं लागला. त्यामुळे खरा अर्थ कसा मिळवायचा, याबद्दल राजाला चिंता पडली. एवढयांत आकाशवाणी झाली, ती अशी ––

'रुद्रशर्मा नांवाच्या आंधळचा मुलाला व्यासपीठावर बसवून पंडितांनी त्याच्यापुढे आपापला अर्थ सांगावा. जो अर्थ ऐकत असतांना आंधळचा मुलाच्या डोळयांतून अश्रू येतील, तोच अर्थ खरा, असें समजावें.'

त्याप्रमाणे केलें असतां नक्कीरर हा पंडित आपला अर्थ सांगूं लागला, तेव्हा त्याच्या प्रत्येक शब्दाबरोबर आंधळयाच्या डोळयांतून अश्रू गळूं लागले. त्यावरून तोच अर्थ खरा, असें ठरविण्यांत आलें. मग त्या अर्थाची टीका नीलकंठण्णार याने लिहून काढली.

या काव्यांत नेडुमारण राजाची प्रशंसा आहे. हा राजा पांडच वंशांतला असून त्याला तेरा बिरुदें लावलेलीं आहेत. त्याने एकंदर वीस लढाया मारल्या; त्यांपैकी बऱ्याचशा चेर राजांशीं होत्या. या राजाने समुद्रमंथन करून देवांना अमृत मिळवून दिलें, असेंहि त्या काव्यांत म्हटलें आहे. [म. ज्ञा को.]

इलयंकुडी मार द. भारतांतील एक शैव संत. याने साधु-संतांच्या सेवेंत आपली सर्व संपत्ति खर्च केली. एकदा पावसाळचांत शंकराने त्याच्या घरीं येऊन भोजनाची इच्छा प्रदर्शित केली असतां, इलयंकुडीच्या पत्नीने शेतांत पेरलेलें भात वेंचून आणलें, त्याचा स्वयंपाक केला व अतिथीला वाढलें. या तत्पर आतिथ्याने प्रसन्न होऊन शंकराने त्या उभयतांवर कृपा केली.

इलयतु मद्रास व त्रिवांकुरमधील एक जात. इलयतु शब्दाचा अर्थ कनिष्ठ किंवा लहान असा आहे. हे मलबारी ब्राह्मणांपैकीच असून ते मलयाळम् शूद्रांचें उपाध्येपण करतात. खाणेंपिणें, कपडालत्ता, दागदागिने, या बाबतींत त्यांचें नंपूतिरि ब्राह्मणांशीं बरेंच साम्य आहे.

इलयतूंना एलदय असेंहि म्हणतात. हे नायरांची भिक्षुकी करून त्यावर उपजीविका करतात. परंतु ही मिळकत फार थोडी असल्यामुळे यांचें सर्व जीवन दारिद्र्यांतच जातें. यांच्या घराजवळ सर्पवाटिका असते व त्या ठिकाणीं ते नागाची पूजा करतात. नंपूतिरि ब्राह्मण हे यांचे उपाध्ये असतात.

विवाहप्रथा –– यांचीं विश्वामित्र व भारद्वाज अशीं दोनच गोत्रें आहेत. मुलींचीं लग्नें बारा ते अठरा वर्षांपर्यंत होतात. यांच्यांत हुंड्याची चाल नाही. तरीपण वराला कमींत कमी एकशेंचाळीस रुपये तरी द्यावे लागतात. याचें कारण असें, की नंपूतिरींप्रमाणे इलयतु कुटुंबांत फक्त वडील मुलाचेंच लग्न होतें. बाकीचे पुरुष नायर किंवा अंबलवासी स्त्रियांशीं संबंधम् करतात.

ब्राह्मणांचे सोळा संस्कार हे पाळतात. पतिनिधनानंतर स्त्रिया केशवपन करीत नाहीत. बाळंतपणानंतर बायकांना नव्वद दिवस विटाळ असतो, असें मानतात. हे यजुःशाखेचे असून आश्वलायन व बौधायन सूत्रें प्रमाण मानतात. [म. ज्ञा. को.]

इला (१) वैवस्वत मनूची कन्या (म. भा. आदि ६३. ६९; ह. वं. १. १०). पुराणांत हिच्याविषयीं कथा आहे ती अशी – मनूने पुत्रप्राप्तीसाठी मित्रावरुणांना उद्देशून एक यज्ञ केला; पण त्यांत चुकीचा हवि पडल्याने पुत्राऐवजीं यज्ञकुंडांतून इला नांवाची स्त्रीच उत्पन्न झाली. मित्रावरुणांच्या अंशाने झाली; म्हणून ती त्यांच्याकडे गेली. मित्रावरुणांनी तिचा स्वीकार केला व 'पुढे तूं सुद्युम्न नामें पुरुष होशील,' असें तिला सांगितलें. नंतर ती परत जात असतांना वाटेंत तिला बुध भेटला. त्याच्यापासून तिला पुरूरवा हा पुत्र झाला. देवीभागवतांत सुद्युम्नाला इला हें स्त्रीरूप प्राप्त झालें, असें सांगितलें आहे.

इला ही मनूची आठवी संतति असून तिने रेत व शोणित यांचें आधान करून पुरुषसंयोगाशिवाय पुरूरव्याची उत्पत्ति केली, अशीहि कथा आहे (म. भा. आदि. ७५).

(२) पृथ्वीलाहि इला हें नांव आहे. शारीरिक सामर्थ्य प्राप्त होण्याकरितां हिचें पूजन करतात (भाग. पु. २. ३. ५). हिने विष्णूची आराधना केली व विष्णूने मत्स्यावतार घेऊन तिचें रक्षण केलें (भाग. पु. ११. ४. १८) **पाहा** –इरा. [प्रा. च. को.; म. ज्ञा. को.; पु. इं.]

इलावृत जंबुद्वीपांतील नऊ वर्षांपैकी एक. याच्या उत्तरेला नील, श्वेत व शृंगवान्, दक्षिणेला निषध, हेमकूट व हिमालय, पूर्वेला माल्यवान् व पश्चिमेला गंधमादन हे पर्वत आहेत. इलावृत हें शिवाचें निवासस्थान असून या प्रदेशांत जाणारा पुरुष पार्वतीच्या शापाने स्त्री होतो, असें सांगितलें आहे. या ठिकाणीं शिव हा संकर्षणाची पूजा करतो (भाग. ५. १६. ७. १०).

याचा आकार धनुष्यासारखा व वर्ण कमलासारखा आहे. कदंब, जंबू (जांभूळ), पिप्पल व वट हे वृक्ष या प्रदेशांत विशेषेंकरून होतात. इथले लोक जंबूफलें खातात व १३००० वर्षें जगतात.

अग्नीध्राचा इलावृत नांवाचा पुत्र या वर्षाचा अधिपति असल्यामुळे या वर्षाला त्याचें नांव मिळालें आहे (विष्णु. पु. २. १). इलावृत हा या प्रदेशाचा पहिला राजा होता. इथे बलीने अनेक यज्ञ केले (मत्स्य पु. ११३. १९).

इलावृतांत चैत्ररथ, गंधमादन, वैभ्राज व नंदन हीं वनें असून चार सरोवरेंहि आहेत. [पु. इं.]

इलाही मुसलमान लोकांचें सौर वर्षमान. धार्मिक दृष्टचा मुसलमान लोक हिजरी सनाला महत्त्व देतात. परंतु हिजरी काल हा चांद्रमानाचा असल्यामुळे हिशेबाच्या किंवा व्यवहाराच्या दृष्टीने त्यांत बऱ्याच अडचणी येतात. त्या टाळण्यासाठी बहुतेक सर्व मुसलमानी देशांत कोणत्या ना कोणत्या तरी रूपाने सौरवर्षमानाचा स्वीकार केला गेला आहे. अकबर गादीवर आला तेव्हां हिजरी सन चालू होता. पुढे अकबराने आपल्या २९ व्या राजवर्षी (इ. स. १५८४) 'तारीख–इ–इलाही' या नव्या सौर कालाचा आपल्या राज्यांत प्रचार सुरू केला. इतकेंच नव्हे; तर गतकालांतील माहितीहि याच कालमानाप्रमाणे देण्याविषयीं फर्माविलें.

केवळ सौरमान धरल्याने प्रत्येक वर्षाचा आरंभ मेष-

संक्रांतीच्या दिवशीं किंवा प्राय: ता. ११ (जुनी पद्धत) किंवा ता. २१ (नवी पद्धत) मार्च रोजीं होई. क्वचित् एखादा दिवस आगेमागेहि होई. इलाही वर्षांतील महिने व दिवस इराणी पद्धतीचे आहेत.

शाहजहानपासून पुढील बादशहांनी इलाही कालाचा सामान्यत: त्याग केला असला, तरी त्याचा प्रचार शेवटच्या मोगल बादशहाच्या अखेरीपर्यंत चालू होता. [सं. मि.]

इलिगेर कर्नाटकांतील एक जात. यांना कलाल आणि शिंगीदार असेंहि म्हणतात. यांच्यांत चार पोटभेद आहेत. हे लोक बसव, तुळजा भवानी, हनुमान्, यल्लम्म व रतनराय यांना भजतात. धर्मविधी चालविण्यासाठी ब्राह्मण व जंगम या दोघांनाहि बोलावितात. यांचा अजय्या नांवाचा लिंगायत धर्मगुरु असतो. ताडी काढणें हा यांचा धंदा आहे; पण हे ताडी पीत मात्र नाहीत. कारण ताडीला ते बहीण मानतात. इतर विधी कब्बलिगरांप्रमाणे करतात.

इली आंबवलेल्या धान्यापासून तयार केलेली दारू. छोटा नागपूरमध्ये पिकणाऱ्या सर्व तऱ्हेच्या धान्यांपासून ही दारू बनवितात. त्या प्रांतांतील मुंड लोकांना ही अत्यंत प्रिय असते. मुंडांचा देव सिम्बोंगा हा होय. त्याने पहिल्या मानवी जोडप्याला ही दारू कशी बनवावी तें शिकविलें, अशी त्यांच्यांत कथा आहे. दुसरी एक दंतकथा अशी -- सिम्बोंगाने अग्निप्रलयाने विश्वाचा नाश केला, तेव्हा त्यांतून दैवयोगाने बचावलेल्या एका बहिणीला व भावाला सिम्बोंगाने पुन्हा ही कला शिकविली. [एन्सा. मुं.]

इलुवन तमिळनाड व केरळ या प्रदेशांतली एक जात. यांना इझावा असेंहि म्हणतात. **पाहा** -- इझावा.

इलेश्वरोपाध्याय (८ वें शतक) तेलंगी कवि व विद्वान्. श्रीशैलाजवळच्या इलेश्वर या गांवीं हा राहत असे. न्याय, मीमांसा, व्याकरण, धर्मशास्त्र इ. शास्त्रांत हा पारंगत होता. हा शांकरमताचा अनुयायी असून वादपटु होता. याला अनेक राजांकडून इनामें व बक्षिसें मिळालीं होतीं. ज्योतिष्मती व इलेश्वरविजय हे ग्रंथ याने रचले आहेत. [म. च. को.]

इल्म या शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. इस्लामी धर्मशास्त्रांत हा शब्द धर्मज्ञान अशा अर्थी वापरलेला आहे. ज्ञानाचे प्रकार दोन – पहिला इल्मुल्-मबादी म्हणजे प्राथमिक ज्ञान. कुराणाचें व हदीसचें पाठान्तर केल्याने हें ज्ञान होतें. दुसरा इल्मुल्-मकाषीद म्हणजे त्यांतील तत्त्वांचें ज्ञान. ज्ञानाचा एक तिसराहि प्रकार आहे; तो म्हणजे सिद्ध पुरुषांना होणारें अंतर्ज्ञान किंवा त्यांच्या हृदयांत पडणारा दिव्य प्रकाश होय. याला ते इल्मुल्-मुकाशफा असें म्हणतात. या दिव्य ज्ञानाला इल्मुल्-हकीका असेंहि नांव आहे. धर्मज्ञान मिळविणें व तें दुसऱ्यांना देणें, हा फार स्तुत्य उपक्रम होय, असें मुहंमद पैगंबराने सांगितलें आहे. [डि. इ.]

इल्यास की किश्ती हिंदूंच्या श्रावण महिन्यांत प्रत्येक शुक्रवारीं मुसलमानी पुराणांतील 'ख्वाजा खिज्र' नांवाच्या जलदेवतेला प्रसन्न करण्यासाठी मुसलमान लोक हा उत्सव करतात. एलिशा किंवा इल्यास याला ते जलदेवतेचा अवतार समजतात. इल्यासने तपश्चर्या केली व त्याला जलदेवता प्रसन्न झाली. त्याच्या विनंतीवरून तिने पर्जन्यवृष्टि करून सर्वत्र समृद्धि केली. त्या गोष्टीची स्मृति म्हणून हा उत्सव करतात. याचा प्रकार असा– नावेच्या आकाराचा एक बांबूचा सांगाडा तयार करून त्यावर तलम सुती, रेशमी किंवा जरतारी कापड ताणून बसवितात. या नावेला किश्ती असें नांव आहे. किश्तींत अनेक पणत्या लावतात व तिची नदीपर्यंत मिरवणूक काढून ती नदींत सोडून देतात. [मु. इं.]

इल्लम् केरळांतील नंपूतिरि ब्राह्मणांच्या पितृसत्ताक कुटुंबपद्धतीला मलयाळम् भाषेंत इल्लम् असें नांव आहे. इल्लम् कुटुंबांत फक्त ज्येष्ठ पुत्रच पैतृक संपत्तीचा वारस होतो. इतर भावांना त्यांत वांटा मिळत नाही. त्याचप्रमाणे फक्त थोरल्या मुलालाच जातींतल्या मुलीशीं लग्न करतां येतें. बाकीचे मुलगे नायरांच्या मुलींशीं 'संबंधम्' करतात. संबंधम् म्हणजे वैदिक संस्काराशिवाय केलेलें लग्नच; पण त्यांत इच्छेनुसार विभक्त होण्याची मोकळीक असते. संबंधम्ची वधू नवऱ्याच्या घरीं नांदायला न येतां ती सदैव माहेरींच राहते. तिचा पतीच रात्रीं तिच्या घरीं राहायला जातो. तिच्या पालन– पोषणाची जबाबदारीहि नवऱ्यावर न पडतां तिच्या माहेरच्या माणसांवरच असतें. वर्षाला लागणारें तेल आणि दोन साड्या फक्त नवऱ्याने तिला द्यायच्या असतात. संबंधम्च्या या पद्धतीमुळे इल्लम्मध्ये भर पडत नाही व मिळकतहि विभागली जात नाही. इल्लम्मध्ये जातींतल्या मुलीशीं लग्न केलेला मोठा मुलगाच मिळकतीचा सर्वाधिकारी असतो.

त्याला कुटुंबांत मोठाच मान असतो. तोच धाकट्या भावांचें आणि मुलांचें भरण पोषण करतो. इल्लम्मधील देवघर आणि होमशाळाहि तोच चालवितो. संस्कार आणि वार्षिक सण यांच्यासाठी तोच आपल्या गंगाजळींतून सगळा खर्च करतो. त्या घरांत त्याला एकट्यालाच शयनगृह असतें. इतर पुरुष रात्रीं आपापल्या संबंधम् केलेल्या वधूच्या घरीं जातात.

नंपूतिरि लोकांच्या जीवनांत शिक्षणाला महत्त्वाचें स्थान आहे. नंपूतिरींच्या धार्मिक समजुती बऱ्याच तीव्र आहेत. सोवळें – ओवळेंहि कडक आहे. घरांतल्या मुलामुलींना ते कडक शिस्तींत वागवितात. स्त्रियांच्या पातिव्रत्याची कसोशीने जपणूक करतात. त्यासाठी त्यांनी स्त्रियांना पडदा पाळायला लावलें आहे. धाकट्या भावानें वडील भावजयीशीं बोलणें किंवा तिच्याकडे पाहणेंहि ते निषिद्ध मानतात.

विवाह ठरविण्यापूर्वीं नंपूतिरि लोक पुष्कळ चिकित्सा करतात. पूर्वीं शिक्षण पूर्ण करून पंधराव्या किंवा सोळाव्या वर्षी मुलगा घरीं परत आला, की सामान्यतः त्याचा विवाह होत असे. सांप्रत ही वयोमर्यादा वाढली आहे. ते कुलशील व गणगोत्र पाहून वधूवर निश्चित करतात. वरपक्ष वधूपक्षाकडून बराच हुंडा घेतो. यांच्यांत विवाह होण्यापूर्वी वधूवरांनी एकमेकांना पाहण्याची पद्धत नाही. म्हणूनच विवाहविधीची सुरवात मुखदर्शन या विधीने करतात. नंपूतिरींत बहुपत्नीकत्वाची चाल आहे. पण तरीसुद्धा नंपूतिरि समाजांत बऱ्याच मुलींना कुंवार राहावें लागतें.


कुटुंबांतील ज्येष्ठ भावाशिवाय इतर भावांना संसारसुख फारसें मिळत नाही. कारण संबंधम् केलेली पत्नी व तिचीं मुलें यांचा नंपूतिरि घरांत विटाळ मानला जातो. या विचित्र रूढीमुळे घरांत पुष्कळ असंतोष निर्माण होतो. पण इ. स. १९३३ पासून सर्व नंपूतिरि पुरुषांना स्वजातींतील मुलींशीं लग्न करण्याची कायद्याने परवानगी मिळाल्याने ही परिस्थिति आता पालटत आहे. त्याच कायद्यामुळे पैतृक मालमत्तेवरील हक्क व तिची विभागणी, यासंबंधींहि पुष्कळ सुधारणा झाल्या आहेत. त्यामुळे मूळ व्यवस्थेंत बराच फरक पडला आहे. हिंदु कायद्याने एकपत्नीकत्वहि त्यांना सक्तीचें झालें आहे.

इल्लम्मध्ये विधवाविवाह व कनिष्ठ जातींतील पुरुषांशीं विवाह करण्याची चाल नाही. [सो. चें. म; केरळ]

इल्लय विजयनगरच्या विरूपाक्ष राजाच्या पदरीं असलेला कवि व ज्योतिषी. यान सूर्यसिद्धान्तावर टीका लिहिली आहे. [म. च. को.]

इल्लीयून इस्लाम धर्मांत स्वर्गीय सुखाची सातवी पायरी किंवा मुसलमान व्यक्तींच्या सत्कृत्यांची नोंद असलेली वही (मिश्कात ५. ३. ३). [डि. इ.]

इल्लुपिन्नु आदिवासींची एक गृहदेवता. पूर्वकाळीं कोंड, मरिया इ. आदिवासी या देवतेसाठी नरबलि देत असत. पण हल्ली ती प्रथा बंद पडली आहे. बळी देण्याच्या वेळीं ते एक लाकडी खांब पुरीत व बळी द्यायच्या माणसाला त्या खांबाशीं घट्ट बांधून पुढचे विधी करीत. नरबलींचे हे स्मारक स्तंभ अद्यापि त्यांच्या वस्तींत आढळतात. कांही ठिकाणीं ते झोपडींत धान्याच्या कणगीजवळ पुरलेले असतात, तर कांही ठिकाणीं बहुसंख्येने रस्त्याच्याकडेला पुरलेले आढळतात. या खांबांचीं टोकें निमुळतीं असून कित्येकदा त्यांना वर टोकदार दुबेळकींहि असतात. कोंड लोक आपलें निवासस्थान बदलतांना ते खांबहि आपल्या बरोबर उपटून नेऊन नव्या जागीं पुरतात. कोंड तरुण लग्न झाल्यावर जेव्हा नवी मठी उभारतो, तेव्हा अशा प्रकारचा एक खांब बनवून तिथे पुरतो. हे खांब ते विविध प्रकारें सजवितात. वर्षातल्या ठराविक दिवशीं त्यांची पूजा करून कुटुंबाचें बरें भलें व्हावें म्हणून प्रार्थना करतात. [ट्रा. आ. मि. इं.]



नरमेधाचे स्मारक स्तंभ

इशा मुसलमानांच्या रात्रींच्या प्रार्थनेला इशा हें नांव आहे. अंधार पडल्यानंतर कांही वेळाने सामुदायिक प्रार्थना करणें, हा मुसलमानांचा रोजचा धार्मिक विधि असतो. [डि. इ.]

इशैक्कोल्लम् रांगोळीचा एक संगीत प्रकार. संगीताचा ठेका किंवा सूर धरून जमिनीवर किंवा फळचावर ही रांगोळी रेखतात. या रांगोळींत ठराविक ठिपके व ठराविक ओळी असतात. ठिपके काढण्याची कृति वाद्यांच्या ठेक्यावर करतात. त्यासाठीं आकर्षक संगीत व ठेका असणारें गीत निवडतात. रांगोळींतले ठिपके व ओळी यांची संख्या समान असते. एखाद्या रांगोळींत ओळी व ठिपके यांची संख्या जर १२८ असेल तर १६ आवर्तांचा आदि तालवर्ण

(१६ × ८ = १२८) उपयुक्त ठरतो. यांत पुनरावृत्ति होते. गीत व रांगोळी दोन्ही एकदमच संपलीं पाहिजेत, असा नियम आहे.

याशिवाय वातावरणांतील (Aerial) रांगोळी असाहि एक प्रकार आहे. यांत अनेक मुलांना भाग घेतां येतो. प्रथम एक मोठी आकृति जमिनीवर काढतात व त्याच्याभोवती मुलें उभीं राहतात. गीत सुरू झाल्यावर प्रत्येक ठेक्याला एकेक मुलगा ठिपक्याच्या जागीं जाऊन उभा राहतो. याप्रमाणे सर्व जण जागच्या जागीं उभे राहिल्यावर आकृति पूर्ण होते. सर्व मुलें समान उंचीचीं असल्यास आकृति चांगली दिसते. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

इशैवेळ्ळाळर् द. भारतांतील एक जात. या जातींतील मुली नृत्य व संगीत या कलांत विशेष प्रवीण असतात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

इष आत्रेय ऋग्वेद ५. ७, ८ या सूक्तांचा द्रष्टा. आपल्याहि आधीच्या काळांत लोक यज्ञ करून अग्नीला घृताहुती व समिधा अर्पण करीत असल्याचें हा सांगतो (ऋ. ५.८.७). हा ऋषि महत्त्वाकांक्षी आहे. समस्त आर्य-शत्रूंचा अत्रींच्या हातून फडशा पडावा, असें याचें म्हणणें आहे (ऋ. ५.७.१०).

इषंधर शाल्मलि द्वीपांतील एक लोकसमाज. [पु. इं.]

इष्ट यज्ञादि कर्म. या कर्मांत पुढील गोष्टी येतात—

अग्निहोत्रं तपः सत्यं वेदानां चार्थपालनम् ।
आतिथ्यं वैश्वदेवं च इष्टमित्यभिधीयते ॥

अर्थ —- अग्निहोत्र, तप, सत्याचरण, वेदार्थाचें पालन, आतिथ्य व वैश्वदेव यांना इष्ट असें म्हणतात (मेदिनीकोश). **पाहा** – इष्टापूर्त.

इष्टका वीट. ही वीट पक्व, सच्छिद्र व रंगीबेरंगी असावी, असें तै. संहितेंत सांगितलें आहे (४.२.९). विटा बनविण्याची क्रिया यजुर्वेदकाळीं प्रगत अवस्थेला पोंचलेली होती.

अग्निचयनांत श्येन, रथचक्र, द्रोण, कंक, गरुड इ. अनेक आकृती करायला सांगितल्या आहेत. या सर्व आकृती इष्टका म्हणजे विटा त्या त्या आकारांत रचून तयार करीत. त्यांचे आकार व मापें काय असावीं, यासंबंधीं शुल्बसूत्रांत बराच तपशील दिलेला आहे. चयनसंस्था ही संपूर्णपणे इष्टकांवरच आधारलेली संस्था आहे. मोहेंजोदडो येथे सनपूर्व ३००० वर्षांच्या भाजलेल्या विटा सांपडल्या आहेत. गुजरातमधील लोथल येथील उत्खननांतहि विटांची भट्टी व विटांचीं घरें सांपडलीं आहेत. अनेक प्राचीन मंदिरांच्या व प्रासादांच्या विटांनी बांधलेल्या भिंती अद्यापि चांगल्या अवस्थेंत आढळतात. **पाहा**– अग्निचयन. [एन्सा. हिं. आ.]

इष्टजात्यवाप्ति एक काम्य व्रत. चैत्र किंवा कार्तिक या मासांत व्रताचा आरंभ. विष्णूची पूजा व व्रताच्या शेवटीं गोप्रदान, असा याचा विधि आहे. फल– अन्य जन्मीं इष्टजातींत जन्म मिळणें. [विष्णु ध. पु. ३.२००]

इष्टदेवता कोणतेंहि महत्त्वाचें धार्मिक किंवा मांगलिक कृत्य निर्विघ्नपणे पार पडावें, म्हणून प्रथम कांही संरक्षक देवतांचें स्मरण व पूजन करतात. या देवतांत इष्ट-देवता म्हणूनहि कांही देवता असतात. कुलदेवतांप्रमाणेच इष्ट-देवताहि वेगवेगळ्या कुलांच्या वेगवेगळ्या असतात. सामान्यतः विशिष्ट प्रसंगीं नवसाला पावणाऱ्या किंवा कर्त्याच्या आवडीच्या असणाऱ्या देवतांची इष्टदेवतांत गणना होते. प्रत्येक कृत्याच्या संकल्पांत ' इष्टदेवताभ्यो नमः, कुलदेवताभ्यो नमः ' असा प्रारंभींच नमस्कार असतो. इष्टदेवतेसंबंधीं कांही वार्षिक कृत्येंहि असतात.

इष्टलिंग वीरशैव किंवा लिंगायत संप्रदायाचे लोकहि शंकराच्या मूर्तीची पूजा न करतां शिवलिंगाची पूजा करतात. हें लिंग ते सदैव अंगावर बाळगतात. याला इष्टलिंग म्हणजे इष्ट देवतेचें लिंग असें नांव आहे. या लिंगाची उपासना हीच सर्वश्रेष्ठ उपासना होय, असें त्यांचें मत आहे. [डे. हिं. इ.]

इष्टापूर्त (इष्ट + पूर्त) हा शब्द फार प्राचीन आहे. ऋग्वेदांत तो आढळतो. ' सं गच्छस्व पितृभिः सं यमेनेष्टापूर्तेन परमे व्योमन् । ' (१०. १४८) या मंत्रांत त्या शब्दाचा अर्थ ' यज्ञ व परोपकारी कृत्यें यांपासून मिळालेलें फल किंवा पुण्य ' असा आहे. अथर्ववेदांतहि अशाच अर्थी इष्टापूर्त हा शब्द आलेला आहे.

इष्ट व पूर्त असे या शब्दाचे दोन भाग पडतात. इष्ट म्हणजे यज्ञयाग आणि पूर्त म्हणजे जें भरलेलें असतें तें.

एकाग्निकर्म हवनं त्रेतायां यच्च हूयते ।
अन्तर्वेद्यां च यद्दानमिष्टमित्यभिधीयते ।
वापीकूपतडागानि देवतायतनानि च ।
अन्नप्रदानमारामः पूर्तमित्यभिधीयते ।

(श. क.)

अर्थ -- गृह्याग्नि व श्रौताग्नि यांत केलेल्या हवनाला आणि श्रौतयज्ञांत वेदींत केलेल्या दानाला इष्ट असें नांव आहे; तर वापी, कूप, तलाव, देवस्थानें व अन्न यांचें दान करणें व सार्वजनिक उद्यानें तयार करणें, यांना पूर्त असें नांव आहे.

ग्रहणप्रसंगीं, सूर्यसंक्रांतीला वा द्वादशीला दान देणें व रुग्णशुश्रूषा करणें, यांचाहि कांही शास्त्रकार इष्टापूर्तांत समावेश करतात. अत्रि म्हणतो --

इष्टापूर्तो द्विजातीनां धर्मः सामान्य इष्यते ।
अधिकारी भवेच्छूद्रो पूर्ते कर्मे न वैदिके ॥

अर्थ -- इष्टापूर्त हा ब्राह्मणांचा सामान्य धर्म आहे. शूद्र पूर्तधर्माचा अधिकारी होऊं शकतो; पण वैदिक म्हणजे इष्ट धर्माचा होऊं शकत नाही.


यावरून इष्टधर्म हा वैदिक असून पूर्तधर्म हा पौराणिक म्हणजे सर्वसामान्य लोकांचा धर्म आहे, हें कळून येतें [हि. ध.; भा. वा.]

इष्टि यज्ञसंस्थेंतलें एक विधान. इष्टि म्हणजे याग. दर्शेष्टि व पूर्णमासेष्टि या प्रकृति-इष्टी होत. विविध कामनांच्या पूर्तीसाठी श्रौतसूत्रांत विविध इष्टी सांगितल्या आहेत.

इष्टिश्राद्ध स्मृतिचंद्रिकेंत श्राद्धाचे बारा प्रकार सांगितले आहेत. त्यांपैकी जें कर्मांगश्राद्ध तेंच इष्टिश्राद्ध होय. इष्टिश्राद्धाला श्राद्धतत्त्वांत इच्छाश्राद्ध असें नांव दिलेलें आहे. [हि. ध.]

इसंदम्म द. भारतांतील सात देवता. या सहोदर बहिणी मानलेल्या आहेत. **पाहा** -- सप्त मातृका.

इसराज वितत जातींतील एक वाद्य. याचा वरचा भाग सतारीसारखा व खालचा भाग तंबोऱ्यासारखा असतो. या दोन भागांना अनुक्रमें डांड व कुंडी अशीं नांवें आहेत. इसराजची कुंडी बकऱ्याच्या चामड्याने मढविलेली असते. या वाद्यांत पोलादाचे किंवा पितळेचे सोळा पडदे असतात. यांतील ४ तारा मुख्य असून बाकीच्या १५-२० गौण असतात. त्यांना तरब असें म्हणतात. यांतील सतारीसारखा भाग डाव्या हाताने व खालचा भाग उजव्या हातांत धनुकली घेऊन वाजवितात. हें वाद्य सारंगीसारखें वाजविलें जात असल्यामुळे या वाद्यांत गायकाच्या गळ्यांतील सुरावट पूर्णपणे दाखवितां येते. त्याचप्रमाणे याला पडदे असल्याने याच्यावर गतकारीहि करतां येते. या वाद्याची रचना मुगलकालांत करण्यांत आली. मात्र याचा शोध कोणीं लावला तें कळत नाहीं. हें विशेषेंकरून गाण्याच्या साथीला वाजवितात. इसराजवादकांत चंद्रिकाप्रसाद दुबे, शीतलप्रसाद मुकर्जी व उस्ताद बरकत अली इ. कलाकार विशेष प्रसिद्ध आहेत. या वाद्याचा प्रसार बंगालमध्ये विशेष आहे. [म्यु. इं.]



इसराज

इसवी सन ही कालगणना आतां आंतरराष्ट्रीय व्यवहारासाठी जगांत सर्वत्र प्रचलित आहे. येशू ख्रिस्ताच्या जन्मापासून ही कालगणना मानतात. ख्रिस्ताच्या जन्मानंतर सुमारें ५३० वर्षांनी एका ख्रिस्ती धर्माधिकाऱ्याने गणिताच्या आधारें ख्रिस्त जन्माचा काळ ठरविला व तेव्हापासून ही गणना सुरू झाली.

सौर वर्ष हें ३६५ दिवस, ५ तास ४८ मिनिटे व ४५.३७ सेकंद एवढ्या मानाचें असतें. परंतु इसवी सनांत वर्षाचे ३६५ दिवस धरल्यामुळे चार वर्षांनी सुमारें चोवीस तास कमी पडतात. ते भरून काढण्यासाठी चार या संख्येने पूर्ण भाग जाणाऱ्या वर्षी फेब्रुवारीचे दिवस २९ धरतात व त्या वर्षाचे दिवस ३६६ होतात. या वर्षाला लीपवर्ष असें नांव आहे. पण या योगाने जो थोडासा काल अधिक होतो, तो कमी करण्यासाठी १०० या संख्येने निःशेष भाग जाणाऱ्या वर्षी म्हणजे १०००, १८०० इ. वर्षी सदर एक दिवस जास्त धरीत नाहीत. पण याहि प्रकाराने कांही काळ कमी पडतोच. तो ४०० ने निःशेष भाग जाणाऱ्या वर्षी ३६६ दिवस धरून भरून काढतात. अशा प्रकारें इ. सनाचे ३६५ किंवा ३६६

दिवस मानून गणितागत वर्षमानाशीं त्याचा मेळ घालतात.

इ. स. च्या गणनेंत नवी व जुनी अशा दोन पद्धती आहेत. ज्यूलियस सीझरने वर्षाचे ३६५ दिवस मानून दर चौथ्या वर्षी एक दिवस अधिक धरावा, असें ठरविलें. पण या योजनेने दर वर्षी सुमारें ११ मिनिटें १४ सेकंद एवढा काल अधिक होत होता. इ. स. १५८५ पर्यंत असे दहा दिवस वाढले होते. म्हणून १३ वा पोप ग्रेगरी याने त्या वर्षी ऑक्टोबर महिन्यांत दहा दिवस कमी करावे, असा हुकूम काढला. रोमन कॅथॉलिक पंथाच्या राष्ट्रांनी हा हुकूम मानला. परंतु इंग्लंडने १७५२ पर्यंत जुनी पद्धतच चालू ठेवली. तोपर्यंत शास्त्रशुद्ध व लौकिक वर्षमान यांत आणखी एका दिवसाचा म्हणजे ११ दिवसांचा फरक पडला होता. म्हणून त्याच वर्षी इंग्लंडमध्ये वर्षांचे अकरा दिवस कमी करण्यांत येऊन म्हणजे ३ सप्टेंबरला १४ सप्टेंबर मानून वरील सुधारणेला मान्यता देण्यांत आली. [पं. ज्यो.; सं. मि.]

इसाइ एक नायनार स्त्री. ही सदिय नायनारचीं पत्नी असून संत सुंदरमूर्तीची माता होती.

इसिगिलिपस्स राजगृहाभोवती असलेल्या पांच टेकड्यांपैकी एका टेकडीचें नांव. या टेकडीवर पांचशें प्रत्येक बुद्ध राहत होते. ते या टेकडीवर गेल्याचें लोकांनी पाहिलें; पण परत आल्याचें मात्र पाहिलें नाही. त्यामुळे या टेकडीला ऋषी व आचार्य यांना गिळणारी टेकडी असें नांव मिळालें (मज्झिम ३. ६८. ७१). बुद्धाने अनेक भिक्षूंसह या टेकडीवर वास्तव्य करून कांही प्रवचनें केलीं होती. [हि. जॉ. ए. इं.]

इस्तिखारा इस्लामी धर्मांतली, वर किंवा आशीर्वाद मागण्यासाठी केलेली प्रार्थना. 'मीं हातीं घेतलेल्या कार्यांत मला यश दे, मला मार्गदर्शन कर,' अशा प्रकारें ही प्रार्थना करावी, असें मुहंमद पैगंबराने सांगितलें आहे. पुढे या प्रार्थनेचा उपयोग कौल लावण्यासाठी होऊं लागला. एखादा संकल्प मनांत धरून तो सिद्धीस जाईल कीं नाही, हें पाहण्यासाठी ही प्रार्थना करायची व मग त्याचा पडताळा पाहायचा, अशी प्रथा मुसलमानांत रूढ आहे. [डि. इ.]

इस्तिर्जा एक इस्लामी संज्ञा. या शब्दाचा अर्थ 'परत जाणें' असा आहे. परंतु व्यवहारांत संकटकाळीं ईश्वराची जी प्रार्थना करतात, तिला उद्देशून हा शब्द योजतात. महान् आपत्तीच्या प्रसंगीं मुसलमान लोक 'इन्ना लिल्लाहि' व 'इन्ना इलैहि रजि–ऊन' म्हणजे आम्ही परमेश्वराचीं लेकरें आहों व शेवटी त्याच्याचकडे जाणार आहों, असे उद्गार काढतात. [डि. इ.]

इस्माईल हाजी मौलवी मुहंमद (१७८१ – १८३१ इ. स.) याचा जन्म दिल्लीजवळच्या फोव्हा गांवीं झाला. याने मक्केची यात्रा केली होती. इस्लामी धर्म हिंदु धर्माच्या तावडींत सांपडला असून त्याचें स्वरूप विकृत झालें आहे, असें याचें मत होतें. म्हणून इस्लामचें शुद्ध स्वरूप पुनश्च प्रस्थापित करण्यासाठी शुद्ध इस्लामी मताचा याने उपदेश सुरू केला. याला अनुयायीहि बरेच मिळाले. याच्या पंथाला इस्माइली पंथ म्हणतात. पण याची चळवळ तत्कालीन ब्रिटिश सरकारला रुचली नाही. त्यामुळे याला दिल्लीहून पंजाबांत जावें लागलें. तिथे अफगाणांच्या मदतीने याने शीखांविरुद्ध लढाई सुरू केली. त्या लढाईंतच पुढे हा मरण पावला. अद्यापि वायव्य सरहद्दीवरच्या पहाडांतून याचे अनुयायी दिसतात. [म. च. को.]

इस्राफील इस्लाम धर्मांत कल्पिलेला उच्च श्रेणींतील एक देवदूत. अंतिम निर्णयाच्या दिवशीं हा तुतारी फुंकतो, अशी त्यांची समजूत आहे. कुराण किंवा अहादीस या ग्रंथांत मात्र त्याचें नांव आढळत नाही. [डि. इ.]

इस्लाम मुहंमद पैगंबराने स्थापन केलेल्या धर्माला इस्लाम अशी संज्ञा आहे. इस्लाम हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ शांतीमध्ये प्रवेश करणें, असा आहे. परमेश्वराला शरण जाणें, मानवमात्रावर प्रेम करणें, व अहिंसा धर्माने वागणें या गोष्टी शिकवितो तो इस्लाम, असा त्याचा लाक्षणिक अर्थ आहे.

मुहंमद पैगंबराचा जन्म इ. स. ५७० सालीं झाला. त्यानें हा धर्म स्वतःच्या बुद्धीने निर्माण केला नाही, तर त्याला या धर्माचें इलहाम (समाधिस्थितींत दर्शन) झालें. तेव्हापासून लोक त्याला पैगंबर, नबी व रसूल म्हणूं लागले. मुहंमदाच्या द्वारें ईश्वराने आपला पैगाम (संदेश) पृथ्वीवर पोंचविला, म्हणून मुहंमदाला पैगंबर ही उपाधि मिळाली. नबी म्हणजे परम ज्ञानाची घोषणा करणारा. याचा दुसरा अर्थ परमेश्वर व समजदार प्राणी यांच्यांतला मध्यस्थ असाहि आहे. रसूल म्हणजे प्रेषित किंवा दूत होय. मुहंमद हा रसूल आहे. कारण त्याने परमेश्वर व मानव यांच्यामध्ये धर्मदूताचें काम केलें.

'ला इलाह् इल्लिल्लाह् मुहम्मदुर्रसूलिल्लाह्' हा इस्लामचा मूलमंत्र आहे. अल्लावांचून दुसरा कोणी पूजनीय नाही व मुहंमद त्याचा रसूल अर्थात् दूत आहे, असा या मंत्राचा अर्थ आहे. केवळ अल्लाला मानणारा मुसलमान हा पाक मुसलमान ठरत नाही; तर जो अल्लाबरोबरच मुहंमदालाहि नबी, रसूल, व पैगंबर मानतो, तो खरा मुसलमान होय.

इस्लामचे इमान (श्रद्धा) व अमल (आचरण) असे दोन विभाग पडतात. इमान म्हणजे पुढील सहा गोष्टींवर श्रद्धा ठेवणें होय –– (१) अल्लाह् (२) देवदूत (३) देवप्रणीत ग्रंथ (४) देवाचे प्रेषित (५) अंतिम निवाडयाचा दिवस व (६) ईश्वराचे आदेश. नबीनें घोषित केलेल्या सत्याची स्वीकृति म्हणजे इमान होय. अहादीसमध्ये वचन आहे, की इमानच्या ७० शाखा असून त्यांतली सर्वोच्च शाखा, अल्लाह्व्यतिरिक्त कोणाची पूजा करूं नये ही असून एखाद्याचें नुकसान होईल, ती गोष्ट न करणें ही सर्वांत खालची शाखा आहे.

अमल या विभागांत कुराणाने पुढील गोष्टी आवश्यक धार्मिक कृत्यें म्हणून सांगितल्या आहेत –– (१) कलमा – अर्थात् 'ला इलाह् ...' या मंत्राचें पठण करणें (२) नमाज– अर्थात् दिवसांतून पांच वेळां ईश्वराची प्रार्थना करणें (३) रोजा– अर्थात् रमजान महिन्यांत महिनाभर फक्त एकदा संध्याकाळीं सूर्यास्तानंतर भोजन करणें. (या उपवासासाठी हा महिना अशाकरितां निवडला, की याच महिन्यांत कुराण पृथ्वीवर अवतीर्ण झालें.) (४) जकात– अर्थात् वार्षिक उत्पन्नाचा चाळिसावा हिस्सा दानधर्मांत खर्च करणें व (५) हज – अर्थात् मक्केची यात्रा करणें.

अशा प्रकारें सहा गोष्टींवर पूर्ण श्रद्धा व पांच आचारांचें पालन मिळून इस्लाम धर्म बनतो. इस्लामचें पूर्ण अर्थानें पालन करणाऱ्याला मुअमिन म्हणतात व वरीलपैकी एखादें श्रद्धास्थान किंवा एखादाहि आचार अमान्य समजणाऱ्या माणसाला काफिर म्हणतात. मुस्लीमेतर लोक हे मुसलमानांच्या दृष्टीने काफिर होत.

ईश्वर हा एक, केवळ एक आहे, या तत्त्वावर मुहंमदाचा सर्वांत अधिक भर आहे. या विषयांत तो कोणालाहि कसलीहि शंका उपस्थित करूं देत नाही. तो म्हणतो, की 'ईश्वर एक आहे व त्याचीच उपासना केली पाहिजे, हें सांगण्यासाठी मी आलों आहें.'

इस्लामने केवळ व्यक्तीच्याच नव्हे, तर साऱ्या समाजाच्या सर्व आचारांचें निर्धारण केलें आहे. कुराणांत केवळ पारलौकिक गोष्टींचीच चर्चा नसून ऐहिक जीवनाविषयींहि तिथे पूर्ण विचार केलेला आहे. माणसा–माणसांतले संबंध, राजनीति, न्याय, शासन, युद्ध, शांति, विवाह, घटस्फोट, सावकारी, दान, इ. अनेक विषयांवर कुराणांत उपदेश आहे. व्याज घेणें पाप आहे (३. १४. १), कृपणता हा गुन्हा आहे (४. ६. ४), मद्यपान व द्यूत महापाप आहे (२. २७. ३), जो मनुष्य दुसऱ्यावर अन्याय करतो व जगांत धर्मात्मा म्हणून स्वतःचा बडेजाव मिरवितो, त्याला घोर यातना भोगाव्या लागतात (५२. ४. १२), असें कुराणांत प्रतिपादिलें आहे.

जिहाद हें इस्लामने एक राष्ट्रीय कर्तव्य मानलें आहे. जिहादचा अर्थ धर्मयुद्ध असा आहे. क्लेन (Klein) नांवाच्या एका विद्वानाने याचा अर्थ संघर्ष असा केला असून त्याचीं तीन क्षेत्रें मानलीं आहेत –– (१) दृश्य शत्रूच्या विरुद्ध संघर्ष, (२) अदृश्य शत्रूच्या विरुद्ध संघर्ष व (३) इंद्रियांच्या विरुद्ध संघर्ष.

सामान्यपणे इस्लामच्या प्रचारासाठी जीं युद्धें लढलीं गेलीं, त्यांना पवित्र अर्थ देण्यासाठी या शब्दाचें प्रचलन झालें आहे.

इस्लाम हा प्रारंभीं केवळ मानवाचा जीवनधर्म होता; पण मुहंमदानंतर थोडयाच काळांत इस्लामचें राज्य व त्यासाठीं सैन्यसंघटन एवढा व्यापक अर्थ त्याला प्राप्त झाला. समस्त विश्वांत इस्लामचें साम्राज्य प्रस्थापित करण्याची कल्पना मुहंमद पैगंबराच्याच मनांत जागृत झाली होती. शेवटीं शेवटीं त्याला असें वाटूं लागलें होतें, की सारी पृथ्वी एक राज्य, एक धर्म आणि एक नबी, यांच्या आधिपत्याखाली यावी.

मुहंमदानंतर इस्लाम याच प्रेरणेने प्रस्फुरित होऊन जग जिंकायला निघाला. त्या काळीं ख्रिस्ती देशांत राजा व धर्मोपदेशक या दोन वेगळया संस्था होत्या. भारतवर्षांतहि राजा आणि पुरोहित हे भिन्न होते. पण इस्लामी धर्मांत धर्मगुरु व राजा या दोन्ही संस्था एका व्यक्तींत एकवटल्या. धर्मामुळे त्यांच्या तलवारीला तेज चढलें व तलवारीमुळे धर्माचा दरारा वाढला.

इस्लाम हा जगांतला सर्वांत अधिक अपरिवर्तनीय असा धर्म आहे. पहिल्या प्रथम हा धर्म जेव्हा अरबस्तानाच्या बाहेर पसरूं लागला, तेव्हा त्यावर अनेक प्रकारच्या अन्य मतांचा प्रभाव पडूं लागला होता. त्यामुळे मूळ इस्लामच्या आचारविचारांत परिवर्तन होतें की काय, अशी शंका खलिफांना येऊं लागली. आणि तसें कांही घडूं नये म्हणून, त्यांनी इस्लामच्या नियंत्रणासाठी त्रिविध व्यवस्था पुढीलप्रमाणे करून ठेवली––

(१) **इज्मा**–– सर्व युगांत व सर्व ठिकाणीं इस्लामच्या उपदेशकांत पूर्ण मतैक्य असावें. जेव्हा एखाद्या प्रश्नावर मतभेद उत्पन्न होईल, तेव्हा उलेमांच्या सभेंत त्यावर चर्चा व्हावी आणि तिच्यांत जो निर्णय ठरेल, तो सर्वांनी मान्य करावा.

(२) **सुन्ना**—पैगंबराने जें कार्य केलें, त्याचें अनुकरण अहादीसच्या आधारें केलें जावें. (अहादीस म्हणजे मुहंमदाच्या वचनांचा संग्रह होय. सर्व प्रकारच्या ज्ञानाच्या बाबतींत मुस्लीम लोक अहादीसचें प्रामाण्य मानतात.)

(३) **कयास**—पैगंबराच्या मूळ उपदेशांतून कोणता अर्थ निष्पन्न होतो, त्यावर विद्वानांचें विवेचन म्हणजे कयास होय. अर्थात् हें विवेचनहि कुराण, अहादीस व इज्मा यांच्या आधारेंच केलेलें असलें पाहिजे.

अशा प्रकारें मूळ कुराण व त्यानंतर अहादीस, इज्मा व कयास असे इस्लामचे चार आधारस्तंभ ठरले.

इस्लाम या जगांत भ्रातृभावाला फार महत्त्व देतो. मुहंमदाने म्हटलें आहे, की 'सर्व मुसलमान एकमेकांचे बंधू आहेत; म्हणून एकमेकांत लढणाऱ्या त्या बंधूंचें ऐक्य करा (४.१.१०).' इस्लामच्या वैभवकाळांत त्या धर्मांतले राव–रंक खांद्याला खांदा लावून लढले, मांडीला मांडी लावून मशिदींत नमाज पढले व एका पंक्तीला बसून एकत्र जेवले. मुहंमदानंतरच्या कांही खलिफांनीहि जाणीवपूर्वक या भ्रातृभावाची त्या समाजांत वाढ केली.

स्वर्ग-नरक – इस्लामी कल्पनेप्रमाणे स्वर्ग सातव्या आकाशांत (अर्श) अवस्थित आहे. नरक उत्तरेस व स्वर्ग दक्षिणेस असून त्या दोहोंच्या मध्ये एक भिंत आहे. स्वर्गांत एक पुष्पोद्यान असून त्यामध्ये निर्झर खळाळतात, कारंजीं उडतात आणि दूध व मध यांच्या नद्या वाहतात. तिथे सोन्याचे बुंधे असलेले वृक्ष असून त्यांना मधुर फळें लागतात. तिथली शराब मधुर व सफेत असते. ती प्याल्याने नशा चढत नाही. तिथे हूरयुल आयून जातीच्या ७० तरुणी असतात. त्यांचे डोळे काळे आणि दीर्घ असतात (कु. ३७.२.२०–२६). त्याशिवाय तिथे पुण्यात्म्यांच्या परिचर्येसाठी सुंदर सुंदर लडकेहि असतात.

कुराणांत अनेक प्रकारच्या नरकांचीहि कल्पना केलेली आहे. हे नरक अत्यंत भयानक आणि विकराल आहेत. मनुष्य हें नरकांतल्या अग्नीचें इंधन असतें (२.३.४). कुराणावर विश्वास न ठेवणाऱ्या माणसाला आगीच्या खाईंत फेकलें जातें. तिथे मृत्यु जीवाच्या जवळ येतो; पण जीव मरत मात्र नाही. जीवाचे स्वर्ग-नरकभोग हे त्याच्या कर्माच्या आधीन आहेत. कुराणांतले स्वर्ग व नरक हे दोन्ही अनंत काल भोगायचे असतात. हिंदुकल्पनेप्रमाणें इस्लामी कल्पनेंत भोगाने पुण्य-पापांचा क्षय होत नाही. कुराणाचा फातिहा नामक अध्याय हा कर्मफलाच्या विवेचनाचा अध्याय असून प्रत्येक मुसलमानाला रोज पांच वेळां त्याचें स्मरण करविलें जातें. त्यांत म्हटलें आहे, की मनुष्याला बऱ्यावाईट कर्मांचे परिणाम अवश्य भोगावे लागतात. कणभर सत्कृत्य किंवा दुष्कृत्य यांचीं फळें 'याचि देहीं याचि डोळां' भोगावीं लागतात. कुराणाच्या मताप्रमाणे मनुष्य जन्म हा पहिला आणि तोच शेवटचा जन्म आहे. देहाच्या संबंधाने आत्म्यावर सुख-दुःखांची छाप पडते, असें कुराण म्हणतें; पण तें आत्म्याला देहाहून भिन्न मानीत नाही. मानवदेह कबरींत जातो तेव्हा तिथून त्याच्या ज्या दुसऱ्या एका जीवनाचा आरंभ होतो, त्याला बरजाख असें नांव आहे. पार्थिव जीवन समाप्त करून कयामतच्या दिवसाची मार्गप्रतीक्षा करीत कबरींत पडून राहणें, असा बरजाख शब्दाचा अभिप्राय असला, तरी बरजाख म्हणजे नेमकें काय, याविषयीं इस्लामी धर्माचार्यांत मोठा विवाद आहे. माणसाला सूक्ष्म जीवनाचें भान करून देणारी अशी ती अवस्था आहे. कदाचित् ती अर्धचेतन अवस्थाहि असूं शकेल. मुहंमदाच्या वचनांवरून दिसतें, की ही अवस्था जाणीवरहित नसते. मनुष्याचा मृत्यु हा केवळ त्याच्या पार्थिव शरिराचा नाश असतो. त्याचा आत्मा कोणत्या तरी वेगळ्या स्वरूपांत कबरींत जीवित असतो व याच आत्म्याला कयामतच्या दिवशीं कबरींतून उठून ईश्वराच्या पुढे उभें राहावें लागतें.

कयामत — निवाड्याच्या दिवसाला कयामत असें नांव आहे. कुराणांतलें कयामतचें वर्णन महाभीषण आहे. तें पुष्कळ अंशीं कल्पान्तकालीन महाप्रलयासारखें आहे. उदा० जेव्हा कयामत येईल, तेव्हा सूर्य–चंद्र एक होतील, आकाशाचे तुकडे तुकडे होतील, तारे लुप्त होतील, पर्वतांची धूळ उडेल इत्यादि. त्या दिवशीं सूरचा आवाज होतांच प्रत्येक आत्मा आपापल्या कबरींतून वर उठेल व ईश्वरापुढे जाऊन उभा राहील. त्या दिवशीं त्याला शुभाशुभ कर्माबद्दल बक्षीस किंवा शिक्षा मिळेल. त्या वेळीं प्रत्येक माणसाचें पुण्य-पाप तोलण्याचें काम जिबरील हे देवदूत करतील. ज्याचें पुण्य अधिक भरेल, तो स्वर्गांत व ज्याचें पाप अधिक भरेल, तो नरकांत जाईल. त्या दिवशीं कोणी कोणाचा मित्र राहणार नाही आणि कोणाला कोणाची मदत होणार नाही.

ईश्वरकल्पना—इस्लामी धर्मांत अल्लाशिवाय दुसरा कोणी ईश्वर नाही. भूमि आणि आकाश अर्थात् समस्त विश्व हें त्याच्याचसाठी आहे. तो सर्वज्ञ व सर्वसाक्षी आहे (कु. २.३४ २). तो कोणापासून उत्पन्न झाला नाही. आद्यंतीं व अंतर्बाह्य तोच आहे. ईश्वर सातव्या आसमानांत सिंहासनावर बसून फरिश्त्यांच्या द्वारें साऱ्या सृष्टीचें शासन करतो (कु. १०.१.३; १३.१.२; ३२.१.४).

फरिश्ते—हिंदु पुराणांत ज्याप्रमाणे शिवदूत किंवा विष्णुदूत मानलेले आहेत त्याचप्रमाणे इस्लामी धर्मांत फरिश्ते

नांवाचे दूत मानलेले आहेत. ते ईश्वराच्या आधीन असतात. ते आस्तिकांच्या जवळ जाऊन त्यांना सांगतात, की 'आमचा धनी परमेश्वर आहे व आमची त्याच्यावर श्रद्धा आहे. भिऊं नका. दुःख करूं नका. त्याचा स्वर्गीय संदेश ऐका. त्याच्याशीं मीलन होण्याबद्दल तुम्हांला वचन दिलेलें आहे (४१.४.५).'

शैतान——फरिष्त्यांव्यतिरिक्त कुराणांत विशिष्ट प्रकारच्या अदृष्ट पापात्म्यांचीहि कल्पना केलेली आहे. त्यांना शैतान असें म्हणतात. फरिष्त्यांप्रमाणेच तेहि सर्वसंचारी आहेत. पण ते माणसाला शुभकर्मापासून परावृत्त करून अशुभ कर्मांची प्रेरणा देतात. इब्लिस हा त्यांचा सरदार असून त्याला ईश्वराने स्वर्गांतून हाकलून दिल्याची कथा कुराणांत आलेली आहे. बायबलानेंहि अशीच शैतानाची कल्पना केलेली आहे. सूक्ष्म विचार केल्याअंतीं असें दिसतें, की फिरिष्ते व सैतान हें मानवाच्या आंतर जीवनांतलें एक द्वंद्व आहे. फरिष्ते म्हणजे सद्‌विचार व शैतान म्हणजे दुर्विचार असें समजायला हरकत नाही. मानवाच्या अंतरांत या दोन विरोधी शक्तींचा संघर्ष सतत चालू असतो. त्यांत कधी फरिष्त्यांचा विजय होतो; तर कधी शैतानांचा.

इस्लामी धर्माचे आचार व तत्त्वप्रणाली यांचा सामान्य परिचय वरीलप्रमाणे आहे.

रीतिरिवाज —— पैगंबराच्या आज्ञेप्रमाणे मुसलमानांनी रोज ५ वेळां नमाज पढायचा असतो. कांही लोक लहानपणीं नमाज करण्यांत कसर राहिली असली, तर मोठेपणीं जादा नमाज करून ती भरून काढतात. एखाद्याला वाईट दिवस आले, तर त्याच्या हितासाठी अधिक नमाज करणारेहि लोक असतात. कुराणपठण हें पवित्र कर्तव्य समजलें जातें. प्रार्थनेसाठी मशिदींत जायचें असतें; पण तें शक्य न झाल्यास ती कुठेहि केली तरी चालते. प्रार्थना अरबी भाषेंतच करणें आवश्यक असतें. अन्यथा तिचें पावित्र्य कमी होतें, असें मानतात. जुम्मा म्हणजे शुक्रवार हा त्यांचा पवित्र दिवस होय. त्या दिवशींची प्रार्थना रोजच्याहून अधिक असते. त्या दिवशीं कोणत्याहि कार्याचा आरंभ करणें लाभदायक मानतात.

स्वतःपेक्षा श्रेष्ठ व्यक्तीला कांहीतरी वस्तु किंवा द्रव्य अर्पण करण्याची मुसलमानांत प्रथा आहे, त्याला नज़र असें म्हणतात. नज़राणा शब्द त्यावरूनच आला आहे. राजेरजवाडे, श्रीमंत व सरदार हे सणाच्या दिवशीं कनिष्ठ व्यक्तींकडून नज़राणे स्वीकारतात व त्यांची त्याहून अधिक प्रमाणांत परतफेडहि करतात.

एखादा माणूस आजारी पडला, तर एका थाळींत धान्य घालून व त्यावर काही द्रव्य ठेवून ती थाळी रात्रभर आजारी माणसाच्या बिछान्याखाली ठेवतात. धान्याऐवजी भाकरीहि ठेवण्याची चाल आहे. सकाळीं तें धान्य व द्रव्य गरिबांना वांटतात. एखाद्या माणसाचा अपघात किंवा गंडांतर टळलें, तर त्याचे इष्टमित्र त्याच्याकडे धान्य, तेल व द्रव्य असा आहेर पाठवितात. संकटमुक्त माणसाने त्या पदार्थांना स्पर्श केल्यानंतर ते गरिबांना वांटून टाकतात. आजारी मनुष्यावरून द्रव्य, वस्त्र किंवा धान्य ओवाळून टाकण्याचीहि पद्धत आहे. या ओवाळणीने आजारी माणसाचा रोग, त्या पदार्थासह निघून जातो, अशी समजूत आहे. या पद्धतीला षद्‌काह किंवा सुटका असें म्हणातात.

इंग्रजी रिवाजाप्रमाणे दुसऱ्याने एखादी गोष्ट आपल्यासाठीं केल्यास त्याला 'थँक्स' म्हणून आपण धन्यवाद देतों. पण मुसलमान लोक कोणत्याहि व्यक्तीला कधीहि धन्यवाद देत नाहीत. व्यक्तीकडून लाभ किंवा कार्य झालें, तरी तो परमेश्वराचाच कृपाप्रसाद असतो, अशी त्यांची समजूत असते. त्यामुळे ते सर्व धन्यवाद 'शुक्र अल्लाह' (सर्व धन्यवाद परमेश्वराला) असें म्हणून परमेश्वराला देतात.

मुसलमानी महिने हे चंद्राच्या गतीवर ठरविलेले असतात. अमावास्येनंतर प्रतिपदेस चंद्रदर्शन होतें, तेव्हा त्यांचा महिना सुरू होतो आणि तो दिवस महत्त्वाचा मानला जातो. शुक्ल प्रतिपदेच्या चंद्रकोरीला ते हिलाल म्हणतात. मुसलमानांत चंद्राला पराकाष्ठेचें महत्त्व आहे. त्यांच्या धार्मिक व सामाजिक जीवनावर चंद्राचा विलक्षण प्रभाव आहे. प्रत्येक महिन्याच्या प्रारंभीं अर्थात् प्रतिपदेच्या चंद्रदर्शनाच्या वेळीं ते उत्सव करतात. लग्न समारंभासाठी पौर्णिमा हा शुभ दिवस मानतात. कोणतेंहि कार्य सुरू करण्यासाठी चंद्राच्या कला पाहून मुहूर्त ठरवितात.

मुसलमानांत पूर्णचंद्रप्राशन नांवाचा एक उपचार प्रचलित आहे. मज्जातंतूंची दुर्बलता व हृदयविकार या रोगांवर तो उपचार करतात. चांदीच्या थाळींत पाणी भरून तींत पूर्णचंद्राचें प्रतिबिंब पडेल, अशाप्रकारें ती ठेवतात. रुग्ण मनुष्य त्या प्रतिबिंबावर थोडावेळ नजर रोखतो व मग तें पाणी एका दमांत पिऊन टाकतो.

चंद्र-शुक्रांची युति शुभकारक मानतात. त्यावेळीं मंत्र लिहवून व तो चांदीच्या ताइतांत घालून मुलांच्या दंडाला बांधतात. चंद्रग्रहण ही घटनाहि महत्त्वाची समजतात. ईश्वरी कोपामुळे चंद्राला ग्रहण लागतें, अशी त्यांची समजूत असते व त्यामुळेच त्यांना चंद्रग्रहणाची भीति वाटते. त्या काळांत ते प्रार्थना व दानधर्म करतात. गरोदर स्त्रियांना ग्रहण कालांत झोपूं देत नाहीत. गाभण पशूंनासुद्धा या काळांत जपतात.

त्यांचा गर्भपात होऊं नये, म्हणून शेणांत कांही औषधें टाकून तें गाभण जनावरांच्या पोटावर थापतात व त्यांना उघड्या-वर जाऊं देत नाहीत. जखमेवर चांदण्याचा परिणाम वाईट होतो, अशीहि समजूत आहे.

मुसलमानी कुटुंबांतील अंत:पुराला ज़नाना म्हणतात. पूर्वी मोठाले वाडे असत व त्यांतील मागच्या चौकांत त्यांचा ज़नाना असे. ज़नान्यांतल्या स्त्रिया जवळच्या नातलगावांचून कोणाच्या नजरेस पडत नसत. लहानपणापासूनच त्यांना या बंदिवासाची संवय झालेली असल्यामुळे त्यांना त्याचें कांही वाटत नसे. या बंदिस्त विभागांत त्या आनंदाने राहत. ही पडदापद्धति मुहंमदाच्या काळापासून व त्याच्या आज्ञेनेच सुरू झाली आहे. पुढे भारतावर स्वाऱ्या करणाऱ्या तैमूरलंगा-सारख्या आक्रमकांनी आपल्या स्त्रियांवर एतद्देशीय लोकांची दृष्टि पडूं नये म्हणून ही पद्धति अधिक कडक केली व ती आजपावेतो अमलांत आहे. जनान्यांतल्या बहुतेक स्त्रियांचे मनोरंजनाचे मार्ग म्हणजे गोष्टी सांगणें व सोंगट्या किंवा गंजीफा खेळणें हे असतात. तिथल्या सर्व स्त्रियांना निजण्या-साठी नवारीचे पलंग असतात. मात्र दिवसा बसण्यासाठी सर्व खोलीभर सतरंजी पसरतात. मुख्य स्त्रीसाठी सतरंजीच्या मध्यभागी गालिच्याची मनसद (खास बैठक) असते. पैजामा, अंगिया, झिरझिरीत कुडती व दुपट्टा, असा मुसलमानी स्त्रीचा पोशाख असतो. त्यांना डोळ्यांत काजळ घालणें व हाता-पायांना मेंदी लावणें फार आवडतें. सोन्याचें वलय व त्यांत माणिक-मोतीं गुंफलेलीं, असें त्यांचें नासाभूषण असतें. तें सौभाग्यचिन्ह म्हणून त्यांना कायम वापरावें लागतें. फक्त मुहर्रमच्या दिवसांत तें काढून ठेवतात. विधवा स्त्रिया नाकां-तला दागिना घालीत नाहीत. मुसलमान स्त्रिया दोन्ही कानांत सोन्याच्या किंवा चांदीच्या अनेक कड्या घालतात. केसांची लांब वेणी घालून तिच्या अग्राला गोंडे बांधतात. सणासुदीला बाहेर पडतांना जरीचें काम केलेले मखमलीचे नाजूक चढाव पायांत घालतात.

मूल होणें ही भाग्याची गोष्ट समजतात. मुलगा झाला तर आनंदोत्सव करतात. मुलगी झाल्यास तिचा विशेषसा उत्सव करीत नाहीत. पुत्रजन्मानिमित्त तोफा किंवा बंदुका यांचे बार काढण्याची पद्धत पूर्वी होती. गरीब माणूससुद्धा बंदुकीचा एक तरी बार काढीतच असे. कारण बंदुकीच्या आवाजाने भुतें-खेतें पळून जातात अशी समजूत होती. पूर्वी श्रीमंत कुटुंबां-तल्या स्त्रिया स्वतःच्या मुलांना पाजीत नसत. त्यासाठी दाई ठेवण्याची चाल होती. दाई वेळेवर मिळाली नाही, तर मुलाला शेळीचें दूध पाजीत. पुष्कळदा मुलाच्या निमित्ताने घरांत आलेली दाई मरेपर्यंत तिथेच राहत असे. नवजात मुलाला मुसलमानी समाजांत पहिले तीन दिवस केवळ बाळगुटीवरच ठेवतात. चौथ्या दिवशीं दूध पाजतात. ९ व्या दिवशीं स्नान घालतात. ४० व्या दिवशीं त्याचें जावळ काढून नांव ठेवतात. नामकरणाचा समारंभ करतात. प्रत्येक वाढदिवशीं एका दोरीला गांठ मारतात. त्या गांठीला 'साल गिरह' किंवा 'बरसगांठ' म्हणतात. सातव्या वर्षी मुलाची सुंता करतात.

मुसलमान लोकांत ज्योतिषाचें बरेंच प्रेम आहे. जुन्या काळीं प्रत्येक कुटुंबांचा एक ज्योतिषी ठरलेला असे. त्याला नजूम म्हणत. नजूम लोक ज्योतिषशास्त्राचें थोडेंसें ज्ञान मिळवून त्यावर सर्वांना झुलविण्यांत फार तरबेज होते. नजूम-वर एकदा विश्वास बसला, की कौटुंबिक जीवनांतल्या लहान मोठ्या प्रत्येक घटनेसाठी त्याचा सल्ला घेतला जाई. त्याने नको म्हटलें, की मग कांहीहि करायचें नाही, असा प्रघात होता. ज्योतिषाप्रमाणेच मुसलमानांची जादू व चेटूक यांच्या-वरहि श्रद्धा असते. बुद्धिमान् व सुशिक्षित लोकहि भुताखेतांवर विश्वास ठेवतांना दिसतात. धर्मनियम कडकपणें पाळणारे व परमेश्वराचें सदैव चिंतन करणारे अवलिये, चेटुक किंवा भूत-बाधा यांच्या तावडींतून माणसांना सोडवूं शकतात, असाहि समज आहे. भूतबाधा होऊं नये म्हणून साधुपुरुषांनी मंतरून दिलेले ताईत किंवा गंडे गळ्यांत किंवा दंडांत बांधतात.

जुन्या काळीं नबाब, अमीर, उमराव यांच्या कुटुंबांत स्त्री-पुरुष गुलाम ठेवण्याची प्रथा होती. गुलाम हा पुरुष असला तर त्याला खच्ची करून नपुंसक बनवीत व मग त्याची ज़नान्यावर नेमणूक करीत. त्याला यूनक् म्हणत. कांही नबाब आपल्या एखाद्या यूनक्ला कुटुंबांत उच्चाधिकारहि देत. मालक गुलामांशीं माणुसकीने व दयाबुद्धीने वागत. त्यामुळे गुलाम आपल्या धन्याशीं एकनिष्ठ राहत. एखाद्या धन्याने आपल्या गुलामांना स्वातंत्र्य देऊं केलें, तरी ते धन्याला सोडून जायला तयार नसत.

ते दिवसाचे चार सारखे भाग पाडतात. प्रत्येक भागाला पहर म्हणतात. रात्रीचेहि चार पहर असतात. प्रत्येक पहराचे आठ भाग पाडून त्या प्रत्येक भागाला घडी म्हणतात. दीन, अपंग व गरीब लोकांना अन्नवस्त्र देणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे असें मानतात. सणासुदीला तसेंच सामाजिक किंवा धार्मिक प्रसंगीं सढळ हाताने अन्नदान करतात. अन्न, वस्त्र व द्रव्य दुसऱ्याला दिल्याने दात्याला ईश्वर अनंत पटींनी तें देऊन सुखी करतो, अशी त्यांची श्रद्धा असते. मक्केची यात्रा करणें हें जीवनांतलें एक पवित्र कर्तव्य मानतात. पैगंबराने दिलेली आज्ञा पाळावी व त्याने पवित्र ठरविलेलें स्थान एकदा तरी

स्वतःच्या डोळ्यानें बघावें, ही इच्छा अनेकांच्या मनांत अत्यंत प्रबल असते. कांही कारणांनी ज्यांना मक्केला जाणें शक्य नसेल त्यांनी निदान एका तरी गरीब यात्रेकरूचा मक्केच्या प्रवासाचा खर्च करावा, असाहि संकेत आहे.

इस्लामी संस्कार—मुसलमान लोकांत जे संस्कार प्रचलित आहेत, त्यांपैकी कुराणांत फारच थोडे सांगितले आहेत. बहुतेक संस्कार परंपरेने चालत आलेले असून कांहींवर त्या त्या देशांतल्या रीतिरिवाजांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. मुहंमदाने कांही संस्कार पूर्वींच्या अरबी संप्रदायांतून घेतले व कांहीं स्वतः निर्माण केले. भारतांत आल्यावर इस्लामने हिंदुधर्माचाहि पुष्कळ प्रभाव ग्रहण केला आहे. देश-पंथपरत्वें त्यांच्या संस्कारांत फरक पडला असला, तरी प्रत्येक संस्काराच्या प्रसंगीं ईश्वरस्मरण ही गोष्ट सर्व देशांत व सर्व पंथांत आढळते. त्याचप्रमाणे त्यांचा कोणताहि संस्कार मौलवीवाचून अडत नाही. पैदाइश, खत्ना, बिस्मिल्ला, निकाह व वफ़ात हे मुसलमानांचे मुख्य संस्कार होत.

विवाह संस्कार— मुसलमान लोकांच्या विवाहसंस्काराला निकाह (अरबी) किंवा शादी (फारसी) असें म्हणतात. या शब्दांचा अर्थ आनंदोत्सव असा आहे. हा संस्कार धार्मिक नसून तो एक सामाजिक करार असतो. त्यांत काजीची उपस्थिति अपरिहार्य नसते. कुराणांतील लग्नविषयक मंत्र म्हणून कोणीहि निकाह लावूं शकतो. मुसलमानांत बालविवाहाची चाल नाही. कित्येकदा मुलांच्या सहाव्या किंवा सातव्या वर्षींच त्यांची जोडी जमवून ठेवतात; पण लग्नसमारंभ मात्र मुलें वयांत आल्यावरच केला जातो. वधूवरांचें कुलशील पाहून ठरविलेलें व विधियुक्त केलेलें लग्न हा विवाहाचा सर्वमान्य प्रकार होय. तें ठरविण्यापूर्वी चिठ्ठ्या टाकून कौल घेण्याचीहि प्रथा आहे. कधी स्वप्नांतील आदेशानुसार सोयरिक जुळवितात तर कधी वधूवरांच्या नांवांचीं आद्याक्षरें विशिष्ट पद्धतीने जुळतात की नाही, हें पाहून मगच पुढची बोलणीं करतात. वराचा पिता वधूच्या पित्याकडे वराच्या वंशाची संपूर्ण माहिती लिहून पाठवितो. तिच्यासोबत कांही द्रव्यहि भेट म्हणून धाडतो. त्याचा स्वीकार केला गेल्यास, मग वधूला मागणी घालतो. मागणीच्या वेळींहि वस्त्रालंकार पाठविण्याची पद्धत आहे. गरीब लोक रेशमी रुमालांत फक्त एक रुपया बांधून पाठवितात. मग लग्नाचा दिवस निश्चित करतात.

मुलीचा सक्तीने इखाद्याशी निकाह लावूं नये, असा कायदा इस्लामच्या स्थापनेपासून प्रचलित आहे. इस्लामने स्त्री व पुरुष यांचा दर्जा बहुतांशीं समान मानला आहे. त्यामुळे लग्नाला वधूची संमति आवश्यक असते. तदनुसार मौलवी किंवा तिच्या नात्यांतला एखादा पुरुष तिचा वकील म्हणून तिची संमति मिळवितो व वराला ती कळवितो. या संमतीला कमीत कमी दोन साक्षीदार लागतात. अलीकडे मात्र हा केवळ एक उपचार झाला आहे. बहुतेक लग्नें मुलीचे वडीलधारे लोकच ठरवितात व वधूची मान्यता गृहीत धरतात. मुसलमानांत वराने आपल्या ऐपतीप्रमाणे वधूला कांही रक्कम हुंडा म्हणून द्यायची असते. तिला मेहेर म्हणतात. त्या रकमेवर वधूची खास मालकी असते. पुष्कळसे गरीब लोक वधूकडून हा मेहेर माफ करवून घेतात.

मुख्य लग्नविधि वधूच्या घरीं होतो. सर्वसाधारणपणें तो तीन दिवस चालतो. वरपक्ष लवाजम्यासह वधूगृहीं आल्यावर प्रथम त्याचें स्वागत होतें. पहिल्या दिवशीं दोन्ही कडचे सोयरे एकत्र बसून खाणेंपिणें, हुक्का, पानसुपारी, नाचगाणें, इ. कार्यक्रमांत वेळ घालवितात. दुसऱ्या दिवशीं वधूकडून मेंदी, कपडे, मिठाई व चैनीच्या वस्तू वराकडे वाजत गाजत नेतात. वराच्या हातापायांना मेंदी लावतात व एका तासाने ती धुवून टाकतात. मग नवरदेव वधूकडून आलेले कपडे घालतो. तिसरा दिवस वरातीचा असतो. त्या दिवशीं वधूच्या हातापायांना मेंदी लावली जाते. तिला मग न्हाऊं घालून वराकडून आलेल्या वस्त्रालंकारांनी सजवितात. संध्याकाळीं नवरदेव डोक्याला बाशिंग बांधून मिरवणुकीने वधूगृहीं जातो. तिथे एका बाजूस बैठक तयार केलेली असते. बैठकीला लागून पडदा असतो. पडद्याआड वधूसह सर्व स्त्रिया बसलेल्या असतात. बैठकीवर नवरदेव मुलामुलीचे वडील, काजी व एकदोन मित्र एवढेच बसतात. काजी वधूला लग्नाबद्दल तिची संमति विचारतो. तिने 'हो' म्हटल्यावर तो नवरदेवाला कुराणांतील लग्नविषयक कायदा वाचून दाखवितो. यावेळी मेहेर किती देणार असा प्रश्न वराला विचारला जातो. त्यावर नवरा मुलगा मनांत धरलेली रक्कम उच्चारतो. ती रक्कम त्या वेळीं द्यायची नसते. कांही करणाने लग्नविच्छेद करण्याची वेळ आलीच, तर त्यावेळीं ती रक्कम त्या वराने तिला द्यायची असते.

एवढें झाल्यावर वराशिवाय सर्व पुरुष बाहेर जातात. वधू व तिची आई या दोघींशिवाय इतर स्त्रियाहि दुसऱ्या खोलींत जातात. मग वधूच्या मातेसमक्ष वधूवरांची भेट होते. त्या वेळीं नवरदेव वधूचें मुख प्रथम आरशांत पाहतो. काजी वधूवरांना आशीर्वाद देतो, की 'आदम व हव्वा, हजरत अली व फातमा, या जोडप्यांप्रमाणे तुम्हालाहि ईश्वर सुखी करो!' मग इतर लोक हात वर करून त्या आशीर्वादांत सहभागी होतात. मग काजी वधूवरांकडून कुराणांतील सहा

कलमे (पवित्र मंत्र) म्हणवून घेतो. मग खारका वाटल्या जातात. काजी आपल्या दप्तरांत त्या लग्नाची नोंद करून घेतो.

वराकडील मंडळींना मेजवानी व वराला आंदण म्हणून द्यायच्या वस्तू देऊन झाल्यावर वरात निघते. नवरदेव वधूला उचलून आणून मेण्यांत बसवितो. वरात वाजतगाजत नवरदेवाच्या घरीं येते. त्यानंतर दोन, तीन दिवसांनी वरपक्षाकडची मेजवानी होते. एवढें झाल्यावर लग्नसमारंभ समाप्त होतो. तसें पाहिलें तर इस्लामी लग्नविधि अगदी सुटसुटीत आहे; पण हिंदूंचे अनेक विवाहविषयक रीतिरिवाज त्यांच्यामध्ये शिरल्यामुळे तो समारंभ विस्तारला आहे. अलिकडे गोरगरीब लोकसुद्धा लग्नासाठी ऐपतीबाहेर खर्च करतांना दिसतात.

इस्लामच्या स्थापनेपूर्वी अरबस्तानांत स्त्रीला एक भोग्य वस्तु या पलिकडे किंमत नव्हती. पुरुष हव्या तितक्या बायका करीत. मुहंमदाने या प्रकाराला आळा घालून पुरुषाला जास्तीत जास्त चार बायका करतां येतील, असा नियम केला.

मुसलमान समाजांत तलाक अर्थात् काडीमोड देण्याची पद्धति आहे. पण तरीहि व्यवहारांत काडीमोडीचीं उदाहरणें फार कमी घडतात. कारण इस्लामने ती गोष्ट ' कायदेशीर; पण ईश्वराला नापसंत ' ठरविली आहे. काडीमोड घ्यायची असेल तर पतिपत्नी एकमेकांना साक्षीदारांसमोर जाणीव (नोटीस) देतात. पतीने पत्नीला काडीमोड द्यायची असल्यास त्याला मेहेरची ठरलेली रक्कम तिला द्यावी लागते. उलट पक्षीं पत्नीला काडीमोड हवी असेल, तर तिने लग्नांत घेतलेल्या हुंड्यापैकी कांही भाग पतीला परत करायचा असतो. या सर्व प्रकारांत स्त्रीला न्याय देण्याची दृष्टि असते. मुसलमानांत विधवाविवाहाला बंदी नाही.

अंत्यसंस्कार – याला वफात असें नांव आहे. हिंदूंप्रमाणेच मुसलमानांतहि मरतांना देवाचे नांव घेण्याची प्रवृत्ति आहे. त्या वेळीं कुरणांतील कांही वचनेंहि कानीं पडावीं असें त्यांना वाटतें. मरणोन्मुख व्यक्तीच्या तोंडांत सरबत किंवा शक्य असल्यास मक्का येथील पवित्र विहिरीचें पाणी घालतात. प्राण निघून जातांच मृताचें तोंड व डोळे बंद करतात. हातपाय सरळ करतात. मग बंदिस्त जागीं सर्व कपडे काढून मृताला सर्वांगस्नान घालतात. स्नानाच्या पाण्यांत बोरीचीं किंवा डाळिंबीचीं पानें कृमिनाशक म्हणून टाकतात. त्यावेळीं कुराणांतील कांहीं मंत्र म्हणतात. मग मृताच्या शरीराला कापूर, चंदन वगैरे सुगंधी द्रव्यें चोळून त्याच्याभोवती कफन म्हणजे शुभ्र वस्त्र गुंडाळतात. पुरुषांचें कफन तीन तुकड्यांचें व स्त्रियांचें पांच तुकड्यांचें असतें. नंतर मृताला पुष्पमाला घालतात. मग बाजेवर किंवा शवपेटींत ठेवून त्याला कबरस्तानांत नेतात. प्रेताला खांदा देणें पवित्र समजतात. कबरस्तानांत गेल्यावर प्रथम प्रार्थना करतात. नंतर खड्डा खणतात. मृताचें तोंड मक्केकडे राहील, अशा बेताने शव कबरींत ठेवून जमलेले लोक त्यावर मूठमूठ माती टाकतात. ' तूं मातींतून निर्माण झाला आहेस, मातींतच मिळून जात आहेस व अंतिम निवाड्याच्या दिवशीं तुला मातींतूनच उठविण्यांत येईल, ' अशा अर्थाचा मंत्र म्हणतात. सर्व दफनविधि चालू असतांना सुराए यासीन व सुराए तबारक हे कुराणांतले मंत्र म्हणतात. कबरीवर पक्कें बांधकाम करणें हें इस्लामी धर्मांत निषिद्ध आहे; पण कालान्तराने तो निषेध शिथिल होऊन मुसलमान लोक कबरीवर सर्रास थडगीं बांधूं लागले. आग्र्याचा ताजमहाल हें त्याचें जगप्रसिद्ध उदाहरण होय.

कबरस्तानांतून घरीं आल्यानंतर प्रेतयात्रेस गेलेल्या सर्वांना साधें भोजन किंवा कांही पेय देतात. मृताच्या घरीं तीन दिवस स्वयंपाक होत नाही. त्या अवधींत मृत व्यक्तीचे नातेवाईक त्था घरच्या लोकांसाठी जेवण पाठवितात. दफनानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं मुल्ला-मौलवींना बोलावून त्यांच्याकडून कुराण वाचून घेतात. त्यांना जेवण व बिदागी देतात. भुकेल्या गरिबांसाठी ४० दिवसपर्यंत रोज मशिदींत जेवण पाठवितात. ४० व्या दिवशीं पुनश्च कुराणपठण व इष्टमित्रांना मेजवानी होते. त्या वेळीं गरिबांना व फकिरांना कपडे, भांडी इ. वस्तु वांटतात. वार्षिक श्राद्धाच्या दिवशींहि दानधर्म करतात.

शिया व सुन्नी – इस्लाम धर्मांतहि अनेक संप्रदाय आहेत. पण त्यांतले प्रमुख संप्रदाय शिया व सुन्नी हे होत. सर्व संप्रदाय कुराण व मुहंमद पैगंबर यांना मानतात. सर्वांत सुन्नींची संख्या अधिक आहे. मुहंमद पैगंबर इ. स. ६३२ सालीं मृत्यु पावला. त्यानंतर त्याच्याजागी खलीफा कोणी व्हावें याबाबत मुसलमानांत तंटा निर्माण झाला. कांही लोक म्हणूं लागले, की बहुमताने निवडून येईल तोच खलीफा होईल. तदनुसार अबूबक्र, उमर व उस्मान हे तिघे क्रमाने खलीफा झाले. या खलीफांना धर्मनेते मानणाऱ्या लोकांना सुन्नी म्हणतात. मुहंमद पैगंबराचा जावई अली, हाच खरा खलीफा होय, असें दुसऱ्या गटाचें मत आहे. यामुळे ते लोक पहिल्या तीन खलीफांना मानीत नाहीत. या पंथाच्या लोकांना शिया असें म्हणतात. हे लोक हजरतअली व त्याचे वंशज मिळून बारा इमाम म्हणजे धार्मिक नेते मानतात. त्यावरूनच शियांना इमाम असेंहि दुसरें नांव पडलें आहे.

शियापंथी लोक कुराणांतला कांही भाग उस्मानने लिहिला

आहे, असें समजतात व तेवढा भाग वगळून कुराणाला मानतात. तसेंच ते अलीच्या प्रशंसेचा मजकूर कुराणांत अधिक घालतात व कुराणाच्या कांही भागाचा अर्थ सुन्नी लोकांच्यापेक्षा वेगळ्या तऱ्हेने लावतात. शिया हे पिराला मानीत नाहीत. शियांतील कांही लोक वद्य प्रतिपदेपासून महिन्याचा आरंभ धरतात. सुन्नी लोक दिवसांतून पांच वेळा व शिया तीन वेळां नमाज पढतात.

शिया व सुन्नी यांच्या संघर्षापूर्वीं इस्लाममध्ये एकरूपता व एकवाक्यता नांदत होती. त्याचें सर्वांत मोठें कारण हें, की त्या काळांत इस्लाम व मुसलमान हे दोन्ही खलीफांच्या नियंत्रणाखालीं होते. खलीफांच्या मंजुरीशिवाय त्यावेळी धार्मिक रीतिरिवाजांत कोणालाहि तिळभरसुद्धा फरक करतां येत नसे. पण शिया-सुन्नींचे झगडे चालू झाले व खलीफांच्या धार्मिक नियंत्रणांत ढिलाई झाली. १९१८ सालीं तुर्कस्थानचा अधिनायक कमालपाशा याने तर खिलाफतच उडवून दिली.

इस्लामचा इतिहास – मुहंमद पैगंबर अरब देशांतल्या मक्का शहरीं जन्मला. त्याच्या काळी जदीस, समूद, कहतान, इस्माइल यहुदी, इत्यादि जमाती अरबस्तानांत वास्तव्य करून होत्या. अरबवासी लोकांची अवस्था त्या काळीं अत्यंत दीन आणि दयनीय झाली होती. भोगवाद पराकोटीला गेला होता. नरबलि, व्यभिचार, जुगार आणि मद्यपान, या प्रकारांना ऊत आला होता. अरब लोकांत गरिबी वाढली होती व गरिबांची पिळवणूकहि वाढली होती. विधवा, अनाथ स्त्रिया व दुर्बल माणसें, यांचा कोणी त्राता उरला नव्हता. श्रीमंत कुटुंबांत कर्ता पुरुष मेल्यावर त्याच्या असंख्य बायका दायभाग म्हणून त्याच्या मुलांना वांटून दिल्या जात होत्या. अरब समाजांत विवाहसंस्थेविषयीं आदर उरला नव्हता. स्त्री-पुरुषांच्या संबंधाचें पावित्र्य नष्ट झालें होतें. स्त्रियांच्या अब्रूला कांही किंमत राहिली नव्हती. युद्धकैद्यांची कत्तल चालू होती. त्या कैद्यांच्या बरोबर त्यांच्या बायका-मुलांचाहि शिरच्छेद केला जात होता. निजलेल्या लोकांवर आक्रमण करून त्यांना लुटणारे आणि मारणारे क्रूर लोक यांचा फातक व फत्ताक या शब्दांनी गौरव होत होता. कोमल बालकांवर तिरंदाजी करणें, एखाद्याला जळत्या खाईंत फेकणें, एखाद्याचे नाक, कान कापणें, एखाद्याचे अवयव तोडणें, इ. क्रूरकर्में म्हणजे बलिष्ठांचा नुसता खेळ झाला होता.

हुब्ल, लात, मनात्. उज्ज इ. अनेक देवतांच्या मूर्ती अरब लोक पुजीत होते. केवळ काबाच्या एका मंदिरांत ३६० देवमूर्ती होत्या. मक्केच्या प्रत्येक मंदिरांत मूर्तींचा नुसता खच होता. या सर्वांत हुब्ल या देवतेची प्रतिष्ठा सर्वाधिक होती. सर्वत्र अंधविश्वास बळावला होता.

अशी ही भौतिक व नैतिक दुर्दशा केवळ अरबांचीच होती असें नव्हे; तर अरबस्तानच्या पश्चिमेस पसरलेलें रोमन साम्राज्यहि अशाच पापांनी आणि दुर्गुणांनी लिडबिडलें होतें. भोगविलास आणि पापाचार यांच्या अतिरेकामुळे तें आंतून बाहेरून खिळखिळें झालें होतें. अरबस्थानाच्या दुसऱ्या बाजूचें इराणी साम्राज्यहि भोगवादाच्या चिखलांत रुतलें होतें. इराण व रोम या दोन साम्राज्यांत सदैव संघर्ष चालू होता. या दोन प्रबल सत्तांच्या टकरीत दोन्ही साम्राज्यांतली गरीब, दुबळी जनता चिरडून भरडून निघत होती. त्या काळांत रोमन साम्राज्यांतला ख्रिस्ती धर्महि आपलें नैतिक अधिष्ठान घालवून बसला होता. तो शासकांच्या अत्याचारांचा समर्थक बनला होता. धर्माच्या नांवावर मंत्रतंत्र आणि दोरेताईत करून जनतेला लुबाडणें, हेंच त्या काळीं ख्रिस्ती धर्मगुरूंचें धर्मकार्य बनलें होतें.

अशा या नेमक्या काळांत मुहंमदाचा जन्म झाला. त्याने तत्त्वज्ञानाच्या जंजाळांत न पडतां सरळ कर्ममय धर्माचा पुरस्कार केला. 'ईश्वर एक आहे व मुहंमद हा त्याचा पैगंबर आहे' या दोन सिद्धान्तांवर विश्वास ठेवणाऱ्यांसाठी त्याने वर उल्लेखलेलीं कलमा, नमाज इ. पांच कर्में आदेशिलीं. मुहंमद मूर्तिपूजेचा कट्टर विरोधी बनला. तत्कालीन अरब हे मूर्तिपूजक असल्यामुळे मुहंमदाचा मूर्तिपूजाविरोध त्यांना समजला नाही व रुचलाहि नाही. त्यामुळे ते मुहंमदावर तुटून पडले. त्याच कारणास्तव मुहंमदाला मक्केंतून मदिनेस पळून जावें लागलें. ही घटना इस्लामी जगांत 'हिजराज' या नांवानें ओळखली जाते. मदिनेस मात्र मुहंमदाचें व त्याच्या धर्मतत्त्वांचेंहि स्वागत झालें. पुढे आपल्या अनुयायांची संघटना बांधून त्याने मक्केवर स्वारी केली. व तिथे आपल्या एकेश्वरवादी धर्माची स्थापना केली.

मुहंमदाने ज्या धर्माचा पुरस्कार केला, तो धर्म अत्यंत सरळ व सर्वसुलभ होता. त्यामुळे अरब जनता त्याकडे सहजपणें आकृष्ट झाली. मुहंमदाने ज्या गोष्टीवर विशेष भर दिला ती गोष्ट ही, की इस्लामचा स्वीकार केल्यानंतर माणसामाणसांत कोणताहि भेद राहत नाही व राहतां कामा नये. त्यामुळे इस्लामची लोकप्रियता वाढली. समाजाच्या खालच्या थरांतल्या लोकांना, दलितानां, अपमानितांना या समतेचें विशेष आकर्षण वाटलें व त्या लोकांत हा धर्म सुलभतेने फैलावला.

इस्लामने यतिवृत्ति व वैराग्य यांना कधीहि प्रोत्साहन दिलें नाही. त्या धर्मांत लौकिक सुखांच्या त्यागाची भलावण नाही.

गिब हा इतिहासकार लिहितो, की 'पूर्व एशियांतल्या सर्व धर्मांत इस्लाम हाच एक धर्म असा आहे, की जो गृहस्थ धर्माच्या-जवळ व वैराग्यापासून दूर राहिला आहे.' इस्लामने लौकिक सुखभोगांना मर्यादा घातली; पण त्यांचा त्याग उपदेशिला नाही.

इस्लाम हा प्रथम एक मानवधर्म एवढ्याच रूपाने उद-याला आला; पण थोड्याच काळांत तत्कालीन परिस्थितीने त्याला राजनैतिक स्वरूप प्राप्त करून दिलें. मुहंमदाला मक्केंतून पळून मदिनेस यावें लागलें आणि त्याच वेळीं त्याने मनाशीं निर्धार केला, की नव्या धर्माच्या प्रसारासाठी केवळ संघटना पुरेशी नाही; तर त्यासाठी तलवारीचीहि जरूरी आहे. या त्याच्या निर्धारासरशी अरबांच्या विखुरलेल्या शक्ती मुहंमदाच्या झेंड्याखाली एकत्र येऊं लागल्या. अरबांची जी संघटना तयार झाली, तिच्यांत राजनीति आणि धर्म हीं दोन्ही एकत्र येऊन मिळालीं. अरबी संघटना अरबी साम्रा-ज्याचें केंद्र बनली आणि खलीफे हे तिचे पुढारी झाले. खलीफे हे मुसलमानांचे शासकहि होते आणि धर्मगुरूहि होते. या खलीफांविषयीं गिब या इतिहासकाराने लिहिलें आहे--

या खलीफांची वागणूक अत्यंत साधी होती. ते न्यायी होते आणि अन्यायाचे कर्दनकाळहि होते. ते आपल्या अनुयायांना उपदेश देत – 'मुसलमान बंधूनो, बहादुर बना. शत्रूसमोर नतमस्तक होण्यापेक्षा मरण बरें. तुम्ही दयाळू बना. बाल, वृद्ध आणि स्त्रिया यांच्यावर तलवार उगारणें पाप आहे, असें समजा. फल देणाऱ्या वृक्षांना आणि शेतीच्या जनावरांना कापूं नका. शत्रूलासुद्धा जर तुम्ही एखादें वचन दिलें असेल, तर तें पाळणें हा तुमचा धर्म आहे. तुम्ही गोरगरीब आणि अश्राप जनतेवर जुलूम करूं नका.'

सुरवातीस इस्लाम हा एक क्रांतिकारक धर्म होता. अंध-विश्वास, तात्त्विक खंडन-मंडनें आणि मूर्तिपूजा, यांपासून जनतेला दूर ठेवणें व एकाच ईश्वराला शरण जायला लावणें, हें त्याने आपलें ध्येय आणि उद्दिष्ट ठरविलें होतें. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही, की कोणताहि आणि कसाहि मनुष्य एकदा मुसलमान झाला, की अमीर आणि सत्ताधारी मुसल-मानहि त्याला आपला खरा धर्मबंधु समजून समान दर्जाने वागवीत होते. इस्लाममधल्या या बंधुभावाने त्या काळांत विलक्षण क्रांति केली, असें दिसून येतें. मानवेंद्रनाथ रॉय लिहितात – अरब वीर जिथे जिथे गेले, तिथे तिथे जनतेने त्यांना आपले त्राते मानून त्यांचें स्वागत केलें. ही सर्व जनता त्या काळीं धर्माच्या नांवाखाली वरिष्ठ वर्गाकडून भरडली जात होती. कुठे रोमन सम्राट् त्या जनतेची पायमल्ली करीत होते, कुठे इराणी सम्राट् तिच्यावर जुलूम करीत होते, तर कुठे ख्रिस्ती धर्मगुरू अंधश्रद्धेच्या जाळ्यांत पकडून तिला लुबाडीत होते. या साऱ्या जनतेने इस्लामचें सहर्ष अंतःकरणाने स्वागत केलें आणि त्याला धन्यवाद दिले.

मुहंमदाच्या मृत्यूनंतर शेंदीडशें वर्षांच्या आंतच अरबांचें धर्मसाम्राज्य उत्तर आफ्रिका, स्पेन, द. फ्रान्स, इराण, मध्य एशिया आणि मंगोलिया इथपर्यंत पसरलें.

इस्लाम व भारत – इस्लाम धर्म पुढे थोड्याच काळांत अरबांच्या स्वाऱ्यांच्या रूपाने भारतांतहि पदार्पण करता झाला. भारतावरचीं मुसलमानी आक्रमणें ही एक राष्ट्रीय आपत्ति होती. हा धोका आकस्मिक किंवा अकल्पितहि नव्हता. कारण, इस्लामच्या जन्मापासून सतत पांच शतकें भारतीय जनता त्या धोक्याखालीच वावरत होती. मुसलमानांच्या आक्रमणां-मुळे जुन्या इराणचा विध्वंस झाला होता. तिथले कांही लोक आपला धर्म राखण्यासाठी निर्वासित होऊन भारतांत आले होते. भारतालाहि तोच धोका आहे, हें त्यांच्या आग-मनावरून सूचित झालें होतें. मुसलमानांनी सबंध पश्चिम आशिया आपल्या अधिसत्तेखालीं आणला होता; पण तेवढ्याने त्यांची राज्यतृष्णा व धर्मतृष्णा शमली नव्हती. त्यांना आपल्या राज्यविस्तारासाठी आणखी प्रदेश हवा होता आणि त्या दृष्टीने त्यांची लोभी नजर भारताकडे वळणें हें स्वाभाविक होतें. इ. स. ६५० सालापूर्वींच अरबांनी भार-ताच्या सरहद्दीवरच्या प्रदेशांत आपल्या मोहिमा सुरू केल्या व इ. स. ७१२ पर्यंत ते सिंध प्रांतांत घुसले. त्यानंतर ५०० वर्षे त्यांच्या स्वाऱ्या अधूनमधून सतत चालू राहिल्या. या कालखंडांत भारतीयांनी या परकीय आक्रमकांना प्रतिकार केला, की नाही, तें जाणून घेणें आवश्यक आहे. त्यांतूनच हिंदूंचें सामर्थ्य व दौर्बल्य हीं दोन्हीहि दृष्टोत्पत्तीस येणार आहेत.

दुर्दैवाची गोष्ट अशी, की हिंदु साहित्यांत मुसलमानी आक्रमणें व त्यांचा प्रतिकार यांविषयीं खुलासेवार माहिती मिळत नाहीं. त्यासाठी मुसलमानी इतिहासकारांवर अवलंबून राहावें लागतें आणि त्या इतिहासकारांनी तो इतिहास निःपक्षपातीपणाने लिहिलेला नाही. त्यांनी विजेत्यांचा गौरव केला आहे व त्यांच्या विरोधकांवर अन्याय केला आहे. त्यामुळे मुसलमान भारतांत आले व हिंदूंकडून त्यांना कोण-ताहि प्रतिकार न होतां ते भारताचे शास्ते बनले, असा समज सर्वत्र प्रसृत झाला आहे. पण मुसलमान इतिहासकारांच्या एकांगी लेखनावरूनदेखील जी माहिती मिळते, तेवढीसुद्धा या बाबतींत बरीच उद्बोधक ठरण्यासारखी आहे.

इ. स. ६३४ ते ६४३ या नऊ वर्षांच्या काळांत दुसरा खलीफा उमर याने भारतावर एकूण तीन आरमारी स्वाऱ्या केल्या, असें दिसतें. पण त्यांत त्याला फारसें यश आलें नाही. नंतर अरब खुष्कीच्या मार्गाने भारतावरच्या स्वारीस निघाले. त्यांनी काबूल, कंदाहार जिंकून सिंधपर्यंत धडक मारली. पण त्यांची तीहि स्वारी यशस्वी झाली नाही.

उमरनंतर अली हा खिलाफतीच्या गादीवर आला. त्यानेहि सिंध प्रांतांतल्या कैकण या डोंगराळ भागावर आपलें सैन्य घातलें. पण त्या स्वारींत अरबांचा धुव्वा उडाला, असें त्यांचाच इतिहास सांगतो. मात्र असे त्यांचे अनेक पराभव झाले, तरी भारत जिंकण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा मात्र सदैव जागृत राहिली यांत शंका नाही.

इ. स. ७०८ सालीं त्यांनी सिंधवर स्वारी करण्याचा एक मोठा बेत आंखला. महंमद इब्न कासीम याच्या आधिपत्याखाली ६००० मुसलमानी सैन्य सिंधवर चालून आलें. सिंधचा राजा दाहर याने या अरबी आक्रमकांचा प्राणपणाने प्रतिकार केला. त्या युद्धांतहि मुसलमानांचा पराभव होण्याची वेळ येऊन ठेपली होती; पण दुर्दैवाने दाहर धारातीर्थी पडला आणि लढाईचें पारडें फिरलें. अरबांना जय मिळाला. त्यांनी दाहरची राजधानी असलेलें अलोर हें शहर आणि त्याचबरोबर ब्राह्मणाबाद व मुलतान हीं शहरें जिंकून घेतलीं. पण सिंधसारख्या एका लहान प्रदेशाच्या राजाने पश्चिम आशियांतल्या एका बलाढ्य सत्तेचा प्रतिकार करायला दंड थोपटून उभें राहणें, ही घटना कांहीं सामान्य नव्हे. या लढाईत दाहरला स्वजनांकडूनच दगाबाजी झाली नसती, तर मुसलमानांना भारतावर सत्ता स्थापन करणें फार जड गेलें असतें. इतिहास असें सांगतो, की मुसलमान आक्रमकांना अथपासून इतिपर्यंत भारतांतल्या फितुरांची आणि देशद्रोह्यांची मदत झाली आहे.

अशा प्रकारें सिंधमध्ये मुसलमानांचें आसन स्थिर झाल्यावर त्यांनी तिथून भारताच्या इतर प्रांतांवर स्वाऱ्या करण्यास सुरवात केली. ते पूर्वेस माळवा आणि दक्षिणेस भडोच इथपर्यंत पोंचले. पण पूर्वेस प्रतिहार राजा नागभट्ट आणि दक्षिणेस चालुक्य राजा पुलकेशी या दोघांनी त्यांना खडे चारले. त्यांच्या सौराष्ट्रावरील स्वारीचीहि वाताहतच झाली. थोडक्यांत सांगायचें, तर मुसलमानांची भारतांतील सत्ता कित्येक शतकेंपर्यंत सिंधुपुरतीच मर्यादित राहिली. सिंधमध्येहि कित्येक शतकें मुसलमान सुरक्षित नव्हते. हिंदु लोक त्यांच्यावर वारंवार हल्ले चढवीत आणि त्यांच्या सत्तेला धक्के देत.

सिंधबाहेरच्या हिंदूंना सिंधविषयीं इतकी आस्था बाळगण्याचें एक महत्त्वाचें कारण, म्हणजे मुलतानमधलें सूर्यमंदिर हें होय. त्या काळांत सौराष्ट्र व राजस्थान या भागांत सूर्योपासक लोक बरेच होते. मुसलमानांनी हिंदूंचें हें वर्म बरोबर ओळखलें होतें. त्यांनी तें सूर्यमंदिर जणू ओलीस ठेवून घेतलें होतें. जेव्हा जेव्हा हिंदूंकडून सिंधवर स्वारी होण्याचा धोका निर्माण होई, तेव्हा तेव्हा मुसलमान लोक मुलतानचें तें सूर्यमंदिर उद्ध्वस्त करण्याची त्यांना धमकी देत. ही केवळ दंतकथा नव्हे. दहाव्या शतकांतला अरब इतिहासकार मसऊदी याने ही गोष्ट आपल्या ग्रंथांत नमूद करून ठेवली आहे. इब्न-हाऊकल या दुसऱ्या एका अरब इतिहासकाराने देखील ही गोष्ट मान्य केली आहे. तो म्हणतो, की मुलतानमध्यें सूर्यमंदिर नसतें व त्याच्या नाशाची भीति हिंदूंना वाटली नसती, तर हिंदूंनी मुलतानमधली मुसलमानांची सत्ता केव्हाच उखडून टाकली असती.

जगांतील इतर देशांत मुसलमानी सत्तेचा प्रसार झपाट्याने आणि पुष्कळ अंशी बिनविरोध झाला, असें इतिहास सांगतो. पण भारत त्यांना तशा प्रकारें पादाक्रांत करतां आला नाही. त्यांना ठायीं ठायीं प्रतिकार झाला. काश्मीरचे राजे, कनोजचे प्रतिहार आणि दक्षिणेचे राष्ट्रकूट, यांनी मुसलमानांचें आक्रमण अनेकवार थोपवून धरलें. पण दुर्दैवाची गोष्ट ही, की वरील राजमंडळ मुसलमानी सत्तेचा पुरता बंदोबस्त मात्र करूं शकलें नाही. त्यांनी जर संघटितपणे प्रतिकार केला असता तर त्यांच्या संयुक्त सामर्थ्यापुढे मुसलमानी सत्तेला निश्चितपणे हार खावी लागली असती. पण तसे घडलें नाही.

भारतावरील मुसलमानी आक्रमणाची दुसरी अवस्था गझनीच्या महंमुदाच्या स्वाऱ्यांपासून सुरू होते. या आक्रमणांचा चंदेल राजे जयपाल, आनंदपाल व त्रिलोचनपाल यांनी प्राणपणाने प्रतिकार केला. सुलतान महंमुद हा एका मोठ्या राज्याचा राजा होता व कुशल सेनापतिहि होता. तो एवढा पराक्रमी होता, की मध्य आशियांतल्या त्याच्या कडव्या शत्रूंना देखील त्याचें नांव ऐकतांच धडकी भरत असे. पण अशा एका प्रबल पराक्रमी सुलतानाशी झुंज घ्यायलाहि तत्कालीन हिंदु राजे पुढे आले, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कित्येकदा ते अगदी विजयाच्या जवळ जाऊन पोचत; पण कांही तरी आकस्मिक कारण उद्भवून विजयश्री त्यांच्यापासून दूर जाई. हिंदूंच्या दुफळीमुळे मुसलमानांचें फावलें व त्यांना भारत पादाक्रांत करतां आला, हें जरी खरें असलें तरी हिंदूंनी एक दोन वेळा मुसलमानांना संघटितपणे सामना दिला होता, ही गोष्टहि विसरतां कामा नये. हिंदूंचें हें ऐक्य वर उल्लेखिलेल्या जयपाल व आनंदपाल या दोन चंदेल

राजांच्या आमदानींत दिसून आलें. त्यांतल्या त्यांत जयपाल राजाने तर मुसलमानी सत्तेवर मूलाघात करायचें ठरवून आपलें सारें बळ एकत्रित केलें आणि खुद्द गझनीवरच स्वारी केली; पण तिथेहि त्याच्या मार्गांत दुर्दैव आडवें पडलें. त्या मोहिमेंत एकाएकीं प्रचंड हिमवृष्टि झाली आणि त्यामुळे त्याची स्वारी फसली. त्याने दुसऱ्यांदा तसाच प्रयत्न केला, तोहि अपेशी ठरला. पण असें असलें तरी जयपाल हा एक मोठ्या योग्यतेचा आणि दूरदृष्टीचा देशभक्त म्हणून भारताच्या इतिहासांत सदैव अजरामर राहील, हें निस्संशय !

आनंदपाल हा जयपालाचा मुलगा. तो हिंदूंच्या ऐक्याचा दुसरा प्रणेता होय. त्याने इस्लामी आक्रमणाबाबत भारताला खडबडून जागें केलें व त्याच्या ऐक्यासाठी शिकस्त केली. त्याच्याविषयी एक मुसलमान बखरकार म्हणतो, की हिंदु स्त्रियांनी आपले दागिने विकून तो पैसा आनंदपालाच्या मोहिमेसाठी दूरवरच्या प्रदेशांत पाठवून दिला होता. पण त्यालाहि अपेशाचेंच धनी व्हावें लागलें. त्याचा जेव्हा पराभव झाला, तेव्हा मुसलमानांनी हिंदूंवर भयंकर सूड उगवला. कत्तल, जाळपोळ, लुटालूट, स्त्रियांवर अत्त्याचार, इ. गोष्टींशिवाय गझनीच्या त्या मुसलमानांनी कांही काळ दुसरें कांहीच केलें नाही. त्यानंतर १०२४ साली सौराष्ट्रांतल्या सोमनाथाचें मंदिर फोडून, तोडून महंमुद तिथली प्रचंड धनसंपदा लुटून घेऊन गझनीला निघून गेला.

महंमद घोरीच्या स्वारीने भारतावरील मुसलमानी आक्रमणाची तिसरी अवस्था सुरू होते. याने प्रथम मुलतान व उच्छ जिंकलें. पेशावरवर स्वारी करून तें शहरहि आपल्या ताब्यांत आणलें. इ. स. ११८५ पर्यंत लाहोर पर्यंतचा मुलूख काबीज करून त्याने आपली सत्ता स्थिर केली. इ. स. ११९२ मध्ये पृथ्वीराजाचें आणि त्याचें युद्ध झालें, आणि त्यांत पृथ्वीराजाचा पूर्ण पराभव झाला. पृथ्वीराजाच्या मृत्यूने दिल्लीचें हिंदुराज्य नष्ट झालें व भारतांत मुसलमानी सत्तेचा पाया दृढ झाला.

भारतांत मोगल राजवंशाची प्रतिष्ठा करणारा पुरुष म्हणजे बाबर हा होय. मंगोल वंशाशी त्याचा संबंध आहे. मंगोल हे जितके पराक्रमी तितकेच क्रूरहि होते. चंगीजखान (१३ वें शतक) हा त्यांचा पुढारी होता. हा धर्माने बौद्ध होता; पण या बौद्धाने जी निर्दय आणि सामूहिक हिंसा केली, ती माणुसकीला काळें फासणारी होती, असेंच म्हटलें पाहिजे. विश्वविजयाच्या उद्देशाने तो युद्धयात्रेला निघाला आणि त्याने बुखारा, समरकंद, हिरात आणि बल्ख हीं शहरें जाळून भस्मसात केलीं. भारतावरहि त्याची संक्रांत वळण्याच्या बेतांत होती; पण थोडक्यांत निभावलें.

मानव जातीचा शत्रु म्हणून इतिहासांत ज्याचा उल्लेख केला जातो, तो तैमूरलंग हा मातेकडून याच चंगीजखानाचा वंशज होता. इ. स. १३९८ मध्ये त्याने दिल्लीवर स्वारी केली. थोडाच काळ तो भारतांत होता; पण तेवढ्या अवधीत त्याने जे रक्ताचे पाट वाहविले आणि जी अगणित द्रव्यसंपदा लुटून नेली, त्याला तोड नाही. त्यानंतर इ. स. १५०० सालीं बाबराने भारतावर पहिली स्वारी केली. बाबर हा आईकडून चंगीजखानाचा व बापाकडून तैमूरलंगाचा वंशज होता. इतिहासांतल्या या साऱ्या घटनांचे विश्लेषण करून श्री. रामधारीसिंह दिनकर व श्री. एम्. एन्. रॉय यानी भारतांतील मुसलमानी अत्याचारांचें एक निराळें स्पष्टीकरण दिलें आहे तें असें –

इस्लाम हा आपल्या प्रगतिशील कालखंडांत भारतांत आला नाही. आला असला तरी सिंध आणि त्याच्या आसपासचा भाग एवढ्यापुरताच तो मर्यादित राहिला. गझनीच्या महंमुदापासून इस्लामचीं भारतावरील आक्रमणें सुरू होतात. पण महंमुद काय, घोरी काय आणि बाबर काय, हे इस्लामचे खरे प्रतिनिधि नव्हतेच. भारतांत आलेला इस्लाम हा तुर्क आणि तातार यांच्या हातांनी दूषित झालेला होता. इस्लामचे हे नवे अनुयायी अर्धसभ्य आणि क्रूर होते. लूटमार आणि पाशवी अत्त्याचार हाच त्यांचा धर्म होता. इस्लामच्या विशुद्ध तत्त्वांची आणि अबूबक्र, उमर, इ. खलीफांच्या धार्मिक चारित्र्याची त्यांना लवमात्र जाणीव नव्हती. असले हे लुटारू लोक इस्लामचा झेंडा घेऊन भारतांत आले. या देशांत त्यांनी केलेले अत्त्याचार इतके भयानक आहेत, की जगाच्या इतिहासांत त्यांना तोड नाही. या अत्याचारांनी हिंदूंच्या हृदयावर दुस्सह आघात झाला आणि त्यांच्या मनांत मुसलमानांविषयीं तिरस्काराची भावना खोलवर रुजून राहिली. मोडलेलीं देवळें, भंगलेल्या मूर्ती आणि बाटविलेलीं तीर्थक्षेत्रें, यांच्या रूपांनी मुस्लीम अत्याचाराच्या निशाण्या आजहि भारतभर सर्वत्र दृष्टीस पडतात. हिंदूंच्या अंत:करणांतलें हें शल्य भारतांतल्या धार्मिक आणि सुसंस्कृत मुसलमानांनाहि जाणवल्यावांचून राहत नाही. आधुनिक मुसलमान इतिहासकार डॉ. हबीब यांनी गझनीच्या महंमुदाच्या संबंधांत लिहिलें आहे, की 'गझनीच्या सैन्याने भारतीय मंदिरांचा जो घोर विध्वंस केला, तो कोणत्याहि इमानदार इतिहासकाराने लपवितां कामा नये. इस्लाम धर्माचा अभ्यास केलेला कोणीहि मुसलमान महंमुद गझनीच्या या अत्याचारांचें समर्थन करणार नाही.'

मध्ययुगीन मुसलमानी आक्रमणाविषयीं आतापर्यंत सांगितलें. आता या परकी व परधर्मी आक्रमणांच्या काळांत हिंदु

राजे व हिंदु लोक यांची एकंदर परिस्थिति काय होती, त्याचाहि विचार करायला हवा. मध्ययुगांतले हिंदु राजे अगदीं संकुचित व अल्पसंतुष्ट दिसतात. त्यांची मौर्यकालीन क्षात्रवृति व गुप्तकालीन बौद्धिक जागरूकता नष्ट झाली होती. भाऊबंदकी व आंतरराष्ट्रीय राजकारणाचें अज्ञान, हे त्यांच्या राष्ट्रीय जीवनांतले मुख्य दोष होते. ते आपल्या बापजाद्यांच्या पराक्रमी वारश्यावर जगत होते. मोठेपणाच्या खोटचा कल्पना, आपल्या संस्कृतीविषयीं आत्मसंतुष्टपणा व भारताबाहेरील लोकांविषयीं आणि त्यांच्या संस्कृतीविषयीं तिरस्कार हे दुर्गुण त्यांच्यामध्ये शिरले होते. अल्बिरूनीने तत्कालीन हिंदूंचें जें वर्णन केलें आहे, त्यावरूनहि हीच गोष्ट कळून येते—

हिंदूंची अशी समजूत आहे, की त्यांच्या देशासारखा देश, त्यांच्या धर्मासारखा धर्म आणि त्यांच्या विज्ञानासारखें विज्ञान भूतलावर कुठेच नाही. ते गर्विष्ठ व मतिमंद आहेत. त्यांनी जर परदेशपर्यटण केलें असतें आणि ते इतर लोकांत मिसळले असते, तर त्यांची ही कूपमंडूकवृत्ति बदलली असती. त्यांचे पूर्वज इतके संकुचित मनोवृत्तीचे नव्हते. विज्ञानांत ते ग्रीकांना आपणांहून पुढारलेले मानीत होते. जेव्हा मनाचीं कवाडें बंद होतात तेव्हा बौद्धिक हवेचे नवनवे प्रवाह आंत येण्याचेंहि बंद होतें. आणि तेव्हाच अध:पतनालाहि प्रारंभ होतो. त्या काळच्या हिंदु राजांत व लोकांत दूरदृष्टि अगदीच कमी होती, असें म्हणावें लागतें.

मुसलमानांच्या भारतावर स्वाऱ्या झाल्या, त्यांत कालाचें अंतर बरेंच होतें. त्या स्वाऱ्यांच्या मधल्या काळांत हिंदूंना आपल्या राष्ट्राच्या सुरक्षिततेविषयीं, तसेंच नवीन स्वाऱ्यांना रोखून धरण्याविषयीं कांहीतरी प्रभावी उपाययोजना करण्यास भरपूर अवसर होता. गझनीच्या महंमुदाची स्वारी कासीमने सिंध पादाक्रांत केल्यानंतर ३०० वर्षांनी झाली. महंमुदानंतर घोरी २०० वर्षांनी आला. पण या यशस्वी आक्रमणांना तोंड देण्यासाठी हिंदु राजांनी संघटित अशी उपाययोजना केली नाही. त्यांचे धैर्य, पराक्रम व अभिमान हे गुण वाखाणण्याजोगे होते, यांत शंका नाही; पण त्यांचें आंतरराष्ट्रीय राजकारणाचें ज्ञान अगदीच तुटपुंजें होतें. अंतर्गत हेव्यादाव्यांनी त्यांची शक्ति क्षीण झाली होती. राजपूत हे कांही शौर्यांत, धर्माभिमानांत व आत्मसमर्पणांत कमी नव्हते; पण मुसलमानांचा सुसंघटितपणा व त्यांचें उत्कृष्ट राजकीय ज्ञान, यामुळे शेवटीं त्यांचाहि पाडाव झाला.

गेलीं कित्येक शतकें भारतांत हिंदु व मुसलमान हे एकत्र राहतात; पण तरीहि त्यांचा परस्परांवर पूर्ण विश्वास आढळत नाही. दोन्ही समाजांत भावनात्मक ऐक्यापेक्षां दुराव्याचीं लक्षणेंच अधिक दिसतात. याची कारणमीमांसा करतांना श्री. हुमायूँ कबीर यांनी पुढील विचार मांडले आहेत—

हिंदु विचारधारा व इस्लाम या दोहोंत बौद्धिक समन्वय न झाल्याकारणाने भारतीय मुसलमानांची बरीच हानि झाली आहे. भारतीय मुसलमान आपल्या इतिहासांतल्या निष्कर्षांना आपल्या बौद्धिक जगांत स्थान देऊं शकले नाहीत. सिकंदर हा मूर्तिपूजक होता; पण तरीहि संपूर्ण पश्चिम आशियांतल्या मुसलमानांनी त्याला आपला राष्ट्रीय महापुरुष मानलें. सोहराब, रुस्तुम व नौशेरवाँ हे पुरुष मुहंमदाच्या जन्मापूर्वी कित्येक वर्षें होऊन गेले. त्यांच्या अनेक साहसपूर्ण कार्यांचा, तसें पाहिलें तर, इस्लामच्या उपदेशांशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध नाही; पण त्यांनाहि आपल्या सांस्कृतिक परंपरेंत स्थान देणाऱ्या भारतीय मुसलमानांनी भारताच्या प्राचीन महापुरुषांना मात्र आपल्या सांस्कृतिक वारशांत सामील करून घेतलें नाही. त्याचा परिणाम असा झाला, की भारताचा प्राचीन इतिहास व भारतीय परंपरा यांच्यांत बद्धमूल झाल्याने जी शक्ति आणि सुदृढता भारतीय मुसलमानांना मिळूं शकली असती, ती वरील गोष्टींच्या अभावीं त्यांना मिळूं शकली नाही. भारताच्या प्राचीन इतिहासाचा स्वीकार न केल्यामुळे भारतीय मुसलमानांचा सांस्कृतिक वारसा कमकुवत झाला. भारतांत प्राचीन कालापासून भिन्न-भिन्न जाती-जमातींचें संमिश्रण होत आलें आहे. मुसलमानांच्या बाबतींतहि तसें व्हायला हरकत नव्हती. कारण इस्लाम हा मनुष्यमात्राच्या समानतेचा समर्थक आहे. त्याच्या ठिकाणी रंग किंवा जाती यांच्यावर आधारित अशा कोणत्याहि भेदभावाला जागा नाहीं. भारतांतल्या प्रत्येक मुसलमानाच्या धमन्यांत ज्या पूर्वजांचें रक्त आहे, ते मुसलमान नव्हते, हें त्यांनी ओळखायला हवें होतें. भारतीय मुसलमान दुसऱ्या देशांतल्या दुसऱ्या धर्माच्या अनुयायांशीं ज्या मैत्रीने वागतात, तीच त्यांची मैत्री भारतीय देशबांधवांशींहि असणें आवश्यक होतें. अन्य देशांतून आलेले इस्लामी मतप्रवाह भारतीय मुसलमानांनी जसे स्वीकारले, त्याचप्रमाणे त्यांनी भारतीय तत्त्वांचाहि स्वीकार करायला हवा होता. या देशांत समन्वय आणि ऐक्य यांना पूर्वीपासून वातावरण अनुकूल होतें; पण भारतीय मुसलमानांनी त्याचा उपयोग करून घेतला नाही. त्यांनी मुख्यत्वें अन्यदेशीय इस्लामी परंपरा व धर्मकथा यांतूनच प्रेरणा घेतली. भारतांत राहायचें पण प्रेरणा मात्र अभारतीय स्वीकारायच्या, या दुरंगीपणामुळे भारतीय मुसलमानांची सदैव ओढाताण झालेली आहे. भारतावर मुसलमानांची सत्ता होती त्या कालांत ही गोष्ट धकून गेली. त्या वेळीं कांही समस्या निर्माण झाल्या नाहीत.

दंडक या नांवाचा एक पुत्र होता. याच्याच नांवावरून एका अरण्याला दंडकारण्य हें नांव पडलें (भाग. पु. ९. ६; विष्णु पु. ४. २). याच्या दहाव्या मुलाचें नांव दशाश्व असून तो माहिष्मतीचा राजा होता (म. भा. अनु. २. ६). इक्ष्वाकूने शंभरहि पुत्रांना आपलें राज्य वांटून दिलें. शकुनिप्रभृति पन्नास पुत्रांना उ. भारताचें व शांतिप्रभृति पुत्रांना द. भारताचें राज्य मिळालें. अयोध्येला इक्ष्वाकूचें राज्य ब:ाच काळपर्यंत नांदलें. या वंशांत अनेक थोर पुरुष होऊन गेले. त्यामुळे बहुतेक पुराणांत याची वंशावळ सांपडते. सर्व पुराणांतील वंशावळीचा सूक्ष्म अभ्यास केल्याअंतीं पुढील नामावली निश्चित होते––

मनु वैवस्वत

१ इक्ष्वाकु, २ विकुक्षि (=देवराट्, शशाद), ३ पुरंजय (= ककुत्स्थ, इन्द्रवाह), ४ अनेता (= सुयोधन, अयोधन), ५ पृथु, ६ दृषदश्व (= विश्वगश्व, विष्टराश्व), ७ आर्द्र (= आद्र, आन्ध्र, चान्द्र), ८ युवनाध (१), ९ श्रावस्त, १० वत्सक (= वंशक, वत्सुक), ११ बृहदश्व, १२ कुवलाश्व (= धुन्धुमार), १३ दृढाश्व, १४ प्रमोद व १५ हर्यश्व (हे दोघे दृढाश्वाचे भाऊ होते, १६ निकुम्भ, १७ संहताश्व, १८ कृशाश्व, १९ प्रसेनजित्, २० युवनाश्व (२),

२१ मांधाता

२२ अंबरीष — २४ पुरुकुत्स

२३ युवनाश्व (३), २५ त्रसुदस्यु, २६ सम्भूत, २७ अनरण्य, २८ त्रसदश्व, २९ हर्यश्व, ३० वसुमना (= वसुमान्, सुमन, सुमति, सुधन्वा), ३१ त्रिधन्वा, ३२ त्रय्यारुण, ३३ सत्यव्रत (= त्रिशंकु), ३४ हरिश्चंद्र, ३५ रोहित (= रोहिताश्व), ३६ हरित, ३७ चंचु (= चंप, धुन्धु), ३८ विजय, ३९ रुरुक (= भीरुक, कारुक, अलर्क), ४० वृक, ४१ बाहु (= असित), ४२ सगर, ४३ असमंजस (= पंचजन), ४४ अंशुमान्, ४५ दिलीप (१), ४६ भगीरथ, ४७ श्रुत (= विश्रुत, श्रुतवान्), ४८ नाभाग, ४९ अम्बरीष (२), ५० सिन्धुद्वीप, ५१ अयुतायु (= अयुताजित), ५२ ऋतुपर्व, ५३ सर्वकाम, ५४ सुदास (= इन्द्रसाख, हंसमुख), ५५ मित्रसह (= कल्माषपाद), ५६ सर्वकर्मा, ५७ अवरण्य, ५८ निघ्न, ५९ अनमित्र, ६० रघु (१), ६१ दुलिदुह, ६२ दिलीप (= खट्वाङ्ग) [दुसरी शाखा- कल्माषपाद – अश्मक – उरकाम – मूलक– शतरथ–इडविड– वृद्धशर्मा–विश्वसह– दिलीप (खट्वाङ्ग)] ६३ रघु (= दीर्घबाहु), ६४ अज, ६५ दशरथ, ६६ राम, ६७ कुश, ६८ अतिथि, ६९ निषध, ७० नल, ७१ नभ, ७२ पुण्डरीकाक्ष, ७३ क्षेमधन्वा, ७४ देवानीक, ७५ अहीनगु, ७६ सुधन्वा (= रुरु), ७७ पारिपात्र, ७८ शिल (= शल, दल, देवल), ७९ दल (= बल, वच्चल, अनल), ८० उन्नाभ (= औंक, उलूक, उत्क, उक्थ), ८१ वज्रनाभ, ८२ शंखन, ८३ व्युशिताश्व (= युषिताश्व), ८४ विश्वसह, ८५ हिरण्यनाभ, ८६ पर कौसल्य (= हैरण्यनाभ), ८७ ब्रह्मनिष्ठ (= वसिष्ठ, वरिष्ठ), ८८ पुष्य (= पुष्प), ८९ ध्रुवसंधि (= अर्थसिद्धि), ९० सुदर्शन, ९१ अग्निवर्ण, ९२ शीघ्र (= शीघ्रग), ९३ मरु (= मनु), ९४ प्रसुश्रुत, ९५ सुसंधि, ९६ अमर्षण (= अमर्ष), ९७ सहस्वान् (= महस्वान्), ९८ विश्रुतवान् (= विश्वभव), ९९ बृहद्बल.

या इक्ष्वाकु कुलाविषयीं डॉ. केतकर पुढीलप्रमाणे माहिती देतात––

इक्ष्वाकुकुल सूतसंस्कृतींतील प्रसिद्ध कुलांपैकी एक होतें. पण मांत्र संस्कृतीच्या लोकांत अध्वर्युप्रधान यज्ञसंस्थेच्या कालाचा उदय होईपर्यंत या कुलाचा फारसा परिचय नव्हता. अथर्ववेदांत इक्ष्वाकु हा कुष्टरोगावरची ओषधी जाणणारा, म्हणून उल्लेखिला जातो. यावरून मांत्र लोक पूर्वेकडे गेले, तेव्हा त्यांना इक्ष्वाकु नामक एक प्राचीन पुरुष होऊन गेला, एवढेंच त्याच्याबद्दल ठाऊक होतें. ऋग्वेदांतल्या एका सूक्तांत असमाति नामक राजाचा आज्ञाधारक वीर या स्वरूपांत इक्ष्वाकूचें दर्शन होतें (१०.६०). ब्राह्मणकालांत मात्र इक्ष्वाकूला बरेंच प्राधान्य मिळालें. या कालांत मंत्रोक्त राजांचा संबंध इक्ष्वाकूशीं जोडण्यांत आला व इक्ष्वाकु कुलांतील राजांचा संबंध श्रौतविधीशीं जोडण्यांत आला. बृहद्देवतेंत त्र्यरुण राजाला व शतपथ ब्राह्मणांत पुरुकुत्साला इक्ष्वाकुकुलोत्पन्न बनविलें आहे. महाभारत, रामायण आणि भागवत इ. अनेक पुराणें हीं इक्ष्वाकुवंशाच्या इतिहासाचीं साधनें होत. काल्पनिक परंपरा खरी मानून अर्वाचीन कालापर्यंत यायचें असेल, तर सांप्रतच्या उदेपूरच्या राण्यांची वंशावळ पाहावी. ते थेट इक्ष्वाकूपासून आपली वंशपरंपरा सांगतात. [इ. जि. पु.; पुराणम् व्हॉ. २; म. ज्ञा. को.]

ई चतुर्दशमुखी विधात्याच्या चौथ्या मुखापासून निर्माण झालेला चौथा स्वरवर्ण. याचें उच्चारणस्थान तालु हें आहे. हा द्विमात्रक आहे. याचें वर्णन कामधेनुतंत्रांत पुढीलप्रमाणे दिलें आहे–

ईकारं परमेशानि स्वयं परमकुण्डली ।
ब्रह्मविष्णुमयं वर्णं तथा रुद्रमयं सदा ।।

अर्थ – हे देवि, ईंकार हा परम कुंडली असून ब्रह्म-विष्णु-रुद्रात्मक आहे.

हा स्त्रीमूर्ति असून याला महामाया, लोलाक्षी इ. नांवें आहेत. मातृकान्यासांत डावा डोळा हें याचें स्थान आहे. [श. क.]

ईद् या शब्दाचा अर्थ मेजवानीचा दिवस असा आहे. ईद-उल्-फित्र व ईद-उल-अझहा हे दोन मोठे मुसलमानी सण आहेत. **पाहा**– बकरी ईद, रमज़ान ईद. [डि. इ.]

ईद्गाह मुसलमान लोकांची प्रार्थनेची जागा. ही जागा बहुधा गांवाबाहेर असते. याच ठिकाणीं ते रमजान ईद व बकरी ईदच्या दिवशीं वाएज (उपदेश) ऐकतात. [वि. मुं. रा. प.]

ईदिग तेलुगु ताडीकलालांची एक जात. उत्तर अर्काट, नेलोर, कडाप्पा जिल्हा, चिंगलपेट, सालेम इ. भागांत यांची वस्ती आहे. हे लोक बलिज वंशांतील असून धंद्यामुळे या भागांत आले, असें कांही लोकांचें म्हणणें आहे. ईदिगांचे दंडु ईदिग व बलिज ईदिग असे दोन वर्ग आहेत. तमिळ मधले शानान व ईदिग यांच्यांत ताडी काढण्याच्या बाबतींत भेद आहे. तमिळ ताडीकलाल माडापासून ताडी काढतात, तर तेलुगु ताडीकलाल खजुरापासून ती काढतात. ईदिगांचा पिढीजात धंदा ताडी काढण्याचा असला, तरी हल्ली फारच थोडे लोक हा धंदा करतात. पुष्कळशा लोकांनी अलिकडे मोलमजुरी, शेती व इतर धंदे पत्करले आहेत. हे मद्यदेवता एल्लम्म हिला भजतात. हे दारू पीत नाहीत. यांची मूळ भाषा तेलुगु आहे.

विवाहप्रथा– या लोकांत बहुपत्नीकत्व रूढ आहे. विवाह प्रौढपणींच करावा, असा निर्बंध आहे. जातिभ्रष्टता व व्यभिचार या गुन्ह्यांखेरीज पुरुषाला स्त्रीचा त्याग करता येत नाही. नवरा जातिभ्रष्ट झाला, तरच स्त्रीला घटस्फोट घेतां येतो.

मर्तिकप्रथा– हे मृतांना पुरतात व बारा दिवस सुतक पाळतात. यांच्यांत श्राद्ध करण्याची पद्धत नाही. परंतु सर्वपित्री अमावास्या व वर्षप्रतिपदा या दिवशीं ते पितरांच्या नांवाने दानधर्म करतात. यांचे उपाध्ये ब्राह्मण असतात.

ताताचार्य नामक एक वैष्णव ब्राह्मण यांचा गुरु असतो. कित्येकांचा गुरु ' सनातनी ' असतो. उच्च जातीच्या लोकांना हे आपल्या जातींत घेऊं शकतात. यांच्यांत एक भिक्षुकांचा वर्ग असून त्यांना हे ठराविक वेळीं देणग्या देतात. हे व्यासापासून आपली उत्पत्ति मानतात. [म. ज्ञा. को.]

ईरनागरमारी द. भारतांतील सात मारी देवतांपैकी एक.

ईर्या जैन दर्शनांत सांगितलेली एक गति. तिचें लक्षण पुढीलप्रमाणे आहे–

लोकातिवाहिते मार्गे चुम्बिते भास्वदंशुभिः ।
जन्तुरक्षार्थमालोक्य गतिरीर्या मता सताम् ।।
(स. द. सं. आर्हत)

अर्थ– ज्यावर सूर्यप्रकाश पडलेला आहे, अशा रहदारीच्या मार्गावर जंतूंचें रक्षण व्हावें (त्यांना इजा पोचूं नये) म्हणून ज्या प्रकारची गति (ठेवतात), तिला सज्जनांनी ईर्या असें मानलें आहे.

ईश शिवाचें एक नांव. ईशाची मूर्ति आदित्याचें रक्षण करते (मत्स्य पु. २६१.२३). [पु. इं.]

ईशान (१) ईशान्य दिशेचा अधिपति. शिवाचें एक नांव. ' ईश्वरः शर्व ईशानः ' (अमर). याची मूर्ति चतुर्भुज असते. याचा एक हात रिकामा असून बाकीच्या तीन हातांत डमरु, तलवार व खंजीर अशीं आयुधें असतात. त्याच्या शेजारीं वृषभाची प्रतिमा असते. कारण वृषभ हें त्याचें वाहन आहे. अष्ट दिक्पालांत याला प्रमुख मानतात. याच्या पत्नीचें नांव शिवा असून दोघां पुत्रांचीं नांवें मनोजव व अविज्ञानगति अशीं आहेत (वायु पु. २७.१२.३२–५२).

(२) शाकद्वीपाच्या हद्दीवरील एका टेकडीचें नांव.

(३) दहाव्या कल्पाला ईशान असें नांव आहे. [पु. इं.]

ईशानबलि शूलगव पाहा.

ईशानव्रत काम्यव्रत. याचा विधि असा– पौषांतील पुष्य नक्षत्रयुक्त पौर्णिमेला शुभ्र वस्त्र आंथरलेल्या वेदीवर चार दिशांना चार व मध्ये एक अशा अक्षतांच्या राशी करतात. त्यांवर पूर्वेला विष्णु, दक्षिणेला सूर्य, पश्चिमेला ब्रह्मा, उत्तरेला रुद्र व मध्ये ईशान यांच्या प्रतिमा स्थापून त्यांची पूजा करतात. व्रतकर्त्याने गोमूत्र प्राशन करून उपवास करायचा असतो व ब्राह्मणभोजन घालून एक गाय व एक बैल

यांचें दान करायचें असतें. व्रताचा अवधि पांच वर्षांचा आहे गोप्रदान देतांना प्रत्येक वर्षी एकेक गाय वाढवीत जातात. बैल मात्र प्रत्येक वर्षी एकेकच असतो. व्रताचें फल– सुख व ऐश्वर्य यांची प्राप्ति. [व्र. प.]

ईशान शिखर केदारतीर्थाचें दुसरें नांव. या शिखरावर ईशान हा साक्षात् वास्तव्य करतो, असें देवीपुराणांत सांगितलें आहे.

ईशावास्योपनिषद् शुक्ल यजुर्वेदाच्या वाजसनेयी संहितेच्या चाळीसाव्या अध्यायाला ईशावास्योपनिषद् असें नांव आहे. याच्या आरंभीं 'ईशावास्यम्' असा शब्द आलेला असल्यामुळे याला हें नांव मिळालें आहे. याशिवाय याला ईशोपनिषद्, वाजसनेयी उपनिषद्, संहितोपनिषद्, मंत्रोपनिषद्, अशींहि अन्य नांवें आहेत. इतर सर्व उपनिषदें ब्राह्मण ग्रंथांत किंवा आरण्यकांत अंतर्भूत आहेत. परंतु हें उपनिषद् मात्र वाजसनेयी संहितेंत अंतर्भूत आहे.

हें उपनिषद् अवघें अठरा मंत्रांचें असलें, तरी त्यांतील विचारांवरून त्याच्या कर्त्याची सूक्ष्म दृष्टि व अगाध ज्ञान दिसून येतें. कर्म व ज्ञान या विरोधी द्वंद्वाचा तर्कशास्त्रदृष्टया समन्वय हा या उपनिषदाचा मुख्य विषय आहे.

यांतील पहिलाच मंत्र असा–

ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्यस्विद्धनम् ।।

अर्थ––या पृथ्वीवरचें सर्व जीवन परमात्म्याने अधिष्ठित आहे, अशी भावना करावी. त्यागबुद्धीने या सर्वांचा उपभोग घ्यावा. कोणाच्याहि धनाची हांव धरूं नये.

हाच विचार विशेष स्पष्टीकरणाने पुढे सांगितला आहे, तो असा––

या लोकांत ईश्वरार्पण बुद्धीने कर्में करावीं. तसें केल्यानें कर्मांचा बंध लागत नाही. कर्मबंधन टाळण्यासाठी याशिवाय अन्य मार्ग नाही. वीतराग स्थितप्रज्ञाचें पुढील मंत्रांनी वर्णन केलें आहे–

यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ।
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ।।
यस्मिन् सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः ।
तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ।।

अर्थ––जो मनुष्य सर्व प्राणिमात्राला परमात्म्याच्या ठिकाणीं व परमात्म्याला सर्व प्राण्यांच्या ठिकाणीं पाहतो, तो कोणाचीहि घृणा करीत नाही. ज्या स्थितींत ज्ञानी पुरुषाला सर्व प्राणीमात्र परमात्मरूपानेच प्रतीत होतात आणि प्राणी व परमात्मा यांच्या एकत्वाचा साक्षात्कार घडतो, त्या वेळी व त्या अवस्थेंत त्याचे शोक आणि मोह शिल्लक उरत नाहीत.

अनुभूति ही कर्म व ज्ञान यांच्या पुढची पायरी असून तिच्यांत कर्म व ज्ञान हीं दोन्ही सामावतात, अशी समन्वयाची उपपत्ति या उपनिषदांत लावली असून ती नवी व महत्त्वाची आहे. या शिवाय विशेष लक्षांत येण्याजोगी गोष्ट म्हणजे या उपनिषदांत 'ब्रह्म' या शब्दाऐवजी 'ईश' हा शब्द वापरलेला असून संभूति, असंभूति, मातरिश्वा इ. कांही शब्द अर्थाच्या दृष्टीने विवाद उत्पन्न करणारेहि आले आहेत.

या उपनिषदांवर शंकराचार्य, आनंदतीर्थ इ. अनेक विद्वानांनी टीका लिहिल्या आहेत. [उ. र.; सु. वि. को.]

ईशित्वम् योगांतील अष्ट सिद्धींपैकी एक. या सिद्धीच्या योगाने मनुष्य ईश किंवा सर्वव्यापी होतो. **पाहा–** अष्ट महासिद्धि [पु. इं.]

ईश्वर ईश् = स्वामित्व करणें, ताब्यांत ठेवणें, सत्ता चालविणें, नियमन करणें, किंवा अश् = व्यापून राहणें या धातूपासून ईश्वर शब्द बनला आहे.

भारताच्या सांस्कृतिक इतिहासांत वेद, यज्ञ, तप, स्वर्ग, मोक्ष, ईश्वर इ. शब्दांना फार महत्त्व आहे. पण या शब्दांबद्दल विद्वानांत मतभेदहि तितकेच तीव्र आहेत. ईश्वर हा शब्द सामान्यपणे जगन्नियंता, सृष्टि–स्थिति–प्रलयाचा कर्ता, सर्वव्यापक, सर्वांतर्यामी आणि देवाधिदेव अशा अर्थांनी घेतला जातो. शिव, विष्णु, राम, कृष्ण, हे शब्दहि ईश्वरवाचकच मानले जातात. पण ईश्वर या अर्थाबरोबरच ते एक सांप्रदायिक भावहि प्रकट करतात. ईश्वर किंवा परमेश्वर हे शब्द मात्र संप्रदायनिरपेक्ष परम प्रभु हाच केवळ अर्थ सूचित करतात.

ईश्वर शब्दाच्या इतिहासावर दृष्टिक्षेप करतां असें दिसून येतें, की हा शब्द परमेश्वर या अर्थी फार उशीरां प्रचारांत आला आहे. प्रारंभीं त्याचा उपयोग राजा किंवा शास्ता या अर्थानेच होत असे. ऋग्वेदांत ईश्वर शब्द एकदाहि आलेला नाही. पण तो ज्या ईश् धातूपासून निघाला, त्या धातूचा प्रयोग मात्र अनेकवार झालेला आढळतो. उदा०– 'मा नो दुःशंस **ईशत**'(१.२३.९). '**ईशे** ह्यग्निरमृतस्य' (७.४.६). '**ईशे** यो विश्वस्यादेववीतेः, (१०. ६. ३).

ईश्वर शब्दाप्रमाणेच ईश् धातूपासून निघालेला दुसरा शब्द म्हणजे ईशान हा होय. त्याचा अर्थ समर्थ किंवा स्वामी असा

असून तो शब्द इंद्रादि देवतांना उद्देशून योजलेला आहे. उदा०— '**ईशानो** यवया वधम्' (ऋ. १. ५. १०). '**ईशानासो** ये दधते स्वर्णः' (ऋ. ७. ९०. ६).

ईशान शब्द यजुर्वेदांत व अथर्ववेदांत व मुख्यत्वें शिव किंवा रुद्र यांचें विशेषण म्हणून प्रयुक्त आहे. पुढें हें विशेषण, विशेषण म्हणून न राहतां तें शिवाचें नामच बनलें. 'ईश्वरः शर्व ईशानः' या श्लोकांतल्या शिवाच्या नामावळींत तें स्वतंत्र नाम म्हणूनच दिलें आहे (अमर).

शुक्लयजुर्वेद संहिता व सामवेद संहिता यांतहि ईश्वर शद्बाला स्थान नाही. अथर्ववेद संहितेंत ईश्वर शब्द आढळतो; पण तोहि स्वामी, धनी या अर्थींच.

मनुस्मृति व भगवद्गीता यांमध्ये मात्र परमेश्वर या अर्थी ईश्वर शब्दाचा प्रयोग झालेला आहे. पण पुढच्या काळांत निर्माण झालेलीं शैव पुराणें, कालिदास, बाणभट्ट इ. कवींचीं काव्यें, यांत ईश्वर शब्द महेश्वर या अर्थी केवळ शिवालाच, उद्देशून योजलेला आहे. ईश्वर शब्दाला संप्रदायनिरपेक्ष असा. परमेश्वर हा अर्थ भारतीय दर्शनांत प्राप्त झाला. सांप्रत द भारत वगळल्यास सामान्यपणें ईश्वर शब्दाचा अर्थ सर्वसाक्षी सर्वव्यापक परमेश्वर असाच करतात.

ईश्वरकल्पनेचा विकास कोणत्या प्रकारें झाला, तें पाहणेंहि बोधक ठरेल. ईश्वर हा जगताचा उत्पादक, जगन्नियंता, सर्वांतर्यामी, सृष्टीचा स्वामी, पण सृष्टीहून भिन्न, पूज्य, देवाधिदेव व पुरुष आहे. ईश्वराच्या या व्यापक अर्थावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही, की ब्रह्मा, शिव, विष्णु इ. देव हे ईश्वर नाहीत; कारण सृष्टीच्या घडामोडींत त्यांना आपल्या परिवारांतील अन्य देवतांची गरज भासते. त्याचप्रमाणे ब्रह्म हेंहि ईश्वर नव्हे. कारण तें मननविषय झालें, तरी पूजाविषय होऊं शकत नाही.

जिला ईश्वर किंवा परमेश्वर म्हणतां येईल, अशी एकहि देवता वैदिक दैवतसमूहांत दिसत नाही. वेदांतल्या इंद्र, अग्नि, मित्र, वरुण इ. देवता ईश्वरपदवीला पोंचलेल्या नाहीत. त्यांना 'नियतकर्माणः' म्हणजे नेमून दिलेलें काम करणाऱ्या देवता असें म्हटलें आहे. ऋग्वेदांत पुढीलप्रमाणे एक मंत्र आहे—

एकं सद्विप्रा बहुधा वद-
न्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥
(१. १६४. ४६)

अर्थ —— तो (ईश्वर) वस्तुतः एकच आहे. ज्ञानी जन त्याला पुष्कळ प्रकारचीं नांवें देतात. त्याला अग्नि, यम, मातरिश्वा म्हणतात.

यावरून वरील सर्व देवतांच्या मागे कोणती तरी एक आध्यात्मिक शक्ति किंवा एकता असून तीच सर्व देवतांच्या ठिकाणीं वास्तव्य करते, अशी कल्पना वैदिक द्रष्टयांच्या अंतरांत प्रादुर्भूत झालेली दिसते. या आध्यात्मिक एकतेचाच पुढे वेदान्त्यांच्या ब्रह्मकल्पनेंत विकास झाला.

ब्रह्म शब्द नपुंसकलिंगी असल्यामुळे कर्मकांडांत ब्रह्म हें पूजाविषय होऊं शकत नाही. पुंलिंगी किंवा स्त्रीलिंगी असलेलें दैवतच पूजायोग्य असतें, असा दैवतशास्त्रांतला नियम आहे. त्यामुळे वैदिक कर्मकांडांत ब्रह्माला स्थान न मिळतां तें इंद्र, अग्नि इ. देवतांना मिळालें. पण तत्त्वज्ञानी लोकांची उपासना ही मानसिक असल्यामुळे त्यांना वेदांतल्या नाना देवतांशीं कांही कर्तव्य नव्हतें. ते स्वभावतःच भेदांत अभेद व नानात्वांत एकत्व पाहणारे असल्यामुळे त्यांना ब्रह्मकल्पना स्वीकारायला कोणतीहि अडचण पडली नाही.

सांप्रतचा हिंदुधर्म हा निगमागम धर्मांच्या संमिश्रणांतून व समन्वयांतून बनलेला आहे. निगम म्हणजे वेद व आगम म्हणजे तंत्रविद्या होय. आधुनिक हिंदुधर्मांतील देवता व कर्मकांड हीं वैदिक धर्मापेक्षा कितीतरी भिन्न आहेत. ऐतिहासिक दृष्टीने पाहतां तांत्रिक धर्म हा वैदिक धर्मापेक्षाहि प्राचीन असल्याचें समजतें. आगमधर्मांत शिवाला प्रमुख स्थान आहे. तंत्रांची रचना त्यानेच केली, असें मानतात. वेदकालीन आर्यांनी तांत्रिक धर्माला दूर ठेवण्याचा व त्यापासून अलिप्त राहण्याचा खूप प्रयत्न केला; पण भारतांतील फार मोठ्या वैदिकेतर समाजाचा तो लोकधर्म असल्यामुळे वैदिकांना त्याला दूर ठेवणें शक्य झालें नाही. कालांतराने तांत्रिक धर्मांतील कांही गोष्टींचा वैदिक धर्मांत अंतर्भाव करणें त्यांना भाग पडलें.

अशा या काळांतच वैदिक रुद्र व तांत्रिक शिव यांचें एकीकरण झालें. ऋग्वेदांतील अनेक देवतांना लागणारें ईशान हें विशेषण पुढे एकट्या शिवालाच प्राप्त झालें व ईशान हा शब्द शिव या अर्थी रूढ झाला. श्वेताश्वतरासारख्या प्राचीन उपनिषदांत महेश्वर हा शब्द शिवाचा पर्यायी म्हणूनच योजलेला आहे. शैव साहित्यांत केवळ शिव हाच ईश्वर ठरला आहे.

त्यापुढचा काळ हा दर्शनांचा काळ होय. त्या कालांत ईश्वर हा सांप्रदायिकतेच्या कक्षेंतून बाहेर पडला. तो दार्शनिक विचाराचा विषय बनला, तेव्हा त्याला जगन्नियंता परमेश्वर असें स्वरूप प्राप्त झालें. विविध दर्शनांच्या मूलसूत्रांतून ईश्वर शब्द आढळतो, तो संप्रदायनिरपेक्ष आहे. पुढे पुढे ही ईश्वरविषयक प्रवृत्ति वाढीस लागली आणि दार्शनिक विचारांत ईश्वरसिद्धीला महत्त्व प्राप्त झालें. न्यायकुसुमांजलि व ईश्वरानुमानचिंतामणि हे दोन ग्रंथ केवळ ईश्वरसिद्धीसाठी निर्माण झाले आहेत.

ईश्वरकल्पना मुळांत निर्माणच कां झाली, हा यापुढचा प्रश्न आहे. या कल्पनेच्या उगमाला कारणें संभवतात, तीं अशीं— आपल्या आवतीभोवती पसरलेल्या या अपार सृष्टीचें निरीक्षण केलें असतां सृष्टींतील समस्त व्यापारांमागे कांही योजकता, शिस्तबद्धता आणि सुसूत्रता दिसते. ऋतूंमागून ऋतु त्याच क्रमाने येणें, दिवस-रात्र यांचा पाठशिवणीचा खेळ, वनस्पतींचा नियमबद्ध पत्रपुष्पफलरूप विकास, पशु व मनुष्य यांच्या गर्भधारणेंतला निश्चित कालावधि, या सर्व गोष्टींत कांहीतरी व्यवस्था असल्याचें दिसून येतें. योजकता किंवा व्यवस्था ही आपोआप घडणारी गोष्ट नव्हे. अर्थात् या समस्त विश्वव्यापारांमागे त्यांचा कोणीतरी नियंता असला पाहिजे. आणि हा जो कोणी असेल, तोच ईश्वर होय. तोच या विश्वाचा कर्ता, धर्ता आणि संहर्ता असून चैतन्य किंवा ज्ञान हें त्याचें वैशिष्टय आहे. हिंदुधर्माप्रमाणे अशा ईश्वराचें अस्तित्व व वेदांचें प्रामाण्य मानणाऱ्याला आस्तिक व तें न मानणाऱ्याला नास्तिक अशी संज्ञा आहे. दार्शनिक तत्त्ववेत्त्यांनी ईश्वरसिद्धीकरितां पुढील आठ प्रकारचा युक्तिवाद सांगितला आहे —

(१) विश्वाची रचना व व्यवस्था नियमबद्ध आहे. ही रचना कोण्यातरी अत्यंत कुशाग्र बुद्धीच्या कर्त्याकडून झाली असली पाहिजे. तो बुद्धिमान् कर्ता म्हणजेच ईश्वर होय. आकाशांतील सूर्य, तारका व ग्रह यांच्या गतीचे नियम अत्यंत सूक्ष्म व निरपवाद आहेत. मानवी शरीर हेंहि रचना कौशल्याचें उत्तम उदाहरण आहे. जगांत कुठेहि अव्यवस्था व घोटाळा नाही. म्हणून हें जग अत्यंत विचारपूर्वक कोणीतरी निर्माण केलें असलें पाहिजे.

(२) जगांत सर्वत्र प्रेरणा दिसते. प्रेरणेला प्रेरकाची अपेक्षा असते. जगांतल्या अणुरेणूंत सर्वत्र गति आहे. त्या गतीला प्रथम प्रारंभ ज्याने केला, तोच ईश्वर होय. सारथी ज्याप्रमाणे घोड्यांना हाकतो, त्याप्रमाणे ईश्वर मूलद्रव्यांना चालना देतो.

(३) जगांत सर्वत्र उद्देश, संकल्प किंवा हेतु आढळतो. हा उद्देश ज्याच्या मनांत आहे, तोच ईश्वर होय. पाणी नसलेल्या ठिकाणीं वनस्पति उत्पन्न होत नाहीत. पाणी व प्राणी यांचा संबंध हेतुपूर्वक दिसतो. त्याचप्रमाणे प्राण्यांना अन्नाची गरज असते, म्हणून तें उत्पन्न होतें. तें शोधण्यासाठी प्राण्यांना डोळेहि मिळतात.

(४) जें जें इंद्रियांना गोचर होतें, बुद्धीला कळतें, तें तें द्रष्टयावर अवलंबून असतें. प्राणिमात्र झोपी गेले तरी विश्व हें असतेंच. म्हणजे त्याचा अनुभव घेणाराहि कोणीतरी असतोच. तोच ईश्वर होय.

(५) जगांत मोहक, मंगलमय व विस्मयजनक सौंदर्य नेहमी प्रतीतीस येतें. त्याच्या मुळाशी विशाल, विशुद्ध व अनंतकलाविलासिनी अशी प्रतिभा असलीच पाहिजे. ही प्रतिभा ज्या कोणाची असेल, तोच ईश्वर होय.

(६) मनुष्यमात्राकरितां नीति-अनीति, सत्कर्म-दुष्कर्म, शुभ-अशुभ यांचे नियम ठरविणारा व त्याप्रमाणे निर्णय देणारा, सर्वांत वरिष्ठ आणि प्रमादरहित असा कोणीतरी न्यायाधीश या जगांत असलाच पाहिजे. तो नसल्यास सगळीं नैतिक मूल्यें व शुभाशुभ विचार निराधार ठरतील. सुकृताचें शुभ फल मिळवून देणारा व दुष्कृत्याबद्दल शासन करणारा या विश्वांत कोणीतरी असलाच पाहिजे. तसेंच अमुक सत्कर्म व अमुक दुष्कर्म हें निश्चित ठरविणारी चेतनशक्ति असलीच पाहिजे. ती शक्ति म्हणजेच ईश्वर होय.

(७) ईश्वर, आत्म्याचें अमरत्व व कर्मविपाकवाद या कल्पनांना मानवी जीवनांत कांही मूल्य आहे. त्यांचें अस्तित्व गृहीत धरल्याशिवाय माणसाला संसारांतलीं कर्मे धीराने करतां येणार नाहीत. बुद्धीपलिकडच्या या वस्तू अस्तित्वांत आहेत, असें मानल्यानेच मनुष्याला आपलें जीवन कृतार्थ करतां येतें. हेंच त्या वस्तूंच्या कल्पनांचें मूल्य होय.

(८) विचारवंत व संशोधक सांगतात, की मानवजातीचा धार्मिक अनुभव हाच ईश्वरी सत्तेचा पुरावा आहे. जगांत एकहि जात किंवा जमात अशी नाही, की जिच्यांत धर्मसंस्था अस्तित्वांत नाही. रानटी समाजापासून तो सुधारणेच्या शिखरावर पोंचलेल्या समाजापर्यंत सर्वत्र धर्मसंस्थेचें अस्तित्व दिसून येतें. रानटी लोकांच्या धार्मिक कल्पना व सुधारलेल्या समाजांतील तत्त्वज्ञांच्या व साधुसंतांच्या धार्मिक कल्पना यांत फार मोठी तफावत असली, तरी अलौकिक शक्तीच्या अस्तित्वाचा प्रत्यय ही गोष्ट उभयसाधारण आहे. त्याचबरोबर ऋषिमुनींचा व साधुसंतांचा दिव्य, अलौकिक अनुभव हें एक ईश्वरी सत्तेचे महत्त्वाचें प्रमाण होय, असें धार्मिक लोक सांगतात. इन्द्रियजन्य अनुभवापेक्षां हा अतीन्द्रिय अनुभव श्रेष्ठ मानलेला आहे.

वर दिलेल्या या युक्तिवादांवर नास्तिकांनी आक्षेप घेतले आहेत, ते यथाक्रम पुढीलप्रमाणे आहेत —

(१) जग हें अत्यंत विचारपूर्वक कोणीतरी निर्माण केलें असलें पाहिजे, हा युक्तिवाद सकृद्दर्शनीच खरा आहे. बुद्धि, जाणीव किंवा ज्ञान या साधनांची गरज नेहमीच लागते असें नाही. मानवाच्या व्यवहारांत बुद्धीची गरज असते, हें खरें असलें तरी तेवढयावरून विश्वरचनेसाठी बुद्धीची गरज आहे, असें ठरत नाही. जीवाच्या शरिरांतल्या पचन, रुधिराभिसरण इ. गुंतागुंतीच्या क्रिया अजाणतां होत असतात. त्याचप्रमाणे

नियमित गति हा ग्रह-ताऱ्यांचा स्वभावच आहे. तेव्हा त्यासाठी ईश्वराची आवश्यकता नाही.

(२) प्रत्येक गतीला स्वतंत्र प्रेरकाची गरज नसते. कारण प्रत्येक वस्तूंत स्वयंगति-शक्ति असते व एक वस्तु दुसऱ्या वस्तूच्या गतीला कारण होते. मूलद्रव्याला प्रथम प्रेरणा देणारा म्हणून ईश्वर मानायचें कारण नाही. कारण विश्व हें अनादि असल्यामुळे 'प्रथम' ही कालदर्शक कल्पनाच चुकीची ठरते.

(३) उद्देश किंवा हेतु म्हणजे कोणती तरी इच्छा. ईश्वराला इच्छा आहे असे मानल्यास तो अपूर्ण व अतृप्त आहे, असें सिद्ध होतें व त्यामुळेच तो अनीश्वर आहे, असे म्हणावें लागतें.

(४) कोणतीहि वस्तु तिच्या ज्ञानावर अवलंबून नसते; तर ज्ञान हें वस्तूवर अवलंबून असतें. जी वस्तु जाणीव असेल तरच असते व जाणीव नसेल तर नसते, ती काल्पनिक असते. म्हणून या जगाचा अनुभव घेणारा कोणी (ईश्वर) नसला तरी जग हें असणारच. त्याच्या अनुभवासाठी ईश्वराची गरज नाही.

(५) विश्व हें केवळ सौंदर्यरूपच आहे, असें म्हणतां येत नाही. समजा तसें मानलें, तरी तें सौंदर्य कोण्या प्रतिभासंपन्न शक्तीने निर्मिलें आहे, याला कांही आधार नाही. सुंदरता किंवा कुरूपता ही तिचा भोग घेणाऱ्या मानवाच्या अनुभवावरून ठरते. मानवाला दोन्ही प्रकारचा अनुभव येतो. शिवाय जगांतील सौंदर्याचा अनुभव हा परिस्थिति सापेक्ष आहे. त्यावरून विश्व हें वस्तुतः सौंदर्यमयच आहे, असें विधान करतां येत नाही. सौंदर्य निर्माण करणारी प्रतिभाशक्ति त्या सौंदर्याच्या मागे असलीच पाहिजे, हेंहि अनुमान चुकीचें आहे. कारण सौंदर्य हा विश्वाचा स्वभाव आहे व तो शाश्वत आहे. सौंदर्य कोणीतरी निर्मिलें असें म्हणणें म्हणजे त्याच्या निर्मितीपूर्वी विश्व कुरूप होतें, असें म्हणावें लागेल. आणि या विधानाला प्रमाण नाही.

(६) नीतिमूलक ईश्वरानुमानहि चुकीचें आहे. शुभाशुभ-कल्पना आणि नीतिनियम हे व्यवहाराच्या सुलभतेसाठी आणि सुस्थितीसाठी मानवानेच बनविले आहेत. विद्रोह, कलह, हिंसा इ. दुराचारांचे दुष्परिणाम याच जगांत अनुभवायला मिळतात. परस्पर सहकार्य, सहानुभूति, प्रेम, जिव्हाळा या गुणांच्या योगाने जीवनांत श्रेयाची प्राप्ति होते. ही गोष्टहि अनुभवाला येणारी आहे. या गोष्टी सांगायला ईश्वराची गरज नाही.

(७) ईश्वरावर श्रद्धा व आत्म्याच्या अमरत्वाची कल्पना या अलौकिक अथवा पारलौकिक मूल्यांपेक्षा केवळ ऐहिक मूल्यांच्या स्वीकारानेच इतिहासांत फार मोठ्या घटना घडल्या आहेत व वर्तमानकाळांतहि घडून येत आहेत. विद्या, कला उत्साह, पराक्रम, त्याग इ. मानवी सद्‌गुण पराकोटीला पोचविण्याचें सामर्थ्य बुद्धिगम्य अशा ऐहिक मूल्यांतच आहे.

(८) धार्मिक अनुभवावरून ईश्वरसिद्धि होऊं शकत नाही. अलौकिक शक्तीच्या अस्तित्वाचा प्रत्यय ही भावना वास्तव अनुभूतीच्या कक्षेंत बसत नाही. तशी ती असती, तर सर्वांनीच ती प्रमाण मानली असती. कारण प्रत्यक्ष अनुभव हाच मनुष्याच्या बुद्धिवादाचा खरा आधार आहे. धार्मिक भावना ही श्रद्धामूलक असते व श्रद्धा म्हणजे प्रत्यक्ष अनुभव नव्हे. मानवजातीने खोट्या कल्पनांनी निर्मिलेल्या अशा कितीतरी अंधश्रद्धा उराशीं बाळगल्या आहेत. अंधश्रद्धेमुळे अनेक प्रकारचे प्रत्यक्ष आभास तयार होतात व भ्रांति निर्माण होते. साधुसंतांचा अनुभव म्हटला, तरी त्यांतहि ऐकमत्य व सारखेपणा नाही. एकाच वस्तूबद्दल परस्पर विसंगत असे अनुभव येत असतील, तर त्या अनुभवांपैकी कोणता खरा तें तर्कशास्त्रांतील नियमांच्या आधारें ठरवावें लागतें. ईश्वराचें सत्यत्व तर्कदृष्ट्या सिद्ध होत नाही आणि म्हणून कपिल, बुद्ध, महावीर व चार्वाक यांचा ईश्वराच्या नास्तित्वाचाच अनुभव खरा, असें म्हणणें भाग पडतें. ज्या साधुसंतांना आपल्याला ईश्वरानुभव घडला असें वाटतें, त्यांचा तो अनुभव भावनेचें बळ, श्रद्धा किंवा निरंतर ध्यास यांमुळे आलेला असतो. तो अनुभव ईश्वर या वस्तूच्या सन्निकर्षामुळे आलेला नसतो.

चार्वाकमतवादी हे केवळ प्रत्यक्ष प्रमाण मानतात. ईश्वर प्रत्यक्ष दिसत नाही, म्हणून तो नाही, असें त्यांचें मत आहे; पण त्यांचें हें विधान बरोबर नाही. कारण, तसें मानल्यास विचार, सत्ता या गोष्टीहि खोट्या मानाव्या लागतील. कारण त्या बाह्य ज्ञानेंद्रियांचा विषय होऊं शकत नाहीत. भूमींतून तृणांकुर उत्पन्न करणारी शक्ति आपल्याला दिसत नसली, तरी ती नाकारतां येत नाही. ईश्वर ही एक व्यक्ति नसल्यामुळे ती दाखवितां येत नाही. सृष्टीला कर्ता पाहिजे, असें म्हटल्यास ईश्वरालाहि निराळा कोणी तरी कर्ता मानावा लागतो; पण अशी ही कर्त्यांची मालिका कधीच संपणारी नाही. त्यापेक्षा सृष्टीला कर्ताच नाही असे म्हणणें सयुक्तिक ठरेल, असा आणखी एक आपेक्ष घेतला गेला आहे. या आक्षेपाचें निराकरण असें––

पंचमहाभूतांचें अस्तित्व सर्वच मान्य करतात. पण तीं स्वतः जड आहेत. तेव्हा त्यांना निर्माण करणारा कोणीतरी असलाच पाहिजे, तोच ईश्वर होय. तो सामर्थ्यसंपन्न असल्या-

मुळे त्याला दुसरा निर्माता असेल, असें मानण्याची आवश्यकता नाही. तो स्वतंत्र व स्वतःला उत्पन्न करणारा असाच असेल.

वैषम्य व नैर्घृण्य हे दोन दोष ईश्वराच्या अंगीं कांही आक्षेपक चिकटवितात. ईश्वराच्या ठिकाणीं समता असती, तर त्याने सर्वांनाच सारखें सुखी किंवा दुःखी ठवलें असतें; पण व्यवहारांत तसें अनुभवाला येत नाही. कांही माणसें जन्मभर पूर्ण सुखोपभोग घेतात, तर असंख्य माणसें जन्मभर दुःखांत पिचत राहतात. ईश्वराला निर्घृण अशासाठी म्हणावें लागतें, की तो तरुण स्त्रीचा पति मृत्युमुखीं पाडून तिला वैधव्याच्या यातना देतो. तो वृद्ध मातापित्यांचा एकमेव आधार असलेला पुत्र त्यांच्यापासून हिरावून नेतो; इतकेंच काय; तो अनेकांवर अनेक प्रकारच्या आपदा आणतो.

पण आस्तिकांच्या मतें वरील दोष ईश्वराच्या अंगीं लागत नाहीत. ईश्वर हा केवळ कर्माध्यक्ष आहे. तो प्रत्येकाच्या पूर्व-कर्मानुसार ज्याला त्याला बरें किंवा वाईट फळ देत असतो.

ईश्वराविषयीं आस्तिक व नास्तिक यांचीं मतें वरीलप्रमाणे आहेत. आस्तिकांनी जे ईश्वरविषयक विचार मांडले आहेत. त्यांचा निष्कर्ष पुढीलप्रमाणे सांगतां येईल.

ईश्वर हा सिद्ध आहे. तो सर्वज्ञ व सर्व शक्तिमान् आहे. म्हणून त्याला दुसऱ्या निर्मात्याची गरज नाही. तो स्वतःच स्वतःला निर्माण करतो. ईश्वरी शक्ति ही एक आंतरिक शक्ति आहे. कळीचें फूल बनतें तेव्हां त्याला बाहेरून पाकळ्या चिकटवाव्या लागत नाहीत. आंतील शक्तीनेच ती कळी फुलते, विकसित होते. ईश्वराच्या एकविध शक्तींतून अनेकविध जीव व वनस्पती निर्माण होतात. सृष्टीला आंतून उत्तेजन देऊन फुलविणारी आणि एकांतून अनेक निर्माण करणारी परमेश्वरी शक्ति अधिष्ठानरूपाने या जगताचें कारण आहे. एखादा घट पाहिला, की कुंभाराने तो निर्माण केला आहे, हें लक्षांत येतें; पण कुंभाराचें घटकर्तृत्व व ईश्वराचें सृष्टि-कर्तृत्व यांत एक मोठाच फरक आहे. घट एकदा बनविला, की कुंभाराचा घटाशीं संबंध राहत नाही; पण ईश्वराचें तसें नाही. जग निर्माण केल्यावरहि जगाशीं असलेला त्याचा संबंध सुटत नाही. जगांत त्याच्या अनंत शक्तीचे अंश वास करीत असतात. वनस्पति, पशु, पक्षी, मानव हे निर्माण झाल्यावर त्यांच्यांत क्रमाने विशिष्ट मर्यादेपर्यंत वाढ होत राहते व पुनरपि त्यांच्या क्षयाला सुरुवात होते. शेवटीं जे जन्मले आणि वाढले, त्या सर्वांचा अंत होतो. पृथ्वी खचते, उल्का पतन पावतात, जंगलें जळतात, समुद्र आटतात, पर्वत कोसळतात, सांथी पसरतात आणि युद्धें भडकतात. विश्वांत कुठे उभारणी दिसते, तर कुठे संहारणी दिसते. या सर्व घडामोडींत ईश्वराच्या शक्तीचे अंश काम करीत असतात. त्यावरून ईश्वर हा चराचराला व्यापून उरणारा आहे, असें मानावें लागतें.

यापुढे वेगवेगळ्या दर्शनांनी ईश्वरविषयक विचार कशा प्रकारें मांडले आहेत, तें पाहायचें आहे –

न्यायदर्शन–न्यायदर्शनांत ईश्वराला महत्त्वाचें स्थान आहे. ईश्वराच्या अनुग्रहाशिवाय पुरुषाला प्रमेयांचे यथार्थ ज्ञान होत नाही किंवा तो मोक्षाचा अधिकारीहि होत नाही, असें नैयायिक मानतात. त्यांच्या मतें ईश्वर हा जगाच्या उत्पत्ति–स्थिति–लयाचा कर्ता आहे. सार्वकाल विद्यमान असणाऱ्या अणूपासून तो जग निर्माण करतो. जगांत व्यवस्थाहि तोच लावतो. त्यांच्या मतें ईश्वर हा विश्वाचें निमित्तकारण आहे; उपादान–कारण नाही. वेदान्तांत त्याला निमित्तकारण व उपादान कारणहि मानलें आहे. मनुष्य जें कर्म करतो, त्याला तो केवळ निमित्तमात्र असतो. ईश्वरच त्या कर्माचा प्रयोजक-कर्ता असतो. अशा प्रकारें ईश्वर हा प्राणिमात्राचा नैतिक शासक, त्यांच्या कर्मफलांचा दाता व सुखदुःखाचा नियामक आहे. नैयायिक ईश्वरसिद्धि पुढील तीन प्रमाणांनी करतात.

(१) **कार्यकारणसंबंध**— विश्वांतील सर्व पदार्थ हे कार्य आहेत, म्हणजे ते उत्पन्न झालेले आहेत. याचें कारण असें, की ते सावयव आहेत व त्यांचें परिमाण सीमित आहे. कार्याला कोणीतरी कर्ता असतो, हा नेहमीचा अनुभव आहे. तदनुसार या कार्यरूप जगताचा कोणीतरी कर्ता असलाच पाहिजे. तोच चेतन व सर्वशक्तिमान् ईश्वर होय. तो सर्वज्ञ आहे व सर्वव्यापकहि आहे.

(२) **अदृष्ट**– सृष्टींतील मानवप्राणी सगळे सारखे नसतात. कोणी राजवैभवात लोळत असतो, तर कोणी दुपारच्या ग्रासमात्र अन्नालाहि महाग असतो. याचें कारण काय ? ज्याचें त्याचें कर्म हेंच त्याचें कारण. माणूस जसें बरेंवाईट कर्म करतो, तसें त्याला फल मिळतें. तें फल अदृष्टद्वारा त्याला प्राप्त होतें, असें नैयायिक मानतात. अदृष्ट स्वतः जड आहे; ईश्वर त्याला प्रेरित करतो. तो अदृष्टाचा नियंता व अदृष्टाप्रमाणे मानवाचें सुखदुःख, उत्कर्ष-अपकर्ष व हर्ष-विषाद यांचा संपादक आहे.

(३) **वेदप्रामाण्य**– आपल्या धर्मांत वेदांची प्रामाणिकता सर्वतोमुखी आहे. वेद सांगतो तो धर्म व तो ज्याचा निषेध करतो, तो अधर्म होय. वेदांना इतकी मान्यता आहे, याचें कारण वेद हे ईश्वररचित आहेत. सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् व सर्वव्यापक ईश्वराने वेद रचलेले असल्यामुळेच आस्तिकांची वेदांच्या प्रामाण्यावर श्रद्धा आहे. वेदच सांगतो, की ईश्वर आहे.

एको देवः सर्वभूतेषु गूढः
सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा ।
कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः
साक्षी चेता केवलो निर्गुणश्च ।।

(श्वेताश्व. ६. ११)

अर्थ– एक देव सर्व प्राणिमात्रांत गूढरूपाने राहिलेला आहे. तो सर्वव्यापी, सर्व भूतांचा अंतरात्मा, कर्मांचा अध्यक्ष, सर्व भूतांचें आश्रयस्थान, साक्षी, चेतन, एकमेव व निर्गुण आहे.

म्हणून ईश्वराचें अस्तित्व मान्य केलें पाहिजे. उदयनाचार्यांनी न्यायकुसुमांजलि या ग्रंथांत ईश्वरसिद्धीसाठी पुढील आठ प्रमाणें सांगितलीं आहेत–

कार्यायोजनधृत्यादेः पदात् प्रत्ययतः श्रुतेः ।
वाक्यात् संख्याविशेषाच्च साध्यो विश्वविदव्ययः।।

अर्थ– कार्य, आयोजन, धृति, पद, प्रत्यय, श्रुति, वाक्य व संख्याविशेष या प्रमाणांनी ईश्वराची सिद्धि होते.

योगदर्शन– योगदर्शनांत ईश्वराचें स्थान फार मोठें आहे. ईश्वर शब्दाची व्याख्या तिथे पुढीलप्रमाणे दिली आहे–

क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेषः ईश्वरः ।

(योगसूत्र १.२४)

अर्थ– क्लेश, कर्मविपाक व आशय (= कर्मफलानुरूप संस्काराचा संपर्क) यांनी रहित असणारा पुरुषविशेष म्हणजे ईश्वर होय.

ऐश्वर्य व ज्ञान यांची पराकाष्ठा म्हणजेच ईश्वर. तो तीन्ही कालांनी अनवच्छिन्न आहे. तो गुरूंचाहि गुरु आहे. वेदशास्त्रांचा प्रथम उपदेष्टा तोच आहे. तो नित्य, सर्वज्ञ, सर्वव्यापी परमात्मा आहे. विश्वांतल्या सर्व जीवांहून तो भिन्न आणि श्रेष्ठ आहे.

योगदर्शनाच्या आचार्यांनी ईश्वरसिद्धीसाठी तीन स्वतंत्र प्रमाणें पुढे केलीं आहेत–

(१) ईश्वरसिद्धीसाठी सर्वश्रेष्ठ प्रमाण म्हणजे शब्द. श्रुति आणि शास्त्रें एका स्वराने ईश्वराची सत्ता उद्घोषित करतात व त्याची प्राप्ति हें जीवनाचें परमसाध्य मानतात.

(२) वस्तूंमध्ये दोन प्रकारच्या कोटी असतात. एक अल्पतम कोटी व दुसरी उच्चतम कोटी. वस्तूचें सर्वांत लहान रूप म्हणजे परमाणु व सर्वांत मोठें म्हणजे आकाश. त्याचप्रकारें ज्ञानाची सर्वांत मोठी मात्रा जिथे राहते, तोच ईश्वर होय. तोच जगतांतील ज्ञानधारेचा मूलस्रोत आहे. या जगांत लोकांना जें ज्ञान मिळतें, तें गुरूपासून मिळतें. गुरूला त्याच्या गुरूकडून आणि त्याला त्याच्याहि गुरूकडून मिळतें. अशा प्रकारें गुरुत्वाची जी अंतिम कोटी तोच ईश्वर होय. एखाद्या ऋषि-मुनीला या अंतिम कोटींत बसविणें शक्य नाहीं. कारण तो ऋषि किंवा मुनि विशिष्ट कालांतच अस्तित्वांत असतो. ईश्वराचें तसें नाही. तो दिक्कालाद्यनवच्छिन्न व म्हणूनच नित्य आहे. तो ज्ञानाचा परमनिधि आहे.

(३) प्रकृति व पुरुष यांचा संयोजक व वियोजक म्हणून ईश्वराची सिद्धि होते. सर्वज्ञ ईश्वराला प्रत्येक पुरुषाचें कर्म व अदृष्ट यांचें ज्ञान असतें व तदनुसार तो प्रकृति-पुरुषांचा संयोग घडवून आणतो आणि जीव-जगत् यांच्या सृष्टीसाठी प्रकृतीला प्रेरणा देतो.

योगाच्या साधनेंतहि ईश्वराला महत्त्व दिलेलें आहे. ईश्वर-प्रणिधानामुळे समाधि सिद्ध होते, असें योगशास्त्रांत मानलें आहे.

मीमांसादर्शन– प्राचीन मीमांसक निरीश्वरवादी होते; पण पुढच्या मीमांसकांना ही गोष्ट खटकली व कर्मफलाचा दाता म्हणून त्यांनी ईश्वराचा स्वीकार केला. चेतनपुरुषाच्या अधिष्ठानाशिवाय कर्म हें स्वकीय फल उत्पन्न करायला असमर्थ आहे, असें जाणून बादरायणाने ईश्वराला कर्मफलाचा दाता मानलें. जैमिनीच्या मतानुसार यज्ञापासूनच त्याच्या फलाची प्राप्ति होते; त्यासाठी ईश्वराची गरज नाही. पण नंतरच्या मीमांसकांनी यज्ञपतीच्या स्वरूपांत ईश्वराचा स्वीकार केला.

वेदान्तदर्शन– हें दर्शन ईश्वर मानणारें आहे. जेव्हा निर्विशेष ब्रह्म मायेने आवृत होऊन सविशेष किंवा सगुण भाव धारण करतें, तेव्हां त्याला ईश्वर म्हणावें, असें वेदान्ती सांगतात. विश्वाच्या सृष्टि-स्थिति-लयाचें कारण ईश्वरच आहे. परमेश्वराचा हा सृष्टिव्यापार लीलारूप आहे. व्यवहारांत सर्व मनोरथ सिद्ध झालेल्या पुरुषाचे व्यापार जसे निरुद्देश होत असतात, तद्वतच ही सकलसृष्टि म्हणजे सर्वज्ञ व सर्वकाम ईश्वराचा लीला–विलास आहे.

प्रकृतिश्च प्रतिज्ञादृष्टान्तानुपरोधात्

(ब्र. सू. १.४.२३)

या सूत्रावर भाष्य करतांना शंकराचार्यांनी ईश्वर हा जगताचें निमित्तकारण आहे व त्याचबरोबर उपादानकारणहि आहे, असें सिद्ध केलें आहे. कुंभार ज्याप्रमाणे मातीपासून नाना प्रकारचीं गाडगीं मडकीं बनवितो, त्याचप्रमाणे ईश्वर स्वतः-मधून जगत् निर्माण करतो. मायोपाधिक ब्रह्म म्हणजेच ईश्वर होय. त्यामुळे ईश्वर चेतन आहे. चैतन्यपक्षाचा अवलंब केल्यास ब्रह्म हें जगताचें निमित्तकारण ठरतें व उपाधिपक्ष स्वीकारल्यास तें जगताचें उपादानकारणहि होतें.

रामानुजाचार्यांच्या मतें सर्वोत्कृष्ट व गुणसंपन्न तो ईश्वर

होय. ते निर्गुण निराकार ब्रह्माला न मानता सगुण पुरुषोत्तमालाच मानतात. ईश्वर हा सेव्य असून जीव हा त्याचा सेवक आहे. ईश्वर शरणागताला शरण्य आहे. त्याची कर्मरूप उपासना केल्याने जीव मुक्त होतो.

मध्वाचार्य ईश्वर हा सर्व गुणसंपन्न व दोष वर्जित आहे व तोच नारायण होय, असें मानतात.

वल्लभाचार्यांच्या मतें ईश्वर हा सगुण व निर्गुण अशा दोन्ही रूपांत आहे. त्याच्या अनंत शक्तींपैकी माया ही एक शक्ति आहे. जीव हा परमेश्वरी अंश असून ईश्वरसेवा हें त्याचें ध्येय आहे. तें पुष्टिमार्गाच्या द्वारें साध्य होतें.

गीता – गीतेंत ईश्वरतत्वाचा सर्वांगीण विचार केलेला दिसतो. तिथे ईश्वराचें वर्णन अनेक ठिकाणीं अनेक प्रकारें आलें आहे. श्रीकृष्ण हा गीतेचा वक्ता असून तो पुरुषोत्तम आणि योगेश्वर आहे. तेव्हां तिथलें बऱ्याच ठिकाणचें ईश्वर-वर्णन प्रथमपुरुषांत केलेलें आहे. सर्वव्यापी निर्गुण निराकार परब्रह्म आणि विश्वाची घडामोड करणारा सगुण-साकार ईश्वर, यांत गीतेने भेद मानलेला नाही. सर्व विश्व ईश्वरापासूनच निर्माण होतें व त्याच्या ठिकाणींच विलीन होतें; पण त्यामुळे ईश्वराच्या अकर्तृत्वाला बाध येत नाही. तो जगन्निर्मितीचें काम प्रकृतीवर सोपवितो आणि त्या सर्व कर्मापासून अलिप्त राहतो. जगांतले सर्व पदार्थ ईश्वरामध्ये आणि ईश्वराच्या आधाराने राहतात. दोऱ्यांत मणी ओवावे, त्याप्रमाणे सर्व विश्व ईश्वरांत ओवलेलें आहे. जगांतील सर्व सात्विक, राजस आणि तामस पदार्थ ईश्वरापासूनच उत्पन्न होतात. पण ईश्वर मात्र त्यांच्यांत राहून मर्यादित होत नाही (गीता ७.१२).

नवव्या अध्यायांत श्रीकृष्ण आपला ऐश्वरयोग पुढीलप्रमाणे विशद करतो—

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ।।
न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ।।
यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ।।

(९.४–६)

अर्थ – मी आपल्या अव्यक्त स्वरूपाने हें जग विस्तारिलें किंवा व्यापिलें आहे. माझ्या ठायीं सर्व भूतें आहेत, पण मी त्यांच्या ठायीं नाही. आणि माझ्या ठायीं सर्व भूतेंहि नाहीत ! पाहा (कशी ही) माझी ईश्वरी करणी किंवा योग सामर्थ्य ! भूतें उत्पन्न करणारा माझा आत्मा भूतें धारण करूनहि (पुनः) भूतांत नाही ! सर्वत्र वावरणारा महान् वायु ज्याप्रमाणे सर्वदा आकाशाच्या ठायीं, त्याप्रमाणे सर्व भूतें माझ्या ठायीं आहेत, असें समज.

ईश्वर हा जर सर्व विश्वाचा निर्माता आहे आणि तो जर दयाळु आहे, तर त्याच्या जगांत दुष्ट, अमंगळ आणि असुंदर पदार्थ कां दिसावे, हा प्रश्न अनादिकालापासून प्रत्येक ईश्वरवाद्याला भेडसावीत आलेला आहे. जगांतील दोषांमुळे ईश्वर दूषित होऊं शकत नाही, हें फार तर गीतेंतल्या विवेचनावरून समजूं शकेल; पण जगांत ईश्वराने वाईट पदार्थ निर्माणच कां करावे, हा प्रश्न शिल्लक राहतोच. याला गीतेचें उत्तर पुढीलप्रमाणे आहे —

जगांत वाईट किंवा अशुभ केवळ भासतें; त्याला वास्तव अस्तित्व नाही. केवळ अज्ञानामुळेच कांही पदार्थ वाईट भासतात. तें अज्ञान दूर झालें म्हणजे बऱ्यावाईट सर्व पदार्थांत सारखाच व्यापून राहिलेला ईश्वर जाणवूं लागतो. चांगलें व वाईट या कल्पना दृश्याच्या क्षेत्रांतील आहेत. सत्य त्या दोहोंच्याहि पलिकडे असतें. म्हणूनच दृश्यातीत झालेले पंडित समदर्शी होतात (५.१८).

व्यावहारिक जगांत बरें–वाईट हा भेद राहणारच. याला कारण स्वभाव हेंच आहे. व्यवहारांत बऱ्याचें बरेपणहि वाईट कांही असल्यावांचून प्रत्ययास येत नाही. पण म्हणून तें ईश्वर निर्माण करतो, असें म्हणणें चूक आहे. ईश्वर कोणाचेंहि पापपुण्य घेत नाही. मात्र ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे तो ज्याला त्याला त्याचें फल मात्र देतो. ही गोष्ट स्पष्ट करण्यासाठी शंकराचार्यांनी 'ईश्वरस्तु पर्जन्यवत् द्रष्टव्यः' असें म्हटलें आहे. ईश्वर सर्वांच्या सुखदुःखांचें साधारण कारण असला, तरी जगांत दिसणारें वैषम्य ज्याच्या त्याच्या कर्मामुळेच उत्पन्न होते. पर्जन्य हा सर्व वनस्पतींच्या वाढीला साधारण कारण असला, तरी त्या वनस्पतींना येणारीं फळें मात्र त्यांच्या बीजावर अवलंबून असतात. त्याबद्दल पर्जन्याला दोष देतां येत नाही. हें जसें, तसाच ईश्वरहि जगांतील वैषम्यामुळे दोषी ठरत नाही.

हें उत्तर जग निर्माण झाल्यानंतर ठीक आहे. परंतु निर्मितीच्या पूर्वी कर्मच ज्यावेळी उत्पन्न झालें नव्हतें, तेव्हां वैषम्य कुठून आलें ! यावर उत्तर असें, की संसार हा अनादि असल्यामुळे 'निर्मितीच्या पूर्वी' असा त्याच्याविषयीं प्रश्नच येऊं शकत नाही. संसाराचें हें अनादित्व गीतेच्या पंधराव्या अध्यायांत श्रीकृष्णांनी विशद केलें आहे. पण तेवढ्यानेहि ज्यांचें समाधान होत नाही, त्यांना गीतेचें उत्तर असें, की जगांतलें वैषम्य केवळ अज्ञानाने किंवा मायेने भासतें; निर्दोष व सम

अशा ब्रह्मांत किंवा ईश्वरांत वैषम्याचा लवलेशहि नाही.

हा ईश्वर प्राणिमात्रांच्या हृदयांत निवास करतो, असें गीतेने सांगितलें आहे—

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ॥
(१८.६१)

अर्थ – हे अर्जुना ! ईश्वर सर्व भूतांच्या हृदयांत राहून यंत्रावर चालविल्याप्रमाणे सर्व भूतांना (आपल्या) मायेने चालवीत असतो.

अशा या ईश्वराला शरण गेल्याने मायेच्या दुस्तर सागरांतून तरून जातां येतें. ईश्वरभजनाने दुराचारी माणसाचीहि बुद्धि बदलते, वर्तन सुधारतें. याउलट सद्वर्तनी माणसाचेंहि ईश्वरानुसंधान सुटलें, तर त्याचाहि अधःपात होण्याची शक्यता असते. कोणत्याहि स्थितींत जोंवर ईश्वरानुसंधान दृढ आहे, तोंवर कोणतेंहि भय संभवत नाही. म्हणूनच गीता सांगते, की कोणतेंहि कर्म करायचें तें ईश्वरार्पण बुद्धीने करावें (९.२७).

माया किंवा प्रकृति यांच्या साहाय्याने व्यक्त रूप धारण करणारा आणि कर्मफल देणारा ईश्वर, हा स्वरूपतः ब्रह्मच असल्याचें गीतेंत सांगितलें आहे. पण त्यांतहि गीतेचें वैशिष्टय हें, की तिने उपनिषदांतील ब्रह्मविद्येला ईश्वरवादाची जोड देऊन ती सर्वसामान्य व्यक्तींना सुगम केली. म्हणूनच ईश्वराचें वास्तवरूप 'कूटस्थ नित्य' असलें, तरी सामान्य माणसाने त्याच्या प्राप्तीसाठी व्यक्तोपासनेचाच मार्ग अवलंबिणें अधिक श्रेयस्कर, असें गीता सांगते. मात्र व्यक्तोपासना करीत असतांहि ईश्वराचें वास्तवरूप जाणून सर्व कांही ईश्वरच आहे, अशी भावना ठेवणें आवश्यक असतें, असेंहि गीतेने सांगितलें आहे.

ख्रिस्ती धर्म––हा धर्महि ईश्वराला मानतो. किंबहुना तो एकेश्वरवादी धर्म आहे. ख्रिस्तपूर्व नवव्या शतकापासून इस्राएलचा इतिहास व त्याचें साहित्य यांचें अवलोकन केलें असतां असें कळतें, की त्या काळीं भिन्न भिन्न मानवसमूह अनेक देवतांना भजत होते. पुढे या अनेक देवतांतूनच एकेश्वराची कल्पना उदयास आली. जुन्या करारांतच हा एकेश्वरी सिद्धान्त प्रस्थापित झालेला दिसतो. सर्वश्रेष्ठ, दिव्य व असामान्य अशी एकच शक्ति विश्वाचें नियमन करते व म्हणून तिचीच उपासना केली पाहिजे, ही कल्पना जुन्या करारांतच स्पष्ट झालेली आहे.

इस्राएलच्या यहुदी धर्मांत ईश्वराला जेहोवा असें नांव असून तो स्वयंभू, स्वयंपूर्ण, विश्वकर्ता व चिन्मय आहे. हा ईश्वर इंद्रियगोचर नाही; पण तो वेळोवेळीं आपल्या प्रतिनिधीच्या रूपाने स्वतःचें रूप व्यक्त करीत असतो. प्रॉफेट किंवा प्रेषित हा केवळ त्याचा संदेशवाहक नसून तो त्याचा अवतार असतो. ईश्वर भक्तांवर कृपा करतो व दुष्टांचा नाश करतो.

ग्रीक युगांत वरील ईश्वरविषयक कल्पनेंत तात्त्विक फरक पडला नसला, तरी ईश्वराला अधिक अलौकिक स्थान प्राप्त झालें. मानव व ईश्वर यांतील अंतर अनेक पटींनी वाढलें. ईश्वराला मानवी रूप देण्याची प्रवृत्ति कमी झाली. त्याच्या भोवतीचें पावित्र्याचें वलय अधिकच गडद झालें.

येशू ख्रिस्ताने ईश्वरविषयक वरील सर्व कल्पनांचा पुरस्कार केला असून 'जगाचा पिता' ही त्याला विशेष संज्ञा दिली आहे. ईश्वर हा प्राणिमात्राकडे पित्याच्या प्रेमळ दृष्टीने पाहतो. मुलें अर्थात् मानव प्राणी कसेहि वागले, तरी या 'बापाचें' त्यांच्यावरचें प्रेम कमी होत नाही. तो भेदभाव न ठेवतां सर्वांवर सारखीच कृपा करतो. तो क्षमाशील आहे. अपराध्याला शासन करतांनाहि तो स्वतः दुःखी होतो. आणि शासन करतो तेंहि मानवाने सुधारावें म्हणूनच. ख्रिस्त सांगतो, की 'मी ईश्वराचा श्रेष्ठ पुत्र असून मला त्याचें सामर्थ्य व त्याची दयाबुद्धि प्राप्त झालेली आहे. तेव्हा सर्वांनी माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवावा.'

ईश्वराच्या इतर सर्व गुणांबरोबर त्याच्या प्राणिमात्राविषयींच्या प्रेमाला नव्या करारांत प्राधान्य मिळालें. परमेश्वर हा पिता, ख्रिस्त हा त्याचा पुत्र व जगाच्या उद्धारासाठी ईश्वराने केलेली योजना असें ईश्वराचें त्रिविध रूप आहे, असें ख्रिस्ती धर्म मानतो (जॉन् ३.१६).

पारशी धर्म––झोरास्ट्रियन अर्थात् पारशी धर्महि एकेश्वरवादीच आहे. या जगांत एकच पूज्य देव आहे आणि तो ज्ञान, जीवन, सत्य व सद्गुण यांचा अधिष्ठाता आहे. त्याला अहुरमज्द म्हणजे सर्वज्ञ ईश्वर असें म्हणतात. अवेस्त्यांतील पहिल्याच ऋचेंत त्याचें सामर्थ्य व गुणविशेष प्रकट केलेले आहेत––

'अहुरमज्द हा जगाचा कर्ता आहे. तो तेजस्वी, वैभवशाली, श्रेष्ठ, उत्कृष्ट, अतिसुंदर, अत्यंत दृढ, सर्वज्ञ, संपूर्ण व अत्युदार आहे.'

झरतुष्ट्राने विविध गाथांतून त्याला पुढील विशेषणें योजलीं आहेत––सृष्टीचा कर्ता, सर्वसाक्षी, सर्वज्ञ, सर्वश्रेष्ठ, सर्वशक्तिमान्, सखा, सत्य-न्यायाचा जनक, सन्मानाचा जनक, कल्याणकारी व उदार. अवेस्त्यानंतरच्या पारशी धर्मग्रंथांत अहुरमज्दाचीं १०१ नावें दिलेलीं आहेत.

इस्लाम— परमेश्वर आहे आणि तो एक आहे, हा इस्लामचा मुख्य संदेश आहे. अल्ला या नांवाने तो ओळखला जातो. इस्लामी धर्मसाहित्यांत अल्लाचे पुढील गुणविशेष सांगितले आहेत— तो एकमेव, सर्वसाक्षी, सर्वश्रोता, सर्ववक्ता, सर्वज्ञ, सर्वसंकल्प, अचिंत्य, अनिरुद्ध, सर्वशक्तिमान् व रब्ब (प्रभु) आहे. तो प्रेम करणारा आहे, हे खरें; पण त्याचें प्रेम सज्जन, मुहंमदाचे अनुयायी, निगर्वी, सदाचरणी, श्रद्धावंत व परमेश्वराचा पक्ष घेऊन लढणारे, यांनाच मिळतें. अल्लाच्या ठिकाणीं 'कर्तुमकर्तुम् अन्यथाकर्तुम्' शक्ति आहे, असें कुराणांत वारंवार सांगितलें आहे. ख्रिस्ती धर्मांत सांगितल्याप्रमाणे अल्लाचें व मानवाचें नातें पिता–पुत्राचें नाही. अल्ला हा धनी असून मानव हा त्याचा गुलाम आहे. अल्लाच्या आदेशानुसारच मानवप्राणी कर्में करीत असतात. ईश्वर सातव्या अस्मानांत अर्श (सिंहासन) वर विराजमान झाला आहे (५७१.४). तो आपल्या सिंहासनावरून फरिश्त्यांच्या द्वारें साऱ्या विश्वावर अधिराज्य करतो. त्यानेच जिबरीलच्या द्वारें मुहंमदाकडे कुराण पाठविलें. कुराणांतला ईश्वरविचार द्वैताद्वैतभावाचें संमिश्रण आहे. [भा. द.; जगांतील विद्यमान धर्म ; विश्वधर्म दर्शन; गीताः एक अध्ययन]

ईश्वर कवि

(१५०० इ. स. चा सुमार) एक कन्नड कवि. याला अभिनव केशिराज अशी पदवी होती. याचा कविजिव्हाबंधन नांवाचा एक काव्यग्रंथ उपलब्ध आहे. [क. क. च.]

ईश्वरकृष्ण

सांख्यकारिकांचा कर्ता. याचा काल साधारणपणे इ. स. चें चौथें शतक मानतात. परंतु तो याहूनहि प्राचीन असावा, असें श्री. बलदेव उपाध्याय यांचें मत आहे. इ. स. च्या सहाव्या शतकांत परमार्थाने चिनी भाषेंत सांख्यकारिकांचा वृत्तीसह अनुवाद केला आहे. चिनी भाषेंत या ग्रंथाला हिरण्यसप्तति किंवा सुवर्णसप्तति असें म्हणतात. अनुयोगद्वारसूत्र (इ. स.१००) या जैन ग्रंथांत, काविलं, सट्ठितंतं, माठरं, या ग्रंथांबरोबर कणगसत्तरीचा उल्लेख आहे. कणगसत्तरी हें सांख्यकारिकेचेंच चिनी नांव आहे. यावरून ईश्वरकृष्णाचा काळ इ. स. च्या पहिल्या शतकाच्या अलिकडचा नाही, असें उपाध्याय म्हणतात.

शंकराचार्यांनी आपल्या शारीरक– भाष्यांत सांख्यमताचा उपन्यास करतांना सांख्यकारिकांतील अवतरणें दिलीं आहेत. सांख्यकारिकांवर अनेक विद्वत्तापूर्ण टीका उपलब्ध आहेत. त्यांपैकी माठरवृत्ति ही सर्वांत प्राचीन आहे.

ईश्वरगणगौरीव्रत

चैत्र शु. १ दे पासून चैत्र कृ. ३ ये पर्यंत रोज शिव-गौरी यांची पूजा करणें, हा या व्रताचा विधि आहे. हें व्रत फक्त सुवासिनींकरितांच उक्त आहे. फल— सौभाग्यप्राप्ति. **पाहा**— गणगौर. [हि. ध.]

ईश्वरचंद्र 'विद्यासागर'

(१८२०–१८९१ इ. स.) बंगालमधील एक सुप्रसिद्ध संस्कृत पंडित व विधवाविवाह कायद्याचे जनक. मेदिनीपुर जिल्ह्यांतल्या वीरसिंह गांवीं यांचा जन्म झाला. यांच्या वडिलांचें नांव ठाकूरदास वंद्योपाध्याय असें होतें. त्यांची आर्थिक स्थिति ठीक नव्हती. ईश्वरचंद्रांना लहानपणापासूनच विद्येची गोडी लागली. आपल्या मुलाला उत्तम शिक्षण मिळावें म्हणून वडिलांनी ईश्वरचंद्रांना वयाच्या अवघ्या नवव्या वर्षीं कलकत्त्याला आणून तिथल्या संस्कृत कॉलेजांत दाखल केलें. दारिद्र्य व शरिराचें अनारोग्य यांच्याविरुद्ध झगडून ईश्वरचंद्रांनी आपला विद्याभ्यास पुरा केला.

१८४१ सालीं फोर्ट विलियम कॉलेजमध्ये मुख्य पंडित म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्याच वेळीं त्यांना 'विद्यासागर' ही पदवीहि मिळाली. १८५१ सालीं ते त्या कॉलेजचे प्राचार्य बनले. पुढे त्यांनी शाळाखात्यांत इन्स्पेक्टर म्हणूनहि काम केलें. तेवढ्या अवधींत त्यांनी पाठशाळांच्या जुन्या पद्धतींत फरक करून नवी शिक्षण-पद्धति सुरू केली. पुढे वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं मतभेद झाल्यामुळे त्यांनी आपल्या सरकारी नोकरीचा राजिनामा दिला आणि ते आपल्या सामाजिक व वाङमयीन कार्यांसाठी मोकळे झाले.



ईश्वरचंद्र विद्यासागर

स्वतःचें प्रारंभिक जीवन अत्यंत हालअपेष्टांत गेल्यामुळे गरींब जनतेबद्दल त्यांना अत्यंत कळकळ वाटे. त्यांनी कित्येक गरीब विद्यार्थ्यांना आणि दुर्दैवी असहाय्य विधवांना आर्थिक मदत केली. हा त्यांचा कनवाळू स्वभाव पाहून लोक त्यांना

'दयासागर' म्हणूं लागले. निर्धनांच्या सेवेंतच त्यांना खरा आनंद लाभत असे. त्यांनी स्वतःजवळचा बहुतेक पैसा रंजल्या-गांजल्यांसाठीच खर्च केला. समाजाच्या उन्नतीसाठी, अज्ञानांना सज्ञान करण्यासाठी, विशेषतः हिंदु बालविधवांच्या उद्धारासाठी ईश्वरचंद्रांनी आपली सारी बौद्धिक शक्तीहि खर्च केली. बंगालला सामाजिक सुधारणेचा प्रकाश त्यांनीच दाखविला.

असें सांगतात, की एका बालविधवेने आपल्याला पुढील जीवनाचा मार्ग दाखविण्याबद्दल ईश्वरचंद्रांची कळवळून प्रार्थना केली. त्या मुलीचा पुर्नविवाह घडवून आणणें हाच तिच्या दुःखपरिहाराचा उपाय होय, असें त्यांनी मनाशीं ठरविलें. पण त्या काळच्या समाजांत विधवेचा पुर्नविवाह ही कल्पनाहि महापाप समजली जात होती. कारण रूढि आणि धर्मशास्त्र दोहोंचाहि त्या गोष्टीला सक्त विरोध होता. म्हणून मग त्यांनी धर्मशास्त्राचें सूक्ष्म परिशीलन करायचें ठरविलें. त्या अभ्यासांत त्यांना विधवाविवाहाला अनुकूल असे किती तरी उल्लेख सापडले. त्या सर्वांची व्यवस्थित मांडणी करून त्यांनी विधवाविवाह या विषयावर एक पुस्तक लिहिलें. पण सनातनी पंडित त्यामुळे खवळले आणि त्यांचें खंडन करायला सरसावले. ईश्वरचंद्रांनी या विरोधकांना उत्तर देण्यासाठीहि बरेंच लेखन केलें. सनातनी पंडितांचा विरोध संस्कृत भाषेंतून व्यक्त होत होता, तर ईश्वरचंद्र त्या विरोधाला बंगाली भाषेंतून सविस्तर उत्तरें देत होते. त्यामुळे ईश्वरचंद्रांचे तद्विषयक विचार सर्व समाजांत प्रसृत झाले आणि त्यांना लोकमताची अनुकूलता लाभली. त्यांच्या या अदम्य प्रयत्नाला अखेर यश लाभलें आणि इ. स. १८५६ मध्ये विधवाविवाहाचा कायदा संमत झाला. याच कायद्यान्वयें विधवेची संततिहि कायदेशीर ठरली.

आपले विचार आचरणांत आणण्याच्या कामीहि ते कचरले नाहीत. त्यांनी आपल्या मुलाचें लग्न एका बालविधवेशींच लावलें. त्यांच्या कालापर्यंत कलकत्त्याच्या संस्कृत कॉलेजांत केवळ ब्राह्मण व वैद्य याच जातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत असे; पण ईश्वरचंद्रांनी चौफेर प्रयत्न करून समस्त हिंदूंना त्या कॉलेजचें द्वार खुलें करून दिलें. स्त्री-शिक्षणाचे ते प्रबळ समर्थक होते. श्री. बेथ्यून यांच्या साहाय्याने त्यांनी कलकत्ता येथे गर्लस्कूलची स्थापना केली व तिच्या संचालनाचा भारहि आपल्या शिरावर घेतला. या त्यांच्या प्रयत्नशील तळमळीमुळे बंगालमधील सारा स्त्रीसमाज त्यांना आपला उद्धारकर्ता या नात्याने मान देऊं लागला.

ईश्वरचंद्र हे परम मातृभक्त होते. आपली आई आजारी आहे, असें समजतांच ते पावसाळ्यांत धो धो वाहणाऱ्या नदींत उडी टाकून पैलथडीस गेले व आपल्या रुग्ण मातेस भेटले.

ईश्वरचंद्रांना आधुनिक बंगाली गद्याचे जनक मानतात. त्यांनी बंगाली भाषेला नवें वळण लावलें व तिला साहित्याचें समर्थ वाहन बनविलें. एक प्रकारें त्यांनी बंगाली भाषेचें पंगुत्वच दूर केलें. वासुदेवचरित, वेतालपंचविंशति, बांगलार इतिहास, जीवनचरित, बोधोदय, कथामाला, शकुंतला, सीतावनवास इ. अनेक ग्रंथ त्यांनी बंगाली भाषेंत लिहिले.

साधेपणा, निर्भयपणा, नीतिमत्ता इ. अलौकिक गुणांनी ते संपन्न होते. त्यांच्या मृत्यूमुळे आपल्यांतला एक समाजोद्धारक महापुरुष हरपला, असें बंगाली जनतेला वाटलें.

ईश्वरपुर भारतांतल्या शक्तिपीठांपैकीं एक. या ठिकाणीं सतीचा डाव्या हाताचा तळवा पडला होता. हें गांव खुलना जिल्ह्यांत आहे. [कल्याण–तीर्थांक]

ईश्वरपुरी (जन्म इ. स. १४३६) एक वैष्णवभक्त. याच्या पित्याचें नांव श्यामसुंदर राठी असें असून तो कुमारहट्टाचा आचार्य होता. ईश्वरपुरीने वेदांचें शास्त्रशुद्ध अध्ययन केलें होतें. पुढे माधवेन्द्रपुरीने याला वैष्णवधर्माची दीक्षा दिली व हा भक्तिमार्गाकडे वळला आणि महान् भक्त म्हणून प्रसिद्धीस आला. चैतन्य महाप्रभूला गया क्षेत्रांत याचें दर्शन झालें होतें व त्यामुळे चैतन्याने आपली यात्रा सफल मानली होती. प्रेमविलासादि अनेक वैष्णव ग्रंथांत ईश्वरपुरीचें वर्णन आलें आहे. [भा. सं.]

ईश्वरप्रणिधान योगशास्त्रांतला एक महत्त्वाचा शब्द. याचें लक्षण पुढीलप्रमाणे सांगितलें आहे—

अभिहितानामनभिहितानां च सर्वासां क्रियाणां परमेश्वरे परमगुरौ फलानपेक्षया समर्पणम् ।

(स. द. सं. पातं.)

अर्थ—उक्त किंवा अनुक्त अशा सर्व क्रिया परमेश्वर किंवा परमगुरु याला, फलाची आकांक्षा न धरतां समर्पित करणें, म्हणजे ईश्वरप्रणिधान होय.

ईश्वरयक्ष जैन दैवतसमूहांतील एक यक्ष. श्रेयांश नाथाचा सेवक. याचें वर्णन प्रतिष्ठा सारसंग्रहांत पुढीलप्रमाणे केलेलें आहे—

त्रिनेत्रोवृषवाहनः फलाक्षसूत्रसंयुक्तः
सत्रिशूलश्चतुर्भुजः ।

अर्थ– त्रिनेत्र, बैलावर बसलेला, फल, माला, त्रिशूल धारण करणारा. चतुर्भुज. (श्वेतांबर मतें मुंगूस, माला, दंड, व फल धारण करणारा.)

याची मूर्ति कलकत्त्याच्या संग्रहालयांत आहे. याचें नांव आणि लक्षणें पाहतां, हा यक्ष म्हणजे पुराणांतला शिवच असून तो जैनसंप्रदायांत यक्षरूपाने तीर्थंकराचा सेवक बनविला गेला आहे, असें दिसतें. [जै. इ.]

ईश्वरव्रत कोणत्याहि महिन्याच्या कृ. १४ शीस शिवाची पूजा करणें, हा या व्रताचा विधि आहे. फल– शिवलोकप्राप्ति [हि. ध.].

ईश्वरसंहिता कांजीवरम् येथे इ. स. १९२३ मध्ये ही पांचरात्र मताची संहिता प्रकाशित झाली. या संहितेंत एकूण २४ अध्याय असून, त्यांपैकी १६ अध्यायांत पूजाविधानाचें वर्णन आहे. इतर अध्यायांत मूर्तींचें विवरण, ध्यान, दीक्षा, मंत्र, प्रायश्चित्त, संयम, पावित्र्य इ. विषय वर्णिलेले आहेत. समस्त वेदांचा उगम एकायन वेद हा असून तो वासुदेवप्रणीत आहे असें या संहितेंत सांगितलें आहे.

एकायन वेद सृष्टीच्या प्रारंभीं अस्तित्व त होता. त्याच्यापासूनच इतर वेद निर्माण झाले. ते विकारवेद होत. या वेदांच्या उदयापासून मनुष्य संसारी बनला, म्हणून वासुदेवाने त्या वेदांपासून एकायन वेद अलग केला व सन, सनत्, सुजाति, सनक, सनंदन, सनत्कुमार, कपिल व सनातन अशा निवडक अधिकारी व्यक्तींना तो शिकविला. मरीचि, अत्रि, अंगिरस, इ. ऋषींनी नारायणाकडून या वेदांचें ज्ञान मिळविलें. याच वेदाच्या आधारावर एका बाजूने पांचरात्र संहिता व दुसऱ्या बाजूने मन्वादि धर्मशास्त्रें निर्माण झालीं, असेंहि यांत सांगितलें आहे. [भ. वि.]

ईसरदास (जन्म १६३८ इ. स.) जोधपूर राज्यांतील भाद्रेस गांवीं चारणकुलांत याचा जन्म झाला. याच्या पित्याचें नांव सूजा व आईचें नांव अमरबाई होतें. हरसूर व आशानंद असे त्याचे दोन चुलते होते व ते कवि म्हणून प्रसिद्धि पावले होते. ईसरदासाचा विवाह वयाच्या १४ व्या वर्षी झाला व लगेच त्याचे आईबाप वारले. त्यानंतर त्याचें शिक्षण व संगोपन आशानंदानेच केलें. दुर्भाग्यवशात् त्याची पत्नी देवलबाई त्याच्या एकविसाव्या वर्षी मरण पावली. त्यामुळे हा संसारांतून विरक्त झाला. पुढे त्याने आशानंदासह द्वारकेची यात्रा केली. तिथून परततांना वाटेंत जामनगर येथे त्याचा मुक्काम झाला. तोंवर कवि म्हणून ईसरदासाने बरीच प्रसिद्धि मिळविली होती. त्यामुळे जामनगरच्या जामसाहेबाने त्याला आपल्या दरबारांत बोलाविलें व त्याचा सन्मान केला. पुढे तो तिथेच राजाश्रयाने राहिला. जामनगरच्या दरबारांत त्याची प्रतिष्ठा उत्तरोत्तर वाढत गेली. सौराष्ट्रांतील राजांचें यशोगान करून त्याने जामसाहेबांचें प्रेमहि संपादिलें. जामसाहेबाने त्याचें दुसरें लग्न केलें. ईसरदास पुनश्च गृहस्थ बनला. त्याच दरबारांत पीतांबरभट्ट नामक एक संस्कृत पंडित होता. ईसरदासाने त्याच्याजवळ संस्कृत भाषेचें अध्ययन केलें. पुढे त्या दोघां गुरुशिष्यांत बेबनाव उत्पन्न झाला व ईसरदास आपल्या गुरूचा मत्सर करूं लागला, असें सांगतात; पण पीतांबरभट्टाच्या उदार अंतःकरणाचा त्याला एक दिवस साक्षात्कार घडला आणि त्याचें हृदयपरिवर्तन झालें. त्यापुढे तो केवळ शब्दज्ञानी कवि राहिला नाही, तर त्याने आध्यात्मक्षेत्रांतहि आपली पुष्कळ प्रगति केली. ईसरदास चाळीस वर्षें जामसाहेबाच्या आश्रयाला राहिला. त्यानंतर तो परत आपल्या जन्मभूमीस आला. आयुष्याच्या अखेरीस लूनी नदीच्या तीरीं गुडा गांवाजवळ एक पर्णकुटी बांधून तो राहूं लागला. वयाच्या ऐंशीव्या वर्षी त्याचा मृत्यु झाला.

राज्यस्थानांत त्याची एवढी कीर्ति झाली, की सर्व जनता त्याला 'ईसरा सो परमेसरा' = ईसरदास हा परमेश्वराचा अवतार आहे, असें समजूं लागली.

ईसरदासाचें समग्र काव्य राजप्रशंसा, हरिभक्ति आणि वीरगाथा अशा तीन विभागांत विभाजित करतां येतें. प्रशंसात्मक काव्यांत त्याची जामसाहेबाच्या प्रशस्तिपर असलेली कविता येते. भक्तिकाव्यांत त्याचा हरिरस हा ग्रंथ सर्वश्रेष्ठ ठरलेला आहे. या ग्रंथांत त्याने अनेक आध्यात्मिक रहस्यांवर विवेचन केलें आहे. प्रस्तुत ग्रंथ कर्म, उपासना व ज्ञान यांचा संगमच आहे, असें म्हटलें तरी त्यांत अतिशयोक्ति होणार नाही. तो म्हणतो. 'ईश्वर राम होवो वा कृष्ण होवो; तो त्याहि स्वरूपांत ईश्वरच आहे. त्याचें वर्णन होऊं शकत नाही. तो अथांग आहे, अग्राह्य आहे, अजात आहे, अतीत आहे.

भक्ताच्या हृदयांत निवास करणाऱ्या परमेश्वराचें वर्णन तो पुढीलप्रमाणे करतो—

तिलाँ तेल पोहप फुलेल, उज्झेलत सायर ।
अगनि काठे जोवन्न घट्ट, भगवट्ट सुकायर ।।
ईख रस्स अहि फेण, अरथ आगम-उरटाहे
पानाँ चंग मजीठ रंग, उछरंग विमाहे ।।

खरगनीर धीर अंतर खरा, मद कुंजर वपु जिम मयण ।
मन बसें तेम तूं सांहरे, मो मन बसियो महम्हण ।।

अर्थ– तिळांत तेल, फुलांत अत्तर, समुद्रांत तरंग, काष्ठांत अग्नि, शरिरांत यौवन, कायर पुरुषांत भगदड, उसांत रस, सर्पात झाग, वेदांत अर्थ, तांबूलांत उन्मत्तता, मंजिष्ठांत रंग, विवाहांत आनंद, तलवारींत पाणी, अंतःकरणांत सच्चाई, हत्तींत मद, जीवनांत काम तसा हे महामहिम परमेश्वरा, तूं माझ्या मनांत वसलेला आहेस.

ईसरदासाचा हा हरिरस ग्रंथ प्रातःपठनीय ठरला आहे. तो राजस्थानी भक्तमंडळींचा कंठमणि ठरला आहे. भक्त-भाविकांना त्याच्या पठनांतून आध्यात्मिक उपदेश लाभतो.

त्याच्या वीरकाव्यांत 'हालाँ झालाँ रा कुंडलिया' हें काव्य अद्वितीय मानलें जातें. ती दोन रणधुरंधर वीरांची गौरवगाथा आहे. राजपूत वीरांच्या नांवापुढे सिंह हा शब्द जोडलेला पाहून तो त्याचें रहस्य पुढीलप्रमाणे सांगतो–

एको लाखाँ आँगमें सीह कहीजै सोय ।
सूराँ जे थी रोड़ियै कळहळ ते थी होय ।।
सादूळौ आपा समौ बियौ न कोय गिणंत ।
हाक बिडाणी किम सहै धण गजियै मरंत ।।
केहरि मरूँ कळाइयाँ रुहिरज रत्तड़ियाँह ।
हेकणि हाथळ गै हणै दत दुहत्था ज्याँह ।।

अर्थ– सिंह त्याला म्हणावें, की जो एकटा लाखांची बरोबरी करूं शकतो. तो जिथे जिथे शूरांना घेरून टाकतो, तिथे तिथे कोलाहाल माजतो. स्वच्छंदगतीने संचार करतांना तो दुसऱ्या कोणाची पर्वा करीत नाही. तो दुसऱ्याचा हुंकारहि सहन करीत नाही. त्याची पत्नी त्याच्या रक्ताने भरलेल्या पंजांवर आपला जीव ओवाळून टाकते. कारण तिला माहीत असते, की आपल्या पतीने पर्वतप्राय हत्तीला एका प्रहारांतच लोळविलें आहे. वस्तुतः सिंह आकाराने लहान असतो; पण हत्तींचें मानमर्दन करून तो श्रेष्ठ ठरतो. [मरुभारती – मोहनलाल 'जिज्ञासु']

ईसुरी (१८३८–१९२३ इ. स.) विंध्य प्रदेशांतील एक कवि. याचा जन्म झांशीजवळच्या मेंढकी या गांवीं झाला. परंतु याचें आयुष्य मात्र विंध्य प्रदेशांतील छतरपुर गांवीं गेलें. हा ब्राह्मण होता. याचें शिक्षणहि बेताचेंच होतें. परंतु याची प्रतिभा असाधारण होती. त्या वेळचा छतरपुरनरेश विश्वनाथसिंह याने त्याला राजाश्रय देऊं केला; परंतु ईसुरीला तो सोन्याचा पिंजरा पसंत पडला नाही. ईसुरी हा प्रेमप्रधान कवि आहे. प्रेम हेंच जीवनाचें सर्वस्व, असें तो मानतो. [ज्योतिप्रसाद सक्सेना]

ईस्टर एक ख्रिस्ती सण. येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या स्मरणार्थ हा सण साजरा करतात. परंतु कांहीं लोकांचें म्हणणें असें, की प्राचीन अँग्लोसॅक्सन लोकांची ईस्टर नामक ऋतुदेवता होती व तिच्या प्रीत्यर्थ ते एप्रिल–मे महिन्यांत हा सण साजरा करीत असत. अन्य कांहीं लोकांच्या मताप्रमाणे प्राचीन काळीं प्रचलित असलेल्या विषुवदिनाच्या सणाचा हा अवशेष आहे.

ईस्टरच्या दिवशीं सूर्य नृत्य करतो, अशी जुन्या इंग्लिश लोकांची समजूत होती. म्हणून त्या दिवशीं ते पहांटे उठून सूर्याकडे तोंड करून बसत. कांहीं लोक पाण्याने भरलेलें भांडें उन्हांत ठेवीत आणि त्यांतलें पाणी हालवीत. पाणी हाललें, की त्यावर पडलेलें किरणहि नाचल्यासारखे दिसत. अशा रीतीने ते सूर्यनृत्य पाहत. आजदेखील आयर्लंडच्या कांहीं भागांतील लोक सूर्यनृत्य पाहण्यासाठी पहांटे लवकर उठतात.

हा सण कधीं करावा, याविषयीं ख्रिस्ती धर्मगुरूंत बराच वाद होता. पुढे इ. स. ३२५ त असें ठरलें, की २१ मार्चनंतर जी पौर्णिमा येईल, तिच्या पुढच्या रविवारीं ईस्टर सण धरावा. लीग ऑफ नेशन्सच्या कॅलेंडर कमिटीने याचा पुन्हा विचार केला व १९२८ मध्यें पार्लमेंटांत असा कायदा केला गेला, की एप्रिलमधील दुसऱ्या शनिवारानंतर येणारा रविवार हा ईस्टरचा दिवस मानावा. ईस्टरच्या दिवशीं अंडीं वांटण्याची प्रथा आहे. कारण अंडें हें पुनरुत्थानाचें जुनें प्रतीक आहे. [क. म.]

ईहाशिल ब्रह्मदेवाच्या मांड्यांपासून निघालेलीं तामस व राजस अशीं दोन विरोधी तत्त्वें. या विरोधी द्वंद्वामुळे स्त्री व पुरुष यांचा संयोग झाला (वायु पु. ८.३९. ४८.). [पु. इं.]

उंछवृत्ति शेतांतलें पीक कापून नेल्यावर तिथे पडलेल्या धान्याचा एकेक दाणा पक्ष्याप्रमाणें गोळा करून, त्यावर पंचमहायज्ञ करून निर्वाह करणें, याला उंछवृत्ति असें नांव आहे. उंछवृत्ति हा तपस्येचाच एक प्रकार आहे. [श. क.]

उंट हा शब्द उष्ट्र या संस्कृत शब्दावरून आला आहे. वैदिक साहित्यांत उष्ट्राचा अनेक ठिकाणीं उल्लेख आलेला आहे. हा सस्तन व रवंथ करणाऱ्या प्राण्यांपैकी आहे. उंट हा मानवजातीला अत्यंत उपयुक्त असा प्राणी आहे.

कोसन्‌कोस पसरलेल्या वालुका-मैदानांतून प्रवास करण्यासाठी व दूरचा प्रवास जलद पुरा करण्यासाठी याचा उपयोग होतो. उंटावर बसून निरोप पोंचविणाऱ्या स्वाराला सांडणीस्वार म्हणतात.

पाणिनीने याचे अनेक उपयोग सांगितलें आहेत. उंटाच्या समूहाला औष्ट्रक म्हणत (अष्टा. ४. २. ३९). उंट व खेचर यांच्या समिश्र तुकडीला उष्ट्रवामि असें नांव देत (अष्टा. ६. २. ४०). उंटाचे केस, चामडें व आंतडीं यांपासून भांडीं वगैरे पदार्थ बनवीत. सैन्यांत उंटांचा उपयोग करीत.

उंट जेव्हा मरतो, तेव्हा आपल्या जन्मभूमीची आठवण काढतो व मारवाड देशाकडे बघतो, असें म्हणतात. याच अर्थाची " उंट मरै जद मारवाड़ सामो जो वै । " अशी म्हण राजस्थानांत प्रचलित आहे. [पा. भा.; मरुभारती].

उंदीर एक नासधूस करणारा प्राणी. हा गणपतीचें वाहन म्हणून पुराणांत वर्णित आहे. गणेशचतुर्थीच्या दुसऱ्या दिवशीं उंदराला महानैवेद्य करण्याची कोंकणांत चाल आहे. त्या तिथीला ' उंदीरबी ' असें म्हणतात. गणपतीच्या ध्वजावरहि उंदीर असतो, असें अथर्वशीर्षांत म्हटलें आहे. उंदराच्या उत्पातासंबंधीं प्राचीन साहित्यांत उल्लेख मिळत नाहीत. जैन साहित्यांत खतरगच्छाचा आचार्य जिनप्रभसूरि याने मात्र एका उंदराला उपदेश केल्याचा उल्लेख जिनप्रभसूरिप्रबंधांत आलेला आहे. [मरुभारती]

उंदीर-मांजर एक खेळ. एक मोठी मुलगी आपल्या दोन्ही हातांत दोन मुलींचा एकेक हात पकडते. या दोन मुलींपैकी एकीला म्हणायचें उंदीर व दुसरीला म्हणायचें मांजर. प्रथम उंदीर पळूं लागतो आणि त्याला पकडण्यासाठी मांजर पळूं लागतें. उंदराला मांजराने धरलें म्हणजे हा खेळ संपतो. उंदीर-मांजर पळत असतां मधल्या मुलीलाहि गोल गोल फिरावें लागतें [व्या. ज्ञा. को.]

उंबऱ्या–उंबरी आगरी लोकांत लग्न ठरलें म्हणजे मुलाच्या अगर मुलीच्या राशींना जुळतील अशीं व ज्यांच्या राशीस गुरुबल आहे, अशीं दोन जोडपीं लग्नांतले मंगलविधी करण्यासाठी निवडतात. त्यांतल्या पुरुषाला उंबऱ्या व स्त्रीला उंबरी म्हणतात. यांनी उंबराचे टहाळे आणून मंडपस्थापना करायची असते. कोकणांत अनेक जातींत उंबरा–उंबरी निवडण्याची चाल आहे. ब्राह्मणादि जातींत उंबऱ्या–उंबरी नेमीत नाहीत; पण लग्न लागतांना बोहल्याजवळ दोन जोडपीं उभीं करणें व कळसवाणी आणण्यासाठी दोन जोडप्यांची योजना करणें, या स्वरूपांत ही चाल दिसते. [बदलापूर]

उंबेक कुमारिल भट्टाचा एक शिष्य. भवभूति व उंबेक या दोन्ही व्यक्ति एकच होत, असें कांही मानतात. दर्शनग्रंथांत उंबेक नामक आचार्याच्या मतांचा व वाक्यांचा अनेकदा उल्लेख येतो. कुमारिलाच्या श्लोकवार्तिकाच्या एका कारिकेवर उंबेकाने लिहिलेल्या टीकेचा, चित्सुखाचार्याच्या तत्त्वप्रकाशिका नामक ग्रंथावरील भगवान् नांवाच्या टीकाकाराने उल्लेख केला आहे. चित्सुखाचार्य विरचित चित्सुखी ग्रंथांत उंबेकाचा नामनिर्देश असून चित्सुखीच्या टीकाकाराने उंबक व भवभूति या व्यक्ति अभिन्न असल्याचें सांगितलें आहे. श्लोकवार्तिकावरील तात्पर्यटीका व मंडनमिश्राच्या भावनाविवेकावरील टीका, हे उंबेक रचित ग्रंथ उपलब्ध आहेत. **पाहा**–भवभूति. [पू. म. भा.]

उ नागरी लिपींतील पांचवा स्वरवर्ण. याला हल्लीचें स्वरूप प्राप्त होण्यापूर्वीं चार अवस्थांतून जावें लागलें आहे. पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार येथील शिलालेखांत (सनपूर्व ३ रें शतक) पाहायला मिळते. दुसरी अवस्था मथुरेच्या लेखांत (सनपूर्व १ लें शतक) दृष्टीस पडते. तिसरी अवस्था दुसरीच्या खालच्या रेघेला बांक पडून घडली आहे.



उ चा विकासक्रम

चवथें वळण राजा यशोधर्म याच्या वेळच्या मंदोसर लेखांतील (इ. स. ५३२) आहे. आजचा ' उ ' हा इ. स. ८३७ च्या जोधपूर लेखांत स्पष्ट व वळणदार असा पाहायला मिळतो.

याचें स्थान ओष्ठ असून हा ऱ्हस्व-दीर्घ–प्लुत भेदाने त्रिविध होतो. याचें वर्णन कामधेनु तंत्रांत पुढीलप्रमाणे दिलें आहे–

उकारं परमेशानि अधः कुण्डलिनी स्वयम् ।
पीतचम्पकसङ्काशं पञ्चदेवमयं सदा ।
पञ्चप्राणमयं देवि चतुर्वर्गप्रदायकम् ।।

अर्थ—हे देवि, उकार हा अधोभागीं कुंडलाकार होत असून तो पिवळ्या चांफ्यासारखा व पंचदेवमय आहे. हा पंच-प्राणात्मकहि असून चतुर्विध पुरुषार्थ प्राप्त करून देणारा आहे.

वर्णाभिधानांत याला शंकर, वर्तुलाक्षी, भूत इ. नांवें आहेत. मातृकान्यासांत उजवा कान हें याचें स्थान आहे. [श. क.; म. ज्ञा. को.]

उइके गोंड जमातींतील सर्वांत मोठी शाखा. या शाखेतले लोक सहा देवांना भजतात. दिंडोरी जिल्ह्यांतील या शाखेचे लोक सुतक असलेल्या घरांत जेवीत नाहीत किंवा कोणाच्या प्रेतयात्रेलाहि जात नाहीत. जावेंच लागलें, तर फार दुरून जातात. याचें कारण ते सांगतात, तें असें— एकदा एक परधान स्त्री तांब्याच्या भांड्यांत स्वयंपाक करीत असतांना तें भांडें फुटलें व ती स्त्री भाजली. त्या रात्रीं देवाने तिच्या स्वप्नांत येऊन सांगितलें, की तिच्या घरचे लोक बाराव्याचें जेवण जेवले म्हणून हा अपघात झाला. तेव्हांपासून या लोकांनी बाराव्याचें जेवण वर्ज्य केलें. बाराव्याप्रमाणेच हे बारशाचेंहि जेवण जेवीत नाहीत. उइके स्त्रिया पांढऱ्या मातीने घरें सारवीत नाहीत.

उकरडी नोतरवी गुजरातेंतील सोनारांचा लग्नाच्या आधी करायचा एक विधि. बायका दोन गोवऱ्यांमध्ये कापसाच्या सरक्या घालतात व गोवऱ्यां-भोवती लाल नाडा गुंडाळतात. नंतर तें गोवऱ्यांचे संपुट मंगल गीतें गात अंगणाच्या एका कोपऱ्यांत पुरतात. [ल. वि. सो.]

उक्थ (१) सामवेदाला उक्थ असें नांव आहे (उणादि कोष).

(२) उद्गाता ज्या सामांचे गान करतो, त्यांना उक्थ असें नांव आहे.


विप्रा उक्थेभिः कवयो गृणन्ति ।

(ऋ.३.६४.७.)

अर्थ— ब्राह्मण कवि सामांनी स्तुति करतात.

उक्थपात्र एक यज्ञीय पात्र. उक्थस्थालींतून या पात्रांत ग्रह घेऊन त्यांचा याग करतात. हें वायव्य पात्र आहे. तें बुंध्याशीं घोड्याच्या टापेएवढें जाड करतात. पाहा—वायव्य पात्र.

उक्थस्थाली सोमयागांतील एक मातीची स्थाली. निर-निराळ्या वेळचे सर्व उक्थ्यग्रह या स्थालीं-तून भरून घेतात.




उक्थस्थाली

हविर्धान मंडपांत असलेल्या खराच्या वायव्य कोपऱ्यावर ही स्थाली मांडतात.

उक्थ्य सप्त सोमसंस्थांपैकी एक संस्था. या यागांत पंधरा उक्थस्तोत्रें गातात व पंधरा उक्थशस्त्रें म्हटलीं जातात. आपस्तंब सांगतो, की गोधनाची इच्छा करणाऱ्याने हा याग करावा (१४.१.२). या यागांत सुत्येच्या दिवशीं इंद्र व अग्नि यांना उद्देशून अग्निष्टोमांत देतात त्यापेक्षां अधिक एक बकरा बळि देतात.

उख कृष्ण यजुर्वेदाच्या एका शाखेचा प्रवर्तक म्हणून पाणिनीने याचा उल्लेख केला आहे. [तर्पण]

उखा यज्ञांतील एक पात्र. उखा एका विशिष्ट पद्धतीने तयार करतात. ती तयार करण्यासाठी मंत्रपूर्वक माती खणतात व ती गाढवावरून यज्ञमंडपाजवळ आणतात. नंतर त्या मातींत खापराचे तुकडे, भाताच्या काड्या, बारीक वाळू, कृष्णाजिनाचे केस इ. पदार्थ मिसळतात व माती पाण्याने कालवून मंत्रपूर्वक उखा तयार करतात. टीचभर उंच व चोवीस अंगुळें लांब व तितकेंच रुंद, असें हें चौकोनी पात्र असतें. उखेचा आकार वाटोळा असावा, असा एक पक्ष सत्याषाढ श्रौतसूत्रांत सांगितला आहे (११.१.५३). आभिचारिक कर्म म्हणूनच यज्ञ असेल, तर उखा नऊ कोपरे असलेली बनवितात. नंतर गार्हपत्या-ग्नीच्या पुढे एक खड्डा खणून त्यांत सर्व बाजूंनी अग्नि घाल-तात व उखा चांगली भाजतात.




उखा

उखां करोतु शक्त्या बाहुभ्यामदितिर्धिया ।
माता पुत्रं यथोपस्थे साऽग्निं बिभर्तु गर्भ आ ।

(तै. सं. ४. १. ५).

अर्थ–अदिति आपल्या बुद्धीने, हस्तकौशल्याने व सामर्थ्याने ही उखा उत्पन्न करो. आई आपल्या मुलाला ज्याप्रमाणे मांडीवर घेते, त्याप्रमाणे कर्मसमाप्तीपर्यंत ही उखा (पुत्ररूप) अग्नीला आपल्या गर्भात धारण करो.

यजमानाच्या दीक्षाविधीच्या वेळीं उखेंत अग्नि उत्पन्न करतात, त्याला उख्याग्नि असें म्हणतात. यजमानाच्या गळ्यांत मुंज गवताचें एक शिंकें अडकवून त्यांत अग्नीसह उखा ठेवतात. दीक्षाकाल संपेपर्यंत उखा आसंदीवर किंवा यजमानाच्या गळ्यांत अडकविलेली असते. दीक्षेचा काल संपला म्हणजे गार्हपत्याग्नीच्या चयनावर उखेंतील अग्नि ठेवतात. मग महाग्निचयनाच्या जागीं मध्यभागीं वाळू भरून ती उखा ठेवतात व वर विटा मांडतात.



उखासंदी

तुंगभद्रेच्या कांठी उत्खननामध्ये एक उखापात्र सांपडलें असून तें धारवाड येथें आहे. हें पात्र सुमारें साडेतीन चार हजार वर्षांपूर्वीचें असावें. [विद्याधरशास्त्री भिडे]

उखाणा

यालाच संस्कृतांत प्रहेलिका असें नांव आहे. दैवकथेप्रमाणेच हा प्रकार प्राचीन आहे. याची बैठक केवळ धार्मिक व सांस्कृतिकच नाही; तर तो एक साहित्यप्रकारहि समजला जातो. ज्ञान व मनोरंजन हे त्याचे उद्देश आहेत. उखाण्यालाच आहाणा, कोहाडा, उमान किंवा उमाण असे प्रतिशब्द आहेत. हिंदीत याला पहेली म्हणतात. पहेली हा प्रहेलिकेचा अपभ्रंश आहे. बंगालींत ध्यामधा, कानडींत आंगणु, तेलुगूंत विडिकथ व तमिळ आणि मल्याळम्‌मध्ये विडिकदाई, असे त्याला प्रतिशब्द आहेत. ब्रह्मदेवाने आपल्या कन्येशीं संभोग केला, त्याच्या निषेधार्थ त्याच्या 'अगुणां'चें वर्णन सुरू झालें. त्यांतूनच उखाण्याची म्हणजे प्रहेलिकेची उत्पत्ति झाली. ब्रह्मदेवाच्या पूजेचा निषेध भारतांत सार्वत्रिक आहे. लग्नांतल्या उखाण्यांतली अश्लीलता यांतूनच पुढे आली असें दुर्गा भागवत सांगतात.

प्रश्न व उत्तर या दोहोंतून उखाणा बनतो. प्रश्नांत रूपकाच्या आश्रयाने एखादी गोष्ट लपविली जाते व उत्तरांत तिचा गौप्यस्फोट होतो. गोपन हा उखाण्याचा प्राण होय. अन्य कोणत्याहि साहित्यिक परंपरेपेक्षा उखाण्यांतून लौकिक कल्पकता अधिक आढळते. त्याची घडण नेटकी व हृद्य असते. उखाण्याची सांस्कृतिक पार्श्वभूमि विस्तृत आहे. मनोरंजक उखाणे सोडले, तर बाकीचे उखाणे महत्त्वाच्या प्रसंगीं वापरायचे असतात, असा प्राचीन काळापासून संकेत आहे. मानवी जीवनांतले महत्त्वाचे प्रसंग म्हणजे पावसाचें येणें-जाणें, शेतीची लावणी, लग्नादि संस्कार व मर्तिक हेच प्रामुख्याने होत. अशा प्रसंगीं उखाणे घालण्याची प्रथा जागतिक आहे (The Standard Dictionary of Folk lore II P. 940). भारतांतला उखाणाहि वेदकालापासून प्रचलित आहे. ब्रह्मोद्य असें त्याचें वैदिक नांव आहे. (ब्रह्मोद्य पाहा). ऋग्वेदांत पुढील उखाणा आढळतो–

सप्त युञ्जन्ति रथमेकचक्रमेको अश्वो वहति सप्तनामा।
त्रिनाभि चक्रमजरमनर्वं यत्रेमा विश्वा भुवनाधि तस्थुः॥

(ऋ. १.१६४.२)

अर्थ– सातजण एक एकचाकी रथ फिरवितात. तो रथ एक 'सात' नांवाचा घोडा ओढतो. त्या चाकाला विनधावेच्या आणि फिरतांना न थांबणाऱ्या अशा तीन अऱ्या आहेत. त्या चाकांत प्राणिमात्र राहतात. याचा आशय असा–

सात पुरोहित यज्ञाच्या योगाने सूर्याचा रथ चालवितात. हा रथ सात घोडे ओढतात. सूर्यरथाच्या चाकाला तीन ऋतूंच्या तीन अऱ्या आहेत. या ऋतुचक्रांत सारे प्राणी जगतात.

खेळांतल्या उखाण्यांचा प्रकार मुलांमध्यें आढळतो, त्याचा एक नमुना असा–

घमघम घमाटा सोन्याची घंटा
विषाचा कांटा आंत गोड गोटा

फणसाच्या आंतले पिवळे धमक गरे, पिकल्याचा दरवळ आणि त्यावरचे कांटे, यांना उद्देशून हा उखाणा आहे.

एवढेंसें पोर वरून खातें ; खालून हगतें

हा जात्यावरचा उखाणा आहे.

सुक्या विहिरींत पाखरें फडफडतात

हा कढई व लाह्या ह्यांच्यावरचा उखाणा आहे.

दो बहिनों बहिनोंका जुडगया हेत
दो बहिनोंके पेटमें लडका एक

दोन बहिणी, त्यांचें मन जुळलें. त्या दोघींच्या पोटांत मिळून एकच बालक जन्मलें. हा छत्तीसगडी परधानांतला उखाणा असून याचा आशय दोन शिंपल्यांतलें एक मोती किंवा आकाश-पृथ्वी यांच्या आंतली सृष्टि असा आहे.

उखाण्यांत ग्राम्यता व अश्लीलताहि पुष्कळदा आढळते. कांही ठिकाणीं रचना अश्लील; पण उत्तर श्लील असतें तर कांहीं ठिकाणीं रचना श्लील; पण उत्तर अश्लील असतें.

नांव घेण्याचे उखाणे हे प्रश्नविरहित उखाण्यांचें उत्तम उदाहरण होय. यांत केवळ गोपनक्रिया असते. बायकोने नवऱ्याचें व नवऱ्याने बायकोचें नांव घेऊं नये, हा संकेत सर्व भारतभर आहे. नांव घेतलें तर त्या व्यक्तीचें आयुष्य कमी होतें, हा त्यामागचा संकेत. एका प्रसिद्ध श्लोकांत याचा निर्देश आला आहे –

आत्मनाम गुरोर्नाम नामातिकृपणस्य च ।
श्रेयस्कामो न गृह्णीयात् ज्येष्ठापत्यकलत्रयोः ।।

अर्थ– ज्याला श्रेयाची कामना असेल त्याने स्वतःचें, गुरूचें, अतिकृपणाचें, थोरल्या मुलाचें आणि पत्नीचें नांव घेऊं नये.

पण महाराष्ट्रांत आणि विकल्पाने कर्नाटकांत लग्नादि मंगलप्रसंगीं पत्नीने पतीचें व पतीने पत्नीचें नांव घेण्याची पद्धत आहे. मात्र तें सुटें न घेतां उखाण्यांत गुंफून घ्यायचें असतें. शब्दांच्या अवडंबरांत गुंफून नांव घेतल्यामुळे तें मृत्यूच्या कानांत पडत नाही, अशी समजूत असते. नांव गुप्त राखणें हा आदिम संस्कृतीचा एक विशेष व अवशेषहि आहे. लग्नांत नवरी मुलगी आपल्या पतीचें नांव पुढीलप्रमाणे घेईल —

(१) **लवंगी वाडी बदामी बंगला**
××× रावांच्या प्रपंचांत जीव माझा रंगला
(२) **मोठे मोठे डोळे पाहण्याची खुबी**
××× रावांची छबी माझ्या नजरेसमोर उभी
(३) **द्राक्षांच्या वेलीला त्रिकोनी पान**
××× रावांचं नांव घेतें राखतें सर्वांचा मान
(४) **संसाररूपी सागरांत पतीपत्नींची नौका**
××× रावांचं नांव घेतें कान देऊन ऐका

नवरा मुलगा आपल्या नववधूचें नांव घेण्यासाठी पुढील उखाणा घेईल ––

भाजींत भाजी मेथीची
××× माझ्या प्रीतीची

भारतभरचे लग्नविधी पाहिले, तर सांकेतिक अश्लीलता, शिवराळपणा व भांडकुदळपणा हे प्रकार सर्वत्र आढळतील. मध्यप्रदेशांत या प्रकाराला 'भडौनि' असेंच म्हणतात. लग्नांत असे अनेक अश्लील व बोचक उखाणे घालून विहिणी अन् करवल्या यांची एकमेकांवर तोंडसुख घेण्याची जणू स्पर्धाच लागते. उदाहरणार्थ ––

आळा गोटा, निळा गोटा
विहीणबाईचा ठमकाराच मोठा
नवरा नवरी सुताएवढी
नवऱ्याची आई भुताएवढी

झिम्मा, फुगडी वगैरे खेळ खेळतांनाहि मुली एकमेकींना उखाणे घालतात. फुगडींत दोनच मुली असतात. तेव्हां उखाण्यांची स्पर्धा रंगते ––

गुलाबाचें अत्तर डबीमधे
××× चा नवरा पेटीमधे
पाठीवर शेपटा लडबडतो
म्हातारा नवरा बडबडतो

अशा प्रकारें या उखाण्यांतून एकमेकींचीं उणींदुणीं काढलीं जातात. चेष्टेचे आणि उपहासाचे महार समाजांतले उखाणेहि मनोरंजक असतात. त्यांतला एक नमुना असा ––

अशी लेक साळ्याची
भाकरी खाईना राळ्याची
पाणी पिईना झाडूचं
काम करीना कवडीचं
कांदा खाईना पातीचा
नवरा मागते जातीचा

उखाणा आणि कथा यांची सांगडहि कांही ठिकाणीं आढळते. देशावर कुणबी लोकांत नांव घेण्याच्या वेळीं जो उखाणा घेतात, त्यांत असे कांही कथाप्रसंग गुंफलेले आढळतात. शेवटीं त्या कथेचा संबंध नवऱ्याशीं आणून त्याचें नांव घ्यायचें असतें. उदाहरणार्थ ––

आड भिंत पड भिंत, पड भिंतींत कोनाडा, त्यांत पांच गहू, त्यांत जल्मले पांच भाऊ, त्यांत एक जल्मला तिरशिंगराव, जाऊ नगराला, नगराशेजारी भिंगार (एक गांव), बांधल्या भाकरी जाऊ रोजगाराला, रोजगार जयंतसिंग, घरची अस्तुरी मावसबहीण, एक भाकरीचं बांधलं पीठ, भाकरीची नाही शुध, पोळचा जेवला सासुरवाडी, तीनशेंची घेतली गाडी, तिचा केला चकणाचूर, मग पाहिला मोती मोर, बाळपणींचा पटका, बाळपणींची बंडी, अस्तुरपणाची लेंडी, त्या बंडीची काय वाट, महाबळेश्वरीं (एक गांव) सभा दाट, दांडा मोडला खांडासाठी, रुपया मोडला पानासाठी, येवढा सायास कोणासाठी, ××× च्या नांवासाठी.

उखाण्यांत लैंगिकतेला गोपनाने भूषवून निर्मितीचें आवाहन केलेलें असतें आणि हा प्रकार प्राचीन कालापासून अद्ययावत चालू आहे. **पाहा** – प्रहेलिका. [अनसूया लिमये; लो. सा. रू.]

उखार अघोरपंथी साधु. हे सुरापान व अभक्ष्यभक्षण करतात. यांचा पंथ सुखार व रुखार या शैव पंथांतून निघाला असावा. हे स्वैराचारी असतात. **पाहा** – रुखार, सुखार.

उग्र (१) एक जात. बृहदारण्यकांतील उल्लेखावरून हे राजाचे सरदार असावे, असें वाटतें (४. ३. ३०). पुढे क्षत्रिय पुरुष व शूद्र स्त्री यांच्या संततीला उग्र असें नांव मिळालें (याज्ञ. १. ९१). ऋग्वेदांत उग्रांचा उल्लेख आहे (१०. ९७. १२). बौधायन, मनु व याज्ञवल्क्य सांगतात, की ही अनुलोम जात असून क्षत्रिय पुरुष व शूद्र स्त्री यांची संतति आहे. गौतमाच्या मतें ती वैश्य पुरुष व शूद्र स्त्री यांची संतति होय. मनु सांगतो, की बिळांत राहणाऱ्या प्राण्यांना पकडून व मारून त्यावर त्यांनी उपजीविका करावी (१०. ४९). उशनस् सांगतो, की त्यांनी राजदंड हातीं घेऊन राहावें व गुन्हेगारांच्या शिक्षा अमलांत आणाव्या. सह्याद्रि-खंड व शूद्रकमलाकर या ग्रंथांत उग्रांना राजपूत म्हटलें असून जातिविवेकांत राऊत म्हटलें आहे.

(२) शिवाचें एक रूप (मस्त्य पु. २६५. ४१; वायु पु. २७. १५). याच्या पत्नीचें नांव दीक्षा असून पुत्राचें नांव संतान आहे. हें महादेवाचें सातवें नांव होय.

(३) अकराव्या द्वापारांतील चार पुत्रांसह भगवंताचा अवतार (वायु पु. २३. १५२). [पु. इं; हि. ध.]

उग्रचंडा शाक्त पंथाची एक देवता. हिचें वर्णन पुढील प्रमाणे आहे—

या मूर्तिः पोडशभुजा भद्रकालीति विश्रुता ।
तथैवमूर्तिर्बाहुभ्यामपराभ्यां तु बिभ्रती ॥
दक्षिणाधो गदां वामपाणिना पानपात्रकम् ।
सुरापूर्णं च शिरसा मुंडमालां बिलेशयम् ॥
भिन्नाञ्जनचयप्रख्या प्रचंडा सिंहवाहिनी ।
रक्तनेत्रा महाकाया युक्ताष्टादशबाहुभिः ॥

अर्थ–षोडशभुजा भद्रकालीप्रमाणेच उग्रचंडेची मूर्ति असून तिच्यापेक्षा हिला दोन हात अधिक आहेत. तिच्या या दोन हातांपैकी उजव्या हातांत गदा व डाव्या हातांत मदिरापात्र आहे. तिच्या गळयांत नररुंडांची माला असून डोक्यावर सर्पानें फणा धरली आहे. ती सिंहारूढ असून प्रचंड देह, अठरा भुजा व लाल डोळे, यांमुळे भयंकर उग्र दिसते.

कौशिकी, शिवदूती, हैमवती, ईश्वरी, शाकंभरी, दुर्गा, महोदरी या उग्रचंडेच्या सख्या होत. [बी. के. बारुआ – गोडे गौरवग्रंथ.]

उग्रतारा दुर्गेचें एक रूप. उग्र किंवा भय यांपासून भक्तांना तारते, ती उग्रतारा होय, अशी तिच्या नांवाची निरुक्ति सांगितली आहे. ही मातंगीच्या देहांतून निर्माण झाली. हिमालय हें हिचें स्थान होय. हिला कालिका किंवा कामाख्या असेंहि म्हणतात. पाहा–कामाख्या. [श. क.]

उग्र नक्षत्रें तीन पूर्वा, मघा व भरणी हीं उग्र नक्षत्रें होत. हीं शुभ कार्यांस वर्ज्य मानतात. पाहा–नक्षत्रें.

उग्रपीठ इमारत बांधण्यापूर्वी त्या क्षेत्राचे ३६ सारखे चौरस विभाग पाडतात; या विभाग रचनेला

वायु	मुख्य	सोम	अदिति	ईश
शोष	रुद्र	भूधर	आपवत्स	जयंत
वरुण	मित्र	ब्रह्मा	आर्यक	आदित्य
सुग्रीव	इंद्र	विवस्वत्	सवित्र	भृश
पितृ	भृंगराज	यम	वितथ	अग्नि

उग्रपीठ

उग्रपीठ असें नांव आहे. [एन्सा. हिं. आ.]

उग्र महाकाली महाकाली पाहा.

उग्ररथशांति मनुष्याच्या वयाला साठ वर्षें पूर्ण झालीं म्हणजे उग्ररथशान्ति करतात. या वयांत माणसाला येणारी शारीरिक व मानसिक विकलता नष्ट होऊन त्याला दीर्घायुरारोग्य प्राप्त व्हावें व अपमृत्यु टळावा, म्हणून या शान्तीचें विधान सांगितलें आहे —

अशेषविघ्नशान्त्यर्थं सर्वदोषप्रशान्तये ।
षष्ठचब्दसन्धौ कर्तव्या शान्तिरुग्ररथाभिधा ॥

अर्थ — सर्व विघ्नें व सर्व दोष यांची शान्ति व्हावी म्हणून साठाव्या वर्षाच्या संधींत उग्ररथ नामक शान्ति करावी.

साठाव्या सबंध वर्षालाच उग्ररथ असें नांव असून, तें वर्ष लागल्यावर किंवा पूर्ण झाल्यावर ही शांति करायची असते, म्हणून हिला षष्टयब्दपूर्तिशान्ति किंवा षष्टितमाब्दिशान्ति असें

नांव आहे. मार्कंडेय ही या शान्तींतील प्रधान देवता असल्यामुळे हिला मार्कंडेयशान्ति असेंहि म्हणतात.

बौधायन गृह्यशेषसूत्रांत (५·८) या शांतीचा विधि दिला आहे, तो असा ––

जन्मनक्षत्रावर किंवा जन्म झाला असेल त्या महिन्यांत शान्ति करावी. प्रथम अग्निस्थापना करून त्याच्या आग्नेय दिशेला कलशावर मृत्युदेवतेची सुवर्णप्रतिमा स्थापून तिची पूजा करावी. प्रधान होमाच्या वेळीं मृत्युदेवतेला शिजलेल्या अन्नाच्या व घृतसूक्ताने आज्याच्या आहुती द्याव्या. अग्निमुख विधीप्रमाणे सर्व कर्म केल्यावर यजमानाला अग्नीच्या पश्चिमेला बसवून मृत्युसूक्त, आयुष्यसूक्त व अभिषेकमंत्र म्हणून त्याला अभिषेक करावा.

ब्रह्मकर्मादि इतर ग्रंथांतहि उग्ररथशान्तीचा प्रयोग दिला आहे, तो पुढीलप्रमाणे ––

प्रथम प्रायश्चित्त विधि करून आत्मशुद्धि करावी. विधिपूर्वक स्नान, पंचगव्य प्राशन व गायत्री पुरश्चरण किंवा सहस्र गायत्री जप करावा. नंतर पुण्याहवाचन करून लिंगतोभद्रमंडलदेवतांची स्थापना व पूजा करावी. मार्कंडेय या प्रधान देवतेची सुवर्णप्रतिमा करून ती कलशावर मांडावी. मृत्यु व यम या दोन अधिदेवता–प्रत्यधिदेवता प्रधान देवतेच्या दोहीं अंगीं मांडून अश्वत्थामा, बलि, व्यास, इ. सप्त चिरंजीव व तिथि, मास व नक्षत्र यांच्या देवतांचीहि त्याच पीठावर स्थापना करावी.

मार्कन्डेय महाभाग सप्तकल्पान्तजीवन ।
आयुरारोग्यमैश्वर्यं देहि मे मुनिपुङ्गव ।।

अर्थ –– हे सप्त कल्पांच्या अंतापर्यंत जगणाऱ्या, मुनिश्रेष्ठ, मार्कंडेय, महाभागा, तूं मला आयुरारोग्य व ऐश्वर्य दे.

या मंत्राने मार्कंडेयाचें पूजन करावें. नंतर प्रधान होम करून ग्रह, लोकपाल व मृत्युंजय यांना आहुती द्याव्या. नंतर तीळ, दूर्वा, दूध, आज्य, परमान्न, या हविर्द्रव्यांच्या प्रत्येकीं एकशें आठ किंवा एक हजार आठ आहुती देऊन प्रधान देवतेसाठीं होम करावा. शेवटीं 'समुद्रादूर्मि...'(ऋ. ४. ५८) या सूक्ताने पूर्णाहुति द्यावी व नंतर वसोर्धारा करावी. या वेळीं रुद्राध्यायांतील चमकानुवाक व 'अग्निमीळे...'(ऋ. १. १) इ. सूक्तें म्हणावीं. मग कलशांतील जलाने यजमानाला अभिषेक करावा. अभिषेकानंतर देवतांचे विसर्जन करावें व यजमानाने आचार्याला देवतापीठ दान द्यावें. [विद्याधरशास्त्री भिडे]

उग्राणी

द. भारतांतील एक जात. कारवारच्या दक्षिणेस हे लोक आढळतात. हे ग्रामसेवकाचें काम करतात व गांवांतील धान्याचीं कोठारें, खजिना व भूतस्थानें यांवर पहारा करतात. १९०७ सालीं सरकारने यांना गांवपोलिसाचीं कामें दिलीं व तेव्हापासून ते आपल्या दंडावर 'ग्रामपोलिस' अशीं अक्षरें असलेला पितळी बिल्ला लावूं लागले. चोरी, घरफोडी, आत्महत्या इ. गुन्हे, जमिनीबाबतचे तंटे, फकीर, वैरागी व दुर्वर्तनी इसमाचें गांवांत आगमन व वास्तव्य, रस्ते, पूल, गुरांचे कोंडवाडे व सरकारी झाडें इ. चें नुकसान, या सर्व गोष्टी त्यांना तालुक्याच्या मामलेदाराला कळवाव्या लागतात. [का. ट्रा. स. इं.]

उग्रेश्वर

वाराणसींतलें एक तीर्थ. लक्ष्मीलिंगाच्याजवळ पश्चिमाभिमुख उग्रेश्वराचें लिंग असून तें पापनाशक आहे. [क्षे. क. त.]

उचली नृत्य

या नृत्यांत पुरुष आपल्या जोडीदार तरुणीला उंच उचलून धरून नाचतो, म्हणून या नृत्याला हें नांव मिळालें आहे. हें जादूविद्येतलें एक जागतिक नृत्य आहे. या नृत्यांत प्रजोत्पादनाची क्षमता असते, असें पुष्कळ जमाती मानतात.

उचले

एक जात. यांना गांठचोर असेंहि नांव आहे. पुणे जिल्ह्यांतील भीमथडी, हवेली, खेड व शिरूर या तालुक्यांत यांची वस्ती आहे. मुळांत हे तेलंगणांतले असावे. कारण हे आपसांत मोडकी तोडकी तेलुगु भाषा बोलतात. हे पूर्वी लोकांच्या घरांत शिरून किंवा गर्दीच्या ठिकाणीं जाऊन चोरी करीत. खिसे कापण्यासाठी त्यांच्याजवळ कोयत्याच्या आकाराची बारीक सुरी असे. ती ते तोंडांत किंवा जिभेखाली लपवून ठेवीत.

उचल्यांच्या टोळींत महार, मांग सोडून कोणाहि हिंदूला प्रवेश मिळतो. उचल्यांच्या जातींत शिरण्यापूर्वी माणसाला बराच विधि करावा लागतो. प्रथम उचल्यांच्या जातींतल्या सर्वांची संमति मिळवावी लागते व प्रवेशशुल्क म्हणून १५ ते २५ रुपये द्यावे लागतात. एवढें झाल्यावर ते लोक या नव्या इसमाला आंघोळ घालून नवा पोषाख देतात. नंतर एक वृद्ध उचल्या त्याच्या तोंडांत चिमूटभर हळद व साखर टाकतो. नंतर भोजनाच्या वेळीं हा नवा उचल्या व दोन तीन वृद्ध उचले एका ताटांत जेवतात. अशा रीतीने हा विधि संपतो. या नव्या उचल्याला कोणत्या तरी एका आडनांवाचा पुरुष आपला कुटुंबीय मानतो व दुसऱ्या आडनांवाचा इसम त्याला आपली मुलगी देतो. या सर्व गोष्टी वाजंत्री लावून होतात. [बॉ. बे. ग्रा.; म. ज्ञा. को.]

उच्च-नीच विशिष्ट राशींत सूर्यादि ग्रह हे उच्च किंवा नीच होऊन चांगलीं-वाईट फलें प्रकर्षानें देतात. ग्रहांच्या उच्च-नीच राशींचें कोष्टक पुढीलप्रमाणें--

ग्रह	उच्च राशि	नीच राशि
सूर्य	मेष	तुला
चंद्र	वृषभ	वृश्चिक
मंगळ	मकर	कर्क
बुध	कन्या	मीन
गुरु	कर्क	मकर
शुक्र	मीन	कन्या
शनि	तुला	मेष

जातकांत ग्रहांचें उच्च-नीच स्थान पाहून फल वर्तविण्याची पद्धत आहे.

उच्चाटन एक आभिचारिक प्रयोग. भूत, प्रेत, पिशाच व शत्रु यांचें त्यांच्या स्थानावरून उच्चाटन व्हावें, या उद्देशानें उच्चाटनाचे विविध प्रयोग केले जातात. या प्रयोगांनी कार्य सिद्ध होतें, अशी प्राचीन काळापासून सार्वभौम श्रद्धा आहे. आजच्या वैज्ञानिक युगांतहि ही श्रद्धा नष्ट झालेली नाही. जारण-मारण, उच्चाटन इ. प्रयोग करणारे कांही मांत्रिक असतात. ते लिंबाला सुया टोचणें, गुलाल शिंपडून भाताचा बळि देणें, कागदावर किंवा भूर्ज-पत्रावर यंत्र तयार करून त्यांत मंत्राचीं अक्षरें लिहिणें इ. प्रयोग करतात. या उच्चाटनाचा विधि मंत्रमहोदधींत पुढील-प्रमाणें दिला आहे--

कृष्ण चतुर्दशीस पडक्या घरांत कुक्कुटासन घालून दक्षिणा-भिमुख बसावें. केस मोकळे सोडावे. निळें वस्त्र नेसावें. माळेच्या ऐवजी गांठी घातलेली दोरी हातांत घेऊन पुढील मंत्र २००० वेळां जपावा.

ॐ ब्लूंस्लूंम्लूंक्ष्लूंकालरात्रिमहाध्वांक्षिअमुकमाशूच्चाटयो-च्चाटय छिन्धि छिन्धि भिन्धि भिन्धि स्वाहा हौं कामाक्षि क्रोम् ।

जप पुरा झाल्यावर २०० संख्येने मोहऱ्यांचें हवन. नंतर तेल व पाणी यांनी युक्त अशा मोहरीच्या पेंडीचें बलिदान. [मं. म.]

उच्चैःश्रवा समुद्रमंथनांतून निघालेला घोडा. चौदा रत्नांत याची गणना आहे. हा इन्द्राचें वाहन आहे. याचा रंग पांढरा असून अमृत हें याचें खाद्य आहे. याला सात तोंडें आहेत. गांधर्वीच्या पोटीं याचा जन्म झाला (ब्रह्मांड पु. ३. ३. ७६; मत्स्य पु. ८. ८). दसऱ्याच्या दिवशीं घोड्याची पूजा करतात, ती तो उच्चैःश्रव्याचा प्रतिनिधि म्हणून. त्या पूजेचा विधि असा--

सकाळीं पाणवठ्यावर नेऊन घोड्याला धुतात. त्याच्या गळ्यांत फुलांच्या माळा, पाठीवर शेला, पायांत तोडा वगैरे अलंकार घालून त्याला शृंगारतात. दुपारीं त्याची मिरवणूक काढतात. या अश्वपूजेचा मंत्र असा--

गंधर्वकुलजातस्त्वं मा भूयाः कुलदूषकः
ब्रह्मणः सत्यवाक्येन सोमस्य वरुणस्य च ।।
प्रभावाच्च हुताशस्य वर्धय त्वं तुरङ्गमान् ।
रिपून् विजित्य समरे सहभर्त्रा सुखी भव ।।

अर्थ--हे अश्वा, तूं गंधर्वकुलांत उत्पन्न झाला आहेस. तरी तूं कुलदूषक होऊं नकोस. ब्रह्मदेवाच्या सत्य वाक्यानें व सोम, वरुण, अग्नि, यांच्या प्रभावानें तूं (माझ्या) घोड्यांची वृद्धि कर व युद्धांत शत्रूंना जिंकून धन्यासह सुखी हो.

उच्छिष्ट भुक्तावशेष = खाऊन उरलेलें. दुसऱ्याच्या पानांतलें उरलेलें किंवा दुसऱ्यानें तोंड लावून टाकलेलें खाऊं नये; खाल्ल्यास त्या दोषाबद्दल प्रायश्चित्त करावें, असें आपल्या धर्मशास्त्रांत सांगितलें आहे (विष्णुस्मृति). याबावतचे नियम पुढीलप्रमाणें--

शूद्रोच्छिष्टाशने च वमनं कृत्वा सप्तरात्रमुपवसेत्

अर्थ--शूद्राचें उच्छिष्ट भक्षण केलें असतां तें ओकून टाकून सात दिवस उपवास करावा.

चांडलपतितादीनामुच्छिष्टान्नस्य भक्षणे ।
द्विजः शुध्येत् पराकेण शूद्रः कृच्छ्रेण शुध्यति ।।
(अंगिरसस्मृति)

अर्थ--चांडाल, पतित, इ. च्या उच्छिष्टाचें भक्षण केलें असतां ब्राह्मण पराक प्रायश्चित्तानें व शूद्र कृच्छ्र प्रायश्चित्तानें शुद्ध होतो.

मात्र कांही उपासना संप्रदायांत गुरूचें उच्छिष्ट खाण्या-विषयीं अनुरोध आहे. जुन्या काळीं बायकोनें नवऱ्याच्या उष्ट्या ताटांत जेवणें ही गोष्ट पत्नीधर्मांत गणली जात असे. [श. क.]

उच्छिष्ट गणेश उत्तराम्नायांत याच्या प्रतिमेचें लेखन पुढीलप्रमाणे सांगितलें आहे--

पद्मासन घातलेला, उन्मत्त, त्रिलोचन, रक्तवर्ण व चतुर्भुज, चार हातांत अनुक्रमे पाश, अंकुश, मोदकपात्र व दंत धारण करणारा असा उच्छिष्ट गणेश रेखावा. दुसरा पर्याय असा--

श्वेतार्क किंवा मर्कतीकाष्ठ यांच्या मुळाची अंगुष्ठमात्र प्रतिमा करावी किंवा रक्तपद्मासनावर बसून चाप, बाण, धनुष्याची दोरी व अंकुश हीं चार आयुधें चार हातांत धारण करणारा व नग्न शक्तीशीं रतिक्रीडा करणारा, अशी याची प्रतिमा करावी. याचा मंत्र श्रीविद्यार्णवतंत्रांत पुढीलप्रमाणें दिला आहे––

ॐ नमो भगवते एकदंष्ट्राय हस्तिमुखाय, लंबोदराय, उच्छिष्टमहात्मने आं क्रीं ऱ्हीं ग घे घे स्वाहा।

तंत्रमार्गांतले वामाचारी लोक या गणपतीची आराधना करतात. उच्छिष्टगणपतिपंथाचे अनुयायी जातीपातींचा भेद मानीत नाहीत. मद्य व मैथुन हे दोन 'म' कार या पंथांत विहित आहेत. या पंथाचे लोक कपाळावर लाल टिळा लावतात.

उच्छिष्ट चंडाली तंत्रमार्गांतील एक देवता. ही प्रेतावर बसणारी असून हिच्या गळयांत गुंजांच्या माळा असतात. हिच्या एका हातांत खड्ग व दुसऱ्या हातांत कपाल असतें. दुसरा पर्याय म्हणजे ती रक्तवस्त्र नेसून शूल व वीणा धारण करते. [श्रीविद्यार्णवतंत्र]

उच्छिष्ट पिशाचयंत्र व्यापार आणि उदीम करणाऱ्या व्यक्तीच्या मार्गांत जर कोणी अडथळे आणूं लागला, तर त्याला प्रतिबंध करण्यासाठी उच्छिष्ट पिशाचयंत्राचा प्रयोग करतात. स्वतःच्या रक्तांत गोरोचन मिसळून त्या मिश्रणाने भूर्जपत्रावर हें यंत्र काढतात. नंतर त्याची पूजा करतात. मग 'ॐ आकर्षय स्वाहा' हा मंत्र म्हणत त्या यंत्राचे तुकडे करून ते शत्रूच्या मार्गांत टाकतात. असें केल्याने शत्रु पराभूत होतो, असें समजतात. [यं. चिं.]



उच्छिष्ट पिशाच यंत्र

उजैन कुमाऊँ जिल्ह्यांतील एक क्षेत्र. इथे ज्वालादेवीचें मंदिर आहे. हिला उजयिनीदेवी असेंहि म्हणतात. चैत्र शुक्ल अष्टमीला इथे मोठी यात्रा भरते. याशिवाय भूतेश्वर, मुक्तेश्वर, नागनाथ व जगेश्वर यांचींहि इथे लहान लहान मंदिरें आहेत. जगेश्वर महादेवाच्या नजिक २० फूट उंचीची व २०० फूट व्यासाची विटांची एक टेकडी आहे. तिथे बौद्धकालांतील एखादा विहार किंवा स्तूप असावा.

युआन च्वांगने वर्णन केलेल्या प्राचीन गोविषाण नगराचे अवशेष इथेच आहेत, असें कनिंगहॅमचें मत आहे. या नगराभोवती बरेचसे तलाव असून द्रोणसागर हा त्यांपैकी सर्वांत मोठा आहे. इथे एक जुना किल्ला आहे. [कुमाऊँ]

उज्जंत एक पर्वत. याच्यावर योगेश्वरीचें देवालय व वसिष्ठ ऋषीचा आश्रम आहे (वायु पु. ७७. ५२).

उज्जनक नैनिताल जिल्ह्यांतील एक शिवक्षेत्र. इथे भीमशंकर शिवाचें विशाल मंदिर आहे. कांही विद्वानांच्या मतें हें ज्योतिर्लिंग असून भीमशंकराचें स्थान आहे व हा प्रदेश म्हणजेच प्राचीन कामरूप किंवा डाकिनी देश होय. [कल्याण–तीर्थांक]

उज्जनी होंकाली महाकालीचें एक स्वरूप.

उज्जानक एक क्षेत्र. महाभारतांत या क्षेत्राचा उल्लेख आहे. सिंधु नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या काफिरीस्थानमधील उद्यानक हेंच उज्जानक होय, असें नंदलाल डे म्हणतात. [क्र. क. त.]


उज्जिहान रामायणांत या प्रदेशाचा उल्लेख आढळतो. हा लहानसा प्रदेश गंगेच्या कांठीं बदायुन जिल्ह्याच्या आसपास असावा. याला पिपरीय म्हणजे पुष्कळ पिंपळ असलेला प्रदेश असें म्हणत. [ए. से. ए. इं.]

उज्जैन हिला उज्जयिनी किंवा अवंती असेंहि नांव आहे. पुराणकाळीं शंकराने या ठिकाणीं त्रिपुरासुरावर विजय मिळविला, म्हणून या स्थानाला उज्जयिनी नांव पडलें, असें स्कंदपुराणांतर्गत आवंत्य खंडांत सांगितलें आहे. अशोकाच्या शिलालेखांत या स्थानाला उजेनी असें म्हटलें आहे; तर पेरिप्लस व टॉलेमी यांनी त्याला ओजेनी असें नांव दिलें आहे. स्कंदपुराणानुसार भिन्न भिन्न कल्पांत ही नगरी कनकशृंग, कुशस्थली, अवंती, उज्जयिनी, पद्मावती, कुमुदवती, अमरावती व विशाला, अशा विविध नांवांनी प्रसिद्ध होती.

अयोध्या, मथुरा इ. मोक्षदायिनी सात पुरींमध्ये अवंतीचाहि (उज्जैन) अंतर्भाव आहे. समग्र तीर्थस्थानें जर देहस्वरुप मानलीं, तर अवंतिका ही त्यांतला नाभिदेश आहे, असें

वराहपुराणाने म्हटलें आहे. द्वादश ज्योतिर्लिंगांपैकी महाकाल-नामक ज्योतिर्लिंग इथे असून एकावन्न शक्तिपीठांपैकी हें एक पीठ आहे. इथे सतीचा कोपर गळून पडला व हें शक्तिपीठ बनलें. इथल्या मंदिरांत देवीच्या मूर्तीऐवजी कोपराचीच पूजा होते.

शिप्रा नदीच्या तीरावर हें शहर वसलें आहे. सम्राट् अशोकाने उज्जैन येथील एका गृहस्थाच्या कन्येशीं विवाह केला होता. अशोकाचीं मुलें महेंद्र व संघमित्रा यांनी इथेच प्रव्रज्या घेतली.



महाकाल–मंदिर उज्जैन

उज्जैनमधील प्रसिद्ध स्थळ म्हणजे महाकाल मंदिर हें होय.

आकाशे तारकं लिङ्गं पाताले हाटकेश्वरम् ।
मृत्युलोके महाकालं लिङ्गत्रयं नमोऽस्तु ते ।।

अशी या महाकालाची महती आहे. या मंदिराला पांच मजले असून त्यांपैकी एक मजला जमिनीखाली आहे. मुख्य मंदिरांत अंधार असतो, त्यामुळे तिथे नित्य दीप तेवत असतात. औरंगजेबाने इथे रोज चार शेर तुपाचे नंदादीप लावावे, अशी आज्ञा केली होती. इथल्या शिवलिंगाला ओंकारेश्वर असें म्हणतात. हें महाकाल–शिवलिंग विशाल असून नागपरिवेष्टित आहे. कोणत्याहि देवाला एकदा फुलें वाहिलीं, की तीं काढल्यावर निर्माल्य बनतात. परंतु ज्योतिर्लिंगाच्या बाबतींत या नियमाला अपवाद आहे. ज्योतिर्लिंगाला एकदा वाहिलेलें बिल्वपत्र पुन्हा धुवून लिंगावर वाहता येतें (शिव पु. १.४२).

शिवपुराणांत या महाकालाची कथा दिली आहे, ती अशी–

अवंती नगरांत एक धार्मिक व योगी ब्राह्मण राहत होता. एकदा दूषण नांवाच्या एका राक्षसाने नगरांतील लोकांना त्रास द्यायला सुरवात केली. तेव्हा सर्व लोक त्या ब्राह्मणाकडे गेले व त्यांनी आपल्याला या त्रासांतून सोडविण्याची त्याला विनंती केली. ब्राह्मणाने मग त्यासाठी उग्र तप केलें. पृथ्वी दुभंग करून महाकाल त्याच्यापुढे प्रकट झाला. ब्राह्मणाच्या इच्छेप्रमाणें त्याने राक्षसाचा संहार केला. नंतर भक्तांनी त्याला तिथेच राहण्याविषयीं प्रार्थना केली व ती महाकालाने मान्य केली (१.४६).


स्कंदपुराणांत या क्षेत्राला महाकालवन म्हटलें आहे. हें सर्वोत्तम तीर्थ आहे, असें अग्निपुराण सांगतें. महाकालाच्या दर्शनाने मुक्ति मिळते व अकालमृत्यु टळतो, अशीहि भाविकांची श्रद्धा आहे.

उज्जैनमधील दुसरें महत्त्वाचें मंदिर म्हणजे हरसिद्धीचें. स्कंदपुराणांत या मंदिराविषयीं पुढील कथा आहे - एकदा शंकर कैलासावर गौरीबरोबर सारीपाट खेळत असतां चंड व प्रचंड या दोन राक्षसांनी त्यांच्या खेळांत विघ्न आणलें व नंदीलाहि घायाळ केलें. तेव्हा शंकराने देवीची प्रार्थना करून तिला राक्षसांचा संहार करायला सांगितलें. देवीने राक्षसांच्या वधाविषयीं हराचें काम सिद्ध केलें, म्हणून तिला हरसिद्धि असें नांव मिळालें (५.१.१९).

उज्जैन नगरांतलें आणखी एक यात्रास्थान म्हणजे सिद्धवट. हा वट आकाराने अतिशय लहान आहे व कित्येक वर्षांपासून त्याचा आकार तेवढाच असल्याचें सांगतात.

कृष्ण, बलराम व सुदामा हे तिघे या नगरींतच सांदीपनि ऋषीच्या आश्रमांत अध्ययनासाठी राहिले होते.

प्राचीन साहित्यांत उज्जैनचे अनेक उल्लेख सांपडतात




सांदीपनि–आश्रम

मौर्य कालांत मालवप्रदेशांत सुराष्ट्र, लाट, माळवा, कच्छ, सिंध व उत्तर कोंकण यांचा समावेश होत होता व या सर्व प्रदेशाची राजधानी उज्जयिनी ही होती. मौर्यांनंतर गंधर्वसेनाच्या (गर्दभिल्ल) राजवंशाने मालव देशावर राज्य केलें. नंतर कांही काळ तिथे शकांचें राज्य आलें. पुढे विक्रमादित्याने शकांचा पराभव करून माळव्यावर आपली सत्ता स्थापिली. पण इ. स. ७५ च्या सुमारास पुन्हा शकांनी हा प्रदेश काबीज केला व त्यावर पुढे सुमारे तीनशें वर्षें राज्य केलें. चौथ्या शतकाच्या शेवटीं गुप्त सम्राट् चंद्रगुप्त विक्रमादित्याने शकांना

परास्त करून माळव्यावर आपलें राज्य स्थापिलें.

विक्रमादित्यानंतर उज्जयिनी नगराची चांगली भरभराट झाली. अनेक वर्षें उज्जयिनी हें ब्राह्मण, बौद्ध व जैन या तीन्ही धर्मांच्या शिक्षणाचें केंद्र होतें. ज्योतिषविषयक शिक्षण तर इथे सर्वोत्कृष्ट मिळत असे. गुप्तकालांत संस्कृत काव्य व नाटयशास्त्र यांच्या उच्च शिक्षणाचें हें मोठेंच केंद्र होतें. भवभूतीचीं नाटकें याच नगरींत कालप्रियनाथ किंवा महाकाल याच्या मंदिरासमोर होत असत. कालिदास, भवभूति, भारवि, भर्तृहरि इ. कवि इथें बराच काळ राहिले होते, अशा अख्यायिका आहेत.

महाराज जयसिंहाने इथे एक वेधशाळा बांधली आहे. जयसिंह हा ज्योतिषशास्त्रांतील मोठा विद्वान् होता व ज्योतिष शास्त्राच्या उत्कर्षाची त्याला तळमळ होती. उज्जैन हें भारतांतील ग्रीनिच आहे. भूमीची मध्यरेखा अर्थात् मुख्य रेखावृत्त उज्जयिनीवरून जातें, असें तिथिचिंतामणींत म्हटलें आहे.



चित्रगुप्त–मंदिर उज्जैन

भारतीय खगोलशास्त्रज्ञांच्या मतें शून्य रेखांशावर हे नगर वसलें आहे. दर बारा वर्षांनी जेव्हा गुरु वृश्चिक राशींत प्रवेश करतो, तेव्हा इथे कुंभमेळा भरतो. कालिदासाने मेघदूतांत उज्जैनविषयीं आपला प्रेमभाव प्रकट केला आहे. यक्ष मेघाला सांगतो–

वक्रः पन्था यदपि भवतः प्रस्थितस्योत्तराशाम् ।
सौधोत्सङगप्रणयविमुखो मा स्म भूरुज्जयिन्याः ।।

(मेघ. पू. २७)

अर्थ– उत्तर दिशेला निघालेला तूं वांकडी वाट करून का होईना, उज्जयिनीला जा व तिथल्या रमणींच्या सौधतलांवर चाललेल्या शृंगारचेष्टा पाहा.

रघुवंशांतहि कालिदासाने स्वयंवराच्या प्रसंगीं सुनंदेच्या मुखाने अवंतिनाथाचें वर्णन केलें आहे (६.३२–३४).

स्कंदपुराणांत या क्षेत्राचें माहात्म्य पुढीलप्रमाणे सांगितलें आहे–


महाकालः सरिच्छिप्रा गतिश्चैव सुनिर्मला ।
उज्जयिन्यां विशालाक्षि वासः कस्य न रोचयेत् ।।
स्नानं कृत्वा नरो यस्तु महानद्यां हि दुर्लभम् ।
महाकालं नमस्कृत्य नरो मृत्युं न शोचयेत् ।।
मृतः कीटः पतङ्गो वा रुद्रस्यानुचरो भवेत् ।

(अवंति क्षेत्र माहा. २६.१७–१९)

अर्थ– जिथे महाकालाचा निवास आहे, व शिप्रा नदीचा सुनिर्मल प्रवाह आहे, त्या उज्जयिनी नगरांत राहणें कोणाला आवडणार नाही ! महानदी शिप्रेंत स्नान करायला मिळणें दुर्लभ होय. तें करून जो महाकालाला नमस्कार करतो, त्याला मृत्यूचें भय राहत नाही. इथे मेलेला कीटक किंवा पतंगहि रुद्राचा अनुचर होतो.

विक्रमादित्याचें स्मारक म्हणून इथे एक विक्रमस्मृतिमंदिर बांधायचें ठरलें असून त्याप्रमाणे ८ मे १९५१ रोजीं डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी या मंदिराचा शिलान्यास केला.

सांप्रतचें उज्जैन नगर प्राचीन उज्जयिनीच्या स्थानापासून थोडें दूर वसलें आहे. पूर्वीं जिथे महाकालवन होतें, तिथे आज गजबजलेलें उज्जैन शहर नांदतें आहे व त्याचबरोबर प्राचीन उज्जयिनी आजमितीस उजाड पडली आहे. तिला हल्ली गढ असें म्हणतात. हें स्थान सांप्रतच्या नगराच्या उत्तरेला क्षिप्रा नदीच्या उजव्या तीरावर आहे. आजूबाजूच्या भूमीपेक्षा हें स्थान तीस–चाळीस फूट उंच आहे. याच्या चारी बाजूंना पूर्वीं प्राकारहि असावा, असें वाटतें. नगराचा विस्तार दक्षिणोत्तर सुमारे एक मैल व पूर्व–पश्चिम सुमारें पाऊण मैल एवढाच होता; परंतु नगराचीं उपनगरें मात्र दूरवर पसरलेलीं होतीं.



मामा–भाच्याचा दरगा उज्जैन

ग्वाल्हेर राज्यांतील पुरातत्त्व विभागाने गढ, वैशा टेकडी

व कुंभार टेकडी या ठिकाणीं इ. स. १९३९ मध्ये उत्खनन सुरू केलें. तें काम दोन वर्षे चाललें होतें. इथे सांपडलेल्या वस्तूंपैकी सर्वांत मनोरंजक वस्तू म्हणजे गोलाकार कूप होत. यांची बनावटहि जरा विचित्र आहे. मातीचे दोन फूट व्यासाचे व सात–आठ इंच उंचीचे वीस ते पंचवीस गोल नळ एकमेकांत बसविलेले सांपडलेले आहेत. या कूपांत मातीच्या मुद्रा, भांडीं, मातीचे घोडे, सुरया, दिवे, खेळणीं, मणके, हस्तिदंती सामान गाढवाचीं हाडें इ. वस्तू मिळाल्या आहेत. हें गोल कूप धान्य किंवा गरजेच्या वस्तू साठविण्यासाठी उपयोगांत आणीत असावे, असें अनुमान आहे. मातीचीं मोठमोठीं पात्रेंहि इथे मिळालीं असून त्यांतील एकांत माणसाच्या अस्थि सांपडल्या आहेत. त्या पात्रांतच मातीची एक मुद्रा असून तिच्यावरचें नांव ज्या व्यक्तीच्या त्या अस्थि आहेत, त्याचें असावें. दुसऱ्या एका मुद्रेवर एका बाजूला मानवी शिर व दुसऱ्या बाजूला कमळ काढलेलें आहे. इ. स. १९६०–६१ मध्येहि इथे पुन्हा उत्खनन झालें. त्यांत तिथल्या प्राचीन खंदकाजवळ हाडांच्या सुऱ्या, मासे धरण्याचे गळ, बाणाग्रें व गुप्तकालीन तांब्याची एक मूर्ति अशा वस्तू सांपडल्या आहेत. [भारती; कल्याण-तीर्थांक; अजन्ता; वि. स्मृ. ग्रं.]

उज्ज्वलदत्त एक वैयाकरण. याने शाकटायनाच्या उणादि सूत्रांवर वृत्ति लिहिली आहे. [म. च. को.]

उज्ज्वल रस रूप गोस्वामी यांनी मानलेला एक रस. ते काव्यशास्त्राच्या पद्धतीला धरूनच त्याचें प्रतिपादन करतात. पण ध्रुवदास वगैरे हिंदी कवींनी या रसाच्या बाबतींत साहित्यशास्त्राला प्रामाण्य न देतां तें स्वानुभूतीला दिलें आहे. रूप गोस्वामी सांगतात —

स्थायिभावोऽत्र शृंगारे कथ्यते मधुरा रतिः।

अर्थ –– (शृंगारप्रधान अशा या रसाचा) मधुरा रति हा स्थायी भाव आहे.

कृष्णरतीलाच मधुरा रति म्हणतात. ही रति कृष्णमूर्ति किंवा तिचें अनुकरण करणारी व्यक्ति यांच्याविषयींहि होऊं शकते. हा रत्यात्मक स्थायिभाव विभाव, अनुभाव व संचारी भाव, यांच्या योगाने उज्ज्वल बनून भक्तांचें अंतःकरण रसमय करतो. भक्ताच्या मनांत जेव्हा राधा व कृष्ण यांचा परस्पर प्रेमभाव भरून राहतो, तेव्हा या रसाची निष्पत्ति होते. मग त्या भावाचें कथन करण्याच्या कामीं वाणी असमर्थ ठरते.

या रसाची देवता विष्णु (कृष्णरूप) आहे. विष्णु हा श्यामवर्ण आहे. पण त्याचा वेष उज्ज्वल आहे. उज्ज्वल शब्द कालुष्यहीनतेचाहि द्योतक आहे. रूप गोस्वामींनी उज्ज्वल नीलमणि नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत उज्ज्वल हा शब्द अलौकिक, रागानुगा मधुर भक्तीसाठी प्रयुक्त केला आहे. या शब्दांत त्यांनी शृंगाराचा पूर्ण अंतर्भाव केलेला आहे. कृष्णाला नायक व राधेला नायिका मानून या ग्रंथांत कृष्णप्रेमाचें विशद वर्णन केलेलें आहे. हरिभक्तिरसामृतसिंधूंत भक्तीचे पांच भाव सांगितले आहेत. पांचवा भाव माधुर्य आहे आणि त्याचाच विस्तार उज्ज्वल नीलमणि या ग्रंथांत उज्ज्वल रसाच्या रूपाने केलेला आहे. या रसाची विलक्षणता ही, की याच्या अनुभूतींत भक्त देहसुखहि विसरून जातो व प्रेमरंगांत रंगून राहतो. [रास और रासान्वयी काव्य; हिं. सा. को.]

उडक्यांचा नाच हें नृत्य कोकणांत पाहायला मिळतें. नर्तक परस्परांच्या दंडांत दंड अडकवून तरापीवाल्यापुढे उभे राहतात व उजव्या पायाने उडचा मारीत नाचतात. उडचा मारीत करण्याचीं सर्व नृत्यें हीं समानोत्पत्तिक जादुविद्येशीं संबंधित आहेत. नाचणारा जेवढी उंच उडी मारील, तेवढीं त्या सालाचीं पिकें उंच वाढतील, असा त्यांतला गर्भित आशय असतो.

उडत कोंबडा मुलींचा एक खेळ. एक मोठी मुलगी उभी राहते व तिच्या पुढचांत एक लहान मुलगी



उडत-कोंबडचाचा दुसरा प्रकार

बसून आपले हात माग नेते व मोठ्या मुलीचे पाय धरते. उभी मुलगी आपल्या हातांनी तिचे हात धरते व दोघीजणी उडत

उडत फिरतात. या खेळाला उडत कोंबडा असें नांव आहे. [व्या. ज्ञा. को.]

उडत रुमाल महार, मांग वा तत्सम जातीच्या लोकांना दिला जाणारा मराठी राज्यांतला एक किताब. जे लढाईंत बहादुरी गाजवीत, त्यांना हा किताब मिळे. असा किताब धारण करणारा माणूस रस्त्याने निघाला, की त्याचे दोन नोकर स्वच्छ पांढरे हातरुमाल हातांत घेऊन ते चवरीप्रमाणे त्याच्यावर वारीत दोहीं अंगीं चालत. अशा किताबधारी लोकांना सरकारांतून कांही नेमणूकहि असे. [इ. सं.–पारसनीस]

उडियाबाबा (१८७६ – १९४८ इ. स.) ओरिसांतील एक संत. याचे आईबापहि मोठे ईश्वरभक्त होते. वयाच्या पांचव्या वर्षी याचें उपनयन झालें व त्याने ओडियाभाषा, संस्कृत व गणित या विषयांचें अध्ययन केलें. नंतर मयूरभंज येथील पाठशाळेंत तो शास्त्रें पढला. तो एकोणीस वर्षांचा असतांना ओरिसांत मोठा दुष्काळ पडला. त्यावेळीं याने गौहाटी येथील कामाख्या मंदिरांत जाऊन तिथे मंत्रानुष्ठान केलें. पुढे त्याला वाचासिद्धि प्राप्त झाली. त्यानंतर त्याने गोवर्धन मठाच्या शंकराचार्यांकडून संन्यासदीक्षा घेतली. आचार्यांनी मग त्याचें पूर्णानंदतीर्थ असें नांव ठेवलें. उडियाबाबा हें त्याला लोकांनी दिलेलें नांव असावें.

उडियाबाबा शांकरमतानुयायी होता. उपासना हा मनाचा स्वाभाविक धर्म असून त्याला जर भगवद्भक्तींत गुंतविलें नाही, तर तें सांसारिक विषयांत आसक्त होतें, असें याचें मत आहे. [भा. सं. म.]

उडियासांझिया एक जात. हे लोक गवंडीकाम व मजुरी करतात. हे उड्र किंवा ओड्र नांवाच्या फिरत्या लोकांचे वंशज आहेत. हे संबळपुरांत राहतात. उडिया राजांच्या पदरीं हे लोक पडतील तीं कामें करीत.

बनेटिया व खांदाईत असे यांचे दोन वर्ग आहेत. बनेटिया लोक खांदाईतांच्या मुलींशीं लग्न करतात; पण त्यांच्या घरीं अन्न मात्र खात नाहीत; फक्त दहीसाखर तेवढी खातात.

यांच्यांत मुलींचीं लग्नें ७ ते १० वर्षांच्या दरम्यान होतात. १२ व्या वर्षांपर्यंत मुलीचें लग्न न झाल्यास विधवाविधीने तिचें लग्न होतें. लग्न उडिया पद्धतीने लागतें व लग्नाची मिरवणूक फार थाटाची असते. वरात घरीं आल्यावर नवरा मुलगा पाण्याने भरलेलीं सात भांडीं उपडीं करतो. नंतर तो आपलें तोंड धुवून तीं भांडीं फोडतो व तिथून पळतो. नंतर बायका त्याला हुडकून काढून त्याच्यावर रंग ओततात. नवव्या दिवशीं वधू सासरच्या सर्व माणसांच्या कपाळाला दहीसाखरेचा टिळा लावते. या लोकांना घटस्फोट व विधवाविवाह संमत आहे. हे विश्वकर्म्याची पूजा करतात. श्राद्धेंहि करतात. मांस खातात; पण मद्य पीत नाहीत. द्रुगच्या राजाची दृष्टि एका विवाहित सांझिया स्त्रीवर गेली व ती आपल्याला मिळावी, म्हणून त्यानें खूप प्रयत्न केले. या गोष्टीला त्रासून नऊ लक्ष सांझियांनी वरार बांधाकडे स्थलांतर केलें. तिथेहि राजाने तिचा पाठलाग केला; म्हणून तिने शेवटीं अग्निप्रवेश केला. ओडनी गीतांत ही कथा दिलेली आहे. [म. ज्ञा. को.]

उडीद एक द्विदल धान्य. वाजसनेयिसंहितेंत मूग व उडीद यांचा उल्लेख आला आहे (१८.१३). याशिवाय तै. सं. (५.१.८.१), का. सं. (१२.७), मै. सं. (४.३.२) इ. ग्रंथांतहि माष म्हणजे उडीद याचे उल्लेख आले आहेत. अथर्ववेदांत (१२.२.४) माषाज्य = भरडलेल्या उडदांचा नैवेद्य, असा शब्द आहे. काठक (३२.७) व मैत्रायणी संहितेंत (१.४.४०) हें धान्य निषिद्ध मानलें आहे. जव व उडीद यांच्या पिकासाठी जी जमीन चांगली असे, तिला व्यय किंवा माष्य असें म्हणत असत. उडीद हा मांसाचा प्रतिनिधि म्हणून श्राद्धाच्या स्वयंपाकांत वापरतात. उडदामध्ये भूतबाधा दूर करण्याचें सामर्थ्य आहे, असेंहि समजतात. शांतिकर्मांतल्या बलिदानांत भातावर उडीद टाकतात. [पा. भा.]

उडीदमुहूर्त सारस्वत लोकांत यज्ञकार्याच्या प्रसंगीं हा विधि करतात. प्रथम गणपति-पूजन करतात. नंतर सुवासिनी स्त्रिया देवकाजवळ जातें मांडून त्याला आंब्याचे टहाळे बांधतात व त्यावर थोडेसे उडीद दळतात. [ल. वि. सो.]

उडुपी दक्षिण कर्नाटकांतील एक क्षेत्र. याचें प्राचीन नांव उडुपा असें होतें. उडु म्हणजे नक्षत्र व पा म्हणजे पालक. उडुपा शब्दाचा अर्थ चंद्र असा होतो. चंद्राने इथे तपश्चर्या केली व शंकराने प्रसन्न होऊन त्याला आपल्या मस्तकीं धारण केलें, अशी कथा आहे. उडुपीला रजतपीठपूर, रौप्यपीठपूर व शिवाली अशींहि प्राचीन नांवें होतीं.

द्वैतमतवादी मध्वाचार्य यांच्या वास्तव्यामुळे उडुपीला क्षेत्राचें स्वरूप प्राप्त झालें. त्यांनी आपलें धार्मिक कार्य उडुपी

येथेच केलें. इथे त्यांनी मठस्थापना केली त्यामुळे हें धार्मिक क्षेत्राचें ठिकाण बनलें. इथली मध्वस्थापित कृष्णमूर्ति पाहण्यासाठी दूरदूरचे यात्रेकरू येऊं लागले. चैतन्य व पुरंदरदास यांनीहि इथे येऊन इथल्या श्रीकृष्णाची पूजा केली होती, असें सांगतात. या मंदिराच्या छतावर चांदीचा पत्रा असून त्यावर सोन्याचीं पानें व फुलें काढलेलीं आहेत व भिंतीवर दशावतारांचीं चित्रें चितारलेलीं आहेत. इथली श्रीकृष्णाची मूर्ति शाळिग्राम शिळेची असून अत्यंत प्रेक्षणीय आहे. मूर्तीच्या चारी बाजूंना चार समया तेवत असतात. त्यांपैकी एक मध्वाचार्यांच्या वेळेपासून आजवर सतत तेवत आहे, असें सांगतात. मकरसंक्रांतीपूर्वी दहा दिवस इथे मोठा उत्सव होतो.

इथली कृष्णमूर्ति मध्वाचार्यांना कशी मिळाली, त्याविषयीं पुढील आख्यायिका सांगतात– उडुपीजवळच्या मालपें बंदरांत द्वारकेहून गोपीचंदनाची माती घेऊन एक जहाज आलें होतें. तें किनाऱ्याजवळ पोंचतें न पोंचतें तोंच मोठें वादळ झालें. मध्वाचार्यांनी दैवी शक्तीने तें वादळ शांत केलें; तेव्हा गलबताच्या मालकाने मध्वाचार्यांना विचारलें, की ‘तुम्हाला काय बक्षिस पाहिजे ? ’ त्यावर त्यांनी जहाजांतील विवक्षित ठिकाणचीं गोपीचंदनाचीं ढेकळें मागितलीं. ही मूर्ति त्या ढेकळांतच दडलेली होती. मग स्वामींनी ती मंदिरात आणून तिची स्थापना केली.

उडुपीला मध्वाचार्यांनी आठ मठ स्थापन केले असून त्यांत एकेक मध्वमतानुयायी संन्यासी राहतो. यांपैकी प्रत्येक संन्यासी आळीपाळीने दोन दोन वर्षे देवाची पूजा व इतर धार्मिक कृत्यें करतो. दोन वर्षांनी होणाऱ्या खांदेपालटाला ‘पर्यायम्’ असें नांव असून त्यावेळीं तिथे मोठा उत्सव होतो. त्यासाठी शेकडों यात्रेकरू तिथे जमतात.

याशिवाय इथे चंद्रेश्वर व अनंतेश्वर यांचीं दोन प्राचीन मंदिरें आहेत. परशुरामाने इथे शंकराची आराधना केली होती, असें सांगतात. त्याने स्थापन केलेल्या शिवलिंगाला अनंतेश्वर असें नांव आहे. [कल्याण–तीर्थांक]

उडेडोलाल सिंधप्रांतांतला एक देव. हा सिंधुनदाचा अवतार असून त्याचा आविष्कार इ स. ९५१ मध्ये झाला. याची आख्यायिका अशी —— त्या काळांत सिंधमधील थता या नगरांत मर्ख नांवाचा मुसलमान राजा राज्य करीत होता. त्याने एके दिवशी फर्मान काढलें, की ‘राज्यांतल्या सर्व हिंदूंनी ताबडतोब मुसलमान व्हावें. जे या आज्ञेचा भंग करतील, त्यांचा शिरच्छेद केला जाईल व त्यांची मालमत्ता सरकार जमा होईल.’

तो हुकूम ऐकतांच सर्व हिंदू घाबरले व सिंधुनदाच्या तीरावर एकत्र जमून त्यांनी त्या नदाची आळवणी सुरू केली. तिसऱ्या दिवशीं त्या नदाच्या पात्रांतून आवाज उठला, की ‘मी आठ दिवसांनी नरसापूर येथे अवतार घेईन व तुमचें संकट निवारीन. माझें नांव उडेडोलाल असें असेल.’

आठ दिवसांनी त्याने नरसापूर येथे अरोरा जातींतील एक प्रख्यात हिंदुपुढारी रतनराय ठाकूर व त्याची पत्नी देवकी यांच्या उदरीं जन्म घेतला. त्या दिवशीं वर्षप्रतिपदा होती. कांही क्षणांतच तो दाढी-मिशांचा तरुण बनला व हें अघटित राजाच्या कानापर्यंत पोंचलें. राजाने त्याला थत्ता येथें बोलावणें धाडलें. उडेडोलाल त्याच्यापुढे उभा ठाकला. त्याने राजाला सांगितलें, की ‘हिंदु-तुर्क समान आहेत; तेव्हा तूं हिंदूंवर धर्मांतराची सक्ति करूं नको.’ राजाला त्याच्या धिटाईचा राग आला व त्याने उडेडोलालला पकडण्याचा हुकूम दिला. पण राजाला ती गोष्ट शक्य झाली नाही. राजाच्या उद्दामपणाचा उडेडोलाललाहि राग आला व त्याने अग्नीला थत्ता नगरी भस्मसात् करण्याची आज्ञा दिली. शहर जळूं लागतांच मग राजाचे डोळे उघडले व तो उडेडोलालला शरण गेला. त्या घटनेमुळे हिंदूंचें धर्मांतर टळून त्यांना त्या राज्यांत धर्माचरणाचें स्वातंत्र्य मिळालें.

मत्स्यावर आसनमांडी घालून बसलेला व घोड्यावर स्वार झालेला अशीं उडेडोलालचीं दोन रूपें आहेत. पहिल्या रूपांत त्याच्या हातीं पुस्तक व जपमाळ आहे. दुसऱ्या रूपांत त्याने आपल्या हातीं ध्वज व खड्ग धारण केलें आहे. कराची नजीक पीर पाथो व पीर मांघो नांवाचीं जीं दोन देवस्थानें आहेत, तीं उडेडोलालचींच आहेत. हिंदूंप्रमाणेच मुसलमानहि त्या ठिकाणीं त्याला भजतात. थत्ता व सक्कर येथेहि त्याचीं मंदिरें आहेत. उडेडोलाल जेव्हा हिंगलाजहून कराचीला आला, तेव्हा तो तिथल्या मनोराबेटावर राहिला होता. तिथे त्याने बांधलेलें मंदिर अद्यापि चांगल्या अवस्थेंत आहे. इथे चैत्र व आषाढ या महिन्यांच्या पौर्णिमेस मोठी जत्रा भरते. दर्यापंथी लोक उडेडोलालला भजतात. त्यांनी अनेक ठिकाणीं त्याचीं मंदिरें बांधलीं आहेत. उडेडोलाल हा शेवटीं भूमि दुभंग होऊन तिच्यांत अदृश्य झाला. [सिंधी कल्चर]

उडैय (वोडैय) द. भारतांत सुखवस्तु लिंगायत व जैन यांना ही पदवी लावतात. उडैय म्हणजे अधिपति. निलगिरी प्रदेशांतील बदग जातीच्या एका लिंगायत पोटजातीलाहि उडैय किंवा वोडैयर हें नांव आहे. म्हैसूरचे महाराज वोडैयर घराण्यांतले आहेत. [का. ट्रा. स. इं.]

उड्डीयान कुरुकुल्ला बौद्धांचीं एक देवता. ही रक्तवर्ण असून हिचें ध्यान भयप्रद आहे. हिचें आसन अर्धपर्यंक व वाहन प्रेत आहे. हिच्या गळ्यांत कपाल-माला असते व हिची जीभ व सुळे बाहेर आलेले असतात. केस तांबूस असून ते ज्वालेप्रमाणे वर गेलेले असातात. ही व्याघ्र-चर्म परिधान करते. हिला तीन डोळे व चार हात असून हातांत पुष्प, धनुष्य व बाण या वस्तू असतात. [इं. बु. इ.]

उड्डीयानबंध हठयोगांतील एक बंध. याचा विधि पुढील-प्रमाणे —

उदरे पश्चिमं तानं नाभिरूर्ध्वं तु कारयेत् ।
उड्डीयानो ह्यसौ बन्धो मृत्युमातङ्गकेसरी ।।
समग्राद् बन्धनादेतदुड्डीयानं विशिष्यते ।
उड्डीयाने समभ्यस्ते मुक्तिः स्वाभाविकी भवेत् ।।

अर्थ – बेंबीच्या वरचें पोट भकाळीं नेऊन बेंबी वर करणें याला उड्डीयानबंध असें म्हणतात. हा मृत्युगजाचा सिंह आहे, सर्व बंधांत श्रेष्ठ आहे व याचा अभ्यास केला असतां मुक्ति सहज मिळते.

तसेंच याच्या अभ्यासाने दीर्घायुष्य प्राप्त होतें, उदराचे व मूत्राशयाचे विकार दूर होतात, नाभिस्थित समान व कृकल या प्राणांत स्थिरता येते, वात, पित्त व कफ शुद्ध होतात व सुषुम्ना नाडीचें द्वार खुलें होतें. [यो. सो. पू. च.; गा म. वि.]

उड्ढकंडूयग एक जैन पंथ. या पंथाचे लोक शरीराचा खालचा भाग कधीहि खाजवीत नाहीत.

उड्र ओरिसांतल्या लोकांना प्राचीन काळीं उड्र म्हणत. यांचा उल्लेख महाभारत, बृहत्संहिता, मनुस्मृति इ. ग्रंथांत आढळतो. यांना ओड्र किंवा औड्र अशींहि नांवें होतीं. **पाहा** – ओरिसा.

उतारा अंगावरून ओवाळून टाकलेला पदार्थ व ती क्रिया. लिंबू मीठ, तांदूळ, पाणी, भाकरीचा तुकडा, दही-भात, इ. उताऱ्याचे पदार्थ होत. संस्कृतमध्ये या क्रियेला अवतरणकमंगल असें नांव आहे. स्त्रियांच्या धार्मिक क्रियांत उताऱ्याला महत्त्वाचें स्थान आहे. कांही उतारे मांगलिक, तर कांही जादूटोण्यांतले असतात. नवरदेव लग्नाच्या मंडपांत आल्यावर, नववधू पतीसह घरीं आल्यावर, बाळ–बाळंतीण दहाव्या दिवशीं घरीं आल्यावर, त्यांच्यावरून लिंबलोण, पाणी किंवा भाकरीचा तुकडा ओवाळून टाकण्याची चाल आहे.

खेडेगांवांत उताऱ्याचा पुढील प्रकार आढळतो– शिजविलेलें अन्न, लाल कापड, सव्वा रुपया, कोळसा, शेंदूर, सुर्मा, खिळा व नारळ हे पदार्थ एका मातीच्या परळांत ठेवतात. मग तें साहित्य रोग्याच्या अंगावरून ओवाळतात. नंतर मांत्रिक तें परळ व नागवी तलवार घेऊन स्मशानांत जातो. त्याच्या मागून लोकहि नाचत व ढोलकी वाजवीत जातात. मांत्रिक तें परळ स्मशानांत ठेवतो व सर्व मंडळी मागे न पाहतां परत येतात. कोंबडीचें पिल्लूं, दहीभात, इ. पदार्थहि रोग्यावरून ओवाळून टाकण्याची पद्धत आहे.

उत्कटासन योगमार्गांतलें एक प्रसिद्ध आसन. याचा विधि असा –

अङ्गुष्ठाभ्यामवष्टभ्य धरां पार्ष्णी च खे गतौ ।
तत्रोपरि गुदं न्यस्य विज्ञेयमुत्कटासनम् ।।

अर्थ – दोन्ही पाय पाठीमागे वळवून टांचांवर बसावें व पायांचे चवडे बोटांच्या आधारावर जमिनीवर ताठ ठेवावे.



उत्कटासन

कंबर, पाठ व डोकें समांतर ठेवून हात गुडघ्यांवर ठेवावे. याला उत्कटासन असें नांव आहे. [उ. यो. द.; यो. सो. पू. च.]

उत्कंठिता अष्टनायिकांपैकी एक नायिका. हिला उत्का असेंहि म्हटलेलें आहे. भरताने प्रथम हिचा उल्लेख केला आहे. ‘ संकेतस्थलं प्रति भर्तुरनागमनकारणं या चिन्तयति ’ = संकेत स्थळीं जाऊन (नायकाच्या येण्याची जी मार्गप्रतीक्षा करते, आणि) तो अजून कां आला नाही अशी

चिंता करते, ती उत्कंठिता होय, अशी भानुदत्ताने तिची व्याख्या केली आहे. तिच्या अवस्थेंत प्रतीक्षेबरोबरच उत्सुकता विशेष जाणवते. भक्तिकाव्यांत व रीतिकाव्यांत या नायिकेची भावविव्हलता, चिंता, उत्सुकता, आकांक्षा व आतुरता या मनोवस्थांचें सुंदर चित्रण केलेलें आहे.

उत्कंठितेच्या मनोव्यापारांचें वर्णन पुढील श्लोकांत केलें आहे–

आनेतुं न गता किमु प्रियसखी भीतो भुजंगात् किमु ।
ऋद्धो वा प्रतिषेधवाचि किमसौ प्राणेश्वरो वर्तते ।
इत्थं कर्णसुवर्णकेतकरजः पातोपघातच्छलाद्
अक्ष्णोः कापि नवोढनीरजमुखी बाष्पोदकं मुञ्चति ॥

अर्थ – प्रियसखी प्रियकराला आणायला गेली नसेल का ? तो सापाला भ्याला असेल का ? का मी त्याचा निषेध केला म्हणून तो रागावला ? अशा अनेक शंकांनी व्याकुळ होऊन कानावरील सोनकेवड्याचे पराग डोळ्यांत गेले अशा बहाण्याने ती कमलमुखी सुंदरी अश्रु गाळीत आहे.

उत्कर वेदीच्या उत्तरेला दोन पावलांवर वेदींतील कचरा टाकण्याची जागा असते, तिला उत्कर असें नांव आहे. सामान्यतः दर्भाचे तुकडे, पुरोडाश तयार करतांना पडलेला कोंडा इ. पदार्थ उत्करांत टाकतात. उत्कर शब्दापासून मराठींत उकिरडा शब्द आला असावा. [विद्याधर शास्त्री भिडे]

उत्कल अर्वाचीन ओरिसा या प्रदेशाचें प्राचीन नांव. हा देश ऋषिकुल्या नदीपासून सुवर्णरेखा आणि महानदी यांच्यापर्यंत पसरला होता (स्कंद पु. ६.२७). उत्कल देशाची पूर्वसीमा कपिशा नदी व पश्चिमसीमा मेकल लोकांचें राज्य, अशी होती. सुद्युम्नपुत्र उत्कल याचें राज्य प्रथम या प्रदेशावर निर्माण झालें, म्हणून याला उत्कल देश म्हणूं लागले. पुराणांत उत्कलांचा उल्लेख उद्र, मेकल, कलिंग व आंध्र यांच्याबरोबर येतो. **पाहा** – ओरिसा.

उत्कल ब्राह्मण ओरिसांत निवास करणाऱ्या ब्राह्मणांपैकी एक जात. यांचे दोन भेद आहेत : दाक्षिणात्य व जाजपुरी. कटक, पुरी, इ. ठिकाणीं दाक्षिणात्यांची वसती आहे. जाजपूर, अंगलेट या भागांत राहणारे ते जाजपूरी होत. सामंत, मिश्र, नंद, पती, कर, आचार्य, तत्यापथी, वेदी, सेनापति, पर्णग्राही, इ. त्यांच्या उपाधी आहेत.

त्यांच्यातलाच आणखी एक पोटभेद म्हणजे महापात्र ब्राह्मण हा होय. हे लोक श्राद्धें, प्रायश्चित्तें इ. कार्यांत पौरोहित्य करतात. उत्कल ब्राह्मणांतील कांही लोक पुरी येथे पंडेगिरीहि करतात. या पंड्यांची सहा गोत्रें असून हे शुक्लयजुर्वेदाच्या माध्यंदिन शाखेचे आहेत. [भा. ब्रा. जा. प्र.]

उत्कील कात्य ऋ. ३.१५–१६ या दोन सूक्तांचा द्रष्टा. हीं दोन्ही सूक्तें अग्निस्तुतिपर आहेत.

उत्क्रांतिधेनुदान सर्व पापांचा क्षय होऊन प्राणांचें उत्क्रमण सुखाने व्हावें, म्हणून धेनूचें दान देतात. आसन्नमरण पुरुष हें दान देतो अथवा त्याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र तें देतो. एका दुभत्या गायीचीं शिंगें व खूर सोन्यारुप्याने मढवून तिच्या अंगावर दोन वस्त्रें घालून तिची व ब्राह्मणाची पूजा करतात. मग–

असूत्क्रान्तौ प्रवृत्तस्य सुखोत्क्रमणसिद्धये ।
तुभ्यमेनां संप्रददे धेनुमुत्क्रान्तिसंज्ञिकाम् ॥

या मंत्राने ती ब्राह्मणाला दान देतात. गायीच्या अभावीं तत्प्रतिनिधिभूत गोमूल्य देतात. या धेनुदानाला मोक्षधेनुदान असेंहि म्हणतात. [दा. चं.; ध. सिं.; तृ. प.]

उत्खनित संस्कृति भारतांतील उत्खनित संस्कृतीचा साकल्याने विचार करायचा झाल्यास दोन गोष्टी प्रामुख्याने विचारांत घ्यायला हव्यात. यांतील पहिली गोष्ट म्हणजे प्राचीन आधिभौतिक संस्कृतीच्या ज्या विविध अवस्था आतापर्यंत ज्ञात झाल्या आहेत, त्या केवळ उत्खननांच्याच मुळे झाल्या असें नव्हे; तर उत्खननपूर्व जें प्राथमिक संशोधन करावें लागतें, त्यामुळें प्राचीन संस्कृतीचीं केंद्रें ज्ञात झालीं. विशेषतः अश्मयुगीन संस्कृतींचा शोध घेण्याकरितां उत्खनन फारसें करावें लागत नाही. निरनिराळ्या नद्यांच्या कांठांच्या छेदांची सूक्ष्म आणि शास्त्रीय पाहणी अश्मयुगीन संस्कृतींची ओळख करून घेण्याकरितां मूलभूत उपयोगाची ठरते. दुसरी गोष्ट अशी, की भारतांत अशा संशोधनामुळे आणि उत्खननामुळे जी अनेक संस्कृतींची ओळख झाली ती मूलतः गेल्या पंचवीस वर्षांतील या क्षेत्रांत जोमाने केल्या गेलेल्या कार्यामुळेच होय. भारतीय पुरातत्त्वकार्याची शतसांवत्सरी जरी गेल्या वर्षीच साजरी झाली असली, तरी पहिल्या पाऊण कालखंडांतील कार्य हें अलिकडील अंतिम चतुर्थकांतील कार्याच्या मानाने थिटे वाटावें, इतकें अल्प आणि सुसंगतीचा अभाव दर्शविणारें आहे. म्हणूनच भारतांतील उत्खनित संस्कृतींचें दिग्दर्शन करतांना अश्मयुगीन संशोधनाचा

आणि गेल्या पंचवीस वर्षांतील उत्खननांच्या व्यापक आणि हेतुपूर्वक योजनांचा आढावा घेणें अगत्याचें ठरतें.

पंचवीस वर्षांपूर्वीच्या कालखंडांत भारतांत जें संशोधन आणि जीं उत्खननें झालीं, त्यामध्ये सुसूत्रता, शास्त्रीयदृष्टि आणि साधनें यांचा बराचसा अभाव होता. या कालांतील पुराणवस्तुसंशोधनाचें कार्य बहुतांशी बौद्धकालीन पुरातन नगरींचा ठाव घेणें आणि या प्रयत्नांत हातीं आलेल्या विविध पुरातन अवशेषांचा संग्रहालयांचें उद्दिष्ट डोळ्या समोर ठेवून सांठा करणें, एवढ्यापुरतेंच मर्यादित होतें. यांत या प्राचीन अवशेषांच्या कलात्मकतेबद्दलचा कौतुकाचाच भाग अधिक होता. अशा विविध अवशेषांचे गट पाडून त्यांचा तौलनिक अभ्यास करून त्यावरून प्राचीन संस्कृतीच्या टप्प्यांचा मागोवा घेण्याची दृष्टि नव्हती. यामुळेच ब्रूस फूट यांना जरी १८६२ सालीं मद्रासजवळ प्राचीन अश्मयुगीन मानवाचें दगडी हत्यार सांपडलें, तरी त्या संस्कृतीची अखिल भारतीय व्याप्ति पटविण्यास जवळजवळ शंभर वर्षें लागलीं. या शतकाच्या प्रथम पादांत उजेडांत आलेल्या सिंधुसंस्कृतीची व्याप्ति केवळ सिंध–पंजाबापुरती मर्यादित राहिलेली नसून ती सौराष्ट्र–गुजरात–राजस्थान या प्रदेशांतहि दृढमूल झालेली होती, हें कळायला मार्शल आणि वत्स यांनी केलेल्या उत्खननानंतर एक पंचविशी उलटावी लागली.

भारतांतील उत्खनित संस्कृतींचा आढावा घ्यायचा झाल्यास तो विभागशः घेणें इष्ट ठरतें. अश्मयुगांतील प्राथमिक संस्कृतीपासून तों तहत मध्ययुगीन संस्कृतीपर्यंतच्या निरनिराळ्या अवस्थांचा अवशेषरूपी पुरावा भारतांत फार मोठ्या प्रमाणांत हातीं आलेला आहे. आणि या निरनिराळ्या अवस्थांचे अश्मयुग, ताम्रयुग, लोहयुग असे विभाग पाडतां येतात––

अश्मयुगांतहि प्राचीन अश्मयुग, मध्य अश्मयुग आणि नव अश्मयुग असे तीन उपविभाग पाडतां येतात. यापैकीं प्राचीन अश्मयुगाचे प्राचीनतम, प्राचीनतर आणि प्राचीन असे तीन भेद करतां येतात. भारतांतील आतापर्यंतच्या संशोधन-उत्खननांत या बहुतेक सर्व अवस्थांचें दर्शन झालेलें असल्याने ढोबळपणे सुसंगतरीत्या मानवी संस्कृतीच्या वाटचालीचें दिग्दर्शन करतां येण्याजोगी परिस्थिति निर्माण झाली आहे, ही नमूद करण्यासारखी गोष्ट आहे, यांत शंका नाही.

अश्मयुगीन संशोधन–– ताम्रयुगीन संस्कृतीच्या विविध अवस्थांचा प्रत्यय केवळ गेल्या पंचवीस तीस वर्षांच्या संशोधनाने आणून दिला आहे. त्याआधीच्या कालात अश्मयुगीन संस्कृतीचें दर्शन अत्यंत त्रुटित स्वरूपांत आणि प्रादेशिक दृष्ट्या असंबद्धरीत्या झालेलें होतें. मद्रास, उत्तर गुजरात, मराठवाड्यांतील पैठण, नर्मदाकांठीं भुत्रा आणि पंजाब-काश्मीर प्रदेश या ठिकाणीं रॉबर्ट ब्रूस फूट, वायने, हॅकेट, टॉड, वाडिया, डिटेरा आणि पॅटरसन यांच्या संशोधनाला यश येऊन प्राचीनतम अश्मयुगांतील मानवी हत्यारें तुरळक प्रमाणांत सांपडलीं. अर्थात् डिटेरा आणि पॅटरसन यांचे शास्त्रीय प्रयत्न सोडल्यास बाकीच्यांचें संशोधन योजनाबद्ध नसल्याने १९४० पर्यंतच्या कालखंडांतील सर्व काम त्रुटित स्वरूपांत राहिलें.

गेल्या वीस पंचवीस वर्षांत मात्र प्राचीन अश्मयुगाबद्दलच्या संशोधनाने क्रांतिकारक काम केलें आहे. या कालांतील दगडांचीं बनविलेलीं अनेक प्रकारचीं हत्यारें संशोधकांनी शोधून काढलीं. आणि त्यावरून आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, ओरिसा, पूर्व पंजाब या विस्तृत भूभागावर प्राचीनतम अश्मयुगीन मानवाचें वास्तव्य होतें, असें निश्चितपणे म्हणण्यासारखा पुरावा आता उपलब्ध झाला आहे.

प्राचीनतम अश्मयुग––या प्राचीनतम अश्मयुगीन संस्कृतीचे तीन प्रमुख विभाग दगडी हत्यारांच्या बनावटीच्या तंत्रावरून पाडण्यांत आलेले आहेत. सोहनपूर्व संस्कृति, सोहन संस्कृति आणि हातकुऱ्हाड वापरणाऱ्यांची संस्कृति असे ते तीन विभाग आहेत. सोहन (संस्कृत – शोभना) ही पश्चिम पंजाबांतील एक नदी असून ती रावळपिंडीजवळून वाहते. तिच्या खोऱ्यांत जें संशोधन झालें आणि त्यावरून अश्मयुगीन हत्यारांचे जे विभाग पाडतां आले, त्यामुळें या संस्कृतींना सोहनच्या अनुषंगाने नांवें दिलीं गेलीं आहेत.

सोहनपूर्व संस्कृति–– दगडी हत्यारांबद्दल फारशी माहिती मिळत नाही. हत्यारांची दुर्मिळता या गोष्टीला कारणीभूत आहे. मात्र या हत्यारांबाबत एवढें सांगता येतें, की हीं सोहन खोऱ्यांतील सर्वांत खालच्या दगडगोट्यांच्या थरांत सांपडल्याने आणि या खोऱ्याचा भूगर्भशास्त्रदृष्ट्या अभ्यास केला गेला असल्याने तीं भारतांत अत्यंत प्राचीन समजलीं जातात. यांचें स्वरूप सर्वसाधारणपणें अत्यंत ओबडधोबड असल्याने त्यांना हत्यारें समजणेंहि बऱ्याच जणांना अवघड वाटतें. हीं आकाराने मोठीं असून यांवर सोहनसंस्कृतीच्या अथवा त्यानंतरच्या कालांतील दगडी हत्यारांत आढळणारा नीटनेटकेपणा आणि तंत्रप्रयोजनाची जाणीव अजिबात दिसून येत नाही.

सोहन संस्कृति–– या संस्कृतीचीं दगडी हत्यारें मात्र बनावटीच्या तंत्रज्ञानाची जास्त प्रगल्भता दाखवितात. असें असून देखील हातकुऱ्हाडीच्या बनावटींत जो तंत्रप्रकर्ष दिसतो, त्याचा सोहन संस्कृतीच्या हत्यारांत अभाव जाणवतो. सोहनसंस्कृतीची

हीं दगडी हत्यारें एका विशिष्ट तंत्राने बनविलेलीं आढळतात. मोठमोठे दगडी गोटे एकमेकांवर आपटल्यास त्याचे दोन तुकडे होतात. अशा अर्धछिन्न गोटयाचा तुकडा घेऊन, तुटलेल्या बाजूवर खालून आणखी ठोके देऊन छिलके काढल्याने तुटलेल्या बाजूचें धारदार कडेंत रूपांतर होतें. या दगडी गोटयांचा बराच मोठा भाग अविछिन्न नैसर्गिक स्वरूपांत कायम राहतो. फक्त एक बाजू तोडण्याच्या अथवा छिलण्याच्या कामीं उपयोगांत येईल, अशी बनविली जाते. यांनाच इंग्रजीत ' चॉपर्स ', ' चॉपिंग टूल्स् ' अथवा ' स्क्रेपर्स ' अशी संज्ञा आहे.

सोहन संस्कृतीची व्याप्ति--सोहन संस्कृतीचीं हत्यारें फक्त पंजाब-काश्मीर विभागांतच सांपडल्याने व तद्विषयक अपुऱ्या संशोधनामुळे सोहनसंस्कृतीचा मानव केवळ याच विभागांत ठाण देऊन बसला होता, असा संशोधकांचा समज झाला होता. तसेंच तो सांस्कृतिक आणि वांशिक दृष्टयाहि ' हातकुऱ्हाड ' बनविणाऱ्या मानवापेक्षा भिन्न होता, असेंहि मत मांडलें जात होतें. परंतु गेल्या वीस-पंचवीस वर्षांतील संशोधनामुळे या मताचा फोलपणा सिद्ध झाला आहे. सोहनसंस्कृतींतल्यासारखीं दगडी हत्यारें आता गुजरात, बिहार, ओरिसा, महाराष्ट्र, मद्रास, आणि मध्यप्रदेश या विस्तृत भूभागावर सांपडलीं असल्याने सोहनसंस्कृतीचा मानव सौराष्ट्र, पश्चिम राजस्थान, गंगा-यमुना दुआब, केरळ, आसाम आणि सिंव हे प्रदेश सोडून इतर सर्व प्रदेशांत हिंडत होता, असें म्हणतां येतें. याहि विभागांत योजनापूर्वक संशोधन झाल्यास सोहन-संस्कृतीच्या निशाण्या मिळण्याची शक्यता आहे.


'हातकुऱ्हाड 'संस्कृति--सोहनसंस्कृतीच्या हत्यारांच्या बाबतींत जसे संकुचित समज होते, तसेच हातकुऱ्हाडी वापरणाऱ्यांच्या बाबतींतहि होते. हा मानव केवळ मद्रासच्या परिसरांतील प्रदेश आणि उत्तर गुजरात एवढचाच भूभागावर वास्तव्य करून असावा, असें त्या प्रदेशांत सांपडलेल्या हत्यारांवरून सांगितलें जाई. परंतु अलिकडील संशोधनाने हातकुऱ्हाडी आणि संलग्न हत्यारें सांपडण्याच्या भूभागाची व्याप्ति मोठ्या प्रमाणावर ज्ञात झाली असल्याने सोहन-संस्कृतीप्रमाणेच ही संस्कृतिहि व्यापक होती किंबहुना सोहन संस्कृतीची आणि तिची व्याप्ति प्रादेशिकदृष्टया तत्सम होती, असें दिसून आलें आहे.

हातकुऱ्हाडींशीं संलग्न असलेल्या संस्कृतीचीं मानवी हत्यारें विविध, उत्कृष्ट बनावटीचीं आणि तांत्रिक प्रगतीचीं निदर्शक वाटतात. तोडण्याकरितां बदामाच्या आकाराच्या; पण मापाने मोठ्या व हातांत धरून वापरतां येण्यासारख्या कुऱ्हाडी, फरशीसारखीं धारदार कड असलेलीं हत्यारें, छिलण्याकरितां उपयोगी पडतील अशीं हत्यारें आणि छिद्रें पाडण्याकरितां उपयोगीं येतील अशीं हत्यारें, हे मुख्यतः या संस्कृतीच्या हत्यारांचे मुख्य प्रकार होत. सोहनसंस्कृतींत न आढळणारी, छिलके उत्कृष्टपणें व नियोजनपूर्वक काढून हत्यारें बनविण्याची कला, या कालांत आढळून येते.

मानवी जीवन—सोहन संस्कृति आणि हातकुऱ्हाड संस्कृति यांतील मानवी जीवनाची कथा मात्र अद्याप अज्ञात आहे. या दोन्ही संस्कृतींच्या हत्यारांची भारतीय व्याप्ति डोळचांत भरण्यासारखी असतांना या संस्कृतींचा जनक मात्र आजतागायत संशोधकांना हुलकावण्या देत लपून बसलेला असावा, ही विलक्षण गोष्ट आहे. या संस्कृतीच्या मानवाचे अवशेष अद्याप हातीं न आल्याने त्याच्या वंशसंबंधाचा अथवा त्याच्या मेंदूच्या बौद्धिक प्रगतीचा अंदाज करणें शक्य झालेलें नाहीं. मात्र त्याच्या कालांतील नैसर्गिक परिस्थितीचा मागोवा घेतल्यास, नद्यांकांठच्या प्रदेशांची व ज्या थरांत हीं हत्यारें सांपडलीं त्या थराचा भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने अभ्यास केल्यास, त्या कालांत पावसाचें प्रमाण आजच्यापेक्षा खूपच अधिक होतें असें सांगता येतें. हीं हत्यारें दगडगोटयांच्या थरांत सांपडल्याने पर्जन्यविपुलतेमुळे नदीच्या पाण्याचा जोर मोठा होता आणि त्यामुळें हे दगडगोटे आणि त्याबरोबरच हीं हत्यारें वाहून नेण्याचें सामर्थ्य नदीच्या पाणलोटांत होतें, हें स्पष्ट होतें. तेव्हा प्राचीनतम अश्मयुगांतील हा मानव घनदाट जंगलांत राहत असावा असें अनुमान करतां येतें. त्याच्या हत्यारांच्या आकारावरून व बोजडपणावरून त्याच्या प्राथमिक गरजांचें स्वरूपहि प्रतीत होतें. तो गुहेंत राहत असावा आणि रानटी हत्ती, बैल इ. स्थूल जनावरांना हांका घालून व कोंडींत पकडून दरडीवरून खाली उडी घ्यायला भाग पाडीत असावा. बाणाचीं टोकें म्हणून वापरतां येणारीं हत्यारें अथवा पळणाऱ्या जनावराला फेंकून मारतां येतील अशा तऱ्हेचीं भाल्याचीं टोकें असलेलीं हत्यारें त्याला निकडीचीं भासत नसत. कारण त्या काळचीं जनावरेंच बोजड आणि मंद गतीचीं असल्याने दरडीखालीं कोसळून तीं गतप्राण झाल्यावर सावकाश हातकुऱ्हाडीने अथवा फरशीसारख्या दगडी हत्याराने त्या प्राण्यांच्या मृत शरीराची तोड करण्यास त्याला भरपूर वेळ होता. मानवी जीवनाच्या अत्यंत प्राथमिक गरजापलिकडे त्याची दृष्टि नव्हती. त्यामुळे जनावरांच्या कळपांमागे अन्नशोधार्थ भटकत तोहि भटकें आयुष्य घालवीत असे.

प्राचीनतर अश्मयुग -- अश्मयुगीन संस्कृतींच्या विविधतेचा प्रत्यय अलिकडील संशोधनाने विलक्षणरीत्या आलेला

आहे. प्राचीनतम अश्मयुगांतील सोहनसंस्कृति आणि हात-कुऱ्हाडी वापरणाऱ्यांची संस्कृति या पलिकडे आणखी कांहो संस्कृतींचा ठावठिकाणा लागेल, असें कोणालाच वाटत नव्हतें. रणत्व पटायला जवळजवळ ऐंशी – पंचाऐंशी वर्षांचा काला-वधि जावा लागला. त्यावेळीं फक्त सोहन आणि हातकुऱ्हाड या संस्कृतींचीं हत्यारेंच जास्त परिचयाचीं असल्याने वायने



१, २, ३–सोहनसंस्कृतींतील हत्यारें, ४– फरशी, ५– स्केपर, ६– हातकुऱ्हाड, ७– प्राचीनतर अश्मयुगीन हत्यारें, ८– मध्याश्मयुगीन हत्यारें व ९– नवाश्मयुगीन हत्यारें.

किंबहुना या प्राचीनतर अश्मयुगांतील हत्यारांचा शोध गोदा-वरीकांठीं मुंगीपैठणला वायने यांना १८६३ सालींच लागला होता. परंतु या शोधाचें नावीन्य अथवा तिचें अनन्यसाधा-यांना सांपडलेल्या अकीक दगडाच्या हत्यारांचें महत्त्व दुर्लक्षिलें गेलें असल्यास नवल नाही.

प्राचीनतर अश्मयुगीन संस्कृतीच्या हत्यारांच्या बाबतींत

गेल्या ८–९ वर्षांत मात्र भरभक्कम पुरावा हातीं आला आहे. आता त्यांच्या शोधालाहि शास्त्रीय दृष्टि मिळाल्याने या संस्कृतीच्या निराळेपणाबद्दल आणि खरेपणाबद्दल शंका राहिली नाही. भारतांत आज अनेक नद्यांच्या काठांच्या छेदांत सर्वांत खाली जो दगडगोटयांचा थर सांपडतो व ज्यांत ट्रॅप, क्वार्ट्झ्, क्वार्ट्झाईट इ. दगडांची, हातकुऱ्हाडी, फरशी, इ. प्राचीनतम अश्मयुगाचीं प्रातिनिधिक हत्यारें सांपडतात, त्या थराच्या वर दुसरा एक पिवळ्या मातीचा थर दिसतो. या थरावर जाडसर वाळूचा थर दृष्टोत्पत्तीस येतो आणि याच थरांत हीं प्राचीनतर अश्मयुगांतील हत्यारें आतापर्यंत सांपडत आलेलीं आहेत. यावरून प्राचीनतम अश्मयुगानंतर कमी पर्जन्याचा अथवा कोरडा कालखंड येऊन गेला आणि त्यानंतर पुन्हा एकवार जास्त पर्जन्याचा अथवा ओला कालखंड आला, असें कळतें. आणि याच दुसऱ्या ओल्या कालखंडांत या दुसऱ्या अथवा प्राचीनतर अश्मयुगाची संस्कृति उदयास आली.

या अश्मयुगाचें वैशिष्टय हत्यारांच्या लहान आकारांत, त्यांच्या प्रकारांत आणि त्याकरितां वापरलेल्या दगडांच्या जातींत प्रतीत होतें आणि यावरून ही संस्कृति प्राचीनतम हत्यारांशीं तुलना करतां वेगळी आणि वैशिष्टयपूर्ण वाटते. लहान आकारावरून हीं प्राचीन अश्मयुगाचीं निर्देशक न मानतां, ज्या नंतरच्या कालखंडांत गारगोटीच्या छिलक्यांचीं लहान लहान हत्यारें वापरांत आलीं, त्या लघु अश्मयुगाची (Mesolithic) प्रातिनिधिक मानण्याकडे सुरवातीस कल दिसून आला. परंतु आता प्राचीनतर अश्मयुग आणि लघु-अश्मयुग या दोन्ही संस्कृति वेगवेगळया व एकमेकांपासून कालखंडाच्या दृष्टीने फारकत असलेल्या अशा आहेत, असें सिद्ध झालेलें आहे.

व्याप्ति : वैशिष्टयें – या प्राचीनतर अश्मयुगीन संस्कृतीची दृढ ओळख पहिल्या प्रथम महाराष्ट्रांत प्रवरा–गोदावरीच्या परिसरांत झाली. त्यानंतर भारतांत महाराष्ट्राशिवाय आंध्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि ओरिसा एवढया विस्तृत प्रदेशांतहि तिच्या निशाण्या मिळालेल्या आहेत. या प्रदेशांत हातीं आलेलीं हत्यारें बहुधा उत्कृष्ट पोताच्या दगडाचीं –– उदाहरणार्थ, अकीक, जास्पर –– बनविलेलीं आढळतात. आकाराने लहान असलेल्या या हत्यारांत विविध प्रकार आहेत. छिद्रें पाडण्यास वापरतां यावीं या हेतूने बनविलेलीं टोकदार हत्यारें, छिलण्यास उपयोगी पडावीं अशीं हत्यारें आणि बाणाच्या टोकाप्रमाणे काम देतील अशीं हत्यारें, हे तीन प्रकार बहुतांशीं या संस्कृतीच्या हत्यारांत आढळतात.

प्राचीनतम अश्मयुगीन संस्कृतीच्या मानवाप्रमाणेच प्राचीनतर अश्मयुगीन मानव अद्याप अज्ञात राहिलेला आहे. मात्र त्याच्या हत्यारांची बनावट, त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीच्या बदलाची कल्पना देते. बाणाच्या टोकासारखीं वापरास योग्य हत्यारें त्या मानवाने वापरलेल्या धनुष्याची अथवा भाल्याची कल्पना सूचित करतात. भोकें पाडण्याकरिता उपयोगी पडणारीं टोकदार हत्यारें तो कदाचित् जनावरांच्या कातडयास छिद्रें पाडण्यास उपयोजीत असावा, तर छिलण्याचीं हत्यारें कातडीं कमावण्यास अथवा मांस छिलून काढण्यास वापरलीं जात असावीं. भाला अथवा बाण त्या काळच्या जलद धावणाऱ्या प्राण्यांचें अस्तित्व सूचित करतात आणि ज्या थरांत हीं हत्यारें सांपडतात, त्या थरांत मोठमोठे दगडगोटे नसून जाड वाळू असल्याने या कालांत पर्जन्यमान प्राचीन-अश्मयुगापेक्षा कमी झालें असावें असें अनुमान करतां येतें.

प्राचीन अश्मयुग –– प्राचीन अश्मयुगाच्या या शेवटच्या अवस्थेचा विस्तृत पुरावा मात्र भारतांत अद्याप मोठया प्रमाणावर उपलब्ध झालेला नाही. युरोपांत या कालांतील संस्कृतीचीं वैशिष्टयें म्हणजे दगडाचे अथवा गारगोटीचे काढलेले लांब धारदार छिलके आणि उभा काटकोनांत टोला दिल्याने निघालेल्या छिलक्यामुळें टोकदार नोंक असलेलीं गारगोटीचीं हत्यारें हीं होत. या कालांत हवामानांतहि बदल झाल्याचा पुरावा तिकडे मिळतो.

मुंबईजवळ खांदिवली येथे आणि आंध्रांत कर्नूलजवळ अशा तऱ्हेच्या प्राचीन अश्मयुगांतील हत्यारांशीं संलग्न वाटणारीं हत्यारें सांपडलेलीं आहेत. मात्र याबद्दल दुमत असल्याने प्राचीन अश्मयुगीन संस्कृतीचें भारतीय स्वरूप अद्याप अज्ञातच राहिलें आहे.

प्राचीन अश्मयुगीन संस्कृतीचा आढावा –– प्राचीन अश्मयुगीन संस्कृतीच्या तीनहि अवस्थांत मानवाभोवतालची परिस्थिति जरी बदलली असली आणि तिचा प्रभाव जरी मानवाच्या हत्यारांच्या बनावटीच्या तंत्रावर झाल्याचें दिसत असलें, तरी या सर्व अवस्थांत मानव भटक्याच राहिला. अन्न आणि आसरा या मूलभूत गरजांपलिकडे त्याची निकड गेली नाही. हवामानांत प्रचंड उलथापालथी झाल्या आणि ओले आणि कोरडे कालखंड येऊन गेले, तरी अश्मयुगीन संस्कृतींच्या व्याप्तींत मात्र फरक पडल्याचें दिसत नाही.

प्राचीन अश्मयुगीन संस्कृतींच्या कालखंडाची निश्चिति करणें हें कठिण काम आहे. मात्र चार-पांच वर्षांपूर्वीं प्राचीनतर अश्मयुगीन संस्कृतीचीं रंगीबेरंगी दगडांचीं लहान आकाराचीं हत्यारें ज्या जाड वाळूच्या थरांत सांपडलीं,

त्याच थरांत गोदेच्या कांठीं अश्मीभूत झालेला एक बैलाचा जबडा सांपडला. या रानटी बैलाची जात आता अस्तित्वांत नाहीं आणि त्याचा कालखंड दीडलाख वर्षांपूर्वींचा असावा, असें प्राणिशास्त्रज्ञांचें मत पडल्याने प्राचीनतर अश्मयुगाचा कालहि तोच असावा आणि या आधीचें प्राचीनतम अश्मयुग दीडलक्ष वर्षापूर्वीं बरेंच प्राचीन असावें, असें म्हणायला हरकत नाही.



प्राचीनतर अश्मयुगीन रानटी बैलाचा अश्मीभूत जबडा

या तीनहि अश्मयुगांतील मानवांचा वंश कोणता, तो एकच होता का भिन्न, त्यांच्या हत्यारांची तंत्राच्या दृष्टीने संलग्न उत्क्रांति होती किंवा कसें आणि त्यांचा एकमेकांशीं कितपत संपर्क आला, याचें उत्तर सध्या हातीं असलेल्या पुराव्यावरून देणें शक्य होत नाही.

लघुअश्मयुग अथवा मध्यअश्मयुग —— प्राचीन अश्मयुग आणि सर्वांत शेवटचें नवअश्मयुग यांमधील कालखंडांत जी संस्कृति विकसित झाली, तिला इंग्रजीमध्ये 'मेसोलिथिक' असें नामाभिधान दिलें गेलें आहे. या संस्कृतीचें वैशिष्टच हें, की या कालांत मानवाचा भटकेपणा आणि रानटीपणा कमी झालेला दिसून येतो. गारगोटीच्या छिलक्यापासून लहान लहान भौमितिक आकाराचीं हत्यारें बनविण्याकडे त्याची प्रवृत्ति झाल्याने या कालखंडास 'लघुअश्मयुग' असें सार्थ नांव देण्यास हरकत नसावी. बारीक छिलक्याचे पुन्हा बारीक बारीक छिलके काढून त्रिकोण, चंद्रकोर, असमांतरभुज चौकोन (trapezium) अशा प्रकारचीं हत्यारें बनवून तीं ओळीने लाकडाच्या अथवा हाडाच्या तुकड्यांत खोबणीत बसवून या कालांतला मानव हत्यारांचा करवतीसारखा अथवा विळ्यासारखा उपयोग करीत असे. अशा तऱ्हेचे गारगोटीच्या पात्याचे विळे पॅलेस्टाईनमध्ये संशोधकांना सांपडले आहेत. परंतु भारतांत मात्र केवळ असे शेंकडो छिलकेच फक्त सांपडले आहेत, त्यामुळे साकल्याने पाहतां या कालांतील संस्कृतीचा पुरावा अद्याप विस्तृतरीत्या हातीं न आल्याने, या कालांतील मानवी जीवनाचें संपूर्ण चित्र भारतापुरतें तरी उभें करतां येत नाही.

लघुअश्मयुगीन कालांतील मानवी जीवनाचें त्रुटित चित्र मात्र गुजरातमधील लांघणज येथील उत्खननामुळे कांही अंशीं पाहायला मिळतें. याशिवाय मद्रासमधील तिनेवेल्ली, पश्चिम बंगालमधील बिरभानपूर आणि कर्नाटकप्रदेश या विभागांतहि अशाच तऱ्हेचीं हत्यारें सांपडल्याने याहि प्रदेशावर लघु-अश्मयुगीन संस्कृतीचें अधिराज्य होतें, असें तात्पुरतें म्हणायला प्रत्यवाय नसावा.

मानवी जीवन —— लांघणज येथील उत्खननांत जो पुरावा हातीं आला, त्यावरून असें म्हणता येतें, की या कालांतील मानवी वस्ती मोठमोठ्या तळ्यांजवळ जरा उंचवट्यावर असे. अर्थात् या वस्तींतील घरकुलांचें स्वरूप कसें होतें, याबद्दल कांहीहि सांगतां येत नाही. मात्र हे रहिवासी शिकार आणि मच्छीमारी यांवर आपली उपजीविका करीत असत, हें अशा वस्त्यांशीं संलग्न असलेल्या थरांत सांपडलेल्या हरिण, नीलगाय, गाय-बैलांसारखीं जनावरें, डुकरें, कासवें आणि मासे यांच्या हाडांवरून कळून येतें. यांतील डुकरांसारखीं जनावरें मुद्दाम पाळून तीं खाण्याकरितां मारलीं जात असावीं. धान्याच्या अभावामुळे व सांपडलेल्या पाट्यांच्या अत्यंत लहान आकारांवरून हे लोक शाकाहारी नसावे, हें अगदी उघड आहे. जनावरांचें मांसहि भाजून खात किंवा कसें, हेंहि चुलींच्या अथवा इतर अग्निसंलग्न कार्यांच्या पुराव्यांच्या अभावीं सांगणें कठिण आहे. तसेंच हे लोक मातीचीं गाडगीं-मडकीं किती प्रमाणावर वापरीत असत, हेंहि निश्चितपणे सांगतां येत नाही. खुद्द लांघणजला अत्यंत छोट्या-छोट्या खापरांचे तुकडे अत्यंत माफक प्रमाणावर सांपडले आहेत. परंतु त्यांवरून लघुअश्मयुगांतील मातीच्या मडक्यांची कल्पना पूर्णपणे येत नाही.



गुजरातमध्ये मिळालेला मध्याश्मयुगीन मानवी सांगाडा

मात्र या युगांतील मानवी बांध्याची कल्पना लांघणज येथेच सांपडलेल्या मानवी सांगाड्यावरून करतां येते. हे स्त्रीपुरुषांचे सांगाडे गुडघे मुडपून एका अंगावर निजविलेल्या अवस्थेंत उघडकीस आलेले आहेत. या मृतांना बहुधा उत्तर

दक्षिण-म्हणजे उत्तरेकडे डोकें आणि दक्षिणेकडे पाय अशा अवस्थेंत ठेवीत असत. दक्षिणेकडे पाय करून जिवंतपणीं निजूं नये, अशी आजहि समजूत आहे! मृताच्या अंगावरील डेंटीलियमच्या मण्यांवरून या लोकांचा सागरी विभागाशीं संपर्क आला असावा असें अनुमान करता येतें आणि सांगाडयांच्या अभ्यासावरून हे लोक उंच, लांब डोक्याचे आणि खालचा ओठ थोडासा पुढे आलेले अशा ठेवणीचे होते हें कळते. वांशिक दृष्टया इजिप्तमधील हॅमिटिक लोकांशीं त्यांचें साम्य दिसतें, असें लांघणजचे उत्खनक डॉ. सांकळिया यांचें मत आहे.

या कालांतील मानवी वस्तीचें स्वरूप जास्त स्थिर झाल्यासारखें दिसतें हें खरें; पण या मानवांचा इतर समकालीन मानवांशीं वांशिक संबंध कोणता, तसेंच ही संकृति भारतांतच उत्क्रांत झाली किंवा कसें आणि तिची परिणति अथवा विनाश कशा प्रकारें झाला, हे अद्यापहि कूट प्रश्नच आहेत. परंतु या कालीं सध्यापेक्षा पर्जन्यमान जास्त असून त्यामुळे भोंवतालीं दाट गवताची वाढ झालेली असली पाहिजे.

नवअश्मयुग — अश्म-युगांतील उत्क्रान्तीची सर्वांत शेवटची अवस्था नवअश्मयुगांत पाहायला मिळते. लघुअश्मयुगांत दिसणारी मानवी जीवनाची स्थिरता या संस्कृतींत जास्त दृढ झाल्याचें प्रत्ययास येतें. या आधीच्या कालांत मानवाला मांसादि अन्नाकरितां जनावरांच्या कळपामागे भटकावें लागे; पण या कालांत मानवाने शेती करण्याची कला हस्तगत केल्याने त्याला आपल्या अन्नावर ताबा मिळवितां येऊन एके ठिकाणीं स्थिर वस्ती करून राहतां येऊं लागलें. अन्न रांधण्याकरिता त्याने अग्नीचा उपयोग केला आणि साठवणीकरिता म्हणून मातीचीं मडकीं चाकावर घडविण्याची कला आत्मसात् केली. चाकाच्या तंत्राचा शोध, ही एक क्रांतिकारक घटना होती, यांत शंका नाहीं.

नवअश्मयुगीन संस्कृतीच्या व्याप्तीवरहि अलिकडील संशोधनाने आणि उत्खननांनी बराच प्रकाश पाडला आहे. कांही वर्षांपूर्वी आंध्रप्रदेशांतल्या बेल्लारी येथील उत्खननांत नवाश्मयुगांतल्या घोटून घोटून गुळगुळीत केलेल्या दगडी कुऱ्हाडी, छिन्न्या आणि रापी, राखी रंगाच्या मातीच्या मडक्याबरोबर सांपडल्या होत्या. असाच पुरावा नागार्जुनकोंडा येथील उत्खननांतहि मिळाला. आणखी संशोधन केल्याअंतीं आंध्र-कर्नाटकांत आणि महाराष्ट्रांतील विस्तृत क्षेत्रांत या संस्कृतीचे धागेदोरे उघडकीस आले. याचबरोबर आसाम-ओरिसा या विभागांतहि अशा तऱ्हेच्या गुळगुळीत व धारदार केलेल्या दगडी कुऱ्हाडी मिळाल्या आहेत. परंतु त्यांचा आकार आंध्र-कर्नाटकांतील कुऱ्हाडींपेक्षा वेगळा आहे. दक्षिणेंतील कुऱ्हाडी धारदार बहिर्गोल कड एका बाजूस आणि दुसरें टोंक निमुळतें टोकदार, अशा स्वरूपाच्या आहेत. या उलट पूर्व भारतांतील या हत्यारांचे फाळ चौकोनी असून ते लांकडांत अडकविण्यास सोपे जावे म्हणून त्यांना वर एक दांडाहि बनविलेला आढळतो.

या दोन प्रकारच्या हत्यारांचा वापर करणारे मानव भिन्न वंशाचे असावे असें दिसतें. कारण टोकदार शीर्ष असलेल्या कुऱ्हाडी प्रामुख्याने दक्षिण भारत आणि अलिकडे काश्मीरमध्यें बूर्झाहोम या ठिकाणींच सांपडतात, तर या उलट दांडायुक्त कुऱ्हाडी फक्त पूर्व भारतांतच आढळतात. या लोकांचा एकमेकांशीं कितपत संपर्क आला, हें पूर्णपणे सांगतां येत नाही. पण टोकदार शीर्ष नसलेल्या कुऱ्हाडी वापरणारे लोक भारतांत आग्नेय आशियांतून आले असावे असें डॉ. दानी वगैरे विद्वानांचें मत आहे. दक्षिणेंतील आणि काश्मीरमधील टोकदार शीर्षाच्या कुऱ्हाडी वापरणारे लोक कांहींच्या मतें पश्चिम आशियांतून भारतांत आलेले असावे. याबाबत निश्चितपणें मत देतां येत नाही, एवढें खरें. प्रो. सांकळिया सुचवितात त्याप्रमाणे भारतांतील संबंधित प्रदेशांतील आदिवासींच्या हत्यारांचा आणि त्यांच्या जीवनक्रमाचा सखोल अभ्यास केल्यास कदाचित् हे आदिवासी देखील नवाश्मयुगीन संस्कृतीचे जनक ठरण्याचा संभव आहे.

नवाश्मयुगीन मानवी जीवन –– नवाश्मयुगीन संस्कृतींतील मानवी जीवनाच्या कांही कांही वैशिष्टयांवर बेल्लारी, ब्रह्मगिरी, पिकळीहाळ, उटनूर आणि बूर्झाहोम येथील उत्खननांनी प्रकाश टाकण्यास मदत केली आहे. हीं सर्व उत्खननें गेल्या दहा-बारा वर्षांतलीं आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

लघुअश्मयुगांत मातीच्या खापरांचा पुरावा जितक्या निःसंदिग्ध स्वरूपांत मिळायला पाहिजे, तितक्या स्वरूपांत गुजरातेंतील लांघणजला तो मिळाला नाही. नवीन अश्मयुगांत मानवाने चाकावर खापरें बनविण्यास मोठ्या प्रमाणावर सुरवात केली असल्याचा पुरावा वरील सर्व उत्खननांमध्ये मिळाला आहे. काळया-राखी रंगाचीं विपुल मडकीं या कालांत वापरांत होतीं. विशेषतः तोटीचीं भांडीं हें तर त्यांचें वैशिष्टयच समजण्यास हरकत नाही. नेवासें आणि बूर्झाहोम येथील उत्खननांत या लोकांची जमिनींत खड्डा करून त्यांत राहण्याची पद्धति उजेडांत आली. या खड्डयावरच्या लांकडी वाशयावर बांबूचे तट्टे टाकून ते आपलें घर झाकीत असत. या लोकांच्या संस्कृतीच्या परंपरेंत बसतील अशा चौकोनी आकाराच्या, मातीनें बाजू लिंपलेल्या भट्टयाहि नेवाश्याला सांपडल्या. पिकळीहाळ आणि उटनूरच्या उत्खननांत मानवी वस्तीशीं संलग्न असलेल्या पाळीव प्राण्यांचीं हाडें आणि शेणाचे

मोठमोठाले सांठेहि उघडकीस आले. त्यामुळे हे लोक स्थिर वस्तीचे असून ते शेणाचा उपयोग जळणासाठी करीत असावे असें कळून आलें. नागार्जुनकोंडा येथे या लोकांची दफन पद्धति आणि मानवी सांगाडेहि सांपडले आहेत. त्यांचा जास्त अभ्यास झाल्यावर या लोकांच्या वांशिक वैशिष्टयांवर जास्त प्रकाश पडेल, यांत शंका नाही.

कालखंड——नवाश्मयुगीन संस्कृतीचा कालखंड निश्चित करणें पुरेशा उत्खननाभावीं शक्य झालेलें नाहीं. परंतु अलिकडे या उत्खननांत सांपडलेल्या अवशेषांचा कालखंड कार्बन १४, या पद्धतीने निश्चित करण्याचा प्रयत्न चालू आहे. पिकळीहाळ येथील अवशेषांचा काल या पद्धतीनुसार इ. स. पूर्व २००० असा आला आहे, तर काश्मीरमधील बूर्झाहोम येथील अशा वस्त्यांची तारीख इ. स. पूर्व अठरावें शतक इतकी ठरवली गेली आहे. त्यावरून भारतांतील नवाश्मयुगीन संस्कृति कमीतकमी आजपासून चार-साडेचार हजार वर्षां-इतकी प्राचीन आहे असें आतां सांगतां येतें. अर्थात् या संस्कृतीची सुरवात केव्हा झाली आणि शेवट कोणत्या परिस्थितींत आणि कसा झाला, हे प्रश्न अद्याप अनिर्णीत अवस्थेंतच राहिलेले आहेत. या लोकांचा ताम्रयुगीन संस्कृतीशीं महाराष्ट्र-कर्नाटकांत मात्र संपर्क आलेला दिसतो. इतरत्र असा पुरावा अद्याप मिळालेला नाही.

ताम्रयुगीन संस्कृति——नवाश्मयुगाच्या अखेरीपर्यंतच्या अश्मयुगाच्या सर्व अवस्थांमध्ये कुठल्याहि तऱ्हेच्या धातूचा वापर मानवाला माहीत नव्हता. यानंतर आलेल्या ताम्रयुगीन संस्कृतींत मात्र पहिल्याप्रथम मानवाने तांब्याचा आणि ब्रॉन्झचा वापर दगडी हत्यारांबरोबरच सुरू केला. धातूचें विशुद्धीकरण आणि त्यापासून वस्तू बनविण्याची कला, ही मानवी संस्कृतीच्या इतिहासांत एक क्रांतिकारक घटना ठरली, यांत शंका नाही. आणि त्यामुळेच सिंधुसंस्कृती-सारख्या नागरी संस्कृतींचा विस्तार झाला.

सिंधुसंस्कृतीची उपलब्धि, तिचें स्वरूप, तिचा विस्तार, माळवा, दख्खन, गुजरात-सौराष्ट्र आणि कर्नाटक या प्रदेशांत आढळणाऱ्या या ताम्रयुगीन संस्कृतीचीं विविध स्वरूपें, त्यांचा विनाश आणि कालखंड यांबद्दल गेल्या दहा वर्षांत विलक्षण शोध लागलेले असल्यानें ताम्रयुगीन संस्कृतीबद्दलच्या कल्पना आता बऱ्याच अंशीं बदलाव्या लागल्या आहेत. विशेषतः सिंधुसंस्कृतीची व्याप्ति आणि दख्खनमधील ताम्र-पाषाणयुगीन संस्कृतीचें अस्तित्व या दोन बाबतींत आमूलाग्र बदल करावा लागला आहे.

सिंधुसंस्कृति——सिंधुसंस्कृतीचा शोध कसा लागला आणि तिचीं अवशेषरूपी वैशिष्टचें कोणतीं, याचें विवेचन दुसरीकडे केलेलेंच आहे (पाहा– सिंधुसंस्कृति, मोहेंजोदडो, हराप्पा). या संस्कृतीचीं वैशिष्टयें, खापरांची बनावट, आकार आणि रंगीत नक्षीकाम यांची विविधता, तांब्याचीं हत्यारें, रंगीत दगड आणि फिऑन्स व स्टिअटाईट यांचे मणी व इतर अलंकार, अद्याप वाचल्या न गेलेल्या शेंकडों मुद्रा, शिस्तबद्ध व योजनापूर्वक बांधण्यांत आलेलीं घरें, स्नानगृहें, धान्याचीं गुदामें, बहुविध मृण्मय मूर्ती, आणि मुद्रांवरील विविध देवता-सदृश आकृत्या, या सर्व बाबी आता सर्वसाधारणपणें परिचित झालेल्या असल्याने त्यांची पुनरुक्ति करण्याचें प्रयोजन नाही.

व्याप्ति—सिंधु संस्कृतीच्या व्याप्तीचें क्षेत्र आता केवळ सिंध आणि पंजाब एवढ्यापुरतेंच मर्यादित राहिलें नसून, या संस्कृतीचे अवशेष आता पंजाबांत अंबाला, भाटिंडा आणि जालंदर हे जिल्हे, गुजरातेंत अहमदाबाद जिल्ह्यातलें लोथल आणि इतर अनेक स्थळें, सौराष्ट्रांत रोजडी, सोमनाथ व इतर कित्येक ठिकाणें आणि उत्तर प्रदेशांत मीरतच्या पश्चिमेस सतरा मैलांवर असलेलें अलमगीरपूर या ठिकाणीं सांपडलेले आहेत.

स्वरूप——अर्थात् या सर्व ठिकाणीं सांपडलेल्या सिंधुसंस्कृतीच्या अवशेषांचें स्वरूप एकजिनसी आणि अविकृत आहे, असें म्हणणें योग्य होणार नाही. गुजरात-सौराष्ट्र, पंजाब राजस्थान आणि उत्तरप्रदेश या प्रदेशांत या संस्कृतीच्य खुणा जरी सांपडल्या असल्या तरी, त्यांचा इतर संस्कृतींशीं कांही कांही ठिकाणीं संपर्क आल्यासारखा वाटतो. त्यामुळे या सर्वच ठिकाणीं सिंधुसंस्कृतीचें निर्भेळ स्वरूप पाहायला मिळतें असें नाही.

गुजरात-सौराष्ट्रांत सिंधुसंस्कृतीच्या निशाण्या जरी अनेक ठिकाणीं मिळाल्या असल्या, तरी यांतील फक्त लोथल, रंगपूर, रोजडी आणि सोमनाथ प्रभासपाटण, या ठिकाणींच उत्खनन बऱ्या प्रमाणावर झालेलें आहे.

अहमदाबाद जिल्ह्यांतील लोथळ या ठिकाणच्या उत्खननांत संपूर्णतया जरी सिंधुसंस्कृतीसारखीं खापरें, मणी, मुद्रा, घरांची रचना या गोष्टी सांपडल्या असल्या, तरी तेथील दोन वैशिष्टचें ध्यानांत घ्यायला हवीं. पहिलें वैशिष्टच असें, की लोथलला सिंधुसंस्कृतीच्या वस्त्यांच्या सर्व थरांत काळीं-तांबडीं खापरें सांपडतात. अशीं खापरें मोहेंजोदडो अथवा हराप्पा या उत्खननांत सांपडल्याची बोलवा अद्याप तरी नाही. त्यामुळे हीं काळीं तांबडीं खापरें सिंधुसंस्कृतीशीं समकालीन ठरतात; एवढेंच नव्हे; तर तीं कदाचित् भारतांतील एत-

द्वेशीयांच्या संस्कृतीचीं निदर्शक असावीं असें मानण्याकडे आता संशोधकांचा कल झुकूं लागला आहे. राजस्थानांत हीं खापरें वापरणाऱ्यांच्या मोठमोठ्या वस्त्यांचे अवशेष नुकतेच हातीं लागले आहेत. आणि त्यांचा कालखंडहि इ. स. पूर्व अंदाजें २००० असावा, असें अनुमान झालें आहे. त्यामुळे लोथलला जरी हराप्पा-मोहेंजोदडोची संस्कृति उघडकीस आणली गेली असली, तरी काळ्या-तांबड्या खापरांच्या संलग्नतेमुळे ती निर्भेळ वाटत नाही आणि म्हणूनच कांही विद्वान् लोथल-संस्कृतीला सिंधुसंस्कृति न म्हणतां सब्–इंडस्–संस्कृति असें म्हणूं लागले आहेत.

लोथलचें दुसरें वैशिष्टय असें, की तिथे एक मोठी जहाजांची गोदी (dock yard) उघडकीस आली आहे. ७१० फूट × १२० फूट अशा मोजणीच्या या गोदीला पूर्वेकडे २३ फूट रुंदीचें मोकळें दार सोडलेलें आहे. त्यांतून भरतीच्या वेळीं गोदीमध्ये भरपूर पाणी आलें म्हणजे मोठमोठीं जहाजें लोथलच्या परिसरांत येत. भरतीचें जादा पाणी वाहून जावें म्हणून दक्षिणेच्या भिंतींतून हें पाणी काढून लावण्याचीहि व्यवस्था केल्याचें आढळलें.

अशा तऱ्हेच्या पुराव्यावरून जसा एक निष्कर्ष काढतां येतो, त्याचप्रमाणे एक नवा प्रश्नहि उभा राहतो. पहिला निष्कर्ष असा, की लोथल समुद्रापासून फार दूर नसावें आणि साबरमती, सध्या वाहते त्यापेक्षा, लोथलच्या जास्त जवळून वाहत असावी. भरतीच्या वेळीं जादा पाण्यामुळे जहाजांना जवळ येणें सुलभ होत असावें. दुसरा प्रश्न उभा राहतो तो असा, की गुजरातेंत ज्या या सिंधुसंस्कृतीच्या वसाहती झाल्या, त्यांचे जनक सिंध-पंजाबमधून या प्रदेशांत कसे आले? या प्रश्नाच्या सोडवणुकीबद्दल एकमत नाही. सौराष्ट्रांत ते सिंध-कच्छ प्रदेशांतून समुद्रमार्गें आले असावे असा एक मतप्रवाह आहे. आणि सौराष्ट्राच्या किनाऱ्याकिनाऱ्यावरच नव्हे, तर आंतपर्यंत सिंधुसंस्कृतीचे अवशेष सांपडल्याने या लोकांनी समुद्रमार्गें अनेक गटागटांनी बोटींतून सबंध सौराष्ट्रांत वसाहती केल्या असाव्या, असें म्हणण्यास दुजोरा मिळतो. दुसरा मत-प्रवाह याहून भिन्न आहे. राजस्थानच्या भूभागाची जी रासा-यनिक तपासणी केली गेली आहे, त्यावरून त्यामध्ये सागरी सैंधवाचें प्रमाण बरेंच सांपडल्याने राजस्थान पूर्वीं मोठा सागर होता, असें वाटतें. हें खरें असल्यास सौराष्ट्र-गुजरातेंत सिंधुसंस्कृतीच्या लोकांनी राजस्थानाच्या सागरांतून नाल-सरोवराच्या मार्गें प्रवेश केला असण्याची शक्यता दृष्टीआड करून चालणार नाही.

लोथलचें आणखीहि एक वैशिष्टय आहे. तिथे गांवाबाहेर मानवांच्या दफनाची जागा सांपडली आहे. आतापर्यंत तिथे जवळजवळ पंधरापेक्षा जास्त मानवी सांगाडे सांपडले आहेत. हे बहुधा उत्तरेकडे डोकें आणि दक्षिणेकडे पाय करून खड्डयांत ठेवलेले आहेत. यांतील एकांत एक पुरुष आणि एक स्त्री असे दोन सांगाडे आढळल्याने लोथलला सतीची चाल होती, असें तेथील उत्खनक म्हणतात. परंतु सतीची कल्पना आणि पद्धति (जाळून घ्यायची) वेगळी असल्याने या मताशीं सहमत होणें कठिण पडतें. या सर्व सांगाड्यांचा मानववंशशास्त्रज्ञांनी अभ्यास केल्यास या लोकांचा सिंधुसंस्कृतीच्या लोकांशी वंशशास्त्राच्या दृष्टीने काय संबंध होता, यावर प्रकाश पडेल.

सौराष्ट्रांत रंगपूर, रोजडी आणि सोमनाथ या ठिकाणच्या उत्खननांत सिंधुसंस्कृतीच्या संपर्काचा पुरावा मिळाला आहे. मात्र या ठिकाणीं सिंधुसंस्कृतीबरोबरच इतरहि सांस्कृतिक संपर्काचे दुवे हातीं आल्याने सिंधुसंस्कृतीचेंच फक्त निर्भेळ स्वरूप सर्व थरांत मिळतें असें नाहीं. रंगपूरला हराप्पासारखीं खापरें, विटांची घरें, गटारें, दागदागिने इ. वस्तू जशाच्या तशा मिळाल्या; परंतु मुद्रा अगर मातीच्या देवतांच्या मूर्ती मात्र अजिबात मिळालेल्या नाहीत. पण उत्कृष्ट तऱ्हेच्या तांबड्या झिलईचे चषक -- जे सिंधुसंस्कृतींत मिळत नाहीत — ते येथे पहिल्याप्रथम सांपडल्याने ते नवीन सांस्कृतिक संपर्क दर्शवितात, असें मानायला हरकत नाही.

रोजडी आणि सोमनाथ येथील उत्खननांतहि विविध तऱ्हेचा पुरावा हातीं आला आहे. दोन्ही ठिकाणीं सर्वांत पहिली वस्ती खापरें, दागिने, तांब्याचीं हत्यारें, या बाबतींत सिंधुसंस्कृतीशीं संलग्नता दाखवीत असली, तरी नंतरच्या थरांत, खापरांत आणि मानवी जीवनांतील इतर आधिभौतिक गोष्टींत मात्र बदल झाल्याचें प्रत्ययास येतें. रोजडी येथे पांढऱ्या रंगांत नक्षीकाम केलेलीं काळीं-तांबडीं खापरें आणि हिरवट-राखी रंगाचीं खापरें आढळून येतात, तर सोमनाथला फिकट तांबड्या रंगांत पांढरट पिवळसर पृष्ठभागावर नक्षी-काम केलेले वैशिष्टयपूर्ण वाडगे सांपडतात. या व इतर अवशेषांवरून सौराष्ट्रांत हराप्पासंस्कृतीचें निर्भेळ स्वरूप पाहायला मिळत नसून, तिथे विविध सांस्कृतिक संपर्कांचा प्रत्यय येतो.

सौराष्ट्र-गुजरातखेरीज पंजाबांत व उत्तरप्रदेशांतहि सिंधु-संस्कृतीचे अवशेष हातीं आलेले आहेत. परंतु तेथील पुरावा गुजरात-सौराष्ट्रापेक्षा जरा निराळा वाटतो. पंजाबांतील रूपड येथे सर्वांत प्रथम वस्ती सिंधुसंस्कृतीच्या लोकांनी केली, हें तिथे सर्वांत खालच्या थरांत सांपडणाऱ्या दागदागिन्यांवरून,

मुद्रांवरून आणि मडक्यांवरून स्पष्टपणें उघड होतें. याशिवाय खड्डे खणून त्यांत मृतांना पुरण्याची पद्धतहि रूपडला आढळून आली. आठ फूट लांब आणि दोन फूट खोल खड्डा खणून त्यांत सभोवार मातीचीं मडकीं ठेवून ते लोक मृतांना पुरीत असत. मडक्यांची संख्या मृतांचें सामाजिक वा आर्थिक स्थान दर्शवीत असावी, असें अनुमान करण्यास हरकत नाही.

रूपडचीं सिंधुसंस्कृतीचीं हीं दफनें राखी रंगाची खापरें वापरणाऱ्यांनी कांही कांही ठिकाणीं उद्ध्वस्त केलेलीं आढळतात. चाकावर बनविलेल्या राखी रंगाच्या खापरांवर काळ्या रंगांत नक्षी काढलेलीं खापरें वापरणाऱ्या लोकांच्या वसाहती हस्तिनापूरजवळ मोठ्या प्रमाणांत उत्खनित करण्यांत आल्या आहेत.

उत्तर प्रदेशांतील अलमगीरपूरच्या उत्खननांतील प्राचीन स्तरांतहि सिंधुसंस्कृतीचे आणि राखी रंगाचीं खापरें वापरणाऱ्यांच्या संस्कृतीचे अवशेष हातीं आले आहेत. या ठिकाणीं सर्वांत प्राचीन वस्ती सिंधुसंस्कृतीच्या लोकांची होती, हें त्या स्तरांत मिळालेल्या फिआन्सच्या दागिन्यांवरून, खापरांवरून आणि विटांच्या वास्तूंच्या अवशेषांवरून सिद्ध झालेलें आहेच. मात्र या संस्कृतीच्या लोकांच्या वसाहतींचा शेवट कसा झाला, हें सांगतां येत नाही. या संस्कृतीचे अवशेष देणाऱ्या स्तरांचा माथा मात्र बराच काळ वस्ती न झाल्याने निसर्गहत होऊन पांढरट आणि कठिण वाटल्याचें उत्खनक सांगतात. यावरून सिंधुसंस्कृतीच्या वस्तीनंतर बराच काल अलमगीरपूरला वस्ती झाली नसावी, असें मानण्यास दुजोरा मिळतो. यानंतरची जी दुसरी वस्ती झाली, ती रूपडप्रमाणेच राखी रंगाचीं खापरें वापरणाऱ्यांची झाली. अलमगीरपूरच्या सिंधुसंस्कृतीच्या अवशषांत पीठ दळण्याच्या मातीच्या कथरोटांवर कापडाची प्रतिकृति उमटली आहे, तिचा उल्लेख मुद्दाम करणें आवश्यक आहे.

गुजरात, सौराष्ट्र, पंजाब, उत्तरप्रदेश या विभागांशिवाय राजस्थानांतहि सिंधुसंस्कृतीच्या वसाहतींचा पुरावा अलिकडे झालेल्या संशोधनांत उजेडांत आला आहे. बिकानेर प्रदेशांत अशा अनेक वसाहतींचे अवशेष सांपडलेले आहेत. परंतु त्यापैकी एकाहि स्थलाचें विस्तृत उत्खनन न झाल्याने याबद्दल जास्त माहिती मिळालेली नाही. परंतु भारत-पाकिस्तान सरहद्दीजवळील कालीबंगाँ या ठिकाणच्या प्राथमिक उत्खननामध्यें अशा तऱ्हेचा पुरावा निश्चितपणें मिळालेला आहे.

सिंधुसंस्कृतीचें समालोचन— वर केलेल्या समालोचनावरून सिंधुसंस्कृतीचा विस्तार किती मोठा होता, हें कळून येईल. मात्र या विस्तारापोटीं सिंधुसंस्कृतीच्या लोकांचा इतरांशीं आलेला सांस्कृतिक संपर्क, त्याचे मानवी आधिभौतिक जीवनावर झालेले परिणाम आणि त्यामुळें इतर प्रदेशांत दिसून येणारें या संस्कृतीचें बदललेलें स्वरूप, यांवरून हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा झालेला आहे. लोथलला सिंधुसंस्कृतीच्या अवशेषांबरोबरच आढळून येणारीं काळीं-तांबडीं खापरें, रोजडी आणि सोमनाथ येथे आढळणारीं फिकट तांबड्या रंगाचीं खापरें, रंगपूरला सांपडणारीं उत्कृष्ट तांबड्या झिलईचीं खापरें, या सर्व गोष्टी, सिंध-पंजाब विभागांतून बाहेर पडल्यानंतर सिंधुसंस्कृतीच्या लोकांचा इतर संस्कृतींशीं आलेला संपर्क दाखवितात आणि त्याबरोबरच या लोकांच्या संस्कृतीच्या उत्पत्तीची मीमांसा, त्यांचें मूलस्थान इ. कूट प्रश्नहि उभे करतात, यांत शंका नाही.

याबरोबरच खुद्द-सिंधुसंस्कृतीबद्दलचे अनेक प्रश्न अद्यापहि अनिर्णित आहेत. या संस्कृतीशीं संलग्न असलेल्या मुद्रांवर जी लिपी आहे, ती वाचतां आल्याशिवाय या संस्कृतीबद्दलचें गूढ पूर्णपणे उकललें जाईल, असें वाटत नाही. मात्र अशाच मुद्रा पश्चिम आशियांतहि सांपडल्याने सिंधुसंस्कृतीचा संपर्क — मग तो व्यापारीदृष्टचा का असेना — भारताबाहेरील प्रदेशांतहि आला होता, हें सिद्ध झालेलें आहे. अगदी अलीकडील संशोधनांत तर कांही बाबिलोनियन ग्रंथांत बलुचिस्तान, सिंध आणि सौराष्ट्र यांतील स्थलांचा आणि विभागांचा उल्लेख आल्याचें सूचित केलें गेलें आहे.

सिंधुसंस्कृतीचा विनाश कसा झाला, याबद्दलहि अद्याप




सिंधुसंस्कृतींतील दफनपद्धति

एकमत झालेलें नाही. कांहींच्या मतें ही संस्कृति पुरामुळे नष्ट झाली असावी. परंतु तसा निर्णायक पुरावा हातीं आलेला नाही. कांहींच्या मतें हीं शांतताप्रिय संस्कृतीचीं शहरें पुरंदर इंद्राच्या आधिपत्याखालीं आर्यांनी धुळीस मिळवलीं. पण

हें मतहि चुकीचें ठरतें. कारण या संस्कृतीच्या हराप्पा, रोजडी इ. ठिकाणीं सांपडलेल्या तटबंदीवरून ही संस्कृति निर्भेळ अहिंसक अथवा शांततेचा उद्घोष करणारी होती, असें दिसत नाही. शिवाय आर्यांनी जर या संस्कृतीचा नाश केला असेल, तर 'आर्य' अवशेष त्यांबरोबरच तिथे मिळायला पाहिजेत; पण तसे ते मिळालेले नाहीत. हराप्पाला उजेडांत आलेल्या 'सिमेटरी एच्' या भागांतील मानवी सांगाडयांचा आर्यांशीं संबंध जोडून हें मत सिद्ध करण्याचा प्रयत्नहि फारसा निर्णायक ठरलेला नाही. कांही संशोधकांच्या मतें उत्क्रांतीच्या नियमाप्रमाणे एखाद्या संस्कृतीच्या उच्चतम परिपोषांतच तिच्या विनाशाची वाटचाल नकळत सुरू होते. हें मत ग्राह्य धरल्यास, सिंधुसंस्कृतीच्या परिपूर्णतेंतूनच तिच्या अवनतीची गति सुरू होऊन, तिचा विनाश पायऱ्यापायऱ्यांनी होत गेला, असें म्हणावें लागतें. अर्थात् हें सिद्ध करण्यास हराप्पा–मोहेंजोदडो येथील उत्खननांत जर क्रमाक्रमाने स्तरवार आधिभौतिक अवनतीचें चित्र हातीं आलें असतें, तर मदत झाली असती. परंतु अद्याप तरी सिंधुसंस्कृतीचीं वैशिष्टयें सगळीकडे एकजिनसी, एकसारखीं आणि अविकृत स्वरूपांत आढळून आलेलीं आहेत.

राजस्थानांतील ताम्रयुगीन संस्कृतीचें स्वरूप–इ. स. १९५४–५५ सालीं राजस्थानांत उदेपूरच्या आहाड विभागांत उत्खनन झालें, तेव्हा राजस्थानांतील ताम्रयुगीन संस्कृतीवर संशोधकांचें लक्ष केंद्रित व्हावें अशी परिस्थिति निर्माण झाली. या ठिकाणीं काळीं-तांबडीं खापरें वापरणाऱ्या लोकांच्या वसाहतीच्या अवशेषांचें स्वरूप मोठ्या प्रमाणावर उघडकीस आणलें गेलें. गुजरातमधील लोथल येथेहि सिंधुसंस्कृतीच्या खापरांबरोबर काळीं-तांबडीं खापरें सर्व स्तरांत सांपडल्याचा उल्लेख वर



राजस्थानांतील ताम्रयुगीन काळा – तांबडा वाडगा

आला आहेच. अशींच खापरें माळव्यांत आणि इतरत्र सांपडलीं होतीं. याशिवाय ऐतिहासिक कालांतहि "उलटी भाजणी" (Inverted firing) च्या पद्धतीने खापरांच्या बनावटीचें तंत्र वापरांत असल्यामुळें अशा काळचा-तांबडया खापरांचा काल काय असावा, याची गूढता होतीच. या तंत्राची प्राचीनता केवळ ऐतिहासिक कालाइतकीच नव्हे; तर ताम्रयुगांत सिंधुसंस्कृतीच्या कालाइतकी आहे, हें लोथलच्या उत्खनन ने सिद्ध केलें असल्याने, आहाडचें उत्खनन महत्त्वाचें ठरावें, यांत नवल नाही.

या दृष्टीनें पाहतां १९५४–५५ च्या उत्खननापेक्षा १९६०-६१ सालचें विस्तृत उत्खनन फार फलदायी ठरलेलें आहे. काळीं-तांबडीं खापरें वापरणाऱ्या लोकांच्या एकावर एक अशा कमीत कमी १६-१७ वस्त्यांचे अवशेष या उत्खननांत आढळून आले. या वस्त्या एकंदर तीन खंडांत विभागतां आल्या. पहिल्या वस्तींतील लोक काळीं-तांबडीं, काळचा रंगांत नक्षी काढलेलीं पिवळसर खापरें आणि तांबडीं खापरें वापरीत असत. यांत वाडगे, उंच मानेचे घडे, स्टॅण्डवरील थाळचा, मोठमोटाले रांजण, वाटचा, इ. प्रकार होते. त्यांचीं घरें ओबडधोबड दगडाच्या पायाचीं असून भिंती मातीच्या असत. छप्पर कसें होतें याचा उलगडा झाला नाहीं. परंतु खांबाचे दर न मिळाल्याने छप्पर आडव्या तुळईवर दोहों बाजूंस उतरतें असावें, असें दिसतें. भिंतीला भक्कमपणा येण्याकरितां चिखलांत गारगोटयांचे तुकडे मिसळीत. अशाच बनावटीचीं घरें अद्याप राजस्थानांत आढळून येतात. खापरांवरील नक्षी बहुधा ठिपके आणि रेघा यांची असून ठिपक्यांची खडी वस्त्रांवर काढून घेण्याची पद्धत अजून राजस्थानांतील स्त्रियांच्या वस्त्रप्रावरणांत प्रकर्षाने आढळून येते.

या वरील तीन वस्त्यांची धाटणीहि सर्वसामान्यपणे अशीच राहिली. खापरांचे आकार, घरांची बांधणी, इ. गोष्टी अविकृतच राहिल्या. फक्त काळचा-तांबडचा खापरांच्या आकारांत बदल झाला. उंच मानेचे आणि मानेवर आणि मानेखाली पन्हाळीची नक्षी असलेले तांबडचा रंगाचे मोठमोठे रांजण, राखी रंगाचे, विविध नक्षी असलेले, पातळ बुडाचे माठ व झांकण्या, शंख आणि फिआन्सचे मणी, तांब्याच्या, काटकोनचौकोनी पण बहिर्गोल धारदार कड असलेल्या कुऱ्हाडी, धान्य वाटण्याकरितां केलेले मोठमोठे पाटे, मोठमोठचा चुली, बहुधा तांबे गाळण्याकरितां केलेल्या भट्टचा व सुपारीच्या आकाराचे, पण उत्कृष्ट कोरीव नक्षीकाम केलेले मातीचे मणी, मागाच्या टोकाचे लंबक, इ. गोष्टी या लोकांच्या जीवनावर प्रकाश पाडतात. यांतील मातीचे मणी व स्टॅण्डवरील वाडगे इ. अवशेष पश्चिम आशिया आणि क्रीट येथील संस्कृतीशीं संपर्क दाखवितात, ही मुद्दाम नमूद करण्यासारखी बाब आहे.

आहाडपासून पंचेचाळीस मैलांवर असलेल्या गिलुंड येथेहि काळीं-तांबडीं खापरें वापरणाऱ्यांच्या वस्तीचे अवशेष मिळाले आहेत. मात्र येथे मातीच्या विटांच्या ज्या वास्तू मिळाल्या आहेत, त्यांच्या रचनेचा अथवा वापराचा बोध मात्र अजून झालेला नाही. अशा वास्तूंबरोबरच भाजलेल्या विटांची व दगडी पाया असलेली मोठी भिंत उघडकीस आली आहे. ही भिंत कदाचित् कोटाची असावी. मात्र आहाडपेक्षा गिलुंडला विविध तऱ्हेचीं खापरें सांपडलेलीं असल्याने येथील संस्कृति जास्त विविध वाटते.


या संस्कृतीच्या लोकांचें जीवन इतकें साधें आणि अप्रगत असतांना एवढया कालखंडांत तें कसें टिकलें, हा एक प्रश्नच आहे. सर्व वस्त्यांच्या अवशेषांत दगडी अथवा धातूचीं हत्यारें अत्यंत अल्प प्रमाणांत सांपडलीं, हें वैशिष्टचच म्हटलें पाहिजे. केवळ तांबें गाळून त्यापासून विविध वस्तू बनवणें, या त्यांच्या धंद्यामुळेच या वस्त्या आर्थिकदृष्टचा तग धरून राहिल्या असाव्या, या अनुमानाला उत्खननांत सांपडलेला कच्च्या तांब्याचा सांठा पुष्टि देतो.

गिलुंड आणि आहाड येथे सांपडलेलीं काळीं-तांबडीं, पांढऱ्या नक्षीचीं मडकीं, माळव्यांतहि नावडातोडी येथे सर्वांत खालच्या थरांत सांपडल्याने राजस्थानांतील ताम्रयुगीन संस्कृति माळव्यापेक्षा प्राचीन असावी, असें आता निश्चित झालें आहे. हेंच कार्बन १४ च्या तारखांनीहि सिद्ध केलेलें आहे. माळव्यांतील नावडातोडीचे सर्वांत खालचे थर इ. स. पूर्व अठराव्या शतकांत पडतात. या दृष्टीने आहाडची संस्कृति याहिपेक्षा प्राचीन असावी, हें उघड आहे. सिंधुसंस्कृतीशीं या संस्कृतीचा माळव्यांतील संबंध आणि ताम्रयुगीन संस्कृतीच्या संपर्काची व्याप्ति, या दोन गोष्टी अजून संशोधकांची वाट पाहत आहेत.

माळव्यांतील ताम्रयुगीन संस्कृति––आहाडच्या ताम्रयुगीन संस्कृतीनंतरच्या कालखंडांत प्रसारित झालेल्या माळव्यांतील ताम्रयुगीन संस्कृतीचें चित्र मुख्यत्वेंकरून नर्मदाकांठीं नावडातोडी आणि चंबळतीरीं नागदा या ठिकाणच्या उत्खननांतून प्रकट झालें आहे. याशिवाय या संस्कृतीची व्याप्ति माळव्याच्या विस्तृत प्रदेशावर होती, हेंहि अनेक स्थलांच्या पाहणीवरून सिद्ध झालेलें आहे.

आहाडला सांपडलेलीं काळीं-तांबडीं खापरें नावडातोडी येथे सर्वांत खालच्या स्तरांत सांपडल्याने नावडातोडी येथील वसाहत नंतरच्या कालखंडांतील आहे, हें उघड होतें. मात्र आहाडला काळीं–तांबडीं खापरें वापरणाऱ्यांच्या संस्कृतीचें जें बरेचसें अविकृत स्वरूप दिसून येतें, त्यापेक्षा नावडातोडीच्या संस्कृतींत विविधता दिसून येते. काळीं-तांबडीं, दुधट रंगाचीं, तांबडीं, राखी, खणखणीत तांबडीं, अशीं तऱ्हेतऱ्हेचीं खापरें येथे सांपडलेलीं आहेत.

नावडातोडी येथील वसाहतीचे चार कालखंड पडतात.




नावडातोडी येथील ताम्रयुगीन वर्तुळाकार वास्तू

सर्वांत प्रथम वस्तीचे लोक पांढऱ्या रंगांत नक्षी काढलेले काळे-तांबडे छोटे वाडगे, छोटचा आकाराचीं मडकीं, दुधट रंगाच्या पृष्ठभागावर काळचा रंगांत नक्षी काढलेले बहिर्गोल बाजू असलेले वाडगे, अंतर्वक्र बाजू असलेले वाडगे, पिंपळाच्या पानासारखी नक्षी काढलेले व त्याच आकाराचे खोलगट मातीचे दिवे, दांडा असलेल्या झांकण्या, पळणाऱ्या हरणाची नक्षी असलेले घडे व मानवांचें समूहनृत्य दाखविणारे कप वापरीत असत. यांचीं घरें काटकोनी-चौकोनी असून त्यांच्या भिंती, बांबूच्या तट्टचांवर माती लिंपून व मध्ये मजबुतीकरिता लांकडी वांसे पुरून तयार केलेल्या असत. छपराची कल्पना येत नाही; पण तें गवत-माती-बांबू यांचें बनविलेलें असावें. भिंतीवर उत्कृष्ट लिंपण देण्याची पद्धत होती. घराच्या खोलीचा आकार आपल्या सध्यांच्या खोलीसारखाच म्हणजे १०×८ फूट असा होता. याशिवाय ८ ते ९ फूट व्यास असलेलीं गोल घरेंहि बांधलीं जात असत. त्यांच्या सभोवार लांकडी वांसे पुरीत असत. अर्थात् अशा वास्तूंचा उपयोग राहण्यापेक्षा धान्य सांठवण्यासाठी कणगीसारखा करीत असावे. यांतील आणि घरांतील जमिनी चुन्याने उत्कृष्टपणे सारवून तयार करीत. हत्यारें म्हणून येथील रहिवासी गारगोटीचीं लांबसडक पातीं आणि तांबडचा काटकोन-चौकोनी कुऱ्हाडी वापरीत असत.

नावडातोडी येथे एकंदर चार मुख्य वस्त्या झाल्या; पण त्या सर्व आगीच्या भक्ष्यस्थानीं पडल्याने बरेचसे अवशेष आगीची झळ पोंचलेल्या स्वरूपांत मिळाले. या चारहि

वस्त्यांचें स्वरूप सर्वसाधारणपणे फारसें बदललेलें दिसत नाही. फक्त खापरांचें स्वरूप मात्र बदलतें. सर्वप्रथम वस्तीशीं संलग्न असलेलीं काळीं-तांबडीं खापरें फक्त प्रथम खंडांतच मिळालीं, तर दुधट रंगाची खापरें प्रथम आणि द्वितीय खंडांत मिळालीं. तृतीय खंडांत तांबडया रंगाची मडकीं प्रकर्षाने वापरांत होतीं. त्यांचे आकारहि विविध होते. स्टॅण्डवरील थाळया, वाडगे, कप, लोटे, कळशा, माठ आणि याचबरोबर जाडया-भरडया तांबडया पोताचे मोठाले रांजण, पीठ मळण्याकरितां मातीच्या पराती, धुण्याकरितां घमेल्यासारखीं (basin) भांडीं, राखी रंगाचीं मडकीं व रांजण, असे विविध प्रकार वापरांत होते. चतुर्थ खंडांत या तांबडया रंगाच्या माळवा–पोताच्या खापरांबरोबरच खणखणीत आवाजाचीं, उत्तम भाजणीचीं आणि चाकावर घडविलेलीं मडकीं मिळालीं. अशींच खणखणीत मडकीं दख्खन व कर्नाटक प्रदेशांत फार मोठ्या प्रमाणांत ताम्रपाषाणयुगाचीं प्रातिनिधिक म्हणून मिळालेलीं आहेत.


या लोकांची वसाहत मुख्यत्वेंकरून शेतीप्रधान स्वरूपाची



इराणच्या संस्कृतीशीं साम्य दर्शविणारा
नावडातोडी येथील तोटीचा वाडगा

होती. नावडातोडी येथे एका जळलेल्या घरांत, उत्कृष्टपणें तयार केलेल्या चुलखंडाभोवती मूग, हरभरा, तांदूळ, तीळ, मसूर, वाटाणे आणि गहू जळलेल्या स्थितींत फार मोठ्या प्रमाणावर सांपडल्याने वरील अनुमानास निश्चिति आली आहे. या लोकांच्या धर्मविषयक मतांची कल्पना कांही कांही अवशेषांवरून येते. मोठमोठ्या रांजणांवर मानवी युगुलांच्या आकृत्या चिकटविणें, वाडग्याच्या आंतील बाजूस त्रिशूळ घेतलेल्या व केस पिंजारलेल्या मानवी आकृति काढणें, दोन्ही हातांत धरून, आडवा कापलेल्या व तोटी असलेल्या वाडग्यांतून जलादि द्रव अर्घ्यासारखे ओतणें, अशा तऱ्हेच्या मूर्तींवरून आणि अशा तऱ्हेच्या क्रिया दर्शविणाऱ्या मातीच्या भांड्यांच्या आकारांवरून या लोकांच्या धर्मभावनांची ओळख पटते.

याशिवाय धान्य भरडण्याकरितां वापरांत आणले जाणारे



नावडातोडी येथील ताम्रयुगांतल्या तांब्याच्या कुऱ्हाडी

दगडी पाटे; ठोकण्याच्या कामीं उपयोगी पडणारे दगडाचे गोल घण; धान्याबरोबरच मांसाहाराकरितां उपयोगांत आणलीं गेलेलीं हरणें, बकरीं आणि डुकरें यांचे अवशेष; हत्यारें म्हणून बनविलेल्या तांब्याच्या कुऱ्हाडी आणि तलवारी; मासे पकडण्याकरितां तांब्याचे गळ; दररोजच्या व्यवहारांत अथवा शेतीचें पीक कापण्याकरितां वापरांत असलेलीं शेंकडो गारगोटीचीं पातीं आणि फिआन्स, स्टिअटाईट, अकीक, कार्नेलियन मायक्रोक्लाईन इ. चे विविध मणी, या लोकांच्या जीवनाच्या निरनिराळ्या अंगांवर प्रकाश पाडतात.

नावडातोडीच्या ताम्रयुगीन वसाहतीच्या संस्कृतीचीं तीन वैशिष्टचें नजरेंत भरण्यासारखीं आहेत. पहिलें असें, की ही संस्कृति राजस्थानातील संस्कृतीनंतरची असली, तरी प्रथमावस्थेंत तिचा राजस्थानाशी संपर्क आला होता. दुसरें वैशिष्टच असें, की या संस्कृतीचे कांही अवशेष इराणमधील ताम्रयुगीन संस्कृतीशीं विलक्षण साम्य दर्शवितात. तोटीचे वाडगे, उंच व पऱ्हाळीची नक्षी असलेलीं भांडीं, मान व उदर असलेले माठ, मद्याचे चषक, कांही तांब्याचीं हत्यारें, या सर्व गोष्टी इराणच्या संस्कृतीशीं संलग्न वाटतात. तिसरी गोष्ट अशी, की या वसाहतींच्या चतुर्थ खंडांत जीं खापरें सांपडतात, तशींच खापरें महाराष्ट्र-कर्नाटकांतील ताम्रयुगीन संस्कृतीशीं संलग्न असल्याने माळव्यांतील ताम्रयुगीन लोक महाराष्ट्राकडे वसाहतीच्या निमित्ताने सरकले, असा कयास बांधतां येतो.

कालखंडाच्या दृष्टीने माळव्यांतील संस्कृति ही आहाडपेक्षा नंतरची आहे हें जसें खापरांच्या अभ्यासावरून सांगतां येतें, तसेंच तें कार्बन १४ पद्धतीने आलेल्या तारखांवरून निश्चित

करतां आलेलें आहे. आहाडच्या तारखा इ. स. पूर्व २००० पर्यंत जातात, त्याच नावडातोडीच्या बाबतींत इ.स. पूर्व १७०० ते १३०० च्या दरम्यान पडतात. नावडातोडीनंतर दख्खनची संस्कृति उदयास आल्याने दख्खनच्या बाबतींत याच तारखा इ. स. पूर्व १३०० ते ११०० या कालखंडांत स्थिर होतात.

दख्खनची ताम्रयुगीन संस्कृति––गेल्या दहा वर्षांमधील संशोधन आणि उत्खनन यामुळे दख्खन व कर्नाटकाच्या ताम्रयुगीन संस्कृतीच्या बाबतींत विलक्षण शोध लागलेले आहेत. कांही वर्षांपूर्वी 'महाराष्ट्रांत ताम्रयुग झालेंच नाहीं, तेथील मानव अश्मयुगांतून एकदम लोहयुगांत आला', अशा तऱ्हेचीं मतें विद्वानांत प्रचलित होतीं. पण घोड, गोदा, प्रवरा, भीमा, कृष्णा, तापी, गिरणा, मुळा, इ. महाराष्ट्राच्या प्रमुख नद्यांच्या खोऱ्यांत ही ताम्रयुगीन संस्कृति विस्तीर्णपणे पसरली होती, हें या प्रदेशांत मिळणाऱ्या अवशेषांवरून आता सिद्ध झालेलें आहे.



नावडातोडी येथील ताम्रयुगीन मद्य—चषक

माळव्यांतील ताम्रयुगीन लोक सरकत सरकत तापीच्या कांठावर आणि घोडच्या कांठावर येईपर्यंत त्यांनी आपलीं खापरांतील बनावटीचीं वैशिष्टचें कायम ठेवल्याचें आढळतें. परंतु महाराष्ट्राच्या मध्य आणि दक्षिण प्रदेशांत येत असतांना त्यांचा आंध्र-कर्नाटकाच्या नवाश्मयुगीन लोकांशीं संपर्क आला आणि या संपर्कातून जी एक मिश्र संस्कृति निर्माण झाली, तिचा प्रत्यय महाराष्ट्र-कर्नाटकांत अनेक ठिकाणीं आलेला आहे.

या मिश्र संस्कृतीचें चित्र मात्र एकजिनसी स्वरूपांत मिळतें. चाकांवर बनविलेलीं, उत्तम भाजणीचीं, खणखणीत आवाजाचीं भांडीं, तांबडचा रंगावर काळचा रंगाने भौमितिक आकाराची नक्षी काढलेले वाडगे, उंच व बुटक्या मानेच्या कळशा, तोटीचीं व फनेलच्या आकाराचें तोंड असलेलीं भांडीं, हें या संस्कृतीचें वैशिष्टच होय. याशिवाय हातबनावटीचे मोठाले रांजण, राखी रंगाचे, गोल बुडाचे व पसरट तोंडाचे,



नेवासें येथील ताम्रयुगीन संस्कृतींतलें तोटीचें मडकें


मृत बालकांना पुरण्याकरितां वापरण्यांत येणारे मृद्‌घट, तांब्याच्या छिन्न्या, दांडा विभाजित केलेल्या कटचारी, काटकोन - चौकोनी आकाराच्या कुऱ्हाडी, वाळे, बांगडचा, अंगठचा, मणी, गारगोटीच्या छिलक्यांचीं धारदार पातीं, कुठे बांबूच्या तट्टचांवर माती लिंपून बनविलेल्या घरांच्या भिंती, तर कांही ठिकाणीं जमिनींत खड्डे घेऊन त्यांतच राहण्याची केलेली संभाव्य व्यवस्था, मातीच्या चुली व चुन्याच्या जमिनी, फिआन्स, स्टिअटाईट व अकीकादि दगडांचे मणी, बैल,



चांडोली येथील ताम्रयुगीन कटचार

बकरे यांच्या मांसाची आहारांत योजना, घोटून घोटून गुळगुळीत आणि धारदार कड केलेल्या काळ्या दगडाच्या कुऱ्हाडी, राप्या व छिन्न्या, या सर्व गोष्टी महाराष्ट्रांतील ताम्रयुगीन संस्कृतींतील जीवनाचें प्रतिबिंब दर्शवितात.

मात्र या संस्कृतीचीं खास वैशिष्टचें दोन-तीन आहेत, त्यांचें समालोचन करणें ठीक होईल. या लोकांच्या घोटीव दगडी कुऱ्हाडी, तोटीचीं मडकीं आणि राखी रंगाचीं खापरें ज्याप्रमाणें नवाश्मयुगीन वैशिष्टचांचा प्रभाव दर्शवितात, तोच प्रभाव या लोकांच्या दफनपद्धतींतहि दिसून येतो. नेवासें, दायमाबाद, चांडोली, बहाळ आणि प्रकाशें या सर्व ठिकाणीं या संस्कृतीच्या लोकांचीं शेंकडों दफनें सांपडलेलीं आहेत. लहान अडीच-तीन वर्षांपर्यंतचीं मृत मुलें बहुधा तोंडास तोंड लावून ठेवलेल्या दोन राखी मडक्यांत ठेवून पुरीत असत. डोकें उत्तरेकडे व पाय दक्षिणेकडे या पद्धतीने मृतांना ठेवलें जाई. प्रौढांना मोठमोठ्या रांजणांत अथवा ओळीने ठेवलेल्या ५–६ मडक्यांत याचप्रमाणे पुरीत असत. परंतु पुरण्याकरिता खणलेल्या खड्ड्यांच्या निशाण्या मात्र सांपडलेल्या नाहीत. कांहीं कांहीं वेळां तर प्रौढांना मडक्यांत न झांकतां तसेंच उघड्या अंगाने पुरलें जाई. हीं सर्व दफनें घरांतील जमिनींतच उरकलीं जात आणि मृतांबरोबर त्यांच्या वयोमानाप्रमाणे खेळणीं, बोळकीं, मोठालीं तोटीचीं भांडीं व वाडग्यांचा संच पुरला जात असे. मृत्यूनंतरच्या अवस्थेंत यामुळे त्यांच्या अन्नपाण्याची सोय व्हावी, अशी समजूत असावी. त्याचबरोबर लहान मुलांना जीं खेळणीं प्रिय असत, तीं त्यांच्याबरोबरच पुरण्याचीहि हृद्य तरतूद या



नेवासें येथील ताम्रयुगीन मुलांची दफनपद्धति

संस्कृतींत आढळून येते. बहुधा राखी रंगाचीं मडकीं जरी दफनाकरिता वापरलीं जात, तरी कांही वेळां इतर प्रकारचीं मडकींहि उपयोगांत आणीत. कांही वेळां तर हातीं येतील त्या वाडग्यांनीहि मृताचा देह झाकल्याचें आढळून आलें आहे. हें सर्व बालकांच्या आईवडिलांच्या आर्थिक परिस्थितीवर आणि सामाजिक दर्जावर अवलंबून असावें असें वाटतें. नेवासें आणि चांडोली येथील उत्खननांत कांही बालकांच्या गळ्याभोंवती तांब्याच्या मण्यांची माळ जशीच्या तशी आढळली. या बाळलेण्यांचें पृथक्करण करतां हे सर्व मणी कापूस आणि रेशीम यांच्या संयुक्तपणे बनविलेल्या धाग्यांत ओवलेले असल्याचें दिसून आलें. याशिवाय या दोन्यांस शेणाचे व तेलाचे अवशेष चिकटलेले असल्याने मृतांना पुरण्यापूर्वी गोमय व तेल यांच्या लेपनाचे संस्कार करीत असावे असें वाटतें.

दुसरें वैशिष्टच असें, की महाराष्ट्र-कर्नाटकांत जरी आतापर्यंत सर्वसाधारणपणे ताम्रयुगीन खापरांचा सारखेपणाच आढळून येतो, तरी नगर जिल्ह्यांतील दायमाबाद येथील उत्खननांत सर्वांत पहिल्या वस्तीचीं खापरें वेगळेपणा दाखवितात. हीं खापरें तांबडीं असलीं तरी त्यांचा आकार आणि बनावट खणखणीत खापरांपेक्षा वेगळी असल्याने, माळव्यांतून संभाव्य रीतीने आलेल्या ताम्रयुगीन संस्कृतीच्या लोकांनी दक्खनच्या या मूळ रहिवाश्यांवर प्रभाव पाडून आपला सांस्कृतिक ठसा त्यांच्यावर पूर्णपणे उमटविल्याचें दिसून येतें.

तिसरें वैशिष्टच असें, की राखी रंगाचीं तोटीचीं भांडीं, दफनपद्धति, गुळगुळीत दगडी कुऱ्हाडी, हीं सर्व नवाश्मयुगीन वैशिष्टचें फक्त महाराष्ट्र–कर्नाटकांतील ताम्रयुगीन संस्कृतीशीं संलग्न सांपडतात. तीं माळवा अथवा इतर ठिकाणीं न सांपडल्याने माळव्यांतून दक्षिणेकडे सरकणाऱ्या ताम्रयुगीन संस्कृतीचा आणि आंध्र–कर्नाटकांतून उत्तरेकडे पसरणाऱ्या नवाश्मयुगीन संस्कृतीचा मिलाफ महाराष्ट्रांत झाल्याचें मनोरम चित्र उघडकीस येतें.

महाराष्ट्रांतील ताम्रयुगीन संस्कृतीचा कालखंड नेवासें आणि चांडोली येथील उत्खननांतील अवशेषांच्या, कार्बन १४ या पद्धतीने आलेल्या तारखांवरून निश्चित झालेला आहे. या दोन्ही ठिकाणीं इ. स. पूर्व १२०० ते ११०० या कालांत आणि तत्पूर्वी थोडें आधी महाराष्ट्रांत या संस्कृतीची पाळेंमुळें रुजूं लागलीं असावीं असें दिसतें.

या संस्कृतीचा विनाश कसा झाला, हें सांगणें कठिण आहे. परंतु या विनाशानंतर बरींच वर्षें महाराष्ट्रांत वस्ती झाली नसावी असें दिसतें. नेवाश्याला ताम्रयुगीन संस्कृतीच्या वस्तीचा शेवटचा थर जंगलाच्या वाढीमुळें काळसर झाल्याचें आढळून आलें. त्यानंतर जी वस्ती झाली, ती मात्र इ. स. पूर्व दुसऱ्या, तिसऱ्या शतकांत झाली. या ऐतिहासिक कालांतील लोकांना लोखंडाचा वापर माहीत असल्याने त्यांनी आपल्या हत्यारांनी महाराष्ट्राच्या भूभागावरील घनदाट जंगलें तोडून आपल्या वसाहती स्थापन केल्या.

गंगा-यमुना दुआबांतील ताम्रयुगीन संस्कृतीचें स्वरूप –– राजस्थान, माळवा, सौराष्ट्र अथवा महाराष्ट्र या ठिकाणीं ताम्रयुगीन संस्कृतीचें जें स्वरूप दिसून येतें, त्यापेक्षा वेगळें स्वरूप गंगा-यमुना दुआबांत दिसून येतें. उत्तरप्रदेशांत आलमगीरपूर, मथुरा, अहिच्छत्रा, हस्तिनापूर, बिहारांत श्रावस्ती, राजस्थानांत बिकानेर, पंजाबांत रूपड आणि मध्यप्रदेशांत उज्जैन, येथे या संस्कृतीचीं निदर्शक राखी रंगाचीं, चाकावर घडविलेलीं, उत्तम भाजणीचीं, शुद्ध चिखलाचीं आणि काळचा रंगांत नक्षी काढलेलीं खापरें सांपडलेलीं आहेत. हस्तिनापूरच्या उत्खननांत यांचा काल इ. स. पूर्व ११०० ते ८०० असा पडतो. वाडगे आणि थाळचा या व्यतिरिक्त दुसरे आकार या खापरांत आढळत नाहीत. थाळचा स्वतंत्रपणे इतरत्र ताम्रयुगांत फारशा आढळत नाहीत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

राखी रंगाच्या या खापरांचें साहचर्य महाभारतकालीन अहिच्छत्रा, हस्तिनापूर, कौशाम्बी, या नगरांशीं आढळतें हें लक्षांत घेण्यासारखें आहे. याशिवाय या खापरांचें बलुचिस्तानांत मिळणाऱ्या राखी रंगाच्या खापरांशींहि साधर्म्य दिसतें तें महत्त्वाचें ठरतें.

या लोकांच्या राहणीची फारशी माहिती विस्तृत उत्खननाच्या अभावीं मिळालेली नाही. मात्र हस्तिनापूर, आलमगीरपूर आणि रूपड येथील उत्खननांत या लोकांच्या, वेताच्या जाळीवर चिखल थापून केलेल्या घरांच्या भिंतींचे अवशेष मिळाले आहेत. याशिवाय हे लोक तांदूळ आणि मांसहि खात असत. यांना तांब्याच्या हत्यारांचा आणि आर्य संस्कृतीशीं संलग्न असलेल्या अश्वांचा वापर माहीत होता, असें दिसतें. अश्वांचा वापर आणि महाभारतकालीन नगरांशीं साहचर्य, यावरून हे लोक आर्यवंशापैकी महत्त्वाचा घटक असावे, असें अनुमान करतां येतें.

ताम्रयुगीन संस्कृतींचें समालोचन –– सिंधुसंस्कृतीच्या सुरवातीपासून तों तहत हस्तिनापूरच्या, राखी रंगाचीं खापरें वापरणाऱ्या लोकांच्या कालापर्यंत भारतांत ताम्रयुगीन संस्कृतीचें बदलतें चित्र दृष्टोत्पत्तीस येतें. सिंधुसंस्कृतीचें नागरी स्वरूप मात्र त्यानंतर येणाऱ्या कुठल्याहि इतर ताम्रयुगीन संस्कृतींत दिसत नाही.

सिंधुसंस्कृतीव्यतिरिक्त उघडकीस आलेल्या ताम्रयुगीन वसाहती नागरी स्वरूपाच्या नसून छोटचा छोटचा वस्त्यांच्या स्वरूपांत होत्या. मात्र राजपुताना, माळवा, पंजाब, उत्तरप्रदेश महाराष्ट्र, या ठिकाणच्या वसाहतींचा एकमेकींशीं किती प्रमाणावर संपर्क आला, याची शहानिशा पूर्णतया झालेली नाही. त्यांच्या प्रगतीच्या वेगवेगळचा पायऱ्यांना कोणती परिस्थिति – आर्थिक, नैसर्गिक वा तांत्रिक – कारणीभूत झाली, याचाहि पडताळा घेतां आलेला नाही.

सिंधुसंस्कृतीचा विनाश आर्यांनीच केला की काय, याबद्दल एकमत नाहीं. परंतु माळवा, राजस्थान, उत्तर महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेश या ठिकाणीं अनुक्रमे इराणांतल्या सारखीं खापरें, क्रीटमधे आढळतात त्याप्रमाणे मातीचे नक्षीचे मणी, दांडचाचें टोक विभाजित केलेल्या (antennae) तांब्याच्या कटचारी अथवा भाले आणि महाभारतकालीन आर्यांचें सूचित होणारें साहचर्य, यांवरून भारतांतील आर्यांच्या आगमनाचा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहे, असें म्हणावेंसें वाटतें.

फक्त महाराष्ट्रांतच ताम्रयुगीन संस्कृतीचा नवाश्मयुगीन संस्कृतीशीं संपर्क आल्यासारखें वाटतें. इतरत्र मात्र निर्भेळ ताम्रयुगीन संस्कृतीचें दर्शन होतें.

या ताम्रयुगीन संस्कृतीचे जनक कोण, याबद्दल अद्याप उलगडा होत नाही. कदाचित् इराणांतून आर्यांच्या निरनिराळचा टोळचा भारतांत येऊन त्यांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या असाव्या. हें आगमन एककालीं न झाल्याने या संस्कृतीचें बदलतें चित्र आपणांस पाहायला मिळतें.


लोथल, रूपड व इतर अनेक ठिकाणीं उजेडांत आलेल्या मानवी सांगाडचांचा अभ्यास झाल्यास ताम्रयुगीन संस्कृतींतील विविध मानववंशांवर प्रकाश पडेल. नेवाश्याला सांपडलेल्या सांगाडचांपैकी प्रौढांचा जो अभ्यास झाला आहे, त्यावरून हे लोक रुंद चेहेऱ्याचे, अरुंद डोक्याचे, बसक्या नाकाचे आणि खालचा जबडा वरच्यापेक्षा जरा पुढे आलेले असे होते, असें समजून आलें. मानववंशशास्त्रज्ञांच्या मतें महाराष्ट्राच्या आदिवासी जमातींची ठेवणहि अशीच आहे. यावरून ताम्रयुगीन संस्कृतीपैकी कांही लोक तरी महाराष्ट्राच्या आदिवासींपैकी असावे, असें वाटतें.

भारतांतील लोहयुगीन संस्कृति –– महाराष्ट्रांत ताम्रयुगानंतर इ. स. पूर्व दुसऱ्या, तिसऱ्या शतकांत लोहयुगीन लोकांनी वसाहती केल्याचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. उत्तरप्रदेशांतहि हस्तिनापूरला राखी रंगाच्या खापरांच्या उत्तरकालांत लोखंडाच्या वापराचा पुरावा मिळाल्याचा निर्देश आलाच आहे. उज्जैनच्या उत्खननांत उत्तर भारतांत लोखंडाचा वापर इ. स. पूर्व पांचव्या, सहाव्या शतकांत झाल्याचा पुरावा मिळाला आहे. यावरून उत्तर भारतांत आणि दक्षिण भारतांत लोखंडाचा वापर झाल्याचे कालखंड भिन्न असल्याचें स्पष्ट होतें. प्राचीन ऐतिहासिक कालांतील लोहसंस्कृतीच्या लोकांनी आपल्या तांत्रिक ज्ञानाच्या जोरावर नागरी संस्कृति पुन्हा कशी स्थापन केली, याचा आढावा घेण्यापूर्वी दक्षिणें-

तील एका नव्याच संस्कृतीची ओळख करून घेणें इष्ट ठरेल.

या संस्कृतीचें जरी लोहाशीं साहचर्य आढळून आलेलें असलें, तरी ही ऐतिहासिक कालांतील लोहसंस्कृतीपासून व त्या आधीच्या ताम्रयुगीन संस्कृतीपासून भिन्न वाटते, यांत शंका नाही. या संस्कृतीचे अवशेष मुख्यत्वेंकरून दक्षिण भारतांत वैपुल्यानें सांपडतात आणि या संस्कृतीला संशोधकांनी इंग्रजींत 'मेगॅलिथिक' (बृहदश्म) संस्कृति असें नामाभिधान दिलेलें आहे.

या संस्कृतीचें वैशिष्टच हें, की या संस्कृतीचे लोक मृतांना दगडी कुंडांत अथवा मातीच्या शवपेटिकेंत पुरून त्यावर मोठमोठ्या दगडांचीं वर्तुळें अथवा दगडी सोट (menhir) उभारीत. अशा तऱ्हेच्या दफनाचे अनेक प्रकार आढळतात; परंतु मुख्यत्वेंकरून तीन तऱ्हा जास्त प्रचलित होत्या असें दिसतें. अश्मवर्तुळें, अश्मछत्रें, प्रस्तरगुहा, दगडी



मेगॅलिथिक दफनपद्धति

सोट इ. अनेक प्रकार आहेत. हे उकरल्यावर त्यांत मधोमध एका दगडी चौकटींत अथवा मातीच्या घरांत, मृताचे अवशेष, मणी, मातीचीं भांडीं, शंखांचे अलंकार, लोखंडाचीं हत्यारें व इतर वस्तु ठेवलेल्या आढळतात. सबंध सांगाडा सहसा सांपडत नाही; पण मृताचे शरीर उघड्यावर टाकून कांही कालानंतर जे त्याच्या अस्थींचे अवशेष मिळतील, तेवढेच घटामध्ये ठेवण्याची पद्धत असावी असें दिसतें.

दक्षिणभारताव्यतिरिक्त आसाम, ओरिसा आणि बिहार या प्रदेशांतहि या संस्कृतीचे अवशेष सांपडलेले आहेत. परंतु यांतील बरींचशीं दफनें नसून त्या केवळ स्मृतिशिला आहेत.

या संस्कृतीच्या लोकांचा वंश कोणता, याबद्दल निश्चितपणें सांगतां येत नाही. ब्रह्मगिरी, नागार्जुनकोंडा, बहाळ व इतर अनेक ठिकाणीं जे सांगाडे सांपडलेले आहेत, त्यांचा अभ्यास अजून झालेला नाही. परंतु यांच्या काळ्या-तांबड्या खापरांची बनावट उत्कृष्ट असून त्यांचे आकारहि वैशिष्टयपूर्ण असल्याने त्यांचा सांस्कृतिक संपर्काच्या दृष्टीने अजून वेध घेतला गेला नाही. कांहींच्या मतें दक्षिणेंत या लोकांची संस्कृति ताम्रयुगीन संस्कृतीच्या पाठोपाठ आल्याने व काळ्या-तांबड्या खापरांचें तंत्रहि कांही कांही ताम्रयुगीन लोकांना माहीत असल्याने संपर्काचा संभव दिसतो. मृतांना घटांत घालून पुरण्याची पद्धति मेगॅलिथिक लोकांनी नवाश्मयुगीन व ताम्रयुगीन लोकांपासून उचलली असावी, असें संभवतें. दक्षिणेतील संगम् साहित्यांत यांच्या कांही प्रथांचा उल्लेख आलेला आहे.


दफनाव्यतिरिक्त या लोकांच्या इतर बाबींची फारशी माहिती मिळालेली नाही. त्यामुळे या संस्कृतीबद्दल फार मोठें गूढ अजूनहि अस्तित्वांत आहे. या संस्कृतीच्या उत्पत्तीबद्दल दोन मतप्रवाह आहेत. कांही सांगाड्यांचा जो अभ्यास झाला आहे, त्यावरून हे लोक मूळचे द्रविड वंशाचे असावे असें कांहीजण समजतात, तर या उलट हे लोक भूमध्यसमुद्राच्या परिसरांतून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरले व तिथून आंत पसरले आणि त्यांनी दक्षिण भारतांतील नवाश्मयुगीन व ताम्रयुगीन लोकांवर मात केली, असें दुसऱ्या कांही विद्वानांचें मत आहे. युरोपांत मेगॅलिथिक संस्कृति भारतीय संस्कृतीपेक्षा जवळ जवळ पंधराशें वर्षांनी प्राचीन आहे. परंतु याच लोकांनी दक्षिणेंत द्रविड भाषा आणल्या असेंहि मत मांडलें जातें, तें तितकेंसें पटणारें नाही.

ब्रह्मगिरीसारखीं शास्त्रशुद्ध उत्खननें, खापरांच्या आकारांचा तौलनिक अभ्यास, सांगाड्यांचा वांशिक दृष्टीने अभ्यास, इ. सर्व बाबींचा सूक्ष्मपणें अवलंब केल्याखेरीज या प्रश्नाची निरगांठ सुटणें शक्य नाही.

लोह युगांतील नागरी संस्कृतीचा उदय– इ. स. पूर्व ६ व्या शतकापासून तों गुप्तकालाच्या अखेरीपर्यंत भारतांत लोहयुगांतील संस्कृतीचें भव्य नागरी स्वरूप विविधतेने भरलेलें आढळतें. पाकिस्तानांतील तक्षशिला, चारसद्दा; उत्तर प्रदेशांतील अहिच्छत्रा, हस्तिनापूर, जगत्ग्राम, कौशाम्बी, राजघाट, सारनाथ, भीटा, कांसिया, सहेथमहेथ; बिहारांतील राजगीर, वैशाली, लौरिया नंदनगड, कुम्राहार, नालंदा; राजस्थानांतील बैराट, आहाड, रंगमहाल, रैर, सांभर व नगरी; बंगाल्यांतील तामलुक, बाणगड, पहारपूर, मैनामती; ओरिसांतील रत्नगिरि व शिशुपालगड; मध्यप्रदेशांतील उज्जैन, महेश्वर, विदिशा, सांची, त्रिपुरी; महाराष्ट्रांतील कोल्हापूर, नासिक, तेर, सोपारा, पैठण, कोंडापूर, कौंडिण्यपूर, नेवासें, प्रकाशें; गुजरातेंतील शामलाजी, बडोदा, आमरेली, टिम्बवी आणि

दक्षिणेंतील अरिकामेडु, ब्रह्मगिरी, चंद्रवल्ली, अमरावती, नागार्जुनकोण्डा; अशा अनेक ठिकाणच्या उत्खननांतून प्राचीन ऐतिहासिक कालांतील जीवनाची विविधता प्रत्ययास आलेली आहे. अर्थात् या सर्वांचा आढावा येथे घेणें शक्य व आवश्यक नसल्याने यांतील वैशिष्टयांचाच तेवढा विचार करणें योग्य होईल.


प्राचीन ऐतिहासिक कालांतील सर्वांत वैशिष्टयपूर्ण गोष्ट म्हणजे मौर्य-सातवाहन कालांतील काळया झिलईचीं खापरें (Northern Black polished pottery) ही होय. मुख्यत: वाडगे, कप आणि थाळया, हेच प्रकार यांत सांपडतात आणि यांचा काल इ. स. पूर्व पांचवें, सहावें शतक तों इ. सनाचें पहिलें शतक असा ढोबळ मानानें देतां येतो. या कालांत समाजावर बौद्ध धर्मीयांची पकड जबरदस्त असल्याने या उत्कृष्ट मडक्यांचा प्रसार गावोगाव भ्रमंती करणाऱ्या बौद्ध भिक्षूंच्या मार्फत झाला असल्यास नवल नाही. हीं खापरें मुख्यत्वेंकरून उत्तर भारतांतच जास्त सांपडतात. दक्षिणेंत तीं सांपडलीं असलीं, तरी त्यांचा काल उत्तर भारतांतील त्यांच्या कालखंडाइतका प्राचीन ठरत नाही.



वरचें चित्र-- मौर्यकालीन झगझगीत काळया रंगाचा पेला.
खालचें चित्र-- मौर्यकालीन झगझगीत काळया रंगाची थाळी.

इ. स. च्या पूर्वी पहिल्या शतकांत आणि त्यानंतर दोन शतकें सौराष्ट्र आणि दक्षिण भारत यांचा रोमन साम्राज्याशीं जो व्यापारी आणि सांस्कृतिक संपर्क आला व ज्याबद्दलचे वृत्तान्त रोमन व ग्रीक मुसाफिरांच्या लिखाणांत आढळतात, त्यांचा वस्तुरूप पुरावा अनेक ठिकाणीं मिळालेला आहे. रोमन नाणीं, रोमन बनावटीचीं उत्कृष्ट तांबडीं खापरें, कप, वाडगे, दिवे, पुतळे, अर्चनाकुंडें, कांच सामान, मणी, नाण्यासारख्या मातीच्या व शिशाच्या पुतळचा, रोमन मद्यकुंभ (amphora) व कुजे, या वस्तु आतापर्यंत अरिकामेडु, नासिक, तक्षशिला नेवासें, बडोदें, तेर, कौंडिण्यपूर आणि सौराष्ट्र या भागांत अनेक स्थळीं उत्खननांत सांपडलेल्या आहेत. नेवाश्याला तर मद्यकुंभाच्या एका तुकडचाला रोमन मद्याचा महत्त्वाचा घटक असलेली राळ अद्याप चिकटलेल्या स्वरूपांत जशीच्या तशी सांपडली आहे.

मौर्यकालीन काळचा झिलईचीं खापरें, इ. स. च्या सुरवातीच्या कालांतील रोमन बनावटीचीं झगझगीत तांबडीं खापरें व आंतील भागांवर नक्षी असलेल्या काळचा थाळचा, हीं ऐतिहासिक कालांतील नाण्यांइतकींच कालखंडनिश्चितीचीं साधनें आता ठरलेलीं आहेत.



रोमन मद्यघट


मौर्यकाल आणि त्यानंतरचा काल, यांतील वाङमयांत आणि प्रवाश्यांच्या वर्णनांत अजरामर केलीं गेलेलीं मोठमोठीं तटबंदीचीं शहरेंहि उत्खननांत सांपडलेलीं आहेत. पाटलिपुत्र येथील तटबंदी व मेगॅस्थिनीसने वर्णिलेला मौर्यांचा प्रासाद, उज्जैन, शिशुपालगढ व कौशाम्बी येथील उघडकीस आलेली मातीची तटबंदी, अहिच्छत्रा, शिशुपालगढ, नेवासें, नासिक, राजघाट, वैशाली, तक्षशिला येथील रेखीव वास्तूंचे आणि सांडपाण्याच्या कूपांचे अवशेष, या गोष्टी त्या काळच्या नागरी आंखणीची कल्पना देण्यास पुरेशा आहेत.



रोमन पुतळा - कोल्हापूर


धार्मिक बाबतींतहि बौद्ध आणि ब्राह्मणी धर्मांची साक्ष देणारे अनेक महत्त्वाचे अवशेष हातीं आलेले आहेत. तक्षशिला, महेश्वर, वैशाली, नागार्जुनकोंडा, कौशांबी, सिरपूर, रत्नागिरी व सोपारा

येथील बौद्धस्तूप, विहार आणि शिल्पें बौद्ध धर्माच्या प्रभावाची कल्पना देतात; तर कौशांबी येथील श्येनचितीची वास्तु, डेहराडूनजवळील जगत्ग्राम येथील अश्वमेधाचे अवशेष आणि राजस्थानांतील यूप, ब्राह्मणीधर्माच्या पुनरुज्जीवनाची साक्ष पटवितात. मातीच्या देवता, यक्षमूर्ती, आणि दगडांचे ताईत बहुजनसमाजांतील धर्मसमजुतींचा



कोल्हापूर येथे सांपडलेलीं ब्राँझची भांडीं

प्रत्यय देतात. याबरोबरच तक्षशिलेला परकीयांच्या आधिपत्यामुळें भारतीय जीवनांत अनेक रोमन-ग्रीक देवतांच्या आणि अर्चनाकुंडांच्या पूजेसारख्या प्रकारांचा शिरकाव झाल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. मात्र गेल्या कांही वर्षांतील सर्वांत महत्त्वाचा शोध म्हणजे कौशांबीला भगवान् बुद्धाला अर्पण केलेल्या घोषिताराम विहाराचे अवशेष व त्या दाना-



कौशांबी येथील श्येनचितीचे अवशेष

बद्दलचा एका आयागपट्टावर केलेला ब्राह्मी लिपींतील उल्लेख हा होय! वाङमयीन माहितीला दुजोरा देणारा इतका निःशंक पुरावा दुसरा क्वचितच असेल!

या कालांतील घरें पक्क्या विटांचीं बांधलेलीं आणि बहुधा काटकोन-चौकोनी आकाराच्या खोल्या असलेलीं होतीं. घरांचे पाये दगडगोटयांनी पक्के करीत. छपराचा पुरावा फारसा शाबूत असा कुठे मिळाला नाही. मात्र बहुतेक घरांना जोडून विटांचा अथवा मातीच्या कड्यांचा सांडपाण्याकरितां बांधून काढलेला कूप असे. यावरून या लोकांच्या सामाजिक व आरोग्यविषयक कल्पना लक्षांत येतात.

वस्त्र-प्रावरणांच्या बाबतींत या कालांत कमालीचें वैचित्र्य आढळून येतें. अर्थात् कापडाचा फारसा पुरावा मोठ्या प्रमाणावर मिळलेला नाही. परंतु या कालांतील कांही खापरांवर व पुरचुंडीत बांधून ठेवलेल्या नाण्यांवर नाशिक व पैठण येथे कापडाच्या प्रतिकृतीचा पुरावा मिळालेला आहे. याशिवाय विविध शिल्पांतून व मातीच्या मूर्तींतून स्त्री- पुरुषांच्या वस्त्र-प्रावरणांचे व नेसण्याच्या पद्धतीचें दर्शन झालेलें आहे. तक्षशिला येथें सांपडलेल्या मूर्तींत ग्रीक व रोमन छाप दिसते, तर राजस्थानांतील रंगमहाल येथे सांपडलेल्या मातीच्या स्त्री-मूर्तीचा ओढणी, लेहंगा आणि चोळी असा पोषाख सध्याच्या तेथील स्त्रीपोषाखाशीं विलक्षण साम्य दर्शवितो.


सिंधुसंस्कृतींत ज्याप्रमाणे सोन्याचे आणि इतर विविध दागदागिने वापरीत होते, त्याप्रमाणेच उत्कृष्ट दागदागिने तक्षशिला, नागार्जुनकोंडा इ. ठिकाणच्या उत्खननांत सांपडलेले आहेत. समकालीन वाङमयांत आणि शिल्पांतहि हरतऱ्हेच्या बांगड्या, नूपुर, बाजुबंद, मेखला, शिरोभूषणें व कंठाभरणें दृष्टोत्पत्तीस येतात. त्यावरून या कालांतील लोकांची सुस्थिति, कलात्मकता आणि रसिकता प्रकर्षानें जाणवते. विशेषतः



कौशांबी येथे सांपडलेला घोषितारामासंबंधींचा लेख


निरनिराळ्या दगडांचे विविध प्रकारचे मणी व ताईत बनविण्याचीं मोठमोठीं केंद्रें भारतांत या कालांत भरभराटीस आलीं. गुजरातमधील खंबायतजवळ अशा तऱ्हेचा धंदा आजहि चालू आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

प्राचीन ऐतिहासिक कालांतील संस्कृतीचे लोक शाकाहारी तद्वतच मांसाहारीहि होते, असें दिसतें. अनेक उत्खननांत



प्राचीन ऐतिहासिक कालांतील मणी व ताईत

धान्यावशेषांबरोबरच हरिण, बकरे, यांच्या हाडांचेहि अवशेष मिळाल्याने या अनुमानास दुजोरा मिळतो. धान्य वाटण्याकरितां वापरांत आणल्या जाणाऱ्या दगडी पाटयांवर त्रिरत्नादि बौद्धधर्मीय चिन्हें ज्या स्वैपाकघरांत सांपडलीं, त्याच ठिकाणीं



सातवाहन कालांतील पाटा-वरवंटा

हरणांचे अवशेष जळलेल्या स्थितींत नासिकच्या आणि नेवाश्याच्या उत्खननांत सांपडले आहेत. याशिवाय नेवाश्याला हरभरे, करडी बाजरी, गहू, नाचणी, धने इ. चे अवशेषहि मोठ्या प्रमाणावर हातीं लागले आहेत.

या कालांतील लोखंडाच्या वापराचा विपुल पुरावा मिळालेला आहे. लोखंडाचे बाण, चाकू, सुऱ्या, विळे, दिवे, भाले, अशा विविध वस्तू वापरांत होत्या. आपल्या लोहविषयक तांत्रिक ज्ञानाच्या जोरावरच प्राचीन ऐतिहासिक कालांतील लोकांनी आपला प्रभाव पाडून नागरी संस्कृति उभारली. या संस्कृतीच्या विविधतेचा प्रत्यय जसा वाङ्मयांत येतो, तसाच तो उत्खनित अवशेषांवरूनहि येतो. चाणक्याच्या अर्थशास्त्रांत उल्लेखिलेले अर्धचंद्राकृति टोक असलेले बाण आणि अणकुचीदार टोकें असलेले त्रिक उत्खननांत सांपडले आहेत. हे त्रिक जमिनीवर पसरून ठेवल्यास घोडदळाला पुढे जाणें कठिण जातें. असेच त्रिक पहिल्या महायुद्धांत फ्रान्समध्येहि वापरले गेले होते !

शैक्षणिक प्रगतीचा प्रत्ययहि उत्खननांत आलेला आहे. शेंकडो मुद्रा, नाणीं, शिलालेख, इष्टकालेख, मातीच्या मडक्यावर कोरलेले लेख, अशोकाचे द्विभाषिक आणि एकभाषी लेख, आणि नालंदा, तक्षशिला येथील विद्यालयांचे अवशेष या कालांतील बौद्धिक प्रगतीची आणि सुसंस्कृततेची पातळी दाखवितात. नेवाश्याच्या सातवाहनांच्या नाण्यांवरून त्यांचा कालखंड ठरविणें जसें शक्य झालें तद्वतच इ. स. च्या पूर्वी एक-दोन शतकें व तितकेंच नंतर एवढ्या कालांतल्या राजकीय इतिहासाची रूपरेषा ठरविण्यास मुख्यत्वेंकरून नाणींच उपयुक्त ठरलीं आहेत. याशिवाय त्यांवर जीं विविध देवतांचीं आणि इतर धार्मिक चिन्हें आढळून येतात, त्यांवरून परदेशांतलीं राजघराणीं भारतीय जीवनाशीं कितपत समरस झालीं आणि भारतांतहि धार्मिक जीवनाचें स्वरूप काय होतें, हें कळून येण्यास फार मोठी मदत झाली आहे. नालंदा विश्वविद्यालयाच्या मुद्रा, भाजें येथील लांकडी तुळईवरील लेख, कौशांबी येथील घोषितारामासंबंधीचा लेख, कंदाहारजवळ सांपडलेला अशोकाचा ग्रीक आणि अर्मेनियन भाषेंतील लेख, यांनी प्राचीन ऐतिहासिक संस्कृतीवर विलक्षण प्रकाश टाकला आहे.

समृद्ध ऐहिक जीवन, राजकीय स्थिरता आणि मजबूत सामाजिक जीवनाची ठेवण, हीं लोहयुगांतील वैशिष्टचें होत. आणि यामुळेच कलेच्या क्षेत्रांतहि अलौकिक कामगिरी झाली असल्याचें प्रत्ययास येतें. मथुरा, गंधार, भरहूत, सांची व अमरावती येथील शिल्पपद्धतीचीं वैशिष्टचें; तामलुक, अहिच्छत्रा, राजघाट येथील मृत्तिकामूर्ती; तेर येथील उत्कृष्ट हस्तिदंती आणि मृण्मय मूर्ती आणि गुप्तकालीन नाण्यांची मनोहारी बनावट, या गोष्टी केवळ राजकीय स्थिरता आणि भौतिक समृद्धता यांमुळेच होऊं शकल्या यांत शंका नाही.

मौर्यकालापासून तों तहत गुप्तकालअखेरपर्यंत ही समृद्धता विकसित झाल्याचें उत्खनित अवशेषांवरून प्रत्ययास येतें. मात्र मध्ययुगाच्या सुरवातीपासून घडी बिघडूं लागली. राजकीय अनिश्चितता, यवनी स्वाऱ्या आणि अंतर्गत यादवी यांमुळे जनतेच्या जीवनाचे धागे विस्कळित झाल्यासारखे दिसतात आणि त्याचा प्रत्यय मध्ययुगीन स्थलांच्या उत्खननांत येतो. मुसलमानी अमदानींत कलेचें क्षेत्र जास्त संकुचित

झालें. प्राचीन कालांत समाजांतील विविध स्तरांतील लोकांनी एकत्र येऊन उभारलेलीं काल्यांसारखीं क्षेत्रें जशीं सर्व समाजाच्या सामूहिक प्रयत्नांची निशाणी दाखवितात, तशी निशाणी मुसलमानी अमदानींत फारशी दिसत नाही. या कालांतील सर्वसामान्यांच्या जीवनांत आलेल्या आर्थिक विस्कळितपणाचें चित्र उत्खनित वास्तूंवरून आणि घराघरांतून चालत असलेल्या कांचेच्या बहुरंगी बांगड्यांच्या धंद्यावरून चटकन् दिसून येतें.

भारतांतील उत्खनित संस्कृतीचें चित्र जितकें विविध तितकेंच कालदृष्ट्या अतिविस्तृत आहे. अश्मयुगापासून तों मध्ययुगाच्या अखेरीपर्यंत येथें अनेक प्रकारच्या संस्कृती मूळ धरून राहिल्या, बदलल्या आणि नामशेषहि झाल्या. या विविध संस्कृतींच्या परंपरांचे आणि जीवनपद्धतीचे विविध धागे एकत्र होऊन भारतीय जीवन समृद्ध आणि बहुरंगी झालेलें आहे. आणि याचाच प्रत्यय भारतांतल्या उत्खननांत स्पष्टपणें आलेला आहे. [डॉ. शां. भा. देव]

उत्तम (१) तिसरा मनु. हा प्रियव्रताचा पुत्र असून एका मन्वंतराचा अधिपति होता. पवनादि त्याचे पुत्र होते. या मन्वंतरांत वसिष्ठाचे प्रमदादि पुत्र सप्तर्षि होते. सत्य, वेदश्रुत व भद्र हे देव होते व सत्यजित् हा इंद्र होता (भाग. पु. ५.१.२८; ८.१.२३–२४).

(२) शाल्मली द्वीपांतील सात टेकड्यांपैकी एक टेकडी (ब्रह्मांड पु. २. १९.३६). [पु. इं.]

उत्तमभर्तृप्राप्ति एक स्त्रीव्रत. वसंत ऋतूंतल्या शु. १२ शीस विष्णूची पूजा, हा या व्रताचा विधि आहे. फल– उत्तम भर्त्याची प्राप्ति. [हि. ध.]

उत्तममुक्तावलिव्रत एक जैन व्रत. याचा प्रारंभ भाद्र० शु. ७ मीला होतो. व्रतावधि नऊ वर्षें. या व्रतांत उपवास मुख्य आहे. त्या दिवशीं जिनेंद्राचा अभिषेक व पूजा करायची असते. फल– तिसऱ्या भवांत मोक्ष. [व्र. ति. नि.]

उत्तमश्लोक (१७०९–१७८६ इ. स.) एक महाराष्ट्रीय कवि. याचे मूळचें नांव माधवराव असें असून पुढे कृष्णदयार्णवाने त्याला उत्तमश्लोक हें नांव दिलें. हा बीड (मराठवाडा) येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होता. हा नाथपंथी असून कृष्णदयार्णवाचा पट्टशिष्य होता. कृष्णदयार्णवाने ओवी सांगावी व उत्तमश्लोकाने ती लिहून घ्यावी, अशा प्रकारें भागवताच्या दशमस्कंधावरील कृष्णदयार्णवाची हरिवरदानामक ओवीबद्ध टीका ८७ व्या अध्यायाच्या २३ व्या श्लोकापर्यंत निर्माण झाली. त्यानंतर कृष्णदयार्णव समाधिस्थ झाला व पुढचा ग्रंथ उत्तमश्लोकाने लिहून पुरा केला.

उत्तमश्लोकाने प्रबोधसार नांवाचा ग्रंथ लिहिला असून त्याची ओवीसंख्या ३२१ आहे. याची समाधि पैठण येथे आहे. [म. च. को.]

उत्तमा गुण किंवा प्रकृति यांचा विचार करून ठरलेला एक नायिकाभेद. भरताने ही नायिका मानली आहे. ‘अहितकारिण्यपि प्रियतमे हितकारिण्युत्तमा’ = प्रियकराचा अपराध असूनहि जी त्याचें हित व प्रियच करते, ती उत्तमा समजावी अशी भानुदत्ताने तिची व्याख्या केली आहे (र. मं.). गीतगोविंदांतली राधा ही उत्तमा नायिकेचें उदाहरण ठरण्यासारखी आहे. ती म्हणते–

गणयति गुणग्रामं भ्रामं भ्रमादपि नेहते ।
वहति च परितोषं दोषं विमुञ्चति दूरतः
युवतिषु चलत्तृष्णे कृष्णे विहारिणि मां विना
पुनरपि मनो वामं कामं करोति करोमि किम् ॥

अर्थ– कृष्ण जरी मला सोडून अन्य स्त्रीशीं विहार करीत असला, तरी माझें मन त्याचे गुण पाहतें, त्याच्या वांचून अन्याचा विचार करीत नाही, दोष दूर ठेवून परितोष धारण करतें आणि त्याचीच कामना करतें, त्याला मी काय करूं !

उत्तमार्ण विंध्य प्रदेशांतील एक जमात. (वायु पु. ४५.१३२)

उत्तमेश्वर वाराणसींतलें एक तीर्थ. [कृ. क. त.]

उत्तरकाशी उत्तरखंडांतील एक महान् तीर्थक्षेत्र. इथे अनेक प्राचीन मंदिरें असून, त्यांपैकी विश्वनाथाचें व एकादशरुद्राचें हीं दोन अत्यंत प्रेक्षणीय आहेत. विश्वनाथमंदिराजवळच गोपेश्वर, परशुराम, दत्तात्रेय, भैरव, अन्नपूर्णा, रुद्रेश्वर, लक्षेश्वर, शिव–दुर्गा व जडभरत यांचीं मंदिरें आहेत. [कल्याण– तीर्थांक]

उत्तर कुरु उत्तरेकडील कुरु लोकांचा देश. हिमाचल प्रदेशांतील गढवालचा उत्तर भाग. अर्जुनाने दिग्विजयाच्या वेळीं हा प्रदेश जिंकला होता व आपल्या

राज्याला जोडला होता. राजसूय यज्ञाच्या वेळीं या प्रदेशांतून पुष्कळ रत्नें धर्मराजाला उपायन म्हणून मिळालीं होती.

मेरु पर्वताजवळील शृंगवनाच्या उत्तरेकडील व समुद्राच्या दक्षिणेकडील सुपार्श्व टेकडीवरील उत्तर कुरु हें एक खंड असून इथे विष्णु वराहरूपाने प्रकट झाला, असें सांगितलें आहे. परीक्षित् राजाने हा देश जिंकून घेतला होता (भाग. पु. १.१६. १३). इथल्या स्त्रिया अप्सरांपेक्षाहि सुंदर आहेत. इथलीं जोडपीं चक्रवाक पक्ष्याप्रमाणे एकमेकांवर प्रेम करतात. पुरूरव्याने उर्वशीसह कांही काल या ठिकाणीं वास्तव्य केलें होतें.

हिमालयाच्या उत्तर भागाला उत्तर कुरु म्हणतात, असें ऐतरेय ब्राह्मणांत म्हटलें आहे (८.१४). या प्रदेशाला देवक्षेत्र असेंहि नांव होतें. ललितविस्तरांत उत्तर कुरु देशालाच प्रत्यंतद्वीप असें म्हटलें आहे. हा देश केवळ दंतकथात्मक व काल्पनिक आहे, असें कांही विद्वानांचें मत आहे. [पु. त. मी.; पु. इं; हि. जॉ. ए. इं; वै. सा.]

उत्तरकूलग गंगेच्या उत्तर तीरावर वास्तव्य असलेला जैनांचा एक पंथ. [स्कू. से. जै. लि.]

उत्तर कोंकणस्थ माध्यंदिन ब्राह्मण यां च्या पै की पुरुषोत्तम पंत कावळे नांवाचा एक ब्राह्मण बिंब राजाबरोबर उत्तर कोंकणांत आला. त्याने बिंब राजाचा अंमल स्थिर करायला चांगली मदत केली. पुढे त्याने त्या भागांतली जोशीवृत्ति चांगुणाबाई नांवाच्या एका विधवा स्त्रीकडून विकत घेऊन ती स्वकीयांस वांटून दिली. पोर्तुगीजांनी सुरू केलेल्या बाटवाबाटवींत याने जिवापाड श्रम करून हिंदुत्वाचें रक्षण केलें व बाटलेल्यांना शुद्ध करून परत जातींत घेतलें. हे ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदी वाजसनेयि शाखेचे आहेत. पारस्कर व कात्यायन या सूत्रांच्या आधारें ते आपलीं धर्मकृत्यें करतात. यमाई व महालक्ष्मी या त्यांच्या कुलदेवता आहेत. मार्गशीर्षांत यांचें नवरात्र असतें. आश्विनांत दर रविवारीं हे उपास करतात. भाद्र० व. १ देस यांचा मुका पाडवा नांवाचा सण असतो. हे वर्षांतून एकदा व्यंकोबाची समाराधना करतात. एका काळीं हे व चित्पावन ब्राह्मण यांच्यामध्ये भयंकर वितुष्ट होतें; पण आतां तें मोडलें आहे. [मुं. इ. जा.; ब्रा. भि. वि.]

उत्तरकोसल एक प्राचीन देश. अयोध्या ही याची राजधानी होती, असें रामायणांत सांगितलें आहे. श्रावस्ती ही नंतरच्या काळांतील राजधानी होय. दक्षिण कोसल देशापासून उत्तर कोसलाचें पार्थक्य ध्यानांत यावें, म्हणून पुढे त्याला श्रावस्ती देश असें म्हणूं लागले. युआन च्वांग यानेहि उत्तर कोसलाचें श्रावस्ती हें नांव सांगितलें असून त्याचें क्षेत्रफळ ६०० चौ. मैल एवढें दिलें आहे. कोसलाचें राज्य सनपूर्व ५ व्या शतकाच्या सुमारास मगध राज्यांत समाविष्ट झालें. [हि. जॉ. ए. इं.]

उत्तर दिशा पूर्वेस तोंड करून उभें राहिल्यावर डाव्या हाताला येते, ती उत्तर दिशा होय. कुबेर हा या दिशेचा स्वामी होय. ही दिशा शुभ मानलेली असून कोणत्याही शुभकर्मास पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख बसण्याची पद्धत आहे.

उत्तरनाभि घोड्याच्या टापेएवढा किंवा प्रादेशमात्र लांब–रुंद व चार बोटें उंच अशा ओटयाला उत्तरनाभि असें नांव आहे. उत्तरवेदीच्या मध्यभागीं ही तयार करतात. उत्तरवेदीच्या मापाप्रमाणे उत्तरनाभिहि लहान मोठी असते. [विद्याधरशास्त्री भिडे]

उत्तरपथ पाणिनीने एका सूत्रांत उत्तरपथाचा उल्लेख केला आहे. या मार्गाने येणाऱ्या मालाला किंवा या मार्गावर फिरणाऱ्या लोकांना त्या काळी औत्तरपथिक अशी संज्ञा होती. उत्तर भारतांत प्राचीन काळीं गंधार देशापासून पाटलिपुत्र नगरापर्यंत एक हमरस्ता होता. अशोक, शेरशहा, अकबर इ. राजांच्या कारकीर्दींतहि तो चालू होता. या महामार्गाला उत्तरपथ असें म्हणत. मेगॅस्थिनिसने याला ' नॉर्दर्न रूट ' असें नांव दिलें आहे. त्याच्या मतें या हमरस्त्याचे दोन मोठे फाटे होते. त्यांपैकी एक वंक्षुपासून निघून कास्पियन सागर व काळा समुद्र यांच्यावरून युरोपपर्यंत जात असे. याच मार्गाने भारतांतील माल पश्चिमी देशांत जात असे.

या मार्गाचा दुसरा फाटा भारतवर्षांतच होता. तो गंधारची राजधानी असलेल्या पुष्कलावती नगरीपासून निघून मार्गांत सिंधु, शुतुद्रि व यमुना या नद्या पार करून हस्तिनापूर, प्रयाग, पाटलिपुत्र या नगरांवरून ताम्रलिप्तीपर्यंत गेला होता. या मार्गावर पथिकांना विश्रांति घेण्यासाठी धर्मशाळा, विहिरी व छायेसाठी वृक्ष लावलेले होते. मार्गावर सर्वत्र एकेका कोसावर तद्दर्शक दगड बसविले होते. याच मार्गाचा एक मधला फाटा तक्षशिला व पुष्कलावतीपासून तापशीवरून बाल्हिक देशांत जात होता व इथ पूर्वेकडच्या कंबोजच्या दिशेने आलेल्या चीनच्या कौशेय मार्गांना मिळाला होता. अशा प्रकारें चीन,

भारत व पश्चिमी देश या तिघांना जोडणारा हा महामार्ग जगांतील व्यापारी रस्त्यांमध्ये फार महत्त्वाचा ठरला होता. सांप्रत या रस्त्याला ' ग्रँड ट्रंक रोड ' असें नांव आहे. [पा. भा.]

उत्तरपंथा स्वर्गाचा मार्ग. याला उत्तरापथ व उत्तरमार्ग अशींहि नांवें आहेत. हा मार्ग नागवीथि, गजवीथि व ऐरावतीवीथि यांनी बनलेला आहे (ब्रह्मांड २.२७. १२४). [पु. इं.]

उत्तरपुराण एक जैन पुराण. जिनसेनाने आदिपुराण लिहायला घेतलें होतें; पण तें पुरें होण्याच्या आंतच त्याला मृत्यु आला. नंतर त्याच्या शिष्यांनी तें पुरें केलें व बाकीच्या तीर्थंकरांचें चरित्र लिहिण्याच्या उद्देशाने उत्तरपुराणाची रचना केली. यांत दुसरा तीर्थंकर अजितनाथ याच्यापासून तों चौविसावा तीर्थंकर महावीर याच्यापर्यंत तेव्वीस तीर्थंकरांचीं चरित्रें आलीं आहेत. एका तीर्थंकराच्या नांवावर एक पुराण, अशीं तेव्वीस पुराणें या ग्रंथांत अंतर्भूत आहेत.

आदि व उत्तर या दोन्ही पुराणांत प्रत्येक तीर्थंकराच्यापूर्वी कांही राजांच्या कथा दिलेल्या असून तीर्थंकरांचे ते पूर्वजन्म मानलेले आहेत.

उत्तरपुराणांत श्रीकृष्णाला तीर्थंकर नेमिनाथाचा शिष्य व त्रिखंडाचा अधिपति म्हटलें आहे. यांत जैन धर्माच्या दीक्षेचीहि वारंवार चर्चा आलेली आहे.

आदि व उत्तर या पुराणांत चौवीस तीर्थंकर, बारा चक्रवर्ती, नऊ वासुदेव, नऊ शुक्ल बल व नऊ विष्णुद्वीप अशा त्रेसष्ट महापुरुषांचीं चरित्रें दिलेलीं असल्यामुळे त्या दोन ग्रंथांना त्रिषष्ट्यवयवी असें नांव मिळालें आहे. [हिंदुत्व; वि. ध. द.]

उत्तरपूजा कोणत्याहि देवतेचें विसर्जन करतेवेळीं तिची जी पूजा करतात, तिला उत्तरपूजा असें नांव आहे. ही पूजा सामान्यतः पंचोपचारच असते. [सं. कौ.]

उत्तर प्रदेश भारतीय संघराज्यांतलें एक राज्य. पूर्वेस बिहार, पश्चिमेस पंजाब व राजस्थान, दक्षिणेस मध्य प्रदेश व उत्तरेस नेपाळ व तिबेट, अशा याच्या चतुःसीमा आहेत. याचें एकूण क्षेत्रफळ १,१३,४०९ चौ. मैल आहे. भारताच्या सर्व राज्यांत हें राज्य मोठें असून याची लोकसंख्या १९६१ च्या जनगणनेनुसार ७,३६,५०,००० इतकी आहे. आगरा, अवध, रामपुर, टेहरी-गढ़वाल व वाराणसी हीं देशी संस्थानें आणि अन्य राज्यांचे छोटे छोटे तुकडे मिळून हा प्रदेश बनला आहे. याचें पूर्वीचें नांव संयुक्त प्रांत असें होतें. भारतीय राज्यघटनेने तें बदलून त्याला ' उत्तर प्रदेश ' असें नवें नांव दिलें. या राज्याची राजभाषा हिंदी आहे. भौगोलिक दृष्टीने याचें तीन मोठे नैसर्गिक विभाग पडतात.

(१) **पर्वतीय प्रदेश** -- याच्या उत्तरेस एखाद्या प्रचंड भिंतीप्रमाणे हिमालयपर्वत पूर्व-पश्चिम पसरला आहे. त्याची लांबी पाहूनच कालिदासाने त्याला ' पृथ्वीचा जणू मानदंड,' असें म्हटलें आहे (कु. सं. १.१). याच्या पहिल्या विभागांत नंदादेवी, धौलागिरि इ. गगनचुंबी शिखरें येतात. दुसऱ्या विभागांत मध्यहिमालयाच्या श्रेणी येतात. तिसऱ्या विभागांत सर्वांत खालच्या सिवालिक पर्वतश्रेणी येतात. यांच श्रेणींत दून नामक टेकड्या असून तिथली भूमि भरपूर पीक देणारी व आरोग्यप्रद म्हणून प्रसिद्ध आहे. सिवालिक पर्वतश्रेणीच्या खाली भावर प्रदेश येतो. हा प्रदेश निरनिराळ्या नद्यांनी वाहून आणलेला गाळ एकत्र होऊन बनलेला आहे. या प्रदेशांत नद्या भूपृष्ठाच्या खालून वाहतात.

(२) **दक्षिणेचा पठारी प्रदेश** -- रचना, नैसर्गिक अवस्था, माती आणि हवामान यांवरून याचे दोन विभाग पडतात. पहिला विभाग मध्यभारतांतील पश्चिमेकडील पठारी प्रदेश होय. हा बुंदेलखंडाच्या पठाराचा एक भाग असून नीस नामक खडकांनी बनलेला आहे. झांशी हें या भागाचें केंद्र आहे. दुसरा भाग पूर्वेस शोण नदाच्या उत्तर भागांत पडत असून तो प्राचीन खडकांनी बनलेला आहे. याच्या उत्तरेस गंगेच्या मैदानी प्रदेशांत मिर्झापूर हें शहर वसलें आहे. याला मिर्झापूरचें पठार असें म्हणतां येईल. हा विभाग उंचसखल, मध्ये मध्ये तुटलेला आणि छोट्या छोट्या टेकड्यांनी बनलेला आहे.

(३) **गंगेचें मैदान** — या भागांत उत्तर प्रदेशाचा अधिकांश भाग येतो. हें मैदान गंगा, यमुना, रामगंगा, घाघरा इ. नद्यांनी बनलें आहे. हा सर्व प्रदेश शेतीला उपयुक्त असा आहे. या मैदानाच्या उत्तरेस हिमालयाचे प्रत्यन्त पर्वत येतात. एक मैदान व ही छोटी पर्वतराजी यांच्या मध्यभागीं एक अरुंद अशी पट्टी आहे. ही पट्टी मैदानी भागापेक्षा थोडी उंच आहे. ज्या नद्या भावर प्रदेशांत भूपृष्ठाखालून वाहतात, त्या या भागांत भूमीच्या पृष्ठभागावर येतात. हा तराईचा भाग जंगले व लांब गवत यांनी झाकलेला असतो. हा भाग आरोग्याला हितकर नसल्यामुळे इथे लोकवस्ती कमी आहे. तराई व मैदान यांच्या सीमारेषेवर नगरांची पंक्ति आढळते.

तिच्यांत सहाराणपूर, पीलीभीत, खीरी-बहराइच, गोरखपूर इ. शहरें वसलीं आहेत.

उत्तर प्रदेशाची मुख्य नदी गंगा होय. तिला डाव्या बाजूने रामगंगा, गोमती व घाघरा या नद्या मिळतात, तर उजव्या बाजूने यमुना नदी मिळते. टेहरी-गढवाल जिल्ह्यांतल्या देवप्रयाग या ठिकाणीं अलकनंदा व भागीरथी यांचा संगम होतो. त्या दोघींचा मिळून जो एक प्रवाह पुढे वाहूं लागतो, त्यालाहि गंगा म्हणतात. गंगा नदी हरिद्वारजवळ मैदानांत उतरते व राज्याच्या आग्नेय दिशेकडे वाहूं लागते. यमुना नदी गंगेच्या उजव्या अंगाने हिमालयांतून उगम पावते व उत्तर प्रदेशाच्या पश्चिम व दक्षिण सीमांचे जवळून वाहत प्रयाग क्षेत्रांत गंगेला मिळते.




सामान्यपणे उत्तर प्रदेशाचें हवामान उष्ण व कोरडें आहे. या प्रदेशांत गहू, ज्वारी, बाजरी इ. पिकें होतात. उत्तर प्रदेश मुख्यत्वें कृषि-प्रधान राज्य आहे. अतएव त्याचें सुभिक्ष किंवा दुर्भिक्ष पावसाच्या लहरीवर अवलंबून असतें. राज्यांतले प्रमुख उद्योग साखर, खनिज धातु, कापड, चामडें, काच, रसायनें यांच्या निर्मितीचे आहेत. हा प्रदेश कुटीरोद्योगांसाठीहि प्रसिद्ध आहे. या कुटीरोद्योगांत हातमागावरचें कापड, रासायनिक पदार्थ, टिनचीं भांडीं, लोखंडी ट्रंका, कार्बन कागद, चाकूकात्र्या इ. वस्तू बनतात.

उत्तर प्रदेश भारतीय संस्कृतीच्या विकासाचें एक प्राचीन क्षेत्र आहे. याचा इतिहास हा अखिल भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचा एक अविभाज्य घटक आहे. या प्रदेशांतलें गंगेचें खोरें म्हणजे प्राचीन संस्कृतीचें एक उगमस्थानच म्हणावें लागेल. सिंधु-संस्कृति आणि वैदिक संस्कृति यांना जोडणारा हा एक दुवाच असावा, असें म्हणायला हरकत नाही. वाराणसी ही नगरी, मोहेंजोदडो, उर, बाबिलोन, मेंफिस या नगरांहून पुरातन असावी, असे डॉ. नंदलाल चतर्जी म्हणतात. आर्यांनी हा प्रदेश व्यापल्यानंतर या भागांत हस्तिनापुर, पांचाल, कोसल इ. अनेक बलिष्ठ राज्यें स्थापन झालीं. हिंदूंचे औपनिषदिक तत्त्वज्ञानाची हीच उगमभूमि आहे.

प्राचीन काळीं या प्रदेशांतील अनेक नगरें विद्या व कला यांचीं माहेरें होतीं. उदा० काशी, प्रयाग, अयोध्या कौशांबी, मथुरा इत्यादि. नैमिषारण्यांतील ऋषींचे आश्रमहि विद्येचीं अधिष्ठानें होतीं. ही विद्यापरंपरा मुसलमानांच्या आक्रमणापर्यंत अबाधित चालू होती. या प्रदेशांत अनेक साम्राज्यें उदयास आलीं. सहाव्या शतकांत मौखरींचें साम्राज्य इथे गाजत होतें. त्यानंतर कनौज शहर हें हर्ष-साम्राज्याची

राजधानी बनलें होतें. आगरा या शहराने मुस्लीम राजधानीचा मान मिळविला होता. हिंदु समाजावर मुस्लीम संस्कृतीचा




हिंदुविद्यापीठ - वाराणसी

विशेष प्रभाव पडला, तो याच प्रदेशांत. इथे झालेल्या हिंदु-मुस्लीम साधु-संतांनी अन्य धर्मांतील तत्त्वें व विचार जाणून घेतले व उभय संस्कृतींना समन्वयाचें आणि सहिष्णुतेचें वळण लावलें. गोरखनाथ, कबीर व त्याचे शिष्य यांनी या प्रदेशांत हिंदु-मुस्लीम सलोख्याचें वातावरण निर्माण केलें. राम-रहीम एकच असल्याचें त्यांनी जनतेला शिकविलें. मोगल बादशहा शहाजहाँ याचा पुत्र दारा शुकोह याने संस्कृत भाषा व हिंदु तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करून या समन्वयाला हातभार लावला होता. उत्तर प्रदेशांतला सर्वश्रेष्ठ संतकवि तुलसीदास हा होय. त्याने 'रामचरितमानस' लिहून जनतेपुढे मानवी जीवनाचे नैतिक आदर्श उभे केले व तिथल्या जनतेंत रामधुन पसरून दिली. तुलसीदासामुळेच 'सियराम' हा उत्तर प्रदेशाचें परम उपास्य ठरला.


धर्माप्रमाणेच कला व साहित्य यांच्या क्षेत्रांतहि हिंदु-मुस्लीम संस्कृतीचा समन्वय उत्तर प्रदेशांतच विशेषत्वाने झालेला दिसतो. आगरा येथील ताजमहाल हिंदु व इस्लामी अशा समन्वित स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना आहे. हिंदी व उर्दू या दोन भाषांचे सहजीवन याच प्रदेशांत घडलें. सामाजिक जीवनांतहि हिंदु-मुस्लीम समन्वय याच प्रदेशांत विशेषत्वाने घडून आला. मोगल सत्ता दुबळी झाल्यानंतरहि ही समन्वित संस्कृति या प्रदेशांतील अवध संस्थानांत टिकून राहिली. मोगल कालांत सांस्कृतिक नेतृत्व दिल्लीकडे होतें, तें पुढे लखनौकडे गेलें.

१८५७ च्या क्रान्तियुद्धांत या प्रदेशाने फार मोठा भाग घेतला होता. या युद्धाचीं प्रमुख केंद्रें याच भागांत होतीं व युद्धाचे बरेचसे नेते याच प्रदेशांतले होते. ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर उत्तर प्रदेश हा एक प्रांत बनविला गेला. त्याची सांस्कृतिक प्रगति त्यानंतर नव्या धर्तीने सुरू झाली. या भागांत पुढे अनेक विद्यापीठें स्थापन झालीं. पं. मैथिलिशरण, पं. सुमित्रानंदन, महाकवि निराला, श्री. महादेवी इ. हिंदी कवि आणि साहित्यिक, तसेच गालिब, मौ. आज़ाद, नज़ीर अहमद, अकबर, प्रेमचंद इ. उर्दू लेखक, या प्रदेशांत विख्यात झाले. राजकीय क्षेत्रांत पं. अयोध्यानाथ, पं. गंगा-



आनंदभुवन - प्रयाग

प्रसाद, पं. मोतीलाल नेहरू, पं. मालवीय, असे थोर राजकीय नेते या प्रदेशाला लाभले. भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू हे याच प्रदेशांतले असून सांप्रत संपूर्ण भारताचें नेतृत्व



धमेख स्तूप - सारनाथ


त्यांच्याकडेच आहे. आंतरराष्ट्रीय जगांतहि त्यांनी आपल्या शांतिप्रिय धोरणामुळे आणि व्यापक दृष्टिकोनामुळे फार मोठी कीर्ति मिळविली आहे.

बौद्ध धर्माचा उदय वाराणसीजवळ सारनाथ येथे झाला. बौद्धग्रंथांत त्या स्थानाला इसिपत्तन किंवा मृगदाव असें म्हटलें आहे. अशोकाने तिथे स्तूप व स्तंभ उभारले, तेव्हापासून बौद्ध जगांत त्याचें माहात्म्य वाढलें. सनपूर्व ३०० ते इ. स. १२०० पर्यंतच्या १५०० वर्षांतील भिन्न भिन्न स्मारकांचे भग्न अवशेष तिथे सापडले आहेत. त्यांत चौखंडीचा स्तूप, धमेखस्तूप, सिंहशीर्ष स्तंभ व मूलगंधकुटी हे प्रमुख होत. श्रावस्ती ही नगरी उत्तर कोसलाची प्राचीन राजधानी होती. तिचाहि बुद्धाच्या जीवनाशीं घनिष्ट संबंध आला होता. बुद्धाने तिथे अनेक प्रवचनें केलीं होतीं व वर्षावासहि केला होता. त्या घटनांचें स्मारक म्हणून तिथे अनेक स्तूप व विहार बांधले गेले होते. त्या नगरीचे अवशेष राप्ती नदीच्या तीरावर सहेथ-महेथ या ठिकाणीं सांपडले आहेत.

सांकास्य हें नगरहि बुद्धाच्या तेथील वास्तव्यामुळें विख्यात बौद्ध क्षेत्र बनलें होतें. फरुकाबादजवळचें संकिस हें गांव म्हणजेच प्राचीन सांकास्य होय, असें आतां सिद्ध झालें आहे. बुद्धाचें महापरिनिर्वाण ज्या ठिकाणीं झालें, तें कुशिनारा हें गांव याच प्रदेशांत आहे. सांप्रत त्याला कसिया म्हणतात. इथे परिनिर्वाण अवस्थेंतली बुद्धाची प्रचंड मूर्ति आहे.

प्राचीन काळीं दाशरथीं राम व भगवान् श्रीकृष्ण हे दोघे महान् अवतार याच प्रदेशांत प्रकट झाले. त्यांच्याहि पूर्वकाळांत शिव, विष्णु व दुर्गा या तीन महान् दैवतांची ही लीलाभूमि होती. म्हणून या प्रदेशांत राम-कृष्ण व शिव-विष्णू यांचीं असंख्य मंदिरें उभारलीं गेलीं आहेत. एका वाराणसींतच सुमारें २००० मंदिरें आहेत. काशीची यात्रा करणें व विश्वेश्वराचें दर्शन घेणें हें समस्त हिंदु जातीने आजवर महत्पुण्यकृत्य मानलें आहे. गंगा आणि यमुना या दोन लोकपावनी नद्या याच प्रदेशाची भूमि पवित्र करतात. प्रयाग येथे त्या दोघींचा संगम झाला असून त्या क्षेत्राला 'तीर्थराज' ही पदवी आहे. पुण्यनगरी वाराणसी गंगेच्या तीरावरच वसली आहे.

कोसलाची राजधानी अयोध्या हिला प्रभु रामचंद्रामुळे गौरव प्राप्त झाला. श्रीकृष्णाचा जन्म व त्याच्या बाललीला, यामुळे मथुरा व गोकुळ-वृंदावन या स्थळांना तीर्थरूपता प्राप्त झाली आहे. मिर्जापुरपासून सात मैलांवर गंगेच्या कांठीं एका डोंगरावर विंध्याचल नांवाचें एक क्षेत्र आहे. तिथूनच विंध्याची पर्वतराजि सुरू होते. तिथलें विंध्यवासिनीचे मंदिर प्रसिद्ध आहे. कानपूरपासून चौदा मैलांवर बिठूर हें क्षेत्र आहे. ब्रह्मदेवाने विश्वनिर्मितीचें कार्य पूर्ण झाल्यानंतर इथेच अश्वमेध केला होता, असें सांगतात. वाल्मीकीचा आश्रम इथे असून सीतेने आपल्या लव-कुश नामक पुत्रांना इथेच जन्म दिला होता. सीतापुर जिल्ह्यांतील गोमतीच्या तीरावरचें निमसर म्हणजेच पुराणकालीन नैमिषारण्य होय. हें शौनकादि ऋषींच्या वसा-



लव - कुशांची जन्मभूमि – ब्रह्मावर्त

हतीचें मोठें क्षेत्र होतें. त्या ठिकाणीं त्यांचीं मोठमोठीं सत्रेंहि चालत. हरिद्वार हें गंगा नदी मैदानांत उतरते, त्या ठिकाणचें मोठें क्षेत्र आहे. इथे दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो. पुराणप्रसिद्ध दक्षयज्ञ इथून जवळच असलेल्या कनखल क्षेत्रांत झाला. या ठिकाणीं आर्य समाजाने चालविलेल्या शिक्षणसंस्था आहेत. तिथून पुढे १५ मैलांवर हृषिकेश हें क्षेत्र गंगेच्या कांठींच आहे. हें नारायणाचें स्थान समजलें जातें. हिमालयांतील केदारनाथाचें मंदिर हें भारतांतलें सुप्रसिद्ध क्षेत्र मानलें जातें. हें मंदाकिनीच्या खोऱ्यांत असून त्याच्या जवळच 'महापंथ' शिखर आहे. हिमालयांतलें सर्वश्रेष्ठ तीर्थक्षेत्र म्हणजे बदरीनारायणाचें स्थान होय. या बदरीनारायणाचें प्राचीन काळींच नष्ट झालेलें मंदिर शंकराचार्यांनी पुनश्च बांधलें, असें सांगतात. हिमालयांत अशीं अनेक तीर्थें आणि क्षेत्रें आहेत. इतकेंच नव्हे; तर समग्र हिमालयच देवतात्मा मानलेला आहे. हिमाचल ही ऋषींची तपोभूमि व योग्यांची ध्यानभूमि आहे. हिमालयांत बदरिकाश्रमीं वास्तव्य करूनच व्यासांनी भारताची रचना केली.

मुसलमानी अंमल सुरू झाल्यापासून उत्तर प्रदेशांत असंख्य मशिदी बांधल्या गेल्या. प्रांतिक व बादशाही असें त्यांचे दोन वर्ग पडतात. पहिल्या वर्गांतल्या मशिदी इटावा, इटा, कनौज इ. ठिकाणीं आहेत. त्या साध्या पण मजबूत आहेत. बादशाही मशिदी भव्य, सुंदर आणि नक्षीकामाच्या असून त्या पाषाण किंवा संगमरवर यांच्या आहेत. बादशाही सत्तेचीं तीं प्रतीकेंच होत, असें म्हणायला हरकत नाही. आगरा, फतेपूर

सीकरी व जौनपूर या ठिकाणच्या मशिदी पहिल्या वर्गांत येतात. स्त्रियांना बसण्यासाठी सुंदर, जाळीदार सज्जे हें या मशिदींचें वैशिष्टय होय. फतेपूर सीकरी येथें अकबरानें बांधलेली जामेमशीद उत्तर प्रदेशांतल्या सर्व मशिदींत अतिभव्य आणि अत्यंत सुंदर आहे. वाराणसी व मथुरा येथें औरंगजेबानें बांधलेल्या मशिदींचें स्वरूप याहून भिन्न आहे. त्यानें सौंदर्याला महत्त्व न देतां इस्लामच्या गौरवाला महत्त्व दिलें. त्या नुसत्याच भव्य आहेत. हिंदु कारागिरांनी त्या बांधलेल्या नाहीत. या सर्व लहानमोठ्या मशिदींत हिंदु-मुस्लीम अशी जी संमिश्र शिल्पकला दिसते, ती उत्तर प्रदेशांत अनेक शतकें टिकून राहिली होती.

इतिहासकाळांत उत्तर प्रदेशामध्यें अनेक ठिकाणीं गड किंवा कोट होते. कांही दगडी, कांही विटांचें तर कांही मातीचे. प्रदेश मैदानी असल्यामुळे गावें किंवा शहरें यांच्या संरक्षणासाठी त्या काळीं कोट बांधण्याची प्रथा होती. त्याचप्रमाणे राज्याच्या संरक्षणासाठी जागोजाग मोक्याच्या ठिकाणीं गडहि बांधलेले होते. सांप्रत त्यांतले बहुतेक गड-कोट उद्ध्वस्त व जमीनदोस्त झाले आहेत. मोगलकालांतले किल्ले-कोट मात्र अजून बरेच शाबूत आहेत. याचें कारण ते भरीव वाळूपाषाणाचे असून त्यांचे तट व बुरुज अत्यंत भक्कम आहेत. त्यांची रचना चमत्कृतिपूर्ण असून शिल्पकामहि दर्शनीय आहे. अशा प्रकारच्या किल्लेकोटांत आगरा, अलाहाबाद, चुनार व झांशी येथील किल्ले विशेष उल्लेखनीय आहेत. [ग्लो. उ. प्र.; हिं. वि. को.]

उत्तरबोधि एक मुद्रा. दोन्ही हात छातीशीं टेकलेले, बोटें एकमेकांत गुंतविलेलीं, अंगठा व तर्जनी उभी आणि उभय तर्जनींचीं टोकें जुळविलेलीं, अशी ही मुद्रा असून ती अत्युच्च पूर्णतेची निदर्शक आहे. [गॉ. नॉ. बु.]

उत्तरमद्र एका प्राचीन देशाचें व त्यांतील लोकांचें नांव. हे लोक हिमालयाच्या उत्तरेला राहत होते (ऐ. ब्रा. ८.१४). मद्र व कंबोज हे प्रदेश एकमेकांना लागून असावे, असें वंशब्राह्मणांतील वर्णनावरून दिसतें. [वे. इं.; वै. सा.]

उत्तर मानस एक तीर्थ. फल्गु नदीच्या गयेपर्यंतच्या प्रवाहाला हें नांव आहे. [कृ. क. त.]

उत्तरमालिका रेवतीला अनुसरणारी एक देवता (मत्स्य पु. १७९.७२). [पु. इं.]

उत्तरमीमांसा एक दर्शन. वेदांच्या उपनिषद्रूप शेष भागाला उत्तर भाग असें म्हणतात. त्याची पंचांगन्यायानें युक्त अशा वाक्यसमुदायानें मीमांसा करणारें शास्त्र तें उत्तर मीमांसा होय. बादरायण व्यासांनी 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' (ब्र. सू. १. १. १.) या सूत्रापासून प्रारंभ करून 'अनावृत्तिः शब्दात्' (ब्र. सू. ४. ४. २३) या सूत्रापर्यंतच्या चार अध्यायांत जो ब्रह्मविचार केला, त्याला उत्तरमीमांसा असें म्हणतात. या दर्शनालाच वेदान्त असें दुसरें नांव आहे. वेदान्तमत हें अद्वैतप्रतिपादक असल्यामुळे त्याला अद्वैतदर्शन असेंहि म्हणतात. **पाहा**––अद्वैतदर्शन.

उत्तरा फल्गुनी अश्विन्यादि नक्षत्रगणनेंतलें १२ वें नक्षत्र. अर्यमा ही या नक्षत्राची देवता आहे. हें नक्षत्र सिंह राशींत येतें. आकाशांतल्या सिंहाच्या आकृतींत तें पुच्छभागीं दिसतें. हें शुभ नक्षत्र आहे. उत्तरेचें ध्यान पुढीलप्रमाणे सांगितलेलें आहे––

व्याघ्राननोत्तरा गोस्था शुभ्रवर्णा चतुर्भुजा ।
द्वयक्षिणी सूत्रखट्वाङ्गधारिणी परिकीर्तिता ।।

अर्थ––उत्तरा ही वाघाच्या तोंडाची, बैलावर बसणारी, शुभ्रवर्ण, चतुर्भुज, द्विनेत्र, व सूत्र आणि खट्वांग धारण करणारी करावी असें सांगितलें आहे. [हेमाद्रि]

उत्तराधि एक संप्रदाय. यांत पंजाबच्या बाजूच्या धनिक लोकांचाहि अंतर्भाव आहे. या संप्रदायांतील बहुतेकांचा व्यवसाय औषधें देणें व जमाखर्च लिहिणें हा आहे. बनवारीदास हा या संप्रदायाचा प्रवर्तक होय. पण कांही लोक रजबजीला संप्रदाय प्रवर्तक मानतात. या पंथाचे ५२ यांवे पृथक् पृथक् स्थापलेले आहेत व फक्त डेहरा गांवांतच याच्या चौदा गाद्या विद्यमान आहेत. पंथाचे मुख्य महंत हिसार जिल्ह्यांतील रसिया गावीं राहतात. [उ. भा. सं. पं.]

उत्तराध्ययनसूत्र जैनांचें एक मूल सूत्र. जैन धर्म व जैन दर्शन या दोहोंच्याहि दृष्टीनें याला महत्त्व आहे. या ग्रंथांत प्राचीन काळांतली पुष्कळशी धार्मिक कविता, पद्यबद्ध आख्यानें, वार्तालाप इ. मनोरंजक विषयांचें संकलन आहे. यांत अनेक ऐतिहासिक कथाहि आल्या आहेत. याचे २६ अध्याय असून तेविसाव्या अध्यायांत जैनांच्या मूल सिद्धान्तांचें विवेचन आहे.

उत्तराध्ययनसूत्रांत एक प्रश्न वारंवार उपस्थित केलेला आहे, की युवावस्थेंत सकल कामभोगांचा त्याग करून वैराग्य

घेणें श्रेयस्कर, कीं कामभोग भोगून वृद्धावस्थेंत तें घेणें श्रेयस्कर ? यशा नामक स्त्री तारुण्यांत विषयभोग अवश्य भोगावे अशा मताची होती, तर तिचा पति भृगु हा तिच्या विरुद्ध होता. पण सती राजमतीच्या कथेंत याच्या उलट प्रकार आहे. तिचा पति रथनेमि हा राजमतीला आवाहन करतो, की 'तूं जवळ ये. आपण या दुर्लभ मानवजन्मांतल्या तारुण्याचा पुरेपूर रस घेऊं आणि सकल भोग भोगून मग जिन-मार्गाचा स्वीकार करूं.' त्यावर राजमती त्याचा धिक्कार करून त्याला म्हणते, की 'विषय हे वमनसदृश आहेत. त्यांची कामना धरण्यापेक्षा तुम्हांला मरण येणें, हें माझ्या दृष्टीने अधिक चांगलें.' [आ. सं.; रास और रासान्वयी काव्य]

उत्तरापथ (१) उत्तर भारताचें एक नांव. कांही वेळां उत्तरापथाऐवजी उदीचीपथ असाहि उल्लेख येतो. कनोजचा हर्षवर्धन हा उत्तरापथाचा अथवा उत्तर प्रदेशाचा प्रभु होता, असें पश्चिम चालुक्यांच्या इतिहासांत लिहिलें आहे. उत्तरापथाचा बृहत्संहितेंत उल्लेख आहे. [म. ज्ञा को.]

(२) उत्तर प्रदेशांत हिमालयापर्यंत पसरलेलें एक ब्राह्मण जनपद. हें गंधार व कंबोज अशा दोन महाजनपदांत विभक्त होतें. तक्षशिला ही गंधारची राजधानी होती. काश्मीरहि गंधार जनपदाच्या अंकित होतें. सीमाप्रांतांतलें राजौरी हें कंबोज जनपदाचें स्थान होतें. युआन च्वांग याचें प्रवास-वर्णन व अशोकाचे शिलालेख यांवरून या गोष्टीला आधार मिळतो. [जा. का. भा. सं.]

उत्तराभाद्रपदा अश्विन्यादि नक्षत्रगणनेंतलें २६ वें नक्षत्र. अहिर्बुध्न्य ही याची देवता असून हें मीन राशींत येतें. हें शुभ नक्षत्र आहे. वैदिक काळांत पूर्वा—उत्तरा-भाद्रपदांना प्रोष्ठपदा म्हणत. या दोहोंच्या दोन दोन तारका दक्षिणोत्तर असून आकाशांत त्यांचा चौकोन दिसतो. आकाशां-तला हा सर्वांत मोठा चौकोन होय. या चौकोनाचें पाश्चात्य नांव पेगासस् असें आहे. उत्तराभाद्रपदेचें ध्यान पुढीलप्रमाणे सांगितलें आहे –

गर्दभास्या वृषारूढा सिता भाद्रपदोत्तरा ।
पात्रं च डमरुं धत्ते द्विभुजेयमुदीरिता ॥

अर्थ – उत्तराभाद्रपदा ही गाढवाच्या तोंडाची, वृषभवाहन, गोरी व द्विभुज आहे. हिच्या हातांत पात्र व डमरु असतो. [हेमाद्रि]

उत्तरायण सूर्याचा उत्तरेकडे जाण्याचा अर्थात् मकर संक्रमणापासून तों कर्कसंक्रमण होण्यापर्यंतचा सहा महिन्यांचा काळ. या काळांत मृत्यु आल्यास माणसाला मोक्ष मिळतो, अशी समजूत आहे —

आपन्ने तूत्तरां काष्ठां सूर्ये यो निधनं व्रजेत् ।
नक्षत्रे च मुहूर्ते च पुण्ये राजन् स पुण्यकृत् ॥

(म. भा. शांति. २९८.२३)

अर्थ – हे राजा, सूर्य उत्तर दिशेला गेल्यावर चांगल्या नक्षत्रावर व पुण्य मुहूर्तावर ज्याला मृत्यु येईल, तो पुण्यवान् समजावा.

उत्तरायणाचा काल दक्षिणायनापेक्षा अधिक निरामय असतो. सूर्याचा प्रकाश जसा पृथ्वीवर पडतो, तसाच तो इतर ग्रहांवरहि पडतो. त्यामुळे त्या ग्रहांवर उत्पन्न होणारें तेज पृथ्वीवरील सृष्टीलाहि मिळतें. असे ग्रह उत्तरेकडे अधिक संख्येने असल्यामुळे उत्तरायणांत त्यांना अधिक सूर्यप्रकाश मिळतो व त्या प्रमाणांत पृथ्वीला त्यांचें तेजहि जास्त मिळतें. त्या मानाने दक्षिणायनांत पृथ्वीला तेज कमी मिळतें, म्हणून तो काळ रोगट व अशुभ समजतात. **पाहा** – देवयान व पितृ-याण. [हि. ध.; सा. इं. फे.]


उत्तराषाढा अश्विन्यादि नक्षत्रगणनेंतलें २१ वें नक्षत्र. या नक्षत्राची देवता विश्वेदेव ही असून याचा प्रथम चरण धनुराशींत व पुढचे तीन चरण मकरराशींत येतात. अनुराधांतली वरची तारका व वृश्चिकपुच्छांतलें शेवटचें नक्षत्र यांच्यावरून दोन समांतर रेषा पूर्वेकडे ओढल्या असतां त्या दोहींच्या मध्ये पूर्वाषाढा व उत्तराषाढा हीं नक्षत्रें दिसतील. त्यांचा चौकोन आहे. उत्तराषाढेचें ध्यान पुढीलप्रमाणे सांगि-तलें आहे –

सर्पगा चोत्तराषाढा गौरवर्णा सुरूपिणी ।
नागबन्धजटाजूटस्वर्णकुण्डलभूषिता ।
अक्षनागधरा दक्षे वामे पुस्ती सकुण्डिका ॥

अर्थ – उत्तराषाढा ही सर्पावर बसणारी, गोरी, सुंदर, नागदोरीने जटाजूट बांधणारी, सुवर्णाचीं कुंडलें घालणारी आणि उजव्या हातीं फासे व नाग, तसेंच डाव्या हातीं पुस्तिका व कुंड धारण करणारी आहे. [हेमाद्रि]

उत्तरीय पांघरायचें उपरणें. अंतरीय म्हणजे नेसायचें धोतर व उत्तरीय म्हणजे पांघरायचें वस्त्र असा भारती-यांचा प्राचीन वेष होता. या जोडीला शाटकयुग असें म्हणत. 'न वा शाटकयुगाद्यर्थम्' या वार्तिकांत कात्यायनाने या जोडीचा

उल्लेख केला आहे. अंतरीय व उत्तरीय अशी जोडी बाजारांत विकली जात असे, असा कात्यायन व पतंजलि यांच्या ग्रंथांतून संकेत मिळतो. अंतरीयाला अधोवास असेंहि म्हणत. अधोवास कमरेभोवती वाटोळें गुंडाळीत. [पा.भा.]



उत्तरीय

उत्तानकूर्मासन

या आसनाने आळस दूर होऊन इंद्रियें शांत होतात. याचा विधि असा –

कुक्कुटासनबन्धस्थकराभ्यां धृतकन्धरम् ।
पीठं कूर्मवदुत्तानमेतदुत्तानकूर्मकम् ।।

अर्थ – कुक्कुटासन केल्यानंतर जमिनीवरचे हात तसेच वर उचलून मान धरावी. याला उत्तानकूर्मासन असें नांव आहे. [यो. सो. पू. च.]

उत्तानमंडूकासन

हठयोगांतलें एक आसन. याचा विधि असा –

मण्डूकासनमध्यास्य कर्पूराभ्यां धृतं शिरः ।
एतद् भेकवदुत्तानमेतदुत्तानमण्डुकम् ।।

अर्थ – मंडूकासन करून दोन्ही हात मस्तकावर ठेवावे. डाव्या हाताने उजवा व उजव्या हाताने डावा दंड धरावा. याला उत्तानमंडूकासन म्हणतात. [यो. सो. पू. च.]

उत्थान

एक शिशुसंस्कार. वैखानस (३.१८) व शांखायन गृह्यसूत्र (१.२५) या दोनच ग्रंथांत या संस्काराचा उल्लेख आहे. वैखानसाने याचा विधि पुढीलप्रमाणे दिला आहे–

मुलाच्या जन्माच्या दहाव्या किंवा बाराव्या दिवशीं पित्याने श्मश्रु करून आंघोळ करावी; गृहशुद्धि करावी. नंतर जातकाग्नींत भिन्नगोत्रीय गृहस्थाकडून भूमीला उद्देशून याग करावा. नंतर त्या अग्नींत धाता व इतर देवता यांना आहुती द्याव्या व ब्राह्मणभोजन घालावें. [हि. ध.]

उत्पत्ति एकादशी

कार्तिक व. ११ शीचें नांव.

उत्पल

(१० व्या शतकाचा पूर्वार्ध) काश्मीर मधील शैवमताच्या प्रत्यभिज्ञाशाखेचा एक महान् आचार्य. हा सोमानंदाचा पुत्र होय. ईश्वरप्रत्यभिज्ञा हा प्रमेयबहुल ग्रंथ लिहून व त्यांत अन्य मतांचें युक्तिपूर्वक खंडन करून याने प्रत्यभिज्ञादर्शनाला उच्च कोटि प्राप्त करून दिली. सर्वसामान्य जनतेलाहि प्रत्यभिज्ञादर्शन कळावें म्हणून याने कित्येक ग्रंथ लिहिले आहेत. उदा० स्तोत्रावलि, सिद्धित्रय, शिवदृष्टिव्याख्या इत्यादि. शैव दर्शनाला प्रत्यभिज्ञा हें नांवहि यानेच दिलें. याचे पुत्र व शिष्य यांनीहि प्रत्यभिज्ञादर्शनांत पांडित्य मिळविलें. [हि. वि. को. – बलदेव उपाध्याय]

उत्पलदेव

(९ वें शतक) एक संस्कृत कवि. त्रिकदर्शनाचा हा एक आचार्य होता. याची शिवस्तोत्रावलि प्रसिद्ध आहे. या ग्रंथांत २१ स्तोत्रें असून त्यांत शिवाची स्तुति केलेली आहे. उदा० ––

कण्ठकोणविनिविष्टमीश ते
कालकूटमपि मे महामृतम् ।
अप्युपात्तममृतं भवद्वपु –
र्भेदवृत्ति यदि मे न रोचते ।।

अर्थ –– हे भगवन्, तुझ्या कंठातील कोपऱ्यांत सांठलेलें विषहि मला महान् अमृताप्रमाणे वाटेल. परंतु तुझ्या शरिरापासून अलग असणारें अमृतहि लाभलें, तरी तें मला आवडणार नाही. [सं. सा. इ.]

उत्पलवर्णा

बौद्ध भिक्षुणीसंघांतली प्रसिद्ध स्थविरा. ही ऋद्धिमती होती. श्रावस्ती नगरींतील एका श्रेष्ठीची ही कन्या होती. हिचा वर्ण नीलोत्पलासारखा असल्यामुळे हिचें नांव उत्पलवर्णा असें ठेवण्यांत आलें. हिच्या सौंदर्यावर भाळून अनेक राजकुमारांनी हिला मागणी घातली. परंतु एका राजपुत्राला कन्या दिली, तर बाकीच्या राजपुत्रांचा रोष ओढवेल या भयाने तिच्या पित्याने उत्पलवर्णेला प्रव्रज्या घेण्याचा उपदेश केला. त्याप्रमाणे भिक्षुणीसंघांत दाखल होऊन तिने प्रव्रज्या घेतली. नंतर तिने त्रिपिटकांचें अध्ययन करून पुढे अर्हत्पदहि मिळविलें. त्यानंतर चमत्कार करून दाखविणें (ऋद्धि) या गोष्टींत ती पारंगत झाली. म्हणून बुद्धाने तिला ऋद्धिमती हें भिक्षुणींतील श्रेष्ठ पद बहाल केलें. [पा. वा. ते. भि. र.]

उत्पलावती

मलय टेकडीपासून उगम पावलेली एक नदी. [पु. इं.]

उत्पलाक्षी

सहस्राक्ष क्षेत्रांतल्या देवालयांतील एक देवता. (मत्स्य पु. १३. १४). [पु. इं.]

उत्पवन शुद्धीकरण. दोन्ही हातांचे अंगठे व करंगळी-जवळील बोटें यांनी दोन दर्भ (पवित्रें) धरून त्यांनी प्रोक्षणी वगैरे पात्रांतील द्रव पदार्थ वर उडविणें, याला उत्पवन असें म्हणतात. आज्याचें उत्पवन करतांना दर्भाचें पवित्रक विरळ धरून आज्यामध्ये बुडवितात. नंतर तें पुढे व मागे नेऊन पुन्हा मध्यभागापासून वर उचलतात, याला पुनराहार-उत्पवन असें म्हणतात. [सं. कौ.; विद्याधरशास्त्री भिडे].

उत्पात 'उत्पतति अकस्माद् आयाति इति' = एकाएकीं घडून येणाऱ्या घटनेला उत्पात असें म्हणतात. प्राणिमात्रांना शुभाशुभसूचक अशा पंचमहाभूतांच्या आविष्कारांना उत्पात म्हणावें, असें अमरकोशाच्या टीकेंत भरत म्हणतो.

उत्पात हा त्रिविध आहे — (१) दिव्य म्हणजे पर्वकाल नसतांना चंद्रसूर्यांचें ग्रहण इत्यादि, (२) आन्तरिक्ष म्हणजे उल्कापातादि व (३) भौम म्हणजे भूकंप, प्रलय इत्यादि. ऋतुस्वभावानुसार होणारे उत्पात हे दोषावह नाहीत, असें मत आहे.

चंद्रसूर्याला खळें पडणें, अग्नीशिवाय ज्वलन होणें, पृथ्वीला भेगा पडणें, दिवसां ग्रहनक्षत्र तारे दिसणें, यक्षराक्षसादिकांचें दर्शन होणें इ. घटना या औत्पातिक होत.

हे उत्पात कां होतात, याचें कारण गर्गसंहितेंत पुढीलप्रमाणे दिलें आहे —

अतिलोभादसत्याद्वा नास्तिक्याद्वाप्यधर्मतः ।
नरापचारान्नियतमुपसर्गः प्रवर्तते ॥
ततोऽपचारान्नियतमपवर्जन्ति देवताः ।
ताः सृजन्त्यद्‌भुतांस्तास्तु दिव्यनाभसभूमिजान् ॥
त एव त्रिविधा लोके उत्पाता देवनिर्मिताः ।
विचरन्ति विनाशाय रूपैः संबोधयन्ति च ॥

अर्थ — अतिलोभ, खोटेपणा, नास्तिकता, अधर्म अशा प्रकारच्या मानवाच्या दुर्वर्तनांमुळे उत्पात घडतात. या दुराचारांमुळे देवता क्रुद्ध होतात व त्या अंतराळांत, आकाशांत व भूमीवर उत्पात निर्माण करतात. हे उत्पात स्वतःच्या रूपांनी जगाला आपली जाणीव देतात.

उत्पातादि योग जातकशास्त्रांतील विविध योग. यांची सिद्धि पुढीलप्रमाणे —

द्वीशात्तोयाद्वासवात्पौष्णभाच्च
ब्राह्मात्पुष्यादर्यमर्क्षाद्युगर्क्षैः ।
स्यादुत्पातो मृत्युकाणौ च सिद्धि
र्वारेऽर्काद्येतत्फलं नामतुल्यम् ॥

अर्थ — विशाखा, पूर्वाषाढा, धनिष्ठा, रेवती, रोहिणी, पुष्य, आणि उत्तराफल्गुनी या सात नक्षत्रांपैकी प्रत्येक नक्षत्रापासून चार नक्षत्रें रविवारादि सात वारीं आलीं असतां अनुक्रमें उत्पात, मृत्यु, काण व अमृतसिद्धि हे योग होतात. त्यांचीं फळें नांवासारखीं असतात.

यांतील पहिले तीन अशुभ व चौथा अमृतसिद्धियोग शुभ असतो. हे चार योग खालील कोष्टकावरून स्पष्ट होतील —

वार	उत्पात	मृत्यु	काण	अमृतसिद्धि
रविवार	विशाखा	अनुराधा	ज्येष्ठा	मूळ
सोमवार	पूर्वाषाढा	उत्तराषाढा	अभिजित्	श्रवण
मंगळवार	धनिष्ठा	शततारका	पूर्वभाद्रपदा	उत्तराभाद्रपदा
बुधवार	रेवती	अश्विनी	भरणी	कृत्तिका
गुरुवार	रोहिणी	मृगशीर्ष	आर्द्रा	पुनर्वसु
शुक्रवार	पुष्य	आश्लेषा	मघा	पूर्वा
शनिवार	उत्तरा	हस्त	चित्रा	स्वाती

[मु. चिं.]

उत्प्रेक्षावल्लभ (६ वें शतक) एक शैव कवि. याचें खरें नांव गोकुळनाथ असून उत्प्रेक्षावल्लभ हें त्याने घेतलेलें टोपण नांव आहे. याने भिक्षाटन नामक महाकाव्य लिहिलें असून त्यांत शंकराच्या शृंगार–विलासांचें वर्णन केलें आहे.

उत्सर्ग विहिरी, तळीं यांचा उत्सर्ग करावा, म्हणजे त्यांतलें पाणी बाहेर उपसून टाकावें, असें शास्त्रवचन आहे. तसें न केल्यास त्यांतील पाणी अपवित्र व म्हणून अपेय ठरतें. तें जो प्राशन करील, त्याने चांद्रायण प्रायश्चित करायला हवें, असें भविष्यपुराणांत सांगितलें आहे. या उत्सर्गाचा विधि असा—

शुभ दिवशीं वापी, कूप, तलाव इ. जलाशयांच्या समीप अग्निस्थापना करून त्यावर वरुणदेवतेकरितां चरु शिजवितात. नंतर आज्यभागापर्यंत तंत्र झाल्यावर 'समुद्रज्येष्ठाः ... ' या सूक्ताच्या प्रत्येक ऋचेने आज्याहुती देतात. चरूच्याहि आठ आहुती देतात. नंतर स्विष्टकृत् होम करून त्या जलाशयांत एक गाय सोडतात व पुढील मंत्र म्हणतात —

इदं सलिलं पवित्रं कुरुष्व शुद्धाः पूताः अमृताः सन्तु नित्यम् ।
मां तारयन्तीं कुरु तीर्थाभिषेकं लोकाल्लोकं तरते तीर्यते च ॥

गाय जलाशयांत शिरतांना तिचें पुच्छाग्र धरून यजमान जलांत उतरतो व मार्जन केल्यावर ईशान्य दिशेला गायीला वर काढतो. नंतर ती गाय अलंकृत करून ब्राह्मणाला दान

द्यायची असते. एवढें झाल्यावर त्या जलाशयाचा उत्सर्ग करतात म्हणजे त्यांतलें पाणी बाहेर काढून टाकतात व ब्राह्मणभोजन घालतात. [नि. सि.]

उत्सर्जन उत्सर्जन म्हणजे वेदाध्ययन कांही काल बंद ठेवण्यासाठी करायचा विधि. आपस्तंबाने उत्सर्जनाला समापन असें नांव दिलें आहे. हा विधि केव्हा करावा, याबद्दल सूत्रकारांत मतभेद आहेत. बौधायन गृह्यसूत्र सांगतें की पौष किंवा माघ पौर्णिमेला उत्सर्जन करावें. आश्वलायनाच्या मतें उपाकर्मानंतर सहा महिन्यांनी तें करावें म्हणजे श्रावण पौर्णिमेला उपाकर्म केल्यास माघपौर्णिमेला उत्सर्जन करावें. पौष महिन्यांत चंद्र रोहिणी नक्षत्रांत असतांना उत्सर्जन करावें, असें पारस्कर गृह्यसूत्रांत म्हटलें आहे.

पारस्कर गृह्यसूत्रांत (२.१२) उत्सर्जनाचा विधि दिला आहे, तो पुढीलप्रमाणे——

आचार्य आपल्या शिष्यांसह नदीकिनाऱ्यावर जातो व देव, छंद, वेद, ऋषि, पूर्वाचार्य, गंधर्व, अन्य आचार्य, संवत्सर, पितर इ. चें जलाने तर्पण करतो. सर्वजण चारवेळां सावित्री म्हणतात व 'आम्ही वेदाध्ययन थांबविलें आहे,' असें उद्घोषित करतात. यानंतर अनध्याय असतो.

ऋग्वेदी लोकांचा उत्सर्जनविधि पुढीलप्रमाणे असतो——

प्रथम आचमन, प्राणायम, देशकालसंकीर्तन करून संकल्प करतात. नंतर पंचगव्य प्राशन करून अग्निमुख करतात. यांतल्या अग्नीचें नांव बलवर्धन असतें. उपाकर्म देवतांना आज्याहुती व अग्न्यादि वीस देवतांना चरूच्या आहुती दिल्यावर ब्रह्मयज्ञ करतात व सर्वजण 'उत्सृष्टा वै वेदाः' आम्ही वेदांचें उत्सर्जन केलें, असा उद्घोष करतात. यानंतर अग्नीला प्रायश्चित्तादाखल आज्याहुती देतात.

उत्सर्जनानंतर उपाकर्मापर्यंत म्हणजे जवळ जवळ पांच सहा महिने वेदाध्ययन बंद ठेवणें, हें सूत्रकारांना योग्य वाटलें नाही; म्हणून त्यांनी पर्याय सांगितला तो असा, की शुक्लपक्षांत वेदाध्ययन करावें व कृष्णपक्षांत वेदाध्ययन बंद ठेवून वेदांगांचें अध्ययन करावें. हल्लीं हा विधि उपाकर्माच्या दिवशींच प्रथम करतात. [हि. ध.]

उत्सव याची व्याख्या अशी—'नियताल्हादजनकव्यापारः'= निश्चितपणे आल्हाद उत्पन्न करणारा व्यापार म्हणजे उद्योग तोच उत्सव होय (श. क.). 'मह उद्धव उत्सवः' असें अमरकोशांत त्याचे पर्यायशब्द दिले आहेत. ज्या एखाद्या धार्मिक समारंभांत तो करणाऱ्या व त्यांत भाग घेणाऱ्या लोकांना हर्ष, आनंद आणि मनःप्रसाद यांचा अनुभव घडतो, त्याला उत्सव म्हणतात. सामान्यपणे सर्व उत्सव साक्षात् किंवा पर्यायाने तरी धार्मिकच असतात. भारतीयांच्या सर्व उत्सवांना मुळापासून धार्मिक असेंच स्वरूप आहे. भारतीयांचे यज्ञयागादि सर्व विधी देवा–धर्मांवरच आधारलेले आहेत. इतर सामाजिक समारंभांनाहि येन केन प्रकारेण धर्माचें अधिष्ठान असतेंच.

मनुष्य हा स्वभावतःच सामाजिक प्राणी आहे. समाजाला सोडून त्याला जगणें कठीण असतें व जगला तरी तें जीवन असुरक्षित आणि निरानंद होतें. 'जीवनार्थ कलह' हा जसा प्रत्येक प्राण्याच्या मागे लागलेला आहे, तसाच तो मानवालाहि लागलेला आहे. जगण्यासाठी आणि वाढण्यासाठी त्याला खूप कष्ट करावे लागतात. योगक्षेमाची चिंता करीत सदैव धडपडत राहणें, यालाच संसार म्हणतात. संसार हा कष्टमय आणि दुःखमय आहे, हा सर्वांचाच अनुभव असतो. तेव्हा अशा संसारग्रस्त मानवाला त्याच्या दैनंदिन व्यवसायांतून आणि चिंता-व्यथांतून बाजूला काढून त्याच्या शरिराला विश्रांति व मनाला आनंद मिळवून देणें आणि त्याला सामाजिक सुखाचा अनुभव घडविणें, या उद्देशांनी मानवसमाजांत उत्सवाची प्रथा निर्माण झाली आहे. वर्षांतून ठराविक ऋतूंत ठराविक दिवशीं माणसाने समाजांत मिसळावें, सर्वांनी मिळून आमोद–प्रमोद करावा, निसर्ग आणि ललितकला यांचा रस द्यावा, घ्यावा आणि आपलें भावजीवन समृद्ध करावें, हा उत्सवांच्या मागचा प्रधान विचार आहे. म्हणूनच वात्स्यायनाने समाज आणि मेळावे यांना 'संभूय क्रीडा' असें नांव दिलें आहे.

हे उत्सव सामान्यतः पितृपूजा, वीरपूजा, नांगरणी, पेरणी, कापणी इ. कृषिकर्में, ऋतुपरिवर्तन, गणदेवता, ग्रामदेवता इ. संबंधीं असत. याशिवाय कांही उत्सव राजा आणि राज्यशासन यांच्या मार्फतहि होत असत. उदा० हस्तिमंगल, वप्पमंगल, जयपान इत्यादि. कांही उत्सवांना केवळ मेळा किंवा समाजोत्सव असें स्वरूप असे. त्यांत कोणत्याहि धर्माचा किंवा कर्मकांडाचा समावेश नसे. त्यामुळे समस्त जनता अशा उत्सवांत सहभागी होत असे. अशा प्रसंगीं वाह्यात भाषण, स्वच्छंद वर्तन, मद्यपान, जुगार, नाचगाणें यांना मोकळेपणीं अवसर मिळत असे. ऋग्वेदांत अशा एका समाजोत्सवाचें वर्णन आलें आहे. त्याचें नांव 'समन' असें होतें. या उत्सवांत स्त्री-पुरुष मुक्तपणे भाग घेत. कवी, धनुर्धारी, वेश्या आणि उपवर तरुणीहि तिथे गोळा होत. त्या प्रसंगीं घोडयांच्या शर्यतीहि होत असत (ऋ. २. १६. ७; १. १२४. ८; १. ४८. ६).

रामायणांत कित्येक ठिकाणीं 'समाज' हा शब्द प्रयुक्त

झाला असून तो सार्वजनिक उत्सव या अर्थीच आहे. वाल्मीकीने अयोध्येचें वर्णन करतांना तिला 'समाजोत्सवशालिनी' म्हटलें आहे. कामसूत्रांत जे आमोद-प्रमोदांचे प्रकार सांगितले आहेत, त्यांत समाजोत्सवाला प्रथम स्थान आहे. या समाजोत्सवांत नाचगाणीं व नाटकेंहि होत असल्याचें वात्स्यायनाने सांगितलें आहे. जैनांच्या आचारांगसूत्रांत 'संखडि' नामक उत्सवाचा उल्लेख येतो. या उत्सवांतहि नृत्य, नाट्य, भोजन, सुरापान इ. प्रकार चालत.

प्राचीन काळीं नगरांत एखादा उत्सव व्हायचा अ:ला, की तिथल्या राजाकडून छणभेरी नांवाचा ढोल वाजवून नागरिकांना त्याची सूचना दिली जात असे. असा एक मोठा उत्सव म्हणजे कौमुदीमहोत्सव होय. याशिवाय उद्यानयात्रा, पर्वतयात्रा इ. सार्वजनिक उत्सवांच्या बाबतींतहि अशीच ढोल वाजवून सूचना देण्याची पद्धत होती. आजहि कोंकणांत जेव्हा एखाद्या ग्रामदेवतेची जत्रा असते, तेव्हा सकाळीं त्या देवळाजवळ ढोल वाजवितात.

जसजसा धर्माचा विकास होत गेला, नवे अवतार, नवीं दैवतें, नवे संप्रदाय निर्माण झाले, तसतशी उत्सवांची संख्याहि वाढत गेली. त्याचें विधिविधान अंगप्रत्यंगांनी वाढलें. ते ते उत्सव साजरे करण्याचीं पंचांगांतलीं मास-तिथि-नक्षत्रेंहि निर्धारित केलीं गेलीं. आम जनतेचे कित्येक साधे सरळ उत्सव वैदिकांनी आपल्या यज्ञसंस्थेंत दाखल केले आणि त्यांत कर्मकांडाची जटिलता निर्माण केली. – उदा० चातुर्मास्य, सीतायज्ञ, आग्रयणेष्टि इत्यादि. आज आपण संप्रदाय-निरपेक्ष असे वर्षप्रतिपदा, अक्षय्यतृतीया, नागपंचमी, गौरीगणपति, दसरा, दिवाळी, मकरसंक्रमण, होळी इ. जे उत्सव करतों, त्या सर्वांचें मूळ प्राचीन ऋतूत्सवांत किंवा कृषिविषयक उत्सवांत असल्याचें आढळेल.

जैनांच्या भगवतीसूत्रांत इ. स. च्या पहिल्या सहस्रकांत होणाऱ्या उत्सवांची एक यादी दिलेली आहे, ती पुढीलप्रमाणे–

इन्द्रमह – इन्द्रोत्सव
स्कंदमह – कार्तिकेयाचा उत्सव
रुद्रमह – शिवाचे उत्सव
मुकुंदमह – कृष्णविषयक उत्सव
भूतमह – भूत, प्रेत, पिशाच, भैरव यांचे उत्सव
यक्षमह – यक्ष, कुबेर यांचे उत्सव
नागमह – नागपूजोत्सव
स्तूपमह – बौद्धस्तूपांचे उत्सव
चैत्यमह – मठ, विहार यांचे उत्सव
वृक्षमह – वृक्षपूजेचे उत्सव
गिरिमह – पर्वतयात्रा
दरीमह – दऱ्याखोऱ्यांतला विहार
अगडमह – विहिरींचे उत्सव
तडागमह – पुष्करिणींचे उत्सव
दहमह – तळ्यांचे उत्सव
नदीमह – नद्यांच्या स्नानासाठी यात्रा
सरमह – सरोवरांच्या स्नानासाठी यात्रा
सागरमह – समुद्रस्नानाचे पर्व
आगरमह – भूगर्भातल्या खाणींची पूजा

(भ. सू. ९. ३३)

वरील यादींतील उत्सवांचें पृथक्करण केल्यास प्राचीन काळांतले लोकोत्सव पुढील चार प्रकारांत विभागून दाखवितां येतात– (१) श्रेष्ठ देवतांचा सन्मान (२) क्षुद्रदेवतांची कृपा संपादन करणें (३) भूतकालांत होऊन गेलेले धर्मप्रवर्तक व महात्मे यांचें पुण्यस्मरण व (४) पंचमहाभूतें आणि निसर्गातल्या उपयुक्त वस्तू यांचा गौरव किंवा कृतज्ञता.

उत्सव, सण, समारंभ हें मानवाच्या मनाचें अन्न आहे. मानवाच्या सामाजिक जीवनाचा विकास उत्सव-समारंभांच्या द्वारेंच होत असतो. त्याच्या कलात्मक प्रवृत्तीला उत्सवप्रसंगींच आविष्काराची संधि मिळते. दक्षिणेंतल्या नृत्य-नाट्यकला देवस्थानें आणि उत्सवसमारंभ यांच्या अनुषंगानेच वाढल्या, विकसित झाल्या. उत्सव हें जीवनांतला एकसुरीपणा घालवितात, कांहीं नवें करायची, पाहायची, अनुभवायची संधि देतात; जीवनांतलीं दैन्य-दुःखें तेवढ्या कालापुरतीं तरी विसरायला लावतात.

भारतांत अनेक संप्रदाय आपापल्या परीने धर्मकार्य करीत आहेत. त्यांचे दर वर्षी विशिष्ट क्षेत्रांत मेळावे भरतात. राजकीय पक्षहि आपापलीं वार्षिक अधिवेशनें भरवितात. या धार्मिक आणि राजकीय उत्सवांचा उद्देश संप्रदायाच्या किंवा पक्षाच्या माणसांनी एकत्र यावें, सहविचार, सहभोजन आणि सहश्रवण करावें, मागील कार्याचा आढावा घेऊन पुढील कार्याच्या योजना आंखाव्या आणि मनावर येणारें शिळेपणाचें किंवा मालिन्याचें पटल झटकून पुनश्च नव्या जोमाने कार्यप्रवृत्त व्हावें, हाच असतो.

वर्षाच्या निरनिराळ्या ऋतूंत 'नेमेंचि' येणारे हे सण किंवा उत्सव नसतील, तर जीवन एकसुरी आणि निरानंद होईल.

उत्सवविग्रह उत्सव किंवा मिरवणूक यांच्यासाठी देवस्थानांत देवतेची जी चलमूर्ति करून ठेवतात, तिला हें नांव आहे.

उत्सव—संकेत जोडीने उल्लेखिले जाणारे दोन प्राचीन गण. कालिदासाने यांचा उल्लेख किंनरांबरोबर केला असून किंनर व किरात यांच्यामध्ये त्यांचें स्थान सांगितलें आहे (रघु. ४.८७). लदाख व कनौर यांच्या मध्यभागी कनौर–दामा उपवर्गांतल्या बोली बोलणारे जे लोक आहेत, त्यांचे हे पूर्वज होत. रघुवंशाच्या एका टीकेंत या जोडशब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे––

उत्सव आनन्दजनकः सङ्केतः स्त्रीपुंसयो
रत्यर्थमनुरागादाव्हानं यस्य ।

अर्थ–– रतिक्रियेसाठी आव्हान केल्यावर तशा संकेतस्थळी उत्सवासाठी (आनंद उपभोगण्यासाठी) जे येतात, ते उत्सवसंकेत होत.

या दोन गणांत विवाहसंस्था निर्माण झाली नव्हती व त्यांचे स्त्री–पुरुषसंबंध खुले होते, असें म्हटलेलें आहे. [भा. इ. रू.]

उथमपालयम् मदुरा जिल्ह्यांतील कंबम् खोऱ्यांतील एक क्षेत्र. या क्षेत्रांत कालहस्तीश्वराचें मंदिर आहे. या मंदिराविषयीं एक आख्यायिका सांगतात ती अशी––

त्या गांवांत कालहस्तीश्वराचा एक भक्त राहत होता. तो नियमाने कालहस्तीची वारी करी. एक दिवस त्याला दृष्टान्त झाला, की ‘ तुला यापुढे कालहस्तीला येण्याची गरज नाही. तूं गांवांतच माझी पूजा कर. ’

त्यानंतर इथे कालहस्तीश्वराचें मंदिर निर्माण झालें. त्याच्या प्रवेशद्वारांत एक शिला असून तिच्याभोंवती प्रदक्षिणा केल्यास सर्पदंश उतरतो, अशी समजूत आहे.

इथे द्रौपदीचेंहि एक मंदिर आहे. त्यांतल्या मूर्तीला ब्राह्मण विधवेने वर्षांतून एकदा उजळा दिला पाहिजे, अशी रूढि आहे.

याशिवाय करुपन्नस्वामीच्या मंदिराजवळील एका खडकावर अनेक जैनमूर्ती कोरलेल्या असून एका शिलालेखांत कांही जैनगुरूंचीं नांवेंहि आहेत. त्यावरून पांड्य राजांच्या अमदानींत जैन लोकांचें हें एक महत्त्वाचें केंद्र असावें, असें वाटतें. [मदुरा गॅझेटियर.]

उदकशांति ग्रहांची पीडा दूर व्हावी व सर्वांना शांति मिळावी म्हणून उदकशांति करतात. जलांत सर्व देवतांचा वास असतो व जल हें स्वभावतःच शांत असतें. तेव्हा अशा शांत व पवित्र जलाने दुरित नष्ट व्हावें म्हणून उदकशांतीचा विधि बौधा. गृ. शेषसूत्रांत (१.४) सांगितला आहे, तो असा–

संकल्प करून चार ब्राह्मण चार दिशांना बसवितात. मध्यभागीं धान्याचें एक स्थंडिल करून त्यावर सुवर्णाने रेषा काढतात. एक कलश घेऊन तो प्रथम धुपाच्या धुराने भरून घेतात. मग तो कलश जलाने भरून त्यांत गंध, फुलें, दूर्वा व फळें घालतात. मग त्यावर पूर्णपात्र ठेवून त्यांत षडंगसहित ब्रह्माची स्थापना करून त्याची पूजा करतात. त्या कलशाला दर्भाने स्पर्श करून सर्व ब्राह्मण राक्षोघ्नसूक्त, आयुष्यसूक्त, राष्ट्रभृत्होममंत्र, विहव्यसूक्त, पावमानी इ. मंत्रांचा पाठ करतात. शेवटीं ओंकाराचा उच्चार करून तो कुंभ सगळे मिळून उचलतात व त्यांतील जलाने यजमान व त्याचे कुटुंबीय यांना अभिषेक करतात. ब्राह्मणांना सोनें, रूपें, कांसें व वस्त्र, दक्षिणा म्हणून देतात. हा विधि तीन, पांच, सात किंवा नऊ दिवस करावा म्हणजे अपमृत्यु टळतो, असें बौधायन सांगतो. [विद्याधरशास्त्री भिडे]

उदंक शौल्बायन एक तत्त्वज्ञ आचार्य. प्राण व ब्रह्म एकच आहेत, असें हा सांगतो (बृह. उ. ४.१.३). हा देवरात जनकाचा समकालीन असावा. सत्रांतील दशरात्र क्रतु हाच मुख्य याग होय, असें हा सांगतो (तै. सं. ७.५.४.१.). [प्रा. च. को.]

उदक सप्तमी कोणत्याहि सप्तमीस ओंजळभर पाणी पिऊन राहणें, हा या व्रताचा विधि आहे. फल – सुखप्राप्ति. [हे. व्र.]

उदकक्ष्वेडिका एक प्राचीन मनोविनोद. याला शृंगक्रीडा असेंहि म्हणत. पोकळ बांबूंत पाणी भरून त्यांतून सिंहगर्जनेसारखा आवाज काढणें, असें या क्रीडेचें स्वरूप होतें. लंकेंतील सिगिरिया गुहेंत या क्रीडेचें चित्र आढळतें [प्रा. भा. म.]

उदकुंभदान उदकुंभ = उदकपूर्ण कुंभ. अक्षय्य तृतीयेला उदकुंभाचें दान दिल्याने मोक्षप्राप्ति होते, अशी समजूत आहे. उदकुंभदान स्वतःसाठी, त्याचप्रमाणे पितरांची अक्षय्य तृप्ति व्हावी म्हणूनहि देतात.

प्रथम उदकुंभाला गंध लावून त्यांत फळें व यव घालून त्याला सूत गुंडाळतात. मग स्वतःसाठीं असल्यास––

एष धर्मघटो दत्तो ब्रह्मविष्णुशिवात्मकः ।
अस्य प्रदानात् सफला मम सन्तु मनोरथाः ॥

हा मंत्र म्हणून व पितरांसाठी असल्यास त्याचा उत्तरार्ध–

अस्य प्रदानात् तृप्यन्तु पितरोऽपि पितामहाः ।
असा बदलून ब्राह्मणाला दान देतात. [व्रतराज]

उदकुंभश्राद्ध याचा विशेष असा, की यांत देवांचें कर्म वर्ज्य असतें. केवळ पितरांसाठीच हें श्राद्ध करतात. त्याचा विधि पार्वणश्राद्धाप्रमाणेच असतो. पिंडदान मात्र करायचें नसतें. या प्रसंगीं जलपूर्ण कुंभ ब्राह्मणाला दान देतात. हें श्राद्ध नित्य, वर्षभर, एक महिना अथवा निदान एकदां तरी करावें, असें सांगितलें आहे. [ॠ. ब्र. क.]

उदंतपुरी महाविहार उदंतपुरी हें बंगालमधल्या नवद्वीपाजवळचें एक गांव आहे. नवद्वीप हें संस्कृतभाषेच्या, विशेषतः न्यायदर्शनाच्या अभिवृद्धीसाठी, तर उदंतपुरी हें पालिभाषेच्या अभिवृद्धीसाठी प्रसिद्ध होतें. बौद्धांच्या हीनयान पंथाचें तें एक मोठें केंद्र होतें. तिथे येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या पंथाची दीक्षा दिली जाई. इथे सहस्रावधि विद्यार्थी निरनिराळ्या आचार्यांजवळ शिक्षण घेत. शांतरक्षित, अतीश, रत्नाकरशांति, प्रभाकर, अभयकर गप्त, हे येथील प्रसिद्ध आचार्य होत. हे सर्व आचार्य जसे महापंडित होते, तसेच ते निरलस लोकसेवकहि होते. सेवा, ज्ञान व चारित्र्य या त्रयीच्या बळावर ते लोकांच्या मनांत बौद्ध धर्माविषयीं आदर उत्पन्न करीत. बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी सर्व प्रकारचें शिक्षण देऊन भिक्षु तयार करणें, हा उदंतपुरीच्या विहाराचा प्रसिद्ध उद्योग होता. १० व्या शतकाच्या अखेरीस इथल्या भिक्षूंची संख्या सहा हजारांच्या वर गेली होती. जसजशी या विहाराची भरभराट होत गेली, तसतसें राजेरजवाड्यांचें लक्ष उदंतपुरीकडे आकृष्ट होऊं लागलें. गुप्त सम्राटांनी नालंदा हें जसें आपलें विद्यापीठ मानलें, तसाच बंगालच्या पाल राजांनी उदंतपुरीचा विहार हा आपला विहार मानून त्याला सढळ हाताने मदत केली. पालराजे हे बौद्ध होते. त्यांनीच या विहाराचें नांव सर्वतोमुखीं केलें. पुढे तो साधा विहार न राहतां महाविहार बनला. आठव्या शतकापासून तों अकराव्या शतकापर्यंत उदंतपुरीने उत्कर्षाचें शिखर गांठलें. नालंदाप्रमाणेच इथेहि फार मोठा ग्रंथसंग्रह होता. पण इ. स. ११९९ मध्ये बखत्यार खिलजीने तो सगळाच्या सगळा जाळून टाकला. त्यामुळे या विहारासंबंधीं तपशीलवार माहिती मिळूं शकत नाही. [प्रा. भा. वि.]

उदबत्ती सुगंधी वासाची काडी. चंदन, कृष्णागुरु, नागरमोथा, देवदार, ऊद, मैदालकाडी, कोळसा, गूळ व शिलारस या द्रव्यांपासून उदबत्ती बनवितात. उंची उदबत्तींत गुलाबकळी, पाचपाला, वेलदोडे, वाळा, अंबर, कस्तुरी इ. द्रव्यें अधिक वापरतात. या सर्व द्रव्यांची कुटून वस्त्रगाळ पूड करतात व तिला शिलारस गरम करून चोळतात. नंतर त्यांत गूळ किंवा मध मिसळतात. मग हा सर्व मसाला भिजवून काड्यांना लावतात. मसाला वाळल्यावर उदबत्ती तयार होते. जाड उदबत्तीला अगरबत्ती असें म्हणतात. **पाहा**—अगरबत्ती [सु. वि. को.]

उदंब्रा ब्राह्मण उदुंबर ऋषीवरून या ब्राह्मणांना हें नांव मिळालें आहे. यांच्यांत तीन पोटभेद आहेत. हे भिक्षुकी व भिक्षा यांवर निर्वाह करतात. गुजरातमध्ये यांची वस्ती आहे. [मुं इ जा.]

उदयकुंकुम द. भारतांतील स्त्रियांचें एक व्रत. सौभाग्यवती गृहिणी सूर्योदयापूर्वी पांच सुवासिनींना बोलावून त्यांना कुंकू लावते. असें केल्याने अखंड सौभाग्य प्राप्त होतें, अशी समजूत आहे. [का. ट्रा. स. इ.]

उदयगिरि भेलसा शहरापासून पांच मैलांवर हें स्थान आहे. इथे एकूण वीस गुंफा आहेत. त्यांपैकी



वराहमूर्ति - उदयगिरि

दोन गुंफा जैनांच्या आहेत. शिल्पकलेच्या दृष्टीने उदयगिरी-

मधील ५ व्या क्रमांकाची गुहा सर्वांत अधिक महत्त्वाची आहे. त्या गुहेंत वराहावताराचा देखावा कोरलेला आहे. वराहाची प्रतिमा हें गुप्तकालीन कलेचेंच नव्हे,तर भारतीय कलेचेंहि अप्रतिम उदाहरण आहे. या वराहाची मूर्ति बारा फूट उंच असून तिला दोन हात आहेत. धड मानवाचें आणि मुख वराहाचें अशी ही मूर्ति आहे. त्याच्या दंताग्रावर स्त्रीरूपधारिणी पृथ्वी आहे. तिचें मुख तुटलेलें असलें, तरी बाकीचें शरीर अभग्न असून तें मूर्तिकाराच्या अनुपम सौंदर्यनिर्मितीची साक्ष देतें. वराहाचें शरीरहि इतकें दृढ व ओजस्वी आहे, की त्याच्या अंगप्रत्यंगांतून शक्ति व चैतन्य ओसंडत आहे, असें वाटावें. वराहानें पृथ्वीचा उद्धार केल्यामुळे ब्रह्मा, शिव, यक्ष, किन्नर, राक्षस हे सर्व वराहाची स्तुति करीत आहेत व पृथ्वीच्या उध्दाराबद्दल आनंद व्यक्त करीत आहेत, असा तो सर्व देखावा आहे.

क्रमांक ६ च्या गुहेच्या दारावर दोन्ही बाजूंना विष्णूच्या दोन मूर्ती उभ्या आहेत. विशेषतः उजव्या हाताची मूर्ति गुप्तकालीन मूर्तिकलेचें वैशिष्टच दाखविणारी आहे. विष्णूच्या मस्तकीं मुकुट, गळ्यांत कौस्तुभमणिहार व गुडघ्यापर्यंत रुळणारी वैजयंतीमाला आहे. मूर्तिकारानें त्याच्या हातांतील गदेला स्त्रीरूप व चक्राला पुरुषरूप दिलें आहे.



सिंहयुक्त स्तंभशीर्ष - उदयगिरि

याशिवाय या गुहेंत दोन गणेशमूर्ति आहेत. या मूर्तींच्या अंगांवर कोणताहि अलंकार नाही किंवा गणपतीचें कोणतेंच सांप्रदायिक चिन्हहि नाही. म्हणून ही मूर्ति गणेशाच्या प्राचीनतम मूर्तींपैकी एक आहे, असें डॉ. पाटील सांगतात. १७ क्रमांकाच्या गुहेंतील गणेशमूर्तीच्या मस्तकावर मात्र मुकुट दिसतो. गुहा क्रमांक ३ मधील गणेशमूर्ति मात्र पूर्णतया सांप्रदायिक चिन्हांनी युक्त आहे.

उदयगिरींतील गुहाद्वारांवर जे द्वारपाल उभे आहेत, त्यांपैकी क्रमांक ६ च्या गुहाद्वारावरील द्वारपाल सर्वांत अधिक डोळ्यांत भरतात. त्यांचा विपुल केशकलाप, सुदृढ शरीर व हातांतील मोठे परशु यांमुळे ते अत्यंत भीषण दिसतात.

उदयगिरींत एक स्तंभशीर्ष सांपडलें आहे. त्या शीर्षाखाली पालथें कमल आहे. त्यावर गोल पीठ असून त्याच्यावर चार सिंह बसले आहेत. त्याचप्रमाणे त्या पीठावर सूर्य व इतर बारा राशी यांच्या मूर्तिहि खोदलेल्या आहेत. याप्रमाणे गुप्त राजांनी मौर्यांचें सिंह हें प्रतीक आपलेंहि राज्यप्रतीक म्हणून स्वीकारलें. पण त्याचबरोबर त्याच्याभोंवती बारा राशींच्या पौराणिक रूपांचें चित्रण करून त्याला अधिक आकर्षक बनविलें. गुप्तकालांत झालेल्या ज्योतिषाच्या विकासाचें तें द्योतक म्हणावें लागेल. [हि. जॉ. ए. इं.; वि. स्मृ. ग्रं.]

उदयगिरि-खंडगिरि जैनांचें एक क्षेत्र. भुवनेश्वरापासून पश्चिमेला सात मैलांवर उदयगिरि व खंडगिरि नांवाच्या दोन टेकड्या आहेत. या ठिकाणीं कलिंग देशांतील पांचशें मुनी मोक्षाला गेले, असें जैन पुराणें सांगतात. त्यामुळे हें स्थान जैनांचें तीर्थक्षेत्र बनलें आहे.

उदयगिरीला कुमारीगिरि असेंहि नांव आहे. महावीरानें या ठिकाणची यात्रा केली होती. या पर्वतांत अनेक गुहामंदिरें आहेत. अलकापुरी गुहा, जय–विजयगुहा, राणीगुहा, गणेशगुहा अशीं त्यांचीं नांवें आहेत.

गणेशगुहेच्या बाहेर दोन हत्ती आहेत. गणेशगुहा पाहून



राणीगुंफा - उदयगिरि

परत येतांना स्वर्गगुहा, मध्यगुहा व पाताळगुहा लागतात. पाताळगुहेच्यावर हत्तीगुहा आहे. हत्तीगुहा किंवा हत्तीगुंफा या गुहेंत कलिंग राजा खारवेल याचा सुप्रसिद्ध शिलालेख

आहे. या सर्व गुहांत अनेक मूर्ती खोदलेल्या आहेत.

उदयगिरीच्या जवळच खंडगिरि आहे. खंडगिरीच्या वर व खालीं पांच गुहा आहेत. शिखरावर जैन मंदिरें आहेत. एका तटाच्या आंत एक मोठें व एक लहान अशीं दोन मंदिरें आहेत. जवळच आकाशगंगाकुंड आहे. त्याच्यापुढे गुप्तगंगा, श्यामकुंड व राधाकुंड हीं कुंडें आहेत. तिथून जवळच इंद्रकेसरीगुंफा आहे. या गुहेच्या मागे आणखी एक गुहा असून तींत चौवीस तीर्थंकरांच्या प्रतिमा कोरल्या आहेत. या गुहा पाहण्यासाठी दूरदूरचे प्रवासी येतात. [कल्याण–तीर्थांक]

उदयनाचार्य (इ. स. १० व्या शतकाचा उत्तरार्ध) मिथिलेंतील करिओन गांवीं याचा जन्म झाला. हा जातीने ब्राह्मण असून याला उदयकर असेंहि म्हणत असत. भारतांत याच्यासारखे प्रौढ विद्वान् अगदी क्वचित्च आढळतील. न्यायशास्त्राचा तो एक प्रधान आचार्य होता. तात्पर्यटीकेवर परिशुद्धि नामक एक विस्तृत टीका त्याने लिहिली आहे. त्याशिवाय वैशेषिक दर्शनांतल्या रहस्यांचें उद्घाटन करण्यासाठी याने किरणावलि नांवाची एक पांडित्यपूर्ण व्याख्या लिहिली असून ती प्रशस्तपादभाष्यावरची टीका आहे. आत्मतत्त्वविवेक व न्यायकुसुमाञ्जली हे याचे सर्वश्रेष्ठ ग्रंथ होत. आत्मतत्त्वविवेकांत क्षणभंगवाद व शून्यवाद यांचें खंडन केलेलें असून न्यायसंमत आत्मतत्त्वाचें विस्तृत निरूपण केलेलें आहे. न्यायकुसुमाञ्जलि हा तर उदयनाचार्यांच्या ग्रंथांतील मेरुमणिच होय. यांत सांख्यादि वैदिक व बौद्धादि वेदबाह्य दर्शनांतील ईश्वरनिषेधविषयक प्रमाणांचें मार्मिक व विद्वत्तापूर्ण खंडन केलेलें आहे. हा ईश्वरसिद्धिविषयक तर्कप्रधान ग्रंथ न्यायदर्शनाच्या जगांत अद्वितीय समजला जातो. याच्या मृत्यूबद्दल पुढील आख्यायिका प्रसिद्ध आहे–

ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं एकदा याचा बौद्धांशी वाद चालू असतां याला अनुमान प्रमाणाने ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करतां आलें नाही. त्यामुळे चिडून जाऊन त्याने एका निराळ्याच प्रकारें ईश्वरसिद्धि करायचें ठरविलें. तो एक श्रमण व एक ब्राह्मण यांना घेऊन एका टेकडीवर गेला व तिथून त्याने त्या दोघांचाहि कडेलोट केला. पडतांपडतां ब्राह्मण ओरडला, की 'मला ईश्वराचें अस्तित्व मान्य आहे.' श्रमण ओरडला की 'मला तें मान्य नाही.' त्यामुळे ब्राह्मण बचावला ; पण श्रमण मात्र मरण पावला. या प्रसंगावरून ईश्वराचें अस्तित्व सिद्ध झालें खरें; परंतु उदयनाचार्यावर मात्र खुनाचा आरोप आला. तेव्हां तो उदयनपुरीच्या जगन्नाथाच्या मंदिरांत गेला. त्या काळीं अशी समजूत होती, की जगन्नाथ फक्त पुण्यवान् लोकांनाच दर्शन देतो. उदयनाचार्याला दोन दिवस जगन्नाथाचें दर्शन झालें नाही. तिसऱ्या दिवशीं जगन्नाथाने त्याला स्वप्नांत येऊन सांगितलें, की तूं काशीला जा व स्वतःला जाळून घेऊन घडल्या पापाचें प्रायश्चित कर. मगच तुला माझें दर्शन घडेल. त्याप्रमाणे काशीस जाऊन त्याने आपला देह अग्नीला अर्पण केला. ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्यासाठी आपण एवढे कष्ट घेतले, तरी जगन्नाथाने आपल्यावर दया केली नाही, हें पाहून त्याला जगन्नाथाचा अत्यंत राग आला व मरतेसमयीं त्याने पुढील उद्गार काढले–

ऐश्वर्यमदमत्तोऽसि मामवज्ञाय वर्तसे ।
प्रवृत्ते बौद्धसम्पाते मदधीना तव स्थितिः ।।

अर्थ– देवा, तुला ऐश्वर्याचा माज चढला आहे; म्हणून तूं माझा धिक्कार करीत आहेस. (पण) बौद्धलोक बळावले असतां तुझें अस्तित्व माझ्याच हातांत होतें (हें लक्षांत ठेव). [भा. द.; प्रा. च. को.]

उदय पर्वत शाकद्वीपांतील एक पर्वत. याचा रंग सोनेरी आहे. पृथु राजाच्या प्रदेशाची मर्यादा इथवर असल्याचें सांगितलें आहे. हा पर्वत अगस्त्याने पवित्र मानला आहे. [पु. इं.]

उदयपूर राजस्थानांतील एक अत्यंत सुंदर शहर. याला पूर्वेचें व्हेनिस असें म्हणतात. इ. स. १५६७ मध्ये अकबराने तिसऱ्यांदा चितोडला वेढा दिल्यावर, त्या वेळचा चितोडचा राजा महाराणा उदयसिंह याने चितोड सोडलें व चितोडच्या पश्चिमेस साठ मैलांवर उदयपूर हें नवें शहर वसविलें.


हें शहर अरवली पर्वतावर वसलेलें असून तिथले भव्य संगमरवरी प्रासाद, स्वच्छ जलाचे तलाव, प्रशस्त उद्यानें व उत्तुंग कमानी प्रेक्षकांचें मन वेधून घेतात. शहराभोवती तटबंदी असून शहरांत प्रवेश करण्यासाठी पांच दरवाजे आहेत.

उदयपुरांत एकूण तीन राजवाडे आहेत. त्यांपैकी महाराणापॅलेस हा पिचोला तलावाच्या पश्चिम कांठावर उभा आहे. वालुकामय दगड व संगमरवर यांच्या चौथऱ्यावर हा राजवाडा बांधलेला आहे. त्याची दक्षिणोत्तर लांबी सुमारें १५०० फूट व जास्तींत जास्त रुंदी ८०० फूट आहे. राजवाड्याला अनेक मजले आहेत. पण इमारतीच्या कामांत एकसूत्रीपणा दिसत नाही. कारण इ. स. १५७१ पासून गादीवर आलेल्या प्रत्येक राजाने त्यांत कांही ना कांही नवीन भर घातली आहे. राजवाड्यांतील छोटी चित्रशाळा, माणिक महाल, मोतीमहाल,

बारी महाल, व चिनीका चित्रमहाल, हे महाल अत्यंत प्रेक्षणीय असून रंगीबेरंगी कांचा, आरसे आणि अनेक चित्रें त्यांच्या सौंदर्यांत भर घालतात.

इथला दुसरा राजवाडा म्हणजे जगत्‌निवास प्रासाद हा होय. महाराणा जगत्‌सिंग (दुसरा) याने इ. स. १७५७ मध्ये पिचोला तलावाच्या कांठीं हा प्रासाद उभारला. शिल्पकलेचें अत्युच्च वैभव दर्शविणारा चकचकीत पांढऱ्या संगमरवराचा हा राजवाडा म्हणजे दगडांतलें काव्यच आहे. प्रारंभीं राजपरिवारांतल्या स्त्रिया व वारांगना यांचा निवास या राजवाड्यांत असे.

पिचोला तलावाच्या दक्षिण टोकाला जगमंदिर राजवाडा



राजवाडा - उदयपूर

असून तो जणूं तलावाच्या पाण्यांत आपलें प्रतिबिंबच न्याहाळीत उभा आहे, असें वाटतें. जहांगीरच्या विरुद्ध बंड करून उठलेला राजपुत्र खुर्रम (पुढच्या काळांतील शहाजहाँ) याला याच प्रासादांत आश्रय मिळाला होता. इ. स. १६१५ सालीं महाराणा अमरसिंग (पहिला) याच्या कारकीर्दींत याचें बांधकाम सुरू झालें व १६२२ सालीं महाराणा करणसिंग याच्या राजवटींत तें पुरें झालें. त्याचा पुत्र महाराणा जगत्‌सिंग (पहिला : १६२८–१६५२ इ. स.) याने या इमारतीला आणखी थोडी जोड दिली व त्याला आपलें नांव दिलें. या छोट्या प्रासादांत एकावर एक तीन मजले असून वर गोलाकार सुरेख घुमट आहे.

पिचोला तलाव हें आणखी एक प्रेक्षणीय स्थळ होय. तलावाच्या सभोवती असलेले डोंगर, स्नानासाठी बांधलेले घाट, मंदिरें व राजवाडे यांमुळे हें सरोवर नितांत सुंदर दिसतें. याचें क्षेत्रफळ सुमारें चार चौरस मैल आहे. १४ व्या शतकाच्या अखेरीस लाखा बनजारा या लमाण व्यापाऱ्याने हा तलाव खोदला, असें म्हणतात. याच्या उत्तरेला फतेसागर नामक दुसरा एक कृत्रिम तलाव आहे व मधे एक कालवा काढून हे दोन्ही तलाव जोडलेले आहेत. महाराणा फतेसिंगाने हा तलाव निर्मिला असून तो सुमारें दीड मैल लांब व मैलभर



पिचोला तलाव व राजप्रासाद - उदयपूर

रुंद आहे. फतेसागराच्या जवळच 'सहेलियों की बारी' नांवाचें एक रमणीय उद्यान आहे.

याशिवाय इथे व्हिक्टोरिया हॉल म्युझियम, सरस्वती–सदन हें संस्कृत, प्राकृत, हिंदी व पर्शियन या भाषांतील दुर्मिळ हस्तलिखितांचें संग्रहालय, जगदीश मंदिर हीं स्थानें प्रेक्षणीय आहेत. उदयपूरच्या परिसरांतच कैलाशपुरी येथे मेवाडच्या महाराण्यांचें कुलदैवत असलेल्या एकलिंगजीचें मंदिर आहे. **पाहा —** कैलाशपुरी.

उदयसप्तमी मार्गशीर्ष शु. सप्तमीला हें नांव आहे. हें एक तिथिव्रत आहे. व्रतावधि एक वर्ष. यांत प्रत्येक महिन्यांत सूर्याची निरनिराळ्या नांवांनी पूजा करतात. [हि. ध.]

उदरबंध एक अलंकार. बहुतेक शिल्पांत सामान्यतः पुरुषाच्या अंगावर हा अलंकार आढळतो. अमरावतीच्या शिल्पांत उत्तरकालीन (इ. स. सुमारें ३ रें शतक) आकृतींत फक्त एकाच मूर्तींत उदरबंध आढळतो. एका नागराजाच्या अंगावर यज्ञोपवीतासारखा तो रुळतांना दिसतो.

उदररोगनाशक मंत्र उदररोग नाहीसा करणारा हा चौवीस अक्षरी मंत्र पुढीलप्रमाणे—

यो यो हनुमन्तफलफलितधगधगित
आयुराष परुडाह ।

या मंत्राचा ऋषि ईश्वर, छंद अनुष्टुभ, देवता हनुमान, बीज हुं व शक्ति स्वाहा.

मंत्राचा प्रयोग करण्याची पद्धति अशी—

प्लीहायुक्त उदरावर विडयाचें पान ठेवून तें आठघडी वस्त्राने झाकतात. नंतर मारुतीचें स्मरण करून त्या वस्त्रावर वेळूचा तुकडा ठेवतात. रानशेणीच्या विस्तवावर बोरीची एक काठी चांगली तापवितात व तिने वांवूच्या तुकडयावर समंत्रक सात वेळां ताडन करतात. असें केल्याने उदरप्लीहारोग नष्ट होतो, असें सांगितलें आहे. [मं. म.]

उदल विश्वामित्र कुलांतील सामद्रष्टा (पं. ब्रा. १४. ११.३३).

उदलम्म द. भारतांतली गळा सुजविणाऱ्या एका रोगाची देवता. ही अन्नम्माच्या देवळांत आढळते.

उदवाडा पारशी लोकांचें एक प्रमुख धर्मस्थान. पश्चिम रेल्वेच्या मुंबई-अहमदाबाद मार्गावर उदवाडा हें स्टेशन आहे. इराणांतून येतांना पारश्यांनी आपल्याबरोबर जो अग्नि आणला होता, त्याची त्यांनी प्रथम इथे स्थापना केली. हा अग्नि त्यांनी आजवर विझूं दिलेला नाही. आदर व अरदीबेहस्त या महिन्यांत इथे पारशी लोक यात्रेसाठी जमतात. **पाहा** — पारशी. [कल्याण-तीर्थांक]

उदवाह एक ऋषि. सांख्यायन गृह्य सूत्रामध्ये याला तर्पणांत स्थान दिलेलें आहे. कौषीतकि गृह्यसूत्रांत याला वगळलें आहे. [तर्पण]

उदसेविका एक प्राचीन उत्सव. भूतमाताउत्सव असें याचें दुसरें नांव आहे. इंद्रध्वजमहोत्सव संपल्याबरोबर भाद्र० शु. १३ शीला हा उत्सव साजरा करीत. उदसेविका ही अंगाला माती माखणारी देवता असून ती भैरवाची पत्नी आहे. भैरव व उदसेविका यांचा जन्म अनुक्रमें शिव व पार्वती यांच्या मनापासून झाला. नंतर तीं दोघें भाद्र० शु. १३ शीला विवाहबद्ध झालीं. त्या विवाहाच्या स्मृतीचा हा उत्सव प्राचीन काळीं करीत. त्या दिवशीं अश्लील बोलत. स्त्रीपुरुष गाढव, बैल किंवा कुत्रा यांच्यावर बसून हिंडत. म्हातारेकोतारेसुद्धा लहान मुलासारखे चाळे करीत, गवळी, डोंब किंवा न्हावी यांचीं सोंगें घेत किंवा उघडेहि फिरत. या उत्सवांत जो कोणी भाग घेत नाही, त्याचा बलि देव किंवा पितर ग्रहण करीत नाहीत, असें स्कंदपुराणांत सांगितलें आहे. या उत्सवाच्या काळाविषयीं मात्र मतभेद आहेत. हेमाद्रि व वायुपुराण यांच्या मतें हा काळ ज्येष्ठ प्रतिपदा ते पूर्णिमा असा आहे. [हि. ध.]

उदात्त एक स्वरभेद. वेदपठणांतल्या उच्च स्वराला उदात्त म्हणतात. हा एक काव्यालंकारहि आहे (श. क.).

उदान (१) पंचप्राणांतील कंठस्थ प्राणवायु. हा सदैव ऊर्ध्वगामी असतो.

उदानो नाम यस्तूर्ध्वमुदेति पवनोत्तमः ।
तेन भाषितगीतादिविशेषोऽभिप्रवर्तते ॥

अर्थ– जो ऊर्ध्व जाणारा वायु तो उदान होय. त्याच्या योगाने बोलणें, गाणें इ. शब्दविशेष प्रवर्तित होतात (श. क).

(२) भगवान् बुद्धाच्या मुखांतून भावातिरेकामुळे बाहेर पडलेल्या प्रीतिवाक्यांचा संग्रह. बुद्धाने कांही विशिष्ट वेळीं उच्चारलेलीं गंभीर व समाधि-अवस्थेचीं सूचक अशीं वाक्यें उदानांत आहेत. बौद्ध जीवनाचें स्पष्ट दर्शन हें उदानाचें वैशिष्टय आहे. यांत बुद्धाच्या जीवनांतील अनेक प्रसंग आहेत. त्याशिवाय चित्ताची शांति, निर्वाण, पुनर्जन्म, कर्म व आचार-तत्त्व यासंबंधीचाहि उपदेश उदानांत आहे.

उदानांत आठ वर्ग (वग्ग) आहेत, ते पुढीलप्रमाणे— (१) बोधि वग्ग (२) मुचलिंद वग्ग (३) नंद वग्ग (४) मेधिय वग्ग (५) सोणत्थेरस्स (शोणस्थविरसंबंधी) वग्ग (६) जच्चंध (जात्यंध) वग्ग (७) चूल वग्ग व (८) पाटलिगामिथ (पाटलिग्राम) वग्ग. प्रत्येक वर्गांत प्रायः दहा सूक्तें आहेत. सातव्या वर्गांत मात्र नऊच सूक्तें आहेत. उदानांतल्या गाथांची शैली साधी व सरळ आहे. [पा. सा. इ.]

उदासी पंथ शीख संन्याशांचा एक पंथ. इस्लामाच्या प्रभावाने जी एक हिंदु-मुस्लीम संयुक्तीकरणाची प्रक्रिया सुरू झाली, तिच्यांतून या पंथाचा उगम झाला आहे. हा पंथ सुधारकवादी असून त्यांत स्त्री-शूद्रांनाहि प्रवेश मिळे. प्रारंभीं तर मुसलमानांनाहि या पंथांत घेत. हिंदु देवतांपैकी शिव, विष्णु, सूर्य, दुर्गा व गणपती या पंचायतनाचा त्या पंथाने स्वीकार केला आहे, हा त्याच्या सुधारणावादाचा एक भाग होय. उदासी साधु हे अद्वैत तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते आहेत. यांचा मूर्तिपूजेला विरोध असला, तरी तो कडवा नाही. पण हे लोक ग्रंथसाहिबाला जें महत्त्व देतात, त्यावरून कुराणाचें अनुकरण त्यांना प्रिय असावें, असें वाटतें. या पंथाचा मुळांत शैव संप्रदायाशीं संबंध होता. बहुतेक शैव पंथ हे स्मार्त आहेत. पण उदासी पंथ मात्र स्वतःला श्रौत समजतो.

गुरु नानकाचा पुत्र श्रीचंद्र हा या पंथाचा संस्थापक होय.

नानकाच्या नंतर त्याची गादी आपल्याला मिळणार नाही, म्हणून श्रीचंद्र उदास झाला आणि त्यामुळे त्याच्या पंथाला उदासी किंवा उदासीन असें नांव पडलें, असें दसनामी म्हणतात. उदासींना नानकपुत्र असेंहि दुसरें नांव आहे. हा पंथ ओंकारापासून निघाला असून श्रीचंद्र हा त्याचा ७३ वा गुरु होय, असे त्यांची परंपरा सांगते. दुसऱ्या एका परंपरेनुसार सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार व नारद हे या पंथांचे पहिले पांच प्रवर्तक मानलेले आहेत.

उदासी पंथाचा दीक्षाविधि अत्यंत साधा आहे. ज्याच्याकडून दीक्षा घ्यायची त्याचें चरणतीर्थ त्यांत थोडी साखर घालून प्राशन करायचें म्हणजे दीक्षाविधि पुरा होतो.

चरण साधका धो धो पियो ।
अरण साधको अपना जियो ।।

हा त्यांचा आवडता मंत्र या विधीचाच निदर्शक आहे. दीक्षेनंतर गुरु त्याला मंत्र देतो व नवीन नांवहि देतो. उदासी लोक अविवाहित राहतात.

उदासी साधूंचे नागा (नंगे) व परमहंस असे दोन भेद आहेत. नागा साधूंच्या नांवाच्या शेवटीं दास किंवा शरण हा शब्द असतो; जो परमहंस दीक्षा घेतो त्याच्या नांवाच्या अंतीं आनंद हा शब्द लागतो. परमहंस उदासी भगवीं वस्त्रें परिधान करतात; नागा उदासी फक्त कटिवस्त्र गुंडाळून सर्वांगाला भस्म फासतात. उदासी लोक ' ॐ नमो ब्रह्मणे ॐ ' असें म्हणून एकमेकांना अभिवादन करतात.

उदासी साधु हिंदूंचे धार्मिक सण व उपवासादि नियम पाळतात. भाद्रपद शु. ९ मीला ते श्रीचंद्राची जयंती मोठ्या थाटामाटानें साजरी करतात.

पूर्वीं सिंधमधील सक्कर गांवीं उदासींचें साधुबेला नामक मोठें केंद्र होतें. सिंधमधील बहुतेक मंदिरांतील पुजारी उदासी असत. त्यांच्या मागून त्यांच्या शिष्यांची त्या जागेवर नेमणूक होई. यांची बहुतेक वस्ती पंजाब व सिंध या प्रांतांतच होती. वाराणसी, वृंदावन व हरद्वार या ठिकाणीं उदासींचे मठ असून तिथे पाठशाळा चालविल्या जातात.

उदासी पंथाच्या चार शाखा आहेत, त्यांना धुनी असें म्हणतात. काबूलच्या उदासी मठांत श्रीचंद्राने (जन्म इ. स. १४९४) जी धुनी पेटविली होती, ती आजपावेतो अव्याहत प्रज्वलित आहे, असें उदासी सांगतात.

चार शाखांचे चार प्रवर्तक आहेत. फूलसाहेबाची शाखा बहादुरपूरला, बाबा हसन याची चरनकौल या ठिकाणीं, अलमस्तसाहेबाची पुरी व नैनिताल येथे व गोविंदसाहेबाची शिकारपूर व अमृतसर येथे आहे. हे सर्व पंथ स्वतंत्र असून त्यांची व्यवस्थाहि वेगवेगळ्या महंतांकरवीं चालते.

या सर्व पंथांच्या उदासींची ' बडा आखाडा ' नांवाची एक सभा आहे. दुसरा एक ' छोटा आखाडा'हि असून तो हरराय नांवाच्या शीख गुरूच्या फेरू नामक शिष्यानें स्थापला आहे.

या चार पंथांशिवाय संगत साहिब नांवाचा आणखी एक पंथ आहे. दक्षिण व पश्चिम पंजाबमध्ये या पंथाचा बराच प्रसार आहे.

रामदास उदासी या नांवाच्या दुसऱ्या एका पंथाची स्थापना गुरुदत्त याने केली. उदासी संप्रदायाच्या प्रत्येक पंथाची व्यवस्थित संघटना असते. प्रत्येक पंथाचा एक मुख्य श्रीमहंत असून त्याच्या हाताखाली दुसरे कांही महंत असतात.

उदासी संप्रदायांत वाचिक, मानसिक व कायिक अशी त्रिविध साधना आहे. सामान्य जनांना उपदेश करून ईश्वराचें ध्यान करण्याकडे प्रवृत्त करणारी जी साधना असते, तिला वाचिक साधना म्हणतात. मौन पाळून लोकांचें चित्त ईश्वराचें ध्यान करण्याकडे आकर्षित करणें, याला मानसिक साधना म्हणतात व स्वतः समाधि लावून लोकांनाहि समाधि लावण्यास प्रवृत्त करणें, याला कायिक साधना म्हणतात. [इं. सा.; म. ज्ञा. को.; कल्याण – साधनांक]

उदीची एक महानदी (वायु पु. १०८. ८०).

उदीचीतीर्थ गयेंतील दक्षिण मानसाच्या पलिकडील एक तीर्थ (वायु पु. १११. ६).

उदीच्य (१) उत्तरेकडील ब्राह्मण. यांची भाषा अतिशय शुद्ध असून हे कुरु-पांचालांतील ब्राह्मणांना वादविवादांत पराभूत करीत, असें म्हटलें आहे (श. ब्रा. ११.४. १०.१; गो. ब्रा. १.३.६). ब्राह्मण विद्यार्थी त्यांच्याकडे विद्याभ्यासासाठी जात (कौषी. ब्रा. ७.६). [वे. इं.]

(२) पूर्वेकडील एक जमात. कल्कीने या जमातीला जिंकण्याचा बेत केला आहे (ब्रह्मांड पु. ३. ७३. १०७). [पु. इं.]

उदीच्य सामग हे पौष्यंजीचे शिष्य होते (विष्णु पु. ३.६.४). [पु. इं.]

उदुक्कु एक वाद्य. कर्नाटकांत शैवपंथी हें वाजवितात.

उदुपे एक प्रकारचा ढोल. याचा आकार पंचपात्रीसारखा असतो. कर्नाटकांतील लिंगायत लोक धार्मिक सभा

रंभांत हा ढोल वाजवतात. [म्यु. इं.]

उदुंबर

एक वृक्ष. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाही. अथर्ववेदांत मात्र याचें नांव आढळतें (१९.३१.१). पूर्वी सर्व धार्मिक विधींत याच्या लाकडाचा उपयोग करीत असत. यूप, लाकडी पळी, ताईत इ. वस्तू याच्या लाकडाच्याच करीत. उदुंबराचें फळ वर्षांतून तीनदा पिकतें व तें मधुर असतें, असें ऐतरेय ब्राह्मण सांगतें (७.१५; ५.२४). राज्याभिषेक समारंभांत राजासाठी औदुंबराच्या लाकडांचें सिंहासन करीत.

उदुंबर वृक्ष पवित्र असल्यामुळे त्याची पूजा करावी, असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे.

उदुम्बरे वसेन्नित्यं भवानी सर्वदेवता।
ततः सा प्रत्यहं पूज्या गन्धपुष्पाक्षतादिभिः॥

(आचारेन्दु)

अर्थ – उदुंबर वृक्षांत नेहमी सर्व देवतांमध्ये श्रेष्ठ अशा भवानीचा वास असतो. तिची रोज सकाळीं गंध, फूल, अक्षता इ. द्रव्यांनी पूजा करावी.

उदुंबर किंवा औदुंबर हा दत्ताचा आवडता वृक्ष आहे. औदुंबराच्या तळवटीं दत्तात्रेयाचा निवास असतो, असें समजतात. जिथे दत्तस्थान असतें, तिथे बहुधा औदुंबराचा वृक्ष असतोच. ग्रहयज्ञांत गुरूसाठी औदुंबराच्या समिधा घेतात. औदुंबराच्या खाली मलमूत्रविसर्जन करीत नाहीत. औदुंबराचें झाड असेल तिथे विहीर खोदल्यास तिला पाणी लागतें, अशीहि समजूत आहे.

उदुंबर लोक

एक प्राचीन मानवगण. पाणिनीच्या राजन्यादि गणांत (४.२.५३) तसेंच महाभारत, महामायूरी, बृहत्संहिता व मार्कंडेयपुराण या ग्रंथांत उदुंबरांचा उल्लेख आहे. उदुंबरांचीं प्राचीन नाणीं कांगडा प्रदेशांत बियास व रावी या नद्यांच्या मधल्या प्रदेशांत मिळालीं आहेत. हीं नाणीं इ. स. च्या दुसऱ्या, तिसऱ्या शतकांतलीं आहेत. पठाणकोट नगरांतहि उदुंबरांच्या पुष्कळ मुद्रा सांपडल्या आहेत. बुद्धकालीन जीवक नांवाच्या वैद्याने तक्षशिलेपासून मथुरेपर्यंत जी यात्रा केली, त्या यात्रावृत्तांत उदुंबरांच्या प्रदेशाचा उल्लेख आहे. यावरून शाकल, अग्रोदक व रोहटक या नगरांवरून तक्षशिलेला जाणाऱ्या राजरस्त्यावर उदुंबरांचा प्रदेश होता, असें दिसून येतें.

उदुंबर लोक समृद्ध व सधन होते, हें त्यांच्या सांपडलेल्या नाण्यांवरून समजतें. ही समृद्धि त्यांना कशी प्राप्त झाली, तें मात्र समजत नाही. तथापि एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे ती ही, की उदुंबरांचें राज्य मगध आणि काश्मीर यांना जोडणाऱ्या राजरस्त्यावर होतें आणि हिमालयाच्या जवळ वसल्यामुळे पर्वत व मैदानें यांमधील मोक्याचें स्थान त्याला प्राप्त झालें होतें. या भौगोलिक परिस्थितीचा या लोकांना फायदा मिळाला असावा.

स्थानिक उद्योगधंदे हें उदुंबरांच्या समृद्धीचें आणखी एक कारण असावें. हिमालयाच्या पठारावर मेंढ्यांची निपज होते व त्यांच्या लोकरीपासून सुंदर कापड तयार होतें. पठाणकोट शहरांत लोकरीच्या उत्तम शाली आजहि बनतात. पठाणकोट हें त्या काळीं उदुंबरांच्या राज्यांतील एक महत्त्वाचें औद्योगिक केंद्र होतें व तिथे व्यापारी उलाढाली मोठ्या प्रमाणावर चालत. या प्रदेशांतून वाहणाऱ्या कोणत्या तरी एका नदीला उदुंबरावती असें नांव होतें.

पुरातत्त्ववेत्त्यांच्या मतें बियासच्या उत्तरेला व रावीच्या दक्षिणेला असलेली अरुंद दरी धरून त्रिगर्तांच्या प्रवेशद्वारांत (सांप्रतचें गुरदासपुर) उदुंबरांचें राज्य असावें. [पा. भा.; नागरी प्रचारिणी पत्रिका; इं. स्ट. भा. १]

उदुंबरवन

शिशिर व पतंग या दोन टेकड्यांमध्ये हें वन असून इथे कर्दम प्रजापतीचा आश्रम होता, असें वायुपुराणांत सांगितलें आहे. [पु. इं.]

उदैयन

तमिळनाडमधील एक जात. देवराज नांवाचा एक चेर राजा होऊन गेला. त्याला तीन जातींच्या तीन राण्या होत्या. त्यांपैकी एका राणीचा पुत्र तो, या उदैयन जातीचा मूळ पुरुष असें मानतात. हे लोक शेतकरी पेशाचे आहेत. हे जानवें घालतात.

विवाहप्रथा–लग्न ठरण्यापूर्वी वधूचे आप्तेष्ट वरगृहीं जाऊन वरासह भोजन करतात. नवरा मुलगा अन्न किती खातो, त्यावरून त्याची लायकी ठरवितात. मुलगा लहान असतांनाच त्याच्या कपाळीं भस्म लावून व त्याला नवें वस्त्र आणि चटई देऊन वाङ्निश्चय करून ठेवतात.

मर्तिकप्रथा–श्मशानांत गेलेले मृताचे आप्तेष्ट परत येताना तोंडांत भात चावून तो थुंकत थुंकत येतात. मृताची बायको असेल, तर ती सोळाव्या दिवशीं दिव्याची पूजा करते व मिठाच्या भांड्याला स्पर्श करते.

कुटुंबांतील एखादा माणूस असाध्य रोगाने आजारी पडला, तर त्याच्यासाठी काली देवतेच्या नांवाने एक रेडा सोडतात व रोगी इसम बरा झाल्यावर त्या रेड्याचा बळी देतात. [का. ट्रा. स. इं.]

उद्गाता यज्ञप्रसंगीं सामगान करणाऱ्यांपैकी एक प्रमुख ऋत्विज. ज्या यज्ञांत सामगान असतें, अशाच यज्ञांत याची आवश्यकता असते. दर्शपूर्णमासेष्टि किंवा चातुर्मास्य याग यांमध्ये उद्गाता नसतो. यज्ञांत ज्या देवतांना हविर्भाग द्यायचा असतो, त्यांची स्तुति ज्याप्रमाणे होता करतो, त्याचप्रमाणे उद्गाताहि करतो. उद्गात्याच्या गटांत प्रस्तोता, प्रतिहर्ता व सुब्रह्मण्य असे तीन ऋत्विज असतात. सामगानाचा भाग या तिघांत विभागलेला असतो. कोणत्याहि सामाचा प्रस्ताव म्हणजे प्रारंभ प्रस्तोता करतो. उद्गीथ हा मुख्य भाग उद्गाता गातो व प्रतिहर्ता प्रतिहार अर्थात् शेवट करतो. उद्गाते जीं विशिष्ट सामें म्हणतात, त्यांना स्तोत्रें असें नांव असून तीं सामवेदांत असलेल्या ऋचांवर बसविलेलीं असतात. एका ऋचेवर अनेक प्रकारचीं सामें असतात. त्यामुळे उद्गाता सामवेदी असावा लागतो. सोमयागांत सदोमंडपामध्ये औदुंबरीजवळ बसून उद्गाते सामगान करतात. [विद्याधरशास्त्री भिडे]

उद्गाथ एक वेदाचार्य. याच्या कालाविषयीं माहिती मिळत नाही. स्कंदस्वामीने लिहिलेल्या ऋग्वेदभाष्यांत उद्गीथाचें सहकार्य होतें, असें वेंकट माधव सांगतो. हा कर्नाटकांतल्या वनवासी प्रांतांतला रहिवासी असावा, असें अनुमान आहे. [वै. सा. सं.]

उद्गीथ विद्या प्रणवाला उद्गीथ अशी संज्ञा आहे. त्याचा जप केल्याने आत्मज्ञानाची प्राप्ति होते, असें योगदर्शनांत व उपनिषदांत सांगितलें आहे. 'उद्गीथाक्षराण्युपासीत' = उद्गीथाच्या अक्षरांची उपासना करावी, असें छांदोग्य म्हणतें (१. ३. ६). वाणी हें पुरुषांतलें सारतत्त्व आहे. सर्व वाङ्मयांत ऋक् व साम हे यथार्थतत्त्वरूप आहेत. प्रणव (उद्गीथ) हें त्यांचें सार होय. 'प्रणवात्मकं ब्रह्म' = ब्रह्म हें प्रणवात्मक आहे (त्रिपाद्विभूतिमहानारायणोपनिषद् १. ३). त्याची शक्ति लक्षांत घेतां ईश्वराचें ध्यान करण्यास प्रणवासारखा श्रेष्ठ शब्द नाही, असें म्हटलें पाहिजे. त्याच्या उच्चाराने वाक् व प्राण यांची एकता होते. उद्गीथाच्या उपासनेने सर्व मनोरथ पूर्ण होतात, असें छांदोग्य सांगतें.

उद्दंडक हातांतला दांडा उंच धरून चालणाऱ्या लोकांचा एक पंथ. विशेष माहिती उपलब्ध नाही.

उद्दालक व्रत ज्याची उपनयनाची वयोमर्यादा टळून गेली आहे व त्यामुळे जो द्विजत्वापासून भ्रष्ट झाला आहे, अशा पुरुषाने हें व्रत करायचें असतें. आमिक्षा व आटीव दूध यांवर प्रत्येकी दोन महिने निर्वाह करणें, आठ दिवस दह्यावर, व तीन दिवस तुपावर राहणें आणि एक दिवस पूर्ण उपोषण करणें असा याचा विधि आहे. [वसि. ध. सू. ११. ७६–७७]

उद्दालकेश्वर वाराणसींतलें एक तीर्थ. हें कपिलेश्वराच्या समोर असून त्या ठिकाणीं उद्दालक ऋषीला परमसिद्धि प्राप्त झाली, असें लिंगपुराणांत सांगितलें आहे. [कृ. क. त.]

उद्देहिक एक प्राचीन जमात. पुष्यमित्र शुंगाच्या मृत्यूनंतर गंगा–यमुनांचें खोरें, राजस्थान व पूर्व पंजाब या प्रदेशांत कांही लहान राज्यें अस्तित्वांत आलीं होतीं, त्यांपैकी हें एक गणराज्य होतें. सनपूर्व दुसऱ्या शतकांतील यांचीं कांही नाणीं सांपडलीं असून त्यांवर उदेहकी अशीं ब्राह्मी लिपींतलीं अक्षरें कोरलेलीं आहेत. कनौजच्या नैर्ऋत्येला ११२ मैलांवर बझननजीक उद्देहिक होतें, असें अल्बिरुनी सांगतो. [अ. हिं. नॉ. इं.]

उद्धता एक नायिकाभेद. गाथासप्तशतींत हिचें वर्णन पुढीलप्रमाणे केलें आहे—

अण्ण-महिला-पसंगं हे देव
करेसु अम्ह दइअस्स ।
पुरिसा एक्कंत-रसा न हु
दोस-गुणे विआणंति ।।

अर्थ — देवा, आमच्या प्रियतमाला अन्य स्त्रियांचा योग घडव. एकीचीच शृंगारमाधुरी (सदैव) चाखीत राहिल्याने पुरुषांना (दुसरीचे) दोष उमजत नाहीत आणि (स्वस्त्रीचे) गुणहि कळत नाहीत.

उद्धव चिद्घन (१७ व्या शतकाची अखेरी) एक चरित्र ग्रंथकार. हा धारूरचा राहणारा असून याचें आडनांव कोकीळ असें होतें. उद्धव चिद्घन हें जोडनांव आहे. त्यांतलें उद्धव हें कवीचें व चिद्घन हें त्याच्या गुरूचें नांव आहे. हा चैतन्य संप्रदायांतला होता. गुरूपदेश झाल्यावर याने काव्यरचनेस प्रारंभ केला. अनुभवशतक, गीतार्थमंजरी, शुकरंभा-संवाद, गोराकुंभार, नागनाथ, इ. संतांचीं चरित्रें अशा प्रकारचें याचें साहित्य आहे. याने रचलेली संतमाला प्रसिद्ध आहे. याची समाधि धारूर येथे आहे.

ज्याचे वंशीं कुलधर्म रामसेवा ।
त्याचे वंशीं मज जन्म घडो देवा ।।

हें उद्धव चिद्‌घनाचें पद प्रसिद्ध आहे.

कृष्णा धाव रे लवकरी । संकट पडलें भारी
हरि तूं आमुचा कैवारी । आलें विघ्न निवारी ।।

हा त्याने रचलेला धावा करुणापूर्ण असून तो जुन्या काळच्या स्त्रिया आवडीने म्हणत. [म. सा.; म. ज्ञा. को.]

उद्धव मुल्हेरकर (१५००–१६०० इ. स.) मुल्हेर येथे राहणारा, रामानुजी कृष्णभक्त. उद्धवबोध, बोधरहस्य इ. याचे ग्रंथ आहेत. [म. च. को.]

उद्धवसुत (इ. स. १८ व्या शतकाचा उत्तरार्ध) हा मूळचा विदर्भांतील अंजनगांवचा असून त्र्यंबक-मल्हारी–उद्धव अशी त्याची वंशपरंपरा आहे. यानेच रामदासांचें ओवीबद्ध चरित्र लिहिलें असून त्याचे ५१ अध्याय आहेत. याचें उद्धव हें नांव असतां हा स्वतःला उद्धवसुत कां म्हणवितो, तें कळत नाही. याचीं कांही पदेंहि आहेत [म. सा.]

उद्धव स्वामी (१६०४–१६९३ इ.स.) समर्थ रामदासांचा पहिला शिष्य. याचें आडनांव दशपुत्रे असें होतें. याचा मुख्य मठ मोंगलाईंत इंदूर बोधन येथें असून दुसरा पंचवटीजवळच्या टाकळीस आहे. रामदासांनी समाधि घेतल्यावर हा कांही काल सज्जनगडावर राहिला होता. याने रामदासांचें एक चरित्र लिहिल्याचा उल्लेख ग्रंथांतरीं सांपडतो. पण तें चरित्र मात्र उपलब्ध नाही [म. सा.]

उद्‌ध्य–भिद्य कालिदासाने रघुवंशांत राम–लक्ष्मणांच्या जोडीला या दोन नद्यांच्या प्रवाहाची उपमा दिली आहे (रघु. ११.८). पाणिनीने अष्टाध्यायींत या दोन नद्यांचा उल्लेख केला आहे (३. १. ११५). काशिका वृत्तींतील ‘ उद्‌ध्येरावती ’ या उदाहरणावरून उद्‌ध्य ही इरा-वतीची (हल्लीची रावी) साहाय्यक नदी होती, असें कळतें. [पा. भा.]

उद्‌बंधक एक प्राचीन जात. ही संकरजाति असल्याचें उशना सांगतो. वैखानसमतें खनक पुरुष व क्षत्रिय स्त्री यांची संतति. हे लोक अस्पृश्य गणले गेले आहेत. [हि. ध.]

उद्‌बोधनाथ (समाधि १६८७ इ. स.) महाराष्ट्रांतल्या राशिन गांवांतले मल्हार नाईक ठिपसे यांचा हा मुलगा होय. मूळ नांव उद्धव. गंगाबाई नांवाच्या नाथ-परंपरेंतल्याच एका स्त्रीने याला उपदेश दिला व पुढे हा उद्‌बोधनाथ झाला. पदें, अभंग इ. याची काव्यरचना आहे. योगमार्गावर याने बरींच पदें रचलीं आहेत. राशिन येथे याची समाधि आहे. [म. सा.]

उद्‌भट (इ. स. ८०० चा सुमार) काश्मीरी पंडित. हा जयापीड राजाच्या दरबारांत सभापति होता. याचें रोजचें वेतन एक लक्ष दीनार (सुवर्णमुद्रा) होतें, असें राजतरंगिणींत लिहिलें आहे (४. ४९५). ध्वन्या-लोककार आनंदवर्धनाचार्य याचा हा वारंवार उल्लेख करतो. याने भामहाच्या ग्रंथावर भामहविवरण नामक ग्रंथ लिहिला आहे. पण उद्‌भटाची कीर्ति झाली, ती त्याच्या काव्यालं-कारसंग्रह या ग्रंथामुळेच. यांत ६ वर्ग व ७६ कारिका असून ४१ अलंकारांचें वर्णन आहे. या ग्रंथावर कोंकणांतल्या प्रतीहारेन्दुराज याने टीका लिहिली आहे. उद्‌भटाने भर-ताच्या नाटचशास्त्रावरहि टीका लिहिली होती, असें संगीतरत्नाकरावरून कळतें. याचा उद्‌भटालंकार नांवाचा आणखी एक ग्रंथ आहे. [सा. शा. इ.]

उद्भिद (१) एक प्राचीन देश. ज्योतिष्मानाचा पुत्र या देशावर राज्य करीत होता (वायु पु. ३३. २४; विष्णु पु. २. ४. ३६).


(२) कुशद्वीपांतील एक वर्षपर्वत (वायु पु. ४९. ५२).

उद्‌भ्रम कुबेराच्या सेवेंतील एक गण (मत्स्य पु. १८०. ९८). [पु. इं.]

उद्यंतक गिरि अगस्त्याने गया क्षेत्रांत स्थापिलेला एक पर्वत. इथे ब्रह्मा व विष्णु यांनी उग्र तप केलें. इथें पिंडदान केल्याने पितर ब्रह्मलोकाला जातात. [पु. इं.]

उद्यान मोठा बगीचा, उपवन असे याचे पर्यायशब्द आहेत. ‘ राज्ञः साधारणं वनम् ’ =राजाने निर्माण केलेलें साधारण वन म्हणजे उद्यान होय, असें अमरकोशांत म्हटलें आहे. उद्यानांत विविध प्रकारचे लतावृक्ष, लताकुंज, कृत्रिम पर्वत, निरनिराळ्या आकारांचे चबुतरे, लतामंडप, जलो-

च्छ्वास, क्रीडाविलास स्थळें, तलाव, पुष्करिणी—त्यांत हंस-कारंडवादि पक्षी इ. गोष्टी असत. उद्यानाचे एक किंवा अनेक रक्षक असत. त्यांत नगरांतले रसिकजन आणि प्रेमी युगुलें सहलीसाठी व प्रेमक्रीडेसाठी जात असत. इंद्राचें नंदनवन, कुबेराचें चैत्ररथवन व रावणाचें अशोकवन हीं उद्यानें पुराणांतरीं प्रसिद्ध आहेत. प्राचीनकाळीं अशा उद्यानांतून सामाजिक व ऋतुसंबंधीं उत्सव होत असत. आपल्या राजधानींत एखादें उद्यान निर्माण करणें, ही गोष्ट राजेलोक आपलें एक सामाजिक कर्तव्य समजत.



निशात बाग–काश्मीर

इतिहासकालांत मोगल सम्राट् हे उद्याननिर्मितीचे शौकीन समजले जातात; पण त्यांच्या आगमनापूर्वीहि भारतांत उद्याननिर्मिति चालू होती, असें श्री. विलियम क्रूक म्हणतो. त्याने लिहिलें आहे, ‘चौदाव्या शतकांत फ़िरोजशहाने दिल्लीच्या आसपास १२०० बगीचे निर्माण केले होते.’ मोगलांच्या आगमनापूर्वीच भारतांत उद्यानकला विकसित झाली होती. या उद्यानांची शैली प्राचीन भारतीय उद्यानकलेशीं मिळतीजुळती होती. मोगलकालीं उद्यानकलेचा जो विकास झाला, तो भारतीय पद्धतीला धरून झाला नाही. मोगली उद्यानकलेवर पर्शिया व तुर्कस्तान या देशांतील कलेचा विशेष प्रभाव होता.


मोगलांच्या उद्यानांत तलाव, पुष्करिणी आणि लहान मोठे पाट असत. उद्यानांत जाण्याच्या मार्गावर दोहीं अंगीं पाणी वाहतें ठेवीत. रांगेने कांही चबुतरे बांधीत. त्यांच्या शेजारी वृक्ष लावीत. मंडपगृहें निर्माण करीत. गुलाबाचीं रोपटीं विशेष प्रमाणांत लावीत. याशिवाय मोठमोठे वृक्ष आणि फळझाडेंहि या उद्यानांत असत. जिथे राजकुमार व बडेबडे सरदार यांचा दफनविधी होत असे, तिथे कबर बांधणें व तिच्या भोंवती बगीचा निर्माण करणें, अशी प्रथा बाबराच्या कालांत सुरू झाली होती. अशा कबरींच्या जवळच लहानमोठे जलाशय निर्माण केले जात व त्यांत कारंजींहि निर्माण करीत. मोगल राजेच बगीचे बनवीत असें नसून त्यांचे मोठमोठे सरदारहि उद्यानें तयार करीत. मोगल सम्राट् राजकीय कार्यासाठीहि उद्यानांचा उपयोग करीत. उद्यानांतल्या लतामंडपांत किंवा खास बनविलेल्या महालांत बसून त्यांचीं राजकारणाचीं खलबतें चालत.



चष्मशाही उद्यान–काश्मीर

बाबर बादशहा हा फुलवेडा होता. त्याला सृष्टिसौंदर्याची विलक्षण आवड होती. आगऱ्याच्या एका उद्यानांत त्याने एक खजुरीचे झाड लावलें होतें. त्याची उंची अकबराच्या कालापर्यंत ९० फूट झाली होती. त्याच्या ‘जौहराबाग’ नांवाच्या उद्यानांत ६० विहिरी होत्या. अकबरालाहि बागेचा छंद होता. तो फळाफुलांच्या रोपट्यांना ईश्वराची अपूर्व देणगी समजत असे व त्यांच्या वाढीकडे पूर्ण लक्ष देत असे. त्याने आपल्या बागा सुशोभित करण्यासाठी इराण व तुराण या देशांतून मोठमोठे उद्यानपंडित बोलाविले होते. काश्मीरमधील दल सरोवराच्या तीरावरील नसीमबाग व फत्तेहपूर सीकरी येथील कित्येक उद्यानें अकबराच्या उद्यानरुचीची स्पष्टपणे साक्ष देत आहेत. जहांगिरहि उद्यानांचा विलक्षण प्रेमी होता. राज्यारोहणापूर्वींच त्याने उदयपूर येथे अनेक बगीचे बनविले होते. अहमदाबादच्या उद्यानांत त्याने फळझाडांची विशेष प्रमाणांत लागवड केली होती. त्याला पुष्पशय्येची विशेष आवड होती.

ताजमहालाच्या भोंवतालचें उद्यान हें शाहजहाँच्यां कालांतलें प्रसिद्ध उद्यान होय. लाहोर येथील प्रसिद्ध



शालिमार बाग—लाहोर

शालिमार बाग ही शाहजहाँचीच निर्मिति आहे. आगरा येथील खासमहलच्या समोरची अंगुरी बाग व दिल्ली जवळची तालकटोरा बाग या दोन बागाहि शाहजहाँनेच निर्माण केल्या आहेत. लाहोरच्या बादशाही मसजिदच्या सभोंवती एक सुंदर बगीचा आहे व तो औरंगजेबाने बनविला आहे. औरंगजेबाची कन्या जेबुन्निसा हिनेहि लाहोरांत 'चार बुर्ज' नांवाचें एक उद्यान निर्माण केलें होतें. मोगलकालांत काश्मीर व उत्तरप्रदेश या भागांत अशीं किती तरी लहान मोठीं उद्यानें निर्माण झाली व त्यांनी प्रजेच्या रसिक वृत्तीचें समाधान केलें.

श्रीनगर येथील निशात व शालिमार हीं उद्यानें जगप्रसिद्ध आहेत. याशिवाय त्या ठिकाणीं मोगलनिर्मित अनेक बगीचे आजहि विद्यमान आहेत. निशात बागेविषयीं जगभर जेवढें लिहिलें गेलें आहें, तेवढें दुसऱ्या कोणत्याहि बागेविषयीं लिहिलें गेलें नसेल. तिच्यांतल्या प्रत्येक चबुतऱ्याची लांबी-रुंदी, प्रत्येक पायरीची उंची व प्रत्येक निर्झरिणीची खोली मोजलेली असून त्यांच्या आकडेवारीचे तक्तेहि तयार झालेले आहेत. या बागेची रचना मोठ्या कुशलतेने केलेली आहे. तिथली सोपानश्रेणी, प्रपात, फुलझाडें, वृक्ष, जागोजाग नाचत नाचत वाहणाऱ्या निर्झरिणी, इ. अनेक गोष्टींनी निशात बागेंत गतिशीलता, उत्साह आणि अनंत जीवनाचें वातावरण निर्माण झालेलें आहे. निशात बागेंतले सर्व प्रयोग शालिमार बागेंतहि केलेले आहेत. तिथेहि पाण्याचे पाट वाहतात. नर्गिसचीं फुलें फुलतात. चिनारचे वृक्ष डोलतात. या बागेंत आल्यावर मनाचें चांचल्य नष्ट होतें व त्याला घटकाभर असीम शांतीचा लाभ घडतो.

श्री. हॅवेल म्हणतो, की 'मोगल सम्राटांनी उद्यानांच्या रूपाने भारतीय कलेला एक महान् देणगी दिली आहे.' [अजन्ता—मे १९५३; प्रसारिका १९५६.]

उद्यानयात्रा

एखाद्या ऋतुविषयक किंवा सामाजिक उत्सवासाठी उद्यानांत जाणें, याला प्राचीन काळीं उद्यानयात्रा म्हणत. फलपुष्पांनी विनटलेल्या वसंत ऋतूंत उद्यानयात्रा करणें, ही एक आनंददायक गोष्ट असे. निश्चित दिवशीं सकाळीं नागरिकजन उद्यानयात्रेसाठी नटून सजून तयार होत. मातबर लोक घोड्यावरून जात, तर बहुसंख्य लोक पायींच जात. कित्येक वेळीं नगरांतल्या शेठसावकार व सरदार यांच्या उद्यानयात्रेंत गणिकाहि सामील असत. राज लोक अंत:पुरांतल्या राण्यांना घेऊन जात. वाटेंत कोंबड्यांच्या व मेंढ्यांच्या झुंजा, तसेच निरनिराळे खेळ पाहत आणि रमतगमत ही यात्रा होत असे. उद्यानांत गेल्यावर झोपाळ्यावर झोके घेणें, समस्यापूर्ति, कथाकथन, उखाणे व कोडीं घालणें, अशा प्रकारचे खेळ व मनोविनोद करीत (कामसूत्र पृ. ९३). पालिग्रंथांत उद्यानयात्रेचीं वर्णनें अनेक ठिकाणीं आढळतात. काशीचा राजा ब्रह्मदत्त कित्येकदा आपल्या परिवारासह दिवसभर उद्यानांत रमून सायंकाळीं नगरांत परत येत असे. वाराणसीचे नगरश्रेष्ठी व राजपुरोहित यांच्या मुली खाद्यपेय सामग्री घेऊन उद्यानक्रीडेसाठी जात.

एकदा तीस संपन्न नवयुवक आपल्या बायकांसह उद्यानक्रीडा करण्यासाठी गेले होते. दैववशात् त्यांतल्या एका तरुणाला भार्या नव्हती. म्हणून मग त्याच्या मित्रांनी त्याच्यासाठी नगरांतून एक वारांगना बोलावून घेतली (महावग्ग १.१४.१). कित्येकदा कुमारिका व विवाहित स्त्रिया पुरुषांना बरोबर न घेतां स्वतंत्रपणे उद्यानयात्रा करीत. श्रीमंत स्त्रिया व गणिका पालखी-मेण्यांतून जात व त्यांच्या परिचारिकांचा समुदाय पाठीमागून पायी जाई. पण कामसूत्रावरून असें कळतें, की तरुण मुलींनी अशा प्रकारें पुरुषांच्या सोबतीवांचून उद्यानयात्रेला जाणें, त्या काळांतहि बिनधोक नव्हतें. पुष्कळ वेळां अशा प्रसंगीं गुंड लोक मुलींचें अपहरण करण्याची संधि साधीत. [प्रा. भा. म.; प्रा. भा. क. वि.]

उद्यापन

एखादें व्रत घेऊन तें पुरें केल्यावर त्याची सांगता करण्यासाठी जीं जप, होम, पूजा, इ. कृत्यें केलीं जातात, त्या सर्वांना मिळून उद्यापन म्हणतात. उद्यापन केलें नाही, तर व्रत सफल होत नाही, असें शास्त्रवचन आहे. उद्यापन कसें करावें, तें त्या त्या व्रताच्या विधानांतच सांगितलेलें असतें. जिथें तें सांगितलेलें नसतें, तिथे गोप्रदान व

सुवर्णदान, याच्या योगें उद्यापन पूर्ण होतें, असें समजतात.

व्रतावधि संपल्यावर, ज्या तिथीस व्रत घेतलें असेल, त्याच तिथीवर उद्यापन करणें, हा सर्वश्रेष्ठ मार्ग होय. कांही व्रतांच्या उद्यापनाचा काल आधी, मधे किंवा अंतीं सांगितलेला असतो. यथोक्त कालीं उद्यापन करतां आलें नाही, तर तें कोणत्याहि एकादशीस, किंवा मार्गशीर्षांत किंवा माघ शु. १२ मीस किंवा सोमवारीं करावें, असें सांगितलें आहे. यांपैकी कोणताहि पर्याय सोयीचा नसेल, तर ज्यावेळीं द्रव्य जवळ असून इच्छा होईल, त्यावेळीं तें करावें, अशीहि शास्त्राने सवलत ठेवली आहे. द्रव्य व साहित्यसामग्री मिळविण्याच्या कामीं असमर्थता असेल, तर ब्राह्मणाला यथाशक्ति दक्षिणा देऊन 'तुझ्या व्रताची पूर्ति झाली' असा त्याच्याकडून आशीर्वाद घ्यावा. मात्र येन केन प्रकारेण व्रताचें उद्यापन केल्यावांचून राहूं नये. उद्यापनाचा सामान्य विधि असा---

नदींत किंवा जलाशयांत यथाविधि स्नान, स्नानांगतर्पण, देवालयांत, नदीतीरीं किंवा घरीं मंडप घालून तो लतापल्लवांनी सुशोभित करणें. मंडपांत ग्रहवेदि व कुंड तयार करणें. संकल्प, गणपतिपूजन, आचार्यवरण, प्रतिमास्थापन व पूजन, धान्यराशीवर कलशस्थापन, विशेषार्घ्यदान, इ. गोष्टी करणें. रात्री कथाश्रवणादि गोष्टींनी जागरण. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं आज्यादि उक्त हविर्द्रव्यांनी होम. पूर्णाहुति. अभिषेक. पीठदेवतांची उत्तरपूजा. आचार्यपूजा. पीठ-प्रतिमादान. वायनदान. ब्राह्मण, सुवासिनी व दंपती यांस भोजन. अन्नदान. कर्म ईश्वरार्पण करणें. आशीर्वाद ग्रहण व शेवटीं आप्तेष्टांसह भोजन. [व्रतराज]

उद्योतकर (इ. स. ७ वें शतक) एक शैव आचार्य. याचें जन्मस्थान नक्की कळत नाही. ठाणेश्वरापासून २० कोसांवर यमुनेच्या पूर्वभागीं असलेल्या स्रुघ्न नांवाच्या गांवाचा तो उल्लेख करतो (न्यायवार्तिक १. ३३). पण तें त्याचें जन्मगांव असेलच असें म्हणवत नाही. सतीशचंद्र विद्याभूषणांच्या मतें न्यायवार्तिक लिहितेवेळीं तो ठाणेश्वर येथे राहत होता. कदाचित् त्याला ठाणेश्वराधिपतीचा राजाश्रय असावा. तो भारद्वाज गोत्रांतला होता. बौद्ध पंडित धर्मकीर्ति हा याचा समकालीन होय.

याचा न्यायवार्तिक हा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. हा ग्रंथ म्हणजे न्यायसूत्रांवरची टीका आहे. दिङ्नाग, नागार्जुन व त्याच्या पूर्वीं होऊन गेलेल्या बौद्ध तार्किकांचें खंडन करणें, हा प्रस्तुत ग्रंथाचा मुख्य उद्देश आहे. याने बौद्ध न्यायाचा सखोल अभ्यास केला होता. याची शैली प्रौढ व पांडित्यपूर्ण आहे. याला पाशुपताचार्य असेंहि म्हणत. [हि. इं. लॉ.]

उद्योतन जैनांच्या ८४ व्या गच्छाचा उत्पादक. ऋषभदेवाची पूजा करण्याच्या उद्देशाने हा मालवक देशाहून शत्रुंजय (पालिताणा) पर्वताकडे निघाला असतां, वाटेंतच याचा मृत्यु झाला. [म. च. को.]

उद्र एक प्राचीन मानवगण. मानव धर्मशास्त्रांत या लोकांचा प्रथम उल्लेख आढळतो. पुराणांत पुंड्र, उत्कल, मेखल, कलिंग या लोकांसमवेत उद्रांचाहि निर्देश आहे.

उद्रांचा देश व्रजमंडलाच्या उत्तरेकडे असून त्यांत पुरुषोत्तम किंवा श्रीक्षेत्र, सवितृ किंवा अर्कक्षेत्र व बिरज क्षेत्र अशीं तीन क्षेत्रें वैतरणा नदीच्या कांठीं होतीं, असें ब्रह्मपुराणांत सांगितलें आहे.

हे लोक काळे व अतिशय चिकाटीचे होते. त्यांच्यापैकी कांही बौद्ध धर्मानुयायी होते व ते मध्यभारतांत राहत होते, असें युआन च्वांगने म्हटलें आहे. त्यानंतरच्या वाङमयांत मात्र त्यांच्याविषयीं कसलेच उल्लेख सांपडत नाहीत. [ट्रा. ए. इं.]

उद्वह तिसऱ्या वातस्कंधांतला मुख्य. हा सूर्य व चंद्र यांच्यामध्ये आहे. (ब्रह्मांड पु. ३. ५.; ४; ४;)

उद्वृषभ यज्ञ प्राचीन काळीं ज्येष्ठ पूर्णिमेस बैलांची पूजा करून त्यांना समारंभाने पळवीत, त्याला हें नांव होतें. [जै. न्या. १. ३. ८]

उधळिपा हा चौऱ्यांयशी सिद्धांपैकी एक होता. हा जातीने वैश्य असून देवीकोट येथे राहणारा होता. याला उधरिपा असेंहि म्हणतात. याचा गुरु कर्णरिपा हा होता. तो चौऱ्यांयशीं सिद्धांपैकी १८ वा होय. याची परंपरा सरहपा, नागार्जुन, कर्णरिपा, उधळिपा, अशी लागते. उधळिपाने कांही काव्यरचना केलेली आहे, असें आढळत नाही. याचा गुरु कर्णरिपा याची मात्र काव्यरचना आहे. 'निर्विकल्प प्रकरण' नांवाचा कर्णरिपाचा एक हिंदी ग्रंथ आहे.



उधळिपा

उनकेश्वर महाराष्ट्रांतलें एक क्षेत्र. माहूरच्या पूर्वेला सुमारे २० मैलांवर अत्यंत दुर्गम ठिकाणीं हें क्षेत्र वसलेलें आहे. इथे महादेवाचें एक मंदिर असून त्याच्या दक्षिणेला व पूर्वेला अशीं दोन गरम पाण्याचीं कुंडें आहेत. या पाण्यांत स्नान केल्याने कुष्टरोग व त्वचारोग बरे होतात, असें सांगतात. या कुंडांसंबंधी एक आख्यायिका आहे, ती अशी— पूर्वी या ठिकाणीं शरभंग ऋषीचा आश्रम होता. त्याने रामचंद्राची प्रार्थना केली व रामाने भूमींत बाण मारून तिथे उष्णोदकाचे झरे निर्माण केले.

उनकेश्वर मंदिराच्या सभामंडपाच्या भिंतींत एक यादवकालीन शिलालेख (इ. स. १२८९) असून त्यांत हेमाद्रिपंत, राजपुत्र वेंकदेव, सोमदेव पंडित इ. व्यक्तींचे उल्लेख आहेत. या स्थानाच्या आसपास दहा-बारा मैलांच्या परिसरांत भीमेश्वर, सिद्धेश्वर, कपीश्वर व सोमेश्वर अशीं चार शिवस्थानें आहेत. [मातापूरची जगन्माता]

उनपदेव महाराष्ट्रांतील गरम झऱ्यांचें एक ठिकाण. जळगांव जिल्ह्यांत चोपडयाजवळ हें ठिकाण आहे. या ठिकाणीं २०० वर्षांपूर्वी बांधलेलें मुरलीधराचें मंदिर असून जवळच महादेव व कृष्ण-बलराम यांचीं दोन देवालयें आहेत. पौष महिन्यांत इथे जत्रा भरते. उष्ण पाण्याचा प्रवाह एका मंदिराच्या खालच्या गोमुखांतून बाहेर पडतो आणि तें पाणी एका जलाशयांत साठविलें जातें. त्या पाण्याचें उष्णतामान १४०° असून त्याला एक प्रकारचा वास येतो. या पाण्याने त्वचा रोग बरे होतात, असें सांगतात. इथे पूर्वी शरभंग ऋषीचा आश्रम होता. शरभंगाला पाण्याची सोय हवी होती, म्हणून रामचंद्राने या जागी बाण मारून पाण्याचा झरा निर्माण केला, अशी आख्यायिका सांगतात. [महाराष्ट्रांतील जिल्हे-जळगांव]

उन्नत (१) शाल्मलिद्वीपांतील एक लघु पर्वत (वायु पु. ४९. ३३; विष्णु पु. २. ४. २६).
(२) कुशद्वीपांतील एक पर्वत (मत्स्य पु. १२२.२३).

उन्नी अंबलवासी समाजांतील पुष्पकन, ब्राह्मण, तियत्तुनी व नत्तुपत्तर या चार पोटजातींची पदवी. या पोटजाती स्वतःला नायरांपेक्षा उच्च मानतात. त्यांच्यापैकी पुष्पकन ही फार प्राचीन जात असून त्या लोकांना परशुरामाने मलबारमधील देवालयांत फुलांचे हार करण्याचें काम दिलें होतें, अशी आख्यायिका आहे. नंबियस्सन ही पुष्पकनांचीच एक पोटजात असून ते मल्लविद्येंत प्रवीण आहेत. त्यांनी तालीमखाने व लष्करी शिक्षणाच्या शाळाहि चालविल्या आहेत.

या समाजांतले ब्राह्मण त्रिवांकुरमधील शूद्र जातींचें पौरोहित्य करतात.

तियत्तुन्नी लोक देवळांतून कांहीं विशिष्ट धार्मिक कामें करतात. या जातीच्या उत्पत्तीची दंतकथा अशी सांगतात— भद्रकालीने दरिकाला ठार मारल्यावर शिवाने आपल्या भूतगणांपैकी ज्या एकाला तिच्या स्तुतिपर कवनें गायला सांगितलें, त्याचेच वंशज हे तियत्तुनी लोक होत. आजहि ते नायरांच्या विवाहसमारंभांत धार्मिक गीतें गातात.

नत्तुपत्तर यांना पत्तर उन्नी व करप्पुरम् उन्नी असें म्हणतात. करप्पुरम् उन्नी हे मुळांत शूद्र होते; पण केरळच्या चेरमल पेरुमल नामक एका प्राचीन राजाने त्यांना सांप्रतचा उच्च दर्जा दिला. त्यांना ब्राह्मणांचीं कामें करण्याची व उन्नी ही पदवी धारण करण्याची परवानगी त्यानेच दिली.

पुष्पकनाच्या घराला पुष्पकम्, पुन्तुम् किंवा पदोदकम् असें म्हणतातया. घराला पदोदकम् म्हणण्याचें कारण असें, की घर अगदीं देवळाजवळ असतें व देवाचें चरणतीर्थ या घराजवळ पडतें. पुष्पकन व उन्नी लोक ब्राह्मणांप्रमाणे ताडपत्री छत्री घेऊन व नायर जातींतली मोलकरीण बरोबर घेऊन सार्वजनिक ठिकाणीं जातात.

सांथीचे रोग उद्‌भवल्यास हे लोक भद्रकाली व गणपति यांची पूजा करतात व नृत्य—गायनाने तिला संतुष्ट करतात. सदर प्रसंगीं एक इसम भद्रकालीचा वेष करून दरिक राक्षसाला ठार मारण्याचा नाटयप्रवेशहि करतो.

विवाहप्रथा—मुलीचा विवाह बाराव्या वर्षानंतर करतात. विवाहाच्या आदल्या दिवशीं सायंकाळीं वधू स्नान करून देवीची पूजा करते. विवाहसमारंभ वधूच्या घरीं होतो. कुटुंबांतला वडील मुलगा तेवढाच जातींतल्या मुलीशीं लग्न करतो व बाकीचे नायर स्त्रियांशीं संबंधम् करतात.

तियत्तुनी हे दहा दिवस, ब्राह्मण बारा दिवस व नत्तुपत्तर तेरा दिवस सुतक पाळतात. [का. ट्रा. स. इं.]

उन्नेता अध्वर्युगणांतला चौथा ऋत्विज. अध्वर्यूबरोबर सोम कुटणें, हविर्धान मंडपांतल्या सोमरसाच्या घागरींमधून वेळोवेळीं सोम काढून देणें व प्रत्येक सवनाला पुरेल इतका सोम तयार ठेवणें, हीं कामें मुख्यतः उन्नेत्यावर सोंपविलेलीं असतात. यज्ञ संपल्यावर सोमरस शिल्लक राहूं नये, अशी दक्षताहि त्यानेच घ्यायची असते. थोडक्यांत म्हणजे यज्ञांतलें सोमविषयक सर्व काम उन्नेत्याकडे असतें. अवभृथ

स्नानाच्या वेळीं सर्वांना नदींतून बाहेर काढण्याचें कामहि याच्याकडेच असतें. उन्नेता हा नारायणाच्या पायापासून निघालेला ऋत्विज होय, असें मत्स्यपुराणांत म्हटलें आहे (१६७-१०). [विद्याधरशास्त्री भिडे]

उन्मत्तोदुंबरी मानसजात मातृदेवता (मत्स्य पु. १७९-२८).

उन्मनी एक अवस्था. अर्थात् मनाचें मनपण हरवणें. हठयोगांतील पांच मुद्रांपैकी एक मुद्रा. यांत साधक नासिकाग्रावर दृष्टि स्थिर करून भुवया वर चढवितो. उन्मनीची साधना ही साधकाला अत्यंत उपयोगी आहे, असें गोरख, कबीर इ. संतांनी म्हटलें आहे–

तूटी डोरी रस कस बहै ।
उन्मनी लागा अस्थिर रहै ।
उन्मनि लागा होइ आनंद ।
तूटी डोरी बिनसै कंद ।

उन्मनीभाव ही आनंदाची एक अवस्था असून यांत मनाचा लय होतो व प्राणाचा संचार अजिबात बंद होतो. सहजिया संतांच्या मतें जीवाचा हाच निज स्वभाव आहे. [हिं. सा. को.; बौ. द. मी.]

उन्माद (१) दुष्ट पिशाचांचा एक गण.
(२) या नांवाचा दैत्यांचा एक वर्ग आहे (भाग. पु. १०. ६. २८; २. १०. ३९).

उन्मादनाथ उन्माद नामक पिशाचगणाचें अधिपत्य करतो, म्हणून शिवाला हें नांव मिळालें आहे. (भाग पु. ४. २. १६).

उन्मादिनी एक मुद्राशक्ति (ब्रह्मांड पु. ४. १९. ६६).

उन्मीलनी एकादशी जी अहोरात्र पूर्ण असून दुसऱ्या दिवशीं एक घटिका शिल्लक उरते, त्या एकादशीला हें नांव आहे. या दिवशीं विष्णुपूजा व दान यांचें विधान सांगितलें आहे. [प. पु. उ. खं. ३५]

उन्ह उन्ह सावली एक खेळ. कोवळ्या उन्हांत अगर चांदण्यांत हा खेळ खेळतात. कांहीं ठिकाणीं प्रकाश व कांहीं ठिकाणीं सावली असलेली जागा या खेळासाठी निवडतात. ज्याच्यावर राज्य येईल, तो मुलगा प्रकाशांत उभा राहतो व इतर मुलें सावलींत उभीं राहतात. सावलींतील मुलें मधून मधून उन्हांत किंवा प्रकाशांत येतात व राज्य घेतलेला मुलगा त्यांना शिवायला धावला, की तीं लगेच सावलींत पळतात. सावलींत जाण्यापूर्वी जर एखाद्या मुलाला पकडलें, तर त्याच्यावर राज्य येतें. मग पूर्वीचा राज्य घेतलेला मुलगा इतर मुलांत सामील होतो व खेळ पुन्हा सुरू होतो. [व्या. ज्ञा. को.]

उपकरण 'प्रधानाङ्गीभूतोपकारकद्रव्यम्' = मुख्य असेल त्याला जवळचें उपकारक द्रव्य म्हणजे उपकरण होय, असें म्हटलें आहे (श. क.). उदा० राजाचीं छत्र-चामरें, भोजनांतल्या शाकभाज्या, व पूजेंतल्या नैवेद्यादि वस्तू, हीं त्या त्या प्रकरणांतलीं उपकरणें होत. देवपूजेंत ज्या पात्रांतून देवाला उपचारसमर्पण होतें, त्या पात्रांनाहि उपकरणें म्हणतात. व्यापक अर्थानें पाहिल्यास पूजकाचें शरीर व मन हेंहि एक उपकरणच असतें. म्हणूनच सर्व उपकरणांबरोबर पूजकाची देहशुद्धि व मनःशुद्धिहि देवपूजेंत अपेक्षित असते.

उपकेश श्रीमाळच्या ऊहडाने ओस नांवाची नगरी स्थापली, तेव्हांपासून त्या ठिकाणच्या जैन समाजाला उपकेश हें नांव मिळालें व त्या नगरीला उपकेशपट्टण म्हणूं लागले. उपकेशाचा संक्षेप 'ओस' असा झाला. पाहा–ओसवाल. [म. ज्ञा. को.]

उपगुप्त (सनपूर्व ३ रें शतक) एक प्रसिद्ध बौद्ध अर्हत्. दिव्यावदानांत याच्यासंबंधीं माहिती आहे. भिक्षु शाणकवासी हा त्याचा गुरु होता. हा शाणकवासी एका सुगंधी व्यापाऱ्याकडे भिक्षा मागण्यासाठीं जात असे. एक दिवस तो कोणाहि शिष्याला बरोबर न घेतां त्या व्यापाऱ्याच्या घरीं गेला. तेव्हा व्यापाऱ्याने त्याला आपला एक पुत्र शिष्य म्हणून देण्याचें मान्य केलें. व्यापाऱ्याला कालांतराने दोन पुत्र झाले. परंतु त्या दोन्ही पुत्रांच्या बाबतींत व्यापाऱ्याने आपलें वचन पाळण्याची टाळाटाळ केली. आपला तिसरा पुत्र उपगुप्त हा मोठा झाल्यावर मात्र त्याने त्याला बौद्ध धर्माची दीक्षा देण्याचें ठरविलें.

पुढे उपगुप्ताच्या ऐन उमेदीच्या वयांत मथुरेची वासवदत्ता नांवाची एक वारांगना त्याच्यावर मोहित झाली व तिने एक दिवस त्याला आपल्या भेटीसाठी बोलाविलें. पण उपगुप्ताने तिला निरोप पाठविला, की योग्य वेळीं मी तुझी भेट घेईन. पुढे मथुरेच्या राजाने वासवदत्तेच्या कांहीं अपराधाबद्दल तिचे

नाक-कान कापून तिला स्मशानांत नेऊन टाकलें. त्या वेळीं मात्र उपगुप्ताने तिची भेट घेतली व तिच्यापुढे मानवी शरिराच्या क्षणभंगुरतेचें वर्णन करून तिला चार आर्य सत्यांचा उपदेश केला. तिला उपदेश केल्यामुळे उपगुप्तालाहि अनागामी अवस्था प्राप्त झाली. या घटनेनंतर शाणकवासीने त्याला आपल्या विहारांत बौद्ध धर्माची दीक्षा दिली व पुढे तो अर्हत् अनला.

उपगुप्त हा सम्राट् अशोकाचा गुरु होता, असें स्मिथने म्हटलें आहे. उपगुप्ताने अशोकाला बुद्धाच्या जीवनांतील महत्त्वाचीं स्थळें दाखविलीं व अशोकाने त्या ठिकाणीं बुद्धाचीं स्मारकें उभारलीं.

उपगुप्ताचे पुष्कळ शिष्य होते. त्यांपैकी कित्येक अर्हत्-पदाला पोचले. त्याच्या अर्हत्पदीं पोचलेल्या शिष्यांकडून त्याला जे काष्ठदंड मिळाले, त्यांनी एक मोठी थोरली गुंफा भरून गेली, असें सांगतात. पुढे त्याच काष्ठांनी त्याची चिता रचण्यांत आली. बौद्ध धर्मांतील सर्वास्तिवाद संप्रदायांत उपगुप्ताचें स्थान वरच्या दर्जाचें मानतात. [उ. प्र. बौ. ध. वि.]

उपचार सेवा, पूजा, आदर, आराधना, आतिथ्य, असे उपचाराचे अनेक अर्थ आहेत. फल, पुष्प इ. पूजा-साधनांचाहि उपचारांत अंतर्भाव होतो. नित्याची आणि व्रतांतली देवपूजा सामान्यतः सोळा उपचारांनी करतात. तिला षोडशोपचारपूजा असें म्हणतात. क्वचित् दहा किंवा पांच उपचारांनीहि पूजा करतात. सनत्कुमारतंत्रांत इष्टदेवतेची पूजा सोळा, दहा किंवा पांच उपचारांनी करावी, असें सांगितलें आहे. शारदातिलकाचा तांत्रिक टीकाकार राघवभट्ट हा पूजेच्या उपचारांचे अडतीस, सोळा, बारा, दहा व पांच इतके पर्याय सांगतो.

अडतीस उपचार– आसन, आवाहन, उपस्थिति, सान्निध्य, आभिमुख्य, स्थिरीकृति, प्रसादन, अर्घ्य, पाद्य, आचमन, मधुपर्क, पुनराचमन, स्नान, नीराजन, वस्त्र, वस्त्रोत्तर आचमन, उपवीत, उपवीतोत्तर आचमन, भूषण, दर्पणावलोकन, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, पानीय, पानीयोत्तर आचमन, हस्तवास, तांबूल, अनुलेपन, गीत, वाद्य, नृत्य, स्तुति, प्रदक्षिणा, नमस्कार, मंत्र-पुष्प व पुनर्नमस्कार असे हे अडतीस उपचार होत.

छत्तीस उपचार– निबंधतंत्राच्या ५५ व्या पटलांत पुढील छत्तीस उपचार दिले आहेत– आसन, दंतकाष्ठ, उद्वर्तन, त्रिरूक्षण, संमार्जन, अभ्यंजन, स्नान (घृताचें), आवाहन, पाद्य, अर्घ्य, आचमनीय, स्नानीय, मधुपर्क, आचमनीय, नमस्कार, नृत्य, गीत, वाद्य, स्तुति, होम, प्रदक्षिणा, दर्पणदर्शन, चामर-व्यजन, शय्या, अनुलेपन, वस्त्र, अलंकार, उपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, बलिदान, तर्पण, आत्मसमर्पण व विसर्जन.

अठरा उपचार– फेत्कारिणी तंत्राच्या ३ ऱ्या पटलांत पुढील अठरा उपचार सांगितले आहेत– आसन, आवाहन, अर्घ्य, पाद्य, आचमनीय, स्नान, वस्त्र, उपवीत, भूषण, गंध, पुष्प, धूप, दीप, अन्न, तर्पण, माल्य, अनुलेपन, व नमस्कार.

सोळा उपचार– नित्य पूजेंतले सोळा उपचार पुढीलप्रमाणे-आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमनीय, स्नान (अभ्यंग, पंचामृत इ.), वस्त्र, उपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, मंत्रपुष्प, प्रदक्षिणा व नमस्कार.

बारा उपचार– स्वतंत्रतंत्रांत हे पुढीलप्रमाणें सांगितले आहेत– अर्घ्य, पाद्य, आचमनीय, मधुपर्क, आचमन, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, प्रदक्षिणा व नमस्कार.

दहा उपचार– कालीतंत्रांत हे पुढीलप्रमाणे सांगितले आहेत– अर्घ्य, पाद्य, आचमनीय, मधुपर्क, आचमन, गंध, पुष्प, धूप, दीप व नैवेद्य.

सात उपचार –प्रयोगसारांत हे पुढीलप्रमाणे सांगितले आहेत–अर्घ्य, गंध, पुष्प, अक्षता, धूप, दीप, व नैवेद्य.

पांच उपचार–निबंधतंत्राच्या ५५ व्या पटलांत हे पुढील-प्रमाणे सांगितले आहेत– गंध, पुष्प, धूप, दीप व नैवेद्य (सायंकाळीं धूपारतीच्या वेळची पूजा पंचोपचार असते.)

तीन उपचार –गंध, पुष्प, व नैवेद्य.

वर दिलेल्या ३८ उपचारांनी केलेली पूजा ही श्रेष्ठ होय. ज्याला शक्य असेल, त्याने या उपचारांत कमीपणा करूं नये. **पाहा–** पूजा. [प्रि. तं.]

उपदेश गुरूने शिष्याला तत्त्वज्ञान सांगणें, दीक्षा देणें किंवा मंत्र सांगणें याला उपदेश असें म्हणतात.

चन्द्रसूर्यग्रहे तीर्थे सिद्धक्षेत्रे शिवालये ।
मन्त्रमात्रप्रकथनमुपदेशः स उच्यते ॥

(रामार्चनचंद्रिका)

अर्थ– चंद्र-सूर्यांच्या ग्रहणांत, तीर्थांच्या ठिकाणीं, सिद्धक्षेत्रांत (व) शिवालयांत (गुरु) मंत्र सांगतो, त्याला उपदेश म्हणतात.

आप्ताने (जाणत्या, वडीलधाऱ्या माणसाने) शिष्याला, लहानाला किंवा अजाण माणसाला हितवाक्य सांगणें यालाहि उपदेश म्हणतात. उपदेशाने गुरु-शिष्यसंबंध निर्धारित होतो. गुरूकडून शिष्याला विशिष्ट संप्रदायाची दीक्षा मिळणें, यालाहि उपदेशच मानतात.

व्याकरणांत आद्योच्चारणाला उपदेश म्हटलें आहे. मीमांसक, अपेक्षित अर्थाचा प्रतिपादक ठरणाऱ्या ग्रंथसंदर्भाला

उपदेश समजतात (न्या. को.).

अध्ययन समाप्त झाल्यावर स्नातकाला गुरूकडून मिळणारा सामान्य उपदेश पुढीलप्रमाणे असतो---

सत्यं वद। धर्मं चर। स्वाध्यायान्मा प्रमदः। आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः। सत्यान्न प्रमदितव्यम्। धर्मान्न प्रमदितव्यम्। कुशलान्न प्रमदितव्यम्। भूत्यै न प्रमदितव्यम्। स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्। देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम्। मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। अतिथिदेवो भव। यान्यनवद्यानि कर्माणि। तानि सेवितव्यानि। नो इतराणि।.........एष उपदेशः।

(तै. उप. शिक्षावल्ली)

अर्थ— सत्य बोल. धर्माचें आचरण कर. स्वाध्याय (वेदांचें अध्ययन) सोडूं नको. आचार्याला (गुरुदक्षिणारूप) प्रियधन देऊन प्रजातंतु विच्छिन्न होऊं देऊं नको. गृहस्थाश्रमाचा स्वीकार कर. सत्याला चुकूं नको. धर्माचरणाच्या कामीं प्रमाद होऊं देऊं नको. प्रावीण्यापासून च्युत होऊं नको. ऐश्वर्यापासून च्युत होऊं नको. स्वाध्याय आणि प्रवचन (अध्यापन) यांना सोडूं नको. देव आणि पितर यांचीं कार्यें वेळच्या वेळीं कर. मातेला देवता मान. पित्याला देव मान. आचार्याला देव मान. अतिथीला देव मान. जीं स्तुत्य कर्में असतील, तीं कर. निंद्य कर्में आचरूं नको.... हा (तुला माझा) उपदेश आहे.

उपदेशरसायनरास

जिनदत्त सूरीचें (१०७६–११५४ इ. स.) अपभ्रंश भाषेंतील एक काव्य. जिनदत्त हा जिनवल्लभ सूरीचा शिष्य होता. तो संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश या भाषांचा पंडित असून या तीन्ही भाषांत त्याने ग्रंथरचना केली आहे. उपदेशरसायनरासाशिवाय त्याच्या कालस्वरूपकुलक व चर्चरी या दोन रचना प्रसिद्ध आहेत.

उपदेशरसायनरास या ग्रंथांत ८० पद्यें आहेत. त्यांतील काव्याचा एक नमुना असा —

धम्मिउ धम्मुकज्जु साहंतउ।
परु मारई किवई ज्झंतउ।
तुवि तसु धम्मु अत्थिन हु नासइ।
परमपइ निपसइ सो सासइ।

अर्थ---एखादा धार्मिक कार्य करीत असतां त्याच्या मार्गांत अडथळे आणणाऱ्याचा पाडाव करणें, हें सुद्धां त्याचें धर्मकार्यच होतें. व तें करणाऱ्यास शाश्वत परमपदाचा लाभ होतो. [अपभ्रंश साहित्य]

उपद्रष्टा

यज्ञकर्मांतला साक्षीपुरुष. ऋत्विज व यजमान हे यजनकर्मांत व्यापृत असतां स्वतः अव्यापृतपणे जवळ राहून जो त्या यजनकार्यांतले गुणदोष पाहतो, त्याला उपद्रष्टा म्हटलें आहे. परमात्म्यालाहि त्याच्या साक्षित्वामुळे उपद्रष्टा म्हणतात (गीता १३. २२).

उपनयन

कुमाराचा एक प्रमुख संस्कार. याला मौंजीबंधन व व्रतबंध अशींहि नांवें आहेत. उपनयनाची व्याख्या अशी —

गृह्योक्तकर्मणा येन समीपं नीयते गुरोः।
बालो वेदाय तद्योगाद्बालस्योपनयं विदुः।।

अर्थ—ज्या गृह्यसूत्रोक्त कर्माने बालाला वेदाध्ययनासाठी गुरूजवळ नेलें जातें, त्याला उपनयन असें म्हणतात.

मौंजीबंधन हा शब्द, या संस्कारांत बटूच्या कमरेंत मुंजतृणाची मेखला बांधतात, त्यावरून आला आहे. व्रतबंध याचा अर्थ ब्रह्मचर्यासाठीं बटूला विशिष्ट नियमांनी बद्ध करणें, असा होतो.

उपनयन संस्कार किती प्राचीन आहे, तें निश्चितपणे सांगतां येत नाही. पारशी लोकांत नवजोत नांवाचा एक उपनयनासारखाच संस्कार आहे. उपनयनाने मुलाला दुसरा जन्म मिळतो अशी जी हिंदूंत धारणा आहे, तीच नवजोतविषयीं पारश्यांचीहि आहे. त्यावरून एवढें म्हणतां येतें, की भारतीय आर्य व इराणी आर्य हे जेव्हा एकत्र राहत होते, त्या काळांत या संस्काराचा उगम झाला असावा.

धार्मिक विद्यांचें अध्ययन या अर्थी ब्रह्मचर्य या शब्दाचा प्रयोग ऋग्वेदांत आढळतो (१०. १०९. ५). वैदिक कालांत छात्राला ब्रह्मचारी व अध्यापकाला आचार्य म्हणत. हाच आशय अथर्ववेदाच्या पुढील मंत्रांत सांगितला आहे—

आचार्य उपनयमानो
ब्रह्मचारिणं कृणुते गर्भमन्तः।
तं रात्रीस्तिस्त्र उदरे बिभर्ति
तं जातं द्रष्टुमभिसंयन्ति देवाः।।

(११. ५. ३)

अर्थ—उपनयन करणारा आचार्य ब्रह्मचाऱ्याला गर्भांत धारण करतो. तो तीन रात्रीं त्याला उदरांत रक्षितो. जेव्हा तो जन्म (द्वितीय) ग्रहण करतो, तेव्हा देव त्याच्या दर्शनासाठी येतात.

ब्राह्मणकालांत उपनयनाचा विधि हळूहळू निश्चित होऊं लागला होता. गृह्यसूत्रांच्या कालांत तो तपशीलवार निश्चित होऊन त्या संस्काराला प्रतिष्ठा प्राप्त झाली. समस्त गृह्य-

सूत्रांनी बटूच्या द्विजत्वप्राप्तीसाठी उपनयन संस्कार आवश्यक मानला असून त्यासंबंधींचे नियम विस्तारपूर्वक दिले आहेत.

उपनयनसंस्थेच्या प्रदीर्घ इतिहासांत उपनयनविषयक धारणांमध्ये अनेक परिवर्तनें झालेलीं दिसतात. अथर्ववेदांत ब्रह्मचाऱ्याचें आचार्यद्वारा ग्रहण या अर्थी तो शब्द आला आहे. ब्राह्मणकालांतहि उपनयनाचा हाच अर्थ समजला जात होता. सूत्रकालांत बटूने ब्रह्मचर्यासाठी आचार्याची प्रार्थना करणें व आचार्याने त्यासाठी बटूचा स्वीकार करणें हाच उपनयनसंस्काराचा केंद्रबिंदु होता. पण पुढच्या काळांत उपनयनाचा रहस्यात्मक अर्थ करण्याची प्रवृत्ति वाढली व गायत्री मंत्राच्या द्वारें बटूला द्वितीयजन्माची प्राप्ति होते, या धारणेने ब्रह्मचर्यदीक्षेच्या मूळ कल्पनेवर आवरण पडलें. मनु म्हणतो—

तत्र यद् ब्रह्मजन्मास्य मौञ्जीबन्धनचिह्नितम् ।
तत्रास्य माता सावित्री पिता त्वाचार्य उच्यते ।।

(२. १७०)

अर्थ——ब्रह्मचाऱ्याचा दुसरा जन्म (ब्रह्मजन्म) हा मौञ्जीबंधनाने चिह्नित असतो. त्याचें प्रतीक मुंजमेखला धारण करणें, हें असतें. सावित्री ही त्याची माता व आचार्य हा पिता असें सांगितलें जातें.

याज्ञवल्क्याचा टीकाकार अपरार्क लिहितो, की उपनयन शब्दाने छात्र व गायत्री मंत्र यांच्यामधला संपर्क अभिप्रेत असून आचार्यांच्या द्वारें तो संपर्क प्रस्थापित होतो (याज्ञ. स्मृ. १. १४ अपरार्काची व्याख्या).

कोणत्या वर्षी बालकाचा उपनयन संस्कार करावा, हा प्रश्न या विषयांत महत्त्वाचा होता. आश्व. गृह्यसूत्र सांगतें, की ब्राह्मणाचें उपनयन ८ व्या वर्षी, क्षत्रियाचें ११ व्या वर्षी व वैश्याचें १२ व्या वर्षी करावें (१. १९). त्रैवर्णिकांत ही वयाची भिन्नता कां सांगितली, याविषयीं अनेकांनी अनेक तर्क केले आहेत. कित्येक विद्वान् या भेदकल्पनेंत ब्राह्मणांचा दंभ समजतात (केई-एन्शंट इंडियन एज्युकेशन पृ. २९).

पण या भेदाला कांही व्यावहारिक आधारहि सांपडण्याजोगा आहे. अतिप्राचीन काळीं ब्राह्मण पिता हा आपल्या मुलांचा आचार्यहि होऊं शकत होता. तोच त्याचें उपनयन करी. त्यामुळे ८ व्या वर्षी म्हणजे इतक्या कमी वयांत तो संस्कार करणें, गैरसोयीचें वाटत नव्हतें; कारण त्या मुलाला विद्याभ्यासासाठी गृहत्याग करावा लागत नसे. क्षत्रिय व वैश्य यांची स्थिति याहून वेगळी होती. त्यांच्या मुलांना अध्ययनासाठी आईबापांना सोडून गुरुगृहीं दूर जावें लागे. त्यामुळे आठव्या वर्षीच मुलाला आपल्यापासून तोडणें आईबापांना जड जात असे. म्हणून त्यांच्या सोयीसाठी धर्मशास्त्रकारांनी क्षत्रिय-वैश्यांच्या उपनयनाचें वय वाढवून दिलें असण्याची शक्यता आहे. या बाबतींत मनूने आणखी एक विकल्प सांगितला आहे —

ब्रह्मवर्चसाच्या प्राप्तीसाठी ब्राह्मण कुमाराचें उपनयन पांचव्या वर्षी, बलप्राप्तीसाठी क्षत्रियाचें उपनयन सहाव्या वर्षी व ऐश्वर्यप्राप्तीसाठी वैश्याचें उपनयन आठव्या वर्षी करावें (२. ३७). विभिन्न गुणांसाठी अशा प्रकारचे विकल्प बौधायनानेहि सांगितले आहेत; पण ते आपाततः काल्पनिकच वाटतात.

उपनयन संस्काराची अखेरची वर्षमर्यादा ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांना अनुक्रमे १६, २२ व २४ अशी मानलेली आहे (पार. गृ. सू. २. ५. ३६–३८). पण जेव्हा उपनयनाला एक शारीरिक संस्कार असें स्वरूप प्राप्त झालें, तेव्हा कितीहि विलंब होवो, उपनयन हें लग्नाआधी कधी तरी केलेंच पाहिजे, असें मानलें जाऊं लागलें. इतके विकल्प असूनहि ज्यांचें उपनयन होत नसे, ते पतित समजले जात. त्यांच्यावर धार्मिक बहिष्कार घातला जाई. ते संस्कारहीन म्हणूनच व्रात्य ठरत.

सूत्रकालाच्या पूर्वी प्रत्येक कुमाराचें उपनयन केलेंच पाहिजे, असा निर्बंध नव्हता. तो एक ऐच्छिक संस्कार होता. तो संस्कार केवळ सुसंस्कृत कुळें व पुरोहितवर्ग एवढ्यापुरताच मर्यादित होता. अध्ययनाची आवड असलेला कोणीहि कुमार वा तरुण गुरूकडे जाऊन स्वतःचें उपनयन करीत असे. उपनिषत्कालाच्या शेवटीं कधीतरी तो अनिवार्य मानला जाऊं लागला. या अनिवार्यतेच्या मुळाशीं एक सांस्कृतिक कारण होतें. कोणत्याहि प्रगतिशील समाजांत शिक्षण हें आवश्यक मानलें जातें. वैदिक समाज हा प्रगतिशील होता. त्याने ठरविलें, की प्रत्येक मुलाने आपल्या जीवनाचा कांही भाग गुरुकुलांत किंवा कोणत्या तरी शिक्षणसंस्थेंत विद्यार्जनाच्या कामी सार्थकीं लावलाच पाहिजे. उपनिषत्कालाच्या अंतीं ज्ञानाच्या विविध शाखा विकसित होऊं लागल्या होत्या. त्या विद्यांचें रक्षण करणें व त्यांचा विस्तार करणें, हें एक पवित्र सामाजिक कर्तव्य त्या काळीं मानलें जात होतें. या ज्ञानासाठी ब्रह्मचारी बनायचें, तर बटु हा उपनयन संस्काराने पात्र व पवित्र झालाच पाहिजे, अशा प्रकारची धारणा होती. उपनयनाच्या सक्तीचें हें दुसरें कारण. आभिजात्य किंवा उच्चत्व हें शेवटचें कारण होय. विद्येची साधना होवो वा न होवो, ब्रह्मचर्य राहो वा न राहो, ज्या अर्थी माझ्या खांद्यावर यज्ञोपवीत आहे, त्या अर्थी बहुजनसमाजापेक्षा मी वेगळा आणि उच्च आहें, ही भावना उपनयन संस्काराने निर्माण केली व जोपासली. संपूर्ण अभिजातवर्ग केवळ या यज्ञोपवीतामुळेच स्वतःला द्विज

म्हणवून घेऊं लागला. आणि अशा प्रकारें उपनयन संस्कार अपरिहार्य ठरल्यावर लोक त्याचें मूळ प्रयोजन विसरले.

प्राचीन काळीं उपनयन हा विद्यासंस्कार होता व त्यामुळेच अध्ययनाला अयोग्य अशा कुमारांना उपनयनाचा अधिकारहि नव्हता. पण जेव्हा हा संस्कार एक दैहिक संस्कार या रूपांत परिवर्तित झाला, तेव्हा मुके, बहिरे व आंधळे यांचेंहि उपनयन केलेंच पाहिजे, असें मानलें जाऊं लागलें. जोंवर त्रैवर्णिकांवर वैदिक धर्माचें कडक नियंत्रण होतें, तोंवर त्या समाजांत उपनयन अनिवार्यपणे चालू राहिलें. पण मध्ययुगांत भारतावर एकाहून एक अधिक प्रखर अशीं मुसलमानी आक्रमणें होऊं लागलीं. हिंदुधर्मावर आकाशींची कुऱ्हाड कोसळली. हिंदूंचें धार्मिक जीवन संकटांत सांपडून विस्कळितहि झालें. क्षत्रिय व वैश्य हा समाजांतला वर्ग आपल्या मूळ व्यवसायापासून च्युत होऊन साधारण शेतकरी या अवस्थेला प्राप्त झाला. त्यामुळे कालांतराने असें मत प्रचलित झालें, की 'कलावाद्यन्तयो: स्थिति: '= कलियुगांत ब्राह्मण व शूद्र असे दोन वर्णच आहेत. परंतु हें मत सार्वत्रिक स्वरूपांत मान्य होऊं शकलें नाही. अनेक प्रदेशांतल्या बहुतेक क्षत्रिय-वैश्यांनी उपनयन संस्काराचा मात्र त्याग केला.

प्रारंभी उपनयन संस्कार अत्यंत साधा होता. ब्राह्मणकुलांत वेदाध्ययन पिढ्यान् पिढ्या चालत होते. बाप हाच मुलाचा गुरु होत होता. उपनिषत्कालांतील आचार्यत्व हें पित्याकडेच असे, हें बृहदारण्यकांतल्या एका उल्लेखावरूनहि कळून येतें (५. २. १.). उपनिषदांतून उपनयनाचीं जीं अनेक उदाहरणें आढळतात, तीं पाहिल्यावर त्या संस्काराचा साधेपणा व सुटसुटीतपणा कळून येतो. विद्यार्थी हातीं समिधा घेऊन गुरूकडे जाई व गुरू त्याचें कुलगोत्र विचारून शिष्य या नात्याने त्याचा स्वीकार करी. तिथून त्या विद्यार्थ्याचें अध्ययन सुरू होई. पुढे हळूहळू त्यांत कर्मकांड शिरलें व त्याच्या अनेक अंगांचा विकास झाला. उपनयनाच्या या संपूर्ण विकसित स्वरूपाचें विशद वर्णन गृह्यसूत्रें करतात. उपनयनाचा असा विस्तार होत असतां त्यात अवैदिक अर्थात् लौकिक विधीहि समाविष्ट केले गेले.

प्राचीन काळीं मुलींचेंहि उपनयन करण्याची चाल होती. कूर्मपुराणांत तसा उल्लेख आहे–

पुराकल्पे हि नारीणां मौञ्जीबन्धनमीरितम्

अर्थ–पूर्वीच्या कल्पांत स्त्रियांचें मौंजीबंधन सांगितलें आहे.

बाप, चुलता वा भाऊ मुलींना विद्यादान करी. अन्य पुरुषाला मात्र त्या कामीं मनाई असे. ब्रह्मचारिणी मुलगी स्वगृहांतच भिक्षा मागे. स्त्रियांचें उपनयन अमंत्रक करीत, असें मनु सांगतो. (२. ६६). यावरून मनूच्या काळींच ही प्रथा हळूहळू लोपत चालली असावी, असें वाटतें.

पुढच्या काळांत कन्येचें वराकडून होणारें पाणिग्रहण हाच कन्येचा मुख्य संस्कार मानला गेला. संस्काररत्नमालेच्या उपनयनप्रकरणांत हारीत स्मृतींतल्या वचनाला धरून स्त्रियांचे दोन प्रकार सांगितले आहेत— (१) ब्रह्मवादिनी–ब्रह्मतत्त्वाचें अध्ययन करूं इच्छिणारी ती ब्रह्मवादिनी. तिचें उपनयन करून तिला वेदाध्ययन करूं द्यावें व (२) सद्योवधू–संसाराची इच्छा बाळगणारी असेल ती सद्योवधू. तिचें उपनयन करून लगेच तिचा विवाह करावा, असें सांगितलें आहे. आर्यसमाजी लोक आजहि मुलींचें उपनयन करतात.

शुभमुहूर्तादि– माघामासून ज्येष्ठापर्यंतचे पांच महिने, शुक्लपक्ष (वद्यपक्षांत फक्त पंचमीपर्यंत), हस्त, चित्रा, स्वाती, पुष्य, धनिष्ठा, अश्विनी, मृगशीर्ष, पुनर्वसू, श्रवण व रेवती हीं नक्षत्रें व गुरु, शुक्र, बुध हे वार, अशी दिनशुद्धि उपनयनला उत्तम आहे.

गुरुबल–गुरु हा ज्ञानदाता ग्रह मानलेला आहे. उपनयनाला त्याचें आनुकूल्य पाहावें लागतें. यालाच गुरुबल असें म्हणतात. मुलाच्या जन्मराशीवरून गुरु २, ५, ७, ९ व ११ या राशींत असेल, तर मुलाला गुरुबल लाभतें, असें मानतात. ६, ३, १, १० या राशींत असेल, तर गुरुबल नाही; पण गुरूची पूजा करून उपनयन करायला हरकत नाही, असा मध्यमपक्ष मानलेला आहे. ४, ८ व १२ या ठिकाणीं गुरु असल्यास गुरुबळ लाभत नाही, अतएव उपनयन करूं नये, असें सांगितलें आहे.

उपनयनप्रयोग–उपनयन संस्काराचें विधान सर्व गृह्यसूत्रकारांनी सांगितलें आहे. मुलाचें उपनयन करण्याचा पहिला अधिकार बापाचा मानलेला आहे. तो नसेल, तर कुलांतल्या अन्य कोण्यातरी पुरुषाने उपनयन करावें. उपनयन केल्यानंतर त्या कुमाराला वेदांचें अध्यापन करण्याचें सामर्थ्य कर्त्याला असलें पाहिजे, असें मानलें आहे. उपनयनांत गायत्री मंत्राचा उपदेश हा एक प्रमुख विधि आहे. या मंत्रोपदेशाची पात्रता येण्यासाठी कर्त्याने अनुष्ठान करावें, असेंहि सांगितलें आहे. मुलाचे उपनयनाच्या पूर्वीचे संस्कार झालेले नसल्यास ते या वेळीं करावे लागतात अथवा ते न केल्याबद्दल प्रायश्चित्तविधि करून मग उपनयन करतात.

मुलाला वेदाध्ययनाचा अधिकार प्राप्त होवो आणि त्याला द्विजत्व मिळो, असा कर्ता प्रथम संकल्प करतो. मग गणपतिपूजन, पुण्याहवाचन व मंडपदेवतांची प्रतिष्ठा केली जाते. मग कुमारास भोजन घालतात. हें भोजन त्याने आपल्या

आईबरोबर करायचें असते. याला मातृभोजन असें म्हणतात. भोजनानंतर मुलाचें वपन करून त्याला शेंडी ठेवतात. मग त्याला मंगलस्नान घालून त्याच्या कपाळीं कुंकुमतिलक लावतात. व डोक्याला मुंडावळ्या बांधतात. अशाप्रकारें मुलगा विभूषित होऊन मंडपांत आल्यावर लगेच त्याचें उपनयन करावें, असें ऋग्वेदीय ब्रह्मकर्मांत सांगितलें आहे. त्यासाठी कर्ता व कुमार यांच्या मध्ये अंतरपाट धरून पुरोहित व जमलेले लोक मंगलाष्टकें म्हणतात. कुमारास लंगोटी, कृष्णाजिन वगैरे दिल्यानंतर मंगलाष्टकें म्हणावीं, असें हिरण्यकेशी ब्रह्मकर्मांत सांगितलें आहे.

मग कर्ता कुमाराला आपल्या उजव्या बाजूस बसवून स्थंडिलावर अग्नीची स्थापना करून अन्वाधान करतो. आज्यसंस्कारापर्यंतचें कर्म केल्यावर कुमाराला ' युवं वस्त्राणि ...' या मंत्राने लंगोटी नेसवितो व शुभ्रवस्त्र पांघरायला देतो. ' मित्रस्य चक्षुः ...' या मंत्राने त्याला हरणाचें कातडें देऊन ' यज्ञोपवीतं परमं पवित्रम् ...' या मंत्राने यज्ञोपवीत घालायला देतो. मग आपल्या व अग्नीच्या मधून कुमाराला उत्तर बाजूस नेतो व त्याला आचमन करायला लावून पहिल्या जागीं आणून बसवितो. मग ' अग्न आयूंषि ...' इ. चार मंत्रांनी अग्नीला चार आज्याहुती देतो. हा या संस्कारांतला प्रधानहोम होय.

मग अवक्षारण विधि होतो. त्यासाठी प्रथम संकल्प करून कर्ता शुद्धोदकाने कुमाराची ओंजळ भरतो व स्वतःची पुरोहिताकडून भरवितो. ' तत्सवितुर्वृणीमहे. ... ' हा मंत्र म्हणून स्वतःच्या ओंजळींतील पाणी कुमाराच्या ओंजळींत ओततो व कुमार तें उदक आपल्या ओंजळींतून खाली सांडतो. कर्ता कुमाराचा उजवा हात अंगठ्यासह आपल्या उजव्या हाताने धरून ' देवस्य... हस्तं गृह्णामि ' हा मंत्र म्हणतो. असें हे अवक्षारण तीनदा करायचें असतें. तीन्ही वेळचे मंत्र वेगवेगळे असतात.

त्यानंतर कर्ता ' अग्निराचार्यस्तव ...' हा मंत्र म्हणून कुमाराचा हात धरतो. ' देव सवितः ... ' या मंत्राने कुमाराला सूर्यदर्शन करवितो. आपण प्राङ्मुख उभा राहून कुमाराला समोर उभा करतो. ' कस्य ब्रह्मचार्यसि ...' हा मंत्र म्हणतो. कुमाराच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवतो.

मग कुमार अग्नीला समिधा देऊन उपस्थान करतो. कुमार कर्त्याला अभिमुख होऊन उजवा गुडघा भूमीवर टेकवितो व दोन्ही हातांनी दोन्ही कानांस स्पर्श करून मग कर्त्याच्या दोन्ही पायांना गुडघ्यापासून पावलांपर्यंत स्पर्श करतो. स्वतःच्या गोत्रप्रवराचा व आपल्या नक्षत्रनामाचा उच्चार करून कर्त्याला अभिवादन करतो. कर्ता त्याला दीर्घायुष्याचा आशीर्वाद देतो.

त्यानंतर गायत्रीचा उपदेश होतो. कुमार कर्त्याच्या शेजारीं उजव्या मांडीवर ब्रह्मांजलि ठेवून बसतो. कर्ता त्याचे दोन्ही हात वस्त्राने झाकतो. नंतर त्याला गायत्रीचा उपदेश करतो. प्रथम मंत्राचा चरण, नंतर अर्धी ऋचा व नंतर संपूर्ण मंत्र अशा क्रमाने व्याहृतिपूर्वक मंत्र शिकवून तो कुमाराकडून म्हणवून घेतो. मग त्याच्या हृदयाला दोन्ही हातांनी स्पर्श करून पुढील मंत्र म्हणतो –

मम व्रते हृदयं ते दधामि ।
मम चित्तमनुचित्तं ते अस्तु ।
मम वाचमेकव्रतो जुषस्व ।
बृहस्पतिष्ट्वा नियुनक्तु मह्यम् ।

अर्थ – माझ्या व्रताच्या ठिकाणीं मी तुझें हृदय ठेवतों. तुझें चित्त माझ्या चित्ताला अनुकूल असो. तूं एकव्रत होऊन माझ्या वाणीचें सेवन कर. बृहस्पति तुझ्यासाठी माझी नियुक्ति करो.

नंतर कुमाराच्या कमरेंत मुंजतृणाची तिपेडी मेखला बांधतो. ब्राह्मण कुमाराला मुंजतृणाची, क्षत्रियाला धनुष्याच्या दोरीची व वैश्याला शण नांवाच्या वनस्पतीची मेखला करावी, असें मनु सांगतो (२.४२). मग कुमाराच्या हातीं दंड देतो. ब्राह्मणकुमाराचा दंड पळसाचा व मस्तकाच्या केसांना लागेल इतक्या उंचीचा असावा, तसेंच क्षत्रियाचा दंड औदुंबराचा व ललाटाइतक्या उंचीचा असावा आणि वैश्याचा दंड बेलाचा व हृदयाइतक्या उंचीचा असावा, असें आश्व. गृह्यसूत्रांत सांगितलें आहे. कर्ता कुमाराला ब्रह्मचर्याश्रमासंबंधीं आचारांचा उपदेश करतो, तो असा –

' तूं ब्रह्मचारी आहेस. लघुशंका, शौच इ. झाल्यावर आचमन करीत जा. संध्या, अग्निकार्य इ. नियमित वेळीं कर. दिवसा झोप घेऊं नको. आचार्याच्या आज्ञेंत राहून वेदाध्ययन कर. इथून पुढे बारा वर्षेपर्यंत अथवा वेदाध्ययन संपेपर्यंत ब्रह्मचर्य पाळायचें आहे, हें ध्यानांत ठेव. सांजसकाळ भिक्षा मागत जा. सांजसकाळ अग्नीला समिधा देत जा. भिक्षा घालण्याची नाकारणार नाही, अशा पुरुषाकडे किंवा स्त्रीकडे प्रथम भिक्षेला जा. आधी आईकडे जा किंवा बापाकडे जा. '

हा उपदेश झाल्यावर कर्ता स्विष्टकृत् होमापासून पुढचीं अग्निमुखासंबंधीचीं सर्व कर्में संपवितो. मग ब्रह्मचारी कुमार दंड व भिक्षापात्र हातीं घेऊन प्रथम मातेकडे जातो व ' भवति भिक्षां ददातु ' असें म्हणून भिक्षा मागतो. भिक्षेंत तांदूळ अथवा जें कांही मिळेल, तें गुरूच्या स्वाधीन करतो. ब्रह्म-

चाऱ्याने सूर्यास्त होईपर्यंत मौन धरून उभे राहायचें असतें. मग ब्राह्मणांना भोजन घातलें जातें. एवढें झाल्यावर हा उपनयनाचा विधि समाप्त होतो.

उपनयनाच्या दिवशींच सायंकाळीं अनुप्रवचनीय होम करावा, असें आश्व. गृह्यसूत्रांत सांगितलें आहे (१.२२.१०). त्यासाठी अग्नि प्रज्वलित करून त्यावर चरु शिजवितात. सदसस्पति, सविता व ऋषि या देवतांसाठी त्या चरूच्या आहुती देतात. त्या चरूचें नांव ब्रह्मौदन असें असतें. त्याचेंच ब्राह्मणांना भोजन घालतात.

त्रिरात्रव्रत – उपनयनविधि पुरा झाल्यावर ब्रह्मचाऱ्याला तीन दिवसपर्यंत कठोर संयमाचें व्रत पाळावें लागतें. त्याला त्रिरात्र व्रत म्हणत. क्वचित् त्याचा काळ १२ दिवस किंवा १ वर्ष एवढाहि असे. विद्यार्थिजीवनांतल्या कठोर व्रतपालनाचा हा प्रारंभ असे. त्याला जेवणांतलें आंबट तिखट वर्ज्य करावें लागे. दिवसा निजायचें नाही व रात्रौ जमिनीवर झोपायचें, असाहि नियम असे.

या व्रताच्या शेवटीं बुद्धि, धारणा व प्रज्ञा यांना तीक्ष्ण करण्यासाठी मेधाजनन नांवाचा विधि करतात. **पाहा** – गायत्री मंत्र; मेधाजनन. [ऋ. ब्र. क.; हिं. सं.]

उपनिषदें

संहिता व ब्राह्मणें या ग्रंथानंतर उपनिषदांचा क्रमांक येतो. प्राचीन भारतीय आर्यांचे तत्त्वज्ञानविषयक विचार उपनिषदांत ग्रथित झाले आहेत. 'सद्' या धातूला उप आणि नि हे उपसर्ग लागून उपनिषद् हा शब्द सिद्ध झाला आहे. सद् याचा अर्थ बसणें व उप या उपसर्गाचा अर्थ जवळ, यावरून उपनिषद् म्हणजे जवळ बसणे, असा त्या शब्दाचा धात्वर्थ होतो. अत्यंत भक्तिभावाने गुरूजवळ बसून शिष्य जी परमार्थविद्या गुरूकडून संपादन करतो, त्या विद्येला उपनिषद् असें म्हणतात.

कठोपनिषदावरील भाष्याच्या प्रारंभीं शंकराचार्यांनी उपनिषद् या शब्दातील 'सद्' धातूचे विशरण, गति व अवसादन असे तीन अर्थ दिले आहेत. विशरण म्हणजे विध्वंसन. ज्या विद्येमुळे मुमुक्षूच्या अविद्येचा विध्वंस होऊन त्याला पराविद्येची प्राप्ति होते, त्याला विध्वंसन म्हणावें. गति हा अर्थ ब्रह्माचें ज्ञान, अशा अर्थी सांगतां येतो. आणि अवसादन म्हणजे जन्म, जरा, मृत्यु या तापांचें ज्या विद्येमुळे निवारण होतें, ती विद्या होय. अशा प्रकारें शंकराचार्यांनी वरील शब्दाचा त्रिविध अर्थ सांगून त्या विद्येला 'अविद्याविध्वंसिनी ब्रह्मविद्या' असें म्हटलें आहे.

अशी हीं ब्रह्मविद्याप्रतिपादक उपनिषदें किती आहेत, हें नक्की सांगणें कठिण आहे. मुक्तिक उपनिषदाच्या कथनानुसार उपनिषदांची संख्या १०८ आहे. अन्य कोणी त्यांची संख्या २५० पर्यंत असल्याचें सांगतात. या २५० उपनिषदांत अल्लोपनिषद्, खंडोपनिषद् अशा अगदी अर्वाचीन उपनिषदांचीहि गणना होते. पण निरनिराळ्या आचार्यांनी आपापल्या भाष्यांत ज्या उपनिषदांचा वेळोवेळीं उल्लेख केला आहे, तींच उपनिषदें महत्त्वाचीं, प्राचीन व विश्वसनीय मानतात. शंकराचार्यांनी ज्या उपनिषदांवर भाष्य लिहिलें, तीं उपनिषदें सर्वांत महत्त्वाचीं समजतात. त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणे आहेत–

(१) ईश (२) केन (३) कठ (४) प्रश्न (५) मुंडक (६) मांडूक्य (७) तैत्तिरीय (८) ऐतरेय (९) छांदोग्य (१०) बृहदारण्यक आणि (११) नृसिंहपूर्वतापनी. (या प्रत्येक उपनिषदाचा परिचय त्या त्या नांवाखाली पाहावा.) याशिवाय शंकराचार्यांनी आणखी पांच सहा अन्य उपनिषदांचा उल्लेख आपल्या ग्रंथांतून केला आहे.

वैदिक वाङमयांत उपनिषदें हीं शेवटीं येतात, म्हणून त्यांना वेदान्त असेंहि म्हटलें आहे. शिवाय उपनषदें हीं वेदांचें ज्ञानकांड असल्यामुळे त्यांना ब्रह्मविद्या असेंहि नांव पडलें आहे. वेदान्ताचार्यांनी पुढच्या काळांत वेदान्तशास्त्र तीन प्रस्थानांत विभक्त केलें. तीं प्रस्थानें श्रुति, स्मृति आणि न्याय हीं होत. उपनिषद हें श्रुतिप्रस्थान, भगवद्गीता, सनत् सुजातसंहिता, इ. ग्रंथ हें स्मृतिप्रस्थान आणि ब्रह्मसूत्रादि ग्रंथ हें न्यायप्रस्थान होय.

कांही उपनिषदें मंत्रात्मक असून कांही गद्यात्मक आहेत. मंत्रात्मक उपनिषदांना मंत्रस्वर आणि गद्यात्मक उपनिषदांना ब्राह्मणस्वर असतात. तदनुसार त्यांचें अध्ययन केलें जातें.

उपनिषदें तत्त्वज्ञान उपदेशितात, म्हणून त्यांना ब्रह्मविद्या म्हटलें आहे. ब्रह्मविद्या हीच पराविद्या किंवा श्रेष्ठविद्या होय. ती मोक्षाचें एकमेव कारण आहे. उपनिषदांचे एकमात्र प्रतिपाद्य म्हणजे ब्रह्म ! हें ब्रह्म काय आहे ? त्याच्या ठिकाणीं विश्वाचा अध्यास कसा आणि कां होतो ? ब्रह्मप्राप्ति कोणत्या उपायाने होते ? आत्मा ही काय वस्तु आहे ? आणि ब्रह्मात्मैक्यज्ञानाचें रहस्य काय ? इ. विषयांचा विस्तृत आणि सूक्ष्म विचार उपनिषदांत आलेला आहे.

उपनिषदांचे मुख्यतः प्राचीन व अर्वाचीन असे दोन विभाग पडतात. ईश, केन, इ. दहा आणि श्वेताश्वतर, कौषीतकी व मैत्रेयी मिळून तेरा उपनिषदांचा पहिल्या विभागांत समावेश होतो. दुसऱ्या विभागांत बृहज्जाबाल, नारद, परिव्राजक, महानारायण, सुबाल इ. उपनिषदें येतात. सनपूर्व १२०० ते ६०० हा कालखंड उपनिषद्काल म्हणून मानतात. या काला-

नुरूपच त्यांचें पौर्वापर्य ठरविणें भाग आहे. बाह्य आणि अंत:स्थ अशा प्रमाणांचा विचार करून ग्रंथांचा कालानुक्रम ठरविण्याची पद्धती आहे. त्या दृष्टीने विचार करतां बृहदारण्यक व छांदोग्य हीं उपनिषदें सर्वांत प्राचीन आहेत, असें ठरतें. ईश व केन हीं उपनिषदें त्यानंतरचीं आणि समकालीन असावीं, असें वाटतें. ऐतरेय उपनिषद् हें जुनें असलें, तरी तें बृहदारण्यकाइतकें प्राचीन नसावें. तैत्तिरीय आणि कौषीतकी हीं दोन उपनिषदें ऐतरेयाला जवळचीं वाटतात. कठोपनिषदापेक्षा मुंडक अलिकडचें दिसतें. प्रश्नोपनिषद् हें सर्वांत अर्वाचीन होय. मैत्री उपनिषद् हें पौराणिक काळाच्या प्रारंभीं निर्माण झालें असावें. प्राचीन उपनिषदांमध्ये मांडूक्य उपनिषद हें सर्वांत शेवटचें ठरेल. याला धरून उपनिषदांचें पौर्वापर्य पुढीलप्रमाणे गटवारीने दाखवितां येईल —

(१) बृहदारण्यक व छांदोग्य.
(२) ईश व केन.
(३) ऐतरेय, तैत्तिरीय व कौषीतकी.
(४) कठ, मुंडक व श्वेताश्वतर.
(५) प्रश्न, मैत्री व मांडूक्य.

उपनिषदांत मुख्यत: तीन विषय प्रतिपादिले आहेत– धर्म, सृष्टि व अंतिम वस्तुतत्त्व म्हणजेच आत्मा किंवा परमात्मा. उपनिषदांनी आत्मा किंवा ब्रह्म हें अंतिम आणि शाश्वत मूल्य मानलें आहे. ब्रह्म हें अंतिम सत्य असून तें त्रिकालाबाधित आहे, हा उपनिषदांचा सिद्धान्त आहे. अंतिम वस्तुसत्याचें स्वरूप, पुरुष, आत्मा किंवा ब्रह्म या तीन कल्पना उपनिषद्पूर्व वेद वाङ्मयांत रुजून वाढीस लागल्या होत्या. त्यांचीच पूर्णता पुढे उपनिषदांत झाली. अंतिम वस्तुसत्याचें ज्ञान हेंच जीवाचें परमसाध्य, असें त्यांनी ठरविलें.

कस्मिन्नु खलु भगवो विज्ञाते
सर्वमिदं विज्ञातं भवति ।

(मुंड. १. १–३)

अर्थ — ज्याचें ज्ञान झालें असतां बाकी सर्व गोष्टीचें ज्ञान होतें, असें तत्त्व कोणतें ?

उपनिषद्कालीन तत्त्वज्ञांच्या पुढे हाच मुख्य प्रश्न होता. म्हणून अंतिम सत्याचा शोध घेण्यासाठी त्यांनी सृष्टींतील जड पदार्थांपासून शोध घ्यायला प्रारंभ केला. त्या अनुषंगानेच सृष्टिविषयक विचार उपनिषदांत झाला आहे. अंतिम सत्य हें जीवनाचें रहस्य असून तें अनुभवगम्यहि आहे. म्हणूनच जीवनाचा व विश्वाचा अर्थ किंवा कार्यकारणभाव उलगडून दाखविल्याने अंतिम सत्याचा आविष्कार होण्यास मदत होते. धर्म हें सत्यदर्शनाचें साधन आहे. श्रेयाची प्राप्ति त्यावरच अवलंबून असते. धर्म शब्दाने या ठिकाणीं यज्ञरूप कर्मकांड घ्यायचें नसून व्रतें, नियम व शमदमादि मोक्षसाधनें घ्यायचीं आहेत.

उपनिषदांतील व्यापक, शुद्ध आणि तात्त्विक कल्पनांचें मूळ पूर्वीच्या वेद वाङ्मयांत सांपडतें. वेदांत परमात्मविषयक कल्पना सुस्पष्टपणे आढळत नसली, तरी तिचें बीजारोपण ऋग्वेदांतील नासदीय सूक्तांत झालें आहे, असें दिसून येईल.

सृष्टीच्या प्रारंभीं सर्वत्र अंधकाराने वेष्टिलेला अंधकार होता. सर्व कांही अज्ञात व जलमय होतें. जें कांही सर्वव्यापी तत्त्व असेल तें अविद्यमान वस्तूने आच्छादिलेलें होतें. तपस्व्यांच्या प्रभावाने तिथेच एक तत्त्व उत्पन्न झालें. प्रकृततत्त्वाला कोण बरें जाणील ? कोण त्याचें वर्णन करील ? ही सृष्टि कोणत्या उपादानकारणांतून उत्पन्न झाली ? कोणत्या निमित्तकारणाने या विविध सृष्टी निर्माण झाल्या ? देवता सृष्टीच्या नंतरच निर्माण झाल्या काय ? हें सर्व या सृष्टीच्या परमधामांत वास्तव्य करणारा स्वामीच जाणत असेल. कदाचित् त्यालाहि हें ठाऊक असेल अथवा नसेल (ऋ. १०.१२९).

भारतीय तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी ऋग्वेदापर्यंत मागे जावें लागतें. उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचा वैचारिक कार्यकारणभाव समजून घेण्यासाठी चारी वेदांतील देवताविषयक व यज्ञविषयक विचारांचें परिशीलन करायला हवें. उपनिषदें ज्ञानकांडाचें प्रतिपादन करतात; पण वेदांतील कर्मकांडाचा ज्ञानकांडाशीं एकजीव सांधा कुठे झाला आहे, हें जर समजलें नाही, तर उपनिषदांतील ज्ञानकांड कसें प्रगट झालें, तें समजणें शक्य नाही.

वैदिक कल्पनांच्या पैकी धर्मदृष्टचा व तत्त्वदृष्टचा अत्यंत महत्त्वाच्या कल्पना म्हणजे पुरुष, आत्मा आणि ब्रह्म या होत. इथे पुरुष शब्दाने परमेश्वर घ्यायचा आहे. विश्वाचें अंतिम सत्य हें पुरुषसूक्तांत आणि तेंच पुढे उत्तम पुरुष या संज्ञेने छांदोग्यांत निर्दिष्ट केलेलें आहे. पुरुष हा अग्निरूप किंवा सूर्यरूप आहे, असें ऋग्वेदांत सांगितलें आहे. यजुर्वेदांत पुरुषरूप अग्नीसाठी अग्निचयन नामक विधि सांगितला आहे. अग्निचयनाशीं उपनिषदांचा संबंध फार निकटचा आहे. उपनिषदांतील हिरण्मय पुरुष प्रथम अग्निचयनांत उपलब्ध होतो. त्याची सुवर्णमूर्ति करून ती सोन्याच्या तबकडीवर स्थापन करावी, असें सांगितलें आहे (तै. सं. ५. २.७). हिरण्मय पुरुष म्हणजेच उपनिषदांतील परमात्मा होय. (पुरुष पाहा)

पुरुष या कल्पनेंतूनच आत्मा ही कल्पना निघाली. आत्मा हा शब्द पुरुष शब्दापेक्षा अधिक सूक्ष्म आणि निर्दोष आहे. विश्वसत्य पुरुषरूप आहे, या विचारांतूनच तो आत्मा आहे, हा विचार निष्पन्न झाला. कोणाचेंहि व्यक्तित्व अहम् (अस्मद्)

या संज्ञेने व्यक्त होतें. अहम् हा आत्मन् शब्दाचा पर्याय आहे. मनुष्य (पुरुष) स्वतःच्या जीवनशक्तीस आत्मा या दृष्टीनें निर्दिष्ट करतो. जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्था किंवा जन्म–मृत्युरूप अवस्था ज्यांत ओंवल्या आहेत, असें सूत्र म्हणजे आत्मा होय. म्हणून उपनिषदांत आत्मविचार हा अधिकाधिक सूक्ष्म होत गेला. विश्वसत्य आत्मा आहे, या सिद्धान्तापर्यंत उपनिषद्कालीन ऋषी येऊन ठेपले. (आत्मा पाहा)

आत्मकल्पनेइतकीच दार्शनिक दृष्टया अत्यंत महत्त्वाची कल्पना ब्रह्म ही आहे. आत्मकल्पना आदिपुरुषाच्या कल्पनेंतून निघाली, तर ब्रह्मकल्पना स्वतंत्रपणे परिणत झाली. ब्रह्मपदाचा ऋग्वेदांतील मूळ अर्थ 'देवाचा महिमा वर्णन करणारें काव्य', असा आहे. ब्रह्म शब्द वृह् धातूपासून बनला आहे. मोठें होणें, विस्तार पावणें, असा या धातूचा अर्थ आहे. त्यावरून देवांचा महिमा वर्णन करणारें काव्य या अर्थी ब्रह्म शब्द प्रथम रूढ झाला. ब्रह्म म्हणजे विश्वशक्तींचें किंवा त्यांचें नियमन करणाऱ्या देवतांचें स्तोत्र होय. या स्तोत्रांत अद्भुत सामर्थ्य भरलेलें आहे व तेंच विश्वशक्तींचेंहि जीवनभूत तत्त्व आहे, अशी भावना वैदिक ऋषींच्या मनांत भिनलेली होती. यांतूनच ब्रह्म शब्दाचा तात्त्विक, गहन व व्यापक अर्थ परिणत झाला. उपनिषदांत उदय पावलेल्या ब्रह्मविचाराचा उषःकाल अथर्ववेदांत प्रथम दिसूं लागतो. अथर्ववेदांत एक ब्रह्मसूक्त आहे. हें सूक्त सर्व विश्व ब्रह्ममय असल्याचें सविस्तरपणें सांगतें. उपनिषदांतील ब्रह्मविचाराचीं मुख्य बीजें चार असून ती अथर्ववेदाच्या ब्रह्मसूक्तांत निर्दिष्ट केलेलीं आढळतात–

(१) मनुष्य शरीर हें ब्रह्मपुर व त्यांत आत्म्याचा निवास.

पुण्डरीकं नवद्वारं त्रिभिर्गुणेभिरावृतम् ।
तस्मिन् यद्यक्षमात्मन्वत्तद्वै ब्रह्मविदो विदुः ।।

(अथर्व. १०. २. ३२.)

अर्थ–(मनुष्याचें) शरीर हें नवद्वार पुंडरीक व त्रिगुणांनी वेष्टिलेलें असें ब्रह्मपुर असून त्यांत आत्मवान् यक्ष (ब्रह्म) प्रविष्ट झाला आहे आणि त्याला ब्रह्मवेत्त्यांनी जाणलें आहे.

(२) ब्रह्म हें नियामक.

स्कम्भो दाधार द्यावापृथिवी ।

(अथर्व. १०.७.३५)

अर्थ– ब्रह्म हें स्कंभ म्हणजे द्यावा–पृथिवीची नियंत्रक शक्ति आहे.

(३) ब्रह्म हें सर्वांत ज्येष्ठ.

तदेव मन्येऽहं ज्येष्ठ ।

(अथर्व. १०.८.१६)

अर्थ—ब्रह्म हेंच सर्वांत ज्येष्ठ आहे, असें मी मानतों.

(४) ब्रह्म हें विश्वात्मक.

यो भूतं च भव्यं च सर्वं यश्चाधितिष्ठति ।

(अथर्व. १०.८.१)

अर्थ—तो आत्मा (किंवा ब्रह्म) भूत आणि भविष्य असून सर्वांचें अधिष्ठान आहे.

यावरून उपनिषदांच्याकडे अथर्ववेदाचें ऋण फार मोठें आहे, हें कळून येईल. उत्साह, स्फूर्ति, आनंद, स्वसंवेद्यत्व, आश्चर्यमय सामर्थ्य आणि स्वातंत्र्य हा उपनिषदांतील ब्रह्म शब्दाचा भावार्थ आहे. सर्वव्यापित्व किंवा विभुत्व हा त्याचा व्युत्पत्त्यर्थ आहे. म्हणून छांदोग्यांत त्याला भूमा असें म्हटलें आहे. स्वयंभू, सर्वात्मक चैतन्य हें त्याचें लक्षण होय. (ब्रह्म पाहा)

समृद्ध, सुखपूर्ण आणि उत्साहप्रद अशा वैदिक काळांतच वैदिक ऋषींच्या मनांत मोक्षाची अंधुकशी कल्पना स्फुरण पावली. तिथून पुढे ज्ञानमार्गाचें चिंतन सुरू झालें. कर्म आणि ज्ञान हे दोन्ही मार्ग वेदांत सांगितले आहेत. संहिता आणि ब्राह्मण या ग्रंथांत कर्मकांडाला प्राधान्य आहे आणि हें कर्म यज्ञात्मक आहे. यज्ञाने देवता प्रसन्न होऊन इहलोकीं विजय आणि परलोकी स्वर्ग देतात, अशी वैदिकांची श्रद्धा होती. पण यज्ञसंस्थेच्या उत्कर्षकालांतच कित्येक ऋषी, कर्मकांड हा मानवाचा स्थूलधर्म आहे; याहून उच्चतर अशा मानसिक आणि नैतिक धर्माचा आपण विचार केला पाहिजे, असा विचार करूं लागले. यज्ञाने प्राप्त होणारीं सुख आणि स्वर्ग हीं फलें नाशवंत आहेत आणि खऱ्या शाश्वत सुखाचा मार्ग याहून वेगळा असला पाहिजे, अशी कल्पना त्यांच्या मनांत उदित झाली. यांतूनच ज्ञानप्रधान अशा उपनिषदांचा जन्म व विकास झाला. मोक्ष हेंच सर्वश्रेष्ठ सुख असून त्याच्यापुढे अन्य सुखें तुच्छ आहेत, असें उपनिषदांनीं उद्घोषित केलें. जन्म आणि मृत्यु यांच्यापासून सुटका म्हणजे मोक्ष होय, असा मोक्ष शब्दाचा अर्थ त्यांनी सांगितला. त्याच्या प्राप्तीसाठी वैराग्य आणि संन्यास यांचा साधन म्हणून उपदेश केला. भारतीय दर्शनांत नैराश्याची, वैराग्याची, अलिप्ततेची जी एक सूक्ष्म छटा सर्वत्र दिसते, तिचा प्रारंभ उपनिषदांत झाला आणि जैन व बौद्ध धर्मांत याच वैराग्य-संन्यासांची पराकाष्ठा झाली.

उपनिषदांतील ब्रह्मविचारांतून द्वैतवाद प्रतिपादणारीं अनेक दर्शनें निर्माण झालीं असलीं, तरी उपनिषदांत अद्वैतच प्रतिपादिलें आहे, असेंच आपण परंपरेने मानीत आलों आहों. इंद्र, वरुण, सूर्य, अग्नि इ. दृश्य देवतांपासून मानवाला बाजूला खेंचून निराकार ब्रह्माकडे त्याची दृष्टि वळविण्याचें महत्कार्य उपनिषदांनीच केलें.

आत्मा, परमात्मा किंवा परब्रह्म हे तीन्ही शब्द उपनिषदांत

सामान्यपणें एकाच तत्त्वाचा बोध करतात. आकाश जसें आंत-बाहेर सर्वत्र पसरलें आहे, त्याचप्रमाणे ब्रह्महि सृष्टीच्या कणाकणामध्ये व्याप्त आहे, असें उपनिषदें सांगतात –

सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानिति शान्त उपासीत । अथ खलु ऋतुमयः पुरुषो यथा ऋतुरस्मिल्लोके पुरुषो भवति तथेतः प्रेत्य भवति । स ऋतुं कुर्वीत ।

(छांदो. ३.१४.१)

अर्थ—हें सारें जगत् ब्रह्म आहे. हें ब्रह्मांतूनच उत्पन्न झालें, ब्रह्मांतच अवस्थित आहे आणि पुढे ब्रह्मांतच विलीन होणार आहे. संयत होऊन त्याची उपासना करावी. पुरुष कर्ममय आहे. तो इहलोकीं जसें कर्म करतो, तसें परलोकीं फल भोगतो. म्हणून धर्माचरण करावें.

या एकाच मंत्रांत सारें ब्रह्मज्ञान, समस्त कर्मवाद आणि समग्र धर्माचरण यांचें रहस्य सूत्ररूपाने येऊन गेलें आहे.

उपनिषदांतले कित्येक सिद्धान्त परस्पर विरोधी आहेत. उपनिषदें कधीं ब्रह्म निर्विकार असल्याचें सांगतात; तर कधीं ब्रह्मानेच सृष्टि केली, असें म्हणतात. कधीं आत्मा आणि परमात्मा यांत अभेद मानतात; तर कधीं त्या दोघांच्या सामर्थ्यांत फरक मानतात. परमात्मा आनंद स्वरूप; तर आत्मा दुःखजर्जर. परमात्मा सर्वशक्तिमान; तर आत्मा मर्यादित शक्तीचा, असेंहि मानतात. या विरोधी प्रतिपादनामुळेच द्वैत, विशिष्टाद्वैत, अद्वैत, इ. भिन्न दर्शनें उपनिषदांतूनच निर्माण झाली. पण इथे आपण एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, की उपनिषदकर्ते ऋषि हे दार्शनिक नसून द्रष्टे होते. त्यांच्या एकान्तचिन्तनांतून प्रसंगीं त्यांना जे विचार स्फुरले तेच उपनिषदांत ग्रथित झाले आहेत. त्या विचारांच्या मागे त्या त्या ऋषीची किंवा चिंतकाची अनुभूति उभी आहे. त्यांच्या प्रतिभेंतून ते ज्ञानस्फुलिंग बाहेर पडले आहेत. सहज ज्ञानाच्या बलावर जें जसें अनुभूतींत चमकलें तें तसें त्यांनी मंत्रबद्ध करून ठेवलें.

प्राचीन भारतीयांच्या ज्ञानविकासांतील अत्यंत महत्त्वाचें क्रान्तिकारक युग म्हणजे उपनिषद्काल हें होय. उपनिषदांत विशाल, भव्य आणि शुद्ध कल्पनांचें सर्जन कार्य दिसून येतें. उपनिषदांचें लेखन बांधीव स्वरूपाचें नाही; त्याचप्रमाणे त्यांत कल्पनांची संगतवार व्यवस्थित मांडणीहि नाही. उच्चविचारांचे ते प्राथमिक आविष्कार आहेत. उपनिषद्कालीन समाज हा यज्ञविषयक कर्मकांडालाच परम धर्म मानीत होता. आणि इहपरलोकांतल्या वैषयिक सुखोपभोगासाठी आसुसलेला होता. उपनिषदांनी या समाजापुढे निराळे आदर्श उभे केले, धर्माचें सूक्ष्म स्वरूप त्यांना दाखविलें आणि सांगितलें, की जीवनांतील श्रेष्ठ सुख भोगांत नसून त्यागांत आहे. जन्ममरणांतून सुटणें, हीच मानवमात्राची खरी समस्या असून, मोक्ष हें तिचें अंतिम आणि एकमेव उत्तर आहे.

यासाठी उपनिषदांनी सदाचाराचा आदेश दिला, सद्गुणांची आवश्यकता प्रतिपादिली, त्याग आणि तपस्या यांचा महिमा सांगितला आणि ब्रह्मज्ञान हीच जीवनाची कृतार्थता होय, असा उद्घोष केला.

ऋषि व आचार्य — उपनिषत्कालीन ऋषि-मुनी व आचार्य यांच्याविषयीं फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. त्या थोर महात्म्यांच्या जीवनावर कालाचा पडदा पडला आहे. उपनिषदांत असे कितीतरी मंत्र आहेत, की त्यांचा कर्ता अमका तमका ऋषि आहे, असें सांगता येणार नाही. तथापि ज्या थोड्या स्त्री-पुरुषांचीं नांवें उपनिषदांत आढळतात, त्यांत अध्यात्मपारंगत या दृष्टीने याज्ञवल्क्य हा सर्वांचा मेरुमणि ठरतो. जनकाच्या दरबारांतल्या विद्वत्परिषदेंत याज्ञवल्क्याचा जो अमृतमय वाक्स्रोत वाहिला, त्यांत तिथले सर्व विद्वान् मज्जन करून पावन झाले. त्याला प्रतिप्रश्न करायला कोणाची छातीच होईना. शेवटी गार्गीने तिथल्या ऋषींना आणि आचार्यांना असा सल्ला दिला, की 'तुम्ही नमस्कार करून या ब्रह्मवेत्त्यापासून आपली सुटका करून घ्या. तुमच्यापैकी कोणीहि या ब्रह्मवेत्त्याला जिंकूं शकणार नाही.' (बृहदा. ३.८.१२).

याज्ञवल्क्यानंतर आरुणि, सनत्कुमार, रैक्व, शांडिल्य, ऐतरेय, दधीच इ. विद्वान् आचार्यांचीं नांवें दिसतात. मृत्यूवर विजय मिळविण्यासाठी यमाच्या दरबारांत जाऊन त्यालाच आपला गुरु करणारा कुमार नचिकेत आणि विद्याप्राप्तीसाठी गुरुगृहीं पडतील ते कष्ट सोसणारा सत्यकाम जाबाल हे दोघे उपनिषदांतले आदर्श ब्रह्मचारी होत. उपनिषदांत पुरुषांबरोबरच ब्रह्मवादिनी अशा दोन स्त्रियाहि आढळतात. गार्गी आणि मैत्रेयी हीं त्यांचीं नांवें होत.

आत्मा आणि ब्रह्म — पिंडांत असलेला आत्मा व ब्रह्माण्डाच्या बुडाशीं असलेलें ब्रह्म हीं दोन्ही एकच होत, असा उपनिषद्कारांचा सिद्धान्त आहे (ईश. १६; तैत्ति. २.८).

आत्मब्रह्मैक्य ही एक गृहीत धरलेली कल्पना नाही; तर मानवी बुद्धि, भावना व इच्छाशक्ति यांच्या स्वरूपाचें विश्लेषण केल्यानंतर त्यांतून निघालेला तो अपरिहार्य सिद्धान्त आहे. उपनिषदांत जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या अशा आत्म्याच्या चार अवस्था मानलेल्या आहेत. त्यांपैकी पहिल्या तीन अवस्थांचा प्रत्येकाला प्रत्यहीं अनुभव येतो. आत्मविद्येची साधना करील त्याला चौथी अवस्था प्राप्त होते. या अवस्थेंत ज्ञाता व ज्ञेय हा भेद उरत नाही. द्रष्टा, दृश्य व दर्शन ही त्रिपुटीहि मावळते. या अवस्थेंतील आत्मा व ब्रह्म हीं एकच आहेत.

उपनिषदांतील ब्रह्म हें चैतन्यमय व सर्वशक्तिमान् असें तत्त्व असून तेंच सर्वांचें मूळ व सर्वांचा आधार आहे. सच्चिदानंद हें त्याचें स्वरूप आहे. तें स्वयंभू आहे. ज्ञान, बल व क्रिया हा त्यांचा स्वभाव आहे (श्वेता. ६.८).

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।

अर्थ—तें पूर्ण आहे. हें पूर्ण आहे. पूर्णांतून पूर्ण उत्पन्न होतें. पूर्णांतून पूर्ण काढून घेतल्यावर देखील पूर्णच शिल्लक राहतें.

'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म' असें जें तैत्तिरीयांत म्हटलें आहे, तेंहि त्या पूर्णब्रह्माचेंच पूर्ण वर्णन होय.

सृष्टिविषयक कल्पना —– सृष्टीची उत्पत्ति कशी झाली, याची अतिप्राचीन उपनिषदांतून केलेली मांडणी तितकीशी पद्धतशीर नाही. आरंभीं उपनिषदांतील ऋषींच्या मनावर यज्ञसंस्थेचा बराच प्रभाव होता. त्यामुळे त्यांच्या सृष्ट्युत्पत्तिविषयक मतांवर यज्ञसंस्थेचा परिणाम दिसल्यावांचून राहिला नाही. बृहदारण्यकांत (१.२) सृष्टीच्या उत्पत्तीचा क्रम पुढीलप्रमाणे दिला आहे —–

प्रारंभीं या जगांत कांही नव्हतें. बुभुक्षारूपी मृत्यूने हें सर्व व्यापलेलें होतें. बुभुक्षा म्हणजे भक्षण करण्याची इच्छा. तोच मृत्यु होय. आपण देहवान् व्हावें, असें त्याच्या मनाने घेतलें. तो मृत्युरूपी देव उपासना करूं लागला. त्याच्यापासून पृथ्वी, आप व तेज हीं महाभूतें उत्पन्न झालीं. या तेजाचीं सूर्य, अग्नि व वायु अशीं तीन स्वरूपें होतीं. वायु म्हणजेच प्राण होय.

त्या प्राणापासून निरनिराळे लोक उत्पन्न झाले. मग आपलें दुसरें स्वरूप निर्माण करावें, अशी बुभुक्षारूप मृत्यूने इच्छा केली. त्याने मन व वाणी या जोडप्याचें रूप धारण केलें. त्याचें रेत हेंच संवत्सर झालें. पण एवढी सृष्टि उत्पन्न करूनहि त्या मृत्युदेवाचें समाधान झालें नाही. त्याला ती सृष्टि अल्प वाटली. मग त्याने वाणीपासून ऋक्, यजुः, साम, छंद, यज्ञ, प्रजा आणि पशु हें सर्व उत्पन्न केलें. त्याने जें जें उत्पन्न केलें, तें तें सर्व भक्षण करण्याचें ठरविलें (प्रत्येक सृष्टपदार्थ कालवश बनला). आपण मोठ्या यज्ञाने यजन करावें, अशी त्या मृत्युदेवाला इच्छा झाली, म्हणून तो अश्व बनला.

या वर्णनावरून यज्ञसंस्थेची पूर्तता हेंच सृष्टीच्या उत्पत्तीचें उद्दिष्ट असल्याचें या ऋषींचें मत दिसतें. शिवाय ज्या क्रमाने इथे सृष्टीची उत्पत्ति दिली आहे, त्यांत तर्कशुद्धता फारच थोडी दिसते.

मुंडकोपनिषदांत (२.१) सृष्ट्युत्पत्तीचें वर्णन पुढीलप्रमाणे दिलें आहे —–

प्रारंभीं अक्षर पुरुष होता. त्याच्यापासून प्राण, मन, इंद्रियें, पंचमहाभूतें, वृक्ष-वनस्पती, वेद, यज्ञ, काल, लोक, देव, मनुष्य, पशु, पक्षी, सत्य, ब्रह्मचर्य, इ. सर्व उत्पन्न झाले.

या उपपत्तींतहि सृष्ट्युत्पत्तीचा शास्त्रीयक्रम दिसत नाही. सृष्टीच्या उत्पत्तीविषयीं उपनिषदांत निरनिराळीं मतें आढळतात. कांही ठिकाणीं पंचमहाभूतांपैकी एक किंवा अनेक भूतें सृष्टीचें मूळकारण म्हणून मानलेलीं आहेत. कांही ठिकाणीं असत्, सत् अथवा प्राण यांपैकी एखाद्या निर्विशेष तत्त्वाला सृष्टीचें आदिकारण म्हटलें आहे. कांही ठिकाणीं आत्मा, ईश्वर अथवा प्रजापति यांपैकी एखाद्याला सृष्टीचा उत्पादक म्हटलें आहे.

या सर्व सृष्टिनिर्मितीच्या उपपत्तींत ऐतरेयोपनिषदांतला सृष्ट्युत्पत्तीचा क्रम व्यवस्थित व विस्तृत आहे —–

आत्मा वा इदमेक एवाग्र आसीन्नान्यत्किंचन मिषत् ।
स ईक्षत लोकान्नु सृजा इति ।

(१. १)

अर्थ – सृष्टि उत्पन्न होण्याच्या अगोदर एक आत्मतत्त्वच होतें. दुसरें व्यापारवान् असें कांहीच नव्हतें. आपण लोक निर्माण करावे, अशी त्याला इच्छा झाली.

तैत्तिरीयोपनिषदांत या आत्मतत्त्वापासूनच पुढे आकाश, आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून आप, आपापासून पृथ्वी, पृथ्वीपासून वनस्पती, वनस्पतीपासून अन्न व अन्नापासून पुरुष उत्पन्न झाला, असा क्रम सांगितला आहे (२. १).

वरील विविध उपपत्तीवरून तीन गोष्टी निश्चितपणे सिद्ध होतात–(१) ही सर्व सृष्टि एका आत्म्यापासूनच उत्पन्न झाली आहे (२) सृष्टि सत्य आहे व (३) आत्मा किंवा ब्रह्म सृष्टीच्या आंतबाहेर ओतप्रोत भरून राहिलें आहे.

जीवकल्पना—–सर्व सान्त पदार्थांत जीव हा परमात्म्याचा सर्वश्रेष्ठ अंश आहे, असें उपनिषदांचें मत आहे. जीवात्मा हा परमात्मा नाही; पण तो इतर सर्व भूतसृष्टीपेक्षा त्याच्या अधिक जवळ आहे. अर्थात् जीवाचा विचार करीत असतां आपण ज्याला शरीरसंघात या नांवाने ओळखतों त्यापेक्षा तें स्वतंत्र व निराळें तत्त्व आहे, हें गृहीत धरलेलें आहे. ऋग्वेदकालापासून जीव हें शरिराहून निराळें तत्त्व आहे, ही समजूत आर्यांच्यामध्ये चालत आलेली आहे.

प्रारंभीं जीव प्राणस्वरूप आहे, अशी कल्पना होती व ती स्वाभाविक होती. वाचारहित, नेत्ररहित, श्रोत्ररहित व मनोरहित असा प्राणी जगूं शकतो; पण प्राणावांचून मात्र तो जिवंत राहूं शकत नाही (कौषी. ३.३). पण पुढे या बाबतींत

विचारांची प्रगति होऊन जीवात्मा मनोमय असून हृदयांतील आकाश हें त्याचें स्थान आहे, असें मानलें गेलें. छांदोग्यांत तो तेज, आप व अन्न यांचा बनला आहे, असें म्हटलें आहे (६.३.२). जीव हा बुद्धि व आत्मतत्त्व यांच्या मिश्रणाने बनला आहे; कारण आत्म्यानेच जीवरूपाने शरीरांत प्रवेश केला आहे, असें तैत्तिरीयांत म्हटलें आहे. पण विचारांची वाढ इथेच थांबली नाही. जीवात्मा हा मनोमय अथवा प्रज्ञास्वरूप आहे, एवढेंच नव्हे; तर जें तेज ब्रह्माण्डाच्या मुळाशीं आहे, तेंच या जीवात्म्यांतहि आहे, असे मानण्यापर्यंत पुढे विचाराची भरारी गेली.

जीवात्मा आणि परमात्मा या दोघांत जीव कर्मफलाचा भोक्ता व परमात्मा केवळ त्याचा साक्षी, अशी कल्पना आहे. जीव सान्त असून परमात्मा अनन्त आहे. जडप्रकृतीशीं अहर्निश झगडणारा जीव सर्व सृष्ट पदार्थांत श्रेष्ठ असला, तरी ज्याची प्राप्ति त्याला करून घ्यायची आहे, तो त्याच्याहिपेक्षा श्रेष्ठ आहे. परमात्म्याचें स्वातंत्र्य व त्याचा आनंद यांच्या प्राप्तीचा जीवाला अधिकार आहे. मात्र त्यासाठीं त्याने सान्ताचा अनन्तांत लय करायला पाहिजे व त्यासाठी परमात्म्याशीं तद्रूप झालें पाहिजे. गाढ झोपेंत या तद्रूपतेचा अनुभव जीवाला घडत असतो; पण अज्ञानामुळे त्याला त्याची जाणीव नसते. त्याच्या अंतःकरणांत जो निधि आहे, त्याचें त्याला ज्ञान नसतें. म्हणून तो हीन, दीन, कृपण बनतो. सान्त व अनन्त यांच्या या संघर्षांत जीवात्मा जेव्हा विजय मिळवील, तेव्हांच त्याला परमात्म्याची प्राप्ति होईल.

मोक्षकल्पना—जीवाला मिळणाऱ्या मुक्तीचे सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता असे चार भेद आहेत. त्याचप्रमाणे विदेहमुक्ति आणि जीवनमुक्ति असेहि तिचे कालदृष्ट्या दोन भेद मानतात. मोक्षाच्या या सर्व प्रकारांना उपनिषदांत कमी-अधिक प्रमाणाने आधार मिळतो. म्हणूनच भिन्न भिन्न संप्रदायांच्या आचार्यांना आपली मोक्षाची कल्पना उपनिषदांत आहे, असें प्रतिपादन करणें शक्य झालें. कारण उपनिषदें अनेक असून त्यांचे ऋषीहि अनेक आहेत. तेव्हा ईश्वर, मोक्ष इ. तात्त्विक सिद्धान्तांविषयीं उपनिषदांत निरनिराळीं मतें प्रदर्शित होणें स्वाभाविक आहे. विकासवादाच्या नियमानुसार त्यांची संगति लावतां येण्याजोगी आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत विकासवादाचें तत्त्व एकदा मान्य केलें, की अद्वैतवाद व सायुज्यमुक्ति हें उपनिषदांचें अखेरचें मत आहे, असें मान्य करावें लागतें.

छांदोग्यांत एका ठिकाणीं सलोकतामुक्ति सांगितलेली आहे (२. २०. २). मुण्डकांतील कांही वर्णनावरून समीपता व सरूपता यांचाहि बोध होतो (१. २. ६). पण ब्रह्मामध्ये संपूर्णपणे विलीन होणें, म्हणजेच मुक्ति होय, असें उपनिषदांत जागोजागीं सांगितलेलें आढळतें (मुंड. ३. २. ७-८; प्रश्न. ६.५; छांदो. ६. ९. १–२; ६. १०. १).

उपनिषदांच्या मतें सायुज्यमुक्तीच्या या सर्वश्रेष्ठ अवस्थेंत 'मी' या वैयक्तिक भावनेचें अस्तित्व उरत नाही; मात्र त्या वेळीं व्यक्ति शून्य होते किंवा नाश पावते, असा त्याचा अर्थ नव्हे. पारमार्थिक दृष्टीने संकुचित व्यक्तित्वाला सत्यत्व नाही. पुरुषाच्या ठिकाणीं जें कांही सत्य व शिव आहे, तें अनंत आहे. जोंवर देहाची आसक्ति आहे, तोंवर त्या अनंताचें दर्शन पूर्णतया होत नाही. देहासक्ति सुटते, तेव्हा मात्र त्याचें संपूर्ण दर्शन घडतें. निराळ्या शब्दांत सांगायचें, तर मुक्तावस्था म्हणजे आत्मसूर्याचा संपूर्ण उदय होय. उपनिषदांतल्या ऋषींच्या मतें ब्रह्म हें आनंदरूप आहे, म्हणून ब्रह्माची प्राप्ति म्हणजे सर्वश्रेष्ठ आनंदाची प्राप्ति होय. अर्थात् आनंदाची ही अवस्था सामान्य बुद्धीला सर्वथा अगम्य आहे. ही स्थिति अवर्णनीय असल्यामुळे उपनिषद्कार एवढेंच सांगतात, की या सर्वश्रेष्ठ अवस्थेंत जीव-ब्रह्माची संपूर्ण तन्मयता होते. ही मोक्षावस्था म्हणजे ऋषींची केवळ कल्पना नाही; तर उपनिषदांतील कांही ऋषींनी आपले तद्विषयक कांही अनुभवहि नमूद करून ठेवले आहेत (छांदो. ८.१३.१; तैत्ति. १.१०).

उपनिषदांत वर्णिलेली ही सायुज्यमुक्तीची अवस्था अभावरूप नसून भावरूप आहे. ती शून्यस्थिति नसून आनंदस्थिति आहे आणि ती क्रिया, स्वातंत्र्य व पूर्णावस्था यांची द्योतक आहे. मुक्ताचें जीवन हे अवर्णनीय असे ब्रह्मात्मैक्य जीवन आहे. सूर्यकिरण सूर्यांत, तरंग सागरांत, किंवा सूर नादांत लय पावला म्हणजे त्याचा नाश झाला, असें मानणें योग्य नव्हे. हाच न्याय जीव-शिवसंगमाला लागू आहे. मुक्ताच्या ठिकाणीं निराळेपणाचा भाव उरत नसला, तरी त्याचें व्यक्तित्व कायम असतें. त्यांत फक्त अहंकाराचें विसर्जन झालेलें असतें. बृहदारण्यक म्हणतें —

यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः ।
अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते ।।

(४.४.७)

अर्थ — जेव्हा या जीवाच्या हृदयांत आश्रय करून राहिलेल्या सर्व कामना नष्ट होतात, तेव्हा मर्त्य जीव हा अमृत होतो (आणि) इहलोकीं ब्रह्मानुभव घेतो.

जीव-परमात्मयोग हेंच अमरत्व होय. व्यवहारांत यालाच मोक्ष किंवा जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून सुटका असें म्हणतात.

साधनमार्ग — सर्व विश्वाचा आधार व सर्वांतर्यामी असा

जो आत्मा त्याचें दर्शन, त्याचें ज्ञान किंवा त्याचा साक्षात्कार हेंच उपनिषदांनी आपलें अंतिम ध्येय मानलें आहे; पण यापुढे प्रश्न असा येतो, की तें उद्दिष्ट साध्य करण्यास मनुष्याजवळचें साधन कोणतें? मन-बुद्धींसह पंचज्ञानेंद्रियें हीं ज्ञानप्राप्तीचीं साधनें मानलीं जातात; पण आत्मज्ञानाच्या क्षेत्रांत तीं अपुरीं आहेत. कठोपनिषद सांगतें ––

नैव वाचा न मनसा प्राप्तुं शक्यो न चक्षुषा ।

(२. ३. १२)

अर्थ ––(तो आत्मा) वाणीने, मनाने किंवा चक्षुरिंद्रियाने प्राप्त होणें शक्य नाही.

आत्मा इंद्रियगोचर किंवा बुद्धिगोचर नाही (तैत्ति. २.४. १). आत्मा हा ज्ञाता असून त्याला सर्वज्ञान होतें, म्हणून तो दुसऱ्याच्या ज्ञानाचा विषय होऊं शकत नाही (श्वेता. ३.१९). पण यावर असा प्रश्न उत्पन्न होतो की, आत्म्याला जाणूं शकेल, असा अन्य कोणी नसला तरी तो स्वतःच स्वतःला जाणूं शकतो कीं नाही? या प्रश्नाला उपनिषदांचें 'होय' असें उत्तर आहे. स्वतःला जाणणें हें आत्म्याला शक्य आहे, असें याज्ञवल्क्य म्हणतो (मुंड. ३.१.८). त्याच्या मतें स्वयंप्रज्ञान हीच अंतिम वस्तु आहे. स्वयंप्रज्ञान शक्य नसेल, तर या जगांत कांहीच शक्य नाही. आत्म्यामध्ये स्वतःचे दोन विभाग करून स्वतःला जाणण्याची विलक्षण शक्ति आहे. तो स्वतःच ज्ञाता व ज्ञेय अशीं दोन रूपें घेऊं शकतो.

मात्र अशा रीतीनें आत्मदर्शन हें शक्य असलें, तरी तो अनुभव सर्वांना सहजपणे येण्यासारखा नाही. त्यासाठी तपश्चर्येची किंवा खडतर साधनेची गरज असते (केन. ४.८). त्यासाठी वैराग्याचीहि नितान्त आवश्यकता असते. मनांत विषयांबद्दल निर्वेद व आत्मज्ञानाबद्दल तीव्र तळमळ उत्पन्न होणें, याला वैराग्य म्हणतात. म्हणून विवेकी व वैराग्यसंपन्न साधकाने गुरुमुखांतून आत्मविद्या ग्रहण करावी, असें उपनिषदांचें म्हणणें आहे.

तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्
समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्

(मुंड. १. २. १२)

अर्थ –– आत्मज्ञानासाठी शिष्याने समिधा हातांत घेऊन श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ अशा गुरूकडे जावें.

साधकाने गुरूपासून आत्मविद्येचा उपदेश मिळविल्याच्या अनेक कथा उपनिषदांत आढळतात. ब्रह्मविद्येचा उपदेश करणारा गुरुहि अधिकारी असणें आवश्यक आहे. तो शास्त्रसंपन्न तर असलाच पाहिजे; कारण त्याशिवाय शिष्याच्या आशंकांचें त्याला समाधान करतां येणार नाही. जसा शास्त्रसंपन्न तसाच तो ब्रह्मनिष्ठहि असला पाहिजे. त्याशिवाय तो शिष्याला अनुभविक मार्गदर्शन करूं शकणार नाही.

साक्षात् आत्मदर्शनाचें साधन म्हणून उपनिषदांत योगाचाहि उपदेश केला आहे. चित्ताच्या अनंत वृत्ती इंद्रियद्वारा बाहेर पडत असतात. त्यांचा निरोध करून मनासह सर्व इंद्रियांना आत्म्याच्या ठिकाणीं एकाग्र करणें, हाच योग होय. हाच आशय कठोपनिषदांतल्या पुढील मंत्रांत सांगितला आहे––

तां योगन्यमिति मन्ते स्थिरामिन्द्रियधारणाम् ।

(२. ३. ११)

योगाभ्यासाने प्राणांचें नियमन केल्याने चित्त शुद्ध होतें व त्या शुद्ध चित्तांत आत्मा स्वतःच प्रकट होतो (मुंड. ३. १. ९.). आत्म्याचें प्रत्यक्ष दर्शन घडविणाऱ्या या योगाचा अभ्यास कसा करावा याची पद्धतशीर माहिती श्वेताश्वतर उपनिषदांत दिली आहे (२. ८–११). ध्यानयोगाने आत्म्याची उपासना करीत असतां प्रणवाचा प्रतीक म्हणून अवलंब करावा, असें सांगून कठोपनिषदाने शेवटीं ॐ हेंच परब्रह्म आहे, असें म्हटलें आहे (१. २. १५). मनाची एकाग्रता, चित्ताची निष्कंपता व अखंड ब्रह्मभावना हीं यशस्वी योगाचीं लक्षणें होत. आत्मा आंतबाहेर सर्वत्र व्यापून राहिला आहे (मुंड. २.१.२). म्हणून तो शरिरांत विशिष्ट ठिकाणीं राहतो, असें म्हणणें योग्य नव्हे; तथापि आत्मदर्शी पुरुषांनी, तो ध्यानासाठी शरिराच्या एका खास भागांत म्हणजे हृदयांत उपलब्ध होतो, असें सांगितलें आहे (कठ. २. ३. १७). तो मनोमय आत्मा शरीर व प्राण यांचा चालक आहे. बुद्धीचा आश्रय करून तो विश्वांत राहतो. ज्यांची बुद्धि ज्ञानाने शुद्ध व विकसित झाली आहे, ते त्या आनंदरूप, अमृतमय व स्वयंप्रकाश आत्म्याला पाहतात (मुंड. २. २. ७.).

नीतिकल्पना––उपनिषदांतला नीतिविचार मानवासाठी निश्चित ठरविलेल्या उत्तम पुरुषार्थाचें साधन म्हणून केलेला आहे. ब्रह्म जाणणें व ब्रह्म होणें हाच तो उत्तम पुरुषार्थ होय.

एषोऽस्य परमा गतिरेषाऽस्य परमा संपदेषाऽस्य ।
परम लोक एषोऽस्य परम आनन्दः ।।

(बृहदा. ४. ३.३२)

अर्थ–आत्मा हीच जीवाची परम गति, तीच परम संपत्ति, हेंच परम ध्येय व तोच परम आनंद होय.

या परमोच्च आत्म्याखेरीज बाकी सगळें आर्त म्हणजे दुःखयुक्त किंवा नाशवंत आहे, असें उपनिषदें सांगतात. या आत्मदर्शनरूप किंवा मोक्षरूप पूर्णत्वाकडे जाण्याच्या अंतःकरणां-

तील नैसर्गिक तळमळीमुळे मनुष्य जो प्रयत्न करतो, तीच नीति होय. आत्मसाक्षात्कार हेंच नीतीचें ध्येय आहे. देहभावना व विषयासक्ति यांपासून मुक्त होणें, जें अल्प व सान्त असेल त्याच्यापासून सुटका करून घेणें व सर्व भूतें आत्म्यामध्ये पाहणें हें नैतिक सदाचरण होय. नीतीचें हें ध्येय साध्य करायचें, तर मनुष्याने व्यक्तित्वाचीं संकुचित कुंपणें मोडून सर्व भूतें आत्मवत् मानलीं पाहिजेत. मनुष्य हा जड व चैतन्य यांच्या सांध्यावर उभा आहे. त्याच्या अंतरांत दवी व आसुरी या दोन्ही प्रवृत्ती तुंबळ माजवीत असतात. नीतीचा आधार घेऊन त्याला आसुरी प्रवृत्तींशीं झगडा द्यावा लागतो. माणसाचा जन्म जणू या युद्धासाठीच असतो व त्याचा विकासहि त्या युद्धांतूनच व्हायचा असतो. मनुष्याचे निरनिराळे वासना–विकार त्याच्या ठिकाणीं असलेल्या दिव्य शक्तीची वाढ होऊं देत नाहीत व त्याचें जीवन स्वार्थी व संकुचित बनवितात. जीवनाच्या विकासासाठी त्या वासना–विकारांचें नियंत्रण करणें जरूर असतें. इंद्रियसुख आणि वासनातृप्ति म्हणजे नैतिक जीवन नव्हे. मनुष्याच्या जीवननौकेचें सुकाणू जर वासनेच्या हातीं जाईल, तर ती नौका संसारसागरांत फुटल्याशिवाय राहणार नाही. देह हाच आत्मा असें समजून त्याची पूजा करणाऱ्या विरोचनाची कथा याच संदर्भांत छांदोग्यांत दिली आहे (८. ८. ४. ५). हा विरोचनाचा संप्रदाय म्हणजेच असुरसंप्रदाय होय.

आत्मा हा नीतीचें साध्य आहे, असें ठरल्यावर त्या नीतिधर्मांत त्याग व वैराग्य यांना आपोआप महत्त्व येतें. मात्र विरागी म्हणजे अंगाला राख फासून संसारांतून उठून गेलेला माणूस असा त्याचा अर्थ नव्हे. सर्वच वासना निंद्य किंवा त्याज्य नसतात. काम हींसुद्धा सर्वस्वी त्याज्य वस्तु नव्हे. फक्त त्या कामाला माणसाने आपल्यावर स्वार होऊं देतां कामा नये. उपनिषदांतले कित्येक ऋषी गृहस्थाश्रमी व संसारी होते. परिवारांत राहून इहलोकींची जीवनयात्रा सफल करणें, यांत ते पुरुषार्थ मानीत. तैत्तिरीयांतला तो ऋषि पुढील प्रकारची आकांक्षा बाळगतांना दिसतो—

" हे परमेश्वरा, मी अमृतरूप वेदांचें धारण करणारा व्हावें. माझें शरीर कार्यक्षम असावें. माझी वाणी अत्यंत मधुर असावी. मीं कानांनी पुष्कळ श्रवण करावें. हे देवा, माझ्या विद्येचें रक्षण कर. वस्त्रें पुरविणारी, माझें गोधन वृद्धिंगत करणारी आणि खाद्यपेयें देणारी लक्ष्मी मला प्राप्त करूनदे (१. ४)."

उपनिषदांत चित्तशुद्धीचें साधन म्हणून तपाचें अनुशासन केलें असलें, तरी तप या शब्दाने देहदंडना करणारीं कृच्छ्र-चांद्रायणादि व्रतें उपनिषदांना अभिप्रेत नाहीत. इंद्रियांसह मनाचा निग्रह करून त्याला आत्म्यामध्ये स्थिर करणें, हाच तपाचा मुख्य अर्थ आहे. उपनिषदांतले ऋषी आत्मज्ञानाच्या क्षेत्रांत आहारशुद्धीला फार महत्त्व देतात (छांदो. ७. २६. २). अंतःकरणाच्या शुद्धीसाठी आहारशुद्धीची फार जरुरी आहे. शास्त्रविहित व परिमित असें विषयसेवन करणें, हा आहारशुद्धीचा अर्थ आहे. चित्तशुद्धीने माणसाला आत्मबल प्राप्त होतें. या आत्मबलाने त्याची विवेकबुद्धि जागृत होते व तो देहाच्या दास्यांतून मुक्त होतो.

जीवन हा एक यज्ञ आहे आणि तप, दान, सरलता, अहिंसा व सत्यवचन या त्या यज्ञाच्या दक्षिणा आहेत, असें छांदोग्यांत म्हटलें आहे (३. १७. ४). हे सगळे नैतिक गुण आहेत. त्यांमध्ये वैयक्तिक व सामाजिक नीतीचा अंतर्भाव होतो. मनुष्याने केवळ व्यक्तिधर्माचें पालन केलें, म्हणजे त्याचा जीवनयज्ञ यथासांग पुरा झाला, असें म्हणतां येणार नाही. त्यासाठी त्याने सामाजिक कर्तव्यांचेंहि पालन केलें पाहिजे. आत्मसंयमन हें सर्व सद्गुणांचें मूळ होय. म्हणूनच नारायणीय उपनिषदांत यज्ञाचें वर्णन करतांना शम–दमांना त्या यज्ञाची दक्षिणा म्हटलें आहे. काम, क्रोध व लोभ हे माणसाचे शत्रू असल्यामुळे त्यांना जिंकण्यासाठी दम, दया व दान या गुणांची उपासना करावी, असें बृहदारण्यकांत एका कथेच्या द्वारें सांगितलें आहे (५. २. ३).

उपनिषदांनी सर्व गुणांत सत्याला पहिलें स्थान दिलें असून अनेक ठिकाणीं त्याची महती गायिली आहे. बृहदारण्यकांत सत्यालाच धर्म म्हटलें आहे (१. ४. १४). प्रत्यक्ष मृत्यूपासूनहि रक्षण करण्याचें सामर्थ्य सत्याच्या ठिकाणीं आहे, अशी त्या ऋषींची श्रद्धा आहे. असत्याने माणसाचा नाश होतो, असें सुकेशा ऋषि म्हणतो (प्रश्न. ६. १). ' सत्यमेवजयते ' असा मुंडकोपनिषदाचा उद्घोष आहे.

उपनिषदांत नीतीचा विचार आत्मप्राप्तीचें साधन म्हणून केला आहे, असें वर सांगितलें; पण त्याबरोबरच उपनिषदांतल्या ऋषींनी सामाजिक जीवनाच्या दृष्टीनेहि नीतीचा विचार केला होता, असें दिसतें. अध्ययन व अध्यापन सदैव चालवावें आणि त्याबरोबरच व्रत, सत्य, तप, शम, दम, यज्ञ, अतिथिसत्कार, भूतदया, इ. गोष्टी माणसाने आचरिल्या पाहिजेत, असा उपदेश उपनिषदांत जागोजाग केलेला आढळतो (तै. उ. १. ९).

नैतिक जीवनाची परिणति आध्यात्मिक अनुभूतींत झाली पाहिजे, असा उपनिषदांचा आशय आहे. धर्मश्रद्धा हा नीतीचा पाया आहे व जीवनांत शांति व समाधान यांचा लाभ हें नीतीचें

फळ आहे. जगांत सर्वत्र संघर्ष, दुःख व अमंगलता दिसत असली, तरी जीवनाचें अन्तिम स्वरूप मंगल व आनंदमय आहे असें वाटणें, हीच धर्मश्रद्धा होय. या श्रद्धेनेच जीवन ईश्वरमय व सेवामय बनतें. अशा जीवनांत शांति व समाधान हीं येऊन निवास करतात. अशा अवस्थेप्रत पोचलेल्या पुरुषाच्या जीवनांत मग नीतीच्या विधि-निषेधांचें कांही प्रयोजनच उरत नाही. ' नैनं कृताकृते तपतः ' = त्याला कांही केल्याने वा न केल्याने ताप होत नाही (बृहदा. ४. ४. २२). अशा पुरुषांच्या जीवनांत भूत, वर्तमान व भविष्य या तिन्ही काळांतील सर्व सुकृतें व दुष्कृतें पाण्याच्या लोंढ्यापुढे वाळूचा ढीग वाहून जावा, त्याप्रमाणे वाहून जातात. हिलाच ब्राह्मी स्थिति किंवा सिद्धावस्था म्हटलें आहे. अशा पुरुषाला बऱ्यावाईटाचा लेप लागत नाही. ज्यांच्यामध्ये अंशतः का होईना; स्वार्थाचा मल शिल्लक आहे, त्यांना नीतीच्या बंधनाची गरज असते. याउलट जे आत्मानुभवी असतात, त्यांचा नीति हा स्वभावच बनून जातो.

यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ।
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ।।
यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः ।
तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ।।

(ईश. ६–७)

अर्थ –– जो ब्रह्मवेत्ता पुरुष सर्वभूतें आत्म्याच्या ठिकाणीं पाहतो व सर्व भूतांच्या ठिकाणीं आत्म्याला पाहतो, तो कोणाचीहि घृणा करीत नाही. ज्या ज्ञानी पुरुषाला सर्व विश्व आत्मरूपच झालें, त्याच्या ठिकाणीं शोक व मोह कुठून शिल्लक राहणार !

नव्य उपनिषदें–यज्ञप्रधान ब्राह्मणधर्माच्या उतरत्या काळांत इतर वेदबाह्य तत्त्वज्ञानांची वाढ होऊं लागली होती. बौद्ध व जैन या धर्मांचे प्रचारक व आचार्य वैदिक धर्माला आव्हान देत होते. समाजांत नव्या श्रद्धा, नवीं दैवतें व नव्या उपासनापद्धती प्रचलित होऊं लागल्या होत्या. पण धर्माचरणाच्या या नव्या स्वरूपाला वैदिक धर्मांत स्थान नव्हतें. या नव्या धर्माला समाजांत मान्यता मिळवून द्यायची, तर त्यासाठीं त्याला उपनिषदांचा आधार मिळवून देण्याची गरज होती. कारण, जुन्या उपनिषदांना उपासना व तत्त्वज्ञान या क्षेत्रांत प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. त्यामुळें नव्या संप्रदायप्रवर्तकांना वाटलें, की आपल्या संप्रदायांच्या लोकमान्यतेसाठीहि अशा उपनिषदांची गरज आहे. म्हणून त्यांनी आपापल्या संप्रदायाचीं उपनिषदें रचण्यास प्रारंभ केला. त्यामुळें उपनिषदांची संख्या वाढत गेली. वैदिक धर्माला विरोधकांच्या हल्ल्यांपासून वांचविण्याच्या उदात्त हेतूने हीं नव्य उपनिषदें लिहिलीं गेलीं, असें म्हटल्यास त्यांचें महत्त्व लक्षांत येईल. या नवरचनेंत अथर्ववेदाच्या ऋषींचा पुढाकार होता हें आथर्वण उपनिषदांच्या मोठ्या संख्येवरून दिसून येतें.

या सांप्रदायिक उपनिषदांत विष्णु, सूर्य, शिव, देवी व गणपति या पंचदेवतांचें व त्यांच्या अवतारांचें वर्णन आहे; त्या त्या देवतांचे पराक्रम, इतर देवांचा त्यांच्याशीं संबंध, मूर्तिकरण, पूजाविधि, मंत्र-यंत्र-तंत्र, गायत्रीमंत्र, अथर्वशिरस् पूर्वोत्तरतापिनी, इष्टवस्तु, अप्रिय वस्तु, प्रतीक, अभिषेकपद्धति, मानसपूजा इ. विषय आले आहेत. तसेंच इतर देवता या उपास्य देवतेच्या अंगभूत मानून अखेर सगुण उपास्याचें निर्गुण निराकार परब्रह्माशीं ऐक्य कल्पिलेलें आहे. वैष्णव उपनिषदांत दशावतारांचें व त्या अवतारांच्या स्वतंत्र संप्रदायांचें वर्णन व त्यांच्या आध्यात्मिक स्वरूपाचें स्पष्टीकरण असतें. सूर्य व विष्णु यांचें एकरूपत्व मान्य असूनहि सौर उपनिषदांत त्याचें वेगळें महत्त्व सांगितलें आहे. शैव उपनिषदांत शिवाचीं प्रसिद्ध रूपें आणि वटुक व शरभ हीं अप्रसिद्ध रूपें, यांचें सविस्तर वर्णन आहे. शाक्त उपनिषदांत देवीच्या सौम्य व उग्र अशा उभय रूपांचें वर्णन आहे. गाणपत्य उपनिषदांत गणेशाच्या तांत्रिक उपासनेची सविस्तर माहिती असून हेरंब या त्याच्या स्वरूपाचें स्वतंत्र वर्णन आहे.

अशा प्रकारें या नव्य उपनिषदांत पंचायतनदेवतांना प्राधान्य दिलेलें असलें, तरी त्यांच्या अनुषंगाने इंद्र, अग्नि, काम, ज्वर, वासुकि, सोम, हनुमान् इ. देवतांचेंहि स्वरूप व सामर्थ्य वर्णिलेलें आहे.

नव्य उपनिषदांत वक्ता, श्रोता व उपासक या नात्यांनी बरेच नवे ऋषी आढळतात. कित्येक देवता याच त्या उपनिषदांच्या कर्त्या या स्वरूपांत दिसतात. नव्य उपनिषदांच्या या लेखकानी केवळ देवताविषयकच उपनिषदें रचलीं नसून योग, संन्यास व वेदान्त या विषयांवरहि तीं रचलीं आहेत. भक्तिविषयक स्वतंत्र उपनिषदें नसलीं, तरी सर्व उपनिषदांतून भक्तीचा ओघ वाहतांना दिसतो. भक्तिकल्पनेंत मूर्त व अमूर्त यांची पूजा, तसेंच उपचारपूजा व मानसपूजा असे दोन्ही प्रकार पुरस्कारिलेले असून, देवतेच्या नामजपाचेंहि माहात्म्य सांगितलें आहे. भक्ताला प्राप्त होणाऱ्या विविध लोकांचीं वर्णनेंहि तिथे आहेत. योगविषयक उपनिषदांत योगाचीं पंधरा अंगें व त्यांचें विवरण, तसेंच योगावस्था, योगबंध, योगमुद्रा व कुंडलिनी जागृत करण्याचे विविध उपाय दिलेले आहेत. प्रणवाचेंहि महत्त्व प्रतिपादिलें आहे. संन्यासाचें सविस्तर वर्णन हें नव्य उपनिषदांचें एक वैशिष्ट्य म्हणावें लागेल.

कुटीचक, बहूदक इ. संन्याश्यांचे चढत्या श्रेणीचे प्रकार, त्यांची दिनचर्या, विधि–निषेध व त्यांना प्राप्त होणारा मोक्ष इ. गोष्टींचें विस्तृत वर्णन संन्यासविषयक उपनिषदांत आहे. वेदान्तपर उपनिषदांत जीवात्मा, परमात्मा, प्रणव, मुक्ति व तिच्या सात पायऱ्या, यांचें वर्णन आहे.

हीं नव्य उपनिषदें गद्यपद्यात्मक असून त्यांतला गद्य भाग बराच मोठा आहे. पद्यरचनेंत प्रामुख्याने अनुष्टुभ्छंद आढळतो. कधी संवादरूपाने, कधी उपदेशरूपाने, कधी सरळ व्याख्यानरूपाने, तर कधी प्रश्नाचें उत्तर या रूपाने त्यांची मांडणी झालेली आहे. त्यांची भाषा सोपी, मनोवेधक, समर्पक उदाहरणांनी युक्त व क्वचित् अलंकारिक असते. त्या त्या उपनिषदांची फलश्रुति आकर्षक वाटावी, अशा प्रकारें दिलेली असते. धर्मार्थकाममोक्षांची प्राप्ति, हा या उपनिषदांच्या अभ्यासाचा उद्देश आहे. सर्व उपनिषदांचा अद्वतावरच भर आहे.

सृष्टिनिर्माणशास्त्र व जीवाची मरणोत्तर अवस्था, या बाबतींत जुन्या उपनिषदांचे सिद्धांत गृहीत धरून नव्य उपनिषदें तेंच नव्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न करतात. सर्व मार्ग मोक्षाकडेच जातात, हें तत्त्व नव्या उपनिषदांनी सूचित केलें आहे.

हीं नव्य उपनिषदें गौण असलीं, तरी तीं उपेक्षणीय नसून अनेक दृष्टींनी अभ्यसनीय आहेत. हिंदूंच्या सांप्रतच्या पौराण धर्माला त्यांनीच प्रामाण्य प्राप्त करून दिलें आहे. हिंदूंच्या सामाजिक व धार्मिक इतिहासांत त्यांना महत्त्वाचें स्थान आहे.

१०८ नव्य उपनिषदांची नांवनिशी मुक्तिकोपनिषदांत दिलेली आहे. यांखेरीज आणखी ७२ उपनिषदें आता प्रकाशित झालीं आहेत. दोन्ही मिळून हीं संख्या १८० भरते. त्यांत ईश, केन इ. १० उपनिषदें व ११ वें श्वेताश्वतर हीं प्राचीन उपनिषदें मिळविल्यास उपनिषदांची संख्या १९१ होते. त्यांतली १० ऋग्वेदाशीं, १९ शुक्लयजुर्वेदाशीं, ३२ कृष्णयजुर्वेदाशीं, १६ सामवेदाशीं व उरलेलीं सर्व म्हणजे ११४ उपनिषदें अथर्ववेदाशीं संबंधित आहेत. नव्य उपनिषदांचें विषयवारीने वर्गीकरण स्थूल मानाने सांगतां येतें तें असें– वैष्णव उपनिषदें ३४, सौर ५, शैव २७, शाक्त २७, गाणपत्य ४, योग २२, संन्यास २०, व वेदान्त ४१.

या सर्व उपनिषदांची कालनिश्चिति करणें कठिण आहे. विशेषतः सांप्रदायिक उपनिषदें हीं त्या त्या संप्रदायांच्या स्थापनेआधी, त्या त्या संप्रदायाच्या वृद्धीबरोबर किंवा त्या त्या संप्रदायांचें तत्त्वज्ञान निश्चित झाल्यावर लिहिलीं गेलीं हें सांगणें अवघड आहे. स्थूल मानाने एवढेंच म्हणतां येईल की, या सर्व उपनिषदांची रचना इ. स. ४०० ते १४०० पर्यंतच्या विस्तृत कालखंडांत झाली असावी. वरील सर्व उपनिषदांची यादी पुढीलप्रमाणे आहे––

मुख्य उपनिषदें (श्वेताश्वतरासह) –– (१) ईश (२) केन (३) कठ (४) छान्दोग्य (५) बृहदारण्यक (६) तैत्तिरीय (७) ऐतरेय (८) प्रश्न (९) मुंडक (१०) मांडूक्य (११) श्वेताश्वतर.

अन्य उपनिषदें (अकारानुक्रमाने)–– (१२) अक्षमाला (१३) अक्षि (१४) अथर्वशिखा (१५) अथर्वशिरस् (१६) अद्वयतारक (१७) अद्वैत (१८) अध्यात्म (१९) अन्नपूर्णा (२०) अमृतनाद (२१) अमृतबिंदु (ब्रह्मबिंदु) (२२) अल्ला (२३) अवधूत (गद्य-पद्यात्मक) (२४) अवधूत (दर्शन) (२५) अव्यक्त (२६) आचमन (२७) आत्म (२८) आत्मपूजा (२९) आत्मप्रबोध (आत्मबोध) (३०) आथर्वण द्वितीया (३१) आरुणिक (आरुणेयी) (३२) आर्षेय (३३) आश्रम (३४) इतिहास (३५) ऊर्ध्व पुंड्र (३६) एकाक्षर (३७) कठरुद्र (कंठ) (३८) कलिसंतरण (हरिनाम) (३९) कात्यायन (४०) कामराज-कीलितोद्धार (४१) कालाग्निरुद्र (४२) कालिका (४३) कालिमेधादीक्षित (४४) कुंडिका (४५) कृष्ण (४६) कैवल्य (४७) कौषीतकीब्राह्मण (४८) क्षुरिका (४९) गणपत्यथर्वशिरस् (५०) गणेशपूर्वतापिनी (वरदापूर्वतापिनी) (५१) गणेशोत्तरतापिनी (वरदोत्तर तापिनी) (५२) गर्भ (५३) गायत्री (५४) गायत्रीरहस्य (५५) गरुड (५६) गुह्यकाली (५७) गुह्यषोढान्यास (५८) गोपालपूर्वतापिनी (५९) गोपालोत्तरतापिनी (६०) गोपीचंदन (६१) चतुर्वेद (६२) चाक्षुष (६३) छागलेय (६४) जाबाल (६५) जाबाल दर्शन (६६) जाबालि (६७) तारसार (६८) तुरीय (६९) तुरीयातीत (७०) तुलसी (७१) तेजोबिंदु (७२) तैत्तिरीय (७३) त्रिपादविभूतिमहानारायण (७४) त्रिपुरा (७५) त्रिपुरा तापिनी (७६) त्रिशिखोब्राह्मण (७७) दक्षिणामूर्ति (७८) दत्तात्रेय (७९) देवी (८०) द्वय (८१) ध्यानबिंदु (८२) नादबिंदु (८३) नारद (८४) नारदपरिव्राजक (८५) नारायणपूर्वतापिनी (८६) नारायणोत्तरतापिनी (८७) नारायण–याज्ञिक्युपनिषद्, (८८) निरालंब (८९) निरुक्त (९०) निर्वाण (९१) नीलरुद्र (९२) नृसिंहपूर्वतापिनी (९३) नृसिंहषट्चक्र (९४) नृसिंहोत्तरतापिनी (९५) पंचब्रह्म (९६) परब्रह्म (९७) परमहंस (९८) परमहंस परिव्राजक (९९) पारमात्मिक (१००)

पारायण (१०१) पाशुपतब्रह्म (१०२) पिंड (१०३) पीतांबरा (१०४) पैंगल (१०५) प्रणव (गद्यात्मक) (१०६) प्रणव (पद्यात्मक) (१०७) प्राणाग्निहोत्र (१०८) बटुक (वटुक) (१०९) बह्वृच (११०) बाष्कलमंत्र (१११) बिल्व (११२) बृहज्जाबाल (११३) ब्रह्मविद्या (११४) ब्रह्म (११५) भस्मजाबाल (११६) भावना (कपिल) (११७) भिक्षुक (११८) मठाम्नाय (११९) मंडलब्राह्मण (१२०) महा (१२१) महानारायण (बृहन्नारायण किंवा उत्तरनारायण) (१२२) महावाक्य (१२३) मांत्रिक (१२४) मुक्तिक (१२५) मुद्गल (१२६) मृत्युलांगुल (१२७) मैत्रायणी (१२८) मैत्रेयी (१२९) यज्ञोपवीत (१३०) याज्ञवल्क्य (१३१) योग (१३२) योगकुंडलिनी (१३३) योगचूडामणि (१३४) योगतत्त्व –१ (१३५) योगतत्त्व –२ (१३६) योगराज (१३७) योगशिखा (१३८) राजश्यामलारहस्य (१३९) राधा (१४०) राधिका (१४१) रामपूर्वतापिनी (१४२) रामरहस्य (१४३) रामोत्तरतापिनी (१४४) रुद्र (१४५) रुद्राहृदय (१४६) रुद्राक्ष जाबाल (१४७) लांगूल (१४८) लिंग (१४९) वज्रपंजर (१५०) वज्रसूचिका (१५१) वनदुर्गा (१५२) वराह (१५३) वासुदेव (१५४) विश्राम (१५५) शरभ (१५६) शाटचायनीय (१५७) शांडिल्य (१५८) शारीरिक (१५९) शिव (१६०) शिवसंकल्प –१ (१६१) शिवसंकल्प –२ (१६२) शुकरहस्य (१६३) शौनक (१६४) श्यामा (१६५) श्रीकृष्णपुरुषोत्तम (१६६) श्रीचक्र (१६७) श्रीविद्यातारक (१६८) षोढोपनिषद् (१६९) संकर्षण (१७०) सदानंद (१७१) संन्यास (अध्यायात्मक) (१७२) संन्यास (वाक्यमय) (१७३) सरस्वतीरहस्य (१७४) सर्वसार (१७५) सामरस्य (रसिकानंद) (१७६) सावित्री (१७७) सिद्धान्त (१७८) सिद्धान्तसार (१७९) सीता (१८०) सुदर्शन (१८१) सुबाल (१८२) सुमुखी (१८३) सूर्य (१८४) सूर्यतापिनी (१८५) सौभाग्यलक्ष्मी (१८६) स्कंद (१८७) स्वसंवेद (१८८) हयग्रीव (१८९) हंस (१९०) हंसषोढा व (१९१) हेरंब. [डॉ. सी. ग. देसाई; उ. र.; उपनिषत्सार.]

उपनिषद्व्रत उपनीत बटूचें एक व्रत. हें महाव्रताप्रमाणेंच करायचें असतें. 'संवत्सरमुपनिषद्व्रतं चर'- एक वर्ष उपनिषद्व्रताचें आचरण कर, असा बटूस प्रैष देतात. 'उपनिषदं भो अनुब्रूहि' असें बटु म्हणतो. अनुप्रवचनीय होमाच्या वेळीं, 'उपनिषदे स्वाहा' अशी मध्यम आहुति देतात. व्रताच्या वेळीं गुरूपासून जें ऐकायला मिळतें, त्यानेच अध्ययनाची सिद्धि होते, असा त्यांत अभिप्राय आहे. म्हणून महानाम्नीच्या श्रवणानंतर, ज्यांनी पूर्वी अध्ययन केलें नसेल त्यांनी फाल्गुन पौर्णिमेपासून श्रावण पौर्णिमेपर्यंत अध्ययन करावें, असें सांगितलें आहे. आचार्य नसल्यास महाव्रतादींचें अध्ययन शिष्याने स्वतःच करावें, असें पारिजात ग्रंथाचें वचन आहे. [सं. कौ.]

उपनिष्क्रमण निष्क्रमण पाहा.

उपपद ठेंगणा व लहान स्तंभ. हा मोठ्या स्तंभाच्या वर बसवितात. स्थापत्यरचनेंत याचें स्थान गौण असतें. [मानसार १५]

उपपातक पापाचा एक प्रकार. उपपातकें ४९ सांगितलीं आहेत. त्यांचीं नांवें अशीं– गोवध, अयाज्ययाजन, परदारगमन, आत्मविक्रय, गुरुत्याग, मातृत्याग, पितृत्याग, वडिलांची शुश्रूषा न करणें, स्वाध्यायत्याग, अग्नित्याग, पुत्रत्याग, ज्येष्ठाच्या आधीं कनिष्ठाने विवाह करणें, परिवेत्त्याला कन्यादान, परिवेत्त्याचें याजन, कन्यादूषण, वार्धुष्य (निषिद्ध व्याजावर उपजीविका करणें), व्रतलोप (ब्रह्मचाऱ्याने स्त्रीसंग करणें), तडागविक्रय, आरामविक्रय, दारविक्रय, अपत्यविक्रय, व्रात्यत्व (योग्य काळीं उपनयन न होणें), बांधवत्याग, भृताध्यापन (वेतन घेऊन विद्या शिकविणें), भृताध्ययन (वेतन प्रदानपूर्वक अध्ययन), अविक्रेय वस्तूंचा विक्रय, सोन्या-रुप्याच्या खाणीवर अधिकार करणें, महायंत्रप्रवर्तन (तेलाचा घाणा, शस्त्राला धार लावणारें यंत्र इ. चालविणें), औषधीची हिंसा, कुटुंबांतल्या स्त्रियांना वेश्याकर्म करायला लावून त्यावर उपजीविका करणें. अभिचारकर्म (जारणमारणादि), मूलकर्म (वशीकरण), ओलें झाड तोडणें, स्वास्थ्य असतां देव-पितर यांच्या उद्देशाने पाकादि क्रिया न करणें, निंदितान्नाचें भक्षण, आहिताग्नि न होणें, स्तेय (चौर्य, अपहार), ऋणाशोधन (ऋणत्रय न फेडणें), पाखंडशास्त्राचें अध्ययन करणें, कौशीलव्यक्रिया (नृत्य-वाद्याचें सतत अनुष्ठान), धान्यचौर्य, पशुचौर्य, सोन्यारुप्याव्यतिरिक्त इतर धातूंचें चौर्य, मद्य पिणाऱ्या स्त्रीचा उपभोग, स्त्रीवध, शूद्रवध, वैश्यवध, क्षत्रियवध व नास्तिकता (श. क.).

उपपीठ स्तंभाचा, सिंहासनाचा किंवा पुतळ्याचा चबुतरा. स्तंभाचा अधोभाग, त्याच्या पूर्ण उंचीच्या एक चतुर्थांश असतो व उपपीठाची उंची अधोभागाएवढी, त्याच्या

दुप्पट किंवा तिप्पटहि असूं शकते. [एन्सा. हिं. आ.]

मरुत्	मुख्य	सोम	अदिति	ईश
शेष	रुद्र	भूधर	अपवत्स	जयंत
वरुण	मित्र	ब्रह्मा	आर्यक	आदित्य
सुग्रीव	इंद्र	विवस्वत्	सवित्र	भृश
पितृ	भृंगराज	यम	वितथ	अनिल

उपपीठ

उपपुराणें संस्कृत साहित्यांत अठरा महापुराणांव्यतिरिक्त जीं अन्य पुराणें आहेत, त्यांना उपपुराणें म्हणतात. हीं उपपुराणें कोणत्या ना कोणत्या महापुराणाशीं संलग्न आहेत. उपपुराणें हीं महापुराणांच्या नंतर रचलेलीं व कनिष्ठ प्रतीचीं आहेत, असा गैरसमज फार पूर्वीपासून प्रचलित आहे. पण कांही उपपुराणें महापुराणांपेक्षाहि प्राचीन असल्याचें सिद्ध झालें आहे. एकूण सर्वच उपपुराणांत मोलाची ऐतिहासिक माहिती साठवलेली आहे. गुप्तपूर्वकालांतील संस्कृति, कला, साहित्य, समाजव्यवस्था व धर्मसंस्था या विषयीं बरीच माहिती उपपुराणांत आढळते.

उपपुराणांची नेमकी संख्या किती, याबद्दल मात्र मतभेद आहेत. अनेक संस्कृत ग्रंथांत त्यांची नामावली दिली असून त्यांची संख्या सर्वत्र अठराच सांगितली आहे. यांपैकी कांही नांवें सर्व ग्रंथांत समान असून कांही मात्र भिन्न आहेत. सर्व ठिकाणचीं एकूण उपपुराणांचीं नांवें पाहतां त्यांची संख्या १८ पेक्षा जास्त भरते. प्रचलित उपपुराणांचीं नांवें पुढीलप्रमाणे आहेत—

(१) आद्य किंवा सनत्कुमारीय (२) नारसिंह (३) स्कान्द (४) शिवधर्म (५) दुर्वासोक्त (६) नारदीय (७) कापिल (८) वामन (९) औशनस (१०) ब्रह्माण्ड (११) वारूण (१२) कालिका (१३) माहेश्वर (१४) साम्ब (१५) सौर (१६) पराशरोक्त (१७ मारीच (१८) भार्गव (१९) नंदी (२०) वायवीय (२१) नन्दिकेश्वर-युग्म (२२) दैव (२३) भास्कर (२४) मानव (२५) भागवतद्वय (२६) पाद्म (२७) शौक्रेय (२८) बार्हस्पत्य (२९) कौर्म (३०) आणु (३१) बृहन्नारदीय (३२) बृहन्नन्दीश्वर (३३) क्रियायोगसार (३४) धर्म (३५) विष्णुधर्मोत्तर (३६) विष्णुधर्म (३७) बृहद्धर्म (३८) शौक्र (३९) बृहन्नारसिंह (४०) बृहद् वैष्णव (४१) गारुड (४२) प्रभासक (४३) लीलावती (४४) देवी (४५) आखेटक (४६) एकाम्र (४७) एकपाद (४८) लघु भागवत (४९) मृत्युंजय (५०) आंगिरसक (५१) गणेशक.

या उपपुराणांशिवाय आणखीहि कांही उपपुराणें उपलब्ध आहेत. कांही उपपुराणें नष्ट झालीं असेंहि कळतें.

कूर्मपुराणांत ज्या १८ उपपुराणांचीं नांवें आलीं आहेत, तीं इ. स. ६५० ते ८५० या काळांत रचलीं गेलीं असावीं. या उपपुराणांच्या रचनेचा आरंभ गुप्तकाळीं झाला, असें साधारणपणे म्हणतां येईल. कित्येकांच्या मतें कांही उपपुराणें यापेक्षाहि प्राचीन आहेत.

वैदिक काळापासूनच पुराणें हीं सूतवाङ्मय या स्वरूपांत प्रचलित होतीं. वैदिक आर्य त्यांना वेदांच्या खालोखाल पवित्र मानीत. कालांतराने बौद्ध व जैन या धर्मांच्या प्रसारामुळे वैदिक धर्मावर आघात बसल्यासारखें झालें. तेव्हा स्मार्त ब्राह्मणांनी आपापल्या पंथाच्या उत्कर्षासाठी त्या पुराणसाहित्याचा उपयोग करून घेतला व त्याच्या आधारें वर्णाश्रमधर्माचें पुनरुज्जीवन केलें. त्यावेळीं ब्रह्मा, विष्णु व महेश या देवतांची उपासना करणारे ब्राह्म, पांचरात्र व पाशुपत हे पंथ अस्तित्वांत होते. पुढे गुप्तकालांत भागवत पंथाचा उत्कर्ष झाला.

स्मार्तपंथी ब्राह्मणांनी जी पुराणें रचलीं, तीं महापुराणें या नांवाने प्रसिद्धीला आलीं. इ. सनापूर्वी त्यांच्या रचनेला आरंभ झाला होता. हीं पुराणें रचलीं गेल्यावर त्यांची एकूण संख्या अठरा झाली. ती संख्या शुभ आहे असें समजून निश्चित ठरविली गेली. त्यानंतर ब्राह्म, पांचरात्र व पाशुपत या पंथांचे आणखी उपपंथ निर्माण झाले. त्या पंथांपैकी स्मार्त लोकांनी नवीन पुराणें रचलीं. पण अठरापुराणें मानणाऱ्यांनी या नवरचित पुराणांना आपल्या गटांत थान दिलें नाही. परंतु तीं प्रसिद्ध व लोकप्रिय झाल्यामुळें त्यांना दुय्यम स्थान तरी देणेंच भाग होतें. म्हणून मग मत्स्यपुराणांत कांही श्लोकांची भर घालून त्यांत नवीन पुराणांचें वर्णन उपपुराणें म्हणून करण्यांत आलें.

महापुराणांप्रमाणेच उपपुराणांतहि सर्ग, प्रतिसर्ग, वंश, मन्वंतर व वंशानुचरित हे विषय असावे, असें कांही ठिकाणीं

म्हटलें आहे. पण प्रत्यक्षांत मात्र तसें क्वचितच आढळतें. हीं उपपुराणें विशिष्ट पंथाच्याच तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्यासाठी रचलेलीं असल्यामुळे त्यांच्या कर्त्यांनी राजवंशावळीला कांही वेळां मुळीच महत्त्व दिलें नाही. कांही ठिकाणीं उपपुराणांत राजवंश दिलेले असतात; पण त्यांची माहिती यथार्थ नसते. त्यांत दंतकथाहि बऱ्याच घुसडलेल्या आढळतात. पण असें असूनहि धार्मिक व सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने हीं उपपुराणें अत्यंत उपयुक्त ठरलीं आहेत. हिंदूंची सामाजिक स्थिति, त्यांचें तत्त्वज्ञान, विज्ञानाचा विकास व साहित्य, यांविषयीं पुष्कळ माहिती या उपपुराणांमध्ये आढळते. महापुराणें हीं श्रेष्ठ प्रतीचीं व अधिकृत मानलीं गेल्यामुळे त्यांतहि पुढे पुष्कळच भर घालून त्यांचें उपबृंहण केलें गेलें. त्यामुळें सांप्रत उपलब्ध असलेलीं महापुराणें हीं इतिहासाच्या दृष्टीने विश्वसनीय राहिलेलीं नाहीत. पण उपपुराणांची गोष्ट तशी नाही. तीं दुय्यम प्रतीचीं म्हणूनच उपेक्षणीय राहिल्यामुळे त्यांवर नवीन संस्कार झाले नाहीत किंवा त्यांत भरहि पडली नाही. त्यामुळेच त्यांचें मूळ रूप बहुशः अबाधित राहिलें. त्यांतील माहितीहि त्यामुळेच अधिक विश्वसनीय ठरते.

उपबर्हिण क्रौंच द्वीपांतील एक लघुपर्वत [पु. इं.].

उपभूषण देवाच्या पूजोपचारांत मुख्य भूषणांच्या मध्ये ज्या वस्तू देतात, त्यांना हें नांव आहे. हीं उपभूषणें पुढीलप्रमाणे असतात—

प्रावारः पानपात्रं च गेण्डुको गृहमेव च ।
पर्यङ्कादि यदन्यच्च सर्वं तदुपभूषणम् ।।

अर्थ— उत्तरीय वस्त्र, पानपात्र, उशी, घर, पलंग आणि इतर वस्तू या सर्व उपभूषणें होत.

उपभृत् यज्ञांतली एक पिंपळाची स्रुची. जुहूने जेव्हा जेव्हा आहुती दिल्या जातात, तेव्हा तेव्हा ही स्रुची तिच्याबरोबर घ्यावी लागते. ही जुहूवर झाकण म्हणून



उपभृत

ठेवतात व आहुति देण्याच्या वेळीं जुहूच्या खाली धरतात.

उपमंथनी उप+मन्थ्=घुसळणें; त्यावरून घुसळण्याच्या रवीला उपमंथनी असें नांव पडलें आहे (बृहदा. उप.६.३.१३). घुसळणाऱ्या पुरुषाला बाज. संहितेंत उपमन्थिता



उपमंथनी

असें म्हटलें आहे. पुरुषमेधांतील बळींच्या यादींत याचा समावेश आहे [वे. इं.]

उपमा ब्रह्मक्षेत्रांतली एक देवता (वायु पु. ५९.१३०).

उपमाता मातृसदृश स्त्री. मुख्यत्वें दाईला उपमाता म्हणतात. पण स्मृतिग्रंथांत सहा उपमाता सांगितल्या आहेत त्या अशा——

मातुःस्वसा मातुलानी पितृव्यस्त्री पितृष्वसा ।
श्वश्रूः पूर्वजपत्नी च मातृतुल्याः प्रकीर्तिताः ।।

अर्थ—मावशी, मामी, चुलती, आत्या, सासू व मोठी भावजय या सहा उपमाता होत.

उपयज् होम पशुयागांत अनुयाजाच्या वेळीं करायचा एक होम. शामित्र अग्नि वेदींत ठेवून त्या अग्नीवर पशूच्या गुदकांडाच्या अकरा भागांच्या आहुती देतात. या होमाचे मंत्र शुक्ल यजुर्वेदामध्ये सांगितले आहेत (६.२१). प्रतिप्रस्थाता ऋत्विज् हा होम हाताने अथवा गुदकांडाचा तुकडा स्रुचींत घेऊन त्याने करतो. उपयज् होम झाल्यावर होमकर्त्याने बर्हीवर हात पुसून आपल्या हृदयास स्पर्श करायचा असतो. ज्या यागांत पशुयाग असेल, तिथे अनुयाजाबरोबर हा होम करतात.

उपयमनी उंबराच्या लांकडाची मोठी स्रुची. या स्रुचीचें बिल (टवळें) मोठें करतात. महावीर खूप तप्त झाला, म्हणजे तो अग्नीतून काढून उपयमनींत ठेवतात.

उपयोग ऐहिक व पारलौकिक कल्याणासाठीं जीं पुण्यकर्मे करतात त्यांना इष्टापूर्त असें नांव आहे. या इष्टापूर्तांच्या सिद्धीसाठी द्रव्य खर्च करणें याला उपयोग अशी संज्ञा आहे. 'उपयोगः धर्मादिप्रयोजनो वियोगः' अशी त्याची व्याख्या

आहे. ‘ नियमपूर्वकं विद्याग्रहणम् ’ = नियमपूर्वक विद्येचें ग्रहण करणें यालाहि उपयोग म्हटलें जातें. (अष्टा. १.४.२९ वरील काशिका).

उपरागा एक शक्तिदेवता [पु. इं.]

उपवत्तन सालवन हें वन मल्लांच्या प्रदेशांत होतें. या ठिकाणीं बुद्धाला महापरिनिर्वाण प्राप्त झालें. [हि. जॉ. ए. इं.]

उपवर्ष एक महान् आचार्य. याने पूर्व व उत्तर मीमांसा यांवर वृत्ति लिहिली आहे. शबरस्वामीने आपल्या मीमांसासूत्रभाष्यांत भगवान् उपवर्ष असें म्हणून याला गौरविलें आहे (१. १. ५). शंकराचार्यहि याला सर्वत्र भगवान् ही उपाधि लावतात. शबरस्वामी याचा उल्लेख करतो व शबर स्वामीचा काल इ. स. दुसऱ्या शतकाच्या मागे जात नाही, यावरून उपवर्ष हा तत्पूर्वकालीन ठरतो. उपवर्षाने व्याकरणांतील स्फोटवादाचें खंडन केलें आहे. पतंजलि हा स्फोटवादाचा प्रवर्तक असून त्याचा काल सनपूर्व दुसरें शतक मानतात. त्यावरून उपवर्ष हा पतंजलीच्या नंतर व शबरस्वामीच्या पूर्वी म्हणजे सनपूर्व २०० ते इ. स. २०० या कालखंडांत कधीतरी होऊन गेला, एवढेंच म्हणता येतें. [प्रा. मौ. बि.; हिंदुत्व; शंकराचार्य.]

उपवसथ यागाच्या आदल्या दिवसाला उपवसथ म्हणतात. दुसऱ्या दिवशीं यागासाठी ज्या देवता असतील, त्यांचें आवाहन करून ‘ आजच्या दिवस तुम्ही अग्नींत राहा, ’ असें उपवसथाच्या विधींत त्यांना सांगायाचें असतें. याला देवतोपवासन असेंहि म्हणतात. या दिवशीं यजमानदंपती उपवास करतात व देवतांच्या सान्निध्यांत राहतात.

उपवास अन्नपाणी वर्ज्य करून राहणें म्हणजे उपवास होय. याचें लक्षण पुढील प्रमाणे सांगितलें आहे –

उपावृत्तस्य पापेभ्यो यस्तु वासो गुणैः सह ।
उपवासः सविज्ञेयः सर्वभोगविवर्जितः ।।

अर्थ – पापकर्मांपासून निवृत्त झालेल्या माणसाचा सद्गुणांसह वास म्हणजे उपवास होय. त्यांत (खानपानदि) सर्वभोग वर्ज्य करायचे असतात.

सर्वसाधारणपणे उपवासाचा अर्थ हलका व मित आहार घेणें, असा करतात (तै. सं. १०६.१०७.३). उपवास हा पापक्षालनाचा एक मार्ग होय, असें गौ. धर्मसूत्र सांगतें (१९. ११). उपनिषत्कालींहि जाणत्या लोकांना उपवासाचें महत्त्व माहीत झालें होतें. बृहदारण्यकांत परमेश्वराप्रत जाणण्याचे जे अनेक मार्ग सांगितले आहेत, त्यांत उपवासाचाहि निर्देश आहे ––

तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणाविविदिषन्ति
यज्ञेन दानेन तपसाऽनाशकेन ।

अर्थ–– वेदवचनाधार घेऊन यज्ञ, दान, तप व उपवास हे परमेश्वरप्राप्तीचे मार्ग आहेत, असें ब्राह्मण सांगतात.

तपाच्या निरनिराळ्या प्रकारांत उपवास हा मुख्य व श्रेष्ठ आहे, असें महाभारतांत सांगितलें आहे. म. भा. च्या अनुशासनपर्वांत निरनिराळ्या प्रकारचे उपवास व त्यांचीं फलें यांचें वर्णन आहे (१०६.५). या सर्व फलांचे तात्पर्य स्वर्गप्राप्ति हें आहे.

गृह्यसूत्रांत उपवास शब्दाचा अर्थ थोडा वेगळा केला आहे. यज्ञकर्माला उपयुक्त असें धान्य शिजवून अल्पाहार करणें म्हणजे उपवास होय, असें काठक गृह्यसूत्र सांगतें (४६. २).

कोणतेंहि वैदिक कर्म करण्यांत हयगय झाली, तर त्याचें प्रायश्चित्त म्हणून एक दिवस उपास करावा, असें मनुस्मृतींत (११. २०३) व विष्णु धर्मसूत्रांत (५४. २९) सांगितलें आहे.

अहोरात्राच्या उपवासाला संपूर्ण उपवास म्हणतात. एकादशी, शिवरात्रि, रामनवमी, जन्माष्टमी, हरितालका तृतीया इ. संपूर्ण उपवास होत. दिवसांत एकदा जेवणें याला एकभुक्त म्हणतात. सोमवार, शनिवार इ. वारांचे उपवास हे एकभुक्त करायचे असतात. संकष्टचतुर्थी, प्रदोष हेहि एकभुक्तच होत. अशा उपवासांत दुपारीं किंवा रात्रीं, एकदा भोजन करतात.

अंजन, गंध, पुष्प, माला, अलंकार, दंतधावन, गात्राभ्यंग, तांबूल, दिवसा झोप, अक्षक्रीडा, मैथुन, अतिजलपान इ. गोष्टी उपवासाच्या दिवशीं वर्ज्य होत. व्रतीमनुष्य उपवास करण्याच्या कामीं असमर्थ असेल, तर त्याच्या प्रतिनिधीने उपवास केला तरी चालतो.

पुत्रं वा विनयोपेतं भगिनीं भ्रातरं तथा ।
एषामभाव एवान्यं ब्राह्मणं विनियोजयेत ।।

(स्कंदपुराण)

अर्थ–– विनयशील पुत्र, बहीण, भाऊ किंवा त्यांच्या अभावीं ब्राह्मण यांस उपवासासाठीं प्रतिनिधि नेमावे.

भार्या भर्तृव्रतं कुर्यात् भार्यायाश्च पतिस्तथा ।
असामर्थ्ये द्वयोस्ताभ्यां व्रतभङ्गो न जायते ।।

(गरुड पुराण)

अर्थ— पत्नीने पतीचें व पतीने पत्नीचें व्रत केल्यास चालतें;

पण तीं दोघेंहि जर त्या कामीं असमर्थ असतील, तर त्यांना व्रतभंगाचा दोष लागत नाही.

उपवास करणें शक्य नसेल, तर त्यासाठी आणखीहि एक पर्याय सांगितला आहे–

उपवासासमर्थश्चेदेकं विप्रं तु भोजयेत् ।
तावद्धनानि वा दद्याद् यद् भक्ताद् द्विगुणं भवेत् ।
सहस्रसम्मितां देवीं जपेद्वा प्राणसंयमान् ।
कुर्याद् द्वादशसंख्याकान् यथाशक्ति व्रते नरः ।

(ब्रह्मवै. पु.)

अर्थ –– उपवास करणें शक्य नसेल तर एका ब्राह्मणाला भोजन द्यावें किंवा भाताच्या (शिध्याच्या) दुप्पट किमतीचें द्रव्य द्यावें. देवीचा जप एक हजार संख्येने करावा. बारा वेळां प्राणायाम करावा. हें सर्व यथाशक्ति केलें तरी चालेल.

नक्तं हविष्यान्नमनोदनञ्च
फलं तिलाः क्षीरमथाम्बु चाज्यम् ।
यत्पञ्चगव्यं यदि वाथ वायुः
प्रशस्तमत्रोत्तरमुत्तरञ्च ।।

अर्थ –– नक्तभोजन, भात वगळून हविष्यान्न, फळें, तीळ, दूध, पाणी, तूप, पंचगव्य व वायु यांचें भक्षण करून केलेला उपवास उत्तरोत्तर प्रशस्त होय.

जैनांनी उपवासाचें महत्त्व फारच वाढविलें आहे. त्यांनी सरसकट सर्वांना उपवास करण्याचा आदेश दिल्यामुळे खालच्या वर्गांतहि त्या धर्माचा प्रसार होण्यास मदत झाली. जैनधर्मांत अखंड ४२ दिवसांपर्यंतचा उपवास सांगितला आहे. त्यांच्या उपवासांत अन्नाबरोबर पाणीहि वर्ज्य असतें.

फार प्राचीनकाळीं कधीतरी माणसाला अन्नाचें दुर्भिक्ष झालें असावें व त्यांतून धार्मिक उपवासाची कल्पना निघाली असावी. त्यामुळे उपवासकालांत होणारा शारीरिक व मानसिक त्रास म्हणजे तपच होय, असें मानलें गेलें आहे. मृताशौचांत उपवास करण्याची पद्धत पुष्कळ देशांत आढळून येते. पापाचें परिमार्जन व ईश्वराची क्षमा, यांसाठीहि कित्येक लोक उपवास करतात. विषयवासना शमावी व आत्मिक उन्नतीच्या मार्गांतल्या सर्व अडचणी व बाधा दूर व्हाव्या, म्हणूनहि उपवास करतात. उपवास ही धार्मिक आचारांतली एक शिस्त आहे. उपवासाने जप, तप, ध्यान, इत्यादि गोष्टींना तेज येतें. उपवास किती दिवस करावा, हें त्या त्या धर्मकृत्याच्या विधीवर अवलंबून असतें. ख्रिस्ती व इस्लाम या धर्मांतहि उपवास विहित असून त्या धर्मांनी त्याचे दिवसहि ठरवून दिलेले आहेत. पारश्यांच्या धर्मांत मात्र उपवास सर्वथा वर्ज्य ठरविलेला आहे. [हि. ध.; श. क.; म. भा. उ. सं.; एन्सा. रि.]

उपवीत डाव्या खांद्यावरून घातलेल्या यज्ञसूत्राला उपवीत म्हणतात. तें नऊ धाग्यांचें आणि त्रिवृत असतें. पाहा–यज्ञोपवीत.

उपवीर पिशाचांचा एक वर्ग. हा वृक्षांच्या साली परिधान करून स्मशानांत राहतो. [पु. इं.]

उपवेद प्रत्येक वेदाला एक या प्रमाणे चार वेदांचे चार उपवेद आहेत, ते पुढीलप्रमाणे – ऋग्वेदाचा आयुर्वेद, यजुर्वेदाचा धनुर्वेद, सामवेदाचा गांधर्ववेद व अथर्ववेदाचा अर्थशास्त्र हा उपवेद होय.

उपवेशन एक शिशुसंस्कार. उपवेशन म्हणजे बालकाला भूमिवर बसविणें. हा संस्कार पांचव्या महिन्यांत करायचा असतो. उत्तरात्रय, मृग, पुष्य, ज्येष्ठा, अश्विनी व अनुराधा, हीं नक्षत्रें या संस्कारास शुभ असतात. दुसरी गोष्ट म्हणजे मंगळ शुभस्थानीं असावा लागतो. या प्रसंगीं वराह व पृथ्वी यांची पूजा करून बालकाला भूमीवर बसवितात व पुढीलप्रमाणे भूमीची प्रार्थना करतात–

रक्षैनं वसुधे देवि सदा सर्वगतं शुभे ।
आयुःप्रमाणं सकलं निक्षिपस्व हरिप्रिये ।।
चराचराणां भूतानां प्रतिष्ठानाव्यया ह्यसि ।
कुमारं पाहि मातस्त्वं ब्रह्मा तदनुमन्यताम् ।।

अर्थ – हे पृथ्वी, तूं या मूलाचें सर्वत्र रक्षण कर. याला संपूर्ण आयुःप्रमाण (शतायुष्य) दे. तूं चराचर भूतांची प्रतिष्ठा व अव्यय आहेस. तूं या कुमाराचें रक्षण कर. ब्रह्मा या गोष्टीला मान्यता देवो. [नि. सिं.]

उपवेष पळसाची प्रादेशमात्र समिधा. पण कात्यायनपरिशिष्टांत उपवेष हाताच्या आकाराचा करावा व तो एक अरत्नि लांब असावा असें सांगितलें आहे. तसेंच तो खैराचा केल्यासहि चालेल असेंहि म्हटलें आहे. [विद्याधरशास्त्री भिडे]

उपशांत शिव वाराणसींतलें एक तीर्थ. हें भद्रेश्वराच्या नैर्ऋत्येला आहे. [कृ. क. त.]

उपशून्य (इ. स. चें ६ वें शतक) हा मध्य भारतांत राहणारा एक भिक्षु होता. याने चीनमध्ये जाऊन तीन बौद्ध ग्रंथांचें चिनी भाषेंत भाषांतर केलें. [म. ज्ञा. को.]

उपश्रुति अदृष्ट कथन करणारी एक देवता. इंद्राणीच्या प्रार्थनेवरून हिने इंद्र जिथे लपला होता, तें ठिकाण तिला दाखविलें. [म. भा. उद्यो. १३–१४]

उपसंग्रहण पादस्पर्श, अभिवादन. बटूने गोत्र, प्रवर व नाम यांचा उच्चार करून ' मी नमस्कार करतों, ' असें म्हणणें व उजव्या व डाव्या कानाला अनुक्रमें डाव्या व उजव्या हातांनी स्पर्श करून नंतर गुरूच्या पायांवर मस्तक टेकणें, याला उपसंग्रहण असें नांव आहे.

उपसथागार बौद्ध विहाराचा एक भाग. या ठिकाणीं भिक्षूंचा पापोच्चारणविधि होत असे.

उपसद् श्रौत यज्ञांतला एक होम. देवानी हा होम करून असुरांना त्रिलोकांतून हाकलून दिलें. [ऐ. ब्रा.]

उपसर्ग महामारी वगैरे जीवघेण्या सांथींना उपसर्ग म्हणतात. योगमार्गाच्या आचरणांत येणाऱ्या विघ्नांनाहि हें नांव आहे. उपसर्ग हे त्रिगुणांचे परिणाम असतात. [पु. इं.]

उपस्तरण होमासाठी पात्रांत हविर्भाग घेण्यापूर्वी पात्राला तूप लावतात, त्याला उपस्तरण म्हणतात.

उपस्तुत वार्ष्टिहव्य सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांतलें ११५ वें सूक्त याच्या नांवावर आहे. याने त्याच्या पहिल्या ऋचेंत एक कोडें घातलें आहे–

' (म्हटला तर) लहान आणि (म्हटला तर) तरुण असा एक पुरुष आहे. त्याची वाढ म्हणजे अद्भुत प्रकार ! त्याला आया दोन. पण एकीजवळहि तो कधी स्तनपानासाठी गेला नाही. कारण त्याच्या आयांना स्तनच नाहीत. त्यांनी त्याला जन्म दिला म्हणावें, तर तो तात्काळ कसा वाढला ? आणि पुढे त्याने देवांचें प्रतिनिधित्व तरी कसें केलें ?'

या कोड्याचें ' अग्नि ' असें उत्तर त्यानेच पुढील ऋचेंत दिलें आहे.

उपस्थ आसन हें एक योगमार्गांतलें आसन असून त्याचें लक्षण पुढीलप्रमाणे आहे –

दक्षिणं चोपविश्योरुं वामगुल्फोपरि न्यसेत् ।
वामोरौ दक्षिणं गुल्फं तच्चोपस्थमुदीरितम् ।।

(आचारेन्दु)

अर्थ –– बसतांना उजवी मांडी डाव्या घोट्यावर व डावी मांडी उजव्या घोट्यावर ठेवून बसणें म्हणजे उपस्थ होय.

उपस्थान उप = जवळ, स्थान = स्थिति. याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे –

उपस्थानं तदेव स्यात्प्रणतिस्थानसंयुतम्

(आचारेन्दु)

अर्थ – मंत्राला नमस्कारविषयाची जोड दिली, की तें उपस्थान होतें.

उपस्थानांत उभें राहून देवाचें स्तोत्र करतात. संध्यावंदनांत गायत्रीजप झाल्यावर उभें राहून उपस्थान करतात. सकाळीं ' मित्रस्य चर्षणी ' (ऋ. ३. ५९. ६–९) इ. मंत्रांनी सूर्याचें व सायंकाळीं ' जातवेदसे ' (ऋ. १.९९.१) या मंत्राने अग्नीचें उपस्थान करतात. [आह्निकसार]

उपहूत (१) मरीचिगर्भ लोकांतील पितरांचा एक वर्ग. हे सोमज व सोमप आहेत.

(२) साध्यांनी वाढविलेले अंगिरसाचे पुत्र. [पु. इं.]

उपज्ञात वैदिक साहित्यांतला एक प्रकार. एखाद्या आचार्याच्या प्रथम आविष्काराला उपज्ञात ही संज्ञा आहे. अशा प्रकारच्या प्रयत्नाला आद्य आचिख्यासा म्हणत (अष्टा. २. ४. २१). आपिशलि, शाकटायन व पाणिनि यांच्या सारख्या महान् आचार्यांच्या कृती या सदरांत येतात. उपज्ञात साहित्य हें प्रोक्त साहित्याच्या अंतर्गत मानतात. छंदोग्रंथ किंवा शाखा ग्रंथ हे केवळ प्रोक्त आहेत; उपज्ञात नाहीत. प्रवचनकर्त्या ऋषींनी मूळ संहितांमध्ये कांही फेरफार करून त्या आपल्या शिष्यांना पढविल्या. त्यामुळेच एकाच वेदाच्या कित्येक शाखा परस्पर मिळत्या जुळत्या आढळतात. पाणिनीची अष्टाध्यायी मात्र प्रोक्त व उपज्ञात अशा दोन्ही सदरांत येऊं शकते (पाणिनिना प्रोक्तम् पाणिनिना उपज्ञातम् – काशिका). पाणिनीच्या नव्या व्याकरणशास्त्राला प्रोक्तलक्षण लागू पडतें तें असें, की छंदोग्रंथांप्रमाणेच त्याचीहि गुरु-शिष्यपरंपरा प्रवर्तित झाली. व त्याचें उपज्ञातलक्षण हें, की त्या शास्त्रांत पाणिनीचें स्वतंत्र कर्तृत्व मानलें गेलें. [पा. भा.]

उपाकरण पशुयागांत ज्या देवतेसाठी जो पशु सांगितला असेल, त्याचा याग करायचा असतो. पशु यज्ञशाळेंत आणल्यावर ' हा अमुक देवतेसाठी आहे, ' असा जो संकल्प करतात, त्याला उपाकरण म्हणतात. हें झाल्यावर

मग त्या पशूचें हनन करून त्याच्या वपेचा व अंगांचा याग करतात.

उपाकर्म याला उपाकरण असेंहि म्हणतात. संस्कारपूर्वक श्रुतींचें ग्रहण करणें, म्हणजे उपाकरण होय. उपाकर्म म्हणजे वार्षिक वेदाध्ययनाचा प्रारंभ करणें व उत्सर्जन म्हणजे वेदाध्ययन कांही काल बंद ठेवणें होय. प्राचीन काळीं हे दोन विधी वेगवेगळ्या दिवशीं करीत; पण पुढे वेदाध्ययनाचा ऱ्हास होऊं लागला आणि हे दोन्ही विधी एकाच दिवशीं प्रथम उत्सर्जन व मग उपाकर्म असे लागोपाठ करण्यांत येऊं लागले.

उपाकर्माला कांहीं सूत्रांत अध्यायोपाकरण किंवा अध्यायोपाकर्म असें म्हटलें आहे. यांतील अध्याय शब्दाचा अर्थ वेदाध्ययन असा आहे. तेव्हा उपाकर्म म्हणजे वेदाध्ययनाला प्रारंभ करण्याचा विधि असा त्याचा अर्थ होतो. हें वर्षाऋतूंत करतात किंवा वर्षातून एकदा करतात, म्हणून याला वार्षिक असेंहि म्हटलेलें आढळतें. उपाकर्म केव्हा करावें, याबद्दल सूत्रकारांत मतभेद आहेत. आश्वलायन म्हणतो–

ओषधीनां प्रादुर्भावे श्रवणेन श्रावणस्य
पञ्चम्यां हस्तेन वा ।

(आश्व. गृ. सू. ३. ५. १–२)

अर्थ–ओषधी उगवल्या म्हणजे चंद्र श्रवण नक्षत्रांत असतां (श्रावण पौर्णिमेला) किंवा चंद्र हस्त नक्षत्रांत असतां श्रावण पंचमीला उपाकर्म करावें.

या बाबतींत प्रत्येकाने आपापल्या गृह्यसूत्राप्रमाणे वागावें, असें टीकाकार सांगतात. ऋग्वेदी लोक श्रावण शु. ५ मी किंवा १४ शी किंवा पूर्णिमा या तीथींना उपाकर्म करतात. गोभिल व खादिर गृह्यसूत्रें भाद्रपदपूर्णिमा व हस्तनक्षत्र यांच्या योगावर कर्म विहित समजतात. ब्रह्मचारी, गृहस्थ व वानप्रस्थ या तिघांनाहि उपाकर्म करावें लागतें. तें सकाळीं करतात. आचार्य आपल्या शिष्यांसह गृह्याग्नीवर हा विधि करतो, असें पारस्कर सांगतो. याचा विधि असा –

आचार्य व शिष्य एकत्र जमून स्थंडिलावर संकल्पपूर्वक अग्नि सिद्ध करतात. आज्यभागान्त कर्म झाल्यावर सावित्री, ब्रह्मा, श्रद्धा, मेधा, प्रज्ञा, धारणा, सदसस्पति, अनुमति व छंदसीऋषि या नऊ देवतांना आज्याहुती देतात. नंतर सातूचें पीठ दह्यांत मिसळून त्याच्या गोळ्या करतात व अग्नि, अप्तृणसूर्य इ. देवतांना त्यांच्या आहुती देतात. मग स्विष्टकृत् करून आचार्य व शिष्य त्या अवशिष्ट उरलेल्या सातूच्या पिठाचें सेवन करतात. मग आचमन, मार्जन, यज्ञोपवीतधारण, गायत्री जप इ. विधी करतात. सांगतेसाठी ब्राह्मणांना भोजन घालून दक्षिणा देतात.

उपाकर्माला सांप्रत श्रावणी म्हणतात. श्रावणी म्हणजे नवें यज्ञोपवीत घालण्याचा वार्षिक दिवस, अशी हल्लीं समाजांत सार्वत्रिक समजूत आहे; पण ती भ्रममूलक होय. गृह्यसूत्रांत उपाकर्माचें विधान सांगतांना त्यांत यज्ञोपवीतधारणाचा विधि सांगितलेला नाही. तो उपाकर्माचा प्रधान हेतु नव्हेच. प्रतिवर्षी वेदाध्ययनास किंवा वेदांच्या उजळणीस प्रारंभ करण्याच्या प्रसंगीं विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांसमवेत करण्याचा तो एक सोपा, सुटसुटीत, परंतु शिक्षणशास्त्रदृष्ट्या महत्त्वपूर्ण असा विधि होता.

असें असेल, तर सांप्रत गुरु-शिष्यांव्यतिरिक्त समाजांतले इतरहि सर्व उपनीत व गृहस्थाश्रमी लोक श्रावणी करतात, ती कां, असा प्रश्न उपस्थित होतो. पूर्वकालीन समाजसुधारकानी घडवून आणिलेली ती एक सामाजिक सुधारणा आहे, असें त्याचें उत्तर द्यावें लागतें. शिक्षण संपलें व पदवी प्राप्त झाली, म्हणजे विद्यार्थी शिकलेलें बहुतेक सगळें विसरूं लागतात, असा आजचा जो अनुभव, तोच पूर्वीचाहि होता. वेदाध्ययन विसरूं नये, म्हणून नित्य ब्रह्मयज्ञाची योजना केलेली होती. या ब्रह्मयज्ञांत थोडा वेळ तरी स्वाध्याय करावा लागे. पण रोजच्या व्यावहारिक दगदगींत पुढे या स्वाध्यायाचीहि हेळसांड होऊं लागली. त्यामुळे शिकलेले वेदमंत्र जर विस्मृतींत नष्ट होऊं द्यावयाचे नसतील आणि त्या मंत्रांना येणारा शिळेपणा काढून टाकायचा असेल, तर याहून निराळी कांही तरी तजवीज करणें आवश्यक आहे, असें समाजधुरीणांना वाटूं लागलें.

आपला देश कृषिप्रधान आहे. भारतांत आषाढापासून तों भाद्रपदापर्यंत केव्हातरी पावसाळा सुरू होतो. शेतीचीं पेरणी वगैरे कामें झाल्यावर कांही महिने शेतकऱ्याला फुरसतीचे मिळतात. म्हणून या कालांत सर्व स्नातकांनी दर वर्षी शिकलेल्या वेदांची उजळणी करावी, अशा हेतूने उपाकर्म अर्थात् श्रावणी सर्वांना सक्तीची करण्यांत आली. हस्तनक्षत्राची देवता सविता ही होय. गायत्रीमंत्रांतहि त्याच देवतेची प्रार्थना आहे. तेव्हा प्रतिवार्षिक वेदाध्ययनाचें अधिवेशन श्रावण महिन्यांतील हस्तनक्षत्राच्या दिवशीं म्हणजे शु. ५ मीस करावें, अशी प्रथा पडली. प्रारंभीं गुरुमुखांतून श्रवण करूनच शिष्य वेद शिकत. तेव्हा उपाकर्मासाठीं श्रावण महिन्यांतील श्रवण नक्षत्राचा दिवस म्हणजेच पौर्णिमा हीहि मान्य करण्यांत आली. आजहि उपाकर्म श्रावण शु. ५ मीस झालें नाही, तर तें पौर्णिमेस करतात. उपाकर्माच्या वेळीं वैदिक देवतांचें हवन करून बुद्धि व

धारणा प्राप्त व्हावी म्हणून प्रार्थना करतात. त्याच बरोबर मंत्रद्रष्टच्या ऋषींनाहि कृतज्ञतापूर्वक प्रणाम करतात. प्रत्येक शाखेचें उपाकर्म भिन्न असतें. उत्सर्जनविधि हा उपाकर्माचें अधिवेशन संपण्याच्या वेळीं करीत असत. उत्सर्जन झालें, की पाठशाळांना सुट्टी होत असे. पण सांप्रत हे दोनहि विधी केवळ तांत्रिकच झाल्यामुळे श्रावणी करणारे लोक उत्सर्जन व उपाकर्म एकाच दिवशीं करून मोकळे होतात. **पाहा**—उत्सर्जन. [प्रा. भा. शि. प. ; हि. ध. ; ऋ. ब्र. क.]

उपाख्यान कोणत्याहि मोठ्या कथानकांत विशिष्ट प्रसंगाने समाविष्ट केलेली दुय्यम कथा म्हणजे उपाख्यान होय. ही कथा स्वयमेव परिपूर्ण असते व मुख्य कथेला उपोद्बलक म्हणून सांगितली जाते. सत्यवान्-सावित्री, नल-दमयंती, इ. कथा हीं महाभारतांतलीं उपाख्यानेंच होत.

उपांगललिताव्रत आश्विन शु. ५ मीच्या दिवशीं हें व्रत करतात. हें काम्य व्रत असून स्त्री-पुरुषांना करतां येतें. विशिष्ट कामनेने हें व्रत करतात. ललिता देवी ही या व्रताची देवता आहे. यांत एखाद्या करंडकाचें झांकण तिचें प्रतीक म्हणून पूजेस घेतात. सकाळीं आघाड्याच्या काडीनें दंतधावन करतात. केळीचे खांब व पुष्पमाळा यांनी देवीसाठी मखर बांधतात. देवीचें ध्यान पुढील मंत्राने करतात——

नीलकौशेयवसनां हेमाभां कमलासनाम् ।
भक्तानां वरदां नित्यं ललितां चिन्तयाम्यहम् ।।

अर्थ —— कमलावर अधिष्ठित, निळें, रेशमी वस्त्र परिधान करणारी, सुवर्णकांतीची, भक्तांना नित्य वर देणारी, अशा ललितेचें मी चिंतन करतों.

या पूजाविधानांत पुष्पांजलि समर्पण झाल्यावर गंधाक्षतायुक्त व साग्र अशा ४८ दूर्वा ललितेला वाहतात. नैवेद्यासाठी लाडू, वडे, घारगे वगैरे पदार्थ करतात. पूजेच्या अंतीं घारग्यांचें वायन देतात. रात्रौ जागरण व कथाश्रवण करतात. दुसऱ्या दिवशीं देवीचें विसर्जन करतात.

उद्यापनविधि – या व्रताचें उद्यापन करण्यास एक आचार्य व इतर वीस ऋत्विज यांची आवश्यकता असते. या विधींत कलशावर ब्रह्मादि देवतांच्या पीठावर मध्यभागीं ललितेची प्रतिमा ठेवतात. पूजा झाल्यावर उसाचे करवे, पांढरे तीळ व पायसान्न यांच्या १०८ आहुती देतात. वेळूच्या शिप्तरांत २० घारगे ठेवून त्यांचें वायन देतात. ब्राह्मणभोजन घालून व्रताची सांगता करतात. या व्रताची कथा अशी—

प्राचीन काळीं भृगुक्षेत्रांत गौतम नांवाचा एक ब्राह्मण राहत असे. त्याचा बंधुवर्ग मोठा होता. त्याला म्हातारपणीं दोन पुत्र झाले. श्रीपति व गोपति अशीं त्याने त्यांची नांवें ठेवलीं. पुढे थोड्याच काळांत तो निवर्तला. त्याची पत्नी सती गेली. त्यामुळे मुलें उघडीं पडलीं. त्यांच्या चुलत्याने सर्व धनदौलत बळकावून त्या मुलांना घरांतून हाकलून दिलें. ते देशोधडीस लागले. फिरत फिरत विशालनगरीस आले. विवेक नांवाच्या ब्राह्मणाच्या दारीं उभे राहिले. ब्राह्मणाने त्यांना घरांत बोलावून त्यांची हकीकत ऐकली. मुलें पोरकीं आहेत, असें समजल्यावर त्यांना आपल्या घरीं ठेवून घेतलें. तिथेच ते मुलगे विद्या शिकूं लागले.

पुढे आश्विन महिना आला. ब्राह्मणाने उपांगललितेचें व्रत केलें. दोन्ही मुलांनी त्या व्रताचें विधान विचारून घेतलें व आपणहि तें आचरिलें. त्या दोघांतला श्रीपति हा थोरला मुलगा होता. तो विद्वान् झाल्याचें पाहून बाह्मणाने आपली गुणवती नामक कन्या त्याला दिली. नंतर कांही दिवसांनी श्रीपति व गोपति दोघेहि आपल्या गांवीं जाण्यास निघाले. गुणवतीहि त्यांच्या समागमें होतीच.

एवढ्या अवधींत चुलत्याला आपल्या वर्तनाचा पश्चात्ताप झाला होता. त्यामुळे पुतण्ये परत आलेले पाहून तो आनंदित झाला. नंतर त्याने गोपतीचेंहि लग्न करून दिलें. पण गोपति विषयलंपट निघाला. त्याने ललिताव्रत सोडून दिलें. त्यामुळे त्याचें सर्व वैभव नष्ट होऊन तीं नवराबायको अन्नान्नदशेला पोंचलीं. श्रीपति मात्र नियमितपणे व्रत आचरीत होता. एके दिवशीं श्रीपतीच्या घरीं व्रतानिमित्त अन्नसंतर्पण चालू असतां गोपति तिथे गेला; पण पंगती भरल्या असल्यामुळे त्याला जागा मिळाली नाही. तो मग पाकशाळेंत जाऊन बसला व तिथेच भोजन मागूं लागला; पण भावजयीने त्याला झिडकारून लावलें.

मग गोपतीला आपली चूक कळून आली. आपण व्रत सोडलें म्हणून आपली अशी दुर्दशा झाली, हें त्याला पटलें. त्याने निर्धार केला, की आता तपश्चर्या करून ललितेची कृपा संपादन केल्याशिवाय परत यायचें नाही. म्हणून तो तिथून निघून अरण्यांत गेला. भाऊ उपाशी परत गेल्याचें समजून श्रीपतीला दुःख झालें.

गोपतीने आपल्या निर्धाराप्रमाणे देवीच्या कृपेसाठी निराहार तप केलें. देवीने त्याच्यावर अनुग्रह केला. मग तो तिथून पुढे निघाला. फिरत फिरत उपांगराजाच्या नगरींत पोचला. तिथे त्याला ललितेचें मंदिर दिसलें. त्या मंदिरांत त्याने वसती केली. रात्रीं त्याला देवीचा स्वप्नदृष्टान्त झाला. तदनुसार तो

राजाकडे गेला. त्याने करंडकाचें झांकण देण्याविषयीं राजाला प्रार्थिलें. राजाने तें त्याला दिलें. तें घेऊन तो घरीं आला. त्याने पत्नीसह ललितेचें व्रत आचरिलें. त्यामुळे त्याचें वैभव त्याला परत मिळालें.

पुढे एक दिवस गोपतीची कन्या मैत्रिणीबरोबर खेळत होती. त्या खेळासाठी तिने घरांतलें तें करंडकाचें झांकण घेतलें होतें. त्या वेळीं एका तरुणाला सर्पदंश होऊन तो मृत झाला होता व लोक त्याचें प्रेत घेऊन स्मशानाकडे चालले होते. गोपतीच्या मुलीने तें पाहिलें. तिला वाटलें, की हें करंडकाचें झांकण ललितादेवीचें प्रतीक आहे. त्यांतून प्रेतावर पाणी टाकलें, तर देवी त्या मृत तरुणावर कृपा करील. श्रद्धापूर्वक तिने ती गोष्ट केली. तो मृत तरुण जिवंत होऊन उठून बसला. तो कुलशीलवान् व सुंदर असल्यामुळे त्या कन्येच्या मनांत तो भरला. गोपतीने तिचें त्याच्याशीं लग्न करून दिलें. तें तरुण दांपत्य गोपतीच्या घराशेजारींच राहूं लागलें. सासरीं राहायला जातांना त्या मुलीने तें करंडकाचें झांकण आपल्या घरीं नेलें. त्यामुळे ती वैभवाला चढली आणि गोपति पुनरपि दरिद्री झाला.

आपल्या दारिद्र्याचें कारण गोपतीच्या पत्नीला समजलें व ती मुलीकडे झांकण मागायला गेली; पण मुलगी तें देईना. गोपतीच्या बायकोला त्या गोष्टीचा राग आला व तिने जावई समिधा आणण्यासाठी रानांत गेला असतां त्याचा घात करविला. पण ललितेच्या कृपेने तो पुनश्च सजीव होऊन घरीं आला. मग गोपतीच्या बायकोला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला. गोपतीने आपल्या थोरल्या भावाची भेट घेऊन त्याला आपली कर्मकथा सांगितली. श्रीपतीने त्याला ललिताव्रताची पुन्हा एकदा आठवण करून दिली. मग गोपतीने तें व्रत श्रद्धापूर्वक केलें आणि तो सर्वप्रकारें सुखी झाला. [व्रतराज]

उपाध्याय

अध्यापक. ‘ उपाध्यायोऽध्यापकोऽश ’ (अमर). याची व्याख्या अशी –

एकदेशं तु वेदस्य वेदाङ्गान्यपि वा पुनः ।
योऽध्यापयति वृत्यर्थमुपाध्यायः स उच्यते ।

(मिताक्षरा १. ३५)

अर्थ – वेदांचा कांही भाग किंवा वेदांगें यांचें उपजीविकेसाठी जो अध्यापन करतो, त्याला उपाध्याय असें म्हणतात.

महाराष्ट्रांत धार्मिक विधींचें पौरोहित्य करणाऱ्यालाच उपाध्याय म्हणण्याची पद्धत आहे.

उपाध्याय काशीनाथ

(मृत्यु १८०५ इ. स.) यांना बाबा पाध्ये या नांवाने लोक ओळखीत. यांचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यांतल्या गोळवली या गांवीं राहत. यांना ७२ गांवांची जोसपणाची वृत्ति होती. यांचा बाप अनंत उपाध्याय हा स्थानांतर करून पंढरपुरास जाऊन राहिला. काशीनाथ उपाध्याय यांचें कविवर्य मोरोपंत यांच्याशीं नातें होतें. यानी धर्मसिंधु नांवाचा धर्मशास्त्रावरील निबंधग्रंथ लिहिला. त्याशिवाय प्रायश्चित्तेन्दुशेखर, वेदस्तुतीचें विवरण, विठ्ठलऋङ्मंत्रसारभाष्य, असे यांचे आणखीहि ग्रंथ आहेत. शेवटच्या ग्रंथांत त्यांनी ऋग्वेदांतील कित्येक ऋचा विठ्ठलाला लागू होतात, असें दाखविलें आहे. **पाहा–**धर्मसिंधु. [हि. ध.]

उपाय

राजादि लोकांचे शत्रूला वश करून घेण्याचे हेतु (श. क.). हे साम, दान, भेद व दंड, असे चार आहेत. ‘ सामदाने भेददण्डावित्युपायचतुष्टयम् ’ (अमर). यांत उपेक्षा, माया व इंद्रजाल अशा तीन अधिक उपायांची भर घातली, कीं ते सात होतात (मत्स्य पु.२२२.१–३). उपाययुक्त केलेलीं कर्मे फलद्रूप होतात.

उपायेन हि यच्छक्यं न तच्छक्यं पराक्रमैः ।

(हितोपदेश)

अर्थ – जें उपायाने शक्य होतें, तें पराक्रमांनी सिद्ध होत नाही.

उपायकौशल

बौद्ध धर्मांतला एक पारमिता ग्रंथ. बौद्ध भिक्षु सर्वत्र संचार करून या पारमितेच्या द्वारें जनतेंत बुद्धाचा संदेश व महायान पंथाचे सिद्धान्त यांचा प्रचार करीत होते. चैत्यनिर्माण, प्रतिमांकन, संगीत इ. कलांचें विधानहि याच ग्रंथांत आहे. त्यानंतर पुढच्या काळांत मिथुनभावनेचा विकास झाला आणि उपायकौशल याचा, मुद्रामैथुनाची गुह्य साधना असा अर्थ झाला. [हिं. सा. को.]

उपायप्रत्यय

उपाय = प्रज्ञा किंवा शुद्ध ज्ञान. बौद्ध मतें वास्तव समाधींत या शुद्ध ज्ञानाचा उदय होतो व त्यामुळे संस्कार जळून जातात. मग व्युत्थानाविषयीं कसलीहि आशंका राहत नाही. भवप्रत्ययाहून उपायप्रत्यय उच्च कोटीचा असतो. कारण त्यांत वृत्तींच्या निरोधाबरोबरच शुद्ध ज्ञानाचाहि उदय होत असतो. [बौ. द. मी.]

उपांशु

मंत्रजपाची एक पद्धति. आश्व. सूत्रांत (१.१) वृत्तिकारांनी याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे–

शनैरुच्चारयेन्मन्त्रं मन्दमोष्ठौ प्रचालयेत् ।
अपरैरश्रुतः किञ्चित् स उपांशुर्जपः स्मृतः ।।

अर्थ – नुसत्या ओठांच्या हालचालीने, दुसऱ्याला ऐकूं न येईल, इतका हळू मंत्र जपणें याला उपांशु म्हणतात.

यज्ञकर्मांत कांही देवतांचा याग उपांशु होत असतो.

उपांशु पात्र यज्ञांतला एक ग्रह. हें पात्र वेकळीचें करतात.

उपांशुसवनग्रावा उपांशु म्हणजे मंत्रांनी गाळलेला सोमरस. हा सोम ज्या दगडांनी कुटायचा, त्याला उपांशुसवनग्रावा म्हणतात. हा दगड उपांशुपात्राला चिकटवून ठेवल्यास यजमानाचे प्राणापान विच्छिन्न होतात, असें तै. संहितेंत सांगितलें आहे (६. ४. ६).

उपासना उप+आस् = बसणें, प्रवेशणें, या धातूपासून हा शब्द बनला आहे. वरिवस्या, परिचर्या, शुश्रूषा असे उपासनेचे पर्याय शब्द अमरकोशांत दिले आहेत. आपल्या इष्ट किंवा आराध्य देवतेच्या जवळ पोचणें, असा त्या शब्दाचा भावार्थ आहे. उपासनेच्या द्वारें भक्त आपल्या इष्ट देवतेच्या जवळ पोंचतो व त्याच्या कृपेने कृतार्थ होतो, असें सांगितलें आहे. पुराणांत भक्तीला उपासनेचा प्राण मानलें असून योगाला तिचें अंग मानलें आहे. प्राणाविना जसें शरीर राहूं शकत नाही, त्याचप्रमाणें भक्ति व योग यांच्यावांचून उपासना घडूं शकत नाही. वैदिक किंवा अवैदिक कोणीहि असोत; त्यांच्या उपासनेच्या तपशिलांत फरक असला, तरी उपासना हें तत्त्व सर्वांनाच मान्य आणि स्वीकार्य ठरलेलें आहे.

आपल्या शास्त्रकारांनी मोक्ष हें मानवाचें अंतिम ध्येय ठरविलें आहे. मोक्ष म्हणजे दुःखाची आत्यंतिक निवृत्ति व निरतिशय आनंदाची नित्य प्राप्ति होय. प्रत्येक जीव हा तत्त्वतः परमात्मरूपच आहे. पण अज्ञानामुळे त्याला आत्मस्वरूपाची साक्षात् अनुभूति घडत नाही. जिवाशिवांच्या ऐक्यानुभूतींत अज्ञान हें अंतराय निर्माण करतें. म्हणून तें अज्ञान दूर करणें व त्यासाठी झटणें हें प्रत्येक मोक्षसाधकाचें आद्य कर्तव्य ठरतें. या अज्ञानाच्या निरासासाठी शास्त्रकारांनी कर्म, उपासना व ज्ञान हीं तीन श्रेष्ठ साधनें सांगितलीं आहेत. शास्त्रविहित कर्मांनी चित्तशुद्धि होते, तें शुद्ध चित्त उपासनेनें एकाग्र होतें आणि पुढे तेंच ज्ञानाने परब्रह्मांत विलीन होतें.

ईश्वर हा उपासनेचा श्रेष्ठ विषय होय. तो एकमेवाद्वितीय असून अनेक देवदेवतांचा स्रष्टा, प्रभव, उद्भव व अधिप आहे. सर्व धर्मांत ईश्वर हाच उपासनेचा विषय मानलेला आहे. पण तो निर्गुण, निराकार असल्यामुळे प्रत्येक व्यक्ति आपल्या आवडीप्रमाणे एखाद्या सगुण, साकार रूपांत त्याची उपासनेसाठी निवड करते. या सगुण, साकार ईश्वराला कार्यब्रह्म म्हणतात. कार्यब्रह्म हें परिछिन्न असतें. त्याच्या ठिकाणीं व्यापक व सच्चिदानंदरूप असें जें कारणब्रह्म अनुस्यूत असतें, तेंच वस्तुतः उपास्य होय. पण त्याची उपासना निरालंब अतएव दुर्घट असल्यामुळे सामान्य लोक उपासनेसाठी त्याच्या सगुण, साकार रूपाचेंच ग्रहण करतात.

सकाम व निष्काम असे उपासनेचे मुख्य दोन भेद सांगितले आहेत. निष्काम उपासना केवळ मोक्षाच्या उद्देशाने केली जाते. सकाम उपासनेंत विशिष्ट कामनेची पूर्ति अपेक्षित असते. बहुधा पुष्कळसे लोक सकाम उपासकच असतात. अशा उपासकांची सोय व्हावी म्हणून कोणत्या कामनेसाठी, कोणत्या देवाची कशी उपासना करावी, हें पुराणें व तंत्रग्रंथ यांत सांगितलें आहे. हिला नैमित्तिक उपासना असेंहि म्हणतात. याशिवाय संध्यावंदनादि नित्य उपासनाहि शास्त्रकारांनी सांगितल्या आहेत. त्या निष्काम असतात व निष्कामपणेच आचरायच्या असतात.

उपासनेंतील उपास्य हें आधिदैविक जगांतील सूक्ष्म तत्त्व असतें. आधिभौतिक नाम, रूप व कर्म यांचा आध्यात्मिकाशीं सांधा जोडणें, हें त्याचें कार्य असतें. सगुण उपासनेंत उपास्य व उपासक हे शरीरी असतात. त्या उपासनेंत देहबुद्धि जागृत असते. हळूहळू ती क्षीण होत जाऊन त्या ठिकाणीं ब्रह्मात्मैक्य बुद्धि स्थापित होणें, ही उपासनेची परिणति समजावी.

उपासनेंत ईश्वराचें सगुण रूप श्रद्धेने गृहीत केलेलें असतें. त्यावांचून उपासना संभवणारच नाही. हीच श्रद्धा पुढे अनुभवाने दृढ होत जाते. निर्गुण निराकार परब्रह्माचीहि उपासना करणें शक्य आहे; पण सामान्य साधकाला तो मार्ग कष्टप्रद ठरतो. ज्यांचें चित्त अव्यक्ताच्या ठिकाणीं आसक्त आहे, अर्थात् जे अव्यक्तोपासक आहेत त्यांना क्लेश अधिक पडतात; कारण व्यक्त देहधारी माणसांना अव्यक्तोपासनेचा मार्ग कष्टानेच सिद्ध होणारा आहे, असें गीतेंत सांगितलें आहे (१२. ६).

पूजा, नामजप आणि ध्यान हे उपासनेचे मुख्य प्रकार आहेत. उपास्याच्या मूर्तीची मानसपूजा ही सुद्धा उपासनेंतच मोडते. याशिवाय नवविधा भक्ति, निष्काम कर्मयोग, लोकसेवा, शास्त्रसेवा, राजयोग, तांत्रिक अनुष्ठानें इ. सर्व गोष्टींना व्यापक अर्थाने उपासनाच म्हटलेलें आहे.

भारतांत वेदकालापासून किंबहुना त्याच्याहि पूर्वीपासून उपासनामार्ग उपलब्ध आहे. वैदिक धर्मावर त्या पूर्वीच्या अवैदिक संप्रदायांचा परिणाम घडला असल्याचें तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सांगतात. कर्म, उपासना व ज्ञान ही कांडत्रयी वैदिक वाङ्मयांत आणि पुढे गीतेंतहि मानलेली आहे. उपास-

नेंत कर्म आणि ज्ञान या दोहोंचाहि अंशत: अंतर्भाव आवश्यक असतो. उपनिषदांतील दहरोपासना, प्रणवोपासना इ. उपासनांनी उपासकाने ब्रह्मपदीं आरोहण करणें किंवा ईश्वराला प्रतिमा-प्रतीकादिकांत आवाहन करून त्याचें स्वत:पुढे अवतरण करणें, अशा दोन प्रक्रिया उपासनेंत असतात. पहिल्या प्रकारांत ध्यान–धारणेला महत्त्व असतें; तर दुसऱ्या प्रकारांत मूर्तिपूजेला महत्त्व असतें. सगुणोपासकाला त्याच्या उपासनेंत मूर्तिपूजा हें बहिरंगसाधन व श्रद्धा हें अंतरंगसाधन अशीं दोन साधनें आवश्यक असतात. भारतांत मूर्तिपूजा हीसुद्धा प्राचीन आहे. यजुर्वेद, अथर्ववेद व शतपथब्राह्मण यांत तिचा आढळ होतो. शैव, शाक्त, वैष्णव, सौर व गाणपत्य, या पंचोपासकांचीं निरनिराळीं तंत्रें असून त्यांत त्या त्या मूर्तींचें वर्णन उपास्य म्हणून तपशिलवार केलेलें असतें. सगुणोपासकाला ध्यानासाठी अशी एखादी मूर्ति आवश्यकच असते. ती जड असली, तरी श्रद्धापूर्वक केलेल्या ध्यानाने उपासकाला तिच्या ठिकाणीं हास्य, प्रसन्नता इ. अनेक चैतन्यभाव प्रतीत होतात. इतकेंच नव्हे; तर त्या मूर्तीकडून उपासकाला मंत्रोपदेशहि होऊं शकतो, अशा गोष्टी तुकाराम, रामकृष्ण परमहंस इ. संत–भक्तांच्या चरित्रांत आढळून येतात.

मानवाचीं ज्ञानेंद्रियें स्वभावतःच बहिर्मुख असल्यामुळे उपासकाने प्रपंचाप्रमाणेच परमार्थातहि बहिर्मुख असणें, म्हणजे त्याचें बाह्यार्थाकडे लक्ष वेधलेलें असणें हें स्वाभाविकच आहे. बहिर्मुखतेंत विषय-विषयीभावांचें द्वैत गृहीत धरावें लागतें. उपासना या कर्मांत उपासक हा विषयी असतो; तर परमात्मा हा त्याचा विषय असतो. परमात्मा हा उपासकाच्या देहासकट सर्व ब्रह्मांडांत ओतप्रोत भरलेला आहे, असें वेदान्तशास्त्र सांगतें. पण मायेच्या आच्छादनामुळे साधकाला त्याचा अपरोक्ष अनुभव होणें कठिण पडतें. पण तरीहि त्याने मूर्ति किंवा प्रतीक यांच्या ठिकाणीं परोक्षतेने तशी भावना करायची असते. यालाच उपासनाकर्म म्हणतात.

उपासनेस योग्य प्रतिमा–प्रतीकांचीं संवादी अशीं आलंबनें शास्त्रांत अनेक प्रकारचीं सांगितलीं आहेत. साधकांनी त्या साधनांच्या द्वारें इष्ट देवतेची उपासना करायची असते. या प्रतिमा–प्रतीकांत कांही चिद्रूप; तर कांही जडरूप असतात. कांही दृश्य; तर कांही मनोवेद्य असतात. जीवमात्राची आपल्या मूळ कारणाकडे, म्हणजेच परमात्मरूपाकडे कळत वा न कळत पण स्वाभाविक ओढ असते. देहोपाधींत अडकलेला जीव, मनाच्या द्वारें बाहेर पडूं पाहतो व आपल्याहून जें श्रेष्ठ, समर्थ किंवा लोभनीय असेल, त्याची उपासना करूं लागतो. रम्य व दिव्य विषयांचें आकर्षण, संतांविषयी आदर, पूज्य विभूतींविषयीं श्रद्धा, ईश्वराच्या सगुण–साकार मूर्तीविषयीं प्रेम, निर्गुण-निराकाराकडे ओढ, विश्वीं विश्वरूप परमेश्वराचा साक्षात्कार, ब्रह्मात्मैक्याची अपरोक्षानुभूति व सायुज्यतेच्या अखंडानंदाचा अनुभव, अशा उपासनेच्या एकाहून एक वरचढ पायऱ्या आहेत.

बहिरंग उपासना – बाह्य विषयभूत उपास्यांच्या बहिरंगोपासनेचे पुढील चार प्रकार शिवगीतेंत सांगितले आहेत –

(१) संपत्– अल्प वस्तूच्या ठिकाणीं अनंत गुणांची भावना करणें. उदा० अन्न, प्राण, मन हेंच ब्रह्म होय, अशी भावना अजाणतां म्हणजे स्वत:ला ब्रह्मज्ञान झालें नसतांहि करणें, हा संपद्विधि होय.

(२) आरोप – उपास्याच्या एकदेशावर अथवा एका अंशावर किंवा त्याच्या प्रतिमादिकांवर सर्व उपास्य तत्त्वाचा आरोप करून त्याची उपासना करणें. उदा० शिव, विष्णु, राम, कृष्ण यांच्या प्रतिमांवर त्या देवांची भावना करणें. याला आरोपविधि म्हणतात.

(३) संवर्ग – कर्मकांडांतल्या अनेक देवतांची एका अग्नीच्या ठिकाणीं धारणा करून उपासना करणें. हा संवर्गविधि होय.

(४) अध्यास – कोणत्याहि प्रकारचें सारूप्य अथवा साधर्म्य नसतां एखाद्या वस्तूवर उपास्याचा आरोप करणें. उदा० शाळिग्रामावर विष्णूच्या आणि बाणलिंगावर शिवाच्या देहाकाराची धारणा करणें. याला अध्यासविधि म्हणतात.

वरीलप्रमाणे उपास्यदेवतेची ध्यान–धारणा करीत असतां प्रथम त्या उपासनेंत इतर विजातीय विषय विघ्नें आणतात. पण त्यामुळें चित्त विचलित होऊं न देतां उपासकाने आपली साधना अखंड चालू ठेवायची असते. म्हणजे पुढे पुढे क्रमाने त्याला उपास्य देव व उपासक आपण यांच्यामध्ये तादात्म्य भावनेचा अनुभव येऊं लागतो (शिवगीता १२.१०-१६).

अंतरंग उपासना – ही बहिरंगोपासनेपेक्षा श्रेष्ठ मानलेली आहे. या उपासनेंत व्यक्त व ज्ञात अशा नाम-रूपांच्या मागे त्यांना अधिष्ठानरूप असणाऱ्या अव्यक्त व अज्ञात अशा सूक्ष्म तत्त्वांचें चिंतन, मनन व निदिध्यासन अभिप्रेत असतें. या उपासनेंत ध्यानशक्तीच्या द्वारें ध्याता व ध्येय, विषय व विषयी या दोहोंतलें द्वैत व अंतर हळूहळू नाहीसें होतें व अखेर ध्याता, ध्यान, ध्येय ही त्रिपुटी मावळून शुद्ध निर्विशेष अखंडानंदरूप ज्ञान तेवढें शिल्लक उरतें. तेंच ब्रह्मात्मैक्यस्वरूप होय.

प्रत्येक मनुष्याची प्रकृति सत्त्व, रज, तम या त्रिगुणांमुळे व त्यांच्या मिश्रणामुळे भिन्न भिन्न प्रकारची बनत असते. प्रकृतिभेदानुसार त्या त्या माणसाच्या आहार, व्यवहार व उपासना

याहि भिन्न होत असतात. म्हणून शास्त्रांत उत्तम, मध्यम व निकृष्ट अशा अधिकारिभेदाने उपासनेचेहि तीन भेद सांगितले आहेत. गीता म्हणते –

यजन्ते सात्त्विका देवान् यक्षरक्षांसि राजसाः ।
प्रेतान् भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः ।।

(१७-४)

अर्थ–सात्त्विक पुरुष देवांचें यजन करतात. राजस पुरुष यक्ष-राक्षसांचें व त्यांहून अन्य म्हणजे तामस पुरुष भूतप्रेतांचें यजन करतात.

याशिवाय उपासनेचे आणखीहि पांच प्रकार सांगितलेले आहेत–

(१) **आसुरी उपासना** – क्षुद्र देवता, ग्रामदेवता, यक्ष-गंधर्व, राक्षस आणि भूत–प्रेत यांच्या उपासनेला आसुरी उपासना म्हणतात.

(२) **देव-ऋषि-पितरांची उपासना** – अष्ट वसु, द्वादशादित्य, एकादश रुद्र, इंद्र व प्रजापति या ३३ मूल देवता मानलेल्या आहेत. यांव्यतिरिक्त नैमित्तिक देवता ३३ कोटि म्हणजेच पर्यायाने असंख्य आहेत. ऋषींच्या सात श्रेणी आहेत– ब्रह्मर्षि, देवर्षि, महर्षि, परमर्षि, काण्डर्षि, श्रुतर्षि व राजर्षि. यांच्या द्वारें जगांत वेदादि ग्रंथांच्या ज्ञानाचा विस्तार झाला. मार्कंडेय पुराणाच्या मतें पितरांची संख्या ३१ आहे. याशिवाय पितृपितामहादि हे नैमित्तिक पितर होत. यांच्या उपासनेचे विविध प्रकार शास्त्रांत सांगितले आहेत.

(३) **अवतारोपासना** – नवविधा भक्तीच्या द्वारें अवतारांची उपासना होते. भक्ति निष्काम असेल, तर कैवल्यप्राप्ति होते व सकाम असेल तर यथाधिकार सालोक्य, सामीप्य इ. चतुर्विध मुक्तींचा लाभ होतो.

(४) **पंचसगुणब्रह्मोपासना** – विष्णु, शिव, देवी, सूर्य व गणपति या पांच देवतांच्या उपासनेला पंचसगुणब्रह्मोपासना असें म्हणतात. त्यांचीं त्यांचीं प्रतीकें किंवा मूर्ती यांची पूजा व ध्यान–धारणा यांच्या द्वारें या पांच देवांची उपासना केली जाते.

(५) **निर्गुणब्रह्मोपासना** – गुणरहित ईश्वराच्या उपासनेला निर्गुणब्रह्मोपासना म्हणतात. ही उपासना प्रणवाच्या ध्यानाच्या द्वारें केली जाते. ओंकाराला निर्गुणपरब्रह्माचा वाचक म्हटलें असून तें एकाक्षरब्रह्म आहे असेंहि म्हटलें आहे (गीता ८. १३). ईश्वराचा देह अदृश्य असतो. तो भावग्राह्य व मनोमय असतो. ओंकार हेंच त्याचें नाम–रूप होय. त्याच्या द्वारें आवाहान केल्याने तो प्रसन्न होतो. [शिवलिंगोपासना; पुराणतत्त्वमीमांसा]

उपासनी महाराज

(१८७०–१९४१ इ. स.) एक संतपुरुष. पूर्वाश्रमीं हे एक सर्वसामान्य संसारी गृहस्थ होते. यांनी अनेक विवाह केले; पण त्यांच्या सर्व बायका एकामागून एक निवर्तल्या. पुढे अमरावतीला ते वैद्यकी करूं लागले. नंतर नागपुरांत नारायणमहाराजांची व त्यांची गांठ पडली. नारायणमहाराजांनी त्यांचें आध्यात्मिक सामर्थ्य ओळखून आपल्या गळ्यांतील माळ त्यांच्या गळ्यांत घातली. १९११ सालीं त्यांना साईबाबांचें दर्शन घडलें व बाबांच्या आदेशावरून ते शिर्डीला राहूं लागले. त्यांची वागण्याची तऱ्हा अजब होती. एकदा त्यांची श्रीमेहेरबाबांशीं गांठ पडली असतां त्यांनी मेहेरबाबांना दगड मारून देहाच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. १९१५ साली ते खरगपूरला राहायला गेले. तिथे ते हरिजनांत राहत असत. त्या भागांत त्यांना अवलिया म्हणून ओळखीत. पुढे ते साकोरीला आले व पिंजऱ्यांत राहूं लागले. १९४१ सालीं तिथेच ते समाधिस्थ झाले.

उपुकट्टी

मदुराई जिल्ह्यांतल्या मरवारांमधली एक प्रमुख पोटजात. [मदुरा गॅझे.]

उपेंद्र

उप + इंद्र = इंद्राचा धाकटा भाऊ. 'उपेन्द्र इन्द्रावरजः' (अमर). याचा जन्म अदिति व कश्यप यांच्या पासून झाला. यालाच वामन असेंहि म्हणतात (भाग. पु. १०.३.४२; वायु पु. ९८.८४; ब्रह्मांड पु. ३.२१.५९). सर्व लोकांचा अधिपति म्हणून त्याला देवांनी अभिषेक केला. त्याने आपला थोरला बंधु इंद्र याला राज्यकारभार करण्यांत मदत केली (भाग. पु. ८.२३.२३–२५). **पाहा**–वामन. [पु. इं.]

उपेंद्रवज्रा

वर्णिक छंदांतील समवृत्ताचा एक भेद. पिंगलसूत्र (६.१७) व नाट्यशास्त्र (१६.३३) यांतील लक्षणाप्रमाणे या वृत्तांत जगण, तगण, जगण व शेवटीं दोन गुरु वर्ण येतात. याचें उदाहरण-

सन्दारमालाकुलितालकायै
कपालमालाङ्कितशेखराय ।
दिव्याम्बरायै च दिगम्बराय
नमः शिवायै च नमः शिवाय ।।

या वृत्तांत पांच व सहा वर्णांवर यति येतो.

उपेक्षाविहारी

उपेक्षा नामक शीलधर्माचें पालन करणाऱ्या बौद्ध भिक्षूला हें नांव आहे. तो

उदासीनपणें जगांत वावरतो व कशाचीहि अपेक्षा करीत नाही. [चं. हा.]

उपेक्षिता नायिकेचा एक प्रकार. गाथासप्तशती या ग्रंथांत या नायिकेचा उल्लेख आहे. उदाहरण म्हणून तिथे पुढील श्लोक दिला आहे —

विरहाणलो सहिज्जइ आसा बंधेण
वल्लह जणस्स ।
एक्क-ग्गाम-पवासो माए मरणं विसेसेइ ।।

अर्थ –– प्रियकराचा विरहाग्नि (तो परत येईल या) आशेच्या बंधावर सहन करतां येतो. पण आई, गांवांतल्या गांवांतच तो (अन्यत्र) गेला, तर (मात्र ती गोष्ट) मरणाहून दुःसह वाटते.

उपोदिति गौपालेय हा एक सामद्रष्टा ऋषि आहे. (पं. ब्रा. १२. १३.११)

उपोषण व्रत किंवा तप याच्यासाठी केला जाणारा विशिष्ट कालावधीचा अन्नत्याग. शारीरिक आरोग्यासाठीहि उपोषणाचा अवलंब करतात. कांही दिवस अन्न वर्ज्य केल्यास माणसाची भूक वाढते व तन-मनाला काटकपणाहि प्राप्त होतो. उपोषण ही धार्मिक आचारांतली एक शिस्त आहे. तो एक मनःशुद्धीचाहि उपाय आहे. उपोषणाने धार्मिक कृत्यांना अधिक पवित्र्य व सामर्थ्य येतें, असें समजतात. जैनधर्मांत आत्मिक उन्नतीसाठी दीर्घ उपोषण करण्याची प्रथा आहे. त्यांच्यांतले कित्येक मुनी प्रायोपवेशनाने देहत्यागहि करून जातात. पापांचें परिमार्जन व्हावें आणि परमेश्वराने त्याबद्दल क्षमा करावी, म्हणूनहि उपोषण केलें जातें. राजकारणांतील उद्दिष्टें सिद्ध होण्यासाठी उपोषण (किंवा प्रायोपवेशन) करण्याची पद्धत म. गांधींनी सुरू केली आणि ती सांप्रतहि अधून मधून चालू असलेली ऐकू येते. यहुदी, ख्रिस्ती व इस्लाम या तीन्ही धर्मांत उपोषणाचे विशिष्ट दिवस ठरवून दिलेले आहेत. **पाहा––** उपवास.

उपोसथ बौद्धांची पाक्षिक सभा. उपोसथाचें मूळ वैदिक धर्मांत आढळतें. महिन्यांतले पौर्णिमा व अमावास्या हे दोन पर्व दिवस वैदिक लोक विशेष पवित्र मानीत. या दिवसांना उपवसथ असें नांव दिलेलें आढळतें. बौद्धांनीहि त्यांचेंच अनुकरण केलें. सुरवातीस वरील दोनच दिवस उपोसथाचे मानले जात. पण पुढे दोन्ही पक्षांतील अष्टमी या तिथीहि उपोसथाला उक्त ठरल्या. अशा प्रकारें उपोसथाचे चार दिवस झाले.

उपोसथाच्या दिवशीं विहाराच्या सीमेच्या आंत राहणाऱ्या सर्व बौद्ध भिक्षूंना एकत्र जमावें लागे. या सभेंत प्रत्येक भिक्षूला आपल्या हातून घडलेल्या दोषांचा स्वमुखाने उच्चार करून त्याबद्दल प्रायश्चित्त घ्यावें लागे. सभेचा अध्यक्ष पातिमोक्ष सुत्ताचें पठण करून त्यांत दिलेल्या १५० नियमांचा ज्याच्याकडून भंग झाला असेल, त्याने तशी कबुली द्यावी, अशी आज्ञा करी. भिक्षूचा अपराध सौम्य किंवा क्षुल्लक असेल, तर केवळ त्याच्या उच्चाराने त्याला दोषमुक्त ठरवीत. अपराध गंभीर असेल, तर त्याला सभेंतून बाहेर जावें लागे व भिक्षुसमितीने सांगितलेलें प्रायश्चित्त करून शुद्ध व्हावें लागे.

उपोसथाचे चार दिवस पाठशाळांना सुट्टी असे. त्या काळांत बौद्ध भिक्षू शुभ्र वस्त्रें परिधान करीत. अहिंसा, सत्यादि नियमांचें पालन करणें, वाईट फळें न खाणें, अभ्यंग न करणें, चटईवर निजणें इ. नीतिधर्मांचें पालन या चार दिवसांत त्यांना कठोरपणे करावें लागे. या उपोसथव्रताचा प्रारंभ बिंबिसार राजाच्या सूचनेवरून झाला, असें सांगतात. **पाहा**–उपवसथ. [उ. प्र. बौ. वि.]

उप्पर उप्पर, उप्पार किंवा उप्पलिगर हीं एकाच जातीचीं नांवें आहेत. या जातीचे बरेचसे लोक म्हैसूर नजीकच्या जिल्ह्यांतून राहतात. कन्नड भाषेंत मिठाला उप्पु म्हणतात. हे लोक पूर्वी मीठ पिकविण्याचा धंदा करीत म्हणून यांना उप्पर हें नांव पडलें. पण सांप्रत ते मिठाचा धंदा सोडून विहिरी-तलाव खोदणें, विटा पाडणें, घरें बांधणें, शेतीला पाणीपुरवठा करणें, इ. कामें करतात. देशपरत्वें ते कन्नड, तेलुगु व तमिळ भाषा बोलतात. यांच्या चेहरेपट्टीवरून व चालीरीतींवरून यांचें ओड्ड जातीशीं साम्य दिसतें.

यांचे अनेक पोटभेद आहेत. ज्यांच्यांत परस्पर बेटीव्यवहार होत नाही, अशा समुच्चयास बेडगु अर्थात् कुल म्हणतात. बेडगूंचीं नांवें वृक्षांवरून किंवा प्राण्यांवरून पडलेलीं असतात. म्हणजे त्या त्या कुलाचा एखादा पूज्य वृक्ष किंवा प्राणी असतो. ज्याच्यावरून नांव पडलें, तो वृक्ष वा प्राणी त्या कुलांतल्या लोकांनी मारतां कामा नये, असा निर्बंध असतो.

विवाहप्रथा – मुलींचीं लग्नें प्रौढपणीं करतात. मुलाला आतेबहिणीशीं लग्न करण्याचा हक्क असतो. या बाबतींतली चाल चमत्कारिक आहे. मुलगा जन्मास येण्यापूर्वीच त्याचा विवाह जन्मास न आलेल्या आतेबहिणीशीं ठरतो. मात्र लग्नाच्या वेळीं

नियोजित वराशीं लग्न करण्याविषयीं त्या वधूवर सक्ती होऊं नये म्हणून अनेक वेळां तिची संमति विचारतात. वधूपिता मुलीचें देज घेतो. ती रक्कम बारा रुपयांपासून तों तीस रुपयांपर्यंत असते. वर वधूच्या मनगटाला रेशमी दोऱ्याचें कंकण बांधतो. मुलीचा विवाह ऋतुप्राप्तीपूर्वी होत असेल, तर वराने वधूच्या डोळ्याला डोळा भिडवायचा नसतो. ऋतुप्राप्ति झाल्यावर मग नवरा मुलगा एक मेंढा व शाकभाजी घेऊन वधूच्या घरीं जातो. तिथे मेंढ्याचें शिर तोडून वराचा मेहुणा त्या मेंढ्याच्या रक्ताचा टिळा वराच्या कपाळीं लावतो. नवरा मुलगा दूध–केळें तोंडांत घेऊन त्याची चूळ पडद्यामागे उभी असलेल्या वधूच्या अंगावर टाकतो. विवाहापूर्वी वधूला रजोदर्शन झालें असेल, तर लग्नाच्या दिवशीं तिला लांकडाच्या सात वाटोळ्या कड्यांमधून जावें लागतें. लग्नापूर्वी मुलाने श्मश्रू करतां कामा नये. केल्यास जन्मभर त्याला श्मश्रू न करतां राहावें लागतें. कानडी उप्परांत नवरा मुलगा श्मश्रू केल्यावर स्नान करून जानवें घालतो. मात्र तें जानवें सुताचें नसून पितळी तारांचें व दुहेरी असतें. तें फक्त पांच दिवस अंगावर ठेवायचें असतें. यांच्यांत घटस्फोटाची चाल आहे.

अंत्यविधि – प्रेतें पुरतात किंवा जाळतात. सुतक १६ दिवस पाळतात. विधवा स्त्री पतिमरणानंतर ताळी (मंगळसूत्र) तोडून टाकीत नाही. ती आपोआप तुटेपर्यंत गळ्यांत ठेवते. मृताला तेल लावून स्नान घालतात व फुलांच्या माळाहि घालतात. प्रेत पुरायचें असेल, तर खड्डा खणण्यासाठी मृताचा पुत्र पहिली कुदळ मारतो. सोळाव्या दिवशीं एका विशिष्ट झुडपाचा चीक काढून तो त्या झुडपावरच ओततात. तसें करतांना मृताला उद्देशून ‘ स्वर्गाला जा ; कैलासाच्या मार्गाने जा, ’ असें म्हणतात. मृतांचे चांदीचे मुखवटे करून ते घरांत ठेवतात व वैशाखांत त्यांची पूजा करतात. श्राद्ध करीत नाहीत ; पण सर्वपित्री अमावस्येच्या दिवशीं कलशाची पूजा करून पितरांच्या नांवाने ब्राह्मणाला किंवा जंगमाला शिधा देतात.

देव-धर्म – यांच्यांत शैव, वैष्णव हे दोन्ही पंथ आहेत. वैष्णव चेन्नकेशवाला भजतात व तिरुपति, कादरि, नंजनगुड इ. वैष्णव क्षेत्रांच्या यात्रा करतात. शैवपंथी शिवाला भजतात. सुंकलम्म, जंबुलम्म, येल्लम, दुर्गम्म, तिम्मप्प, या यांच्या ग्रामदेवता होत.

पंचायत – यांच्यांत पंचायतीची पद्धत आहे. न्यायदान पंचायतीमार्फतच होतें. जातींत एखाद्याने गुन्हा केला असें समजलें, की पंचायत भरते. प्रथम कुलदेवतेची पूजा होते. मग गुन्हा करणाऱ्या आरोपीला पुढे उभा करून साक्षीपुरावा घेतात. गुन्हा शाबीत ठरल्यास आरोपीला बहिष्कार, दंड किंवा ज्ञातिभोजन अशी शिक्षा देतात. तो निर्दोषी ठरल्यास त्याला जलकलशाला स्पर्श करायला लावतात. ज्या घरांत गुन्हा घडला असेल, त्या घराची शुद्धि करतात. व्यभिचार करणाऱ्या स्त्रीच्या केसांची एक बट कापतात, तिला गार पाण्याने स्नान घालतात व शेणपाणी प्यायला देतात. नंतर तिला देवळांत नेऊन पुजाऱ्याकरवीं तिच्या मस्तकावर तीर्थ शिंपडतात व तिच्या घरच्या माणसांकडून दंड घेतात. व्यभिचारी पुरुषाच्या एका बाजूची मिशी व भुवईचे केस काढतात. डोक्यावरच्या केसांचे तीन पाट काढतात. सात लहान मांडव तयार करून त्यांना आग लावतात व त्या सातहि जळत्या मांडवांखालून त्याला जायला लावतात. मग देवळांत नेऊन तीर्थजलाने शुद्ध करतात. **पाहा–** ओड्ड [का. ट्रा. स. इं; मुं. इ. जा.]

उभयतोमुखी धेनुदान

गाय प्रसूत होत असतां फक्त वत्साचें मुख तेवढें बाहेर येऊन बाकीचा सर्वभाग गर्भांत असतो, अशा वेळीं तिला उभयतोमुखी म्हणतात. ही धेनु पर्वतवनराजीसह पृथ्वीचें प्रतीक असते. तिला त्या अवस्थेंत असतांना प्रदक्षिणा केल्याने पृथ्वीप्रदक्षिणेचें पुण्य मिळतें, असें मानतात. गौतमाने अहल्येच्या प्राप्तीसाठी अशीच प्रदक्षिणा घातली होती. अशा धेनूचें दान पृथ्वीदानाच्या योग्यतेचें समजतात. त्या वेळीं तिला वस्त्रालंकारांनी भूषवून तिची पूजा करावी व सत्त्वशील ब्राह्मणाला तिचें दान करावें, असें सांगितलें आहे. याचा विधि असा – दानकर्ता ब्राह्मणाला बोलावून आणून यथाविधि संकल्प करतो. एका कांस्यपात्रांत घृत व तिल भरून त्यांत त्या धेनूचें पुच्छ बुडवून तें पुच्छ त्या पात्रासह ब्राह्मणाच्या हातीं देतो. त्या वेळीं पुढील मंत्र म्हणतो —

इमां गृहाणोभयमुखीं भवांस्त्राता ममास्तु वै ।
मम वंशविशुद्धेश्च सदा स्वस्तिकरो भव ।।

अर्थ – (हे ब्राह्मणा), या उभयतोमुखी धेनूचें दान घेऊन तूं माझा रक्षणकर्ता हो. तूं माझ्या वंशशुद्धीला कारण होऊन सार्वकाल स्वस्तिप्रद हो.

मग दान ग्रहण करणारा ब्राह्मण ‘ स्वस्ति ’ म्हणून धेनूचें ग्रहण करतो व उजव्या हाताने वत्साला धेनूच्या गर्भांतून बाहेर ओढून काढतो. वत्स बाहेर आल्यावर त्या दानाची सांगता व्हावी म्हणून दानकर्ता यथाविधि हवन करतो. देव, पितर, इत्यादींचें तर्पण करतो. ब्राह्मण गायीला घेऊन स्वगृहीं जात असतां तिच्या मागून थोडें अंतर चालून जातो. मग पायसान्नाने बारा ब्राह्मणांस भोजन घालतो. अशा धेनूचें दान घेतल्याबद्दल दान घेणारा ब्राह्मण कृच्छ्रत्रय प्रायश्चित करतो. [दा. चं.]

उभय द्वादशी एक तिथिव्रत. व्रतारंभ मार्गशीर्ष कृ. १२ शीस होतो. दर १२ शीला विष्णूच्या केशव, नरायणादि एकेका रूपाची पूजा करतात. याप्रमाणे वर्षभरांत चौवीस रूपांची पूजा होते. [हि. ध.]

उभय नवमी एक तिथिव्रत. पौषमासांतल्या शुक्ल-कृष्ण ९ मीस उपवास व भगवतीची त्रिकाल पूजा. देवीची मूर्ति पिठाची करतात. ती चतुर्भुज व शूलधारिणी करावी, असें सांगितलें आहे. तिला घृताचें स्नान घालतात. खीर–भाताचा नैवेद्य दाखवितात. कुमारीला भोजन घालतात. अशाप्रकारें प्रत्येक महिन्याच्या उभय नवमीस दुर्गेचीं विविध रूपें बनवून पूजा करतात. फल – दुर्गापुरनिवास. [कृ. क.]

उभय सप्तमी सूर्यव्रत. पौष शुद्ध आणि वद्य ७ मीस उपवास व त्रिकाल सूर्यपूजा. सूर्याला क्षारसिद्ध (तळणींत थोडें मीठ टाकणें) मोदकांचा नैवेद्य. फल – सर्वकामसिद्धि. [व्रतपरिचय]

उभयैकादशी एक तिथिव्रत. मार्गशीर्ष शु. ११ शीला आरंभ. व्रतावधि एक वर्ष. वद्य पक्षांतील ११ शीला विष्णूची केशव, नारायणादि नांवांनी व शुक्ल पक्षांतील ११ शीला कृष्णाच्या इतर नांवांनी पूजा करतात. गुर्जर लोकांत हिला फक्त उभया असें म्हणतात. [हि. ध.]

उभी चोथ चंद्रपूजा पाहा.

उमा (१) हिमाचलाची कन्या पार्वती, हिचें एक सौम्य रूप. या शब्दाची व्युत्पत्ति पुढील प्रमाणें––‘ उं शिवं माति मिमीते वा ’ = उ म्हणजे शिव, त्याला मापते, मोजते ती उमा (श. क.). दुसरी व्युत्पत्ति अशी ––

यतो हि तपसे पुत्रि वनं गन्तुं च मेनका ।
उमेति तेन सोमेति नाम प्राप तदा सती ।।

(कालिका पु. ४२)

अर्थ –– तपासाठी वनांत जाऊं इच्छिणाऱ्या मुलीला मेनकेने ‘ हे उ (= मुली) मा (तपाला जाऊं नको) ’ म्हणून निषेध केला. त्यामुळे तिला उमा हें नांव मिळालें.

कालिदासानेहि उमा शब्दाची अशीच व्याख्या कुमारसंभवांत दिली आहे (१·२६).

हिचा प्रथम उल्लेख केनोपनिषदांत सांपडतो. ही एक शक्तिदेवताहि आहे. कुटुंब सुखी राहावें म्हणून हिची पूजा करतात (भाग. पु. २. ३. ७). ही सोमवल्लीची अधिदेवता आहे (मत्स्य पु. ८४. ९) उमा मुळांत गोरी होती; पण निशा देवीने तिला स्पर्श केला आणि ती काळी झाली. त्यामुळे शिवाला ती आवडेनाशी झाली. त्यांतून दोघांत वितुष्ट आलें. उमेने पुनश्च गोरी होण्याचा निर्धार केला व ती तपस्येसाठी निघून गेली. कालांतराने तिला मूळचा वर्ण पुन्हा प्राप्त झाला (मत्स्य पु. १५५–५८). उमा ही पूर्वजन्मांतली सती होय. उमेच्या रूपांत अनेक देवतांचे गुणधर्म एकत्र आले आहेत.

उमा व शिव यांचा एकान्त चालू असतां अग्नि पोपटाच्या रूपाने तिथे प्रवेशला. तें पाहून उमा शय्येवरून दूर झाली. शिवाने आपलें स्खलित वीर्य अग्नीला प्राशन करायला सांगितलें. अग्नीने तसें केलें. अवशिष्ट उरलें त्याचें एक तळें बनलें. त्यांत सहा कृत्तिकांनी स्नान केलें. त्यांच्या आशीर्वादाने उमा गर्भवती झाली आणि तिच्या डाव्या कुशींतून सुब्रह्मण्य जन्माला आला (वायु पु. ७२).

उमेची तांत्रिक पद्धतीने उपासना होते. तिचें तांत्रिक रूपध्यान पुढीलप्रमाणे आहे ––

सुवर्णसदृशीं गौरीं भुजद्वयसमन्विताम् ।
नीलारविन्दं वामेन पाणिना बिभ्रतीं सदा ।।
शुक्लं तु चामरं धृत्वा भर्गस्याङ्केऽथ दक्षिणे ।

(कालिका पु. ६१. ४३–४४)

अर्थ –– सुवर्णाप्रमाणे कांति, दोन भुज, उजव्या हातीं नील कमल, डाव्या हातीं शुभ्र चामर, अशी ही उमा, शंकराच्या उजव्या मांडीवर बसलेली असते.

तांत्रिक उपासनेंत उमेबरोबर तिच्या सख्या जया, विजया, मातंगी, ललिता, नारायणी, सावित्री, स्वाहा व स्वधा यांचीहि पूजा करायची असते.

(२) उमा म्हणजे अळशीचें शेत. अळशीपासून बनलेल्या वस्त्राला औम किंवा औमक म्हणत (अष्टा. ४. ३. १५८). [पा. भा.]

उमाकेरळम् मल्याळम् भाषेंतलें एक महाकाव्य. महाकवि उळ्ळूर परमेश्वर अय्यर हा याचा कर्ता होय. तिरुवितांकुर राज्यांतल्या वेणाट्टु या भागावर १७ व्या शतकांत आदित्यवर्मा नांवाचा एक दुर्बल राजा राज्य करीत होता. त्या राज्यांत घडलेल्या कांहीं सत्य घटनांच्या पार्श्वभूमीवर या महाकाव्याची रचना झाली आहे ––

आदित्यवर्म्याने आठ ब्राह्मण व आठ गृहाधिपति अशा सोळा लोकांचें सल्लागार मंडळ बनविलें होतें. राजाची दुर्ब-

लता पाहून त्या सल्लागारांनीच त्याचा घात करण्याचें कारस्थान रचलें. रविवर्मा तंपान हा राजाचा मुख्य व विश्वासू प्रधान होता. राजकन्या कल्याणी हिच्याशीं त्याचें लग्नहि ठरलें होतें. एक दिवस एका गृहाधिपतीने राजमहालाला आग लावली व तो आरोप तंपानवर घातला. राजाला तंपानचा राग आला व त्याने वस्तुस्थितीचा कांहीहि विचार न करतां त्याला राज्यांतून हद्दपार केलें. राजाच्या अंतःशत्रूंना तेंच हवें होतें.

थोड्याच दिवसांत त्या लोकांनी राजाला विष घालून ठार मारलें. राज्याला कोणी पुरुष वारस नसल्यामुळे राजाची बहीण उमयम्मराणी हिला राज्याची जबाबदारी स्वीकारावी लागली. पण शत्रूंनी तिचाहि पिच्छा पुरविला. त्यांनी तिच्या सहा पुत्रांपैकी पांचांना तलावांत बुडवून मारलें. सुदैवाने थोरला मुलगा तेवढा वांचला. राज्याचे वैरी एवढेंच करून थांबले नाहीत. त्यांच्यांतल्या एकाने राज्यकन्या कल्याणी हिचेंहि अपहरण केलें. पुढे एका मोगल सरदाराने त्याला ठार करून कल्याणीला आपल्या ताब्यांत घेतलें आणि राज्यांतली ती अंदाधुंदी पाहून तिरुवितांकुरवर मोठ्या सैन्यानिशी धाड घातली.

उमयम्मराणी अशा सर्व बाजूंनी संकटांत सांपडली. तिने रविवर्मा तंपानचा शोध करून त्याला राज्यरक्षणासाठी गळ घालून बोलाविलें. तो आला आणि त्याने कोट्टयम्च्या केरळवर्मा या राजाची मदत घेऊन मोगल सरदाराशीं युद्ध पुकारलें. मोगल सरदार पराभूत होऊन पळाला. जातां जातां त्याने कल्याणीवर बलात्काराचा प्रसंग आणला. पण तिने मोठ्या धैर्याने त्या मोगलसरदाराचा प्राण घेतला व आपलें शील अभंग राखलें. अशा रीतीने राज्यावरचें संकट टळल्यावर मग कल्याणी व रविवर्मा तंपान यांचें शुभमंगल झालें. [के. सा. द.]

उमाचतुर्थी

ज्येष्ठ शु. चतुर्थीचें नांव. स्त्रियांनी करायचें एक व्रत.

ज्येष्ठशुक्लचतुर्थ्यां तु जाता पूर्वभवा सती ।
तस्मात् सा तत्र संपूज्या स्त्रीभिः सौभाग्यवृद्धये ।।

(संवत्सर कौमुदी)

अर्थ — ज्येष्ठ शु. ४र्थीच्या दिवशीं उमेचा जन्म झाला. म्हणून स्त्रियांनी सौभाग्यवृद्धीसाठी त्या दिवशीं तिची पूजा करावी.

या व्रतांत उमेची कुंदपुष्पांनी पूजा करतात व उपवासहि करतात. पुरुषांनीहि हें व्रत करायला हरकत नाही, असें कृत्यरत्नांत सांगितलें आहे. बंगालमध्ये उपवर मुली उत्तम नवरा मिळावा म्हणून हें व्रत करतात.

उमातुंग

एक श्राद्धयोग्य क्षेत्र. स्थलनिर्देश नाही. कदाचित् हें कैलासावरील उमावनांतलें एक स्थान असावें. **पाहा** – उमावन. [पु. इं.]

उमादिपूजा

एक तिथिव्रत. चैत्र शु. २ येस हें करतात. या व्रतांत उमा, शिव व अग्नि यांची पूजा करायची असते. [पु. चि.]

उमापति शिवाचार्य

(इ. स. १३ वें शतक) तमिळनाडमधल्या शैव आचार्यांतला एक प्रमुख आचार्य. हा चिदंबरम् येथील शिवमंदिरांत पुजारी होता. मरै ज्ञानसंबंधर नांवाचा याचा ब्राह्मणेतर गुरु होता. याने त्या गुरूच्या पानांतलें उच्छिष्ट खाल्ल्यामुळे ब्राह्मणांनी याला चिदंबरम्मधून हाकलून दिलें. पण पुढे हा मोठा ग्रंथकर्ता झाला आणि याची कीर्ति सर्वत्र पसरली. त्यामुळे मग चिदंबरम्मधल्या ब्राह्मणांनी देवाच्या वार्षिक जत्रेच्या प्रसंगीं त्याला परत बोलावून घेतलें.

याने पुष्करागमावर संस्कृत भाष्य लिहिलें असून तें तिरुवदुथुरै येथील मठांत ठेवलेलें आहे. याच्या कोइरपुराणम् या ग्रंथांत चिदंबरम् देवस्थानाचा इतिहास आहे. याने शैव सिद्धान्त पुढीलप्रमाणे मांडला आहे—

ईश्वर हा रूपी, अरूपी व रूपारूपी आहे. ज्ञानवंतांना तो ज्ञानरूपी आहे. कल्याण करतो म्हणून तो 'शंकर' आहे. जो अरुळ (ब्रह्म) ओळखीत नाही, त्याला मोक्ष नाही. 'नमःशिवाय' या पंचाक्षरी मंत्राच्या जपाने शिवाची कृपा होते. [म. ज्ञा. को.]

उमा ब्राह्मणी

एक व्रत. ज्येष्ठ शु. ९ मीस उपवास, ब्राह्मणीनामक श्वेतवर्णा पार्वतीची पूजा व ब्राह्मणकन्येस दूधभाताचें भोजन घालणें, असा याचा विधि आहे. [व्रतपरिचय]

उमा–महेश्वर

शिव-पार्वतींची एक संज्ञा. यांची मूर्ति कशा प्रकारें करावी, याचें वर्णन मत्स्यपुराणांत पुढीलप्रमाणे आलेलें आहे—

द्विभुज किंवा चतुर्भुज, त्रिनेत्र, गजचर्म पांघरलेले, दोहीं अंगीं जय-विजय हे द्वारपाल व कार्तिकेय आणि विनायक हे पुत्र, असें उमा–महेश्वरांचें मूर्तिकरण करावें.

आदित्यशयन व्रतांत यांची पूजा करतात. दानचंद्रिकेंत या संयुक्त मूर्तीचें दान करावें, असें सांगितलें आहे. त्याचा मंत्र असा —

शिवशक्त्यात्मकं यस्माज्जगदेतच्चराचरम् ।
तव दानेन मे वश्या पृथिवी स्यात् सुनिश्चला ।।

अर्थ – ज्या अर्थी हें चराचर जगत् शिवशक्त्यात्मक आहे, त्या अर्थी (हे उमा–महेश्वरा,) तुझ्या दानाने पृथ्वी मला सुनिश्चल व वश होवो.

या दानानंतर ब्राह्मणाला सुवर्णदक्षिणा देतात. [पु. इं.]

उमामहेश्वरव्रत एक काम्य व्रत. भाद्रपद पूर्णिमेस याचा आरंभ करतात. व्रतावधि १५ वर्षे. विशेषतः पुरुषांनी करायचें हें व्रत असून कर्नाटकांत त्याची विशेष प्रसिद्धि आहे. याचा विधि पुढीलप्रमाणे ––

शुद्ध १४ शीस व्रताचा संकल्प. शिव आणि शिवभक्त यांची पूजा. हविष्यान्नाचें भोजन. रात्रौ शिवासन्निध निद्रा. पूर्णिमेस स्नान व भस्म–रुद्राक्ष धारण. शिव-पार्वतींच्या सुवर्णमूर्तींची स्थापना. मूर्तींच्यापुढे पंधरा ग्रंथींचा कुंकुमरंजित दोरा ठेवणें.

ध्यायामि तं महादेवमुमादेहार्धधारिणम् ।
मुक्तामालापरीताङ्गं दुकूलपरिवेष्टितम् ।।
ध्यायामि च परां गौरीमादिविद्यामनामयाम् ।
लक्ष्मीसेवितपादाब्जां शचीसेवितपादुकाम् ।।

या मंत्राने ध्यान करून षोडशोपचारपूजा. दोरकाची पूजा. मग दोरकाचें ग्रहण व जुन्या दोरकाचें विसर्जन. पंधरा घारग्यांचें किंवा मांडच्यांचें वायनदान. आचार्यपूजा. पीठदान. ब्राह्मण-सुवासिनी भोजन. आणि यजमानाचें मौन धरून भोजन. हविष्यान्न व तैलविरहित अन्न यांचें सेवन, हा या व्रताचा विशेष आहे.

सोळाव्या वर्षी व्रताचें उद्यापन करतात. त्या वेळीं उमामहेश्वरांच्या पंधरा प्रतिमा करून त्यांची स्थापना करतात व त्यांची यामपूजा करतात. यथाविधि हवनहि करतात. या व्रताची कथा अशी ––

एकदा दुर्वासमुनि फिरत फिरत वैकुंठाला गेला. त्याच्याजवळ शंकराने दिलेली बिल्वदलांची माळ होती, ती त्याने विष्णूला दिली. विष्णूने ती स्वतःच्या गळ्यांत न घालतां गरुडाच्या मानेवर ठेवली. त्यामुळे दुर्वास खवळला. त्याने विष्णूला शाप दिला. 'ज्या लक्ष्मीच्या प्राप्तीमुळे तूं इतका गर्विष्ठ झालास, ती लक्ष्मी क्षीरसागरांत बुडेल, गरुडाचा नाश होईल आणि तुझें वैकुंठावरचें प्रभुत्व नष्ट होऊन तूं पृथ्वीवर वणवण भटकशील ! '

दुर्वासाचा शाप खरा होऊन विष्णु रानावनांत भटकूं लागला. पुढे त्याची व गौतमऋषीची गांठ पडली. विष्णने त्याला आपली दुर्दशा सांगितली. गौतमाने त्याला उमा–महेश्वरव्रताचें विधान सांगितलें. विष्णूने तें केलें व त्यामुळे त्याला गतवैभव परत मिळालें.

या व्रताला शिवानंतव्रत असें दुसरें नांव आहे, त्यावरून आणि व्रताच्या विधानावरून हें व्रत वैष्णव संप्रदायांतून शैवसंप्रदायांत आलें असावें, असें वाटतें. वैष्णवांचा आराध्य जो विष्णु त्यालाच या व्रतकथेंत दुर्दशा भोगायला लावून शैवसंप्रदायाने आपली थोरवी वाढवून घेतलेली दिसते.

उमावन हें कैलासावर असून इथेच शंकराने अर्धनारी हें रूप धारण केलें (वायु पु. ४१.३६). एकदा उमेने शिवाला विनंती केली, की 'या वनांतल्या आपल्या आश्रमांत जो पुरुष प्रवेश करील, त्याला स्त्रीरूप प्राप्त व्हावें व तुम्हीहि स्त्रीरूप घ्यावें. ' शिवाने ती विनंती मान्य केली व त्या वनांतले सर्व प्राणी स्त्री बनले. [पु. इं.]

उमासहित मूर्ति चंद्रशेखर मूर्ति पाहा.

उमास्वाति वाचक (इ. स. १ लें किंवा २ रें शतक) एक जैन आचार्य व ग्रंथकार. जैन-साहित्यांत याचें विशेष स्थान आहे. हा घोषनंदि श्रमणाचा शिष्य व उच्चानागरी शाखेचा वाचनाचार्य होता. हा मूळचा ब्राह्मण असून न्यग्रोधिका या गांवचा रहिवासी होता. पुढे त्याने जैन धर्म स्वीकारला. याने जैनांच्या विविध आगम-ग्रंथांत विखरून पडलेलें तत्त्वज्ञान एकत्र करून संस्कृतांत सूत्रबद्ध केलें व त्या ग्रंथाला तत्त्वार्थाधिगमसूत्र असें नांव दिलें. बौद्ध पंडित वसुबंधु याने ज्याप्रमाणे पालि पिटकांतलें तत्त्वज्ञान एकत्र करून अभिधर्मकोश या ग्रंथाची रचना केली व त्यावर स्वोपज्ञभाष्यहि रचलें, त्याच धर्तीवर उमा स्वातीने केलेला हा मोठा प्रयत्न आहे. यानेहि आपल्या तत्त्वार्थाधिगमावर स्वोपज्ञ भाष्य लिहिलें आहे.

उमास्वातीच्या पूर्वी प्रायः सर्व जैन वाङ्मय अर्धमागधींत होतें. उमा स्वातीलाच पहिल्या प्रथम असें भावलें, की ' सांप्रत विद्वत्समुदायाची प्रधान भाषा संस्कृत आहे; अतएव जैन तत्त्वज्ञान जर संस्कृतांत परिवर्तित झालें, तरच विद्वानांचें लक्ष त्याकडे जाईल. ' म्हणूनच त्याने हा दीर्घ प्रयत्न केला. त्यामुळे जैन धर्माचार्यांत उमास्वातीचें स्थान फार वरच्या दर्जाचें ठरलें आहे. त्याच्या मतें जीवनांत ज्ञान, आचार आणि श्रद्धा या तीन्ही गोष्टींना सारखेंच महत्त्व आहे. सम्यक् विश्वास, सम्यक् ज्ञान व सम्यक् आचार ही त्रयीच जीवाला मोक्ष प्राप्त

करून देते. [खो. प.; जै. सा. इ.]

उमिया माता गुजरातमधल्या केडवा लोकांची कुल-स्वामिनी. हिचें स्थान उंझा येथे आहे.

उम्मज्जग एक प्राचीन जैनपंथ. हे लोक स्नान करतांना एकच बुचकळी मारीत असत. [स्कू. से. जै. लि.]

उम्मेदराम (१७४४–१८१२ इ. स.) राजस्थानांतील पाल्हावत शाखेचा एक चारण. याचा जन्म जयपूर राज्यांतील हणूंतिया गांवीं झाला. अलवरचा राजा बख्तरसिंह याने उम्मेदरामाला त्याच्या तरुणपणींच आपल्याकडे बोलावून घेतलें व शेवटपर्यंत त्याची चांगली बडदास्त ठेवली.

डिंगल व पिंगल या दोन्ही भाषांत उम्मेदरामाने अनेक कविता रचल्या आहेत. त्याने ग्रंथहि बरेच लिहिले आहेत. त्याच्या कांही ग्रंथांचीं नांवें अशीं – (१) वाणीभूषण (२) राजनीति– चाणक्य (३) रामचंद्रजीकी राजनीति (४) अवध पच्चीसी (५) जनकशतक (६) कविप्रिया की टीका इत्यादि.

याची भाषा सुश्लिष्ट व सरस आहे. याच्या इतकी कलात्मक व विचारसंपन्न कविता रचणारे कवी चारणांत फारच थोडे आढळतात. याच्या काव्याचा नमुना पुढीलप्रमाणे —

पर नारी सब मातु सम, पर धन धूलिसमान ।
सबै जीव निज जीव सम, देखै सो दृगवान ।।

अर्थ– सर्व परस्त्रिया या मातेसमान, दुसऱ्याचें धन हें मातीप्रमाणे व सगळ्यांचा जीव हा आपल्यासारखाच हें जो पाहतो (जाणतो), तोच खरा दृष्टिवान होय.

इक तरु सूखे की अगनि जारत सब बनराय ।
त्योंही पूत कपूत तै वंश समूल नसाय ।।

अर्थ– ज्याप्रमाणे एका सुकलेल्या झाडाला लागलेला अग्नि सगळ्या रानाला भस्मसात् करतो, त्याप्रमाणे वंशांत एखादा कुपुत्र निर्माण झाला, तरी तो सर्व वंशाचा उच्छेद करतो. [रा. भा. औ. सा.]

उरगप्प दंडनाथ (इ. स. १४ वें शतक) हा विजयनगरच्या हरिहर राजाच्या पदरीं होता. याने नानार्थ रत्नमाला व एकाक्षर निघण्टु असे दोन शब्दकोश निर्मिले आहेत.

उरम्म उर = गाव (कन्नड शब्द). प्राचीन काळीं कर्नाटकांतल्या सगळ्या ग्रामदेवतांना उरम्म असें म्हणत असत. पुढे त्यांना त्यांच्या गुणधर्मानुसार दुसरीं नांवें मिळालीं. पण बेळ्ळारी जिल्ह्यांतली ग्रामदेवता अजून उरम्म याच नांवाने ओळखली जाते. हिच्या जत्रेच्या प्रारंभीं गावांतल्या रेड्डीच्या घरासमोर एक पणती तेवत ठेवतात. ती पणती जत्रा संपेपर्यंत तेवत राहिली पाहिजे, असा नियम आहे. जत्रेंत देवीची मूर्ति रथांतून मिरवितात. मिरवणुकीपुढे पायघड्या घालतात. नंतर देवीला रेडा बळि देतात. हा रेडा म्हणजे उरम्माचा अस्पृश्य नवरा समजतात. शेवटी देवीची मूर्ति वाजत गाजत गांवाच्या सीमेवर नेऊन ठेवतात व परत येतात.

उरश सिंधु व झेलम या नद्यांच्या मधला प्रदेश. हा पश्चिम गंधार व अभिसार (हल्लीचा पुंछ रजोरी) यांच्या मध्ये येतो. या प्रदेशाचें अर्वाचीन नांव हजारा असें आहे [पा. भा.]

उरळी त्रिवांकुर–मद्रास सीमेवरील वेलचीटेकड्यांवर राहणारी एक आदिवासी जमात. पूर्वी मदुरेच्या राजाचें छत्र धरणारे जे सेवक होते, त्यांचे हे वंशज आहेत, असें म्हणतात. एकदा तो राजा या विभागांत आला असतां, त्याने परत जातांना आपले हे छत्रधारी सेवक तिथेंच सोडून दिले. त्यानंतर त्यांनी तिथेंच आपली वसाहत केली.



उरळींची झाडावरची झोंपडी

हे लोक पठारावर न राहतां सामान्यपणे डोंगराच्या उतारा-

वर राहतात. त्यांच्या कांही झोपड्या जमिनीवर तर कांही झाडांवर बांधलेल्या असतात. त्यांमध्ये एक झोपडी सार्वजनिक असते. तिचा उपयोग कधी देऊळ म्हणून तर कधी रंगमंदिर म्हणून करतात. या झोपडींत एक ढोल असतो. हत्तींच्या कळपाची चाहूल लागल्यास हा ढोल वाजवून ते लोकांना इशारा देतात व मग सर्वजण आत्मसंरक्षणासाठी झाडांवर किंवा उंच झोपड्यांत जाऊन बसतात.

यांच्या स्त्रिया आकर्षक असून पुरुषांचे चेहरेहि नाजूक व प्रसन्न असतात. स्त्रिया तीन वस्त्रें वापरतात. एक कमरेला



उरळी स्त्री

गुंडाळलेलें, दुसरें डाव्या हाताखालून घेऊन उजव्या खांद्यावर गांठ मारलेलें व तिसरें अंगावर घेऊन गळ्याला बांधलेलें असतें. तिसऱ्या वस्त्राचा उपयोग सामान बांधायला किंवा मुलांना अंगावर वागविण्यासाठी करतात.

विवाहप्रथा— मुलामुलींचे विवाह आईबाप ठरवितात. वाङ्निश्चयाच्या वेळीं वराचा मामा वधूगृहीं व वधूचा मामा वरगृहीं तीन तीन मापें तांदूळ मोजून देतो. विवाह ठरल्यावर वधू वराच्या झोपडींत जाते. विवाहाची खूण म्हणून वधूच्या गळ्यांत ताळी बांधतात. पुनर्विवाहाची पद्धति आहे. विवाह झाला, की मुलगा आईबापांपासून वेगळा राहतो.

हे लोक शेती करतात. शिकार करण्यांतहि ते तरबेज आहेत. हत्ती व म्हशी यांना ते पूज्य मानतात व त्यांची शिकार करीत नाहीत.



उरळी शिकारी

प्रसूतिविधि—ऋतुमती स्त्रीला पहिले तीन दिवस निराळ्या झोपडींत व चौथ्या दिवशीं स्नान केल्यावर आणखी दोन दिवस दुसऱ्या एका झोपडींत ठेवतात व नंतर घरांत घेतात. स्त्रीची प्रसूति दूर कुठेतरी बनविलेल्या एका झोपडींत होते व तिथेच ती बारा दिवस राहते. नंतर तिला तिथून जवळच्या एका झोपडींत आणतात व तिथे पांच दिवस ठेवून मग घरांत घेतात. पण घरांतहि बारा दिवस तिला कशाला स्पर्श करूं देत नाहीत. पहिल्या प्रसूतीच्या वेळीं तिचा पति तीन दिवस जननाशौच पाळतो व पुढच्या वेळीं मुळीच पाळीत नाही. मुलाच्या जन्मानंतर १८ व्या दिवशीं घरांतील वृद्ध इसम त्याचें नांव ठेवून कानहि टोचतो. मूल चालूं लागल्यानंतर त्याचें चौल करतात.

अंत्यविधि— प्रेत घरापासून दूर अंतरावर पुरतात व त्या

जागेवर झोपडी बांधून तिच्यांत मयताची सुरी, भात व पान-सुपारी या वस्तू ठेवतात. सातव्या दिवशीं मृताला पिंड व पाणी



उरळी पुरुष

देतात. सोळा दिवस सुतक पाळतात. [का. ट्रा. स. इं.]

उराँव बंगाल, ओरिसा, छोटा नागपूर व आसाम या भागांत राहणारी आदिवासींची एक जमात. हे लोक द्रविड असून स्वतःला कुरुख म्हणवितात. होरो=मनुष्य या शब्दावरून उराँव हें नांव बनलें असावें. डाल्टन व कालडवेल यांच्या मतें हे लोक मूळ कोंकणांतले होते. तिथून ते बंगालमधील कैमूर डोंगरावर गेले. तिथे रोहतास नांवाच्या पठारावर त्यांनी कांही काळ वास्तव्य केलें. नंतर पठाणी आक्रमणामुळे त्यांची पांगापांग झाली. त्यांतले कांही लोक गंगातीरावरून पुढे जात जात राजमहाल डोंगरावर गेले, तर कांही लोक शोण नदीच्या खोऱ्यांतून पलमाऊपर्यंत पोचले व तिथून पूर्वेकडे वळून छोटा नागपूरच्या वायव्य भागांत शिरले. आजमितीस ते छोटा नागपूरच्या उत्तर आणि पश्चिम भागांत, तसेच सिरगुजा आणि झासपूर यांच्या पूर्व भागांत बहुसंख्येने आढळतात. सिंगभूम, गंगपुर, बोनाई आणि हजारीबाग या जिल्ह्यांत त्यांची थोडीबहुत वस्ती आहे.

ते छोटा नागपूरच्या वायव्य व पश्चिम या भागांत गेले, तेव्हा त्यांना तिथे मुंड लोकांची तुरळक वस्ती आढळली. मुंडांनी त्यांना विरोध न करतां आपल्या भागांत स्थायिक होण्यास अनुमति दिली. आजमितीस देखील बहुसंख्य उराँव खेड्यांत मुंडांची थोडीबहुत वस्ती दिसते. उराँव लोकांनी स्थानिक दैवतांची पूजा-अर्चा करणें व त्यांना बलि समर्पण करणें हीं धार्मिक कृत्यें मुंडांच्याकडे दिलीं. मुंडांच्यापेक्षा उराँव हे सुधारलेले होते व त्यांनीच छोटा नागपूरमधील अन्य आदिवासींना जमीन नांगरून शेती करण्याची विद्या शिकविली.

उराँव लोकांचा वर्ण काळसर तपकिरी असतो. त्यांचे केस काळे, राठ व किंचित् कुरळे असतात. त्यांचे ओठ जाड असून दांत थोडे पुढे आलेले असतात. डोळे मोठे आणि तेजस्वी असतात. आकुंचित कपाळ व रुंद चपटें नाक हें त्या जमातीचें शारीरिक वैशिष्टच होय. या वैशिष्टयावरून ते शुद्ध द्रविडियन वंशांचे आहेत, असें समजलें जातें. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांची कुरुख नांवाची बोलीहि द्राविडच आहे. छोटा नागपूरच्या उत्तरेस गंगापूर या विभागांत वेर्गा नांवाचे लोक राहतात. त्यांना उराँव लोकांची मूळ शाखा समजतात. वेर्गांची बोली कुरुख बोलीहून थोडी भिन्न आहे. हे लोक रानटी व क्रूर दिसतात.

उराँव लोक, मुंडांहून आपण सुसंस्कृत आहों, असें समजत असले, तरी त्यांचीं घरें मात्र झोपडीवजाच असतात. हे लोक गुरेंसुद्धा आपल्या राहत्या घरांतच बांधतात. फक्त डुकरांसाठी तेवढीं वेगळीं घरकुलें करतात. त्यांच्या घरांच्या भिंती तांबड्या मातीच्या असून छप्पर कैंबळी असतें. प्रत्येक खेड्यांत मुंड व पहाण (पुजारी) असतो. त्यांचा अधिकार वंशपरंपरेने चालतो. हे लोक खेड्याच्या संस्थापकांचे वंशज असतात. या दोघांच्याहि वंशपरंपरागत जमिनींना खूंट म्हणतात. या दोघांशिवाय गांवचीं जरूर तीं कामें करणारा एक मनुष्य असतो, त्याला महातो म्हणतात. त्यालाहि जमिनीचा तुकडा तोडून दिलेला असतो. पहाण वंशपरंपरागत असला, तरी त्यांतला एखादा दुर्व्यसनी निघाला किंवा त्याने धर्मांतर केलें, तर त्याचा तो अधिकार काढून घेतात व देवाला कौल लावून नव्या पहाणाची नेमणूक करतात. उराँव वस्तींत पहाणाची सत्ता अनियंत्रित असते. वस्तीचें भवितव्य त्याच्याच हातांत असतें.

धुमकुरिया– प्रत्येक उराँव खेड्यांत अविवाहित तरुणांना झोपण्यासाठी सामुदायिक शय्याघर असतें. त्याला धुमकुरिया म्हणतात. मुलांप्रमाणेच मुलींचेंहि शय्याघर असतें व त्या घरांत झोपणाऱ्या मुलींवर नजर ठेवण्यासाठी एखाद्या विधवा स्त्रीची नेमणक केली जाते. सामुदायिक शय्याघर नसल्यास खेड्यांतल्या विधवांच्या घरीं मुलींच्या झोपण्याची सोय केली जाते. उराँव लोकांत लैंगिक निर्बंध शिथिल असतात. एखादी तरुण मुलगी रात्रीच्या वेळीं मुलांच्या शय्याघरांत गेली, तरी तिच्या आई-बापांना अनैसर्गिक असें कांही वाटत नाही. उराँव मुली

विनयशील असतात. त्या सहसा असभ्य भाषा बोलत नाहीत. कुंवारपणांत त्यांच्या हातून कांही प्रमाद घडला, तरी वैवाहिक जीवनांत त्या आपल्या नवऱ्याशीं एकनिष्ठ राहतात. दुसरी गोष्ट म्हणजे खेड्यांतल्या खेड्यांत विवाह क्वचितच घडतात. शक्यतों दुसऱ्या खेड्यांतली मुलगी आणायची, असा रिवाज आहे. धुमकुरियामध्ये जे प्रकार घडतात, त्याची बाहेर वाच्यता करायची नाही, अशी तिथे झोपणाऱ्या तरुणांना शपथ घ्यावी लागते. शपथ मोडणाऱ्याला कडक शिक्षा होते.

धुमकुरिया समोरच एक नृत्यांगण असतें. त्याला आखाडा म्हणतात. त्याचा परिघ अंदाजें ४० फुटांचा असतो व त्याच्या मध्यभागीं एक खांब किंवा दगड असतो. उराँव लोकांचीं त्या



उराँव नृत्य

ठिकाणीं नृत्यें होत असतात. प्रेक्षकांसाठी किंवा थकलेल्या नर्तकांसाठी आखाड्याभोंवती कट्टा किंवा आसन बांधलेलें असतें. सणाच्या दिवसांत काळोख पडल्यावर नृत्य सुरू होतें आणि नर्तकांना यथेच्छ दारू मिळाली, तर तें नृत्य सूर्योदया-पर्यंत चालू राहतें.

वेषभूषा– पुरुष केस लांब वाढवितात व त्यांचा बुचडा बांध-तात. जत्रेला किंवा समारंभाला जातांना ते त्या बुचड्यावर तांबडा रुमाल बांधतात आणि केसांत लाकडी फण्या खोचतात. ते अरुंद धोतर काचा मारून नेसतात व त्यावर वेताचा किंवा रेशमी धाग्यांचा गोफ बांधतात. ते अंगांत सदरा, डगला, असें कांहीं घालीत नाहीत. अंगावर आणि कानांत पितळेचे आणि आरशांचे दागिने घालतात. सुसंस्कृत जगाशीं ज्यांचा संबंध येतो, अशा उराँव तरुणी लाल किंवा पांढऱ्या किनारीची जाडीभरडी साडी नेसतात. शहरवस्तीपासून दूर असलेल्या बायका मात्र कमरेभोवती वस्त्राचा एक तुकडा गुंडाळतात. शिप्याने शिवलेले कपडे ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या स्त्रियांशिवाय इतर स्त्रिया वालीत नाहीत. चोळीचें काम साडीच्या पदरानेच करतात. त्या लाल मण्यांच्या माळा गळ्यांत घालतात व पितळेचे पुष्कळसे दागिने वापरतात. डाव्या हाताच्या बोटांत तांब्याच्या अंगठ्या व पायांत पितळेचीं किंवा पचधातूंचीं जोडवीं घालतात. त्यांच्या हातापायांत धातूंचे वाळे आणि कडीं असतात. त्या उजव्या कानाजवळ केसांचा बुचडा बांधतात. केसांत फुलें माळण्याची त्यांना विलक्षण हौस असते. त्या कानांना अनेक भोकें पाडून त्यांत अनेक प्रकारचे अलंकार घालतात. उराँव स्त्रिया बाल-पणांतच अंगावर गोंदून घेतात. त्यांच्या भुवयांवर तीन ठिकाणीं आणि प्रत्येक कानशिलावर दोन ठिकाणीं गोंदणें हमखास दिसतें. उराँव स्त्री ओळखण्याची ती एक खास खूण असते.

आहार– उराँव लोक खूप खाणारे आहेत. मात्र त्यांना पाककला बिलकुल अवगत नाही. भात आणि उडदांची डाळ हा त्यांचा मुख्य आहार असतो. भाजीपाला जंगलांत मिळेल तो. ते उंदीर, कोल्हे, लांडगे, साप, कासव, मासे, बेडूक इ. बहुतेक सर्व प्राण्यांचें मांस खातात. डुकराचें मांस हें त्यांना सर्वांत अधिक आवडतें. ते मेलेल्या जनावरांचें देखील मांस खातात; पण तरीहि त्यांना अस्पृश्य समजलें जात नाही, हें विशेष आहे. हे पट्टीचे दारूबाज असतात. ते तांदुळांची दारू घरींच बनवितात व बायका-मुलांसह ती पितात.

विवाहप्रथा– उराँव लोकांत बालविवाहाची चाल नाही. बहुतेक तरुण मुलगे आपली सोबतीण निवडतात. लग्नांत मुलीचें देज घेतात. शकुनप्रश्न पाहिल्याशिवाय विवाह नक्की करीत नाहीत. लग्न ठरल्यावर वराकडील वऱ्हाडी मंडळी वधूच्या गावीं जायला निघतात. या मंडळींतले पुरुष हत्यारबंद असतात. हीं हत्यारें अर्थात् बनावट किंवा बोथट असतात. गांवाच्या शिवेवर पोचायच्या वेळीं वधूपक्षाकडील हत्यारबंद पुरुष वरपक्षावर तुटून पडतात. थोडा वेळ उभय पक्षांत लुटू-पुटीची लढाई होते. नवरा मुलगा आपल्या मित्राच्या कडेवर बसून व नवरी आपल्या नातेवाईक स्त्रीच्या कडेवर बसून त्या लढाईत भाग घेतात. या लढाईंत वरपक्षाचा जय ठरलेला असतो.

वधूपित्याच्या घरासमोर एक लता-कुंज उभारला जातो. त्यांत एक पाटा, त्यावर जूं आणि जुंवावर मक्याचें कणीस ठवलेलें असतें. त्या ठिकाणीं नवरा-नवरीला घेऊन जातात. तिथे वधू-वर एकमेकांच्या कपाळीं सिंदूर लावतात. हा संस्कार

सभोवती पडदा लावून करतात. तो झाल्यावर बंदुकीचे बार काढतात. नंतर वधू-वर एका खोलींत कपडे बदलण्यासाठी जातात. तो त्यांचा एकान्तवास असतो. तीं दोघें खोलींत गेल्यावर बाहेरचे लोक नृत्य सुरू करतात. वधू–वर बाहेर येतात, तेव्हा त्यांचें पति-पत्नी हें नातें सिद्ध झालेलें असतें. लग्नें कोणत्याहि महिन्यांत होत असलीं, तरी उन्हाळचाचे दिवस अधिक पसंत करतात. नवरी मुलगी सासरीं गेली, की ती जेवायच्या वेळीं रुसून बसते. सासरकडून एखादा मोल्यवान् अलंकार मिळाल्यानंतरच ती अन्नाला स्पर्श करते.

प्रसूतिप्रथा– बायका एकमेकींचें सुईणपण करतात. त्यांना मृत्यूची कदर वाटत नाहीं. प्रसववेदना सुरू असतां आणि प्रसूतिनंतर १५ दिवसपर्यंत बाळंतिणीला चोरडेवान या भुताची भीति असते. तें मांजराच्या रूपानें येऊन बाळंतिणीच्या अंगाला नाजूक ठिकाणीं इजा करतें, अशी समजूत आहे. तो धोका टाळण्यासाठी बाळंतिणीच्या शेजारी रात्रंदिवस आगटें पेटवून ठेवतात. मुलाला जें नांव ठेवायचें मनांत असतें, तें नांव उच्चारून पाण्यांत एक दाणा टाकतात. तो तळाशीं गेल्यास नांव शुभ व तरंगल्यास अशुभ समजतात.

मैत्रीप्रथा– उराँव मुलीची दुसऱ्या एखाद्या मुलीशीं जिवश्च कंठश्च मैत्री जमली, की तें नातें विवाहबंधनाइतकेंच दृढ मानतात. त्यासाठी दोघी मैत्रिणी मिळून भोजनाचा बेत करतात व इतर मुलींना त्यासाठी बोलावतात. ज्यांची मैत्री व्हायची, त्या दोन मुली इतर मुलींसमक्ष एकमेकींना फुलें माळतात व मण्यांच्या माळांची अदलाबदल करून एकमेकींना आलिंगन देतात. त्या दिवसापासून त्या दोघी एकमेकींना नांवानें हाक न मारतां 'माझ्या फुला' किंवा तत्सम एखाद्या नांवानें संबोधितात.

देवधर्म – उराँव लोक परमेश्वर मानतात. त्याला ते धरमी किंवा धरमेश म्हणतात. हा धरमेश सूर्याचा प्रतिनिधि असतो; पण तो कोणाचें कल्याण किंवा अकल्याण करीत नसल्यामुळे त्याला भजण्यांत कांही अर्थ नाही, असें उराँव लोक समजतात. त्यामुळेच ते दुष्ट भुतें व क्षुद्र दैवतें यांना भजतात. कारण त्यांच्या अंगीं मानवांचें भलें-बुरें करण्याचें सामर्थ्य असतें. त्यांचा परलोकावर विश्वास नसला, तरी ते पाप-पुण्य मानतात. त्यांचा जादू-टोण्यावर विलक्षण विश्वास असतो. ते देवऋषीला ओझा म्हणतात व रोगराईच्या वेळीं त्याच्याकडून मंत्रतंत्राचे प्रयोग करवितात. त्यांच्या प्रमुख भुताला दऱ्हा असें नांव आहे. जुन्या काळीं त्याला नरबलि देण्याचीहि प्रथा होती. दुसऱ्या एका भुताचें नांव खुंटा असें आहे. भात लावणीच्या वेळीं त्याला बकरा बळि देतात. याशिवाय बरंडा (डोंगरी समंध), अद्दी (घरांतले भूत), चुरेल (सटवी), मूआ (अपघातानें मरण पावलेल्याचें भूत) अशीं अनेक भुतें ते मानतात. त्यांच्या जीवनावर या भुताखेतांचा विलक्षण पगडा असतो. गांवाजवळची वृक्षराई हें त्यांच्या भुतांचें वसतिस्थान असतें. उराँव लोक वृक्षपूजकहि आहेत. ते साल व करम या वृक्षांना पवित्र मानतात. एखादा दगड, मातीचा ढीग किंवा लाकडी खांब यांना भुतांचीं प्रतीकें मानून पुजतात. धरतीमाता धरमेशाची पत्नी समजतात. वसंत ऋतूंत जेव्हा वृक्षाला बहर येतो, तेव्हा धरमेश व पृथ्वी यांचें लग्न लावण्याचा समारंभ करतात. वृक्षराईत कालो पक्को नांवाची देवता असते. तिला धरतीचें प्रतीक मानतात. तिच्या पुढे गांवजोशाला धरमेशाचें प्रतीक म्हणून नवरदेवाच्या पोषाखांत उभें करतात व त्या दोघांवर अक्षता, फुलें उधळतात. या उत्सवाला खद्दी असें म्हणतात. खद्द शब्दाचा अर्थ उत्पत्ति असा आहे. या उत्सवामुळे पिकें भरपूर येतात व वनस्पती खूप वाढतात, अशी त्यांची समजूत आहे.

उराँव लोकांनी मुंडांचीं बहुतेक नृत्यें उचललीं असून त्यांत सुधारणाहि पुष्कळ केली आहे. मुंडांचें जदुरनृत्य त्यांनी विविध पदन्यासांनी बरेंच गुंतागुंतीचें केलें आहे. उराँव मुलें-मुली लहानपणींच नृत्याचा अभ्यास सुरू करतात. नृत्याबरोबरच सांघिक गाणींहि तीं शिकतात. प्रत्येक उराँव खेड्यांतल्या वृक्षराईत जत्रा भरतात, पानोत्सव होतो आणि त्या ठिकाणीं उराँव तरुण-तरुणी बेहोष होऊन नाचतात. ढोल वाजवीत मिरवणुकीने ही मंडळी जत्रेच्या ठिकाणीं जातात. राईंत शिरल्यावर खारिया नांवाचें नृत्य पहिल्या प्रथम करतात. जत्रांमध्ये झेंडेहि नाचवितात. हे झेंडे तिकोनी व वेगवेगळ्या रंगांचें असतात.



उराँव ढोलवादक

अंत्यविधि – घरांत मृत्यु झाला, की आप्तेष्ट माणसें रडून आकांत मांडतात. प्रेताला चौपायीवर ठेवून तेल लावून आंघोळ घालतात. मग त्याच्या अंगावर नवे कपडे चढवितात. त्याच्या तोंडांत भात व तांब्याचीं नाणीं ठेवतात. प्रेत घरांतून बाहेर काढल्यावर मृत्यूच्या जागीं राख पसरून घर बंद कर-

तात. प्रेतयात्रेंत गांवांतले सर्व स्त्री-पुरुष भाग घेतात. प्रेतें पुरतात किंवा जाळतात. जाळायचें असल्यास मयताच्या जवळचा नातेवाईक (पुरुष किंवा स्त्री) चितेला अग्नि देतो. दहन करून घरीं परत आल्यावर मृत्यूच्या जागीं पसरलेल्या राखेवर एखादी खूण उमटली आहे कीं काय, हें पाहतात. माणसाचें पाऊल उमटलेलें दिसलें, तर मृतात्मा अजून तृप्त झाला नाही, असें समजून त्याला भात वाढतात. मांजराचें पाऊल उमटलेलें दिसलें, तर मृतात्मा भूतयोनींत गेला, असें समजतात. मृताची रक्षा गोळा करण्याच्या वेळीं नातेवाइकांना आणि गांवांतल्या सर्वांना बोलावतात. त्याच्या अस्थी एका मडक्यांत भरून तें मडकें घरासमोर एका खांबाला टांगून ठेवतात. दरवर्षी एकदा गांवांतलीं अशीं सर्व मडकीं सामायिकपणे श्मशानांत नेऊन तिथे तीं पुरून टाकतात. उराँव मनुष्य परगांवीं मरण पावल्यास त्याच्या अस्थी घरीं आणून गांवांतल्या श्मशानांत पुरतात. मयतांच्या अस्थींची अशा प्रकारें विल्हेवाट लावल्याखेरीज गांवांत लग्नें होत नाहीत. मृत्यूचें सुतक पाळतात; पण श्राद्ध वगैरे कांही करीत नाहीत.

या लोकांना नाच-गाण्यांची अतिशय आवड आहे. लहान मुलांच्या शिक्षणासाठी प्रत्येक गांवांत धांगरकुरियार नांवाची जागा असते. तिथे मुलांना सामाजिक व व्यावहारिक शिक्षण देतात. शेतांत बीं पेरतांना तें स्त्रियांच्या हातून पेरणें शुभ मानतात.

दर बारा वर्षांनी उराँव स्त्रिया एक उत्सव साजरा करतात. तो त्यांच्या मूलस्थानांतील एका घटनेचा स्मारक असतो. उराँव लोक रोहतासगड येथे राहत असतां एकदा पठाणांनी त्यांच्यावर हल्ला केला, पण उराँव स्त्रियांनीच तो हल्ला परतवून लावला. या घटनेचें स्मरण म्हणून चैत्र-वैशाखांत ' जनी सिकार ' हा उत्सव त्यांच्या वस्तींत साजरा होतो. त्या दिवशीं उराँव स्त्रिया मर्दानी पोषाख करतात व हातांत तीर-कमठा, लाठी वगैरे हत्यारें घेऊन नाचत, गात शेजारच्या गांवांत शिकारीसाठी जातात. त्यांचें गाणें पुढीलप्रमाणे असतें—

बारह बधरे राजा जनी सिकार
जनी का मुडे राजा पगडी बांधय ।
गोडे घुंगुरा राजा हाथे तरवारि
जनी का मुडे राजा पगडी बांधय ।

डुक्कर, कोंबडा, बकरा, अशा कोणत्याहि प्राण्याची त्या शिकार करतात. या उत्सवांत पुरुषांना भाग घेण्याची मनाई असते. [सेन्सस ऑफ् इंडिया १९३१; भा. आ.; धर्मयुग; द्रविडियन्स.; एन्सा. रि. ए.; रे. क. इं.]

उरिया गोपाल (१८१९–१८५९ इ. स.) बंगालमधील यात्रागीतें रचणारा एक कवि. १६ व्या शतकापासून बंगालमध्ये प्रचलित असलेलीं यात्रागीतें बहुतेक कृष्णवर्णनपर आहेत. पण कांही गीतें इतर कथांवर व विशेषतः भारतचंद्रांच्या ' विद्यासुंदर ' या कथेवर आधारलेलीं आहेत. अशीं गीतें रचणाऱ्यांमध्ये उरिया गोपाल हा विशेष प्रसिद्ध आहे.

याचा जन्म कटकमधील जयपूर गांवीं झाला. १९ व्या वर्षी तो कलकत्त्याला गेला व फेरीवाला बनून केळीं विकूं लागला. पुढे तो यात्रा मंडळींत शिरला. आपल्या गोड गळ्याने व विनोदी भाषणाने त्याने लोकांवर छाप पाडली. त्याच्या गीतांतील विनोदी संवादांनी लोकांचें खूपच मनोरंजन होत असे. [हि. बं. लॅ. लि.]

उरुक्रम बारा आदित्यांपैकी एक. हा कार्तिक महिन्यांत प्रकाशतो. याच्या भार्येचें नांव कीर्ति असून तिला बृहच्छ्लोक नांवाचा पुत्र झाला. [प्रा. च. को]

उरुचक्रि आत्रेय सूक्तद्रष्टा. याने तीन तेजो लोक, तीन द्युलोक व तीन रजोलोक यांचा उल्लेख केला असून मित्रावरुण त्यांचें धारण करतात, असें सांगितलें आहे (ऋ. ५.६९.१).

उरुमिक्कारन द. भारतांतील एक जात. उरुमी म्हणजे ढोल किंवा पडघम. तें वाजविणारे म्हणून यांना हें नांव मिळालें. हे पूर्वी तुगंभद्रेच्या कांठीं राहत होते. पण तिथे तोत्तियन जातीचे लोक त्यांच्या बायकांवर अत्याचार करूं लागल्यामुळे हे तिथून स्थलांतर करून खाली तमिळनाडमध्ये गेले. हे काप्पिलियन जातीचे शेजारी होते. काप्पिलियन जातींतल्या लग्नसमारंभांत अजूनहि उरुमिक्कारन हे पानसुपारी वांटतात; तसेंच त्यांच्या अंत्यविधीच्या वेळींहि उपस्थित राहतात. [का. ट्रा. स. इं.]

उरुवेला पालि भाषेंत वाळूला उरु म्हणतात. वेला म्हणजे नदीचा तट होय. गया व बुद्धगया यांच्या मधून नेरंजरा नदी वाहते. तिच्या वालुकामय विस्तीर्ण तटप्रांताला उरुवेला असें नांव मिळालें आहे. बुद्धत्व प्राप्त होण्याच्या पूर्वी गौतमाने या ठिकाणीं वास्तव्य करून कठोर तप केलें. गौतम भुकेने विकल झाला असतां, सुजाता नांवाच्या एका गवळ्याच्या मुलीने गौतमाला खीर आणून दिली, ती याच ठिकाणीं.

गौतमाला बोधि प्राप्त झाल्यावर त्याने या ठिकाणीं वास्तव्य करणाऱ्या शेकडो जटाधारी साधूंना आपल्या धर्मांत आणलें.

उरुक्षय आमहीयव ऋ. १०.११८ या सूक्ताचा द्रष्टा. या सूक्तांत त्याने मानवांना अग्नीच्या उपासनेचा उपदेश केला आहे.

उरेन बिहारच्या मोंघीर जिल्ह्यांतील एक गांव. इथे बौद्ध धर्माचे बरेच अवशेष आहेत. गांवांत एक टेकडी असून तिच्यावर गौतम बुद्ध वर्षावासासाठी तीन महिने राहिला होता. याच ठिकाणीं त्याने वकुल यक्षाचा पराजय केला. टेकडीच्या पायथ्याशीं आग्नेय बाजूला एक मोठा पाषाण असून त्याच्यावर बुद्ध विश्रांति घेत असे, असें सांगतात. त्याच्या खुणा तिथे उमटलेल्या आहेत. या खुणा एक इंच खोल, पांच फूट दोन इंच लांब व दोन फूट एक इंच रुंद असून त्यावर एक स्तूप बांधलेला आहे. जवळच वकुल यक्षाचीं पदचिन्हें असून त्यांच्या मागे बुद्धाची सहा–सात फूट उंचीची बैठी पाषाणी मूर्ति आहे. या टेकडीवर पूर्वी बरेच बौद्ध मठ व देवालयें असावीं. [मों. जि. गॅ.]

उर्दू भाषा व साहित्य उर्दू व खडीबोली हिंदी या दोहोंत फार थोडा भेद दिसतो. त्यामुळे विद्वानांत विवाद आहे, की खडीबोलींतून उर्दू निघाली का उर्दूतून खडीबोली निघाली ? उर्दूच्या बाबतींत हेंहि सांगणें कठीण आहे, की तिचा जन्म कोणत्या प्रदेशांत झाला. कांहींच्या मतें ती पंजाबांत जन्मली व तिचें प्रथम चिन्ह 'पृथ्वीराजरासो' मध्ये आढळतें. दुसरें मत असें, की मुहंमद बिन कासीमने सिंधवर आक्रमण केल्यानंतर आक्रमक लोक व सिंधमधले रहिवासी यांच्या संपर्कातून या भाषेची उत्पत्ति झाली. तिसरें मत असें, की उर्दू दक्षिणेंत जन्म पावली. गोवळकोंडा, विजापूर इ. ठिकाणच्या मुसलमान बादशहांनी गज़ला, मस्नवी, मर्सिये इ. काव्यें लिहिलीं आहेत. ही उर्दूची प्रारंभिक कविता मानली जाते. मीर याने लिहिलेल्या एका शेरावरून या गोष्टीचा अंदाज मिळतो ––

ए मीर मैं ही इसको किया रेख्ता वरना,
एक चीज़ लचर सी ब ज़बाने दकिनी थी ।

अर्थ—हे मीर ! मींच उर्दूला उर्दू बनविलें. अन्यथा ती एक तुच्छ अशी दक्षिणी भाषा होती.

मात्र उर्दूच्या जन्मप्रदेशासंबंधीं कितीहि मतभेद असले तरी तिला महत्त्व मिळालें, तें दिल्लीच्या दरबारांत. शाहजहाँच्या

कारकीर्दीत तिला उर्दू हें नांव लाभलें. उर्दू हा शब्द तुर्की असून त्याचा अर्थ सैन्य किंवा लष्कर असा आहे. प्रारंभीं हिला ' ज़बाने उर्दू ' म्हटलें गेलें. कारण ही भाषा प्रथम लष्करांत प्रचलित झाली.

उर्दूला भाषा या दृष्टीने पुढे आणणारा पहिला पुरुष अमीर खुस्रव हा होय. याचा जन्म १३ व्या शतकांत झाला. व त्याचें कार्यक्षेत्र दिल्ली हेंच राहिलें. तो फारसी भाषेचा पंडित आणि कविहि होता. त्याने अरबी, फारसी, संस्कृत, अपभ्रंश व हिंदी या भाषांतील शब्दांचा उर्दूमध्ये भरणा केला व त्या भाषेची वाढ केली. त्याचा हा प्रयत्न मोगलांच्या काळांत विकसित स्वरूपांत दिसून आला.

उर्दू भाषेच्या प्रारंभिक अवस्थेचा अभ्यास केल्याअंतीं कळतें, की उत्तरेच्याहि आधी दक्षिणेंत तिने साहित्यिक रूप धारण केलें. १८ व्या शतकांतील दिल्लींतल्या प्रमुख उर्दू कवींनी आपली काव्यशैली दक्षिणेंतूनच मिळविली होती. मुहंमदशहाच्या दरबारांत वली हा कवि आल्यानंतर उत्तर व दक्षिण या दोन्ही प्रदेशांतल्या उर्दू साहित्यिकांचा निकट संपर्क आला. शाहजहाँच्या काळांतच उर्दूतली पहिली गज़ल रचली गेली. तिचा निर्माता चंद्रभान नांवाचा एक ब्राह्मण होता. ती गज़ल अशी आहे–

न जाने किस शहर अंदर हमन को लाके डाला है ।
न दिलबर है, न साकी है, न शीशा है, न प्याला है ।।
पिया के नाँव की सुमिरन, किया चाहूँ, करूँ कैसे ?
न तस्बीह है, न सुमिरन है, न कंठी है, न माला है ।।

अर्थ–आम्हाला कोणत्या शहरांत आणून घातलें आहे, कोण जाणे ! (इथे) प्रियकर नाही, मद्य देणारा कोणी नाही, बाटली नाही कीं प्याला नाही; प्रियकराच्या नांवाचें स्मरण करण्याची इच्छा आहे. पण करूं कसें ? तसबीर नाही, आठवण नाही, कंठी नाही कीं माला नाही.

दक्षिणेंतल्या राज्यावर जोंवर अकबराने धाड घातली नव्हती, तोंवर विजापूर, गोवळकोंडा इ. मुसलमानी राज्यांतल्या दरबारांत शेर-शायरी बरीच चालत होती. कुतुबशाहीचा महंमदकुली कुतुबशहा हा स्वतः कवि होता. विजापूरचे इब्राहीम आदिलशहा व अली आदिलशहा हे दोन बादशहा कवि व साहित्यिक होते. इब्राहीम आदिलशहाने फारसीच्या बरोबरीने दक्षिणी उर्दूला आश्रय दिला. तो संगीताचा विलक्षण भोक्ता होता. त्याने आपलीं वेळोवेळीं विविध रागांत रचिलेलीं गीतें एकत्र करून त्या संग्रहाला नवरस असें नांव दिलें. आश्चर्याची गोष्ट ही, की त्याच्या काव्यांत शिवपार्वती इ. पौराणिक देवदेवतांची स्तुति आढळते. तो सरस्वतीला म्हणतो–

नवरस सूर जुग जुग जूनी आनद सर्वगुणी
यू सत्सरस्वती माता इब्राहिम प्रसाद भय दूनी

अर्थ–हे माते सरस्वती, इब्राहिमवर तुझी कृपा आहे म्हणून तुझ्या प्रसादाने त्याचीं नवरस गीतें दीर्घकाळपर्यंत जगांत टिकतील.

सतराव्या शतकाच्या सुरवातीस विजापुरांतल्या त्या काळच्या कवींत तहशीनउद्दीन मुल्ला कुतुबी, तवई हाशमी इ. उर्दूचे कवि व साहित्यकार होते. नुसरती हा अलि आदिलशहाच्या दरबारांतील महाकवि होता. त्याने अलीनामा या नांवाने आदिलशहाचें चरित्र लिहिलें आहे. त्याचीं गुलशने इश्क व गुलदस्त ए इश्क हीं मसनवी काव्यें आहेत. दौलत नांवाच्या कवीने शहा बहरामची कहाणी लिहिली. शहा मलिकने इस्लामविषयीं काव्य लिहिलें. शहा अमीमचा जवाहरुल-असरात हा काव्यग्रंथहि धार्मिकच आहे. मौलाना वजदी याचा सबरस नांवाचा एक गद्य ग्रंथ असून तो उर्दूतला पहिला साहित्यिक ग्रंथ मानला जातो. इब्तनशाली, गौवासी, वहदी यांनी मसनवी काव्यें लिहिलीं आहेत.

दक्षिणेंतील उर्दूचा आणखी एक मोठा कवि म्हणजे वली औरंगाबादी हा होय. तो पुढे औरंगाबादेहून दिल्लीस गेला आणि तिथल्या कविजनांवर त्याने आपला प्रभाव गाजविला. वलीने उर्दू कवितेंत एक नवी शैली निर्माण केली आणि ती आजहि थोड्या बहुत प्रमाणांत चालू आहे. वलीच्यानंतर दिल्लीमध्ये उर्दू कवितेला बहर येत गेला. दिल्लींत दरबारी कवींच्या व्यतिरिक्त सूफी कवींचीहि एक परंपरा होती. त्यांना राजदरबारांत प्रतिष्ठा नसली, तरी जनतेंत त्यांच्याविषयीं प्रेम होतें. दरबारी कवींच्या कवितेचा रंग वेगळा होता; आणि सूफी कवींचा वेगळा होता; पण तरीहि प्रेम आणि शृंगार यांना दोन्ही ठिकाणीं प्राधान्य होतें.

उर्दू कवितेंत प्रेमाचीं दोन रूपें मानलेलीं आहेत. एक हक़ीक़ी व दुसरें मजाज़ी. पहिल्यांत परमात्म्याविषयीं प्रेम प्रकट केलें जातें आणि दुसऱ्यांत तें व्यक्तिविशेषासाठी निर्माण होतें. उर्दूवर संस्कृत, अरबी आणि फारसी, या तीन्ही भाषांचा प्रभाव पडलेला असला, तरी फ़ारसीचा सर्वांत अधिक आहे.

१७५७ सालीं प्लासीच्या लढाईत इंग्रजांचा विजय झाला. १७६१ मध्ये अहमदशहा अब्दाली याच्या आक्रमणाने भारतांतलें मोगल राज्य खिळखिळें झालें. शहाआलमच्या काळांत तर मोगलांवर चारी बाजूंनी आक्रमणें झालीं. पण अशा स्थितींतहि दिल्लींतल्या उर्दू कवितेचा बहर ओसरला नव्हता. शहाआलम हा स्वतः फारसीचा कवि असला, तरी त्याच्या दरबारांत उर्दू कवींचाहि सन्मान होत होता. पण पुढे हें सगळें गाडें फिरलें. दिल्लीवर सतत होणाऱ्या आक्रमणांच्या त्रासाने उर्दूचे कवि तिथून पळाले आणि लखनौ येथे नबाव आसफ़ुदौला याच्या आश्रयाला आले. मीर आणि सौदा हे याच काळांतले दोन सुप्रसिद्ध उर्दू कवि होत.

मीरचा जन्म आग्रा येथे १७२३ सालीं झाला. याचें पूर्ण नांव मीर महंमद तक़ी मीर. हा जितका प्रेमळ तितकाच स्वाभिमानी होता. त्याचीं धार्मिक मतें उदार होतीं. इ. स. १७३७ पासून तों १७८२ पर्यंतच्या काळांत दिल्लींत रक्तपात, खून, अंतःकलह, लूटमार यांचें थैमान चालू होतें. मीरला हे सगळे अत्याचार स्वतःच्या डोळ्यांनी पाहावे लागले. नादिरशहाचा हल्ला, महंमदशहाचा मृत्यु, अब्दालीचे अत्याचार, मराठे, शीख, रोहिले आणि जाट यांचीं आक्रमणें या सर्व गोष्टींमुळे दिल्ली उद्‌ध्वस्त झाली आणि तिची शतकानुशतकें सांठलेली संपत्ति नष्ट झाली. या आपत्तींत दिल्लींतलीं कैक घराणीं बुडालीं. अशा या परिस्थितीमुळे मीरला अनेक अमीर व नबाव यांच्याकडे आश्रयार्थ जावें लागलें. मीरने १७५८ मध्ये आत्मचरित्र लिहायला घेतलें. १७८५ पर्यंत त्याने तें आणून सोडलें आहे. तो एका ठिकाणीं म्हणतो –



उर्दू कवि मीर

शहां के कुहल जवाहर थी खाक पा जिनकी।
उन्हींकी आँखोंमें फिरते सलाइयां देखीं ।।

अर्थ — ज्या बादशहाच्या पायांना धुळीच्या ऐवजीं रत्नें लागत, त्याच्या डोळ्यांतून सळया फिरतांना आम्ही पाहिल्या.

दिल्ली में आज भीक भी मिलती नहीं उन्हें।
था कलतलक दिमाग जिन्हें ताजोतख़्त का ।।

अर्थ – कालपर्यंत ज्यांना राजमुकुटाची ईर्ष्या होती, त्यांना आज दिल्लींत भीकसुद्धा मिळेनाशी झाली आहे.

१७८२ मध्ये मीरने दिल्ली सोडली आणि तो लखनौ येथे नबाब आसफ़ुदौला याच्या आश्रयाला गेला. मीरचें साहित्य फार मोठें आहे. त्याच्या नुसत्या गज़लांचीच संख्या १६७४ भरते. शिवाय त्याने मसनवी म्हणजे दीर्घकाव्यें, कसीदे म्हणजे स्तुतिगीतें व सलाम म्हणजे धार्मिक काव्येंहि लिहिलीं आहेत. मीरची कीर्ति त्याच्या गज़लांवर आधारलेली आहे. **गज़ल**

क्षेत्रांत मीरची बरोबरी आजपर्यंत कोणी करूं शकला नाही, असें रसिक म्हणतात. तळमळ, संवेदनाशील हृदय, हृदयाचा ठाव घेणारी भाषा आणि जीवनाच्या अनुभूतींतून निघालेले बोल यांमुळे मीरच्या गज़ला म्हणजे व्यथा आणि वेदना यांचें जणू अग्निकुंडच ठरल्या आहेत.

मीरच्या काव्यांत इश्काचे मनोहर रंगहि ठायीं ठायीं दिसतात. तो म्हणतो –

कहता है दिल के आंखने मुझको किया खराब ।
कहती है आंख ये के मुझे दिलने खो दिया ।।
लगता नहीं पता के सही कौनसी है बात।
दोनों ने मिलके मीर हमें तो डुबोदिया ।।

अर्थ –– हृदय म्हणतें, की हा सारा घात डोळ्यांमुळे घडून आला. डोळे म्हणतात, की ही आपत्ति हृदयामुळे आली. खरें काय तें कळत नाही. पण दोघांनी मिळून मीरला मात्र सफाईने बुडविलें.

मिर्ज़ा महंमद रफी ' सौदा ' हा मीरचा समकालीन कवि होय. त्याचा जन्म १६९५ च्या सुमारास झाला. त्याचा स्वभाव रसिक आणि रंगेल होता. बापाकडून मिळालेली संपत्ति त्याने रंगढंग करून उधळून टाकली. तो म्हणतो ––

सुहबते शेर वबकफ जाम व सुराही दरदस्त ।
इस सिवा सौदा को कुछ काम नहीं दुनियासे ।।

अर्थ – कविजनांची सोबत, हातांत चषक आणि दारूची सुरई यांशिवाय मला जगाशीं दुसरें कांही काम नाही.

त्याच्या काळांत लोक हळूहळू उर्दूकडे वळूं लागले होते. फारसीच्या बरोबरीने उर्दूचे मुशायरेहि होऊं लागले होते. पण सौदावर फारसीचा जबरदस्त पगडा होता. तो प्रथम फारसींतूनच कविता लिही. पण खान आरजू या कवीने एक दिवस त्याला सांगितलें, की ' फारसी तुला अनुकूल नाही; तूं उर्दूंत कविता करूं लागलास तर अद्वितीय ठरशील. ' त्यामुळे मग तो उर्दूकडे वळला. तोहि पुढे दिल्ली सोडून लखनौला गेला. लखनौच्या नबाबाशीं त्याचे घनिष्ठ संबंध निर्माण झाले. त्याचीं शेवटचीं वर्षें तिथे सुखासमाधानांत गेलीं. सौदाची काव्यसंपत्ति विपुल आहे. ती विविध प्रकारची आहे. उर्दू काव्याचा एकहि प्रांत असा नाही, की ज्यांत सौदाने संचार केला नाही. मीरसारखें संवेदनाशील, व्यथित हृदय त्याच्याजवळ नव्हतें; पण त्याची कल्पनाशक्ति तरल व रसिकवृत्ति परिपुष्ट होती. प्रणयाचीं चित्रें डोळ्यांसमोर उभीं करण्यांत तो कुशल चित्रकार होता –

तेरे आगे उस खुर्शीद का मुह खुश नहीं आता चमनसे ।
वर्ना क्यों जाती रही वक्ते सहर शबनम् ।

अर्थ – (प्रेयसीला उद्देशून) तुझा तेजस्वी चेहरा पाहून दवबिंदूच्या मनांत सूर्यसुद्धा भरेनासा झाला. म्हणून का तो सूर्योदय होतांना निघून जातो अन् सूर्यास्तानंतर परत येतो ?

हल्के में उसकी जुल्फ़ के आरिज पे कर नज़र ।
कुछ शब में रह गया है गिरह खाके नूरे सुबह ।।

अर्थ – तिच्या विखुरलेल्या केशकलापांतून दिसणारे गोरे गोरे गाल पाहिले की असें वाटतें, जणू सूर्यास्त झाल्यावर प्रकाशाचा एक तुकडा रजनीच्या हातांत अडकून राहिला असावा.

मीर आणि सौदा हे दोघेहि पट्टीचे कवि. पण मीरचें काव्य व्यथित आणि हळुवार, तर सौदाचें प्रसन्न आणि सुखकर. दोघांची तुलना करतांना एक टीकाकार म्हणतो, की ' मीर का कलम " आह " है और सौदाका कलम " वाह " है। '

या दोघांच्या जोडीला ' दर्द ' ला आणून बसविलें, की उर्दूची तत्कालीन कवित्रिमूर्ति बनते. याचें पूर्ण नांव ख्वाजा मीर दर्द असें होतें. हा एक सूफी संत होता. त्याच्या कवितेचा एक मासला असा आहे –

तोहमतें चंद अपने जीम्मे धर चले
आये क्या करने को और क्या कर चले ।
जिन्दगी है या कोई तूफान है
हम तो इस जीने के हाथों मर चले ।

अर्थ – अनेक आपत्ति कोसळल्या, त्यांची जबाबदारी शिरावर घेऊन चालून गेलों. आलों कशाकरितां आणि काय करून गेलों ? हें जीवन आहे कीं एखादें वादळ आहे ? आम्हाला तर या जीवनाच्या हातानेच मरण आलें.

दिल्ली व लखनौ येथील उर्दू कवितेची चर्चा करीत असतां नजीर अकबराबादी या कवीचें विस्मरण होतां कामा नये. हा जनतेचा आवडता कवि होता. त्याची शैलीहि स्वतंत्र होती. त्याने आपली पुष्कळशी कविता लहान मुलांच्यावर लिहिली आहे. याचें कविहृदय विशाल होतें. याने जशी पैगंबराची ' नात ' (प्रशंसापर कविता) लिहिली, तसेंच कृष्ण कन्हय्याचें बाळपणहि लिहिलें. त्याने गुरु नानकाचें स्तोत्र लिहिलें, तसेंच शिव–पार्वतीच्या विवाहाचें काव्यहि लिहिलें. प्रतिष्ठित कविसमाजांत जरी त्याला स्थान नव्हतें, तरी अशिक्षित जनता आणि मुलें यांचा तो आवडता होता.

लखनौमध्ये गज़लचा विकास झाला, त्याचें श्रेय मुसहफ़ी याला आहे. त्याच्या जोडीचा कवि इन्शा हा होय. याने हास्यरसप्रधान कविता लिहिली. उर्दू भाषेचें पहिलें व्याकरण लिहिण्याचा मान यालाच आहे. इन्शाचा सोबती एक आंधळा कवि होता. त्याचें नांव शेख-कलंदर बख्श जुर्अत असें आहे. जुर्अतचें जुरात झालें आहे. हाहि लखनौवासीच होता. तिथल्या

नबाब व अमीर यांच्या जनानखान्यांत राहतां यावें व विलासी लावण्यवतींचें सौंदर्य डोळे भरून पाहायला मिळावें म्हणून आपण अंध असल्याची त्याने बतावणी केली. पण त्याचें दुर्दैव असें, की तो पुढे खरोखरीचा आंधळा झाला. शेवटचीं २५–३० वर्षे अंधावस्थेंत काढून १८१० सालीं तो मरण पावला. याच्या गज़लांत उत्तान शृंगार बराच आढळतो. त्याने प्रेम, विरह, मीलन इ. भावनांचीं उत्कृष्ट वर्णनें केलीं आहेत. तो एका ठिकाणीं म्हणतो –

याद आती है तो क्या फिरता हूं घबराया हुवा ।
चंपई रंग और बदन उसका वो गदराया हुआ ।।
बात ही अव्वल तो वो करता नहीं मुझसे कभी ।
और जो बोले है कुछ मुंहसे तो शरमाया हुआ ।।
नोके मिजगांपर दिले पज्मुर्दा है यूं सरनिगूं ।
शाखसे झुक आये हैं ज्यूं फल मुरझाया हुवा ।।

अर्थ – तिचा तो चांफ्यासारखा वर्ण आणि प्रफुल्ल गात्रें आठवतात, तेव्हा मनाची अवस्था विचित्र होते. आधीच ती माझ्याशीं बोलत नाही आणि बोलली तरी किती तें लाजणें तिचें ! तिच्या पापण्यांच्या टोकावर माझें हृदय कसें अडकलें आहे म्हणाल; तर फांदीला कोमेजलेलें फूल चिकटलेलें असावें तसें !

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत दिल्लीमध्ये ग़ालिब, ज़ौक़ व मोमिन आणि लखनौमध्ये आतिश व नासर हे कवि उदयाला आले व लोकप्रसिद्ध झाले. ज़ौक़ हा गज़लापेक्षा कसीदे चांगला लिहीत होता. ग़ालिब हा त्या शतकाचें भूषणच म्हटला पाहिजे. त्याचा जन्म इ. स. १७९७ व मृत्यु १८६९ मध्ये झाला.

ग़ालिबचें नांव मिर्ज़ा असदुल्ला खाँ असें होतें. प्रथम तो आपलें कविनाम असद असें लावी. पण पुढे त्याने तें टाकलें व ग़ालिब असें घेतलें. आजहि त्याच नांवाने तो काव्याकाशांत चमकत आहे. उर्दू काव्यांत ग़ालिबची शैली अद्वितीय आहे. त्याला आपल्या प्रतिभेच्या उंच उड्डाणाची जाणीव होती आणि त्याविषयी गर्वहि होता. तो म्हणतो –

आगही दामे शुनीदन, जिस कदर चाहे बिछाये,
मुद्दआ उनका है अपने आलमे तहरीर का ।

अर्थ – श्रवणशक्तीचें जाळें पसरलें तरीहि बुद्धीला माझा कवितारूप अदृश्य पक्षी पकडतां येणार नाही.

ग़ालिब हा प्रथम स्वतंत्रता व स्वाभिमान यांचा पूजक होता; पण भारतांत इंग्रजी राज्य स्थापित झाल्यावर त्याचा तो गुण शिल्लक उरला नाही. जुगार खेळल्याच्या अपराधावरून तो एकदा पकडला गेला व तुरुंगांत त्याचा बराच छळ करण्यांत आला. १८५७ च्या क्रांतियुद्धानंतर तर त्याला निराशेने पूर्ण घेरलें.

ग़ालिब काव्य लिहीत होता, तसेंच गद्यहि लिहीत होता.



उर्दू कवि ग़ालिब

उर्दू-ये-मोअल्ला, उर्दे-हिंदी व खुतू-ते-ग़ालिब असें त्याच्या पत्रांचे तीन संग्रह प्रकाशित झाले आहेत. ग़ालिब हा असा एक साहित्यिक आहे, की ज्याच्या काव्यावर अनेक टीकाग्रंथ लिहिले गेले.

ग़ालिबच्या बरोबरीने दिल्लींतील काव्यक्षेत्र वैभवसंपन्न करणारा ज़ौक़ हा आणखी एक कवि होय. याचा जन्म सन १७९० मध्ये झाला. याचें संपूर्ण नांव शेख इब्राहिम 'ज़ौक़' असें होतें. ज़ौक़ची ख्याति गज़लपेक्षा कसीद्यांत विशेष आहे. याला दिल्लीच्या अकबरशहाचा आश्रय होता. अकबरशहालाहि कविता करण्याचा नाद होता; पण त्या कवितांतल्या उणिवा दूर करणें व त्याच्या अर्धवट कविता पुऱ्या करून देणें अशीं कामें ज़ौक़ला करावीं लागत. उर्दूवर ज़ौक़चें विलक्षण प्रभुत्व होतें. 'ग़ालिबच्या कल्पना आणि ज़ौक़ची भाषा' अशी म्हणच पडली आहे. ज़ौक़च्या कितीतरी काव्यपंक्ती आजहि लोकोक्तींप्रमाणे वापरल्या जातात. जीवन क्षणभंगुर आहे, हें सांगतांना तो म्हणतो—

अय् शम्मा तेरी उम्रे तबई है एक रात ।
रोकर गुज़ार या उसे हंसकर गुज़ार दे ।।

अर्थ – हे ज्योति, तुझें जीवनच मुळीं एका रात्रीचें आहे. मग तें हसत-खेळत, नाही तर दुःख करीत घालव.

गाफिल है बहारे चमन उम्रे जवानी ।

कर सैर, के मोसम ये दुबारा नहीं आता ।।

अर्थ – अरे ! हें तारुण्य म्हणजे दोन दिवसांचा बहर. याचा उपभोग घे. हा ऋतु पुन्हा येणार नाही.

कीर्ति आणि मानमरातब संपादून ज़ौक़ १८५४ सालीं मृत्यु पावला. त्याची कितीतरी कविता १८५७ च्या संग्रामांत नष्ट झाली. महंमद हुसेन आज़ाद हा त्याचा शिष्य होय. त्यानें ज़ौक़चें मिळालें तेवढें काव्य प्रकाशित केलें आहे. तेवढ्यावरूनच त्याच्या दर्ज़ेदार प्रतिभेचा प्रत्यय येतो.



उर्दू कवि ज़ौक़

मोमिन हाहि त्याच काळांतला कवि आहे. ग़ालिब, ज़ौक़ आणि मोमिन या तिघांनी १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत उर्दूचें साहित्याकाश उजळून टाकलें. त्याच शतकाच्या उत्तरार्धांत लखनौ येथे अमीर व जलाल आणि दिल्ली येथे दाग़ व राशिख हे चार कवि प्रसिद्धीस आले. हे सर्व गज़लकार असून त्या सर्वांत दाग़चें स्थान उच्च होतें. दाग़चें संपूर्ण नांव नबाब इब्राहिम उर्फ 'मिर्ज़ाखान दाग़' असें होतें. १८३१ सालीं याचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्याला काव्याचा नाद लागला. तो लाल किल्ल्यांतल्या विलासी वातावरणांत वाढला; त्यामुळे त्याच्या काव्यांत रंगेलपणाला बहर आलेला आहे. तो एका ठिकाणीं एका नर्तकीबद्दल म्हणतो—

जुटी जुटी भौवों की वो तहरीर ।
क्यों न दिल इस लकीर पर हो फ़कीर ।।
गर्दन उसकी है वो सुराहीदार ।
हो सुराही भी देखकर सरशार ।।
ऐसे पत्थर वो दोनों कुब्बएनूर ।
शीशाये दिल हो जिनसे चिकनाचूर ।।

अर्थ – एकत्र आलेल्या भुवयांची ही रेषा ! हिच्यावर मन वेडे कां होणार नाही ? मान सुरईसारखी. सुरईनेहि जी पाहून आनंद मानावा अशी. वक्षस्थळें म्हणजे तेजाचीं दोन अंडींच. तीं दगडासारखीं कठिण. मग हृदयरूपी काचेचा चक्काचूर का होणार नाही ?

दाग़चा शिष्यपरिवार अफाट होता व तो साऱ्या भारतभर पसरला होता. दाग़ हा मुख्यत्वें गज़ल कवि होता. त्याच्या गज़लांची संख्या हजाराच्या जवळपास भरते.

उर्दू गद्याचा विकास मुख्यत्वें कलकत्ता येथे झाला. तिथल्या फोर्ट विल्यम कॉलेजमध्ये एक उर्दू अकादमी निर्माण झाली होती. तिच्यातर्फे उर्दू भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध होऊं लागलीं. ग़ालिबच्या पत्रांचे तीन संग्रह प्रसिद्ध झाले. त्यानंतर मुहंमद हुसेन आज़ादचें 'मक़तुबाते आज़ाद', इकबालचें 'इकबालनामा' व मौ. अबुल कलाम आज़ादचें 'ग़ुबारे ख़ातिर' हीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं. हाली व मुहंमद आज़ाद यांनी उर्दू गद्याच्या नव्या शैलीचा पाया घातला. मुहंमद आज़ाद यांनी अनेक ग्रंथ लिहिले. त्यांत आबे हयात हा उर्दू काव्याचा इतिहास सुप्रसिद्ध आहे. त्यानंतर मौलाना शिबलीचें नांव येतें. त्यांनी मअरिफ़ नांवाचें उर्दू वृत्तपत्र आज़मगढहून चालविलें. दिल्लींतले पहिले कादंबरीकार मौलवी नज़ीर अहमद हे होत. त्यांच्या बऱ्याच कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. मुन्शी अमीर अहमद यांनी अमीरुल-लुग़ात या नांवाने उर्दूचा एक शब्दकोश लिहायला घेतला होता; पण तो पूर्ण होण्याच्या आंतच त्याचा मृत्यु झाला. दुसरा शब्दकोश अज़ीज़ुल-लुग़ात हा लखनौ येथून प्रकाशित झाला.

विसाव्या शतकाच्या प्रारंभीं मुन्शी गंगाप्रसाद वर्मा यांनी हिंदुस्तानी अख़बार या नांवाचें वृत्तपत्र सुरू केलें. उर्दूंत नव्या धर्तीच्या कथालेखनाचा प्रारंभ मुन्शी बालमुकुंद गुप्त यांनी केला. विसाव्या शतकाच्या प्रारंभीं मुन्शी प्रेमचंद हे उर्दूंतून कथा लिहूं लागले. याच काळांतले दुसरे कथालेखक कृष्णचंद्र हे होत. यांच्यापासूनच प्रगतिशील कथालेखनाला प्रारंभ झाला. त्यानंतर राजेंद्रसिंह बेदी, सआदत हसन मिंटो, फ्रिक तौंसवी, देवेन्द्र सत्यार्थी, उपेंद्रनाथ 'अश्क', रेवती सरन इ. कथालेखक उर्दू साहित्यात चमकले. मुमताज शीरीं, इस्मत चुग़ताई, सालिहा आबिद हुसेन या स्त्रिया कथालेखिका म्हणून पुढे आल्या. विनोदी कथालेखनांत मिर्ज़ा फ़रहत अल्लाबेग यांनी कीर्ति मिळविली.

कादंबरी लेखकांत पहिला कोण या बाबतींत विवाद आहे. कोणी म्हणतात, पं. रतननाथ 'सरशार' हे पहिले, तर कोणी म्हणतात की मौलवी नज़ीर अहमद हे पहिले होत. मुन्शी प्रेमचंद यांच्या चौगाने हस्ती, मैदाने अमल, या कादंबऱ्या सुप्रसिद्ध आहेत. कृष्णचंद्रांची शिकस्त व शौकत थानवी यांची

बकवास या कादंबऱ्याहि बऱ्याच प्रसिद्ध आहेत. उर्दूच्या साहित्यसमालोचकांत अदीब, सैय्यद एहतेशाम हुसेन व सुरूर हे श्रेष्ठ समजले जातात.

विसाव्या शतकांतल्या उर्दू कवींत इक़्बाल हे राष्ट्रीय कवि मानले जातात. हिमालय ही त्यांची पहिली कविता इ. स. १९०१ सालीं प्रसिद्ध झाली. विसाव्या शतकाचीं पहिलीं दहा वर्षे राष्ट्रीय चळवळीच्या दृष्टीने फार धामधुमीचीं होतीं. त्या काळांत राष्ट्रीय भावनेचा परिपोष व्हावा, म्हणून इक़्बालनी अनेक स्फूर्तिदायक गीतें लिहिलीं. इ. स. १९०५ मध्ये ते तत्त्वज्ञानाच्या उच्च अभ्यासासाठी इंग्लंडमध्ये गेले. तिथे इस्लाम आणि मुसलमानी राष्ट्रें यांच्या इतिहासाचा अभ्यास केल्यावर त्यांचें पूर्वीचें मन बदललें. त्यांनी भारतीय राष्ट्रभावनेचा त्याग केला आणि इस्लामच्या पुनरुज्जीवनाकडे आपलें लक्ष वळविलें. त्यांच्या काव्यांतून खुदीचें तत्त्वज्ञान प्रस्फुरित होऊं लागलें. व्यापक इस्लामी जगाला आपला संदेश पोचावा, म्हणून त्यांनी उर्दू सोडून फारसीचा आश्रय केला. त्यांचे बांगे-दरा (सूचनेची घंटा), बाले जबरेल (देवदूत गॅब्रिएलचे पंख), ज़र्बे कलीम (उपदेशकाचा तडाखा) हे उर्दू कविता संग्रह व असरारे खुदी (अस्मितेचें रहस्य), रमूज़े बेखुदी (अनस्मितेचे संकेत), पयामे मशरिक़ (पूर्वेचा संदेश) हे फारसी कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत.

मानवी अस्मितेचें भव्य चित्र इक़्बालनी काढलें आहे. आपल्या काव्याच्या द्वारें त्यांनी मानवी मनाला अमर्याद महत्त्वाकांक्षेने प्रेरित होण्याचा व पुढे चलण्याचा संदेश दिला आहे—

सितारोंके आगे जहाँ और भी है ।
अभी इश्क के इम्तिहां और भी है ।।
तही जिन्दगीसे नहीं ये फिजायें ।
यहाँ सैकडों कारवां और भी है ।।
किनाअत न कर आलमें रंगोबूपर ।
चमन और भी आशियां और भी हैं ।।
इसी रोज़ो शब सें उलझकर न रहजा ।
के तेरे ज़मां वो मकां और भी है ।।

अर्थ — नक्षत्रमंडळाच्या पलिकडेहि विश्वें आहेत. तुझ्या प्रेमाच्या कसोटीचे क्षण अद्याप पुढे आहेत. वातावरण जीवनरहित नाही. त्यांत अनेक कारवान आहेत. या जगांतील रस गंधांवरच संतोष मानूं नकोस. अजून पुष्कळ बागा आणि घरटीं तुझी वाट पाहत आहेत. येथील दिवस-रात्रीच्या चक्रांत गुरफटून राहूं नकोस; कारण तुझ्याकरिता अजून दुसरे दिक्काल आहेत.

याच काळांतला आणखी एक उर्दू कवि पं. ब्रजनारायण चकबस्त हा होय. हा राष्ट्रीय वृत्तीचा कवि होता. याने म. गांधी, डॉ. ॲनी बेझंट, गोखले या राष्ट्रीय पुढाऱ्यांवर उर्दू शेर लिहिले आहेत. अज़ीज़ या कवीचें भाग्य हें, की त्याचे शिष्य चांगल्या दर्जाचे कवि निघाले. त्यांमध्ये जोश मलिहाबादी याचें नांव प्रामुख्याने घेतलें जातें. तो उर्दूचा श्रेष्ठ कवि मानला जातो. त्याला क्रांतिकवि असेंहि म्हणतात. पुढे तो प्रेमाचाहि कवि बनला. मलिहाबादचे सरदार, जागिरदार इ. लोक जे रंगढंग करीत होते, तेच त्यानेहि केले. तारुण्य आहे तोंवर इश्काची मजा लुटून घ्यावी अशा वृत्तीचा तो बनला. तो म्हणतो —

नौजवानीमें मसाहबसे डरता है मुझे ।
नासिहा ! नादाँ यह है वोह मौसमे बर्को शरर ।।
आलमे कैफो जुनूँमें मारती है क़हक़हे ।
जिन्दगी जब मौतकी आँखोंमें आँखें डालकर ।।

अर्थ–अरे वेडया उपदेशका, तारुण्यामध्ये तूं मला संकटाची भीति दाखवितोस ? आग आणि विजली यांचा हा काळ असतो. या वेळीं जीवन हें मृत्यूच्या डोळचाशीं डोळा भिडवून उन्मत्तपणे खदखदा हसत असतें.

विसाव्या शतकांत उर्दू कवितेंत कांही नवीन प्रवाह सुरू झाले. अकबर इलाहाबादी याने हास्यरसाच्याद्वारें प्राचीन रूढींचें रक्षण करण्याचा संदेश दिला. इक़्बाल प्रथम राष्ट्रीय कवि होते ते पुढे 'शायरे इस्लाम' बनले. मौ. मुहंमद अलीने नवयुवकांत जागृति निर्माण केली. मौ. हसरत मोहानीने खऱ्या प्रेमाचें वर्णन केलें. बदायूँनी व अज़ीज़ लखनवी यांनी निराशेचीं गंभीर काव्यें गायिलीं. हालीने एक नवी शैली निर्माण केली.

सर सय्यद अहमदखाँ यांनी अलिगड येथें उर्दूचे मोर्चे लावले. चालू शतकाच्या प्रारंभींच अंजुमान-तरक्की-ए-उर्दू या संस्थेचा जन्म झाला. औरंगाबाद येथें तिचें केंद्र स्थापित झालें. मौ. अब्दुल हक्क हे त्या संस्थेचे मंत्री होते. त्यांनी उर्दू चळवळीला मुस्लीम लीगच्या चळवळीचें एक अंग बनवून टाकलें. त्या संस्थेला निजामाकडून पुष्कळच साहाय्य मिळालें. पुढे कांही कालाने या संस्थेचें कार्यालय दिल्लींत आणण्यांत आलें. उर्दूच्या उन्नतीसाठी स्थापित झालेली ती संस्था पुढे राजकारणांतहि भाग घेऊं लागली.

भारताची फाळणी झाल्यावर त्या संस्थेचीही फाळणी झाली. मौ. अब्दुल हक्क पाकिस्तानांत निघून गेले. आजमितीस अंजुमान-तरक्की-ए-उर्दू या नांवापुढे हिंद हा शब्द लागलेला असून त्या संस्थेचें कार्यालय अलिगड येथे आहे. या संस्थेतर्फे 'हमारी ज़बान' व 'उर्दू अदब' अशीं दोन नियतकालिकें

अलिगड व लखनौ येथून प्रसिद्ध होतात. जामिया मिलिया इस्लामिया ही उर्दूची तरफदारी करणारी आणखी एक संस्था होय. मौ. मुहंमदअल्ली यांनी या संस्थेला जन्म दिला. या संस्थेने बरेच उर्दू ग्रंथ प्रकाशित केले आहेत. ही संस्था राष्ट्रीय वृत्तीची आहे. तिच्या तर्फे तालिमो-तरक्की नांवाचें एक उर्दू नियतकालिक निघत होतें. या संस्थेतर्फे मुशायरेहि बरेच होत. या संस्थेंतून जे विद्यार्थी बाहेर पडले, त्यांत भारताचे उप-राष्ट्रपति जाकिर हुसेन यांचें नांव अग्रगण्य आहे. दुसरे मौ. शफ़ी–कुर्रहमान किदवइ हे होत.

भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानने राष्ट्रभाषा म्हणून उर्दूचा स्वीकार केला व भारतीय राज्यघटनेने हिंदी ही राष्ट्र-भाषा मानली. आता प्रश्न असा आहे, की भारतांत उर्दूचें काय होणार ? कांही लोकांचें म्हणणें आहे, की यापुढे भार-तांत उर्दू भाषा पृथक् लिपीच्या रूपांत जिवंत राहूं शकणार नाही. आचार्य नरेंद्र देव यांनीहि हाच विचार व्यक्त केला आहे. त्यांचें म्हणणें असें, की उर्दू नागरी लिपींत लिहिली जावी व तिची शब्दावली तिच्या स्वतंत्र रूपांत कायम राहावी. [उर्दू काव्याचा परिचय; उर्दू और उसका साहित्य]

उर्दू रंगभूमि

उर्दू रंगभूमीचा इतिहास अवघा शंभर वर्षांचा आहे. इ. स. १८४२-४३ मध्ये उर्दू-तलें पहिलें नाटक रंगभूमीवर आलें आणि इ. स. १९३४-३५ च्या सुमारास ही रंगभूमी अस्त पावली. असें कां घडलें, या-विषयीं उर्दू साहित्यिकांत नेहमी चर्चा चालते. या शंभर वर्षांच्या काळांत उर्दू रंगभूमीला अनेक स्थित्यंतरांतून जावें लागलें आहे. उर्दू रंगभूमीला परंपरा नव्हती. उर्दूतील बहुतेक साहित्यप्रकार पर्शियन साहित्यांतून आलेले आहेत आणि त्या साहित्यांत नाटक नाही. इराणांत किंवा अरब मुलखांत नाटक हें अधार्मिक समजून त्यावर बंदी घातलेली होती. १९ व्या शतकाच्या सुरवातीपर्यंत भारतांत अमीर-उमरावांच्या करम-णुकीच्या कार्यक्रमांत गायन, नर्तन, नकला, सोंगें, इ. चा अंत-र्भाव होत असे. सामान्य समाजांत ललितासारखे नौटंकी नांवाचे खेळ होत. राधा–कृष्णांच्या चरित्रावर आधारलेले रासक्रीडेचे आणि रामचरित्रांतल्या प्रसंगांचेहि खेळ होत.

लखनौचा शेवटचा नबाब वाजद अली शहा हा उर्दू रंग-भूमीचा प्रवर्तक मानला जातो. त्याला नाच-गाण्याचा विल-क्षण छंद होता. त्यांतूनच त्याला नाटकाची स्फूर्ति झाली. उत्तर प्रदेशांतले रासक्रीडेचे खेळ पाहून त्याने राधाकृष्णांच्या प्रीती-वर आधारलेलें ‘ राधा कन्हैया का किस्सा ’ हें नाटक रचलें. उर्दूतलें हें पहिलें नाटक होय. तें त्याने आपल्याच राजवाड्यांत रंगभूमीवर आणलें. उर्दूत प्रारंभीं नाटकांना ‘ रहस ’ असें म्हणत. या शब्दाचें मूळ रास या शब्दांत आहे. त्यावरून उर्दू नाटकाची उत्क्रांति रासांतून झाल्याचें कळून येईल. या नाट-कांत सगळीं कामें स्त्रियाच करीत. याच्या प्रयोगासाठीं वाजद अली शहाने अमाप पैसा खर्च केला. त्यांतल्या श्रीकृष्णाचा मुकुटच एका लाखाचा होता, असें म्हणतात. हें पहिलें नाटक इ.स. १८४२ किंवा ४३ या दोन वर्षांच्या दरम्यान रंगभूमीवर आलें असावें, असें उर्दू साहित्यिकाचे संशोधक ठरवितात. याच वाजद अली शहाचें दुसरें नाटक ‘ दर्या ए ताश्शुक ’ हें इ. स. १८५१ मध्ये रंगभूमीवर आलें.

या नाटकाचे १४ प्रवेश होते. एका रात्रीं एक प्रवेश, अशा प्रकारें हें नाटक १४ रात्रीं चाललें होतें. याहि नाटकावर वाजद अली शहाने लाखो रुपये खर्च केले. ‘ अफसाना ये इश्क ’ व ‘ बंहरे उल्फत ’ अशीं आणखीहि दोन नाटकें त्याने रंगभूमी-वर आणलीं. १८५६ मध्ये इंग्रजांनी वजद अली शहाला राज्य-भ्रष्ट केलें. आणि त्याबरोबरच त्याच्या नाटकांचाहि खेळ खलास झाला.

लखनौला याच काळांत सामान्य जनतेलाहि नाटकाची रुचि उत्पन्न झाली होती. कवि अमानत याने इंदरसभा या नांवाचें एक नाटक १८५२ मध्ये रचलें. यालाहि प्रेरणा वाजद अली शहाकडूनच मिळाली होती. १८५४ मध्ये तें रंगभूमीवर आलें. त्यांत इंद्राची भूमिका खुद्द वाजद अली शहाने केली व अप्स-रांचीं कामें राजवाड्यांतील परीखान्यांतल्या स्त्रियांनी केलीं. या इंदरसभा नाटकाचें कथानक पुढीलप्रमाणे होतें––

सिंहलद्वीपाचा राजा इंद्र याला पऱ्यांचें नृत्य पाहण्याची इच्छा होते. त्याप्रमाणे अनेक पऱ्या नृत्य-गायनाने त्याला खूष करतात. शेवटीं येते सब्जपरी. तिचें गाणें ऐकल्यावर इंद्र झोपी जातो. मग सब्जपरी आपल्या रक्षकाला सांगते. ‘ इकडे येतांना वाटेंत मी एक सुंदर राजपुत्र पाहिला. तेव्हापासून त्याच्यावर माझें मन जडलें आहे. तूं त्याला घेऊन ये. रक्षक त्या कामगिरीवर जातो. त्या राजपुत्राचें नांव गुलफाम असें असतें. सब्जपरीचा रक्षक त्याला घेऊन तिच्याकडे येतो. सब्ज-परी त्याच्यापुढे आपलें प्रेम व्यक्त करते. गुलफाम म्हणतो, की ‘ तुझें माझ्यावर प्रेम असेल, तर मला इंदरसभा दाखव. ’ ती गोष्ट कठीण असते; पण गुलफामच्या प्रेमासाठीं तिला तें साहस करावें लागतें. ती गुलफामला घेऊन जाते व एका बागेंत लपवून ठेवते. दुसऱ्या एका रक्षकाकडून ती गोष्ट इंद्राला कळते. इंद्र प्रक्षुब्ध होतो व गुलफामला पकडून एका विहिरींत कोंडून ठेवतो. त्या दुःखाने सब्जपरी जोगीण बनते व गाणीं गात रानावनांत हिंडूं लागते. पुढे एकदा अशीच भटकत

भटकत इंद्राकडे येते. इंद्र तिला ओळखीत नाही; पण तिचें गाणें ऐकून प्रसन्न होतो. तो तिला वर देण्यास प्रवृत्त होतो. सब्जपरी गुलफामशीं आपलें मीलन व्हावें, असा वर मागते. इंद्र तिची इच्छा पूर्ण करतो व नाटक सुखान्त होतें.

इंदरसभा नाटकाच्या एकंदरींत ४८ आवृत्त्या निघाल्या. त्या देवनागरी, गुजराती व गुरुमुखी अशा निरनिराळ्या लिपींतून आहेत. उत्तर प्रदेश, ढाका व मुंबई या ठिकाणीं त्या नाटकाचे शेंकडो प्रयोग झाले. लखनौनंतर उर्दू रंगभूमि एका बाजूने ढाक्याकडे सरकली, तर दुसऱ्या बाजूने ती मुंबईंत दाखल झाली. मुंबईंत तिला पारशी लोकांनी पुढे आणलें. १८५३ सालीं श्री. भाऊ दाजी लाड यांनी गोपीचंद-नामक एक नाटक लिहिलें व तें हिंदु ड्रॅमॅटिक कोर या संस्थेने त्याच सालीं रंगभूमीवर आणलें. मुंबईंत रंगभूमीवर येणारें हें पहिलें उर्दू नाटक होय, असें म्हणतात. इ. स. १८५३ व ५४ मध्ये 'पैदाइशे सय्यादकश', 'हाजीमियां फज़ल और कलाल-खाना', 'पठाण सर्फराज और गुल' व 'अल्लाउद्दिन और बानूजु-लेखा', हीं उर्दू नाटकें पार्शी ड्रॅमॅटिक कोरने मुंबईंत रंगभूमीवर आणलीं. ग्रँटरोडवरील नाट्यगृहांत महाराष्ट्रीय आणि पारशी या मंडळींनी त्या त्या उर्दू नाटकांचे अनेक प्रयोग केले. इ. स. १८६२ मध्ये मुंबईंत पारश्यांचा 'व्हिक्टोरिया क्लब' स्थापन झाला. त्याचीच पुढे व्हिक्टोरिया नाटक मंडळी बनली व ती १८७३ पर्यंत चालली. सुरवातीच्या या नाट्यप्रयोगांचें वर्णन आर्देशीर दादाभाई ठूठी यांनी खालील शब्दांत केलें आहे—

"बेंच आणि फळ्यांच्या द्वारें रंगभूमि तयार करीत. स्टेजच्या डावी-उजवीकडे नटांना बसण्याकरितां खुर्च्या असत. त्यांवर बसून ते मेकअप करीत आणि तयारी करीत. समोर खुर्च्या, सोफे इत्यादि मांडलेले असत. कित्येक प्रेक्षक खुर्च्या घेऊन येत. रंगभूमीच्या मागच्या बाजूस एक पांढरा पडदा असे. नटांपैकी कुणाचें काम आवडलें, तर प्रेक्षक त्याला बोलावून बक्षिसी देत. ती घेऊन तो रंगभूमीवर पुन्हा आपलें नाटकांतील काम चालू करी."

सुरवातीचीं उर्दू नाटकें गुजरातींतून अनुवादित केलेलीं असत. इ. स. १८७१ मध्ये मर्जबान या गृहस्थाने खुर्शीद हें नाटक गुजरातींतून अनुवादित केलें. दादाभाई पटेल याने उर्दू कवि मीर हसन याच्या सहरुल बयान या दीर्घ काव्यावरून 'बेनजीर बद्रमुनीर' या नांवाचें नाटक तयार करून तें रंगभूमीवर आणलें.

१८७० सालीं मुंबई येथे पेस्तनजी फ्रामजी या पारशी गृहस्थाने एक उर्दू नाटककंपनी सुरू केली. त्या कंपनींत खुर्शि-दजी बाटलीवाला हा एक प्रख्यात विनोदी नट होता. त्याने नंतर 'पार्शी व्हिक्टोरिया कंपनी' नांवाची स्वतःची नाटक-कंपनी सुरू केली. या कंपनीने भारतांत अनेक लहानमोठ्या शहरीं दौरे काढून आपलीं नाटकें केलीं.

या ठिकाणीं एका गोष्टीचा निर्देश केला पाहिजे तो हा, की पारशी नाटक कंपन्यांनी उर्दू रंगभूमीची उल्लेखनीय सेवा केली असली, तरी त्यांत सेवेच्या भावनेपेक्षा धंदेवाईकपणाच अधिक होता. पारशी कंपन्यांचे मालक सुरवातीला नाटकांचे संवाद स्वतःच लिहीत किंवा एखाद्या अज्ञात मुन्शीकडून लिह-वून घेत. त्यामुळे नाटककार म्हणून कंपनीच्या मालकाचीच प्रसिद्धि होई. हा प्रकार १८८० पर्यंत टिकला. त्यानंतर या पारशी कंपन्यांचे मालक लेखकांकडून नाटकें लिहवून घेऊं लागले. रौनक बनारसी व मियाँ ज़रिफ या दोघां नाटक-कारांनी पेस्तनजीच्या कंपनीसाठी व विनायक प्रसाद तलीब याने बाटलीवाला कंपनीसाठी नाटकें लिहिलीं. अहसन लख-नवी, नारायणप्रसाद बेताब व आगा हश्र काश्मीरी हे आणखी तीन नाटककार त्या काळांत पुढे आले. बेताब याने आपल्या नाटकासाठी भारतीय इतिहास व पुराणें यांच्यामधले विषय हाताळले. त्याने एकंदर वीस नाटकें लिहिलीं. आगा हश्र हा बेताबहूनहि सवाई ठरला. त्याने एकूण २८ नाटकें लिहिलीं आणि पारशी कंपन्यांनी तीं रंगभूमीवर आणलीं. त्याने पुढे स्वतःची नाटकमंडळीहि सुरू केली. आगा हश्र हा अद्भुत-रम्यतावादी नाटककार होता. बेताबचीं महाभारत व रामायण, ज़रिफचीं बुलबुल इ बिमार व शिरीं फरहाद, तालीबचीं गोपीचंद आणि हरिश्चंद, आगा हश्रचीं शहीदे नाज, सैदे हवस, मुरीद ईजक आणि अशीर इ हिर्स हीं नाटकें इ. स. १९०० ते १९३० पर्यंतच्या काळांत चांगलींच गाजलीं.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या २५ वर्षांत आणि चालू शतकाच्या सुरवातीस लोक नाटकाकडे निव्वळ करमणूक म्हणून पाहत. वेषभूषा, भडक देखावे, जादूचे देखावे, तार-स्वरांतलीं भाषणें, याच गोष्टी लोकांना फार आवडत. अनुप्रास-युक्त वाक्यें आणि काव्यमय संवाद यांचीहि प्रेक्षकांना मोहिनी पडे. आणि जनतेची या प्रकारची अभिरुचि पाहूनच नट, नाट-ककार आणि कंपन्यांचे मालक आपला नाट्यसंसार उभा करीत. पण त्यानंतर ही परिस्थिति हळूहळू बदलूं लागली. लोकांच्या अभिरुचींत फरक पडला. नाटककारहि नाट्यकलेच्या सुधारणेकडे झुकले. ही दृष्टि मुख्यत्वें तलीबची होती.

त्यापुढचे नाटककार विशिष्ट उद्देश मनांत धरून नाटकें लिहूं लागले. त्यांनी कथानकाच्या बांधेसूदपणाकडे आणि त्याच्या परिणामाकडे विशेष लक्ष द्यायला सुरुवात केली. अब्दुल मजीद दर्याबादी याने बालविवाहाचे दुष्परिणाम दाख-

विण्यासाठी झूद पाशेमन हें नाटक लिहिलें. अब्दुल हलीम शरार याने मेवा इ तलख हें नाटक लिहून पडदापद्धतीवर ताशेरे झाडले. उमराव अली याने १८९३ सालीं इल्बर्ट बील या नांवाचें पहिलें राजकीय नाटक लिहिलें. कृष्णचंद झेबा याने जख्मी पंजाब हें नाटक लिहून पंजाबी जनतेचीं मनें थरारून सोडलीं. पंजाबसरकारने त्या नाटकावर बंदी घालून त्यावरचा आपला राग व्यक्त केला. मौलवी जाफ़रअली याने आणखी एक पाऊल पुढे टाकून जंगे रूसो–जपान या नांवाचें आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमीवर आधारलेलें नाटक लिहिलें.

अशा प्रकारें चालू शतकाच्या पहिल्या २५ वर्षांत उर्दू रंगभूमि मर्यादित जगांतून विशाल जगांत प्रविष्ट झाली. तिने प्रगतीची बरीच वाटचाल केली खरी; पण त्याबरोबरच तिच्यांत कांही उणिवाहि तितक्याच प्रमाणांत राहून गेल्या. संघर्ष हा नाटकाचा आत्मा होय. उर्दू नाटकांत त्याचा कुठे पत्ताच लागत नाही. स्वभावलेखनाकडेहि दुर्लक्षच झालें आहे. मानसिक संघर्ष आणि त्याची सखोलता या गुणांचा तर, उर्दू नाटचकलेला स्पर्शहि झालेला नाही. त्यामुळे उर्दू नाटककारांनी निर्माण केलेलीं पात्रें केवळ ठोकळेवजा वाटतात. याला अपवाद फक्त इम्ताझअली ताझ हा नाटककार. त्याच्या अनारकली नाटकांत मोगल राजवाड्यांतील जीवन आणि नायिकेचें स्वभावलेखनहि वास्तववादी उतरलें आहे. त्यामुळे हें नाटक प्रेक्षकाला शेवटपर्यंत चटका लावतें.

उर्दू रंगभूमि इ. स. १९३५ पर्यंत मुख्यतः व्यापारी पेशाच्या मंडळींच्याच ताब्यांत होती. भारतांत बोलपटांचें युग सुरू होतांच या मंडळींनी रंगभूमीकडे पाठ फिरवून चित्रपटव्यवसायांत पदार्पण केलें. उर्दू नाटक कंपन्या एकामागून एक बंद पडूं लागल्या. ही ढासळती इमारत सावरून धरण्याचा शेवटचा प्रयत्न सुप्रसिद्ध नटी कज्जन हिने केला. जहानआरा थिएट्रिकल कंपनी नांवाची नाटचसंस्था स्थापन करून ती नाटकें करूं लागली. ती स्वतः आपल्या नाटकांत स्त्रीभूमिका करी. उर्दू रंगभूमीच्या जन्मापासूनच स्त्रिया त्या रंगभूमीवर कामें करीत होत्या. कज्जनने त्यांचीच परंपरा पुढे चालविली. पण उर्दू रंगभूमीला जिवंत ठेवण्याचे तिचेहि प्रयत्न यशस्वी झाले नाहीत.

अशा प्रकारें उर्दू रंगभूमीचा अज्ञातवास कितीतरी वर्षें चालू असतां, पुढे एका नवीन नाटचप्रकाराने तिला थोडा उजळा दिला. एकांकी नाटकें हा तो प्रकार होय. पाश्चात्य रंगभूमीवर तो नाटचप्रकार यशस्वी होत आहे, असें कळल्यावर भारतांतहि त्याचें अनुकरण सुरू झालें. मग उर्दूतल्या कित्येक प्रथितयश लेखकांनी एकांकिका लिहिण्यास प्रारंभ केला. विद्यार्थ्यांच्या समारंभांतून आणि छोटचा मोठचा नाटचक्लबांतून त्यांचे प्रयोग होऊं लागले. त्यांतल्या कांही उर्दू एकांकिका फारच सुंदर वठल्या आहेत. १९३५ सालीं भारतांत आकाशवाणीचीं केंद्रें सुरू झालीं. त्यामुळे उर्दूलेखकांना एक नवा प्रांत उपलब्ध झाला. या माध्यमाच्या द्वारें उर्दूलेखकांनी श्रुतिका किंवा एकांकिका लिहून प्रसिद्धि मिळविली. उपेन्द्रनाथ अश्क, कृष्णचंद्र, सादतहसन मिंटो, राजेंद्रसिंग बेदी, सज्जद जहीर, इस्मत शाहिद लतीफ, इश्रत रेहयानी हे आजकालचे उर्दू नाटककार होत. उपेन्द्रनाथ अश्क याच्या कांही नाटकांतून सामाजिक दुष्ट रूढींवर कडाडून प्रहार केलेले आहेत. मिंटोचीं कांही नाटकें अश्कच्या नाटकांहूनहि जहाल आहेत. कृष्णचंद्र हा सूचक आणि प्रभावी भाषाशैलीबद्दल प्रसिद्ध आहे. मुजीब याच्या हव्वाखातून या नाटकांत काश्मीरच्या प्रचलित संघर्षाचें चित्रण आहे. इस्मत चुग़ताई व कुदसिया ज़ैदी या दोन उर्दूच्या महिला नाटककार होत. इस्मतचें धानीबाँके हें नाटक जातीय ऐक्यावर आधारलेलें आहे. शकुंतला व खलिदकी खाला हीं कुदसिया ज़ैदीचीं रंगभूमीवर गाजलेलीं नाटकें होत.

इ. स. १९४७ नंतर उर्दू रंगभूमीच्या पुनरुज्जीवनाचे कांही प्रयत्न झाले. श्री. पृथ्वीराज कपूर यांनी या चळवळींत पुढाकार घेतला. पृथ्वी थिएटर्स, इंद्रप्रस्थ थिएटर्स, हिंदुस्थानी थिएटर्स, इंडियन नॅशनल थिएटर्स, थ्री आर्टस् क्लब आणि दिल्ली आर्ट थिएटर्स, या प्रमुख नाटचसंस्था उर्दू रंगभूमीला पुनरुज्जीवित करण्याच्या प्रयत्नांत होत्या व आहेत.

उर्दू रंगभूमि लखनौच्या राजवाड्यांत निर्माण झाली. उत्तर प्रदेशांत ती इंदरसभा या नाटकाच्या द्वारें सामान्य जनांत प्रविष्ट झाली. मुंबईच्या हौशी, पण व्यापारी भांडवलदारांनी तिला नटवून सजवून प्रेक्षकांसमोर आणलें. हेच आधार देणारे हात चित्रपटसृष्टींत गुंतल्यामुळे ती पुढे कोलमडून पडली हें खरें; पण एका जमान्यांत तिने प्रेक्षकांचें भरपूर मनरंजन केलें, यांत मात्र शंका नाही. [उर्दू ड्रामा; मणिकांचन; भारतीय नाटच साहित्य]

उर्वशी एक सुप्रसिद्ध अप्सरा. ऋग्वेदापासून हिची प्रसिद्धि आहे. ऋग्वेदांत तिचा उल्लेख बऱ्याच ठिकाणीं आला आहे (४.२.१८; ५.४१.१९; ७.३३.११; १०.९५.१०). ऋग्वेदांत पुरूरवा व उर्वशी यांच्या संवादाचें एक सूक्त आहे (ऋ. १०.९५). पुरूरवा-उर्वशींची ही कथा जगांतली आद्य प्रेमकथा समजली जाते. त्या संवादसूक्तांत उर्वशी पुरूरव्याची विनवणी झिडकारतांना दिसते. शतपथ ब्राह्मणांतहि ही कथा आलेली आहे. तिचा सारांश असा –

उर्वशीचें पुरूरव्यावर प्रेम जडलें. पण त्याच्याशीं लग्न करतांना तिने त्याला दोन अटी घातल्या–(१) त्याने तिच्या संमतीवाचून तिला भोगूं नये व (२) विवस्त्र अवस्थेंत तिच्या नजरेस पडूं नये. पुढे तिला त्याच्यापासून एक पुत्र झाला. दीर्घ काळ लोटल्यानंतर गंधर्वांनी तिला परत देवलोकीं नेण्यासाठी एक कारस्थान रचलें. त्यांनी तिच्या पलंगाला एक मेंढी व दोन कोंकरें बांधलीं. त्या कोंकरावर उर्वशीचें विलक्षण प्रेम जडलें. एका रात्रीं गंधर्वांनीच तीं कोंकरें पळवून नेलीं. तेव्हा तिने आक्रोश केला, की 'इथे कोणी वीरपुरुष नाही काय?' तें आह्वान स्वीकारून पुरूरवा त्यावेळच्या नग्न अवस्थेंतच त्या कोंकरांच्या मागे धावला. त्या वेळीं गंधर्वांनी एकाएकी विद्युत्प्रकाश पाडला आणि त्या प्रकाशांत तो तिला नग्नावस्थेंतच दिसला. अशा प्रकारें तिची अट मोडली गेल्यामुळे ती त्याला सोडून निघून गेली. पुढे तो वियोगदु:खाने कुरुक्षेत्रांत भटकत असतां ती त्याला एका सरोवराच्या कांठीं भेटली. त्याने खूप विनवणी केल्यावर ती त्याच्याजवळ पुनश्च एक रात्र राहिली. त्या समागमांतून पुढे तिला एक पुत्र झाला. मग गंधर्वांनी पुरूरव्याला वर मागण्यास सांगितलें. त्याने गंधर्व बनण्याची इच्छा प्रकट केली. गंधर्वांनी त्याला 'त्यासाठी यज्ञ कर' असें सांगून त्याबद्दल मार्गदर्शनहि केलें. त्या यज्ञाने तो गंधर्व बनला.

या कथेवरून प्रा. कोसंबी निष्कर्ष काढतात तो असा – मेल्यावाचून गंधर्व बनणें पुरूरव्याला शक्य नव्हतें. म्हणजे त्या यज्ञांतच त्याला मृत्यु आला असावा. मूळ कथेंत उर्वशीला पुरूरव्याकडून पुत्रप्राप्ति झाल्यानंतर पुरूरव्याचा बळी देण्याची तिची कल्पना होती, असें वाटतें. तिचा हा संकल्प समजल्यानंतर तो तिची खूप विनवणी करतो व त्यांत स्वतःच्या मरणाचाहि उल्लेख करतो. पण ती आपला बेत न बदलतां त्याचें सांत्वन करते, की 'हें मरण हा मृत्यु नव्हेच.'

ऋग्वेदांतील पुरूरवा-उर्वशीचा संवाद वरील कल्पनेवर आधारला असावा. तिथे त्याला मृत्युबंधु म्हटलें आहे. देव-दानवांच्या युद्धांत (देवांच्या विजयासाठी?) त्याचा बळि देण्याचा विचार होता. वायुपुराणांतल्या पुरूरव्याच्या कथेंतहि त्याला यज्ञप्रसंगींच मृत्यु आल्याचें सांगितलें आहे. ती कथा थोडक्यांत अशी–

एकदा पुरूरवा शिकारीला गेला असतां त्याला नैमिषारण्यांतील ऋषी सुवर्णवेदीवर यज्ञ करतांना दिसले. त्याने ती सुवर्णवेदि लुटण्याचा प्रयत्न केला. तें पाहून ऋषी क्रुद्ध झाले व त्यांनी वज्रकठिण अशा दर्भांनी त्याच्यावर प्रहार करून त्याला ठार मारलें (वायु पु. १. २. १३–२१).

उर्वशी ही नारायणाच्या ऊरूपासून निर्माण झाली म्हणून तिला उर्वशी हें नांव पडलें. उर्वशीला पाहूनच वासतीवर सत्रांत मित्रावरुणांचें रेतःस्खलन झालें आणि त्या रेतापासून अगस्त्य व वसिष्ठ निर्माण झाले (बृ. दे. २. ३७. ४४. १५६).

उर्वशी ही सह (मार्गशीर्ष) या मासाची अधिष्ठात्री अप्सरा आहे (भाग. पु. १२. ११. ४१). ही हेमंत ऋतूंत सूर्याच्या रथावर असते (विष्णु पु. २. १०. १३; ब्रह्माण्ड पु. १. २. १६). हिला ब्रह्मवादिनी असेंहि म्हटलें आहे. (ब्रह्माण्ड पु. २. ३३. १८). हिच्या नांवाचें एक तीर्थहि आहे.

उर्वशीपुलिन प्रयागांतलें एक तीर्थ. या ठिकाणीं देहत्याग करणाऱ्याला सहासष्ट हजार वर्षें पितरांसह स्वर्ग लोकांत स्थान मिळतें, असें मत्स्यपुराणांत सांगितलें आहे.

उर्वशीरमण प्रयागमधील एक क्षेत्र. [पु. इं.]

उर्वशीश्वर वाराणसींतलें एक तीर्थ. याच्या दर्शनाने गणत्व प्राप्त होतें, असें लिंगपुराणांत सांगितलें आहे.

उर्श एक प्रदेश. तक्षशिलेच्या उत्तरेस व गंधार आणि अभिसार या दोन देशांच्यामध्ये हा प्रदेश होता. त्यामुळे हजारा जिल्ह्याचा कांही भागहि उर्श प्रदेशांत सामील झाला होता. इथल्या रहिवाश्यांना अरस्क असें म्हणत असत. [सि. आ. प. भा.]

उर्सुथियन दक्षिण भारतांतील एक ग्रामदेव. याला कुरुप्पण्णाचा भाऊ मानतात.

उलटी साधना नाथपंथांतली एक पारिभाषिक संज्ञा. त्या काळांत अनेक छोटया छोटया धर्मपंथांत साधना शब्दाच्या मागे उलटी हें विशेषण जोडण्याची प्रथा पडली होती. त्या विशेषणाला एक विशेष अर्थ होता. त्या काळीं सर्व तांत्रिक पद्धतींत वामाचाराला प्राधान्य आलें होतें. वामाचाराचे अर्थ दोन– एक वामायुक्त साधना व दुसरा लोकप्रचलित साधनेच्या सर्वस्वी विरुद्ध अशी साधना. सिद्धांमध्ये मुद्रा-मैथुन प्रचलित होतें. पण त्याला त्यांनी उलटी साधना म्हटलें नाही. सूर्याला उलट करून चंद्रांत विलीन करणें, अशा प्रकारचें एक रूपक सिद्धांच्या चर्यापदांत मिळतें तेवढेंच. नाथयोग्यांनी मुद्रा-मैथुनपर अर्थ बाजूला टाकून त्याचा हठयोगपर अर्थ रूढ केला. त्यांच्या मतें उलटी साधना म्हणजे श्वासनिरोधाच्या द्वारें गंगेला (इडा) उलटी करून यमुनेंत (पिंगला)

मिळविणें होय. [हिं. सा. को.]

उल वातायन एक सूक्तद्रष्टा ऋषि. हा वायुभक्त होता. असें कळतें (ऋ. १०.१८६).

उलुंबन नायरांची एक पोटजात. या शब्दाचा अर्थ गुराखी असा होतो. दंतकथा अशी आहे, की हे लोक द्वारकेहून स्थलांतर करून द. भारतांत आले व स्थायिक झाले. त्यांनी आपला गुरें पाळण्याचा प्राचीन व्यवसाय अद्यापि चालू ठेवला आहे. कोट्टियूर व तेल्लिचेरि येथील देवस्थानांच्या वार्षिक उत्सवांत तूप व दूध पुरविण्याचा हक्क या जातीकडे आहे. [का. ट्रा. स. इं.]

उलूक (१) एक प्राचीन मानवगण. यांच्याविषयीं विद्वानांत अनेक प्रकारचे तर्कवितर्क आहेत. अर्जुन उत्तरदिग्विजयासाठी गेला असतां त्याला या उलूकांशीं सामना द्यावा लागला होता (म. भा. सभा. २७.५). उलूक (= घुबड) हें त्या गणाचें देवक असावें व त्यावरून त्यांना उलूक हें नांव पडलें असावें. संस्कृतांत उलूकाला कौशिक असेंहि म्हणतात. उलूक हे शैव होते व तें लकुलीश संप्रदायाचे अनुयायी होते. लकुलीशाच्या एका शिष्याचें नांव कुशिक असें आहे. उलूक हे कुशिकाच्या परंपरेंतले असल्यामुळे त्यांना कौशिक असेंहि म्हणत असावे. प्राचीन परंपरेच्या विस्मरणामुळे पुढे कौशिक हा शब्द उलूक नांवाच्या पक्ष्याला लावला गेला.

शकुनीचा एक भाऊ उलूक नांवाचा होता. त्यावरून श्री. फ्ळीटने अनुमान केलें आहे, की उलूकजमातीचा तो मूळपुरुष असावा. शकुनि हा गंधार (कंदहार) देशाचा राजा होता. त्यावरून उलूकांचें स्थानहि तिथेंच जवळपास असावें. सोमनाथ पट्टणामध्ये उपलब्ध झालेल्या एका लेखांत उलूकराज नामक दात्याचा उल्लेख आहे. हा उलूकराज त्याच मानवगणांतला शिवोपासक असूं शकेल.

सर्वदर्शनसंग्रहांत कणाददर्शनाला औलूक्यदर्शन म्हटलें आहे. टीकाकारांनी त्याचीं दोन कारणें दिलीं आहेत. एक हें की कणाद हा उलूकऋषीचा वंशज होता. दुसरें हें, की शिवाने उलूकरूप धारण करून कणादाला सहा पदार्थांचें ज्ञान उपदेशिलें. हे औलूक्यमताचे लोक कट्टे शैव होते. शिवसाक्षात्कार हेंच ते मोक्षाचें साधन मानीत. आगमांच्या द्वारें महेश्वराचे गुण ऐकणें, जें श्रवण केलें त्याचा अर्थ अनुमानाने ठीक समजून घेणें व जें समजलें तें ध्यानाने अंतरांत अनुभविणें, अशा त्रिविध प्रकारांनी बुद्धि शिवाच्या ठिकाणीं दृढ झाल्यावर मगच उत्तम योगाची प्राप्ति होते, असें त्यांचें तत्त्वज्ञान होतें. [नाथसंप्रदाय]

(२) एक पक्षी अर्थात् घुबड. ऋग्वेदांत याचें ओरडणें अशुभ मानलें आहे (१०. १६५.४). अश्वमेधयज्ञांत वनवृक्षांना याचा बळि अर्पण करीत (वा. सं. २४. २३). आजमितीसहि दारांतल्या वृक्षावर घुबडाचा घूत्कार सुरू झाला, की घरांत कांहीतरी अशुभ घडणार असें समजतात. पुराणांत घुबडाला लक्ष्मीचें वाहन मानलें आहे.

उलूकी एक मानसजात मातृदेवता. [पु. इं.]

उलूखल एक यज्ञीय पात्र. ही एक लांकडी उखळी असते. 'अहोमार्थानि वारणानि भवन्ति' = होमाकरितां नसणारीं पात्रें वारण वृक्षाचीं असतात, असें आप. श्रौतसूत्रांत सांगितलें आहे (१·१५·११). तदनुसार उलूखल हें त्या वृक्षाचें करतात. यागाच्या वेळीं प्रत्यक्ष भात कांडणें अशक्य असतें. म्हणून टीचभर लांबीची उखळी करून कांडण्याचा केवळ संस्कार करतात.



उलूखल

उलूखलिक एक पिशाच गण. यांचे नेत्र बारीक व जीभ लांब असते. हे पिशाच, अलंकार म्हणून उखळ गळ्यांत धारण करतात. [पु. इं.]

उलेमा आलिम म्हणजे पंडित, विद्वान्. त्याचें बहुवचन उलेमा. यावरून पंडितांची सभा अशा अर्थीहि हा शब्द वापरतात. हे इस्लामी धर्मशास्त्रांत पारंगत असतात. शेख-उल-इस्लामच्या नेतृत्वाखाली उलेमांची सभा भरते व महत्त्वाच्या धार्मिक प्रश्नांवर निर्णय देते. हा निर्णय मुस्लीम समाजाला मान्य करावा लागतो. इस्लामी राजसत्तेवरहि उलेमांचें थोडयाबहुत प्रमाणांत वर्चस्व असतें. [डि. इ.]

उल्का सूर्यमालेंत तुकडयातुकडयांचें एक भरताड अंतराळांतून फिरत असतें. त्यांतला एखादा तुकडा जेव्हा पृथ्वीच्या वातावरणांत प्रवेश करतो, तेव्हा तो घर्षणाने पेट घेतो आणि मधल्यामध्ये जळून जातो. तुकडा मोठा असला, तर तो अर्धवट जळलेल्या अवस्थेंत पृथ्वीवर पडतो. या पत-

नाला उल्कापात म्हणतात. उल्केला अशनि असेंहि म्हटलें आहे. अशनींचे संदर्भ ऋग्वेदांत आढळतात; पण कथा मात्र तै. ब्राह्मणांतच सांपडते ती अशी--

मरुतांनी पाण्याने अग्नि विझविला. तो शांत झाल्यावर त्यांनी त्याचें हृदय फोडलें. त्याचे जे तुकडे पडले, ते अशनि झाले (१·१·३·१२).

उल्कांविषयीं पुढील लोकसमजुती आढळतात --

उल्का म्हणजे पुण्यक्षय झाल्यावर स्वर्गांतून खाली पडणारे पुण्यात्मे होत. ते पृथ्वीवर येऊन पुनर्जन्म घेतात. देवांचे रथ एकमेकांवर घासल्यामुळे उल्कापात होतात. उल्का म्हणजे अनलपक्ष्याने टाकलेली शीट होय. चहाडखोर लोक मेल्यावर इंद्राच्या दरबारांत ऋषी काय बोलतात, तें चोरून ऐकण्याचा प्रयत्न करतात व म्हणून त्यांना जाळण्याची शिक्षा होते. हे जळते आत्मे म्हणजेच उल्का होत. उल्कापात हा एखाद्या पतिव्रतेच्या अथवा सत्पुरुषाच्या मृत्यूचा सूचक मानतात. त्यामुळे दुष्काळ, वादळ व सांथ येईल, असेंहि समजतात. उल्का पडतांना दिसली, तर तें कोणाला सांगू नये; त्या वेळीं 'राम राम' म्हणावें, अशीहि समजूत आहे. [लो. सा. रू.]

उल्का नवमी तिथिव्रत. या व्रतांत आश्विन शु. ९ मीस महिषासुरमर्दिनीची पूजा करतात. व्रतावधि एक वर्ष. या व्रताला उल्का हें नांव पडण्याचें कारण, हें व्रत करणारा पुरुष त्याच्या शत्रूंना व व्रतकर्त्री स्त्री तिच्या सवतींना उल्केप्रमाणे दिसते, असें सांगितलें आहे. [हि. ध.]

उल्कामुखी एक मानसजात मातृदेवता. [पु. इं.]

उल्लादन द. भारतांतील एक जात. नंपूतिरी जातींतील एका जातिबहिष्कृत स्त्रीचे हे वंशज होत, अशी दंतकथा आहे. यांचें मूलस्थान तम्पुरक्कोत्त हें गांव होय. अद्यापहि तें ठिकाण पवित्र क्षेत्र मानून हे लोक तिथे यात्रेला जातात.

विवाहप्रथा--या जातींत विवाहविधीबाबत एक मजेशीर चाल आहे. झाडपाल्याची एक मोठी वाटोळी झोपडी तयार करून हे लोक वधूला तिच्यांत ठेवतात. नंतर गावांतले सर्व उपवर तरुण त्या झोपडीला वेढा घालतात. प्रत्येक जण हातांत बांबूची काठी घेऊन झोंपडीभोंवती नाचत फिरतो व मधेच हातांतील काठी झोपडीत खुपसतो. झोपडींतील वधू ज्याची काठी आंत ओढून घेईल, तो तरुण वर म्हणून निवडला जातो. त्या वेळीं वधूचा पिता व इतर नातलग झोपडीजवळ वाद्यें वाजवीत असतात. हा समारंभ संपल्यावर त्या दोघांचें रीतसर लग्न लावतात.

या लोकांचा निर्वाह रानांतील फळें व कंदमुळें यांवर



उल्लादन पुरुष

चालतो. यांची स्थिति अत्यंत हलाखीची असते. मोठमोठे जमीनदार यांच्यावर आपली मालकी सांगतात व नायर, सिरियन इ. लोकांकडे यांना मजूर म्हणून कामाला पाठवितात. यांच्यांत पंचायत असते. जातींतील वृद्ध इसमांना पंच म्हणून निवडतात. सरपंचाला मुप्पन म्हणतात. त्याच्या हाताखाली पोनंबन नांवाचा मदतनीस असतो. पंचायतीच्या सभेंत सरपंच गुन्ह्याचा निवाडा करतो. गुन्हेगाराला दंड किंवा शिक्षा होते. स्त्री गुन्हेगाराला मात्र नारळाचें पाणी प्यायला सांगतात व त्या तीर्थाने ती दोषमुक्त झाली असें समजतात.

देवधर्म--उल्लादन लोक वृक्ष-पाषाणांची व भुताखेतांची पूजा करतात. एका छपराखाली कप्पिरी, थिकुट्टी व छाथन या देवतांच्या मूर्ती म्हणून कांही पाषाण ठेवलेले असतात. कन्नी (आश्विन) महिन्यांतील शुक्रवारी त्यांची पूजा करतात व कोंबडें, बकरें बळी देऊन ताडी व भात यांचा नैवद्य दाखवितात. त्या वेळीं एखाद्या इसमाच्या अंगांत येतें व भूतबाधा झालेल्या स्त्रियांच्या अंगांतील भुतें तो काढून टाकतो.

अंत्यविधि--प्रेतें पुरतात. सुतक १५ दिवस पाळतात. १६ व्या दिवशीं झोपडी व अंगण झाडून शेणपाणी घालायला न्हावी येतो. नंतर सुतकी लोक स्नान करून घरांत प्रवेश करतात व आप्तेष्टांना जेवण घालतात. जेवायला येणारे आप्तेष्ट तांदूळ,

ताडी व चार आणे एवढें साहित्य आपल्या बरोबर आणतात. हे लोक पितरांची पूजा करतात आणि पितरांपैकी कोणी



उल्लादन स्त्री

स्वप्नांत येऊन कांही मागितल्यास तें त्याला देतात. पितरांना संतुष्ट न केल्यास कुटुंबावर संकटें ओढवतात, अशी त्यांची समजूत आहे.

उद्योगधंदे–हे लोक मोठया ओंडक्यांच्या होडचा तयार करणें, रानांत जाऊन मध व इतर उपयुक्त वस्तू गोळा करणें, शेतीच्या हंगामांत नांगरणी, पेरणी, इ. कामें मजुरीने करणें, गुरें चारणें, वगैरे कामें करतात. कामाचा मोबदला भाताच्या रूपाने घेतात. हे लोक शिकार करण्यांतहि प्रवीण आहेत. शिकारींत मारलेल्या जनावरांची वांटणी प्रत्यक्ष मारणारा इसम, जंगल अधिकारी, गांवचा सरपंच आणि शिकारींतील मदतनीस एवढ्या लोकांत होते. हे लोक पूर्वी अस्पृश्य मानले जात. [का. ट्रा. स. इं.]

उल्लूर त्रिवेंद्रम् जिल्ह्यांतील एक क्षेत्र. इथलें सुब्रह्मण्याचें मंदिर प्रख्यात असून हजारों यात्रेकरू तिथें दर्शनासाठी येतात. पूर्वी त्रिवांकुरचे महाराज व राजदरबारांतील लोक ठराविक दिवशीं इथे येऊन सुब्रह्मण्याची पूजा करीत असत. मंदिराजवळच जुना राजवाडा आहे. [त्रिवेंद्रम् गॅझे.]

उव एस माल कहाणय छप्पय विनयचंद्रकृत एक जैन काव्य. यांत ८१ छप्पय छंद असून तीर्थंकर व धार्मिक पुरुष यांचे दृष्टान्त देऊन धर्माचरणाचा उपदेश केलेला आहे. [अ. सा.]

उवज्झाय (सं. उपाध्याय) जैन श्रमणांचा गुरु किंवा शिक्षक. ही पदवी प्राप्त होण्यासाठी त्याला तीन वर्षें श्रमणधर्माने वागावें लागतें व आचारकल्प या विषयावर प्रभुत्व मिळवावें लागतें. उवज्झाय म्हणजे जैनांच्या मठांतील शिक्षणाधिकारीच असें म्हणायला हरकत नाही. श्रमण व श्रमणी या दोघांच्याहि शिक्षणाची जबाबदारी त्याच्यावर असते [हि. जै. मो.]

उवट (इ. स. ११ वें शतक–मध्यकाल) एक वेदाचार्य. पित्याचें नांव वज्रट. नांवावरून हे दोघे पितापुत्र काश्मीरी असावे, असें वाटतें. उवटाने ऋक्प्रातिशाख्य व यजुःप्रातिशाख्य या ग्रंथांवर टीका लिहिली असून ऋक्-सर्वानुक्रमणी, ईशावास्योपनिषद्, वाजसनेयी संहिता, यांवर भाष्यें लिहिलीं आहेत. अवंतीच्या भोजराजाच्या शासनकाळांत (१०१८–१०६० इ. स.) अवंती व आनंदपुर येथे याने ही ग्रंथरचना केली. [वै. सा. सं.]

उशना एक आचार्य. याला कवि असेंहि नांव आहे. कवींच्यामध्ये उशना हा श्रेष्ठ आहे, असें भगवद्गीतेंत (१०·३७) म्हटलें आहे. ऋग्वेदांत कुत्स व इंद्र यांच्याबरोबर याचा वारंवार उल्लेख येतो (१. ५१. १०; ४. १६. २; ६. २०. ११; ८. २३. १७). यालाच शुक्राचार्य असेंहि नांव आहे. देव–दानवांच्या युद्धप्रसंगीं हा असुरांचा पुरोहित होता. वैदिक साहित्यांत याचा आचार्य म्हणून उल्लेख झालेला आहे. औशनस स्मृति, औशनस उपपुराण, औशनस धर्मशास्त्र, असे तीन ग्रंथ याच्या नांवावर आहेत.

औशनस धर्मसूत्राचे ७ अध्याय आहेत. यांत जननमरणाशौच, जल, अग्नि इ. साधनांनी करायचें शुद्धीकरण, मिश्र जाती, वधदंड, अभक्ष्य भक्षणाचें प्रायश्चित्त, ब्राह्मणाने शूद्र स्त्रीशीं विवाह करावा कीं करूं नये, श्राद्धकल्प, ब्राह्मणाने कोणत्या पदार्थांची विक्री करूं नये, कोणत्या वस्तू सर्वदा पवित्र मानाव्या, इ. विषय आले आहेत. ७ वा अध्याय श्लोकबद्ध असून त्यांतले कित्येक श्लोक मनु व उशना यांचे समान आहेत. या सूत्रांत वसिष्ठ, हारीत, शौनक व गौतम यांचीं मतें उद्धृत केलेलीं आहेत. त्यावरून हें सूत्र मनुस्मृतीनंतरचें आहे, असें ठरतें.

औशनसस्मृतींत ९ अध्याय असून त्यांत उपनयन, नित्य

कर्तव्यें, अनध्याय, स्नातकधर्म, श्राद्ध, अंत्यविधि, प्रायश्चित्तें, इ. विषयांचें विवेचन आहे. यांचीं पुढील दोन मतें विशिष्ट आहेत– (१) पित्याने केलेलें ऋण हें, जर त्याला झालेल्या दंडाबाबत असेल किंवा ती कराची बाकी असेल किंवा तें व्यावहारिक नसेल, तर तें फेडण्याची जबाबदारी पुत्रावर नाही. (२) साहसाच्या गुन्ह्यांत अंध, बधिर, वृद्ध, स्त्रिया व अज्ञान, यांच्याहि साक्षी घ्यायला हरकत नाही. [हि. ध.]

उशीनर एक प्राचीन मानवगण. ऋग्वेदांत या गणाचा उल्लेख आहे (१०. ५९. १०). हे लोक कुरुपांचालांसमवेत मध्यदेशांत राहत होते, असें ऐतरेय ब्राह्मणांत म्हटलें आहे (८.१४). गोपथ ब्राह्मण व कौषीतकी उपनिषद् यांतहि यांचें नांव येतें. पाणिनीच्या मतें उशीनर हें वाहीक देशाचें एक जनपद होतें (अष्टा. ४.२.११७-१८). शिबि हा उशीनरांचा राजा होता (म. भा. वन. १९४.२). पंजाबांतलें शोरकोट हें गांव म्हणजे प्राचीन शिबिपुर होय, असें म्हणतात. इथे प्राचीन अवशेष बरेच आढळतात. झिमरच्या मतें त्यांचें राज्य पंजाबच्या सरहद्दीवर होतें. रावी व चिनाब या दोन नद्यांमधला आणि मद्रांच्या दक्षिणेचा सखल प्रदेश हा उशीनरांचा प्रदेश समजला जात असे. या लोकांच्या भोजनांत दहीदूध विशेष प्रमाणांत असे. कारण तो देश गोधनाने समृद्ध होता. शिबीने यज्ञ केला त्या प्रसंगीं त्याने अगणित गायी ब्राह्मणांना दान दिल्या असें द्रोणपर्वांत म्हटलें आहे (५७. ३-७). बौद्ध जातकांतूनहि उशीनरांचा उल्लेख सांपडतो. पण जातकांनी त्यांना दुष्ट व अराजकाचे भोक्ते असें म्हटलें आहे. त्यांच्याविषयीं कथा अशी ––

इंद्राने त्यांच्या विरुद्ध शस्त्र धरून त्यांचा निःपात केला. जे वांचले ते इंद्राला शरण गेले. इंद्राच्या आज्ञेने ते मग धर्माचें पालन करूं लागले व कालांतराने बौद्ध झाले. यावरून सुरवातीस ते बौद्धांचे विरोधक असावे, असें वाटतें. पण त्यांच्या धर्माबद्दल निर्णायक असा पुरावा अद्यापि उपलब्ध झालेला नाही. [ट्रा. ए. इं.; पा. भा.; वे. इं.]

उशीरबिंदु महेंद्र पर्वतानजीकचा एक पर्वत. [पु. इं.]

उषःकाल सूर्योदयापूर्वी पांच घटिकांचा किंवा आदल्या दिवशींच्या सूर्योदयापासून ५५ घटिकांनंतरचा काळ. सामान्यपणे साठ घटिकांचा एक दिवस मानतात. म्हणजे ५५ घटिकांनंतर पांच घटिकाच उरतात. यावरूनच 'पंच पंच उषःकालः' असा श्लोकचरण लोकांत रूढ झाला आहे. तो संपूर्ण श्लोक असा– –

पञ्च पञ्च उषःकालः सप्त पञ्चारुणोदयः ।
अष्ट पञ्च भवेत्प्रातः शेषः सूर्योदयो मतः ।।

अर्थ – (आदल्या दिवशींच्या सूर्योदयापासून) ५५ घटिकांनंतरचा काळ हा उषःकाल, ५७ घटिकानंतरचा अरुणोदय, ५८ घटिकानंतरचा प्रातःकाल व शेष उरला तो सूर्योदय समजावा.

उषा (१) एक वैदिक देवता. वस्=प्रकाशणें या धातूला संप्रसारण होऊन हा शब्द बनला आहे. ही उषःकालाची देवता आहे. हिच्या वर्णनपर अशीं २० सूक्तें ऋग्वेदांत आहेत. शिवाय इतर देवतांबरोबरहि तिचें अनेक ठिकाणीं वर्णन आढळतें. उषःकाल ही नित्य घडणारी नैसर्गिक घटना आहे. या घटनेला वैदिक ऋषींनी देवत्व दिलें व तिच्यावर मानवी गुणांचा, विशेषतः स्त्रीसौंदर्याचा अध्यारोप करून तिच्याविषयीं काव्यमय सूक्तें रचलीं. ऋग्वेदांतलें तिचें वर्णन संक्षेपांत पुढीलप्रमाणे आहे–

प्रति ष्या सूनरी जनी व्युच्छन्ती परि स्वसुः ।
दिवो अदर्शि दुहिता ।।

(४.५२.१)

अर्थ– ही लावण्यवती रमणी, ही आकाशकन्या उषा पाहा. सुप्रकाशित होऊन ही आपल्या बहिणीच्या (रात्र) पाठोपाठ दृष्टिगोचर झाली आहे.

अधि पेशांसि वपते नृतूरिवा––
पोर्णुते वक्ष उस्रेव बर्जहम् ।
ज्योतिर्विश्वस्मै भुवनाय कृण्वती
गावो न व्रजं व्यु१षा आवर्तमः ।।

(१.९२.४)

अर्थ– ज्याप्रमाणे एखादी नटी (निरनिराळे) वेष धारण करते, त्याप्रमाणे ही उषा निरनिराळीं रूपें घेऊन येते. धेनु जशी आपली कांस सर्वांच्या दृष्टीस पडूं देते, त्याप्रमाणे ही उषा आपला वक्षःप्रदेश अनावृत ठेवते. सर्व जगाला प्रकाश देणाऱ्या या उषेने, गायी आपला गोठा सोडून जातात, त्याप्रमाणे अंधकाराला दूर टाकून दिलें आहे.

ती सर्व ज्योतींतली श्रेष्ठ ज्योति आहे (ऋ. १.११३.१). ती प्राणिजाताला आपापले व्यवहार करण्यासाठी निद्रेंतून जागृत करते. ती उत्साहवर्धक आहे. ती सूर्याच्या उदयस्थानाच्याहि पलिकडे असलेल्या प्रदेशांतून रथांत बसून येते (ऋ. १.४८.५–६). ती सूर्याला येण्याला मार्ग मोकळा करते (ऋ. १.११३.१६). ती द्युलोकाची कन्या असून सूर्याची पत्नी आहे (ऋ. १.४८.१; ७.७५.५). कालदृष्टचा उषा

ही सूर्याच्या अगोदर उगवत असल्यामुळे तिला सूर्याची माता असेंहि म्हटलें आहे. ती यज्ञ व अग्नि यांची जननी आहे (ऋ. ७.७८.३). तिने मातेप्रमाणे आपल्यावर माया करावी व आपल्याला ऐश्वर्य द्यावें, अशी तिची प्रार्थना केलेली आहे (ऋ. ७.८१.४).

उषेच्या सूक्तांत वैदिक ऋषींची प्रतिभा उच्चतम स्वरूपांत दृष्टिगोचर होते. तिच्या वर्णनांत वैदिक कवींच्या उपमा-उत्प्रेक्षांना बहर आलेला आहे. वैदिक ऋषींची निरामय सौंदर्यदृष्टि त्या सूक्तांतून ठायीं ठायीं प्रतीत होते. समस्त ऋग्वेदांत हिच्या सूक्तांइतकीं प्रतिभासंपन्न सूक्तें दुसऱ्या कोणत्याहि देवतेच्या वांटचाला आलेलीं नाहीत. वैदिक कालानंतर कालिदासापर्यंतच्या काळांत निसर्गदृश्याचें इतक्या चांगल्या प्रकारें केलेलें वर्णन क्वचितच आढळेल. मॅक्डोनेल म्हणतो, की उषा ही देवता वैदिक प्रतिभची सर्वांत सुंदर सृष्टि असून दुसऱ्या कोणत्याहि देशाच्या धार्मिक साहित्यांत अशी सुंदर कृति आढळणार नाही.

उषा शब्द ऋग्वेदांत प्रायः एकवचनांत आढळत असला, तरी कांही ठिकाणीं तो बहुवचनांतहि आढळतो. यावरून लो. टिळक असें अनुमान करतात, की ऋग्वेदांत वर्णिलेली उषा ही ध्रुवप्रदेशांतली असावी. ध्रुवप्रदेशांत उषःकाल दीर्घ मुदतीचा असतो आणि तो दीर्घ रात्रीनंतर आल्यामुळे विशेष चित्ताकर्षक वाटतो. ऋग्वेदांतल्या कांही मंत्रांत या दीर्घ उषःकालाचा संकेत आढळतो. 'एकाच अर्थाकडे जाणारी तूं चक्राकार फीर' असें उषेला संबोधून स्पष्ट म्हटलें आहे (ऋ. ३.६१.३). हें वर्णन ध्रुवावरील उषेलाच केवळ लागूं पडणारें आहे, असें लो. टिळक म्हणतात. वैदिक वाङ्मयांतील उषेच्या वर्णनाचें आधुनिक शास्त्रीय शोधांच्या साहाय्याने सूक्ष्म निरीक्षण करून लो. टिळकांनी त्यावरून पुढील अनुमानें काढलीं आहेत—

(१) ऋग्वेदांत वर्णिलेली उषा इतकी दीर्घ होती, की तिच्या प्रथमदर्शनापासून सूर्योदयापर्यंत कित्येक दिवस (चौवीस तासांचे अवधी) जात असत; अथवा पुष्कळ उषा एकामागून एक येऊन त्यांचें सूर्योदयांत पर्यवसान होई (ऋ. ७.७६.३; २.२८.९).

(२) ऋग्वेदांत उषेविषयीं जे अनेकवचनी प्रयोग आहेत, ते केवळ बहुमानार्थक किंवा वर्षाच्या ३६० उषांचे दर्शक नसून ध्रुवावरील दीर्घ उषेच्या दिवसावधि तीस भागांचे द्योतक आहेत (ऋ. १.२३.८; ६.५९.६; तै. सं. ४.३.११.६).

(३) पुष्कळ उषा एकाच ठिकाणीं राहून एकमताने वागत आणि कधीहि एकमेकींशीं भांडत नसत (ऋ. ४.५१.७–९; ७.७६.५; अथर्व. ७.२२.२).

(४) उषेचे तीस भाग पृथक् पृथक् नसून एकाला एक लागून असे अखंडित होते (ऋ. १.१५२.४; तै. ब्रा. २.५.६.५; अथर्व. ७.२२.२).

(५) या तीस उषा किंवा एकाच उषेचे तीस भाग चक्राप्रमाणे वाटोळे फिरत व पुन्हा त्याच ठिकाणीं येत.

या सर्व गोष्टी ध्रुवावर किंवा त्याच्या जवळच्या प्रदेशांत दिसणाऱ्याच आहेत, हें सांगायला नकोच. त्यांत शेवटची तर खुद्द ध्रुवावरच शक्य आहे. त्यामुळे उषा ही वैदिक देवता मूळ ध्रुवोत्पन्न आहे, असें अनुमान करण्यास कोणतीहि हरकत नाही (आर्य लोकांचें मूलस्थान).

ऋग्वेदांतल्या कित्येक मनोरम सूक्तांचा विषय झालेली उषा ध्रुवविशिष्ट असून वैदिक ऋषींच्या पूर्वजांनी तिला हिमपूर्वकालांतच पाहिली असली पाहिजे, असें लो. टिळक सांगतात. आर्यांचें मूल वसतिस्थान उत्तर ध्रुवाच्या प्रदेशांत होतें, हें सिद्ध करण्यासाठी टिळकांनी जे वैदिक वाङ्मयांतले पुरावे दिले आहेत, त्यांतच त्यांनी ऋग्वेदांतील उषःसूक्तांचाहि प्रपंच केला आहे. [ऋ. द.; वै. सा. सं.; म. ज्ञा. को.]

(२) एक मानसजात मातृदेवता. [मत्स्य पु. १७९.२०]

उष्टी हळद लग्नांत वधूला मंगलस्नान घालण्यापूर्वी गव्हांचा चौक घातलेल्या पाटावर बसवितात व तिच्या अंगाला तेलहळद लावतात. वधूला लावून शिल्लक उरलेली हळद 'उष्टी हळद' या नांवाने वधूपक्षाकडील सुवासिनी वराकडे घेऊन जातात. ती हळद वराच्या अंगाला लावल्यावर मग त्याला मंगलस्नान घालतात.

उष्ट्रकर्ण एक प्राचीन जमात. [वायु पु. ४७.५२]

उष्ट्रासन एक यौगिक आसन. या आसनाने चर्मगत व मांसगत रोग दूर होतात. तसेंच वात, पित्त कफ, यांपासून उत्पन्न होणारे रोगहि नाहीसे होतात. तहानभूक सोसून चालण्याची शक्ति येते. प्रवासी लोकांस हें आसन हिताचें असतें. याची क्रिया पुढीलप्रमाणे सांगितलेली आहे—



उष्ट्रासन

कर्तव्यें, अनध्याय, स्नातकधर्म, श्राद्ध, अंत्यविधि, प्रायश्चित्तें, इ. विषयांचें विवेचन आहे. याचीं पुढील दोन मतें विशिष्ट आहेत– (१) पित्याने केलेलें ऋण हें जर त्याला झालेल्या दंडाबाबत असेल किंवा ती कराची बाकी असेल किंवा तें व्यावहारिक नसेल, तर तें फेडण्याची जबाबदारी पुत्रावर नाही. (२) साहसाच्या गुन्ह्यांत अंध, बधिर, वृद्ध, स्त्रिया व अज्ञान, यांच्याहि साक्षी घ्यायला हरकत नाही. [हि. ध.]

उशीनर एक प्राचीन मानवगण. ऋग्वेदांत या गणाचा उल्लेख आहे (१०. ५९. १०). हे लोक कुरु-पांचालांसमवेत मध्यदेशांत राहत होते, असें ऐतरेय ब्राह्मणांत म्हटलें आहे (८.१४). गोपथ ब्राह्मण व कौषीतकी उपनिषद् यांतहि यांचें नांव येतें. पाणिनीच्या मतें उशीनर हें वाहीक देशाचें एक जनपद होतें (अष्टा. ४.२.११७-१८). शिबि हा उशीनरांचा राजा होता (म. भा. वन. १९४.२). पंजाबांतलें शोरकोट हें गांव म्हणजे प्राचीन शिबिपुर होय, असें म्हणतात. इथे प्राचीन अवशेष बरेच आढळतात. झिमरच्या मतें त्यांचें राज्य पंजाबच्या सरहद्दीवर होतें. रावी व चिनाव या दोन नद्यांमधला आणि मद्रांच्या दक्षिणेचा सखल प्रदेश हा उशीनरांचा प्रदेश समजला जात असे. या लोकांच्या भोजनांत दही-दूध विशेष प्रमाणांत असे. कारण तो देश गोधनाने समृद्ध होता. शिबीने यज्ञ केला त्या प्रसंगीं त्याने अगणित गायी ब्राह्मणांना दान दिल्या असें द्रोणपर्वांत म्हटलें आहे (५७.३-७). बौद्ध जातकांतूनहि उशीनरांचा उल्लेख सांपडतो. पण जातकांनी त्यांना दुष्ट व अराजकाचे भोक्ते असें म्हटलें आहे. त्यांच्याविषयीं कथा अशी ––

इंद्राने त्यांच्या विरुद्ध शस्त्र धरून त्यांचा निःपात केला. जे वांचले ते इंद्राला शरण गेले. इंद्राच्या आज्ञेने ते मग धर्माचें पालन करूं लागले व कालांतराने बौद्ध झाले. यावरून सुरवातीस ते बौद्धांचे विरोधक असावे, असें वाटतें. पण त्यांच्या धर्माबद्दल निर्णायक असा पुरावा अद्यापि उपलब्ध झालेला नाही. [ट्रा. ए. इं.; पा. भा.; वे. इं.]

उशीरबिंदु महेंद्र पर्वतानजीकचा एक पर्वत. [पु. इं.]

उषःकाल सूर्योदयापूर्वीं पांच घटिकांचा किंवा आदल्या दिवशींच्या सूर्योदयापासून ५५ घटिकांनंतरचा काळ. सामान्यपणे साठ घटिकांचा एक दिवस मानतात. म्हणजे ५५ घटिकांनंतर पांच घटिकाच उरतात. यावरूनच 'पंच पंच उषःकालः' असा श्लोकचरण लोकांत रूढ झाला आहे. तो संपूर्ण श्लोक असा– –

पञ्च पञ्च उषःकालः सप्त पञ्चारुणोदयः ।
अष्ट पञ्च भवेत्प्रातः शेषः सूर्योदयो मतः ।।

अर्थ – (आदल्या दिवशींच्या सूर्योदयापासून) ५५ घटिकांनंतरचा काळ हा उषःकाल, ५७ घटिकानंतरचा अरुणोदय, ५८ घटिकानंतरचा प्रातःकाल व शेष उरला तो सूर्योदय समजावा.

उषा (१) एक वैदिक देवता. वस्=प्रकाशणें या धातूला संप्रसारण होऊन हा शब्द बनला आहे. ही उषःकालाची देवता आहे. हिच्या वर्णनपर अशीं २० सूक्तें ऋग्वेदांत आहेत. शिवाय इतर देवतांबरोबरहि तिचें अनेक ठिकाणीं वर्णन आढळतें. उषःकाल ही नित्य घडणारी नैसर्गिक घटना आहे. या घटनेला वैदिक ऋषींनी देवत्व दिलें व तिच्यावर मानवी गुणांचा, विशेषतः स्त्रीसौंदर्याचा अध्यारोप करून तिच्याविषयीं काव्यमय सूक्तें रचलीं. ऋग्वेदांतलें तिचें वर्णन संक्षेपांत पुढीलप्रमाणे आहे–

प्रति ष्या सूनरी जनी व्युच्छन्ती परि स्वसुः ।
दिवो अदर्शि दुहिता ।।

(४.५२.१)

अर्थ– ही लावण्यवती रमणी, ही आकाशकन्या उषा पाहा. सुप्रकाशित होऊन ही आपल्या बहिणीच्या (रात्र) पाठोपाठ दृष्टिगोचर झाली आहे.

अधि पेशांसि वपते नृतूरिवा––
पोर्णुते वक्ष उस्रेव बर्जहम् ।
ज्योतिर्विश्वस्मै भुवनाय कृण्वती
गावो न व्रजं व्यु१षा आवर्तमः ।।

(१.९२.४)

अर्थ– ज्याप्रमाणे एखादी नटी (निरनिराळे) वेष धारण करते, त्याप्रमाणे ही उषा निरनिराळीं रूपें घेऊन येते. धेनु जशी आपली कांस सर्वांच्या दृष्टीस पडूं देते, त्याप्रमाणे ही उषा आपला वक्षःप्रदेश अनावृत ठेवते. सर्व जगाला प्रकाश देणाऱ्या या उषेने, गायी आपला गोठा सोडून जातात, त्याप्रमाणे अंधकाराला दूर टाकून दिलें आहे.

ती सर्व ज्योतींतली श्रेष्ठ ज्योति आहे (ऋ. १.११३.१). ती प्राणिजाताला आपापले व्यवहार करण्यासाठी निद्रेंतून जागृत करते. ती उत्साहवर्धक आहे. ती सूर्याच्या उदयस्थानाच्याहि पलिकडे असलेल्या प्रदेशांतून रथांत बसून येते (ऋ. १.४८.५–६). ती सूर्याला येण्याला मार्ग मोकळा करते (ऋ. १.११३.१६). ती द्युलोकाची कन्या असून सूर्याची पत्नी आहे (ऋ. १.४८.१; ७.७५.५). कालदृष्ट्या उषा

ही सूर्याच्या अगोदर उगवत असल्यामुळे तिला सूर्याची माता असेंहि म्हटलें आहे. ती यज्ञ व अग्नि यांची जननी आहे (ऋ. ७.७८.३). तिने मातेप्रमाणे आपल्यावर माया करावी व आपल्याला ऐश्वर्य द्यावें, अशी तिची प्रार्थना केलेली आहे (ऋ. ७.८१.४).

उषेच्या सूक्तांत वैदिक ऋषींची प्रतिभा उच्चतम स्वरूपांत दृष्टिगोचर होते. तिच्या वर्णनांत वैदिक कवींच्या उपमा-उत्प्रेक्षांना बहर आलेला आहे. वैदिक ऋषींची निरामय सौंदर्यदृष्टि त्या सूक्तांतून ठायीं ठायीं प्रतीत होते. समस्त ऋग्वेदांत हिच्या सूक्तांइतकीं प्रतिभासंपन्न सूक्तें दुसऱ्या कोणत्याहि देवतेच्या वांटचाला आलेलीं नाहीत. वैदिक कालानंतर कालिदासापर्यंतच्या काळांत निसर्गदृश्याचें इतक्या चांगल्या प्रकारें केलेलें वर्णन क्वचितच आढळेल. मॅक्डोनेल म्हणतो, की उषा ही देवता वैदिक प्रतिभची सर्वांत सुंदर सृष्टि असून दुसऱ्या कोणत्याहि देशाच्या धार्मिक साहित्यांत अशी सुंदर कृति आढळणार नाही.

उषा शब्द ऋग्वेदांत प्रायः एकवचनांत आढळत असला, तरी कांही ठिकाणीं तो बहुवचनांतहि आढळतो. यावरून लो. टिळक असें अनुमान करतात, की ऋग्वेदांत वर्णिलेली उषा ही ध्रुवप्रदेशांतली असावी. ध्रुवप्रदेशांत उषःकाल दीर्घ मुदतीचा असतो आणि तो दीर्घ रात्रीनंतर आल्यामुळे विशेष चित्ताकर्षक वाटतो. ऋग्वेदांतल्या कांही मंत्रांत या दीर्घ उषःकालाचा संकेत आढळतो. 'एकाच अर्थाकडे जाणारी तूं चक्राकार फीर' असें उषेला संबोधून स्पष्ट म्हटलें आहे (ऋ. ३.६१.३). हें वर्णन ध्रुवावरील उषेलाच केवळ लागूं पडणारें आहे, असें लो. टिळक म्हणतात. वैदिक वाङ्मयांतील उषेच्या वर्णनाचें आधुनिक शास्त्रीय शोधांच्या साहाय्याने सूक्ष्म निरीक्षण करून लो. टिळकांनी त्यावरून पुढील अनुमानें काढलीं आहेत—

(१) ऋग्वेदांत वर्णिलेली उषा इतकी दीर्घ होती, की तिच्या प्रथमदर्शनापासून सूर्योदयापर्यंत कित्येक दिवस (चौवीस तासांचे अवधी) जात असत; अथवा पुष्कळ उषा एकामागून एक येऊन त्यांचें सूर्योदयांत पर्यवसान होई (ऋ. ७.७६.३; २.२८.९).

(२) ऋग्वेदांत उषेविषयीं जे अनेकवचनी प्रयोग आहेत, ते केवळ बहुमानार्थक किंवा वर्षाच्या ३६० उषांचे दर्शक नसून ध्रुवावरील दीर्घ उषेच्या दिवसावधि तीस भागांचे द्योतक आहेत (ऋ. १.२३.८; ६.५९.६; तै. सं. ४.३.११.६).

(३) पुष्कळ उषा एकाच ठिकाणीं राहून एकमताने वागत आणि कधीहि एकमेकींशीं भांडत नसत (ऋ. ४.५१.७–९; ७.७६.५; अथर्व. ७.२२.२).

(४) उषेचे तीस भाग पृथक् पृथक् नसून एकाला एक लागून असे अखंडित होते (ऋ. १.१५२.४; तै. ब्रा. २.५.६.५; अथर्व. ७.२२.२).

(५) या तीस उषा किंवा एकाच उषेचे तीस भाग चक्राप्रमाणे वाटोळे फिरत व पुन्हा त्याच ठिकाणीं येत.

या सर्व गोष्टी ध्रुवावर किंवा त्याच्या जवळच्या प्रदेशांत दिसणाऱ्याच आहेत, हें सांगायला नकोच. त्यांत शेवटची तर खुद्द ध्रुवावरच शक्य आहे. त्यामुळे उषा ही वैदिक देवता मूळ ध्रुवोत्पन्न आहे, असें अनुमान करण्यास कोणतीहि हरकत नाही (आर्य लोकांचें मूलस्थान).

ऋग्वेदांतल्या कित्येक मनोरम सूक्तांचा विषय झालेली उषा ध्रुवविशिष्ट असून वैदिक ऋषींच्या पूर्वजांनी तिला हिमपूर्वकालांतच पाहिली असली पाहिजे, असें लो. टिळक सांगतात. आर्यांचें मूल वसतिस्थान उत्तर ध्रुवाच्या प्रदेशांत होतें, हें सिद्ध करण्यासाठी टिळकांनी जे वैदिक वाङ्मयांतले पुरावे दिले आहेत, त्यांतच त्यांनी ऋग्वेदांतील उषःसूक्तांचाहि प्रपंच केला आहे. [ऋ. द.; वै. सा. सं.; म. ज्ञा. को.]

(२) एक मानसजात मातृदेवता. [मत्स्य पु. १७९.२०]

उष्टी हळद लग्नांत वधूला मंगलस्नान घालण्यापूर्वी गव्हांचा चौक घातलेल्या पाटावर बसवितात व तिच्या अंगाला तेलहळद लावतात. वधूला लावून शिल्लक उरलेली हळद 'उष्टी हळद' या नांवाने वधूपक्षाकडील सुवासिनी वराकडे घेऊन जातात. ती हळद वराच्या अंगाला लावल्यावर मग त्याला मंगलस्नान घालतात.

उष्ट्रकर्ण एक प्राचीन जमात. [वायु पु. ४७.५२]

उष्ट्रासन एक यौगिक आसन. या आसनाने चर्मगत व मांसगत रोग दूर होतात. तसेंच वात, पित्त कफ, यांपासून उत्पन्न होणारे रोगहि नाहीसे होतात. तहानभूक सोसून चालण्याची शक्ति येते. प्रवासी लोकांस हें आसन हिताचें असतें. याची क्रिया पुढीलप्रमाणे सांगितलेली आहे––



उष्ट्रासन

अधश्च शेते पदयुगमव्यस्तं
पृष्ठे विधायापि धृतं कराभ्याम्।
आकुञ्चयेच्चैव हृदास्यमूर्ध्व-
मुष्ट्रं च पीठं मुनयो वदन्ति ।।

अर्थ -- पाय गुडघ्यापासून मोडून जमिनीवर ठेवावे व त्यावर बसावें. दोन्ही हातांनी दोन्ही पायांच्या टांचा पकडून कमरेचा भाग वर उचलावा. दोन्ही हात सरळ ठेवून डोकें पाठीकडे वळवावें. [उ. यो. द.]

उष्ण क्रौंच द्वीपाचा एक प्रदेश. [पु. इं.]

उष्णतीर्थ विंध्यपर्वतावरचें एक क्षेत्र. हें अभया देवीचें स्थान आहे. [मत्स्य पु. १३.४२.]

उष्णा अग्नीला सामर्थ्य देणारी ही एक त्याची कला आहे. [ब्रह्माण्ड पु. ४.३५.८३]

उष्णिक् एक वैदिक छंद. हा गायत्रीच्या पुढचा व त्याहून मोठा छंद आहे. याचीं २५ अक्षरें असतात. हा अग्नीचा छंद मानलेला आहे. याचें उदाहरण—

स चन्द्रो विप्र मर्त्यो महो व्राधन्तमो दिवि ।
प्रपेत्ते अग्ने वनुषः स्याम ।।

(ऋ. १.१५०.३)

पुर उष्णिक् नांवाचा याचा आणखी एक प्रकार ऋग्वेदांत कांही ठिकाणीं आढळतो (१.२३.१९).

वेदोत्तर संस्कृत साहित्यांत उष्णिक् ही सप्ताक्षर वृत्ति मानली असून तिचे मधुमती, कुमारललिता व पदलेखा, असे तीन भेद सांगितले आहेत (श. क.).

उष्णीष पागोटें, शिरोवेष्टन. 'उष्णं ईशते हिनस्ति इति'= जें उन्हाचा ताप दूर करतें, तें उष्णीष होय (सं. इं. डि.) डोक्यावर पागोटें घालण्याची पद्धत भारतांत वेदकालाइतकी प्राचीन आहे. वैदिक वाङ्मयांत अनेक ठिकाणीं त्याचे उल्लेख येतात (ऐ. ब्रा. ६.१. ; श. ब्रा. ३. ३. २. ३; का. सं. १३. १०; पं. ब्रा. १७. १. १४). उष्णीष हा स्त्रीपुरुषांच्या पोषाखांतला महत्त्वाचा भाग मानला जाई. भारतासारख्या उष्ण कटिबंधांतल्या प्रदेशांत डोक्याच्या संरक्षणासाठी त्याचा फार उपयोग होता. उष्णीषाला धार्मिक अर्थहि प्राप्त झाला होता. यज्ञकर्मांत यजमानाने दीक्षा-विधीच्या वेळीं उष्णीष बांधावें व तें सोमक्रयानंतर काढून टाकावें, असें सांगितलें आहे. राजसूय व वाजपेय या यज्ञांत राजाला विशिष्ट प्रकारचें पागोटें बांधावें लागे (श. ब्रा. ५.३.५.२३). व्रात्यांचीं पागोटीं उज्ज्वल व सुंदर असत व तीं त्यांच्या काळ्या-भोर केशसंभारावर फार खुलून दिसत (अथर्व. १५.२).

पागोटयाला शिरोवेष्टन म्हटलें आहे, त्यावरून लांबलचक वस्त्रपट्टी डोक्याभोवती गुंडाळीत असत, असें सिद्ध होतें. पागोटें बांधण्याच्या अनेक पद्धती त्यावरून सूचित होतात.

उष्णीषाच्या वस्त्राचा रंग बहुधा पांढरा असे. क्षेमेंद्राने शुभ्र उष्णीषाचाच वारंवार उल्लेख केला आहे (भरतमंजरी ३. ३९४). विशिष्ट प्रसंगीं मात्र वेगवेगळ्या रंगांचीं उष्णीषें वापरीत. आनंदोत्सवाच्या प्रसंगीं पिवळें उष्णीष वापरीत (जातक ५३२). कृष्णपक्षांत अंधाऱ्या रात्रीं प्रेयसीच्या संकेतस्थळीं निघालेला प्रियकर काळें उष्णीष वापरी. आपण कोणाला दिसूं नये, हा त्यांतला उद्देश असे.

उष्णीष अर्थात् पागोटें बांधण्याच्या अनेक तऱ्हा होत्या. भरहूतच्या शिल्पांत मध्यभागीं मुकुट ठेवून त्याच्या भोवती पागोटें कसें गुंडाळतात, तें दाखविलें आहे. या पागोटयाचे वेढे बरेच असत. निदानकथेंत शक्राने युवराज सिद्धार्थाला पागोटें कसें बांधलें, त्याचें सविस्तर वर्णन आहे. त्याने सिद्धार्थाच्या डोक्यावर मध्यभागीं रत्न ठेवून मग त्याभोवती वस्त्राचे वेढे दिले होते. या पागोटयाचीं दोन्ही टोकें पुढे ओढून एका जागीं खोचलीं जात; तर क्वचित् त्याचे दोन शमले वेगवेगळे सोडीत.

विशिष्ट प्रसंगीं स्त्रियाहि विविध प्रकारचीं सुंदर पागोटीं डोक्याला बांधीत. इंद्राणीने उष्णीष बांधल्याचे उल्लेख आढळतात. भरहूत व सांची येथील शिल्पांत उष्णीषधारी स्त्रिया आढळतात. पण त्यानंतर बायकांनी पागोटें घालण्याची चाल लवकरच बंद पडली असावी. कारण अमरावतीच्या शिल्पांत स्त्रियांच्या मस्तकावर उष्णीष नाही. **पाहा**–पागोटें, पगडी. [वे. इं.; वै. सा. सं.; बुलेटिन ऑफ दि मद्रास गव्हर्नमेंट म्युझियम]

उष्णीष देव हे बौद्धांच्या वज्रयानपंथाचे आठ देव आहेत. प्रत्येकाला एकेक दिशा नेमून दिलेली आहे. यांचा ध्यानी बुद्धांशीं संबंध असून ते ध्यानी बुद्धांचींच मुद्रा व चिन्हें धारण करतात. त्यांचीं नावें व वर्णन पुढील प्रमाणे --

१ **वज्रोष्णीष**– शुक्लवर्ण, भूस्पर्शमुद्रा, पूर्व दिशा.
२ **रत्नोष्णीष**– नीलवर्ण, वरदमुद्रा, दक्षिण दिशा.
३ **पद्मोष्णीष**– रक्तवर्ण, ध्यानमुद्रा, पश्चिम दिशा.
४ **विश्वोष्णीष**– हरितवर्ण, अभयमुद्रा, उत्तर दिशा.
५ **तेजोष्णीष**– सित-रक्तवर्ण, हातांत सूर्यचक्र धारण करणारा, आग्नेयी दिशा.

६ **ध्वजोष्णीष**– रक्त–कृष्णवर्ण, हातांत चिंतामणि व ध्वज धारण करणारा, नैर्ऋत्य दिशा.

७ **तीक्ष्णोष्णीष**–नभश्याम, कृपाण व पुस्तक धारण करणारा, वायव्य दिशा.

८ **छत्रोष्णीष**– शुभ्रवर्ण, हातांत छत्र धारण करणारा, ईशान्य दिशा.

तंत्रविद्येंत या बुद्धांना फार महत्त्व आहे. हे सगळे एकमुखी, द्विभुज, वस्त्रालंकारयुक्त व रत्नखचित शिरोवेष्टन धारण करणारे असतात. [इं. बु. इ.]

उष्णीषपट्ट बाणभट्टाच्या काळांतला सोन्याचा अलंकार. हा शिरोभूषणाच्या वरून बांधला जाई. राजा, युवराज, पट्टराणी व सेनापति यांनाच हा वापरण्याचा अधिकार असे. [हर्षचरित]

उष्णीषविजया बौद्ध देवता. गौर वर्ण. त्रिमुख. अष्टभुज. वरद-अभय मुद्रा, कलश, कमलांतला बुद्ध, इ. धारण करणारी. ही चैत्याच्या गर्भात राहते. ही बौद्धांची लोकप्रिय देवता आहे. नेपाळांतल्या प्रत्येक मंदिरांत हिची मूर्ति आढळते. ही वैरोचनापासून उत्पन्न झाली आहे. [इं. बु. इ.]



उष्णीषविजया

उष्मप पितरांचा एक वर्ग. प्रत्येक शु. १ देला यांची आराधना करतात. कृष्णपक्ष हा या पितरांचा दिवस व शुक्लपक्ष ही रात्र असते. [वायु पु. ५६. २१. ८७]

उसमान अवधी साहित्यांतील एक कवि. याचा जन्म गाजीपूर येथे झाला. शेख हुसेन हा याचा पिता असून याचे चारहि भाऊ कलासंपन्न होते. याचें आडनांव नान असें होतें. चित्रावली हें याचें काव्य प्रसिद्ध आहे. याची भाषा प्रौढ असून त्यांत लोकोक्तींचा वापरहि सहजपणे केलेला आहे. [अ. औ. उ. सा.]

उस्तरण एक पठाण जमात. हे वायव्य सीमाप्रांतीं डेराइस्माईलखान जिल्ह्याच्या दक्षिण भागांत राहतात. हे मूळचे व्यापारी होते. यांचा व्यापार कंदाहार पासून तों बंगालपर्यंत चालत असे. अलिकडे ते सुलेमान पर्वताच्या पायथ्याशीं शेती करतात. हे लोक शूर आणि धाडसी असूनहि सभ्य आहेत. त्यांच्यांतले पुष्कळ लोक सैन्यांत व पोलिस खात्यांत आहेत. [म. ज्ञा. को.]

ऊ सहावा स्वरवर्ण. ओष्ठ हें याचें उच्चारणस्थान आहे. हा प्लुतहि होतो. उदात्त-अनुदात्त-स्वरित या भेदांनी हा त्रिविध होतो. ऱ्हस्व ‘ उ ’ला एक फाटा जोडून हें अक्षर तयार झालें आहे.

मातृकान्यासांत याचें स्थान डाव्या कानावर येतें. कामधेनुतंत्रांत याचें वर्णन पुढीलप्रमाणे दिलेलें आहे –

शङ्खकुन्दसमाकारं ऊङ्कारं परमकुण्डली ।
पञ्चप्राणमयं वर्णं पञ्चदेवमयं सदा ॥

अर्थ –– ऊकार हा परमकुण्डलाकृति असून शंख व कुंद यांच्यासारखा आहे. तो पंचप्राणमय वर्ण असून पंचदेवमय आहे.

ऊढा अष्ट नायिकांच्या बाहेरचा परकीया नायिकेचा एक भेद. ऊढा म्हणजे विवाहिता. हिच्या प्रेमांत विविधता व भावात्मक विषमता अधिक; त्यामुळे रीतिकाव्यांत या प्रेमाचा बराच विस्तार झाला आहे. भक्तिकाव्यांतील गोपींचें प्रेम या प्रकारचें मानलेलें आहे. या नायिकेंत गोपनाचा भाव अधिक असल्यामुळे तिच्या प्रेमाच्या विविध भावनांचें वर्णन

आकर्षक होतें. नायिकेच्या उद्वेग, आकांक्षा, चिंता, वेदना इ. भावनांचें वर्णन यांत प्रामुख्यानें येतें. [हिं. सा. को.]

ऊदल आल्हाचा धाकटा भाऊ. महोबा येथील एक वीर तरुण. तिथल्या चंदेल राजानें या दोघां बंधूंविरुद्ध कारस्थान रचलें आणि त्यामुळे त्यांना महोबा सोडावें लागलें. ते तिथून कनोज येथे जयचंद राजाच्या आश्रयाला गेले. कांही कालानें पृथ्वीराज चव्हाण यानें महोबाच्या चंदेल राजावर स्वारी केली. त्या वेळीं हे दोघे आपल्या देशाचा अभिमान धरून महोबाला परत आले व पृथ्वीराजाविरुद्ध युद्धांत सामील झाले. त्यांनीं बाल वयांतच अपूर्व पराक्रम दाखविला. जगनिक नामक कवीनें या बंधुद्वयाच्या जीवन-मरणावर आल्ह-खंड नामक एक महाकाव्य रचलें आहे. **पाहा – आल्हखंड.** [अ. औ. उ. सा.]

ऊधमपूर जम्मू प्रदेशांतील एक क्षेत्र. देविका नदीच्या तीरावर हें शहर वसलेलें आहे. नदीच्या एका तीरावर शंकराचें देवालय असून त्याच्या समोरच दुसऱ्या तीरावर रामाचें मंदिर आहे. वैशाख महिन्यांत तिथे मोठी जत्रा भरते. ऊधमपूरच्या जवळच देविकेच्या तीरावर शुद्ध महादेवाचें मंदिर आहे. इथे मोठा त्रिशूळ असून त्याचे दोन तुकडे झालेले आहेत. शंकर सुधंतर दैत्याला मारीत असतां हा त्रिशूळ तुटला, असें सांगतात. [कल्याण-तीर्थांक]

ऊरू आंगिरस एक मंत्रद्रष्टा (ऋ. ९. १०८. ४-५).

ऊर्ज अप्सरांच्या अग्निसंभवगणाचा मूळ उत्पादक. [पु. इं.]

ऊर्जा अप्सरांच्या १४ गणांपैकी एक गण. याची उत्पत्ति अग्नीपासून झाली (ब्रह्मांड पु. ३. ७. १९).

ऊर्ण एक डोंगरी जमात (ब्रह्मांड पु. २. १६. ६७). [पु. इं.]

ऊर्णाशस पिशाचांचा एक वर्ग. [वायु पु. ६९. २६४]

ऊर्णास्तुका एकदा कापल्यावर पुन्हा वाढणाऱ्या लोकरीस ऊर्णास्तुका म्हणतात. सोमयागांत ज्याच्याकडून सोम विकत घ्यायचा, त्याच्या कपाळावर काळचा लोकरीची गोळी करून मारतात. त्यावरूनच काळी लोकर अशुभ मानली गेली असावी. पांढरी लोकर सोमक्रयाच्या वेळीं यजमानाजवळ देऊन ठेवतात. सोमरस गाळतेवेळीं तिचा उपयोग करायचा असतो. [विद्याधरशास्त्री भिडे]

ऊर्ध्वकेशा एक स्वरशक्ति (ब्रह्मांड पु. ४.४४). [पु. इं.].

ऊर्ध्वग्रावा एक सूक्तद्रष्टा. यानें ग्राव्यांचें (सोम कुटायचे दगड) स्तवन केलें आहे (ऋ. १०.१७५).

ऊर्ध्वपाद-शिरासन एक योगासन. याची क्रिया अशी – जमिनीवर ताठ बसून दोन्ही पाय समोर सरळ सोडावे. दोन्ही हातांचे पंजे कमरेच्या जवळ समांतर जमिनीस टेकवावे. नंतर पाय जमिनीपासून वर उचलावे. मस्तक पुढे घेऊन पायांच्या दोन्ही गुडघ्यांमध्ये टेकवावें. डोळे मिटावे व पाय गुडध्यांत वाकूं देऊं नयेत.

या आसनामुळे बद्धोदर रोग नष्ट होतो व पायांच्या स्नायूंत चांगलें रक्ताभिसरण होतें. [उ. यो. द.]

ऊर्ध्वपाद हस्तासन एक योगासन. याची क्रिया अशी – जमिनीवर निजावें व कमरेपर्यंत पाय जमिनीपासून वर उचलावे. नंतर हात मस्तकाला लागून वर उचलून पायांच्या अंगठ्याजवळ नेऊन टेकवावे. त्या वेळीं पाठहि वर उचलावी. सर्व शरीर ताठ ठेवावें. [उ. यो. द.]

ऊर्ध्वपुंड्र तिलकविशेष. चंदन किंवा गोपीचंदन यांनी ललाटावर तीन उभ्या रेषा रेखल्यानें ऊर्ध्वपुंड्र होतो. याच्या माहात्म्याविषयीं ब्रह्मपुराणांत पुढील श्लोक आहे–

ऊर्ध्वपुण्ड्रधरो मर्त्यो म्रियते यत्र कुत्रचित् ।
श्वपाकोऽपि विमानस्थो मम लोके महीयते ।।

अर्थ – ऊर्ध्व पुंड्र धारण करणारा चांडाल जरी असला आणि तो कुठेहि जरी मृत्यु पावला, तरी तो विमानांत बसून माझ्या (वैकुंठ) लोकांत येऊन पूज्य होतो.

ऊर्ध्वपुंड्र द्विजांनी धारण करावा, असें बहुमत असलें, तरी देवी भागवतानें द्विजांना त्याचा निषेध केला आहे. ऊर्ध्वपुंड्र कोणत्या धार्मिक कृत्यांत धारण करावा, याविषयीं निर्णय-सिंधूंत हेमाद्रीचा पुढील श्लोक उद्‌धृत केला आहे –

जपे होमे तथा दाने स्वाध्याये पितृकर्मणि ।
तत्सर्वं नश्यति क्षिप्रं ऊर्ध्वपुण्ड्रं विनाकृतम् ।।

अर्थ – जप, होम, दान, स्वाध्याय व पितृकर्म (श्राद्धादि) या गोष्टी ऊर्ध्वपुंड्र धारण केल्यावांचून केल्या, तर त्या त्वरित नष्ट होतात (करून व्यर्थ ठरतात).

श्राद्धांत ऊर्ध्वपुंड्र लावूं नये, अशींहि वचनें आहेत; पण त्या बाबतींत कुलाचार प्रमाण मानावा, अशी सोडवणूक ठेवलेली आहे. व्यंकटगिरीवरच्या मातीचा किंवा गोपीचंदनाचा ऊर्ध्वपुंड्र कपाळावर रेखावा, असा वैष्णवांना विधि सांगितला आहे –


नासादिकेशान्तमूर्ध्वपुण्ड्रं विष्णोः स्थितस्य चरणाकृतिः।

(कात्यायनोपनिषद्)

लक्ष्मीसह विष्णु वास्तव्य करतो, अशी समजूत आहे. उर्ध्वपुंड्रधारी पुरुषाची प्रशंसा ब्रह्मपुराणांत केली आहे–

अशुचिर्वाप्यनाचारो मनसा पापमाचरेत् ।
शुचिरेव भवेन्नित्यमूर्ध्वपुण्ड्राङ्कितो नरः ।।

अर्थ – अशुचि, अनाचारी किंवा मनाने पाप आचरणारा अशा मनुष्याने ऊर्ध्वपुंड्र धारण केला असता, तो नित्य शुद्ध होतो. [पद्म पु. उ. खं. २२५; भा. प्र. वि.; श. क.]



ऊर्ध्वपुंड्राचे प्रकार

(१) रामानंदी (२) निमानंदी (३) वल्लभाचारी (४) मध्वाचारी (५) वडगळ (६) तिगळ (७) गोडनी स्वामी संप्र. (८) बेंदिवाले (९) चतुर्भुजी (१०) कबीरपंथी

अर्थ – नाकापासून मस्तकावरील केसांच्या मुळापर्यंत ऊर्ध्वपुंड्र लावावा. त्याला विष्णूच्या स्थिर चरणाची आकृति समजतात.

उर्ध्वपुंड्राचे अनेक प्रकार आहेत. त्यांत ठिपके व रेषा यांची भिन्नता असते.

उर्ध्वपुंड्राच्या मध्यभागीं लाल रंगाचा टिळा असतो. त्यांत

ऊर्ध्वपुंड्र उपनिषद् हें वैष्णव उपनिषदांपैकी एक आहे. हें वराहरूपी विष्णूने सनत्कुमाराला उपदेशिलें. यांत ऊर्ध्वपुंड्रधारणाचा विधि सांगितला आहे. प्रथम श्वेतमृत्तिकेची प्रार्थना, नंतर तिच्यांत पाणी मिसळून नृसिंहबीजाक्षर लिहिणें व त्या मृत्तिकेने कपाळावर तीन उभ्या रेखा काढणें, असा याचा विधि आहे. या तीन रेखा तीन

विष्णुपदांच्या निदर्शक आहेत. ऊर्ध्वपुंड्र धारण केल्याने विष्णूच्या परमपदाची प्राप्ति होते. [सी. ग. देसाई]

ऊर्ध्वबाहु पंथ एक शैवपंथ. या पंथाचे साधू बाहू उंच करून त्या अवस्थेंत बराच काळ राहतात. कांही वेळां ते मुठीहि आवळून ठेवतात. त्यामुळे त्यांचीं वाढलेलीं नखें हाताला टोचत राहतात. हे लोक सारखे फिरत असतात व केवळ भिक्षेवर उपजीविका करतात. कांही नग्न राहतात; तर कांही कमरेभोवती भगवें वस्त्र गुंडाळतात. हे शिवाप्रमाणे केसांचा जटाजूट बांधतात व अंगाला भस्म फासतात.

ऊर्ध्वमरु सिंधु नदी ज्यांतून वाहते, असा पश्चिमेकडील एक प्रदेश (ब्रह्मांड पु. २.१८.४९). [पु. इं.]

ऊर्ध्वमुखी एक शैव पंथ. या पंथाचे साधू झाडाच्या फांदीला पाय अडकवून खाली डोकें, वर पाय अशा स्थितींत राहतात. [रि. इं.]

ऊर्ध्वरेता ज्याचें वीर्य पतन पावत नाही, अशा निग्रही पुरुषाला ऊर्ध्वरेता अशी संज्ञा आहे. सनत्कुमारादि मुनी हे ऊर्ध्वरेते होते. पित्यासाठी आजन्म ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करणाऱ्या भीष्मालाहि ही पदवी दिलेली आहे (म. भा. आदि. १००). ही एक यौगिक प्रक्रियाहि आहे. योगिजन विशिष्ट साधनेच्या द्वारें आपलें वीर्य ऊर्ध्वगामी करतात व त्यामुळे त्यांना ओज प्राप्त होतें, असें म्हटलें आहे.

ऊर्ध्वायन प्लक्ष द्वीपांत राहणाऱ्या लोकांचा हा एक वर्ग आहे. [भाग. पु. ५.२०.४]

ऊर्मिषट्क ब्रह्मज्ञानांत व्यत्यय आणणाऱ्या सहा ऊर्मी आहेत. त्यांचीं नांवें अशीं– क्षुधा, तृषा, दुःख, धुंदी, ऱ्हास, व मृत्यु (विष्णु पु. १.१५.३७). [पु. इं.]

ऊली शाहाबाद जिल्ह्यांतील एक क्षेत्र. ऊली ही विश्वामित्राची तपोभूमि आहे. महाभारताचें शांतिपर्व, देवी भागवत, ब्रह्मपुराण, इ. ग्रंथांत विश्वामित्र तपश्चर्येसाठी दक्षिणेला गेल्याचा उल्लेख आहे. विश्वामित्र इथे असतांना मोठें अवर्षण पडलें. त्या वेळीं गुरुपुत्रांच्या शापाने चांडाल झालेला त्रिशंकु विश्वामित्राला शोधीत इथे आला व त्याने विश्वामित्राच्या कुटुंबाचें अवर्षणापासून रक्षण केलें. त्यामुळे विश्वामित्राने प्रसन्न होऊन त्याला सदेह स्वर्गात पाठविलें. परंतु तो चांडाल असल्यामुळे स्वर्गांतील देवतांनी त्याला खाली ढकलून दिलें. अशा स्थितींत विश्वामित्राने त्याची गति रोखली. त्यामुळे त्रिशंकु अधांतरीं लोंबकळत राहिला. त्रिशंकूच्या लाळेपासून कर्मनाशा नदी उत्पन्न झाली, अशी आख्यायिका आहे. ती इथूनच कैमूर पर्वतांतून निघाली आहे.

इथून जवळच रावणाने स्थापिलेलें शिवलिंग आहे. त्याला दससीसानाथ असें म्हणतात. शिवरात्रीच्या वेळीं इथे मोठी यात्रा भरते. जवळच महादेवखोहादि कांही साधनोपयोगी गुहा आहेत. [कल्याण–तीर्थांक]

ऊषभंजनक मथुरेंतलें एक तीर्थ. वराह पुराणांत याचा उल्लेख आहे. [क्रु. क. त.]

ऊस याचा उल्लेख प्रथम अथर्ववेदांत (१.३४.५) व नंतर मैत्रायणी संहिता (३.७.९), वाजसनेयि संहिता (२५.१) इ. ग्रंथांत आढळतो. प्राचीन काळीं ऊस जंगलांतहि वाढत असत. अशा वनाला इक्षुवन असें म्हणत (अष्टा ८.४.५). मग त्यांची लागवड करूं लागले. लागवड करतांना ऊस निवडून घेत व त्यामुळे त्याच्यापासून चांगला गूळ तयार होई, असें पाणिनि सांगतो (अष्टा.४.४.१०३). प्राचीन काळींहि आधुनिक काळांतील सरौती, मनगो, डकचन, बाँसपत्ती इ. अनेक प्रकारचे ऊस होते. काष्ठेक्षु, पौंड्रक, वंशक इ. उसांच्या जातींचा कोशांत उल्लेख आलेला आहे. यांपैकी काष्ठेक्षु व वंशक (बाँसपत्ती) हे जंगलांत वाढत असत. उसाच्या शेतांना इक्षुशाकर व इक्षुशाकिन म्हणत.

वायुपुराणांत पितरांना द्यायच्या आहुती श्यामाक व इक्षु यांच्या असाव्या, असें विशेष विधान सांगितलें आहे. [वे. इं.; पा. भा.; क. हि. वा. पु.]

ऊह पूर्व मीमांसेंतील एक पारिभाषिक शब्द. याच्या दोन व्याख्या आहेत – (१) ‘अन्वययोग्यविभक्त्यादिकल्पनम्’ = अन्वयाला योग्य ठरेल त्याप्रमाणे विभक्त्यादिकांची कल्पना किंवा अध्याहार करणें. उदा० पार्वणश्राद्धांत ‘सौम्यासः’ असें पितरांचें बहुवचन असतां एकोद्दिष्ट श्राद्धांत तें ‘सौम्य’ असें एकवचनी कल्पिणें. (२) ‘पदान्तरप्रक्षेपः’ = वाक्यांत विशिष्ट पदाच्या जागीं अन्य पदाचा प्रक्षेप करणें. उदा० सूर्यासाठी चरूचा निर्वाप करणें असतां ‘अग्नये त्वा जुष्टं निर्वपामि’ या वाक्यांतील ‘अग्नये’ पदाच्या जागीं ‘सूर्याय’ असें अन्य पद घालणें. [न्या. को.]

ऋ सातवा स्वरवर्ण. हा मूर्धन्य आहे. ' ऋटुरषाणां मूर्धा ' (सि. कौ.). ऱ्हस्व, दीर्घ, प्लुत व उदात्त, अनुदात्त, स्वरित अशा भेदांनी हा नवविध होतो. त्यांत सानुनासिक व निरनुनासिक असे आणखी प्रकार मानल्यास तो १८ प्रकारचा होतो. कामधेनुतंत्रांत याचें वर्णन पुढीलप्रमाणे दिलें आहे ––

ऋकारं परमेशानि कुण्डली मूर्तिमान् स्वयम् ।
अत्र ब्रह्मा च विष्णुश्च रुद्रश्चैव वरानने ।।
सदाशिवयुतं वर्ण सदा ईश्वरसंयुतम् ।
पञ्चवर्णमयं वर्ण चतुर्ज्ञानमयं तथा ।।
रक्तविद्युल्लताकारं ऋकारं प्रणमाम्यहम् ।

वरील श्लोक अशुद्ध आहेत. त्यांचा सारांश पुढीलप्रमाणे सांगतां येईल. पार्वतीला शिव सांगतो ––

ऋकार हा कुंडलधारी आहे. त्याच्या ठिकाणीं ब्रह्मा-विष्णु-रुद्र वास्तव्य करतात. तो वर्ण सदाशिव व ईश्वर यांनीहि युक्त आहे. त्याला पंचवर्णमय व चतुर्ज्ञानमय म्हटलें आहे. रक्तवर्ण विद्युल्लतेच्या आकाराच्या या ऋकाराला मी प्रणाम करतों.

मातृकान्यासांत याचा उजव्या नाकपुडीवर न्यास करतात. तंत्रग्रंथांत याचीं दीर्घमुख, रुद्र, भावभूति, इ. अनेक नांवें दिलेलीं आहेत. [श. क.]

ऋक् प्रातिशाख्य प्रातिशाख्य ग्रंथांतील एक प्राचीन ग्रंथ पर्षद् किंवा परिषद् हिच्यामध्ये या विद्येचा प्रचार झाल्यामुळे याला पार्षद किंवा पारिषद सूत्र असेंहि म्हटलें आहे. शौनक हा याचा कर्ता, असें विष्णुमित्राने सांगितलें आहे. या सूत्रांत शिक्षाविषयक विवेचन असल्यामुळे याला शिक्षाशास्त्र असेंहि म्हणतात. यांत अठरा पटलें असून पहिल्या पटलांत स्वर, व्यंजन, स्वरभक्ति, रक्त, नाभि, प्रगृह्यादि पारिभाषिक शब्द, इ. चीं लक्षणें दिलीं आहेत. द्वितीय पटलांत प्रश्लिष्ट, क्षैप्र, उद्ग्राह भुग्न, इ. संधींचीं सोदाहरण लक्षणें आहेत. तृतीय पटलांत स्वरांचा परिचय असून चार ते नऊ या पटलांत विसर्जनीय संधि, नकाराचे नाना प्रकार, व्यंजनसंधि, इ. विविध संधींचें विस्तृत शास्त्रीय परीक्षण आहे. दहा व अकरा या पटलांत क्रमपाठ, पंधराव्यांत वेदपारायणाच्या पद्धतीचा संक्षिप्त परिचय व शेवटच्या तीन पटलांत गायत्री, उष्णिक्, बृहती इ. छंदांचें सविस्तर वर्णन असून छंदःशास्त्राच्या दृष्टीने तें फार मोलाचें आहे. [वै. सा. सं.]

ऋग्विधान ऋग्वेदांतील मंत्रांचा विनियोग सांगणारा ग्रंथ. ऋग्वेदांत अनेक प्रकारचीं सूक्तें असून त्यांचा विनियोग यज्ञकर्मांत होत असतो. निरनिराळ्या प्रकारचीं जीं कर्में सांगितलीं आहेत, त्यांत शांत व घोर, तसेंच पौष्टिक व आभिचारिक अशीं कर्में असतात. अशा कर्मांस उपयुक्त असे अनेक मंत्र ऋग्वेदांत आहेत. मंत्रांचा विनियोग यज्ञांत करून त्या यज्ञाच्या द्वारें ईप्सित फल मिळविणें हा एक पक्ष. त्या दृष्टीने आश्वलायनासारख्या कल्पसूत्रकारांनी त्या त्या मंत्रांचा विनियोग निरनिराळ्या यज्ञांत सांगितला आहे. पण यज्ञ न करतांहि केवळ मंत्रजपाच्या द्वारें इष्ट फल मिळवितां येतें, असें सांगणारा दुसरा पक्ष आहे. या पक्षाच्याच दृष्टिकोनांतून ऋग्विधानाची रचना झालेली आहे. प्रस्तुत ग्रंथांत कांहीं होमहि सांगितलेले दिसतात; पण ते श्रौतयज्ञाहून निराळे आहेत.

ऋग्विधानाचा कर्ता कोण, हें निश्चित सांगणें कठिण आहे. तें शौनकाने रचलें, असें एक मत आहे. पण ऋग्विधानाची एकंदर रचना पाहतां तें एका माणसाने रचलें असेल, असें वाटत नाही. त्याच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं ' नमः शौनकाय ' असें म्हटलेलें असतें. प्रस्तुत ग्रंथाचा कर्ता शौनक असता तर त्याने स्वतःलाच असें नमन केलें नसतें. शक्यता अशी वाटते, की शौनक वंशांतल्या अनेक आचार्यांनी मिळून या ग्रंथाची रचना केली व अध्यायाच्या शेवटीं आपल्या शाखाप्रवर्तकाला नमन लिहिलें.

ऋग्विधानांत पांच अध्याय असून सुमारें साडेसातशें श्लोक आहेत. सर्व श्लोक सोपे व अनुष्टुभ् छंदांतले असून ते पुराणांच्या धर्तीवर आहेत. सध्या उपलब्ध असलेल्या ऋग्वेदाच्या शाकल संहितेंतला मंत्रक्रम यांत बरोबर आढळत नाही. त्यावरून तो क्रम शौनक संहितेवरून घेतला असावा, असा तर्क केला जातो. शौनकसंहिता सध्या उपलब्ध नाही.

या ग्रंथांत पौष्टिक व आभिचारिक अशीं दोन्ही प्रकारचीं कर्में सांगून त्यांसाठी जपहोमादि विधानें दिलीं आहेत. दीर्घायुष्य, स्वर्गप्राप्ति, धन, प्रजा, पशुसमृद्धि, शत्रुनाश, रोगनाश, अपमृत्युनिवारण, इ. अनेक कामनांचे मंत्र व त्यांचें अनुष्ठान यांत दिलेलें आहे. विधानांची सामान्य फलश्रुति सांगतांना एक सामान्य सिद्धान्त सांगितला आहे, तो असा ––

येन येनार्थमृषिणा यदर्थं देवताः स्तुताः ।
स स कामः समृद्धिश्च तेषां तेषां तथा तथा ।।

(१. ११)

अर्थ–मंत्रद्रष्टया ऋषीने जी कामना मनांत धरून देवतेची स्तुति केली असेल, ती कामना त्या मंत्राचा जप अथवा त्याचें अनुष्ठान केल्याने फलद्रूप होते.

मंत्राचा मानस जप हाच सर्वांत श्रेष्ठ होय, असेंहि सांगितलें आहे (१. ७१). [विद्याधरशास्त्री भिडे]

ऋग्वेद चार वेदांपैकी पहिला वेद. हा सर्व वेदांत प्राचीन आहे. किंबहुना ऋग्वेद हा सर्व जगांतलाच आज उपलब्ध असलेला सर्वांत प्राचीन ग्रंथ होय. ऋक् म्हणजे छंदोबद्ध रचना. ऋक् शब्दाच्या कांही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत--

(१) ऋच्यन्ते स्तूयन्ते देवा अनया इति ऋक् = जिच्यायोगें देवांची स्तुति केली जाते, ती ऋक् होय (श. क.).

(२) पादेनार्धेन चोपेतवृत्तवद्धा मन्त्रा ऋचः = चरण व अर्धी यांनी युक्त असे वृत्तबद्ध मंत्र म्हणजे ऋचा होत (जै. न्या. २.१.१२).

(३) तेषामृक् यत्रार्थवशेन पादव्यवस्था = ज्या वाक्यांत अर्थ म्हणजे छंद (अनुष्टुभादि) यांच्या आधारें चरणव्यवस्था केलेली असते, ती ऋक् होय (जै. न्या. २.१.१०).

अनेक ऋचा मिळून एक सूक्त बनतें. ऋग्वेदांतील सूक्तें मुख्यत्वें इंद्र, अग्नि, वरुण, मरुत् इ. देवतांच्या स्तुतीचीं किंवा वर्णनाचीं आहेत. याशिवाय समाज, संस्कार, सृष्टिरचना, तत्त्वज्ञान इ. अनेक विषयांवरचीं सूक्तेंहि ऋग्वेदांत आढळतात.

मंत्रब्राह्मणयोर्वेदनामधेयम् = मंत्रविभाग व ब्राह्मणविभाग मिळून बनलेल्या साहित्याला वेद म्हणतात. (आप. परिभाषा ३१). संहिता हा मंत्रविभाग आणि ब्राह्मण, आरण्यक व उपनिषद् मिळून ब्राह्मणविभाग होय. समस्त ऋक्संहितेची मांडणी पुढील दोन प्रकारांनी केलेली आहे—

(१) **अष्टकरचना** – ऋग्वेदाचे एकूण ६४ अध्याय आहेत. आठ अध्यायांचें एक अष्टक अशीं त्याचीं एकूण आठ अष्टकें बनविलेलीं आहेत. प्रत्येक अध्यायाच्या अवांतर विभागाला वर्ग म्हटलें आहे. वर्गाची ऋक्संख्या सामान्यपणे ५ असते. पण कित्येक वर्ग एका ऋचेपासून नऊ ऋचांपर्यंत असलेले आढळतात. या विषमतेचें कारण काय असावें, तें कळत नाही. ऋक्संहितेंतील एकूण वर्गसंख्या २००६ इतकी आहे. वर्गरचना ही अध्ययनाच्या सोयीसाठी केलेली असावी.

(२) **मंडलरचना** – एकूण ऋक्संहिता १० मंडलांत विभक्त केलेली आहे. प्रत्येक मंडलांत अनेक सूक्तें आणि प्रत्येक सूक्तांत अनेक ऋचा असतात. ही रचना ऐतिहासिक स्वरूपाची असल्यामुळे पहिल्या रचनेपेक्षा अधिक महत्त्वाची ठरते. मंडलांचे गोत्रमंडलें व मिश्रमंडलें असे आणखी दोन विभाग आहेत. दोन ते आठ हीं मंडलें गोत्र, ऋषि व त्यांचे वंशज यांच्या नांवांवर असल्यामुळे त्यांना गोत्रमंडलें म्हणतात. गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भरद्वाज, वसिष्ठ व आठव्याचे कण्व व आंगिरस असे क्रमाने एकूण आठ गोत्रऋषि आहेत. दोन ते सात हीं मंडलें म्हणजे ऋग्वेदाचा गाभाच होय. यांतील मंत्रांची रचना सर्वांत प्राचीन असून ऋग्वेदाच्या इतर सूक्तांची रचना ही त्यानंतरच्या काळांतली आहे. नवव्या मंडलांतलीं सगळीं सूक्तें सोम या एकाच देवतेला उद्देशून आहेत. सोमालाच पवमान असें दुसरें नांव आहे. त्यामुळे या मंडलाला पवमानमंडल असें म्हणतात. दोन ते आठ हीं मंडलें तयार झाल्यावर त्या त्या ऋषींचीं सोमविषयक सर्व सूक्तें एकत्र करून नवव्या मंडलाची रचना करण्यांत आली, असें अनुमान आहे. त्यानंतरच्या कालांत पहिलें व दहावें अशीं दोन मंडलें ऋग्वेदाला जोडण्यांत आलीं. या दोन्ही मंडलांतील सूक्तांची संख्या समान म्हणजे १९१ आहे. त्यावरून या मंडलांची रचना मुद्दाम करण्यांत आली आहे, हें स्पष्ट होतें. भाषा, छंद, नवीन देवता व नूतन दार्शनिक विचार यांमुळे दहाव्या मंडलाची रचना प्राचीन मंडलांच्या मानाने अर्वाचीन आहे, असें सिद्ध होतें.

कात्यायनाने आपल्या सर्वानुक्रमणींत वरील दहाहि मंडलांची विविध प्रकारें गणना करून त्यांतलीं सूक्तें, सूक्तांच्या एकूण ऋचा, त्यांतले शब्द आणि अक्षरेंहि मोजून त्यांची संख्या लिहून ठेवलेली आहे. या परिगणनेचें कोष्टक असें–

मंडलें–	१०
सूक्तें–	१०१७
ऋचा–	१०५८०¼
शब्द–	१,५३,८२६
अक्षरें–	४,३२,०००

यांव्यतिरिक्त वालखिल्य नामक ११ सूक्तें ऋग्वेदसंहितेंत आहेत. हीं वालखिल्य सूक्तें ८ व्या मंडलांत ४९ ते ५९ इतकीं असून त्यांच्या मंत्रांची संख्या ८० आहे. याशिवाय ऋग्वेदांत कांही खिलसूक्तें आहेत. खिल शब्दाचा अर्थ परिशिष्ट किंवा पाठीमागून जोडलेले मंत्र असा आहे.

ऋग्वेदाची इतकी तपशीलवार व पद्धतशीर गणना करून ठेवल्यामुळेच इतक्या दीर्घ कालानंतरहि हा ग्रंथ पूर्वी ज्या स्वरूपांत होता, त्याच स्वरूपांत यत्किंचितहि बदल न होतां आज आपल्याला उपलब्ध झाला आहे.

ऋग्वेदाच्या दहाहि मंडलांचें संकलन व विभाजन एकाच व्यक्तीने केलें आहे, अशी परंपरागत समजूत आहे. दहाहि मंडलांच्या ऋषींविषयीं कात्यायनाने आपल्या सर्वानुक्रमणींत पुढील पंक्ति लिहिली आहे –

शर्तार्चिन आद्ये मण्डलेऽन्ते क्षुद्रसूक्तमहासूक्ता मध्यमेषु माध्यमाः।

अर्थ– ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलाच्या ऋषींना शंभर ऋचा रचणारे, शेवटच्या मंडलांतील ऋषींना क्षुद्रसूक्तें व महासूक्तें रचणारे व मधल्या मंडलांतील ऋषींना माध्यम अशी संज्ञा आहे.

पहिल्या मंडलांतील ऋषींना 'शर्तार्चिनः' म्हणण्याचें कारण

सर्वानुक्रमणीचा टीकाकार षड्गुरुशिष्य असें देतो, की मंडलांतील पहिला ऋषि विश्वामित्रपुत्र मधुच्छन्दा याने शंभरांपेक्षा जास्त ऋचा रचल्या. त्यामुळे छत्रिन्यायाने त्या मंडलाच्या सर्व ऋषींना हें अभिधान मिळालें आहे. त्याचप्रमाणे दहाव्या मंडलांतील नासदीय सूक्ताच्या (१०. १२९) आधीच्या व नंतरच्या सूक्तांना अनुक्रमें महासूक्त व क्षुद्रसूक्त अशीं नांवें आहेत, असेंहि षड्गुरुशिष्य सांगतो. दोन ते नऊ हीं मंडलें ऋक्संहितेच्या मध्यवर्ती असल्याकारणाने त्यांच्या ऋषींना माध्यम हें नांव मिळालें आहे.

प्रारंभीं वेद हा राशिरूप होता. व्यासांनी त्याचे चार विभाग केले आणि आपल्या चार शिष्यांना पृथक् पृथक् शिकविले किंवा वांटून दिले. म्हणून व्यासांना 'वेदान् विव्यास' = वेदांचे विभाजन करणारे, या अर्थी वेदव्यास म्हणूं लागले. याच व्यासांनी आपल्या पैल नामक शिष्याला ऋग्वेद पढविला. पैलाने त्याच्या दोन शाखा केल्या. त्यांपैकी एक बाष्कलाला व दुसरी इंद्रप्रमतीला शिकविली. इंद्रप्रमतीची संहिता माण्डूकेयाला मिळाली आणि त्याच्याकडून ती क्रमाने सत्यश्रवा, सत्यहित व सत्यश्रिय यांना मिळाली, असें भागवत, ब्रह्मांड इ. पुराणांत सांगितलें आहे.

या भिन्न भिन्न ऋषींच्या द्वारें पुढे ऋग्वेदाच्या अनेक शाखा झाल्या. पतंजलीने आपल्या व्याकरण महाभाष्याच्या पस्पशाह्निकांत 'एकविंशतिधा बाह्वृच्यम्' = ऋग्वेदाच्या एकवीस शाखा असल्याचें लिहिलें आहे. त्यांपैकी शाकल, बाष्कल, आश्वलायन, शांखायन व मांडूकायन या ऋग्वेदाच्या शाखा प्रसिद्ध आहेत. शाकल शाखा पांच प्रकारच्या होत्या ––

(१) **मुद्गल शाखा** –– या शाखेची संहिता, ब्राह्मण वा सूत्रें उपलब्ध नाहीत. प्रपंचहृदय नामक ग्रंथाच्या लेखनकालापर्यंत ही शाखा अस्तित्वांत होती. कारण त्या ग्रंथांत या शाखेचा उल्लेख आहे. महाभारत किंवा पुराणें यांच्या मतें मुद्गल हे आंगिरस गोत्राचे होते.

(२) **गालव शाखा** –– या शाखेची संहिता, ब्राह्मण किंवा सूत्र उपलब्ध नाही. गालव हा पंचाल देशाचा रहिवासी असून त्याचें दुसरें नांव बाभ्रव्य असें होतें. याने ऋग्वेदाचा क्रमपाठ बनविला होता. ऋक्प्रातिशाख्य, निरुक्त, बृहद्देवता व अष्टाध्यायी या ग्रंथांत याचा उल्लेख आला आहे.

(३) **शालीय शाखा** –– या शाखेची संहिता, ब्राह्मण किंवा सूत्र कांहीच उपलब्ध नाही. काशिकावृत्तींत अन्य शाखाकार ऋषींसमवेत याचाहि उल्लेख आहे.

(४) **वात्स्य शाखा** –– महाभाष्यांत या शाखेचा उल्लेख आहे (४. २. १०४).

(५) **शैशिरि शाखा** –– या शाखेचा उल्लेख अनुवाकानुक्रमणींत आहे.

या पांच शाकल शाखांचें मूळ अशी शाकल्य, शाकलक किंवा शाकलेयक ही संहिता होती. वैदिक संप्रदायांत या संहितेबद्दल मोठा आदर आहे.

बाष्कलशाखा चार प्रकारच्या होत्या त्या पुढीलप्रमाणे आहेत ––

(१) **बौध्य शाखा** –– संहिता–ब्राह्मणादि उपलब्ध नाही. बौध्य हा आंगिरस गोत्राचा होता. 'कपिबोधादाङ्गिरसे' = आंगिरस गोत्राच्या बोधाचा पुत्र बौध्य होय (अष्टा. ४. १.१०७). बृहद्देवतेंत याचें नांव आहे.

(२) **अग्निमाठर शाखा** –– हिच्यासंबंधीं नांवापलिकडे जास्त माहिती मिळत नाही.

(३) **पराशर शाखा** –– अधिक माहिती नाही.

(४) **जातुकर्ण्य शाखा** –– अधिक माहिती नाही.

शाकल्यांप्रमाणेच बाष्कलांचीहि एक सर्वसामान्य संहिता असावी, असें अनुमान आहे. त्यांचें ब्राह्मणहि वेगळें होतें, असा शुक्लयजु:प्रतिज्ञासूत्राच्या अनन्तभाष्यांत उल्लेख आहे. बाष्कल शाखेच्या पाठांत शाकल शाखेच्या पाठापेक्षा आठ सूक्तें अधिक आहेत.

आश्वलायन शाखेचीं सांप्रत गृह्य व श्रौतसूत्रेंच फक्त उपलब्ध असून संहितादि इतर अंश मिळत नाहीत.

शांखायन शाखेचे ब्राह्मण, आरण्यक व कल्पसूत्र हे ग्रंथ उपलब्ध आहेत. शांखायनांची स्वतंत्र संहिता असावी, असा तर्क आहे. शांखायन शाखेचे शांखायन, कौषीतकि, महाकौषीतकि व शांबव्य असे चार भेद आहेत, असें भगवद्दत्त सांगतात.

मांडूकायन शाखेचे अनेक ग्रंथ पूर्वी उपलब्ध होते; पण आज त्यांपैकी एकहि मिळत नाही.

भगवद्दत्तांनी ऋग्वेदाच्या आणखीहि अनेक शाखा दिल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे –– (१) बह्वृच (२) पैङ्ग्य (३) औद्दालकि = गोतम = आरुण (४) शैलालक (५) शतबलाक्ष (६) गज = हास्तिक (७) बाष्कलि भारद्वाज (८) ऐतरेय महैतरेय (९) वासिष्ठ (१०) सुलभ (११) शौनक.

व्याकरण महाभाष्यांत ऋग्वेदाच्या एकूण एकवीस शाखा असल्याचें सांगितलें आहे; पण मोजदाद केल्याअंतीं या सर्व शाखा सत्तावीस भरतात. तेव्हा यांतील सहा शाखांचा अंतर्भाव दुसऱ्या कोणत्या तरी नांवाखाली झाला असला पाहिजे. अणुभाष्यांत स्कंद पुराणांतील कांही ओळी उद्धृत केल्या असून तदनुसार ऋग्वेदाच्या चौवीस शाखा आहेत, असें म्हटलें आहे.

ऋग्वेदांत मुख्यत: यज्ञांतील देवतांची स्तुति, वर्णन किंवा

प्रार्थना केलेली आहे. त्याचबरोबर त्यांत मानवी जीवनाला उपकारक अशा सुंदर व तेजस्वी प्रार्थनाहि आल्या असून मधून मधून आर्यांचे तत्त्वज्ञानविषयक विचारहि ग्रथित केलेले आहेत. कांही सूक्तांत निसर्गाचें रम्य वर्णन आलें आहे. सूक्तांचें सामान्यतः पुढीलप्रमाणे वर्गीकरण करतात --

(१) देवतासूक्तें (२) ध्रुवपदसूक्तें (३) कथासूक्तें (४) संवादसूक्तें (५) दानस्तुतिसूक्तें (६) तत्त्वज्ञानसूक्तें (७) संस्कारसूक्तें (८) मांत्रिकसूक्तें (९) लौकिकसूक्तें व (१०) आप्रीसूक्तें.

देवतासूक्तें -- ऋग्वेदांतील इंद्र, अग्नि, वरुण, सूर्य, सविता, वायु, उषा, पूषा, आप, अश्विनौ, रुद्र, भग, विष्णु, मरुत्, विश्वेदेव, सरस्वती, वाक्, द्यावा-पृथिवी इ. देवतांचें रूप, स्वभाव व माहात्म्य या प्रकारच्या सूक्तांतून वर्णिलेलें असून त्यांचें स्तवन केलेलें आहे.

ध्रुवपदसूक्तें – मंत्राच्या शेवटीं कांही सूक्तांत ठराविक ध्रुवपद आढळतें. अशीं बरींच सूक्तें ऋग्वेदांत आहेत. त्यांपैकी कांही सूक्तांचीं ध्रुवपदें पुढे दिलीं आहेत–

मरुद्‌भिरग्न आ गहि। (ऋ. १.१९)
मरुत्वन्तं सख्याय हवामहे। (ऋ. १.१०१)
स जनास इन्द्रः। (ऋ. २.१२)
महद्देवानामसुरत्वमेकम्। (ऋ. ३.५५)
भद्रा इन्द्रस्य रातयः। (ऋ. ८.६२)

कथासूक्तें– ऋग्वेदाच्या कांही सूक्तांत बीजरूपाने कांही कथा आलेल्या असून पुढे ब्राह्मणग्रंथांत त्यांचा विस्तार झाला आहे. ऋ. १.२४ मध्ये उल्लेखिलेली शुनःशेपकथा ऐ. ब्राह्मणांत (५.१४) विस्तार पावली आहे; तर ऋ. १.१५४ या विष्णुसूक्तावरून शतपथब्राह्मणांतील वामनावताराच्या कथेने जन्म घेतला आहे. ऋग्वेदांत इतर कथावस्तु पुढीलप्रमाणे दिसतात– गोतमकथा (१.८५) वामदेवकथा (१.२६,२७) श्यावाश्वकथा (५.६१) सप्तवध्रीची कथा (५.७८) दाशराज्ञयुद्धकथा (७.१८,३३) नमुचिवधकथा (८.१४) नाभानेदिष्ठकथा (१०.६१) इत्यादि. यांपैकी कांहीचीं कथासूत्रें अगदी त्रोटक आहेत.

संवादसूक्तें – ऋग्वेदांतील दार्शनिक सूक्तांचा ज्याप्रमाणे उपनिषदांतील तात्त्विक विवेचनाशीं संबंध जोडतात, त्याप्रमाणे कांही सूक्तांचा प्रबंध, काव्य व नाटकें यांच्याशीं संबंध मानतात. अशा सूक्तांना संवादसूक्तें असें नांव आहे. ऋग्वेदांत अशीं वीस संवादसूक्तें आहेत. या सूक्तांच्या स्वरूपाविषयीं विद्वानांत बरेच मतभेद आहेत. प्रो. ओल्डेनबर्गच्या मतें संवादसूक्तांतलीं आख्यानें प्रथम गद्यपद्यात्मक होतीं. त्यांतला पद्यमय भाग गद्याहून अधिक सरस होता. त्यामुळे कालांतराने त्यांतला कथात्मक गद्यभाग गळला आणि पद्यभाग तेवढा शिल्लक राहिला. हीं संवादसूक्तें म्हणजे प्राचीन आख्यानांचाच अवशिष्ट भाग होय, असें ते म्हणतात. याच्या उलट प्रो. सिल्वाँ लेव्ही, प्रो. श्रोडर, प्रो. हर्टेल इ. विद्वानांचें मत आहे. ते म्हणतात, की हीं सूक्तें म्हणजे प्राचीन नाटकांचे अवशिष्ट भाग आहेत. त्यांना संगीत आणि पात्रयोजना यांची जोड देऊन यज्ञाच्या वेळीं त्यांचा साभिनय प्रयोग होत असे. प्रो. विंटरनिट्झ यांच्या मतें संवादसूक्तें हीं प्राचीन लोकगीतांचे नमुने आहेत. या संवादसूक्तांत कथात्मक व रूपकात्मक अशा दोन्ही भागांचें मिश्रण आहे. त्यामुळे पुढील काळांत या सूक्तांपासून एका बाजूने महाकाव्य व दुसऱ्या बाजूने नाटक यांचा उदय झाला. भारतीय साहित्यांत या दृष्टीने या सूक्तांचें विशेष महत्त्व आहे.

सगळ्या संवादसूक्तांत पुरूरवा-उर्वशी संवाद (ऋ.१०.९५) यम–यमीसंवाद (ऋ. १०.१०) व सरमा–पणीसंवाद (ऋ. १०.१०८) हीं तीन सूक्तें विशेष महत्त्वाचीं आहेत. पुरूरवा व उर्वशी यांची कथा म्हणजे स्त्री–पुरुषांच्या प्रेमाचा प्राचीन नमुना होय. स्वर्गींची अप्सरा उर्वशी ही भूतलावरचा मानव राजा पुरूरवा याचा कांही अटींवर पति म्हणून स्वीकार करते; पण पुढे त्याने त्यांतली एक अट मोडली, असें पाहून त्याचा त्याग करते आणि स्वर्गांत निघून जाते. या सूक्तांत अठरा मंत्र असून त्यांपैकी कांही उर्वशीच्या तर कांही पुरूरव्याच्या तोंडीं घातलेले आहेत.

यम–यमी संवादांत स्त्रीपुरुषांच्या अनिर्बंध लैंगिक व्यवहाराविषयीं मानवी अंतःकरणांत उद्‌भवलेली संयमात्मक नीतिभावना स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेली दिसते. इथे यमी आपल्या भावाला म्हणजे यमाला आपल्याशीं रतिसुखासाठी एकान्त करण्याबद्दल परोपरीने विनविते. पण यम संयमपूर्वक तिच्या त्या याचनेचा तितक्याच तीव्रतेने निषेध करतो. या सूक्तांत यमाला वश करण्यासाठी यमीने केलेला युक्तिवाद ठसकेबाज असून कामविह्वळ स्त्रीहृदयाची त्यावरून चांगली कल्पना येते. पुरुषाच्या अंतःकरणांत विवेक जागृत झाला म्हणजे तो कसा संयमी बनतो, त्याचें यम हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

तिसरें संवादसूक्त ऋग्वेदकाळांतील समाजस्थितीचें निदर्शक आहे. पणि लोकांनी आर्यांच्या गायी पळवून नेल्या होत्या व त्यांना अंधाऱ्या गुंफांत लपवून ठेवलें होतें. त्या परत मिळविण्यासाठी इंद्र आपली कुत्री सरमा हिला पणींकडे दूती म्हणून पाठवितो. ती पणींकडे जाऊन इंद्राच्या व इतर आर्यांच्या पराक्रमाची स्तुति करते व पणींना दमदाटी देऊन त्यांच्या-

कडून गायी परत मागते. सरमेची निर्भयता, तिचा स्पष्टवक्तेपणा व आपल्या स्वामीबद्दलची तिची निष्ठा या गोष्टी यांत चांगल्या प्रकारें व्यक्त झाल्या आहेत.

दानस्तुतिसूक्तें – ऋग्वेदांतील कांही सूक्तांना दानस्तुति असें नांव आहे. या सूक्तांत निरनिराळ्या राजांनी ऋषींना अश्व, गायी, बैल, धन इ. वस्तूंचीं जीं दानें दिलीं, त्यांबद्दल ऋषींनी त्या दानकर्त्या राजांची स्तुति केलेली आहे. कात्यायनाच्या ऋक्सर्वानुक्रमणींत दानस्तुतिविषयक २२ सूक्तांचा उल्लेख आहे ; परंतु आधुनिक विद्वानांच्या मतें तीं ६८ आहेत.

ऋग्वेदाच्या १० व्या मंडलांतील ११७ व्या सूक्तांत दानमाहात्म्याचें ओजस्वी वर्णन आहे, तें असें–

मोघमन्नं विन्दते अप्रचेताः । सत्यं ब्रवीमि वध इत् स तस्य ।
नार्यमणं पुष्यति नो सखायं । केवलाघो भवति केवलादी ।।

अर्थ–त्या मूर्खानें व्यर्थ अन्न मिळविण्याचे श्रम घेतले. मी खरेंच सांगतों, की (त्याने मिळविलेलें अन्न नसून) तो त्याचा प्रत्यक्ष मृत्युच आहे. कारण (याचकरूपाने येणाऱ्या) अर्यमादिकांना जो अन्नदान करून संतुष्ट करीत नाही व मित्रांनाहि प्रसन्न ठेवीत नाही आणि जो एकटाच खात बसतो, तो महापातकी होय.

तत्त्वज्ञानसूक्तें – उत्तरकालीन उपनिषदांत व्यक्त झालेलीं सुंदर तत्त्वें बीजरूपाने प्रथम ऋग्वेदांत आढळतात. वैदिक ऋषींच्या तात्त्विक विचारांची प्रगति नानादैवतवादांतून 'एक देव' मानण्यापर्यंत झालेली दिसते. ऋग्वेदांत अनेक देवता असून त्यांचीं वेगवेगळीं स्तवनेंहि आहेत. त्यावरून वैदिक धर्म हा बहुदेवतावाद मानणारा आहे, अशी कांही विद्वानांची समजूत झालेली दिसते. ऋग्वेदांत बहुदेवतावाद आहे खरा; पण तो वाद म्हणजे वेदपूर्वपरंपरेंतला अवशेष होय. तो वाद ऋग्वेदांत हळूहळू मंदावत चाललेला दिसतो. वैदिक ऋषी कोणत्याहि मोठ्या देवाची स्तुति करतांना 'तो स्थावर-जंगमाचा नियंता व सर्वांचा ईश्वर आहे', असें म्हणतात. वस्तुतः हा बहुदेवतावाद नसून विभूतिवाद आहे. पण वैदिक ऋषींची धारणा 'एकं सत्' मानणारी असून, सर्व कांही ईश्वरमय आहे व सर्व एकाच सतांतून प्रकट झालें आहे, असा विचार ऋग्वेदांत अनेक जागीं आढळतो. या विषयींचा पुढील मंत्र प्रसिद्ध आहे–

इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो
दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् ।
एकं सद्विप्रा बहुधा वद–
न्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ।।
(ऋ. १. १६४,४६)

अर्थ– इंद्र, मित्र, वरुण, अग्नि अशा निरनिराळ्या नांवांनी संबोधिला जाणारा असा तो सुंदर पंखांचा एक दिव्य गरुड पक्षी आहे. हा वस्तुतः एकच असून, सूज्ञ लोक त्यालाच अग्नि, यम, मातरिश्वा, अशीं निरनिराळीं नांवें देतात.

यो देवेष्वधिदेव एक आसीत् ।
(ऋ. १०. १२१. ८)

अर्थ– जो सर्व देवांत एकटाच वरिष्ठ असा देव (देवाधिदेव) ठरला आहे.

यो देवानां नामधा एक एव ।
(ऋ. १०.८२-३)

अर्थ–तो ईश्वर सर्व देवांमध्ये एकच आहे.

हीं व अशा प्रकारचीं उदाहरणें हीं ऋग्वेदांतील 'एकं सत्' चीं निदर्शक ठरतात.

दहाव्या मंडलांतील नासदीय सूक्त, पुरुषसूक्त, हिरण्यगर्भसूक्त व वाक्सूक्त हीं सूक्तें दार्शनिक गंभीरता व प्रतिभायुक्त अनुभूति यांसाठी प्रसिद्ध आहेत. नासदीयसूक्त हें तर वैदिक ऋषींच्या अलौकिक चिंतनाचा प्रत्यय आणून देणारें आहे. या सूक्तांत सृष्टयुत्पत्तीच्या आधीच्या अवस्थेचें वर्णन आहे–

'त्या वेळीं सत् नव्हतें आणि असत्हि नव्हतें. धूळ नव्हती आणि आकाशहि नव्हतें. रात्र नव्हती किंवा दिवसहि नव्हता. सर्व तमोमय होतें, सर्व जलमय होतें. मग सर्वप्रथम तिथे काम उत्पन्न झाला. संकल्पाच्या साहाय्याने तो आपली अभिव्यक्ति सृष्टीच्या निरनिराळ्या थरांत दाखवूं लागला ...'

या सर्व वर्णनाच्या मुळाशीं अद्वैताचें अनुसंधान दिसतें. हेंच या सूक्ताचें रहस्य होय. ऋग्वेदांतील दहाव्या मंडलांतील सूक्तांचें अनुशीलन केल्यास सकल सृष्टीच्या मुळाशीं किंवा सकलांचा नियामक असा कोणीतरी 'एको देवः' असला पाहिजे, ही कल्पना त्या काळापर्यंत दृढमूल झालेली दिसते. त्या एका देवाला त्यांनी कधी हिरण्यगर्भ, कधी पुरुष, तर कधी प्रजापति म्हणून संबोधिलेलें आहे.

संस्कारसूक्तें –– वेदमंत्रांचा विनियोग हा मुख्यत्वें श्रौत कर्मांच्या ठिकाणीं झालेला असला, तरी त्यांतलीं कांही सूक्तें व कांही मंत्र गृह्य संस्कारांतहि विनियुक्त केलेलीं आहेत. दहाव्या मंडलांतलें ८५ वें सूक्त सूर्यासूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांतले मंत्र विवाहसंस्कारांत घेतलेले आहेत. त्याप्रमाणे पुढील गृह्य संस्कारांत पुढील सूक्तें विनियुक्त केलीं जातात–स्नान व मार्जन (१०.९), श्राद्धप्रयोग (१०.१५), प्रेतकर्म (१०.१६ व १८), उपनयन (१०.१९ व ६२), गर्भाधान (१०.१८४) इत्यादि.

मांत्रिकसूक्तें–मानवी जीवनांत कोणावर कशी आणि केव्हा

आपत्ति येईल तें सांगतां येत नाही. या सगळ्याच आपत्तींचा लौकिक उपायांनी परिहार करतां येत नाही. अशा प्रसंगीं माणूस कोणत्या तरी अलौकिक उपायाचा अवलंब करतो. ऋग्वेदांतील कित्येक सूक्तांचा रोग, अपशकुन, दुःस्वप्नें, जारण-मारण, भूतबाधा, विषबाधा, राजयक्ष्मा इ. विविध आपत्तींचा परिहार करण्यासाठी विनियोग करतात. ऋग्विधान हा ग्रंथ, सूक्तांचा अशा प्रकारचा विनियोग व विधान हें सांगण्यासाठीच निर्माण झालेला आहे.

लौकिक सूक्तें – यासूक्तप्रकारांत द्यूतविषयक सूक्त (१०. ३४) मंडूकसूक्त (७.१०३) राजधर्मविषयक सूक्त (१०. १७३) इ. सूक्तें येतात.

आप्रीसूक्तें –– पशुयागांत या सूक्तांचा विनियोग करतात. या यागांत पशूच्या वपेचा याग होण्यापूर्वी प्रयाजनामक अकरा किंवा बारा देवतांना उद्देशून याग करायचा असतो. यांत प्रत्येक देवतेसंबंधीं स्तावक भाग पठण करण्याबद्दल मैत्रावरुण प्रैष देतो व होता याज्यारूप कांही ऋचा म्हणतो. अशा अकरा अथवा बारा ऋचांच्या सूक्ताला आप्रीसूक्त अशी संज्ञा आहे.

ऋग्वेदांत एकूण दहा आप्रीसूक्तें आहेत. त्यांपैकी पहिल्या मंडलांत तीन असून दहाव्या मंडलांत दोन आहेत. चौथ्या, सहाव्या व आठव्या मंडलांत मात्र आप्रीसूक्त नाही. ज्या गोत्रांना आप्रीसूक्त नाही, त्यांनी जमदग्नीचें आप्रीसूक्त पठण करायचें, असा संकेत आहे. या सर्व सूक्तांतील वर्ण्य विषय, देवता वगैरे समान आहेत. आप्रीसूक्तांचा संबंध भिन्न भिन्न गोत्रांशीं असल्यामुळे तीं अनेक झालीं आहेत. जेव्हा ऋग्वेदाची संहिता बनविण्यांत आली, तेव्हा सूक्तद्रष्टया ऋषींनी पूर्वीच्या आप्रीसूक्तांत अल्पस्वल्प बदल करून तें आपापल्या मंडलांत समाविष्ट केलें. नंतरच्या वैदिक यागांत त्यांचा 'प्रयाज-याज्या' म्हणून उपयोग होऊं लागला.

आप्रीसूक्तांची रचना कृत्रिम असून त्यांतील ऋचांत क्रमाने (१) इध्म, सुसमिद्ध किंवा समिधान (अग्नि) (२) तनूनपात् किंवा नराशंस (३) ईळ (४) बर्हिस् (५) देवीः द्वारः (६) उषासानक्तौ (७) दैव्यौ होतारौ किंवा प्रचेतसौ (८) सरस्वती, भारती, इळा (९) त्वष्टा (१०) वनस्पति (यूप) (११) स्वाहाकृति किंवा विश्वेदेव या देवतांचें वर्णन आहे. या सूक्तांतील दुसऱ्या ऋचेंत जी देवता वर्णिली असेल, त्या अनुरोधाने आप्रीसूक्तांचे नराशंस व तनूनपात् असे दोन भेद पडलेले आहेत. विश्वामित्र, अगस्त्य, कश्यप, जमदग्नि या गोत्रांच्या आप्रीसूक्तांत तनूनपात् देवतेचाच उल्लेख आहे; तर काण्व व आंगिरस गोत्रांच्या आप्रीसूक्तांत दोन्ही देवतांचा निर्देश आहे.

वैदिक मंत्रांची संहिता तयार झाल्यावर निरनिराळ्या ऋषींचीं निरनिराळीं मंडलें बनलीं. त्यावरून पुढे मंडलऋषींत वैमनस्यहि निर्माण झालें आणि तें वैमनस्य नष्ट व्हावें म्हणून आप्रीसूक्तांचा बहुतेक मंडलांत समावेश केला गेला. आप्री शब्द आ + प्री = खुष करणें, संतुष्ट करणें या धातूपासून बनलेला आहे. विश्वामित्र व वसिष्ठ या दोन ऋषींचें आपसांत वैर असलें, तरी त्या दोघांच्या मंडलांतील आप्रीसूक्त मात्र जवळ-जवळ सारखेंच आहे. आप्रीसूक्तांचा जर हा हेतु नसता, तर या सूक्तांचें स्वरूप आहे त्यापेक्षा अगदी वेगळें झालें असतें.

ऋग्वेदांत जशीं आप्रीसूक्तें आहेत, तसाच पारश्यांच्या अवेस्ता ग्रंथांत 'आफ्रिगन्' नामक मंत्रसमूह आहे. त्या दोन्ही ठिकाणीं अग्नि हीच देवता आहे. सुरवातीला आप्रीसूक्तें व 'आफ्रिगन्' यांचा कांहीतरी संबंध होता, असें दिसतें. पण पुढे तो टिकला नाही.

ऋग्वेदांतील देवता – 'यस्य वाक्यं स ऋषिः या तेनोच्यते सा देवता' = ज्याचें वाक्य तो ऋषि व त्या ऋषीने सांगितली ती देवता' असा नियम आहे. अशा ऋषिप्रोक्त देवता ऋग्वेदांत बहुसंख्य आहेत. त्यांची संख्या ३३ व ३३,३९ एवढी सांगितली असली, तरी तितक्या देवतांचीं नांवें ऋग्वेदांत सांपडत नाहीत. त्यांतल्या अनेक देवता सांप्रतच्या प्रचलित देवतांहून भिन्न आहेत. या सर्व देवतांची यादी पुढे दिली आहे. या यादींत मंत्रोक्त देवता तर घेतल्या आहेतच; शिवाय यास्क, सायण इ. वेदवेत्त्या पंडितांनी ज्यांना देवता ही पदवी दिली, त्यांचाहि समावेश केला आहे —

अंश	अकूपार
अक्ष	अग्नायी
अग्नि	अग्नीपर्जन्यौ
अग्नीषोमौ	अघ्न्या
अंगिरसः	अजएकपाद्
अथर्वा	अथर्वाणः
अदिति	अनुमति
अपांनपात्	अप्सरस्
अभीशु	अरण्यानी
अरमति	अरु
अर्धदेव	अर्यमा
अश्वाजनि	अश्विनी
अश्विनौ	असु
असुनीति	अहना
अहि	अहिर्बुध्न्य
आदितेयम्	आदित्य

आदित्यः	आपः	धनुः	धाता
आर्त्नी	इन्दु	धेनु	नक्तोषासा
इन्द्र	इन्द्र-नासत्या	नराशंसः	नासत्यौ
इन्द्रपत्नी	इन्द्र-वायू	निर्ऋति	निष्टिग्री
इन्द्रा-कुत्सा	इन्द्राग्नी	पक्ष्या	पणि
इन्द्राणी	इन्द्रा-पर्वता	पतंग	पथ्या
इन्द्रा-पूषणा	इन्द्रा-बृहस्पती	पर्जन्य	पर्वत
इन्द्रा-ब्रह्मणस्पती	इन्द्रा-मरुतः	पितरः	पितु
इन्द्रा-वरुणौ	इन्द्रा-विष्णू	पिशाचि	पुरंधी
इन्द्रा-सोमौ	इषु	पुरुष	पुरूरवस्
इषुधि	इळा	पूषन्	पृथिवी
उर्वशी	उलूखल	पृथिवी-द्यावा	पृश्नि
उलूखल-मुसल	उषा	प्रजापति	बर्हिस्
उषासा-नक्ता	ऊर्जानी	बृसय	बृहस्पति
ऋत	ऋतु	बृहद्दिवा	ब्रह्मणस्पति
ऋभवः	ऋभुक्षाः	ब्राह्मणासः	भग
ऋक्षः	ओषधि	भानु	भारती
क	कृत्या	भृगवः	मंडूक-की
कृशानु	केशी	मनः	मनु
क्रंदनु	क्रंदसी	मन्यु	मरुत्
क्षेत्रस्य पति	गंधर्व	मातरिश्वन्	मित्र
गांधर्वी	गुंगू	मित्रा-वरुण	मृत्यु
गौः	गौरी	यम	यमी
ग्नाः	ग्नास्पति	यातुधान	यातुमावान्
ग्रावा	ग्राहि	रक्षस्	राका
चन्द्रमा	चमू	राट्	रात्री
चरण्यु	जातवेद	रुद्र	रुद्रिय
ज्या	ज्येष्ठा	रोदसी	वनस्पति
तनूनपात्	तार्क्ष्य	वरुण	वरुणानी
त्रित	त्र्यम्बक	वर्मन्	वसर्हा
त्वष्टा	त्वाष्ट्र	वसु	वसोष्पति
दक्ष	दक्षिणा	वाक्	वाज
दधिक्रावा	दध्यङ	वाजिनः	वात
दानव	दानु	वाता-पर्जन्या	वायु
दुंदुभि	देव	वास्तोष्पति	विधाता
देवजन	देवपत्नी	विपाट्-शुतुद्री	विभावरी
दैव्या-होतारा	द्यावा	विभ्वन्	विवस्वान्
द्यावा-क्षामा	द्यावा-पृथिवी	विश्वकर्मन्	विश्वावसु
द्यावा-भूमी	द्रविणोदाः	विश्वेदेव	विष्णु
द्रुघण	द्वारः	वषभ	वृषाकपायि

वृषाकपि	वेन
वैवस्वत	वैश्वानर
व्रा	शंयु
शकुनि	शक्र
शची	शचीपति
शमीनहुषी	शुनासीर
श्येन	श्रद्धा
सपत्नी	समुद्र
सरण्यू	सरमा
सरस्वान्	सरस्वती
सलिल	ससर्परी
सविता	साध्याः
सिचौ	सिनीवाली
सिंधु	सुपर्ण
सुम्नेआपि	सुसमिद्ध
सुसारथि	सूर
सूर्य	सूर्या
सूर्या-चन्द्रमसौ	सूर्या-मासा
सूर्या-वसू	सोम
सोमा-पूषणौ	सोमा-रुद्रौ
सोम्यासः	स्वस्ति
स्वाहाकृति	हिरण्यगर्भ

देवतांचे पृथिवीस्थ, मध्यस्थ व द्युस्थ असे तीन प्रकार मानले आहेत. ते पुढीलप्रमाणे –

पृथिवीस्थ – शकुनि, द्रुघण, रात्रि, हविर्धाने, शुनासीरौ व शुन.

मध्यस्थ – अग्नि, क, तार्क्ष्य, वात, ऋत, अहिर्बुध्न्य, विधाता, रुद्र, आंगिरस, अनुमति, सरस्वती, स्वस्ति, पथ्या, इळा व उर्वशी.

द्युस्थ – सविता, सरण्यू, वृषाकपायि, वृषाकपि, समुद्र व दध्यङ्.

देवतांच्या द्विविध रूपाचें वर्णन ऋग्वेदांत आढळतें. पहिलें रूप दृश्य व स्थूल असून दुसरें सूक्ष्म व गूढ आहे. देवतांचें नेत्र-गोचर होणारें रूप हें स्थूल अतएव आधिभौतिक होय. जें इंद्रियांच्या अतीत किंवा ज्ञानेंद्रियांना अगम्य असें गूढ रूप असतें, तें आधिदैविक समजावें. या व्यतिरिक्त कांही देवतांच्या तिसऱ्या आध्यात्मिक स्वरूपाचाहि ऋग्वेदांत आढळ होतो. उदाहरणार्थ विष्णु हा सूर्यरूपांत प्रत्यक्ष होतो. सूक्ष्म रूपांत तो विश्वाचें मापन करतो व अंतरिक्षाला स्थिर करतो. पण या दोहोंहून आगळें असें त्याचें आध्यात्मिक 'परम पद' आहे. तिथे त्याचे भक्त आनंदानुभव घेतात. त्या स्थानांत जें मधुचक्र आहे, जो अमृतकूप आहे, त्यासह तें परम पद जागरणशील ज्ञानी पुरुषांना ज्ञात होतें (ऋ. १. १५४. १–२; १. २२. २१).

देवतायुग्में – ऋग्वेदांत कांही देवतायुग्में (जोड देवता) आढळतात. उदा० अग्नी-षोम (ऋ. ४.२.७२), अग्नी-वरुण (६. २. २७), द्यावा-पृथिवी (४. २. ३३), शुना-सीर (४. २. ३१) इत्यादि. दोन स्वतंत्र देवतांची एक जोड देवता कल्पून तिची स्तुति करणें, हा वैदिक उपासनेंतला एक विशेष आहे. अशा सुमारें १२ जोड देवता ऋग्वेदांत आल्या असून सुमारें ६० सूक्तें त्यांच्या स्तुतिपर आहेत.

या जोड देवतांची कल्पना मुळांत द्यावा–पृथिवी या जोडी-वरून निघाली असावी. द्यावा-पृथिवींच्या जोडीची कल्पना वेदपूर्वकालीन असण्याचा संभव आहे. ही कल्पना जगांतल्या बहुतेक प्राचीन समाजांत आढळते. प्राचीन विचारवंतांनाहि सृष्टिरचनेंत पृथ्वी व आकाश ही दोन महाभूतें एकमेकांना कायमचीं जोडलीं गेलीं आहेत, असें वाटलें व त्यांनी या जोड-देवतेची कल्पना प्रसृत केली. ही जोडी दुग्ध व मधु देणारी, अमृत वर्षिणारी व महाविशाल आहे, असें तिचें वर्णन आहे (ऋ. ६.७०.१; १.१५९.२).

द्यावा-पृथिवीच्या खालोखाल मित्रा-वरुणाचा क्रमांक लागतो. ही जोडदेवता पर्शुभारतीय काळांतली आहे. अवेस्त्यां-तहि अहुर व मिथ्र अशी तत्सम जोडी आढळते.

इंद्रा-वरुण हे विश्वसम्राट् आहेत (ऋ. १. १७. १). त्यांनी सर्व जलप्रवाह मोकळे केले व सूर्याला आकाशमार्ग आक्रमि-ण्यास लावलें. तिसरी जोडी इंद्राग्नींची. यांची मैत्री दृढ दिसते. कारण या जोडीच्या वर्णनपर असलेलीं सूक्तें सर्वांत अधिक आहेत. सोमपान करण्यांत हीच जोडी अधिक पटाईत आहे. इंद्रा-विष्णू या जोडीला मदपती म्हटलें असून तिला मुख्यतः सोमपानार्थ पाचारण केलेलें आहे (ऋ. ६. ६९. ३).

वैदिक देवतायुग्मांच्या नमुन्यावर पुढे तांत्रिक व पौराणिक देवतांच्याहि जोड्या जुळविलेल्या दिसतात. 'देवता द्वन्द्वे च' (अष्टा. ६. ३. २६) असें पाणिनीचें सूत्र आहे. त्यावरच्या वृत्तींत अशा कांही वैदिक व वेदोत्तरकालीन देवतायुग्मांचीं नांवें दिलेलीं आहेत. उदा० ब्रह्म-प्रजापती, शिव-वैश्रवणौ, संकर्षण-वासुदेवौ इत्यादि. या देवता गृह्यसूत्रांच्या काळांत नव्याने मानल्या जाऊं लागल्या होत्या.

वैदिक आर्य या देवातांना प्रसन्न करण्यासाठी त्यांच्या उद्देशाने अग्नींत हवन करीत किंवा त्यांना सोमरस समर्पीत. वैदिक आर्यांची ही देवतोपासना सकाम होती. ते देवतांकडे विविध ऐहिक सुखोपभोग मागत अणि आपल्याला सर्वत्र

विजय मिळावा म्हणूनहि त्यांची प्रार्थना करीत. प्रार्थनाविषयक एक ऋचा पुढील प्रमाणे--

नृवद्वसो सदमिद्धेह्यस्मे
भूरि तोकाय तनयाय पश्वः ।
पूर्वीरिषो बृहतीरारेअघा
अस्मे भद्रा सौश्रवसानि सन्तु ।।

(ऋ. ६.१.१२)

अर्थ– हे वसु, आम्हांला मनुष्यांसह धन दे. आमच्या-पुत्रपौत्रांना पुष्कळ पशु दे. पूर्वी ज्याची इच्छा केली, तें पुष्कळ धन (व) कल्याणकारक यश आम्हाला दे.

याशिवाय वैदिक ऋषींनी आपणांस शंभर वर्षे आयुष्य देण्याबद्दल, तसेंच राक्षस व शत्रू यांच्या नाशाबद्दलहि जागोजाग प्रार्थिलें आहे.

वैदिक ऋषी– 'यस्य वाक्यं स ऋषिः' = ज्याचें वाक्य म्हणजे मंत्र, तो ऋषि होय, अशी यास्काने त्याची निरुक्ति दिली आहे. या निरुक्तीप्रमाणे इन्द्र, अग्नि, इ. देवतांकडेहि ऋषित्व जातें. पण देवतांना ऋषि म्हणत नाहीत. शौनकोक्त सर्वानुक्रमणीमध्ये प्रत्येक सूक्ताचा वा ऋचेचा ऋषि कोण, तें सांगितिलें आहे. उदा० 'गायत्र्या विश्वामित्रः सविता गायत्री' = यांत गायत्रीमंत्राचा ऋषि विश्वामित्र असें सांगितलें आहे. 'ऋषयो मन्त्रद्रष्टारो वसिष्ठादयः' = मंत्रद्रष्टे वसिष्ठादि हे ऋषी होत, अशी दुसरी व्याख्या आहे. वेदमंत्रांबदल अशी समजूत आहे, की मंत्र हे अपौरुषेय असून ते ईश्वराचीं निश्वःसितें आहेत. म्हणूनच ऋषी हे मंत्रकर्ते नसून मंत्रद्रष्टे आहेत. ते ते मंत्र त्या त्या ऋषींना दैवी प्रेरणेने दिसले.

देव, ब्राह्मण व राजे यांपैकी जे ऋषि असतील, त्यांना देवर्षि, ब्रह्मर्षि, राजर्षि, असें म्हटलें आहे. महर्षि व कांडर्षि असे आणखी दोन भेद केलेले दिसतात. महर्षि म्हणजे ऋग्वेदाच्या दोन ते सात या मंडलांचे द्रष्टे गृत्समद, विश्वामित्रादि व काश्यप हे असावे. तैत्तिरीय संहितेची पांच कांडें असून त्यांच्या द्रष्टयांना कांडर्षि म्हटलें आहे. प्रजापति, सोम, अग्नि, विश्वेदेव व स्वायंभुव अशीं त्यांचीं नांवें आहेत. ज्यांना मंत्र प्रादुर्भूत झाले, अशा ऋषींचे चार प्रकार चरकाच्या सूत्रस्थानांतील १. ७ च्या व्याख्येंत हरिश्चंद्राने सांगितले आहेत—

मुनीनां चतुर्विधो भेदः
ऋषयः ऋषिकाः ऋषिपुत्राः महर्षयश्च ।

ऋग्वेदांतील मंत्रद्रष्टया ऋषींची संख्या साडेतीनशेच्या वर जाते. या सर्वांत अंगिरा, रहूगण व कुशिक हे प्राचीन मानलेले आहेत. मात्र त्यांचा एखाददुसराच मंत्र उपलब्ध होतो. त्यानंतरच्या मंत्रद्रष्टयांपैकी भरद्वाज, कश्यप, गोतम, अत्रि, विश्वामित्र, जमदग्नि व वसिष्ठ हे श्रेष्ठ ऋषि होत. मंडलक्रमाप्रमाणे पाहिल्यास गृत्समद (मं. २), विश्वामित्र (मं. ३), वामदेव (मं. ४), अत्रि (मं. ५), भरद्वाज (मं. ६), वसिष्ठ (मं. ७) व कण्व (मं. ८) हे ऋषि प्रमुख ठरतात. मंत्ररचनेच्या दृष्टीने विचार केल्यास वसिष्ठाचीं सूक्तें सर्वांत अधिक म्हणजे १०३ आहेत. त्यानंतर ऋषी व सूक्तें यांचा क्रम पुढीलप्रमाणे लागतो– भरद्वाज ६०, वामदेव ५५, विश्वामित्र ४८, गृत्समद ४०, कक्षीवान् २७, अगस्त्य २६, दीर्घतमा २५, गोतम २०, मेधातिथि २०, श्यावाश्व १५, कुत्स १४, मधुच्छंदा १०, प्रस्कण्व ९, पराशर ५, जमदग्नी ५, कवष ४, बृहस्पती २, हर्यत, अपाला, अष्टक, कुशिक व सुदास प्रत्येकी १.

ऋग्वेदांतील छंद – समस्त ऋग्वेद छंदोबद्ध आहे. त्यांतले मंत्र कोणत्यातरी वृत्तांत रचलेले असतात आणि त्यांना पाद असतात. विशिष्ट वैदिक अनुष्ठानें विशिष्ट छंदांतल्या मंत्रांनीच करायचीं असतात. उदा० अग्नीचें आधान ब्राह्मणांनी गायत्री छंदाने, राजन्यांनी त्रिष्टुभ् छंदाने व वैश्याने जगती छंदाने करावें, असें तैत्तिरीय ब्राह्मणांत आदेशिलें आहे. ऋग्वेदांतले पुढील सात छंद प्रमुख आहेत – गायत्री, उष्णिक्, अनुष्टुभ्, बृहती, पंक्ति, त्रिष्टुभ् व जगती.

'सप्तच्छंदांसि चतुरुत्तराणि विराडष्टमानि' हें छंदःशास्त्राचें प्राचीन आणि महत्त्वाचें सूत्ररूपी विधान होय. वर दिलेले सात छंद अक्षरसंख्येवर अवलंबून असून प्रत्येक छंद आपल्या मागील छंदापेक्षा चार अक्षरांनी जास्त मोठा असतो, असा हा नियम आहे. आठवा छंद विराट्. यांतील अक्षरसंख्या ठरलेली नाही. त्यांत कधी एका चरणांत दहा अक्षरें असतात, तर कधी कधी त्यांची संख्या ३०, ३३, ४० अक्षरांपर्यंत जाते. ऋग्वेदांत सर्वांत अधिक उपयोजिलेला छंद त्रिष्टुभ् हा आहे. पद्यबद्ध रचनेला वाणी किंवा सूक्त असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणे गीतीला साम व स्तोत्राला स्तोम असें नांव दिलेलें आहे.

ऋग्वेदाच्या १०,४१४ मंत्रांच्या छंदांची विभागणी पुढीलप्रमाणे आहे –

(१) गायत्री	२,४६७
(२) उष्णिक्	३४१
(३) अनुष्टुभ्	८५५
(४) बृहती	१८१
(५) त्रिष्टुभ्	४,२५३
(६) पंक्ति	३१२
(७) जगती	१,३४८

(८)	अतिजगती	१७
(९)	शाक्वरी	१९
(१०)	अतिशाक्वरी	९
(११)	अष्टि	६
(१२)	अत्यष्टि	८४
(१३)	धृति	२
(१४)	अतिधृति	१
(१५)	एकपादछंद	६
(१६)	द्विपादछंद	१७
(१७)	प्रगाथबार्हत	१९४
(१८)	ककुभ्	५५
(१९)	महाबार्हत	२५७

ऋग्वेदरचनेचे देशकाल – आरण्यकें आणि उपनिषदें निर्माण होण्याच्या पूर्वी ऋग्वेदसंहिता अस्तित्वांत आली होती. वेद-निर्मितीच्या काळीं वेदांचें संग्रहाच्या रूपानें संहितीकरण झालेलें नव्हतें. ऋग्वेदाला आणि इतर वेदांना संहितेचें स्वरूप ब्राह्मण-कालांत प्राप्त झालें. साधारणपणे हा काल सनपूर्व सहाव्या शतकाच्या पूर्वीचा आहे, हें निश्चितपणे सांगतां येतें. ऋग्वेद-मंत्रांच्या रचनेचा काल सनपूर्व १२०० वर्षांच्या अलिकडे येतो, असें कोणीच संशोधक मानीत नाहीत. ऋग्वेदाचा सर्वांत प्राचीन काळ कोणता, यासंबंधी मात्र भारतीय व युरोपीय संशोधकांत मतभिन्नता आढळते. भारतीय संशोधकांचा कल सामान्यपणे ऋग्वेदाचा प्रारंभ जास्तींत जास्त मागे नेण्याकडे असतो. प्रो. याकोबी याने वेदांतल्या ज्योतिषविषयक उल्लेखां-वरून मंत्ररचनेचा काल सनपूर्व ४००० हा ठरविला आहे. लो. टिळकहि ज्योतिषाधिष्ठित संशोधनपद्धतीचा अवलंब करून ऋग्वेदाचा काळ सनपूर्व सहा ते चार हजार वर्षें हा ठरवितात.

एता (कृत्तिकाः) ह वै प्राच्यै दिशो न च्यवन्ते ।

(श. ब्रा. २. १. २. ३).

अर्थ – उदयकालीं कृत्तिकानक्षत्र पूर्वदिशेपासून ढळत नाही. या उल्लेखावरून श्री. शं. बा. दीक्षित यांनी ऋग्वेदाचा काल सनपूर्व अडीच हजार वर्षें हा ठरविला आहे. संपातबिंदु कृत्तिका नक्षत्रांत असण्याचा तो काळ होता. पण यासंबंधांत श्री. दप्तरी अधिक खुलासा करतात, तो असा – वेदकालीन ज्योतिष हें दूरदर्शक यंत्रावांचून साध्या डोळ्यांच्या साहाय्याने निश्चित केलें जात असे. साध्या डोळ्यांना कृत्तिका नक्षत्राचा थेट पूर्वेला होणारा उदय सनपूर्व तेराशें वर्षांच्या सुमारासच दिसूं शकेल, अतएव श. ब्रा. मधील उल्लेख त्याच्या मागे जाऊं शकत नाही. लो. टिळकांचें मत मुख्यतः ऋग्वेदांतील उषा-सूक्तांत वर्णिलेल्या आकाशस्थितीवरून बनलें आहे; पण ऋग्वेदाचा बराचसा भाग आर्य लोक पंजाबांत आल्यानंतर तयार झाला, असें त्यांचेंहि मत आहे. ऋग्वेदाचा प्रारंभ उत्तर-ध्रुवाच्या प्रदेशांत झाला असावा आणि पंजाबांत त्यांची वसति झाल्यानंतर ऋग्वेदाची मुख्य रचना झाली असावी, असें लो. टिळक अनुमान करतात. डॉ. अविनाशचंद्र दास यांनी ऋग्वे-दाचा काल सनपूर्व पंचवीस हजार वर्षांच्या मागे नेला आहे; पण अलिकडचे वेदाभ्यासी पाश्चात्य व कांही भारतीय पंडित ऋग्वेदाचा काल टिळकांनी निर्धारित केलेल्या कालाच्या अलिकडेच ठरवितात.

वैदिक काल अधिकाधिक मागे नेण्याची प्रवृत्ति ही इति-हासाची साखळी जुळविण्यास बाधक आहे. इतिहासांतले स्पष्ट व निश्चित कालखंड आधाराला घेऊन बाकीचीं ऐतिहासिक अनुमानें करणें युक्त असतें. ब्राह्मण ग्रंथांची भाषा सनपूर्व तिसऱ्या शतकांतील अशोकाच्या लेखांशीं व त्रिपिटकांतल्या भाषेशीं जुळणारी आहे. म्हणजे ब्राह्मणग्रंथांचा काल बुद्ध-पूर्व चारशें ते पांचशें वर्षांच्या मागे नेतां येत नाही. ब्राह्मण-काल आणि मंत्रकाल यांच्यांत भाषा, धर्मकल्पना आणि संस्कृति यांच्या विकासाची गति कमीत कमी मानली, तरी त्यांत हजारों वर्षांचें अंतर कल्पितां येत नाही. कोणतीहि भाषा हजारों वर्षेंपर्यंत न बदलतां आहे तशीच राहूं शकत नाही. ब्राह्मणग्रंथांतील भाषेचा आणि ऋग्वेदांतील भाषेचा संबंध निकटचा आहे.

वैदिक आर्यांचीं स्थलांतरें आणि ऋग्वेदाचा भौगोलिक प्रदेश यांविषयीं अजून महत्त्वाचे मतभेद शिल्लक आहेत. पण तरीहि पंजाब हा ऋग्वेद व यजुर्वेद यांच्या रचनेचा भौगोलिक प्रदेश होय, असें निश्चित करतां येतें. कुरु-पांचाल वंशाचा प्रदेश आणि यजुर्वेदांतील यज्ञसंस्थेचा प्रदेश एकच आहे. तो म्हणजे दिल्लीजवळचा पश्चिम उत्तरप्रदेशाचा भाग होय. ऋग्वेदाचा प्रदेश काबूल-कंदाहारपासून दिल्लीपर्यंतचा असावा, असें ऋग्वे-दांतील नद्यांच्या उल्लेखांवरून साधारणपणें ठरवितां येतें. कांही पंडित ऋग्वेदाचा संबंध अफगाणिस्तानाशीं जोडतात, तर कांही विद्वान् इराण, असीरिया आणि कॉकेशस् पर्वत यांना सलगपणे अंतर्भूत करणारा प्रदेश ऋग्वेदरचना करणाऱ्या आर्यांची जन्मभूमि मानतात. त्यांनी असें अनुमान करण्याचें कारण, ऋग्वेदांतील पुष्कळ नद्यांचीं नांवें आज माहीत अस-लेल्या भारतीय नद्यांशीं जुळवितां येत नाहीत, हें होय. त्यांना ऋग्वेदांत उल्लेखिलेल्या जनांचीं (मानवगणांचीं) व ऋषींचीं नांवें आणि सांप्रत प. आशियांतील व भूमध्यसमुद्राजवळील प्रदेशांचीं नांवें यांचें सादृश्य दिसलें आणि त्यांनी तो प्रदेश वैदिक आर्यांच्या ऋग्वेदरचनेचा प्रदेश ठरविला.

समाज व संस्कृति– ऋग्वेदांतील अनेक ठिकाणच्या अनेक उल्लेखांवरून वैदिक आर्यांच्या संस्कृतीची कल्पना करतां येते. संस्कृतीच्या विकासासाठी आवश्यक असणारें आर्थिक स्थैर्य आर्यांनी प्राप्त करून घेतलें होतें. ते शेती करीत व गुरेंहि पाळीत. कृषि, पशुपालन, धातुकाम आणि पक्क्या मालाचें उत्पादन करणारे उद्योग या गोष्टी ऋग्वेदकाळांतल्या आर्थिक जीवनाच्या पायाभूत होत्या. कित्येक पशूंचा उपयोग ते शेतीचीं व वाहतुकीचीं कामें आणि विनिमयाचें साधन म्हणूनहि करीत. ते भूमीपेक्षा पशूंचें सांपत्तिक महत्त्व अधिक मानीत. वैदिक आर्यांना पशूंच्या अपार समृद्धीची हांव होती. पशुसमृद्धीच्या वर्णनाचीं कित्येक सूक्तें ऋग्वेदांत आहेत. सिंध, पंजाब व गंगा-यमुनांचा प्रदेश भरपूर वृष्टीचा व कोसन्कोस पसरलेल्या समृद्ध कुरणांचा असल्यामुळे पशुपालनाला अत्यंत योग्य होता.

मना हें सुवर्णनाणें वैदिक काळांत विनिमयाचें आणखी एक साधन होतें. पहिल्या बाबिलोनियन साम्राज्याशीं दक्षिण व पश्चिम हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावरून व्यापार चालत असे, ही गोष्ट खाल्डियन संस्कृतीच्या अभ्यासकांनी शोधून काढली आहे. भूमध्य समुद्रावरून व्यापार करणाऱ्या फिनिशियन वाण्यांचा निर्देश ऋग्वेदांत पणि या संज्ञेने केलेला आहे. स्थलपथावरच्या व जलपथावरच्या व्यापारी वाहतुकीचीं महत्त्वाचीं साधनें ऋग्वेदांत उल्लेखिलेलीं आहेत. शंभर वल्हयांनी समुद्रांत चाल-विण्याच्या नौकेचें वर्णन ऋग्वेदांत येतें (१.११६.५). दुचाकी बैलगाडया आणि घोडयांनी चालवायचे लहान मोठे रथ वेदकाळीं वापरले जात (३.५३; २.३९; ८.९१; १०.६०). वेदपूर्वकालीं भारतांत राहणाऱ्या अवैदिक लोकांवर वैदिक आर्यांनी प्रभुत्व मिळविलें, याचें एक कारण त्यांच्याजवळ भक्कम अश्वरथ होते, हें होय.

वेदकाळांत सुतारकामाला फार महत्त्व होतें. त्वष्टा ही देवता सुतारकामावरून सुचली असावी. ऋग्वेदांत शंभर दर-वाजे असलेल्या पुराचा उल्लेख आहे.

वैदिक आर्यांच्या स्त्रिया लोकरीचें सुंदर विणकाम करीत. वैदिक स्त्रीपुरुषांना भपकेदार वस्त्रांची आवड होती (५.२९; ८.४६; १०.११).

संस्कृतीच्या आर्थिक इतिहासांत धातूच्या शोधाला व उप-योगाला क्रांतिकारक महत्त्व असतें. वैदिक काळीं त्या लोकांना लोखंडाचीं हत्यारें बनविण्याची कला प्राप्त झाली होती. कुऱ्हाड, तलवार, सुरी, वस्तरा इ. वस्तू ऋग्वेदकाळांत लोखं-डाच्या बनविल्या जात. उत्पादनाचीं साधनें आणि शस्त्रास्त्रें तयार करण्यासाठी वैदिकांना लोखंडाचा उपयोग करतां आला व त्यामुळे ते सिंधुसंस्कृतीवर विजय मिळवू शकले. सिंधु-संस्कृतीला इतर धातू सांपडले असले, तरी तिला लोखंड मिळालें नव्हतें. वैदिकांनी भारतांतील सर्व जुन्या राष्ट्रांवर आपलें अधिराज्य स्थापलें, त्या कामीं लोखंड व अश्वरथ हीं दोन साधनें त्यांना अत्यंत उपयोगी ठरलीं.

वैदिक आर्यांना भारतांत सोन्याचा मुबलक सांठा मिळाला होता. त्याचा त्यांच्या आर्थिक जीवनावर फार मोठा प्रभाव पडला यांत शंका नाही. वैदिक आर्य सोमयागांत सोन्याच्या पात्रामध्ये सोम पिळीत असत (ऋ. ९.७५.३). अश्वमेधांत सोन्यारुप्याचीं पात्रें वापरीत असत. स्त्रीपुरुषांचे अलंकार सोन्याचे असत व घोडयांनाहि सुवर्णालंकारांनी मढवीत असत (ऋ. ५.५३.४; ४.२.८). ऋग्वेदांत व इतर वेदांत सोन्याला पुष्कळच महत्त्व दिलें आहे, तें वैदिकांच्या सुवर्णयुगाचें सूचकच आहे.

खासगी संपत्ति हा ऋग्वेदकालीन समाजसंस्थेचा पाया होता. ऋग्वेदकालीन समाजसंस्था प्राथमिक रानटी अवस्थेंतून बाहेर पडली होती, हें वेदांतील दाय, दान व ऋण या कल्पनांवरून निश्चित होतें. पितृपरंपरेचा वारसाहक्क ऋग्वेदकाळीं रूढ झाला होता. 'आम्ही पितृधनाचे मालक व्हावें' अशी आकांक्षा ऋग्वेदांत व्यक्त झाली आहे (१.७३.१). ज्येष्ठ पुत्राला पैतृक धनाच्या वांटणींत अधिक भाग मिळत असे. ऋणसंस्था ही ऋग्वेदकालांतच अस्तित्वांत आली होती. इहलोकीं ऋणमुक्त होऊन स्वर्गाला जाण्याची कल्पना लोकांच्या मनांत दृढ झाली होती. ऋणसंस्था ही संपत्तीच्या संचयाची द्योतक आहे, तशीच वैदिक दानसंस्थाहि खाजगी संपत्तीच्या मोठ्या संचयाची द्योतक ठरते. यज्ञांतील दक्षिणांचीं परिमाणें असें सूचित कर-तात, की शरीरश्रमाने न जगणारा असा दात्यांचा व दान घेणाऱ्यांचा मोठा वर्ग वैदिक समाजांत निर्माण झाला होता.

केवळ भौतिक साधनांनी संस्कृतीची साधना होत नसते. भौतिक साधनें व आर्थिक व्यवस्था यांना मानसिक साधनां-चीहि जोड लागते. भाषा व गणित हीं मानवी व्यवहाराचीं मानसिक साधनें होत. वैदिक लोकांनी गणन व लेखन या बाबतींत चांगली प्रगति केली होती, याचीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रमाणें वेदांत सांपडतात. ऋग्वेदांत वर्णाला अक्षर म्हटलें आहे. वैदिक कवि छंदोरचना करतांना अक्षरें मोजीत. मोजण्याची कला किंवा गणित या विषयांत वैदिकांनी इतर प्राचीन राष्ट्रांपेक्षा पुढे पाऊल टाकलें होतें. दशांक पद्धति वैदिकांनीच शोधून काढली. शून्याची कल्पनाहि त्यांचीच आहे. या शून्यकल्पनेने गणितशास्त्रांत क्रांति केली. इतकी प्रभावी शुद्ध कल्पना दुसरी कोणती नाही, असें गणितवेत्ते म्हणतात.

'मनुष्य' ही अत्यंत उदात्त अर्थाची कल्पना वैदिक आर्यांना

स्फुरली. ही कल्पना निर्माण झाल्यावर पुरुषसूक्तांत ईश्वरालाच पुरुष म्हणजे मनुष्य या संज्ञेने निर्दिष्ट केलें गेलें. विश्वशक्तीची 'सुकृति' म्हणजे मनुष्य होय. मनुष्य हा सकल सृष्टीत श्रेष्ठ आहे व भक्ति आणि आदर व्यक्त करण्यास मनुष्य हें ईश्वररूप सर्वांत अधिक उपयुक्त आहे, अशी नैतिक कल्पना वैदिक आर्यांच्या मनांत निर्माण झाली. ऋत हें विश्वव्यापी तत्त्व वैदिक ऋषींना नीतिकल्पनेवरूनच सुचलें. ऋत आणि अनृत या द्वंद्वाने नीति व अनीति हें द्वंद्व त्यांनी दिग्दर्शित केलें. 'एकं सत्' म्हणून निर्दिष्ट केलेलें तत्त्व वैदिक आर्यांनी प्रतिपादिलें व सर्व कांही ईश्वरमय असून एकाच सतांतून प्रकट झालें आहे, असें सांगितलें. अशा प्रकारें ऋत व एकं सत् हें दोन मूलभूत विचार वैदिक ऋषींना प्राप्त झाले. या विश्वमननात्मक प्रतिभेच्या पाठीमागे वैदिक मनाला अमरत्वाची उत्कंठा होती. सर्व देवतांशीं एकात्मभाव प्राप्त करून घेणें, हाच अमरत्वाचा उपाय वैदिक ऋषींना दिसला. इहलोक व परलोक यांचा सांधा ऋग्वेदांतील ऋषींनी पूर्णपणे सांधला होता. हें जग त्यांना स्वर्गाइतकेंच सुंदर दिसत होतें. मृत्युभयाने या जगाबद्दलची विरक्ति त्यांच्या मनांत डोकावली नाही.

देव व मानव यांचें या जगांतील संगमस्थान या रूपाने वैदिकांनी यज्ञसंस्था निर्माण केली. तीच पुढे वैदिक संस्कृतीच्या विस्ताराचें केंद्र बनली. सामाजिक जीवनाची प्रक्रिया व सामाजिक संस्थांची संघटना यांचा गाभा म्हणजे यज्ञ होय. परमेश्वर हा यज्ञरूप आहे, अशी वैदिक ऋषींची धारणा होती.

ऋग्वेदांत सोमयागाला मध्यवर्ती स्थान आहे. सोम हें वृष्टीचें व अग्नि हें प्रकाशाचें प्रतीक होय. ऊन आणि पाऊस यांच्या योगानेच सर्व सजीव सृष्टि चालत असते. अन्नाची उत्पत्तिहि त्यांतूनच होते. यज्ञाविषयीं वैदिक ऋषींची अशी भावना असल्यामुळे त्यांनी जीवनांतली प्रत्येक महत्त्वाची क्रिया यज्ञांत गोवून टाकली. या यज्ञसंस्थेंतून पुढे भारतीयांची समाजव्यवस्था, राजशासन, कायदा, पुराणें, कला इ. गोष्टींचा विकास झाला. उपनिषदांतलें तत्त्वज्ञानदेखील याज्ञिकांच्या मननांतूनच निर्माण झालें. वेद आणि यज्ञ यांच्याशीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष ऐतिहासिक संबंध जोडतां येत नाही, अशी कोणतीहि भारतीय संस्कृतीची शाखा नाही.

ऋग्वेदाचें ध्यान– चतुर्वर्ग चिंतामणि या ग्रंथांत ऋग्वेदाची मूर्ति कल्पून तिचें ध्यान पुढीलप्रमाणे केलें आहे–

ऋग्वेदः श्वेतवर्णः स्याद् द्विभुजो रासभाननः।
अक्षमालाभयः सौम्यः प्रीतश्चाध्ययनोद्यतः ॥

अर्थ – ऋग्वेद हा श्वेतवर्णाचा, द्विभुज, गाढवाचें तोंड असलेला, एका हातीं अक्षमाला व दुसरा हात अभय मुद्रेंत असलेला, प्रसन्न व अध्ययनाला उद्युक्त आहे. [ऋ. द. ; ऋ. आ. ; वै. सा. सं. ; वै. वा. इ. ; म. ज्ञा. को.]

ऋचीक अठराव्या द्वापारांतील एक अवतार. [पु. इं.]

ऋजिश्वा एक सूक्तद्रष्टा. हा भारद्वाज गोत्रांतला आहे. ऋग्वेदाच्या सहाव्या मंडलांतील ४९ ते ५२ हीं सूक्तें याच्या नांवावर आहेत. हीं सूक्तें ओज व कांति या गुणांनी युक्त आहेत. याने रात्र आणि उषा यांना आरक्तवर्ण विभूतीच्या दोन कन्या म्हटलें आहे. एक नक्षत्रहाराने मंडित, तर दुसरी सूर्यतेजाने चित्ताकर्षक आहे (६.४९.३). याने सरस्वतीला अद्भुतचरित्र, अतिपवित्र व मंगलधाम म्हटलें आहे (६.४९.७). एका ठिकाणीं नमस्काराचें माहात्म्य सांगतांना तो म्हणतो –

नम इदुग्रं नम आ विवासे
नमो दाधार पृथिवीमुत द्याम् ।
नमो देवेभ्यो नम ईश एषां
कृतं चिदेनो नमसा विवासे ।।

(ऋ. ६.५१.८)

अर्थ – नमस्कार करणें हेंच उग्र तप. म्हणून मी ह्या तपाचेंच आचरण करतों. नमस्कारानेच द्यावा-पृथिवींना आधार मिळाला आहे. म्हणून सर्व दिव्य विबुधांना नमस्कार ! नमनरूप तपानेच या सर्वांवर सत्ता चालते. जें कांही पातक घडलें असेल, तें नमस्कारानेच घालवितां येतें.

हा राजा असून मोठा झुंजार व इंद्राचा मित्र होता. वृङ्गद नांवाच्या दस्यूशीं युद्ध करून याने त्याचें पारिपत्य केलें. याचा सर्वांत महत्त्वाचा पराक्रम पिप्रुनामक दस्यूशीं झालेल्या लढाईंत दिसला. पिप्रु हा महापराक्रमी व क्रूर होता. त्याच्यावर याने चढाई करून त्याला मारलें व त्याचा गौळवाडा फोडून लुटला. [ऋ. द.]

ऋण याची व्याख्या अशी–'पश्चाच्छोध्यत्वेनाङ्गीकृत्य गृहीतं द्रव्यम्' = परत करण्याच्या बोलीवर घेतलेलें द्रव्य तें ऋण होय (शब्दशक्तिप्रकाशिका). ऋग्वेदांत ऋणाचा उल्लेख अनेकदा येतो. त्यावरून त्या काळींहि ऋण देण्याघेण्याची प्रथा असावी, असें दिसतें (ऋ. २. ७४. ४; १०. ३४. १०; ८. ४७. १७). द्यूत खेळण्यासाठी एखाद्याने जर कर्ज घेतलें व तें त्याला फेडतां आलें नाही, तर त्याला धनकोचा दास व्हावें लागे (ऋ. १०. ३४). ऋण न फेडणाऱ्या माणसाला चोराप्रमाणे खांबाला बांधून ठेवल्याचेहि उल्लेख दिसतात. कर्जावर

व्याज घेण्याची प्रथा होती; पण त्याचा दर काय असे, तें मात्र समजत नाही (ऋ. ८. ४७. ७; अथर्व. ६. ४६. ३). ऋणकोचा किंवा धनकोचा मृत्यु झाला, तरी त्याचे वारस कर्ज फेडीत. ऋण-मुक्त होणें, हें नैतिक कर्तव्य होय, असें प्राचीन काळापासून मानलें गेलें आहे. 'पर ऋणा सावीरध मत्कृतानि' = मी केलेलीं एकंदर ऋणें व पातकें तूं नाहीशीं कर, असें गृत्समद ऋषि कळवळून म्हणतो (ऋ. २.२८.९). लौकिक किंवा व्यावहारिक ऋणांतून पुढें नैतिक ऋणत्रयाची कल्पना उगम पावली. धार्मिक ऋणें फेडण्यासाठी जशी पुत्राची आवश्यकता आहे तशीच व्यावहारिक ऋणाच्या फेडीसाठीहि ती आहे, असें नारदस्मृतींत सांगितलें आहे (४.५–९). ऋण परत केलें नाही, तर ऋणकोला धनकोच्या घरीं दास, स्त्री किंवा पशु यांचा जन्म घ्यावा लागतो, असें कात्यायनाने म्हटलें आहे (५५१,५९१). यावरून ज्याला आपले पितर अधोगतीला जाऊं नयेत असें वाटतें त्याने पितृऋण फेडायलाच हवें, अशी धारणा समाजांत दृढ झाली. मात्र जुगार व मद्यपान यांसाठी बापाने कर्ज काढलें असल्यास तें फेडण्याची जबाबदारी पुत्रावर नाही, असें मनु सांगतो (८.१५९).

कर्ज देऊन त्यावर व्याज घेणें, याला तै. सं. व अथर्ववेद यांत कुसीद म्हटलें आहे. "कुसीदं वृद्धिजीविका" = व्याजावर उप-जीविका करणें, म्हणजे कुसीद होय (अमर). मनूने रकमे-वरील व्याजाचे चक्रवृद्धि, कालवृद्धि, कारिता व कायिका असे चार भेद सांगितले आहेत (८.१५३). बृहस्पतीने त्यांचें स्वरूप पुढील श्लोकांत स्पष्ट केलें आहे –

कायिका कायसंयुक्ता मासग्राह्या च कालिका ।
वृद्धेर्वृद्धिश्चक्रवृद्धिः कारिता ऋणिना कृता ।।

(मनु ८.१५३ वरील टीका)

याचा विस्तृत अर्थ असा – (१) शरीरश्रम (दासाचे किंवा बैलाचे) रूपी व्याज देणें किंवा गाईचें दूध देणें, ही कायिका वृद्धि होय (स्मृतिचंद्रिका २.१५४), (२) दरमहा व्याज घेणें, (३) व्याजावर व्याज अर्थात् चक्रवाढ पद्धतीने व्याज घेणें व (४) ऋणकोने स्वतः सुचविलेलें व्याज घेणें.

याशिवाय बृहस्पतीने शिखावृद्धि व भोगलाभ असे आणखी दोन प्रकार सांगितले आहेत. शिखावृद्धि म्हणजे केसांप्रमाणे रोज थोडें थोडें वाढणारें व्याज व भोगलाभ म्हणजे ऋण-कोच्या घराचा किंवा शेताचा उपभोग घेणें होय.

व्याजाच्या दराबद्दल कौटिल्य सांगतो, की शंभर पण कर्जा-वर एका महिन्याचें सव्वा पण व्याज घ्यावें. स्मृति व सूत्रें यांच्या काळांत परिस्थितीला अनुसरून व्याजाचे कमी अधिक दर मान्य होते. मात्र मुद्दल व व्याज मिळून दामदुपटीपेक्षा अधिक

रक्कम घेऊं नये, असें बहुतेक सर्व धर्मशास्त्रकारांचें मत आहे. भारी दराने व्याज आकारणें हें महापाप होय, असें बौधा-यन व वसिष्ठ यांनी म्हटलें आहे (बौ. ध. सू. १.५.९३; व. ध. सू. २.४०–४२). कर्ज देण्यापूर्वी धनकोने पुरेसें तारण घ्यावें किंवा विश्वासार्ह जामीन घ्यावा आणि लेखी करार करावा किंवा साक्षीदार ठेवून व्यवहार करावा, असें बृहस्प-तीने सांगितलें आहे. [हि. ध. ; वे. इं.]

ऋणंचय रुशम जनांचा हा एक वैदिक राजा होता. हा मोठा धनाढ्य होता. बभ्रूने याच्या दानाची प्रशंसा केली आहे (ऋ. ५.३०.१२–१४).

ऋणतीर्थ नर्मदेच्या तीरावरचें एक तीर्थ. [पु. इं.]

ऋणत्रय तीन ऋणांचा समुदाय. ऋणत्रय ही भारतीय समाजशास्त्रांतली मूलभूत कल्पना आहे. ही कल्पना प्रथम तै. संहितेंत (६. ३. १०. ५) आली आहे --

जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणैर्वा जायते । ब्रह्मचर्येण ऋषिभ्यो यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्यः । एष वा अनृणो यः पुत्री यज्वा ब्रह्मचारिवासी ।

अर्थ–जन्माला येणारा ब्राह्मण तीन ऋणांसह जन्मतो. ऋषींचें ऋण ब्रह्मचर्याने, देवांचें ऋण यज्ञाने व पितरांचें ऋण प्रजोत्पादनाने फेडतां येतें. पुत्रवान्, यजनशील व ब्रह्मचर्य पूर्ण करणारा मनुष्यच अनृणी होतो.

शतपथ ब्राह्मणाने या कल्पनेंत महत्त्वाच्या सुधारणा केल्या आहेत. त्यांत ब्राह्मण शब्द वगळून मानवमात्राला तो सिद्धान्त लागू केला आहे. त्याशिवाय त्याने तीन ऋणांबरोबर मनुष्य-ऋण नांवाचें चौथें एक ऋण मानलें असून माणसांना अन्न व वस्त्र दिल्याने तें ऋण फिटतें, असें सांगितलें आहे. जो हीं चारहि ऋणें फेडतो म्हणजेच जो हीं सर्व कर्तव्यें करतो, तो कृतकृत्य होतो, असें म्हटलें आहे (श. ब्रा. १. ७. २. १–६).

धर्मकल्पनेप्रमाणेच ऋणकल्पना हीसुद्धा नीतिशास्त्रांत अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. नैतिक जबाबदारीच्या कल्पनेचा मुळा-पासून कसा विकास होत गेला, त्याची सूचक अशी ही ऋण-कल्पना आहे. ही ऋणकल्पना आश्रमव्यवस्थेशीं जोडून दिली आहे. किंबहुना आश्रमधर्म हा ऋणकल्पनेवरच उभारलेला आहे. मानवसमाज देवघेवींवर अधिष्ठित असतो. आपणा-जवळ असलेलें संचित धन दुसऱ्या गरजू मनुष्याला दिल्या-शिवाय सामाजिक व्यवहार चालत नाहीत. अर्थात् जें दुसऱ्या-कडून घेतलें, त्याची परतफेड करण्याची जबाबदारीहि ऋण-

कोवर असते. जें दुसऱ्यापासून परत करण्यासाठी घेतलें, त्यालाच ऋण म्हणतात. प्रथम ही कल्पना केवळ धनापुरतीच मर्यादित होती; पण पुढे माणसाच्या तीन किंवा चार प्रकारच्या नैतिक जबाबदाऱ्यांनाहि ती लागू करण्यांत आली. हें कार्य वेद-काळांतच घडलें. या कल्पना पुढीलप्रमाणें–

(१) विश्वव्यवहार चालविणारा परमेश्वर माणसाला जीवनसाधनें देत असतो. या उपकारांची जाणीव देवऋण या संज्ञेने वेदांनी दिली आहे. हें ऋण मनुष्याने यजन, पूजन, इ. धार्मिक व दैविक कृत्यांच्या द्वारें फेडायचें असतें.

(२) विद्या व कला यांचा पिढ्यान्‌पिढ्या संचय होऊन मनुष्याची संस्कृति वाढत असते. ऋषी हे वेद-कलांचे अर्थात् विद्या-कलांचे प्रणेते होत. तें त्यांचें ऋण वेदांचें अर्थात् विद्या-कलांचें अध्ययन करून आणि त्यासाठी ब्रह्मचर्य पाळून फेडायचें असतें.

(३) मानववंशाची अविच्छिन्न परंपरा अनंत आपत्तींतून निभावून आजतागायत चालत आली आहे. अनादिकालापासून वेळोवेळीं अनेक आपत्तींशीं झुंजून मानवाच्या पूर्वजांनी आत्म-रक्षण व प्रजारक्षण केलें आहे, म्हणूनच त्यांना पितर म्हण-तात. इथे माता, पिता किंवा सर्वच पूर्वज पितृ शब्दाने सूचित होतात. आपलें जीवन म्हणजे त्यांच्यापासून प्राप्त झालेलें ऋण आहे. ह्या ऋणांतून मुक्त होण्याचा मार्ग म्हणजे गृहस्था-श्रम स्वीकारून प्रजोत्पादन करणें हा होय. प्रजासातत्य हाच पितरांच्या प्रयत्नाचा मुख्य उद्देश असतो. तो पार पाडल्यानेच पितृऋणांतून मुक्ति मिळते.

(४) शतपथब्राह्मणांत चौथें मनुष्यऋण सांगितलें आहे. एक-मेकांच्या सहकार्याने मानवी प्रपंच चालत असतो. सभोवतीचा मानवसमाज आपल्याला अनेक प्रकारें अनेक गोष्टी देत असतो, हेंच मनुष्यऋण होय. दान व सहकार्य यांच्या योगाने या ऋणांतून मुक्त होतां येतें. [वै. सं. वि.; हि. ध.]

ऋणप्रमोचन प्रयागांतलें एक तीर्थ. या तीर्थावर एक रात्र वस्ती व स्नान केल्याने मनुष्य ऋणमुक्त होऊन स्वर्गाला जातो, असें सांगितलें आहे. [कृ. क. त.]

ऋणमोचन एक पितृतीर्थ. या ठिकाणीं श्राद्ध करण्यास सांगितलें आहे. [मत्स्य पु. २२. ६७]

ऋणमोचनक वाराणसीमधलें एक क्षेत्र. या ठिकाणीं शिवाचीं तीन लिंगें असून त्यांच्या दर्शनाने त्रिविध ऋण नष्ट होतें, असें सांगितलें आहे. [कृ. क. त.]

ऋणमोक्षमुहूर्त ऋणमोक्ष म्हणजे ऋणाची फेड. ती कर-तांना पुढीलप्रमाणे मुहूर्त पाहावा, असें सांगितलें आहे– गुरु, शनि हे वार, त्या ग्रहांचीं लग्नें व लग्नांचे अंश, रिक्ता तिथि, कुलिक मुहूर्त, अनुराधा नक्षत्राचा द्वितीय चरण व मैत्र मुहूर्त. अशा योगांवर ऋण परत केल्याने पुनश्च ऋण करण्याचा प्रसंग येत नाही, अशी याच्या मुळाशीं समजूत आहे. [नि. सिं.]

ऋणापनोद धेनुदान मानवाला देव, ऋषि व पितर यांचें ऋण जन्मतःच असतें. त्याची फेड होण्यासाठी वेगवेगळीं कर्तव्यें धर्मशास्त्रांत सांगितलेलीं आहेत. तीं कर्तव्यें योग्य प्रकारें पार न पडल्यास त्या ऋणांतून मुक्त होण्यासाठी धेनुदान सांगितलें आहे. त्यासाठी तांबडी सवत्स धेनु आणून तिला वस्त्रालंकारांनी भूषवितात. तिच्या शेपटीला मोत्यें बांधतात. मग तिची पूजा करून तिच्या दानाचें उदक ब्राह्मणाच्या हातावर सोडतात. [दा. चं.]

ऋत (१) ऋ या गतिवाचक धातूपासून हा शब्द बनला आहे. गति, प्रगति, गतीचा योग्य क्रम, सत्य, विश्व-व्यवस्था, सत्याचा मार्ग, प्रशस्त वर्तनक्रम असे या शब्दाचे पर्यायार्थ आहेत.

या विविध अर्थांत विश्वाचा शाश्वत नियम हा ऋत शब्दाचा प्रमुख अर्थ मानलेला आहे. विश्वांतली व्यवस्था, प्रतिष्ठा व नियमन यांना कारणीभूत असलेलें आणि सकल सृष्टीच्या आधी उत्पन्न झालेलें तत्त्व, म्हणजे ऋत होय. आका-शांतल्या असंख्य तारका, नाचत हसत अवतरणारी आणि नेत्रांना आनंद देणारी उषा, तीन पावलांत त्रिभुवन व्यापण्या-साठी उगवलेला प्रातःकालचा सूर्य, एकामागून एक येणारे दिवस-रात्र, ऋतुचक्राचें नियमित परिवर्तन, वनस्पतींतल्या नियमबद्ध विकासक्रिया, प्राण्यांच्या गर्भधारणेंतील निश्चित कालावधि, तसेच सृष्टींतली सुसंबद्धता, सुसूत्रता आणि द्यावा-पृथिवींचा अभेद्य संबंध, या सर्व घटनांच्यामागे ऋत नामक तत्त्व आहे, असें वैदिक ऋषींच्या कल्पनेला स्फुरलें आहे.

देवांचा आदिदेव प्रजापति हा ऋतांतून प्रथम उत्पन्न झाला, म्हणून त्याला ऋतज म्हटलें असून अग्नि, सोम, वरुण, सविता, इ. देवांना ऋतावा=ऋत धारण करणारे व ऋतपा=ऋताचें रक्षण करणारे, असें म्हटलें आहे. विश्वाची प्रगति एका निश्चित मार्गाने होत असते. प्रगतीच्या या मार्गाचें अनुसरण करणें, हा वैदिक देवतांचा धर्म आहे. तें त्यांचें व्रत आहे. म्हणूनच ऋग्वे-दांत सर्व देवतांना धृतव्रत म्हटलें आहे. मानवी जीवनाच्या

विकासाचा मार्गहि याच तत्त्वाच्या आचरणाने चालतो. अतएव मानवानेहि ऋतावा आणि ऋतपा झालें पाहिजे, अशी वैदिक ऋषींची आकांक्षा आहे.

विश्वाच्या विकासाचें शाश्वत तत्त्व आणि मानवाच्या जीवनसाफल्याला आवश्यक असणारा धर्म या दोन्ही गोष्टी ऋत या शब्दाने ध्वनित होतात. म्हणूनच देवांच्या आणि सज्जनांच्या मार्गाला 'ऋतस्य पन्थाः' म्हटलें आहे. पैजवन सुदास इंद्राला म्हणतो —

वयमिन्द्र त्वायवः सखित्वमा रभामहे ।
ऋतस्य नः पथा नयाऽति विश्वानि दुरिता . . . ॥
(ऋ. १०. १३३. ६)

अर्थ — हे इंद्रा, आम्ही तुझ्यावर विश्वास ठेवणारे आहों. तुझीच कृपा मिळविण्याचा आमचा प्रयत्न आहे. तरी ऋताच्या मार्गाने (तूं) आम्हांला सर्व पातकांच्या पार ने.

ऋताची ही महान् कल्पना वैदिक धर्माची प्रेरणा आहे. पुढच्या काळांत त्याला यज्ञ, सत्य व ब्रह्म असे नवे अर्थ प्राप्त झाले. वेदोत्तरकालांत धर्मकल्पनेचा संकोच झाला. समग्र ऋतदर्शनाऐवजी ऋताच्या विशिष्ट अंगावरच विशेष भर दिला जाऊं लागला. ब्राह्मणांच्या काळांत यज्ञसंस्था महत्त्व पावल्यामुळे ऋत म्हणजे यज्ञ हा अर्थ त्या काळांत रूढ झाला. पुढच्या काळांतल्या कर्मकांडाच्या पुरस्कर्त्यांनीहि ऋत हें केवळ यज्ञस्वरूपच मानलें.

सत्य आणि ब्रह्म हे ऋताचे पर्याय म्हणून यास्काने दिले असले, तरी त्याच्या दृष्टीने ते ऋताचे गौण अर्थ होत. प्रधान अर्थ यज्ञ हाच गृहीत धरून त्याने ऋत शब्दाची निरुक्ति केली आहे. हा एक प्रकारें ऋताच्या महान् कल्पनेचा संकोचच होय, असें म्हटलें पाहिजे.

पुढे यज्ञीय कर्मकांडाचा उबग येऊन उपनिषद्कारांनी तत्त्वसंशोधन सुरू केलें. त्यांच्या त्या चिंतनांत त्यांना ऋताच्या 'सत्य' स्वरूपाचें दर्शन घडलें. उपनिषद्-वाङ्मयांत ऋताच्या सर्व कल्पना सत्याच्या परिभाषेंत मांडलेल्या आहेत. ब्राह्मणकाळांत जसा यज्ञ, तसा उपनिषद्कालांत अंतिम सत्य आणि त्याची प्राप्ति हा युगधर्म होता. 'ऋतं सत्यं परं ब्रह्म' या उपनिषद्वचनांत 'ऋत हें सत्य आणि त्याबरोबरच परब्रह्म अशा फार मोठ्या नांवाने ओळखलें जाऊं लागलें (म. ना. उ. ३.५.६) पण निरनिराळ्या काळीं ऋत शब्दाचे भिन्न भिन्न अर्थ प्रचलित झालेले दिसले, तरी शाश्वत धर्म आणि विश्वनियामकतत्त्व हे ऋताचे मूळ अर्थ पूर्णपणे कधीहि दृष्टीआड झाले नाहीत. ऋत शब्दाचा साक्षात् उल्लेख असो वा नसो; पण त्याची कल्पना मात्र या ना त्या स्वरूपांत अभिव्यक्त होत राहिली आहे. मनुष्याच्या अंतःकरणांत निसर्गतःच ऋत आणि अनृत यांची जाणीव असते. विवेक आणि संस्कार यांनी त्या जाणिवेला स्पष्टपणा येतो व त्यांतून माणसाचीं कर्तव्यें व अकर्तव्यें निश्चित होतात. मनुष्याच्या अंतरंगांतील नैतिक सत्य व विश्वशक्तीच्या अस्तित्वाला आणि व्यापाराला प्रेरक असलेलें सत्य एकच असून तेंच ऋत होय, अशा निश्चयाप्रत वैदिक ऋषींची प्रतिभा पोचली. ही ऋतकल्पना म्हणजे ऋग्वेदांतल्या तत्त्वज्ञानाचा मूलाधार होय. [वै. सं. वि.; ना. भा. ध.]

(२) भावी काळांतील १२ वा मनु. [मत्स्य पु. ९.३७]

ऋतंजय निरनिराळ्या युगांत झालेल्या व्यासांपैकी एक व्यास. [तर्पण]

ऋतधामा भावी काळांतला १३ वा मनु. [पु. इं.]

ऋतध्वज एक श्रेष्ठ सिद्ध. तो जनांना ज्ञान देण्यासाठी जगभर हिंडत असतो. [भाग. पु. ६.१५ १५]

ऋतंभरा प्लक्षद्वीपांतली एक नदी. [भाग. पु. ५.२०.४]

ऋतव्रत शाकद्वीपांतील लोकांचा एक वर्ग. [पु. इं.]

ऋतु याची व्याख्या अशी—'सौरं मासद्वयं राम ऋतुरित्यभिधीयते '= हे रामा, सौरमासद्वयाला ऋतु असें म्हणतात (पु. चिं.). हे सहा असून त्यांचीं नांवे वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत व शिशिर अशीं आहेत. चैत्रादि मास धरून यांची गणना करतात. वर्षाचे विविध हंगाम अशा अर्थी ऋतु शब्द ऋग्वेदांत अनेक वेळां आला आहे; पण तिथे तीनच ऋतूंची कल्पना आढळते. चार महिन्यांचा एक ऋतु अशी त्यांची योजना आहे (ऋ. १.४९.३; १.१६४.२). वसंत, ग्रीष्म व शरद् अशीं त्यांचीं नांवें आहेत (१०.९०.६). प्राचीन काळीं प्रत्येक ऋतूच्या प्रारंभीं देवतांना बलि अर्पण करण्याची प्रथा होती (श. ब्रा. १४.१.१.२८).

त्यानंतरच्या काळांत वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत असे वर्षाचे पांच ऋतू मानले गेले (अथर्व. ८.२.२२; तै. सं. १. ६.२.३; श. ब्रा. १.३५.११). जेव्हा पांच ऋतू मानीत, तेव्हा हेमंत–शिशिर यांचा एकत्र अंतर्भाव करीत. तैत्तिरीय संहितेंत दुसऱ्या एका ठिकाणीं सहा ऋतू मानले असून मधु-माधव, शुक्र–शुचि इ. बारा महिन्यांबरोबर वसंत, ग्रीष्म इ. प्रकारें त्यांची सांगड घातली आहे (४.४.११). वेदांत जिथे जिथे

सहा ऋतूंचा एकत्र उल्लेख केला आहे, तिथे तिथे ऋतूंचा आरंभ वसंतापासून धरलेला आहे. सर्व ऋतूंत वसंत हा मुख्य होय, अशीं स्वतंत्र विधानेंहि आहेत. 'मुखं वा एतदृतूनां यद्वसन्तः'=वसंत हें ऋतूचें मुख होय (तै. ब्रा. १·२·६). गीतेंत श्रीकृष्णानेहि 'ऋतूनां कुसुमाकरः'=ऋतूंमध्ये मी वसंत होय, असें म्हणून वसंतालाच श्रेष्ठत्व दिलें आहे (१०·३५). तैत्तिरीय ब्राह्मणांत दुसऱ्या एका ठिकाणीं संवत्सर हा एक पक्षी कल्पून पुढील रूपक केलें आहे—

तस्य ते वसन्तः शिरः । ग्रीष्मो दक्षिणः पक्षः ।
वर्षाः पुच्छम् । शरदुत्तरः पक्षः । हेमन्तो मध्यम् ।
(१·१०·४·१)

अर्थ – वसंत हें संवत्सररूपी पक्ष्याचें मस्तक, ग्रीष्म उजवा पंख, वर्षाऋतु पुच्छ, शरद् डावा पंख व हेमंत मध्य होय.

ऋतू हे सूर्याच्या गतीवर अवलंबून असतात. सध्या आपण चैत्र-वैशाख = वसंत ऋतु, अशी गणना करीत असलों, तरी ऋतू हे चांद्रमासांवर अवलंबून नसून ते सौरमासांवर म्हणजे सूर्यसंक्रांतीवर अवलंबून असतात. त्यामुळे वसंताचा आरंभ चैत्र शु. १ देस न होतां, तो मीन राशींत सूर्य गेला असतां होतो, असें समजतात. पंचांगांतहि तशा प्रकारेंच त्याचा निर्देश केलेला असतो. ऋतूंचा वास्तविक अर्थ असा आहे, की सूर्याने दोन संक्रांती भोगल्या असतां एक ऋतु पूर्ण होतो व अशा प्रकारें बारा राशींत सहा ऋतू होऊन संवत्सरचक्र पुरें होतें.

सांप्रत ऋतुचक्राचा चैत्रादि गणनेशीं मेळ बसत नाही. तें सुमारें एक महिना मागे गेलें आहे. चैत्रारंभापासून वसंतारंभ मानणें, ही गणना महाभारतानंतरची आहे. ती इ. स. च्या प्रारंभाच्या सुमाराची आहे. त्यांत ज्येष्ठ-आषाढ हे ग्रीष्माचे महिने धरले आहेत व श्रावण-भाद्रपद हे वर्षाऋतूचे मानले आहेत; पण सांप्रत आषाढापासूनच पाऊस सुरू होतो. महाभारतांत 'सर्वसस्य सुखे काले' असें कार्तिकाचें वर्णन आहे; पण अलिकडे धान्य व गवत तयार होण्याचा तो काल आश्विनांतच येतो. यावरून महाभारतकालापासून आतापर्यंत ऋतू सरासरीने एक महिना मागे हटले आहेत, असें स्पष्ट दिसतें.

ऋतूंचें चक्र सूर्याच्या उत्तर-दक्षिण गतीमुळे उत्पन्न होतें, ही गोष्ट महाभारतकाळीं ज्ञात होती. 'सूर्य दक्षिणेकडे गेला म्हणजे शीत उत्पन्न होतें व तो फिरून उत्तरेकडे आला म्हणजे पाणी शोषून घेतो. नंतर तो तें पाणी (पर्जन्यरूपाने) खाली सोडतो व पुन्हा पृथ्वीवर सस्यादींची उत्पत्ति करतो,' असें महाभारतांत म्हटलें आहे (वन. ६३).

वर्षांतल्या तीन ऋतूंच्या प्रारंभीं तीन यज्ञ करण्याची बुद्धपूर्व भारतीयांची चाल होती. पुढे बुद्धाने थोडासा फरक करून तीच कल्पना स्वीकारली. पहिल्या ऋतूंत वृक्षातळीं राहून मनन करायचें, दुसऱ्यांत वस्स (वर्षावास) करायचा व तिसऱ्यांत पर्णशाला बांधून तिच्यांतच अध्ययन करायचें, अशी बुद्धाने वहिवाट पाडली.

पुराणांत ऋतूंविषयीं पुढील उल्लेख आहेत -- ते ब्रह्मदेवाचे पुत्र असून पांच आर्तवांचे पिते आहेत. आर्तवांना पितर व ऋतूंना पितामह समजतात. श्राद्धांत त्यांची प्रार्थना करतात. त्यांनी उमेच्या विवाहप्रसंगीं नृत्य-गायन केलें. [म. भा. उ.; म. ज्ञा. को.; पु. इं.]

ऋतुकल्प सहावा कल्प. [वायु पु. २१. ३०]

ऋतुकुल्या महेंद्रपर्वतावरील एक नदी. [पु. इं.]

ऋतुगमन 'ऋतुर्गर्भग्रहणयोग्यः कालः' = गर्भधारणेस योग्य अशा कालाला ऋतु म्हणतात. स्त्रीच्या रजाला आर्तव म्हणतात. तो शब्द ऋतूवरूनच आला आहे. गृहस्थाने ऋतुकाळीं व पर्वदिवस वर्ज्य करून इतर दिवसांत भार्येशीं समागम करावा, अशी धर्मशास्त्राची आज्ञा आहे (मनु. ३. ४५). हा काल रजोदर्शनापासून सोळा दिवसांपर्यंत मानतात. त्या काळांत पहिले तीन दिवस सोडून समदिवशीं रात्रीं दुसऱ्या प्रहरानंतर पुरुषाने प्रसन्न अंतकरणाने भार्यागमन करावें, असें सांगितलें आहे. या काळांतील कोणते दिवस वर्ज्य करावे, याविषयीं मतभेद आहेत. त्यासाठी त्या त्या ठिकाणीं जो देशाचार असेल तो पाळावा, असें सांगितलें आहे. समागमाच्या प्रसंगीं पत्नी प्रेमयुक्त, संतुष्ट व इतर विषयांकडे लक्ष नसलेली, अशी असावी. पुरुषाने अशा वेळीं तांबूलभक्षण करून तलम, स्वच्छ व न फाटलेलें वस्त्र धारण करावें.

ऋतुगमनासाठी स्वतंत्र रतिमंदिर असावें. तिथे दीप प्रज्वलित असावा. स्त्रीने काजळ, कुंकू व सिंदूर लावून तांबूलभक्षण करावें. तिने धौतवस्त्र परिधान करून फुलें माळावीं. पुरुषानेहि चंदन-पुष्पादिकांनी शरीर भूषित करावें. तर्जनींत रौप्य पवित्रक असेल तर तें काढावें, उपवीती व्हावें, शिखा मोकळी सोडावी व 'विष्णुर्योनिं कल्पयतु' हें सूक्त म्हणून ईश्वरस्मरणपूर्वक समागम करावा. नंतर स्नान करून पृथक् शय्येवर झोपावें. जो गृहस्थ ऋतुकालीं भार्येशीं गमन करीत नाही, त्याला भ्रूणहत्येचें पातक लागतें, असें पराशर म्हणतो. पण कुल्लूकाच्या मतें हा नियम, ज्याला पुत्रसंतति झाली नाही, त्याच्यासाठीच आहे (मनु. ३. ४५ वरील टीका).

पुढील स्त्रियांशीं समागम वर्ज्य सांगितलेला आहे—

नास्नातां तु स्त्रियं गच्छेन्नातुरां न रजस्वलाम् ।
नानिष्टां न प्रकुपितां नाप्रशस्तां न गर्भिणीम् ।।
वृद्धां वन्ध्यामसद्‌वृत्तां मृतापत्यामपुष्पिणीम् ।
बहुपुत्रवतीं चैव गमने परिवर्जयेत् ।।

(आचारेन्दु)

अर्थ–स्नान न केलेली, व्याधिग्रस्त, रजस्वला, प्रतिकूल, क्रुद्ध, अयोग्य, गर्भिणी, वृद्धा, वन्ध्या, दुराचरणी, जिचीं मुलें मरतात अशी, जिला रजोदर्शनच झालें नाही अशी व बहु (दहापेक्षा अधिक) पुत्रवती स्त्री गमनाला वर्ज्य समजावी.

ऋतुपात्र सोमयागांत ऋतु नामक ग्रह घेण्यासाठी या नांवाचीं दोन पात्रें असतात व तीं पिंपळ किंवा श्रीपर्णी (शिवरी) या वृक्षाचीं करतात. ऋतुपात्राला दोन्ही बाजूंस मुख असतें. एक ऋतुपात्र अध्वर्यूचें व दुसरें प्रतिप्रस्थात्याचें असतें. हे दोघेहि या पात्रांनी सोमाचा याग करतात. [विद्याधरशास्त्री भिडे]

ऋतुमत् त्रिकूटपर्वतावरील वरुणाचें आनंदवन. [पु. इं.]

ऋतुशांति एखाद्या अशुभ मासांत, अशुभ दिवशीं व अशुभ नक्षत्रीं स्त्रीला प्रथम रजोदर्शन झालें असतां ती गोष्ट अशुभकारक समजून त्यासाठी ऋतुशांति करतात. या शांतीचें विधान बौधायन गृह्यशेषसूत्रांत पुढीलप्रमाणे सांगितलें आहे––

प्रथम संकल्प करून एका शुद्ध जागीं धान्याचें स्थंडिल करावें. त्यावर कलश मांडून त्यांत पंचपल्लव, पांच प्रकारच्या मृत्तिका इ. वस्तू घालाव्या. कलश पाण्याने भरून त्यावर पूर्णपात्र ठेवावें. त्यांत विष्णूची सुवर्णप्रतिमा स्थापून तिची पूजा करावी. मग ऋत्विजांनी कलशाला हात लावून श्रीसूक्त, वरुणसूक्त, इ. सूक्तांचें पठन करावें. मग यजमान–दंपतीला दर्भासनावर बसवून त्या कलशांतल्या जलाने अभिषेक करावा. त्यानंतर यजमान–दंपतीचें स्नान झाल्यावर अग्निस्थापना व ग्रहांचें पूजन करावें. विष्णुसूक्ताने पळसाच्या समिधांचा, ब्रह्मसूक्ताने भाताचा व रुद्रसूक्ताने आज्याचा होम करावा. नंतर आयुष्यदेवता व नक्षत्रदेवता यांच्यासाठी आहुती द्याव्या. प्रायश्चित्त होमानंतर उडीद घातलेल्या भाताचें बलिप्रदान करावें. मग देवतांची उत्तरपूजा करून विधि समाप्त करावा. या शांतीने स्त्री सर्व दोषांतून मुक्त होते, असें बौधायन सांगतो (५.३).

ऋग्वेदी ब्रह्मकर्मसमुच्चयामध्ये ऋतुशांतीचा विधि नाही. त्याऐवजीं तिथे भुवनेश्वरीशांति करण्यास सांगितलें आहे. पाहा–भुवनेश्वरीशांति. [विद्याधरशास्त्री भिडे]

ऋतुस्नान रजस्वला स्त्रीचें चौथ्या दिवशींचें स्नान. हें स्नान केल्यावर तिने प्रथम पतीचें मुखदर्शन करावें आणि तो उपस्थित नसल्यास त्याचें मनांत ध्यान करून सूर्यदर्शन करावें, असें काशीखंडांत सांगितलें आहे. **पाहा–रजस्वला.**

ऋतूत्सव ऋतुविषयक उत्सव समारंभाने साजरे करण्याची प्रथा भारतांत प्राचीन काळापासून चालू असल्याचे उल्लेख संस्कृत साहित्यांत अनेक ठिकाणीं आढळतात. ऋतुविषयक लहानमोठे अनेक उत्सव त्या काळींहि होते व आजहि आहेत; वसंतोत्सव आणि कौमुदीमहोत्सव हे दोन त्यांतले प्रमुख होत. वसंतोत्सव त्या ऋतूचा सन्मान करण्यासाठी व कौमुदीमहोत्सव शारदीय चंद्रिकेचा आनंद लुटण्यासाठी केला जात असे. कालिदासाने आपल्या काव्यांत आणि नाटकांत वसंतोत्सवाचें निदर्शन अनेक ठिकाणीं केलें आहे. दशरथाच्या वसंतोत्सवाचें वर्णन करून तो लिहितो––

अथ यथासुखमार्तवमुत्सवं
समनुभूय विलासवतीसखः ।
नरपतिश्चकमे मृगयारतिं
स मधुमन्मधुमन्मथसन्निभः ।।

(रघु. ९.४८)

अर्थ – विष्णु, वसंत व मदन यांच्याप्रमाणे असलेला, विलासवती स्त्रियांचा सहचर असा दशरथ राजा वसंतोत्सवाचा यथेच्छ आस्वाद घेऊन मृगयाविहार करण्याची इच्छा करता झाला.

प्राचीन काळीं अशोक व बकुल यांना दोहद उत्पन्न करणें (त्यांना पुष्पोन्मुख करणें), हें वसंतोत्सवाचें एक प्रधान अंग मानीत. वसंताच्या अनेक उत्सवांत सुवसंतक व मदनोत्सव यांचीं वर्णनें सर्वांत अधिक मिळतात. सुवसंतक या उत्सवांत नागरिक लोक एकत्र जमून नृत्य, गायन, क्रीडा, द्यूत इ. कार्यक्रम करीत. मदनोत्सव फाल्गुन महिन्यांत सुरू होऊन चैत्राच्या अखेरीपर्यंत चाले. याचीं दोन रूपें होतीं. सार्वजनिक मदनोत्सव हा एखाद्या उद्यानांत आणि खाजगी उत्सव राजे-महाराजे यांच्या अंतःपुरांत होत असत. कामदेवाची पूजा हा या उत्सवाचा मुख्य भाग असे. हर्षाच्या रत्नावली या नाटकांत मदनोत्सवाच्या सार्वजनिक स्वरूपाचें वर्णन हृदयंगम रीतीने केलेलें आहे.

पावसाळ्यानंतरचें प्रसन्न चांदणें शरद्‌ऋतूंतच प्रकट होतें. शरदाचें वातावरण मोकळें आणि आल्हाददायक असतें. वसंता-

प्रमाणेच तोहि पुष्पांचा ऋतु असतो. शिवाय त्या वेळीं शेतांतलीं धान्येंहि कांही कापणीला आलेलीं असतात, तर कांही कापून, मळून घरांत आलेलीं असतात. अशा वेळीं माणसाचें मन साहजिकच क्रीडा, विनोद आणि उत्सव यांच्यासाठी उत्सुक होतें. त्यामुळेच वसंतांतल्यापेक्षाहि शरद्ऋतूंतले उत्सव संख्येने अधिक आहेत. दसरा, नवान्नपूर्णिमा, कोजागरी, दिवाळी, लक्ष्मीपूजन, गोक्रीडन इ. अनेक उत्सव पंचांगांत दिलेले असतात, ते सगळे शरदाचेच उत्सव होत. या सर्वांत प्राचीन काळीं कौमुदीमहोत्सवाला प्राधान्य होतें. हा उत्सव आश्विन पूर्णिमेला होत असे. त्या दिवशीं नगरानगरांत घरें-दारें सजवीत आणि दिव्यांची रोषणाई करीत. त्या रात्रीं लोक रात्रभर जागरण करीत. सगळीकडे नाच-गाण्यांच्या मैफली होत. द्यूतहि खेळलें जाई. त्या दिवशीं खेडयापाडयांतलीं माणसें तो उत्सव पाहण्यासाठी शहराकडे लोटत. श्रीकृष्णाने गोपींसगें रासक्रीडा केली, ती या शरद्ऋतूंतल्या चांदण्या रात्रींच केली, असें भागवत पुराणांत सांगितलें आहे (१०.२९).

कामसूत्रांत होलिकोत्सवाचें वर्णन आलेलें आहे. तोहि एक ऋतूत्सवच असून प्राचीन काळापासून आजतागायत अविच्छिन्न चालत आलेला आहे. मकरसंक्रांति हाहि एक ऋतूत्सवच मानायला हवा. कारण तेव्हापासून थंडी हळूहळू कमी होऊं लागते आणि निसर्गांत पानगळ सुरू होते.

ऋत्विज

याची व्याख्या अशी– 'ऋतौ यजति इति'= विहित कालामध्ये यज्ञांत काम करणारा, तो ऋत्विज होय (श. क.).

अग्न्याधेयं पाकयज्ञानग्निष्टोमादिकान् मखान् ।
यः करोति वृतो यस्य स तस्यर्त्विगिहोच्यते ।।

(मानव ध. सू. २.१४३)

अर्थ– यजमानाने वरिलेला पुरोहित त्याच्यासाठी अग्न्याधान, पाकयज्ञ व अग्निष्टोमादि यज्ञ करतो, तो त्या यजमानाचा ऋत्विक् होय.

ब्राह्मणग्रंथांच्या कालांत कर्मकांड व ऋत्विक्प्रणाली यांमध्ये पुष्कळ वाढ झाली. एकाह सोमयागापासून तों द्वादशरात्र, संवत्सर व कित्येक वर्षें अखंड चालणारीं सत्रें अशा प्रकारें यज्ञसंस्थेचा विस्तार वाढला. या वाढीबरोबरच ऋत्विजांच्या संख्येंतहि वाढ झाली. ऋग्वेदांत होता, पोता, नेष्टा, आग्नीध्र, प्रशास्ता, अध्वर्यु व ब्रह्मा अशा सात ऋत्विजांचा उल्लेख मिळतो (२.१.२). त्याचबरोबर उद्गाता व त्याचा साहाय्यक प्रस्तोता यांचाहि उल्लेख ऋग्वेदांत मिळतो. ब्राह्मण-काळांत ही ऋत्विजांची संख्या वाढत वाढत सतरापर्यंत गेलेली दिसते. यज्ञसंस्थेंतले हे ऋत्विज चार गटांत विभागलेले आहेत—

(१) **होता**– या गटांत होता व त्याचे साहाय्यक मैत्रावरुण, अच्छावाक् व ग्रावस्तुत् मिळून चार ऋत्विज असतात.

(२) **उद्गाता**—या गटांत उद्गाता व त्याचे साहाय्यक म्हणून प्रस्तोता, प्रतिहर्ता, सुब्रह्मण्य मिळून चार ऋत्विज असतात.

(३) **अध्वर्यु**—या गटांत अध्वर्यु व त्याचे साहाय्यक प्रतिप्रस्थाता, नेष्टा व उन्नेता मिळून चौघे ऋत्विज असतात.

(४) **ब्रह्मा**—या गटांत ब्रह्मा व त्याचे साहाय्यक ब्राह्मणाच्छंसी, आग्नीध्र व पोता मिळून चार ऋत्विज असतात.

सदस्य हा सतरावा ऋत्विज होय. हा प्रधान ऋत्विज म्हणून सर्व यज्ञावर देखरेख ठेवीत असतो. शमिता, वैकर्त व चमसाध्वर्यु असे अध्वर्यूचे आणखी तीन गौण साहाय्यक असतात.

ऋत्विजांच्या योग्यतेविषयीं शास्त्रकारांनी पुष्कळ चर्चा केली आहे. ज्या ब्राह्मणांना आपलें कुल–गोत्र माहीत आहे व ज्यांनी वेदाध्ययन केलें आहे, तेच ऋत्विज होण्याला योग्य असतात. जे तरुण आहेत, ज्यांचे सर्व अवयव निकोप आहेत आणि ज्यांचा आवाज ठणठणीत आहे, अशांनाच ऋत्विज करावें, असें आप. श्रौतसूत्रांत सांगितलें आहे.

युवतः सदाचाररता वेदवेदाङ्गपारगाः ।
शुचयो ब्राह्मणाः पूता ऋत्विजः कर्मसु स्मृताः ।।

अर्थ– सदाचारप्रवण, वेदवेदाङ्गनिपुण, शुचि व पवित्र असे ब्राह्मणच यज्ञकर्मांत ऋत्विज व्हायला योग्य असतात.

क्षत्रिय व वैश्य यांना यज्ञ करण्याचा अधिकार आहे. पण त्यांच्या यज्ञांत ब्राह्मणानेच आर्त्विज्य केलें पाहिजे, असा नियम आहे.

ब्राह्मणाने यज्ञांत आर्त्विज्य केव्हा स्वीकारावें व केव्हा स्वीकारूं नये, याबद्दलचेहि नियम स्मृतिग्रंथांत दिले आहेत. कांही ऋत्विज हे विशिष्ट गोत्राचे असावे, असाहि नियम आहे. उदा० अध्वर्यु आंगिरस गोत्राचा, ब्रह्मा वासिष्ठ गोत्राचा व होता विश्वामित्र गोत्राचा असावा, असें बौधा. श्रौतसूत्र सांगतें. [विद्याधरशास्त्री भिडे; व्रतराज; सं. कौ.; हिं. स.]

ऋद्धपूरवर्णन

महानुभाव पंथाच्या 'साती ग्रंथां' पैकी एक. बहाळे नारो व्यास याने इ. स. १३६३ मध्ये हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथांत ऋद्धपुराचें वर्णन पुढीलप्रमाणे केलें आहे–

सुरनरा पन्नका : जें वंद्य तिहीं लोका : क्रीडास्थान कैवल्यनायका : भणौनिया ।। २२७ ।।

जै योगियाचें मानस : कां कैवल्य रत्नाची मांदुस : मज

पाहतां भानवस : परब्रह्माचें ।। २२८ ।।

तें मोक्षनिधीचें भांडार : कीं विश्वबीजाचें कोठार : ना तें हो कां जे सेजार : परु सुखाचें ।। २२९ ।।

तें श्रीमूर्तीचें देऊळ : कीं देवरायाचें राऊळ : कीं भवार्णती वेलाउळ : मुक्ताचें तें ।। २३० ।।

कीं ब्रह्मविद्येचा घरटा : कीं चैतन्यचोराचा कुरुठा : कीं परपुरुषा बसैठा : राजमठू तो २३१ ।। [म. म. सा.]

ऋद्धि कुबेरपत्नी. नल-कूबरांची माता. एक ब्रह्मकला. पालिसाहित्यांत ऋद्धींचें स्वरूप अणिमा, महिमा, इ. अष्टसिद्धींसारखेंच चमत्कारमय मानलें असून अर्हत् पुरुषाला त्या प्राप्त असतात, असें सांगितलें आहे. याचा सामान्य अर्थ सर्वांगीण वृद्धि असा आहे. पुण्याहवाचनांत ' कर्म ऋध्यताम् ' =कर्माची ऋद्धि होवो, हें वाक्य ब्राह्मण त्रिवार उच्चारतात.

ऋभु (१) एक वैदिक देवतासंघ. ऋभुक्षन्, वाज व विभ्वन् या तीन देवांना मिळून ऋभु अशी संज्ञा आहे. ऋग्वेदांत इंद्रासारख्या प्रमुख देवतांबरोबर कांही कनिष्ठ प्रतीच्या देवतांचाहि उल्लेख आलेला आहे. या कनिष्ठ देवतांत ऋभूंना फार महत्त्वाचें स्थान आहे. ऋग्वेदांतील अकरा सूक्तांत यांची स्तुति केलेली असून इतरत्रहि अनेक वेळां यांचा उल्लेख आलेला आहे.

ऋभु हे सुधन्व्याचे पुत्र असून सौधन्वान या पैतृक संज्ञेनेहि ते ओळखले जातात. ऋभूंच्या शारीरिक वर्णनाचे व पोषाखाचे उल्लेख फारच त्रोटक आहेत. दिसण्यांत ते सूर्यासारखे आहेत (ऋ. १.११०.४). ते धातूचीं शिरस्त्राणें घालतात व उत्तमोत्तम माला धारण करतात. त्यांच्याकडे एक चकचकीत रथ असून त्याला पुष्ट घोडे जोडलेले आहेत. त्यांच्याजवळ पुष्कळ अश्व असतात. ते कुशल हाताचे व हुषार आहेत. हे प्रारंभीं मानवच होते, पण पुढे ते देव बनले.

मर्तासः सन्तो अमृतत्वमानशुः

(ऋ. १.११०.४)

अर्थ—देव होऊन (ते) मर्त्यांचे अमर्त्य झाले.

या तीन भावांनी आपलें सर्व कौशल्य व कलाचातुर्य खर्च करून त्वष्टयाच्या चमसासारखे आणखी चार सुंदर चमस निर्माण करून दिले. आपल्या चमसपात्रांसारखींच चमसपात्रें तीन मानवांनी तयार केलेलीं पाहून त्वष्टयाला फारच आनंद झाला. नंतर वाज हा देवांचा, ऋभुक्षन् हा इंद्राचा व विभ्वन् हा वरुणाचा कारागीर बनला.

त्यानंतर ऋभूंनी आंसाभोवती फिरणाऱ्या चाकांचा एक सुंदर रथ बनविला व तो अश्विनौ देवांना अर्पण केला (ऋ. १.२०.३). त्याचप्रमाणे त्यांनी बृहस्पतीसाठी एक दुभती गाय निर्माण केली व इंद्रासाठी हरीनामक सुंदर घोडे तयार करून दिले. यामुळे इंद्राशीं त्यांचें सख्य जुळलें. आपल्या विद्येच्या बळावर त्यांनी सूर्याच्याहि घरीं जाऊन पाहुणचार घेतला.

पुनर्ये चक्रुः पितरा युवाना
सना यूपेव जरणा शयाना ।

(ऋ. ४.३३.३)

अर्थ– त्यांचे आईबाप वार्धक्यामुळे खांबाप्रमाणे ताठ होऊन पडले असतां, ऋभूंनी त्यांना पुन्हा तारुण्य प्राप्त करून दिलें.

ऋभूंनी आपल्या कर्तबगारीच्या जोरावर देवपद प्राप्त करून घेतलें व यज्ञांत इतर देवांप्रमाणे स्वतःसाठीहि हविर्भाग मिळविला. त्यांनी नंतर त्वष्टयाचें शिष्यत्वहि पत्करलें.

ऋभु हा शब्द रभ् = ग्रहण करणें, या धातूपासून बनला आहे. यावरून ऋभु याचा सरळ धात्वर्थ ग्रहणीय किंवा हातचलाख असा होतो. इंद्र, अग्नि व आदित्य या देवतांनाहि हें विशेषण पुष्कळदा लावलेलें आढळतें. [म. ज्ञा. को.; ऋ. द.]

(२) ब्रह्मदेवाचा पुत्र. हा तपोलोकाचा रहिवासी होता. निदाघनामक याचा एक शिष्य होता. खऱ्या ज्ञानाचें मर्म याने निदाघाला सांगितलें. त्यानंतर एक हजार वर्षांनी याने पुन्हा निदाघाची भेट घेतली व त्याला अद्वैताचें रहस्य समजावून दिलें. [पु. इं.]

(३) देवांचा एक वर्ग. यांचें वास्तव्य भुवर्लोकांत असतें. भृगूने दक्षाच्या यज्ञांत प्रमथादिगणांचा पाडाव करण्याकरितां यांना मुद्दाम निर्माण केलें. [पु. इं.]

ऋषभ (१) नाभि व सुदेवी यांचा पुत्र. विष्णु, वायु व ब्रह्माण्ड या पुराणांत सुदेवीच्या ऐवजी मेरुदेवी असें नांव दिलें आहे. हा विष्णूचा अवतार आहे. लहानपणींच याच्या हस्तपादादि अवयवांवर ध्वज, वज्र, अंकुश, इ. वैष्णव चिन्हें दिसूं लागलीं. याने प्रथम गुरुगृहीं वास्तव्य करून अध्ययन केलें व नंतर गृहस्थाश्रम स्वीकारला. हा अजनाभ वर्षाचा राजा होता. तो ब्राह्मणांच्या अनुज्ञेने राज्य चालवी. यज्ञनामक इंद्राने त्याला आपली जयंती नांवाची कन्या दिली होती. तिच्या ठिकाणीं ऋषभाला शंभर पुत्र झाले. त्या सर्वांत भरत हा आपल्या गुणविशेषांनी श्रेष्ठ ठरला. त्या पुत्रांपैकी ८१ पुत्र कर्ममार्गाचें आचरण करणारे ऋषी झाले व कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस आणि करभाजन हे ९ पुत्र ब्रह्मनिष्ठ झाले. ऋषभाने आपल्या अजनाभ

वर्षाचे ९ खंड करून त्यांवर आपल्या ९ पुत्रांना अधिपति नेमलें व अवशिष्ट भभागाचें सार्वभौमत्व भरताला दिलें. ऋषभाने आपल्या प्रजेला धर्माचरणाचा व पुत्रांना ब्रह्मविद्येचा उपदेश केला.

याचें वैभव पाहून पुढे इंद्राला त्याचा हेवा वाटला. त्याने याच्या राज्यांत पाऊस पाडण्याचें बंद केलें. इंद्राचें हें दुष्ट कृत्य ऋषभदेवाने ओळखलें व आपल्या मायेच्या प्रभावाने अजनाभ वर्षावर सर्वत्र भरपूर वृष्टि केली.

पुत्रांना राज्य दिल्यावर तो संन्यास घेऊन ब्रह्मावर्तांतून बाहेर पडला. लोकांनी कितीहि त्रास दिला, तरी त्याकडे दुर्लक्ष करून तो आनंदमय स्थितींत सर्वत्र भटकत राहिला. तो कोंक, वेंक, कुटक, दक्षिणकर्नाटक, या प्रदेशांतहि आला होता. त्यानंतर देहत्याग करण्याच्या इच्छेने तोंडांत एक दगड धरून दक्षिणेंत कटक पर्वतावरील अरण्यांत भटकत असतां वणव्यांत सांपडून तो जळून गेला, असें भागवतांत सांगितलें आहे; तर तो विरक्त होऊन वनांत भटकत असतां त्याने मातीच्या विटेने श्वसनक्रिया बंद करून देहत्याग केला, असें विष्णु व मार्कंडेय या पुराणांत सांगितलें आहे (भाग. पु. ५. ३. ६; विष्णु पु. २. १. ३२; मार्क. पु. ५०). [पु. इं.]

(२) ऋषभगीतेचा उपदेशक. हा ऋषभकूट नांवाच्या पर्वतशिखरावर राहत असे. याने सुमित्र राजाला आशा ही किती सूक्ष्म व व्यापक असते, तें सांगितलें असून त्या दोघांच्या संवादाला ऋषभगीता असें नांव मिळालें आहे. [म. भा. शांति. १२५-१२८]

(३) भावी काळांतील एक शिवावतार. हा वाराहकल्पांतल्या वैवस्वत मन्वन्तरांतल्या नवव्या चौकडींत होणार असून तो व्यासांच्या निवृत्तिमार्गाचा प्रसार व योगमार्गाचा उद्धार करणार आहे. पराशर, गर्ग, भार्गव व गिरीश असे त्याला चार शिष्य मिळणार आहेत. [प्रा. च. को.]

(४) मेरूच्या उत्तर भागावरील एक पर्वत. श्रीहरीचें प्रिय निवासस्थान. बलरामाने या स्थळाची यात्रा केली होती (भाग. पु. ५. ६. २६; मत्स्य पु. १६२. ७).

या पर्वताचा उल्लेख कथासरित्सागरांत आलेला आहे. इथे चक्रवर्ती राजांचा महाभिषेक होत असे व या पर्वतावर आषाढ शु. १४ शीस सर्व विद्याधर त्र्यंबकाची पूजा करण्यासाठी जमतात, असें तिथे सांगितलें आहे. हा पर्वत हिंदुकुश पर्वतश्रेणींतला कोणतातरी भाग असावा, असें डॉ. केतकर म्हणतात. [प्रा. म.]

(५) भारतीय संगीतांतील सप्तस्वरांपैकी दुसरा स्वर. हा स्वर शुभ मानलेला आहे. एखादा राजा स्वारीवर निघत असतां त्याला या स्वराचें श्रवण झालें, तर तो शुभशकुन मानीत. [पु. इं.]

(६) प्लक्षद्वीपांतील सुमनस पर्वताचें दुसरें नांव. [पु. इं.]

(७) क्रौंचद्वीपांतील लोकांचा एक वर्ग. [भाग. पु. ५. २०. २२]

(८) दक्षसावर्णि मन्वन्तरांतील हरीचा अवतार. आयुष्मान् व अंबुधारा यांच्या पोटीं याचा जन्म झाला. हा ज्ञानयोगांत निमग्न राहिला. [भाग. पु. ८. १३. २०]

ऋषभतीर्थ (१) वाराणसी मधील एक तीर्थ. [पु. इं.] (२) दक्षिण कोसलांतील एक तीर्थस्थान [पु. इं.]

(३) दक्षिण कोसलामधील एक क्षेत्र. इथे तीन दिवस उपवास केल्याने वाजपेय यज्ञाचें पुण्य लाभतें. [म. भा. वन. ८५. १०]

ऋषभदेव आदिनाथ पाहा.

ऋषभपर्वत दक्षिण भारतांतील एक विष्णुक्षेत्र. मदुरेजवळच्या अलगर टेकडीचें हें नांव असावें. नृसिंहपुराणांत या पर्वताचा उल्लेख आहे.

ऋषभ वैराज ऋ. १०.१६६ या सूक्ताचा द्रष्टा. याला शाक्वर असेंहि म्हणतात. याचें सूक्त शत्रुनाशन मानलेलें आहे.

ऋषभा (१) विंध्यपर्वतांतील एक नदी. [पु. इं.] (२) केतुमाल प्रदेशांतील एक नदी. [पु. इं.]

ऋषि ऋष् = गतौ या धातुवरून ऋषि शब्द व्युत्पादितात. या शब्दांत 'ऋष्' हा धातु व 'इ' हा कर्मार्थक प्रत्यय आहे. ऋष् हा जोड धातु आहे. मूळ धातु ऋ असून त्याला भृशार्थक किंवा इच्छार्थक 'स्' प्रत्यय लागून तो बनला आहे. त्याचा अर्थ प्रकर्षाने गति करणें, असा होतो. दैवी स्फूर्ति किंवा अंगांत संचार होऊन थै थै नाचणारा, अंगाला आळोखेपिळोखे देणारा व सामान्य लोकांना अशक्य असे अंगविक्षेप द्रुत गतीने करणारा तो ऋषि होय, असा धात्वर्थ निघतो. राजवाडे ऋषि शब्दाचा अर्थ असाच करतात. त्यांच्या मतें ऋषि म्हणजे मांत्रिक (Sorcerer) होय. हा शब्द पूर्ववैदिक आहे. तो इतका प्राचीन आहे, की त्या काळांतले लोक अप्रत्यय भाषा बोलत होते.

ऋषि शब्द ऋग्वेदांत १३३ वेळां आला असल्याचें नमूद आहे. मात्र इतक्या वेळां तो शब्द येऊनहि यास्काने किंवा सायणाने धात्वर्थावरून त्याची निरुक्ति सांगितलेली नाही. 'मंत्रद्रष्टारः' व 'अतीन्द्रियद्रष्टारः' = ज्यांना मंत्रांचें दर्शन झालें व ज्यांना अतींद्रिय दर्शन घडतें ते ऋषी होत, असे त्या शब्दाचे दोन अर्थ सायणाने दिले आहेत. पण हे दोन अर्थ म्हणजे त्या शब्दाची व्युत्पत्ति नव्हे. 'ऋषिर्दर्शनात्' = ज्याला दर्शन होतें तो ऋषि होय, ही यास्काची व्याख्या ऋषींच्या अतींद्रिय दर्शनाला अनुलक्षूनच असावी (नि. २. ११). ऋग्वेदांत हा शब्द अग्नि, इंद्र, मरुत्, पूषा इ. देवतांना व एकदा ऋतूंना उद्देशून लावलेला आहे. ऋग्वेदांत अग्नीला 'ऋषिर्न स्तुभ्वा' = ऋषीप्रमाणे स्तुति करणारा, असें म्हटलें आहे (१. ६६. २). त्यावरून ऋषींविषयीं वैदिकांच्या मनांत काय कल्पना होती, त्याचा सुगावा लागतो. देवतांच्या स्तुतिपर ऋचा रचणें व त्या म्हणणें, हें ऋग्वेदकाळीं ऋषीचें लक्षण मानीत असावे.

अग्निरिद्धि प्रचेता अग्निर्वेधस्तम ऋषिः ।

(ऋ. ६. १४. २)

अर्थ -- अग्नि हाच ज्ञानघन (व) अग्नि हाच अत्युत्कृष्ट नियामक असा ऋषि आहे.

या ऋचेंत ज्ञानवत्ता आणि नियमन हीं ऋषींचीं आणखी दोन लक्षणें प्रकट होतात. ऋग्वेदांत (२. १८. ३) ऋषि म्हणजे स्तोत्र करणारा कवि असें आणखी एक लक्षण आढळतें. अशीं अनेक ठिकाणचीं विशेषणें गोळा केल्याअंतीं प्रतिभावान्, स्तोत्रसामर्थ्य असलेला, ज्ञानी, हवन करणारा व सोम गाळणारा तो ऋषि होय, एवढा त्याचा अर्थ निष्पन्न होतो. ऋग्वेदांत कांही ठिकाणी भृगु, अंगिरा, विश्वामित्र, वसिष्ठ, कुत्स, औशिज, कक्षीवान् इ. पुरुषांना ऋषि म्हटलें आहे.

ऋग्वेदांत वर्णिलेले ऋषी हे शांत, दांत, तपस्वी व आश्रमांत राहणारे होते, असा जो सामान्यतः समज आहे, तो चुकीचा आहे. हे ऋषी बहुतेक युयुत्सु आणि राजकारणाच्या उलाढाली करणारे होते. वसिष्ठ हे उत्तम घोडेस्वार होते (ऋ. ७. ३३. १). अंगिरांनी पणींचीं धान्यकोठारें लुटलीं. विश्वामित्र व त्याच्या कुलांतले लोक यांना कुशिक म्हणत. हेहि लढवय्ये होते व त्यांनी दाशराज्ञयुद्धांत भाग घेतला होता. कुत्स हाहि लढवय्या होता. त्याने इलिबिशाचीं तटबंदीचीं नगरें फोडलीं (ऋ. १. ३३. १२).

श्री. प्र. रा. देशमुख यांनी ऋषिशब्दाविषयीं एक नवीन कल्पना मांडली असून ती विचारार्थ पुढे दिली आहे —

ऋषि शब्द हा देशवाचक असून मुळांत 'ऋष' देशांतून आलेल्या लोकांना लावीत असावे. त्याच अर्थाने तो विजिगीषु पूर्व आर्यांसंबंधीं योजला असावा. पुढे त्याचा मूलार्थ जाऊन ऋषि म्हणजे ऋचाकार या अर्थी त्याचा उपयोग होऊं लागला. ऋग्वेदांत संकलित केलेल्या ऋचा रचणाऱ्या आधुनिक ऋषींना ऋषि म्हटलें आहे, ते ह्याच अर्थी. म्हणून ऋचांत पूर्व ऋषी आणि नूतन ऋषी असे दोन प्रकारचे ऋषी कल्पिले आहेत. मुळांत ऋषि शब्द आर्यांच्या मूलस्थानाचा द्योतक असावा. आर्यांच्या मूलस्थानासंबंधी अनेक कल्पना आहेत. त्यांपैकी एक कल्पना आर्य हे 'ऋष' देशांतील राहणारे होते, अशी आहे (नवभारत, मे १९६२).

ऋषी म्हणजे तप करणारे, ज्ञाते, द्रष्टे, पुण्यशील, दैवी पुरुष, ही कल्पना ब्राह्मण काळांत रूढ झाली (श. ब्रा. १. ६. २. ७; ६. १. १. १; ४. ३. ४. १९). ब्राह्मणकालीन व उपनिषत्कालीन ऋषिकल्पनेला धरून पुढील व्याख्या शब्दकल्पद्रुमांत दिलेली आहे --

ऋषति प्राप्नोति सर्वान् मन्त्रान् ज्ञानेन पश्यति संसारपारं वा इति ।

अर्थ -- जो सर्व मंत्रांना प्राप्त करून घेतो व ज्ञानाने जो संसारपाराला पाहतो, तो ऋषि होय.

वेदांतील ऋषी व उपनिषदांतले ऋषी यांत एक मोठाच फरक आहे. वैदिक ऋषी हे गृहस्थ, प्रपंचांत रस घेणारे, सामाजिक व राजकीय उलाढालींत पुढाकार घेणारे, देवांची आराधना करणारे, यज्ञ करणारे व कौटुंबिक सुख व पुत्रपौत्र यांची कामना करणारे होते.

उपनिषत्कालीन ऋषींनी आश्रमांत राहणें पसंत केलें. ते संसारापासून विरक्त झाले व सर्वसंगपरित्याग करून तत्त्वचिंतनांत रमूं लागले. ते आश्रमांत राहत असतां कित्येक जिज्ञासू शिष्य त्यांच्याकडे येऊन राहत व त्यांच्याकडून आत्मज्ञान मिळवीत. याज्ञवल्क्य, आरुणि, सनत्कुमार, रैक्व, शांडिल्य, ऐतरेय, दधीच हे उपनिषत्कालीन ऋषी होत.

उपनिषदांतील ऋषींची परंपराच पुढे पुराणकाळांत चालू राहिली. पण पौराणिक ऋषींतले कोणीहि संन्यासी किंवा यति नाहीत. ते जरी अरण्यवास करून असले, तरी ते कुटुंबी होते व त्यांना मुलेंबाळेंहि होतीं. ते उग्र तप करीत व जो कोणी कांही वाकडें करील त्याला शाप देण्यासहि समर्थ असत. जमदग्नि, दुर्वास, विश्वामित्र, इ. कांही ऋषी अत्यंत कोपिष्ट दिसतात. या उलट वसिष्ठ ऋषि हा शांतिब्रह्म असा दिसतो. तो इक्ष्वाकुकुलाचा पुरोहित होता. त्याचा आश्रम हिमाचलाच्या पायथ्याशीं होता. कालिदासाने रघुवंशांत त्याच्या आश्रमाचें वर्णन पुढीलप्रमाणे केलें आहे --

वनान्तरादुपावृत्तैः समित्कुशफलाहरैः ।
पूर्यमाणमदृश्याग्निप्रत्युद्यातैस्तपस्विभिः ।।
आकीर्णमृषिपत्नीनामुटजद्वाररोधिभिः ।
अपत्यैरिव नीवारभागधेयोचितैर्मृगैः ।।
सेकान्ते मुनिकन्याभिस्तत्क्षणोज्झितवृक्षकम् ।
विश्वासाय विहङ्गानामालवालाम्बुपायिनाम् ।।
आतपात्ययसंक्षिप्तनीवारासु निषादिभिः ।
मृगैर्वर्तितरोमन्थमुटजाङ्गनभूमिषु ।।
अभ्युत्थिताग्निपिशुनैरतिथीनाश्रमोन्मुखान् ।
पुनानं पवनोद्धूतैर्धूमैराहुतिगन्धिभिः ।।

(१.४९–५३)

अर्थ–संध्याकाळच्या सुमारास समिधा, दर्भ व कंदमुळें गोळा करून जंगलांतून परत आलेल्या व अदृश्य अशा यज्ञीय अग्नीने स्वागत केलेल्या तपस्विजनांनी भरलेल्या, ऋषीपत्नींच्या मुलांप्रमाणे असणाऱ्या व नीवार धान्यांतील आपला भाग मिळविण्यास चटावल्यामुळे झोपड्यांचीं द्वारें अडवून धरणाऱ्या हरिणांनी व्याप्त झालेल्या, वृक्षांच्या बुंध्याभोवतालच्या आळ्यांतील पाणी पिण्यास पक्ष्यांना भीति वाटूं नये म्हणून पाणी घातल्याबरोबर ऋषिकन्या जेथील वृक्षांपासून दूर झाल्या आहेत अशा, ऊन टळून गेल्यामुळे नीवार धान्यांच्या राशी घालून ठेविलेल्या आश्रमांतील अंगणांत बसून हरिणांनी जिथे रवंथ चालू केला आहे अशा व यज्ञीय अग्नि प्रज्वलित केला आहे असें दर्शविणाऱ्या, हुत द्रव्यांच्या गंधाने सुगंधित झालेल्या वाऱ्याने चहूंकडे पसरलेल्या धुराने आश्रमाकडे येणाऱ्या अतिथींना पुनीत करणाऱ्या अशा (त्या संयमी वसिष्ठ ऋषीच्या आश्रमास दिलीप राजा सपत्नीक येऊन पोंचला.)

निरनिराळ्या पुराणांतलें ऋषींच्या आश्रमाचें वर्णन याच धर्तीचें असतें.

पांडवांच्या कालांत व्यास हे महर्षि होऊन गेले. परीक्षित व जनमेजय या पुढील राजांच्या काळांत वैशंपायन हा ऋषि होऊन गेला. जनमेजयानंतर ऋषींची परंपरा बंद झालेली दिसते. चंद्रगुप्त मौर्य, पुष्यमित्र शुंग किंवा गुप्तराजे यांच्या काळांतल्या कोणत्याहि ऋषीचा पुराणांत उल्लेख नाही.

ऋषींचे प्रकार–मर्हर्षि, ऋषी व ऋषीपुत्र असे ऋषींचे तीन भेद भट्टार हरिश्चंद्राने चरक संहितेंतल्या सूत्रस्थान १.७ वरील व्याख्येंत सांगितले आहेत–

(१) **महर्षि**–हे पुढीलप्रमाणे सांगितले आहेत –

भृगुर्मरीचिरत्रिश्च ह्यङ्गिराः पुलहः क्रतुः ।
मनुर्दक्षो वसिष्ठश्च पुलस्त्यश्चेति ते दश ।।

वरील दहा महर्षी ब्रह्मदेवाचे मानसपुत्र असून स्वतः ईश्वरस्वरूप आहेत. म. भा. शांतिपर्वांत महर्षींचीं नांवें दहाऐवजी सात दिलीं असून तीं पुढीलप्रमाणे आहेत –

मरीचिरत्र्यंगिरसौ पुलस्त्यः पुलहः क्रतुः ।
वसिष्ठश्च महाभागः सदृशो वै स्वयम्भुवा ।।

(२०८.४)

यांना ब्रह्मसदृश किंवा प्रजापति असें म्हटलें आहे.

(२) ऋषि–भृग्वादि महर्षींच्या पुत्रांना ऋषि म्हटलें असून त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणे सांगितलीं आहेत–

काव्यो बृहस्पतिश्चैव कश्यपश्च्यवनस्तथा ।
उतथ्यो वामदेवश्च अगस्त्यश्चौशिजस्तथा ।।
कर्दमो विश्रवाः शक्तिर्वालखिल्यास्तथार्वतः ।

हे सर्व पुरुष तप केल्यामुळे ऋषिपदवीला गेले.

(३) ऋषिपुत्र – हे पुढीलप्रमाणे सांगितले आहेत–

वत्सरो नग्रहूश्चैव भरद्वाजस्तथैव च ।
ऋषिदीर्घतमाश्चैव बृहदुक्थः शरद्वतः ।
वाजश्रवाः सुवित्तश्च वश्याश्वश्च पराशरः ।
दधीचश्शंशपाश्चैव राजा वैश्रवणस्तथा ।

या सर्वांना ऋषिपुत्र म्हणतात. हे सत्याचरणाने ऋषिपदवीला प्राप्त झाले.

रत्नकोशांत ऋषींचे वेगळे सात प्रकार सांगितले आहेत–

सप्त ब्रह्मर्षिदेवर्षिमहर्षिपरमर्षयः ।।
काण्डर्षिश्च श्रुतर्षिश्च राजर्षिश्च क्रमावराः ।।

भृगु, आंगिरा, इ. ब्रह्मर्षी; नारद, पर्वत इ. देवर्षी; व्यास, वसिष्ठ इ. महर्षी; भेल, पराशर इ. परमर्षी; तै. सं. च्या ५ कांडांचे द्रष्टे ते कांडर्षी; सुश्रुत, चरक, इ. श्रुतर्षी व ऋतुर्पण हा राजर्षि होय. [म. ज्ञा. को.; वे. इं.; वै. वा. इ.; श. क.]

ऋषिऋण याची व्याख्या सायणाने पुढीलप्रमाणे केली आहे– 'वेदाभ्यासादिभिरपाकर्तव्यं यद् ऋणं तत्'=वेदाध्ययन, स्वाध्याय इ. गोष्टी केल्यामुळे जें फिटतें, तें ऋषिऋण होय. अध्ययन-अध्यापनाची परंपरा चालू ठेवल्याने ऋषींचें ऋण फिटतें, असा त्याचा अर्थ होतो. **पाहा–**ऋणत्रय.

ऋषिक ल्हादिनी नदीच्या तीरावरचें एक प्राचीन राज्य. [पु. इं.]

ऋषिक देश महाभारतकालीन एक देश. अर्जुन जेव्हा उत्तर दिग्विजयार्थ निघाला, तेव्हा त्याने बाल्हीक, दरद व कंबोज (आधुनिक बलख, गिलगित व पामीर) हे देश जिंकले व तो पूर्वकंबोज देशांत शिरल्यावर तिथे ऋषिक लोकां-

बरोबर त्याचें घनघोर युद्ध झालें, असें सभापर्वांत सांगितलें आहे. मूळ महाभारतांत अर्जुन चीन देशाला गेल्याचा उल्लेख नाही. परंतु बाणभट्टाने अर्जुनाच्या चीनयात्रेचें वर्णन केलें आहे. सनपूर्व पांचव्या शतकांत यूची किंवा ऋषिकदेश हा उत्तर चीनमध्ये होता असें कळतें. (हर्षचरित–एक सांस्कृ. अध्ययन)

ऋषिकन्या नर्मदेवरील एक तीर्थ. इथे महादेवाने एका ऋषिकन्येला वरलें. [मत्स्य १९३. १४]

ऋषिका शुक्तिमती नदीपासून निघालेली एक नदी. [पु. इं.]

ऋषिकुल्या शुक्तिमान् पर्वतांतून निघालेली एक नदी.

ऋषिचांद्रायण एक प्रायश्चित्त. महिनाभर रोज हविष्यान्नाचे फक्त तीन घास खाऊन राहणें, हें या प्रायश्चित्ताचें स्वरूप आहे. [हि. ध.]

ऋषितीर्थ नर्मदेवरील एक स्थान. इथे तृणबिंदु नांवाचा ऋषि शापमुक्त झाला. [मत्स्य पु. १९२. १३]

ऋषिभाषित (पालि– इसिभासित) एक बौद्ध सूत्र ग्रंथ. प्रत्येकबुद्धांच्या द्वारें भाषित (कथित) झाल्या कारणाने या सूत्राला हें नांव मिळालें. याच्या नारद, अंगरिसि, वल्कलचीरि, कुम्मापुत्त, महाकासव, मंखलिपुत्त, बाहुक इ. ४५ अध्ययनांत प्रत्येकबुद्धांचीं चरित्रें दिलेलीं आहेत. [प्रा. सा. इ.]

ऋषिपंचमी (१) स्त्रियांचें एक व्रत. तिथि भाद्र० शु. ५ मी. स्त्रिया सकाळीं उठून नदीवर जाऊन आघाड्याच्या काड्यांनी १०८ वेळां दांत घासतात. नंतर तितक्याच वेळां नदींत बुड्या मारतात किंवा तितके तांब्ये अंगावर ओततात. घरीं आल्यावर एका पाटावर तांदुळांच्या आठ पुंज्या घालून त्यांवर कश्यपादि सात ऋषी व एक अरुंधती यांच्यासाठीं आठ सुपाऱ्या मांडतात. नंतर संकल्प करून

कश्यपोऽत्रिर्भरद्वाजो विश्वामित्रोऽथ गौतमः ।
जमदग्निर्वसिष्ठश्च साध्वी चैवाप्यरुन्धती ।।

या मंत्राने त्यांची षोडशोपचार पूजा करतात. मग ऋषींचें विसर्जन करतात. या दिवशीं स्त्रिया कंदमुळांचा आहार करतात व बैलाच्या श्रमांचें कांहीहि खात नाहीत.

हें व्रत सात वर्षे केल्याने अज्ञानस्थितींत घडलेल्या मासिक विटाळाचा दोष जातो. या व्रताची कहाणी अशी–आटपाट नगर होतें. तिथे एक ब्राह्मण शेतीभाती करून राहत होता. एक दिवस त्याची बायको रजस्वला झाली; पण तिने दूर न राहतां घरांतले सगळे व्यवहार केले. त्या दोषाने तिचा नवरा पुढच्या जन्मीं बैल झाला व ती स्त्री कुत्री झाली. कर्मधर्मसंयोगाने तीं दोघेंहि मुलाच्याच घरीं राहायला आलीं. एक दिवस मुलाने आपल्या बायकोला सांगितलें, की 'आज माझ्या बापाचें श्राद्ध आहे; तर तूं खीरपुरीचा स्वयंपाक कर.' तिनें तसें केलें. पण खिरीचें भांडें उघडें राहिलें व सापानें त्यांत आपलें विष टाकलें. कुत्रीने ती गोष्ट पाहिली. ही खीर ब्राह्मण खातील, तर मरून जातील असें तिला वाटलें व ती खिरीच्या पातेल्याला शिवली. ब्राह्मणाच्या बायकोने कुत्रीला ताडण करून तिला दिवसभर खायलाच घातलें नाही. रात्रीं ती बैलाजवळ जाऊन रडूं लागली. बैल तिला म्हणाला. 'आज मीहि दिवसभर उपाशीच आहें. आज मुलाने मला नांगराला जुंपलें व मारलें. गेल्या जन्मीं तूं विटाळाचा संपर्क केलास, म्हणून तुला व मला हा जन्म आला.' ब्राह्मणाने तें ऐकलें. त्याला वाईट वाटलें. त्याने बैलाला चारा घातला. कुत्रीला अन्न घातलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून तो अरण्यांत ऋषींकडे गेला. बैल झालेल्या आपल्या बापाचा व कुत्री झालेल्या आपल्या आईचा उद्धार कसा होईल, असा त्याने ऋषींना प्रश्न केला. ऋषींनी त्याला ऋषिपंचमीचें व्रत सांगितलें. मुलाने तें व्रत केलें व त्याचें पुण्य आईबापांना दिलें. त्या पुण्याने बैल होता तो पुरुष झाला. कुत्री होती ती स्त्री झाली. मग दोघेंहि विमानांत बसून स्वर्गाला गेलीं. [व्रतराज]

(२) जैनांचें एक व्रत. आषाढ शु. ५ मीला व्रताचा प्रारंभ. दर महिन्याच्या ५ मीस उपवास. असे ६५ उपवास झाल्यावर व्रताचें उद्यापन करतात. याची कथा अशी–

हस्तिनापुरांतील धनपति श्रेष्ठीची कन्या कमलश्री हिने हें व्रत केलें व तिचा हरवलेला पुत्र तिला परत मिळाला. शेवटीं त्या दोघांनाहि स्वर्गप्राप्ति झाली. [जै. व्र. वि. सं.]

ऋषिपुत्र यांनी वेदांची मंत्र व ब्राह्मण अशी पुनर्रचना केली, तसेंच स्वर व वर्ण यांचीहि व्यवस्था केली. [पु. इं.]

ऋषिपुत्रक ऋषिकांचे पुत्र. यांनी ब्राह्मणें, कल्पसूत्रें व धर्मशास्त्र यांची रचना केली. [पु. इं.]

ऋषिबोधोत्सव आर्यसमाजी लोकांचा एक उत्सव. शिवरात्रीच्या दिवशीं हा उत्सव साजरा करतात व त्या प्रसंगीं स्वामी दयानंदांचे गुणानुवाद गातात. स्वामी

दयानंदांच्या अंतरांत खऱ्या ज्ञानाचा उदय याच दिवशीं झाला असें समजतात. लहानपणीं दयानंद शिवरात्रीला रात्रभर जागरण करीत असत. एकदा अशा वेळीं एक उंदीर शिवलिंगावर चढून तिथले तांदूळ खात असतांना त्यांना दिसला. तेव्हांपासून त्यांची मूर्तीच्या सामर्थ्याविषयींची श्रद्धा नष्ट झाली. नंतर त्यांनी खऱ्या शिवतत्त्वाच्या शोधाला प्रारंभ केला व तें प्राप्त झाल्यावर आर्यसमाजाची स्थापना केली. [ब्र. चं.]

ऋषिब्राह्मण सामदेवाच्या प्राचीन अनुक्रमणीला ऋषिब्राह्मण असें नांव आहे. [क्ला. डि. हिं. मा.]

ऋषियज्ञ पंचमहायज्ञांपैकी एक. पाहा–ब्रह्मयज्ञ.

ऋष्टि मरुतांच्या हातांतील एक शस्त्र. हें शस्त्र म्हणजे आकाशांत चमकणारी विद्युत् होय. या अर्थीं ऋष्टि हा शब्द ऋग्वेदांत अनेक वेळां आला आहे (ऋ. १.३७.१; ५.५२.६). [वे. इं.]

ऋष्यमूक एक पर्वत. आनेगुंदीपासून आठ मैलांवर तुंगभद्रा नदीच्या तीरावर हा पर्वत आहे. पंपानदी या पर्वतांतच उगम पावते व नंतर पश्चिमेकडे वाहत जाऊन तुंगभद्रेला मिळते. सुग्रीव या पर्वतावर राहत असे. याच पर्वतावर रामचंद्राची हनुमान् व सुग्रीव यांच्याशीं प्रथम भेट झाली (वा. रा. किष्किंधा ४). मार्कंडेय पुराणांतहि या पर्वताचा उल्लेख आहे.

आधुनिक काळांतील अहमदनगरपासून नळदुर्ग व कल्याणी यांच्या पलिकडे पसरलेली व मंजीरा आणि भीमा या नद्यांना विभागून जाणारी जी टेकड्यांची रांग आहे, तोच प्राचीन ऋष्यमूक पर्वत होय, असें पार्गिटरचें मत आहे. [हि. जॉ. ए. इं.; हि. ध.; पु. इं.]

ऋष्यवत् एक पर्वत. यांतून विमला, चंचला, शुक्तिमती, चित्रकूटा, इ. नद्या उगम पावल्या आहेत. [मत्स्य पु. ११३. २५-२६]

ऋष्यशृंग धर्मशास्त्रावरील एक ग्रंथकार. याचा ग्रंथ उपलब्ध नाहीं; पण त्याच्या ग्रंथांतील आचार, आशौच, श्राद्ध, प्रायश्चित्त इ. विषयांवरील अवतरणें मिताक्षरा, स्मृतिचंद्रिका इ. ग्रंथांत दिलीं आहेत. अपरार्कानें ऋष्यशृंगाचा एक श्लोक दिला आहे, तो असा–

पूर्वनष्टां तु यो भूमिमेकश्चेदुद्धरेत् क्रमात् ।
यथांशं तु लभन्त्वन्ये दत्त्वांशं तु तुरीयकम् ।।

अर्थ– सामायिक कुटुंबांत राहणाऱ्या एका इसमानें पूर्वी गमावलेली जमीन जर स्वप्रयत्नानें परत मिळविली, तर त्याला त्यापैकीं चौथा हिस्सा मिळावा व बाकीची कुटुंबांतील इतर लोकांनी वांटून घ्यावी. [हि. ध.]

ऋष्यशृंगाश्रम हा आश्रम बिहारमधील भागलपूरपासून पश्चिमेस २८ मैलांवर ऋषिकुंड या ठिकाणीं मैरा (मरुक) टेकडीमुळे बनलेल्या एका दरींत होता. तिथे ऋषिकुंड नांवाचें गार व गरम पाण्याच्या झऱ्यांनी बनलेलें एक कुंड आहे. या कुंडाच्या उत्तर दिशेला ऋष्यशृंग व त्याचा पिता विभांडक हे दोघे तपश्चर्येला बसत असत. रोमपादाची कन्या शांता ही ऋष्यशृंगाची पत्नी होती. दशरथ राजासाठी यानें पुत्रकामेष्टि केली. त्या वेळीं दशरथानें ही कन्या त्याला दिली. ऋष्यशृंग हा त्या काळांतील महान् आचार्य होता. चिकित्साशास्त्रांतहि त्याची गति होती. महाभारतकालांतहि याच्या आश्रमाची भरभराट होती. वनवासांत असतांना युधिष्ठिरानें लोमश ऋषीबरोबर या आश्रमाची यात्रा केली होती. त्या वेळीं तिथे दहा हजार छात्र निःशुल्क अध्ययन करीत होते. त्यांच्या भोजनाची व वस्त्रप्रावरणाची सोयहि आश्रमातर्फेच केली जात होती.

रायपूर जिल्ह्यांत महानदीच्या उगमस्थळीं ऋष्यशृंगाचा आश्रम होता, अशीहि समजूत आहे. हा उगम सिहोरा येथील टेकड्यांत झाला आहे. तिथे उखळासारख्या एका खडकांतून महानदी निघते. हा खळगा ऋष्यशृंग कमंडलु ठेवीत होता त्या जागीं निर्माण झालेला आहे, अशी आख्यायिका सांगतात. [दुर्गा भागवत; हि. जॉ. ए. इं.]

ऋष्यशृंगेश्वर वाराणसींतलें एक तीर्थ. हें विभांडेश्वराच्या उजव्या अंगाला आहे. [क्रु. क. त.]

ऋक्ष किंवा ऋक्षवत् (१) भारतवर्षांतील सात कुलपर्वतांपैकीं एक. इथे अत्रीनें पुत्रप्राप्तीसाठीं तपश्चर्या केली. विंध्यपर्वताच्या पूर्वभागाला हें नांव आहे. या पर्वतांतून शोण, नर्मदा व महानदी या नद्या उगम पावतात. याला ऋष्यवत् असेंहि म्हणतात. [मार्कं. पु. ५४. २४–२५; भाग. पु. ४. १. १७.]

(२) मृगमंदा व पुलह या दंपतीपासून जन्मलेली एक वानरजमात. [पु. इं.]

ऌ वर्णमालेंतला नववा स्वरवर्ण. दन्त हें याचें उच्चारण-स्थान आहे. हा ऱ्हस्व, दीर्घ व प्लुतहि होतो. उदात्तानुदात्तस्वरित असेहि याचे तीन भेद होतात. हा बिंदुत्रयात्मक असून याचा वर्ण विद्युल्लतेसारखा पिवळा आहे (कामधेनुतंत्र). मातृकान्यासांत उजव्या गालावर याची योजना होते.

ॡ वर्णमालेंतला दहावा स्वरवर्ण. दन्त हें याचें उच्चारण-स्थान आहे. उदात्तादिभेदांनी हा त्रिविध होतो. याचें रूप गुणत्रयात्मक असून पूर्णचंद्रासारखें आहे (कामधेनुतंत्र). मातृकान्यासांत डाव्या गालावर याची योजना होते.

ए देवनागरी वर्णमालेंतील आठवा व संस्कृत वर्णमालेप्रमाणे अकरावा स्वरवर्ण. कंठ–तालु हें याचें उच्चारणस्थान आहे. हा उदात्तानुदात्तस्वरित अशा भेदाने त्रिविध होतो. या वर्णाला सध्याचें स्वरूप प्राप्त होण्यास स्थूलमानाने पांच अवस्थांतून जावें लागलें आहे. पहिली अवस्था गिरनारच्या शिलालेखांत,



एकार

दुसरी इ. स. च्या सहाव्या शतकांतल्या उष्णीषविजय धारणीच्या ताडपत्री पुस्तकांत, तिसरी बुद्धगया येथील महानामन्च्या लेखांत, चौथी धार येथील कूर्मशतक या शिलाकाव्यांत (११ वें शतक) व पांचवी आपण अलिकडे लिहितों ती, अशा या पांच अवस्था होत.

कामधेनुतंत्रांत एकाराचें वर्णन पुढीलप्रमाणे दिलेलें आहे–

एकारं परमं दिव्यं ब्रह्मविष्णुशिवात्मकम् ।
रञ्जिनीकुसुमप्रख्यं पञ्चदेवमयं सदा ।।

अर्थ – एकार हा परम दिव्य असून तो ब्रह्मविष्णुशिवात्मक व पंचदेवमय आहे. त्याचा वर्ण निळीच्या फुलासारखा आहे.

मातृकान्यासांत एकाराचें स्थान ओष्ठ हें मानलेलें आहे. [म. ज्ञा. को.; श. क.]

एकजटा वज्रयानी बौद्धांची सामर्थ्यशाली देवता. ही नीलवर्ण, एकमुख व द्विभुज, चतुर्भुज किंवा अष्टभुज असते. क्वचित् तिला बारा मुखें व चौवीस हात असतात. तिचें रूप भयानक असून ती हातांत वज्र, खड्ग इ. आयुधें धारण करते. हिचा मंत्र असा –



एकजटा

ॐ ह्रीं नमो भगवत्येकजटे
मम वज्रपुष्पं प्रतीच्छ स्वाहा ।

या मंत्राचें सामर्थ्य पुढील श्लोकांत वर्णिलें आहे–

देव्या एकजटायास्तु
मन्त्रराजो महाबलः ।
अस्य श्रवणमात्रेण
निर्विघ्नो जायते नरः ।।
(साधनमाला)

अर्थ – एकजटा देवीचा मंत्र महाबलवान् असून त्याच्या केवळ श्रवणानेच माणसाचीं विघ्नें दूर पळतात. [इं. बु. इ.]

एकटी तृतीया परधान आदिवासींचा एक धार्मिक सण. वैशाख शु. ३ येस हा सण येतो. या दिवशीं परधान मुली कापडाच्या बाहुल्या बनवितात व त्यांचीं लग्नें लावतात.

मोठ्या माणसांची पध्दत याहून वेगळी असते. गांवचा गुणिया पहाटे उठून गांवाबाहेरच्या झऱ्यावर जातो व एक नवें मडकें पाण्याने भरून घेऊन आपल्या शेतांत जातो. तिथे गांवकऱ्यांनी मातीचीं मोठीं पांच ढेकळें आणून ठेवलेलीं असतात. हीं पांच ढेकळें म्हणजे पावसाळ्याच्या पांच महिन्यांचीं प्रतीकें होत. नंतर पाण्याच्या मडक्याला खालीं एक भोक पाडून त्यांत कापडाचा बोळा बसवितात. त्या मडक्यावर दुसरें एक लहान मडकें ठेवून त्यांत पणती पेटवून ठेवतात. मग गुणिया धूप-दीप दाखवून त्या मडक्याची पूजा करतो व हळदींत बुडविलेला एक दोरा त्याच्या गळ्यांत बांधतो. मग गांवचा पाटील आपल्या दंताळ्यासह त्या मडक्याला पांच व इतर शेतकरी आपल्या बैलासह तीन प्रदक्षिणा घालतात. नंतर तीं मडकीं मातीच्या ढेकळांवर ठेवून लोक घरोघर जातात. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुन्हा ते लोक शेतांत येतात. मडक्यांतल्या पाण्याने जर खालचीं ढेकळें भिजलीं नाहीत, तर त्या वर्षी दुष्काळ पडणार, असें समजतात. जर दोन किंवा तीन ढेकळें ओलीं झालीं, तर तितके महिनेच चांगला पाऊस पडेल, असें मानतात. [दि परधान्स्]

एकतारी एक प्राचीन व साधें तंतुवाद्य. एका पोकळ भोपळ्यांत एक अडीच-तीन फूट लांबीची पोकळ बांबूची काठी बसवितात व तिला एक तार जोडतात. ही

तार बोटाने वाजवितात. एकच तार बसविलेली असते म्हणून या वाद्याला एकतारी असें नांव मिळालें असलें, तरी क्वचित् या वाद्याला दोन ताराहि असतात. एकतारी हें ऐतिहासिक दृष्टया तंबोऱ्याचें पूर्वरूप आहे. साधु, बैरागी, गोसावी, वारकरी इ. लोक या वाद्याच्या सुरावर अभंग, भजनें व पदें गातात. उजव्या हातीं एकतारी व डाव्या हातीं तालासाठी चिपळ्या घेऊन गाणीं म्हणायचीहि पध्दत आहे. [परंपरा—लोकगीत; सु. वि. को.; इं. म्यु. इं.]

एकदंत भट्ट सहा गाणपत्यांतील स्वर्ण गणपतीचा उपासक. हा शंकराचार्यांचा समकालीन होता.

एकधना एक यज्ञीय स्थाली. पण हिला स्थाली म्हणण्यापेक्षा घागरच म्हणणें योग्य होईल. प्रातःसवनाच्या प्रारंभीं विषम संख्येने या एकधना भरून ठेवतात. सोम कुटून झाल्यावर एकधनामधलें पाणी त्यांत मिसळतात. निरनिराळ्या सोमयागांत एकधनांची संख्या भिन्न भिन्न असते. [विद्याधरशास्त्री भिडे]

एकनक्षत्र जननशांति एकाच नक्षत्रावर दोन भावांचा किंवा पितापुत्रांचा जन्म झाला, तर ती गोष्ट अशुभ होय, असें मानतात.

हा दोष दूर करण्यासाठी ही शांति करतात. पिता व बालक यांचें नक्षत्र एक असल्यास प्रथम गोमुखप्रसवशांति करून नंतर वरील शांति करतात. या शांतीचा विधि असा—

पुण्याहवाचन झाल्यावर ईशान्येला एक कलश मांडून त्यावरील पूर्णपात्रांत ज्या नक्षत्रावर बालक जन्मलें असेल, त्या नक्षत्रदेवतेची स्थापना करतात. तिच्या बरोबरीने अन्य देवतांचेंहि स्थापन व आवाहन करून सर्वांची यथाविधि पूजा करतात. नंतर अग्निस्थापना करून त्या त्या नक्षत्रदेवतेसाठी प्रयोगांत सांगितल्याप्रमाणे प्रधान होम करतात. प्रायश्चित्तहोम झाल्यावर अभिषेक करतात. शेवटीं ऋत्विजांना दक्षिणा देऊन कर्म समाप्त करतात.

एकनाथ (१५३३ ते १५९९ इ. स. सुमारें) महाराष्ट्रांतील एक प्रख्यात संत व कवि. हे भानुदास या प्रसिद्ध संतांचे पणतू होत. भानुदास—चक्रपाणि—सूर्यनारायण—एकनाथ अशी ही वंशवेल आहे. सूर्यनारायणाच्या पत्नीचें नांव रुक्मिणी असें होतें. या दांपत्याच्या पोटीं पैठण येथे नाथांचा जन्म झाला. तो नेमका कोणत्या सालीं झाला, याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. पांगारकरांच्या मतें इ. स. १५२८ च्या सुमारास, तर भावे यांच्या मतें इ. स. १५४८ सालीं नाथ जन्मले. त्यांच्या जन्माच्या वेळीं मूळ नक्षत्र होतें, असें सांगतात.

या संबंधांत नाथांनी स्वतःच्या जन्मावर एक अभंग रचला आहे, तो असा——

मुळींच्या मुळीं एका जन्मला ।
मायबापें थोर धाक घेतला ।।
कैसें मूळ नक्षत्र आलें कपाळा ।
स्वयें लागलों दोहींच्या निर्मूळा ।।
शांति करितां अवध्यांची शांति ।
मुळीं लागोनियां लाविली ख्याति ।।
एका जनार्दनी मुळींच्या गोष्टी ।
मायेसगट सगळा बापचि घोटी ।।

या अभंगाचा आध्यात्मिक अर्थ बाजूला ठेवला, तरी नाथांचें चरित्र त्यांतून थोडेंफार पाहतां येतें. मूळ नक्षत्रावर जन्मलेल्या नाथांचे आईबाप त्यांच्या बालपणींच निवर्तले व त्यामुळें त्यांचें संगोपन त्यांचे आजोबा चक्रपाणि यांना करावें लागलें. वयाच्या सहाव्या वर्षीं मौंजीबंधन झाल्यावर तत्कालीन पद्धतीप्रमाणे संस्कृत भाषा व नित्य-नैमित्तिक ब्रह्मकर्म याचें नाथांना शिक्षण मिळालें. पुढे वयाच्या बाराव्या वर्षीं घरांत कोणालाहि न सांगतां ते सद्‌गुरूच्या शोधार्थ घराबाहेर पडले व देवगिरी येथे जनार्दनस्वामींकडे जाऊन राहिले. प्रपंच साधून परमार्थाचा लाहो कसा घ्यावा, हें जनार्दनस्वामींनी आपल्या आचरणाने नाथांना शिकविलें. एकनाथांना देवगिरीवर गुरुमुखाने ज्ञानेश्वरीच्या श्रवणाचा लाभ झाला. सहा वर्षें गुरुसान्निध्यांत राहिल्यावर मग नाथांना 'सुलभ' पर्वतावर ईश्वरसाक्षात्कार झाला. नंतर हे गुरुशिष्य तीर्थयात्रेला निघाले. पंचवटीच्या मुक्कामांत नाथांनी स्वामींच्या आज्ञेवरून चतुःश्लोकी भागवतावर ओवीबद्ध प्राकृत टीका लिहिली. नाथांच्या काव्यरचनेला प्रारंभ झाला, तो इथूनच. पुढे आणखी कांही तीर्थांची यात्रा करून जनार्दनस्वामी देवगिरीला परतले व नाथ एकटेच तीर्थयात्रा करूं लागले. उत्तर व दक्षिण भारतांतील अनेक स्थळांचें दर्शन घेऊन व तत्कालीन देशस्थितीचें अवलोकन करून नाथ वयाच्या पंचविसाव्या वर्षीं पुन्हा पैठणला आले.

जनार्दनस्वामींच्या आदेशाने पुढे नाथांनी विवाह केला व गृहस्थाश्रम थाटला. नाथांची पत्नी गिरिजाबाई ही अत्यंत सुशील व आदर्श पतिव्रता होती. प्रपंचांत राहूनहि नाथांनी उत्कृष्ट परमार्थ साधला, याचें बरेंचसें श्रेय गिरिजाबाईला

द्यायला हवें. नाथांनी आपल्या घरीं सदावर्त ठेवलें होतें. दारीं आलेल्या अतिथ-अभ्यागताची व्यवस्था ते घरच्या सारखीच ठेवीत. हें सर्व करीत असतांनाहि नामस्मरण, कथाकीर्तन, अध्यात्मविवेचन व ग्रंथलेखन हा त्यांचा परमार्थाचा उद्योग नित्य चालू होता.

नाथांच्या चरित्रांत कांही अलौकिक चमत्कारांच्या कथा आहेत. त्यांपैकी कांही अशा--

(१) नाथांच्या देवडीवर दत्तात्रेय स्वतः चोपदार होऊन पहारा करीत असे. जनार्दनस्वामी व दासोपंत यांना दत्तात्रेयाचें दर्शन इथेच झालें.

(२) श्रीखंड्याच्या रूपाने कृष्ण स्वतः नाथांच्या घरीं बारा वर्षें सेवाचाकरी करून राहिला होता.

(३) वडिलांच्या श्राद्धतिथीला केलेला स्वयंपाक नाथांनी भुकेल्या अस्पृश्यांस वाढला हें ऐकून ब्राह्मण रागावले व त्यांनी नाथांवर बहिष्कार टाकला. तेव्हा नाथांनी आपल्या पितरांसच आवाहन करून भोजन घातलें.

एकनाथांनी ग्रंथरचनेचा उद्योग आयुष्यभर चालू ठेवला होता. त्यांनी भागवत पुराणाच्या एकादश स्कंधावर टीका लिहायला घेतली होती. तिचे पांच अध्याय इ. स. १५७० मध्ये लिहून पुरे झाले. भागवतासारख्या पवित्र ग्रंथावर नाथांनी प्राकृत टीका लिहावी, हें त्यावेळच्या काशीच्या कर्मठ पंडितांना आवडलें नाही व त्यांनी नाथांना काशीला बोलावून त्यांना अपमानकारक वागणूक दिली. परंतु पुढे नाथांचें महत्त्व त्यांना कळून आलें आणि इ. स. १५७३ सालीं जेव्हा काशीक्षेत्रीं भागवताच्या टीकेची समाप्ति झाली, तेव्हा काशींतल्या पंडितांनी त्या ग्रंथाची पालखींतून मिरवणूक काढली. काव्यदृष्ट्या हा ग्रंथ सरस असल्यामुळे त्याला मूळ भागवताचें नांव मिळालें व एकनाथी भागवत म्हणून त्याची प्रसिद्धि झाली. याशिवाय नाथांनी भावार्थ रामायण, रुक्मिणी-स्वयंवर हे ग्रंथ लिहिले व असंख्य भारुडें, पदें, इ. काव्यरचना केली.

नाथांच्या काळीं ज्ञानेश्वरांनी समाधि घेतल्याला तीनशें वर्षें होऊन गेलीं होतीं. मध्यंतरीच्या काळांत आळंदीला समाधिस्थानीं मोठें रान माजलें होतें व त्या ठिकाणीं ज्ञानेश्वरांची समाधि आहे, ही गोष्टहि लोक विसरून गेले होते. एकनाथांना एका रात्रीं ज्ञानेश्वरांचा दृष्टान्त झाला व ते आपल्याबरोबर बरीच मंडळी घेऊन आळंदीला गेले. ज्ञानेश्वरांच्या समाधीचें दार उघडून त्यांनी समाधिस्थानांत प्रवेश केला. तिथे त्यांनी पाहिलें, की अजानवृक्षाची मुळी ज्ञानेश्वरांच्या गळचाला लागली आहे. मग नाथांनी ती मुळी काढून टाकली. ही आख्यायिका वारकरी मंडळींत लोकप्रिय आहे. त्याच वेळीं ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार करण्याचा ज्ञानेश्वरांनी नाथांना आदेश दिला, असेंहि वारकरी समाजांत मानलें जातें.

पुढे नाथांनी ज्ञानेश्वरीच्या अनेक हस्तलिखित पोथ्या जमवून तिची एक संशोधित शुद्ध आवृत्ति तयार केली. महाराष्ट्रांत सध्या जी ज्ञानेश्वरी प्रचलित आहे, तीच नाथसंशोधित आवृत्ति होय.

नाथांना एकूण चार अपत्यें झालीं. त्यांपैकी सर्वांत मोठा हरिपंडित. हा मोठा विद्वान् व संस्कृत भाषेचा अभिमानी होता. त्यामुळे सुरवातीला त्याने नाथांच्या लोकाभिमुख वृत्तीला व त्यांच्या मराठी ग्रंथरचनेला बराच विरोध केला. पण नंतर पित्याची थोरवी पटल्यामुळे त्याचा तो विरोध मावळला. त्यांची थोरली मुलगी गोदा ही पैठणच्या मुद्गलांकडे दिली होती. कविवर्य मुक्तेश्वर हा तिचाच मुलगा होय.

एकनाथांच्या भारुडांतून व भावार्थ रामायणांतून तत्कालीन मुसलमानी अंमलाखालील महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक दुरवस्थेचें चित्रण थोडें फार पाहायला मिळतें. त्यांच्या वेळीं धार्मिक क्षेत्रांत दांभिकांच्या कारवायांना ऊत आला होता. नाथांनी या संधिसाधूंचा चांगला समाचार घेतला आहे. नाथांना तत्कालीन समाजाच्या अधोगतीची खंत वाटली व ते लोकोद्धारार्थ उभे ठाकले. कथाकीर्तनें व वाङमयरचना करून त्यांनी तें कार्य सुरूं केलें व तत्कालीन बहुविध व बहुरंगी समाजाला भागवतधर्माच्या सूत्रांत गोवून त्याला भक्तिमार्गाला लावलें. गृहस्थाश्रमांत राहूनहि संतवृत्ति आचरितां येते, हें नाथांनी स्वतःच्या उदाहरणाने लोकांना पटवून दिलें. प्रपंच हाच परमार्थरूप करणारा नाथांसारखा संतपुरुष विरळाच आढळेल.

एकनाथांच्या थोरवीचें रहस्य त्यांनी निर्मिलेल्या ग्रंथसंपत्तींत तर आहेच; शिवाय ज्या परिस्थितींत भागवतधर्माचा प्रसार करून महाराष्ट्राची विस्कळित घडी पुनश्च ठीक बसविण्याचा त्यांनी प्रयत्न केला त्यांतहि आहे. त्यांच्या कार्याचें परिस्थितिनिरपेक्ष मूल्यमापन करणें एकांगी ठरेल. ज्ञानेश्वरांच्या नंतर महाराष्ट्रावर संकटांची परंपराच कोसळत गेली. स्वराज्याचा अस्त झाल्यामुळे समाजाची घडीच विस्कटली. संतांच्या भागवतधर्माने अठरापगड जातींत धर्माविषयींचा अभिमान व सच्चारित्र्याविषयींची निष्ठा जागृत केली होती हें खरें; परंतु ही निष्ठा खोलवर रुजण्यापूर्वीच परचक्र आलें आणि साराच डाव उधळला गेला. धर्म उत्सन्न होण्याच्या मार्गाला लागला. सारा समाज हतप्रभ झाला. अशा आणीबाणीच्या परिस्थितींत धर्माचा ध्वज फडकत ठेवण्याचें महनीय कार्य नाथांनी केलें.

एकनाथांनी अध्यात्मावर लहानमोठे असे ८--१० ग्रंथ

लिहिलेले आहेत. चतुःश्लोकी भागवत हा त्यांचा पहिला ग्रंथ. यानंतर त्यांनी हस्तामलक, शुकाष्टक, स्वात्मसुख, आनंदलहरी, गीतासार, आनंदानुभव, नाथभागवत, रुक्मिणीस्वयंवर, भावार्थ-रामायण, हे ग्रंथ लिहिले. याशिवाय ध्रुव, प्रल्हाद, उपमन्यु, सुदामा, ज्ञानेश्वर, नामदेव, चोखामेळा इ. भक्तांचीं व संतांचीं चरित्रेंहि लिहिलीं आहेत. त्यांनी रचलेलीं पदें व अभंग हे वारकऱ्यांच्या व अन्य पारमार्थिकांच्या परिचयाचे आहेत. त्यांच्या अभंगांची गाथा तुकोबांच्या गाथेएवढीच भरेल. त्यांनी जीं भारुडें रचलीं आहेत, तीं विशेष लोकप्रिय आहेत. जनता भक्तिज्ञानाला सन्मुख व्हावी, तिला आत्मकल्याणाचा मार्ग सांपडावा व संसार करीत असतांनाच जीवाने परमात्मसुख भोगावें, या हेतूने नाथांनी हें सारें वाङमय निर्माण केलें आहे.

चतुःश्लोकी भागवत–हें मूळ भागवताच्या दुसऱ्या स्कंधाच्या ९ व्या अध्यायांत आहे. मुळांत याचे ४५ श्लोक आहेत व नाथांनी त्याच्या स्पष्टीकरणार्थ हजारावर ओव्या लिहिल्या आहेत. हें प्रकरण नाथांनी गोदावरीच्या उत्तरतीरीं चंद्रगिरीवर चंद्र नामक ब्राह्मणाच्या घरीं वस्तीस असतांना लिहिलें.

ब्रह्मदेवाला आदिनारायणाने सृष्टि निर्माण करण्याची आज्ञा केली असतां हें कार्य आपल्या हातून कसें पार पडेल, याची ब्रह्मदेवाला चिंता पडली. तेव्हा उदकांतून 'तप तप' = तप कर, असा ध्वनि निघाला. ब्रह्मदेवाने त्याप्रमाणे तपश्चर्या केली. त्यावर भगवान् प्रसन्न झाला व त्याने ब्रह्मदेवाला दर्शन देऊन चार श्लोकांत आपलें गुह्य ज्ञान सांगितलें. याच विषयावर नाथांनी हें अत्यंत रोचक असें भाष्य लिहिलें आहे. भगवान् सांगतो, की सृष्टीच्या आदिमध्यावसानीं एका नारायणावांचून दुसरें कांहीहि नाही–

तेविं नामरूपसंबंध । जाऊनि भूतभौतिकभेद ।
अंतीं उरें मी परमानंद । स्वानंदकंद निजरूपें ।।
ज्याचें नांव म्हणिजे लुगडें । तें पाहों जातां सूतचि उघडें ।
तेविं जग पाहतां धडफुडें । अति चोखडें चिद्रूप माझें ।।
यालागीं सृष्टिआदि मीच असें । सृष्टिरूपीं मीचि भासें ।
अंतीं सृष्टिचेनि नाशें । म्यां उरिजे अविनाशें सच्चिदानंदें ।।

हस्तामलक–'नाहं मनुष्यो न च देवयक्षो' या शंकराचार्य-कृत १४ श्लोकांच्या स्तोत्रावर नाथांनी हें ६७४ ओव्यांचें भाष्य केलें आहे. नाथांच्या हृदयांतील गुह्य ज्ञान या ग्रंथाच्या मिषाने प्रकट झालें आहे, असें म्हटलें पाहिजे. यांत आत्म-स्वरूपाचें वर्णन पुढीलप्रमाण केलेलें आहे–

आकाश न माखे काजळें । आत्मा न माखे मोहमैळें ।
आकाश न जळ अग्निज्वाळें । आत्मा क्रोधानळें संतापेना ।।
आकाश न भिजे पाउसें । आत्मा न माख विषयरसें ।
नभ शून्यत्वें व्यापक असे । आत्मा चिदंशें स्वानंदपूर्ण ।।

शुकाष्टक–'निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ।' असा चतुर्थ चरण असलेलें एक शुककृत अष्टक प्रसिद्ध आहे. त्यावर नाथांची ही टीका आहे.

स्वात्मसुख–या ग्रंथाच्या नांवारूनच त्यांतील वर्ण्यविषयाची कल्पना येईल.

आनंदलहरी – सुमारें १५० ओव्यांचें हें एक छोटें प्रकरण असून त्यांत आत्म्याचें आनंदरूप कळून आल्यावर बंध-मोक्ष, स्वर्ग-नरक, सगुण-निर्गुण इ. सर्व भाषा मावळते व भ्रांति नष्ट होते असें म्हटलें आहे–

निजस्वरूप पाहतां दृष्टी । निजानंद न समाये सृष्टी ।
तुटल्या जन्ममरणाच्या गाठीं । निर्भय पोटीं मी जालों ।।
बंधमुक्तीची आटाआटी । संचरली होती माझे पोटीं ।
होतां तुझी कृपादृष्टी । उठाउठी पळाली ।।

याशिवाय नाथांनी दशावतार, एकादशी माहात्म्य, रुक्मांगदाची कथा, तुलसीमाहात्म्य, हनुमानजन्म, सांदीपनीकथा, शिव-पार्वती विवाह, गंगागौरीकलह इ. पौराणिक कथानकें व आख्यानें सोप्या अभंग वृत्तांत वर्णिलीं आहेत. [म. वा. इ.; ना. भा.; प्रा. भा. सं.; ए. द.]

एकनाथी भागवत

भागवत पुराणाच्या एकादशस्कंधावर एकनाथांनी मराठी ओवीबद्ध टीका लिहिली व पुढे ती एकनाथी भागवत या नांवाने प्रसिद्धि पावली. नाथांच्या वाङमयरत्नमालेंतला हा ग्रंथ म्हणजे मेरुमणिच होय. तो सागराप्रमाणेच गंभीर, विशाल व रत्नगर्भ आहे. या ग्रंथाची ओवीसंख्या १८८४६ इतकी आहे. संत–सज्जन जनार्दनस्वामी व साक्षात् दत्तात्रेय यांच्या प्रेरणेने आपण हा ग्रंथ लिहायला प्रवृत्त झालों, असें नाथ म्हणतात. पैठण येथे या ग्रंथाचा प्रारंभ होऊन त्याचे पहिले पांच अध्याय लिहिले गेले. पुढे त्यांना काशींतल्या एका स्वामींचें बोलावणें आल्यावरून एकनाथ काशीस गेले व पुढचा सर्व ग्रंथ काशींतच पुरा झाला.

एकनाथ हे वारकरी संप्रदायांतले विठ्ठलाचे उपासक होत. वारकरी संप्रदायाचेंच भागवत धर्म असें दुसरें नांव आहे. एकनाथांनी आपल्या या ग्रंथांत भागवत धर्माचें जागोजाग विवरण केलें असून तें उपमा–दृष्टान्तांनी सजविलें आहे. दुसऱ्या अध्यायांत भागवत धर्माचें सार ते पुढीलप्रमाण सांगतात ––

मनें करावें हरीचें ध्यान। श्रवणें करावें कीर्तिश्रवण।
जिव्हेनें करावें नामस्मरण। हरिकीर्तन अर्हर्निशीं॥
करीं करावें हरिपूजन। चरणीं देवालयगमन।
घ्राणीं तुलसी आमोदग्रहण। जिहीं हरिचरण पूजिले॥
वाढतेनि सद्‌भावें जाण। चढतेनि प्रेमें पूर्ण।
अखंड ज्यासी श्रीकृष्णभजन। त्यासी भवबंधन असेना॥
भागवत धर्माचिये स्थिती। बाळीं भोळीं भवाब्धि तरती।
सुखोपायें ब्रह्मप्राप्ति। होय निश्चिती सकळिकां॥

कवित्वापेक्षा भागवताचा अर्थ सुगम करून सांगण्याकडे नाथांनी अधिक लक्ष पुरविलें आहे. ज्ञानेश्वरींत आढळतात, तशा बुद्धीला थक्क करून सोडणाऱ्या विशाल कल्पना नाथांच्या भागवतांत आढळणार नाहीत; पण वेदान्तासारखा गहन विषय सुगम करून सांगणारी शैली नाथांनी आत्मसात् केली आहे. ज्ञानेश्वर आणि एकनाथ यांच्या वाङ्मयशैलीविषयीं 'महाराष्ट्र सारस्वत'कार पुढील तुलनात्मक वाक्य लिहितात-- 'आपल्या बोलाला रूप द्यावें, अतींद्रिय असलें तरी तें इंद्रियांना भोगवावें ही ज्ञानेश्वरांची हातोटी व जें शब्दरूपाने दिसतें आणि इंद्रियांनाच जाणतां येतें, तें सामान्य माणसांनाहि वागवितां येईल असें करावें, ही एकनाथांची युक्ति.' नाथांच्या भागवतधर्माचें संकलित स्वरूप थोडक्यांत पुढीलप्रमाणे सांगता येईल--

कलियुगांत अधर्माचरणी राजे फार झाले. या राजांना धर्म आणि नीति यांची चाड राहिली नाही. त्यांनी प्रजेची नागवण चालविली आहे. हा अनर्थ भगवंतास सहन होत नाही. म्हणून पूर्वीच्या काळांत भगवंताने धर्मरक्षणार्थ अवतार घेतले, त्या प्रमाणे याहि युगांत भगवंताने विठ्ठलरूपाने अवतार घेतला.

भगवंताच्या अवताराच्या योगाने प्रकट होणारा धर्म म्हणजे याज्ञिकांचा धर्म नसून भागवतधर्म हा आहे. भगवंताच्या भक्तांनी आचरिलेला व भगवंताने उपदेशिलेला हा धर्म सुलभ आणि सोपा आहे. या धर्मांत बुडण्याचा धोका नाही. भक्तिभावाने स्वधर्माचरण केलें म्हणजे भोळ्या-भाबड्यांना भवाब्धि तरून जातां येतें. इतकेंच नव्हे; तर ब्रह्मप्राप्तिहि होते. भक्तीचें आचरण करणारा भक्त हा सर्व कर्म अहेतुक करीत असतो. स्वधर्माचरण करणें, हें परमेश्वराचें शुद्ध भजन आहे. या भजनाने परमेश्वर प्रसन्न होतो. निष्काम कर्मयोगाने सर्वांभूतीं भगवद्‌भाव जागृत झाल्यावर त्याच्या ठिकाणीं श्रेष्ठ-कनिष्ठ हा भाव राहत नाही.

या वृत्तींत भक्त मुरला म्हणजे त्याला 'जनीं जनार्दन' हा प्रत्यय येतो. हा प्रत्यय सकल उपनिषदांचें सार आहे. ज्ञान या प्रत्ययाहून वेगळें नाही. या अवस्थेंत नामरूपातीत सत्तत्त्वाशीं भक्त एकरूप होतो. ज्ञानी भक्त केवळ स्वतःच्या उद्धाराने संतुष्ट होत नाही. दीनोद्धरणाचें कार्य केल्याखेरीज त्याच्या आत्मोद्धारास पूर्णता येत नाही. लौकिक कर्में करूनहि तो कर्मबंधनाने बद्ध होत नाही. प्रपंच करूनहि तो प्रपंचातीत असतो. किंबहुना त्याचा प्रपंचच परमार्थरूप होतो.

नरदेह हा परम पावन आहे. त्याचा विनियोग विषयसुखार्थ न करतां त्याला परमार्थसाधनेसाठी राबविलें पाहिजे. भागवतधर्मांत स्वधर्म आणि स्वकर्म यांचें ऐक्य साधलेलें असतें. म्हणून भागवतधर्मीय संत आश्रमधर्माचें पालन करतात. ते कर्म करतात, पण कर्मठ होत नाहीत; तर कर्मातीत होतात. ते स्वधर्मकर्मातच ब्रह्मप्रतीतीचा अनुभव घेत असतात. [ए. द.; ना. भा.]

एकपर्णा पार्वतीची बहीण. हिचा विवाह असित देवल याच्याशीं झाला होता, असें ब्रह्मांडपुराणांत सांगितलें आहे. [हिं. क. को.]


एकपाटला पार्वतीची बहीण. हिचा विवाह जैगीषव्य मुनीशीं झाला व तिला शंख आणि लिखित नांवाचे दोन पुत्र झाले, असें ब्रह्मांडपुराणांत म्हटलें आहे. [हिं. क. को.]

एकपाठी होण्याचें विधान कुठलीहि गोष्ट किंवा कोणताहि ग्रंथ एकदा ऐकल्यावर मुखोद्‌गत होणें, याला एकपाठ म्हणतात. अशा प्रकारचें एकपाठी होण्याचें विधान सामविधानब्राह्मणांत पुढीलप्रमाणे सांगितलें आहे--प्रथम तीन दिवस उपवास. नंतर सोमरस किंवा सोमवल्लीचीं फुलें पाण्यांत मिसळून किंवा चुरडून तें पाणी अभिमंत्रित करून एक वर्ष प्राशन करणें.

एकपाद एक प्राचीन जमात. म. भा. च्या सभापर्वांत यांचा उल्लेख येतो (४७.१६). यांच्या विषयीं फार थोडी माहिती मिळते. पांडवांच्या दिग्विजययात्रेंत सहदेव दक्षिण दिशा जिंकायला गेला असतां ताम्रक द्वीप व रामक पर्वत यांच्या पुढे हे एकपाद लोक सहदेवाला भेटल्याचें वर्णन आहे (म. भा. सभा. २८.४७). यांना जिंकल्यावर मग त्याने शूर्पारक जिंकलें. यांना 'वनवासी' म्हटलें आहे. त्यावरून हे लोक उत्तर कर्नाटकांतल्या बनवासी प्रदेशांतले रहिवासी असावे. हे लोक चालण्यांत घोड्याहूनहि वेगवान् होते, असें मॅगॅस्थनीज् म्हणतो. यांनी राजसूय यज्ञांत युधिष्ठिराला सोन्याचांदीचा नजराणा दिला होता, असें सभापर्वांत म्हटलें

आहे. [नागरी प्रचारिणी पत्रिका; भा. सा.]

एकपाद उत्थानपादासन जमिनीवर चटई पसरून उताणें झोपतात व हात कंबरेच्या दोन्ही बाजूंना ठेवतात. नंतर श्वास फुप्फुसांत भरून घेऊन उजवा पाय गुडघ्यांत न वाकवितां सुमारें दोन फूट वर उचलतात. उचललेला पाय पुढच्या बाजूस ताणतात. सहजपणे



एकपाद उत्थानपादासन

जितका वेळ श्वास रोखून धरतां येईल, तितका वेळ पाय वर ठेवतात व मग हळूहळू खाली आणतात. श्वासहि हळूहळू बाहेर सोडतात. नंतर पुन्हा फुप्फुसांत श्वास भरून घेऊन डावा पाय वर उचलतात. या आसनामुळे पायांतील रक्ताभिसरण योग्य रीतीने होऊन पायाची सूज व गुडघ्यांतील दुखणें कमी होतें. [उ. यो. द.]

एकपाद पवनमुक्तासन जमिनीवर उताणें झोपून डावा पाय सरळ ठेवतात व उजवा पाय गुडघ्यांत दुमडून छाती व पोट यांवर दोन्ही हातांनी दाबून धरतात. नंतर डोकें वर उचलून गुडघ्याला तोंड लावतात. या वेळीं सर्व शरीर ताणलेल्या स्थितींत ठेवतात. पांच वेळां




एकपाद पवनमुक्तासन

श्वसोच्छ्वास होईपर्यंत गुडघा दुमडलेल्या स्थितींत ठेवतात व नंतर श्वास आंत घेऊन पाय सरळ करतात. नंतर श्वास बाहेर सोडून डावा गुडघा दुमडतात. या आसनाने शरीरांतील मेद व वात कमी होतो. [उ. यो. द.]

एकपाद भुजासन दोन्ही पाय ताठ पसरून बसतात व उजवा पाय गुडघ्यापासून वळवून उजव्या खांद्यावर ठेवतात. दोन्ही हातांचे तळवे कमरेच्या दोन्ही बाजूंना जमिनीवर टेकतात व श्वास आंत घेऊन त्यांच्या आधाराने सर्व शरीर जमिनीपासून वर अधांतरीं उचलतात. या वेळीं डावा पाय गुडघ्यांत वाकूं देत नाहीत. शरीर व डोकें ताठ ठेवतात. नंतर डाव्या पायानेहि अशीच क्रिया करतात. या आसनाने अंतर्गळ, यकृतविकार, गुडघ्याची सूज व खांद्यांतील वेदना, नाहीशा होतात. [उ. यो. द.]

एकपादमूर्ति शिवमूर्तीचा एक प्रकार. या प्रकारांत शिव एका पायावर उभा असून त्याच्या डाव्या–उजव्या कुशींतून अनुक्रमें विष्णु व ब्रह्मा हे हात जोडून बाहेर आलेले दाखविलेले असतात. कारणागम ग्रंथांत हें शिवाचें खेळकर रूप मानलेलें आहे. ऋग्वेदांत एकादश रुद्रांपैकी अज




एकपादमूर्ति

एकपाद असें एकाचें नांव आहे. त्या नांवावरून ही मूर्ति केलेली असावी. ही शिवप्रधान त्रिमूर्ति बनते. त्रिमूर्तीचा हा प्रथम आविष्कार होय. तिच्यावरूनच पुढे वैष्णवपंथी शिल्पकारांनी

विष्णुप्रधान त्रिमूर्ती घडविल्या. [सा. इं. इ. गॉ. गॉ.]

एकपाद शलभासन जमिनीवर पालथें झोपतात व हनुवटी जमिनीवर टेकतात. दोन्ही हात मुठी आवळून शरिराशीं समांतर ठेवतात. नंतर श्वास आंत घेऊन डाव्या हाताच्या आधाराने उजवा पाय वर उचलतात व सहजपणे जेवढा उंच नेतां येईल तेवढा नेतात. पाय



एकपाद शलभासन

वर उचलतांना पांच वेळां श्वासोच्छ्वास करतात. सहाव्या वेळीं श्वास आंत रोखून पाय हळूहळू जमिनीला टेकतात. पाय गुडघ्यांत वाकूं न देण्याची खबरदारी घेतात. या आसनाच्या अभ्यासाने मूळव्याध व आंत्रपुच्छ यांसारखे रोग उद्‌भवत नाहीत. [उ. यो. द.]

एकपाद शिरासन दोन्ही पाय सरळ पसरून बसतात. नंतर डावा पाय डाव्या खांद्यावरून नेऊन मानेच्या मागच्या बाजूस टेकतात. नंतर दोन्ही हात जोडून छातीसमोर ठेवतात. छाती व डोकें ताठ ठेवून सर्व शरीरहि ताणलेल्या अवस्थेंत ठेवतात. त्यानंतर उजव्या पायाने अशीच क्रिया करतात. ज्या स्त्रियांचा गर्भाशय अशक्त आहे व ज्यांचा नेहमी गर्भपात होतो, अशांना हें आसन अत्यंत हितप्रद आहे. अंडकोशाची सूज व मूळव्याधि यांसारखे रोग या आसनाने दूर होतात. [उ. यो. द.]

एकपादात्मिका एक शक्तिदेवता. [पु. इं.]

एकभक्त व्रत याची व्याख्या अशी – 'रात्रिभोजनाभावविशिष्टदिवाभोजनम्' = रात्रीं भोजन न करतां फक्त दिवसाच एकदा भोजन करणें, याला एकभक्तव्रत म्हणतात. हें मध्याह्न टळून गेल्यावर करायचें असतें. हाच आशय स्कंदपुराणांतल्या पुढील श्लोकांत सांगितला आहे––

दिनार्धसमयेऽतीते भुज्यते नियमेन यत् ।
एकभक्तमिति प्रोक्तं रात्रौ तन्न कदाचन ।।

या व्रताचे नियम व फल विष्णुधर्मोत्तर पुराणांत पुढीलप्रमाणे सांगितलें आहे ––

संपूर्ण चैत्रमासभर एकभक्त करून वासुदेवपरायण व्हावें, सर्वभूतांविषयीं अहिंसावृति पाळावी व 'नमोऽस्तु वासुदेवाय' या मंत्राचा ८०० जप करावा. त्यामुळे अतिरात्र यज्ञाचें फल मिळतें. वर्षभर एकभक्त व्रत केल्यानें पौंडरीक यज्ञाचें फल मिळून व्रतकर्ता दहा हजार वर्षें स्वर्गाचा अधिकारी होतो.

एकभक्त व्रतांत भोजन करायचें तें एकोणीस किंवा सव्वीस ग्रासांपुरतें मर्यादित असावें, असें व्रतराजांत सांगितलें आहे.

एकभक्त सोमवारव्रत एक काम्य व्रत. चैत्र, वैशाख, ज्येष्ठ श्रावण, किंवा मार्गशीर्ष यांपैकी कोणत्याहि महिन्यांतील पहिल्या सोमवारीं या व्रताला प्रारंभ करतां येतो. त्यांतल्या त्यांत श्रावणमहिन्यांतील सोमवार विशेष प्रशस्त मानतात. व्रतावधि एक महिना. शिवाची पूजा व उपवास, हा या व्रताचा विधि आहे. उपवास शक्य नसेल, तर नक्तभोजन करतात. चार सोमवार याप्रमाणे व्रत केल्यावर त्याचें उद्यापन करतात.

उद्यापनाच्या दिवशीं उमा-शंकराच्या सुवर्णप्रतिमेची पूजा करतात. दुसऱ्या दिवशीं होमहवन करून आचार्याला सवत्स धेनु दान देतात व तेरा ब्राह्मणांना भोजन घालतात. [व्रतराज]

एकराट् एक राजकीय आधिपत्याची संज्ञा. सम्राट् या उपाधीहून वरच्या दर्जाची. प्राचीनबर्हि, सुवर्म्याचा पुत्र व महापद्म हे एकराट् होते. समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य मिळविणें म्हणजे एकराट् होणें, असें ऐ. ब्राह्मणांत म्हटलें आहे (८.५). श्राद्धांत सप्तार्चिष पठण करण्याने तसेंच त्या प्रसंगीं समृद्ध दानें देण्याने पुढील जन्मीं एकराट् होतो, असें सांगितलें आहे. [पु. इं.]


एकलिंग याची व्याख्या शब्दकल्पद्रुमांत पुढीलप्रमाणे सांगितली आहे–

पञ्चक्रोशान्तरे यत्र न लिङ्गान्तरमीक्ष्यते ।
तदेकलिङ्गमाख्यातं तत्र सिद्धिरनुत्तमा ।।

अर्थ –शिवलिंग असलेल्या स्थानाच्या पंचक्रोशींत जेव्हा दुसरें शिवलिंग आढळत नाही, तेव्हा त्या स्थानाला एकलिंग असें नांव प्राप्त होतें. तिथे तप केल्याने उत्तम सिद्धि मिळते.

एकलिंगजी मेवाड व उदयपूर येथील राजपूत राजघराण्यांचा कुलदेव. उदेपूर–नाथद्वारा या मार्गावर उदेपूरपासून १२ मैलांवर कैलाशपुरी हें एकलिंगजीचें क्षेत्र आहे. इथलें एकलिंगजीचें मंदिर भव्य असून त्याच्या भोवत तटबंदी आहे. मंदिरांतील लिंगमूर्तीला चार मुखें असून पश्चिम द्वाराजवळ नंदीची पितळी मूर्ति आहे. यात्रेकरूंना उतरण्यासाठी इथे धर्मशाळा आहेत.

बाप्पा रावळने हें मंदिर बांधलें, असें सांगतात. बाप्पानंतर कांही वर्षांनी मंदिराचा पूर्व भाग नष्ट झाला होता. महाराणा हम्मीरने तो परत बांधून काढला. हम्मीरचा चौथा वंशज मोकल याने मंदिराच्या चारी बाजूंना तटबंदी उभारली. पुढे महाराणा कुंभ याने संपूर्ण देवळाचा जीर्णोद्धार केला.



एकलिंगजीचें मंदिर

इथल्या देवदर्शनाच्या वेळा ठरलेल्या आहेत. इथला पुजारी ब्रह्मचारी असून तो रोज वेगवेगळ्या रत्नांनी देवाचा साजशृंगार करतो. गाभाऱ्यांत जाऊन देवदर्शन घ्यायचें असल्यास त्या आधी पुजाऱ्याने दिलेलें वस्त्र नेसावें लागतें. **पाहा**–कैलाशपुरी.

एकवीर द. भारतांतील बांसरीचा एक प्रकार. यांत मुखच्छिद्र व पहिलें छिद्र यांत एका अंगुलाचेंच अंतर असतें. एक ते सात हीं छिद्रें बंद करून वाजविल्याने स्थायी, तार षड्ज वाजतो. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

एकवीरा परशुरामाची माता रेणुका हिलाच एकवीरा असें दुसरें नांव आहे. महाराष्ट्रांत रेणुकेचीं जीं स्थानें आहेत, तीं सगळीं एकवीरा देवीचींच स्थानें म्हणून ओळखलीं जातात. महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही प्रदेशांत एकवीरेची पूजा सर्वत्र आढळते. परशुराम हा त्याच्या काळांतला एकमेव वीर होता, त्यावरून त्याच्या आईला हें नांव मिळालें असावें. एकवीरा ही एकनाथांची कुलदेवता होती. एकनाथी भागवताच्या मंगलाचरणांत नाथांनी तिच्या वर्णनासाठी पुढील ओव्या लिहिल्या आहेत–

ते शिवशक्तिरूपें दोनी । नेऊन मिरवे एकपणीं ।
एकपणें जाली गुर्विणी । प्रसवे एकपणीं एकवीरा ।।
ते एकरूपें एकवीरा । प्रसवली बोध-फरशधरा ।
जयाचा कां दरारा । महावीरां अभिमानियां ।।
तेणें उपजोनि निवटिली माया । आज्ञा पाळूनि सुख दे पितया ।
म्हणोनि तो जाहला विजया । लवलाह्यां दिग्मंडळीं ।।
जो वासनासहस्रबाहो । छेदिला सहस्रार्जुन-अहंभावो ।
स्वराज्य करूनियां पाहा हो । अर्पी स्वयमेवो स्वजातियां ।।

(ए. भा. १. ७०-७३)

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विष्णुदास नांवाचे एक थोर पुरुष एकवीरेचे उपासक होऊन गेले. त्यांचा मठ माहूर येथे आहे. **पाहा**–रेणुका, यल्लम्म.

एकशालिक याचें दुसरें रूप ऐकशालिक असें होतें. एकाच व्यक्तीच्या निवासस्थानाला पाणिनीने एकशालिक असें नांव दिलें आहे (५.३.१०९). सार्वजनिक स्थान म्हणून अशा निवासस्थानाचा वापर होत नसे. दीघनिकायामध्ये अशा प्रकारचीं कांही उदाहरणें आढळतात. तिंदुकवन नांवाच्या एका उपवनांत राणी मल्लिकेचा महाल होता. आणि त्यांत ती स्वत: व तिचे पाहुणे एवढेच लोक कधी कधी राहत असत. मल्लिकेचा तो एकशालक महाल पुढे भिक्षुसंघाला दान देण्यांत आला व अशा रीतीने तो बहुशालक झाला. त्या काळांतील धनिक लोक गांवांतल्या घराशिवाय, गांवाबाहेर निराळें एखादें उद्यान तयार करीत व विश्रांति आणि करमणूक या दुहेरी हेतूने तिथेहि एक घर बांधीत. श्रावस्तीचा नगरश्रेष्ठी अनाथपिंडक याने राजकुमार जेताचें एकशालिक उद्यानगृह खरेदी करून तें भिक्षुसंघासाठी दान दिलें, अशी कथा आहे. [पा. भा.]

एकश्रुति यज्ञक्रियेंत उदात्तानुदात्तस्वरित हे स्वर, वर्ज्य करून जे मंत्र म्हटले जातात, त्यांना पाणिनीने एकश्रुति असें म्हटलें आहे (अष्टा. १. २. ३४). जपाचे मंत्र स्वरसहित म्हटले जावे व सामगायनांतहि स्वरांचें यथावत् पालन केलें जावें, याविषयीं मात्र आग्रह होता. कात्यायनाने एकश्रुतीला तान म्हटलें आहे (श्रौ. सू. १. ८. १८).


असें दिसतें, की पाणिनि व कात्यायन यांच्या कालांतच

स्वरसहित मंत्रपाठाचे नियम शिथिल होऊं लागले होते. वैदिक स्वरांच्या जागीं भाषिक स्वर किंवा ब्राह्मणग्रंथांतले वैकल्पिक स्वर प्रचलित होऊं लागले होते. सस्वर उच्चारणांतली ही ढिलाई यज्ञसंस्थेंत विशेष रूपाने आली होती. पुढे पुढे तर स्वरविचार नष्ट होण्याच्याच मार्गावर आला. अशा वेळीं जैमिनीने या प्रवृत्तीला आळा घालण्याचा प्रयत्न केला. त्याने आग्रह धरून प्रतिपादिलें, की यज्ञ आणि स्वाध्याय या दोन्ही प्रसंगीं मंत्रांचें त्रिस्वरयुक्तच पठन व्हायला हवें (जै. मी. १२. ३. २०–२४). पण त्याचा हा आग्रह नव्या प्रवृत्तीपुढे टिकूं शकला नाही. [पा. भा.]

एकसाला कोसल देशांतील ब्राह्मण वस्तीचें एक गांव. बुद्धाने इथे एकदा वस्ती केली होती व इथल्या लोकांसाठी धर्मप्रवचनहि केलें होतें. बुद्धाने माराला याच ठिकाणी पराजित केलें. [हि. जॉ. ए. इं.]

एकहारा स्तंभाच्या शीर्षाखाली साखळीसारखें कोरलेलें नक्षीकाम. एकमजली इमारतीवरहि असें कोरीव काम करतात. [एन्सा. हिं. आ.]

एकांतर ज्वरनाशन यंत्र एकान्तर ज्वर (पाळीचा ताप) नाहीसा होण्यासाठी या यंत्राचा प्रयोग करतात. हळदीच्या रसाने विडयाच्या पानावर बाभ-



एकांतर ज्वरनाशन यंत्र

ळीच्या कांट्याने यंत्र काढतात. एकमेकांत अडकलेल्या दोन समभुज त्रिकोणांनी होणाऱ्या षट्कोणांत 'क्रों' या बीजाक्षराने संपुटित करून साध्यनाम लिहितात. षट्कोणांभोवती होणाऱ्या त्रिकोणांत 'ॐ' हें बीजाक्षर व बाहेरच्या बाजूस कोणबिंदूजवळ 'ह्रीं' हें बीजाक्षर लिहून यंत्र पूर्ण केल्यावर त्याची यथाविधि पूजा करून तें यंत्र भक्षण करितात. या उपचाराने एकान्तर ज्वर जातो, असें सांगितलें आहे. [यं. चि.]

एकांतवाद्यम् द. भारतांतील वीणेसारखें एक वाद्य. याचा आवाज मधुर व आल्हादक असतो. मोठ्या बैठकीऐवजी लहान बंदिस्त जागीं या वाद्याचा प्रभाव विशेष पडतो. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

एकांतिक धर्म वैष्णव संप्रदायाचें प्राचीन नांव. प्राचीन काळीं भागवत, सात्वत, पांचरात्र व एकान्तिक या नांवांनी वैष्णवसंप्रदायांचा उल्लेख होत असे. ज्या धर्मांत एकच म्हणजे भगवान् विष्णु हा अन्त म्हणजे सिद्धान्त मानला जातो, तो एकान्तिक धर्म होय. भागवत धर्माचें प्रधान तत्त्व प्रपत्ति किंवा शरणागति हें आहे. भगवंताला शरण जाण्यानेच जीवाचें परमकल्याण होतें. जोंवर भगवत्कृपा होत नाही, तोंवर जीवाचा उद्धार होणें शक्य नाही. ही भगवत्कृपा मिळविण्याचें शरणागति हेंच श्रेष्ठ साधन आहे. याविषयीं अनुस्मृतींत पुढील श्लोक दिलेला आहे—

एकान्तिनो हि निर्द्वंद्वा निराशाः कर्मकारिणः ।
ज्ञानाग्निदग्धकर्माणस्त्वां विशन्ति मनस्विनः ।। (४८)

अर्थ – द्वंद्वरहित, आशारहित, उद्योगशील आणि ज्ञानाग्नीने ज्यांचीं कर्में दग्ध झालीं आहेत, असे एकान्तिक धर्माचे ज्ञानी लोक (हे भगवंता,) तुझ्याठिकाणीं प्रवेश करतात (भगवद्‌रूप होतात).

एकान्तिक धर्माच्या प्राचीन संहितांची संख्या १०८ च्या वर असल्याचें सांगतात. या सर्व संहितांत अहिर्बुध्न्य, जयाख्य व बृहद्‌ब्रह्म या संहिता मुख्य आहेत. त्यांत ज्ञान, योग, क्रिया व चर्या या चार विषयांचें प्रतिपादन विशेष रूपाने केलेलें आहे. ज्ञानप्रकरणांत ब्रह्म, जीव आणि जगत् यांच्या आध्यात्मिक स्वरूपाचें, तसेंच सृष्टिप्रक्रियेचें निरूपण येतें. योगप्रकरणांत मुक्तीला साधनीभूत अशा योगप्रक्रियांचें विवरण येतें. क्रियाप्रकरणांत विष्णुमंदिरांची निर्मिति, मूर्तिस्थापना इ. विषयांचें वर्णन येतें. चर्याप्रकरणांत आह्निक क्रिया, मूर्तिपूजेचीं विधानें, पर्व आणि उत्सव, यांचें वर्णन येतें. वरील तीन संहितांच्या आधारेंच पुढे मध्ययुगांत वैष्णव संप्रदायांची विशेष प्रगति झालेली आहे.

उपनिषत्कालांत एकायन या नांवाने एक संप्रदाय प्रसिद्ध होता. एकान्तिक व एकायन यांच्यांत भेद नसून एकान्तिक धर्माचेंच एकायन हें दुसरें नांव आहे. **पाहा**–एकायन. [बलदेव उपाध्याय.]

एकादश रुद्र

ब्राह्मण ग्रंथांत अकरा रुद्रांचा उल्लेख केलेला आहे; पण तिथे त्यांचीं नांवें मात्र सांगितलेलीं नाहीत. निरनिराळ्या पुराणांत तीं दिलेलीं असलीं, तरी त्यांत एकवाक्यता नाही. महाभारताच्या आदिपर्वात तीं दिलीं आहेत तीं अशीं–मृगव्याध, सर्प, निर्ऋति, अजैकपाद, अहिर्बुध्न्य, पिनाकी, दहन, ईश्वर, कपाली, स्थाणु व भव. महाभारताच्या शांतिपर्वात हीं नांवें अजैकपाद, अहिर्बुध्न्य, विरूपाक्ष, रैवत, हर, बहुरूप, त्र्यंबक, सुरेश्वर, सावित्र, जयंत्य व पिनाकी अशीं सांगितलीं आहेत; तर अनुशासन पर्वांत यापेक्षाहि वेगळी नामावलि दिलेली आहे.

चतुर्वर्गचिंतामणींत अज, एकपाद, अहिर्बुध्न्य, विरूपाक्ष, रेवत, हर, बहुरूप, अंबक, सुरेश्वर, जयंत व अपराजित हे अकरा रुद्र सांगितले असून ते सोळा हातांचे व शूल, अंकुश, कपाल, डमरु, सर्प, मुद्गर, सुदर्शन, अक्षसूत्र, खट्वांग, गदा, पट्टिश, घंटा, शक्ति, परशु, कुंडिका, धनुष्य, अक्षमाला, चक्र, चर्म, तोमर, तर्जनीघट इ. आयुधें धारण करणारे असतात, असें सांगितलें आहे. [म. ज्ञा. को.; च. व. चिं.]

एकादशी

शुक्ल–कृष्ण पक्षांतील ११ वी तिथि. हिला हरिदिनी असेंहि म्हणतात. ही विष्णूची तिथि मानलेली आहे. या दिवशीं उपवास करून दुसऱ्या दिवशीं त्याची पारणा करतात. एकादशींत स्मार्त व भागवत असे दोन भेद आहेत. ज्या पक्षांत हे दोन भेद संभवतील, त्या वेळीं पंचांगांत पहिल्या दिवशीं स्मार्त व दुसऱ्या दिवशीं भागवत, असें लिहिलेलें असतें. स्मार्त ही पूर्व दिवशीं येते व भागवत दुसऱ्या दिवशीं येते. भागवत एकादशी नेहमी द्वादशीविद्ध असते. वैष्णव लोक भागवत एकादशी पाळतात. या दोन एकादश्या केव्हा मानायच्या, त्यासंबंधींचें विवेचन धर्मसिंधु, निर्णयसिंधु इ. ग्रंथांत सविस्तर दिलेलें आहे. मध्ययुगांत शूलपाणीने एकादशीविवेक व रघुनंदनाने एकादशीतत्त्व हे ग्रंथ केवळ एकादशीवर लिहिलेले आहेत. याशिवाय व्रतराज व कालतत्त्वविवेचन या ग्रंथांत एकादशीच्या विवेचनाला शेंकडो पानें दिलेलीं आहेत.

दर महिन्यास दोन, याप्रमाणे वर्षाच्या २४ एकादश्या यतात. त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणे —

शुक्लपक्ष– (चैत्रापासून) कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा व आमलकी.

कृष्णपक्ष– (चैत्रापासून) पापमोचनी, वरूथिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्तिला व विजया.

एकादशीचे प्रकार– नित्य आणि काम्य असे एकादशीचे दोन भेद आहेत.

सत्यं सर्वाणि पापानि ब्रह्महत्यादिकानि च ।
सन्त्येवैादनमाश्रित्य श्रीकृष्णव्रतवासरे ।।

(ब्र. वै. कृष्णजन्मखंड २६. २३.)

अर्थ– एकादशीच्या दिवशीं ब्रह्महत्यादि सर्व पापें अन्नाचा आश्रय करून राहतात. (जो मनुष्य त्या दिवशीं अन्न भक्षण करतो, त्याला तीं पापें लागतात.)

वर्षाच्या २४ हि एकादश्या नियमाने करणें व त्या दिवशीं विष्णुपूजा, जागरण, हरिकथाश्रवण इ. गोष्टी करणें, हें नित्यव्रत होय.

कात्यायनाने काम्य एकादशीव्रताविषयीं पुढीलप्रमाणे लिहिलें आहे––

संसारसागरोत्तारमिच्छन् विष्णुपरायणः ।
ऐश्वर्यं सन्तर्ति स्वर्गं मुक्ति वा यद्यदिच्छति ।
एकादश्यां न भुञ्जीत पक्षयोरुभयोरपि ।।

अर्थ– जो कोणी विष्णुपरायण होऊन संसारसागरांतून तरून जाऊं इच्छितो किंवा ऐश्वर्य, संतति, स्वर्ग, मोक्ष, किंवा अन्य कोणतेंहि फल इच्छितो, त्यानें उभय पक्षांतील एकादशीस अन्न भक्षण करूं नये.

एकादशीविषयीं विधिनिषेध – दोन्ही एकादशींना उपवास करणें, हा नियम वनांत राहणाऱ्या ऋषीमुनींना आणि यतींना लागू आहे; गृहस्थाने फक्त शुक्ल एकादशीच करावी, असें देवलाचें मत निर्णयसिंधूंत उद्धृत केलें आहे. पुत्रवान् गृहस्थाने कृष्ण एकादशीला उपवास करूं नये, असें नारद म्हणतो. विधवा स्त्रियांनी दोन्ही एकादशींना उपवास करावा. वैष्णवांनाहि उभय एकादशी विहित आहेत. हेमाद्रीने मात्र उभय पक्षांतील एकादशींचा अधिकार सर्वांना दिला आहे. ज्यांचें वय आठ वर्षांच्या खाली व ऐंशी वर्षांहून अधिक असेल, त्यांना एकादशीच्या उपवासाचा नियम लागू नाही, असें नारद सांगतो. मार्कंडेय पुराणांत पुढील पर्याय सांगितला आहे– एकादशीस दुपारनंतर एकदा जेवावें, नक्त (सूर्यास्तानंतर तारे दिसल्यावर) भोजन करावें, अयाचित जें मिळेल, तें खावें व शक्ति असल्यास पूर्ण उपवास करावा ; मात्र एकादशीमुळे प्राप्त होणारें फल गमावूं नये.

एकादशीचें फल– पद्मपुराणाच्या आदिखंडांत एकादशीच्या उपवासाचें फल पुढीलप्रमाणे सांगितलें आहे–

अश्वमेधसहस्राणि राजसूयशतानि च ।
एकादश्युपवासस्य कलां नार्हन्ति षोडशीम् ।।
स्वर्गमोक्षप्रदा ह्येषा शरीरारोग्यदायिनी ।
सुकलत्रप्रदा ह्येषा जीवत्पुत्रप्रदायिनी ।।
न गङ्गा न गया भूप न काशी न च पुष्करम् ।
न चापि वैष्णवं क्षेत्रं तुल्यं हरिदिनेन च ।।
यमुना चंद्रभागा न तुल्या हरिदिनेन तु ।
अनायासेन येनात्र प्राप्यते वैष्णवं पदम् ।।

अर्थ–हजारों अश्वमेध आणि शेंकडो राजसूय यांना एकादशीच्या उपवासाच्या सोळाव्या कलेइतकेंहि महत्त्व नाही. एकादशी ही स्वर्ग, मोक्ष, आरोग्य, चांगली भार्या व जीवत्पुत्र देणारी आहे. गंगा, गया, काशी, पुष्कर, वैष्णवक्षेत्र, यमुना, चंद्रभागा यांपैकी कोणालाहि एकादशीची बरोबरी करतां येणार नाही. या दिवशीं उपवास केल्याने अनायासें वैष्णवपद प्राप्त होतें.

एकादशीची उत्पत्ति–एकादशीच्या उत्पत्तीविषयीं पुढील दोन कथा पुराणांत सांगितल्या आहेत–

(१) मृदुमान्य नांवाचा एक दैत्य शंकराच्या प्रसन्नतेसाठी तप करीत होता. शिवाने प्रसन्न होऊन त्याला पुढील वर दिला–'तुला कोणाकडूनहि मृत्यु येणार नाही. तूं ब्रह्मादिदेवांना युद्धांत जिंकशील. मात्र उन्मत्त झालास, तर तुला एका स्त्रीच्या हातून मरण येईल.' हा वर मिळतांच मृदुमान्याने देवांवर चाल केली. विष्णूसह सर्व देव पराभूत होऊन शेवटीं शिवाकडे आले; पण शिवहि आता त्या दैत्याला आवरूं शकत नव्हता. मग ते सगळे देव एका गुहेंत जाऊन लपले. तिथे त्या सर्वांच्या एकत्र झालेल्या श्वासांतून एक देवता उत्पन्न झाली. तिचेंच नांव एकादशी होय. त्या वेळीं पाऊस पडत असल्यामुळे सर्व देवांना स्नान घडलें व गुहेंत बसल्यामुळे उपोषणहि घडलें. नंतर एकादशीने सर्व देवांना अभय देऊन मृदुमान्याला ठार मारलें.

(२) मुर नांवाचा एक दैत्य होता. तो विष्णूवर चालून गेला. विष्णूने सर्व देवांसह त्याच्याशीं युद्ध केलें; पण त्याचें कांही चाललें नाही. मग विष्णु बदरिकाश्रमीं जाऊन एका गुहेंत दडून बसला. तिथे त्यला शस्त्रास्त्रांनी सज्ज अशी एक सुंदर स्त्री दिसली. मुरदैत्य विष्णूचा पाठलाग करीत तिथवर गेला असतां, त्या स्त्रीने आपल्या हुंकाराने त्याला ठार केलें. विष्णूने संतुष्ट होऊन त्या स्त्रीला वर मागण्यास सांगितलें. तिने 'एकादशीचा उपवास करणाऱ्यांवर तूं सदैव प्रसन्न असावेंस,' असा वर मागितला. विष्णूने 'तथास्तु' म्हटलें.

एकादशीचें ध्यान – हेमाद्रीने शुक्ल–कृष्ण एकादशीचें ध्यान पुढीलप्रमाणे सांगितलें आहे–

एकादशी मृगाब्जस्था तुला–कर्तरिकायुता ।
सिंहाननाऽरुणगला तुन्दिला लासिनी परा ।।

अर्थ–एकादशी (शुक्ल-कृष्ण या अनुक्रमाने) मृगारूढ व कमलारूढ, तागडी व कात्री धारण करणारी, सिंहमुखी व रक्तकंठी, तशीच पुष्ट व कृश आहे.

रुक्मांगद–मोहिनी व अंबरीष–दुर्वास यांच्या कथाहि एकादशीव्रताशींच संबद्ध आहेत. [ध. सिं. ; हि. ध. ; म. ज्ञा. को.]

एकानंगापूजा

स्त्रीव्रत. एकानंगा हें एकानंशेचें दुसरें नांव आहे. कार्तिक शु. ४ थी, ८ मी, ९ मी किंवा १४ शी, या तिथींस हें व्रत करतात. १४ शीच्या दिवशीं पूजा करायची, ती एका फलित वृक्षाखाली करतात व तिला अन्नाचा महानैवेद्य दाखवितात. मग त्या अन्नांतला उत्कृष्ट अंश देवीला पोंचविण्याबद्दल बहिरी ससाण्याची किंवा दुसऱ्या एखाद्या पक्ष्याची प्रार्थना करतात. या व्रताचा विशेष हा, की या दिवशीं पतीच्या अगोदर पत्नी भोजन करते. [हि. ध.]

एकानंशा

दुर्गेचें एक रूप किंवा अवतार. हिच्याविषयीं हरिवंशांत पुढील वर्णन आढळतें–

देवक्यजनयत् विष्णुं यशोदा तां तु कन्यकाम् ।
....
विद्धि चैनामथोत्पन्नामंशाद्देवीं प्रजापतेः ।
एकानंशां योगकलां रक्षार्थं केशवस्य तु ।।

अर्थ–देवकीने विष्णूला (कृष्ण) व यशोदेने त्या कन्येला (एकानंशा) जन्म दिला. प्रजापतीच्या अंशाने कृष्णाच्या रक्षणार्थ उत्पन्न झालेली एकानंशा ही योगकला आहे, असें जाण.

बृहत्संहितेंत हिची मूर्ति द्विभुज, चतुर्भुज व क्वचित् अष्टभुज असल्याचें सांगितलें आहे (५७. ३७–३९). द्विभुज मूर्ति कृष्ण व बलराम यांच्यामध्ये उभी असते. तिचा डावा हात कमरेवर असून उजव्या हातीं कमळ असतें. मध्ययुगांत पूर्वभारतांत या देवीची उपासना होत असावी, असें वाटतें. त्या काळांतल्या तिच्या पाषाणाच्या व पंचरस धातूच्या मूर्ती सांपडल्या आहेत. भुवनेश्वर येथील अनंत-वासुदेवाच्या मंदिरांत मुख्यतः हिच्याच मूर्तीची पूजा होते. बिहारमधील इमदपुर येथे सांपडलेली हिची पंचरशी मूर्ति फार सुरेख आहे. ही द्विभुज असून कमळावर सरळ उभी आहे. हिचा उजवा हात वरदमुद्रेंत असून डाव्या हातांत आरसा आहे. दोहीं अंगीं कृष्ण व बलराम उभे आहेत.

हिला एकानंगा असेंहि दुसरें नांव आहे. [डि. हिं. इ.]

एकांभक एक क्षेत्र. कीर्तिमती देवतेचें स्थान. इथे श्राद्ध करतात. याचें भौगोलिक स्थान सांगितलेलें नाही. [मत्स्य पु. १३. २९]

एकाम्रक ओरिसांत कटकपासून २० मैल अंतरावर हें क्षेत्र आहे. हें रुद्रतीर्थ आहे. सांप्रत याला भुवनेश्वर म्हणतात. इथे पूर्वी एकच आम्रवृक्ष होता, त्यावरून हें नांव पडलें (ब्रह्म पु. ३४. ६.). वाराणसीप्रमाणेच हेंहि पापनाशक क्षेत्र समजलें जातें. या क्षेत्रांत आठ उपतीर्थें आहेत. इथे बाराव्या शतकांतील एक शिलालेख आहे. त्यावरून इथलें विष्णुमंदिर गंगराजवंशांतील अनंगभीम याची मुलगी चंद्रिका (हैहय वंशांतील परमर्दित राजाची विधवा पत्नी) हिनें बांधलें, असें कळतें. **पाहा**–भुवनेश्वर. [हि. ध.]

एकाम्रनिलय शिवकांचीचें नांव. इथे शिवानें ललितादेवीची आराधना केली. **पाहा**–कांची. [पु. इं]

एकायन एक वेद. 'एकं अयनं विषयो यस्य' = ज्याचा विषय एक आहे, तो एकायन होय, अशी याची व्याख्या आहे (श. क.). दुसरी व्याख्या अशी–

मोक्षायनाय वै पन्था एतदन्यो न विद्यते ।
तस्मादेकायनं नाम प्रवदन्ति मनीषिणः ॥

अर्थ–मोक्षप्राप्तीसाठी याहून दुसरा मार्ग नसल्यामुळे याला विद्वान् लोक एकायन म्हणतात.

छांदोग्योपनिषदांत भूमाविद्येच्या प्रसंगानें हा शब्द प्रथम आढळतो (७. १. २–४). तिथे नारद आपण एकायन विद्येचेंहि अध्ययन केल्याचें सांगतो. पांचरात्रसंहितांमध्ये या नांवाचा एक वेद असल्याचें सांगून त्याचा महिमा गायिला आहे–

वेदमेकायनं नाम वेदानां शिरसि स्थिरम् ।
तदर्थकं पञ्चरात्रं मोक्षदं तत्क्रियावताम् ॥

(प्रश्नसंहिता)

अर्थ–एकायन नामक वेद सर्व वेदांत श्रेष्ठ आहे. पंचरात्र मत हें त्या वेदाचेंच समर्थक असून त्याचें आचरण करणाऱ्यास तें मोक्षदायक होतें.

शांडिल्यानें साक्षात् संकर्षणापासून हा वेद प्राप्त करून घेतला व तो सुमंतु, जैमिनि इ. शिष्यांना पढविला. हा एकायनवेद साऱ्या जगांत प्रसिद्ध असल्याचें ईश्वरसंहितेंत लिहिलें आहे (१).

नागेश नामक एका ग्रंथकारानें शुक्ल यजुर्वेदाच्या काण्वशाखेचें दुसरें नांव एकायनशाखा असल्याचें सांगितलें आहे. जयाख्य संहितेंतहि या विधानाला पुष्टि मिळते. तिथे पांचरात्रमताचे प्रवर्तक शांडिल्य, भरद्वाज व मौंज्यायन हे काण्व शाखेचे असल्याचें सांगितलें आहे.

पांचरात्र मताच्या लोकांनी आपल्या मताचें महत्त्व वाढविण्यासाठी कित्येक कथा निर्माण केल्या असल्या, तरी एकायन नांवाचें एक शास्त्र पूर्वी होतें, याचें सूचन छांदोग्योपनिषदावरून होतें (७. १–२).

पंचरात्र संप्रदायाची एकायन नामक एक शाखा होती, तिचें वर्णन शांतिपर्वांत पुढीलप्रमाणे आलें आहे–

पुरुषः पुरुषं गच्छेन्निष्क्रियं पञ्चविंशकम् ।
एवमेकं सांख्ययोगं वेदारण्यकमेव च ॥
परस्पराङ्गान्येतानि पाञ्चरात्रं च कथ्यते ।
एष एकान्तिनां धर्मो नारायणपरात्मकः ॥

(म. भा. शांति. ३४८.८१–८२)

अर्थ–अशा प्रकारें पुरुष (जीव), निष्क्रिय पुरुष (परमात्मा), सांख्य, योग व वेदारण्यक (तत्त्वमस्यादि वाक्यांनी होणारें ज्ञान) हीं पांच जिथे परस्परांचीं अंगें होतात, त्याला पांचरात्र म्हणतात. हा एकान्ती (एकायन) यांचा नारायणपरक अर्थ आहे.

सात्वतशास्त्राच्या अध्ययनावरून एकायनवेद हा भक्तीला प्राधान्य देणारा असल्याचें समजतें. त्यांत मूळ वेदांतूनहि कांही मंत्र घेतलेले आहेत. ब्राह्मणादि ग्रंथांतलींहि कांही वाक्यें घेतलेलीं असावीं. वेदांपैकी यजुर्वेदांतून घेतलेली सामग्री अधिक असावी.

'एकायनान् यजुर्वेदमयानाश्रावि तदन्तरम्' असें सात्वतसंहितेच्या २५ व्या परिच्छेदांत लिहिलेलें आहे. [वे. इं.; वै. वा. इ.; श. क.]

एकार्णव जलप्रलयाच्या वेळची अवस्था. या वेळीं सर्व विश्व जलानें व अंधकारानें भरून जातें. त्या वेळीं विष्णुरूप भगवान् अव्यक्त होतो व त्याचा हंस नामक अवतार कार्य करतो. ही स्थिति एक हजार देवांचीं वर्षें टिकते. या सर्व प्रकाराला एकार्णव असें म्हणतात. [पु. इं.]

एकावली व्रत एक जैनव्रत. श्रावण मासापासून याचा आरंभ करतात. शुक्ल पक्षांत १ दा, ५ मी, ८ मी व १४ शी या तिथींना व कृष्णपक्षांत ४ थीं, ८ मी व १४ शी या तिथींना मिळून सात उपवास करतात. वर्षांतून

असे ८४ उपवास व ८४ पारणा करणें, हा या व्रताचा विधि आहे (व्र. ति. नि.).

याच नांवाचें २४ उपवास व २४ पारणा मिळून होणारें व्रत आहे, त्याला एकावली लघुव्रत म्हणतात. याचा प्रारंभ कोणत्याहि महिन्यांत, कोणत्याहि तिथीपासून करतां येतो (जै. व्र. वि. सं.).

एकाष्टका (१) प्रजापतीची कन्या. इंद्र व सोम यांची माता. अथर्ववेदांत कठोर व्रत करणारी असा हिचा उल्लेख मिळतो.

(२) आज्यप पितरांची मानसजात कन्या. हिचें पूर्वनाम विरजा असून ही नहुषाची पत्नी होती. पुढे ब्रह्मलोकांत गेल्यावर तिला एकाष्टका हें नांव मिळालें.

(३) कोणत्याहि महिन्यांतील वद्य अष्टमीला अष्टका असें नांव आहे (श. ब्रा. ६. २. २. २३). एकाष्टका म्हणजे विशिष्ट महिन्यांतील अष्टमी होय. सायणाने अथर्ववेदाच्या टीकेंत माघ व. ८ मीला एकाष्टका मानलें आहे (३. १०). तैत्तिरीय संहितेंत म्हटलें आहे, की ज्यांना वर्षभर यज्ञ करायचा असेल, त्याने या तिथीला दीक्षा घ्यावी (७. ४. ८. १; ३. ३. ८.४).

एकाक्षरा तांत्रिक गाणपत्य मूर्ति. ही रक्तवर्ण, चंद्रकलाधारी, त्रिनेत्र, नागाभरण दंत व महाळुंग धारण करणारी अशी करतात. [वि. तं.]

एकाक्षरोपनिषद् एकाक्षर ब्रह्माचें वर्णन करणारें एक उपनिषद्. याचा सारांश असा–जगाचें रक्षक व पुरातन असें सुषुम्नानाडींत स्थिरावलेलें अक्षरतत्त्व म्हणजेच हिरण्यगर्भ होय. सूर्याच्या रूपाने त्याचेंच दर्शन होतें. हें एकाक्षरतत्त्व वज्रधारी आहे. सोमरसांत त्याचेंच वास्तव्य आहे. स्वाहा, स्वधा व वषट् हीं त्याचींच रूपें आहेत. हें त्रिकालव्यापी आहे. याच्या मुखापासून ऋक्–यजुः–साम व वसु आणि अंतरिक्ष यांची उत्पत्ति झाली. या एकाक्षरतत्त्वाचें ज्याला ज्ञान झालें, त्याच्या बुद्धीची झेप सर्वसामान्य ज्ञानाच्या कक्षेच्या पलिकडे जाते. तो अमर होतो, अक्षर होतो.

या उपनिषदांत एकाक्षरतत्त्वाबद्दल पुलिंगी निर्देश आहे. त्यावरून उपनिषद् लिहितांना नारायणस्वरूपी एकाक्षरब्रह्म लेखकाच्या दृष्टीसमोर असावें, असें वाटतें. एकाक्षर म्हणजे ओंकार होय. त्याचा नांवाने निर्देश या उपनिषदांत नसला, तरी ' हृदयाच्या गुहेंत वास्तव्य करणारें ' या विशेषणावरून त्याचा बोध होतो. तांत्रिक विधानांत पुढे रां, गं, इ. बीजाक्षरें कल्पून त्या बीजाक्षरांचें उदात्तीकरण ओंकारांत केलेलें आढळतें. सर्व मंत्र, देवता व यंत्रें हीं शेवटीं ओंकारांतच विलीन होतात, असें अनेक ठिकाणीं म्हटलेलें आहे. या ओंकाराचेंच माहात्म्य या छोट्याशा उपनिषदांत अद्वैताच्या परिभाषेने सांगितलें आहे. हें उपनिषद् ऋग्वेदाचें का कृष्णयजुर्वेदाचें तें नक्की सांगतां येत नाही; कारण याच्या वेगवेगळ्या प्रतींत शांतिपाठाचे मंत्र भिन्न आहेत. [डॉ. सी. ग. देसाई]

एकाक्षा (१) केतुमाल खंडांतील एक नदी [पु. इं.]
(२) मानसजात मातृदेवता. [पु. इं.]

एकेश्वर गढवाल प्रदेशांतल्या चौंदकट गांवांत ६००० फूट उंचीवर एकेश्वर नामक एक रमणीय तीर्थ आहे. शिवधारा नांवाचा छोटा जलप्रवाह याच्या जवळून वाहतो. इथे वसंतपंचमी व शिवरात्रि या दिवशीं मोठी यात्रा भरते. [कल्याण–तीर्थांक]

एकेश्वरवाद ज्यांत एकाच ईश्वराचें विधान व एकाच ईश्वरावर श्रद्धा असते, त्याला एकेश्वरवाद असें नांव आहे. हा शब्द इंग्रजी Monotheism या शब्दाला समानार्थक असा नव्याने बनविला गेला आहे. ईश्वर एक आहे, तो परमात्मा असून तोच जगाचे सृष्टि-स्थिति-प्रलय करणारा आहे, तो नित्य ज्ञान आणि नित्यानंद यांचा आश्रय आहे, तो निर्दोष असून समस्त गुणांचें भांडार आहे, अशी एकेश्वरवादाची धारणा असते. त्याचीच एकाची उपासना करावी; अन्य कोणी देव मानूं नयेत, असाहि या मतांत आग्रह असतो.

ऋग्वेदांत एकेश्वरवादाचीं बीजें आढळतात (१. १६४. ४६; १०. ८२. २. १०. ११४. ५). ऋग्वेदापासून महाभारताच्या कालापर्यंत एकेश्वरवादाचा विकास होत गेलेला दिसतो. श्वेताश्वतर उपनिषदांत ईश्वरवादाचें तात्त्विक विवेचन आहे. गीतेंत तर साक्षात् भगवंताच्या मुखानेच ईश्वरवादाची महती गाइली आहे (१८. ६१–६२). पांचरात्र, शैव आणि शाक्त या संप्रदायांतहि हळूहळू एकेश्वरवाद दृढतर होत गेलेला आहे. सगुणब्रह्मवाद्यांत रामानुजाने नारायणाला, मध्वाने विष्णूला तर अन्य कित्येक संप्रदायांनी कृष्णाला एकमेव ईश्वर मानलें आहे. रामानंद, कबीर, तुलसीदास इ. रामभक्त रामचंद्राला एकमेव ईश्वर मानतात. नानकानेहि एकेश्वरवादच मानलेला आहे. कांही संप्रदाय अनेक देवतांचें अस्तित्व मान्य करून त्या सर्वांत एक सर्वश्रेष्ठ असा देव म्हणजे परमेश्वर मानतात, तर कांही धर्मांत अन्य देवतांचें अस्तित्वच नाकारून एकमेव

परमेश्वर मानतात. वैदिक व पौराणधर्म हे पहिल्याचें उदाहरण असून इस्लाम व ख्रिचन धर्म हे दुसऱ्याचें उदाहरण आहे.

एकोत खानदेशांतील एक कुलाचार. याचें विधान रात्रीचें असतें व त्यासाठी फारच खटाटोप करावा लागतो. त्या दिवशीं सूर्योदयानंतर घर सारवून सर्व वस्तूंची सिद्धता करतात. घरांतील प्रमुख स्त्री-पुरुष सकाळपासून सूर्यास्तापर्यंत निर्जल उपवास करतात. सूर्यास्तानंतर स्नान करून देवाची पूजा करतात. व्रतकर्त्या पुरुषाला भगत म्हणतात. तो अभ्यंग अशा एका कुमारिकेची व सात सदाचरणी स्त्रियांची या व्रतासाठी 'गवरणी' म्हणून योजना करतो. गवरणी हें गौरीचें बहुवचन आहे. त्यांच्या जोडीला आणखी एका भगताचीहि योजना करतो. अशीं हीं एकूण नऊ पात्रें होतात. एकोताच्या आदल्या दुपारीं गवरणींना अभ्यंगस्नान घालून नवीं वस्त्रें देतात. हळदीने पिवळ्या केलेल्या कांठांची शुभ्र चोळी देतात.

कलशांत खारका व मनुका भरून ते गवरणींच्या हातीं देतात व त्यांची गांवांतून मिरवणूक काढतात.

एकोद्दिष्ट श्राद्धाचा एक प्रकार. याची व्याख्या अशी— 'एकः प्रेत एव उद्दिष्टः यत्र' = एक मृत व्यक्ति हीच ज्यांत उद्दिष्ट असते असें श्राद्ध. पार्वणादि श्राद्धांत पिता, पितामह, प्रपितामह, किंवा माता पितामही, प्रपितामही अशा त्रयीचा उद्देश असतो, तर एकोद्दिष्टांत फक्त एकाच मृत व्यक्तीचा उद्देश असतो. हें अंत्यक्रियेंतलें एक श्राद्ध आहे. याचे तीन प्रकार आहेत—

(१) **नवश्राद्ध** —हें मृत्यूनंतर १० किंवा ११ दिवसपर्यंत करायचें असतें.

(२) **नवमिश्रश्राद्ध** —हें त्यानंतर एक वर्षपर्यंत दर महिन्यास करायचें असतें.

(३) **पुराणश्राद्ध** —एका वर्षानंतर करायचीं श्राद्धें. यांत अग्नौकरण, अभिश्रवण, पूर्वनिमन्त्रण, धूप, दीप, स्वधा, नमस्कार, अपूप (वडा) या गोष्टी करायच्या नसतात (बौ. ध. सू. ३. १२. ६). यांत एक अर्घ्य, एक पिंड, एक पवित्र असें सगळें एक असतें, 'स्वदितम्' हा तृप्तिप्रश्न नसतो व 'उपतिष्ठताम्' या अक्षय्य स्थानाच्या जागीं 'अभिरम्यताम्' असा ऊह असतो (कात्यायनीय श्राद्धसूत्र ४). यतीला उद्देशून एकोद्दिष्टश्राद्ध करूं नये; फक्त ११ व्या दिवशीं पार्वणश्राद्ध तेवढें करावें; कारण यतीने त्रिदंड ग्रहण केलें असल्यामुळे त्याला प्रेतत्व प्राप्त होत नाही असें सांगितलें आहे. (याज्ञ. १. २५. ५ वरील मिताक्षरा). [हि. ध.]

एक्कालम् पितळेची अथवा तांब्याची सरळ तुतारी. याला चार नळ्या असून त्या एकांत एक बसविलेल्या असतात. निमुळतें टोक ओठावर ठेवून हें वाद्य देवाच्या मिरवणुकींत वाजवितात. याचा आवाज जरा कर्कशच असतो.

तिरुनेलवेल्ली या जिल्ह्यांतल्या शन्बगरामनल्लूरच्या मंदिरांत एक दगडी खांब आहे. त्यांत एक खोदून छिद्र केलेलें आहे. त्यांत फुंकर मारली, की एक्कालम् सारखे स्वर निघतात. त्या छिद्राला एक्कालरंध्र असें नांव आहे. यांतून निघणारे स्वर षड्ज-मध्यमाशीं संवादी असतात. [डि. सा. इं- म्यु. म्यु.]

एखणा सिंधमधील एक प्राचीन उत्सव. नदीला पूर आल्या वेळीं व तो पूर ओसरते वेळीं असा हा दोनदा केला जात असे. या उत्सवांत जत्रा भरवीत व मिरवणुका काढीत. [सिं. क.]

एगलविहारपडिमा जैन श्रमणांच्या तपाचा एक प्रकार. या तपांत एकान्तवास आवश्यक असतो. हें तप विशिष्ट मुदतीचें असतें; तें सुरू करून मधेच सोडल्यास प्रायश्चित घ्यावें लागतें. [हि. जै. मो.]

एट्टुतोगै तमिळनाडमधील प्राचीन आठ काव्य-संग्रहांना हें नांव आहे. हे संग्रह पुढीलप्रमाणे—

(१) **नट्रिरनै**—यांत ४०१ पद्यें असून हा १७५ कवींच्या फुटकळ रचनांचा संग्रह आहे. या संग्रहांत तमिळनाडमधील मुल्लै, मरुदम, कुरिंजि, पालै व नेय्दल या पांच प्रदेशांचें वर्णन आहे. संग्रहाचा प्रधान विषय प्रेम हा आहे.

(२) **कुरुंतोगै**—यांत ४०२ पद्यें असून २०५ कवींच्या रचनांचा हा संग्रह आहे. या संग्रहांत वरील पांच प्रदेशांच्या सामाजिक व धार्मिक परिस्थितीचें वर्णन आहे.

(३) **पदिट्रुप्पत्तु**—हा कल्हणाच्या राजतरंगिणीसारखा ऐतिहासिक पद्यसंग्रह आहे. यांत चेर वंशाच्या अनेक राजांचीं नांवें व कृत्यें यांचें वर्णन आहे. २००० वर्षांपूर्वीं तमिळ देशाची राजकीय परिस्थिति व शासनपद्धति कशा प्रकारची होती, तें या संग्रहावरून कळतें.

(४) **परिपाडल**—विशिष्ट छंदांत रचलेल्या ७० कवितांचा संग्रह. यांतील अधिकांश भाग नष्ट झाला असून फक्त २४

कविता उपलब्ध आहेत.

(५) **कलित्तोगै** –यांत १५० कवींनी रचलेलीं ४०९ कलिच्छंदांतील पद्यें संगृहीत आहेत. यांत २००० वर्षांपूर्वींच्या तमिळनाडमधील विवाहप्रथांचें वर्णन आहे.

(६) **नेडुंतोगै** –१४५ कवींनी रचलेल्या ४०१ मधुर प्रेम काव्यांचा हा संग्रह आहे.

(७) **अहनानूरु** – यांत ५०० पद्यें संगृहीत आहेत.

(८) **पुरुनानूरु** – यांत ४०० पद्यें संगृहीत आहेत. [त. सा. सं.; त. औ. उ. सा.]

एडुताच्छन्

(१६ वें शतक) संपूर्ण नांव तुंचत्तु रामानुजन् एडुताच्छन्. याचा जन्म नायर जातींत तृकण्डियुर येथे झाला. त्याचें विश्वसनीय चरित्र उपलब्ध नाही. आख्यायिका मात्र खूप आहेत. त्या आख्यायिकांतून त्याच्या चरित्राचे धागेदोरे मिळतात, ते असे–

लहानपणींच त्याने अनेक शास्त्रांचें अध्ययन केलें. मग तो तीर्थयात्रेला निघाला. त्या प्रवासांत त्याला साऱ्या द. भारताची सामाजिक व राजकीय दुरवस्था पाहायला मिळाली. लोकस्थितीचें तें दर्शन त्याला उद्वेगकारक वाटलें. परत गांवीं येऊन त्याने अध्यापनाचें कार्य सुरू केलें; पण त्यांत त्याचें मन रमेना. त्याला वाटे, की आपल्या भोवतीचा समाज स्वार्थ, लोभ, कलह, भ्रष्टाचार, लंपटपणा इ. दुर्गुणांनी पोखरून गेला आहे. तो जीवनमूल्यांना पारखा होऊन अधःपाताकडे धाव घेत आहे. या प्रकाराला आळा घालायचा, तर आपण कांही तरी केलें पाहिजे. सुसंस्कृत जीवनाचे आदर्श या समाजापुढे उभे केले पाहिजेत. असा विचार त्याच्या मनांत सतत घोळूं लागला. एकाएकीं त्याला स्फुरलें, की आपण मलयाळम् भाषेंत रामायणाची रचना करावी आणि जनतेला जीवनाचा आदर्शभूत ठरेल, असा एक ग्रंथ निर्माण करून द्यावा.

तो विचार पक्का करून त्याने रामायण लिहायला सुरुवात केली. त्या कामीं तो अध्यात्मरामायणाला अनुसरला. थोडयाच काळांत त्याने आपला ग्रंथ समग्र पुरा केला. हें रामायण त्याने पाट्टुशैलींत लिहिलें आहे. पोपटाच्या मुखांतून कथा वदविण्याची ही शैली किळिपाट्टु या नांवाने केरळांत त्याच्या आधीच लोकप्रिय ठरली होती. एडुताच्छन्ने तिचाच अंगीकार केला. त्याची अनुवादपद्धति स्वतंत्र आहे. जिथे म्हणून नीतिबोधाला अवसर मिळेल, तिथे तिथे तो आपल्या प्रतिभेसह रमला आहे. त्याला लाभलेली काव्यसिद्धि अद्‌भुत आहे. मलयाळम् साहित्याला गति आणि श्रेष्ठता त्यानेच मिळवून दिली. केरळी जीवनांत अध्यात्माचें पावित्र्य आणि प्राणिमात्राविषयींचें सौहार्द त्यानेच आणलें. त्याचें रामायण ऐकून केरळांतली जनता मंत्रमुग्ध झाली, भारून गेली. तिला तो ग्रंथ प्रिय व पूज्य झाला.

एडुताच्छन्ने निर्मिलेला रामचंद्र एका विशिष्ट सीमेपर्यंतच मानव आहे, त्या रेषेपलिकडे पाय ठेवतांच तो दिव्य, उदात्त आणि देव-दानवांनाहि आदर्शरूप बनतो. चौदा वर्षांचा वनवास अचानक पुढे उभा ठाकला असतां हा सत्पुत्र राम, कैकेयीकडे जाऊन तिला म्हणतो —

" आई, तूं किती मायाळू आहेस ! भरत तुझा औरस पुत्र; पण त्याच्यापेक्षा तुझें माझ्यावरच प्रेम अधिक ! कारण लहान वयांत तूं त्याच्या शिरावर राज्यकारभाराचें प्रचंड ओझें ठेवलेंस आणि मला मोकळें केलेंस. मी निश्चित मनाने वनांत हवें तसें, हवें तिकडे हिंडावें. आई, तुझे हे माझ्यावर अनंत उपकार आहेत. "

पण लक्ष्मणाला मात्र तो प्रकार सहन झाला नाही. तो दशरथाला टाकून बोलला आणि म्हणाला —

भ्रान्तचित्तं जडं वृद्धं वधूजितं
शान्तेतरं त्रपाहीनं शठाप्रियं
बन्धिच्चुताततनेयुं पित्रे स्त्रान्
परिपन्थिकळायुळ्ळवे ने युमोक्कवे
अन्तकन् वीटिटन्नयच्चभिषेक–
मोरत्तर मेन्नियै साधिच्चु कोळ्ळुवन्

अर्थ – भ्रांत, जड-मूढ, बाइलबुद्धीच्या, वृद्ध, निर्लज्ज, पित्याला आणि त्याच्या साथिदारांना मी पकडून कैदेंत टाकीन किंवा प्रसंगीं त्यांचा वधहि करीन. जें प्रसंगोचित तें तें करून मी ज्येष्ठ बंधूचा राज्याभिषेक घडवून आणीन, तेवढें सामर्थ्य माझ्या ठिकाणीं आहे.

त्यावर सागराप्रमाणे गंभीर असलेल्या रामचंद्राने खवळलेल्या लक्ष्मणाला पुढील उपदेशाने शांत केलें ––

क्रोधमूलं मनस्तापमुण्टाइवरुं
क्रोधमूलं नृणां संसारबन्धनं
क्रोधमल्लो निजकर्मक्षयकरं
क्रोधं परित्यजिवक्वेणं बुधजनम्

अर्थ – क्रोधाने मनस्ताप होतो. क्रोध संसारबंधनांत घालतो. क्रोध हा कर्माचा क्षय करणारा आहे. म्हणून बुद्धिमान् लोक क्रोधाचा त्याग करतात.

एडुताच्छन्च्या या रामायणाला 'भाषा-अध्यात्मरामायणम्' असें म्हणतात. उत्तरेंत तुलसीरामायणाला जी लोकप्रियता लाभली, तीच केरळांत एडुताच्छन्च्या रामायणाला लाभली आहे. केरळांत घरोघरीं त्याचीं पारायणें चालतात. एडुताच्छ-

न्ने महाभारताचाहि अनुवाद केला आहे. तोहि ग्रंथ केरळी जनतेचा आवडता ठरला आहे. एडुताच्छन्चें हृदय भक्तिप्रवण आहे. तो म्हणतो, की 'भक्तिहीन मनुष्याला शत-सहस्र जन्मांनीहि ज्ञान किंवा मोक्ष मिळणार नाही.' हा आपला भक्तिभाव परिपुष्ट करण्यासाठी त्याने भागवत पुराणाचाहि अनुवाद केला आहे. एडुताच्छन् हा शंकराचार्यांना अनुसरणारा अद्वैतवादी आहे. तो एका ठिकाणीं ईश्वराची स्तुति करतांना म्हणतो–

ओन्नाय निन्नेयिट रन्टन्नु कण्टलविल ।
उन्टायोरिन्टल बत मिन्टावलल मम ।
पन्ट कणक्कुवरुवान निन कृपावलिक–
लुन्डाक एकल इह नारायणाय नमः ।

अर्थ – हे भगवन्, तूं एकमेवाद्वितीय आहेस. पण मायाजालांत सांपडल्यामुळे माझ्या जीवात्म्याला असें भासतें, की तूं माझ्याहून अलग आहेस. याच गंभीर दुःखांत मी बुडालों आहें. तूं माझ्यावर दया कर आणि मला तुझ्याशीं समरस करून टाक.

एडुताच्छन् जिथे जन्मला, तें घर केरळी जनतेला तीर्थरूप ठरलें आहे. जुन्या काळीं मुलाचा विद्यारंभसंस्कार करतेवेळीं त्याच्या धूळपाटीवर टाकण्यासाठी केरळांतले लोक एडुताच्छन्च्या आवारांतली माती आणीत. थोडक्यांत सांगायचें, तर एडुताच्छन् हें भक्तीचें परिपक्व फळ होतें, धर्मग्लानीचें मोचन होतें, धर्माधिष्ठित पौरुषाचें पुनरुज्जीवन होतें आणि केरळाचें मूर्तिमंत पुण्य होतें. एडुताच्छन्च्या मृत्यूनंतर मलयाळम् साहित्यांत कांही काळ जवळजवळ अंधाराचें साम्राज्य पसरलें. [के. सा. द.; केरळ]

एडूक

'यदन्तर्न्यस्तकीकसम्'=ज्यांत अस्थि, केस इ. वस्तू मध्यें ठेवून दगड-मातीचा भिंतीवजा चौथरा बांधला जातो, त्याला एडूक असें म्हणतात (अमर). बौद्ध लोकांनी बुद्धाच्या शरीराचे केस, नखें, हाडें इ. अवशेष सांपडले, ते घेऊन त्यांवर अशीं एडूकें बांधलीं व ते त्यांची पूजा करूं लागले. एडूक हें भावी कालांतील सुबद्ध स्तूपांचें पूर्वरूप होय. युधिष्ठिराला कलियुगाचें भविष्य सांगतांना मार्कंडेय म्हणतो–

विपरीतश्च लोकोऽयं भविष्यत्यधरोत्तरः ।
एडूकान् पूजयिष्यन्ति वर्जयिष्यन्ति देवताः ।।

(म. भा. वन. १९०. ६५)

अर्थ– हा लोकसमाज (यापुढे) उलटा पालटा होऊन विपरीत बनेल. लोक देवतांची पूजा वर्ज्य करून एडूकांना पुजूं लागतील.

एदका

उत्तर भारतांत प्रचलित असलेलें एक वाद्य. हें काठीने वाजवितात.

एप्रिल फूल

एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेस ख्रिस्ती समाजांत एप्रिल फूलदिन अर्थात् थट्टामस्करीचा दिवस असें समजतात. या दिवशीं एखाद्याची फजिती करणें किंवा खोटी अफवा उठवून एखाद्याला फसविणें, अशी चाल रूढ आहे. अशा थट्टामस्करीला बळि पडणाऱ्या माणसाला 'एप्रिल फूल' म्हणतात. शेक्सपिअर, स्विफ्ट, चार्लस् लँब इ. जुन्या इंग्रज साहित्यिकांनी या दिवसाच्या थट्टामस्करीचा उल्लेख केला आहे. ही चाल सर्व युरोपांत व ख्रिस्ती धर्म प्रचलित असलेल्या अन्य देशांतहि चालू आहे. कित्येक विद्वानांच्या मतें ही चाल प्रथम फ्रान्समध्ये उगम पावली व तिथून इतरत्र पसरली. या चालीची एक उपपत्ति पुढीलप्रमाणे सांगितली जाते–

ख्रिस्ती धर्माचें नवीन पंचांग फ्रान्सने प्रथम अमलांत आणलें. त्यांत १ जानेवारी हा वर्षारंभाचा दिवस ठरविलेला होता. आजहि ख्रिस्ती जगांत तोच रूढ आहे. त्यापूर्वी जें पंचांग होतें, त्यांत नवें वर्ष १ एप्रिलला सुरू होत होतें. नवें वर्ष बहुजन समाजाने स्वीकारलें; पण समाजांतले जुन्याचे अभिमानी असे जे लोक होते, ते या गोष्टीला मान्यता देण्यास तयार होईनात. त्यामुळे साहजिकच हे जुन्याचे अभिमानी लोक बहुजनांच्या थट्टामस्करीस पात्र झाले. ते ज्या दिवशीं आपला वर्षारंभ दिन साजरा करीत, त्या दिवशीं म्हणजे एप्रिलच्या पहिल्या तारखेस नवे लोक त्यांना बनावट भेटी व बनावट निमंत्रणें पाठवून फसवूं लागले. हीच चाल पुढे सार्वत्रिक होऊन सर्रास सर्व लोकांना फसविण्याचा दिवस, असें स्वरूप त्या दिवसाला प्राप्त झालें.

कित्येकांच्या मतें एप्रिल फूलची चाल याहूनहि फार प्राचीन असावी व ख्रिस्ती लोकांनी तत्पूर्वीच्या समाजांतून ती स्वीकारली असावी. [एन्सा. रि. ए.]

एमुष

एक काळा व शंभर दातांचा डुक्कर. वराह अवताराचें मूळ रूप. **पाहा**–वराह.

एयट्ठाण

(सं. एकासन) एक जैनव्रत. थाळींत एकदाच वाढलेलें अन्न सेवन करणें अर्थात् दुसऱ्यांदा कोणताहि भोजनपदार्थ न घेणें, असा याचा विधि आहे. दिगंबर परंपरेंत हें व्रत अशा प्रकारें करतात. [व. श्रा.]

एरंड मोकळ्या मैदानांत हा खेळ खेळतात. मुलांची संख्या ३० पर्यंत असली तरी चालते. मलांच्या संख्येच्या मानाने पांच फूट त्रिज्येचें एक व त्या भोवताली पंधरा फूट त्रिज्येचें दुसरें, अशीं दोन वर्तुळें काढतात. राज्य घेणाऱ्या मुलास आंतल्या लहान वर्तुळांत आणि खेळणाऱ्या सर्व मुलांस बाहेरच्या मोठ्या वर्तुळांत उभें करतात.

राज्य घेणारा मुलगा एक पाय उंच करून लंगडी घालीत बाहेरच्या वर्तुळांत खेळणाऱ्या मुलांस मारण्यासाठी बाहेर निघतो आणि त्यांचा पाठलाग करतो. खेळणारीं मुलें लहान वर्तुळाच्या आंत आणि बाहेरच्या वर्तुळाच्या बाहेर न जातां स्वतःच्या संरक्षणासाठी मोठ्या वर्तुळांतच धावतात. [व्या. ज्ञा. को.]

एरंडोल महाराष्ट्रांतल्या जळगांव जिल्ह्यांतलें तालुक्याचें ठिकाण. याच्या जवळून अंजनी नदी वाहते. गांवांत एक जुना पडका वाडा आहे. याच्या भिंतीला विविध प्रकारचें नक्षीकाम केलेल्या सुंदर दगडी खिडक्या आहेत. याला पांडवांचा वाडा असें म्हणतात. वनवासकाळांत पांडव ज्या एकचक्रा नगरींत राहत होते, ती नगरी म्हणजे एरंडोल हीच असावी व तिथून ५ मैलांवर असलेलें पद्मालय हेंच बकासुराचें वधस्थान असावें, अशा आख्यायिका सांगतात.

एरनाडन मलबारमधले डोंगरांत राहणारे लोक. ही एक ठेंगू जमात आहे. इतर वन्य जमाती या जमातीचा विटाळ मानतात. यांना माकडाचें मांस आवडतें. तिरकमठा घेऊन हे माकडें मारतात. मलबारी मुसलमान लाकडें गोळा करणें व शेतावर काम करणें, यांसाठी त्यांची नेमणूक करतात. हे लोक अजगर मारून त्याचें तेल काढतात व महारोगावरचें औषध म्हणून तें विकतात. यांच्यांत एक विचित्र चाल आहे, ती म्हणजे बापाची सर्वांत थोरली मुलगी ही त्याची द्वितीय पत्नी असते. [का. ट्रा. स. इं.]

एरवल्लर मलबार व कोइंबतूर जिल्ह्यांत राहणारी एक जंगली जमात. वेदन असें हिचें दुसरें नांव आहे. हे तमिळ भाषा बोलतात. शेतमजुरी हा यांचा व्यवसाय आहे. हे लोक विश्वासू व देवभीरु आहेत. काली, मुनि, कन्निमार आणि कुरुप्परायन हे यांचे देव होत. पहिल्या दोहोंची पूजा रानांत करतात व बाकीच्यांची घरांत करतात. हे उत्तम शिकारी आहेत. शिकारींत ससे, पक्षी, डुकरें यांना मारून त्यांचें मांस खातात. हे नायर, कम्मालर व इझावा यांच्या घरीं जेवतात; पण मन्नन, परयन व चेरुमन यांना शिवतहि नाहीत. हे लोक केस लांब वाढवितात. बायका पांढऱ्या मण्यांच्या माळा व पितळेच्या अंगठ्या घालतात.

विवाहप्रथा – लग्न ठरलें, की वधू-वरांचे आई-वडील ज्यांच्या शेतीवर मजुरी करतात, त्या जमीनदारांना पानसुपारी व तंबाखू देऊन ती बातमी सांगतात. लग्न सोमवारीं करतात. रविवारीं वरपक्षाच्या बायका वधूला रुपया व पितळेची अंगठी देतात. विधवेला फक्त विधुराशींच लग्न करतां येतें. काडीमोड देण्याचीहि चाल आहे. लग्नापूर्वी एखादी मुलगी गरोदर राहिली तर जुन्या काळीं तिला मृत्युदंड देत; पण अलिकडे फक्त जातिबहिष्कृत करतात. मुलीला न्हाण आलें, की तिला दूर एका झोपडींत ठेवतात. सात दिवसांनंतर तिला न्हायला घालून घरीं आणतात. प्रसूतीच्या वेळीं तिला अशीच दूर झोपडींत ठेवतात.

मृताला सहाव्या दिवशीं भात, केळीं व कोंबडी अर्पण करतात. पाहा-वेदन [का. ट्रा. स. इं.; म. ज्ञा. को.]

एरिलिगारु नीलगिरीच्या पठारावर व त्याच्या पायथ्याशीं असलेल्या जंगलांत राहणारी एक रानटी जमात. हे लोक बहुतांशीं नग्न असतात व झोपड्या न बांधतां झाडाखालीच राहतात. त्यांच्या वसाहतीच्या मध्यभागीं उबेसाठी व हिंस्र पशूंपासून संरक्षण होण्यासाठी एक आगटी सदैव पेटलेली असते. हे शेळ्या, मेंढ्या व गुरें यांची निपज करतात. जाळ्या लावून वाघ धरतात. केळीं व नारिंगें यांच्या बागा लावतात. सभोवतालच्या अनेक भाषांच्या मिश्रणाने बनलेली अशी एक वेगळीच भाषा बोलतात. [म. ज्ञा. को.]

एरुवाक पौर्णिमा ज्येष्ठ पौर्णिमा. आंध्रांतल्या शेतकऱ्यांचा एक खास सण. शेतांत नांगर धरण्याचा हा दिवस असतो. या दिवशीं शेतकरी आपले बैल व आउतें यांना धुवून काढतात. बैलांच्या अंगावर नवे कपडे व दागिने घालतात. त्यांना गोडाधोडाचा नैवेद्य दाखवितात. मग गांवांतले सगळे शेतकरी मिळून गांवभर त्यांची मिरवणूक काढतात. मग बैलांसह आपल्या शेतांत जाऊन नांगरणीचा मुहूर्त करतात आणि एवढें झाल्यावर घरीं परततात. [आं. सा. इ.]

एरेंगा मुंड एक आदिवासी जमात. ही मुंडांची एक शाखा आहे. बिहारमध्ये कोल्हन, गंगपूर आणि बिरू

या प्रदेशांत जंगलें आणि डोंगर यांच्या आश्रयाने हे राहतात. इंग्रजांनी यांना गुन्हेगार जमातींत घातलें होतें. त्यांच्यावर पोलिस खात्याची सक्त नजर असे. ते आपल्या वसाहतीजवळ एक गुप्त भुयार खोदीत व पोलीसांचा छापा आला, की त्यांत लपून बसत. त्यांच्यामध्ये दरोडे घालण्याची जबरदस्त प्रवृत्ति होती. ते तिथल्या संस्थानांत व मोठ्या जमीनदारींत सशस्त्र दरोडे घालीत, जाळपोळ करीत आणि स्त्रियांवरहि बलात्कार करीत. पण अलिकडे त्यांची ही गुन्हेगारी प्रवृत्ति कमी झाली असून ते आता शेती आणि शेतमजुरी यांसारखे व्यवसाय करूं लागले आहेत.

त्यांची मूळ भाषा मुंडारी ही आहे. पण ते एक वेगळीच भाषा बोलतात. तिला चोरांची हिंदी असें नांव आहे. ती जलद बोलली असतां कोणाला कळत नाही.

एरेंगांचा इतिहास व धर्म यांविषयीं माहिती मिळविणें दुरापास्त झालें आहे. आपले पूर्वज बिरूच्या बाजूने येऊन सरंद व बोनाइ इथे स्थायिक झाले, असें ते सांगतात. मुंडां-प्रमाणे यांचींहि अनेक गोतें असतात. यांच्यांतला रोटीबेटी व्यवहार कडक असतो. ते आपल्या गोताबाहेर अन्न घेत नाहीत व मुलीहि देत नाहीत. मुंडाप्रमाणे ते बोंगाला भजतात. याशिवाय हुटुबोंगा नांवाचा त्यांचा एक ग्रामदेवहि असतो. यांच्यांत जादूटोणा आढळत नाही. हो आदिवासींचा व यांचा धार्मिक संबंध आहे. ते लोक भुताखेतांना बलिदान करण्यासाठी एरेंगांना पुरोहित म्हणून बोलावितात. इतर बाबतींत मात्र हो व त्या भागांतल्या अन्य जमाती यांना अस्पृश्यांप्रमाणेच लेखतात.


विवाहप्रथा– एरेंगा तरुणाला एखादी मुलगी आवडली, की तो आपल्या कांही सोबत्यांना बरोबर घेऊन तिला पळवून आणतो. मुलीच्या आई-बापाना त्या तरुणाचा पत्ता लागला, की ते त्याच्या आईबापांकडे जाऊन मुलीच्या किमतीबद्दल वाटाघाटी करतात. गुरें, डुकरें, कोंबडीं, शेळ्या-मेंढ्या, हीं पाळीव जनावरें मुलीची किंमत म्हणून तिचा बाप वसूल करतो. एवढें झाल्यावर मग लग्न होतें. घरांत बाळंतपण झाल्या-वर सबंध घर आशौचांत पडलें, असें समजतात. विशिष्ट दिवशीं एक पांढरा कोंबडा देवाला बळि देतात व त्याचें रक्त बाळंतिणीला पाजतात.

मर्तिकप्रथा – प्रेतें जाळतात. प्रेताचें दहन चालू असतां एक बैल त्याच्या चितेजवळ बांधून ठेवतात. त्या वेळीं तो हंबरला, तर तें सुचिन्ह मानून मृतात्म्याला गति मिळाली, असें समज-तात. दहन झाल्यावर त्या बैलाच्या डोक्यावर घण घालून त्याला ठार करतात. [एन्सा. मुं.]

एरांपत्तु तमिळनाडमधलें प्रेमिकांचें एक द्वंद्वगीत. मोटेने किंवा लाटेने शेतांत पाणी काढतांना हें गीत गातात. हें गीत ग्रामीण विभागांत तसेंच शहरांतहि प्रचलित आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

एलक श्राद्धयोग्य तीर्थ. [मत्स्य पु. २२. ५३.]

एलकपादकपीठ मेंढ्याचे पाय असलेलें आसन, असा याचा शब्दशः अर्थ होतो. पण बुद्धघोषाने त्याचा अर्थ ज्याचे पाय लाकडाच्या आधारावर स्थित आहेत,



एलकपादकपीठ

असें आसन असा दिला आहे. भरहूत व बुद्धगया या ठिकाणीं दिसणारीं किंचित् वक्र पायांचीं आसनें हीं एलकपादकपीठ म्हणतां येतील. [मै. श. गु. अ. ग्रं.]

एलापत्र सहस्रफणांचा एक नाग. श्रावणमासांत हा नाग सूर्याबरोबर राहतो (भाग पु. १२. ११ ३७.).

भरहूत येथील शिल्पांत बुद्धाच्या दर्शनार्थ आलेल्या नाग-राजांच्या अनेक प्रतिमा आहेत. त्यांत एलापत्राच्या दोन भिन्न प्रकारच्या मूर्ति दिसतात. एका रूपांत त्याला पांच फणा असून मधल्या फणेवर एक युवती आहे. हें त्याचें संपूर्ण नागरूप होय. दुसरें रूप अर्धमानव आहे. त्यांत त्याच्या मानवमस्तकाच्या मागे नागफणा आहेत. पालि-बौद्ध-वाङ्मयांत बुद्धाला वंदन करून त्याचे आशीर्वाद मिळविणाऱ्या अनेक नागराजांच्या कथा आहेत. त्या सर्व नागांत एलापत्र (किंवा एरकपत्र) विशेष प्रसिद्ध आहे. [डि. हिं. इ.]

एलापुत्र एक नाग. याने कंबल नागापासून विष्णुपुराण ऐकलें व तें वेदशिरस या आपल्या एका शिष्याला सांगितलें. [विष्णु पु. ६. ८. ४७–४८]

एलापूर हें सध्याचें एल्लोर असावें. राष्ट्रकूटराजा कृष्ण-राज (पहिला) याच्या इ. स. ७६८ च्या एका ताम्रपटावरून असें दिसतें, की त्याने कांची येथील कैलासनाथ-मंदिराच्या धर्तीवर इथे एक मंदिर बांधलें (एपि. इं. १३ पृ. २७५). हें श्राद्धयोग्य क्षेत्र असल्याचें मत्स्यपुराण सांगतें (२०.५०).

एल्लाई कुरुप्पु तमिळ प्रदेशांतील ग्रामसीमेवरचा एक देव. याला पशुबळि देत नाहीत; पण ग्राम-देवतेच्या जत्रेंत मारलेल्या पशूंच्या रक्तांत कालविलेला भात मात्र अर्पण करतात. [व्हि. गॉ. सा. इं.]

एल्हण (१४ वें शतक) एक महानुभाव कवि. याला ओंकार असेंहि दुसरें नांव आहे. हा कवीश्वर आम्ना-यांतील चाहे व्यास याचा शिष्य होय. याने बालक्रीडा नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ लिहिला आहे.

त्याच सुमारास एल्हण किंवा येल्हण या नांवाचा दुसरा एक कवि होऊन गेला. हाहि महानुभावच होता. त्याचा अष्ट-विवाह नांवाचा एक बारा अध्यायांचा ग्रंथ असून त्यांत रुक्मिणी, जांबवती इ. कृष्णस्त्रियांच्या विवाहांचें रसाळ वर्णन आहे. त्याच्या काव्याचा नमुना पुढीलप्रमाणे–

तेथ परमानंद बहाळीः वसंतु खेळताये वनमाळीः
तें सौभाग्यें पातली वनस्थळीः दिसे चहुंकडे ॥
खेळावया शेला सावरिला कासेः
अंगीचे अलंकार केले सरिसेः
वेणी वीर गुंठी हात परिवसेः ओजावली मुकुटीं ॥
अष्टपाट मुख्य ललनाः सोळासहस्र गौरांगनाः
नानाविध शृंगाररचनाः करित्या जाल्या ॥
अतिपातला सुरंगाः कासे वेढिलिया पागा ॥
परिवट दाटणो रुळता सोगाः सोडिला पुडा ॥
सरिसीं सांवरुनि कुरळे : केंस माखिलें जवादि परिमळेः
माथें त्रिचुरले झळाळेः फणिया गजदंतासिया ॥

[म. म. वा.]

एवया मरुत् ऋग्वेदाच्या ५. ८७ या सूक्ताचा द्रष्टा. हा अत्रिकुलांतला आहे. याने विष्णूला मरुतांचा नायक म्हटलें असून विष्णु व मरुत् यांचें अंतःकरण द्वेषरहित असल्याचें सांगितलें आहे.

एवाव्रत काम्य स्त्रीव्रत. आश्विन अमावास्येस उपवास व रात्री गव्हाचें व कोणत्याहि एका धान्याचें भोजन असा याचा विधि आहे. फल अखंड सौभाग्याची प्राप्ति.

एशियाटिक सोसायटी एक ज्ञानसंस्था. एकोणिसाव्या शतकांत इंग्रजांच्या अमदानींत महाराष्ट्रांत ज्ञानसंवर्धनाचें कार्य जोराने सुरू झालें, त्याचा प्रणेता सर विल्यम् जोन्स हा होय. त्याने इ. स. १७८३ सालीं कलकत्ता येथे एशियाटिक सोसायटी ऑफ् बेंगॉल, या संस्थेची स्थापना केली. तोच त्या संस्थेचा अध्यक्षहि झाला. भारतीय कला, शास्त्रें, साहित्य, इतिहास आणि प्राचीन अवशेष यांचा अभ्यास करणें, हें या संस्थेचें उद्दिष्ट होतें. इतिहासाचा व संस्कृत भाषेंतील ज्ञानभांडाराचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यासाठी स्थापन झालेली, ही पहिलीच संस्था होय. ही संस्था पुढे अनेक विद्वानांना मार्गदर्शक ठरली. विल्यम् चेंबर्स, ग्लॅड्विन, हॅमिल्टन् व चार्लस विल्किन्स हे या सोसायटीचे मूळ सभासद होते. विल्यम् जोन्सने शाकुंतलाचा व मनुस्मृतीचा इंग्रजी अनुवाद केला. विल्यम् चेंबर्स हा प्राच्यविद्यांचा पंडित होता. ग्लॅड्विनने अकबराच्या कायदेकानूंचें भाषांतर केलें. हॅमिल्टनने कांही पर्शियन ग्रंथ इंग्रजींत अनुवादिले. चार्ल्स विल्किन्स याने संस्कृत ग्रंथांच्या मुद्रणाचा पाया घातला. विल्यम् जोन्सने चालविलेल्या या महान् ज्ञानकार्याला हिंदुस्थान सरकारने मोठाच पाठिंबा दिला.

संस्कृत विद्येच्या अध्ययनाच्या बाबतींत कलकत्याच्या या सोसायटीचें मुंबई प्रांतांतहि लगेच अनुकरण झालें. सर जेम्स् मॅकिंटॉश याने त्या कामीं पुढाकार घेतला रेकॉर्डर म्हणून मुंबईत त्याची नेमणूक झाली होती. १८०४ सालीं तो मुंबईत दाखल झाला व त्याच सालीं त्याने एशियाटिक सोसायटी ऑफ् बाँबे या संस्थेची स्थापना केली. त्या वेळचा मुंबईचा गव्हर्नर जोनॅथन डंकन याने मॅकिंटॉशला त्या कामीं बरीच मदत केली. त्याने सोसायटीचा अध्यक्ष म्हणून मॅकिंटॉ-शचीच नेमणूक केली. सोसायटीच्या मार्फत एक सार्वजनिक वाचनालय सुरू करण्याचें ठरलें. त्यासाठीं मुंबईतल्या वैद्यकीय व्यवसायांतील कांही लोकांनी जमविलेला मोठा ग्रंथसंग्रह सोसा-यटीने विकत घेतला. प्राचीन अवशेषांचा बहुमोल वस्तुसंग्रह कॅप्टन बेसिल हॉल याने, मुंबईत वस्तुसंग्रहालय स्थापलें जावें म्हणून सोसायटीला बहाल केला. मुंबईसरकारनेहि अनेक संस्कृत ग्रंथ वेळोवेळीं सोसायटीला दिले. एशियाटिक सोसाय-टीच्या कार्याचा वृत्तान्त म्हणजे भारताच्या ज्ञानोपासनेच्या इतिहासांतील एक महत्त्वाचें पर्व होय. [म. सा. पु.]

ऐंद्र वैदिक सूक्तद्रष्टे ऋषी. ऋग्वेदांत अप्रतिरथ, जय, लव, वसुक, वसुक, विमद, वृषाकपि व सर्वहरि या नांवांच्या मागे ऐंद्र हें विशेषण आढळतें. [हिं. क. को.]

ऐंद्र इष्टि ही इष्टि युवनाश्वाने पुत्रप्राप्तीसाठी केली होती. [भाग पु. ९. ६. २६]

ऐंद्रवायवपात्र एक यज्ञीय पात्र. हें वेकळीचें करतात. या पात्रांत इंद्र व वायु यांच्यासाठी सोम घेतात. या पात्राच्या गळ्याला रास्ना करतात. घागरीच्या गळ्याला दोरी बांधावी तशी ही रास्ना असते.

ऐंद्र व्याकरण ब्रह्मदेव व देवेंद्र शक्र यांनी पाणिनीच्या पूर्वी व्याकरणविषयक कांही नियम प्रस्थापित केले होते, अशी अनुश्रुति आहे. देवतांनी इंद्राला 'वाचं व्याकुरु' = वाणीचें व्याकरण कर, अशी प्रार्थना केल्याचा तै. संहितेंत उल्लेख आहे. सामवेदाच्या ऋक्तंत्र नामक प्रातिशाख्यांत लिहिलें आहे, की ब्रह्म्याने इंद्राला व इंद्राने भारद्वाजाला व्याकरण शिकविलें व पुढे भारद्वाजाकडून अन्य ऋषींना तें व्याकरण प्राप्त झालें (१.४). [पा. भा.]

ऐंद्रीपूजन देवीव्रत. आषाढांतल्या कोणत्याहि पक्षांतल्या ९ मीला शुभ्र ऐरावतावर आरूढ अशा श्वेतवर्ण ऐंद्रीदेवतेची पूजा करून नक्त भोजन करणें, असा याचा विधि आहे. [भविष्योत्तर पुराण]

ऐनँ साई १९ व्या शतकांतला एक मुसलमान संत. हा ग्वाल्हेर येथे जन्मला. तरुण वयांतच त्याने फकिरी पत्करली. पुढे तो दतिया येथे सिफशहाच्या मठांत राहूं लागला. आजहि त्याची शिष्यशाखा त्या भागांत दिसते. त्याने गीतेचा संक्षेपानुवाद उर्दूंत केला आहे. त्याचा 'ऐनँ साईं की हिलारें' हा पद्यग्रंथ सुप्रसिद्ध आहे.

ए बारावा स्वरवर्ण. कंठ व तालु हीं याचीं उच्चारणस्थानें होत. हा दीर्घ असून प्लुतहि होतो. उदात्तादि भेदाने त्रिविध व अनुनासिक–अननुनासिक या भेदाने सहा प्रकारचा होतो. कामधेनुतंत्रांत याचें वर्णन पुढीलप्रमाणे आहे ––

ऐकारं परमं दिव्यं महाकुण्डलिनीस्वयम् ।
कोटिचन्द्रप्रतीकाशं पञ्चप्राणमयं सदा ।।

अर्थ ––ऐकार हा परम, दिव्य, महाकुंडलिनी आहे. तो कोटिचंद्रांइतका प्रकाशमय असून पंचप्राणमय आहे.

मातृकान्यासांत खालचा ओठ, हें याचें स्थान आहे. त्रिपुरालोहिता, भौतिकासन इ. याचीं अनेक नांवें आहेत.

अक्षरविकास –– सनपूर्व दुसऱ्या शतकांतल्या हाथी गुंफा येथील लेखांत पहिल्या अवस्थेंतील 'ए' ला डोक्यावर आडवी रेघ काढून 'ऐ' बनविल्याचें दिसून येतें. दुसऱ्या अवस्थेंतील 'ए' ला मात्रा देऊन 'ऐ' केल्याचें उदाहरण इ. स. ६ व्या शतकांतील उष्णीषविजयधारिणीच्या पुस्तकांत आढळतें. पुढील शतकांतल्या कुयारकोट लेखांत तिसऱ्या अवस्थेंतील 'ए' ला चांगली मोठी मात्रा देऊन ऐ अक्षर काढलें आहे. दहाव्या शतकांत असाच ऐ काढीत असत, असें दिसतें. बाराव्या शतकांतील हस्तलिखित पुस्तकांत हल्लींचा वळणदार ऐ पाहायला सांपडतो. [म. ज्ञा. को.; श. क.]

ऐकादशिन पशुयाग पशुयागाचा हा एक विशेष प्रकार आहे. यांत अग्नि, सरस्वती, सोम, पूषा, बृहस्पति, विश्वेदेव, इंद्र, मरुत्, इंद्राग्नी, सविता आणि वरुण या देवतांना प्रत्येकी एक पशु अर्पण करतात. या यागांत अकरा पशूंसाठी तेरा किंवा एकच यूप पुरतात. तेरा यूपांपैकी अकरा यूप हे अकरा पशूंसाठीं असतात. बाराव्या यूपाला उपशय असें नांव असून तो भूमींत न पुरतां यूपांच्या दक्षिणेला आडवा ठेवतात. तेराव्या यूपाला पात्नीवत असें नांव असून जमिनींत पुरल्यावर त्याची उंची यजमानाच्या नाभीपेक्षा जास्त नसते. दक्षिणेकडचा यूप सर्वांत उंच असतो. पात्नीवत यूपाला बांधलेला पशु त्वष्ट्यासाठी असून तो न मारतां सोडून देतात. [हि. ध.]

ऐक्य स्वरुपिणी एक शक्तिदेवता. [पु. इं]

ऐघरा ओडिसामधला एक ग्रामीण उत्सव. हा डोल महिन्याच्या पौर्णिमेस करतात. एक छोटीशी झोपडी बांधून रात्रौ तिची पूजा करून ती पेटवितात. पेटतांना ती ज्या बाजूला कलंडेल त्या बाजूच्या भागांत पिकें चांगलीं येतील, असें समजतात. हा अग्न्युत्सवाचाच एक प्रकार आहे. हा उत्सव केल्याने घरें जळत नाहीत, अशी समजूत आहे. [बँ. ग्रा. आ. क.]

ऐतरेय ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राह्मणाचा कर्ता. महीदास हें याचें खरें नांव आहे. त्याच्या आईचें नांव इतरा असें होतें. त्यावरून पुढे त्याला ऐतरेय म्हणूं लागले, असें

सायण म्हणतो. ऐतरेय आरण्यकांत याचा वारंवार उल्लेख यतो (२. १. ८; ३. ७). सायणाने याची आख्यायिका दिली आहे, ती अशी ––

एका महर्षीला अनेक भार्या होत्या. त्यांतल्या इतरा नामक भार्येला महीदास नांवाचा एक पुत्र झाला. त्याला अनेक सावत्र-बंधू होते. महीदास बुद्धिमान् असूनहि तो बापाला आवडत नसे. एके दिवशीं तो महर्षि आपल्या सर्व मुलांसह एका यज्ञाला गेला. तिथे त्याला पुत्रवात्सल्याचा उमाळा येऊन त्याने महीदासाला वगळून बाकीच्या पुत्रांना जवळ घेतलें. महीदासाला तो अपमान सहन झाला नाही. रडतरडत घरीं येऊन त्याने घडलेली हकीकत आपल्या आईला सांगितली. तिला आपल्या मुलाचा कळवळा आला. तिने आपली कुलदेवता भूमाता हिचा धांवा केला. ती तात्काळ प्रगट झाली. तिने महीदासाला हातीं धरून त्या यज्ञसभेंत आणलें. त्याला सिंहासनावर बसवून ती सर्वांना म्हणाली, की ‘ हा महीदास सर्व कुमारांत श्रेष्ठ आहे.’ त्याच वेळीं तिने त्याला वरहि दिला, की ‘तूं ब्राह्मणसंज्ञक वेद-वाङमयाचा द्रष्टा होशील ! ’ त्या वराने महीदासाला स्फूर्ति झाली व त्याने चाळीस अध्यायांचा एक ब्राह्मणग्रंथ निर्माण केला. त्या ग्रंथालाच पुढे ऐतरेय ब्राह्मण असें नांव मिळालें. हा ११६ वर्षें जगला. उत्तरायुष्यांत रोगाने याला जर्जर केलें; पण तो रोगाला निर्धारवचन बोलला, की ‘मी तुझ्या त्रासाने मरणार नाहीं.’ [छांदो. ३. १६. ७; जै. उ. ब्रा. ४. २. ११.]

ऐतरेय आरण्यक

हें ऋग्वेदाचें आरण्यक असून याचे पांच भाग व अठरा अध्याय आहेत. पहिल्यांत पांच, दुसऱ्यांत सात, तिसऱ्यांत दोन, चौथ्यांत एक व पांचव्यांत तीन अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायांत कांही खंड आहेत. ऐ. आरण्यक हा ऐ. ब्राह्मणाचाच अवशिष्ट भाग असावा. कारण यांत तत्त्वज्ञानात्मक विचारांपेक्षा यज्ञविषयक विवेचनच अधिक आहे. महाव्रत नामक श्रौतविधीच्या हौत्रा-संबंधी याच्या पहिल्या, चौथ्या व पांचव्या आरण्यकांत विचार केलेला आहे. दुसरें आरण्यक आध्यात्मिक विचारांचें असून पहिल्या तीन अध्यायांत पुरुष या नांवाने विचार केलेला आहे. तिसऱ्या आरण्यकांत ऋग्वेदाच्या संहिता, पदपाठ व क्रमपाठ या तीन पठनांच्या गूढ अर्थाविषयीं रूपकात्मक विवेचन असून सृष्टींतील कांही अद्‌भुत चमत्कार प्रत्यक्ष अथवा स्वप्नांत पाहिल्यास तद्‌विषयक शांतीची कांही विधानेंहि सांगितलीं आहेत. चौथ्या आरण्यकांत महानाम्नी ऋचांचें संकलन आहे. पांचव्यांत महाव्रताच्या माध्यंदिन सवनांत म्हटल्या जाणाऱ्या निष्कैवल्य शस्त्राचें विवरण आहे. [वै. सा.; म. ज्ञा. को.]

ऐतरेय उपनिषद्

हें ऋग्वेदाचें उपनिषद् आहे. ऐ. आरण्यकाच्या दुसऱ्या विभागांतील चौथ्यापासून पुढचे तीन अध्याय एवढ्या भागाला ऐ. उपनिषद् म्हणतात. पहिल्या अध्यायांत जग हें ब्रह्मापासून निर्माण झालें असून मनुष्य हा त्याचें अत्युच्च व्यक्त स्वरूप होय; तसेंच मनुष्यामधल्या इंद्रियें, मन व हृदय या तीन करणांत आत्मा वास करीत असून तदनुरूप त्याला जाग्रति, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्था उत्पन्न होतात, असें म्हटलें आहे. दुसऱ्या अध्यायांत वामदेवाच्या तीन जन्मांची मीमांसा आणि तद्विषयक तत्त्वज्ञान सांगितलें आहे. या उपनिषदांत पुनर्जन्माची कल्पना निश्चयात्मक रूपाने प्रतिपादिली असून सर्व सचेतन-अचेतन पदार्थ एकाच प्रज्ञानरूप चैतन्याचीं रूपें होत, असें म्हणून शेवटच्या अध्यायांत अद्वैत तत्त्वज्ञानाचीं मूलतत्त्वें सांगितलीं आहेत. ‘ प्रज्ञानं ब्रह्म ’ हें या उपनिषदांतील महावाक्य होय. सर्वाधिष्ठान, शुद्ध, अद्वय असें जें चैतन्यमय प्रज्ञान तेंच ब्रह्म असून त्याच्या ज्ञानाने मुक्ति मिळते, असा या उपनिषदाचा उद्‌घोष आहे. [उ. र.]

ऐतरेय ब्राह्मण

हें ऋग्वेदाचें ब्राह्मण आहे. याचे चाळीस अध्याय असून पांच अध्यायांची एक अशा आठ पंचिका आहेत. यज्ञांतले हौत्रकर्म व त्या कर्मांत ऋग्वेदांतल्या कोणत्या ऋचा कोणत्या ठिकाणीं म्हणायच्या, हा या ब्राह्मणाचा मुख्य विषय आहे. याचा मोठा भाग सोमयागाने व्यापलेला आहे. पहिल्या सोळा अध्यायांत अग्निष्टोमाचा ऊहापोह आहे. सतरा व अठरा या दोन अध्यायांत ३६० दिवस चालणाऱ्या गवामयन सत्राचा विचार केलेला आहे. एकोणीस ते चौव्वीस या अध्यायांत द्वादशाह यागाचें विवरण आहे. पंचवीस ते बत्तीस या अध्यायांत अग्निहोत्राची चर्चा आलेली आहे. शेवटच्या आठ अध्यायांत राज्याभिषेकाचा विधि सविस्तर दिलेला आहे.

सायणाने जी आख्यायिका दिली आहे, तिच्यावरून पाहतां ऐतरेय ब्राह्मण हा ग्रंथ एकाच्याच हातचा असावा, असें वाटतें. श्री. चापेकर यांना हें मत मान्य आहे; पण डॉ. केतकर या ग्रंथांतला बराच भाग मूळचा नसावा, असें म्हणतात. सोमयागाला धरून जो मजकूर असेल, तो मूळचा व अवांतर विषय मागाहून त्याला जोडलेला असावा, असें त्यांचें मत आहे. वेबर, कीथ इ. विद्वानांचें मतहि आपल्यासारखेंच असल्याचें डॉ. केतकर सांगतात.

रचनाकाल– ऐ. ब्राह्मण व कौषीतकी ब्राह्मण हीं दोन्ही यास्काला माहीत होतीं व यास्कपूर्व शाकल्यालाहि माहीत

होतीं. यावरून या ब्राह्मणाचा काळ सनपूर्व ६०० वर्षांच्या पूर्वीचा असला पाहिजे, असें मानावें लागतें. हा झाला बाह्य पुरावा. प्रस्तुत ग्रंथांत ज्या ऋत्विजांचा व राजांचा उल्लेख येतो, त्यावरूनहि वरील कालालाच पुष्टि मिळते. ऐ. ब्राह्मणांत जनमेजयाच्या राज्याभिषेकाचें वर्णन आहे. हा जनमेजय संहितीकरणाच्या प्राचीन कालाच्या शेवटीं शेवटीं झाला. अर्थात् प्रस्तुत ग्रंथांत प्रसिद्ध राजा म्हणून त्याचा उल्लेख येणें स्वाभाविकच आहे. त्यावरून हें ब्राह्मण कुरुयुद्धानंतर लौकरच रचलें गेलें असावें.

भाषा – ऐ. ब्राह्मणाची गद्य भाषाशैली अपरिणत, बोजड व तुटक स्वरूपाची आहे. यांत उपमा-उत्प्रेक्षा सहसा आढळत नाहीत. कित्येक स्थळें मात्र अशीं आहेत, की तिथली भाषा सोपी, सरळ व जिवंत वाटते. शुनःशेपाची कथा हें त्याचें उत्कृष्ट उदाहरण होय. यांतील गद्यापेक्षा यांतल्या गाथा भाषेच्या दृष्टीने उच्च प्रतीच्या आहेत.

अंतरंगपरिचय – ऐतरेय ब्राह्मणाचा प्रारंभ पुढीलप्रमाणे झाला आहे–

अग्निर्वै देवानामवमो विष्णुः परमस्तदन्तरेण
सर्वा अन्या देवताः ।

अर्थ – अग्नि हा सर्व देवतांच्या अलिकडचा असून विष्णु हा पलिकडचा अर्थात् सर्वश्रेष्ठ आहे आणि इतर सर्व देवता या दोहोंच्या मध्ये अन्तर्भूत आहेत.

यावरून प्रस्तुत ग्रंथाच्या काळीं वरील दोन देवतांना महत्त्व प्राप्त झाल्याचें दिसून येतें. प्रसंगाने इंद्र, सूर्य इ. देवतांना महत्त्व दिलें असलें, तरी सर्व देवता हीं अग्नीचींच रूपें होत, असें म्हटलें आहे (३ . ४).

यांत देवासुरयुद्धाचा आठ वेळां उल्लेख आला आहे. देव निरनिराळे यज्ञ करीत व असुर त्यांत विघ्नें आणीत आणि त्यांतून देवासुरांचीं युध्दें उद्‌भवत. देवांचीं यज्ञकर्में पाहून असुरहि यज्ञ करूं लागले; पण त्यांतले कित्येक गूढ मंत्र व कित्येक गूढ क्रिया त्यांना न समजल्यामुळे त्यांचा यज्ञ असफल झाला व अखेरीस देवांकडून त्यांचा पराभव झाला. या वर्णनावरून असें दिसतें, की ' देव ' संज्ञा धारण करणाऱ्या कांही आर्यजनांत यज्ञविधि चालत; पण त्याच्या क्रिया असुर संज्ञक इतर जनांस माहीत नव्हत्या. यज्ञकांड हें आर्यांच्या कांही विशिष्ट समुदायांतच प्रचलित होतें. यज्ञकर्मास अत्यावश्यक असलेल्या सोमाबद्दल या ब्राह्मणांत बरीच मनोरंजक माहिति आली आहे. वाग्देवते स्त्रीरूपने धारण करून गंधर्वलोकीं असलेल्या सोमाला देवलोकीं आणलें, याविषयीं कथा अशी–

एकदा यज्ञदेवता देवापासून दूर निघून गेली. त्यामुळे देवांना पुरेसें अन्न मिळेना. म्हणून त्यांनी अदितीची प्रार्थना करून पुनश्च त्या देवतेला संपादन केलें. यज्ञानेच देव स्वर्गाला गेले; पण त्या वेळीं त्यांना अशी भीति वाटली, की आपल्याप्रमाणेच मानव आणि ऋषि हे देखील यज्ञ करून स्वर्गात येतील. म्हणून देवांनी त्यांची दिशाभूल करण्यासाठी यज्ञाचा यूप खाली तोंड करून पुरला; पण मानव आणि ऋषी यांनी देवांची ही लबाडी ओळखली व तेहि देवांप्रमाणे यज्ञ करून स्वर्ग मिळविते झाले (ऐ. ब्रा. १ . ७).

ऐतरेय ब्राह्मणावरून यज्ञाची उत्क्रांति कसकशी होत गेली त्याचें दिग्दर्शन होतें. प्रथम देव नामक आर्य हे नरमेध करीत असावे. शुनःशेपाची कथा नरमेधाचीच द्योतक आहे (७. १३--१८). नरमेधांतून अश्वमेधाची कल्पना उगम पावली. अश्वमेधांतून गवालंभ व त्यांतून पुढे अजालंभ सुरू झाला. अजालंभ म्हणजे यज्ञांत बोकडाचें हनन करणें होय. हा प्रघात पुढे बराच काळपर्यंत प्रचलित राहिला; पण ए. ब्राह्मणाच्या कालांतच सर्व यज्ञांची व्रीहीयज्ञांत उत्क्रांति झाली होती, असें दिसून येतें.

भृगु, अंगिरा इ. ऋषींनी शूद्रेचा पुत्र कवष याचा ऋषि म्हणून स्वीकार केला आहे. अशी या ब्राह्मणांत आणखी एक लक्षांत घेण्याजोगी गोष्ट दिसते. प्रस्तुत ब्राह्मणांत विश्वोत्पत्तीविषयीं पुढील कथा आली आहे --

एकदा प्रजापतीला आपली मुलगी उषा हिला पाहून कामवासना उत्पन्न झाली. तो तिच्या मागे लागला. ती रोहित मृगीचें रूप घेऊन पळूं लागतांच त्यानेहि ऋष्य नामक मृगाचें रूप घेऊन तिचा पाठलाग आरंभिला. तें पाहून सर्व देवांनी प्रजापतीच्या अंगांतल्या पापपुरुषाला मारण्यासाठी आपलीं भयानक स्वरूपें एकत्र केलीं. त्यांतून भूतवान् नामक भयंकर पुरुष निर्माण झाला. त्याने प्रजापतीचा पापयुक्त मृगदेह ठार मारला. तोच सांप्रत मृगनक्षत्राच्या रूपाने आकाशांत दिसतो. रोहिणीची तारका हीच ती प्रजापतीची कन्या होय. तिच्या मागून पळत असतांना प्रजापतीचें जें वीर्य पडलें, त्याच्या निरनिराळ्या भागांपासून निरनिराळ्या प्राण्यांची उत्पत्ति झाली. प्रजापतीने प्रखर तप करून तीन लोक उत्पन्न केले व त्या तपाच्या तेजानेच अग्नि, वायु, आदित्य हे तीन देव, तीन वेद व त्यांपासून अ उ म् हीं तीन अक्षरें उत्पन्न केलीं आणि अशा रीतीने सर्व चराचर सृष्टि निर्माण झाली (३ . ३३; ५ . २३).

याशिवाय क्षत्रिय आणि यज्ञ, नाभानेदिष्ठ, अर्बुद काद्रवेय, विश्वामित्र–वामदेव इ. कितीतरी कथा व आख्यायिका ऐ. ब्राह्मणांत पाहायला मिळतात. [म. ज्ञा. को.– वेदविद्या; वै. सा.]

ऐतान लिंगायतांच्या पुरोहित वर्गातला एक उपनयनसदृश संस्कार. मुलाच्या सात ते नऊ या वर्षांच्या कालावधींत केव्हा तरी हा संस्कार करतात. त्यासाठी शुभ मुहूर्त पाहतात. संस्कारासाठी एक चौकोन आंखतात. त्यांच्या चारी कोनांवर तांदुळाच्या राशींवर चार जलकलश ठेवतात. त्या कलशांच्या गळ्याभोवती सूत गुंडाळतात. प्रथम मुलाची हजामत करवून त्याला स्नान घालतात व वरील चौकोनाच्या पुढे पाटावर बसवितात. मग गुरु त्या मुलाच्या कानांत कांही मंत्र उच्चारतो व ते त्याच्याकडून म्हणवून घेतो. मंगल वाद्यांच्या गजरांत हा समारंभ होतो. मग भोजनसमारंभ व अन्नदान होतें.

ऐतान विधि झाल्यावर मग तो मुलगा पुरोहित बनतो. त्या दिवसापासून स्नान व लिंगपूजा केल्याशिवाय त्याने कांही खायचें नसतें. [कोल्हापूर गॅझे.]

ऐतिहासिक वेदांतील कथांना इतिहास मानणाऱ्या आचार्यांना ऐतिहासिक म्हणतात. [निरुक्त.]

ऐतिह्य हें एक ज्ञानसाधन असें प्रमाण आहे. ज्ञान होण्यासाठी प्रत्यक्षादि सहा प्रमाणें सांगितलीं आहेत, त्यांतलें हें सातवें होय. याला अगदीच गौण प्रतीचें मानतात. ' इह वटे यक्षस्तिष्ठति ' = इथे वडावर यक्ष राहतो, अशीं जीं आख्यायिकारूप प्रमाणें दाखविलीं जातात, तीं ऐतिह्य प्रमाणाचीं उदाहरणें होत. तार्किक लोक ऐतिह्याला शब्दप्रमाणाचाच एक भाग मानतात.

ऐनुद्दीन मूल्हकांत व किताब–उल्–अन्वार या ग्रंथांचा कर्ता. या ग्रंथांत भारतांतील सर्व मुस्लीम संतांचा इतिहास दिलेला आहे. हा इतिहासकार सुलतान अल्लाउद्दिन हसन बहामनी याच्या कालांत उदयाला आला. [म. ज्ञा. को.]

ऐयर कुलु कापूंची एक उपशाखा. याचा अर्थ प्रसिद्ध व्यक्ति असा आहे. राजकृपेमुळे यांचा सामाजिक दर्जा वाढला. यांचे पूर्वज विजयनगरच्या सैन्यांत सैनिक होते व त्यांनी त्या राज्याची चांगली सेवा केली. दंतकथा अशी सांगतात, कीं 'एक मुसलमान सेनापति यांचीं घरेंदारें उद्ध्वस्त करण्यास निघाला, त्या वेळीं गांवांतले सगळे पुरुष गोवळकोंड्याच्या मोहिमेवर होते. अशा स्थितींत हें सुलतानी संकट आलें असतां तिथल्या स्त्रिया पुरुषवेष घेऊन मुसलमानी सैन्याशीं लढल्या व त्यांनीं त्या सैन्याला पळवून लावलें.' या त्यांच्या शौर्याबद्दल विजयनगरच्या राजाने त्यांचा सत्कार करून त्या सर्व स्त्रियांच्या पायांत चांदीचे वाळे घातले. आजहि ऐयर कुलूंच्या बायका पायांत चांदीचे वाळे घालतात.

हे लोक शेती करतात व बैलगाड्याहि बाळगतात. यांना पाट्टुडू अशा उपाधीने संबोधिण्याची पद्धत आहे. यांच्यांतले कांही लोक स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजून जानवें घालतात. नाग व कासव अशी यांचीं दोन देवकें आहेत. यांच्या एका शाखेंत मामेबहिणीशींच लग्न करण्याची प्रथा आहे. मुलगी वयांत येण्याच्या आधी तिचें लग्न करतात. घटस्फोट व विधवाविवाह यांना मान्य नाही. [का. ट्रा. स. इं.]

ऐया अथवा ऐय्या याचा अर्थ पिता असा होतो. द. भारतांतील दासरी, देवाङ्ग, कोप्पळ इ. अनेक जाती स्वतःला ही उपाधि लावून घेतात. पूर्वी ही उपाधि फक्त ब्राह्मणच घेत असत; पण आता प्रत्येक ठिकाणचा स्थानिक पुजारी ती स्वतःला लावून घेतो. [का. ट्रा. स. इं.]

ऐरंडीतीर्थ ऐरंडी ही एक नदी असून तिचा नर्मदेशीं संगम होतो. हें स्थान पवित्र मानतात. [पु. इं.]

ऐरावत (१) एक हत्ती. इरावानाचा पुत्र व नागांचा राजा (अथर्व. ८. १०. २९; पं. ब्रा. २५. १५. ३.). नंतरच्या वाङ्मयांत याला इंद्राचा हत्ती असें म्हटलें आहे. हा समुद्रमंथनांतून उत्पन्न झाला व इंद्राचें वाहन बनला. हा शुभ्र वर्णाचा असून याला चार सुळे आहेत. इंद्राने याला पूर्वदिशेचें स्वामित्व दिलें. कृष्ण व इंद्र यांच्या युद्धांत गरुडाने याचा पराभव केला होता.

(२) धृतराष्ट्र नांवाच्या नागाचें पैतृक नांव. कद्रूपुत्र नागांना ऐरावत म्हणतात. जनमेजयाच्या सर्पसत्रांत यांचीं दहा कुळे दग्ध झालीं. [पु. इं. ; प्रा. च. को.]

ऐरावत धन्व मध्य आशियांतल्या गोबीच्या बाळवंटांतला एक प्रदेश ऐरावत धन्व या नांवाने प्रसिद्ध असावा, असें डॉ. वासुदेवशरण आग्रवाल म्हणतात. पांडवांनी महाप्रस्थानाच्या प्रवासांत हिमाचल ओलांडून वाळूचा समुद्र पाहिला व त्याच्या जवळच असलेल्या मेरु पर्वताचें दर्शन घेतलें, असें महाप्रस्थानिक पर्वांत म्हटलें आहे (२. २). पामीरचें पठार हाच मेरुपर्वत होय. इथेच ऐरावत वर्ष असल्याचें भीष्मपर्वांत म्हटलें आहे (६. ३७). यावरून ऐरावत वर्ष व ऐरावत धन्व या दोहोंचें स्थान मध्य आशियांतल्या मोठ्या वाळवंटांतच असलें पाहिजे, असें समजून येतें. [पा. भा.]

ऐरावती हिमालयांतून उगम पावलेली एक नदी. पंजाबमधील रावी नदीचेंच हें पूर्वीचें नांव असावें. मत्स्य पुराणांत हिच्या उगमाजवळच्या प्रदेशाचें वर्णन केलेलें आहे.

ऐरावती वीथी गगनमंडळांत दिसणारा एक मार्ग. पुनर्वसु, पुष्य आणि आश्लेषा हीं तीन नक्षत्रें या मार्गांत येतात. [पु. इं.]

ऐरिणीदान विवाह संस्काराच्या उत्तरांगांतला एक विधि. याला महाराष्ट्रांत झाल असें म्हणतात. ऐरिणी म्हणजे वंशपात्र अर्थात् वेळूच्या पट्ट्यांचें शिप्तर. कन्यापित्याने हें वराच्या आईला वंशवृद्धिच्या उद्देशाने दान करायचें असतें. या पात्रांत पांच पुरणपोळ्या, पांच कच्चे पापड इ. पदार्थ पत्रावळीवर घालून ठेवतात. पात्रांत कणकीचे पंधरा दिवे पेटवून ठेवतात. सोळावा दिवा मधोमध ठेवतात. मग कन्येचा पिता पत्नीसह त्या पात्राची पूजा करतो व तें वरमातेला दान देतो. या वेळीं वरमातेला चोळी-लुगडें देतात, त्याला ' मांडी चेपणें ' असें नांव आहे. मग ती दिव्यांनी प्रज्वलित केलेली झाल वरपक्षांतल्या प्रमुख स्त्री-पुरुषांच्या मस्तकावर ठेवतात व वधूला त्यांच्या मांडीवर बसवितात. वरमातेच्या मांडीवर वधूला बसविल्यावर वधूपक्षीय स्त्रिया ' जड का हळू ? ' असें वरमातेला विचारतात. ती ' मध्यम ' असें उत्तर देते व वधूच्या मुखांत साखरेची चिमूट घालते. या वेळीं वधूपिता वराच्या वडिलधाऱ्या मंडळींना पुढील श्लोकाने प्रार्थना करतो–

अष्टवर्षात्वियं कन्या पुत्रवत्पालिता मया।
इदानीं तव पुत्राय दत्ता स्नेहेन पाल्यताम् ।।

अर्थ– आठ वर्षांची माझी ही मुलगी आजवर मी मुलाप्रमाणे सांभाळली आहे. आतां मी ती तुझ्या पुत्राला दिली आहे. (तुम्ही सर्वांनी) तिचें प्रेमाने पालन करावें.

एवढें झाल्यावर मग वधू सोळा ब्राह्मणांना सौभाग्यवायनें देते.

वेळूचें संस्कृत नांव वंश असें आहे. वंशवृद्धि हा विवाहाचा एक उद्देश असतो. तेव्हां वंशवृद्धीसाठी वंशपात्र म्हणजे वेळूचें शिप्तर दान द्यावें, असा नामैक्यावरून हा विधि प्रचलित झाला असावा.

ऐलक हा शब्द अचेलक = वस्त्रहीन, यावरून बनला आहे. प्रथम हा शब्द जैनांतल्या नग्न मुनींना लावला जात असे. पुढे जेव्हा नग्न मुनींना निर्ग्रंथ किंवा दिगंबर म्हणूं लागले, तेव्हा ऐलक शब्द ११ व्या प्रतिमाधारीला व नाममात्र वस्त्रखंड धारण करणाऱ्या उत्कृष्ट श्रावकाला लावला जाऊं लागला. ऐलकाला उभ्या उभ्या भोजन करणें, केशलुंचन करणें व मयूरपिच्छिका बाळगणें या गोष्टींचा अधिकार असतो. [व. श्रा.]

ऐश्वर्य अणिमादि अष्टसिद्धींना ऐश्वर्य असें म्हणतात. याचे सावद्य (निंद्य), निरवद्य (श्लाघ्य) व सूक्ष्म असे तीन भेद होतात. [पु. इं.]

ऐश्वर्यकारिणी एक शक्तिदेवता. [पु. इं.]

ऐश्वर्यतृतीया व्रत कोणत्याहि ३ येस ब्रह्मा-विष्णु-महेशांची व त्रिलोकांची पूजा करणें, हा या व्रताचा विधि आहे. फल–ऐश्वर्यप्राप्ति. [हि. ध.]

ऐश्वर्यसंग्रह रोहित प्रजापतीचा एक गण. [पु. इं.]


ऐषुकारि एक प्राचीन मानवगण. अष्टाध्यायींत याचा उल्लेख आहे (४. २. ५४). उत्तराध्ययनसूत्रावरून कळतें, की कुरुजनपदांत इषुकार नांवाचें एक सुंदर व समृद्ध शहर होतें (१४. १). सांप्रतच्या हिसार शहराचेंच हें प्राचीन नांव असावें. त्या नगरांत राहणाऱ्या लोकांना ऐषुकारि म्हणत. [पा. भा.]

ऐसोदशव्रत एक जैन व्रत. हें व्रत पुरें होण्यास ६५० दिवस लागतात. यांत ५५० उपवास व १०० पारणा असतात. कोणत्याहि महिन्यापासून याचा प्रारंभ करतां येतो. प्रथम एक उपवास, एक पारणा, नंतर दोन उपवास, एक पारणा, अशा प्रकारें हें दहा उपवासांपर्यंत वाढवीत न्यायचें व नंतर उलटचा क्रमाने नऊ उपवास, एक पारणा, आठ उपवास एक पारणा अशा रीतीने एका उपवासापर्यंत यायचें. अशीं दहा आवर्तनें झालीं, की सर्व उपवास व पारणा पूर्ण होतात. [जै. व्र. वि. सं.]

ऐसोनवव्रत एक जैन व्रत. यांत ४०५ उपवास व ८० पारणा असतात. [जै. व्र. वि. सं]

ऐहोळ (सं. आर्यपुर) हें मलप्रभेच्या तीरावर व बदामीच्या पूर्वेस १२ मैलांवर वसलेलें आहे. चालुक्य राजा पुलिकेशी (पहिला) याने आपली राजधानी बदामीला नेण्या-

पूर्वी ती ऐहोळ येथे होती. इथल्या लहानशा परिसरांत सुमारें ३०–३५ मंदिरें आहेत. त्यांतलीं कांही चालुक्यांनी बांधलेलीं तर कांही त्यांच्याहि पूर्वीचीं आहेत. त्यावरून १५०० वर्षांपूर्वी कर्नाटकाची शिल्पकला किती प्रगत आणि वैभवशाली होती, याची स्पष्ट कल्पना येते. आजमितीस तिथे थोडींच मंदिरें चांगल्या स्थितींत आहेत. पण त्या मंदिरांच्या ढासळलेल्या अवशेषांतहि उत्कृष्ट शिल्प आढळतें. इथलीं बहुतेक मंदिरें इ. स. च्या पांच ते सात या शतकांतलीं आहेत. येथील स्थापत्यांत बांधणीची निश्चित नियमबद्धता दिसून येत नाही. ऐहोळचे स्थपति बांधणीचे वेगवेगळे प्रयोग करीत होते, असें दिसतें.



लाडखानाचें मंदिर–ऐहोळ

ऐहोळच्या मध्यभागीं 'लाडखानाचें मंदिर' नामक एक हिंदु मंदिर आहे. तें बरेचसें कोरीव लेण्याच्या धर्तीवर आहे. या मंदिराचें छप्पर सपाट आहे. त्यांत एकाच्या पोटांत दुसरा असे दोन मंडप आहेत. या शिल्पांत नक्षीकाम बेताचेंच आहे; पण जें आहे, तें मात्र स्पष्ट आणि प्रभावी आहे. त्याच्या भिंतींत जीं जाळीदार दगडी गवाक्षें बसविलीं आहेत, त्यांतल्या माशांच्या आकृति मनोज्ञ आहेत. मंदिराच्या मुख्य भागापेक्षा पडवीचे खांब दर्शनीय असून त्यावरच्या पूर्णाकृति प्रतिमा रेखीव आहेत. गाभाऱ्यांत शिवलिंग आणि मंडपांत नंदी असला, तरी हें मंदिर मुळांत विष्णूचें असावें. कारण त्या ठिकाणीं कांही वैष्णवचिन्हें दिसतात.

इथलें दुर्गमंदिर हें प्रथम सूर्यमंदिर असावें. आता तिथे सर्व देवतांच्या मूर्ती आढळतात. याच्याभोवती कोट उभारलेला असल्यामुळे याला दुर्गमंदिर म्हणू लागले. हें मंदिर म्हणजे बौद्धांच्या चैत्याचें ब्राह्मणी रूपांतर होय. हें उंच दगडी जोत्यावर उभारलेलें आहे. याला शिखर आहे; पण कदाचित् ती रचना मागाहूनची असावी.

इथलें तिसरें महत्त्वाचें मंदिर म्हणजे हुच्चिमल्लीगुडि. याची रचना भुवनेश्वरमधील परशुरामेश्वराच्या मंदिरासारखी आहे. मोठमोठ्या शिळा एकीवर एक चढवून याचें बांधकाम केलें आहे. याचे खांब ओबडधोबड असले, तरी ते भक्कम आहेत. यांत गर्भगृह आणि सभामंडप यांच्यामध्ये एक खोली नव्याने दाखल झाली, हें याचें इतरांहून वेगळेंपण होय. हिलाच विमान किंवा अन्तराळ अशी मंदिरशिल्पांतली विशिष्ट अशी संज्ञा आहे. पुढे जी चालुक्य शिल्पपद्धति उदयाला आली, तिच्यांत हें विमान अपरिहार्य ठरलें. याच्या छतावर कार्तिकेयाची प्रतिमा कोरलेली दिसते. तिच्यावरून आणि इतरहि कांही चिन्हांवरून हें पूर्वी शिवमंदिर असावें, असें संशोधकांचें अनुमान आहे.



शिवमूर्ति–ऐहोळ

इथलें विष्णुमंदिर ६ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास बांधलें गेलें. चालुक्य शिल्पाची ही पुढची पायरी होय. याच्या प्राकारांत विष्णूचे अवतार, अष्टदिक्पाल इ. मूर्ती कोरलेल्या आहेत. याच्या मध्यभागावरील छप्पर बाजूच्या छप्परापेक्षा बरेंच उंच आहे.

ऐहोळ-शिल्पाची शेवटची प्रगत अवस्था दाखवतें, तें तिथल्या एका टेकडीवरचें मेगुटी मंदिर. हें जैन स्थापत्य आहे. याची उभारणी इ. स. ६३४ सालीं झाली. लहान लहान शिलाखंडांनी हें मंदिर उभारलें आहे. इथे पाथरवटाचें कौशल्य चांगलेंच प्रतीत होतें. इथल्या स्तंभावरची कलाकुसरहि नाजूक

आहे. ऐहोळच्या पूर्वेस व उत्तरेस कांही जैन गुंफा आहेत. त्यांतल्या एका गुंफेंत पार्श्वनाथाची सुरेख मूर्ति आहे. [क. द.; खं. वै.; कर्नाटक.]

ओंकारगणेश हें स्थान प्रयाग क्षेत्रांत आहे. इथे ओंकाराने गणेशमूर्ति स्थापून तिची आराधना केली आणि अखिल ज्ञानस्वरूप सत्ता प्राप्त करून घेतली.

ओंकार चोरमागे (१७ वें शतक) महानुभाव पंथांतला एक कवि. याच्या कोण्या पूर्वजाला चोर म्हणून सुळीं देत असतांना एका महानुभावपंथी साधूने त्यास सोडविलें व आपल्या पंथांत मागून घेतलें. त्यावरून चोरमागे असें त्याचें आडनांव पडलें, असें सांगतात. हा पळसी गांवचा रहिवासी असून कोण्या पहाडसिंग नांवाच्या राजाच्या आश्रयाला तो राहिला होता, असें त्याच्याच काव्यावरून कळतें. याने लक्ष्मणास्वयंवर नांवाचें एक काव्य लिहिलें आहे. त्याचे सात सर्ग असून त्यांत ४४२ पद्यें आहेत. हा चित्रकवि असून याने आपल्या काव्यांत चौरसबंध, नवरसबंध, गोमूत्रिकाबंध इ. अनेक चित्रबंध रचून घातले आहेत. याचें गोमूत्रिकाबंधाचें उदाहरण पुढीलप्रमाणे ––

कुरंगणी जया परी । परीस सांपडे वनीं ।
वनीं भवार्णवीं हरी । हरी हरी त्वरा करी ।।

हा कवि विठ्ठल अनंत क्षीरसागर याचा समकालीन होता. [म. सा.]

ओंकार मांधाता ओंकारेश्वराचें क्षेत्र. बारा ज्योतिर्लिंगांत याची गणना आहे. हें स्थान मध्यप्रदेशांतल्या निमाड जिल्ह्यांत मोरटक्का स्टेशनापासून दहा मैलांवर येतें. हें नर्मदेच्या दुभंगलेल्या पात्रांत बेटासारखें वसलेलें आहे. एक चौरस मैल भरेल, एवढाच या बेटाचा टापू आहे. याच्या एका अंगाने वाहणाऱ्या प्रवाहाला नर्मदा म्हणतात व दुसऱ्या अंगाने वाहणाऱ्या प्रवाहाला कावेरी म्हणतात. बेटाच्या टोकावर कावेरी नर्मदेला मिळते. या बेटाचा आकार ओंकाराशीं मिळता-जुळता असल्यामुळे याला ओंकार असें नांव मिळालें व मांधात्याने इथे तपश्चर्या केल्यामुळे ओंकाराला मांधात्याचें नांव जोडलें जाऊन लोक या क्षेत्राला ओंकार मांधाता असें म्हणू लागले. मांधात्याची ती कथा पुढीलप्रमाणे आहे ––

इक्ष्वाकु कुलांत युवनाश्व नांवाचा एक राजा झाला. पुष्कळ भार्या असूनहि त्याला संतति झाली नाही. संततिप्राप्तीसाठी त्याने अनेक यज्ञयाग केले; पण ते सर्व व्यर्थ गेले. त्यामुळे एके दिवशीं उदास होऊन त्याने अरण्यवास पत्करला. फिरतां फिरतां त्याला खूप तहान लागली. पाणी मिळेल या आशेने तो जेव्हा भार्गव ऋषीच्या आश्रमांत गेला, तेव्हा बरीच रात्र झाली होती. त्या आश्रमांत एक यज्ञ चालला होता व यज्ञवेदीवर जलपूर्ण कलश ठेवलेला होता. कोणाकडे पाणी मागायचें, तर सर्व मंडळी निद्रावश झाली होती. तेव्हा युवनाश्वाला तहान अनावर झाल्यामुळे तो कोणालाहि न विचारतां त्या कलशांतलें पाणी प्याला. मग रात्रीं तिथेच झोपला. सकाळीं ऋषिमंडळी उठल्यावर कलश रिकामा पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. त्या प्रकरणाची चौकशी सुरू झाली, तेव्हा युवनाश्वाने आपण तें पाणी प्राशन केल्याचें सांगितलें. त्यावर भार्गव ऋषि म्हणाला. 'तें पाणी अभिमंत्रित होतें. त्याच्या ठिकाणीं स्त्रीच्या उदरांत गर्भधारणा करण्याचें सामर्थ्य होतें. तें पाणी तू प्राशन केल्यामुळे आता तुझ्याच उदरीं गर्भ राहील.'

आणि त्याप्रमाणेच झालें. युवनाश्वाच्या उदरांत गर्भ वाढू लागला. योग्य काळीं त्याची कूस छेदून तो बाहेर पडला. राजाला पुत्रजन्माचा आनंद झाला खरा; पण त्याचबरोबर या मुलाला कोण पाजील, अशी चिंताहि उत्पन्न झाली. एवढ्यांत इंद्र त्या ठिकाणीं आला आणि युवनाश्वाला म्हणाला, 'मां धास्यति' = हा मला पिईल. असें म्हणून इंद्राने आपली अमृतपूर्ण करांगुलि त्या बालकाला चोखायला दिली. इंद्राच्या त्या शब्दावरून मुलाचें नांव मांधाता असें ठेवलें गेलें (म. भा. वन. १२७; दे. भा. ७. ९–१०). इंद्रहस्ताचें प्राशन घडल्यामुळे मांधाता दिशींमाशीं वाढला व बलाढ्य झाला.

या एकाच क्षेत्रांत ओंकारेश्वर व अमलेश्वर अशीं दोन ज्योतिर्लिंगें आहेत. ओंकारेश्वर मंदिराचा आकार प्राचीन बौद्ध विहारासारखा दिसतो. मंदिरप्रदक्षिणेच्या वाटेवर शेंकडो भग्नमूर्ती व बौद्धविहारांच्या द्वारासारख्या भग्न कमानी आढळतात. सांप्रतचें ओंकारेश्वराचें मंदिर अहिल्याबाईने बांधलें आहे. ओंकारेश्वराचें लिंग ओबडधोबडच आहे. शिवाय हें लिंग नेमकें शिखराच्या खाली नसून तें बरेंच बाजूला आहे. असें म्हणतात, की मुसलमानी आक्रमणापासून ओंकारेश्वराचें रक्षण करण्यासाठी तिथल्या पुजाऱ्यांनी किंवा अधिकाऱ्यांनी मूळ लिंग कोणत्यातरी प्रकारें लपविलें व दुसरेंच एक लिंग त्याच्या बाजूला बसवून टाकलें. या शिवलिंगाभोवती सदैव पाणी भरलेलें असतें. ओंकारेश्वराच्या जवळच पार्वती व पंचमुख गणेश यांच्या मूर्ति स्थापलेल्या आहेत. मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावर महाकालेश्वरलिंग व तिसऱ्या मजल्यावर वैद्यनाथेश्वर लिंग आहे. हीं दोन्हीं लिंगें ठीक शिखराच्या खाली येतात. तळमजल्यावरचें

ओंकारेश्वराचें लिंग मात्र बरेंच बाजूला दिसल्यामुळे वर दिलेल्या आख्यायिकेंत तथ्य आहेसें वाटतें.

ओंकारेश्वर व अमलेश्वर या दोन ज्योतिर्लिंगांच्या स्थापनेची कथा पुढीलप्रमाणे आहे--

विंध्यपर्वत इथे पार्थिव लिंगाच्या रूपांत शंकराची आराधना करीत होता. शिव प्रसन्न झाल्यावर विंध्याने त्याला म्हटलें, की 'तूं आपल्या दिव्य रूपांत इथेच राहा.' तेव्हापासून तो ओंकारयंत्राच्या ठिकाणीं ओंकारेश्वर या रूपांत व पार्थिवलिंगाच्या ठिकाणीं अमलेश्वर या रूपांत राहिला.

यात्रिकाने प्रथम ओंकारेश्वराचें व तिथून परत येतांना अमलेश्वराचें दर्शन घ्यावें, असा इथला नियम आहे. ओंकारेश्वर बेटांत आहे; तर अमलेश्वर नर्मदातटाकीं पलिकडे रुद्रपुरींत आहे. इथे कांही जैन मंदिरेंहि आहेत. महाशिवरात्रीला इथे मोठी यात्रा भरते. स्कंदपुराणांत या स्थळाचें माहात्म्य पुढीलप्रमाणे सांगितलें आहे --

देवस्थानसमं ह्येतत् मत्प्रसादाद् भविष्यति ।
अन्नदानं तपः पूजा तथा प्राणविसर्जनम् ।।
ये कुर्वन्ति नरास्तेषां शिवलोकनिवासनम् ।

(रेवाखंड २२)

अर्थ--(शिव म्हणतो-) माझ्या प्रसादामुळे हें स्थान स्वर्गतुल्य होईल. जे लोक इथे अन्नदान, तप, पूजा किंवा प्राणविसर्जन करतील, त्यांना शिवलोकीं निवास मिळेल.

पूर्वी कांही अत्यंत भाविक यात्रेकरू या क्षेत्रांतल्या डोंगराच्या कड्यावरून उडी घेऊन आत्मत्याग करीत, असे उल्लेख आढळतात.

ओंकारवाकु (१७ वें शतक-उत्तरार्ध) एक महानुभावी संतकवि. याचा 'लीळानिधि' नांवाचा मराठी ओवीबद्ध ग्रंथ असून त्याचे १०० अध्याय आहेत. हा ग्रंथ शके १५९५ (इ. स. १६७३) मध्ये परंडपट्टणीं लिहिल्याचा उल्लेख ग्रंथाच्या शेवटीं आहे. यांत परमेश्वराच्या लीला वर्णिल्या आहेत. [म. म. वा.]

ओंगी अंदमान-निकोबार या द्वीपसमूहांतील छोटा अंदमान या बेटावर राहणारी एक आदिवासी जमात. हे लोक ठेंगणे असून त्यांचा रंग निग्रोंसारखा काळा असतो. त्यांच्या डोक्यावरचे केस अगदी लहान व कुरळे असतात. पुरुषांप्रमाणेच स्त्रियाहि डोक्यावरले केस कापतात. पुरुष सगळेच विवस्त्र असतात. स्त्रियांच्या कमरेंत कमरपट्टा असतो व पुढच्या भागीं लज्जारक्षणार्थ त्याला एक झुपका बांधलेला असतो. एका मोठ्याशा झोपडींत चार-पांच कुटुंबें एकत्र राहतात. झोपण्यासाठी हे लोक बांबूची दोन अडीच फूट उंच एक खाट बनवितात. अशा तऱ्हेच्या चार पांच खाटा एका झोपडींत असतात.



माता बालक--ओंगी

प्रत्येक कुटुंब आपल्या खाटेच्या शेजारींच आपापला स्वयंपाक करतें. तसा यांचा स्वयंपाक विशेषसा नसतोच. कधी ते डुक्कर, मासे, बेडूक इ. प्राणी विस्तवावर भाजतात, तर कधी त्यांचे मांस कच्चेंच खातात. विशेष प्रसंगीं झोपडींतील सर्व कुटुंबें एकत्र स्वयंपाक करतात व भोजनोत्तर नृत्य करतात.

ही जमात अत्यल्प असून तिच्यांत फक्त १३० माणसें आहेत. त्यांची भाषा दुसऱ्या लोकांना कळत नाही.

यांच्या घरांत डुकराचें मुंडकें व डुक्कर, बेडूक इ. प्राण्यांचे सांगाडे टांगलेले असतात. डुकराचें मुंडकें गेरूने रंगवितात व शिकारीला जाण्यापूर्वी पुष्कळ शिकार मिळावी, म्हणून त्या मुंडक्याचें दर्शन घेतात.

कांही वर्षांपूर्वी हे लोक कुठल्याहि बाहेरच्या माणसाला आपल्या बेटावर पाय ठेवूं देत नसत. तसा कोणी प्रयत्न केल्यास त्याला त्यांच्या तिरंदाजीला बळी पडावें लागे. परंतु हल्ली हें लोक त्या बाबतींत बरेच सुधारले आहेत. इथला सरकारी नोकरवर्ग आपल्या सुखसोयीसाठी प्रयत्न करतो, हें त्यांना आता कळून चुकलें आहे.

ओंगी स्त्रियांत वंध्यत्वाचें प्रमाण फार मोठें म्हणजे शेकडा ८८ टक्के एवढें आहे. त्यामुळे हे लोक अपत्यजन्म ही एक मोठी आनंदाची बाब मानतात. स्त्रीच्या गरोदरपणीं सुरुवातीच्या महिन्यांत एक साधा विधि करण्याची पद्धत आहे. गरोदर स्त्री आपल्या अंथरुणावर बसते. मग तिच्यासमोर एखादा पुरुष, स्त्री किंवा मूल यांना बसवितात. त्याच्या हस्तें डुकराचें किंवा कासवाचें मांस मधांत घोळवून त्याचा तुकडा तिच्या तोंडांत

घालतात. थोडा वेळ चघळून गर्भवती तो घास थुंकून टाकते. या विधीच्या वेळीं गर्भवतीला जो पदार्थ दिला असेल, त्यावरून पुढे तिच्या मुलाचें नांव ठेवतात.

विवाहप्रथा – ओंगी लोकांत खऱ्या विवाहापूर्वी एक लुटुपुटीचा विवाह लावण्याची पद्धत आहे. वडील-धारीं माणसें मुलीसाठी एखाद्या तरुणाची किंवा विवाहित पुरुषाचीहि वर म्हणून निवड करतात. मुलाला व ठरलेल्या वधूला दोन वेगवेगळ्या बिछान्यांवर बसवितात. नंतर मुलगा उठून त्या वधूचा हात धरतो व तिला आपल्या बिछान्यावर आणतो. नंतर तो मुलगा वधूला आपल्या मांडीवर घेतो व दोघें एकमेकांना आलिंगन देतात. नंतर वधू तिथून उठून आपल्या बिछान्यावर जाऊन झोपते. खरा विवाह समारंभहि अशाच पद्धतीने होतो. मुलगा आपली वधू पसंत करतो व तिच्या आई-बापांकडे तिला मागणी घालतो. आई-बाप मुलीच्या संमतीने होकार देतात. मग त्यांचें खरें लग्न लागतें. जमलेले स्त्री-पुरुष लग्नाच्या रात्रीं चेहरे रंगवून नृत्य-गायन करतात.



ओंगी–नर्तक

मर्तिकप्रथा – ओंगी माणूस मृत झाला म्हणजे त्याला बिछान्याच्या खालीच खड्डा खणून पुरतात. मृताचे सर्व नातेवाईक जमून मोठमोठ्याने आक्रोश करतात. मृत माणसाचें नांव कोणीहि उच्चारीत नाहीत. पांच सहा महिन्यानंतर मृताचा खालचा जबडा काढून घेतात. तो तांबड्या रंगाने रंगवितात आणि त्याला तांबडा दोर बांधून सर्व नातेवाईक क्रमाक्रमाने तो आपल्या गळ्यांत बांधतात. नंतर तो जबडा परत पुरून टाकतात. हा जबडा उकरून काढल्यानंतर तीन चार दिवसांनी सर्व नातेवाईक आपले चेहरे रंगवून गातात व नाचतात. नाचतांना स्त्रिया मधेच थांबून आपल्या नवऱ्याला मिठी मारतात व हुंदके देऊन रडतात. हा कार्यक्रम स्त्रिया दमेपर्यंत चालू असतो. नंतर पुरुषहि तसेंच करतात. हा समारंभ झाला, की सुतक संपलें असें समजतात. [फोक लोअर; धर्मयुग.]

ओंटेडु

दक्षिणेंतील गाणिग जातीचा एक पोटविभाग. हे लोक आपल्या तेलघाण्याला एकच बैल जुंपतात. [का. ट्रा. स. इं.]

ओंडिपुली

दक्षिणेंतील सालेम जिल्ह्यांत राहणारे लोक. हे तेलुगु भाषा बोलतात, शेती करतात व गुरें पाळतात. [का. ट्रा. स. इं.]

ओ

तेरावा स्वरवर्ण. ओष्ठ व कंठ हीं याचीं उच्चारणस्थानें होत. हा दीर्घ असून प्लुतहि होतो. तसेच उदात्तादि भेदाने व अनुनासिक-अननुनासिक या भेदाने सहा प्रकारचा होतो. कामधेनुतंत्रांत याचें वर्णन पुढीलप्रमाणे दिलेलें आहे–

ओकारं चञ्चलापाङ्गि पञ्चदेवमयं सदा ।
रक्तविद्युल्लताकारं त्रिगुणात्मानमीश्वरम् ॥

अर्थ–हे देवी, ओकार हा रक्तविद्युल्लतेच्या आकाराचा, त्रिगुणात्मक, पंचदेवमय व ईश्वर आहे.

याला सद्योजात, वासुदेव इ. अनेक नांवें आहेत. मातृकान्यासांत याचें स्थान वरच्या दंतपंक्तीवर येतें.

अक्षरविकास– 'अ' पासून 'ओ' वर्ण तयार झाला असावा, ही साहजिक सुचणारी कल्पना चुकीची ठरते. कारण अशोकाच्या गिरनार लेखांत 'ओ' ची आकृति स्वस्तिकांतील उभ्या भागाप्रमाणे आहे. इ. स. च्या पहिल्या शतकांतील कुशानवंशी राजाच्या वेळच्या मथुरा येथील लेखांत वरील 'ओ' च्या वरच्या आडव्या रेघेला बराच बांक आहे. पुढील शतकांतील नासिकच्या वासिष्ठीपुत्र पुलुमायीच्या लेखांत खालच्या रेघेलाहि बांक आहे. कार्ले लेण्यांतसुद्धा असाच ओ दिसतो. पांचव्या शतकांतील जयनाथच्या दानपत्रांत हल्लींच्या 'उ' च्या सारखी 'ओ' ची आकृति दिसते. प्रतिहार कक्कुकाच्या घटिआला लेखांत (इ. स. ८३१) हें साम्य अधिकच पटतें. १२व्या शतकांतील एका हस्तलिखित पुस्तकांत 'ओ' हा 'अ' ला मात्रा देऊन काढल्यासारखा दिसतो. आज आपण काढतों, तसा ओ कुठेच आढळत नाही. पूर्वी अक्षराच्या डाव्या हाताला काना काढून मात्रेचें काम भागवीत असत. [श. क. ; म. ज्ञा. को.]

ओकच्छीय

जैन साध्वीने हृदय आणि पाठ झाकण्यासाठी वापरायचें वस्त्र.

ओका-बोका

लहान मुलांचा एक खेळ. यांत दहा-पांच मुलें जमिनीवर बसून आपल्या दोन्ही हातांचीं बोटें उभीं जमिनीवर टेकवितात. मग त्या समुदायांतला एक

मुलगा प्रत्येकाच्या हाताला स्पर्श करीत पुढील गाणें म्हणतो.

ओका बोका तीन तडोका ।
लडवा लाठी चंदन काठी ।
बाग में बगडवा डोले ।
सावनमें करइली फूले ।
ओ करइली के नाँव का ?
इजइल बिजइल, पानवा फूलवा
ढोढिया पचक ।।

हें त्याचें गाणें ठेक्यांत चालतें. प्रत्येक ठेक्याला तो मुलांच्या एकेका हातावर बोट ठेवीत जातो आणि 'पचक' शब्द येतांच त्या मुलाच्या हातावर मूठ मारून तो हात जमिनीसरपट करतो. [लो. सा. भू.]

ओकोपोई अंदमानी आदिवासींतले विशिष्ट पुरुष. यांना दिव्यदृष्टि असते. त्या दृष्टीमुळे त्यांना स्वप्नांचे अर्थ कळतात, भूमिगत संपत्ति दिसते व दुसऱ्या गांवीं काय चाललें आहे, तेंहि कळतें, अशी समजूत आहे. [प्रि. क. इं.]

ओ क्यां को राजस्थानांतील मुलांचा एक खेळ. क्रीडास्थानीं मुलें एकत्र जमल्यावर त्यांतला एक मुलगा हात उंच उभारून इतर खेळाडूंना विचारतो, 'ओ क्यां को ?' यावर बाकीचे एका आवाजांत म्हणतात, 'आल को.' मग तो मुलगा खेळाडूंतल्या कोण्या एकाचें नांव घेऊन म्हणतो, --

इकै सिर पर जिको नई देगो ।
जिको मोडी रांड चिंडाल को ।

ही एक शिवी असते. ती ऐकल्यावर तिचा प्रभाव दूर करण्यासाठी ज्याला शिवी दिली असेल, त्याच्या डोक्यावर सगळे लोक थपडा मारायला धावतात. तो त्या थपडा चुकविण्यासाठी धावत सुटतो; पण सर्व मुलें त्याला पकडून थपडा लगावतातच. सर्वांच्या थपडा लगावून झाल्या, की मग त्यालाहि तोच प्रश्न विचारला जातो. तो दुसऱ्या कोणाचें तरी नांव घेतो. मग मुलें त्याच्यामागे लागतात. अशा रीतीने हा खेळ सगळ्या मुलांचीं नांवें घेऊन होईपर्यंत चालतो. [मरुभारती]

ओक्किलियन कानडी शेतकऱ्यांची तमिळनाडमध्ये जाऊन वसलेली एक शाखा. हे लोक स्वतःला आनेगुंदीच्या बल्लाळ राजाचे वंशज समजतात. हे मूळचे शेतकरी होते; पण आता त्यांनी दूधविक्री, गवंडीकाम, शिंपीकाम, विड्या वळणें, इ. धंदे पत्करले आहेत. यांच्यांत पोटजाती पुष्कळ आहेत. त्यांच्यांतली अरुव ही पोटजात शैव आणि हट्टी ही वैष्णव आहे. शैव-वैष्णवांत विवाह होतात. मागालिअम्म व कोनिअम्म या यांच्या ग्रामदेवता असून ते त्यांना कोंबड्या बकऱ्यांचे बळि देतात.

विवाहप्रथा – वधूपेक्षा कित्येक प्रसंगीं वर अल्पवयी असतो. लग्नाच्या वेळीं वधूगृहीं जातांना तो एक बांबूची काठी, अलंकार, कंकणें, ताळी, फळें, नारळ, कोरी चटई, कापूर इ. वस्तू आपल्याबरोबर नेतो. लग्नाच्या वेळीं तो आपल्या हातीं टोकाला लिंबू खोचलेली कट्यार धरतो. मुलीला प्रथम रजोदर्शन झालें, की तिचा मामा किंवा मामेभाऊ तिच्याकरितां माडाच्या झावळ्यांची एक निराळी झोपडी बांधून देतो. ती त्या झोपडींत राहते व तिचे नातेवाईक तिला दररोज कपडे फळें व फुलें आणून देतात. तिथे तिला एका दिवसाआड स्नान घालतात. सातव्या दिवशीं तिची पहिली झोपडी मोडून तिच्यासाठी दुसरी झोपडी बांधतात.

मर्तिकप्रथा – मृतांना पुरतात. प्रेतयात्रा चालू असतां मृतावर फुलें, नाणीं, भात इ. वस्तू उधळतात. मृताची विधवा आपल्या बांगड्या फोडून त्याच्या थडग्यांत टाकते. तिसऱ्या दिवशीं फणसाच्या डहाळ्या जाळून त्या राखेची मृताची प्रतिमा बनवितात, तिच्यावर फुलें टाकतात व दूध घालतात. ११ दिवस सुतक पाळतात. ११ व्या दिवशीं ब्राह्मणाकडून पंचगव्य घेऊन शुद्ध होतात व ज्ञातिभोजन घालतात.

जातीचा कोणीतरी पुढारी असतो. तो ज्ञातिसभा भरवून तंटे भांडणें मिटवितो व व्यभिचार, मारामारी, इ. अपराधांबद्दल गुन्हेगाराला दंड किंवा शिक्षा करतो. [का. ट्रा. स. इं.]

ओगलिया कुमाऊँ प्रदेशांत साजरा होणारा सिंहसंक्रांतीचा सण. इंग्रजी राज्य येण्यापूर्वी चंद राजे त्या प्रदेशावर राज्य करीत होते. त्या दिवशीं विविध कलात्मक वस्तू प्रजेकडून राजाला भेट म्हणून दिल्या जात. या उपायनाला ओगल असें नांव होतें. या दिवशीं उडदांच्या डाळीचे वडे करण्याची प्रथा आहे. या दिवशीं पुष्कळ ठिकाणीं मेळे भरतात. त्या दिवशीं हुडका नांवाचें वाद्य वाजवून पहाडी लोक गाणीं गातात. हा येथील आदिवासी जातींचा प्राचीन उत्सव आहे. [संमेलनपत्रिका]

ओघद्वादशी भाद्रपद शु. १२ शीला ओघद्वादशी असें दुसरें एक नांव आहे. या द्वादशीची एक लोककथा पुढीलप्रमाणे आहे--

भाद्रपद शु. १२ शीस एका राज्यांतल्या स्त्रिया गांवा-

बाहेरच्या तळ्यावर स्नानाला जात. राजाची राणीसुद्धा तिथेच स्नानाला येई; पण प्रजेला वाटलें, की राणीसाठी स्वतंत्र तळें असावें. प्रजेने राणीच्या मनांत ही गोष्ट भरविली. राणीने राजाकडे हट्ट धरला. राजाने तिच्यासाठी तळें खोदलें. पण त्याला कुठूनहि पाणी लागेना. तेवढ्यांत एक साधु तिथे आला. त्याने राजाला सांगितलें, की तूं जर तुझा थोरला पुत्र व तुझी राणी यांना तळ्यांत बळि देशील तर तळें पाण्याने भरेल. राजाने तसें केलें. त्यामुळे तळें पाण्याने भरलें व त्या पाण्यांत राणी व राजपुत्र दोघेंहि मरून गेलीं. तेव्हापासून ओघद्वादशीला तळ्यांत स्नान करण्याची प्रथा पडली. [इं. फो. लो.]

ओघवती पंजाबांतील एक नदी. हिच्या तीरीं श्राद्ध व दान पुण्यप्रद होतें (मत्स्य. पु. २२. ७१). हें सरस्वती नदीचेंच दुसरें नांव असावें, असें डॉ. काणे म्हणतात. [हि. ध.]

ओचवा धेड जातीचा धार्मिक मेळा. या मेळ्यांत धेड लोक आपणांस पुढील युगांत प्राप्त होणाऱ्या श्रेष्ठ दर्जाविषयीं गाणीं गातात.

ओच्छन् तमिळनाडमधील वाद्यवादकांचा एक वर्ग. हे लोक पिडारी व इतर ग्रामदेवतांचे पुजारीहि असतात. देवालयांत असतांना हे जानवें घालतात. 'ओच्छन्' ही या लोकांची पदवी असून ती त्रिवांकुरच्या राजाने त्यांना दिलेली आहे. ओच्छन् शब्दांतला मूळ धातु ओच्छै = आवाज करणें, असा आहे. हे लोक मृदंग वाजवून ग्रामदेवतांच्या स्तुतिपर गाणीं म्हणत, त्यावरून त्यांना ही पदवी दिली गेली. याशिवाय त्यांना आच्छिक, उमै आच्छिक, दीवर, पुलवर आणि कंबन अशाहि उपाधी आहेत. शेवटची उपाधि तमिळ रामायण लिहिणाऱ्या कंबन या महाकवीवरून त्यांना मिळाली आहे. कारण कंबन हा ओच्छन् वर्गांतला होता.

यांच्यातले बरचसे लोक शैव आहेत, तर कांही थोडे वडगळ किंवा तिंगळ या वैष्णवपंथांतले आहेत. चिंगलपुट जिल्ह्यांतील कांही ओच्छन् देवदासींना नृत्य शिकवितात. त्यांना नट्टुवान् म्हणतात. मद्रासच्या उत्तरेकडील जिल्ह्यांत ओच्छनांचे मारयन्, पांडी, कंडप्पन्, पेरिय अर्थात् पल्लवरायन् व पुलवन् असे पांच पोटभेद आहेत. दक्षिणेकडील जिल्ह्यांत ओच्छन् लोक आत्याच्या मुलीवर हक्क सांगून तिच्याशीं लग्न करतात. उत्तरेकडील जिल्ह्यांतले मामेबहिण किंवा मावसबहीण हिच्याशीं लग्न करतात. यांचे बहुतेक धार्मिक विधी पल्ली व वन्नियन् लोकांच्या प्रमाणे आहेत. हे प्रेतें जाळतात. यांच्या अंत्यकर्माचें पौरोहित्य ब्राह्मण करतात. ही जमात संघटित असते. प्रत्येक ठिकाणीं त्यांचा एक वर्गप्रमुख असतो त्याला 'पेरियथन कारन्' म्हणतात व त्याच्या आदेशानुसार सर्व महत्त्वाचीं कामें होतात. [का. ट्रा. स. इं.]

ओज (१) शरीरान्तर्गत रसरक्तादि धातूंचा सारभूत भाग. सर्व शरिरांत स्थिति, स्निग्धता, शीतलता, स्थिरता, शुक्लवर्णता, कफात्मकता व बलपुष्टिकरत्व हे त्याचे गुण होत. चेतनास्थान असें हृदय हें ओजाचेंहि आश्रयस्थान असतें.

(२) एक काव्यगुण. 'ओजः समासभूयस्त्वम्' काव्यरचना अधिक प्रमाणांत समासबहुल असणें, याला ओजोगुण म्हणतात. काव्याची गौडी रीति ही ओजोगुणयुक्त असते.

ओजली आंध्रांतील एक जात. यांना बोजली किंवा ओझोलु असेंहि म्हणतात. हे लोहारकाम करतात. चोलांच्या कारकीर्दींत आपण ब्राह्मणांच्या बरोबरीचे आहों, असें हे प्रतिपादूं लागले. त्यामुळे चोलराजा रागावला आणि त्याने त्या सर्व लोकांचा शिरच्छेद करण्याचा हुकूम दिला. त्या आपत्तींतून बचावण्यासाठी त्यांच्यांतल्या कांही लोकांनी ओझू नांवाच्या जातीचा आश्रय घेतला. पुढे या उपकाराची कृतज्ञता म्हणून ते ओझू हें नांव आपल्या नांवापुढे जोडूं लागले. उदा० कट्टोझू, लक्कोझू इत्यादि. [का. ट्रा. स. इं.]

ओझर पुणें जिल्ह्यांतलें एक गणपतिक्षेत्र. विघ्नासुराला शरण आणल्यामुळे या गणपतीला विघ्नेश्वर म्हणतात.

ओझा हे लोक गोंडांचे भाट असून शकुनप्रश्न सांगणारे आहेत. ओझ शब्दाचा अर्थ आंतडें असा आहे. यांतले कांही लोक आता सातपुड्यांतल्या कोरकूंचेहि जोशी बनले आहेत. गोंडांचे ओझा त्यांच्या घरीं जाऊन करताळ वाजवीत नाचतात व त्यांच्याकडून बिदागी मिळवितात. [म. ज्ञा. को.]

ओटी भरणें सुवासिनी किंवा गर्भिणी यांच्या लुगड्याच्या ओच्यांत किंवा पदरांत तांदूळ, सुपारी, हळकुंड, नारळ इ. वस्तू घालतात, त्याला ओटी भरणें असें नांव आहे. ओटी भरणें हें गर्भधारणेचें प्रतीकविधान आहे. कारण सासुरवाशीण माहेरीं जाऊं लागली म्हणजे तिला फक्त कुंकू लावतात, पण तिची ओटी भरीत नाहीत. कारण स्त्री किंवा वधू माहेरीं असतांना तिला गर्भधारणा होण्याचा संभवच नसतो. माहेरवाशीण सासरीं जाऊं लागली म्हणजे मात्र तिची ओटी

भरतात. ओटी म्हणजे बेंबीखालचें पोट होय. तिथेच स्त्रीचा गर्भाशय असतो. गर्भाधानालाहि ओटभरण अशी संज्ञा आहे. ओटींत घातलेलीं फलपुष्पें हीं संततीचीं सूचक असून तांदूळ हे विघ्ननिवारक आहेत. लग्नसमारंभांत अनेक सुवासिनींच्या ओटचा भरतात, त्यांतहि विवाहित वधूला संतानप्राप्ति व्हावी, हाच गर्भित उद्देश असतो. पहिल्या गर्भारपणांत, पांचव्या महिन्यांत गर्भिणीची ओटी भरतात. एकदा हा ओटीभरणाचा सोहळा झाला, की मग प्रसूतिपर्यंत गर्भिणीची ओटी भरीत नाहीत. [चित्पावन]

ओट्टम् थुळ्ळल

कथकळि नृत्यांतला एक प्रमुख प्रकार कुंचन नंबियार हा या नृत्याचा जनक होय. हें एकाच नटाने करायचें नृत्यनाटच असतें. विशिष्ट प्रकारची वेषभूषा व रंगरेखणी करून एकच नट रंगभूमीवर येतो व एखादें आख्यान मुद्राभिनयांच्या द्वारें प्रेक्षकांना विदित करतो. या नृत्याचीं आख्यानें रामायण-महाभारतांतील असतात. नटाच्या मागे दोन साथीदार उभे असतात. त्यांतला एक मृदंग आणि दुसरा टाळ वाजवून नृत्याला साथ करतो.

थुळ्ळल नृत्याचें तंत्र कथकळीप्रमाणे शास्त्रशुद्ध व काटेकोर नाही. त्याचें वैशिष्टच हें, की तें पूर्णपणे लोकाभिमुख आहे. मलबारमधील सर्व जनतेवर त्याची विलक्षण छाप आहे. लोकांच्या वर्तमानकालीन जीवनाशीं त्याने आपला मेळ बसविला असल्यामुळे तें आजतागायत केरळांत विलक्षण लोकप्रिय ठरलें आहे. 'गरिबांची कथकळि' या नांवाने त्याचा उल्लेख होतो. तंत्राचा बडेजाव नसल्यामुळे थुळ्ळल नृत्य करणारा नट प्रेक्षकांशीं चटकन् समरस होतो.


परयन्, सीथंकन् व ओट्टम् असे थुळ्ळल नृत्याचे तीन प्रकार आहेत. त्यांपैकी ओट्टम् हा प्रकार विशेष लोकप्रिय आहे. थुळ्ळल नृत्यपद्धति १८ व्या शतकाच्या मध्यावर जन्माला आली, तो प्रसंगहि मोठा मनोरंजक आहे–

एके दिवशीं एका कृष्णमंदिरांत एक चाकियार कूत्तु नामक नृत्यनाटचाचा प्रयोग करीत होता. त्या दिवशीं कुंचन नंबियार याला मिझाऊ नांवाचें वाद्य वाजवून चाकियारची साथ करावी लागली. तें काम करीत असतां कुंचनला एकाएकीं डुलकी आली. चाकियारला सहन न होऊन त्याने भरल्या सभेंत कुंचनची हजेरी घेतली. त्याच्यावर तोंडसुख घेतांना चाकियारनें यत्किंचित्हि मागेपुढे पाहिलें नाही. कूत्तु हा धार्मिक नाटचप्रसंग असल्यामुळे चाकियार कोणाला कांहीहि बोलला, तरी कोणी त्याचा प्रतिवाद करायचा नाही, असा सक्त नियम आहे. त्यामुळे कुंचनला तो तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागला. प्रयोग संपल्यावर त्या अपमानाच्या दंशाने फणफणतच तो घरीं आला. या अपमानाचें उट्टें काढलेंच पाहिजे, असें त्याने मनाशीं ठरविलें. तो बुद्धिमान् होता, कवि होता आणि प्रत्युत्पन्नमतिहि होता. त्याने त्या रात्रीं महाभारतांतल्या 'भीम – मारुति भेट' या प्रसंगावर एक आख्यान रचलें व दुसऱ्याच दिवशीं रात्रीं रंगभूषा करून त्याच देवळाच्या प्राकारांतल्या एका चौथऱ्यावर तो उभा राहिला. आपल्या अभिनयाच्या द्वारें तो आख्यानांत रंग भरूं लागला. मंदिरांत चाकियारचें ठराविक पद्धतीचें कूत्तु आख्यान सुरू होतें आणि बाहेर कुंचनने आपला नवा खेळ मांडला होता. मधून मधून विनोदी कोटचा करून तो समोरच्या प्रक्षकांना हंसवीत होता. तो हास्याचा खळखळाट ऐकून मंदिरांतले प्रेक्षकहि बाहेर पडले आणि कुंचनच्या प्रेक्षकांत येऊन बसले. कुंचनने रात्रभर त्यांना हसवीत ठेवलें आणि उजाडतां प्रसन्न मनाने घरीं पाठविलें.


नर्तक–ओट्टम् थुळ्ळल

त्याच रात्रीं सामान्य जनतेला समजेल आणि रंजवील अशी कथकळीची एक लोकाभिमुख शाखा प्रकट झाली. कुंचनने चौसष्ट थुळ्ळल आख्यानें रचलीं आणि तीं रंगभूमीवर जनतेला सादर केलीं. त्यापुढ त्याने आपलें समग्र जीवनच थुळ्ळल नृत्याला वाहिलें. थुळ्ळची आजची जडण–घडण, वेषभूषा, अभिनयाची रीत, ही सारी त्या कलेला कुंचनचीच देणगी आहे.

थुळ्ळल नर्तकाची रंगभूषा आणि वेषभूषा वैचित्र्यपूर्ण असते. तो कमरेला करदोटा बांधून त्यांत तांबडचा–पांढऱ्या रंगाच्या कापडाची तीन इंच रुंदीची लांबच लांब पट्टी अशा प्रकारें गुंफतो की तिचा गुडघ्यापर्यंत लोंबणारा परकर बनावा. तो अंगावर मण्यांचे अलंकार घालतो. मस्तकावर मणिजडित किरीट चढवितो. चेहऱ्यावर हनुवटीवरून या कानापासून


नर्तकाची वेषभूषा–
ओट्टम् थुळ्ळल

त्या कानापर्यंत एक पांढरा पट्टा ओढतो. ओठ व डोळ्यांच्या कडा लाल करतो. पायांत चाळ बांधतो व कपाळावर जातिविशिष्ट चिन्ह उमटवितो.

अशी वेषभूषा करून नर्तक रंगभूमीवर प्रविष्ट होतांच प्रेक्षकांकडून हास्याची फैर झडते. तिकडील देवस्थानांतल्या उत्सवांत तर थुळ्ळल नृत्याचे प्रयोग होतातच. शिवाय ते धनिकांच्या घरच्या लग्न–समारंभांतहि होतात. थुळ्ळलचा प्रयोग दोन-अडीच तास चालतो. [केरळ]

ओट्टुक्कूत्तन तमिळनाडमधला कंबनचा समकालीन एक कवि. या दोघांच्या संबंधीं एक आख्यायिका प्रचलित आहे, ती अशी– कंबन व ओट्टुक्कूत्तन दोघेहि मोठे विद्वान् होते. त्या दोघांच्यामध्ये स्पर्धाहि होती. कंबनप्रमाणेच ओट्टुक्कूत्तननेहि तमिळ भाषेंत रामायण रचलें होतें; पण कंबनचें रामायण जनतेंत लोकप्रिय झालें आणि त्यामुळे ओट्टुक्कूत्तनचें रामायण मागे पडलें. या गोष्टीचें ओट्टुक्कूत्तनला फार दुःख झालें आणि तो एके दिवशीं आपले रामायण जाळायला निघाला. ही गोष्ट कंबनला समजतांच तो त्या जागीं धावत आला. एवढ्या अवधींत सहा कांडें भस्मसात् झालीं होतीं. ओट्टुक्कूत्तनचा हात धरून कंबनने ७ वें उत्तरकांड तेवढें वांचविलें. त्या कालावधीपर्यंत कंबनच्या रामायणाची युद्धकांडाच्या अखेरीपर्यंत रचना झाली होती. कंबनने ओट्टुक्कूत्तनचा आदर करण्यासाठी आपलें रामायण तिथेच थांबविलें व ओट्टुक्कूत्तनचें उत्तरकांड आपल्या रामायणाला जोडून आपली कृति पूर्ण केली. [त. सा. सं.]

ओडव पंचस्वरयुक्त राग. यांत ऋषभ आणि पंचम हे स्वर वर्ज्य असतात. याचें लक्षण संगीतरत्नाकरांत पुढीलप्रमाणे दिलें आहे–

वान्ति यान्त्युडवोऽत्रेति व्योमोक्तमुडवं बुधैः ।
पञ्चमं तच्च भूतेषु पञ्चसंख्या तदुद्भवा ।
ओडवी सास्ति येषां च स्वरास्ते त्वोडवा मताः ॥

अर्थ-- नक्षत्रें ज्यांतून गमन करतात, तें उडव होय. उडव म्हणजे आकाश. तें भूतांतलें पांचवें असतें. त्यावरून ओडव शब्दाने पांच ही संख्या लक्षित होते. ज्या रागांच्या स्वरांची संख्या पांच असते, ते ओडव होत.

मल्लारादि राग हे ओडव होत असें म्हटलें आहे (श. क.).

ओड वांद्लु आंध्रांतल्या मील जातीचेंच हें दुसरें नांव आहे. हे लोक गंजम व विशाखापट्टम् या जिल्ह्यांत आढळतात. मच्छीमारी हा यांचा व्यवसाय आहे. [का. ट्रा. स. इं.]

ओडारी ओडारी किंवा वोडारी हे दक्षिण कानडा जिल्ह्यांत राहणारे, कुंभारकाम करणारे व तुळु भाषा बोलणारे लोक होत. ज्यांनी कुंभारकाम सोडलें, ते स्वतःला 'मूलिया' म्हणतात. हे क्षुद्रदेवतांच्या देवळांत पुजाऱ्याचें काम करतात. ओडारी लोकांचें कुंभारकामाचें चाक प्राथमिक अवस्थेंतलें असतें. त्याचा दांडा ते हाताने फिरवितात. हे भुतांखेतांना भजतात, तसेच वेंकटरामालाहि भजतात.

विवाहप्रथा– वाङ्निश्चयाच्या वेळीं वधू-वरांचे बाप एकमेकांना विड्याचें पान देतात. वरपक्षाकडून या वेळीं वधूला अंगठी मिळते. लग्नाच्या दिवशीं मांडवांत एक बांक ठेवतात. परीट त्यावर वस्त्र आंथरतो. वधूचा भाऊ वराला त्या बांकाकडे नेतो. वर त्याला तीन प्रदक्षिणा करून त्यावर बसतो. या वेळीं कांही स्त्रिया दिवा, अक्षता व फळें घेऊन वरापुढे चालतात. मग प्रथम दिव्यावर व नंतर वराच्या मस्तकावर अक्षता टाकतात. नंतर न्हावी पुढे येऊन वराच्या डोक्याला दूध लावतो व वस्तऱ्यान केसांची रेघ धरतो. न्हावीण त्याच पद्धतीने वधूच्या डोक्याचे कांही केस काढते. नंतर वधू-वरांना सजवून मांडवांत आणतात. जमलेले लोक त्यांच्यावर अक्षता उधळतात. वधूवरांना रोख आहेर करतात. मग वधूपक्षाकडील प्रमुख पुरुष वधू-वरांचे हात एकमेकांच्या हातीं देतो. वधूचा मामा त्या पाणिग्रहणावर पाण्याची धार ओततो. लग्नविधि एका दिवसांत पुरा होतो.

गर्भिणीप्रथा– गर्भिणीला तिचा मामा एक किंवा दोन कबुतरें देतो. गर्भिणी त्यांचें पोषण करते. कबुतराने पुष्कळ अंडीं घातलीं, तर त्या स्त्रीलाहि पुष्कळ मुलें होतील, असें समजतात.

मतिकप्रथा– मृताला जाळतात किंवा पुरतात. दहन केल्यास ११ व्या किंवा १३ व्या दिवशीं अंत्यक्रिया करतात. पुरलेल्या माणसाची एक महिना पुरा होण्यापूर्वीं क्रिया करीत नाहीत. [का. ट्रा. स. इं.]

ओडिय दक्षिणेंतील गंजम जिल्हयांतील एक प्रमुख जात. या जातींत अनेक पोटभेद आहेत. बेनाइटो हा सर्वांत मोठा पोटभेद असून नुनिआ हा त्याच्या खालोखालचा पोटभेद आहे. हे व्यवसायाने शेतकरी आहेत. यांच्यांत नागसिर, गोंड, कोछिपो, बरह इ. अनेक देवकें आहेत. हे लोक जगन्नाथाचे भक्त आहेत. ठाकुराणी ही यांची ग्रामदेवता आहे.

विवाहप्रथा –यांच्यांत बाल व प्रौढ असे उभयविध विवाह रूढ आहेत. घटस्फोट व पुनर्विवाहहि मान्य आहेत. यांच्याकडे ब्राह्मण पौरोहित्य करतात. अविवाहित मुलगी आजारी पडली, तर तिला बरें वाटण्यासाठी धर्मदेवतेशीं (सूर्य) तिचा विवाह करण्याचा नवस बोलतात. या देवतेचें प्रतीक म्हणून एक पितळी भांडें घेतात व त्याच्याशीं हें नवसाचें लग्न लावतात.

हे लोक मासे व मांस खातात. पण दारू पीत नाहीत. [का. ट्रा. स. इं.]

ओडिया भाषा व साहित्य

ओडिसांतील भाषेला ओडिया हें नांव आहे. भाषा या अर्थी ओडिया हा शब्द प्रथम केव्हा व्यवहृत झाला, हें सांगणें कठीण आहे. पण ओडिया भाषेची उत्पत्ति बरीच प्राचीन आहे. भरताने ओड्रजा म्हणून तिचा उल्लेख केला आहे. तो तिला विभाषा म्हणतो. ओड्री विभाषेचा शबर, आभीर, द्राविड इ. विभाषांशीं संबंध होता. तात्त्विक दृष्टीने विचार केल्याअंतीं ही भाषा आर्य, द्राविड व मुंडारी या भाषांच्या संमिश्रणांतून निर्माण झाली आहे. मात्र आधुनिक ओडिया भाषेचा मुख्य आधार आर्य भाषा हाच आहे. आर्य भाषा म्हणजे मुख्यत्वें प्राकृत भाषा होय. ओडिया भाषेचा मागधी भाषेशीं संबंध आहे. या भाषेंत तालव्य श्‌चें उच्चारण उपलब्ध आहे. र–ल व न–ण हे दोन्ही वर्णहि तिच्यांत आहेत.

ओडिया भाषेचा क्षेत्रविस्तार ६०,१३६ चौ. मैल आहे. ओडियाची व्याकरणपद्धति थोड्या प्रमाणांत बंगालीसारखी आहे. तथापि ती बंगालीची पोटभाषा नाही.

ओडिया लिपि ब्राह्मी लिपींतून निघाली आहे. ती नागरी लिपीहून सर्वथैव भिन्न असली, तरी त्या दोन्ही लिपींत कांही साम्यहि आढळतें. नागरी लिपीची शिरोरेखा ओडिया लिपींत वर्तुळाकार होते व त्या त्या वर्णाच्या मुख्य अंशापेक्षा अधिक जागा व्यापते. या वर्तुळाच्या बाबतींत विद्वानांचें मत असें आहे, की ओडिसांत प्रारंभीं ताडपत्रांवर लोखंडी सळईने लिहिण्याची पद्धत होती आणि सरळ आडवी शिरोरेखा ओढण्याने ताडपत्र फाटण्याची भीति होती. म्हणून सरळ रेषेच्या ऐवजीं वर्तुळरेषा दिली जाऊं लागली आणि ओडिया लिपीला क्रमशः आधुनिक रूप प्राप्त झालें.



ओडिया लिपी – भारतीय व्यवहारकोशावरून

ओडिया व्याकरणाचीं प्रमुख वैशिष्ट्यें पुढीलप्रमाण आहेत– भूतकाळांत ने प्रयोगाचा अभाव व लिंगानुसारी क्रियापदाच्या परिवर्तनाचा अभाव. ओडिया भाषेंत क्रियापदाला स्त्रीलिंगी विकार होतच नाही. विशेषणांतहि तो होत नाही, विशेष्यांत होतो. भूतकालवाचक क्रियापदाला ळ, ला, लिं, लु, इळ, इळु, इळँ, इ. लयुक्त प्रत्यय लावले जातात.

वाक्यरचनेंत हिंदीहून ओडिया भाषेचें आणखी एक वेगळेपण आहे. हिंदींत निषेधात्मक अव्यय क्रियेच्या पूर्वी येतें, पण ओडिया भाषेंत तें क्रियेच्या मागून वाक्याच्या अंतीं येतें.

ओडिया साहित्याचे कालविभाग पुढीलप्रमाणे पडतात–

(१) आदियुग– यालाच इतिवृत्तयुग किंवा सारळादासयुग

असें म्हणतात. ११ व्या शतकापासून १६ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत या युगाचा कालखंड मानतात.

(२) मध्ययुग– सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धापासून एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत.

(३) आधुनिक युग – स्वातंत्र्यानंतर.

आदियुग – या युगांत सारळापूर्व साहित्याचाहि अंतर्भाव आहे. बौद्ध गान ओ दोहा या ग्रंथाला ओडिया भाषेचें पूर्वरूप व प्रथमसाहित्य मानतात. या ग्रंथांत कान्हूपा, शबरपा, लुइपा इ. सिद्धांचें पद्यात्मक वाङमय पाहायला मिळतें. साहित्यिक प्रवाहाच्या दृष्टीने या सिद्धांच्या पद्यांचा पंचसखासाहित्याशीं घनिष्ठ संबंध आहे. या युगाच्या साहित्यांत गोरखनाथाचा सप्तांगयोगधारणम् हा ग्रंथहि सामील आहे. त्यांत सात वारांची स्वरसाधना वर्णिलेली आहे. दुसऱ्या ग्रंथाचें नांव आहे, मादळापांजि. तो ग्रंथ जगन्नाथाच्या मंदिरांत सुरक्षित आहे. आसामांतल्या बुरंजी साहित्याप्रमाणे यांतहि ओडिसाच्या राजवंशांचें वर्णन आहे. ओडिया भाषेच्या प्राचीन गद्याचें स्वरूप त्यांत पाहायला मिळतें. आख्यायिका अशी सांगतात, की गंगवंशाचा पहिला राजा चोडगंगदेव याने इ. स. १०४२ मध्ये मादळापांजि लिहायला सुरुवात केली; पण दुसरें मत असें आहे, की मादळापांजि सोळाव्या शतकांत रामचंद्रदेवाच्या कारकीर्दींत लिहविली गेली. रुद्रसुधानिधि हाहि सारळापूर्वकालीन ग्रंथ समजतात. ही रचना तेराव्या किंवा चौदाव्या शतकांतली असावी. हा ग्रंथ संपूर्ण उपलब्ध नाही आणि जेवढा उपलब्ध आहे, तेवढाहि तो छापलेला नाही. या ग्रंथाचा लेखक नारायणानंद अवधूतस्वामी हा आहे. त्याने या ग्रंथांत एका योगभ्रष्ट पुरुषाचा वृत्तान्त वर्णिलेला आहे. कोणी म्हणतात, हा ग्रंथ गद्य आहे; तर कोणी म्हणतात, तो दंडिवृत्तांत आहे. कलशाचौतिशा हा ग्रंथहि सारळापूर्वकालीन समजला जातो. वत्सदास हा याचा लेखक होय. या काव्यग्रंथांत शिवाची वरयात्रा व विवाह या गोष्टी विनोदी पद्धतीने लिहिल्या आहेत. या ग्रंथाची आणखी एक गम्मत अशी आहे, की त्यांत ओडिया लिपींतील ३४ अक्षरांपैकी एकेक अक्षर प्रत्येक श्लोकाच्या आरंभीं घेतलेलें आहे.

सारळादास हाच ओडिया भाषेचा प्रथम कवि होय. तो आदियुगाचा प्रतिनिधीच मानला जातो. त्याने स्वतःला शूद्रमुनि म्हटलें आहे. त्याचें पहिलें नांव सिद्धेश्वर परिडा असें होतें. तो सारळादेवीच्या वरप्रसादाने कवि बनला, असें सांगतात. सारळेचा भक्त म्हणून त्याने स्वतःला सारळादास असें म्हणवून घेतलें. याचा काल इ. स. १४३५ च्या सुमारास येतो. कांही लोक त्याला १३५० च्या सुमाराचा मानतात. सारळादासाच्या विळंकारामायण, महाभारताचा अनुवाद व चंडीपुराण अशा तीन साहित्यकृती उपलब्ध आहेत. महाभारताचा अनुवाद हा त्याचा प्रचंड ग्रंथ आहे. याच कालांत अर्जुनदास या नांवाचा एक कवि होऊन गेला. त्याचा रामविभा नांवाचा एक काव्यग्रंथ उपलब्ध आहे. आणखी एक कवि चैतन्यदास हा होय. त्याचे विष्णुगर्भपुराण व निर्गुणमाहात्म्य असे दोन ग्रंथ मिळतात. ते निर्गुणिया संप्रदायाचे आहेत.

मध्ययुग – याचे पूर्वमध्य व उत्तरमध्य असे दोन विभाग पडतात. पूर्वमध्याला भक्तियुग असेंहि म्हणतां येईल; पण या युगांतली भक्ति रामप्रवण नाही व प्रेमप्रधानहि नाही. ती आहे ज्ञानमिश्र व योगप्रधान. या भक्तींत कायसाधनेचें अवडंबर होतें. पंचवैष्णव किंवा पंचसखा हे या युगाचे प्रधानकवि होत. याच काळांत चैतन्यदेव ओडिसांत आले होते व पंचवैष्णवांनी त्यांच्याशीं सख्य केलें होतें. त्यावरूनच त्यांना पंचसखा असें नांव मिळालें. बलरामदास, जगन्नाथदास, यशोवंतदास, अनंतदास व अच्युतानंतदास अशीं त्या पंचवैष्णवांचीं नांवें होतीं. ते अनुक्रमें रामतारक, षोडषनाम, पंचाक्षर, एकाक्षर व अष्टाक्षर मंत्राचे उपासक होते. या प्रत्येकाने अनेक ग्रंथ लिहिले होते, असें कळून येतें. आजमितीस त्यांतले कांही मुद्रित, कांही अमुद्रित व कांही अप्राप्य आहेत.

याच कालांत कांही चरित्रग्रंथहि पद्यांत लिहिले गेले. दिवाकरदासाने जगन्नाथचरितामृत लिहिलें. त्यांत पंचवैष्णवांपैकी जगन्नाथदासाचें चरित्र वर्णिलें आहे. दिवाकरदास हा सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धांत झाला. ईश्वरदास हा दुसरा एक कवि १७ व्या शतकाच्या प्रारंभीं झाला व त्याने चैतन्यभागवत लिहिलें. सालवाग नामक एका मुसलमान भक्तकवीने भक्तिरसात्मक अशीं अनेक गीतें रचलीं. शिशुशंकरदास याने उषाभिलाष, कपिलेश्वरदासाने कपटकेलि, हरिहरदासाने चन्द्रावलीविलास व देवदुर्लभदासाने रहस्यमंजरी हीं पौराणिक काव्यें लिहिलीं. याच काव्यांच्या बरोबरीने लौकिक अथवा काल्पनिक काव्यांचीहि निर्मिति सुरू झाली होती. याचें एक उदाहरण म्हणजे प्रतापरायाचें शशिसेणा हें काव्य होय.

उत्तरमध्ययुगांत ओडिया भाषेचा रीतिकाल सुरू होतो. या कालांत पौराणिक व काल्पनिक अशीं उभयविध काव्यें प्राप्त होतात. नायिकांमध्ये सीता, राधा, इ. चीं नखशिखान्त वर्णनें आढळतात. या युगांतलें काव्य शृंगाररसाने ओतप्रोत भरलेलें असून तें बरेचसें क्लिष्ट आहे. उपेन्द्रभंज या कवीने अशा प्रकारच्या काव्याची परिसीमा गाठली, म्हणून या युगाला भंजयुग असें नांव मिळालें. पण या युगाचा प्रारंभ उपेन्द्रभंजाचा आजा धनंजयभंज (१६३७–१७०१ इ. स.) याच्यापासूनच

झाला होता. हा घुमसरचा राजा होता. त्याने रघुनाथविलास, त्रिपुरसुंदरी, मदनमंजरी, रत्नमंजरी, अनंगरेखा, इच्छावती, इ. अनेक काव्यें लिहिलीं. याचेच रत्नपरीक्षा, अश्व-गजपरीक्षा इ. कांही लक्षणग्रंथ व चौपदी, भूषण इ. कांही संगीतग्रंथहि आढळतात. उपेन्द्रभंजावर आपल्या आजोबाचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

उपेन्द्रभंजाच्या आधी म्हणजे त्याच्या आजोबाच्या काळांत आणखी कांही रीतियुगाचे कवि आढळतात. त्यांतले दीनकृष्णदास, द्वितीय मुकुंददेव (१६५१–१६८६ इ. स.) व दिव्यसिंहदेव हे समकालीन कवी होते. त्यांनी रसकल्लोल नामक काव्य लिहिलें. याचें वैशिष्ट्य हें, की त्याच्या प्रत्येक पंक्तीच्या आरंभीं 'क' हें अक्षर आहे. वृंदावनीदासी या कवीने पूर्णतमचन्द्रोदय नामक काव्य लिहिलें. त्याचा नायक श्रीकृष्ण हाच पूर्णतमचंद्र होय. भूपतिपंडित हा तिरहुत येथून ओडिसांत आलेला एक कवि होय. याने प्रेमपंचामृत नामक काव्य लिहून कृष्णलीला वर्णिली. लोकनाथ विद्यालंकार याने सर्वांगसुंदरी, पद्मावतीपरिणय, वृन्दावनविहार इ. काव्यें निर्माण केलीं. याच रीतिकालीन परंपरेचा उपेन्द्रभंज हा मुकुटमणि ठरला. १६८५-१७२५ इ. स. हा याचा काल होय. याने सुभद्रापरिणय, व्रजलीला, लावण्यवती, भाववती इ. सुमारें ४० काव्यें लिहिलीं. त्याच्या वैदेहीशविलास या काव्यांतल्या प्रत्येक पंक्तीचा प्रारंभ 'व' या अक्षराने होतो. याचाच रसपंचक नांवाचा एक आलंकारिक ग्रंथ आहे. चित्रकाव्यबंधोदय हा त्याचा आणखी एक ग्रंथ चित्रकाव्याचा एक उत्तम नमुना आहे. त्याने एक कोशग्रंथहि लिहिला होता. उपेन्द्रभंजाच्या काव्यांत रीतिकालीन काव्यलक्षणांचा पूर्ण विकास झालेला आहे. कुठे कुठे त्याची काव्यरचना मर्यादेचें उल्लंघन करून अश्लीलहि बनली आहे.

मध्ययुगांतल्या ओडिया साहित्यांत वैष्णवधर्माची प्रवृत्ति आणि रीतिलक्षणाची प्रवृत्ति अशा उभयविध प्रवृत्ती दिसतात. भंजयुगानंतर ओडिया साहित्यांत गौडीयवैष्णवधर्म व रीतिकालीन लक्षणें या दोहोंचा समन्वय झालेला दिसतो. या काळांतलीं बहुतेक काव्यें राधा-कृष्णप्रेमाचीं आहेत. यांत साधुचरणदासाचीं प्रेमतरंगिणी, प्रेमलहरी इ. काव्यें, भक्तचरणदासाचीं मथुरामंगल, मनबोधचौतिशा इ. काव्यें, अभिमन्युसामन्तसिंदार याचीं सुलक्षणी, रसवती, प्रेमकला इ. काव्यें, गोपालकृष्ण पटनायकाची पद्यावली, यदुमणिमहामात्राचें प्रबंधपूर्णचंद्र, बलदेवकविसूर्याचीं किशोरचंद्राननचंपू, चंद्रकला इ. काव्यें प्रमुख मानलेलीं आहेत.

व्रजनाथ बडजेना याचे समरतरंग व चतुरविनोद हे दोन महत्त्वपूर्ण ग्रंथ आहेत. समरतरंग हें एक ऐतिहासिक काव्य आहे. त्यांत ढेंकानालचा राजा त्रिलोचनमहेन्द्र याचें नागपूरच्या चिमणाजीशीं जें युद्ध झालें, त्याचें सरस वर्णन आहे.

याच युगांतला आणखी एक उल्लेखनीय कवि म्हणजे भीम भोई. हा जन्मान्ध होता. व जातीने कंध आदिवासी होता. तो कुंभिपाटिआ या संप्रदायाचा अनुयायी व महिमागोसांईचा उपासक होता. त्याने स्तुतिचिंतामणि नांवाचा एक ग्रंथ रचला आहे. त्याने अनेक भजनेंहि रचलीं असून तीं ओडिसांत लोकप्रिय आहेत.

आधुनिक युग — मोगलकाल व मराठाकाल संपण्याच्या वेळींच मध्ययुगहि समाप्त होतें. तिथून पुढे ब्रिटिश अमलाचा काल सुरू होतो. आधुनिक युगाचाहि प्रारंभ तिथूनच होतो. त्या काळाच्या प्रारंभीं तत्कालीन सुशिक्षितांत इंग्रजी साहित्याविषयींचें असामान्य आकर्षण दिसतें. पण त्या लोकांवर संस्कृत, फारसी व हिंदी साहित्यांचाहि प्रभाव थोडाबहुत शिल्लक राहिला होता. या काळांतले प्रमुख कवि म्हणजे राधानाथ राय. त्यांनी पार्वती, नंदिकेश्वरी, ययातिकेशरी अशीं कांही ऐतिहासिक काव्यें लिहिलीं. त्यांनी महापात्र नांवाचें एक महाकाव्यहि निर्मिलें. त्या काव्यावर मिल्टनचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. याशिवाय त्यांनी कित्येक संस्कृत व हिंदी काव्यांचे अनुवादहि केले आहेत. थोडेंबहुत गद्यहि लिहिलें आहे. या आधुनिक युगाला कांही लोक राधानाथयुग असेंहि म्हणतात.

याच युगांत राजेंद्रलाल मित्र व त्यांचे कांही सहकारी यांनी बंगालमधून एक भाषिक चळवळ सुरू केली होती. त्यांच्या मतें ओडिया ही स्वतंत्र भाषाच नव्हती. या चळवळीला प्रत्युत्तर देण्यासाठी ओडिसांतल्या कांही लेखकांनी कंबरा कसल्या. फकीर मोहन व सेनापति हे या लेखकमंडळींत अग्रसर होते. त्यांनी कित्येक कादंबऱ्या लिहिल्या, ओडिया गद्याला आकार व शैली प्राप्त करून दिली. लछमा, छमाण, प्रायश्चित्त, इ. त्यांच्या अनेक कादंबऱ्या आहेत. उत्कलभ्रमण, पुष्पमाला, उपहार इ. त्यांचे कित्येक काव्यसंग्रहहि आहेत. त्यांनी रामायण–महाभारताचाहि पद्यानुवाद केला आहे.

या कालखंडांत कवि म्हणून विशेष प्रसिद्धीला आले, ते मधुसूदन राय. ते ब्राह्मसमाजी होते. त्यांची कविता भक्तिरसात्मक आहे. विश्वकवि रवीन्द्रनाथ व त्यांचा परिवार यांचा मधुसूदन राय यांच्यावर पुष्कळच प्रभाव होता.

त्याच काळांतले आणखी एक कवि म्हणजे गंगाधर मेदेर. हे निसर्गोपासक होते. त्यांना ओडिसाचे वर्ड्स्वर्थ म्हणतात. कालिदास हा त्यांचा आदर्श होता. त्यांची 'प्रणयवल्लरी' शाकुंतलावर, 'तपस्विनी' सीतावनवासावर व 'इंदुमती' अजविलापावर आधारित आहे.

राधानाथयुगानंतर सत्यवादीयुगाचा प्रारंभ होतो. या

युगावर म. गांधींचा स्पष्ट प्रभाव आहे. श्री. गोपबंधुदास यांनी शांतिनिकेतनाच्या धर्तीवर सत्यवादी (साक्षी गोपाल) येथें एक महाविद्यालय प्रस्थापित केलें होतें. श्री. गोपबंधुदास यांनी धर्मपद, बंदीर-आत्मकथा, काराकविता, अवकाशचिंता इ. ग्रंथ लिहिले. याच कालांत नीलकंठदास यांनी टेनिसनच्या 'प्रिन्सेस'च्या आधारावर प्रणयिनी व 'इनॉक आर्डेन'च्या आधारावर दासनायक हे ग्रंथ लिहिले. याच कालांत गोदावरीश मिश्र हे गद्य-पद्य लेखक म्हणून प्रसिद्धीस आले.

त्यानंतरच्या रोमँटिकयुगाचे प्रधान कवि म्हणजे मायाधर मानसिंह हे होत. यानंतर सवुझयुग प्राप्त होतें. या युगांत कालिंदीचरणपाणिग्राही, वैकुंठनाथ पटनायक, हरिहर महापात्र, शरच्चंद्र मुखर्जी व अन्नदाशंकर राय या पांच कवींनी आपला संघ निर्मून काव्यरचना केली. त्यांची ती कविता सवुझ कवित्व या नांवाने प्रसिद्ध आहे. कांही कालाने हें पंचायतन अलग झालें. कालिंदीचरण यांच्या माटिरमणिष, लुहारमणिष इ. अनेक काव्यकृती उपलब्ध आहेत. वैकुंठनाथ पटनायक यांच्याहि कवितांचे संग्रह निघाले आहेत.

सच्चिदानंद राउतराय, गोपीनाथ महान्ती, कान्दुचरण महान्ती, नित्यानंद महापात्र, राधामोहन गडनायक, क्षुद्रगालिक, गोदावरीश महापात्र इ. लेखक आधुनिक युगाचे प्रतिनिधि समजले जातात. [हिं. सा. को.; सु. वि. को.]

ओडिया रंगभूमि

ओडिया नाट्य आणि रंगभूमि यांची सुरुवात ओडिसांत मध्ययुगाच्या प्रारंभीं झाली. ओडिसांतील संस्कृत पंडितांनी भारताच्या प्रवासाहून परत येतांना आपल्यावरोबर कांही संस्कृत नाटकें आणलीं होतीं. या बाहेरून आणलेल्या नाटकांचा स्थानिक पंडितांवर मोठा प्रभाव पडला व त्यांनी महाकाव्यांतील विषयांवर स्वतः नाटकें लिहिण्यास सुरुवात केली. हीं नाटकें भरताच्या नाट्यशास्त्राच्या नियमाप्रमाणे लिहिलेलीं असलीं तरी नाट्यतंत्राच्या दृष्टीने तीं कनिष्ठ प्रतीचीं होतीं. नंतरच्या कालांत शेजारच्या प्रदेशांत जाऊन कांही लोकांनी प्रयोग-तंत्राचा अभ्यास केला आणि त्याचा परिणाम म्हणून प्रयोगतंत्रांत सुधारणाहि झाली. सध्या ओडिसामध्ये जी भाषा प्रचलित आहे तिची निर्मिती इ. स. च्या ८ ते १२ या शतकांच्या दरम्यान झाली. या काळांत प्राकृत भाषेचा चांगलाच विकास झाला होता. त्यामुळे संस्कृत नाटकांत आस्ते आस्ते प्राकृत पद्यांचा आणि संवादांचा अंतर्भाव होऊं लागला. नाट्यकला किंवा रंगभूमि ही समाजाभिमुख झाल्याचेंच हें द्योतक होतें.

ओडिया नाटकाच्या वाङ्मयीन स्वरूपाचा विकास यानंतरच्या काळांत झाला. १४ व्या शतकांत ओडिया लेखनशैलीला आकार येऊं लागला. या घटनेमुळे ओडिया रंगभूमीच्या इतिहासाला वेगळें वळण मिळालें. ओडिसांतील सूर्यवंशी सम्राटांच्या राजवटींत ओडिया नाट्यलेखन आणि रंगभूमि या दोहोंनाहि उत्तेजन मिळालें. कपिलेंद्र देव, पुरुषोत्तम देव आणि प्रतापरुद्र देव या तीनहि सम्राटांनी नाट्यकलेच्या उत्कर्षासाठी मोठी खटपट केली. या सम्राटांच्या कारकीर्दींत संस्कृत आणि प्राकृत या दोन्ही भाषांत नाटकें लिहिलीं गेलीं आणि जगन्नाथाच्या मंदिरांत त्यांचे प्रयोग झाले. स्वतः सम्राट् कपिलेंद्र देव याने परशुराम व्यायोग नांवाचें नाटक प्राकृत भाषेंत न लिहितां ओडिया भाषेंतच लिहिलें आणि जुन्या परंपरेला कलाटणी दिली. राजा प्रतापरुद्र देव याने अभिनव वेणीसंहारम् नांवाचें एकांकी नाटक लिहिलें आणि त्यांत जगन्नाथ मंदिरांतील देवदासींनी भूमिका केल्या. महाभारत, रामायण आणि इतर पौराणिक ग्रंथ यांतील कथानकें निवडून, त्या काळांत निदान चौव्वीस तरी एकांकी नाटकें लिहिलीं गेलीं असतील. सूर्यवंशी सम्राट् शांततेच्या काळांत आपल्या सैनिकांकडूनहि लष्करी मोहिमांतील महत्त्वाच्या घटनावर आधारलेलीं नाटकें करून घेत. अशा रीतीने लष्करांतील सैनिकांत नाट्यकलेची आवड निर्माण झाली.

पुढे संस्कृत नाटकांचें स्थान ओडिया लोकनाट्यांनी घेतलें. रामलीला व रासलीला हीं त्यांपैकी प्राचीन लोकनाट्यें होत. याशिवाय दंडनाट नामक शिवपार्वतीच्या विवाहाचें वर्णन करणारें एक प्राचीन नाट्यहि प्रसिद्ध आहे. ओडिसामध्ये सध्या प्रचलित असलेलें छउ नृत्य या दंडनाटाचेंच एक उन्नत रूप होय, असें कांही पंडित म्हणतात. तोंड झांकून त्या नृत्याचा प्रयोग करतात. छउ या शब्दाची व्युत्पत्ति कांही जण छवि या शब्दावरून सांगतात; तर कांही ती छावणी या शब्दापासून लावतात. याचें कारण असें, की मुळांत हें एक युद्धनृत्य होतें. हल्ली दंडनाट व छउ या दोन्ही नृत्यांचे प्रयोग चैत्र संक्रांतीला होतात. याशिवाय रंगसभा नांवाचा एक नाट्यप्रकार अतिशय लोकप्रिय आहे. रंगसभा म्हणजे कंसाची राजसभा होय. कंसाने कृष्णाला कपटाने मारण्याच्या हेतूने या राजसभेंत बोलाविलें होतें. परंतु त्यांत कंसाचेंच मरण ओढवलें. या नाट्य प्रयोगाच्या वेळीं मोठमोठे कृत्रिम हत्ती, घोडे व पक्षी बनवून भव्य आणि चमत्कृतिपूर्ण असें वातावरण निर्माण केलें जात असे.

१८ व्या शतकाच्या मध्यावर पहिल्या वीर किशोर देवाच्या राजवटींत गौरीहरण नांवाचें एक नाटक लिहिलें गेलें आणि पुरीमध्ये त्याचे प्रयोगहि झाले. १८३४ सालीं ओडिया भाषेंत खड्गप्रसाद नांवाच्या लेखकाने पद्मावतीहरण नांवाचें एक

नाटक लिहिलें. रघुनाथ परिछ आणि जगमोहन लाला हे त्या काळांतले आणखी दोन नाटककार होत. परिछकृत गोपीनाथ-वल्लव हें नाटक १८६८ सालीं प्रकाशित झालें. तें ओडिया भाषेंत लिहिलेलें असून त्यांतील अनेक पद्यें संस्कृतांत आहेत. जगमोहन याचें बालाजी हें नाटक मादक पदार्थांच्या व्यसना-विरुद्ध लिहिलेलें असून तें १८७७ सालीं प्रसिद्ध झालें. अशा रीतीनें इ. स. १८८० च्या सुमारास ओडिया रंगभूमीवर नवीन आणि सुधारलेल्या नाटकानें प्रवेश केला.

ओडिया रंगभूमीची दुसरी अवस्था रामाशंकर रॉय यांच्या-पासून सुरू होते. आधुनिक ओडिया रंगभूमीचे ते जनक मानले जातात. शेक्सपिअरच्या नाटकांचा त्यांनी अभ्यास केला आणि भारतीय रंगभूमीच्या तत्त्वानुसार आधुनिक नाटकें लिहिलीं. गंभीर भावनांचा आविष्कार करतांना त्यांनी मुक्तछंदाचा उप-योग केला आहे. रामाशंकरांनी एकूण दहा नाटकें लिहिलीं. पद्मानव नारायणदेव, राधामोहन राजेंद्रदेव, कंपाल मिश्र आणि भिकारी चरण पटनायक हे रामाशंकरांचे समकालीन नाटक-कार होत. त्यांनीहि नवीन तंत्रानुसार नाट्यलेखन केलें. या नवीन नाट्यप्रयोगांबरोबर लीला, स्वांग, यात्रा हे नाट्यप्रका-रहि लोकांचें मनोरंजन करीत होते. रामलीला, भरतलीला, पाला या नाट्यप्रकारांची या काळांत भरभराट झाली. या नाट्यप्रकारांचे प्रयोग उघड्यावर होत. वैष्णवपाणि व लक्ष्मी-कांत महापात्र यांच्या यात्रा व रासलीला या नाट्यप्रकारांनी अलिकडील काळांत लोकांचे पुष्कळ मनोरंजन केलें. कृष्ण-प्रसाद बसु हे अद्यापहि पालाची रचना करतात. त्यांचे हे नाट्यप्रकार अतिशय लोकप्रिय आहेत.

पंडित गोदावरीश मिश्र आणि नाट्यसम्राट् अश्विनीकुमार घोष यांच्यापासून ओडिया रंगभूमीच्या आधुनिक इतिहासाला प्रारंभ होतो. या दोघांनी अगदी नवीन धर्तीचीं नाटकें लिहि-ण्यास सुरवात केली. अश्विनीकुमारांनी आपली नाट्यलेख-नाची सुरुवात पौराणिक नाटकांनी केली; पण नंतर ते सामा-जिक, ऐतिहासिक आणि चरित्रात्मक नाटकांकडे वळले. यांचें कोणार्क हें नाटक अत्युत्कृष्ट गणलें जातें. गोदावरीश मिश्रांचीं ऐतिहासिक नाटकें त्यामानानें रंगभूमीवर विशष प्रभावी ठरलीं नाहीत. या दोघांचीं बहुतेक सर्व नाटकें राधाकृष्ण थिएटर या नाटक कंपनीनें रंगभूमीवर आणलीं. वनमाली पति हे या कंप-नीचे मालक होते. त्यांच्या मृत्यूनंतर कंपनीला वनमाली आर्ट थिएटर हें नांव देण्यांत आलें. इ. स. १९२८ ते ३० या दर-म्यान ही नाटक मंडळी मोडली.

अशा प्रकारें ओडिया नाटकाचा एकीकडे विकास होत असतांना दुसरीकडे रासलीला या गीतिनाट्याचीहि प्रगति चालू होती. १९१७ सालीं गोविंदचंद्रसूर देवानें एक गीति-नाट्य मंडळी स्थापन केली. त्यानंतर मोहनसुंदर गोस्वामीनें दुसरी एक मंडळी बनविली. या दोन्ही मंडळ्या गीति-नाट्यांचे प्रयोग सादर करीत. विशेषेंकरून या मंडळ्या ओडियांतील वैष्णव कवींचीं गीतें सादर करीत असत. कविचंद्र कालीचरण पटनायक हे यांचे उत्तराधिकारी होत. हे राधाकृष्णांच्या रासलीलेचा प्रयोग दाखवीत असत. संगीतविशारद आणि कवि म्हणून त्यांनी रंगभूमीवर पदार्पण केलें. पण अल्पावधींतच एक चांगला नाट्य–दिग्दर्शक म्हणून त्यांचा लौकिक झाला. त्यांनी ओडिसा थिएटर्स या नांवाची एक नाट्यसंस्थाहि स्थापन केली. ही संस्था मुख्यतः कालीचरणांचींच नाटकें करते. निय-मितपणें वर्षभर नाट्यप्रयोग सादर करणें, हें या संस्थेचें वैशिष्ट्य आहे. ओडिसांत या नाट्यसंस्थेइतकी लोकप्रियता दुसऱ्या कोणत्याहि नाट्यसंस्थेला लाभली नाही. स्त्री कला-वंतांना ओडिया रंगभूमीवर आणण्याचें श्रेय मुख्यतः यांनाच आहे. अस्पृश्यता, भूक, बेकारी, आर्थिक शोषण इ. समस्यांवर लिहिलेलीं भात, रक्तमाटि, बेकार इ. यांचीं नाटकें रंगभूमी-वर अनेक दिवस गाजत होतीं. यांनी एकूण बारा नाटकें लिहिलीं. वर्तमानकालांतील नवीन नाटककारांत मनोरंजन दास, लक्ष्मीधर नायक, अद्वैतचरण महंती, भंजन किशोर पट-नायक व नरसिंह महापात्र यांची गणना होते.

नंतरच्या कालांत कालीचरण पाणिग्रही यांच्या माटिर मणिष या कादंबरीच्या आधारें कांहीं नाटकें लिहिलीं गलीं आहेत. या नाटकांचे कांही प्रयोग प्राणबंधुकर यांनी रंग-भूमीवर यशस्वीरीत्या सादर केले. कालीचरणांच्या नंतर गोपाल छोटा रॉय यांची एक यशस्वी नाटककार म्हणून कीर्ति झालेली आहे. यांनी सामाजिक व राजनैतिक विषयांवर नाटकें लिहिलीं आहेत. कालीचरणांच्या ओडिसा थिएटर्स या संस्थेशिवाय आर्ट थिएटर्स व अन्नपूर्णा थिएटर अशा आणखी दोन धंदेवाईक नाट्यसंस्था ओडिसांत आहेत. याचबरोबर धंदेवाईक कलावंतांच्या संघामार्फत जनता रंगमंच या नांवाची आणखी एक नाट्यसंस्था चालविली जाते. धंदेवाईक नाट्य-संस्थेप्रमाणेच हौशी नाट्यसंस्थाहि अधूनमधून नाट्यप्रयोग करीत असतात. या ओडिया रंगभूमीवर एकांकिका, संस्कृत नाटकांचीं भाषांतरें, इंग्लिश आणि तेलुगु नाटकांचीं रूपांतरें इ. विविध प्रकारचे नाट्यप्रयोग सादर केले जातात. [भा. ना. सा.; मार्च ऑफ इंडिया.]

ओडिसा भारतीय संघराज्यांतलें एक घटकराज्य. आज ज्या प्रदेशाला आपण ओडिसा असें म्हणतों, तो प्रदेश

एके काळीं प्राचीन कलिंग साम्राज्यांत मोडत होता. प्राचीन ओडिसा प्रांतांत ओड्र, उत्कल व कलिंग या तीन प्रदेशांचा समावेश होत होता. ओडिया भाषेंत ओडिसा शब्द ओडिशा असा लिहितात. या प्रदेशांत पूर्वी उड्र किंवा ओड्र या जमातीचे लोक राहत होते. त्यांच्या नांवावरून औड्रियविषय > ओडिविस्स > ओडीविसा > ओडिसा अशीं रूपें होऊन या प्रदेशाला ओडिसा हें नांव रुढ झालें. याउलट एक मत असें आहे, की कांही तिथले राजवंश यांविषयीं बरीच माहिती मिळते. कलिंग देश हा आर्य संस्कृतीच्या कक्षेबाहेर असल्यामुळे त्या देशांत जाणें निषिद्ध होय, असें बौ. ध. सूत्रांत सांगितलें आहे. सनपूर्व तिसऱ्या शतकांत अशोकाने कलिंग देश जिंकला. इ. स. पूर्वी १५० वर्षें जैन राजा खारवेल हा कलिंगाच्या गादीवर आला. आंध्रराजा शातकर्णी याचा त्याने पराभव केला व त्याचें राज्य आपल्या साम्राज्याला जोडलें. खारवेल हा अत्यंत बलाढ्य होता.




द्राविडी भाषांमध्ये ओक्कल व ओड्डिस या शब्दांचा अर्थ शेतकरी असा आहे. त्यावरून आर्यांनी या प्रदेशाला उत्कल व ओड्र हीं नांवें ठेवलीं. कालिंजी नांवाची एक जात या भागांत अजूनहि वसलेली आहे. त्यावरून या देशाला कलिंग असेंहि म्हणूं लागले.

महाभारतांत कलिंग, ओड्र व उत्कल या तीन्ही नांवांचा उल्लेख अनेकवार आला आहे. त्या काळीं हे तीन प्रदेश वेगळे वेगळे होते. पद्म, मत्स्य, वायु, इ. पुराणांत कलिंग देश व त्याने राष्ट्रिक व भोजक या राजांनाहि जिंकलें. मगधराजा पुष्यमित्र याचा पराभव करून त्याने अंग व मगध हे प्रदेशहि जिंकून घेतले. इ. स. च्या ५ व्या शतकांत कलिंगाचा विस्तार कृष्णा नदीपासून महानदीपर्यंत झाला होता. सध्याच्या ओडिसाच्या ईशान्येकडील किनारपट्टीच्या भागाला उत्कल देश असें नांव होतें. उत्कल, कलिंग, अंग, वंग, पौंड्र, इ. लोक एकाच कुळांत जन्मलेले होते, असें महाभारतांत व पुराणांत सांगितलें आहे. उत्कल देश वंग व कलिंग यांच्या मध्ये आहे, असें

कालिदासाने रघुवंशांत म्हटलें आहे (४.३८). सध्याच्या ओडिसांतील बलसोर जिल्हा, कटक जिल्हयाचा कांही भाग व बंगालमधील मिदनापूर जिल्हयाचा कांही भाग, एवढा प्रदेश पूर्वीच्या उत्कल देशांत मोडत होता.

इ. स. ५०० च्या सुमारास कलिंग देशावर गंग वंशाचें राज्य चालू झालें. पण गंजम, पुरी व कटक या भागांवर मात्र विग्रह वंशांची सत्ता होती. या राजांची राजधानी तोसली ही असून त्यांच्या राज्याचें नांवहि तोसली हेंच होतें. विग्रह राजांनी पुढे उत्कल प्रदेशावरहि आपली सत्ता प्रस्थापित केली व त्याला उत्तर तोसली असें नांव दिलें. पुढे ११ व्या शतकापर्यंत उत्तर व दक्षिण तोसली हींच नांवें प्रचलित होतीं. त्यानंतर मात्र उत्कल व ओड्र हीं नांवें प्रचारांत आलीं.

वाकाटक नृपति हरिसेन याच्या साहाय्याने गंग वंशाने कलिंग देशावर सुमारें ३०० वर्षें राज्य केलें. या काळांत कलिंगांत एक नवयुग सुरू झालें. आणि नवीन संस्कृतिहि उदयाला आली. गंग राजांनी आपला स्वतंत्र शक सुरू केला. त्याचा आरंभ इ. स. ४९८ मध्ये झाला असावा, असें मानतात. मात्र तो नक्की कोणत्या राजाने सुरू केला, तें अज्ञात आहे. या वंशांतील पहिले दोन तीन राजे स्वतःला त्रिकलिंगाधिपति म्हणवून घेत. त्यांची राजधानी कलिंगनगर होती. मध्यंतरीं कांही काळ चालुक्यांनी कलिंग देशावर स्वामित्व मिळविलें होतें; पण गंग राजांनी पुन्हा त्याचा ताबा घेतला.



परशुरामेश्वर मंदिर — ओडिसा

८ व्या शतकाच्या पूर्वार्धांत उत्कल देशांतील भौमकर वंश प्रबळ झाला व त्या राजांनी सबंध ओडिसावर आपली सत्ता स्थापन केली. त्यांनी सुमारें २०० वर्षें राज्य केलें. या काळाला ओडिसाच्या इतिहासांतलें सुवर्णयुग मानतात. भौमकर राजांनी मोठें साम्राज्य स्थापलें व सबंध भारतांत आपल्या संस्कृतीचा प्रसार केला. गुहेश्वरपाटक ही त्यांची राजधानी होती. सध्या त्या ठिकाणीं जयपूरशहर (कटक जिल्हा) वसलें आहे. या वंशांतील राजाने इ. स. ७४० च्या सुमारास आपला शक सुरू केला, तो इ. स. ९४० पर्यंत चालला. हे राजे स्वतः बौद्ध धर्मी असले, तरी त्यांचा शैव व वैष्णव पंथांनाहि आश्रय होता. याच काळांत ओडिया भाषेच्या विकासाला प्रारंभ झाला व ओडिया लोकांचें भारतांत स्वतंत्र स्थान निर्माण होऊं लागलें.


भौमकर वंशानंतर सोम किंवा केसरी या वंशाचा उदय झाला. कोसलामधील हे सोमवंशी राजे प्रथम वैष्णवपंथी होते; पण ओडिसांत राज्य स्थापन केल्यावर त्यांनी शैवपंथ स्वीकारला. ओडिसांत हा वंश केसरी वंश म्हणून प्रसिद्धि पावला. त्यांच्या त्रिकलिंग राज्यांत कोसलाचा कांही भाग समाविष्ट होता. म्हणून ते स्वतःला कोसलेंद्र व त्रिकलिंगाधिपति असें म्हणवून घेत. महाभवगुप्त जनमेजय हा ओडिसावर राज्य करणारा पहिला सोमवंशी राजा होय. या वंशाची सत्ता तिथे ११ व्या शतकाच्या अखेर पर्यंत टिकली. कान्यकुब्ज देशांतून त्याने दहा हजार ब्राह्मण ओडिसांत आणले. त्याच्या कारकीर्दींत शिल्प व इतर कला यांचा पुष्कळ विकास झाला.

९ व्या शतकाच्या प्रारंभीं लुप्त झालेल्या गंग वंशांतील राजांनी त्या शतकाच्या अखेरीस पुन्हा ओडिसांत आपली सत्ता स्थापली. ११ व्या शतकाच्या उत्तरार्धांत चोडगंगदेव नांवाचा महापराक्रमी राजा या वंशांत झाला. द्रविड राजा राजेंद्र चोल याची कन्या राजसुंदरी व गंग राजा देवेंद्र वर्मा (१०६९–७६ इ. स.) यांचा हा पुत्र होय. हा महापराक्रमी असून याने गंगेपासून गोदावरीपर्यंत आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. वेद, पुराणें, काव्यशास्त्र, धर्मशास्त्र व शिल्पशास्त्र या विषयांचें त्याला उत्तम ज्ञान होतें. त्याने वेंगी, उत्कल, मंदार रामबाग व बंगाल हे प्रदेश जिंकले. खारवेल राजाप्रमाणे याचेंहि साम्राज्य विशाल होतें.

गंग राजे प्रथम शिवभक्त होते; पण चोडगंगदेवापासून ते वैष्णव बनले. त्याच वेळीं रामानुजाचार्य वैष्णव धर्माचा प्रचार करीत होते, त्याचा हा परिणाम असावा. याने विष्णूचीं पुष्कळ मंदिरें बांधलीं. पुरी येथे जगन्नाथाचें एक जुनें मंदिर होतें. चोडगंगाने तिथे हल्लीचें भव्य मंदिर उभारलें. त्याने ७० वर्षें राज्य केलें. त्याच्या कारकीर्दींत ओडिसाचें राजकीय संघटन झालें व ओडिया संस्कृति उत्कर्षाला पोचली. त्याच्या नंतर १२ व्या शतकाच्या अखेरीस उ. भारतावर मुसलमान आक्रमकांचें वर्चस्व सुरू झालें. परंतु गंगराजे प्रबळ असल्यामुळे १४ व्या शतकाच्या मध्यापर्यंत ओडिसाला मुसलमानी आक्रमणाची झळ लागली नाही. त्यानंतर मुसलमानांच्या कांही

स्वाऱ्या ओडिसावर झाल्या; पण गंग राजांनी त्या परतवून लावल्या. १५ व्या शतकाच्या मध्यापर्यंत ओडिसांत गंगांचें राज्य टिकून राहिलें.

त्यानंतरच्या शंभर वर्षांत दुसऱ्या वंशातील अनेक हिंदु राजांनी ओडिसावर राज्य केलेलें दिसतें. मुकुंददेव हा त्यांतला शेवटचा हिंदु राजा होय. शेवटीं १५६८ मध्ये बंगालचा अफगाण सुलतान सुलेमान कर्राणी याने ओडिसाचें राज्य जिंकलें. पण ओडिसांत आपली राज्यव्यवस्था सुरू करायच्या आंतच इ. स. १५७२ मध्ये त्याचा मृत्य झाला. त्याच्या मागून त्याचा धाकटा मुलगा दाऊद हा सुलतान बनला. कर्राणीने दिल्लीच्या अकबर बादशहाचें स्वामित्व मान्य केलें होतें. पण अफगाण लोक दिल्लीचें वर्चस्व झुगारून देण्याची संधि पाहत होते. दाऊदने त्याचा फायदा घेतला व अफगाण सरदारांच्या मदतीने आपल्या नांवाची द्वाही फिरविली. या घटनेमुळे अफगाण व



वैतालमंदिर – ओडिसा

मोगल यांच्यांत संघर्ष माजला व पुढे अनेक वर्षें तो चालू राहिला. अखेरीस त्यांत दाऊदचा अंत झाला (इ. स. १५७६). इ. स. १५७८ सालीं ओडिसा मोगल राज्याला जोडला गेला खरा; पण मोगल व अफगाण यांच्यामधलें वैर मात्र एवढ्यावर थांबलें नाही, तें पुढेहि चालूच राहिलें. त्यानंतर अकबराने राजा रामचंद्रदेव याला ओडिसाचा राजा म्हणून मान्यता दिली. इ. स. १५९२ ते १६०४ या कालांत मानसिंह हा बंगाल व ओडिसा यांचा सुभेदार होता.

त्याच्यानंतर जे सुभेदार झाले, त्यांपैकी हासिमखान हा फार जुलमी निघाला. त्याने जमीनदारांना तर लुटलेंच; पण त्याचबरोबर जगन्नाथाच्या देवालयाचीहि लूट केली. शहाजहानच्या कारकीर्दीतील बाकरखान सुभेदारहि असाच अत्यंत जुलमी व क्रूर होता. त्याने सात हजार जमीनदारांना तुरुंगांत कोंडून त्यांचा वध केला. शेवटीं शहाजहानने त्याला कामावरून दूर केलें. औरंगजेबाच्या धर्मवेडाची झळहि ओडिसाला लागल्यावांचून राहिली नाही. त्याच्या कारकीर्दीत मुर्शिद कुलीखान हा ओडिसाचा सुभेदार होता. इ. स. १७०४ सालीं त्याने आपला जावई सुजाउद्दिन याची आपल्या हाताखाली नेमणूक करून घेतली. ओडिसामध्ये सध्या प्रचलित असलेला सत्यपीराचा पंथ यानेच सुरू केला, असें कांही पंडितांचें मत आहे. हा दयाळू होता. त्याने कैदेंत असलेल्या अनेक जमीनदारांची मुक्तता केली. १७३९ सालीं सुजाउद्दिन मरण पावला. त्यानंतर थोड्याच काळांत त्याचा भाऊ अलिवर्दी व मराठे यांच्यामध्ये लढाई सुरू झाली व मराठ्यांनी ओडिसावर ताबा मिळविला. नागपूरच्या रघूजी भोसल्याने आपल्या दहा हजार फौजेनिशी अलिवर्दीखानावर चाल केली व त्याला बंगालमध्ये




मिथुनशिल्प – ओडिसा

पिटाळून लावलें. पण या मराठ्यांनीहि ओडिसांतील लोकांचे खूप हाल केले. लोकांना त्यांची इतकी दहशत बसली, की मराठा हें नांव ऐकतांच माणसें गिरिकंदरांचा आश्रय घेऊं

लागलीं. इ. स. १७५१ सालीं ओडिसावर मराठ्यांचा अंमल आला व तो सुमारें पन्नास वर्षें टिकला.

इ. स. १५१४ मध्ये ओडिसा प्रांतांत एक उल्लेखनीय घटना घडली. पिपली या गांवी पोर्तुगीजांनी आपली वसाहत केली व पिपली गांव त्यांच्या व्यापाराचें एक केंद्र बनलें. पोर्तुगीजांच्या पाठोपाठ डच व इंग्रज या लोकांनीहि ओडिसांत आपले पाय रोवले. इंग्रजांनी इ. स. १८०३ मध्ये ओडिसा जिंकला. इंग्रजांच्या आक्रमणाच्या काळांत मयूरभंजचा मुख्य दामोदर भांज याने इंग्रजाशीं चांगली झुंज दिली. तो शूर सेनापति होता, तसाच धूर्त राजकारणीहि होता. त्याची देशभक्तिहि प्रखर होती. एकाकीपणे त्याने मराठा व इंग्रज या दोन्ही शत्रूंना तोंड दिलें.

यानंतरची ओडिसांतली प्रमुख घटना म्हणजे पाइकांचें बंड. ओडिसांत प्राचीन काळापासून पाइकपद्धति अस्तित्वांत होती. तिथल्या निरनिराळ्या स्वतंत्र राजांचे जे खडे सैनिक होते, त्यांना पाइक असें नांव होतें. राजांनी या लोकांना जमिनी फुकट दिल्या होत्या. त्या कसून ते आपला उदरनिर्वाह करीत. जमिनीच्या मोबदल्यांत त्यांना केव्हाहि युद्धाच्या मोहिमेवर जावें लागे. अबुलफजलच्या मतें या लोकांची संख्या एक लाख पंचावन हजार होती. इंग्रजांचें राज्य आल्यावर त्यांच्या या वंशपरंपरागत जमिनी काढून घेण्यांत आल्या. त्यामुळे ते बिथरले व



कोणार्क येथील भव्य हत्ती

त्यांनी इंग्रजांविरुद्ध बंड उभारलें (इ. स. १८१७). परंतु इंग्रजांनी त्या बंडाचा मोड केला. जे पाइक जंगलांत लपून बसले होते, त्यांना शोधून काढून शिक्षा करण्याचें काम पुढे इ. स. १८२६ पर्यंत चालू होतें. या बंडाचा आणखी एक परिणाम असा झाला, की ओडिया लोकांना सैन्यांत दाखल व्हायला बंदी करण्यांत आली. यानंतरहि त्यांनी इ. स. १८३३ व १८४७ मध्ये असे दोनदा उठाव केले; परंतु ते अयशस्वी ठरले. १९०५ सालीं ओडिसा प्रांत बिहारला जोडण्यांत आला; पण पुढे एकतीस वर्षांनी तो स्वतंत्र प्रांत झाला. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळालें. त्यानंतर दोन वर्षांतच ओडिसांतील पंचवीस संस्थानें विलीन करण्यांत आलीं.

ओडिसाचे लोक एका विशिष्ट वंशाचे किंवा जातीचे नाहीत. त्यांच्यांत अनेक जातींचें मिश्रण आहे. सुमारें हजार वर्षांपूर्वी ओडिसाच्या राजांनी कनोजच्या ब्राह्मणांना आपल्या राज्यांत बोलावलें व त्यांच्याकडे चातुर्वर्ण्याधिष्ठित धर्माची व्यवस्था लावण्याचें काम दिलें. ब्राह्मणांनी हें काम चोखपणे बजावलें असें सांगतात. ब्राह्मणांप्रमाणेच ओडिसांत परप्रांतांतून कायस्थ व आग्रा-दिल्लीकडचे अघारिया हे शेतकरी आले व स्थायिक झाले. ओडिसावर मुसलमानांची सत्ता असतांना परप्रांतांतून हजारों मुसलमान इथे वस्ती करण्यासाठी आले. तथापि ओडिसांत सध्या मात्र बहुतेक सर्व वस्ती हिंदूंची आहे.

ओडिसांतले ससनी नांवाचे ब्राह्मण सर्वांत उच्च समजले जातात. पूर्वींच्या राजांकडून त्यांना वंशपरंपरा जमिनी मिळालेल्या आहेत. उत्कल ब्राह्मणांनाहि समाजांत उच्च दर्जा आहे. ब्राह्मणांच्या खालोखाल क्षत्रिय किंवा राजपूत यांचा वर्ग येतो. बहुतेक सर्व जमीनदार स्वतःला क्षत्रिय म्हणवितात. याशिवायहि तिथे अनेक जाती आहेत. परंतु ओडिसाचें वैशिष्ट्य हें, की तिथे जातीय भेदभाव फार कमी आहे.



ओडिया ब्राह्मण

ओडिसामध्ये आदिवासी व मागसलेल्या जमाती यांची संख्या सुमारें दीड कोटि आहे. त्यापैकी आदिवासी ३० लाख, मागस जमाती ३६ लाख व इतर मागसलेल्या जाती ४२ लाख मिळून सुमारें एक कोटि लोक मागसलेले आहेत. हे लोकहि एके ठिकाणीं वसलेले नसून जंगलांत विखुरलेले आहेत. ओडिसा प्रांताचें क्षेत्रफळ ६० हजार चौरस मैल असून दर चौरस मैलाला २४४ लोक असें तिथल्या लोकवस्तीचें प्रमाण


पडतें. संपूर्ण प्रांतांत सुमारें ५ लाख लोकसंख्या असलेलें मोठें शहर कटक हें एकच आहे.

ओडिसांतली जमीन अत्यंत सुपीक असून तिथे भात विपुल प्रमाणांत पिकतें. याशिवाय ताग, गळिताचीं धान्यें, डाळी, नारळ, हळद, विडयांचीं पानें, आवळा, काजू, फणस, केळी, इ. पिकेंहि येतात.

ओडिसाचा एक तृतीयांशापेक्षा जास्त भाग जंगलांनी व्यापलेला आहे. या जंगलांत इमारती लांकूड, बांबू, रेल्वेच्या स्लिपर्ससाठी लागणारें लांकूड, विडयांना लागणारीं केंडूचीं पानें, वेत, मध, शिंगें, मोहाचीं फुलें, रेशमाचे किडे, लाख, हस्तिदंत, कातडीं, औषधी वनस्पति वगैरे नाना वस्तू मिळतात. या जंगलांतच कोंढ, संताळ, गदब, कोया, जुआंग, सवर, बोंडो वगैरे आदिवासी स्वच्छंदपणें आपलें आयुष्य घालवितात. हे आदिवासी अत्यंत प्रामाणिक, कष्टाळू व काटक आहेत.

ओडिसा प्रांत खनिज संपत्तीनहि समृद्ध आहे. दगडी कोळसा, लोखंड, मँगेनीज, बॉक्साइट, चुनखडी, क्रोमाइट, कोळसा, ग्राफाइट व डोलोमाइट हीं खनिज द्रव्यें ओडिसांत सांपडतात.

महानदी व मुचकुंद या ओडिसांतील प्रमुख नद्या होत. याशिवाय ब्राह्मणजी, शालंदी, सुवर्णरेखा, वैतरणा, इंद्रावती वगैरे छोटया नद्या आहेतच. महानदीवर संबलपुराजवळ हिराकूड हें प्रचंड धरण बांधण्यांत आलें आहे. याची लांबी सुमारें



हिराकूड धरण – ओडिसा

तीन मैल असून उंची १५० फूट आहे. या धरणाच्या पाण्याने ११ लाख एकर जमीन भिजेल, असा अंदाज आहे. याशिवाय उद्योगधंद्यांसाठी यापासून साडेतीन लाख किलोवॅट वीज मिळेल ती वेगळीच. चौद्वारला एक कापडगिरणी, राजगंगापूरला एक सिमेंट फॅक्टरी, कटकला रेफिरजिरेटर तयार करण्याचा कारखाना, तालचेर व रामपूर येथे कोळशाच्या खाणी इ. नव्या उद्योगधंद्यांची ओडिसांत उभारणी होऊं लागली आहे.

भारतांतील इतर प्रदेशांप्रमाणे ओडिसांतहि ग्रामोद्योगाला महत्त्वाचें स्थान आहे. मातीचीं व काशाचीं भांडीं तयार करणें, शंख–शिंपले, हस्तिदंत व शिंगें यांच्या कलाकृति बनविणें हे ग्रामोद्योग इथे चालतात. पण इथला महत्त्वाचा ग्रामोद्योग म्हणजे हातमागावर नक्षीदार कापड तयार करणें, हा आहे. रंगीबेरंगी धाग्यांनी सुंदर वेलबुट्टी व भडक पशुपक्षी विणलेल्या या कापडाला विलायतेंत फार मोठी मागणी असते.

ओडिसांतली नैसर्गिक परिस्थिति कोकणाप्रमाणे आहे. तिथली हवा कोकणाप्रमाणेच उष्ण व दमट असल्यामुळे कपडे विशेषसे लागत नाहीत. सर्वसामान्य लोक पंचेवजा आखूड धोतर नेसतात व आखूड बाह्यांचा सदरा घालतात. ग्रामीण लोकांना तर सदऱ्याचीहि गरज भासत नाही. एक पंचा कमरेला वेढला व दुसरा अंगावर टाकला, की त्यांचें काम भागतें. स्त्रिया मुख्यत: पांचवारी पांढऱ्या साड्या वापरतात. आदिवासी स्त्रिया मात्र रंगीत लुगडीं नेसतात. इथे बहुतेक सर्व ठिकाणीं सामायिक कुटुंबपद्धति आहे; परंतु हल्ली शिक्षित लोकांत विभक्त होण्याची प्रवृत्ति वाढत आहे. इथे स्त्रियांत पडदापद्धति नाही; परंतु वडील माणसांसमोर उघडया चेहऱ्याने सुनांना येण्याची परवानगी नसते.



नर्तिका – कोणार्क

ओडिसांतील लोकांचे कांही खास सणवार आहेत. वैशाख शु. १ देला ते पणासंक्रांति म्हणतात. त्या दिवशीं ओडिसांत ठिकठिकाणीं जत्रा भरतात.

आषाढ शु. १ दा ही त्यांची रजसंक्रांति. या सणासाठी तीन दिवस सर्वांना सुट्टी असते. त्या दिवसांत शेतकरीहि आपलें काम बंद ठेवतात. स्त्रिया स्वयंपाकालाहि सुट्टी घेतात. तीन दिवस पुरुष व स्त्रिया खेळ खेळतात व आमोद–प्रमोद करतात.

आषाढ शु. २ येथपासून जगन्नाथाची रथयात्रा सुरू होते व ती नऊ दिवस चालते. कोजागरीला ते कुमारपौर्णिमा म्हणतात. या पौर्णिमेच्या आधी महिनाभर मुली चंद्राची पूजा



जगन्नाथपुरी – ओडिसा

करतात व या दिवशीं सकाळीं सूर्याची आणि रात्रीं चंद्राची पूजा करतात. माघ पौर्णिमेला ते अग्न्युत्सव करतात. या दिवशीं घरोघरचा कचरा एकत्र करून पेटवितात व गांव स्वच्छ करतात. चैत्र शु. ८ मीला अशोकाष्टमी असें नांव आहे. या दिवशीं अशोकाचीं फुलें खाल्ल्याने वर्षभर शोक होत नाही, अशी त्या लोकांची समजूत आहे. ज्येष्ठ पौर्णिमेला देवस्नान-पौर्णिमा म्हणतात. या दिवशीं जगन्नाथाला स्नान घालतात. याशिवाय गणेशचतुर्थी, नवरात्र, दिवाळी, होळी वगैरे सार्वजनिक सणहि ओडिसांतील लोक साजरे करतातच.

ब्रिटिश अमदानींत सुमारें शंभर-सव्वाशें वर्षें ओडिसावर बंगाली भाषिकांचें वर्चस्व होतें. त्याचा परिणाम म्हणून बंगाली भाषेचा फार मोठा प्रभाव ओडिया भाषेवर पडला आहे. त्याच्या खालोखाल छत्तीसगढी व मराठी भाषेचा प्रभावहि त्या भाषेवर दिसतो. छत्तीसगढाचा भाग ओडिसाला लागून असल्यामुळे त्या भाषेंतील कांही शब्द व ओडियांतील कांही शब्द समान असणें स्वाभाविक आहे; पण मराठी व ओडिया भाषेच्या साम्याबद्दल मात्र जरा आश्चर्य वाटतें. मराठ्यांनी या प्रदेशावर सुमारें पन्नास वर्षें राज्य केलें, त्याचा हा परिणाम असावा.

ओडिसा प्रांतावर निसर्गसौंदर्याचा वरदहस्त आहे. लहान मोठे पर्वत, दाट जंगलें, नद्या, समुद्रकिनारा, इ. गोष्टींमुळे इथे अनेक प्रेक्षणीय स्थळें निर्माण झालीं आहेत. सातकोसिया खिंड ही त्यांपैकीं एक होय. ही सुमारें चौदा मैल लांब असून महानदीच्या डोंगराळ भागांतील प्रवाहामुळे निर्माण झाली आहे. दुसरें एक निसर्गनिर्मित सौंदर्यस्थळ म्हणजे चिलका सरोवर. या सरोवराचें क्षेत्रफळ सुमारें चारशें चौरस मैल



चिलका सरोवर – ओडिसा

असून त्याची लांबी ४४ मैल आहे. भारतांतील हें सर्वांत मोठें सरोवर होय. याची खोली मात्र सरासरी पांच-सहा फूट असून ती बारा फुटांहून जास्त कुठेच नाही. हिवाळ्यांत इथे जगाच्या निरनिराळ्या भागांतून चित्रविचित्र रंगांचे व जातींचे पक्षी जमतात व त्यांच्या शिकारीसाठी शिकारी लोकांचे तळ पडतात. याशिवाय या सरोवराचें एक वैशिष्ट्य असें, की यांत उत्कृष्ट व विपुल मासळीहि सांपडते.

ओडिसांतले आदिवासी–– सवर आणि भुइया हे ओडिसाचे मूळ रहिवासी होत. त्यांनी ओडिसाच्या सांस्कृतिक क्षेत्रांत आपलें असें कांही पेरून ठेवलें आहे. पूर्वीं या प्रदेशांत आदिवासींची अशी एक खास संस्कृति होती. त्यांची जातपंचायत होती व तिची सर्वांवर हुकमत चाले. या सर्व जमातींत सवर आदिवासी हे प्रमुख आहेत. इंडो-आर्यन भाषा बोलणाऱ्या लोकांशीं यांचा फार पूर्वीपासून संबंध आला होता. आजच्या ओडिया भाषेंत इंडो-आर्यन भाषेचे अवशेष आहेत, असें भाषाशास्त्रज्ञांचें मत आहे. ओडिसांतील कांही धार्मिक पंथांचा उगमहि याच सवरांच्या मूळ धर्मांत सांपडतो. सध्याची जगन्नाथाची पूजा करण्याची पद्धत ही सवरांकडूनच उचललेली आहे. पेरलेल्या धान्याला फूल आल्यावर कार्तिक महिन्यांत त्या फुलाची पूजा करतात, हाहि आदिवासी संस्कृतीचाच अवशेष आहे.

ओडिसाच्या संस्कृतीवर आपली छाप उमटविणारे दुसरे आदिवासी म्हणजे भुइया होत. ओडिसाचा कांही भाग


प्राचीन काळीं यांच्या ताब्यांत होता, असें दिसतें. कारण केओंजहार संस्थानांतील राजाला राज्याभिषेक करतांना भुइया जमातीचा पुरोहित उपस्थित असावा लागे. यावरून भुइया लोकांच्या संमतीनेच हे राजे राज्य करीत, असें अनुमान निघतें.

ओडिसा व बौद्ध धर्म यांचा संबंधहि वराच जुना आहे. मगध व ओडिसा या देशांत व्यापारी देवाण घेवाण सहाव्या शतकापासून सुरू असल्याचे पुरावे सांपडतात. इ. स. च्या तिसऱ्या शतकांत अशोकाने कलिंग देश काबीज केला. व त्यामळे तिथल्या लोकांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला. जगन्नाथाची पूजाअर्चाहि कांही काल बौद्ध भिक्षूंच्याच हातांत होती. बौद्ध वाङ्मयांतहि जगन्नाथ हा बुद्धाचाच अवतार असल्याचे उल्लेख आढळतात. इ. स. च्या सातव्या शतकापर्यंत हा संबंध टिकून होता, असें दिसतें.

द. भारताशींहि ओडिसाचा संबंध प्राचीन काळींच आला असावा, असें वाटतें. जगन्नाथाच्या देवालयांत अजूनहि उच्छिष्ट किंवा बंदा गणपतीची पूजा होते, हा त्याचाच पुरावा होय.

ययाति केसरी या राजाने ओडिसांत हिंदु धर्माचा व विशेषतः शैव पंथाचा पुरस्कार केला. कनोज व संयुक्त प्रांत या दोन ठिकाणांहून त्याने दहा हजार ब्राह्मण आणून इथे बसविले. जयपूर या नव्याने वसविलेल्या नगरींत एक मोठा यज्ञ केला. तेव्हापासून ओडिसांत हिंदु धर्म प्रबळ झाला व बौध धर्माला ओहोटी लागली. इ. स. च्या १५ व्या शतकांत चैतन्यप्रभूंच्या वैष्णव पंथाने ओडिसांत मूळ धरलें. त्यामुळे पुढे जगन्नाथ हा विष्णूचा अवतार मानण्यांत येऊं लागला. वैष्णव पंथाचा ओडिसांत सर्वत्र प्रसार झाल्यावर तिथल्या शैव पंथाला ओहोटी लागली.

ओडिसांतील शिल्पकला— द. भारताप्रमाणेच ओडिसा प्रांतांतहि शिल्पकलेचें वैभव जागोजाग दृष्टीस पडतें. भुवनेश्वर, कोणार्क, जगन्नाथपुरी, या ठिकाणीं भारतीय शिल्पकलेचा जो आविष्कार दिसतो, तो अतिशय भव्य-दिव्य असा आहे. भुवनेश्वराचें लिंगराज मंदिर हें ययाति राजाच्या कारकीर्दींत (इ. स. ७९५–८४०) बांधलेलें आहे. हिंदु शिल्पकलेचा परमोत्कर्ष याठिकाणीं दृष्टीस पडतो. भुवनेश्वर शहर म्हणजे मंदिरांचें आगरच असून इथे लहान-मोठीं मिळून सुमारें पांचशें मंदिरें आहेत. त्यांपैकी लिंगराज, परशुरामेश्वर वैताल, राजरानी, मुक्तेश्वर, इ. मंदिरें विशेष प्रेक्षणीय आहेत. लिंगराज मंदिराच्या आवाराची लांबी ५२० फूट व रुंदी ४६५ फूट आहे. मंदिराच्या मुख्य शिखराची उंची जोत्यापासून १४७ फूट आहे. यावरून मंदिराच्या भव्यतेची कल्पना येईल. आंतील शिवलिंगहि मंदिराला साजेसें मोठें आहे. येथील शिल्पांत भव्यता व नाजूकपणा यांचा मनोहर संगम दिसतो.



भुवनेश्वर मंदिर – ओडिसा

मुक्तेश्वराचें मंदिर इतर मंदिरांच्या मानाने आकाराने लहान असलें, तरी शिल्पकलेच्या दृष्टीने तें श्रेष्ठ आहे. या मंदिरांत उंदरावर बसलेला गणपति, मोरावर आरूढ झालेला कार्तिकेय, व सप्तमातृका यांच्या मूर्ती आहेत. परशुरामेश्वराच्या मंदिराच्या भिंतीवर रामायण-महाभारतांतील प्रसंग कोरलेले आहेत.

राजरानी या मंदिरांत देवाची मूर्ति नाही. देवालयाचें हें बांधकाम अर्धवट सोडण्यांत आलें आहे. त्यामुळे इथे कोणत्याहि धर्माच्या वा पंथाच्या माणसाला मज्जाव नाही. इथलें शिल्पकाम नाजूक व मनोहर आहे. ओडिसाची पूर्वीची राजधानी कटक होती, तर हल्लीची राजधानी भुवनेश्वर ही आहे. चंडीगडाप्रमाणेच हें शहर नव्याने वसविण्यांत आलें आहे. १३ एप्रिल १९४८ रोजीं या नव्या राजधानीचा कोनशिला समारंभ पंडित नेहरूंच्या हस्तें झाला. या नव्या शहराची विभागणी पांच भागांत करण्यांत आली असून प्रत्येक भाग शाळा, बाजार, क्रीडांगणें, उद्यानें या बाबतींत स्वयंपूर्ण आहे.

ओडिसांतील प्रख्यात क्षेत्र म्हणजे जगन्नाथपुरी. सम्राट् अनंग भीमदेव (११८९–१२२३ इ. स.) याने हें मंदिर ११९८ सालीं बांधलें. कृष्ण, बलराम व त्या दोघांच्यामध्ये सुभद्रा अशा तीन लाकडी मूर्ती या मंदिरांत आहेत. त्यांना मूर्ती म्हणण्यापेक्षा ओबडधोबड लाकडी ठोकळे म्हणणेंच रास्त होईल. या मूर्ती कुजून जाऊं नयेत म्हणून दर बारा वर्षांनी त्या बदलण्याची पद्धत आहे. तो समारंभ मोठा होतो.

ओडिसांतील आणखी एक प्रेक्षणीय शिल्प म्हणजे कोणार्क येथील सूर्यमंदिर. हें गंगवंशांतील सम्राट् नरसिंह (१२३८–१२६४ इ. स.) याने बांधलें. मंदिर अगदी समुद्रकिनाऱ्यावर



घोडेस्वार – कोणार्क

असल्याने समुद्राच्या खाऱ्या पाण्याचा व हवेचा मंदिराच्या जांभ्या दगडावर परिणाम होऊन बराचसा भाग पडला आहे. सध्या अस्तित्वांत असलेल्या मंदिराच्या अवशेषांवरून या मंदिराची मुळांत उंची २२७ फूट असावी, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. या मंदिराचा आकार रथासारखा आहे. त्याच्या दोन्ही बाजूंना प्रचंड चाकें असून त्याला घोडे जोडलेले आहेत. मंदिरांत सूर्याची मूर्ति मात्र नाही. मंदिराच्या वरच्या बाजूला मध्यान्हीच्या व सूर्यास्तसमयींच्या सूर्याच्या मूर्ती, नृत्यांगनांच्या मूर्ती व माणसांची आणि पशूंचींहि सुंदर चित्रें आहेत. नटमंडपाच्या भिंतीवरील नृत्य-वाद्यांचीं चित्रें अप्रतिम आहेत. इथेहि स्त्री-पुरुषसंभोगाचीं अनेक शिल्पें कोरलेलीं दिसतात. [लोकयात्रा; हि. ओ.; संस्कृति (मासिक); पु. इं.; अजन्ता–मार्च १९५७.; हि. जॉ. ए. इं.; जॉ. ए. मे. इं.; ट्रा. ए. इं.]


ओडिसी

दक्षिणेंतील भोंडारी लोकांचा हा एक पोटविभाग आहे. [का. ट्रा. स. इं.]

ओडिसी नृत्य

प्राचीन भारतीय नृत्यांच्या अनेक प्रकारांपैकी हा एक शास्त्रीय नृत्यप्रकार आहे. भरतनाट्यम्, कथकळी, मणिपुरी व कथक या नृत्यांच्या बरोबरीचें स्थान ओडिसीला द्यावें लागेल. ओडिसामध्ये या नृत्याची परंपरा आहे. सनपूर्व २०० वर्षांच्या आधीपासून हें नृत्य तिथे प्रचलित होतें. उदयगिरि येथील हाथीगुंफेतल्या शिलालेखांत या प्राचीन कलेचें वर्णन आढळतें. कलिंगाधिपति खारवेल याने लोकांच्या मनोरंजनासाठी दर्पनृत्य व वादित्रनृत्य या उभयविध नृत्यांचा कार्यक्रम ठरविला होता, असा उल्लेख त्या लेखांत आहे. इ. स. च्या ८ व्या शतकापर्यंत तिथ बौद्ध राजांची सत्ता होती. त्यांच्या कालांत ओडिसांतील विविध कलांचा विकास झाला. ८ व्या शतकांत केसरी राजसत्तेच्या आश्रयाने तिथे पुनश्च श्रुतिस्मृतिपुराणप्रतिपादित धर्माची प्रस्थापना झाली. त्यानंतर त्या भागांत जीं शिवमंदिरें उभारलीं गेलीं, त्यांत नृत्यमंडपहि बांधण्याची प्रथा सुरू झाली. या मंदिरशिल्पावरील कोरीव कामांत ओडिसी नृत्याचें विशष दर्शन घडतें. तेव्हापासूनच त्या प्रदेशांत देवदासींची प्रथा सुरू झाली. शंकरासमोर विविध प्रसंगीं नृत्य-गायन करणें, ही सेवा त्यांना नेमून देण्यांत आली.

इ. स. १५८६ मध्ये मुसलमान आक्रमकांनी ओडिसा जिंकून जगन्नाथाचें मंदिरहि लुटलें. पुढे मोगलसत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्या मंदिरांत पुनश्च पूजा, उत्सव इ. कार्यक्रम सुरू झाले. मोगल सत्तेकडून रामचंद्र देव या गृहस्थाला पुरी येथील जगन्नाथ मंदिराचा व्यवस्थापक नेमण्यांत आलें. त्यानें पूर्वीची पूजापद्धति चालू केली. मुलांना ओडिसी नृत्य शिकवून व त्यांना मुलींचे वेष देऊन त्यांच्याकरवीं उत्सवादि प्रसंगीं ओडिसी नृत्य करण्याची प्रथाहि त्यानेच सुरू केली. आजहि ती प्रथा चालू आहे.



दर्पणभंगी—ओडिसी नृत्य

इ. स. १९५८ मध्ये ओडिसा येथील एका नृत्यमंडळाने ओडिसी नृत्याचा प्रयोग करून दाखविला. या नृत्यमंडळाचे कलागुरु श्री. कलचरण पटनायिक हे होते. हे गृहस्थ या नृत्याच्या क्षेत्रांत संशोधन करीत असून त्यांनी ओडिसी नृत्याविषयीं अनेक प्राचीन हस्तलिखितें व प्रबंध जमा केले आहेत.

ओडिसी नृत्यांत एकूण ५७ हस्तमुद्रा असतात. अनेक पदमुद्राहि असतात. त्याचे लास्य व उग्र असे दोन प्रकार आहेत. शरिराच्या मूलभूत हालचालींना ओडिसींत भंगी म्हणतात. दर्पण व एकपादभ्रमरी या विशेष भंगी होत. या नृत्याला गाण्याची जोड असते व साथीला मर्दल (मोठा मृदंग), बांसरी व झांज हीं वाद्यें असतात. त्रिभंग अवस्थेंत उभें राहून डोळे, भुवया व मान यांच्या लयबद्ध हालचाली करणें, हा या नृत्याचा पूर्वरंग असतो. त्या वेळीं मृदंगावर लयबद्ध असे बोल किंवा तुकडे वाजविले जातात व त्यावरच या नृत्यांतील विविध तालबद्ध क्रिया आधारलेल्या असतात. अतिभंग व त्रिभंग यांना ओडिसी नृत्यांत महत्त्वाचें स्थान आहे.

नाट्यशास्त्रांत अवंती, दाक्षिणात्य, पांचाली व ओड्र-मगध अशा चार प्रादेशिक नृत्यपद्धतींचा उल्लेख आहे. ओड्र म्हणजेच ओडिसाची ओडिसी नृत्यपरंपरा होय. या नृत्यांत शरिराचीं डौलदार वळणें व लवचिक हालचाली, यांचें सुंदर दर्शन घडतें. [रागिणीदेवी]

ओड्ड भारताच्या सर्व भागांत पसरलेली एक जात. या लोकांना बेलदार, ओड्डे, वोड्डे, वड्डर, वडार व ओर्ह असेंहि म्हणतात. हे लोक स्वतःला क्षत्रिय समजतात. ओड्र अर्थात् ओडिसा या प्रदेशाशीं यांचा संबंध असावा. प्रांतपरत्वें यांचे अनेक पोटभेद आहेत. हे लोक खेड्यापाड्यांत राहून विहिरी खणतात, तलाव बांधतात व रस्ते आणि कालवेहि खणतात. इतरहि माती – दगडाचीं कामें यांना चांगलीं करतां येतात. किंबहुना अशा कामांवर हे लोक आपला विशेष हक्क सांगतात. हे लोक अशिक्षित व अडाणी आहेत. मात्र ते खुल्या दिलाचे व सुस्वभावी असतात. मजुरीचा पैसा मिळाला, की तो मात्र लगेच चैनींत उडवून टाकतात. या त्यांच्या स्वभावाविषयीं एक दंतकथा सांगतात, ती अशी–




ओड्ड स्त्री-पुरुष

प्राचीन काळीं देवांना व माणसांना पाणी मिळावें म्हणून ओड्डांना एक तलाव खोदण्याचें काम देण्यांत आलें. तें काम पुरें झाल्यावर ते आपली मजुरी मागूं लागले, तेव्हा शिवाने प्रत्येकाच्या कपाळीं अंगारा लावला. घरी येऊन पाहतात, तों त्या अंगाऱ्याचें नाणें बनलें. पण तेवढ्यानें संतुष्ट न होतां, ते शिवाकडे आणखी अंगारा मागूं लागले. तें पाहून शिव रागावला व त्याने ओड्डांना शाप दिला, कीं 'जंगलांत खणण्याच्या कामाचा जो पैसा तुम्ही मिळवाल, तो जंगलांतून बाहेर येतांच नाहीसा होईल.'

हा शाप ऐकून पार्वतीला ओड्डांची दया आली. तिनें त्यांना पुष्कळ द्रव्य देण्याविषयीं शिवाला विनविलें. मग शिवाने एका कोहळ्यांत सुवर्णनाणीं भरून तो कोहळा ओड्डांच्या मुकादमाच्या हस्तें ओड्ड ज्या जागीं काम करीत होते, त्या जागीं जमिनींत पुरून ठेवला. पुढे थोड्याच वेळाने एक रेडा तिथे आला व त्याने ती जागा आपल्या शिंगांनी उकरली. त्यामुळे तो पुरलेला कोहळा वर आला. पण ओड्ड असे अडाणी, की त्यांनी त्या कोहळ्यांत काय आहे तें न पाहतांच तो कोहळा अल्प किंमतींत एका कोमट्याला विकून टाकला.

ओड्ड हे खाण्यापिण्याच्या बाबतींत कोणतेहि निर्बंध पाळीत नसले, तरी ते उच्च जातींच्या घरींच अन्नग्रहण करतात. पण तरीहि बहुतेक शूद्र जाती यांना आपल्याहून हलकें मानून यांचा तिरस्कार करतात. यांच्यांत बहुपत्नीकत्व व घटस्फोट अशा दोन्ही चाली आहेत. बायकांना अठरा वेळा पाट लावतां येतो.



ओड्डांची झोपडी

आणि त्यानंतर मात्र तिला त्या कामीं बंदी होते. ही मर्यादा पुरुषांना लागू नाही. सात नवरे केलेली स्त्री सन्माननीय समजली जाते व अशा स्त्रीने लग्नांत वधू-वरांना आशीर्वाद देणें हें मंगलकारक समजतात. एका कुळांत लग्नें करीत नाहीत. आते-मामे बहीणींशीं लग्नें करतात. लग्नांतले पुरोहित त्यांच्याच जातीचे असतात.

हे लोक व्यंकटरमण, नरसोबा, महादेव, यल्लम्म, अंक्कम्म इ. देवतांना भजतात. यल्लमाची वार्षिक जत्रा करतात. कुदळ हें या जातीचें देवक आहे.

कल्लु व मन्नु अशा यांच्या दोन पोटजाती आहेत. कल्लु दगडांचें व मन्नु मातीचें काम करतात. पोटजातींत लग्नसंबंध होत नाहीत. कारण कल्लु स्वतःला श्रेष्ठ समजतात. मन्नु लोक उंदीर, साळू व खवलें मांजर खातात. वरील दोन पोटजातीं-शिवाय बंडोल्लु, बोच्छोल्लु, अशा आणखी २४ उपजाती त्यांच्यांत निर्माण झाल्या आहेत. अरशिन (हळद), हुविन (फुलें), होन्न (सोनें) व अक्षंतल (अक्षता) हीं या पोट-जातींचीं देवकें होत.

गुजरातेंत या लोकांना जयसिंह सिद्धराज याने पाटण येथील सहस्रलिंग तलाव खोदण्यासाठी आणलें, अशी दंतकथा सांग– तात. दुसरी दंतकथा अशी–

तलाव खाणणाऱ्या एका सुंदर ओड्ड स्त्रीवर जयसिंह सिद्ध-राजाचें मन जडलें. त्याने तिला वश करण्याचा प्रयत्न केला; पण ती वश झाली नाही. म्हणून जयसिंह सिद्धराज तिचा छळ करूं लागला. त्या छळाला कंटाळून तिने आत्महत्या केली. मरतांना तिने राजाला शाप दिला, की 'तळयांत पाणी राहणार नाही व इतःपर कोणीहि ओडाणी स्त्री रूपवती निपजणार नाही.'

ही दंतकथा खरी खोटी कशीहि असो; पण एवढें खरें, की ओड्डांच्या बायकांना रूप नसतें.

अन्य जातींतील लोक ओड्डांच्या जातींत येऊं शकतात. पर– जातीचा माणूस आपल्या जातींत घेतांना ते प्रथम त्याचें क्षौर करतात, लिंबाच्या जळत्या काठीने त्याच्या जिभेच्या टोकाला डाग देतात व मग त्याला तीर्थ पाजतात. स्त्रीचें जात्यंतर करायचें झाल्यास तिचें क्षौर करीत नाहीत; पण तिची चोळी बांगडी काढून घेतात. [रजःकण; का. ट्रा. स. इं.; मुं. इ. जा.]

ओढणी

भारताचा मध्यदेश व माळवा यांतील स्त्रिया डोकें झाकण्यासाठी ज्या वस्त्राचा उपयोग करतात, त्याला ओढणी म्हणतात. तलम कापडावर सुंदर वेलबुट्टी काढून त्याचा कांही भाग डोक्याच्या मागील बाजूस व दोन्ही खांद्यांवर शोभून दिसेल, अशा प्रकारें ओढणी तयार करतात. सुंदर केशरचनेचा कांही भाग नजरेस पडावा, अशा रीतीने ओढणी डोक्यावर टाकतात. चेहऱ्याचें सौंदर्य खुलून दिसावें हाहि हेतु त्यांत असतो. मध्ययुगांत ओढणी फार लोकप्रिय होती.

ओणम्

केरळांतला एक मोठा सण. हा चिंगम् (आश्विन) मासाच्या शुक्लपक्षांत, श्रवण नक्षत्र येईल त्या दिवशीं साजरा करतात. श्रवणालाच केरळांत तिरु ओणम् असें नांव आहे. त्याआधी दहा दिवस हस्त नक्षत्र येतें व त्या दिव-सापासून त्या सणाला प्रारंभ होतो. या सणासाठी केरळांत घरांची रंगसफेती करतात. घराचा दर्शनी भाग फुलांनी शृंगा-रतात. गृहिणी घरापुढचें अंगण सारवितात व त्यावर बहुरंगी रांगोळी व तिच्यावर फुलांची रचना करतात. गावांत व रानांत हिंडून फुलें गोळा करणें, हें मुलांचें काम असतें. दहा दिवसांपर्यंत अशी पुष्प-शोभा केल्यावर श्रवण नक्षत्राच्या मुख्य दिवशीं वामनाची शंकूच्या आकाराची मृण्मय मूर्ति करून ती अंगणांत बस-वितात व तिच्याभोव-तीहि पुष्पशोभा करतात. प्रथम सर्व मिळून 'आरप्पु' असा उद्घोष करतात. हा एक मंगल-ध्वनि व हर्षध्वनि असतो. मग वामनाची पूजा करतात. या वेळीं घरांतलीं सर्व माणसें नटूनथटून तिथ उभीं राहतात. वामनाला ते तृक्काक्करप्पन् असें म्हणतात. त्या दिवशीं घरोघरीं मिष्टान्नभोजन असतें. भात, भाज्या, पापड, फळे, खीर व पिकलेल्या केळ्यांचे तळलेले तुकडे, हे पदार्थ त्या दिवशींच्या भोजनांत आवश्यक असतात.



वामनाची पूजा

हा एक शारदीय उत्सव आहे. प्राचीन कालापासून तो केरळांत प्रचलित आहे. केरळ प्रदेश तमिळनाडपासून अलग होण्याच्या पूर्वी पासून हा उत्सव त्या भागांत चालत आल्याचें प्रत्यंतर तमिळ आळवारांच्या कित्येक भक्तिगीतांतून मिळतें. केवळ वामनाचाच नव्हे; तर भगवान् श्रीविष्णूचे सर्व अवतार ओणम्च्या दिवशींच झाले, ही आळवारांची श्रद्धा त्यांच्या कित्येक अवतारगीतांवरून दिसून येते. आजहि तमिळनाड-मधील वैष्णव ओणम्च्या दिवशीं भगवंताचा विशेष पूजोत्सव करतात. हे दोन प्रदेश विभक्त झाल्यावर तमिळनाडमध्ये ओणम्ला फक्त पंथीय स्वरूप राहिलें व केरळांत तो सार्व-जनिक झाला. कर्नाटकाच्या समुद्रकिनाऱ्याच्या भागांतहि गंगावळी नदीपर्यंत ओणम्च्या उत्सवाचे अवशेष दिसतात.

ओणम् उत्सव कसा व कां सुरू झाला, त्याविषयींची

आख्यायिका पुढीलप्रमाणे आहे–

बळिराजाने पृथ्वी आणि स्वर्ग जिंकून साम्राज्य स्थापलें. त्याच्या राज्यांत प्रजेला अपार सुखशांति मिळाली. लोक देवांना विसरून दानवमहिमा गाऊं लागले. देवांना हा अपमान सहन न होऊन त्यांनी आपलें महत्त्व वाढविण्यासाठी विष्णूची प्रार्थना केली. विष्णूने 'वामन' अवतार घेऊन बळीकडे त्रिपाद भूमीची याचना केली आणि त्या प्रसंगांत बळीला पातळांत दडपलें. पातळांत जाते वेळीं बळीने वामनापाशीं एवढेंच मागितलें, की वर्षांतून एकदा पृथ्वीवर येऊन आपल्या प्रजेचा समाचार घेण्याची आपल्याला मोकळीक असावी. वामनाने 'तथास्तु' म्हटलें. त्या दिवसापासून आश्विन मासीं बळिराजा एकदा पृथ्वीवर आपल्या प्रजेला भेटण्यासाठी येतो आणि त्या प्रजावत्सल राजाला आपलीं दैन्य-दुःखें दिसूं नयेत म्हणून केरळी प्रजा आनंदोत्सव करते. बळि राजा लोकांचा तो उल्हास पाहतो आणि आपली प्रजा पूर्ववत् खुशींत आहे, असें समजून परत स्वस्थानीं जातो.


समस्त केरळाची बळिराजावर महान् श्रद्धा आहे. ही श्रद्धा सूक्ष्म रूपाने महाराष्ट्रांतहि दिसून येते. दिवाळीच्या पाडव्याला मराठी जनताहि 'बळीचें राज्य येवो' अशी आकांक्षा उद्‌घोषित करते. वाल्मीकि रामायण व प्रादेशिक भाषांतलीं अनेक रामायणें यांमध्ये रामराज्याविषयीं ज्या कल्पना दिसून येतात, त्या सर्व कल्पना केरळी जनतेने बळीच्या म्हणजेच एका असुराच्या राज्याला लावलेल्या आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पाट्टुकाव्यांत एक केरळी लोककवि बळीच्या राज्याची पुढीलप्रमाणे प्रशंसा करतो–

मावेली नाट्टु वाणीटुम कालम ।
मानुष रेल्लारु मोन्नुपोले ।
कळ्ळवुमिल्ला चतियुमिल्ला ।
एळ्ळोळमिल्ला पोळिवचनम ।

अर्थ– जेव्हा मावेलि (महाबलि) राजा राज्य करीत होता, तेव्हा सर्व माणसें समान होतीं. राज्यांत चोरी नव्हती, कपट नव्हतें व लोक तिळाएवढेंहि खोटें बोलत नव्हते.

या उत्सवावर मलयाळम् भाषेंत दोन अतीव सुंदर काव्यें निर्माण झालीं आहेत. एक विल्वत्तथु राघवन् नंबियार याचें 'अरण्मुलाविलासम्' व दुसरें पेरुंपरा वासुदेव भट्टाथिरि याचें 'उट्ट्रितथि चरितम्'. याशिवाय कुंचन् नंबियार यानेहि आपल्या काव्यांत या उत्सवाचें मनोरम वर्णन केलें आहे.

केरळांतील सामाजिक व कौटुंबिक जीवनांत स्नेह–सौहार्द उत्पन्न करणारा हा एक महान् उत्सव आहे. मलबारांतलीं माणसें दूर देशांत असलीं, तरी बहुधा ओणम्च्या सणाला घरीं येतात. या वेळीं माहेरीं गेलेली मुलगी सासरीं आलीच पाहिजे, असा नियम आहे. जुन्या काळीं माहेरवाशीण सासरीं न आल्यास तेवढा एकच अपराध विवाहविच्छेद करायला किंवा कुटुंबांतून तिला काढून लावायला पुरेसा होत असे. ओणम्च्या दिवसांत घरांतील माणसांना आणि नोकरचाकरांना नवीं वस्त्रप्रावरणें मिळतात. खंडकरी कुळें त्या दिवशीं आपल्या धन्याला केळीं, काकड्या, कारंदे इ. वस्तूंची भेट पाठवितात, जमीनदार त्यांना गोड-धोड जेवण वाढतात. ओणम्च्या दिवसांत तिकडचे लोक चेंडूचा एक खास खेळ खेळतात. त्याला नाटन पंतुकळि असें नांव आहे.



ओणम्‌मधील लुटुपुटीची लढाई

याशिवाय किळितट्टु, कुंतिक्कळि असे आणखीहि कांही मैदानी खेळ आहेत. बुद्धिबळें पलॉन्कुगि, पल्लुकळि हे त्या दिवसांतले घरबैठे खेळ होत. या दिवसांत बायका मुली दुपारीं व रात्रीं एकत्र जमून नृत्य करतात. त्याला कैकोट्टिक्कळि असें नांव आहे. पुरुष लुटुपुटीची लढाई खेळतात. या उत्सवांत वाद्यांच्या, तिरंदाजीच्या, मल्लयुद्धाच्या अशा अनेक स्पर्धा घडवून आणतात. नौकास्पर्धा ही त्यांतली सर्वश्रेष्ठ स्पर्धा होय. या स्पर्धेला वंचिकळि असें नांव आहे.

उत्सवाच्या चौथ्या दिवशीं या नौकास्पर्धा होतात. केरळांत नावाडी लोकांची संख्या फार मोठी आहे. त्यामुळे ते लोक तिथल्या नद्यांत आणि खाड्यांत आपल्या होड्या सोडतात. त्यांत चुंडन् या सर्वांत मोठ्या होडीपासून घरगुती बनावटीच्या पन्हळी होड्यांपर्यंत सर्व लहान-मोठ्या होड्या या नौकाविहारांत भाग घेतात. या नौकांचें पुढील टोक एखाद्या बगळ्याच्या मानेसारखें उंच असतें. चढाओढींत भाग घेणारे नावाडी शुभ्र वस्त्रें आणि शुभ्र शिरोवेष्टनें वापरतात. वल्हीं मारणारे, गाणीं म्हणणारे, वाद्यें वाजविणारे असे अनेक लोक त्या होड्यांत खेचून भरलेले असतात. नदीच्या कांठावर माणसांची कतार उभी असते. रंगीबेरंगी पताका लावलेल्या त्या होड्या वेगाने नदींतून पाणी कापीत जाऊं लागल्या, की तें दृश्य मोठें मनोवेधक व उत्साहवर्धक दिसतें.

पंपा नदीच्या किनाऱ्यावर आरन्मुळा या गांवीं होणारा नौकाविहार केरळांत विशेष प्रसिद्ध आहे. त्याच्यामागे एक

आख्यायिका आहे, ती अशी–

तीर्थयात्रेला निघालेला अर्जुन कन्याकुमारीपर्यंत जाऊन तिथून परत इंद्रप्रस्थाकडे जायला निघाला होता. त्याच्याजवळ पार्थसारथीची (कृष्ण) एक मूर्ति होती. तो पंपा नदीवर येतो, तर तिला महापूर आलेला व तरी-होड्या बंद झालेल्या. अशा स्थितींत एक नावाडी धाडस करून पुढे आला आणि त्याने अर्जुनाला आपल्या होडींत बसवून महाप्रयासाने त्या महापुरांतून पैलतीराला नेलें. नदी पार झाल्यावर अर्जुनाने आपल्याजवळची पार्थसारथीची मूर्ति तिथेंच स्थापन केली. कालांतराने लोकांनी मग तिच्यावर मंदिर उभारलें. त्या घटनेच्या स्मरणार्थ आरन्मुळा येथे पुढे प्रतिवार्षिक नौकोत्सव सुरू झाला. [सुभद्रा तंपुरान; इं. फो. लो.; केरळ; युगप्रभात]

ओतत्तू दक्षिण भारतांतील नायरांपैकी जे लोक कौलें करतात व ब्राह्मणांचीं घरें आणि देवळें शाकारतात, त्यांना हें नांव आहे. [का. ट्रा. स. इं.]

ओतारी महाराष्ट्र व मध्यप्रदेश यांत आढळणारी एक जात. हे लोक धातूंचें ओतकाम करतात, त्यावरून यांना हें नांव मिळालें आहे. यांचे गोंडाद्य अर्थात् गोंड ओतारी व मराठा ओतारी असे दोन प्रमुख भेद आहेत. त्यांच्यांत लग्नसंबंध होत नाहीत. हे स्वतःला क्षत्रिय समजतात. महाराष्ट्रांत अहीर, वेद्रे, धनगर, गोटपागर, मगरघाट, महाडिक अशीं यांचीं आडनांवें आहेत.

हे लोक दसऱ्याच्या दिवशीं तुळजापूरच्या अंबाबाईला बकरा बळि देतात. पैठणच्या कालकादेवीला हे आपली कुलस्वामिनी मानतात व बहिरोबा, खंडोबा, भवानी, नागजी इ. देवतांना भजतात.

हे मामेबहिणीशीं लग्न करतात. विधवाविवाह रूढ असला, तरी अविवाहिताला विधवेशीं लग्न करतां येत नाही. पूर्वी यांच्यामध्ये राक्षसविवाह प्रचलित होता. एखाद्याने एखाद्याच्या मुलीला मागणी घातली आणि त्याने झिडकारली, तर त्या मुलीला पळवून नेलें जाई. पुढे तिच्या बापाला देज म्हणून कांही रक्कम देऊन तिचें इष्ट वराशीं लग्न लावीत.

मृतांना जाळतात किंवा पुरतात. वार्षिक श्राद्ध करतात. यांना मद्यमांस चालतें. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

ओत्तिकुंड दक्षिणेंतील कम्म जातीची एक शाखा. हे एका कुळींत विवाह करीत नाहीत. बाकी सर्व व्यवहार कम्मांप्रमाणेच करतात.

ओत्तैसेक्कण दक्षिण भारतांतील वलियन जातीची एक शाखा. हे लोक आपल्या तेलघाण्याला एकच बैल जुंपतात. [का. ट्रा. स. इं.]

ओदन भाताला संस्कृतांत ओदन असें नांव आहे. हें प्राचीन काळापासून लोकांचें प्रिय भोजन आहे. ओदन भोजनाच्या सुरवातीलाच वाढण्याची प्रथा आहे. जेवायला बसणारा माणूस पानांत वाढलेल्या भाताचे प्रारंभींच दोन विभाग करी. त्यांतील एक भाग भोजनारंभीं खाणें व दुसरा भोजनान्तीं खाणें, अशी पद्धत होती आणि आहे. प्राचीन वाङमयांत ओदनाचे अनेक प्रकार वर्णिलेले आहेत. शुद्ध पाण्यांत शिजविलेल्या भाताला उदौदन म्हणत (अष्टा. ६.३. ७). मांसाबरोबर शिजविलेल्या भाताला मांसोदन म्हणत. यालाच हल्ली आपण पुलाव म्हणतों. दुधाबरोबर शिजविलेल्या भाताला क्षीरौदन म्हणत. त्यांतच साखर घातली, की तीच खीर बने. याशिवाय दध्योदन (दहीभात), घृतौदन (तूप घालून शिजविलेला भात), मुद्गौदन (मुगांची खिचडी) असे अनेक प्रकार शतपथांत उल्लेखिलेले आढळतात (श. ब्रा. २. ५. ३. ४; १०. ५. ७. ५). चरकानेहि ओदनांच्या अनेक प्रकारांचा उल्लेख केला आहे.

ओदन=भात=चरु. हें एक हविर्द्रव्यहि आहे. ग्रहयज्ञांत व इतर अनेक देवतांच्या हवनांत चरूचा समावेश असतो. ग्रामदेवता व क्षुद्र देवता यांनाहि कोंबड्या-बकऱ्याबरोबर भाताचा बळी देतात. श्राद्धांत पिंडहि भाताचेच करतात. **पाहा– चरु.** [पा. भा.; वे. इं.]

ओदनसव एक सोमयाग. शिजविलेला भात हें यांतील मुख्य हविर्द्रव्य असतें. या यागांत चार वर्णांचे चार पुरुष अनुक्रमें तूप, दूध, दही व पाणी यांत भाजलेल्या सातूंचें पीठ कालवून त्याने भरलेलें प्रत्येकी एक पात्र यजमानाला देतात. त्या चारी पात्रांना स्पर्श करून यजमान कांही मंत्र म्हणतो. नंतर हुतशेष भात भक्षण करतो. शेवटीं वरील चारी पात्रांतल्या पिठाच्या मिश्रणाने यजमानाला अभिषेक केला जातो. [म. ज्ञा. को.–वेदविद्या]

ओदुव तिरुमलाम्बा ही महान् कवयित्री प्रथम विजयनगरचा राजा अच्युतराय याच्या पदरीं काव्यगान करणारी सेविका होती. पुढे त्याच राजाने तिच्याशीं लग्न केलें. ती अतिशय लावण्यवती होती. तिच्या अंगीं प्रतिभेप्रमाणेच विद्वत्ताहि होती. काव्य, नाट्य, संगीत,

व्याकरण, तत्त्वज्ञान इ. विषयांत तिची उत्तम गति होती. तिला अनेक भाषांत बोलतां व लिहितां येत असे. राजाची पट्टराणी वरदाम्बिका ही होती. तिच्याशीं अच्युतरायाचा विवाह झाला, त्या समारंभाचें वर्णन तिने 'वरदाम्बिका-परिणयचम्पू' या संस्कृत ग्रंथांत केलें आहे या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत स्वत:विषयीहि तिने कांही माहिती दिली आहे. राजाची राणी झाल्यावर तिने अनेक पंडितांना, कवींना व देवालयांना उदार देणग्या दिल्याचे उल्लेख आहेत. [ग्रे. वि. इं.]

ओदुवार शैव देवस्थानांत तेवारम् या ग्रंथामधील स्तोत्रांचें पठण करण्याचें काम जे लोक करतात, त्यांना ओदुवार असें नांव आहे. [का. ट्रा. स. इं.]

ओद्दिलु आंध्रांतली एक जात. हे लोक गोदावरींत तराफे चालवितात. जातीच्या देवता यांच्या ताब्यांत असतात, त्यामुळे यांना इतर जातींपेक्षा अधिक मान असतो. [का. ट्रा. स. इं.]

ओध पंजाबांतील एक जात. यांच्यांतले कांही लोक मुसलमान झाले आहेत. हे मजुरी करतात व कामाच्या शोधार्थ बायका-मुलांसह गांवोगांव भटकतात. हे ओडकी नांवाची भाषा बोलतात. [म. ज्ञा. को.]

ओपश स्त्रियांच्या केशरचनेचा विशिष्ट प्रकार. या प्रकारांत केस डोक्याभोवती गोलाकार लपेटीत व डोक्यावर मध्यभागीं त्यांची गांठ बांधीत. हा शब्द ऋग्वेद, अथर्ववेद, वाजसनेयि संहिता, पंचविंश ब्राह्मण इ. ग्रंथांत आढळतो (ऋ. १०.८५.८; अथर्व. ६.१३८.३; वाज. सं. ११.५०; पं. ब्रा. ४.१.१).

ऋग्वेदांत सिनीवालीला स्वौपशा (=जिची ओपशरचना सुंदर आहे), असें म्हटलें आहे. ओपश शब्दाचा मूळ अर्थ शिंग असाहि असू शकेल. कारण पंचविंश ब्राह्मणांत पशूंना 'द्विओपशाः'=दोन शिंगें असलेले, असें म्हटलें आहे (१३.४.३). ऋग्वेदांत 'इंद्राचा किरीट' या अर्थीहि हा शब्द वापरलेला आढळतो. [वै. सा. सं.; वे. इं.]

ओपोटो दक्षिणेंतील गावडा जातींतील लोकांपैकी जे लोक पालख्या वाहण्याचें, काम करतात, त्यांना हें नांव आहे. [का. ट्रा. स. इं.]

ओप्पनक्कारण दक्षिणेंतील बलिज जातीचा एक पोटविभाग. हे लोक तेलुगु भाषा बोलणारे व्यापारी व शेतकरी असतात. [का. ट्रा. स. इं.]

ओप्पोमरंगो दक्षिणेंतील भोंडारी जातींतला एक पोटविभाग. [का. ट्रा. स. इं.]

ओबरी राजस्थानांतलीं मुलें पावसाळ्यांत बाग, महाल, स्तूप, घर इ. गोष्टी बनवून जो खेळ खेळतात, त्याला हें नांव आहे. महाराष्ट्रांत दिवाळीच्या वेळीं मुलें किल्ले बनवितात, तशांतलाच हा प्रकार आहे. [मरुभारती]

ओभास गाथा (सं. अवभास गाथा) बौद्ध संघांतल्या भिक्षु-भिक्षुणींना धीर देण्यासाठी किंवा त्यांची श्रद्धा दृढ करण्यासाठी भगवान् बुद्ध स्वतः दूर असला तरी स्वतःचा रूपाविर्भाव त्या भिक्षु-भिक्षुणींच्या पुढे उभा करी व त्याच्या मुखाने एखादी गाथा म्हणे. अशा गाथेला वरील नांव आहे.

ओमनगुंटल आंध्रांतला एक प्राचीन खेळ. लाकडाच्या पाटावर १४ खड्डे बनवायचे व त्यांत चिंचोके भरायचे आणि उपसायचे, असें या खेळाचें स्वरूप होतें.

ओमनैटो ओरिया शेतकऱ्यांची दक्षिणेंतील एक जात. आपला मूळ पुरुष अयोध्येंत श्रीरामाचा एक अमात्य होता, असें हे लोक सांगतात. या जातीच्या बोडो (मोठे) आणि सन्नो (हलके) अशा दोन पोटजाती आहेत. बोडोंच्या आणखी आठ उपजाती बनलेल्या आहेत.

विवाहप्रथा– यांच्यांत बाल व प्रौढ असे दोन्ही प्रकारचे विवाह होतात. हे आते-बहिणीशीं लग्न करतात. देसारी हा त्यांचा पुरोहित असतो व तोच लग्नविधि चालवितो. घटस्फोट व विधवाविवाह रूढ आहे.

मर्तिकप्रथा– हे लोक प्रेतें जाळतात. दहा दिवस सुतक पाळतात. अकराव्या दिवशीं ज्ञातिभोजन घालतात. या भोजनांत दारू वर्ज्य असते.

ठाकुराणी व चामरिया या यांच्या देवता होत. ते चैत्रांत त्यांचा वार्षिक उत्सव करतात. यांची पंचायत असते व तीच जातीचे न्यायनिवाडे करते. हे लोक आपल्याला नायको म्हणवितात. पण यांच्यांत जे श्रीमंत असतात, ते स्वतःला पात्रो म्हणवितात. [का. ट्रा. स. इं.]

ओम् उद्गारवाचक वर्ण. यालाच प्रणव असेंहि म्हणतात. ऋग्वेद व अथर्ववेद या दोन्ही वेदांत हा वर्ण आढळत नाही. प्राचीन यज्ञयागांत व लौकिक मंत्र-तंत्रांत ओंकार प्रचारांत असल्याचें दिसत नाही. तै. संहितेंत एकदाच तो प्रणव या संज्ञेने दिसतो. ॐ प्रतिष्ठ व ॐ श्रावय अशी वाक्यें वाजसनेयी व मैत्रायणी या संहितेंत आढळतात. प्रतिज्ञापूर्वक विधान या अर्थी ओंकाराचा उपयोग प्रथमच ब्राह्मणग्रंथांत केलेला दिसून येतो. यज्ञप्रसंगीं होकार दर्शविण्यासाठी ओंकाराचा उपयोग शतपथ ब्राह्मणांत पुष्कळ वेळां केलेला आहे.

या वर्णाचा उद्भव कसा झाला, त्यावद्दल निश्चित उपपत्ति मिळत नाही. माक्स म्यूलर याच्या मतें अव् या सार्वनामिक मूलरूपापासून हें अक्षर उत्पन्न झालें, त्याचेंच अवम् असें रूप बनलें व पुढे संप्रसारण क्रियेने त्याचें अउम् असें रूप होऊन त्याच्यापासून सामान्य ध्वनीच्या संधिनियमाप्रमाणे ॐ हें अक्षर बनलें.

पण रोट व बोथलिंग या दोघां पंडितांनी शास्त्रीय पुराव्याच्या अभावीं वरील उपपत्ति त्याज्य ठरविली आहे. त्यांच्या मतें ॐ हा वर्ण 'ओ' या ध्वनीचें सानुनासिक उद्गारस्वरूप असून 'आ' या ध्वनीशीहि त्याचा संबंध आहे. या उपपत्तीला वैदिक वाङ्मयांतच पुरावा आढळतो, तो असा– 'ॐ श्रावय' या वैदिक वाक्याबद्दल सूत्र ग्रंथांत 'ओ श्रावय' व 'आ श्रावय' अशीं वाक्यें वापरलीं जातात. उच्चार करतांना ध्वनींना अनुनासिकत्व प्राप्त होणें, ही वैदिक भाषेची सर्वसामान्य प्रवृत्ति आहे.

प्रणव या ओंकारवाचक शब्दापासूनहि या वर्णाच्या उत्पत्तीवर कांहीसा प्रकाश पडूं शकेल. कारण श्रौतांत 'पुरोनुवाक्या' मंत्र म्हणत असतां शेवटच्या अक्षराचा दीर्घ सानुनासिक उच्चार करणें व त्यांत 'ओ' हा वर्ण मिळविणें, असा प्रणव या शब्दाचा मूलार्थ आहे. आणि त्यावरूनच ॐ हा वर्ण उत्पन्न झाला असावा, असें वाटतें. पाणिनीनेहि 'ओमाङोश्च' या सूत्रांत नियम सांगितला आहे, की ॐ पूर्वीचा ऱ्हस्व किंवा दीर्घ 'अ' यांत अउम् असा बदल न होतां ओंकारच कायम राहून पूर्वींच्या 'अ' चा लोप होतो (अष्टा० ६. १. ९). ब्राह्मणें व तदुत्तर उपनिषदें यांच्या कालांत ओंकारामध्ये गूढवाद प्रविष्ट झाला. अनेक रहस्यात्मक अर्थ ओंकाराला येऊन चिकटले. सर्वप्रथम ऐतरेय ब्राह्मणाने म्हटलें, की ओंकारांत अउम् अशीं तीन अक्षरें असून तीं 'भूर्भुवःस्वः' या तीन व्याहृतींपासून निघालीं आहेत. तैत्तिरीय उपनिषदांत, ॐ हें ब्रह्म असून जगाचे उत्पत्ति-स्थिति-लय त्याच्याच आश्रयाने चालू असतात, असें म्हटलें आहे (१. ८). कठोपनिषदांत त्याच्याविषयी पुढील मंत्र आला आहे–

सर्वे वेदा यत्पदमामनन्ति ।
तपांसि सर्वाणि च यद्वदन्ति ॥
यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति ।
तत्ते पदं संग्रहेण ब्रवीम्योमित्येतत् ॥

(१. २.)

अर्थ– सर्व वेद ज्या पदाची घोषणा करतात, सर्व तपें ज्याच्याविषयी बोलतात, (व) ज्याची इच्छा करणारे ब्रह्मचर्याचें आचरण करतात, तें पद तुला संक्षेपाने सांगतों, की तें ॐ हें आहे.

गोपथ ब्राह्मणाच्या प्रणवोपनिषदांत ओंकाराच्या गूढार्थाची परिसीमा झाली आहे. वेद, छंद, इतिहास–पुराणें, गीत–नृत्य इ. सारें कांही ओंकारापासून उत्पन्न झालें, असें सांगितलें आहे.

अ + उ + म् + ँ मिळून ओंकार बनतो. ओंकाराचे हे चार विभाग जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या या चार अवस्थांचे, तसेच विश्व, तैजस, प्राज्ञ व आत्मा अशा चार आत्मस्वरूपाचे निदर्शक मानलेले आहेत. त्याचप्रमाणे अकार हा विष्णु, उकार हा महेश्वर, मकार हा ब्रह्मा अशा प्रकारें तीन्ही देवांचाहि ओंकारांत समावेश केलेला आहे.

उपनिषदांनी प्रणवाच्या गूढार्थाचा विकास केला, त्याचबरोबर श्रौतसूत्रांनी प्रणवाच्या यज्ञसंबंधीं विनियोगाचें विवेचन केलें. धर्मसूत्रांपैकी बौधायन धर्मसूत्रांत त्रैवर्णिकाने करायच्या प्रणवोच्चारपूर्वक वेदाध्ययनालाच ब्रह्मयज्ञ म्हटलें. दुर्गादास नामक वैय्याकरण म्हणतो, की ओंकार हा ब्रह्मदेवाचा कंठ भेदून बाहेर आल्यामुळे तो मांगलिक ठरला आहे. वेदाध्ययनांच्या आरंभीं व अध्ययनसमाप्तीच्या वेळीं ओंकाराचें उच्चारण केलें पाहिजे आणि तसें जो न करील त्याचें तें वेदाध्ययन हळूहळू नाश पावेल, असें मनूनेहि म्हटलें आहे (२. ७४). पुढे प्रायश्चित्त प्रकरणांतहि प्रणवोच्चाराला महत्त्व दिलें गेलें. दररोज प्रणवोच्चारपूर्वक सोळा प्राणायाम महिनाभर केल्याने ब्रह्महत्त्येचाहि दोष नष्ट होतो, असें सांगितलें आहे. मंत्र–तंत्रात्मक अभिचार कर्मांतहि प्रणवोच्चाराला किती महत्त्व आलें, तें कौशिक सूत्रावरून कळतें.

भारतीय तत्त्वज्ञानात्मक वाङ्मयांत ओंकाराचें ध्यान हें ब्रह्मप्राप्तीचें एक साधन म्हणून सांगितलें आहे. पातंजल योगसूत्रांत 'तस्य वाचकः प्रणवः' इ. सूत्रांनी प्रणव हा ईश्वराचा वाचकवर्ण असून त्याची पुनःपुन्हा आवृत्ति करावी, त्याच्या अर्थाचें सतत अनुसंधान ठेवावें, म्हणजे त्यायोगें तत्त्वज्ञान होतें,

असें स्पष्ट सांगितलें आहे. त्यामुळे योगदर्शनांत ओंकाराचें महत्त्व फारच वाढलें आहे.

हिंदूंच्या सर्व वैदिक व लौकिक धर्मकृत्यांत मंत्राबरोबर ओंकाराचा उच्चार आवर्जून केला जातो. इ. स. च्या ६ व्या शतकापासून जे हस्तलिखित धर्मग्रंथ आढळतात, त्यांतहि मंगलाच्या उद्देशाने प्रणवपूर्वक ग्रंथारंभ केलेला आढळतो. जैन व बौद्ध यांनीहि ओंकाराचा स्वीकार केलेला आहे. 'ॐ मणिपद्मे हुम्' या अवलोकितेश्वराच्या मंत्रांत आरंभीं ओंकार आवश्यक रीतीने आलेला आहे. बौद्धदर्शनांत शून्यापासून प्रणवाची उत्पत्ति व त्यापासून विश्वाची उत्पत्ति झाल्याचें सांगितलें आहे.

पुराणवाङ्मयांत भिन्न भिन्न संप्रदायांच्या लोकांनी ओंकाराचा अर्थ आपापल्या विशिष्ट देवतेला धरून केलेला आहे. शिवपुराणांत ओंकाराला पंचमुख शिवाचें प्रतीक मानलें आहे. वैष्णवपुराणांत त्र्यक्षरात्मक प्रणवाला विष्णु, श्री व भक्त या तीहींचा द्योतक मानलें असून प्रणव म्हणजे तीन वेद, तीन लोक, तीन अग्नि व विष्णूचीं तीन पावलें असल्याचें सांगितलें आहे. प्रणवाच्या विनियोगाविषयीं गीतेंत पुढील श्लोक लिहिलेले आहेत –

ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।
ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥
तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ।
प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ॥

(गीता. १७. २३–२४)

अर्थ–परब्रह्माचा 'ॐ तत्सत्' असा तीन प्रकारें (शास्त्रांत) निर्देश केला जातो. या (च) निर्देशाने पूर्वीं ब्राह्मण, वेद व यज्ञ निर्माण केलेले आहेत. म्हणून ब्रह्मवादी लोकांचीं यज्ञ, दान, तप आणि इतर शास्त्रोक्त कर्में नेहमी ॐ असा उच्चार करून प्रवृत्त होत असतात.

म्हणूनच याज्ञवल्क्याने म्हटलें, की 'वेदांच्या आरंभीं प्रणव होता. वेदांचें पर्यवसानहि प्रणवांतच होतें. सर्व वाङ्मय म्हणजे प्रणवच होय. म्हणून प्रणवाचा अभ्यास करावा.' **पाहा–प्रणवोपासना.** [उपनिषदांचा अभ्यास; उ. र.; म. ज्ञा. को.]

ओम् मणिपद्मे हुम् वज्रयानी बौद्धांचा प्रसिद्ध मंत्र. त्यांच्याकडून तो हिंदूंच्या तंत्रमार्गांत दाखल झाला. हुम् हा शब्द प्रथम ध्यानी बुद्ध अक्षोभ्य याला उद्देशून उच्चारण्यांत आला होता. तोच पुढे हिंदूंच्या तंत्रग्रंथांत शिवाला उद्देशून वापरण्यांत आला आहे. वरदातंत्रांत या गूढमंत्राची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे —

ह शिवः कथितो देवि उ भैरव इहोच्यते ।
परार्थो नादशब्दस्तु बिन्दुर्दुःखहरार्थकः ॥

अर्थ – ह म्हणजे शिव-शिवाचें सौम्य रूप. उ म्हणजे भैरव-शिवाचें भयानक रूप. अनुनासिक नाद आणि बिंदु म्हणजे अनुक्रमें श्रेष्ठ व दुःखहारक होत.

हुम् याचा रंग निळा आहे. याचें कारण त्याचें नीलाकाशाशीं तादात्म्य आहे. म्हणून ध्यानी बुद्ध अक्षोभ्य याचा वर्णहि निळा मानलेला आहे. शिवाने समुद्रमंथनांतून निघालेलें हालाहल प्राशन केल्यामुळे त्याचा कंठहि निळाच आहे.

हुम् हा गूढ वर्ण वज्रयान पंथांतून हिंदूंच्या तंत्रमार्गांत आणला गेला, हें खरें असलें तरी त्याचें मूळ आपणांस वेदामध्येच आढळतें. हा वैदिक वर्ण असून त्याचा वैदिक यज्ञाशीं संबंध होता. यज्ञांतला प्रस्तोता हा मंत्र म्हणण्याच्या प्रारंभीं व प्रतिहर्ता प्रस्तोत्याला उत्तर देत असतांना या वर्णाचा उच्चार करी. श्रौतसूत्रांतहि याचा उल्लेख आहे. यावरून निश्चितपणे असें म्हणतां येतें, की हा वर्ण वज्रयान संप्रदायाच्याच नव्हे, तर बौद्ध धर्माच्याहि पूर्वींचा आहे. वैदिक यज्ञसंस्था मागे पडल्यावर या वर्णाने बौद्ध धर्मांत प्रवेश केला आणि तिथून हिंदूंनी पुनश्च तो आपल्या धर्मांत आणला.

या हुम्च्या मागे मणिपद्मे असा शब्द आहे. त्याचा अर्थ रत्नकमल असा होतो. तें सूर्योदयाचें प्रतीक मानलेलें आहे. सूर्योदयाचा संबंध प्राचीन कवींनी आत्मप्रकाशाशीं जोडलेला आहे. ऋग्वेदांत अग्नीविषयीं असा एक उल्लेख आहे, की अथर्वणाने अग्नीला पुष्करांतून मंथन करून प्रकट केलें (६. १६. १३). वेदांत अग्नीचा संबंध तेजस्वी हिरे-माणकांशीं व तत्सम सर्व श्रीमंतीशीं जोडलेला आढळतो. म्हणून आकाशांत प्रकाश देणारा, पृथ्वीवर विस्तव पाडणारा आणि प्राण्यांच्या उदरांत अन्न पचविणारा या अर्थीं हठयोगांत अग्नीला मणिपद्म म्हटलें आहे. थोडक्यांत सांगायचें तर हठयोगांतील मणिपूर पद्म हेंच मणिपद्म होय. त्याच्या निळ्या पाकळ्यांमध्ये हुम् हा निळा वर्ण वास्तव्य करतो, असें वज्रयानी बौद्ध मानतात. मणिपद्म हें वज्राचें महान् केन्द्र आहे. तिथे प्राणापान समतोलपणाने राहतात. सृष्टि आणि स्थिति म्हणजेच प्रजनन आणि जीवन यांची ती वेदि आहे. तिथूनच सर्व गूढ मंत्रांना प्रचोदना मिळते. सारांश 'ॐ मणिपद्मे हुम्' हा मंत्र जीवनशक्तीचें माहेरघरच आहे.

महायान बौद्ध ग्रंथांमध्येदेखील वज्रधर या आदिबुद्धाचा अक्षोभ्य या ध्यानी बुद्धाशीं निकटचा संबंध दाखविला आहे. त्यांनी हुम् हा महामंत्र वज्रधराशीं जोडलेला आहे. वज्रयानी लोक षडक्षरी लोकेश्वराचाहि या मंत्राशीं संबंध प्रस्थापित कर-

तात. इतकेंच नव्हे; तर लोकेश्वराला या गूढमंत्राचें दृश्य प्रतीक मानतात. धर्म, बुद्ध आणि संघ या त्रिरत्नांपैकी लोकेश्वर हें धर्माचें प्रतीक आहे. धर्म, लोकेश्वर व पशुपति शिव या सर्वांचें आसन पद्मासन हेंच आहे. मोहेंजोदडो येथे पशुपतीची पद्मासनस्थ व ध्यानमग्न मूर्ति सांपडली आहे. लोकेश्वराची मूर्ति सारनाथ येथे आढळते. हा लोकेश्वर चतुर्भुज असून त्याच्या उजव्या हातीं जपमाळ, डाव्या हातीं कमल आहे. षडक्षरी विद्या ' मणिपद्मे हुम् ' या मंत्राची शक्ति होय. ती मानवी स्त्रीच्या स्वरूपांत लोकेश्वरासन्निध दिसते. [श्री. प्रफुल्लचंद्र भंजदेव]

ओयिल आट्टम् तमिळनाडमधलें एक धार्मिक नृत्य. सुमारे २० पुरुष एका गटाने हें नृत्य करतात. तिरुचिरपल्ली, मदुराई व कोइंबतोर या जिल्ह्यांतल्या मंदिरांतील उत्सवप्रसंगींच हें केलें जातें. नृत्य करणारे लोक रंगीत कपडे घालतात. एका हातांत टिपरी व दुसऱ्या हातांत रंगीत रुमाल घेतात. मग रांगा किंवा वर्तुळ करून फिरतात. मग टिपरी देत व रुमाल फिरवीत नाचतात आणि गातात. [मार्च ऑफ इंडिया]

ओरकझाई वायव्य सीमा प्रांतांतली एक पठाण जमात. दौलतझाई, इस्माइलझाई, लष्करझाई व हमसाया असे तिचे चार पोटविभाग आहेत. ब्रिटिशांनी पठाणी स्वातंत्र्यावर घाला घातला, तेव्हा त्यांना पहिला प्रतिकार कोणी केला असेल, तर तो ओरकझाई टोळीच्या लोकांनी. त्या लढाईंत त्यांचा पराभव होऊन समाना हें त्यांचें महत्त्वाचें ठाणें त्यांना गमवावें लागलें. हे लोक पूर्वींचे शस्त्रजीवी; पण अलिकडे शेती करतात. **पाहा**–पठाण. [फ्रँटियर स्पीक्स]

ओरिग भक्तुडु दक्षिणेंतील भिक्षेकऱ्यांचा एक वर्ग. हे लोक फक्त पेरिके लोकांकडेच भिक्षा मागतात.

ओरुगंटी दक्षिणेंतील कापू व मुन्नाछ या जातींतला एक पोटविभाग. [का. ट्रा. स. इं.]

ओरुनाट्टु मदुराई जिल्ह्यांतील मारवार जातीची एक पोटजात. [मदुरा गॅझे.]

ओरुनुल दक्षिण भारतांतील मारान जातीचा हा एक पोटविभाग आहे. या जातींतील विधवा पुनर्विवाह करीत नाहीत. [का. ट्रा. स. इं.]

ओरुमन मलबारमधील एक जात. यांना चेरुमन असेंहि म्हणतात. हे लोक शेतकाम व मजुरी करतात. कित्येक लोक एखाद्या जमीनदाराकडे जन्माचे गुलाम असतात. ते आपल्या या गुलामांना दुसऱ्याच्या कामावरहि मजूर म्हणून धाडतात. सांप्रत त्यांची गुलामगिरींतून मुक्तता झालेली असली, तरी त्यांची आर्थिक परिस्थिति मात्र सुधारलेली नाही. इतिहासकाळांत हे लोक स्वतः जमीनदार होते व उत्तर त्रिवांकुरमध्ये या जातीचें एक राजघराणेंहि होतें. त्रिवेंद्रम् येथील कालीमातेच्या मंदिरांत जाण्यास या लोकांना प्रतिबंध आहे. मात्र तिच्या उत्सवांत एक दिवस मंदिरांत जाऊन त्यांना तिची पूजा हक्काने करतां येते. यांच्यांतहि अनेक पोटजाती आहेत. त्यांतली कणक्कन ही पोटजात श्रेष्ठ समजली जाते. हे लोक पितृपूजक आहेत. ते कुट्टीचत्तन आणि करिमकुत्ती या दोन शूर पूर्वजांना भजतात.

विवाहप्रथा– पोटजातींतच विवाहसंबंध करतात. उभय पक्षांतल्या वडीलधाऱ्या माणसांच्या संमतीने नियोजित वधू-वर लग्नापूर्वीच एकत्र राहूं लागतात. कुंवारपणीं त्यांना मुलेंहि झालीं तरी चालतात. पुढे कधीतरी दोन्ही पक्षांच्या संमतीने मुहूर्त ठरतो व त्यांचें लग्न होतें. लग्नाचा खर्च पूर्वी नवरदेवाचा मालक करीत असे.

मर्तिकप्रथा– मृताला बहुधा पुरतात. पुरलेल्या जागीं मातीचा उंचवटा करून तिथे मृताच्या मस्तकाच्या जागीं एक दगड ठेवतात. मर्तिकाच्या दिवशीं मयताचे नातलग उपास करतात व दुसऱ्या दिवशीं ज्ञातिभोजन घालतात. शेतीच्या हंगामांत एखाद्याचा मृत्यु झाल्यास दफनानंतरचा अंत्यविधि तहकूब ठेवून पुढे उन्हाळ्यांत शेतकाम संपल्यावर तो करतात. सुतक १५ दिवस पाळतात. पितरांचें वार्षिक श्राद्ध ताडी आणि भात वाढून करतात. [डॉ. सी. अच्युत मेनन–बी. सी. लॉ. कोमे. व्हॉल्यूम]

ओलाई दक्षिणेंतील पल्ली जातीची एक शाखा. हे लोक ओलाई नांवाचें कर्णवलय घालतात. त्यामुळे यांना हें नांव मिळालें आहे. [का. ट्रा. स. इं.]

ओलारो गदब आदिवासींची एक शाखा.

ओलीकल दक्षिणेंतील देवांग जातीचा असगोत्र विवाह करणारा एक पोटविभाग. [का. ट्रा. स. इं.]

ओवी मराठींतला एक जुना छंद. ओवीचा उगम इ. स. ११२९ पर्यंत मागे नेतां येतो. त्या काळांतल्या अभि-

लषितार्थ चिंतामणि नांवाच्या ग्रंथांत ओवीचा पुढीलप्रमाणे उल्लेख आला आहे ––

महाराष्ट्रेषु योषिद्‌भिरोवी गेया तु कण्डने ।

महाराष्ट्रांतल्या स्त्रिया कांडण (व दळण) करतांना ओवी गातात, असा त्याचा अर्थ आहे. वरील अवतरणांत ओवी ही संज्ञा छंद या अर्थी योजिली आहे. महानुभाव पंथांत १६ व्या शतकाच्या अखेरीस भीष्माचार्य नामक एक ग्रंथकार झाला. त्याने मार्ग प्रभाकर या आपल्या ग्रंथांत दिलेलें ओवीचें लक्षण श्री. राजवाडे यांनी उद्‌धृत केलें आहे, तें असें –

गायत्रीछंदापासौनी धृतिपर्यंत ।
ग्रंथ वोवीयांचे तीन चरण जाणावे मिश्रित ।
प्रतिष्ठे पासौनि जगतीपर्यंत ।
चौथा चरण ।।

अर्थ –– ओवीचे पहिले तीन चरण गायत्रीपासून धृतीपर्यंतच्या कोणत्याहि छंदाचे असावे व चौथा चरण प्रतिष्ठेपासून जगतीपर्यंतच्या कोणत्याहि छंदाचा असावा.

वरील ओवीचा विस्तृत अर्थ असा, की पहिले तीन चरण षडक्षरी वृत्तापासून तों अष्टादशाक्षरी वृत्तापर्यंतच्या कोणत्याहि वृत्ताचे असावे आणि चौथा चरण चतुरक्षरी वृत्तापासून तों द्वादशाक्षरी वृत्तापर्यंतच्या कोणत्याहि वृत्ताचा असावा. सामान्यतः ओवीचे चार चरण असतात. त्यांत शेवटचा चरण दिडका असतो, पहिल्या तीन चरणांच्या अंतीं यमक असतें व चौथा चरण निर्यमक असतो. सोळाव्या शतकांतील महानुभावीय कवि लक्षधीर याचा छंदःशास्त्रावर महाराष्ट्र-काव्य-प्रदीपिका नांवाचा छप्पन्न ओव्यांचा ग्रंथ आहे. त्यानें साडेतीन चरणी, चार चरणी, साडेचार चरणी व पांच चरणी असे ओवीचे प्रकार नमूद केले आहेत. साडेतीन चरणी ओवीला लघुचरणी असेंहि म्हटलें आहे. ज्ञानेश्वरांची ओवी ही लघुचरणी असते. उदा०–

ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।
जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।
देवा तूंचि गणेशु । सकलार्थ प्रकाशु ।
म्हणे निवृत्तिदासु । अवधारि जो ।।

(ज्ञाने. १. १–२)

एकनाथांची ओवी चोहड अर्थात् साडेचार चरणी असते. शिवाय ती समतोल असून अंतःप्रासयुक्त असते. हा अंतःप्रास चौथ्या चरणांत दिसतो.

कवळें अध्यासिला डोळा ।
तो चंद्रमा देखे पिवळा ।
तेवीं आत्मा कर्ता भासे स्थूळा ।
केवळ निश्चळा नेणती ।।
सवेग चालतां आभाळें ।
बाळें म्हणती चंद्रमा पळे ।
तेवि आत्मा कर्ता मानिती स्थूळें ।
उपाधि मेळे अध्यासु ।।

(ए. भा. १०. ६३३–३४)

ओवी ही गद्य व पद्य किंवा ग्रांथिक व गेय अशा दोन प्रकारची असते. चौथा चरण दिडका असणें, हें वैशिष्ट्य दोन्ही प्रकारच्या ओव्यांत समान असतें.

ओवीच्या उगमाविषयीं विद्वानांत अनेक मतें आहेत. राजवाडे तो उगम वैदिक छंदांत आहे, असें म्हणतात (मराठी छंद पृ. ३१), तर पांगारकर तो अनुष्टुभांत आहे, असें मानतात (मोरोपंत चरित्र–काव्यविवेचन पृ. ५३१); पण श्री. भ. श्री. पंडित यांना हीं दोन्ही मतें मान्य नाहीत. ओवी बहुधा कानडी मुलखांतून महाराष्ट्रांत आली असावी, या श्री. बेंद्रे यांच्या मताशीं ते सहमत आहेत. कारण कन्नड त्रिपदीशीं ओवीचें सादृश्य आहे. अभंग हा छंद ओवींतून उत्क्रांत झाला, असेंहि ते सूचित करतात. अभिलषितार्थ चिंतामणींतील वर दिलेल्या उल्लेखावरून महाराष्ट्रांतील बायका-मुली ओवी गात असत, हें स्पष्ट कळतें. तेव्हा तिच्या पद्यस्वरूपाविषयीं वाद असायचें कारण नाही. पद्य ओवीलाच अभंग असें दुसरें नांव आहे. मोरोपंतांनी मुलींसाठी रचलेल्या ओव्या अभंग म्हणूनच प्रसिद्ध आहेत.

ओवी हा आबालसुबोध साहित्य प्रकार आहे. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, मुक्तेश्वर, श्रीधर इ. संतपंत कवींनी आपापले ग्रंथ ओवींत लिहून ओवीला महाराष्ट्रीय जनजीवनांत असाधारण स्थान प्राप्त करून दिलें. महाराष्ट्रांत विठ्ठलभक्तीचा भागवतधर्म समाजांतल्या सर्व थरांत आणि बाळचा-भोळचांपर्यंत प्रसृत झाला, त्याला ओवी व अभंग हे दोन छंद मुख्यत्वें साधनीभूत आहेत. महाराष्ट्रांत निर्माण झालेल्या ग्रांथिक ओवीची संख्या लाखांनी मोजावी लागेल. भक्तीचें पावित्र्य, तरल कल्पना, विविध अलंकार आणि हृद्य भावना, ही सारी संपदा ओवीला लाभलेली आहे.

ओवी जशी ग्रंथांत आहे, तशीच ती महाराष्ट्रांतल्या स्त्रियांच्या तोंडीहि आहे. स्त्रीजीवनांत भावनांचे पाझर आणि अश्रूंचे ओघळ निर्माण करणाऱ्या जानपद ओवीचें स्वरूप आणि कार्य पुढीलप्रमाणे सांगतां येतें ––

महाराष्ट्रांत पूर्वापार चालत आलेल्या जानपदगीतांचे जे अनेक प्रकार आजहि प्रचलित आहेत, त्या सर्वांत ओवीचें स्थान श्रेष्ठ आहे. श्राव्य ओवी हा प्रकार अशिक्षित जनता व विशेषतः स्त्रिया यांच्या जीवनाशीं निगडित झालेला आहे.

२ ते ४ ओळींच्या अत्यंत लहान पद्यांत पुष्कळदा कल्पनाचातुर्य आणि हृद्य भावनाविष्कार यांचा सुंदर मिलाफ आढळून येतो. अशिक्षित स्त्रीवर्गाने ओवीमध्ये आपलें कौटुंबिक जीवन व भोवतालचें सामाजिक जीवन जणू ओतून ठेवलें आहे. त्यामुळेच ओवीचा जिवंतपणा अजूनहि कायम राहिलेला दिसतो. आजहि महाराष्ट्रांतल्या खेड्यांतून सकाळच्या रामपाऱ्यांत ग्रामीण स्त्रिया जात्यावर दळीत असतांना ओव्या गात असलेल्या ऐकूं येतात. सुखवस्तु कुटुंबांतल्या मुलींनी झोपाळ्यावर बसून म्हटलेल्या व मातांनी आपल्या तान्ह्या अर्भकांना निजवितांना आळविलेल्या ओव्यांचा मंजूळ स्वर आजहि खेडोपाडीं कानांवर पडतो.

साधारणपणे उच्च वर्गातील मुली किंवा स्त्रिया झोपाळ्यावर बसल्या वेळीं किंवा मुलाला अंगाई गातांना ज्या ओव्या म्हणतात, त्या साडेतीन चरणी असतात–

मोरमुगुट माथा । गळा वनमाळा ।
स्मरावा सावळा । गोकुळीचा ।।

पण खालच्या वर्गातील स्त्रिया जात्यावर दळतांना ज्या ओव्या म्हणतात, त्या बहुधा चार चरणी असतात–

सकाळींच्या पारीं । चल अंगण लोटूं दोघी ।
माझ्या दारामधी सुर्व्या । पावणा आला बिगी ।।

सामान्यतः जानपद ओवीची रचना पुढे दिल्या प्रमाणे होत असते––

दळण मांडलें की एक स्त्री सुचेल ती ओवी म्हणते व ती थोडीशी आळवून सोडून देते. दुसरी तिला साथ करतां करतां तीच ओवी उचलून ती पुरी करते किंवा त्यावरून सुचलेली दुसरी एखादी ओवी रचते. अशाच प्रकारे दुव्यांत दुवा गुंफला जातो व ओव्यांची साखळी तयार होते.

जनपदांतल्या या ओव्यांचें वर्गीकरण मुख्यत्वें पुढीलप्रमाणे करतां येतें–

(१) पौराणिक कथांवर आधारलेल्या ओव्या.
(२) भक्तिप्रधान ओव्या.
(३) ऐतिहासिक कथांवर आधारलेल्या ओव्या.
(४) देवादिकांच्या ओव्या.
(५) सामाजिक व कौटुंबिक जीवनावरील ओव्या.

पुराण कथांवर आधारलेल्या ओव्यांमध्ये महाभारत व रामायण यांमधील कथाप्रसंगांवरच्या ओंव्या अधिक मिळतात. महाभारतापेक्षांहि रामायण कथा अधिक लोकप्रिय आहे. राम, सीता व लक्ष्मण यांचें वनवासी कष्टमय जीवन हा विभाग जानपद स्त्रियांना अत्यंत हृद्य वाटलेला आहे. एकवचनी, एकपत्नी रामापेक्षाहि सीतेसारख्या सुकुमार साध्वी स्त्रीला सर्व थरांतल्या स्त्रियांच्या अंतरांत अधिक सहानुभूति मिळालेली आहे. विशेषतः लोकनिंदेस्तव रामाने सीतेचा त्याग केला आणि त्यानंतर तिला जें परित्यक्त जीवन जगावें लागलें, त्याबद्दल स्त्रीहृदयांत अपार करुणा पाझरतांना दिसते––

सीता वनवासी । दगडाची केली उशी ।
अंकुश बाळ कुशी । वाढतसे ।।
सीता वनवासी । वनीं कंटकांची दाटी ।
पांचा महिन्यांचा । अंकुशबाळ पोटीं ।।

१३ व्या शतकांत ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रांत भागवतधर्माचा पाया घातला व पुढे १७ व्या शतकांत तुकारामाने त्यावर कळस चढविला. या चारशे वर्षांत पंढरपूर हें भागवत धर्माचें आणि महाराष्ट्रांतल्या सर्व जनतेच्या भक्ति-प्रेमाचें केंद्र बनलें आणि तसेंच विठ्ठल हें परम उपास्य ठरलें. पंढरपुराच्याच जोडीने देहू, आळंदी, पैठण, या संतक्षेत्रांनाहि तेवढेंच महत्त्व प्राप्त झालें. संत चरित्रांना अलौकिक चमत्कारांची जोड मिळाली आणि महाराष्ट्रांतल्या स्त्रियांनी पंढरी, पांडुरंग आणि संत यांच्यावर भक्तिभावाच्या विपुल ओव्या लिहिल्या–

आल्या जल्मामधीं । मला पंढरी पाहृयाची ।
पाण्यामधीं माडी । देव कुंडलीक रायाची ।।
आळंदीला जावें । जीवन्मुक्त व्हावें ।
तेथें श्रीज्ञानदेवें । दिव्य केलें ।।
देहूला जाऊन । देह विसरावा ।
अंतरीं स्मरावा । तुकाराम ।।

ऐतिहासिक संदर्भावरच्या ओव्या तुरळकच आढळतात; पण ज्या आहेत त्यांत मराठेशाहीबद्दल आत्मीयतेची भावना दिसते–

शिवाजीचे किल्ले । किल्ले चढाया कठीण ।
मोल प्राणाचें देऊन । करी मराठा जतन ।।
शिवछत्रपति । धन्य ग धन्य राजा ।।
पोटच्या पुत्रापरी । पाळिली त्याने प्रजा ।।
चिमणाजी बाजीराव । दोघे सख्खे भाऊ ।
म्हणती वसई घेऊं । एका रात्रीं ।।
नारायणरावाला मारिलें । गंगाबाई गरभार ।
नवा भरविला दरबार । रघुनाथरावांनी ।।
पुण्याचें वैभव । पुन्हा दिसेल ठळक ।
तिथे आहेत टिळक । देशभक्त ।।
गांधी जादुगार । भ्याडा करी धीट ।
दास्याचा आणी वीट । सर्व लोकां ।।

देवादिकांच्या ओव्यांत गणपति, मारुति, राम, कृष्ण, शिव, व देवी यांच्या बऱ्याच ओव्या आढतात–

मोरया रे देवा । सारीं विघ्नें कर दूर ।
निर्विघ्न माझा कर । संवसार ।।
रानीं वनीं वसे । माझा कैलासीचा राजा ।
भोळ्या सांबालागीं । माझा प्रणिपात ।।
राम लक्ष्मण । मोतियांची जोडी ।
मध्ये शोभते लालडी । सीतामाई ।।
खांदिये घोंगडी । अधरीं धरी पांवा ।
गोपाळकृष्ण गावा । गोकुळींचा ।
वाढतां वाढतां । सुटे द्रौपदीची चोळी ।
गोविंद सांभाळी । तिची लाज ।।
देव भावाचा भुकेला । विदुराच्या कण्या खातो ।
अर्जुनाचे घोडें धुतो । नारायण ।।
राम राम म्हणत । दारावरून कोण गेला ।
रामराया तुझा चेला । मारुतिराया ।

सर्व देवदेवतांत देवी किंवा अंबाबाई हिच्या ओव्या अधिक आहेत. देवी जगदंबा ही स्त्रियांनी आपली सौभाग्यरक्षक देवता मानली असून तिने आपले चुडे अभंग ठेवावे व आपला संसार सुखी राखावा, म्हणून तिची परोपरीनी आळवणी केली आहे–

आई अंबाबाई । भरत्यें तुझी ओटी ।
सांभाळ सौभाग्याची पेटी । उषाताईची ।
आई अंबाबाई । फुलें तुला सुवासाचीं ।
काळजी कुंकवाची । माझ्या घेई ।।

सामाजिक व कौटुंबिक जीवनावरील ओव्या जनपदांत सर्वांत अधिक आणि प्रमुख आहेत. त्यांत खेड्यांतील जीवनाचीं निरनिराळीं चित्रें रेखाटलेलीं दिसतात. पुष्कळशा ओव्या कुटुंबांतल्या किंवा सभोवतालच्या कोण्यातरी माणसावरून गायिलेल्या असतात व त्या माणसाबद्दलच्या गाणारणीच्या भावना त्यांतून व्यक्त झालेल्या असतात. अशा ओव्यांत भावनात्मक भाग अधिक असतो. गाणारीण स्वतःला सुचणाऱ्या कल्पनांची सांगड त्या आवडत्या व्यक्तीच्या नांवाशीं घालून अशा ओव्या गाते. त्यामुळे पुष्कळदा ओवीचा तिसरा किंवा चौथा चरण त्या व्यक्तीचें नांव किंवा संबंध दर्शवून पुरा केलेला असतो. या भावनात्मक ओव्यांचें वर्गीकरण खालीलप्रमाणे करतां येतें–

(१) मातृ-पितृ प्रेम (२) वात्सल्य (३) भावा-बहिणीचें प्रेम (४) पति-पत्नी प्रेम (५) इतर नातलगांबद्दलच्या भावना (६) शेजारणीविषयींच्या भावना व (७) मैत्रीभाव.

आईविषयींची भावना पुढीलप्रमाणे व्यक्त झालेली दिसते–

बया बया म्हणूं । बया साखरेची लाही ।
प्रिथिम धुंडल्यानं । तिच्या सारखी माया नाही ।।
आई तूं हवीस । हवींस जन्मवेरीं ।
सांग कोण कंटाळेल । अमृताच्या ग सागरीं ।।
माउलीचे कष्ट । कुठे रे फेडूं देवा ।
तळहाताचा पाळणा । नेत्रींचा केला दिवा ।।

बापाविषयींची भावना पुढीलप्रमाणे व्यक्त केलेली आहे–

फुलामध्यें फूल । फूल हुंगावें चांपयाचें ।
सुख भोगावें बापाचें । बाळपणीं ।।
आई तूं मुके घेशी । बाबा कां बोलताती ।
पुत्र होवो वाचस्पति । म्हणूनियां ।।
बाप्पाजी चंदन । घासलिया वास ।
आईचा सुवास । आपोआप ।।

वात्सल्याच्या ओव्यांमधून मातृप्रेमाला पूर आलेला दिसतो. त्यांतल्या त्यांत मुलीचें कौतुक विशेष असतें. आईच्या लेखीं मुलाइतकीच मुलीचीहि किंमत असते; किंबहुना काकणभर सरसच ! ती परघरीं जायची असते, हें त्याचें प्रमुख कारण ! मुलामुलींच्या प्रेमाविषयीं पुढील ओव्या पाहा––

तान्ह्या रे तान्हिका । बाळा रे माणिका ।
तुझ्या रे श्रीमुख । लिंबलोण ।।
माझें तान्हेबाळ । हळदीने न्हाई ।
त्याचें पाणी जाई । शेवंतीला ।।
बाप म्हणे लेकी । लाडकी होऊं नको ।
जाशील परघरीं । वेडी माया लावूं नको ।।
लेका ग परिस । लेक ती काय उणी ?
हिरा नव्हे हिरकणी । उषाताई ।।
लेकीच्या रे बापा । धन्य धन्य तुझी छाती ।
काळजाचा घडा । देतोस परक्या हातीं ।।

बहीण व भाऊ यांच्यांतील परस्पर प्रेम हा ओवी-गीतांचा सर्वांत मोठा विषय आहे. भावावरील आपलें गाढ प्रेम बहिणीने अनेक प्रकारें व्यक्त केलेलें आढळतें. आईला जशी आपल्या मुलापुढे कुठलीहि गोष्ट तुच्छ वाटते, तशीच ती बहिणीलाहि आपल्या भावापुढे वाटते. भाऊ म्हणजे तिचा एक अमूल्य दागिनाच असतो ––

म्यापला येशीवर । शिंपिते दहीभात ।
ताईत माझा बंधू । आला शिंगी नाचवीत ।।
नको धन, नको मुद्रा । नको मोतियांचे हार ।
देई प्रेमाश्रूंची धार । भाईराया ।।
पाठच्या बहिणीवरी । भाऊ कसा रागावेल ?
चंद्र आग का ओकेल । कांही केल्या ।।
संसारी कितीक । असती नाती-गोतीं ।
मोलाचीं माणिक-मोती । बहिणभाऊ ।।

भावा ग बहिणीच्या । प्रेमाला नाही सरी ।
गंगेच्या पाण्यापरी । पवित्रता ॥

पति–पत्नींच्या मधुर प्रेमाची साक्ष पटविणाऱ्या ओव्या जनपदांत किती तरी आढळतात. पण या ओव्यांत बरोबरीच्या नात्यापेक्षां पति हा आपला धनी आहे, ही भावना अधिक प्रभावी दिसते. पति हाच स्त्रीचा देव, हा स्मृतिग्रंथांनी सांगितलेला सिद्धान्त जनपदांतल्या स्त्रियांनीहि स्वीकारलेला आहे. त्यामुळे प्रत्येक स्त्रीला आपला पति हा रूप, गुण आणि अधिकार यांनी श्रेष्ठ वाटलेला आहे. पतीचें कर्तृत्व, त्याचा दर्जा, त्याचा दरारा, त्याचा उद्योगधंदा इ. गोष्टींबद्दल अशा ओव्यांतून सुरेख वर्णनें आढळतात––

काळी चंद्रकळा । माझ्या मनांत घ्यावी होती ।
हौशा भर्ताराने । आणिली अंगमती ॥
उन्हाळा पावसाळा । पानमळ्याला गारवा ।
हौशाच्या जिवावरी । न्हाई कुणाची परवा ॥
सावळी सुरत । अशी पाहिली न्हाई कुठं ।
माझ्या राजसाचं । ओठ बारीक, डोळं मोठं ॥
सोइरे धाइरे । सारे संपत्तीचे लोक ।
आपुल्या भरताराचं । निर्वाणीचं राज्य एक ॥

भाऊ–बहीण, माय-लेकरें आणि पति-पत्नी या अत्यंत निकट संबंधांवरच्या ओव्यांबरोबरच चुलता, मामा, आजा–आजी, दीर, मेहुणा, मावशी, मेहुणी, सासू–सासरे इ. परिवारांतल्या नात्यांवरहि कांही ओव्या आहेत; मात्र त्यांची संख्या अल्प आहे––

अक्काची ग चोळी । येते माझ्या अंगा ।
आम्ही दोघी बहिणी । एका वेलाच्या दोन शेंगा ॥
पाटाचं ग पानी । उसासंग एरंडाला ।
सांगून मी धाडी । बहिणीकारन मेव्हन्याला ॥
मामंजी सासूबाई । तुम्ही तुळशीची झाडें
आम्ही तुमच्या उजेडें । राज्य करूं ॥
भावोजी हो दिरा । माझ्या मनींचें जाणावें ।
माझ्या वेणीस आणावें । गंगावन ॥

शेजारणीविषयींच्या कित्येक ओव्या समर्पक व गोड आहेत. शेजारचीं माणसें कशीं भेटतील, त्यावर पुष्कळसें कौटुंबिक सुखसमाधान अवलंबून असतें. मुलगी माहेराहून सासरीं येते, तेव्हा सासरचीं माणसें तिच्यावर अधिकार गाजवितात; पण एखादी शेजारीण जर हळुवार अंतःकरणाची असेल, तर ती त्या नववधूला दिलासा देते व मायाहि देते. आणि मग नववधूच्या तोंडून पुढीलप्रकारें कृतज्ञतेचे बोल उमटतात––

शेजारिणी बाई । तुझा शेजार चांगला ।
नाही मला आठवला । मायबाप ॥
शेजारिणी बाई । माझी वेणी हो घालावी ।
आईच्या हातांची । आठवण मज द्यावी ॥

शेजारधर्मापेक्षा मैत्री भावनेच्या ओव्या अल्प असल्या, तरी त्या अत्यंत मनोज्ञ आहेत. शेजारीं राहणाऱ्या दोन मुली एकत्र वाढतात, हसतात, खेळतात. त्यांच्यामध्ये मैत्रीचा नाजूक बंध निर्माण होतो. स्त्री ज्या व्यथा–वेदना, जे मनाच्या खोल कप्प्यांतलें सुख – दुःख आईजवळ बोलूं शकत नाही किंवा नवऱ्याजवळहि बोलूं शकत नाही, तें ती आपल्या मैत्रिणीशीं निस्संकोचपणे बोलूं शकते. पागोळीला पागोळी लावून असलेल्या घरांत वाढलेल्या दोन मुली लग्न झाल्यावर कोसांच्या अंतरावर जाऊन पडतात. त्या दोघींची पुनश्च गांठभेट व्हायची ती केवळ योगायोगानेच. अशा भेटीच्या वेळीं त्या दोघींच्या अंतरांत प्रेमाला जें भरतें येतें, त्याच्या कांही लहरी पुढीलप्रमाणे दिसतात––

आपण मैत्रिणी । जाऊं ग बारावाटे ।
जसे नशिबाचे फाटे । फुटतील ॥
वारियाच्या संगें । आपण पाठवूं निरोप ।
पोचेल आपोआप । मैत्रिणीला ॥
तुझा माझा मैत्रपणा । मैत्रपणा काय देऊं ।
एक लवंग दोघी खाऊं । मनुबाई ॥
आपण गुज बोलूं । कशाला हवा दिवा ।
आहे चांदण्याची हवा । शांताताई ॥
गळां घालूं गळा । ये ग रडूं पोटभरी ।
पुन्हा जायाचें सासरीं । चार दिशीं ॥

जनपदांतलें जीवन हें शहरी जीवनाहून सर्वस्वीं निराळें असतें. नागरी स्त्रीच्या दैनंदिन कार्यक्रमापेक्षा जानपद स्त्रीचा दैनंदिन कार्यक्रम अगदी वेगळा असतो. ग्रामीण जीवन श्रमाधिष्ठित असतें आणि हे श्रम मळ्यांत, शेतांत, अंगणांत, घरांत आणि परसांत करायचे असतात. शेतांत पतीबरोबर पत्नीहि राबते, त्या दोघांचा सारा जन्म शेतामळ्याच्याच सावलींत जातो. मोट, बैलजोडी, गुरें-वासरें, शेतांत वाढणारीं हिरवीं रोपें, कापणी–मळणी, कणगींत किंवा बळदांत येऊन पडणारी धान्यसंपदा, निरनिराळ्या ऋतूंत करावीं लागणारीं कामें, गांवांतले कारू-नारू, गांवची देव-देवस्की, अज्ञानांतून पोसलेल्या अंधश्रद्धा आणि भ्रामक समजुती, गांवांतले सण आणि उत्सव, या गोष्टींनी व्यापलेलें तें कृषिजीवन असतें. या जीवनांतल्या

विविध अंगांविषयीं ग्रामीण स्त्रियांनी कितीतरी सुंदर ओव्या लिहून त्याला जिवंतपणा आणला आहे--

सकाळच्या पारीं । हात जोडिते डोंगराला ।
खोंड खिलारी नांगराला ॥
मोट ग चालते । एका वानाचं चारी बैल ।
मोटकऱ्याला दृष्ट व्हईल ॥
शिवंच्या शेतामंदी । शाळु आलाया राखनीला ।
घुंगुर लाविलं गोफनीला ॥
पाऊस पडतो । मोत्यांचा शिरवा ।
मळा सख्याचा हिरवा ॥
दृष्ट मी काढीतें । मीठ, मोहऱ्या, मिरच्या तीन ।
धन्या–बैलाची एक शीण ॥
घुसळण घुसळितें । पांच फेरांत आलं लोनी ।
माझ्या गौळणीची भरज्वानी ॥
वाटेवरली लक्षुमी । आली दडत लपत ।
धान्याची ग रास । पडली सोप्यांत ॥
शिमग्या दिशीं । होळी बाई बाळंतीण ।
राघूच्या डफाखाली । नाचते कळवंतीण ॥
माझ्या पाठीवरनं । नका नेऊंसा रानशेणी ।
ताईत माझा बंधू । नाग गुंफला माझ्या वेणी ॥
पेरणीला जातां । आडवी झाली कुरी ।
बंधु पिकेल तुमची शेरी ॥

ग्रांथिक ओवी आणि जनपदांतली गेय ओवी या दोहींचा दृढ संबंध आहे. ग्रांथिक ओवीनें गेय ओवीवर बराच प्रभाव पाडलेला असला, तरी त्या दोहींत एक मूलभूत फरक आहे. ग्रांथिक ओवीचें मूळ विशिष्ट व्यक्तीच्या बुद्धींत किंवा एखाद्या पंथाच्या तत्त्वज्ञानांत असतें; तर जानपद ओवीचा उगम सर्वसामान्य अशिक्षित जनतेच्या सामुदायिक मनःप्रवृत्तींत आणि अनुभवांत असतो. यामुळेच ग्रांथिक ओवीचा जोरकस प्रचार होऊनहि गेय ओवीनें आपलें जानपद स्वरूप कायम ठेवलें आहे. संत-पंत कवींच्या ओवीबद्ध ग्रंथांचा मूळ हेतु प्रचारात्मक होता. समाजाला धर्म, नीति आणि भक्ति यांची त्यांना आपल्या ग्रंथांच्या द्वारें शिकवण द्यायची होती; पण जानपद ओवीनें तशा प्रकारचा हेतु कधीच धरलेला नाही. जानपद ओवी मानवतेला आणि वास्तविकतेला धर्म व नीति यांच्यापेक्षाहि अधिक किंमत देते. आणि म्हणूनच समाजशास्त्र-दृष्टचा ग्रांथिक ओवीपेक्षा गेय जानपद ओवीचें महत्त्व अधिक आहे. [संत समागम; मराठी छंदोरचना (ना. ग. जोशी); मराठी छंद (राजवाडे); छंदोरचना; स्त्रीजीवन; लोकसाहित्याचें लेणें; म. सा. प.–सौ. अनसूया लिमये.]

ओशन मारू मूळ तेलंगणांतली एक जात. हे लोक कर्नाटकांतहि आढळतात. भंडी, बोशेट्टी, धनशेट्टी, सतनूर, इ. यांचीं आडनांवें आहेत. पोटभेद नाहीत. अचित्रु, कमळ, निळ, पळ व पसणी अशी यांचीं पांच देवकें आहेत. यांचा बांधा वंजीगारांसारखा असतो. हे उत्तम स्वयंपाकी असतात. पुरुषहि कानांत कुडीं घालतात. हनुमान्, हुलगव्व, येल्लम्म हीं यांचीं कुलदैवतें होत. यांचा पूर्वापार धंदा कुंकू व अत्तरें तयार करणें हा आहे. कांचीचा ताताचार्य हा या ज्ञातीचा गुरु असतो. यांच्यांतले लहानसहान तंटे पंचायतीकडून व मोठे तंटे गुरूकडून निवडले जातात. गुरुची आज्ञा मोडल्यास बहिष्काराची शिक्षा मिळते. यांच्यांत मुलाचें नांव नवव्या दिवशीं ठेवतात. मृतांना पुरतात. यांना पुनर्विवाह मान्य आहे. [म. ज्ञा. को.]

ओषधि वैदिक वाङमयांत वनस्पतींचे ओषधि व वीरुध किंवा वनस्पति असे दोन विभाग केलेले आहेत. पहिल्या विभागांतल्या वनस्पतींत औषधी गुणधर्म असतात व दुसऱ्या प्रकारच्या वनस्पतींत ते नसतात, असें मानलेलें आहे (ऋ. १०. ९७). तृण व धान्यरोप यांना वृक्षापासून अलग गणलें असलें, तरी पाणिनि यांचा समावेश ओषधि-वर्गांत करतो (अष्टा. २. ४. १२). तैत्तिरीय संहितेंत सामान्य वनस्पतींचे मूल, तूल (अग्रें), कांड (खोड), वल्श (दोन फांद्यांचा सांधा), पुष्प व फल असे सहा भाग कल्पिलेले आहेत (तै. सं. ७. ३. १९. १). अथर्ववेदांत वनस्पतींचें प्रस्तृणती, स्तंबिनी, एकशुंगा इ. अनेक प्रकारें विस्तृत वर्गीकरण केलेलें आढळतें. पण त्याच्यावरून समाधानकारक स्पष्टीकरण होत नाही (अथर्व. ८. ७. ४).

निरनिराळ्या रोगांच्या चिकित्सेसाठी ओषधींचें संशोधन करून त्यांचा उपयोग करणें, ही गोष्ट वैदिक युगापासून चालू झालेली दिसते. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलांत ओषधींबद्दल एक स्वतंत्र सूक्त आहे. त्यांतील पुढील दोन ऋचा पाहण्याजोग्या आहेत--

यत्रौषधीः समग्मत राजानः समिताविव ।
विप्रः स उच्यते भिषग् रक्षोहामीवचातनः ॥
अश्वावतीं सोमावतीमूर्जयन्तीमुदोजसम् ।
आवित्सि सर्वा ओषधीरस्मा अरिष्टतातये ॥

(ऋ. १०. ९७. ६–७)

अर्थ -- लोकसभेमध्ये जसे राजे अधिष्ठित होतात, त्या-

प्रमाणे ज्याच्या ठिकाणीं ओषधी (आपलें ज्ञान ठेवून) एकत्रित होतात, त्याच ज्ञानी पुरुषाला वैद्य असें नांव आहे. तो पिशाच व राक्षस यांचा नाश करून व्याधींचाहि निःपात करतो. कांही ओषधी अश्वाप्रमाणे (झटपट गुणकारी) असतात. कांही सोमाच्या गुणांनी युक्त (वीर्योत्पादक), कांही उत्साहवर्धक, तर कांही ओज उत्पन्न करणाऱ्या असतात. त्या सर्वांचा मी आरोग्यवृद्धीसाठी उपयोग करतों.

भरद्वाजाचा शिष्य पुनर्वसु आत्रेय हा महान् ओषधि-संशोधक होता. तो अनेक ऋषींना आपल्याबरोबर घेऊन ओषधींच्या संशोधनासाठी हिमालयांत हिंडत असे. बौद्ध युगांत निर्माण झालेल्या भारतांतील प्रमुख विद्यापीठांत आयुर्वेदाचें अध्यापन आणि तदंगभूत ओषधींचें संशोधनहि चालत असे. तक्षशिलेचें विद्यापीठ या विषयांत अग्रगण्य होतें. बिंबिसाराचा राजवैद्य असलेला जीवक नांवाचा वैद्य तक्षशिलेंत राहूनच ओषधिविज्ञान संपादून आला होता.

गुरूने एक दिवस त्याला म्हटलें, की 'औषधी नसलेली अशी एखादी वनस्पति मला आणून दे.' जीवक 'बरें' म्हणन निघाला व खूप भटकला. पण त्याला औषधी नसलेली अशी एकहि वनस्पति सांपडली नाही. त्याने परत येऊन गुरूला तसें सांगितलें. तेव्हा गुरु प्रसन्न होऊन त्याला म्हणाला, की 'तूं आता खरा वैद्य झालास' (महावग्ग).

पाणिनीच्या काळांत निरनिराळ्या वनस्पतींना त्यांच्या त्यांच्या विशिष्ट गुणधर्मांवरून नांवें दिलीं जात असत. पाणिनीच्या अजादिगणांत त्रिफलेचा व पतंजलीच्या महाभाष्यांत ब्राह्मीचा उल्लेख आहे. [वे. इं.; पा. भा.]

ओषधिप्रस्थ हिमालयांतील एक नगर. [पु. इं.]

ओषधी उत्तर कुरु प्रदेशांतील एक देवता. [पु. इं.]

ओष्टम दक्षिणेंतील सातानी जातीचें दुसरें नांव. तें वैष्णव शब्दाचें अपभ्रष्ट रूप असावें. [का. ट्रा. स. इं.]

ओसवाल एक वाणी जात. महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, पंजाब इ. ठिकाणीं यांची वस्ती आहे. ओसवालांत जैनांची संख्या मोठी आहे. ओस या स्थळावरून यांना ओसवाल हें नांव मिळालें. हें स्थळ मारवाडांत लूनी नदीच्या जवळ आहे. आजमितीस तें नकाशांत दिसत नसलें, तरी मुनि आत्मारामजी यांच्या अज्ञानतिमिरभास्कर या ग्रंथांत तें जोधपूरच्या पश्चिमेस २० कोसांच्या अंतरावर असल्याचें सांगितलें आहे. राजस्थानांतल्या मरुभूमींतलें तें एक निर्जन व अप्रसिद्ध स्थळ आहे. तिथे एक प्राचीन जैन मंदिर असून त्यांत महावीराची वैशिटचपूर्ण मूर्ति आहे. या स्थळाचा इतिहास असा——

भिन्नमाळच्या राजाने असा एक कायदा केला, की जो कोटयधीश नाही, त्याने राजधानींत राहूं नये. ऊहड नांवाचा एक गृहस्थ तिथे होता. त्याच्याजवळ कोटिसंख्या भरायला एक लाखच रुपये कमी होते. त्याने आपल्या भावाजवळ तेवढे उसने मागितले; पण भावाने त्याला नकार दिला. तेव्हा निरुपाय होऊन नवी वसाहत करण्यास भिन्नमाळमधून ऊहड बाहेर पडला. त्याच्याबरोबर त्याचे नातलग व बरेचसे मित्रहि निघाले. दिल्लीच्या राजाने त्याला वसाहतीसाठी जमीन दिली. त्या भूमीवर ऊहडाने ही ओस नगरी उभारली.

रत्नप्रभसूरि नामक एका जैन आचार्याच्या प्रयत्नाने ही वसाहत भरभराटीस आली. तिथले श्रीमाळी, वाणी, चौहान, गोहिल, राठोड, राजपूत इ. सारे वसाहतकार शैवपंथी होते. रत्नप्रभसूरीने त्या सर्वांना जैन धर्माची दीक्षा दिली. तिथल्या जैन समाजाला उपकेश हें नांव मिळालें व त्या नगराला उपकेशपट्टण किंवा उपकेशनगरी असें नांव पडलें. त्याचाच पुढे ओस असा संक्षिप्त अपभ्रंश झाला. तिथले जैन 'ओसवाल' म्हणून ओळखले जाऊं लागले.

हे ओसवाल उपकेशगच्छाचे गृहस्थाश्रमी अनुयायी होत. राजस्थानांतले हे प्रमुख व्यापारी आहेत. बिकानेरमधील ओसवालांची दद, कोटारी, सेठिया, सावन, भटिया इ. गोत्रें असून मारवाडांतील ओसवालांची भंडारी, मोहनत, लोधा, सिंग्वी, इ. गोत्रें आहेत. ओसवाल व्यापाऱ्यांच्या वसाहती भारताच्या कित्येक भागांत आढळतात. काशीचा प्रसिद्ध राजा शिवप्रसाद हा ओसवाल जातीचा होता. भोजक हे ओसवालांचे उपाध्ये होत. त्यांच्या तीर्थंकरांचे पुजारीहि भोजकच असतात. हे लोक अबूचा पहाड, पालिताणा, गिरनार, पावागढ इ. जैन क्षेत्रांच्या यात्रा करतात. याशिवाय काशी, अयोध्या, यांसारख्या हिंदुक्षेत्रांच्याहि यात्रेला हे लोक जातात. मारवाडांतील ओसिया ही सर्व ओसवालांची कुलदेवता होय.

सौराष्ट्रांतील ओसवालांत दसा, वीसा व पांचा असे तीन पोटभेद आहेत. दसांतलेच विधवाविवाहाला मान्यता देणारे जे लोक तेच पांचा म्हणून विभक्त झाले. दसांत सगुण व निर्गुण अशा उपासनाभेदाने दोन गट पडलेले आहेत. यांच्यांत प्राचीन काळापासून पंचायतसंस्था चालत आलेली आहे. दसा व वीसा यांच्यांत रोटीव्यवहार होतो; पण बेटीव्यवहार मात्र होत नाही. [म. ज्ञा. को.]

औंड्र एक प्राचीन मानवगण. याचा उल्लेख मालव, मेकल इ. गणांच्याबरोबर येतो. [मत्स्य पु. ११३. ५२]

औंढ्या नागनाथ बारा ज्योतिर्लिंगांपैकी नागेशाचें क्षेत्र. याला पूर्वी दारुकावन असें म्हणत. कारण इथे प्राचीन काळीं अरण्य होतें आणि त्यांत दारुका राक्षसी वास्तव्य करीत होती. ती ऋषिमुनींना त्रास देऊं लागल्यावर शिवाने तिथे प्रकट होऊन त्या दारुकेचा नाश केला. नंतर तो नागेशलिंगाच्या रूपाने तिथेच राहिला.


या ज्योतिर्लिंगाच्या उत्पत्तीची दुसरी कथा अशी–

दक्षयज्ञांत सतीने देहत्याग केल्यावर शिव विषण्ण होऊन दारुकावनांत राहायला आला. तो दिगंबर अवस्थेंत राहत होता. तो जेव्हा भिक्षा मागण्यासाठी आसपासच्या मनुष्य-वस्तींत जाई, तेव्हा त्याचें तेजस्वी रूप पाहून ब्राह्मण स्त्रिया त्याच्यावर मोहित होत व त्याच्या मागे लागत. हा प्रकार पाहून त्यांचे पती संतप्त झाले आणि त्यांनी शिवाला शाप दिला. त्यामुळे त्याचा देह भस्मसात् झाला आणि त्यांतून देदीप्यमान् असें ज्योतिर्लिंग प्रकट झालें. मग देव तिथे आले आणि त्यांनी तिथल्या जलाशयांत त्या लिंगाचीं स्थापना केली. तिथल्या नागलोकांकडे त्याच्या पूजेची व्यवस्था सोपवून देव स्वस्थानीं निघून गेले. नागांकडून पूजिला गेला, म्हणून त्याला नागेश असें नांव पडलें.

हें गांव मराठवाड्यांतल्या परभणी जिल्ह्यांत आहे. नागनाथाचें मंदिर शिल्पसौंदर्याने नटलेलें आहे. मंदिराभोवती २० फूट उंचीचा तट असून त्याला ४ प्रवेशद्वारें आहेत. अन्य प्राचीन शिवालयांत गाभारा नेहमी खोल असतो, पण इथे तो तसा नाही.

मुख्य मंदिराची बरीच मोडतोड झालेली असून त्याचे भग्नावशेष आवारांत विखरून पडले आहेत. त्यांत कांही बुद्ध-मूर्तीहि आहेत. मंदिराची बांधणी हेमाडपंती असून आकार द्वादशकोनी आहे. तें उतरत्या कंगोऱ्यांनी युक्त अशा चौथऱ्यावर उभें आहे. मंदिराच्या आंत व बाहेर अनेक शिल्पपट्ट असून त्यांत हत्ती, घोडे, स्वार, कमळें इ. आकृती कोरलेल्या आहेत. महाद्वाराच्या दोन्ही बाजूंस शिवाचीं विविध रूपें कोरलेलीं आहेत. त्यांच्या शेजारी पार्वती, रावण, यति, बुद्ध, इ. अनेक मूर्ती कोरलेल्या दिसतात. दक्षिणेकडील भिंतीवर गणेशाच्या कांही सुंदर मूर्ती आढळतात. या मंदिराचे शिल्पकार वेरुळ–अजंटा येथील शिल्पपरंपरेचे असावे.

मंदिरांतील मध्यमंडप वर्तुळाकार असून तो आठ खांबांनी तोलून धरलेला आहे. त्याचें छत घुमटाकार आहे. खांब अष्टकोनी व कलाकुसरीचे आहेत. गांवाच्या दक्षिणेला जवळच कनकेश्वरीचें मंदिर असून तिला नागेशाची पत्नी असें



औंढ्या नागनाथाचें मंदिर

मानलें जातें. या गांवांत लहानमोठीं १०८ शिवालयें आहेत. [रा. चिं. ढेरे]

औंदिचित्ती पादी ब्रजमंडलांतील एक स्त्रीनृत्य. हें नृत्य करतांना स्त्रिया एकदम पाठीकडे वळतात व तिथे कांही काल पदसंचालन करून डाव्या पायावर भोवर मारून एकदम पुढे होतात. **पाहा**–मोहिली नृत्य. [संमेलन पत्रिका]

औ चौदावा स्वरवर्ण. कंठ व ओष्ठ हीं याचीं स्थानें आहेत. हा दीर्घ असून प्लुतहि होतो. उदात्तानुदात्तस्वरित भेदाने तो त्रिविध होतो व अनुनासिक–अननुनासिक अशा भेदाने सहा प्रकारचा होतो. कामधेनुतंत्रांत याचें वर्णन पुढीलप्रमाणे दिलेलें आहे —

रक्तविद्युल्लताकारं औकारं कुण्डली स्वयम् ।
अत्र ब्रह्मादयः सर्वे तिष्ठन्ति सततं प्रिये ।।

अर्थ –औकार हा वर्तुळ व रक्तविद्युल्लतेसारखा आहे. हे प्रिये, याच्या ठिकाणीं सर्वब्रह्मादि देव सतत वास्तव्य करतात.

मातृकान्यासांत याचें स्थान खालच्या दंतपंक्तीवर असतें.

अक्षरविकास – इ. स. ६ व्या शतकांतील मंदसोर येथील लेखांत हा वर्ण प्रथम दिसतो. ५ व्या शतकांतील जयनाथ-दानपत्रांत 'ओ' च्या कमरेवर एक वाकडी (रोमन S सारखी) रेघ काढून औ बनविलेला दिसतो. याच शतकांतील उष्णीष-विजयधारिणीच्या ताडपत्री पुस्तकांत असाच औ आहे, पण त्याच्या रेघेचा बाक कोन करून गेलेला दिसतो. १० व्या शत

काच्या सुमारास नेपाळांत सांपडलेल्या हस्तलिखित ग्रंथांतला 'औ' हि वरीलप्रमाणेच आहे. ११ व्या व १२ व्या शतकांतील हा वर्ण अ सारखा रेखाटलेला दिसतो. इतर वर्णांप्रमाणे ओ व औ या वर्णाचा संगतवार विकास आढळून येत नाही. [श. क.; म. ज्ञा. को.]

औखीय चरणव्यूहानुसार तैत्तिरीय चरणाचे दोन उपविभाग झाले. त्यांचीं नांवें औखीय व खांडिकीय अशीं आहेत (२. १). आत्रेय हाहि औखीय चरणाचाच एक लहानसा उपविभाग होता. पाणिनि औखीयांचा उल्लेख करतो (४. ३. १०२). आत्रेयांचाहि त्याने निर्देश केला आहे (२. ४. ६५).

औघवती श्राद्धयोग्य अशी एक नदी. [मत्स्य पु. २२.७१]

औचित्यसंप्रदाय संस्कृत साहित्य शास्त्रांतील एक संप्रदाय. औचित्याची भावना ही रस, ध्वनि इ. समस्त काव्यतत्त्वांची मूल भावना आहे. सगळ्या प्राचीन साहित्यशास्त्रज्ञांनी औचित्याचें रक्षण करण्याविषयी आवर्जून सांगितलें आहे. क्षेमेंद्राने औचित्यविचारचर्चा नामक ग्रंथ लिहून या काव्यतत्त्वाचें व्यापक स्वरूप स्पष्ट केलें आहे. क्षेमेंद्र म्हणतो, की औचित्य हाच रसाचा प्राण आहे (औ. वि. च. ३). कोणत्या वस्तूसह वर्णन केल्यास तें रसाला अनुकूल होईल, त्याचा विचार करणें म्हणजे 'उचित' व उचिताचा भाव तें औचित्य होय (औ. वि. च. ७).

क्षेमेंद्रानें उपलक्षण म्हणून २७ प्रकारच्या औचित्यांचा विचार केला आहे. तो म्हणतो, की काव्यांत शृंगाररसाशीं माधुर्य हा गुण व कोमलवृत्ति, तसेंच वीर-रौद्र यांच्याशीं ओज हा गुण व कठोरवृत्ति हीं सुसंवादी अतएव उचित ठरतात. त्याचप्रमाणे विशिष्ट अलंकारहि विशिष्ट रसांना अनुकूल ठरतात.

औचित्य हें पद, वाक्य, अर्थ, रस, लिंग, वचन इ. अनेक ठिकाणीं कसें असतें, तें क्षेमेंद्राने विस्तारपूर्वक सांगितलें आहे. पण औचित्य या कल्पनेचा क्षेमेंद्र हा जनक नाही, हेंहि लक्षांत ठेवायला हवें. त्याच्याहि पूर्वी आनंदवर्धन व अभिनवगुप्त यांनी औचित्याची दखल घेतलेली आहे. आनंदवर्धन म्हणतो ––

अनौचित्यादृते नान्यद् रसभङ्गस्य कारणम् ।
औचित्योपनिबन्धस्तु रसस्योपनिषत् परा ॥

अर्थ – अनौचित्यावांचून रसभंगाचें दुसरें कारण नाही. औचित्य संभाळणें हेंच रसाचें परम रहस्य आहे.

भरताच्या नाट्यशास्त्रांतहि औचित्याचीं बीजें सांपडतात. अनौचित्याचें उदाहरण म्हणून पुढील श्लोक प्रसिद्ध आहे –

कण्ठे मेखलया, नितम्बफलके तारेण हारेण वा ।
पाणौ नूपुरबंधनेन, चरणे केयूरपाशेन वा ॥
शौर्येण प्रणते रिपौ करुणया नायान्ति के हास्यतां ।
औचित्येन विना रुचिं प्रतनुते नालंकृतिर्नो गुणः ॥

अर्थ – गळ्यांत मेखला, कटिभागावर हार, हातांत नूपुर व पायांत केयूर बांधणें यांत अवयव व अलंकार यांचें अनौचित्य आहे. त्याचप्रमाणे नमलेल्या माणसाच्या ठिकाणीं शौर्य व शत्रूच्या ठिकाणीं करुणा हे गुणहि अनुचित ठरतात. अशा गोष्टींच्या प्रदर्शनाने कोणाचा उपहास होणार नाही ? तात्पर्य काय, औचित्यावांचून अलंकार किंवा गुण रुचि उत्पन्न करीत नाहीत. [सं. सा. इ.; हिं. सा. बृ. इ.]

औजी गढवाल प्रदेशांत ढोल–दमामा वाजविणारी एक पूर्वास्पृश्य जात. मंगलकार्यें व सणवार या प्रसंगीं हे लोक सवर्णांच्या घरीं भिक्षा मागायला येतात व त्यांची बिरुदावलि गातात. त्यांच्या गाण्याचा एक नमुना––

मंगलाचार, मंगलाचार ।
बडा सरकार, बडा दरबार ।
राजमहल्लीं, राजमुसद्दी ।
जुग जुग जीवे राजाधिराज ।
माराज बोलां दा बद्रीनाथ ।
जै जै कार, जै जै कार ।
पूरबी पच्छमी घाटको राज बढे ।
उत्तरी दख्खणी घाटको राज बढे ।
बेटी बेटानको राज बढे ।
नाती पोतानको राज बढे । [ग. लो.]

औडुलोमि अद्वैत दर्शनाचा एक आचार्य. हा बादरायणाच्या पूर्व कालांतला असावा. याचें नांव ब्रह्मसूत्रांत तीन ठिकाणीं आढळतें (१.४.२१; ३.४.४५; ४.४.६). मीमांसासूत्रांत याचें नांव दिसत नाही. हा अद्वैतवादी पण अद्वैतांत भेदाभेद मानणारा होता. जीव आणि ब्रह्म यांच्यांत भेद आणि अभेद हें भिन्न अवस्थांमुळे होत असतात, असें याचें मत आहे. संसारी दशेंत जीव हा ब्रह्माहून नितान्त भिन्न असतो. देह व इंद्रियें यांचा संपर्क येतांच जीव कलुषित होतो; पण ज्ञान आणि ध्यान यांच्या योगें त्याचें कलुषत्व दूर होतांच तो प्रसन्न होऊन ब्रह्माशीं एकत्व प्राप्त करून घेतो. म्हणून मुक्तावस्थेंत अभेद आहे; पण संसारदशेंत भेद आहे. चैतन्य हेंच आत्म्याचें स्वरूप असल्यामुळे जीव हा मोक्षावस्थेंत केवळ आत्म्याच्या चैतन्य स्वरूपाशींच अभिन्न होतो; पण त्याहि वेळीं


परमात्म्याचें सत्यसंकल्पत्व, सर्वज्ञत्व, सर्वेश्वरत्व इ. धर्म जीवाच्या ठिकाणीं राहत नाहीत. [हिंदुत्व; बलदेव उपाध्याय]

औताद स्तंभवाचक शब्द. जगाच्या चार कोपऱ्यांना आधार देणाऱ्या चार स्तंभांना सूफी लोक औताद मानतात.

औत्थानिक कौतुक लहान मूल प्रथम कुशीवर वळतें, तेव्हा करायचा एक कौतुकोत्सव. गोकुळांत कृष्णाचा हा उत्सव केला होता (भाग. पु. १०.७).

औदवाहि उपनिषदांतला एक आचार्य. उदवाहाचा वंशज. बृहदारण्यकांत भारद्वाजाचा गुरु म्हणून याचा उल्लेख आहे. (२.५.२०; ४.५.२६).


औदीच्य ब्राह्मण सर्व गुजरातभर यांची वस्ती आहे. अणहिलवाडच्या मूलराज सोळंकी या राजानें उत्तरेकडून अनेक ब्राह्मणांना यज्ञ करण्यासाठी आणलें होतें, त्यांपैकीच हे ब्राह्मण होत. हे उत्तरेकडून आले, त्या वेळीं त्यांची संख्या एक हजार होती, म्हणून त्यांना औदीच्य सहस्र हें नांव मिळालें. हे सर्व औदीच्य ब्राह्मण २९ गोत्रांचे होते. त्यांत कांही ऋग्वेदी आश्वलायन शाखेचे, कांही सामवेदी कौथुम शाखेचे आणि कांही यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे होते. सांप्रत यांच्यामध्यें यजुर्वेदीयांचा भरणा जास्त आहे.



औदीच्य ब्राह्मण

औदीच्य ब्राह्मणांच्या सहस्र आणि टोळकिया अशा दोन शाखा आहेत. सहस्रांचे पुन्हा सिद्धपुरा आणि शिहोरा असे दोन भेद आहेत. सुरुवातीला ज्या ब्राह्मणांनी दान स्वीकारलें नव्हतें, त्यांना टोळकिया असें नांव पडलें. नंतर मात्र या लोकांनी खंबायत आणि इतर गांवें दान म्हणून स्वीकारलीं. पूर्वी हे सर्व ब्राह्मण भिक्षा, यजमानवृत्ति व शेती हे तीनहि धंदे करीत असत. [वि. मुं. रा. प.]

औदुंबर (१) महाराष्ट्रांतील एक प्रसिद्ध दत्तक्षेत्र. हें सांगली जिल्ह्यांत भिलवडी स्टेशनपासून चार मैलांवर कृष्णेच्या कांठीं आहे. कृष्णा नदीच्या ऐलतीरावर भिलवडी आहे आणि पैलतीरावर औदुंबर आहे. भिलवडीजवळ



भुवनेश्वरीमंदिर–भिलवडी

भुवनेश्वरीचें प्राचीन शक्तिपीठ आहे. त्यामुळे या स्थानीं तपस्वी जनांची वस्ती नेहमी असे. कृष्णेच्या तीरावरील वृक्षांच्या दाटीमुळे इथे आपोआपच एकान्तमय तपोवन निर्माण झालेलें होतें. त्यामुळे या निसर्गसिद्ध तपोवनांत औदुंबराच्या छायेंत इ. स. १४२२ च्या सुमारास श्रीनृसिंह सरस्वतींनी इथे येऊन चातुर्मासाचा काळ घालविला आणि या स्थळाला चिरंतन पावित्र्य प्राप्त करून दिलें. येथील कृष्णेचा घाट प्रशांत आणि प्रशस्त आहे. या घाटावरच दत्तपादुकांचें मंदिर आहे. तें ज्या घाटावर आहे, तो घाट येथील ब्रह्मानंदस्वामींचे शिष्य सहजानंदस्वामी यांनी बांधविला आहे.



दत्तपादुकामंदिर – औदुंबर

या क्षेत्रांत ब्रह्मानंदस्वामींचा मठ आहे. हे सत्पुरुष इ. स. १९०४ च्या सुमारास गिरनारहून औदुंबर क्षेत्रीं आले आणि

इथेच एक मठ उभारून राहिले. येथील शांत आणि पवित्र वातावरणांत त्यांच्या तपाला सिद्धीचें यश प्राप्त झालें आणि अखेर इथेच त्यांनी समाधि घेतली.

कित्येक भवतापतप्त लोक इथे दत्ताची सेवा करण्यासाठी येऊन राहतात.

(२) एक प्राचीन मानवगण. हे लोक स्वतःला विश्वामित्राचे वंशज म्हणवीत. पंजाबांतील बियास, सतलुज व रावी यांच्या मधल्या प्रदेशांत यांचें जनपद होतें. पठाणकोट, ज्वालामुखी व होशियारपुर या प्रदेशांत यांचीं कांही नाणीं सांपडलीं आहेत. या नाण्यांवर शिवदास, रुद्रदास, महादेव आणि धारघोष या राजांचीं नांवें दिसतात. कांही नाण्यांवर विश्वामित्र ऋषीचेंहि चित्र दिसतें. औदुंबरांचें राज्य प्रजासत्ताक असावें, असें त्यांच्या नाण्यांवरून कळतें. इ. स. च्या प्रारंभीं विमकी नांवाचें राजघराणें औदुंबर प्रदेशावर राज्य करूं लागलें. त्या घराण्याच्या नाण्यांवर रुद्रवर्मा, आर्यमित्र, महीमित्र आणि भानुमित्र हीं नांवें आढळतात. [अ. हि. नॉ. इं.]

(३) एक मुनिपंथ (भाग. पु. ३.१२.४३). हे लोक सकाळीं उठल्यावर जी दिशा प्रथम पाहत, त्याच दिशेचीं फळें आणि कंदमूळें आणून त्यांवर निर्वाह करीत. [श. क.]

औदुंबरायण शब्द हा अनित्य आहे, असें मत मानणारा एक प्राचीन आचार्य. [निरुक्त १.२.१]

औदुंबरी यज्ञमंडपांतला एक खांब. ऋत्विजांना बसण्यासाठी केलेल्या सदोमंडपांत, मंडपाच्या मध्यभागीं खड्डा खणून त्यांत उंबराच्या झाडापासून तयार केलेला व यजमानाच्या उंचीचा एक खांब पुरतात. याच्या वरच्या टोकाला दुबेळकें असावें लागतें. या खांबाला वस्त्र गुंडाळतात. साम गाणारे ऋत्विज औदुंबरीजवळ बसूनच सामगायन करतात. हे ऋत्विज औदुंबरीला देवता समजतात. [विद्याधरशास्त्री भिडे]

औद्दालक छांदोग्य उपनिषदांत उद्दालकाचा उल्लेख आहे. औद्दालक हा त्याचा वंशज असावा. गायत्री मंत्राच्या चौवीस अक्षरांचे जे चौवीस ऋषी आहेत, त्यांतला हा विसावा होय. [क्रि. स्ट. ले. उ.]

औद्वाहिक पुरुषाला लग्नाच्या वेळीं सासुरवाडीकडून मिळालेलें द्रव्य. हें भार्याधन अर्थात् स्त्रीधन असतें. त्याची वांटणी त्या पुरुषाच्या भावांना मिळत नाही. याविषयीं मनूचें वचन असें –

विद्याधनं तु यद्यस्य तत्तस्यैव धनं भवेत् ।
मैत्रमौद्वाहिकं चैव माधुपर्किकमेव च ।।
(९.२०६)

अर्थ –– विद्या, मैत्री व विवाह या संबंधांत मिळालेलें द्रव्य हें ज्याला मिळालें असेल, त्याच्याच मालकीचें असतें.

औधेलिया बिलासपूर जिल्ह्यांत आढळणारी एक जात. उहारिया राजपूत व मूरीबंदी नामक एक दासी यांच्या संबंधांतून ही जात उत्पन्न झाली, असें सांगतात. यांच्या विषयीं एक आख्यायिका प्रचलित आहे, ती अशी–

सहरमान, बुध आणि मंगल असे तीन भाऊ होते. ते भक्ष्य शोधण्यासाठी रानांत गेले असतां मंगलला बोरें मिळालीं. दुसरे दोघे बंधु त्याच्याकडे त्यांतलीं कांही बोरें मागूं लागले. पण मंगल त्यांना म्हणाला, की 'तुम्हांपैकी एखादा जर मला आपली मुलगी देत असेल, तर मी तुम्हांला बोरें देईन.' पण एका गोत्रांत लग्न निषिद्ध असल्याचें सांगून ते मंगलला म्हणाले, की 'लोखंडाचे मांजर तूं बुक्क्या मारून फोडशील, तर आम्ही तुझी मागणी पुरी करूं.' मंगल त्या गोष्टीला तयार झाला. त्याने लोखंडी मांजर बुक्क्यांनी तोडलें. मग ते दोघे भाऊ समजले, की मंगल जर बुक्क्या मारून लोखंडी मांजर तोडतो, तर त्याच्या बाबतींत गोत्र तोडायला हरकत नाही. मग मोठ्या भावाने आपली मुलगी मंगलला दिली.

या मंगलाची संतति पुढे कंजर या नांवाने ओळखली जाऊं लागली. कंजर स्त्रिया वेश्याव्यवसाय करीत असल्याचें सांगतात. यांच्यांत बचावत, धनावत, पंचभैया इ. गोत्रें आहेत.

विवाहप्रथा– पूर्वीं मुलींचीं लग्नें ५ व्या किंवा ७ व्या वर्षीं करीत. या जातींत मुलींची संख्या कमी आहे. बहुधा साटेंलोटें करून लग्नें जुळवितात. मुलीचें देज घेतात. व्यभिचार निषिद्ध मानतात. घटस्फोटाची चाल आहे.

दुल्हादेव व देवी यांना भजतात. होळी हा यांचा मुख्य सण असतो.

मर्तिकप्रथा– प्रेतें जाळतात. तिसऱ्या दिवशीं मृताच्या अस्थी गोळा करून पिंपळाखाली पुरतात. १० व्या दिवशीं जातीचे लोक एकत्र जमून क्षौर करतात आणि झाडाखाली अंगाला तेल लावतात. अविवाहित माणूस महामारीने मेल्यास त्याचें प्रेत पुरतात. प्रेत उघडें पडलें, तर तो गंगचा अपमान समजतात. [म. ज्ञा. को.]

औपजंघनि उपनिषदांतील एक ऋषि. बृहदारण्यकांत याचा गुरु म्हणून उल्लेख केलेला आहे.

विविध पुत्रांपैकी हा फक्त औरस पुत्रालाच मानतो. [हि. ध.]

औपधर्म्य श्रीविष्णूने असुर व इतर दुष्कृत्यें करणारे लोक यांची दिशाभूल करण्यासाठी प्रसृत केलेला एक पाखंडात्मक धर्म (भाग. पु. २. ७. ३७.).

औपधेनव आयुर्वेदाचा एक आचार्य. उपधेनूचा पुत्र. हा सुश्रुताचा समकालीन होता. याने धन्वंतरीकडून अष्टांग आयुर्वेदाचें शिक्षण घेतलें. याचें एक शल्यतंत्र असल्याचें सुश्रुतसंहितेवरून कळतें (सू.४.९). [आ. इ.]

औपनिषदिक निंद्य कृत्यांच्या द्वारें उपजीविका चालविणारा तो औपनिषदिक, असें पाणिनि सांगतो (अष्टा. गणपाठ ४. ४. १२). कौटिल्याने या शब्दाचा प्रयोग गुप्तचरविभागांत अधार्मिक व्यक्तींसाठी केल्या जाणाऱ्या निंद्य उपायांच्या अर्थाने केला आहे (अर्थ. १.१२; ५.३). [पा. भा.]

औपनिषद्व्रत ब्रह्मचाऱ्यांसाठी सांगितलेल्या चार व्रतांपैकी एक व्रत. उपनिषद्-ब्राह्मणांचें अध्ययन करण्यापूर्वी हें व्रत करायचें असतें. या व्रताच्या वेळीं क्षौरापासून तों परिदानापर्यंतचे उपनयनांतले सर्व संस्कार करायचे असतात. त्या प्रसंगीं ब्रह्मचाऱ्याने अजिन, यज्ञोपवीत व मेखला या वस्तू नव्या धारण कराव्या, असें मनूने सांगितलें आहे. [आश्व. गृ. सू. १. २२. २०; हि. ध.]

औपमन्यव (१) एक सामवेदी आचार्य. भानुमान् व औपमन्यव अशा दोन्ही नांवांनी हा प्रसिद्ध आहे. या नांवाचे बरेच आचार्य होऊन गेले असावे. [तर्पण]

(२) ऋग्वेदांत उपमन्यूचा उल्लेख आहे (९.९७.१३–१५). उपमन्यूचा पुत्र औपमन्यव. याचा छांदोग्य उपनिषदांत निर्देश आहे. गायत्री मंत्राच्या चौवीस ऋषींपैकी हा चौथा होय. [क्रि. स्ट. ले. उ.]

औपयिक सामादि चार उपायांशीं संबंध राखणारी राजनीति व तिच्या उद्देशपूर्तीसाठी उपयोजिली जाणारीं अनेक साधनें यांना औपयिक असें नांव आहे. अर्थशास्त्रामध्ये औपयिकांचा प्रपंच केलेला आहे.

औपासन होम गृहस्थाने गृह्याग्नि ठेवून त्यांत सकाळ संध्याकाळ नित्य होम करायचा असतो. अग्नीच्या उपासनेचा हा एक भाग असल्यामुळें याला औपासन होम म्हणतात. याच्या नित्यत्वाच्या बाबतींत 'अकरणे प्रत्यवायजनकं कर्म ' = न केल्याने दोष घडविणारें कर्म, असें म्हटलें आहे. केल्याने पुण्य नाही; पण न केल्याने मात्र दोष आहे, असें हें कर्म आहे. सूर्योदयापूर्वी आणि त्यानंतर दहा घटिका एवढा काल प्रातर्होमाचा व सूर्यास्तापूर्वी आणि त्यानंतर नऊ घटिका हा काल सायंहोमाचा सांगितलेला आहे.

या होमास दोन आहुतींना पुरतील इतके व्रीहि (भात) किंवा यव घेतात. प्रथम अग्नीभोवती परिस्तरणें घालून परिषेक करतात. स्थालीमध्यें हविर्द्रव्यें घेऊन त्यांवर प्रोक्षण करतात. या होमाच्या देवता प्रातर्होमांत सूर्य व प्रजापति आणि सायंहोमांत अग्नि व प्रजापति या असतात. होमानंतर परिषेक व अग्नीचें उपस्थान करतात.


औमापतम् उमापतीने लिहिलेला संगीतावरील एक ग्रंथ. शिव–पार्वतींच्या संवादांतून हा ग्रंथ विस्तारला असून त्यांत ३८ प्रकरणें आहेत. यांत शुद्ध रागांचीं लक्षणें, वाद्यें, ताल, नृत्य इ. विषयांचें विवेचन आहे. तांत्रिक शब्दांची सूचीहि दिलेली आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

औरंगजेब (१६१८–१७०७ इ. स.) संपूर्ण नांव मुहिउद्दिन मुहंमद औरंगजेब. हा शहाजहानचा मुलगा होता. याचा आजा गुजरातेहून आग्र्यास परत जात असतां दोह या गांवीं याचा जन्म झाला. शहाजहानचें हें सहावें अपत्य होय. १६२७ सालीं शहाजहान गादीवर येतांच औरंगजेबाला मासिक पंधरा हजारांची नेमणूक देण्यांत आली व त्याच्या शिक्षणास प्रारंभ झाला.

औरंगजेबाची बुद्धि प्रखर होती. त्याने थोडक्याच काळांत कुराण व हदीस यांचें अध्ययन पुरें केलें. तो अरबी व फारसी या दोन्ही भाषा उत्तम शिकला. त्याचबरोबर त्याने तुर्की व हिंदी याहि भाषा शिकून घेतल्या. त्याला चित्रकला, संगीत व इतर ललितकला यांची मुळीच आवड नव्हती. त्याने आवडीने अध्ययन केलें, तें धार्मिक ग्रंथांचें. अरबी लिपींत कुराणाच्या दोन प्रती लिहून त्याने मक्का व मदिना येथे पाठविल्या. त्याचें हस्ताक्षर फार सुरेख होतें. दिल्ली येथील निजामुद्दिन अवलियाच्या दर्ग्यातहि त्याच्या हातची कुराणाची एक प्रत ठेवली आहे. त्याला दरवेशी व अवलिया यांची संगत आवडे.

सोळा वर्षांचा होईपर्यंत तो कुशल सैनिक बनला. वयाच्या चौदाव्या वर्षी त्याने एक मोठा पराक्रम केला. साठमारींतल्या एका हत्तीने त्याच्यावर हल्ला केला असतां त्याने हत्तीला

घायाळ करून माघारी परतविलें. या त्याच्या धाडसाबद्दल शहाजहानने त्याला दोन लाख रुपये बक्षीस दिले आणि वर 'बहादुर' ही पदवी दिली. १६३५ सालीं शहाजहानने त्याला दसहजारी मनसब देऊन चार हजार पायदळासह ओरछाच्या जूझरसिंहावर आक्रमण करण्यासाठी पाठविलें. या मोहिमेंत जूझरसिंह मारला गेला. या विजयाचें बक्षीस म्हणून शहाजहानने त्याला दक्षिणचा सुभेदार नेमलें व तो दौलताबादेस राहण्यास आला (१६३६).



औरंगजेब

दक्षिणेंत शहाजी भोसले हा त्या वेळीं हुसेन निजामशहाला पुढे करून निजामशाही तगविण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्याला औरंगजेबापुढे हार खावी लागली व बाल निजामशहाला मोगलांच्या ताब्यांत द्यावें लागलें.

१६३७ सालीं पर्शियाच्या राजघराण्यांतल्या शहानवाझची कन्या दिलरासबानू बेगम हिच्याशीं त्याचा विवाह झाला. दिलरासबानूच्या शिवाय त्याला आणखी तीन स्त्रिया होत्या. सर्व स्त्रियांपासून त्याला एकूण दहा मुलें झालीं. दारा शुकोह हा औरंगजेबाचा थोरला भाऊ होय. पुढे कांही कारणावरून शहाजहानचें औरंगजेबाशीं बिनसलें व त्याने औरंगजेबाला दक्षिणच्या सुभेदारीवरून बदललें. इतकेंच नव्हे; तर त्याचा तनखाहि बंद केला. पुढे जहानआरा या औरंजेबाच्या बहिणीने शहाजहानची समजूत घातली व शहाजहानने त्याला पुनश्च अधिकारावर आणून गुजरातच्या सुभेदारीवर नेमलें.

१६४७ सालापर्यंत तो तिथे राहिला. त्याने गुजरातमधल्या लुटारू व बंडखोरांचा बंदोबस्त करून प्रांताची एकंदर व्यवस्था उत्तम लावली. त्यानंतर शहाजहानने त्याला बल्ख व बदक्शाँ या प्रांतांच्या सुभेदारीवर नेमलें. शहाजादा मुरादने १६४६ सालीं बल्ख जिंकून घेतलें होतें; पण मुराद परत येतांच तिकडे पुन्हा बंडाळी सुरू झाली. तिचाच बंदोबस्त करण्यासाठी शहाजहानने औरंगजेबाची ही नेमणूक केली होती. औरंगजेबाने २५,००० सैन्यानिशी बल्खवर हल्ला चढवून तो प्रांत काबीज केला. पुढे तिथून बदक्शाँकडे जात असतां त्याच्या सैन्याचा पराभव होऊं लागला. त्यामुळे त्याला बल्खकडे परत फिरावें लागलें. वाटेंत उझबेग जमातींनी त्याच्यावर हल्ले करून त्याचे फार हाल केले. शेवटीं बल्ख शहर व किल्ला तेथील पूर्वीचा राजा नजरमहंमद याच्या नातवास देऊन तो १६४७ सालीं काबूलकडे परतला. येतांना उझबेगांचे हल्ले व वादळें यांच्यामुळे त्याचें सुमारे १०,००० सैन्य गारद झालें. या स्वारींत मोगलांचा काडीचाहि फायदा न होतां ४ कोट रुपयांचा चुराडा मात्र झाला.

यानंतर शहाजहानने औरंगजेबास मुलतनाचा सुभेदार नेमलें (१६४८). तो या जागेवर १६५२ सालापर्यंत होता. एवढ्या अवधींत त्याने कंधारवर दोन स्वाऱ्या केल्या; पण त्या दोन्ही स्वाऱ्यांत त्याला अपयशच आलें. त्यामुळे शहाजहाजनची त्याच्यावर फार इतराजी झाली. त्यानंतर शहाजहानने त्याची पुनश्च दक्षिणच्या सुभेदारीवर नेमणूक केली.

नेमणूक झाल्यानंतर तो प्रथम बऱ्हाणपुरास आला. तिथे त्याने ९ महिने काढले. पुढे दौलताबादेस तो ४ वर्षें राहिला. या मुदतींत त्याने विजापूर व गोवळकोंडा यांच्यावर स्वाऱ्या केल्या. दौलताबादेहून ५ मैलांवर असलेल्या खडकी या गांवी त्यानें १६३८ मध्यें नवें शहर वसविलें, तेंच औरंगाबाद होय. औरंगाबाद येथेच त्याची दिलरासबानू ही बेगम मृत झाली. तिथे त्याने ताजमहालच्या नमुन्यावर तिची कबर बांधली. तीच कबर हल्ली 'बिबीका मकबरा' म्हणून प्रसिद्ध आहे. औरंगजेबाने देवगडचें राज्य व जव्हार १६३८ मध्यें जिंकून घेतलें. १६५७ सालीं अली अदिलशहाशीं भांडण उकरून काढून त्याच्यावर स्वारी केली आणि बिदर व कल्याणी येथील किल्ले जिंकून घेतले. पण शहाजहानने हुकूम केल्यावरून त्याने पुढे आदिलशहाशीं तहहि केला. याच वेळीं शिवाजी महा-

राजांनी आदिलशहाची बाजू घेऊन जुन्नरपासून औरंगाबाद-पर्यंतचा त्याचा मुलुख लुटला. अहमदनगरवरहि धाड घातली. तें पाहून औरंगजेबाने शिवाजी महाराजांवर नासीरखानास पाठविलें. पण विजापूरकरांशी तह झाल्यावर ही मोहीम आपोआप थांबली.

पुढे शहाजहान दिल्लीस आजारी पडला व त्याने सर्व सरदारांदेखत दारा शुकोह याला गादीचा वारस नेमलें व तो प्रकृतिस्वास्थ्यासाठी आग्र्यास मुक्काम करून राहिला. तो थोडचा दिवसांत बराहि झाला; पण बंगालमध्ये असणाऱ्या शुजाने स्वतःला बादशहा ही पदवी घेऊन दिल्लीवर चाल केली. मुरादनेहि आपण बादशहा बनल्याचें जाहीर केलें. शहाजहानने मुरादची तिथून वऱ्हाड प्रांतांत बदली केली; पण मुरादने तो हुकूम मानला नाही. पुढे औरंगजेबहि मुरादला सामील झाला. त्यानंतर त्यांच्या दारा शुकोहशीं दोन लढाया झाल्या. शेवटीं आपल्या बापाला म्हणजे शहाजहानला आग्र्याच्या किल्ल्यांत कैद करून औरंगजेबाने १६५८ सालीं दिल्लींच्या तख्तावर आरोहण केलें. या प्रसंगीं त्याने 'आलमगीर गाझी' अशी पदवी धारण केली. पुढे त्याने दारा शुकोहला पकडून त्याचा शिरच्छेद केला व त्याच्या मुलालाहि ठार मारलें.

औरंगजेब तख्तावर बसल्यानंतर त्याच्या मृत्यूपर्यंतच्या काळाचे सामान्यतः २५।२५ वर्षांचे दोन भाग पाडतात. पैकी त्याचा पहिला कालखंड उत्तरेंत गेला. अफगाण व राजपूत यांचीं बंडें या कालखंडांत मोडतात. दुसरा कालखंड दक्षिणेंत गेला. दक्षिणेंत गेल्यानंतर औरंजेबाला पुनश्च दिल्लीचें तोंड पाहतां आलें नाही.

मराठ्यांना पाणी पाजण्यासाठी म्हणून तो १६८२ सालीं पुनश्च दक्षिणेंत उतरला. त्याने मराठेशाहीवर प्रचंड सैन्यानिशी हल्ला चढविला, पण मराठ्यांनी त्याची दाणादाण उडविली. मराठे जिवावर उदार होऊन त्याच्याशीं लढले.

शिवाजी महाराजांचा पुत्र संभाजी याने इ. स. १६८० ते ८८ या काळांत मोगलांशीं चांगलीच टक्कर दिली. पुढे १६८९ सालीं शेख निजामाने संभाजीला संगमेश्वरीं पकडलें व वडू येथें त्याचा वध करण्यांत आला. त्यानंतर औरंगजेबाने रायगड जिंकला व संभाजीचा पुत्र शाहू याला कैद केलें, पण तरीहि मराठे दबले नाहीत. ते मोगली सैन्यावर जागोजाग हल्ले करीतच राहिले. मोगलांनी मराठ्यांचे किल्ले सर करावे आणि त्यांची पाठ वळतांच मराठ्यांनी पुनश्च ते जिंकून घ्यावे, असा प्रकार सुरू झाला. धनाजी आणि संताजी यांनी तर त्याला 'त्राहि भगवन्' करून सोडलें. औरंगजेबाने शाहूकडून मराठ्यांना पत्रें लिहून त्यांचा बुद्धिभेद करण्याचाहि प्रयत्न केला; पण त्यांतहि त्याला यश आलें नाही.

वर्षानुवर्षें चाललेल्या या युद्धाच्या धुमश्चक्रीमुळे अखेर औरंगजेब जर्जर झाला. तो १७०६ मध्यें अहमदनगरास परतला. मराठ्यांनी त्याचा पाठलाग केला आणि वाटेंत त्याच्यावर हल्ला करून त्याला लुटलें. तो अहमदनगर येथे आजारी पडून इ. स. १७०७ सालीं मृत्यु पावला. मरणाआधी त्याने मृत्युपत्र करून आपलें राज्य आपल्या तीघां मुलांत वांटून दिलें. दौलताबादेजवळ खुलदाबाद येथे त्याच्या शवाचें दफन करण्यांत आलें.

औरंगजेबाच्या एकंदर कारकीर्दीचें निरीक्षण करतांना पुढील कांही गोष्टी ठळकपणे नजरेंत भरतात. त्याची शासनव्यवस्था त्याच्याच ठिकाणीं केंद्रित होती. त्याने राज्याचे सारे अधिकार सम्राट् या नात्याने आपल्याच हातीं ठेवले होते. राज्यांतल्या बारीकसारीक तपशिलाच्या गोष्टीहि तो जातीने पाही. तो सगळे हुकूम स्वतः देत असे. त्याचे सर्व मंत्री आणि अधिकारी त्याच्या कठोर नियंत्रणांत असत. तो एकतंत्र शासनपद्धतीचा पुरस्कर्ता होता. तो म्हणे, की 'जर एकतंत्री शासन जारी केलें नाही, तर राज्यांतले सारे कायदे-कानू मोडले जातील.'

औरंगजेबाचा मृत्यु झाला, त्यावेळीं भारतांतले २० प्रांत त्याच्या साम्राज्यांत समाविष्ट होते. त्यांपकी १४ उत्तर भारतांत आणि ६ दक्षिण भारतांत होते. यद्यपि औरंगजेबाची शासनव्यवस्था एकतंत्री आणि कठोर होती, तरीहि तो पंचवीस वर्षें कायम दक्षिणेंत राहिल्यामुळे अखेरीस उत्तरेंत त्याची सत्ता ढिली पडली. त्याच्या अनुपस्थितीने तिकडच्या सरदारांचें आणि जमीनदारांचें फावलें.

औरंगजेबानें हिंदूवर 'जजिया' कर लादला होता. शिवाय तो हिंदूंकडून यात्राकरहि वसूल करी. आपल्या अमदानींत औरंगजेबानें सैन्य खूप वाढविलें. शहाजहानच्या कारकिर्दीत होई, त्यापेक्षा औरंगजेबाच्या काळांत सैन्यावर दुप्पट खर्च होऊं लागला. जरी औरंगजेबाची सैन्यावर करडी नजर होती, तरी त्याचें सैन्य अकबराच्या सैन्यापेक्षा निकृष्ट दर्जाचेंच राहिलें.

औरंगजेबाच्या व्यक्तिमत्त्वाच्या बाबतींत सांगायचें तर त्याचें जीवन हें एक आदर्श जीवन होतें. तो उद्योगी व संयमी असून त्याचें आचार-विचारांवर कठोर नियंत्रण होतें. त्याचें भोजन साधें असे आणि पोशाखहि साधा असे. चारांपेक्षा अधिक बायका करायच्या नाहीत, हा कुराणप्रणीत नियम त्याने पाळला होता. त्याला अन्य स्त्रियांचें कधीहि आकर्षण वाटलें नाही. त्याला दारूचेंच नव्हे, तर कसलेंहि व्यसन नव्हतें. तो बालपणा-

पासूनच विद्याप्रेमी होता. त्याला ग्रंथांचेंहि प्रेम होतें. तो रोज ५ वेळां नमाज पढे, रमजानचे उपवास करी आणि आपल्या धर्माचें श्रद्धेने पालन करी. इस्लामशिवाय तो इतर सारे धर्म झूट मानी.

सैनिक आणि सेनापति या स्वरूपांत औरंगजेब त्याच्या वंशांतल्या अनेक सम्राटांपेक्षा श्रेष्ठ होता. त्याच्या ठिकाणीं शरीरबल आणि सहनशीलता तर होतीच; शिवाय प्रसंगीं जीव धोक्यांत घालण्याचीहि त्याची तयारी होती. तो एक कुशल आणि प्रत्युत्पन्नमति असा सेनानी होता. शत्रूची चूकभूल आणि दुर्बलता यांचा तो सदैव लाभ उठवी. कारस्थानें आणि राजनैतिक चलाखी करून तो शत्रूवर मात करी. त्याच्या ठिकाणीं असे अनेक चांगले गुण होते; पण तरीहि त्याचें जीवन हें एक विफल जीवन होतें, असेंच मानावें लागेल.

त्याच्या या विफलतेचीं अनेक कारणें आहेत. त्याने राज्ययंत्र केवळ आपल्याच हातीं केंद्रित करण्याचा प्रयत्न केला आणि दुसऱ्या कोणालाहि विश्वासांत घेतलें नाही. तो बुद्धिमान् होता हें खरें; पण देशांतल्या समस्या यथातथ्य समजून घेऊन प्रसंगानुरूप त्यांची सोडवणूक करण्याइतकी सूक्ष्मता त्याच्या बुद्धींत नव्हती. त्याच्या राजनीतीवर धार्मिक पक्षपाताचा रंग चढलेला असल्यामुळे त्याचें प्रत्येक पाऊल सदोषच पडे. त्यानें आपल्या मुलांना योग्य शिक्षण देऊन त्यांना राज्यकारभाराला लायक बनविलें नाही. आपल्या मुलांना तो दूरदूरच ठेवीत होता. आपण आपल्या बापाची जी वासलात लावली, तशीच आपलीं मुलें आपलीहि लावतील अशी त्याला सदैव धास्ती वाटत होती. अकबराने राजपुतांना वश करून घेऊन त्यांच्या साहाय्याने आपलें साम्राज्य वाढविलें होतें. औरंगजेबानें नेमकें त्याच्या उलट केलें. सिसोदिया, राठौड आणि दुसरे राजपूत राजे यांना त्याने आपले कट्टर शत्रू बनविलें. दक्षिणेंतल्या मराठ्यांच्या राज्याचा नाश करण्याची आणि दक्षिणेंतल्याच शियापंथी मुसलमानी शाह्यांचा उच्छेद करण्याची त्याने जी महत्त्वाकांक्षा धरली, ती तर त्याची मोठीच चूक होती. त्याला वाटे, की मुत्सद्देगिरी आणि सैनिकसंघटना यांच्या जोरावर साम्राज्य चिरंतन चालेल. म्हणून त्याने साम्राज्याच्या आर्थिक उन्नतीकडेहि लक्ष दिलें नाही आणि कोणत्याहि कलेला प्रोत्साहन दिलें नाही. त्याच्या ५० वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत भारतीय सभ्यतेचें उत्थान न होतां पतनच झालें. तो देशांत शांति आणि सुरक्षा निर्माण करूं शकला नाही. मोगल साम्राज्याच्या पुढील ऱ्हासाला औरंगजेबाचीं चुकीचीं धोरणें कारणीभूत झालीं असें म्हणावें लागेल. [म. ज्ञा. को.; मु. का. भा.]

औरभ्र (१) ही एक जमात. हे लोक शेळ्या व मेंढ्या पाळण्याचा धंदा करतात; तसेंच लोकरीच्या घोंगड्याहि तयार करतात. **पाहा**— धनगर. [हि. ध.]

(२) एक आयुर्वेदाचार्य. हा उरभ्राचा पुत्र असून धन्वंतरीच्या अनेक शिष्यांतला एक होता. याचें एक शल्यतंत्र होतें. अष्टांगसंग्रहाच्या इंदुनामक एका पुरातन टीकेंत उरभ्राच्या नांवाने दहा श्लोक उद्धृत केले आहेत. उरभ्र आणि औरभ्र यांचा पिता-पुत्र संबंध होता कीं काय, याविषयीं श्री. भगवद्दत्त संदेह व्यक्त करतात. औरभ्र हा सुश्रुताचा समकालीन होता, असें आयुर्वेदीय ग्रंथांवरून कळून येतें. [आ. इ.]

औरस (१) द्वादशविध पुत्रांमध्ये श्रेष्ठ पुत्र. 'सवर्णायां संस्कृतायां स्वयमुत्पादितमौरसं विद्यात्'=संस्कार केलेल्या सवर्ण स्त्रीच्या ठिकाणीं स्वतः उत्पन्न केलेला पुत्र तो औरस होय, असें बौधायन म्हणतो. मनूनेहि अशाच प्रकारची व्याख्या केलेली आहे (९.१६६). धर्मपत्नीपासून उत्पन्न झालेल्या पुत्राला औरस म्हणावें, असें याज्ञवल्क्य सांगतो.

(२) गंधार प्रदेशानजीकची एक जमात. यांचा उल्लेख दरद, ऊर्ज, गुंड, इ. गणांबरोबर केलेला आहे. [पु. इं.]

और्णवाभ कौंडिन्याचा शिष्य (बृहदा. ४.५.२६). नैरुक्त नामक व्याकरणकारांच्या मताला अनुसरणारा एक आचार्य. याने दोन ठिकाणीं ऐतिहासिकांचेंहि मत मानलें आहे (निरुक्त ६.१२; १२ १). [प्रा. च. को.]

और्ध्वदेहिक मनुष्य मृत झाल्यावर प्रेताच्या दाहसंस्कारापासून तों सपिंडीकरणाच्या पूर्वीं प्रेताला उद्देशून जीं पिंडदानादि कृत्यें केलीं जातात, त्यांना और्ध्वदेहिक म्हणतात. **पाहा** – अंत्यक्रिया; अंत्येष्टि.

और्व (१) श्रीहरीने और्व नामक अग्नीचें रूप धारण करून समुद्रांतलें जल प्राशन केलें. ब्रह्याने त्याला महासागरांत कायमचें स्थापलें. यालाच संवत्सर व वडवामुख हीं नांवें आहेत (मत्स्य पु. १२१. ७७). याची और्वी नामक माया प्रसिद्ध आहे (मत्स्य पु. १७४.१८).

(२) एक ऋषि. आप्नुवान् व ऋची यांचा पुत्र. हा मंत्रकर्ता होता. याने सगराला विष्णुपूजेची पद्धति सांगितली. यानेच पित्याच्या मृत्यूनंतर जन्मलेल्या सगराचें आपल्या आश्रमांत संगोपन केलें. हा स्वारोचिष मन्वंतरांला ऋषि होता. भार्गवगोत्राच्या पांच प्रवरांपैकी और्व हा एक प्रवर आहे.

औलिया 'वली' चें बहुवचन. देवाच्या आवडत्या व्यक्ती. यांना कशाचीहि भीति नसते व दुःख कधीहि शिवत नाही, असें कुराणांत म्हटलें आहे (१०. ६३).

औशनस सरस्वती नदीवरील प्रसिद्ध तीर्थ. यालाच कपालमोचन असेंहि म्हणतात. इथे उशना ऋषीने तप करून सिद्धि मिळविली. इथे कार्तिकेय व ब्रह्मादि देव उशना ऋषीचें प्रिय करण्यासाठी वास्तव्य करतात. इथे स्नान केल्याने सर्व पापें नष्ट होतात (म. भा. वन. ८३.१३५–३७).

औशनस धर्मशास्त्र उशनसाचें हें धर्मशास्त्र ५१ श्लोकांचें असून त्यांत सूत, मगध, चंडाल इ. मिश्रवर्णीय जाती आणि त्यांचे धंदे दिलेले आहेत. [हि. ध.]

औशनस स्मृति या स्मृतींत ९ अध्याय असून सुमारे ६०० श्लोक आहेत. त्यांत उपनयन, वेदाध्ययन, अनध्याय, श्राद्ध, वृत्तिविधान, अनुलोम-प्रतिलोम जाती इ. विषयांचा विचार केलेला आहे. [हिंदुत्व; हि. ध.]

औषध रोगनाशक द्रव्य. वाग्भटाने आपल्या ग्रंथाच्या सूत्रस्थानांत औषधाविषयीं पुढील श्लोक दिलेले आहेत–

शोधनं शमनं चेति समासादौषधं द्विधा ।
शरीरजानां दोषाणां क्रमेण परमौषधम् ।।
बस्तिर्विरेको वमनं तथा तैलं घृतं मधु ।
धीर्धैर्यात्मादिविज्ञानं मनोदोषौषधं परम् ।।

अर्थ–शोधन (शरीरांतील मलद्रव्यें काढून टाकणें) व शमन असे औषधाचे दोन प्रकार आहेत. (दोन्ही मिळून) क्रमाने शरीरजन्य दोषांचे परम औषध बनतात. बस्ति, विरेचन, वमन त्याचप्रमाणे तेल, तूप, मध हीं शरीरदोषावरचीं; तसेच बुद्धि, धैर्य, आत्मादि विज्ञान हीं मानसिक दोषांवरचीं औषधें होत.

औषधासाठी मुहूर्त– मुहूर्तचिंतामणींत औषध तयार करणें, तें घेणें व सूचीकर्म (सुई वगैरेंनी टोचणें) यांसाठी पुढीलप्रमाणे मुहूर्त सांगितले आहेत––

भैषज्यं सल्लघुमृदुचरे मूलभे द्व्यंगलग्ने
शुक्रेंद्विज्ये विदि च दिवसे चापि तेषां रवेश्च ।
शुद्धेरिःफद्युनमृतिगृहे सत्तिथौनोजनर्थे–
सूचीकर्माप्यदितिवसुभे तक्षमैत्राश्विपुष्ये ।।

अर्थ–लघु नक्षत्रें (हस्त, अश्विनी, पुष्य, अभिजित्), मृदु नक्षत्रें (मृगशीर्ष, रेवती, चित्रा, अनुराधा), चरनक्षत्रें (स्वाती, पुनर्वसु, श्रवण, धनिष्ठा, शततारका) व मूळ या चौदा नक्षत्रांवर तसेंच द्विस्वभाव लग्न व त्यांत शुक्र, चंद्र, गुरु व बुध हे ग्रह असतां आणि याच चार ग्रहांच्या वारीं व रविवारीं नवीन औषध तयार करणें किंवा तें घेण्यास आरंभ करणें शुभ होय. या मुहूर्ताच्या वेळीं लग्नापासून सात, आठ व बारा हीं स्थानें शुद्ध अर्थात् ग्रहरहित असावीं. अमावास्या व रिक्ता या तिथी नसाव्या. जन्मनक्षत्रीं औषध घेण्यास आरंभ करूं नये. पुनर्वसु, धनिष्ठा, चित्रा, अनुराधा, अश्विनी व पुष्य हीं नक्षत्रें सूचिकर्मास शुभ होत.

औषधात्मिका एक शक्तिदेवता. [पु. इं.]

औग्रकर्णक ल्हादिनीच्या तीरावरचें प्राचीन राज्य. [पु. इं.]

औक्षण उक्ष् = शिंपडणें, या धातूवरून हा शब्द बनला आहे. सायणाने औक्ष म्हणजे प्रलेपन द्रव्य असा त्याचा अर्थ दिला आहे. महाराष्ट्रांत आरती, नीरांजन किंवा लामणदिवा ओवाळणें, यांसाठी हा शब्द वापरला जातो. मंगलप्रसंगीं ज्याचें मंगलकार्य व्हायचें असेल, त्याच्या तोंडाभोवतीं सुवासिनी स्त्रिया ताम्हनांत नीरांजन ठेवून आरती ओवाळतात. देवमूर्ती व राजे यांचेंहि उचित प्रसंगीं औक्षण करतात. हा एक आयुष्यवर्धक विधि आहे.